॥ श्रीरामसमर्थ ॥

सार्थ श्रीतुलसी रामायण

श्रीरामचरितमानस



: संपादक :

श्री. नारायण भास्कर जोशी

एम्. ए., एल्एल्. बी.

किंमत चाळीस रुपये

१

: प्रकाशक :

किसन शंकर जोशी

सारथी प्रकाशन

द्वारा १००५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

*


: प्रथमावृत्ती :

श्रीदत्तजयंती, मार्गशीर्ष शुद्ध १५, शके १८९२

१२ डिसेंबर, १९७०

श्रीराम-समर्थ

— अर्पण पत्रिका —



श्री. प. प. प्रज्ञानानंद सरस्वती

ज्यांच्या वात्सल्यपूर्ण कृपेच्या सान्निध्यात श्रीरामचरितमानसाचे श्रवण, मनन, पारायणे, प्रवचने, चर्चा इ. झाल्याने, तसेच गूढार्थ-चंद्रिका नावाची ज्यांची मानस पीयूषा एवढी तुलसीरामायणावरील विस्तृत टीका जरुर तेथे परिशीलनास मिळाल्यामुळे प्रस्तुतचा 'मानसा' चा मराठी अनुवाद करण्याचे धाडस झाले व तो शेवटास गेला, त्याचप्रमाणे ज्यांच्या कृपाशीर्वादानेच तो आज महाराष्ट्र जनतेच्या सेवेस सादर होत आहे त्या ब्रह्मीभूत श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीसद्गुरु प्रज्ञानानन्द सरस्वती यतीश्वरांच्या चरणकमली अत्यंत कृतज्ञतापूर्वक व भावनेने भारावलेल्या अंतःकरणाने हे अनुवाद सुमन समर्पण ! !

नम्र बालक,

ना. भा. जोशी

प्रकाशकाचे निवेदन

गोस्वामी श्रीतुलसीदासजींचा श्रीरामचरितमानस हा सर्वश्रेष्ठ ग्रंथ उत्तर भारतात पाचवा वेद समजतात. मानवाच्या ऐहिक व पारमार्थिक जीवनाला उत्तम आधार ठरलेला हा हिंदी ग्रंथराज मराठी भाषाप्रेमी, सामान्य आणि धर्मशील मराठी जनतेला सादर करण्याचे भाग्य आज आम्हाला लाभत आहे.

रामायण आणि महाभारत हे भारताच्या सांस्कृतिक संपत्तीतील दोन चिरंतन महत्त्वाचे ग्रंथ. जीवनाचे, भौतिक आचारविचाराचे मार्ग आज बदलले आहेत तरी या दोन ग्रंथांची भारतीय जनमानसावरील पकड आहे तशीच कायम आहे किंबहुना ती उत्तरोत्तर वाढत आहे. सश्रद्ध व केवळ वाङ्मयप्रेमी लोकांनाही यांची अवीट गोडी पुनः पुन्हा मोह घालते. निरनिराळ्या कालखंडात साधुसंतांनी आणि कवींनी 'स्वान्तःसुखाय' आणि परजनहिताय तसेच बहुजनसुखाय यातील उत्कृष्ट आणि उत्कट कथा आपल्या भाषेत लिहून भारतीय जनतेवर खूप उपकार केले आहेत.

रघुकुलतिलक राजा रामचंद्राचे अनन्यसाधारण असे भक्त श्रीतुलसीदासजी यांच्या रामचरितमानस काव्याची मोहिनी किती आहे हे सांगायला काही फार मोठी मोहीम काढायला नको. उत्तर भारतात साक्षरच काय निरक्षरसुद्धा हे अप्रतिम रामकाव्य नित्य गातात. त्याना ते मुखोद्‌गत असते. श्रीतुलसीरामायणाचा पाठ हा श्रीज्ञानेश्वरीच्या पाठासारखा एक नित्यक्रमातला भाग झालेला आहे; लाखो श्रीरामभक्तांना तुलसीदासजींच्या चौपाया, दोहे आणि छंद म्हणण्याचा छंद जडून त्याना आनंद देऊन भक्तिप्रेम गोडी 'जिव्हाग्री' बैसवीत आहे. शेकडो वर्षे ही 'श्रीराम भक्तिप्रेम-काव्यकालिंदी' अखंड दुथडी भरून वाहात आहे. तुलसीरामायण—श्रीरामचरितमानस—हा ग्रंथ उत्तर भारतीयास तर प्रातःस्मरणीय—पठनीय झालेला आहे.

हा ग्रंथ इतका श्रेष्ठ असूनही महाराष्ट्रास तसा अपरिचितच राहिला. नागपूरचे श्री. जामदार, (शब्दानुवाद) मराठवाड्यातील श्री. महाजन यांचा ओवीबद्ध अनुवाद, कोल्हापूरचे डॉ. श्रीखंडे यांचा सुश्लोक मानस (अनिर्बंध) अनुवाद, ब्र. भू. श्रीमत् प. प. प्रज्ञानानन्द सरस्वतींचा (समश्लोकी समवृत्त) अनुवाद इ. प्रकाशने मानसाचा महाराष्ट्रास परिचय करून देण्याच्या दृष्टीने थोडीफार यशस्वी झाली तरी सामान्य जनतेपर्यंत प्रचार होण्यासारखा अनुवाद झाला नाही. आज ते सर्व अनुवादही दुर्मिळ झाले आहेत. ह्यामुळेच सार्थ तुलसीरामायण—तेही मराठीत—प्रसिद्ध करावयाचा विचार जोराने पुढे आला व मराठी अनुवाद प्रसिद्ध करण्याचे, सारथी प्रकाशन संस्थेने गेल्या रामनवमीस नाशिकास जाहीर केले.

आमचे स्नेही श्री. अनंतराव वैद्य (यशवंत प्रकाशनाचे मालक) ह्यांनी आम्हास श्री. ना. भा. जोशी, एम्. ए., एल्एल्. बी. (मु. पो. कुण्डल, जि. सांगली) यांच्याकडील अपेक्षित अनुवादाची मुद्रणप्रत मिळवून दिली. श्रीरामकृपेनेच श्री. ना. भा. जोशी यांनी केलेला हा तुलसीरामायणाचा सरळ व सोपा अनुवाद आम्हास व आमच्या स्नेह्यांना फारच समाधानकारक वाटल्याने श्री. जोशी यांनीही अत्यंत आपुलकीने तो अनुवाद आम्हास प्रकाशनासाठी दिला. त्यांचे आभार किती मानावेत !

चांगल्या कामास एका द्वाराने मोठी विघ्ने येतात व दुसऱ्या द्वाराने त्यांचे निरसन प्रभूकडून होते हा अनुभव अनुवादाप्रमाणेच कागद, टाईप, साधी व रंगीत चित्रे इ. जरूर ती सर्व साधने हाती येण्याच्या बाबतीत पदोपदी आला.

श्रीतुलसीरामायणाच्या (गोरखपूरच्या) हिंदी प्रती अत्यंत स्वस्त किमतीस बाजारात मिळत असल्याने त्या रामायणाचा फक्त 'संपूर्ण मराठी' अनुवादच तेवढा छापावा, म्हणजे तो ग्रंथ कमी किमतीस देणे शक्य होईल, असा सल्ला अनेकां-कडून आम्हास मिळाला. तथापि 'सार्थ श्रीतुलसीरामायण' प्रकाशित करण्याचे आम्ही एकवेळ जाहीर केले होते, अनेकांकडून तशा रामायणाची मागणीही येत आहे व अशा प्रकाशनाचे काही आगळे महत्त्व आहे अशी तज्ज्ञांची खात्री असल्याने आम्ही 'सार्थ श्रीतुलसीरामायण' व 'संपूर्ण मराठी तुलसीरामायण' असे दोन्ही ग्रंथ एकदमच प्रकाशित करण्याचे ठरवले.

ही दोन्ही प्रकाशने अधिकांत अधिक सर्वांगसुंदर व सर्वतोपरी परिपूर्ण व्हावीत म्हणून; आतापर्यंत प्रसिद्ध झालेल्या

कोणत्याच रामायणात न सापडणारी वैशिष्ट्ये या प्रकाशनात अंतर्भूत केलेली आपणास पहावयास मिळतील. उदा. पद्मपुराणातील रामचरित्रांतर्गत महत्त्वाच्या घटनांचे तिथिपत्रक, अत्यंत उपयुक्त अशा जागजागी टीपा इ. मूळ काव्याचा अर्थ अधिक चांगल्या तऱ्हेने समजावा म्हणून वाचकांच्या सोयीसाठी ग्रंथाचे शेवटी कठीण शब्दांचे अर्थ दिलेले असून आवश्यक तितके शुद्धिपत्र दिले आहे.

या शिवाय, या रामायणाच्या इतर निरनिराळ्या प्रकाशनात उपलब्ध असलेल्या अनेक विषयांचा समावेश आम्ही आमच्या प्रकाशनात केलेला आहेः (१) श्रीतुलसीचरित्र, (२) प्रश्नशलाका, (३) पारायण विधी, (४) सविस्तर विषयानुक्रमणिका, (५) आरत्या इ.

गोस्वामी तुलसीदासजींच्या रामचरितमानसाच्या चतुःशताब्दी महोत्सवी वर्षात हे सार्थ श्रीतुलसीरामायण प्रसिद्ध होत आहे हा आमच्या प्रकाशनाचा बलवत्तर, सुढाळ सुदैवयोग आहे.

आज दरमहा महागाई वाढत असताना आणि परिस्थितीने पकडीत धरल्यावरही आम्ही पूर्वी जाहीर केलेली या ग्रंथाची किंमत कायम ठेवली आहे. व्यवहारातला हा " अव्यवहारीपणा ' आमच्या जमाखर्चात खर्चाचेच पारडे जड करणारा असला तरी जनतेला दिलेल्या शब्दाप्रमाणे वागण्याचे, [illegible] प्रेम आणि जनतेचा विश्वास ही सदैव फार मोठी ' जमा ' आमच्याकडे आता होत आहे हे, आमच्याकडे या ग्रंथाच्या निमित्ताने झालेल्या पत्रव्यवहाराने सिद्ध करून दिलेले आहे.

या ग्रंथाच्या प्रकाशनाच्या कामी अनेकांचे वेळेवर व अमोल असे सहाय्य झाले. त्या सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे आमचे पवित्र कर्तव्य आहे.

पुण्यातील तरुण कीर्तनकार आणि हिन्दी-मराठी साहित्याचा अध्ययनशील व्यासंग असलेले आमचे निःसीम स्नेही श्री. दत्तराज देशपांडे (साहित्य-विशारद) यांचा सारथी प्रकाशनावर लोभ आहे. हस्तलिखिते, मुद्रिते, संदर्भ इत्यादि अनेकविध प्रकारांत त्यांचे सहकार्य पूर्वीप्रमाणेच याही ग्रंथाबाबत आम्हाला हक्काने मिळाले आहे.

अगदी थोड्या अवधीत उत्कट प्रसंगाची चित्रे उत्तम चित्रकार किती समर्थपणे काढू शकतो याचे उदाहरण म्हणजे या ग्रंथातील श्री. एन्. जी. जोशींची चित्रे होत. खरोखरीच चित्रकार जोशी यांचा रंगकुंचला आमच्या मदतीला आला आणि त्याने ' रंग जमविला. '

ह्या ग्रंथ-प्रकाशनाच्या वाटचालीत आमचे व्यावसायिक हितचिंतक श्री. राजाभाऊ जोशी, पुणे यांचे आम्हास मूलगामी व उपकारक मार्गदर्शन झालेले आहे.

भारतीय संस्कृतीचा ग्रंथरूपी खजिना सतत जतन करण्याचे जणू काही आव्हानच स्वीकारलेल्या गीता प्रेसचे (गोरखपूर) संस्कृत, हिन्दी ग्रंथ प्रमाण मानण्याचा प्रघात आहे. त्यांच्याही इतर काही ग्रंथांची निरनिराळ्या दृष्टीने आमच्या या ग्रंथास मूर्तस्वरूप आणण्यास उपयुक्तता लाभली.

संतवाङ्मय किंवा अजोड महान ग्रंथ छपाई करण्याची परंपरा असलेले छापखाने महाराष्ट्रात विरळाच. त्यात परंपरेने वरचा क्रमांक इंदिरा प्रिंटिंग प्रेसचाच लागेल. अशा दीर्घायु संस्थेतील चालक व कामगार मंडळींनी उत्साहाने व तितक्याच प्रेमाने अविश्रांत श्रम घेऊन सुंदर छपाई केली. त्यांचा मी ऋणी आहे.

ह्या महान् ग्रंथराजाचे कार्य पार पाडताना एकट्या दुकट्या जीवाच्या हातून ते कसे पार पडत असेल अशीही शंका राहून राहून मनात येण्यासारखी आहे. परंतु शक्तीशिवाय जोम येत नाही म्हणूनच आमचे बंधूद्वय श्री. बबनराव जोशी व श्री. रामभाऊ जोशी यांनी प्रथमपासून अखेरपर्यंत या प्रकाशनकार्यात सर्वतोपरी मोलाची मदत केली व सतत प्रोत्साहन दिले.

आईवडिलांच्या आशीर्वादाच्या बळावर आम्ही हे अवघड काम हाती घेतले. आणि त्या विश्वचालकाने आम्हास हाती धरून रामोपासनेस व सामान्य महाराष्ट्रीय जनतेच्या नैतिक प्रगतीस अत्यंत उपयुक्त अशा श्रीतुलसीरामायणाचे ' सार्थ ' व ' संपूर्ण मराठी ' असे दुहेरी प्रकाशन करविले. श्रीरामचरणी उत्कट भावनेने मस्तक नमवून महाराष्ट्र-जनता-जनार्दनाचे सेवेस हा ग्रंथ सादर करीत आहोत.

' सारथी प्रकाशन '–पुणे
मार्गशीर्ष शु।। १५, शके १८९२

सर्वस्वी नम्र,
प्रकाशक

अनुवादकाची प्रस्तावना

" सार्थ श्रीतुलसी रामायण ' व ' संपूर्ण मराठी तुलसी रामायण ' अशा द्विविध स्वरूपात श्रीरामचरितमानस हा अत्यंत श्रेष्ठ ग्रंथ पुणे येथील ' सारथी प्रकाशन ' या संस्थेतर्फे प्रकाशित होत आहे ही एक दैवी प्रेरणेचीच घटना होय.

अखिल जगताच्या दृष्टीने सामान्यतः व भारतीय स्वराज्यानंतर, विशेषतः विसाव्या शतकाचा उत्तरार्ध प्रत्यही अधिकाधिक विपन्नावस्थेचा होत आहे, भारतात तर आज धार्मिक, सामाजिक आर्थिक व राजकीय दुःस्थितीने प्रज्ञाहत झाल्यामुळे अधोगतीचे, असमाधानाचे जवळ जवळ टोकच गाठले आहे !

अशा स्थितीत ज्या ग्रंथाला महाराष्ट्रात कोणी फारसे जाणत नाही, अशा ग्रंथासाठी हजारों रुपयांचे भांडवल गुंतवून तो प्रकाशित करण्याचे धाडस करण्यास, ईशप्रेरणा सोडून अन्य कोणते सुसंबद्ध कारण असू शकेल ?

ईशप्रेरणेस मात्र सबळ कारणे आहेत. रामचरितमानस म्हणजे रामोपासनेचे साधन आणि सामाजिक जीवन, त्याची नैतिक पातळी उंचावून सुधारण्यास रामोपासना घरोघर होणे हाच एकमेव उपाय भारतीयांनी शतकानुशतके अवलंबिला आहे. अशा रामोपासनेसाठी तुलसीरामायणासारखा सर्वश्रेष्ठ ग्रंथ अन्य नसल्याने आज त्याच्यासाठी ईशप्रेरणा होत आहे. श्रीशिवबांच्या स्वराज्य स्थापनेस जरूर ते अखिल भारतीय अधिष्ठान, राष्ट्रगुरू श्रीसमर्थांनी आसेतुहिमाचल रामोपासना दृढ करून प्राप्त करून दिले हा ताजा इतिहास आहे.

भारतातील एकाच प्रांताला ' महाराष्ट्र ' हे नाव आहे ' महाराष्ट्रधर्म वाढवावा ' असे जागतिक कल्याणाच्या भूमिकेवरून समर्थ सांगतात. श्रीशिव छत्रपतींनी हिंदुपद पातशाही स्थापून त्या महाराष्ट्र-धर्मांचे उज्ज्वल स्वरूप अखिल जगतापुढे ठेवून आपल्या सद्गुरूंच्याकडून धन्य धन्य म्हणवून घेतले. व असा 'राजा' हे ' देणे ईश्वराचे ' असे उद्गार त्यांच्या मुखातून काढले. यावरून महाराष्ट्राच्या शक्ति-बुद्धीत काही विशेष प्रकारचे जागतिक कल्याणाचे चैतन्य आहे असे इतिहास दर्शवितो. फक्त योग्य मार्गदर्शन पाहिजे. त्यासाठी [illegible] साधन होणार काय ?

सामाजिक घडी बसवून अपेक्षित उन्नती साधण्यास तुलसीरामायण हे एक निश्चित साधन कसे आहे हे पुढे उद्धृत केलेल्या तत्संबंधीच्या थोरांच्या बोलावरून ध्यानी येईल.

' कल्याण 'चे माननीय संपादक हनुमानप्रसाद पोतदार म्हणतात—" हिंदी साहित्यातच नव्हे तर जागतिक साहित्यात मानसाचे स्थान सर्वस्वी आगळे आहे. याच्या जोडीला इतका सर्वांगसुन्दर, उत्तम काव्यलक्षणांनी युक्त, साहित्यातील सर्व रसांचा आस्वाद देणारा, काव्यकलेचा उत्कृष्ट आदर्श, तसेच गृहस्थाश्रम, राजधर्म, कौटुंबिक जीवन, पतिव्रताधर्म, बंधुभाव, इत्यादींचा अतुल्य असा आदर्श दाखवून त्याच्या बरोबरच सर्वोच्च भक्ती, ज्ञान, त्याग, वैराग्य यांची जाणीव देऊन सामाजिक जीवनातील अत्यंत श्रेष्ठ अशा सदाचाराची बैठक दाखविणारा, आबाल-वृद्ध स्त्रीपुरुषांस उपयुक्त, जाति-धर्म-देश इत्यादींच्या [illegible] जाऊन मानवधर्मांचे उज्ज्वल स्वरूप दाखवणारा, त्याचप्रमाणे सगुण साकार भगवंताच्या आदर्श मानवी लीला, गुण, प्रभाव, रहस्य व प्रेम यांचे गहन तत्त्व अत्यंत सरळ, रोचक व ओजस्वी शब्दांत प्रगट करणारा अन्य ग्रंथ हिंदी भाषेतच नव्हे तर कदाचित् अखिल जगतातही मिळणार नाही. "

श्रीरामचरितमानसाचे भाषांतर झाले नाही अशी जगातील सुशिक्षितांची भाषा नाही, इतकेच नव्हे तर या ग्रंथाची लक्षावधी संस्करणे हिंदीत व अन्य भाषांत झाली व होत आहेत हे त्याच्या श्रेष्ठत्वाचे जगजाहीर गमकच होय.

[illegible] आपल्या पंचप्राणांची कुरवंडी करणारे ब्र. भू. श्रीप्रज्ञानानंदस्वामी महाराज मोठ्या कळकळीने मानसाची महती गातात. "रामचरितमानस हे रामचंद्र प्रभूचे प्रत्यक्ष निवासस्थान आहे. मंत्रमय दिव्य संगीत आहे. त्यात निमग्न झाल्याने बगळ्याचे हंस व कावळ्याचे कोकीळ होतात. कलियुगातील नाना आपत्तींनी गांजलेल्या, विविध तापांनी होरपळून निघालेल्या चित्तभ्रमराला भगवत्पदजन्य भक्तिमकरंदास्वादन करून स्थिर होऊन बसण्याला सुगंधयुक्त अशी ती तुलसीमंजिरी आहे. या मंजिरीत जो कोणी कीट होऊन बसला त्याला या मंजिरीच्या संगतीने भगवानसुद्धा आपल्या शिरावर धारण करण्यास तयार असतात. ' मानस ' ही भगवत्कथा

असून ते एक दिव्य अनुपम काव्य आहे. आदर्शनीतिशिक्षक असून सहज उपदेश देणारे आहे. श्रीरामचंद्राच्या चरणाजवळ न कळत ओढून नेणारी ती रज्जू आहे. प्रपंच वा परमार्थात किंकर्तव्यमूढ बनलेल्यास स्वकर्तव्याची श्रेष्ठ जाणीव देणारा तो सन्मित्र आहे. शब्दपंडितांच्या नेत्रांत कर्मोपासनेचे मृदू नेत्रांजन घालून त्यांना ते शुद्धीवर आणते. अनाचारी व कर्मठांना मोहनिद्रेतून जागे करणारा तो दिव्य दुंदुभिनिनाद आहे. ज्ञानाविषयी बेपर्वा असलेल्या भाविकांना धोक्याची सूचना देणारा तो लाल बावटा आहे. विषयपंकात रुतलेल्यांच्या हाती तो वैराग्याची काठी देऊन त्याना तो बाहेर काढतो. बद्धाला मुमुक्षू, मुमुक्षूला साधक, साधकाला सिद्ध व सिद्धास पंचम पुरुषार्थप्रवण करणारा हा ग्रंथ आहे. जीवाला निर्भय व गतशोक करून परमसुखात मग्न झाल्याने सदा प्रसन्न ठेवणारे असे ते दिव्य सुधारसयुक्त चूर्ण आहे. मर्त्य लोकातील मर्त्यांना खरे खरे अमर करणारी ती मृत संजीवनी आहे."

मानसाबद्दल मराठीत स्वानुभव लिहिण्याच्या दृष्टीने श्रींचा अधिकार अत्यंत मोठा होता. (अल्पपरिचय पाहा.) आज ते हयात असते तर प्रस्तावना यापेक्षा चांगल्या रीतीने त्यांच्याच लेखणीतून प्रसिद्ध झाली असती. तथापि तसा योग नसल्याने [illegible] माझ्यापेक्षा त्यांचे स्वानुभवाचे शब्द येथे उद्धृत करणेच इष्ट. याशिवाय, सुन्दर काव्य, मंत्रमयत्व, निर्दोष चरित्रे, भाषाशैली इ. बाबतीतही मानसाची महती किती श्रेष्ठ आहे ते समजून घेण्यासाठी जिज्ञासूंनी मूळ प्रस्तावना व गू. चं. टीकेचा प्रस्तावना खंड जरूर पहावा. (गरजूंनी अनुवादकाशी पत्रव्यवहार करावा.)

" **क्षणे क्षणे यन्नवतामुपैति तदेवरूपं रमणीयतायाः** " हा रमणीयतेचा निकष मानसास उत्तम प्रकारे लागू होत असल्याने ती त्याची रमणीयता चढत्या वाढत्या गोडीने अखिल भारताप्रमाणे जगातही कशी प्रत्ययास येत आहे, याचे प्रत्यंतर म्हणून काही आधुनिक चिकित्सक विद्वानांचे अत्यंत त्रोटक अभिप्राय खाली देत आहे.

" मानसाचे योगे अनुपम सुख शांति-प्रसार प्रत्येक घरी झाला पाहिजे."—**पं. मदन मोहन मालवीय.**

" मनुष्यास श्रद्धा कशी मिळेल याचे उत्तर श्रीरामचरितमानसात आहे. "—**म. गांधी.**

" तुलसीरामायणाने दिव्य प्रेरणा प्राप्त होते. "—**श्यामाप्रसाद मुकर्जी.**

" तुलसीरामायणाने धर्म व अध्यात्मविद्येचा प्रसार होतो. अध्यात्मविद्येच्या उच्चातिउच्च सिद्धान्तांना तुलसीदासांनी सुंदर, सुललित, सहज, सरळ भाषेत गावोगाव नव्हे घरोघर पसरून दिले आहेत. "—**बाबू राजेंद्रप्रसाद.**

" मानसात वीरत्व व विनयपूर्ण भावाचा प्रवाह आहे. "—**रे. एड्विन ग्रीव्हज.**

" श्रमपरिहार करण्याची तुलसीवचनशक्ती अनुभवास आली. थोडया शब्दांत अधिक भाव तुलसीदास कसे प्रगट करतात हे पाहून शरीर पुलकित होते. तुलसीदास संत या नात्याने भारताचे हृदयसम्राट आहेतच पण ते साहित्य सम्राटही आहेत. सदाचाराचा प्रसार भारतात कोणी केला याची गणना होईल तेव्हा तुलसीदासाचे नाव प्रथम येईल."—**श्री. काका कालेलकर.**

" मधुर-संगीत-लहरी."—**न. चिं. केळकर**

" तुलसीरामायण आमचे संजीवन-अमृत आहे "—**श्री. एस्. सत्यमूर्ती.**

" वीणा-मधुर असून स्वार्थत्याग, मनःसंयम, भूतप्रेम, परदुःखदुःखिता, कर्तव्यपरायणता, निष्कामता, निरहंकारिता, गुरुजनसेवा, इ. गुणांची दृढ छाप वाचकावर पडते. "—**श्री. गंगाधरराव देशपांडे.**

इतर अभिप्राय

" राष्ट्राचा महानिधि," " आर्यसंस्कृतिसंरक्षक," "भक्तिभावाचा सागर," मानसात पुरुषोत्तम आहे इ.

अशा प्रकारचे अभिप्राय द्यावयाचे झाल्यास त्यांचाच एक स्वतंत्र ग्रंथ होईल, इतके ते अनेक व विस्तृत आहेत.

' सार्थ श्रीतुलसीरामायण ' व ' संपूर्ण मराठी तुलसीरामायण ' अशा द्विविध स्वरूपांत आज जे तुलसीरामायण प्रकाशित होत आहे त्यातील मराठी अनुवादाचे औचित्य, महत्त्व व उपयुक्तता या संबंधी थोडे विवेचन करणे कर्तव्य आहे.

श्रीरामचरितमानसासारख्या महान् ग्रंथाला मराठीचा सरळ, सरस, सुन्दर, सोपा, सार्थ व भावपूर्ण असा साज चढविण्याचे अत्यंत जोखमीचे अवघड काम हाती घेण्यास अनुवादक आत्मविश्वासाने कसा प्रवृत्त झाला हे त्या अनुवादाच्या जन्मकथेवरून ध्यानी येईल. अनुवाद व त्याचे प्रकाशन या दोन्ही घटना दैवीप्रेरणेच्या व रहस्यमय आहेत.

ब्र. भू. प. प. श्रीप्रज्ञानानंद सरस्वती स्वामींच्या समश्लोकी-समवृत्त मानसानुवादाच्या द्वितीयावृत्तीचे प्रकाशन ' प्रसाद-प्रकाशन ' मध्ये कै. य. गो जोशी यांच्याकडे झाले. या ग्रंथाच्या मुद्रणप्रतीपासून छपाई पूर्ण होईपर्यंतचे सर्व काम अनुवादकाच्या माझ्या हस्ते झाल्याने त्याचा मुक्काम काही काळ प्रसाद प्रकाशनमध्ये होता. त्यावेळी मानसाचा सरळ मराठी गद्यानुवाद माझ्याकडून प्रथम थोडा कै. भाऊंनी लिहून घेतला, न्यायनिष्ठुर, कठोर अशा निवडक टीकाकारांच्या मुक्त कंठाने केलेल्या एकमुखी स्तुतीस पात्र झालेला पाहिला आणि माझ्यामागे रात्रंदिवस तगादा करून तो सुमारे एक वर्षाच्या अवधीत (इ. स. १९६०) पूर्ण करून घेतला. चित्रकार दीक्षित यांच्याकडून रंगीत व साधी भरपूर चित्रे घालून सुबोध ज्ञानेश्वरीच्या पद्धतीने हे मराठी तुलसीरामायण प्रकाशित करण्याचा त्यांचा हेतू होता. परंतु त्यांच्या अकाली स्वर्गवासाने तो पूर्ण होऊ शकला नाही. त्याच्या नशिबी पुढे दहा वर्षाचा अज्ञातवास होता !

अनुवादाच्या लेखनाचा हा जसा विलक्षण इतिहास आहे तसाच हा अनुवाद लिहिण्यास लेखक कसा तयार झाला हेही समजून घेणे रहस्यमय आहे. इ. स. १९३१ साली वै. गु. मामासाहेब दांडेकर यांच्या सान्निध्यात मी तत्त्वज्ञान विषय घेऊन एम्. ए. झालो. त्यापूर्वी व त्यानंतर १९४७ पर्यंत तुलसीरामायणच नव्हे हिंदी भाषेचाही कधी संबंध आला नाही. त्यावर्षी ब्र. भू. श्रीसद्‌गुरू प. प. प्रज्ञानानन्द सरस्वती स्वामीमहाराज यांचे दर्शन घडले. त्यांच्या समश्लोकी-समवृत्त मानसानुवादाचे प्रकाशन (प्रथमावृत्ति) अनुवादक ' अखंड भारत ' या साप्ताहिकाचा संपादक असता त्याच्या मदतीने झाले. त्यानंतर श्री शंकराचार्य मठ-(पुणे) येथे मानसाचे प्रथम मास पारायण श्रींच्या मार्गदर्शनाने व स्नेहपूर्ण शिकवणीने पार पडले. त्यानंतर मानसाच्या सखोल परिशीलनास नवाह मास शेकड्याहून अधिक पारायणे, प्रवचने, श्रीच्या मुखाने श्रवण-चर्चा मनन, श्रीच्या मानसावरील गूढार्थचंद्रिका नामक बृहद्दीपिका ग्रंथाचे मधून मधून वाचन-अध्ययन इ. विविध मार्ग केवळ रघुनाथकृपेने लाभले. आज प्रकाशित होत असलेल्या अनुवादास पोषक व आवश्यक अशी ती पूर्वतयारी आहे हे त्यावेळी स्वप्नीही नव्हते !

ईशेच्छेने वरीलप्रमाणे अनुवादकाची तयारी होऊन त्याच्याकडून तयार झालेला अनुवाद अज्ञातवासात पडून राहिलेला परिचित व स्नेही यांच्या नजरेस येई तेव्हा ते म्हणत, " अहो, एवढा मोठा ग्रंथ तुम्ही परिश्रमपूर्वक लिहून काढला, त्याच्या प्रकाशनाची तजवीज केव्हा ?" अशा प्रश्नाना अनुवादकाचे नेहमीचे एकच उत्तर असे, " ज्या रघुनाथाच्या प्रेरणेने तो लिहून झाला तो सर्वसमर्थ असल्याने त्याचे प्रकाशन तो योग्य वेळी खास करील. माझ्या श्रमाचे सार्थक अनुवाद लिहीत असताना झाले आहे."

चौ०—" लेखन करता श्रम जो झाला । परमानंद श्रेय पावला ॥
सुमनहार माळ्याने ग्रंथिला । सुगंध सहजचि मिळे तयाला ॥ " (श्रीस्वामी)

याप्रमाणे अनुवाद लेखन व त्याचे प्रकाशन यासंबंधी आवश्यक ते दिग्दर्शन झाले. आता काही किरकोळ पण नमूद करण्यासारख्या बाबींचा विचार पाहू.

गोस्वामींच्या हातची मानसाची मूळ प्रत अद्याप कोणासच मिळाली नाही. प्रचलित प्रतीत गोरखपूर प्रत हीच अधिक प्रमाण मानली जात असल्याने वरील प्रकाशनात तीच घेतली आहे. जे पाठभेद व अर्थभेद श्रीस्वामींना श्रीतुलसीदासांच्या संकेताना धरून आहेत असे आढळून आले तेवढे अनुवादात गोरखपूर प्रतीला सोडून आहेत. अनुवादकाचे मंगलाचरण म्हणून ज्या मूळ श्रीस्वामींच्या संस्कृत श्लोकांचा तो अर्थ दिला आहे ते सर्व श्लोक, सर्व कांडांतील परिशिष्टात एकत्र छापले आहेत.

सार्थ श्रीतुलसी रामायणात मूळ मानसरत्नाकर शेजारी आहे. संपूर्ण मराठी तुलसीरामायणात तो गोरखपूर प्रत अगर श्रीस्वामींचा अनुवाद शेजारी घेऊन अनुवादात ज्या रत्नांचा अभाव वाटेल त्यांची पाठक भरपाई करून घेऊ शकतील. सर्वस्वी निर्दोष व पूर्ण असे केवळ ' निर्दोषंहि समं ब्रह्म 'च असल्याने या प्रकाशनातील दोषासंबंधी बोलणे त्या दृष्टीने योग्य होणार नाही ! मानवी प्रयत्नाची शिकस्त केली आहे एवढेच सांगता येईल.

अत्यंत महत्त्वाच्या ठिकाणी टीपा, विषयदर्शक मोठ्या टाइपात मथळे, संदर्भसूचक वाक्ये, इ. देऊन मानसातील मूळ नाट्यविशेष व भाषेचा गोडवा अंतरीच्या भावासह —भाषांतर होत असता —कायम ठेवण्याची काळजी घेतली आहे. देशकालपरिस्थिती ध्यानी घेऊन मूळ तत्त्वे नव्या भाषेत मांडण्याचा —भांडे बदलून हे मानसामृत मराठी

वाचकास सादर करण्याचा —प्रयत्न केला आहे. त्यामुळे काव्यातील अर्थसंकोच, संकेत व नादमाधुर्य यांचा रंगीत पडदा बाजूस सरून अर्थामृताचा ओघ मातृभाषेतील या गद्यानुवादामुळे सरळ हृदयापर्यंत जाऊन अत्यंत परिणामकारक रीतीने भिडेल व त्याचे पठण-श्रवण करणारे मूळ मानसामृताचा आस्वाद स्वतंत्रपणे घेऊ लागतील असा विश्वास वाटतो.

या अनुवादात जे चांगले असेल त्याचे श्रेय श्रीतुलसीदासांना व श्रीस्वामींना आहे. ज्या उणिवा व दोष असतील ते मात्र सर्वस्वी अनुवादकाचे आहेत. तथापि वर सांगितल्याप्रमाणे हे सर्व अनुवादाचे कार्य केवळ ईश-प्रेरणेने घडले असल्याने ते आपली शक्ति-बुद्धी सर्वस्वी खर्च करून शेवटास नेणेचा प्रयत्न करणे एवढेच अनुवादकाच्या हाती होते. त्याप्रमाणे त्याने ते 'रघुनाथ स्मरोनी केले' आहे.

महात्माजींच्या द्वारा भारताची सामाजिक-नैतिक घडी बसविण्यासाठी, प्रारंभी थोड्या विस्ताराने ज्याचे श्रेष्ठत्व दाखविण्याचा प्रयत्न केला, त्या श्रीरामचरितमानसाच्या प्रकाशनाची प्रभू रघुनाथाला ओढ लागून त्याच्याच केवळ प्रेरणेने मानसाचे सानुवाद असे हे द्विविध प्रकाशन होत आहे. त्याने इष्ट तो संकेत सफल करावा एवढी त्या विश्वचालकाच्या चरणी प्रार्थना करून ही प्रस्तावना पूर्ण करतो.

मार्गशीर्ष शु॥ १५ श्रीदत्तजयंती
शके १८९२ (डिसेंबर १९७०)
कुंडल—(जि. सांगली)

आपला नम्र,
नारायण भास्कर जोशी
अनुवादक

श्री प्रज्ञानानंद स्वामींचा अल्प परिचय

ब्रह्मीभूत श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य प्रज्ञानानन्द सरस्वती स्वामीमहाराज यांचे पूर्वाश्रमीचे नाव दत्तात्रेय नारायण कर्वे. जन्म शके १८१५ वै. वा॥ ३० (१५।५।९३). जन्मस्थळ माहीम (ता. पालघर—ठाणे). इ. स. १९१८ मध्ये बी. ए. नंतर एस्. टी. सी., काही वर्षे शिक्षकाचे काम. मध्यंतरी गोस्वामींचे अनुयायी श्री. बाबा गंगादास यांची संगत ५।७ वर्षे. श्रीरामचरितमानसाच्या अध्ययनाची प्रेरणा व अखेर 'तुझ्या मुखाने गोस्वामी बोलतील!' असा अमोघ आशीर्वाद. परिणाम शेकडो त्रिदिनात्मक व नवाह, एकाह पारायणे, समश्लोकी समवृत्त मानसाचा मराठी अनुवाद. मानसपीयूष नामक मानसावरील ५२ टीकाकारांच्या बृहत् टीकाग्रंथांत श्रींच्या टीकेचा समावेश व स्वतःचा तेवढाच सुमारे ७००० पृष्ठांचा 'गूढार्थ चंद्रिका' नामक टीकाग्रंथ!

पौष शु॥ १२ शके १८६४ (१८।१।४३) चतुर्थाश्रम दीक्षा खेड, (जि. पुणे) ब्र. भू. श्री. प. प. वासुदेवानन्द सरस्वती स्वामीमहाराज (पोटे स्वामी—आळे) यांच्याकडून दंडग्रहण. या मोक्षगुरूंच्या कृपाशीर्वादाने श्रींची अमर काव्यशक्ती जागृत होऊन अनेक काव्यग्रंथ निर्माण झाले. समश्लोकी संगीत गीता, अभिनव रामायण, वेदान्तसार, अभंग रामायण इ. प्रकाशित, अनेक अप्रकाशित.

अनेकांच्या ऐहिक पारमार्थिक जीवनास आधार मिळवून देण्याचे कार्यही श्रींनी वरील व्याप सांभाळून व आदर्श धर्माचरण ठेवून निरलसपणे अनेक तपे केल्याने श्रींचा शिष्यसंप्रदायही बराच मोठा आहे.

श्रींचा अभ्यास संस्कृत, इंग्रजी, मराठी, हिंदी, गुजराथी इ. भाषांचा सखोल होता. शिवाय ज्योतिष, मंत्रशास्त्र, योगशास्त्र, वैद्यक, धर्मशास्त्र इत्यादींचा व्यासंग एवढा होता की, त्यावरील त्यांचा शब्द प्रमाण मानला जाई.

डोळस व दृढ अशी रामोपासना आयुष्यभर करून शेवटी ध्यानधारणा, भजन, जप एवढाच कार्यक्रम ठेवला. जडदेह सांभाळत राहण्याची आवश्यकता नाही असे दिसून येताच शांतपणे व समाधानाने या अत्यंत थोर व असामान्य अशा पुण्य पुरुषाने शके १८९० फा. वा॥ १० (२३।३।६८) रोजी [illegible] परंडा (जि. उस्मानाबाद) येथे आपल्या देहाचे विसर्जन केले! तेथेच श्रींची समाधी आहे.

गोस्वामी श्रीतुलसीदासजींचे चरित्र

'मूल गोसांई चरित्र' गोस्वामी श्रीतुलसीदासजींचे शिष्य श्रीवेणी-माधवदास यांनी लिहिलेले आहे. त्यांची व श्रीतुलसीदासांची भेट संवत् १६०९ ते १६१६ चे दरम्यान झाली. गोस्वामी श्रीतुलसीदासमहाराज हे आद्य कवी व ब्रह्मदेवाच्या मानसपुत्रांपैकी एक प्रसिद्ध वाल्मीकीऋषी ह्यांचा अवतार होत.

तीर्थराज प्रयाग क्षेत्राजवळ, बांदा जिल्ह्यात राजापूर गावात आत्माराम दुबे नावाचे एक प्रतिष्ठित पाराशर गोत्री, शरयूपारी ब्राह्मण राहात होते. त्यांच्या पत्नीचे नाव हुलसी. ती महापतिव्रता होती. बारा महिने गरोदर असताना हुलसीचे पोटी अभुक्त मूळ नक्षत्रावर एक पुत्र जन्मास आला. जन्मल्याबरोबर मुलाने रडण्याऐवजी 'राम' शब्दाचा उच्चार केला. त्यावेळी हे बालक चार-पाच वर्षांच्या मुलासारखे दिसत होते व त्यास बत्तीस दात होते. अशा प्रकारच्या बालकास पाहून वडील अशुभ शंकेने भयभीत झाले. त्यासंबंधी नानाप्रकारच्या कल्पना करू लागले. हे पाहून आई हुलसी मोठी चिंताक्रान्त झाली. तिने आपली प्रेमळ व विश्वासू दासी चुनिया हिला बोलावून दशमीचे रात्री या प्राणप्रिय सुंदर अर्भकाला घेऊन तू गुपचूप हरिपुराला—आपल्या सासरी—जा. याचे मातेप्रमाणे संगोपन कर असे सांगितले. दासी बालकाला घेऊन रातोरात हरिपुराला निघून गेली. प्रातःकाळी हुलसीने देहत्याग केला. दासीने मोठ्या प्रेमाने बालकाचे पालन-पोषण केले. तुलसीदास साडेपाच वर्षांचे झाले आणि त्याचवेळी चुनियाचा देहान्त झाला. आता त्या बालकास कोणाचाच आधार राहिला नाही. अभागी मुलगा म्हणून तुलसीदासजींच्या वडिलांनीदेखील मुलाची पर्वा केली नाही. मुलगा पोरका झाला, कोणी आश्रय देईना, दारोदार भटकू लागला. ही त्याची दुर्दशा पाहून जगज्जननी पार्वतीला त्याची दया आली. तो जेथे असेल तेथे ब्राह्मण स्त्रीच्या वेषाने जाऊन, मुलास जेवू घालून ती नित्य निघून जाऊ लागली.

आपल्या प्रियेचे हे व्रत अखंड चाललेले पाहून, भगवान शंकरांनी रामशैलावर राहणारे श्रीअनन्तानन्दजींचे प्रिय शिष्य श्रीनरहर्यानन्दजींना दृष्टान्त देऊन सांगितले की, 'हरिपूरच्या ब्राह्मण बालकास शोधून आणा व त्याचे उपनयन करून त्यास वैष्णवदीक्षा द्या; व मी सांगितलेले रामायण त्यास सांगा.' श्रीनरहर्यानंदजी हेच पुढे तुलसीदासजींचे गुरू झाले.

याप्रमाणे श्रीनरहर्यानंदजींनी तुलसीदासास शोधून काढून त्याचे नाव 'रामबोला' असे ठेविले. संवत् १५६१ माघ शु॥ ५ ला त्यांचा उपनयन संस्कार झाला. रामबोलाने कोणी न शिकविताच गायत्री मंत्राचा शुद्ध उच्चार केला. नरहरीस्वामींनी वैष्णव-संस्कारपूर्वक श्रीराममंत्राची दीक्षा त्यास दिली. रामबोला अयोध्येस गुरूजवळ राहून विद्याध्ययन करू लागला. प्रखर बुद्धीमुळे एकदाच ऐकलेले त्याला तोंडपाठ होऊ लागले. काही दिवसांनंतर गुरु-शिष्यांच्या या जोडीने तीर्थयात्रा करीत करीत वराहक्षेत्रात (सोरो) मुक्काम केला. तेथे नरहरींना विश्वेश्वराच्या आज्ञेचे स्मरण झाले व त्यांनी तुलसीदासांना श्रीरामचरितमानस सांगितले. पुढे तुलसीदासजी काशीक्षेत्री आले. तेथे पंडित शेषसनातनजींच्याजवळ राहून वेदवेदांग, शास्त्रे इत्यादींचे अध्ययन त्यांनी केले. तुलसीदासजी २५।२६ वर्षांचे झाले व अध्ययनसमाप्ती झाली. त्यांच्या लौकिक वासना जागृत झाल्या व आपल्या विद्यागुरूची आज्ञा घेऊन ते जन्मभूमीस परतले. तेथे आल्यानंतर त्यांना आपला सर्व परिवार, घरदार नष्ट झाल्याचे आढळून आले. श्रीतुलसीदासांनी श्राद्ध वगैरे सर्व विधी श्रद्धेने केले. गावच्या लोकांनी त्यांना घर बांधून दिले व तेथे राहून तुलसीदासजी लोकांना रामायण सांगू लागले.

भरद्वाज गोत्रातील एका ब्राह्मणाने आपल्या सुंदर कन्येचा विवाह तुलसीदासजींच्या बरोबर व्हावा म्हणून फार फार मनधरणी केली व त्याप्रमाणे विवाह करण्याचे तुलसीदासांनी मान्य केले. संवत् १५८३ ज्येष्ठ शु॥ १३ गुरुवारी त्यांचा विवाह झाला. पुढे ते गृहस्थाश्रमात आपल्या पत्नीसह तेथे राहू लागले व स्वपत्नीच्या मोहात अतिशय गुरफटले गेले. एके दिवशी त्यांची पत्नी आपल्या भावाबरोबर माहेरी निघून गेली. तिच्या पाठोपाठ तुलसीदासजीही तिथे आले. हे पाहून त्यांची पत्नी त्यांना म्हणाली की, 'महाराज, आपण माझ्यावरील प्रेमाने इतके आंधळे झाले आहात की, रात्र-अपरात्र, याचीदेखील आपणास शुद्ध राहिली नाही ! धिक्कार असो ! माझ्या या हाडामांसाच्या शरीरावर जितके प्रेम करिता, त्याच्या अर्धे जरी आपण श्रीरामावर केले असते तर या भयंकर संसारातून मुक्त झाला नसता काय ?'

तुलसीदासजींना हे शब्द फार लागले. ते क्षणाचाही विलंब न लावता तेथून तावडतोब निघून गेले. ते थेट प्रयागला आले. तेथे गृहस्थाश्रमाचा त्याग करून त्यांनी साधुवेष धारण केला व ते तीर्थाटनाला निघाले. इकडे पतीच्या वियोगाने त्यांच्या पत्नीने संवत् १५८९ आषाढ व॥ ९ला बुधवारी देहत्याग केला. श्रीतुलसीदासजी अयोध्या, पुरी, रामेश्वर, द्वारका, बदरीनारायण, कैलास वगैरे यात्रा करीत करीत मानससरोवराजवळ आले. तेथे त्यांना काकभुशुंडीचे दर्शन झाले.

तीर्थाटन करून ते काशीस परतले. काशीस येऊन राहिल्यावर प्रतिदिनी ते रामायण सांगत. उपनिषदातील वचना-

प्रमाणे तुलसीदास प्रातर्विधीसाठी दूर जात असत व शौचानंतर अवशेषजल एका पिंपळाच्या वृक्षाला घालीत असत. त्यावर असणारे पिशाच्च (त्या जलाने त्याची तृप्ती होऊन) एके दिवशी प्रगट झाले. त्यावेळी त्याच्यापाशी तुलसीदासजींनी श्रीरघुनाथजींचे दर्शन व्हावे अशी इच्छा व्यक्त केली. तेव्हा त्याने सांगितले की, गलिच्छ, अमंगळ वेषात हनुमानजी आपली कथा ऐकण्यास दररोज येत असतात. त्यांचे पाय दृढ धरा व श्रीरामचंद्राचे दर्शन करवून देण्यास कबूल करा. तुलसीदासजींनी त्याप्रमाणे करताच हनुमानजींनी सांगितले, ' चित्रकूटास दर्शन होईल !' त्याप्रमाणे तुलसीदासजी चित्रकूटास जाण्यास निघाले.

चित्रकूटावर पोचल्यावर मंदाकिनीवर स्नान, देवदर्शन, रामायणपाट, नित्यकर्म व निरंतर मंत्रजप असा त्यांचा रोजचा कार्यक्रम चालत असे. एके दिवशी ते चित्रकूट-प्रदक्षिणेस निघाले असता, वाटेत त्यांना श्रीरामचंद्रांचे दर्शन घडले. दोन अत्यंत सुंदर राजकुमार घोड्यावर बसलेले व धनुष्यबाण धारण करून शिकारीस जात असताना दिसले. ते पाहून तुलसीदासजी एकदम स्तब्ध झाले, त्यांना ते ओळखू शकले नाहीत. तेव्हा प्रगट होऊन हनुमानजींनी सर्व मर्म सांगितले. त्याचा त्यांना पश्चात्ताप झाला. . हनुमानजींनी त्यांची समजूत काढून उद्या प्रातःकाळी पुन्हा दर्शन होईल असे सांगितले. संवत् १६०७ मध्ये मौनी अमावास्या, बुधवार या दिवशी तुलसीदासजींच्यासमोर श्रीरामचंद्र पुन्हा प्रगट झाले. ते बालकरूपात तुलसीदासांना म्हणतात, ' बाबा ! आम्हाला चन्दन द्या ! ' तो चमत्कार पाहून तुलसीदास देहभान पूर्ण विसरून गेले. भगवान श्रीरामचंद्रांनी चंदन हातात घेऊन त्यांच्या मस्तकास लावले व ते अन्तर्धान पावले.

या घटनेनंतर हळूहळू श्रीतुलसीदासाची कीर्ती चंद्रकलेप्रमाणे वाढू लागली. गावातील स्त्रिया, पोपटांना पढविताना-सुद्धा तुलसीदासांचा महिमाच पढवू लागल्या. कित्येक चमत्कारही यावेळी तुलसीदासजींकडून घडले. त्याचप्रमाणे दरम्यानच्या काळात संतमहंतांच्या गाठीभेटी होत असत. संवत् १६१६ मध्ये ज्यावेळी गोस्वामी तुलसीदासजी कामदागिरीजवळ निवास करून राहिले होते. त्यावेळी तेथे त्यांच्या भेटीसाठी सूरदास हे प्रसिद्ध कृष्णभक्त आले. त्यांनी आपला प्रसिद्ध ग्रंथ 'सूरसागर' त्यांना दाखविला व त्यातील दोनचार पदे म्हणून दाखविली. तुलसीदासांनी तो ग्रंथ पोटाशी धरून कवटाळला, व भगवान कृष्णाचे माहात्म्य खूप वर्णन केले. सुखपाल नावाचा ब्राह्मण मेवाडहून मीराबाईचे पत्र घेऊन याच काळात तुलसीदासजींकडे आला. ते पत्र वाचून त्याचे उत्तर म्हणून जे पद गोस्वामींनी तयार करून दिले त्याचे धृपद उत्तर हिन्दुस्थानात सर्वतोमुखी आहे.

एक मुलगा भर दुपारी येई व आपल्या मधुर निर्विकार कंठानें तुलसीदासांना सुंदर सुंदर पदे म्हणून दाखवी. त्यावर प्रसन्न होऊन तुलसीदासानी त्यास दोन नवीन पदे तयार करून दिली. ती त्याने लगेच पाठ करून त्यांना म्हणून दाखविली व पुढे प्रत्येक वेळी नवनवीन पदे तयार करून द्यायचा हट्ट त्याने धरिला. असा हा नित्यक्रम सुरू झाला व त्यानिमित्ताने त्यांच्या काव्यप्रतिभेस प्रेरणा मिळून संवत् १६२८ त त्याचे दोन ग्रंथ ' श्रीरामगीतावली ' व ' श्रीकृष्णगीतावली ' तयार झाले. पुढे त्यांनी अयोध्येस प्रयाण केले.

अयोध्येस जात असता प्रयागास कुंभमेळा होता. काही दिवस त्यांनी तेथे वास्तव्य केले. सातवे दिवशी एका वटवृक्षाखाली त्यास भरद्वाज व याज्ञवल्क्य मुनींचे दर्शन झाले. त्यांच्या गुरूनी, सूकरक्षेत्रात जी कथा लहानपणी सांगितली होती, तीच कथा त्या उभयांमध्ये त्यावेळी चालली होती. नंतर ते काशीस जाण्यास निघाले. तेथे प्रल्हादघाटावर एका ब्राह्मणाच्या घरी ते राहिले. तेथे त्यास कवित्व-स्फूर्ती झाली व त्यांनी संस्कृतात श्रीरामायण रचना करण्यास सुरुवात केली. आश्चर्य हे की, दिवसा जेवढे लिहावे. तेवढे सर्व दुसऱ्या दिवशी गुप्त व्हावे. ही घटना रोजच्या रोज घडू लागली. आठवे दिवशी स्वप्नात श्रीशंकरानी सांगितले की, 'तुम्ही स्वभाषेत काव्यरचना करावी '. जागे झाल्यावर शिवपार्वतींनी प्रत्यक्ष दर्शन दिले. ' माझ्या आज्ञेने तुम्ही अयोध्येत जाऊन रहा व तेथे मातृभाषेत रामायण लिहा. माझ्या आशीर्वादाने तुमचे रामायण सामवेदासारखे सफळ होईल. ' याप्रमाणे सांगून उमामहेश्वर अन्तर्धान पावले व नंतर गोस्वामीजी अयोध्येस गेले.

अयोध्येस येऊन राहिल्यानंतर संवत् १६३१ चा पहिला महिना, नववा दिवस— चैत्र शुद्ध नवमी—उगवला. त्यावर्षी श्रीरामनवमीचे दिवशी अगदी भगवंताच्या अवतारकाळासारखा ग्रहयोग होता. त्या रामनवमीचे दिवशी भौमवारी, प्रातःकाळी प्रगट होऊन हनुमंतानी तुलसीदासजींना अभिषेक केला. शिवपार्वती, गणेश, सरस्वती, नारद, शेष यांनी आशीर्वाद दिले. याप्रमाणे सर्वांच्या आज्ञेने व आशीर्वादाने गोस्वामी तुलसीदासजींनी श्रीरामचरितमानसाची रचना करण्यास प्रारम्भ केला. दोन वर्षे, सात महिने व सव्वीस दिवसांनी संवत् १६३३ मार्गशीर्ष शुक्ल ५ला ते संपूर्ण झाले. त्यावेळी गोस्वामीजींचे वय ८० वर्षांचे होते.

त्यानंतर तुलसीदासजी काशीस गेले. तेथे भगवान विश्वेश्वर व अन्नपूर्णा याना प्रथम रामायण वाचून दाखविले. रात्री ग्रंथ श्रीविश्वेश्वराचे संनिध ठेवण्यात आला. प्रातःकाळी देवद्वार उघडण्याचे वेळी, विद्वान, संन्यासी, साधू वगैरे पुष्कळ मंडळी उपस्थित असता द्वार उघडून पाहतात तो ग्रंथावर 'सत्यं शिवं सुंदरं' असे लिहिले असून त्याखाली सही 'शंकर' असे लिहिलेले आढळले. ही घटना पाहून प्रत्येकाच्या आनंदसागराला भरती आली. जो तो आपापले प्रेम प्रगट करू लागला.

श्रीरामचरितमानसाच्या प्रसिद्धीने शास्त्री-पंडितांचे उरात धडकी भरली. मत्सर, द्वेष, निंदा यांचा अग्नी धुमसू लागला. तुलसीदासासारख्या महाभगवद्भक्ताचा विनाश करण्याचे गुप्त व प्रकट प्रयत्न सुरू झाले. ग्रंथ चोरण्यासाठी काही चोरही पाठविण्यात आले. चोर तेथे गेले तेव्हा तुलसीदासजीच्या कुटीभोवती दोन धनुर्धारी महावीर पहारा करीत असलेले दिसले. त्यांच्या असामान्य लावण्यतेजाने त्या चोरांची बुद्धी पालटली. त्यांनी निष्कपटबुद्धीने गोस्वामींना भेटून आपण कोण व का आलो होतो हे सांगून ते पहारेकरी कोण होते ह्याची कुतूहलाने चौकशी केली. अखेर ते गोस्वामींचे शिष्य बनले.

गोस्वामींनी मूळ रामायणाची एक प्रत तयार केली व मूळ ग्रंथ आपला मित्र राजा तोडरमल याचेकडे सुरक्षित राहण्यासाठी नेऊन ठेविला. रामायणाचा प्रसार जोरात सुरू झालेला पाहून पंडितांचे पोट फारच दुखू लागले. दुसरा काहीही उपाय चालत नाही हे पाहून ही पंडित मंडळी तत्कालीन महान विद्वान स्वामी मधुसूदन सरस्वतींकडे गेली व म्हणाली, 'आपण तुलसीदासांचा ग्रंथ पहावा व कोणत्या ग्रंथाच्या तोडीचा आहे ते सांगावे, त्याप्रमाणे श्रीमधुसूदन सरस्वतींनी तो ग्रंथ पडताळून मोठे समाधान व्यक्त केले. त्यावर आपला अभिप्रायही व्यक्त केला. तरीदेखील पंडित मंडळींचे समाधान होईना. त्यांनी त्या ग्रंथाची परीक्षा पाहण्याचे ठरविले. भगवान श्रीविश्वेश्वराचे समोर वर वेद, त्याखाली शास्त्र व शास्त्राच्याखाली पुराण ठेवून सर्वांत तळाशी रामचरितमानस अशा क्रमाने ग्रंथ ठेवून दिले व मंदिराचे द्वार बंद केले. प्रातःकाळी जेव्हा मंदिराचे दार उघडले, तेव्हा रामचरितमानस वेदाच्याही वर असलेले आढळले त्यामुळे सर्व पंडित आश्चर्यचकित झाले. अखेर ते शरण आले. त्यांनी गोस्वामी तुलसीदासजींची क्षमा मागितली.

तुलसीदासजी आता असी घाटावर राहू लागले. एके रात्री कलियुग, हातात तलवार घेऊन आले व गोस्वामीजींना दरडावून म्हणाले की, 'तू आपली सर्व पुस्तके पाण्यात बुडवून टाक' गोस्वामींनी हनुमानजीचे ध्यान केले. तेव्हा त्यांनी सांगितले, की, 'ते असे ऐकणार नाही तुम्ही विनयपत्रिका लिहून द्या.' त्यावेळी गोस्वामींनी 'विनयपत्रिका' हा ग्रंथ लिहिला. त्यावर भगवान रामचंद्रांनी आपली सही करून त्यास निर्भय केले.

यानंतर तुलसीदासांनी जनकपुरीची यात्रा केली. तेथून ते हरिहरपूरला आले. पुढे संवत् १६४० त काशीत येऊन 'दोहावली' लिहिली. संवत् १६४१ मार्गशीर्ष शुद्ध सप्तमी रविवारी वाल्मीकीरामायणाचे लेखन संपविले. संवत् १६४२ त जानकी नवमीला (वै. शु॥ ९ ला) 'सतसई' चे लेखन त्यांनी सुरू केले.

श्रीतुलसीदासमहाराजांची सर्वतोमुखी झालेली कीर्ती ऐकून मोगल बादशहाने त्यास भेटण्यास बोलाविले. त्याप्रमाणे ते दिल्लीस बादशहापुढे येऊन दाखल झाले. बादशहाने सांगितले की, 'काही चमत्कार करून दाखवा.' तुलसीदासानी 'मला चमत्कार येत नाहीत' म्हणून सांगितले. त्यामुळे बादशहाने रागावून त्यांची तुरुंगात रवानगी केली. थोड्याच वेळात रात्री हजारो वानरे जमली व त्यांनी सर्वत्र नासधूस, मारपीट करावयास सुरुवात केली. बादशहाही चांगलाच बुकलला गेला. मग तो श्रीतुलसीदासांना शरण गेला. त्यांना सोडून देऊन त्यांची क्षमा मागितली व बादशहाने गोस्वामीजींचा योग्य मानसन्मान केला.

एकदा एका ब्राह्मणाने तुलसीदासांपुढे रामदर्शनाचा हट्ट धरला. त्याप्रमाणे तुलसीदासानी पिंपळाचे वृक्षाखाली त्रिशूल रोवून त्या ब्राह्मणास झाडावरून त्रिशूलावर उडी घे म्हणजे तुला रामदर्शन होईल असे सांगितले. परंतु प्रथम त्या ब्राह्मणाचे काही धारिष्ट होईना. पुढे त्याने झाडावर चढून त्रिशूलावर उडी मारिली व त्याला भगवंतांचे दर्शन झाले.

पुढे तुलसीदासांना आपल्या अवतारसमाप्तीची वेळ जवळ आली असे समजताच, समय जाणून ते लोकांस म्हणाले, 'श्रीरामचंद्राच्या चरित्राचे वर्णन करून आता मी शांत होऊ इच्छितो, माझ्या मुखात तुलसीपत्र व सोने घाला.' असे सांगून काही वेळाने गोस्वामींनी इहलोकच्या आपल्या अवताराची समाप्ती केली. त्यावेळी त्यांचे वय १२६ वर्षांचे होते. गोस्वामी श्रीतुलसीदासजींनी संवत् १६८० श्रावण शुद्ध ३ शनिवारी काशीक्षेत्री असीच्या तीरावर आपला देह विसर्जन केला.

गीतावली, ' छप्पया रामायण, बरव्वा रामायण, हनुमान चालिसा, हनुमान बाहूक इत्यादि लहानमोठे भक्ति-वैराग्य प्रधान ३२।३४ ग्रंथ तुलसीदासांनी लिहिले. हनुमान चालिसा व रामशलाका प्रश्नावली हे दोन अगदी लहान असूनसुद्धा फारच प्रभावशाली आहेत. तुलसीदासांसारख्या विभूतींच्या हातचे फक्त वाल्मीकीरामायण व सुंदर-कांड इतके दोनच ग्रंथ उपलब्ध आहेत.

* * *

स्कंद पुराणाच्या आधारे तयार केलेले तिथिपत्रक.

(१) श्रीसीता रामविवाह-वृश्चिक राशीस सूर्य. मीन लग्न. (२) मार्गशीर्ष शु॥ ५ श्रीरामचंद्र वय १५. श्रीसीता वय ६. (३) विवाहोत्तर अयोध्येत १२ वर्षे वास्तव्य. (४) चै. व॥ ६ ला वनवास सुरू. वय श्रीराम २७ व श्रीसीता १८. (५) पहिला आहार दि. ४. शृंगवेरपूर, दि. ५ गंगानदीपार. प्रथम चित्रकूट व नंतर पंचवटी. एकूण बारा वर्षांचा काळ. (६) शूर्पणखा नाक-कान-छेद. वनवास १३ व्या वर्षाचा प्रारंभ. (७) माघ शु॥ ८ दुपारी १२ नंतर जानकीहरण. (८) आषाढाच्या प्रारंभी सुग्रीव भेट. (९) चातुर्मास प्रवर्षण पर्वतावर वास्तव्य. (१०) कार्तिक व॥ ११ श्रीहनुमंताचे समुद्रोल्लंघन. (११) कार्तिक व॥ १३ रात्री श्रीजानकीमाता दर्शन. अशोकवनाचा विध्वंस. (१२) कार्तिक व॥ १४ अक्षया वध, रावण संभाषण, लंका दहन, चूडामणीसह परत, समुद्रतीरी वानरमित्र भेट. (१३) समुद्राच्या किनाऱ्यापासून किष्किंधेस मार्गशीर्ष शु॥ ६. (१४) मार्गशीर्ष शु॥ ७ श्रीरामचंद्र भेट, चूडामणि प्रदान. [सीताहरणापासून १० महिन्यांचा काळ.] (१५) मार्ग. शु॥ ८ उत्तरा फाल्गुनी नक्षत्रावर लंकेकडे प्रयाण. (१६) मार्ग. शु॥ १५ समुद्रतीर गाठला. (१७) मार्ग. व॥ १ ते ४ सागर-तीरावर मुक्काम. (१८) मार्ग. व॥ ४ बिभीषणाची शरणागती. (१९) मार्ग. व॥ ५ ते ८ श्रीराम प्रभूंची समुद्रास प्रार्थना. (२०) मार्ग. व॥ ९ ब्राह्मणरूपाने समुद्र शरण आला. (२१) मार्ग. व ॥ १० सेतुबंधनाच्या कामास प्रारंभ. (२२) मार्ग. व॥ १३ स [४ दिवस] सेतू पूर्ण. १०० योजने लांब व १० योजने रुंद असा सेतू बांधला. (२३) मार्ग. व॥ १४ ते पौष शु॥ ३ सागरपार सेना १८ पद्मे सेनापती. (२४) पौष शु॥ ३ ते १० लंकेला सैन्याचा वेढा. (२५) पौष शु॥ ११ शुक-सारण –रावणमंत्री सेना पाहणीस (२६) पौष शु॥ १२ छत्रमुकुट ताटंक एका बाणाने. [सेनेचे ४ विभाग.] (२७) पौष शु॥ १३ ते १५ रावण सेना सन्नद्ध. (२८) पौष व॥ १ अंगद शिष्टाई करून परत. (२९) पौष व॥ २ युद्धाला प्रारंभ. (३०) पौष व॥ ३ ते ९ रावण सेनेसह युद्ध, प्रभु नाग पाश बद्ध. (३१) पौष व॥ १० गरुड नाग खाऊन वैकुंठास परत. (३२) पौष व॥ ११–१२ घनघोर युद्ध. धूम्रलोचन मारला. (३३) पौष व॥ १३ ते ३० नीलादि दैत्य ठार. (३४) माघ शु॥ १ ते ४ रावण वानर युद्ध. लंकेवर चाल. (३५) माघ शु॥ ५ ते ८ कुंभकरणास जागा करण्यास तीन दिवस. (३६) माघ शु॥ ९ ते १४ सहा दिवस कुंभकर्णाशी युद्ध व तो ठार. (३७) माघ शु॥ १५ रावणाला रडण्यासाठी युद्धाला सुट्टी. (३८) माघ व॥ १ ते ५ श्रीरामचंद्रांनी नारान्तकादि दैत्यांचा वध केला. (३९) माघ व॥ ६ ते ८ घनघोर युद्ध. अनेक दैत्यांचा प्रभूकडून वध. (४०) माघ व॥ ८ ते १३ कुंभ-निकुंभ दैत्यांचा वध. (४१) माघ व॥ १४ ते फा. शु॥ २ जुमक दैत्याचा त्याच्या सेनेसह वध. (४२) फा. शु॥ ३ ते १३ लक्ष्मण-मेघनाद युद्ध व शेवटी मेघनादाचा वध. (४३) फा. शु॥ १४ रावणास रडण्यासाठी सुट्टी. (४४) फा. शु॥ १५ रावण रणभूमीवर युद्धासाठी आला (४५) फा. व ॥ १ ते ५ रावणाचे इतरांशी युद्ध त्याचे सेनापती ठार. (४८) फा. व॥ ९ लक्ष्मण मूर्च्छित, हनुमंताकडून संजीवनी. मूर्छा गेली. (४७) फा. व॥ १० राम-रावण घनघोर युद्ध. (४६) फा. व॥ ११ मातली रथ घेऊन आला. प्रभू रथारूढ. (४९) फा. व॥ १२ ते चै. शु॥ १४. १८ दिवस रावणाशी घनघोर संग्राम व तो ठार. (५०) चै. शु॥ १५ रावणशरीराचे दहन. (५१) चै. व॥ १ श्रीराम विजयोत्सवानंद. इंद्रागमन-अमृतसिंचन. वानर उठले. (५२) चै. व॥ २ बिभीषण राज्यारोहण. (५३) चै. व॥ ३ श्रीसीतामाता बाहेर-अग्निप्रवेश-शुद्धि [१४ महिने १० दि. लंकेत.] (५४) चै. व॥ ४ पुष्पक अयोध्येकडे निघाले. (५५) चै. व॥ ५ विमान प्रयागात आले. (५६) चै. व॥ ६. १४ वर्षे पूर्ण. नंदिग्रामात भरत भेट. (५७) चै. व॥ ७ रामराज्याभिषेक [राम वय ४१ सीता ३२]. (५८) भा. शु॥ ९ श्रीजानकी गर्भवती. (५९) चै. शु॥ १२–७ वा महिना सीतात्याग –आषाढ व॥ ९ लवांकुशजन्म. [श्रीरघुनाथ राज्य ११००० वर्षे.]

श्रीरामशलाका प्रश्नावली

श्रीरामचरितमानसाचे श्रद्धापूर्वक पठण करणाराना ऐहिक अगर पारलौकिक प्रश्न, दैवीशक्तीच्या सहाय्याने सोडविण्याची सोय, अत्यंत गूढ अशा पद्धतीने एका यंत्रात तुलसीदासांनी करून ठेवली आहे. उत्तर हिंदुस्थानातील मानस-प्रेमी जनांना या शलाकेचा पूर्ण परिचय आहे. महाराष्ट्रीयांना मूळ 'मानस' च अपरिचित असल्याने अत्यंत उपयुक्त अशा या प्रश्नशलाकेचा समावेश आम्ही आमच्या तुलसीरामायणांत केला आहे. तिचा उपयोग कसा करावा हे खाली दिलेल्या माहितीवरून कळेल.

प्रश्नशलाका कोष्टक

मु	प्र	उ	वि	हो	मु	ग	व	सु.	नु	बि	घ	धि	इ	द
र	रु	फ	सि	सि	रें	बस	है	मं	ल	न	ल	य	न	अं
सुज	सो	ग	सु	कु	म	स	ग	त	न	ई	ल	धा	बे	नो
त्य	र	न	कु	जा	म	रि	र	र	अ	की	हो	स	रा	य
पु	सु	थ	सी	जे	इ	ग	* म	सं	क	रे	हो	स	स	नि
त	र	त	र	स	इ	ह	ब	ब	प	चि	स	य	स	तु
म	का	ा	र	र	मा	मि	मी	म्हा	ा	जा	हू	हीं	ा	जू
ता	रा	रे	री	हृ	का	फ	खा	जि	ई	र	रा	पू	द	ल
नि	को	मि	गो	न	म	ज	य	ने	मनि	क	ज	प	स	ल
हि	रा	म	स	रि	ग	द	न	ष	म	खि	जि	मनि	त	जं
सिं	मु	न	न	कौ	मि	ज	र	ग	धु	ख	सु	का	स	र
गु	क	म	अ	ध	नि	म	ळ	ा	न	ब	ती	न	रि	भ
ना	पु	व	अ	ढा	र	ल	का	ए	तु	र	न	नु	ब	थ
सि	ह	सु	म्ह	रा	र	स	हि	र	त	.न	ष	ा	जा	ा
र	मा	ा	ला	धी	ा	गी	ज	हू	ही	घा	जू	ई	ग	रे

वर दिलेल्या श्रीरामशलाका प्रश्नावली कोष्टकावरून आपल्या प्रश्नाचे उत्तर पाहताना प्रथम भगवान श्रीरामचंद्राचे अनन्य भावाने स्मरण करावे. त्यानंतर आपल्या प्रश्नाचे श्रद्धापूर्वक चिंतन करून वरील कोष्टकातील कोणत्याही अक्षरावर बोट ठेवावे. एका कोऱ्या कागदावर हे अक्षर लिहून घ्यावे.

नंतर क्रमाने ९ चौकटी मोजून येणाऱ्या नवव्या चौकटीत असणारे अक्षर आधी लिहून घेतलेल्या अक्षराच्या पुढे लिहावे. हा क्रम आपण प्रथम लिहून घेतलेली चौकट येईपर्यंत चालू ठेवावा.

या पद्धतीचा चमत्कार असा की, वर दिलेल्या क्रमाने लिहून घेतलेल्या अक्षरांचीच एक चौपाई तयार झालेली आपल्याला वाचायला मिळेल.

येथे आणखी एक गोष्ट लक्षात घ्यायची की, एखाद्या रकान्यात दोन अक्षरे आली तर ती दोन्ही लिहून घ्यायची. नुसता (ा) काना आला तर तो आधी लिहून घेतलेल्या अक्षराला जोडून लिहावा.

ही शलाका प्रश्नावली नीट समजावी म्हणून येथे आपण एक उदाहरण करून पाहू.

समजा आपण ' म ' अक्षर असणाऱ्या * चिन्हांकित चौकटीवर बोट ठेवले. त्यानंतर क्रमाने (उजव्या बाजूने) दर नवव्या चौकटीतील येणारे अक्षर लिहिले. अशा तऱ्हेने येणाऱ्या अक्षरांची एक खालील चौपाई तयार झालेली दिसेल ती अशी—

हो इ है सो ई जो रा म* र चि रा खा ।

को क रि त र क ब ढ़ा व हिं सा षा ॥

ही चौपाई बालकांडात शिव-पार्वती संवादात आली आहे. आपण या चौपाईवरून हा आशय लक्षात घेतला पाहिजे की, इच्छित कार्य पार पडण्यात अडचण आहे. तरी कार्य सिध्दी होणे कठिण आहे म्हणून कार्याचे यशापयश ईश्वरावर सोडून देणेच श्रेयस्कर आहे, हेच या प्रश्नाचे उत्तर समजावे.

या चौपाईशिवाय श्रीराम शलाका प्रश्नावलीवरून जितक्या चौपाया तयार होणे शक्य आहे त्यांचे स्थान व त्यांचे फल खाली दिले आहे.

(१) सुनु सिय सत्य असीस हमारी । पूजिहि मनकामना तुम्हारी ॥

स्थान—ही चौपाई बालकांडात सीतेच्या गौरीपूजनाच्या प्रसंगाची आहे. हा गौरीने सीतेला आशीर्वाद दिला आहे.

फल—प्रश्नकर्त्याचा प्रश्न उत्तम आहे. कार्य सिध्दी होईल.

(२) प्रविसि नगर कीजे सब काजा । हृदय राखि कोसलपूर राजा ॥

स्थान—ही चौपाई सुंदर कांडातील असून हनुमान लंकेत प्रवेश करण्याच्या वेळची आहे.

फल—ईश्वराचे स्मरण करून कार्यारंभ केल्यास कार्य सिध्दी होईल.

(३) उधरे अंत न होइ निबाहू । काल नेमि जिमि रावन राहू ॥

स्थान—ही चौपाई बालकांडाच्या सुरुवातीस सत्संगतीचे वर्णनाच्या वेळची आहे.

फल—या कार्यात चांगुलपणा नाही, म्हणून कार्यात यश मिळण्यात अडचण आहे.

(४) विधि बस सुजन कुसंगत परहीं । फनि मनि सम निज गुन अनुसरहीं ॥

स्थान—ही चौपाई सुद्धा बालकांडाच्या सुरुवातीलाच आली असून यात सत्संगतीचे वर्णन आहे.

फल—खोट्या (अयोग्य) माणसाची संगत सोडावी. कार्य पूर्ण होण्याची शक्यता कमी आहे.

(५) मुद मंगलमय संत समाजू । जिमि जग जंगम तीरथ राजू ॥

स्थान—ही चौपाई बालकांडातील असून साधुसंताची थोरवी येथे वर्णन केली आहे.

फल—प्रश्न उत्तम आहे. कार्य सिद्धी होईल.

(६) गरल सुधा रिपु करय मिताई । गोपद सिंधु अनल सितलाई ॥

स्थान—ही चौपाई हनुमान लंकेत प्रवेश करण्याच्या वेळची आहे.

फल—प्रश्न अत्यंत उत्कृष्ट असून कार्य सिद्ध होईल.

(७) बरुन कुबेर सुरेस समीरा । रन सनमुख धरि काहु न धीरा ॥

स्थान—चौपाई लंकाकांडातील असून रावणाच्या मृत्यूनंतर मंदोदरीच्या विलाप प्रसंगाची आहे.

फल—कार्य सिद्ध होण्यात संदेह (अडथळा) आहे.

८) सुफल मनोरथ होहुँ तुम्हारे । रामु लखनु सुनि भए सुखारे ॥


स्थान—ही चौपाई बालकांडातील असून बागेतून फुले आणल्याच्यानंतर विश्वामित्रांनी आशीर्वाद दिला आहे.

फल—प्रश्न उत्तम आहे. कार्य सिद्धी होईल.

श्रीरामचरितमानस पारायण विधी

श्रीरामचरितमानसाच्या विध्युक्त पारायणाचे वेदोक्त, पुराणोक्त व परंपरासंमत असे तीन प्रकार असून मास नवाह, त्रिदिनात्मक व एकाह अशी नऊ असेही प्रकार आहेत. याशिवाय वैयक्तिक, सामूहिक कामनिक [मानस माहात्म्यात संपुटादि माहिती आहे] व भगवत्प्रीत्यर्थ निष्काम असे पाठांचे प्रकार आहेत.

वेदोक्तः—श्रीसत्यनारायणाच्या पूजेप्रमाणे पूर्वतयारी करावी. पीठावरील ताम्हणात खाली दाखवलेल्या आकृतीप्रमाणे अष्टदल कमलात सुपाऱ्या ठेवाव्यात.



आवाहनाचे मंत्र पुढे दिले आहेत. पुरुषसूक्तयुक्त षोडशोपचार अभिषेकास रुद्र, पवमान अगर पुरुषसूक्त पीठदेवता. आवाहनानंतर प्रधानदेवतेचे ध्यान करावे. पीठावर उजव्या बाजूस श्रीगणेश व डाव्या बाजूस सुराःसिद्धाः साधकाः [तांदुळावर सुपारी]. पाठारंभापूर्वी श्रीरामायणस्वरूपी रामचंद्रदेवतेचे पूजन व नित्यपठणाप्रमाणे श्रीहनुमंताचे स्वतंत्र आसन व आवाहन. बुक्का लावून सर्वांनी साष्टांग नमस्कार करावेत.

पारायण विधीः—आचम्य प्राणानायम्य देशकालौ संकीर्त्य संकल्पः —अस्य श्रीरामचरितमानस रामायणस्य नवाह [त्र्याह इ. असेल तसे] पारायणागभूतं श्रीरामचंद्राद्यावाहित देवतापूजनं करिष्ये । तदंग निर्विघ्नतासिध्यर्थं श्रीगणपति पूजनं करिष्ये । आदौ कलश शंख-घंटादीन् पूजयेत् । आत्मानं च प्रोक्षेत् !

अथ आवाहनमंत्राः

शं शत्रुघ्न नमस्तुभ्यमिहागच्छ सहप्रिय । पीठेऽस्मिन्नुपविश्येदं पूजनं स्वीकुरुष्व मे ॥

श्री सपत्नीकाय शत्रुघ्नाय नमः ।

गं गंगादास नमस्तुभ्यं मानसार्थप्रदायक । पीठेऽस्मिन्नुपविश्येदं मम पूजां गृहाण च ॥

श्रीवाबा गंगादासाय नमः ।

भं भरत नमस्तुभ्यमिहागच्छ सहप्रिय । पीठेऽस्मिन्नुपविश्येदं पूजनं स्वीकुरुष्व मे ॥

श्रीसपत्नीकाय भरताय नमः ।

वाँ वाल्मीक नमस्तुभ्यमिहागच्छ शुभप्रद । पीठेऽस्मिन्नुपविश्येदं पूजनं स्वीकुरुष्व मे ॥

श्रीवाल्मीकाय नमः ।

हं हनूमन्नमस्तुभ्यमिहागच्छ कृपानिधे । पीठस्य पश्चिमे भागे तिष्ठ पूजां गृहाण मे ॥

श्रीहनूमते नमः ।

गौं गौरीपते नमस्तुभ्यमिहागच्छ महेश्वर । पीठेऽस्मिन्नुपविश्येदं पूजनं स्वीकुरुष्व मे ॥

श्रीगौरीपतये नमः ।

लं लक्ष्मण नमस्तुभ्य मिहागच्छ सहप्रिय । याम्य भागे समातिष्ठ पूजनं संगृहाण मे ॥

श्रीसपत्नीकाय लक्ष्मणाय नमः ।

तुं तुलसीक नमस्तुभ्यमिहागच्छ शुचिप्रद । पीठेऽस्मिन्नुपविश्येदं पूजनं प्रतिगृह्यताम् ॥

श्रीतुलसीदासाय नमः

अथ प्रधान पूजा च कर्तव्या विधिपूर्वकम् ।
पुष्पांजलिं गृहीत्वा तु ध्यानं कुर्यात् परस्य च ॥
रक्तांभोजदलाभिरामनयनं पीताम्बरालंकृतम् ।
श्यामाङ्गं द्विभुजं प्रसन्नवदनं श्रीसीतया शोभितम् ॥
कारुण्यामृतसागरं प्रियगणैर्भ्रात्रादिभिर्भावितम् ।
वन्दे विष्णुशिवादिसेव्यमनिशं भक्तेष्टसिद्धिप्रदम् ॥
आगच्छ जानकीनाथ जानक्या सह राघव ।
गृहाण मम पूजां च वायुपुत्रादिभिर्युतः ॥

— इत्यावाहनम् —

सुवर्णरचितं राम दिव्यास्तरणशोभितम् ।
आसनं हि मया दत्तं गृहाण मणिचित्रितम् ॥
इति षोडशोपचारैः पूजयेत् ।

पाठारंभी न्यासपूर्व संकल्पः—अस्य श्रीरामचरित्रमानस रामायणस्य श्रीशिव काकभुशुंडी याज्ञवल्क्य गोस्वामी तुलसीदासा ऋषयः । श्रीसीतारामो देवता । श्रीरामनामबीजं । भवरोगहरी भक्तिः शक्तिः । मम (अस्माकं) नियंत्रिताशेष विघ्नतया श्रीसीताराम प्रीतिपूर्वकं (अधर्मविनाशार्थं धर्माभिवृद्धयर्थं च) सामूहिक नवाह पाठांगभूतं प्रथम (द्वितीय इ.) दिनस्य पठणमहंकरिष्ये । तदंगन्यासांश्च करिष्ये ।

अथ करन्यासः ।

जग मंगल गुन ग्राम राम के। दानि मुकुति धन धरम धाम के।
अङ्गुष्ठाभ्यां नमः ।

राम राम कहि जे जमुहाहीं । तिन्हहि न पापपुंज समुहाहीं ॥
तर्जनीभ्यां नमः ।

राम सकल नामन्ह ते अधिका । होउ नाथ अघ खग गन बधिका ॥
मध्यमाभ्यां नमः ।

उमा दारु जोषित की नाईं । सबहि नचावत रामु गोसाईं ॥
अनामिकाभ्यां नमः ।

सन्मुख होइ जीव मोहि जबहीं । जन्म कोटि अघ नासहिं तबहीं ॥
कनिष्ठिकाभ्यां नमः ।

मामभिरक्षय रघुकुलनायक । धृत वर चाप रुचिर कर सायक ॥
करतलकरपृष्ठाभ्यां नमः ।

इति करन्यासः

अथ हृदयादिन्यासः ।

जग मंगल गुन ग्राम राम के । दानि मुकुति धन धरम धाम के ॥
हृदयाय नमः ।

राम राम कहि जे जमुहाही । तिन्हहि न पापपुंज समुहाहीं ॥
शिरसे स्वाहा ।

राम सकल नामन्ह ते अधिका । होउ नाथ अघ खग गन बधिका ॥
शिखायै वषट् ।

उमा दारु जोषित की नाईं । सबहि नचावत रामु गोसाईं ॥
कवचाय हुम् ।

सन्मुख होइ जीव मोहि जबहीं । जन्म कोटि अघ नासहिं तबहीं ॥
नेत्राभ्यां वौषट् ।

मामभिरक्षय रघुकुलनायक । धृत वर चाप रुचिर कर सायक ॥
अस्त्राय फट् ।

इति हृदयादिन्यासः ।

अथ ध्यानम् ।

मामवलोकय पंकजलोचन । कृपा बिलोकनि सोच बिमोचन ॥
नील तामरस स्याम काम अरि । हृदय कंज मकरंद मधुप हरि ॥
जातुधान बरूथ बल भंजन । मुनि सज्जन रंजन अघ गंजन ॥
भूसुर ससि नव वृन्द बलाहक । असदन सदन दीन जन गाहक ॥
भुजबल बिपुल भार महि खंडित । खर दूषन बिराध बध पंडित ॥
रावनारि सुखरूप भूपवर । जय दसरथ कुल कुमुद सुधाकर ॥
सुजस पुरान बिदित निगमागम । गावत सुरमुनि संत समागम ॥
कारुनीक ब्यलीक मद खंडन । सब बिधि कुसल कोसला मंडन ॥
कलिमल मथन नाम ममताहन । तुलसिदास प्रभु पाहि प्रनत जन ॥

इति ध्यानम् ।

[सूचना—व्र. भू. श्रीस्वामींच्या समवृत्त समश्लोकी मराठी मानसावरून महाराष्ट्रात अनेक ठिकाणी पारायणे वरील चौपायांचा मराठी अनुवाद घेऊन चालतात. संकल्पात 'गोस्वामी तुलसीदास प्रज्ञानानंद ऋषयः' एवढे अधिक घेतात.]

उत्तर हिंदुस्थानात कार्तिक, माघ व चैत्र अशी तीन नवाह पारायणे करतात. महाराष्ट्रात आश्विन व चैत्र नवरात्रात अशी दोन करतात. उत्तर हिंदुस्थानात श्रीरामायणपूजन करून अग्नीमध्ये 'ॐ नमो नारायणाय स्वाहा' म्हणून तीन आहुती तूप-तिळांच्या देतात व नंतर पठण करतात. हाच **परंपरागत सामान्य सर्वांचा पारायण विधी** होय.

पुराणोक्त—श्रीसीतारामाभ्यां नमः । श्रीरामचंद्राय नमः । श्रीरामभद्राय नमः । इति मंत्रत्रितयेन आचमनं कुर्यात् । श्रीयुगल बीजमंत्रेण प्राणायामं कुर्यात् ।

याशिवाय पूजन-आवाहन न्यास इ. सर्व मानसांतील वेदोक्ताप्रमाणे घ्यावे (षोडशोपचार पूजा पुराणोक्त मंत्रांनी). उत्तर हिंदुस्थानी पद्धतीत सात पीठ देवता व आठवी प्रधान देवता. श्रीस्वामींच्या मार्गदर्शनाने महाराष्ट्रात जी मानसाची गेल्या १२–१५ वर्षांत शेकडो पारायणे झाली त्यांत गोस्वामींच्या परंपरेतील अत्यंत थोर अशा अधिकारसंपन्न श्री बाबा गंगादासांचे नाव आठवे समाविष्ट केले आहे. नवाहपारायणात नऊ दिवस एका जागी देवता स्थापन नंदादीप—नामपहारा इ. घेऊन करतात अगर नित्य उत्तरपूजा करून देवता विसर्जन करूनही करतात. उत्तर हिंदुस्थानी पद्धतीने श्रीरामाचा फोटो—त्याची व रामायणाची पूजा हनुमंताचे आवाहन व पाठ असाहि सामान्यजनांचा परिपाठ आहे. सोयीप्रमाणे करावे. शेवटी आरती, मंत्रपुष्प हनूमंतांना निरोप व प्रसाद.

अनुक्रमणिका

बालकांड (प्रथम सोपान)

अयोध्याकांड (द्वितीय सोपान)

अरण्यकांड (तृतीय सोपान)




सार्थ श्रीतुलसीरामायण



'दादा!
हा पहा
तो ग्रंथराज.'

—प्रकाशक

श्रीराम पंचायतन



॥ श्रीगणेशाय नमः ॥

॥ श्रीराम समर्थ ॥

सार्थ श्रीतुलसी रामायण

श्रीरामचरितमानस



॥ मंगलाचरण ॥

श्रीगणेश-शारदा-वंदन

श्रीरामनामाचा महिमा जाणणारे, प्रथमपूज्य असलेले, विघ्नांचा परिहार करणारे जे गणनायक त्यांना व रस देणाऱ्या हंसारूढ सरस्वतीला मी वंदन करतो.

श्रीहनुमंत-वंदन

श्रेष्ठ रामभक्तांनाही वंद्य, रघुनाथभक्तांचे संकट निवारणारा, शरणागतांना अभय देणारा, धैर्यशाली, प्रत्यक्ष श्रीरघुवीरांनीही ज्याची स्तुती केली अशा महावीर हनुमंताला मी नमस्कार करतो.

श्रीप्रभु रामचंद्र-वंदन

शरदृऋतूतील आकाशाप्रमाणे ज्याचा शोभायमान नीलवर्ण आहे, तसेच शारदीय सुंदर नीलकमलाप्रमाणे ज्याचे रमणीय मुखकमल आहे, विधिहरांनीही ज्याला वंदनीय मानले आहे, आद्य कवी श्रीवाल्मीकींच्या विमलवाणीने ज्याचे यशोगान केले आहे, अशा प्रभू श्रीरामचंद्राला मी वंदन करतो.

श्रीतुलसीदास-वंदन

आद्य कवींचा अवतार, संसार दुःखातून मुक्त करणाऱ्या श्रीरामचरिताचा विस्तार करणारे आणि कामारी श्रीशंकरांचे लाडके भक्त, अशा श्रीतुलसीदासांना मी साष्टांग नमस्कार करतो.

श्री बाबा गंगादास-वंदन

ज्यांचा आशीर्वादमेघ मानसगूढार्थाची संततधार वृष्टी करून आमच्या हृदयसरितेला सारखा पूर आणतो, त्या श्री बाबा गंगादासांना मी भक्तिप्रेमाने नमस्कार करतो.

श्रीसद्गुरू वासुदेवानंद-नमन

ज्यांच्या चरणकमलातील रजःकणांनी मस्तक पवित्र झाल्यावर मानव मातेच्या जठराला पुनः पाहातच नाही, जे स्वरूपतः अजन्मा, सर्वशक्तिमान्, अनंतबोध व शरणागताला अभय देणारे आहेत अशा श्रीसद्गुरू वासुदेवानंदांना माझे नित्य नमन असो.

बालकांड

प्रथम सोपान

श्लोक

वर्णानामर्थसंघानां रसानां छन्दसामपि ।
मङ्गलानां च कर्तारौ वन्दे वाणीविनायकौ ॥ १ ॥
भवानीशङ्करौ वन्दे श्रद्धाविश्वासरूपिणौ ।
याभ्यां विना न पश्यन्ति सिद्धाः स्वान्तःस्थमीश्वरम् ॥ २ ॥
वन्दे बोधमयं नित्यं गुरुं शङ्कररूपिणम् ।
यमाश्रितो हि वक्रोऽपि चन्द्रः सर्वत्र वन्द्यते ॥ ३ ॥
सीतारामगुणग्रामपुण्यारण्यविहारिणौ ।
वन्दे विशुद्धविज्ञानौ कवीश्वरकपीश्वरौ ॥ ४ ॥
उद्भवस्थितिसंहारकारिणीं क्लेशहारिणीम्
सर्वश्रेयस्करीं सीतां नतोऽहं रामवल्लभाम् ॥ ५ ॥
यन्मायावशवर्ति विश्वमखिलं ब्रह्मादिदेवासुरा यत्सत्त्वादमृषैव भाति सकलं रज्जौ यथाहेर्भ्रमः ।
यत्पादप्लवमेकमेव हि भवाम्भोधेस्तितीर्षावतां वन्देऽहं तमशेषकारणपरं रामाख्यमीशं हरिम् ।६।

श्रीतुलसीदासांचे मंगलाचरण

वर्ण, अर्थांचा संघ, रस, छंद आणि मंगलांचे कर्ते असे वाणी व विनायक यांना मी वंदन करतो १.

श्रद्धा, विश्वास हेच ज्यांचे रूप आहे, अशा भवानी-शंकरांना मी वंदन करतो; कारण या दोहोंवाचून हृदयस्थ ईश्वराला सिद्धसुद्धा पाहू शकत नाहीत २.

शंकरस्वरूपी ज्ञानमय गुरुमहाराजांना मी नित्य वंदन करतो. यांचा आश्रय केल्यामुळेच वाकडा असूनही चंद्राला सर्वत्र वंदन करतात ३.

सीतारामांच्या गुणसमुदायरूप पुण्यारण्यात विहार करण्याचा स्वभाव असलेले व विशुद्ध विज्ञानसंपन्न अशा कवीश्वर वाल्मीकी व कपीश्वर हनुमंत यांना मी वंदन करतो ४.

विश्वाची उत्पत्ती, स्थिती व लय करणाऱ्या, क्लेशाचे हरण करून सर्व प्रकारचे कल्याण करणाऱ्या व श्रीरामप्रभूला प्रिय असणाऱ्या अशा सीतेच्या चरणी माझे नमन असो ५.

ब्रह्मादि देव व असुर यांच्यासह सर्व विश्व ज्याच्या मायेला वश होऊन राहिले आहे, रज्जूच्या ठिकाणी सर्पभ्रम व्हावा तसे ज्याच्या अस्तित्वामुळेच हे सर्व मूळचे खोटे दृश्य जगत् खरेच असल्यासारखे वाटते; भवसागरातून तरून जाण्याची इच्छा करणारांना ज्याचे चरण हीच एकमात्र नौका आहे आणि जो सर्व कारणांचे श्रेष्ठ आदिकारण आहे अशा **राम** या नावाने संबोधिल्या जाणाऱ्या ईश्वर—हरीला मी वंदन करतो ६.

नानापुराणनिगमागमसम्मतं यद् रामायणे निगदितं क्वचिदन्यतोऽपि ।
स्वान्तःसुखाय तुलसी रघुनाथगाथाभाषानिबन्धमतिमञ्जुलमातनोति ॥ ७ ॥

सो०—जो सुमिरत सिधि होइ गननायक करिबर बदन ।
करउ अनुग्रह सोइ बुद्धि रासि सुभ गुन सदन ॥ १ ॥
मूक होइ बाचाल पंगु चढ़इ गिरिबर गहन ।
जासु कृपाँ सो दयाल द्रवउ सकल कलिमल दहन ॥ २ ॥
नील सरोरुह स्याम तरुन अरुन बारिज नयन ।
करउ सो मम उर धाम सदा छीरसागर सयन ॥ ३ ॥
कुंद इंदु सम देह उमा रमन करुना अयन ।
जाहि दीन पर नेउ करउ कृपा मर्दन मयन ॥ ४ ॥
बंदउँ गुरु पद कंज कृपा सिंधु नररूप हर ।
महामोह तम पुंज जासु बचन रबि कर निकर ॥ ५ ॥

चौ०— बंदउँ गुरु पद पदुम परागा । सुरुचि सुबास सरस अनुरागा ॥
अमिअ मूरिमय चूरन चारू । समन सकल भव रुज परिवारू ॥
सुकृति संभु तन बिमल बिभूति । मंजुल मंगल मोद प्रसूती ॥

अनेक पुराणे, वेद व तंत्रशास्त्रें यांना संमत, त्याचप्रमाणे अनेक रामायणांत जे वर्णन आले व क्वचित अन्यत्रही जे श्रीरघुनाथ-चरित्र गाइले आहे ते—आपल्या हृदयाला सुख व्हावे म्हणून—तुलसीदास अत्यंत मनोहर अशी भाषेची रचना करून विस्तृत करीत आहेत ७.

ग्रंथारंभीचे प्राकृत नमन

ज्याच्या केवळ स्मरणाने सर्व कार्ये सिद्ध होतात, जे गणांचे नायक आहेत, ज्यांचे मुख सुंदर हत्तीच्या मुखासारखे आहे, बुद्धिमत्तेचे आगर असून शुभ गुणांचे माहेर असणारे असे श्री मंगलमूर्ती माझ्यावर कृपा करोत १.

मुक्याला वाचा फुटते व पांगळा कठीण अशा पर्वतावर चढून जातो, असा ज्याच्या कृपेचा प्रभाव आहे, आणि कलियुगामुळे उत्पन्न होणाऱ्या सर्व पातकांचा नाश करणारा असा जो दयासागर प्रभू, त्याला माझी करुणा येवो २.

नीलवर्णाच्या ताज्या कमळाप्रमाणे ज्याचा रसरशीत शामवर्ण आहे, टवटवीत लालसर कमळाप्रमाणे ज्याचे डोळे आरक्त आहेत आणि क्षीरसागरामध्यें सदोदित शयन करणारा असा भगवान माझ्या हृदयांत वास्तव्य करो, ३.

कुन्दाचे फूल व चंद्र यांच्यासारखा धवल देह असणारे, करुणेचे आश्रयस्थान, मदनाचा विनाश करणारे व दीनावर स्नेह करणारे उमारमण माझ्यावर कृपा करोत ४.

सूर्यकिरणांच्या समूहाप्रमाणे ज्यांची वचने महामोहरूपी अंधःकारराशीचा नाश करतात, जे नररूपाने साक्षात् शंकर आहेत, अशा करुणासागर सद्‌गुरूंच्या चरणकमली माझे नमन असो ५.

श्रीगुरुवंदना

गुरूंच्या चरणरूपी कमलातील परागांना मी वन्दन करतो. यांत सुरुचिरूप सुगंध असून ते अनुराग (प्रेम) रसाने भरले आहेत. श्रीसद्‌गुरूंच्या चरणांची धूळ ही धूळ नसून हे अमृतमुळीचेच फार सुंदर चूर्ण आहे. ते भवरोगाच्या सर्व परिवाराचे शमन करते. शरीराला लागणारी ही धूळ सुकृतिरूपी साक्षात शिवाच्या अंगावरील निर्मल विभूती आहे. सौंदर्य, कल्याण व आनंद यांची ती जननी आहे. भक्तांचे हृदय



जन मन मंजु मुकुर मल हरनी । किएँ तिलक गुन गन बस करनी ॥
श्रीगुर पद नख मनि गन जोती । सुमिरत दिब्य दृष्टि हियँ होती ॥
दलन मोह तम सो सप्रकासू । बड़े भाग उर आवइ जासू ॥
उघरहिं बिमल बिलोचन ही के । मिटहिं दोष दुख भव रजनी के ॥
सूझहिं राम चरित मनि मानिक । गुपुत प्रगट जहँ जो जेहि खानिक ॥

दो०— जथा सुअंजन अंजि दृग साधक सिद्ध सुजान ।
कौतुक देखत सैल बन भूतल भूरि निधान ॥ १ ॥

चौ०— गुरु पद रज मृदु मंजुल अंजन । नयन अमिअ दृग दोष बिभंजन ॥
तेहिं करि बिमल बिबेक बिलोचन । बरनउँ राम चरित भव मोचन ॥
बंदउँ प्रथम महीसुर चरना । मोह जनित संसय सब हरना ॥
सुजन समाज सकल गुन खानी । करउँ प्रनाम सप्रेम सुबानी ॥
साधु चरित सुभ चरित कपासू । निरस बिसद गुनमय फल जासू ॥
जो सहि दुख परछिद्र दुरावा । बंदनीय जेहिं जग जस पावा ॥

हा एक सुंदर आरसा, या रजःकणांच्या साह्याने त्यावरील मल दूर होतो. यांचा तिलक मस्तकावर धारण करताच सर्व सद्‌गुणांची प्राप्ती होते.

श्रीगुरुचरणनखांची प्रभा ही रत्न प्रकाशासारखी आहे. त्या ज्योतीचे स्मरण करताच हृदयात दिव्य दृष्टी उत्पन्न होते. या तेजाने अज्ञानांधःकाराचा पूर्ण नाश होतो. असा प्रकाश ज्याच्या हृदयात पडतो, तो पुरुष मोठा भाग्यवान् होय.

याचे कारण असे की, एकदा अंतःकरणात हा प्रकाश पडला की, हृदयाचे सर्व निर्मल नेत्र उघडतात. संसाररूपी रात्रीतील सर्व दुःखे व दोष नाश पावतात आणि रामचरित्ररूपी खाणीतील गुप्त व प्रकट असणारे सर्व हिरे व रत्ने स्पष्ट दिसू लागतात.

सिद्धांजन डोळ्यांत घातल्यावर जसा साधक सिद्ध व सुजाण होतो व त्याला सहज लीलेने* वनात, पर्वतावर किंवा जमिनीत असलेले धनाचे गुप्त ठेवे दिसतात १. तसेच श्री सद्‌गुरूंचे चरणरज हे 'नयनामृत' नावाचे अंजन (काजळ) अत्यंत मऊ व सुखावह आहे. त्याने दृष्टीतील सर्व दोष नाहीसे होतात; म्हणून या अंजनाने माझे विवेकनेत्र स्वच्छ करून संसारदुःख नष्ट करणाऱ्या श्रीरामचरित्राचे मी वर्णन करीन.

त्यासाठी मोहामुळे उत्पन्न होणाऱ्या सर्व संशयांचे निरसन करणाऱ्या विप्रचरणांना मी प्रथम वन्दन करतो.

सर्व सद्‌गुणांचे आगर असणाऱ्या सन्मान्य सज्जनांच्या समाजाला मी प्रेमपुरःसर गोड वाणीने प्रणाम करतो. संतचरित्र हे कापसाच्या जीवनासारखे शुभ्र असते. त्याचे फळ नीरस, उज्ज्वल व गुणमय असते. ते स्वतः अनेक प्रकारची दुःखे भोगून दुसऱ्यांच्या गोपनीय भागांना (उघड न करण्यालायक्या दोषांना) झाकते; आणि याच कारणाकरिता सत्पुरुष या जगात वंदनीय अशी कीर्ती मिळवतात.+

*वन=इतिहास, पर्वत=वेदपुराणे, सुजाण=ज्ञान-वैराग्यसंपन्न.

+ कापसाचे बोंड=१ नीरस. २. शुभ्र. ३. गुण-तंतुमय ४. अनेक कष्ट सोसून दोरा वस्त्ररूपात. छिद्र व शरीर आच्छादन संतचरित्र=१. विरक्त. २. अज्ञान-पाप मलरहित. ३. सद्‌गुणसंपन्न. ४. स्वतः दुःख सोसून दुसऱ्यांचे दोष झाकतात.



मुद मंगलमय संत समाजू । जो जग जंगम तीरथराजू ॥
राम भक्ति जहँ सुरसरि धारा । सरसइ ब्रह्म बिचार प्रचारा ॥
बिधि निषेधमय कलि मल हरनी । करम कथा रबिनंदनि बरनी ॥
हरि हर कथा बिराजति बेनी । सुनत सकल मुद मंगल देनी ॥
बटु बिस्वास अचल निज धरमा । तीरथराज समाज सुकरमा ॥
सबहि सुलभ सब दिन सब देसा । सेवत सादर समन कलेसा ॥
अकथ अलौकिक तीरथराऊ । देइ सद्य फल प्रगट प्रभाऊ ॥
दो०— सुनि समुझहिं जन मुदित मन मज्जहिं अति अनुराग ।
लहहिं चारि फल अछत तनु साधु समाज प्रयाग ॥ २ ॥
चौ०— मज्जन फल पेखिअ ततकाला । काक होहिं पिक बकउ मराला ॥
सुनि आचरज करै जनि कोई । सतसंगति महिमा नहिं गोई ॥
बालमीक नारद घटजोनी । निज निज मुखनि कही निज होनी ॥
जलचर थलचर नभचर नाना । जे जड़ चेतन जीव जहाना ॥
मति कीरति गति भूति भलाई । जब जेहिं जतन जहाँ जेहिं पाई ॥
सो जानब सतसंग प्रभाऊ । लोकहुँ बेद न आन उपाऊ ॥

फिरते प्रयागक्षेत्र

अशा संतांचा समाज म्हणजे कल्याण व सात्विक आनंद यांनी भरलेले एक जागतिक फिरते प्रयाग क्षेत्रच होय! येथे रामभक्तिरूपी भागीरथी अखंड वाहात असते. ब्रह्मविचाराचा प्रचार ही गुप्त सरस्वती. कलिमलाचे हरण करणारी विधिनिषेधमय आचार-धर्मचर्चा हीच येथील यमुना नदी! हरिहरकथा हाच मनोहर त्रिवेणी-संगम या कथेचे श्रवण केल्याने सर्व प्रकारच्या कल्याणमय आनंदाची प्राप्ती होते. स्वधर्मावरील अढळ विश्वास हा येथील अक्षय वट! सत्कर्मे हा या तीर्थराजाचा सर्व साजसरंजाम समजावा. हे जंगम प्रयाग क्षेत्र सर्वकाळी सर्व स्थळी सर्वांना सुलभ असते. याचे सादर सेवन केले म्हणजे सर्व क्लेशांचे निवारण होते. असा हा तीर्थराज अलौकिक असून त्यांचे किती वर्णन केले तरी ते अपुरेच होणार! त्याचे फल तत्काळ मिळते, हे कोणासही प्रत्यक्ष अनुभवास येणारे आहे.

जो मनुष्य या संत समाजरूपी जंगम प्रयाग क्षेत्राचा प्रभाव, प्रसन्न अंतःकरणाने ऐकून व समजून घेतो; अत्यंत प्रेमादराने यांत अवगाहन (सेवन) करतो, त्याला याच देही धर्म-अर्थ-काम-मोक्ष स्वरूपी चारी पुरुषार्थांचा लाभ होतो २.

या प्रयाग क्षेत्रातील स्नानाचे पुण्य तत्काळ कसे मिळते पाहा. यात स्नान करणारे बगळे हंस होतात व कावळे कोकिळ बनतात. हे ऐकून आश्चर्यचकित होण्याचे कारण नाही! संतांच्या संगतीचा महिमा का दडून राहिला आहे? वाल्मीकी, नारद व अगस्ती ऋषींनी संतसंगतीचा लाभ आपणास कसा तत्काळ मिळाला हे स्वतःच्या मुखानेच सांगितले आहे.

पृथ्वी, पाणी व आकाश या पैकी कोणतेही निवासस्थान असणाऱ्या जड-चेतन प्राण्यांपैकी ज्याला जेव्हा, जेथून, जेवढी प्रयत्नपूर्वक सुमती, कीर्ती, सद्गती, ऐश्वर्य, मोठेपणा इत्यादींची प्राप्ती झाली आहे तो सर्व मूलतः सत्संगतीचा प्रभाव आहे. या सर्व गोष्टींच्या प्राप्तीस वैदिक आणि लौकिक अन्य साधनच नाही.



बिनु सतसंग बिबेक न होई । राम कृपा बिनु सुलभ न सोई ॥
सतसंगत मुद मंगल मूला । सोइ फल सिधि सब साधन फूला ॥
सठ सुधरहिं सतसंगति पाई । पारस परस कुधात सुहाई ॥
बिधि बस सुजन कुसंगत परहीं । फनि मनि सम निज गुन अनुसरहीं ॥
बिधि हरि हर कबि कोबिद बानी । कहत साधु महिमा सकुचानी ॥
सो मो सन कहि जात न कैसें । साक बनिक मनि गुन गन जैसें ॥

दो०— बंदउँ संत समान चित हित अनहित नहिं कोइ ।
अंजलि गत सुभ सुमन जिमि सम सुगंध कर दोइ॥ ३ (क) ॥

संत सरल चित जगत हित जानि सुभाउ सनेहु ।
बालबिनय सुनि करि कृपा राम चरन रति देहु ॥ ३ (ख) ॥

चौ०— बहुरि बंदि खल गन सतिभाएँ । जे बिनु काज दाहिनेहु बाएँ ॥
पर हित हानि लाभ जिन्ह केरें । उजरें हरष बिषाद बसेरें ॥

सत्संगाव्याचून विवेक व ज्ञान प्राप्त होत नाही आणि रामकृपेशिवाय सत्संग सुलभ होत नाही. आनंद व मांगल्यवृक्षाचे मूळ सत्संगती असून प्रत्यक्ष संत संगतीचा लाभ हेच फळ व सिद्धी. त्यासाठी करावी लागणारी सर्व साधने ही त्या वृक्षाची फुले आहेत.

सत्संगानें मूर्ख सुधारतात, परीस लागताच अत्यंत हीन अशा लोखंडासारख्या धातूचेही शंभर नंबरी सोने होतेच ना?

दैवयोगाने सज्जन कुसंगतीत पडला तरी, विषारी नागाच्या सान्निध्यात राहून विषहरण करण्याचा आपला गुण जसा नागाच्या मस्तकातील मणी सोडत नाही त्याप्रमाणें सज्जन कुसंगतीतही स्वतःचे शील सांभाळतात.

एवंच, ब्रह्मा, विष्णू, शंकर, कवी, शहाणे इतकेच काय, प्रत्यक्ष सरस्वतीसुद्धा जेथे साधूंच्या गुणांचे साकल्याने वर्णन करण्यात संकोच पावतात तेथे माझी काय कथा? सामान्य भाजीविक्याने रत्नपरीक्षा करण्याचा उपद्व्याप करण्यासारखाच माझा हा उद्योग आहे!

शत्रुमित्रभाव सोडून ज्यांच्या मनाची वृत्ती सर्वत्र सारखी झाली आहे, अशा संतांना माझा नमस्कार असो. ज्याप्रमाणे ओंजळीतील सुवासिक फुले, हा हात डावा आहे की उजवा आहे हा फरक न पाहता दोन्ही हात सारखेच सुगंधित करतात, तशीच संतांची सर्वत्र सारखी कृती असते ३ (क). म्हणून हे सज्जन हो! तुमचे सरल मन सर्व जगाचे हित साधण्यासाठी प्रेमाने भरलेले असते हे जाणून या बाळाची विनंती ऐका आणि आपला स्नेह व स्वभाव ध्यानी घेऊन कृपा करा आणि मला रामचरणी स्नेह द्या ३ (ख).

खलवंदन

या नंतर, संत वंदनाप्रमाणेच सद्भावनेने मी खलांना पुनः वंदन करतो. सरळपणाने स्वहित करणाराशीही हे काही कारण नसता प्रतिकूल वागतात. दुसऱ्यांना लाभ झाला की यांचा तोटा होतो आणि कोणाचेही नुकसान झाले की, यांना मोठा लाभ झाल्याचा आनंद! इत्यर्थ, लोकांच्या विनाशात यांना हर्ष व ते सुखाने नांदू लागले की यांना विषाद असा यांचा स्वभाव!

हरि हर जस राकेस राहु से पर अकाज भट सहसबाहु से ॥
जे पर दोष लखहिं सहसाखी । पर हित घृत जिन्ह के मन माखी ॥
तेज कृसानु रोष महिषेसा । अघ अवगुन धन धनी धनेसा ॥
उदय केत सम हित सब ही के । कुंभकरन सम सोवत नीके ॥
पर अकाजु लगि तनु परिहरहीं । जिमि हिम उपल कृषी दलि गरहीं ॥
बंदउँ खल जस सेष सरोषा । सहस बदन बरनइ पर दोषा ॥
पुनि प्रनवउँ पृथुराज समाना । पर अघ सुनइ सहस दस काना ॥
बहुरि सक्र सम बिनवउँ तेही । संतत सुरानीक हित जेही ॥
बचन बज्र जेहि सदा पिआरा । सहस नयन पर दोष निहारा ॥

दो०— उदासीन अरि मीत हित सुनत जरहिं खल रीति ।
जानि पानि जुग जोरि जन बिनती करइ सप्रीति ॥ ४ ॥

हरिहरांच्या कथारूपी पूर्ण चंद्राला हे राहूसारखे विघ्न आणणारे तर दुसऱ्यांचे अनहित करण्यात अगदी सहस्रबाहूप्रमाणे वीर ! दुसऱ्याचे दोष पाहण्याचे काम ते साक्षीदार बरोबर घेऊन लक्षपूर्वक करतात. यांचे मन परहितरूपी तुपातील जणू माशीच ! [निंद्याप्रमाणे स्वतःचा नाश करूनही दुसऱ्याच्या कामात व्यक्तिशः बिघाड करतात.] दुसऱ्यास त्रास देण्याच्या बाबतीत हे प्रत्यक्ष अग्नीच असून, रागावले म्हणजे महिषासुराचा अवतारच प्रकट होतो. पाप व दुर्गुणरूप धनाचे ते कुबेर असतात. यांचा उदय झाला म्हणजे सर्वांचे अनहित साधणारा धूमकेतूच उगवतो ! म्हणून कुंभकर्णाप्रमाणे अशा खलांना दीर्घकाळ झोप लागेल तर फार बरे होईल.

गारा ज्याप्रमाणे पिकाचा नाश करून स्वतःही वितळून जातात, त्याचप्रमाणे प्रसंगी स्वतःचा नाश करून घेऊनही दुसऱ्याला अपकार करण्यास ते संघशः तयार असतात. अशा दुष्टांना सहस्रमुखाच्या शेषाप्रमाणे भयंकर समजून मी प्रणाम करतो. याचे कारण, तळव्याची आग मस्तकास जाऊन आपल्या हजारो तोंडांनी ते परदोषांची चर्चा करीत असतात.

पृथुराजाप्रमाणेच यांना पुनः नमस्कार; कारण त्याने भगवंताच्या यशाचे श्रवण करण्यासाठी दहा हजार कान असावेत, असा वर मागितला; त्याचप्रमाणे हे खलसुद्धा आपल्या शेकडो कर्णांनी दुसऱ्याच्या पापाचे श्रवण करीत असतात !

देवेंद्राप्रमाणे पुनः या खलांना वंदन. दोघेही सुरानीक आहेत.* इंद्राला वज्र प्रिय असते तर खलांना दुष्ट भाषणरूपी वज्र फार प्रिय असते. त्याला सहस्राक्ष आहेत, तर हे खलसुद्धा आपल्या हजारो डोळ्यांनी दुसऱ्याचे दोषच तेवढे टिपण्यात पूर्ण पटाईत असतात !

दुष्टांची अशी रीत असते की, उदासीन शत्रू अगर मित्र कोणीही असो, त्याचे हित होत आहे असे कानावर पडताच यांच्या अंगाचा अगदी तिळपापड होतो. हाच त्यांचा स्वभाव जाणून या दासाने दोन हात जोडून त्यांना सप्रेम विनंती केली आहे. ४

*सुरा=मदिरा—नीक=हितकर. किंवा सुरा+अनीक=मायेचे सैन्य खलांना प्रिय, सुर+अनीक=देवांचे सैन्य इंद्राला प्रिय.



चौ०– मैं अपनी दिसि कीन्ह निहोरा । तिन्ह निज ओर न लाउब भोरा ॥
बायस पलिअहिं अति अनुरागा । होहिं निरामिष कबहुँ कि कागा ॥
बंदउँ संत असज्जन चरना । दुखप्रद उभय बीच कछु बरना ॥
बिछुरत एक प्रान हरि लेहीं । मिलत एक दुख दारुन देहीं ॥
उपजहिं एक संग जग माहीं । जलज जोंक जिमि गुन बिलगाहीं ॥
सुधा सुरा सम साधु असाधू । जनक एक जग जलधि अगाधू ॥
भल अनभल निज निज करतूती । लहत सुजस अपलोक बिभूती ॥
सुधा सुधाकर सुरसरि साधू । गरल अनल कलिमल सरि ब्याधू ॥
गुन अवगुन जानत सब कोई । जो जेहि भाव नीक तेहि सोई ॥

दो०–भलो भलाइहि पै लहइ लहइ निचाइहि नीचु ॥
सुधा सराहिअ अमरताँ गरल सराहिअ मीचु ॥ ५ ॥

चौ०– खल अघ अगुन साधु गुण गाहा । उभय अपार उदधि अवगाहा ॥
तेहि तें कछु गुन दोष बखाने । संग्रह त्याग न बिनु पहिचाने ॥
भलेउ पोच सब बिधि उपजाए । गनि गुन दोष बेद बिलगाए ॥
कहहिं बेद इतिहास पुराना । बिधि प्रपंचु गुन अवगुन साना ॥

मी आपले कर्तव्य समजून त्यांना जरी अशी विनंती केली आहे तरी माझी अशी खात्री आहे की ते चुकूनसुद्धा माझ्या प्रार्थनेला किंमत देणार नाहीत. अहो! कावळ्यांना फार प्रेमाने शाकाहार देऊन पाळले म्हणून ते का कधी निर्मांस होणार ?

असे असूनही संत व असंत या दोघांच्याही चरणी मी वंदन करीत आहे याचे कारण दोघेही दुःख देतातच; तथापि त्यांतील साम्य व भेद पाहण्यासारखा आहे. संतांच्या संगतीचा वियोग होत असता प्राणान्ताप्रमाणे दुःख होते तर खलांच्या सहवासात अनंत यातना होतात.

दोघेही एकाच जगात जन्मतात. जळू व कमल एकत्र जलातच जन्मले तरी गुण वेगळे. जळू शरीरस्पर्श होताच रक्त शोषते तर कमळ दर्शन-स्पर्शाने सुखविते. समुद्रमंथनात अमृत व सुरा ही दोन्ही रत्ने एकाच सागरातून निघाली, त्याचप्रमाणे या अगाध जगत्सागरांतूनच साधू-असाधू ही माणके बाहेर पडतात! भले-सज्जन व बुरे-दुर्जन आपल्याही कर्म करतात व त्यांच्या चांगल्या-वाईट हेतूस अनुसरून ते वंद्य अगर निंद्य ठरतात.

अमृत, चंद्र, गंगा नदी व सज्जन एका बाजूस तर दुसऱ्या बाजूस विष, अग्नी, कर्मनाशा नदी व हिंसा करणारे दुर्जन; यांच्या गुणावगुणांची माहिती कोणास नाही? परंतु असे असूनही जगात ज्याला ज्याची आवड तिकडे तो खेचला जातो. सारांश, भल्याला भलेपणा आवडतो तर नीचाला नीच कर्म प्यारे वाटते! अमृतामुळे अमरत्व प्राप्ती होते म्हणून ते स्तुत्य; तर जहर विषाने मरण येत असताही त्याची वाहवासुद्धा जग करतेच!. ५

दुष्टांचे पातक व अवगुण आणि सज्जनांचे सुकृत व सद्गुण या दोन्हींचे वर्णनरूप अगाध व अपार असे सागरच आहेत. दोषांचा त्याग व सद्गुणांचे ग्रहण हे समजल्याशिवाय करणे शक्य नसते म्हणूनच यांच्या गुणदोषांचे थोडक्यात वर्णन केले.

चांगले व वाईट ही दोन्ही ब्रह्मदेवाचीच सृष्टी आहे. परंतु गुण व दोष यांचा विचार करून वेदांनी व शास्त्रांनी त्यांचे दोन चांगले-वाईट असे वेगवेगळे भाग करून ठेवले आहेत.

दुख सुख पाप पुन्य दिन राती । साधु असाधु सुजाति कुजाती ॥
दानव देव ऊँच अरु नीचू । अमिअ सुजीवनु माहुरु मीचू ॥
माया ब्रह्म जीव जगदीसा । लच्छि अलच्छि रंक अवनीसा ॥
कासी मग सुरसरि क्रमनासा । मरु मारव महिदेव गवासा ॥
सरग नरक अनुराग बिरागा । निगमागम गुन दोष बिभागा ॥

दो०—जड चेतन गुन दोषमय बिस्व कीन्ह करतार ।
संत हंस गुण गहहिं पय परिहरि बारि बिकार ॥ ६ ॥

चौ०— अस बिबेक जब देई बीधाता तब तजि दोष गुनहिं मनु राता ॥
काल सुभाउ करम बरिआईं । भलेउ प्रकृति बस चुकइ भलाईं ॥
सो सुधारि हरिजन जिमि लेहीं । दलि दुख दोष बिमल जसु देहीं ॥
खलउ करहिं भल पाइ सुसंगु । मिटइ न मलिन सुभाउ अभंगू ॥
लखि सुबेष जग बंचक जेऊ । बेष प्रताप पूजिअहिं तेऊ ॥
उघरहिं अंत न होइ निबाहू । कालनेमि जिमि रावन राहू ॥
किएहूँ कुबेषु साधु सनमानू । जिमि जग जामवंत हनुमानू ॥

वेदशास्त्रे व पुराणेतिहास या सर्वांनी एकमताने असे सांगितले आहे की, ही ब्रह्मसृष्टी गुणावगुणांच्या मिश्रणाने बनली आहे, उदाहरणार्थ. सुख-दुःख, पाप-पुण्य, दिवस-रात्र, साधू-असाधू, सुजाती-कुजाती, देव-दानव, उच्च-नीच, विष-अमृत, मरण व सुखी जीवन, माया-ब्रह्म, जीव-जगदीश्वर, संपत्ती-विपत्ती, राजा-रंक, काशी-मगध, भागीरथी-कर्मनाशा नदी, माळवा-मारवाड, ब्राह्मण-गोमांसभक्षक, स्वर्ग-नरक, आसक्ती-विरक्ती इ. सर्व पदार्थ ब्रह्मदेवाच्या सृष्टीतीलच असून वेदशास्त्रांनी त्यांचे गुणदोष स्वतंत्रपणाने दाखविले आहेत.

विधात्याने याप्रमाणे ही सृष्टी जड-चेतन व गुणदोष यांनी पूर्णपणे मिश्रित अशी निर्माण केली आहे, हे जाणून संतरूपी हंस सृष्टीतील गुण-दुग्ध घेऊन दोष-जलाचा त्याग करतात. ६

विधात्याच्या कृपेने ज्यावेळी हा नीरक्षीर विवेक प्राप्त होतो, तेव्हा मनुष्याचे मन दोषांचा त्याग करून गुणात रमू लागते.

काल, स्वभाव व प्रारब्ध कर्म यांच्या भोवऱ्यांत सापडून मायेच्या जोरामुळे, कधी कधी सज्जनांचाही सन्मार्ग सुटतो; परंतु ते जर भगवंतांचे अनन्य भक्त असतील, तर प्रभू त्यांची चूक सुधारून घेतात, तिकडे लक्ष देत नाहीत. इतकेच नव्हे तर त्यांचा दुःख-दोषांचा धोका टाळून त्यांच्या पदरी सुयश घालतात.

याच्या उलट क्वचित प्रसंगी सज्जनांच्या संगतीचा तात्पुरता परिणाम होऊन दुर्जनांच्याकडून सत्कर्म घडते, परंतु त्यामुळे त्यांचा अभंग नीच स्वभाव मुळीच सुधारत नाही. बुवाबाजी करण्यात पटाईत असणारे साधुवेश धारण करतात व त्या वेषाच्या जोरावर समाजात काही काळ पूज्य ठरतात. परंतु शेवटपर्यंत निभाव न लागता कालनेमि, रावण किंवा राहू यांच्याप्रमाणे त्यांचा मूळ दुष्ट स्वभाव केव्हातरी डोके वर काढतोच व केव्हातरी सर्व बेंड फुटून त्यांची फजिती होते.

तथापि हनुमान-जांबुवंतासारख्या स्वभावसिद्ध सज्जनांचा कुवेश असूनही त्यांच्या अंगच्या सद्गुणांचा प्रभाव प्रकट होऊन ते लोकात मान्यता पावतातच !



हानि कुसंग सुसंगति लाहू । लोकहुँ बेद बिदित सब काहू ॥
गगन चढ़इ रज पवन प्रसंगा । कीचहिं मिलइ नीच जल संगा ॥
साधु असाधु सदन सुक सारीं । सुमिरहि राम देहिं गनि गारीं ॥
धूम कुसंगति कारिख होई । लिखिअ पुरान मंजु मसि सोई ॥
सोइ जलअनल अनिल संघाता । होइ जलद जग जीवन दाता ॥

दो०— ग्रह भेषज जल पवन पट पाइ कुजोग सुजोग ।
होहिं कुबस्तु सुबस्तु जग लखहिं सुलच्छन लोग ॥ ७ (क) ॥
सम प्रकाश तम पाख दुहुँ नाम भेद बिधि कीन्ह ।
ससि सोषक पोषक समुझि जग जस अपजस दीन्ह ॥ ७ (ख) ॥
जड चेतनं जग जीव जत सकल राममय जानि ।
बंदउँ सब के पद कमल सदा जोरि जुग पानि ॥ ७ (ग) ॥
देव दनुज नर नाग खग प्रेत पितर गंधर्ब ।
बंदउँ किंनर रजनिचर कृपा करहु अब सर्ब ॥ ७ (घ) ॥

चौ०— आकर चारि लाख चौरासी । जाति जीव जल थल नभ बासी ॥
सीय राममय सब जग जानी । करउँ प्रनाम जोरि जुग पानी ॥

कुसंगतीने हानी होते व सत्संगतीने लाभ होतो. हा सर्व वेदशास्त्रपुराणांचा सिद्धान्त लोकांत सर्वसंमत आहे. वायूच्या संगतीने रजःकण आकाशात विहार करू शकतात, पण त्याच रजःकणांना नीचग (सखल भागात जाणाऱ्या—नीचाकडे जाणाऱ्या) पाण्याची संगती लागताच त्यांचा चिखल होतो. शुक-साळुंक्यांना सज्जनांची घरे मिळाली तर त्यांच्या मुखात रामनाम येऊ लागते, पण दुर्दैवाने जर खलांच्या संगतीत ते पक्षी पडले तर शेलक्या शिव्याच त्यांच्या तोंडातून निघणार! कुसंगतीने धुराची जळमटे बनतात, पण त्याच धुराचा सज्जनाने उपयोग केल्यास तो त्याचे काजळ करून शाईच्या उपयोगी आणतो व त्या शाईने पुराणा-सारखे श्रेष्ठ लेखन करू शकतो. इतकेच काय, पण त्या धुराला जर जल, अग्नी व वायूची संगत लाभली तर त्या धुराचा मेघ बनून तो जगाचा जीवनदाता बनतो!

ग्रह, औषधी, जल, वायू व वस्त्र या सर्वांना संगती मिळेल, त्याप्रमाणे त्यांचा सदुपयोग अगर दुरुपयोग होऊ शकतो. विवेकी-विचारी लोक या तत्त्वाची जाणीव ठेवून त्यांचा उपयोग करून घेतात. ७ (क)

वास्तविक पाहिले तर एकूण चंद्रप्रकाश दोन्ही पक्षात सारखाच असतो. मग एकाला शुक्ल व दुसऱ्याला कृष्ण अशी भेदांची नावे त्यांना विधात्याने का दिली? कारण सरळ आहे : एकात चंद्राचे पोषण म्हणजे वृद्धी होते व दुसऱ्यात त्याचा क्षय होतो. (त्याचप्रमाणे शुक्लपक्षांतच चंद्र वनस्पतीचे पोषण आपल्या किरणांनी करतो.) हे जाणूनच त्यांना जगात यश व अपयश प्राप्त झाले. ७ (ख)

या जगातील सर्व जड-चेतन जीव हे राममय आहेत, हे ओळखून त्यांच्या चरणकमलांना हात जोडून माझे अखंड वंदन आहे. ७ (ग)

देव, असुर, नर, नाग, खग, प्रेत, पितर गंधर्व, निशिचर आणि किन्नर या सर्वांना माझे नमस्कार असोत. आता त्या सर्वांनी माझ्यावर कृपा करावी. ७ (घ)

स्वेदज, अंडज, उद्भिज व जरायुज अशा चार प्रकारच्या चौऱ्यांयशी लक्ष योनी आहेत. हे सर्व प्राणी पृथ्वी, पाणी व आकाश या ठिकाणी निवास करतात. त्या सर्वांनी भरलेले हे सर्व जग सीताराममय आहे, हे

जानि कृपाकर किंकर मोहू । सब मिलि करहु छाडि छल छोहू ॥
निज बुधि बल भरोस मोहि नाहीं । तातें बिनय करउँ सब पाहीं ॥
करन चहउँ रघुपति गुन गाहा । लघु मति मोरि चरित अवगाहा ॥
सूझ न एकउ अंग उपाऊ । मन मति रंक मनोरथ राऊ ॥
मति अति नीच ऊँचि रुचि आछी । चहिअ अमिअ जग जुरइ न छाछी ॥
छमिहहिं सज्जन मोरि ढिठाई । सुनिहहिं बालबचन मन लाई ॥
जौं बालक कह तोतरि बाता । सुनहिं मुदित मन पितु अरु माता ॥
हँसिहहिं कूर कुटिल कुबिचारी । जे पर दूषन भूषनधारी ॥
निज कबित्त केहि लाग न नीका । सरस होउ अथवा अति फीका ॥
जे पर भनिति सुनत हरषाहीं । ते बर पुरुष बहुत जग नाहीं ॥
जग बहु नर सर सरि सम भाई । जे निज बाढ़ि बढ़हिं जल पाई ॥
सज्जन सकृत सिंधू सम कोई । देखि पूर बिधु बाढइ जोई ॥

दो०—भाग छोट अभिलाषु बड करउँ एक बिस्वास ।
पैहहिं सुख सुनि सुजन सब खल करिहहिं उपहास ॥ ८ ॥

जाणून, दोन्ही कर जोडून मी त्यांना प्रणाम करतो. त्या सर्वांनी मला कृपाकराचा किंकर समजून निष्कपट अंतः-करणाने एकत्र होऊन माझ्यावर कृपा करावी.

मला आपल्या बुद्धीच्या कुवतीचा बिलकुल भरवसा नाही म्हणूनच मी आपणा सर्वांना ही विनंती करत आहे. रघुपतीच्या गुणांचे आपण गायन करावे अशी माझी इच्छा आहे. परंतु त्या चरित्रात अवगाहन करण्यास माझी बुद्धि फारच तोकडी आहे. काव्याची अंगे व उपाय यांतील एक सुद्धा मला माहीत नाही. मन व बुद्धी रंक असून मनोरथ मात्र राजे आहेत. बुद्धी अत्यंत खालच्या दर्जाची आणि आवड परमोच्च व सुंदर. अमृत मिळविण्याची वासना, पण सर्व जगात नुसते ताकाचे पाणीहि न मिळण्याइतकी लायकी !

अशी वस्तुस्थिती असता रामगुणगानाचा जो उद्धटपणा मी करत आहे, त्या बद्दल सज्जन मला क्षमा करतील व मन लावून या बालकाचे शब्द ऐकतील; कारण आपल्या लाडक्या लेकराचे बोबडे बोल ऐकून कोणत्या सहृदय मायबापांना आनंद होत नाही ?

जे कोणी क्रूर व कुटिल असतील ते याची टिंगल करतील, कारण दुसऱ्याचे दोष शोधून काढून ते इतरांना दाखवणे हे त्यांना भूषणास्पद वाटते.

त्याचप्रमाणे स्वतःचे काव्य सुरस वा अतिनीरस कसेही असो, ते ज्याचे त्याला आवडतेच. पण दुसऱ्याच्या काव्याचे आनंदाने रसग्रहण करणारे श्रेष्ठ पुरुष फारच विरळा !

[**गूढार्थ** : प्रिय निजकाव्यः आपणास प्रिय असणाराचे अगर प्रिय असणाऱ्याने केलेले काव्य. परकाव्यः परमात्म्याच्या वर्णनाचे काव्य.]

स्वतःच्या पाण्यात वाढ झाल्यामुळे भरून येणाऱ्या नद्या व तलावाप्रमाणे स्वतःच्या उन्नतीनेच बहरणारे बहुतेक लोक असतात. परंतु पूर्ण बिंबाने आकाशात विहार करू लागलेला चंद्रमा पाहून सागराला जशी भरती येते, त्याप्रमाणे परगुण पाहून ज्याचे हृदय आनंदाने उचंबळून येते, असा एखादाच श्रेष्ठ पुरुष असावयाचा !

याप्रमाणे भाग्य अल्प पण अभिलाष मोठा, अशी माझी स्थिती आहे. तथापि एक विश्वास मात्र पक्का आहे की, खलांनी जरी माझ्या काव्याचा उपहास केला तरी याच्या श्रवणाने संतांच्या हृदयाला खास सुख होईल. ८

चौ०— खल परिहास होइ हित मोरा । काक कहहिं कलकंठ कठोरा ॥
हंसहि बक दादुर चातकही । हँसहिं मलिन खल बिमल बतकही ॥
कबित रसिक न राम पद नेहू । तिन्ह कहँ सुखद हास रस एहु ॥
भाषा भनिति भोरि मति मोरी । हँसिबे जोग हँसें नहिं खोरी ॥
प्रभु पद प्रीति न सामुझि नीकि । तिन्हहि कथा सुनि लागिहि फीकी ॥
हरि हर पद रति मति न कुतरकी । तिन्ह कहुँ मधुर कथा रघुबर की ॥
राम भगति भूषित जियँ जानी । सुनिहहिं सुजन सराहि सुबानी ॥
कबि न होउँ नहिं बचन प्रबीनू । सकल कला सब बिद्या हीनू ॥
आखर अरथ अलंकृति नाना । छंद प्रबंध अनेक बिधाना ॥
भाव भेद रस भेद अपारा । कबित दोष गुन बिबिध प्रकारा ॥
कबित बिबेक एक नहिं मोरें । सत्य कहउँ लिखि कागद कोरें ॥

दो०— भनिती मोरि सब गुन रहित बिस्व बिदित गुन एक ।
सो बिचारि सुनिहहिं सुमति जिन्ह कें बिमल बिबेक ॥ ९ ॥

असे असूनही खलांच्या उपहासात माझे थोर हित साधणार आहे. कोकिळांचा स्वर कर्कश, असे कावळे ओरडणारच ! हंसांची निंदा बगळ्यांनी करावी व वाघुळांनी चातकांना हसावे, हा त्यांचा स्वभावच ! त्याच न्यायाने या विमल रामकथेला पापी व खळ हसतील यात नवल काय ? ज्यांना श्रीरामाच्या चरणारविंदांचे प्रेम नाही व काव्यातील शुद्ध रस ग्रहण करण्याचीही कुवत नाही, त्यांना सुद्धा हे काव्य हास्यरसमय वाटून सुखदायक होईल. माझी बुद्धी भोळी आणि काव्य रचना प्राकृतात, मग त्यांना माझा ग्रंथ हास्यास्पद वाटला तर त्यांत त्यांचा तरी काय दोष ? त्यांच्या ठिकाणी ग्राहक शक्ती नसते व प्रभुपदी प्रेमही नसते; त्यामुळे त्यांना ही कथा साहजिकच [illegible] वाटणार !

श्रीरघुवीराची कथा त्यांनाच मधुर वाटणार की, ज्यांनी पूर्वी हरिहरांची उपासना अंतःकरण पूर्वक केली आहे व ज्यांनी आपल्या बुद्धीला कुतर्कापासून काळजीपूर्वक सांभाळून शुद्ध स्वरूपात ठेवली आहे.

सज्जन एक गोष्ट पाहतात की, ही कथा [illegible] झालेली आहे की नाही ? आणि एकदा का त्यांच्या मनाची तशी खात्री झाली की, ते माझ्या वाणीची स्तुती करत ती कथा ऐकतील. मी स्तुतीस पात्र नाही याची मात्र मला पूर्ण जाणीव आहे. कारण मी ना कवी ना माझे भाषेवर प्रभुत्व ! सगळ्या कला व विद्यांचा माझ्या ठिकाणी पूर्ण अभाव ! नाना अर्थालंकार व शब्दालंकार, विविध प्रकारचे सुंदर छंद-प्रबंध, भावांतील भेद व रसातील भेद किती हे तर विचारूच नका ! काव्यातील दोष-गुण पुष्कळ अठ्ठावन प्रकारचे आहेत. अशा प्रकारच्या काव्यज्ञानाचा मला गंधही नाही व ही गोष्ट खरोखरच मी प्रतिज्ञेवर अगदी कोऱ्या कागदावर लिहून दाखवत आहे.

मग हे धाडस का ? त्यालाही एक जोर आहे. माझी काव्यरचना सर्व गुणरहित असली तरी सगळ्या विश्वाला मान्य असणारा एक गुण तीत आहे. ज्यांच्या हृदयात शुद्ध विवेक आहे, ते सद्बुद्धीचे लोक वरील एकमेव गुणाची कल्पना आल्याने माझ्या काव्याचा मनमुराद आस्वाद घेतील. ९

चौ०— एहि महँ रघुपति नाम उदारा । अति पावन पुरान श्रुति सारा ।।
मंगल भवन अमंगल हारी । उमा सहित जेहि जपत पुरारी ।।
भनिति बिचित्र सुकबि कृत जोऊ । राम नाम बिनु सोह न सोऊ ।।
बिधुबदनी सब भाँति सँवारी । सोह न बसन बिना बर नारी ।।
सब गुन रहित कुकबि कृत बानी । राम नाम जस अंकित जानी ।।
सादर कहहिं सुनहिं बुध ताही । मधुकर सरिस संत गुनग्राही ।।
जदपि कबित रस एकउ नाहीं । राम प्रताप प्रगट एहि माहीं ।।
सोइ भरोस मोरें मन आवा । केहिं न सुसंग बड़प्पनु पावा ।।
धूमउ तजइ सहज करुआई । अगरु प्रसंग सुगंध बसाई ।।
भनिति भदेस बस्तु भलि बरनी । राम कथा जग मंगल करनी ।।

छं० — मंगल करनि कलि मल हरनि तुलसी कथा रघुनाथ की ।
गति कूर कबिता सरित की ज्यों सरित पावन पाथ की ।।
प्रभु सुजस संगति भनिति भलि होइहि सुजन मन भावनी ।
भव अंग भूति मसान की सुमिरत सुहावनी पावनी ।।

श्रुती-पुराणे यांनी मंथन करून अती पावन असे जे सार काढले ते म्हणजे रघुपतीचे श्रेष्ठ नाव आणि मी आपल्या काव्यात ते पूर्णत्वाने ग्रथित केले आहे. मंगलाचे ते माहेर घर असून अमंगलाचा त्याने नाश होतो. उमेसह श्रीशंकर याचाच जप करीत असतात.

एकाद्या कवीश्वराने शास्त्रोक्त सर्व गुणसंपन्न असे काव्य मोठ्या परिश्रमाने व बुद्धिमत्तेने निर्माण केले, पण त्यात जर रामनाम नसेल तर त्याला शोभा येणार नाही. एकाद्या चंद्रमुखी तरुण स्त्रीला सर्व भूषणांनी मंडित करावी, पण तिला फक्त विवस्त्र ठेवावी, मग त्या श्रेष्ठ युवतीला काय शोभा राहील? त्यातलाच हा प्रकार होय. याच्या उलट सर्वस्त्री काव्य गुणविहीन पण रामनामयशाने परिप्लुत असे काव्य एकाद्या कुकवीने लिहिले, तर मधुकर वृत्तीचे शहाणे संत त्यातील रसास्वादासाठी त्याचे सादर श्रवण-कथन करतात.

माझ्या काव्याची तशीच स्थिती आहे. यात एक सुद्धा काव्यरस नाही; पण प्रभुरामचंद्राचा प्रताप मात्र अगदी प्रकट आहे. माझ्या अंतःकरणाला एवढाच एक आधार आहे. सत्संगतीने जगात कोणाला मोठेपणा आला नाही? चंदनाची संगती मिळताच धूर आपला उपजत कडवटपणा सोडतो व अत्यंत मधुर सुगंध देतो.

याच न्यायाने माझी भाषा ग्राम्य असली तरी सर्व जगाचे मंगल साधणारी रामाची श्रेष्ठ कथा तिच्यात प्रतिपाद्य मुख्य विषय म्हणून ग्रथित केली आहे. या कथेचा महिमा फार मोठा आहे.

ही रघुनाथकथा मांगल्य निर्माण करते, कलिनिर्मित सर्व दोषांचे निर्मूलन करते, पावन जलाच्या भागीरथीच्या वाकड्या वळणाप्रमाणे माझ्या काव्य नदीची नागमोडी गती असली तरी प्रभु श्रीरामाच्या सुयश संगतीने माझी ही कृती पवित्र होऊन सज्जनांच्या मनाला परम सुखदायक होईल. अहो ! स्मशानातील अपवित्र राखही श्रीशंकराच्या संगतीने पवित्र होते, इतकेच नव्हे तर तिच्या नुसत्या स्मरणाने मानव पावन होतो. तशीच ही माझी रामकथा पावनकारी झाल्याशिवाय राहणार नाही.

दो० — प्रिय लागिहि अति सबहि मम भनिति राम जस संग ।
दारु बिचारु कि करइ कोउ बंदिअ मलय प्रसंग ।। १० (क) ।।
स्याम सुरभि पय बिसद अति गुनद करहिं सब पान ।
गिरा ग्राम्य सिय राम जस गावहिं सुनहिं सुजान ।। १० (ख) ।।

चौ० — मनि मानिक मुकुता छबि जैसी । अहि गिरि गज सिर सोह न तैसी ।।
नृप किरीट तरुनी तनु पाई । लहहिं सकल सोभा अधिकाई ।।
तैसेहिं सुकबि कबित बुध कहहीं । उपजहिं अनत अनत छबि लहहीं ।।
भगति हेतु बिधि भवन बिहाई । सुमिरत सारद आवति धाई ।।
राम चरित सर बिनु अन्हवाएँ । सो श्रम जाइ न कोटि उपाएँ ।।
कबि कोबिद अस हृदयँ बिचारी । गावहिं हरि जस कलि मल हारी ।।
कीन्हें प्राकृत जन गुन गाना । सिर धुनि गिरा लगत पछिताना ।।
हृदय सिंधु मति सीप समाना । स्वाति सारदा कहहिं सुजाना ।।
जौं बरषइ बर बारि बिचारू । होहिं कबित मुकुतामनि चारू ।।

दो० — जुगुतिं बेधि पुनि पोहिअहिं राम चरित बर ताग ।
पहिरहिं सज्जन बिमल उर सोभा अति अनुराग ।। ११ ।।

रामयशात रंगलेले हे माझे काव्य सर्वांना अत्यंत प्रिय होईल. एकदा का मलय पर्वताची माती मिळाली की, हे लाकूड कसले आहे, हा विचार सुटतो; त्याला चंदन म्हणून लोक वंदन करतात. गाय काळी असली तरी तिचेही दूध अगदी शुभ्र व गुणकारी म्हणून सगळे लोक पीत नाहीत का? तसेच या माझ्या काव्यातील भाषा गावढळ असली तरी सीतारामयशाने ती भरलेली असल्याने जाणते लोक तिचे गायन श्रवण करतील. १० (क) (ख).

सर्प, पर्वत व हत्तीचे गंडस्थळ येथे जरी मणी-माणिक-मोती यांची उत्पत्ति झाली तरी त्यांच्या जन्मस्थळी त्यांना असावी तशी शोभा-प्राप्त होत नाही. त्यांचे तेज खुलण्यासाठी त्यांना राजमुकुटाचा किंवा सुंदर तरुण स्त्रीच्या तनूचा आश्रय करावा लागतो. तेथेच त्यांचे खरे सौंदर्य खुलते. त्याच प्रमाणे सुकवींच्या काव्यांनाही जन्मस्थळापेक्षा रसिकांच्या आश्रयानेच खरा मोहोर येतो, असे बुद्धिवंत म्हणतात.

कोणत्याही सुकवीने शारदेचे स्मरण करतांच भक्तिप्रेमाने सत्यलोक सोडून सरस्वती सत्वर धावून येते; पण त्या कवीने जर रामचरित-सरोवरात स्नान केले नाही, तर दुसऱ्या कोट्यवधी साधनांनी शारदेच्या धावत येण्याच्या श्रमाचे सार्थक होणार नाही! म्हणून जाणते कवी हा विचार मनात बाळगून कलिदोष नाश करणाऱ्या अशा भगवंताच्या कथांचे गायन करतात. परंतु याच्या उलट जर क्षुद्र लोभाला बळी पडून मर्त्य मानवाची स्तुती करण्यासाठी कवी आपली काव्यरचना करू लागले तर याच्यासाठी आपण व्यर्थ आलो, या पश्चात्तापाने शारदा मस्तक बडवून घेऊ लागते.

सुजाण लोक सांगतात की, हृदय हे समुद्रासारखे असून, बुद्धी मोत्याच्या शिंपल्यासारखी आहे. स्वाती नक्षत्रासारखी शारदा उत्तम विचाररूपी जलाचा वर्षाव करू लागताच सुंदर काव्यरूपी मोत्ये तयार होऊं लागतात. मग मोठ्या युक्तीने त्या काव्यरूपी मोत्यांना छिद्रे पाडून रामचरितरूपी तागाच्या धाग्यात ती ओवल्यानंतर निर्माण होणारा काव्यहार सज्जनांच्या प्रेमपूर्ण हृदयावर खुलू लागतो व उत्कट भक्तिप्रेमाची त्याला शोभा येते. ११

चौ० – जे जनमे कलिकाल कराला । करतब बायस बेष मराला ।।
चलत कुपंथ बेद मग छाँड़े । कपट कलेवर कलि मल भाँड़े ।।
बंचक भगत कहाइ राम के । किंकर कंचन कोह काम के ।।
तिन्ह महँ प्रथम रेख जग मोरी । धींग धरमध्वज धंधक धोरी ।।
जौं अपने अवगुन सब कहऊँ । बाढ़इ कथा पार नहिं लहऊँ ।।
ताते मैं अति अलप बखाने । थोरे महुँ जानिहहिं सयाने ।।
समुझि बिबिधि बिधि बिनती मोरी । कोउ न कथा सुनि देइहि खोरी ।।
एतेहु पर करिहहिं जे असंका । मोहि ते अधिक ते जड़ मति रंका ।।
कबि न होउं नहिं चतुर कहावउँ । मति अनुरूप राम गुन गावउँ ।।
कहँ रघुपति के चरित अपारा । कहँ मति मोरि निरत संसारा ।।
जेहिं मारुत गिरि मेरु उड़ाहीं । कहहु तूल केहि लेखे माहीं ।।
समुझत अमित राम प्रभुताई । करत कथा मन अति कदराई ।।

दो० – सारद सेस महेस बिधि आगम निगम पुरान ।
नेति नेति कहि जासु गुन करहिं निरंतर गान ।। १२ ।।

या भयंकर कलिकालात ज्यांचा जन्म झाला आहे, ज्यांची कृति कावळ्याप्रमाणे असून ज्यांनी वेष मात्र हंसाचा धारण केला आहे, वेदमार्ग सोडून ज्यांनी कुमार्ग धरला आहे अशी माणसे, म्हणजे कपटाचा मूर्तिमंत अवतार ! कलियुगातील पापांनी भरलेली ती भांडीच होत. लोकांत रामभक्त म्हणून मिरवतात, पण अंतरात मात्र काम-क्रोध–कनकाचे बंदे गुलाम असतात ! अशा प्रकारच्या लोकांत माझी प्रथम गणना करा; कारण, घाण्याच्या बैलाप्रमाणे प्रगती न दाखवता स्वतःच्या पापकर्मांतच फिरत रहाणारा व धर्माचा टेंभा मात्र मोठा मिरवणारा असा मी असल्याने धिक्कारास पात्र आहे.

माझ्या दुर्गुणांचा सांगोपांग पाढा वाचावयाचा म्हटल्यास अमर्याद ग्रंथ वाढेल व तो संपणारच नाही. यासाठी मी त्यांचे थोडक्यात वर्णन केले. सुजाण मनुष्य शितावरून भाताची पूर्ण परीक्षा करू शकतो !

श्रीरामकथा ऐकत असता माझ्या दोषांची चर्चा सुरू होऊन त्या कथेत खंड पडू नये याच केवळ हेतूने मी आतापर्यंत अनेक प्रकारे प्रार्थना केली आहे. इतके करूनही जर कोणी या बाबतीत अधिक शंका काढतील तर माझ्यापेक्षाही त्यांची बुद्धि भिकार आहे असेच ठरेल !

खरे पाहिले असता, मी चतुर विद्वान नाही अगर मोठा कवी नाही. फक्त यथामती रामगुणगान करतो आहे हे विसरू नये. कुठे रघुपतीचे अपार चरित्र आणि कुठे संसारपंकात रुतलेली माझी बुद्धी ! ज्या बलवान वाऱ्याने मेरुपर्वतही उडून जाणार, त्याच्यापुढे यःकश्चित् कापसाची काय कथा ? श्री रघुनाथाच्या अपार प्रभावाची जाणीव होताच त्याच्या कथांचे गायन करण्यास मन अत्यंत कचरते !

सरस्वती, शेष, शंकर, ब्रह्मदेव, शास्त्र, वेद व पुराणे हे सर्व 'नेति नेति' [असे, एवढेच नाही, एवढेच नाही] या शब्दाचा आश्रय करून ज्याचे गुणगान निरंतर करतात, अशा प्रभूची प्रभुता अमर्याद आहे. १२



चौ० —सब जानत प्रभु प्रभुता सोई । तदपि कहें बिनु रहा न कोई ॥
तहाँ बेद अस कारन राखा । भजन प्रभाउ भाँति बहु भाषा ॥
एक अनीह अरूप अनामा । अज सच्चिदानंद पर धामा ॥
ब्यापक बिस्वरूप भगवाना । तेहिं धरि देह चरित कृत नाना ॥
सो केवल भगतन हित लागी । परम कृपाल प्रनत अनुरागी ॥
जेहि जन पर ममता अति छोहू । जेहिं करुना करि कीन्ह न कोहू ॥
गई बहोर गरीब नेवाजू । सरल सबल साहिब रघुराजू ॥
बुध बरनहिं हरि जस अस जानी । करहिं पुनीत सुफल निज बानी ॥
तेहिं बल मैं रघुपति गुन गाथा । कहिहउँ नाइ राम पद माथा ॥
मुनिन्ह प्रथम हरि कीरति गाई । तेहिं मग चलत सुगम मोहि भाई ॥

दो० —अति अपार जे सरित बर जौं नृप सेतु कराहिं ।
चढ़ि पिपीलिकउ परम लघु बिनु श्रम पारहि जाहिं ॥ १३ ॥

चौ० —एहि प्रकार बल मनहि देखाई । करिहउँ रघुपति कथा सुहाई ॥
ब्यास आदि कबि पुंगव नाना । जिन्ह सादर हरि सुजस बखाना ॥
चरन कमल बंदउँ तिन्ह केरे । पुरवहुँ सकल मनोरथ मेरे ॥
कलि के कबिन्ह करउँ परनामा । जिन्ह बरने रघुपति गुन ग्रामा ॥

हे त्यांच्या ध्यानी आलेच आहे. तरीही त्याचे वर्णन करावयाचे कोणी सोडले आहे ? याचे मुख्य कारण वेदांनी असे दाखविले आहे कीं, भगवंताच्या भजनाचा प्रभाव अनेक प्रकारचा आहे. सारांश, साकल्यानें भगवंताचे गुणगान कोणीही करू शकत नसला तरी यथामती ते प्रत्येकाने करावे, मानव त्याने सहज उद्धरतो. ते प्रभू एक, अनिच्छ, नामरूपातीत, अजन्मा, सच्चिदानंद व परंधाम आहेत. सर्वव्यापी व विश्वाच्या रूपात नटलेले असे भगवान, देह धारण करून नाना प्रकारची चरित्रे करतात; आणि हे सर्व ते केवळ आपल्या भक्तांसाठीच करतात. याचे कारण ते आपल्या अनन्य भक्तावर परमकृपा करणारे अत्यंत स्नेहाळू स्वामी आहेत. आपल्या दासावर ते अत्यंत कृपा व माया करतात आणि एकदां ज्याच्यावर करुणा केली त्याच्यावर पुनः कधीच रागावत नाहीत !

ते दीनबंधू असून गेलेल्या वस्तूची प्राप्ती करून देणारे आहेत. त्यांचा स्वभाव सरळ असून सर्व शक्तिमान असे रघुराज सर्वांचे धनी आहेत. हे त्यांचे स्वरूप समजल्यानेच शहाणी माणसे त्या भगवंताच्या यशाचे वर्णन करून आपली वाणी सुफल (मोक्ष=दुर्लभ भगवत्प्रेम) व परम पवित्र करतात. अगदी बरोबर याच सिद्धान्ताच्या जोरावर मीही श्रीरामचरणी आपले मस्तक नमवून रघुपती गुणगान करीत आहे.

व्यास, वाल्मीकी आदि थोर कवीश्वरांनी माझ्यापूर्वीच प्रभूच्या लीला सविस्तर वर्णन केल्या असल्याने त्यांच्याच पावलावर पाऊल टाकीत गेल्यामुळे माझा मार्ग सुगम झाला आहे. अफाट व दुस्तर अशा पात्राच्या नदीवर जेव्हा राजेलोक उत्तम पूल बांधतात तेव्हां अत्यंत लहान मुंगीसुद्धा त्याच्यावर चढून नदीच्या पैलतीरावर सुखाने जात नाही का? (तसेच माझे आहे. मलाही पूर्वीच्या कवीश्वरांच्या काव्यामुळे श्रीरामाचे यशगान यथामती सहज करता येईल असा विश्वास वाटतो.) १३

याप्रमाणे अत्यंत भ्यालेल्या मनाला धीर देऊन रघुपतीच्या कथेचे सुंदर गायन मी करीन. व्यासादिक ज्या मोठमोठ्या अनेक कवींनी अत्यंत आदराने हरीच्या सुयशाचे वर्णन केले आहे त्या सर्वांच्या चरणकमलांना वंदन करून मी विनवतो की त्यांनी माझे मनोरथ पूर्ण करावेत.

त्याचप्रमाणे संस्कृतात ज्यांनी रघुपतीचे गुणगान केले अशा सर्व कलियुग-कवींना मी वंदन करतो.

चौ–० जे प्राकृत कबि परम सयाने । भाषाँ जिन्ह हरि चरित बखाने ॥
भए जे अहहिं जे होइहहिं आगें । प्रनवउँ सबहि कपट सब त्यागें ॥
होहु प्रसन्न देहु बरदानू । साधु समाज भनिति सनमानू ॥
जो प्रबंध बुध नहिं आदरहीं । सो श्रम बादि बाल कबि करहीं ॥
कीरति भनिति भूति भलि सोई । सुरसरि सम सब कहँ हित होई ॥
राम सुकीरति भनिति भदेसा । असमंजस अस मोहि अँदेसा ॥
तुम्हरी कृपाँ सुलभ सोउ मोरे । सिअनि सुहावनी टाट पटोरे ॥

दो० –सरल कबित कीरति बिमल सोइ आदरहिं सुजान ॥
सहज बयर बिसराइ रिपु जो सुनि करहिं बखान ॥ १४ (क) ॥
सो न होइ बिनु बिमल मति मोहि मति बल अति थोर ।
करहु कृपा हरि जस कहउँ पुनि पुनि करउँ निहोर ॥ १४ (ख) ॥
कबि कोबिद रघुबर चरित मानस मंजु मराल ।
बालबिनय सुनि सुरुचि लखि मो पर होहु कृपाल ॥ १४ (ग) ॥

सो ० –बंदउँ मुनि पद कंजु रामायन जेहिं निरमयउ ।
सखर सुकोमल मंजु दोष रहित दूषन सहित ॥ १४ (घ) ॥

तसेच स्वतःच्या मायभाषेत भगवल्लीलांचे वर्णन करणारे जे अतिचतुर व सुज्ञ प्राकृत कवि झाले आहेत व जे होतील त्या सर्वांना मी निष्कपट अंतःकरणाने प्रणाम करतो.

आपण सर्व माझ्यावर असे प्रसन्न व्हा व मला असा वर द्या की ज्याच्या योगाने माझे काव्य सज्जनांच्या समाजात सन्मान्य होईल. कारण जो प्रबंध शहाण्याच्या आदराला पात्र होत नाही; त्यासाठी केलेले होतकरू कवीचे सर्व श्रम फुकट जातात !

कीर्ती संपत्ती व कविता तीच उत्तम की जी गंगेप्रमाणे सर्वांना हितकर असते. रामचंद्राची सत्कीर्ती जगमंगलकारी आहे. पण माझी भाषा बोजड ! आणि या असंबद्धतेमुळेच मला काळजी वाटते. पण हे कविवर हो ! आपण जर माझ्यावर अनुग्रह केला तर माझी ही चिंतासुद्धा नाहीशी होईल; कारण तरटावर-सुद्ध रेशीम ओवून सुंदर गालिचा नाही का होत ?

जी कविता सुबोध असते, जिच्यातील वर्णन विषय विमल रामकीर्ती आहे, जिच्या वाचनाने प्रत्यक्ष वैरीही आपले स्वाभाविक शत्रुत्व विसरून तिची स्तुती करू लागतो, तीच कविता सुज्ञांच्या आदरास पात्र होते. १४ (क)

पण अशा काव्याच्या निर्मितीला बुद्धिबल मोठे लागते व माझ्या जवळ तेवढेच भांडवल कमी आहे. म्हणून हे कविराज मी पुनः पुन्हा आपल्या चरणी विनवणी करतो की, आपण माझ्यावर कृपा करा म्हणजे मला भगवत्कथांचे वर्णन करणे शक्य होईल. १४ (ख)

कवी व ज्ञाते सज्जन हो ! आपण श्रीरामचरित मानसातील सुन्दर हंस आहात म्हणून या बालकाची सुरुची जाणून याच्यावर कृपा करा. १४ (ग)

ज्यांनी रामायणाची रचना केली अशा आद्य कवी श्रीवाल्मीकींच्या चरणकमली माझे प्रणाम असोत. त्यांचे रामायण सखर असूनही कोमल मनोहर आहे. (खर राक्षस वर्णना सहित असूनही तसेच ते दूषण-सहित (दूषण राक्षसाचे वर्णना सहित) असूनहि दूषण विवर्जित म्हणजे निर्दोष आहे. १४ (घ)

सो० — बंदउँ चारिउ बेद भव बारिधि बोहित सरिस ।
जिन्हहि न सपनेहुँ खेद बरनत रघुबर बिसद जसु ॥ १४ (ङ)॥
बंदउँ बिधि पद रेनु भव सागर जेहिं कीन्ह जहँ ।
संत सुधा ससि धेनु प्रगटे खल बिष बारुनी ॥ १४ (च)॥

दो० — बिबुध बिप्र बुध ग्रह चरन बंदि कहउँ कर जोरि ।
होइ प्रसन्न पुरवहु सकल मंजु मनोरथ मोरि ॥ १४ (छ)॥

चौ० — पुनि बंदउँ सारद सुरसरिता । जुगल पुनीत मनोहर चरिता ॥
मज्जन पान पाप हर एका । कहत सुनत एक हर अबिबेका ॥
गुर पितु मातु महेस भवानी । प्रनवउँ दीनबंधु दिन दानी ॥
सेवक स्वामि सखा सिय पी के । हित निरुपधि सब बिधि तुलसी के ॥
कलि बिलोकि जग हित हर गिरिजा । साबर मंत्र जाल जिन्ह सिरिजा ॥
अनमिल आखर अरथ न जापू । प्रगट प्रभाउ महेस प्रतापू ॥
सोइ उमेस मोहि पर अनुकूला । करिहिं कथा मुद मंगल मूला ॥
सुमिरि सिवा सिव पाइ पसाऊ । बरनउँ राम चरित चित चाऊ ॥

[illegible] पैलतीरास नेणाऱ्या जहाजाप्रमाणे असणारे व रघुनाथाच्या निर्मल यशाचे वर्णन करीत असता ज्यांना स्वप्नातही शीण येत नाही, अशा चारी वेदांना मी वंदन करतो. १४ (ङ.)

ज्यांनी या भवसागराला जन्म दिला, त्या विधात्याच्या चरणरजांना मी वन्दन करतो. एका बाजूने या भवसागरातून संतस्वरूपात अमृत, चंद्र व कामधेनू निघाले, तर दुसऱ्या बाजूने दुष्टांच्या रूपाने विष व मदिरा बाहेर पडली. १४ (च)

देवता, ब्राह्मण, पण्डित व ग्रह यांच्या चरणीं नमनपूर्वक हात जोडून मी प्रार्थना करतो की, आपण सर्व माझ्यावर प्रसन्न व्हा व माझे सर्व सुंदर मनोरथ पूर्ण करा. १४ (छ)

यानंतर सरस्वती व देवनदी गंगा यांना मी वन्दन करतो. याचे कारण दोन्ही पवित्र असून, त्यांचे चरित्र चित्ताकर्षक आहे. एकीच्या स्नान-पानाने पाप नाश होतो तर दुसरीच्या सद्गुण कथांचे कथन-श्रवण केल्याने अविवेकाचा नाश होतो.

माझ्या गुरूस्थानी व मातापित्याप्रमाणे असणाऱ्या महेशभवानींना मी वन्दन करतो. ते दीनबन्धू असून नित्यदान करण्याचे त्यांचे व्रत आहे. शिवाय, सीतापती श्रीरामचन्द्राचे ते सेवक, स्वामी व सखा अशा तिन्ही भूमिका साजऱ्या करणारे असून तुलसीदासांचे जर निर्मळ हित कोणी साधले असेल तर ते त्यांनीच ! कलियुग आलेले पाहून जनहितार्थ गिरिजा-शंकरांनी शाबरमंत्रजालाची रचना केली. या मंत्र समूहाची अशी मौज आहे की, त्यातील अक्षरांचा परस्परांशी मेळ तर नाहीच, पण त्यांच्या अर्थाचाही पत्ता लागत नाही. असे असूनही श्री महेश्वरांच्या सामर्थ्यप्रतापामुळे या मंत्रांचा केवळ जप करतांच त्यांचा प्रभाव प्रचीतीस आल्यावाचून राहात नाही.

असे उमेश श्री शंकर माझ्यावर प्रसन्न असल्याने माझी ही श्रीरामचरित्राची कथा आनन्द व मांगल्याचे उत्पत्तिस्थान निश्चित करतील.

याप्रमाणे श्री उमामहेशाचे स्मरण करून त्यांचा प्रसाद प्राप्त झाल्यामुळे (माझी भीति व नैराश्य संपते) मोठ्या उल्हसित मनाने मी श्रीरामचरितवर्णनास प्रारंभ करतो. याचे कारण मला आता असा आत्म-

चौ०– भनिति मोरि सिव कृपाँ बिभाती । ससि समाज मिलि मनहुँ सुराती ॥
जे एहि कथहि सनेह समेता । कहिहहिं सुनिहहिं समुझि सचेता ॥
होइहहिं राम चरन अनुरागी । कलि मल रहित सुमंगल भागी ॥

दो०–सपनेहुँ साचेहुँ मोहि पर जौं हर गौरि पसाउ ।
तौ फुर होउ जो कहेउँ सब भाषा भनिति प्रभाउ ॥ १५ ॥

चौ०– बंदउँ अवधपुरी अति पावनि । सरजू सरि कलि कलुष नसावनि ॥
प्रनवउँ पुर नर नारि बहोरी । ममता जिन्ह पर प्रभुहि न थोरी ॥
सिय निंदक अघ ओघ नसाए । लोक बिसोक बनाइ बसाए ॥
बंदउँ कौसल्या दिसि प्राची । कीरति जासु सकल जग माची ॥
प्रगटेउ जहँ रघुपति ससि चारू । बिस्व सुखद खल कमल तुसारू ॥
दसरथ राउ सहित सब रानी । सुकृत सुमंगल मूरति मानी ॥
करउँ प्रनाम करम मन बानी । करहु कृपा सुत सेवक जानी ॥
जिन्हहि बिरचि बड़ भयउ बिधाता । महिमा अवधि राम पितु माता ॥

सो०–बंदउँ अवध भुआल सत्य प्रेम जेहि राम पद ।
बिछुरत दीनदयाल प्रिय तनु तृन इव परिहरेउ ॥ १६ ॥

विश्वास उत्पन्न झाला आहे कीं, अनंत आकाशात स्वस्थानी चमकणारे तारे व मध्यावर पूर्णचन्द्र यांच्यासह जशी शरदऋतूतील रात्र खुलते, त्यांच्याप्रमाणे माझी ही काव्यरचना सर्वतोपरी आकर्षक व आल्हादजनक बनेल.

अत्यंत भक्तिप्रेमाने व सावधानपणे ही कथा जे सांगतील व तशाच सावधगिरीने समजून घेऊन जे ती ऐकतील, त्यांचे रामचरणी अविरल प्रेम उत्पन्न होईल, कलियुगातील अनेक पापांपासून ते सुटतील आणि सर्व सौमांगल्याची प्राप्ती करून देणारे त्यांचे भाग्य उदयास येईल.

याचे कारण असे की, श्री गिरिजाशंकराचा जर स्वप्नात का असेना, पण खराखुरा प्रसाद प्राप्त झाला असेल तर या माझ्या प्राकृत काव्याचा प्रभाव मी वर्णन केला तो सर्व अक्षरशः खरा ठरो. १५

अत्यंत पावन अशा अयोध्यापुरीला व कलिदोषपरिहार करणाऱ्या शरयू नदीला मी आता वंदन करतो. अयोध्यानगरवासी नरनारींना मी पुनः प्रणाम करतो. त्यांच्यावर प्रभूची ममता थोडी थोडीकी नव्हती. प्रत्यक्ष सीतेची निंदा करणारा परीट व त्याच्या आरोपाचे समर्थन करणारे अयोध्यावासी स्त्रीपुरुष यांनाही त्यांच्या घोर पापापासून मुक्त करून पश्चात्ताप दुःखरहित असे वैकुंठनिवासी बनवले.

कौसल्यारूपी पूर्व दिशेला माझे वंदन. सर्व विश्वात तिची कीर्ती दुमदुमत राहिली आहे. या पूर्व दिशेतूनच विश्वाससुखद व दुष्टरूपी कमलांना दहिवराप्रमाणे विनाशक असा मनोहर रामचंद्र प्रगट झाला. तसेच सर्व राण्यांना व दशरथ राजांना पुण्याची व मांगल्याची प्रत्यक्ष मूर्तीच समजून कायावाचामनाने मी प्रणाम करतो. मी आपल्या पुत्राचा एक सेवक आहे हे ध्यानी घेऊन आपण सर्व माझ्यावर कृपा करा. मोठेपणाची परमावधी अशा राम-मातांना व पित्याला निर्माण करून विधाताही धन्य झाला.

दीनदयाळ अशा रामाचा वियोग होतांच परमप्रिय स्वदेहाचा कस्पटाप्रमाणे त्याग करून श्रीरामचरणी सत्य प्रेम कसे करावे याचा एक अत्यंत श्रेष्ठ आदर्श ज्यांनी निर्माण करून ठेवला अशा अयोध्येच्या भूपालांना मी वंदन करतो. १६

चौ०– प्रनवउँ परिजन सहित बिदेहू । जाहि राम पद गूढ़ सनेहू ।।
जोग भोग महँ राखेउ गोई । राम बिलोकत प्रगटेउ सोई ।।
प्रनवउँ प्रथम भरत के चरना । जासु नेम ब्रत जाइ न बरना ।।
राम चरन पंकज मन जासू । लुबुध मधुप इव तजइ न पासू ।।
बंदउँ लछिमन पद जलजाता । सीतल सुभग भगत सुख दाता ।।
रघुपति कीरति बिमल पताका । दंड समान भयउ जस जाका ।।
सेष सहस्रसीस जग कारन । जो अवतरेउ भूमि भय टारन ।।
सदा सो सानुकूल रह मो पर । कृपासिंधु सौमित्रि गुनाकर ।।
रिपुसूदन पद कमल नमामी । सूर सुसील भरत अनुगामी ।।
महाबीर बिनवउँ हनुमाना । राम जासु जस आप बखाना ।।

सो०–प्रनवउँ पवनकुमार खल बन पावक ग्यानघन ।
जासु हृदय आगार बसहिं राम सर चाप धर ।। १७ ।।

चौ०–कपिपति रीछ निसाचर राजा । अंगदादि जे कीस समाजा ।।
बंदउँ सब के चरन सुहाए । अधम सरीर राम जिन्ह पाए ।।
रघुपति चरन उपासक जेते । खग मृग सुर नर असुर समेते ।।
बंदउँ पद सरोज सब केरे । जे बिनु काम राम के चेरे ।।

परिवारासहित राजा जनकांना मी प्रणाम करतो. यांचे श्रीरामचरणी मोठे गूढ प्रेम होते. त्यांनी आपला योग (ज्ञान) भोगात लपवून ठेवला होता. प्रभु रामचंद्र डोळ्यासमोर येताच तोच प्रगट झाला.

ज्याच्या व्रतनेमांचे वर्णन करणे अशक्य आहे अशा भरतचरणांना आता मी वंदन करतो. भ्रमर हा सुवासिक कमलाला क्षणभरही न सोडता जसा त्यांत गुंगून जावा त्याप्रमाणे श्रीरामचरणकमलांचा मनाने थोडाही विरह यांनी सहन केला नाही.

नंतर जे शीतल, सुंदर व भक्तांना सुख देणारे आहेत त्या श्री लक्ष्मणचरणकमलांना मी नमस्कार करतो. श्रीरघुपतीच्या कीर्तिरूपी विमल ध्वजाला ज्याचे यश दंडासारखे झाले, त्यामुळेच तो उंच होऊन फडकत राहिला. जे हजार मस्तकांचे शेषरूप असून जगाचे कारण भूमिभय हरण करण्यासाठी अवतरलेले; ते कृपासिंधू सद्‌गुणांची खाण असे सुमित्रातनय श्रीलक्ष्मणजी माझ्यावर सर्व काळी प्रसन्न राहोत.

मी श्रीशत्रुघ्नाच्या चरणी प्रणाम करतो. हे मोठे शूर, अत्यंत सुशील व श्री भरताचे अनुयायी आहेत.

यानंतर मी श्री हनुमंताच्या चरणी विनंती करतो. यांचा अधिकार केवढा मोठा म्हणून सांगू? प्रत्यक्ष श्रीरामचंद्रानी यांच्या यशाचे गायन स्वमुखाने केले आहे. दुर्जन वनाला भस्मसात करणारे अग्निरूप, भरीव ज्ञानाची प्रत्यक्ष मूर्ती व हृदयमंदिरात धनुर्धारी प्रभू श्रीरामचंद्राचे अखंड वास्तव्य अनुभवणारे, अशा वायुनन्दन श्री हनुमंतांना मी वन्दन करतो. १७

या नंतर वानरराज सुग्रीव, अस्वलांचा राजा जांबुवंत, राक्षसराजा विभीषण आणि अंगद, इतकेच काय पण अठरा पद्‌मे वानराच्या भाग्यवंत चरणांना मी प्रणाम करतो. कारण, वानर-राक्षसादी शरीरातही त्यांनी श्री प्रभू रामचंद्राची प्राप्ती करून घेतली !

पशु, पक्षी, देवता, मनुष्य व असुर यांच्यामध्ये जेवढे म्हणून रामचरणोपासक व रामाचे निष्काम दास झाले आहेत, त्या सर्व श्रीप्रभुसेवकांना माझा मनःपूर्वक नमस्कार.

चौ ०– सुक सनकादि भगत मुनि नारद । जे मुनिबर बिग्यान बिसारद ॥
प्रनवउँ सबहि धरनि धरि सीसा । करहु कृपा जन जानि मुनीसा ॥
जनकसुता जग जननि जानकी । अतिसय प्रिय करुनानिधान की ॥
ताके जुग पद कमल मनावउँ । जासु कृपाँ निरमल मति पावउँ ॥
पुनि मन बचन कर्म रघुनायक । चरन कमल बंदउँ सब लायक ॥
राजिवनयन धरें धनु सायक । भगत बिपति भंजन सुख दायक ॥

दो०–गिरा अरथ जल बीचि सम कहिअत भिन्न न भिन्न
बंदउँ सीता राम पद जिन्हहि परम प्रिय खिन्न ॥ १८ ॥

चौ०–बंदउँ नाम राम रघुबर को । हेतु कृसानु भानु हिमकर को ॥
बिधि हरि हरमय बेद प्रान सो । अगुन अनूपम गुन निधान सो ॥
महामंत्र जोइ जपत महेसू । कासी मुकुति हेतु उपदेसू ॥
महिमा जासु जान गनराऊ । प्रथम पूजिअत नाम प्रभाऊ ॥
जान आदिकबि नाम प्रतापू । भयउ सुद्ध करि उलटा जापू ॥
सहस नाम सम सुनि सिव बानी । जपि जेईं पिय संग भवानी ॥

विज्ञानविशारद व परमभक्त अशा शुकाचार्य, सनत्कुमार, ब्रह्मर्षि नारद आदिकरून श्रेष्ठ मुनिवरांना पृथ्वीवर मस्तक ठेवून मी प्रणाम करतो. हे मुनीश्वरहो ! आपण सर्वांनी हा आपला दास समजून याच्यावर कृपा करावी.

राजा जनकाची कन्या, सर्व जगताची माता किंवा जगत् –भूतल आहे जिची जननी, करुणानिधान श्रीरामचंद्राची प्रियतमा व कृपा निधान श्रीरामचंद्र जिला अतिशय प्रिय आहेत, अशा श्री जानकीमातेच्या दोन्ही चरण कमलांवर मी आपले मस्तक विनम्र करतो. तिच्याच कृपेने मला निर्मल अशी बुद्धी मिळणार आहे. शेवटी कमलनयन, धनुष्य व बाण धारण केलेले, भक्तांच्या संकटांचा निरास करून त्यांना सुख देणारे, असे श्रीरघुनाथ, त्यांच्या सर्वसमर्थ चरणकमली काया-वाचा-मनाने-मस्तक ठेवून मी त्यांना वंदन करतो.

वाणी व तिचा अर्थ, तसेच पाणी व त्यावरील तरंग हे पदार्थ बोलण्यास वेगळे, पण वस्तुतः एकरूप असतात; त्याचप्रमाणे दीनदुःखी ज्यांना अतिशय प्रिय असतात, अशा अभिन्न स्वरूपी श्रीसीतारामचरणांना मी वंदन करतो.

राम-नामवंदन व माहात्म्य

अग्नी, सूर्य व चंद्र यांच्या मूळ बीज स्वरूपात असणाऱ्या [र+आ+म्] रघुवराच्या ' राम ' या नामास मी वंदन करतो. ते रामनाम ब्रह्मा-विष्णु-शिवमय जो वेद प्राण म्हणजे प्रणव तो आहे. तसेच ते निर्गुण व अनुपम गुणांचे निधान आहे. जो महामंत्र महेश सदा जपत असतात व काशीत मुक्ती देण्यासाठी ते ज्याचा उपदेश करतात, तो ' राम ' मंत्रच होय! या रामनामाचा महिमा गणपती चांगला जाणतात, कारण त्याच्या जपानेच त्यांना अग्रपूजेचा मान मिळाला आहे.

आदिकवी श्रीवाल्मीकी या रामानामाच्या प्रतापाचे प्रत्यक्ष उदाहरण आहे. त्यांनी उलटा मंत्र (' राम 'च्या उलट मरा) जपून पावित्र्याची प्राप्ती करून घेतली आहे.



चौ०— हरषे हेतु हेरि हर ही को । किन भूषन तिय भूषन ती को ॥
नाम प्रभाउ जान सिव नीको । कालकूट फलु दीन्ह अमी को ॥
दो०—बरषा रितु रघुपति भगति तुलसी सालि सुदास ।
राम नाम बर बरन जुग सावन भादव मास ॥ १९ ॥

चौ०— आखर मधुर मनोहर दोऊ । बरन बिलोचन जन जिय जोऊ ॥
सुमिरत सुलभ सुखद सब काहू । लोक लाहु परलोक निबाहू ॥
कहत सुनत सुमिरत सुठि नीके । राम लखन सम प्रिय तुलसी के ॥
बरनत बरन प्रीति बिलगाती । ब्रह्म जीव सम सहज सँघाती ॥
नर नारायन सरिस सुभ्राता । जग पालक बिसेषि जन त्राता ॥
भगति सुतिय कल करन बिभूषन । जग हित हेतु बिमल बिधु पूषन ॥
स्वाद तोष सम सुगति सुधा के । कमठ सेष सम धर बसुधा के ॥
जन मन मंजु कंज मधुकर से । जीह जसोमति हरि हलधर से ॥

राम नाम हे विष्णुसहस्त्रनामाच्या तोडीचे आहे, असे श्रीशिवमुखातून ऐकून भवानीने पतीसह भोजन केले. राम नामावरील पार्वतीचे हे प्रेम शंकरांच्या ध्यानी आल्यामुळे त्याना परमानंद झाला. स्त्रीभूषण असलेल्या पार्वतीला त्यामुळे त्यानी आपले भूषण बनवली. तिला स्वशरीरातील अर्धांग देऊन अक्षरशः अर्धांगिनी बनवली ! (मांडीवर घेतली.)

या नामाच्या प्रभावाची शंकरांनाही एकवेळ पूर्ण प्रचीती आली आहे. या नामाच्या प्रतापानेच जहर अशा कालकूटाचे रूपांतर अमृतात झाले !

श्री रघुनाथाची भक्ती, तुलसीदास म्हणतात, हाच कोणी एक वर्षाऋतू आहे. अनन्य भक्त हे त्यांतील साळीच्या धान्याचे पीक आहे. ' रा ' आणि ' म ' ही दोन श्रेष्ठ अक्षरे त्यातील श्रावण व भाद्रपद मास असून ती दोन्ही अक्षरे मधुर व मनोहर आहेत १९.

भक्तहृदयातील हा प्राणच आहे. स्मरण करण्यास सर्वांना सुलभ व सुखदायक ! तसेच ही दोन अक्षरे ऐहिक व पारलौकिक कल्याणाची तरतूद करणारी आहेत. उच्चार करण्यास, ऐकायला व स्मरण करण्याला ही दोन अक्षरे फारच सुंदर व मधुर आहेत. तुलसीदासाला तर ही ' रा ' व ' म ' ची जोडी म्हणजे प्रत्यक्ष राम-लक्ष्मणाचीच जोडी वाटते. ' रा ' आणि ' म ' चे जर वेगवेगळे वर्णन केले तर यांचे प्रेम टिकत नाही. [म्हणजे बीजमंत्राच्या दृष्टीने यांचा उच्चार, अर्थ व फल यांत भेद आहे.] परंतु ब्रह्म आणि जीवाप्रमाणे त्याचे सहज सख्य आहे. [सदोदित एकरूप व एकरस असे हे दोन वर्ण आहेत.] ' म ' व ' रा ' ही दोन्ही अक्षरे, नर-नारायणाप्रमाणे [येथे विलोम म्हणजे उलट नाम ' म ' ' रा ' यांचे माहात्म्य आहे. म्हणून नर-नारायणरे, चंद्र-सूर्य असा उलटा क्रम.] प्रेमळ बंधुरूप आहेत. जगाचे पालन करण्याची ताकद यांना असून, भक्तांचे रक्षण करण्यास हे समर्थ आहेत.

भक्तिरूपी सुंदर स्त्रीच्या कानातील ही दोन अक्षरे उत्तम कर्णभूषणे आहेत व जगाच्या हितासाठी निष्कलंक चंद्र व निर्दोष सूर्याप्रमाणे आहेत.

मोक्षामृताचा स्वाद व तृप्ती असे यांचे दुहेरी स्वरूप असून, शेष व कासवाप्रमाणे ते पृथ्वीला धारण करू शकतात. भक्ताच्या हृदयकमलात विहार करणारे हे दोन मनोहर भ्रमर आहेत. तसेच जीभरूपी यशोदेचे हे श्रीकृष्ण-बलराम आहेत.

दो०— एकु छतु एकु मुकुटमनि सब बरननि पर जोउ ।
तुलसी रघुबर नाम के बरन बिराजत दोउ ॥ २० ॥

चौ० — समुझत सरिस नाम अरु नामी । प्रीति परसपर प्रभु अनुगामी ॥
नाम रूप दुइ ईस उपाधी । अकथ अनादि सुसामुझि साधी ॥
को बड़ छोट कहत अपराधू । सुनि गुन भेदु समुझिहहिं साधू ॥
देखिअहिं रूप नाम आधीना । रूप ग्यान नहिं नाम बिहीना ॥
रूप बिसेष नाम बिनु जानें । करतल गत न परहिं पहिचानें ॥
सुमिरिअ नाम रूप बिनु देखें । आवत हृदयँ सनेह बिसेषें ॥
नाम रूप गति अकथ कहानी । समुझत सुखद न परति बखानी ॥
अगुन सगुन बिच नाम सुसाखी । उभय प्रबोधक चतुर दुभाषी ॥

दो०— राम नाम मनिदीप धरु जीह देहरीं द्वार ।
तुलसी भीतर बाहेरहुँ जौं चाहसि उजिआर ॥ २१ ॥

श्रीरघुनाथाच्या या नावातील दोन अक्षरांची शोभा काय वर्णन करावी ? त्यांतील ' र ' कार छत्ररूपी (रेफ) व ' म् ' कार मुकुटामारखा (अनुस्वाररूप) असल्याने सर्व वर्णांच्या शिरोभागीच त्यांचे नेहमी स्थान विराजत असते. (छत्राच्या आत मुकुट-नाम —नामापेक्षा श्रेष्ठ.) २०

नाम-नामी-भेद-निरूपण

[illegible] दृष्टीने नाम व नामी (ते नामधारण करणारी व्यक्ती) एकरूपच असतात. [परंतु विचार केला असता असे दिसते की,) दोहोंच्यामध्ये स्वामी-सेवक भावाची प्रीती आहे. [अर्थात नाम-नामी एकरूप झाल्यावर; जसा सेवक स्वामीच्या पाठोपाठ जातो, त्याप्रमाणे नामाच्या मागून नामीस जावे लागते. प्रभू श्रीरामही आपल्या नामाच्या (' राम ' या) उच्चाराबरोबर तिकडे जातात.]

नाम व रूप या दोन्ही भगवंताच्या उपाधी आहेत. त्या अनिर्वचनीय असून अनादि आहेत. शुद्ध भक्तियुक्त बुद्धीने यांचे दिव्य अविनाशी स्वरूप जाणता येते.

या नामरूपाच्या जोडीत मोठा कोण व छोटा कोण याची चर्चा करणे, हा अपराध आहे. यांच्या गुणांचे तारतम्य समजून साधुपुरुष स्वतः त्यांच्या स्वरूपाचा अनुभव घेऊ शकतात.

रूप हे नामाच्या आधीन असते. नामाच्या शिवाय रूपाचे ज्ञानच होऊ शकत नाही. कोणत्याही अज्ञात पदार्थाचे रूप प्रथम अगदी हातात घेऊन जरी पाहिले तरी त्याचे नाव समजेपर्यंत त्या रूपाची ओळख पटू शकत नाही. पण याच्या उलट रूप न पाहता नुसत्या नामाचे [पूर्वज्ञात ज्याचे रूप आहे अशाचे] स्मरण केले तर प्रेमभराने ते रूप हृदयात प्रकट होते.

म्हणून नाम व रूप यांच्या वैशिष्ट्याचे स्वरूप हे वर्णनातीत आहे. त्याच्या स्वरूपाचा अनुभव आला म्हणजे सुख होते; परंतु त्या सुखाचे वर्णन बरोबर करता येणार नाही.

भगवंताच्या निर्गुण व सगुण रामस्वरूपाच्या दरम्यान नाम हा एक सुन्दर मध्यस्थ-साक्षी आहे. त्याच्या साह्याने चतुर दुभाष्याप्रमाणे दोन्ही स्वरूपांचे यथार्थ ज्ञान होऊ शकते.

नाम-जप महिमा

अंतर्बाह्य शुद्ध ज्ञानाचा स्वच्छ प्रकाश अखंड पडावा, अशी जर इच्छा असली तर, तुलसीदास स्वानुभव सांगतात. मुखाच्या दरवाजात जीभ ' उंबरठा ' आहे, तेथे रामनामरूपी रत्नाचा दिवा सतत तेवत ठेवावा. २१

चौ०– नाम जीहँ जपि जागहिं जोगी। बिरति बिरंचि प्रपंच बियोगी ॥
ब्रह्मसुखहि अनुभवहिं अनूपा। अकथ अनामय नाम न रूपा ॥
जाना चहहिं गूढ़ गति जेऊ। नाम जीहँ जपि जानहिं तेऊ ॥
साधक नाम जपहिं लय लाएँ। होहिं सिद्ध अनिमादिक पाएँ ॥
जपहिं नामु जन आरत भारी। मिटहिं कुसंकट होहिं सुखारी ॥
राम भगत जग चारि प्रकारा। सुकृती चारिउ अनघ उदारा ॥
चहू चतुर कहुँ नाम अधारा। ग्यानी प्रभुहि बिसेषि पिआरा ॥
चहुँ जुग चहुँ श्रुति नाम प्रभाऊ। कलि बिसेषि नहिं आन उपाऊ ॥

दो० – सकल कामना हीन जे राम भगति रस लीन।
नाम सुप्रेम पियूष ह्रद तिन्हहुँ किए मन मीन ॥ २२ ॥

चौ०– अगुन सगुन दुइ ब्रह्म सरूपा। अकथ अगाध अनादि अनूपा ॥
मोरें मत बड़ नामु दुहू तें। किए जेहिं जुग निज बस निज बूतें ॥
प्रौढ़ि सुजन जनि जानहिं जन की। कहउँ प्रतीति प्रीति रुचि मन की ॥

मुखाने नामजप करून जपाची योगासिद्धी मिळवलेला पुरुष मोहरूप निद्रा-विलासातील वैराग्यरूप जागृती मिळवू शकतो. त्या वैराग्याची प्राप्ती झाल्यावर विरंचीच्या प्रपंचापासून त्याची सुटका होते. (दृश्याचा पसारा सत्यत्वाने अनुभवास येण्याचे बंद होते.) मग अनुपम, अनिर्वचनीय, मायादि दोषरहित व नामरूप-रहित अशा ब्रह्मसुखाचा तो अनुभव घेऊ लागतो.

परमात्म्याच्या गूढ रहस्याचा यथार्थ महिमा आपणास कळावा, अशी ज्यांना इच्छा असेल त्यांनी जिव्हेने नामजप करावा. म्हणजे त्या गूढ रहस्याचे ज्ञान होते. तसेच केवळ ऐहिक अणिमादि, सिद्धींची ज्यांना लालसा असते, तेही लय लावून नामाचा जप करतील तर त्यांना त्या अणिमादि अष्टसिद्धी मिळून ते सिद्ध होतील.

आर्त स्थितीतील भक्त जर अंतःकरणपूर्वक भगवंताच्या नामाचा जप करतील तर महासंकटातून पार पडतील व सुखी होतील.

तसे पाहिले तर भक्तांचे चार प्रकार आहेत–(१. अर्थार्थी, २. आर्त, ३. जिज्ञासू, व ४. ज्ञानी.) हे चारही प्रकारचे रामभक्त पुण्यात्मे, निष्पाप व उदार असतात; कारण या चारी प्रकारच्या चतुर भक्तांना नामाचाच आधार असतो. तथापि यांतील ज्ञानी हा जो भक्तांचा चौथा प्रकार आहे, तो भगवंताला विशेष प्रिय असतो. चारी युगांत व चारी वेदांत नामाचा हा प्रभाव वर्णन केलेला आहे, परंतु कलियुगात तो महिमा विशेष आहे. याचे कारण या युगात मानवास नामाचा आधार सोडल्यास उद्धारास दुसरा उपायच नाही. भोग अगर मोक्ष यांपैकी कोणतीही कामना न ठेवता प्रभू रामचंद्राच्या भक्तिरसात जे मग्न असतात, त्यांनी खरोखर नामस्वरूपी श्रेष्ठ प्रेमामृताच्या डोहात स्वैर संचार करणाऱ्या एखाद्या माशाप्रमाणे आपले मन विहार करण्यास मोकळे केलेले असते. २२

निर्गुण-सगुण ब्रह्माहून नाम श्रेष्ठ

ब्रह्माची निर्गुण व सगुण अशी दोन स्वरूपे आहेत; व ती दोन्ही अनिर्वचनीय, अगाध, अनादि व अनुपम अशीच आहेत. पण माझ्या मते या दोन्हीहून नाम श्रेष्ठ आहे. कारण ते आपल्या प्रभावाने दोघांनाही आपल्या आधीन करते. सज्जन हो! दासाच्या या माझ्या भाषेला उद्धटपणा किंवा केवळ काव्योक्ती समजू नका. मी स्वतःच्या अंतःकरणातील प्रतीती, प्रेम व आवड यांचा अनुभव सांगत आहे!

एकु दारुगत देखिअ एकू । पावक सम जुग ब्रह्म बिबेकू ।।
उभय अगम युग सुगम नाम तें । कहेउँ नामु बड़ ब्रह्म राम तें ।।
व्यापकु एकु ब्रह्म अबिनासी । सत चेतन घन आनँद रासी ।।
अस प्रभु हृदयँ अछत अबिकारी । सकल जीव जग दीन दुखारी ।।
नाम निरूपन नाम जतन तें । सोउ प्रगटत जिमि मोल रतन तें ।।

दो ०– निरगुन तें एहि भाँति बड़ नाम प्रभाउ अपार ।
कहउँ नामु बड़ राम तें निज बिचार अनुसार।। २३ ।।

चौ०-- राम भगत हित नर तनु धारी । सहि संकट किए साधु सुखारी ।।
नामु सप्रेम जपत अनयासा । भगत होंहिं मुद मंगल बासा ।।
राम एक तापस तिय तारी । नाम कोटि खल कुमति सुधारी ।।
रिषि हित राम सुकेतुसुता की । सहित सेन सुत कीन्हि बिबाकी ।।
सहित दोष दुख दास दुरासा । दलइ नामु जिमि रबि निसि नासा ।।


निर्गुण व सगुण अशा दोन्ही प्रकारच्या ब्रह्माचे ज्ञान हे अग्नीच्या सारखे आहे. निर्गुण ब्रह्म हे लाकडातील न दिसणाऱ्या अग्नीसारखे आहे. तो अग्नी लाकडाच्या आत असतो व डोळ्यांना दिसत नाही. सगुण ब्रह्म हे प्रत्यक्ष दिसणाऱ्या अग्नीप्रमाणे प्रकट असते. वस्तुतः दोन्ही एकच आहेत. प्रकट व अप्रकट स्वरूपांमुळे त्यांचे दोन भेद पडले आहेत. असे असूनही जाणण्यास दोन्ही ब्रह्मस्वरूपे कठीण आहेत; परंतु ते कठीण असणारे ब्रह्मज्ञान रामाच्या नामजपाने सुगम होते. याच कारणासाठी निर्गुण व सगुण रामरूप या दोहोंपेक्षा नाम मोठे आहे, असे मी सांगितले.

ब्रह्म हे व्यापक, एक व अविनाशी असून सत्ता, चैतन्य व आनन्द यांची घनराशी आहे. (सच्चिदानंदस्वरूप) अशा विकाररहित प्रभूचे हृदयात वास्तव्य असूनही जगतातील सर्व जीव अत्यंत दीन व दुःखी आहेत. यासाठी नामाचे यथार्थ स्वरूप, महिमा, रहस्य व प्रभाव जाणून श्रद्धापूर्वक नामाचा जप करण्याच्या साधनाचा अचूक यत्न केल्याने –रत्नाची पारख झाल्यावर जसे त्याचे खरे मोल कळते त्याचप्रमाणे-- तेच ब्रह्म उत्तम प्रकारे प्रकट होते आणि दैन्य व दुःख यांचा तेव्हाच खरा शेवट होऊ शकतो.

याप्रमाणे निर्गुण (व सगुण) ब्रह्माहून नामाचा प्रभाव अत्यंत मोठा आहे, हे वरील विवेचनावरून ध्यानी येईल. आता माझ्या समजुतीप्रमाणे सगुण ब्रह्मरूप रामाहूनही त्याचे नाम कसे थोर आहे, हे स्पष्ट करण्याचा मी प्रयत्न करतो. २३

स्वभक्तांच्या हितासाठी रामाने नरतनू धारण केली. स्वतः अनेक प्रकारची संकटे सोसून आपल्या भक्तांना (संतांना) सुख दिले. पण प्रेमाने जर भगवंताच्या नामाचा जप केला तर काहीही श्रम न करता जापक नामभक्तांना आनंद व मांगल्य यांचे माहेरघर बनता येते. रामाने एका अहिल्येचा उद्धार केला. नामाने कोट्यवधी खलांच्या कुमतींना सुधारले.

विश्वामित्रांच्या यज्ञ रक्षणार्थ रामाने सुकेतु यक्षाच्या ताटका नावाच्या एका कन्येचा, तिचा मुलगा सुबाहु व तिची अफाट सेना यांसह सर्वांचा संहार केला; पण ज्याप्रमाणे सूर्याच्या तेजाने अंधारादि अनेक दोषांचा एकदम व संपूर्णत्वाने नाश होतो, तसाच नामाच्या जपाने भक्तांच्या दुराशा-दुःख-दोषादिकांचा समूळ आणि सत्वर नाश होतो.



चौ०-- भंजेउ राम आपु भव चापू। भव भय भंजन नाम प्रतापू ॥
दंडक बनु प्रभु कीन्ह सुहावन। जन मन अमित नाम किए पावन ॥
निसिचर निकर दले रघुनंदन। नामु सकल कलि कलुष निकंदन ॥

दो०-- सबरी गीध सुसेवकनि सुगति दीन्हि रघुनाथ।
नाम उधारे अमित खल बेद बिदित गुन गाथ ॥ २४ ॥

चौ०-- राम सुकंठ बिभीषन दोऊ। राखे सरन जान सबु कोऊ ॥
नाम करीब अनेक नेवाजे। लोक बेद बर बिरिद बिराजे ॥
राम भालु कपि कटकु बटोरा। सेतु हेतु श्रमु कीन्ह न थोरा ॥
नामु लेत भवसिंधु सुखाहीं। करहु बिचारु सुजन मन माहीं ॥
राम सकुल रन रावनु मारा। सीय सहित निज पुर पगु धारा ॥
राजा रामु अवध रजधानी। गावत गुन सुर मुनि बर बानी ॥
सेवक सुमिरत नाम सप्रीती। बिनु श्रम प्रबल मोह दलु जीती ॥
फिरत सनेहँ मगन सुख अपनें। नाम प्रसाद सोच नहिं सपनें ॥

दो०-- ब्रह्म राम तें नामु बड़ बर दायक बर दानि।
रामचरित सत कोटि महँ लिय महेस जियँ जानि ॥ २५ ॥

मास पारायण, पहला विश्राम

रामाने एका भव (संकट) चापाचा भंग केला; पण नामाचा एवढा प्रताप आहे की, त्यामुळे भव (जन्ममरणरूप संसार) याच्या भीतीचाच उच्छेद होतो.

भगवंतानी एक भयाण दण्डक वन सुशोभित केले; पण अगणित भक्तांच्या मन-काननांना नाम पावन करते. राक्षसांच्या सेनेचा नाश रामांनी केला, पण नाम सर्वच कलिदोषांचा निरास करते. श्रीरघुनाथांनी भिल्लीण शबरी व गृध्र जटायू आदि आपल्या उत्तम सेवकांना सद्गती दिली; पण नामाने किती खलांचा उद्धार केला, याची गणना कोण करणार? अशा गुणकथा वेदांनीसुद्धा वर्णिल्या आहेत. २४

सुग्रीव व विभीषण हे शरण आल्यामुळे त्या दोघांचे संरक्षण रामाने केले, हे सर्वविश्रुत आहे; पण नामाने किती अज्ञात गरिबांना आश्रय दिला, आज देत आहे व पुढे देईल, हे कोणास सांगता येईल? नामाचे हे ब्रीद लौकिक व वैदिकशास्त्रांत सुद्धा विराजत आहे.

रामांनी वानर-भालूसैन्याचा प्रचंड सेनासागर घेऊन समुद्रावर सेतू [illegible] केवढा दीर्घोद्योग केला! पण भगवंताच्या नामजपाने भवसागरच सुकून जातो. तेव्हा सज्जनहो! मग दोहोंत कोण श्रेष्ठ ते सुविचार करून तुम्हीच सांगा.

रावणाच्या सर्व कुलाचा रणांगणावर नाश करून रघुनाथांनी सीतेसह अयोध्येत पदार्पण केले. रामचंद्र सिंहासनावर बसले व अयोध्या त्यांची राजधानी झाली. सुरमुनी त्यांचे सुन्दर वाणीने गुणगान करू लागले. पण प्रभूचे सेवक जर प्रेमाने भगवताच्या नामाचा जप करतील तर विनायास या प्रबळ मोह-मद-कामादिकांच्या आसुरी सेनेला जिंकतील. त्यानंतर त्या प्रेमभक्तिरंगात रंगल्याने पृथ्वीच्या पाठीवर सुखाने स्वैर संचार करतील. नामाच्या कृपेने त्यांना स्वप्नातही दुःख होणार नाही. अशाप्रकारे नाम हे निर्गुण ब्रह्म व सगुण रामावतार-ब्रह्म या दोहोंपेक्षा श्रेष्ठ आहे, हे सिद्ध झाले. वरदान देण्याचा ज्यांना अधिकार त्यांनाही नाम वरदान देऊ शकते, हे हृदयात जाणून महेशांनी शतकोटी [illegible] जीव की प्राण असे राम हे नाम घेतले. २५.



चौ०-- नाम प्रसाद संभु अबिनासी । साजु अमंगल मंगल रासी ।।
सुक सनकादि सिद्ध मुनि जोगी । नाम प्रसाद ब्रह्मसुख भोगी ।।
नारद जानेउ नाम प्रतापू । जग प्रिय हरि हरि हर प्रिय आपू ।।
नामु जपत प्रभु कीन्ह प्रसादू । भगत सिरोमनि भे प्रहलादू ।।
ध्रुवँ सगलानि जपेउ हरि नाऊँ । पायउ अचल अनूपम ठाऊँ ।।
सुमिरि पवनसुत पावन नामू । अपने बस करि राखे रामू ।।
अपतु अजामिलु गजु गनिकाऊ । भए मुकुत हरि नाम प्रभाऊ ।।
कहौं कहाँ लगि नाम बड़ाई । रामु न सकहिं नाम गुन गाई ।।

दो०--नामु राम को कलपतरु कलि कल्यान निवासु ।
जो सुमिरत भयो भाँग तें तुलसी तुलसीदासु ।। २६ ।।

चौ ०-- चहुँ जुग तीनि काल तिहुँ लोका । भए नाम जपि जीव बिसोका ।।
बेद पुरान संत मत एहू । सकल सुकृत फल राम सनेहू ।।

नामाच्या कृपेने शंभू हे अविनाशी झाले. त्यामुळेच अमंगल वेष धारण करूनही मंगलधाम असे ते बनले. शुकाचार्य, सनत्कुमार हे सिद्ध व योगी बनले; आणि नामाच्या जोरावरच ब्रह्मानंदाचा सुखसोहळा अनुभवू लागले.

नारदांना नामाचा प्रताप समजला आहे. हरी सर्व विश्वाला प्रिय आहे व अशा हरीला हर प्रिय आहेत. पण हरी व हर या दोघांनाही नारद प्रिय झाले आहेत. याचे इंगित जर कशात असेल तर ते त्यांच्या अखंड नाम-स्मरणात आहे.

नामाचा जप केल्यानेच प्रल्हादावर भगवंतांनी कृपा केली व भक्तांच्या मालिकेत त्याला पहिला क्रमांक दिला ! तसेच ध्रुवबाळाने सापत्नमातेच्या शब्दप्रहारांनी दीन-दुःखी होऊन सकाम भावनेने भगवंताच्या नामाचा जप केला आणि त्याच्या प्रभावाने अचल-अनुपमेय अशा ध्रुवलोकाची प्राप्ती करून घेतली !

पावन अशा रामनामाचे पवनसुतांनी अखंड स्मरण ठेवले व रामाला सर्वस्वी आपल्या अंकित करून घेतले.

नीच अजामिल, गजेंद्र व अत्यंत पापिणी जीवंती वेश्येसुद्धा सगळे हरिनामाच्या प्रभावाने तरले. आता या नामाचा मोठेपणा मी किती व कोठवर गाऊ ? प्रत्यक्ष भगवान रामचंद्रांनाही आपल्या नामाचा प्रताप पूर्णपणे वर्णन करता येणार नाही.

या कलियुगात रामनाम हा एक कल्पतरू असून, कल्याणाचे ते एक निवासस्थान आहे. केवळ याच्या स्मरणानेच भांगेप्रमाणे नीच असणारा हा तुलसीदास तुलसीप्रमाणे पवित्र झाला आहे.२६

कलियुगात नामच आधार पण चारी युगांत, त्रिकाळी व त्रैलोक्यात नामाच्या जपाने पुष्कळ जीव शोक-रहित (मुक्त) झाले, हा सिद्धान्त आहे. वेद, पुराणे व संतांचे मत असे आहे की, रामाच्या म्हणजे रामनामाच्या ठिकाणी निष्काम प्रेम उत्पन्न होणे हेच सर्व पुण्यकर्मांचे श्रेष्ठ फल आहे.



चौ०– ध्यानु प्रथम जुग मखबिधि दूजें। द्वापर परितोषत प्रभु पूजें॥
कलि केवल मल मूल मलीना। पाप पयोनिधि जन मन मीना॥
नाम कामतरु काल कराला। सुमिरत समन सकल जग जाला॥
राम नाम कलि अभिमत दाता। हित परलोक लोक पितु माता॥
नहिं कलि करम न भगति बिबेकू। राम नाम अवलंबन एकू॥
कालनेमि कलि कपट निधानू। नाम सुमति समरथ हनुमानू॥

दो०–राम नाम नरकेसरी कनककसिपु कलिकाल।
जापक जन प्रहलाद जिमि पालिहि दलि सुरसाल॥ २७॥

चौ०– भायँ कुभायँ अनख आलसहूँ। नाम जपत मंगल दिसि दसहूँ॥
सुमिरि सो नाम राम गुन गाथा। करउँ नाइ रघुनाथहि माथा॥
मोरि सुधारिहि सो सब भाँती। जासु कृपा नहिं कृपाँ अघाती॥
राम सुस्वामि कुसेवकु मोसो। निज दिसि देखि दयानिधि पोसो॥

सत्ययुगात ध्यान, त्रेतायुगात यज्ञयागादि कर्मे आणि [illegible] अशा साधनांनी त्या त्या युगात भगवान प्रसन्न होतात. परंतु मलिन कलियुग हे केवळ पापाचे मूळ आहे. या युगात पापाचा सागराप्रमाणे विस्तार होऊन त्यात मनुष्याचे मन माशाप्रमाणे अखंड पोहू लागते. (पापापासून त्याला वेगळे काढणे अशक्य होते.) अशा भयंकर कलिकालात भगवन्नाम हे कल्पतरूप्रमाणे आहे. त्याचे स्मरण करताच संसारातील सर्व आधि[illegible] आग शमते. या कलियुगात रामनाम सर्व मनकामना पूर्ण करणारे आहे. तसेच ते परलोकातील परमहित साधणारे असून इहलोकात प्रत्यक्ष [illegible] आमचे संकटापासून रक्षण करून ममतेने पालन करणारे आहे.

या कलियुगात निर्दोष व विधिवत् कर्म अशक्य! शुद्ध भक्ती व सत्य ज्ञानही मिळणे दुर्लभ. अशा वेळी सर्वांचा व सर्व काळी जर एकमेव कोणता आधार असेल, तर तो फक्त रामनामच होय. कलियुग हे कपटाच्या [illegible]प्रमाणे असणाऱ्या कालनेमी राक्षसासारखे आहे. त्याला ठार करण्यास रामनाम हेच बुद्धिमान हनुमंताचे काम करते.

कराल कलिकाल हा हि[illegible]शिपू असून, रामनाम हा नृसिंह आहे. नामजप करणारे हे प्रिय भक्त प्रल्हाद आहेत. अर्थात देवतांचा शत्रू जो कलियुगरूपी हि[illegible]शिपू दैत्य त्याचा वध नाम-नृसिंह करतो व भक्त प्रल्हादांना अनेक संकटांपासून सांभाळतो. २७

सद्भावाने असो अगर वैरभावाने असो, आळसाने असो अगर संतापाने असो, नामजपाने दाही दिशांना मंगलच होणार!

असे परम कल्याणकारी नाम स्मरून व श्रीरघुनाथाच्या पायावर मस्तक ठेवून मी राम-गुण-गान करतो. तोच माझ्या सर्व दोषांचे निवारण करील. त्याच्या नामाची कृपा झाली की, कृपा करण्यात रामचंद्राला कधी तृप्ती वाटत नाही. कारण रामासारखा उत्तम धनी व माझ्यासारखा नीच सेवक! असे असूनही केवळ आपला अमर्याद दयाशील स्वभाव ध्यानी घेऊन त्याने माझे रक्षण केले आहे.



लोकहुँ बेद सुसाहिब रीती । बिनय सुनत पहिचानत प्रीती ।।
गनी गरीब ग्रामनर नागर । पंडित मूढ़ मलीन उजागर ।।
सुकबि कुकबि निज मति अनुहारी । नृपहि सराहत सब नर नारी ।।
साधु सुजान सुसील नृपाला । ईस अंस भव परम कृपाला ।।
सुनि सनमानहिं सबहि सुबानी । भनिति भगति नति गति पहिचानी ।।
यह प्राकृत महिपाल सुभाऊ । जान सिरोमनि कोसलराऊ ।।
रीझत राम सनेह निसोतें । को जग मंद मलिन मति मोतें ।।

दो०—सठ सेवक की प्रीति रुचि रखिहहिं राम कृपालु ।
उपल किए जलजान जेहिं सचिव सुमति कपि भालु ।। २८ (क) ।।
हौंहु कहावत सबु कहत राम सहत उपहास ।
साहिब सीतानाथ सो सेवक तुलसीदास ।। २८ (ख) ।।

चौ०— अति बड़ि मोरि ढिठाई खोरी । सुनि अघ नरकहुँ नाक सकोरी ।।
समुझि सहम मोहि अपडर अपनें । सो सुधि राम कीन्हि नहिं सपनें ।।
सुनि अवलोकि सुचित चख चाही । भगति मोरि मति स्वामि सराही ।।
कहत नसाइ होइ हियँ नीकी । रीझत राम जानि जन जी की ।।

लौकिक मतांत व वैदिक शास्त्रांत उत्तम धन्यांची अशी रीत प्रसिद्ध आहे की, ते दासांची विनंती ऐकून त्याच्या अंतरीचा भाव ओळखतात. एखादा दरिद्री, एखादा श्रीमंत, गावढळ, शहरवासी शिष्ट, विद्वान, मूर्ख, शिळपटलेला, पाणीदार, सत्कवी, पोटभरू कवी असे सर्व; स्त्रिया व पुरुष आपापल्या बुद्धिमत्तेनुसार राजाची स्तुती करतात. सात्त्विक, शहाणा व सुशील असा, ईश्वरअंशापासून उत्पन्न झालेला, अत्यंत दयाळू राजा सर्वांची यथोचित स्तुती ऐकून, नम्रपणा, अनन्यगतिकत्व, योग्य भाषण, नीतियुक्त वर्तन इ. साधनांनी आपल्या-वरील प्रीती जाणतो व चांगल्या शब्दांनी सर्वांचा यथायोग्य आदर करतो. असा सुस्वभाव, मानव-राजाचा असतो. मग येथे तर सर्व ज्ञान्यांचे मुकुटमणी असे कोसलाधीश भगवान श्रीरामचंद्र हे प्रभू आहेत !

अशा या रघुराजाला शुद्ध प्रेमाने संतोष होतो, पण जगात माझ्यापेक्षा अधिक मूर्ख व अमंगल कोण सापडणार ? तथापि कृपाळू श्रीरामचंद्र माझ्यासारख्या दोषयुक्त दासाचीही प्रीती व रुची अवश्य सांभाळतात. कारण पाषाणांचे जहाज व अस्वला-माकडाचे मोठे बुद्धिवान मंत्री करणाराला हे अशक्य थोडेच आहे ? २८ (क)

कोणी विचारले तर मी सांगतो की, सीतापती रामचंद्राचा मी सेवक आहे आणि लोक उपहासाने असे म्हणतात की, कुठे सीतापतीसारखे स्वामी व कुठे सेवक तुलसीदास ! पण हा सर्व उपहास राम सहन करतात. २८ (ख)

खरोखर विचार केला असता माझा हा केवढा पापी उद्धटपणा ! हा दोष पाहून नरकालासुद्धा माझी शिसारी येते. या माझ्या कल्पनेनेच माझे मन घाबरून जाते. पण आश्चर्य हे की, या माझ्या पापी धिटाईकडे प्रभुजींनी स्वप्नातही लक्ष दिले नाही. दुसऱ्यांकडून ऐकून व स्वतः आपल्या मनाशी विचार करून पाहून प्रभू उलट माझ्या भक्तीची व बुद्धीची स्तुती करण्यास प्रारंभ करतात. भाषा वेडीवाकडी असली तरी हृदयात जर प्रीतीला भरती येत असेल तर दासाचे मन ओळखून राम प्रसन्न होतात.



चौ०— रहति न प्रभु चित चूक किए की । करत सुरति सय बार हिए की ॥
जेहिं अघ बधेउ ब्याध जिमि बाली । फिरि सुकंठ सोइ कीन्हि कुचाली ॥
सोइ करतूति बिभीषन केरी । सपनेहुँ सो न राम हियँ हेरी ॥
ते भरतहि भेंटत सनमाने । राजसभाँ रघुबीर बखाने ॥

दो०— प्रभु तरु तर कपि डार पर ते किए आपु समान ।
तुलसी कहूँ न राम से साहिब सीलनिधान ॥ २९ (क) ॥
राम निकाईं रावरी है सब ही को नीक ।
जौं यह साँची है सदा तौ नीको तुलसीक ॥ २९ (ख) ॥
एहि बिधि निज गुन दोष कहि सबहि बहुरि सिरु नाइ ।
बरनउँ रघुबर बिसद जसु सुनि कलि कलुष नसाइ ॥ २९ (ग) ॥

चौ०— जागबलिक जो कथा सुहाई । भरद्वाज मुनिबरहि सुनाई ॥
कहिहउँ सोइ संबाद बखानी । सुनहुँ सकल सज्जन सुखु मानी ॥
संभु कीन्ह यह चरित सुहावा । बहुरि कृपा करि उमहि सुनावा ॥
सोइ सिव कागभुसुंडिहि दीन्हा । राम भगत अधिकारी चीन्हा ॥
तेहि सन जागबलिक पुनि पावा । तिन्ह पुनि भरद्वाज प्रति गावा ॥
ते श्रोता बकता समसीला । सवँदरसी जानहिं हरिलीला ॥

यानंतर प्रभूच्या चित्तात आपल्या भक्ताच्या कृतीतील चूकभूल पाहण्याची वृत्तीच उठत नाही. फक्त भक्ताच्या हृदयातील शुद्ध प्रेमाची मात्र ते पुनः पुन्हा शेकडो वेळा आठवण करतात ! मौज कशी ती पाहा. एखाद्या व्याधाने मृगाला मारावा तसा ज्या पापासाठी वालीला भगवंतानी ठार केला, तीच दुष्ट कृती पुढे सुग्रीवाने केली. तसाच प्रकार बिभीषणाच्याही कृतीचा दिसून येतो. असे असता प्रभूना त्याची स्वप्नातही आठवण झाली नाही ! इतकेच नव्हे, भरत-भेटीच्या वेळी त्यांचा सन्मान केला व राजसभेत त्यांच्या गुणांचा गौरव केला !

खरोखर प्रभू श्रीरामचंद्रासारखा शीलनिधान स्वामी कुठेही मिळणार नाही. कारण प्रभू झाडाच्या खाली तर वानर झाडाच्या डहाळीवर ! अशा वानरांनाही प्रभूने आपल्या समान बनवले !! २९ (क) *

हे श्रीरामचंद्रा ! आपल्या सर्व मंगलकारक स्वभावामुळे सर्वांचेच कल्याण साधणार, आणि ही गोष्ट जर सत्य असेल तर तुलसीदासाचेही सर्व काळी कल्याणच होणार. २९ (ख)

याप्रमाणे आपल्या गुणदोषांचे कथन करून व सर्वांचे चरणी पुनः एक वेळ मस्तक नमवून मी श्रीरघुनाथाच्या निर्मल यशाचे वर्णन सुरू करतो. याच्या श्रवणाने कलियुगामुळे उत्पन्न होणाऱ्या सर्व पातकांचा नाश होईल. २९ (ग)

मुनिश्रेष्ठ याज्ञवल्क्यांनी जी सुंदर कथा मुनिवर भारद्वाजांना सांगितली, त्यांचा संवाद मी विस्तार पूर्वक सांगणार आहे. तरी आपण सर्व सज्जन सर्व सुख मानून श्रवण करावी, अशी माझी विनंती आहे.

प्रथम शंकरांनी हे सुंदर चरित्र रचले. नंतर पार्वतीवर दया करून तिला ते सांगितले. तेच चरित्र [illegible] श्रीरामाचा भक्त व कथाधिकारी जाणून शंकरांनी दिले. त्या चरित्राचा लाभ काकभुशुण्डी-कडून याज्ञवल्क्यांना झाला. त्याचे गायन करून ते त्यांनी भारद्वाजांना सांगितले. ते सर्व श्रोते व वक्ते समान शीलाचे असून, समदर्शी आहेत. त्यांना श्रीहरीच्या लीलांचे ज्ञान आहे. हातात ठेवलेल्या एखाद्या आवळ्याचे

---

* (कुठे मर्यादापुरुषोत्तम श्रीरामचंद्र व कुठे झाडाच्या फांद्यावर उड्या मारणारी माकडे ! अशांना—)

चौ० – जानहिं तीनि काल निज ग्याना । करतल गत आमलक समाना ॥
औरउ जे हरिभगत सुजाना । कहहिं सुनहिं समुझहिं बिधि नाना ॥
दो०–मैं पुनि निज गुर सन सुनी कथा सो सूकरखेत ।
समुझी नहिं तसि बालपन तब अति रहेउँ अचेत ॥ ३० (क) ॥
श्रोता बकता ग्याननिधि कथा राम कै गूढ़ ।
किमि समुझौं मैं जीव जड़ कलि मल ग्रसित बिमूढ़ ॥ ३० (ख) ॥
चौ०– तदपि कही गुर बारहिं बारा । समुझि परी कछु मति अनुसारा ॥
भाषाबद्ध करबि मैं सोई । मोरें मन प्रबोध जेहिं होई ॥
जस कछु बुधि बिबेक बल मेरें । तस कहिहउँ हियँ हरि के प्रेरें ॥
निज संदेह मोह भ्रम हरनी । करउँ कथा भव सरिता तरनी ॥
बुध बिश्राम सकल जन रंजनि । रामकथा कलि कलुष बिभंजनि ॥
रामकथा कलि पंनग भरनी । पुनि बिबेक पावक कहुँ अरनी ॥
रामकथा कलि कामद गाई । सुजन सजीवनि मूरि सुहाई ॥
सोइ बसुधातल सुधा तरंगिनि । भय भंजनि भ्रम भेक भुअंगिनि ॥

जसे स्पष्ट ज्ञान असावे, त्याप्रमाणे ते त्रिकालज्ञ व आत्मज्ञानी आहेत. या शिवाय दुसरे कितीतरी सुज्ञ हरिभक्त श्रोते-वक्ते हे श्रीरामचरित्र विविध प्रकारांनी सांगतात, ऐकतात व समजून घेतात.

अशा प्रकारे गुरुशिष्यपरंपरेने चालत आलेली ती कथा माझ्या सुजाण अशा गुरूंनी मला सूकरखेत या गावी सांगितली. पण मी त्यावेळी फार लहान व अज्ञानी असल्यामुळे मला ती जशी समजावयास पाहिजे तशी समजली नाही. ३० (क)

याज्ञवल्क्यासारखे वक्ते व भारद्वाजासारखे श्रोते यांनी रामकथेतील गूढ रहस्ये बोलावी व ऐकावी, अशी जी रामकथा ती कलिमलाने बुरशी आलेल्या मंदबुद्धीच्या मला एकदा श्रवण करून अशा बालपणी कशी समजावी ? ३० (ख)

तरीसुद्धा गुरुजींचे माझ्यावर प्रेम फार त्यामुळे त्यांनी मला ती कथा पुनः पुनः सांगितली. त्यांच्या या प्रयत्नाने मला ती थोडीशी यथामती समजली. तीच कथा आता मी माझ्या भाषेत पुनः लिहिण्याचे ठरवले आहे. आशा आहे की, असे केल्याने माझ्या अंतःकरणात त्या कथेचा पूर्ण प्रकाश पडेल.

मला जेवढे ज्ञान आहे व माझी बुद्धी जितके बल देईल, त्याप्रमाणे हे रामकथा गायनाचे काम चालणार. मुख्यतः अंतर्यामीचा भगवान जी प्रेरणा देईल तेच मी सांगणार ! माझ्या मनातील भ्रम, संशय व मोह याचा नाश व्हावा व भवसागरातून तरून जाण्यास नौकेप्रमाणे उपयोग व्हावा, असा या कथेचा मुख्य हेतू आहे.

सज्जनांच्या हृदयाला आराम देणारी, सर्व लोकांचे मनरंजन करणारी, कलियुगाच्या दोषांचे निर्मूलन करणारी, कलियुग सर्पाला ती *भरणी पक्ष्याप्रमाणे गट्ट करणारी, ज्ञानरूपी अग्नी निर्माण करणारी अरणी, कलियुगातील ही एक कामधेनूच, सज्जनांना संजीवन देणारी सुंदर मुळी, पृथ्वीच्या पाठीवरील एक अमृताची नदी, भवभयाचा भंग करणारी, ईश्वरावतारविषयक भ्रमरूप बेडकीस गिळंकृत करणारी नागीण, अगर सेनेप्रमाणे

---

* भरणी–हा एक बेडकाच्या आकाराचा पक्षी असून बेडूक समजून साप त्याला गिळतो. नंतर तो भरणी पक्षी आपल्या चोचीने व काटेदार पंखांनी सापाचे पोट फाडून बाहेर पडतो व त्या सापाला खातो.



चौ० – असुर सेन सम नरक निकंदिनि । साधु बिबुध कुल हित गिरिनंदिनि ॥
संत समाज पयोधि रमा सी । बिस्व भार भर अचल छमा सी ॥
जम गन मुहँ मसि जग जमुना सी । जीवन मुकुति हेतु जनु कासी ॥
रामहि प्रिय पावनि तुलसी सी । तुलसिदास हित हियँ हुलसी सी ॥
सिवप्रिय मेकल सैल सुता सी । सकल सिद्धि सुख संपति रासी ॥
सदगुन सुरगन अंब अदिति सी । रघुबर भगति प्रेम परमिति सी ॥

दो० – रामकथा मंदाकिनी चित्रकूट चित चारु ।
तुलसी सुभग सनेह बन सिय रघुबीर बिहारु ॥ ३१ ॥

चौ० – रामचरित चिंतामनि चारू । संत सुमति तिय सुभग सिंगारू ॥
जग मंगल गुनग्राम राम के । दानि मुकुति धन धरम धाम के ॥
सदगुर ग्यान बिराग जोग के । बिबुध बैद भव भीम रोग के ॥
जननि जनक सिय राम प्रेम के । बीज सकल ब्रत धरम नेम के ॥
समन पाप संताप सोक के । प्रिय पालक परलोक लोक के ॥
सचिव सुभट भूपति बिचार के । कुंभज लोभ उदधि अपार के ॥
काम कोह कलिमल करिगन के । केहरि सावक जन मन बन के ॥

असणाऱ्या नरकांचा पूर्ण संहार करणारी, साधू-संत-देवतांच्या कुलांचे हित साधणारी गिरितनया, (पार्वती) संतसमाजरूपी क्षीरसागरातून निघालेली लक्ष्मी, संपूर्ण विश्वाच्या भरणाचा भार वाहणारी अचल पृथ्वी, यम-दूतांच्या मुखाला काजळ फासण्याचे काम करणारी यमुना नदी, जीवांना मुक्तिप्रदान करण्यात प्रत्यक्ष काशीच, प्रभू श्रीरामांच्या पवित्र तुलसीमालेप्रमाणे प्रिय, तुलसीदासाचे परम हित साधण्यात रात्रंदिवस जागी अशी जणू त्याची हुलसी आईच ! श्रीशंकरांची मेकल-अमरकंटक कन्या नर्मदेप्रमाणे लाडकी, सर्व सिद्धी व सुख-संपत्तींची राशी, सद्‌गुणरूपी देवांची जनन-पालन-पोषण करणारी अदिती माता अशीही रामकथा आहे.

श्री रघुवराच्या भक्तिप्रेमाची परमसीमा, चित्रकूटावरील मंदाकिनी नदीप्रमाणे सुखद, शुद्ध व निर्मल चित्त हा चित्रकूट पर्वत, अंतःकरणातून उफाळून येणारे प्रेम हे तेथील मनोहर वनराजीप्रमाणे असून, तिच्यात श्रीसीता-रामांचा विचार चालू राहतो. ३१

रामचरित हा मौल्यवान चिंतामणी आहे. संतांची सद्‌बुद्धी हीच कोणी एक तरुणी, तिचा हा आकर्षक शृंगार आहे.

श्रीराम सद्‌गुण महिमा

श्रीरामचंद्राच्या सद्‌गुण समुदायात जगाचे मंगल करण्याचे सामर्थ्य असून, मुक्ती, धन, धर्म व परम-धाम देणारा तो गुणगण आहे. ज्ञान, वैराग्य व योग यांच्या प्राप्तीसाठी हा श्रीरामाचा सद्‌गुणसमूह सद्‌गुरुस्वरूप आहे. संसाररूपी भयंकर रोगाचे निर्मूलन करण्यात हा देवांच्या अश्विनीकुमार वैद्यांच्या तोडीचा आहे. श्रीसीताराम चरणांच्या प्रेमनिर्मितीस आईबापाप्रमाणे, व्रत, धर्म व नियम यांची संपूर्ण मूल बीजांची साठवण असणारा, पाप, संताप व शोक यांचा विनाश करणारा, ऐहिक व पारलौकिक हिताचे प्रेमाने पालन करणारा, ज्ञानभूपतीचा शूर असा मंत्र्यांचा समुदाय, अपार अशा लोभसागराचे शोषण करणारा तो अगस्ती, भक्तांच्या मनवनात वसती करणारे कामक्रोधादि कलिनिर्मित जे हत्ती, त्यांचा फडशा पाडण्यात तो



चौ० – अतिथि पूज्य प्रियतम पुरारि के । कामद घन दारिद दवारि के ॥
मंत्र महामनि विषय ब्याल के । मेटत कठिन कुअंक भाल के ॥
हरन मोह तम दिनकर कर से । सेवक सालि पाल जलधर से ॥
अभिमत दानि देवतरु बर से । सेवत सुलभ सुखद हरि हर से ॥
सुकबि सरद नभ मन उडगन से । रामभगत जन जीवन धन से
सकल सुकृत फल भूरि भोग से । जग हित निरुपधि साधु लोग से ॥
सेवक मन मानस मराल से । पावन गंग तरंग माल से ॥

दो० – कुपथ कुतरक कुचालि कलि कपट दंभ पाषंड ।
दहन राम गुन ग्राम जिमि ईंधन अनल प्रचंड ॥ ३२ (क) ॥
रामचरित राकेस कर सरिस सुखद सब काहु ।
सज्जन कुमुद चकोर चित हित बिसेषि बड़ लाहु ॥ ३२ (ख) ॥

चौ० – कीन्हि प्रस्न जेहि भाँति भवानी । जेहि बिधि संकर कहा बखानी ॥
सो सब हेतु कहब मैं गाई । कथाप्रबंध बिचित्र बनाई ॥
जेहिं यह कथा सुनी नहिं होई । जनि आचरजु करै सुनि सोई ॥
कथा अलौकिक सुनहिं जे ग्यानी । नहिं आचरजु करहिं अस जानी ॥

गुणगण सिंहाचा छावाच, त्रिपुरारींना प्रियतम व पूज्य अशा अतिथींची जागा भूषविणारा, दरिद्रदावानलाला विझवून सर्व मनकामना पूर्ण करणारा मेघ, विषयरूप भुजंगाचे जहर उतरण्यास [illegible] उपयुक्त (रामगुणगण हेच त्यावरील रामबाण औषध.) आपल्या ललाटी लिहिलेली दुर्भाग्याची विधिलिखित अक्षरे पुसून टाकून आम्हास भाग्यवान करण्यास पूर्ण समर्थ, आपल्या तेजस्वी किरणांनी अज्ञानांधःकार समूळ नष्ट करण्यासाठी प्रकाशमान झालेला सूर्य, सेवक हीच कोणी एक साळीच्या धान्याची शेती, तिचे संवर्धन करण्यासाठी वेळेवर वृष्टी करणारा मेघ, आमच्या सर्व इष्ट मनकामना पूर्ण करणारा कल्पवृक्ष असून, त्या सद्गुणसमूहाचे सेवन करणे हे हरिहरांच्या भक्तीसारखे सुलभ व सुखद होते. सत्कवी हे शरदृऋतू त्यांच्या हृदयाकाशात प्रकाशमान होणारा तो तारागण आहे. रामभक्तांचे जीवन सर्वस्वरूपधन, सर्व सुकृताचे फल म्हणून लाभणारा हा अत्यंत श्रेष्ठ सुखोपभोग, सर्वोपाधिरहित होऊन निष्कपट अंतःकरणाने जगाचे हित साधणाऱ्या साधुसंतांचे कर्तव्य करणारा, आपल्या अनन्य सेवकांच्या मन-मानसात हंसाप्रमाणे विहार करणारा, पावित्र्याची प्राप्ती करून देणारी भागीरथीची तरंगमाला, सारांश, प्रचंड अग्नी ज्याप्रमाणे केवळ्याही सर्पणाची राख करून टाकतो, त्याचप्रमाणे कुमार्ग, कुतर्क, दुर्वर्तन, कलिदोष, कपट, ढोंग व नास्तिकपणा यांना भस्मसात करून टाकण्यात अगदी हातखंडा असा हा **श्रीरामाच्या सद्गुण-समुदायाचा महान प्रभाव** आहे. ३२ (क)

पौर्णिमेच्या पूर्ण चंद्राच्या शीतल किरणाप्रमाणे सर्वांना, सर्व काळी सुखविणारे हे रामचरित आहे. तथापि त्यातूनही सज्जनरूपी कुमुदिनींना उमलविण्याचे व त्यांच्या चित्तचकोरांना कोवळ्या किरणांचा मनसोक्त चारा देण्याचे काम ही रामकथा विशेष प्रकारे हितवर्धक व लाभदायक रीतीने करते.

पार्वतीने शंकरांना जशा प्रकारे प्रश्न विचारले व शंकरांनी जशी त्यांची सविस्तर उत्तरे दिली, तो सर्व [illegible] साग्र इतिहास, मनोरंजक कथा प्रबंध बनवून साकल्याने मी वर्णन करणार आहे.

ज्यांच्या कानावर ही कथा पूर्वी आलेली नाही, त्यांनी ती ऐकल्यावर आश्चर्य मानू नये. जाणत्या



चौ० — रामकथा कै मिति जग नाहीं । असि प्रतीति तिन्ह के मन माहीं ॥
नाना भाँति राम अवतारा । रामायन सत कोटि अपारा ॥
कलप भेद हरि चरित सुहाए । भाँति अनेक मुनीसन्ह गाए ॥
करिअ न संसय अस उर आनी । सुनिअ कथा सादर रति मानी ॥

दो० — राम अनंत अनंत गुन अमित कथा बिस्तार ।
सुनि आचरजु न मानिहहिं जिन्ह कें बिमल बिचार ॥ ३३ ॥

चौ० — एहि बिधि सब संसय करि दूरी । सिर धरि गुर पद पंकज धूरी ॥
पुनि सबही बिनवउँ कर जोरी । करत कथा जेहिं लाग न खोरी ॥
सादर सिवहि नाइ अब माथा । बरनउँ बिसद राम गुन गाथा ॥
संबत सोरह सै एकतीसा । करउँ कथा हरि पद धरि सीसा ॥
नौमी भौम बार मधु मासा । अवधपुरीं यह चरित प्रकासा ॥
जेहि दिन राम जनम श्रुति गावहिं । तीरथ सकल तहाँ चलि आवहिं ॥
असुर नाग खग नर मुनि देवा । आइ करहिं रघुनायक सेवा ॥
जन्म महोत्सव रचहिं सुजाना । करहिं राम कल कीरति गाना

दो० — मज्जहिं सज्जन बृंद बहु पावन सरजू नीर ।
जपहिं राम धरि ध्यान उर सुंदर स्याम सरीर ॥ ३४ ॥

लोकांच्या कानी एखादी अलौकिक व अपूर्व अशी कथा आली तर त्यांना मुळीच विस्मय वाटत नाही; कारण रामकथा अनंत आहेत, अशी त्यांची खात्री असते. त्यामुळे त्यांच्या मनात असा विश्वास असतो की, रामाचे अवतार अनेक व रामायण शतकोटी श्लोकांचे अपार आहे. प्रत्येक कल्पामध्ये निरनिराळे घडलेले रामचरित सुशोभन बनवून, त्याचे गायन मुनिवर्यांनी विविध प्रकारांनी केले आहे, ही गोष्ट ध्यानी धरावी; आणि मनातील सर्व संशय काढून प्रेमादराने श्रवणास बसावे. राम अनंत, त्याचे गुणही अनंत व त्यामुळे त्यांच्या कथांचा विस्तारही अमर्याद झालेला आहे, म्हणून ज्यांना सुसंबद्ध विचार करण्याची सवय झाली आहे, ते ही कथा ऐकून आश्चर्य मानणार नाहीत व संशयही काढणार नाहीत. ३३

अशा प्रकारे सर्व संशयांची घाण फेकून देऊन मी श्रीसद्गुरुचरणांबुजातील रज मस्तकी धारण करतो; व पुनः हात जोडून सर्वांना विनंती करतो की, या कथारचनेत कोणताही दोष निर्माण न होवो.

शिवचरणी आता मी सादर मस्तक नमवून श्रीरामचंद्राच्या उज्ज्वल गुणांची कथा सांगण्यास सुरुवात करतो.

संवत १६३१ मध्ये हरिपदी नमन करून या कथेला मी प्रारंभ करतो. चैत्र शु॥ ९ मंगळवारी अयोध्येत हे चरित्र प्रकाशित झाले. याच दिवशी श्रीरामचंद्राचा जन्म होतो. वेद म्हणतात की, 'या दिवशी सर्व तीर्थे अयोध्येस येतात. असुर, नाग, पक्षी, मनुष्य, मुनी आणि देवता असे सर्व त्या दिवशी अयोध्येस येतात व आपापली सेवा (पूजा-जप इ.) भगवच्चरणी सादर करतात. जाणती माणसे जन्मोत्सवाचा सोहळा साजरा करतात आणि प्रभूरामचंद्राच्या पावन यशाचे सुन्दर गायन करतात. संतांचे थवेच्या थवे शरयू नदीच्या पापहारी पाण्यात मनसोक्त स्नान करतात व हृदयात शामसुन्दर रघुनाथाला स्थिर करून त्याच्या नामाचा जप करतात. ३४



चौ०– दरस परस मज्जन अरु पाना । हरइ पाप कह बेद पुराना ॥
नदी पुनीत अमित महिमा अति । कहि न सकइ सारदा बिमलमति ॥
राम धामदा पुरी सुहावनि । लोक समस्त बिदित अति पावनि ॥
चारि खानि जग जीव अपारा । अवध तजें तनु नहिं संसारा ॥
सब बिधि पुरी मनोहर जानी । सकल सिद्धिप्रद मंगल खानी ॥
बिमल कथा कर कीन्ह अरंभा । सुनत नसाहिं काम मद दंभा ॥
रामचरितमानस एहि नामा । सुनत श्रवन पाइअ बिश्रामा ॥
मन करि विषय अनल बन जरई । होइ सुखी जौं एहिं सर परई ॥
रामचरितमानस मुनि भावन । बिरचेउ संभु सुहावन पावन ॥
त्रिबिध दोष दुख दारिद दावन । कलि कुचालि कुलि कलुष नसावन ॥
रचि महेस निज मानस राखा । पाइ सुसमउ सिवा सन भाषा ॥
तातें रामचरितमानस बर । धरेउ नाम हियँ हेरि हरषि हर ॥
कहउँ कथा सोइ सुखद सुहाई । सादर सुनहु सुजन मन लाई ॥

वेद व पुराणे शरयू नदीचा फार मोठा महिमा गातात. तिचे पाणी हे स्नान-पान-मार्जनानेच नव्हे, नुसत्या दर्शनानेही पापांचा नाश करते. श्रेष्ठ बुद्धिमत्तेच्या शारदेलाही हिचा परमपावन असा अमर्याद महिमा सांगता येत नाही.

श्रीरामचंद्राचे परमधाम जिच्या कृपेने प्राप्त होते ती अयोध्यानगरीही मनोहर असून अत्यंत पावन आहे, हे सर्व लोकांत प्रसिद्ध आहे. चारी खाणींतील (स्वेदज, जारज, अण्डज उद्भिज) अनंत जीवांपैकी जो कोणी या अयोध्या नगरीत देह विसर्जन करतो, त्याला पुनः जन्ममरणरूप संसारात फेऱ्या कराव्या लागत नाहीत ! अशी ही अयोध्यापुरी सर्व प्रकारे मनोहर, सर्व सिद्धिप्रद व कल्याणाची खाण समजून या निर्मल कथेचा आरंभ मी हेतुपूर्वक या नगरीत केला. तिचे श्रवण या पुण्यपावन पुरीत केल्यास काम, मद व दंभ यांचा नाश निःसंशय होतो.

या कथेचे नाव रामचरित-मानस. हिच्या श्रवणाने कानांना पूर्ण शांतिलाभ होतो. मनरूपी हत्ती जेव्हा विषयारण्यातील आगीने होरपळू लागतो, तेव्हा या सरोवरात त्याने आपला देह टाकताच त्याला पूर्ण सुख-शांती लाभते. अशा या महाप्रभावी मानसाच्या रचनेसंबंधी आता विशेष माहिती सांगतो.

मुनींच्या अंतःकरणास समाधान देणारे अत्यंत पवित्र व सुंदर असे हे रामचरित मानस प्रथम श्रीशंकरांनी रचले आहे, त्यामुळे त्रिविधदोष, दुःख व दारिद्र्य यांना साफ जाळून या कलियुगातील दुराचार आणि सर्व पातके यांचा नाश करण्याचे सामर्थ्य यात आले आहे.

याची रचना करून शंकरांनी ते आपल्या माणसात ठेवून दिले व अनुकूल काल प्राप्त झाल्यावर ते पार्वतीला सांगितले. याच कारणाने याला **रामचरित-मानस** हे नाव शंकरांनी विचारपूर्वक व आनंदाने दिले.

अशा या श्रेष्ठ रामचरित-मानसातील अत्यंत मनोहर व सुखदायक कथा सांगण्यास मी प्रारंभ करतो. सज्जनहो ! ती आपण सादर व मनःपूर्वक ऐकावी.



दो० — जस मानस जेहि बिधि भयउ जग प्रचार जेहि हेतु ।
अब सोइ कहउँ प्रसंग सब सुमिरि उमा बृषकेतु ।। ३५ ।।

चौ० — संभु प्रसाद सुमति हियँ हुलसी । रामचरितमानस कबि तुलसी ।।
करइ मनोहर मति अनुहारी । सुजन सुचित सुनि लेहु सुधारी ।।
सुमति भूमि थल हृदय अगाधू । बेद पुरान उदधि घन साधू ।।
बरषहिं राम सुजस बर बारी । मधुर मनोहर मंगलकारी ।।
लीला सगुन जो कहहिं बखानी । सोइ स्वच्छता करइ मल हानी ।।
प्रेम भगति जो बरनि न जाई । सोइ मधुरता सुसीतलताई ।।
सो जल सुकृत सालि हित होई । राम भगत जन जीवन सोई ।।
मेधा महि गत सो जल पावन । सकिलि श्रवन मग चलेउ सुहावन ।।
भरेउ सुमानस सुथल थिराना । सुखद सीत रुचि चारु चिराना ।।

दो० — सुठि सुंदर संबाद बर बिरचे बुद्धि बिचारि ।
तेइ एहि पावन सुभग सर घाट मनोहर चारि ।। ३६ ।।

चौ० — सप्त प्रबंध सुभग सोपाना । ग्यान नयन निरखत मन माना ।।
रघुपति महिमा अगुन अबाधा । बरनब सोइ बर बारि अगाधा ।।
राम सीय जस सलिल सुधासम । उपमा बीचि बिलास मनोरम ।।

हे रामचरित-मानस कसे आहे, त्याची रचना कशी झाली, कोणत्या हेतूने ते जगात प्रकट झाले वगैरे सर्व प्रसंग [illegible]रांचे स्मरण करून मी प्रथम सांगतो. ३५

श्री शिवजींच्या कृपेने ह्या तुल्सीदासाच्या हृदयात सुमती स्फुरली; व त्यामुळे हा श्रीरामचरित मानसाचा जनक कवी होत आहे. आपल्या बुद्धीप्रमाणे तो या काव्याला सुंदर साज चढविण्याची शिकस्त करीलच. तरीही सुजनहो ! एकाग्र चित्ताने श्रवण करून ते आपण सुधारून घ्यावे.

हे श्रीरामचरितमानस खरोखर कथारसाने तुडुंब भरलेले एक मानस सरोवरच आहे. सुमती ही भूमी व अगाध हृदय हे याचे स्थळ आहे. वेद व पुराणे हे सागर असून साधुसंतांनी त्यातील सार शोषून मेघाचे काम केले आहे. असे हे मेघ श्रीरामचंद्राच्या सुयशरूपी उत्तम, मधुर, मनोहर व जगमंगलकारी जलाचा पाऊस पाडतात ! प्रभूच्या सगुणलीलांच्या विस्तृत वर्णनाने हे पाणी स्वच्छ बनते आणि त्यातील सर्व गढूळपणा नाहीसा होतो. असे हे सविस्तर लीलावर्णन चालू असता अंतःकरण भक्तिप्रेमातिशयाने जे वारंवार भरून येते, तीच या जलाची शीतल माधुरी ! या वृष्टीने सत्कर्म-साळीच्या पिकाचे पोषण होते. रामभक्तांचे प्राणधारण करणारे तर ते मुख्य जीवनच !

हे पवित्र व सुन्दर जल बुद्धी (मेधा) स्वरूपी पृथ्वीवर प्रथम येते. त्यानंतर ते एकत्र होऊन भाग्यशाली कानांच्या मार्गाने वाहू लागते. असे हे वाहून आलेले राम-सुयश-वारी सुमानसरूपी सुस्थळी भरून स्थिरावते. काही काळ गेल्यावर ते शीतल, रुचकर, सुखावह, स्वच्छ व मनोहर बनते.

या कथेत चार अत्यंत सुन्दर संवाद विचारपूर्वक गोवले आहेत. (शिव-पार्वती; याज्ञवल्क्य-भारद्वाज; भुशुण्डी-गरुड आणि तुलसी-संत) या मनोहर मानससरोवराचे हेच पवित्र व सुन्दर चार घाट आहेत. ३६

या रामायणात सात काण्डे आहेत. या सरोवराच्या त्याच सात पायऱ्या. ज्ञाननयनांनी हे दृश्य निरखून पाहाण्याची ज्यांना कुवत असेल, त्यांच्या मनाला हे रूपक उत्तम समजेल. [illegible] निर्गुण व अबाधित स्वरूपाचे जे वर्णन या कथेत आहे, तीच या सरोवराची अगाध खोली आहे. [illegible] अमृताने ते काठोकाठ भरले आहे. उपमादि अलंकार हा या पाण्यावरील लाटा व तरंगांचा मनोहर विलास आहे.

चौ०— पुरइनि सघन चारु चौपाई । जुगुति मंजु मनि सीप सुहाई ॥
छंद सोरठा सुंदर दोहा । सोइ बहुरंग कमल कुल सोहा ॥
अरथ अनूप सुभाव सुभासा । सोइ पराग मकरंद सुबासा ॥
सुकृत पुंज मंजुल अलि माला । ग्यान बिराग बिचार मराला ॥
धुनि अवरेब कबित गुन जाती । मीन मनोहर ते बहुभाँती ॥
अरथ धरम कामादिक चारी । कहब ग्यान बिग्यान बिचारी ॥
नव रस जप तप जोग बिरागा । ते सब जलचर चारु तड़ागा ॥
सुकृती साधु नाम गुन गाना । ते बिचित्र जलबिहग समाना ॥
संतसभा चहुँ दिसि अवँराई । श्रद्धा रितु बसंत सम गाई ॥
भगति निरूपन बिबिध बिधाना । छमा दया दम लता बिताना ॥
सम जम नियम फूल फल ग्याना । हरि पद रति रस बेद बखाना ॥
औरउ कथा अनेक प्रसंगा । तेइ सुक पिक बहुबरन बिहंगा ॥

दो०— पुलक बाटिका बाग बन सुख सुबिहंग बिहारु ।
माली सुमन सनेह जल सींचत लोचन चारू ॥ ३७ ॥

या काव्यातील मुख्य चौपाई वृत्त याच या सरोवरातील सुन्दर-घनदाट अशा कमलिनी आहेत. तसेच काव्यात जे कौशल्य दाखवले आहे, त्याच मणिमोती तयार करणाऱ्या छान शिंपा आहेत. छंद, सोरटे व दोहे ही बहुरंगी मोठी सुन्दर कमळे या मानसात सर्वत्र खुलून उमललेली आहेत.

अनुपमेय अर्थ, गूढ भाव, व आकर्षक भाषाशैली म्हणजे या कमळातील पराग, सुवास व मकरंद होत. या काव्यातील सत्कर्म-पुण्यशील कर्मांच्या वर्णनांचे समूह याच सुन्दर भ्रमरांच्या रांगा असून त्यातील परोक्ष ज्ञान, अपार वैराग्य व विवेकविचार हे या मानसातील विहार करणारे राजहंस आहेत. काव्यातील ध्वनी, वक्रोक्ती, व्यंग, गुण व जाती हे अनेक प्रकारचे मोहक मासे यात फिरत असतात. अर्थ, धर्म, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ, ज्ञान व विज्ञान यांच्या विचाराची चर्चा, काव्यातील नऊ रस, जप, तप, योग आणि वैराग्य यांच्या वर्णनाचे प्रसंग हे सर्व या मानसातील विविध प्रकारचे जलचर प्राणी आहेत.

साधु-संतांचे वर्णन व श्रीरामगुणांचे गायन हे चित्रविचित्र रंगाचे जलपक्षी आहेत. संतांचे मेळावे ह्या चारी बाजूंनी विलसणाऱ्या आमरायाच दिसतात. श्रद्धारूपी वसंत त्यांना कोमल पालवी फोडत आहे. नाना-प्रकारचे भक्ति-निरूपण व क्षमा, दया, इन्द्रियनिग्रह इत्यादि लताकुंज शोभत आहे. मनोनिग्रह, यम (अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह), नियम (शौच, संतोष, तप, स्वाध्याय व ईश्वरप्रणिधान), ही या लतांची सुंदर सुमने असून या सर्वांना ज्ञान हे एकच फल लागत असते. आणि श्रीहरिपदकमली दृढ प्रेम हा त्या फळातील गाभा आहे, असे वेदांनी मार्मिक वर्णन केले आहे. श्रीरामचरित मानसात प्रासंगिक ज्या दुसऱ्या कथा आहेत, त्या पोपट, कोकिळ इत्यादि बहुरंगी पक्ष्यांप्रमाणे येथे आपले मंजुळ कूजन करत असतात.

कथा चालू असता जेथे रोमांच येतात, त्या बागा, वन व वाटिका आहेत. त्यामुळे ज्या सुखद लहरी येतात ती सुंदर पक्ष्यांची क्रीडा आहे. सुमन हाच माळी असून तो आपल्या रामप्रेमाचे पाणी आपल्या सुंदर नेत्रांच्या झारीने या वृक्ष-लतांना शिंपत असतो. ३७



चौ०– जे गावहिं यह चरित सँभारे । तेइ एहि ताल चतूर रखवारे ॥
सदा सूनहिं सादर नर नारी । तेइ सूरबर मानस अधिकारी ॥
अति खल जे बिषई बग कागा । एहि सर निकट न जाहिं अभागा ॥
संबुक भेक सेवार समाना । इहाँ न बिषय कथा रस नाना ॥
तेहि कारन आवत हियँ हारे । कामी काक बलाक बिचारे ॥
आवत एहिं सर अति कठिनाई । राम कृपा बिनु आइ न जाई ॥
कठिन कुसंग कुपंथ कराला । तिन्ह के बचन बाघ हरि ब्याला ॥
गृह कारज नाना जंजाला । ते अति दुर्गम सैल बिसाला ॥
बन बहु बिषम मोह मद माना । नदीं कुतर्क भयंकर नाना ॥

दो०–जे श्रद्धा संबल रहित नहिं संतन्ह कर साथ ।
तिन्ह कहुँ मानस अगम अति जिन्हहि न प्रिय रघुनाथ ॥ ३८ ॥

चौ०– जौं करि कष्ट जाइ पुनि कोई । जातहिं नीद जुड़ाई होई ॥
जड़ता जाड़ बिषम उर लागा । गएहुँ न मज्जन पाव अभागा ॥
करि न जाइ सर मज्जन पाना । फिरि आवइ समेत अभिमाना ॥
जौं बहोरि कोउ पूछन आवा । सर निंद करि ताहि बुझावा ॥

सावधानतेने सांभाळून जे लोक या चरित्राचे गायन करतात, तेच या मानससरोवराचे चतुर-कर्तव्यदक्ष रखवालदार आहेत. जे स्त्री-पुरुष याचे सदोदित अंतःकरणपूर्वक सादर श्रवण करतात त्या, या श्रेष्ठ सरोवराच्या अधिकारी देवता आहेत.

जे अत्यंत दुष्ट व विषयलंपट आहेत, ते अभागी कावळे व बगळे या मानससरोवराच्या आसपासही फिरकत नाहीत. याचे कारण त्यांचे खाद्यविषय कथारसरूपी बेडूक, काळू, शेवाळ, जंतू इ. येथे मुळीच नाहीत. त्यामुळे कावळ्या-बगळ्यासारखे विषयासक्त बिचारे या सरोवराकडे येण्यासच कचरतात ! आणि या सरोवराकडे येणेही अत्यंत कठीण आहेच. श्रीरामकृपेवाचून येथे पोचणे अशक्य आहे. घोर कुसंगती ही अवघड वाट असून त्यांचे भाषण हेच त्या वाटेवरील सिंह, हत्ती, वाघ व भुजंग आहेत ! तसेच घरच्या अनेक कामांचे जंजाळ हेच त्या वाटेवरील अत्यंत मोठे तुटलेले पहाडी कडे आहेत ! मोह, मान व मद हे त्या वाटेवरील निविड अरण्य असून, नाना प्रकारच्या कुतर्करूपी दुस्तर नद्यांनी हा मार्ग अडविला आहे.

वाटखर्चीसाठी श्रद्धेची पुंजी व संतांची सोबत यांचा अभाव, तसेच ज्यांना रघुनाथ प्रिय नाही त्यांना या मानसाचा मार्ग अत्यंत अगम्यच राहाणार ! ३८

वरील तीन गोष्टी जवळ नसता आग्रहपूर्वक जर कोणी या मानसाचा मार्ग धरला तर त्याला झोपेची हुडहुडी भरते, अंतःकरणातील वेडेपणाच्या हिवतापाने अखेर त्या अभाग्याला या मानसावर जाऊनही स्नान-पान न करताच परतावे लागते. परत येताना आपल्या शिष्टाईचा अभिमान मात्र बरोबर घेऊन तो येतो—त्याला अशा स्थितीत जर कोणी प्रश्न विचारला, "का हो ! तुम्ही स्नान न करताच परत फिरला ?" तर या मानसाची भरपूर निंदा करून त्या प्रश्नकर्त्याचे समाधान करण्याचा तो प्रयत्न करतो.

चौ०– सकल बिघ्न ब्यापहिं नहिं तेही । राम सुकृपाँ बिलोकहिं जेही । ॥
सोइ सादर सर मज्जनु करई । महा घोर त्रयताप न जरई ॥
ते नर यह तजहिं न काऊ । जिन्ह कें राम चरन भल भाऊ ॥
जो नहाइ चह एहिं सर भाई । सो सतसंग करउ मन लाई ॥
अस मानस मानस चख चाही । भइ कबि बुद्धि बिमल अवगाही ॥
भयउ हृदयँ आनंद उछाहू । उमगेउ प्रेम प्रमोद प्रबाहू ॥
चली सुभग कबिता सरिता सो । राम बिमल जस जस भरिता सो ॥
सरजू नाम सुमंगल मूला । लोक बेद मत मंजुल कूला ॥
नदी पुनीत सुमानस नंदिनि । कलिमल तृन तरु मूल निकंदिनि ॥

दो०– श्रोता त्रिबिध समाज पुर ग्राम नगर दुहुँ कूल ।
संतसभा अनुपम अवध सकल सुमंगल मूल ॥ ३९ ॥

चौ०– रामभगति सुरसरितहि जाई । मिली सुकीरति सरजु सुहाई ॥
सानुज राम समर जसु पावन । मिलेउ महानदु सोन सुहावनँ ॥
जुग बिच भगति देवधुनि धारा । सोहति सहित सुबिरति बिचारा ॥
त्रिबिध ताप त्रासक तिमुहानी । राम सरूप सिंधु समुहानी ॥

पण रामाच्या कृपेचा कटाक्ष ज्याला लाभला, त्याला मात्र वर वर्णन केलेल्यापैकी कोणत्याही विघ्नाची बाधा होत नाही. या मानसात तो आदरयुक्त स्नान करून घोर अशा त्रिविध तापातून (आधिभौतिक, आधिदैविक, आध्यात्मिक) आपली सुटका करून घेतो. रामचरणी ज्यांचा सद्भाव जडला, ते या सरोवरास कधीच सोडत नाहीत. म्हणून बंधो ! जो या सरोवरात स्नान करू इच्छितो त्याने प्रथम मनःपूर्वक संतांची संगती करावी.

अशा प्रकारच्या मानसाचे मानसचक्षूंनी दर्शन घेतल्यावर पवित्र जलस्नानाने कवीची मती स्वच्छ होते. हृदयात आनंदोत्साहास भरती येते; आणि उचंबळलेल्या प्रेमानंदाचा प्रवाह बाहेर वाहू लागतो. त्यातून सुंदर कविता-सरिता निघते. या नदीत रघुनाथाच्या विमल यशाचे जल भरपूर भरलेले आहे. सरयू नावाची ही नदी सर्व मांगल्याची जननी आहे. लोकमत व वेदमत अशा दोन भक्कम तीरांचा आश्रय करून ती वाहाते. सुमानसाची ही सुंदर कन्या असल्याने ती साहजिकच पवित्र आहे. हिच्या जोराच्या प्रवाहामुळे कलिमलजनित लहान मोठ्या दोषरूपी गवताचे मूळच उखडून जाते.

उत्तम, मध्यम व कनिष्ठ असे तीन प्रकारचे श्रोते हेच या नदीच्या दोन्ही काठावरील नगर, गाव, व खेडी अशी तीन प्रकारची वसाहत आहे आणि या सर्वांत संतांची सभा ही सकल मांगल्याची जननी अशी अनुपमेय अयोध्या आहे. ३९

मनोहर सुकीर्तीची ही सरयू नदी शेवटी रामभक्तिरूप भागीरथीस जाऊन मिळते. त्यातच लक्ष्मणासह केलेल्या रामप्रभूच्या युद्धाच्या पवित्र कीर्तीचा महानद सुंदर शोण येऊन मिळतो. सरयू आणि शोण यांच्यामध्ये भक्तिरूप गंगेची धार धगधगीत वैराग्य व विमल विवेक यांच्यासह शोभते. अशा प्रकारची ही त्रिविधतापनाशिनी त्रिवेणी नदी रामरूप सागराकडे अखेर वाहात जाते.



चौ०— मानस मूल मिली सुरसरिही । सुनत सुजन मन पावन करिही ॥
बिच बिच कथा बिचित्र बिभागा । जनु सरि तीर तीर बन बागा ॥
उमा महेस बिबाह बराती । ते जलचर अगनित बहुभाँती ॥
रघुबर जनम अनंद बधाई । भवँर तरंग मनोहरताई ॥

दो०— बालचरित चहु बंधु के बनज बिपुल बहुरंग ।
नृप रानी परिजन सुकृत मधुकर बारिबिहंग ॥ ४० ॥

चौ०— सीय स्वयंबर कथा सुहाई । सरित सुहावनि सो छबि छाई ॥
नदी नाव पटु प्रस्न अनेका । केवट कुसल उतर सबिबेका ॥
सुनि अनुकथन परस्पर होई । पथिक समाज सोह सरि सोई ॥
घोर धार भृगुनाथ रिसानी । घाट सुबद्ध राम बर बानी ॥
सानुज राम बिबाह उछाहू । सो सुभ उमग सुखद सब काहू ॥
कहत सुनत हरषहिं पुलकाहीं । ते सुकृती मन मुदित नहाहीं ॥
राम तिलक हित मंगल साजा । परब जोग जनु जुरे समाजा ॥
काई कुमति केकई केरी । परी जासु फल बिपति घनेरी ॥

या कीर्तिरूप सरयूचे मूळ (रामचरित) मानस आहे व ती रामभक्तिरूप गंगेस मिळाल्याने तिच्या श्रवणाने (सेवनाने) सज्जनांचे मन ती पावन करील. यामध्ये जागोजागी जो विलक्षण कथांचा भाग आहे तो म्हणजे या सरयूच्या तीरावर जागोजागी बनवलेले वने व उपवने-बागा यांचे समूहच आहेत. शिवपार्वती विवाहातील वऱ्हाडी म्हणजे या कीर्तिसरयूतील अनेकप्रकारचे अगणित जलचरच होत. रघुनाथांच्या जन्मकाळी होणारा आनंदोत्सव हे त्या नदीतील भोवरे व मनोहर वैभव आहे. चारी बंधूंचे जे बालचरित ते विविध रंगाचे कमलकुल आहे. महाराज दशरथ व त्यांच्या राण्या व पुण्यवान कुटुंबीयमंडळी हे सर्व मधुकर व जलविहंग समजावेत. ४०

सीतेच्या स्वयंवराची मनोहर कथा म्हणजे या नदीला व्यापून राहाणारे सौदर्य ! या कीर्तिरूप सरयूत अनेक सत्यसिद्धान्तांच्या कौशल्यपूर्ण प्रश्नरूपी नावांचा विहार चालला असून, त्यांची विचारपूर्वक उत्तरे हे हुशार नावाडी आहेत. ही प्रश्नोत्तरे ऐकून आपसात चर्चा करणारे लोक हे या नदीच्या तटाक यात्रेस निघालेले पांथस्थ चांगले शोभतात.

भृगुपती परशुरामांचा अनावर क्रोध ही या नदीतील भयंकर धार असून, श्रीरामचंद्राची श्रेष्ठ वाणी हा त्या धारेतून सुटकेचा निःश्वास टाकण्यास उपयोगी पडणारा सुंदर बांधलेला घाट समजावा. बंधूच्यासह रामविवाहोत्सव हा या कथासरितेला आलेला शोभन व सर्वांना सुखदायक असा पूर आहे. ही कथा सांगत—ऐकत असता आनंदित होऊन पुलकित होणारे सर्व पुण्यवान लोक प्रसन्न अंतःकरणाने या नदीत स्नान करून धन्य होतात. रामराज्याभिषेकासाठी मंगल वस्तूंची जमवाजमव करण्यासाठी एकत्र झालेले लोक म्हणजे पर्वकाळी जमलेला यात्रेकरूंचा मेळावाच होय !

कैकेयीची दुष्ट बुध्दी ही या नदीतील शेवाळ असून त्यामुळे परिणामी फलस्वरूपात भयंकर मोठ्या



दो०— समन अमित उतपात सब भरतचरित जपजाग ।
कलि अघ खल अवगुन कथन ते जलमल बग काग ।। ४१ ।।

चौ०— कीरति सरित छहूँ रितु रूरी । समय सुहावनि पावनि भूरी ।।
हिम हिमसैलसुता सिव ब्याहू । सिसिर सुखद प्रभु जनम उछाहू ।।
बरनब राम बिबाह समाजू । सो मुद मंगलमय रितुराजू ।।
ग्रीषम दुसह राम बनगवनू । पंथकथा खर आतप पवनू ।।
बरषा घोर निसाचर रारी । सुरकुल सालि सुमंगलकारी ।।
राम राज सुख बिनय बड़ाई । बिसद सुखद सोइ सरद सुहाई ।।
सती सिरोमनि सिय गुनगाथा । सोइ गुनं अमल अनूपम पाथा ।।
भरत सुभाउ सुसीतलताई । सदा एकरस बरनि न जाई ।।

दो०— अवलोकनि बोलनि मिलनि प्रीति परसपर हास ।
भायप भलि चहु बंधु की जल माधुरी सुबास ।। ४२ ।।

चौ०— आरति बिनय दीनता मोरी । लघुता ललित सुबारि न थोरी ।।
अदभुत सलिल सुनत गुनकारी । आस पिआस मनोमल हारी ।।

विपत्ती कोसळल्या आहेत. सर्व अमित उत्पातांचे शमन करणारे भरतचरित्र हाच या नदीच्या तीरावर केला जाणारा जप-यज्ञ होय. कलियुगातील पातके व दुष्टांचे अवगुण यांचे जे वर्णन आहे, ते या नदीतील गढूळपणा व तिच्याकाठचे कावळे-बगळे आहेत. ४१

भगवत्कीर्ती सरिता ही सहाही ऋतूंत सुन्दर असते. विशेष प्रसंगी तिच्या सौंदर्यात व पावित्र्यात भरपूर भर पडल्याचे दिसून येते. यात शिवपार्वती-विवाह हा हेमंत, श्रीरामजन्मोत्सव हा सुखदायक शिशिर ऋतू, राम-विवाहपूर्व तयारी व विवाहादिकातील समाजाचे वर्णन तो आनंद व मांगल्याने भरलेला ऋतूंचा राजा वसंत होय. श्रीरामाचे वनगमन हा दुःसह ग्रीष्मऋतू असून त्या वनवासातील प्रवास-कथा या प्रखर ऊन व ताप-लेल्या वाऱ्यासारख्या आहेत. भयंकर व अकाळ-विकाळ अशा राक्षसांच्या सह केलेला घनघोर युद्धप्रसंग हा वर्षाऋतू. त्यामुळे देवसमुदायाच्या कल्याणस्वरूपी साळीच्या पिकाचे चांगले मंगलकारक असे पोषण झाले. रामराज्यातील सुख, विनय व महत्ता यांचे वर्णन हें उज्ज्वल सुखदायक व रम्य अशा शरद ऋतू-प्रमाणे आहे.

सती शिरोमणी सीतेच्या सद्गुणांची गाथा हा या कीर्तिसरितेतील अनुपम जलाचा अतुल्य असा स्वच्छता गुण आहे. भरताचा सद्भाव हीच या जलातील सुंदर शीतलता आहे. ती सर्व काळी एकरस असून, अवर्णनीय आहे. चारी बंधूंच्या गाठी-भेटी, भाषा, परस्परांवरील प्रेम, हास्य व चौघांचा परस्परावरील श्रेष्ठ बंधुभाव ही त्या कीर्ति-सरयूच्या पाण्याला सुवास व माधुरी आणतात. ४२

माझा आर्तभाव, विनय व दीनता ही या सुंदर जलाला काही थोडा थोडका हलकेपणा आणीत नाहीत ! या पाण्याचे गुणधर्म आश्चर्यकारक आहेत. याच्या केवळ श्रवणाने अद्भुत सद्गुणसाठा होतो. त्या जलाने आशा-तृष्णा यांचे शमन होऊन मनाचा सर्व मळ धुऊन निघतो. त्याने श्रीरामाच्या प्रेमाचे पोषण होते.



चौ०— राम सुप्रेमहि पोषत पानी । हरत सकल कलि कलुष गलानी ॥
भव श्रम सोषक तोषक तोषा । समन दुरित दुख दारिद दोषा ॥
काम कोह मद मोह नसावन । बिमल बिबेक बिराग बढ़ावन ॥
सादर मज्जन पान किए तें । मिटहिं पाप परिताप हिए तें ॥
जिन्ह एहिं बारि न मानस धोए । ते कायर कलिकाल बिगोए ॥
तृषित निरखि रबि कर भव बारी । फिरिहहिं मृग जिमि जीव दुखारी ॥

दो०— मति अनुहारि सुबारि गुन गन गनि मन अन्हवाइ ।
सुमिरि भवानी संकरहि कह कबि कथा सुहाइ ॥ ४३ (क) ॥
अब रघुपति पद पंकरुह हियँ धरि पाइ प्रसाद ।
कहउँ जुगल मुनिबर्य कर मिलन सुभग संबाद ॥ ४३ (ख) ॥

चौ०— भरद्वाज मुनि बसहिं प्रयागा । तिन्हहि राम पद अति अनुरागा ॥
तापस सम दम दया निधाना । परमारथ पथ परम सुजाना ॥
माघ मकरगत रबि जब होई । तीरथपतिहिं आव सब कोई ॥
देव दनुज किंनर नर श्रेनीं । सादर मज्जहिं सकल त्रिबेनीं ॥
पूजहिं माधव पद जलजाता । परसि अखय बटु हरषहिं गाता ॥

कलियुग, त्यातील सर्व पाप व त्यांचा ताप यांचा ते जल परिहार करते. जन्ममरणरूप संसाराचे ते शोषण करून पाप, ताप व दरिद्र इ० दोषांचे ते शमन करते. काम, क्रोध, मद व मोह यांचे निवारण करून निर्मल ज्ञान व उत्कट वैराग्य यांना वाढीस लावण्याचा गुण त्या पाण्यात आहे. म्हणून सुकीर्ति-सरयू नदीत जे कोणी श्रद्धापूर्वक स्नान करून तिचे पाणी पितात, त्यांच्या अंतःकरणातील सर्व पाप-ताप यांचा पूर्ण निरास होतो !

परंतु ज्यांनी या रामसुयशरूप कथा-सरितेत आपले हृदय धुऊन स्वच्छ केले नाही, त्या वाचळट भेदरटांना कलिकालाने खास फसवले ! तहानेने व्याकुळ झालेली हरणे मृगजळासाठी धावून जशी शेवटी पाण्याचा एक थेंबही न मिळाल्याने दुःखी होतात, तसेच हे जीवमृग विषय-मृगजळासाठी श्रमून अखेर निराशा व दुःख पदरी घेतात !

याप्रमाणे या पावन सरितेच्या गुणांचे यथामतिवर्णन करून त्या मंगलजलात मनाला स्नान घातल्यावर श्रीभवानीशंकरस्मरणपूर्वक कवी (तुलसीदास) सुंदर कथा सांगू लागतात. ४३ (क)

आता, श्रीरघुपतिपदकमल हृदयात धारण करून भगवंताच्या प्रसादाची प्राप्ती झाल्यामुळे दोन श्रेष्ठ ऋषिवर्यांच्या गाठीभेटीचा व सुंदर संवादाचा प्रसंग मी वर्णन करून सांगतो. ४३ (ख)


मुनिश्रेष्ठ भरद्वाज ऋषी प्रयाग क्षेत्रात राहात असत. श्रीरामचरणी त्यांचे दृढ प्रेम होते. शम, दम व दया यांचे निधान असे ते तपस्वी होते. परमार्थाच्या मार्गावर अत्यंत जाणता म्हणून त्यांची पावले पडत होती. पौष पौर्णिमेनंतर माघ महिन्यात जेव्हा मकर राशीला सूर्य येतो, तेव्हा सर्व संतवृंद, तीर्थराज प्रयागक्षेत्री जमा होतात. देव, दानव, मानव, किन्नर, असे सर्व थव्याथव्यांनी अत्यंत श्रद्धापूर्वक त्यावेळी त्रिवेणीत स्नान करतात. श्रीवेणीमाधवचरण-कमलांची पूजा करून अक्षय्य वटाला भेटतात, तेव्हा त्यांचे शरीर भावभक्तीने पुलकित होते.

चौ०— भरद्वाज आश्रम अति पावन। परम रम्य मुनिबर मन भावन ॥
तहाँ होइ मुनि रिषय समाजा। जाहिं जे मज्जन तीरथराजा ॥
मज्जहिं प्रात समेत उछाहा। कहहिं परसपर हरि गुन गाहा ॥
दो०— ब्रह्म निरूपन धरम बिधि बरनहिं तत्त्व बिभाग।
कहहिं भगति भगवंत कै संजुत ग्यान बिराग ॥ ४४ ॥
चौ०— एहि प्रकार भरि माघ नहाहीं। पुनि सब निज निज आश्रम जाहीं ॥
प्रति संबत अति होइ अनंदा। मकर मज्जि गवनहिं मुनिबृंदा ॥
एक बार भरि मकर नहाए। सब मुनीस आश्रमन्ह सिधाए ॥
जागबलिक मुनि परम बिबेकी। भरद्वाज राखे पद टेकी ॥
सादर चरन सरोज पखारे। अति पुनीत आसन बैठारे ॥
करि पूजा मुनि सुजसु बखानी। बोले अति पुनीत मृदु बानी ॥
नाथ एक संसउ बड़ मोरें। करगत बेदतत्त्व सबु तोरें ॥
कहत सो मोहि लागत भय लाजा। जौं न कहउँ बड़ होइ अकाजा ॥
दो०— संत कहहिं असि नीति प्रभु श्रुति पुरान मुनि गाव।
होइ न बिमल बिबेक उर गुर सन किएँ दुराव ॥ ४५ ॥

अशा पवित्र ठिकाणी भरद्वाजांचा अत्यंत पावन व परमरम्य असा आश्रम असल्यामुळे श्रेष्ठ अशा मुनींच्या अंतःकरणाला तेथे समाधान वाटत असे. तीर्थराजावर स्नानाला येणारी सर्व मंडळी स्नानविधी झाल्यावर भरद्वाजाच्या आश्रमात काही काळ एकत्र घालवून नंतर स्वस्थळी परत जात असत. प्रातःकाळी आनंदाने स्नानविधी उरकावा आणि [illegible] भगवंताच्या कथा परस्परास सांगण्यात आयुष्याचे सार्थक करावे, अशी त्यांची वहिवाट होती. या चर्चेत ब्रह्माचे निरूपण होऊन धार्मिक आचार-विचारांची माहिती मिळे. तसेच आपल्या धर्मातील सिद्धान्तभूत तत्त्वांचे वर्णन झाल्यावर ज्ञानासह वैराग्य व भगवंताची भक्ती यांचे सुंदर निरूपण चाले. ४४

अशा प्रकारे हा दैवी आनंदाचा सोहळा माघस्नानाच्या निमित्ताने लुटून संतमंडळी पुनः आपापल्या आश्रमास परतत. मकर-स्नानाचा हा वार्षिक कार्यक्रम म्हणजे मुनिवृंदांना एक आनंदाची लूटच होती! असाच हा [illegible] सोहाळा एकदा आनंदाने सांग करून सर्व मुनिवृन्द स्वाश्रमास परतण्याच्या वेळी भरद्वाजांनी परम विवेकी अशा याज्ञवल्क्य मुनिश्रेष्ठांच्या चरणी मस्तक ठेवून त्यांना आग्रहपूर्वक ठेवून घेतले. अत्यंत आदराने त्यांचे पदकमल धुऊन परम पुनीत आसनावर त्यांना भरद्वाजांनी बसवले. त्यानंतर त्यांची विधियुक्त पूजा करून त्यांच्या धवल यशाचे यथामती वर्णन केले. आता आपला इष्ट हेतू उघड करण्यास अनुकूल वेळ आली, असे जाणून भरद्वाजांनी अत्यंत पवित्र व कोमल वाणीने बोलण्यास प्रारंभ केला.

“ नाथ! माझ्या हृदयात एक मोठा संशय उत्पन्न झाला आहे. सर्व वेदांचे सार आपणास करतलामलकवत् आहे—अशी स्थिती असल्याने तो संशय आपल्यापुढे सांगण्यास मला भय व लज्जा वाटते, म्हणून न बोलावे तर मोठीच अनिष्ट गोष्ट घडणार! हे प्रभो! सर्व संतांनी अशी नीती सांगितली आहे व त्याच सिद्धान्ताचे वेद-पुराणांत मुनींनी गायन करून निश्चित केले आहे की, गुरूशी प्रतारणा केल्यास हृदयात शुद्ध ज्ञानाचा उदय होणे अशक्य! ४५



चौ०— अस बिचारि प्रगटउँ निज मोहू । हरहु नाथ करि जन पर छोहू ॥
राम नाम कर अमित प्रभावा । संत पुरान उपनिषद गावा ॥
संतत जपत संभु अबिनासी । सिव भगवान ग्यान गुन रासी ॥
आकर चारि जीव जग अहहीं । कासीं मरत परम पद लहहीं ॥
सोपि राम महिमा मुनिराया । सिव उपदेसु करत करि दाया ॥
रामु कवन प्रभु पूछउँ तोही । कहिअ बुझाइ कृपानिधि मोही ॥
एक राम अवधेस कुमारा । तिन्ह कर चरित बिदित संसारा ॥
नारि बिरहँ दुखु लहेउ अपारा । भयउ रोषु रन रावनु मारा ॥

दो०— प्रभु सोइ राम कि अपर कोउ जाहि जपत त्रिपुरारि ।
सत्यधाम सर्बग्य तुम्ह कहहु बिबेकु बिचारि ॥ ४६ ॥

चौ ०—जैसें मिटै मोर भ्रम भारी । कहहु सो कथा नाथ बिस्तारी ॥
जागबलिक बोले मुसुकाई । तुम्हहि बिदित रघुपति प्रभुताई ॥
रामभगत तुम्ह मन क्रम बानी । चतुराई तुम्हारि मैं जानी ॥
चाहहु सुनै राम गुन गूढ़ा । कीन्हिहु प्रस्न मनहुँ अति मूढ़ा ॥

" असा विचार करूनच, गुरुवर्य ! मी आपणास माझ्या मनातील संशय उघड करून सांगत आहे. हे नाथ ! दासावर कृपा करून त्याच्या या संशयाचे निर्मूलन करावे. वेदोपनिषदे, पुराणे व संत रामनामाच्या अमर्याद प्रभावाचे गायन एकमुखाने करतात. म्हणून षड्गुणैश्वर्य संपन्न असे शंकर स्वतः भगवान ईश्वर, अविनाशी, ज्ञान व सद्गुण यांची राशी असूनही या रामनामाचा अखंड जप करीत असतात. चौऱ्यांशी लक्ष योनींतील सर्व जगात कुठेही जन्म पावणारे चारी खाणीतील (स्वेदज, अण्डज, जारज, व उद्भिज) जीव जर काशीत मरण पावले तर त्यांना परमपदाची प्राप्ती खास होते; आणि हे मुनिश्रेष्ठ ! याचे रहस्य केवळ रामनामाच्या प्रभावातच आहे. कारण दयावंत होऊन, शंकर त्या मुमूर्षूला सद्गती लाभावी म्हणून त्याच्या कानात या राम-महावाक्याचाच उपदेश करतात.

" हे प्रभो ! मी तुम्हाला विचारतो की, एवढे ज्याच्या नामाचे महत्त्व आहे, असा ' राम ' कोण, ते हे कृपानिधी, मला कळेल असे समजावून सांगा. एक राम, अयोध्याधीश दशरथाचा मुलगा, त्याचे चरित्र सर्व जगाला जाहीर आहे. बायको राक्षसाने पळवून नेल्यामुळे तिच्या विरहाचे अपार दुःख होऊन त्या भरात रावणाला त्याने रणांगणावर ठार केला—त्रिपुरारी ज्याच्या नामाचा सतत जप करतात तो हाच राम की, दुसरा कोणी आहे, एवढे, हे प्रभो ! आपण सत्यधाम व सर्वज्ञ असल्याने विवेक-विचाराने मला समजावून सांगा. ४६

" ज्याच्या योगाने या दीर्घकालीन भ्रमरूप संशय पिशाचाच्या तडाख्यातून मी कायमचा मुक्त होईन, अशा प्रकारची साद्यंत कथा मला आपण ऐकवावी. "

हे भरद्वाजांचे सर्व भाषण ऐकून याज्ञवल्क्य स्मितपूर्वक म्हणाले, ' ऋषिवर्य ! रघुपतीची प्रभुता तुम्ही चांगल्या प्रकारे जाणत असून मनाने, कर्माने व वाणीने तुम्ही श्रीरामाचे एकनिष्ठ भक्त आहांत, हे का मला माहीत नाही ? तुमची चतुराई मी बरोबर ओळखली ! [illegible] गूढगुणानुवाद श्रवण करावे हा मनात हेतू आणि प्रश्न मात्र जणू आपण अगदी मूढ आहो असे भासवणारे !



चौ०– तात सुनहु सादर मनु लाई । कहउँ राम कै कथा सुहाई ॥
महामोहु महिषेसु बिसाला । रामकथा कालिका कराला ॥
रामकथा ससि किरन समाना । संत चकोर करहिं जेहि पाना ॥
ऐसेइ संसय कीन्ह भवानी । महादेव तब कहा बखानी ॥

दो०– कहउँ सो मति अनुहारि अब उमा संभु संबाद ।
भयउ समय जेहि हेतु जेहि सुनु मुनि मिटिहि बिषाद ॥ ४७ ॥

चौ०– एक बार त्रेता जुग माहीं । संभु गए कुंभज रिषि पाहीं ॥
संग सती जग जननि भवानी । पूजे रिषि अखिलेस्वर जानी ॥
रामकथा मुनिबर्ज बखानी । सुनी महेस परम सुखु मानी ॥
रिषि पूछी हरिभगति सुहाई । कही संभु अधिकारी पाई ॥
कहत सुनत रघुपति गुन गाथा । कछु दिन तहाँ रहे गिरिनाथा ॥
मुनि सन बिदा मागि त्रिपुरारी । चले भवन सँग दच्छकुमारी ॥

'असो. तुमच्या इच्छेप्रमाणे अत्यंत सुंदर अशी रामकथा मी सांगतो. तात! मनःपूर्वक तिचे आदराने श्रवण करावे. तुमच्या भ्रम-संशयाचा त्यामुळे निश्चित नाश होईल; कारण महामोहरूपी मोठ्या महिषासुराला ठार करणारी रामकथा हीच भयंकर कालिकादेवी आहे. [illegible]गे सतत अमृत स्रवणाऱ्या या रामकथा-सुधेचे, संतचकोर अवीट गोडीने अखंड पान करतात.

'भवानीदेवीने एकदा तुमच्याप्रमाणेच संशय प्रकट केल्यानंतर महादेवांनी तिच्या शंकानिरसनार्थ विस्तृत असे रामचरित सांगितले. तोच उमा-शंसभुंवाद कोणत्या काळी कोणत्या कारणास्तव आणि कसा झाला ते तुम्हाला मी यथामती सांगतो. अहो मुनी! माझी खात्री आहे की, त्याच्या श्रवणाने तुमची तळमळ पूर्णपणे नाहीशी होईल.' ४७

सतीमोह-प्रकरण

एका त्रेतायुगातील गोष्ट. अगस्ती ऋषी हे मोठे रामभक्त; आणि महादेव तर पहिल्या प्रतीचे रामोपासक! एक वेळ दक्षकन्या जगज्जननी भवानी सतीसह शंकर अगस्ती ऋषींच्या आश्रमात गेले. हे अखिलेश्वर आहेत, याची जाणीव ऋषिवर्यांना असल्याने त्यांनी मोठ्या आनंदाने शिवपूजन केले; आणि आग्रहपूर्वक काही दिवस त्यांना आपल्या आश्रमात ठेवून घेतले. दोन श्रेष्ठ प्रतीचे रामभक्त एकत्र आल्यावर तेथे रामकथा गायनास केवढी भरती आली असेल! अगस्ती ऋषींनी रसाळ रामकथा प्रेमभराने सविस्तर सांगितली. सांब सदाशिवांनी परम सुख मानून ती ऐकली. नंतर अगस्ती ऋषींनी सुंदर हरिभक्ती आपणास कळावी, अशी शंकरचरणी इच्छा प्रकट केली; आणि ऋषींचा अधिकार जाणून त्यांना रामभक्तिरहस्य महेश्वरांनी कथन केले.

अशा प्रकारे श्रीरघुनाथाचे गुणगान त्या आश्रमात सांगत व ऐकत असतां कैलासनाथांचे काही दिवस केव्हा निघून गेले ते त्यांनाच कळले नाही! अखेर त्रिपुरारींनी एके दिवशी अगस्तीऋषींचा निरोप घेतला व ते दक्षकुमारीसह स्वगृहाकडे निघाले.

त्याचवेळीं भूमिभार भंजन करणारे, रघुवंशात अवतरलेले हरी, पित्याच्या वचनाने राज्यत्याग केलेले, उदासीन व अविनाशी राम, दंडकवनात फिरत होते. त्यामुळे मार्गावर चालत असता आपल्या उपास्य देवतेचे



चौ०– तेहि अवसर भंजन महिभारा । हरि रघुबंस लीन्ह अवतारा ॥
पिता बचन तजि राजु उदासी । दंडक बन बिचरत अबिनासी ॥
दो०– हृदयँ बिचारत जात हर केहि बिधि दरसनु होई ।
गुप्त रूप अवतरेउ प्रभु गएँ जान सबु कोइ ॥ ४८ (क) ॥
सो०– संकर उर अति छोभु सती न जानहिं मरमु सोइ ।
तुलसी दरसन लोभु मन डरु लोचन लालची ॥ ४८ (ख) ॥
चौ०– रावन मरन मनुज कर जाचा । प्रभु बिधि बचनु कीन्ह चह साचा ॥
जौं नहिं जाउँ रहइ पछिताया । करत बिचारु न बनत बनावा ॥
एहि बिधि भए सोचबस ईसा । तेही समय जाइ दससीसा ॥
लीन्ह नीच मारीचहि संगा । भयउ तुरत सोइ कपटकुरंगा ॥
करि छलु मूढ़ हरी बैदेही । प्रभु प्रभाउ तस बिदित न तेही ॥
मृग बधि बंधु सहित हरि आए । आश्रमु देखि नयन जल छाए ॥
बिरह बिकल नर इव रघुराई । खोजत बिपिन फिरत दोउ भाई ॥
कबहूँ जोग बियोग न जाकें । देखा प्रगट बिरह दुखु ताकें ॥
दो ०–अति बिचित्र रघुपति चरित जानहि परम सुजान ।
जे मतिमंद बिमोह बस हृदयँ धरहिं कछु आन ॥ ४९ ॥

दर्शन कसे घडेल असा विचार गौरीहरांच्या हृदयात सुरू झाला. अडचणीचे कारण प्रभूंनी गुप्त रूपाने अवतार घेतल्यामुळे प्रकट दर्शनास सांब सदाशिव गेल्यास सर्वांना अवतार-रहस्य उघड होणार ! ४८ (क)

अर्थात् रामभक्त शंकरांच्या अंतःकरणात वरील कारणामुळे मोठा क्षोभ झाला. परंतु त्यातील मर्म सतीच्या ध्यानात मुळीच आले नाही. तुलसीदास म्हणतात, शंकरांना दर्शनाचा मोठा लोभ, त्यासाठी डोळे तर तीव्र लालसा उत्पन्न झालेले आणि समोर जाण्यास मन धजेना ! ४८ (ख)

रावणाने ब्रह्मदेवाकडून वर मागून घेतला की, आपणास मनुष्याच्या हातून मरण यावे. ती विधिवाणी सत्य करण्याची प्रभूची इच्छा होती. त्यासाठी हा वनसंचार होता. अशावेळी आपण दर्शनाची संधी गमावली तर मागून पश्चात्ताप करावा लागणार. म्हणून दर्शनार्थ पुढे जावे तर वर सांगितलेली अडचण ! अशा मनःस्थितीत सदाशिवांनी असा उलट-सुलट खूप विचार केला, पण दर्शन होण्याच्या दृष्टीने एकही युक्ती विनतोड दिसेना. त्यामुळे शंकर खिन्न झाले.

इकडे याच वेळी दशमुखाने मारीचाकडे जाऊन त्या नीचाला आपल्या बरोबर घेतला. तो लगेच कपट-कुरंग बनून त्याने प्रभूना बाहेर काढले आणि मूढ रावणाने अशा कपटनाटकाचा प्रयोग करून वैदेहीचे हरण केले. राम प्रभूचा खरा प्रभाव जसा आहे, तसा त्याला मुळीच कळला नाही.

कपट कांचनमृगाच्या स्वरूपातील मारीचाचा वध करून बंधूसह हरी परत येऊन आश्रमात त्यांनी पाहिल्यावर तो सीताविरहित असल्याचे त्याना दिसले व त्यांचे डोळे अश्रूंनी भरले. एखाद्या सामान्य पुरुषाप्रमाणे रघुनाथ विरहविकल झाले. नंतर ते दोघे बंधू अरण्यात तिचा शोध घेत फिरू लागले.

खरोखर योग-वियोगाच्या अतीत अशी ज्याची नेहमी स्थिती त्याला विरह दुःख झालेले प्रत्यक्ष प्रगट दिसले. त्यामुळे परम सुजाण पुरुषच या अतिविचित्र रघुपतिचरित्रातील रहस्य जाणू शकतो. परंतु जे मंद बुद्धीचे व ईश्वरी अविद्या मायेला वश झालेले असतात, त्यांनी भगवंताची अशा प्रकारची लीला पाहिली की त्यांच्या हृदयात काहीतरी भलताच गैरसमज ठाण मांडून बसतो. ४९



चौ०— संभु समय तेहि रामहि देखा । उपजा हियँ अति हरषु बिसेषा ॥
भरि लोचन छबिसिंधु निहारी । कुसमय जानि न कीन्हि चिन्हारी ॥
जय सच्चिदानंद जग पावन । अस कहि चलेउ मनोज नसावन ॥
चले जात सिव सती समेता । पुनि पुनि पुलकत कृपानिकेता ॥
सतीं सो दसा संभु कै देखी । उर उपजा संदेहु बिसेषी ॥
संकरु जगतबंद्य जगदीसा । सुर नर मुनि सब नावत सीसा ॥
तिन्ह नृपसुतहि कीन्ह परनामा । कहि सच्चिदानंद परधामा ॥
भए मगन छबि तासु बिलोकी । अजहुँ प्रीति उर रहति न रोकी ॥

दो०— ब्रह्म जो व्यापक बिरज अज अकल अनीह अभेद ।
सो कि देह धरि होइ नर जाहि न जानत बेद ॥ ५० ॥

चौ०— बिष्नु जो सुर हित नरतनु धारी । सोउ सर्बग्य जथा त्रिपुरारी ॥
खोजइ सो कि अग्य इव नारी । ग्यानधाम श्रीपति असुरारी ॥
संभुगिरा पुनि मृषा न होई । सिव सर्बग्य जान सबु कोई ॥
अस संसय मन भयउ अपारा । होइ न हृदयँ प्रबोध प्रचारा ॥

बरोबर याच प्रसंगी शंभूंनी रामाला पाहिले. अपेक्षित असे आपल्या उपास्यदेवतेचे दर्शन घडताच त्यांच्या हृदयात अत्यंत मोठा हर्ष विशेष प्रकारे तुडुंब भरू लागला. त्यांनी सौंदर्यसागराचे अगदी निरखून असे डोळे भरून दर्शन घेतले, परंतु कुसमय समजून नमस्कार, भेट इ. प्रकारे परिचय मात्र होऊ दिला नाही. "जय सच्चिदानंद जगपावन !" असा जयघोष करून मदनांतक शंकर चालू लागले. त्या ध्यानमग्न स्थितीत सतीसह सदाशिव पावले टाकत असता त्या कृपानिकेतांचे शरीर पुनःपुनः पुलकित होऊ लागले. शंकरांची ही सर्व दशा पाहून सतीच्या हृदयात विशेष प्रकारचा संशय निर्माण झाला. तिला वाटले, भगवान शंकर हे जगद्वंद्य व जगदीश आहेत. सर्व देव, ऋषी, मानव, त्यांच्या चरणी आपले मस्तक आदराने नमवतात. त्यांनी एका राजपुत्राला नमस्कार करावा आणि तोसुद्धां सच्चिदानंद परधाम म्हणून ! त्याचे सौंदर्य पाहून यांना एवढा परमानंद झाला की अजून त्याच्या लहरीवर लहरी—अंतःकरणातून बाहेर येऊ नयेत म्हणून दाबत असताही— जणू काही उसळून वर येत आहेत !

मग काय, जे सर्वव्यापक, मायादिमलरहित, अजन्मा, अंश—कलादिविहीन म्हणजे पूर्ण, इच्छारहित, त्रिविध भेदरहित, ज्याचे वेदांनाही आकलन होत नाही, असे जे ब्रह्म, तेच हा देह धरून मनुष्य झाले आहे असे समजायचे ? ५०

पण, देवाच्या हितासाठी भगवान विष्णू मानव तनुधारी झाला असे मानले तरीसुद्धा तो त्रिपुरारीप्रमाणे सर्वज्ञ असाच आहे. ज्ञानाचे भाण्डार, लक्ष्मीपती व असुरान्तक असा तो भगवान विष्णू एखाद्या अडाणी मनुष्या-प्रमाणे आपल्या बायकोला शोधीत फिरेल हे शक्य कसे ?

तसा तो नाही, एक सामान्य मानव आहे असे म्हणावे, तरीही अडचण येतेच. कारण शंभुगिरा खोटी होणार नाही. ते सर्वज्ञ आहेत, हे सर्वत्र कोणीही जाणते !

अशा प्रकारे सतीचे मन अपार संशयाने व्याकुळ झाले. तिने आपल्या मनाला प्रबोध करण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करून पाहिला; पण हृदयात त्याचा जरासुद्धा प्रवेश होईना.



चौ०– जद्यपि प्रगट न कहेउ भवानी । हर अंतरजामी सब जानी ।।
सुनहि सती तव नारि सुभाऊ । संसय अस न धरिअ उर काऊ ।।
जासु कथा कुंभज रिषि गाई । भगति जासु मैं मुनिहि सुनाई ।।
सोइ मम इष्टदेव रघुबीरा । सेवत जाहि सदा मुनि धीरा ।।

छं०– मुनि धीर जोगी सिद्ध संतत बिमल मन जेहि ध्यावहीं ।
कहि नेति निगम पुरान आगम जासु कीरति गावहीं ।।
सोइ रामु व्यापक ब्रह्म भुवन निकाय पति माया धनी ।
अवतरेउ अपने भगत हित निजतंत्र नित रघुकुलमनी ।।

सो०– लाग न उर उपदेसु जदपि कहेउ सिवँ बार बहु ।
बोले बिहसि महेसु हरिमाया बलु जानि जियँ ।। ५१ ।।

चौ०– जौं तुम्हरें मन अति संदेहू । तौ किन जाइ परीछा लेहू ।।
तब लगि बैठ अहउँ बटछाहीं । जब लगि तुम्ह ऐहहु मोहि पाहीं ।।
जैसें जाइ मोह भ्रम भारी । करेहु सो जतनु बिबेक बिचारी ।।
चलीं सती सिव आयसु पाई । करहिं बिचारु करौं का भाई ।।

सदाशिवांच्यासह सती निमूटपणे चालत होती; पण हृदयांतर्यामी विचारांचे सहज ज्ञान होणाऱ्या शंकरांना, भवानी स्पष्ट बोलली नाही म्हणून तिच्या हृदयातील संशयकल्लोळ ध्यानी येण्यास थोडाच वेळ लागणार? ते म्हणाले, 'सती ! ऐक. तुमच्या स्त्रीस्वभावानुरूप हृदयात आलेला असला संशय योग्य नाही. अग, अगस्ती ऋषी ज्याच्या कथा गातात, तसेच ज्याच्या पराभक्तीचे रहस्य तुझ्या समक्ष मी त्या ऋषिवर्यांना सांगितले, तेच माझे इष्टदैवत, हे रघुवीर आहेत. ज्ञानी मुनी अनासक्त होऊन यांच्याच चरणांची धैर्याने सेवा करतात.'

'हे पाहा; योगी, सिद्ध व ज्ञानी, धीर, मुनी अत्यंत शुद्ध अंतःकरणाने ज्याचे अखंड ध्यान करतात; वेद, पुराणे व शास्त्रे ज्याच्या कीर्तीचे नेति, नेति म्हणून गायन करतात, असे जे सर्वव्यापी ब्रह्म, मायापती, आत्मतंत्र अनंत कोटी ब्रह्माण्डनायक, तेच माझे राम आपल्या भक्तांच्या हितासाठी, जन्मरहित असे असूनही, रघुकुलमणी म्हणून स्वेच्छेने अवतरलेले आहेत.'

भावभक्तिप्रेमाने, अंतःकरण भरून येऊन सदाशिवांनी अगदी जीव तोडून सतीला इतका स्पष्ट खुलासा अनेक वेळा केला तरी सतीच्या हृदयाला त्या उपदेशाचा स्पर्शसुद्धा होईना! तेव्हा भगवन्माया किती बलवान आहे याची जाणीव अंतःकरणाला पटून महेशांना सतीच्या वेडेपणाचे हसू आले. ५१

ते म्हणाले, " सती ! तुझ्या मनात जर संशयाचा एवढा जोर झाला असेल, तर स्वतः जाऊन परीक्षा का घेत नाही ? परत कुठे यावे अशी काळजी नको; याच वडाच्या छायेत, तू [illegible] परत येईपर्यंत आम्ही बसून राहतो. पण एक गोष्ट लक्षात ठेव हो ! ज्या मोहाने तुला हा जो महाभ्रम झाला आहे, त्याचे समूळ उच्चाटण होईल, असा सावध राहून विवेकाने यत्न कर हं ! "

सतीला अगदी हेच पाहिजे होते. यजमानांचा भोळा स्वभाव त्यांच्या पदरी बांधण्याची तिला घाई झाली होती. पडत्या फळाची आज्ञा मिळताच, तिने झपाझप पावले टाकून परीक्षा घेण्यासाठी आपला रस्ता झटकन् सुधारला ! कशी परीक्षा घ्यावी, हे विचारचक्रही पायाच्या गतीबरोबर सुरू झाले. "आता काय करू बाई !"

चौ०– इहाँ संभु अस मन अनुमाना । दच्छसुता कहुँ नहिं कल्याना ॥
मोरेहु कहें न संसय जाहीं । बिधि बिपरीत भलाई नाहीं ॥
होइहि सोइ जो राम रचि राखा । को करि तर्क बढ़ावै साखा ॥
अस कहि लगे जपन हरिनामा । गईं सती जहँ प्रभु सुखधामा ॥

दो०– पुनि पुनि हृदयँ बिचारु करि धरि सीता कर रूप ।
आगें होइ चलि पंथ तेहिं जेहिं आवत नरभूप ॥ ५२ ॥

चौ०– लछिमन दीख उमाकृत बेषा । चकित भए भ्रम हृदयँ बिसेषा ॥
कहि न सकत कछु अति गंभीरा । प्रभु प्रभाउ जानत मतिधीरा ॥
सती कपटु जानेउ सुरस्वामी । सबदरसी सब अंतरजामी ॥
सुमिरत जाहि मिटइ अग्याना । सोइ सरबग्य रामु भगवाना ॥
सती कीन्ह चह तहँहुँ दुराऊ । देखहु नारि सुभाव प्रभाऊ ॥
निज माया बलु हृदयँ बखानी । बोले बिहसि रामु मृदु बानी ॥
जोरि पानि प्रभु कीन्ह प्रनामू । पिता समेत लीन्ह निज नामू ॥
कहेउ बहोरि कहाँ बृषकेतू । बिपिन अकेलि फिरहु केहि हेतू ॥

कोणताच साधकबाधक विचारविनिमय न करता सती झपाट्याने चालू लागल्याचे अनपेक्षित दृश्य पाहून, तिचे भवितव्य ठीक नाही, असे शंकरांनी सहजच अनुमान काढले. आपण स्वतः एवढी समजूत घालूनही सतीचा संशय संपला नाही, तेव्हा हे खास की, तिचे दैव आता विपरीत होऊन कल्याण होणार नाही. रामाने जशी रचना करून ठेवली असेल तेच होणार. आपण व्यर्थ तर्ककुतर्क करून फाटे कशाला फोडा? असे म्हणून शंकरांनी हरिनामजपास प्रारंभ केला. इकडे सतीनेही ज्या दिशेला सुखधाम प्रभू होते, त्या बाजूने बराच मार्ग आक्रमण केला.

सतीने पुनः पुन्हा हृदयात विचार करून सीतेचे रूप धारण केले व नरभूपती रघुनाथ जिकडून येत होते, त्यांच्या रस्त्यानेच समोरून जाण्यास तिने सुरुवात केली. ५२

ही नकली सीता प्रथम लक्ष्मणजींच्या दृष्टीस पडली. तिला पाहून ते अगदी चकित झाले व त्यास विशेष भ्रम झाला. "या तर मातोश्री खास नाहीत, पण रूप अगदी हुबेहूब!" त्या दृश्याने त्यांना एवढे गंभीर केले की त्यांच्या तोंडून एकही शब्द येईना, कारण धीर मतीच्या लक्ष्मणांना प्रभूच्या प्रभावाची पूर्ण कल्पना होतीच.

देवांच्या स्वामीच्या लक्षात सतीचे कपट लगेच आले. सर्वदर्शी व सर्वांच्या अंतर्यामी निवास करणारास अज्ञात काय राहणार ! ज्याच्या केवळ स्मरणाने अज्ञानाचे निर्मूलन होते, अशा सर्वज्ञ भगवान रामचंद्राला कपटाने सती भुलवू पाहात आहे. स्त्रियांच्या स्वभावाचा कसा प्रभाव असतो पाहा तर खरे !

आपल्या मायेच्या सामर्थ्याची मनातल्या मनात रामांनी प्रशंसा केली व मोठ्याने हसून कोमल वाणीने बोलले, "मातोश्री! दशरथनंदन राम आपणास वंदन करत आहे." असे म्हणून प्रभूंनी हात जोडून सतीला प्रणाम केला व लगेच पुनः विचारले, "वृषकेतू कुठे आहेत ? अरण्यात एकट्याच फिरत आहात. काय बेत आहे ?"

दो०— राम बचन मृदु गूढ़ सुनि उपजा अति संकोचु ।
सती सभीत महेस पहिं चलीं हृदयँ बड़ सोचु ॥ ५३ ॥

चौ०— मैं संकर कर कहा न माना । निज अग्यानु राम पर आना ॥
जाइ उतरु अब देहउँ काहा । उर उपजा अति दारुन दाहा ॥
जाना राम सतीं दुखु पावा । निज प्रभाउ कछु प्रगटि जनावा ॥
सतीं दीख कौतुकु मग जाता । आगें रामु सहित श्री भ्राता ॥
फिरि चितवा पाछें प्रभु देखा । सहित बंधु सिय सुंदर बेषा ॥
जहँ चितवहिं तहँ प्रभु आसीना । सेवहिं सिद्ध मुनीस प्रबीना ॥
देखे सिव बिधि बिष्नु अनेका । अमित प्रभाउ एक तें एका ॥
बंदत चरन करत प्रभु सेवा । बिबिध बेष देखे सब देवा ॥

दो०— सती बिधात्री इंदिरा देखीं अमित अनूप ।
जेहिं जेहिं बेष अजादि सुर तेहि तेहि तन अनुरूप ॥ ५४ ॥

रामाचे हे कोमल पण गूढ शब्द कानी पडताच अंतःकरणात सती फारच लाजली. हृदयात मोठे दुःख होऊन भीतिग्रस्त स्थितीत तिने शंकराकडे जाण्याचा रस्ता धरला. ५३

" शंकरांच्या शब्दांचा आपण अपमान केला, आपलेच अज्ञान रामावर लादले. 'कशी परीक्षा घेतली?' असे शंकरांनी विचारल्यावर आता उत्तर तरी काय देऊ ?" अंतःकरणात भयंकर आग भडकवणारे असले विचार सतीला सतावू लागले. मातोश्रीला दुःख झाले हे रामांनी जाणले व आपल्या प्रभावाची थोडी चुणूक तिला दाखवली.

इकडे मनातल्या मनात पूर्ण विरघळून सती चालू लागली तो एक कौतुकास्पद दृश्य दिसले. तिच्या मागे असलेले रामलक्ष्मण एकदम पुढे दिसू लागले आणि विशेष गोष्ट म्हणजे त्यांच्याबरोबर सीताही चालत असलेली दिसली. (यात प्रभूचा मुख्य हेतू हा की सतीला योगातीत भगवंताचे सच्चिदानन्दमय रूपाचे दर्शन व्हावे व मनातील संशयाचा पूर्ण निरास व्हावा.)

आपण उलट दिशेने तर चाललो नाहीना ? अशी शंका येताच तिने आपल्या पाठीमागे वळून पाहिले तो तेथेही तोच प्रकार. बंधू लक्ष्मण व सीतेसह श्रीरामचंद्र सुंदर वेषात तिच्या दृष्टीस मागेपुढ़ा दिसले. इतकेच काय, बाजूला, सर्वत्र, जिकडे नजर टाकावी तिकडे सिद्धमुनी उपासना करीत असलेल्या भगवंताचे तिला दर्शन होऊ लागले.

याहीपेक्षा आता तिला अधिक विलक्षण देखावा पाहावयास मिळाला. अनेक शिव, ब्रह्मा व विष्णू ! एकापेक्षा एक अधिकाअधिक प्रभाव असलेल्या त्या त्रैमूर्ती अनेक वेषात विराजमान होऊन इतर सर्व देवांच्यासह श्रीरामचंद्राच्या चरणी नमन करून सेवा करीत होत्या !

एवढ्यानेही न भागता थोड्याच वेळात अधिक विस्मय वाढवणारे दृश्य तिच्या अंतःकरणाचा ठाव घेऊ लागले ! अगणित व उपमारहित ब्राह्मणी, पतिव्रता सती लक्ष्मी, अनेक रूपांनील [illegible] ज्या ज्या वेषात ते देव होते, त्या त्या शरीरास अनुरूप अशा या त्यांच्या शक्ती तिच्या नजरेला ताणू लागल्या. ५४

चौ०– देखे जहँ तहँ रघुपति जेते । सक्तिन्ह सहित सकल सुर तेते ।।
जीव चराचर जो संसारा । देखे सकल अनेक प्रकारा ।।
पूजहिं प्रभुहि देव बहु बेषा । राम रूप दूसर नहिं देखा ।।
अवलोके रघुपति बहुतेरे । सीतासहित न बेष घनेरे ।।
सोइ रघुबर सोइ लछिमनु सीता । देखि सती अति भईं सभीता ।।
हृदय कंप तन सुधि कछु नाहीं । नयन मूँदि बैठीं मग माहीं ।।
बहुरि बिलोकेउ नयन उघारी । कछु न दीख तहँ दच्छकुमारी ।।
पुनि पुनि नाइ राम पद सीसा । चलीं तहाँ जहँ रहे गिरीसा ।।
दो०– गईं समीप महेस तब हँसि पूछी कुसलात ।
लीन्हि परीच्छा कवन बिधि कहहु सत्य सब बात ।। ५५ ।।

मास पारायण, दूसरा विश्राम

चौ०–सतीं समुझि रघुबीर प्रभाऊ । भय बस सिव सन कीन्ह दुराऊ ।।
कछु न परीच्छा लीन्हि गोसाईं । कीन्ह प्रनामु तुम्हारिही नाईं ।।

जेथे तेथे रघुपती जितके तिला दिसले तितके सर्व देव आपापल्या शक्तीसह प्रकट झाले. त्यात फक्त दक्ष कुमारी सती नाही. स्थावर-जंगम सृष्टीतील अनेक प्रकारचे जीव जन्म-मरणाच्या चक्रात भ्रमण करीत असलेले तिच्या नजरेसमोर दिसू लागले. अनेक देव विविध वेषांत भूषित होऊन प्रभूची पूजा करीत आहेत, हे मनोहर दृश्य पाहात असता सतीला एक विशेष आढळला व तो म्हणजे, देव अनेक व पूजेची दृश्येही अगणित, पण रामरूप सर्वत्र एकच.

सीतेसह एकाच वेषात विलसणाऱ्या रघुपतींच्या अनंत मूर्तींचे सतीला दर्शन घडले. पण त्याचे रूपादिक वेष निराळे दिसले नाहीत. तेच रघुवर, तीच सीता व तोच लक्ष्मण, पुन्हा पुन्हा तिच्या समोर येऊ लागल्याने आता मात्र आनंद, आश्चर्य, कौतुक, जिज्ञासा इत्यादि भावना लयाला जाऊन सतीच्या कोमल हृदयात भीतीचे साम्राज्य पसरू लागले. तिच्या हृदयात थरकाप सुटला. देहभान पूर्ण हरपले. तिने घट्ट डोळे मिटले व उभी होती तेथेच ती मटकन् वाटेतच खाली बसली !

सर्वव्यापी दयाघन रामरायाला ही सतीची केविलवाणी स्थिती कशी सहन होणार ?

थोडा वेळ जाताच सतीने डोळे उघडले. तो चमत्कार काय दिसला ? आतापर्यंत पाहिलेल्या दृश्यांपैकी एकही दक्षकुमारीच्या नजरेस दिसेना !

भावभक्तीने भारावलेल्या अंतःकरणाच्या सतीने कित्येक वेळा रामचरणी आपले शिर नमवले आणि ज्या वडाच्या झाडाखाली शंकर सतीची वाट पाहात बसले होते, त्या दिशेने सतीने झपाझप पावले टाकण्यास प्रारंभ केला.

सती सन्निध आल्याचे शंकरांना समजताच, हसून महेशांनी तिच्या क्षेमकुशलाची चौकशी केली व म्हणाले, " कशी कशी परीक्षा घेतली हो ? खरं खरं सर्व वृत्त सांगा हं ! " ५५

नुकताच एवढा रघुवीराचा प्रभाव प्रत्यक्ष चर्मचक्षूंनी पाहिला असूनही भीतीचा पगडा बसल्यामुळे सतीने शिवाबरोबर कपट केले. शंकरांच्या प्रश्नास तिने उत्तर दिले, " नाथ ! अहो, मी परीक्षा वगैरे काही घेतली नाही. आपण जसे नमन केले तसेच मीही शिर नमवले ! आपण सांगितले ते कधीच खोटे असू शकत नाही. इतक्या दिवसांच्या सहवासात एवढीही प्रतीती का माझ्या मनास आली नाही ? "

चौ०– जो तुम्ह कहा सो मृषा न होई । मोरे मन प्रतीति अति सोई ।।
तब संकर देखेउ धरि ध्याना । सती जो कीन्ह चरित सबु जाना ।।
बहुरि राममायहि सिरु नावा । प्रेरि सतिहि जेहिं झूँठ कहावा ।।
हरि इच्छा भावी बलवाना । हृदयँ बिचारत संभु सुजाना ।।
सती कीन्ह सीता कर बेषा । सिव उर भयउ बिषाद बिसेषा ।।
जौं अब करउँ सती सन प्रीती । मिटइ भगति पथु होइ अनीती ।।

दो०– परम पुनीत न जाइ तजि किएँ प्रेम बड़ पापु ।
प्रगटि न कहत महेसु कछु हृदयँ अधिक संतापु ।। ५६ ।।

चौ० – तब संकर प्रभु पद सिरु नावा । सुमिरत रामु हृदयँ अस आवा ।।
एहिं तन सतिहि भेंट मोहि नाहीं । सिव संकल्पु कीन्ह मन माहीं ।।
अस बिचारि संकरु मति धीरा । चले भवन सुमिरत रघुबीरा ।।
चलत गगन भै गिरा सुहाई । जय महेस भलि भगति दृढ़ाई ।।
अस पन तुम्ह बिनु करइ को आना । रामभगत समरथ भगवाना ।।
सुनि नभगिरा सती उर सोचा । पूछा सिवहि समेत सकोचा ।।

ही सतीची लबाडी थोडीच लपणार ! शंकरांनी ध्यानस्थ होऊन जेव्हा पाहिले तेव्हा सतीचे सर्व चरित्र त्यांच्या अंतश्चक्षूंसमोर स्पष्टपणाने दिसले. म्हणून राममायेपुढे त्यांनी आपले मस्तक टेकले ! तिने सतीच्याही मुखातून असत्य भाषण वदवले ! भविष्यकाळी काही विपरीत घटना घडवून आणण्याची प्रबळ हरीच्छा, विचारान्ती जाणत्या शंभूंच्या ध्यानी आली. सुजाण शंभू मनात विचार करू लागले, हरिइच्छा व भावी घटना अत्यंत बलवान आहेत. सीतेचा वेष सतीने धरून भगवंतांची परीक्षा घेतली, ही घटना शिवहृदयाला फारच जोराने खटकली ! कारण आता सतीवर पत्निप्रेम केल्यास भक्तिमार्ग भग्न होऊन अनीती घडणार ! पण सतीचे मन परम पुनीत असल्याने तिचा त्यागही करणे अनिष्ट व प्रेम करावे तर मोठे पाप घडते, अशा पेचात शंकर सापडून, उघड बोलले नाहीत तरी आतल्या आत त्यांच्या हृदयात दुःखाची आग अधिक पेटू लागली. ५६

अखेर काही मार्ग सापडेना तेव्हा शंकरांनी (शं करणाऱ्या) प्रभुपदी शिर नमवले. भगवंताचे रामनामोच्चार-पूर्वक स्मरण, व हृदयात ध्यान करण्यास प्रारंभ केला. आपल्या बुद्धीने जो प्रश्न सुटू शकत नाही, त्यावेळी भक्ताने दुसरे काय करावे ? थोड्याच वेळात मनात विचार आला; सतीच्या या देहात तिच्याशी पत्नी-संबंध ठेवणे शक्य नाही ! धीर बुद्धीच्या शंकरांनी लगेच तसा शिवसंकल्प चित्तात करून अखेर तोच निर्णय घेतला व रघुवीराचे स्मरणकरून कैलासास जाण्याकरता त्यांनी आसन सोडले.

भगवंतांना केवढे समाधान झाले ! शंकर मार्गस्थ होतात न होतात तोच सुंदर आकाशवाणी झाली, "हे महेश ! आपला जयजयकार असो. आपण भक्तीला उत्तम प्रकारे दृढता आणली ! आपणाशिवाय असला पण दुसरा कोण करू शकेल ? आपण श्रीरामचंद्रांचे भक्त आहांत, समर्थ आहांत व भगवान आहांत, म्हणूनच आपणास हे शक्य आहे."

सतीच्या हृदयाला स्वकृत कपटाची खरी आच लागावी, हाच या आकाशवाणीचा मुख्य हेतू ! कानावर आकाशवाणी पडताच चिन्तातुर होऊन, भीत भीत, तिने शंकरांना विचारण्यास सुरुवात केली–

कीन्ह कवन पन कहहु कृपाला। सत्यधाम प्रभु दीनदयाला ॥
जदपि सतीं पूछा बहु भाँती। तदपि न कहेउ त्रिपुर आराती ॥

दो०—सतीं हृदयँ अनुमान किय सबु जानेउ सर्बग्य।
कीन्ह कपटु मैं संभु सन नारि सहज जड़ अग्य ॥ ५७ (क)

सो०—जलु पय सरिस बिकाइ देखहु प्रीति कि रीति भलि।
बिलग होइ रसु जाइ कपट खटाई परत पुनि ॥ ५७ (क) ॥

चौ०—हृदयँ सोचु समुझत निज करनी। चिंता अमित जाइ नहिं बरनी ॥
कृपासिंधु सिव परम अगाधा। प्रगट न कहेउ मोर अपराधा ॥
संकर रुख अवलोकि भवानी। प्रभु मोहि तजेउ हृदयँ अकुलानी ॥
निज अघ समुझि न कछु कहि जाई। तपइ अवाँ इव उर अधिकाई ॥
सतिहि ससोच जानि बृषकेतू। कहीं कथा सुंदर सुख हेतू ॥
बरनत पंथ बिबिध इतिहासा। बिस्वनाथ पहुँचे कैलासा ॥

"नाथ, कृपासागरा, आपण कोणता पण केला? दीनदयाळा, प्रभो! आपण सत्यधाम आहांत, मला सांगणार ना?"

सतीने अनेक प्रकारांनी लडिवाळपणा करून पणाचा तपशील विचारण्याची शिकस्त केली, पण छे! त्रिपुरारातींनी त्याबाबतीत मूग गिळून बसण्याचे धोरण ठरवले होते.

आपल्या प्रश्नाचे उत्तर देण्याचे शंकर हेतुपुरःसर टाळत आहेत, हे समजून आल्यावर सतीने साहजिकच मनात तर्क केला की, सर्वज्ञ शिवजींनी आपली सगळी कृती जाणली. सदाशिवाशी मी कपट केले! हर! हर!! आम्ही स्त्रिया जात्याच मूर्ख व असमंजस! ५७ (क)

कवी सांगतात—प्रेमाची सुंदर रीत महात्म्यापूर्ण आहे. प्रत्यक्ष पाणी, ते दुधात एकजीव झाल्यास त्याला दुधाबरोबर किंमत येते. पण जर का त्यांच्या निर्मळ प्रेमात कपटरूपी अम्ल पडले की लगेच दूध फुटते ते पाणी वेगळे होऊन पडते; आणि त्यातील रसाची—प्रेमाची गोडी खलास होऊन जाते! ५७ (ख)

आपण काय हा वेडेपणा केला याचा विचार सतीच्या हृदयात पुनःपुन्हा येऊन ती शोकाकुल झाली. पुढे काय होणार याची तिला अमर्याद चिंता लागून राहिली; तिचे वर्णन अशक्य!

'खरोखर शिवजी हे कृपेचे परम अगाध सागर आहेत, आणि म्हणूनच त्यांनी माझ्या अपराधाची वाच्यता केली नाही' याची जाणीवही सतीला लवकरच झाली. तथापि वर्तनातील फरक लक्षात येताच शंकरांनी आपला त्याग केला (टाकली) आहे, हे कळले व ती व्याकुळ झाली!

स्वतःच्या पापाची स्पष्ट कल्पना येऊनही ते बोलून दाखवण्याची तयारी होईना व त्याचा परिणाम म्हणजे कुंभाराच्या आव्याप्रमाणे शोक-चिंतेचा ताप तिच्या हृदयाला आतल्या आत जाळू लागला!

पत्नीचे नाते संपले असले तरी सहानुभूतीचा झरा थोडाच आटला होता? सतीची शोकाकुल स्थिती बघून वृषकेतूंनी तिला सुख व्हावे म्हणून सुंदर कथा सांगण्यास सुरुवात केली. अनेक प्रकारचे इतिहास वर्णन करून सांगत असता हे सती-शिवाचे कपटाम्लाने अंतरी नासलेले जोडपे कैलासास येऊन पोचले.



तहँ पुनि संभु समुझि पन आपन । बैठे बट तर करि कमलासन ।।
संकर सहज सरूपु सम्हारा । लागि समाधि अखंड अपारा ।।

दो०— सती बसहिं कैलास तब अधिक सोचु मन माहिं ।
मरमु न कोऊ जान कछु जुग सम दिवस सिराहिं ।। ५८ ।।

चौ०— नित नव सोचु सती उर भारा । कब जैहउँ दुख सागर पारा ।।
मैं जो कीन्ह रघुपति अपमाना । पुनि पति बचनु मृषा करि जाना ।।
सो फलु मोहि बिधाताँ दीन्हा । जो कछु उचित रहा सोइ कीन्हा ।।
अब बिधि अस बूझिअ नहिं तोही । संकर बिमुख जिआवसि मोहि ।।
कहि न जाइ कछु हृदय गलानी । मन महुँ रामहि सुमिर सयानी ।।
जौं प्रभु दीनदयालु कहावा । आरति हरन बेद जसु गावा ।।
तौ मैं बिनय करउँ कर जोरी । छूटउ बेगि देह यह मोरी ।।
जौं मोरें सिव चरन सनेहू । मन क्रम बचन सत्य ब्रतु एहू ।।

दो०— तौ सबदरसी सुनिअ प्रभु करउ सो बेगि उपाइ ।
होइ मरनु जेहिं बिनहिं श्रम दुसह बिपत्ति बिहाइ ।। ५९ ।।

शंभूच्या ध्यानी स्वतःचा पण होताच ! त्याचे योग्य पालन होण्यासाठी पद्मासन घालून वडाच्या झाडाच्या खाली त्यांनी सहजस्वरूप चिंतन करताच अखंडित व अपार अशी त्यांना समाधी लागली !

यामुळे सतीचे शिवाशी नुसते भाषणही बंद झाले ! कैलासात एकलकोंडे राहावे लागल्याने सतीच्या चित्तात शोक अधिकाअधिक वाढू लागला. पण शिवगणांत या गुप्त दुःखाची वाच्यता करणे अशक्य असल्याने सर्वांपुढे नेहमीप्रमाणेच तिला हास्यमुद्रेने वागावे लागे. अर्थात सतीच्या दुःखाचे मर्म कोणीच जाणू शकले नाही. याचा परिणाम मात्र असा झाला की; एकेक दिवस सतीला युगाप्रमाणे कंटाळवाणा झाला. ५८

एकान्तात असता सतीच्या हृदयात विचारांचे काहूर माजे व तिच्या दुःखाची खपली उचकटत असे. तिला चिंता वाटे. देवा ! आता या दुःखसागराच्या पैलतीरास मी कधी तरी जाईन का रे ? रघुपतीचा मी अपमान केला. पतिदेवाचे वचन खोटे मानले. मग साहजिकच दैवाने, मी जे केले त्याचे योग्य फळ माझ्या पदरात टाकले ! पण हे विधे ! एक गोष्ट मात्र तू अयोग्य करीत आहेस. विरोधामुळे शंकरापासून दुरावलेल्या या दुर्दैवी दासीला व्यर्थ का जगवतोस ?

सतीच्या हृदयाला ग्लानी आल्यामुळे तिला तोंडाने काही बोलवेना असा प्रसंग येऊन असह्य दुःख झाले की प्रभुरामरायाचे मनात स्मरण करण्याइतकी सती आता शहाणी झाली होती !

" प्रभो तुला जर दीनदयाळू म्हणतात, दुःखितांचे दुःख हरण करणारा तू अशी तुझी कीर्ती वेद गातात, हे जर खरे असेल तर मग भगवंता मी हात जोडून तुझ्या चरणी विनवणी करते. या देहाचा त्याग माझ्या कडून लवकर करवा. शिवचरणी जर माझे शुद्ध प्रेम असेल, कायावाचा मनाने जर माझे हेच खरे व्रत असेल, तर हे सर्वदर्शी प्रभो माझी एवढी प्रार्थना ऐकाच. असा शीघ्र उपाय करा की ज्याच्या योगाने अनायासाने मला मरण येईल व या असह्य यातनांचा एकदाचा शेवट होईल. " ५९

चौ० –एहि बिधि दुखित प्रजेसकुमारी । अकथनीय दारुन दुखु भारी ॥
बीतें संबद् सहस सतासी । तजी समाधि संभु अबिनासी ॥
राम नाम सिव सुमिरन लागे । जानेउ सतीं जगतपति जागे ॥
जाइ संभु पद बंदनु कीन्हा । सनमुख संकर आसनु दीन्हा ॥
लगे कहन हरिकथा रसाला । दच्छ प्रजेस भय तेहि काला ॥
देखा बिधि बिचारि सब लायक । दच्छहि कीन्ह प्रजापति नायक ॥
बड़ अधिकार दच्छ जब पावा । अति अभिमानु हृदयँ तब आवा ॥
नहिं कोउ अस जनमा जग माहीं । प्रभुता पाइ जाहि मद नाहीं ॥
दो० –दच्छ लिए मुनि बोलि सब करन लगे बड़ जाग ।
नेवते सादर सकल सुर जे पावत मख भाग ॥ ६० ॥
चौ० –किंनर नाग सिद्ध गंधर्बा । बधुन्ह समेत चले सुर सर्बा ॥
बिष्नु बिरंचि महेसु बिहाई । चले सकल सुर जान बनाई ॥
सतीं बिलोके ब्योम बिमाना । जात चले सुंदर बिधि नाना ॥
सुर सुंदरी करहिं कल गाना । सुनत श्रवन छूटहिं मुनि ध्याना ॥
पूछेउ तब सिवँ कहेउ बखानी । पिता जग्य सुनि कछु हरषानी ॥

अशा प्रकारे दक्षाची कन्या, अकथनीय अशा मनोयातना भोगत दिवस कंठीत होती व प्रभुचरणी प्रार्थना करत होती. या तिच्या दुःसह दुःखात सत्यांयशी हजार वर्षांचा काळ लोटला.

एके दिवशी अविनाशी अशा शंकर भगवंतांनी समाधी सोडली व ते देहभानावर आले.

'राम राम' असे शिवाचे नामस्मरण सुरू होताच जगत्पती जागृत झाल्याचे सतीने जाणले. तिने झटकन् जाऊन शंभुपदी वंदन केले. पण शंकरांनी समोर आसनावर बसण्यास सांगितले. एवढा काल लोटला तरी आपला त्याग कायमच. हे दुःख सतीला पुनः जाणवले. शंकरांनी रसाळ हरिकथा सांगण्यास प्रारंभ केला.

याच वेळी दक्षाची योग्यता जाणून ब्रह्मदेवांनी विचारपूर्वक, त्याला सर्व प्रजापतींचा नायक बनवला. एवढा मोठा अधिकार प्राप्त होताच तो अंतःकरणात अभिमानाने चांगलाच फुगला!

प्रभुता प्राप्त झाल्यावर ज्याला मस्ती आली नाही असा पृथ्वीवर कोण जन्माला आला आहे?

सगळ्या मोठ्या मोठ्या मुनींना बोलावून त्याने एका मोठ्या यज्ञाला प्रारंभ केला व ज्या ज्या देवांना यज्ञभाग मिळणे योग्य आहे त्या सर्वांना आदरपूर्वक निमंत्रणे पाठविली. ६०

लगेच नाग, सिद्ध, गंधर्व, किन्नर व सर्व देव सहकुटुंब या दक्षप्रजापतीकडे यज्ञासाठी आपापल्या ठिकाणाहून निघाले. विष्णू व ब्रह्मदेव आदिकरून सर्व देवांनी आपापली विमाने सजवली. या सर्व सोहाळ्यात फक्त सदाशिवांना मात्र हेतुपुरःसर वगळले होते!

आकाशातून नानाप्रकारची सुंदर विमाने जात असलेली सतीच्या दृष्टीस पडली. देवांगनांनी इतकी गोड गाणी गाण्यास सुरुवात केली की, त्यांचे श्रवण होताच ध्यानस्थ मुनींचे लक्ष विचलित होऊ लागले!

सतीने या सर्व सोहाळ्यासंबंधी चौकशी केल्यावर, शंकरांनी तिला कल्पना दिली. आपल्याच वडिलांच्या घरी होणाऱ्या यज्ञासाठी ही सर्व मंडळी निघाली आहेत, हे समजून सतीला थोडे बरे वाटले. तिने विचार केला



जौं महेसु मोहि आयसु देहीं । कछु दिन जाइ रहौं मिस एहीं ॥
पति परित्याग हृदयँ दुखु भारी । कहइ न निज अपराध बिचारी ॥
बोली सती मनोहर बानी । भय संकोच प्रेम रस सानी ॥
दो० – पिता भवन उत्सव परम जौं प्रभु आयसु होइ ।
तौ मैं जाउँ कृपायतन सादर देखन सोइ ॥ ६१ ॥
चौ० – कहेहु नीक मोरेहुँ मन भावा । यह अनुचित नहिं नेवत पठावा ॥
दच्छ सकल निज सुता बोलाईं । हमरें बयर तुम्हउ बिसराईं ॥
ब्रह्मसभाँ हम सन दुखु माना । तेहि तें अजहुँ करहिं अपमाना ॥
जौं बिनु बोलें जाहु भवानी । रहइ न सीलु सनेहु न कानी ॥
जदपि मित्र प्रभु पितु गुर गेहा । जाइअ बिनु बोलेहुँ न सँदेहा ॥
तदपि बिरोध मान जहँ कोई । तहाँ गएँ कल्यानु न होई ॥
भाँति अनेक संभु समुझावा । भावी बस न ग्यानु उर आवा ॥
कह प्रभु जाहु जो बिनहिं बोलाएँ । नहिं भलि बात हमारे भाएँ ॥
दो० – कहि देखा हर जतन बहु रहइ न दच्छकुमारि ।
दिए मुख्य गन संग तब बिदा कीन्ह त्रिपुरारि ॥ ६२ ॥

की, जर महेश्वर परवानगी देतील तर या निमित्ताने चार दिवस तिकडे जाऊन राहावे. पतिने टाकल्यापासून अंतःकरणात सारखी तळमळत ती दिवस कंठीत होती; पण आपल्याच अपराधाचा विचार करता तिला काही बोलवेना. शेवटी भीती, लज्जा, प्रेम यांच्या रसांच्या खाणीतून जणू काही काढलेल्या मनोहर शब्दांनी सतीने आपली ती इच्छा प्रकट केली. ती म्हणाली, "हे प्रभो, आपणच म्हणता ना की, बाबांच्या घरी फार मोठ्या यज्ञाचा उत्सव आहे म्हणून? आपली संमती जर मिळाली तर आदराने तो पाहायला जावे म्हणते. "आपण कृपानिवास आहात! अनुज्ञा देण्याची कृपा करालच." ६१

शंकर म्हणाले, "तुमचे म्हणणे योग्य आहे. माझ्या मनालाही ते पटते. पण निमंत्रण नसल्यामुळे जाणे अनुचित होय. दक्षाने आपल्या सगळ्या मुलींना बोलावले, परंतु माझ्या वैरामुळे तुम्हाला तेवढे बरोबर वगळले!"

"ब्रह्मदेवाच्या सभेत एकदा त्यांच्या कल्पनेप्रमाणे मी विरुद्ध आहे, असे त्यांना वाटले. आणि तो खुनस ठेवून माझा अपमान करण्याचे धोरण त्यांनी आजतागायत चालू ठेवले आहे. म्हणून तुम्ही जर आमंत्रणाशिवाय गेला तर तो खवळेल आणि मग स्नेह-शील-मर्यादा इत्यादि काहीच राहणार नाही! हो, तुम्ही म्हणाल, आपला मित्र, बाप, धनी आणि गुरू यांच्या घरी जाण्यास निमंत्रणाची मुळीच गरज नाही. ते बरोबर आहे, पण ज्यांच्या अंतःकरणात जर वैरभाव निर्माण झाला असेल तर त्यांच्याकडे गेल्याने आपले कल्याण होणार नाही." अशा नानाप्रकारे शंभूंनी समजूत घातली, पण भवितव्याचा जोर अधिक असल्याने सतीची समजूत पडेना!!.

प्रभू शंकर अखेर म्हणाले, "अधिक निमंत्रणाशिवाय गेला तर परिणाम चांगला होणार नाही, असे मला निश्चित वाटते. या ऊपर तुम्हाला जे करावेसे वाटत असेल ते खुशाल करा."

पुष्कळ प्रयत्न करूनही दक्षकुमारी ऐकत नाही, असे पाहिल्यावर प्रमुख शिवगण बरोबर देऊन त्रिपुरारींनी सतीला निरोप दिला! ६२

चौ० – पिता भवन जब गईं भवानी । दच्छ त्रास काहुँ न सनमानी ॥
सादर भलेहिं मिली एक माता । भगिनीं मिलीं बहुत मुसुकाता ॥
दच्छ न कछु पूछी कुसलाता । सतिहि बिलोकि जरे सब गाता ॥
सतीं जाइ देखेउ तब जागा । कतहुँ न दीख संभु कर भागा ॥
तब चित चढ़ेउ जो संकर कहेऊ । प्रभु अपमानु समुझि उर दहेऊ ॥
पाछिल दुखु न हृदयँ अस ब्यापा । जस यह भयउ महा परितापा ॥
जद्यपि जग दारुन दुख नाना । सब तें कठिन जाति अवमाना ॥
समुझि सो सतिहि भयउ अति क्रोधा । बहु बिधि जननीं कीन्ह प्रबोधा ॥

दो० – सिव अपमानु न जाइ सहि हृदयँ न होइ प्रबोध ।
सकल सभहि हठि हटकि तब बोलीं बचन सक्रोध ॥ ६३ ॥

चौ० – सुनहु सभासद सकल मुनिंदा । कही सुनी जिन्ह संकर निंदा ॥
सो फलु तुरत लहब सब काहूँ । भली भाँति पछिताब पिताहूँ ॥
संत संभु श्रीपति अपबादा । सुनिअ जहाँ तहँ असि मरजादा ॥
काटिअ तासु जीभ जो बसाई । श्रवन मूदि न त चलिअ पराई ॥
जगदातमा महेसु पुरारी । जगत जनक सब के हितकारी ॥

वडिलांच्या वाड्यात पाऊल टाकल्यावर भवानी पाहाते, तो दक्षाच्या भीतीने आपला सन्मान करण्यास कोणीच तयार नाही. पंधरा बहिणींनी हसत हसत टोमणे मारले. फक्त आई तेवढी शुद्ध प्रेमाने भेटली ! दक्षाने नुसते क्षेमकुशलसुद्धा विचारले नाही ! इतकेंच नव्हे, सतीला पाहताच त्याच्या अंगाची नुसती लाहीलाही झाली !

हे दृश्य दिसल्यावर तोंडात पाणीसुद्धा न घालता सतीने यज्ञमंडपात पदार्पण केले. तो तेथे तिला काय दिसले ? शंभूसाठी हविर्भाग कुठेच नाही ! हे पाहताच शंकराचे वचन चित्तात चांगले उमटले व आपल्या पतिदेवाचा असा अपमान झालेला पाहून सतीच्या मनाचा तिळपापड झाला ! त्यापुढे, तिने यापूर्वी भोगलेल्या त्रासाची तिला काहीच किंमत वाटेना ! जगात जरी नानाप्रकारची दारुण दुःखे आहेत तरी आपल्या माणसांनी केलेल्या अपमानाइतकी ती तीव्र नसतात. आणि याच कारणाने सतीचा संताप अनावर झाला !

आईने अनेक प्रकारे तिची समजूत घालण्याची शिकस्त केली, पण काही उपयोग होईना. शिव-अपमानाने तिचे अंतःकरण भडकले होते; त्यामुळे त्यात आईचा उपदेश शिरण्यास जागाच नव्हती !

रागाने ओठ थरथर कापत असलेल्या स्थितीत ती भरसभेत झपाट्याने गेली व तिने अत्यंत क्रुद्ध होऊन सर्व सभासदांना जोराने हाक दिली. ६३

"हे सर्व मुनिश्रेष्ठ व सभासद हो ! ऐका. ज्यांनी ज्यांनी शंकराची निंदा केली अगर ऐकली, त्यांना त्यांना त्यांच्या पापाचे फळ लवकरच मिळाल्याशिवाय राहाणार नाहीं ! बाबांनाही पोटभर पश्चात्ताप होईल ! खरोखर, संत, शंकर व विष्णू यांच्या निंदेच्या बाबतीत अशी शास्त्रमर्यादा आहे की, त्यांची निंदा कानावर येताच सामर्थ्य असेल तर निंदकाची जीभ छाटावी, नाहीतर कानात बोटे घालून तेथून पळ काढावा ! अहो ! पुरारी महेश म्हणजे सर्व जगाचा आत्मा. सर्वांचा उत्पत्तिकर्ता व हितकर्ता !

चौ० – पिता मंदमति निंदत तेही । दच्छ सुक्र संभव यह देही ॥
तजिहउँ तुरत देह तेहि हेतू । उर धरि चंद्रमौलि बृषकेतू ॥
अस कहि जोग अगिनि तनु जारा । भयउ सकल मख हाहाकारा ॥

दो०–सती मरनु संभु गन लगे करन मख खीस ।
जग्य बिधंस बिलोकि भृगु रच्छा कीन्हि मुनीस ॥ ६४ ॥

चौ० – समाचार सब संकर पाए । बीरभद्रु करि कोप पठाए ॥
जग्य बिधंस जाइ तिन्ह कीन्हा । सकल सुरन्ह बिधिवत फलु दीन्हा ॥
भै जगबिदित दच्छ गति सोई । जसि कछु संभु बिमुख कै होई ॥
यह इतिहास सकल जग जानी । ताते मैं संछेप बखानी ॥
सतीं मरत हरि सन बरु मागा । जनम जनम सिव पद अनुरागा ॥
तेहि कारन हिमगिरि गृह जाई । जनमीं पारबती तनु पाई ॥
जब तें उमा सैल गृह जाईं । सकल सिद्धि संपति तहँ छाईं ॥
जहँ तहँ मुनिन्ह सुआश्रम कीन्हे । उचित बास हिम भूधर दीन्हे ॥

दो० – सदा सुमन फल सहित सब द्रुम नव नाना जाति ।
प्रगटीं सुंदर सैल पर मनि आकर बहु भाँति ॥ ६५ ॥

"असे असून त्यांची निंदा करण्यापर्यंत माझ्या पित्याची बुद्धी चळली ! हर ! हर ! ही माझी काया असल्या पातकी दक्षतेजापासून उत्पन्न झालेली. डोळ्याला लाली उत्पन्न करणारा रोग झाल्याने ताबडतोब नष्ट करणेच उचित (शुक्र=तेज, नेत्ररोग)."

असे आहे म्हणून सतीने लगेच भगवान् चंद्रशेखर वृषकेतूचे हृदयात ध्यान केले व योगाग्नीत आपल्या देहाला करून दग्ध टाकला !! ते पाहून यज्ञ मंडपात सर्वत्र हा हाःकार उडाला ! सतीच्या मरणाचे वृत्त कानी शंभुगणांनी यज्ञाचा विध्वंस करण्यास प्रारंभ केला पण मुनिश्रेष्ठ भृगू ऋषीनीं ही आपत्ती ध्यानी घेऊन यज्ञाचे रक्षण केले. ६४

तथापि हा सर्व भयंकर वृत्तान्त शंकराच्या कानी पडताच त्यांचा कोपानल उफाळला व त्यातून वीरभद्राचा जन्म झाला. त्याला दक्षप्रजापतीच्या अत्याचाराचा योग्य समाचार घेण्याची शिवांनी आज्ञा दिली. मग काय ! वीरभद्राने सर्व यज्ञाचा धुव्वा उडवला. देवांना त्यांच्या कृतकर्माचे झणझणीत बक्षीस मिळाले. शंभु विमुखाची जी दुर्दशा या जगात जशी होणे योग्य आहे, तशीच व्हावयाची. तशीच दक्षाची झाली हे सर्व लोक जाणतातच. पुराणातून ही कथा सविस्तर वर्णन केली असल्याने येथे तिचा संक्षेप केला असे भारद्वाजाला याज्ञवल्क्य म्हणाले.

मरणकाळी सतीने रामचरणी प्रार्थना केली होती की जन्मोजन्मी शिवचरणावरील माझे प्रेम अखंड राहो. त्याप्रमाणे तिला पार्वतीचा देह मिळून ती हिमवंताच्या पोटी जन्मली. अर्थात उमेचे आगमन तेथे होताच सर्व सिद्धि-संपतीनी आपले निवासस्थान हिमालयावर कायम केले. जागोजागी मुनिवृंदांनी शुभाश्रम थाटले आणि हिमवंतानेही योग्यप्रकारे जागा देऊन त्यांचे स्वागत केले.

अनेक प्रकारचे नवनवीन वृक्ष, फूल, फलभाराने सर्वकाळी वाकू लागले. त्याचप्रमाणे त्या पर्वतावर सुंदर सुंदर रत्नांच्या अनेक प्रकारच्या खाणी एकामागून एक उघडकीस येऊ लागल्या ! ६५

चौ०— सरिता सब पुनीत जलु बहहीं । खग मृग मधुप सुखी सब रहहीं ॥
सहज बयरु सब जीवन्ह त्यागा । गिरि पर सकल करहिं अनुरागा ॥
सोह सैलँ गिरिजा गृह आएँ । जिमि जनु रामभगति के पाएँ ॥
नित नूतन मंगल गृह तासू । ब्रह्मादिक गावहिं जसु जासू ॥
नारद समाचार सब पाए । कौतुकहीं गिरि गेह सिधाए ॥
सैलराज बड़ आदर कीन्हा । पद पखारि बर आसनु दीन्हा ॥
नारि सहित मुनि पद सिरु नावा । चरन सलिल सबु भवनु सिंचावा ॥
निज सौभाग्य बहुत गिरि बरना । सुता बोलि मेली मुनि चरना ॥

दो०— त्रिकालग्य सर्बग्य तुम्ह गति सर्बत्र तुम्हारि ।
कहहु सुता के दोष गुन मुनिबर हृदयँ बिचारि ॥ ६६ ॥

चौ०— कह मुनि बिहसि गूढ़ मृदु बानी । सुता तुम्हारि सकल गुन खानी ॥
सुंदर सहज सुसील सयानी । नाम उमा अंबिका भवानी ॥
सब लच्छन संपन्न कुमारी । होइहि संतत पियहि पिआरी ॥
सदा अचल एहि कर अहिवाता । एहि तें जसु पैहहिं पितु माता ॥
होइहि पूज्य सकल जग माहीं । एहि सेवत कछु दुर्लभ नाहीं ॥

त्या गिरीवर पवित्र पाण्याने अथांग भरून नद्या वाहू लागल्या. पक्षी पशुभ्रमरादि सर्व प्राणी अत्यंत सुखाने तेथे विहार करू लागले. वस्तुतः ज्यांच्यात जन्मतःच वैरभाव असतो, असे प्राणीही आपले वैर विसरून सर्वच त्या पर्वतावर प्रेम करून सुखाने कालक्रमणा करू लागले. रामभक्ती प्राप्त झाल्यावर तो रामभक्त जसा शोभतो, तसा गिरिजा घरी आल्यावर त्या गिरिराजाला मंडित करू लागली. हिमवंताच्या घरी नित्य नवे मंगल कृत्य होऊ लागले. ज्याची कीर्ती ब्रह्मदेवादिक गातात अशा त्या नारदाच्या कानी सर्व वृत्त येताच त्यांना चैन कुठले पडणार ?

स्वारी जी निघाली ती थेट हिमवंताच्या दारात उभी ! ब्रह्मर्षी आपण होऊन आलेले पाहताच गिरिराजाने त्यांचे आदराने स्वागत केले; त्यांचे पाय धुऊन बसावयास सिंहासन दिले. आपल्या पत्नीसह त्याच्या चरणी मस्तक नमवले आणि त्यांचे चरणतीर्थ सर्व गृहात शिंपडले. आज आपला कसा फार मोठा भाग्योदय झाला, त्यांचे रसभरित वर्णन करून आपल्या कन्यकेस बोलावून त्यांच्या चरणावर घातली ! नंतर हात जोडून हिमवंत म्हणतो,

" हे मुनिश्रेष्ठ ! आपण त्रिकालज्ञ व सर्वज्ञ असून, आपली त्रैलोक्यात अकुंठित गती आहे. म्हणून मनात विचार करून माझ्या मुलीच्या भवितव्यातील (वराच्या गूढस्थ) गुणदोषांचे विवेचन करा." ६६

हे भाषण श्रवण करून नारद हसले. गूढ व कोमल वाणीने बोलले. " हे पाहा तुमची मुलगी म्हणजे सर्व सद्गुणांची प्रत्यक्ष खाणच ! जन्मतःच सुंदर असून, शीलसंपन्न व शहाणी आहे. उमा, अंबिका व भवानी अशी तिची नावे आहेत. तात्पर्य, ही सर्व सुलक्षणसंपन्न कुमारी असल्याने तिच्या पतीला ती कायमची प्रिय होईल. तिचे सौभाग्य सदाच अखंड राहील व तिच्यामुळे तिच्या आईबापाचे नाव मोठे होईल. सकळ जगाला ती पूज्य होईल. इतकेच काय हिची उपासना करणारास अलभ्य असे काहीच राहणार नाही. हिच्या नावाचे



एहि कर नामु सुमिरि संसारा । त्रिय चढ़िहहिं पतिब्रत असिधारा ।।
सैल सुलच्छन सुता तुम्हारी । सुनहु जे अब अवगुन दुइ चारी ।।
अगुन अमान मातु पितु हीना । उदासीन सब संसय छीना ।।
दो०– जोगी जटिल अकाम मन नगन अमंगल बेष ।
अस स्वामी एहि कहँ मिलिहि परी हस्त असि रेख ।। ६७ ।।

चौ०– सुनि मुनि गिरा सत्य जियँ जानी । दुख दंपतिहि उमा हरषानी ।।
नारदहूँ यह भेदु न जाना । दसा एक समुझब बिलगाना ।।
सकल सखीं गिरिजा गिरि मैना । पुलक सरीर भरे जल नैना ।।
होइ न मृषा देवरिषि भाषा । उमा सो बचनु हृदयँ धरि राखा ।।
उपजेउ सिव पद कमल सनेहू । मिलन कठिन मन भा संदेहू ।।
जानि कुअवसरु प्रीति दुराई । सखी उछँग बैठी पुनि जाई ।।
झूठि न होइ देवरिषि बानी । सोचहिं दंपति सखीं सयानी ।।
उर धरि धीर कहइ गिरिराऊ । कहहु नाथ का करिअ उपाऊ ।।
दो०– कह मुनीस हिमवंत सुनु जो बिधि लिखा लिलार ।
देव दनुज नर नाग मुनि कोउ न मेटनिहार ।। ६८ ।।

स्मरण ज्या स्त्रिया करतील, त्यांना असिधाराव्रतासारखा पातिव्रत्य धर्म सहज सुलभरीतीने आचरता येईल. हे शैलराज ! तुमची ही कन्या अशा तऱ्हेने अत्यंत सुलक्षणी आहे.


आता तिच्या भवितव्यातील दोन-चार अवगुण सांगतो ते ऐका. तिच्या हातावरील रेषा असे स्पष्ट दाखवते की, गुणहीन, मानहीन, आईबाप नसलेला, उदासीन, बेपर्वाईने वागणारा, योगी, जटाधारी, कामवासनारहित, नग्न, अमंगलवेषधारी असाच नवरा हिला मिळणार ! " ६७

नारदाची ही वाणी कानी पडताच सर्वांना खरी वाटली व त्या दांपत्याला सर्वांना केवढे दुःख झाले ! पण उमेला मात्र हर्ष झाला ! त्यांच्या नेत्रांतून अश्रू वाहू लागले ! तथापि आईबापांचे दुःखाश्रू व कन्यकेचे आनंदाश्रू हा सूक्ष्म भेद नारदांच्याही ध्यानी आला नाही !

सर्व मैत्रिणी, गिरिजा, हिमवान व मैना अशा सर्वांचे शरीर पुलकित होऊन नेत्रातून अश्रू वाहू लागले. देवर्षींचे वाक्य असत्य कधीही होणार नाही, हे जाणून पार्वतीने ते वाक्य आपल्या हृदयात पक्के दृढ केले. शिवचरणकमली तिला प्रेम उत्पन्न झाले. परंतु मनात असा संशय उत्पन्न झाला की, त्या पदपद्मांची प्राप्ती अती कठीण आहे. प्रतिकूल काळ जाणून तिने आपल्या या प्रेमास वाचा फोडली नाही व ती आपल्या सखीच्या मांडीवर जाऊन बसली.

त्याच देवर्षींच्या वाक्याचा परिणाम, ते असत्य होणार नाही, याच विश्वासाने पार्वतीखेरीज तिच्या जाणत्या मैत्रिणीसुद्धा व पार्वतीचे आईबाप यांच्यावर उलट होऊन, ती सर्व मंडळी अत्यंत दुःखी झाली. शेवटी धीर धरून हिमवंताने नारदास विचारले, " नाथ ! यावर काही उपाय करावयास सांगा ना ? "

मुनी म्हणतात, " हिमवंता, अरे, ब्रह्मदेवानी जे कपाळावर लिहून ठेवले ते देव, दनुज, नर, नाग, मुनी यापैकी कोणासही पुसून टाकणे शक्य नाही. ६८



चौ० — तदपि एक मैं कहउँ उपाई। होइ करै जौं दैउ सहाई ॥
जस बरु मैं बरनेउँ तुम्ह पाहीं। मिलिहि उमहि तस संसय नाहीं ॥
जे जे बर के दोष बखाने। ते सब सिव पहिं मैं अनुमाने ॥
जौं बिबाहु संकर सन होई। दोषउ गुन सम कह सबु कोई ॥
जौं अहि सेज सयन हरि करहीं। बुध कछु तिन्ह कर दोषु न धरहीं ॥
भानु कृसानु सर्ब रस खाहीं। तिन्ह कहँ मंद कहत कोउ नाहीं ॥
सुभ अरु असुभ सलिल सब बहई। सुरसरि कोउ अपुनीत न कहई ॥
समरथ कहुँ नहि दोषु गोसाईं। रबि पावक सुरसरि की नाईं ॥

दो०— जौं असा हिसिषा करहिं नर जड़ बिबेक अभिमान।
परहिं कलप भरि नरक महुँ जीव कि ईस समान ॥ ६९ ॥

चौ० — सुरसरि जल कृत बारुनि जाना। कबहुँ न संत करहिं तेहि पाना ॥
सुरसरि मिलें सो पावन जैसें। ईस अनीसहि अंतरु तैसें ॥
संभु सहज समरथ भगवाना। एहि बिबाहँ सब बिधि कल्याना ॥
दुराराध्य पै अहहिं महेसू। आसुतोष पुनि किएँ कलेसू ॥
जौं तपु करै कुमारि तुम्हारी। भाविउ मेटि सकहिं त्रिपुरारी ॥
जद्यपि बर अनेक जग माहीं। एहि कहँ सिव तजि दूसर नाहीं ॥

"तथापि एक उपाय सांगतो तो ऐक. तुला जर दैव अनुकूल असेल तर त्याचा उपयोग होईल. तुमच्या भावी जावयाचे जे वर्णन मी केले तसाच उमेला वर मिळणार यात शंका नाही. पण वराचे सर्व दोष शंकराच्या ठिकाणी आहेत, हे आता माझ्या ध्यानी आले आणि उमेचा शंकराशी जर विवाह होईल तर वरच्या सर्व दोषांना लोक ताबडतोब गुण म्हणू लागतील ! हे पाहा, विष्णू शेषावर शयन करतात म्हणून कोणत्या शहाण्या मनुष्याने त्यांना दोष दिला आहे ? भानु-कृशानू सर्व रस खातात म्हणून त्यांची गणना वेड्यात कोणीच करीत नाही. शुभ व अशुभ असे सर्व प्रकारचे पाणी गंगेला मिळते म्हणून त्याला अपवित्रता थोडीच येते ! तात्पर्य, हृषिकेश, सूर्य, पावक, आणि गंगा यांच्यासारख्या समर्थांना कोणताच दोष लागत नाही !

" मूर्ख माणसे ज्ञानाच्या अभिमानाने व स्पर्धेने अशा समर्थांचे जर अनुकरण करतील तर ते कल्पभर नरकात पडतील. बाबारे, जीवाला कधीतरी ईश्वराप्रमाणे सर्वस्वी स्वातंत्र्य मिळणे शक्य आहे काय ? ६९

" गंगेच्या पाण्याची मदिरा बनवली आहे, अशी खात्री पटवली तरीही संत काही तिचे पान करणार नाहीत. पण तीच मदिरा गंगेत मिसळली तर लगेच पावन होते, अगदी बरोबर असाच जीव आणि ईश्वर यात भेद आहे ! "

" सदाशिव स्वभावतःच समर्थ आहेत. कारण ते भगवान आहेत. आणि पार्वतीचा शंकराच्याबरोबर विवाह झाला तर त्यात सर्वांचेच कल्याण होईल. दुराराध्य असले तरी ते महेश्वर आहेत आणि आशुतोष असल्याने त्यांच्याकरता तपश्चर्या केल्यास लवकर प्रसन्न होतील ! तुझी मुलगी जर तप करण्यास तयार असेल तर वर सांगितल्याप्रमाणे तिच्या खडतर भवितव्याला सुंदर कलाटणी मिळेल ! भवितव्यावर पुरारी खास मात करतील म्हणून माझ्या मते जगात अनेक प्रकारचे नवरे मुलगे असले तरी शिवाशिवाय हिला अनुरूप वर

चौ० — बर दायक प्रनतारति भंजन । कृपासिंधु सेवक मन रंजन ॥
इच्छित फल बिनु सिव अवराधें । लहिअ न कोटि जोग जप साधें ॥
दो०— अस कहि नारद सुमिरि हरि गिरिजहि दीन्हि असीस ।
होइहि यह कल्यान अब संसय तजहु गिरीस ॥ ७० ॥
चौ० — कहि अस ब्रह्मभवन मुनि गयऊ । आगिल चरित सुनहु जस भयऊ ॥
पतिहि एकांत पाइ कह मैना । नाथ न मैं समुझे मुनि बैना ॥
जौं घरु बरु कुलु होइ अनूपा । करिअ बिबाहु सुता अनुरूपा ॥
न त कन्या बरु रहउ कुआरी । कंत उमा मम प्रानपिआरी ॥
जौं न मिलिहि बरु गिरिजहि जोगू । गिरि जड़ सहज कहिहि सबु लोगू ॥
सोइ बिचारि पति करेहु बिबाहू । जेहिं न बहोरि होइ उर दाहू ॥
अस कहि परी चरन धरि सीसा । बोले सहित सनेह गिरीसा ॥
बरु पावक प्रगटै ससि माहीं । नारद बचनु अन्यथा नाहीं ॥
दो० — प्रिया सोचु परिहरहु सबु सुमिरहु श्रीभगवान ।
पारबतिहि निरमयउ जेहिं सोइ करिहि कल्यान ॥ ७१ ॥

दुसरा खास नाही ! ! ते वर देणारे, शरणागतांच्या दुःखाचा नाश करणारे, कृपासागर व सेवकाच्या मनाला प्रसन्न करणारे आहेत. आणि शिवाराधना सोडून कोट्यवधी योगजपांची साधने केली तरी वांछित फलप्राप्ती होणार नाही हे पक्के ध्यानात ठेव."

या प्रमाणे सांगून भगवत्स्मरणपूर्वक पार्वतीला देवर्षींनी आशीर्वाद दिला आणि म्हणाले, "पर्वतराज, तुम्ही मनातील सर्व संशय सोडा. तुमच्या मुलीचे खास कल्याण होईल." ७०

वरील भाषण करून नारद सत्यलोकाला निघून गेले. 'आता यापुढे काय काय झाले ते ऐका', असे याज्ञवल्क्य भरद्वाजांना म्हणाले.

नारदांच्या भाषणातील खेदकारक शब्दांचा खोल परिणाम मैनेच्या अंतःकरणावर साहजिकच झाला होता. ती एकान्तात आपल्या पतीस म्हणते, "नाथ मुनिवचनाचा अर्थ माझ्या काही सरळ ध्यानी येत नाही. मी एवढेच सांगून ठेवते की, सर्वोत उत्तम स्थळ व कुल पाहून अनुरूप अशाच वराला माझी मुलगी द्यावी. तसे जमणार नसेल तर ती कुमारी राहिलेली परवडली. कान्त! ही उमा माझी प्राणाहून आवडती आहे. उगीच आपली कोणातरी भलत्यालाच तिला तुम्ही देऊन टाकली तर सगळे लोक म्हणतील, अहो! पर्वत स्वभावतःच असे जड (मूर्ख) असणार ! नाही का म्हणणार ? ही गोष्ट ध्यानात ठेवूनच नाथ, तिचे लग्न ठरवा. ज्याच्या योगाने पश्चात्तापाचे असह्य दुःख होणार नाही, असेच पाऊल टाका. हे बोलत असता तिचे अंतःकरण भरून आले, आता पुढे बोलणे अशक्य, हे ध्यानी येताच तिने पतिचरणावर मस्तक ठेवले व ती खाली कोसळली !

हा सर्व प्रकार पाहून हिमवंताने स्नेहपूर्वक आपल्या प्रेमळ पत्नीची समजूत घातली. तो म्हणाला, "एक गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे. चंद्रकिरणातून एखादेवेळी अमृताच्याऐवजी अग्नी निघेल, पण नारदांच्या वचनाला हरताळ लागणार नाही !

"हे प्रिये ! सर्व प्रकारे शोक सोड. श्री भगवंताचे स्मरण कर. पार्वतीला ज्याने निर्माण केली तोच तिचे निश्चित कल्याण करील अशी खात्री असू दे. ७१



चौ०— अब जौं तुम्हहि सुता पर नेहू । तौ अस जाइ सिखावनु देहू ॥
करै सो तपु जेहिं मिलहिं महेसू । आन उपायँ न मिटिहि कलेसू ॥
नारद बचन सगर्भ सहेतु । सुंदर सब गुन निधि बृषकेतू ॥
अस बिचारि तुम्ह तजहु असंका । सबहि भाँति संकरु अकलंका ॥
सुनि पति बचन हरषि मन माहीं । गई तुरत उठि गिरिजा पाहीं ॥
उमहि बिलोकि नयन भरे बारि । सहित सनेह गोद बैठारी ॥
बारहिं बार लेति उर लाई । गदगद कंठ न कछु कहि जाई ॥
जगत मातु सर्बग्य भवानी । मातु सुखद बोलीं मृदु बानी ॥

दो०— सुनहि मातु मैं दीख अस सपन सुनावउँ तोहि ।
सुंदर गौर सुबिप्रबर अस उपदेसेउ मोहि ॥ ७२ ॥

चौ०— करहि जाइ तपु सैलकुमारी । नारद कहा सो सत्य बिचारी ॥
मातु पितहि पुनि यह मत भावा । तपु सुखप्रद दुख दोष नसावा ॥
तपबल रचइ प्रपंचु बिधाता । तपबल बिष्नु सकल जग त्राता ॥
तपबल संभु करहिं संघारा । तपबल सेषु धरइ महिभारा ॥
तप अधार सब सृष्टि भवानी । करहि जाइ तपु अस जियँ जानी ॥

"तुझे जर आपल्या कन्येवर शुद्ध प्रेम असेल तर तिला योग्य तो उपदेश करून महेशप्राप्तीसाठी तपाराधना करण्यास प्रवृत्त कर. दुसरे काहीही करून अनिष्ट टळणार नाही! नारदांच्या भाषणाच्या मागे विशिष्ट हेतू असून, त्यात काही गर्भितार्थ आहे. त्यातील सार असे की, शंकर वृषकेतू असून गुणनिधी व सुंदर आहेत, असा विचार करून शंकराविषयी सर्व शंकांचे निर्मूलन करून टाक. शंकरांना दोष देण्यास मुळीच जागा नाही."

इतका भरपूर खुलासा झाल्यावर मैनेच्या अंतःकरणाला शांती मिळाली. ती सकाळी उठून लगेच गिरिजेकडे गेली. तिचे सौंदर्य पाहताच पुनः आईच्या डोळ्यात पाणी डबडबले. तिला तिने ओढून आपल्या मांडीवर घेतली. वारंवार तिला कवटाळले. कंठ दाटून आला व मुखातून शब्द उमटेना. आईची ही केविलवाणी स्थिती सर्वज्ञ जगदंबा-भवानीच्या ध्यानी येण्यास वेळ थोडाच लागणार! ती आपल्या मातेच्या हृदयाचे सांत्वन करण्यासाठी मधुर शब्दात म्हणते, "आई, हे बघ, मला एक विलक्षण स्वप्न पडले. सांगू का? मोठे मौजेचे आहे! ऐक हं. सांगतेच. पहाटेचीच वेळ. एक गोरा गोरा सुंदर असा तपस्वी ब्राह्मणश्रेष्ठ माझ्या स्वप्नात आला. आणि तो मला काय उपदेश करतो? ७२

"शैलकुमारी! वनात जा. तप कर. नारदवचन सत्य आहे, हे पक्के ध्यानी धर. ही गोष्ट तुझ्या आई-बापांनाही आवडणारी आहे. तपाच्या योगाने दोष व दुःखांचा परिहार होतो व सुखप्राप्ती होते. तपाच्याच बळावर ब्रह्मदेव सृष्टी उत्पन्न करतात, विष्णू पालन करतात व हर संहार करतात. तपाच्या बळानेच शेषाला पृथ्वीचा भार सोसण्याचे सामर्थ्य येते. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे हे भवानी, या अखिल सृष्टीस केवळ तप हाच आधार आहे, हे ध्यानी धर. वनात जा आणि तपस्येला प्रारंभ कर."



चौ०– सुनत बचन बिसमित महतारी । सपन सुनायउ गिरिहि हँकारी ॥
मातु पितहि बहुबिधि समुझाई । चलीं उमा तप हित हरषाई ॥
प्रिय परिबार पिता अरु माता । भए बिकल मुखु आव न बाता ॥

दो० – बेदसिरा मुनि आइ तब सबहि कहा समुझाइ ।
पारबती महिमा सुनत रहे प्रबोधहि पाइ ॥ ७३ ॥

चौ०– उर धरि उमा प्रानपति चरना । जाइ बिपिन लागीं तपु करना ॥
अति सुकुमार न तनु तप जोगू । पति पद सुमिरि तजेउ सबु भोगू ॥
नित नव चरन उपज अनुरागा । बिसरी देह तपहिं मनु लागा ॥
संबत सहस मूल फल खाए । सागु खाइ सत बरष गवाँए ॥
कछु दिन भोजनु बारि बतासा । किए कठिन कछु दिन उपबासा ॥
बेल पाती महि परइ सुखाई । तीनि सहस संबत सोइ खाई ॥
पुनि परिहरे सुखानेउ परना । उमहि नामु तब भयउ अपरना ॥
देखि उमहि तप खीन सरीरा । ब्रह्म गिरा भै गगन गभीरा ॥

मुलीचे हे स्वप्न ऐकून मैना आश्चर्याने थक्कच झाली. तिने लगेच गिरिनाथांना बोलावून ते सर्व स्वप्न सविस्तर सांगितले. सर्वांना इष्ट अशीच ती गोष्ट होती.

आईबापांची निरनिराळ्या प्रकारांनी समजूत घालून लवकरच उमेने तपस्येसाठी जाण्याची तयारी केली. मुलीला तपाचरणासाठी जाण्यास निरोप देण्याची वेळ आली. सर्व गोतावळा गोळा झाला. कोणाच्याच मुखातून शब्द उमटणे शक्य होईना, इतके त्यांचे कंठ दाटून आले.

इतक्यात वेदशिरा मुनी तेथे आले. त्यांनी पार्वतीचा महिमा विकल झालेल्या परिवाराला समजावून सांगितला. तो ऐकून मनावर तो उपदेश चांगलाच ठसल्याने सर्वांचे समाधान होऊन सर्वजण घरी राहिले. ७३

इकडे पार्वती मोठ्या हर्षाने वनात आली. आपल्या प्राणपतीचे चरणकमल हृदयात स्थिर करून, तिने तपस्येला प्रारंभ केला. वस्तुतः उमेचे शरीर अत्यंत सुकुमार! ती का असल्या कष्टदायक तपस्येसाठी जन्माला आली होती? तिचे शरीर तपस्येला अगदीच अयोग्य! पण पतिपदस्मरण करून तिने एकदम सर्व उपभोगांना फाटा दिला. दिवसेंदिवस पतिचरणी तिचे प्रेम वृद्धिंगत होऊ लागले. देहाचा विसर पडला. तपात मन अधिकाधिक रमू लागले.

एक हजार वर्षे तिने केवळ मूळफळांचाच आहार ठेवला. शंभर वर्षे नुसत्या भाजीपाल्यावर तिने काढली. नुसते पाणी घेऊन पुढे तिने कित्येक दिवस तपस्या केली. शेवटी नुसत्या हवेवर प्राण धारण केले. अशा प्रकारचे अत्यंत दुष्कर असे उपवास तिने अनेक दिवस केले! तीन हजार वर्षे जमिनीवर वाळून पडलेल्या बेलांच्या पानांचाच आहार तिने ठेवला होता. पुढे ती वाळलेली पानेही खावयाची नाहीत असा तिने निश्चय केला. तेव्हा तिला अपर्णा हे यथार्थ नाव-अभिधान-प्राप्त झाले. या सर्व खडतर तपश्चर्येचा साहजिकच तिच्या सुकुमार शरीरावर परिणाम होऊन ते फारच क्षीण झाले!

ही उमेची करुण स्थिती सर्वज्ञ प्रभूच्या लक्षात येण्यास थोडाच वेळ लागणार! एके दिवशी गंभीर अशी-आकाशात ब्रह्मदेवांची वाणी तिच्या कानावर आली.

दो०— भयउ मनोरथ सुफल तव सुनु गिरिराजकुमारि ।
परिहरु दुसह कलेस सब अब मिलिहहिं त्रिपुरारि ॥ ७४ ॥

चौ०— अस तप काहुँ न कीन्ह भवानी । भए अनेक धीर मुनि ग्यानी ॥
अब उर धरहु ब्रह्म बर बानी । सत्य सदा संतन सुचि जानी ॥
आवै पिता बोलावन जबहीं । हठ परिहरि घर जाएहु तबहीं ॥
मिलहिं तुम्हहिं जब सप्त रिषीसा । जानेहु तब प्रमान बागीसा ॥
सुनत गिरा बिधि गगन बखानी । पुलक गात गिरिजा हरषानी ॥
उमा चरित सुंदर मैं गावा । सुनहु संभु कर चरित सुहावा ॥
जब तें सतीं जाइ तनु त्यागा । तब तें सिव मन भयउ बिरागा ॥
जपहिं सदा रघुनायक नामा । जहँ तहँ सुनहिं राम गुन ग्रामा ॥

दो०— चिदानंद सुखधाम सिव बिगत मोह मद काम ।
बिचरहिं महि धरि हृदयँ हरि सकल लोक अभिराम ॥ ७५ ॥

चौ०— कतहुँ मुनिन्ह उपदेसहिं ग्याना । कतहुँ राम गुन करहिं बखाना ॥
जदपि अकाम तदपि भगवाना । भगत बिरह दुख दुखित सुजाना ॥

" हे पर्वतराजकन्यके, ऐक. तुझे मनोरथ सुफल झाले असे समज. आता यापुढे दुःसह अशा क्लेशांनी-युक्त असणारी तुझी तपस्या थांबव. आता त्रिपुरारींची तुला खास प्राप्ती होईल." ७४

" हे भवानी, तुझ्यासारखे तप आजपर्यंत कोणीच केले नाही. पुष्कळ ज्ञानी व धैर्यवान मुनी होऊन गेले. पण ह्या तपस्येचा नमुना कोणासच आचरता आला नाही. वराविषयीची ही ब्रह्मयाची श्रेष्ठ आकाशवाणी हृदयात धारण कर. ती सदा पावन व सनातन सत्यानेच भरलेली आहे, हे पक्के लक्षात ठेव. कोणास सांगू नको; व जेव्हा वडिलांच्याकडून बोलावणे येईल, तेव्हा हट्ट सोडून घरी परत जा. तुझ्याकडे सप्तऋषी येतील, तेव्हा तुला या आकाशवाणीची दैवी सत्यता पटेल. "

अशा प्रकारची ब्रह्मदेवांची आकाशांत वर्णन करणारी वाणी कानी पडत असता पार्वतीचा हर्ष गगनात मावेना ! तिच्या शरीरावर सर्वत्र काटा उभा राहिला.

याज्ञवल्क्य भारद्वाजांना म्हणतात आतापर्यंत पार्वतीचे सुंदर चरित्र तुम्हाला सांगितले. आता मनोहर असे शंकर चरित्र सांगतो ते ऐका.

शंभु चरित्र

वडिलांच्या वेडेपणाचा संताप येऊन सतीने दक्षप्रजापतीच्या यज्ञमंडपात योगाग्नीने आपला देह दग्ध करून टाकल्याचे वृत्त कानी आल्यापासून शंकरांच्या चित्तात वैराग्याने ठाणे दिले. त्यांचा कार्यक्रम म्हणजे रघुपतीच्या नामाचा अखंड जप करावा. कुठेही रामगुणगान चालले असेल तेथे जाऊन ते श्रवण करावे.

चिदानन्द सुखाचे माहेरघर, मोह, मद अथवा काम यांचा ज्याना स्पर्शही नाही असे शिवजी सर्वांना आनन्द देणाऱ्या भगवान श्रीरामचंद्राला हृदयात धारण करून त्याच्या ध्यानाच्या धुंदीत पृथ्वीवर स्वैर संचार करू लागले. ७५

योग्य साधक मुनी भेटल्यास त्याला ज्ञानोपदेश द्यावा, कुठे रामगुणांचे सविस्तर वर्णन करावे. वस्तुतः ज्ञानी शिवजी कामनाविरहित खरेच; परंतु असे भगवान असूनही आपल्या ठिकाणी अनन्यभक्ती असणाऱ्या सतीच्या

चौ०— एहि बिधि गयउ कालु बहु बीती । नित नै होइ राम पद प्रीती ।।
नेमु प्रेम संकर कर देखा । अबिचल हृदयँ भगति कै रेखा ।।
प्रगटे रामु कृतग्य कृपाला । रूप सील निधि तेज बिसाला ।।
बहु प्रकार संकरहि सराहा । तुम्ह बिनु अस ब्रतु को निरबाहा ।।
बहुबिधि राम सिवहि समुझावा । पारबती कर जन्मु सुनावा ।।
अति पुनीत गिरिजा कै करनी । बिस्तर सहित कृपानिधि बरनी ।।

दो०— अब बिनती मम सुनहु सिव जौं मो पर निज नेहु ।
जाइ बिबाहहु सैलजहि यह मोहि मागें देहु ।। ७६ ।।

चौ०— कह सिव जदपि उचित अस नाहीं । नाथ बचन पुनि मेटि न जाहीं ।।
सिर धरि आयसु करिअ तुम्हारा । परम धरमु यह नाथ हमारा ।।
मातु पिता गुर प्रभु कै बानी । बिनहिं बिचार करिअ सुभ जानी ।।
तुम्ह सब भाँति परम हितकारी । अग्या सिर पर नाथ तुम्हारी ।।
प्रभु तोषेउ सुनि संकर बचना । भक्ति बिबेक धर्म जुत रचना ।।
कह प्रभु हर तुम्हार पन रहेऊ । अब उर राखेहु जो हम कहेऊ ।।
अंतरधान भए अस भाषी । संकर सोइ मूरति उर राखी ।।
तबहिं सप्तरिषि सिव पहिं आए । बोले प्रभु अति बचन सुहाए ।।

वियोग-दुःखाने ते दुःखी झाले होते. अशा प्रकारे दीर्घकाळ लोटला. रामचरणप्रीती नित्य नवी वाढतच होती.

भगवान् रामचंद्रांनी पार्वतीवरील शंकराचे अनन्य प्रेम व कठोर नेम पाहिले. अविचलित असे भक्तिस्वरूप हृदयात स्थिरावलेले लक्षात आले आणि कृतज्ञ-कृपाळू, रूपशील नि अपार तेजस्वी असे भगवान् रामचंद्र आपल्या परमभक्तापुढे प्रकट झाले. अनेक प्रकारांनी शंकराची स्तुती केली ते म्हणाले, "शिवजी तुमच्याशिवाय असल्या कठोर व्रताचे पालन अन्य कोण करू शकेल ?"

पार्वतीच्या जन्माची कथा सांगून पुष्कळ तऱ्हेने त्यांनी शिवाची समजूत घातली. अती पावन अशा गिरिजेच्या खडतर तपाचरणाचे कृपाघनानी सविस्तर वर्णन केले व शेवटी म्हणाले,

"सदाशिवा ! आपला माझ्या ठिकाणी जर स्नेह खरा असेल तर माझी विनंती ऐका. आपण जाऊन गिरिजेबरोबर विवाह करावा. एवढे माझे मागणे मान्य कराच."

शंकर म्हणाले, 'हे व्रतभंग करणे जरी अनुचित असले तरी स्वामिवचनाची अवज्ञा करणे मला शक्य नाही. आपली आज्ञा शिरसामान्य करून पालन करणे. प्रभो, आज्ञापालन हाच सेवकांचा परमधर्म होय. माता-पिता-गुरू व धनी यांच्या आज्ञा विचार न करता शुभ समजून त्यांचे पालन करावयाचे असते. तुम्ही तर सर्वप्रकारे माझे परमहित करणारे ! म्हणून हे नाथ, आपली आज्ञा मी मस्तकी धारण करीत आहे !"

भक्ती, विवेक व धर्मपर अशी रचना असलेली शंकरवचने ऐकून प्रभूंना संतोष झाला. भगवान पुनः म्हणाले, "तुमच्या पूर्वीच्या पणाची आता सांगता झाली ! आता आम्ही सांगितलेली गोष्ट मात्र विसरू नका हं !!"

एवढे बोलून भगवान अंतर्धान पावले. तीच मूर्ती शंकरांनी आपल्या हृदयफलकावर कोरून ठेवली ! त्याचवेळी शंकराच्या जवळ सप्तऋषी आले. त्यांना योग्य शब्दात शंकर म्हणाले,

दो ०—पारबती पहिं जाइ तुम्ह प्रेम परिच्छा लेहु ।
गिरिहि प्रेरि पठएहु भवन दूरि करेहु संदेहु ॥ ७७ ॥

चौ० — रिषिन्ह गौरि देखी तहँ कैसी । मूरतिमंत तपस्या जैसी ॥
बोले मुनि सुनु सैलकुमारी । करहु कवन कारन तपु भारी ॥
केहि अवराधहु का तुम्ह चहहू । हम सन सत्य मरमु किन कहहू ॥
कहत बचन मनु अति सकुचाई । हँसिहहु सुनि हमारि जड़ताई ॥
मनु हठ परा न सुनइ सिखावा । चहत बारि पर भीति उठावा ॥
नारद कहा सत्य सोइ जाना । बिनु पंखन्ह हम चहहिं उड़ाना ॥
देखहु मुनि अबिबेकु हमारा । चाहिअ सदा सिवहि भरतारा ॥

दो ०—सुनत बचन बिहसे रिषय गिरिसंभव तव देह ।
नारद कर उपदेसु सुनि कहहु बसेउ किसु गेह ॥ ७८ ॥

चौ० — दच्छसुतन्ह उपदेसेन्हि जाई । तिन्ह फिरि भवनु न देखा आई ॥
चित्रकेतु कर घरु उन घाला । कनककसिपु कर पुनि अस हाला ॥
नारद सिख जे सुनहिं नर नारी । अबसि होहिं तजि भवनु भिखारी ॥

" पार्वती तपस्या करीत आहे. तिच्याकडे जा. आमच्या वरील तिच्या प्रेमाला चांगली कसोटी लावा. हिमवंताची गाठ घेऊन त्याला आपल्या मुलीस परत आणण्याची सूचना द्या. तसेच पार्वतीच्या हृदयातील सर्व संशय घालवून तिला घरी परतण्यास प्रवृत्त करा. " ७७

ही सदाशिवांची आज्ञा घेऊन परीक्षकांच्या भूमिकेवरून सप्तऋषी गौरीच्या तपस्थानात येऊन पोचले. परंतु तिची कठोर तपाने तेजस्वी झालेली मूर्ती पाहताच त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. ऋषींना ती प्रत्यक्ष तपस्येची मूर्तीच दिसली ! त्यांनी आपली परीक्षेची कामगिरी सुरू केली.

" शैलकुमारी ! आमचे म्हणणे थोडे ऐकून घे. एवढी खडतर तपस्या तू कोणत्या कारणास्तव चालू ठेवली आहेस ? कोणाची उपासना करतेस ? मनांत कोणती कामना धरली आहेस ! यातील वस्तुस्थितीची खरी खरी कल्पना आम्हाला का देत नाहीस ? "

उमेने उत्तर केले " मुनिश्रेष्ठ हो, बोलण्यासच संकोच वाटतो व माझ्या तपस्येचे मर्म सांगण्याला तर या मनाला अती लाज वाटत आहे. कारण ते तुम्हाला कळताच माझ्या वेडेपणाबद्दल तुम्हाला हसू येईल. पण काय करावे ! मनाने एक हट्ट धरला आहे. विरुद्ध शिकवण ऐकण्यास ते तयार होत नाही ! त्याने पाण्यावर भिंत बांधण्याचा अविचार चालवला आहे. नारदांच्या शब्दांवर श्रद्धा ठेवून विना पंख उडण्याची इच्छा धरली आहे. मुनिश्रेष्ठ आमचा मूर्खपणा सांगू ! सदाशिवाला भर्ता म्हणून मिळविण्याची इच्छा धरून हे तप चालू आहे. "

वरील उमेचे भाषण ऐकून ऋषींनी हसत हसत बोलण्यास प्रारंभ केला, ' पार्वती, खरेच तुझा जड (मूर्ख) गिरिसंभव देह आहे ! नारदाचे ऐकून कुणाचे घर धड राहिले आहे ? ७८

दक्षसुतांना त्याने उपदेश केला. काय परिणाम झाला ! त्या मुलांनी आपल्या घराचे पुन्हा तोंडही पाहिले नाही ! चित्रकेतूच्या घराण्याचा सत्यानाश त्यानेच केला ! हिरण्यकशिपूला उपदेश करून त्याला ठार करविला ! अशा प्रकारे ज्या स्त्रीपुरुषांनी नारदाचा उपदेश ऐकला, ते आपल्या घराला मुकून भिकारी बनले.



मन कपटी तन सज्जन चीन्हा । आपु सरिस सबही चह कीन्हा
तेहि कें बचन मानि बिस्वासा । तुम्ह चाहहु पति सहज उदासा ।।
निर्गुन निलज कुबेष कपाली । अकुल अगेह दिगंबर ब्याली ।।
कहहु कवन सुखु अस बरु पाएँ । भल भूलिहु ठग के बौराएँ ।।
पंच कहें सिवँ सती बिबाही । पुनि अवडेरि मराएन्हि ताही ।।

दो० – अब सुख सोवत सोचु नहिं भीख मागि भव खाहिं ।
सहज एकाकिन्ह के भवन कबहुँ कि नारि खटाहिं ।। ७९ ।।

चौ० – अजहूँ मानहु कहा. हमारा । हम तुम्ह कहुँ बरु नीक बिचारा ।।
अति सुंदर सुनि सुखद सुसीला । गावहिं बेद जासु जस लीला ।।
दूषन रहित सकल गुन रासी । श्रीपति पुर बैकुंठ निवासी ।।
अस बरु तुम्हहि मिलाउब आनी । सुनत बिंहसि कह बचन भवानी ।।
सत्य कहेहु गिरिभव तनु एहा । हठ न छूट छूटै बरु देहा ।।
कनकउ पुनि पषान तें होई । जारेहुँ सहजु न परिहर सोई ।।
नारद बचन न मैं परिहरऊँ । बसउ भवनु उजरउ नहिं डरऊँ ।।

दिसायला वर वर मोठा सज्जन पण मोठा आतल्या गाठीचा ! आपण जसा भणंग तसेच सर्वांनी व्हावे, ही त्याची इच्छा. त्याच्या शब्दावर विश्वास ठेवून काय पण नवऱ्याची निवड केलीस ! जन्मतःच उदास, अगुण, अलज्ज, कुवेषधारण करणारा, प्रेताची कवटी हातात घेणारा, नाही कुलाचा पत्ता, ना अंगावर वस्त्र, ना घर ना दार, संपत्ती फक्त सापांची ! गळ्यात व अंगावर सर्वत्र तेच भरलेले ! ! असला नवरा मिळवून काय सुख लागणार सांग बरं ? ठकाने तुम्हाला ठकवले. आणि तुम्ही चांगलेच फसला ! हा तुमचा अभिष्ट पती—त्याची बायको सांभाळण्याची लायकी तरी ठाऊक आहे ? सतीबरोबर पाचाच्या मताने विवाह केला आणि तिला भानगडीत पाडून तिचा त्याग केला, आणि अखेर तिला ठार मारवली !

आता पूर्ण मोकळा झाला. बायको मेल्याचे त्याला दुःख मुळीच नाही ! भीक मागतो व संसाराचा चट्टामट्टा करतो. आणि मग खुशाल ताणून देतो. असल्या मूळच्याच एकलकोंड्याच्या घरात स्त्री कधीतरी टिकेल काय ? ७९

इतका खुळेपणा झाला तरी अजून चूक सुधारणे शक्य आहे. पण आम्ही सांगतो तसे मात्र वागले पाहिजे. तुमच्यासाठी आम्ही चांगला वर पाहून ठेवला आहे. तो अतिशय सुंदर आहे. पवित्र आहे. सुशील आहे आणि सुख देणारा आहे. त्याच्या यशाची लीला प्रत्यक्ष वेद गातात. त्याच्यात कोणताच दोष नाही. पण सकळ गुणांची रास असा तो आहे. लक्ष्मीपती वैकुंठनिवासी भगवान विष्णूंची तुम्हाला आम्ही प्राप्ती करून देतो. मग काय ? ”

हे सर्व वक्तव्य ऐकून भवानी हसली व बोलली, “ मुनिवर, आपण माझा देह गिरिसंभव म्हणाला तेच बरोबर ! कारण हा देह पडला तरी त्याचा हट्ट सुटणार नाही, इतका तो निश्चय पक्का आहे. सोने पाषाणातून जन्मते. जाळले तरी त्याचा उपजत कठीण स्वभाव कुठे सुटतो ? तसेच माझे आहे. नारदवचनावरील माझा विश्वास अढळ आहे. तुमच्या म्हणण्याप्रमाणे घर राहो अगर बुडो ! मला त्याची मुळीच भीती वाटत नाही.

गुर कें बचन प्रतीति न जेही । सपनेहुँ सुगम न सुख सिधि तेही ॥

दो०— महादेव अवगुन भवन बिष्नु सकल गुन धाम ।
जेहि कर मनु रम जाहि सन तेहि तेही सन काम ॥ ८० ॥

चौ०— जौं तुम्ह मिलतेहु प्रथम मुनीसा । सुनतिउँ सिख तुम्हारि धरि सीसा ॥
अब मैं जन्मु संभु हित हारा । को गुन दूषन करै बिचारा ॥
जौं तुम्हरे हठ हृदयँ बिसेषी । रहि न जाइ बिनु किएँ बरेषी ॥
तौ कौतुकिअन्ह आलसु नाहीं । बर कन्या अनेक जग माहीं ॥
जन्म कोटि लगि रगर हमारी । बरउँ संभु न त रहउँ कुआरी ॥
तजउँ न नारद कर उपदेसू । आपु कहहिं सत बार महेसू ॥
मैं पा परउँ कहइ जगदंबा । तुम्ह गृह गवनहु भयउ बिलंबा ॥
देखि प्रेमु बोले मुनि ग्यानी । जय जय जगदंबिके भवानी ॥

दो०— तुम्ह माया भगवान सिव सकल जगत पितु मातु ।
नाइ चरन सिर मुनि चले पुनि पुनि हरषत गातु ॥ ८१ ॥

चौ०— जाई मुनिन्ह हिमवंतु पठाए । करि बिनती गिरजहिं गृह ल्याए ॥
बहुरि सप्तरिषि सिव पाहिं जाई । कथा उमा कै सकल सुनाई ॥

ज्याचा गुरुवचनी विश्वास नाही, त्याला स्वप्नातही सुख वा सिद्धी प्राप्त होणार नाही. महादेव सर्व दोषांचे स्थान व विष्णू सर्व गुणांचा निधी, पण ज्याच्या मनाला जे आवडले तेच त्याला प्रिय व सुखद होणार ! ८०

इतक्यातून ही जर तुम्ही प्रथमच आला असता तर तुमचे वचन शिरसामान्य केले असते. आता मी आपला सर्व जन्म हरासाठी अर्पण केला. आता गुण दोषांची चर्चा या वेळी करण्याला जागाच नाही.

पण तुम्हाला लग्ने जमवण्याचा छंदच जर लागला असला तर अशा हौशी लोकाना आळस मुळीच नसतो. जगात विवाहेच्छू कुमारी व नवरदेव होऊ इच्छिणारे तरुण काय थोडे आहेत ? माझ्या बाबतीत तुम्हाला अखेरचेच सांगून टाकते, कोटीजन्म तपस्या करत राहावे लागले तरी मी मागे सरणार नाही. एका शंकरांशीच विवाह करीन; नाहीतर कुमारी राहीन ! केव्हाही नारदवचनावरील श्रद्धा ढळू देणार नाही प्रत्यक्ष शंकरांनी येऊन शंभरवेळा सांगितले तरी माझा निश्चय तिळमात्र ढळणार नाही. फार उशीर झाला. " जगदंबा म्हणाली, " मी आपले पाय धरते. आपण आता आपल्या घराचा रस्ता धरावा."

शंकराच्या ठिकाणच्या या निःसीम प्रेमाची कसोटी त्या ज्ञानी मुनीना लागल्यानंतर त्यांच्या मुखांतून एकदम पुढील उद्गार बाहेर पडले. "हे जगज्जननि ! हे भवानी ! आपला जय जयकार असो !! आपण शक्ती व शिव हे भगवान ! सकल विश्वाचे मायबाप."

पार्वतीच्या चरणावर अनेक वेळ मुनींनी मस्तक नमवले व अशाप्रकारे सप्तऋषींनी तिचा जेव्हा निरोप घेतला तेव्हा त्यांचे देह अनेक वेळा रोमांचित झाले ८१ !

शंकरांच्या आज्ञेप्रमाणे सप्तर्षींनी हिमवंताला गिरिजेस परत बोलावण्यास पाठवले. बरीच विनवणी करून त्यानी तिला घरी परत आणली. त्यानंतर परत शंकराकडे जाऊन त्यांना उमेच्या प्रेमाची घेतलेली कसोटी



भए मगन सिव सुनत सनेहा । हरषि सप्तरिषि गवने गेहा ॥
मनु थिर करि तब संभु सुजाना । लगे करन रघुनायक ध्याना ॥
तारकु असुर भयउ तेहि काला । भुज प्रताप बल तेज बिसाला ॥
तेहिं सब लोक लोकपति जीते । भए देव सुख संपति रीते ॥
अजर अमर सो जीति न जाई । हारे सुर करि बिबिध लराई ॥
तब बिरंचि सन जाइ पुकारे । देखे बिधि सब देव दुखारे ॥

दो०— सब सन कहा बुझाइ बिधि दनुज निधन तब होइ ।
संभु सुक्र संभूत सुत एहि जीतइ रन सोइ ॥ ८२ ॥

चौ०— मोर कहा सुनि करहु उपाई । होइहि ईश्वर करिहि सहाई ॥
सतीं जो तजी दच्छ मख देहा । जनमी जाइ हिमाचल गेहा ॥
तेहिं तपु कीन्ह संभु पति लागी । सिव समाधि बैठे सबु त्यागी ॥
जदपि अहइ असमंजस भारी । तदपि बात एक सुनहु हमारी ॥
पठवहु कामु जाइ सिव पाहीं । करै छोभु संकर मन माहीं ॥
तब हम जाइ सिवहि सिर नाई । करवाउब बिबाहु बरिआई ॥

निवेदन केली. ते ऐकून शिव काही काळ स्नेहमग्न झाले. आपले सर्व काम चोख बजावल्याच्या समाधानात सप्तऋषी आपापल्या घरी परतले.

जाणत्या शंभूनी आपल्या मनाला स्थिर केले व रघुपतीच्या ध्यानात त्याला गुंतवले.

याच वेळी तराकासुर अत्यंत माजला. त्याच्या तेजाचा व प्रतापाचा सर्वत्र दरारा उत्पन्न झाला. त्याने सर्व लोक व लोकपति यांचा पराभव केला. देवांच्या सौख्याची व संपत्तीची त्याने कायमची वाट लावून टाकली !

तो अजरामर झाल्यामुळे रणांगणांत त्याचा पराभव करणे अशक्य ठरले. त्याच्या बरोबर अनेक प्रकारच्या लढाया करून देव अगदी टेकीस आले. अखेर त्यांनी सत्यलोक गाठला. आपली शोकाकुल स्थिती ब्रह्मदेवाच्या नजरेस आणून त्यांनी विरंचीची कळवळून प्रार्थना केली ! तेव्हा देवांना फार दुःख झाल्याचे ब्रह्मदेवांना आढळून आले.

ब्रह्मदेवांनी देवांना विधी-सर्व रहस्य-समजावून दिले व शेवटी सांगितले की, शंकराचा मुलगाच फक्त या तारकासुराला रणांगणात जिंकू शकेल व त्याला मरण येईल. ८२

म्हणून मी सांगतो तो तुम्ही उपाय करा म्हणजे कार्य होईल. तुम्हाला ईश्वर सहाय्य करील व तुमचे काम होईल. दक्षमखामध्ये सतीने आपला देह दग्ध केला. ती आता हिमवंताच्या घरी जन्मली आहे. तिने शंभू पती लाभावे म्हणून तप केले आहे परंतु शंभू, सर्व व्यवहार सोडून ते समाधी लावून बसले आहेत.

ते साधणे फार कठीण आहे, तरीपण एक गोष्ट सांगतो ती ऐका जाऊन कामाला शिवाकडे पाठवा. त्याने शंकराच्या मनात क्षोभ उत्पन्न करावा इतके झाल्यावर शंकरचरणी आपण मस्तक नमवू आणि भीड घालून त्यांचा पार्वतीबरोबर जबरीने विवाह घडवून आणवू. देवांचे हित साधण्यास एवढाच एक उत्तम उपाय आहे.

चौ०– एहि बिधि भलेहिं देवहित होई । मत अति नीक कहइ सबु होई ।।
अस्तुति सुरन्ह कीन्हि अति हेतू । प्रगटेउ बिषमबान झषकेतू ।।

दो०– सुरन्ह कही निज बिपति सब सुनि मन कीन्ह बिचार ।
संभु बिरोध न कुसल मोहि बिहसि कहेउ अस मार ।। ८३ ।।

चौ०– तदपि करब मैं काजु तुम्हारा । श्रुति कह परम धरम उपकारा ।।
पर हित लागि तजइ जो देही । संतत संत प्रसंसहिं तेही ।।
अस कहि चलेउ सबहि सिरु नाई । सुमन धनुष कर सहित सहाई ।।
चलत मार अस हृदयँ बिचारा । सिव बिरोध ध्रुव मरनु हमारा ।।
तब आपन प्रभाउ बिस्तारा । निज बस कीन्ह सकल संसारा ।।
कोपेउ जबहिं बारिचरकेतू । छन महुँ मिटे सकल श्रुति सेतू ।।
ब्रह्मचर्ज ब्रत संजम नाना । धीरज धरम ग्यान बिग्याना ।।
सदाचार जप जोग बिरागा । सभय बिबेक कटकु सबु भागा ।।

छं०– भागेउ बिबेकु सहाय सहित सो सुभट संजुग महि मुरे ।
सदग्रंथ पर्बत कंदरन्हि महुँ जाइ तेहि अवसर दुरे ।।

स्वतःला कुठेच चटका बसणार नसल्याने सर्व देवांनी अगदी एकमताने हा ठराव पास केला. आपल्या स्वार्थासाठी देवांनी कामदेवाची मनसोक्त स्तुती केली. तेव्हा तो प्रकट झाला. तारकासुराने आपणाला कसे त्राहिभगवान करून सोडले आहे व आता शंकराची समाधी भंग पावण्यासाठी त्याने गेले पाहिजे, इत्यादि हकीकत देवांच्याकडून ऐकल्यावर तो विचार करू लागला. शंकराशी विरोध करून आपण क्षेम राहू शकणार नाही, हे ध्यानी येऊन तो हसला व म्हणाला. ८३

" देव हो, असे प्राणसंकट असूनही मी तुमचे काम करीन बरं. वेदानी परोपकार हा श्रेष्ठधर्म वर्णन केला आहे. परहितासाठी जो आपला देह त्याग करतो त्याची मुक्तकंठाने संतदेखील प्रशंशा करतात. "

नंतर मदनाने सर्वांना मस्तक नमवले. आपले सुमन-धनुष्य व फुले हाती घेतली आणि सहकाऱ्यांना बरोबर घेऊन तो या महत्कार्यासाठी निघाला. चालत असता त्याच्या मनात विचार आला की, शिवविरोधांत आपले मरण खास !

तथापि अंगीकृत कार्य यशस्वी करण्यासाठी स्वकर्तव्य केले पाहिजे म्हणून त्याने आपला प्रभाव विस्तृत करण्यास प्रारंभ केला. त्याबरोबर सर्व सृष्टी त्याच्या ताब्यात आली. मदन जेव्हा क्रुद्ध झाला तेव्हा एकदम वेदमर्यादा सर्व (अर्थबंधने) खलास होऊन गेल्या ! !

ब्रह्मचर्य, संयम नानाप्रकारची व्रते, धैर्य, धर्म, ज्ञान, विज्ञान यासह सदाचार, जप, योग, वैराग्य इत्यादि सर्व सैन्याने कच खाऊन माघार घेतली.

विवेक भूपतीनेसुद्धा आपल्या सहायकांसह पळ काढला. त्याचे मोठे मोठे खंदे वीर रणांगातून परत वळले. त्यानी सद्ग्रंथ रूपी पर्वतांच्या गुहेत आपापल्यासाठी लपून राहाण्याच्या जागा शोधून काढल्या. (अर्थात् सदाचार ग्रंथात राहिला. आचरण बंद पडले.) सर्व जगतात जिकडे तिकडे मोठी खळबळ उडाली !

छं० — होनिहार का करतार को रखवार जग खरभरु परा ।
दुइ माथ केहि रतिनाथ जेहि कहुँ कोपि कर धनु सरु धरा ॥
दो० — जे सजीव जग अचर चर नारि पुरुष अस नाम ।
ते निज निज मरजाद तजि भए सकल बस काम ॥ ८४ ॥

चौ० — सब के हृदयँ मदन अभिलाषा । लता निहारि नवहिं तरु साखा ॥
नदीं उमगि अंबुधि कहुँ धाईं । संगम करहिं तलाव तलाईं ॥
जहँ असि दसा जड़न्ह कै बरनी । को कहि सकइ सचेतन करनी ॥
पसु पच्छी नभ जल थलचारी । भए कामबस समय बिसारी ॥
मदन अंध ब्याकुल सब लोका । निसि दिनु नहिं अवलोकहिं कोका ॥
देव दनुज नर किंनर ब्याला । प्रेत पिसाच भूत बेताला ॥
इन्ह कै दसा न कहेउँ बखानी । सदा काम के चेरे जानी ॥
सिद्ध बिरक्त महामुनि जोगी । तेपि कामबस भए बियोगी ॥

छं० — भए कामबस जोगीस तापस पावँरन्हि की को कहै ।
देखहिं चराचर नारिमय जे ब्रह्ममय देखत रहे ॥
अबला बिलोकहिं पुरुषमय जगु पुरुष सब अबलामयं ।
दुइ दंड भरि ब्रह्मांड भीतर कामकृत कौतुक अयं ॥

सर्वांच्या मुखातून उद्गार निघू लागले, "हा दैवा! आता काय होणार? आमचे रक्षण कोण करणार? असा दोन डोक्यांचा (उलटच्या डोक्याचा) कोण आहे की, ज्याच्याकरिता रतिपती कामदेवाने क्रुद्ध होऊन आपल्या हातातील धनुष्याला बाण लावले आहेत?"

या जगातील स्त्री व पुरुष या संज्ञा ज्यांना आहेत असे सर्व चेतन व जड असे जे जे प्राणी होते, त्यांनी आपली मर्यादा सोडली व ते कामाला वश झाले. ८४

सर्वांच्या मनात मदनाची अभिलाषा सुरू झाली. उदा० लतांना पाहून वृक्षांच्या डहाळ्या लवू लागल्या. नद्या फुगून सागराकडे पळत सुटल्या. तलाव-पुष्करिणींचा संयोग होऊ लागला. जडांची जिथे ही अवस्था झाली, तिथे चेतनांनी कामांध होऊन काय लीला केल्या असतील याचे किती वर्णन करावे!

आकाशात उड्डाण करणारे सर्व पक्षी, वनात विहार करणारे सर्व पशु, पाण्यात राहाणारे सर्व प्राणी-कोणीही असो, कामवश होऊन त्यानी कालमर्यादा सोडली. सर्वच लोक कामांध होऊन व्याकुळ झाले. दिवस आहे की रात्र आहे, पुरुष कोण, कसा आहे, स्त्री कोण, कशी आहे हेसुद्धा बघत नाहीसे झाले. देव, दैत्य, मनुष्य, किन्नर, सर्प, प्रेत, पिशाच, भुते, वेताळ हे सदोदितच कामाचे गुलाम असल्याने त्यानी काय चाळे केले याचे वर्णन करण्याचे कारणच नाही! परंतु सिद्ध, विरक्त, महामुनी आणि योगी हेही आपले साधन सोडून स्त्रियांच्या विरहाने तडफडू लागले.

योगीच कामवश झाले, मग इतर पामरांची काय स्थिती झाला असेल हे काय सांगावे? ज्यांना सर्व जगच ब्रह्ममय दिसत होते, त्यांना तेच आता स्त्रीमय दिसू लागले. पुरुषांना सर्व जगात फक्त स्त्रियाच दिसू लागल्या व स्त्रियांना सर्वत्र पुरुषांचेच ध्यान लागले. कामदेवाने ही केलेली अद्भुत लीला सर्व ब्रह्माण्डभर दोन घटकापर्यंत चालू राहिली.

सो० — धरी न काहूँ धीर सब के मन मनसिज हरे ।
जे राखे रघुबीर ते उबरे तेहि काल महुँ ।। ८५ ।।

चौ० — उभय घरी अस कौतुक भयऊ । जौ लगि कामु संभु पहिं गयऊ ।।
सिवहि बिलोकि ससंकेउ मारू । भयउ जथाथिति सबु संसारू ।।
भए तुरत सब जीव सुखारे । जिमि मद उतरि गएँ मतवारे ।।
रुद्रहि देखि मदन भय माना । दुराधरष दुर्गम भगवाना ।।
फिरत लाज कछु करि नहिं जाई । मरनु ठानि मन रचेसि उपाई ।।
प्रगटेसि तुरत रुचिर रितुराजा । कुसुमित नव तरु राजि बिराजा ।।
बन उपबन बापिका तड़ागा । परम सुभग सब दिसा बिभागा ।।
जहँ तहँ जनु उमगत अनुरागा । देखि मुएहुँ मन मनसिज जागा ।।

छं० — जागइ मनोभव मुएहुँ मन बन सुभगता न परै कही ।
सीतल सुगंध सुमंद मारुत मदन अनल सखा सही ।।
बिकसे सरन्हि बहु कंज गुंजत पुंज मंजुल मधुकरा ।
कलहंस पिक सुक सरस रव करि गान नाचहिं अपछरा ।।

कोणालाही धीर धरवेना. सर्वांचे मन मदनाने आपल्या शक्तीने हरण केले. परंतु, रघुवीरांनी रक्षण केले तेवढेच या कामप्रलयातून बचावले ! ८५

शंभुसन्निध कामदेवाला जाण्याला दोन घटका लागल्या. तेवढ्या वेळात एवढा हाहाकार झाला. पण शंकराचे दर्शन होताच मदन भ्याला. त्याबरोबर सर्व सृष्टी पूर्ववत शांत स्वरुपात आली. मदमस्तांचा मद उतरल्यावर त्याना जसे सुख होते, त्याप्रमाणे सर्व जीवांना ताबडतोब सुखस्वास्थ्याची स्थिति प्राप्त झाली.

ज्याचा पराभव करणे अत्यंत कठीण आहे, ज्याच्या हृदयात प्रवेश करणे अत्यंत कठीण आहे, जो भगवान, (संपूर्ण ऐश्वर्य, धर्म, यश, श्री, ज्ञान व वैराग्य अशा षड्गुणैश्वर्याने युक्त) आहे, जो रुद्र (महाभयंकर असुरादिकाना रडविणारा,) संसृतिजनित रोगांना पळविणारा आहे अशा शंकरांना पाहाताच मदन भयभीत झाला.

पराभूत होऊन परत फिरणे लज्जास्पद आहे. परंतु कार्य तर करण्याचे सामर्थ्य नाही! अशी पुष्पकेतूची स्थिति झाली. अखेर हाती शिर घेऊन त्याने उपाय योजनेला सुरवात केली. झटकन् मनोहर वसंत प्रकट केला. त्याबरोबर नव पुष्प पल्लवानी तरुराजी विलसू लागली. उपवन, वन, वापिका आणि तलाव व दाही दिशातील सर्व विभागात सौंदर्य भरून राहिले जणू काही परमप्रीतीला पूरच आला आहे!! त्याचा परिणाम इतका की, मेलेल्याच्याहि मनात मदन जागृती होऊन त्याने उठून बसावे ! याप्रमाणे मढ्याच्याही ठिकाणी कामवासना निर्माण होईल असे वनाचे सौंदर्य अवर्णनीय फुलले. कामरूपी अग्नीचा खरा मित्र शीतल-मंद-सुगन्धित असा वारा वाहू लागला. सरोवरात अनेक प्रकारची कमळे खिलू लागली. त्यांच्या आनंदात मधुकरांनी आपल्या गुंजारवाने साथ दिली ! राजहंस, कोकिळ, राघू यांच्यासारख्या पक्ष्यांनी मंजुळ कूजन सुरू केले आणि अप्सरांनी नृत्य गायनास प्रारंभ केला.

दो० — सकल कला करि कोटि बिधि हारेउ सेन समेत ।
चली न अचल समाधि सिव कोपेउ हृदयनिकेत ॥ ८६ ॥

चौ० — देखि रसाल बिटप बर साखा । तेहि पर चढ़ेउ मदनु मन माखा ॥
सुमन चाप निज सर संधाने । अति रिस ताकि श्रवन लगि ताने ॥
छाड़े बिषम बिसिख उर लागे । छुटि समाधि संभु तब जागे ॥
भयउ ईस मन छोभु बिसेषी । नयन उघारि सकल दिसि देखि ॥
सौरभ पल्लव मदनु बिलोका । भयउ कोपु कंपेउ त्रैलोका ॥
तब सिवँ तीसर नयन उघारा । चितवत कामु भयउ जरि छारा ॥
हाहाकार भयउ जग भारी । डरपे सुर भए असुर सुखारी ॥
समुझि कामसुखु सोचहिं भोगी । भए अकंटक साधक जोगी ॥

छं०—जोगी अकंटक भए पति गति सुनत रति मुरुछित भई ।
रोदति बदति बहु भाँति करुना करति संकर पहिं गई ।
अति प्रेम करि बिनती बिबिध बिधि जोरि कर सन्मुख रही ।
प्रभु आसुतोष कृपाल सिव अबला निरखि बोले सही ॥

दो० — अब तें रति तव नाथ कर होइहि नामु अनंगु ।
बिनु बपु ब्यापिहि सबहि पुनि सुनु निज मिलन प्रसंगु ॥ ८७ ॥

याप्रमाणे कामदेवाने आपल्या सेनेसह कोट्यवधि प्रकारानी उपाय केले पण व्यर्थ ! तेव्हा तो हरला. शिवजींची समाधी अचल अभंगच राहिली हे पाहून मदन संतप्त झाला ! ८६

त्याने एका अम्रवृक्षाच्या शाखेवर आपले आसन ठोकले आणि अत्यंत चिडून आपल्या सुमन धनुष्याला बाण लावला. शंकराच्या हृदयाचे लक्ष्य ठरवून तो बाण त्याने कर्णांत ताणला ! आणि कठीण असे आपले पाच बाण सोडले. शंकर हृदयावर ते लागले. त्याबरोबर त्यांच्या समाधीचा भंग होऊन ते जागे झाले. ईश्वराचे मन अत्यंत क्षुब्ध झाले तेव्हा, डोळे उघडून त्यांनी झट्कन दाही दिशांना आपली दृष्टि फेकली ! इतक्यात आंब्याच्या पानाखाली छपून बसलेला मदन शंकरांच्या नजरेस आला. ते पाहताच रुद्रांना भयंकर संताप आला ! सर्व त्रैलोक्य थरथर कापू लागले. तत्काळ शंकरांनी तिसरा डोळा उघडून त्याच्याकडे दृष्टी रोखताच त्याची जळून राख झाली.

मदन-दहनाने सर्व जगतात मोठा हाहाकार झाला. सर्व देवांना भीती उत्पन्न झाली. देवांच्या शत्रूंना, असुरांना सुख झाले. कामसुखाचे स्मरण करून भोगी रडू लागले. साधक व योगी यांचा साधन-मार्ग निष्कंटक झाला. म्हणून त्यांना फार समाधान वाटले.

योगी अकंटक झाले, पण पतीची ही शोचनीय स्थिती कानावर पडताच रतीला मूर्च्छा आली. तिने रडून मोठा विलाप केला व शेवटी ती शंकरांच्या जवळ गेली. हात जोडून पुढे उभी राहिली व प्रेमाने अनेक प्रकारे विनवणी केली. आशुतोष व सर्व समर्थ शिवजी त्या अबलेला पाहून कृपाळू बनले व म्हणतात,

"रति, तुझ्या पतीला येथून पुढे अनंग असे नाम प्राप्त होईल. शरीरावाचूनच तो सर्व विश्व व्यापील, आणि तुझ्या व त्याच्या भेटीचा प्रसंग सांगतो ऐक. ८७

चौ०—जब जदुबंस कृष्न अवतारा। होइहि हरन महा महिभारा॥
कृष्न तनय होइहि पति तोरा। बचनु अन्यथा होइ न मोरा॥
रति गवनी सुनि संकर बानी। कथा अपर अब कहउँ बखानी॥
देवन्ह समाचार सब पाए। ब्रह्मादिक बैकुंठ सिधाए॥
सब सुर बिष्नु बिरंचि समेता। गए जहाँ सिव कृपानिकेता॥
पृथक पृथक तिन्ह कीन्हि प्रसंसा। भए प्रसन्न चंद्र अवतंसा॥
बोले कृपासिंधु बृषकेतु। कहहु अमर आए केहि हेतु॥
कह बिधि तुम्ह प्रभु अंतरजामी। तदपि भगति बस बिनवउँ स्वामी॥
दो०—सकल सुरन्ह के हृदयँ अस संकर परम उछाहु।
निज नयनन्हि देखा चहहिं नाथ तुम्हार बिबाहु॥ ८८॥
चौ०—यह उत्सव देखिअ भरि लोचन। सोइ कछु करहु मदन मद मोचन॥
कामु जारि रति कहुँ बरु दीन्हा। कृपासिंधु यह अति भल कीन्हा॥
सासति करि पुनि करहिं पसाऊ। नाथ प्रभुन्ह कर सहज सुभाऊ॥
पारबतीं तपु कीन्ह अपारा। करहु तासु अब अंगीकारा॥
सुनि बिधि बिनय समुझि प्रभु बानी। ऐसेइ होउ कहा सुखु मानी॥
तब देवन्ह दुंदुभीं बजाईं। बरषि सुमन जय जय सुर साईं॥

महामहिभार हलका करण्यासाठी जेव्हा यदुवंशात कृष्णावतार होईल, तेव्हा तुझा पती कृष्णतनय होऊन तुमची दोघांची भेट होईल. माझे वचन कधी जरासुद्धा खोटे होणार नाही. काळजी सोड !"

हे श्रीशंकरांचे भाषण ऐकून रती परत फिरली. आता दुसरी कथा सांगतो, ती ऐका, असे याज्ञवल्क्य भारद्वाजास म्हणाले.

उमा-शंभू विवाह

वरील सर्व वृत्त देवांच्या कानी येताच ब्रह्मदेवासह सर्व देव वैकुण्ठित गोळा झाले. श्रीविष्णूसह ब्रह्मादि देव कृपासागर शिवभगवानाजवळ आले. पृथक् पृथक् प्रार्थना करून त्यांनी चंद्रशेखरांना सुप्रसन्न केले. दयाळू वृषकेतूंनी देवांना येण्याचे कारण विचारले. ब्रह्मदेव म्हणतात, "प्रभो, आपण अंतर्ज्ञानी आहातच. तथापि मी भक्तिवश होऊन आपणास विनंती करतो. हे शंकरा, सर्व देवांच्या अंतःकरणात अशी प्रबल इच्छा आहे की, नाथ, तुमच्या विवाहाचा परम मंगलमहोत्सव आपल्या डोळ्यांनी पाहावा. ८८

म्हणून डोळे भरून हा उत्सव जेणे करून, पाहाता येईल, असेच हे मदन-मद-मोचना, आपण करावे. काम दग्ध करून रतीला वरदान दिले; कृपासागरा ही फारच चांगली गोष्ट आपण केली. शिक्षा करून पुनः त्यावर कृपाप्रसाद करणे हा, नाथ ! समर्थांचा सहज स्वभावच असतो. पार्वतीने अपार तप केले आहे. आता तिचा अंगीकार करणे अवश्य आहे."

ब्रह्मदेवाची ही विनंती ऐकली, श्रीरघुनाथांना वचन दिल्याचे स्मरण झाले व शंकरांनी समाधानाने ठीक आहे, म्हणून वचन दिले. लगेच देवांनी सुमनवृष्टी करण्यास व दुंदुभी वाजवण्यास सुरुवात केली. तसेच जयजय सुरनायक म्हणून श्रीशंकराचा जयजयकार केला !

चौ० — अवसरू जानि सप्तरिषि आए । तुरतहिं बिधि गिरिभवन पठाए ॥
प्रथम गए जहँ रहीं भवानी । बोले मदुर बचन छल सानी ॥

दो० — कहा हमार न सुनेहु तब नारद कें उपदेस ।
अब भा झूठ तुम्हार पन जारेउ कामु महेस ॥ ८९ ॥

मास पारायण, तीसरा विश्राम

चौ० — सुनि बोलीं मुसुकाइ भवानी । उचित कहेहु मुनिबर बिग्यानी ॥
तुम्हरें जान कामु अब जारा । अब लगि संभु रहे सबिकारा ॥
हमरें जान सदा सिव जोगी । अज अनवद्य अकाम अभोगी ॥
जौं मैं सिव सेये अस जानी । प्रीति समेत कर्म मन बानी ॥
तौ हमार पन सुनहु मुनीसा । करिहहिं सत्य कृपानिधि ईसा ॥
तुम्ह जो कहा हर जारेउ मारा । सोइ अति बड़ अबिबेकु तुम्हारा ॥
तात अनल कर सहज सुभाउ । हिम तेहि निकट जाइ नहिं काऊ ॥
गएँ समीप सो अवसि नसाइ । असि मन्मथ महेस की नाई ॥

दो० — हियँ हरषे मुनि बचन सुनि देखि प्रीति बिस्वास ।
चले भवानिहि नाइ सिर गए हिमाचल पास ॥ ९० ॥

चौ० — सबु प्रसंगु गिरिपतिहि सुनावा । मदन दहन सुनि अति दुखु पावा ॥
बहुरि कहेउ रति कर बरदाना । सुनि हिमवंत बहुत सुखु माना ॥

यावेळी आपण गेले पाहिजे असे समजून सप्तऋषी आले. तेव्हा ब्रह्मदेवांनी त्यांना ताबडतोब हिमवंताकडे पाठविले. ते प्रथम भवानीच्याच महालात गेले व चेष्टा करण्याच्या दृष्टीने मधुर शब्दात बोलण्यास सुरुवात केली, " भवानी, आम्ही सांगितलेले ऐकले नाही. तुमचा सर्व विश्वास नारदाच्या शब्दांवर! घ्या आता! तुमचा पण खोटा ठरला. महादेवांनी कामालाच जाळून टाकला !! " ८९

हे ऐकून भवानी हसली व म्हणते, " मुनिश्रेष्ठ हो ! आपण ज्ञानी असल्याने योग्य तेच बोलला ! आपल्या मताप्रमाणे शंकरांनी आता कामाला जाळले. याचा अर्थ यापूर्वी शंकर कामी होते ! आमच्या मते तर शिव सदाच योगी, अजन्मा, अनिंद्य, कामरहित व भोगेच्छारहित असेच आहेत आणि मी जर याच शुद्ध भावनेने व प्रेमाने, कायावाचामने त्यांची सेवा केली असेल तर अजून हे मुनिश्रेष्ठ हो ! सांगते ऐका, महेश्वर कृपासागर माझी प्रतिज्ञा खास सत्य करतील."

" आपण आताच म्हणाला की, हराने माराला जाळला पण हा आपला फार मोठा अविवेक आहे. अहो, अग्नीचा हा सहज स्वभावच आहे. त्याच्या सन्निध हिम जाऊ शकत नाही. आणि हट्टाने जाईल तर त्याचा समूळ नाश होणारच ! महेश-मदन संबंधाला हाच न्याय लागू आहे. "

या भाषणाने मुनींना मनोमनी हर्ष झाला. शंकरचरणी तिचा असलेला दृढ विश्वास व तिचे शुद्ध प्रेम पाहून ते प्रसन्न झाले. त्यांनी भवानीला वंदन केले व ते हिमाचलाकडे निघून गेले. ९०.

सप्तऋषींनी हिमवंताला मदनदहनवृत्त सांगितल्यामुळे त्याला फार दुःख झाले. त्यानंतर जेव्हा रतिवरदान-कथा कथन केली, तेव्हा त्याला हायसे वाटले. शंभूचे सामर्थ्य लक्षात आणून त्याने मुनिश्रेष्ठांना बोलावून आणवले. त्या कुल पुरोहिताकडून शुभदिवस, शुभनक्षत्र, शुभघटका इ. पाहून जलदीने लग्नाची तिथी कायम केली !

चौ०– हृदयँ बिचारि संभु प्रभुताई । सादर मुनिबर लिए बोलाई ।।
सुदिनु सुनखतु सुघरि सोचाई । बेगि बेदबिधि लगन धराई ।।
पत्री सप्तरिषिन्ह सोइ दीन्ही । गहि पद बिनय हिमाचल कीन्ही ।।
जाइ बिधिहि तिन्ह दीन्हि सो पाती । बाचत प्रीति न हृदयँ समाती ।।
लगन बाचि अज सबहि सुनाई । हरषे मुनि सब सुर समुदाई ।।
सुमन बृष्टि नभ बाजन बाजे । मंगल कलस दसहुँ दिसि साजे ।।

दो०– लगे सँवारन सकल सुर बाहन बिबिध बिमान ।
होहि सगुन मंगल सुभद करहिं अपछरा गान ।। ९१ ।।

चौ० –सिवहि संभु गन करहिं सिंगारा । जटा मुगुट अहि मौरु सँवारा ।।
कुंडल कंकर पहिरे ब्याला । तन बिभूति पट केहरि छाला ।।
ससि ललाट सुंदर सिर गंगा । नयन तीनि उपबीत भुजंगा ।।
गरल कंठ उर नर सिर माला । असिव बेष सिवधाम कृपाला ।।
कर त्रिसुल अरु डमरु बिराजा । चले बसहँ चढ़ि बाजहिं बाजा ।।
देखि सिवहिं सुरत्रिय मुसुकाहीं । बर लायक दुलहिनि जग नाहीं ।।
बिष्नु बिरंचि आदि सुरब्राता । चढ़ि चढ़ि बाहन चले बराता ।।
सुर समाज सब भाँति अनूपा । नहिं बरात दूलह अनुरूपा ।।

सप्तऋषींच्या हातीच ती लग्नपत्रिका देऊन त्यांचे पाय हिमाचलाने धरले व कार्य सांग पार पाडण्याविषयी विनंती केली. त्यांनी ती लग्नपत्रिका ब्रह्मदेवांना नेऊन दिली. तिच्या वाचनाने त्यांना अपार आनंद झाला. ब्रह्मदेवांनीच ती पत्रिका सर्व देव व मुनिगण यांच्या समेत जाहीर रीतीने वाचून दाखवल्याने सर्वांनाच परम संतोष वाटला. आकाशातून पुष्पवृष्टी होऊ लागली. नाना वाद्यांचा गजर सुरू झाला व दाहीदिशांना मंगलवस्तू, मंगल कलश सजू लागले.

सर्व देवांनी आपापली विमाने सजविण्यास प्रारंभ केला. मंगल कल्याणकारी असे सर्वांना शकुन होऊ लागले व त्या आनंदात अप्सरांनी गायन केले. ९१

शिवगणांनी नवरदेव शिवजींच्या शृंगाराचा थाट चालू केला. जटामुकुटावर सापाचा मोर (एक सुंदर आकृती) सजविला! शिवजींनी कानांत सापाची कुंडले व हातात भुजंगाची सलकडी घातली. सगळ्या शरीराला चिताभस्माची विभूती लावली व वस्त्रपरिधानासाठी कमरेला व्याघ्रांबर गुंडाळले. : कपाळावर सुंदर चंद्रकोर व मस्तकावर सुंदर गंगा शोभत आहे. तीन डोळे उत्तम असून सर्पाची जानवी घातली आहेत. हालाहलाने झालेला नीळकंठ व गळ्यात नरमुंडमाला! कृपाळू मंगलधाम शिवाचा असा हा सगळा अशिव वेषालंकार! एका हातात त्रिशूळ आणि दुसऱ्या हातात डमरू शोभत होते. नंदीवर स्वार होऊन, अशा थाटात नवरदेव बाहेर पडताच वाद्याचे नाना प्रकारचे गजर सुरू झाले.

सदाशिवांचा हा वरवेष पाहून देवांगना गालातल्या गालात हसून आपसात कुजबुजू लागल्या, अशा नवरदेवाला अनुरूप अशी नवरी जगात कधी मिळणारच नाही!

बिष्णू, ब्रह्मदेव व इंद्रादी देवांनी आपापली वाहने काढली व स्वतःच्या परिवारासह ही सर्व मंडळी लग्नासाठी निघाली. देवांच्या या वऱ्हाडाचे सौंदर्य अनुपम पण त्याला अगदीच विसंगत असा नवरदेवांचा थाट!



दो०— बिष्नु कहा अस बिहसि तब बोलि सकल दिसिराज।
बिलग बिलग होइ चलहु सब निज निज सहित समाज ॥ ९२ ॥

चौ० — बर अनुहारि बरात न भाई। हँसी करैहहु पर पुर जाई ॥
बिष्नु बचन सुनि सुर मुसुकाने। निज निज सेन सहित बिलगाने ॥
मनहीं मन महेसु मुसुकाहीं। हरि के बिंग्य बचन नहिं जाहीं ॥
अति प्रिय बचन सुनत प्रिय केरे। भृंगिहि प्रेरि सकल गन टेरे ॥
सिव अनुसासन सुनि सब आए। प्रभु पद जलज सीस तिन्ह नाए ॥
नाना बाहन नाना बेषा। बिहसे सिव समाज निज देखा ॥
कोउ मुखहीन बिपुल मुख काहू। बिनु पद कर कोउ बहु पद बाहू ॥
बिपुल नयन कोउ नयन बिहीना। रिष्टपुष्ट कोउ अति तनखीना ॥

छं० — तन खीन कोउ अति पीन पावन कोउ अपावन गति धरें ॥
भूषन कराल कपाल कर सब सद्य सोनित तन भरें ॥
खर स्वान सुअर सृकाल मुख गन बेष अगनित को गनै ॥
बहु जिनस प्रेत पिसाच जोगि जमात बरनत नहिं बनै ॥

ही कुजबुज ऐकून विष्णू स्मितमुखाने दिक्पालांना जवळ घेऊन म्हणाले, "आपापले समाज वेगळे काढून हे वऱ्हाड चालू लागू दे!

हे वऱ्हाड आणि ही वर घोड्याची मिरवणूक वराला योग्य नसल्याने उगीच दुसऱ्याच्या नगरीत जाऊन हसे करून घेण्यात काय शहाणपणा?"

एवढा इषारा मिळताच सर्व देवांनी आपली सेना वेगळ्या करून त्यांनी अलग अलग असे प्रयाण आरंभिले. विष्णूच्या थट्टेखोर भाषणाला खंड नाही हे ऐकून शंकरांनीं मनातल्या मनात स्मित केले व म्हणाले, "आपल्या आवडत्या प्रभूचे हे मधुर शब्द ऐकताच भृंगीला आज्ञा देऊन सर्व शिवगणांना बोलावण्यास शिवांनी सांगितले."

शंकरांची अज्ञा कानी पडताच तावडतोब सर्व शिवगणांचा मेळा हजर झाला. त्यांनी सामोरे येऊन आपल्या प्रभूच्या चरणी सिर नमविले. नाना प्रकारची त्यांची वाहने व नाना प्रकारचे त्यांचे वेष पाहून शंकरांना सुद्धा हसू अवरेना!

त्या शिवगणांत कुणाला तोंडेच नाहीतर कुणाला अनेक मुखे! कुणाला भरपूर हात पाय तर कुणाला हात व पाय ही दोन्ही नाही!! कुणाच्या अंगावर खच्चून डोळे तर कुणी पूर्ण नेत्रहीन!

कोणी चांगलेच गलेलठ्ठ तर कुणाचे अंगावरील हाडे कातड्याखाली झाकलेली!! कोणी शुचिर्भूत तर कोणी अत्यंत अपवित्र वेष धारण करणारे. अंगावर भीतिदायक भूषणे घातलेले, हातात नरकपाल (मस्तकाचे हाड) घेतलेले, सर्व अंगाला ताजे रक्त माखलेले, गाढव, कुत्रा, डुक्कर व कोल्हा यांच्या सारखी तोडे असलेले, अगणित प्रकारचे विचित्र वेष धारण करणारे, प्रेत पिशाच व योगिनी यांचा हा अनेक जातींचा योगी शंकरांच्या जमाव याचे वर्णन कोणी करावे!

सो० – नाचहिं गावहिं गीत परम तरंगी भूत सब ।
देखत अति बिपरीत बोलहिं बचन बिचित्र बिधि ।। ९३ ।।

चौ० – जस दूलहु तसि बनी बराता । कौतुक बिबिध होहिं मग जाता ।।
इहाँ हिमाचल रचेउ बिताना । अति बिचित्र नहिं जाइ बखाना ।।
सैल सकल जहँ लगि जग माहीं । लघु बिसाल नहिं बरनि सिराहीं ।।
बन सागर सब नदीं तलावा । हिमगिरि सब कहुँ नेवत पठावा ।।
कामरूप सुंदर तन धारी । सहित समाज सहित बर नारी ।।
गए सकल तुहिनाचल गेहा । गावहिं मंगल सहित सनेहा ।।
प्रथमहिं गिरि बहु गृह सँवराए । जथाजोगु तहँ तहँ सब छाए ।।
पुर सोभा अवलोकि सुहाई । लागइ लघु बिरंचि निपुनाई ।।

छं० – लघु लाग बिधि की निपुनता अवलोकि पुर सोभा सही ।
बन बाग कूप तड़ाग सरिता सुभग सब सक को कही ।।
मंगल बिपुल तोरन पताका केतु गृह गृह सोहहीं ।।
बनिता पुरुष सुंदर चतुर छबि देखि मुनि मन मोहहीं ।।

दो० – जगदंबा जहँ अवतरी सो पुरु बरनि कि जाइ ।
रिद्धि सिद्धि संपत्ति सुख नित नूतन अधिकाइ ।। ९४ ।।

चांगले रंगात येऊन हे भूतप्रेत स्वरूपातील शिवगण नाचत होते व मजेत गात होते. दिसायला जसे ते अत्यंत विपरीत तशीच त्यांची भाषाही विचित्र प्रकारचीच ! ९३

आता मात्र थाट बरोबर जमला ! नवरदेवाला साजेल असले हे वऱ्हाड झाले. वाटेत किती मौजा झाल्या-असतील याची कल्पनाच केलेली बरी !

लग्नाचा सोहाळा यथासांग व्हावा, व्याह्यांची कोणतीच गैरसोय होऊ नये व आपल्या वैभवाला साजेल असाच सर्व समारंभ व्हावा म्हणून हिमवंताने वर्णनातीत सुंदर मंडप बनवला.

जगाच्या पाठीवर जेवढे म्हणून लहानथोर अगणित पर्वत आहेत, त्याचप्रमाणे वने, सागर, सर्व नद्या व सरोवरे यांच्या अधिष्ठात्री सर्व देवतांना हिमवंताने सादर निमंत्रणे पाठविली आणि तितक्याच प्रेमाने, इच्छेप्रमाणे सुंदर शरीरे धारण करून, सहकुटुंब सहपरिवार ही नातलग पाहुणे मंडळी गिरिराजाच्या घरी आली व त्यांच्या स्त्रियांनी स्नेहभराने गायिलेली मंगल गीते सर्व दऱ्याखोऱ्यांतून निनादू लागली. अगदी आरंभीच तुहिनगिरीने राहाण्यासाठी घरे शृंगारून ठेवली होती. त्यात राहण्याचा ज्यांचा हक्क व मान होता, त्यांना त्याप्रमाणे उतरण्यास परवानगी मिळाली.

एकंदरीत त्यावेळची ती नगरशोभा पाहणारास ती इतकी अनुपमेय वाटे की, त्यापुढे विरंचीची सृष्टि-रचनेची निपुणता क्षुद्रच वाटावी !

वने, बागा, नद्या, विहिरी, सरोवरे सर्वत्र सौंदर्याचेच साम्राज्य पसरले होते. त्यांचे वर्णन करील तरी कोण ? तोरणे, पताका व ध्वजा घरोघरी विपुल फडकू लागल्याने त्यांनी मूळच्या शोभेत चांगलीच भर टाकली. नगरीतील सुंदर व चतुर स्त्रीपुरुषांचे तेज एवढे होते की, मुनींच्याही नजरेला ते मोहिनी घालीत असे ! पण जेथे प्रत्यक्ष जगदंबेनेच अवतार घेतला होता, त्या नगरीचे वर्णन कोण करू शकेल ? त्याठिकाणी ऋद्धी, सिद्धी, संपत्ती व सुखाला नित्य नवी भरती येत होती ! ९४



चौ० – नगर निकट बरात सुनि आई । पुर खरभरु सोभा अधिकाई ।।
करि बनाव सजि बाहन नाना । चले लेन सादर अगवाना ।।
हियँ हरषे सुर सेन निहारी । हरिहि देखि अति भए सुखारी ।।
सिव समाज जब देखन लागे । बिडरि चले बाहन सब भागे ।।
धरि धीरजु तहँ रहे सयाने । बालक सब लै जीव पराने ।।
गएँ भवन पूछहिं पितु माता । कहहिं बचन भय कंपित गाता ।।
कहिअ काह कहि जाइ न बाता । जम कर धार किधौं बरिआता ।।
बरु बौराह बसहँ असवारा । ब्याल कपाल बिभूषन छारा ।।

छं० – तन छार ब्याल कपाल भूषन नगन जटिल भयंकरा ।
सँग भूत प्रेत पिसाच जोगिनि बिकट मुख रजनीचरा ।।
जो जिअत रहिहि बरात देखत पुन्य बड़ तेहि कर सही ।।
देखिहि सो उमा बिबाहु घर घर बात असि लरिकन्ह कही ।।

दो० – समुझि महेस समाज सब जननि जनक मुसुकाहिं ।
बाल बुझाए बिबिध बिधि निडर होहु डरु नाहिं ।। ९५ ।।

वऱ्हाड जवळ आल्याची बातमी कानी येताच सर्व पुरात खळबळ उडाली आणि उरला-सुरला थाट लोकांनी घाईने करून नगरीच्या सौंदर्यात पुनः भर टाकली. चांगली शेलकी मंडळी स्वागतार्थ सुंदर पोशाख करून व उत्तम वाहने सजवून वऱ्हाडास आदराने घेऊन येण्यासाठी निघाली. देवांची सेना बघून त्यांना हर्ष झाला व विष्णूला निरखून पाहिल्यावर ते स्वागती अत्यंत सुखी झाले !

परंतु त्याच्या मागोमाग आलेला शिवगणांचा गोंधळ पाहाताच सर्व वाहने बुजून चारी दिशांना अस्ताव्यस्त पळू लागली ! जाणती माणसे धीर धरून उभी राहिली, पण पोरांना जीव घेऊन पळता भुई थोडी झाली ! धापा टाकत पोरे घरात घुसू लागलेली पाहून वडील मंडळींनी चौकशी केली, तेव्हा भीतीने अंग लटलट कांपत असता ती म्हणाली, 'अहो, काय सांगावे ? न सांगता येण्यासारखेच आहे. हे वऱ्हाड नव्हे यमाची धाडच आली न् काय ? वऱ्हाड कुठलं नि वर कुठला ? नवरा मुलगातर काय वेडापीर. बैलावर स्वार झाला आहे !

अंगावर साप, हातात कवटी आणि शरीराला फासलेली राख हेच दागिने नवरदेवाचे ! उघडानागडा ! भयंकर जटा पसरलेल्या ! आणि त्याच्या बरोबर सेना कुणाची ? प्रेत, भूत, पिशाच, जोगिणी, आणि राक्षस ! आणि त्याची तोंडे किती अक्राळ विक्राळ आणि भयंकर ! खरोखर असले वऱ्हाड आणि नवरदेव पाहून जो जिवंत राहील त्याचे पुण्य मोठेच असले पाहिजे. कारण त्यालाच पार्वतीच्या लग्नाचा सोहाळा पाहावयास मिळणार ! ”

अशा प्रकारे घरोघर पोरे आपल्या आईबापाना सांगत सुटली ! हे सर्व शंकरांच्या समाजाचे वर्णन ऐकून आईबाप हासले. त्यानी अनेक प्रकारे मुलांना समजावून सांगितले की तुम्ही मुळीच भिऊ नका. भिण्याचे कारण नाही ! ९५

चौ० –लै अगवान बरातहि आए । दिए सबहि जनवास सुहाए ।।
मैनाँ सुभ आरती सँवारी । संग सुमंगल गावहिं नारी ।।
कंचन थार सोह बर पानी । परिछन चली हरहि हरषानी ।।
बिकट बेष रुद्रहि जब देखा । अबलन्ह उर भय भयउ बिसेषा ।।
भागि भवन पैठीं अति त्रासा । गए महेसु जहाँ जनवासा ।।
मैना हृदयँ भयउ दुखु भारी । लीन्ही बोलि गिरीसकुमारी ।।
अधिक सनेहँ गोद बैठारी । स्याम सरोज नयन भरे बारी ।।
जेहिं बिधि तुम्हहि रूपु अस दीन्हा । जेहिं जड़ बरु बाउर कस कीन्हा ।।

छं०– कस कीन्ह बरु बौराह बिधि जेहिं तुम्हहि सुंदरता दई ।
जो फलु चहिअ सुरतरुहिं सो बरबस बबूरहिं लागई ।।
तुम्ह सहित गिरि तें गिरौं पावक जरौं जलनिधि महुँ परौं ।
घरु जाउ अपजसु होउ जग जीवत बिबाहु न हौं करौं ।।

दो०–भईं बिकल अबला सकल दुखित देखि गिरिनारि ।
करि बिलापु रोदति बदति सुता सनेहु सँभारि ।। ९६ ।।

चौ०–नारद कर मैं कहा बिगारा । भवनु मोर जिन्ह बसत उजारा ।।
अस उपदेसु उमहि जिन्ह दीन्हा । बौरे बरहि लागि तपु कीन्हा ।।
साचेहुँ उन्ह कें मोह न माया । उदासीन धनु धामु न जाया ।।

स्वागतींनी वऱ्हाड नगरात आणून त्यांना सुंदर जानोसे दिले. मैनेने स्वतः मंगल आरती तयार केली. सुंदर ललना तिच्या बरोबर मंगल गीते म्हणू लागल्या. हातात मनोहर सुवर्णाचे ताट घेतले व आनंदाने वरास ओवाळण्यासाठी पार्वतीमाता निघाली. परंतु तो रुद्राचा भयंकर वेष पाहिल्याबरोबर; जातीच्याच त्या भेदरट स्त्रिया, त्यांची भीतीने गाळण उडाली जे घर उघडे दिसेल त्यात त्या धावतच घुसल्या! तेव्हा आरतीचा कार्यक्रम झाला असे समजून महेश थोड्याच वेळात जानोशाच्या घरी वऱ्हाडासह जाऊन पोचले!

पण इकडे मैनेच्या अंतःकरणात आग पेटली. तिने गिरीशकुमारीला बोलावून तिला स्नेहभराने मांडीवर घेतली. तीच नीलकमलासारखे तिचे डोळे अश्रूंनी भरून आले.

ती म्हणाली "ज्या विधीने तुला असे सुंदर रूप दिले त्याने असल्या खुळचट व बावळट नवऱ्याला जन्माला काय म्हणून घातले? कल्पवृक्षालाच जी फळे यावयाची ती आता जबरदस्तीने बाभळीला येणार! छे छे! ते काही नाही; मी तुझ्यासह कडलोट करून घेईन, आगीत उडी टाकून जळून जाईन, नाहीतर सागरात उडी घेईन; आमचे घर बुडाले तरी चालेल किंवा सर्व जगात आमची अपकीर्ती झाली तरी बेहत्तर! पण माझ्या जिवात जीव आहे तोपर्यंत मी काही हे लग्न होऊ देणार नाही!"

गिरिराजाच्या राणीचे हे दुःख पाहून सर्व स्त्रिया रडून कासावीस झाल्या. मैनेने आपल्या मुलीचे प्रेम आठवून आठवून विलाप करण्यास व रडण्यास सुरुवात केली, तिच्या त्या शोकाकुल स्थितीत तिच्या मुखातून शब्द बाहेर पडू लागले. ९६

"अहो या नारदाचे काय मी वाईट केले म्हणून त्याने माझ्या नांदत्या घराचा असा सत्यानाश केला! मूर्ख वरासाठी एवढे खडतर तप करण्यास त्यांनीच शिकवले! खरंच ग बाई! त्याला ना मोह ना माया, ना

चौ० – पर घर घालक लाज न भीरा । बाँझ कि जान प्रसव कै पीरा ।।
जननिहि बिकल बिलोकि भवानी । बोली जुत बिबेक मृदु बानी ।।
अस बिचारि सोचहि मति माता । सो न टरइ जो रचइ बिधाता ।।
करम लिखा जौं बाउर नाहू । तौ कत दोसु लगाइअ काहू ।।
तुम्ह सन मिटहिं कि बिधि के अंका । मातु ब्यर्थ जनि लेहु कलंका ।।

छं० – जनि लेहु मातु कलंकु करुना परिहरहु अवसर नहीं ।
दुखु सुखु जो लिखा लिलार हमरें जाब जहँ पाउब तहीं ।।
सुनि उमा बचन बिनीत कोमल सकल अबला सोचहीं ।
बहु भाँति बिधिहि लगाइ दूषन नयन बारि बिमोचहीं ।।

दो० – तेहि अवसर नारद सहित अरु रिषि सप्त समेत ।
समाचार सुनि तुहिनगिरि गवने तुरत निकेत ।। ९७ ।।

चौ० – तब नारद सबही समुझावा । पूरब कथाप्रसंगु सुनावा ।।
मयना सत्य सुनहु मम बानी । जगदंबा तव सुता भवानी ।।
अजा अनादि सक्ति अबिनासिनि । सदा संभु अरधंग निवासिनि ।।
जग संभव पालन लय कारिनि । निज इच्छा लीला बपु धारिनि ।।
जनमीं प्रथम दच्छ गृह जाई । नामु सती सुंदर तनु पाई ।।
तहँहुँ सती संकरहि बिबाहीं । कथा प्रसिद्ध सकल जग माहीं ।।

जवळ कवडी, ना घर, बायको बिऱ्हाड बैरागी कुठला ! ! म्हणून लोकांची घरे बुडवत असता त्याला काही लाज किंवा खंत वाटते का पाहा ! वांझोटीला प्रसववेदना कशा कळणार ? ''

अत्यंत असह्य दुःखाने आर्त होऊन आपली आई अविचाराने बरळू लागलेली पाहून भवानीने विवेकयुक्त मधुर भाषण केले. ती म्हणाली, 'आई विचार कर आणि शोक आवर. ब्रह्मदेवाने कपाळी लिहिलेली अक्षरे का कोणी पुसू शकेल ! माझ्याच कपाळी जर बावळा पती लिहिला असला तर उगीच कुणाला तरी काय म्हणून दोष द्यावा ! विधिलिखित पुसण्याची, आई, आहे का तुला शक्ती ! मग उगीच व्यर्थ कलंकाला धनी का होतेस ? आता असला शोक करण्याची ही वेळ नाही ! माझ्या नशिबी जे सुख असेल ते मी जिथे कुठे जाईन तिथे मला मिळणार ! चुकणार नाही.''

उमेचे हे, अशाही आपत्तीत विनीत, कोमल व ...गाने बोल ऐकून, पार्वतीच्या मैत्रिणी व आप्त स्त्रिया जास्तीच दुःखाकुल झाल्या व डोळ्यातून अश्रू ढाळीत विधीला दूषण देऊ लागल्या.

हा सर्व समाचार हिमवंताच्या कानी पडताच नारदमुनी व सप्त ऋषी यांच्यासह तो घाईने आपल्या घरी आला. ९७

लगेच नारदांनी पूर्वीचा सर्व इतिहास सांगून बायकांची समजूत घातली. ते म्हणाले, " मैने, खरे सांगतो ते माझे शब्द ऐक. ही तुझी कन्या भवानी खरोखर जगदंबा आहे, ती अजन्मा, अनादि व अविनाशिनी शक्ती आहे. ती सदोदित शंकरांच्या अर्धांगी वास्तव्य करणारी आहे. या जगाची उत्पत्ती, पालन व लय करणारी ती असून, केवळ आपल्या इच्छेने तिने हे लीला-शरीर धारण केले आहे.

हिच्या मागील जन्माची कथा ऐका. ही प्रथम दक्षाच्या घरात जाऊन जन्मली. अत्यंत लावण्यसंपन्न अशी ही कन्यका तेथे सती या नावाने प्रसिद्ध होती. तिथेही तिने शंकराच्याशीच विवाह केला. सर्व जगाला ही कथा माहीत आहे.

चौ० – एक बार आवत सिव संगा । देखेउ रघुकुल कमल पतंगा ।।
भयउ मोहु सिय कहा न कीन्हा । भ्रम बस बेष सीय कर लीन्हा ।।
छं० – सिय बेषु सतीं जो कीन्ह तेहिं अपराध संकर परिहरीं ।
हर बिरहँ जाइ बहोरि पितु कें जग्य जोगानल जरीं ।।
अब जनमि तुम्हरे भवन निज पति लागि दारुन तपु किया ।
अस जानि संसय तजहु गिरिजा सर्बदा संकर प्रिया ।।
दो० – सुनि नारद के बचन तब सब कर मिटा बिषाद ।
छन महुँ ब्यापेउ सकल पुर घर घर यह संबाद ।। ९८ ।।
चौ० – तब मयना हिमवंतु अनंदे । पुनि पुनि पारबती पद बंदे ।।
नारि पुरुष सिसु जुबा सयाने । नगर लोग सब अति हरषाने ।।
लगे होन पुर मंगलगाना । सजे सबहिं हाटक घट नाना ।।
भाँति अनेक भई जेवनारा । सूपसास्त्र जस कछु ब्यवहारा ।।
सो जेवनार कि जाइ बखानी । बसहिं भवन जेहिं मातु भवानी ।।
सादर बोले सकल बराती । बिष्नु बिरंचि देव सब जाती ।।
बिबिधि पाँति बैठी जेवनारा । लागे परुसन निपुन सुआरा ।।
नारिबृंद सुर जेवँत जानी । लगीं देन गारीं मृदु बानी ।।

एके दिवशी आपल्या पतीसह दंडकारण्य वनातून जात असता तिने रघुवंशमणीला (रामाला) पाहिले. तिला एवढा मोह झाला की, शिवजीनी केलेला उपदेशही तिने मानला नाही आणि भ्रमिष्ट बनून प्रत्यक्ष दशरथनंदनाची परीक्षा घेण्यासाठी सीतेचाच वेष, केला !

"या तिच्या अपराधामुळे शंकरांना तिचा त्याग करणे भाग पडले; पण शंकरचरणांचा असा वियोग झालेला तिला असह्य होऊन तिने आपल्या पिताजीच्या यज्ञमंडपात योगाग्नीने स्वतःचा देह जाळून टाकला! तीच सती आज पुन्हा तुझ्या घरी जन्माला येऊन तिने दुःसह अशी तपस्या आपल्या पतिपदप्राप्तीकरता केली. अशी ही तुमची गिरिजा सदोदित शंकराची प्रियकरीण आहे हे ध्यानी घेऊन सर्व संशयाचा त्याग करा !"

हे नारदांचे भाषण ऐकून सर्वांचाच विषाद नाहीसा झाला आणि हा हा म्हणता सगळ्या नगरीभर ती बातमी पसरून घरोघरी तोच संवाद सुरू झाला! ९८

मैनेला आणि हिमवंताला तर झालेला आनंद त्यांच्या पोटात मावेना. त्यानी पुनः पुन्हा पार्वतीचे पाय धरण्यास सुरुवात केली. म्हातारे, तरुण, पोरे, एकूण सर्व झाडून स्त्री-पुरुष हिमवंताच्या या भाग्यानंदाचे वाटेकरी झाले.

नगरात मंगल गायन पुनः सुरू झाले. नानाप्रकारचे सुवर्ण कलश घरोघरी सजू लागले. सूपशास्त्रात वर्णन केल्याप्रमाणे विविध प्रकारची पक्वान्ने राजवाड्यात तयार झाली. अहो ! ज्या घरात प्रत्यक्ष अन्नपूर्णेचाच अवतार झालेला तेथील अन्नाला अमृताची रुची आली असणार हे का सांगायला पाहिजे ?

सर्व वऱ्हाडी पाहुण्याना मोठ्या सन्मानाने आणवले. विष्णू, ब्रह्मदेवादिक देव मोठ्या थाटाने आले. भोजनासाठी अनेक पंगती बसल्या, हुषार वाढपी चटचट वाढू लागले. स्त्रियांनी देवांची भोजने चाललेली पाहून विविध प्रकारचे मधुर उखाणे घातले.

छं०— गारीं मधुर स्वर देहिं सुंदरि बिंग्य बचन सुनावहीं ।
भोजनु करहिं सुर अति बिलंबु बिनोदु सुनि सचु पावहीं ॥
जेवँत जो बढ़्यो अनंदु सो मुख कोटिहूँ न परै कह्यो ।
अचवाँइ दीन्हें पान गवने बास जहँ जाको रह्यो ॥

दो०— बहुरि मुनिन्ह हिमवंत कहुँ लगन सुनाई आइ ।
समय बिलोकि बिबाह कर पठए देव बोलाइ ॥ ९९ ॥

चौ० — बोलि सकल सुर सादर लीन्हे । सबहि जथोचित आसन दीन्हे ॥
बेदी बेद बिधान सँवारी । सुभग सुमंगल गावहिं नारी ॥
सिंघासनु अति दिब्य सुहावा । जाइ न बरनि बिरंचि बनावा ॥
बैठे सिव बिप्रन्ह सिरु नाई । हृदयँ सुमिरि निज प्रभु रघुराई ॥
बहुरि मुनीसन्ह उमा बोलाईं । करि सिंगारु सखीं लै आईं ॥
देखत रुपु सकल सुर मोहे । बरनै छबि अस जग कबि को है ॥
जगदंबिका जानि भव भामा । सुरन्ह मनहिं मन कीन्ह प्रनामा ॥
सुंदरता मरजाद भवानी । जाइ न कोटिहुँ बदन बखानी

छं०— कोटिहुँ बदन नहिं बनै बरनत जग जननि सोभा महा ।
सकुचहिं कहत श्रुति सेष सारद मंदमति तुलसी कहा ॥

त्या उखाण्यात चेष्टेची खुमारी चटणीसारखी चटकदार लागत होती! हा विनोद ऐकून मधून मधून मोठा हशा पिके व त्यामुळे भोजने सावकाश चालली. अशा या भोजन प्रसंगी सर्वांनी जो आनंद लुटला, त्याचे वर्णन कोटी मुखांनीही करणे अशक्य आहे. आचवून झाल्यावर सर्वांना विडे दिले व व्याही मंडळी आपापल्या जानोशाच्या घरी निघून गेली.

मुनिश्रेष्ठांनी लग्नपत्रिका हिमवंताला वाचून दाखवली आणि लग्नघटिका समीप आल्याची कल्पना देऊन सर्व देवांना विवाह–मंडपात बोलावले. ९९

आणि लगेच योग्य त्या आसनावर आदराने त्यांना विराजमान केले. वेदोक्त विधीने विवाहवेदी सजवली. स्त्रियांनी मंगल गीतांचे मंजुल गायन प्रारंभिले. एक अत्यंत दिव्य असे सुशोभित आसन स्वतः विरंचीने आपल्या हाताने तयार केले होते. ते त्या वेदीवर मांडले, त्याचे वर्णन करणे अशक्य!

विप्रचरण वंदून त्या सिंहासनावर शिव बसले. हृदयात प्रिय अशा रघुरायाचे स्मरण करून त्यासमयी मुनिश्रेष्ठांनी उमेला बोलावणे पाठविले. सखींनी आज ही नवरी अत्युत्तम प्रकारे नटविली होती. तिने मंडपात पदार्पण करताच सर्व देव तिच्या रूपाला पाहून मोहित झाले. तेव्हा तिच्या सौंदर्याचे वर्णन करतील असे कवी विश्वात कुठे पाहावयास सापडणार? परंतु भवाची ती भामिनी जगदंबा आहे. हे ध्यानी आणून सर्व देवांनी तिला मनात नमन केले! अशीही सौंदर्याची सीमा असणारी भवानी तिचे वर्णन कोट्यवधी मुखांनीही करणे अशक्य!

वेद, शेष व शारदा यांना जिथे वर्णनास आपले सामर्थ्य तोकडे पडते, म्हणून लाज वाटली, तेथे मूळचाच मंदमतीचा तुलसीदास किती वर्णन करणार!

छं० – छबिखानि मातु भवानि गवनीं मध्य मंडप सिव जहाँ ।
अवलोकि सकहिं न सकुच पति पद कमल मनु मधुकरु तहाँ

दो० – मुनि अनुसासन गनपतिहि पुजेउ संभु भवानि ।
कोउ सुनि संसय करै सुर अनादि जिहँ जानि ।। १०० ।।

चौ० – जसि बिबाह कै बिधि श्रुति गाई । महामुनिन्ह सो सब करवाई ।।
गहि गिरीस कुस कन्या पानी । भवहि समरपीं जानि भवानी ।।
पानिग्रहन जब कीन्ह महेसा । हियँ हरषे तब सकल सुरेसा ।।
बेदमंत्र मुनिबर उच्चरहीं । जय जय जय संकर सुर करहीं ।।
बाजहिं बाजन बिबिध बिधाना । सुमनबृष्टि नभ भै बिधि नाना ।।
हर गिरिजा कर भयउ बिबाहु । सकल भुवन भरि रहा उछाहू ।।
दासीं दास तुरग रथ नागा । धेनु बसन मनि बस्तु बिभागा ।।
अन्न कनकभाजन भरि जाना । दाइज दीन्ह न जाइ बखाना ।।

छं० – दाइज दियो बहु भाँति पुनि कर जोरि हिमभूधर कह्यो ।
का देउँ पूरनकाम संकर चरन पंकज गहि रह्यो ।।
सिवँ कृपासागर ससुर कर संतोषु सब भाँतिहिं कियो ।
पुनि गहे पद पाथोज मयनाँ प्रेम परिपूरन हियो ।।

मंडपाच्या मध्यावर जेथे शंकर सिंहासनावर विराजमान झाले होते, तेथे सौंदर्याची खाण असणारी भवानी गेली. ज्या चरणकमलांच्या ठिकाणी ही अखंड आकृष्ट झाली होती त्याकडे पाहात असता मात्र ती लाजली! तिचे मन त्यात मधुप झाले.

मुनि-आज्ञा होताच शंकर-पार्वतींनी विघ्नहर्त्या गणेशाचे पूजन केले. हे ऐकून संशय काढण्याचे कारण नाही, सर्वच उपास्य दैवते श्रेष्ठ भूमिकेवरून अनादीच आहेत, हे ध्यानी धरावे! १००

मुनिश्रेष्ठांनी वेदरहित सर्व विवाहविधी यथासांग करवून घेतले. गिरीशाने आपल्या हातात दर्भ, जल व कन्येचा हात धरून ती भवानी आहे असे जाणून भवाला कन्यादान केले. महेशांनी पाणिग्रहण केले, त्यावेळी सर्व देव आनंदित झाले. मुनिवरांनी वेदमंत्राचा घोष केला, त्याबरोबर 'पार्वतीपते हरहर महादेव!! जयशंकर शंकराचा विजय असो.' इत्यादि जयघोष सर्व देवांनी एकमुखाने केले. नाना वाद्ये नानाप्रकारे वाजू लागली. अनेक प्रकारची पुष्पवृष्टी गगनातून झाली. याप्रमाणे गिरिसुता व हर यांचा विवाह सांगपणे पार पडून सर्व भुवनात उत्साहानंद भरला !

दासी, दास, घोडे, रथ, हत्ती, गाई, वस्त्रे, रत्ने व इतर अनेक वस्तू तसेच सुवर्णपात्रातून खाद्य पदार्थ भरून अनेक गाड्या, रथ इत्यादि वाहनातून पाठविले. अशा या गिरिनाथाने दिलेल्या आंदणाचे कोण वर्णन करू शकेल ?

शेवटी त्याने हात जोडून प्रार्थना केली, "हे पूर्णकाम सदाशिवा, मी आपणास काय देणार!" असे म्हणून त्याने शिवपदांना मिठी मारली !

कृपानिधी शंकरांनी अनेक प्रकारांनी आपल्या सासऱ्याला संतुष्ट केले. त्यानंतर अत्यंत प्रेमभराने मैनेने ते शिवपद धरले व म्हणते,

दो० – नाथ उमा मम प्रान सम गृहकिंकरी करेहु ।
छमेहु सकल अपराध अब होइ प्रसन्न बरु देहु ॥ १०१ ॥

चौ० – बहु बिधि संभु सासु समुझाई । गवनी भवन चरन सिरु नाई ॥
जननीं उमा बोलि तब लीन्ही । लै उछंग सुंदर सिख दीन्ही ॥
करेहु सदा संकर पद पूजा । नारिधरमु पति देउ न दूजा ॥
बचन कहत भरे लोचन बारी । बहुरि लाइ उर लीन्हि कुमारी ॥
कत बिधि सृजीं नारि जग माहीं । पराधीन सपनेहुँ सुखु नाहीं ।
भै अति प्रेम बिकल महतारी । धीरजु कीन्ह कुसमय बिचारी ॥
पुनि पुनि मिलति परति गहि चरना । परम प्रेमु कछु जाइ न बरना ॥
सब नारिन्ह मिलि भेटि भवानी । जाइ जननि उर पुनि लपटानी ॥

छं० – जननिहि बहुरि मिलि चली उचित असीस सब काहूँ दईं ।
फिरि फिरि बिलोकति मातु तन तब सखीं लै पहिं गईं ॥
जाचक सकल संतोषि संकरु उमा सहित भवन चले ।
सब अमर हरषे सुमन बरषि निसान नभ बाजे भले ॥

दो० – चले संग हिमवंतु तब पहुँचावन अति हेतु ।
बिबिध भाँति परितोषु करि बिदा कीन्ह बृषकेतु ॥ १०२ ॥

" हे नाथ, ही उमा माझ्या प्राणासारखी आहे; तरीपण आपल्या घरची तिला दासी करा; व आता तिचे सर्व अपराध क्षमा करा व मला प्रसन्न होऊन एवढाच वर द्या. " १०१.

शंभूनी सासूबाईची खूप प्रकारे समजूत घातल्यावर तिने शंकरचरणी मस्तक नमवून ती घराकडे परतली. तिने झटकन् कन्येला आपल्या मांडीवर घेतली व सुंदर शिकवण दिली. मुली, सदोदित शंकरांना सुप्रसन्न ठेव. त्यांच्या चरणाचे नियमाने पूजन कर; कारण पतीला देव मानणे हाच स्त्रियांचा धर्म आहे. दुसरा देव त्यांना नाही. " हे बोलत असता पुनः अश्रू गळू लागले. पार्वतीला पोटाशी धरून म्हणते, " विधात्या, बायकांना कशाला जन्माला घालतोस ? सर्व आयुष्य पराधीनतेत ! त्यात स्वप्नात तरी सुखाची आशा ठेवलीस काय ? भरून आलेल्या भावनांनी तिला व्याकूळ केले, पण यावेळी हे अयोग्य हे जाणून तिने आपल्या भावनांना बांध घातला ! अनेक वेळा ती भेटली व पाया पडली ! मैनेच्या यावेळच्या मातृप्रेमाचे कसे वर्णन करावे ?

आपल्या सगळ्या सखींचा उमेने निरोप घेतला आणि पुनः फिरून आईला मिठी मारली. शेवटी सर्वांनी तिला योग्य आशीर्वाद दिले. आता सासरी निघाली ! वळून वळून आईकडे भरल्या डोळ्यांनी ती पाहात आहे व तिच्या हाताला धरून मैत्रिणी तिला शंभूसमीप नेत आहेत ! !

सर्व याचकांना संतुष्ट करून शंकर उमेसह कैलासास निघाले. सर्व देवांना हर्ष झाला. त्यांनी सुमन-वृष्टी केला व आकाशात अनेक वाद्यांचा आवाज भरून गेला

अत्यंत प्रेमाने हिमवंत पोचविण्यासाठी बरोबर गेला. बरेच लांब सासरे आलेले पाहून त्यांचे पुष्कळ रीतींनी सांत्वन करून त्यांना वृषकेतूंनी निरोप दिला. १०२

चौ० – तुरत भवन आए गिरिराई । सकल सैल सर लिए बोलाई ॥
आदर दान बिनय बहुमाना । सब कर बिदा कीन्ह हिमवाना ॥
जबहिं संभु कैलासहिं आए । सुर सब निज निज लोक सिधाए ॥
जगत मातु पितु संभु भवानी । तेहिं सिंगारु न कहउँ बखानी ॥
करहिं बिबिध बिधि बिलासा । गनन्ह समेत बसहिं कैलासा ॥
हर गिरिजा बिहार नित नयऊ । एहि बिधि बिपुल काल चलि गयऊ ॥
तब जनमेउ षटबदन कुमारा । तारकु असुरु समर जेहिं मारा ॥
आगम निगम प्रसिद्ध पुराना । षन्मुख जन्मु सकल जग जाना ॥
छं० – जगु जान षन्मुख जन्मु कर्मु प्रतापु पुरुषारथु महा ।
तेहि हेतु मैं बृषकेतु सुत कर चरित संछेपहिं कहा ॥
यह उमा संभु बिबाहु जे नर नारि कहहिं जे गावहीं ।
कल्यान काज बिबाह मंगल सर्बदा सुखु पावहीं ॥
दो० – चरित सिंधु गिरिजा रमन बेद न पावहिं पारु ।
बरनै तुलसीदासु किमि अति मतिमंद गवाँरु ॥ १०३ ॥
चौ० – संभु चरित सुनि सरस सुहावा । भरद्वाज मुनि अति सुखु पावा ॥
बहु लालसा कथा पर बाढ़ी । नयनन्हि नीरु रोमावलि ठाढ़ी ॥

गिरिराज नंतर सत्वर घरी परत आले. पर्वत सरोवरादि सर्व समाजाला एकत्र बोलावले; आणि त्यांचा आदर, बहुमान भरपूर विनंती, अतिशय दाने इत्यादि करून त्यांना हिमवंताने बोळवले.

शंभू कैलासाला येऊन पोचल्यावर सर्व देव आपापल्या स्थानी गेले. विश्वाचे मायबाप भवानीशंकर असल्याने त्यांच्या शृंगाराचे वर्णन करणे योग्य होणार नाही. अनेक प्रकारचे भोग व विलास करीत ते गणासह कैलासी राहिले. प्रत्येक दिवशी विहाराचा नवनवीन नमुना चालू असता विपुल काळ लोटला. त्यानंतर कुमार षडाननाचा जन्म होऊन त्याने रणक्षेत्रावर तारकासुराचा नाश केला. वेदतंत्रादि शास्त्रे व पुराणातून कार्तिकस्वामींच्या जन्माची कथा प्रसिद्ध असल्याने सर्व लोक ती जाणतात.

षण्मुखाचा जन्म, त्याची कर्तबगारी, प्रताप व महा पुरुषार्थ हा जगाला ठाऊक असल्याने त्याच्या चरित्राचे वर्णन संक्षिप्त केले.

हा उमा-शंभू विवाह जे नरनारी गातात व सांगतात, त्यांना कल्याणकारक कार्यात व विवाहादी मंगल संस्कारांत सदोदित सुख मिळते.

गिरिजापती महादेवाचे चरित्र सागरासारखे अपार आहे. त्याचा अंत वेदांनाही लागत नाही. मग अत्यंत मंदबुद्धीच्या व गावढळ तुलसीदासाला त्याचे वर्णन कसे करता येणार ? १०३

उमा-शंभू संवाद-हेतु-कथन

सरस आणि सुंदर अशा शंभुचरित्राचे श्रवण करून भारद्वाजमुनींना अत्यंत सुख झाले. वारंवार शरीर पुलकित झाले. आनंदाश्रूंनी डोळे भरले. त्यामुळे कथा ऐकण्याची इच्छा अत्यंत वाढली. प्रेमविवश झाल्यामुळे



प्रेम बिबस मुख आव न बानी । दसा देखि हरषे मुनि ग्यानी ॥
अहो धन्य तव जन्मु मुनीसा । तुम्हहि प्रान सम प्रिय गौरीसा ॥
सिव पद कमल जिन्हहि रति नाहीं । रामहि ते सपनेहुँ न सोहाहीं ॥
बिनु छल बिस्वनाथ पद नेहू । राम भगत कर लच्छन एहू ॥
सिव सम को रघुपति ब्रतधारी । बिनु अघ तजी सती असि नारी ॥
पनु करि रघुपति भगति देखाई । को सिव सम रामहि प्रिय भाई ॥

दो०– प्रथमहिं मैं कहि सिव चरित बूझा मरमु तुम्हार ।
सुचि सेवक तुम्ह राम के रहित समस्त बिकार ॥ १०४ ॥

चौ० –मैं जाना तुम्हार गुन सीला । कहउँ सुनहु अब रघुपति लीला ॥
सुनु मुनि आजु समागम तोरें । कहि न जाइ जस सुखु मन मोरें ॥
राम चरित अति अमित मुनीसा । कहि न सकहिं सत कोटि अहीसा ॥
तदपि जथाश्रुत कहउँ बखानी । सुमिरि गिरापति प्रभु धनुपानी ॥
सारद दारुनारि सम स्वामी । रामु सूत्रधर अंतरजामी ॥
जेहि पर कृपा करहिं जनु जानी । कबि उर अजिर नचावहिं बानी ॥
प्रनवउँ सोइ कृपाल रघुनाथा । बरनउँ बिसद तासु गुन गाथा ॥
परम रम्य गिरिबरु कैलासू । सदा जहाँ सिव उमा निवासू ॥

मुखातून शब्द उमटेना व ही त्यांची दशा पाहून ज्ञानी याज्ञवल्क्य मुनीही बहुत प्रसन्न झाले. त्यांचे शरीरावरही रोमांच उठले. ते म्हणतात, "अहाहा! हे मुनीश्वर ! धन्य आहे तुमचे जीवित! कारण तुम्हाला गौरीश्वर प्राणासारखे प्रिय आहेत ! शिवपदकमली ज्यांना प्रेम नाही, त्यांच्यावर राम स्वप्नातही कृपा करीत नाहीत. म्हणून विश्वनाथपदी कपटहीन प्रेम असणे हेच रामभक्तांचे मुख्य लक्षण होय.

"शिवासारखे रामभक्तीचे व्रत धारण करणारा कोण आहे? कारण सतीसारख्या निष्पाप अशा उत्तम पतीचा त्याग केला व प्रतिज्ञा करून रामभक्तीचा अत्यंत श्रेष्ठ आदर्श जगापुढे ठेवला ! अर्थात अशा भक्तश्रेष्ठासारखा अन्य कोण रामाला प्रिय असणार ! म्हणून प्रथमच मी शिवचरित्र सांगून तुमचे मर्म जाणले, की, तुम्ही सर्व विकाररहित असे रामाचे पावन दास आहात ! १०४

तुमच्या शीलगुणाची मला पूर्ण कल्पना आहे. आता रघुपतिलीला सांगतो, ऐका. खरोखर तुमच्या सारख्यांचा सहवास लाभल्याने माझ्या मनाला केवढे सुख होत आहे म्हणून सांगू !

रामाचे चरित्रही, मुनिश्रेष्ठा ! अत्यंत अपार आहे. शंभर कोटी शेषांनाही त्याचे यथायोग्य वर्णन करता येणार नाही. तथापि वाणीचे प्रेरक व धनुर्धारी अशा प्रभूचे स्मरण करून जसे मी ऐकले तसे तुम्हास सविस्तर सांगतो.

वस्तुतः लाकडाच्या बाहुलीप्रमाणे सरस्वती असून, अंतर्यामी वास करणारा स्वामी राम हाच तिचा सूत्रधार आहे. आपला भक्त जाणून ज्या कवीला ते कृपेचा आधार देतात, त्याच्या हृदयप्रांगणात त्या सरस्वतीला ते मनसोक्त नाचवतात, अशा कृपाकर रघुनाथाला प्रणाम करून त्याच्याच निर्मल गुणांची कथा सांगतो.

सर्व पर्वतांत कैलास श्रेष्ठ असून, अत्यंत मनोहर, रमणीय आहे म्हणून तेथे शिवपार्वतीचे सदैव वास्तव्य असते.

दो० – सिद्ध तपोधन जोगिजन सुर किंनर मुनिबृंद ।
बसहिं तहाँ सुकृती सकल सेवहिं सिव सुखकंद ।। १०५ ।।

चौ० – हरि हर बिमुख धर्म रति नाहीं । ते नर तहँ सपनेहुँ नहिं जाही ।।
तेहि गिरि पर बट बिटप बिसाला । नित नूतन सुंदर सब काला ।।
त्रिबिध समीर सुसीतलि छाया । सिव बिश्राम बिटप श्रुति गाया ।।
एक बार तेहि तर प्रभु गयऊ । तरु बिलोकि उर अति सुखु भयऊ ।।
निज कर डासि नागरिपु छाला । बैठे सहजहिं संभु कृपाला ।।
कुंद इंदु दर गौर सरीरा । भुज प्रलंब परिधन मुनिचीरा ।।
तरुन अरुन अंबुज सम चरना । नख दुति भगत हृदय तम हरना ।।
भुजग भूति भूषन त्रिपुरारी । आननु सरद चंद छबि हारी ।।

दो० – जटा मुकुट सुरसरित सिर लोचन नलिन बिसाल ।
नीलकंठ लावन्यनिधि सोह बालबिधु भाल ।। १०६ ।।

चौ० – बैठे सोह कामरिपु कैसें । धरें सरीरु सातरसु जैसें ।।
पारबती भल अवसरु जानी । गईं संभु पहिं मातु भवानी ।।
जानि प्रिया आदरु अति कीन्हा । बाम भाग आसनु हर दीन्हा ।।

म्हणून सिद्ध, तपस्वी, योगीजन, देवता, किन्नर आणि मुनींचे समुदाय हे या कैलास पर्वतावर राहतात. हे मोठे पुण्यात्मे असून सुखकंद सदाशिवाची उपासना करण्याचे भाग्य त्याना लाभलेले असते ! १०५

याच्या उलट जे भगवान विष्णू व शंकर यांना विन्मुख होतात, ज्यांना धर्माचरणाचे प्रेम नाही अशा लोकांना स्वप्नातही या पावन पर्वताचे दर्शन होत नाही.

या पर्वतावर एक अत्यंत विस्तीर्ण असे वडाचे झाड आहे. ते नित्य नूतन सहाही ऋतूंत सौंदर्याने खुलते. त्याच्या शीतल छायेत मंद-सुगंध गार असा वायू वाहात असतो. शंकर-विश्रांतिवट असे यांचे गुण गान वेदांनी केले आहे.

एकदा भगवान शंकर त्या वृक्षाखाली आले असता त्या वृक्षाचे सौंदर्य पाहून त्याना अत्यंत संतोष झाला. आपल्या हातांनी त्यांनी व्याघ्रांबर पसरले व त्यावर कृपाळु शंभु सहज आसन घालून बसले ! कुन्दांचे फूल, चंद्रमा व शंख यांच्यासारखा त्यांचा गौर वर्णाचा देह, दीर्घ बाहु, मुनिवेष धारण केलेला, पूर्णपणे उमलेल्या लाल कमलाप्रमाणे त्यांच्या चरणाच्या तळव्याचे तेज विलसत होते. नखांची कांती भक्ताच्या हृदयातील अज्ञानांधःकार नष्ट करीत होती ! भुजंग व भस्म यांनी मंडित झालेल्या त्रिपुरारीचे मुख कमल शरद ऋतूतील चंद्रांची शोभा हरण करीत होते.

मस्तकावर जटामुकुट. त्यातून देवसरितेचा सुंदर प्रवाह चाललेला, विशाल कमलाप्रमाणे नेत्र, कंठाचा मनोहर नीलवर्ण, बीजेच्या बाल चंद्राची कपाळावर चमकणारी कोर, असे कामरिपू, शरीरधारी लावण्याच्या निधी प्रमाणे शोभू लागले ! १०६

ही संधी फारच अनुकूल आहे हे जाणून जगज्जननी भवानी शंकराच्या सन्निध गेली. आपली प्रिय अर्धांगी समजून त्यानी तिच्या सन्मान केला व हरानी तिला आपल्या वामभागी शोभन आसन दिले. तेव्हा भवानी हर्षाने

बैठीं सिव समीप हरषाई । पूरुब जन्म कथा चित आई ॥
पति हिएँ हेतु अधिक अनुमानी । बिहसि उमा बोलीं प्रिय बानी ॥
कथा जो सकल लोक हितकारी । सोइ पूछन चह सैलकुमारी ॥
बिस्वनाथ मम नाथ पुरारी । त्रिभुवन महिमा बिदित तुम्हारी ॥
चर अरु अचर नाग नर देवा । सकल करहिं पद पंकज सेवा ।

दो०— प्रभु समरथ सर्बग्य सिव सकल कला गुन धाम ।
जोग ग्यान बैराग्य निधि प्रनत कलपतरु नाम ॥ १०७ ॥

चौ०— जौं मो पर प्रसन्न सुखरासी । जानिअ सत्य मोहि निज दासी ॥
तौ प्रभु हरहु मोर अग्याना । कहि रघुनाथ कथा बिधि नाना ॥
जासु भवनु सुरतरु तर होई । सहि कि दरिद्र जनित दुखु सोई ॥
ससिभूषन अस हृदयँ बिचारी । हरहु नाथ मम मति भ्रम भारी ॥
प्रभु जे मुनि परमारथबादी । कहहिं राम कहुँ ब्रह्म अनादी ॥
सेस सारदा बेद पुराना । सकल करहिं रघुपति गुन गाना ।
तुम्ह पुनि राम राम दिन राती । सादर जपहु अनँग आराती ॥
रामु सो अवध नृपति सुत सोई । की अज अगुन अलख गति कोई ॥

दो०—जौं नृप तनय त ब्रह्म किमि नारि बिरहँ मति भोरि ।
देखि चरित महिमा सुनत भ्रमति बुद्धि अति मोरि ॥ १०८ ॥

शिवाच्या जवळ बसली. मागील जन्मातील विरहव्यथेने होरपळून अखेर योगाग्नीत देह जाळून टाकल्याचे स्मरण झाले व दीर्घ काळ अपेक्षा केलेले सुख आज मिळाल्याने तिला विशेष हर्ष झाला. पतीच्या अंतःकरणात आज अधिक प्रेम उत्पन्न झाल्याचे अनुमान होताच मंद हास्य युक्त अशा तिने मधुर वाणीने बोलण्यास प्रारंभ केला. याज्ञवल्क्य भारद्वाजास सांगतात कीं, सर्व लोकांना हितकारक अशीच कथा आता शैलकुमारी शंकरांना विचारणार आहे. ती म्हणते, " विश्वनाथ, आपण त्रिपुरारी, माझे स्वामी असून आपला श्रेष्ठ महिमा त्रिभुवनात प्रसिद्ध आहे. देव, नाग, नर नव्हे सर्व चराचर सृष्टी आपल्या चरणकमलांची सेवा करतात. आपण हे प्रभो ! समर्थ व सर्वज्ञ व कल्याणब्रह्म स्वरूपी आहा. सर्व कला व गुणांचे निवासस्थान आपणच ! ज्ञान, योग व वैराग्याचे भाण्डार, शरणागताचे कल्पवृक्ष हे आपले नाम आहे ! १०७

" हे सुखराशी ! माझ्यावर जर आपण खरेच प्रसन्न झाला असाल, मला जर मनापासून आपल्या चरणाची दासी समजत असाल, तर विविध प्रकारची रघुनाथकथा मला सांगून माझ्या अज्ञानाचा नाश करा.

" ज्याचे घर कल्पवृक्षाच्या खाली असते, त्याला दुःख आणि दारिद्र्य सहन करण्याचा कधीतरी प्रसंग येईल काय ? हे शशिभूषण नाथ ! हा सिद्धान्त लक्षात घेऊन माझ्या महान् मोहभ्रमाचा नाश करावा.

" हे प्रभो ! जे कोणी परमार्थवादी मुनी असतात, त्यांच्या मते अनादि ब्रह्म हेच रामरूप झाले आहे. शेष, शारदा, वेद व पुराणे ही सर्व रघुपतीचेच गुणगान करतात. तुम्ही तर अनंगाचे शत्रु असूनही रात्रंदिवस अत्यंत आदराने ' राम राम ' असा जप करीत असता, म्हणून संशय असा की, अयोध्या नरेशाचा मुलगा राम व हा वर वर्णन केलेला राम एकच, का तो दुसरा कोणी अजन्मा, अगुण व अगोचर असा निराळाच राम आहे ?

" तो जर राजपुत्र असेल तर ब्रह्म कसा ? निराकारब्रह्माचा सगुण अवतार म्हणावा तर स्त्री-विरहाने त्याची बुद्धी बावळी कशी बनली ? गेल्याजन्मी त्याचे असे एका बाजूस गोंधळात पडणारे चरित्र पाहून व दुसऱ्या बाजूस त्याचा अपार महिमा श्रवण करून माझ्या मतीला अमर्याद भ्रम उत्पन्न झाला आहे ! १०८

चौ० – जौं अनीह ब्यापक बिभु कोऊ । कहहु बुझाइ नाथ मोहि सोऊ ॥
अग्य जानि रिस उर जनि धरहू । जेहि बिधि मोह मिटै सोइ करहू ॥
मैं बन दीखि राम प्रभुताई । अति भय बिकल न तुम्हहि सुनाई ॥
तदपि मलिन मन बोधु न आवा । सो फलु भली भाँति हम पावा ॥
अजहूँ कछु संसउ मन मोरें । करहु कृपा बिनवउँ कर जोरें ॥
प्रभु तब मोहि बहु भाँति प्रबोधा । नाथ सो समुझि करहु जनि क्रोधा ॥
तब कर अस बिमोह अब नाहीं । रामकथा पर रुचि मन माहीं ॥
कहहु पुनीत राम गुन गाथा । भुजगराज भूषन सुरनाथा ॥
दो० – बंदउँ पद धरि धरनि सिरु बिनय करउँ कर जोरि ।
बरनहु रघुबर बिसद जसु श्रुति सिद्धांत निचोरि ॥ १०९ ॥
चौ० – जदपि जोषिता नहिं अधिकारी । दासी मन क्रम बचन तुम्हारी ॥
गूढ़उ तत्त्व न साधु दुरावहिं । आरत अधिकारी जहँ पावहिं ॥
अति आरति पूछउँ सुरराया । रघुपति कथा कहहु करि दाया ॥
प्रथम सो कारन कहहु बिचारी । निर्गुन ब्रह्म सगुन बपु धारी ॥
पुनि प्रभु कहहु राम अवतारा । बालचरित पुनि कहहु उदारा ॥
कहहु जथा जानकी बिबाहीं । राज तजा सो दूषन काहीं ॥

" जर व्यापक, इच्छारहित, सर्वांतर्यामी असा जर कोणी दुसरा राम असेल तर, हे नाथ ! मला तसे समजावून सांगा. अडाणी समजून अंतःकरणात रागावू मात्र नका ! ज्याच्या योगाने माझा हा मोह नष्ट होईल, असा उपाय करावा. पूर्वी सतीच्या देहात असताना मला रामाचे प्रभुत्व प्रत्यक्ष दृष्टीस दिसले. पण स्वतःच्या वेडेपणामुळे मी भयव्याकुळ झाले आणि तुम्हास सांगण्याचा मला धीरच झाला नाही. इतके होऊनही माझे मन मलिनच राहिले व ज्ञान झाले नाही. अर्थात त्याचे योग्य फळ मला पदरी घ्यावे लागलेच ! अजूनही माझ्या मनात काही संशय आहेतच, म्हणून मी हात जोडून विनंती करते आहे की, आपण माझ्यावर कृपा करावी. पूर्वीच्या जन्मी प्रभूंनी मला पुष्कळ बोध केला. पण नाथ ! तो व्यर्थ झाल्याचे पुनः स्मरण करून माझ्यावर रोष धरू नका. कारण पूर्वीच्या प्रकारचा आता विशेष मोह राहिला नाही. माझ्या मनाला रामकथेची गोडी लागली आहे. हे देवांचे देवा ! भुजंगराजभूषणा, पावन करणारी अशी रामगुणगाथा मला कथन करा.

" मी जमिनीवर मस्तक टेकून नाक घासून आपल्या पाया पडते व हात जोडून दीनवाणीने प्रार्थना करते की, श्रुतिसिद्धांत पिळून श्रीरघुवीराच्या निर्मल यशाचे विवरण करून मला सांगा. १०९

" तुम्ही म्हणाल असल्या ज्ञानाचा स्त्रियांना अधिकार नसतो; पण कायावाचामने मी आपल्या चरणाची दासी आहे, जेव्हा एखादा आर्त साधक अधिकारी आहे, असे संतांच्या ध्यानी येते, तेव्हा अत्यंत गूढतत्त्वही ते लपवून ठेवत नाहीत. हे देवराज ! मी अत्यंत आर्त होऊनच आपणास विचारीत आहे. म्हणून माझ्यावर दया करून रघुपतिकथा मला सांगावी !

" प्रथम मला हे फोड करून सांगा की, निर्गुण ब्रह्म, सगुणरूप का धारण करते ? मग रामाचा अवतार कसा झाला ते सांगा. त्यानंतर त्या अवतारातील श्रेष्ठ बालचरिताचे विवरण करा. त्याच्या पुढे जानकी-पाणिग्रहण व राज्यत्याग करण्यास काही दूषण झाले काय ती हकीकत सांगा. वनात अपार लीला केल्या त्यांचे

चौ० — बन बसि कीन्हे चरित अपारा । कहहु नाथ जिमि रावन मारा ॥
राज बैठि कीन्हीं बहु लीला । सकल कहहु संकर सुखसीला ॥

दो० — बहुरि कहहु करुनायतन कीन्ह जो अचरज राम ।
प्रजा सहित रघुबंसमनि किमि गवने निज धाम ॥ ११० ॥

चौ० — पुनि प्रभु कहहु सो तत्त्व बखानी । जेहिं बिग्यान मगन मुनि ग्यानी ॥
भगति ग्यान बिग्यान बिरागा । पुनि सब बरनहु सहित बिभागा ॥
औरउ राम रहस्य अनेका । कहहु नाथ अति बिमल बिबेका ॥
जो प्रभु मैं पूछा नहिं होई । सोउ दयाल राखहु जनि गोई ॥
तुम्ह त्रिभुवन गुर बेद बखाना । आन जीव पाँवर का जाना ॥
प्रस्न उमा कै सहज सुहाई । छल बिहीन सुनि सिव मन भाई ॥
हर हियँ रामचरित सब आए । प्रेम पुलक लोचन जल छाए ॥
श्रीरघुनाथ रूप उर आवा । परमानंद अमित सुख पावा ॥

दो० — मगन ध्यान रस दंड जुग पुनि मन बाहेर कीन्ह ।
रघुपति चरित महेस तब हरषित बरनै लीन्ह ॥ १११ ॥

चौ० — झूठेउ सत्य जाहि बिनु जानें । जिमि भुजंग बिनु रजु पहिचानें ॥
जेहि जानें जग जाइ हेराई । जागें जथा सपन भ्रम जाई ॥

यथासांग वर्णन करून रावणाला कसा मारला ते कथन करा. हे शंकरा! त्यानंतर राज्यारोहण झाल्यावर ज्या सुखदायक विविध लीला केल्या, त्याची माहिती द्या. शेवटी हे कृपाळा त्या रघुवंशमुनीने निजधामाला जाताना सर्व प्रजाजनाला बरोबर नेले. हे आश्चर्य कसे केले ते सांगावे. ११०

" इतके मला समजले म्हणजे मग, ज्याच्या अनुभवात ज्ञानी मुनी सदा मग्न असतात, ते तत्त्व माझ्या गळी उतरविण्याचा प्रयत्न करा. त्याचवेळी वैराग्य ज्ञान, विज्ञान व भक्ती यांच्या [illegible] मला ते सर्व समजावून द्या. या शिवाय हे विमल विवेकी प्रभो! अनेक व अपार अशी जी याशिवाय रामचंद्राची रहस्ये आहेत तीही अगदी सोप्या भाषेत मला पटवून द्या. इतकेच नव्हे पण मी जे विचारण्यास विसरले किंवा मला विचारता आले नाही, तेही हे दयाळो, गुप्त राखून ठेवू नका! त्रिभुवनाचे बोध गुरू अशी आपली वेद कीर्ती गातात. दुसऱ्या पामरांना ही रहस्ये काय उकलणार ?"

अशा प्रकारचे निष्कपटमनाने उमेने स्वभावतःच मनोहर प्रश्न केलेले ऐकून त्रिपुरारींच्या चित्ताला ते फार आवडले. हरहृदयात सर्व रामचरित स्फुरले व अंगावर रोमांच उभे राहून डोळ्यात आनंदाश्रू भरले. श्रीरघुनाथाचे अंतःकरणात रूप प्रकटले व शिवजींना परमानंद होऊन अमित सुख झाले.

त्या विशाल तेजस्वी रघुनाथ रूपारसात दोन घटका बुडून गेलेले मन, शंकरांनी वर ओढून काढून भानावर आणले. आणि अत्यंत हर्षयुक्त होऊन [illegible] महेशांनी प्रारंभ केला. १११.

ते म्हणाले, " रज्जूवर सर्पाचा जसा भास होतो, तसेच ज्याच्या अज्ञानामुळे मिथ्या असणाऱ्या सृष्टीला सत्यत्व येऊ लागते, जागृतीनंतर जसा स्वप्नातील भ्रम नाहीसा व्हावा तसेच ज्याच्या ज्ञानाने दृष्टीपुढचे जगत्

बंदउँ बालरूप सोइ रामू । सब सिधि सुलभ जपत जिसु नामू ।।
मंगल भवन अमंगल हारी । द्रवउ सो दसरथ अजिर बिहारी ।।
करि प्रनाम रामहि त्रिपुरारी । हरषि सुधा सम गिरा उचारी ।।
धन्य धन्य गिरिराजकुमारी । तुम्ह समान नहिं कोउ उपकारी ।।
पूँछेहु रघुपति कथा प्रसंगा । सकल लोक जग पावनि गंगा ।।
तुम्ह रघुबीर चरन अनुरागी । कीन्हिहु प्रस्न जगत हित लागी ।।

दो० – राम कृपा तें पारबति सपनेहुँ तव मन माहिं ।
सोक मोह संदेह भ्रम मम बिचार कछु नाहिं ।। ११२ ।।

चौ० – तदपि असंका कीन्हिहु सोई । कहत सुनत सब कर हित होई ।।
जिन्ह हरिकथा सुनी नहिं काना । श्रवन रंध्र अहिभवन समाना ।।
नयनन्हि संत दरस नहिं देखा । लोचन मोरपंख कर लेखा ।।
ते सिर कटु तुंबरि समतूला । जे न नमत हरि गुर पद मूला ।।
जिन्ह हरिभगति हृदयँ नहिं आनी । जीवत सव समान तेइ प्रानी ।।
जो नहिं करइ राम गुन गाना । जीह सो दादुर जीह समाना ।।
कुलिस कठोर निठुर सोइ छाती । सुनि हरिचरित न जो हरषाती ।।
गिरिजा सुनहु राम कै लीला । सुर हित दनुज बिमोहनसीला ।।

लयाला जाते, ज्याच्या नामाचा जप केल्याने सर्व सिद्धी सुलभ होतात अशा बालरूप रामाला प्रथम मी वंदन करतो. मंगलाचे माहेर, अमंगलाचा परिहार करणारे व श्रीदशरथाच्या प्रांगणात विहार करणारे असे बाल रामचंद्र माझ्यावर कृपा करोत."

याप्रमाणे त्रिपुरारींनी रामाला प्रणाम केला; व हर्षित होऊन अमृत.वाणीने ते बोलू लागले " हे गिरिराज-कुमारी तू खरोखर धन्य धन्य आहेस ! तुझ्यासारखा आमच्यावर आतापर्यंत कोणीच उपकार केला नाही ! रघुपतीच्या कथाप्रसंगाचे वर्णन करावयास तू सांगितलेस. खरोखर रामचरित हीच खरी सकल लोकांना पावन करणारी जगातील गंगा होय । रघुवराच्या चरणी तुमचे खरे प्रेम असून जगाच्या कल्याणाकरिताच तुम्ही हे प्रश्न विचारले आहेत. प्रभुरामकृपेने, पार्वती तुझ्या मनात शोक, मोह, संदेह अथवा भ्रम स्वप्नातही राहिला आहे असे मला मुळीच वाटत नाही ! ११२.

शंकर पार्वतीला सांगतात, " म्हणून तू जी मोठी शंका काढलीस ती सांगण्याने सर्वांचेच हित होणार आहे, ज्यानी हरिकथा कानाने ऐकली नाही त्यांची कानाची भोके म्हणजे सापाची बिळेच ! ज्यां डोळ्याना संतांचे दर्शन घडले नाही त्याना मोरपंखावरील डोळ्यापेक्षा अधिक किंमत नाही. हरिगुरुपदी जे नमले नाही त्या मस्तकाची तुलना कडू भोपळ्याच्या तुंब्याशी करणेच योग्य ! ज्याच्या हृदयात हरिभक्तीचा उदय होत नाही ते प्राणी जिवंत असून प्रेताप्रमाणे समजावेत ! रामगुणाचे गान न करणारी जीभ ही खरोखर बेडकाचीच जीभ नव्हे काय ? हरिचरित श्रवणाने जिला हर्ष होत नाही ती छाती वज्राप्रमाणे कठोर असली पाहिजे. गिरिजे रामाची लीला ऐक. देवाचे कल्याण करण्यासाठी राक्षसांना मोह उत्पन्न करण्याचा तिचा स्वभाव आहे.



दो० – रामकथा सुरधेनु सम सेवत सब सुख दानि ।
सतसमाज सुरलोक सब को न सुनै अस जानि ।। ११३ ।।

चौ०– रामकथा सुंदर कर तारी । संसय बिहग उड़ावनिहारी ।।
रामकथा कलि बिटप कुठारी । सादर सुनु गिरिराजकुमारी ।।
राम नाम गुन चरित सुहाए । जनम करम अगनित श्रुति गाए ।।
जथा अनंत राम भगवाना । तथा कथा कीरति गुन नाना ।।
तदपि जथा श्रुत जसि मति मोरी । कहिहउँ देखि प्रीति अति तोरी ।।
उमा प्रस्न तव सहज सुहाई । सुखद संतसंमत मोहि भाई ।।
एक बात नहिं मोहि सोहानी । जदपि मोह बस कहेहु भवानी ।।
तुम्ह जो कहा राम कोउ आना । जेहि श्रुति गाव धरहिं मुनि ध्याना ।।

दो०– कहहिं सुनहिं अस अधम नर ग्रसे जे मोह पिसाच ।
पाषंडी हरि पद बिमुख जानहिं झूठ न साच ।। ११४ ।।

चौ० – अग्य अकोबिद अंध अभागी । काई बिषय मुकुर मन लागी ।।
लंपट कपटी कुटिल बिसेषी । सपनेहुँ संतसभा नहिं देखी ।।
कहहिं ते बेद असंमत बानी । जिन्ह कें सूझ लाभु नहिं हानी ।।

" रामकथा ही सेवन केल्यानंतर कामधेनूप्रमाणे सर्व प्रकारची सुखे प्राप्त करून देणारी आहे तसेच संतांचा समाज हेच देवतांचे लोक आहेत. एवढे कळल्यावरसुद्धा असा कोण प्राणी असेल की या कथेचे जो श्रवण करणार नाही ? ११३

रामकथेची सुंदर टाळी वाजताच संशय पक्षी दूर उड्डाण करतो. रामकथा ही कलिरूपी विशाल वृक्षाच्या बुंध्यालाच घाव घालणारी कुऱ्हाड आहे ! म्हणून गिरीशकुमारी ! मनः पूर्वक ऐक.

श्रीरामचंद्राचे नाम, गुण, चरित्र जन्म व कर्म या सर्वांचे सुंदर व अमर्याद वर्णन वेदांनी केले आहे. ज्या प्रमाणे भगवान श्रीरामचंद्राचे स्वरूप अनन्त आहे तशाच प्रकारे त्याच्या कथा त्याची कीर्ती व त्याचे गुण हे अनन्त आहेत.

तथापि तुझे उत्कट प्रेम पाहून जसे मी ते रामचरित ऐकले तसे यथामती तुला सांगतो. उमे ! तुझे सर्व प्रश्न जात्याच चांगले व संतसंमत, सुखद असल्याने मला आवडले परंतु तू जरी मोहवश होऊन सांगितलेस की श्रेष्ठ मुनि ज्याचे ध्यान करतात वेद ज्याची कीर्ती गातात तो राम कोणी तरी दुसरा असला पाहिजे ही तुझी कल्पना मात्र आपल्याला मुळीच आवडली नाही !

जो मोहरूपी पिशाच्चाने ग्रस्त आहे, पाखंडी आहे, भगवंताच्या चरणाना विन्मुख झालेला आहे, ज्याला सत्य काय व असत्य काय यातील विवेक मुळीच कळत नाही, असा अधम मनुष्यच अशा प्रकारे बोलतो व बोललेले ऐकतो. ११४

जो अज्ञानी असे तो मूर्ख, धर्म, शास्त्रादिकाचे ज्ञान नसलेले अकोपित आंधळे व भाग्यहीन झालेले आहेत तसेच ज्यांच्या मनरूपी आरशावर विषयाची बुरशी चढलेली आहे जे व्यभिचारी कपटी व अत्यंत कुटिल आहेत आणि ज्याना कधीही स्वप्नातसुद्धा संतसभेचे दर्शन घडलेले नाही ज्याना आपली लाभहानी कशात आहे हे मुळीच कळत नाही; असलीच माणसे वरील प्रकारची वेदविरोधी भाषा करतात व ऐकतात.

मुकुर मलिन अरु नयन बिहीना । राम रूप देखहिं किमि दीना ॥
जिन्ह कें अगुन न सगुन बिबेका । जल्पहिं कल्पित बचन अनेका ॥
हरिमाया बस जगत भ्रमाहीं । तिन्हहि कहत कछु अघटित नाहीं ॥
बातुल भूत बिबस मतवारे । ते नहिं बोलहिं बचन बिचारे ॥
जिन्ह कृत महामोह मद पाना । तिन्ह कर कहा करिअ नहिं काना ॥
सो० – अस निज हृदयँ बिचारि तजु संसय भजु राम पद ।
सुनु गिरिराज कुमारि भ्रम तम रबि कर बचन मम ॥ ११५ ॥
चौ० – सगुनहि अगुनहि नहिं कछु भेदा । गावहिं मुनि पुरान बुध बेदा ॥
अगुन अरूप अलख अज जोई । भगत-प्रेम बस सगुन सो होई ॥
जो गुन रहित सगुन सोइ कैसें । जलु हिम उपल बिलग नहिं जैसें ॥
जासु नाम भ्रम तिमिर पतंगा । तेहि किमि कहिअ बिमोह प्रसंगा ॥
राम सच्चिदानंद दिनेसा । नहिं तहँ मोह निसा लवलेसा ॥
सहज प्रकासरूप भगवाना । नहिं तहँ पुनि बिग्यान बिहाना ॥
हरष बिषाद ग्यान अग्याना । जीव धर्म अहमिति अभिमाना ॥
राम ब्रह्म ब्यापक जग जाना । परमानंद परेस पुराना ।

ज्यांचा हृदयरूपी आरसा मलिन झाला आहे व ज्यांना विवेक नेत्र नसल्याने जे आंधळे आहेत त्या बिचाऱ्यांना रामचंद्राचे सत्यस्वरूप कसे दिसणार? ज्याना सगुण-निर्गुणातील विवेक बिल्कुल नाही जे स्वकपोल कल्पित नाना बाता झोकून देतात, भगवंताच्या मायेला वश होऊन जे जन्म-मरणरूपी संसार-चक्रात भ्रमण पावत असतात त्यांना कोणतीही असंबद्ध गोष्ट बडबडताना काहीच अडचण वाटत नाही.

ज्यांना वात झाला आहे, पिशाच्च लागले आहे किंवा मादक पदार्थ सेवन करून झिंगले आहेत असे लोक अविचाराने ग्रस्त होऊन मन मानेल ते बोलतात ज्यांनी महामोहरूपी मदिरा प्राशन केली आहे त्याचा शब्द आपण ऐकणे योग्य नाही.

हे भवानि! आपल्या अंतःकरणात असा सुविचार करून सर्व संशय सोड आणि श्रीरामचंद्राच्या चरणाचे भजन कर. हे गिरिराजकुमारी भ्रमरूपी अंधःकाराचे सूर्यप्रकाशासारखे निरसन करणारे असे माझे भाषण आता ऐक. ११५

सगुण व निर्गुण यांत खरोखर वस्तुतः काहीच भेद नाही असेच मुनि, पुराणे, वेद व पण्डित या सर्वांचे म्हणणे आहे. जो अलक्ष, अजन्मा, अरूप आणि गुणरहित आहे तोच भक्तांच्या प्रेमाने सगुण होतो. जो निर्गुण आहे तोच सगुण कसा होतो ते आता समजून घे. पाणी व पाण्याची बनलेली गार यात एकच अभेद्य पदार्थ स्वरूप असून दिसण्याला फक्त दोन स्वरूपे दिसतात तसाच प्रकार या दोन भगवत्स्वरूपाचा आहे.

ज्याचे नुसते नामच भ्रमरूपी अंधःकार नाहीसा करण्याच्या बाबतीत सूर्य आहे, त्याच्यासंबंधी मोहाची भाषा तरी बोलणे कसे शक्य आहे? श्रीरामचंद्र हे सच्चिदानंदस्वरूप सूर्यनारायण आहेत. त्यांच्याठिकाणी मोहरूपी रात्रीचा लवलेशही संभवत नाही, ते स्वभावतःच प्रकाशरूप व षड्गुणैश्वर्य भगवान आहेत. त्यांच्या-बद्दल विज्ञानरूपी उषःकालाचा चकार शब्द काढणेही चूक आहे.

हर्ष, शोक, ज्ञान, अज्ञान, व मी मी हा अभिमान—हे सर्व जीवाचे गुणधर्म आहेत. परंतु श्रीरामचंद्र हे व्यापक परब्रह्म, परमानन्दस्वरूप, परात्पर प्रभू आणि पुराणपुरुष आहेत, ही गोष्ट सर्वविश्रुत आहे. जो

दो० – पुरुष प्रसिद्ध प्रकास निधि प्रगट परावर नाथ ।
रघुकुलमनि मम स्वामि सोइ कहि सिवँ नायउ माथ ।। ११६ ।।

चौ० – निज भ्रम नहिं समुझहिं अग्यानी । प्रभु पर मोह धरहिं जड़ प्रानी ।।
जथा गगन घन पटल निहारी । झाँपेउ भानु कहहिं कुबिचारी ।।
चितव जो लोचन अंगुलि लाएँ । प्रगट जुगल ससि तेहि के भाएँ ।।
उमा राम बिषइक अस मोहा । नभ तम धूम धूरि जिमि सोहा ।।
बिषय करन सुर जीव समेता । सकल एक तें एक सचेता ।।
सब कर परम प्रकासक जोई । राम अनादि अवधपति सोई ।।
जगत प्रकास्य प्रकासक रामू । मायाधीस ग्यान गुन धामू ।।
जासु सत्यता तें जड़ माया । भास सत्य इव मोह सहाया ।।

दो० – रजत सीप महुँ भास जिमि जथा भानु कर बारि ।
जदपि मृषा तिहुँ काल सोइ भ्रम न सकइ कोउ टारि ।। ११७ ।।

चौ० – एहि बिधि जग हरि आश्रित रहई । जदपि असत्य देत दुख अहई ।।
जौं सपनें सिर काटै कोई । बिनु जागें न दूरि दुख होई ।।

प्रसिद्ध (पुराण) पुरुष आहे, प्रकाशाचे भाण्डार आहे, सर्व स्वरूपात नटलेला आहे. जीव, माया व जगत या सर्वांचे ते स्वामी आहेत; तेच रघुकुलमणि श्रीरामचंद्र माझे प्रभू आहेत.

हे शब्द मुखावाटे बाहेर पडत असताच शंकराचे मस्तक प्रभुचरणी विनम्र झाले !! ११६

अज्ञानी मनुष्याला आपला भ्रम ध्यानी येत नाही व तो मूर्ख प्रभू रामचंद्रावर त्या भ्रमाचा आरोप करतो. ज्याप्रमाणे अडाणी मनुष्य आकाशात मेघाची घनदाट छाया पसरताच म्हणतो की, ढगांनी सूर्याला झाकून टाकला! जो मनुष्य स्वतःचेच बोट डोळ्यात खुपसून चंद्राकडे पहातो त्याला दोन चंद्र दिसू लागतात.

आकाश जसे अंधःकार धूळ, धुके यांनी शोभा पावते तसेच हे पार्वती श्रीरामचंद्रविषयीचे मोह रामास शोभा आणणारेच असतात.

विषय, इंद्रिये इंद्रियांच्या देवता आणि जीवात्मा या सर्वांना, क्रमशः एकापासून दुसऱ्यास चेतना मिळते. परंतु सर्वांना ज्याच्यापासून मूळ प्रकाशरूपचेतना मिळते, तोच अनादि ब्रह्म, अयोध्यानरेश श्रीरामचंद्र आहे. सर्वजगत प्रकाश्य व रामचंद्र प्रकाशक, तो मायापती असून, ज्ञान गुणधाम आहे! त्याच्याच सत्तेने जड अशी माया मोहाचे साहाय्य मिळताच सत्यत्वाने भासमान होऊ लागते. ज्याप्रमाणे शिंपल्यात चांदी चमकते उखर प्रदेशात सूर्यकिरणांनी मृगजळ वाहू लागते; मूळ कारण सूर्याचे किरण. कोणत्याही काळी ती चादी अगर ते पाणी खरे असणे शक्य नाही. पण असे असूनही हा भ्रम हटवण्यास कोणीही समर्थ होत नाही. ११७

याच रीतीने भगवंताच्या आश्रयाने या सर्व जगताला मिथ्या (नकली) सत्यत्व आलेले आहे. हे जग जरी असत्य आहे तरी ते दुःखदायक मात्र खरे आहे. ज्याप्रमाणे स्वप्नात जर कोणी मस्तक कापले तर जागे होईपर्यंत ते सर्व दुःख खरे खरेच राहणार !



जासु कृपाँ अस भ्रम मिटि जाई । गिरिजा सोइ कृपाल रघुराई ॥
आदि अंत कोउ जासु न पावा । मति अनुमानि निगम अस गावा ॥
बिनु पद चलइ सुनइ बिनु काना । कर बिनु करम करइ बिधि नाना ॥
आनन रहित सकल रस भोगी । बिनु बानी बकता बड़ जोगी ॥
तन बिनु परस नयन बिनु देखा । ग्रहइ घ्रान बिनु बास असेषा ॥
असि सब भाँति अलौकिक करनी । महिमा जासु जाइ नहिं बरनी ॥

दो० –जेहि इमि गावहिं बेद बुध जाहि धरहिं मुनि ध्यान ।
सोइ दसरथ सुत भगत हित कोसलपति भगवान ॥ ११८ ॥

चौ० –कासीं मरत जंतु अवलोकी । जासु नाम बल करउँ बिसोकी ॥
सोइ प्रभु मोर चराचर स्वामी । रघुबर सब उर अंतरजामी ॥
बिबसहुँ जासु नाम नर कहहीं । जनम अनेक रचित अघ दहहीं ॥
सादर सुमिरन जे नर करहीं । भव बारिधि गोपद इव तरहीं ॥
राम सो परमातका भवानी । तहँ भ्रम अति अबिहित तव बानी ॥
अस संसय आनत उर माहीं । ग्यान बिराग सकल गुन जाहीं ॥

हे पार्वती ! ज्याच्या कृपेने असल्या भ्रमाचा संपूर्ण निरास होतो, तोच माझा कृपाळू राजा राम होय ! त्याचे आदि व अंत यांचा पत्ता कोणासच समजला नाही. वेदांनी आपल्या बुद्धीप्रमाणे त्याचे स्वरूप गाइले आहे ते असे—

तो पाय नसून चालतो, कानावाचून ऐकतो, हात नसताना नानाप्रकारचे कर्म करतो, मुखाचा पत्ताच नाही, पण सर्व रसांचा आस्वाद घेतो, वाणीशिवाय अत्यंत कुशल वक्तृत्व करतो, शरीरहीन असून स्पर्श करतो, बिनडोळ्यांनी पहातो, नाकाखेरीज सर्व गंधाचे ग्रहण करतो—अशाप्रकारे ज्याची सर्वच अलौकिक करणी आहे, त्याचा महिमा कोण कसा वर्णन करणार ?

ज्याचे अशा प्रकारे वेद व पण्डित वर्णन करतात, आणि मुनी ज्याचे ध्यान करतात. तेच भगवान भक्तांचे हित करण्यासाठी अयोध्यापती दशरथनंदन श्रीरामचंद्र झाले. ११८

हे पार्वती ! ज्याच्या नामाच्या जोरावर, काशीमध्ये आसन्नमरण झालेला प्राणी पाहून मी त्याला रामचंद्र देऊन शोकमुक्त करतो, तेच माझे व सर्व विश्वाचे स्वामी प्रभू रघुश्रेष्ठ श्रीरामचंद्र असून सर्वांच्या हृदयांत अंतर्यामी आहेत.

आर्त होऊन (अथवा निर्हेतुपूर्वक) ज्याचे नामस्मरण केले असता अनेक जन्मातील पातकांचे पर्वत दग्ध होऊन जातात, मग जे आदरपूर्वक त्यांचे नामाचा जप करतील त्यांना संसारसागर तरून जाण्यास गायीचा खूर चिखलात उमटल्यावर त्यात जे पाणी साचते ते ओलांडून जाण्यास जेवढे आयास पडतील तेवढेच त्यांना पडतील !

हे भवानी ! तोच परमात्मा रामचंद्र आहे. त्याच्या ठिकाणी भ्रमाचा आरोप करणारी तुझी भाषा अत्यंत वेदविरोधी आहे. असले संशय मनात येताच मनुष्याच्या ठिकाणचे ज्ञान-वैराग्यहि सर्व सद्गुण एकदम नाहीसे होतात !



सुनि सिव के भ्रम भंजन बचना। मिटि गै सब कुतरक कै रचना॥
भइ रघुपति पद प्रीति प्रतीती। दारुन असंभावना बीती॥
दो० – पुनि पुनि प्रभु पद कमल गहि जोरि पंकरुह पानि।
बोलीं गिरिजा बचन बर मनहुँ प्रेम रस सानि॥ ११९॥

चौ० – ससि कर सम सुनि गिरा तुम्हारी। मिटा मोह सरदातप भारी॥
तुम्ह कृपाल सबु संसउ हरेऊ। राम स्वरूप जानि मोहि परेऊ॥
नाथ कृपाँ अब गयउ बिषादा। सुखी भयउँ प्रभु चरन प्रसादा॥
अब मोहि आपनि किंकरि जानी। जदपि सहज जड़ नारी अयानी॥
प्रथम जो मैं पूछा सोई कहहू। जौं मो पर प्रसन्न प्रभु अहहू॥
राम ब्रह्म चिनमय अबिनासी। सर्ब रहित सब उर पुर बासी॥
नाथ धरेउ नरतनु केहि हेतू। मोहि समुझाइ कहहु बृषकेतू॥
उमा बचन सुनि परम बिनीता। रामकथा पर प्रीति पुनीता॥
दो० – हियँ हरषे कामारि तब संकर सहज सुजान।
बहु बिधि उमहि प्रसंसि पुनि बोले कृपानिधान॥ १२० (क)॥

नवाह्नपारायण, पहला विश्राम
मास पारायण, चौथा विश्राम

सदाशिवांचे हे भ्रम निर्मूलन करणारे भाषण ऐकून तिचे सर्व कुतर्क पार पळाले. श्रीरघुपतिपदी विश्वास व प्रेम निर्माण झाले आणि जी गोष्ट कधीच संभवत नाही, तिच्या अस्तित्वाची खोटी कल्पना सर्वस्वी उडून गेली!

गिरिजेने कित्येक वेळा सांबसदाशिवांचे चरणकमल आपल्या करकमलांनी धरले व जणू काही प्रेम-रसात घोळून आपले श्रेष्ठ शब्द तिने कमलासारखे आपले हात जोडून बोलण्यास प्रारंभ केला. ११९

"भगवन्! चंद्रकिरणासारखे आपले शीतल शब्द श्रवण करून, शरदऋतूतील उन्हाप्रमाणे मला ताप-विणारा माझा मोह खलास झाला! तुम्ही कृपा केली म्हणूनच माझे सर्व संशय नाहीसे होऊन मला रामाच्या सत्यस्वरूपाचे आकलन करण्याची कुवत आली. नाथ! केवढी आपली ही दया! नाहीतर माझा हा विषाद कसा गेला असता? प्रभुचरण कृपेने मिळालेल्या या उपदेशामृताने मी पूर्ण सुखी झाले."

आता मला आपली खरी प्रेमातील दासी समजून, नारी, स्वभावतःच अडाणी व मंदबुद्धीची जरी असली तरी, प्रभू जर माझ्यावर प्रसन्न असतील तर, प्रथम मी जे आपणास विचारले तेच आता मला सांगावे.

ही गोष्ट खरी आहे की, श्रीरामचंद्र हेच ब्रह्म, चिन्मय, अविनाशी, सर्वांहून निराळे व सर्वांच्या हृदय-पुरीत निवास करणारे आहेत. नाथ! मग पुन्हा त्यानी मनुष्याचे शरीर कोणत्या कारणास्तव धारण केले? धर्माची ध्वजाधारण करणारे प्रभो! मला हे समजावून सांगा."

शंकरांनीं हे पार्वतीचे अत्यंत नम्र वचन ऐकले आणि श्रीरामचंद्राच्या कथाच्या ठिकाणचे तिचे शुद्ध प्रेमही पाहिले, तेव्हा कामारि, सहज ज्ञानयुक्त, कृपानिधान शंकर अंतःकरणात प्रसन्न झाले. त्यांनी उमेची पुष्कळ प्रकारे प्रशंसा केली व ते बोलू लागले. १२० (क)

सो० – सुनु सुभ कथा भवानि रामचरितमानस बिमल ।
कहा भुसुंडि बखानि सुना बिहग नायक गरुड़ ॥ १२० (ख) ॥
सो संबाद उदार जेहि बिधि भा आगें कहब ।
सुनहु राम अवतार चरित परम सुंदर अनघ ॥ १२० (ग) ॥
हरि गुन नाम अपार कथा रूप अगनित अमित ।
मैं निज मति अनुसार कहउँ उमा सादर सुनहु ॥ १२० (घ) ॥

चौ० – सुनु गिरिजा हरिचरित सुहाए । बिपुल बिसद निगमागम गाए ॥
हरि अवतार हेतु जेहि होई । इदमित्थं कहि जाइ न सोई ॥
राम अतर्क्य बुद्धि मन बानी । मत हमार अस सुनहि सयानी ॥
तदपि संत मुनि बेद पुराणा । जस कछु कहहिं स्वमति अनुमाना ॥
तस मैं सुमुखि सुनावउँ तोही । समुझि परइ जस कारन मोही ॥
जब जब होइ धरम कै हानी । बाढ़हिं असुर अधम अभिमानी ॥
करहिं अनीति जाइ नहिं बरनी । सीदहिं बिप्र धेनु सुर धरनी ॥
तब तब प्रभु धरि बिबिध सरीरा । हरहिं कृपानिधि सज्जन पीरा ॥

दो० – असुर मारि थापहिं सुरन्ह राखहिं निज श्रुति सेतु ।
जग बिस्तारहिं बिसद जस राम जन्म कर हेतु ॥ १२१ ॥

शंकर सांगू लागले. हे भवानी! अत्यंत पवित्र अशी रामचरितमानसाची ही मंगलमयी कथा श्रवण कर. ही काकभुशुंडीने पक्ष्यांचा राजा गरुड याला समग्र सांगितली. १२० (ख)

त्यांचा हा श्रेष्ठ संवाद कसा झाला ते तुला नंतर सांगेन. आता अगोदर तुला श्रीरामचंद्राच्या अवताराची परमसुंदर व पापनाशक कथा सांगतो. १२० (ग)

श्रीहरीचे गुण, नामे, कथा व स्वरूपे सर्वच अपार, अगणित व अमर्याद आहेत. असे असताही हे उमे ! मी यथामती सांगतो ते तू सादर ऐक. १२० (घ)

गिरिजे ! हरीची चरित्रे पुष्कळ, उज्ज्वल व सुंदर आहेत त्यांचे गायन वेद व पुराणे करतात.

अवतार–हेतू

हरी-अवतार कोणत्या हेतूने झाला ते अगदी काटे कोर पणाने, एवढेच कारण म्हणून सांगणे शक्य नाही. रामाचे स्वरूप बुद्धि, मन, वाणीला तर्काने जाणाण्यासारखे नाही, हे माझे मन तू सुज्ञ असल्याने तुला पटेल. तथापि, संत, मुनी, वेद व पुराणे आपापल्या बुद्धीच्या बलाने काहीतरी सांगतात त्याचप्रमाणे मला जसे कारण समजते तसे तुला, हे सुमुखी ! सांगतो.

जेव्हा जेव्हा धर्माला अवकळा येते, देहाभिमानी दैत्य जेव्हा मदोन्मत्त होतात व अत्याचार, अनाचार व्यभिचार कल्पनातीत करू लागताते, तेव्हा देव, विप्र, गायी व पृथ्वी यांना अत्यंत असह्य यातना होऊ लागतात, अशा प्रत्येक प्रसंगी कृपाळू प्रभू, नाना प्रकारचे देह धारण करून सज्जनांच्या पीडेचा परिहार करतात. असुरांचा वध करून देवांना सुखी करतात, आपल्या विश्वासरूप वेदांची मर्यादा राखतात आणि जगतात आपले निर्मल यश पसरवितात. श्रीरामचंद्राच्या अवताराला हे एक कारण आहे. १२१



चौ० – सोइ जस गाइ भगत भव तरहीं । कृपासिंधु जन हितु तनु धरहीं ॥
राम जनम के हेतु अनेका । परम बिचित्र एक तें एका ॥
जनम एक दुइ कहउँ बखानी । सावधान सुनु सुमति भवानी ॥
द्वारपाल हरि के प्रिय दोऊ । जय अरु बिजय जान सब कोऊ ॥
बिप्र श्राप तें दूनउ भाई । तामस असुर देह तिन्ह पाई ॥
कनककसिपु अरु हाटकलोचन । जगत बिदित सुरपति मद मोचन ॥
बिजई समर बीर बिख्याता । धरि बराह बपु एक निपाता ॥
होईं नरहरि दूसर पुनि मारा । जन प्रहलाद सुजस बिस्तारा ॥

दो० – भए निसाचर जाइ तेइ महाबीर बलवान ।
कुंभकरन रावन सुभट सुर बिजई जग जान ॥ १२२ ॥

चौ० – मुकुत न भए हते भगवाना । तीनि जनम द्विज बचन प्रवाना ॥
एक बार तिन्ह के हित लागी । धरेउं सरीर भगत अनुरागी ॥
कश्यप अदिति तहाँ पितु माता । दशरथ कौसल्या बिख्याता ॥
एक कलप एहि बिधि अवतारा । चरित पवित्र किए संसारा ॥
एक कलप सुर देखि दुखारे । समर जलंधर सन सब हारे ॥
संभु कीन्ह संग्राम अपारा । दनुज महाबल मरइ न मारा ॥
परम सती असुराधिप नारी । तेहिं बल ताहि न जितहिं पुरारी ॥

भगवंताच्या त्या यशाचे गायन करून भक्तजन भवसागरातून तरून जातात. म्हणून कृपासागर भगवान भक्तांच्या हितासाठीच देह धारण करतात. असे माझे मत आहे. रामजन्माला अनेक कारणे असून ती एकाहून एक अती विलक्षण अशी आहेत. एक दोन जन्मांचे मी वर्णन करतो. हे भवानी ! तू सुमती आहेस म्हणून सावधपणाने ऐक.

सर्वांनाच ठाऊक आहे की हरीचे प्रिय असे जय आणि विजय दोन द्वारपाळ आहेत. ब्राह्मणाच्या शापामुळे दोन्ही भावांना असुरांचा तामस देह धरावा लागला. हिरण्यकशिपू आणि हिरण्याक्ष असे दोघे दैत्य होऊन त्यांनी इंद्राला हैराण केले, हे सर्वांना ठाऊकच आहे. रणांगणात हार न खाणारे अतुल्यवीर. दोघां-पैकी एकाला वराहशरीर घेऊन भगवंतांनी ठार केले. नारसिंह अवतार घेऊन दुसऱ्याचा वध केला आणि प्रल्हादाची कीर्ती जगात वाढविली.

हीच जोडी पुनः जन्माला येऊन रावण-कुंभकर्ण या स्वरूपात अवतरली. हेही अत्यंत बलवान वीर होते व त्यांनी देवांचा पूर्ण पराभव केला होता, ही कथा सर्वांच्या [illegible] आहे. १२२

ब्राह्मणशापामुळे भगवंताकडून वध होऊनही मुक्त न होता त्यांना तीन जन्म घ्यावे लागले. एकदा त्यांच्यासाठी भक्तावर प्रेम करणाऱ्या भगवंतानी (श्रीविष्णूंनी) शरीर धारण केले. तेव्हा कश्यप व अदिती हे आईबाप होते, तेच पुनः विख्यात दशरथ कौसल्या झाले. एका कल्पात असा अवतार धारण करून जीवांना पावन करणारे चरित्र त्यांनी केले.

एका कल्पात, जलंधराने रणक्षेत्रावर सर्वस्वाचे हरण केल्यामुळे देव दुःखी झाले. त्याचे बरोबर शत्रूंनी अपार युद्ध केले. दैत्य महाबलाढ्य; मारूनही त्याचा प्राण जाईना. याचे कारण त्याची पत्नी परमश्रेष्ठ पतिव्रता होती. तिच्या तपोबलामुळे जलंधर त्रिपुरारीनाहि (आवरत नव्हता !) भारी झाला !

दो० – छल करि टारेउ तासु ब्रत प्रभु सुर कारज कीन्ह ।
जब तेहिं जानेउ मरम तब श्राप कोप करि दीन्ह ।। १२३ ।।

चौ० – तासु श्राप हरि दीन्ह प्रमाना । कौतुकनिधि कृपाल भगवाना ।।
तहाँ जलंधर रावन भयऊ । रन हति राम परम पद दयऊ ।।
एक जनम कर कारन एहा । जेहि लगि राम धरी नरदेहा ।।
प्रति अवतार कथा प्रभु केरी । सुनु मुनि बरनी कबिन्ह घनेरी ।।
नारद श्राप दीन्ह एक बारा । कलप एक तेहि लगि अवतारा ।।
गिरिजा चकित भईं सुनि बानी । नारद बिष्नुभगत पुनि ग्यानी ।।
कारन कवन श्राप मुनि दीन्हा । का अपराध रमापति कीन्हा ।।
यह प्रसंग मोहि कहहु पुरारी । मुनि मन मोह आचरज भारी ।।

दो० – बोले बिहसि महेस तब ग्यानी मूढ़ न कोइ ।
जेहि जस रघुपति करहिं जब सो तस तेहि छन होइ ।। १२४ (क)।।

सो० – कहउँ राम गुन गाथ भरद्वाज सादर सुनहु ।
भव भंजन रघुनाथ भजु तुलसी तजि मान मद ।। १२४ (ख) ।।

चौ० – हिमगिरि गुहा एक अति पावनि । बह समीप सुरसरी सुहावनि ।।

भगवंतांनी कपटाने त्याच्या स्त्रीच्या पातिव्रत्याचा भंग करून देवताचे कार्य केले. तिला ज्यावेळी या भेदाची जाणीव झाली, तेव्हा तिने संतप्त होऊन प्रभूला (शेषशायी नागश्नाला) शाप दिला ! १२३

लीलांचे भाण्डार व षड्गुणैश्वर्य भगवान अशा कृपाळू हरीने त्या स्त्रीच्या शापाला प्रमाण मानले. त्याचे कल्पांत जलंधराने रावणशरीर धारण केले आणि त्याला रणांगणात रामाने परमपद दिले. ज्याकारणाकरता भगवंतानी मानवशरीर धारण केले तीही एक कारणपरंपरा झाली.

प्रभुच्या प्रत्येक अवतारकथा नानाप्रकारांनी कवींनी वर्णन केल्या आहेत. एका कल्पात भगवंतानी नारदाच्या शापासाठी अवतार घेतला.

ज्ञानी विष्णुभक्त नारदांना शाप दिल्याचे ऐकून गिरिजा आश्चर्यचकित झाली.

तिने विचारले, " हे पुरारी ! कशाकरता मुनिश्रेष्ठांना शाप दिला ? रमापतीने असा भयंकर अपराध तरी काय केला ? मुनिश्रेष्ठांच्या मनात मोह कसा उत्पन्न झाला. मोठीच आश्चर्याची गोष्ट ! नाथ, मला हा सर्व वृत्तांत सांगावा. !

महेश हसले व म्हणाले, " कोणी शहाणा नाही व कोणी वेडा नाही ! ज्यावेळी ज्याला जसा करण्याची रघुपतीची इच्छा असेल त्यावेळी तो प्राणी तसा होतो ! " १२४(क)

याज्ञवल्क्य म्हणतात, हे भारद्वाज, मी श्रीरामचंद्राच्या गुणांची कथा सांगतो, तुम्ही आदरपूर्वक ऐका ! तुलसीदास अभिमान व मद सोडून भवभंजन रघुनाथाची भक्ति करा. कारण ते जन्ममरणाची भीती नष्ट करणारे आहेत. १२४ (ख)

नारद–मोहकथा

हिमालय पर्वतावर एक अत्यंत पवित्र अशी गुहा आहे. तिच्या शेजारीच भागीरथीचा मंगल प्रवाह



आश्रम परम पुनीत सुहावा । देखि देवरिषि मन अति भावा ॥
निरखि सैल सरि बिपिन बिभागा । भयउ रमापति पद अनुरागा ॥
सुमिरत हरिहि श्राप गति बाधी । सहज बिमल मन लागि समाधि ॥
मुनि गति देखि सुरेस डेराना । कामहि बोलि बोलि कीन्ह सनमाना ॥
सहित सहाय जाहु मम हेतू । चलेउ हरषि हियँ जलचरकेतू ॥
सुनासीर मन महुँ असि त्रासा । चहत देवरिषि मम पुर बासा ॥
जे कामी लोलुप जग माहीं । कुटिल काक इव सबहि डेराहीं ॥

दो० — सूख हाड़ लै भाग सठ स्वान निरखि मृगराज ।
छीनि लेइ जनि जान जड़ तिमि सुरपतिहि न लाज ॥ १२५ ॥

चौ० — तेहि आश्रमहिं मदन जब गयऊ । निज मायाँ बसंत निरमयऊ ॥
कुसुमित बिबिध बिटप बहुरंगा । कूजहिं कोकिल गुंजहिं भृंगा ॥
चली सुहावनि त्रिबिध बयारी । काम कृसानु बढ़ावनिहारी ॥
रंभादिक सुरनारि नबीना । सकल असमसर कला प्रबीना ॥
करहिं गान बहु तान तरंगा । बहुबिधि क्रीड़हिं पानि पतंगा ॥
देखि सहाय मदन हरषाना । कीन्हेसि पुनि प्रपंच बिधि नाना ॥

वाहतो. तो परमपवित्र व सुंदर आश्रम पाहून देवर्षि नारदांचे मन तेथे रमले. उत्तुंग पर्वतराजी, प्रशांत वन-विभाग आणि पवित्र गंगाप्रवाह पाहून, रमापतिपदकमली त्यांचे मन लीन झाले.

दक्ष प्रजापतीने अखंड भ्रमणाचा शाप दिला होता. हरिस्मरणाने तो बाधित होणार, या श्रद्धेमुळे स्वभावतःच पवित्र असणारे नारदांचे मन समाधिसुखात मग्न झाले.

देवर्षींची ही तपस्या पाहून देवेंद्राचे धाबे दणाणले ! त्याने लगेच कामदेवाला बोलावून त्याचा सन्मान केला व विनंती केली " माझ्या कामासाठी आपल्या हस्तकासह जावे " अशी इंद्राची आज्ञा होताच ज्याच्या ध्वजावर माशाचे चिन्ह आहे असा तो कामदेव मोठ्या हर्षाने निघाला. सुनासीराला एकच भीती ! देवर्षींना इंद्रपद व अमरावती पाहिजे म्हणूनच त्यांनी ही तपस्या आरंभिली !!

" जे कामी व लोभी या जगात असतात, त्यांना कपटी कावळ्याप्रमाणे सर्वांचीच भीती वाटत असते ! " याज्ञवल्क्य म्हणाले.

वाळलेले हाड तोंडात धरून मूर्ख कुत्रे सिंहाला पाहून पळत सुटते. त्या वेडप्याला वाटते, सिंह ते हाड हिरावून घेईल ! त्या कुत्र्याप्रमाणेच सुरपतीची निर्लज्जपणाची वागणूक आहे. १२५

नारद ऋषींच्या आश्रमाजवळ जाताच आपल्या मायेने वसंतऋतू निर्माण केला ! विविध वृक्ष बहुरंगी फळाफुलांनी लगडले. कोकिळांचे 'कुहूकुहू' सुरू झाले. भ्रमरांचा गुंजारव कानी येऊ लागला ! कामाग्नीस फुलविणारा मंद-सुगंध शीतल वारा वाहू लागला. कामदेवाच्या नव यौवनभराने भारावलेल्या रंभादिक अप्सरा, कामकलेत सर्वच पटाईत असलेल्या ! त्यांच्या कलकण्ठातून विविध प्रकारच्या गायनाचे आरोहावरोहयुक्त आलाप निघू लागले. हातात चेंडू घेऊन त्यांनी निरनिराळ्या प्रकारचे खेळ व क्रीडा सुरू केली.

कामदेवाने आपल्या या सहाय्यकांना पाहिले; व त्याला मोठा संतोष वाटला. म्हणून अधिक उत्साहाने त्याने आपले नाना प्रकारचे मायेचे जाळे पसरले.

चौ०— काम कला कछु मुनिहि न ब्यापी । निज भयँ डरेउ मनोभव पापी ॥
सीम कि चाँपि सकइ कोउ तासू । बड़ रखवार रमापति जासू ॥

दो० —सहित सहाय सभीत अति मानि हारि मन मैन ।
गहेसि जाइ मुनि चरन तब कहि सुठि आरत बैन ॥ १२६ ॥

चौ०—भयउ न नारद मन कछु रोषा । कहि प्रिय बचन काम परितोषा ॥
नाइ चरन सिरु आयसु पाई । गयउ मदन तब सहित सहाई ॥
मुनि सुसीलता आपनि करनी । सुरपति सभाँ जाइ सब बरनी ॥
सुनि सब कें मन अचरजु आवा । मुनिहि प्रसंसि हरिहि सिरु नावा ॥
तब नारद गवने सिव पाहीं । जिता काम अहमिति मन माहीं ॥
मार चरित संकरहि सुनाए । अतिप्रिय जानि महेस सिखाए ॥
बार बार बिनवउँ मुनि तोही । जिमि यह कथा सुनायहु मोही ॥
तिमि जनि हरिहि सुनावहु कबहुँ । चलेहुँ प्रसंग दुराएहु तबहूँ ॥

दो०— संभु दीन्ह उपदेस हित नहिं नारदहि सोहान ।
भरद्वाज कौतुक सुनहु हरि इच्छा बलवान ॥ १२७ ॥

परंतु कामदेवाच्या कोणत्याही कलेचा लवमात्रही परिणाम देवर्षींच्या मनावर झाला नाही !

शेवटी मनोभवाला आपल्या या पराभवाचा अनिष्ट परिणाम होणार म्हणून स्वकल्पितच भीती वाटू लागली ! त्याला असे खास वाटले की, ज्याचा महानुरक्षक रामपती आहे, त्याची अमर्यादा करण्याची कोणाची छाती आहे ?

तेव्हा मदनाने मनाने हाय खाल्ली ! तो अत्यंत घाबरला. आपल्या सहाय्यकासह (भयंकर उग्रशाप चुकवण्यासाठी) जाऊन त्याने नारदांचे पाय घट्ट धरले व कमालीच्या दीनवाणीने त्याने क्षमेची याचना केली ! १२६

नारदांना मुळीच राग आला नव्हता. त्यांनी मधुर भाषणाने [illegible] संतुष्ट केले. त्याने पुनः नारदचरणी मस्तक नमवून आज्ञा घेतली; आणि आपल्या हस्तकासह तो परतला. आपली कलाप्रवीण-करणी व मुनींची सुशीलता यांचे त्याने सुरपती सभेत जाऊन रसभरित वर्णन केले. सर्वांनाच मोठे आश्चर्य वाटले ! भगवंताला वंदन करून त्यांनी ब्रह्मर्षींची प्रशंसा केली !

लवकरच नारद कैलास पर्वतावर शंकरांच्या जवळ येऊन दाखल झाले. त्यांच्या मनात, मी माराला [मदनाला] जिंकला, हा मोठा गर्व झाला !

मदनाचा सर्व कार्यक्रम त्यांनी शंकरांना निवेदन केला. ब्रह्मर्षीवरील उत्कट प्रेमामुळे महेशांनी त्यांना शिकवले. " हे मुनिश्रेष्ठा, तुम्हाला पुनःपुन्हा विनंती करून सांगतो की, मला हा सर्व मदनवृत्तान्त जशा रीतीने सांगितला तसा हरीजवळ कधीही बोलू नका बरं ! इतकेच नव्हे, पण बोलण्याच्या ओघात निघाला तरीही लपवून ठेवा हो ! "

याप्रमाणे शंभूनी कल्याणकारक असा उपदेश जरी कळकळून केला तरी नारदांना काही तो पसंत पडला नाही. भारद्वाजा, ऐका हे कौतुक ! केव्हाही हरीची इच्छाच श्रेष्ठ ठरणार ! रामाच्या मनात जे करायचे असेल तसे घडणार. त्याच्या उलट करण्याचे सामर्थ्य कोणासच नाही. १२७



चौ०– राम कीन्ह चाहहिं सोइ होई । करै अन्यथा अस नहिं कोई ॥
संभु बचन मुनि मन नहिं भाए । तब बिरंचि के लोक सिधाए ॥
एक बार करतल बर बीना । गावत हरि गुन गान प्रबीना ॥
छीरसिंधु गवने मुनिनाथा । जहँ बस श्रीनिवास श्रुतिमाथा ॥
हरषि मिले उठि रमानिकेता । बैठे आसन रिषिहि समेता ॥
बोले बिहसि चराचर राया । बहुते दिनन कीन्हि मुनि दाया ॥
काम चरित नारद सब भाषे । जद्यपि प्रथम बरजि सिवँ राखे ॥
अति प्रचंड रघुपति कै माया । जेहि न मोह अस को जग जाया ॥

दो०– रूख बदन करि बचन मृदु बोले श्रीभगवान ।
तुम्हरे सुमिरन तें मिटहिं मोह मार मद मान ॥ १२८ ॥

चौ० –सुनु मुनि मोह होइ मन ताकें । ग्यान बिराग हृदय नहिं जाकें ॥
ब्रह्मचरज ब्रत रत मतिधीरा । तुम्हहि कि करइ मनोभव पीरा ॥
नारद कहेउ सहित अभिमाना । कृपा तुम्हारि सकल भगवाना ॥
करुनानिधि मन दीख बिचारी । उर अंकुरेउ गरब तरु भारी ॥
बेगि सो मैं डारिहउँ उखारी । पन हमार सेवक हितकारी ॥

शंभुवचन, मुनीस न मानवल्याने ते लोच सत्यलोकाला गेले. एके दिवशी आपल्या हातात आपली श्रेष्ठ वीणा घेऊन गाण्यात प्रवीण असलेले नारद हरिगुण गात गात, जेथे मूर्तिमान् वेदान्त तत्त्व, लक्ष्मीनिवास, भगवान नारायण राहात होते, तेथे क्षीराब्धीस येऊन पोचले.

रमापतींनी चटकन् उठून आनंदाने नारदांना आलिंगन दिले व त्यांसह ते आपल्या आसनावर बसले. चराचरेश्वर भगवंतांनी हसून बोलण्यास सुरुवात केली, "काय ब्रह्मर्षे ! आज पुष्कळ दिवसांनी आमच्यावर तुम्ही दया केली बुवा !"

बोलण्याची संधि मिळताच, शंकरांनी सांगू नका म्हणून सांगितलेले सर्व कामचरित वृत्तान्त, भगवंतांना नारदांनी शिस्तीत सांगितला ! याज्ञवल्क्य म्हणतात, "खरोखर रघुपतीची माया अत्यंत प्रचंड आहे. जगात जन्मला आणि या मायेच्या मोहात सापडला नाही, असा कोणीतरी आहे काय ?"

तोंड कडवट पण शब्द गोड, अशा पद्धतीने भगवान म्हणाले, "नारदा, अहो तुमचा अधिकार केवढा ! केवळ तुमच्या स्मरणाने दुसऱ्याचे मोह, काम, मद व व अभिमान पळून जातात. (मग तुमच्या स्वतःच्या बाबतीत बोलण्याचा प्रश्नच काय ?) १२८

"मुनिश्रेष्ठा, ज्यांच्या हृदयात ना ज्ञान, ना वैराग्य; त्यांच्या मनात मोह उत्पन्न होतो. तुमच्यासारखे ब्रह्मचर्यरत, धीर बुद्धीचे त्यांना कधीतरी मनात उत्पन्न होणारा काम छळू शकेल काय ?"

पोटात अभिमानाचे गाठोडे घट्ट बांधून नारद बोलले, "भगवता ही सर्व आपली कृपा !"

करुणासागर भगवंतांनी मनात विचार करून पाहिले तेव्हा नारदांच्या अंतःकरणात महान गर्ववृक्ष उफाळला आहे अशी त्यांची खात्री झाली. त्यांनी मनात बेत केला; याचे निर्मूलन झटकन केलेच पाहिजे.

चौ० – मुनि कर हित मम कौतुक होई । अवसि उपाय करबि मैं सोई ।।
तब नारद हरि पद सिर नाई । चले हृदयँ अहमिति अधिकाई ।।
श्रीपति निज माया तब प्रेरी । सुनहु कठिन करनी तेहि केरी ।।

दो० – बिरचेउ मग महुँ नगर तेहिं सत जोजन बिस्तार ।
श्रीनिवासपुर तें अधिक रचना बिबिध प्रकार ।। १२९ ।।

चौ० – बसहिं नगर सुंदर नर नारी । जनु बहु मनसिज रति तनुधारी ।।
तेहिं पुर बसइ सीलनिधि राजा । अगनित हय गय सेन समाजा ।।
सत सुरेस सम बिभव बिलासा । रूप तेज बल नीति निवासा ।।
बिस्वमोहनी तासु कुमारी । श्री बिमोह जिसु रूपु निहारी ।।
सोइ हरिमाया सब गुन खानी । सोभा तासु कि जाइ बखानी ।।
करइ स्वयंबर सो नृपबाला । आए तहँ अगनित महिपाला ।।
मुनि कौतुकी नगर तेहिं गयऊ । पुरबासिन्ह सब पूछत भयऊ ।।
सुनि सब चरित भूपगृहँ आए । करि पूजा नृप मुनि बैठाए ।।

दो० – आनि देखाई नारदहि भूपति राजकुमारि ।
कहहु नाथ गुन दोष सब एहि के हृदयँ बिचारि ।। १३० ।।

आपल्या सेवकाचे खरे कल्याण साधावयाचे हे तर माझे ब्रीद आहे. मुनीचे हित होईल व मलाही थोडी करमणूक होईल; अशा उपायाची ताबडतोब योजना करावयाची !

हरिचरणी शिर नमवून मुनी निघाले. त्यांचे अंतःकरण अहंकाराने तुडुंब भरले होते !

भगवंतांनी आपल्या मायेला प्रेरणा दिली. तिची किती कठोर करणी आहे ती ऐका .

त्या मायेने नारदांच्या वाटेवर लगेच एक चारशे कोस विस्तृत असे नगर निर्माण केले. त्यातील रचना प्रत्यक्ष वैकुंठाहून अनेक प्रकारे विलक्षण ! १२९

त्या नगरात अत्यंत सुंदर स्त्री-पुरुष रहात होते. मदन-रतींची जणू काही तितकी रूपेच ! त्या नगरीत शीलनिधी नावाचा राजा राज्य करीत होता. हत्ती, घोडे इत्यादि सुसज्ज सैन्य अफाट पसरले होते. शेकडो सुरपतींच्या वैभवाला मागे सारणारे या नरपतीचे वैभव आणि विलास ! त्याचप्रमाणे लावण्य, तेज, सामर्थ्य आणि नीतिमत्ता यांचे ते एक निवासस्थानच होते !

अशा शीलनिधी राजाला विश्वमोहिनी नावाची एक लावण्यवती कन्या होती. तिच्या स्वरूपाकडे पाहताच प्रत्यक्ष लक्ष्मीला मोह उत्पन्न व्हावा एवढे तिचे सौंदर्य ! अहो हरीची ती सर्वगुणांची खाण अशी मूर्तिमंत मायाच ! तिच्या शोभेचे कोण कसे वर्णन करू शकणार ?

त्या विश्वमोहिनीचे स्वयंवर ठरले असल्याने त्यावेळी तेथे अनेक देश-देशीचे राजे येऊन त्यांचे तळ पडले होते. त्या नगरीत नारदांनी कौतुक म्हणून प्रवेश केला व पुरजनांच्याकडून चौकशीच्या रूपाने सर्व माहिती जमवली ! विश्वमोहिनीसंबंधी सर्व समजल्यावर स्वारी राजाच्या मंदिरात आली. राजाने आदरयुक्त पूजन केले. त्यांना योग्य आसनावर बसवले. लगेच विश्वमोहिनीला बोलावणे पाठवून आणवली व नारदांना ती दाखवून राजा म्हणतो, " नाथ ! या मुलीचे सर्व गुणदोष विचारपूर्वक आपण सांगावेत, अशी आपल्या चरणी माझी प्रार्थना आहे. " १३०

चौ० – देखि रूप मुनि बिरति बिसारी । बड़ी बार लगि रहे निहारी ॥
लच्छन तासु बिलोकि भुलाने । हृदयँ हरष नहिं प्रगट बखाने ॥
जो एहि बरइ अमर सोइ होई । समरभूमि तेहि जीत न कोई ॥
सेवहिं सकल चराचर ताही । बरइ सीलनिधि कन्या जाही ॥
लच्छन सब बिचारि उर राखे । कछुक बनाइ भूप सन भाषे ॥
सुता सुलच्छन कहि नृप पाहीं । नारद चले सोच मन माहीं ॥
करौं जाइ सोइ जतन बिचारी । जेहि प्रकार मोहि बरै कुमारी ॥
जप तप कछु न होई तेहि काला । हे बिधि मिलइ कवन बिधि बाला ॥

दो० – एहि अवसर चाहिअ परम सोभा रूप बिसाल ।
जो बिलोकि रीझै कुअँरि तब मेलै जयमाल ॥ १३१ ॥

चौ० – हरि सन मागौं सुंदरताई । होइहि जात गहरु अति भाई ॥
मोरें हित हरि सम नहिं कोऊ । एहि अवसर सहाय सोइ होऊ ॥
बहु बिधि बिनय कीन्हि तेहि काला । प्रगटेउ प्रभु कौतुकी कृपाला ॥
प्रभु बिलोकि मुनि नयन जुड़ाने । होइहि काजु हिएँ हरषाने ॥
अति आरति कहि कथा सुनाई । करहु कृपा करि होहु सहाई ॥
आपन रूप देहु प्रभु मोही । आन भाँति नहिं पावौं ओही ॥

विश्वमोहिनीचे रूप बघून मुनींना वैराग्याचा विसर पडला. किती वेळ तरी ते नुसते बघतच बसले. तिची लक्षणे निरीक्षण करून त्यांना भूल पडली. हृदयात हर्ष उसळू लागला, पण ती लक्षणे त्यांनी बोलून दाखवली नाहीत. ते म्हणाले, "हिला जो वरील तो अमर होईल. त्याचा रणांगणावर कधीच पराभव होणार नाही; ही ज्याला वरील त्याच्या सेवेला सर्व स्थावर जंगमसृष्टी सादर होईल ! हे शीलनिधी ! ज्याच्या गळ्यात, ही तुझी कन्या माळ घालील त्याचा असा भाग्योदय होईल !"

सर्व लक्षणे मुनींनी पाहून आपल्या मनातच गुप्त ठेवली. आणि बनावट काही तरी राजाला थाप मारली ! 'राजा, तुझी कन्या फारच सुलक्षणी आहे,' असे सांगून ब्रह्मर्षी तत्काल सचिंत होऊन तेथून निघाले. 'आता विचारपूर्वक एकच यत्न केला पाहिजे. आणि तो असा की, या कुमारीने आपणासच वरले पाहिजे ! नारदांच्या मेंदूला जोराने चालना मिळाली. 'आता जप-तप करण्याला वेळ आहेच कुठे? दैवा, ह्या बालिकेची कशी बरे मला प्राप्ती होईल? यावेळी एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे कमालीचे आकर्षक सौंदर्य ! ते पाहून त्या कुमारीचे मन रमले की, ती जयमाला आपल्या गळ्यात घालणारच ! १३१

'अशा सौंदर्याची मागणी हरीपाशीच जाऊन करावी, पण तिथे पोचावयास तर उशीर होणार ! काय करावे बुवा! मोठीच पंचायत होऊन बसली आहे ! खरोखर हरीसारखा माझे हित करणारा दुसरा कोण आहे? या वेळेला त्यानेच साह्य केले पाहिजे. लगेच नारदांनी परोपरींनी भगवंताला आळवले. मग काय उशीर ! भगवंत कृपाळू आणि त्यांनाच तर कौतुक करावयाचे होते. त्यामुळे नारदापुढे एकदम भगवान् प्रकट झाले !

प्रभूला बघून नारदांचे डोळे निवले. आपले काम आता हटकून होणार, अशी त्यांनी शकुनगाठ बांधली ! आनंद हृदयात मावेना. अत्यंत दीनवाणीने व कळवळून त्यांनी विश्वमोहिनीचे सर्व वृत्त थोडक्यात सांगून, शेवटी कृपा करा व जरुर ते सहाय्य करा, अशी विनंती केली. भगवंता ! आपले हेच रूप मला द्या.

चौ० – जेहि बिधि नाथ होइ हित मोरा । करहु सो बेगि दास मैं तोरा ।।
निज माया बल देखि बिसाला । हियँ हँसि बोले दीनदयाला ।।
दो० – जेहि बिधि होइहि परम हित नारद सुनहु तुम्हार ।
सोइ हम करब न आन कछु बचन न मृषा हमार ।। १३२ ।।

चौ० – कुपथ माग रुज ब्याकुल रोगी । बैद न देइ सुनहु मुनि जोगी ।।
एहि बिधि हित तुम्हार मैं ठयऊ । कहि अस अंतरहित प्रभु भयऊ ।।
माया बिबस भए मुनि मूढ़ा । समुझी नहिं हरि गिरा निगूढ़ा ।।
गवने तुरत तहाँ रिषिराई । जहाँ स्वयंबर भूमि बनाई ।।
निज निज आसन बैठे राजा । बहु बनाव करि सहित समाजा ।।
मुनि मन हरष रूप अति मोरें । मोहि तजि आनहि बरिहि न भोरें ।।
मुनि हित कारन कृपानिधाना । दीन्ह कुरूप न जाइ बखाना ।।
सो चरित्र लखि काहुँ न पावा । नारद जानि सबहिं सिर नावा ।।
दो० – रहे तहाँ दुइ रुद्र गन ते जानहिं सब भेउ ।
बिप्रबेष देखत फिरहिं परम कौतुकी तेउ ।। १३३ ।।

त्याशिवाय तिची प्राप्ती होणे शक्यच नाही ! नाथ ! मी आपल्या चरणांचा दास आहे. ज्याच्या योगाने माझे हित होईल ते झटकन् करावे ! !

आपल्या मायेचे अफाट सामर्थ्य पाहून दीनदयाळ मनात हसले व मुनीला म्हणतात, " नारदा ! तुमचे ज्याच्या योगाने परमहित होईल तेच आम्ही करू, अन्य काही करणार नाही, आमचे वचन खोटे होणार नाही, हे पूर्ण ध्यानी ठेवा. १३२

' अहो मुनी ! अहो योगी ! हे पाहा की, रागाने व्याकुळ झालेला रोगी कुपथ्य मागतो, पण वैद्य ते मुळीच देत नाही, त्याचप्रमाणे मीही तुमचे हित साधणार आहे.

एवढे भाषण संपताच प्रभू अंतर्धान पावले !

मायेला वश झाल्यामुळे नारदांची बुद्धी चळली आणि भगवंतानी अगदी उघड बोललेली भाषा त्यांच्या ध्यानात आली नाही !

स्वयंवर मंडपाकडे मात्र अत्यंत त्वरेने स्वारी धावत सुटली. नरराज जेथे आपापल्या आसनावर आपल्या समाजासह नटून थटून बसले होते, त्या राजसमाजात हे ऋषिराज येऊन दाखल झाले. त्यांच्या अंतःकरणात आनंदाच्या उकळ्यावर उकळ्या येत होत्या की, आता आपले अनुपमरूप असल्याने राजकन्या आपल्याच गळ्यात माळ घालणार, चुकूनसुद्धा ती दुसऱ्या राजाकडे ढुंकून पाहणार नाही.

पण कृपासागर भगवंतांनी मुनीचे परमहित साधण्याकरिता ज्यांचे वर्णन अशक्य इतके कुरूप त्यांना करून ठेवले. मौज मात्र अशी की, भगवंताच्या या लीलेचा पत्ता इतरेजनांना मुळीच लागला नाही. सर्व मंडळी नारद समजून त्यांना वंदन करीत होती. त्या ठिकाणी दोन मोठे कौतुकी रुद्रगण होते. ते हा सर्व भेद जाणून ब्राह्मणवेषात ह्या स्वयंवराचे कौतुक बघत फिरत होते. १३३.



चौ० — जेहिं समाज बैठे मुनि जाई। हृदयँ रूप अहमिति अधिकाई ॥
तहँ बैठे महेश गन दोऊ। बिप्रबेष गति लखइ न कोऊ ॥
करहिं कूटि नारदहि सुनाई। नीकि दीन्हि हरि सुंदरताई ॥
रीझिहि राजकुअँरि छबि देखी। इन्हहि बरिहि हरि जानि बिसेषी ॥
मुनिहि मोह मन हाथ पराएँ। हँसहिं संभु गन अति सचु पाएँ ॥
जदपि सुनि अटपटि बानी। समुझि न परइ बुद्धि भ्रम सानी ॥
काहुँ न लखा सो चरित बिसेषा। सो सरूप नृपकन्याँ देखा ॥
मर्कट बदन भयंकर देही। देखत हृदयँ क्रोध भा तेही ॥

दो० — सखीं संग लै कुअँरि तब चलि जनु राजमराल।
देखत फिरइ महीप सब कर सरोज जयमाल ॥ १३४ ॥

चौ० — जेहि दिसि बैठे नारद फूली। सो दिसि तेहिं न बिलोकी भूली ॥
पुनि पुनि मुनि उकसहिं अकुलाहीं। देखि दसा हर गन मुसुकाहीं ॥
धरि नृपतनु तहँ गयउ कृपाला। कुअँरि हरषि मेलेउ जयमाला ॥
दुलहिनि लै गे लच्छि निवासा। नृप समाज सब भयउ निरासा ॥

त्यांच्या मात्र लक्षात नारदांचे हे स्थित्यंतर बरोबर आले. आपल्या सौंदर्याच्या अभिमानाने तट्ट फुगून जेथे नारद बसले होते, त्यांच्या शेजारीच या दोन रुद्रगणांनी जागा धरली ! ब्राह्मण वेषात ते असल्याने त्यांना कोणीच ओळखले नाही.

नारदांचे ते कुरूप ध्यानी येताच त्यांना ऐकू जाईल एवढ्याने त्यांनी त्यांची टिंगल करण्यास सुरुवात केली. एक जण म्हणतो अहाहा ! काय अनुपम हे हरि-सौंदर्य ! (हरि=मर्कट) दुसरा म्हणतो, राजकुमारीचे मन ही मनोहर आकृती बघताच आनंदाने बेहोष होईल. पहिला म्हणतो वा ! वा ! यास प्रत्यक्ष भगवान समजून यांच्याच गळ्यात ती माळ घालील ! नारद मुनींना मोह झाला होता. कारण त्यांचे मन दुसऱ्याचे हाती (मायावश) गेले होते.

ही गंमत पाहून रुद्रगण मात्र मनापासून खिदळत होते. विचित्रपणाची असली चेष्टा मुनींच्या कानावर जरी पडत होती, तरी बुद्धी अत्यंत भ्रमिष्ट झाल्यामुळे त्यांच्या ध्यानात ही कुचाळी मुळीच आली नाही. याशिवाय इतरांच्या लक्षात मात्र नारदरूपातील हा फरक बिल्कुल आला नाही. परंतु राजकन्येला नारदाचे रूप कसे दिसले ?

भयंकर शरीर व त्यावर माकडाचे मुख ! ते भयानक व विद्रूप माणूस पाहून तिला अंतःकरणात खच्चून संताप आला. सखीसह ती सुकुमार विश्वमोहिनी एखाद्या बाल राजहंसाला लाजविणाऱ्या गतीने करकमळात कमळांची जयमाला घेऊन त्या राजसमुदायाला बारकाईने पाहात पाहात फिरू लागली ! १३४

काम-लोभ-मनोराज्यातील नारद ज्या दिशेला अगदी आनंदाने फुलून बसले होते, तिकडे तिने चुकून पुनः नुसती नजरसुद्धा टाकली नाही. मुनी मात्र फिरून फिरून उठत, सारखे तळमळत, व ही नारदाची दशा पाहून हरगण खच्चून चेकाळत !

इतक्यात त्या मंडपात राजवेषधारी भगवान नारायण प्रकटले, राजकन्येने आनंदित होऊन चटकन् त्यांच्या गळ्यात माळ घातली ! लक्ष्मीपती त्या नवरीस घेऊन तेथून निघून गेले. त्याबरोबर सर्व राजसमाजात जबरदस्त निराशा पसरली !

चौ०– मुनि अति बिकल मोहँ मति नाठी । मनि गिरि गई छुटि जनु गाँठी ॥
तब हर गनबोले मुसुकाई । निज मुख मुकुर बिलोकहु जाई ॥
अस कहि दोउ भागे भयँ भारि । बदन दीख मुनि बारि निहारी ॥
बेषु बिलोकि क्रोध अति बाढ़ा । तिन्हहि सराप दीन्ह अति गाढ़ा ॥

दो० – होहु निसाचर जाइ तुम्ह कपटी पापी दोउ ।
हँसेहु हमहि सो लेहु फल बहुरि हँसेहु मुनि कोउ ॥ १३५ ॥

चौ० – पुनि जल दीख रूप निज पावा । तदपि हृदयँ संतोष न आवा ॥
फरकत अधर कोप मन माहिं । सपदि चले कमलापति पाहीं ॥
देहउँ श्राप कि मरिहउँ जाई । जगत मोरि उपहास कराई ॥
बीचहिं पंथ मिले दनुजारि । संग रमा सोइ राजकुमारी ॥
बोले मधुर बचन सुरसाई । मुनि कहँ चले बिकल की नाईं ॥
सुनत बचन उपजा अति क्रोधा । माया बस न रहा मन बोधा ॥
पर संपदा सकहु नहिं देखी । तुम्हरें इरिषा कपट बिसेषी ॥
मथत सिंधु रूद्रहि बौरायहु । सुरन्ह प्रेरि बिष पान करायहु ॥

गाठ सुटून रत्न निसटून पडावे, त्याप्रमाणे मोहाने बुद्धी नष्ट झालेले नारद अत्यंत कासावीस झाले! अशा वेळी मिस्किलपणे हंसत ते हरगण म्हणतात, ' मुनिराज ! आपला मुखवटा एकदा जाऊन आरशात पाहा तरी ! "

एवढे बोलून भीतीने त्या दोन्ही रुद्रगणांनी तेथून पळ काढला. इकडे व्याकुळस्थितीत जात असतां पाण्यात नारदाना आपले तोंड पाहावयास मिळाले. तो विद्रूप वेष पाहून त्यांचा रोष भयंकर वाढला व त्याच्या-भरात त्या रुद्रगणांना त्यांनी घोर शाप दिला,

" तुम्ही दोघे अत्यंत कपटी व पापी आहांत म्हणून राक्षस व्हा. जा! मला हसता त्याचे हे फळ! हसाल का पुनः दुसऱ्या कोणा मुनीस आता ? " १३५

पुनः पाण्यात पाहिल्यावर नारदांना पहिले रूप प्राप्त झालेले दिसले. तरीही यत्किंचितसुद्धा त्यांचे समाधान दिसले नाही. मनात प्रचंड क्रोधाग्नी रसरसला होता. ओठ थर थर कापत होते, लक्ष्मीकडे तत्काळ जाण्यासाठी स्वारी निघाली. " माझी जगात फजिती केली नाही का ? आता शाप तरी देईन, नाही तर पायाजवळ प्राण तरी देईन ! मनाचा निश्चय झाला. कारण त्यानी माझा जगात उपहास करवला."

इतक्यात वाटेच्या मध्येच दनुजारी (भगवान) नारदांच्याकडे समोरून येत असलेले दिसले. त्यांच्या एका बाजूस विश्वमोहिनी !!

" काय नारदा, अगदी कासावीस झाल्यासारखे दिसता ! स्वारी कुठे निघाली ? " सुरनाथांनी मधुर-वाणीने विचारले.

मग काय, धगधगणाऱ्या संतापाचा भडका उडाला ! मायाविवश झाल्यामुळे विचाराचा-विवेकाचा संपूर्ण विसर पडला. सरबत्ती सुरू झाली,

" तुम्हाला दुसऱ्याचे बरे कुठे पहावते ? आणि त्यासाठी मत्सर-कपट करण्यात तुम्ही विशेष पटाईत ! समुद्रमंथन सुरू असता देवांना प्रेरणा देऊन त्या भोळ्या सांबाला बावळट बनवून हालाहल घ्यावयाला लावले !



दो० — असुर सुरा बिष संकरहि आपु रमा मनि चारु ।
स्वारथ साधक कुटिल तुम्ह सदा कपट ब्यवहारु ।। १३६ ।।

चौ० — परम स्वतंत्र न सिर पर कोई । भावइ मनहि करहु तुम्ह सोई ।।
भलेहि मंद मंदेहि भल करहू । बिसमय हरष न हियँ कछु धरहू ।।
डहकि डहकि परिचेहु सब काहू । अति असंक मन सदा उछाहू ।।
करम सुभासुभ तुम्हहि न बाधा । अब लगि तुम्हहि न काहूँ साधा ।।
भले भवन अब बायन दीन्हा । पावहुगे फल आपन कीन्हा ।।
बंचेहु मोहि जवनि धरि देहा । सोइ तनु धरहु श्राप मम एहा ।।
कपि आकृति तुम्ह कीन्हि हमारी । करिहहिं कीस सहाय तुम्हारी ।।
मम अपकार कीन्ह तुम्ह भारी । नारि बिरहँ तुम्ह होब दुखारी ।।

दो ०— श्राप सीस धरि हरषि हियँ प्रभु बहु बिनती कीन्हि ।
निज माया कै प्रबलता करषि कृपानिधि लीन्हि ।। १३७ ।।

चौ ० — जब हरि माया दूरि निवारी । नहिं तहँ रमा न राजकुमारी ।।
तब मुनि अति सभीत हरि चरना । गहे पाहि प्रनतारति हरना ।

असुरांना सुरा पाजली ! शंकरांना विषाची देणगी दिली ! स्वतः मात्र रूपवती लक्ष्मी, सुंदर कौस्तुभ मणी लाटला. अत्यंत स्वार्थसाधू , आणि कपटाने सदोदित व्यवहार करण्याची तुमची दानत ! १३६

" महा स्वतंत्र ना ! विचारणारा कोणीच शिरजोर नाही ! मग काय, आपल्या मनाला येईल तसे वागण्याला चारी दिशा मोकळ्याच !

" एखादा सज्जन मनुष्य दिसला तर त्याला नीचाच्या कोटीत ढकलता आणि एखाद्या महानीचाला मोठा सज्जन बनवता !

" आणि हे असले धंदे करीत असता मनाला तिळभर आनंदही नाही व खंतहि नाही ! !

" सर्वांना फसविण्याचा धंदा दीर्घकाळ केल्यामुळे आता तुम्हाला भीती उरली नाही. त्यामुळे तुम्हाला हे चाळे करण्यास नेहमीच उत्साह ! कारण कोणाचा धाकच नाही ना !

" कर्म शुभ असो वा अशुभ असो, तुम्ही त्याच्या फळापासून मोकळे ! सगळा कायदा तो इतरांना ! त्यामुळे तुम्हाला केल्या कर्माची फळे भोगावयास आतापर्यंत कोणीच बाकवले नाही. पण आजचा अहेर तुम्ही चांगल्या जबरदस्त घरी केला आहे. केल्या कर्माचे झणझणीत फळ आज तुमच्या पदरात पडतेच पाहा !

" मला जो देह धरून फसवले तोच तुम्ही देह धरा, हा माझा पहिला शाप ! मला भयंकर माकड बनवले काय ! मग तुम्हाला मदत करायला माकडच ! माझ्या हृदयाला आज तुम्ही फार भयंकर जखम केली म्हणून माझ्यासारखेच नारी-विरह-दुःख भोगत बसाल. तसे पाहिल्याशिवाय माझे मन शांत होणार नाही !"

नारदांचा चढत असलेला पारा शांतपणे भगवंतांनी चढू दिला. अत्यंत आनंदित अंतःकरणाने सर्व शाप शिरसामान्य केले. अनेक प्रकारे विनवून नारदाचे सांत्वन केले आणि आपली प्रबल माया कृपासागरांनी आकर्षून घेतली. १३७

अशा प्रकारे भगवंतांनी आपली माया सर्वस्वी हरण करताच काय किमया झाली ? तिथे लक्ष्मीही नाही व विश्वमोहिनीही नाही ! !

चौ० —मृषा होउ मम श्राप कृपाला । मम इच्छा कह दीनदयाला ॥
मैं दुर्बचन कहे बहुतेरे । कह मुनि पाप मिटिहिं किमि मेरे ॥
जपहु जाइ संकर सत नामा । होइहि हृदयँ तुरत बिश्रामा ॥
कोउ नहिं सिव समान प्रिय मोरें । असि परतीति तजहु जनि भोरें ॥
जेहि पर कृपा न करहिं पुरारी । सो न पाव मुनि भगति हमारी ॥
अस उर धरि महि बिचरहु जाई । अब न तुम्हहि माया निअराई ॥
दो ०—बहुबिधि मुनिहि प्रबोधि प्रभु तब भए अंतरधान ।
सत्यलोक नारद चले करत राम गुन गान ॥ १३८ ॥
चौ ० —हर गन मुनिहि जात पथ देखी । बिगत मोह मन हरष बिसेषी ॥
अति सभीत नारद पहिं आए । गहि पद आरत बचन सुनाए ॥
हर गन हम न बिप्र मुनिराया । बड़ अपराध कीन्ह फल पाया ॥
श्राप अनुग्रह करहु कृपाला । बोले नारद दीनदयाला ॥
निसिचर जाइ होहु तुम्ह दोऊ । बैभव बिपुल तेज बल होऊ ॥
भुजबल बिस्व जितब तुम्ह जहिआ । धरिहहिं बिष्नु मनुज तनु तहिआ ॥

नारद अत्यंत भयविव्हल झाले. भगवत्‌चरणी त्यांनी मिठी मारली आणि " हे प्रणतार्तिहरणा ! माझे रक्षण करा. कृपाळा, माझे सर्व शाप खोटे ठरोत ! " अशी अत्यंत आर्त होऊन सद्‌गदित वाणीने प्रार्थना सुरू केली.

दीनांवर दया करणारे प्रभू म्हणाले, " नारदा ! दुःख करू नका. ही सर्व माझीच इच्छा आहे ! "

" पण, दीनबंधो ! मी किती, किती तरी भलतेसलते शब्द मुखातून काढले ! भगवंता ! या माझ्या नीचाच्या या भयंकर पापाचा आता कसा नाश होणार ? " अती काकुळतीला येऊन नारद विचारू लागले.

" जा; शंकरांच्या शत नामावलीचा जप करा. त्यामुळे तुमच्या तप्त हृदयाला सत्वर शांती प्राप्त होईल. शंकराप्रमाणे मला दुसरे कोणीही प्रिय नाही ही प्रतीती कधीही चुकूनसुद्धा सोडू नका ! हे मुने, काय सांगू ! त्रिपुरारी शंकर ज्याच्यावर कृपा करणार नाहीत त्याला माझ्या भक्तीचा लाभ मुळीच होणार नाही ! हे तत्त्व अंतःकरणावर कोरून ठेवून खुशाल त्रैलोक्यात संचार करा. इतःपर तुम्हाला मायेच्या तडाख्यात पुन्हा सापडण्याचा प्रसंग येणार नाही. "

या प्रमाणे, पुष्कळ तऱ्हेने नारदांना उपदेश करून भगवान अंतर्धान पावले. श्रीरामचंद्राचे गुणगान करीत नारदांनीही सत्यलोकाचा रस्ता शांतपणे सुधारला ! १३८

मोहाच्या भोवऱ्यातून पूर्ण मोकळे झालेले व विशेष आनंदात असलेले नारद, त्या दोन रुद्रगणांना वाटेत दिसले. लगेच भीत भीत ते नारदांच्या जवळ आले. त्यांचे पाय धरून अत्यंत दीनवाणीने विनवू लागले.

" हे मुनिश्रेष्ठा ! आम्ही दोन ब्राह्मण नसून रुद्रगण आहोत ! आम्ही मोठा अपराध केला व त्याबद्दल आम्हाला शिक्षा झालेली आहे. कृपाळा, आता काही शापानुग्रह करावा. "

" शापाप्रमाणे तुम्हाला निशिचर जन्म येणारच, तरीपण तुम्हाला विपुल वैभव, बल व तेज यांची प्राप्ती होईल. आपल्या भुजबलाने जेव्हा तुम्ही सर्व विश्वाला जिंकाल तेव्हा, भगवान विष्णूनारायण मानवतनू धरून



चौ० – समर मरन हरि हाथ तुम्हारा । होइहहु मुकुत न पुनि संसारा ॥
चले जुगल मुनि पद सिर नाई । भए निसाचर कालहि पाई ॥

दो०– एक कलप एहि हेतु प्रभु लीन्ह मनुज अवतार ।
सुर रंजन सज्जन सुखद हरि भंजन भुबि भार ॥ १३९ ॥

चौ०– एहि बिधि जनम करम हरि केरे । सुंदर सुखद बिचित्र घनेरे ॥
कलप कलप प्रति प्रभु अवतरहीं । चारु चरित नाना बिधि करहीं ॥
तब तब कथा मुनीसन्ह गाई । परम पुनीत प्रबंध बनाई ॥
बिबिध प्रसंग अनूप बखाने । करहिं न सुनि आचरजु सयाने ॥
हरि अनंत हरिकथा अनंता । कहहिं सुनहिं बहुबिधि सब संता ॥
रामचंद्र के चरित सुहाए । कलप कोटि लगि जाहिं न गाए ॥
यह प्रसंग मैं कहा भवानी । हरिमायाँ मोहहिं मुनि ग्यानी ॥
प्रभु कौतुकी प्रनत हितकारी । सेवत सुलभ सकल दुख हारी ॥

सो०– सुर नर मुनि कोउ नाहिं जेहिं न मोह माया प्रबल ।
अस बिचारि मन माहिं भजिअ महामाया पतिहि ॥ १४० ॥

चौ० – अपर हेतु सुनु सैलकुमारी । कहउँ बिचित्र कथा बिस्तारी ॥

त्यांच्या हस्ते समरांगणावर तुमचा वध होईल आणि मग तुम्ही याप्रमाणे मुक्त व्हाल. पुनः जन्माला येणार नाही. दीनदयाळू नारदानी स्नेहभावाने त्यांचे सांत्वन केले.

नारदाना नमस्कार करून ते निघाले योग्य काळ जाताच त्यांना निशाचरांचा जन्म मिळाला !

देवाचे रंजन करणाऱ्या, सज्जनाना सुख देणाऱ्या, भूभार हरण करणाऱ्या हरीने एका कल्पात यामुळे मानवाचा अवतार धरला. १३९

सुंदर, सुखद आणि विचित्र अशा प्रकारच्या हरीच्या जन्म व कर्मांना ना अंत ना पार! प्रत्येक कल्पा-कल्पात प्रभू अवतार धारण करतात. नाना प्रकारची मनोहर लीला करतात त्या त्या वेळी भगवंताच्या पावन अशा कथा प्रबंधाची रचना करून मुनिश्रेष्ठ त्यांचे गायन करतात. अनुपमेय अशा नाना प्रकारच्या प्रसंगाचे ते विस्ताराने वर्णन करतात. म्हणून जे सुविचारी, सज्जन असतात त्याना त्यांचे श्रवण करत असता त्यात अशक्य असे काहीच वाटत नाही व परम सुख होते.

हरी जसे अनंत आहेत तशा त्यांच्या कथाहि अनंतच ! सर्व संत त्यांचे कथन व श्रवण अनेक प्रकारानी करतात. अशा सुंदर रामचरित्राचे गायन करण्यास कोटीकल्पांचाहि काळ पुरा पडणार नाही. मी हा प्रसंग, हे भवानी ! एवढ्याच करिता सांगितला की ज्ञानी मुनीसुद्धा हरि मायेच्या योगाने मोहित होतात हे तुला कळावे ! प्रभू अत्यंत कौतुकी असून त्याना शरण जातील, त्यांच्या चरणाचे सेवन करतील, त्यांच्या सर्व दुःखाचे हरण करतात. सेवा करण्यास ते सुलभ, सुर, नर, मुनी असा कोणीही नाही की जो प्रबळ मायेच्या तावडीतून सुटू शकेल ! म्हणून हा सुविचार अंतःकरणात अखंड वागवून महामायापतीच्या चरणांचे भजन करावे. १४०

मनू–शतरूपाख्यान

शंकर पार्वतीला म्हणतात, ‘ हे शैलकुमारी ! भगवंताच्या अवताराला आणखी एक दुसरे कारण झाले. ती कथा मोठी विचित्र आहे. सांगतो ऐक !

चौ० – जेहि कारन अज अगुन अरूपा। ब्रह्म भयउ कोसलपुर भूपा ॥
जो प्रभु बिपिन फिरत तुम्ह देखा। बंधु समेत धरें मुनिबेषा ॥
जासु चरित अवलोकि भवानी। सती सरीर रहिहु बौरानी ॥
अजहुँ न छाया मिटति तुम्हारी। तासु चरित सुनु भ्रम रुज हारी ॥
लीला कीन्हि जो तेहिं अवतारा। सो सब कहिहउँ मति अनुसारा ॥
भरद्वाज सुनि संकर बानी। सकुचि सप्रेम उमा मुसुकानी ॥
लगे बहुरि बरनै बृषकेतू। सो अवतार भयउ जेहि हेतू ॥

दो० – सो मैं तुम्ह सन कहउँ सबु सुनु मुनीस मन लाइ।
राम कथा कलि मल हरनि मंगल करनि सुहाइ ॥ १४१ ॥

चौ० – स्वायंभू मनु अरु सतरूपा। जिन्ह तें भै नरसृष्टि अनूपा ॥
दंपति धरम आचरन नीका। अजहुँ गाव श्रुति जिन्ह कै लीका ॥
नृप उत्तानपाद सुत तासू। ध्रुव हरिभगत भयउ सुत जासू ॥
लघु सुत नाम प्रियब्रत ताही। बेद पुरान प्रसंसहिं जाही ॥
देवहूति पुनि तासु कुमारी। जो मुनि कर्दम कै प्रिय नारी ॥
आदिदेव प्रभु दीनदयाला। जठर धरेउ जेहिं कपिल कृपाला ॥
सांख्य सास्त्र जिन्ह प्रगट बखाना। तत्त्व बिचार निपुन भगवाना ॥
तेहिं मनु राज कीन्ह बहु काला। प्रभु आयसु सब बिधि प्रतिपाला ॥

रूप-जन्म-गुणरहित असे मूळ, ब्रह्म ते अयोध्याधीश कसे झाले? आपण वनात फिरत असता मुनिवेष धारण केलेले, आपल्या बंधूसह तुम्हाला ते प्रभू दिसले होते. सतीच्या शरीरात असता त्याचे चरित्र पाहून तुम्ही भवानी असता भ्रमिष्ट झाला! अजूनसुद्धा ती भ्रमरोगाची छाया तुमच्या अंतःकरणातून समूळ नष्ट झालेली नाही. म्हणून भ्रमरोगनिवारण करणारे त्यांचे चरित्र कथन करतो, ते ऐका. त्या अवतारात भगवंतांनी ज्या लीला केल्या, त्या सर्व यथामति नंतर निवेदन करू.

'हे भारद्वाज!' याज्ञवल्क्य म्हणतात, "शंकरांचे हे (खूण पटवणारे) भाषण ऐकून उमा लाजली व तिने प्रेमाने स्मित केले. तो अवतार धरण्यास जे कारण घडले, त्याचे वर्णन करण्यास वृषकेतूंनी प्रारंभ केला.

"मुनिवरा, तो सर्व कथाभाग मी आता सांगतो. अगदी पूर्ण लक्ष देऊन ऐका. रामकथा ही कलिमल-हरण करणारी व मंगल करणारी अत्यंत मनोहर अशी आहे!" १४१

स्वायंभू नावाचा मनू व त्याची पत्नी शतरूपा यांच्यापासूनच अमर्याद अशी मानव सृष्टी झाली. ज्याची कीर्ती अनुपमेय म्हणून वेदांनी वर्णन केले, इतके हे दंपती उत्तम धर्माचरण करणारे होते. त्यांचा मुलगा उत्तानपाद राजा, व त्याच्याच पोटी हरिभक्त ध्रुवाचा जन्म झाला. वेदपुराणांत ज्या प्रियव्रत राजाचे प्रसिद्ध आख्यान आढळते तो मनु-शतरूपांचा धाकटा मुलगा. त्यांचीच मुलगी देवहूती. कर्दम मुनीची ही प्रिय पत्नी. आदिदेव, दीनदयाल प्रभूला तिने कपिलरूपाने आपल्या गर्भात धारण केले! तत्त्व-विचारनिपुण असे ते भगवान. त्यांनीच सांख्यशास्त्राचे वर्णन करून ते प्रसिद्धीस आणले. असा ज्याचा पावन वंशविस्तार झाला, त्या मनूने, भगवंताच्या सर्व आज्ञांचे प्रतिपालन करून, दीर्घकाळ राज्य केले.

सो० –होइ न विषय बिराग भवन बसत भा चौथपन ।
हृदयँ बहुत दुख लाग जनम गयउ हरिभगति बिनु ॥ १४२ ॥

चौ० –बरबस राज सुतहि तब दीन्हा । नारि समेत गवन बन कीन्हा ॥
तीरथ बर नैमिष बिख्याता । अति पुनीत साधक सिधि दाता ॥
बसहिं तहाँ मुनि सिद्ध समाजा । तहँ हियँ हरषि चलेउ मनु राजा ॥
पंथ जात सोहहिं मतिधीरा । ग्यान भगति जनु धरें सरीरा ॥
पहुँचे जाइ धेनुमति तीरा । हरषि नहाने निरमल नीरा ॥
आए मिलन सिद्ध मुनि ग्यानी । धरम धुरंधर नृपरिषि जानी ॥
जहँ जहँ तीरथ रहे सुहाए । मुनिन्ह सकल सादर करवाए ॥
कृस सरीर मुनिपट परिधाना । सत समाज नित सुनहिं पुराना ॥

दो० –द्वादस अच्छर मंत्र पुनि जपहिं सहित अनुराग ।
बासुदेव पद पंकरुह दंपति मन अति लाग ॥ १४३ ॥

चौ० –करहिं अहार साक फल कंदा । सुमिरहिं ब्रह्म सच्चिदानंदा ॥
पुनि हरि हेतु करन तप लागे । बारि अधार मूल फल त्यागे ॥
उर अभिलाष निरंतर होई । देखिअ नयन परम प्रभु सोई ॥

राजवाड्यातील सर्व सुखोपभोग घेत वार्धक्य आले, इतका दीर्घ काळ लोटला तरीही विषयात वैराग्य निर्माण होत नाही; अरेरे ! सर्व जन्म हरिभक्ति विना व्यर्थ गेला, असा अंतःकरणात तो अत्यंत दुःखी झाला ! १४२

शेवटी जुल्माने मुलाला राज्य देऊन आपल्या पत्नीसह मनूने वनात गमन केले. साधकांना सिद्धी देणारे, अरण्यातील अत्यंत पावन व सुप्रसिद्ध असे श्रेष्ठ नैमिष नावाचे तीर्थ आहे. सिद्ध व मुनी यांचा समाज त्या ठिकाणी वसती करून राहात होता, तेथेच मनुराजा जाण्यास निघाला.

अंतःकरणात धैर्य धरून जेव्हा हे राजाराणीचे जोडपे रस्त्याने चालू लागले, तेव्हा जणू काही ज्ञान व भक्ती यांनीच शरीरे धारण केली आहेत, असे दिसले. लवकरच गोमती नदीच्या काठावर ते आले व त्यांनी तिच्या निर्मल पाण्यात आनंदाने स्नाने केली.

धर्मधुरंधर नृपर्षी (तपस्येसाठी राज्यत्याग) करून नैमिष तीर्थावर आलेले समजतांच ज्ञानी, सिद्ध व श्रेष्ठ मुनी त्यांच्या भेटीस आले. जेथे जेथे पवित्र तीर्थे होती, त्या त्या सर्व तीर्थांची यात्रा अत्यंत आदरपूर्वक या राजर्षींकडून मुनींनी करवून घेतली. कृश शरीरे, मुनिवेष धारण केलेला व सत्संगतीत नित्य पुराणादि श्रवणाचा कार्यक्रम चाललेला, असा त्यांचा जीवनक्रम सुरू झाला.

त्यानंतर भक्तियुक्त अंतःकरणाने त्यानी द्वादशाक्षरी मंत्राच्या जपाला सुरवात केली. त्याचा क्रमशः परिणाम होऊन वासुदेवाच्या चरणकमली या दांपत्याचे मन जडू लागले. १४३

कंद, मूल, फल व भाजीपाला भक्षण करावा, सच्चिदानंद परब्रह्माचे स्मरण करावे, नित्यक्रम चालू असता. भगवंताचे डोळे भरून रूप पाहावे असा सतत अभिलाष उत्पन्न झाल्यामुळे त्यांनी फलाहारही वर्ज्य करून, हरिप्राप्त्यर्थ केवळ पाण्यावर राहावयाचे व कठोर तप करावयाचे असा निश्चय केला !

चौ० – अगुन अखंड अनंत अनादी । जेहि चिंतहिं परमारथबादी ॥
नेति नेति जेहि बेद निरूपा । निजानंद निरुपाधि अनूपा ॥
संभु बिरंचि बिष्नु भगवाना । उपजहि जासु अंस तें नाना ॥
ऐसेउ प्रभु सेवक बस अहई । भगत हेतु लीलातनु गहई ॥
जौं यह बचन सत्य श्रुति भाषा । तौ हमार पूजिहि अभिलाषा ॥

दो० – एहि बिधि बीते बरष षट सहस बारि आहार ।
संबत सप्त सहस्र पुनि रहे समीर अधार ॥ १४४ ॥

चौ० – बरष सहस दस त्यागेउ सोऊ । ठाढे रहे एक पद दोऊ ॥
बिधि हरि हर तप देखि अपारा । मनु समीप आए बहु बारा ॥
मागहु बर बहु भाँति लोभाए । परम धीर नहिं चलहिं चलाए ॥
अस्थिमात्र होइ रहे सरीरा । तदपि मनाग मनहिं नहिं पीरा ॥
प्रभु सर्बग्य दास निज जानी । गति अनन्य तापस नृप रानी ॥
मागु मागु बरु भै नभ बानी । परम गभीर कृपामृत सानी ॥
मृतक जिआवनि गिरा बहाई । श्रवन रंध्र होइ उर जब आई ॥
हृष्ट पुष्ट तन भए सुहाए । मानहुँ अबहिं भवन ते आए ॥

जो अगुण, अखंड, अनादी व अनंत आहे, परमार्थवादी लोक ज्याचे सतत चिंतन करतात, 'नेति-नेति' म्हणून ज्याचे निरूपण केले, जो अती आनंदस्वरूप, उपाधिरहित व अनुपम आहे, ज्याच्या अंशमात्राने अनेक ब्रह्माविष्णुमहेशभगवंतांची उत्पती होते, असा प्रभूही सेवकाला वश असतो व भक्तांच्या करिता लीला-देह धारण करतो अशी जी श्रुतीची भाषा आहे, ती जर खरी असेल तर आमची मनकामना पूर्ण झालीच पाहिजे ! असा संकल्प त्यांनी केला.

याप्रमाणे तपस्या चालू असता सहा हजार वर्षे केवळ पाण्यावर त्यांची गेली. त्यानंतर सात हजार वर्षे नुसत्या वायुसेवनाने त्यांनी तपस्या केली. १४४

एवढ्यावर न थांबता दहा हजार वर्षे एका पायावर उभे राहून दोघांनी, वायुसेवनही न करता अत्यंत उग्र तपस्या केली !

हे त्यांचे अपूर्व व अपार तप पाहून ब्रह्मा, विष्णु, महेश अनेक वेळा मनूच्या जवळ येऊन वर माग म्हणून त्यांना पुष्कळ प्रलोभने दाखवली. पण इतक्या तऱ्हेने ध्येयभ्रष्ट करण्यासाठी प्रयत्न झाला असताही ही जोडी धैर्याचे केवळ मेरू असल्याने त्यांनी आपल्या ध्येयाचा ध्रुवतारा निश्चल सांभाळला !

शरीरे म्हणजे केवळ हाडांचे सांगाडे ! इतकी स्थिती झाली तरी मनाला लेश मात्र दुःख नाही ! प्रभु सर्वज्ञ असल्याने, तपस्वी असे हे राजाराणीचे दांपत्य आपल्या चरणांची अनन्य दास्य-भक्ती करीत आहे हे त्यानी जाणले.

"वर माग! वर माग!" अशी कृपामृतमिश्रित परम गंभीर आकाशवाणी झाली ! मृतालाही संजीवनी देणारी ती सुंदरवाणी कानांतून जेव्हा हृदयात शिरली तेव्हा काय परिणाम झाला? राजवाड्यातील सुखोपभोगातून आताच जणू काही हे जोडपे वनात आलेले आहे, असे वाटेल इतकी त्यांची शरीरे हृष्ट-पुष्ट व सुंदर झाली !

दो० — श्रवण सुधा सम बचन सुनि पुलक प्रफुल्लित गात ।
बोले मनु करि दंडवत प्रेम न हृदयँ समात ।। १४५ ।।

चौ० — सुनु सेवक सुरतरु सुरधेनू । बिधि हरि हर बंदित पद रेनू ।।
सेवत सुलभ सकल सुख दायक । प्रनतपाल सचराचर नायक ।।
जौं अनाथ हित हम पर नेहू । तौ प्रसन्न होइ यह बर देहू ।।
जो सरूप बस सिव मन माहीं । जेहि कारन मुनि जतन कराहीं ।।
जो भुसुंडि मन मानस हंसा । सगुन अगुन जेहि निगम प्रसंसा ।।
देखहिं हम सो रूप भरि लोचन । कृपा करहु प्रनतारति मोचन ।।
दंपति बचन परम प्रिय लागे । मृदुल बिनीत प्रेम रस पागे ।।
भगत बछल प्रभु कृपानिधाना । बिस्वबास प्रगटे भगवाना ।।

दो० — नील सरोरुह नील मनि नील नीरधर स्याम ।
लाजहिं तन सोभा निरखि कोटि कोटि सत काम ।। १४६ ।।

चौ० — सरद मयंक बदन छबि सींवा । चारु कपोल चिबुक दर ग्रीवा ।।
अधर अरुन रद सुंदर नासा । बिधु कर निकर बिनिंदक हासा ।।
नव अंबुज अंबक छबि नीकी । चितवनि ललित भावँती जी की ।।

कर्णेंद्रियाचे केवळ अमृतच अशी ही वाणी कानी पडताच दोघांचीही शरीरे रोमांचांनी फुलली ! हृदयात भगवत्प्रेम मावेना. दंडवत व प्रणाम करून मनूने बोलण्यास सुरुवात केली. १४५

" ऐका, सेवकांचा कल्पवृक्ष किंवा कामधेनू, ब्रह्मा विष्णु महेश ज्याच्या चरणरजाला वंदन करतात, सेवकांना प्राप्त होण्यास सुलभ, सर्व सुखांचा दाता, शरणागताचे रक्षण करणारा, चराचराचा नायक, अनाथांचे हित करणारा, अशा प्रभो ! जर तुझे आम्हांवर प्रेम असेल तर प्रसन्न होऊन आम्ही मागतो तो वर द्यावा. तुझे जे स्वरूप शिवमानसी राहाते, ज्याच्या प्राप्तीसाठी मुनिवर मनःपूर्वक प्रयत्न करतात, काकभुशुंडीच्या मन-मानसात जे हंसाप्रमाणे सतत विहार करते, सगुण व अगुण अशा दोन्ही स्वरूपात ज्याचे वेदांनी वर्णन केले आहे,—ते तुझे रूप डोळे भरून पाहावे अशी आमची अभिलाषा आहे. शरण आलेल्यांच्या आर्त हांकेला ओ देणारा तू आमच्यावर कृपा कर ! "

प्रेमरसाने ओथंबलेले, नम्र व मधुर असे ते दंपतीचे भाषण भगवंताला अत्यंत आवडले ! मग काय, भक्तवत्सल, कृपासागर, सर्व विश्वात ओतप्रोत भरलेला भगवान् त्वरीच प्रकटला !

निळे ताजे फुललेले कमळ, नीलमणी निळ्या रंगाचा पाण्याने संपूर्ण भरलेला शाममेघ, यांच्याप्रमाणे शरीराची शोभा (कोमल प्रकाशमय व सरस) पाहून कोव्यवधी कामदेवांना लज्जेने मान खालीच करावी लागणार ! सर्व शरीरातील प्रत्येक अवयव सौंदर्यपूर्ण ! १४६

शरद ऋतूतील पूर्ण चंद्राप्रमाणे वदनकमल सौंदर्याची केवळ सीमा ! गाल व हनुवटी अत्यंत मनोहर ! कंठ, शंखाप्रमाणे तीन रेषा व चढ-उतार असणारा, अधरोष्ठ अरुणवर्णाचा, दात व नासिका अत्यंत मनोवेधक, चंद्रकिरणांच्या समुदायाला तुच्छ करणारे हास्य ! नुकत्याच उमललेल्या कमळाप्रमाणे आकर्षक असे नेत्र, दृष्टी इतकी लालित्यपूर्ण की ज्याच्यावर ती पडेल त्याच्या चित्ताची चोरी झालीच म्हणून समजावे !

चौ० – भृकुटि मनोज चाप छबि हारी । तिलक ललाट पटल दुतिकारी ।।
कुंडल मकर मुकुट सिर भ्राजा । कुटिल केस जनु मधुप समाजा ।।
उर श्रीबत्स रुचिर बनमाला । पदिक हार भूषन मनिजाला ।।
केहरि कंधर चारु जनेऊ । बाहु बिभूषन सुंदर तेऊ ।।
करि कर सरिस सुभग भुजदंडा । कटि निषंग कर सर कोदंडा ।।

दो ० – तड़ित बिनिंदक पीत पट उदर रेख बर तीनि ।
नाभि मनोहर लेति जनु जमुन भवँर छबि छीनि ।। १४७ ।।

चौ० – पद राजीब बरनि नहिं जाहीं । मुनि मन मधुप बसहिं जेन्ह माहीं ।।
बाम भाग सोभति अनुकूला । आदिसक्ति छबिनिधि जगमूला ।।
जासु अंस उपजहिं गुनखानी । अगनित लच्छि उमा ब्रह्मानी ।।
भृकुटि बिलास जासु जग होई । राम बाम दिसि सीता सोई ।।
छबिसमुद्र हरि रूप बिलोकी । एकटक रहे नयन पट रोकी ।।
चितवहिं सादर रूप अनूपा । तृप्ति न मानहिं मनु सतरूपा ।।
हरष बिबस तन दसा भुलानी । परे दंड इव गहि पद पानी ।।
सिर परसे प्रभु निज कर कंजा । तुरत उठाए करुनापुंजा ।।

मदनाच्या धनुष्याची शोभा हरण करून घेणाऱ्या भुवया, भालप्रदेशी लावलेला तिलक सर्वत्र प्रकाश पाडणारा, कानात उत्तम मकरकुंडले, मस्तकावर उत्कृष्ट मुकुट विराजमान झालेला, केशकलापाचा काळेपणा पाहून मधुकर पंक्तीला लाज वाटे ! वक्षःस्थलावर श्रीवत्स व गळ्यात रुचिर वनमाला, पदकाचा हार व रत्नमोत्यांची जाळी यांनी छाती विभूषित झाली आहे. सिंहाच्या सारखी गर्दन असून सुंदर यज्ञोपवीत खाली रुळलेले, बाहूवर घातलेली भूषणेही मनोहर ! हत्तीच्या सोंडेप्रमाणे वरून खाली निमूळते शोभणारे भुजदंड, कमरेला भाता व हातात धनुष्य-बाण विजेची तेजात फजिती करणारा पीतांबर उदरावर सुंदर तीन घड्या पडल्या आहेत, यमुनेच्या भोवऱ्याचे सौंदर्य हरण करील इतके मनोहर नाभिकमल. १४७

मुनींच्या मनरूपी मधुकरांनी जेथे निवास केलेला आहे, त्या चरणकमलांचे वर्णन शब्दातीत !

भगवंताच्या वामभागी राहणारी सदोदित अनुकूल सौंदर्यखाणी, जगताची मूलकारणरूप आदिशक्ती श्री जानकी शोभते आहे. जिच्या अंशापासून गुणांची खाण असणाऱ्या अगणित उमा, रमा आणि ब्रह्माणी उत्पन्न होतात. जिच्या केवळ भुवईच्या विलासाने अनेक जगांची रचना होते ती सीता (भगवंताची स्वरूपशक्ती रामाच्या डावे बाजूस विलसते आहे !

अशा प्रकारचे त्या सौंदर्यसागर भगवंताचे रूप दिसताच पापण्या लवण्याचे बंद होऊन मनु-शतरूपानी एकसारखी त्यानी टक लावली ! आदरयुक्त अंतःकरणाने त्या अनुपमेय रूपाचे निरीक्षण करीत असता मनू आणि शतरूपा त्यांची तृप्ती मुळीच होईना. आनंदातिरेकाने त्याचे देहभान हरपले. धाडकन् भगवंताच्या पायी त्यांचे देह पडले व त्यानी प्रभुचरणाना मिठी मारली !

प्रभूनी आपले हस्तकमल त्याच्या मस्तकावर ठेवून दयासागरांनी त्याना सत्वर उठवले.

दो० — बोले कृपानिधान पुनि अति प्रसन्न मोहि जानि ।
मागहु बर जोइ भाव मन महादानि अनुमानि ।। १४८ ।।

चौ० — सुनि प्रभु बचन जोरि जुग पानी । धरि धीरजु बोली मृदु बानी ।।
नाथ देखि पद कमल तुम्हारे । अब पूरे सब काम हमारे ।।
एक लालसा बड़ि उर माहीं । सुगम अगम कहि जाति सो नाहीं ।।
तुम्हहि देत अति सुगम गोसाईं । अगम लाग मोहि निज कृपनाईं ।।
जथा दरिद्र बिबुधतरु पाई । बहु संपति मागत सकुचाई ।।
तासु प्रभाउ जान नहिं सोई । तथा हृदयँ मम संसय होई ।।
सो तुम्ह जानहु अंतरजामी । पुरवहु मोर मनोरथ स्वामी ।।
सकुच बिहाइ मागु नृप मोही । मोरें नहिं अदेय कछु तोही ।।

दो० — दानि सिरोमनि कृपानिधि नाथ कहउँ सतिभाउ ।
चाहउँ तुम्हहि समान सुत प्रभु सन कवन दुराउ ।। १४९ ।।

चौ० — देखि प्रीति सुनि बचन अमोले । एवमस्तु करुनानिधि बोले ।।
आपु सरिस खोजौं कहँ जाई । नृप तव तनय होब मैं आई ।।
सतरूपहि बिलोकि कर जोरें । देबि मागु बरु जो रुचि तोरें ।।

कृपानिधी पुनः म्हणाले, 'मी तुमच्यावर पूर्ण संतुष्ट झालो आहे. मी महादानी समजून तुमच्या मनाला जो आवडत असेल असा कोणताही वर मागून घ्या!' १४८

प्रभूची ही वाणी ऐकून त्यानी हात जोडले आणि धीर धरूनम धुर वाचेने मनू म्हणाले "नाथ! आपले चरणकमल दर्शनास मिळाल्यानेच आमच्या सर्व कामना परिपूर्ण झाल्या आहेत. असे असूनही एक बलवत्तर वासना हृदयात उसळत आहे. सुगम आहे व दुर्लभही आहे. बोलवत नाही हे स्वामिन्! आपणाला ती पूर्ण करणे सुलभ आहे पण माझ्या दीनपणाने मात्र मला ती दुर्लभ वाटते. भिकाऱ्याला कल्पतरूची प्राप्ती झाल्यावर ही मोठी संपत्ती मागण्याची त्याला लाज वाटणारच! याचे कारण त्या देववृक्षाचा प्रभाव त्या बिचाऱ्याला कुठे ठाऊक असतो? तशीच माझीही पण संशयाकुल स्थिती झाली आहे. आपण सर्वांतर्यामी असल्याने माझा मनोरथ जाणताच, तेवढा पूर्ण करा."

"हे राजा! संकोच सोडून खुशाल माग! कारण तुला न देण्यासारखी अशी कोणतीच गोष्ट माझ्याजवळ नाही. काय वाटेल ते माग! प्रभूनी असे लगेच आश्वासन दिले.

"अखिल दात्यांचे मुकुटमणी कृपासागरा! प्रभो! सांगू का, अंतःकरणातून कोणती सद्भावना जोराने उठत आहे? देवा, तुमच्यासारखा मुलगा आपणाला असावा अशी इच्छा आहे, देवाजवळ लपवून ठेवून कसे चालेल?" १४९

अखेर मनूने हे मागण्याचे धाडस केले! भगवंतांनी त्याचे शुद्ध प्रेम पाहिले. अमोल शब्द ऐकले आणि दयानिधीच्या मुखातून 'तथास्तु' असे उद्गार बाहेर पडले. प्रभू पुढे म्हणतात, 'राजा अरे माझ्यासारखा मी कुठे शोधावा? (दुसरा नाहीच.) म्हणून मीच अवतार घेऊन तुझा मुलगा होईन! नंतर हात जोडून उभी राहिलेल्या शतरूपेस भगवंतांनी सुचवले, देवि तुला जो वाटावा सारखा वाटतो तो वर माग.

चौ०– जो बरु नाथ चतुर नृप मागा । सोइ कृपाल मोहि अति प्रिय लागा ॥
प्रभु परंतु सुठि होति ढिठाई । जदपि भगत हित तुम्हहि सोहाई ॥
तुम्ह ब्रह्मादि जनक जग स्वामी । ब्रह्म सकल उर अंतरजामी ॥
अस समुझत मन संसय होई । कहा जो प्रभु प्रवान पुनि सोई ॥
जे निज भगत नाथ तव अहहीं । जो सुख पावहि जो गति लहहीं ॥

दो० – सोइ सुख सोइ गति सोइ भगति सोइ निज चरन सनेहु ।
सोइ बिबेक सोइ रहनि प्रभु हमहि कृपा करी देहु ॥ १५० ॥

चौ० – सुनि मृदु गूढ़ रुचिर बर रचना । कृपासिंधु बोले मृदु बचना ॥
जो कछु रुचि तुम्हरे मन माहीं । मैं सो दीन्ह सब संसय नाहीं ॥
मातु बिबेक अलौकिक तोरें । कबहुँ न मिटिहि अनुग्रह मोरें ॥
बंदि चरन मनु कहेउ बहोरी । अधर एक बिनती प्रभु मोरी ॥
सुत बिषइक तव पद रति होऊ । मोहि बड़ मूढ़ कहै किन कोऊ ॥
मनि बिनु फनि जिमि जल बिनु मीना । मम जीवन तिमि तुम्हहि अधीना ॥
अस बरु मागि चरन गहि रहेऊ । एवमस्तु करुनानिधि कहेऊ ॥
अब तुम्ह मम अनुसासन मानी । बसहु जाइ सुरपति रजधानी ॥

" हे नाथ, " शतरूपा बोलू लागली, " चतुर नृपतींनी जो वर मागितला तो, हे कृपानिधे ! मला अधिकच आवडणारा असा आहे. परंतु, भक्ताचे हित साधणारे तुम्ही असल्याने जर तुम्हास आवडत असेल तर प्रभू ! —पण मोठे धाडस होत आहे.देवा ! आपण सर्व जगताचे स्वामी आहा. ब्रह्मादि देवांचे जनिते आहा, परब्रह्म आपणच असून सर्वांच्या हृदयाला चालना देता असे ध्यानी येताच मन संशयाने कचरते; पण भगवंतांचे वचन प्रमाण असल्याने मी आता मागतेच !

" देवा ! तुझे जे निःसीम भक्त आहेत, त्यांना जे सुख मिळते, ते ज्या गतीला जातात, ते सुख, तीच गती, तीच भक्ती, तेच आपल्या चरणावरील प्रेम, तोच विवेक, तीच राहणी हे सर्व प्रभुकृपेने आम्हा दोघांस मिळावी. " १५०

गूढ, रुचिर व मार्दवपूर्ण अशी ती वरमागणी ऐकून कृपासागर मधुरवचन बोलले, " तुझ्या मनात हे जननी, ज्याची आवड उत्पन्न झाली आहे, ते सर्व निःसंशय तुम्हा दोघांना दिले आहे. माझ्या अनुग्रहाने हे माते, तुझे अलौकिक ज्ञान केव्हाच नष्ट होणार नाही. "

आपल्या पत्नीने विचारपूर्वक अविनाशी ज्ञानप्राप्तीचा वर मागून घेतल्याचे पाहून मनूने पुनः चरणावर मस्तक ठेऊन भगवंताला प्रार्थना केली.

" हे प्रभो ! माझी आणखी एक विनंती आहे. तुम्ही माझ्या पोटी पुत्र होऊन आल्यावर लोकांनी मला अगदी वेडा म्हटले तरी चालेल, पण माझे तुमच्यावर पुत्र म्हणूनच निरतिशय प्रेम असावे. ते इतके की, मण्यावाचून सापाची अगर पाण्याच्या अभावी माशाची जी स्थिती होते, तशीच होऊन माझी जीवन-मर्यादा तुमच्या आधीन असावी. "

असला विलक्षण वर मनूने मागितला व भगवंतांनी ' तथास्तु ' म्हणेपर्यंत पाय धरूनच बसला. शेवटी भगवान् म्हणाले, " आता माझी आज्ञा प्रमाण मानून इंद्राच्या नगरीत जाऊन राहा.



सो० – तहँ करि भोग बिसाल तात गएँ कछु काल पुनि ।
होइहहु अवध भुआल तब मैं होब तुम्हार सुत ।। १५१ ।।

चौ० – इच्छामय नरबेष सँवारें । होइहउँ प्रगट निकेत तुम्हारें ।।
अंसन्ह सहित देह धरि ताता । करिहउँ चरित भगत सुखदाता ।।
जे सुनि सादर नर बड़भागी । भव तरिहहिं ममता मद त्यागी ।।
आदिसक्ति जेहिं जग उपजाया । सोउ अवतरिहि मोरि यह माया ।।
पुरउब मैं अभिलाष तुम्हारा । सत्य सत्य पन सत्य हमारा
पुनि पुनि अस कहि कृपानिधाना । अंतरधान भए भगवाना ।।
दंपति उर धरि भगत कृपाला । तेहिं आश्रम निवसे कछु काला ।।
समय पाइ तनु तजि अनयासा । जाइ कीन्ह अमरावति बासा ।।

दो० – यह इतिहास पुनीत अति उमहि कही बृषकेतु ।
भरद्वाज सुनु अपर पुनि राम जनम कर हेतु ।। १५२ ।।

मास पारायण, पाँचवाँ विश्राम

चौ० – सुनु मुनि कथा पुनीत पुरानी । जो गिरिजा प्रति संभु बखानी ।।
बिस्व बिदित एक कैकय देसू । सत्यकेतु तहँ बसइ नरेसू ।।
धरम धुरंधर नीति निधाना । तेज प्रताप सील बलवाना ।।

तेथे काही काळ संपूर्ण सुखे भोगल्यानंतर तुम्ही अयोध्यानरेश व्हाल. तेव्हा मी तुमचा मुलगा होईन. " १५१

" इच्छामय नरवेष घेऊन मी तुमच्या निवासस्थानी प्रकट होईन. माझ्या अंशासह, हे तात ! अवतार घेऊन भक्तांना सुखावह होईल, अशी लीला करीन. अती भाग्यवान लोक त्या लीलेचे जे श्रवण करतील, ते आसक्ती व मद यांचा त्याग करून भवसागरातून तरून जातील. या जगाला निर्माण करणारी आदिशक्ती तीच ही माझी माया सीता या नावाने अवतरेल. मी तुमचा मनोरथ पूर्ण करीन; सत्य, सत्य, माझी प्रतिज्ञा सत्यच होईल. "

असे अनेक वेळा बोलून कृपासागर भगवान अंतर्धान पावले !

भक्तावर दया करणाऱ्या प्रभूचे नित्य स्मरण करत काही काळ त्याच आश्रमात या राजा-राणीने काढला. योग्य समय येताच विनायास त्यांनी आपल्या शरीराचा त्याग केला व देवेंद्राच्या नगरीत निवास केला.

वृषकेतूंनी उमेला सांगितलेला अत्यंत पवित्र असा हा इतिहास आहे. भरद्वाज ! मी तुम्हाला तो सांगितला. आता रामजन्माला दुसरे एक कारण झालेले सांगतो ते ऐका. १५२

प्रतापभानू आख्यान

याज्ञवल्क्य भारद्वाजांना म्हणतात, " हे मुने ! शंभूंनी जी कथा गिरिजेला कथन केली, ती प्राचीन-पवित्र कथा आता सांगतो; ऐका."

पूर्वी जगात प्रसिद्ध असा केकय नावाचा एक देश होता, त्या देशाच्या राजाचे नाव सत्यकेतू. तो धर्मधुरंधर नीतिनिपुण, तेजस्वी, प्रतापशाली, शीलसंपन्न आणि बलाढ्य असा होता.

तेहि कें भए जुगल सुत बीरा । सब गुन धाम महा रनधीरा ।।
राज धनी जो जेठ सुत आही । नाम प्रतापभानु अस ताही ।।
अपर सुतहि अरिमर्दन नामा । भुज बल अतुल अचल संग्रामा ।।
भाइहि भाइहि परम समीती । सकल दोष छल बरजित प्रीती ।।
जेठे सुतहि राज नृप दीन्हा । हरि हित आपु गवन बन कीन्हा ।।
दो० — जब प्रतापरबि भयउ नृप फिरी दोहाई देस ।
प्रजा पाल अति बेदबिधि कतहुँ नहीं अघ लेस ।। १५३ ।।
चौ० — नृप हितकारक सचिव सयाना । नाम धरमरुचि सुक्र समाना ।।
सचिव सयान बंधु बलबीरा । आपु प्रतापपुंज रनधीरा ।।
सेन संग चतुरंग अपारा । अमित सुभट सब समर जुझारा ।।
सेन बिलोकि राउ हरषाना । अरु बाजे गहगहे निसाना ।।
बिजय हेतु कटकई बनाई । सुदिन साधि नृप चलेउ बजाई ।।
जहँ तहँ परीं अनेक लराईं । जीते सकल भूप बरिआईं ।।
सप्त दीप भुजबल बस कीन्हे । लै लै दंड छाडि नृप दीन्हे ।।
सकल अवनि मंडल तेहि काला । एक प्रतापभानु महिपाला ।।
दो० — स्वबस बिस्व करि बाहुबल निज पुर कीन्ह प्रबेसु ।।
अरथ धरम कामादि सुख सेवइ समयँ नरेसु ।। १५४ ।।

त्याला सद्‌गुणसंपन्न आणि मोठे रणझुंझार असे दोन शूर मुलगे होते. राज्याचा मालक ज्येष्ठ सुत, प्रतापभानू; धाकटा अरिमर्दन. तोही संग्रामात न डगमगणारा व अतुल्य पराक्रमी असाच होता. दोघां भावांत निर्दोष व निष्कपट असे निर्भेळ प्रेम असल्यामुळे त्यांची परस्परांची परममैत्री होती.

आपल्या श्रेष्ठ संस्कृतीला अनुसरून सत्यकेतूने आपला वृद्धापकाळ समीप आल्याची जाणीव होताच प्रतापभानूला राज्याभिषेक केला व स्वतः भगवत्प्राप्तीसाठी वनात गेला !

राजा प्रतापभानू गादीवर आल्याची सर्वत्र द्वाही फिरली. वेदप्रणीत धर्माने दिलेल्या सर्व आज्ञांचे सादर प्रतिपालन करून तो प्रजापालन करू लागल्यामुळे त्याच्या राज्यात लेशमात्रही पाप उरले नाही. १५३

जणू काही प्रतिशुक्राचार्यच असा राजाच्या हिताला जपणारा धर्मरुचि नावाचा शहाणा सचिव प्रतापभानूला मिळाला, बलाढ्य बंधू, कुशल प्रधान व स्वतः प्रतापशाली रणशूर ! अशा भाग्यवान प्रतापभानूने अफाट चतुरंग सैन्य जमवले. त्यामध्ये रणझुंझार असे अगणित वीर होते. अशी ती सेना पाहून राजाला मोठा आनंद झाला. धडाम्-धडाम्-धम् असा भेरींचा आवाज सुरू झाला. राजाने फौज सज्ज केली व शुभमुहूर्तावर तो नौबतींच्या निनादात दिग्विजयासाठी बाहेर पडला !

अनेक ठिकाणी निकराच्या लढाया होऊन आपल्या बाहुबळाच्या जोरावर त्याने सर्व राजांचा पराभव केला. सप्तद्वीपावरील राजांना आपल्या सामर्थ्याने वश केले व नियमित खंडणी देण्याचे ठरवून मग त्यांना सोडून दिले

तेव्हा सर्व भूमंडलावर प्रतापभानू हाच एकटा सम्राट झाला. याप्रमाणे आपल्या बाहुबलाने अखिल विश्व वश करून राजाने राजधानीत प्रवेश केला. योग्यकाळी धर्म, अर्थ व मुख्यतः काम आदिकरून सर्व सुखाचा तो उपभोग घेऊ लागला. १५४



चौ०—भूप प्रतापभानु बल पाई । कामधेनु भै भूमि सुहाई ।।
सब दुख बरजित प्रजा सुखारी । धरमसील सुंदर नर नारी ।।
सचिव धरमरुचि हरि पद प्रीती । नृप हित हेतु सिखव नित नीती ।।
गुर सुर संत पितर महिदेवा । करइ सदा नृप सब कै सेवा ।।
भूप धरम जे बेद बखाने । सकल करइ सादर सुख माने ।।
दिन प्रति देइ बिबिध बिधि दाना । सुनइ सास्त्र बर बेद पुराना ।।
नाना बापीं कूप तड़ागा । सुमन बाटिका सुंदर बागा ।।
बिप्रभवन सुरभवन सुहाए । सब तीरथन्ह बिचित्र बनाए ।।
दो०—जहँ लगि कहे पुरान श्रुति एक एक सब जाग ।
बार सहस्र सहस्र नृप किए सहित अनुराग ।। १५५ ।।
चौ०—हृदयँ न कछु फल अनुसंधाना । भूप बिबेकी परम सुजाना ।।
करइ जे धरम करम मन बानी । बासुदेव अर्पित नृप ग्यानी ।।
चढि बर बाजि बार एक राजा । मृगया कर सब साजि समाजा ।।
बिंध्याचल गभीर बन गयऊ । मृग पुनीत बहु मारत भयऊ ।।
फिरत बिपिन नृप दीख बराहू । जनु बन दुरेउ ससिहि ग्रसि राहू ।।
बड़ बिधु नहिं समात मुख माहीं । मनहुँ क्रोध बस उगिलत नाहीं ।।

प्रतापभानूसारखा बलाढ्य राजा राज्य करू लागल्यावर पृथ्वी कामधेनू होऊन सर्व शुभकामना पूर्ण करू लागली. प्रजेला मुळीच दुःख न राहता सर्व सुखे प्राप्त झाली. राज्यातील सर्व स्त्री-पुरुष धर्मशील असून लावण्यसंपन्न झाले. सचिव [illegible] धर्मरुची होता. राजाच्या कल्याणाकरिता राजनीतीबरोबरच तो भगवच्चरणी प्रीतीही त्याला नित्य शिकवत असे. ते मानून राजादेखील गुरू, देव, संत, पितर आणि ब्राह्मण यांचे सदोदित पूजन करून त्याची सेवा करीत असे. वेदात जे राजधर्म सांगितले आहेत, त्याचे आदरपूर्वक आचरण करण्यातच राजा सुख मानीत असे.

नित्य नानाप्रकारची तो दाने देई. वेदशास्त्र पुराणांचे श्रवण करी. जागोजागी तलाव, विहिरी व आड पुष्कळ तयार केले. त्याचप्रमाणे पुष्पवाटिका आणि सुंदर सुंदर बागा बनवल्या. सर्व तीर्थांच्या ठिकाणी सुंदर देवालये बांधून, ब्राह्मणांना राहण्यासाठी मनोहर आश्रम तयार केले.

वेद-पुराणात जो जो यज्ञ एकेक वेळ करावा म्हणून वर्णन आहे, तो तो यज्ञ त्याने अत्यंत प्रेमाने हजार हजार वेळेला केला. १५५

विवेकसंपन्न व परमज्ञानी असा राजा असल्याने त्याने हे सर्व कर्म हृदयात फलाकांक्षा न ठेवता केले. काया-वाचा-मनाने आपल्या हातून जे जे धर्माचरण अगर कर्म होई ते ते सर्व तो ज्ञानाच्या भूमिकेवरून वासुदेवार्पण करीत असे.

एके दिवशी शिकारीची चोख तयारी करवून तो उत्तम घोड्यावर बसला आणि विंध्यपर्वताच्या घनदाट अशा वनात शिरला. अनेक प्रकारच्या पवित्र पशूंची त्याने शिकार केली. अशा प्रकारे त्या अरण्यात शिकारीसाठी फिरत असता चंद्राला गिळून जसा राहू बसावा, तसा त्याला एक छपून बसलेला वराह दिसला. जणू काही तोंडात न मावणारा चंद्र त्याला गिळता येईना म्हणून तो संतापला असून ओकण्यासही तयार नाही,

चौ० —कोल कराल दसन छबि गाई । तनु बिसाल पीवर अधिकाई ॥
घुरुघुरात हय आरौ पाएँ । चकित बिलोकत कान उठाएँ ॥

दो० —नील महीधर सिखर सम देखि बिसाल बराहु ।
चपरि चलेउ हय सुटुकि नृप हाँकि न होइ निबाहु ॥ १५६ ॥

चौ० —आवत देखि अधिक रव बाजी । चलेउ बराह मरुत गति भाजी ॥
तुरत कीन्ह नृप सर संधाना । महि मिलि गयउ बिलोकत बाना ॥
तकि तकि तीर महीस चलावा । करि छल सुअर सरीर बचावा ॥
प्रगटत दुरत जाइ मृग भागा । रिस बस भूप चलेउ सँग लागा ॥
गयउ दूरि घन गहन बराहू । जहँ नाहिन गज बाजि निबाहू ॥
अति अकेल बन बिपुल कलेसू । तदपि न मृग मग तजइ नरेसू ॥
कोल बिलोकि भूप बड़ धीरा । भागि पैठ गिरिगुहाँ गभीरा ॥
अगम देखि नृप अति पछिताई । फिरेउ महाबन परेउ भुलाई ॥

दो० —खेद खिन्न छुद्धित तृषित राजा बाजि समेत ।
खोजत ब्याकुल सरित सर जल बिनु भयउ अचेत ॥ १५७ ॥

अशी त्या रानडुकराच्या दातांची शोभा होती. शरीर मोठे व तितकेच ते धष्टपुष्ट ! घोड्याची चाहूल लागताच तो घुर घुर करू लागला व कान टवकारून चकित होऊन इकडे तिकडे पाहू लागला. एखाद्या नीलपर्वतावरील शिखरासारखा तो विशाल रानडुकर नजरेत भरताच राजाने घोडयाला चमकावून टाच दिली व म्हणाला, “ ही असली शिकार आता कोण सोडणार ? बच्चा आता कोठे जाशील ? ” १५६

आपल्या पाठीमागे भरधाव घोडा पिच्छा पुरवत आहे, हे त्या वराहाच्या लक्षात येताच त्यानेही वाऱ्या-प्रमाणे दौड सुरू केली. राजाने धनुष्याला बाण लावून त्याच्यावर शरसंधानास प्रारंभ केला. बाण अंगावर येण्यापूर्वीच तो जमीनसपाट होई. राजाने नेम धरावा व त्या डुकराने युक्ती करून आपला देह वाचवावा; अशाप्रकारे केव्हा लपावे, केव्हा दिसावे, असे करीत करीत तो गहन अरण्यात घुसला. राजाने इरेस पडून त्याची पाठ सोडली नाही.

जेथे हत्ती अगर घोडे यांना प्रवेश करणेच मुष्किल, अत्यंत निर्जन व क्लेशकारक अशा घनदाट अरण्यात अखेर तो डुकर शिरला. पण तेथेही राजाने पाठलाग केला. अत्यंत एकटा, वन अतिशय क्लेशकारक असूनसुद्धा अजूनही राजा आपला पिच्छा पुरवत आहे, हे राजाचे धैर्य पाहून झटकन् एका पर्वताच्या खोल अंधाऱ्या गृहेत तो रानडुकर घुसला ! अशा भयंकर गुहेत शिरणे सर्वस्वी अशक्य हे समजताच राजा चिंतेने व्याकुळ झाला. त्याने आपल्या घोड्याला परत फिरवला; पण वन घनदाट असल्याने त्याला भूल पडून रस्ता चुकला.

राजा व त्याचा घोडा अत्यंत दमलेले. त्यांना तहान व भूक लागून त्याचा जीव कासावीस झालेला ! एखादी नदी, एखादा तलाव कुठे तरी शोधून काढावा म्हणून बिचारा घोडयासह वणवण करीत फिरला, पण पाण्याचा थेंबही दिसेना, त्यामुळे तो अत्यंत कासावीस झाला ! १५७



चौ० – फिरत बिपिन आश्रम एक देखा । तहँ बस नृपति कपट मुनिबेषा ।।
जासु देस नृप लीन्ह छड़ाई । समर सेन तजि गयउ पराई ।।
समय प्रतापभानु कर जानी । आपण अति असमय अनुमानी ।।
गयउ न गृह मन बहुत गलानी । मिला न राजहि नृप अभिमानी ।।
रिस उर मारि रंक जिमि राजा । बिपिन बसइ तापस कें साजा ।।
तासु समीप गवन नृप कीन्हा । यह प्रतापरबि तेहिं तब चीन्हा ।।
राउ तृषित नहिं सो पहिचाना । देखि सुबेष महामुनि जाना ।।
उतरि तुरग तें कीन्ह प्रनामा । परम चतुर न कहेउ निज नामा ।।

दो० –भूपति तृषित बिलोकि तेहिं सरबरु दीन्ह देखाइ ।
मज्जन पान समेत हय कीन्ह नृपति हरषाइ ।। १५८ ।।

चौ० – गै श्रम सकल सुखी नृप भयऊ । निज आश्रम तापस लै गयऊ ।।
आसन दीन्ह अस्त रबि जानी । पुनि तापस बोलेउ मृदु बानी ।।
को तुम्ह कस बन फिरहु अकेलें । सुंदर जुबा जीव परहेलें ।।
चक्रबर्ति के लच्छन तोरें । देखत दया लागि अति मोरें ।।
नाम प्रतापभानु अवनीसा । तासु सचिव मैं सुनहु मुनीसा ।।
फिरत अहेरें परेउँ भुलाई । बड़ें भाग देखेउँ पद आई ।।

इतक्यात त्याला एक आश्रम दिसला ! त्यात मुनीच्या वेषात एक कपटी राजा बसला होता. आपल्या देशावर प्रतापभानूचे अटळ आक्रमण पाहून त्याने सैन्य व समर सोडून पळ काढला होता. प्रतापभानूचा काळ चालता व आपला फिरलेला पाहून तो मनात अत्यंत खेद पावला. त्या स्थितीत त्या स्वाभिमानी राजाने परत घराचाही रस्ता धरला नाही अगर प्रतापभानूबरोबर तहही केला नाही. आपला सगळा संताप हृदयात सांठवून, एखाद्या दरिद्री तपस्व्याप्रमाणे मुनी बनून तो या आश्रमात दिवस कंठीत बसला होता !

त्याच्याजवळ प्रतापभानू येताच त्याने चटकन् त्याला ओळखले. तहानेने कासावीस झालेल्या या राजाला मात्र त्या कपटी मुनीबद्दल काहीच शंका न येता त्याच्या पावन वेषावरून त्याला, तो राजा महर्षी समजला. घोड्यावरून खाली उतरताच त्याने त्याला वंदन केले. राजाने चातुर्याने आपले नाव मात्र त्या कपटी मुनीला मुळीच सांगितले नाही.

तहानेने व्याकूळ झालेला राजा पाहून त्या मुनीने राजाला तलाव दाखवला. आपल्या घोड्यासह राजाने त्या पाण्यात यथेच्छ स्नान व पान करून तो समाधान पावला. १५८

त्याचे सर्व श्रम परिहार झालेले पाहिल्यानंतर त्या मुनीने त्याला आपल्या आश्रमात आणले. सूर्यास्त-समय झाल्याने त्याला आसन देऊन तो कोमल वाणीने बोलू लागला, " तुम्ही कोण ? या अरण्यात एकटेच कसे फिरत आहा ? एवढे लावण्य व एवढे सौंदर्य असता जिवावर उदार का बरे झाला ? तुमच्या ठिकाणी मला चक्रवर्तीची सर्व चिन्हे स्पष्ट दिसत असल्याने तुमच्याबद्दल माझे अंतःकरण दयेने भरून आले आहे ! "

" हे मुनिश्रेष्ठा ! सांगतो ऐका. " प्रतापभानू बोलू लागला, " प्रतापभानू नावाचा पृथ्वीपती आहे. त्याचा मी प्रधान. शिकारीसाठी वनात फिरत असता वाट चुकलो. खरोखर माझे मोठे भाग्य म्हणूनच आपल्या

चौ०– हम कहँ दुर्लभ दरस तुम्हारा । जानत हौं कछु भल होनिहारा ॥
कह मुनि तात भयउ अँधिआरा । जोजन सत्तरि नगरु तुम्हारा ॥
दो०– निसा घोर गंभीर बन पंथ न सुनहु सुजान ।
बसहु आजु अस जानि तुम्ह जाइहु होत बिहान ॥ १५९ ॥ (क) ॥
तुलसी जसि भवतब्यता तैसी मिलइ सहाइ ।
आपुनु आवइ ताहि पहिं ताहि तहाँ लै जाइ ॥ १५९ ॥ (ख)
चौ०– भलेहिं नाथ आयसु धरि सीसा । बाँधि तुरग तरु बैठ महीसा ॥
नृप बहु भाँति प्रसंसेउ ताही । चरन बंदि निज भाग्य सराही ॥
पुनि बोलेउ मृदु गिरा सुहाई । जानि पिता प्रभु करउँ ढिठाई ॥
मोहि मुनीस सुत सेवक जानी । नाथ नाम निज कहहु बखानी ॥
तेहि न जान नृप नृपहि सो जाना । भूप सुहृद सो कपट सयाना ॥
बैरी पुनि छत्री पुनि राजा । छल बल कीन्ह चहइ निज काजा ॥
समुझि राजसुख दुखित अराती । अवाँ अनल इव सुलगइ छाती ॥

चरणदर्शनास आलो. माझा काही तरी भाग्योदय निकट असला पाहिजे ! नाहीतरी आमच्यासारख्यांना आपले दर्शन कुठले शक्य ?"

"बाळा !" मध्येच तो मुनी म्हणतो, "आता काळोख पडला. तुमची नगरी येथून सत्तर योजने राहिली ! रात्र गाढ अंधकाराची, गर्द झाडी, जाणत्यालासुद्धा वाट सापडणे कठीण ! आजची रात्र, ही अडचण ओळखून राहा, पहाट होताच रस्ता धरण्यास हरकत नाही !" १५९ (क)

तुलसीदास म्हणतात, "जशी होणारी घटना असेल, तिला अनुसरून सहाय्य मिळत जाते. एक तो भवितव्यताच आपणहून त्याच्याकडे चालत येते, नाहीतर त्याला आपल्याकडे घेऊन जाते. १५९ (ख)

"ठीक आहे नाथ ! आपली आज्ञा शिरसावंद्य आहे," असे उत्तर राजाने दिले. झाडाला घोडा बळकट बांधला; आणि आश्रमात येऊन तो आसनावर बसला.

राजाने त्या मुनीच्या चरणी मस्तक नमवून अनेक प्रकारे स्तुती केली व त्यांच्या दर्शनाने आपण कसे मोठे भाग्यवान झालो तेही सांगितले.

राजा क्रमशः अधिकाधिक मधुर व आदरयुक्त बोलू लागला, प्रभू ! मी आपणाला माझ्या वडिलांच्या स्थानी मानून बोलण्याचे धाडस करतो. हे मुनिश्रेष्ठा ! आपण मला आपल्या मुलाप्रमाणे या चरणांच्या दासाप्रमाणे मानावे. नाथ ! आपले नाव काय ?"

त्या कपटी मुनीने पहिल्याच क्षणाला राजाला बरोबर ओळखले होते, पण त्याच्याबरोबर उलटी परिस्थिती या राजाची होती. त्याला या कपटी व वैरी राजाचा नुसता संशयसुद्धा आला नाही. राजा शुद्ध हृदयाचा आणि तो कपटपटू ! एक वैरी, जातीचा क्षत्रिय आणि त्यात पुनः राजा ! कपटाच्या जोरावर आपला हेतू साधण्याचे त्याने योजले.

आपल्या पूर्वीच्या राज्यवैभवाचे त्याला स्मरण होऊन दुःख झाले. त्या वैभवाची राखरांगोळी करणारा हाच प्रतापभानू, या जाणीवेने कुंभाराच्या आव्याप्रमाणे (बाहेर न दिसणारा पण आत धगधगणारा) त्याच्या

सरल बचन नृप के सुनि काना । बयर सँभारि हृदयँ हरषाना ॥
दो०– कपट बोरि बानी मृदुल बोलेउ जुगुति समेत ।
नाम हमार भिखारि अब निर्धन रहित निकेत ॥ १६० ॥
चौ०– कह नृप जे बिग्यान निधाना । तुम्ह सारिखे गलित अभिमाना ॥
सदा रहहिं अपनपौ दुराएँ । सब बिधि कुसल कुबेष बनाएँ ॥
तेहि तें कहहिं संत श्रुति टेरें । परम अकिंचन प्रिय हरि केरें ॥
तुम्ह सम अधन भिखारि अगेहा । होत बिरंचि सिवहि संदेहा ॥
जोसि सोसि तव चरन नमामी । मो पर कृपा करिअ अब स्वामी ॥
सहज प्रीति भूपति कै देखी । आपु बिषय बिस्वास बिसेषी ॥
सब प्रकार राजहि अपनाई । बोलेउ अधिक सनेह जनाई ॥
सुनु सतिभाउ कहउँ महिपाला । इहाँ बसत बीते बहु काला ॥
दो०– अब लगि मोहि न मिलेउ कोउ मैं न जनावउँ काहु ।
लोकमान्यता अनल सम कर तप कानन दाहु ॥ १६१ ॥ (क) ॥
सो०– तुलसी देखि सुबेषु भूलहिं मूढ़ न चतुर नर ।
सुंदर केकिहि पेखु बचन सुधा सम असन अहि ॥ १६१ ॥ (ख)

अंतःकरणात संतापाचा भडका उडाला!! राजाचे ते सरळ भाषण कानावर पडताच मागील वैर मनात येऊन त्याला हर्ष वाटला.

आता त्याने कपटमिश्र, मधुर भाषण युक्तिपूर्वक करण्यास सुरवात केली. "आमचे नाव होय, भिकारी! आता ना घर ना पैसा !" १६०

राजा म्हणतो, 'आपल्यासारखे जे विज्ञाननिधान व अभिमानरहित असतात, ते नेहमीच आपले खरे स्वरूप लपवतात व कुवेषात गुप्त राहून सुखाने कालक्रमणा करतात ! एवढ्याचकरिता संत व वेद टाहो फोडून सांगतात की जे परम अकिंचन (अहंकार) ममता व मद सर्वस्वी नसलेले, तेच भगवंताला परमप्रिय होतात ! आपल्यासारखे निर्धन, भिकारी व गृहहीन पाहून ब्रह्मदेव व शिवही गोंधळात पडतील, आपण खरेच भिकारी का संत ? हेच त्यांना कळत नाही. स्वामिन् आपण कोणीही असा, मी आपले चरणी वंदन करत आहे, माझ्यावर कृपा करा!'

आपल्यावरील राजाचे मनापासूनचे प्रेम पाहिले, त्यातल्या त्यात स्वतःवरील विशेष विश्वास अनुभवला; मग राजाला अनेक प्रकारांनी त्याने आपलासा करून घेतला व वरवर खरे प्रेम दाखवून तो म्हणाला, "राजा; तुला आता खरे सांगू? ऐक. आम्ही येथे राहात आहो, त्याला फार काळ लोटला. आमच्याकडे कोणी आले नाही! आम्हीही स्वतःहून प्रकट झालो नाही. अरे बाळा! लोकमान्यता हा एक अग्नी आहे. त्याने तपस्यारूपी सर्व वन दग्ध होऊन जाते." १६१ (क)

तुलसीदास म्हणतात, "सुंदर वेष पाहून मूढच केवळ फसत नाही, [मूर्ख तो मूर्खच आहे] मी मी म्हणणारे शहाणेसुद्धा धोक्यात पडतात! सुंदर मोर पाहा. किती चांगला दिसतो ! त्याच्या केका किती अमृताप्रमाणे आकर्षक ! पण खातो काय ?–साप ! हे लक्षात ठेव. १६१ (ख)



चौ० –तातें गुपुत रहउँ जग माहीं । हरि तजि किमपि प्रयोजन नाहीं ॥
प्रभु जानत बस बिनहि जनाएँ । कहहु कवनि सिधि लोक रिझाएँ ॥
तुम्ह सुचि सुमति परम प्रिय मोरें । प्रीति प्रतीति मोहि पर तोरें ॥
अब जौं तात दुरावउँ तोही । दारुन दोष घटइ अति मोही ॥
जिमि जिमि तपसु कथइ उदासा । तिमि तिमि नृपहि उपज बिस्वासा ॥
देखा स्वबस कर्म मन बानी । तब बोला तापस बगध्यानी ॥
नाम हमार एकतनु भाई । सुनि नृप बोलेउ पुनि सिरु नाई ॥
कहहु नाम कर अरथ बखानी । मोहि सेवक अति आपन जानी ॥

दो० –आदिसृष्टि उपजी जबहिं तब उतपति भै मोरि ।
नाम एकतनु हेतु तेहि देह न धरी बहोरि ॥ १६२ ॥

चौ० –जनि आचरजु करहु मन माहीं । सुत तप तें दुर्लभ कछु नाहीं ॥
तपबल तें जग सृजइ बिधाता । तपबल बिष्नु भए परित्राता ॥
तपबल संभु करहिं संघारा । तप तें अगम न कछु संसारा ॥
भयउ नृपहि सुनि अति अनुरागा । कथा पुरातन कहै सो लागा ॥
करम धरम इतिहास अनेका । करइ निरूपन बिरति बिबेका ॥
उद्‌भव पालन प्रलय कहानी । कहेसि अमित आचरज बखानी ॥

बाबारे ! लोकमान्यता तपनाश करते. एवढ्याचसाठी आम्ही अरण्यात गुप्तपणे वास्तव्य करतो. भगवंताशिवाय आम्हाला दुसरे काय साध्य? न सांगता भगवंताला सर्व काही कळते. जनरंजन करून काय मिळणार, सांग बरं! तुझी सरळ बुद्धी व पवित्र अंतःकरण पाहून माझे तुझ्यावर फार प्रेम बसले आहे; आणि तुला प्रतीती आल्यामुळे माझ्यावर तुझीही निष्ठा अढळ झाली आहे.

अशा स्थितीत तुझ्यापासून जर मी काही लपवून ठेवीन तर बाळा मला फार मोठे पाप लागेल!

याप्रमाणे त्या तपस्व्याची जशी जशी विरक्तीची भाषा अधिकाधिक सुरू झाली, तशी तशी राजाची श्रद्धा त्याच्या ठिकाणी वाढू लागली. कर्ममनवचनाने हे सावज आता पूर्णपणे आपल्या तावडीत सापडले आहे, अशी पूर्ण खात्री झाल्यावर तो बकध्यानी तापस पुनः साखर पेरू लागला, "बाळा! आमचे नाव एकतनू बरं!"

लगेच चरणावर मस्तक ठेवून राजा हात जोडून विनवतो, " महाराज, आपल्या चरणाचा याला एकनिष्ठ सेवक समजून या नामाचा मला अर्थ सांगावा. " त्यावर तो दांभिक सांगू लागला.

" आदिसृष्टी झाली ना ? तेव्हा आमची उत्पत्ती झाली. पुनः देहच धारण केला नाही म्हणून 'एकतनू' असे नाव पडले. १६२

असा नावाच्या अर्थाचा खुलासा करून स्वारी पुढे पुस्ती जोडते, " यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही बाळ ! तपस्येला दुर्लभ असे काय आहे ? तपाच्याच बळाने ब्रह्मदेव सृष्टी रचतात, तिचे पालन तपोबलावरच विष्णू करतात, आणि अखेर तपाच्याच जोरावर त्या विश्वाचा संहार शंकर करतात. तात्पर्य, या जगात तपाला असाध्य असे काहीच नाही ! "

राजा अगदी लय लावून श्रवण करीत असल्याचे पाहून त्याने पुरातन कथा सांगितल्या. धर्म-कर्म इतिहासांचे विविध स्वरूपात निरूपण केले. ज्ञानवैराग्याचे साधार विवेचन झाले. सृष्टीच्या उत्पत्तिस्थितिलयाची कहाणी सांगून अगणित आश्चर्यकारक गोष्टी त्याने चटकदारपणे सांगितल्या.



सुनि महीप तापस बस भयउ । आपन नाम कहन तब लयऊ ।।
कह तापस नृप जानउँ तोही । कीन्हेहु कपट लाग भल मोही ।।

सो० – सुनु महीस असि नीति जहँ तहँ नाम न कहहिं नृप ।
मोहि तोहि पर अति प्रीति सोइ चतुरता बिचारि तव ।। १६३ ।।

चौ० – नाम तुम्हार प्रताप दिनेसा । सत्यकेतु तव पिता नरेसा ।।
गुर प्रसाद सब जानिअ राजा । कहिअ न आपन जानि अकाजा ।।
देखि तात तव सहज सुधाई । प्रीति प्रतीति नीति निपुनाई ।।
उपजि परी ममता मन मोरें । कहउँ कथा निज पूछे तोरें ।।
अब प्रसन्न मैं संसय नाहीं । मागु जो भूप भाव मन माहीं ।।
सुनि सुबचन भूपति हरषाना । गहि पद बिनय कीन्हि बिधि नाना ।।
कृपासिंधु मुनि दरसन तोरें । चारि पदारथ करतल मोरें ।।
प्रभुहि तथापि प्रसन्न बिलोकी । मागि अगम बर होउँ असोकी ।।

दो० – जरा मरन दुख रहित तनु समर जितै जनि कोउ ।
एकछत्र रिपुहीन महि राज कलप सत होउ ।। १६४ ।।

या सर्वांची मोहिनी पडून राजा त्या तपस्व्याला चांगलाच भाळला आणि त्याने आपले खरे नाव सांगितले; त्याबरोबरच तो म्हणतो, " राजा, अरे तुला पहिल्याच दृष्टिक्षेपात आम्ही ओळखले. तू जे कपट-नीतीने खोटे बोललास त्यामुळे तुझा राग न येता आम्हाला तुझे कौतुकच वाटले.

कारण हे महीशा ! तुला राजनीती सांगतो. ऐक. राजेलोक आपले नाव, वाटेल त्या अपरिचित ठिकाणी मुळीच सांगत नाहीत. तीच सावधगिरी तू बिनचूक घेतलेली पाहून तुझ्या चातुर्याबद्दल आम्हाला फारच प्रेम वाटले ! १६३

अरे ! तुझे नाव प्रतापभानू तुझा बाप सत्यकेतू राजा ! हे नृपते ! आम्हाला सर्व काही अंतर्ज्ञान सद्गुरु कृपेने होते. पण तपस्येचा नाश होतो म्हणून आम्ही काही बोलत नाही इतकेच ! तुझा स्वाभाविक सरळपणा, तुझी श्रद्धा, आमच्याविषयीचा आदर, राजनीतीतील तुझे नैपुण्य इत्यादि पाहून आमच्या अंतः-करणात तुझ्याबद्दलचे प्रेम उत्पन्न झाले, आणि तू विचारल्यावरून आम्ही आपली हकीकत तुला थोडक्यात सांगितली.

" तुझ्यावर आम्ही पूर्ण प्रसन्न आहो. तुला जे आवडेल ते आता खुशाल मागून घे. "

हे शब्द कानावर पडताच राजाचा हर्ष गगनात मावेना. त्याने कपटी राजाच्या पुनः पदकमली मिठी मारून अनेक प्रकारे विनवणी सुरू केली, " हे कृपासिंधो, आपल्या चरणदर्शनाबरोबरच चारी पुरुषार्थ माझ्या हातात आले आहेत. असे असले तरीही प्रभू प्रसन्नच झाले आहेत तर अत्यंत दुर्लभ असा वर मागून दुःखाचे पूर्ण निर्मूलन का करू नये ? मागतोच तसा वर—वार्धक्य, मरण व रोगांचे दुःख याचा संपर्क नसलेले शरीर मला मिळावे, रणांगणात माझा पराभव कधीच होऊ नये, शत्रुविहीन, एकछत्री सम्राट म्हणून मी शंभरकल्प * पर्यंत राज्यसुख भोगावे, असा वर द्या ! " १६४

*[१००×८ अब्ज ६४ कोटी वर्षे=कल्प.]

चौ० — कह तापस नृप ऐसेइ होऊ। कारन एक कठिन सुनु सोऊ ॥
कालउ तुअ पद नाइहि सीसा। एक बिप्रकुल छाड़ि महीसा ॥
तपबल बिप्र सदा बरिआरा। तिन्ह के कोप न कोउ रखवारा ॥
जौं बिप्रन्ह बस करहु नरेसा। तौ तुअ बस बिधि बिष्नु महेसा ॥
चल न ब्रह्मकुल सन बरिआई। सत्य कहउँ दोउ भुजा उठाई ॥
बिप्र श्राप बिनु सुनु महिपाला। तोर नास नहि कवनेहुँ काला ॥
हरषेउ राउ बचन सुनि तासू। नाथ न होइ मोर अब नासू ॥
तव प्रसाद प्रभु कृपानिधाना। मो कहुँ सर्ब काल कल्याना ॥

दो० — एवमस्तु कहि कपटमुनि बोला कुटिल बहोरि।
मिलब हमार भुलाब निज कहहु त हमहि न खोरि ॥ १६५ ॥

चौ० — तातें मैं तोहि बरजउँ राजा। कहें कथा तव परम अकाजा ॥
छठें श्रवन यह परत कहानी। नास तुम्हार सत्य मम बानी ॥
यह प्रगटें अथवा द्विजश्रापा। नास तोर सुनु भानुप्रतापा ॥
आन उपायँ निधन तव नाहीं। जौं हरि हर कोपहि मन माहीं ॥
सत्य नाथ पद गहि नृप भाषा। द्विज गुर कोप कहहु को राखा ॥
राखइ गुर जौं कोप बिधाता। गुर बिरोध नहिं कोउ जग त्राता ॥
जौं न चलब हम कहे तुम्हारें। होउ नास नहिं सोच हमारें ॥

तपस्वी म्हणतो, ' हे सर्व असे खास होईल. पण त्याला एक अडचण आहे. ब्राह्मण कुल सोडून, हे महीशा! प्रत्यक्ष काळसुद्धा तुझ्यापुढे मान वाकवील. परंतु तपाच्यामुळे ब्राह्मणांना फार शक्ती येते. त्यांच्या कोपातून सोडविणारा कोणीही नाही. म्हणून, नरेश! तू जर विप्रांना वश केलेस तर ब्रह्माविष्णू-महेश तुझ्या अंकित झालेच म्हणून समज! खरोखर अगदी प्रतिज्ञापूर्वक तुला सांगतो की, [illegible] कोणाचीच मात चालणार नाही! ब्राह्मणाच्या शापाखेरीज नृपाळा! तुझा नाश कोणत्याही काळी होणार नाही."

हे त्या तपस्व्याचे भाषण ऐकून राजा संतुष्ट झाला. " नाथ आता माझा नाश मुळीच होणार नाही. हे प्रभो! आपण कृपासागर, असताना आपल्या कृपेच्या योगाने माझे सतत कल्याणच होणार!"

तथास्तु! म्हणून तो कपटी कुटिल मुनी पुनः म्हणतो, ' वनात तुझा रस्ता चुकणे, माझी भेट होणे या गोष्टी जर तू कोठे बोललास तरी माझी ही वाणी खरी ठरणार नाही. मग मला दोष देऊ नकोस. १६५

हे वर्ज्य म्हणून तुला मुद्दाम सांगण्याचे कारण, जर तू हे बोललास तर तुझे फार अकल्याण होईल. जर का तुझी वाणी षटकर्णी पडली तर तुझा नाश झालाच म्हणून समज! एक ब्राह्मणाचा शाप, किंवा एक ही गुप्त गोष्ट फुटणे या दोन कारणांनी, प्रतापभानू! तुझा नाश होईल. हे लक्षात ठेव. या खेरीज मात्र प्रत्यक्ष हरिहर कोपले तरीही तुझा नाश होणे शक्य नाही!"

राजाने कपटी मुनीचे पाय पुनः धरले. तो म्हणतो, " नाथ! अगदी खरे! द्विज व गुरू कोपल्यावर कोणी तरी रक्षण करील काय? विधाता रागावला तर गुरू रक्षण करतात, पण गुरूच विरोधी झाले तर जगात कोणीच त्राता नाही, हे अगदी उघड आहे. प्रभो! मी जर ही आपली आज्ञा पाळली नाही, तर माझा खुशाल नाश होवो, त्याची मला मुळीच फिकीर नाही! पण, प्रभो! एक मात्र मला मोठी भीती वाटते. ब्राह्-

चौ० – एकहि डर डरपत मन मोरा । प्रभु महिदेव श्राप अति घोरा ॥

दो० – होहिं बिप्र बस कवन बिधि कहहु कृपा करि सोउ ॥
तुम्ह तजि दीनदयाल निज हितू न देखउँ कोउ ॥ १६६ ॥

चौ० – सुनु नृप बिबिध जतन जग माहीं । कष्टसाध्य पुनि होहिं कि नाहीं ॥
अहइ एक अति सुगम उपाई । तहाँ परंतु एक कठिनाई ॥
मम आधीन जुगुति नृप सोई । मोर जाब तव नगर ग होई ॥
आजु लगें अरु जब तें भयउँ । काहू के गृह ग्राम न गयउँ ॥
जौं न जाउँ तव होइ अकाजू । बना आइ असमंजस आजू ॥
सुनि महीस बोलेउ मृदु बानी । नाथ निगम असि नीति बखानी ॥
बड़े सनेह लघुन्ह पर करहीं । गिरि निज सिरनि सदा तृन धरहीं ॥
जलधिं अगाध मौलि बह फेनू । संतत धरनि धरत सिर रेनू ॥

दो० – अस कहि गहे नरेस पद स्वामी होहु कृपाल ।
मोहि लागि दुख सहिअ प्रभु सज्जन दीनदयाल ॥ १६७ ॥

चौ० – जानि नृपहि आपन आधीना । बोला तापस कपट प्रबीना ॥
सत्य कहउँ भूपति सुनु तोही । जग नाहिन दुर्लभ कछु मोही ॥
अवसि काज मैं करिहउँ तोरा । मन तन बचन भगत तैं मोरा ॥
जोग जुगुति तप मंत्र प्रभाऊ । फलइ तबहिं जब करिअ दुराऊ ॥

णांचा शाप खरोखर मोठा भयंकर ! हे दीनदयाळा ! असे हे ब्राह्मण, मला कसे वश होतील ते कृपा करून सांगा. या जगात तुमच्याशिवाय माझे हित करणारा दुसरा कोणी दिसत नाही." १६६

"हे भूपाळा !" कपटी मुनी स्पष्टीकरण करतो, "याकरिता जगात नाना प्रकारचे उपाय आहेत. ते कष्टसाध्य असून ते सफल होतीलच अशी खात्री नाही. एक अगदी सोपे साधन आहे पण त्यालाही एक मोठी अडचण आहे. कारण ती युक्ती आमच्या स्वाधीन आहे. आणि तुझ्या नगरीत तर आमचे गमन होणार नाही ! जन्मल्यापासून आजपर्यंत कोणाच्याही घरी किंवा गावात आम्ही गेलो नाही. परंतु आता जर नाही गेलो तर तुझी मोठी हानी होणार ! केवढे मोठें संकट पुढे येऊन ठाकले पाहा बरं !"

हे ऐकून राजा कोमलवाणीने म्हणतो, "नाथ ! वेदात अशी नीती सांगितली आहे की, थोर नेहमीच पोरावर प्रेम करतात, पर्वत नेहमी आपल्या मस्तकावर तृण धारण करतात. अगाध जलधी आपल्या पृष्ठावरून फेस वाहातो, पृथ्वी आपल्या शिरावर धूळ धारण करते, असे म्हणून राजाने त्या मुनीच्या पायांना पुनः मिठी मारली व कळवळून प्रार्थना करू लागला, "स्वामिन् ! कृपाळू व्हा. हे प्रभो ! एवढे कष्ट माझ्यासाठी सहन करा ! आपण सज्जन व दीनदयाळू आहात !" ॥ १६७ ॥

राजा पूर्णपणे पाशात सापडला हे पाहून, कपटात पटाईत असा तो तपस्वी मुनी म्हणतो, "भूपते ! तुला खरेच सांगतो, मला दुष्कर असे जगात काहीच नाही. तू माझा, कायावाचा मनाने भक्त असल्यामुळे मी हे तुझे कार्य अवश्य करीन. योग, युक्ती, तप व मंत्र यांची शक्ती सफल होण्यास ती गुप्त ठेवावी लागते.

चौ० —जौं नरेस मैं करौं रसोई । तुम्ह परुसहु मोहि जान न कोई ॥
अन्न सो जोइ जोइ भोजन करई । सोइ सोइ तव आयसु अनुसरई ॥
पुनि तिन्ह के गृह जेवँइ जोऊ । तव बस होइ भूप सुनु सोऊ ॥
जाइ उपाय रचहु नृप एहू । संबत भरि संकलप करेहू ॥

दो० —नित नूतन द्विज सहस सत बरेहु सहित परिवार ।
मैं तुम्हरे संकलप लगि दिनहिं करबि जेवनार ॥ १६८ ॥

चौ० —एहि बिधि भूप कष्ट अति थोरें । होइहहिं सकल बिप्र बस तोरें ॥
करिहहिं बिप्र होम मख सेवा । तेहिं प्रसंग सहजेहिं बस देवा ॥
और एक तोहि कहउँ लखाऊ । मैं एहि बेष न आउब काऊ ॥
तुम्हरे उपरोहित कहुँ राया । हरि आनब मैं करि निज माया ॥
तपबल तेहि करि आपु समाना । रखिहउँ इहाँ बरष परवाना ॥
मैं धरि तासु बेषु सुनु राजा । सब बिधि तोर सँवारब काजा ॥
गै निसि बहुत सयन अब कीजे । मोहि तोहि भूप भेंट दिन तीजे ॥
मैं तपबल तोहि तुरग समेता । पहुँचैहउँ सोवतहि निकेता ॥

दो० —मैं आउब सोइ बेषु धरि पहिचानेहु तब मोहि ।
जब एकांत बोलाइ सब कथा सुनावौं तोहि ॥ १६९ ॥

चौ० —सयन कीन्ह नृप आयसु मानी । आसन जाइ बैठ छलग्यानी ॥
श्रमित भूप निद्रा अति आई । सो किमि सोव सोच अधिकाई ॥

" हे नरेश ! मी जर अन्न शिजविले व तू जर वाढले व मला कोणीच ओळखले नाही तर असे अन्न जे जे खातील, ते ते तुझी आज्ञा पालन करतील. इतकेच नव्हे अशांच्या घरी पुनः जे जेवतील तेसुद्धा तुला वश होतील. तू आता येथून राजधानीत गेल्यावर हाच उपाय करून एक वर्षभर असे ब्राह्मण-भोजन घालण्याचा संकल्प कर.

" सहकुटुंब सहपरिवार नित्य नवे एक लक्ष ब्राह्मण बोलावावयाचे आणि तू संकल्प सोडल्याप्रमाणे तेवढे दिवस [एक वर्ष] मी स्वयंपाक करणार ! " १६८

याप्रमाणे, थोडया कष्टाने सर्व ब्राह्मण तुला वश होतील. यज्ञ, होम, पूजा व स्तुती इत्यादि साधनांनी देवांना द्विज सहज प्रसन्न करून घेतात.

" आणखी एक गोष्ट लक्षात ठेव. मी या वेषात येणार नाही हं ! आपल्या मायेने तुमच्या उपाध्येबुवांना मी पळवून इकडे आणीन. तपाच्या सामर्थ्याने त्याला माझे रूप देऊन एक वर्षपर्यंत येथे ठेवीन. आणि त्याचे रूप मी घेऊन तुझे कार्य सर्वप्रकारे सांगरीतीने पार पाडीन ! समजले ? "

" उठ आता बाळा ! रात्र फार झाली. नीज बरं ! आजपासून तिसऱ्या दिवशी तुला येऊन भेटेन. तुला झोपेतच घोडयासह, तुझ्या घरी तपाच्या सामर्थ्याने पोचवीन. उपाध्याच्या रूपाने येऊन तुला एकांतात बोलावून हीच कथा सांगेन, तेव्हाच मी आलो आहे असे ओळख. १६९.

मुनींची आज्ञा प्रमाण मानून राजा स्वस्थानी जाऊन निजला आणि तो कपटपटू आपल्या आसनावर बसला. राजा खूप दमला असल्याने त्याला गाढ झोप लागली, पण त्या मुनीला काळजी जाळत असल्याने

चौ ०—कालकेतु निसिचर तहँ आवा। जेहिं सूकर होइ नृपहि भुलावा ॥
परम मित्र तापस नृप केरा। जानइ सो अति कपट घनेरा ॥
तेहि के सत सुत अरु दस भाई। खल अति अजय देव दुखदाई ॥
प्रथमहिं भूप समर सब मारे। बिप्र संत सुर देखि दुखारे ॥
तेहिं खल पाछिल बयरु सँभारा। तापस नृप मिलि मंत्र बिचारा ॥
जेहिं रिपु छय सोइ रचेन्हि उपाऊ। भावी बस न जान कछु राऊ ॥
दो—० रिपु तेजसी अकेल अपि लघु करि गनिअ न ताहु।
अजहुँ देत दुख रबि ससिहि सिर अवसेषित राहु ॥ १७० ॥

चौ ०—तापस नृप निज सखहि निहारी। हरषि मिलेउ उठि भयउ सुखारी ॥
मित्रहि कहि सब कथा सुनाई। जातुधान बोला सुख पाई ॥
अब साधेउँ रिपु सुनहु नरेसा। जौं तुम्ह कीन्ह मोर उपदेसा ॥
परिहरि सोच रहहु तुम्ह सोई। बिनु औषध बिआधि बिधि खोई ॥
कुल समेत रिपु मूल बहाई। चौथें दिवस मिलब मैं आई ॥
तापस नृपहि बहुत परितोषी। चला महाकपटी अतिरोषी ॥
भानुप्रतापहि बाजि समेता। पहुँचाएसि छन माझ निकेता ॥
नृपहि नारि पहिं सयन कराई। हयगृहँ बाँधेसि बाजि बनाई ॥

त्याला कुठली झोप ? इतक्यात रानडुकराच्या रूपाने ज्याने राजाला भुलवून गहन अरण्यात आणले होते, तो कालकेतू नावाचा राक्षस तेथे आला.

या तपस्वी मुनीचा परममित्र कपटविद्येत याच्यापेक्षा पटाईत ! या कालकेतूचे शंभर मुलगे व दहा भाऊ हे अत्यंत दुष्ट, देवांना दुःख देणारे व अजिंक्य होते. विप्र, देव व संत यांचा त्याने चालवलेला छळ पाहून प्रतापभानूने पहिल्या स्वारीतच त्यांना ठार केले ! हे पूर्वीचे वैर मनात ठेऊन त्याने या कपटी मुनि-वेषातील राजाशी मैत्री करून कारस्थान रचले.

आपल्या शत्रूच्या नाशासाठी ही त्यांनी युक्ती केली, पण भवितव्यतेला वश झाल्यामुळे राजाच्या ध्यानी ते मुळीच आले नाही. खरेच आहे ! तेजस्वी असा एक जरी शत्रु असला तरी त्याला क्षुद्र समजू नये. केवळ डोके शिल्लक राहिलेला राहू रविचंद्रांना अजून छळत आहे ना ? १७०.

कालकेतू राक्षस आपला जिवलग मित्र, आलेला दिसताच तापस नृपाने आनंदाने उठून त्याला भेट दिली त्याला तेव्हा केवढे सुख झाले ! आपल्या मित्राला त्याने सर्व ताजी बातमी दिली. राक्षसाचे समाधान होऊन तो म्हणतो, " तुम्ही माझा उपदेश मानला. राजा ! शत्रूला आता मारलाच म्हणून समज ! सगळी चिंता सोडून स्वस्थ झोप. सुदैवाने सुंठीवाचूनच खोकला गेला ! नृपाचा वंशवृक्ष कुळासहित समूळ उपटून आजपासून चौथ्या दिवशी तुला येऊन भेटेन. "

याप्रमाणे त्या तापसनृपाला चांगले खूष करून तो महाकपटी केतू व संतापी कालकेतू राक्षस आपल्या पुढील कामाला लागला. एका क्षणात त्याने घोड्यासह प्रतापभानूला त्याच्या राजवाड्यात पोचवले. राणीच्या शेजारी राजाला निजवून पागेत घोड्याला त्याच्याच खुंट्याला घट्ट बांधला. नंतर राजाच्या उपाध्येबुवांना एकदम

दो०—राजा के उपरोहितहि हरि लै गयउ बहोरि ।
लै राखेसि गिरि खोह महुँ मायाँ करि मति भोरि ॥ १७१ ॥

चौ०—आपु बिरचि उपरोहित रूपा । परेउ जाइ तेहि सेज अनूपा ॥
जागेउ नृप अनभएँ बिहाना । देखि भवन अति अचरजु माना ॥
मुनि महिमा मन महुँ अनुमानी । उठेउ गवँहि जेहिं जान न रानी ॥
कानन गयउ बाजि चढ़ि तेहीं । पुर नर नारि न जानेउ केहीं ॥
गएँ जाम जुग भूपति आवा । घर घर उत्सव बाज बधावा ॥
उपरोहितहि देख जब राजा । चकित बिलोक सुमिरि सोइ काजा ॥
जुग सम नृपहि गए दिन तीनी । कपटी मुनि पद रह मति लीनी ॥
समय जानि उपरोहित आवा । नृपहि मते सब कहि समुझावा ॥

दो०—नृप हरषेउ पहिचानि गुरु भ्रम बस रहा न चेत ।
बरे तुरत सत सहस बर बिप्र कुटुंब समेत ॥ १७२ ॥

चौ०—उपरोहित जेवनार बनाई । छरस चारि बिधि जसि श्रुति गाई ॥
मायामय तेहिं कीन्हि रसोई । बिंजन बहु गनि सकइ न कोई ॥
बिबिध मृगन्ह कर आमिष राँधा । तेहि महुँ बिप्र माँसु खल साँधा ॥

उचलले आणि एका गुहेत चोरून आणून ठेवले. आपल्या मायेने त्याची बुद्धी भ्रमिष्ट केल्यामुळे त्याला काहीच समजले नाही. १७१

आपण त्या उपाध्येबुवाचे रूप घेऊन त्याच्या सुंदर शेजेवर जाऊन झोपला.

इकडे राजा पहाटेपूर्वीच जागा झाला. स्वतःच्या राजवाडा पाहून आश्चर्याने थक्कच झाला. तापस मुनीचा महिमा मनात आणून आवाज न होऊ देता तो येथून उठला. राणीच्या काहीच ध्यानी येऊ नये हा हेतू ! बागेत जाऊन पूर्वीचाच घोडा घेतला व स्वार होऊन नगरातील कोणाही स्त्री-पुरुषास नकळत तो वनात गेला.

दोन प्रहर झाल्यानंतर राजाने नगरात प्रवेश केला. राजा सुखरूप परत आल्याचे समजताच घरोघरी आनंदोत्सव व मोठे जयघोष सुरू झाले. उपाध्येबुवाशी नजर भेट होताच, आपल्या कामाचे स्मरण होऊन तो त्याच्याकडे जिज्ञासेने पाहू लागला. तीन दिवस म्हणजे जणू काही तीन युगेच ! इतका त्याला त्या कपटी मुनीच्या चरणाचा ध्यास लागला ! योग्य वेळ झाली हे जाणून तो पुरोहित आला. त्याने आपण केलेले संकल्प राजाला एकान्तात सांगितला.

आपल्या या नव्या गुरूला ओळखून राजाला केवढा आनंद झाला. तो भ्रमिष्ट बनल्यामुळे त्याला सारासार विचार काहीच राहिला नाही. पूर्वी ठरल्याप्रमाणे एकलक्ष ब्राह्मणांना सहकुटुंब ताबडतोब भोजनास निमंत्रण देण्यात आले. १७२

वेदोक्त विधीने षड्रसांच्या अन्नाचा पुरोहिताने स्वयंपाक केला. सर्वच मायेचा प्रकार असल्याने पक्वान्ने व भाज्या इत्यादी अगणित झाल्या. अनेक प्रकारच्या पशूंचे मांस शिजवून त्या नीचाने त्यात ब्राह्मणांचे मांस मिसळले !

चौ० — भोजन कहुँ सब बिप्र बोलाए । पद पखारि सादर बैठाए ॥
परुसन जबहिं लाग महिपाला । भै अकासबानी तेहि काला ॥
बिप्रबृंद उठि उठि गृह जाहू । है बड़ि हानि अन्न जनि खाहू ॥
भयउ रसोईं भूसुर माँसू । सब द्विज उठे मानि बिस्वासू ॥
भूप बिकल मति मोहँ भुलानी । भावी बस न आव मुख बानी ॥

दो० — बोले बिप्र सकोप तब नहिं कछु कीन्ह बिचार ।
जाइ निसाचर होहु नृप मूढ़ सहित परिवार ॥ १७३ ॥

चौ० — छत्रबंधु तैं बिप्र बोलाई । घालै लिए सहित समुदाई ॥
ईस्वर राखा धरम हमारा । जैहसि तैं समेत परिवारा ॥
संबत मध्य नास तव होऊ । जलदाता न रहिहि कुल कोऊ ॥
नृप सुनि श्राप बिकल अति त्रासा । भै बहोरि बर गिरा अकासा ॥
बिप्रहु श्राप बिचारि न दीन्हा । नहिं अपराध भूप कछु कीन्हा ॥
चकित बिप्र सब सुनि नभबानी । भूप गयउ जहँ भोजन खानी ॥
तहँ न असन नहिं बिप्र सुआरा । फिरेउ राउ मन सोच अपारा ॥
सब प्रसंग महिसुरन्ह सुनाई । त्रसित परेउ अवनीं अकुलाई ॥

दो० — भूपति भावी मिटइ नहिं जदपि न दूषन तोर ।
किएँ अन्यथा होइ नहिं बिप्रश्राप अति घोर ॥ १७४ ॥

भोजनार्थ सर्व ब्राह्मणांना बोलावले. त्याचे चरण क्षालन करून त्याना आदरपूर्वक पाटावर बसवले. राजाने पाने वाढण्यास सुरुवात केली मात्र, इतक्यात आकाशवाणी झाली, "हे विप्रवृंद हो ! उठून घरचा रस्ता धरा. अन्न खाल्ल्याने अत्यंत मोठी हानी होणार आहे. यात ब्राह्मणांचे मास घातले आहे ! !"

ती वाणी सत्य समजून ब्राह्मण पाटावरून उठले ! राजाची बुद्धी भ्रमाने भुलून गेली. होणारे न चुके या न्यायाने त्याच्या तोंडून एकही शब्द बाहेर येईना ! हे पाहून तोच पापी आहे, अशी सर्व ब्राह्मणांची खात्री झाली व ते अत्यंत संतापाने, पण थोडाही विचार न करता म्हणाले, "मूर्खा ! आपल्या सर्व परिवारासह राक्षस हो ! ! १७३

अरे क्षत्रियाधमा ! सगळे ब्राह्मण, भ्रष्ट करण्यासाठी तू कुळासह आम्हाला आणलेस ना ? पण प्रभू आमचा पाठीराखा कसा आहे ते पाहिलेस ? सर्व परिवारासह तुझा नष्टांश होवो ! ! एक वर्षाच्या आत तुझा नाश होईल ! पाणी [illegible] तुझ्या कुळात कोणी उरणार नाही ! !"

ही शापवाणी ऐकून राजा भीतीने अत्यंत विव्हळ झाला. इतक्यात पुनः खरी दैवी देववाणी आकाशात दुमदुमली ! "ब्राह्मण हो ! आपण हा शाप विचारपूर्वक दिला नाही. या राजाने काहीही अपराध केलेला नाही."

ही दुसरी आकाशवाणी होताच ब्राह्मण आश्चर्यचकित झाले. राजा स्वयंपाकघरात धावतच गेला ! पण तिथे काय होते ? ना तो ब्राह्मण आचारी. ना स्वयपाकाचे नाव ! अत्यंत शोकावेगाने स्फुंदत राजा तेथून परतला ! जमिनीवर दुःखाने गडबडा लोळत असता, शोक करीत करीत, घडलेली सर्व घटना ब्राह्मणांच्या कानावर त्याने तळमळत घातली !

ब्राह्मणही पश्चात्ताप पावले. पण करतात काय बिचारे ? एक वेळ शापबाण सुटला. तो आता परत घेणे अशक्य ? "राजा, भवितव्यता टळणार नाही. तुझा लेशमात्र दोष नाही हे आम्ही समजलो; पण ब्राह्मणांचा श्राप अत्यंत घोर ! तो कितीही प्रयत्न करून खोटा होणार नाही !" १७४

चौ०—अस कहि सब महिदेव सिधाए । समाचार पुरलोगन्ह पाए ।।
सोचहि दूषन दैवहि देहीं । बिरचत हंस काग किय जेहीं ।।
उपरोहितहि भवन पहुँचाई । असुर तापसहि खबरि जनाई ।।
तेहिं खल जहँ तहँ पत्र पठाए । सजि सजि सेन भूप सब धाए ।।
घेरेन्हि नगर निसान बजाई । बिबिध भाँति नित होई लराई ।।
जूझे सकल सुभट करि करनी । बंधु समेत परेउ नृप धरनी ।।
सत्यकेतु कुल कोउ नहिं बाँचा । बिप्रश्राप किमि होइ असाँचा ।।
रिपु जिति सब नृप नगर बसाई । निज पुर गवने जय जसु पाई ।।

दो०—भरद्वाज सुनु जाहि जब होइ बिधाता बाम ।
धूरि मेरुसम जनक जम ताहि ब्यालसम दाम ।। १७५ ।।

चौ०—काल पाइ मुनि सुनु सोइ राजा । भयउ निसाचर सहित समाजा ।।
दस सिर ताहि बीस भुजदंडा । रावन नाम बीर बरिबंडा ।।
भूप अनुज अरिमर्दन नामा । भयउ सो कुंभकरन बलधामा ।।
सचिव जो रहा धरमरुचि जासू । भयउ बिमात्र बंधु लघु तासू ।।
नाम बिभिषण जेहि जग जाना । बिष्णुभगत बिग्यान निधाना ।।
रहे जे सुत सेवक नृप केरे । भए निसाचर घोर घनेरे ।।

एवढे बोलून ब्राह्मण तसेच उपाशी परत फिरले ! ही बातमी हा हा म्हणता सर्व नगरभर पसरली ! सर्वांना अत्यंत दुःख होऊन, नगरजन आपल्या दुर्दैवाला दोष देऊ लागले. " काय हो ! हंसाची रचना करून अखेर असला कावळा झाला ना ? "

कालकेतूने ताबडतोब पुरोहिताला भुलवून स्वस्थानी पोचवले ! तपस्वी नृपाला सर्व आह्वाल सादर केला. त्या दुष्ट राक्षसाने सर्वांना पत्रे पाठवली व प्रतापभानूच्या एकूण एक शत्रूंची सैन्ये सज्ज करून त्याच्यावर एकदम चाल केली. डंक्यांची गर्जना होऊन नगरीला शत्रुसैन्याचा वेढा पडला ! नित्य नव्या जोमाने त्यांनी प्रतापभानूवर चढाई करून रणकुंड पेटवले ! प्रतापभानूच्या सैन्यातील प्रत्येक वीर प्राणपणाने लढला ! पण हाय ! अखेर अरिमर्दनासह प्रतापभानू रणक्षेत्रावर घायाळ होऊन पडला ! सत्यकेतूच्या कुळात एकही पुरुष शिल्लक उरला नाही ! ! विप्रशाप कधीतरी खोटा ठरला आहे काय ?

कीर्ती आणि यश मिळवलेले विजयी राजे पुनः नगर वसवून आपापल्या राजधानीला परतले.

याज्ञवल्क्य भारद्वाजाला म्हणतात, हे मुने ! पाहा; जेव्हा एखाद्याचे दैव फिरते, तेव्हा एक रेणू-मेरूसारखा होतो; प्रत्यक्ष बाप यम बनतो आणि हाती धरलेल्या पुष्पहाराचा साप होऊन ती धरणाराला फोडतो. १७५

रावण-अवतार व रावण-चरित्र

मुनिश्रेष्ठा ! पुढे ऐक. प्रतापभानू पुढे योग्य काळी आपल्या सर्व परिवारासह राक्षस झाला. दहा डोकी व वीस हात असे त्याला शरीर मिळाले. रावण हे त्याचे नाव ! तो बलवंतांना वंद्य असा वीर झाला. त्याचा धाकटा भाऊ अरिमर्दनसुद्धा बलशाली कुंभकर्ण झाला. धर्मरुचि नावाचा त्याचा जो मंत्री तो जगप्रसिद्ध बिभीषण नावाचा धाकटा सावत्र भाऊ. तो विज्ञानाचा निधी, असा जगप्रसिद्ध विष्णुभक्त झाला. राजाचे मुलगे व नोकरचाकरही भयंकर व अगणित असे सगळे राक्षस बनले.

कामरूप खल जिनस अनेका। कुटिल भयंकर बिगत बिबेका ।।
कृपा रहित हिंसक सब पापी। बरनि न जाहिं बिस्व परितापी ।।
दो० – उपजे जदपि पुलस्त्यकुल पावन अमल अनूप।
तदपि महीसुर श्राप बस भए सकल अघरूप ।। १७६ ।।
चौ० – कीन्ह बिबिध तप तीनिहुँ भाई। परम उग्र नहिं बरनि सो जाई ।।
गयउ निकट तप देखि बिधाता। मागहु बर प्रसन्न मैं ताता ।।
करि बिनती पद गहि दससीसा। बोलेउ बचन सुनहु जगदीसा ।।
हम काहू के मरहिं न मारें। बानर मनुज जाति दुइ बारें ।।
एवमस्तु तुम्ह बड़ तप कीन्हा। मैं ब्रह्माँ मिलि तेहि बर दीन्हा ।।
पुनि प्रभु कुंभकरन पहिं गयऊ। तेहि बिलोकि मन बिसमय भयऊ ।।
जौं एहिं खल नित करब अहारू। होइहि सब उजारि संसारू ।।
सारद प्रेरि तासु मति फेरी। मागेसि नीद मास षट केरी ।।
दो० – गए बिभीषन पास पुनि कहेउ पुत्र बर मागु।
तेहिं मागेउ भगवंत पद कमल अमल अनुरागु ।। १७७ ।।
चौ० – तिन्हहि देइ बर ब्रह्म सिधाए। हरषित ते अपने गृह आए ।।

वाटेल ते रूप यांना घेता येई. नाना जातीचे, अत्यंत नीच, कपटी, महाभयंकर व अविचारी असे ते असल्यामुळे अनेक प्रकारचे अत्याचार ते करू लागले. ते अतिनिष्ठुर, हिंसक व पापी होते; त्यांनी सर्व विश्वाला किती छळले त्याचे वर्णन अशक्य. अत्यंत पवित्र व अनुपमेय अशा पावन पुलस्त्य कुळात जन्मूनसुद्धा केवळ विप्रशापामुळे ते सर्व पापाचरणी, पापाची मूर्तीच बनले. १७६

तिन्हीही भावांनी किती उग्र तपश्चर्या केली ते सांगणे कठीण. त्यांची ती तपस्या पाहून ब्रह्मदेव त्यांच्याजवळ गेले व म्हणाले, "बाळांनो! मी प्रसन्न झालो आहे. कोणताही वर मागा!"

रावणाने ब्रह्मदेवाचे पाय धरले व विनंती करू लागला, "हे जगदीश्वरा! मी काय मागतो ते ऐक. मनुष्य व माकड या दोन जातींखेरीज करून आम्हाला कोणीही मारण्याचा प्रयत्न केला तरी मरण येऊ नये." तेव्हा शंकर सांगतात की, मी व ब्रह्मदेव म्हणालो,

"तथास्तु! तुम्ही फार उत्तम तपस्या केल्यामुळे माझा व ब्रह्मदेवाचा हा तुम्हाला वर आहे." एवढे रावणाला सांगून नंतर ब्रह्मदेव कुंभकर्णाजवळ गेले. त्याचे ते विशाल पर्वतप्राय शरीर पाहून ब्रह्मदेवांना वाटले, हा जर नित्य पोटभर खाऊ लागला तर सगळे जग लवकरच उजाड करून टाकील. लगेच सरस्वतीला प्रेरणा देऊन त्यांनी त्याची बुद्धी फिरविली. त्यामुळे त्याने सहा महिने गाढ झोप व एक दिवस जागृती मागून घेतली. नंतर ते बिभीषणाजवळ जाऊन त्याला म्हणाले, "बाळा, वर माग!" त्याने भगवच्चरणकमली शुद्ध प्रेम मागून घेतले. १७७

त्याने असा वर मागितल्यामुळे ब्रह्मदेवांना संतोष होऊन त्यांनी बिभीषणाला इष्ट वर दिला व ते सत्यलोकाला गेले.



मय तनुजा मंदोदरि नामा । परम सुंदरी नारि ललामा ॥
सोइ मयँ दीन्हि रावनहि आनी । होइहिं जातुधानपति जानी ॥
हरषित भयउ नारि भलि पाई । पुनि दोउ बंधु बिआहेसि जाई ॥
गिरि त्रिकूट एक सिंधु मझारि । बिधि निर्मित दुर्गम अति भारी ॥
सोइ मय दानवँ बहुरि सँवारा । कनक रचित मनिभवन अपारा ॥
भोगावति जसि अहिकुल बासा । अमरावति जसि सक्रनिवासा ॥
तिन्ह तें अधिक रम्य अति बंका । जग बिख्यात नाम तेहि लंका ॥

दो०— खाईं सिंधु गभीर अति चारिहुँ दिसि फिरि आव ।
कनक कोट मनि खचित दृढ़ बरनि न जाइ बनाव ॥ १७८ (क) ॥
हरि प्रेरित जेहिं कलप जोइ जातुधानपति होइ ।
सूर प्रतापी अतुलबल दल समेत बस सोइ ॥ १७८ (ख) ॥

चौ०— रहे तहाँ निसिचर भट भारे । ते सब सुरन्ह समर संघारे ॥
अब तहँ रहहिं सक्र के प्रेरे । रच्छक कोटि जच्छपति केरे ॥
दसमुख कतहुँ खबरि असि पाई । सेन साजि गढ़ घेरेसि जाई ॥
देखि बिकट भट बड़ि कटकाई । जच्छ जीव लै गए पराई ॥
फिरि सब नगर दसानन देखा । गयउ सोच सुख भयउ बिसेषा ॥
सुंदर सहज अगम अनुमानी । कीन्हि तहाँ रावन रजधानी ॥

सर्व स्त्रियांना ललामभूत असणारी अशी परमलावण्यवती मंदोदरी नावाची मयासुराची कन्यका होती. सर्व राक्षसांचा अधिपती रावणच होणार हे जाणून त्याने आपली मुलगी दशाननाला दिली. सुंदर पत्नी मिळाल्यामुळे आनंदित होऊन त्याने आपल्या भावांचीही लग्ने केली.

समुद्रात, त्रिकूट नावाचा एक अत्यंत दुर्गम, अतिशय मोठा असा पर्वत ब्रह्मदेवाने उत्पन्न केलेला होता. त्यामध्ये मयासुराने आपल्या कौशल्याने अगणित सुवर्णाची रत्नखचित अशी सुंदर गृहे निर्माण केली. पातालात नागाची जशी भोगावती, किंवा इंद्राची राजधानी जशी अमरावती, त्याहूनही अभेद्य व निसंशय सुंदर अशी जगप्रसिद्ध लंका नावाची नगरी जगप्रसिद्ध बनली. सागरासारखे खोल असे चारी दिशांना खंदक खणले आणि रत्नजडित अशी सोन्याची अवर्णनीय भक्कम तटबंदी केली. १७८ (क)

थोडा इतिहास

ईशेच्छेने ज्या कल्पात जो राक्षस राजा होई, तो बलवान् प्रतापशाली व अत्यंत शूर असा तो असल्याने आपल्या सैन्यासह या लंका नगरीत वास्तव्य करीत असे. १७८ (ख)

तेथे जे अमित असे शूर असुर होते, त्यांचा सरसहा रणांगणात देवांनी फडशा पाडला. यावेळी इंद्राच्या हुकुमाने, यक्षपतीचे अगणित रक्षक तेथे सुखाने राहात होते. ही बातमी कुठे तरी रावणाच्या कानी जाताच सैन्यासह जाऊन त्याने त्या यक्षराजधानीला वेढा घातला. ते अतिशय अक्राळ-विक्राळ असे राक्षसांचे अफाट सैन्य आलेले पाहून, यक्षांनी जीव घेऊन पळ काढला !

आत शिरून सर्व नगराची पाहाणी केल्यानंतर रावणाची चिंता जाऊन त्याला विशेष प्रकारचे समाधान झाले. स्वभावतःच सुंदर पण तितकीच अभेद्य अशी ती नगरी पाहून रावणाने ती आपली राजधानी केली.

जेहि जस जोग बाँटि गृह दीन्हि । सुखी सकल रजनीचर कीन्हे ॥
एक बार कुबेर पर धावा । पुष्पक जान जीति लै आवा ॥

दो०– कौतुकहीं कैलास पुनि लीन्हेसि जाइ उठाइ ।
मनहुँ तौलि निज बाहुबल चला बहुत सुख पाइ ॥ १७९ ॥

चौ०– सुख संपति सुत सेन सहाई । जय प्रताप बल बुद्धि बड़ाई ॥
नित नूतन सब बाढ़त जाई । जिमि प्रतिलाभ लोभ अधिकाई ॥
अतिबल कुंभकरन अस भ्राता । जेहि कहुँ नहिं प्रतिभट जग जाता ॥
करइ पान सोवइ षट मासा । जागत होइ तिहुँ पुर त्रासा ॥
जौं दिन प्रति अहार कर सोई । बिस्व बेगि सब चौपट होई ॥
समर धीर नहिं जाइ बखाना । तेहि सम अमित बीर बलवाना ॥
बारिदनाद जेठ सुत तासू । भट महुँ प्रथम लीक जग जासू ॥
जेहि न होइ रन सनमुख कोई । सुरपुर नितहिं परावन होई ॥

दो०–कुमुख अकंपन कुलिसरद धूमकेतु अतिकाय ।
एक एक जग जीति सक ऐसे सुभट निकाय ॥ १८० ॥

चौ०–कामरूप जानहिं सब माया । सपनेहुँ जिन्ह कें धरम न दाया ॥
दसमुख बठ सभाँ एक बारा । देखि अमित आपन परिवारा ॥
सुत समुह जन परिजन नाती । गनै को पार निसाचर जाती ॥

सर्व राक्षसांना योग्य अशी निवासस्थाने देऊन त्याने त्यांचे समाधान केले. कुबेरावर लगेच चाल करून त्याच्या पुष्पक विमानाची लूट आणली. सहज लीलेने त्याने सर्व कैलास पर्वतच उचलून आपल्या हातावर घेतला. जणू काही आपल्या बाहूंचे बळच अजमावून त्याला परम सुख झाले. १७९

सुख, सुत, सैन्य, सहाय्य, संपत्ती तसेच जय, बल, बुद्धी आणि महान् प्रताप व प्रतिष्ठा ही सर्व रात्रंदिवस नव्या नव्या जोमाने वाढू लागली. एका लाभामागून दुसरा लाभ झाल्याने जसा मनुष्याचा लोभ झपाट्याने वाढू लागतो, तसेच रावणाच्या बाबतीत या वेळी झाले.

कुंभकर्णासारखा बलाढ्य भाऊ, ज्याला जगात जोडच नाही! मनसोक्त झोकून सहा सहा महिने ताणून देतो, पण जर का एकदा जागा झाला की त्रैलोक्याला धडकीच भरे! तो दररोज आपले दुर्भर भरत असता तर विश्वाची चटणीच झाली असती! तो रणशूर किती होता म्हणून सांगावे? त्याच्या जोडीचा बलाढ्य वीरच पृथ्वीतलावर नव्हता!

तसेच मेघनाद नावाचा रावणाचा एक मोठा मुलगा होता. त्रैलोक्यात वीराग्रणी म्हणून त्याची ख्याती झाली. त्याच्या विरुद्ध रणांगणात कोणीच टिकाव धरीत नसल्याने देवांना अमरावतीत सदोदित पळता भुई थोडी होत असे.

दुर्मुख, अकंपन, वज्रदंत, धूमकेतू आणि अतिकाय यांपैकी एकेक जण जग जिंकण्यास समर्थ होता! आणि असे योद्धे अनेक होते. १८०

सर्वच राक्षसी मायेने युक्त, वाटेल ते शरीर धारण करण्यास समर्थ, स्वप्नातसुद्धा धर्म किंवा दयेचे नाव नाही, अशा घोर राक्षसांच्या सभेत एकदा रावण बसला असता त्याने अपार असा आपला परिवार पाहिला. मुले. नातवंडे, बायका, नातेवाईक, त्याच्या त्या राक्षसी गोतावळ्याची कोण खानेसुमारी करू शकणार?

सेन बिलोकि सहज अभिमानी । बोला बचन क्रोध मद सानी ॥
सुनहु सकल रजनीचर जूथा । हमरे बैरी बिबुध बरूथा ॥
ते सनमुख नहिं करहिं लराई । देखि सबल रिपु जाहिं पराई ॥
तेन्ह कर मरन एक बिधि होई । कहउँ बुझाइ सुनहु अब सोई ॥
द्विजभोजन मख होम सराधा । सब कै जाइ करहु तुम्ह बाधा ॥

दो० —छुधा छीन बलहिन सुर सहजेहिं मिलिहहिं आइ ।
तब मारिहउँ कि छाड़िहउँ भली भाँति अपनाइ ॥ १८१ ॥

चौ० —मेघनाद कहुँ पुनि हँकरावा । दीन्ही सिख बलु बयरु बढ़ावा ॥
जे सुर समर धीर बलवाना । जिन्ह कें लरिबे कर अभिमाना ॥
तिन्हहि जीति रन आनेसु बाँधी । उठि सुत पितु अनुसासन काँधी ॥
एहि बिधि सबही अग्या दीन्ही । आपुनु चलेउ गदा कर लीन्ही ॥
चलत दसानन डोलति अवनी । गर्जत गर्भ स्रवहि सुर रवनी ॥
रावन आवत सुनेउ सकोहा । देवन्ह तके मेरु गिरि खोहा ॥
दिगपालन्ह के लोक सुहाए । सूने सकल दसानन पाए ॥
पुनि पुनि सिंघनाद करि भारी । देइ देवतन्ह गारि पचारी ॥
रन मद मत्त फिरइ जग धावा । प्रतिभट खोजत कतहुँ न पावा ॥

जात्याच गर्विष्ठ ! त्याने ती सेना पाहिली आणि मस्तीयुक्त क्रोधाने म्हणतो, " निशिचर सैनिक हो! सर्वांनी मी काय सांगतो ते नीट ऐका. देवांचे सर्व संघ हे आपले हाडवैरी आहेत ! ते तोंड देऊन कधीच लढत नाहीत. जबरदस्त शत्रू पाहिला की पळ काढतात. त्यामुळे त्यांना ठार करणे कठीण होते; तरी पण त्यांच्या मरणासाठी एक खास उपाय मी शोधून काढला आहे तो आता सांगतो—ब्राह्मणभोजने, यज्ञ, होम, श्राद्धे या सर्व धर्मकर्मांचा विध्वंस करा. असे केले की चंदी तुटलेले सर्व देव भुकेने व्याकूळ होऊन बलहीन झाल्यामुळे आपोआप शरण येतील. मग जे वश होतील त्यांना गुलाम करू व वश न होतील त्यांना ठार करू ! १८१

मेघनादाला बोलावून आणला व त्याचे सामर्थ्य आणि देवाशी वैर ज्याच्या योगाने वाढेल असा त्याला उपदेश केला. " रणशूर, बलवान् व लढण्याची ज्यांना हिंमत आहे, अशा सर्व देवांना युद्धात पराभूत कर आणि देवांना मुसक्या बांधून घेऊन ये आपल्या वडिलांची आज्ञा वंद्य मानून या कामगिरीवर निघ!

या प्रमाणे सर्वांना हुकूम सोडून स्वतः हातात गदा घेऊन स्वारी बाहेर पडली. त्याच्या धाड धाड वाजणाऱ्या पदाघातांनी पृथ्वी डोलू लागली. त्याची भयंकर गर्जना ऐकून देवांगनाचे गर्भ गळू लागले.

संतापलेला रावण आला रे आला, असे ऐकताच देव पळत सुटत व मेरू पर्वताच्या गुहा हुडकू लागत.

त्यामुळे दिक्पालांचे अत्यंत रमणीय असे सर्व लोक ओसाड पडलेले रावणाला पाहावयास मिळाले. मोठमोठ्याने अनेक वेळा तो सिंहनाद करी व शिव्या देऊन देवांना आव्हान देई. समरवारुणीने झिंगलेला असा तो इकडून तिकडे आणि तिकडून इकडे, जोड शोधण्यासाठी दौडत जाई, पण त्याला तोंड देणारा वीर कुठेच आढळला नाही.

रबिससि पवन बरुन धनधारी । अगिनि काल जम सब अधिकारी ।।
किंनर सिद्ध मनुज सुर नागा । हठि सबहि के पंथहिं लागा ।।
ब्रह्मसृष्टि जहँ लगि तनुधारी । दसमुख बसबर्ती नर नारी ।।
आयसु करहिं सकल भयभीता । नवहिं आइ नित चरन बिनीता ।।

दो०–भुजबल बिस्व बस्य करि राखेसि कोउ न सुतंत्र ।
मंडलीक मनि रावन राज करइ निज मंत्र ।। १८२ (क) ।।
देव जच्छ गंधर्ब नर किंनर नाग कुमारि ।
जीति बरीं निज बाहुबल बहु सुंदर बर नारि ।। १८२ (ख) ।।

चौ०–इंद्रजीत सन जो कछु कहेहु । सो सब जनु पहिलेहिं करि रहेऊ ।।
प्रथमहिं जिन्ह कहुँ आयसु दीन्हा । तिन्ह कर चरित सुनहु जो कीन्हा ।।
देखत भीमरूप सब पापी । निसिचर निकर देव परितापी ।।
करहिं उपद्रव असुर निकाया । नाना रूप धरहि करि माया ।।
जेहि बिधि होई धर्म निर्मूला । सो सब करहिं बेद प्रतिकूला ।।
जेहिं जेहिं देस धेनु द्विज पावहिं । नगर गाउँ पुर आगि लगावहिं ।।
सुभ आचरन कतहुँ नहिं होई । देव बिप्र गुरु मान न कोई ।।
नहिं हरि भगति जग्य तप ग्याना । सपनेहुँ सुनिअ न बेद पुराना ।।

छं०–जप जोग बिरागा तप मख भागा श्रवण सुनइ दससीसा ।
आपुनु उठि धावइ रहै न पावइ धरि सब घालइ खीसा ।।

रवी, शशी, वायू, वरुण, कुबेर, अग्नी, काल, यम, आदि सर्व मोठमोठ्या अधिकाऱ्यांचा त्याने जबरदस्तीने पाठपुरावा केला. अखेर शरीर धारण करणारी ब्रह्मदेवाची सर्व सृष्टी दशमुखाच्या ताब्यात आली. भयभीत होऊन ते विनयाने त्याच्या चरणी नित्य वंदन पूर्वक ते त्याच्या आज्ञा पाळन करू लागले.

अखिल विश्व, स्वतःच्या बाहुबलाने वश केले, कोणीच स्वतंत्र राहिले नाही. सम्राट रावण याप्रमाणे आपल्या इच्छेनुसार साम्राज्य सत्ता गाजवू लागला! १८२ (क)

देव, यक्ष, गंधर्व, नर, किन्नर आणि नाग यांच्यातील अत्यंत सौंदर्यसंपन्न अशा कुमारी व पुष्कळ उत्तम सुंदर स्त्रिया त्याने आपल्या सामर्थ्याच्या जोरावर जिंकून आणून त्यांच्याशी विवाह केले. १८२ (ख)

इंद्रजिताला ज्या आज्ञा दिल्या होत्या, त्याने जणू काही पूर्वीच निकालात काढल्या होत्या.

ज्यांना प्रथम आज्ञा दिल्या त्यांनी कशी करणी केली ते पाहा:—देवांना त्रस्त करणारे, अनेक मायावी रूपे घेत, ज्याच्या योगाने, धर्माचे निर्मूलन होईल अशीच धर्मभ्रष्ट कोणतीही कृती ते बिनचूक करत! ज्या ज्या ठिकाणी गायी व ब्राह्मण दिसत, त्यांची नगरे; गावे व पुरे यांना सरसहा आगी लावून त्यांना त्राहि त्राहि करून सोडत. शुभाचरण सर्वत्र बंद पडले. देव-ब्राह्मण, गुरुजन यांना कोणीच मान देईना! हरिभक्ती, ज्ञान, यज्ञ, जप, तप, यांच्यापैकी काहीच राहिले नाही! वेद अगर पुराणे यांचे श्रवण स्वप्नातही होणे बंद पडले.

अशाही स्थितीत कुठे जप, योग, वैराग्य, तप, यज्ञ यातील हविर्भाग देवांना मिळण्याचा संभव, इत्यादी जर काही दशाननाच्या कानी आले, तर तो धावत जाऊन त्या त्या सर्व धर्माचरणाचा समूळ उच्छेद करून टाकी!

अस भ्रष्ट अचारा भा संसारा धर्म सुनिअ नहिं काना ।
तेहि बहुबिधि त्रासइ देस निकासइ जो कह बेद पुराना ।।

सो० – बरनि न जाइ अनीति घोर निसाचर जो करहिं ।
हिंसा पर अति प्रीति तिन्ह के पापहि कवनि मिति ।। १८३ ।।

मासपारायण, छठा विश्राम

चौ० – बाढे खल बहु चोर जुआरा । जे लंपट परधन परदारा ।।
मानहिं मातु पिता नहिं देवा । साधुन्ह सन करवावहिं सेवा ।।
जिन्ह के यह आचरन भवानी । ते जानेहु निसिचर सब प्रानी ।।
अतिसय देखि धर्म कै ग्लानी । परम सभीत धरा अकुलानी ।।
गिरि सरि सिंधु भार नहिं मोही । जस मोहि गरुअ एक परद्रोही ।।
सकल धर्म देखइ बिपरीता । कहि न सकइ रावन भय भीता ।।
धेनु रूप धरि हृदयँ बिचारी । गई तहाँ जहँ सुर मुनि झारी ।।
निज संताप सुनाएसि रोई । काहू तें कछु काज न होई ।।

छं० – सुर मुनि गंधर्बा मिलि करि सर्बा गे बिरंचि के लोका ।
सँग गोतनुधारी भूमि बिचारी परम बिकल भय सोका ।।

याप्रमाणे पृथ्वीतलावरील सर्व सदाचार त्याने संपुष्टात आणला ! आणि धर्माचे नाव सुद्धा कानावर येता काम नये असे आपले निधर्मी राज्य सर्वत्र सुरू केले ! इतक्यातून जर का कोणी वेद व पुराणे यांचे पठण करत आहे, असे कळले तर त्यांना अनेक प्रकारे सतावून अखेर हद्दपारीची शिक्षा तो ठोठावी !

भयंकर राक्षसांनी याप्रमाणे नीतिभ्रष्ट होऊन जे थैमान घातले, त्याचा तोंडाने उच्चार सुद्धा करवत नाही. हिंसेची मनापासून आवड असणाऱ्या त्या नराधमांनी किती पापे केली. त्यांची मोजदाद कोण करणार ? १८३

परधन व परस्त्री यांना लंपट असणारे असे नीच चोर व जुगारी यांची संख्या मोठी वाढली. आई, बाप अथवा देव यांना किंमत राहिली नाही. सज्जन संत यांना ते सेवा करावयास लावू लागले. शंकर म्हणतात, "हे भवानी ! असे ज्याचे आचरण असते, ते सर्व प्राणी राक्षसच समजावे !"

धर्माला फार ग्लानी आलेली कळताच पृथ्वीला मोठी भीती उत्पन्न होऊन ती अतिशय व्याकूळ झाली. ती म्हणते की, सर्व पर्वत, नद्या, सागर हे मला हलके वाटतात, पण एक परद्रोही मात्र मला जड वाटतो. सर्वच आचार विपरीत सुरू झालेले तिने पाहिले, पण रावणाच्या भीतीने एक अवाक्षर तिने मुखावाटे काढले नाही. शेवटी विचारांती गायीचे रूप घेऊन ज्या ठिकाणी सर्व देव, ऋषी यांचा समाज जमला होता, तेथे ती गेली. तिने रडत आपल्या दुःखाची कल्पना त्यांना दिली, परंतु त्यावर कोणाचाच काही उपाय चालणे अशक्य होते.

मग सुर, मुनी, गंधर्व असे सगळेच एकत्र होऊन सत्यलोकाला गेले. त्यांच्याबरोबर, गायीचे रूप धारण करणारी, भीती व शोक यांनी अतिशय व्याकूळ झालेली, विचारी भूमीही गेली. ब्रह्मदेवांनी सर्व जाणले



ब्रह्माँ सब जाना मन अनुमाना मोर कछु न बसाई ।
जा करि तैं दासी सो अबिनासी हमरेउ तोर सहाई ॥
सो० –धरनि धरहि मन धीर कह बिरंचि हरिपद सुमिरु ।
जानत जन की पीर प्रभु भंजिहि दारुन बिपति ॥ १८४ ॥
चौ० –बैठे सुर सब करहिं बिचारा । कहँ पाइअ प्रभु करिअ पुकारा ॥
पुर बैकुंठ जान कह कोई । कोउ कह पयनिधि बस प्रभु सोई ॥
जाके हृदयँ भगति जसि प्रीति । प्रभु तहँ प्रगट सदा तेहि रीती ॥
तेहिं समाज गिरिजा मैं रहेऊँ । अवसर पाइ बचन एक कहेऊँ ॥
हरि ब्यापक सर्बत्र समाना । प्रेम तें प्रगट होहि मैं जाना ॥
देस काल दिसि बिदिसिहु माहीं । कहहु सो कहाँ जहाँ प्रभु नाहीं ॥
अग जगमय सब रहित बिरागी । प्रेम तें प्रभु प्रगटइ जिमि आगी ॥
मोर बचन सब के मन माना । साधु साधु करि ब्रह्म बखाना ॥
दो० –सुनि बिरंचि मन हरष तन पुलकि नयन बह नीर ।
अस्तुति करत जोरि कर सावधान मतिधीर ॥ १८५ ॥
छं० – जय जय सुरनायक जन सुखदायक प्रनतपाल भगवंता ।
गो द्विज हितकारी जय असुरारी सिंधुसुता प्रिय कंता ॥
पालन सुर धरनी अद्भुत करनी मरम न जानइ कोई ।
जो सहज कृपाला दीनदयाला करउ अनुग्रह सोइ ॥ १ ॥

व यावर काही उपाय काढणे आपल्या हाती मुळीच नाही, हे लक्षात येऊन ते म्हणतात, "हे धरे! धीर धर. ज्यांची तू दासी आहेस, ते अविनाशी असून त्यांचेच तुला व मलाही सहाय्य होणार, म्हणून त्यांच्या चरणांचे स्मरण कर. ते आपल्या दासाचे दुःख जाणतात. इतकेच नव्हे, दारुण दुःख व भय दूर करण्यास तेच समर्थ आहेत !" १८४

परंतु त्या प्रभूची प्रार्थना करण्यास तो कुठे सापडणार, या विचाराने अडचणीत पडून सगळे देव बसले होते ! कोणी म्हणत, त्यांच्या दर्शनास वैकुण्ठास गेले पाहिजे, तर दुसरे सुचवीत, 'छे हो ! त्यांचा मुक्काम यावेळी क्षीरसागरात!' ज्याच्या हृदयात जशी भक्ती व प्रेम असते, तसे त्याला प्रभू सदोदित प्रकट असतात ! शंकर सांगतात, 'उमे ! सभेत मीही होतोच, संधी सापडताच मी म्हणालो, 'भगवान् सर्वांना सारखे व्यापून राहातात. प्रेमाने ते प्रकट होतात, हे मला ठाऊक आहे. देश, काल, दिशा, विदिशा असा कोणता भाग आहे, की जेथे प्रभू नाही ते सांगा तर खरे. चराचराला व्यापूनही निर्लेप व वेगळा असा तो असून मंथनाने जरा प्रकट होतो, त्या प्रेमाने प्रकटतो. हे माझे मत सर्वांना आवडले व "साधू साधू!" असे उद्गार ब्रह्मदेवांच्या मुखातून बाहेर पडले. त्यांना तेव्हा एवढा आनंद झाला की, त्यांचे शरीर पुलकित झाले व डोळ्यात आनंदाश्रू आले ! धीर बुद्धीचे असे ते असल्याने त्यांनी सावधानपणाने हात जोडून स्तुती करण्यास सुरुवात केली. १८५

"हे देवाधिदेवा ! सेवकसुखदा, शरणागतांचे रक्षण करणाऱ्या भगवंता, आपले ऐश्वर्य प्रकट करा, प्रकट करा! गोब्राह्मणांचे हित करणारे, असुरांचा विनाश करणारे, समुद्राची कन्या, लक्ष्मी, हिचे प्रियकांत, आपले ऐश्वर्य प्रकट करा ! पृथ्वी व देवतांचे पालन करणाऱ्या ! ज्याची करणी अद्‌भुत असते व तिचे मर्म कोणालाच कळत नाही; असा स्वभावतःच कृपाळू व दीनांचा दयाळू प्रभू, तोच आमच्यावर अनुग्रह करो.



छं०— जय जय अबिनासी सब घट बासी ब्यापक परमानंदा ।
अबिगत गोतीतं चरित पुनीतं मायारहित मुकुंदा ॥
जेहि लागि बिरागी अति अनुरागी बिगतमोह मुनिबृंदा ।
निसि बासर ध्यावहिं गुन गन गावहिं जयति सच्चिदानंदा ॥ २ ॥
जेहिं सृष्टि उपाई त्रिबिध बनाई संग सहाय न दूजा ।
सो करउ अघारी चिंत हमारी जानिअ भगति न पूजा ॥
जो भव भय भंजन मुनि मन रंजन गंजन बिपति बरूथा ।
मन बच क्रम बानी छाड़ि सयानी सरन सकल सुरजूथा ॥ ३ ॥
सारद श्रुति सेषा रिषय असेषा जा कहुँ कोउ नहिं जाना ।
जेहि दीन पिआरे बेद पुकारे द्रवउ सो श्रीभगवाना ॥
भव बारिधि मंदर सब बिधि सुंदर गुनमंदिर सुखपुंजा ।
मुनि सिद्ध सकल सुर परम भयातुर नमत नाथ पद कंजा ॥ ४ ॥

दो०— जानि सभय सुर भूमि सुनि बचन समेत सनेह ।
गगनगिरा गंभीर भइ हरनि सोक संदेह ॥ १८६ ॥

हे अविनाशी; प्रत्येक देह-पिंडरूपी घटात वास करणाऱ्या,:सर्वव्यापक, परमानंदस्वरूप, (अज्ञेय) जे विशेष ज्ञानातीत, इंद्रियातीत, पवित्र-चारित्र्याचे, मायेपासून वेगळे असणारे, मोक्षदाते, मुकु (मोक्ष) देणारे, आपले ऐश्वर्य प्रकट करा ! आपला जयजयकार असो ! ऐहिक व पारलौकिक सर्व सुखोपभोगाची आसक्ती सोडून, वैराग्यसंपन्न झालेले, मोहापासून सर्वस्वी मुक्त होऊन ज्ञान झालेले, असे मुनिवृन्दही अत्यंत प्रेमी बनून, ज्याची प्राप्ती व्हावी म्हणून रात्रंदिवस ध्यान करतात व ज्याच्या गुणांच्या समूहाचे गायन करतात. अशा सच्चिदानंद-स्वरूपी भगवंता आपले ऐश्वर्य प्रकट करा ! ”

ज्याने दुसऱ्या कोणत्याही सहायक अगर साधनाशिवाय, एकट्यानेच (ब्रह्मा-विष्णू-शिवात्मक) तीन रूपे घेऊन अथवा कोणतेही उपादान कारण न घेता, अर्थात् स्वतःच सृष्टीचे अभिन्न निमित्त व उपादान कारण होऊन तीन प्रकारची सुंदर सृष्टी उत्पन्न केली, तोच दुःख-पापांचा नाश करणारा भगवान् आमच्यावर कृपा दृष्टी टाको ! आमची चिंता वाहो ! आम्हाला तुझी भक्ती अगर पूजा कशी करावी याचे ज्ञान मुळीच नाही. जो जन्म-मृत्युरूप संसाराचा नाश करणारा, मुनिमनाला आनन्द देणारा, विपत्तिसमूहाला नष्ट करणारा :आहे, अशा प्रभो ! आमचा सर्व देवतांचा संघ, मन-वचन-कर्माने अभिमान व ज्ञानाहंकार सोडून शरण आला आहे !

सरस्वती, वेद, शेष व सर्व ऋषी यांपैकी कोणीही ज्याला जाणू शकत नाही, तथापि ज्याला दीन अत्यंत प्रिय असतात, अशी वेद घोषणा करतात, त्या भगवंताने आमच्यावर दया करावी ! संसारसागरमंथन करणारा मंदरपर्वत, सर्व सौंदर्याचे आगर; गुणाचे निवासस्थान व सुखराशी, नाथ ! मुनी, सिद्ध व सगळे सुर परम भयातुर होऊन आपल्या चरणकमलांना नमस्कार करीत आहेत !

देवाचा समूह व गोरूपधारी पृथ्वी यांना भयव्याकुल झालेले पाहून व त्याचे स्नेहयुक्त भाषण ऐकून भगवंतांची दुःख व संशय नष्ट करणारी अशी गंभीर आकाशवाणी झाली. १८६

चौ०— जनि डरपहु मुनि सिद्ध सुरेसा। तुम्हहि लागि धरिहउँ नर बेसा ॥
अंसन्ह सहित मनुज अवतारा। लेहउँ दिनकर बंस उदारा ॥
कस्यप अदिति महातप कीन्हा। तिन्ह कहुँ मैं पूरब बर दीन्हा ॥
ते दसरथ कौसल्या रूपा। कोसलपुरीं प्रगट नरभूपा ॥
तिन्ह कें गृह अवतरिहउँ जाई। रघुकुल तिलक सो चारिउ भाई ॥
नारद बचन सत्य सब करिहउँ। परम सक्ति समेत अवतरिहउँ ॥
हरिहउँ सकल भूमि गरुआई। निर्भय होहु देव समुदाई ॥
गगन ब्रह्मबानी सुनि काना। तुरत फिरे सुर हृदय जुड़ाना ॥
तब ब्रह्माँ धरनिहि समुझावा। अभय भई भरोस जियँ आवा ॥

दो०— निज लोकहि बिरंचि गे देवन्ह इहइ सिखाइ।
बानर तनु धरि धरि महि हरि पद सेवहु जाइ ॥ १८७ ॥

चौ०— गए देव सब निज निज धामा। भूमि सहित मन कहुँ बिश्रामा ॥
जो कछु आयसु ब्रह्माँ दीन्हा। हरषे देव बिलंब न कीन्हा ॥
बनचर देह धरी छिति माहीं। अतुलित बल प्रताप तिन्ह पाहीं ॥
गिरि तरु नख आयुध सब बीरा। हरि मारग चितवहिं मतिधीरा ॥
गिरि कानन जहँ तहँ भरि पूरी। रहे निज निज अनीक रचि रूरी ॥
यह सब रुचिर चरित मैं भाषा। अब सो सुनहु जो बीचहिं राखा ॥

" मुनि, सिद्ध, देवतांचे स्वामी, तुम्ही मुळीच भिऊ नका! तुमच्यासाठी मी उत्तम मनुष्यरूप धारण करीन. त्याकरता पवित्र सूर्यवंशात माझ्या अंशांसह मनुष्याचा अवतार घेईन. कश्यप व अदिती यांनी फार मोठी तपस्या केली, तेव्हा त्यांना पूर्वीच मी वर देऊन ठेवला आहे, तेच आता दशरथ आणि कौसल्येच्या रूपांत नरपती होऊन अयोध्यानगरीत प्रकट झाले आहेत. त्यांच्या घरी जाऊन रघुकुलातील श्रेष्ठ चार बंधू-स्वरूपात, अवतार घेईन. नारदांच्या सर्व वचनांना सत्य करण्यासाठी आपल्या पराशक्तिसहित अवतार घेऊन भूमीचा सर्व भार हरण करीन. देवगणहो! आता निर्धास्त राहा. "

अशा प्रकारची ब्रह्मवाणी आकाशात प्रकट झालेली श्रवण करून सर्वांच्या अंतःकरणाला शांती प्राप्त झाली व ते घाईने परतले. त्यावेळी ब्रह्मदेवांनी पुनः पृथ्वीचे सांत्वन केले, तेव्हा तिला भरंवसा वाटून ती निर्भय झाली.

'पृथ्वीवर जाऊन वानरशरीरे धारण करा व हरिचरणांची सेवा करा!' असे देवांना सांगून ब्रह्मदेव सत्यलोकास गेले. १८७

सर्व देव आपापल्या स्थानी गेले. पृथ्वीसह त्यांच्या हृदयाची व्यथा समाप्त झाली. ब्रह्मदेवांनी जी आज्ञा दिली, तिची अंमलबजावणी विलंब न लावता त्यांनी मोठ्या आनंदाने केली. पृथ्वीवर जाऊन वनचरांचे (ऋक्ष-वानरांचे) देह धारण केले. ज्यांचा प्रताप व बल अतुल्य आहे, असे ते बनले! पर्वत, झाडे, नखे ही आयुधे घेणारे सगळे वीर? शांतबुद्धीने हरीच्या आगमनाची वाट पाहात राहिले. पर्वतावर व वनात मोठ्या संख्येने वास्तव्य करून त्यांनी आपापल्या सेना शिस्तीत सुसज्ज केल्या!

चौ०– अवधपुरीं रघुकुलमनि राऊ। बेद बिदित तेहि दसरथ नाऊँ ॥
धरम धुरंधर गुननिधि ग्यानी। हृदयँ भगति मति सारँगपानी ॥
दो०– कौसल्यादि नारि प्रिय सब आचरन पुनीत।
पति अनुकूल प्रेम दृढ़ हरि पद कमल बिनीत ॥ १८८ ॥
चौ०– एक बार भूपति मन माहीं। भै गलानि मोरें सुत नाहीं ॥
गुर गृह गयउ तुरत महिपाला। चरन लागि करि बिनय बिसाला ॥
निज दुख सुख सब गुरहि सुनायउ। कहि बसिष्ठ बहुबिधि समुझायउ ॥
धरहु धीर होइहहिं सुत चारी। त्रिभुवन बिदित भगत भय हारी ॥
सृंगी रिषिहि बसिष्ठ बोलावा। पुत्रकाम सुभ जग्य करावा ॥
भगति सहित मुनि आहुति दीन्हें। प्रगटे अगिनि चरू कर लीन्हें ॥
जो बसिष्ठ कछु हृदयँ बिचारा। सकल काजु भा सिद्ध तुम्हारा ॥
यह हबि बाँटि देहु नृप जाई। जथा जोग जेहि भाग बनाई ॥
दो०– तब अदृस्य भए पावक सकल सभहि समुझाइ।
परमानंद मगन नृप हरष न हृदयँ समाइ ॥ १८९ ॥
चौ०– तबहिं रायँ प्रिय नारि बोलाईं। कौसल्यादि तहाँ चलि आईं ॥
अर्ध भाग कौसल्यहि दीन्हा। उभय भाग आधे कर कीन्हा ॥

हे सर्व मनोहरचरित्र तुम्हाला मी आतापर्यंत सांगितले, आता मध्येच जे सांगावयाचे शिल्लक ठेवले ते सांगतो ऐका. श्रीरामावतार व रघुकुलशिरोमणी दशरथ नावाचे राजे अयोध्याधिपती झाले. त्यांचे नाव वेदातही विख्यात आहे. ते धर्मधुरंधर, गुणागार व ज्ञानी होते. त्यांच्या हृदयात धनुर्धारी भगवंताची भक्ती असून त्यांच्या बुद्धीचाही लय तिकडेच लागलेला होता. कौसल्यादि त्यांच्या सर्व राण्या त्यांना प्रिय होत्या व त्याही आचरणाने पवित्र होत्या. त्या नम्र असून पतीच्या मताने चालणाऱ्या होत्या. शिवाय पतीच्या ठिकाणी व हरिचरणकमली त्यांचे दृढ प्रेम होते. १८८

एकदा आपल्याला मुलगा नाही म्हणून राजाच्या मनाला फार खेद वाटला. लगेच जलदीने राजा गुरुगृही गेला व त्यांच्या पाया पडून त्याने अत्यंत नम्रपणे विनंती केली. त्याने आपल्या सर्व सुखदुःखाची कहाणी आपल्या गुरूंना निवेदन केली. गुरु वसिष्ठांनीही त्याची अनेक प्रकारे समजूत घातली. ते म्हणाले, "धीर धरा. त्रिभुवन-विख्यात आणि भक्ताच्या भीतीचे निवारण करणारे असे चार मुलगे तुम्हाला होतील!"

वसिष्ठांनी शृंगीऋषींना आणवून पुत्रकामेष्टी नावाचा शुभ यज्ञ केला. त्या यज्ञात भक्तियुक्त अंतःकरणाने मुनींनी आहुती देताच अग्निनारायण हातात पायस होऊन प्रकटले! अग्निदेव म्हणाले, "वसिष्ठा! तुम्ही जे काही मनाशी ठरविले होते ते सर्व कार्य साधले असे समजा. "राजा, आता हे हविष्यान्न, ज्यांना जसे योग्य तसे घरी जाऊन वाटून दे!!" अशी त्यांनी दशरथराजांना सूचना दिली.

याप्रमाणे अग्निनारायण सर्व सभासदांना जाणीव करून देऊन अदृश्य झाले. राजा परमानंदात निमग्न झाला. त्याच्या हृदयात आनंद मावेना! १८९

राजाने आपल्या प्रिय राण्यांना लगेच बोलावले. कौसल्या आदिकरून राण्या ताबडतोब चालतच आल्या. हविर्भागापैकी निम्मा भाग राजाने कौसल्येला दिला. उरलेल्या अर्ध्याचे पुनः दोन भाग केले. त्यापैकी

चौ०— कैकेई कहँ नृप सो दयऊ। रह्यो सो उभय भाग पुनि भयऊ ॥
कौसल्या कैकेई हाथ धरि। दीन्ह सुमित्रहि मन प्रसन्न करि ॥
एहि बिधि गर्भसहित सब नारी। भईं हृदयँ हरषित सुख भारी ॥
जा दिन तें हरि गर्भहिं आए। सकल लोक सुख संपति छाए ॥
मंदिर महँ सब राजहिं रानीं। सोभा सील तेज की खानीं ॥
सुख जुत कछुक काल चलि गयऊ। जेहिं प्रभु प्रगट सो अवसर भयऊ ॥

दो०— जोग लगन ग्रह बार तिथि सकल भए अनुकूल।
चर अरु अचर हर्षजुत राम जनम सुखमूल ॥ १९० ॥

चौ०— नौमी तिथि मधु मास पुनीता। सुकल पच्छ अभिजित हरिप्रीता ॥
मध्यदिवस अति सीत न घामा। पावन काल लोक बिश्रामा ॥
सीतल मंद सुरभि बह बाऊ। हरषित सुर संतन मन चाऊ ॥
बन कुसुमित गिरिगन मनिआरा। स्रवहिं सकल सरिताऽमृतधारा ॥
सो अवसर बिरंचि जब जाना। चले सकल सुर साजि बिमाना ॥
गगन बिमल संकुल सुर जूथा। गावहिं गुन गंधर्ब बरूथा ॥

एक त्याने कैकेयीस दिला. आणि उरलेल्या एकाचे पुनः दोन भाग केले. ते त्याने कौसल्या व कैकेयीचे हस्ते सुमित्रेला दिले.* त्यामुळे आपल्याला मान मिळाला म्हणून कौसल्या-कैकेयी संतुष्ट झाल्या व दोन भाग मिळाल्याने सुमित्रा संतुष्ट झाली !

याप्रमाणे तिन्ही राण्या गर्भवती झाल्याने हृदयात हर्ष होऊन त्यांना परम समाधान लाभले. गर्भात हरी आल्यावेळेपासून जनतेत सर्व सुख संपत्तीची समृद्धी झाली! त्या राण्या शोभा, शील व तेज यांच्या सुंदर खाणीच बनून आपापल्या मंदिरात पूर्ण तेजाने प्रकाशू लागल्या ! अशा प्रकारे काही काळ सुखाने गेल्यानंतर प्रभू प्रकट होण्याचा समय जवळ आला.

लग्न, वार, तिथी योग सर्वच ग्रह आदिकरून अनुकूल झाले. जड-चेतन सर्व सृष्टी हर्षाने भरून गेली! कारण रामाचा जन्म हाच मुळी सर्वांच्या सुखाचे मूळ होय ! १९०

नवमी तिथी, पवित्र चैत्र मास, शुक्ल पक्ष, भगवंताना प्रिय असा अभिजित् मुहूर्त, दिवस मध्यावर आलेला, अत्यंत उष्णता नाही, अत्यंत थंडी नाही असा सर्व लोकांना संतोष देणारा समशीतोष्ण काळ, मंद, सुगंध, शीतल असा वारा वाहू लागला! देवता हर्षित झाल्या! संतांचा उत्साह वाढला. वनराजी कुसुमांनी प्रफुल्लित झाली! पर्वतावर रत्ने चमकू लागून ते खुलले! सर्व नद्या अमृतासारख्या पाण्याने भरून वाहू लागल्या !

भगवंताच्या अवताराची वेळ विरंचीच्या (ब्रह्मदेवांच्या) ध्यानी येताच, आपापली विमाने सजवून निघण्यासाठी सर्व देवांना सूचना मिळाल्या! स्वच्छ आकाशात देवतांच्या समुदायांनी गर्दी उडवली! सगळ्या

---

* १) लक्ष्मण—कौसल्येच्या हातच्या हविर्भागाचा; शत्रुघ्न—कैकयीच्या हातच्या हविर्भागाचा. दोघेही याप्रमाणे जन्मल्यानंतर योग्यकाळी दोन्हीकडे गेले. २) दशरथराजांची दूरदृष्टी व गृहव्यवस्थेची शिस्त. ३) ज्या क्रमाने हविर्भाग मिळाले, त्याच क्रमाने पुत्र झाले. १ कौसल्या—राम, २ कैकयी—भरत. ३ कैकयीच्या हस्ते सुमित्रेस—शत्रुघ्न. ४ कौसलेच्या हस्ते सुमित्रेस—लक्ष्मण.

चौ०— बरषहिं सुमन सुअंजुलि साजी । गहगहि गगन दुंदुभी बाजी ॥
अस्तुति करहिं नाग मुनि देवा । बहुबिधि लावहिं निज निज सेवा ॥

दो०— सुर समूह बिनती करि पहुँचे निज निज धाम ।
जगनिवास प्रभु प्रगटे अखिल लोक बिश्राम ॥ १९१ ॥

छं०- भए प्रगट कृपाला दीनदयाला कौसल्या हितकारी ।
हरषित महतारी मुनि मन हारी अद्भुत रूप बिचारी ॥
लोचन अभिरामा तनु घनस्यामा निज आयुध भुज चारी ।
भूषन बनमाला नयन बिसाला सोभासिंधु खरारी ॥ १ ॥
कह दुइ कर जोरी अस्तुति तोरी केहि बिधि करौं अनंता ।
माया गुन ग्यानातीत अमाना बेद पुरान भनंता ॥
करुना सुख सागर सब गुन आगर जेहि गावहिं श्रुति संता ।
सो मम हित लागी जन अनुरागी भयउ प्रगट श्रीकंता ॥ २ ॥
ब्रह्मांड निकाया निर्मित माया रोम रोम प्रति बेद कहै ।
मम उर सो बासी यह उपहासी सुनत धीर मति थिर न रहै ॥
उपजा जब ग्याना प्रभु मुसुकाना चरित बहुत बिधि कीन्ह चहै ।
कहि कथा सुहाई मातु बुझाई जेहि प्रकार सुत प्रेम लहै ॥ ३ ॥

गंधर्वांनी भगवंताच्या गुणांचे गायन सुरू केले. सुंदर फुलांच्या अंजुली बनवून पुष्पवृष्टी सुरू झाली. आकाशात दुदुंभी दुम दुम वाजू लागल्या ! नाग, मुनी व देव यांनी स्तुती केली. आपापली सेवा भगवच्चरणी अर्पण करून, ते विनंती करून जेथे आपापले धाम (स्थान) होते तेथे (उदा० चंद्र मनात,आदित्य नेत्रात) नंतर सर्व (ब्रह्मादि) जाऊन पोचले. आणि अखिल लोकांना विश्राम देणारे जगन्निवास प्रभू प्रकटले! १९१

दीनावर दया करणारे व कौसल्येचे हित साधणारे कृपाळू प्रभू प्रकट झाले ! मुनींच्याही मनाचे हरण करणाऱ्या त्या अद्‌भुत रूपाचा जसा विचार कौसल्या करू लागली तसे तिचे हृदय हर्षाने भरून गेले. नेत्रांना समाधान देणाऱ्या मेघाप्रमाणे श्याम शरीर होते. आपली आयुधे हातांनी फिरवीत होते. चारी हातात आपली खास आयुधे धारण केली होती. दिव्य आभूषणे व वनमाला परिधान केली होती. विशाल नेत्र होते. अशा प्रकारचे खरराक्षसाचा वध करणारे सौंदर्यसागर भगवान् प्रकट झाले ! !

दोन्ही हात जोडून कौसल्या सांगू लागली, "हे अनन्ता! मी तुझी स्तुती कशाप्रकारे करू? वेद व पुराणे तुम्हाला माया, गुण व ज्ञानाच्या पलीकडचे व परिमाणरहित असे म्हणतात; पण श्रुती आणि संतजन दया व सुखाचा सागर, सर्व गुणाचे निवासस्थान म्हणून ज्याचे गायन करतात, तोच भक्तांवर प्रेम करणारा, लक्ष्मीपती भगवान्, माझ्या कल्याणासाठी येथे प्रकट झाला आहे.

वेद म्हणतात की, तुमच्या प्रत्येक रोमात मायेने रचना केलेल्या अनेक ब्रह्मांडांचे समूह भरले आहेत. असा तू माझ्या उदरात राहिलास—ही हास्यास्पद गोष्ट ऐकून विवेक पुरुषाची बुद्धीही विचलित झाल्याशिवाय राहणार नाही !

अशाप्रकारे मातेच्या ठिकाणी ज्ञानाचा स्वच्छ उदय झालेला पाहून भगवंतांनी स्मित केले. त्यांना पुष्कळ प्रकारचे चरित्र करावयाचे होते. म्हणून त्यांनी पूर्वजन्मीची सुंदर कथा सांगून अशी मातेची समजूत घातली की, ज्याच्या योगाने तिचे पुत्रवात्सल्य जागृत झाले.



छं०— माता पुनि बोली सो मति डोली तजहु तात यह रूपा ।
कीजै सिसुलीला अति प्रियसीला यह सुख परम अनूपा ॥
सुनि बचन सुजाना रोदन ठाना होइ बालक सुरभूपा ।
यह चरित जे गावहिं हरिपद पावहिं ते न परहिं भवकूपा ॥ ४ ॥

दो०— बिप्र धेनु सुर संत हित लीन्ह मनुज अवतार ।
निज इच्छा निर्मित तनु माया गुन गो पार ॥ १९२ ॥

चौ०— सुनि सिसु रुदन परम प्रिय बानी । संभ्रम चलि आईं सब रानी ॥
हरषित जहँ तहँ धाईं दासी । आनँद मगन सकल पुरबासी ॥
दसरथ पुत्रजन्म सुनि काना । मानहुँ ब्रह्मानंद समाना ॥
परम प्रेम मन पुलक सरीरा । चाहत उठन करत मति धीरा ॥
जाकर नाम सुनत सुभ होई । मोरें गृह आवा प्रभु सोई ॥
परमानंद पुनि मन राजा । कहा बोलाइ बजावहु बाजा ॥
गुर बसिष्ठ कहँ गयउ हँकारा । आए द्विजन सहित नृपद्वारा ॥
अनुपम बालक देखेन्हि जाई । रूप रासि गुन कहि न सिराई ॥

दो०— नंदीमुख सराध करी जातकरम सब कीन्ह ।
हाटक धेनु बसन मनि नृप बिप्रन्ह कहँ दीन्ह ॥ १९३ ॥

आईची ती ज्ञानस्वरूपी बुद्धी बदलताच ती पुनः म्हणते, "हे तात! (विश्वजनका) हे रूप सोडून अत्यंत प्रिय अशा अनुपम सुख देणाऱ्या पुष्कळ बाललीला करा!" मातेचे हे वचन ऐकून, देवतांचे स्वामी अशा सुजाण भगवंतांनी बालकरूप धारण करून रडण्यास प्रारंभ केला!

तुलसीदास म्हणतात, जो या चरित्राचे गायन करील, तो हरिपद प्राप्त करून घेईल व पुनः संसाररूपी कूपात पडणार नाही!

ब्राह्मण, गाय, देवता व संत यांच्या कल्याणाकरता भगवंतांनी मानवाचा अवतार घेतला. अज्ञानमयी मलिन माया, आणि तिचे सत्त्व, रज, तम हे त्रिगुण व अंतर्बाह्य इंद्रिये यांच्या अतीत असे ते भगवंतांचे दिव्य शरीर त्यांच्या इच्छेनेच निर्माण झालेले आहे. इतरांच्या शरीराप्रमाणे प्रारब्धकर्माधीन होऊन त्रिगुणात्मक भौतिक पदार्थांच्या द्वारा ते बनलेले नाही! १९२

अत्यंत प्रिय असे ते मुलाचे रडणे ऐकताच सर्व राण्या त्वरेने आल्या. आनंदाच्या भरात चारी दिशांना धावता धावता दासींना पुरे वाट झाली! सर्व नगरजन आनंदात निमग्न झाले. पुत्रजन्मांची वार्ता कानी पडल्यावर दशरथमहाराज जणू काही ब्रह्मानंदात बुडून गेले! मनात प्रेम परमकोटीस पोचले. अंगावर काटा येऊन ते थरारले. तरीसुद्धा धीर धरून उठण्याचा प्रयत्न करू लागले. केवळ ज्याचे नाम कानावर पडले तरीही कल्याण होते, असा प्रभू आज माझ्या घरी आला, असे त्यांना वाटले. या भावनेत रंगलेले राजाचे मन परमानंदाने भरून वाहू लागले. अनेक प्रकारची वाद्ये वाजविण्याकरिता त्यांनी हुकूम सोडले. वसिष्ठगुरूंना बोलावणे गेले. दुसऱ्या पूज्य विप्रवृंदासह ते राजवाड्यात येऊन लगेच दाखल झाले. नंतर त्यांनी जाऊन त्या अनुपमेय बालकाचे दर्शन घेतले. त्यावेळी रूपाचा तो सागरच! गुण सांगून ते आहे नंपण्याइतके अमर्याद आहेत! असा त्यांना अनुभव आला.

दशरथराजांनी नांदी श्राद्धाचा विधी उरकताच जातकर्म (पुत्रावण) संस्कार केला. राजाने ब्राह्मणांना बोलावून रत्ने, गायी, सुवर्ण, वस्त्रे अशी दाने दिली. १९३

चौ० – ध्वज पताक तोरन पुर छावा । कहि न जाइ जेहि भाँति बनावा ।।
सुमनबृष्टि अकास तें होई । ब्रह्मानंद मगन सब लोई ।।
बृंद बृंद मिलि चलीं लोगाईं । सहज सिंगार किएँ उठि धाईं ।।
कनक कलस मंगल भरि थारा । गावत पैठहिं भूप दुआरा ।।
करि आरति नेवछावरि करहीं । बार बार सिसु चरनन्हि परहीं ।।
मागध सुत बंदिगन गायक । पावन गुन गावहिं रघुनायक ।।
सर्बस दान दीन्ह सब काहू । जेहिं पावा राखा नहिं ताहू ।।
मृगमद चंदन कुंकुम कीचा । मची सकल बीथिन्ह बिच बीचा ।।

दो० – गृह गृह बाज बधाव सुभ प्रगटे सुषमा कंद ।
हरषवंत सब जहँ तहँ नगर नारि नर बृंद ।। १९४ ।।

चौ० – कैकयसुता सुमित्रा दोऊ । सुंदर सुत जनमत भैं ओऊ ।।
वह सुख संपति समय समाजा । कहि न सकइ सारद अहिराजा ।।
अवधपुरि सोहइ एहि भाँती । प्रभुहि मिलन आई जनु राती ।।
देखि भानु जनु मन सकुचानी । तदपि बनी संध्या अनुमानी ।।
अगर धूप बहु जनु अँधिआरी । उड़इ अबीर मनहुँ अरुनारी ।।
मंदिर मनि समूह जनु तारा । नृप गृह कलस सो इंदु उदारा ।।

सर्व अयोध्या ध्वज व पताका, तोरणे इत्यादिकांनी जणू काही आच्छादित केली ! किती जागी केवढ्या उत्साहाने तिला सजवली ते सांगणे कठीण ! आकाशातून तर पुष्पवृष्टीचा सारखा वर्षाव चालूच होता. त्यामुळे सर्व अयोध्यावासी जनता ब्रह्मानंदाच्या सुखसागरात हर्षयुक्त अशी पोहू लागली ! स्वाभाविक जरूर त्या अलंकारांसह स्त्रिया तशा धावत निघाल्या. काही थव्याथव्यांनी राजवाडयाकडे निघाल्या. सुवर्णाचे मंगल कलश सुवर्णाच्या ताटात घेऊन त्यात मंगल द्रव्ये भरून, मंगल गीते गात गात त्या राजवाडयात शिरू लागल्या ! सूतिकागृहाच्या दाराजवळ जाऊन आरती करून अनेक वस्तू त्यांनी ओवाळून टाकल्या आणि पुनः पुन्हा त्यांनी शिशुचरणांना प्रणाम केले ! मागध, सूत व बंदीजन यांनी रघुनायकाच्या पावन गुणांच्या गायनाचा सपाटा सुरू ठेवला ! सर्वांनीच सर्वस्वाचे दान केले, इतकेच नव्हे, ज्यांनी दाने घेतली त्यांनीही ती आपल्याजवळ शिल्लक ठेवली नाहीत. कस्तुरी, कुंकुम व चंदन यांचे रस्त्यावर जागोजागी इतके सडे पडले की, त्यांचा चिखल तयार झाला !! अयोध्यानगरीतील प्रत्येक घरात स्वतंत्र थाटाने उत्सव व मंगल जयघोष सुरू झाले ! कारण परम शोभेचा गाभा आज प्रकट झाला होता ना ? चौकाचौकावर सर्व स्त्रिया व पुरुष थव्याथव्यांनी उभे राहून उसळणाऱ्या आनंदाच्या लाटांची जणू काही संगमक्षेत्रे बनवीत होते ! ! १९४

कौसल्येच्या प्रसूतीनंतर थोडयाच वेळात कैकेयीला एक व सुमित्रेला दोन असे अत्यंत सुंदर पुत्र झाले. त्यावेळच्या अयोध्यानगरीतील सामाजिक सुख, संपत्ती समय व समाज याचे वर्णन शेषशारदेलाही करणे अशक्य होते. अशी ती अयोध्या नगरी शोभू लागली. वेळ दुपारची, पण असे वाटले की, प्रभुदर्शनासाठी निशाच आली आहे ! सूर्याला पाहून ती जणू लाजली व यथोचित अशा संध्याकालाचे तिने रूप घेतले असे वाटले. अगरू व धूप यांचे ढग आकाशात जमले; व त्यामुळे अंधारून आल्यासारखे झाले. त्यातच गुलाल उडून जरूर तो लालिमा पसरला ! कौसल्येच्या मंदिरावरील जडलेली रत्ने ताऱ्याप्रमाणे चमकत होती आणि राजवाडयाचा कळस हा पूर्णिमेच्या चंद्राप्रमाणे आपली प्रभा चारी दिशांना फेकत होता ! आतील बाजूस

चौ० – भवन बेदधुनि अति मृदु बानी । जनु खग मुखर समयँ जनु सानी ॥
कौतुक देखि पतंग भुलाना । एक मास तेइँ जात न जाना ॥

दो० – मास दिवस कर दिवस भा मरम न जानइ कोइ ।
रथ समेत रबि थाकेउ निसा कवन बिधि होइ ॥ १९५ ॥

चौ० – यह रहस्य काहूँ नहिं जाना । दिनमनि चले करत गुनगाना ॥
देखि महोत्सव सुर मुनि नागा । चले भवन बरनत निज भागा ॥
औरउ एक कहउँ निज चोरी । सुनु गिरिजा अति दृढ़ मति तोरी ॥
काकभुसुंडि संत हम दोऊ । मनुजरूप जानइ नहिं कोऊ ॥
परमानंद प्रेम सुख फूले । बीथिन्ह फिरहिं मगन मन भूले ॥
यह सुभ चरित जान पै सोई । कृपा राम कै जापर होई ॥
तेहि अवसर जो जेहि बिधि आवा । दीन्ह भूप जो जेहि मन भावा ॥
गज रथ तुरग हेम गो हीरा । दीन्हे नृप नानाबिधि चीरा ॥

दो० – मन संतोषे सबन्हि के जहँ तहँ देहिं असीस ।
सकल तनय चिर जीवहुँ तुलसिदास के ईस ॥ १९६ ॥

चौ० – कछुक दिवस बीते एहि भाँती । जात न जानिअ दिन अरु राती ॥
नामकरन कर अवसरु जानी । भूप बोलि पठए मुनि ग्यानी ॥

विप्रवृंद मधुर स्वरात वेदपाठ करीत होते, तोच पुरीतील उपवनातून पक्ष्यांचा मधुर किलबिलाट झाला ! हे सर्व कौतुक पाहून सूर्यनारायण भुलून जो गुंगला, (द्विजांचा) तो एक महिना गेल्याचेही त्या भानूला भान राहिले नाही ! एक महिनाभर दिवसच लांबला आहे, यातील इंगित कोणाच्याही ध्यानात न येण्याइतकी सर्वच जनता आनंदाने बेहोष झाली होती. रथासह सूर्यच जिथे थबकून उभा राहिला, तेथे रात्र होणार तरी कशी ? १९५

अखेर हे रहस्य कोणालाच कळले नाही, हे जाणून दिनमणी आपल्याच वंश अवतंसाचे गुणगान करीत निघाला !

सुर, मुनी, नागसुद्धा हा पहिल्या दिवसाचा महोत्सव पाहून आपल्या भाग्याची प्रशंसा करीत आपापल्या स्थानास जाऊ लागले. "गिरिजे !" शंकर म्हणतात, "आणखी एक आम्ही केलेली चोरी सांगतो, कारण, तू चांगलीच चौकस आहेस, म्हणून ऐक ! काक, भुशुंडी व मी असे दोघेजण मानवरूप घेऊन, कुणाला नकळत प्रेमपरमानंदाच्या सुखात फुलून वेड लागल्याप्रमाणे अयोध्येच्या रस्त्यातून आनंदमय मनःस्थितीत भटकलो !"

रामकृपाजलाची ज्याच्या मस्तकावर वृष्टी होते, त्यालाच या शुभचरितातील रहस्य उकलते. त्या प्रसंगी जो मनुष्य जसा आला, त्याला आवडेल ते राजाने दिले. हत्ती, घोडे, रथ, सोने, गायी, भूमी, हिरे व अनेक प्रकारची वस्त्रे यांची राजाने खैरात केली. राजाने सर्वांचे मन संतुष्ट केल्यामुळे जो तो अंतःकरणापासून आशीर्वचन बोलू लागला. "तुलसीदासांचे ईश असे हे सर्वच राजपुत्र चिरंजीव होवोत !" १९६

काही दिवस या आनंदात निघून गेले. दिवस केव्हा संपला व रात्र केव्हा उजाडली, याची दादही लागली नाही. नामकरणाचा दिवस आलेला पाहून राजाने तज्ज्ञ वसिष्ठ मुनींना बोलावून आणले. मुनिदेवांची पूजा करून तो म्हणाला, "मुनिश्रेष्ठ, आपण मनात योजना करून ठरविलेली नावेच ठेवा."

करि पूजा भूपति अस भाषा । धरिअ नाम जो मुनि गुनि राखा ॥
इन्ह के नाम अनेक अनूपा । मैं नृप कहब स्वमति अनुरूपा ॥
जो आनंद सिंधु सुखरासी । सीकर तें त्रैलोक सुपासी ॥
सो सुखधाम राम अस नामा । अखिल लोक दायक बिश्रामा ॥
बिस्व भरन पोषन कर जोई । ताकर नाम भरत अस होई ॥
जाके सुमिरन तें रिपु नासा । नाम सत्रुहन बेद प्रकासा ॥

दो० — लच्छन धाम राम प्रिय सकल जगत आधार ।
गुरु बसिष्ट तेहि राखा लछिमन नाम उदार ॥ १९७ ॥

चौ० — धरे नाम गुर हृदयँ बिचारी । बेद तत्व नृप तव सुत चारी ॥
मुनि धन जन सरबस सिव प्राना । बाल केलि रस तेहिं सुख माना ॥
बारेहि ते निज हित पति जानी । लछिमन राम चरन रति मानी ॥
भरत सत्रुहन दूनउ भाई । प्रभु सेवक जसि प्रीति बड़ाई ॥
स्याम गौर सुंदर दोउ जोरी । निरखहिं छबि जननीं तृन तोरी ॥
चारिउ सील रूप गुन धामा । तदपि अधिक सुख सागर रामा ॥
हृदयँ अनुग्रह इंदु प्रकासा । सूचत किरन मनोहर हासा ॥
कबहुँ उछंग कबहुँ बर पलना । मातु दुलारइ कहि प्रिय ललना ॥

कौसल्येच्या मांडीवरून बाळाकडे बोट करून मुनी म्हणाले, " राजा! यांची अनुपमेय अशी अनेक नावे आहेत. त्यापैकी हे राजा! माझ्या बुद्धीप्रमाणे मी सांगतो. हा जो आनंदाचा सागर व सुखाची राशी आहे, ज्या आनंद सिंधूतील एका बिंदूपासून त्रैलोक्य सुखाने भारावते जो सुखाचे निवासस्थान असून सर्वांना शांती देणारा आहे ! तो आपला सर्वांत ज्येष्ठ मुलगा ! त्याचे नाव राम !

जो या विश्वाचे भरण व पोषण करणारा आहे, त्या आपल्या या दुसऱ्या पुत्राचे नाम भरत ! ज्याच्या केवळ स्मरणाबरोबर शत्रूंचा नायनाट होतो, त्याचे वेदप्रसिद्ध नाव ' शत्रुघ्न ! '

(सुदर्शन चक्रे; किंवा मृत्युंजय रुद्र.) तसेच जो शुभ लक्षणांचे वसतिस्थान, श्रीरामाचा प्रिय व अखिल जगाचा आधार आहे, त्याचे गुरु वसिष्ठांनी ' लक्ष्मण ' असे श्रेष्ठ नाव ठेवले ! १९७

गुरुजींनी याप्रमाणे हृदयात विचार करून ही नावे ठेवली व म्हणाले, ' राजा ! तुमचे हे चार पुत्र मिळून वेदातील तत्त्व – साक्षात् भगवान आहेत. मुनींचे धन, भक्तांचे सर्वस्व आणि शिवजीचे प्राण असणारे असे भगवान, तुम्हा लोकांच्या प्रेमाला वश होऊन, बाललीलांच्या रसात सुख मानत आहेत. '

बाल्यपणापासूनच, रामचंद्रांना आपले परमहितैषी स्वामी जाणून, लक्ष्मण रामचरणावर प्रेम करू लागले. भरत व शत्रुघ्न, दोन्ही भावामध्ये, स्वामी व सेवकामधील स्तुत्य अशी प्रीती सुरू झाली. श्याम व गौर अशा त्या दोन सुंदर जोड्या निरखून आई लगेच दृष्ट काढून टाकीत असे.

शील, रूप व गुण यांचे निवासस्थान असेच ते चारी बंधू आहेत. त्यांतल्या त्यात राम हे केवल सुख-सागरच आहेत. त्यांच्या हृदयात कृपारूपी चंद्रमा पूर्ण प्रकाशित झाला आहे, याची कल्पना त्यांच्या मनोहर हास्याने त्यांची किरणे बाहेर पडताच येत असे. कौसल्यामाता कधी उत्तम पाळण्यात, कधी मांडीवर घेऊन माझ्या लाडक्या ! छकुल्या ! म्हणून कुरवाळत असे ! !

दो० — ब्यापक ब्रह्म निरंजन निर्गुन बिगत बिनोद ।
सो अज प्रेम भगति बस कौसल्या कें गोद ॥ १९८ ॥

चौ० — काम कोटि छबि स्याम सरीरा । नील कंज बारिद गंभीरा ॥
अरुन चरन पंकज नख जोती । कमल दलन्हि बैठे जनु मोती ॥
रेख कुलिस ध्वज अंकुस सोहे । नूपुर धुनि सुनि मुनि मन मोहे ॥
कटि किंकिनी उदर त्रय रेखा । नाभि गभीर जान जेहिं देखा ॥
भुज बिसाल भूषन जुत भूरी । हियँ हरि नख अति सोभा रूरी ॥
उर मनिहार पदिक की सोभा । बिप्र चरन देखत मन लोभा ॥
कंबु कंठ अति चिबुक सुहाई । आनन अमित मदन छबि छाई ॥
दुइ दुइ दसन अधर अरुनारे । नासा तिलक को बरनै पारे ॥
सुंदर श्रवन सुचारु कपोला । अति प्रिय मधुर तोतरे बोला ॥
चिक्कन कच कुंचित गभुआरे । बहु प्रकार रचि मातु सँवारे ॥
पीत झगुलिआ तनु पहिराई । जानु पानि बिचरनि मोहि भाई ॥
रूप सकहिं नहिं कहि श्रुति सेषा । सो जानइ सपनेहुँ जेहिं देखा ॥

दो० — सुख संदोह मोहपर ग्यान गिरा गोतीत ।
दंपति परम प्रेम बस कर सिसुचरित पुनीत ॥ १९९ ॥

जे ब्रह्म, जो परमात्मा सर्वव्यापक, विमल मायारहित, गुणातीत, जन्मरहित, असे व चेष्टा-क्रीडादि विनोदरहित आहे, तोच प्रेम व भक्तीला वश होऊन, कौसल्येच्या मांडीवर खेळत राहिला आहे ! १९८

नीलकमल व पाण्याने डवडवलेला मेघ — यांच्याप्रमाणे श्यामवर्णाचे त्या भगवंताचे शरीर कोट्यवधी कामदेवांचे सौंदर्य एकवटून प्रकटत होते. पायाचे तळवे लालेलाल कमलांच्यासारखे असून नखांची शुभ्र प्रभा अशी खुलत होती की जणू काही लाल कमलाच्या पाकळीवर मोतीच बसवले आहेत ! चरणतलावर ध्वज, ऊर्ध्वरेषा अंकुश व वज्र चिन्हे रेषांनी झळकत होती. पायातील नूपुरांचा ध्वनी कानावर पडताच मुनींचीही मने मोहित होत. कमरेला घागऱ्यांचा कडदोरा व पोटावर तीन वळ्या ! ज्याला नाभिकमल दिसेल त्यालाच त्याच्या गांभीर्याची कल्पना येई. बाहुभूषणे योग्यस्थळी घातलेले विशाल आजानु भुज हृदयावर खुलणारी वाघनखांची शोभा ! हार व पदक अतिसुंदर व त्यातील भृगुचरण चिन्हाकडे पाहात असलेले पाहून लोभ वाटे ! तीन रेषांनी युक्त व चढउताराचा असा शंखाप्रमाणे कंठ ! आणि हनुवटी तर अतीव सुंदर ! अशा त्या मुखावर अनंत मदनांचे तेज विलसत आहे. मुखात खाली व वर दोन दोन दांत आलेले आणि लाललाल अधरोष्ठ तर श्रेष्ठ शोभेचे स्थानच नासिका व कपाळावरील तिलक यांचे वर्णन कोण करू शकेल ? सुंदर कान व अतिशय आकर्षक गाल ! बोबड्या बोलांची माधुरी अतीच प्रिय वाटणारी ! बाळाचे तुळतुळीत काळे व कुरळे जावळ आईच्या विविध कलायुक्त हातांनी ठाकठीक केलेले ! शरीरावर पिवळे पातळ तलम झबले घालून दुडदुड रांगत येत असता मला कितीतरी प्रिय वाटले ! पार्वतीना शंकर सांगतात ‘ अशी ती सौंदर्याची शोभा वेदांना किंवा शेषांनाही वर्णन करता येणार नाही. ज्याला कधी स्वप्नात जरी दर्शन झाले असेल तोच त्या शोभेची कल्पना करू शकेल ? वर्णन करता येणार नाहीच.

केवळ आनंदघन, मोहातीत, ज्ञान, वाणी, इंद्रियांच्या पलीकडे आहे असा जो भगवान् तो दशरथ-कौसल्या दंपत्याच्या आत्यंतिक प्रेमाला वश होऊन पवित्र बाललीला करत आहे ! १९९

चौ० – एहि बिधि राम जगत पितु माता । कोसलपुर बासिन्ह सुखदाता ।।
जिन्ह रघुनाथ चरन रति मानी । तिन्ह की यह गति प्रगट भवानी ।।
रघुपति बिमुख जतन कर कोरी । कवन सकइ भव बंधन छोरी ।।
जीव चराचर बस कै राखे । सो माया प्रभु सों भय भाखे ।।
भृकुटि बिलास नचावइ ताही । अस प्रभु छाडि भजिअ कहु काही ।।
मन क्रम बचन छाडि चतुराई । भजत कृपा करिहहिं रघुराई ।।
एहि बिधि सिसुबिनोद प्रभु कीन्हा । सकल नगरबासिन्ह सुख दीन्हा ।।
लै उछंग कबहुँक हलरावै । कबहुँ पालनें घालि झुलावै ।।

दो० – प्रेम मगन कौसल्या निसि दिन जात न जान ।
सुत सनेह बस माता बालचरित कर गान ।। २०० ।।

चौ० – एक बार जननीं अन्हवाए । करि सिंगार पलनाँ पौढ़ाए ।।
निज कुल इष्टदेव भगवाना । पूजा हेतु कीन्ह अस्नाना ।।
करि पूजा नैबेद्य चढावा । आपु गई जहँ पाक बनावा ।।
बहुरि मातु तहवाँ चलि आई । भोजन करत देख सुत जाई ।।
गै जननी सिसु पहिं भयभीता । देखा बाल तहाँ पुनि सूता ।।
बहुरि आइ देखा सुत सोई । हृदयँ कंप मन धीर न होई ।।

याप्रमाणे सर्व जगाचे मायबाप राम अयोध्यानगरीतील लोकांना आपल्या बाललीलांनी सुख देत होते. शंकर म्हणतात, "हे भवानी ! जे रघुनाथ पदकमली असे प्रेम बाळगतात त्यांना कसे सुख होते त्याचे हे प्रत्यक्ष उदाहरण पाहा ! (दशरथ, कौसल्या व अयोध्यावासी भोगत असलेले सुख) यांच्या उलट रघुपतीला विन्मुख होऊन जरी कोट्यवधी यत्न केले तरी भवबंधन सोडण्यास कोण समर्थ ? जी माया चराचर जीवांना वश करते, तिलासुद्धा भगवंताला भ्यावे लागते. आपल्या नुसत्या भुवईच्या चढ-उताराने जो अशा मायेला नाचवतो, अशा प्रभूला सोडून इतर कोणाच्या भजनी लागावे ? मनाने, कर्माने व वाणीने अहंकार सोडून रघुराजाची भक्ती केल्यास ते कृपा करतात.

याप्रमाणे बाललीला करून सर्व कोसलपुरवासी जनांना प्रभूंनी सुख दिले. [illegible] कधी मांडीवर घेऊन डोलवी तर कधी पाळण्यात घालून हालवी. अशी ती प्रेममग्न झाल्यामुळे दिवस व रात्री एका-मागून कशा व किती गेल्या यांचे तिला मुळीच भान राहिले नाही. भगवंताच्या ठिकाणी पुत्रप्रेमाला वश होऊन त्याच्या बालचरित्राचे गायन ती करू लागली. २००.

एके दिवशी नेहमीप्रमाणेच कौसल्येने आपल्या छकुल्याला न्हाऊ घातले, बाळलेणी अंगावर घालून तीट काजळ करून त्याला पाळण्यात निजवला. स्नान करून आपल्या इष्ट कुलदेवतेचे पूजन करण्यासाठी ती मग गेली. यथासांग पूजन करून देवाला नैवेद्य समर्पण केला. नंतर काही कामानिमित्त स्वयंपाकघरात आली. नैवेद्य परत आणण्यासाठी पुनः देवघरात जाऊन पाहाते तो काय ? आपला बाळच नैवेद्य खात असलेला तिला दिसला ! तिची भीतीने गाळण उडून ती धावतच पाळण्याजवळ गेली, पण तिथे तिचा लाडका शांत झोपी गेलेला तिला दिसला ! 'हे काय बाई !' म्हणून परत देवघरात येऊन पाहू लागली तो आपलाच बाळ नैवेद्य खात आहे ! आता मात्र तिच्या हृदयात कापरे भरले ! अगदी धीर धरवेना ! पाळण्यात झोपलेला बाळ

चौ० – इहाँ उहाँ दुइ बालक देखा । मतिभ्रम मोर कि आन बिसेषा ॥
देखि राम जननी अकुलानी । प्रभु हँसि दीन्ह मधुर मुसुकानी ॥

दो० – देखरावा मातहि निज अद्भुत रूप अखंड ।
रोम रोम प्रति लागे कोटि कोटि ब्रह्मंड ॥ २०१ ॥

चौ० – अगनित रबि ससि सिव चतुरानन । बहु गिरि सरित सिंधु महि कानन ॥
काल कर्म गुन ग्यान सुभाऊ । सोउ देखा जो सुना न काऊ ॥
देखी माया सब बिधि गाढ़ी । अति सभीत जोरें कर ठाढ़ी ॥
देखा जीव नचावइ जाही । देखी भगति जो छोरइ ताही ॥
तन पुलकित मुख बचन न आवा । नयन मूदि चरननि सिरु नावा ॥
बिसमयवंत देखि महतारी । भए बहुरि सिसुरूप खरारी ॥
अस्तुति करि न जाइ भय माना । जगत पिता मैं सुत करि जाना ॥
हरि जननी बहुबिधि समुझाई । यह जनि कतहुँ कहसि सुनु माई ॥

दो० – बार बार कौसल्या बिनय करइ कर जोरि ।
अब जनि कबहूँ ब्यापै प्रभु मोहि माया तोरि ॥ २०२ ॥

आणि देवघरात नैवेद्य खात बसलेलाही तोच हे दृश्य पुनः पुन्हा पाहून तिला वाटले, माझ्या नजरेतच काही दोष निर्माण झाला, बाई ! हे भलतेच काही तरी काय आहे ?

व्याकुळ झालेल्या आईकडे नैवेद्य खात असलेल्या रामाने निरखून पाहिले आणि प्रभूनी मधुर, गोड स्मित केले. त्याबरोबर मुखात कौसल्येला काय दिसले ? भगवंतांनी आपल्या मातेला आपले अखंड अद्भुत विश्वरूप दाखवले. त्यांच्या प्रत्येक रोमात कित्येक कोटी ब्रह्मांडे लागली आहेत ! २०१.

सूर्य, चंद्र, शंकर, ब्रह्मदेव यांच्या रूपांना तर मितीच नव्हती. तोच प्रकार पर्वत, नद्या, समुद्र, पृथ्वी व अरण्यांचा ! काल, कर्म, गुण, दोष व स्वभाव,इतकेच काय जे कधी कानांनीसुद्धा ऐकले नव्हते, ते सर्व आता तिच्या चर्मचक्षूपुढे प्रत्यक्ष दिसू लागले. अत्यंत जबरदस्त अशा मायेचे तिने अनेक प्रकार पाहिले. आणि तीच प्रबल माया भगवंतापुढे हात जोडून उभी राहिलेली तिला दिसली. ज्याला ही भगवन्माया नाचवत आहे, असा स्वतःचा जीव तिच्या नजरेपुढे आला व त्या जीवाला या मायेच्या तडाख्यातून सोडविणारी भक्ती जेव्हा तिच्या डोळ्यासमोर आली, तेव्हा तिचे सर्व शरीर रोमांचित झाले, कंठ दाटून आला. तिने आपले डोळे (तृप्तीच्या समाधानाने) मिटले आणि प्रभूच्या पायावर मस्तक ठेवले.

आपली आई फारच विषण्ण झाल्याचे पाहून, मुरारी पुनः बालरूप बनले. त्याना पाहून मुखातून स्तुतीचा शब्द उमटेना. तिला भीती वाटू लागली, ती मनात म्हणाली, जगजनकाला मी आपला मुलगा समजले ? केवढे धाडस माझे हे ! !

जननीची हरींनी पुष्कळपरीनी समजूत घातली व शेवटी म्हणाले, " अंब ! गोष्ट कोठे न वदावी ! "

कौसल्या हात जोडून प्रभुचरणी पुनः पुन्हा प्रार्थना करत आहे. " भगवंता ! तुझ्या मायेच्या जाळ्यात, इतःपर मला कधीही अडकवू नकोस ! ! " २०२

चौ० – बालचरित हरि बहुबिधि कीन्हा। अति अनंद दासन्ह कहँ दीन्हा॥
कछुक काल बीतें सब भाई। बड़े भए परिजन सुखदाई॥
चूड़ाकरन कीन्ह गुरु जाई। दसरथ अजिर बिचर प्रभु सोई॥
परम मनोहर चरित अपारा। करत फिरत चारिउ सुकुमारा॥
मन क्रम बचन अगोचर जोई। बिप्रन्ह पुनि दछिना बहु पाई॥
भोजन करत बोल जब राजा। नहिं आवत तजि बाल समाजा॥
कौसल्या जब बोलन जाई। ठुमुकु ठुमुकु प्रभु चलहिं पराई॥
निगम नेति सिव अंत न पावा। ताहि धरैं जननी हठि धावा॥
धूसर धूरि भरें तनु आए। भूपति बिहसि गोद बैठाए॥

दो० – भोजन करत चपल चित इत उत अवसरु पाइ।
भाजि चले किलकत मुख दधि ओदन लपटाइ॥ २०३॥

चौ० – बालचरित अति सरल सुहाए। सारद सेष संभु श्रुति गाए॥
जिन्ह कर मन इन्ह सन नहिं राता। ते जन बंचित किए बिधाता॥
भए कुमार जबहिं सब भ्राता। दीन्ह जनेऊ गुरु पितु माता॥
गुरगृहँ गए पढ़न रघुराई। अलप काल बिद्या सब आई॥

अशा रीतीने दासांना परमानंद देणाऱ्या अनेक बाललीला हरीने केल्या. परिजनांना सुख देणारे असे ते चौघे बंधू, काही काळ लोटल्यावर (शेंडी राखणे —चौल) चूडाकरण हा संस्कार करण्याइतके मोठे झाले. तो संस्कार यथाविधी वसिष्ठांनी करवून घेतला, ब्राह्मणाना भरपूर दक्षणा मिळाली. हे चारीही सुकुमार राजपुत्र परम मनोहर चरित्र करीत हिंडू फिरू लागले. खरोखर मन, शरीर आणि वाणीला न मिळणारा असा प्रभू दशरथाच्या प्रांगणात खेळू लागला !

जेवणाच्या वेळी राजांनी हाका मारल्या तरीही मित्रांना सोडून प्रभू येत नसत. कौसल्या बोलावण्यास गेली की, दुडक्या उड्या मारत प्रभू पळून जात असत. याज्ञवल्क्य म्हणतात—वेदाना तो न सापडल्याने त्यांनी 'नेति' असे उद्गार काढले ! भगवान् शंकरांनाही ज्यांचा अंत लागला नाही, अशा परमात्म्याला जबरदस्तीने धरण्यासाठी आई धावत जात असे ! अंगाला सगळी धूळ लागलेली अशी एकदाची स्वारी सापडली म्हणजे, दशरथांनी हास्य करून त्यांना मांडीवर घ्यावे. जेवताना सारखी चुळबूळ करावी व इकडे-तिकडे निसटण्याची संधी शोधावी व थोड्याच वेळात आनंदाने आरोळी ठोकून, तोंडाला दहिभात लागलेला असताच धूम पळून जावे !! २०३

श्रीरामचंद्राच्या अत्यंत सरळ व मनाला प्रसन्न करणाऱ्या, बाललीलांचे गायन सरस्वती, शेष, शंकर आणि वेद यांनी केले आहे. ज्यांचे मन या लीलात रंगून जाणार नाही त्यांना त्यांच्या दैवाने फसवले; भाग्यहीन केले असेच समजावे !

चारी भावांचे मुंजीचे वय होताच गुरू व मातापिता यांनी त्यांचे व्रतबंध केले. त्यानंतर गुरुगृही वसिष्ठाश्रमात विद्याध्ययन करण्यासाठी गेले. थोड्याच अवधीत ते सर्व विषयांत पारंगत झाले. चारी वेद हेच ज्यांचे

जाकी सहज स्वास श्रुति चारी । सो हरि पढ़ यह कौतुक भारी ।।
बिद्या बिनय निपुन गुन सीला । खेलहि खेल सकल नृपलीला ।।
करतल बान धनुष अति सोहा । देखत रूप चराचर मोहा ।।
जिन्ह बीथिन्ह बिहरहिं सब भाई । थकित होहिं सब लोग लुगाई ।।

दो० – कोसलपुर बासी नर नारि बृद्ध अरु बाल ।
प्रानहु ते प्रिय लागत सब कहुँ राम कृपाल ।। २०४ ।।

चौ० – बंधु सखा सँग लेहिं बोलाई । बन मृगया नित खेलहिं जाई ।।
पावन मृग मारहिं जियँ जानी । दिन प्रति नृपहिं देखावहिं आनी ।।
जे मृग राम बान के मारे । ते तनु तजि सुरलोक सिधारे ।।
अनुज सखा सँग भोजन करहीं । मातु पिता अग्या अनुसरहीं ।।
जेहि बिधि सुखी होहिं पुर लोगा । करहिं कृपानिधि सोइ संजोगा ।।
बेद पुरान सुनहिं मन लाई । आपु कहहिं अनुजन्ह समुझाई ।।
प्रातकाल उठि कै रघुनाथा । मातु पिता गुरु नावहिं माथा ।।
आयसु मागि करहिं पुर काजा । देखि चरित हरषइ मन राजा ।।

दो० – ब्यापक अकल अनीह निर्गुन नाम न रूप ।
भगत हेतु नाना बिधि करत चरित्र अनूप ।। २०५ ।।

निःश्वास आहेत, तो प्रभू अध्ययन करतो हीच मुळी कौतुकाची गोष्ट होय ! चारी बंधू विद्या, विजय, गुण व शील यांत नैपुण्य मिळवून, शिवाय त्यांच्या पेशाला आणि वयाला शोभणाऱ्या सर्व खेळांत व राजलीलांत आवडीने व कौशल्याने भाग घेत असत ! हातात धनुष्यबाण घेऊन हा चौकडा बाहेर पडला म्हणजे जड व चेतन सर्व सृष्टीला अगदी मोहिनी पडे ! ज्या रस्त्याने हे चारी भाऊ जात, त्या रस्त्यावरील सर्व स्त्रिया व पुरुष त्यांच्याकडे पाहून त्यांच्या अतुल्य लावण्याने थक्क होत ! याचा परिणाम असा झाला की, [illegible] कोणीही स्त्रीपुरुष, वृद्ध अगर बाल असो, सर्वांनाच कृपाळू राम, प्राणांहूनही प्रिय वाटू लागले ! २०४

आपले मित्र व बंधू यांना बरोबर घेऊन नित्य मृगयेसाठी ते वनात जात. मनात पवित्र भावना ठेवून ते मृगया करीत व केलेली शिकार राजाला आणून दाखवीत ! रामबाणाने ज्यांचा वध होई ते सर्व मृग (वनपशू) शरीर पडताच देवलोकी निवास करण्यास जात !

भोजन प्रसंगी आपले सवंगडी व बंधू यांच्यासह जेवत. त्यांना टाकून कधीच काही खात नसत ! आई-बापांच्या आज्ञा आदराने पाळत. असेच निरनिराळे प्रसंग कृपासागर जमवून आणीत की, ज्याच्या योगाने सर्व पुरवासी सुखावतील ! वेद, इतिहास व पुराणे मनःपूर्वक श्रवण करीत व आपल्या धाकट्या भावांना समजावून सांगत. पंचपंच उषःकाली रघुनायक उठत. माता, पिता व गुरू यांना वंदन करीत, त्यांच्या आज्ञा घेऊन नगरातील कामकाजात लक्ष घालत. एकंदरीत हे सर्व चरित्र पाहून दशरथ राजाला मनात मोठा हर्ष होई !

जे ब्रह्म व्यापक, अज्ञेय पूर्ण निष्क्रिय, जन्मादिरहित, निर्गुण व नामरूपातीत असे आहे, तेच मनुजरूप-धरून भक्तासाठी अनेक प्रकारचे अनुपमेय चरित्र करीत आहे. २०५

चौ० – यह सब चरित कहा मैं गाई । आगिलि कथा सुनहु मन लाई ।।
बिस्वामित्र महामुनि ग्यानी । बसहिं बिपिन सुभ आश्रम जानी ।।
जहँ जप जग्य जोग मुनि करहीं । अति मारीच सुबाहुहि डरहीं ।।
देखत जग्य निसाचर धावहिं । करहिं उपद्रव मुनि दुख पावहिं ।।
गाधितनय मन चिंता ब्यापी । हरि बिनु मरहिं न निसिचर पापी ।।
तब मुनिबर मन कीन्ह बिचारा । प्रभु अवतरेउ हरन महि भारा ।।
एहूँ मिस देखौं पद जाई । करि बिनती आनौं दोउ भाई ।।
ग्यान बिराग सकल गुन अयना । सो प्रभु मैं देखब भरि नयना ।।

दो० – बहुबिधि करत मनोरथ जात लागि नहिं बार ।
करि मज्जन सरऊ जल गए भूप दरबार ।। २०६ ।।

चौ० – मुनि आगमन सुना जब राजा । मिलन गयउ लै बिप्र समाजा ।।
करि दंडवत मुनिहि सनमानी । निज आसन बैठारेन्हि आनी ।।
चरन पखारि कीन्हि अति पूजा । मो सम आजु धन्य नहिं दूजा ।।
बिबिध भाँति भोजन करवावा । मुनिबर हृदयँ हरष अति पावा ।।

श्री रघुवीर विवाह

हे सर्व चरित्र मी सविस्तर कथन केले. आता या पुढची कथा मन लावून ऐका.

ज्ञानी विश्वामित्र हे मुनिश्रेष्ठ ! वनात पवित्र स्थळी शुभ आश्रम करून राहात असत. त्या सिद्धाश्रमाच्या सान्निध्यात मुनिमंडळी जप-यज्ञ-योग इत्यादींचे अनुष्ठान करीत. परंतु त्यांना मारीच आणि सुबाहू या दोन राक्षसांची फार भीती वाटत होती. याचे कारण कुठे यज्ञ सुरू झाल्याचे पाहताच हे राक्षस त्या ठिकाणी धावून जात, मुनींना अतिशय त्रास देत आणि त्यामुळे मुनी दुःखी होत.

हा सर्व दुःसह प्रकार पाहून गाधिज मुनींच्या अंतःकरणात चिंता उत्पन्न झाली. अखेर भगवंताशिवाय हे पापी राक्षस मरणार नाहीत, असा त्यांच्या मनाचा निश्चय झाला. लगेच मुनींद्राच्या हृदयात कल्पना आली की, पृथ्वीचा भार हलका करण्यासाठी प्रभूंनी अवतार घेतलाच आहे. मग काय ! हेच कारण भरपूर आहे. त्या निमित्ताने जाऊन चरणदर्शन घ्यावे आणि राजाला विनंती करून दोन्ही बंधूंना आणावे.

ज्ञान, वैराग्य, सर्व सद्‌गुणांचे वसतिस्थान असणाऱ्या प्रभूला आता डोळे भरून पाहण्याचे भाग्य लाभणार म्हणून मुनिवरांना केवढा आनंद झाला ! अशा रीतीने नाना प्रकारचे मनोराज्य करीत वाट चालत गेल्यामुळे ते झटकन् अयोध्येसमीप आले. सरयू नदीत स्नानसंध्यादि नित्यकर्म यथासांग उरकून ते राजद्वाराजवळ येऊन पोचले. २०६

विश्वामित्र ऋषींचा अधिकार फारच मोठा. त्यांच्या आगमनाचे वृत्त दूतांकडून दशरथ महाराजांच्या कानी जाताच अनेक ब्राह्मण मंडळींना बरोबर घेऊन राजे सामोरे गेले. त्यांना दशरथांनी दंडवत प्रणाम केला व अत्यंत सन्मानपूर्वक आणून सिंहासनावर बसवले. त्यांच्या चरणांचे प्रक्षालन करून उत्तम प्रकारे त्यांची पूजा केली. हात जोडले व " आपले आगमन माझ्याकडे आज झाले खरोखर माझ्यासारखा दुसरा कोण धन्य आहे ?" असे त्यांनी उद्‌गार काढले ! भोजनाचा बेतही उत्तम झाला. त्यामुळे मुनिश्रेष्ठ मनात अत्यंत आनंदित झाले.

चौ०— पुनि चरननि मेले सुत चारी । राम देखि मुनि देह बिसारी ॥
भए मगन देखत मुखु सोभा । जनु चकोर पूरन ससि लोभा ॥
तब मन हरषि बचन कह राऊ । मुनि अस कृपा न कीन्हहु काऊ ॥
केहि कारन आगमन तुम्हारा । कहहु सो करत न लावउँ बारा ॥
असुर समूह सतावहिं मोही । मैं जाचन आयउँ नृप तोही ॥
अनुज समेत देहु रघुनाथा । निसिचर बध मैं होब सनाथा ॥

दो०— देहु भूप मन हरषित तजहु मोह अग्यान ।
धर्म सुजस प्रभु तुम्ह कौं इन्ह कहँ अति कल्यान ॥ २०७ ॥

चौ०— सुनि राजा अति अप्रिय बानी । हृदय कंप मुख दुति कुमुलानी ॥
चौथेंपन पायउँ सुत चारी । बिप्र बचन नहिं कहेहु बिचारी ॥
मागहु भूमि धेनु धन कोसा । सर्बस देउँ आजु सहरोसा ॥
देह प्रान तें प्रिय कछु नाहीं । सोउ मुनि देउँ निमिष एक माहीं ॥
सब सुत प्रिय मोहि प्रान कि नाईं । राम देत नहिं बनइ गोसाईं ॥

दशरथ महाराजांनी आपल्या चारी पुत्रांना ऋषींच्या पायावर घातले. रामदर्शन होताच विश्वामित्रांचे देहभान हरपले ! पूर्णिमेच्या चंद्रकिरणांच्या लाभाने अत्यानंद होऊन चकोराने जसे बेहोष व्हावे तशीच बरोबर विश्वामित्र ऋषींची स्थिति रामचंद्र मुखचंद्र पाहून झाली.

आपल्या चारी मुलांना व विशेषतः रामचंद्राला पाहून ऋषिवर्य संतुष्ट झालेले राजाने पाहिले त्यावेळी त्यांच्या मनात केवढा हर्ष झाला ! "मुने ! अशी कृपा आजपर्यंत आपण कोणावरच केली नाही ! असे उद्गार त्यांना नकळत त्यांच्या मुखावाटे बाहेर पडले. दशरथराजे पुढे बोलू लागले, "यावेळी येण्याचा हेतू काय तो सांगावा; आज्ञेप्रमाणे ताबडतोब अंमलबारी करीन !"

"असुरांचा समूह मला सतावून सोडत आहे. त्याकरिता तुझ्याकडे काही याचना करावी म्हणून आलो ! अनुजासह रघुनाथाला माझ्या स्वाधीन कर. त्यामुळे असुरांचा नाश होऊन मी सनाथ होईन." विश्वामित्रांनी योग्य संधी पाहून हेतू स्पष्ट केला !

परंतु या बोलण्याचा परिणाम अनपेक्षित होऊन राजा खिन्न झालेला दिसताच विश्वामित्र त्याची समजूत घालण्यासाठी म्हणाले, "राजा ! मनात संतुष्ट होऊन माझी इच्छा पूर्ण कर ! मोह व अज्ञान सोड म्हणजे दुःख होणार नाही; कारण यांना माझ्या स्वाधीन केल्याने तुम्हाला धर्म व सत्कीर्तीची प्राप्ती होईल; आणि यांचेही परमकल्याण होईल." २०७

राजाने अत्यंत अप्रिय असे भाषण ऐकले. त्याच्या हृदयांत कंप सुरू झाला. चेहेरा म्लान झाला ! त्याने धीर धरून मोठ्या कष्टाने बोलण्याचा प्रयत्न केला, "हे विप्र, म्हातारपणी हे चार मुलगे मला झाले एवढा विचार करूनही तुम्ही बोलला नाही ! तुम्ही भूमी, गायी, धन किंवा खजिना मागा. हे सर्वस्व आता आनंदाने देण्यास मी तयार आहे. शरीर व प्राण यांहून तर प्रिय माणसास काही नसते ना ? पण एका निमिषात तेही द्यावयास मी मागे पाहणार नाही.

"सगळेच मुलगे मला प्राणप्रिय आहेत. पण हे स्वामिन् ! त्यातूनही माझा राम तुम्हाला देणे माझ्या हातून

चौ०— कहँ निसिचर अति घोर कठोर। कहँ सुंदर सुत परम किसोरा ॥
सुनि नृप गिरा प्रेम रस सानी। हृदयँ हरष माना मुनि ग्यानी ॥
तब बसिष्ट बहुबिधि समुझावा। नृप संदेह नास कहँ पावा ॥
अति आदर दोउ तनय बोलाए। हृदयँ लाइ बहु भाँति सिखाए ॥
मेरे प्रान नाथ सुत दोऊ। तुम्ह मुनि पिता आन नहिं कोऊ ॥

दो०— सौंपे भूप रिषिहि सुत बहुबिधि देइ असीस ॥
जननी भवन गए प्रभु चले नाइ पद सीस ॥ २०८ (क) ॥

सो०— पुरुषसिंह दोउ बीर हरषि चले मुनि भय हरन।
कृपासिंधु मतिधीर अखिल बिस्व कारन करन ॥ २०८ (ख) ॥

चौ०— अरुन नयन उर बाहु बिसाला। नील जलज तनु स्याम तमाला ॥
कटि पट पीत कसें बर भाथा। रुचिर चाप सायक दुहुँ हाथा ॥
स्याम गौर सुंदर दोउ भाई। बिस्वामित्र महानिधि पाई ॥
प्रभु ब्रह्मन्यदेव मैं जाना। मोहि निति पिता तजेउ भगवाना ॥
चले जात मुनि दीन्हि देखाई। सुनि ताड़का क्रोध करि धाई ॥

घडणार नाही! अहो, थोडा विचार करा; कुठे अत्यंत भयंकर व कठोर निशिचर आणि कुठे माझे हे सुंदर अति सुकुमार, किशोरवयाचे सुत!

वात्सल्याने ओथंबलेली ती राजाची वाणी ऐकून ज्ञानी मुनीला मनातल्या मनात मोठा मोद झाला!

हा सर्व समजुतीचा गोंधळ उडालेला, जेव्हा वसिष्ठांच्या ध्यानात आला, तेव्हा त्यानी दशरथराजांची अनेक प्रकारे समजूत घालून, त्यांच्या मनातील सर्व संदेह नाहीसे केले.

लगेच दोघां पुत्रांना अत्यंत सन्मानपूर्वक राजाने बोलावून आणवले, त्याना आपल्या हृदयाशी धरून अनेक परीनी शिकवले, शेवटी विश्वामित्राना म्हणाले "हे नाथ हे दोन्ही मुलगे नसून, माझे प्राणच आहेत बरं! हे मुनिश्रेष्ठा! येथून पुढे तुम्हीच त्यांचे वडील; दुसरे कोणीही नाही."

याप्रमाणे बोलून अनेक शुभ आशीर्वादांसह राजाने आपले दोन्ही मुलगे विश्वामित्रांच्या हाती सोपवले! तसेच, प्रभू आपल्या जननीच्या मंदिरात गेले, तिच्या चरणांवर मस्तक ठेवून, लगेच निघाले. २०८ (क)

मानवातील सिंहरूप असणारे रामलक्ष्मण, मुनींचे भय हरण करण्याकरिता आनंदाने निघाले! कारण ते कृपासागर, धीर बुद्धीचे आणि सर्व विश्वाचे आदिकारण असे होते! २०८ (ख)

अशा भगवंताचे मनोहररूप त्यावेळी कसे दिसले?

श्रीरामचंद्राचे अरुणलाल असे डोळे, छाती व बाहू विशाल, नीलकमल व तमालतरुप्रमाणे श्याम शरीर! दोघानी पीतांबर परिधान केलेला, त्यावर भाता कसलेला, एका हातात धनुष्य व दुसऱ्यात बाण! अशी ही श्याम व गौर अत्यंत सुंदर जोडी म्हणजे विश्वामित्रांना लाभलेला एक महानिधीच होता! त्यांच्या मनात विचार आला, भगवान् (ब्रह्मण्यदेव) ब्राह्मणांचे भक्त आहेत हे मी जाणतो! म्हणूनच केवळ, माझ्या हितासाठी त्यांनी आपल्या परमप्रिय पित्यालाही सोडले!

जात असता वाटेतच मुनींनी या पुरुषसिंहांना ताडका राक्षसीण दाखविली. यांचे शब्द ऐकताच संतप्त होऊन ती धावतच चाल करून आली! भगवंतांनी फक्त एकाच बाणाने तिचे प्राण हरण केले व तिच्या



चौ० – एकहिं बान प्रान हरि लीन्हा । दीन जानि तेहि निज पद दीन्हा ॥
तब रिषि निज नाथहि जियँ चीन्ही । बिद्यानिधि कहुँ बिद्या दीन्ही ॥
जाते लाग न छुधा पिपासा । अतुलित बल तनु तेज प्रकासा ॥

दो० – आयुध सर्ब समर्पि कै प्रभु निज आश्रम आनि ।
कंद मूल फल भोजन दीन्ह भगति हित जानि ॥ २०९ ॥

चौ० – प्रात कहा मुनि सन रघुराई । निर्भय जग्य करहु तुम्ह जाई ॥
होम करन लागे मुनि झारी । आपु रहे मख कीं रखवारी ॥
सुनि मारीच निसाचर क्रोही । लै सहाय धावा मुनिद्रोही ॥
बिनु फर बान राम तेहि मारा । सत जोजन गा सागर पारा ॥
पावक सर सुबाहु पुनि मारा । अनुज निसाचर कटकु सँघारा ॥
मारि असुर द्विज निर्भयकारी । अस्तुति करहिं देव मुनि झारी ॥
तहँ पुनि कछुक दिवस रघुराया । रहे कीन्हि बिप्रन्ह पर दाया ॥
भगति हेतु बहु कथा पुराना । कहे बिप्र जद्यपि प्रभु जाना ॥
तब मुनि सादर कहा बुझाई । चरित एक प्रभु देखिअ जाई ॥
धनुष्यजग्य सुनि रघुकुल नाथा । हरषि चले मुनिबर के साथा ॥

दैन्याची जाणीव ठेवून तिला वैकुण्ठाला पाठविली! तेव्हा ऋषींनी आपल्या मनात खूणगाठ बांधली की, हे हे आपले नाथ आहेत. मला सनाथ करतील.

त्या नंतर भगवान् हे विद्येचे भाण्डार असे जाणूनही केवळ भगवंताच्या लीलेस पूर्णत्व आणण्यासाठीच त्यांना विश्वामित्रांनी अशी विद्या शिकविली की, ज्या योगे तहान-भूक नष्ट होऊ शरीराला अतुल्य बल व तेज यांची प्राप्ती व्हावी. प्रभूला सर्व प्रकारची अस्त्रे व शस्त्रे समर्पण करून मुनींनी त्यांना आपल्या आश्रमात आणले आणि खरे कल्याण करणारे हे भगवान आहेत, हे जाणून भक्तियुक्त अंतःकरणाने कंद-मूल-फले भोजनासाठी आणून दिली. २०९

सूर्योदय होतांच रघुपती म्हणाले, 'हे मुनिवर्य! आता आपण जाऊन खुशाल निर्भयपणे यज्ञ करावा!'

त्याप्रमाणे मुनिसमूहाने होम करण्यास सुरवात केली. लक्ष्मणासह प्रभू मखरक्षणासाठी खडे उभे राहिले. हे ऐकून मुनिद्रोह करणारा रागीट मारीच राक्षस, सैन्यासह चाल करून आला. आल्याबरोबर एका बोथट बाणाने त्याला रामचंद्रानी जो उडवला तो शंभर योजने दूर जाऊन समुद्राच्या किनाऱ्यावर पडला! त्यानंतर सुबाहू आला, त्याला अग्निबाणाने ठारच करून टाकला. सगळ्या राक्षससेनेचा एकट्या लक्ष्मणाने फन्ना उडवला! याप्रमाणे राक्षसांचा उपद्रव नाहीसा करणाऱ्या राजपुत्रांची साऱ्या देव व मुनि यांच्या समाजाने स्तुती केली. काही काळ तेथे राहून रघुनाथांनी ब्राह्मणांवर दया केली. भगवान सर्वज्ञ आहेत हे माहीत असूनही भक्तिप्रेमाने ब्राह्मणांनी त्यांना पुराणातील पुष्कळ कथा सांगितल्या. (अध्यात्मपर अर्थ ताडका = देहबुद्धी; मारीच = लिंगदेह; सुबाहू = कारण देह.)

एके दिवशी मुनींनी मोठ्या आदराने रामाची समजूत घालून सांगितले की, एक मौज जाऊन पाहू या! धनुर्मखाची कल्पना येताच मुनींसह रघुनाथ हर्षाने निघाले. वाटेत त्यांना एक आश्रम लागला. त्या

चौ० — आश्रम एक दीख मग माहीं । खग मृग जीव जंतु तहँ नाहीं ।।
पूछा मुनिहि सिला प्रभु देखी । सकल कथा मुनि कहा बिसेषी ।।
दो० — गौतम नारि श्राप बस उपल देह धरि धीर ।
चरन कमल रज चाहति कृपा करहु रघुबीर ।। २१० ।।
छं० — परसत पद पावन सोक नसावन प्रगट भई तपपुंज सही ।
देखत रघुनायक जन सुखदायक सनमुख होइ कर जोरि रही ।।
अति प्रेम अधीरा पुलक सरीरा मुख नहिं आवइ बचन कही ।
अतिसय बड़भागी चरनन्हि लागी जुगल नयन जलधार बही ।। १ ।।
धीरजु मन कीन्हा प्रभु कहुँ चीन्हा रघुपति कृपाँ भगति पाई ।
अति निर्मल बानीं अस्तुति ठानी ग्यानगम्य जय रघुराई ।।
मैं नारि अपावन प्रभु जग पावन रावन रिपु जन सुखदाई ।
राजीव बिलोचन भव भय मोचन पाहि पाहि सरनहिं आई ।। २ ।।
मुनि श्राप जो दीन्हा अति भल कीन्हा परम अनुग्रह मैं माना ।
देखेउँ भरि लोचन हरि भवमोचन इहइ लाभ संकर जाना ।।
बिनती प्रभु मोरी मैं मति भोरी नाथ न मागउँ बर आना ।
पद कमल परागा रस अनुरागा मम मन मधुप करैं पाना ।। ३ ।।

ठिकाणचे आश्चर्य म्हणजे तेथे मनुष्य तर कोणी नव्हतेच, पण पशु-पक्षी-जीव-जन्तू कोणीही सचेतन असे तेथे औषधास सुद्धा नव्हते ! एक मोठी शिला मात्र दिसली, तेव्हा प्रभूंनी मुनीजवळ तिच्याविषयी चौकशी केली. मुनींनी रामाला सर्व नवलकथा साद्यंत सांगितली व म्हणाले, " हे धीर रघुवीरा ! गौतमऋषीची ही पत्नी; शापामुळे शिला-शरीर धारण करून, मोठ्या धैर्याने आपल्या चरणकमलांतील रजःकणाची इच्छा करीत पडून राहिली आहे; तिच्यावर कृपा करा. " २१०.

श्रीरामचंद्राच्या पवित्र आणि शोकविनाशक चरणांचा स्पर्श होताच, भगवंताच्या समोर ती अहिल्येची तपोमूर्ती प्रकट झाली ! भक्तांना सुखदायक अशा रघुनायकाला पाहून तिने हात जोडले व पुढे उभी राहिली ! परंतु प्रेमाच्या आवेगाने, तिचे सर्व शरीर पुलकित झाले व प्रयत्न करूनही मुखावाटे शब्द उमटेना ! अखेर महाभाग्यवान ती, भगवंताच्या चरणी पडली, तिच्या दोन्ही डोळ्यांतून अश्रूंची धार गळू लागली !

अशा स्थितीत बराच वेळ गेल्यावर मनात तिने धीर धरला. भगवंताची ओळख पटली. व रघुपति-कृपेने तिला भक्तिलाभ झाला त्यामुळे तिने अत्यंत निर्मलवाणीने स्तुती केली.

" केवळ ज्ञानानेच ज्याचे आकलन होऊ शकते, अशा, रघुवरा ! आपले ऐश्वर्य माझ्या हृदयात प्रकट करा. तुझा विजय असो ! मी जातीनेच अपवित्र स्त्री, आणि हे प्रभो ! आपण सर्व जगताला पवित्र करणारे, भक्तांना सुख देणारे, रावणरिपू आहात ! हे कमलनयन ! जन्ममृत्यूच्या चक्रातून सोडवणारे ! प्रभो ! मी आपणाला शरण आले आहे, माझे भवभयापासून रक्षण करा, माझे रक्षण करा ! "

" मुनींनी मला जो शाप दिला तो फारच भाग्याचा ठरला ! तो शाप नसून माझ्यावर त्यांनी अनुग्रहच केला, असे आता मला वाटते. कारण त्यामुळेच [illegible] मुक्त करणारे हरी मला डोळे भरून पाहता आले ! अशा दर्शनाचाच सर्व श्रेष्ठ लाभ शंकरांना आवडतो. हे प्रभो ! मी बुद्धीने बावळट आहे, माझी एक विनंती आहे. मी दुसरा कोणताही वर आपल्याजवळ मागत नाही; एवढेच मला द्या की, माझा मन-मधुप आपल्या चरण कमलपरागातील प्रेमरस अखंड पान करीत राहो ! "

छं० – जेहिं पद सुरसरिता परम पुनीता प्रगट भई सिव सीस धरी ।
सोई पद पंकज जेहि पूजत अज मम सिर धरेउ कृपाल हरी ॥
एहि भाँति सिधारी गौतम नारी बार बार हरि चरन परी ।
जो अति मन भावा सो बरु पावा गै पतिलोक अनंद भरी ॥ ४ ॥

दो० – अस प्रभु दीनबंधु हरि कारन रहित दयाल ॥
तुलसिदास सठ तेहि भजु छाड़ि कपट जंजाल ॥ २११ ॥

मास पारायण, सातवाँ विश्राम

चौ० – चले राम लछिमन मुनि संगा । गए जहाँ जग पावनि गंगा ॥
गाधिसूनु सब कथा सुनाई । जेहि प्रकार सुरसरि महि आई ॥
तब प्रभु रिषिन्ह समेत नहाए । बिबिध दान महिदेवन्हि पाए ॥
हरषि चले मुनि बृंद सहाया । बेगि बिदेह नगर निअराया ॥
पुर रम्यता राम जब देखी । हरषे अनुज समेत बिसेषी ॥
बापीं कूप सरित सर नाना । सलिल सुधासम मनि सोपाना ॥
गुंजत मंजु मत्त रस भृंगा । कूजत कल बहुबरन बिहंगा ॥
बरन बरन बिकसे बनजाता । त्रिबिध समीर सदा सुखदाता ॥

" ज्या चरणापासून परम पवित्र गंगानदी प्रकट झाली, जिला सदाशिवांनी आपल्या मस्तकी धारण केली, ज्या पदकमलांची ब्रह्मदेव पूजा करतात, तो हा पाय, हे कृपाळो, हरि ! आपण माझ्या मस्तकी ठेवला (केवढी भाग्यवान मी ! !) "

अशी स्तुती करत, व वारंवार भगवंताचे चरण धरीत मनाला अत्यंत आवडणारा असा वर मिळवून गौमत ऋषींची पत्नी अहिल्या, आनन्दनिर्भर होऊन पतिलोकाला गेली.

प्रभू श्रीरामचंद्र अशा प्रकारचे दीनबंधू असून, निर्हेतुक दया करणारे आहेत. तुलसीदास म्हणतात, " हे मूर्ख मना ! सर्व कपटजंजाळ सोडून त्यांच्या भजनी लाग ! " २११

रामलक्ष्मण विश्वामित्रांसह पुढे चालू लागले व लवकरच ते सर्व जगाला पावन करणाऱ्या गंगेजवळ आले. या पृथ्वीवर देवनदी कशी आली ती सर्व कथा गाधिज मुनींनी सांगितल्यावर ऋषींच्यासह प्रभूंनी गंगेत स्नान केले. नाना प्रकारची दाने ब्राह्मणांना दिली. अनेक ऋषिमंडळींच्यासह ते आनंदाने पुढे चालू लागले व अल्पकाळातच मिथिलानगरीजवळ आले. जनकपुरीची शोभा जेव्हा प्रभूंनी पाहिली, तेव्हा लक्ष्मणासह त्यांना विशेष हर्ष वाटला !

त्यांना आड, विहिरी, तलाव व नद्या अनेक दिसल्या. त्यातील पाणी अमृतासारखे व त्याच्या पायऱ्या रत्नखचित होत्या. मकरंदाचे मनमुराद पान करून, मस्त झालेले मधुप मंजुळ गुंजारव करीत होते. रंगीबेरंगी पक्षी मधुर आवाज काढीत होते. कितीतरी वेगवेगळ्या रंगाची कमळे जिकडे तिकडे फुलली होती व मंदसुगंधी, शीतल असा वारा मनाला सुखवीत होता.

दो० –सुमन बाटिका बाग बन बिपुल बिहंग निवास ।
फूलत फलत सुपल्लवत सोहत पुर चहुँ पास ।। २१२ ।।

चौ० – बनइ न बरनत नगर निकाई । जहाँ जाइ मन तहँइँ लोभाई ।।
चारु बजारु बिचित्र अँबारी । मनिमय बिधि जनु स्वकर सँवारी ।।
धनिक बनिक बर धनद समाना । बैठे सकल बस्तु लै नाना ।।
चौहट सुंदर गलीं सुहाई । संतत रहहिं सुगंध सिंचाई ।।
मंगलमय मंदिर सब केरें । चित्रित जनु रतिनाथ चितेरें ।।
पुर नर नारि सुभग सुचि संता । धरमसील ग्यानी गुनवंता ।।
अति अनूप जहँ जनक निवासू । बिथकहिं बिबुध बिलोकि बिलासू ।।
होत चकित चित कोट बिलोकी । सकल भुवन सोभा जनु रोकी

दो० – धवल धाम मनि पुरट पट सुघटित नाना भाँति ।
सिव निवास सुंदर सदन सोभा किमि कहि जाति ।। २१३ ।।

चौ० – सुभग द्वार सब कुलिस कपाटा । भूप भीर नट मागध भाटा ।।
बनी बिसाल बाजि गज साला । हय गय रथ संकुल सब काला ।।
सूर सचिव सेनप बहुतेरे । नृपगृह सरित सदन सब केरे ।।

पुष्पवाटिका, बागा व वनोपवने जेथे पुष्कळ पक्ष्यांचा निवास असतो अशी रमणीय स्थळे, फुले, फळे व कोवळी पाने यांनी भरगच्च झालेली नगराच्या चारी बाजूना शोभा आणीत होती ! २१२

नगराच्या सौंदर्याचे वर्णन करणेच कठीण ! कारण जे ठिकाण पाहावे तेथेच मन लुब्ध होई ! सुंदर बाजार, रत्नांनी मढविलेले, चित्रांनी विशेषशोभा आणलेले सज्जे ! असे वाटे की, जणू काही ब्रह्मदेवांनी स्वहस्तेच ही सर्व रचना केली आहे ! कुबेराप्रमाणे श्रेष्ठ धनिक व्यापारी सर्व प्रकारच्या अनेक वस्तू दुकानात मांडून बसले आहेत, रस्त्यातील प्रत्येक चौक (चव्हाटा) मनोहर असून त्याला जोडणारे बोळ, गल्ल्यासुद्धा, सदोदित सुगंधित पदार्थांनी सडे घातल्यामुळे सुंदर दिसले ! सर्वांची हृदये प्रभूची मंदिरे आहेतच, पण घरेही मंगलायतने दिसली. इतकेच काय त्याच्यावर काढलेली चित्रे प्रत्यक्ष रतिनाथानेच चित्रकार होऊन ती काढल्याचा भास होत होता ! नगरवासी सर्व स्त्रिया व पुरुष सुंदर, पवित्र, सुस्वभावी, धर्मशील, सुशिक्षित व सद्गुणसंपन्न असेच दिसले.

जनकमहाराजांचा राजवाडा तर काय अनुपमेयच होता ! त्यातील गोगनित्रची ऐश्वर्य पाहून देवताही स्तंभित होणार, मग मानवाची गोष्ट कशाला ! राजमहालाचे तट पाहिल्यावर कोणीही आश्चर्यचकितच होई ! असे वाटे की सर्व विश्वातील शोभा अडवून ठेवण्याचे कामच हे करीत आहेत ! उज्ज्वल महालात अनेक प्रकारच्या सुंदर कलाकृतीनी सजविलेले रत्नखचित सोन्याच्या जरीचे पडदे लावले होते ! यानंतर आता सीतेच्या सुन्दर महालाची शोभा कशी वर्णन करणे शक्य आहे ! २१३

राजमहालातील सर्व दरवाजे सुन्दर आहेत. त्यात वज्राप्रमाणे मजबूत रत्नाची व हिऱ्याप्रमाणे चमकणारी दारे बसवली होती. तेथे राजाचे भाट, नट, मागधी यांची गर्दी उसळली होती !

घोड्यांचा पागा, हत्तींच्या शाळा, अत्यंत अफाट होत्या. त्यांच्यात सकाळ-दुपार-संध्याकाळ-केव्हाही हत्ती, घोडे व रथ भरलेले असत. शूरवीर, मंत्री व सेनापती यांचीही संख्या मोठीच होती. यांची सर्वांची घरेही राजमहालाप्रमाणेच सुरेख दिसली.



चौ० — पुर बाहेर सर सरित समीपा । उतरे जहँ तहँ बिपुल महीपा ॥
देखि अनूप एक अँवराई । सब सुपास सब भाँति सुहाई ॥
कौसिक कहेउ मोर मनु माना । इहाँ रहिअ रघुबीर सुजाना ॥
भलेहिं नाथ कहि कृपानिकेता । उतरे तहँ मुनिबृंद समेता ॥
बिस्वामित्र महामुनि आए । समाचार मिथिलापति पाए ॥

दो ० — संग सचिव सुचि भूरि भट भूसुर बर गुर ग्याति ।
चले मिलन मुनिनायकहि मुदित राउ एहि भाँति ॥ २१४ ॥

चौ० — कीन्ह प्रनामु चरन धरि माथा । दीन्हि असीस मुदित मुनिनाथा ॥
बिप्रबृंद सब सादर बंदे । जानि भाग्य बड़ राउ अनंदे ॥
कुसल प्रस्न कहि बारहिं बारा । बिस्वामित्र नृपहि बैठारा ॥
तेहि अवसर आए दोउ भाई । गए रहे देखन फुलवाई ॥
स्याम गौर मृदु बयस किसोरा । लोचन सुखद बिस्व चित चोरा ॥
उठे सकल जब रघुपति आए । बिस्वामित्र निकट बैठाए ॥
भए सब सुखी देखि दोउ भ्राता । बारि बिलोचन पुलकित गाता ॥
मूरति मधुर मनोहर देखी । भयउ बिदेहु बिदेहु बिसेषी ॥

नगराच्या बाहेर सरोवराच्या भोवती व नदीच्या काठावर अनेक देशांच्या राजांचे त्यांच्या सेनेसह डेरे पडले होते!

एक मनोवेधक अनुपम आमराई पाहिली. ती सर्वप्रकारे सोयीची व सुंदर पाहून! "रघुवीरा! तू समजूतदार आहेस, मला हे स्थळ आवडले. आपण येथेच उतरू या!" विश्वामित्रांनी राम-लक्ष्मणांना वसतीच्या दृष्टीने सुचवले. "बरे नाथ!" असे लगेच उत्तर कृपासागरांनी दिले. मुनिवृंदासह सर्व मंडळी त्या ठिकाणी उतरली.

थोड्याच वेळात मुनिश्रेष्ठ विश्वामित्रांच्या आगमनाचे वृत्त मिथिलापतींच्या कानी गेले. लगेच इमानी व पवित्र हृदयाचे मंत्री, पुष्कळ योद्धे, श्रेष्ठ ब्राह्मण, गुरू शतानंद व आपल्या बांधवांपैकी श्रेष्ठ मंडळी अशा सर्वांना बरोबर घेऊन, प्रसन्न मनाने मुनिश्रेष्ठांना भेटण्यासाठी जनक गेले. २१४

जवळ जाताच विश्वामित्रांच्या चरणांवर मस्तक ठेवून मिथिलेश्वरांनी त्यांना वंदन केले. मुनीश्वरांनीही मुदित होऊन आशीर्वाद दिले, सर्व विप्रवृंदांनाही राजाने आदराने वंदन केले व आपले आज महद्भाग्य समजून त्यांना आनंद झाला. वारंवार क्षेम-कुशल विचारून विश्वामित्रांनी जनकराजाला आपल्या जवळ बसवून घेतले.

इतक्यात, शेजारची फुलबाग बघण्यासाठी गेलेली रामलक्ष्मणाची जोडी तेथे आली. एक सावळा, एक गोरा. दोघेही वयाने तरुण व अविवाहित कुमार, डोळ्यांना सुख देणारे, व सर्व जगाचे चित्त, आपल्या दैवी अतुल्य-सौंदर्याने, चोरून घेणारे असे ते असल्यामुळे, रघुपतीने तेथे पाऊल टाकताच सर्व बसलेला जनकराज-समाज खाड्कन् उठून उभा राहिला! विश्वामित्रांनी दोघांना आपल्या अगदी जवळ बसवले.

दोघां भावांना निरखून पाहात असता सर्वांना जे सुख झाले, ते शब्दांत सांगणे अशक्य! अंगावर रोमांच थरारले व डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. त्या मनोहर, मधुर मूर्तीस पाहात असता मूळचेच विदेह जनकमहाराज आता विशेषच विदेह झाले. थोडा वेळ गेला.

दो० –प्रेम मगन मनु जानि नृपु करि बिबेकु धरि धीर ।
बोलेउ मुनि पद नाइ सिरु गदगद गिरा गभीर ।। २१५ ।।

चौ० –कहहु नाथ सुंदर दोउ बालक । मुनिकुल तिलक कि नृपकुल पालक ।।
ब्रह्म जो निगम नेति कहि गावा । उभय बेष धरि की सोइ आवा ।।
सहज बिरागरूप मनु मोरा । थकित होत जिमि चंद चकोरा ।।
ताते प्रभु पूछउँ सतिभाऊ । कहहु नाथ जनि करहु दुराऊ ।।
इन्हहि बिलोकत अति अनुरागा । बरबस ब्रह्मसुखहि मन त्यागा ।।
कह मुनि बिहसि कहेहु नृप नीका । बचन तुम्हार न होइ अलीका ।।
ए प्रिय सबहि जहाँ लगि प्रानी । मन मुसुकाहिं रामु सुनि बानी ।।
रघुकुल मनि दसरथ के जाए । मम हित लागि नरेस पठाए ।।

दो० –रामु लखनु दोउ बंधुबर रूप सील बल धाम ।
मख राखेउ सबु साखि जगु जिते असुर संग्राम ।। २१६ ।।

चौ० –मुनि तव चरन देखि कह राऊ । कहि न सकउँ निज पुन्य प्रभाऊ ।।
सुंदर स्याम गौर दोउ भ्राता । आनँदहू के आनँद दाता ।।
इन्ह कै प्रीति परसपर पावनि । कहि न जाइ मन भाव सुहावनि ।।
सुनहु नाथ कह मुदित बिदेहू । ब्रह्म जीव इव सहज सनेहू ।।

आपले मन प्रेममग्न होत आहे, हे पाहून राजाने विवेकाच्या साह्याने धीर धरला, विश्वामित्रचरणी शिर नमवून सद्‌गदित कंठाने गंभीर शब्दात तो म्हणतो,

"नाथ ! हे दोन सुंदर बालक ब्रह्मकुलाचे भूषण का नृपकुलाचे पालक आहेत, ते मला सांगा. वेदांनी ज्या ब्रह्माचे 'नेति' म्हणून यशगान केले, त्यानेच या बंधुद्वयांचा वेष धरून ते येथे आले आहे, अशी माझी श्रद्धा बोलते. माझ्या चित्ताला स्वभावतः अनासक्ती असल्यामुळे ते बाह्य कोणत्याच पदार्थाने आकृष्ट होत नाही, पण यांच्याकडे पहाताच चकोर पूर्णचंद्रकिरणांनी जसे वेडे होतात, तशी माझ्या चित्ताची अवस्था झाली आहे. म्हणून हे प्रभो ! मी सद्भावनेने विचारत आहे, हे जाणून आपण काहीही न लपवता मला सांगा. कारण यांना पाहिल्यापासून निर्गुण ब्रह्माच्या ठिकाणी लय पावणारे माझे मन जबरदस्तीने ते सुख सोडून यांच्याठिकाणी अनुरक्त होत आहे !"

विश्वामित्रमुनी हसले व म्हणाले, 'नृपते ! तुम्ही अगदी बरोबरच बोललात. तुमचे वाक्य कधीच खोटे होणार नाही ! सर्व प्राणिमात्रांना हे प्रिय आहेत.' ही मुनींची वाणी श्रवण करून राम मनातल्या मनात हसले. "हे दोन रघुकुलमणी, दशरथमहाराजांचे मुलगे आहेत. माझ्या हिताकरिता माझ्याबरोबर त्यांनी पाठविले आहेत. हे राम व लक्ष्मण दोघे श्रेष्ठ भाऊ. रूप, शील व सामर्थ्य यांचे वसतिस्थान आहेत. सर्व जगतात ही गोष्ट जाहीर आहे की, यांनी युद्धात असुरांचा पराजय करून माझ्या यज्ञाचे रक्षण केले आहे." २१६

"हे मुने ! आपल्या चरणदर्शनानेच माझा केवढा पुण्याचा प्रभाव झाला हे सांगता येत नाही. श्याम आणि गौर असे हे दोघे बंधू, आनंदालाही आनंद देणारे यांची परस्परपुनीत आणि सुंदर प्रीती पाहून मन किती प्रसन्न होते, ते सांगता येत नाही." आनंदित झालेला राजा म्हणतो, "मुनिवर ऐका, यांचे परस्परांवरील प्रेम, ब्रह्म आणि जीवाइतके स्वाभाविक आहे !"

चौ० – पुनि पुनि प्रभुहि चितव नरनाहू । पुलक गात उर अधिक उछाहू ॥
मुनिहि प्रसंसि नाइ पद सीसू । चलेउ लवाइ नगर अवनीसू ॥
सुंदर सदनु सुखद सब काला । तहाँ बासु लै दीन्ह भुआला
करि पूजा सब बिधि सेवकाई । गयउ राउ गृह बिदा कराई ॥
दो० – रिषय संग रघुबंस मनि करि भोजनु बिश्रामु ।
बैठे प्रभु भ्राता सहित दिवसु रहा भरि जामु ॥ २१७ ॥
चौ० – लखन हृदयँ लालसा बिसेषी । जाइ जनकपुर आइअ देखी ॥
प्रभु भय बहुरि मुनिहि सुकुचाहीं । प्रगट न कहहिं मनहिं मुसुकाहीं ॥
राम अनुज मन की गति जानी । भगत बछलता हियँ हुलसानी ॥
परम बिनीत सकुचि मुसुकाई । बोले गुर अनुसासन पाई ॥
नाथ लखनु पुरु देखन चहहीं । प्रभु सकोच डर प्रगट न कहहीं ॥
जौं राउर आयसु मैं पावौं । नगर देखाइ तुरत लै आवौं ॥
सुनि मुनीसु कह बचन सप्रीती । कस न राम तुम्ह राखहु नीती ॥
धरम सेतु पालक तुम्ह ताता । प्रेम बिबस सेवक सुखदाता ॥
दो० – जाइ देखि आवहु नगरु सुख निधान दोउ भाइ ।
करहु सुफल सब के नयन सुंदर बदन देखाइ ॥ २१८ ॥

नरेंद्राने प्रभूकडे पुष्कळवेळा पाहिले. अंतःकरणात उत्साहांना भरते येई आणि शरीर पुलकप्रफुल्लित होई! अखेर मुनींची स्तुती केली, त्यांच्या पदकमली मस्तक ठेवले व जनकमहाराज त्यांना घेऊनच नगरीकडे निघाले! सर्वकाळी सुखावह होणाऱ्या अशा सुंदर सदनात त्यांना नेऊन तेथेच त्यांच्या राहण्याची व्यवस्था ठेवली! पुष्कळ प्रकारे त्यांची सेवा करून त्यांचे पूजन केले आणि मिथिलेश्वर आज्ञा घेऊन स्वतःच्या महालाकडे परतले. रघुवंशमणींनी ऋषींसह भोजन करून विश्रांती घेतली आणि लक्ष्मणासह बसले असता एक प्रहर दिवस उरला होता. २१७

त्यावेळी लक्ष्मणाच्या मनात एक वेगळीच इच्छा उत्पन्न झाली. त्याला वाटले, आपण सगळी जनकपुरी पाहून यावे. पण रामाचे भय व मुनींना विचारण्याचा संकोच वाटल्याने मनातल्या मनात लक्ष्मण हसले. मुखावाटे शब्द काही निघेना. तथापि धाकट्या भावाच्या मनात काय विचार चालू आहे ते रामानी चटकन् ताडले; आणि हृदयामध्ये भक्ताचे वात्सल्य द्रवले. गुरुजींची परवानगी मिळाल्यावर मग अतिविनयाने व लज्जेने स्मित करून बोलले, "नाथ! नगर पाहण्याची लक्ष्मणाची इच्छा आहे. गुरुजींच्या भीतीने व संकोचाने तो आपली इच्छा प्रकट करू शकत नाही. आपली आज्ञा मला जर मिळाली तर थोड्याच वेळात सर्व नगर त्याला दाखवून आणतो."

हे ऐकून, विश्वामित्र प्रेमळ शब्दांत म्हणाले, "रामा, तुम्ही नीतिनियमांचे पालन करत नाही, असे कसे होईल? हे तात! तुम्ही धर्माच्या मर्यादेचे पालन करणारे आणि प्रेमाला वश होऊन सेवकाला सुख देणारे आहा. सुखाचे निधान असे दोघे बंधू जा आणि नगरी पाहून या. आपले सुंदर मुखकमल दाखवून सर्व नागरिकांच्या डोळ्यांचे पारणे फेडा." २१८

चौ ० –मुनि पद कमल बंदि दोउ भ्राता। चले लोक लोचन सुख दाता ।।
बालक बृंद देखि अति सोभा । लगे संग लोचन मनु लोभा ।।
पीत बसन परिकर कटि भाथा । चारु चाप सर सोहत हाथा ।।
तन अनुहरत सुचंदन खोरी । स्यामल गौर मनोहर जोरी ।।
केहरि कंधर बाहु बिसाला । उर अति रुचिर नागमनि माला ।।
सुभग सोन सरसीरुह लोचन । बदन मयंक तापत्रय मोचन ।।
कानन्हि कनक फूल छबि देहीं । चितवत चितहि चोरि जनु लेहीं ।।
चितवनि चारु भ्रकुटि बर बाँकी । तिलक रेख सोभा जनु चाँकी ।।
दो ०–रुचिर चौतनीं सुभग सिर मेचक कुंचित केस ।
नख सिख सुंदर बंधु दोउ सोभा सकल सुदेस ।। २१९ ।।
चौ ० –देखन नगरु भूपसुत आए । समाचार पुरबासिन्ह पाए ।।
धाए धाम काम सब त्यागी । मनहुँ रंक निधि लूटन लागी ।।
निरखि सहज सुंदर दोउ भाई । होहिं सुखी लोचन फल पाई ।।
जुबतीं भवन झरोखन्हि लागी । निरखहिं राम रूप अनुरागीं ।।
कहहिं परसपर बचन सप्रीती । सखि इन्ह कोटि काम छबि जीती ।।

मुनिपदकमलांना वंदन करून लोकांच्या डोळ्यांना सुखविणारे, ते दोन्ही भाऊ बाहेर पडले. लगेच यांच्या सौंदर्याची अत्यंत शोभा पाहून, पोरांच्या झुंडी मागे लागल्या ! कारण त्यांचे डोळे आणि मन यांच्या सौंदर्यामुळे लुब्ध झाले होते !

दोघांनीही पीतांबर नेसलेला होता, कमरेला गुंडाळलेल्या दुपेट्यात भाता बांधला होता. हातात सुंदर धनुष्य व बाण घेतले होते. प्रत्येकाच्या शरीराला शोभेल, अशा चंदनाची वर उटी केलेली होती ! त्यामुळे ही श्याम-गौर जोडी लोकांच्या डोळ्यात चांगलीच भरत होती ! सिंहाप्रमाणे पुष्ट गर्दन, विशाल भुज, रुंद व भरदार छातीवर अत्यंत सुंदर गजमुक्तामाला रुळलेली, सुंदर सोनकमलाप्रमाणे आरक्त नेत्र, त्रिविध तापांतून सोडविणारा मुखचंद्रमा आहे. कानांतील कनक-फुले मुखावरील तेजात चांगलीच भर टाकीत आहेत. पाहिल्या-बरोबर जणू काही ती चित्ताला चोरूनच नेत आहेत. भुवया बाकदार व दृष्टी मनोहर आहे. कपाळावर तिलक-रेषा इतकी आकर्षक आहे की, जणूकाही मूर्तिमती शोभाच ही मोहोर करून गेली आहे ! उत्तम मस्तकावर छान अशी चौकोनी टोपी घातली आहे, काळे कुरळे केस आहेत ! एकूण, हे दोघे बंधू म्हणजे नखशिखान्त सौंदर्य खुलले असून, ज्या स्थळी ज्या तऱ्हेचे सौंदर्य असावे असे वाटते त्या ठिकाणी तसे मनोवेधक सौंदर्य शोभेला देण्यासाठीच प्रगट झाले होते ! २१९

दशरथराजांचे मुलगे नगर [illegible] बाहेर पडले आहेत, ही बातमी नगरीत पसरली. आपल्या हातचे काम व आपले धाम सोडून, जन्मदरिद्री धनाची राशी लुटण्यास पळावा, तशी सर्व माणसे नुसती धावत सुटली ! त्या दोन भावांचे नैसर्गिक सौंदर्य पाहून, आपल्या डोळ्यांचे आज सार्थक झाले, असे सर्वांना समाधान झाले. तरुणी, घराच्या खिडक्यातून डोकावत, अतिप्रेमाने रामरूपसुधेचे पान करीत होत्या !

गवाक्षाशीं बसलेल्या त्या आपसात शुद्ध भावाने बोलू लागल्या, "काय गं ! यांनी कोट्यवधी काम-



चौ०— सुर नर असुर नाग मुनि माहीं । सोभा असि कहुँ सुनिअति नाहीं ॥
बिष्नु चारि भुज बिधि मुख चारि । बिकट बेष मुख पंच पुरारी ॥
अपर देउ अस कोउ न आही । यह छबि सखी पटतरिअ जाही ॥
दो०—बय किसोर सुषामा सदन स्याम गौर सुख धाम ।
अंग अंग पर वारिअहिं कोटि कोटि सत काम ॥ २२० ॥
चौ०—कहहु सखी अस को तनुधारी । जो न मोह यह रूप निहारी ॥
कोउ सप्रेम बोली मृदु बानी । जो मैं सुना सो सुनहु सयानी ॥
ए दोऊ दसरथ के ढोटा । बाल मरालन्हि के कल जोटा ॥
मुनि कौसिक मख के रखवारे । जिन्ह रन अजिर निसाचर मारे ॥
स्याम गात कल कंज बिलोचन । जो मारीच सुभुज मदु मोचन ॥
कौसल्या सुत सो सुख खानी । नामु रामु धनु सायक पानी ॥
गौर किसोर बेषु बर काछें । कर सर चाप राम के पाछें ॥
लछिमनु नामु राम लघु भ्राता । सुनु सखि तासु सुमित्रा माता ॥
दो०—बिप्रकाजु करि बंधु दोउ मग मुनिबधू उधारि ।
आप देखन चापमख सुनि हरषीं सब नारि ॥ २२१ ॥

देवांचे सौंदर्य लुटतो म्हणून लुटले आहे. यात संशयच नाही. देव, मुनी, मानव, दानव, नाग यांच्यात एवढे लावण्य आपण कधी पाहिले नाही, नव्हे कानांनीसुद्धा ऐकले नाही! पाहा की! विष्णूला चार हात, ब्रह्मदेवाला चार तोंडे, त्रिपुरारी पंचानन, त्यांच्या विद्रूप व भयानक वेषाविषयी बोलणेच नको ! मग सांग बरं, असा कोणता दुसरा देव राहिला की, ज्याच्या सौंदर्याबरोबर या रूपराशींची तुलना करावी ! किशोरवय, परम शोभेचे माहेरघर, एक श्याम तर एक गौर ! यांना पाहून कित्ती कित्ती सुख होतं नाही? शेकडो रतिनाथ यांच्या एकेक अवयवावरून खरोखर ओवाळून टाकावेत! २२०

दुसरी म्हणते, "तूच सखी, सांग बरं ! असा देहधारी कोण आहे, की जो ह्या मनोहर मूर्ती पाहून आनंदाने बेहोष होणार नाही?"

त्यातली तिसरी एक प्रेमाने हळूच म्हणते, "ए शहाणे ! माझ्या कानावर आलेली माहिती सांगते ऐक. हे दोघे राजकुमार दशरथ महाराजांचे. ही अत्यंत सुंदर जणू बाल हंसाची जोडी, कौशिक मुनींच्या यज्ञाचे रक्षण करण्यास गेली असता त्यांनी रणांगणात राक्षसांची धूळधाण उडवली ! त्या दोघांतील श्याम वर्णाचा, कमल नेत्रांचा, ज्याने मारीच-सुबाहूंची मस्ती जिरवली, हातात धनुष्यबाण घेतलेला, सुखाची खाण असणारा, तो कौसल्येचा मुलगा; त्याचे नाव राम !

वर्णाने गौर, सुंदर वेष केलेला किशोर ! हातात धनुष्यबाण घेऊन रामाच्या मागोमाग चाललेला, त्याचे नाव लक्ष्मण. तो रामाचाच धाकटा भाऊ. सखे! त्याची आई सुमित्रा ! ऐकलेस का सखी! याप्रमाणे या दोन भावांनी ब्राह्मणांचे हित साधले, वाटेत गौतम मुनीपत्नीचा रामाने उद्धार केला, आणि तुला सांगू का? अग ही भावांची जोडी आता आपल्या येथे होणारा धनुर्यज्ञ पाहावयास आली आहे !" हे ऐकताच त्या सगळ्याजणींना केवढा हर्ष झाला! २२१

चौ० – देखि राम छबि कोउ एक कहई । जोगु जानकिहि यह बरु अहई ॥
जौं सखि इन्हहि देख नरनाहू । पन परिहरि हठि करइ बिबाहू ॥
कोउ कह ए भूपति पहिचाने । मुनि समेत सादर सनमाने ॥
सखि परंतु पनु राउ न तजई । बिधि बस हठि अबिबेकहि भजई ॥
कोउ कह जौं भल अहइ बिधाता । सब कहँ सुनिअ उचित फल दाता ॥
तौ जानकिहि मिलिहि बरु एहू । नाहिन आलि इहाँ संदेहू ॥
जौं बिधि बस अस बनै सँजोगू । तौ कृतकृत्य होइ सब लोगू ॥
सखि हमरें आरति अति तातें । कबहुँक ए आवहिं एहि नातें ॥

दो० – नाहिं त हम कहुँ सुनहु सखि इन्ह कर दरसनु दूरि ।
यह संघटु तब होइ जब पुन्य पुराकृत भूरि ॥ २२२ ॥

चौ० – बोली अपर कहेहु सखि नीका । एहिं बिआह अति हित सबही का ॥
कोउ कह संकर चाप कठोरा । ए स्यामल मृदुगात किसोरा ॥
सबु असमंजस अहइ सयानी । यह सुनि अपर कहइ मृदु बानी ॥
सखि इन्ह कहँ कोउ कोउ अस कहहीं । बड़ प्रभाउ देखत लघु अहहीं ॥
परसि जासु पद पंकज धूरी । तरी अहल्या कृत अघ भूरी ॥
सो कि रहिहि बिनु सिवधनु तोरें । यह प्रतीति परिहरिअ न भोरें ॥

रामाचे ते अनुपमेय लावण्य पाहून त्यातली एक म्हणते, " सखे ! आपल्या जानकीला हाच नवरा योग्य दिसतो, नाही ? याला जर आपले जनकमहाराज पाहातील तर लगेच प्रतिज्ञा मोडून, हट्टपूर्वक याच्या-बरोबरच ते तिचा विवाह करतील. "

दुसरी शेजारची लगेच म्हणते, " अगऽ! यांना आपल्या राजांनी पाहिले आहे; मुनिमंडळींसह यांचा फार सत्कार केला ! पण सखी, राजा आपला पण काही सोडायला तयार नाही ! भवितव्यतेच्या आधीन होऊन हट्टाने तो अविचाराने वागत आहे ! "

त्यांच्यातील कोणी एक सहावी दैववादी मैत्रीण म्हणते, " विधाता जर सज्जन असला आणि तो सर्वांना त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणे फळ देतो, हे जर खरे असले, तर जानकीला हाच वर मिळणार, यात बिलकुल संशय नाही ! खरोखर सुदैवाने हा जर योग आला तर सर्व लोक कृतकृत्य होतील ! आम्हांला तरी अगदी एवढी तळमळ का, तर या (जावई) नात्याने ते येथे केव्हातरी येतील ! नाहीतर सखी ! यांचे दर्शन आपल्या-सारख्यांना मिळण्याची कुठली आशा ? आमची पूर्वपुण्याई मोठी असली तरच हा संयोग घडून येणार ! " २२२

हे ऐकताच सातवी सखी म्हणते, " अगदी बरोबर बोललीस बघ ! हा विवाह झाला तर सगळ्यांचेच फार फार कल्याण होणार आहे ! "

" अगं ! काय म्हणतेस ? ते शिवधनुष्य अत्यंत कठीण, आणि हे श्यामल-अवयवांचे किती सुकुमार पाहिलेस ना ? सुज्ञे ! मला तर बाई हे सगळे जमणे फार कठीण वाटते ! " अशी शंका आठवीने बोलून दाखवली, तोच " अग ! कुणी कुणी यांना असं म्हणतात ", नववी हळूच सांगू लागली, " हे दिसायला लहान असले तरी यांचा प्रभाव फार मोठा आहे ! त्यांच्या कमलासारख्या कोमल पायांची नुसती धूळ लागताच महापापीण अशी अहल्या उद्धरून गेली ! त्याला शिवधनुष्य तोडणे अशक्य आहे होय ? चुकूनसुद्धा हा

जेहिं बिरंचि रचि सीय सँवारी । तेहिं स्यामल बरु रचेउ बिचारी ॥
तासु बचन सुनि सब हरषानीं । ऐसेइ होउ कहहिं मृदु बानीं ॥

दो० – हियँ हरषहिं बरषहिं सुमन सुमुखि सुलोचनि बृंद ।
जाहिं जहाँ जहँ बंधु दोउ तहँ तहँ परमानंद ॥ २२३ ॥

चौ० – पुर पूरब दिसि गे दोउ भाई । जहँ धनुमख हित भूमि बनाई ॥
अति बिस्तार चारु गच ढारी । बिमल बेदिका रुचिर सँवारी ॥
चहुँ दिसि कंचन मंच बिसाला । रचे जहाँ बैठहिं महिपाला ॥
तेहि पाछें समीप चहुँ पासा । अपर मंच मंडली बिलासा ॥
कछुक ऊँचि सब भाँति सुहाई । बैठहिं नगर लोग जहँ जाई ॥
तिन्ह के निकट बिसाल सुहाए । धवल धाम बहुबरन बनाए ॥
जहँ बैठें देखहिं सब नारी । जथाजोगु निज कुल अनुहारी ॥
पुर बालक कहि कहि मृदु बचना । सादर प्रभुहि देखावहिं रचना ॥

दो० – सब सिसु एहि मिस प्रेमबस परसि मनोहर गात ।
तन पुलकहिं अति हरषु हियँ देखि देखि दोउ भ्रात ॥ २२४ ॥

चौ० – सिसु सब राम प्रेमबस जाने । प्रीति समेत निकेत बखाने ॥
निज निज रुचि सब लेहिं बोलाई । सहित सनेह जाहिं दोउ भाई ॥

विश्वास तू सोडू नकोस. ज्या विरंचीने सुंदर सीतेला निर्माण केली त्यानेच चांगला विचार करून तिच्यासाठीच हा श्यामवर्णाचा नवरा जन्माला घातला आहे."

हे तिचे उत्साहवर्धक भाषण ऐकून सगळ्याजणींना मोठा आनंद झाला. "असंच घडो आणि तुझ्या तोंडात साखर पडो!" असा, एकाच पण हळू सुरात, त्यांनी तिच्या म्हणण्याला दुजोरा दिला.

ज्या ज्या ठिकाणी ते बंधू फिरले, तेथे तेथे याप्रमाणे हृदयात हर्ष पावून, सुंदर मुखकमलाच्या व सुंदर नेत्राच्या त्या तरुण स्त्रियांनी त्या दोघा भावांवर पुष्पवृष्टी केली आणि असा परमानंद लुटला. २२३.

ज्या ठिकाणी त्या धनुर्यज्ञासाठी मंडप घातला होता, तिकडे नगरीच्या पूर्व दिशेला आता हे भाऊ वळले. मंडप अत्यंत विस्तृत. सर्वत्र फरशी घातलेली. त्यात एक स्वच्छ असा चौथरा, धनुष्याची पेटी ठेवण्यासाठी तयार केला होता. त्याच्या चारी बाजूस ऐसपैस असे सोन्याचे उत्तम कोच, मोवती ठेवले होते. राजे लोकांनी त्यावर बसावे; अशी ती योजना होती. त्यांच्याच मागे चिकटून, समोवार आणखी एक कोचाचे दुसरे वलय विराजत होते. ते अनेक प्रकारचे सुंदर आणि थोडेसे उंच असे होते. नगरजन आल्यानंतर त्यांनी त्यावर बसावे यासाठी ती व्यवस्था होती. त्यांच्याच पलीकडे, जवळ पांढरी, स्वच्छ अशी अनेक रंगांची सुबक घरे बनवली होती. आपापल्या कुलमर्यादा रक्षण करून नगरातील स्त्रियांनी आत बसून त्यांना सर्व पाहता यावे म्हणून ती बांधली होती.

गावातील पोरे गोडगोड शब्दांत, प्रभूंना अतिशय आदराने ती रचना समजावून सांगत होती. या निमित्ताने दोघा भावांच्या मनोहर गात्रांना स्पर्श करताच त्या अनुपमेय स्पर्शाबरोबर ती प्रेमविवश होत. त्यांच्याही अंगावर पुनः पुनः दर्शन घेतल्याने रोमांच उभे राहात व त्यांची हृदये आनंदातिशयाने भरून जात. २२४

ती बालके, प्रेमविवश झालेली पाहून, प्रभूंनी त्या धनुर्मखमंडपातील निरनिराळ्या स्थानांची मोठ्या प्रेमाने स्तुती केली. ज्यांना जसे आवडेल तसे त्या (भाग्यवंत!) मुलांनी बोलवावे व रामलक्ष्मणांनी त्या त्या दिशेस

राम देखावहिं अनुजहि रचना । कहि मृदु मधुर मनोहर बचना ॥
लव निमेष महुँ भुवन निकाया । रचइ जासु अनुसासन माया ॥
भगति हेतु सोइ दीनदयाला । चितवत चकित धनुष मखसाला ॥
कौतुक देखि चले गुरु पाहीं । जानि बिलंबु त्रास मन माहीं ॥
जासु त्रास डर कहुँ डर होई । भजन प्रभाउ देखावत सोई ॥
कहि बातें मृदु मधुर सुहाई । किए बिदा बालक बरिआई ॥
दो० – सभय सप्रेम बिनीत अति सकुच सहित दोउ भाइ ।
गुर पद पंकज नाइ सिर बैठे आयसु पाइ ॥ २२५ ॥

चौ० – निसि प्रबेस मुनि आयसु दीन्हा । सबहीं संध्याबंदनु कीन्हा ॥
कहत कथा इतिहास पुरानी । रुचिर रजनि जुग जाम सिरानी ॥
मुनिबर सयन कीन्हि तब जाई । लगे चरन चापन दोउ भाई ॥
जिन्ह के चरन सरोरुह लागी । करत बिबिध जप जोग बिरागी ॥
तेइ दोउ बंधु प्रेम जनु जीते । गुर पद कमल पलोटत प्रीते ॥
बार बार मुनि अग्या दीन्ही । रघुबर जाइ सयन तब कीन्ही ॥
चापत चरन लखनु उर लाएँ । सभय सप्रेम परम सचु पाएँ ॥
पुनि पुनि प्रभु कह सोवहु ताता । पौढ़े धरि उर पद जलजाता ॥

जावे. त्याबरोबरच राम, कोमल, मधुर, मनोहर वचनांनी, लक्ष्मणाला ती सर्व रचना समजावून देत होते! ज्याच्या आज्ञेने एका लवनिमिषात माया अनेक ब्रह्मांडे रचते, तोच दीनांवर दया करणारा प्रभू भक्तिप्रेमाने ती यज्ञशाला चकित होऊन पाहातो!!

ते सर्व कौतुक पाहून झाल्यानंतर उशीर झाल्यामुळे भीत भीत घाईने ते गुरूकडे परत गेले. ज्याच्या धाकाने भीतीचीच घाबरगुंडी उडावयाची, तो भगवान भक्तिप्रभाव कसा दाखवतो पाहा. प्रेमाने कुरवाळून, गोड शब्दांनी त्या बालकांना, भगवंतांनी मोठ्या जुलमाने घरी पाठविले. प्रेम, भय, विनय व संकोच इत्यादि भावनांच्या मिश्रित वृत्तीने गुरुपदकमली शिर नमवून त्यांची आज्ञा मिळाल्यावर ते दोघे खाली बसले. तोपर्यंत ते उभेच होते. २२५

सायंकाल होताच, गुरुजींनी सूचना दिली. सर्वांनी संध्यावंदन केले. इतिहास व पुराणे यांतील कथा गुरुमुखाने श्रवण करीत असता, रमणीय रात्रीचे दोन प्रहर केव्हा निघून गेले ते मुळीच ध्यानी आले नाही. मग मुनिवर्य उठून आपल्या शय्येवर झोपले. लगेच दोन्ही भावांनी विश्वामित्रांचे चरण चेपण्यास सुरवात केली! ज्यांच्या चरणसरोजासाठी विरक्त पुरुष, योगाचे व जपाचे नानाप्रकारचे अनुष्ठान करतात, तेच बंधू, प्रेमाने जिंकले गेल्यामुळे गुरुपदपंकजसेवेत रममाण झाले! गुरुजींनी 'पुरे आता बाळांनो!' असे अनेक वेळा सांगितल्यानंतर रघुवरांनी जाऊन शयन केले.

मग रामचरण आपल्या हृदयाला लावून प्रेमाने लक्ष्मण ते चेपू लागले. ते अतिसुकुमार असल्याने त्याला मनात भीती वाटे, पण ही सेवा करण्याचे अनुपमेय भाग्य लाभल्याने त्याला परम सुख झाले! "बाळा, आता नीज" असे किती तरी वेळा प्रभूंनी सांगितल्यावर तेच पदकमल, आपल्या हृदयात धरून ध्यान करीत

दो० – उठे लखनु निसि बिगत सुनि अरुनसिखा धुनि कान ॥
गुर तें पहिलेहिं जगतपति जागे रामु सुजान ॥ २२६ ॥

चौ०– सकल सौच करि जाइ नहाए । नित्य निबाहि मुनिहि सिर नाए ॥
समय जानि गुर आयसु पाई । लेन प्रसून चले दोउ भाई ॥
भूप बागु बर देखेउ जाई । जहँ बसंत रितु रही लोभाई ॥
लागे बिटप मनोहर नाना । बरन बरन बर बेलि बिताना ॥
नव पल्लव फल सुमन सुहाए । निज संपति सुर रूख लजाए ॥
चातक कोकिल कीर चकोरा । कूजत बिहग नटत कल मोरा ॥
मध्य बाग सरु सोह सुहावा । मनि सोपान बिचित्र बनावा ॥
बिमल सलिलु सरसिज बहुरंगा । जलखग कूजत गुंजत भृंगा ॥

दो०– बागु तड़ागु बिलोकि प्रभु हरषे बंधु समेत ।
परम रम्य आरामु यहु जो रामहि सुख देत ॥ २२७ ॥

चौ०– चहुँ दिसि चितइ पूँछि मालीगन । लगे लेन दल फूल मुदित मन ॥
तेहि अवसर सीता तहँ आई । गिरिजा पूजन जननि पठाई ॥
संग सखीं सब सुभग सयानीं । गावहिं गीत मनोहर बानीं ॥
सर समीप गिरिजा गृह सोहा । बरनि न जाइ देखि मनु मोहा ॥

(लक्ष्मण) विश्रांती घेण्यासाठी आडवे झाले. कोंबडा आरवल्याचे कानी येताच, रात्र संपली, असे जाणून लक्ष्मण उठले. ज्ञानी प्रभूही आपल्या गुरुजींच्या अगोदर जागे झालेच! २२६

पुष्पवाटिका प्रसंग

शौचस्नानादि नित्यकर्म उरकल्यावर, मुनिपदकमली त्यांनी वंदन केले. योग्य वेळ होताच गुरुजींची आज्ञा घेऊन हे भाऊभाऊ फुले आणण्यास निघाले. राजाची उत्तम बाग त्यांनी जाऊन पाहिली. वसंताने लुब्ध होऊन त्या बागेत आपला मुक्काम कायमचाच ठेवला होता! जिकडे तिकडे नाना प्रकारचे मनोहर वृक्ष दिसले! त्यांच्यावर लतांचे कुंज सोडून विविध आकृतींची चित्रे बनवली होती. नवीन फुटलेली कोवळी पाने, फुले, फळे यांनी आपल्या संपत्तीची अशी शोभा सर्वत्र पसरली होती की, ती पाहून कल्पवृक्ष लाजून खाली मानच घालतात! चातक, चकोर, कोकिळ, पोपट इत्यादि पक्ष्यांनी मधुर कूजन सुरू केले. मनोहर पिसारा पसरून, मोर सुंदर नाच करीत आहेत. बागेच्या मध्यावर एक रमणीय तलाव होता. त्या तलावाच्या पायऱ्या विविध रंगांच्या रत्नांनी मढवल्या होत्या! पाणी अत्यंत स्वच्छ व त्यात अनेक रंगांची कमले फुललेली! पाणकोंबड्या-सारखे पाण्यातील पक्षी गोड आवाज करीत व भुंगे गुंजारव करीत. बाग व तिच्यातील हा तलाव यांचे सौंदर्य पाहून बंधूसह रामाला केवढा आनंद वाटला! खरोखर रामालाही सुख देणारा हा आराम परम रम्यच म्हटला पाहिजे! २२७

या बंधूंनी माळ्याची परवानगी घेतली. चारी दिशांना चौकस बुद्धीने पाहून, मोठ्या आनंदाने पत्रे व फुले जमविली. त्याचवेळी, आईच्या आज्ञेने गिरिजेच्या पूजनासाठी, सीता त्याच बागेत आली. तिच्याबरोबर सुंदर व शहाण्या अशाच सगळ्या सखी होत्या. त्या मधुर आणि मनोहर गाणी म्हणू लागल्या! सरोवराच्या जवळच गिरिजेचे गृह (मंदिर) शोभत होते. [illegible] मनाला मोहिनी पडत असल्यामुळे त्या देवालयाचे वर्णन करणे

मज्जनु करि सर सखिन्ह समेता। गई मुदित मन गौरि निकेता ॥
पूजा कीन्हि अधिक अनुरागा। निज अनुरूप सुभग बरु मागा ॥
एक सखी सिय संगु बिहाई। गई रही देखन फुलवाई ॥
तेहिं दोउ बंधु बिलोके जाई। प्रेम बिबस सीता पहिं आई ॥

दो०— तासु दसा देखी सखिन्ह पुलक गात जलु नैन।
कहु कारनु निज हरष कर पूछहिं सब मृदु बैन ॥ २२८ ॥

चौ०— देखन बागु कुअँर दुइ आए। बय किसोर सब भाँति सुहाए ॥
स्याम गौर किमि कहौं बखानी। गिरा अनयन नयन बिनु बानी ॥
सुनि हरषीं सब सखीं सयानी। सिय हियँ अति उतकंठा जानी ॥
एक कहइ नृपसुत तेइ आली। सुने जे मुनि सँग आए काली ॥
जिन्ह निज रूप मोहनी डारी। कीन्हे स्वबस नगर नर नारी ॥
बरनत छबि जहँ तहँ सब लोगू। अवसि देखिअहिं देखन जोगू ॥
तासु बचन अति सियहि सोहाने। दरस लागि लोचन अकुलाने ॥
चली अग्र करि प्रिय सखि सोई। प्रीति पुरातन लखइ न कोई ॥

अशक्य ! सखींच्यासह सीतेने सरोवरात बुडी मारून स्नान केले व मोठ्या संतोषाने ती गौरीच्या दर्शनास गेली. अत्यंत भक्ति पुरःसरपूजन करून स्वतःला अनुरूप असा वर मिळावा अशी तिने प्रार्थना केली.

दरम्यानच्या काळात सीतेबरोबर आलेल्या सखींपैकी एक तिची संगत सोडून फुलबाग पाहण्यासाठी, न सांगताच गेली होती. अकस्मात् तिला या दोन बंधूंचे दर्शन घडले, त्याबरोबर ती इतकी आनंदातिरेकाने बेहोष झाली की धावतच ती सीतेजवळ आली !

अंगावर रोमांच उभे राहिलेले, नेत्रांतून आनंदाश्रूंचा पूर चाललेला, अशी तिची विलक्षण झालेली दशा पाहून सखींनी तिला कोमलवाणीने विचारले, “ अगं ! एवढा हर्ष होण्यासारखं झालं तरी काय ? सांग ना !”. २२८

“ दोन कुमार बाग पाहण्यासाठी आले आहेत, ” ती प्रयत्नपूर्वक, धापा टाकीत बोलू लागली, “ वय किशोर आहे. सगळे अवयव कसे अगदी रेखीव आहेत. एक श्यामवर्णाचा आणि एक गौर वर्णाचा. आणि त्यांचे अधिक वर्णन कसे करू ? डोळ्यांनी पाहिले, त्यांना बोलता येत नाही; आणि वाणी बोलणार पण तिला डोळे नाहीत !! ”

हे ऐकून जाणत्या सर्व सखी हर्षित झाल्या. सीता या कुमारांना पाहण्यास उत्कंठित झाली आहे, हे त्यांच्या चटकन् ध्यानी आले. तेव्हा त्यांच्यापैकी एकीने माहिती सांगितली. “ अग सखी ! मला वाटते ते दोन राजकुमार बहुतेक कौशिक मुनींच्यासह कालच आल्याची बातमी मला कळली आहे. अगं ! त्यांचे इतके मनोहर लावण्य आहे की, त्यांनी सर्व नगरातील स्त्रियांनाच काय, पुरुषांनासुद्धा आपल्या रूपाने अगदी मोहून टाकले आहे म्हणे ! जागोजागी लोक त्यांच्या सौंदर्याचेच वर्णन करीत असल्याचे आढळते. खरोखर बघण्याला अगदी योग्य आहेत, आपण बघू या बाई ! तेच बागेत आले असतील. ”

त्यांच्या दर्शनासाठी तृषित नयन झालेल्या सीतेला हे मैत्रिणीचे भाषण फारच आवडले. जिने ते राजकुमार प्रथम पाहिले होते तिला पुढे करून आपल्या सखींसह सीता निघाली ! तिच्या हृदयातील पुरातन प्रेम

दो०– सुमिरि सीय नारद बचन उपजी प्रीति पुनीत ।
चकित बिलोकति सकल दिसि जनु सिसु मृगी सभीत ॥ २२९ ॥

चौ०– कंकन किंकिनि नूपुर धुनि सुनि । कहत लखन सन रामु हृदयँ गुनि ॥
मानहुँ मदन दुंदुभी दीन्ही । मनसा बिस्व बिजय कहँ कीन्ही ॥
अस कहि फिरि चितए तेहि ओरा । सिय मुख ससि भए नयन चकोरा ॥
भए बिलोचन चारु अचंचल । मनहुँ सकुचि निमि तजे दिगंचल ॥
देखि सीय सोभा सुखु पावा । हृदयँ सराहत बचनु न आवा ॥
जनु बिरंचि सब निज निपुनाई । बिरचि बिस्व कहँ प्रगटि देखाई ॥
सुंदरता कहुँ सुंदर करई । छबिगृहँ दीपसिखा जनु बरई ॥
सब उपमा कबि रहे जुठारी । केहिं पटतरौं बिदेहकुमारी ॥

दो ० –सिय सोभा हियँ बरनि प्रभु आपनि दसा बिचारि ।
बोले सुचि मन अनुज सन बचन समय अनुहारि ॥ २३० ॥

चौ ० –तात जनकतनया यह सोई । धनुषजग्य जेहि कारन होई ॥
पूजन गौरी सखीं लै आई । करत प्रकासु फिरइ फुलवाई ॥

कुणाच्याच ध्यानी आले नाही! नारदांच्या वचनाचे सीतेला स्मरण होऊन तिच्या हृदयात पवित्र प्रेम उत्पन्न झाले. हरिणीच्या घाबरलेल्या पाडसाप्रमाणेच जणू काही ती चकित होऊन सगळ्या दिशांना निरखून पाहू लागली. २२९

कंकणांचा व कमरपट्ट्यातील घागऱ्यांचा किण किण आवाज व पायातील पैंजणे, वाळे यांचा, नूपुरांचा रुण झुण नाद कानी पडल्यावर विचार करून राम लक्ष्मणाला म्हणतात, ‘‘विश्वविजय करण्याच्या निश्चयाने जणू काही कामदेव दुंदुभीच वाजवीत आहे!” असे बोलून श्रीरामांनी त्या आवाजाच्या दिशेला फिरून पाहिले. तोच समोर सीतेच्या मुखचंद्राला पाहिले. त्याबरोबर रामाचे डोळे जणू काही चकोर बनले! ते रूप टक लावून पाहात असता, –ते सुंदर विशाल डोळे स्थिर झाले. संकोचाने निमी (जानकीचा पूर्वज) ने पापणीतील आपली जागा सोडली! ते अनिमिष होऊन पाहू लागले! (निमीचे वास्तव्य पापणीत मानले आहे. कन्या व तिचा भावी पती यांच्या प्रथम नजरभेटीच्या वेळी वडील मंडळींनी तेथे असणे बरे नव्हे, हा भाव.)

सीतेचे रूप पाहून प्रभूना सुख झाले. अंतःकरणात त्याची स्तुती केली पण मुखाने वर्णन करण्यास शब्द अपुरे! ‘जणू काही विरंचीने आपले सर्व नैपुण्य एकत्र करून हे स्त्रीरत्न बनवले आणि ते नंतर विश्वात प्रकट केले! त्या रत्नाच्यामुळे सौंदर्याला सुंदरपणा आला व लावण्याच्या गृही ही जणू काही तेजाची ज्योतच पाजळत आहे! सगळ्याच उपमा कवीच्या उष्ट्या झाल्यामुळे विदेह कुमारीला कुणाची उपमा देऊ?’

याप्रमाणे सीतेच्या स्वरूपाचे हृदयात स्तवन करून स्वतःच्या स्थितीचा प्रभू विचार करू लागले व शुद्ध अंतःकरणाचे रामचंद्र पवित्र मनाच्या आपल्या धाकट्या भावाबरोबर समयोचित शब्दांत बोलू लागले, २३०

“बाळा! जिच्यासाठी हा धनुर्यज्ञ सुरू होणार तीच ही जनकराजनन्दिनी. गौरीच्या पूजनासाठी सखींनी तिला आणले आहे; आणि फुलबागेला आपल्या तेजाने उजळा देत ती फिरत आहे! तिच्या अलौकिक

जासु बिलोकि अलौकिक सोभा। सहज पुनीत मोर मनु छोभा ॥
सो सबु कारन जान बिधाता। फरकहिं सुभद अंग सुनु भ्राता ॥
रघुबंसिन्ह कर सहज सुभाऊ। मनु कुपंथ पगु धरइ न काऊ ॥
मोहि अतिसय प्रतीति मन केरी। जेहिं सपनेहुँ परनारि न हेरी ॥
जिन्ह कै लहहिं न रिपु रिन पीठी। नहिं पावहिं परतिय मनु डीठी ॥
मंगन लहहिं न जिन्ह कै नाहीं। ते नरबर थोरे जग माहीं ॥

दो० – करत बतकही अनुज सन मन सिय रूप लोभान।
मुख सरोज मकरंद छबि करइ मधुप इव पान ॥ २३१ ॥

चौ० – चितवति चकित चहूँ दिसि सीता। कहँ गए नृपकिसोर मनु चिंता ॥
जहँ बिलोक मृग सावक नैनी। जनु तहँ बरिस कमल सित श्रेनी ॥
लता ओट तब सखिन्ह लखाए। स्यामल गौर किसोर सुहाए ॥
देखि रूप लोचन ललचाने। हरषे जनु निज निधि पहिचाने ॥
थके नयन रघुपति छबि देखें। पलकन्हिहूँ परिहरीं निमेषें ॥
अधिक सनेहँ देह भै भोरी। सरद ससिहि जनु चितव चकोरी ॥
लोचन मग रामहि उर आनी। दीन्हे पलक कपाट सयानी ॥
जब सिय सखिन्ह प्रेमबस जानी। कहि न सकहिं कछु मन सकुचानी ॥

शोभेला पाहून माझे स्वभावतः पवित्र असणारे मन क्षुब्ध झाले! काय कारण ते एक विधाताच जाणे! ताता पहा तर माझी सर्व शुभांगे कशी स्फुरण पावत आहेत!

"भाऊराया! तुला ठाऊकच आहे की रघुवंशीयांचा हा जन्मतःच स्वभाव असतो. त्यांचे मन कुमार्गावर चुकूनही पाऊल टाकणार नाही. मला तर स्वतःच्या मनाची पूर्ण खात्री आहे. त्याने स्वप्नातही परस्त्री कधी पाहिलेली नाही! रणांगणात शत्रूला पाठ न दाखविणारे व मनाने अगर दृष्टीने परस्त्री न पाहणारे, 'नाही' असे याचकास कधीही न म्हणणारे असे पुरुषश्रेष्ठ (राम) पृथ्वीवर फारच थोडे असतात.

मुखाने लक्ष्मणाबरोबर असे बोलत असता मनाने राम सीतेच्या सौंदर्यरूप मकरंद रसाचे मधुपाप्रमाणे त्यांचे मन पान करीत होते. २३१

इकडे चारी दिशांना चकित होऊन सीता पाहाते आहे. ते नृपकिशोर कुठे गेले, अशी तिच्या मनाला चिंता लागून राहिली आहे. मृगाच्या पाडसाच्या डोळ्यानी, सीता जिकडे कटाक्ष टाकी तिकडे जणू काही श्वेतकमलांची वृष्टीच होई!

इतक्यात सखीने, लतेआड असलेल्या, त्या श्याम-गौर सुंदर किशोरांकडे, खुणेने दाखवले. ते रूप पाहाताच तिचे डोळे तेथे लालुचले! जणू काही आपला हरवलेला खजिनाच सांपडला, एवढा त्यांना परमानंद झाला. रघुपतीचे ते दिव्य लावण्य पाहून डोळे थक्कच झाले व पापण्यांनी आपली उघडझाप बंद केली! हृदयातून स्नेहाचा पाझर उसळू लागला व देहभान हरपू लागले. शरदऋतूतील चंद्राकडे पहाण्यात जणू ती एक चकोरीच गर्क झाली आहे! शेवटी नयनांच्या मार्गाने, रामाला हृदयात स्थिर करून शहाण्या सीतेने (ते रूप परत बाहेर पडू नये) म्हणून पापण्यांची दारे घट्ट लावून घेतली!

सीता प्रेमविवश झालेली आहे, सखीच्या ध्यानी आले, पण मनात संकोच वाटून त्या काहीच बोलल्या नाहीत.



दो ०—लताभवन तें प्रगट भे तेहि अवसर दोउ भाइ ।
निकसे जनु जुग बिमल बिधु जलद पटल बिलगाइ ॥ २३२ ॥

चौ ०—सोभा सीवँ सुभग दोउ बीरा । नील पीत जलजाभ सरीरा ॥
मोरपंख सिर सोहत नीके । गुच्छ बीच बिच कुसुम कली के ॥
भाल तिलक श्रमबिंदु सुहाए । श्रवन सुभग भूषन छबि छाए ॥
बिकट भृकुटि कच घूघरवारे । नव सरोज लोचन रतनारे ॥
चारु चिबुक नासिका कपोला । हास बिलास लेत मनु मोला ॥
मुखछबि कहि न जाइ मोहि पाहीं । जो बिलोकि बहु काम लजाहीं ॥
उर मनि माल कंबु कल गीवा । काम कलभ कर भुज बलसींवा ॥
सुमन समेत बाम कर दोना । सावँर कुअँर सखी सुठि लोना ॥

दो ०—केहरि कटि पट पीत धर सुषमा सील निधान ।
देखि भानुकुलभूषनहि बिसरा सखिन्ह अपान ॥ २३३ ॥

चौ० —धरि धीरजु एक आलि सयानी । सीता सन बोली गहि पानी ॥
बहुरि गौरि कर ध्यान करेहू । भूपकिसोर देखि किन लेहू ॥
सकुचि सीयँ तब नयन उघारे । सनमुख दोउ रघुसिंघ निहारे ॥
नख सिख देखि राम कै सोभा । सुमिरि पिता पनु मनु अति छोभा ॥

भावनांचा असा पूर आला आहे तोच, लतागृहातून ते दोन्ही बंधू बाहेर प्रकटले ! जणू काही, निष्कलंक दोन चंद्रच, मेघांचे पटल बाजूस सारून बाहेर पडले ! २३२

तेव्हां ते बंधू कसे दिसले ? दोन्ही सुंदर बंधू शोभेची सीमाच असे होते. नील व पीत कमलाच्या तेजाप्रमाणे तेजस्वी शरीरे. मस्तकावर उत्तम काकपक्ष (झुलपे : कानांजवळ शेंड्या ठेवतात त्या !) शोभत असून, त्यात फुले व कळ्या असलेले गुच्छ मधे मधे खोवले आहेत. कपाळावर उत्तम तिलक असून त्याला श्रमाने आलेले घामाचे बिंदू खुलवीत आहेत. मनोहर कर्णभूषणे घातलेली, कानात चमकत आहेत. बाकदार भुवया व काळे व कुरळे केस, ताज्या टवटवीत फुललेल्या अरुण कमलाप्रमाणे डोळे, हनुवटी, नाक व गाल, हे सर्वच अवयव अत्यंत सुंदर, हास्यविलास, मनाचीच किंमत घेत आहे. (मनोहर!) ज्याला पाहून अगणित रतिपती, स्वतःचा सौंदर्यमद परिहार झाल्यामुळे लाजेने माना खाली घालणार अशा त्या मुखकमलाच्या लावण्याचे वर्णन माझ्याने कसे करवेल ? हृदयावरून खाली लोंबत असलेली रत्नांची माळ, वळणदार शंखाप्रमाणे भरदार मान; कामदेवाच्या हत्तींच्या पिलांची सुंदर सोंडच असे त्यांचे सुकुमार पण बलवान बाहू; डाव्या हातात फुलांनी भरलेले द्रोण!... " सखी! त्यातल्या त्यात श्याम वर्णाचा कुमार फारच लावण्यखाण आहे; होय ना ? "

सिंहाप्रमाणे पातळ कमर असलेले, पीतांबर परिधान केलेले, शोभा व शील यांचे भाण्डार अशा रविकुलभूषण श्रीरामचंद्रांना पाहून त्या सर्व सखींचे देहभान हरपले. २३३

त्यातल्या त्यात एक शहाणी मैत्रीण होती. तिने धीर धरून सीतेचा हात धरला व म्हणते, " अगोदर या राजकुमारांना पोटभर पाहून घ्या आणि मग सावकाऽश गौरीचे ध्यान करा ! "

संकोचाने सीतेने डोळे उघडून पाहिले, तो आपल्या समोरच ते दोन्ही रघुसिंह उभे ठाकले आहेत ! तिने नखशिखांत ती रघुपतीची सुकुमार लावण्यमूर्ती निरखून पाहिली. आपल्या वडिलांच्या पणाचे स्मरण होऊन मात्र तिचे मन क्षुब्ध झाले,

परवस सखिन्ह लखी जब सीता । भयउ गहरु सब कहहिं सभीता ॥
पुनि आउब एहि बेरिआँ काली । अस कहिं मन बिहसी एक आली ॥
गूढ़ गिरा सुनि सिय सकुचानी । भयउ बिलंबु मातु भय मानी ॥
धरि बड़ि धीर रामु उर आने । फिरी अपनपउ पितु बस जाने ॥

दो० – देखत मिस मृग बिहग तरु फिरइ बहोरि बहोरि ।
निरखि निरखि रघुबीर छबि बाढइ प्रीति न थोरि ॥ २३४ ॥

चौ० – जानि कठिन सिवचाप बिसूरति । चली राखि उर स्यामल मूरति ॥
प्रभु जब जात जानकी जानी । सुख सनेह सोभा गुन खानी ॥
परम प्रेममय मृदु मसि कीन्ही । चारु चित्त भीतीं लिखि लीन्ही ॥
गई भवानी भवन बहोरी । बंदि चरन बोली कर जोरी ॥
जय जय गिरिबरराज किसोरी । जय महेस मुख चंद चकोरी ॥
जय गजबदन षड़ानन माता । जगत जननि दामिनि दुति गाता ॥
नहिं तव आदि मध्य अवसाना । अमित प्रभाउ बेदु नहिं जाना ॥
भव भव बिभव पराभव कारिनि । बिस्व बिमोहनि स्वबस बिहारिनि ॥

सीतेची ती रामप्रेमवश होऊन व्याकुळ झालेली स्थिती पाहिल्यावर त्या सगळ्या मैत्रिणी भ्याल्या आणि म्हणाल्या, “आपणाला किती उशीर झाला नाही?” त्यातली एक चुणचुणीत होती, तिने लगेच पुस्ती जोडली, “उद्या अगदी याचवेळी आपण येऊ हं!” असे म्हणून ती मनात हसली! या तिच्या गूढ भाषणाने सीतेला संकोच वाटला; आणि उशीर झाला म्हणून आई रागावणार अशी भीतीपण वाटली! तरीसुद्धा पुष्कळ धीर धरून तिने रामरूप हृदयात आणले. आपण आपल्या वडिलांच्या आधीन आहो, हे समजून ती परतली! पशु, पक्षी वृक्ष, लता यांना पाहण्याचा बहाणा करून सीता पुनः पुन्हा वळून पाही; रघुवीराचे सौंदर्य अशा प्रकारे वारंवार पाहून तिच्या हृदयातील प्रेम अपार वाढले! २३४

परंतु शिवधनू अत्यंत कठीण, हे जाणून ती कासावीस होई; शेवटी ती श्यामलमूर्ती हृदयात बसवून, तिने राजमहालाचा रस्ता धरला.

प्रभू श्रीरामचंद्रानी जेव्हा सुख, स्नेह, शोभा आणि गुण यांची खाण असणारी जानकी निघालेली पाहिली तेव्हा परम प्रेमरूप शाई बनवून, आपल्या सुंदर चित्तभिंतीवर, तिच्या स्वरूपाचे चित्र त्यानी काढले!

सीता पुनः भवानीच्या देवळात आली. तिच्या चरणावर मस्तक नमवले व हात जोडून ती प्रार्थना करू लागली,

“हे श्रेष्ठ, पर्वतराज हिमाचलकन्यके! तुझे ऐश्वर्य प्रकट कर! श्रीमहादेवांच्या मुखचंद्राकडे पाहणाऱ्या चकोरिके! तुझे ऐश्वर्य प्रकट कर. श्रीगजानन व स्वामी कार्तिकांच्या माते तुझे ऐश्वर्य प्रकट कर! हे विजेप्रमाणे तेजस्वी देह असणाऱ्या जगज्जननी, तुझे ऐश्वर्य प्रकट कर! तुला आदि, मध्य व अंत मुळीच नाही! तुझ्या अनंत प्रभावाचे वेदांनाही आकलन होत नाही! या विश्वाची उत्पत्ती, पालन व नाश करणारी अशी तूच आहेस! विश्वाला मोहित करून, स्वतंत्ररूपाने विहार करणारी अशीही तूच आहेस!

दो० –पतिदेवता सुतीय महुँ मातु प्रथम तव रेख ।
महिमा अमित न सकहिं कहि सहस सारदा सेष ।। २३५ ।।

चौ० –सेवक तोहि सुलभ फल चारी । बरदायनी पुरारि पिआरी ।।
देबि पूजि पद कमल तुम्हारे । सुर नर मुनि सब होहिं सुखारे ।।
मोर मनोरथु जानहु नीकें । बसहु सदा उर पुर सबही कें ।।
कीन्हेउँ प्रगट न कारन तेहीं । अस कहि चरन गहे बैदेहीं ।।
बिनय प्रेम बस भई भवानी । खसी माल मूरति मुसुकानी ।।
सादर सियँ प्रसादु सिर धरेऊ । बोली गौरि हरषु हियँ भरेऊ ।।
सुनु सिय सत्य असीस हमारी । पूजिहि मन कामना तुम्हारी ।।
नारद बचन सदा सुचिं साचा । सो बरु मिलिहि जाहिं मनु राचा ।।

छं० –मनु जाहिं राचेउ मिलिहि सो बरु सहज सुंदर साँवरो ।
करुना निधान सुजान सीलु सनेहु जानत रावरो ।।
एहि भाँति गौरि असीस सुनि सिय सहित हियँ हरषीं अली ।
तुलसी भवानिहि पूजि पुनि पुनि मुदित मन मंदिर चली ।।

सो० –जानि गौरि अनुकूल सिय हिय हरषु न जाइ कहि ।
मंजुल मंगल मूल बाम अंग फरकन लगे ।। २३६ ।।

पतीलाच आपले इष्ट दैवत मानणाऱ्या ज्या श्रेष्ठ स्त्रिया आहेत त्यांच्यात हे मातोश्री ! तुझी गणना प्रथम होते ! तुझा अपार महिमा हजारो सरस्वती आणि शेषही सांगू शकत नाहीत; तेथे मी बालिका काय करणार ? २३५

हे वरदायिनी ! त्रिपुरारींना प्रिय असणाऱ्या हे वरदायिनी तुझ्या सेवेने धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चारी फळांची प्राप्ति उत्तम होते ! पुरारीप्रिये ! हे देवी तुझ्या चरणकमलांची पूजा करून देव, मानव, मुनी इत्यादि सर्वच सुखी होतात ! तू सर्वांच्याच अंतर्यामी निवास करत असल्यामुळे माझा मनोरथ तू खास नीटपणे जाणला आहेस ! म्हणूनच मी तो प्रकटपणे बोलून दाखवला नाही. " असे बोलून वैदेहीने गिरिजेचे चरण धरले.

सीतेचा विनय व तिच्या हृदयातील प्रेम पाहून भवानी प्रसन्न झाली ! मूर्तीच्या गळ्यातून माळ खाली गळली व तिने मंदहास्य केले. लगेच ती माळ प्रसाद समजून आपल्या मस्तकी अत्यंत आदराने सीतेने धारण केली. हे पाहून गौरी हर्षनिर्भर होऊन बोलू लागली. "सीते ! आमचा आशीर्वाद ऐक ! तुझी मनकामना पूर्ण होईल ! नारदाचा शब्द केव्हाही पावन व सत्यच असतो.

" ज्याचा तुझ्या मनाला ध्यास लागला आहे, तोच स्वभावतः सुंदर व श्याम वर्णाचा वर तुला मिळेल ! कारण तो करुणासागर असून तुमचे सुशील व स्नेह याची जाणीव असलेला आहे. तुझ्या अंतरीच्या प्रेमाची त्याला योग्य अशीच कल्पना आलेली आहे.

हा गौरीचा आशीर्वाद समजल्यावर सखीसह तिला हर्ष झाला. भवानीची वारंवार पूजा करून ती आनंदित मनाने आपल्या मंदिराकडे परतली ! गौरीची ही अनुकूलता पाहून सीतेच्या मनाला केवढे समाधान झाले, हे कसे सांगावे ? यामुळे सुन्दर मांगल्याचे मूल अशी तिची वामांगे स्फुरण पावू लागली. २३६

चौ० –हृदयँ सराहत सीय लोनाई । गुर समीप गवने दोउ भाई ।।
राम कहा सबु कौसिक पाहीं । सरल सुभाउ छुअत छल नाहीं ।।
सुमन पाइ मुनि पूजा कीन्ही । पुनि असीस दुहु भाइन्ह दीन्ही ।।
सुफल मनोरथ होहुँ तुम्हारे ।रामु लखनु सुनि भए सुखारे ।।
करि भोजनु मुनिबर बिग्यानी । लगे कहन कछु कथा पुरानी ।।
बिगत दिवसु गुरू आयसु पाई । संध्या करन चले दोउ भाई ।।
प्राची दिसि ससि उयउ सुहावा । सिय मुख सरिस देखि सुखु पावा ।।
बहुरि बिचारु कीन्ह मन माहीं । सीय बदन सम हिमकर नाहीं ।।

दो० –जनमु सिंधु पुनि बंधु बिषु दिन मलीन सकलंक ।
सिय मुख समता पाव किमि चंदु बापुरो रंक ।। २३७ ।।

चौ० –घटइ बढ़इ बिरहिनि दुखदाई । ग्रसइ राहु निज संधिहिं पाई ।।
कोक सोकप्रद पंकज द्रोही । अवगुन बहुत चंद्रमा तोही ।।
बैदेही मुख पटतर दीन्हे । होइ दोषु बड़ अनुचित कीन्हे ।।
सिय मुख छबि बिधु ब्याज बखानी । गुर पहिं चले निसा बड़ि जानी ।।
करि मुनि चरन सरोज प्रनामा । आयसु पाइ कीन्ह बिश्रामा ।।
बिगत निसा रघुनायक जागे । बंधु बिलोकि कहन अस लागे ।।

इकडे प्रभू रामचंद्रही सीतेच्या रूपाची मनात स्तुती करीत आपल्या धाकट्या भावासह गुरुजींकडे गेले. घडलेली सर्व हकीकत अगदी जशीच्या तशी इत्थंभूत त्यांनी गुरुजींना लगेच निवेदन केली. याचे कारण प्रभूचे अंतःकरण स्वभावतःच अत्यंत सरळ, त्याला कपटाचा गंधही नाही ! शिष्यांनी आणलेल्या फुलांनी, आपल्या पूजनाची समाप्ती त्यांनी केली व उभयतांना आशीर्वाद दिले. " तुमचे मनोरथ सुफल होतील, " हे कौशिकांचे वाक्य ऐकून राम-लक्ष्मणांना मोठे सुख झाले.

विज्ञानी अशा मुनिश्रेष्ठांनी, भोजनोत्तर अनेक पौराणिक कथा सांगत असताच सायंकाळ झाली. गुरुजींची आज्ञा झाली व सायंसंध्येकरता दोघेही बंधू गेले. पूर्वदिशेला अत्यंत आल्हादक असा चंद्र उगवला होता. सीतेच्या मुखाप्रमाणेच तो सुखद वाटला ! पण पुनः प्रभू विचार करू लागले तो खरोखर हिमकर, सीतेच्या वदना-सारखा नाही असे त्यांना दिसून आले. कारण एकच नव्हे, अनेक दोषांनी तो भरला आहे.

खाऱ्या समुद्रात जन्म, त्याचे व हालाहल विषाचे बंधुत्वाचे नाते, दिवसा निस्तेज, कलंकयुक्त ! अशा बिचाऱ्या दरिद्री चंद्राला सीतेच्या मुखाची योग्यता कशी येणार ? २३७

शिवाय क्षय व वृद्धीने बेजार ! विरहीजनांचा दुःखदायक, योग्य संधी सांपडताच राहू त्याला ग्रासतो, कमलांचा (सूर्यविकासिनी) द्वेष करणारा, चक्रवाकाला शोक करावयास लावणारा –छे! छे! चंद्रा, तुझ्या ठिकाणी एक ना दोन फारच दोषांचा भरणा ! तुझ्याबरोबर वैदेहीच्या मुखाची तुलना केल्यास फार मोठे अनुचित कर्म केल्याचा दोष लागेल ! याप्रमाणे चंद्राच्या निमित्ताने सीतेच्या मुखकांतीचे वर्णन प्रभूनी केले. रात्र बरीच झाली, हे जाणून ते परत गुरुजींच्याकडे निघाले.

त्या बंधुद्वयांनी विश्वामित्रांच्या चरणी मस्तक नमवले. आज्ञा मिळाल्यानंतर विश्रांती घेतली. रात्र संपत येताच रघुनाथ जागे झाले. बंधुलाही जागा झाल्याचे पाहून ते म्हणतात, " बाळा ! पाहा; सूर्यविकासिनी

उयउ अरुन अवलोकहु ताता । पंकज कोक लोक सुखदाता ।।
बोले लखनु जोरि जुग पानी । प्रभु प्रभाउ सूचक मृदु बानी ।।

दो०—अरुनोदयँ सकुचे कुमुद उडगन जोति मलीन ।
जिमि तुम्हार अगमन सुनि भए नृपति बलहिन ।। २३८ ।।

चौ०—नृप सब नखत करहिं उजिआरी । टारि न सकहिं चाप तम भारी ।।
कमल कोक मधुकर खग नाना । हरषे सकल निसा अवसाना ।।
ऐसेहिं प्रभु सब भगत तुम्हारे । होइहहिं टूटें धनुष सुखारे ।।
उयउ भानु बिनु श्रम तम नासा । दुरे नखत जग तेजु प्रकासा ।।
रबि निज उदय ब्याज रघुराया । प्रभु प्रतापु सब नृपन्ह दिखाया ।।
तव भुज बल महिमा उदघाटी । प्रगटी धनु बिघटन परिपाटी ।।
बंधु बचन सुनि प्रभु मुसुकाने । होइ सुचि सहज पुनीत नहाने ।।
नित्यक्रिया करि गुरु पहिं आए । चरन सरोज सुभग सिर नाए ।।
सतानंदु तब जनक बोलाए । कौसिक मुनि पहिं तुरत पठाए ।।
जनक बिनय तिन्ह आइ सुनाई । हरषे बोलि लिए दोउ भाई ।।

दो०—सतानंद पद बंदि प्रभु बैठे गुर पहि जाइ ।
चलहु तात मुनि कहेउ तब पठवा बोलाइ ।। २३९ ।।

मासपारायण, आठवाँ विश्राम
नवाह्नपारायण, दूसरा विश्राम

कमले, चक्रवाक पक्षी, आणि सर्व चेतन सृष्टी यांना सुखदायक असा अरुणोदय झाला आहे!" हे ऐकून लक्ष्मणांनी मोठ्या मधुर शब्दात प्रभूचा प्रभाव सूचित करणारे उत्तर दिले.

धनुर्यज्ञ

"प्रभो! अरुणोदय होताच कुमुदिनी संकोचित झाल्या! नक्षत्रांचे तेज क्षीण झाले. आपले आगमन झाल्याचे समजताच सर्व राजे लोक असेच बलहीन झाले आहेत. २३८.

सगळे राजेरूपी तारका मंद प्रकाश देतात, धनुष्यरूपी महाअंधःकार त्यांच्याकडून हटला जात नाही. रात्रीचा शेवट होताच कमले, चक्रवाक, भुंगे, आणि नाना प्रकारचे पक्षी ज्याप्रमाणे आनंदित होतात, त्याच-प्रमाणे हे प्रभो! धनुर्भंगानंतर आपले सर्व भक्त सुखी होतील!

सूर्योदय होताच, विनाश्रम अंधःकार नष्ट होतो! तारे आपली तोंडे लपवतात; आणि सर्व विश्व दिव्य प्रकाशाने उजळून निघते! नाथ सूर्याने आपल्या उदयाच्या निमित्ताने रघुनाथाच्या प्रतापाचीच सर्व राजांना जाणीव करून दिली आहे! आपल्या बाहूंचे सामर्थ्य केवढे आहे, हे उघड करून सर्व जगाला दाखविण्या-साठीच धनुर्भंगाची ही पद्धती प्रकट झाली आहे, असे मला वाटते!"

आपल्या बंधूचे हे भाषण ऐकून प्रभूनी स्मित केले. स्वभावतःच पवित्र असणाऱ्या भगवंतांनी स्नान व नित्यकर्म केले. गुरुजींच्याकडे येऊन त्यांच्या चरणकमली आपले सुन्दर शिर नमवले!

इकडे जनकांनी, शतानंदाना आणवून विश्वामित्रांच्याकडे सत्वर जावयास सांगितले. त्यांनी मुनिवर्यांच्या जवळ येऊन जनकमहाराजांची विनंती विदित केली. विश्वामित्रांनी आनंदाने बंधुद्वयांना बोलावले. लगेच येऊन, त्यांनी शतानंद-पायी नमन केले व गुरुजींच्या जवळ जाऊन ते बसले. तेव्हा मुनी म्हणाले, "हे तात! चला; जनकराजांनी बोलावणे पाठविले आहे." २३९

चौ०— सीय स्वयंबरु देखिअ जाई। ईसु काहि धौं देइ बड़ाई॥
लखन कहा जस भाजनु सोई। नाथ कृपा तव जापर होई॥
हरषे मुनि सब सुनि बर बानी। दीन्हि असीस सबहि सुखु मानी॥
पुनि मुनिबृंद समेत कृपाला। देखन चले धनुषमख साला॥
रंगभूमि आए दोउ भाई। असि सुधि सब पुरबासिन्ह पाई॥
चले सकल गृह काज बिसारी। बाल जुबान जरठ नर नारी॥
देखी जनक भीर भै भारी। सुचि सेवक सब लिए हँकारी॥
तुरत सकल लोगन्ह पहिं जाहू। आसन उचित देहु सब काहू॥
दो०— कहि मृदु बचन बिनीत तिन्ह बैठारे नर नारि।
उत्तम मध्यम नीच लघु निज निज थल अनुहारि॥ २४०॥
चौ०— राजकुअँर तेहि अवसर आए। मनहुँ मनोहरता तन छाए॥
गुन सागर नागर बर बीरा। सुंदर स्यामल गौर सरीरा॥
राज समाज बिराजत रूरे। उडगन महुँ जनु जुग बिधु पूरे॥
जिन्ह कें रही भावना जैसी। प्रभु मूरति तिन्ह देखी तैसी॥
देखहिं रूप महा रनधीरा। मनहुँ बीर रसु धरें सरीरा॥

विश्वामित्र वाटेने चालत असता म्हणाले, "सीतास्वयंवर पाहावयास जाऊ. ईश्वर कोणाला महत्त्व देतो ते आता बघावयाचे!"

लक्ष्मणाने लगेच उत्तर केले ' हे नाथ! ज्याच्यावर आपली कृपा होईल त्यालाच या यज्ञाचे भाग्य लाभेल (धनुर्भंगाचे श्रेय त्यालाच मिळेल.)

ही चातुर्याची वाणी ऐकून सगळ्या मुनिवृंदाना हर्ष झाला व सर्वांनी प्रसन्न होऊन त्यांना आशीर्वाद दिले. नंतर कृपाळू रामचंद्र, सर्व मुनिमंडळीसह ती धनुर्मखशाला पाहण्यासाठी निघाले. दोन्ही बंधू रंगभूमीवर आले, एवढी बातमी सर्व नागरिकांच्या कानी जाताच लहान पोरे तसेच तरुण व वृद्ध स्त्रिया-पुरुष, आपली घरकामे जिथल्या तिथे विसरून स्वयंवर-मंडपाकडे धावत सुटले!

गर्दी बरीच झाल्याचे जनकानी पाहून, सुशील, विश्वासू व कार्यतत्पर अशा सर्व सेवकांना आपल्या जवळ बोलावून घेतले आणि त्याना सांगितले की, सर्व लोकांच्या जवळ झटकन् जाऊन सगळ्याना योग्य अशा आसनावर बसवा! त्याप्रमाणे त्यांनी नम्र व मधुर शब्द बोलून, ज्यांच्या त्यांच्या योग्यतेनुसार पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या, बैठकीवर आणि अगदी खाली अशा स्थानी (स्त्रिया व पुरुषांना) बसवले.

इतक्यात सर्व स्त्रिया व पुरुष आपापल्या स्थानी बसल्यावर त्या मंडपात रामलक्ष्मण आले! मूर्तिमंत मनोहरताच त्यांच्या शरीरांच्या स्वरूपात तेथे अवतरली! एक सुंदर सावळा व दुसरा गौरवर्णाचा असे ते दोन बंधू, गुणांचे सागर, चतुर व उत्तम वीर असे होते. नक्षत्रांच्या मंडलात दोन पूर्ण चंद्र प्रकाशमान व्हावेत, तसे सर्व राजे लोकांच्या त्या समुदायात त्या दोघांचे सौंदर्य उठून नजरेत भरत होते!

अशा वेळी ज्यांच्या अंतःकरणात जशी भावना होती, तशीच त्यांना प्रभूची मूर्ती दिसली. शूरवीर अशा राजे लोकांना वीररसानेच प्रत्यक्ष अवतार घेतला आहे असे वाटले! कुत्सित असे जे राजे होते, त्यांनी प्रभूकडे

डरे कुटिल नृप प्रभुहि निहारी । मनहुँ भयानक मूरति भारी ॥
रहे असुर छल छोनिप बेषा । तिन्ह प्रभु प्रगट कालसम देखा ॥
पुरबासिन्ह देख दोउ भाई । नरभूषन लोचन सुखदाई ॥

दो०—नारि बिलोकहिं हरषि हियँ निज निज रुचि अनुरूप ।
जनु सोहत सिंगार धरि मूरति परम अनूप ॥ २४१ ॥

चौ०—बिदुषन्ह प्रभु बिराटमय दीसा । बहु मुख कर पग लोचन सीसा ॥
जनक जाति अवलोकहिं कैसें । सजन सगे प्रिय लागहिं जैसें ॥
सहित बिदेह बिलोकहिं रानी । सिसु सम प्रीति न जाति बखानी ॥
जोगिन्ह परम तत्त्वमय भासा । सांत सुद्ध सम सहज प्रकासा ॥
हरि भगतन्ह देखे दोउ भ्राता । इष्टदेव इव सब सुख दाता ॥
रामहि चितव भायँ जेहि सीया । सो सनेहु सुखु नहिं कथनीया ॥
उर अनुभवति न कहि सक सोऊ । कवन प्रकार कहै कबि कोऊ ॥
एहि बिधि रहा जाहि जस भाऊ । तेहिं तस देखेउ कोसलराऊ ॥

दो०—राजत राज समाज महुँ कोसलराज किसोर ।
सुंदर श्यामल गौर तन बिस्व बिलोचन चोर ॥ २४२ ॥

चौ०—सहज मनोहर मूरति दोऊ । कोटि काम उपमा लघु सोऊ ॥
सरद चंद निंदक मुख नीके । नीरज नयन भावते जी के ॥

पाहताच त्यांच्या हृदयात भीतीने धडकीच भरली. त्यांना रामचंद्र भयानक रसाची मूर्तीच भासली. राजांच्या वेषात जे राक्षस येऊन बसले होते, त्याना प्रत्यक्ष काळाच्याच विशेष स्वरूपात प्रभू प्रकट झाल्याची जाणीव झाली ! नगरवासी लोकांच्या डोळ्यांना मात्र सुखाचे आगर असणारी अशी श्रेष्ठ मानवांची ती जोडी दिसली !

प्रमुदित मनाने स्त्रियांनी आपापल्या आवडीप्रमाणे रामरूपाचे निरीक्षण केले. जणू काही शृंगाररसानेच, अत्यंत अनुपमेय असे रूप धारण करून तो शोभू लागला आहे. २४१

अनेक हातपाय, मस्तके, मुखे व डोळे असलेले असे विराट स्वरूप पंडितांनी पाहिले. जनक महाराजांच्या नातेवाइकांना ते आपलेच प्रिय संबंधी स्नेही असे दिसले. जनकमहाराज व त्यांची राणी यांना आपल्या बालकासारखे ते वाटले, त्यांच्या त्या प्रेमाचे वर्णन कोणी करावे ? योगीजनांना, शांत, शुद्ध, सम, स्वयंप्रकाशी अशी ती परमतत्त्वमय मूर्ती जाणवली ! हरिभक्तांना, सर्व सुख देणाऱ्या त्यांच्या इष्ट देवतेप्रमाणे ते दोघे बंधू दिसले. सीतेने ज्या भावनेने रामरूप पाहिले, तो स्नेह व ते सौख्य अनिर्वचनीय आहे. तिलाच त्याचे वर्णन करणे अशक्य आहे. केवळ हृदयात ती ते अनुभवीत आहे, मग कोणताही कवी, केव्हा तरी, ते शब्दात कसे वर्णू शकेल ? तात्पर्य, ज्याच्या मनात जसा भाव होता तसे त्यांना कोसलपती दिसले !

कोसलाधिपाचे ते दोन राजकिशोर, एक श्याम वर्णाचा, एक गोरापान, सौंदर्यसंपन्न शरीरधारी, सर्व विश्वाची नजर चोरून घेणारे, असे त्या राजांच्या समाजात तेजाने तळपू लागले ! २४२

स्वभावतःच दोन्ही मनोहर मूर्तींना कोट्यवधी कामदेवांच्या सौंदर्याची उपमाही पुरी पडणारी नव्हती. शरद ऋतूतील पूर्णिमेच्या चंद्राला आपल्या तेजाने लाजविणारी मुखकमले, मनाला आल्हाद देणारे कमलनेत्र,

चितवनि चारु मार मनु हरनी । भावति हृदय जाति नहिं बरनी ॥
कल कपोल श्रुति कुंडल लोला । चिबुक अधर सुंदर मृदु बोला ॥
कुमुदबंधु कर निंदक हाँसा । भृकुटी बिकट मनोहर नासा ॥
भाल बिसाल तिलक झलकाहीं । कच बिलोकि अलि अवलि लजाहीं ॥
पीत चौतनीं सिरन्हि सुहाईं । कुसुम कलीं बिच बीच बनाईं ॥
रेखें रुचिर कंबु कल गीवाँ । जनु त्रिभुवन सुषमा की सीवाँ ॥

दो० – कुंजर मनि कंठा कलित उरन्हि तुलसिका माल ।
बृषभ कंध केहरि ठवनि बल निधि बाहु बिसाल ॥ २४३ ॥

चौ० – कटि तूनीर पीत पट बाँधें । कर सर धनुष बाम बर काँधें ॥
पीत जग्य उपबीत सुहाए । नख सिख मंजु महाछबि छाए ॥
देखि लोग सब भए सुखारे । एकटक लोचन चलत न तारे ॥
हरषे जनकु देखि दोउ भाई । मुनि पद कमल गहे तब जाई ॥
करि बिनती निज कथा सुनाई । रंग अवनि सब मुनिहि देखाई ॥
जहँ जहँ जाहिं कुअँर बर दोऊ । तहँ तहँ चकित चितव सबु कोऊ ॥
निज निज रुख रामहि सबु देखा । कोउ न जान कछु मरमु बिसेषा ॥
भलि रचना मुनि नृप सन कहेऊ । राजाँ मुदित महासुख लहेऊ ॥

मदनाच्याही मनाला खेचून घेणारी रमणीय नजर, सर्व जीवांना ती अत्यंत प्रिय असल्याने तिचे वर्णन करणेच अशक्य ! कान व गाल छान ! छान ! ! कानातील कुंडले दैदीप्यमान; हनुवटी व अधरोष्ठ सुंदर; शब्द फारच मधुर ! चंद्रकिरणांचा धिःकार करणारे हास्य ! वक्र भुवया, मनोहर नासिका, विशाल अशा कपाळावर झळकणारे तिलक, केसांना पाहून भृंगवृंद लाजतो, पिवळी चौकोनी टोपी मस्तकावर शोभते आहे, त्यामध्ये उत्तमोत्तम कुसुमकळ्या गुंफलेल्या आहेत, शंखाप्रमाणे सुंदर रेषांसहित लावण्यपूर्ण कंठ, त्याने तर त्रिभुवनातील कांतीची सीमाच गाठली ! गळ्यात गजमुक्ताफलांची सुंदर कंठी व त्यावर दोघांच्या गळ्यात तुळसीची माळ विलसत आहे. उंच व भरदार असे वृषाप्रमाणे खांदे, उभे राहाण्याची ढब अगदी सिंहाप्रमाणे, विशाल भुज, ते तर सामर्थ्यांचे भाण्डारच ! २४३

कमरेबरोबर पिवळ्या शेल्याने भाते बांधलेले, डाव्या सुंदर खांद्यावर धनुष्य आणि उजव्या हातात बाण. लखलखीत पिवळी सुवर्ण यज्ञोपवीते असे ते दोघे आपादमस्तक मनोहर सौंदर्याने नटलेल्या रूपाचे होते ! ! दोघा भावांचे ते रूप पाहून सर्व लोकांना परम सौख्य झाले. एकदा लागलेली नजर थोडेसुद्धा बुबुळ न हालता तेथेच स्थिरावत असे !

त्या दोन बंधूंना पाहून जनकांना मोठा हर्ष झाला. त्यांनी जाऊन विश्वामित्रांचे चरण कमल धरले. विनंतीपूर्वक, सर्व कार्यक्रमाची त्याना कल्पना दिली व सर्व रंगभूमी मुनींना फिरून दाखविली. विश्वामित्रांच्या बरोबर हे दोन कुमार जेथे जात, तेथे चकित होऊन सर्वजण टकटक पाहात असत ! सर्वांनाच राम सन्मुख दिसत, पण यातील विशिष्ट रहस्य मात्र कोणाच्याच ध्यानी आले नाही.

" वा ! वा ! ! राजा, फारच सुंदर रंगभूमीची रचना तू केली आहेस ! " असे उद्गार शेवटी कौशिक मुनींच्या मुखातून निघताच राजाला मोठे समाधान वाटले.



दो ०—सब मंचन्ह तें मंचु एक सुंदर बिसद बिसाल ।
मुनि समेत दोउ बंधु तहँ बैठारे महिपाल ॥ २४४ ॥

चौ ०—प्रभुहि देखि सब नृप हियँ हारे । जनु राकेस उदय भएँ तारे ॥
आसि प्रतीति सब के मन माहीं । राम चाप तोरब सक नाहीं ॥
बिनु भंजेहुँ भव धनुषु बिसाला । मेलिहि सीय राम उर माला ॥
अस बिचारि गवनहु घर भाई । जसु प्रतापु बलु तेजु गवाँई ॥
बिहसे अपर भूप सुनि बानी । जे अबिबेक अंध अभिमानी ॥
तोरेहुँ धनुषु ब्याहु अवगाहा । बिनु तोरें को कुअँरि बिआहा ॥
एक बार कालउ किन होऊ । सिय हित समर जितब हम सोऊ ॥
यह सुनि अवर महिप मुसुकाने । धरमसील हरिभगत सयाने ॥

सो ०—सीय बिआहबि राम गरब दूरि करि नृपन्ह के ।
जीति को सक संग्राम दसरथ के रन बाँकुरे ॥ २४५ ॥

चौ० —ब्यर्थ मरहु जनि गाल बजाई । मन मोदकन्हि कि भूख बुताई ॥
सिख हमारि सुनि परम पुनीता । जगदंबा जानहु जियँ सीता ॥

सर्वांत उंच ठिकाणी, एक पलंग ठेवला होता; तो अत्यंत सुंदर, उज्ज्वल व प्रशस्त होता. विश्वामित्र मुनींच्यासह त्या दोन बंधूंनी त्यावर बसावे अशी राजाने त्याना प्रार्थना केली. २४४.

पौर्णिमेच्या चंद्रोदयानंतर ज्याप्रमाणे आकाशातील सर्वच तारे निष्प्रभ होतात, तशी प्रभूना पाहिल्यानंतर सर्व राजे लोकांची अवस्था झाली. कारण सर्वांच्या मनात अशी खात्री वाटू लागली होती की, रामाकडून धनुर्भंग होणार, यात शंकाच (शक) नाही! कदाचित हे न झाले तरी भवाचे विशाल धनुष्य न मोडताही सीता रामाच्या गळ्यात माळ घालील. त्याचे सौंदर्य इतके अनुपमेय आहे की त्या शिवधनुष्याचा भंग न करताच सीता त्याच्या गळ्यात माळ घालणार !

हे जाणून आपले यश-प्रताप, व तेज-बल ही निकालात निघाली म्हणून आपापल्या घरी जावे हेच चांगले ! ही भाषा कानी पडताच अविवेकाने अंध बनलेले व घमेंडखोर दुसरे राजे हसून म्हणतात, “अहो, अहो ! सोडा भाषा ती ! धनुर्भंग केला तरीसुद्धा सुखाने लग्नसोहळा होणे महाकर्मकठीण; मग धनुर्भंग न करताच या कुमारीबरोबर विवाह करण्याची कोणाची छाती आहे ? प्रत्यक्ष काळ जरी आला तरी सीतेच्या प्राप्तीसाठी रणांगणात त्याची खोड मोडू. आहे का ठाऊक ?”

ही बालिशपणाची भाषा ऐकून, धर्मशील हरिभक्त व शहाणे जे राजे होते, ते स्मितपूर्वक, या घमेंडखोरांना इषारा देतात,

‘हे पाहा सर्व भूपांची मस्ती खलास करून, सीतेचे पाणिग्रहण राम करतील ! [illegible] पुत्र एवढे रणशूर आहेत की, त्यांच्या पुढे रणांगणात कोणाचा टिकाव लागणार ? २४५

म्हणून उगीच शेखी मिरवून फुकट मरू नका ! मनचे मांडे खाऊन कोणाची भूक शमली आहे का ? परमपवित्र अशी ही आमची शिकवण ऐका. अत्यंत पुनीत अशी सीता ही जगदंबा आहे याची जाणीव



जगत पिता रघुपतिहि बिचारी । भरि लोचन छबि लेहु निहारी ।।
सुंदर सुखद सकल गुन रासी । ए दोउ बंधु संभु उर बासी ।।
सुधा समुद्र समीप बिहाई । मृगजलु निरखि मरहु कत धाई ।।
करहु जाइ जा कहुँ जोइ भावा । हम तौ आजु जनम फलु पावा ।।
अस कहि भले भूप अनुरागे । रूप अनूप बिलोकन लागे ।।
देखहिं सुर नभ चढ़े बिमाना । बरषहिं सुमन करहिं कल गाना ।।

दो० — जानि सुअवसरु सीय तब पठई जनक बोलाइ ।
चतुर सखीं सुंदर सकल सादर चलीं लवाइ ।। २४६ ।।

चौ० — सिय सोभा नहिं जाइ बखानी । जगदंबिका रूप गुन खानी ।।
उपमा सकल मोहि लघु लागीं । प्राकृत नारि अंग अनुरागीं ।।
सिय बरनिय तेइ उपमा देई । कुकबि कहाइ अजसु को लेई ।।
जौं पटतरिअ तीय सम सीया । जग असि जुबति कहाँ कमनीया ।।
गिरा मुखर तन अरध भवानी । रति अति दुखित अतनु पति जानी ।।
बिष बारुनी बंधु प्रिय जेही । कहिअ रमासम किमि बैदेही ।।
जौं छबि सुधा पयोनिधि होई । परम रूपमय कच्छपु सोई ।।
सोभा रजु मंदरु सिंगारू । मथै पानि पंकज निज मारू ।।

हृदयात ठेवा. रघुपति हे सर्व विश्वाचे पिते आहेत म्हणून त्यांचे रूप डोळे भरून पाहाण्याचे भाग्य लुटा! सकल गुणसागर, लावण्यसंपन्न व सुखदायक असे हे दोघे बंधू शंकराच्या हृदयात उपास्य दैवत म्हणून वास्तव्य करतात! शेजारी असलेला अमृताचा सागर तुमच्या डोळ्यांना दिसेना आणि मृगजलाच्या मागे लागून, पळून निष्कारण का मरता? बाकी तुम्हाला हे आमचे बोलणे पटणार नाही! तुम्हाला जसे आवडेल तसे खुशाल करा! आम्ही मात्र आपल्या जन्माचे आज सार्थक करून घेणार!

याप्रमाणे सांगून भले असे जे भूप होते त्यांच्या हृदयात भक्ती, प्रेम उत्पन्न झाल्यामुळे त्यांनी त्या अनुपम रूपावर आपली दृष्टी स्थिर केली! देव आकाशात आपापल्या विमानात बसून हे कौतुक पाहात असता पुष्पवृष्टी करून गोड गायन करीत आहेत!

योग्य शुभ समय झाला, असे पाहून जनकाने सीतेला आणण्यासाठी निरोप पाठविला! लगेच सुंदर चतुर अशा सगळ्या तिच्या मैत्रिणी आदरपूर्वक तिला घेऊन निघाल्या. २४६

रूप-गुणांची खाण असलेल्या जगज्जननी सीतेचे रूप वाणीने वर्णन करवतच नाही! सगळ्याच उपमा मला तुच्छ वाटतात; कारण पंचमहाभूतात्मक शरीराच्या स्त्रियांच्या वर्णनासच त्या उपयोगात आलेल्या आहेत. तसल्या उपमांनी सीतेचे वर्णन करण्याचा उपद्व्याप करून आपणाला कुकवी म्हणवून अपकीर्ती कोण घेईल? एखाद्या स्त्रीची सीतेबरोबर तुलना करावी असे म्हटले तर अशी लोकोत्तर सौंदर्याची स्त्री सापडणार कुठे? सरस्वती अधिक बोलणारी, भवानी अर्धशरीराची, शरीरहीन अनंग पति असल्यामुळे रती सदा अत्यंत विषण्ण, वारुणी विष ही जिची भावंडे, त्या रमेसारखी वैदेही म्हणू तरी कशी?

दो० — एहि बिधि उपजै लच्छि जब सुंदरता सुख मूल ।
तदपि सकोच समेत कबि कहहिं सीय समतूल ।। २४७ ।।

चौ० — चलीं संग लै सखीं सयानी । गावत गीत मनोहर बानी ।।
सोह नवल तनु सुंदर सारी । जगत जननि अतुलित छबि भारी ।।
भूषन सकल सुदेस सुहाए । अंग अंग रचि सखिन्ह बनाए ।।
रंगभूमि जब सिय पगु धारी । देखि रूप मोहे नर नारी ।।
हरषि सुरन्ह दुंदुभी बजाईं । बरषि प्रसून अपछरा गाईं ।।
पानि सरोज सोह जयमाला । अवचट चितए सकल भुआला
सीय चकित चित रामहि चाहा । भए मोहबस सब नरनाहा ।।
मुनि समीप देखे दोउ भाई । लगे ललकि लोचन निधि पाई ।।

दो० — गुरजन लाज समाजु बड़ देखि सीय सकुचानि ।
लागि बिलोकन सखिन्ह तन रघुबीरहि उर आनि ।। २४८ ।।

चौ० — राम रूपु अरु सिय छबि देखें । नर नारिन्ह परिहरीं निमिषें ।।
सोचहिं सकल कहत सकुचाहीं । बिधि सन बिनय करहिं मन माहीं ।।
हरु बिधि बेगि जनक जड़ताई । मति हमारि असि देहि सुहाई ।।

जर सौंदर्यरूपी अमृताचा सागर, तेच भगवान पण परमरूपमय कासव, शोभारूप दोर, शृंगार रस हाच मंदरपर्वत इतके घेऊन आपल्या करकमलाने प्रत्यक्ष कामदेवानेच जर मंथन केले व अशा प्रकारे केलेल्या मंथनातून जर सौंदर्य व सौख्याचे आवस्थान अशी लक्ष्मी उत्पन्न झाली तरीही कविलोक बऱ्याचशा संकोचाने त्या लक्ष्मीला सीतेसारखी म्हणतील ! २४७

मंजुळ आवाजात मनोहर गीते गात गात सुजाण सखी सीतेला बरोबर घेऊन निघाल्या. सीतेच्या अलौकिक शरीरावर सुंदर साडी शोभत होती. जगज्जननीचे महान् सौंदर्य अतुल्य व गाढ आहे. सर्व दाग-दागिने अगदी जिथल्या तिथे सर्वांनी कौशल्याने घातल्यामुळे ते सर्वच आपापल्या परीने खुलून दिसत होते ! अशा सीतेने रंगभूमीत जेव्हा पदार्पण केले, तेव्हा तिच्या लावण्याने सर्व पुरुषच नव्हे, स्त्रियासुद्धा मोहित झाल्या !

देवांनी मुदित होऊन दुंदुभी वाजवल्या. अप्सरांनी पुष्पवृष्टी करून गायन सुरू केले.

हातात शोभिवंत जयमाला घेतलेल्या सीतेने झटकन् पाहिले, पण राजेच तिच्या नजरेस पडले; पण राम दिसले नाहीत. आश्चर्य-भयचकित होऊन ती राम कुठे आहेत, म्हणून पाहू लागली. पण त्यामुळे सर्वच राजे व्यर्थ निराशेने मोहवश झाले ! त्या शोधक नेत्रांना, फिरता फिरता अखेर मुनिसमीप ते दोघे बंधू दिसताच, आपले निधान मिळाल्याने ते लोभी डोळे त्या रामरूपावर लुब्ध होऊन स्थिर झाले !

परंतु वडील माणसांची मर्यादा, व मोठा समाज पाहून सीता लज्जित झाली. म्हणून रघुवीराला हृदयात स्थिर करून ती सखीकडे बघू लागली ! २४८

एका बाजूस रामाचे रूप व दुसऱ्या बाजूस सीतेचे सौंदर्य पाहात असता सर्वच स्त्रिया व पुरुष पापण्यांची उघडझाप करण्याचे पूर्ण विसरले ! सर्वांनाच चिंता उत्पन्न झाली. बोलण्यास मात्र कोणीच धजेना. म्हणून ब्रह्मदेवाला मनातल्या मनात सर्वजण विनंती करू लागले, " हे विधे ! जनकाचा अविचार लवकर घालव. आमच्यासारखीच त्याला लवकर चांगली बुद्धी दे ! थोडासुद्धा विचार न करता त्याने आपला पण




बाणासुर किंवा रावणही शिवधनुष्याचा
भंग करू शकले नाहीत.



अत्यंत प्रेमविवश झाल्यामुळे, रामाच्या गळ्यात जयमाला
घालण्यासाठी सीतेचे हातसुद्धा वर उचलेनात.



संतापलेले परशुराम, रामाला शिवधनुष्याचे
भय दाखवू लागले.



श्री रामांची नम्रता आणि शौर्य पाहून
परशुरामांचा संदेह नाहीसा झाला.



बिनु बिचार पनु तजि नरनाहू । सीय राम कर करै बिबाहू ।।
जगु भल कहिहि भाव सब काहू । हठ कीन्हें अंतहुँ उर दाहू ।।
एहिं लालसाँ मगन सब लोगू । बरु साँवरो जानकी जोगू ।।
तब बंदीजन जनक बोलाए । बिरिदावली कहत चलि आए ।।
कह नृपु जाइ कहहु पन मोरा । चले भाट हियँ हरषु न थोरा ।।

दो० – बोले बंदी बचन बर सुनहु सकल महिपाल ।
पन बिदेह कर कहहिं हम भुजा उठाइ बिसाल ।। २४९ ।।

चौ० – नृप भुजबलु बिधु सिवधनु राहू । गरुअ कठोर बिदित सब काहू ।।
रावनु बानु महाभट भारे । देखि सरासन गवँहिं सिधारे ।।
सोइ पुरारि कोदंडु कठोरा । राज समाज आजु जोइ तोरा ।।
त्रिभुवन जय समेत बैदेही । बिनहिं बिचार बरइ हठि तेही ।।
सुनि पन सकल भूप अभिलाषे । भटमानी अतिसय मन माखे ।।
परिकर बाँधि उठे अकुलाई । चले इष्टदेवन्ह सिर नाई ।।
तमकि ताकि तकि सिवधनु धरहीं । उठइ न कोटि भाँति बलु करहीं ।।
जिन्ह के कछु बिचारु मन माहीं । चाप समीप महीप न जाहीं ।।

सोडून द्यावा व सीता-रामांचा विवाह करावा. सगळ्यांनाच हे आवडत असल्याने, कोणी राजांना असे केल्या-बद्दल नावे ठेवणार नाही; चांगलेच केले, असे सगळे म्हणतील ! परंतु हट्ट केला तर मात्र शेवटी त्याच्या हृदयाला मोठा दाह होईल ! ”

जानकीजोगा हाच सावळा वर आहे, या एकच गोष्टीचा ध्यास सर्व जमलेल्या समाजाला लागला आहे.

इतक्यात जनकराजांनी बंदीजनांना बोलावले. लगेच ब्रीदावलीचे वर्णन करीत ते पुढे येऊन उभे राहिले. “ जा, माझा पण जाहीर करा; ” अशी राजाज्ञा होताच त्यांना मनात थोडासुद्धा आनंद न होता ते भाट निघाले.

भाटांनी खडया आवाजात भाषण केले, “ हे पृथ्वीचे पालन करणारे सर्व राजेलोक हो ! आम्ही, आपले बाहू उंच करून विदेह महाराजांचा पण जाहीर रीतीने सांगतो तो ऐका. २४९

“ राजांचे बाहुबल हाच चंद्र, शिवधनुष्य हाच राहू. ते जड आहे, कठीण आहे, हे जगत्रिख्यात आहे. अत्यंत मोठे शूर योद्धे रावण व बाणासुर, हेही या धनुष्याला पाहून त्यांचा गर्व नष्ट झाला व ते निमूटपणे निघून गेले. अशा कठोर पुररिपु-कोदंडाला, या राजांच्या भरसभेत, आज जो कोणी खंडित करील, त्याला त्रिभुवनजयासह वैदेही अन्य कोणताही विचार न करता, आग्रहपूर्वक वरील. ”

हा पण ऐकून सर्व भूपाळांना लोभ वाटला ! स्वतःस मोठे योद्धे समजत होते, अशा घमेंडखोर राजांना मनात फार राग आला. काचे कसून मोठ्या त्वेषाने ते उठले. आपल्या इष्ट देवतेला वंदन करून ते धनुष्या-जवळ गेले. धनुष्याकडे पाहून कुठे धरावे हे पाहून मोठ्या संतापाने त्याला त्यांनी हात घातला. पण सगळी शक्ती खर्च करून, अगदी कुंथूनसुद्धा, ते रेसभरही हालले नाही !

ज्यांचे डोके थोडे तरी ठिकाणावर होते, त्या राजांनी धनुष्याजवळ जाण्याचा वेडेपणा बिलकुल केला



दो० – तमकि धरहिं धनु मूढ नृप उठइ न चलहिं लजाइ ।
मनहुँ पाइ भट बाहुबलु अधिकु अधिकु गरुआइ ।। २५० ।।

चौ० – भूप सहस दस एकहि बारा । लगे उठावन टरइ न टारा ।।
डगइ न संभु सरासनु कैसें । कामी बचन सती मनु जैसें ।।
सब नृप भए जोगु उपहासी । जैसें बिनु बिराग संन्यासी ।।
कीरति बिजय बीरता भारी । चले चाप कर बरबस हारी ।।
श्रीहत भए हारी हियँ राजा । बैठे निज निज जाइ समाजा ।।
नृपन्ह बिलोकि जनकु अकुलाने । बोले बचन रोष जनु साने ।।
दीप दीप के भूपति नाना । आए सुनि हम जो पनु ठाना ।।
देव दनुज धरि मनुज सरीरा । बिपुल बीर आए रनधीरा ।।

दो० – कुअँरि मनोहर बिजय बड़ि कीरति अति कमनीय ।
पावनिहार बिरंचि जनु रचेउ न धनु दमनीय ।। २५१ ।।

चौ० – कहहु काहि यहु लाभु न भावा । काहुँ न संकर चाप चढ़ावा ।।
रहउ चढ़ाउब तोरब भाई । तिलु भरि भूमि न सके छड़ाई ।।
अब जनि कोउ माखै भट मानी । बीर बिहीन मही मैं जानी ।।

नाही ! मूर्ख राजांनी मात्र एकामागून एक असा त्या धनुष्याला हात घातला व ते मुळीच हालू शकत नाही, अशी खात्री झाल्यावर लाजून आपल्या जागेवर येऊन ते खाली मान घालून बसत ! जणू काही शूरांचे बाहुबळ मिळाल्याने त्या धनुष्याचे वजन अधिकाधिकच वाढू लागले होते ! २५०

शेवटी एकाच वेळी दहा हजार राजांनी ते उचलण्याचा प्रयत्न केला. निदान हालते काय म्हणून पाहिले, पण एक तिळमात्र त्याने आपली जागा सोडली नाही ! कामी पुरुषांच्या शब्दांनी जसे सतीचे मन बिल्कुल चळत नाही, त्याप्रमाणे शिवधनुष्य मुळीच ढळले नाही ! वैराग्याशिवाय संन्यासी जसे उपहासाचा विषय होतात, तशीच या प्रकाराने सर्व राजाची लाजिरवाणी स्थिती झाली मोठी कीर्ती, दिगंत विजय, अफाट शौर्य इत्यादी सर्व धनुष्याच्या हाती, हट्टाने त्यांनी घालवली आणि तोंडे काळवंडलेले ते राजे, हृदयात हार खाऊन आपापल्या समाजात जाऊन बसले.

अशा प्रकारे सर्व राजसमाजातून एकही वीर धनुष्य भंगू शकत नाही, अशी खात्री झाल्यावर जनक व्याकुळ झाले व जणू काही संतप्त होऊन बोलू लागले, " मी केलेला पण ऐकून द्वीप-द्वीपांचे राजे या ठिकाणी एकत्र जमले. देव-दानवसुद्धा मानवाची शरीरे धारण करून, रणक्षेत्रात मोठ्या हिमतीने शौर्य गाजवणारे, असे सर्व वीर राजे आले.

" मनोहर कुमारी, मोठा विजय, अत्यंत स्पृहणीय अशा कीर्तीचा लाभ, या गोष्टी धनुर्भंग करून मिळविणारा, विरंचीने जणू काही निर्माणच केला नाही की काय ? २५१

हा लाभ न आवडून, ज्याने शिवधनुष्याला सज्ज करण्याचा प्रयत्नच केला नाही, असा कोण आहे ते बोला !

मोडणे, सज्ज करणे या गोष्टी तर दूरच राहिल्या, पण जमिनीवरून तुम्हाला जरासुद्धा उचलता आले नाही इतःपर कोणीही मी शूर-वीर म्हणून मिजास मारू नये ! ही सर्व पृथ्वी वीरविहीन झाली असेच मी समजतो !

तजहु आस निज निज गृह जाहू । लिखा न बिधि बैदेही बिबाहू ॥
सुकृतु जाइ जौं पनु परिहरउँ । कुअँरि कुआरि रहउ का करऊँ ॥
जौं जनतेउँ बिनु भट भुबि भाई । तौ पनु करि होतेउँ न हँसाई ॥
जनक बचन सुनि सब नर नारी । देखि जानकिहि भए दुखारी ॥
माखे लखनु कुटिल भइँ भौंहें । रदपट फरकत नयन रिसौंहें ॥

दो० —कहि न सकत रघुबीर डर लगे बचन जनु बान ।
नाइ राम पद कमल सिरु बोले गिरा प्रमान ॥ २५२ ॥

चौ० —रघुबंसिन्ह महुँ जहँ कोउ होई । तेहिं समाज अस कहइ न कोई ॥
कही जनक जसि अनुचित बानी । बिद्यमान रघुकुल मनि जानी ॥
सुनहु भानुकुल पंकज भानू । कहउँ सुभाउ न कछु अभिमानू ॥
जौं तुम्हारि अनुसासन पावौं । कंदुक इव ब्रह्मांड उठावौं ॥
काचे घट जिमि डारौं फोरी । सकउँ मेरु मूलक जिमि तोरी ॥
तव प्रताप महिमा भगवाना । को बापुरो पिनाक पुराना ॥
नाथ जानि अस आयसु होऊ । कौतुकु करौं बिलोकिअ सोऊ ॥
कमल नाल जिमि चाप चढ़ावौं । जोजन सत प्रमाण लै धावौं ॥

सर्व आशा सोडून खुशाल आपापल्या घराचा रस्ता सुधारा ! हाय ! विधीने वैदेहीच्या कपाळातच विवाह लिहिला नाही त्याला काय करावे ? जर केलेल्या पणाचा त्याग करीन तर माझ्या सर्व पुण्याचा नाश होईल ! म्हणून सीता कुमारीणच राहाणार असेल तर राहो, त्याला काय करायचे ! मला जर अगोदरच ही सर्व पृथ्वी निर्वीर झाली आहे याची कल्पना आली असती तर हा असा पण करून मी उपहासास पात्र झालोच नसतो ! ! "

नागरिक स्त्री-पुरुषांनी जनकराजाचे हे निराशेचे उद्गार ऐकले आणि त्यांनी पुनः जानकीकडे पाहिले मात्र ! त्यांच्या सर्वांच्या हृदयाचे पाणी होऊ लागले !

पण त्या भाषणाचा परिणाम लक्ष्मणावर अगदीच वेगळा झाला ! त्याना भयंकर संताप आला ! भुवया अधिक वक्र होऊन चढल्या. नेत्रांची लाली रागाने वाढली ! ओठ थरथरू लागले ! जनकाचे शब्द बाणासारखे त्याच्या हृदयाला भिडले, पण रघुवीरांच्या भीतीने ते बोलू शकत नव्हते ! अखेर असह्य झाल्यामुळे रामपदकमली मस्तक नमवून प्रमाणभूत अशी भाषा ते बोलले. २५२

" ज्याठिकाणी कोणताही रघुवंशीय असेल त्या समाजात, आता केली असली भाषा, कोणीही बोलणार नाही ! रघुकुलमणी येथे बसलेले आहेत, हे माहीत असूनही जनकांनी जे भाषण केले ते अत्यंत अनुचित आहे ! हे भानुकुल-पंकजभानू ! पाहा अभिमानाने मी मुळीच बोलत नाही, हा कुलस्वभाव मला बोलवत आहे ! आपण जर मला आज्ञा दिली तर सर्व ब्रह्मांड चेंडूसारखे उठवतो ! किंवा एकाद्या कच्च्या मडक्याप्रमाणे ते फोडू ? का मुळ्यासारखा मेरुपर्वत मोडून टाकू ? हे भगवन् ! एवढा जर आपल्या प्रतापाचा महिमा आहे, तर या बिचाऱ्या जीर्ण धनुष्याची काय किंमत आहे ? म्हणून हे नाथ ! मला आज्ञा द्याच ! एक कौतुक करून दाखवतो; आपण सुखाने पाहा तर खरे ! एकाद्या कमळाच्या देठाप्रमाणे हे धनुष्य सज्ज करतो व शंभर योजनेपर्यंत ते

दो० —तोरौं छत्रक दंड जिमि तव प्रताप बल नाथ।
जौं न करौं प्रभु पद सपथ कर न धरौं धनु भाथ ॥ २५३ ॥

चौ० —लखन सकोप बचन जे बोले। डगमगानि महि दिग्गज डोले ॥
सकल लोग सब भूप डेराने। सिय हियँ हरषु जनकु सकुचाने ॥
गुर रघुपति सब मुनि मन माहीं। मुदित भए पुनि पुनि पुलकाहीं ॥
सयनहिं रघुपति लखनु नेवारे। प्रेम समेत निकट बैठारे ॥
बिस्वामित्र समय सुभ जानी। बोले अति सनेहमय बानी ॥
उठहु राम भंजहु भव चापा। मेटहु तात जनक परितापा ॥
सुनि गुरु बचन चरन सिरु नावा। हरषु बिषादु न कछु उर आवा ॥
ठाढ़े भए उठि सहज सुभाएँ। ठवनि जुबा मृगराजु लजाएँ ॥

दो० —उदित उदयगिरि मंच पर रघुबर बालपतंग।
बिकसे संत सरोज सब हरषे लोचन भृंग ॥ २५४ ॥

चौ० —नृपन्ह केरि आसा निसि नासी। बचन नखत अवली न प्रकासी ॥
मानी महिप कुमुद सकुचाने। कपटी भूप उलूक लुकाने ॥
भए बिसोक कोक मुनि देवा। बरिसहिं सुमन जनावहि सेवा ॥

घेऊन खरोखर धावून दाखवतो! नाहीतर तुझ्या प्रतापाच्या जोरावर, कुत्र्याच्या (कावळ्याच्या?) छत्रीच्या दांड्याप्रमाणे हे आता मोडून दाखवतो; आणि प्रभुचरणाची शपथ घेऊन सांगतो की, असे जर माझ्या हाताने घडले नाही तर पुनः धनुष्य व भात्याला माझे हात स्पर्श करणार नाहीत! २५३

संतप्त होऊन जेव्हा लक्ष्मणांची अशी गर्जना झाली, तेव्हा पृथ्वी कंपित झाली! दिग्गज डळमळू लागले. सगळे लोक व राजे घाबरून गेले. सीतेच्या हृदयात हर्ष झाला. जनक महाराज खजील झाले! गुरू, रघुपती व सर्व मुनींचा समुदाय, मनात मुदित झाला! त्यांच्या देहावर अनेक वेळा रोमांच आले!

रघुपतींनी लक्ष्मणाला खुणेने अधिक बोलण्यापासून परावृत्त केले व मोठ्या प्रेमाने आपल्या अगदी जवळ बसवून घेतले!

विश्वामित्रांनी शुभ वेळ आल्याचे जाणले व अत्यंत स्नेहमय शब्दांत रामाला सांगितले, "उठा राम! भंगा भवचापा। वारा तात! जनक परितापा!"

गुरुजींची आज्ञा मिळताच, त्यांच्या चरणी प्रभूंनी आपले शिर नमवले. अंतःकरणाला हर्ष अगर विषाद यांपैकी कोणत्याही मात्रेने स्पर्शही केला नाही!! अशा स्वाभाविक ऐटीत ते उभे राहिले की, ती ढब पाहून जवान सिंहानेही लाजावे!

त्या अत्युच्च मंचकरूपी उदयाचलावर रघुनाथ हा बालसूर्य उदय पावताच संतस्वरूपातील सर्व कमले फुलून सर्व लोकांचे नेत्र हेच भुंगे हर्षित झाले! २५४

राजे लोकांच्या आशेची निशा संपली. व्यर्थ बडबड करणारी त्यांची मुखे हीच नक्षत्रे लुप्त झाली. मानी महीपकुमुदे (चंद्रविकासिनी कमळे) मिटली! कपटी भूपघुबडांनी आपली तोंडे लपवली! मुनी व देवतारूपी चक्रवाकांचा शोक संपला. त्यांनी पुष्पवृष्टी करून आपली सेवा प्रभुचरणी सादर केली.



गुर पद बंदि सहित अनुरागा । राम मुनिन्ह सन आयसु मागा ॥
सहजहिं चले सकल जग स्वामी । मत्त मंजु बर कुंजर गामी ॥
चलत राम सब पुर नर नारी । पुलक पूरि तन भए सुखारी ॥
बंदि पितर सुर सुकृत सँभारे । जौं कछु पुन्य प्रभाउ हमारे ॥
तौ सिवधनु मृनाल की नाईं । तोरहुँ रामु गनेस गोसाईं ॥

दो० —रामहि प्रेम समेत लखि सखिन्ह समीप बोलाइ ।
सीता मातु सनेह बस बचन कहइ बिलखाइ ॥ २५५ ॥

चौ० —सखि सब कौतुकु देखनिहारे । जेउ कहावत हितू हमारे ॥
कोउ न बुझाइ कहइ गुर पाहीं । ए बालक असि हठ भलि नाहीं ॥
रावन बान छुआ नहिं चापा । हारे सकल भूप करि दापा ॥
सो धनु राजकुअँर कर देहीं । बाल मराल कि मंदर लेहीं ॥
भूप सयानप सकल सिरानी । सखि बिधि गति कछु जाति न जानी ॥
बोली चतुर सखी मृदु बानी । तेजवंत लघु गनिअ न रानी ॥
कहँ कुंभज कहँ सिंधु अपारा । सोषेउ सुजसु सकल संसारा ॥
रबि मंडल देखत लघु लागा । उदयँ तासु तिभुवन तम भागा ॥

अत्यंत आदराने विश्वामित्रांच्या चरणी मस्तक ठेवून रामचंद्रानी [illegible] त्यांची आज्ञा मागितली. ती मिळताच अखिल जगाचा स्वामी स्वाभाविक चालीने धनुष्याकडे निघाला. पण ती चाल मदोन्मत्त सुंदर हत्तीच्या चालीची आठवण करून देणारी होती ! इकडे अशी रामाची पावले पडत असता ते दृश्य पाहून नागरिक सर्व स्त्री-पुरुषांना अपूर्व सुख झाले, त्यांचे संपूर्ण शरीर रोमांचानी डंवरले (पुलकित झाले !) त्यानी आपल्या सगळ्या पूर्वपुण्याईवर उदक सोडून देव व पितरांना वंदन केले आणि मनःपूर्वक प्रार्थना केली; "आमच्या पुण्याईचा जर थोडा तरी प्रभाव असला तर हे देवा, विघ्ननाशक गणनायका ! कमळाप्रमाणे हे शिवचाप राम लीलेने तोडोत !"

वात्सल्यपूर्ण भावनांनी रामाकडे निरखून पाहिल्यावर सीतेच्या आईने आपल्या सखींना जवळ बसवून घेतले व अत्यंत दुःखित होऊन ती स्नेहवश स्थितीत डोळे भरून येऊन बोलू लागली, २५५.

"हे सखी ! आमचे हितेच्छू म्हणून स्वतःस म्हणविणारेसुद्धा, सगळे नुसते दुरून मजा बघणारे आहेत ! कारण एक तरी कुणी पुढे होऊन गुरू विश्वामित्रांना समजावून सांगतो आहे का पाहा बरं ! की हा सुकुमार बालक ! असला हा हट्ट चांगला नव्हे. रावणासारखे शूर व बाणासुरासारखे प्रबळ जिथे या धनुष्याला शिवलेसुद्धा नाहीत, सामर्थ्याची फुशारकी मारणारे सगळे राजे ते उचलण्याचा प्रयत्न करून फजित पावले, असले धनुष्य या राजकुमारांच्या हाती देणे, म्हणजे राजहंसाच्या शावकाला मंदरपर्वत उचलून मस्तकावर घेण्यास सांगण्यासारखेच नव्हे काय ? खरोखर आमच्या राजेलोकांचे शहाणपण तर सगळेच संपले ! सखी ! दैवाची काय गती आहे, ते काहीच कळत नाही !" असे म्हणून राणीने एक निराशेचा श्वास सोडला.

सखी जाणती होती. तिने मधुर शब्दात राणीची समजूत घातली. "महाराणी ! जे तेजस्वी असतात त्यांना लहान कधीच समजू नये. कुठे अपार सागर आणि कुठे एवढेसे अगस्ती ऋषी ! पण त्यांनी तो सगळा शोषून टाकल्याने त्यांची सत्कीर्ती जगभर पसरली आहेच ना ? रविमंडळ किती लहान दिसते, पण

दो ० —मंत्र परम लघु जासु बस बिधि हरि हर सुर सर्ब ।
महामत्त गजराज कहुँ बस कर अंकुस खर्ब ॥ २५६ ॥

चौ ० —काम कुसुम धनु सायक लीन्हे । सकल भुवन अपने बस कीन्हे ॥
देबि तजिअ संसउ अस जानी । भंजब धनुषु राम सुनु रानी ॥
सखी बचन सुनि भै परतीती । मिटा बिषादु बढ़ी अति प्रीती ॥
तब रामहि बिलोकि बैदेही । सभय हृदयँ बिनवति जेहि तेही ॥
मनहीं मन मानव अकुलानी । होहु प्रसन्न महेस भवानी ॥
करहु सफल आपनि सेवकाई । करि हितु हरहु चाप गरुआई ॥
गननायक बरदायक देवा । आजु लगें कीन्हिउँ तुअ सेवा ॥
बार बार बिनति सुनि मोरी । करहु चाप गुरुता अति थोरी ॥

दो ० —देखि देखि रघुबीर तन सुर मनाव धरि धीर ।
भरे बिलोचन प्रेम जल पुलकावली सरीर ॥ २५७ ॥

चौ ० —नीकें निरखि नयन भरि सोभा । पितु पनु सुमिरि बहुरि मनु छोभा ॥
अहह तात दारुनि हठ ठानी । समुझत नहिं छुक लाभु न हानी ॥
सचिव सभय सिख देइ न कोई । बुध समाज बड़ अनुचित होई ॥

ते उगवताच सर्व त्रैलोक्यातील अंधार नाहीसा होतो ना ? मंत्र अत्यंत लघू असतो, पण त्याला ब्रह्माविष्णुमहेशादि सर्व देव वश होतात, हे आपण पाहातो ना ? एवढासा अंकुश, पण तो मोठ्या माजलेल्या हत्तीलाही वश करू शकतो ! २५६

कामदेव केवळ फुलाचे धनुष्य व फुलाचाच बाण घेतो, पण सर्व ब्रह्मांडाला आपल्या मुठीत ठेवतो !! म्हणून हे देवी ! हे ध्यानी घेऊन आपली भीती, संशय सोडा. पाहा तर राम कसे आता धनुष्य मोडतात ते ! ”

मैत्रिणीचे भाषण ऐकून राणीला विश्वास वाटला, खेद जाऊन त्याच्या जागी प्रीतीची वाढ होऊ लागली.

पण धनुर्भंगासाठी निघालेले राम वैदेहीच्या दृष्टीस पडताच ती भयाकुल होऊन ज्या त्या देवाला मनातल्या मनात विनवू लागली. अत्यंत विकल होऊन मनात ती प्रार्थना करू लागली. “ हे शिवभवानी ! मला प्रसन्न व्हा. आजपर्यंत मी केलेल्या आपल्या भजनाचे सार्थक होऊ दे. या आपल्या बालिकेवर कृपा करा आणि त्या धनुष्याचा जडपणा तेवढा नाहीसा करा !

वरदान करणाऱ्या गणनायका ! आजपर्यंत तुझी सेवा केली, तिचे फल आज यावे म्हणून किती तरी वेळा प्रार्थना केली, ती लक्षात घेऊन धनुष्याला अत्यंत हलके करा. ”

रघुनाथाचे ते अतिसुकुमार शरीर सीता पुनः पुन्हा पाहाते आहे आणि मनापासून धीर धरून देवाची प्रार्थना करण्याचा कसून प्रयत्न चालू आहे. पण त्या उत्कट प्रेमामुळे शेवटी डोळे पाण्याने भरले व शरीर पुलकित झाले ! २५७

डोळे पुसून पुनः एकदा ते अनुपम लावण्य मनमुराद निरखले आणि वडिलांच्या त्या निष्ठुरपणाची आठवण होऊन तिचे मन प्रक्षुब्ध झाले !

बाबा, बाबा !! अरेरे ! काय हो हा भयंकर पण हट्टाने केला ! त्याची लाभ-हानी आपल्या लक्षात कशी येत नाही ? सचिव भीतिग्रस्त ! ते आपणास योग्य उपदेश करीत नाहीत ! सगळे शहाणे लोक येथे एकत्र

कहँ धनु कुलिसहु चाहि कठोरा । कहँ स्यामल मृदुगात किसोरा ॥
बिधि केहि भाँति धरौं उर धीरा । सिरस सुमन कन बेधिअ हीरा ॥
सकल सभा कै मति भै भोरी । अब मोहि संभुचाप गति तोरी ॥
निज जड़ता लोगन्ह पर डारी । होहि हरुअ रघुपतिहि निहारी ॥
अति परिताप सीय मन माहीं । लव निमेष जुग सय सम जाहीं ॥

दो० —प्रभुहि चितइ पुनि चितव महि राजत लोचन लोल ।
खेलत मनसिज मीन जगु जनु बिधु मंडल डोल ॥ २५८ ॥

चौ० —गिरा अलिनि मुख पंकज रोकी । प्रगट न लाज निसा अवलोकी ॥
लोचन जलु रह लोचन कोना । जैसें परम कृपन कर सोना ॥
सकुची ब्याकुलता बड़ि जानी । धरि धीरजु प्रतीति उर आनी ॥
तन मन बचन मोर पनु साचा । रघुपति पद सरोज चितु राचा ॥
तौ भगवानु सकल उर बासी । करिहि मोहि रघुबर कै दासी ॥
जेहि कें जेहि पर सत्य सनेहू । सो तेहि मिलइ न कछु संदेहू ॥
प्रभु तन चितइ प्रेम तन ठाना । कृपानिधान राम सबु जाना ॥
सियहि बिलोकि तकेउ धनु कैसें । चितव गरुरु लघु ब्यालहि जैसें ॥

झाले असता त्यांच्या डोळ्यासमोर केवढी अनुचित घटना घडत आहे ही! हाय हाय आता करू तरी काय?

कुठे ते वज्रासारखे भयंकर कठोर धनुष्य आणि कुठे हे अत्यंत कोमल शरीराचे स्यामसुंदर किशोर! हे विधे! आता मी अशी बरं मनात धीर धरू? शिरीष कुसुमाच्या पाकळीच्या टोकाने हिऱ्याला भोक पडेल तरी कसे? सगळ्या सभेला अशी भुरळ पडल्यावर हे शंभुचापा! आता तूच माझे दुःख निवारण करण्यास समर्थ! रघुपतीकडे एकदा नीट निरखून पाहा! आणि आपले सर्व जाडय या लोकांवर दे टाकून!

सीतेच्या मनात एवढा दुःखाचा वणवा पेटला की, एक लव, निमिष आता तिला एकेक युगाच्या शतका-इतके मोठे होऊन बसले.

भगवंताकडे एकदा नजर टाकावी व अश्रुबिंदू सुंदर डोळ्यात चमकू लागले की चटकन् जमिनीकडे पाहावे, अशा प्रकारे सीतेच्या त्या चंचल डोळ्यांची अशी शोभा खुलली की जणूकाही कामदेवाचे दोन मासे चंद्रमंडळरूपी झोपाळ्यावर खेळत राहिले आहेत. २५८

मुखकमलाने वाणीरूपी भ्रमरीला कोंडून ठेवली! कारण लज्जारूपी रात्र पाहून ते उमलत नाही, (प्रकट होत नाही.) डोळ्यात आलेले पाणी डोळ्याच्या कोपऱ्यातच कृपणाच्या कांचनाप्रमाणे तिने लपवले! आपण भलतेच व्याकुळ झालो हे ध्यानी येऊन ती लाजली व धीर धरून श्रीराम धनुर्भंग करतील असा विश्वास धरला! ती मनात म्हणू लागली 'जर काया-वाचा-मनाने माझा पण अगदी खरा खरा आहे आणि रघुपतीच्या चरणकमली माझे मन जर जडले आहे तर मग सर्वांतर्यामी असणारे भगवान् मला रघुवराची दासी खास करतील; कारण ज्यांचे अंतःकरणापासून ज्यावर खरे प्रेम असते त्याला त्याची प्राप्ती निःसंशय होतेच. असा विचार करून तिने एक वेळ प्रभूकडे पाहिले व आपल्या प्रेमाची प्रतिज्ञा केली! आणि कृपासागर रामांनी ते जाणले. लगेच त्यांनीहि सीतेकडे एकवेळ पाहून गरुडाने एखाद्या क्षुद्र सापाच्या पिलाकडे पाहावे, तशी त्या धनुष्याकडे आपली नजर रोखली.

दो०—लखन लखेउ रघुबंसमनि ताकेउ हर कोदंडु ।
पुलकि गात बोले बचन चरन चापि ब्रह्मांडु ॥ २५९ ॥

चौ०— दिसिकुंजरहु कमठ अहि कोला । धरहु धरनि धरि धीर न डोला ॥
रामु चहहिं संकर धनु तोरा । होहु सजग सुनि आयसु मोरा ॥
चाप समीप रामु जब आए । नर नारिन्ह सुर सुकृत मनाए ॥
सब कर संसउ अरु अग्यानू । मंद महीपन्ह कर अभिमानू ॥
भृगुपति केरि गरब गरुआई । सुर मुनिबरन्ह केरि कदराई ॥
सिय कर सोचु जनक पछितावा । रानिन्ह कर दारुन दुख दावा ॥
संभुचाप बड़ बोहितु पाई । चढ़े जाइ सब संगु बनाई ॥
राम बाहुबल सिंधु अपारू । चहत पारु नहिं कोउ कड़हारू ॥

दो०— राम बिलोके लोग सब चित्र लिखे से देखि ।
चितई सीय कृपायतन जानी बिकल बिसेषि ॥ २६० ॥

चौ०— देखी बिपुल बिकल बैदेही । निमिष बिहात कलप सम तेही ॥
तृषित बारि बिनु जो तनु त्यागा । मुएँ करइ का सुधा तड़ागा ॥
का बरषा सब कृषी सुखानें । समय चुकें पुनि का पछितानें ॥
अस जियँ जानि जानकी देखी । प्रभु पुलके लखि प्रीति बिसेषी ॥

शिवधनुष्याकडे रघुवंशमणी निरखून पहात आहेत, हे लक्ष्मणाच्या लक्षात येताच त्यांचे सर्व शरीर रोमांचित झाले. पायाने सर्व ब्रह्मांड दाबून धरून ते म्हणाले, २५९.

‘ हे दिग्गज, शेष, कूर्म, सूकर, तुम्ही सर्वांनी बिलकुल न हालता धैर्याने पृथ्वीला सांभाळून धरा ! राम, शिवधनुष्याचा भंग करू इच्छितात, म्हणून माझ्या आज्ञेने तुम्ही अत्यंत सावध राहा ! ! ’

धनुष्याच्या जवळ राम गेल्याबरोबर सर्व नरनारींनी आपल्या देवतांची व आपल्या सुकृतांची प्रार्थना केली. एकंदरीत सर्वांचे संशय व अज्ञान, मूर्ख राजांची मस्ती व घमेंड, परशुरामाच्या गर्वाचे जाड्य, देव व मुनिश्रेष्ठ यांची भीतिग्रस्त स्थिती, सीतेची चिन्ता व जनकाचा पश्चात्ताप, राण्यांच्या हृदयात पेटलेला भयंकर दाह या सर्वांना शिवधनुष्यरूपी जहाजावर भरपूर जागा मिळाल्याने त्यावर ते चढले आहेत, त्यांना श्रीरामाच्या बाहुबल-रूपी अपार सागराच्या पैलतीरास जावयाचे आहे, पण कोणी कर्णधारच सांपडेना ! (अर्थात जहाज फुटणार व बसलेले खलास होणार.)

प्रभूंनी एकवेळ सभोवार दृष्टी फेकली तो काय, सर्व लोक अगदी चित्रासारखे तटस्थ बसले होते. शेवटी सीतेकडे पाहिले तेव्हा ती विशेषच व्याकुळ झालेली त्यांच्या नजरेस आली. २६०

त्यामुळे तिला एकेक निमिष कल्पाइतका दीर्घ वाटत आहे, तहानेलेल्याचा देह, पाण्याविना व्याकुळ होऊन त्याचा प्राण गेल्यावर तो प्रेत झाला, आणि मग त्याला अमृताचा तलाव जितका उपयुक्त, किंवा सर्व शेत पावसाच्या दुष्काळाने करपून खाक झालें, व नंतर धो धो पाऊस ओतला उपयोग काय ? तसेच वेळेला जे करावयाचे ते न करता मागून भरपूर पश्चात्ताप करून व्यर्थ होणार ! जानकीस बारकाईने पाहिल्यावर प्रभूंच्या मनात हा विचार आला व तिचे शुद्ध व कमालीचे प्रेम पाहून प्रभूच्या अंगावर एकदम जोराने रोमांच आले !



चौ० –गुरहि प्रनामु मनहिं मन कीन्हा । अति लाघवँ उठाइ धनु लीन्ह ॥
दमकेउ दामिनि जिमि जब लयऊ । पुनि नभ धनु मंडल सम भयऊ ॥
लेत चढ़ावत खैंचत गाढ़ें । काहूँ न लखा देख सबु ठाढ़ें ॥
तेहि छन राम मध्य धनु तोरा । भरे भुवन धुनि घोर कठोरा ॥

छं० –भरे भुवन घोर कठोर रव रबि बाजि तजि मारगु चले ।
चिक्करहिं दिग्गज डोल महि अहि कोल कूरुम कलमले ॥
सुर असुर मुनि कर कान दीन्हें सकल बिकल बिचारहीं ॥
कोदंड खंडेउ राम तुलसी जयति बचन उचारहीं ॥

सो० –संकर चापु जहाजु सागरु रघुबर बाहुबलु ।
बूड़ सो सकल समाजु चढ़ा जो प्रथमहिं मोह बस ॥ २६१ ॥

चौ० –प्रभु दोउ चापखंड महि डारे । देखि लोग सब भए सुखारे ॥
कौसिकरूप पयोनिधि पावन । प्रेम बारि अवगाहु सुहावन ॥
रामरूप राकेसु निहारी । बढ़त बीचि पुलकावलि भारी ॥
बाजे नभ गहगहे निसाना । देवबधू नाचहिं करि गाना ॥
ब्रह्मादिक सुर सिद्ध मुनीसा । प्रभुहि प्रसंसहिं देहिं असीसा ॥
बरिसहिं सुमन रंग बहु माला । गावहिं किंनर गीत रसाला ॥

मनाने पुनः गुरूला वंदन केले, अत्यंत चपलतेने ते धनुष्य उचलले, ते हातात घेताच विजेप्रमाणे एक वेळ चमकले, नंतर लगेच आकाशात एका गोल वलयाप्रमाणे वळले, ते सज्ज करण्यासाठी प्रभूंनी जोराने ओढले; धनुष्य उचलणे, वाकवणे व सज्ज करण्यासाठी जोराने ओढणे या तिन्ही गोष्टी इतक्या जलद रामांनी केल्या की, त्या कोणालाच कळल्या नाहीत. सर्वांनी रामांना फक्त उभे राहिलेले पाहिले, इतक्यात ते धनुष्य तत्काळ मध्येच मोडले, त्याचा कानठळ्या बसण्यासारखा भयंकर आवाज त्रिभुवनात दुमदुमला !

त्याचा असा परिणाम झाला की, सूर्याचे घोडे रस्ता सोडून उधळले, दिग्गजांनी 'चींची' करण्यास प्रारंभ केला, पृथ्वी डळमळू लागली, शेष, कूर्म व वराह विव्हळू लागले, देव, असुर मुनींनी दोन्ही हातांनी कानात बोटे घालून व्याकुळ होऊन विचारले, "अहो ! काय झाले ? केवढा हा आवाज !"

तुलसीदास म्हणतात, "रामानी शिवधनुष्याचा भंग केला." हे शब्द त्यांच्या कानावर पडताच, 'सकलांनी जयजयकार केला.

श्री शिवधनुष्य हे एक जहाज, श्रीराम बाहुबल हा एक अपार सागर, त्यावर मोहवश होऊन चढलेला सर्व समाज नावाड्याच्या अभावी होता असे वर वर्णन केले होते, तो सर्व आता त्या सागरात बुडाला. २६१

प्रभूनी धनुष्याचे दोन तुकडे जमिनीवर टाकले. हे दृश्य पाहून सर्व लोकांच्या सुखाला पारावार राहिला नाही ! विश्वामित्ररूपी पवित्र सागर प्रेमाचे सुंदर अगाध व पाणी भरलेला, आता श्रीराम पूर्ण चंद्राला त्याने पाहताच, रोमांचरूपी लाटांनी त्याला जोराने भरती आली !

आकाशात नौबतींचा दुमदुम आवाज घुमू लागला, देवांगना अत्यानंदाने बेहोष होऊन गाऊ नाचू लागल्या ! ब्रह्मादिक सर्व देव, सिद्ध आणि मुनीश्वर यांनी प्रभूची स्तुती करून उत्तम आशीर्वाद दिले. किन्नरांनी रसाळ गायन करून अनेकरंगी फुलांचा व पुरुष माळांचा वर्षाव केला ! त्रिभुवनात जयजयकारांचाच एवढा

रही भुवन भरि जय जय बानी । धनुषभंग धुनि जात न जानी ।।
मुदित कहहिं जहँ तहँ नर नारी । भंजेउ राम संभुधनु भारी ।।

दो० — बंदी मागध सूतगन बिरुद बदहिं मतिधीर ।
करहिं निछावरि लोग सब हय गय धन मनि चीर ।। २६२ ।।

चौ० — झाँझि मृदंग संख सहनाई । भेरि ढोल दुंदुभी सुहाई ।।
बाजहिं बहु बाजने सुहाए । जहँ तहँ जुबतिन्ह मंगल गाए ।।
सखिन्ह सहित हरषी अति रानी । सूखत धान परा जनु पानी ।।
जनक लहेउ सुखु सोचु बिहाई । पैरत थकें थाह जनु पाई ।।
श्रीहत भए भूप धनु टूटे । जैसें दिवस दीप छबि छूटे ।।
सीय सुखहि बरनिअ केहि भाँती । जनु चातकी पाइ जलु स्वाती ।।
रामहि लखनु बिलोकत कैसें । ससिहि चकोर किसोरकु जैसें ।।
सतानंद तब आयसु दीन्हा । सीताँ गमनु राम पहिं कीन्हा ।।

दो० — संग सखीं सुंदर चतुर गावहिं मंगलचार ।
गवनी बाल मराल गति सुषमा अंग अपार ।। २६३ ।।

चौ० — सखिन्ह मध्य सिय सोहति कैसें । छबिगन मध्य महाछबि जैसें ।।
कर सरोज जयमाल सुहाई । बिस्व बिजय सोभा जेहिं छाई ।।

मोठा आवाज झाला, की त्यात धनुर्भंगाचा महान् कडकडाट कुठल्या कुठे गडप होऊन गेला ! जिथे तिथे आनंदित झालेल्या स्त्री पुरुषांच्या सर्वांच्या तोंडी एकच वाक्य—" एवढे जड व कठीण शिव धनुष्य रामाने मोडले की हो ! ! "

बंदी, मागध, सूत इत्यादींच्या समुदायाने आपापल्या बुद्धीच्या पराकाष्ठेने भगवंताचे यशगान आरंभिले. हत्ती, घोडे, पैसे, रत्ने व वस्त्रे, ही लोकांनी भराभर रामावरून ओवाळून टाकली ! २६२

झांझा, मृदंग, सनया, अनेक प्रकारचे शंख, ढोल, दुंदुभी, भेरी इत्यादि विविध सुंदर वाद्यांचे मधुर वादन सुरू झाले. जागजागी तरुण स्त्रियांनी मंगल गीतांचे गायन आरंभिले. सुकू लागलेल्या साळीच्या पिकावर अगदी वेळेवर पाऊस पडावा व ते पीक जसे टवटवीत व्हावे, तशीच सखींसह सर्व राण्यांची हर्षाने स्थिती झाली. पोहत असता धाप लागून कासावीस झालेल्या मनुष्याचे जमिनीस पाय टेकले म्हणजे जशी भीती जाऊन त्याचा जीव सुखी होतो, तसे जनक महाराज चिंतारहित होऊन सुखी झाले. सूर्योदयाबरोबर दिव्याचे तेज जसे खलास होते, तशी धनुष्य तुटल्याबरोबर राजेलोकांची तोंडे फिकी पडली ! सीतेचे सुख कसे सांगावे ? चातकीला स्वातीच्या पाण्याचीच प्राप्ती झाली होती !! जणू काही चकोर किशोराने चंद्राकडे नजर लावावी, तसाच क्षुधित नेत्रांनी लक्ष्मण रामरूपसुधा प्राशन करीत होता !

इतक्यात शतानंदाच्या आज्ञेने रामाकडे सीता निघाली ! तिच्याबरोबर चतुर आणि सुंदर अशा मैत्रिणी मंगल गीते गात चालल्या. बालहंसिनीच्या गतीने सीता चालू लागली. तिची सर्वांगे अमित शोभेने प्रकाशित झाली होती ! २६३.

सौंदर्यराशीत सौंदर्यसम्राज्ञी शोभावी तशी सीता आपल्या मैत्रिणींच्या समुदायात खुलून दिसत होती ! सुंदर करकमलात सुंदर जयमाला घेतलेली आहे. तिच्यावर विश्वविजय करणारी मनोहर शोभा सर्वत्र पसरत



तन सकोचु मन परम उछाहू । गूढ़ प्रेमु लखि परह न काहू ॥
जाइ समीप राम छबि देखी । रहि जनु कुअँरि चित्र अवरेखी ॥
चतुर सखीं लखि कहा बुझाई । पहिरावहु जयमाल सुहाई ॥
सुनत जुगल कर माल उठाई । प्रेम बिबस पहिराइ न जाई ॥
सोहत जनु जुग जलज सनाला । ससिहि सभीत देत जयमाला ॥
गावहिं छबि अवलोकि सहेली । सियँ जयमाल राम उर मेली ॥

सो०— रघुबर उर जयमाल देखि देव बरिसहिं सुमन ।
सकुचे सकल भुआल जनु बिलोकि रबि कुमुदगन ॥ २६४ ॥

चौ०— पुर अरु ब्योम बाजने बाजे । खल भए मलिन साधु सब राजे ॥
सुर किंनर नर नाग मुनीसा । जय जय जय कहि देहिं असीसा ॥
नाचहिं गावहिं बिबुध बधूटीं । बार बार कुसुमांजलि छूटीं ॥
जहँ तहँ बिप्र बेद धुनि करहीं । बंदी बिरिदावलि उच्चरहीं ॥
महि पाताल नाक जसु ब्यापा । राम बरी सिय भंजेउ चापा ॥
करहिं आरती पुर नर नारी । देहिं निछावरि बित्त बिसारी ॥
सोहति सीय राम कै जोरी । छबि सिंगारु मनहुँ एक ठोरी ॥
सखीं कहहिं प्रभुपद गहु सीता । करति न चरन परस अति भीता ॥

होती ! शरीर लज्जेने भारावलेले, पण मन मात्र उत्साहाने तुडुंब भरलेले ! अत्यंत गूढ अशा सीतेच्या प्रेमाची कुणालाही कल्पना येणे अशक्य होते. श्रीरामाजवळ ती गेली; तिने ते रामरूप पाहिले मात्र ! आणि अगदी चित्रात काढलेल्या कुमारीप्रमाणे ती तटस्थ उभी राहिली !

सुज्ञ सखींनी तिची ती प्रेमवश स्थिती जाणून हळूच कानात सुचवले, "अग ! ती शुभ मंगल जय-माळ गळ्यात घाल ना !" हे ऐकून आपल्या दोन्ही हातांनी ती माळ तिने वर केली, पण ती लगेच इतकी प्रेमविवश झाली की, गळ्यात ती माळ घालणे तिच्याकडून होईनाच ! देठासह दोन सुंदर कमळांनी, भीत भीत चंद्राला जयमाला घालावी, तसे हे रमणीय दृश्य दिसत होते ! ते पाहून सखींनी सुंदर गाणी म्हणण्यास प्रारंभ केला, तोच सीतेने जयमाळ रामाच्या गळ्यात घातली !!

गळ्यात माळ पाहताच देवांनी पुष्पवृष्टी केली. सूर्योदयाने कुमुदिनीच्या पाकळ्या मिटाव्यात, तसे सगळे राजे तोंडे सुकून बसले ! २६४.

आकाशात व नगरात पुष्कळ वाद्ये वाजू लागली. सर्व खल उदास झाले सर्व साधू संतुष्ट झाले. सुर, किन्नर, नर, नाग व मुनीश्वर यांनी जयजयकार करून अनेकवेळा शुभाशीर्वाद दिले. देवांगनांचे मंजुळ गायन व नृत्य सुरू झाले. देवांच्या कडून अनेक वेळा पुष्पवृष्टी झाली. विप्रांनी मोठा वेदघोष केला. बंदीभाटांनी बिरुदावलीचा स्पष्ट उच्चार केला ! रामाने धनुर्भंग करून सीतेला वरली. असे सुयश पृथ्वीवर आणि पाताळात भरून ते स्वर्गाला जाऊन पोचले. नागरिक स्त्री-पुरुषांनी आरत्या करून ओवाळल्या व आपल्या शक्तीबाहेर धन ओवाळले. एकाच ठिकाणी शोभा व शृंगार याचे वास्तव्य झाल्याप्रमाणे सीता-रामाची जोडी रमणीय दिसली !

सखींनी सीतेला नंतर प्रभुपद धरण्यास सांगितले, परंतु तिला अत्यंत भीती वाटत असल्यामुळे तिने

दो०— गौतम तिय गति सुरति करि नहिं परसति पग पानि ।
मन बिहसे रघुबंसमनि प्रीति अलौकिक जानि ।। २६५ ।।

चौ०— तब सिय देखि भूप अभिलाषे । कूर कपूत मूढ़ मन माखे ।।
उठि उठि पहिरि सनाह अभागे । जहँ तहँ गाल बजावन लागे ।।
लेहु छड़ाइ सीय कह कोऊ । धरि बाँधहु नृप बालक दोऊ ।।
तोरें धनुषु चाड़ नहिं सरई । जीवत हमहि कुअँरि को बरई ।।
जौं बिदेहु कछु करै सहाई । जीतहु समर सहित दोउ भाई ।।
साधु भूप बोले सुनि बानी । राजसमाजहि लाज लजानी ।।
बलु प्रतापु बीरता बड़ाई । नाक पिनाकहि संग सिधाई ।।
सोइ सूरता कि अब कहुँ पाई । असि बुधि तौ बिधि मुहँ मसि लाई ।।

दो० —देखहु रामहि नयन भरि तजि इरिषा मदु कोहु ।
लखन रोषु पावकु प्रबल जानि सुलभ जनि होहु ।। २६६ ।।

चौ० —बैनतेय बलि जिमि चह कागू । जिमि ससु चहै नाग अरि भागू ।।
जिमि चह कुसल अकारन कोही । सब संपदा चहै सिवद्रोही ।।
लोभी लोलुप कल कीरति चहई । अकलंकता कि कामी लहई ।।
हरिपदबिमुख परम गति चाहा । तस तुम्हार लालचु नरनाहा ।।

चरणांना स्पर्श केला नाही. कारण गौतमनारीला ज्या चरणस्पर्शाने गती मिळाली, त्या चरणांनाच आपण स्पर्श करणार, याची जाणीव होऊन पायाला हात लावण्याचे धाडस तिला होईना ! ही तिची अलौकिक प्रीती पाहून रघुकुलमणी मनातल्या मनात हसले ! २६५

सीतेचे ते दैवी लावण्य पाहून काही राजांना लोभ सुटला. ते दुष्ट, भ्रष्ट व मूर्ख असल्यामुळे त्यांच्या मनात मोठा संताप वाटला. दुर्दैवी बिचाऱ्यांनी मोठ्या त्वेषाने चिलखते चढवली आणि जागोजागी फुशारकी मारण्यास सुरवात केली:—"अरे बघता काय, कोणी तरी सीतेला धरून न्या ! त्या दोन्ही राजकुमारांच्या मुसक्या बांधून त्यांना पकडा. नुसते धनुष्य मोडले म्हणून काही सर्व काम झाले नाही ! आम्ही चांगले जिवंत असता, सीतेशी विवाह कोण करतो ? विदेहाने कसलीही मदत केली तरी या दोन राजपुत्रांसह त्याला रणांगणात खास जिंकू. सोडणार नाही !"

जे राजे शहाणे व सज्जन होते, त्यांनी हे भाषण ऐकले व ते म्हणतात, "या राजेलोकांच्या बडबडीमुळे लाजेने लज्जित होऊन खाली मान घातली ! तुमचे बळ, प्रताप, वीर्य, मोठेपणा व प्रतिष्ठा ही सर्व तुमची नाके त्या पिनाकानेच आपल्याबरोबर नेली ! त्या वेळचेच तुमचे ते शौर्य ना ! का नवीन कुठून आले ? असली दुष्ट बुद्धी आहे म्हणूनच विधीने तुमच्या तोंडाला पराजयाचे काजळ फासले आहे ! मत्सर, घमेंड व क्रोध सोडून डोळे भरून ते रामरूप पाहून घ्या ! लक्ष्मणाचा क्रोधरूपी अग्नी फार भयंकर आहे. जाणूनबुजून त्यात पतंगाप्रमाणे पडून जळून जाऊ नका ! २६६

गरुडाच्या भक्ष्याची कावळ्याने इच्छा करणे, सिंहाच्या खाद्याची सशाने हौस बाळगणे, कारणाशिवाय क्रोध करणाऱ्याने कुशलाची अपेक्षा करणे, शिवाचा द्रोह करणाराने सर्व प्रकारच्या संपत्तीच्या प्राप्तीची इच्छा करणे, लोभी व लोलुप माणसाने विमल कीर्तीची इच्छा धरणे, कामी मनुष्याने आपले चारित्र्य निष्कलंक ठेवणे, हरिपदविमुख होऊन परमपदप्राप्ती साठी प्रयत्न करणे—अगदी बरोबर, हे राजेलोकहो ! तसलीच ही दुर्वासना आहे !



कोलाहलु सुनि सीय सकानी । सखीं लवाइ गईं जहँ रानी ॥
रामु सुभायँ चले गुरु पाहीं । सिय सनेहु बरनत मन माहीं ॥
रानिन्ह सहित सोचबस सीया । अब धौं बिधिहि काह करनीया ॥
भूप बचन सुनि इत उत तकहीं । लखनु राम डर बोलि न सकहीं ॥

दो०—अरुन नयन भृकुटी कुटिल चितवत नृपन्ह सकोप ।
मनहुँ मत्त गजगन निरखि सिंघकिसोरहि चोप ॥ २६७ ॥

चौ०—खरभरु देखि बिकल पुर नारीं । सब मिलि देहिं महीपन्ह गारीं ॥
तेहिं अवसर सुनि सिवधनु भंगा । आयउ भृगुकुल कमल पतंगा ॥
देखि महीप सकल सकुचाने । बाज झपट जनु लवा लुकाने
गौरि सरीर भूति भल भ्राजा । भाल बिसाल त्रिपुंड बिराजा ॥
सीस जटा ससिबदनु सुहावा । रिस बस कछुक अरुन होइ आवा ॥
भृकुटि कुटिल नयन रिस राते । सहजहुँ चितवत मनहुँ रिसाते ॥
बृषभ कंध उर बाहु बिसाला । चारु जनेउ माल मृगछाला ॥
कटि मुनिबसन तून दुइ बाँधें । धनु सर कर कुठारु कल काँधें ॥

दो०—सांत बेषु करनी कठिन बरनि न जाइ सरूप ।
धरि मुनितनु जनु बीर रसु आयउ जहँ सब भूप ॥ २६८ ॥

ही सर्व गडबड उडालेली पाहून सीता साशंक झाली, म्हणून सखींनी तिला राणीजवळ नेली. राम स्वाभाविक गतीने आपल्या गुरुजीजवळ गेले. मनातल्या मनात सीतेच्या स्नेहाचे ते कौतुक करीत होते! [illegible] सीता व्याकुळ झाली! विधी, आता काय करतो न कळे, असे त्यांना वाटले.

राजेलोकांची ती मूर्खपणाची बडबड ऐकून लक्ष्मणाने आपली दृष्टी त्याच्यांकडे फिरवली, पण रामाच्या भीतीने मुखावाटे शब्द काढला नाही. डोळे इंगळासारखे लालेलाल झाले आहेत, भुवया चढल्या आहेत, संतप्त होऊन त्या राजेलोकांकडे नजर लावलेली आहे; जणू काही माजलेल्या हत्तींच्या झुंडीकडे सिंहाचा छावाच क्रुद्ध होऊन पाहत आहे ! २६७

भार्गव-दर्प-विमर्दन

राजेलोकांतील ही खळबळ पाहून नागरिक-स्त्रिया दुःखी झाल्या. सर्व राजेलोकांना त्यानी शेलक्या शिव्या दिल्या. इतक्यात शिवधनुर्भंगाचा विलक्षण आवाज कानी पडून भृगुकुलरूपी कमलांना प्रफुल्लित करणारा सूर्य परशुराम तेथे आला! ही बातमी लागताच श्येनाची झडप पाहून जसे लावी पक्षी लपावे, तसे ते सर्व राजे एकदम आवळले ! परशुराम कसे दिसले ?

गौर शरीर ! भस्मांकित काया ! विशाल अशा कपाळावर भव्य त्रिपुंड्र शोभत आहे. मस्तकावर जटा! मनोहर मुखकमल, क्रोधामुळे किंचित् लालसर. भुवया वक्र. डोळे रागाने लाल झालेले. सहज नजर टाकली तरी संतापून पाहत आहेत असे वाटावे ! पुष्ट बैलाप्रमाणे भरदार खांदे. छाती आणि बाहू विशाल. सुंदर यज्ञोपवीत. अंगावर मृगजिन व गळ्यात माळा धारण केलेली. मुनिवसन, वल्कले, परिधान केलेले दोन भाते कमरेस कसलेले, खांद्यावर परशू. हातात धनुष्यबाण. वेष शांत, पण करणी मात्र अतिशय उग्र ! अशा विलक्षण स्वरूपाचे वर्णन अशक्य ! जेथे हे सर्व राजे जमा झाले होते, तेथे मुनींच्या शरीरात जणू काही मूर्तिमान वीररसच प्रकट झाला ! २६८



चौ०– देखत भृगुपति बेषु कराला । उठे सकल भय बिकल भुआला ॥
पितु समेत कहि कहि निज नामा । लगे करन सब दंड प्रनामा ॥
जेहि सुभायँ चितवहिं हितु जानी । सो जानइ जनु आइ खुटानी ॥
जनक बहोरि आइ सिरु नावा । सीय बोलाइ प्रनामु करावा ॥
आसिष दीन्हि सखीं हरषानीं । निज समाज लै गईं सयानीं ॥
बिस्वामित्रु मिले पुनि आई । पद सरोज मेले दोउ भाई ॥
रामु लखनु दसरथ के ढोटा । दीन्हि असीस देखि भल जोटा ॥
रामहि चितइ रहे थकि लोचन । रूप अपार मार मद मोचन ॥

दो०– बहुरि बिलोकि बिदेह सन कहहु काह अति भीर ।
पूँछत जानि अजान जिमि ब्यापेउ कोपु सरीर ॥ २६९ ॥

चौ०– समाचार कहि जनक सुनाए । जेहि कारन महीप सब आए ॥
सुनत बचन फिरि अनत निहारे । देखे चापखंड महि डारे ॥
अति रिस बोले बचन कठोरा । कहु जड़ जनक धनुष कै तोरा ॥
बेगि देखाउ मूढ़ न त आजू । उलटउँ महि जहँ लहि तव राजू ॥
अति डरु उतरु देत नृपु नाहीं । कुटिल भूप हरषे मन माहीं ॥
सुर मुनि नाग नगर नर नारी । सोचहिं सकल त्रास उर भारी ॥

परशुरामांचा तो भयंकर वेष पाहिला मात्र त्याबरोबर सगळे राजे भीतीने थरथर कापत एकदम उठले ! आपले व आपल्या पित्याचे नाव सांगून, पटापटा दंडवत प्रणाम करण्यास त्यांनी प्रारंभ केला ! एखाद्याकडे हा आपला म्हणून त्यांनी पाहिले की, त्याला वाटावे माझी शंभरवर्षे आताच भरली !

जनकमहाराज आले, त्यांनीही आपले मस्तक विनम्र केले. सीतेला आणवून तिच्याकडून प्रणाम करविला ! परशुरामांनी आशीर्वाद दिलेला पाहून सीतेच्या सखींना हर्ष झाला. त्या सुज्ञ असल्यामुळे त्यांनी लगेच तिला बायकामंडळी बसली होती तिकडे नेली. त्यानंतर विश्वामित्र–परशुराम भेट होऊन दोन्ही बंधूंना त्यांनी परशुरामाच्या पदकमली घातले. दशरथनंदन रामलक्ष्मणाचे ते अलौकिक सौंदर्य पाहून त्यांनाही भार्गव-रामांनी आशीर्वाद दिले. रामाकडे टक लावून त्यांनी पाहण्यास सुरुवात केली; कारण मदनाचाही गर्व परिहार करणारे असे ते रूपच अपार होते !

विदेहाकडे पुनः पाहिले व म्हणतात, "राजा ! ही एवढी गर्दी कशी काय ?" सर्व ठाऊक असून न कळल्याप्रमाणे त्यांनी प्रश्न केला आणि या प्रश्नाबरोबरच त्यांच्या सर्व शरीरात कोप भरला ! २६९.

ज्या कारणासाठी सर्व समाज जमला होता, त्याची थोडक्यात हकीकत जनकांनी परशुरामांना सांगितली. ती ऐकून पलीकडे पाहतात तो शिव-धनुष्याचे तुकडे जमिनीवर पडलेले दिसले ! आणि स्वारी भयंकर संतापाने कडाडली, "जड जनका ! बोल कोणी धनुष्य मोडले ? मूर्खा ! त्याला लवकर दाखव ! नाही तर, आताच्या आता तुझे राज्य आहे तेवढी सर्व पृथ्वी उलथून टाकतो !"

जनक महाराज अत्यंत भ्याल्यामुळे त्यांच्या तोंडून उत्तर येईना. दुष्ट राजांना मनात मोठा आनंद वाटला! सुर, मुनी, नाग सर्व नगरवासी नारी-नर सर्वांनाच चिंता उत्पन्न होऊन मनात मोठीच भीती उत्पन्न



मन पछिताति सीय महतारी । बिधि अब सँवरी बात बिगारी ।।
भृगुपति कर सुभाउ सुनि सीता । अरध निमेष कलप सम बीता ।।
दो० – सभय बिलोके लोग सब जानी जानकी भीरु ।
हृदयँ न हरषु बिषादु कछु बोले श्रीरघुबीरु ।। २७० ।।

मास पारायण, नवाँ विश्राम

चौ० – नाथ संभुधनु भंजनिहारा । होइहि केउ एक दास तुम्हारा ।।
आयसु काह कहिअ किन मोही । सुनि रिसाइ बोले मुनि कोही ।।
सेवकु सो जो करै सेवकाई । अरि करनी करि करिअ लराई ।।
सुनहु राम जेहिं सिवधनु तोरा । सहसबाहु सम सो रिपु मोरा ।।
सो बिलगाउ बिहाइ समाजा । न त मारे जैहहिं सब राजा ।।
सुनि मुनि बचन लखन मुसुकाने । बोले परसुधरहि अपमाने ।।
बहु धनुहीं तोरीं लरिकाईं । कबहुँ न असि रिस कीन्हि गोसाईं ।।
एहि धनु पर ममता केहि हेतू । सुनि रिसाइ कह भृगुकुलकेतू ।।
दो० – रे नृप बालक काल बस बोलत तोहि न सँभार ।
धनुही सम तिपुरारि धनु बिदित सकल संसार ।। २७१ ।।
चौ० – लखन कहा हँसि हमरे जाना । सुनहु देव सब धनुष समाना ।।
का छति लाभु जून धनु तोरें । देखा राम नयन के भोरें ।।

झाली. ‘चांगला जुळलेला सर्व संच विधीने विघडून टाकला !’ असे वाटून सीतेच्या आईला मनात फार दुःख झाले. भृगुपतीच्या स्वभावाची कल्पना ऐकून सीतेला अर्धे निमिषही एका कल्पाएवढे मोठे असे वाटू लागले. सर्व लोक भयव्याकुळ झालेले पाहिले, व सीतेची भीतीने केविलवाणी स्थिती झालेली ध्यानी घेतली आणि मनात यत्किंचित हर्ष अगर विषाद न वाटता, श्रीरघुवीर बोलले. २७०.

“नाथ ! ज्याने शंभु-धनू मोडले, तो कुणीतरी आपला सेवकच असेल. काय आज्ञा असेल ती मला सांगावी” त्यावरोबर ते संतापी मुनी उसळले, “जो सेवा करतो तोच सेवक, शत्रू प्रमाणे कृती केली तर सरळ युद्धाला तयार व्हावे. राम ! हे लक्षात घ्या; ज्याने शिवधनुष्य मोडले, तो सहस्रार्जुनाइतकाच माझा शत्रू आहे शत्रू ! त्याने झटकन् सर्व राजेलोकातून पुढे यावे, नाहीतर सर्वच राजांची कत्तल होईल !”

हे ऐकून प्रभूच्या सरळ उत्तरास हे उर्मट उत्तर ऐकून शेपावतारी लक्ष्मण उसळले. लक्ष्मणांनी स्मित केले व परशुरामांचा अपमान करण्यासाठी म्हणाले, “लहानपणी अशा धनुकल्या आम्ही कितीतरी मोडल्या, परंतु तेव्हा स्वामी इतके कधीच रागावले नव्हते ! याच धनुष्यावर एवढे विशेष प्रेम कशाकरता ?” हे ऐकून भृगुनाथ भडकले, “अरे राजाच्या पोरा ! तू कालवश झाल्यामुळे विचार न करता बोलत आहेस ! सगळ्या जगाला ही गोष्ट माहीत आहे की, शिवधनुष्य म्हणजे धनुकली नव्हे !” २७१

पुनः लक्ष्मण हसले व म्हणाले, “हे पाहा ! देवांना सर्व धनुष्ये सारखीच असतात, एवढी एकच गोष्ट आम्हाला माहीत आहे ! जुने धनुष्य तुटले, त्यात फायदा काय आणि तोटा काय? नवे असे चुकून

छूअत टूट रघुपतिहु न दोसू । मुनि बिनु काज करिअ कत रोसू ।।
बोले चितइ परसु की ओरा । रे सठ सुनेहि सुभाउ न मोरा ।।
बालकु बोलि बधहुँ नहिं तोही । केवल मुनि जड़ जानहि मोही ।।
बाल ब्रह्मचारी अति कोही । बिस्व बिदित छत्रियकुल द्रोही ।।
भुजबल भूमि भूप बिनु कीन्ही । बिपुल बार महिदेवन्ह दीन्ही ।।
सहसबाहु भुज छेदनिहारा । परसु बिलोकु महीपकुमारा ।।

दो० – मातु पितहि जनि सोचबस करसि महीसकिसोर ।
गर्भन्ह के अर्भक दलन परसु मोर अति घोर ।। २७२ ।।

चौ० – बिहसि लखनु बोले मृदु बानी । अहो मुनीसु महा भटमानी ।।
पुनि पुनि मोहि देखाव कुठारू । चहत उड़ावन फूँकि पहारू ।।
इहाँ कुम्हड़बतिया कोउ नाहीं । जे तरजनी देखि मरि जाहीं ।।
देखि कुठारु सरासन बाना । मैं कछु कहा सहित अभिमाना ।।
भृगुसुत समुझि जनेउ बिलोकी । जो कछु कहहु सहउँ रिस रोकी ।।
सुर महिसुर हरिजन अरु गाई । हमरें कुल इन्ह पर न सुराई ।।
बधें पापु अपकीरति हारें । मारतहूँ पा परिअ तुम्हारें ।।

रामाला वाटले; तरी पण त्याला हात लावताच त्याचे तुकडे झाले ! त्यात रघुपतीचा बिल्कुल दोष नाही. मुने ! निष्कारण का रागावता ?"

आपल्या परशूकडे एकवेळ नजर टाकीत परशुराम म्हणतात, "अरे मूर्ख ! तुला माझा स्वभाव माहीत नाही वाटतं ? पोर म्हणूनच ठार केला नाही, आणि मलाच अडाणी मुनी समजतोस होय? लक्षात ठेव, मी बालब्रह्मचारी. अत्यंत रागीट, सर्व क्षत्रियांचा संहार करणारा आहे, ही गोष्ट जगजाहीर आहे ! सर्व पृथ्वी आपल्या बाहूच्या बळावर निःक्षत्रिय केली व ती अनेक वेळा ब्राह्मणांना दान देऊन टाकली ! सहस्रार्जुनाच्या हातांचे तुकडे तुकडे उडविणारा हा माझा परशू पाहिलास का, राजाच्या पोरा !

"आपल्या आईबापांना शोक सागरांत लोटू नकोस; नृपकिशोरा ! गर्भातील अर्भकांना निर्दाळणारा माझा महाघोर परशू आहे, समजलास ?" २७२

खदखदा हसून त्यावर लक्ष्मण हलक्या आवाजाने म्हणाले "अहो मुनीशा ! अहो भटमानी ! स्वतःला फार मोठे शूर वीर समजून मला अनेक वेळा कुऱ्हाड दाखवता, नुसत्या फुंकराने डोंगर उडविण्याचा तुमचा का बेत आहे ? इथे अगदी केवळ तर्जनीचे बोट पाहून मरणारा छोटा भोपळा कोणीच नाही." ते पुढे म्हणाले, "तुमचा तो परशू व धनुष्यबाण पाहून क्षत्रियाच्या अभिमानाने थोडे बोललो, पण भृगुऋषींचे आपण चिरंजीव, हे आपल्या गळ्यातील जानवे पाहून आता लक्षात आले. आता काय वाटेल ते बोला, राग दाबून ते कसे तरी सोसणे माझे कर्तव्यच आहे.

"कारण ब्राह्मण, देव, गायी, आणि संतजन यांच्यावर रघुवंशीय आपले शौर्य कधीच दाखवत नसतात ! त्याना ठार मारले तर भयंकर पाप, आमचा पराभव झाला तर अपकीर्ती ! म्हणून तुम्ही आम्हाला मारू लागला तरी आम्ही आपले पायच धरणार !! पण मला एक शंका आहे, महाराज ! कोटीवज्राप्रमाणे आपल्या शब्दांना



कोटि कुलिस सम बचनु तुम्हारा । ब्यर्थ धरहु धनु बान कुठारा ।।

दो० – जो बिलोकि अनुचित कहेउँ छमहु महामुनि धीर ।
सुनि सरोष भृगुबंसमनि बोले गिरा गभीर ।। २७३ ।।

चौ० – कौसिक सुनहु मंद यहु बालकु । कुटिल कालबस निज कुल घालकु ।।
भानु बंस राकेस कलंकू । निपट निरंकुस अबुध असंकू ।।
काल कवलु होइहि छन माहीं । कहउँ पुकारि खोरि मोहि नाहीं ।।
तुम्ह हटकहु जौं चहहु उबारा । कहि प्रतापु बलु रोषु हमारा ।।
लखन कहेउ मुनि सुजसु तुम्हारा । तुम्हहि अछत को बरनै पारा ।।
अपने मुँह तुम्ह आपनि करनी । बार अनेक भाँति बहु बरनी ।।
नहिं संतोषु त पुनि कछु कहहू । जनि रिस रोकि दुसह दुख सहहू ।।
बीरब्रती तुम्ह धीर अछोभा । गारी देत न पावहु सोभा ।।

दो० – सूर समर करनी करहिं कहि न जनावहिं आपु ।
बिद्यमान रन पाइ रिपु कायर कथहिं प्रतापु ।। २७४ ।।

चौ० – तुम्ह तौ कालु हाँक जनु लावा । बार बार मोहि लागि बोलावा ।।
सुनत लखन के बचन कठोरा । परसु सुधारि धरेउ कर घोरा ।।
अब जनि देइ दोसु मोहि लोगू । कटुबादी बालकु बधजोगू ।।

धार असताना हे धनुष्यबाण व ती कुऱ्हाड यांचे ओझे काय म्हणून आपण वागवता? ही सर्व हत्यारे पाहूनच माझ्या मुखातून काही अयोग्य शब्दबाहेर पडले. हे महामुने ! आपण धैर्याचे आहात, तेव्हां क्षमा करावी !"

हे शब्द भृगुवंशमणीना अधिक चिडविणारेच असल्याने ते गंभीरपणाने म्हणतात, २७३

"कौशिक ! हा बालक किती मूर्ख आहे ! हा कुटिल स्वकुळाचा घात करणारा, काळाच्या स्वाधीन झालेला, सूर्यवंशाच्या पूर्णचंद्राचा कलंक, हा अत्यंत बेछूट, अडाणी व बेडर आहे ! काही क्षणात हा काळाच्या तोंडचा घास होईल ! म्हणून तुलाच स्पष्ट बजावून ठेवतो, नंतर मला दोष देऊ नका ! त्याचे प्राण वाचवावेत असे वाटत असेल तर अजून बोलावून जवळ घ्या आणि आमचा प्रताप, सामर्थ्य आणि संताप याची त्याला योग्य कल्पना द्या. आणि त्याचे तोंड बंद करा." लगेच लक्ष्मणांनी उत्तर दिले, "हे मुनींद्र ! आपली सुकीर्ती आपण समक्ष असता दुसरा कोण योग्य वर्णू शकेल ? आपणच आपल्या तोंडाने आपल्या करणीचा अनेक वेळा अनेक प्रकारांनी आतापर्यंत पुष्कळ पाढा वाचलाच आहे; परंतु जर तेवढ्याने संतोष झाला नसला तर पुनः वर्णन सुरू करा. ते वर्णन अपुरे पडले, यावद्दल होणारे असह्य दुःख, राग गिळून, सोसू नका ! आपण क्षोभ-विरहित, धैर्यवान, वीर-व्रत धारण केलेले असे असून असल्या शिव्या देत राहाणे हे आपणाला शोभत नाही ! जे शूर असतात ते रणांगणावर पराक्रम गाजवतात. स्वतःच्या तोंडाने आपला पराक्रम कधीच सांगत नसतात. डोळ्यापुढे प्रत्यक्ष शत्रू उभा ठाकला असता भेदरट असतात तेच अशी स्वप्रतापाची गाणी गात सुटतात ! २७४. माझ्यासाठी पुनः पुन्हा बोलावून तुम्ही तर काळाला जणू हाक मारून आणला आहे असे मला वाटते !"

आता मात्र या लक्ष्मणाच्या कठोर वाणीने अगदी आगीत तेलच पडले ! भयंकर परशूला घासून पुसून भृगुपतीनी तो हातात घेतला व म्हणतात, "लोक हो ! आता मला दोष देऊ नका. हे कडवट बोलणारे

बाल बिलोकि बहुत मैं बाँचा । अब यहु मरनिहार भा साँचा ।।
कौसिक कहा छमिअ अपराधू । बाल दोष गुन गनहिं न साधू ।।
खर कुठार मैं अकरुन कोही । आगें अपराधी गुरुद्रोही ।।
उतर देत छोड़उँ बिनु मारें । केवल कौसिक सील तुम्हारें ।।
न त एहि काटि कुठार कठोरें । गुरहि उरिन होतेउँ श्रम थोरें ।।

दो० – गाधिसूनु कह हृदयँ हँसि मुनिहि हरिअरइ सूझ ।
अयमय खाँड़ न ऊखमय अजहुँ न बूझ अबूझ ।। २७५ ।।

चौ० – कहेउ लखन मुनि सीलु तुम्हारा । को नहिं जान बिदित संसारा ।।
माता पितहि उरिन भए नीकें । गुर रिनु रहा सोचु बड़ जी कें ।।
सो जनु हमरेहि माथे काढ़ा । दिन चलि गए ब्याज बड़ बाढ़ा ।।
अब आनिअ ब्यवहरिआ बोली । तुरत देउँ मैं थैली खोली ।।
सुनि कटु बचन कुठार सुधारा । हाय हाय सब सभा पुकारा ।।
भृगबर परसु देखावहु मोही । बिप्र बिचारि बचउँ नृपद्रोही ।।

पोर ठार करण्याला योग्य असेच आहे. लहान पोर म्हणून त्याला वाचवण्याचा पुष्कळ यत्न केला, पण आता ते खास मरावयास उद्युक्त झाले आहे हे निश्चित! [प्रकरण येथेच थांबवावे या इच्छेने घसरून गाडी सावरून धरली व वेळ मारून घेण्याचे ठरवले.]

हे ऐकून विश्वामित्र म्हणाले, "क्षमा करा ! बालकाचे गुणदोष सत्पुरुष मुळीच विचारात घेत नाहीत.' असे सांगून भडकलेल्या परशुरामांना शातवले !

"कौशिका ! माझ्या हातात परशु, अत्यंत निष्ठुर व तापट असा मी, पुढे गुरुद्रोही अपराधी; त्याला उलट बोलत असता न मारता सोडला, तो केवळ कौशिका ! तुझ्या चांगुलपणामुळे नाहीतर, या घोर कुठाराने केव्हाच त्याला छाटून गुरुऋणातून लीलेने मोकळा झालो असतो !" परशुरामांनी स्वतःचे समाधान या शब्दांनी करून घेतले.

हे परशुरामाचे भाषण ऐकून गाधिसुत मनात हसून म्हणतात, 'मुनींला हे आपले नेहमीचेच *हिरवळ-रान वाटत आहे. (ते रामलक्ष्मणांना साधारण क्षत्रिय समजत आहे.) हे (लक्ष्मण) अस्सल पोलादी खड्ग आहे. ते केवळ साखरेचे बनलेले नाही, एवढी गोष्टही ह्या अजाण मुनींना कशी समजेना ?' २७५

लक्ष्मणांनी पुनः आग पेटवली, "हे मुने ! आपले शील कोणाला नाही कळले ? सर्व विश्वाला ते ठाऊक आहे ! आईबापांचे ऋण चांगले फेडलेत ! आता राहिले आहे फक्त गुरुऋण ! ते मनात फार सलते आहे. ते ऋण जणू काढले आमच्या पतीवर ! (आम्हाला जामीन ठेवून). शिवाय पुष्कळ दिवस गेल्याने व्याजाचा बोजा बराच झाला असेल. ! म्हणून कोण धनको असेल त्याला बोलवा; मी एकटाच थैली खोलून ताबडतोब तुमची बाकी शून्य करतो ! मग तर काही हरकत नाही ?"

हे शब्द ऐकताच परशुरामांनी कुऱ्हाड उगारली. त्याबरोबर "हाय ! हाय !" असे उद्गार सर्वांच्या मुखातून बाहेर पडले.

पण लक्ष्मण खवळून म्हणतात "भृगुवर ! मला कुऱ्हाड दाखवता होय ? नृपद्रोही ! केवळ ब्राह्मण

* "हरिअरइ सूझ" –मूळ–हराहि हरा सूझ रहा है (?) हिंदी गोरखपूर टीका.



मिले न कबहुँ सुभट रन गाढ़े । द्विज देवता घरहि के बाढ़े ॥
अनुचित कहि सब लोग पुकारे । रघुपति सयनहिं लखनु नेवारे ॥

दो० – लखन उतर आहुति सरिस भृगुबर कोपु कृसानु ।
बढ़त देखि जल सम बचन बोले रघुकुलभानु ॥ २७६ ॥

चौ० – नाथ करहु बालक पर छोहू । सूध दूधमुख करिअ न कोहू ॥
जौं पै प्रभु प्रभाउ कछु जाना । तौ कि बराबरि करत अयाना ॥
जौं लरिका कछु अचगरि करहीं । गुर पितु मातु मोद मन भरहीं ॥
करिअ कृपा सिसु सेवक जानी । तुम्ह सम सील धीर मुनि ग्यानी ॥
राम बचन सुनि कछुक जुड़ाने । कहि कछु लखनु बहुरि मुसुकाने ॥
हँसत देखि नख सिख रिस ब्यापी । राम तोर भ्राता बड़ पापी ॥
गौर सरीर स्याम मन माहीं । कालकूटमुख पयमुख नाहीं ॥
सहज टेढ़ अनुहरइ न तोही । नीचु मीचु सम देख न मोही ॥

दो० – लखन कहेउ हँसि सुनहु मुनि क्रोधु पाप कर मूल ।
जेहि बस जन अनुचित करहिं चरहिं बिस्व प्रतिकूल ॥ २७७ ॥

म्हणूनच सोडतो वरं ! आतापर्यंत तुम्हाला रणांगणात तुमचा समाचार घेणारा योद्धा भेटलाच नाही, म्हणून, चढून जाऊन हे द्विजदेवा ! आपल्या पराक्रमाची ही वाढ घरच्या चुलीपुढचीच होय. ”

“ अयोग्य ! अयोग्य ! असा त्या राजसभेतून सर्वतामुखी एकदम आवाज निघाला. रघुपतींनी खूण करून बंधूला परावृत केले व भृगुवर कोपरूपी अग्नी लक्ष्मण-वचन रूपी आहुतींनी भडकला आहे हे पाहून रघुकुलाचे सूर्य, श्रीरामचंद्र पाण्याप्रमाणे शांत करणारे भाषण बोलले. २७६

“ नाथ ! बाळावर कृपा करा. तो अगदी शुद्र आहे ! ओठ पिळले तर दूध निघेल इतका लहान, कोमल आहे. अगदीच बच्चा आहे. त्याच्यावर नका रागावू. त्याला जर प्रभूच्या प्रभावाची कल्पना असती तर नेणत्याने बरोबरी कशाला केली असती ! लहान मुलांनी काही खोड्या केल्या तर गुरुजन व आईबापाना मनात आनंदाला भरती येते. याला आपला बालक व सेवक समजून आपण त्याच्यावर कृपा करावी ! आपण ज्ञानी, धैर्यवान, सुशील आणि समदृष्टीचे असे मुनी आहात ! ”

रामाच्या या भाषणाने भृगुपति थोडेसे शांत होतात न होतात तोच लक्ष्मण काही तरी हळूच बोलून हसले ! ते हास्य पाहाताच पुनः स्वारी नखशिखान्त लाल झाली व उखडली. रामा ! तुझा भाऊ अत्यंत पापी आहे. दिसायला गोरा पण मनाने अगदी काळा कुट्ट ! त्याचे तोंड दुग्धमुख नसून कालकूट विषाने ते भरले आहे. त्याला अमृताचा वासमुद्धा नाही ! स्वभावतःच खोडील ! त्यामुळे तुझा भाऊ मुळीच शोभत नाही. तुझे अनुकरण कधीच करणार नाही आणि नीच अवस्थामुळे प्रत्यक्ष काळा सारखा मी उग्र असूनही मला आदर देत नाही. ”

यावर लक्ष्मण हसून म्हणतात, “ हे मुनिमहाराज ! ऐका, क्रोध हा सर्व पापाचे मूळ आहे, त्याच्या आधीन होऊन लोक अयोग्य कर्मे करतात आणि सर्व विश्वाला प्रतीकूल असे वागतात. २७७



चौ० – मैं तुम्हार अनुचर मुनिराया । परिहरि कोपु करिअ अब दाया ॥
टूट चाप नहिं जुरिहि रिसाने । बैठिअ होइहिं पाय पिराने ॥
जौं अनि प्रिय तौ करिअ उपाई । जोरिअ कोउ बड़ गुनी बोलाई ॥
बोलत लखनहिं जनकु डेराहीं । मष्ट करहु अनुचित भल नाहीं ॥
थर थर काँपहिं पुर नर नारी । छोट कुमार खोट बड़ भारी ॥
भृगुपति सुनि सुनि निरभय बानी । रिस तन जरइ होइ बल हानी ॥
बोले रामहि देइ निहोरा । बचउँ बिचारि बंधु लघु तोरा ॥
मनु मलीन तनु सुंदर कैसें । बिष रस भरा कनक घटु जैसें ॥

दो० – सुनि लछिमन बिहसे बहुरि नयन तरेरे राम ।
गुर समीप गवने सकुचि परिहरि बानी बाम ॥ २७८ ॥

चौ० – अति बिनीत मृदु सीतल बानी । बोले रामु जोरि जुग पानी ॥
सुनहु नाथ तुम्ह सहज सुजाना । बालक बचनु करिअ नहिं काना ॥
बररै बालकु एकु सुभाऊ । इन्हहि न संत बिदूषहिं काऊ ॥

हे मुनिराज ! मी आपला सेवक आहे आता क्रोध सोडून त्याच्यावर दया करा. धनुष्य तुटले ते तुटलेच रागावून का ते जोडले जाणार आहे ? आता खाली तरी बसा ! आपले पाय दुखू लागले असतील. ते धनुष्य फार आवडते असले, तर युक्तिप्रयुक्तीने एखादा कुशल कारागीर आणून त्याला ते तुकडे सांधून देण्यास सांगू !"

लक्ष्मणाचे हे भाषण ऐकून जनकांनासुद्धा भीती वाटली व ते म्हणाले, "गप्प बसावे; असे बोलणे अयोग्य आहे. हे बरे नाही!"

सगळ्या नगरीतील स्त्रिया व पुरुष भीतीने थरथर कापत असता व आपसात कुजबजत; "धाकटा कुमार फारच खोटा आणि वात्रट आहे नाही का ?"

लक्ष्मणाची निर्भय वाणी ऐकून भृगुपतीच्या सर्वांगाचा दाह सुरू झाला व ते हतबल झाले. रामावर जणू काही आपण उपकार करत आहो असे अवसान आणून म्हणतात, "रामा ! तुझा हा धाकटा भाऊ आहे हे मनात आणूनच त्याला वाचवतो, विषाने भरलेला सोन्याचा घडा असावा तसा तो मनाने मलीन असल्यामुळे शरीराने सुंदर असून काय उपयोग !"

हे ऐकताच लक्ष्मण पुनः खदखदा हसले. त्याबरोबर रामांनी तिरक्या नजरेने खुणावून त्यांना दाबले. * त्यामुळे ते लाजले आणखी काही खवचट बोलावयाचे सोडून गुरुजींच्या जवळ गेले. २७८

नंतर रामांनी हात जोडले, अत्यंत विनयाने कोमल व मधुर वाणीने त्यांनी परशुरामांची समजूत घालण्यास सुरुवात केली. ते म्हणाले, "नाथ ! आपण जात्याच समजूतदार आहात. बाळाचे बोल काय मनावर घ्यायचे ? पोरे ही गांधिलमाशीच्या सारखी स्वभावतः असतात. म्हणून त्यांना संत कधीही डिवचत नाहीत ! शिवाय

---

* डोळे वटारणे हे सामान्यतः नावडते कृत्य भीती दाखवून बंद करण्याचा इषारा म्हणूनच केले जाते. येथे श्रीरामचंद्राची व विश्वामित्राची मूक संमती आहे हे उघड असून फक्त हे गर्वहरणाचे नाटक पद्धतशीर चालण्यासाठीच जरूरीप्रमाणे संकेत देण्याचे काम चालू आहे. म्हणून तिरप्या नजरेने खुणावणे हेच योग्य. कारण खरोखर श्रीराम रागावले असते तर लक्ष्मण एकही शब्द पुढे बोलले नसते. तसे न होता पुनः भरपूर भाषण चालू आहेच.

तेहिं नाहीं कछु काज बिगारा । अपराधी मैं नाथ तुम्हारा ।।
कृपा कोपु बधु बँधब गोसाईं । मो पर करिअ दास की नाईं ।।
कहिअ बेगि जेहि बिधि रिस जाई । मुनिनायक सोइ करौं उपाई ।।
कह मुनि राम जाइ रिस कैसें । अजहुँ अनुज तव चितव अनैसें ।।
एहि कें कंठ कुठारु न दीन्हा । तौ मैं काह कोपु करि कीन्हा ।।

दो०— गर्भ स्रवहिं अवनिप रवनि सुनि कुठार गति घोर ।
परसु अछत देखउँ जिअत बैरी भूपकिसोर ।। २७९ ।।

चौ०— बहइ न हाथु दहइ रिस छाती । भा कुठारु कुंठित नृपघाती ।।
भयउ बाम बिधि फिरेउ सुभाऊ । मोरे हृदयँ कृपा कसि काऊ ।।
आजु दया दुखु दुसह सहावा । सुनि सौमित्रि बिहसि सिरु नावा ।।
बाउ कृपा मूरति अनुकूला । बोलत बचन झरत जनु फूला ।।
जौं पै कृपाँ जरिहिं मुनि गाता । क्रोध भएँ तनु राख बिधाता ।।
देखु जनक हठि बालकु एहू । कीन्ह चहत जड़ जमपुर गेहू ।।
बेगि करहु किन आँखिन्ह ओटा । देखत छोट खोट नृप ढोटा ।।
बिहसे लखनु कहा मन माहीं । मूदें आँखि कतहुँ कोउ नाहीं ।।

आपले त्याने काहीच नुकसान केलेले नाही. खरोखर नाथ ! मी आपला अपराध केला. म्हणून आपला दास समजून कृपा करा. ते शक्य नसले, व फार राग आला असला तर ठार करा, नाहीतर मुसक्या बांधा ! आपला संताप झटदिशी कमी होण्यासाठी, मी काय करू ते सांगा ! हे मुनिनायका, आपण सांगाल तो उपाय मी करीन."

ते ऐकून मुनी म्हणतात, "रामा ! अरे माझा राग कसा जाणार ? बघ, बघ ! तो तुझा धाकटा भाऊ कसा वाकड्या नजरेने माझ्याकडे अजून पाहात आहे ! अरे, परशूने याची मान छाटून टाकली नाही तर मी रागावून साधले तरी काय ? माझ्या परशूची घोर गती पाहून, (राजे उत्पन्न होणाऱ्या खाणीचे) राण्यांचे गर्भ स्रवतात ! असा परशू माझ्या हातात असून, हा माझा वैरी, राजकिशोर जिवंत राहिलेला बघण्याचा आज मला प्रसंग आला आहे ! २७९

रागाने माझी छाती नुसती जळते आहे, पण हातच पुढे जाण्यास धजत नाही ! हजारो राजांना सहज कंठस्नान घालणारा हा माझा कुठारसुद्धा आज असा कुंठित कसा झाला ? दैवच प्रतिकूल ! माझ्यासारख्याचा स्वभाव बदलून माझ्या हृदयात कधी न येणाऱ्या कृपेने आज आपला प्रभाव गाजवावा ? या दयेने, मला असह्य दुःख सहन करावयास लावले आहे ! !"

लगेच सुमित्रासुत मनापासून हसला ! व त्याने मस्तक विनम्र करून भाषण केले, "कृपारूपी वायू आहे. आपण त्याच्या अनुकूलतेची मूर्तीच झाला आहात. त्यामुळे, जणू काही फुले पडावीत, तसे आपल्या मुखातून शब्द आपले पडत आहेत ! हे मुने ! असली कृपासुद्धा जर आपल्या गात्रांचा भडका उडवीत असली तर, विधाता क्रोधाने आपल्या शरीराचे रक्षक करो !" हे शब्द भयंकर चीड आणणारे असल्याने मुनी ओरडले,

"जनका ! हे मूर्ख पोर हट्टाने यमपुरीत आपले घर गाठू इच्छीत आहे, दिसतो छोटा पण हा राजाचा पोर्टा मोठा खोटा आहे ! अगोदर माझ्या डोळ्यापुढून त्याला दूर कर पाहू !"

लक्ष्मण मोठ्याने हसून लगेच हळूच म्हणाले, "आपण डोळे मिटले की कुठेच कोणी दिसत नाही !"



दो० —परसुरामु तब राम प्रति बोले उर अति क्रोधु ।
संभु सरासनु तोरि सठ करसि हमार प्रबोधु ॥ २८० ॥

चौ० —बंधु कहइ कटु संमत तोरें । तू छल बिनय करसि कर जोरें ॥
करु परितोषु मोर संग्रामा । नाहिं त छाड़ कहाउब रामा ॥
छलु तजि करहि समरु सिवद्रोही । बंधु सहित न त मारउँ तोही ॥
भृगुपति बकहिं कुठार उठाएँ । मन मुसुकाहिं रामु सिर नाएँ ॥
गुनह लखन कर हम पर रोषू । कतहुँ सुधाइहु ते बड़ दोषू ॥
टेढ़ जानि सब बंदइ काहू । बक्र चंद्रमहि ग्रसइ न राहू ॥
राम कहेउ रिस तजिअ मुनीसा । कर कुठारु आगें यह सीसा ॥
जेहिं रिस जाइ करिअ सोइ स्वामी । मोहि जानिअ आपन अनुगामी ॥

दो० —प्रभुहि सेवकहि समरु कस तजहु बिप्रबर रोसु ।
बेषु बिलोकें कहेसि कछु बालकहू नहिं दोसु ॥ २८१ ॥

चौ० —देखि कुठार बान धनु धारी । भै लरिकहि रिस बीरु बिचारी ॥
नामु जान पै तुम्हहि न चीन्हा । बंस सुभायँ उतरु तेहिं दीन्हा ॥
जौं तुम्ह औतेहु मुनि की नाईं । पद रज सिर सिसु धरत गोसाईं ॥

तेव्हा जनकही मूग गिळून स्वस्थ बसलेले पाहून हृदयात वणवा पेटल्याने, परशुराम रामास म्हणाले, " मूर्खा ! शिवधनू शंभूचे धनुष्य मोडून आम्हाला वर उपदेश करतोस काय ? २८०

हा तुझा धाकटा भाऊ सारखा चुरचुर बोलतो आहे, त्याला तुझी संमती आहे, आणि हात जोडून आम्हाला तू नाटकी विनंती करीत आहेस ! आता ते काही चालणार नाही. एक माझ्याबरोबर युद्धास उभा राहून माझे समाधान तरी कर, नाहीतर आपले 'राम ' हे नाव सोड ! आता या लबाडच्या सोड आणि हे शंभुद्रोही ! लढाईस सज्ज हो ! नाहीतर तू आणि तुझा धाकटा भाऊ अशा दोघांनाही ठार करतो. "

हातातील परशू उगारून भृगुपतींनी अशा वल्गना सुरू केल्या. पण मनात स्मित करून रामांनी आपले शिर नमवले. ते म्हणतात, दोष लक्ष्मणाचा आणि रोष माझ्यावर ! या वरून ठरते की, कधी कधी सरळपणा हाच महादोष होऊन बसतो ! वाकडी चंद्राची कोर पाहून लोक तिला नमस्कार करतात; वक्र चंद्राचे राहू-सुद्धा कधीच ग्रहण करीत नाही ! "

राम पुढे म्हणाले, " हे मुनिवर ! किती रागावला आहात ! सोडा तो राग, ही माझी मान आपल्यापुढे वाकलेली असून आपल्या हाती भयंकर कुठार आहे ! ज्याच्या योगाने राग जाईल ते करावे. मात्र मला आपला दास समजावा. हे विप्रश्रेष्ठा, प्रभू आणि त्याचा सेवक यांच्यामध्ये युद्ध कसे शक्य ? म्हणून राग सोडा !

आपला क्षत्रिय वेष पाहून माझा धाकटा भाऊ थोडेसे बोलला, यात त्या बाळाचाही काही दोष नाही ! २८१

आपल्या हातात धनुष्य व बाण, खांद्यावर कुऱ्हाड, संतप्त मूर्ती ! यामुळे आपण शूर क्षत्रियवीर आहात, असे तो समजून कोपला तुमचे नाव त्याला माहीत होते, पण त्याने प्रत्यक्ष पाहिले नव्हते ! त्यामुळे रघुवंशाच्या स्वभावाला अनुसरून त्याने तेजस्वी उत्तरे दिली ! हे स्वामिन्, आपण जर मुनिवेषात आला असता तर माझ्या बाळाने आपल्या चरणाचे रजःकण आपल्या मस्तकावर खास धारण केले असते !



छमहु चूक अनजातन केरी । चहिअ बिप्र उर कृपा घनेरी ॥
हमहि तुम्हहि सरिबरी कसि नाथा । कहहु कहाँ चरन कहँ माथा ॥
राम मात्र लघु नाम हमारा । परसु सहित बड़ नाम तोहारा ॥
देव एकु गुनु धनुष हमारें । नव गुन परम पुनीत तुम्हारें ॥
सब प्रकार हम तुम्ह सन हारे । छमहु बिप्र अपराध हमारे ॥

दो० —बार बार मुनि बिप्रबर कहा राम सन राम ।
बोले भृगुपति सरुष हसि तहूँ बंधु सम बाम ॥ २८२ ॥

चौ०—निपटहिं द्विज करि जानहि मोही । मैं जस बिप्र सुनावउँ तोही ॥
चाप स्रुवा सर आहुति जानू । कोपु मोर अति घोर कृसानू ॥
समिधि सेन चतुरंग सुहाई । महा महीप भए पसु आई ॥
मैं एहिं परसु काटि बलि दीन्हे । समर जग्य जप कोटिन्ह कीन्हे ॥
मोर प्रभाउ बिदित नहिं तोरें । बोलसि निदरि बिप्र के भोरें ॥
भंजेउ चापु दापु बड़ बाढ़ा । अहमिति मनहुँ जीति जगु ठाढ़ा ॥
राम कहा मुनि कहहु बिचारी । रिस अति बड़ि लघु चूक हमारी ॥
छुअतहि टूट पिनाक पुराना । मैं केहि हेतु करौं अभिमाना ॥

" त्याकारणाने नकळत चूक झाली हे समजून आपण क्षमा करावी ! कारण विप्राच्या हृदयात, फार मोठ्या प्रमाणात कृपा असावी. नाथ ! आमची व तुमची बरोबरी कशी शक्य ? कुठे मस्तक आणि कुठे पाय ? कसा मेळ बसणार, सांगा बरं ! " राम असे अगदी छोटे आमचे नाव, 'परशु' या उपपदासह आपले नाव मोठे. देवा ! एकाच दोरीचे (गुणाचे) आमचे धनुष्य ! परंतु (शमादि) नऊ गुणांचे परम पवित्र असे तुमचे ! सर्व दृष्टीनी तुमच्यापेक्षा आम्ही खालच्या दर्जाचे ठरलेलेच आहोत. म्हणून हे विप्र ! आमच्या अपराधाला कृपा करून पोटात घाला ! "

वरचेवर मुनी, विप्रवर अशी संबोधने देऊन रामानी परशुरामाशी भाषण केले पण त्यामुळेच भृगुपति संतप्त झाले व त्या रागात विकट हास्य करून प्रभूला म्हणतात,

" तूसुद्धा धाकट्या भावाच्याच खोडकर वळणावर निघालास ! २८२

मला नुसता पळिपंचपात्रीवाला विप्र समजतोस काय ? तो विप्र कसा आहे ते तुला सांगतो ऐक.

धनुष्य ही आहुतीची पळी, त्यातून सुटणारे बाण या आहुती. माझा भयंकर मोठा राग हाच अग्नि राजांच्या चतुरंगिणी सेना याच समिधा, मोठे मोठे राजे हेच यज्ञात बळी द्यावयाचे पशू ! याच परशूने त्याना कापून त्यांचे बळी अर्पण केले अशा प्रकारच्या युद्धरूपी यज्ञाचा जप मी अनेक वेळा केला ! तुला माझ्या या प्रभावाची कल्पना नाही म्हणून एखाद्या क्षुद्र ब्राह्मणाच्या भ्रमाने तू माझा अपमान करणारी मुनी—विप्र—अशी भाषा वापरत आहेस. धनुष्याचा भंग केल्यापासून तुला अंतःकरणात मोठा गर्व झाला आहे आणि त्यामुळे अगदी जगज्जेत्याप्रमाणे मदोन्मत्त होऊन तू ताठला आहेस ! "

आता हे प्रकरण भलत्याच थरास पोचल्याचे पाहून प्रभूनी त्याचा समारोप करण्याचे ठरवले. ते म्हणाले,

" मुनिराज थोडा विचार करून बोला. आमची चूक अत्यंत क्षुद्र व त्या मानाने तुमचा क्रोध अगदीच भलत्या टोकास पोचला आहे ! जुने शिवधनुष्य, त्याला नुसता स्पर्शकरताच त्याचे तुकडे झाले. त्यात मला ताठून जाण्यासारखा अभिमान करण्यासारखे आहे तरी काय ?

दो० – जौं हम निदरहिं बिप्र बदि सत्य सुनहु भृगुनाथ ।
तौ अस को जग सुभटु जेहि भय बस नावहिं माथ ॥ २८३ ॥

चौ० – देव दनुज भूपति भट नाना । समबल अधिक होउ बलवाना ॥
जौं रन हमहि पचारै कोउ । लरहिं सुखेन कालु किन होऊ ॥
छत्रिय तनु धरि समर सकाना । कुल कलंकु तेहिं पावँर आना ॥
कहउँ सुभाउ न कुलहि प्रसंसी । कालहु डरहिं न रन रघुबंसी ॥
बिप्रबंस कै असि प्रभुताई । अभय होइ जो तुम्हहि डेराई ॥
सुनि मृदु गूढ़ बचन रघुपति के । उघरे पटल परसुधर मति के ॥
राम रमापति कर धनु लेहू । खैंचहु मिटै मोर संदेहू ।
देत चापु आपुहिं चलि गयऊ । परसुराम मन बिसमय भयऊ ॥

दो० – जाना राम प्रभाउ तब पुलक प्रफुल्लित गात ।
जोरि पानि बोले बचन हृदयँ न प्रेमु अमात ॥ २८४ ॥

चौ० – जय रघुबंस बनज बन भानू । गहन दनुज कुल दहन कृसानू ॥
जय सुर बिप्र धेनु हितकारी । जय मद मोह कोह भ्रम हारी ॥

भगवंतांनी आपले विशिष्ट तेज प्रकट करून विचारले—

"हे भृगुकुलोत्पन्न मुने ! विप्र म्हणून जर तुमचा अनादर करण्याचे आम्ही मनात आणले, तर खरोखर असा पृथ्वीच्या पाठीवर कोण मोठा रणशूर आहे की, ज्याच्या पुढे आम्हाला भीतीने मान वाकवावी लागेल "! २८३

सर्व जगातील राजे, देव, दानव वगैरे सर्व शूरवीर आमच्या जोडीचे, बलवान अगर अधिक बलाढ्य असोत, त्यांपैकी कोणी युद्धाला आव्हान दिले, तर प्रत्यक्ष काळ जरी पुढे आला तरी त्याच्याशी आम्ही दोन हात करू ! क्षत्रिय असून जो लढाईला भितो, तो पामर ! आपल्या कुलाला कलंकित करतो ! मी हा कुळाचा स्वभाव सांगत आहे, यात आमच्या कुळाची प्रशंसा नाही. या रघुवंशात प्रत्यक्ष काळाशीही दोन हात करण्यास कधी कोणी कचरत नाही !

मला मुख्यतः हे सांगावयाचे आहे की, आपणाला भिऊन जो वागेल त्याला पुनः पृथ्वीच्या पाठीवर भीती उरत नाही ! असा आपल्या विप्रकुलाचा महिमा आहे !! "

हे गूढ व मधुर असे रघुपतीचे भाषण ऐकताच, परशुरामाच्या बुद्धीवर आलेले पटल खाडकन दूर झाले. अखेरचे म्हणून, ते एकच विनम्र वाक्य बोलले, "रामा, हे रमापती-धनुष्य (वैष्णवीय) आपल्या हाती घेऊन राज्य करा म्हणजे माझ्या संशयाचा पूर्ण निरास होईल ! "

लोहचुंबकाकडे एखादी सुई जावी त्याप्रमाणे ते धनुष्य देण्यासाठी हात पुढे करताच आपण होऊन ते प्रभूकडे गेलेले पाहून, परशुराम मनात विस्मयचकित झाले ! रामाचे दैवी स्वरूप ध्यानी येताच त्यांचे शरीर पुलक-प्रफुल्ल झाले. अंतःकरण भक्तिप्रेमाने भरून आले. त्यांनी [illegible] हात जोडले व दोन्ही बंधूंची क्षमा मागण्यासाठी रामलक्ष्मणाची एकत्र प्रार्थना सुरू केली. २८४

"हे रघुकुलरूपी कमलवनाला विकसित करणाऱ्या नारायणा ! आपला उत्कर्ष प्रकट करा. हे राक्षस-रूपी गहन वनाला जाळून दग्ध करणाऱ्या अग्निनारायणा ! देवता, ब्राह्मण व गायी यांचे हित करणाऱ्या प्रभो !



चौ० – बिनय सील करुना गुन सागर । जयति बचन रचना अति नागर ।।
सेवक सुखद सुभग सब अंगा । जय सरीर छबि कोटि अनंगा ।।
करौं काह मुख एक प्रसंसा । जय महेस मन मानस हंसा ।।
अनुचित बहुत कहेउँ अग्याता । छमहु छमामंदिर दोउ भ्राता ।।
कहि जय जय जय रघुकुलकेतू । भृगुपति गए बनहि तप हेतू ।।
अपभयँ कुटिल महीप डेराने । जहँ तहँ कायर गवँहिं पराने ।।

दो० – देवन्ह दीन्हीं दुंदुभीं प्रभु पर बरषहिं फूल ।
हरषे पुर नर नारि सब मिटि मोहमय सूल ।। २८५ ।।

चौ० – अति गहगहे बाजने बाजे । सबहिं मनोहर मंगल साजे ।।
जूथ जूथ मिलि सुमुखि सुनयनीं । करहिं गान कल कोकिलबयनीं ।।
सुखु बिदेह कर बरनि न जाई । जन्मदरिद्र मनहुँ निधि पाई ।
बिगत त्रास भइ सीय सुखारी । जनु बिधु उदयँ चकोरकुमारी ।

आपला जयजयकार असो. मद-मोह क्रोध व भ्रम यांच्यापासून सुटका करणाऱ्या भगवंता ! आपला जय होवो. हे विनय, शील, कृपा आदि गुणांच्या सागरा ! भाषेतील शब्दांची योजना करण्यात अत्यंत चतुर असणाऱ्या देवाधिदेवा आपला विजय असो. सेवकांना सुख देणारांनो, सर्व अवयवांनी सुंदर, कोट्यवधी कामदेवांच्या लावण्याने भरलेले असे शरीर धारण करणाऱ्या जगदीशा ! तुमचा जयजयकार असो. महादेवांच्या मनरूपी मानससरोवरात हंसाप्रमाणे विहार करणाऱ्या विश्वचालकानो ! तुमची या एकमुखाने मी कशी स्तुती करू ? अज्ञानाने मी अत्यंत अनुचित असे बोललो; क्षमेचे निवासस्थान असणाऱ्या बंधूंनो ! मला क्षमा करा. हे रघुकुलाच्या ध्वजाप्रमाणे श्रेष्ठ असणाऱ्यांनो ! तुमचा विजय असो. तुजचा विजय असो !"

याप्रमाणे प्रार्थना करून तपश्चर्या करण्यासाठी परशुराम वनात गेले. परशुरामासारख्या महान शूर, कर्दनकाळालासुद्धा क्षमा मागावयास लावली, त्याचे धनुष्यच काढून घेतले, आता मात्र आपली काही धडगत नाही, अशी काल्पनिक धडकी भरून, कपटी व दुष्ट पण भ्याड असे जे राजे होते, त्यांनी सर्वांनी त्या ठिकाणाहून ताबडतोब गुपचूप पोबारा केला !

या विजयानंदाने देवांनी दुंदुभी वाजवून प्रभुवर पुष्पवृष्टी केली. सर्व नागरिक स्त्री-पुरुषांचा आनंद गगनात मावेना; कारण अज्ञानामुळे उत्पन्न झालेल्या त्यांच्या सर्व चिंता आता पूर्णपणे नष्ट झाल्या. २८५

वाद्यांचा मोठा धडधडाट वाजू लागला. सर्वांनी घरोघर मनोहर मंगलसाज सजविले. सुंदर मुख व नयन मनोहर डोळे असलेल्या अशा स्त्रिया थव्याथव्यानी एकत्र जमून, कोकिळेच्या कंठाने त्यानी मधुर गाणी सुरू केली !

जन्मदरिद्रयाला जसे निधान सापडावे त्याप्रमाणे भाग्यलाभ झालेल्या जनकाच्या या वेळच्या सुखाचे कसे वर्णन करावे ? पूर्णचंद्र पूर्व दिशेला आपले मुख दाखवून सुधा-शीतल किरणांचा वर्षाव करू लागल्यानंतर चकोरकन्यकेला जसा सुखसागर लाभावा तसाच परमानंद, भयविषादादि सर्व विघ्ने टळल्यामुळे आता सीतेला परमानंद झाला.

जनक कीन्ह कौसिकहि प्रनामा । प्रभु प्रसाद धनु भंजेउ रामा ।।
मोहि कृतकृत्य कीन्ह दुहुँ भाईं । अब जो उचित सो कहिअ गोसाईं ।।
कह मुनि सुनु नरनाथ प्रबीना । रहा बिबाहु चाप आधीना ।।
टूटतहीं धनु भयउ बिबाहू । सुर नर नाग बिदित सब काहू ।।
दो ० –तदपि जाइ तुम्ह करहु अब जथा बंस ब्यवहारु ।
बूझि बिप्र कुलबृद्ध गुर बेद बिदित आचारु ।। २८६ ।।
चौ ० –दूत अवधपुर पठवहु जाई । आनहिं नृप दसरथहि बोलाई ।।
मुदित राउ कहि भलेहिं कृपाला । पठए दूत बोलि तेहि काला ।।
बहुरि महाजन सकल बोलाए । आइ सबन्हि सादर सिर नाए ।।
हाट बाट मंदिर सुरबासा । नगरु सँवारहु चारिहुँ पासा ।।
हरषि चले निज निज गृह आए । पुनि परिचारक बोलि पठाए ।।
रचहु बिचित्र बितान बनाई । सिर धरि बचन चले सचु पाई ।।
पठए बोलि गुनी तिन्ह नाना । जे बितान बिधि कुसल सुजाना ।।
बिधिहि बंदि तिन्ह कीन्ह अरंभा । बिरचे कनक कदलि के खंभा ।।

---

* श्रीरघुवीर विवाह

परशुराम गेल्यावर जनकराजांनी विश्वामित्रांना वंदन केले. ते म्हणाले, ' रामांनी धनुष्याचा भंग केला. ही आपलीच कृपा होय ! दोन्ही बंधूंनी मला कृतकृत्य केले आहे. हे स्वामिन् ! आता पुढे काय करणे योग्य, त्याविषयी आज्ञा द्यावी ! '

मुनि म्हणाले. ' राजा ! तूं सूज्ञ आहेस. ऐक. धनुर्भंगामुळे जो विवाह व्हावयाचा तो धनुष्य मोडताच झाला. त्याची ग्वाही त्रैलोक्यात (पाताळ, मृत्युलोक स्वर्ग) पसरली ! तथापि तुझ्या वंशात जसा व्यवहार करण्याची पद्धती असेल त्याची, ब्राह्मण, घराण्यातील वृद्ध माणसे व गुरू यांच्याकडून वैदिक आचाराची माहिती घे व त्याप्रमाणे सर्व सांगपणे कर. २८६

दूतांना अयोध्येला पाठवा, म्हणजे ते तिकडे जाऊन दशरथ महाराजांना निमंत्रण देतील व त्याना घेऊन येतील. '

' कृपासागरा ! ठीक ठीक ! ' असे आनंदोद्गार राजाने काढले. लगेच दूताना बोलावून आणवून त्यांची अयोध्येकडे रवानगी केली.

नगरातील सर्व श्रेष्ठीना बोलावून आणले. त्यानी येऊन आदरपूर्वक वंदन केले.

' हे पहा, बाजार, रस्ते, घरे, शंकराचे राजमंदिर, दुसरी देवाल्ये इत्यादि चारी दिशांची ठिकाणे शृंगारून सर्वनगरी उत्तम सजवा ! राजाकडून ही सूचना मिळताच ते आनंदाने आपापल्या घरी आले.

नोकरांना बोलावून अत्यंत उत्कृष्ट मंडप घालण्याची कामगिरी त्यांच्याकडे सोपवली. ती आज्ञा शिरसामान्य करून ते सेवक निघून गेले.

---

* " इतर प्रचलित कोणत्याही रामायणात श्री रघुवीर विवाह इतका विस्तारपूर्वक व इतका निरुपम काव्यसौंदर्याने शृंगारलेला आढळत नाही. शृंगार, वात्सल्य, भक्ती, करुणा इ. शुद्ध कोमल परम सुखदायक रसाचा हा एक अपार सागरच आहे. मर्यादापालन पदोपदी दृष्टीस पडतेच " [गू. चं. मु. प्र. पृ. १, विभाग. ९.]



दो ० — हरित मनिन्ह के पत्र फल पदुमराग के फूल ।
रचना देखि बिचित्र अति मनु बिरंचि कर भूल ।। २८७ ।।

चौ ० — बेनु हरित मनिमय सब कीन्हे । सरल सपरब परहिं नहिं चीन्हे ।।
कनक कलित अहिबेलि बनाई । लखि नहिं परइ सपरन सुहाई ।।
तेहि के रचि पचि बंध बनाए । बिच बिच मुकुता दाम सुहाए ।।
मानिक मरकत कुलिस पिरोजा । चीरि कोरि पचि रचे सरोजा ।।
किए भृंग बहुरंग बिहंगा । गुंजहिं कूजहिं पवन प्रसंगा ।।
सुर प्रतिमा खंभन गढ़ि काढ़ीं । मंगल द्रब्य लिएँ सब ठाढ़ीं ।।
चौकें भाँति अनेक पुराईं । सिंधुर मनिमय सहज सुहाईं ।।

दो० — सौरभ पल्लव सुभग सुठि किए नीलमनि कोरि ।
हेम बौर मरकत घवरि लसत पाटमय डोरि ।। २८८ ।।

चौ० — रचे रुचिर बर बंदनिवारे । मनहुँ मनोभवँ फंद सँवारे ।।
मंगल कलस अनेक बनाए । ध्वज पताक पट चमर सुहाए ।।
दीप मनोहर मनिमय नाना । जाइ न बरनि बिचित्र बिताना ।।

मंडप घालण्यात ज्यांचा हातखंडा आहे अशा कुशल कारागिराना आणवले. त्यानी सृष्टिकर्त्याला वंदन करून मंडपाच्या कामास सुरवात केली. त्यांनी सोन्याच्या केळीचे खांब प्रथम उभे केले. हिरव्या रंगाच्या रत्नांची पाने व फळे पद्मपरागांची फुले इतकी सुंदर बनवली की ही मानवी कृती की आपलीच कृती याबद्दल विरंचीच्या मनातसुद्धा संशय उत्पन्न झाला असता. २८७

सर्व वेळू हिरव्या रत्नांचेच बनवले. ते इतके सरळ व त्यांची कांडी इतकी बेमालूम की कोणालाच ओळखता येणार नाही ! सोन्याच्याच सुंदर नागवेली (विड्याच्या पानांच्या वेली) बनवून त्याना तसलीच तुळतुळीत पाने फुटलेली बेमालूमपणे दाखवली. त्यांचेच कोरून काढून बांधण्याचे दोर तयार केले आणि त्यांच्यात मधेमधे मोत्यांच्या झालरी लावल्या !

माणिक, नीलमणी मरकत, हिरे व पिरोज या रत्नांना चिरून, त्यांच्यात खोदकाम केले व त्यांची सुंदर बहुरंगी कमले तयार केली. विशेष कौतुकाची करणी म्हणजे वाऱ्याबरोबर गुंजारव करणारे भुंगे व गाणारे निरनिराळ्या रंगाचे पक्षीही त्यांनी तयार करून योग्य ठिकाणी त्यांना बसवले ! मंगल वस्तू हातात घेऊन उभ्या राहिलेल्या खांबात देवांच्या मूर्तींची दर्शने होऊ लागली. गजमुक्ताफलाच्या अनेक प्रकारच्या काढलेल्या रांगोळ्या स्वाभाविकपणेच खुलून दिसू लागल्या. नीलमणी कोरून अत्यंत सुंदर असे आम्रपल्लव टांगले. त्यावर सोन्याचा मोहोर आला. त्यातील बारीक आम्रफळे (कैऱ्या) पाचूची केली, व त्यांना रेशमी दोरीने जागोजागी टांगले होते. २८८

कामदेवाने आपले पाशच जणू काही लावले आहेत, अशी शोभिवंत तोरणे सर्वत्र लावली. अनेक मंगल कलश, सुंदर ध्वजा, पताका, पडदे व चवऱ्या तिकडे तिकडे विलसू लागल्या ! अनेक प्रकारच्या रत्नांचे दीप योग्य ठिकाणी पक्के बसवून टाकले. अशा प्रकारच्या त्या अतुल्य मंडपाचे कोठवर वर्णन करावे ?



जेहिं मंडप दुलहिनि बैदेही । सो बरनै असि मति कबि केही ॥
दूलहु रामु रूप गुन सागर । सो बितानु तिहुँ लोक उजागर ॥
जनक भवन कै सोभा जैसी । गृह गृह प्रति पुर देखिअ तैसी ॥
जेहिं तेरहुति तेहि समय निहारी । तेहि लघु लगहिं भुवन दस चारी ॥
जो संपदा नीच गृह सोहा । सो बिलोकि सुरनायक मोहा ॥

दो०—बसइ नगर जेहिं लच्छि करि कपट नारि बर बेषु ।
तेहि पुर कै सोभा कहत सकुचहिं सारद सेषु ॥ २८९ ॥

चौ०—पहूँचे दूत राम पुर पावन । हरषे नगर बिलोकि सुहावन ॥
भूप द्वार तिन्ह खबरि जनाई । दसरथ नृप सुनि लिए बोलाई ॥
करि प्रनामु तिन्ह पाती दीन्ही । मुदित महीप आपु उठि लीन्ही ॥
बारि बिलमोचन बाँचत पाती । पुलक गात आई भरि छाती ॥
रामु लखनु उर कर बर चीठी । रहि गए कहत न खाटी मीठी ॥
पुनि धरि धीर पत्रिका बाँची । हरषी सभा बात सुनि साँची ॥
खेलत रहे तहाँ सुधि पाई । आए भरतु सहित हित भाई ॥

ज्या लग्न मंडपात वैदेही नवरी येणार, त्याचे बरोबर वर्णन करू शकेल, एवढी बुद्धिमत्ता असणारा कवी कुठे असणार ? आणि रूप व गुण यांचा सागर असणारा श्रेष्ठ नवरदेव राम ज्याच्यात पदार्पण करणार तो मंडप त्रैलोक्यात चमकलाच पाहिजे !

ज्याप्रमाणे जनकराजांचा राजवाडा विभूषित केला होता, तशाच प्रकारची शोभा मिथिला नगरीतील प्रत्येक घराला आणली होती. त्यावेळी ज्यांनी कोणी विदेहपुरी पाहिली असेल, त्यांना चौदाही भुवने क्षुद्रच वाटली असणार ! अत्यंत खालच्या दर्जाच्या गृहस्थाच्या घरालाही जी संपत्ती भूषवित होती, ती पाहून देवराज इंद्रालासुद्धा हे वैभव आपणाला असावे अशी लालूच वाटेल !

ज्या नगरीत, अतुल्य सुंदर वेष धारण करून, गुप्तपणे प्रत्यक्ष लक्ष्मीने आपला मुक्काम ठेवला आहे, तिची शोभा वर्णन करण्यास शेष आणि सरस्वतीसुद्धा लाजतात. २८९

पावन अशा रामाच्या नगरात दूत येऊन दाखल झाले. त्या नगरीचे सौंदर्य पाहून त्यांना हर्ष झाला. राजदारी जाऊन, त्यांनी आपण आल्याची बातमी कळवली. आतून उलट निरोप पाठवून दशरथमहाराजांनी त्यांना बोलावून घेतले. प्रणाम करून त्यांनी बरोबर आणलेले पत्र महाराजांना अर्पण केले. अत्यंत आनंदाने ते पत्र उठून स्वतः राजांनी घेतले.

पत्राचे वाचन चालू झाले. तसे राजांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. अंगावर रोमांच उभे राहिले; छाती भरून आली. हातात ती मंगलपत्रिका, हृदयात राम आणि लक्ष्मण, पत्रातील मजकूर शुभ की अशुभ ते बोलवतच नसल्याने राजा काही काळ स्तब्ध राहिला. थोडा वेळ असा गेला. सभेतील लोकांची मनःस्थिती फारच ताणली गेली. मग धीर धरून महाराजांनी ते पत्र मोठ्याने वाचले. तो सर्व सत्य वृत्तान्त ऐकून सर्व सभेला हर्ष झाला.

शत्रुघ्न व भरत खेळ खेळत असता, ही बातमी त्यांच्या कानावर आली. आपल्या सोबत्यांसह ते



पूछत अति सनेहँ सकुचाई। तात कहाँ तें पाती आई ।।

दो० — कुसल प्रानप्रिय बंधु दोउ अहहिं कहहु केहिं देस।
सुनि सनेह साने बचन बाची बहुरि नरेस ।। २९० ।।

चौ० — सुनि पाती पुलके दोउ भ्राता। अधिक सनेहु समात न गाता ।।
प्रीति पुनीत भरत कै देखी। सकल सभाँ सुखु लहेउ बिसेषी ।।
तब नृप दूत निकट बैठारे। मधुर मनोहर बचन उचारे ।।
भैआ कहहु कुसल दोउ बारे। तुम्ह नीकें निज नयन निहारे ।।
स्यामल गौर धरें धनु भाथा। बय किसोर कौसिक मुनि साथा ।।
पहिचानहु तुम्ह कहहु सुभाऊ। प्रेम बिबस पुनि पुनि कह राऊ ।।
जा दिन तें मुनि गए लवाई। तब तें आजु साँचि सुधि पाई ।।
कहहु बिदेह कवन बिधि जाने। सुनि प्रिय बचन दूत मुसुकाने ।।

दो० — सुनहु महीपति मुकुट मनि तुम्ह सम धन्य न कोउ।
रामु लखनु जिन्ह के तनय बिस्व बिभूषन दोउ ।। २९१ ।।

चौ० — पूछन जोगु न तनय तुम्हारे। पुरुषसिंघ तिहु पुर उजिआरे ।।
जिन्ह के जस प्रताप कें आगे। ससि मलीन रबि सीतल लागे ।।
तिन्ह कहँ कहिअ नाथ किमि चीन्हे। देखिअ रबि कि दीप कर लीन्हे ।।

ताबडतोब दरबारात आले. प्रेमाने पण संकोचाने हळूच त्यांनी विचारले, “बाबा! हे पत्र? आता आले? कुठून आले ते? आमचे प्राणप्रिय बंधू, दोघेजण, कुशल आहेत ना? कुठे आहेत ते?”

हे त्यांचे प्रेमळ प्रश्न ऐकून नरपतींनी ते पत्र पुनः वाचावयास घेतले. २९०.

पत्राचे वाचन चालू असता त्या दोघा बंधूंच्याही अंगावर रोमांच उभे राहिले. प्रेमाच्या भावनांनी अंतःकरण भरून आले. रामावरील भरताचे ते शुद्ध प्रेम पाहून सर्व सभेने आपल्या हृदयात एका विशेष सुखाची गाठ बांधून ठेवली!

त्यानंतर दशरथराजांनी, त्या दूतांना आग्रहपूर्वक आपल्या अगदी जवळ बसवले व मधुर, मनोहर भाषण केले, “बाबांनो! माझी बाळे कुशल आहेत ना? तुम्ही, नीटपणे आपल्या डोळ्यांनी, त्यांना पाहिले काय? एक श्याम वर्णाचा, एक गोरा; दोघांच्या जवळ धनुष्ये व भाते; किशोर वय, विश्वामित्र ऋषी त्यांच्या-बरोबर! तुम्ही अशी जोडी पाहिलीच म्हणता, तर मग त्यांच्या स्वभावाची माहिती सांगा बरं!”

प्रेमविवश होऊन राजाने त्या दूतांना असे कितीदा तरी विचारले. “मुनिश्रेष्ठ त्यांना घेऊन गेले, त्या दिवसापासून त्यांचे खरे क्षेम आज कळले. जनक राजाने त्यांना कसे ओळखले, ते सांगा पाहू!”

प्रेमाने भारलेले हे शब्द कानी पडल्यावर, दूत हसले! ते म्हणतात, “हे राजांचे मुकुटमणी, महाराज! सर्व विश्वाचे भूषण असणारे, राम-लक्ष्मण-दोन मुलगे ज्याला आहेत, असा तुमच्यासारखा धन्य कोणीच नाही!” २९१

आपल्या मुलांची चौकशी करण्याचा प्रश्नच उत्पन्न होत नाही. सर्व जगाला दिपवणारे ते दोन पुरुषसिंह आहेत! त्यांच्या यश-प्रतापापुढे चंद्र निस्तेज व सूर्य गार वाटू लागतात. त्यांना कसे ओळखले, असे प्रभूंनी विचारले; हातात दिवा घेऊन का सूर्याला बघतात?

सीय स्वयंबर भूप अनेका । समिटे सुभट एक तें एका ॥
संभु सरासनु काहुँ न टारा । हारे सकल बीर बरिआरा ॥
तीनि लोक महँ जे भटमानी । सभ कै सकति संभु धनु भानी ॥
सकइ उठाइ सरासुर मेरू । सोउ हियँ हारि गयउ करि फेरू ॥
जेहि कौतुक सिवसैलु उठावा । सोउ तेहि सभाँ पराभउ पावा ॥

दो० — तहाँ राम रघुबंसमनि सुनिअ महा महिपाल ।
भंजेउ चाप प्रयास बिनु जिमि गज पंकज नाल ॥ २९२ ॥

चौ० — सुनि सरोष भृगुनायकु आए । बहुत भाँति तिन्ह आँखि देखाए ॥
देखि राम बलु निज धनु दीन्हा । करि बहु बिनय गवनु बन कीन्हा ॥
राजन रामु अतुलबल जैसें । तेज निधान लखनु पुनि तैसें ॥
कंपहिं भूप बिलोकत जाकें । जिमि गज हरि किसोर के ताकें ॥
देव देखि तव बालक दोऊ । अब न आँखि तर आवत कोऊ ॥
दूत बचन रचना प्रिय लागी । प्रेम प्रताप बीर रस पागी ॥
सभा समेत राउ अनुरागे । दूतन्ह देन निछावरि लागे ॥
कहि अनीति ते मूदहिं काना । धरमु बिचारि सबहिं सुखु माना ॥


दो० — तब उठि भूप बसिष्ट कहुँ दीन्हि पत्रिका जाइ ।
कथा सुनाई गुरहि सब सादर दूत बोलाइ ॥ २९३ ॥

" सीतेच्या स्वयंवराच्या वेळी, एकापेक्षा एक, मोठे रणशूर असे सगळे राजे एकत्र जमले. पण शिवधनुष्य एकालाही नुसते उचललेसुद्धा नाही. त्यामुळे मोठे बलवान् म्हणणारे सगळे वीर पराभूत झाले. त्रैलोक्यातील सर्व मी मी म्हणणाऱ्या घमेंडखोर शूर वीरांची, शंभुधनुष्याने खोडच मोडली! ज्याने प्रत्यक्ष मेरूपर्वत उचलला अशा बाणासुराने मनात कच खाऊन पाठ फिरवली! ज्याने कैलासपर्वत लीलेने उचलला, तो बलाढ्य रावणही सर्व सभेत पराभूत झाला! महाराज, ऐका! अशा ठिकाणी, रघुवंशमणी रामाने, ज्याप्रमाणे एखाद्या कमळाचा देठ तोडावा तसे, सहज लीलेने त्या धनुष्याचे तुकडे करून टाकले!" २९२

" हे समजताच संतापून भृगुपती आले. नाना प्रकारांनी दाबले व धमकावणी दिली! अखेर रामाचे बल पाहून आपले धनुष्य त्यांच्या स्वाधीन केले. पश्चात्तापपूर्वक भरपूर स्तवन करून ते वनात गेले. महाराज, रामाचे जसे बल अतुल्य आहे, तसेच लक्ष्मणही तेजाचे निधान आहेत. त्यांनी नुसती दृष्टी टाकल्याबरोबर, सिंहाच्या छाव्याच्या पुढे जशी गजश्रेष्ठांची स्थिती होते, त्याप्रमाणे राजेलोक थरथर कापू लागतात. राजाधिराज! आपल्या दोन्ही बालकांना [illegible] जगात दुसऱ्या कोणालाच पाहून समाधान होऊ शकत नाही."

दूतांची सांगण्याची पद्धत दशरथमहाराजांना आवडली. प्रेम, ऐश्वर्य व वीररसभरित वृतान्त ऐकून राजा व सर्व सभासद प्रसन्न झाले व त्यांनी दूतांना बक्षिसे देण्यास काढली. पण 'अनीती' म्हणून त्यांनी कानावर हात ठेवले. त्यांचे ते धर्माचरण पाहून सर्वांना सुख झाले.

महाराजांनी लगेच स्वतःच ते पत्र आश्रमात जाऊन वसिष्ठ गुरूंना दिले. दूतांना आणवून आदरपूर्वक सर्व वृत्तान्त त्यांना समक्ष कथन करवला. २९३



चौ०– मुनि बोले गुर अति सुखु पाई। पुन्य पुरुष कहुँ महि सुख छाई।
जिमि सरिता सागर महुँ जाहीं। जद्यपि ताहि कामना नाहीं॥
तिमि सुख संपति बिनहिं बोलाएँ। धरमसील पहिं जाहिं सुभाएँ॥
तुम्ह गुर बिप्र धेनु सुर सेबी। तसि पुनीत कौसल्या देबी॥
सुकृती तुम्ह समान जग माहीं। भयउ न है कोउ होनेउ नाहीं॥
तुम्ह ते अधिक पुन्य बड़ काकें। राजन राम सरिस सुत जाकें॥
बीर बिनीत धरम ब्रत धारी। गुन सागर बर बालक चारी॥
तुम्ह कहुँ सर्ब काल कल्याना। सजहु बरात बजाइ निसाना॥

दो०– चलहु बेगि सुनि गुर बचन भलेहिं नाथ सिरु नाइ।
भूपति गवने भवन तब दूतन्ह बासु देवाइ॥ २९४॥

चौ०– राजा सबु रनिवास बोलाई। जनक पत्रिका बाचि सुनाई॥
सुनि संदेसु सकल हरषानीं। अपर कथा सब भूप बखानीं॥
प्रेम प्रफुल्लित राजहिं रानी। मनहुँ सिखिनि सुनि बारिद बानी॥
मुदित असीस देहिं गुर नारीं। अति आनंद मगन महतारीं॥
लेहिं परस्पर अति प्रिय पाती। हृदयँ लगाइ जुड़ावहिं छाती॥
राम लखन कै कीरति करनी। बारहिं बार भूपबर बरनी॥

सर्व समाचार श्रवण करून गुरूंना परमसुख झाले. ते राजाला म्हणतात, राजा, "पुण्य पुरुषाला ही सर्वच पृथ्वी सुखाने परिपूर्ण भरलेली असते. सागराला काय सर्व नद्यांनी आपणास येऊन मिळावे अशी कामना असते? पण सर्व नद्या जाऊन त्यालाच मिळतात ना? त्याचप्रमाणे इच्छा नसतानाच धर्मशील पुरुषांकडे सर्व सुख-संपत्तीची साधने आपण होऊन एकत्र होतात!

"तुम्ही स्वतः गुरू, विप्र, गायी, देव यांची कायावाचामनाने सेवा करणारे, त्याचप्रमाणे शुद्ध शीलाची कौसल्यादेवीही आहे. तुमच्याप्रमाणे पुण्यवान् या पृथ्वीच्या पाठीवर पूर्वी कोणी झाला नाही. आता विद्यमान तर नाहीच, पण भविष्यकाळीही होणे शक्य नाही! खरोखर पाहता ज्यांना रामासारखे पुत्र झाले, त्यांच्यापेक्षा अधिक मोठे पुण्य कोणाचे असणार? चारी पुत्र वीर, विनयी, धर्माचाराप्रमाणे वागणारे, सर्व गुण संपन्न असेच आहेत. तुमचे अखंड कल्याण होवो. जा. डंके पिटून वऱ्हाड सजवण्याकरिता जरूर ते हुकूम सोडा."

"चला शीघ्र," हे गुरुजींचे शब्द ऐकताच "बरे आहे, प्रभो!" असे चरणावर मस्तक ठेवून राजांनी सांगितले व दूतांना योग्य अशी उतरण्यास जागा देववून महाराज राजवाड्यात परतले. २९४

राजांनी सर्व राण्यांना एकत्र जमवून जनकांची ती निमंत्रण पत्रिका (तिसऱ्यांदा!) वाचून दाखवली. कानांवर पडताच सर्वांना केवढा हर्ष झाला! राजाने इतर सर्व तपशीलवार कथा, चुरचुरीत शब्दांत शिस्तीने सांगितल्या! मेघगर्जना ऐकून ज्याप्रमाणे मयूरी संतुष्ट होतात, तशा प्रेमाने टवटवीत उमललेल्या राण्या शोभू लागल्या! गुरुपत्नींनी संतुष्ट होऊन आशीर्वचन दिल्यामुळे सर्व माता आनंदसागरात पोहू लागल्या!

अत्यंत आवडीचे ते पत्र एकीच्या हातून दुसरीने घ्यावे व ते आपल्या हृदयावर ठेवून त्याला शांतवावे, असा प्रकार सुरू झाला! रामलक्ष्मणाची शौर्यवीर्याची कृती व त्यांची कीर्ती भूपाने किती वेळा वर्णन करून

मुनि प्रसादु कहि द्वार सिधाए। रानिन्ह तब महिदेव बोलाए ॥
दिए दान आनंद समेता। चले बिप्रबर आसिष देता ॥
सो०— जाचक लिए हँकारि दीन्हि निछावरि कोटि बिधि।
चिरु जीवहुँ सुत चारि चक्रबर्ति दसरत्थ के ॥ २९५ ॥
चौ०— कहत चले पहिरें पट नाना। हरषि हने गहगहे निसाना ॥
समाचार सब लोगन्ह पाए। लागे घर घर होन बधाए ॥
भुवन चारि दस भरा उछाहू। जनकसुता रघुबीर बिआहू ॥
सुनि सुभ कथा लोग अनुरागे। मग गृह गलीं सँवारन लागे ॥
जद्यपि अवध सदैव सुहावनि। राम पुरी मंगलमय पावनि ॥
तदपि प्रीति कै प्रीति सुहाई। मंगल रचना रची बनाई ॥
ध्वज पताक पट चामर चारू। छावा परम बिचित्र बजारू ॥
कनक कलस तोरन मनि जाला। हरद दूब दधि अच्छत माला ॥
दो० — मंगलमय निज निज भवन लोगन्ह रचे बनाइ।
बीथीं सींचीं चतुरसम चौकें चारु पुराइ ॥ २९६ ॥
चौ० — जहँ तहँ जूथ जूथ मिलि भामिनि। सजि नव सप्त सकल दुति दामिनि ॥
बिधुबदनीं मृग सावक लोचनि। निज सरूप रति मानु बिमोचनि ॥

सांगावी, याला मर्यादाच राहिली नाही! "शेवटी ही सर्व विश्वामित्रांचीच कृपा!" असे म्हणून ते बाहेर पडले.

राण्यांनी ब्राह्मणांना बोलावून आणले. आनंदाने त्याना दाने दिली. विप्रवर शुभाशीर्वाद देऊन परतले. किती पदार्थ ओवाळून टाकून ते याचकांना दिले त्यांची गणती नाही! त्यांच्या सर्वांच्या मुखातून एकच उद्गार बाहेर पडे. "चक्रवर्ती दशरथ महाराजांचे चार तनय चिरंजीव होवोत. त्यांना उदड आयुष्य मिळो!!" २९५

याप्रमाणेच मुखाने म्हणत नाना प्रकारची सुंदर वस्त्रे परिधान करून त्या आनंदातिशयात वाजंत्री, नगारे जोरजोराने धमाधम वडवू लागले! त्यामुळे सर्व अयोध्यापुरीत ही आनंदाची बातमी विजेच्या वेगाने पसरली. प्रत्येक घरात आनंदोत्सव सुरू झाला. हा आनंद चौदा भुवनांत तुडुंब भरून राहिला! सारांश, रघुवीर व जनक यांचा विवाह होणार!

लोकांना हे शुभवृत्त समजताच, त्यांनी रस्ते व बोळ, घरे इत्यादि सजवण्यास सुरुवात केली. अयोध्यापुरी ही पवित्र, मंगलमय अशी रामपुरी असल्याने जरी नेहमीच शोभन असते तरीही प्रीतीची रीत काही औरच असते! लोकांनी मनोहर, मंगल, सुंदर अशी रचना करण्याचा सपाटा लावला! छान छान ध्वज, पताका, पडदे, चवऱ्या इत्यादींच्या साहाय्याने सर्व बाजार अतिशय विलक्षण रीतीने नटवले! सुवर्णकलश, तोरणे, मोत्याच्या झालरी, हळद-कुंकू, दही, अक्षता, माळा, ही साधने घेऊन लोकांनी आपापली घरे सजवून सुगंधी मांगल्याने भरून काढली. रस्ते, चव्हाटे इत्यादींवर चतुरसम नावाच्या सुगंधी द्रव्याचे सडे टाकून त्यावर सुंदर सुंदर रांगोळ्या घातल्या. २९६ [चतुरसम=केशर, कस्तूरी, कंकोळ व अगरु-कंकोळाऐवजी कापूर समप्रमाण.]

विजेप्रमाणे तेजाने तळपणाऱ्या तरुण सुंदर स्त्रिया, अंगावर [पायाच्या बोटापासून गळ्यापर्यंत ९ स्थाने व साधारण मानाने नाकापासून केशान्तापर्यंत ७ आहेत.] पायाची बोटे, घोटे, कमर, हात, मनगट, कोपर, दंड, बाहू, गळा, नाक, कान, कपाळ, मस्तकवेणी, षोडश अलंकार घालून, थव्याथव्यांनी जागोजागी गोळा



गावहिं मंगल मंजुल बानीं । सुनि कलरव कलकंठि लजानीं ।।
भूप भवन किमि जाइ बखाना । बिस्व बिमोहन रचेउ बिताना ।।
मंगल द्रब्य मनोहर नाना । राजत बाजत बिपुल निसाना ।।
कतहुँ बिरिद बंदी उच्चरहीं । कतहुँ बेद धुनि भूसुर करहीं ।।
गावहिं सुंदरि मंगल गीता । लै लै नामु रामु अरु सीता ।।
बहुत उछाहु भवनु अति थोरा । मानहुँ उमगि चला चहु ओरा ।।

दो० — सोभा दसरथ भवन कइ को कबि बरनै पार ।
जहाँ सकल सुर सीस मनि राम लीन्ह अवतार ।। २९७ ।।

चौ० — भूप भरत पुनि लिए बोलाई । हय गय स्यंदन साजहु जाई ।।
चलहु बेगि रघुबीर बराता । सुनत पुलक पूरे दोउ भ्राता ।।
भरत सकल साहनी बोलाए । आयसु दीन्ह मुदित उठि धाए ।।
रचि रुचि जीन तुरग तिन्ह साजे । बरन बरन बर बाजि बिराजे ।।
सुभग सकल सुठि चंचल करनी । अय इव जरत धरत पग धरनी ।।
नाना जाति न जाहिं बखाने । निदरि पवनु जनु चहत उड़ाने ।।
तिन्ह सब छयल भए असवारा । भरत सरिस बय राजकुमारा ।।
सब सुंदर सब भूषनधारी । कर सर चाप तून कटि भारी ।।

झाल्या ! सगळ्याच स्त्रिया चंद्रमुखी, हरिणाच्या पाडसाप्रमाणे मनोहर नेत्राच्या, आपल्या लावण्याने रतीला लाजविणाऱ्या अशा होत्या. त्यांनी मंजुळ-मंगल गाणी गोड आवाजात म्हणण्यास प्रारंभ करताच त्या आवाजापुढे कोकिळेचा आवाज फिका पडला ! राजवाड्याच्या सजावटीचे वर्णन बरोबर करणे अशक्यच ! सर्व विश्वाला मोह पडेल असा मंडप घालण्यात आला. अनेक मंगल वस्तूंचा संभार शोभू लागला. त्याचप्रमाणे अनेक प्रकारे नगाऱ्यांचे खच्चून आवाज सुरू झाले. कुठे बंदी—मागध—भाटांनी ब्रीदाचा उच्चार करावा, तर कुठे विप्रांचा वेदघोष कानी पडावा, तर कुठे सुंदरींची मंगल गीते, राम सीता ही नावे त्यात गोवून म्हटलेली ऐकावीत त्या महोत्सवाला चोहोकडून एवढा पूर आला की, तो प्रशस्त राजवाडा त्याला अगदीच तुटपुंजा होऊ लागला. अशाप्रकारे ज्याठिकाणी आनंदाचा सोहळा शिगेला पोचला होता त्या दशरथभवनाचे कोणता कवी पूर्णपणे वर्णन करू शकेल की, ज्याठिकाणी सर्व देवांचा अधिदेव जो राम त्याने अवतार धारण केला होता. २९७

राजांनी भरताला बोलावून घेतला व सांगितले की, "हत्ती घोडे, रथ उत्तम प्रकारे सजवा. रघुवीराच्या वऱ्हाडाची तयारी करा." ही राजाज्ञा ऐकून भरताच्या हृदयात प्रेम-भक्तियुक्त भावनांची भरती येऊन अंगावर रोमांच उभे राहिले ! लगेच भरताने सर्व कोतवाल अधिकाऱ्यांना (प्रत्येक खात्याच्या) जवळ बोलावून त्यांना योग्य आज्ञा दिल्या. ते आनंदाने आपापल्या कामगिरीवर धावत सुटले !

खोगीर घालून, आवडीप्रमाणे अनेक रंगाचे मनोहर घोडे, सज्ज केले. सर्वच घोडे सुंदर असून इतके चपळ चरणांचे होते की, त्याचे पाय जणू काही लाल तापलेल्या लोखंडावरच पडत आहेत ! इतक्या जातीचे ते घोडे होते की, त्यांची पुरी यादी देणेच अशक्य ! जणू काही वाऱ्याला जिंकून उड्डाण करण्याचीच त्याची धडपड आहे ! भरताच्याच वयाचे सर्व शोकिन राजकुमार त्या घोड्यावर स्वार झाले. निवडक, सुबक, सुरूप, शूर, शहाणे व तरुण असे सगळे राजकुमार होते. त्यांच्या अंगावर उत्तम दागदागिने घातलेले, हातात धनुष्य-

दो०— छरे छबीले छयल सब सूर सुजान नबीन ।
जुग पदचर असवार प्रति जे असिकला प्रबीन ।। २९८ ।।

चौ०—बाँधें बिरद बीर रन गाढ़े । निकसि भए पुर बाहेर ठाढ़े ।।
फेरहिं चतुर तुरग गति नाना । हरषहिं सुनि सुनि पनव निसाना ।।
रथ सारथिन्ह बिचित्र बनाए । ध्वज पताक मनि भूषन लाए ।।
चवँर चारु किंकिनि धुनि करहीं । भानु जान सोभा अपहरहीं ।।
सावँकरन अगनित हय होते । ते तिन्ह रथन्ह सारथिन्ह जोते ।।
सुंदर सकल अलंकृत सोहे । जिन्हहि बिलोकत मुनि मन मोहे ।।
जे जल चलहिं थलहि की नाईं । टाप न बूड़ बेग अधिकाईं ।।
अस्त्र सस्त्र सबु साजु बनाई । रथी सारथिन्ह लिए बोलाई ।।

दो०— चढ़ि चढ़ि रथ बाहेर नगर लागी जुरन बरात ।
होत सगुन सुंदर सबहि जो जेहि कारज जात ।। २९९ ।।

चौ०— कलित करिबरन्हि परीं अँबारीं । कहि न जाहिं जेहि भाँति सँवारीं ।।
चले मत्त गज घंट बिराजी । मनहुँ सुभग सावन घन राजी ।।
बाहन अपर अनेक बिधाना । सिबिका सुभग सुखासन जाना ।।
तिन्ह चढ़ि चले बिप्रबर बृंदा । जनु तनु धरें सकल श्रुति छंदा

बाण व कमरेस भरगच्च भाता होता. तलवारीच्या युद्धात निपुण असणारे पायदळांपैकी दोन दोन सैनिक प्रत्येक घोडेस्वाराबरोबर ठेवले होते. अशा प्रकारचा तो एकंदर थाट झाला. २९८

वीरवेषात शोभणारे हे सर्व रणशूर, पुरीबाहेर निघून तेथे थांबले, नानाप्रकारच्या चालीवर आपापले घोडे ते फिरवीत होते. (पणव व निशाण, ढोल व नगारा) यांच्या आवाजाने त्यांना हर्ष होई. रथ व सारथी विचित्र प्रकारे सजवले होते. ध्वज, पताका आणि रत्नखचित दागिने यांनी ते भूषविले होते. उत्तम चवऱ्या व घागऱ्यांचा मंजुळ आवाज होत होता. त्यामुळे हे रथ सूर्याच्या रथालाही शोभेत मागे टाकीत होते. श्यामकर्ण घोडे वाटेल तेवढे होते म्हणून सारथ्यानी तेच आणून रथांना जोडले. सगळे अलंकार घालून ते घोडे इतके नटवले होते की, त्याच्या सौंदर्याने मुनींच्या मनालासुद्धा मोह उत्पन्न होई. त्या घोड्यांचे वैशिष्ट्य असे की, ते जमिनीवर उत्तम पळतच पण पाण्यावरून अशा वेगाने उड्डाण करीत की त्यांची टापही पाण्यात बुडत नसे. शस्त्रास्त्रांनी सुसज्ज केलेले असे रथ तयार होताच सारथ्यांनी रथींना जमवले. प्रत्येक रथी आपल्या रथात बसताच, त्याचा सारथी रथ गावाबाहेर आणी. याप्रमाणे वरातीतील रथ आता एकत्र जमू लागले, जे जे ज्या कार्याला जात त्या सर्वांना शुभ शकुन होत असल्यामुळे त्याचा उत्साह द्विगुणित होई. २९९

सुंदर हत्तीच्या पाठीवर छानदार अंबाऱ्या घालून त्याना असे रंगवून तयार केले होते की, त्याचे वर्णनच पुरे होणार नाही ! ते मत्त हत्ती सपाट्याने चालू लागल्यानंतर त्यांच्या सर्वांच्या घंटाचा असा एकत्रित नाद होई की, जणु श्रावणातील सुंदर मेघांच्या पंक्तीच चालल्या आहेत. याशिवाय पालख्या, मेणे, डोली इत्यादि दुसरी अनेक वाहने होती की, ज्यात बसण्याची उत्तम व्यवस्था केल्याने त्यात बसल्यावर सुखाचा प्रवास व्हावा ! त्यात बसून श्रेष्ठ असे ब्रह्मवृंद निघाले. ते पाहून वेद व उपनिषदेच तिनकी शरीरे धारण करून जात आहेत असे वाटे.



मागध सूत बंदि गुनगायक । चले जान चढ़ि जो जेहि लायक ॥
बेसर ऊँट बृषभ बहु जाती । चले बस्तु भरि अगनित भाँती ॥
कोटिन्ह काँवरि चले कहारा । बिबिध बस्तु को बरनै पारा ॥
चले सकल सेबक समुदाई । निज निज साजु समाजु बनाई ॥
दो० —सब कें उर निर्भर हरषु पूरित पुलक सरीर ॥
कबहिं देखिबे नयन भरि रामु लखनु दोउ बीर ॥ ३०० ॥
चौ०—गरजहिं गज घंटा धुनि घोरा । रथ रव बाजि हिंस चहु ओरा ॥
निदरि घनहि घुर्म्मरहिं निसाना । निज पराइ कछु सुनिअ न काना ॥
महा भीर भूपति कै द्वारें । रज होइ जाइ पषान पबारें ॥
चढ़ीं अटारिन्ह देखहिं नारीं । लिएँ आरती मंगल थारीं ॥
गावहिं गीत मनोहर नाना । अति आनंदु न जाइ बखाना ॥
तब सुमंत्र दुइ स्यंदन साजी । जोते रबि हय निंदक बाजी ॥
दोउ रथ रुचिर भूप पहिं आने । नहिं सारद पहिं जाहिं बखाने ॥
राज समाजु एक रथ साजा । दुसर तेज पुंज अति भ्राजा ॥
दो० —तेहिं रथ रुचिर बसिठ कहुँ हरषि चढ़ाइ नरेसु ।
आपु चढ़ेउ स्यंदन सुमिरि हर गुर गौरि गनेसु ॥ ३०१ ॥

मागध-सूत-बंदी गुणगायकादि सर्व मंडळी स्वतःला योग्य अशा वाहनात बसून बाहेर पडली. त्याचप्रमाणे खेचरे, उंट, बैल अनेक प्रकारचे जरूर त्या सर्व सामानांनी लादून पुढे निघाले. याशिवाय ज्या वस्तू कावडीतून (द्रवपदार्थ तेले, तूप , ताक, दही इ.) नेणे भाग होते. त्या साठी कोट्यवधी कावडीवाले विविध अगणित वस्तू भरून वाट चालू लागले. सर्व सेवक आपापल्या समाजाबरोबर थव्याथव्यांनी नटून निघाले.

सर्वांचीच हृदये "कधि पाहू डोळे भरून राम नि लक्ष्मण वीर" या अपेक्षेने इतकी आनंदोत्सुक झाली होती की, मधून मधून त्या भावनेच्या उद्रेकाबरोबर त्यांचे शरीर पुलकित होई ! ३००

हत्तीच्यावरील घंटांचा घणघणाट चारी दिशांना चक्कर मारणाऱ्या रथाच्या घोड्याचे खेंकाळणे, मेघाच्या गर्जनेची जणू काही निंदा करण्यासाठीच होणारा भेरीचा गंभीर धडधडाट या सर्व आवाजात एकमेक कोण काय बोलत आहे हे कळण्याची मोठीच पंचाईत झाली ! राजवाड्यासमोर एवढी गर्दी उसळली की एखादा दगड जर वाटेत फेकला तर बोलबोल म्हणता त्याचे पीठ होऊन जाई ! ही वरात निघाल्यानंतर ओवाळण्यासाठी हातात मंगल आरती घेऊन स्त्रिया जागजागी गच्च्यावर चढून पाहात उभ्या होत्या ! त्यांची मंगल गीते सुस्वर चालू होती. एकंदरीत सर्वच आनंदाला अमर्याद भरती आली होती.

सूर्याच्या घोड्याना गतीत पराभूत करणारे घोडे जोडून, सुमंत्राने दोन रथ तयार केले. असे हे सुंदर रथ दशरथ राजाच्या जवळ आणले त्यांचे वर्णन सरस्वतीलाही करता येणे अशक्य आहे. एका रथात राजेसाहेबांना जरूर लागणाऱ्या सर्व वस्तु ठेवल्या व दुसरा अत्यंत दैदीप्यमान रथ होता त्या मनोहर रथात मोठ्या उल्हासाने वसिष्ठ गुरुजीना चढवले आणि नंतर हर, गुरु, गौरी आणि गणेश या देवतांचे चिंतन करून स्वतः दशरथ त्याच रथात बसले. ३०१

चौ ०–सहित बसिष्ठ सोह नृप कैसें । सुर गुर संग पुरंदर जैसें ।।
करि कुल रीति वेद विधि राऊ । देखि सबहि सब भाँति बनाऊ ।।
सुमिरि रामु गुर आयसु पाई । चले महीपति संख बजाई ।।
हरषे बिबुध बिलोकि बराता । बरषहिं सुमन सुमंगल दाता ।।
भयउ कोलाहल हय गय गाजे । ब्योम बरात बाजने बाजे ।।
सुर नर नारि सुमंगल गाईं । सरस राग बाजहिं सहनाईं ।।
घंट घंटि धुनि बरनि न जाहीं । सरव करहिं पाइक फहराहीं ।।
करहिं बिदूषक कौतुक नाना । हास कुसल कल नान सुजाना ।।

दो ०–तुरग नचावहिं कुअँर बर अकनि मृदंग निसान ।
नगर नट चितवहिं चकित डगहिं न ताल बँधान ।। ३०२ ।।

चौ ०–बनइ न बरनत बनी बराता । होहिं सगुन सुंदर सुभदाता ।।
चारा चाषु बाम दिसि लेई । मनहुँ सकल मंगल कहि देई ।।
दाहिन काग सुखेत सुहावा । नकुल दरसु सब काहूँ पावा ।।
सानुकूल बह त्रिबिध बयारी । सघट सबाल आव बर नारी ।।
लोवा फिरि फिरि दरसु देखावा । सुरभी सनमुख सिसुहि पिआवा ।।

त्यावेळी बृहस्पतीसह जसा पुरंदर दिसावा तसे दशरथ महाराज वसिष्ठ गुरूसह शोभू लागले !

राजानी वेदविहित विधि व कुलाचार केले. सर्व प्रकारे समाज सज्ज आहे अशी खात्री करून घेतली. रामाचे स्मरण केले. गुरूंची आज्ञा घेतली व निघण्याचा इशारा देण्याचा शंख फुंकण्यास सूचना दिली.

ही वरात निघालेली पाहून देवांनाही मोठा आनंद झाला. सुमंगलदायक अशा सुमनांची त्या वरातीवर त्यांनी वरून वृष्टी केली. हत्तीघोडे यांचे आवाज व वरातीतील आणि आकाशातील वाद्यांचे आवाज या सगळ्यांचा मिळून एक मिश्रित, अतिशय मोठा आवाज सुरू झाला ! सुंदर रागदारीत सनया वाजू लागल्या. देवांगना व मानवांगना यांनी सुमंगल गीते गाण्यास प्रारंभ केला मोठ्या घंटा व लहान घंटी यांचे आवाज किती व कसे होत होते ते सांगणे कठीण ! पैलवान, सेवक वाटेत नवनवीन कसरतीचे खेळ करत आहेत ! सुंदर गाणी म्हणणे ! आणि अनेक युक्त्या करून हसवणे या कलांत प्रवीण असणारे विदूषक नाना प्रकारची कौतुके करत आहेत. मृदंगादि वाद्यांच्या तालाला अनुकूल असे आपले घोडे सुंदर राजकुमार नाचवत आहेत. चतुर नट चकित होऊन पाहू लागले की घोडयाचा ताल अणुमात्रहि कसा चुकत नाही ! ३०२

अशा प्रकारे सुसज्ज होऊन निघालेल्या वरातीचे वर्णन कोठवर करावे ? निघाल्यानंतर त्याना शकुन-सुद्धा शुभदायी व सुंदर होऊ लागले ! नील कंठाचा चास पक्षी डाव्या बाजूने जाऊन चारा घेऊ लागला, पुढे सर्व मंगलच होणार हा या शकुनांचा अर्थ ! चांगल्या भरघोस आलेल्या पिकात उजव्या बाजूला कावळे दिसले. सर्वांच्याकडे नजर लावून बसलेले मुंगुस पहावयास मिळाले. मंद-सुगंध-शीतल-असा त्रिविध अनुकूल वारा वाहू लागला. कडेवर मूल व डोकीवर भरलेली घागर घेऊन सुवासिनी पुढे आली, कोल्हिणीने संतुष्ट होऊन वारंवार दर्शन दिले. समोर शांतपणे उभी राहून धेनु वत्साला पाजू लागली. डाव्या बाजूने जाऊन पुनः उजव्या

मृगमाला फिरि दाहिनि आई । मंगल गन जनु दीन्हि देखाई ॥
छेमकरी कह छेम बिसेषी । स्यामा बाम सुतरु पर देखी ॥
सनमुख आयउ दधि अरु मीना । कर पुस्तक दुइ बिप्र प्रबीना ॥

दो०—मंगलमय कल्यानमय अभिमत फल दातार ।
जनु सब साचे होन हित भए सगुन एक बार ॥ ३०३ ॥

चौ०— मंगल सगुन सुगम सब ताकें । सगुन ब्रह्म सुंदर सुत जाकें ॥
राम सरिस बरु दुलहिनि सीता । समधी दसरथु जनकु पुनीता ॥
सुनि अस ब्याहु सगुन सब नाचे । अब कीन्हे बिरंचि हम साँचे ॥
एहि बिधि कीन्ह बरात पयाना । हय गय गाजहिं हने निसाना ॥
आवत जानि भानुकुल केतू । सरितन्हि जनक बँधाए सेतू ॥
बीच बीच बर बास बनाए । सुरपुर सरिस संपदा छाए ॥
असन सयन बर बसन सुहाए । पावहिं सब निज निज मन भाए ॥
नित नूतन सुख लखि अनुकूले । सकल बरातिन्ह मंदिर भूले ॥

बाजूने वळून हरिणाची झुंड आली ! जणू काही त्यांनी आपल्या स्वरूपात सर्व मंगल गोष्टींच्या समूहाचेच दर्शन दिले. क्षेमकरी (लालपंखाची व शुभ्रमुख असलेली घार) विशेष प्रकारचे क्षेम सांगू लागली. डाव्या बाजूच्या सुंदर वृक्षावर कोकिळा दिसली. कोणी दही व मासे समोरून आणले. विद्वान ब्राह्मणाची जोडी हातात पोथी घेऊन पुढे आली.

मंगलमय, [illegible] इष्टफलप्राप्ती करून देणारे जेवढे म्हणून शकुन आहेत ते सर्वच, जणू काही आपला खरेपणा पटविण्यास याच्याइतका हुकमी प्रसंग पुनः मिळणार नाही म्हणून एकदम गोळा होऊन पुढे आले ! ३०३

तसे पाहू गेल्यास, ज्याच्या पोटी, प्रत्यक्ष सगुण ब्रह्म सुतरूपाने आले, त्याला सगळे शकुन सुलभ व [illegible] ! रामासारखा वर, सीतेसारखी वधू, दशरथ आणि जनकासारखे पावन व्याही ! ही बातमी लागताच 'आता आम्हाला विरंची खास खरे करणार !' असे म्हणून शकुनांचा सर्व समुदाय आनंदाने नाचू लागला !

याप्रमाणे त्या वरातीची वाटचाल सुरू झाली. हत्ती ओरडत आहेत, घोडे खेकाळत आहेत, डंके मोठमोठ्याने वाजत आहेत ! सूर्यवंशाच्या ध्वजाप्रमाणे असणारे दशरथमहाराज, या रस्त्याने येणार म्हणून जनकांनी जागोजागी नद्यांवर पूल बांधवले. त्याचप्रमाणे मुक्कामाच्या सर्व ठिकाणी सुंदर बंगले बांधले व त्यात देवलोकाप्रमाणे सर्व सुखसोयी परिपूर्ण करून ठेवल्या. खाण्याचे पदार्थ, झोपण्यास गाद्या-गिर्द्या, पलंग, अंगावर घेण्यास व अंगात घालण्यास सुंदर सुंदर भरपूर वस्त्रे; बसावयास भरपूर बैठकी, इत्यादि सामान ज्याच्या त्याच्या [illegible] त्याला ते मिळावे अशी चोख व्यवस्था करून ठेवली. त्या समृद्ध वसतिगृहातून नवनवीन सुखसोयींचा अनुभव घेत असता वऱ्हाडी इतके रंगले की, काही काल रामाचा त्यांना लागलेला ध्यास सुटला ! (स्वतःच्या घराचा विसर पडला असा अर्थ करण्यापेक्षा हा अर्थ, मंदिर शब्दाच्या संकेताने मनात अधिक भरतो !)

दो०– आवत जानि बरात बर सुनि गहगहे निसान ।
सजि गज रथ पदचर तुरग लेन चले अगवान ॥ ३०४ ॥

मास पारायण, दसवाँ विश्राम

चौ०– कनक कलस भरि कोपर थारा । भाजन ललित अनेक प्रकारा ॥
भरे सुधासम सब पकवाने । नाना भाँति न जाहिं बखाने ॥
फल अनेक बर बस्तु सुहाई । हरषि भेंट हित भूप पठाई ॥
भूषन बसन महामनि नाना । खग मृग हय गय बहुबिधि जाना ॥
मंगल सगुन सुगंध सुहाए । बहुत भाँति महिपाल पठाए ॥
दधि चिउरा उपहारा अपारा । भरि भरि काँवरि चले कहारा ॥
अगवानन्ह जब दीखि बराता । उर आनंदु पुलक भर गाता ॥
देखि बनाव सहित अगवाना । मुदित बरातिन्ह हने निसाना ॥

दो० –हरषि परसपर मिलन हित कछुक चले बगमेल ।
जनु आनंद समुद्र दुइ मिलत बिहाइ सुबेल ॥ ३०५ ॥

चौ० –बरषि सुमन सुर सुंदरि गावहिं । मुदित देव दुंदुभीं बजावहिं ॥
बस्तु सकल राखीं नृप आगें । बिनय कीन्हि तिन्ह अति अनुरागें ॥
प्रेम समेत रायँ सबु लीन्हा । भै बकसीस जाचकन्हि दीन्हा ॥

मोठ्या जोराने वाजत असलेल्या नगाऱ्याचा आवाज ऐकून दशरथ महाराजांची श्रेष्ठ वऱ्हाडी मंडळी आली हे मिथिला नगरवासी जनांना समजले. स्वागतींनी (स्वागत करणारी मंडळी) घोडे, हत्ती रथ पायदळ इत्यादि सजवून आणण्यासाठी लगेच घाई उडवली. ३०४

दूध, सरबत, थंडाई, पाणी इत्यादींनी भरलेले सुवर्णकलश, त्याचप्रमाणे वर्णनातीत अशा सुधेसम पचपक्वान्नांनी भरलेली अशी सोन्याची ताटे, पराती, नानाप्रकारची रूप फळे व सुंदर दुसरे खाद्य पदार्थ इत्यादि भरून, भेट म्हणून जनकराजानी पाठविली. त्याचप्रमाणे, नानाप्रकारची वाहने, मौल्यवान रत्ने, वस्त्रे, पक्षी, पशु, घोडे, हत्ती, नानाप्रकारची वाहने, मंगल शकुनकारक अनेक सुंदर सुशोभित सुगंधि द्रव्ये, राजाने पाठविली. त्याचबरोबर दही-पोहे व फराळाचे जिन्नस भरून गड्याच्या बरोबर किती कावडी पाठवल्या त्याची मोजदाद करणेच अशक्य ! स्वागतींनी जेव्हा ते आलेले वऱ्हाड पाहिले तेव्हा त्यांची मने आनंदाने भरली व शरीरे रोमांचित झाली. याच्या उलट वऱ्हाड्यांनी जेव्हा मोठ्या थाटामाटाने स्वागती आल्याचे पाहिले तेव्हा आनंदित होऊन डंक्याचा धडधडाट जोराने सुरू केला.

दोनी जमाती जवळ येताच भेटण्याच्या उत्सुकतेने दोघांनीहि थोडी दौड केली. तेव्हा वाटले की, काही आनंदसागर, आपली मर्यादा सोडून परस्पराना मिळत आहेत ! ३०५

देवांगनानी गोड गाणी म्हणत पुष्पवृष्टी केली. देवांनी प्रमुदित होऊन दुंदुभी वाजवल्या. स्वागतींनी सर्व वस्तू पुढे ठेवून त्याचा स्वीकार करावा अशी महाराजांना प्रेमाने विनंती करताच दशरथ राजानी तितक्याच प्रेमाने त्याचा स्वीकार करून नोकरचाकराना बक्षिसे दिली आणि याचकांना देणग्या दिल्या !



करि पूजा मान्यता बड़ाई । जनवासे कहुँ चले लवाई ।।
बसन बिचित्र पाँवड़े परहीं । देखि धनदु धन मदु परिहरहीं ।।
अति सुंदर दीन्हेउ जनवासा । जहँ सब कहुँ सब भाँति सुपासा ।।
जानी सियँ बरात पुर आई । कछु निज महिमा प्रगटि जनाई ।।
हृदयँ सुमिरि सब सिद्धि बोलाई । भूप पहुनई करन पठाई ।।

दो०—सिधि सब सिय आयसु अकनि गईं जहाँ जनवास ।
लिएँ संपदा सकल सुक सुरपुर भोग बिलास ।। ३०६ ।।

चौ०—निज निज बास बिलोकि बराती । सुर सुख सकल सुलभ सब भाँती ।।
बिभव भेद कछु कोउ न जाना । सकल जनक कर करहिं बखाना ।।
सिअ महिमा रघुनायक जानी । हरषे हृदयँ हेतु पहिचानी ।।
पितु आगमनु सुनत दोउ भाई । हृदयँ न अति आनंदु अमाई ।।
सकुचन्ह कहि न सकत गुरु पाहीं । पितु दरसन लालचु मन माहीं ।।
बिस्वामित्र बिनय बड़ि देखी । उपजा उर संतोषु बिसेषी ।।
हरषि बंधु दोउ हृदयँ लगाए । पुलक अंग अंबक जल छाए ।।
चले जहाँ दसरथु जनवासे । मनहुँ सरोबर तकेउ पिआसे ।।

त्यानंतर स्वागतीनी दशरथ राजाचे सीमान्त पूजन करून पूजा-मान-मरातब वगैरे कार्यक्रम झाल्यावर जानोशाच्या ठिकाणी वऱ्हाडांना नेले. वाटेत विविध वस्त्राच्या पायघड्या [illegible] निरनिराळ्या नमुन्याची वस्त्रे घातली. त्याची शोभा पाहून कुबेरानेही आपल्या श्रीमंतीचा अभिमान सोडला.

जानोशाचे ठिकाण अत्यंत सुंदर होते. त्यात सर्वांच्या करता सर्व सोयी पूर्वीच करून ठेवल्या होत्या. नगरात वऱ्हाड आल्याची कल्पना येताच सीतेने आपल्या सामर्थ्याची किंचित् चुणुक प्रभूंना दाखवण्याचे ठरवले. सर्व सिद्धींचे स्मरण करताच त्या हात जोडून पुढे उभ्या राहिल्या ! त्याना दशरथ राजांच्या पाहुणचाराचे काम तिने दिले. आज्ञेप्रमाणे त्या सर्व सिद्धी इंद्राच्या नगरीतील भोगविलास व अखिल सुख-संपत्ती आपल्याबरोबर घेऊन जानोशाच्या ठिकाणी गेल्या. ३०६

वऱ्हाड्यांनी आपापल्या निवासस्थानी जाऊन जेव्हा पाहिले, तेव्हां देवांनीच ज्या सुखोपभोगांचा आस्वाद घ्यावा ते सर्व अनेक प्रकारांनी आपल्यासाठी येथे भरून राहिले आहेत ! असे त्यांना दिसून आले. यातील मूळ रहस्यमात्र कोणालाच कळले नाही. सगळ्यांनी जनकाच्या वैभवाचीच वाखाणणी केली ! सीतेचा हा महिमा आहे हे एकट्या रघुपतीनी जाणले व तिचा हेतू जाणून त्यांना हृदयात हर्ष झाला.

पित्याचे आगमन झाल्याचे ऐकल्यापासून रामलक्ष्मणनांना एवढा आनंद झालाकी तो हृदयात मावेना ! मनात पितृदर्शनाची मोठी उत्कंठा लागली. पण संकोचामुळे त्यानी गुरूजींच्या जवळ भाषा काढली नाही. ही त्यांची अत्यंत विनयाची वागणूक पाहून विश्वामित्राना केवढे समाधान वाटले ! दोन्ही शिष्यांना त्यांनी प्रसन्न होऊन पोटशी धरले तेव्हा अंगावर रोमांच व डोळ्यांत आनंदाश्रू, अशी त्यांची स्थिती झाली ! दशरथाच्या जानोशाच्या मंदिराकडे आपल्या या दोन शिष्यासह ते निघाले. जणू काही तहानेलेल्याची ओढ लागून आपण होऊन तलावच त्याच्याकडे निघाला होता !

दो०—भूप बिलोके जबहिं मुनि आवत सुतन्ह समेत ।
उठे हरषि सुखसिंधु महुँ चले थाह सी लेत ।। ३०७ ।।

चौ०—मुनिहि दंडवत कीन्ह महीसा । बार बार पद रज धरि सीसा ।।
कौसिक राउ लिए उर लाई । कहि असीस पूछी कुसलाई ।।
पुनि दंडवत करत दोउ भाई । देखि नृपति उर सुखु न समाई ।।
सुत हियँ लाइ दुसह दुख मेटे । मृतक सरीर प्रान जनु भेंटे ।।
पुनि बसिष्ठ पद सिर तिन्ह नाए । प्रेम मुदित मुनिबर उर लाए ।।
बिप्र बृंद बंदे दुहुँ भाईं । मनभावती असीसें पाईं ।।
भरत सहानुज कीन्ह प्रनामा । लिए उठाइ लाइ उर रामा ।।
हरषे लखन देखि दोउ भ्राता । मिले प्रेम परिपूरित गाता ।।

दो०— पुरजन परिजन जातिजन जाचक मंत्री मीत ।
मिले जथाबिधि सबहि प्रभु परम कृपाल बिनीत ।। ३०८ ।।

चौ०— रामहि देखि बरात जुड़ानी । प्रीति कि रीति न जाति बखानी ।।
नृप समीप सोहहिं सुत चारी । जनु धन धरमादिक तनुधारी ।।
सुतन्ह समेत दसरथहि देखी । मुदित नगर नर नारि बिसेषी ।।

आपल्या पुत्रांच्यासह विश्वामित्र येत आहेत असे दिसताच राजे आनंदाने उठले आणि जणू काही त्या सुखसागराचा ठाव घेतल्यासारखे त्यात शिरले ! ३०७ (आनंदातिशयाने विकल झाल्याने कोणाचा तरी आधार घेऊन सावकाश पावले टाकत निघाले.)

महीशांनी मुनींना दंडवत प्रणाम केला व त्याच्या चरणाची धूळ वारंवार आपल्या मस्तकी धारण केली. कौशिकानी झटकन् राजाला उठवून आलिंगन दिले ! आशीर्वाद देऊन कुशल विचारले. त्यानंतर उभय बंधूनी आपल्या पित्याला दंडवत नमस्कार घातले. त्याच्याकडे पाहिल्यानंतर राजाचा आनंद गगनात मावेना ! त्याने त्या पुत्रांना घट्ट हृदयाशी कवटाळले, जणू काही मृत देहाला प्राणच भेटत आहे एवढे सुख राजाला होऊन वियोग जन्म दुःखाचा शेवट झाला.

लगेच वसिष्ठ ऋषींच्या पदकमली त्यानी आपली मस्तके नमवली. (या बंधूंना कवटाळत असता प्रेम व आनंद या भावनांनी त्यांचे हृदय उचंबळून आले !) सर्व विप्रसमुदायाना त्यांनी वंदन करताच त्याच्याकडून अपेक्षित असे आशीर्वाद बंधुद्वयाना मिळाले. इतके होताच भरत पुढे येऊन त्याने अनुजासह रामाच्या चरणावर आपले मस्तक ठेवले. प्रियबंधूना उठवून रामांनी त्याना पोटाशी धरले. लक्ष्मणाने दोन्ही बंधूना पाहिले तेव्हा त्याला मोठा हर्ष झाला. प्रेमपूर्ण अंतःकरणाने त्याने दोघाना भेट दिली.

त्यानंतर परमकृपालु व विनयी अशा प्रभूंनी अयोध्यावासी, कुटुंबीय मंडळी, नातेवाईक, याचक, मंत्री व मित्र अशा सर्वांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे व अपेक्षेप्रमाणे भेट दिली. ३०८

रामविरहाने तप्त झालेले सर्व वऱ्हाडी, एकदा डोळे भरून रामरूपसुधा प्याले व त्यानी आपली हृदये निववली. या प्रीतीच्या रीतीचे वर्णन करण्यास शब्दच नाहीत !

चारी मुलगे जेव्हा राजाजवळ बसले तेव्हा धर्म, अर्थ, काम व मोक्ष या पुरुषार्थांनी जणू शरीर धारण केले आहे, असे वाटले. पुत्रांच्यासह राजाला पाहून मिथिलावासी नागरिक स्त्रीपुरुषांना मोठा आनंद झाला.



सुमन बरिसि सुर हनहिं निसाना । नाकनटीं नाचहिं करि गाना ॥
सतानंद अरु बिप्र सचिव गन । मागध सूत बिदुष बंदीजन ॥
सहित बरात राउ सनमाना । आयसु मागि फिरे अगवाना ॥
प्रथम बरात लगन तें आई । तातें पुर प्रमोदु अधिकाई ॥
ब्रह्मानंदु लोग सब लहहीं । बढ़हुँ दिवस निसि बिधि सन कहहीं ॥
दो०—रामु सीय सोभा अवधि सुकृत अवधि दोउ राज ।
जहँ तहँ पुरजन कहहिं अस मिलि नर नारि समाज ॥ ३०९ ॥
चौ०— जनक सुकृत मूरति बैदेही । दसरथ सुकृत रामु धरें देही ॥
इन्ह सम काहुँ न सिव अवराधे । काहुँ न इन्ह समान फल लाधे ॥
इन्ह सम कोउ न भयउ जग माहीं । है नहिं कतहूँ होनेउ नाहीं ॥
हम सब सकल सुकृत कै रासी । भए जग जनमि जनकपुर बासी ॥
जिन्ह जानकी राम छबि देखी । को सुकृती हम सरिस बिसेषी ॥
पुनि देखब रघुबीर बिआहू । लेब भली बिधि लोचन लाहू ॥
कहहिं परसपर कोकिलबयनीं । एहि बिआहँ बड़ लाभु सुनयनीं ॥
बड़ें भाग बिधि बात बनाई । नयन अतिथि होइहहिं दोउ भाई ॥

देवांनीही दुदुंभी वाजवून पुष्पवृष्टी केली. देवांगनानी नृत्यगायन केले.

शतानंद, विप्र व मंत्री मंडळी, मागध, सूत, विद्वान् व भाट यानी वऱ्हाडासह राजा दशरथाचा सन्मान करून स्वागतीनी निरोप घेण्यासाठी परवानगी घेतली. लग्नाच्या तिथीच्या पूर्वीच पुष्कळ वऱ्हाड आल्यामुळे विदेहपुरीतील लोकांना अधिकच आनंद झाला. कारण त्याना सर्वांना आता ब्रह्मानंद लुटण्याची संधी मिळाल्यामुळे "हे विधे! आता रात्री व दिवस साठ घटकापेक्षा भरपूर वाढव!" असे ते मनात प्रार्थना करू लागले. पुष्कळ स्त्रिया व अनेक पुरुष यांचे घोळके जागजागी जमलेले दिसत व त्यांच्या अहमहमिकेने भाषा चालत. "राम व सीता हे जोडपे म्हणजे सौंदर्याचे सर्वोच्च टोक!" असे एकाने म्हणावे, तर दुसरा लगेच पुस्ती देई, "दशरथ-जनक हे दोन राजे म्हणजे पुण्याईचे परमोच्च टोक!" ३०९.

त्यांची बोलणी पुढे चालत. एकाने जानकी म्हणजे जनकाच्या पुण्याईने धारण केलेलेच शरीर! असे म्हणताच दुसऱ्याने राम म्हणजे दशरथाची देहधारी पुण्याई! अशी पुरवणी द्यावी.

आतापर्यंत याच्यासारखी शंकराराधना कोणी केली नाही व यांच्यासारखे त्या आराधनेचे फलही कोणाला लाभले नाही. यांच्यासारखे कोणी जगात जन्माला आले नाहीत, आता ह्यात दुसरे नाहीत व पुढेही जन्माला येण्याची शक्यता नाही. जगात जन्माला येऊन यावेळी मिथिलेत हजर असणारे सर्व स्त्री-पुरुष आम्ही मोठेच पुण्यवान्! जानकी व राम यांचे अलौकिक सौंदर्य ज्यांनी या चर्मचक्षूनी पोटभर पाहिले ते आम्ही सर्वांत अधिक पुण्यवान् यात काय शंका आहे? इतकेच काय, आता पुनः त्यांच्या विवाहाचा सर्व सोहाळा पहाण्याचा लाभ आमच्या डोळ्यानी आम्ही यथेष्ट लुटणार!

कोकिळेप्रमाणे मधुरवाणीच्या त्या स्त्रिया आपसात पुनः म्हणत, 'हे सुनयने! अग, आपले मोठे भाग्य म्हणूनच ही घटना विधीने घडवली! हे दोन्ही बंधू आता आपल्या डोळ्यांना भरपूर पहावयास मिळतील.

दो०– बारहिं बार सनेह बस जनक बोलाउब सीय ।
लेन आइहहिं बंधु दोउ कोटि काम कमनीय ।। ३१० ।।

चौ०– बिबिध भाँति होइहि पहुनाई । प्रिय न काहि अस सासुर माई ।।
तब तब राम लखननि निहारी । होइहहिं सब पुर लोग सुखारी ।।
सखि जस राम लखन कर जोटा । तैसेइ भूप संग दुइ ढोटा ।।
स्याम गौर सब अंग सुहाए । ते सब कहहिं देखि जे आए ।।
कहा एक मैं आजु निहारे । जनु बिरंचि निज हाथ सँवारे ।।
भरतु रामही की अनुहारी । सहसा लखि न सकहिं नर नारी ।।
लखनु सत्रुसूदनु एकरूपा । नख सिख ते सब अंग अनूपा ।।
मन भावहिं मुख बरनि न जाहीं । उपमा कहुँ त्रिभुवन कोउ नाहीं ।।

छं०–उपमा न कोउ कह दास तुलसी कतहुँ कबि कोबिद कहैं ।
बल बिनय बिद्या सील सोभा सिंधु इन्ह से एइ अहैं ।।
पुर नारि सकल पसारि अंचल बिधिहि बचन सुनावहीं ।
ब्याहिअहुँ चारिउ भाइ एहिं पुर हम सुमंगल गावहीं ।।

सो०–कहहिं परस्पर नारि बारि बिलोचन पुलक तन ।
सखि सबु करब पुरारि पुन्य पयोनिधि भूप दोउ ।। ३११ ।।

कन्येच्या प्रेमामुळे जनकराजे सीतेला पुनः पुन्हा आणणार, आणि कोट्यवधी रतिनाथांचे सौंदर्य ज्यांच्या ठिकाणी आहे अशा भावांची जोडी तिला नेण्यासाठी आपल्या नगरीला येणारच ! ! ३१०

भरपूर पाहुणचार होणार आणि असल्या सासुरवाडीत रहाण्याला कोणी जावई कंटाळेल होय ? त्या त्या वेळी या रामलक्ष्मणाच्या जोडीला पाहून, विदेहपुरीतील सर्व लोकांना अत्यंत सुख होईल.

सखी ! जशी रामलक्ष्मणाची भावांची जोडी आहे ना, अगदी तशी दुसरी एक पुत्रांची जोडी दशरथ-महाराजांच्याबरोबर आली आहे. एक श्याम, दुसरा गौर; अत्यंत रूपसंपन्न. जी मंडळी पहावयास गेली होती ती असे वर्णन करतात. इतक्यात त्यांच्यातील एक मैत्रीण म्हणते, ' मी आजच त्यांना डोळेभर पाहिले. विरंचीने स्वतःच्या हातांनीच त्यांना बनवले असे वाटते ! भरत इतके हुबेहूब रामासारखे आहेत की, नागरिक स्त्री-पुरुष सहजासहजी नक्की ओळखूच शकणार नाहीत ! तसेच लक्ष्मण व रिपुसूदन यांचे नखशिखांत, अगदी तंतोतंत एकसारखे दुसऱ्याचे सर्वांग पूर्ण सौंदर्य आहे ! मनाला ते रूप अतिशय आवडते. पण मुखाने वर्णन मुळीच करता येत नाही. याचे कारण या त्रिभुवनात ज्यांची त्यांना उपमा देता येईल असे कोणीच नाही. ''

तुलसीदास विद्वान आणि कवींच्या मते या जगात यांना उपमा देण्यास कोणीच नाही. बल, विनय, विद्या, शील, आणि सौंदर्याचे सागर यांच्यासारखे हेच ! म्हणून पुरनारी पदर पसरून, ब्रह्मदेवाला प्रार्थना करतात की, ''या चारी बंधूंची लग्ने आमच्याच नगरीत होवोत आणि त्यांच्या सुकीर्तीचे मंगलगीत गाण्याचे भाग्य आम्हाला मिळो.'' अशाप्रकारे त्या स्त्रिया आपसात बोलत असता जेव्हा त्यांच्या भावनांना याप्रमाणे भरती येई. तेव्हा तो लोंढा आनंदाश्रूच्या रूपाने डोळ्यातून बाहेर वाट काढी व त्याचा परिणामच की काय त्यांची शरीरे थरारून रोमांचित होत ! '' दोन्ही राजे पुण्याईचे सागर असल्याने, हे सखी ! त्रिपुरारी आपले सर्व मनोरथ खास पूर्ण करील.'' या वाक्याने त्यांच्या संभाषणाचा समारोप होई. ३११

चौ० — एहि बिधि सकल मनोरथ करहीं । आनँद उमगि उमगि उर भरहीं ॥
जे नृप सीय स्वयंबर आए । देखि बंधु सब तिन्ह सुख पाए ॥
कहत राम जसु बिसद बिसाला । निज निज भवन गए महिपाला ॥
गए बीति कछु दिन एहि भाँती । प्रमुदित पुरजन सकल बराती ॥
मंगल मूल लगन दिनु आवा । हिम रितु अगहनु मासु सुहावा ॥
ग्रह तिथि नखतु जोगु बर बारू । लगन सोधि बिधि कीन्ह बिचारू ॥
पठै दीन्हि नारद सन सोई । गनी जनक के गनकन्ह जोई ॥
सुनी सकल लोगन्ह यह बाता । कहहिं जोतिषी आहिं बिधाता ॥

दो० — धेनुधूरि बेला बिमल सकल सुमंगल मूल ।
बिप्रन्ह कहेउ बिदेह सन जानि सगुन अनुकूल ॥ ३१२ ॥

चौ० — उपरोहितहि कहेउ नरनाहा । अब बिलंब कर कारनु काहा ॥
सतानंद तब सचिव बोलाए । मंगल सकल साजि सब ल्याए ॥
संख निसान पनव बहु बाजे । मंगल कलस सगुन सुभ साजे ॥
सुभग सुआसिनि गावहिं गीता । करहिं बेद धुनि बिप्र पुनीता ॥
लेन चले सादर एहि भाँती । गए जहाँ जनवास बराती ॥
कोसलपति कर देखि समाजू । अति लघु लाग तिन्हहि सुरराजू ॥

याप्रमाणे हृदयात आनंदसागराला भरती येऊन सर्व नगरवासी मनोरथ करीत असत. जे सज्जन राजे सीतेच्या स्वयंवरासाठी आले होते त्यांनाही या चार बंधूंना एकत्रित पाहून परम सुख वाटले. रामाची निर्मल व महनीय अशी कीर्ती गात, ते राजे आपापल्या स्थानाला गेले.

याप्रमाणे नागरिक व वऱ्हाडी या सर्वांची आनंदाची लूट चालू असता त्याना नकळत काही दिवस निसटून गेले ! हेमंतऋतूतील शोभन अशा मार्गशीर्ष महिन्यातला मंगल मूल लग्न तिथीचा दिवस उजाडला ! ग्रह, तिथी, योग, वार नक्षत्र ही सर्वच श्रेष्ठ होती. मुहूर्त उत्तम कोणता याबद्दल प्रत्यक्ष ब्रह्मदेवांनीच विचार करून तो दिवस नारदाच्या हस्ते त्यानी कायम करण्यासाठी जनकाच्याकडे कळवला ! मौज अशी की जनक महाराजांच्या ज्योतिष्यानी गणित करून तोच दिवस कायम केला होता. सगळ्या लोकांना ही बातमी मिळाली, तेव्हा ते म्हणू लागले अहो आमचे ज्योतिषी काय कमी आहेत? दुसरे ब्रह्मदेवच !

निर्मल, सर्वांग सुंदर, मंगलाचे मूळ अशी गोरजाची पवित्र वेळ प्राप्त झाली. अनुकूल शकुन होऊ लागलेले पाहून विप्रांनी विदेहाना सांगितले. ३१२

तेव्हा जनकांनी शतानंदाना आता उशीर करण्याचे कारण नाही याची जाणीव दिली. सचिवाना बोलावून सर्व मंगलवस्तू त्यांच्या करवी नीट सजवून आणल्या. शङ्ख, नगारे, ढोल इत्यादि वाद्ये जोराने वाजू लागली. मंगल कलश व दधिदूर्वादि शुभसूचक [illegible] सर्व पदार्थ तयार ठेवले. सुन्दर सुवासिनींची गाणी सुरू झाली. पवित्र (आचारसंपन्न) ब्राह्मण वेदघोष करू लागले. वराला आणण्यासाठी अत्यंत सन्मानपूर्वक मूळ (बोलावणे) निघाले. ते दशरथ-जानोशाला येऊन पोचले. कोसलेश्वराचा श्रेष्ठ समाज पाहून त्याना देवेंद्रही कमी दर्जाचा



भयउ समउ अब धारिअ पाऊ। यह सुनि परा निसानहिं घाऊ ॥
गुरहि पूछि करि कुल बिधि राजा। चले संग मुनि साधु समाजा ॥

दो० — भाग्य बिभव अवधेस कर देखि देव ब्रह्मादि।
लगे सराहन सहस मुख जानि जनम निज बादि ॥ ३१३ ॥

चौ० — सुरन्ह सुमंगल अवसरु जाना। बरषहिं सुमन बजाइ निसाना ॥
सिव ब्रह्मादिक बिबुध बरूथा। चढ़े बिमानन्हि नाना जूथा ॥
प्रेम पुलक तन हृदयँ उछाहू। चले बिलोकन राम बिआहू ॥
देखि जनकपुरु सुर अनुरागे। निज निज लोक सबहिं लघु लागे ॥
चितवहिं चकित बिचित्र बिताना। रचना सकल अलौकिक नाना ॥
नगर नारि नर रूप निधाना। सुघर सुधरम सुसील सुजाना ॥
तिन्हहि देखि सब सुर सुरनारीं। भए नखत जनु बिधु उजिआरीं ॥
बिधिहि भयउ आचरजु बिसेषी। निज करनी कछु कतहुँ न देखी।

दो० — सिवँ समुझाए देव सब जनि आचरज भुलाहु।
हृदयँ बिचारहु धीर धरि सिय रघुबीर बिआहु ॥ ३१४ ॥

चौ० — जिन्ह कर नामु लेत जग माहीं। सकल अमंगल मूल नसाहीं ॥
करतल होहिं पदारथ चारी। तेइ सिय रामु कहेउ कामारी ॥

वाटला ! व मुहूर्ताची वेळ समीप आली. त्वकर चलावे ! असे ऐकताच नगाऱ्यावर टिपरी पडली ! राजाने वसिष्ठांच्या आज्ञेप्रमाणे कुलाचार उरकले. मुनिसमाज, साधुसमाज व राजसमाज व इतर मंडळी यांच्यासह दशरथ राजे रामविवाहोत्सवासाठी निघाले !

ब्रह्मदेवादि देवांनी अयोध्येशाचे भाग्य व वैभव पाहून त्यांना स्वतःचा जन्म व्यर्थ वाटला आणि त्यांनी हजारो मुखाच्या शेषाची स्तुती करण्यास प्रारंभ केला.

कारण त्या वैभवाचे वर्णन तोच सर्वांत अधिक करू शकणार ! देवांनी मुहूर्ताची वेळ जवळ आलेली पाहून दुंदुभी वाजवल्या व दशरथ समाजावर पुष्पवृष्टी केली. शंकर व ब्रह्मदेवादिक देवांचा समाज नाना-प्रकारच्या विमानात बसून थव्या थव्यांनी आकाशात आला तसेच हृदयात मोठा उत्साह व त्यामुळे प्रेमाने पुलक-प्रफुल्ल-वश झालेले देव रामविवाह पहाण्यास निघाले. देवांनी जेव्हा मिथिला नगरी पाहिली तेव्हा सर्वांनाच आपापले लोक कमी दर्जाचे वाटले विलक्षण प्रकारचे मंडप उभारलेले बारकाईने पाहिल्यावर ती विविध प्रकारची सर्वच रचना अलौकिक आहे अशी त्यांची खात्री झाली. रूपनिधान असे सर्व नागरिक स्त्री-पुरुष कुलवान, धार्मिक सुशील व सुजाण असेच त्यांना दिसले. त्याना पाहिल्यावर पूर्णचंद्रापुढे जशी सर्व नक्षत्रे फिकी पडतात तशी सर्व देव देवांगनांची टोळीं अगदीच निस्तेज दिसली ! एकंदर थाट पाहून ब्रह्मदेव चांगले गोंधळून गेले. व रुसले ! कारण त्या सर्व कामगिरीत त्यांच्या करणीचा कुठे ठाव ठिकाणाच मुळी लागेना. तेव्हा शंकरानी सगळ्याच देवांना एकदा सणसणीत इशारा दिला. " हे विबुध ! आश्चर्याने भुलून जाऊ नका. अहो हा आदिमाता सीता व अनंत कोटी ब्रह्मांडनायक जगत्पिता राम यांचा विवाह आहे ! चांगला मनात धीर धरून शांतपणाने पाहा ! ३१४

जगात ज्याचे नाव घेताच सर्व अमंगलाचे मूळच उखडून निघते व चारी पुरुषार्थांची सहज प्राप्ती होते ते हे सीताराम आहेत असे, कामरिपूनी बजावले !



एहि बिधि संभु सुरन्ह समुझावा। पुनि आगें बर बसह चलावा ॥
देवन्ह देखे दसरथु जाता। महामोद मन पुलकित गाता ॥
साधु समाज संग महिदेवा। जनु तनु धरें करहिं सुख सेवा ॥
सोहत साथ सुभग सुत चारी। जनु अपबरग सकल तनुधारी ॥
मरकत कनक बरन बर जोरी। देखि सुरन्ह भै प्रीति न थोरी ॥
पुनि रामहि बिलोकि हियँ हरषे। नृपहि सराहि सुमन तिन्ह बरषे ॥

दो० – राम रूपु नख सिख सुभग बारहिं बार निहारि।
पुलक गात लोचन सजल उमा समेत पुरारि ॥ ३१५ ॥

चौ० – केकि कंठ दुति स्यामल अंगा। तड़ित बिनिंदक बसन सुरंगा ॥
ब्याह बिभूषन बिबिध बनाए। मंगल सब सब भाँति सुहाए ॥
सरद बिमल बिधु बदनु सुहावन। नयन नवल राजीव लजावन ॥
सकल अलौकिक सुंदरताई। कहि न जाइ मनहीं मन भाई ॥
बंधु मनोहर सोहहिं संगा। जात नचावत चपल तुरंगा ॥
राजकुअँर बर बाजि देखावहिं। बंस प्रसंसक बिरिद सुनावहिं ॥
जेहि तुरंग पर रामु बिराजे। गति बिलोकि खगनायकु लाजे ॥
कहि न जाइ सब भाँति सुहावा। बाजि बेषु जनु काम बनावा ॥

याप्रमाणे सर्व देवांना प्रसंगाच्या महत्त्वाची कल्पना देऊन शंकरानी आपल्या श्रेष्ठ नंदिकेश्वराला सगळ्याच्या पुढे काढला ! देवांनी दशरथ महाराज लग्नमंडपाकडे निघालेले पहाताच त्याना परमानंद होऊन, त्यांच्या शरीरावर रोमांच उठले ! त्यांच्याबरोबर संत मंडळी व विप्रवृंद पाहून असे वाटले की, जणू काही सर्व प्रकारच्या सौख्ये, शरीरे धारण करून दशरथ महाराजांच्या संगतीचा लाभ ती आता लुटत आहेत ! महाराजांच्याबरोबर त्यांचे अद्वितीय सौंदर्याने तळपत असलेले, चार सुत हे मूर्तिमान् चारी प्रकारचे मोक्षच (सालोक्य, सामीप्य, सारूप्य व सायुज्य) जणू शोभत होते ! मरकत वर्णाचे दोन व सुवर्ण वर्णाचे दोन अशा त्या दोन दोन जोड्या पाहून देवांना काही थोडेथोडके प्रेम वाटले नाही ! शेवटी रामाला पाहून ते हृदयात अत्यंत हर्षित झाले; राजाची भरपूर स्तुती करून त्यानी खूप सुमनवृष्टी केली ! !

नखशिखान्त सौंदर्याने विलसत असलेले, ते रामरूप पुनः पुन्हा निरीक्षण करून, उमेसह त्रिपुरारी पुलकित झाले व त्यांच्या नेत्रातून आनंदाश्रू वाहू लागले ! ३१५

त्यावेळी रामरूप अत्यंत सुंदर दिसले, म्हणजे कसे दिसले ? पाहा—" अंगावरील श्यामवर्ण कांती मोराच्या मानेच्या नीलिमेला लाजविणारी सुंदर रंगाची, विजेच्या तेजाला फिकी पाडणारी वस्त्रे परिधान केलेली, नवरदेवांना योग्य असे सर्व अवयवाना खुलविणारे दागिने सुव्यवस्थित घातलेले, सगळ्या प्रकारांनी मांगल्यपूर्ण ते शोभत होते; शरद् ऋतूतील स्वच्छ, पूर्णचंद्राप्रमाणे तेजस्वी व प्रसन्न मुख; नवीन उमललेल्या कमलाला मागे सारणारे नेत्र, सर्वच काही दैवी सौंदर्य ! नुसते हृदयात भरगच्च भरावयाचे ! ! मुखाने कां ते सांगणे जमणार आहे ? बरोबर मनोहर बंधू, चंचल घोड्याना ठेक्यात नाचवीत चालले आहेत ! अनेक राजकुमार आपापल्या घोड्याची डौलदार चाल दाखवीत आहेत, कुलप्रशंसक मागध-भाट रघुकुलाचे यश गात आहेत.

ज्या घोड्यावर राम विराजमान झाले होते, त्याची गती पाहून गरुड लज्जित झाला ! त्याचे सर्व अवयव इतके कमालीचे, सर्वांगी उत्कृष्ट होते की प्रत्यक्ष कामदेवच यावेळी तो घोडा बनला आहे असे वाटे !



छं० – जनु बाजि बेषु बनाइ मनसिजु राम हित अति सोहई ।
आपनें बय बल रूप गुन गति सकल भुवन बिमोहई ॥
जगमगत जीनु जराव जोति सुमोति मनि मानिक लगे ।
किंकिनि ललाम लगामु ललित बिलोकि सुर नर मुनि ठगे ॥

दो० – प्रभु मनसहिं लयलीन मनु चलत बाजि छबि पाव ।
भूषित उड़गन तड़ित घनु जनु बर बरहि नचाव ॥ ३१६ ॥

चौ० - जेहिं बाजि रामु असवारा । तेहि सारदउ न बरनै पारा ॥
संकरु राम रूप अनुरागे । नयन पंचदस अति प्रिय लागे ॥
हरि हित सहित रामु जब जोहे । रमा समेत रमापति मोहे ॥
निरखि राम छबि बिधि हरषाने । आठइ नयन जानि पछिताने ॥
सुर सेनप उर बहुत उछाहू । बिधि ते डेवढ़ लोचन लाहू ॥
रामहि चितव सुरेस सुजाना । गौतम श्रापु परम हित माना ॥
देव सकल सुरपतिहि सिहाहीं । आजु पुरंदर सम कोउ नाहीं ॥
मुदित देवगन रामहि देखी । नृपसमाज दुहुँ हरषु बिसेषी ॥

छं० – अति हरषु राजसमाज दुहु दिसि दुंदुभीं बाजहिं घनी ।
बरषहिं सुमन सुर हरषि कहि जय जयति जय रघुकुलमनी ॥

खरोखर, रामाच्या हितासाठी, जणू काही रतिनाथ, घोड्याच्या देहात अत्यंत शोभू लागला. त्याचे वय, घोटीव व पुष्ट अवयव, लावण्य, आकर्षक गुण, सुखावहगती ही सर्व विश्वाला मोहिनीच घालत होती! चमचम चमकणारे रत्नजडित जीन, त्यावर अनेक मोती, रत्ने, माणके भरगच्च गुंफलेली, मंजुळ आवाज करणाऱ्या घागऱ्यांनी मढवलेला लालित्यपूर्ण असा लगाम इत्यादि सर्व पाहून सर्व देव, मानव व मुनिसुद्धा थक्कच झाले! प्रभूच्या मनात आपले मन विलीन करून चालत असलेला तो घोडा सौंदर्याच्या सीमेने किती खुलला म्हणून वर्णन करावे? जणू काही तारकांच्या समुदायात विजेने अलंकृत झालेला वररूपी मेघ, सुंदर मोराला मोहक गतीने नाचवीत आहे! ३१६.

तात्पर्य, ज्या घोड्यावर राम स्वार झाले होते त्याचे स्तवन शारदा तरी पूर्णत्वाने कसे करणार?

पंधरा डोळ्यांचा उपयोग करून, (तीन डोळ्यांची पाच मुखे!) शंकर रामाचे रूप पाहण्यात गर्क झाले. रामचंद्रानी जेव्हा प्रेमाने विष्णूकडे पाहिले तेव्हा त्या अत्यंत मनोहर रूपाने रमेसह रमापतिसुद्धा मोहित झाले. रामाची अलौकिक कांति पाहून ब्रह्मदेव हर्षित झाले, परंतु आपल्याला फक्त आठच डोळे म्हणून त्यांना खेद झाला! कारण कार्तिकस्वामीना, ब्रह्मदेवाच्या दीडपट डोळ्यांचा लाभ झाल्यामुळे मोठा जोर चढला होता! इन्द्राला रामाकडे पाहात असता विचार आला की, गौतमऋषींच्या शापाने आपला यावेळी केवढा फायदा झाला! देवांनीही पुरंदराच्या या भाग्याबद्दल हेवा वाटून, त्याची वाहवा केली. याप्रमाणे रामाला पाहून सर्व देवसमुदाय आनंदित झाला.

दोन्हीकडील राजसमाजात त्यामुळे हर्ष अधिकच वाढला. मोठ्याने दुदुंभी निनादू लागल्या. "हे रघुकुलमणे! तुझा जयजयकार असो." असे मोठ्या हर्षाने म्हणून त्यांनी पुष्पवृष्टी केली. वरात याप्रमाणे



छं० — एहि भाँति जानि बरात आवत बाजने बहु बाजहीं ।
रानी सुआसिनि बोलि परिछनि हेतु मंगल साजहीं ।।

दो० — सजि आरति अनेक बिधि मंगल सकल सँवारि ।
चलीं मुदित परिछनि करन गजगामिनि बर नारि ।। ३१७ ।।

चौ० — बिधुबदनीं सब मृगलोचनि । सब निज तन छबि रति मदु मोचनि ।।
पहिरें बरन बरन बर चीरा । सकल बिभूषन सजें सरीरा ।।
सकल सुमंगल अंग बनाएँ । करहिं गान कलकंठि लजाएँ ।।
कंकन किंकिनि नूपुर बाजहिं । चालि बिलोकि काम गज लाजहिं ।।
बाजहिं बाजने बिबिध प्रकारा । नभ अरु नगर सुमंगलचारा ।।
सची सारदा रमा भवानी । जे सुरतिय सुचि सहज सयानी ।।
कपट नारि बर बेष बनाई । मिलीं सकल रनिवासहिं जाई ।।
करहिं गान कल मंगल बानीं । हरष बिबस सब काहुँ न जानी ।।

छं० — को जान केहि आनंद बस सब ब्रह्म बर परिछन चली ।
कल गान मधुर निसान बरषहिं सुमन सुर सोभा भली ।।
आनंदकंदु बिलोकि दुलहु सकल हियँ हरषित भई ।
अंभोज अंबक अंबु उमगि सुअंग पुलकावलि छई ।।

जवळ येताच अनेक वाद्यांचा एकच गजर झाला. सुमंगल द्रव्ये घेऊन सुवासिनींसह राण्यांनी ओवाळण्याची तयारी करून ठेवली. त्यांच्या प्रमाणेच अनेक मंगल द्रव्याच्या संभारासह, गजगामिनी श्रेष्ठ स्त्रिया [illegible] आनंदाने आरत्या सजवून निघाल्या. २१७.

सर्वच स्त्रिया चंद्राप्रमाणे सुंदर मुख असलेल्या, सर्वांचेच नेत्र [illegible]प्रमाणे मनोहर, आपल्या शरीर-कांतीच्या योगाने रतीचा रूपाहंकार नष्ट [illegible] सगळ्याच लावण्यवती होत्या. त्या निरनिराळ्या रंगाची लुगडी नेसल्या होत्या; त्यांनी अंगावर सर्व प्रकारचे दागिने घातले होते, त्यामुळे त्यांचे सर्व मंगल अवयव शोभिवंत दिसत होते. त्यांची गाणी सुरू झाली म्हणजे आपल्या मंजुळ आवाजाने त्या कोकिळेच्या स्वराला हिणवीत ! त्या चालू लागल्या म्हणजे, पायातील नूपुर, किंकिणी व हातातील मधुर आवाज करणारी कंकणे यांच्या तालात त्यांची पावले पडत व त्यापुढे कामदेवाच्या हत्तीच्या गतीची किंमत कमी होई !

अनेक प्रकारची वाद्ये वाजू लागली. आकाशात व नगरीत मंगलविधी सुरू झाले. शची, शारदा, रमा व भवानी या देवस्त्रिया स्वभावतःच पवित्र व ज्ञानी असल्यामुळे, त्यांनी कृत्रिम अशा उच्च दर्जाच्या स्त्रियांच्या रूपात, राण्यांच्या मेळ्यात आपला प्रवेश करून घेतला. अत्यंत सुस्वर अशी मंगल गाणी त्यांनी म्हणण्यास प्रारंभ करताच सगळ्या स्त्रिया आनंदाने वेड्या झाल्या ! पण रहस्य कोण जाणणार ?

त्या सर्व स्त्रिया परब्रह्माला ओवाळण्यास निघाल्या. गोड गाणी चालू आहेत. मधुरमधुर नगारे वाजताहेत, देवतांची पुष्पवृष्टी चालू आहे. सगळीकडेच मनोहरतेचे साम्राज्य सुरू झाले आहे !

आनंदकंद अशा नवरदेवाला पाहून सर्वांनाच परमानंद झाला. त्यांच्या कमल नेत्रांत अश्रू भरले व सर्व

दो० – जो सुखु भा सिय मातु मन देखि राम बर बेषु ।
सो न सकहिं कहि कलप सत सहस सारदा सेषु ॥ ३१८ ॥

चौ० – नयन नीरु हटि मंगल जानी । परिछनि करहिं मुदित मन रानी ॥
बेद बिहित अरु कुल आचारू । कीन्ह भली बिधि सब ब्यवहारू ॥
पंच सबद धुनि मंगल गाना । पट पाँवड़े परहिं बिधि नाना ॥
करि आरती अरघु तिन्ह दीन्हा । राम गमनु मंडप तब कीन्हा ॥
दसरथु सहित समाज बिराजे । बिभव बिलोकि लोकपति लाजे ॥
समयँ समयँ सुर बरषहि फूला । सांति पढहिं महिसुर अनुकूला ॥
नभ अरु नगर कोलाहल होई । आपनि पर कछु सुनइ न कोई ॥
एहि बिधि रामु मंडपहिं आए । अरघु देइ आसन बैठाए ॥

छं० – बैठारि आसन आरती करि निरखि बरु सुखु पावहीं ।
मनि बसन भूषन भूरि वारहिं नारि मंगल गावहीं ॥
ब्रह्मादि सुरबर बिप्र बेष बनाइ कौतुक देखहीं ।
अवलोकि रघु कुल कमल रबि छबि सुफल जीवन लेखहीं ॥

दो० – नाऊ बारी भाट नट राम निछावरि पाइ ।
मुदित असीसहिं नाइ सिर हरषु न हृदयँ समाइ ॥ ३१९ ॥

शुभांगे पुलकयुक्त झाली. पण वरवेषातील प्रभूला पाहून, सीतेच्या मातेला जे सुख झाले, ते हजारो शेष-शारदांना शेकडो कल्पातही वर्णन करता येणार नाही ! ३१८

मंगलसमय जाणून तिने आपल्या डोळ्यातील आनंदाश्रू आवरले व राणीने मनात हर्षयुक्त होऊन औक्षण (विशिष्ट प्रकारे ओवाळणे) केले. तसेच वेदोक्त व कुलाप्रमाणे सर्व आचार-व्यवहार पद्धतशीरपणे पार पाडले. मंगलगीते सुरू झाली. पंचवाद्ये (वीणा, करताल, झांज, नगारा, व शिंग या पाच वाद्यांचे शब्द) वाजू लागली. तसेच पाच प्रकारचे (वेद–बंदी, जय, शंख व हुलू म्हणजे स्त्रियांनी आनंदाने केलेला ध्वनिविशेष) यांचे ध्वनी झाले ! अनेक प्रकारच्या उंची वस्त्रांच्या पायघड्या घालण्यात आल्या. आरती करून अर्घ्य दिल्यावर रामानी मंडपात पदार्पण केले. दशरथांच्यासह सर्व समाज विराजमान झाला. त्यांचे ते वैभव पाहून लोकपालांना लाज वाटली ! मधून मधून देव पुष्पवृष्टी करीत व समयोचित अशी शांतिसूक्ते ब्राह्मण म्हणत. आकाशात व नगरीत केवढा किलकिलाट माजला ! ! आपला अगर दुसऱ्याचा शब्द काहीच ऐकू येईना.

राम अशाप्रकारे मंडपात आल्यावर त्यांना पुनः अर्घ्य देऊन आसनावर बसवले. आरती केली. त्यांना पाहून राणीप्रमुख सर्व स्त्रियांनी सुखाची लूट केली. स्त्रियांची मंगल गीते सुरू असताच, दागिने, वस्त्रे, रत्ने रामावरून ओवाळून टाकली ! हे परम कौतुक पहाण्यास ब्रह्मदेवादि देव श्रेष्ठ ब्राह्मणवेषात तेथे हजर रहाण्यास विसरतील कसे ? या प्रसंगीची रघुकुलकमलरवीची जेव्हा कान्ती पाहिली तेव्हा आपल्या जीवनाचे सार्थक झाले असे त्यांना वाटले.

न्हावी, बारी, भाट, नट यांनी आपापल्या वहिवाटीप्रमाणे रामावरून उतरून टाकलेले पदार्थ घेतले. त्यांच्या पोटात हर्ष मावेना, त्यांनी शिर नमवून आशीर्वाद दिले. ३१९



चौ० — मिले जनकु दसरथु अति प्रीतीं । करि बैदिक लौकिक सब रीतीं ।।
मिलत महा दोउ राज बिराजे । उपमा खोजि खोजि कबि लाजे ।।
लही न कतहुँ हारि हियँ मानी । इन्ह सम एइ उपमा उर आनी ।।
सामध देखि देव अनुरागे । सुमन बरषि जसु गावन लागे ।।
जगु बिरंचि उपजावा जब ते । देखे सुने ब्याह बहु तब तें ।।
सकल भाँति सम साजु समाजू । सम समधी देखे हम आजू ।।
देव गिरा सुनि सुंदर साँची । प्रीति अलौकिक दुहु दिसि माची ।।
देत पाँवड़े अरघु सुहाए । सादर जनकु मंडपहिं ल्याए ।।

छं० — मंडपु बिलोकि बिचित्र रचनाँ रुचिरताँ मुनि मन हरे ।
निज पानि जनक सुजान सब कहुँ आनि सिंघासन धरे ।।
कुल इष्ट सरिस बसिष्ट पूजे बिनय करि आसिष लही ।
कौसिकहि पूजत परम प्रीति कि रीति तौ न परै कही ।।


दो० — बामदेव आदिक रिषय पूजे मुदित महीस ।
दिए दिव्य आसन सबहि सब सन लही असीस ।। ३२० ।।

चा० — बहुरि कीन्हि कोसलपति पूजा । जानि ईस सम भाउ न दूजा ।।
कीन्हि जोरि कर बिनय बड़ाई । कहि निज भाग्य बिभव बहुताई ।।

मंडप दाराजवळ येताच वैदिक-लौकिक विधिपूर्वक जनक-दशरथ भेटी झाल्या! त्यांच्या परस्पर भेटीच्या वेळी ते कुणासारखे शोभले हे [illegible] कवीनी त्रैलोक्यात उपमा धुंडाळल्या व शेवटी हात टेकले! अखेर लज्जित होऊन मनात पराभूत झाले व त्यांच्या [illegible] तेच असा निर्णय त्यांच्या अंतःकरणाने दिला! दोन नृपांची ही भेट पाहून देवांना अत्यंत सौख्य वाटले. त्यांनी पुष्पवृष्टी केली व त्यांचे यश गाइले. ब्रह्मदेवाने सृष्टी उत्पन्न केल्यापासून आजपर्यंत एवढे विवाह झालेले पाहिले व ऐकले परंतु त्यात अगदी तंतोतंत जशास तसे, सर्व प्रकारे योग्य व श्रेष्ठ असे दोन्ही व्याही जमलेले आजच पाहिले! ही देवांची सत्य व मधुर वाणी ऐकून, अलौकिक प्रेमाने दोनी बाजूंच्या समाजांतील लोकांची हृदये भरून आली! छानदार पायघड्या घालीत, व शुभ असे अर्घ्य देत अत्यंत सन्मानाने, दशरथ महाराजांना जनकराजांनी मंडपात आणले.

मंडपाची विलक्षण रचना व त्याची मनोहरता पाहून बरोबरची मुनि मंडळीसुद्धा चकित झाली! सुज्ञ जनकमहाराजानी आपल्या हातानी सर्वांना योग्य त्या सिंहासनावर बसवले. कुलदेवतेप्रमाणेच वसिष्ठांचे पूजन करून त्याची प्रार्थना केली. त्यानीही उत्तम आशीर्वाद दिले. नंतर विश्वामित्र ऋषीचे पूजन करत असता जनक महाराजांच्या अंतःकरणात कोणत्या भक्तिभावना उचंबळून आल्या त्याचे वर्णन कवी कसे करणार? वामदेवादी सर्व ऋषीश्वरांची मोठ्या संतोषाने राजाने मग पूजा केली. त्याना दिव्य अशी आसने दिली त्या सर्वांकडून राजाला आशीर्वाद मिळाले. ३२०

त्यानंतर दुसरी कल्पना न आणता शंकर-ईश्वराप्रमाणेच कोसलपतीची पूजा [illegible] केली. हात जोडून स्तुति व प्रार्थना केली. अशाप्रकारे आपल्या भाग्य व वैभवाची फारच वृद्धि झाली असे उद्गार काढले.



पूजे भूपति सकल बराती । समधी सम सादर सब भाँती ॥
आसन उचित दिए सब काहू । कहौं काह मुख एक उछाहू ॥
सकल बरात जनक सनमानी । दान मान बिनती बर बानी ॥
बिधि हरि हरु दिसिपति दिनराऊ । जे जानहिं रघुबीर प्रभाऊ ॥
कपट बिप्र बर बेष बनाएँ । कौतुक देखहिं अति सचु पाएँ ॥
पूजे जनक देव सम जानें । दिए सुआसन बिनु पहिचानें ॥

छं० – पहिचान को केहि जान सबहि अपान सुधि भोरी भई ।
आनंद कंदु बिलोकि दूलहु उभय दिसि आनँदमई ॥
सुर लखे राम सुजान पूजे मानसिक आसन दए ।
अवलोकि सीलु सुभाउ प्रभु को बिबुध मन प्रमुदित भए ॥

दो० – रामचंद्र मुख चंद्र छबि लोचन चारु चकोर ।
करत पान सादर सकल प्रेमु प्रमोदु न थोर ॥ ३२१ ॥

चौ० – समउ बिलोकि बसिष्ठ बोलाए । सादर सतानंदु मुनि आए ॥
बेगि कुअँरि अब आनहु जाई । चले मुदित मुनि आयसु पाई ॥
रानी सुनि उपरोहित बानी । प्रमुदित सखिन्ह समेत सयानी ॥

व्याह्मप्रमाणेच्च अत्यंत आदराने सर्व वऱ्हाडी मंडळीचेही पूजन राजानी केले. सर्वांना योग्य तऱ्हेने स्थानापन्न केले. त्या उत्सवाचे वर्णन एका मुखाने करणे सर्वस्वी अशक्य ! सर्वांना योग्य त्या दान, मान, विनंती व आदरयुक्तवाणीने त्यानी संतुष्ट केले.

ब्रह्मा-विष्णु-शंकर दिनराज, दिशापती इत्यादि सर्व देव ज्याना रघुवीराच्या प्रभावाची कल्पना बरोबर होती. त्यानी श्रेष्ठ ब्राह्मणांच्या सुंदर गुप्त वेषात उपस्थित राहून तो सुखसोहळा पहाण्याचा आनंद मनसोक्त लुटला ! त्यांच्याकडे येताच जनकांनी न ओळखताच केवळ त्यांचे तेज पाहून त्यांची देवाप्रमाणे पूजा केली व त्यांना श्रेष्ठ आसनावर बसवले.

कोणीही मनुष्य देहभान विसरून वेडा होण्यासारखाच तो प्रसंग होता. कारण आनंदरूपी जलाची वृष्टी करणारा (आनंद-कं+द) प्रभू रामराय नवरदेव म्हणून पहाण्यात दोन्ही बाजूची मंडळी आनंदसागरात पोहतच होती. अशा स्थितीत कोण कोणास जाणणार व ओळखणार ?

विवाहोत्सवानंद लुटण्यासाठी ब्रह्मादिदेव विप्रवेषात आल्याचे प्रभूनी जाणलेच. त्यानी सर्वाना योग्य मानसिक आसने देऊन त्यांची मानसिक अर्घ्यादि देऊन पूजा केली. भगवंताचे हे शील व त्यांचा तो सु-भाव पाहून देवाना परमानंद झाला.

श्रीरामचंद्राचे मुखकमल हाच पूर्ण चंद्र व तेथे बसलेल्या सर्व समाजाचे नेत्र हेच चकोर ! त्या अपूर्व सौंदर्य सुधेचे मनमुराद प्राशन करीत असता त्या चकोरांना थोडे का सुख-समाधान होत होते ? ३२१

कार्याची योग्य वेळ होताच वसिष्टांनी आदराने शतानंदाना बोलावले. ते लगेच येऊन आदरयुक्त पुढे उभे राहिले. 'कुमारीला आता लौकर घेऊन या' मुनींची ही आज्ञा मिळताच शतानंद (शत+आनंद) त्या कामगिरीवर आनंदाने गेले. शहाण्या राणीने पुरोहितांची वाणी लक्षपूर्वक ऐकताच ती संतुष्ट झाली. लगेच तिने



बिप्र बधू कुलबृद्ध बोलाईं । करि कुल रीति सुमंगल गाईं ॥
नारि बेष जे सुर बर बामा । सकल सुभायँ सुंदरी स्यामा ॥
तिन्हहि देखि सुख पावहिं नारीं । बिनु पहिचानि प्रानहु ते प्यारी ॥
बार बार सनमानहिं रानी । उमा रमा सारद सम जानी ॥
सीय सँवारि समाजु बनाई । मुदित मंडपहिं चलीं लवाई ॥

छं० – चलि ल्याइ सीतहि सखीं सादर सजि सुमंगल भामिनीं ।
नवसप्त साजें सुंदरीं सब मत्त कुंजर गामिनीं ॥
कल गान सुनि मुनि ध्यान त्यागहिं काम कोकिल लाजहीं ।
मंजीर नूपुर कलित कंकन ताल गति बर बाजहीं ॥

दो० – सोहति बनिता बृंद महुँ सहज सुहावनि सीय ।
छबि ललना गन मध्य जनु सुषमा तिय कमनीय ॥ ३२२ ॥

चौ० – सिय सुंदरता बरनि न जाई । लघु मति बहुत मनोहरताई ॥
आवत दीखि बरातिन्ह सीता । रूप रासि सब भाँति पुनीता ॥
सबहि मनहिं मन किए प्रनामा । देखि राम भए पूरनकामा ॥
हरषे दसरथ सुतन्ह समेता । कहि न जाइ उर आनँदु जेता ॥

ब्राह्मण स्त्रिया व आपल्या घराण्यातील वृद्ध बायकांना आणवून सुमंगल गीतांच्या साथीने कुलाचार सांगपणे पार पाडले.

देवांच्या स्त्रिया ज्या गुप्तवेषात तेथे आल्या होत्या, त्या सर्व श्यामा (सोळा वर्षांच्या) होत्या. त्यांचे स्वाभाविक लावण्य व कांती पाहून सर्व स्त्रियांना मोठे समाधान झाले. परिचय नसताच त्यांना त्या अतिशय प्राणप्रिय वाटू लागल्या! राणीने तर पुनः पुन्हा त्यांचा, अगदी उमा, रमा, शची-शारदेप्रमाणे सन्मान केला.

सीता आणि तिच्याबरोबर जाणाऱ्या स्त्रिया यांनी मंगलवस्तू सजवून योग्य तयारी होताच तिला घेऊन मोठ्या संतोषाने ही मंडळी मंडपाकडे निघाली. सखी व भागिमनी सीतेच्या सर्वच मैत्रिणी जात्या सुंदर, आज उत्तम नट्टा पट्टा केलेल्या; षोडशभूषणे अंगावर घालून मत्त गजाच्या चालीने त्या सीतेला घेऊन निघाल्या, त्यांचे गायन कानावर पडताच मुनींचे ध्यान सुटले! त्याचा तो गोड स्वर ऐकून प्रत्यक्ष कामदेवाचे कोकीळ-सुद्धा लाजून त्यांनी खाली माना घातल्या. नूपुरांचा आवाज कटिमेखला (मंजीर) व कंकणांचा मधुरध्वनी अगदी तालावर निघत होता!

जन्मतःच अत्यंत लावण्यसंपन्न सीता तिच्या त्या सौंदर्यपूर्ण मैत्रिणींच्या मध्ये आता कमालीची खुलून दिसू लागली. जणू काही सौंदर्यरूपी स्त्रियांच्या प्रभावळीमध्ये साक्षात् परम मनोहर शोभारूपी स्त्री ठसठशीतपणे नजरेत भरत आहे! ३२२

सीतेची शोभा अवर्णनीय व अपार. आणि या कवीच्या या लघुबुद्धीला न पेलणारी ती अमर्याद मनोहरता आहे.

सर्वतो परी पवित्र अशी रूपराशी सीता मंडपात आलेली वऱ्हाडी मंडळींनी पाहिली व त्यांनीम नातल्या मनात तिला प्रणाम केला. व नंतर श्रीरामचंद्राकडे निरखून पाहिल्यावर त्यांना कृतकृत्यता वाटली. आपल्या पुत्रासह दशरथ महाराजांना हृदयात केवढा हर्ष झाला ते सांगणे अशक्य. देवांनी प्रणाम करून पुष्पवृष्टी केली.

सुर प्रनामु करि बरिसहिं फूला । मुनि असीस धुनि मंगल मूला ॥
गान निसान कोलाहलु भारी । प्रेम प्रमोद मगन नर नारी ॥
एहि बिधि सीय मंडपहिं आई । प्रमुदित सांति पढ़हिं मुनिराई ॥
तेहि अवसर कर बिधि व्यवहारू । दुहुँ कुलगुर सब कीन्ह अचारू ॥

छं०—आचारु करि गुर गौरी गनपति मुदित बिप्र पुजावहीं ।
सुर प्रगटि पूजा लेहिं देहिं असीस अति सुखु पावहीं ॥
मधुपर्क मंगल द्रब्य जो जेहि समय मुनि मन महुँ चहैं ।
भरे कनक कोपर कलस सो तब लिएहिं परिचारक रहैं ॥ १ ॥
कुल रीति प्रीति समेत रबि कहि देत सबु सादर कियो ।
एहि भाँति देव पुजाइ सीतहि सुभग सिंघासनु दियो ॥
सिय राम अवलोकनि परसपर प्रेमु काहु न लखि परै ।
मन बुद्धि बर बानी अगोचर प्रगट कबि कैसें करै ॥ २ ॥

दो०—होम समय तनु धरि अनलु अति सुख आहुति लेहिं ।
बिप्र बेष धरि बेद सब कहि बिबाह बिधि देहिं ॥ ३२३ ॥

चौ०—जनक पाटमहिषी जग जानी । सीय मातु किमि जाइ बखानी ॥
सुजसु सुकृत सुख सुंदरताई । सब समेटि बिधि रची बनाई ॥

मंगलमूळ अशी आशीर्वचने मुनींच्या समुदायातून प्रकटली. गायन व वादन यांचा अत्यंत मोठा कोलाहल झाला. प्रेमानंदात सर्व स्त्रीपुरुष मग्न होऊन गेले. अशा थाटात सीता एकदाची मंडपात येऊन दाखल झाली.

प्रमुदित झालेल्या मुनिश्रेष्ठांनी शक्तिसूक्ते म्हणण्यास प्रारंभ केला. दोन्हीकडील कुलगुरू वसिष्ठ-शतानंदानी समयोचित विधी व व्यवहाराचे आचार इत्यादि सर्व विधी उरकले. वधूवराकडून गुरु, गौरि-गणपती व ब्राह्मण याचे आनंदाने पूजन करविले. तेव्हा देवानी प्रगट होऊन पूजा घेतली व आशीर्वाद दिल्या-नंतर देव परम सुखी झाले.

मधुपर्क वगैरे जी जी मंगल वस्तू पाहिजे, असे नुसते मुनींच्या मनात यावयाचा अवकाश की, ती ती वस्तू सुवर्णाच्या परातीत किंवा कलशात भरलेली, अगदी हातात घेऊन सेवक तयार राहात. स्वतः सूर्यनारायणच आपल्या कुलाच्या रीतीची, माहिती करून देण्यास प्रीतिपूर्वक उभे राहिले व त्यांच्या सांगण्याप्रमाणे प्रत्येक गोष्ट यथासांग केली. याप्रमाणे देवतांची पूजा करवून, मुनीनी सीतेला सुन्दर सिंहासन रामासमोर दिले. त्यानंतर सीता व राम यानी परस्परांचे अवलोकन केले. त्यावेळचे त्यांचे परस्परांवरील प्रेम कोणालाच जाणता आले नाही. जी गोष्ट श्रेष्ठ मन-बुद्धी (एकमेकाकडे पाहिले) वाणीच्याही कक्षेत वसू शकत नाही. तिचे वर्णन करून कवि कसे सांगणार ?

होम चालू असता हवनाच्यावेळी अग्निनारायण मूर्तिमंत प्रगट होऊन मोठ्या संतोषाने त्यानी आहुती ग्रहण केल्या ! त्याचप्रमाणे सर्व वेदांनी ब्राह्मणांची रूपे घेऊन सर्व विवाहविधी करवून घेतला ! ३२३

जगविख्यात जनकाची पट्टराणी व सीतेची माता तिचे वर्णन करणे शक्य ? कारण सुयश, कसे सर्व सुकृत, सर्व सुख व सर्व प्रकारचे सौंदर्य याचे संकलन करून विधीने तिला उत्पन्न केली होती ! कन्यादानाची वेळ

समउ जानि मुनिबरन्ह बोलाईं । सुनत सुआसिनि सादर ल्याईं ।।
जनक बाम दिसि सोह सुनयना । हिमगिरी संग बनी जनु मयना ।।
कनक कलस मनि कोपर रूरे । सुचि सुगंध मंगल जल पूरे ।।
निज कर मुदित रायँ अरु रानी । धरे राम के आगें आनी ।।
पढ़हिं बेद मुनि मंगल बानी । गगन सुमन झरि अवसरु जानी
बरु बिलोकि दंपति अनुरागे । पाय पुनीत पखारन लागे ।।

छं० —लागे पखारन पाय पंकज प्रेम तन पुलकावली ।
नभ नगर गान निसान जय धुनि उमगि जनु चहुँ दिसि चली ।।
जे पद सरोज मनोज अरि उर सर सदैव बिराजहीं ।
जे सकृत सुमिरत बिमलता मन सकल कलि मल भाजहीं ।। १ ।।
जे परसि मुनिबनिता लही गति रही जो पातकमई ।
मकरंदु जिन्ह को संभु सिर सुचिता अवधि सुर बरनई ।।
करि मधुप मन मुनि जोगिजन जे सेइ अभिमत गति लहैं ।
ते पद पखारत भाग्यभाजनु जनकु जय जय सब कहैं ।। २ ।।
बर कुअँरि करतल जोरि साखोचारु दोउ कुलगुर करैं ।
भयो पानिगहनु बिलोकि बिधि सुर मनुज मुनि आनँद भरैं ।।

होताच मुनिवर्यांनी बोलावणे पाठवले, तेव्हा तिला सुवासिनींनी आदरपूर्वक आणली. हिमवंताच्या सन्निध जशी त्याची पट्टराणी मयना शोभावी तशी जनक महाराजांच्या वामांगी सुनयना खुलून दिसू लागली.

पवित्र, सुगन्धित आणि मंगल अशा पाण्याने भरलेले सोन्याचे कलश, रत्नखचित सुन्दर परातीत ठेवून राजा राणींनी आनंदाने आपल्या हातानी त्या पराती आणून श्रीरामचंद्रांच्या पुढे ठेवल्या. मंगलवाणीने मुनींनी वेदघोष सुरू केला. कन्यादानाचा समय ओळखून आकाशांतून देवांनी सुमनवृष्टीची झड सुरू केली. वराकडे निरखून पाहून राजाराणींची हृदये प्रेमाने भरून आली. त्यानंतर पावन पदकमले धुण्याची वेळ आली.

दंपती राम चरणकमल धुण्यास प्रारंभ करू लागताच त्यांचे सर्व शरीर प्रेमभराने रोमांचांनी भरून गेले. इकडे आकाशात व नगरीत मंगल गीते, नगाऱ्यांचे आवाज, जयघोष इत्यादींचे पूर दाही दिशांना भरून चालले. जी पदकमले शंकरांच्या मानससरोवरात सदोदित फुलून खुलतात, ज्यांचे फक्त एकवेळही स्मरण केल्याने मनातील सर्व दोषांचे निर्मूलन होते, व कलियुगासंबंधी सर्व पाप पळून जाते. गौतमपत्नी जरी अत्यंत पापी होती तरीही ज्यांचा केवळ स्पर्श होताच अहिल्येला सद्गती मिळाली, ज्यांच्या चरणांचा मकरन्दरस (गंगा नदी) शंकरांच्या मस्तकी आहे, सर्व देव तिला पावित्र्याची परमसीमा समजतात; मुनी व योगी आपल्या मनाला भ्रमर बनवून ज्या चरणकमलांचा आश्रय केल्याने मनोवांछित गती मिळवतात, ते चरण, परम भाग्यवंत जनक, आज धूत आहेत व सर्व लोक त्यांचा जयजयकार करीत आहेत ! !

दोन्ही कुळांचे गुरू, वर व वधू यांचे करतल एकत्र करून शाखेचा उच्चार करतात; हे पाणिग्रहण पाहून, ब्रह्मादिक देव मानव व मुनी आनंदसागरात मग्न झाले ! सुखाचे मूलस्थान असणारा असा आपला



सुखमूल दूलहु देखि दंपति पुलक तन हुलस्यो हियो ।
करि लोक बेद बिधानु कन्यादानु नृपभूषन कियो ॥ ३ ॥
हिमवंत जिमि गिरिजा महेसहि हरिहि श्री सागर दई ।
तिमि जनक रामहि सिय समरपी बिस्व कल कीरति नई ॥
क्यों करै बिनय बिदेहु कियो बिदेहु मूरति सावँरीं ।
करि होमु बिधिवत गाँठि जोरी होन लागीं भावँरीं ॥ ४ ॥

दो०—जय धुनि बंदी बेद धुनि मंगल गान निसान ।
सुनि हरषहिं बरषहिं बिबुध सुरतरु सुमन सुजान ॥ ३२४ ॥

चौ०—कुअँरु कुअँरि कल भावँरि देहीं । नयन लाभु सब सादर लेहीं ॥
जाइ न बरनि मनोहर जोरी । जो उपमा कछु कहौं सो थोरी ॥
राम सीय सुंदर प्रतिछाहीं । जगमगात मनि खंभन माहीं ॥
मनहुँ मदन रति धरि बहु रूपा । देखत राम बिआहु अनूपा ॥
दरस लालसा सकुच न थोरी । प्रगटत दुरत बहोरि बहोरी ॥
भए मगन सब देखनिहारे । जनक समान अपान बिसारे ॥
प्रमुदित मुनिन्ह भावँरीं फेरीं । नेगसहित सब रीति निबेरीं ॥

जामात पाहून, राजा व राणी यांचे अंतःकरण इतके हर्षनिर्भर झाले की, दोघांच्या शरीरावर भराभर काटा उभा राही ! सर्व राजांना भूषण बनलेल्या जनक राजाने नंतर लौकिक वैदिक विधियुक्त कन्यादान केले.


हिमवंताने आपली कन्या पार्वती जशी शंकराना किंवा सागराने विष्णूला जशी लक्ष्मी दिली त्याचप्रमाणे रामप्रभूना जनक राजानी सीता समर्पण केली आणि त्यामुळे अखिल विश्वात त्यांची ही अशी नवी कीर्ती दुमदुमून राहिली. श्यामल अशा भगवंतांच्या देहकान्तीने अगोदरच ज्याला विदेह बनवून टाकला असा विदेह आता प्रभूना विनंती कशी करणार ? होम यथासांग झाल्यावर गाठ मारून सप्तपदि-विधी सुरू झाला !

त्याबरोबर ब्राह्मणांचा वेदघोष, मागध-भाट बंदीचा जयघोष, स्त्रियांची मंगलगाने, दुंदुभीचे मधुर ध्वनी इत्यादी एकदम सुरू झाले. हा आवाज ऐकताच देवांना परमानंद होऊन त्यानी शहाणपणाने लगेच कल्पतरूच्या सुमनांचा भगवंतावर वर्षाव केला ! ३२४

श्रेष्ठ अशी ही वधुवरांची जोडी सप्तपदीतील पावले टाकत असता, तेथील सर्व प्रेक्षक लोकांनी आपल्या डोळ्यांचे पारणे फेडून घेतले. या मनोहर जोडीचे वर्णन करण्याचा वेडेपणा ज्यानी केला त्याना असे आढळले की आपण जी उपमा देत आहो ती सर्वस्वी अपुरीच !

रत्नखचित सुंदर खांबांत, (सप्तपदी चालू असता), राम आणि सीतेची अनेक मनोहर प्रतिबिंबे चमकू लागली ! असे वाटले की, जणू काही राम-सीता विवाहाचा अनुपमेय उत्सव पहाण्यासाठीच मदनरतीनीच अनेक रूपे धारण केली आहेत ! पहाण्याची उत्कंठा तर मोठी, पण लोकांच्या पुढे जाण्याची लाज अतिशय, त्यामुळे प्रगट व्हावे की, लपावे, पुनः प्रगट व्हावे की, लपावे असा त्यांचा खेळ सुरू होता ! हा अतुल्य, अपूर्व, अलौकिक नयनानंद लुटत असतां विदेहाबरोबर तेथे हजर असणारे सगळेच लोक विदेह बनले ! (देहभान विसरले.)

प्रमुदित मुनींनी याप्रमाणे सप्तपदीचा विधी उरकताच लोकांनी अहेरादि देण्याचा कार्यक्रम संपवला.



राम सीय सिर सेंदुर देहीं । सोभा कहि न जाति बिधि केहीं ॥
अरुन पराग जलजु भरि नीकें । ससिहि भूष अहि लोभ अमी कें ॥
बहुरि बसिष्ठ दीन्हि अनुसासन । बरु दुलहिनि बैठे एक आसन ॥
छं० –बैठे बरासन रामु जानकि मुदित मन दसरथु भए ।
तनु पुलक पुनि पुनि देखि अपने सुकृत सुरतरु फल नए ॥
भरि भुवन रहा उछाहु राम बिबाहु भा सबहीं कहा ।
केहि भाँति बरनि सिरात रसना एक यहु मंगलु महा ॥ १ ॥
तब जनक पाइ बसिष्ठ आयसु ब्याह साज सँवारि कै ।
मांडवी श्रुतकीरति उरमिला कुअँरि लईं हँकारि कै ॥
कुसकेतु कन्या प्रथम जो गुन सील सुख सोभामई ।
सब रीति प्रीति समेत करि सो ब्याहि नृप भरतहि दई ॥ २ ॥
जानकी लघु भगिनी सकल सुंदरि सिरोमनि जानि कै ।
सो तनय दीन्ही ब्याहि लखनहि सकल बिधि सनमानि कै ॥
जेहि नामु श्रुतकीरति सुलोचनि सुमुखि सब गुन आगरी ।
सो दई रिपुसूदनहि भूपति रूप सील उजागरी ॥ ३ ॥

लगेच, सीतेच्या केशमध्यांवर मस्तकी शेंदूर भरण्यासाठी रामानी सुरवात केली. त्याची शोभा वर्णन करण्यास मन धजतच नाही. कारण त्यावेळी असे वाटले की, जणू सूर्यविकासी कमल लालपराग संपूर्ण भरून घेऊन ते अमृताच्या अत्यंत लोभाने चंद्राला भूषित करत आहे ! [प्रभूचे दोन श्यामवर्णांचे हात हे भुजंग, शेंदूर हाच पराग, त्यानी भूषित झालेले कर हीच कमळे आणि सीतेचे मुख हा चंद्र !!]

वसिष्ठांची आज्ञा होताच वधुवरांनी एक आसन सुभूषित केले. एका उच्च व श्रेष्ठ अशा सिंहासनावर राम व जानकी बसलेली पाहून दशरथाच्या शरीरावर भरपूर रोमांच कितीतरी वेळा उठत आहेत ! मन अत्यंत मुदित झाले. कारण आपल्या सुकृतरूपी कल्पवृक्षाला ही नवीन फळे आलेली त्यानी पाहिली.

चौदाही भुवनांत मोठा उत्साह भरून राहिला. ' रामविवाह सोहाळा झाला ' असे लोक म्हणू लागले. एकटी बिचारी जीभ या महान् मंगलाचे वर्णन करून ते कसे संपवू शकणार ?

याप्रमाणे हा एक लग्नसोहाळा सांग होतांच वसिष्ठ गुरूंची आज्ञा मिळवून, जनकराजांनी सर्व लग्न सामग्री सिद्ध केली; आणि मांडवी, श्रुतिकीर्ती व उर्मिला अशा तीन्ही कुमारिकांना आणवल्या.

कुशध्वजाची मोठी कन्या, गुण, शील, शोभा, सुखाचे स्वरूप असणारी मांडवी; राजा जनकाने, प्रेमपूर्वक सर्व विधि यथासांग करून, तिचा भरताशी विवाह केला.

जानकीची धाकटी बहिणी उर्मिला, सर्व सुंदर कुमारिकांची मुकुटमणी, अशी वैवाहिक सर्व विधिपूर्वक जनकांनी ती लक्ष्मणाला दिली.

चौथी श्रुतिकीर्ती नांवाची, नेत्र व मुख सुंदर असून सर्व सद्गुणांची केवळ खाणच असणारी रूप व शीलाने तळपणारी अशी कन्या, यथाविधी शत्रुघ्नाला कुशध्वज भूपतींनी दिली !

अनुरूप बर दुलहिनि परस्पर लखि सकुच हियँ हरषहीं ।
सब मुदित सुंदरता सराहहिं सुमन सुर गन बरषहीं ॥
सुंदरीं सुंदर बरन्ह सह सब एक मंडप राजहीं ।
जनु जीव उर चारिउ अवस्था बिभुन सहित बिराजहीं ॥ ४ ॥

दो० — मुदित अवधपति सकल सुत बधुन्ह समेत निहारि ।
जनु पाए महिपाल मनि क्रियन्ह सहित फल चारि ॥ ३२५ ॥

चौ० — जसि रघुबीर ब्याह बिधि बरनी । सकल कुअँर ब्याहे तेहिं करनी ॥
कहि न जाइ कछु दाइज भूरी । रहा कनक मनि मंडपु पूरि ॥
कंबल बसन बिचित्र पटोरे । भाँति भाँति बहु मोल न थोरे ॥
गज रथ तुरग दास अरु दासी । धेनु अलंकृत कामदुहा सी ॥
बस्तु अनेक करिअ किमि लेखा । कहि न जाइ जानहिं जिन्ह देखा ॥
लोकपाल अवलोकि सिहाने । लीन्ह अवधपति सबु सुखु माने ॥
दीन्ह जाचकन्हि जो जेहि भावा । उबरा सो जनवासेहिं आवा ॥
तब कर जोरि जनकु मृदु बानी । बोले सब बरात सनमानी ॥

छं० — सनमानि सकल बरात आदर दान बिनय बड़ाइ कै ।
प्रमुदित महा मुनि बृंद बंदे पूजि प्रेम लड़ाइ कै ॥

या सर्व नव्या नोवऱ्या, आपल्या मनाजोगा पती प्रत्येकीला मिळाल्याने, एकमेकाला पाहून लाजू लागल्या ! पण मनात हर्षित होत आहेत. सर्व लोकांनी त्यांच्या सौंदर्याची वाहवा केली आणि देवांनी पुष्पवृष्टी केली. अशा त्या सुंदर कन्यका, सुंदर वरांसह एकाच मंडपात इतक्या मनोहर दिसू लागल्या की, चारी अवस्था (जागृति, स्वप्न, सुषुप्ति व तुरीया) जणू काही आपल्या चारी स्वामीसह (विश्व, तैजस, प्राज्ञ व प्रत्यगात्मा) जीवांच्या हृदयांत विराजमान झाल्या आहेत !

आपल्या चारी पुत्रांना त्यांच्या पत्नींसह पाहून, अयोध्यापती इतके मुदित झाले की, जणू काही राजाच्या मुगुटमणीना चारी क्रियांसह (वार्ताक्रिया, श्रद्धाक्रिया, त्यागक्रिया व ज्ञानक्रिया) चारी फळांची (अर्थ, धर्म, काम व मोक्ष या पुरुषार्थांची) प्राप्ती झाली आहे ! ३२५

रघुवीरांच्या विवाहांत जेवढे विधि ज्या थाटाने केले तसेच, सर्व कार्यक्रम या तीन्ही मुलांच्या लग्नांत तितक्याच उत्साहाने केले.

वरदक्षणा (देज-हुंडा) किती दिली हे काय सांगावे ? सर्व मंडपच सोन्यारत्नांनी तुडुंब भरून टाकला ! सुती, रेशमी व लोकरीची वस्त्रें नानाप्रकारची ! त्यांच्या किमतीबद्दल विचारूच नका. हत्ती, घोडे, रथ व चांगल्या निष्ठेचे दास व दासी व अलंकृत केलेल्या [illegible] गायी ! याशिवाय इतक्या नानाप्रकारच्या वस्तू दिल्या की त्या ज्याने पाहिल्या त्यालाच कल्पना येणार, तोंडाने त्याचे वर्णन होणार नाहीं ! ती संपत्ती पाहिल्यावर लोकपालांच्या तोंडाला पाणी सुटले ! अयोध्यापतींनी समाधान मानून तिचे ग्रहण केले. लगेच याचकांपैकी ज्यांना जे आवडले ते त्यांना देऊन टाकले व उरलेले त्यांच्या जानोशाच्या घरी [illegible] आले.

जनकांनी हात जोडले व कोमल शब्दांनी वऱ्हाड्यांचा आदर, दान मोठेपणा व विनंती या रीतीने सन्मान केला. मुनिश्रेष्ठ मंडळींची योग्यप्रकारे प्रेमपूर्वक पूजा करून राजाने त्यांना वंदन केल्यानंतर ते सर्व संतुष्ट झाले.



सिरुनाइ देव मनाइ सब सन कहत कर संपुट किएँ ।
सुर साधु चाहत भाउ सिंधु कि तोष जल अंजलि दिएँ ॥ १ ॥
कर जोरि जनकु बहोरि बंधु समेत कोसलराय सों ॥
बोले मनोहर बयन सानि सनेह सील सुभाय सों ॥
संबंध राजन रावरें हम बड़े अब सब बिधि भए ।
एहि राज साज समेत सेवक जानिबे बिनु गथ लए ॥ २
ए दारिका परिचारिका करि पालिबीं करुना नई ।
अपराधु छमिबो बोलि पठए बहुत हौं ढीट्यो कई ॥
पुनि भानुकुलभूषन सकल सनमान निधि समधी किए ।
कहि जाति नहिं बिनती परस्पर प्रेम परिपूरन हिए ॥ ३ ॥
बृंदारका गन सुमन बरिसहिं राउ जनवासेहि चले ।
दुंदुभी जय धुनि बेद धुनि नभ नगर कौतूहल भले ॥
तब सखीं मंगल गान करत मुनीस आयसु पाइ कै ।
दूलह दुलहिनिन्ह सहित सुंदरि चलीं कोहबर ल्याइ कै ॥ ४ ॥

दो ० –पुनि पुनि रामहि चितव सिय सकुचति मनु सकुचै न ।
हरत मनोहर मीन छबि प्रेम पिआसे नैन ॥ ३२६ ॥

मासपारायण, ग्यारहवाँ विश्राम

शेवटी देवतांच्यापुढे, मिथिलाधिपतीनी आपले मस्तक नमवून विनंतिपूर्वक प्रार्थना केली. ‘ देवता व साधू हे केवळ भावाचेच भोक्ते असतात. (ते प्रेमानेच प्रसन्न होतात, नाहीतर त्या पूर्णकाम महामुनीना काही तरी देऊन कसे संतुष्ट करणे शक्य आहे ?) असे नसते तर एक ओंजळभर अर्घ्य देऊन समुद्र कधीतरी तृप्त झाला असता काय ? ’

मग, आपल्या धाकट्या बंधूसह जनकराजांनी कोसलेशांपुढे हात जोडले; आणि स्नेह, उत्तम शील व सद्‌भावनांनी भरलेले असे मधुर भाषण केले. “ हे राजन् आपल्याशी आज आमचा नात्याचा संबंध जोडला गेल्याने आम्ही सर्व प्रकारेच आता मोठे झालो ! तेव्हां या आमच्या सर्व राज्यवैभवासह काहीही मोबदल्याची अपेक्षा न करता, आम्ही आपले फुकट सेवक झालो असे मानावे ! या आमच्या कन्यका आपल्या घरच्या दासी करून नित्य नव्या प्रेमाने त्यांचे पालन करावे ! आपणाला (सम्राटाला) मी इकडे बोलावले हा माझा फारच मोठा उद्धटपणा झाला असून तो माझा अपराध आपण मला आपला दास मानून पोटात घालावा. ”

हे मिथिलेश्वराचे अत्यंत गोड भाषण झाल्यावर सूर्यकुलाचे भूषण अशा दशरथ महाराजांनीही जनकराजाचा एवढा सन्मान केला की, मिथिलेश्वर सन्मानाचे एक भाण्डार बनले ! तात्पर्य दोघांचा परस्परांबद्दलचा आदर शब्दातीतच ! दोघांची हृदये प्रेमाने भरून आली !

देवतांच्या पुष्पवर्षावातच दशरथमहाराज जानोशाच्या ठिकाणी निघाले. नगाऱ्यांच्या फेरी जयजयकारांचे ध्वनी आणि वेदघोष सुरू झाले. आकाशात व नगरीत कुतूहल ओतप्रोत भरून राहिले. मुनीश्वरांची परवानगी मिळताच सुंदर सखीनी मंगलगान करीत, वरवधूंना बरोबर घेऊन त्यांना गौरीहराकडे नेले.

सीतेने पुनः पुन्हा रामाकडे हळूच पहावे व लाजावे,: पण तिच्या मनाला मात्र संकोच वाटत नव्हता ! प्रेमासाठी तहानेलेले तिचे नेत्र मनोहर मीनांचे सौंदर्य हरण करून घेत होते. (इतके सुंदर व चपळ होते.) ३२६

चौ० —स्याम सरीरु सुभायँ सुहावन । सोभा कोटि मनोज लजावन ॥
जावक जुत पद कमल सुहाए । मुनि मन मधुप रहत जिन्ह छाए ॥
पीत पुनीत मनोहर धोती । हरति बाल रबि दामिनि जोती ॥
कल किंकिनि कटि सूत्र मनोहर । बाहु बिसाल बिभूषन सुंदर ॥
पीत जनेउ महाछबि देई । कर मुद्रिका चोरि चितु लेई ॥
सोहत ब्याह साज सब साजे । उर आयत उरभूषन राजे ॥
पिअर उपरना काखासोती । दुहुँ आँचरन्हि लगे मनि मोती
नयन कमल कल कुंडल काना । बदनु सकल सौंदर्ज निधाना ॥
सुंदर भृकुटि मनोहर नासा । भाल तिलकु रुचिरता निवासा ॥
सोहत मौरु मनोहर माथे । मंगलमय मुकुता मनि गाथे ॥

छं० —गाथे महामनि मौर मंजुल अंग सब चित चोरहीं ।
पुर नारि सुर सुंदरीं बरहि बिलोकि सब तिन तोरहीं ॥
मनि बसन भूषन वारि आरति करहिं मंगल गावहीं ।
सुर सुमन बरिसहिं सूत मागध बंदि सुजसु सुनावहीं ॥ १ ॥
कोहबरहिं आने कुअँर कुअँरि सुआसिनिन्ह सुख पाइ कै ।
अति प्रीति लौकिक रीति लागीं करन मंगल गाइ कै ॥

नवरदेव, भगवान् रामचंद्र निघाल्यानंतर त्यांचे त्यावेळचे लावण्य अत्यंत आकर्षक होते. स्वभावतः रमणीय असे श्यामसुंदर शरीर ! कोटि काम-शोभेला ते लाजवीत होते. अळित्याने विशिष्ट पद्धतीने रंगवलेले (अळिता लावलेले) पदकमल खुलून दिसत होते. मुनींच्या मनरूपी भ्रमरांचे ते कायमचे वसतिस्थान ! नुकत्याच उगवलेल्या सूर्याला व विजेला फिका पडणारा स्वच्छ व मनोहर पीतांबर ! सुंदर घागऱ्यांचा छानदार कडदोरा, विशाल भुजांवर रमणीय बाहूभूषणे घातलेली. पिवळे यज्ञोपवीत या सर्व थाटात चांगल्याच शोभेची भर पाडीत होते; हातातील अंगठी कोणाच्याही नजरेला आकर्षक वाटे. याप्रमाणे नवरदेवाचे सर्व अलंकार मनाला आल्हाद देत होते, विशाल वक्षःस्थलावर उरभूषणे विराजत होती ! खाके खालून पिवळे उपरणे घेतले होते, त्याच्या दोन्ही पदरांना व दशांना रत्ने व मोती गुंफले होते.

नेत्रकमल मनोहर व कानातील कुण्डले शोभिवंत, मुखकमल तर सर्व सौंदर्याची उत्तम खाणच ! त्यावरील भृकुटी छानदार, नाक मनोहर, कपाळावरील तिलक तर सौंदर्याचे श्रेष्ठ निवासस्थानच ! मोती व रत्नांनी मांगल्यपूर्ण बनवलेला मोरमुकुट मस्तकावर विलसत आहे !! त्यावर अत्यंत मौल्यवान रत्ने बसवली असल्याने, प्रभूचे सर्वच अवयव कोणाच्याही चित्ताला मोहिनी घालीत.

नगरातील स्त्रिया व देवस्त्रिया अशा या अतुल्य वरश्रेष्ठाला पाहून भराभर दृष्ट काढून टाकीत असत. मंगल गाणी गाऊन, दागिने, रत्ने व वस्त्रे ओवाळून आरती करीत. देव पुष्पवृष्टी करीत, सूत-मागध-बंदी आदिकरून सर्व भगवंताचे सुयश गान करू लागले.

अशा आनंदोत्सवात कुमार-कुमारींना गौरीहराकडे आणलेले पाहून, स्त्रियांना समाधान वाटले. प्रेमाने मंगल गाणी सुरू झाली व लौकिकाचार करण्यास प्रारंभ झाला. गौरी (उमा) रामास शिकवित आहे की,

लहकौरि गौरि सिखाव रामहि सीय सन सारद कहैं ।
रनिवासु हास बिलास रस बस जन्म को फलु सब लहैं ।। २ ।।
निज पानि मनि महुँ देखिअति मूरति सुरूपनिधान की ।
चालति न भुजबल्ली बिलोकनि बिरह भय बस जानकी ।।
कौतुक बिनोद प्रमोदु प्रेमु न जाइ कहि जानहिं अलीं ।
बर कुअँरि सुंदर सकल सखीं लवाइ जनबासेहि चलीं ।। ३ ।।
तेहि समय सुनिअ असीस जहँ तहँ नगर नभ आनंदु महा ।
चिरु जिअहुँ जोरीं चारु चार्‍यो मुदित मन सबहीं कहा ।।
जोगींद्र सिद्ध मुनीस देव बिलोकि प्रभु दुंदुभि हनी ।
चले हरषि बरषि प्रसून निज निज लोक जय जय जय भनी ।। ४ ।।

दो० —सहित बधूटिन्ह कुअँर सब तब आए पितु पास ।
सोभा मंगल मोद भरि उमगेउ जनु जनवास ।। ३२७ ।।

चौ० —पुनि जेवनार भई बहु भाँती । पठए जनक बोलाइ बराती ।।
परत पाँवड़े बसन अनूपा । सुतन्ह समेत गवन कियो भूपा ।।
सादर सब के पाय पखारे । जथाजोगु पीढ़न्ह बैठारे ।।
धोए जनक अवधपति चरना । सीलु सनेहु जाइ नहिं बरना ।।


सीतेला (मिठाचा, खिरीचा) घास द्या पाहू व सरस्वती सीतेला सांगते की (लोणच्याचा, आमटीचा) घास द्या पाहू. याप्रमाणे हास्यविलासांतून उत्पन्न होणाऱ्या प्रेमरसाला वश होऊन सर्व राण्यांना आपल्या जन्माचे सार्थक झाल्याचे समाधान वाटले.

हातातील रत्नखचित बांगड्यांत लावण्याचे निधान अशा प्रभूचे प्रतिबिंब पडे. आणि त्या आनंदाला आपण पारखे होऊ नये म्हणून सीता आपला हात अगदी निश्चळ ठेवून त्यावरील आपली नजर किंचितसुद्धा चळू देत नसे. त्यावेळचे कौतुक, थट्टा, मस्करी, त्यातून निर्माण होणारा आनंद व प्रेम यांचे वर्णन अशक्य ! त्याची पूर्ण कल्पना तेथे हजर असणाऱ्या सीतेच्या मैत्रिणींनाच बरोबर आली ! त्या सुंदर सखीनी मग वधुवराना जानोशाकडे नेले.

त्यावेळी आकाशात अगर नगरीत जेथे ऐकावे तेथे मोठा आनंद झालेला व सर्वजण अंतःकरणापासून आशीर्वचने उच्चारीत असलेले ऐकू येई. ' हे मनोहर चार जोडे वधुवराचे चिरंजीव होवोत ' असेच शब्द सर्वत्र कानी पडत. सुर, सिद्ध, मुनी व योगी यांनी भगवंताचे मनसोक्त रूप पाहिले व दुंदुभी वाजवून अत्यंत हर्षाने पुष्पवृष्टी व जयजयकार करीत ते आपापल्या लोकास परतले.

आपल्या [illegible] वधूसह ते चौघे नवरदेव जेव्हा आपल्या वडिलांच्या जवळ आले, तेव्हा त्या जानोशाच्या घरात शोभा, मांगल्य व आनंद याना पूर आला असेल हे काय सांगायला पाहिजे ? ३२७

' स्वयंपाक उत्तम प्रकारे तयार आहे ! ' असे निमंत्रण घेऊन जनकराजाचेकडील वऱ्हाडीमंडळीस बोलावणे आले. अनुपमेय अशा वस्त्रांच्या पायघड्या पडल्या. दशरथराजानी आपल्या पुत्रांसह गमन केले. सर्वांचे पाय अत्यंत आदराने धुऊन त्यांना योग्य अशा स्थानी पाटावर बसवले. दशरथ महाराजांचे पाय जेव्हा जनकमहाराजानी धुतले त्यावेळच्या स्नेहाची व शीलाची थोरवी कशी गावी ? नंतर श्रीरामाचे चरणकमल



बहुरि राम पद पंकज धोए। जे हर हृदय कमल महुँ गोए।।
तीनिउ भाइ राम सम जानी। धोए चरन जनक निज पानी।।
आसन उचित सबहि नृप दीन्हे। बोलि सूपकारी सब लीन्हे।।
सादर लगे परन पनवारे। कनक कील मनि पान सँवारे।।

दो०—सूपोदन सुरभी सरपि सुंदर स्वादु पुनीत।
छन महुँ सब कें परुसि गे चतुर सुआर बिनीत।। ३२८।।

चौ०—पंच कवल करि जेवन लागे। गारि गान सुनि अति अनुरागे।।
भाँति अनेक परे पकवाने। सुधा सरिस नहिं जाहिं बखाने।।
परुसन लगे सुआर सुजाना। बिंजन बिबिध नाम को जाना।।
चारि भाँति भोजन बिधि गाई। एक एक बिधि बरनि न जाई।।
छरस रुचिर बिंजन बहु जाती। एक एक रस अगनित भाँती।।
जेवँत देहिं मधुर धुनि गारी। लै लै नाम पुरुष अरु नारी।।
समय सुहावनि गारि बिराजा। हँसत राउ सुनि सहित समाजा।।
एहि बिधि सबहीं भोजनु कीन्हा। आदर सहित आचमनु दीन्हा।।

दो०—देइ पान पूजे जनक दसरथु सहित समाज।
जनवासेहि गवने मुदित सकल भूप सिरताज।। ३२९।।

धुतले—जे वस्तुतः शंकर-हृदयसरोवरात गुप्त ठेवले आहेत! तीन्ही भावांना रामाप्रमाणेच समजून त्यांचेही योग्य स्थानी सर्व मंडळीना [illegible] आसने दिल्यानंतर वाढप्यांना बोलावणे गेले.

आदरयुक्त पात्रे ठेवली. रत्नांच्या पानांना सोन्याचे टाके लावून पात्रे तयार केली होती. स्वादिष्ट वरण-भात आणि गायीचे लोणकडे, सुवासिक, सुरस व पवित्र तूप असे पदार्थ चतुर व नम्र अशा वाढप्यांनी हा हा म्हणता सर्व पात्रांवर वाढले. ३२८

पंच प्राणाहुती प्रथम घेऊन सगळे जेवू लागले. मधून मधून चाललेल्या उखाण्यामुळे मोठी मजा आली! अनेक प्रकारची पक्वान्ने वाढली. सर्वांनाच अमृताची गोडी होती. मग कोणाचे कसे वर्णन करावे? वाढपी अत्यंत हुषार असल्यामुळे ते भावनेने वाढत असत. अनेक प्रकारच्या भाज्या आमट्या-सगळी नावे तरी कोणाला ठाऊक आहेत? भोजनात मुख्यतः (भोज्य, चोष्य, लेह्य व पेय) खाण्याचे, चोखण्याचे, चाटण्याचे व पिण्याचे असे पदार्थ होते. त्यापैकी प्रत्येकाचे पोटभेद किती होते ते सांगणे अशक्य! षड्रसांनी (खारट, अंबट, तुरट, तिखट, कडू, गोड) युक्त अशा अनेक चटण्या, कोशिंबिरी, लोणची, रायती इ. रस एक पण त्याच्या प्रकारांची मोजदाद कोण करणार? नाना प्रकारचे मधुर उखाणे घालण्याचा दोन्ही बाजूनी सपाटा चालवला! (उदाः—प्रश्नः आम्हाला बाई पायस पिऊन पुत्र होतात हे ठाऊक नाही—उत्तरः जमीनी नांगरत असता मुली सांपडतात हे एक मोठे कोडेच नाही का? इ.) त्यात स्त्रिया आणि पुरुषांची यथेच्छ नावे गोवलेली असत. त्या भोजन-प्रसंगी शोभणारा असा विनोद भरपूर चालला. त्यामुळे दशरथमहाराज आपल्या सर्व मंडळीसह मनसोक्त हसू लागले!

याप्रमाणे सर्वांची जेवणे झाली. आदराने आचमनास पाणी दिले. दशरथ आदिकरून वऱ्हाडी मंडळींना विडे देऊन त्यांचे पूजन केले. सर्व राजांचे मुकुटमणी कोसलेश्वर प्रसन्न चित्ताने जानोशाच्या ठिकाणी परतले. ३२९

चौ० — नित नूतन मंगल पुर माहीं । निमिष सरिस दिन जामिनि जाहीं ।।
बड़े भोर भूपतिमनि जागे । जाचक गुन गन गावन लागे ।।
देखि कुअँर बर बधुन्ह समेता । किमि कहि जात मोदु मन जेता ।।
प्रातक्रिया करि गे गुरु पाहीं । महाप्रमोदु प्रेम मन माहीं ।।
करि प्रनामु पूजा कर जोरी । बोले गिरा अमिअँ जनु बोरी ।।
तुम्हरी कृपाँ सुनहु मुनिराजा । भयउँ आजु मैं पूरनकाजा ।।
अब सब बिप्र बोलाई गोसाईं । देहु धेनु सब भाँति बनाईं ।।
सुनि गुर करि महिपाल बड़ाई । पुनि पठए मुनि बृंद बोलाई ।।

दो० — बामदेउ अरु देवरिषि बालमीकि जाबालि ।
आए मुनिबर निकर तब कौसिकादि तपसालि ।। ३३० ।।

चौ० — दंड प्रनाम सबहि नृप कीन्हे । पूजि सप्रेम बरासन दीन्हे ।।
चारि लच्छ बर धेनु मगाईं । कामसुरभि सम सील सुहाईं ।।
सब बिधि सकल अलंकृत कीन्हीं । मुदित महिप महि देवन्ह दीन्हीं ।।
करत बिनय बहु बिधि नरनाहू । लहेउँ आजु जग जीवन लाहू ।।
पाइ असीस महीसु अनंदा । लिए बोलि पुनि जाचक बृंदा ।।
कनक बसन मनि हय गय स्यंदन । दिए बूझि रुचि रबिकुलनंदन ।।

जनकपुरीत असे नित्यनवे मंगल चालू राहिल्याने निमिषाइतक्या जलद दिवस पळाले. उषःकाली भूपती जागे होत. त्यावेळी याचक त्यांचे सद्गुण गायन करीत. सर्वपरी सद्गुणी अशा वधूसह कुमारांना पाहून राजाच्या अंतर्यामी केवढे सुख होई ते कसे सांगावे ?

नित्यकर्म करून गुरूकडे जेव्हा ते जात त्यावेळी त्यांनाही मोठा आल्हाद होत असे. प्रणामपूर्वक त्यांचे पूजन राजानी केले आणि अमृतमय सुंदर वाणीने, हात जोडून ते म्हणाले, ' हे मुनिराज ! पाहा, आज आपल्या कृपेने माझ्या सर्व मनकामना परिपूर्ण झाल्या. आता स्वामिन् ! विप्रांना आणून सालंकृत गोदाने द्यावीत असे वाटते. ' हे ऐकून वसिष्ठांनी दशरथमहाराजांची स्तुती करून मुनिवृंदाना निमंत्रणे पाठविली.

थोड्याच वेळात, वामदेव, देवर्षि नारद, वाल्मीकी, जाबाली, कौशिक आदिकरून सर्व तपस्वी मुनिश्रेष्ठांचा समुदाय आला. ३३० !

त्यांना राजानी दण्डवत् प्रणाम केले. प्रेमपूर्वक त्यांचे पूजन करून उच्च आसनावर बसवले. उत्तमोत्तम चार लक्ष गायी आणवल्या. कामधेनुप्रमाणे सुंदर, गरीब, सद्गुणी अशाच त्या सर्व होत्या. विधिपूर्वक त्या सर्व अलंकृत केल्या. त्या सर्वांचा गोप्रदानाचा विधि सांगपणे पार पडल्यानंतर राजा संतुष्ट झाला. ' आज मला जीवनलाभाचे खरे सुख झाले , असे म्हणून त्याने सर्वांची नानाप्रकारे प्रार्थना केली. सर्वांनी शुभाशीर्वाद दिल्याने राजाला आनंद झाला.

लगेच याचकांच्या समुदायाला आणवले. सोने, वस्त्रे, हत्ती, घोडे, रथ, रत्ने इत्यादी ज्यांनी जे जे आवडीने मागितले, ते ते रविकुलनंदनाने त्यांना संतोषाने दिले. अर्थात् ते सर्व, कोणी मंत्र पढत, कोणी

चले पढ़त गावत गुन गाथा । जय जय जय दिनकर कुल नाथा ॥
एहि बिधि राम बिआह उछाहू । सकइ न बरनि सहस मुख जाहू ॥

दो० –बार बार कौसिक चरन सीसु नाइ कह राउ ।
यह सबु सुखु मुनिराज तव कृपा कटाच्छ पसाउ ॥ ३३१ ॥

चौ० –जनक सनेहु सीलु करतूती । नृप सब भाँति सराह बिभूती ॥
दिन उठि बिदा अवधपति मागा । राखहिं जनकु सहित अनुरागा ॥
नित नूतन आदरु अधिकाई । दिन प्रति सहस भाँति पहुनाई ॥
नित नव नगर अनंद उछाहू । दसरथ गवनु सोहाइ न काहू ॥
बहुत दिवस बीते एहि भाँती । जनु सनेह रजु बँधे बराती ॥
कौसिक सतानंद तब जाई । कहा बिदेह नृपहि समुझाई ॥
अब दसरथ कहँ आयसु देहू । जद्यपि छाड़ि न सकहु सनेहू ॥
भलेहिं नाथ कहि सचिव बोलाए । कहि जयजीव सीस तिन्ह नाए ॥

दो० –अवधनाथु चाहत चलन भीतर करहु जनाउ ।
भए प्रेमबस सचिव सुनि बिप्र सभासद राउ ॥ ३३२ ॥

चौ० –पुरबासी सुनि चलिहि बराता । बूझत बिकल परस्पर बाता ॥
सत्य गवनु सुनि सब बिलखाने । मनहुँ साँझ सरसिज सकुचाने ॥

राजाचे गुणगान करीत व कोणी, 'जय जय जय दिनकर-कुळनाथा!' असा जयजयकार करीत निघून गेले. रामचंद्राचा व भरतादिकांचा विवाहोत्साह अशा रीतीने परिपूर्ण झाला त्याला. हजार मुखे आहेत तो शेष-सुद्धा वर्णन करू शकणार नाही. शेवटी विश्वामित्रांच्या चरणी मात्र राजाने पुनः पुन्हा आपले मस्तक नमवले व म्हटले, "हे मुनिराज आपल्या कृपाकटाक्षाच्या प्रतापानेच मला या परमसौख्याची प्राप्ती झाली! ३३१.

त्यानंतर जनकांच्या शील, कर्तृत्व, वैभव, स्नेह इत्यादींची अनेकप्रकारे दशरथराजांनी स्तुती केली.

अयोध्यापतींनी जाण्यासाठी दररोज निरोप मागावा व काहीतरी महत्त्वाचे कारण दाखवून मिथिलेश्वरांनी त्यांना ठेवून घ्यावे असा प्रकार चालला! नित्य नवीन प्रेमादरात अधिक वृद्धी व्हावी व दररोज पाहुणचाराची रेलचेल व्हावी; नगरीत नित्य नवे आनंदोत्सव चालत, दशरथराजांचे परत फिरणे कोणाच्याच अंतःकरणाला रुचत नसे. दिवसामागून दिवस गेले, व असे वाटले की स्नेहरूपी दोरीने सर्वच वऱ्हाड बांधले गेले आहे!

अखेर विश्वामित्र व शतानंद यानी जनकमहाराजांच्याकडे जाऊन त्यांना समजावून सांगितले, "आपले प्रेम इतके आहे की आपण दशरथराजांना कधीच येथून सोडू शकणार नाही. तथापि आता व्यावहारिक दृष्टीने त्यांना आपण निरोप द्यावा.'

जनकराजांनी नाइलाजाने 'बरे आहे नाथ!' असे म्हणून सचिवांना बोलावले. 'जय जीव' म्हणून त्यांनी वंदन करताच, "कोसलेश जातो असे म्हणतात, तरी ही गोष्ट आता (अंतःपुरात) जाऊन कळवा."

एवढे कानावर पडताच, सचिव, विप्र आणि सर्व सभेसहित विदेहराज प्रेमाने व्याकुळ झाले. ३३२.

'वऱ्हाड जाते' ही बातमी परिवारात पसरताच जो तो खिन्न होऊन एकमेकाला विचारू लागला, 'काय हो! कोसलनरराज आपल्या सुतसमाजासह परत जाणार, हे खरेच काय?" "होय खरे!" असे उत्तर कानी पडताच सूर्यास्तानंतर जशी कमळे कोमेजतात तसे सर्वांचे चेहरे म्लान होत.



जहँ जहँ आवत बसे बराती । तहँ तहँ सिद्ध चला बहु भाँती ॥
बिबिध भाँति मेवा पकवाना । भोजन साजु न जाइ बखाना ॥
भरि भरि बसहँ अपार कहारा । पठई जनक अनेक सुसारा ॥
तुरग लाख रथ सहस पचीसा । सकल सँवारे नख अरु सीसा ॥
मत्त सहस दस सिंधुर साजे । जिन्हहि देखि दिसिकुंजर लाजे ॥
कनकबसन मनि भरि भरि जाना । महिषीं धेनु बस्तु बिधि नाना ॥

दो ० –दाइज अमित न सकिअ कहि दीन्ह बिदेहँ बहोरि ।
जो अवलोकत लोकपति लोक संपदा थोरि ॥ ३३३ ॥

चौ ० –सबु समाजु एहि भाँति बनाई । जनक अवधपुर दीन्ह पठाई ॥
चलिहि बरात सुनत सब रानीं । बिकल मीनगन जनु लघु पानीं ॥
पुनि पुनि सीय गोद करि लेहीं । देइ असीस सिखावनु देहीं ॥
होएहु संतत पियहि पिआरी । चिरु अहिबात असीस हमारी ॥
सासु ससुर गुर सेवा करेहू । पति रुख लखि आयसु अनुसरेहू ॥
अति सनेह बस सखीं सयानी । नारि धरम सिखवहिं मृदु बानी ॥
सादर सकल कुअँरि समुझाई । रानिन्ह बार बार उर लाई ॥
बहुरि बहुरि भेटहिं महतारीं । कहहिं बिरंचि रचीं कत नारीं ॥

येतेवेळी ज्या ज्या ठिकाणी वऱ्हाडी मंडळीचे मुक्काम पडले होते, त्या सर्व ठिकाणी राजाने अन्नसामग्री पुढे पाठविली. मेवा, पक्वान्ने कितीतरी प्रकारची ! भोजन सामग्रीला तर परिमितीच नव्हती. ही सर्व कावडी भरून पाठविली, त्याचप्रमाणे बैलावर गोण्या घालून अनेक शुभ शय्यासुद्धा पाठवल्या.

एकलक्ष घोडे, पंचवीस हजार रथ, पायापासून मस्तकापर्यंत उत्तम प्रकारे सर्वच्या सर्व अलंकृत केले; दहाहजार मदोन्मत्त झालेले व सजवलेले हत्ती, ज्यांना पाहून दिग्गजांनी लाजावे इतके ते सुंदर; सोने, वस्त्रे, रत्ने इत्यादी भरभरून गाडया, आणि गायी, म्हशी अनेक तऱ्हेच्या वस्तू त्यांच्याबरोबर, अशा प्रकारचे विदेह राजांनी पुनः अपार आंदण इतके दिले की, लोकपालांना आपली संपत्ती अगदीच थोडी वाटू लागली! ३३३

याप्रमाणे सर्व सुसज्ज करून मिथिलाधिपतींनी ते अयोध्येला परस्पर पुढे रवाना केले. (कारण पहिले सर्व बहुतेक याचकांनाच वाटले. तसा पुनः प्रकार होऊ नये म्हणून !)

वऱ्हाड परतणार ही बातमी कानावर पडताच, थोडया पाण्यातील माशाप्रमाणे राण्या कासावीस झाल्या ! सीतेला कितीतरी वेळा मांडीवर घेऊन तिला प्रेमाने आशीर्वाद देऊन अनेक गोष्टींची शिकवण दिली. " बालिके ! आपल्या पतीला सदोदित प्रिय होशील हो ! तुला चिरकाल सौभाग्य लाभो असा आमचा आशीर्वाद आहे ! सासू-सासरे-गुरुजन यांची मनापासून सेवा कर हं. आपल्या पतिदेवाच्या मनाचा कल पाहून आज्ञा पाळीत जा बरं. "

सीतेच्या सुजाण सख्या फारच स्नेहविवश झाल्या व त्यांनी ही सीतेला आपापल्या परीने कोमलवाणीने नारीधर्म शिकवला.

शेवटी अत्यंत आदराने आपल्या कन्यकांची समजूत घालून राण्यांनी त्यांना पुनः पुन्हा पोटाशी कवटाळले. माताही वारंवार मुलींना भेटल्या व म्हणतात, ' खरोखर विधात्याने स्त्रियांना का जन्माला घातले, कळत नाही ! '

दो ० —तेहि अवसर भाइन्ह सहित रामु भानु कुल केतु ।
चले जनक मंदिर मुदित बिदा करावन हेतु ।। ३३४ ।।

चौ ० —चारिउ भाइ सुभायँ सुहाए । नगर नारि नर देखन धाए ।।
कोउ कह चलन चहत हहिं आजू । कीन्ह बिदेह बिदा कर साजू ।।
लेहु नयन भरि रूप निहारी । प्रिय पाहुने भूप सुत चारी ।।
को जानै केहिं सुकृत सयानी । नयन अतिथि कीन्हे बिधि आनी ।।
मरनसीलु जिमि पाव पिऊषा । सुरतरु लहै जनम कर भूखा ।।
पाव नारकी हरिपदु जैसें । इन्ह कर दरसनु हम कहँ तैसें ।।
निरखि राम सोभा उर धरहू । निज मन फनि मूरति मनि करहू ।।
एहि बिधि सबहि नयन फलु देता । गए कुअँर सब राज निकेता ।।

दो ० —रूप सिंधु सब बंधु लखि हरषि उठा रनिवासु ।
करहिं निछावरि आरती महा मुदित मन सासु ।। ३३५ ।।

चौ ० —देखि राम छबि अति अनुरागीं । प्रेमबिबस पुनि पुनि पद लागीं
रही न लाज प्रीति उर छाई । सहज सनेहु बरनि किमि जाई ।।
भाइन्ह सहित उबटि अन्हवाए । छरस असन अति हेतु जेवाँए ।।

त्याचवेळी इकडे तीन बंधूंच्यासह, सूर्यवंशाच्या ध्वजाप्रमाणे असणारे राम, (सासवांचा) निरोप घेण्यासाठी जनकमंदिराकडे निघाले. ३३४.

आता आपणास हे सुख डोळ्यांनी पहावयास मिळणार नाही म्हणून जात्याच सुंदर असणाऱ्या त्या चारी बंधूंना बघण्यासाठी सर्व नगरीत जिकडे तिकडे धावपळ सुरू झाली! कुणी सांगितले वऱ्हाड आज जाणार, कुणी म्हणाले सर्व पाठवणी सज्ज झाली. “डोळे भरून रूप बघून घ्या. हे पाहुणे, चार राजपुत्र सर्वांचे अत्यंत प्रिय आहेत. खरोखर अग शहाणे ! आपण अशी कोणती पुण्याई केली की जिचे फळ म्हणून विधीने यांना आणून आमच्या नेत्रांचे अतिथि केले! एकाद्या मरणोन्मुखाला अमृत मिळावे, जन्माचा भुकेलेला त्याला कल्पवृक्ष सांपडावा, नरकात ज्याची रवानगी ठरलेली त्याला त्याच्या ऐवजी वैकुंठ प्राप्ती व्हावी! यांचे दर्शन अगदी तसेच आम्हास झाले ग! एवढ्यासाठी आता रामाचे सौंदर्य आपल्या हृदयात नीट साठवा की स्वतःच्या मनाला भुजंग बनवून राममूर्तीला त्याचा अखंड ध्यासाचा मणि करा.”

याप्रमाणे सर्वांच्या डोळ्यांचे पारणे फेडीत राम तेवढ्यात विदेह-मंदिरात येऊन पोचलेदेखील.

रूपांचे सागर असणारे असे हे बंधू आलेले पाहाताच हर्ष होऊन राण्या झटकन् उठल्या, ओवाळून टाकून आरती केली तेव्हा, सासूबाईच्या अंतःकरणात परम सुखाला भरती आली. ३३५

रामाचे ते सौंदर्य पाहून त्यांचे प्रेम परमकोटीस जाऊ लागले. त्या प्रेमाच्या भावनेला आवरणे शक्य न झाल्याने त्या वारंवार पाया पडू लागल्या. प्रीतीनें छाती भरून आली व लाज-मर्यादाचा विसर पडला. राण्यांचे ते स्वाभाविक प्रेम कसे वर्णावे ?

अंगाला उटणी वगैरे लावून चौघा बंधूंना त्यानी स्नाने घातली, नंतर सुप्रेमाने षड्रसान्ने जेवण्यास वाढली !

बोले रामु सुअवसरु जानी । सील सनेह सकुचमय बानी ।।
राउ अवधपुर चहत सिधाए । बिदा होन हम इहाँ पठाए ।।
मातु मुदित मन आयसु देहू । बालक जानि करब नित नेहू ।।
सुनत बचन बिलखेउ रनिवासू । बोलि न सकहिं प्रेमबस सासू ।।
हृदयँ लगाइ कुअँरि सब लीन्ही । पतिन्ह सौंपि बिनती अति कीन्ही ।।

छं० —करि बिनय सिय रामहि समरपी जोरि कर पुनि पुनि कहै ।
बलि जाउँ तात सुजान तुम्ह कहुँ बिदित गति सब की अहै ।।
परिवार पुरजन मोहि राजहि प्रानप्रिय सिय जानिबी ।
तुलसीस सीलु सनेहु लखि निज किंकरी करि मानिबी ।

सो० —तुम्ह परिपूरन काम जान सिरोमनि भावप्रिय ।
जन गुन गाहक राम दोष दलन करूनायतन ।। २३६ ।।

चौ० —अस कहि रही चरन गहि रानी । प्रेम पंक जनु गिरा समानी ।।
सुनि सनेह सानी बर बानी । बहुबिधि राम सासु सनमानी ।।
राम बिदा मागत कर जोरी । कीन्ह प्रनामु बहोरि बहोरि ।।
पाइ असीस बहुरि सिरु नाई । भाइन्ह सहित चले रघुराई ।।

रामांनी योग्य समय पाहून, अत्यंत स्नेहशील व संकोचयुक्त असे भाषण केले. 'आज अयोध्येला जावयाचे असे राजे म्हणाले. मातोश्रींची आज्ञा घेण्यासाठी त्यानी आम्हास पाठविले आहे. म्हणून आई! मुदित मनाने आम्हाला आज्ञा द्यावी व आता आपले बालक म्हणून प्रेम ठेवावे."

या भाषणामुळे राण्या उदास बनल्या. सासवांच्या अंतःकरणात तर एवढे प्रेम उत्पन्न झाले की, त्यांच्या मुखांतून शब्दच निघाला नाही. प्रथम त्यानी कुमारीना पोटाशी धरल्या व नंतर ज्याच्या त्याच्या पतीच्या हवाली करून अंतःकरणापासून विनंती केली. सीतेला विनंतीपूर्वक रामाच्या स्वाधीन करून सासूबाईनी हात जोडले व पुनः पुन्हा प्रार्थना करण्यास प्रारंभ केला, "हे तात! तुमची इडापिडा टळो! मी आपल्या कायेची तुमच्यावरून कुरवंडी करते.

तुम्ही सुजाण आहात व सर्वांची गती तुम्ही जाणत असता. परिवार, नागरिक, मी व भूपती या सर्वांना सीता प्राणांप्रमाणे प्रिय आहे हे ध्यानी घ्या. हे तुलसीश ! हिचे शील व हिच्या अंतरीचे तुमच्यावरील प्रेम यांची पारख करून तिला आपल्या पायाची दासी मानावी !

तुम्ही पूर्णकाम, ज्ञानवंतांतील सर्वश्रेष्ठ व हृदयीचा शुद्ध भाव आवडणारे असे आहात, तसेच भक्तांच्या गुणांचे ग्रहण करणारे त्यांच्या दोषांच्या परिहार करणारे, व दयेचे वसतिस्थानही आहात." २३६

एवढें बोलून तिने भगवंताचे चरण घट्ट धरले ! प्रेमाच्या दलदलीत तिची वाणी जणू काही रुतूनच बसली !

सासूबाईंचे हे स्नेहपूर्ण श्रेष्ठ भाषण ऐकून रामानी त्यांचा मोठा सन्मान केला ! हात जोडून त्यांचा निरोप घेतला. सर्वांना पुनः पुन्हा प्रणाम केले. मस्तक नमवल्यावर सर्वांनी आशीर्वाद दिले आणि बंधूसह रघुराय दशरथराजांच्याकडे परत आले.

मंजु मधुर मूरति उर आनी। भईं सनेह सिथिल सब रानी॥
पुनि धीरजु धरि कुअँरि हँकारीं। बार बार भेटहिं महतारीं॥
पहुँचावहिं फिरि मिलहिं बहोरी। बढ़ी परस्पर प्रीति न थोरी॥
पुनि पुनि मिलत सखिन्ह बिलगाई। बाल बच्छ जिमि धेनु लवाई॥

दो०—प्रेमबिबस नर नारि सब सखिन्ह सहित रनिवासु।
मानहुँ कीन्ह बिदेहपुर करुनाँ बिरहँ निवासु॥ ३३७॥

चौ०—सुक सारिका जानकी ज्याए। कनक पिंजरन्हि राखि पढ़ाए॥
ब्याकुल कहहिं कहाँ बैदेही। सुनि धीरजु परिहरइ न केही॥
भए बिकल खग मृग एहि भाँती। मनुज दसा कैसें कहि जाती॥
बंधु समेत जनकु तब आए। प्रेम उमगि लोचन जल छाए॥
सीय बिलोकि धीरता भागी। रहे कहावत परम बिरागी॥
लीन्हि रायँ उर लाइ जानकी। मिटी महामरजाद ग्यान की॥
समुझावत सब सचिव सयाने। कीन्ह बिचारु न अवसर जाने॥
बारहिं बार सुता उर लाईं। सजि सुंदर पालकीं मगाईं॥

रामाची पाठ फिरताच, राण्यांनी त्या मंजुल, मधुर मूर्तीला पुनः आपल्या मनःसिंहासनावर बसवले आणि त्या सर्व स्नेहशिथिल झाल्या ! मग कसातरी धीर धरून थोड्या वेळाने त्यांनी मुलीना बोलावले व माता त्यांना वारंवार भेटल्या 'आता सुखाने जा बरं बाई !' असे म्हणावे व पुनः धावत जाऊन आणखी एक वेळ पोटाशी धरावे, असा कार्यक्रम सुरू झाल्याने परस्परांच्या प्रेमाला अमर्याद भरती आली. उशीर झाला म्हणून नवीन व्यालेल्या गायी व त्यांची वासरे यांना जशी एकमेकापासून दूर करावी तशाता सखी त्यांना विलग करू लागल्या.

स्त्रिया, पुरुष, सखींच्यासह सर्व राणीवसा असे सर्व सीतेवरील प्रेमामुळे तिचा आतां वियोग होणार म्हणून दुःखातिशयाने अगदी व्याकूळ झाले ! यावेळी जणू काही करुण व विरहरसाचे जोडपे विदेहपुरीत येऊन त्याने आपले ठाणे दिले असेच वाटू लागले ! ३३७

स्वतः शिकवून तयार केलेले राघू व मैना जानकीने सोन्याच्या पिंजऱ्यात घालून ठेवले होते. त्यांनीही जेव्हा व्याकूळ होऊन 'वैदेही कुठे ?' असा कंठरव सुरू केला, तेव्हा मी मी म्हणणाऱ्यांचाही धीर सुटला ! पशुपक्षी जर जानकीच्या विरहाने असे विकल झाले तर मानवांची किती विलक्षण केविलवाणी स्थिती झाली असेल याचे वर्णन कसे करता येईल ?

या स्नेहसरितेला मिळण्यासाठी मिथिलापती बंधूंची प्रेमगंगा तेथे आली. सीतेला पाहिले मात्र आणि त्यांचे धैर्य खलास होऊन, 'परम विरागी' हे नुसते आडनाव झाले ! जनकाने जानकीला हृदयाशी कवटाळल्यावर त्यांच्या महाज्ञानाची मर्यादा समाप्त झाली ! समयज्ञ सचिवांनी पुष्कळ बोध केल्यानंतर, ही वेळ अशा प्रकारे शोक करत बसण्याची नाही. हे विदेहभूपाच्या ध्यानी आले !

मुलीना पुनः पुन्हा कडकडून भेटल्यावर सुंदर मेणे सजवून आणण्याबद्दल त्यानी हुकूम सोडला !

दो ० – प्रेमबिबस परिवारु सबु जानि सुलगन नरेस ।
कुअँरि चढ़ाईं पालकिन्ह सुमिरे सिद्धि गनेस ॥ ३३८ ॥

चौ ० – बहुबिधि भूप सुता समुझाईं । नारिधरमु कुलरीति सिखाईं ॥
दासीं दास दिए बहुतेरे । सुचि सेवक जे प्रिय सिय केरे ॥
सीय चलत ब्याकुल पुरबासी । होहिं सगुन सुभ मंगल रासी ॥
भूसुर सचिव समेत समाजा । संग चले पहुँचावन राजा ॥
समय बिलोकि बाजने बाजे । रथ गज बाजि बरातिन्ह साजे ॥
दसरथ बिप्र बोलि सब लीन्हे । दान मान परिपूरन कीन्हे ॥
चरन सरोज धूरि धरि सीसा । मुदित महीपति पाइ असीसा ॥
सुमिरि गजाननु कीन्ह पयाना । मंगल मूल सगुन भए नाना ॥

दो० – सुर प्रसून बरषहिं हरषि करहिं अपछरा गान ।
चले अवधपति अवधपुर मुदित बजाइ निसान ॥ ३३९ ॥

चौ० – नृप करि बिनय महाजन फेरे । सादर सकल मागने टेरे ॥
भूषन बसन बाजि गज दीन्हे । प्रेम पोषि ठाढ़े सब कीन्हे ॥
बार बार बिरिदावलि भाषी । फिरे सकल रामहि उर राखी ॥
बहुरि बहुरि कोसलपति कहहीं । जनकु प्रेमबस फिरै न चहहीं ॥

सर्वच परिवार प्रेमविवश झाला ! विदेहानी चांगली शुभ वेळ पाहून, श्रीसिद्धिविनायकस्मरणपूर्वक मुलीना मेण्यांत बसवल्या. ३३८

राजांनी मुलींना परोपरीने समजावून सांगितले. आपल्या कुलपरंपरेस अनुसरून त्यांना नारीधर्म शिकवला. अत्यंत निर्मळ अंतःकरणाचे असे सीतेच्या आवडीचे अनेक दास-दासी तिच्याबरोबर दिले. याप्रमाणे सीता मासरी निघालेली पाहून सर्व मिथिलानगरी [illegible] झाली. तिला अनेक मंगल शकुन झाले.

ब्राह्मण, सचिव व इतर समाज यांच्यासह जनक राजा त्याना पोचवण्यासाठी पायी निघाला. योग्य समय होताच नानाप्रकारची वाद्ये वाजू लागली. हत्ती, घोडे, रथ इत्यादीसह वऱ्हाड सज्ज झाले.

सर्व ब्राह्मणवर्ग एकत्र करून दशरथ राजांनी त्याना दाने व मान देऊन संतुष्ट केले. त्यांच्या पदकमलाची धूळ आपल्या मस्तकी राजाने धारण केली. त्यांचे शुभाशीर्वाद मिळताच भूप संतुष्ट झाले. गणेशाचे स्मरण करून त्यानी प्रयाण आरंभिले. त्यावेळी मंगलमूल असे अनेक शकुन झाले.

देवानी आनंदाने पुष्पवृष्टी केली. अप्सरांनी गायन केले. नगारे वाजू लागताच अयोध्यापती प्रमुदित होऊन आपल्या पुरीकडे चालले. ३३९

सर्व मोठमोठ्या लोकांना दशरथराजानी अत्यंत विनयपूर्वक प्रार्थना करून परतवले. सर्व याचकांना अगत्यपूर्वक बोलावून त्यांना दागदागिने, वस्त्रे, घोडे, हत्ती इत्यादी मनसोक्त दिल्याने ते प्रेमपुष्ट व संपन्न झाले. अनेक वेळा सूर्यवंशाच्या यशाचा जयघोष त्यानी केला व रामप्रभूला हृदयमंदिरात बसवून ती सर्व मंडळी परत फिरली.

परंतु कोसलपतीनी अनेक वेळा सांगूनही मिथिलेश्वर परत जाईनात. ' राजन् ! आपण फारच दूर आला.



पुनि कह भूपति बचन सुहाए । फिरिअ महीस दूरि बड़ि आए ।।
राउ बहोरि उतरि भए ठाढ़े । प्रेम प्रबाह बिलोचन बाढ़े ।।
तब बिदेह बोले कर जोरी । बचन सनेह सुधाँ जनु बोरी ।।
करौं कवन बिधि बिनय बनाई । महाराज मोहि दीन्हि बड़ाई ।।
दो० – कोसलपति समधी सजन सनमाने सब भाँति ।
मिलनि परसपर बिनय अति प्रीति न हृदयँ समाति ।। ३४० ।।

चौ० – मुनि मंडलिहि जनक सिरु नावा । आसिरबादु सबहि सन पावा ।।
सादर पुनि भेंटे जामाता । रूप सील गुन निधि सब भ्राता ।।
जोरि पंकरुह पानि सुहाए । बोले बचन प्रेम जनु जाए ।।
राम करौं केहि भाँति प्रसंसा । मुनि महेस मन मानस हंसा ।।
करहिं जोग जोगी जेहि लागी । कोहु मोहु ममता मदु त्यागी ।।
ब्यापकु ब्रह्मु अलखु अबिनासी । चिदानंदु निरगुन गुनरासी ।।
मन समेत जेहि जान न बानी । तरकि न सकहिं सकल अनुमानी ।।
महिमा निगमु नेति कहि कहई । जो तिहुँ काल एकरस रहई ।।
दो० – नयन बिषय मो कहुँ भयउ सो समस्त सुख मूल ।
सबइ लाभु जग जीव कहँ भएँ ईसु अनुकूल ।। ३४१ ।।

आता परत फिरा.' असे पुनः पुन्हा विनवून दशरथ राजांनी सांगितले; व रथातून ते खाली उतरले. डोळ्यांतून अश्रूंचा पूर वाहू लागला.

त्यावेळी जणू काही स्नेहामृतात घोळलेल्या वचनांनी, जनक हात जोडून बोलू लागले, "महाराज ! मला आपण केवढा हा मोठेपणा दिला ! मी आपली स्तुती किंवा प्रार्थना करू तरी कशी ?"

दशरथ राजांनी आपल्या व्याह्यांना, स्वजनांना पुष्कळ प्रकारांनी मान दिला. अत्यंत विनयाने ते परस्परांना भेटले. त्यांच्या हृदयात, एकमेकांबद्दलचे प्रेम मावेना ! दोघेही सत्त्वभावापन्न झाले. ३४०

सर्व ऋषिमंडळींना जनकराजांनी प्रणाम केला. त्यांनी राजांना आशीर्वाद दिले.

त्यानंतर रूप, शील व सद्गुण यांचा सागर असणाऱ्या त्या चौघा बंधूंना–आपल्या जावयांना–मोठ्या सन्मानाने ते भेटले. आपले सुंदर कमळासारखे हात जोडून जणू काही प्रेमरसातूनच निर्माण झालेल्या वाणीने ते म्हणाले,

"हे रामा ! सर्व मुनी व प्रत्यक्ष शंकर यांच्या मनरूपी मानससरोवरात हंसाप्रमाणे विहार करणारा तू! तुझी मी कोणत्या रीतीने प्रशंसा करू ? क्रोध, मोह, मद आणि ममता यांचा त्याग करून योगी लोक ज्याकरिता खडतर योगाचे अनुष्ठान करतात, अज्ञेय, अविनाशी, सच्चिदानंदस्वरूप, निर्गुण असून गुणराशी सर्वव्यापी, मन व वाणी इत्यादींना अगोचर, जे अतर्क्य आहे तरी सर्व अनुमानांच्या साह्याने ज्याचा तर्क करतातच, वेद ज्याचा महिमा 'नेति' म्हणून सांगतात, त्रिकाळी जे एकरसच रहाते, असे ब्रह्म, जे सर्व-प्रकारच्या सुखाचे आदिकारण आहे, ते आज माझ्या या डोळ्यांनी मला पहावयास मिळत आहे !! भगवान् शंकर ज्याला अनुकूल झाले, त्या जीवाला या जगात अलभ्य काय राहणार ? ३४१.

चौ० —सबहि भाँति मोहि दीन्हि बड़ाई । निज जन जानि लीन्ह अपनाई ॥
होहिं सहस दस सारद सेषा । करहिं कलप कोटिक भरि लेखा ॥
मोर भाग्य राउर गुन गाथा । कहि न सिराहिं सुनहु रघुनाथा ॥
मैं कछु कहउँ एक बल मोरें । तुम्ह रीझहु सनेह सुठि थोरें ॥
बार बार मागउँ कर जोरें । मनु परिहरै चरन जनि भोरें ॥
सुनि बर बचन प्रेम जनु पोषे । पूरनकाम रामु परितोषे ॥
करि बर बिनय ससुर सनमाने । पितु कौसिक बसिष्ठ सम जाने ॥
बिनती बहुरि भरत सन कीन्ही । मिलि सप्रेमु पुनि आसिष दीन्ही ॥

दो० —मिले लखन रिपुसूदनहि दीन्हि असीस महीस ।
भए परसपर प्रेमबस फिरि फिरि नावहिं सीस ॥ ३४२ ॥

चौ० —बार बार करि बिनय बड़ाई । रघुपति चले संग सब भाई ॥
जनक गहे कौसिक पद जाई । चरन रेनु सिर नयनन्ह लाई ॥
सुनु मुनीस बर दरसन तोरें । अगमु न कछु प्रतीति मन मोरें ॥
जो सुखु सुजसु लोकपति चहहीं । करत मनोरथ सकुचत अहहीं ॥
सो सुखु सुजसु सुलभ मोहि स्वामी । सब सिधि तव दरसन अनुगामी ॥
कीन्हि बिनय पुनि पुनि सिरु नाई । फिरे महीसु आसिषा पाई ॥

सर्वप्रकारे मला मोठेपणा दिला, आपल्या चरणाचा एक दीन दास समजून मला जवळ घेतला; हजारो शेष-शारदा एकत्र होऊन, कोट्यवधी कल्पपर्यंत त्यानी गणना केली, तरीही हे रघुनाथा ! माझे भाग्य व आपल्या गुणांचे गायन समाप्त होणार नाही, हे लक्षात घ्या ! अत्यंत थोड्या शुद्ध प्रेमाने आपण संतुष्ट होता हा आपला स्वभाव माहीत असल्यानेच, त्याच्या जोरावर मी इतके बोललो. आता वारंवार हात जोडून, एकच मागणे मागतो, " आपल्या चरणाला सोडून, चुकूनसुद्धा माझ्या मनाने अन्य कोणत्याही ठिकाणी जाऊ नये ! "

अशा प्रकारे सर्वतोपरी प्रेमाने ओतप्रोत भरलेले भाषण ऐकून, ज्याच्या सर्व कामना कायमच्याच पूर्ण झालेल्या आहेत असे रामसुद्धा परिपुष्ट झाले ! वडील दशरथ, विश्वामित्र आणि वसिष्ठ गुरू [illegible] त्यांना विनंती करून प्रभूनी आपल्या सासऱ्याना बहुमान दिला.

त्यानंतर जनक राजांनी भरताला विनवले, त्याची भेट घेतली व प्रेमाने शुभाशीर्वाद दिले. सर्वच प्रेम-विवश होऊन त्यांनी अनेक वेळा नमस्कार केले. ३४२

पुष्कळ वेळा स्तुती व विनंती करून अखेर बंधूंसह रघुपतीनी एकदाचा निरोप घेतला !

जनकांनी लगेच [illegible] चरण धरले व ती पायधूळ आपल्या डोळ्यांना लावून मस्तकावर ठेवली. " हे मुनीश्वर ! आपल्या दर्शनाने कोणतीच गोष्ट दुर्लभ राहात नाही अशी आता माझ्या मनाची खात्री झाली ! ज्या सुखाची व सुयशाची लोकपाल इच्छा करतात व आपण भलतेच मनोराज्य केले म्हणून त्यांना मनोमनी लाज वाटते, ते सुख व ती सत्कीर्ती, हे स्वामिन् ! मला आपल्या कृपेने सुलभ झाली ! कारण आपले दर्शन झाल्यानंतर पाठोपाठ सर्व सिद्धी येतातच ! " याप्रमाणे सहजस्फूर्त असे उद्गार जनकमहाराजांचे मुखातून बाहेर पडले. पुनः पुन्हा नमस्कार व प्रार्थना असा कार्यक्रम थोडा वेळ होऊन शेवटी आशीर्वाद घेऊन जनक



चली बरात निसान बजाई । मुदित छोट बड़ सब समुदाई ॥
रामहि निरखि ग्राम नर नारी । पाइ नयन फलु होहिं सुखारी ॥

दो० –बीच बीच बर बास करि मग लोगन्ह सुख देत ।
अवध समीप पुनीत दिन पहुँची आइ जनेत ॥ ३४३ ॥

चौ० –हने निसान पनव बर बाजे । भेरि संख धुनि हय गय गाजे ॥
झाँझि बिरव डिंडिमीं सुहाई । सरस राग बाजहिं सहनाई ॥
पुरजन आवत अकनि बराता । मुदित सकल पुलकावलि गाता ॥
निज निज सुंदर सदन सँवारे । हाट बाट चौहट पुर द्वारे ॥
गलीं सकल अरगजाँ सिंचाई । जहँ तहँ चौकें चारु पुराई ॥
बना बजारु न जाइ बखाना । तोरन केतु पताक बिताना ॥
सफल पूगफल कदलि रसाला । रोपे बकुल कदंब तमाला ॥
लगे सुभग तरु परसत धरनी । मनिमय आलबाल कल करनी ॥

दो० – बिबिध भाँति मंगल कलस गृह गृह रचे सँवारि ।
सुर ब्रह्मादि सिहाहिं सब रघुबर पुरी निहारि ॥ ३४४ ॥

परतले. पुनः एकदा नगारे नौबदीचा गडगड् धों होऊन सर्व वऱ्हाड चालू लागले, ते पाहिल्यावर लहानथोर सर्वच मंडळींना आनंद झाला.

वाटेतील गावोगावचे लोक जेव्हा रामाला पाहात तेव्हा त्यांना आपल्या डोळ्यांचे पारणे फिटल्याचे सुख-समाधान होई !

याप्रमाणे जागोजागी वस्ती करत व वाटेवरच्या लोकांना अलौकिक सुखाची लूट देत, ही सुंदर वरात शुभ दिवशी अयोध्येच्या जवळ आली ! ३४३

अयोध्या दुरून दिसू लागताच डंके पिटण्यास प्रारंभ झाला. उत्तम ढोल वाजू लागले. भेरी, शंखादींचे ध्वनी निघाले. घोडे खेकाळू लागले. हत्ती गर्जना करू लागले. झांझा, डफ, मृदंग यांचा ताल सुरांत आवाज होऊ लागला. सनयांतून मनोहर राग बाहेर निनादू लागले !

हा सर्व आवाज कानी पडल्यावरोबर, अयोध्यावासी लोकांना वरात जवळ आल्याची बातमी मिळाली. त्यावेळी त्यांचा तो आनंद व त्यांची रोमांचित होणारी शरीरे प्रेक्षणीय होती !

भराभर, आपापली घरे त्यांनी थाटाने सजविली. अयोध्येच्या सर्व वेशी, रस्ते, चव्हाटे, बाजार, गल्या-सुद्धा सुगंधी द्रव्य अर्गजाने शिंपडल्या ! त्यावर नाना प्रकारच्या रांगोळ्या घातल्या ! तोरणे, पताका, ध्वज, झालरी इत्यादींच्या साधनांनी बाजारपेठा किती प्रकारांनी सुशोभित केल्या ते कसे सांगून संपणार ? सुपारी, आंबे, केळी वकुल, कदंब व तमाल इत्यादी वृक्ष फळांसहित जागजागी लावण्यात आले. अत्यंत सुंदर असे ते वृक्ष फळभाराने जमिनीपर्यंत खाली वाकले होते. त्यांच्या बुंध्यांभोवती केलेल्या आळ्यात सुंदर रत्ने वसवली होती.

घरोघरी, नानाप्रकारचे मंगल कलश उत्तमप्रकारे मांडून आरास केली होती. त्यावेळी नगरीचे सौंदर्य इतके डोळ्यात भरू लागले की, ब्रह्मादि देवांना रघुवर पुरी पाहून मत्सर वाटू लागला ! ३४४



चौ० – भूप भवनु तेहि अवसर सोहा । रचना देखि मदन मनु मोहा ।।
मंगल सगुन मनोहरताई । रिधि सिधि सुख संपदा सुहाई ।।
जनु उछाह सब सहज सुहाए । तनु धरि धरि दसरथ गृहँ छाए ।।
देखन हेतु राम बैदेही । कहहु लालसा होहि न केही ।।
जूथ जूथ मिलि चली सुआसिनि । निज छबि निदरहिं मदन बिलासिनि ।।
सकल सुमंगल सजें आरती । गावहिं जनु बहु बेष भारती ।।
भूपति भवन कोलाहलु होई । जाइ न बरनि समउ सुखु सोई ।।
कौसल्यादि राम महतारीं । प्रेम बिबस तन दसा बिसारीं ।।
दो० – दिए दान बिप्रन्ह बिपुल पूजि गनेस पुरारि ।
प्रमुदित परम दरिद्र जनु पाइ पदारथ चारि ।। ३४५ ।।

चौ० – मोद प्रमोद बिबस सब माता । चलहिं न चरन सिथिल भए गाता ।।
राम दरस हित अति अनुरागीं । परिछनि साजु सजन सब लागीं ।।
बिबिध बिधान बाजने बाजे । मंगल मुदित सुमित्राँ साजे ।।
हरद दूब दधि पल्लव फूला । पान पूगफल मंगल मूला ।।
अच्छत अंकुर लोचन लाजा । मंजुल मंजरि तुलसि बिराजा ।।

राजवाडा तर असा शृंगारला होता की, प्रत्यक्ष कामदेवसुद्धा ते सौंदर्य पाहून विरघळला पाहिजे! मंगल शकुन, मनोहरता, ऋद्धी, सिद्धी, सुख, शोभना-संपत्ती सर्व प्रकारचे आनन्द, सर्व प्रकारचे उत्सव इत्यादी जणू काही सहज मनोहर अशी शरीरे धारण करून यावेळी दशरथ महाराजांच्या राजवाड्यात मुक्कामासच आले होते ! साहजिकच आहे ! राम आणि वैदेही यांचे ते अलौकिक रूप निरीक्षण करण्याला, कोणाला बलवत्तर इच्छा होणार नाही ?

थव्याथव्यानी मिळून सुवासिनी निघाल्या. मदनाच्या विलासी स्त्रियांना आपल्या सौंदर्याने त्या खाली पहावयास लावीत होत्या ! सर्व मंगल द्रव्याचे एकत्र साज करून त्यांनी आपल्या आरत्या तयार केल्या होत्या. त्याना पाहून असे वाटे की, सरस्वतीनेच इतकी रूपे घेऊन गायन सुरू केले आहे !!

प्रत्यक्ष राजवाड्यात तर एवढा कलकलाट उडाला होता की, त्यासमयीच्या त्यांच्या सुखाचे सर्वस्वी वर्णन करणेच अशक्य ! कौसल्यादी राममाता अत्यंत प्रेमविवश होऊन देहभान: विसरल्या ! थोड्या वेळाने धीर धरून विघ्नविनाशकर्त्या गणेशाची व कल्याण करणाऱ्या शंकराची पूजा केली. ब्राह्मणांना भरपूर दाने दिली ! एखाद्या कमालीच्या दरिद्रयाला, चारी पुरुषार्थाची एकदम प्राप्ती व्हावी, तसा त्याना परमानंद झाला. ३४५

आनंद व प्रेम या भावनांनी सर्व मातांची हृदये उचंबळून आली. त्यामुळे एक पाऊलही न टाकण्या-इतकी त्यांची गात्रे शिथिल झाली ! अत्यंत प्रेमाने रामदर्शनासाठी प्रत्येकीने आपापले औक्षण सजवण्यास सुरुवात केली !

अनेक प्रकारच्या वाद्यांचे आवाज सुरू झाले.

हर्षनिर्भर होऊन सुमित्रेची त्यावेळी केवढी तारंबळ उडाली होती ! सर्व मंगल साज तयार करण्याचे काम, नेहमीप्रमाणे यावेळी तर खास म्हणून तिच्याकडे आले होते. हळद, आम्रपल्लव, पत्री, दही, दुर्वा, फुले, विड्यांची पाने सुपाऱ्या इत्यादी मांगल्याच्या सर्व मूळ वस्तू, तसेच अंकुर (रोह), अक्षता, लाह्या, गोरोचन,



छुहे पुरट घट सहज सुहाए । मदन सकुन जनु नीड़ बनाए ।।
सगुन सुगंध न जाहिं बखानीं । मंगल सकल सजहिं सब रानी ।।
रचीं आरतीं बहुत बिधाना । मुदित करहिं कल मंगल गाना ।।

दो० – कनक थार भरि मंगलन्हि कमल करन्हि लिएँ मात ।
चलीं मुदित परिछनि करन पुलक पल्लवित गात ।। ३४६ ।।

चौ० – धूप धूम नभु मेचक भयऊ । सावन घन घमंडु जनु ठयऊ ।।
सुरतरु सुमन माल सुर बरषहिं । मनहुँ बलाक अवलि मन करषहिं ।।
मंजुल मनिमय बंदनिवारे । मनहुँ पाकरिपु चाप सँवारे ।।
प्रगटहिं दुरहिं अटन्ह पर भामिनि । चारु चपल जनु दमकहिं दामिनि ।।
दुंदुभि धुनि घन गरजनि घोरा । जाचक चातक दादुर मोरा ।।
सुर सुगंध सुचि बरषहिं बारी । सुखी सकल ससि पुर नर नारी ।।
समउ जानि गुर आयसु दीन्हा । पुर प्रबेसु रघुकुलमनि कीन्हा ।।
सुमिरि संभु गिरिजा गनराजा । मुदित महीपति सहित समाजा ।।

अत्यंत सुंदर अशा तुळसीच्या मंजुळा यांच्या साह्याने तिने उत्तम वेलबुट्टी काढलेले सुवर्ण कलश सजवले. जणू काही मदनाच्या पक्ष्यांची ती घरटीच होती ! शुभशकुनसूचक सुगंधित द्रव्यांचे वर्णन अशक्य !

सर्व राण्यांनी मंगल साज तयार केले, नानाप्रकारच्या सुंदर आरत्या तयार केल्या; आणि आनंदाने मधुर मंगल गाणी म्हणण्यास त्यांनी प्रारंभ केला.

वरमाईनी आपल्या कमळासारख्या हातात सोन्याची सुंदर ताटे भरून मंगल वस्तू घेतल्या आणि आपल्या बाळांना [illegible] त्या निघाल्या, त्याबरोबर आनंदाला भरती येऊन त्यांच्या सर्व अंगावर कांटा उभा राहिला ! ३४६

सर्व अयोध्यानगरीत अनेक ठिकाणी एवढा सुगंधित द्रव्याचा लोकांनी धूप घातला की, त्याच्या धुराने सर्व आकाश श्रावण महिन्यातील गच्च भरणाऱ्या मेघाप्रमाणे आच्छादित झाले.

देवानी फुलांच्या ऐवजी, स्वर्गातील कल्पवृक्षांच्या फुलांच्या माळाच वरून टाकण्यास प्रारंभ केला. त्या जणू काही बगळ्यांच्या रांगाच. मन आकर्षक करू लागल्या.

रत्नखचित तोरणे इतकी मनोवेधक निर्माण केली होती की, जागोजागी जणू काही तितकी इंद्रधनुष्येच सुसज्ज केली आहेत !

गच्च्यावर सुंदर स्त्रिया पुढे येत व पुनः दृष्टिआड होत, त्यामुळे अत्यंत तेजस्वी पण चंचल अशा विजाच चमकत असल्याचा भास होई ! मेघांच्या गंभीर गर्जनेप्रमाणे दुंदुभींचा आवाज सुरू झाला ! याचकांचे विविध आवाज म्हणजेच मोर, चातक व बेडूक यांचे ओरडणे आहे असे वाटे. सुगंधित द्रव्यांची वृष्टी देव करू लागले तेव्हा पाऊस पडत आहे असे वाटले. त्यामुळे सर्व नागरिक स्त्री-पुरुष हे जणू सुखी झालेले साळीचे पीकच !

पुरप्रवेशाच्या शुभमुहूर्ताची वेळ होताच वसिष्ठांनी आदेश दिला. शंभु, गिरिजा व गणराज यांचे स्मरण अत्यंत आनंदाने करून, आपल्या सर्व समाजासह रघुकुलमणी भूपतीने पुरीत प्रवेश केला !



दो ० —होहिं सगुन बरषहिं सुमन सुर दुंदुभी बजाइ ।
बिबुध बधू नाचहिं मुदित मंजुल मंगल गाइ ।। ३४७ ।।

चौ ० —मागध सूत बंदि नट नागर । गावहिं जसु तिहु लोक उजागर ।।
जय धुनि बिमल बेद बर बानी । दस दिसि सुनिअ सुमंगल सानी
बिपुल बाजने बाजन लागे । नभ सुर नगर लोग अनुरागे ।।
बने बराती बरनि न जाहीं । महा मुदित मन सुख न समाहीं ।।
पुरबासिन्ह तब राय जोहारे । देखत रामहि भए सुखारे ।।
करहिं निछावरि मनिगन चीरा । बारि बिलोचन पुलक सरीरा ।।
आरति करहिं मुदित पुर नारी । हरषहिं निरखि कुअँर बर चारी ।।
सिबिका सुभग ओहार उघारी । देखि दुलहिनिन्ह होहिं सुखारी ।।

दो ० —एहि बिधि सबहि देत सुखु आए राजदुआर ।
मुदित मातु परिछनि करहिं बधुन्ह समेत कुमार ।। ३४८ ।।

चौ ० —करहिं आरती बारहिं बारा । प्रेम प्रमोदु कहै को पारा ।।
भूषन मनि पट नाना जाती । करहिं निछावरि अगनित भाँती ।।
बधुन्ह समेत देखि सुत चारी । परमानंद मगन महतारी ।।
पुनि पुनि सीय राम छबि देखी । मुदित सफल जग जीवन लेखी ।।

शुभशकुन झाले. देवांनी पुष्पवृष्टी केली व दुंदुभींनी खूप मोठा गजर केला. आकाशात, देवांगनांनी आनंदित होऊन नृत्य व मंजुळ मंगल गायन सुरू केले. ३४७

मागध-सूत बंदी व चतुर नट यांनी त्रैलोक्याला उजाळा आणणाऱ्या, अशा श्रीरामचंद्राच्या यशाचे गायन सुरू केले !

जयध्वनी व पवित्र आणि श्रेष्ठ अशी वेदांची वाणी, मांगल्याने भरून दाही दिशांना दुमदुमत राहिली!

इतकी विविध प्रकारची वाद्ये त्यावेळी वाजू लागली की, आकाशात देव व नगरीत नागरिक आनंदाने डोलू लागले !

त्या वरातीचा थाट शब्दाने सांगता येणार नाही! एवढा मोठा आनंद झाला की, ते सुख हृदयात मावत नव्हते. नागरिकांनी राजाला जागोजागी वंदन केले; रामरूप पाहून त्यांना परमसुख झाले. रत्ने,. वस्त्रे, भराभर रामावरून ओवाळून टाकत असता, त्यांचे डोळे आनंदाश्रूंनी भरून येत व शरीर पुलकित होई ! स्त्रियांनी प्रभूची प्रेमभराने आरती केली. चारी नवरदेवांना बघून त्यांना केवढा हर्ष झाला ! पण अनिवार जिज्ञासेमुळे मेण्यांचे सुंदर पडदे बाजूस सारून जेव्हा त्यानी एकदा नोवऱ्या पाहिल्या तेव्हा त्यांची हृदये सुखाने तुडुंब भरली!

याप्रमाणे सर्वांना सुखाची खैरात करीत ही वरात राजद्वारी एकदाची येऊन पोचली. लगेच मातांनी आपल्या बाळांना त्यांच्या नववधूसह औक्षण करून ओवाळले! ३४८

पुनः पुन्हा ओवाळत असता जी प्रेमाला व प्रमोदाला भरती येई त्याचे वर्णन कसे करावे? दागिने, रत्ने, वस्त्रे इत्यादि इतक्या प्रकारचे जिन्नस त्यांच्यावरून ओवाळून टाकले की, त्यांची मोजदाद करणेच शक्य नाही!

वधूसह वरांना निरखून पाहिल्यानंतर राण्या परमानंदात मग्न होत आहेत. सीतारामाचे सौंदर्य पुनः पुन्हा पाहून आपल्या जीवनसाफल्याचे त्याना परम समाधान होत आहे!



सखीं सीय सुख पुनि पुनि चाहीं । गान करहिं निज सुकृत सराही ॥
बरषहिं सुमन छनहिं छन देवा । नाचहिं गावहिं लावहिं सेवा
देखि मनोहर चारिउ जोरीं । सादर उपमा सकल ढँढोरीं ॥
देत न बनहिं निपट लघु लागीं । एकटक रहीं रूप अनुरागीं ॥

दो० –निगम नीति कुल रीति करि अरघ पाँवड़े देत ।
बधुन्ह सहित सुत परिछि सब चलीं लवाइ निकेत ॥ ३४९ ॥

चौ० – चारि सिंघासन सहज सुहाए । जनु मनोज निज हात बनाए ॥
तिन्ह पर कुँअर कुअँरि बैठारे । सादर पाय पुनीत पखारे ॥
धूप दीप नैबेद बेद बिधि । पूजे बर दुलहिनि मंगल निधि ॥
बारहिं बार आरती करहीं । ब्यजन चारु चामर सिर ढरहीं ॥
बस्तु अनेक निछावरि होहीं । भरीं प्रमोद मातु सब सोहीं ॥
पावा परम तत्त्व जनु जोगीं । अमृतु लहेउ जनु संतत रोगीं ॥
जनम रंक जनु पारस पावा । अंधहि लोचन लाभ सुहावा ॥
मूक बदन जनु सारद छाई । मानहुँ समर सूर जय पाई ॥

दो० – एहि सुख ते सत कोटि गुन पावहिं मातु अनंदु ।
भाइन्ह सहित बिआहि घर आए रघुकुलचंदु ॥ ३५०(क) ॥

राण्यांच्या सखी सीतेचे मुख वारंवार पाहात आहेत व आपल्या पुण्याईची स्तुती करत गाणी म्हणण्यास प्रारंभ करत आहेत.

क्षणोक्षणी देवाकडून पुष्पवृष्टी होत आहे. अप्सरा नृत्य-गायन करीत आहेत व नानाप्रकारच्या भेटी आणून देत आहेत.

ते चार वधू-वरांची मनोहर जोडपी पाहिली आणि शारदेने उपमांच्या भाण्डारात योग्य अशी उपमा शोधून काढण्याचा प्रयत्न केला. पण कोणतीच उपमा योग्य ठरेना म्हणून शेवटी प्रेमभराने नुसतीच टकमक बघत उभी राहिली !

वेदोक्त व स्वकुलोचित असे सर्व आचार सांगपणे केले. अर्घ्य दिले. पायघड्या घातल्या. आणि वधूसह सुतांना औक्षणपूर्वक ओवाळून राजवाड्यात नेले. ३४९

मदनाने जणू काही स्वतःच कारागीर होऊन बनवल्याप्रमाणे अकृत्रिम सौंदर्याने खुललेल्या सिंहासनावर कुमार व कुमारिकांना बसवले. अत्यंत आदराने त्यांचे पावन पाय मातांनी धुतले. वेदोक्त विधीने, धूप, दीप नैवेद्य इत्यादी उपचारांनी मांगल्याचे माहेरघर असणाऱ्या (लक्ष्मीनारायण स्वरूपी नव्हे !) वधूसह वरांची पूजा केली ! पुनः पुन्हा मातानी आरती ओवाळली. सुंदर पंखे व चवऱ्या त्यांच्या मस्तकावर ढाळल्या ! अगणित वस्तु पुनः ओवाळून टाकल्या !

त्यावेळेच्या आनंदसागरात पोहणाऱ्या मातांची शोभाही अवर्णनीयच होती ! योग्याला परम तत्त्वाची प्राप्ती व्हावी, कायमच्या अंथरुणास खिळलेल्या रोग्याला अमृताचा लाभ व्हावा, एकाद्या जन्मदरिद्र्याच्या हाताला परिस सापडावा, जन्मांधाला कमलनेत्र यावे, मुक्याच्या मुखात प्रत्यक्ष सरस्वतीनेच वास्तव्य करावे, रणशूराच्या गळ्यात विजयश्रीने माळ घालावी, अशा प्रकारच्या सौख्यांच्या बेरजेला शंभर कोटीनी गुणल्यानंतर जो गुणाकार येईल तेवढा आनंद व तेवढे सुख, आपल्या बंधूसह विवाह होऊन रघुकुलचंद्र घरी आल्यानंतर माताना झाले! कारण रघुकुलचंद्र श्रीरामचंद्र बंधूसह विवाहित होऊन घरीं आले ! ३५० (क)



लोक रीति जननीं करहिं बर दुलहिनि सकुचाहिं ।
मोदु बिनोदु बिलोकि बड़ रामु मनहिं मुसुकाहिं ।। ३५० (ख) ।।

चौ० – देव पितर पूजे बिधि नीकी । पूजीं सकल बासना जी की ।।
सबहि बंदि मागहिं बरदाना । भाइन्ह सहित राम कल्याना ।।
अंतरहित सुर आसिष देहीं । मुदित मातु अंचल भरि लेहीं ।।
आयसु पाइ राखि उर रामहि । मुदित गए सब निज निज धामहि ।।
पुर नर नारि सकल पहिराए । घर घर बाजन लगे बधाए ।।
जाचक जन जाचहिं जोई जोई । प्रमुदित राउ देहिं सोइ सोई ।।
सेवक सकल बजनिआ नाना । पूरन किए दान सनमाना ।।

दो० – देहिं असीस जोहारि सब गावहिं गुन गन गाथ ।
तब गुर भूसुर सहित गृहँ गवनु कीन्ह नरनाथ ।। ३५१ ।।

चौ० – जो बसिष्ट अनुसासन दीन्ही । लोक बेद बिधि सादर कीन्ही ।।
भूसुर भीर देखि सब रानी । सादर उठीं भाग्य बड़ जानी ।।
पाय पखारि सकल अन्हवाए । पूजि भली बिधि भूप जेवाँए ।।
आदर दान प्रेम परिपोषे । देत असीस चले मन तोषे ।।

लौकिक सर्व व्यवहार जेव्हां मातांनी सुरू केले तेव्हा वर आणि वधू याना संकोच वाटला. होणारा अलोट आनंद व चाळणारा अमर्याद विनोद पाहून रामानी मनात स्मित केले ! ३५०(ख)

आपल्या सर्व मनोवासना पूर्ण झालेल्या पाहून देवता व पितर यांचे पूजन मातांनी केले. त्याना वंदून एकच वरदान मागितले, 'बंधूंसह रामाचे कल्याण होवो !' देवतांनी अन्तरिक्षातून (दृष्टीस न दिसता) आशीर्वाद दिले व मातांनी ते आनंदाने पदरात घेतले !

राजवाडयात प्रवेश केल्यावर राजानी सर्व वऱ्हाडी मंडळींना बोलावून घेतले आणि ज्याच्या त्याच्या इतमामाप्रमाणे वाहने, वस्त्रे, रत्ने, दागिने इत्यादि देणग्या दिल्या. आज्ञा मिळताच, रामाचे ध्यान करीत, सर्व मंडळी संतोषाने आपापल्या घरी परतली. त्या वऱ्हाडयानंतर नागरिक स्त्रिया व पुरुष, वरातीबरोबर आलेल्याना दशरथ राजे व राण्या यानी त्यांच्या योग्यतेप्रमाणे अहेर दिले. घरोघरी आनंदोत्सव-जयघोष सुरू झाले. याचकानी वाटेल ते मागावे व राजानी ताबडतोब त्याला ते संतोषाने द्यावे असा हा अपूर्व सोहाळा झाला ! सगळे सेवक, नानाप्रकारचे वाजंत्री यांचा दान-सन्मानपूर्वक संतोष केला ! त्यानी जोहार केले, अंतःकरण पूर्वक दुवे दिले व गुणगणांचे गायन करीत ते मार्गस्थ झाले !

अशा प्रकारे हा कार्यक्रम संपल्यावर वसिष्ठऋषी व ब्राह्मणमंडळीच्यासह अंतर्गृहात राजे गेले. ३५१

वसिष्ठऋषीनी ज्या ज्या प्रकारे आज्ञा दिली तसे सर्व लौकिक, वैदिक आचार आदरपूर्वक यथासांग राजानी पार पाडले.

भूदेव अशा ब्राह्मणांची एकदम गर्दी घरात झालेली पाहून आपले आज परम भाग्य, अशा भावनेने आदराने राण्या झटकन् उठल्या ! त्यांचे चरण प्रक्षालन करून, त्याना स्नाने घातली, राजानी त्यांचे पूजन केल्यानंतर त्यांची भोजने झाली. प्रेम, दान व सन्मान यांच्या योगाने प्रसन्न झालेले ते विप्र राजाला आशीर्वाद देऊन संतोषाने स्वस्थानाला गेले.

बहु बिधि कीन्हि गाधिसुत पूजा । नाथ मोहि सम धन्य न दूजा ॥
कीन्हि प्रसंसा भूपति भूरी । रानिन्ह सहित लीन्हि पग धूरी ॥
भीतर भवन दीन्ह बर बासू । मन जोगवत रह नृपु रनिवासू ॥
पूजे गुर पद कमल बहोरी । कीन्हि बिनय उर प्रीति न थोरी ॥
दो०—बधुन्ह समेत कुमार सब रानिन्ह सहित महीसु ।
पुनि पुनि बंदत गुर चरन देत असीस मुनीसु ॥ ३५२ ॥
चौ०—बिनय कीन्हि उर अति अनुरागें । सुत संपदा राखि सब आगें ॥
नेगु मागि मुनिनायक लीन्हा । आसिरबादु बहुत बिधि दीन्हा ॥
उर धरि रामहि सीय समेता । हरषि कीन्ह गुर गवनु निकेता ॥
बिप्रबधू सब भूप बोलाईं । चैल चारु भूषन पहिराईं ॥
बहुरि बोलाइ सुआसिनि लीन्हीं । रुचि बिचारि पहिरावनि दीन्हीं ॥
नेगी नेग जोग सब लेहीं । रुचि अनुरूप भूपमनि देहीं ॥
प्रिय पाहुने पूज्य जे जाने । भूपति भलीभाँति सनमाने ॥
देव देखि रघुबीर बिबाहू । बरषि प्रसून प्रसंसि उछाहू ॥
दो०—चले निसान बजाइ सुर निज निज पुर सुख पाइ ।
कहत परसपर राम जसु प्रेम न हृदयँ समाइ ॥ ३५३ ॥

त्यानंतर राजाने अनेक प्रकारे विश्वामित्रांचे पूजन केले. 'नाथ! आज माझ्यासारखा दुसरा कोण धन्य आहे!' अशी प्रार्थना केली! राजाने किती तरी त्यांची स्तुती केली. राण्यांच्यासह त्यांच्या चरणांची धूळ आपल्या मस्तकावर धारण केली! अगदी आपल्या महालाशेजारी उत्तम अशा ठिकाणी त्यांची निवासाची व्यवस्था केली. हेतू एकच की त्यांच्या अपेक्षेप्रमाणे [illegible] मुनिवर्यांची सेवा करणे शक्य व्हावे!

त्यानंतर गुरु वसिष्ठांच्या पदकमलांचे पूजन केले व प्रार्थना केली. मनात केवढे प्रेम उचंबळून येत होते! वधूंसह सगळे कुमार, राण्यांसह दशरथ राजा या सर्वांनी पुनः पुन्हा वसिष्ठ ऋषींच्या चरणांवर मस्तक नमवले. ३५२

मुनिश्रेष्ठांनीही तेवढ्याच प्रेमाने सर्वांना आशीर्वाद दिले. अखेर अगदी अंतःकरण भरून येऊन राजाने आपली सर्व संपत्ती व सगळे सुत ऋषिवर्यांच्या पुढे ठेऊन त्यांचा स्वीकार करण्याविषयी मनःपूर्वक त्यांची प्रार्थना केली. परंतु गुरु वसिष्ठांनी उपाध्यायाच्या नात्याने आपली दक्षणा मागून घेतली व अनेक शुभाशीर्वाद दिले. हृदयांत सीतारामाची मूर्ती स्थिर करून हर्षाने वसिष्ठ आपल्या आश्रमाकडे गेले.

लगेच ब्राह्मणांच्या सुवासिनीना आणवल्या. त्यांना उत्तमोत्तम वस्त्रे व दागिने देण्याची व्यवस्था केली. त्यानंतर सर्व नगरातील इतर सुवासिनींना बोलावल्या व त्याच्या आवडीप्रमाणे दागिने, वस्त्रे त्यांना दिली. मानकऱ्यांनी त्यांच्या हक्काप्रमाणे मागण्या केल्या व राजाने त्यांच्या आवडीप्रमाणे त्या सर्व पुरवल्या! प्रेमळ नातेवाईक पाहुणे जे जे सन्मान्य होते त्यांचाही सत्कार त्यांच्या योग्यतेप्रमाणे केला!

असा हा थाटाचा रघुवीर विवाह देवांनी शांतपणे पाहिला. त्यातील उत्सवाची नवलाई मनःपूर्वक वर्णन केली व शेवटी पुष्पवृष्टी केली! त्यानंमर सुख समाधान पावलेले ते सर्व देव नगारे वाजू लागताच आपापल्या पुरीस निघाले. रामाचे यश परस्परास सांगत असता प्रेमाला जो पूर येई त्याला सामावण्यास प्रत्येकाचे हृदय अपुरे होई! ३५३



चौ ० —सब बिधि सबहि समदि नरनाहू । रहा हृदयँ भरि पुरि उछाहू ॥
जहँ रनिवासु तहाँ पगु धारे । सहित बहूटिन्ह कुअँर निहारे ॥
लिए गोद करि मोद समेता । को कहि सकइ भयउ सुखु जेता ॥
बधू सप्रेम गोद बैठारीं । बार बार हियँ हरषि दुलारीं ॥
देखि समाजु मुदित रनिवासू । सब कें उर अनंद कियो बासू ॥
कहेउ भूप जिमि भयउ बिबाहू । सुनि सुनि हरषु होत सब काहु ॥
जनक राज गुन सीलु बड़ाई । प्रीति रीति संपदा सुहाई ॥
बहुबिधि भूप भाट जिमि बरनी । रानीं सब प्रमुदित सुनि करनी ॥

दो ० —सुतन्ह समेत नहाइ नृप बोलि बिप्र गुर ग्याति ।
भोजन कीन्ह अनेक बिधि घरी पंच गइ राति ॥ ३५४ ॥

चौ० — मंगलगान करहिं बर भामिनि । भै सुखमूल मनोहर जामिनि ॥
अँचइ पान सब काहूँ पाए । स्रग सुगंध भूषित छबि छाए ॥
रामहि देखि रजायसु पाई । निज निज भवन चले सिर नाई ॥
प्रेम प्रमोदु बिनोदु बड़ाई । समउ समाजु मनोहरताई ॥
कहि न सकहिं सत सारद सेसू । बेद बिरंचि महेस गनेसू ॥
सो मैं कहौं कवन बिधि बरनी । भूमिनागु सिर धरइ कि धरनी ॥

सर्वांचा यथोचित सन्मान करीत असता दशरथ महाराजांच्या हृदयात उत्साहाला कमालीची भरती आली. ते तसेच [illegible] महालात—ज्याठिकाणी राणीवसा होता त्या राजवाड्यातील विभागांत—शिरले. तेथे नववधूसह कुमारांना पाहिले. दशरथ राजाना राहवेना. त्यांनी अत्यंत आनंदाने मुलांना चटकन् मांडीवर घेतले. त्यांना केवढे सुख त्यावेळी झाले हे कोणाला तरी मुखाने सांगता येईल काय ?

पुत्रांच्यानंतर राजांनी वधूंना वात्सल्यपूर्ण अंतःकरणाने मांडीवर घेऊन हर्षयुक्त होऊन त्यांचे लाड चालवले. अंतःपुरातील हा आनंद व हा सोहाळा पाहून सर्वांनाच मोठा संतोष झाला. राजांनी राण्यांना विवाहाचा थाट कसा झाला याची हकीकत सांगितली. ती ऐकूनही सर्वांना समाधान वाटले. जनकराजाचे गुण, शील, मोठेपणा, प्रीती, वागण्याची रीत, मोठे वैभव व अनेकप्रकारांची करणी इत्यादींचे वर्णन राजांनी एखाद्या भाटाप्रमाणे, यथास्थित केले व राण्यांनीहि समाधानाने ते ऐकून घेतले.

पुत्रांच्यासह स्नान करून राजाने गुरू, ब्राह्मण व कुटुंबीय मंडळींना बोलावून अनेक प्रकारच्या पक्वान्नांचे भोजन केले. हा सर्व कार्यक्रम उरकेपर्यंत पाच घटका रात्र झाली. ३५४.

सुंदर स्त्रियांनी ही मोठ्या सुखाच्या पर्वणीची रात्र म्हणून मंगल गायन केले. आंचवल्याबरोबर सर्वांना विडे पोचले. हार, गुच्छ, अत्तर, गुलाब इत्यादींनी सुशोभित झाल्यावर सर्वांच्याच सौंदर्यात वाढ झाली ! रामाकडे एक वेळ डोळे भरून पाहून, मंडळींनीं निरोप घेतला व शिर नमवून ते स्वस्थानी गेले.

दशरथमहाराजांच्या राजवाड्यातील या सोहाळ्यातील सर्वांचे उत्कट प्रेम, आनंद, विनोद, महत्त्व,प्रसंग समाज, सुमनोहरता इत्यादींची शेकडो सरस्वती, शेष, वेद, ब्रह्मदेव, महादेव किंवा गणेशसुद्धा वर्णन करू शकणार नाहीत, मग मी कसे त्याचे रहस्य सांगणार ? भूमिनागाला (दानव्याला) कधी मस्तकावर पृथ्वी धरता येईल ?

नृप सब भाँति सबहिं सनमानी । कहि मृदु बचन बोलाईं रानी ॥
बधू लरिकनीं पर घर आईं । राखेहु नयन पलक की नाईं ॥
दो० – लरिका श्रमित उनीद बस सयन करावहु जाइ ।
अस कहि गे बिश्रामगृहँ राम चरन चितु लाइ ॥ ३५५ ॥
चौ० – भूप बचन सुनि सहज सुहाए । जरित कनक मनि पलँग डसाए ॥
सुभग सुरभि पय फेन समाना । कोमल कलित सुपेतीं नाना ॥
उपबरहन बर बरनि न जाहीं । स्रग सुगंध मनिमंदिर माहीं ॥
रतनदीप सुठि चारु चँदोवा । कहत न बनइ जान जेहिं जोवा ॥
सेज रुचिर रचि रामु उठाए । प्रेम समेत पलँग पौढ़ाए ॥
अग्या पुनि पुनि भाइन्ह दीन्ही । निज निज सेज सयन तिन्ह कीन्ही ॥
देखि स्याम मृदु मंजुल गाता । कहहिं सप्रेम बचन सब माता ॥
मारग जात भयावनि भारी । केहि बिधि तात ताड़का मारी ॥
दो० – घोर निसाचर बिकट भट समर गनहिं नहिं काहु ।
मारे सहित सहाय किमि खल मारीच सुबाहु ॥ ३५६ ॥
चौ० – मुनि प्रसाद बलि तात तुम्हारी । ईस अनेक करवरें टारी ॥
मख रखवारी करी दुहुँ भाईं । गुरु प्रसाद सब बिद्या पाईं ॥

राजाने जेवायला आलेल्या सर्वांना बहुमान दिला व मधुर वाणीने राण्यांना जवळ बोलावून सांगितले, " या वधू-बालिका परगृही आल्या आहेत; पापण्या ज्याप्रमाणे डोळे संभाळतात तशा रीतीने त्यांना जपा बरं ! मुलगेसुद्धा दमलेभागले असून झोपेला आलेले दिसतात. त्यांना निजवा पाहू " एवढे सांगून रामचरणाचे ध्यान करीत, दशरथराजे आपल्या विश्रांतीच्या महालात गेले. ३५५

राजाचे सहज पण सुंदर बोलणे ऐकून, रत्नजडित सुवर्ण पलंग घातले. कामधेनूच्या दुधाच्या फेसाप्रमाणे पांढऱ्या स्वच्छ मऊ व सुंदर अनेक चादरी, उत्तम तक्क्ये, माळा, अत्तरे, त्यांचे वर्णन पुरे होणार नाही असे त्या रत्नयुक्त मंदिरात सज्ज करून ठेवले होते. रत्नांचे दीप होते. उत्कृष्ट चांदवे टांगले होते. हे सर्व पाहूनच समजणार, त्याची शब्दांत माहिती देता येणार नाही.

उत्तम प्रकारे शेज (बिछाना) घातल्यावर रामाला उठवले व प्रेमाने त्याला पलंगावर निजवले. बंधूंना अनेक वेळा सांगितल्यावर तेही आपापल्या पलंगावर पहुडले.

भगवंताच्या सुकुमार, श्यामल व मनोहर अवयवांकडे पाहून प्रेमाने माता आपसांत बोलू लागल्या.

" जाताना वाटेत महाभयंकर अशी ती क्रूर ताडका कशी रे बाळा मारलीस ? या कोवळ्या हातांनी ? त्याच प्रमाणे ते घोर राक्षस, त्यात अक्राळविक्राळ, महारणशूर, शिवाय स्वभावाने दुष्ट, युद्धात कुणालाच हार न जाणारे अशा त्या दुष्ट मारीच व सुबाहूना त्यांच्या सैन्यासह कसे रे खलास केलेस माझ्या सुकुमारा ? ३५६

खरोखर मुनींच्या कृपेने, बाळ ! तुमच्या सगळ्या संकटांचे ईश्वराने निवारण केले ! आणि मी धन्य झाले. दोघांनी ऋषींच्या यज्ञाचे रक्षण केले. गुरुजींच्या कृपेने तत्काल विद्या प्राप्त झाली ! मुनिनारी, केवळ चरणाच्या



मुनि तिय तरी लगत पग धूरी । कीरति रही भुवन भरी पूरी ।।
कमठ पीठि पबि कूट कठोरा । नृप समाज महुँ सिव धनु तोरा ।।
बिस्व बिजय जसु जानकि पाई । आए भवन ब्याहि सब भाई ।।
सकल अमानुष करम तुम्हारे । केवल कौसिक कृपाँ सुधारे ।।
आजु सुफल जग जनमु हमारा । देखि तात बिधुबदन तुम्हारा ।।
जे दिन गए तुम्हहि बिनु देखें । ते बिरंचि जनि पारहिं लेखें ।।
दो० — राम प्रतोषीं मातु सब कहि बिनीत बर बैन ।
सुमिरि संभु गुर बिप्र पद किए नीदबस नैन ।। ३५७ ।।
चौ० — नीदउँ बदन सोह सुठि लोना । मनहुँ साँझ सरसीरुह सोना ।।
घर घर करहिं जागरन नारीं । देहिं परसपर मंगल गारीं ।।
पुरी बिराजति राजति रजनी । रानीं कहहिं बिलोकहु सजनी ।।
सुंदर बधुन्ह सासु लै सोईं । फनिकन्ह जनु सिरमनि उर गोईं ।।
प्रात पुनीत काल प्रभु जागे । अरुनचूड़ बर बोलन लागे ।।
बंदि मागधन्हि गुनगन गाए । पुरजन द्वार जोहारन आए ।।
बंदि बिप्र सुर गुर पितु माता । पाइ असीस मुदित सब भ्राता ।।
जननिन्ह सादर बदन निहारे । भूपति संग द्वार पगु धारे ।।

रजःस्पर्शाने उद्धरली व ही तुमची कीर्ती सर्व विश्वभर पसरली! भगवान् कूर्माची पाठ, पर्वत किंवा वज्र यांच्यापेक्षाही अत्यंत कठीण व घोर असे ते शिवधनुष्य, सर्व राजे लोकांच्या समक्ष मोडून टाकले! आणि विश्वविजयाचे यश व जानकी यांची प्राप्ती करून घेऊन बंधूंचे विवाह घडवले आणि मग घरी परत आला. खरोखर ही सर्व तुमची कामे अतिमानुषच! यांचे सर्व श्रेय विश्वामित्रांच्या कृपाप्रसादालाच! बाळा! तुमचे चंद्रमुख, आज या जगात पाहून आमचा जन्म सुफल झाला यात मात्र मुळीच शंका नाही!

तुमच्या दर्शनावाचून आमचे जेवढे आयुष्याचे दिवस गेले त्यांची गणना आमच्या गेलेल्या आयुष्यात विरंचीने करू नये अशी त्याच्याजवळ प्रार्थना!"

रामचंद्रांनी नम्र व उत्तम भाषण करून मातांना संतुष्ट केले; आणि शंभू, गुरू, विप्र यांच्या चरणाचे ध्यान करता करता रामाचा डोळा लागला! ३५७

झोपेतसुद्धा रामाचे मुख फारच मनोहर दिसत आहे! जणू काही सायंकाळचे सुंदर सोनकमळ (लाल)च मिटले आहे असे वाटते!

मंगल विनोद, थट्टा भरपूर करीत घरोघरी स्त्रिया जागत होत्या. राण्या म्हणतात, "हे सखी! पाहा तर खरी आजची रात्र कशी शोभायमान झाली आहे! तिच्यात अयोध्यापुरी विशेष खुलून दिसत आहे!"

असे बोलून आपल्या सुनांना पोटाशी घेऊन सासवा अशा निजल्या की जणू काही भुजंगानी आपले मस्तकावरील मणी पोटात लपवूनच ठेवले!

पवित्र ब्राह्ममुहूर्ती, प्रातःकाळ होताच प्रभू जागे झाले. कोंबड्यांचे मधुर आरवणे सुरू झाले. मागध आणि बंदीजनांनी भगवंताचे भरपूर यशगायन केले आणि पुष्कळ सेवकजन जोहार-मुजरे करण्यासाठी राजद्वारात येऊन उभे राहिले.

विप्र, देव, गुरू व आईबाप यांना सर्व बंधूंनी वंदन केले. त्यांना शुभाशीर्वाद मिळताच ते संतुष्ट झाले. आईने प्रेमादराने चौघा भावांचा मुखचंद्र पाहिल्यावर राजासह ते बाहेर पडले.

दो० – कीन्हि सौच सब सहज सुचि सरित पुनीत नहाइ ।
प्रातक्रिया करि तात पहिं आए चारिउ भाइ ।। ३५८ ।।

नवाह्नपारायण, तीसरा विश्राम

चौ० – भूप बिलोकि लिए उर लाई । बैठे हरषि रजायसु पाई ।।
देखि रामु सब सभा जुड़ानी । लोचन लाभ अवधि अनुमानी ।।
पुनि बसिष्टु मुनि कौसिकु आए । सुभग आसनन्हि मुनि बैठाए ।।
सुतन्ह समेत पूजि पद लागे । निरखि राम दोउ गुर अनुरागे ।।
कहहिं बसिष्ट धरम इतिहासा । सुनहिं महीसु सहित रनिवासा ।।
मुनि मन अगम गाधिसुत करनी । मुदित बसिष्ट बिपुल बिधि बरनी ।।
बोले बामदेउ सब साँची । कीरति कलित लोक तिहुँ माची ।।
सुनि आनंदु भयउ सब काहू । राम लखन उर अधिक उछाहू ।।

दो० – मंगल मोद उछाह नित जाहिं दिवस एहि भाँति ।
उमगी अवध अनंद भरि अधिक अधिक अधिकाति ।। ३५९ ।।

स्वभावतःच पवित्र अशा चारी बंधूंनी, शौचमुखमार्जन उरकून, पवित्र अशा सरयू नदीत स्नाने केली; व प्रातःसन्ध्यादि नित्यकर्मे आटोपून ते विचारवंत बंधू आपल्या पित्याजवळ दरबारात आले. ३५८

अशा प्रकारे सर्व नित्यकर्म आटपून मुले आलेली पाहताच त्यांच्या शिस्तीच्या [illegible] राजांना संतोष होऊन ते त्यांना आलिंगन देत आहेत.! वडिलांची आज्ञा मिळाल्यानंतर मुलगे आनंदाने आसनावर बसत. राम दरबारात जात आहेत असे पाहून नयनलाभाची परमसीमाच मानून लोक सभेत भराभर येऊ लागतात. प्रभूच्या दर्शनाने त्यांना आपल्या डोळ्यांच्या लाभाची सीमा झाल्याचे सुख होत आहे.

यानंतर दरबारात वसिष्ट व विश्वामित्र येतात. त्यांना राजा सन्मानपूर्वक उच्च आसनावर बसवितो. आपल्या पुत्रांसह राजा त्यांचे पूजन करून त्यांच्या पदकमली आपले मस्तक ठेवतो. रामाला पाहून दोन्ही गुरूंना परम संतोष होत आहे.

कुलगुरू, धर्म व इतिहास सांगत; त्याचे श्रवण, [illegible] राजा मनःपूर्वक करी. मुनींच्या मनालाही आकलन न करता [illegible] यांच्या कर्तबगारीचे, अनेक प्रकारे समाधानपूर्वक वर्णन वसिष्ठगुरूंनी केले. त्यावर वामदेवांनी भाषण करून सांगितले की, हे सर्व सत्य असून कौशिकाची सुकीर्ती त्रैलोक्यात भरून राहिली आहे ! हे ऐकून सगळ्यांनाच हर्ष पण वाटला. त्यातल्या त्यात राम-लक्ष्मणांना फारच आनंद झाला !

नित्य उत्सव होऊन मंगलकारक आनंद सुरू झाला. अशा प्रकारे दिवसामागून रात्र व रात्र संपताच दिवस, असे किती तरी दिवस पळाले ! आणि अयोध्येतील आनंदाला, नित्य नवी एकसारखी अधिकाधिक भरती येतच होती ! ३५९

चौ० – सुदिन सोधि कल कंकन छोरे। मंगल मोद बिनोद न थोरे ।।
नित नव सुखु सुर देखि सिहाहीं। अवध जन्म जाचहीं बिधि पाहीं ।।
बिस्वामित्रु चलन नित चहहीं। राम सप्रेम बिनय बस रहहीं ।।
दिन दिन सयगुन भूपति भाऊ। देखि सराह महामुनिराऊ ।।
मागत बिदा राउ अनुरागे। सुतन्ह समेत ठाढ़ भे आगे ।।
नाथ सकल संपदा तुम्हारी। मैं सेवकु समेत सुत नारी ।।
करब सदा लरिकन्ह पर छोहू। दरसनु देत रहब मुनि मोहू ।।
अस कहि राउ सहित सुत रानी। परेउ चरन मुख आव न बानी ।।
दीन्हि असीस बिप्र बहु भाँति। चले न प्रीति रीति कहि जाती ।।
रामु सप्रेम संग सब भाई। आयसु पाइ फिरे पहुँचाई ।।

दो० – राम रूपु भूपति भगति ब्याहु उछाहु अनंदु ।
जात सराहत मनहिं मन मुदित गाधिकुलचंदु ।। ३६० ।।

चौ० – बामदेव रघुकुल गुर ग्यानी। बहुरि गाधिसुत कथा बखानी ।।
सुनि मुनि सुजसु मनहिं मन राऊ। बरनत आपन पुन्य प्रभाऊ ।।

शुभ मुहूर्त पाहून हातातील सुंदर कंकणे सोडली. आनंद-मंगल व विनोद यांचा तुटवडा कुठेच नव्हता. अयोध्येतील नित्य नव्या सुखाचा सुकाळ पाहून देवांच्या मनाला चुटपुट लागे व ते ब्रह्मदेवाजवळ, 'आम्हाला अयोध्येत यावेळी जन्म द्या' अशी मागणी करीत.

दिवस उगवताच, 'आज आता आम्हाला परवानगी द्या हं!' असे विश्वामित्रांनी म्हणावे व 'छे! छे! आज तर विशेष कार्यक्रम ठरला आहे; तो झाल्याशिवाय आपणाला कसे जाता येईल?' असे रामाने विनयपूर्वक म्हटल्यामुळे त्यांचा मुक्काम पडे. असे काही दिवस गेले! दशरथ महाराजांच्या अंतःकरणातील विश्वामित्रावरील प्रेम दिवसेंदिवस शेकडो पटींनी वाढू लागलेले पाहून मुनिवर्य त्यांची मनात पोटभर स्तुती करीत असत.

अखेर एके दिवशी विश्वामित्रांनी दशरथाच्या संमतीने जाण्याचे निश्चित केले. राजाच्या अंतःकरणात भावनांना भरती आली. तो आपल्या पुत्रांच्यासह हात जोडून पुढे उभा राहिला. "नाथ! ही सर्व संपत्ती आपली आहे! या चारी पुत्रांसह मी व माझ्या सर्व राण्या चरणाचे सेवक आहोत. माझ्या बाळांवर आपली सदोदित कृपादृष्टी असावी! आणि येता जाता माझ्याकडे येऊन आम्हाला आपल्या दर्शनाचा कृपाप्रसाद नेहमी देत असावे."

अशी प्रार्थना करून शेवटी, राण्या व मुलगे यांच्यासह त्याने विश्वामित्रांचे पाय घट्ट धरले. त्यांचा कंठ दाटून आला! प्रयत्न करूनही त्यांच्या मुखातून शब्द उमटेना!

विश्वामित्रांनी निघतेवेळी अंतःकरणपूर्वक अनेक शुभाशीर्वाद सर्वांना दिले. त्या प्रीतीचे व वागणुकीचे वर्णन करणेच कठीण! राम आपल्या धाकट्या सर्व बंधूंच्यासह गुरुवर्यांना पोचविण्यासाठी गेले व त्यांची आज्ञा झाल्यावर परत फिरले.

रामाचे अलौकिक लावण्य, दशरथाची भक्ती, लग्नातील सोहाळा व लुटलेला आनंद, यांची मनातल्या मनात स्तुती करत, मोठ्या समाधानाने, गाधिकुल कमलांना फुलविणारे विश्वामित्र चालू लागले. ३६०.

ज्ञानसंपन्न कुलगुरू वसिष्ठ आणि वामदेव यांनी कौशिक मुनींचा महिमा पुनः एकवेळ सांगितला. अशा प्रकारचे विश्वामित्राचे सुयश ऐकून राजाला मनातल्या मनात स्वतःच्या मोठ्या पुण्याईबद्दल धन्यता वाटली.

बहुरे लोक रजायसु भयऊ । सुतन्ह समेत नृपति गृहँ गयऊ ॥
जहँ तहँ राम ब्याहु सबु गावा । सुजसु पुनीत लोक तिहुँ छावा ॥
आए ब्याहि रामु घर जब तें । बसइ अनंद अवध सब तब तें ॥
प्रभु बिबाहँ जस भयउ उछाहू । सकहिं न बरनि गिरा अहिनाहू ॥
कबिकुल जीवनु पावन जानी । राम सीय जसु मंगल खानी ॥
तेहि ते मैं कछु कहा बखानी । करन पुनीत हेतु निज बानी ॥

छं०– निज गिरा पावनि करन कारन राम जसु तुलसीं कह्यो ।
रघुबीर चरित अपार बारिधि पारु कबि कौनें लह्यो ॥
उपबीत ब्याह उछाह मंगल सुनि जे सादर गावहीं ।
बैदेहि राम प्रसाद ते जन सर्बदा सुखु पावहीं ॥

सो० – सिय रघुबीर बिबाहु जे सप्रेम गावहिं सुनहिं ।
तिन्ह कहुँ सदा उछाहु मंगलायतन राम जसु ॥ ३६१ ॥

मासपारायण, बारहवाँ विश्राम

इति श्रीमद्रामचरितमानसे सकल-कलि-कलुष-विध्वंसने प्रथमः सोपानः समाप्तः ।

(बालकाण्ड समाप्त)

सभा बरखास्त होऊन आज्ञा मिळताच सर्व नागरिक आपापल्या घराकडे निघाले व पुत्रांच्यासह राजे आपल्या मंदिरात गेले.

रामाच्या विवाहाचे वर्णन लोक सर्वत्र गाऊ लागले, प्रभुचे पवित्र सद्‌यश त्रिभुवनांत पसरले.

विवाहाचा सोहळा सांग करून, राम अयोध्येस आल्या वेळेपासून सर्व अयोध्या नगरीत आनंदाचे साम्राज्य सुरू झाले.

रघुवीर विवाहातील महोत्सवाचे वर्णन सरस्वती किंवा सर्पराज शेषही करू शकत नाहीत.

श्रीसीतारामांचे यश, कविसमुदायांच्या जीवनाला पवित्र करणारे व मांगल्याची केवळ खाणच समजून आपली वाणी पावन करण्यासाठी मी यथामती त्याचे अल्पसे वर्णन केले.

खरोखर आपली वाणी पवित्र व्हावी एवढ्या एकाच हेतूने रामयशाचे गायन तुलसीदासाने केले. नाही तर रघुवीर चरित्ररूपी अपार सागराच्या पैलतीराला कोणता कवी गेला आहे ?


श्रीरामाच्या यज्ञोपवीत व विवाहाच्या मंगलमय उत्सवाचे, जे लोक आदराने श्रवण-गायन करतात, त्यांच्यावर श्रीजानकी व श्रीराम यांची कृपा होते आणि ते सुखी होतात. रामाचे यश हेच मांगल्याचे निवासस्थान असल्यामुळे, सीताराम विवाहाचे प्रेमपूर्वक गायन श्रवण करणारांच्या हृदयातील उत्साह, नित्य वृद्धिंगतच होत राहतो. ३६१

याप्रमाणे, कलिनिर्मित सर्व प्रकारच्या दोषांचे निर्मूलन करणाऱ्या श्रीमद्रामचरितमानसातील प्रथम सोपान संपला.

॥ बालकांड समाप्त ॥

॥ श्री रामचंद्राच्या चरणी सर्व अर्पण ॥





श्रीराम, सीता आणि लक्ष्मण यांच्यासह वनात निघाले.

[illegible] सीता[illegible] ।
पाणौ [illegible] नमामि रामं [illegible] ॥ ३ ॥

दो० —श्रीगुरु चरन सरोज रज निज मनु मुकुरु सुधारि ।
बरनउँ रघुबर बिमल जसु जो दायकु फल चारि ॥

चौ० —जब तें रामु ब्याहि घर आए । नित नव मंगल मोद बधाए ॥
भुवन चारिदस भूधर भारी । सुकृत मेघ बरषहिं सुख बारि ॥
रिधि सिधि संपति नदीं सुहाई । उमगि अवध अंबुधि कहुँ आई ॥
मनिगन पुर नर नारि सुजाती । सुचि अमोल सुंदर सब भाँती ॥
कहि न जाइ कछु नगर बिभूती । जनु एतनिअ बिरंचि करतूती ॥
सब बिधि सब पुर लोग सुखारी । रामचंद मुख चंदु निहारी ॥
मुदित मातु सब सखीं सहेली । फलित बिलोकि मनोरथ बेली ॥
राम रूपु गुन सीलु सुभाऊ । प्रमुदित होई देखि सुनि राऊ ॥

दो० —सब कें उर अभिलाषु अस कहहिं मनाइ महेसु ।
आप अछत जुबराज पद रामहि देउ नरेसु ॥ १ ॥

[illegible] श्यामवर्णाचे व कोमल असे ज्याचे शरीर आहे, श्रीसीतामाता ज्याच्या वामभागी विराजमान झालेली आहे, ज्याच्या हातात सुंदर धनुष्य व अमोघ बाण आहेत, जो रघुवंशाचा स्वामी आहे अशा रामप्रभूला मी नमस्कार करतो. ३

श्रीमद्‌गुरुचरण-कमलातील रजःकणांनी मनरूपी आरसा अगदी स्वच्छ धुऊन, चारी पुरुषार्थांची प्राप्ती करून देणाऱ्या [illegible] निर्मल यशाचे मी वर्णन करीन.

मिथिला नगरीहून विवाहाचा सोहाळा आटोपून राम आल्यापासून, अयोध्यानगरीत नित्य नवा आनंद व नित्य नवा उत्सव असा कार्यक्रम सुरू झाला.

चौदाही भुवने हेच मोठे विशाल पर्वत, त्यांच्यावर पुण्यरूपी मेघ, सुखस्वरूपी पाण्याचा पाऊस पाडत आहेत. त्यामुळे ऋद्धी-सिद्धी-संपत्तिरूपी सुंदर नद्या भरभरून अयोध्या-सागराला मिळत आहेत. नगरातील स्त्रिया व पुरुष ही या रत्नाकरातील उत्कृष्ट प्रकारची रत्ने आहेत. ती सर्व प्रकारे अमोल, पवित्र व मनोहर आहेत — नगराच्या ऐश्वर्याचे वर्णन करणे शक्यच नाही. नगरी पाहिल्यावर असे वाटते की, ब्रह्मदेवाच्या कर्तबगारीची या ठिकाणी पूर्णपणे परिसमाप्ती झालेली आहे. श्रीरामचंद्राच्या मुखचंद्राचे निरीक्षण करून सर्वनगरवासी सर्व प्रकारच्या सुखाची दिवाळी करीत आहेत !

सर्व [illegible] माता, आपली मनोरथ-वेली सुफल झालेली पाहून, संतुष्ट झाल्या !

तसेच रामाचे रूप, गुण, शील व स्वभाव इत्यादींचा अलौकिकपणा प्रत्यक्ष पाहून व दुसऱ्यांच्या तोंडून ऐकून दशरथराजे प्रसन्न झाले ! अयोध्यावासी सर्वजण, शंकराची स्तुती करून प्रार्थना करत असतात. भगवन् ! आमच्या अंतःकरणातील एकच उरलेली अभिलाषा आता आपण पूर्ण करा. ती म्हणजे दशरथराजे ह्यात असताच त्यांनी रामाला युवराजा करावे ! १

चौ ० —एक समय सब सहित समाजा । राजसभाँ रघुराजु बिराजा ।।
सकल सुकृत मूरति नरनाहू । राम सुजसु सुनि अतिहि उछाहू ।।
नृप सब रहहिं कृपा अभिलाषें । लोकप करहिं प्रीति रुख राखें ।।
तिभुवन तीनि काल जग माहीं । भूरि भाग दसरथ सम नाहीं ।।
मंगलमूल रामु सुत जासू । जो कछु कहिअ थोर सबु तासू ।।
रायँ सुभायँ मुकुरु कर लीन्हा । बदनु बिलोकि मुकुटु सम कीन्हा ।।
श्रवन समीप भए सित केसा । मनहुँ जरठपनु अस उपदेसा ।।
नृप जुबराजु राम कहुँ देहू । जीवन जनम लाहु किन लेहू ।।

दो ० —यह बिचारु उर आनि नृप सुदिनु सुअवसरु पाइ ।।
प्रेम पुलकि तन मुदित मन गुरहि सुनायउ जाइ ।। २ ।।

चौ ० —कहइ भुआलु सुनिय मुनि नायक । भए राम सब बिधि सब लायक ।।
सेवक सचिव सकल पुरबासी । जे हमारे अरि मित्र उदासी ।।
सबहि रामु प्रिय जेहि बिधि मोही । प्रभु असीस जनु तनु धरि सोही ।।
बिप्र सहित परिवार गोसाईं । करहिं छोहु सब रौरिहि नाईं ।।
जे गुर चरन रेनु सिर धरहीं । ते जनु सकल बिभव बस करहीं ।।

एके दिवशी सर्व समाजासह राजेसाहेब दरबारात सिंहासनावर विराजमान झाले ! सर्व सत्कृत्यांनी या राजाच्या स्वरूपात जणू काही देह धारण केला होता ! अशा राजांच्या कानावर रामाचे उत्साहवर्धक सुयश आले. सर्व मांडलिक राजे यांच्या कृपेची इच्छा करतात. इंद्रादि लोकपाल प्रेमपूर्वक रुची जाणून तो पूर्ण करतात व मर्जी संपादन करतात ! त्यामुळे त्रिभुवनांत (स्वर्ग-पृथ्वी-पाताळ) व भूत-भविष्य-वर्तमानात दशरथाच्यासारखा महाभाग्यवान् कोणीही नाही ! कारण सर्व मंगलांचे जे मूळ असा अनंतकोटी ब्रह्माण्ड-नायक राम ज्याचा प्रत्यक्ष पुत्र झाला, त्याच्या भाग्य वैभवाचे महत्त्व जेवढे गावे, तेवढे अपुरेच होणार !

राजाने हातात सहज आरसा घेऊन त्यात आपले मुख पाहिले व मस्तकावरील मुकुट सारखा केला. त्यावेळी कानाजवळ त्याला थोडे पिकलेले पांढरे केस सहज पाहावयास मिळाले. तेव्हा जणू काही वार्धक्यच कानात उपदेश करत आहे की, रामाला युवराजपद दे आणि जन्माला येऊन जीवनलाभ घे !

लगेच तो विचार राजाने मनात कायम केला. शुभदिवस व अनुकूल वेळ पाहून तो गुरुगृही गेला व आनंदाने बोलू लागला असता, प्रेमातिशयाने त्याचे शरीर पुलकित झाले ! गुरुजींच्या चरणी त्याने प्रार्थना करण्यास प्रारंभ केला, २

" मुनीश्वरा ! थोडे सांगतो ऐकावे. राम आता सर्वतोपरी लायक झाले आहेत. सेवक, सचिव, सर्व नागरिक स्त्री-पुरुष; आमच्याशी स्नेहभावाने वागणारेच नव्हेत, तर आमच्याशी वैर करणारे-सुद्धा व उदासीन राहणारे, या सर्वांचे रामावर माझ्या इतकेच प्रेम आहे. खरोखर आपल्या आशीर्वादानेच रामरूप धारण केले आहे असे वाटते ! सर्व ब्राह्मण व स्वकीय संबंधीजनसुद्धा अगदी आपल्याप्रमाणेच रामावर जीव की प्राण प्रेम करतात ! "

" मला तर वाटते, " राजा पुढे अंतःकरण मोकळे करू लागला, " जे सद्गुरुचरणरज आपल्या मस्तकी धारण करतात, ते जणू काय, त्या एकाच साधनाने अखिल वैभवांना आपल्या मुठीत आणतात.

मोहि सम यहु अनुभयउ न दूजें । सबु पायउँ रज पावनि पूजें ।।
अब अभिलाषु एकु मन मोरें । पूजिहि नाथ अनुग्रह तोरें ।।
मुनि प्रसन्न लखि सहज सनेहू । कहेउ नरेस रजायसु देहू ।।
दो ० –राजन राउर नामु जसु सब अभिमत दातार ।
फल अनुगामी महिप मनि मन अभिलाषु तुम्हार ।। ३ ।।
चौ० – सब बिधि गुरु प्रसन्न जियँ जानी । बोलेउ राउ रहँसि मृदु बानी ।।
नाथ रामु करिअहिं जुबराजू । कहिअ कृपा करि करिअ समाजू ।।
मोहि अछत यहु होइ उछाहू । लहहिं लोग सब लोचन लाहू ।।
प्रभु प्रसाद सिव सबइ निबाहीं । यह लालसा एक मन माहीं ।।
पुनि न सोच तनु रहउ कि जाऊ । जेहिं न होइ पाछें पछिताऊ ।।
सुनि मुनि दसरथ बचन सुहाए । मंगल मोद मूल मन भाए ।।
सुनु नृप जासु बिमुख पछिताहीं । जासु भजन बिनु जरनि न जाहीं ।।
भयउ तुम्हार तनय सोइ स्वामी । रामु पुनीत प्रेम अनुगामी ।।

याबाबतीत माझ्याइतका पूर्ण अनुभव दुसऱ्या कोणास आला असेल असे दिसत नाही. कारण पावन अशा आपल्या पदकमल-रजपूजनानेच आज माझे म्हणून जेवढे हे ऐश्वर्य आहे, त्याची मला प्राप्ती झालेली आहे, हे अगदी स्पष्ट व सत्य आहे !

“ आता अंतःकरणात एकच अभिलाषा आहे; व ती हे नाथ ! आपल्या कृपेने पूर्ण होईल अशी खात्रीहि आहे. ”

स्वाभाविक प्रेमाने मुनिश्रेष्ठ वसिष्ठ प्रसन्न झालेले पाहून नृपश्रेष्ठ म्हणाले की, “ आज्ञा द्यावी ” ते ऐकून मुनि म्हणतात, ‘ राजन् ! आपले नाव व आपले यशच एवढे मोठे आहे की, त्यामुळे सर्वांचे सर्व मनोरथ पूर्ण होतील ! त्यामुळे अगोदर अदृश्य स्वरूपात फळ उत्पन्न झाल्यानंतरच त्या फलाची इच्छा आपल्या मनात उत्पन्न होणार अशी, हे सर्व राजांच्या मुकुटमणे ! आमची खात्री आहे. ” (किंवा हे महिषमणी ! चारी फले (पुरुषार्थ) तुमची अनुगामी असता तव मानसी अभिलाष !) ३

याप्रमाणे अगदी अं[illegible] वसिष्ठ सुप्रसन्न आहेत, असे कळून आल्यानंतर राजाने हर्षयुक्त होऊन अत्यंत आपला हेतू स्पष्ट केला, “ हे नाथ ! श्रीरामचन्द्राला युवराजा करावा. तरी कृपा करून, ‘ तयारी करा ! ’ अशी आज्ञा होताच पुढच्या योजनेस लागतो. माझ्या डोळ्यादेखत एवढा उत्सव व्हावा व लोकांच्या नेत्रांचे पारणे फिटावे. प्रभू आपल्या कृपेने अंतःकरणातील सर्व मनोरथ शिवाने पूर्ण केले. एवढी एकच हौस शिल्लक राहिली आहे. तेवढी पूर्ण झाली म्हणजे मग हे शरीर केव्हाही पडो, पुनः मला दुःख अगर पश्चात्ताप करण्याचा प्रसंग येणार नाही ! ”

आनंद व मंगल यांचे उगमस्थान असणारे हे दशरथाचे भाषण ऐकून वसिष्ठ गुरूंना मनात मोठा संतोष झाला. ते म्हणाले, “ राजा ! सांगतो ऐका; ज्याच्याशी विरोध केला असता विरोधकांना पश्चात्ताप करावा लागतो, व ज्याच्या भजनाशिवाय जीवाची तापत्रयांतून (आधिभौतिक, आध्यात्मिक व आधिदैविक) सुटका होत नाही, असा सर्वलोक महेश्वर तुझ्या पोटी पुत्र होऊन ‘ राम ’ झाला आहे; कारण तो शुद्ध प्रेमाच्या मागे धावणारा आहे !

दो० – बेगि बिलंबु न करिअ नृप साजिअ सबुइ समाजु ।
सुदिन सुमंगलु तबहिं जब रामु होई जुबराजु ॥ ४ ॥

चौ० – मुदित महीपति मंदिर आए । सेवक सचिव सुमंतु बोलाए ॥
कहि जयजीव सीस तिन्ह नाए । भूप सुमंगल बचन सुनाए ॥
जौं पाँचहि मत लागै नीका । करहु हरषि हियँ रामहि टीका ॥
मंत्री मुदित सुनत प्रिय बानी । अभिमत बिरवँ परेउ जनु पानी ॥
बिनती सचिव करहिं कर जोरी । जिअहु जगतपति बरिस करोरी ॥
जग मंगल भल काजु बिचारा । बेगिअ नाथ न लाइअ बारा ॥
नृपहि मोदु सुनि सचिव सुभाषा । बढ़त बौंड़ जनु लही सुसाखा ॥

दो० – कहेउ भूप मुनिराज कर जोइ जोइ आयसु होइ ।
राम राज अभिषेक हित बेगि करहु सोइ सोइ ॥ ५ ॥

चौ० – हरषि मुनीस कहेउ मृदु बानी । आनहु सकल सुतीरथ पानी ॥
औषध मूल फूल फल पाना । कहे नाम गनि मंगल नाना ॥
चामर चरम बसन बहु भाँती । रोम पाट पट अगनित जाती ॥
मनिगन मंगल बस्तु अनेका । जो जग जोगु भूप अभिषेका ॥
बेद बिदित कहि सकल बिधाना । कहेउ रचहु पुर बिबिध बिताना ॥


" भूपते ! मग आता उशीर बिल्कुल करू नका. राज्याभिषेकाची सर्व तयारी जलद करा. जेव्हा रामराज्याभिषेक होईल, तो कोणताही दिवस सुदिन व सुमंगलच आहे ! " ४

लगेच, अत्यंत हर्षाने महीपती मंदिराकडे परतले. त्यांनी सेवकाकडून सचिव व मंत्री यांना जलदीने एकत्र बोलावले. येऊन ' जय जीव ! ' असे म्हणाले व सर्वांनी दशरथराजांना वंदन केले. तेव्हा राजाने त्या सर्वांना रामराज्याभिषेकाचा मंगलमय बेत सांगितला. " पंचाना जर ही योजना मान्य असेल, तर आनन्दपूर्वक रामराज्याभिषेकाचा कार्यक्रम पार पाडा ! " असा ठराव त्यांच्यापुढे राजाने पद्धतशीर मांडला.

ही राजाची भाषा ऐकताच, नवीनच फुटून आलेल्या अंकुरावर जलसिंचन करावे, त्याप्रमाणे त्यांच्या अपेक्षांना उत्तेजन मिळाले. हात जोडून त्यांनी आपले म्हणणे विनयपूर्वक सांगितले, " हे जगाच्या मायबापा ! आपणाला परमेश्वर कोटी वर्षे आयुष्य देवो ! आपण केलेला हा हितकर विचार, अखिल जगाचे मंगल साधणारा असल्याने, उशीर न लावता त्याची जलद अंमलबारी करा. "

मंत्रिमंडळाचा असा भक्कम पाठिंबा मिळताच, उफाड्याने वाढणाऱ्या वेलीला तरुशाखेचा आधार मिळावा तसा दशरथ राजांना मोठा आनंद झाला. त्यांनी लगेच निर्णय देऊन टाकला. मुनिराज जी काही आज्ञा देतील त्याप्रमाणे रामराज्याभिषेकाची सर्व प्रकारची सिद्धता सत्वर व व्यवस्थितपणे पूर्ण करा. ५

ही दशरथमहाराजांची परवानगी मिळताच वसिष्ठांच्याकडे पुढील तयारी करण्याकरतां योग्य ती माणसे गेली. त्यांना मुनिश्रेष्ठांनी मोठ्या उत्साहाने गोड शब्दांत सविस्तर कल्पना दिली. त्यांनी सर्व श्रेष्ठ तीर्थांचे पाणी आणावयास सांगितले. वनस्पती मूळ, फूल, फल, पाने इत्यादि मंगल वस्तूंची नावे सांगून त्या आणा म्हटले. चवऱ्या, विविध चर्मे, नानाप्रकारची वस्त्रे —रेशीम, लोकरी व सुती, रत्ने व अनेक मंगलवस्तू—ज्यांची गरज राज्याभिषेकाच्या वेळी लागते अशांची यादी देऊन त्या आणावयास सांगितल्या. त्याचप्रमाणे वेदशास्त्रोक्त सर्व विधींची माहिती दिली. तसेच नगरात जागोजागी नानाप्रकारचे मंडप घालून ते शृंगारण्याची आज्ञा दिली.



सफल रसाल पूगफल केरा । रोपहु बीथिन्ह पुर चहुँ फेरा ॥
रचहु मंजु मनि चौकें चारू । कहहु बनावन बेगि बजारू ॥
पूजहु गनपति गुर कुलदेवा । सब बिधि करहु भूमिसुर सेवा ॥

दो ० —ध्वज पताक तोरन कलस सजहु तुरग रथ नाग ॥
सिर धरि मुनिबर बचन सबु निज निज काजहिं लाग ॥ ६ ॥

चौ ० —जो मुनीस जेहि आयसु दीन्हा । सो तेहिं काजु प्रथम जनु कीन्हा ॥
बिप्र साधु सुर पूजत राजा । करत राम हित मंगल काजा ॥
सुनत राम अभिषेक सुहावा । बाज गहागह अवध बधावा ॥
राम सीय तन सगुन जनाए । फरकहिं मंगल अंग सुहाए ॥
पुलकि सप्रेम परसपर कहहीं । भरत आगमनु सूचक अहहीं ॥
भए बहुत दिन अति अवसेरी । सगुन प्रतीति भेंट प्रिय केरी ॥
भरत सरिस प्रिय को जग माहीं । इहइ सगुण फलु दूसर नाहीं ॥
रामहि बंधु सोच दिन राती । अंडन्हि कमठ हृदउ जेहि भाँति ॥

त्याचप्रमाणे नगरात चारी दिशाना सर्व रस्त्यांच्या दोन्ही बाजूस आंबा, सुपारी व केळी यांची फळांसह झाडे लावण्यास सांगितले. मण्यांच्या रांगोळ्याचे सुंदर चौक भरा. कमानी वगैरे उभारून उत्तम प्रकारे सर्व बाजारपेठा सुंदर रीतीने शृंगारण्यास हुकूम द्या. विघ्नहर्ता श्रीगणराज, कुलोपाध्याय व कुलदेवता यांचे पूजन करा. भूलोकीचे देवच असणारे जे ब्राह्मण त्यांना सर्व प्रकारे संतुष्ट करा, ध्वज व पताका गुढया उभारा, तोरणे लावा, हत्ती, घोडे, रथ सजवा, मंगल कलश तयार करा ! ”

याप्रमाणे मुनिश्रेष्ठांच्या सर्व आज्ञा शिरसामान्य करून सर्व लोक आपापल्या कामास लागले. ६

लोकांचा उत्साह एवढा मोठा होता की ज्याना ज्याना जे करावयास सांगितले ते ते काम त्यानी इतक्या जलद व शिस्तीने पार पाडले की, जणू कांही त्यांनी ते काम पूर्वीच करून ठेवले होते !

ब्राह्मण, संत, देवता यांचे राजाने पूजन केले. तात्पर्य, रामाच्या कल्याणासाठी जे जे मंगल कृत्य करणे जरूर ते ते सर्व राजाने श्रद्धेने केले.

रामराज्याभिषेकाची बातमी नगरवासीयांना मिळताच लागोलागी नागरिकांना स्वतंत्रपणे काही उत्सव करण्यास, वाद्ये वाजवण्यास व जयघोष करण्यास प्रारंभ केला.

मंगलसूचक अशी शुभांगे, सीतेची व रामांची स्फुरण पावू लागल्याने त्यांना उत्तम शकुन होत असल्याची जाणीव झाली. त्याबरोबर त्यांचे शरीर पुलकित झाले. त्यांनी परस्परांशी बोलून त्या शकुनांचा अर्थ लावला. “प्रियकर भरताचे आगमन होणार ”, हे यामुळे सूचित झाले ! कितीतरी दिवस झाले, अगदी चुकल्याचुकल्यासारखे वाटत आहे. या शकुनांच्यामुळे प्रिय कोणीतरी भेटणार असे उघड आहे ! आणि या पृथ्वीच्या पाठीवर भरताइतका दुसरा प्रिय कोण आहे ? अर्थात् शकुनांचे फल भरतभेट ! दुसरे कोणतेच शक्य नाही !

कासवीला जसे रात्रंदिवस आपल्या पिलांचे ध्यान लागलेले असते, त्याप्रमाणे रामाच्या हृदयात एकसारखा **भरताच्या भेटीचाच वेध !**

दो०–एहि अवसर मंगलु परम सुनि रहँसेउ रनिवासु ।
सोभत लखि बिधु बढ़त जनु बारिधि बीचि बिलासु ॥ ७ ॥

चौ०–प्रथम जाइ जिन्ह बचन सुनाए । भूषन बसन भूरि तिन्ह पाए ॥
प्रेम पुलकि तन मन अनुरागीं । मंगल कलस सजन सब लागीं ॥
चौकें चारु सुमित्राँ पूरी । मनिमय बिबिध भाँति अति रूरी ॥
आनँद मगन राम महतारी । दिए दान बहु बिप्र हँकारी ॥
पूजीं ग्रामदेबि सुर नागा । कहेउ बहोरि देन बलिभागा ॥
जेहि बिधि होइ राम कल्यानू । देहु दया करि सो बरदानू ॥
गावहिं मंगल कोकिलबयनी । बिधुबदनीं मृगसावकनयनीं ॥

दो०–राम राज अभिषेकु सुनि हियँ हरषे नर नारि ।
लगे सुमंगल सजन सब बिधि अनुकूल बिचारी ॥ ८ ॥

चौ०–तब नरनाहँ बसिष्ठु बोलाए । राम धाम सिख देन पठाए ॥
गुर आगमनु सुनत रघुनाथा । द्वार आइ पद नायउ माथा ॥

राम-सीतेला शुभ-शकुन झाले त्याचवेळी राण्यांना ही मंगल बातमी समजली तेव्हा पौर्णिमेच्या चंद्राच्या आकर्षक पूर्ण बिंबाला पाहून जशा लाटावर लाटा येऊन सागराला भरती येते त्याप्रमाणे, रामचंद्राच्या राज्यारोहणाच्या बातमीमुळे सर्व राण्यांच्या आनंदसागराला तुफान भरती येत होती ! ७

ज्यांनी हे वृत्त प्रथम सांगितले, त्यांना राण्यांकडून वस्त्रे, दागिने यांची भरपूर बक्षिसे मिळाली !

मनात अनेक मनोराज्यांच्या लाटा उठाव्यात व त्यांचे रूपांतर अंगावर येणाऱ्या रोमांचात व्हावे, आणि घाईघाईने लगेच मंगल वस्तू व मंगल कलश सुसज्ज करण्याच्या कामास लागावे, अशी सर्व राण्यांची एकच तारांबळ उडून गेली होती.

सुमित्रादेवी सर्व प्रकारे कार्यकुशल असल्याने तिने प्रथम गजमुक्तांच्या रत्नांच्या साहाय्याने नाना-प्रकारच्या रांगोळ्यांची अतिसुंदर गर्दी उडवून दिली !

राममाता सत्वाची केवळ मूर्ती ! ही बातमी ऐकून ती प्रथम आनंदात निमग्न झाली. नंतर ब्राह्मणांना बोलावून आणून तिने त्यांना नानाप्रकारची दाने दिली; ग्रामातील देवदेवता, नाग, यांची पूजा करून निर्विघ्न कार्य-सिद्धी व्हावी, म्हणून 'बलिभाग' देण्याचेही ठरविले ! सर्वांच्यापुढे तिची एकच प्रार्थना ! "माझ्या रामाचे ज्यामुळे कल्याण होईल, तेच वरदान दया करून द्या !"

हरिणशावकाप्रमाणे सुंदर नेत्र असणाऱ्या व चंद्रबिंबाप्रमाणे मनोहर मुखकमलाच्या स्त्रियांनीं आपल्या कोकिळेप्रमाणे मधुर कंठाने सुमंगल गीते गाण्यास प्रारंभ केला.

दैवाने खरोखर आपल्यावर कृपा केली, असे समजून रामाच्या अभिषेकाचे वृत्त कानावर आल्यापासून, मनात मोठा हर्ष झाल्यामुळे, नागरिक नरनारींनी अनेक तऱ्हेच्या मंगलसाजांची सिद्धता सुरू केली. ८

मग राजाने वसिष्ठ गुरुजींना बोलावून आणवून राज्याभिषेकापूर्वी कोणकोणत्या नियमांचे पालन करावयाचे ते रामनिवासात जाऊन सांगण्यास विनंती केली.

आपल्या पूज्य गुरूजींचे आगमन आपल्या निवासात होणार, हे समजताच राम त्यांच्या स्वागतार्थ दारात येऊन उभे राहिले, त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवून आदराने अर्घ्य दिले व त्याना घरात घेऊन आले.



सादर अरघ देइ घर आने । सोरह भाँति पूजि सनमाने ॥
गहे चरन सिय सहित बहोरी । बोले रामु कमल कर जोरी ॥
सेवक सदन स्वामि आगमनू । मंगल मूल अमंगल दमनू ॥
तदपि उचित जनु बोलि सप्रीती । पठइअ काज नाथ असि नीती ॥
प्रभुता तजि प्रभु कीन्ह सनेहू । भयउ पुनीत आजु यहु गेहू ॥
आयसु होइ सो करौं गोसाईं । सेवकु लहइ स्वामि सेवकाईं ॥

दो० – सुनि सनेह साने बचन मुनि रघुबरहि प्रसंस ।
राम कस न तुम्ह कहहु अस हंस बंस अवतंस ॥ ९ ॥

चौ० – बरनि राम गुन सीलु सुभाऊ । बोले प्रेम पुलकि मुनिराऊ ॥
भूप सजेउ अभिषेक समाजू । चाहत देन तुम्हहि जुबराजू ॥
राम करहु सब संजम आजू । जौं बिधि कुसल निबाहै काजू ॥
गुरु सिख देइ राय पहिं गयऊ । राम हृदयँ अस बिसमउ भयऊ ॥
जनमे एक संग सब भाई । भोजन सयन केलि लरिकाई ॥
करनबेध उपबीत बिआहा । संग संग सब भय उछाहा ॥
बिमल बंस यहु अनुचित एकू । बंधु बिहाइ बड़ेहि अभिषेकू ॥
प्रभु सप्रेम पछितानि सुहाई । हरउ भगत मन कै कुटिलाई ॥

उच्च आसनावर त्यांना बसवून त्यांची षोडशोपचारे पूजा केली. शेवटी सीतेसह त्यांचे गुरुपद धरले. व आपले करकमल जोडून प्रार्थना करू लागले, “ सेवकाच्या घरी स्वामींचे आगमन, म्हणजे सर्व मांगल्याचा सुमुहूर्त व सर्व अमंगलाचे निर्मूलन हे सत्यच ! तथापि कोणाःकडून तरी या दासाला निरोप पाठवून बोलावून घ्यावयाचे व योग्य त्या कामाला लावावयाचे, अशी नीती असता आपला मोठेपणा बाजूस ठेवून नाथ माझ्या घरी आले आणि प्रेमाने माझे गृह पावन केले ! .गुरुदेवा ! जी आज्ञा द्याल त्याप्रमाणे लगेच मी वागेन. स्वामीसेवेएवढा सेवकाला अन्य कोणता मोठा लाभ असणार ! ”

हे स्नेहरसाने ओथंबलेले भाषण श्रवण करून, वसिष्ठांनी रघुवीराची प्रशंसा केली. “ हंसवंशाच्या अवतंसा, असे विवेकपूर्ण तुम्ही न बोलाल तरच आश्चर्य ! ” ९

याप्रमाणे रामाच्या शील–गुण–स्वभावाची मनसोक्त स्तुती करत असता मुनी प्रेमाने पुलकित झाले. शेवटी त्यांनी मुख्य जरूर ती सूचना रामाला स्नेहभावाने दिली; ते म्हणाले, “ दशरथराजानी यौवराज्या-भिषेकाची जय्यत तयारी केली आहे. तुम्हाला ते युवराज करू इच्छितात. म्हणून रामा ! ज्यांच्या योगाने विधाता हे काम यथाविधी सांगपणे सफल करील अशा उपवास-हवन इत्यादि सगळ्या बाबी आज सर्व प्रकारे तुम्ही संयमपूर्वक पार पाडा. ” याप्रमाणे रामाला उपदेश करून वसिष्ठ गुरू दशरथ राजाकडे परत आले.

हे वृत्त कानी पडल्यानंतर रामाला मोठाच विस्मय व खेद वाटला ! ते विचार करू लागले आम्ही सगळे बंधु जन्माला एकदम आलो, एकत्र खेळलो, खाणेपिणे, निजणे, इतकेच काय पण कान टोचणे, मुंज, लग्न इत्यादि सर्व उत्सव व संस्कार सर्वांचे एकत्र झाले पण या परमपवित्र सूर्यवंशात ही एक गोष्ट किती अयोग्य होत आहे! सर्व भावांना सोडून फक्त सर्वांत वडील जो असतो त्यालाच तेवढा यौवराज्याचा अभिषेक करत आहेत ! ” शुद्ध प्रेमामुळे होणारा हा प्रभूचा कल्याणकारक खेद भक्ताच्या हृदयातील सर्व क्षुद्रभावनांचा नाश करो !

दो ० –तेहि अवसर आए लखन मगन प्रेम आनंद ।
सनमाने प्रिय बचन कहि रघुकुल कैरव चंद ।। १० ।।

चौ ० –बाजहिं बाजने बिबिध बिधाना । पुर प्रमोदु नहिं जाइ बखाना ।।
भरत आगमनु सकल मनावहिं । आवहुँ बेगि नयन फलु पावहिं ।।
हाट बाट घर गलीं अथाईं । कहहिं परसपर लोग लोगाईं ।।
कालि लगन भलि केतिक बारा । पूजिहि बिधि अभिलाषु हमारा ।।
कनक सिंघासन सीय समेता । बैठहिं रामु होइ चित चेता ।।
सकल कहहिं कब होइहि काली । बिघन मनावहिं देव कुचाली ।।
तिन्हहि सोहाइ न अवध बधावा । चोरहि चंदिनि राति न भावा ।।
सारद बोलि बिनय सुर करहीं । बारहिं बार पाय लै परहीं ।।

दो ० –बिपति हमारि बिलोकि बड़ि मातु करिअ सोइ आजु ।
रामु जाहिं बन राजु तजि होइ सकल सुरकाजु ।। ११ ।।

चौ ० –सुनि सुर बिनय ठाढ़ि पछिताती । भइउँ सरोज बिपिन हिमराती ।।
देखि देव पुनि कहहिं निहोरी । मातु तोहि नहिं थोरिउ खोरी ।।

त्याचवेळी प्रेममग्न झालेले लक्ष्मण अत्यंत आनंदाने रामाकडे आले. रघुकुल कैरव चंद्राने प्रेमळ शब्दांनी त्यांचा सन्मान केला. १०

सर्व अयोध्या नगरीत अनेक प्रकारच्या वाद्यांचा निनाद सुरू झाला. नागरिकांच्या हृदयातील आनंदाला अमर्याद भरती आली. भरताच्या आगमनासाठी सर्वजण प्रार्थना करू लागले की त्याने लवकर यावे व राज्याभिषेकाचा सोहाळा पाहून डोळ्यांचे पारणे फेडावे.

बाजारात, रस्त्यात, गल्लीत, बोळात, घरात आणि दारात जिकडे जावे तिकडे, स्त्रिया व पुरुष यांच्या परस्पर चर्चेत एकच विषय, “ आता उशीर कुठे आहे ? उद्याचाच मुहूर्त ! विधी तुमच्याआमच्या सर्वांच्या अभिलाषा खास पूर्ण करील. एकदा सुवर्णसिंहासनावर सीतेसह राम बसले की, आमची मनकामना सर्व पुरी होईल. केव्हां एकदा आजची रात्र उजाडते असे झाले आहे ! ”

राज्यरसभंग

याचवेळी भलताच विचार एका ठिकाणी चालू होता ! चोराला ज्याप्रमाणे स्वच्छ पडलेल्या चांदण्याला पाहून कपाळाला आठी पडते त्याचप्रमाणे अयोध्यानगरीतील हा उफाळणारा आनंद एक क्षणही देवांना पाहावेना. या कार्यक्रमाला विघ्न कसे आणावे याचा ध्यास त्यांना लागला होता.

त्यांनी शेवटी शारदेला आवाहन करून आणली व वारंवार तिच्या पाया पडण्यास प्रारंभ केला व प्रार्थना केली.

“ हे मातोश्री ! आमची सर्व देवांची ही विपत्ती पाहून अशी काहीतरी आजच्या आज युक्ती काढ की, ज्याच्या योगाने राम राज्याचा त्याग करून वनात जातील व देवांचे कार्य साधेल. ११

ही देवांची भलतीच प्रार्थना ऐकून सरस्वती जागच्या जागीच थंड उभी राहिली ! तिला वाटले “ कमलातल्या वनात हिम पाडणारी हेमंतऋतूतील रात्रच मी झाले म्हणायची ! ”

शारदादेवी स्तंभित होऊन विचारात मग्न झालेली पाहून देवांनी पिच्छा पुरवला, ‘ आई ! यात तुझ्याकडे



बिसमय हरष रहित रघुराऊ। तुम्ह जानहु सब राम प्रभाऊ॥
जीव करम बस सुख दुख भागी। जाइअ अवध देव हित लागी॥
बार बार गहि चरन सँकोची। चली बिचारि बिबुध मति पोची॥
ऊँच निवास नीचि करतूती। देखि न सकहिं पराइ बिभूती॥
आगिल काजू बिचारी बहोरी। करिहहिं चाह कुसल कबि मोरी॥
हरषि हृदयँ दसरथ पुर आई। जनु ग्रह दसा दुसह दुखदाई॥

दो०-नामु मंथरा मंदमति चेरी कैकइ केरि।
अजस पेटारी ताहि करि गई गिरा मति फेरि॥ १२॥

चौ०-दीख मंथरा नगरु बनावा। मंजुल मंगल बाज बधावा॥
पूछेसि लोगन्ह काह उछाहू। राम तिलकु सुनि भा उर दाहू॥
करइ बिचारु कुबुद्धि कुजाती। होइ अकाजु कवनि बिधि राती॥
देखि लागि मधु कुटिल किराती। जिमि गवँ तकइ लेउँ केहि भाँती॥
भरत मातु पहिं गइ बिलखानी। का अनमनि हसि कह हँसि रानी॥

कोणताही दोष येणार नाही. रघुरायाला यात विस्मय अगर हर्ष काहीच वाटणार नाही. तुला रामाचा सर्व प्रभाव माहीतच आहे! जीव आपापल्या कर्माच्या आधीन होऊन सुख-दुःखे भोगत असतो. म्हणून देवहिता-साठी तू आज अयोध्येला जा की!"

अशी प्रार्थना अगदी कळवळून करून देवांनी कितीतरी वेळा पाय धरले व तिला कमालीची भीड घातली!

"अत्यंत क्षुद्र, स्वार्थी बुद्धीचे हे सर्व देव आहेत!" असे अखेर समजून ती निघाली. ती मनात म्हणते, 'खरोखर यांचे निवासस्थान उच्च पण करणी मात्र अत्यंत नीच! कारण दुसऱ्याचे ऐश्वर्य सुख, भाग्य यांना मुळीसुद्धा पाहवत नाही! असो. आता इलाज नाही! भविष्यकालीन सर्व कार्याचा विचार करता (राक्षसवध भूभारहरण त्यामुळे सर्व जगास सुख इत्यादी) चतुर कवी (श्रीरामचंद्राचे चरित्र गायन करण्यासाठी) माझी प्रार्थना करतीलच!"

याप्रमाणे अनुकूल विचार केल्यावर अंतःकरणात उत्साह उत्पन्न झाला व ती अयोध्येला येऊन दाखल झाली. जणू काही असह्य दुःख देणारी ग्रहदशाच! कैकेयीची मंथरा नावाची एक हीनबुद्धीची दासी होती. सर्व दुष्कीर्तीची पेटी बनण्याइतकी तिची बुद्धी फिरवून सरस्वती परत चालती झाली! १२.

त्यानंतर मंथरा बाहेर पडली, मग सर्व अयोध्या नगरी शृंगारलेली तिने पाहिली. मंजुळ व मंगल उत्सव व जयघोष सर्वत्र चाललेले बघून ती विचारते, "काय हो! कसला उत्सव चालला आहे?"

"रामाच्या राज्याभिषेकाचा! हे उत्तर ऐकून तिच्या अंतःकरणात आगीचा गोळा उठला! अत्यंत हीन कुळातील व क्षुद्र बुद्धीचीच ती असल्याने, आजच्या रात्रीच या कार्यक्रमाला विघ्न कसे करता येईल, यासंबंधी तिचा विचार सुरू झाला. जणू काही मधाचे पोळे पाहून ते आपल्या हाताला कसे लागेल, याची युक्ती शोधू लागलेली किरातिनीच!

अशा विषण्ण मनःस्थितीत ती भरत-जननीजवळ गेली. राणीने हंसतच 'तू आज इतकी दुश्चित्त

उतरु देइ न लेइ उसासू । नारि चरित करि ढारइ आँसू ॥
हँसि कह रानि गालु बड़ तोरें । दीन्ह लखन सिख अस मन मोरें ॥
तबहुँ न बोले चेरि बड़ि पापिनि । छाड़इ स्वास कारि जनु साँपिनि ॥

दो०—सभय रानि कह कहसि किन कुसल रामु महिपालु ।
लखनु भरतु रिपुदमनु सुनि भा कूबरि उर सालु ॥ १३ ॥

चौ०—कत सिख देइ हमहि कोउ माई । गालु करब केहि कर बलु पाई ॥
रामहि छाड़ि कुसल केहि आजू । जेयि जनेसु देइ जुबराजू ॥
भयउ कौसिलहि बिधि अति दाहिन । देखत गरब रहत उर नाहिन ॥
देखहु कस न जाइ सब सोभा । जो अवलोकि मोर मनु छोभा ॥
पूतु बिदेस न सोचु तुम्हारें । जानति हहु बस नाहु हमारें ॥
नीद बहुत प्रिय सेज तुराई । लखहु न भूप कपट चतुराई ॥
सुनि प्रिय बचन मलिन मनु जानी । झुकी रानि अब रहु अरगानी ॥
पुनि अस कबहूँ कहसि घरफोरी । तब धरि जीभ कढ़ावउँ तोरी ॥

दो०—काने खोरे कूबरे कुटिल कुचाली जानि ।
तिय बिसेषि पुनि चेरि कहि भरतमातु मुसुकानि ॥ १४ ॥

का?" म्हणून विचारले. प्रश्नाचे उत्तर न देता, स्त्रियांच्या कपटलाघवाचा एक नमुना म्हणून डोळ्यांतून अश्रू गाळीत ती मोठ्याने उसासे टाकू लागली!

राणी हसली व म्हणते, "काय ग! तुझी जीभ फार लांब असल्याने, मला वाटते, लक्ष्मणाने तुला काही तरी शिक्षा खास केली!"

यावरही तिने तोंडांतून शब्दच काढला नाही. ती अत्यंत पापीण दासी एखाद्या काळ्या नागिणीप्रमाणे नुसती भयंकर निःश्वासच सोडत राहिली! त्यामुळे मात्र राणीला भीती वाटू लागली. तिने घाबरून विचारले, "काय झालं तुला? बोलत का नाहीस? माझा राम खुशाल आहे ना? महाराज, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न असे सर्व सुखी आहेत ना?" हे ऐकून मात्र, कुब्जेच्या अंगाचा भडका उडाला. १३

ती म्हणते, "मला शिक्षा कोण आणि कशाकरता करणार? माझे तोंड, माई! कोणाच्या जिवावर मोकळे सोडू? आज एकटा राम तेवढा कुशल! त्याच्याशिवाय दुसरे कोण? रामाला, नृपति युवराज करत आहेत. कौसल्येला दैव फारच अनुकूल झाले! हे पाहून तिच्या मनात आता केवढा गर्व उत्पन्न झाला आहे! उठून एकदा सर्वत्र कशी नगरी शृंगारली आहे ती पहा तर खरे! ते सर्व बघून माझी मात्र तळव्याची आग अगदी मस्तकास जाऊन पोचली!

"पुत्र परक्या ठिकाणी, तुम्हाला नाही चिंता! तुमची कल्पना राजे सर्वस्वी आपल्या मुठीत आहेत. गाद्या, गिर्द्या झोपायला मिळाल्या की तुम्ही खूष! त्यामुळे इकडे राजाने आपल्या कपटी स्वभावाने आणि चातुर्याने काय काय चालवले आहे, त्याची दाद कुठे आहे तुम्हाला?"

हे सर्व भाषण कानाला काही खटकले नाही, पण अंतःकरणातील तिची दुष्ट बुद्धी पाहून राणीने एकदम दरडावून तिला ताकीद दिली, "अग ए घरफोडे! तोंड बंद कर अगोदर. जर पुनः असली भाषा वापरलीस तर जीभ ओढून काढवीन, समजलीस! कुबडी! काणी! पांगळी! कपटी!—लोक कुचाळक्या करणारे असतात. हे ठरलेलेच; यात तू जातीची स्त्री आणि त्यात पुनः दासी!" १४



चौ० —प्रियबादिनि सिख दीन्हिउँ तोही । सपनेहुँ तो पर कोपु न मोही ॥
सुदिनु सुमंगल दायकु सोई । तोर कहा फुर जेहि दिन होई ॥
जेठ स्वामि सेवक लघु भाई । यह दिनकर कुल रीति सुहाई ॥
राम तिलकु जौं साँचेहुँ काली । देउँ मागु मन भावत आली ॥
कौसल्या सम सब महतारी । रामही सहज सुभायँ पियारी ॥
मो पर करहिं सनेहु बिसेषी । मैं करि प्रीति परीछा देखी ॥
जौं बिधि जनमु देइ करि छोहु । होहुँ राम सिय पूत पुतोहु ॥
प्रान तें अधिक रामु प्रिय मोरें । तिन्ह कें तिलक छोभु कस तोरें ॥

दो० —भरत सपथ तोहि सत्य कहु परिहरि कपट दुराउ ।
हरष समय बिसमउ करसि कारन मोहि सुनाउ ॥ १५ ॥

चौ० —एकहिं बार आस सब पूजी । अब कछु कहब जीभ करि दुजी ॥
फोरै जोगु कपारु अभागा । भलेउ कहत दुख रउरेहि लागा ॥
कहहिं झूठि फुरि बात बनाई । ते प्रिय तुम्हहि करुइ मैं माई ॥

मंथरा कैकेयीची प्रिय दासी होती. तिच्यावर पूर्वी ती इतकी कधीच रागावली नव्हती. त्यामुळे भरत-जननीचा रागाचा चढता पारा, शब्दांच्या भडिमारामुळे उतरत येऊन शेवटी तर ती हसूच लागली व आपल्या लाडक्या दासीला आपण फारच कडक बोललो या भावनेने मधुर शब्दाने तिला तिने गोंजारण्यास सुरवात केली. भरतमाता हसून म्हणते " प्रियवादिनि ! तुला मी जरी रागावून बोलले तरी तुझ्यावर माझा खरा संताप स्वप्नातही होणार नाही ! हे बघ तू बोललीस ती गोष्ट ज्या दिवशी खरोखर घडेल तो अत्यंत मंगल सुदिन उगवला अशी खात्री असू दे ! रघुवंशातील हा अत्यंत सुंदर दंडक आहे की सर्वांत थोरला मुलगा स्वामी व धाकटे सर्व भाऊ त्याचे सेवक ! अग ! उद्या सकाळी जर खरोखर रामाला राज्याभिषेक होणार असेल तर मैत्रिणी तुला काय बक्षीस देऊ बोल ! काय वाटेल ते मागून घे ! मी देईन.

" रामाला स्वभावतःच प्रथमपासून कौसल्येप्रमाणे सर्व माता प्रिय आहेत. परंतु माझ्यावर रामाचे विशेषच प्रेम आहे. आणि रामाच्या प्रेमाची परीक्षा करून हे माझे मत मी ठाम केले आहे. ब्रह्मदेवाने जर पुनः जन्माला घातलेच तर त्याला प्रार्थना एकच की, त्याने कृपाकरून राम मुलगा व सीता सून द्यावी ! म्हणून रामावर, माझ्या प्रत्यक्ष प्राणाहूनही माझे जास्त प्रेम आहे ! आणि त्याला राज्याभिषेक करण्याचे ठरल्यामुळे तुला ग का एवढे दुःख झाले ?

" हे बघ, तुला भरताच्या गळ्याची शपथ आहे ! सगळे डावपेच आणि लबाड्या सोडून मला खरं खरं सांग बरं ! अशा आनंदाच्या वेळी तुला इतके भयंकर दुःख का ? काय मूळ कारण आहे, ते एकदा टाक बघू मोकळ्या मनाने सांगून, मला कळू दे !" १५.

राणीच्या या भोळसट पण लाघवी शब्दांनी, आपला डाव साधण्याला जागा आहे, याची खात्री पटून, ती महामुत्सद्दी कुबडी, नवे अवसान घेऊन बोलू लागली, " सगळ्या आशा एकदाच बोलून पुऱ्या झाल्या असता मला दुसरी जीभ बनवूनच बोलले पाहिजे. माझं मेलीचं डोकंच फोडून टाकण्याच्या लायकीचं आहे ! तुमच्या हिताचं बोलले तेच आपणाला कडू लागलं ! खरं खोटं तिखटमीठ लावून काही तरी जे बोलतात ते

हमहुँ कहबि अब ठकुरसोहाती । नाहिं त मौन रहब दिनु राती ।।
करि कुरूप बिधि परबस कीन्हा । बवा सो लुनिअ लहिअ जो दीन्हा ।।
कोउ नृप होउ हमहि का हानी । चेरि छाड़ि अब होब कि रानी ।।
जारै जोगु सुभाउ हमारा । अनभल देखि न जाइ तुम्हारा ।।
तातें कछुक बात अनुसारी । छमिअ देबि बड़ि चूक हमारी ।।
दो ० –गुढ़ कपट प्रिय बचन सुनि तीय अधरबुधि रानि ।
सुरमाया बस बैरिनिहि सुहृद जानि पतिआनि ।। १६ ।।
चौ ० –सादर पुनि पुनि पूँछति ओही । सबरी गान मृगी जनु मोही ।।
तसि मति फिरी अहइ जसि भाबी । रहसी चेरि घात जनु फाबी ।।
तुम्ह पूँछहु मैं कहत डेराऊँ । धरेहु मोर घरफोरी नाऊँ ।।
सजि प्रतीति बहुबिधि गढ़ि छोली । अवध साढ़साती तब बोली ।।
प्रिय सिय रामु कहा तुम्ह रानी । रामहि तुम्ह प्रिय सो फुरि बानी ।।
रहा प्रथम अब ते दिन बीते । समउ फिरें रिपु होहिं पिरीते ।।

आपणाला गोड वाटतात, मी कडू वाटते. त्यांच्यासारखे केले असते तर मी वाईटही झाले नसते ! तोंडपुजेपणा काय, मलाही करायला येईल की ! नाहीतर रात्रंदिवस तोंडाला कायमचे कुलूप तरी घालून टाकीन !

अगोदरच विधीने कुरूप करून पराधीन ठेवली. लोकाला दोष काय लावायचा ? आपण जसे पेरले तसेच उगवणार आणि जेवढे दिले तेवढेच परत मिळणार ! त्याला इलाज नाही. कोणी राजा झाला तरी त्यांत आमचा काय नफा-तोटा ? काय माझं दासीपण सुटून मला राणीपदाची प्राप्ती थोडीच होणार ?

पण काय करू ? या माझ्या स्वभावाला एकदा केव्हा आग लागेल ? तुमचं अनहित बघणं कसं ते त्याला एवढंसुद्धा सोसत नाही ! केवळ या माझ्या वाईट स्वभावामुळेच मी चार शब्द तोंडातून काढले. माझ्याकडून ही फार मोठी चूक झाली बरं राणी साहेब ! या आपल्या दासीला त्याबद्दल क्षमा करा ! ! "

याप्रमाणे मंथरेने अत्यंत गोड, गूढ व कपटयुक्त भाषण केले. जात्याच तमोगुणाची चंचल स्त्री, त्यात राणी ! देवांच्या मायेला आधीन झाली. वस्तुतः असली भयंकर आग लावणारी ती हाडवैरीण, पण कैकेयीला आता ती अगदी आपली जिव्हाळ्याची मैत्रीण वाटली आणि तिने तिच्यावर विश्वास ठेवला. १६

शबरीच्या गाण्याला हरिणी जशी भुलावी तशी कुबडीच्या मोहक भाषणाच्या जाळ्यात कैकयी पूर्णपणे सापडली ! तिला राणीने अगदी आपल्या जवळ बसवून घेतली आणि अतिशय आदराने विनवणी करून ती पुनः पुन्हा विचारू लागली.

जे होणार ते चुकणार नाही ! कैकेयीची बुद्धी चळली आपला डाव बरोबर साधला हे पाहून कुबडीला हर्ष झाला व चाणक्याला चकित करणाऱ्या कौशल्याने तिने बोलण्यास सुरवात केली, " तुम्ही पुनः पुन्हा विचारत आहा, परंतु बोलायला मला भीती वाटते बाई ! मला घरफोडी म्हणून एकदा तुमच्याकडून नाव मिळालेच आहे की ! "

राणी आता सर्वस्वी विश्वास ठेवण्याइतकी तिची निष्ठा पक्की झाली आहे अशी खात्री झाल्यानंतर तिने नवे कुभांड रचले आणि अयोध्यानगरीची ती साडेसाती बोलू लागली, " राणीसाहेब सीता व राम तुम्हाला

भानु कमल कुल पोषनिहारा । बिनु जल जारि करइ सोइ छारा ॥
जरि तुम्हरि चह सवति उखारी । रूँधहू करि उपाउ बर बारी ॥

दो ० –तुम्हहि न सोचु सोहाग बल निज बस जानहु राउ ।
मन मलीन मुह मीठ नृपु राउर सरल सुभाउ ॥ १७ ॥

चौ ० –चतुर गँभीर राम महतारी । बीचु पाइ निज बात सँवारी ॥
पठए भरतु भूप ननिअउरें । राम मातु मत जानब रउरें ॥
सेवहिं सकल सवति मोहि नीकें । गरबित भरत मातु बल पी कें ॥
सालु तुम्हार कौसिलहि माई । कपट चतुर नहिं होइ जनाई ॥
राजहि तुम्ह पर प्रेम बिसेषी । सवति सुभाउ सकइ नहिं देखी ॥
रचि प्रपंचु भूपहि अपनाई । राम तिलक हित लगन धराई ॥
यह कुल उचित राम कहुँ टीका । सबहि सोहाइ मोहि सुठि नीका ॥
आगिलि बात समुझि डरु मोही । देउ दैउ फिरि सो फलु ओही ॥

फार प्रिय असे तुम्ही म्हणता, तसेच रामाचे तुमच्यावर विशेष प्रेम हे तुमचे म्हणणे खरेच; पण पूर्वी तसे होते. आता तो काळ पालटला. काळाचा वारा उलटला म्हणजे मित्राचेच शत्रू होतात. कमलांच्या समुदायाचे पोषण करणारा सूर्यनारायण त्याचा मित्रच पण तोच उन्हाळ्यात पाण्याचा अभाव होताच त्याचा संहार करतो. तुमची सवत तुमचा काटा काढू इच्छिते. यत्नपूर्वक याचवेळी चांगला बंदोबस्त करून तिचा डाव हाणून पाडला पाहिजे !

" आपणाला स्वतःच्या मोठ्या भाग्याचा जोर वाटतो. त्याचप्रमाणे महाराज सर्वस्वी आपल्या शब्दाबाहेर नाहीत, अशी आपली समजूत. परंतु त्यांचे अंतःकरण कपटी आणि वर भाषा कशी अगदी मधाहून मधुर ! आपला अगदी सरळ स्वभाव, त्यामुळे दुसऱ्याचे वेडेवाकडे आपल्या ध्यानीच येत नाही ! १७.

" आणि रामाची आई ! काय सांगू ? धूर्त, गंभीर, कारस्थानी बाई ! योग्य संधी सापडल्याबरोबर तिने आपला कसा गुपचुप स्वार्थ साधला ! कोणाच्याही लक्षात येण्यासारखे हे उघड कपट आहे. भरताला आताच आजोळी कोणी धाडला हो ? शंकाच नको, सगळा व्यूह याच बाईचा ! तिला काय वाटते सांगू ? सगळ्या सवती कशा माझ्या दासीप्रमाणे माझी सेवा करतात पण भरताची आई मात्र आपल्या यजमानांच्या जोरावर मोठ्या घमेंडीत आहे ! आणि तुमच्याबद्दल तिला मत्सर वाटण्याचे अगदी नेमके हेच कारण आहे. पण तुमचा पडला भोळा स्वभाव ! कोण, काय कपटकौशल्य गाजवून, कुठे कसा धोका निर्माण करत आहे, हे तुमच्या, त्यामुळे झटकन् ध्यानात येतच नाही ! तुमच्यावर राजाचे फार प्रेम आहे, हे सवतीमत्सरामुळे तिला साहजिकच पाहवत नाही. एवढ्याकरता अनेक कपटकारस्थाने केली, राजाचे मन वळवले, आणि रामाला राज्याभिषेक करण्याचा मुहूर्त किती तातडीने ठरवला, पाहा की !

" रघुवंशात, राम थोरला मुलगा, त्यालाच अभिषेक करावा; असे सर्वांना आवडते, मला तर अगदी मनापासून तसेच वाटत होते. पण भविष्यकाळी, या कारस्थानाचा परिणाम म्हणून ज्या घटना घडणार आहेत, त्याची नुसती कल्पना आली तरी भीतीने जिवाचा थरकाप होतो. दैवाने खरोखर अगदी बरोबर याच्या उलट करून, लोकांसाठी जे वाईट चिंतिले तेच भोगण्याचे, कौसल्येच्या नशिबी आले पाहिजे ! "

दो ० —रचि पचि कोटिक कुटिलपन कीन्हेसि कपट प्रबोधु ।
कहिसि कथा सत सवति कै जेहि बिधि बाढ़ बिरोधु ॥ १८ ॥
चौ ० —भावी बस प्रतीति उर आई । पूँछ रानि पुनि सपथ देवाई ॥
का पूँछहु तुम्ह अबहुँ न जाना । निज हित अनहित पसु पहिचाना ॥
भयउ पाखु दिन सजत समाजू । तुम्ह पाई सुधि मोहि सन आजू ॥
खाइअ पहिरिअ राज तुम्हारें । सत्य कहें नहिं दोषु हमारें ॥
जौं असत्य कछु कहब बनाइ । तौ बिधि देइहि हमहि बजाई ॥
रामहि तिलक कालि जौं भयऊ । तुम्ह कहुँ बिपति बीजु बिधि बयऊ ॥
रेख खँचाइ कहउँ बलु भाषी । भामिनि भइहु दुध कइ माखी ॥
जौं सुत सहित करहु सेवकाई । तौ घर रहहु न आन उपाई ॥
दो ० —कद्रूँ बिनतहि दीन्ह दुखु तुम्हहि कौसिलाँ द ।
भरतु बंदिगृह सेइहहिं लखनु राम के नेब ॥ १९ ॥
चौ ० —कैकयसुता सुनत कटु बानी । कहि न सकइ कछु सहमि सुखानी ॥
तन पसेउ कदली जिमि काँपी । कुबरीं दसन जीभ तब चाँपी ॥

कोट्यवधी कपटकारस्थानांच्या कल्पित कथा अगदी रंगवून, या कुटिल नाटकाच्या पूर्ण स्वाधीन झालेल्या राणीच्या मनावर तिने खोल परिणाम केला. सवतीच्या अमानुषपणे केलेल्या छळाच्या शेकडो कथा मंथरेने कैकेयीला सांगितल्या तिच्या ठिकाणच्या सवती मत्सराचा ज्वालामुखी त्यामुळे आपले विक्राळ स्वरूप प्रकट करील इतक्या कौशल्याने तिच्या अंतःकरणात या कुटिल दासीने त्या भरवल्या ! १८.

भवितव्यतेने भरतजननीच्या हृदयावर आपला पूर्ण ताबा बसवला. मंथरेवरून कैकेयीला पूर्ण विश्वास वाटून बिचारीने आपल्या गळ्याची शपथ घालून त्या कृष्णकारस्थानी कुबडीला अगदी कळवळून विचारण्यास सुरवात केली ! शिकार संपूर्ण साधली, या भरंवशावर ती उसळून बोलते,

" काय मला पुनः पुन्हा विचारता ? अजुनी तुमच्या लक्षात येत नाही ? अहो, आपले हित काय नी अनहित काय, ते पशूलासुद्धा समजते, गेले पंधरा दिवस सर्व नगरीत हा गोंधळ चालू आहे (सर्वस्वी खोटे) ! आणि तुम्हाला ही बातमी सांगायला मला यावे लागते ! पण करायचं काय ? तुमच्याच राज्यात खाते, पिते, लेणी लेते, मग आपल्या मनाला जे खरे खरे दिसते, ते नको का सांगायला तुम्हाला ? खोट्या थापा मारल्या तर तो म्हातारा बाबा ब्रह्मदेव बसला आहे की, आम्हाला कडक शिक्षा करायला !

" आता अगदी अखेरचे एकदाच सांगून टाकते. उद्या जर रामाला यौवराज्याभिषेक झाला, तर दुर्दैवाने, तुमच्या दुःखांचे वृक्षारोपण केलेच म्हणून समजा ! मी सांगते, ही अगदी काळ्या दगडावरची रेघ ! यात काडीचीही शंका नाही. हे सुंदरी ! त्या घटनेनंतर तू अगदी दुधातली माशी होशील बरं ! आपल्या पुत्रासह जर कौसल्येच्या पायाचे दास्य केले तरच तुम्हाला या घरात राहायला जागा मिळेल. नाही तर दुसरा उपायच नाही !

" कद्रूने आपल्या सवतीला, विनतेला कशी छळून चळचळ कापायला लावली, तशी तुम्हाला कौसल्या छळल्याशिवाय बिलकुल राहाणार नाही. भरताच्या नशिबी बंदिखाना ! आणि सगळी सूत्रे हालवणारा लक्ष्मण रामाचा दिवाण ! " १९

ही सर्व भयंकर भाषा चालू असता कैकयी भीतीने अगदी सुकून गेली. तिच्या मुखावाटे एक शब्दही उमटेना ! तिच्या सर्वांगाला दरदरून घाम सुटला. कौसल्येकडून होणाऱ्या छळाची केवळ कल्पनाच ! पण



कहि कहि कोटिक कपट कहानी । धीरजु धरहु प्रबोधिसि रानी ।।
फिरा करमु प्रिय लागि कुचाली । बकिहि सराहइ मानि मराली ।।
सुनु मंथरा बात फुरि तोरी । दहिनि आँखि नित फरकइ मोरी ।।
दिन प्रति देखउँ राति कुसपने । कहउँ न तोहि मोहबस अपने ।।
कहा करौं सखि सूध सुभाऊ । दाहिन बाम न जानउँ काऊ ।।
दो ०—अपनें चलत न आजु लगि अनभल काहुक कीन्ह ।
केहिं अघ एकहि बार मोहि दैअँ दुसह दुखु दीन्ह ।। २० ।।
चौ ०--नैहर जनमु भरब बरु जाई । जिअत न करबि सवति सेवकाई ।।
अरि बस दैउ जिआवत जाही । मरनु नीक तेहि जीवन चाही ।।
दीन बचन कह बहुबिधि रानी । सुनि कुबरीं तियमाया ठानी ।।
अस कस कहहु मानि मन ऊना । सुखु सोहागु तुम्ह कहुँ दिन दूना ।।

भविष्य काळी आपल्या होणाऱ्या केविलवाणी स्थितीमुळे ती आताच केळीसारखी थरथर कापू लागली !

आपल्या वक्तृत्वाचा हा प्रत्यक्ष प्रभाव कुबडीने पाहिला. कदाचित् भीतीमुळे या सुकुमार स्त्रीची भलतीच अवस्था होईल व मग आपला टाकलेला डाव हुकेल, अशी तिलाही, राणीची करुणस्थिती पाहून, धास्ती पडली. तिने झटकन् आपली जीभ दाताखाली चावली व आपल्या कपटनौकेचे सुकाणू वळवून भाषणाची दिशा बदलली.

भीतीने हैराण झालेल्या राणीला थोडा धीर देऊन, जरूर त्या कपटनाटकातील तिची भूमिका, तिला यशस्वी करण्यासाठी राणीला समर्थ करणे भाग होते. तिने आता राणीला धीर देऊन अनेक कपट-कहाण्या सांगितल्या !

शेवटी जे नको तेच झाले ! कैकेयीच्या भाग्याने उलट खाल्ली. मंथरेच्या भयंकर दुष्ट कारस्थानाचेच तिला प्रेम वाटू लागले. बगळीलाच हंसी (वैरिणीलाच मैत्रीण) मानून तिची स्तुती करण्यास सुरुवात केली. कुबडीलाच आता आपली खरी कल्याण करणारी समजून राणी म्हणते,

" मंथरे ! अग, तुझ बोलणं अगदी अक्षरशः खरं आहे बघ ! माझा किनी, उजवा डोळा सारखा लवतो ! रोज रात्री भयंकर दुःस्वप्ने पडतात. पण मी खुळी बनून तुला यातले काहीच सांगितले नाही. हे पाहा ! माझ्या या भाबड्या स्वभावानेच माझा खरोखर घात केला ! डावं काय नी उजवं काय हेच मला कधी कळत नाही, तूच माझी आता खरी सखी ! माझे कोण बरे करते व कोण बुरे करते, हे खरोखर मला अजिबात आजपर्यंत कळलेच नाही. माझ्या शब्दाला मान असेपर्यंत, कोणाचे तिळाएवढेही नुकसान केले नाही ! असे असतां कोणत्या महापापाची शिक्षा म्हणून, विधीने माझ्यावर एवढ्या दुःसह दुःखाचा घाला एकाएकी घातला? २०

" पण सखी ! तुला सांगून ठेवते, मला मरण आले तरी मी सवतीचे दास्य मात्र एक क्षणभरही करणार नाही ! त्यापेक्षा सगळा उभा जन्म बापाच्या घरी, तसा प्रसंग पडला तर [illegible] मी डरणार नाही ! शत्रूच्या अंकित होऊन त्यांनी टाकलेल्या तुकड्यावर, दुर्दैवाच्या नावाने खडे फोडीत जगण्यापेक्षा अशा माणसाने मरणेच अधिक श्रेयस्कर ! "

अशा प्रकारे अत्यंत दीन होऊन निराशेचे दुःखोद्‌गार राणीच्या मुखातून बाहेर पडू लागताच, कुबडीने आपल्या स्त्री-मायेची रसवंती सुरू केली, " राणीसाहेब मनात भलते भलते उगीच आणून असे अमंगळ अगदी अक्षरसुद्धा काढू नका ! आपणाला तर आता वैभव-सौख्य दुप्पट प्राप्त होणार ! दुसऱ्याच्या सुखात माती कालवण्यासाठी जिने कंबर कसली तेच फळ शेवटी तिच्या पदरात पडणार ! (इच्छी परा, ते येई घरा !!)

चौ० – जेहिं राउर अति अनभल ताका । सोइ पाइहि यहु फलु परिपाका ।।
जब तें कुमत सुना मैं स्वामिनि । भूख न बासर नीद न जामिनि ।।
पूँछेउँ गुनिन्ह रेख तिन्ह खाँची । भरत भुआल होहि यह साँची ।।
भामिनि करहु त कहौं उपाऊ । है तुम्हरीं सेवा बस राऊ ।।

दो ० –परउँ कूप तुअ बचन पर सकउँ पूत पति त्यागि ।
कहसि मोर दुखु देखि बड़ कस न करब हित लागि ।। २१ ।।

चौ ० –कुबरीं करि कबुली कैकेई । कपट छुरी उर पाहन टेई ।।
लखइ न रानि निकट दुखु कैसें । चरइ हरित तिन बलिपसु जैसें ।।
सुनत बात मृदु अंत कठोरी । देति मनहुँ मधु माहुर घोरी ।।
कहइ चेरि सुधि अहइ कि नाहीं । स्वामिनि कहिहु कथा मोहि पाहीं ।।
दुइ बरदान भूप सन थाती । मागहु आजु जुड़ावहु छाती ।।
सुतहि राजु रामहि बनबासू । देहु लेहु सब सवति हुलासू ।।
भूपति राम सपथ जब करई । तब मागेहु जेहि बचनु न टरई ।।
होइ अकाजु आजु निसि बीतें । बचनु मोर प्रिय मानेहु जी तें ।।

"काय सांगू बाई ! ज्या दिवशी या कपट कारस्थानाचा सुगावा लागला, त्या दिवसापासून हे स्वामिनी ! आपल्या पायाच्या दासीला नाही दिवसा भूक, ना रात्री झोप । चैन पडेना. गेले ज्योतिष्यांकडे. त्यांना नक्की काय असेल तेच सांगा, असे निक्षून सांगितले. आणि आनंदाची गोष्ट म्हणजे त्यांनी सांगितले, अगदी खरं, खरं, त्रिवार सत्य भरतच राजा होणार ! ! !

" पण, हे भामिनी ! मी सांगते तस्सा उपाय करणार असशील तरच हे शक्य ! तुझ्या सेवेने राजे संतुष्ट होऊन तुझ्या अगदी अंकित झालेले आहेत. मग पाहा—"

"तू म्हणशील तर आता आडात उडी टाकते, भरतालाच काय प्रत्यक्ष पतीलासुद्धा तुझ्या शब्दासाठी, मी सोडून द्यायला तयार आहे ! ! माझ्या दुःखाने तुझ्या जिवाची तळमळ होऊन तू इतके जीव तोडून सांगत असता, आपल्याच कल्याणाची गोष्ट मी करणार नाही होय ?" २१

राणीने अधीरपणाने उत्तर दिले. राणीची श्रद्धा आता आपणास अपेक्षित इतक्या कमालीची आपल्यावर बसलेली मंथरेने पाहिली. आता अखेरी साधली पाहिजे, म्हणून तिने अनेक प्रकारची वचने कैकेयीकडून घेतली. आपल्या कपटसुरीला कठोर हृदयाच्या निसण्यावर चांगली धार लावली ! बळी द्यावयाचा पशू ज्याप्रमाणे हिरवे घास भवितव्यतेच्या अज्ञानात खातो, त्याप्रमाणे सन्निध भयंकर दुःखाची खाई भडकणार याची बिलकुल कल्पना न येता भोळी राणी कुबडीला भराभर वचने देत होती, व तिचे शब्द प्रमाण मानीत होती !

कानाला ऐकावयास अती मंजुळ, पण परिणामी अत्यंत घोर असे तिचे ते भाषण म्हणजे प्राणघातक विषच जणू मधात मिसळलेले होते !......तिने राणीवर शेवटचा डाव टाकला !

ती दासी म्हणते, " माझ्याजवळ सांगितलेल्या वृत्तान्ताची शुद्ध आहे का ? राजाजवळ दोन वर ठेव म्हणून ठेवले आहेत, अशी तुम्ही एकदा माझ्याजवळ गोष्ट केली होती ना ? मग आजच्या आज ते वर मागून घेऊन आपल्या तप्त हृदयाला शांत करा वरं ! एका वराने भरताला राज्य आणि दुसऱ्या वराने रामाला वनवास द्या ! म्हणजे सर्व सवतीच्या उफाळणाऱ्या आनंदाला चांगलेच विरजण लागेल आणि तो सगळा आनंद तुम्ही लुटा. आणि एक गोष्ट पक्की लक्षात ठेव हं, महाराज रामाची शपथ घेतील तेव्हाच वर मागा म्हणजे वचन बदलणार नाहीत ! आजची रात्र जर का अशीच उजाडली की, सर्वच घात झाला म्हणून समजा. माझे हे सर्व सांगणे अगदी प्राणापेक्षा मोलाचे समजा. "



दो ०—बड़ कुघातु करि पातकिनि कहेसि कोपगृहँ जाहु ।
काजु सँवारेहु सजग सबु सहसा जनि पतिआहु ।। २२ ।।

चौ ०—कुबरिहि रानि प्रानप्रिय जानी । बार बार बड़ि बुद्धि बखानी ।।
तोहि सम हित न मोर संसारा । बहे जात कइ भइसि अधारा ।।
जौं बिधि पुरब मनोरथु काली । करौं तोहि चख पूतरि आली ।।
बहुबिधि चेरिहि आदरु देई । कोपभवन गवनी कैकेई ।।
बिपति बीजु बरषा रितु चेरी । भुइँ भइ कुमति कैकेई केरी ।।
पाइ कपट जलु अंकुर जामा । बर दोउ दल दुख फल परिनामा ।।
कोप समाजु साजि सबु सोई । राजु करत निज कुमति बिगोई ।।
राउर नगर कोलाहलु होई । यह कुचालि कछु जान न कोई ।।

दो ०—प्रमुदित पुर नर नारि सब सजहिं सुमंगलचार ।
एक प्रबिसहिं एक निर्गमहिं भीर भूप दरबार ।। २३ ।।

चौ ०—बाल सखा सुनि हियँ हरषाहीं । मिलि दस पाँच राम पहिं जाहीं ।।
प्रभु आदरहीं प्रेमु पहिचानी । पूँछहिं कुसल खेम मृदु बानी ।।

त्या पापिणीने याप्रमाणे मोठा घात केला व कैकेयीस कोपगृहात जावयास सांगितले. शेवटी बजावून बजावून म्हणते, "अगदी सावध राहून सर्व बेत साधला पाहिजे, सहजासहजी राजाच्या बोलण्यावर विश्वास मात्र ठेवू नका हं ! !" २२

कुबडी म्हणजे आता अगदी राणीला जीव की प्राण झाली ! तिच्या दूरदर्शीपणाची, चातुर्याची, तीक्ष्ण बुद्धीची तिने वारंवार तारीफ केली ! शेवटी राणीचे हृदय प्रेमाने व कृतज्ञतेने भरून आले व ती म्हणाली, "मंथरे ! तुझ्यासारखे माझे हित साधणारे या पृथ्वीच्या पाठीवर कोणी तरी आहे का ग ? मी दुःखसागरात बुडत असता तू नौका होऊन आलीस ! विधीने आपणाला या अंगीकृत कार्यात जर उद्या यश दिले, तर माझ्या जिवलग सखीला, मी अगदी आपल्या बुबुळातल्या बाहुलीप्रमाणे सांभाळीन बरं !"

इतके बोलून तिला कैकेयीने अगदी कवटाळले ! तिच्या पाठीवरून, तोंडावरून हात फिरवला. तिचे केवढे कोडकौतुक मोठ्या आदराने राणीने केले ! आणि तिच्या शब्दाला प्रमाण मानून ती कोपगृहात विश्वासाने शिरली.

याप्रमाणे अंतःकलहरूप बीज, कैकेयीच्या कुबुद्धीरूपी जमिनीत पडले; वर्षाऋतूप्रमाणे मंथरा येऊन तिच्या कपट-वाक्पटुत्वाचा त्यावर पाऊस पडला; व त्या कलह-बीजाला अंकुर फुटले. दोन 'वर' हीच त्याला दोन पाने फुटून, अंती भोगावी लागणारी अनेक दुःखे म्हणजेच या विपत्तिबीजाला आलेली फळे होत !

कोपगृहात शिरताना जी वस्त्रे नेसावयाची व जेवढे दरिद्री दागिने घालावयाचे त्यांच्याच उपयोग करून कैकेयी जमिनीवर पडली. स्वतःच्याच दुष्ट बुद्धीने विचारीला फसवून राज्योपभोग घेत असता खाली ओढले!

उद्या सकाळी होणाऱ्या राज्यारोहण समारंभापूर्वीची अनेक कामे संपवून तयारी करण्यासाठी सर्व नगरात व विशेषतः [illegible] कामांची एकच गर्दी उसळली होती. त्यामुळे ही अंतर्गत घडलेली कुचाळी कुणालाच कळली नाही !

मोठ्या आनंदाने उषःकाली सर्व नागरिक उठले. त्यांनी सर्वत्र सर्व प्रकारचे मंगल साज सजवले ! राजवाड्यात कोणी आत शिरतात, तर कोणी बाहेर येतात, जशी अगदी विलक्षण बारी लागली होती ! २३

रामाला यौवराज्याभिषेक होणार ही वार्ता कानी पडताच अत्यंत प्रमुदित झालेले रामाचे बालमित्र टोळी-टोळीने रामाला भेटावयास जात. त्याचे प्रेम पाहून प्रभू त्यांचे आदरातिथ्य करीत व त्यांना मधुरवाणीने क्षेमकुशल

फिरहिं भवन प्रिय आयसु पाई । करत परसपर राम बड़ाई ॥
को रघुबीर सरिस संसारा । सीलु सनेहु निबाहनिहारा ॥
जेहिं जेहिं जोनि करम बस भ्रमहीं । तहँ तहँ ईसु देउ यह हमहीं ॥
सेवक हम स्वामी सियनाहू । होउ नात यह ओर निबाहू ॥
अस अभिलाषु नगर सब काहू । कैकयसुता हृदयँ अति दाहू ॥
को न कुसंगति पाइ नसाई । रहइ न नीच मतें चतुराई ॥

दो ० –साँझ समय सानंद नृपु गयउ कैकई गेहँ ।
गवनु निठुरता निकट किय जनु धरि देह सनेहँ ॥ २४ ॥

चौ ० –कोपभवन सुनि सकुचेउ राऊ । भय बस अगहुड़ परइ न पाऊ ॥
सुरपति बसइ बाहँबल जाकें । नरपति सकल रहहिं रुख ताकें ॥
सो सुनि तिय रिस गयउ सुखाई । देखहु काम प्रताप बड़ाई ॥
सूल कुलिस असि अँगवनिहारे । ते रतिनाथ सुमन सर मारे ॥
सभय नरेसु प्रिया पहिं गयऊ । देखि दसा दुखु दारुन भयऊ ॥
भूमि सुयन पटु मोट पुराना । दिए डारि तन भूषन नाना ॥

विचारीत. परत प्रेमाचा निरोप घेऊन जात असता रामाचे सौजन्य ते एकमेकांना वाटेत अहंमहमिकेने सांगत. शेवटी सर्व एकाच पद्धतीने आपले भाषण संपवत !

"खरोखर या जगात, रघुवीरासारखा दुसरा कोण सुशील व प्रेमळ पाठीराखा सापडणार ? ज्या ज्या योनीत आम्ही स्वकर्माने जन्माला जाऊ तेथे श्रीशंकराने आमची एकच मागणी पूर्ण करावी व ती म्हणजे सीतापती हा आमचा स्वामी, आम्ही त्याच्या पायाचे दास ! बस्स ! हेच एवढे नाते शेवटपर्यंत नांदो !"

सर्व नागरिकांच्या हृदयात अशा प्रकारचीच उत्कट इच्छा सर्वत्र नियम म्हणून पाहावयास सापडत होती. अपवाद फक्त एकच आणि तो त्या कैकेयसुतेचा. तिच्या हृदयात मात्र यावेळी अगदी आगीचा भडका उडाला होता ! बरोबरच आहे, कुसंगतीमुळे कोणाच्या शीलाची नासाडी झाली नाही ? नीचाच्या नादी लागल्या नंतर अकलेचा अंशही उरणार नाही ! ज्यादिवशी सकाळी आरशात कानाजवळ पांढरे केस पाहिले, त्याच दिवशीच्या संध्याकाळच्या वेळी दशरथ राजे, आता कैकेयीच्या महालाकडे तिच्या प्राणप्रिय रामाच्या अभिषेकाची बातमी देण्यासाठी मोठ्या उत्साहाने निघाले. (सर्व दिवस घाईत गेला.) परंतु त्यावेळी मूर्तिमंत देहधारी स्नेहच साक्षात् निष्ठुरतेकडे निघाला असे वाटले ! ! २४

लाडक्या राणीची चौकशी करता, ती क्रोधागारात जाऊन पडली आहे, हे ऐकताच राजाचा चेहरा एकदम सुकला. त्याचा पायच पुढे पडेना !

खरोखर ज्याच्या बाहुबलाच्या आधारावर देवेंद्र विश्वासून राहातो, अनेक राजे ज्याच्या नुसते नजरेकडे पाहून आपले धोरण ठरवतात, तो दशरथराजा, राणी रुसली हे ऐकताच पाढरा फटफटीत झाला ! "ध्या प्रताप कामाचा बघुनी ! ! " :– शूल, तलवार, प्रत्यक्ष वज्रही छातीवर पुरुष झेलू शकेल, पण तोच मर्द मदनाच्या कोमल पुष्पबाणाने घायाळ होतो ! !

भीतभीतच अगदी हळुवार पावलांनी, दशरथराजे आपल्या प्रियेपाशी आले; तिची ती विलक्षण दशा पाहून त्यांना अत्यंत दारुण दुःख झाले.

अंगावरची ती जाडीभरडी पुराणी वस्त्रे नेसलेली व जमिनीवर लोळत पडलेले तिचे अव्यवस्थित शरीर,

कुमतिहि कसि कुबेषता फाबी । अनअहिवातु सूच जनु भाबी ॥
जाइ निकट नृपु कह मृदु बानी । प्रानप्रिया केहि हेतु रिसानी ॥

छं० – केहि हेतु रानि रिसानि परसत पानि पतिहि नेवारई ।
मानहुँ सरोष भुअंग भामिनि बिषम भाँति निहारई ॥
दोउ बासना रसना दसन बर मरम ठाहरु देखई ।
तुलसी नृपति भवतब्यता बस काम कौतुक लेखई ॥

सो० – बार बार कह राउ सुमुखि सुलोचनि पिकबचनि ।
कारन मोहि सुनाउ गजगामिनि निज कोप कर ॥ २५ ॥

चौ० – अनहित तोर प्रिया केइँ कीन्हा । केहि दुइ सिर केहि जमु चह लीन्हा ॥
कहु केहि रंकहि करौं नरेसू । कहु केही नृपहि निकासौं देसू ॥
सकहुँ तोर अरि अमरउ मारी । काह कीट बपुरे नर नारी ॥
जानसि मोर सुभाउ बरोरू । मनु तव आनन चंद चकोरू ॥
प्रिया प्रान सुत सरबसु मोरें । परिजन प्रजा सकल बस तोरें ॥

नानाप्रकारची भूषणे चारी दिशांना भिरकावून दिलेली, असला हा अनिष्ट प्रकार पाहून तिच्या नशिबी येणाऱ्यां वैधव्याची पूर्व चिन्हे म्हणूनच, तिच्या भ्रष्ट बुद्धीला तो कुवेष आवडला, असेच कोणासही वाटेल !

अगदी जवळ जाऊन, कोमलवाणीने राजाने विचारले, “ माझ्या प्राणप्रिये ! राणी, कशाकरता रुसलीस ? ”

‘ राणी, का रुसलीस ? ’ असे म्हणून राजाने तिच्या शरीराला स्पर्श करताच, तो हात तिने रागाने झिडकारून टाकला ! आणि राजाकडे अशी दृष्टी टाकली की, जणू काही संतापलेली नागीणच आपल्या विषारी नजरेने निरखीत आहे ! दोन वर मागण्याची इच्छा म्हणजेच तिची ती द्विधा झालेली जीभ, आणि ते दोन वर हेच तिचे भयंकर विषारी दात, त्यांच्या साहाय्याने राजाला दंश करण्यासाठी ती जणू मर्मस्थान शोधत आहे !

भवितव्यतेला वश होऊन, राजाने अशा राणीच्या आहारी जाणे व तिने त्याचा हात झिडकारून टाकून क्रुद्ध भुजंगिनीप्रमाणे त्याला रोखणे, ही खरोखर कामदेवाची एक कौतुकास्पद क्रीडाच आहे असे राजाला वाटत आहे ! !

“ हे (सुंदर मुख) सुमुख, हे सुलोचनी (सुंदर डोळे,) हे पिकवचनी, (कोकळेप्रमाणे गोड गळा), किती रागावलीस ही !! कशासाठी ? हे गजवरगामिनी (गजश्रेष्ठाप्रमाणे चाल), काय कारण झाले ते सांगना ? ” दीन झालेल्या त्या नृपतीने याप्रमाणे पुनः पुन्हा केविलवाण्या वाणीने तिची मनधरणी चालवली. तो पुढे म्हणतो, “ प्रिये ! कोणत्या दोन डोळ्याच्या पामराने तुला दुःख दिले ? तुझे अनहित करणारा असा कोण की, ज्याच्या गळ्याला यमपाश लागलाच ! तुला प्रिय असा दरिद्री रंक कोण की, ज्याला ताबडतोब राज्यपद देऊ ? तुझ्या अवकृपेला पात्र झालेला कोण भूपाल, की ज्याला एकदम हद्दपारीची शिक्षा ठोठावू ? तुला ठाऊकच आहे, प्रत्यक्ष अमर (देव) सुद्धा तुझा शत्रू ठरताच मी त्याला ठार करीन !

“मग पामर अशा मानवाची–एखाद्या किड्याप्रमाणे–किंमत काय ? हे सुंदरी ! तुला माझा स्वभाव माहीत आहे ना ? माझे मन म्हणजे तुझ्या मुखचंद्रावरच सर्वस्वी आपले प्राण अवलंबून ठेवणारा चकोर ! प्रिये ! माझे केवळ प्राणच असणारे असे माझे सगळे मुलगे, माझे म्हणून जे आहे ते सर्व, सर्व परिजनासह माझी प्रजा ही सर्व तुझ्याच स्वाधीन आहेत ना ? ” राजा संपूर्णपणे भावनेने भरून आला.

जौं कछु कहौं कपट करि तोही । भामिनि राम सपथ सत मोही ॥
बिहसि मागु मनभावति बाता । भूषन सजहि मनोहर गाता ॥
घरी कुघरी समुझि जियँ देखू । बेगि प्रिया परिहरहि कुबेषू ॥

दो० – यह सुनि मन गुनि सपथ बडि बिहसि उठी मतिमंद ॥
भूषन सजति बिलोकि मृगु मनहुँ किरातिनि फंद ॥ २६ ॥

चौ० – पुनि कह राउ सुहृद जियँ जानी । प्रेम पुलकि मृदु मंजुल बानी ॥
भामिनि भयउ तोर मनभावा । घर घर नगर अनंद बधावा ॥
रामहि देउँ कालि जुबराजू । सजहि सुलोचनि मंगल साजू ॥
दलकि उठेउ सुनि हृदउ कठोरू । जनु छुइ गयउ पाक बरतोरू ॥
ऐसिउ पीर बिहसि तेहिं गोई । चोर नारि जिमि प्रगटि न रोई ॥
लखहिं न भूप कपट चतुराई । कोटि कुटिल मनि गुरू पढाई ॥
जद्यपि नीति निपुन नरनाहू । नारिचरित जलनिधि अवगाहू ॥
कपट सनेहु बढ़ाइ बहोरी । बोली बिहसि नयन मुहु मोरी ॥

" खरोखर हे भामिनी अंतःकरणात कपट ठेवून एक अक्षरसुद्धा—शेकडो वेळा माझ्या रामाची शपथ घेऊन सांगतो—एक अक्षर सुद्धा मी तुला कपटाने सांगत नाही !"

आता आपण अगदी अखेरची गोष्ट केली आता राणी खास खूष होणार या आशेने दशरथ राजे पुढे बोलू लागले, " हं आता हास बघू ! काय तुला वाटेल ते मागून घे ! त्या तुझ्या मनोहर अवयवावर ते सुंदर दागिने एकदा घाल पाहू ! लाडके ! रुसायला काही वेळ-अवेळ तरी पाहायची की नाही ? हं आटप आटप. लवकर तो घाणेरडा वेष अगोदर दे टाकून बरं ! "

राजाचे हे सर्व कळकळीचे भाषण कैकेयीने ऐकून घेतले. रामाची शपथ एकदा नव्हे शेकडो वेळा घेतलेली पाहिली व मोठ्याने हसत ती कुमती कैकेय-सुता उठली. अंगावर दागिने घालू लागली. त्यावेळी असे दिसले की ही कोणी भिल्लीण हरिणाला पाहून आपला फासच सज्ज करीत आहे. २६

अंगावर दागदागिने घालून हंसतमुख उभी राहिलेली कैकेयी पाहून राजाचे अंतःकरण प्रेमाने उचंबळून आले. त्याचे सर्व शरीर पुलकित झाले. कैकेयी आपली प्राणप्रिया सखी सुहृद आता पूर्ववत् बनली अशी स्वतःची समजूत झाल्यामुळे दशरथ महाराज अत्यंत कोमल व वाणीने राणीला सांगू लागले.

" भामिनी ! अगदी तुझ्या मनाप्रमाणेच घडून येत आहे. सगळ्या नगरात घरोघर केवढा उत्सव चालला आहे ! उद्याच आपण आपल्या प्राणप्रिय रामाला युवराजा करूया ! हे सुलोचनी ! मग सर्व मंगलसाज लवकर तयार कर पाहू ! "

हे राजाचे अत्यंत अप्रिय भाषण ऐकून कैकेयीचे वज्र कठोर काळीजही भंगू लागले आणि पिकलेल्या केस्तुडाला धक्का लागून वेदना व्हाव्यात तशा तिच्या हृदयाला यातना झाल्या !

इतकी भयंकर तिडिकसुद्धा तिने सफाईने लपवली ! चोरी करत असता सापडल्यामुळे चोप मिळालेली बाई जशी रडण्याचा आवाजसुद्धा काढत नाही, तसे तिने आपले सर्व दुःख मोठ्याने हसून लपवले. कोट्यवधी कौटिल्याच्या मुकुटमणीने कुब्जीने–तिला गुरुपदेश देऊन पक्की तयार केली होती. असल्या कैकेयीचे कपटचातुर्य राजाच्या ध्यानी येणेच शक्य नव्हते ! कोणी म्हणेल, ' अहो ! दशरथराजे राजनीतिशास्त्रांत अत्यंत तल्लख बुद्धीचे होते ! ' पण अशांनाही स्त्रीचरित्ररूपी सागर हा अगाधच राहणार ! !

आपली खरी मनःस्थिती राजाच्या ध्यानी मुळीच आलेली नाही, अशी पूर्ण खात्री होताच तिने स्त्रीसंमोहास्त्र राजावर टाकण्यास पुनः प्रारंभ केला. नाटकी प्रेमाचा आवेग आणून, हसत हसत, नेत्र-मुख कटाक्ष फेकीत, तिने एकदाचे तोंड उघडले.

दो ० — मागु मागु पै कहहु पिय कबहुँ न देहु न लेहु ।
देन कहेहु बरदान दुर तेउ पावत संदेहु ।। २७ ।।

चौ ० — जानेउँ मरमु राउ हँसि कहई । तुम्हहि कोहाब परम प्रिय अहई ।।
थाती राखि न मागिहु काऊ । बिसरि गयउ मोहि भोर सुभाऊ ।।
झूठेहुँ हमहि दोषु जनि देहू । दुइ कै चारि मागि मकु लेहू ।।
रघुकुल रीति सदा चलि आई । प्रान जाहुँ बरु बचनु न जाई ।।
नहिं असत्य सम पातक पुंजा । गिरि सम होहिं कि कोटिक गुंजा ।।
सत्यमूल सब सुकृत सुहाए । बेद पुरान बिदित मनु गाए ।।
तेहिं पर राम सपथ करि आई । सुकृत सनेह अवधि रघुराई ।।
बात दृढ़ाइ कुमति हँसि बोली । कुमत कुबिहग कुलह जनु खोली ।।

दो ० — भूप मनोरथ सुभग बनु सुख सुबिहंग समाजु ।
भिल्लिनि जिमि छाड़न चहति बचनु भयंकरु बाजु ।। २८ ।।

मास पारायण, तेरहवाँ विश्राम

" प्रियकरा ! माग, माग असे मला म्हणता; आजपर्यंत काय दिले-घेतले हो ? एक दोन वर दिले, ते तरी मिळणार किंवा कसे कुणास ठाऊक ! " २७

सगळे कोडे सुटले एकदाचे, या आनंदातिरेकाने राजानी स्मितपूर्वक उत्तर दिले, " कळले, कळले, सगळे रहस्य कळले बरं ! अग, यासाठी का इतके आणि अशा प्रकारे, अशावेळी रुसायचे ? पण तुला रुसण्याचेच भारी वेड बघ ! ! ठेवलेली ठेव तू आम्हाला मागितलीस कधी ? मी विसरभोळ्या स्वभावाचा, गेलो विसरून ! बरं, जाऊ दे ते आता सारं, उगीच आम्हाला खोटे दोष मात्र देत बसू नकोस. नुकसान भरपाई-दाखल दाम दुप्पट करून, दोन्हीच्या ऐवजी चार वर मागून घे म्हणजे होईल का नाही पूर्ण समाधान ! "

" रघुकुलवंशीय राजांचा हा अखंड दंडक चालू आहे. त्यांचा प्रसंगी प्राण जाईल, पण दिलेले वचन भंग पावणार नाही ! ! एका असत्यासारखा पापांचा भयंकर ढीग (पुंज) तो होऊच शकत नाही. कोट्यवधी वर्षी गुंजा एकत्र करून त्यांच्या राशीचा पर्वत कधी तरी होईल काय ? (त्या पसरत राहातात. त्याप्रमाणे असत्याशी संबद्ध पापांचा भयंकर प्रसार होतो.) याच्या उलट, सत्यावर आधारलेलीच सर्व सत्कृत्ये शोभा पावतात, अशी वर्णने वेद-पुराणांत असून मनूनेही तीच गोष्ट सांगितलेली आहे ! इतके असूनही, प्रेम व पुण्य यांची परिसीमा असणारा रघुराणा राम, त्याची अनेक वेळा शपथ घेतलेली आहे ! "

पवित्र गंगेच्या ओघाप्रमाणे दशरथ राजांचे हे हर्षयुक्त भाषण कैकेयीने ऐकल्यावर, राजाचे वचन आता पक्के झाले, अशी खात्री होऊन, तिची दुष्ट बुद्धी हीच कोणी एक बहिरी ससाण्याच्या डोळ्यावरील आच्छादनच जणू तिने काढले. (त्याला सोडण्यासाठी).

राजाचे मनोरथ हाच कोणी एक अत्यंत रमणीय वनप्रदेश, त्या वनात उत्तम प्रकारच्या सुंदर सुख-स्वरूप पक्ष्यांचे मोठेमोठे समूह ! पण कैकेयीरूपी भिल्लीण, आपल्या भयंकर भाषणरूपी बहिरी ससाण्याला त्या पक्ष्यांवर सोडू पाहात आहे ! त्यासाठी आपले दुष्ट मनरूपी त्या दुष्ट पक्ष्याची टोपीच तिने जणू काढली. (हास्याच्या स्वरूपात.) आणि दुष्ट वचनरूपी बहिरी ससाणा आता ती सोडणार !' २८

चौ ० –सुनहु प्रानप्रिय भावत जी का । देहु एक बर भरतहि टीका ।।
मागउँ दूसर बर कर जोरी । पुरवहु नाथ मनोरथ मोरी ।।
तापस बेष बिसेषि उदासी । चौदह बरिस रामु बनबासी ।।
सुनि मृदु बचन भूप हियँ सोकू । ससि कर छुअत बिकल जिमि कोकू ।।
गयउ सहमि नहिं कछु कहि आवा । जनु सचान बन झपटेउ लावा ।।
बिबरन भयउ निपट नरपालू । दामिनि हनेउ मनहुँ तरु तालू ।।
माथें हाथ मूदि दोउ लोचन । तनु धरि सोचु लाग जनु सोचन ।।
मोर मनोरथु सुरतरु फूला । फरत करिनि जिमि हतेउ समूला ।।
अवध उजारि कीन्हि कैकेईं । दीन्हिसि अचल बिपति कै नेईं ।।

दो ० –कवनें अवसर का भयउ गयउँ नारि बिस्वास ।
जोग सिद्धि फल समय जिमि जतिहि अबिद्या नास ।। २९ ।।

चौ० –एहि बिधि राउ मनहिं मन झाँका । देखि कुभाँति कुमति मन माखा ।।
भरतु कि राउर पूत न होंही । आनेहु मोल बेसाहि कि मोही ।।
जो सुनि सरु अस लाग तुम्हारें । काहे न बोलहु बचनु सँभारे ।।
देहु उतरु अनु करहु कि नाहीं । सत्यसंध तुम्ह रघुकुल माहीं ।।
देन कहेहु अब जनि बरु देहू । तजहु सत्य जग अपजसु लेहू ।।
सत्य सराहि कहेहु बरु देना । जानेहु लेइहि मागि चबेना ।।

आता आपले मनोरथ पूर्ण होण्यास पूर्ण अनुकूल संधी आहे. हे पाहून कैकेयीने स्त्रियांचे हावभावाचे कौशल्यरूपी भांडवल संपूर्ण खर्ची टाकून ती म्हणाले, “ प्राणनाथ ! माझ्या मनाला आवडेल ते मागते, एका-वराने माझ्या भरताला राज्य द्यावे. नाथ ! हात जोडून मी आता दुसरा वर मागते. माझा एवढा मनोरथ पूर्ण करावा हं ! तपस्व्याच्या वेषात विरक्त मुनिप्रमाणे चौदा वर्षे रामाने वनवास स्वीकारावा ! ! ”

हे कोमल शब्द कानावर पडताच, शशिकिरण लावून चक्रवाक् जसा शोकविव्हळ व्हावा, तशी भूपतीची दुःस्थिती झाली ! लावी पक्ष्याला श्येनाने झडपल्याप्रमाणे राजा घाबरून गेला व त्याच्या तोंडून शब्दच उमटेना ! तालवृक्षावर वीज पडावी, तसा राजा एकदम काळा ठिक्कर पडला ! त्याने डोळे मिटले, डोके दोन्ही हातांनी दाबून धरले आणि त्याच्या स्वरूपात मूर्तिमंत शोकच शोक करू लागला हो !

अनेक विचारांनी त्याचे डोके भणभणून गेले. “ माझ्या मनोरथांचा किती छान फुललेला कल्पतरू अगदी फळे येण्याच्या वेळी या हत्तिणीने पार मुळासकट उपटून टाकला ! कैकेयीने सर्व अयोध्यानगरी उद्ध्वस्त केली. विपत्तिरूपी मेढ अगदी न हालेल इतकी खोल घट्ट रोवली ! कोणत्या वेळेला भयंकर घटना घडली ही ! योगाच्या सिद्धीचे फल प्राप्त होण्याच्या ऐन वेळी, ज्याप्रमाणे योग्याचा नाश अविद्या करते, तसा मी, या स्त्रीच्या मोहात सापडून, खलास झालो ! ! ” २९

याप्रमाणे आपल्या स्वतःच्याच मनात, हैराण करून सोडणाऱ्या विचारांच्या काहुराने राजा विषण्ण होऊन बसला असता, त्याची ती दशा पाहून दुष्ट बुद्धीची कैकेयी चवताळली,–

“ भरत आपला पुत्र नव्हे, की मला कोठून विकत आणली ? माझे भाषण अगदी बाणासारखे हृदयात घुसलेले दिसते, तर मग अगोदरच विचार करून बोलायला काय झाले होते ? तुम्ही सत्यसंध रघुवंशी नाही का ? मग ते लक्षात ठेवून मी मागितलेल्या वरांना होय की नाही ते अगोदर उत्तर द्या. वर देण्याची कबुली आपणच दिली आणि आता प्रत्यक्ष देण्याची वेळ आल्यावर आता देत नाही ? ठीक आहे. नका देऊ ! सत्याचा त्याग केल्याने जगात अपकीर्ती होईल ती घ्या पदरात ! सत्याची मोठी स्तुती केली व वर माग म्हणून सांगितले, तेव्हा काय, ही एका वराने चणे आणि दुसऱ्या वराने फुटाणे मागील असे

सिबि दधीचि बलि जो कछु भाषा । तनु धनु तजेउ बचन पनु राखा ॥
अति कटु बचन कहति कैकेई । मानहुँ लोन जरें पर देई ॥

दो० – धरम धुरंधर धीर धरि नयन उघारे रायँ ।
सिरु धुनि लीन्हि उसास असि मारेसि मोहि कुठायँ ॥ ३० ॥

चौ० – आगें दीखि जरत रिस भारी । मनहुँ रोष तरवारि उघारी ॥
मूठि कुबुद्धि धार निठुराई । धरी कूबरीं सान बनाई ॥
लखी महीप कराल कठोरा । सत्य कि जीवनु लेइहि मोरा ॥
बोले राउ कठिन करि छाती । बानी सबिनय तासु सोहाती ॥
प्रिया बचन कस कहसि कुभाँती । भीर प्रतीति प्रीति करि हाँती ॥
मोरें भरतु रामु दुइ आँखी । सत्य कहउँ करि संकरु साखी ॥
अवसि दूतु मैं पठइब प्राता । ऐहहिं बेगि सुनत दोउ भ्राता ॥
सुदिन सोधि सबु साजु सजाई । देउँ भरत कहुँ राजु बजाई ॥

दो० – लोभु न रामहि राजु कर बहुत भरत पर प्रीति ।
मैं बड़ छोट बिचारि जियँ करत रहेउँ नृपनीति ॥ ३१ ॥

वाटले होय ? आजपर्यंत शिबी, दधिची, बळीसारखे श्रेष्ठ पुरुष होऊन गेले. त्यांनी आपल्या शरीरांवर, धनसंपत्तीवर तिलांजली देऊन एक वेळ मुखातून गेलेली भाषा प्राणपणाने पाळली !"

अशा प्रकारे, जखमेत मीठ भरावे, तसे अत्यंत कर्णकटू शब्द, [illegible] लाव्हारसाप्रमाणे कैकेयीच्या मुखातून बाहेर पडू लागले !

धर्माची धुरा धारण करणाऱ्या दशरथांनी प्रयत्नपूर्वक धीर धरून डोळे उघडले व आपले मस्तक बडवून घेत, एक दीर्घ निःश्वास घेतला व मनात म्हटले की, "ही तलवार माझ्या मर्मावर घाव घालत आहे." ३०

क्रोधरूपी तलवार जणू काही म्यानातून बाहेर उपसल्याप्रमाणेच संतापाने भडकलेली कैकेयी, राजाने डोळे उघडताच त्यांना पुढे उभी राहिलेली दिसली. त्या तलवारीची मूठ दुष्टबुद्धी आणि हृदयाची कठोरता हीच तिची धार ! तिला कुबडीच्या सहाणेवर परजलेली !! राजाने त्या भयंकर तलवारीकडे (तप्त कैकेयीकडे) पाहिले व ती कठोर व विक्राळ दिसल्याने त्याला वाटले, 'खरंच, ही माझा प्राण घेणार की काय ?'

आपल्या विदीर्ण हृदयाचे तुकडे जणू कांही पुनः जमा करून, येईल तेवढे त्यात अवसान आणून ते कठीण केले व कैकेयीच्या मनाला गोड वाटेल अशा कोमल वाणीने राजा पुनः फिरून प्रयत्न करू लागला, "प्रिये ! असं कसं भलत्याच रीतीनं बोलतेस ? हे भीरू ! तुझ्या अंतःकरणातील सर्वच रामप्रेम एकदम कसे आटले ? त्याचा अनेक वर्षांचा तुझा स्नेहाचा अनुभव एकदम कसा खलास झाला ? श्री शंकरच साक्षी आहेत, अगदी खरं खरं तुला सांगतो, भरत आणि राम हे दोन्हीही माझे सारखेच दोन डोळे आहेत. अगदी उद्याच निश्चितपणे भरताला आणि शत्रुघ्नाला [illegible] दूतांना पाठवतो. दूत जाताच दोन्ही भाऊ आज्ञा ऐकून जलद येतील. चांगला मुहूर्तकाढून उत्तम मंगल साज सिद्ध करू आणि मोठ्या थाटाने भरताला यौवराज्याचा अभिषेक करू ! मगतर होईलना तुझ्या मनासारखे ?

माझ्या रामाला राज्याचा मुळीसुद्धा लोभ नाही उलट भरतावरच त्याची परम प्रीती आहे. फक्त ज्येष्ठ कनिष्ठ एवढाच विचार करून मीच राज्यनीतीचे अवलंबन केले ! ३१

चौ० – राम सपथ सत कहउँ सुभाऊ । राममातु कछु कहेउ न काऊ ॥
मैं सबु कीन्ह तोहि बिनु पूँछें । तेहि तें परेउ मनोरथु छूछें ॥
रिस परिहरु अब मंगल साजू । कछु दिन गएँ भरत जुबराजू ॥
एकहि बात मोहि दुखु लागा । बर दूसर असमंजस मागा ॥
अजहूँ हृदय जरत तेहि आँचा । रिस परिहास कि साँचेहुँ साँचा ॥
कहु तजि रोषु राम अपराधू । सबु कोउ कहइ रामु सुठि साधू ॥
तुहूँ सराहसि करसि सनेहू । अब सुनि मोहि भयउ संदेहू ॥
जासु सुभाउ अरिहि अनुकूला । सो किमि करिहि मातु प्रतिकूला ॥

दो० – प्रिया हास रिस परिहरहि मागु बिचारि बिबेकु ।
जेहिं देखौं अब नयन भरि भरत राज अभिषेकु ॥ ३२ ॥

चौ० – जिऐ मीन बरु बारि बिहिना । मनि बिनु फनिकु जिऐ दुख दीना ॥
कहउँ सुभाउ न छलु मन माहीं । जीवनु मोर राम बिनु नाहीं ॥
समुझि देखु जियँ प्रिया प्रबीना । जीवनु राम दरस आधीना ॥
सुनि मृदु बचन कुमति अति जरई । मनहुँ अनल आहुति घृत परई ॥
कहइ करहु किन कोटि उपाया । इहाँ न लागिहि राउरि माया ॥

रामाची शंभर वेळां शपथ घेऊन अंतःकरणापासून सांगतो की या रामाच्या अभिषेकाच्या बाबतीत राममातेने एक अक्षराक्षरसुद्धा उच्चारलेले नाही !

तुझ्याशी विचारविनिमय न करता मी हे सर्व केले आणि त्याचे प्रायश्चित्त म्हणून माझे सर्व मनोरथ धुळीस मिळाले !

आता तरी राग सोड ! उत्सवाची तयारी कर. थोड्याच दिवसात तुझा भरत युवराज झालेला तुझ्या डोळ्यास पाहावयास मिळेल !

एकाच गोष्टीने मला दुःखाच्या परम खाईत लोटले आहेस. तू दुसरा जो वर मागितलास त्याने मी संकटात पडलो आहे. त्या तुझ्या मागण्याने उत्पन्न केलेली आग अजून माझ्या हृदयाचा दाह करीत आहे म्हणून तुला पुनः विचारतो की हा तुझा राग थट्टेचा आहे का खरोखरचाच आहे ? सांग बरं एकदा.

राग सोडून मला सांग तरी रामाने असा कोणता अपराध केला ? सर्वांच्याच तोंडी त्याच्या श्रेष्ठ शीलाचे गुणगान ऐकू येते. तूसुद्धा आजपर्यंत त्याची पोटभर स्तुती करत होतीस व त्याच्यावर विशेष प्रेम करीत होतीस आणि त्यामुळेच तुझ्या या आजच्या भाषणाने मनात संशय उत्पन्न होतो. कारण ज्याचा स्वभाव शत्रूलासुद्धा अनुकूल वाटतो, तो आपल्या प्रत्यक्ष आईशी प्रतिकूल वर्तन करणे कसे शक्य ?

" म्हणून हे प्रिये ! राग सोडून एकदा हास पाहू ! थोडा विवेक करून दुसरा वर माग आणि अशी थोडी शहाणपणाने वागलीस तरच आता भरताचा राज्याभिषेक डोळे भरून मी पाहीन ! ३२

मासे पाण्यातून बाहेर काढले तर (कदाचित्) जगतील, मणिहीन झालेले नाग दीन होऊन दिवस कंठू शकतील ! परंतु अगदी कपट मनात न ठेवता अंतःकरणापासून तुला सांगतो रामाच्या वियोगाने माझे प्राण राहणार नाहीत. प्रिये ! तू शहाणी आहेस, विचार करून पाहा म्हणजे तुझ्या ध्यानी येईल की माझे जीवन रामदर्शनावरच अवलंबून आहे ! "

या दशरथ महाराजांच्या स्नेहार्द्र वचनांनी अग्नीत तूप घातल्याप्रमाणे ती कुबद्धीची कैकेयी अपेक्षेबाहेरच भडकली ! ती म्हणते,

" हे पाहा, कोट्यवधी उपाय करा ना का ! माझ्याजवळ तुमची लटपट आता बिलकुल चालणार नाही !



देहु कि लेहु अजसु करि नाहीं । मोहि न बहुत प्रपंच सोहाहीं ॥
रामु साधु तुम्ह साधु सयाने । राममातु भलि सब पहिचाने ॥
सब कौसिलाँ मोर भल ताका । तस फलु उन्हहि देउँ करि साका ॥

दो० — होत प्रातु मुनिबेष धरि जौं न रामु बन जाहिं ।
मोर मरनु राउर अजस नृप समुझिअ मन माहिं ॥ ३३ ॥

चौ० — अस कहि कुटिल भई उठि ठाढ़ी । मानहुँ रोष तरंगिनि बाढ़ी ॥
पाप पहार प्रगट भइ सोई । भरी क्रोध जल जाइ न जोई ॥
दोउ बर कूल कठिन हठ धारा । भवँर कूबरी बचन प्रचारा ॥
ढाहत भूपरूप तरु मूला । चली बिपति बारिधि अनुकूला ॥
लखी नरेस बात फुरि साँची । तिय मिस मीचु सीस पर नाची ॥
गहि पद बिनय कीन्ह बैठारी । जनि दिनकर कुल होसि कुठारी ॥
मागु माथ अबहीं देउँ तोही । राम बिरहँ जनि मारसि मोही ॥
राखु राम कहुँ जेहि तेहि भाँती । नाहिं त जरिहि जनम भरि छाती ॥

दो० — देखी ब्याधि असाध नृपु परेउ धरनि धुनि माथ ।
कहत परम आरत बचन राम राम रघुनाथ ॥ ३४ ॥

एक वचनाप्रमाणे मागितलेले वर द्या तरी किंवा नाही म्हणून आपल्या कुलाला अपयशाने कलंकित करा तरी ! मला फुकट काथ्याकूट मुळीच आवडत नाही. तुमचा राम साधू, तुम्हीही फार शहाणे आणि साधू ! रामजननीही फार साध्वी आहे, मी तुम्हा सगळ्यांना चांगली ओळखून आहे. कौसल्येने माझ्या भल्याची जशी तयारी केली, तस्सं तिला अगदी झणझणीत फळ दिल्याशिवाय आता मी राहणार होय? एकदाच सांगते ऐका, उद्या सूर्योदयाबरोबर, राम मुनिवेषात जर वनात गेले नाहीत, तर माझे मरण व तुमची अपकीर्ती होणार, याची पक्की गाठ राजेसाहेब ! आपल्या मनात बांधून ठेवा !! " ३३

असे बोलून ती कुटिल कैकेयी ताडकन् उठून उभी राहिली. जणू काही क्रोधनदीला महापूरच आला. पापपर्वतावर हिचा उगम झाला. क्रोधजळाने ही इतकी अथांग भरून चालली की तिच्याकडे पाहण्याची सोयच नाही. दोन वर हेच या नदीचे दोन काठ. तिने दाखवलेला हट्टीपणा हीच त्या पाण्याची अत्यंत वेगाची धार. कुबडीने कुटिल कारस्थान करून कैकेयीला जी चिथावणी दिली तोच या नदीतील भोवरा. आता नृपतीचे शरीररूप-वृक्ष ही नदी मुळासुद्धा उन्मळून टाकून ती अनुकूल वाटत असलेल्या पण परिणामी भयंकर अशा विपत्तिसागराला मिळण्यासाठी सपाट्याने धावत आहे !

आता मात्र राजाला हे पक्के कळून चुकले की कैकेयी विनोद करीत नसून सर्व खरेच आहे. नारीवेषात हा प्रत्यक्ष मृत्यूच आपल्या मस्तकावर नाचत उभा राहिला आहे ! दशरथ महाराजांची स्थिती कमालीची केविलवाणी झाली. त्यांनी हात धरून तिला खाली बसवली. तिचे अक्षरशः पाय धरले आणि प्रार्थना केली, " हे प्राण प्रिये नको ग या सूर्यवंशाची भयंकर कुऱ्हाड बनू ! आताच पाहिजे तर माग, माझे मस्तक तोडून तुझ्या चरणावर वाहतो, त्याचे मला दुःख नाही, पण रामाच्या वियोगाने तडफडत मारू नकोस ! माझ्या रामाला तेवढा माझ्याजवळ राख आणि मग वाटेल ते करायला तुला अगदी पूर्ण मुभा आहे. पण जर का एवढे केले नाही तर तुला जन्मभर हृदयातील आगीने होरपळत राहावे लागेल !! "

व्याधी सर्वस्वी असाध्य आहे, असे पाहून राजा जमिनीवर गडबडा लोळू लागला. मस्तकावर हाताने बडवून घेण्यास त्याने सुरुवात केली. त्याच्या तोंडावाटे अत्यंत आर्त असा एकच स्वर बाहेर पडू लागला, " राम ! राम !! रघुनाथ !!! " ३४

चौ० — ब्याकुल राउ सिथिल सब गाता । करिनि कलपतरु मनहुँ निपाता ॥
कंठु सूख मुख आव न बानी । जनु पाठीनु दीन बिनु पानी ॥
पुनि कह कटु कठोर कैकेई । मनहुँ घाय महुँ माहुर देई ॥
जौं अंतहुँ अस करतबु रहेऊ । मागु मागु तुम्ह केहिं बल कहेऊ ॥
दुइ कि होइ एक समय भुआला । हँसब ठठाइ फुलाउब गाला ॥
दानि कहाउब अरु कृपनाई । होइ कि खेम कुसल रौताई ॥
छाड़हु बचनु कि धीरजु धरहू । जनि अबला जिमि करुना करहु ॥
तनु तिय तनय धामु धनु धरनी । सत्यसंध कहुँ तृन सम बरनी ॥

दो० — मरम बचन सुनि राउ कह कहु कछु दोषु न तोर ॥
लागेउ तोहि पिसाच जिमि कालु कहावत मोर ॥ ३५ ॥

चौ० — चहत न भरत भूपतहि भोरें । बिधि बस कुमति बसी जिय तोरें ॥
सो सबु मोर पाप परिनामू । भयउ कुठाहार जेहिं बिधि बामू ॥
सुबस बसिहि फिरि अवध सुहाई । सब गुन धाम राम प्रभुताई ॥
करिहहिं भाइ सकल सेवकाई । होइहि तिहुँ पुर राम बड़ाई ॥
तोर कलंकु मोर पछिताऊ । मुएहुँ न मिटिहि न जाइहि काऊ ॥
अब तोहि नीक लाग करु सोई । लोचन ओट बैठु मुहु गोई ॥

सर्व शरीर शिथिल होऊन राजा अगदी कासावीस झाला. मत्त हत्तिणीने कल्पतरूलाच जणू काही छिन्नविछिन्न करून टाकला ! राजाच्या घशाला कोरड पडली. मुखातून शब्द काढणे अशक्य झाले. पाण्यावाचून दीन झालेला जसा काही पाठीण जातीचा मासाच धापा टाकीत आहे !

पाषाणहृदयाच्या पापिणीने —कैकयीने—अशाही वेळी केलेल्या-जखमेत-विष घालावे तसे भयंकर जहरी शब्द उच्चारले, " असं जर तुम्हाला करायचं होतं तर कोणाच्या जोरावर तोंड पसरून ' माग माग असे म्हणाला? भूपाला ! दोन विरुद्ध गोष्टी एकाच वेळी घडू शकतात काय? इकडे रागाने गालही फुगवायचे, आणि त्याच वेळी खदखद हसायचे? इकडे मोठे बलीचे अवतार म्हणून दातृत्व गाजवायचे, आणि कवडी चुंबकपणा सोडायचा नाही; रणवीर म्हणून बहादुरी मिळवण्याची इच्छा करायची पण शरीराला कुठे धक्का मात्र लागता उपयोगी नाही ! अशी सावधगिरी ठेवायची, हे एकदम कसे करणार ! एक वचन तरी मोडा, नाहीतर धीर धरा. बायकासारखे मुळूमुळू रडत काय बसता? शरीर, बायको, पुत्र, धरणी, घर, संपती ही सर्व, जो सत्यप्रतिज्ञ असतो त्याला कस्पटाप्रमाणे वाटतात असे सज्जन म्हणतात ! "

अशा प्रकारच्या दुःसह वाक्प्रहारांची कैकेयीकडून जेव्हा फैर झडू लागली, तेव्हा दशरथमहाराज म्हणाले, " बोल, बोल ! तुझा यात काहीच दोष नाही. माझ्या मृत्यूनेच पिशाच्याप्रमाणे तुला झपाटले आहे व तोच तुझ्या तोंडातून असले हालाहल ओकायला लावत आहे ! "

" भरताला राजा होण्याची स्वप्नातही इच्छा नाही. दुर्दैवाने तुझ्या सुमतीचा मात्र माती करून टाकली ! तुला काय दोष? माझ्याच पापाचे हे पिकलेले फळ आहे ! म्हणून अशा ऐन वेळी सर्वच दैव फिरले. योग्य काळी तू उजाड केलेली ही अयोध्यानगरी पुनः सुखाने नांदू लागेल. आणि सकलगुणनिधान रामाचे राज्य सुरू होईल. अंतःकरणापासून सगळेच, बंधू रामाची सेवा करतील हे निश्चित. तसेच रामाची यशोदुंदुभी त्रैलोक्यात दुमदुमेल !—पण तुझा कलंक तू मेल्यावरही जाणार नाही व माझा पश्चात्ताप माझ्या या शरीराची राख झाली तरीही शांत होणार नाही.

" आता तुला वाटेल ते कर. फक्त येथून चालती हो आणि आपले तोंड काळे कर. हात जोडून एक

जब लगि जिऔं कहउँ कर जोरी । तब लगि जनि कछु कहसि बहोरी ॥
फिरि पछितैहसि अंत अभागी । मारसि गाइ नहारू लागी ॥

दो० — परेउ राउ कहि कोटि बिधि काहे करसि निदानु ।
कपट सयानि न कहति कछु जागाति मनहुँ मसानु ॥ ३६ ॥

चौ० — राम राम रट बिकल भुआलू । जनु बिनु पंख बिहंग बेहालू ॥
हृदयँ मनाव भोरु जनि होई । रामहि जाइ कहै जनि कोई ॥
उदउ करहु जनि रबि रघुकुल गुर । अवध बिलोकि सूल होइहि उर ॥
भूप प्रीति कैकइ कठिनाई । उभय अवधि बिधि रची बनाई ॥
बिलपत नृपहि भयउ भिनुसारा । बीना बेनु संख धुनि द्वारा ॥
पढ़हिं भाट गुन गावहिं गायक । सुनत नृपहि जनु लागहिं सायक ॥
मंगल सकल सोहाहिं न कैसे । सहगामिनिहि बिभूषन जैसें ॥
तेहि निसि नीद परी नहिं काहू । राम दरस लालसा उछाहू ॥

प्रार्थना करतो, माझ्या कुडीत प्राण असेपर्यंत, एक शब्दसुद्धा आता माझ्या कानावर, तुझ्या तोंडातून येऊ देऊ नकोस ! ‘ वादीसाठी गाय मारावयास तू तयार झालीस ! ’ म्हणून करंटे ! मागून कायमचे तुला रडत बसावे लागेल ! ”

कोट्यवधी प्रकारे राजाने माझा असा अंत करू नको म्हणून तिची विनवणी केली ! अखेर “ काय ग तू हा सर्वनाश केलास ! ” असे ओरडून राजा जमिनीवर कोसळला !

हे सर्व भयंकर दृश्य डोळ्यासमोर प्रत्यक्ष चालू असता, त्या पाषाणहृदयी व कपटपटू कैकेयीच्या अंतःकरणास तिळमात्र पाझर फुटला नाही ! तिने राजाला समाधान होईल, असा एकही शब्द मुखावाटे काढला नाही. फक्त तिचे तोंड बंद झाले, जणू काही अमावास्येच्या रात्री प्रेताच्या छातीवर नग्न बसून प्रेतमंत्र सिद्ध करण्याचेच त्या चेटकीचे काम चालू होते ! ३६

मुखाने ‘ राम ! राम !’ असा ध्यास चालू ठेवून राजा व्याकुळ होऊन पडला. पंख छाटून टाकल्यामुळे तडफडणारा पक्षीच जणू काही !

त्याच्या मनात विचार चालू झाले. ‘ आता उजाडूच नये. ही भयंकर बातमी रामाला कोणीच सांगू नये. हे रघुकुलगुरो, (मूळ पुरुष) सूर्यनारायणा ! नका उगवू ! अयोध्येची दुःस्थिती पाहून आपल्या हृदयात यातनांचा गोळा उठेल ! ”

खरोखर विधिरचना अगाध आहे. रामावरील प्रेमाचे एक टोक दशरथराजे, तर रामावर आग पाखडण्या-साठी, पाषाणहृदयी बनून दुसऱ्या टोकास गेलेली कैकेयी !

अशा स्थितीत प्रभात झाल्याचे समजताच दशरथ राजांचा शोक भलताच वाढला !

वेणू-वीणा इत्यादि वाद्यांचे मंजुळ स्वर राजद्वारात निनादू लागले. भाट बिरुदावली उच्चारू लागले व गुणगायक रघुकुलावतंसांचे यशगान करू लागले.

पण त्यातील प्रत्येक शब्द दशरथ राजांच्या हृदयात बाणाप्रमाणे घुसून त्यांना घायाळ करीत होता !

सती जाण्यास सिद्ध झालेल्या सुवासिनीच्या अंगावरील सौभाग्यालंकार ज्याप्रमाणे तिच्या हृदयाच्या दुःखास भरतीच आणतात, त्याचप्रमाणे हे सर्व मंगल ध्वनी राजाचा शोक वाढवण्यासच कारणीभूत होत होते.

अयोध्यानगरातील स्त्री-पुरुषांचा उत्साह एवढा त्या रात्री शिगेस पोचला होता की केव्हा उजाडते व केव्हा रामदर्शनास आपण जातो अशी प्रत्येकास उत्कंठा लागल्यामुळे झोप कोणीच घेतली नाही !

दो० – द्वार भीर सेवक सचिव कहहिं उदित रबि देखि।
जागेउ अजहुँ न अवधपति कारनु बिसेषि॥ ३७॥

चौ० – पछिले पहर भूपु नित जागा। आजु हमहि बड़ अचरजु लागा॥
जाहु सुमंत्र जगावहु जाई। कीजिअ काजु रजायसु पाई॥
गए सुमंत्रु तब राउर माही। देखि भयावन जात डेराहीं॥
धाइ खाइ जनु जाइ न हेरा। मानहुँ बिपति बिपाद बसेरा॥
पूछें कोउ न ऊतरु देई। गए जेहिं भवन भूप कैकेई॥
कहि जयजीव बैठ सिरु नाई। देखि भूप गति गयउ सुखाई॥
सोच बिकल बिबरन महि परेऊ। मानहुँ कमल मूलु परिहरेऊ॥
सचिउ सभीत सकइ नहिं पूँछी। बोली असुभ भरी सुभ छूछी॥

दो० – परी न राजहि नीद निसि हेतु जान जगदीसु।
रामु रामु रटि भोरु किय कहइ न मरमु महीसु॥ ३८॥

चौ० – आनहु रामहि बेगि बोलाई। समाचार तब पूँछेहु आई॥
चलेउ सुमंत्र राय रुख जानी। लखी कुचालि कीन्हि कछु रानी॥
सोच बिकल मग परइ न पाऊ। रामहि बोलि कहिहि का राऊ॥

सूर्योदय झाल्याचे पाहून राजद्वारात सेवक आणि सचिवांची एकच गर्दी उसळली ! जो तो आपापसात कुजबजतो, " अजून महाराज उठले नाहीत ? असे काय विशेष कारण झाले, काहीच कळत नाही ! ३७

" नित्य तीन प्रहर रात्र संपताच उठण्याची महाराजांची शिस्त ! आज आम्हाला मोठाच विस्मय वाटतो ! सुमंत्र ! जा. जा. जाऊन राजाना जागे करा. आम्हाला जी आज्ञा मिळेल त्याप्रमाणे भराभर कामे उरकून टाकू."

लोकांचा असा तगादा लागल्यामुळे सुमंत राजगृहात शिरले परंतु सर्व दृश्य भयाण दिसल्यामुळे मन एकदम कचरले जणू काही कोणी तरी धावत येऊन आपणाला आता गिळणारच आणि त्यांना भीती वाटल्या-मुळे त्यांना तिकडे पाहाण्याचाही धीर होईना !

विपत्ती आणि विषाद यांचा तेथे तळ पडल्याचाच भास होत होता !

विचारले तर कोणीही उत्तरसुद्धा देईना. अखेर ज्या गृहात राजा आणि कैकेयी होते त्या घरात सुमंत दाखल झाले.

' जय जीव ' असे म्हणून त्यांनी आपले शिर नमवले व तो खाली बसला. परंतु राजाची ती विपरीत स्थिती पाहून त्याच्या काळजाचे पाणी पाणी झाले ! शोकाने कासावीस होऊन अगदी निस्तेज असे ते नुसत्या जमिनीवरच पडले होते. देठासहच जणू कमळ उपटून टाकले होते !

हे दृश्य पाहून घाबरल्यामुळे सचिव काहीच विचारू शकत नाही, असे ध्यानी येताच अमंगल्याने भरलेली कैकेयी मांगल्यहीन भाषा बोलली, " महाराजांना रात्रभर झोप नाही. काय कारण ते देव जाणे. रात्रभर फक्त राऽऽम, राऽऽम, राऽऽम असा कंठशोष चालू असता सूर्योदय झाला. यातले रहस्य काहीच भूपाल बोलत नाहीत ! म्हणून झटकन् रामाला घेऊन या आणि मग काय तो खुलासा समजून घ्या " ३८.

राजाचा कल त्याच्या चेहऱ्यावरून जाणून सुमंताने रस्ता धरला. त्याला हे सहज कळून चुकले की, राणीने काही तरी कृष्णकृत्य केले असले पाहिजे ! बिचारा स्वतःच शोकाने व्याकुळ झाल्यामुळे त्याचेच पाऊल रस्त्यावर पुढे पडेना. एकाच विचाराने त्याला बेचैन केले होते,–रामाला बोलावून आता महाराज काय सांगणार ?

उर धरि धीरजु गयउ दुआरें । पूँछहिं सकल देखि मनु मारें ।।
समाधानु करि सो सबही का । गयउ जहाँ दिनकर कुल टीका ।।
राम सुमंत्रहि आवत देखा । आदरु कीन्ह पिता सम लेखा ।।
निरखि बदनु कहि भूप रजाई । रघुकुलदीपहि चलेउ लेवाई ।।
रामु कुभाँति सचिव सँग जाहीं । देखि लोग जहँ तहँ बिलखाहीं ।।

दो० — जाइ दीख रघुबंसमनि नरपति निपट कुसाजु ।
सहमि परेउ लखि सिंघिनिहि मनहुँ बृद्ध गजराजु ।। ३९ ।।

चौ० — सूखहिं अधर जरइ सबु अंगू । मनहुँ दीन मनिहीन भुअंगू ।।
सरुष समीप दीखि कैकेई । मानहुँ मीचु घरीं गनि लेई ।।
करुनामय मृदु राम सुभाऊ । प्रथम दीख दुखु सुना न काऊ ।।
तदपि धीर धरि समउ बिचारी । पूँछी मधुर बचन महतारी ।।
मोहि कहु मातु तात दुख कारन । करिअ जतन जेहिं होइ निवारन ।।
सुनहु राम सबु कारनु एहू । राजहि तुम्ह पर बहुत सनेहू ।।
देन कहेन्हि मोहि दुइ बरदाना । मागेउँ जो कछु मोहि सोहाना ।।
सो सुनि भयउ भूप उर सोचू । छाड़ि न सकहिं तुम्हार सँकोचू ।।

धीर धरून ते कसेबसे राजद्वारापर्यंत आले. त्यांचा तो उदास चेहेरा पाहून त्याना प्रत्येकाने प्रश्न विचारून बेजार केले. काही तरी तात्पुरते उत्तर तोंडावर टाकून त्यांनी लोकांची जिज्ञासा शमवली व रघुकुल-तिलकाच्या मंदिराकडे ते गेले.

सुमंत्र आपल्याकडेच येत आहेत, असे पाहून रामानी त्यांना, आपल्या पित्याप्रमाणे मानून आदराने वागवले. श्रीरामचंद्र मुखकमल त्यांनी एकवेळ निरखून पाहिले; दशरथ राजांची आज्ञा सांगितली व रघुकुलदीपासह ते परत फिरले.

अगदीच विलक्षण रीतीने सचिवासह राम रस्त्याने जात असलेले पाहून, जो जो त्यांना पाही, तो तो व्याकुळ होई !

रघुवंशमणींनी कैकेयीच्या महालात जाऊन अत्यंत दुःस्थितीत पडलेले नृपती पाहिले. वृद्ध गजराज, सिंहिणीला बघून भीतीने कोलमडावा, तसे ते दृश्य होते ! ३९.

ओठ वाळून गेलेले, सर्वांगाची लाही होत आहे. मणी काढून घेतल्यामुळे दीन झालेला जणू भुजंगच दीन होऊन पडला आहे ! संतप्त झालेली कैकेयी समीपच दिसली. जणू काही तिच्या स्वरूपात मृत्यूच घटका मोजून माप घेत होता !

राम स्वभावतःच अत्यंत दयाळू व कोमल ! ज्याने कानानेसुद्धा दुःख कसले ते कधी आजपर्यंत ऐकले-सुद्धा नाही, त्याला हे भयंकर दुःख आज प्रत्यक्ष डोळ्यानी पाहण्याचा प्रसंग आला होता. त्यामुळे ते फारच दुःखी झाले. परंतु प्रसंगाचे गांभीर्य ध्यानी घेऊन रामानी धीर धरला व मातेला मधुर शब्दात म्हणतात, " आई ! बाबांच्या दुःखाचे कारण सांग ना ! उपाय करून त्याचे निवारण करू. "

" रामा ! अरे तुझ्यावरील अमर्याद प्रेम हे एकच त्या दुःखाचे कारण !' संधी साधून कैकेयीने उत्तर झोकले ! ती पुढे खुलासा करते, " मला त्यांनी दोन वर देऊन ठेवले होते. मला जे आवडले ते मी मागितले. पण ते ऐकल्यापासून महाराजांचे हृदय फार दुःखी झाले. कारण तुमच्याबद्दलच्या प्रेमामुळे त्यांच्या मनाला

दो० — सुत सनेहु इत बचनु उत संकट परेउ नरेसु ।
सकहु त आयसु धरहु सिर मेटहु कठिन कलेसु ।। ४० ।।

चौ० — निधरक बैठि कहइ कटु बानी । सुनत कठिनता अति अकुलानी ।।
जीभ कमान बचन सर नाना । मनहुँ महिप मृदु लच्छ समाना ।।
जनु कठोरपनु धरें सरीरू । सिखइ धनुपबिद्या बर बीरू ।।
सबु प्रसंगु रघुपतिहि सुनाई । बैठि मनहुँ तनु धरि निठुराई ।।
मन मुसुकाइ भानुकुल भानू । रामु सहज आनंद निधानू ।।
बोले बचन बिगत सब दूषन । मृदु मंजुल जनु बाग बिभूषन ।।
सुनु जननी सोइ सुतु बड़भागी । जो पितु मातु बचन अनुरागी ।।
तनय मातु पितु तोषनिहारा । दुर्लभ जननि सकल संसारा ।।

दो० — मुनिगन मिलनु बिसेषि बन सबहि भाँति हित मोर ।
तेहि महँ पितु आयसु बहुरि संमत जननी तोर ।। ४१ ।।

चौ० — भरतु प्रानप्रिय पावहिं राजू । बिधि सब बिधि मोहि सनमुख आजू ।।
जौं न जाउँ बन ऐसेहु काजा । प्रथम गनिअ मोहि मूढ़ समाजा ।।
सेवहिं अरँडु कलपतरु त्यागी । परिहरि अमृत लेहिं बिषु मागी ।।
तेउ न पाइ अस समउ चुकाहीं । देखु बिचारि मातु मन माहीं ।।

वाटणारा संकोच ते सोडू शकत नाहीत. इकडे मुलावरील प्रेम; तिकडे दिलेले वचन अशा संकटात नरेश पडले आहेत. तुम्हाला शक्य असेल तर राजाची आज्ञा शिरसामान्य करा आणि त्यांना या दुःसह क्लेशातून मुक्त करा ! " ४०

कैकेयीने बसूनच बेधडक इतकी कठोर वचने उच्चारली की, ती ऐकून प्रत्यक्ष कठोरता अत्यंत व्याकुळ होऊन उठली ! कैकेयीची जीभ हेच धनुष्य, तिची अनेक वाक्ये हेच बाण आणि त्यांच्या कोमल लक्ष्याचा स्थानी राजा ! या सर्व साहित्यासह जणू काही श्रेष्ठ वीराचे शरीर धारण करून कठोरताच धनुर्विद्या शिकत आहे, असे त्यावेळी वाटले !

अथपासून इतिपर्यंत, कैकेयी सर्व हकीगत रघुपतीला सांगत असता, मूर्तिमंत निष्ठुरताच बसून हे सर्व बोलत आहे असे वाटले !

सूर्यकुलाचे सूर्य, स्वभावतःच आनंदाचे निधान, श्रीराम, मनात स्मित करून, सर्वस्वी निर्दोष व वाणीचे भूषणच की काय, असे कोमल व मधुर वचन उत्तरादाखल बोलले, " हे जननी ! सांगतो ऐक. आपल्या आईबापांच्या वचनाबद्दल परमादर बाळगणारा मुलगाच खरोखर धन्य होय ! मातापित्यांना संतोषविणारा मुलगा या सर्व जगात आई ! फारच विरळा.

" वनात जाण्याने विशेष लाभ म्हणजे माझे हित ज्याने साधणार, अशा मुनिमंडळींच्या भेटी मला घेता येतील. वडिलांच्या आज्ञेचे परिपालन तर होईलच, पण त्यातल्यात्यात जननी ! या वनगमनाला तुझी मनापासून संमती आहे, हे केवढे माझे भाग्य ! ४१

" शिवाय, माझ्या प्राणाप्रमाणे प्रिय असणाऱ्या भरताला राज्य मिळणार! खरोखर दैव मला आज पूर्णपणे अनुकूल झाले आहे यात शंकाच नाही. इतकी सुसंधी प्राप्त झाली असता मी जर वनात गेलो नाही तर जगातील मूर्खातला अग्रण्यच मला समजावा लागेल! कल्पवृक्ष सोडून जेपाळाचे (एरंड ?) संवर्धन करणारा, अमृताला लाथाडून विषाचा पेला घेणारा—असले लोक सुखाच्या संधीचा फायदा घेण्यास चुकणार नाहीत. म्हणून आई मनात विचार करून पाहा म्हणजे तुझी खात्री होईल की हा वनात जाणारच !

अंब एक दुखु मोहि बिसेषी । निपट बिकल नरनायकु देखी ॥
थोरिहिं बात पितहि दुख भारी । होति प्रतीति न मोहि महतारी ॥
राउ धीर गुन उद्धि अगाधू । भा मोहि तें कछु बड़ अपराधू ॥
जातें मोहि न कहत कछु राऊ । मोरि सपथ तोहि कहु सतिभाऊ ॥

दो० — सहज सरल रघुबर बचन कुमति कुटिल करि जान ।
चलइ जोंक जल बक्रगति जद्यपि सलिलु समान ॥ ४२ ॥

चौ० — रहसी रानि राम रुख पाई । बोली कपट सनेहु जनाई ॥
सपथ तुम्हार भरत कै आना । हेतु दूसर मैं कछु जाना ।
तुम्ह अपराध जोगु नहिं ताता । जननी जनक बंधु सुखदाता ॥
राम सत्य सबु जो कछु कहहू । तुम्ह पितु मातु बचन रत अहहू ॥
पितहि बुझाइ कहहु बलि सोई । चौथेंपन जेहिं अजसु न होई ॥
तुम्ह सम सुअन सुकृत जेहिं दीन्हे । उचित न तासु निरादरु कीन्हे ॥
लागहिं कुमुख बचन सुभ कैसे । मगहँ गयादिक तीरथ जैसे ॥
रामहि मातु बचन सब भाए । जिमि सुरसरि गत सलिल सुहाए ॥

दो० — गइ मुरुछा रामहि सुमिरि नृप फिरि करवट लीन्ह ।
सचिव राम आगमन कहि बिनय समय सम कीन्ह ॥ ४३ ॥

" पण हे अंब माझ्या मनाला हे एक अत्यंत दुःख होत आहे. नरनायक फारच व्याकुळ झालेले मला पाहवत नाही. बाब एवढी किरकोळ असता एवढे भयंकर दुःख वडिलांना होत आहे. माते ! याचा माझ्या अंतःकरणात अजून मेळ बसत नाही. कारण महाराज मोठे धीराचे आणि सद्गुणांचे अगाध सागर ! ! तेव्हा माझ्याच हातून काही तरी अक्षम्य महान अपराध झाला असला पाहिजे ! म्हणूनच राजे माझ्याशी एक शब्दही बोलत नाहीत. आई ! तुला माझ्या गळ्याची शपथ आहे अगदी खरं खरं सांग बरं!"

इतके स्वाभाविक व सरळ भाषण रघुवराचे ! पण तेसुद्धा त्या कुमतीच्या कैकेयीला कपटाचे वाटले. साहजिकच आहे पाणी जरी सरळ वाहात असले तरी जळू त्यातून वाकड्या गतीनेच जाणार !.४२

एकंदरीत रामाचे धोरण समजल्यावर राणीचा आनंद गगनात मावेना. अंतःकरण कपटाने पूर्ण भरलेले पण वरवर नाटकी विलक्षण प्रेम दाखवून ती बोलू लागली, ' तुमची व भरताचीसुद्धा शपथ घेऊन मी सांगते रामा ! याशिवाय राजांच्या दुःखाचे मला दुसरे कोणतेच कारण माहीत नाही ! बाळा ! तू कधी तरी कसला अपराध करतोस काय ? तुझ्यावर्तनाने तुझे आईबाप, बंधू सर्वच नेहमी सुखी होतात रामा ! तुम्ही जे जे आता बोलला ते सर्व सत्यच आहे. कारण आईबापाच्या आज्ञा परिपालनात तुम्ही स्वतःला नेहमीच धन्य समजतात. म्हणून मी आपली काया बाबा ! तुझ्यावरून ओवाळून टाकते ! काहीही करून आपल्या पित्याची समजूत कर. कारण वार्धक्यात अपकीर्ती होणे चांगले नाहीं. ज्या पूर्वजन्मीच्या पुण्याईने तुमच्यासारख्या तनयाचा लाभ झाला त्या सुकृताचा अनादर करणे अनुचित नव्हे काय ?"

निंद्य मगध देशातील गयादिक क्षेत्राप्रमाणेच कैकेयीच्या कुमुखात ही शुभवचने दिसत होती !

भागिरथी नदीत जे मिसळेल ते सर्व पाणी गंगाच; या न्यायाने आईच्या मुखातून बाहेर पडलेली सर्व वचने रामाने प्रेमाने स्वीकारली.

आलेली भयंकर मूर्च्छा गेली. रामाचे स्मरण होऊन ' राऽम ! राऽऽम ! म्हणत महाराज या कुशीवरून त्या कुशीवर वळताच सचिवाने, राम आलेले आहेत, हे दशरथाना योग्य रीतीने विनंती करून कळवले. ४३

चौ० – अवनिप अकनि रामु पगु धारे । धरि धीरजु तब नयन उघारे ॥
सचिवँ सँभारि राउ बैठारे । चरन परत नृप रामु निहारे ॥
लिए सनेह बिकल उर लाई । गै मनि मनहुँ फनिक फिरि पाई ॥
रामहि चितइ रहेउ नरनाहू । चला बिलोचन बारि प्रवाहू ॥
सोक बिबस कछु कहै न पारा । हृदयँ लगावत बारहिं बारा ॥
बिधिहि मनाव राउ मन माहीं । जेहिं रघुनाथ न कानन जाहीं ॥
सुमिरि महेसहि कहइ निहोरी । बिनती सुनहु सदासिव मोरी ॥
आसुतोष तुम्ह अवढर दानी । आरति हरहु दीन जनु जानी ॥

दो० – तुम्ह प्रेरक सब के हृदयँ सो मति रामहि देहु ।
बचनु मोर तजि रहहिं घर परिहरि सीलु सनेहु ॥ ४४ ॥

चौ० – अजसु होउ जग सुजसु नसाऊ । नरक परौं बरु सुरपुरु जाऊ ॥
सब दुख दुसह सहावहु मोही । लोचन ओट रामु जनि होंही ॥
अस मन गुनइ राउ नहिं बोला । पीपर पात सरिस मनु डोला ॥
रघुपति पितहि प्रेमबस जानी । पुनि कछु कहिहि मातु अनुमानी ॥
देस काल अवसर अनुसारी । बोले बचन बिनीत बिचारी ॥
तात कहउँ कछु करउँ ढिठाई । अनुचितु छमब जानि लरिकाई ॥

त्या मंदिरात रामाचे पदार्पण झाले, हे ऐकताच, त्यानी धीर धरून डोळे उघडले. सुमंत्र झटकन् पुढे झाला व त्याने भूपतीला काळजीपूर्वक टेकून बसवले ! रामाने लगेच पित्याच्या पायांवर मस्तक ठेवले. दशरथ-महाराजांनी रामाला एकदा डोळे भरून पाहिले, लगेच स्नेहविकल होऊन त्याला हृदयाशी कवटाळले ! जणू काही फणीचा (नागाचा) गमावलेला मणीच त्याला पुनः प्राप्त झाला !

डोळ्यातून अश्रूंचा संतत प्रवाह सुरू आहे आणि रामाच्या मुखचंद्रावर राजाचे नेत्र खिळले आहेत ! दुःखाचा अनावर आवेग, त्यामुळे भाषा अशक्य ! फक्त त्याला एक वेळ घट्ट आलिंगन द्यावे, पुनः त्याच्या मुखकमलावर दृष्टी लावावी, पुनः आलिंगन द्यावे, असा क्रम वारंवार सुरू होता.

भूपती मनात विधात्याला विनवणी करीत होते की, रघुनाथ वनात जाऊ नयेत. पुनः महेशाचे स्मरण करून त्यानी प्रार्थना केली, हे सदाशिवा ! माझी एवढी विनंती ऐका. आपण शीघ्र संतुष्ट होणारे व मनात येईल ते देणारे आहात, म्हणून मी यावेळी अत्यंत दीन झालो आहे, हे जाणून माझी एवढी विपत्ती दूर करा. सर्वांच्या अंतर्यामी प्रेरणा देणारे आपणच असल्याने, माझे वचन मोडील स्वतःच्या शीलाला आणि स्नेहाला फाटा देईल आणि घरी राहील, अशी बुद्धी रामाला द्या ! ४४

त्यामुळे माझी अपकीर्ती होवो, आजपर्यंतचे सर्व सुयश कलंकित होवो, स्वर्गप्राप्ती न होता नरकात पडावे लागो, इतकेच काय, दुःसह असे, कोणतेही दुःख माझ्या वाट्याला घाला, पण माझ्या रामाला तेवढा डोळ्याच्या आड नेऊ नका ! अशा प्रकारच्या विचाराच्या मालिकेत राजाच्या मुखातून शब्द बाहेर पडत नव्हता. त्याच्या मनाला पिंपळाच्या पानाप्रमाणे हेलकावे बसत होते.

प्रेमविव्हल झालेल्या पित्याला रघुपतींनी पाहिले, पुनः कदाचित् काहीतरी क्षोभकारक शब्द माता बोलेल, हे ध्यानी येऊन, काळ-वेळ आणि तो प्रसंग यांना शोभेल, असे विचारपूर्वक भाषण त्यांनी केले.

“ थोडी धिटाई करून मी काही बोलतो; बाळपणामुळे, अपुरी समजूत म्हणून, बाबा ! मला क्षमा करा. अत्यंत क्षुद्र गोष्टींकरता आपण फार दुःखी झालात असे माझ्या अल्प बुद्धीला वाटते. अगोदरच मला

अति लघु बात लागि दुखु पावा । काहुँ न मोहि कहि प्रथम जनावा ॥
देखि गोसाइँहि पूँछिउँ माता । सुनि प्रसंगु भए सीतल गाता ॥

दो० – मंगल समय सनेह बस सोच परिहरिअ तात ।
आयसु देइअ हरषि हियँ कहि पुलके प्रभु गात ॥ ४५ ॥

चौ० – धन्य जनमु जगतीतल तासू । पितहि प्रमोदु चरित सुनि जासू ॥
चारि पदारथ करतल ताकें । प्रिय पितु मातु प्रान सम जाकें ॥
आयसु पालि जनम फलु पाई । ऐहउँ बेगिहिं होउ रजाई ॥
बिदा मातु सन आवउँ मागी । चलिहउँ बनहि बहुरि पग लागी ॥
अस कहि राम गवनु तब कीन्हा । भूप सोक बस उतरु न दीन्हा ॥
नगर ब्यापि गइ बात सुतीछी । छुअत चढ़ी जनु सब तन बीछी ॥
सुनि भए बिकल सकल नर नारी । बेलि बिटप जिमि देखि दवारी ॥
जो जहँ सुनइ धुनइ सिरु सोई । बड़ बिषादु नहिं धीरजु होई ॥

दो० – मुख सुखाहिं लोचन स्त्रवहिं सोकु न हृदयँ समाइ ।
मनहुँ करुन रस कटकई उतरी अवध बजाइ ॥ ४६ ॥

चौ० – मिलेहि माझ बिधि बात बेगारी । जहँ तहँ देहिं कैकइहि गारी ॥
एहि पापिनिहि बूझि का परेउ । छाइ भवन पर पावकु धरेउ ॥

कळवले असते तर बरे झाले असते. आपली ही अशी विकल स्थिती पाहून मी मातेला विचारले. सर्व वृत्त समजून समाधान झाले. अशा मंगलप्रसंगी, बाबा! प्रेमाधीन होऊन शोकविव्हल होऊ नये. प्रसन्न अंतःकरणाने मला आज्ञा द्यावी!" हे शब्द मुखातून बाहेर पडत असता प्रभू रामचंद्राचे सर्वांग रोमांचित झाले! ४५.

ते पुढे बोलू लागले, "त्याच पुत्राचा जन्म या पृथ्वीच्या पाठीवर धन्य होय की, ज्याच्या वर्तनाने पित्याला संतोष होतो! प्राणाप्रमाणेच ज्याचे प्रेम आईबापावर असते, त्याच्या हातात चारी पुरुषार्थ आले म्हणून समजावे! म्हणून आपल्या आज्ञापालनाने माझ्या जन्माचे सार्थक होईल. आज्ञापालन करून मी तेव्हाच परत येईन. मला परवानगी द्यावी! आईची आज्ञा घेऊन येतो, आपल्या पदकमली पुनः मस्तक नमवतो, आणि मग वनाला जातो.!"

एवढे बोलून राम झटकन् बाहेर पडले. शोकाकुल नृप उत्तरादाखल म्हणून एकही शब्द बोलू शकले नाहीत.

पुरवासीजनविरह - विषाद

ही अत्यंत कर्णकटू बातमी हा हा म्हणता सर्व अयोध्यानगरीत, इंगळी चावल्यावर तिचे विष ज्या वेगाने शरीरात भिनते तशी जणू पसरली!

मोठ्या दावाग्नीला पाहून ज्याप्रमाणे वेली आणि वृक्ष व्याकुळ होतात, तशीच स्थिती हे वृत्त ऐकून सर्व नगरातील स्त्रिया व पुरुषांची झाली. ज्याला जेथे हे समजे तेथेच तो कपाळ बडवून घेऊन अत्यंत दुःखी होई. व त्याचा सर्वस्वी धीर सुटे.

तोंडे कोमेजून जात, डोळ्यांतून अश्रूंचा प्रवाह चाले, हृदय शोकाला अपुरे पडे, याप्रमाणे सर्व नगरात जणु काही करुणरसाच्या सेनेनेच आपले डंके पिटून अयोध्येवर चाल केली होती. ४६.

सगळी कुटुंबातील एकीची घडी उत्तम प्रकारे बसलेली विधात्याने विस्कटून टाकली! जिथे तिथे लोक कैकेयीला शिव्या देत सुटले होते. "काय हो, या पापिणीला दुष्ट बुद्धी सुचली! अगोदर घराची शाकारणी

निज कर नयन काढ़ि चह दीखा। डारि सुधा बिषु चाहत चीखा ॥
कुटिल कठोर कुबुद्धि अभागी। भइ रघुबंस बेनु बन आगी ॥
पालव बैठि पेड़ु एहिं काटा। सुख महुँ सोक ठाटु धरि ठाटा ॥
सदा रामु एहि प्रान समाना। कारन कवन कुटिलपनु ठाना ॥
सत्य कहहिं कबि नारि सुभाऊ। सब बिधि अगहु अगाध दुराऊ ॥
निज प्रतिबिंबु बरुकु गहि जाई। जानि न जाइ नारि गति भाई ॥

दो० — काह न पावकु जारि सक का समुद्र समाइ ।
का न करै अबला प्रबल केहि जग कालु न खाइ ॥ ४७ ॥

चौ० — का सुनाइ बिधि काह सुनावा। का देखाइ चह काह देखावा ॥
एक कहहिं भल भूप न कीन्हा। बरु बिचारि नहिं कुमतिहि दीन्हा ॥
जो हठि भयउ सकल दुख भाजनु। अबला बिबस ग्यानु गुनु गा जनु ॥
एक धरम परमिति पहिचाने। नृपहि दोसु नहिं देहिं सयाने ॥
सिबि दधीचि हरिचंद कहानी। एक एक सन कहहिं बखानी ॥
एक भरत कर संमत कहहीं। एक उदास भायँ सुनि रहहीं ॥
कान मूदि कर रद गहि जीहा। एक कहहिं यह बात अलीहा ॥
सुकृत जाहिं अस कहत तुम्हारे। रामु भरत कहुँ प्रानपिआरे ॥

करून एकाएकी रात्री हिने त्याला आग लावली ! हातात आपले डोळे काढून, मग त्यांना पाहण्याची हिची इच्छा ! अमृताचा घट लाथाडून विष पिण्याची हिला तहान लागली ! अत्यंत कपटी, पाषाणहृदयाची, दुष्टबुद्धी, करंटी, रघुवंशरूपी वेळूच्या वनाला हिने आत्मवंचनेने कशी आग लावली पाहा ना ! डहाळीवर बसून वृक्षाचे मूळच हिने तोडले की हो ! सुखाच्या नदीत हिने दुःखाचे अनेक भयंकर प्रवाह आणून सोडले ना !

" काय सांगावे हो ! हिला राम म्हणजे अगदी सदोदित जीव की प्राण ! आणि कशाकरता एवढे कपट कारस्थान केले हे ? स्त्रियांचा स्वभाव अत्यंत अगाध. पूर्णपणे न समजणारा आणि अनेक प्रकारच्या कपटांनी भरलेला असा असतो, असे कवि म्हणतात ते अगदी खरे आहे. एखाद्या वेळी मनुष्याला आपले प्रतिबिंब हातात घेणे शक्य होईल, पण स्त्रियांचे चारित्र्य कधीच कळणार नाही ! नाहीतरी, विस्तव काय जाळू शकणार नाही? सागराच्या पोटात काय राहणार नाही? काळ कोणाला खाणार नाही? तसेच प्रबळ झालेली ' अबला ' काय करू शकणार नाही ? ४७

खरोखर विधात्याने कालच काय ऐकवले आणि आज हे काय ऐकावयास लावले? काल काय दाखवले आणि आज कशाला अनुभव घ्यावयास लावला ? "

एक म्हणाले, ' राजाने विचार न करता या दुष्ट बुद्धीच्या कैकेयीस वर दिले, हीच गोष्ट चांगली केली नाही. तिचा हट्ट पुरवण्यास बांधला गेल्यामुळे अनेक दुःखांच्या परंपरेस त्याला तोंड द्यावे लागले. एका अबलेला वश झाल्यामुळे जणू काही त्याचे सर्व ज्ञान व गुण समाप्त झाले ! '

धर्मच श्रेष्ठ हे जाणणारे ज्ञाते होते, त्यांनी चुकूनही राजाला दोष लावला नाही. हरिश्चंद्र, शिबी, दधीची सर्वच वचनासाठी प्राणार्पण करणारे ! यांची चरित्रे आधारासाठी एकजण दुसऱ्याला सांगू लागला.

एक म्हणाला, ' कैकेयीच्या या कुटिल कारस्थानाच्या बुडाशी भरताची संमती असलीच पाहिजे; ' तर कोणी हे एकून काहीच मत देत नसत. कोणी हे ऐकून दोन्ही हातांनी कानात बोटे घालून दाताखाली जीभ चावत, तर दुसरे म्हणत, ' ही भाषा साफ खोटी ! अशी गोष्ट बोलणे म्हणजे पापाला धर्ना होणे होय. अहो,

दो० – चंदु चवै बरु अनल कन सुधा होइ बिषतूल ।
सपनेहुँ कबहुँ न करहिं किछु भरतु राम प्रतिकूल ।। ४८ ।।

चौ० – एक बिधातहि दूषनु देहीं । सुधा देखाइ दीन्ह बिषु जेहीं ।।
खरभरु नगर सोचु सब काहू । दुसह दाहु उर मिटा उछाहू ।।
बिप्रबधू कुलमान्य जठेरी । जे प्रिय परम कैकई केरी ।।
लगीं देन सिख सीलु सराही । बचन बानसम लागहिं ताही ।।
भरतु न मोहिप्रिय राम समाना । सदा कहहु यहु सबु जगु जाना ।।
करहु राम पर सहज सनेहू । केहिं अपराध आजु बनु देहू ।।
कबहुँ न कियहु सवति आरेसू । प्रीति प्रतीति जान सबु देसू ।।
कौसल्याँ अब काह बिगारा । तुम्ह जेहि लागि बज्र पुर पारा ।।

दो० – सीय कि पिय सँगु परिहरिहि लखनु कि रहिहहिं धाम ।
राजु कि भूँजब भरत पुर नृपु कि जिइहि बिनु राम ।। ४९ ।।

चौ० – अस बिचारी उर छाड़हु कोहू । सोक कलंक कोठि जनि होहू ।।
भरतहि अवसि देहु जुबराजू । कानन काह राम कर काजू ।।

भरताचे रामावर प्राणापेक्षा जास्त प्रेम आहे. अग्निकिरणांचा वर्षाव चंद्रकिरणातून जरी झाला, अमृत बिघडून विष बनले तरीसुद्धा रामाच्या विरुद्ध भरत स्वप्नातसुद्धा काहीही करणार नाही.' ४८

दाखवले अमृत आणि हालाहल विष दिले म्हणून कोणी विधात्याला दूषण देत होते.

अशा प्रकारे सर्व नगरीत जिकडे तिकडे खळबळ उडाली. सर्वांनाच अनावर शोक झाला. हृदयातील आग असह्य झाली होती. सर्व प्रकारे निरुत्साहाचेच साम्राज्य सर्वत्र माजले होते.

श्रेष्ठ कुळातील ब्राह्मणांच्या सन्मान्य वृद्ध स्त्रिया ज्याच्याबद्दल कैकेयीला फार प्रेम वाटत होते त्या सर्व एकत्र होऊन कैकेयीच्या सौजन्याची स्तुती करून तिला चार उपदेशाच्या गोष्टी सांगू लागल्या. परंतु त्यांचे ते हितपरिणामी बोल तिला अगदी बाणासारखे खुपत होते! तथापि त्यांनी आपल्या प्रयत्नांची शिकस्त करण्याचे ठरवून त्या म्हणाल्या,

"रामाइतका मला भरतसुद्धा प्रिय नाही असे तुम्ही सदोदित म्हणत असलेले सर्व जगजाहीर आहे. अशा प्रकारे स्वभावतःच रामावर निरपेक्ष प्रेम करत असता त्याने कोणता गुन्हा केला म्हणून त्याला वनवास भोगण्याची शिक्षा तुम्ही देत आहा? सवतीमत्सर तुमच्या स्वभावात औषधासुद्धा नव्हता. तुमचे एकमेकावरील प्रेम व त्याची प्रचीती सर्व देशाला माहीत आहे! असे असता त्या बिचाऱ्या कौसल्येने काय तुमचे बिघडविले की ज्याच्याकरता सर्व अयोध्यानगरीवर असा वज्राघात तुम्ही केला?

या हट्टाचा काय परिणाम होईल याचा अजून गंभीरपणे विचार करा! राम वनाला निघाल्यानंतर सीता आपल्या पतीचे पदकमल सोडून मागे राहील काय? लक्ष्मण तरी रामाचा वियोग होत असता घराचा त्याग करण्यास थांबेल? तेही जाऊ द्या. पण ज्याच्यासाठी हा सर्व महान् भयंकर व्यूह रचला तो भरत तरी अयोध्या पुरीत राहून राज्याचा उपभोग घेईल अशी तुमची समजूत असेल तर तीही साफ खोटी ठरेल आणि सर्वांत भयंकर गोष्ट म्हणजे रामाच्या वियोगाने दशरथ महाराज जगतील असे स्वप्नातसुद्धा आणू नका! ४९

या सर्व घटनांचा विचार करून राग सोडा. शोक व कलंक यांच्या साठवणीचे स्थान स्वतःला बनवू नका."

या सर्व सुविचारांचा काहीही परिणाम दिसेना. शेवटी अखेरची म्हणून एक तडजोड त्या सुज्ञ व वयोवृद्ध स्त्रियांनी कैकेयीला समजून सांगण्यास पुन्हा सुरुवात केली. "तुमच्या भरताला जरूर जरूर युवराज-

नाहिन रामु राज के भूखे । धरम धुरीन बिषय रस रूखे ॥
गुर गृह बसहुँ रामु तजि गेहू । नृप सन अस बरु दूसर लेहू ॥
जौं नहिं लगिहहु कहें हमारे । नहिं लागिहि कछु हाथ तुम्हारे ॥
जौं परिहास कीन्ह कछु होई । तौ कहि प्रगट जनावहु सोई ॥
राम सरिस सुत कानन जोगू । काह कहिहि सुनि तुम्ह कहुँ लोगू ॥
उठहु बेगि सोइ करहु उपाई । जेहि बिधि सोकु कलंकु नसाई ॥

छं ० –जेहि भाँति सोकु कलंकु जाइ उपाय करि कुल पालही ।
हठि फेरु रामहि जात बन जनि बात दूसरि चालही ॥
जिमि भानु बिनु दिनु प्रान बिनु तनु चंद बिनु जिमि जामिनी ।
तिमि अवध तुलसीदास प्रभु बिनु समुझि धौं जियँ भामिनी ॥

सो ० –सखिन्ह सिखावनु दीन्ह सुनत मधुर परिनाम हित ।
तेइँ कछु कान न कीन्ह कुटिल प्रबोधी कूबरी ॥ ५० ॥

चौ ० –उतरु न देइ दुसह रिस रूखी । मृगिन्ह चितव जनु बाघिनि भूखी ॥
ब्याधि असाधि जानि तिन्ह त्यागी । चलीं कहत मतिमंद अभागी ॥
राजु करत यह दैअँ बिगोई । कीन्हेसि अस जस करइ न कोई ॥
एहि बिधि बिलपहिं पुर नर नारीं । देहिं कुचालिहि कोटिक गारीं ॥

पद द्या. पण रामाला वनवास काय म्हणून ? रामाच्या हृदयात राज्योपभोगाची लालसा चुकूनही नाही ! ते धर्मधुरीण असल्यामुळे त्यांना सर्वच विषयांतील भोग रूक्ष वाटतात ! तुमचा अगदी हट्टच असला व राम डोळ्यांसमोरच नको असले, तर त्यांना गुरु वसिष्ठमुनींच्या आश्रमात ठेवावे असा दुसरा वर मागून घ्या ! एवढेही जर आमचे सांगणे तुम्ही ऐकले नाही तर तुमच्या हाती काहीही लागणार नाही, हे पक्के लक्षात ठेवा !

"आम्हाला अजूनही तुमच्या या विसंगत वागण्याचे कोडे उलगडत नाही. जर सर्वच थट्टा केली असलीच तर ती आता भलत्याच थराला गेली असल्याने सर्व उघड करून सांगणेच इष्ट ! अहो रामासारखा मुलगा--आणि त्याला वनवासाची शिक्षा कशी योग्य ? हे ऐकून लोक आपणाला काय म्हणत असतील, याचा विचार तरी करा. असो !

" चटकन् उठा आणि सर्वांचा शोक व तुमचा कलंक ज्याच्या योगाने नष्ट होईल, असा कोणताही उपाय करा आणि या रघुवंशाचे रक्षण करा. वनाला निघालेल्या रामाला आग्रहपूर्वक परत वळवा. त्याशिवाय दुसरी गोष्टच काढायची नाही ! हे भामिनी ! सूर्यावाचून दिवस, प्राणावाचून शरीर किंवा चंद्रावाचून रात्र तशीच (तुलसीदासाचे प्रभू) रामावाचून सर्व अयोध्यानगरी उजाड होईल, हे मनात पक्के आणा ! "

याप्रमाणे त्या जिवलग स्त्रियांनी कैकेयीला ऐकायला मधुर व परिणामी हितकर असा उपदेश केला. पण सर्वच पालथ्या घागरीवर पाणी ! कारण कुटिल अशा कुबडीने पढवून पक्की खात्री केलेली ही शिष्या आहे ! म्हणून यातील एक अक्षरही कानात शिरू देण्यास ती तयार नव्हती ! ५०.

ती कुमती काहीच बोलली नाही. रुसलेली मात्र खच्चून दिसत होती. जशी काही अगदीं भुकेलेली वाघीणच हरिणीकडे पाहात आहे !

हा रोग असाध्य आहे, यावर औषध नाही असे समजून सर्व स्त्रिया उठल्या. ' अगदीच मूर्ख बनलेली कपाळ करंटी आहे, ' असे म्हणून त्यांनी रस्ता धरला. " चांगले राज्य करीत असता दुर्दैवाने दुःखाच्या खाईत हिला लोटली ! हिच्यासारखे आजपर्यंत कुणीच कधी केले नाहीं " याप्रमाणे सर्व नगरवासी नरनारी विलाप करू लागल्या. त्याचप्रमाणे दुष्टपणाने दावा साधणाऱ्या त्या कैकेयीला शिव्यांची लाखोलीही वाहात

जरहिं बिषम जर लेहिं उसासा । कवनि राम बिनु जीवन आसा ॥
बिपुल बियोग प्रजा अकुलानी । जनु जलचर गन सूखत पानी ॥
अति बिषाद बस लोग लोगाईं । गए मातु पहिं रामु गोसाईं ॥
मुख प्रसन्न चित चौगुन चाऊ । मिटा सोचु जनि राखै राऊ ॥

दो०—नव गयंदु रघुबीर मनू राजु अलान समान ।
छूट जानि बन गवनू सुनि उर अनंदु अधिकान ॥ ५१ ॥

चौ०—रघुकुलतिलक जोरि दोउ हाथा । मुदित मातु पद नायउ माथा ॥
दीन्हि असीस लाइ उर लीन्हे । भूषन बसन निछावरि कीन्हे ॥
बार बार मुख चुंबति माता । नयन नेह जलु पुलकित गाता ॥
गोद राखि पुनि हृदयँ लगाए । स्रवत प्रेमरस पयद सुहाए ॥
प्रेम प्रमोदु न कछु कहि जाई । रंक धनद पदबी जनु पाई ॥
सादर सुंदर बदनू निहारी । बोली मधुर बचन महतारी ॥
कहहु तात जननी बलिहारी । कबहिं लगन मुद मंगलकारी ॥

होत्या. विषमज्वराने सर्वांगाचा दाह व्हावा, तसा दीर्घ श्वास घेत सर्वांच्या मुखातून उद्गार निघत, ' रामचंद्राशिवाय जगण्याची तरी कसली आशा उरली आहे ? "

याप्रमाणे पाणी आटल्यावर जसे त्यातील प्राणी तडफडू लागतात, तसे सर्व अयोध्यावासी रामप्रभूच्या वियोग दुःखाने, भयंकर शोक करू लागले !

इकडे याप्रमाणे शोकाने सर्व नगरीत हाहाःकार उडवला असता स्वामी श्रीरामचंद्र आपल्या मातेच्या गृहात येऊन पोचले. तेव्हा रामप्रभूचे मुख प्रसन्न. मनात चौपट उत्तम उत्साह, कारण नृपती अडवून घरी ठेवत नाहीत ना !—अशी खात्री झाल्याने सर्व चिंता दूर झाली.

श्रीरामचंद्रांचे मन नवीनच पकडलेल्या हत्तीप्रमाणे; असून राज्यबंधन, स्तंभासारखे आहे. यौवराज्याभिषेक विधी हा काटेरी साखळदंडासारखा. तो राज्याभिषेक आता रहित झाला; आता वनात जावयास मिळणार, हे समजून गजेंद्राच्या शृंखला सुटल्याप्रमाणे त्यांच्या हृदयात महान् आनंद झाला ! ५१

वनवासापूर्वी राम जननीगृही

रघुकुलतिलकाने हात जोडून अत्यंत संतोषाने आपल्या आईच्या चरणावर मस्तक ठेवले !

मुखाने आशीर्वाद देत असताच तिने आपल्या वत्साला ओढून हृदयाशी कवटाळले आणि अनेक दागिने, वस्त्रे रामावरून भराभर ओवाळून टाकली.

रामाचा मुखचंद्रमा पाहावा त्याचे वात्सल्याने चुंबन घ्यावे, पुन्हा पोटाशी धरावे पुन्हा मुखाकडे पाहावे. पुन्हा एकदा चुंबन घ्यावे असे कितीतरी वेळा कौसल्येने रामाचे पटापट मुके घेतले तरी तिचे समाधान झालेच नाही ! हा कार्यक्रम चालू असता प्रेमभराने तिच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले व सर्व शरीर पुलकित झाले !

आता तिने सरळ रामाला मांडीवर घेतला आणि कडकडून मिठी मारली तेव्हा तिच्या पवित्र स्तनांतून प्रेमरस पाझरू लागला ! ! रंकाला कुबेराची पदवी प्राप्त व्हावी त्याप्रमाणे त्या वेळी कौसल्येला आपले सर्व श्रेष्ठ निधान लाभले होते. अशा प्रसंगी तिला होणाऱ्या आनंदाचे आणि प्रेमाचे वर्णन करावयास शब्द कोठून आणावेत ?

अत्यंत आदराने एकवेळ रामाचे सुंदर मुख निरखून पाहिले; आणि मृदु-मधुर वाणीने ती बोलू लागली, " बाळा ! तुझी आई, आपल्या जिवाचं लिंबलोण करून, हा देह तुझ्यावरून ओवाळून टाकत आहे ! आनंद

चौ० –सुकृत सील सुख सीवँ सुहाई । जनम लाभ कइ अवधि अघाई ।।

दो० –जेहि चाहत नर नारि सब अति आरत एहि भाँति ।
जिमि चातक चातकि तृषित बृष्टि सरद रितु स्वाति ।। ५२ ।।

चौ० –तात जाउँ बलि बेगि नहाहू । जो मन भाव मधुर कछु खाहू ।।
पितु समीप तब जाएहु भैया । भइ बड़ि बार जाइ बलि मैया ।।
मातु बचन सुनि अति अनुकूला । जनु सनेह सुरतरु के फूला ।।
सुख मकरंद भरे श्रियमूला । निरखि राम मनु भवँरु न भूला ।।
धरम धुरीन धरम गति जानी । कहेउ मातु सन अति मृदु बानी ।।
पिताँ दीन्ह मोहि कानन राजू । जहँ सब भाँति मोर बड़ काजू ।।
आयसु देहि मुदित मन माता । जेहिं मुद मंगल कानन जाता ।।
जनि सनेह बस डरपसि भोरें । आनँदु अंब अनुग्रह तोरें ।।

दो० –बरष चारिदस बिपिन बसि करि पितु बचन प्रमान ।
आइ पाय पुनि देखिहउँ मनु जनि करसि मलान ।। ५३ ।।

चौ० –बचन बिनीत मधुर रघुबर के । सर सम लगे मातु उर करके ।।
सहमि सूखि सुनि सीतलि बानी । जिमि जवास परें पावस पानी ।।

आणि मंगलकारक असा तो शुभ मुहूर्त केव्हा आहे, सांग ना ? तुला यौवराज्याभिषेक झालेला एकदा पाहिला की, आमच्या पुण्याची, शीलाची व सुखाचीसुद्धा परमसीमा झाली ! यापेक्षा जन्माला येऊन, अधिक अलभ्य, आणखी काय मिळवायचे उरणार !

" म्हणून, शरद् ऋतूतील स्वाती नक्षत्राच्या वृष्टीसाठी, जसे चातक व चातकी तृषार्त होऊन, मार्ग प्रतीक्षा करत बसतात; त्याचप्रमाणे सर्व नरनारी अत्यंत आर्त होऊन, या राज्याभिषेकाच्या शुभमुहूर्ताची वाट पाहात बसले आहेत. ५२

" इडापिडा टळो! माझ्या हातानी लवकर स्नान घालते, चार गोड घास, तुला आवडतील ते खा आणि आपल्या वडिलांच्याकडे मग जा बरं बाबा ! मला एकदा ओवाळू दे, किती उशीर झाला हा ! "

जणू काही स्नेहरूपी कल्पतरूची फुलेच ! त्यांत सुखरूपी मकरंद भरलेला व सर्व 'श्री'चे मूळ आहेत. असे ते शब्द आईच्या मुखातून पडत असता रामाच्या मनस्वरूपी भ्रमराला बिलकुल मोह उत्पन्न झाला नाही !

ते स्वतः धर्मधुरीण ! धर्माच्या गतीचा विचार करून आईला अत्यंत कोमल वाणीने, त्यानी सांगण्यास सुरुवात केली " आई ! बाबांनी मला वनाचे राज्य दिले आहे. तेथे मला कामही फारच मोठे करावयाचे आहे. म्हणून तू अंतःकरणपूर्वक पूर्ण संतोषाने मला आज्ञा दे ! म्हणजे मग वनात गेल्यानेसुद्धा मला आनंद मंगलाचीच प्राप्ती होईल.

" चुकूनसुद्धा पुत्रवात्सल्याने घाबरून जाऊ नकोस. हे अंब ! तुझ्या कृपेतच माझा सर्व आनंद साठवलेला आहे. वडिलांच्या आज्ञेचे पालन करून वनात चार वर्षे आणि दहा वर्षे वास्तव्य करतो, आणि लगेच तुझ्या चरण-दर्शनास येतो ! अगदी, अगदी मनात दुःख मानू नकोस ! "५३

रामाचे हे भाषण अत्यंत नम्र व मधुर असेच होते, पण त्यातील प्रत्येक शब्द आईच्या हृदयात बाणांच्या तीक्ष्ण टोकाप्रमाणे घरे पाडीत होता !

वर्षाऋतूतील थंड पाणी काटे धमाशावर (यवास) पडल्यानंतर ती झाडे जशी कोमेजतात तशीच प्रभूच्या या शीतल शब्दांनी कौसल्या घाबरून सुकून गेली ! अंतःकरणातील विषाद एवढा तीव्र होता की,



कहि न जाइ कछु हृदय बिषादू । मनहुँ मृगी सुनि केहरि नादू ॥
नयन सजल तन थर थर काँपी । माजहि खाइ मीन जनु मापी ॥
धरि धीरजु सुत बदनु निहारी । गदगद बचन कहति महतारी ॥
तात पितहि तुम्ह प्रानपिआरे । देखि मुदित नित चरित तुम्हारे ॥
राजु देन कहुँ सुभ दिन साधा । कहेउ जान बन केहिं अपराधा ॥
तात सुनावहु मोहि निदानू । को दिनकर कुल भयउ कृसानू ॥

दो०—निरखि राम रुख सचिवसुत कारनू कहेउ बुझाइ ।
सुनि प्रसंगु रहि मूक जिमि दसा बरनि नहिं जाइ ॥ ५४ ॥

चौ०—राखि न सकइ न कहि सक जाहू । दुहूँ भाँति उर दारुन दाहू ॥
लिखत सुधाकर गा लिखि राहू । बिधि गति बाम सदा सब काहू ॥
धरम सनेह उभयँ मति घेरी । भइ गति साँप छुछुंदरी केरी ॥
राखउँ सुतहि करउँ अनुरोधू । धरमु जाइ अरु बंधु बिरोधू ॥
कहउँ जान बन तौ बड़ि हानी । संकट सोच बिबस भइ रानी ॥
बहुरि समुझि तिय धरमु सयानी । रामु भरतु दोउ सुत सम जानी ॥
सरल सुभाउ राम महतारी । बोली बचन धीर धरि भारी ॥

त्याचे मुळीच वर्णन करवत नाही. हरिणीने सिंहगर्जनाच जणू काही ऐकली ! माशाच्या पोटात पावसाचे नवीन पाणी फेसासह गेले म्हणजे ते त्याला विषासारखे मारक ठरून तो धापा टाकू लागतो, त्याप्रमाणे, रामाचे शब्द ऐकताच कौसल्येचे नेत्रकमल अश्रूंनी डबडबले व तिचे कोमल शरीर थरथर कापू लागले ! असा काही काळ गेल्यावर आईने बराच धीर धरून, आपल्या बाळाचे मुख निरखून पाहिले; मोठ्या कष्टाने तिच्या सद्गदित कंठातून शब्द बाहेर पडू लागले,

"बाळा ! तू आपल्या पित्याला प्राणापेक्षाही प्रिय ! तुझे वागणे इतके चांगले की, त्यामुळे त्यांना नित्य नवा आनंद होतो. म्हणून तुला राज्याभिषेक करण्यासाठी त्यांनी शुभ दिवस ठरविला !—आणि असा कोणता भयंकर गुन्हा इतक्यात केलास की तुला ताबडतोब वनवासाची शिक्षा दिली !! माझ्या वासरा ! मला सांग रे, या सूर्यवंशाला आग लावायला कोण मूळ कारण झाले ?"

हा खुलासा रामचंद्राच्या मुखाने अशक्य ! म्हणून रामाचा कल ओळखून सचिवाच्या मुलाने सर्व हकीकत समजावून दिली. ती ऐकताच एखाद्या मुक्याप्रमाणे कौसल्या निश्चल झाली ! तिच्या त्यावेळच्या परिस्थितीचे वर्णन कसे करावे ? ५४.

अनेक उलट-सुलट विचारांनी तिच्या मस्तकात काहूर माजवले ! रामाने वनात जाण्यास आज्ञा मागितली; मग काय, त्याला जा म्हणू ? पण जाऊ नको, असे तरी आता मला कसे म्हणता येणार ? दोन्ही बाजूनी पेटलेली ही आग, आता शमवू तरी कशी ? ब्रह्मदेवाने आरंभ केला काढायला पूर्ण चंद्र, आणि काढून ठेवला मात्र राहू ! असा त्या विधात्याचा खेळ, नेहमीच सगळ्यांना सतावून सोडतो !!

साप आणि चिचुंदरीप्रमाणे (धरले तर चावते आणि सोडले तर पळते) धर्म एका बाजूस आणि पुत्रप्रेम दुसऱ्या बाजूस अशा रस्सीखेचीत कौसल्येची बुद्धी सापडली. तिला वाटले, आग्रह करून जर रामाला मी ठेवून घेतला तर एका बाजूला भाऊबंदकी ! मग त्याला वनात जा म्हणू ? तिकडूनही फार मोठी आपत्ती !

अशा चिंतेने आणि संकटपरंपरेच्या भयानक दृश्यांनी कौसल्या अगदी कासावीस झाली !

अखेर त्या विचारवंत राणीने दोन महत्त्वाच्या गोष्टीवर भर देण्याचे ठरविले. एक तिचा श्रेष्ठ पातिव्रत्यधर्म व दुसरी गोष्ट म्हणजे राम आणि भरत हे दोन्ही तिचे सारखेच पुत्र !

शेवटी त्या सरळ स्वभावाच्या राममातेने मोठ्या प्रयासाने बोलण्यास प्रारंभ केला.

तात जाउँ बलि कीन्हेहु नीका । पितु आयसु सब धरमक टीका ।।

दो ० –राजु देन कहि दीन्ह बनु मोहि न सो दुख लेसु ।
तुम्ह बिनु भरतहि भूपतिहि प्रजहि प्रचंड कलेसु ।। ५५ ।।

चौ ० –जौं केवल पितु आयसु ताता । तौ जनि जाहु जानि बड़ि माता ।।
जौं पितु मातु कहेउ बन जाना । तौ कानन सत अवध समाना ।।
पितु बनदेव मातु बनदेवी । खग मृग चरन सरोरुह सेवी ।।
अंतहुँ उचित नृपहि बनबासू । बय बिलोकि हियँ होइ हराँसू
बड़भागी बनु अवध अभागी । जो रघुबंसतिलक तुम्ह त्यागी ।।
जौं सुत कहौं संग मोहि लेहू । तुम्हरे हृदयँ होइ संदेहू ।।
पूत परम प्रिय तुम्ह सबही के । प्रान प्रान के जीवन जी के ।।
ते तुम्ह कहहु मातु बन जाउँ । मैं सुनि बचन बैठि पछिताऊँ ।।

दो०– यह बिचारि नहिं करउँ हठ झूठ सनेहु बढ़ाइ ।
मानि मातु कर नात बलि सुरति बिसरि जनि जाइ ।। ५६ ।।

चौ०– देव पितर सब तुम्हहि गोसाईं । राखहुँ पलक नयन की नाईं ।।
अवधि अंबु प्रिय परिजन मीना । तुम्ह करुनाकर धरम धुरीना ।।

" बाळा ! तू धन्य आहेस ! तू इष्ट तेच करत आहेस ! सर्व धर्मांत पित्राज्ञा-परिपालन हाच श्रेष्ठ धर्म होय ! तुला राज्य देण्याचे ठरवून वनवासाला पाठवले. त्यामुळे माझा जीव गोळा होत नाही; पण तुझ्या वियोगाने भरताला, भूपतीला आणि सर्व अयोध्यानगरीला जे दुःसह क्लेश होणार त्यामुळे माझ्या अंतःकरणाने ठाव सोडला आहे ! ५५

" म्हणून तुम्ही म्हणाला त्याप्रमाणे केवळ पित्याचीच वनगमनाला आज्ञा असती तर पित्यापेक्षा माता श्रेष्ठ असे जाणून तू वनाला जाऊ नको असे म्हटले असते पण सचिवपुत्राने सांगितल्याप्रमाणे आई व बाप दोघांचीही आज्ञा वनात जाण्याला झाली असेल तर शेकडो अयोध्याप्रमाणे वन समजावे. मग वनदेव हेच तुझे वडील होतील व वनदेवी ह्याच तुझ्यावर माताप्रमाणे प्रेम करतील. वनातील पशू आणि पक्षी हेच तुझ्या चरणांची सेवा करणारे तुझे सेवक ! राजानी शेवटी वृद्धापकाळी वनात जाऊन मुनिवृत्तीने राहाणे योग्यच ! पण तुझे सुकुमार वय पाहून हृदयाचे पाणी होते !

ज्या वनात तुम्ही जाल त्या वनाचा भाग्योदय झाला आणि ज्या पुरीचा रघुकुळ टिळकाचे पूर्णपणे त्याग केला ती अयोध्यानगरी अत्यंत दुर्दैवी झाली !

बाळा ! मला बरोबर घेऊन चल असा जर मी आग्रह धरला तर तुझ्या हृदयात संदेह निर्माण होईल की माझी माता पतिव्रत परायण नाही, हे मला माहीत आहे; म्हणून बाळ सर्वांचे तुम्ही अत्यंत प्रिय ! प्राणाला प्राण देणारे ! मी तसेही म्हणू शकत नाही व जीवाला जीवभावाला आणणारे असे तुम्ही ! आई वनात जातो असे म्हणता ! आणि ते ऐकून मला नुसते पश्चात्तापपूर्वक हृदयदाह सोसीतच बसणे भाग आहे.

खोटा स्नेह उराशी बाळगून याच विचाराने मी हट्ट करीत नाही ! पण अशा प्रकारे आपल्या बाळाला वनात जाण्यास परवानगी देणारी आई म्हणून मला विसरून मात्र जाऊ नकोस हं ! तू आपले आईचे नाते शिल्लक ठेव ! " ५६

" हे गोस्वामी ! पापण्या जशा डोळ्याना सांभाळतात, तसे सर्व देव आणि पितर तुमचे रक्षण करोत !

" चौदा वर्षांची मुदत हेच पाणी; त्याच्या आश्रयाने जीव शिल्लक ठेवून राहणारे तुमचे सर्व प्रिय जन माशासारखे आहेत ! तुम्ही दयेची खाण असून धर्माची धुरा वागवणारे आहात, हे ध्यानी धरून

अस बिचारि सोइ करहु उपाई । सबहि जिअत जेहिं भेंटहु आई ॥
जाहु सुखेन बनहि बलि जाऊँ । करि अनाथ जन परिजन गाऊँ ॥
सब कर आजु सुकृत फल बीता । भयउ कराल कालु बिपरीता ॥
बहुबिधि बिलपि चरन लपटानी । परम अभागिनि आपुहि जानी ॥
दारुन दुसह दाहु उर ब्यापा । बरनि न जाहिं बिलाप कलापा ॥
राम उठाइ मातु उर लाई । कहि मृदु बचन बहुरि समुझाई ॥

दो०– समाचार तेहि समय सुनि सीय उठी अकुलाइ ।
जाइ सासु पद कमल जुग बंदि बैठि सिरु नाइ ॥ ५७ ॥

चौ०– दीन्हि असीस सासु मृदु बानी । अति सुकुमारि देखि अकुलानी ॥
बैठि नमितमुख सोचति सीता । रूप रासि पति प्रेम पुनीता ॥
चलन चहत बन जीवन नाथू । केहि सुकृती सन होइहि साथू ॥
की तनु प्रान कि केवल प्राना । बिधि करतबु कछु जाइ न जाना ॥
चारु चरन नख लेखति धरनी । नूपुर मुखर मधुर कबि बरनी ॥
मनहुँ प्रेम बस बिनती करहीं । हमहि सीय पद जनि परिहरहीं ॥
मंजु बिलोचन मोचति बारी । बोली देखि राम महतारी ॥
तात सुनहु सिय अति सुकुमारी । सास ससुर परिजनहि पिआरी ॥

असा उपाय करा की, जेणे करून आम्ही सर्व जिवंत आहो तोपर्यंतच परत भेटावयास येऊ शकाल !

" आता माझ्या बाळावरून माझा देह कुरवंडून लिंबलोण करते ! जा, सुखाने वनात जा बरं ! आपल्या बांधवांना, परिजनाना आणि सगळ्या नगरीला अनाथ करून खुशाल जा !

" कठीण काळ विपरीत झाला ! आमची सर्वांची पुण्याईच आज संपली म्हणायची !"... इथे दुःखातिशयाने तिचे तोंड बंद झाले.

स्वतःला परम अभागिनी समजून कौसल्या खूप रडली आणि शेवटी तिने रामाचे पाय पकडले ! तिच्या हृदयात भयंकर दुःसह असा जो वणवा पेटला आणि तिने जे करुण रुदन केले, त्याचे वर्णन करवत नाही.

रामांनी तिला उठवून हृदयाशी धरले. कोमल शब्दांनी तिचे सांत्वन करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला.

याचवेळी सीतेच्या कानावर हे विषारी वृत्त गेले, त्याबरोबर ती कासावीस होऊनच कौसल्येच्या महालात उठून आली, तिने सासूच्या चरणकमळी वंदन केले आणि आज्ञा मिळाल्यानंतर ती मान खाली घालून बसली. ५७

सासूबाईनी कोमल वाणीने आशीर्वाद दिला व तिचे ते अत्यंत नाजुक शरीर पाहून ती पुनः गहिंवरली!

रूपाची खाण, पतीवर अत्यंत शुद्ध अंतःकरणाने उत्कट प्रेम करणारी अशी सीता खाली मान करून विचारमग्न झाली. ' आपल्या जीविताचे स्वामी वनात जाऊ इच्छितात. त्यांच्यासह जाण्याचे सुपुण्य कोणाचे ? शरीरासह प्राण जाणार की नुसते प्राणच पतिचरणाला अनुसरणार ? विधात्याने काय ठरवले आहे, कळत नाही ! '

—या विचाराच्या तंद्रीत आपल्या मनोहर चरणनखांनी तिने जमीन टोकरण्यास सुरुवात केली. त्यावेळी जानकीच्या पायातील नूपुरांचा मंजुल ध्वनी होऊ लागला !

तो आवाज कानी पडताच कवीला असे वाटले की, प्रेमविवश होऊन, ' या चरणांनी आमचा कधीच त्याग करू नये, ' अशी ते जणू काही सीतेला विनंतीच करीत राहिले आहेत !

(मंजुल) सीतेच्या मंजुल नेत्रातून अश्रूंचे थेंब टपाटपा पडत असलेले पाहून कौसल्या रामाला म्हणते, " बाळा ! पाहिलेस काय ? सासवा, सासरे व आप्त मंडळींना प्राणाहून प्रिय वाटणारी सीता किती कोमल आहे !

दो० — पिता जनक भूपाल मनि ससुर भानुकुल भानु ।
पति रविकुल कैरव बिपिन बिधु गुन रूप निधानु ॥ ५८ ॥

चौ० — मैं पुनि पुत्रबधू प्रिय पाई । रूप रासि गुन सील सुहाई ॥
नयन पुतरि करि प्रीति बढाई । राखेउँ प्रान जानकिहिं लाई ॥
कलपबेलि जिमि बहुबिधि लाली । सींचि सनेह सलिल प्रतिपाली ॥
फूलत फलत भयउ बिधि बामा । जानि न जाइ काह परिनामा ॥
पलँग पीठ तजि गोद हिंडोरा । सियँ न दीन्ह पगु अवनि कठोरा ॥
जिअन मूरि जिमि जोगवत रहऊँ । दीप बाति नहिं टारन कहउँ ॥
सोइ सिय चलन चहति बन साथा । आयसु काह होइ रघुनाथा ॥
चंद किरन रस रसिक चकोरी । रबि रुख नयन सकइ किमि जोरी ॥

दो० — करि केहरि निसिचर चरहिं दुष्ट जंतु बन भूरि ।
बिष बाटिकाँ कि सोह सुत सुभग सजीवनि मूरि ॥ ५९ ॥

चौ० — बन हित कोल किरात किसोरी । रचीं बिरंचि बिषय सुख भोरी ॥
पाहन कृमि जिमि कठिन सुभाऊ । तिन्हहि कलेसु न कानन काऊ ॥
कै तापस तिय कानन जोगू । जिन्ह तप हेतु तजा सब भोगू ॥
सिय बन बसिहि तात केहि भाँती । चित्रलिखित कपि देखि डेराती ॥

"हिचा बाप जनक, सर्व राजांचा मुगुटमणी. सासरा सूर्यकुलातील सूर्यच आहे; आणि पती तर सूर्य-कुलरूपी कैरवांना (चंद्रविकासिनी कमले) पूर्ण प्रफुल्ल करणारा, सद्‌गुण आणि सौंदर्य याचे भाण्डार असणारा पूर्ण चंद्रच आहे! ५८

"या वर केवळ रूपाची राशी, गुण व शीलात कोणाहीपेक्षा वर दर्जाची अशी माझ्या पुत्राची पत्नी म्हणून लाडकी सून मला लाभली आहे! म्हणून अगदी डोळ्यातील बाहुलीप्रमाणे तिला सांभाळून, आजपर्यंत वाढवली; आणि सर्व जीव तिच्यावर लावून ठेवला आहे. स्नेहाचे पाणी घालून, कल्पलतेप्रमाणे नानाप्रकारे तिचे लालनपालन केले आणि आता मात्र, ऐन फुला-फळाचा बहर येण्याच्या वेळी, दैव डावे झाले आहे! पुढे काय परिणाम होणार याची कल्पनाच करवत नाही.

"रामा! तुला काय सांगू रे! पाटावरून पलंगावर, पलंगावरून माझ्या मांडीवर, पुनः झोपाळ्यावर त्यानंतर मऊ आसनावर अशी तिला एखाद्या संजीवनीच्या मुळीसारखी काळजीपूर्वक जपत राहिले आहे, चुकूनसुद्धा कठीण जमिनीवर तिला पाय टेवू दिला नाही, की नुसती दिव्याची वात सारायलासुद्धा सांगितली नाही!!–अशी माझी सीता, रघुनाथा! तुझ्याबरोबर वनात जाऊ इच्छिते, काय तिला आज्ञा द्यायची? चंद्राच्या कोवळ्या किरणांचा सुधारस चाखणारी चकोरी, तिच्या डोळ्यांना प्रखर सूर्यकिरण कसे पाहावणार!

"अरण्यात काय, हत्ती, सिंह, राक्षस, एक ना दोन भयंकर प्राण्यांचा संचार! बाळा शोभिवंत संजीवनीचे सुकुमार रोपटे विषारी वृक्षांच्या वनात कसे खुलेल रे?" ५९.

"ज्यांना स्वप्नातसुद्धा सुख म्हणजे काय याची कल्पनाच नसते अशा भिल्ल कोळ्याच्या कन्यकांचे जीवन वनासाठी विरंचीने निर्माण केले आहे. दगडातील किडयाप्रमाणे जन्मतःच कठीण अशी त्यांची शरीरे असल्या-मुळे त्यांना वनात केव्हाच क्लेश होत नाहीत! किंवा तपस्येकरता सर्व भोगाना जिने तिलांजलीच दिली आहे, अशा तपस्विनीने वनवासाचे कष्ट सोसणे योग्य होईल! हे तात! नुसते चित्रातले माकड पाहून जी घाबरी होते, ती सीता वनात कशी राहाणार? रमणीय मानस सरोवरातील कमलवनात विहार करणारी हंसकन्यका घाणेरडया डबक्यात दम काढील काय?



चौ० — सुरसर सुभग बनज बन चारी । डाबर जोगु कि हंसकुमारी ॥
अस बिचारि जस आयसु होई । मैं सिख देउँ जानकिहि सोई ॥
जौं सिय भवन रहै कह अंबा । मोहि कहँ होइ बहुत अवलंबा ॥
सुनि रघुबीर मातु प्रिय बानी । सील सनेह सुधाँ जनु सानी ॥
दो० — कहि प्रिय बचन बिबेकमय कीन्हि मातु परितोष ।
लगे प्रबोधन जानकिहि प्रगटि बिपिन गुन दोष ॥ ६० ॥

मासपारायण, चौदहवाँ विश्राम

चौ० — मातु समीप कहत सकुचाहीं । बोले समउ समुझि मन माहीं ॥
राजकुमारि सिखावनु सुनहू । आन भाँति जियँ जनि कछु गुनहू ॥
आपन मोर नीक जौं चहहू । बचनु हमार मानि गृह रहहू ॥
आयसु मोर सासु सेवकाई । सब बिधि भामिनि भवन भलाई ॥
एहि ते अधिक धरमु नहिं दूजा । सादर सासु ससुर पद पूजा ॥
जब जब मातु करिहि सुधि मोरी । होइहि प्रेम बिकल मति भोरी ॥
तब तब तुम्ह कहि कथा पुरानी । सुंदरि समुझाएहु मृदु बानी ॥
कहउँ सुभायँ सपथ सत मोही । सुमुखि मातु हित राखउँ तोही ॥

" म्हणून या सगळ्या गोष्टी नीट ध्यानात घेऊन जशी तू तिच्यासाठी आज्ञा देशील तशी मी तिची समजूत करून तिला शिकवीन. ती जर घरात राहिली तर माझ्या जिवाला मोठा आधार होईल हेही तितकेच खरे आहे!"

याप्रमाणेच शील-स्नेहामृताच्या झऱ्याप्रमाणे सारखा ओघ वाहात असलेले आईचे प्रिय भाषण रघुवीराने ऐकले आणि विवेकपूर्ण अशी आपली विचारसरणी कौसल्येपुढे मांडून तिचे मातृहृदय संतुष्ट केले. त्यानंतर वनातील गुण-दोष स्पष्ट करून जानकीची समजूत घालण्यास प्रभूंनी सुरुवात केली. ६०

सीता-राम संवाद

आईच्या समोर बोलण्याचा हा पहिलाच प्रसंग ! त्यामुळे रघुवीरास लाज वाटत होती. तथापि आता इलाजच नसल्याने व त्या समयाला ते साजेल असे असल्याने विचारपूर्वक राम बोलू लागले !

" हे राजकुमारी ! मी सांगतो ते लक्षपूर्वक ऐका. भलतेच काहीतरी मनात धरून बसू नका. तुमचे व आमचे कल्याण व्हावे अशी जर इच्छा असेल तर आम्ही सांगतो म्हणून तुम्ही घरी राहा. त्यामुळे माझ्या आज्ञेचे पालन केल्याचे श्रेय तर मिळेलच, पण सासूचीही सेवा साधेल. एकंदरीत घरी राहिल्यामुळे हे भामिनी ! पुष्कळच चांगल्या गोष्टी साधणार आहेत. तसे पाहिले तर सासू आणि सासरा यांच्या सेवेपेक्षा आणखी दुसरा श्रेष्ठ धर्मच सुनेसाठी नाही ! ज्या ज्या वेळी माझी आठवण होऊन आई प्रेमाने व्याकुळ होईल, तिच्या बुद्धीचा तोल जाईल, त्या त्या वेळी हे सुंदरी ! तुमच्या मधुरवाणीने तिला पुराणातील कथा सांगून तुम्ही तिच्या दुःखाचा भार हलका करा. "

या निमित्ताने आपला त्यागच प्रभू करत आहेत, असे सीतेला वाटणार अशी साहजिक शंका येऊन मुद्दामच खुलासा केला. ते म्हणतात, " हे सुमुखी ! माझ्या गळ्याच्या शेकडो शपथा घेऊन तुला सांगतो, केवळ आईच्या करताच तुला घरी राहा असे मी प्रामाणिकपणे म्हणत आहे ! यांत कपट बिलकुल नाही.

दो०—गुर श्रुति संमत धरम फलु पाइअ बिनहिं कलेस।
हठ बस सब संकट सहे गालव नहुष नरेस ॥ ६१ ॥
चौ०—मैं पुनि करि प्रवान पितु बानी। बेगि फिरब सुनु सुमुखि सयानी॥
दिवस जात नहिं लागिहि बारा। सुंदरि सिखवनु सुनहु हमारा॥
जौं हठ करहु प्रेम बस बामा। तौ तुम्ह दुखु पाउब परिनामा॥
काननु कठिन भयंकरु भारी। घोर घामु हिम बारि बयारी॥
कुस संकट मग काँकर नाना। चलब पयादेहिं बिनु पदत्राना॥
चरन कमल मृदु मंजु तुम्हारे। मारग अगम भूमिधर भारे॥
कंदर खोह नदीं नद नारे। अगम अगाध न जाहिं निहारे॥
भालु बाघ बृक केहरि नागा। करहिं नाद सुनि धीरजु भागा॥
दो०—भूमि सयन बलकल बसन असनु कंद फल मूल।
ते कि सदा सब दिन मिलहिं सबुइ समय अनुकूल॥ ६२ ॥
चौ०—नर अहार रजनीचर चरहीं। कपट बेष बिधि कोटिक करहीं॥
लागइ अति पहार कर पानी। बिपिन बिपति नहिं जाइ बखानी॥

म्हणून माझ्या आज्ञेचे पालन करून तू घरी राहिल्याने आपले गुरु व वेद यांनी सांगितलेल्या धर्माचे आचरण केल्याचे पुण्य सहज तुझ्या पदरी पडेल. परंतु जर हट्ट केला तर काय होते ते, गालव* मुनी आणि नहुष× राजा यांनी भोगलेल्या असह्य संकटावरून सहज ध्यानी येते! ६१.

"पित्राज्ञापालन करून मी लवकर परत येईन. हे सुमुखी! तू शहाणी आहेस, म्हणूनच तुला हे सर्व समजावून सांगतो. हा आमच्या वनवासाचा काळ बोल बोल म्हणता जाईल, म्हणून हे सुंदरी! आमचे सांगणे ऐक. पण जर का प्रेमामुळे वेडा हट्ट केला तर परिणामी अनेक दुःखे भोगावी लागतील!

"वनातील दुःखांची तुम्हाला कल्पना नाही! भयंकर ऊन, कडाक्याची थंडी, मुसळधार पाऊस, सोसाट्याचा वारा, इत्यादि, कधीच नागरिकांना कल्पना येणार नाही, असे प्रकार वनात असतात! रस्त्यात दगड, गवत आणि काटे इतके असतात की, बोलायची सोय नाही, आणि त्यात पुनः पायात काही न घालता अनवाणी चालावे लागणार! तुमचे चरणकमल किती कोमल आणि सुंदर! दुर्धर डोंगरातून वाटा काढून चालणे महाकर्म कठीण! तसेच वाटेत किती दऱ्या, मोठमोठ्या गुहा, नद्या, मोठे नद आणि नाले ओलांडून जाणे दुष्करच, पण नुसते नजरेने बघणेसुद्धां भयंकर!

"शिवाय वाघ, अस्वले, लांडगे, हत्ती आणि सिंह यांच्या आरोळ्या कानी पडताच पाचावर धारण बसते! निजायला जमीन, वल्कलांचेच कपडे अंगावर, कंद, मूल-फल जेव्हा ज्या ठिकाणी मिळेल, तसले खायला! नाहीच मिळाले तर उपास!" ६२

"जिवंत माणसांना फाडून खाणारे राक्षस! ते नानाप्रकारच्या गुप्त वेषात फिरतात. डोंगरातील पाणी कोणत्या प्रकारचे पिण्याचा प्रसंग येईल, सांगता येत नाही. ते विषारी असण्याचाही संभव! वनातील आपत्तींचे वर्णन या वाणीने कोठवर करावे?

---

*गालव मुनी गुरुदक्षिणेचा गुरुजवळ हट—महाभारत उद्योगपर्व—राजा नहुष, इन्द्रपदी हंगामी नेमला असता, इन्द्राणीबद्दल त्याने हट्ट केल्याने तो अजगर होऊन पडला! म. भा. वनपर्व.

×नहुष :—एक राजा. पुरुरवसूचा पौत्र. आयु याचा पुत्र. ययाति पिता. काही काळ इंद्रपद मिळाले तेव्हा इन्द्रपत्नीचा अभिलाष केला. तिच्याकडे जाताना पालखीत बसून सप्तर्षींना तिचे वाहक केले. त्यांना पायाने डिवचून 'लवकर चला, लवकर चला सर्प-सर्प-सर्प' असे म्हणाला. त्याच्या उन्मत्तपणाबद्दल 'सर्प हो,' असा अगस्तींनी शाप दिला. 'अजगर' होऊन खाली पडला!

ब्याल कराल बिहग बन घोरा । निसिचर निकर नारि नर चोरा ।।
डरपहिं धीर गहन सुधि आएँ ।मृगलोचनि तुम्ह भीरु सुभाएँ ।।
हंसगवनि तुम्ह नहिं बन जोगू । सुनि अपजसु मोहि देइहि लोगू ।।
मानस सलिल सुधाँ प्रतिपाली । जिअइ कि लवन पयोधि मराली ।।
नव रसाल बन बिहरनसीला । सो कि कोकिल बिपिन करीला ।।
रहहु भवन अस हृदयँ बिचारी । चंदबदनि दुखु कानन भारी ।।

दो० – सहज सुहृद गुर स्वामि सिख जो न करइ सिर मानि ।
सो पछिताइ अघाइ उर अवसि होइ हित हानि ।। ६३ ।।

चौ० – सुनि मृदु बचन मनोहर पिय के । लोचन ललित भरे जल सिय के ।।
सीतल सिख दाहक भइ कैसें । चकइहि सरद चंद निसि जैसें ।।
उतरु न आव बिकल बैदेही । तजन चहत सुचि स्वामि सनेही ।।
बरबस रोकि बिलोचन बारी । धरि धीरजु उर अवनिकुमारी ।।
लागि सासु पग कह कर जोरी । छमबि देबि बड़ि अबिनय मोरी ।।
दीन्हि प्रानपति मोहि सिख सोई । जेहि बिधि मोर परम हित होई ।।
मैं पुनि समुझि दीखि मन माहीं । पिय बियोग सम दुखु जग नाहीं ।।

" अजस्र साप वाटेत पसरलेले असतात. अरण्यातील पक्षीसुद्धा भयंकरच ! राक्षसांच्या झुंडीच्या झुंडी स्त्रिया-आणि पुरुषांना खाण्याकरिता पळवून नेतात. अशा प्रकारच्या वनाचे दृश्य नुसते डोळ्यांसमोर आले तरी मी मी म्हणणारे लटलट कापू लागतात, आणि हे मृगलोचनी ! तुम्ही तर स्वभावाच्याच भित्र्या !

" हे हंसगामिनी ! तुम्हाला वनवास कधी तरी योग्य ठरेल काय ? ही गोष्ट नुसती कानी पडताच, लोक मला किती नावे ठेवतील ! मानस सरोवरातील अमृतोपम पाण्याने, जिचे पोषण झालेले आहे, अशी मराली (हंसिनी) खाऱ्या समुद्रात जर टाकली, तर ती जिवंत तरी राहील काय ? नवीन कोमल मोहोर आलेल्या आंबराईत, सुखाने विहार करणाऱ्या कोकिळेला, जर कारवी (पाने व फुले नसलेले एक प्रकारचे झाड) च्या अरण्यात नेऊन सोडली तर ते करणे कसे योग्य होणार ?

" हा सगळा दुःखांचा पसारा डोळ्यांपुढे आणून, हे चंद्रानने ! पूर्ण विचार कर आणि तू घरात राहण्याचेच ठरव ! स्वभावतःच तुमच्या कल्याणाचा विचार करणारे स्नेही गुरु व स्वामी यांचे हितकर वाक्य जे शिरसामान्य करीत नाहीत त्यांना नंतर पोटभर पश्चात्ताप करावा लागतो, कारण त्यांच्या हिताची हानी झाल्याशिवाय रहातच नाही ! " ६३

हे पतीचे मधुर व मनोहर भाषण ऐकून सीतेचे सुंदर नेत्र अश्रूंनी डबडबले ! शरदऋतूतील चांदणी रात्र ज्याप्रमाणे चक्रवाकीला रात्री असह्य ताप देते तशीच, या शीतल शब्दांनी सीतेची स्थिती झाली ! ती इतकी शोकाकुल झाली की तिच्या मुखातून बाहेर शब्दच उमटेना ! पवित्र अंतःकरणाचे व प्रेमळ असे आपले प्राणनाथ आपणाला सोडू इच्छितात या एकाच कल्पनेने ती हैराण झाली होती !

शेवटी त्या अवनिकुमारीने (पृथ्वीची कन्या) जुलमाने डोळ्यांतील पाणी आवरले. अंतःकरणात थोडा धीर धरण्याचा प्रयत्न केला आणि उठून प्रथम सासूबाईंच्या पायावर मस्तक नमवले. हात जोडून ती बोलण्याचा प्रयत्न करू लागली, "देवी ! या माझ्या मोठ्या धिटाईबद्दल मला क्षमा करावी. प्राणपतींनी मला आता जो उपदेश केला त्यात माझे परमहित होणार; परंतु विचार करता माझ्या मनाला मात्र असे वाटते की पतिवियोग सम विश्वी दुःख ना !

दो० – प्राननाथ करुनायतन सुंदर सुखद सुजान ।
तुम्ह बिनु रघुकुल कुमुद बिधु सुरपुर नरक समान ।। ६४ ।।

चौ० – मातु पिता भगिनी प्रिय भाई । पिय परिवारु सुहृद समुदाई ।।
सासु ससुर गुर सजन सहाई । सुत सुंदर सुसील सुखदाई ।।
जहँ लगि नाथ नेह अरु नाते । प्रिय बिनु तियहि तरनिहु ते ताते ।।
तनु धनु धाम धरनि पुर राजू । पति बिहीन सबु सोक समाजू ।।
भोग रोगसम भूषन भारू । जम जातना सरिस संसारू ।।
प्राननाथ तुम्ह बिनु जग माहीं । मो कहुँ सुखद कतहुँ कछु नाहीं ।।
जिय बिनु देह नदी बिनु बारी । तैसिअ नाथ पुरुष बिनु नारी ।।
नाथ सकल सुख साथ तुम्हारें । सरद बिमल बिधु बदनु निहारें ।।

दो० – खग मृग परिजन नगरु बनु बलकल बिमल दुकूल ।
नाथ साथ सुरसदन सम परनसाल सुख मूल ।। ६५ ।।

चौ० – बनदेवीं बनदेव उदारा । करिहहिं सासु ससुर सम सारा ।।
कुस किसलय साथरी सुहाई । प्रभु सँग मंजु मनोज तुराई ।।
कंद मूल फल अमिअ अहारू । अवध सौध सत सरिस पहारू ।।
छिनु छिनु प्रभु पद कमल बिलोकी । रहिहउँ मुदित दिवस जिमि कोकी ।।

" हे प्राणनाथ ! हे दयानिधे ! आपण जाणते आहात. सर्व प्रकारची सुखे हे सौंदर्यसागरा ! आपल्यामुळेच मला मिळणार ! रघुकुलरूपी कुमुदांना खुलविणाऱ्या पूर्णचंद्रा ! एकाच वाक्यात सांगू का ? आपणाशिवाय मला स्वर्गसुद्धा नरकाप्रमाणे यातनाच देणार ! " ६४

" आई बाप, प्रिय बंधुभगिनी, संबंधी सर्व सग्यासोयऱ्याचा परिवार, सासू-सासरा, गुरुजन व सहकारी सुशील, सुंदर, सुख देणारे असे मुलगे–नाथ ! पतिविरहानंतर हे सर्व स्नेह आणि ही सर्व नाती कोणत्याही सतीला सूर्याच्या चंडकिरणांपेक्षाहि अधिक तापदायकच होणार !

इतकेच काय, स्वतःचे शरीर, संपत्ती, घरदार जमीनजुमला, राज्य व सत्ता ही सर्व एका पतीवाचून सतीला शोकाची परमसीमाच होय ! अशावेळी तिला भोग हे रोगासारखे यातना देतात व भूषणे ही ओझ्यासारखी वाटतात. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे सर्व संसारच पतीच्या वियोगात यमपुरीतील यातनाप्रमाणे असह्य दुःखकारक होतो; म्हणून हे प्राणनाथ ! आपणाशिवाय या सर्व जगात मला कोणीही कसलेच देऊ सुख शकणार नाही !

" जिवावाचून देह आणि पाण्यावाचून जशी नदी, तशीच हे नाथ ! पुरुषावाचून त्याची पत्नी व्यर्थ होय ! याच्या उलट हे प्रभो ! आपल्या बरोबर येऊन, शरद् ऋतूतील स्वच्छ व पूर्ण चंद्राप्रमाणे आपले सुंदर मुख पाहात असता मला सर्वच सुखे प्राप्त होतील. मिळत आहेत. वन हेच माझे नगर बनेल, त्यातील पशु-पक्षी हाच माझा परिवार होईल, वल्कलेसुद्धा मला अगदी उंची रेशमी वस्त्राप्रमाणे सुखावह वाटतील, नाथ ! आपल्यासह पर्णकुटीतही मी स्वर्गसुखाची लूट करू शकेन ! ६५

" वनातील देव आणि देवता सदोदित अत्यंत उदार असल्यामुळे ते प्रत्यक्ष सासूसासऱ्याप्रमाणे माझा सांभाळ करतील. गवत आणि झाडांची कोवळी पाने, यांची बनवलेली सुंदर शय्या, प्रभूच्या सान्निध्यात कामदेवाच्या गाद्यांप्रमाणे मला सुखकर होईल. कंद, मूळ आणि फळे ही अमृताच्या स्वादिष्ट भोजनाची रुची देतील. मला वनातील पर्वतराजी अयोध्येतील सौधांच्या शतपट सुख देतील. चक्रवाकी ज्याप्रमाणे दिवसा चक्रवाकाबरोबर आनंदात असते, तसेच सुख मी प्रभुपदपद्मांचे क्षणोक्षणी दर्शन घेत असता लुटीन ! व अगदी प्रसन्न राहीन.



चौ० – बन दुख नाथ कहे बहुतेरे । भय बिषाद परिताप घनेरे ।।
प्रभु बियोग लवलेस समाना । सब मिलि होहिं न कृपानिधाना ।।
अस जियँ जानि सुजान सिरोमनि । लेइअ संग मोहि छाड़िअ जनि ।।
बिनती बहुत करौं का स्वामी । करुनामय उर अंतरजामी ।।

दो ० –राखिअ अवध जो अवधि लगि रहत न जनि अहिं प्रान ।
दीनबंधु सुंदर सुखद सील सनेह निधान ।। ६६ ।।

चौ ० –मोहि मग चलत न होइहि हारी । छिनु छिनु चरन सरोज निहारी ।।
सबहि भाँति पिय सेवा करिहौं । मारग जनित सकल श्रम हरिहौं ।।
पाय पखारि बैठि तरु छाहीं । करिहउँ बाउ मुदित मन माहीं ।।
श्रम कन सहित स्याम तनु देखें । कहँ दुख समउ प्रानपति पेखें ।।
सम महि तृन तरुपल्लव डासी । पाय पलोटिहि सब निसि दासी ।।
बार बार मृदु मूरति जोही । लागिहि तात बयारि न मोही ।।
मैं सुकुमारि नाथ बन जोगू । तुम्हहि उचित तप मो कहुँ भोगू ।।
को प्रभु सँग मोहि चितवनिहारा । सिंघबधुहि जिमि सकल सिआरा

दो ० –ऐसेउ बचन कठोर सुनि जौं न हृदउ बिलगान ।
तौ प्रभु बिषम बियोग दुख सहिहहिं पावँर प्रान ।। ६७ ।।

" नाथ ! आपण वनातील दुःखाची खूप मोठी यादी सांगितली, त्याचप्रमाणे वनवासातील भीती, विषाद, आणि संताप यांचीही सविस्तर माहिती दिली; परंतु हे कृपानिधे ! त्या सर्वांची बेरीज केल्यानंतरसुद्धा, प्रभु-वियोगदुःखाच्या पासंगासही ती पुरणार नाहीत ! जाणत्यातील सर्व श्रेष्ठ असे आपण असल्याने, ही माझ्या अंतःकरणाची स्थिती लक्षात घेऊन–हात जोडून प्रार्थना करते – मला बरोबर वनात न्या हो. नका टाकून जाऊ !

" हे स्वामी किती विनवणी करून सांगू ? तुम्ही करुणेचे सागर असून माझ्या मनाची बरोबर पारख करणारे आहात ! मला अयोध्येत मागे ठेवली तर चौदा वर्षें मी आपल्या वियोगाचे दुःख भोगत जिवंत राहीन, असे आपणाला तरी वाटते का ? आपण दीनबन्धु, सुंदर, सुखदायक आणि शील व प्रेमाचे भाण्डार आहात हे मात्र विसरू नये. माझी अगदी अगदी काळजी करू नका. घटके घटकेला आपल्या चरणांचे दर्शन मिळत राहिल्यामुळे चालताना वाटेत मला थकवा कसा तो येणारच नाही !

" वनात असता आपल्याला सुख होईल, अशी सर्व कामे तेव्हाच उरकीन. प्रवासामुळे आलेला आपला शिणवटा कसा झटकन् नाहीसा करीन. झाडाखाली बसून आपले पाय धुईन आणि मग आपणाला वारा घालत असता मला केवढा तरी आनंद होईल ! आपल्या श्यामल देहावर मोत्याप्रमाणे घामाचे बिंदू चमकू लागलेले पाहिल्यावर – माझ्या प्राणनाथाकडे त्या स्थितीत निरखून पाहात असता – माझे क्लेश कुठल्या कुठे भुरकन् उडून जातील ! चांगली सपाट अशी जमीन बघून तिच्यावर मऊ गवत आणि कोवळी पाने घालून ही दासी आपली शय्या सजवील, आणि सर्व रात्रभर पाय चेपत सुखाने बसेन. "

" ही सुकुमार मूर्ती पुनः पुन्हा पाहत असता मला ऊन आणि वारा यांचा त्रास होणे शक्य तरी आहे का ? सिंहिणीकडे ज्याप्रमाणे कोल्हा किंवा ससा पाहूच शकत नाही, त्याप्रमाणे आपण सन्निध असता –माझ्याकडे कोण आणि कसा पाहू शकेल ? मी तेवढी सुकुमार शरीराची आणि नाथ ! आपण काय, वनातील सर्व दुःखे सोसण्यास लायक होय ? वनात राहून आपण तपश्चर्या करण्यात काया कष्टवा, आणि मी राजवाड्यात राहून सुखोपभोग घेते ! ! असली वज्रप्रहार करणारी वाणी ऐकूनही जर अजून माझे हृदय फाटून जात नाही, तर प्रभुवियोगाचे दुःसह दुःख माझे नीच प्राण सहन करण्याचे प्रायश्चित्त भोगू देतच ! ! ६७

चौ ० –अस कहि सीय बिकल भइ भारी । बचन बियोगु न सकी सँभारी ।।
देखि दसा रघुपति जियँ जाना । हठि राखें नहिं राखिहि प्राना ।।
कहेउ कृपाल भानुकुलनाथा । परिहरि सोचु चलहु बन साथा ।।
नहिं बिषाद कर अवसरु आजू । बेगि करहु बन गवन समाजू ।।
कहि प्रिय बचन प्रिया समुझाई । लगे मातु पद आसिष पाई ।।
बेगि प्रजा दुख मेटब आई । जननी निठुर बिसरि जनि जाई ।
फिरिहि दसा बिधि बहुरि कि मोरी । देखिहउँ नयन मनोहर जोरी ।।
सुदिन सुघरी तात कब होइहि । जननी जिअत बदन बिधु जोइहि ।।

दो० –बहुरि बच्छ कहि लालु कहि रघुपति रघुबर तात ।
कबहि बोलाइ लगाइ हियँ हरषि निरखिहउँ गात ।। ६८ ।।

चौ० –लखि सनेह कातरि महतारी । बचनु न आव बिकल भइ भारी ।।
राम प्रबोधु कीन्ह बिधि नाना । समउ सनेहु न जाइ बखाना ।।
तब जानकी सासु पग लागी । सुनिअ माय मैं परम अभागी ।।
सेवा समय दैअँ बनु दीन्हा । मोर मनोरथु सफल न कीन्हा ।।
तजब छोभु जनि छाड़िअ छोहू । करमु कठिन कछु दोसु न मोहू ।।

हे शब्द सीतेच्या मुखावाटे बाहेर पडत असता तिच्या दुःखाला अनावर कढ आला! केवळ बोलण्यातला वियोगसुद्धा तिला एवढा असह्य झाला, यावरून रघुपतींनी जाणले की, आग्रहपूर्वक जर हिला मागे ठेवली तर ही खास प्राण ठेवणार नाही!

कृपाळू भानुकुलनाथ नंतर म्हणाले, "ठीक आहे! शोक पुरे करा आणि चला आमच्याबरोबर वनांत! आजची वेळ अधिक विषाद करत बसण्यासारखी नसल्यामुळे जाण्याची तयारी चटकन् करा."

याप्रमाणे आपल्या प्रिय पत्नीला प्रेमळ शब्दांनी शांत केले व आईच्या चरणी मस्तक नमवून आशीर्वाद घेतला.

"सर्व प्रजाजन, तुझ्या वियोगाने तडफडत राहणार म्हणून रामा! लवकर ये! या तुझ्या पाषाण-हृदयाच्या आईला मात्र विसरू नको बरं! हे विधात्या! माझ्या या दुर्दैवाचा कधी शेवट होईल का? ही नयन मनोहर जोडी पुनः माझ्या डोळ्यांना दिसेल का?

"ही तुझी आई जिवंत राहून तुझा मुखचंद्र बघेल तो सुदिन आणि ती सुवेळ, बाळ! आता केव्हा येईल रे?"—

कौसल्येच्या दुःखाने तिच्या हृदयाचा बांध फोडला. "हे वत्स! रघुपते! रघुवर! लाल! अशा हाका मारत! माझ्या बाळाला पोटाशी धरून, मी त्याचे शरीर आनंदाने कधी निरखीन, सांग ना!!" ६८

मातेच्या हृदयातील भावनांना भयंकर पूर येऊन, ती अत्यंत विव्हळ झाली. आई; तिच्या मुखावाटे शब्द उमटू शकत नाही, असे पाहून प्रभूंनी तिची किती परोपरीनी समजूत घातली, त्यावेळी माता आणि तिचे पाडस यांच्या परस्परांच्या आर्त प्रेमाने काय कहर करून सोडला, याचे कोणी वर्णन करावे?

मातेपासून राम दूर होताच जानकीने सासूबाईचे पाय धरून कळवळून प्रार्थना केली, "मातोश्री! मी केवढी अभागिनी आहे पाहा बरं! ज्या वेळी या चरणांची मी सेवा केली पाहिजे, त्याच समयाला दैवाने मला वनाचा रस्ता दाखवला! आजपर्यंत मी त्या सेवेचे केलेले माझे सगळे मनोरथ वाया गेले! म्हणून प्रार्थना करते, माझ्यावरचा राग सोडा, पण कृपा मात्र पण सोडू नका! दैवानेच भलता खेळ मांडला, मी तरी काय करू?"



सुनि सिय बचन सासु अकुलानी । दसा कवनि बिधि कहौं बखानी ॥
बारहिं बार लाइ उर लीन्ही । धरि धीरजु सिख आसिष दीन्ही ॥
अचल होउ अहिवातु तुम्हारा । जब लगि गंग जमुन जल धारा ॥

दो० — सीतहि सासु असीस सिख दीन्हि अनेक प्रकार ।
चली नाइ पद पदुम सिरु अति हित बारहिं बार ॥ ६९ ॥

चौ० — समाचार जब लछिमन पाए । ब्याकुल बिलख बदन उठि धाए ॥
कंप पुलक तन नयन सनीरा । गहे चरन अति प्रेम अधीरा ॥
कहि न सकत कछु चितवत ठाढ़े । मीनु दीन जनु जल तें काढ़े ॥
सोचु हृदयँ बिधि का होनिहारा । सबु सुखु सुकृतु सिरान हमारा ॥
मो कहुँ काह कहब रघुनाथा । रखिहहिं भवन कि लेहहिं साथा ॥
राम बिलोकि बंधु कर जोरें । देह गेह सब सन तृनु तोरें ॥
बोले बचनु राम नय नागर । सील सनेह सरल सुख सागर ॥
तात प्रेम बस जनि कदराहू । समुझि हृदयँ परिनाम उछाहू ॥

दो० — मातु पिता गुरु स्वामि सिख सिर धरि करहिं सुभायँ ।
लहेउ लाभु तिन्ह जनम कर नतरु जनमु जग जायँ ॥ ७० ॥

तळहातावरील फोडाप्रमाणे सांभाळलेल्या सुकुमार सुनेचे हे स्नेहमधुर शब्द ऐकून सासू किती व्याकुळ झाली व तिची काय दशा झाली, हे सांगण्यास योग्य शब्दच नाहीत ! तिला कौसल्येने पुनः पुन्हा हृदयाशी कवटाळली व शेवटी धीर धरून आशीर्वादपूर्वक चार उपदेशाचे शब्द सांगितले.

"बाळे ! गंगा आणि यमुना या नद्यांचे पाणी जोपर्यंत वाहात राहील, तोपर्यंत तुझे सौभाग्य अखंड स्थिर राहो !" असा राममातेने आपल्या सुनेला आशीर्वाद दिला. वारंवार आठवण होईल तशी जानकीला शिकवण देत कितीतरी वेळ राहिली ! शेवटी कौसल्येच्या पदकमली अत्यंत प्रेमाने पुन्हा शिर नमवून सीता निघाली. ६९.

श्रीराम-लक्ष्मण-संवाद

रामाच्या वनवासाची भयंकर बातमी लक्ष्मणाच्या कानावर जाताच ते शोकविव्हळ होऊन झटकन् उठले. त्यांचे मुखकमल सुकून गेले व ते धावतच सुटले !

त्यांचे सर्व शरीर रोमांचित होऊन त्याला कंप सुटला ! डोळ्यातून अश्रूंचा प्रवाह वाहू लागला. प्रेमाने ते अत्यंत अधीर झाले मुखांतून शब्दच बाहेर पडेना. प्रभूचे पाय धरून ते नुसते त्यांच्या मुखाकडे बघतच राहिले ! जणू काही पाण्यातून बाहेर काढून टाकलेला मासाच ! त्याच्या मनात विचार आला हाय रे दैवा ! हे काय केलेस ? आमचे सर्वच पुण्य आणि सुख एकदम कसे संपवलेस ? रघुनाथ मला काय सांगतील ? घरातच राहा म्हणतील का वनात ये म्हणतील ?

देह आणि घर याचे संबंध पार तोडून हात जोडून पुढे उभा राहिलेल्या बंधूकडे रामानी पाहिले तेव्हा नीतीमध्ये प्रवीण, शील, स्नेह, सरळपणा आणि सुख यांचा सागर असे प्रभू आपल्या बंधूला म्हणतात, "बाळ ! प्रेमाच्या भरात धीर सोडू नकोस ! या सर्वच घटनेचा शेवट आनंददायकच होईल हे मनात आण. आपले आई-बाप, गुरू आणि धनी यांची शिकवण जे स्वभावतःच अंतःकरणपूर्वक मान्य करतात तेच या जगात जन्मलाभ लुटतात आणि याच्या उलट वागणाऱ्यांचा जन्म व्यर्थ होतो ! ७०

चौ ० –अस जियँ जानि सुनहु सिख भाई । करहु मातु पितु पद सेवकाई ॥
भवन भरतु रिपुसूदनु नाहीं । राउ बृद्ध मम दुखु मन माहीं ॥
मैं बन जाउँ तुम्हहि लेइ साथा । होइ सबहि बिधि अवध अनाथा ॥
गुरु पितु मातु प्रजा परिवारू । सब कहुँ परइ दुसह दुख भारू ॥
रहहु करहु सब कर परितोषू । नतरु तात होइहि बड़ दोषू ॥
जासु राज प्रिय प्रजा दुखारी । सो नृप अवसि नरक अधिकारी ॥
रहहु तात असि नीति बिचारी । सुनत लखनु भए ब्याकुल भारी ॥
सिअरें बचन सूखि गए कैसें । परसत तुहिन तामरसु जैसें ॥

दो ० –उतरु न आवत प्रेम बस गहे चरन अकुलाइ ।
नाथ दासु मैं स्वामि तुम्ह तजहु त काह बसाइ ॥ ७१ ॥

चौ ० –दीन्हि मोहि सिख नीकि गोसाईं । लागि अगम अपनी कदराईं ॥
नरबर धीर धरम धुर धारी । निगम नीति कहुँ ते अधिकारी ॥
मैं सिसु प्रभु सनेहँ प्रतिपाला । मंदरु मेरु कि लेहिं मराला ॥
गुर पितु मातु न जानउँ काहू । कहउँ सुभाउ नाथ पतिआहू ॥
जहँ लगि जगत सनेह सगाई । प्रीति प्रतीति निगम निजु गाई ॥

" हे तत्त्व पुढे ठेवून भाऊराया ! मी काय सांगतो ते समजून घे. "

" माता आणि बाबा यांच्या चरणाची सेवा कर. घरात भरत-शत्रुघ्न नाहीत. राजांचे वय झाले असून, शिवाय माझ्या विरह दुःखाने ते व्याकूळ झाले आहेत. अशा स्थितीत जर मी तुम्हाला बरोबर घेऊन वनात गेलो तर सर्व अयोध्यानगरी सर्वस्वीच अनाथ होईल ना ! आपले गुरू, आईबाप, सर्व आप्तेष्ट आणि परिजन हे दुःसह दुःखाने हैराण होतील. म्हणून अशा प्रसंगी तुम्ही घरी राहून सर्वांचे सांत्वन करणे हेच श्रेष्ठ कर्तव्य ! असे जर केले नाही तर मात्र फारच मोठा दोष घडेल. ज्याच्या राज्यातील प्रेमळ प्रजा अत्यंत दुःखी राहते, तो राजा खरोखर नरकाचाच अधिकारी होतो ! ही राज्यनीती ध्यानात घेऊन, बाळा ! तू सर्वांच्या पालनासाठी घरी राहा. '

हिमवर्षाव शीतल असला तरी त्यामुळे कमळे पार सुकूनच जातात ना ? त्याप्रमाणे प्रभूचे शब्द जरी शीतल होते, तरी त्यांच्या श्रवणाने लक्ष्मण अधिकाधिक व्याकुळच होत राहिला ! मुखावाटे शब्दच निघेना; मग प्रभूना तो उत्तर कसले देणार ? फक्त अंतःकरणात प्रेमभावनेला ऊत येऊन तो कासावीस झाला; त्याने रामाचे पाय घट्ट धरले आणि मोठ्या कष्टाने तो बोलण्याचा प्रयत्न करू लागला.

" नाथ !. . . मी आपल्या चरणाचा दास ! –आपण माझे स्वामी ! तुम्हीच टाकले तर मग त्यावर उपाय काय ? " ७१

" हे गोस्वामी ! आपण मला योग्य अशीच शिकवण दिली. पण माझ्या भेदरटपणामुळे, त्याप्रमाणे वागणे मला कठीण वाटते. धैर्यशाली आणि धर्मधुरंधर असे जे नरवीर असतात, तेच आपण सांगितलेल्या नीतीचे व शास्त्राचे अधिकारी होत ! प्रभूच्या स्नेह-पयावर पोसलेले मी केवळ एक लेकरू. मराल (हंसबालक) कधी मेरू-मंदार पर्वत उचलू शकेल होय ? "

" हे स्वामिन् ! आपण माझ्या बोलण्यावर पूर्ण विश्वास ठेवा. मी अगदी खरी खरी वस्तुस्थिती आपणाला सांगतो. मला या जगात गुरु, बाप, आई यापैकी कोणीच माहीत नाहीत ! इतकेच काय, जगात जेवढे स्नेहामुळे संबंध निर्माण होतात, प्रेम किंवा विश्वास म्हणून ज्याचे प्रत्यक्ष वेदांनी वर्णन केले आहे,



मोरें सबइ एक तुम्ह स्वामी। दीनबंधु उर अंतरजामी ॥
धरम नीति उपदेसिय ताही। कीरति भूति सुगति प्रिय जाही ॥
मन क्रम बचन चरन रत होई। कृपासिंधु परिहरिअ कि सोई ॥

दो०—करुनासिंधु सुबंधु के सुनि मृदु बचन बिनीत।
समुझाए उर लाइ प्रभु जानि सनेहँ सभीत ॥ ७२ ॥

चौ०—मागहु बिदा मातु सन जाई। आवहु बेगि चलहु बन भाई ॥
मुदित भए सुनि रघुबर बानी। भयउ लाभ बड़ गइ बड़ि हानी ॥
हरषित हृदयँ मातु पहिं आए। मनहुँ अंध फिरि लोचन पाए ॥
जाइ जननि पग नायउ माथा। मनु रघुनंदन जानकि साथा ॥
पूँछे मातु मलिन मन देखी। लखन कही सब कथा बिसेषी ॥
गई सहमि सुनि बचन कठोरा। मृगी देखि दव जनु चहु ओरा ॥
लखन लखेउ भा अनरथ आजू। एहिं सनेह बस करब अकाजू ॥
मागत बिदा सभय सकुचाहीं। जाइ संग बिधि कहिहि कि नाहीं ॥

दो०—समुझि सुमित्राँ राम सिय रूप सुसीलु सुभाउ।
नृप सनेहु लखि धुनेउ सिरु पापिनि दीन्ह कुदाउ ॥ ७३ ॥

—हे नाथ! हे दीनबंधो! हे सर्वांच्या हृदयातील भावना जाणणाऱ्या प्रभो! माझे ते सर्व संबंध आणि ती सर्व नाती केवळ आपणच आहात!!"

"ज्याला कीर्ती, ऐश्वर्य व सद्गती यांची आकांक्षा असेल, त्याला धर्मनीतीचे पालन कसे करावे ते शिकवले पाहिजे. परंतु मनाने, देहाने आणि वाणीने जो आपल्या पायी रत झाला, त्याचा हे दयासागरा! त्याग करणार काय?"

करुणेचे समुद्र अशा रामचंद्रानी आपल्या सुशील बंधूचे ते कोमल आणि नम्र असे भाषण ऐकले; व प्रेमाकुल होऊन तो घाबरला आहे, हे जाणून त्यांनी त्याला ओढून प्रथम हृदयाशी कवटाळले. ७२

शांतपणे समजूत घालून अखेर सांगितले, "भाऊ! आपल्या आईचा निरोप घेऊन लवकर ये; आणि चल आमच्याबरोबर वनात."

लक्ष्मण-सुमित्रा-भेट

रघुवराची ही आज्ञा कानी पडताच, केवढा आनंद लक्ष्मणाला झाला! त्याला सर्वश्रेष्ठ लाभ झाला! मोठी आपत्ती टळली! आंधळ्याला पुनः डोळे मिळाल्याप्रमाणे हर्ष होऊन, तो मोठ्या उत्साहाने सुमित्रेकडे आला. येताच त्याने आपले मस्तक आईच्या पायावर ठेवले, पण मन मात्र रघुनंदन-जानकीजवळच होते.

मुलाचा उदास चेहेरा पाहून, मातेने कारणाची चौकशी केली व लक्ष्मणाने सर्व भयंकर घटना थोडक्यात तिला सांगितली. चारी बाजूनी दावाग्नी भडकून मध्ये सापडलेल्या हरिणीप्रमाणे तिची मनःस्थिती झाली. तिची ती शोकार्त स्थिती पाहून लक्ष्मण पुनः घाबरला. त्याला वाटले, हे एक दुसरेच संकट उत्पन्न झाले. ही एखाद्या वेळी प्रेमविवश होऊन माझ्या वनगमनाला अडचण निर्माण करते काय कोण जाणे! त्यामुळे तिची परवानगी मागण्यास लक्ष्मणास धीर होईना. 'रामाबरोबर वनात जा हं,' असे म्हणाली तर ठीक, आणि नकोच म्हणाली तर? या विचाराने तो बुचकळ्यात पडला!

श्रीराम आणि सीता याचे, अलौकिक सौंदर्य, आदर्श शील व सर्वांना आवडणारा स्वभाव जेव्हा सुमित्रेच्या मनात आला; तसेच त्यांच्यावरील राजाचे अत्यंत उत्कट प्रेम तिच्या डोळ्यासमोर ज्यावेळी उभे राहिले तेव्हा तिने दुःखातिरेकाने आपले मस्तक बडवून घेतले व म्हणाली, "पापिणीने कसा रेऽघात केला!" ७३

चौ० –धीरजु धरेउ कुअवसर जानी । सहज सुहृद बोली मृदु बानी ॥
तात तुम्हारि मातु बैदेही । पिता रामु सब भाँति सनेही ॥
अवध तहाँ जहँ राम निवासू । तहँइँ दिवसु जहँ भानु प्रकासू ॥
जौं पै सीय रामु बन जाहीं । अवध तुम्हार काजु कछु नाहीं ॥
गुर पितु मातु बंधु सुर साईं । सेइअहिं सकल प्रान की नाईं ॥
रामु प्रानप्रिय जीवन जी के । स्वारथ रहित सखा सबही के ॥
पूजनीय प्रिय परम जहाँ तें । सब मानिअहिं राम के नातें ॥
अस जियँ जानि संग बन जाहु । लेहु तात जग जीवन लाहू ॥

दो० –भूरि भाग भाजनु भयहु मोहि समेत बलि जाउँ ।
जौं तुम्हरें मन छाड़ि छलु कीन्ह राम पद ठाउँ ॥ ७४ ॥

चौ० –पुत्रवती जुबती जग सोई । रघुपति भगतु जासु सुतु होई ॥
नतरु बाँझ भलि बादि बिआनी । राम बिमुख सुत तें हित जानी ॥
तुम्हरेहिं भाग रामु बन जाहीं । दूसर हेतु तात कछु नाहीं ॥
सकल सुकृत कर बड़ फलु एहू । राम सीय पद सहज सनेहू ॥
रागु रोषु इरिषा मदु मोहू । जनि सपनेहुँ इन्ह के बस होहू ॥
सकल प्रकार बिकार बिहाई । मन क्रम बचन करेहु सेवकाई ॥

तथापि लक्ष्मणमाता जात्याच विचारवंत असल्यामुळे, तिने शोक करण्याला ती वेळ अयोग्य आहे, हे जाणले. धीर धरला. जन्मापासूनच आपल्या पुत्राच्या खऱ्या कल्याणाची तिला ग्वूण पटलेली होती. अशा स्थितीत आता तो रामाबरोबर वनवासात जावयास निघालेला पाहून, तिचे मातृहृदय उचंबळून येऊन बोलके झाले. "बाळा ! तुझी आता माता वैदेही ! तुझ्यावर सर्वस्वी प्रेम करणारे तुझे वडील आता रामच ! जेथे सूर्याचा प्रकाश तेथेच दिवस या न्यायाने, रामाच्या वास्तव्याचे जे ठिकाण, तीच तुझी अयोध्यानगरी ! सीता आणि राम जर वनात निघाले, तर तुझे अयोध्येत कामच काय उरले ?

"गुरू, पिता, माता, भावंडे, देवता आणि धनी –या सर्वांची सेवा आपल्या प्राणाप्रमाणे वस्तुतः केली पाहिजे. परंतु श्रीरामचंद्र तर प्राणापेक्षाही प्रिय आहे. अखिल प्राणिमात्रांचे तोच जीवन आहे आणि सर्वांचा स्वार्थरहित तोच सखा आहे. म्हणून, या जगात जे जे पूजनीय आणि परमप्रिय लोक आहेत, ते सर्व रामचंद्राच्या नात्यानेच पूज्य व प्रिय मानणे योग्य आहे. हा सिद्धान्त हृत्पटलावर कोरून ठेव आणि खुशाल रामाबरोबर वनात जा. माझ्या बाळा ! जिवाचे सार्थक करून घेण्याची तुला आलेली ही सुवर्णसंधी मुळीच गमावू नकोस !

"माझ्यासह तू परम भाग्यवान् बनला आहेस ! वत्सा ! सर्व इडापिडा टळो ! हा देहच आता तुझ्यावरून ओवाळून टाकते ! तू खरोखर धन्य आहेस ! कारण तुझे मन, सर्व कपटांचा त्याग करून रामचरणी रंगले आहे हे मी जाणले आहे." ७४

"या जगात, जिचा पुत्र रघुपतिभक्त झाला, तीच खरी पुत्रवती –युवती ! नाहीतर, रामविमुख पुत्राला आपला हितकर समजणारी स्त्री वांझ असलेलीच बरी ! कारण तिची प्रसूती पशूहूनही व्यर्थ होय ! तुझ्या भाग्योदयासाठीच ताता ! राम वनात जात आहेत. मला तर दुसरे काहीच कारण दिसत नाही ! सगळ्या पुण्यकर्मांचे सर्वश्रेष्ठ फळ एकच आणि ते म्हणजे राम आणि सीता यांच्या चरणी अकृत्रिम प्रेम ! म्हणून तुला सांगून ठेवते; लोभ, मोह, मद, मत्सर, क्रोध इत्यादि दोषांना स्वप्नातसुद्धा वश होऊ नकोस. हे सर्व विचार सावधानतेने दूर ठेवून, मनाने, देहाने व वाणीने सेवा कर.

तुम्ह कहुँ बन सब भाँति सुपासू । सँग पित मातु रामु सिय जासू ।।
जेहिं न रामु बन लहहिं कलेसू । सुत सोई करेहु इहइ उपदेसू ।।
छं० – उपदेसु यहु जेहिं तात तुम्हरे राम सिय सुख पावहीं ।
पितु मातु प्रिय परिवार पुर सुख सुरति बन बिसरावहीं ।।
तुलसी प्रभुहि सिख देइ आयसु दीन्ह पुनि आसिष दई ।।
रति होउ अबिरल अमल सिय रघुबीर पद नित नित नई ।।
सो० – मातु चरन सिरु नाइ चले तुरत संकित हृदयँ ।
बागुर बिषम तोराइ मनहुँ भाग मृगु भाग बस ।। ७५ ।।
चौ० – गए लखनु जहँ जानकिनाथू । भे मन मुदित पाइ प्रिय साथू ।।
बंदि राम सिय चरन सुहाए । चले संग नृपमंदिर आए ।।
कहहिं परसपर पुर नर नारी । भलि बनाइ बिधि बात बिगारी ।।
तन कृस मन दुखु बदन मलीने । बिकल मनहुँ माखी मधु छीने ।।
कर मीजहिं सिरु धुनि पछिताहीं । जनु बिनु पंख बिहग अकुलाहीं ।।
भइ बड़ि भीर भूप दरबारा । बरनि न जाइ बिषादु अपारा ।।

" तुझी काळजी मला मुळीच नाही, कारण ज्याच्याबरोबर सीताराम हे माय-बाप आहेत, त्याला वनातसुद्धा सर्व सुखे सुलभ होणारच ! पण वनात रामाला तिळमात्र क्लेश पडता कामा नयेत असा वाग हो ! हाच माझा तुला मुख्य उपदेश आहे.

" माझे मुख्य सांगणे एवढे की, तू रामाबरोबर असल्यामुळे रामाला आणि सीतेला वनात सुख व्हावे असेच तुझे वागणे असू दे. तसेच आपले प्रिय आई, बाप, आप्तइष्ट, नगरवासी या सर्वांच्या सुखाचा वनात आहेस तोपर्यंत त्याना विसर पडेल असा तू वाग."

याप्रमाणे माझ्या प्रभूला तुलसीदास लक्ष्मणासही आपले प्रभूच समजतात. सुमित्रेने लक्ष्मणाला उपदेश करून, वनगमनास परवानगी दिली. व शेवटी तिने आशीर्वाद दिला, " बाळा ! सीता व राम यांच्या चरणी तुझे निर्मल महान व गाढ (निष्काम व अनन्य) म्हणजे निःसीम प्रेम नित्य नवे वृद्धिंगत होवो.

आईच्या चरणी मस्तक विनम्र करून, मनातल्या मनातल्या मनात बिचकतच (आता आणि दुसरे कोणते विघ्न न येवो या भावनेने) जाळ्यातून, भाग्याने सुटलेल्या एखाद्या हरिणाप्रमाणे, अत्यंत वेगाने स्वारी निघाली ! ७५ (उर्मिला अत्यंत श्रेष्ठ त्यागी पतिव्रता –साकेत किंवा च. पहा.)

–विपिन गमन–

श्रीजानकीनाथ जेथे होते तेथे येऊन पोचल्यावर, आपणाला पाहिजे ती प्रिय संगती मिळाल्यामुळे, लक्ष्मणाला मनात मोठाच हर्ष झाला ! आल्याबरोबर सीता-रामाच्या सुंदर चरणकमली वंदन करून, त्याच्यासह तो राजमंदिराकडे निघाला.

वाटेत त्यांना जाताना पाहून नागरिक स्त्री-पुरुषांची आपसात भाष्ये सुरू होती. " विधात्याने सर्व घडी उत्तम बसवून ऐनवेळी विस्कटून टाकली ! " सर्वांची शरीरे नित्राण, मने दुःखी व तोंडे कोमेजलेली दिसत होती. पोळ्यातील मध पळवल्यावर जशी मधमाशांची केविलवाणी स्थिती होते, तशीच यावेळी सर्व अयोध्यावासीयांची झाली ! पंख उपटून नेल्यामुळे जसे पक्षी तडफडावे, तसे सर्व स्त्री-पुरुष हात चोळत, डोके बडवून घेत व आक्रोश करीत असलेले नगरीत सर्वत्र दिसत होते. या सर्व शोकनदीचे मुख जणू काही राजद्वार बनले होते. तेथे ती अनेक फाट्यांनी येऊन आतील करुणसागराला मिळत होती ! त्यामुळे त्या विषादाचे वर्णन कसे होणार ?

सचिवँ उठाइ राउ बैठारे । कहि प्रिय बचन रामु पगु धारे ।।
सिय समेत दोउ तनय निहारी । ब्याकुल भयउ भूमिपति भारी ।।
दो० – सीय सहित सुत सुभग दोउ देखि देखि अकुलाइ ।
बारहि बार सनेह बस राउ लेइ उर लाइ ।। ७६ ।।
चौ० – सकइ न बोलि बिकल नरनाहू । सोक जनित उर दारुन दाहू ।।
नाइ सीसु पद अति अनुरागा । उठि रघुबीर बिदा तब मागा ।।
पितु असीस आयसु मोहि दीजै । हरष समय बिसमउ कत कीजै ।।
तात किएँ प्रिय प्रेम प्रमादू । जसु जग जाइ होइ अपबादू ।।
सुनि सनेह बस उठि नरनाहाँ । बैठारे रघुपति गहि बाहाँ ।।
सुनहु तात तुम्ह कहुँ मुनि कहहीं । रामु चराचर नायक अहहीं ।।
सुभ अरु असुभ करम अनुहारी । ईसु देइ फलु हृदयँ बिचारी ।।
करइ जो करम पाव फल सोई । निगम नीति असि कह सबु कोई ।।
दो ० –औरु करै अपराधु कोउ और पाव फल भोगु ।
अति बिचित्र भगवंत गति को जग जानै जोगु ।। ७७ ।।
चौ ०– रायँ राम राखन हित लागी । बहुत उपाय किए छलु त्यागी ।।
लखी राम रुख रहत न जाने । धरम धुरंधर धीर सयाने ।।

नृपसन्निध प्रभू आल्याबरोबर सचिवाने 'राम आले' हे प्रिय शब्द उच्चारून भूपतींना उठवून बसवले. सीतेसह ती सुंदर पुत्रांची जोडी पाहून, भूमिपती फारच शोक विव्हल झाले. राजाने त्यांच्याकडे पाहावे, जवळ घेऊन दृढ मिठी मारावी, पुनः पाहावे, पुनः भेटावे आणि व्याकुळ व्हावे, एवढेच करणे, काही काळ दशरथराजाना शक्य झाले ! ७६

कारण शोकामुळे हृदयात आगच एवढी भडकली होती की, शब्द न बोलता महाराज नुसते विव्हळत होते ! !

हा प्रकार आता केव्हा तरी थांबवणे भाग आहे, हे जाणून रघुवीरांनी अत्यंत प्रेम भराने चरणांवर मस्तक ठेवून ते उठले; आणि हात जोडून आज्ञा मागितली, " बाबा ! आशीर्वादपूर्वक आज्ञा द्यावी. खरोखर आनंदाच्या वेळी विषाद करण्याचे काय कारण ? प्रिय असणाऱ्या व्यक्तीच्या प्रेमाला वश होऊन, जेव्हा मनुष्य कर्तव्यपराङ्मुख होतो, तेव्हा त्याच्या यशाचा नाश होऊन जग त्याला अपवाद देऊ लागते. "

हे ऐकून, प्रेमविवश दशरथराजे उठले, त्यांनी रघुपतींचे हात धरून त्यांना बसवून घेतले; आणि बोलण्यास सुरुवात केली.–

" हे तात ! ऐका. तुमच्या श्रेष्ठ मुनींचे असे मत आहे की, राम हे चराचराचे स्वामी आहेत. शुभ आणि अशुभ जसे कर्म असेल, त्याप्रमाणे तो स्वामी हृदयात विचार करून फळ देतो. जो कर्म करतो त्यालाच त्याच्या कर्मांचे फळ भोगावे लागते. हीच वेदांनी सांगितलेली नीति असल्याचे सर्वांचे म्हणणे आहे.

असा हा सिद्धान्त असतांना यावेळी ही विपरीत घटना का घडत आहे ? कोणी एक अपराध करून बसला आहे आणि त्या अपराधाची शिक्षा मात्र भोगण्याचे दुसऱ्याच्या नशिबी आले आहे. हे कसे ? असा प्रश्न रामाला दशरथांनी मोठ्या विचाराने विचारला. पण त्यावर रामचंद्रांनी मार्मिक उत्तर दिले. भगवंताची लीला अत्यंत विचित्र आहे, ती जाणण्याची लायकी या जगात कोणाची आहे ? ७७ (शिवाय " कर्मणो गहना गतिः " हा सिद्धान्त आहेच.)

याप्रमाणे आडपडदा न ठेवता राजाने रामाला घरी ठेवून घेण्यासाठी शिकस्तीचे उपाय केले. धर्मधुरंधर, धैर्यशाली आणि जाणते असे राम राहू शकत नाहीत, असा त्यांचा कल समजल्यानंतर महाराजांनी सीतेला



तब नृप सीय लाइ उर लीन्ही । अति हित बहुत भाँति सिख दीन्ही ।।
कहि बन के दुख दुसह सुनाए । सासु ससुर पितु सुख समुझाए ।।
सिय मनु राम चरन अनुरागा । घरु न सुगमु बनु बिषमु न लागा ।।
औरउ सबहिं सीय समुझाई । कहि कहि बिपिन बिपति अधिकाई ।।
सचिव नारि गुर नारि सयानी । सहित सनेह कहहिं मृदु बानी ।।
तुम्ह कहुँ तौ न दीन्ह बनबासू । करहु जो कहहिं ससुर गुर सासू ।।

दो० —सिख सीतलि हित मधुर मृदु सुनि सीतहि न सोहानि ।
सरद चंद चंदिनि लगत जनु चकई अकुलानि ।। ७८ ।।

चौ० —सीय सकुच बस उतरु न देई । सो सुनि तमकि उठी कैकेई ।।
मुनि पट भूषन भाजन आनी । आगें धरि बोली मृदु बानी ।।
नृपहि प्रानप्रिय तुम्ह रघुबीरा । सील सनेह न छाड़िहि भीरा ।।
सुकृतु सुजसु परलोकु नसाऊ । तुम्हहि जान बन कहिहि न काऊ ।।
अस बिचारि सोइ करहु जो भावा । राम जननि सिख सुनि सुखु पावा ।।
भूपहि बचन बानसम लागे । करहिं न प्रान पयान अभागे ।।

जवळ घेऊन विनवण्यास सुरवात केली. अत्यंत स्नेहभावाने तिला पुष्कळ उपदेश केला. वनातील दुःसह अशी पुष्कळ दुःखे सांगितली. सासू-सासरा आणि माहेरी वडिलांच्या जवळ राहाण्यात सुख (वनवासाच्या दुःखापेक्षा) आहे त्याचे वर्णन केले !

परंतु सीतेचे मन, श्रीरामचंद्राच्या चरणी जडले असल्यामुळे, तिला घराचे सुखही पटले नाही व वनाच्या दुःखाची भीतीही वाटली नाही!

[illegible] या प्रयत्नास (सीतेला परावृत्त करण्याच्या) इतर सर्व मंडळींनी साथ दिली व सीतेला वनवास दुःखे पुनः पुन्हा सांगून तिची समजूत पाडण्याचा प्रयत्न केला. मंत्री सुमंत्राची पत्नी, गुरू वसिष्टांची स्त्री, अरुंधती आणि इतरही चतुर स्त्रियानी आपल्या प्रेमपूर्ण मधुरवाणीने सांगितले की, तुला काही राजाने वनवासाला पाठवले नाही मग, सासरे, गुरू आणि सासू यांची सर्वांची जी एकच आज्ञा आहे, तिचेच पालन करणे तुझे कर्तव्य आहे.

शरदृऋतूतील पूर्ण चंद्राचे शीतल चांदणेही, चक्रवाकीला संतापजनकच ठरते, तशीच ही प्रेमळ, मधुर आणि कोमल शिकवण ऐकून सीता व्याकुळ झाली ! ७८

इतकी वडील मंडळी सांगत असता आपण त्यांची शिकवण ऐकू शकत नाही व त्यांच्यापुढे काही बोलूही शकत नाही, या अडचणीमुळे सीतेला फार संकोच झाला.

तिच्या मुखावाटे शब्द निघेना, हे पाहून कैकेयी फणकाऱ्याने उठली ! वनवासात उपयुक्त अशी वल्कले, माळा कमंडलू इत्यादि वस्तू तिने आणल्या, त्या रामापुढे ठेवल्या आणि मोठ्या गोड शब्दात म्हणते,

" हे रघुवीरा ! नृपाला तुम्ही प्राणप्रिय आहा, ते प्रेमाला वश झाल्यामुळे त्याचे मन कमकुवत झाले आहे. त्यांचा स्नेहच एवढा मोठा स्वाभाविक आहे की, सर्व पुण्याई; सत्कीर्ती, परलोक यांचा पूर्णपणे जरी नाश झाला तरीही ते तुम्हाला आपल्या मुखाने वनात जा, असे कधीही सांगणार नाहीत. तुम्हीच आता मी सांगितले याचा विचार करून तुम्हाला आवडेल ते करा."

एवढी जननीची वाणी कानी पडताच आपले कोडे सुटल्याचे प्रभूंना समाधान वाटले ! पण तेच शब्द राजाच्या हृदयात मात्र बाणासारखे घुसले. त्यांना असे वाटले की, हे शब्द कानी पडताच प्राणांनी हा देहच

लोग बिकल मुरुछित नरनाहू । काह करिअ कछु सूझ न काहू ।।
रामु तुरत मुनि बेषु बनाई । चले जनक जननिहि सिरु नाई ।।

दो ० –सजि बन साजु समाजु सबु बनिता बंधु समेत ।
बंदि बिप्र गुर चरन प्रभु चले करि सबहि अचेत ।। ७९ ।।

चौ ० –निकसि बसिष्ठ द्वार भए ठाढ़े । देखे लोग बिरह दव दाढ़े ।।
कहि प्रिय बचन सकल समुझाए । बिप्र बृंद रघुबीर बोलाए
गुर सन कहि बरषासन दीन्हे । आदर दान·बिनय बस कीन्हे ।।
जाचक दान मान संतोषे । मीत पुनीत प्रेम परितोषे ।।
दासीं दास बोलाइ बहोरी । गुरहि सौंपि बोले कर जोरी ।।
सब कै सार सँभार गोसाईं । करबि जनक जननी की नाईं ।।
बारहिं बार जोरि जुग पानी । कहत रामु सब सन मृदु बानी ।।
सोइ सब भाँति मोर हितकारी । जेहि तें रहै भुआल सुखारी ।।

दो ० –मातु सकल मोरे बिरहँ जेहिं न होहिं दुख दीन ।
सोइ उपाउ तुम्ह करेहु सब पुर जन परम प्रबीन ।। ८० ।।

चौ ० –एहि बिधि राम सबहि समुझावा । गुर पद पदुम हरषि सिर नावा ।।
गनपति गौरि गिरीसु मनाई । चले असीस पाइ रघुराई ।।

सोडून जावयास पाहिजे होते. पण ते कसचे जातात, त्यांचे दुर्भाग्यच तेवढे मोठे आहेना ? सर्व मंडळी व्याकूळ झाली. राजाला जबर घेरी आली. आता पुढे काय करावे, हे कोणासच काही सुचेना !

रामांनी झटकन् मुनिवेष केला. जनक आणि जननी कैकेयी यांना वंदन करून ते जल्दीने तेथून निघाले. सीता व लक्ष्मण यांच्यासह वनवासाचा पोषाख केला व जरूर ते सामान बरोबर घेऊन विप्र व गुरुवसिष्ट यांना प्रणाम केले आणि सर्व जनतेचे देहभान नष्ट करून प्रभू चालू लागले. ७९

राजदारातून निघाल्यानंतर सरळ वसिष्ट आश्रम त्यांनी गांठला, आणि त्यांच्या द्वारात ते थांबले. सर्व अयोध्यावासी जनतेचा अफाट समूह विरहानलाने जळून गेल्याप्रमाणे त्यांना तेथे दिसला ! मधुर भाषण करून त्यांनी सर्वांची समजूत करण्याचा प्रयत्न केला. विप्रमंडळींना बोलावून आणवले. वसिष्ठांच्या हस्ते त्यांना वर्षासने नेमून दिली. विनयपूर्वक त्यांना सन्मान व दाने देऊन त्यांचे मन वळवले व त्यांचा निरोप घेतला. त्याचप्रमाणे सर्व याचकवर्गाला आदरपूर्वक दाने दिली. त्यांचा संतोष केला. निरपेक्ष प्रेमाने निगडित झालेल्या मित्र-सुहृदांच्या अंतःकरणांचे सांत्वन केले. दास-दासी या पराधीन जीवन असणाऱ्या सर्व परिचारकांना बोलावून आणवले आणि हात जोडून योग्य सांभाळ करण्याकरिता वसिष्ठांच्या स्वाधीन त्यांना केले व म्हणाले, " हे गोस्वामी ! आता यांचे आईबाप आपणच ! सर्वांना प्रेमाने सांभाळा ! "

यानंतर सर्वांना उद्देशून रामानी दोन्ही हात जोडून चार समारोपाचे शब्द मधुर वाणीने सांगितले. " भूपतीना जे कोणी भरपूर सुख देण्याचा प्रयत्न करतील तेच माझे सर्व प्रकारे हित करणारे आहेत. हे नागरिक हो ! आपण अत्यंत कुशल आहात ! माझ्या वियोगाने सर्व माता दुःखाने दीन होणार नाहीत असा जो उपाय योग्य असेल तो आपण जरूर करावा " ! ! ८०

याप्रमाणे सर्वांना समजून सांगून समाधानाने गुरू वसिष्ठांच्या पदकमली रामांनी शिर नमवले. गणपती, गौरी आणि गिरीश शंकर यांची प्रार्थना केली व आशीर्वाद मिळताच ते निघाले.



राम चलत अति भयउ बिषादू । सुनि न जाइ पुर आरत नादू ।।
कुसगुन लंक अवध अति सोकू । हरष बिषाद बिबस सुरलोकू ।।
गइ मुरुछा तब भूपति जागे । बोलि सुमंतु कहन अस लागे ।।
रामु चले बन प्रान न जाहीं । केहि सुख लागि रहत तन माहीं ।।
एहि तें कवन ब्यथा बलवाना । जो दुखु पाइ तजहिं तनु प्राना ।।
पुनि धरि धीर कहइ नरनाहू । लै रथु संग सखा तुम्ह जाहू ।।

दो० – सुठि सुकुमार कुमार दोउ जनकसुता सुकुमारि ।
रथ चढ़ाइ देखराइ बनु फिरेहु गएँ दिन चारि ।। ८१ ।।

चौ० – जौं नहिं फिरहिं धीर दोउ भाई । सत्यसंध दृढ़ब्रत रघुराई ।।
तौ तुम्ह बिनय करेहु कर जोरी । फेरिअ प्रभु मिथिलेसकिसोरी ।।
जब सिय कानन देखि डेराई । कहेहु मोरि सिख अवसरु पाई ।।
सासु ससुर अस कहेउ सँदेसू । पुत्रि फिरिअ बन बहुत कलेसू ।।
पितुगृह कबहुँ कबहुँ ससुरारी । रहेहु जहाँ रुचि होइ तुम्हारी ।।
एहि बिधि करेहु उपाय कदंबा । फिरइ त होइ प्रान अवलंबा ।।
नाहिं त मोर मरनु परिनामा । कछु न बसाइ भएँ बिधि बामा ।।

रामांनी पाऊल पुढे टाकताच सर्व जनतेला अत्यंत विषाद झाला. त्यावेळी दुःखाचा जो एकच विलक्षण आर्त नाद निघाला तो कानाला दुःखसह असा होता !

रामाच्या प्रयाण काळी तिकडे लंकेला कुशकुन झाले. अयोध्यानगरी शोकसागरात बुडून गेली ! प्रभू असुरनाशासाठी बाहेर पडल्यामुळे देवांना आनंद झाला, तर रामवियोगाने उडवलेला हाहाःकार पाहून त्यानाही परम विषाद वाटलाच !

रघुवीर जाताना आलेली मूर्च्छा कमी होताच इकडे दशरथ महाराजांनी सुमंत्राला तावडतोब बोलावून घेतले व म्हणाले, " मल्या ! राम वनाला गेले आणि त्याच्या पाठोपाठ माझे प्राण कसे रे अजून गेले नाहीत ? या क्षुद्र देहात आता कोणते सुख [illegible] लालसेने ते राहिले आहेत ! याहून अधिक भयंकर अशी कोणती व्यथा झाली म्हणजे माझे प्राण प्रयाण करतील ? "

शोकाचा असह्य वेग आवरून महाराजांनी थोडा धीर धरला व म्हणाले, " सुमंता ! रथ घेऊन अत्यंत जलद जा. माझे दोन कुमार आणि ती जनककुमारी अत्यंत सुकुमार आहेत रे ! रथात त्यांना बसव, चार दिवस वन दाखव आणि परत अयोध्येला सर्वांना घेऊन ये. ८१

पण ते दोघे बंधू धैर्यशाली असल्यामुळे कदाचित् परत फिरणार नाहीत ! रघुनाथ हे सत्यप्रतिज्ञ आणि दृढव्रताचे आहेत. पण हात जोडून माझी त्यांना विनंती सांगा की, प्रभो ! मिथिलेश किशोरीला परत पाठवा.

" वन पाहिल्याबरोबर सीतेची भीतीने गाळण उडेल ! तेव्हा योग्य संधि सापडताच तिला आमचा निरोप सांगा की, तुला तुझ्या सासू-सासऱ्याचा संदेश आहे की मुली ! वनात क्लेश अत्यंत आहेत. तू परत ये. तुला आवडेल त्याप्रमाणे कधी माहेरी राहा; कधी सासरी ये.

" याप्रमाणे नाना उपाय करून जर तिला परत आणले तरच या माझ्या प्राणाला काही आधार होईल. नाहीतर शेवटी माझा मृत्यू आता ठरलेलाच आहे ! जेव्हा दैवच प्रतिकूल होते तेव्हा आपल्या हातात काहीच राहात नाही !

" माझ्या रामाला, माझ्या सीतेला, माझ्या लक्ष्मणाला आणून लवकर दाखवा हो ! "

अस कहि मुरुछि परा महि राऊ । रामु लखनु सिय आनि देखाऊ ॥

दो० – पाइ रजायसु नाइ सिरु रथु अति बेग बनाइ ।
गयउ जहाँ बाहेर नगर सीय सहित दोउ भाइ ॥ ८२ ॥

चौ० – तब सुमंत्र नृप बचन सुनाए । करि बिनती रथ रामु चढ़ाए ॥
चढ़ि रथ सीय सहित दोउ भाई । चले हृदयँ अवधहि सिरु नाई ॥
चलत रामु लखि अवध अनाथा । बिकल लोग सब लागे साथा ॥
कृपासिंधु बहुबिधि समुझावहिं । फिरहि प्रेम बस पुनि फिरि आवहिं ॥
लागति अवध भयावनि भारी । मानहुँ कालराति अँधिआरी ॥
घोर जंतु सम पुर नर नारी । डरपहिं एकहि एक निहारी ॥
घर मसान परिजन जनु भूता । सुत हित मीत मनहुँ जमदूता ॥
बागन्ह बिटप बेलि कुम्हिलाहीं । सरित सरोवर देखि न जाहीं ॥

दो० – हय गय कोटिन्ह केलिमृग पुरपसु चातक मोर ।
पिक रथांग सुक सारिका सारस हंस चकोर ॥ ८३ ॥

चौ० – राम बियोग बिकल सब ठाढ़े । जहँ तहँ मनहुँ चित्र लिखि काढ़े ॥
नगरु सफल बनु गहबर भारी । खग मृग बिपुल सकल नर नारी ॥
बिधि कैकई किरातिनि कीन्ही । जेहिं दव दुसह दसहुँ दिसि दीन्ही ॥

अशी एकच आर्त किंकाळी फोडून दशरथराजे तत्काल पुनः मूर्छित होऊन जमिनीवर कोसळले !

इकडे आज्ञा झाल्याबरोबर शिर नमवून सुमंताने रथ जोडला आणि अत्यंत वेगाने ज्या ठिकाणी नगराच्या बाहेर हे दोघे बंधू आणि सीता होती तेथे आणून तो उभा केला. ८२

सुमंताने राजाचा निरोप सांगितला आणि विनंती करून रामाला रथात बसण्यास सांगितले. सीतेसह रामलक्ष्मण रथात बसताच एकवेळ त्यांनी मनाने अयोध्येला वंदन केले व रथ चालू लागला !

अयोध्येतून 'राम' गेल्याबरोबर सर्व पुरी लोकांना अनाथ दिसली आणि ते विकल होऊन मागोमाग धावत सुटले. कृपासागर रामांनी पुनः पुनः समजावून सांगावे, रामाची आज्ञा उल्लंघन करणे अशक्य म्हणून लोकांनी परतावे. परंतु पुनः रामाच्या प्रेमाचा पूर येऊन रथाच्या मागे लोकांनी पळत सुटावे असा प्रकार सुरू झाला.

कारण सर्व अयोध्यानगरी अत्यंत भीषण दिसू लागली ! अंधाराने व्यापलेली जणू काही ती काळरात्रच ! त्यामुळे नगरातील नरनारी घोर जळूप्रमाणे एकमेकांना भासू लागले ! एकमेकाला पाहूनच त्यांची भीतीने गाळण उडू लागली ! आप्तांचा परिवार हीच भुते वाटू लागली ! घरे नसून ते स्मशान भासू लागले. मित्र, बांधव, स्वतःचीच मुले-बाळे हे सर्व जणू यमदूतच बनले ! बागेतील वृक्ष व वेली सुकून गेल्या ! नद्या व तलाव यांच्याकडे नुसते पाहावेनासुद्धा !

कोट्यवधी हत्ती, घोडे, असंख्य पाळीव पशू, गावातील इतर पशू, चातक, मोर, कोकीळ, चक्रवाक, पोपट, मैना, सारस, हंस, चकोर. ८३

इत्यादि सर्व रामवियोगाने पाहावे तेथे चित्रासारखे खिन्न होऊन राहिले होते !

वस्तुतः अयोध्यानगरी म्हणजे फळांनी भरगच्च भरलेले असे एक समृद्ध वन होते. त्यात सुखाने निवास करणारे नारी-नर हेच अगणित पशुपक्षी होते. परंतु विधात्याने कैकेयीला किरातिनी करून अशा सुंदर



सहि न सके रघुबर बिरहागी । चले लोग सब ब्याकुल भागी ॥
सबहिं बिचारु कीन्ह मन माहीं । राम लखन सिय बिनु सुखु नाहीं ॥
जहाँ रामु तहँ सबुइ समाजू । बिनु रघुबीर अवध नहिं काजू ॥
चले साथ अस मंत्रु दृढाई । सुर दुर्लभ सुख सदन बिहाई ॥
राम चरन पंकज प्रिय जिन्हही । बिषय भोग बस करहिं कि तिन्हही ॥

दो० — बालक बृद्ध बिहाइ गृहँ लगे लोग सब साथ ।
तमसा तीर निवासु किय प्रथम दिवस रघुनाथ ॥ ८४ ॥

चौ० — रघुपति प्रजा प्रेम बस देखी । सदय हृदयँ दुखु भयउ बिसेषी ॥
करुनामय रघुनाथ गोसाँई । बेगि पाइअहिं पीर पराई ॥
कहि सप्रेम मृदु बचन सुहाए । बहुबिधि राम लोग समुझाए ॥
किए धरम उपदेस घनेरे । लोग प्रेम बस फिरहिं न फेरे ॥
सीलु सनेहु छाड़ि नहिं जाई । असमंजस बस भे रघुराई ॥
लोग सोग श्रम बस गए सोई । कछुक देवमायाँ मति मोई ॥
जबहिं जाम जुग जामिनि बीती । राम सचिव सन कहेउ सप्रीती ॥
खोज मारि रथु हाँकहु ताता । आन उपायँ बनिहि नहिं बाता ॥

वनाला, दाही दिशांनी दुःसह दावानल तिच्याकरवी लावला ! रघुवराचा हा विरहानळ लोकांना मुळीच सहन न होऊन ते विव्हळ झाले आणि रामदर्शनार्थ पळू लागले.

शेवटी सर्वांनी एकत्र होऊन निश्चय ठरवला: राम, सीता व लक्ष्मण यांच्या विरहात आपण सुखी होणे शक्यच नाही. ज्या ठिकाणी राम तेथेच सर्व सुखाची साधने व आराम ! मग रघुनाथ वनात गेल्यावर आपले अयोध्येत काय काम उरले ? एवढा ठाम बेत होताच, देवांनाही दुर्लभ अशी सुखे ज्या घरात मिळत होती ती सर्व सोडून रामाबरोबर वनात राहाण्यास हे लोक निघाले !

खरेच आहे, रामचरणकमले ज्यांना एकदा आवडली, त्यांना विषयोपभोगांचे आकर्षण कसे उरणार ?

लहान मुले व म्हातारी माणसे त्यांनी घरात टाकली आणि बाकीची सर्व अयोध्यानगरी रामाच्या मागोमाग वनवासात धावली ! म्हणून रघुनाथांनी, पहिल्या दिवशी तमसानदीच्या तीरावर मुक्काम केला व तेथे हे सर्व नागरिक येऊन पोचले. ८४

अशा प्रकारे अगदीच अनपेक्षितपणे, सर्व अयोध्यानगरीच वनवासासाठी आपल्या मागोमाग आलेली पाहून, सदय हृदयाच्या रघुपतीना अत्यंत दुःख झाले. इंद्रियाचे स्वामी असे रघुनाथ असले तरी दुसऱ्यांच्या बद्दलच्या सहानुभूतीने साहजिकच ते करुणासागर कष्टी झाले !

प्रेमल आणि कोमळ अशा सुंदर शब्दांनी, रामांनी लोकांची पुष्कळ समजूत केली. धर्माच्या सिद्धान्तांचा अनेक प्रकारांनी प्रभूंनी त्यांना उपदेश केला. पण सर्व व्यर्थ ! त्या अयोध्यावासी लोकांचे रामचरणी एवढे कमालीचे प्रेम होते की, काहीही सांगून परत फिरण्यास ते तयारच नव्हते !

अशा स्थितीत त्यांना वनवासात बरोबर नेणेही अयोग्य व अव्यवहार्य ! रघुराजा, आपल्या श्रेष्ठ शीलाने व शुद्ध प्रेमाने, त्यावेळी मोठ्या अडचणीत पडला.

दीर्घकाळ शोक करून, पोटात अन्नपाणी बराच वेळ नसल्याने विकल होऊन, आणि अंशतः देवांच्या मायेने मोहित होऊन सर्वच लोक निश्चेष्ट होऊन निजले होते.

ही अनुकूल वेळ साधण्यासाठी, दोन प्रहर रात्र होताच, राम सुमंत्राला प्रेमाने म्हणाले, " हे तात ! माग न ठेवता झटकन् रथ हाक; आता या अडचणीतून सुटण्याला दुसरा उपायच नाही ! "

दो० — राम लखन सिय जान चढ़ि संभु चरन सिरु नाइ।
सचिवँ चलायउ तुरत रथु इत उत खोज दुराइ ॥ ८५ ॥

चौ० — जागे सकल लोग भएँ भोरू। गे रघुनाथ भयउ अति सोरू ॥
रथ कर खोज कतहुँ नहिं पावहिं। राम राम कहि चहुँ दिसि धावहिं ॥
मनहुँ बारिनिधि बूड़ जहाजू। भयउ बिकल बड़ बनिक समाजू ॥
एकहि एक देहिं उपदेसू। तजे राम हम जानि कलेसू ॥
निंदहिं आपु सराहहिं मीना। धिग जीवनु रघुबीर बिहीना ॥
जौं पै प्रिय बियोगु बिधि कीन्हा। तौ कस मरनु न मागें दीन्हा ॥
एहि बिधि करत प्रलाप कलापा। आए अवध भरे परितापा ॥
बिषम बियोगु न जाइ बखाना। अवधि आस सब राखहिं प्राना ॥

दो० — राम दरस हित नेम ब्रत लगे करन नर नारि।
मनहुँ कोक कोकी कमल दीन बिहीन तमारि ॥ ८६ ॥

चौ० — सीता सचिव सहित दोउ भाई। सृंगबेरपुर पहुँचे जाई ॥
उतरे राम देवसरि देखी। कीन्ह दंडवत हरषु बिसेषी ॥
लखन सचिवँ सियँ किए प्रनामा। सबहि सहित सुखु पायउ रामा ॥

सदाशिवास वंदनपूर्वक सीता, राम व लक्ष्मण रथांत चढलेले पाहताच, अजिबात माग न ठेवता सचिवाने सपाट्याने तेथून रथ चालू केला ! ८५.

सर्व लोक उजाडल्यावर पाहतात तो " राम सोडून गेले ! " असा एकच सर्वत्र ओरडा झाला ! राम ! राम !! हा रघुनाथ ! !! ' म्हणून चारी दिशांना आक्रोश करीत लोक धावले, पण रथाचा माग त्यांना कुठेही सापडला नाही. व्यापाऱ्यांचे भरलेले जहाज समुद्रात बुडावे, तशी या सर्व जणांची त्यावेळी शोचनीय स्थिती झाली !

त्यांनी मग एकमेकांना उपदेश करण्यास प्रारंभ केला, " अरे, तुमच्या आमच्या हालअपेष्टांची कीव येऊनच रामांनी आपणाला येथे सोडले !

पाण्यातून वेगळा केलेला मासाच खरोखर धन्य होय. कारण पाण्याच्या वियोगाबरोबर त्याचे प्राण त्याला सोडून जातात ! याच्या उलट धिक्कार असो आमच्या जगण्याला; रामाचा वियोग झालेला स्पष्ट दिसत असूनही अजून आम्ही जिवंतच आहोत !! विधात्याला जर अशाप्रकारे आमच्या प्राणप्रिय रघुनाथापासून आम्हाला तोडून बाजूला करावयाचे होते तर मग निदान आम्ही मरण मागितल्यावर तरी त्याने ते झटकन् आम्हास का देऊ नये ?"

अशातऱ्हेने, अनेक रीतींनी जिवाला संताप आणि पश्चात्ताप करीत सर्व लोक अत्यंत जड पावलांनी अयोध्येकडे वळले. रामवियोगाने त्यांची आंतडी कशी सतत गोळा होत होती, त्यांचे वर्णन करणेच अशक्य ! चौदावर्षानंतर तरी खास राम-दर्शन होणार या आशेवरच त्यांनी आपले फक्त प्राण रक्षण करून ठेवले.

अयोध्यावासी सर्व स्त्रीपुरुषांनी रामदर्शनासाठी नानाप्रकारची व्रते (ब्रह्मचर्यादि) व उपोषणे सुरू केली. सूर्याच्या अभावी दीन झालेली, ती चक्रवाक आणि चक्रवाकीची जोडपी किंवा सूर्यविकासिनी कमलेच जणू होती ! ८६

इकडे सीता, सचिव, लक्ष्मण आणि रघुपती अशी मंडळी शृंगवेरपुराच्या जवळ येऊन पोचली. देवनदी गंगेचे पवित्र पात्र दिसताच राम आनंदाने रथातून खाली उतरले आणि त्यांनी तिला दण्डवत प्रणाम केला. लगेच लक्ष्मण, सीता व सुमंत यानीही तसेच वंदन केले. रामप्रभूंना, या सर्व सुहृदांच्या संगतीत त्यावेळी परमसुख वाटले !

गंग सकल मुद मंगल मूला । सब सुख करनि हरनि सब सूला ।।
कहि कहि कोटिक कथा प्रसंगा । रामु बिलोकहिं गंग तरंगा ।।
सचिवहि अनुजहि प्रियहि सुनाई । बिबुध नदी महिमा अधिकाई ।।
मज्जनु कीन्ह पंथ श्रम गयऊ । सुचि जलु पिअत मुदित मन भयऊ ।।
सुमिरत जाहि मिटइ श्रम भारू । तेहि श्रम यह लौकिक ब्यवहारू ।।

दो० —सुद्ध सच्चिदानंदमय कंद भानुकुल केतु ।
चरित करत नर अनुहरत संसृति सागर सेतु ।। ८७ ।।

चौ० —यह सुधि गुहँ निषाद जब पाई । मुदित लिए प्रिय बंधु बोलाई ।।
लिए फल मूल भेंट भरि भारा । मिलन चलेउ हियँ हरषु अपारा ।।
करि दंडवत भेंट धरि आगें । प्रभुहि बिलोकत अति अनुरागें ।।
सहज सनेह बिबस रघुराई । पूँछी कुसल निकट बैठाई ।।
नाथ कुसल पद पंकज देखें । भयउँ भागभाजन जन लेखें ।।
देव धरनि धनु धामु तुम्हारा । मैं जनु नीचु सहित परिवारा ।।
कृपा करिअ पुर धारिअ पाऊ । थापिअ जनु सबु लोगु सिहाऊ ।।

ते गंगेच्या शुभ्रपाण्यावरचे मनोहर तरंग प्रभूंनी पाहिले आणि भागीरथी हेच सर्व आनंद मांगल्याचे कसे मूळ आहे, सर्व दुःखांचा निरास करून सर्व सुखांची प्राप्ती करून देण्यास ती कशी समर्थ आहे, याची पूर्ण कल्पना येण्यासाठी अनेक कथा व प्रसंग सुमंत, सीता व लक्ष्मण यांना त्यावेळी रामचंद्रानी सांगितले.

गंगेच्या त्या निर्मळ पांढऱ्या पाण्यात सर्वांनी स्नाने करताच त्यांचे सगळे प्रवासाचे श्रम नाहीसे झाले. तिचे ते दुधासारखे सफेत पवित्र पाणी प्याल्यावर त्यांना अवर्णनीय आनंद झाला !

ज्याचे स्मरण करताच सर्व दुःखश्रमांचा परिहार होतो, त्याला श्रम झाले होते, असे बोलणे हा फक्त एक लौकिक व्यवहारच ! कारण, प्रकृतिनिर्मित अशा त्रिगुणांच्या अतीत, मायेच्याही पलीकडील, असा सच्चिदानन्दकन्दस्वरूप, भगवानच सूर्यकुलाचा ध्वज श्रीरामचंद्र बनलेला आहे. त्यामुळे, प्राणिमात्राच्या अफाट व क्लेशमय जीवनात एक सोपा, सरळ व सर्वोत्तम आदर्श निर्माण करावा व त्या मार्गाने जाणाऱ्या सर्वांचाच उद्धार व्हावा, हाच प्रभूच्या सर्व अवताराच्या मुळाशी हेतू असे. ८७

निषादांचा राजा गुह, त्याच्या कानावर राम आल्याची बातमी येताच त्याने घाईने आपल्या सर्व मित्र-मंडळींना बोलावले. फळे व कंदमुळे यांची भेट बरोबर घेऊन तो अत्यंत हर्षभराने दर्शनासाठी निघाला !

जवळ येताच त्याने भेट समर्पण केली दण्डवत प्रणाम केला व अत्यंत प्रेमभराने प्रभूला निरखत तो उभा राहिला.

त्याचे ते नैसर्गिक शुद्ध प्रेम पाहून रघुराजांही स्नेह पूर्ण झाला. त्याला आपल्याजवळ बसवून घेऊन त्यानी त्याच्या क्षेमकुशलाची चौकशी केली. तेव्हां तो निषाद राजा म्हणतो.

" नाथ आपल्या चरणकमलांचे दर्शन होण्यातच आमचे सर्व कुशल साधले आहे. त्याचप्रमाणे मला आपला दास समजून जवळ केले यापेक्षा आणखी दुसरे कोणते माझे मोठे भाग्य असणार ! हे देवाधिदेवा ! ही (पृथ्वी) राज्य, धन व घरदार हे सर्व आपलेच आहे. मी तर सर्व परिवारासह आपला एक नीच सेवक आहे. आता कृपाकरून शृंगवेरपुरास आपले पाय लावा म्हणजे या दासाचा मोठेपणा वाढून त्याला सर्व लोक धन्य म्हणतील ! "

कहेहु सत्य सबु सखा सुजाना । मोहि दीन्ह पितु आयसु आना ॥

दो ० –बरष चारिदस बासु बन मुनि ब्रत बेषु अहारु ।
ग्राम बासु नहिं उचित सुनि गुहहि भयउ दुखु भारु ॥ ८८ ॥

चौ ० –रामु लखन सिय रूप निहारी । कहहिं सप्रेम ग्राम नर नारी ॥
ते पितु मातु कहहु सखि कैसे । जिन्ह पठए बन बालक ऐसे ॥
एक कहहिं भल भूपति कीन्हा । लोयन लाहु हमहि बिधि दीन्हा ॥
तब निषादपति उर अनुमाना । तरु सिंसुपा मनोहर जाना ॥
लै रघुनाथहि ठाउँ देखावा । कहेउ राम सब भाँति सुहावा ॥
पुरजन करि जोहारु घर आए । रघुबर संध्या करन सिधाए ॥
गुहँ सँवारि साँथरी डसाई । कुस किसलयमय मृदुल सुहाई ॥
सुचि फल मूल मधुर मृदु जानी । दोना भरि भरि राखेसि पानी ॥

दो ० –सिय सुमंत्र भ्राता सहित कंद मूल फल खाइ ।
सयन कीन्ह रघुबंसमनि पाय पलोटत भाइ ॥ ८९ ॥

चौ ० –उठे लखनु प्रभु सोवत जानी । कहि सचिवहि सोवन मृदु बानी ॥
कछुक दूरि सजि बान सरासन । जागन लगे बैठि बीरासन ॥
गुहँ बोलाइ पाहरू प्रतीती । ठावँ ठावँ राखे अति प्रीति ॥
आपु लखन पहिं बैठेउ जाई । कटि भाथी सर चाप चढ़ाई ॥

श्रीरामचंद्रानी यावर त्याला समजावून सांगितले, " सख्या ! तू समंजस आहेस, तुझे म्हणणे सर्व बरोबर आहे परंतु; माझ्या पिताजींची मला दुसरीच आज्ञा आहे. त्या आज्ञेप्रमाणे चौदा वर्षे मुनिवेषात त्यांच्याच आहाराने मला वनात राहावयाचे आहे त्यामुळे मी ग्रामात वास्तव्य करणे योग्य नाही. "

हे ऐकून गुहाला अमर्याद दुःख झाले. ८८

राम, सीता व लक्ष्मण यांचे ते अलौकिक सौंदर्य पाहून ग्रामीण भागातील स्त्रिया व पुरुष आपसात बोलू लागले. सखी अशा सुंदर सुकुमार मुलांना वनवासात पाठविणारे असले कसले ग हे आईबाप ! यावर दुसरे म्हणतात, " राजाने फारच चांगले केले. अहो या निमित्ताने विधात्याने आपल्या डोळ्यांचे पारणे फेडले !

शृंगवेरपुरात प्रभू येत नाहीत, असे पाहून निषाद राजाने एक मनोहर शिंशपा वृक्ष पाहिला व रघुनाथांना नेऊन ते ठिकाण त्याने दाखवले. " म्हणती राम, छान ! अति छान ! वा ! "

सर्व पुरवासी लोक जोहार करून घराकडे परतले व रघुवर संध्या करण्यासाठी गंगेवर निघाले.

मधल्या वेळात कोवळी मनोहर पाने व गवत यांच्या साह्याने इकडे गुहाने सुंदर शय्या तयार केली. त्याचप्रमाणे पवित्र कोमल आणि गोड फळे कंदमूळ आणि स्वच्छ मधुर पाणी असे सर्व द्रोणात भरभरून ठेवले.

सीता, सुमंत आणि लक्ष्मण यांच्यासह रघुकुलमणीने तो फलाहार केला व शयन केले. बंधू लक्ष्मण रामाचे सुखमूल पाय चेपू लागला ! ८९.

प्रभूना झोप लागल्याची जाणीव होताच लक्ष्मण उठला. मधुरवाणीने सुमंताला झोपण्यास परवानगी दिली; व थोड्या अंतरावर वीरासन घातले आणि धनुष्याला बाण लावून रात्रभर पहारा करीत बसला !

निषाद–विषाद–योग

गुहाने ही अत्यंत प्रेमाने पुष्कळ विश्वासू रक्षक आणवले. त्याना निरनिराळ्या जागा पहारा करण्यासाठी नेमून दिल्या व स्वतः धनुष्यबाण सज्ज करून तो लक्ष्मणाजवळ येऊन बसला.



सोवत प्रभुहि निहारि निषादू । भयउ प्रेम बस हृदयँ बिषादू ॥
तनु पुलकित जलु लोचन बहई । बचन सप्रेम लखन सन कहई ॥
भूपति भवन सुभायँ सुहावा । सुरपति सदनु न पटतर पावा ॥
मनिमय रचित चारु चौबारे । जनु रतिपति निज हाथ सँवारे ॥

दो० —सुचि सुबिचित्र सुभोगमय सुमन सुगंध सुबास ।
पलँग मंजु मनिदीप जहँ सब बिधि सकल सुपास ॥ ९० ॥

चौ० —बिबिध बसन उपधान तुराईं । छीर फेन मृदु बिसद सुहाईं ॥
तहँ सिय रामु सयन निसि करहीं । निज छबि रति मनोज मदु हरहीं ॥
ते सिय रामु साथरीं सोए । श्रमित बसन बिनु जाहिं न जोए ॥
मातु पिता परिजन पुरबासी । सखा सुसील दास अरु दासी ॥
जोगवहिं जिन्हहि प्रान की नाईं । महि सोवत तेइ राम गोसाईं ॥
पिता जनक जग बिदित प्रभाऊ। ससुर सुरेस सखा रघुराऊ ॥
रामचंदु पति सो बैदेही । सोवत महि बिधि बाम न केही ॥
सिय रघुबीर कि कानन जोगू । करम प्रधान सत्य कह लोगू ॥

दो० —कैकयनंदिनि मंदमति कठिन कुटिलपनु कीन्ह ।
जेहिं रघुनंदन जानकिहि सुख अवसर दुखु दीन्ह ॥ ९१ ॥

प्रभूला तसल्या शय्येवर गाढ झोप लागलेली निषाद पाहातच राहिला ! त्याचे अंतःकरण प्रेमाने भरून आले ! मन विषण्ण झाले. अंगावर रोमांच उठू लागले व डोळ्यातून अश्रूंचा प्रवाह सुरू झाला ! स्नेहशिथिल अंतःकरणाने तो लक्ष्मणास म्हणतो;—

" काय विलक्षण घटना ही ! इन्द्रभवनासही ज्याची सर येणार नाही, असा सहजसुंदर दशरथमहाराजांचा राजवाडा, कामदेवाने आपल्या हातानेच जणू ज्यांची रत्नखचित सजावट केली आहे, असे मधले चौक. ते अत्यंत स्वच्छ, विलक्षण रचनेचे, उपभोगांच्या साधनांची रेलचेल असलेले, सुगंधित अत्तरांचा व फुलांचा सुवास सर्वत्र दरवळत असलेल्या ठिकाणी मनोहर पलंग जागोजागी घातलेले, रत्नांचे दीप लावलेले, जेथे कोणत्याही सुखाची उणीव नाही ! ९०.

गाद्या-गिरद्या, अनेक प्रकारची दुधाच्या फेसाप्रमाणे सफेत व मऊ, लांब रुंद आणि मनोहर उंची वस्त्रे ! आपल्या सौंदर्याने रती व मदन यांचा मद हरण करणारे सीता-राम अशा ठिकाणी दररोज निजणारे—ते सीता-राम आज दमून, वस्त्रावाचून गवताच्या शय्येवर झोपलेले. मला तर मुळी तिकडे पाहवतसुद्धा नाही !! "

" आईबाप, नगरवासी, आप्त इष्ट मंडळी, मित्र, सुस्वभावाचे दास आणि दासी, ज्यांना प्राणाप्रमाणे जपत, ते स्वामी, राम आज जमिनीवर निजले ! जगात ज्यांचा प्रभाव विख्यात आहे, असे जिचे पिताजी जनक राजे, प्रत्यक्ष देवेंद्र ज्यांचा सखा आहे, असे रघुवर दशरथ जिचा सासरा, आणि पतीतर प्रत्यक्ष प्रभुरामचंद्र, अशी सीता आज जमिनीवर निद्रा करत आहे ! खरोखर विधाता कोणाला प्रतिकूल होणार नाही ?

सीता आणि रामासारख्यांना वनवास भोगावा लागावा ! 'कर्माचा कायदा जबरदस्त,' असे जे लोक म्हणतात ते खरेच ! कैकय राजाची कन्या, नीच बुद्धीची कैकेयी ! तिने अत्यंत कुटिल कारस्थान रचले आणि ऐन सुखाच्या सुमुहूर्तावर दुःखाच्या खाईत लोटले ! ९१

चौ०—भइ दिनकर कुल बिटप कुठारी। कुमति कीन्ह सब बिस्व दुखारी ॥
भयउ बिषादु निषादहि भारी। राम सीय महि सयन निहारी ॥
बोले लखन मधुर मृदु बानी। ग्यान बिराग भगति रस सानी ॥
काहु न कोउ सुख दुख कर दाता। निज कृत करम भोग सबु भ्राता ॥
जोग बियोग भोग भल मंदा। हित अनहित मध्यम भ्रम फंदा ॥
जनमु मरनु जहँ लगि जग जालू। संपति बिपति करमु अरु कालू ॥
धरनि धामु धनु पुर परिवारू। सरगु नरकु जहँ लगि ब्यवहारू
देखिअ सुनिअ गुनिअ मन माहीं। मोह मूल परमारथु नाहीं ॥
दो०—सपनें होइ भिखारि नृपु रंकु नाकपति होइ।
जागें लाभु न हानि कछु तिमि प्रपंच जियँ जोइ ॥ ९२ ॥
चौ०—अस बिचारि नहिं कीजिअ रोसू। काहुहि बादि न देइअ दोसू ॥
मोह निसाँ सबु सोवनिहारा। देखिअ सपन अनेक प्रकारा ॥
एहिं जग जामिनि जागहिं जोगी। परमारथी प्रपंच बियोगी ॥
जानिअ तबहिं जीव जग जागा। जब सब बिषय बिलास बिरागा ॥

सूर्यकुलरूपी महान् वृक्षाच्या बुंध्यावर घाव घालणारी ती कुऱ्हाडच बनली! त्या कुमतीने सर्व विश्वाला दुःखसागरात लोटले!"

अशा प्रकारे सीता-रामांना जमिनीवर निजलेले पाहून निषादराजालासुद्धा अनावर दुःख झाले.

लक्ष्मण–सीता

त्याची ती करुणास्पद स्थिती पाहून, ज्ञान-वैराग्य आणि भक्तिरसाची केवळ खाणच असे, लक्ष्मणांनी कोमळ व गोड भाषण केले,

" बंधो! तुझी ही सर्व विचारसरणी अज्ञान्याची आहे! अरे या जगात सुख अगर दुःख कोणीही कोणाला देत नाही! जो तो स्वतः केलेल्या कर्मांचेच भोग भोगत असतो. संयोग (एकत्र येणे) वियोग (वेगळे होणे) चांगले अगर वाईट भोग, शत्रू, मित्र व उदासीन या सर्व बंधाचा जन्म, भ्रमातूनच होतो! हे जगत्‌रूपी जाळे जोपर्यंत पसरलेले आहे, तोपर्यंत त्यात जन्म-मृत्यू, संपत्ती, विपत्ती, कर्म व काळ, हे सर्व येणारच! धरणी, (पृथ्वी-जमीन) घर, पैसा, नगर, परिवार, स्वर्ग, नरक, इतकेच नव्हे, कानाला ऐकू येणारा, डोळ्याला दिसणारा किंबहुना मनात येणारा म्हणून जेवढा सर्व व्यवहार आहे, तेवढा सर्व तेवढा सर्व मोहातून जन्माला आलेला आहे वस्तुतः त्याला खरे अस्तित्व मुळीच नाही पारमार्थिक सत्ता नाही. स्वप्नात एक भिकारी राजा झाला व देवांचा राजा इंद्र दरिद्री झाला ते दोघे जागे झाले. त्याच्या प्रत्यक्ष स्थितीत या स्वप्नांमुळे काय फरक होणार? भिकारी राजा होत नाही की इंद्राला भीक मागण्याची वेळ येत नाही. अगदी बरोबर अशीच स्थिती या सर्व जगाची आहे! ९२ (काही काळ टिकणारा एक भ्रम)

" अशा विचाराने कोणावर व्यर्थ रागावू नये अगर कोणाला दोषही देऊ नये सर्वच या मोह निशेत निजले असून त्यांना अनेक प्रकारची स्वप्ने दिसत आहेत. जे शुद्ध परमार्थी असतात व या नश्वर प्रपंचापासून मुक्त झालेले असतात, तेच योगी या जगत् रूपी रात्री जागे असतात. त्याचप्रमाणे संपूर्ण भोगविलासाच्या बाबतीत जेव्हा पूर्ण वैराग्य उत्पन्न होते त्याचवेळी या जगात तो जीव जागा झाला असे समजावे. खरा विवेक उत्पन्न



होइ बिबेकु मोह भ्रम भागा। तब रघुनाथ चरन अनुरागा ॥
सखा परम परमारथु एहू। मन क्रम बचन राम पद नेहू ॥
राम ब्रह्म परमारथ रूपा। अबिगत अलख अनादि अनूपा ॥
सकल बिकार रहित गतभेदा। कहि नित नेति निरूपहिं बेदा ॥

दो०—भगत भूमि भूसुर सुरभि सुर हित लागि कृपाल।
करत चरित धरि मनुज तनु सुनत मिटहिं जग जाल ॥ ९३ ॥

मास पारायण, पंद्रहवाँ विश्राम

चौ०—सखा समुझि अस परिहरि मोहू। सिय रघुबीर चरन रत होहू ॥
कहत राम गुन भा भिनुसारा। जागे जग मंगल सुखदारा ॥
सकल सौच करि राम नहावा। सुचि सुजान बट छीर मगावा ॥
अनुज सहित सिर जटा बनाए। देखि सुमंत्र नयन जल छाए ॥
हृदयँ दाहु अति बदन मलीना। कह कर जोरि बचन अति दीना ॥
नाथ कहेउ अस कोसलनाथा। लै रथु जाहु राम कें साथा ॥
बनु देखाइ सुरसरि अन्हवाई। आनेहु फेरि बेगि दोउ भाई ॥

झाल्यावर मोहरूपी भ्रम नाहीसा होतो. तेव्हा (अज्ञान-नाशानंतर) श्रीरघुनाथ चरणांचे निःसीम व अनन्य प्रेम निर्माण होते. श्रीरामपदी मनाने, शरीराने व वाणीने स्नेह उत्पन्न झाला, की हे सख्या! त्यालाच परम परमार्थ म्हणावे, आणि राम तृणशय्येवर झोपले म्हणून तुला दुःख होत आहे, परंतु राम म्हणजे कोण?

"श्रीरामाचे खरे स्वरूप समजून घे! म्हणजे तुला दुःख होणार नाही. श्रीराम परमार्थस्वरूप परब्रह्म आहेत. ते अविगत म्हणजे आपल्या बुद्धीला त्यांचे सत्य स्वरूप पूर्णपणे कधीच न कळणारे असे आहेत. अलख म्हणजे आपल्या या कातड्याच्या डोळ्याना त्याची पूर्ण कल्पना येणारच नाही; अनादि म्हणजे ज्याना जन्मच नाही. अनुपम म्हणजे दुसऱ्या कोणत्याही पदार्थाची त्याना उपमा देऊन त्यांचे वर्णन करता येणार नाही. ते सर्व प्रकारच्या विकारांनी विरहित आहेत. त्यांच्यात भेद निर्माणच होत नाही आणि 'ज्यांचे नेतिनेति' असे सांगून वेद नित्य वर्णन करतात असे ते आहेत.

असे ज्यांचे वर्णन काहीसे करता येते ते कृपाळू रामचंद्र भक्त भूमी (पृथ्वी) ब्राह्मण, गाय आणि देवता यांच्या हिताकरता मनुष्याचे शरीर धारण करून हे लीला चरित्र करत आहेत. त्या लीलांचे श्रवण केले असता, आपल्याला पुनः हे जगत् खरे आहे असे वाटून जी दुःखे होतात ती होत नाहीत! ९३

लक्ष्मणांनी शेवटी सांगितले, सख्या! असा पक्का विश्वास धरून मोह सोडावा आणि रघुवीर-सीता पदकमलांच्या ठिकाणी अनन्य प्रेम धरावे."

याप्रमाणे रामाचे गुणगान चालू असता पहाट झाली. जगाचे मंगल साधून त्यांना सुखी करणारे राम जागे झाले.

रामांनी शौचस्नानादि क्रिया आटोपल्या. पवित्र आणि जाणते असे ते असल्यामुळे त्यांनी वडाचा चीक मागविला. त्याचा उपयोग करून लक्ष्मणाच्या व आपल्या जटा वळल्या! हा कार्यक्रम इकडे चालू असता तिकडे सुमंताच्या नेत्रातून अश्रूंच्या धारा वाहात होत्या. हृदयातील दुःखाचा दाह दाबून अत्यंत उदास मुखाने धीर धरून त्याने हात जोडले व दीन वाणीने तो बोलू लागला,

"नाथ! कोसलाधिप मला म्हणाले, रघुनाथाच्यासह रथ घेऊन जा. वन दाखव. त्यांना गंगेत स्नान करू दे. त्यानंतर मात्र दोन्हीही बंधूंना परत अयोध्येला घेऊन ये. लक्ष्मणाला, रामाला आणि सीतेला सर्व

लखनु रामु सिय आनेहु फेरी । संसय कसल सँकोच निवेरी ॥

दो० – नृप अस कहेउ गोसाइँ जस कहइ करौं बलि सोइ ।
करि बिनती पायन्ह परेउ दीन्ह बाल जिमि रोइ ॥ ९४ ॥

चौ० – तात कृपा करि कीजिअ सोई । जातें अवध अनाथ न होई ॥
मंत्रिहि राम उठाइ प्रबोधा । तात धरम मतु तुम्ह सबु सोधा ॥
सिबि दधीच हरिचंद नरेसा । सहे धरम हित कोटि कलेसा ॥
रंतिदेव बलि भूप सुजाना । धरमु धरेउ सहि संकट नाना ॥
धरमु न दूसर सत्य समाना । आगम निगम पुरान बखाना ॥
मैं सोइ धरमु सुलभ करि पावा । तजें तिहूँ पुर अपजसु छावा ॥
संभावित कहुँ अपजस लाहू । मरन कोटि सम दारुन दाहू ॥
तुम्ह सन तात बहुत का कहऊँ । दिएँ उतरु फिरि पातकु लहऊँ ॥

दो० – पितु पद गहि कहि कोटि नति बिनय करब कर जोरि ।
चिंता कवनिहु बात कै तात करिअ जनि मोरि ॥ ९५ ॥

गोष्टी समजून सांगा. त्यांच्या अंतःकरणातील संशय आणि परत येण्याच्या बाबतीत उत्पन्न होणारा संकोच पूर्ण नाहीसा करून सर्वांना परत घेऊन ये, अशी मला नृपतींची आज्ञा आहे. आता स्वामी मला जे म्हणतील तसे मी करीन. ”

याप्रमाणे सुमंताने विनंती केली. रामाचे त्याने पाय धरले व तो लहान मुलासारखा ओक्साबोक्सी रडू लागला ! ९४.

“ महाराज ! महाराज !! कृपा करून, आपली अयोध्या अनाथ होणार नाही, असे काय करायचे ते करा; एवढीच माझी अगदी काकुळतीला येऊन आपल्या चरणी प्रार्थना आहे हो !! ”

रामांनी सुमंताला हाताला धरून प्रेमाने उठवले व उपदेश केला, “ हे तात ! आपण सर्व धर्ममतांचा अभ्यास केलेला आहे. शिबी, दधीची, हरिश्चंद्र यांच्यासारख्या राजांनी धर्मपालन करण्यासाठी शरीर-क्लेश किती सोसले ? रंतिदेवराजा केवढा धर्मात्मा !

राज्यत्याग करून स्त्री-पुरुषासह वनात तपस्या करत असता अठ्ठेचाळिसाव्या उपवासादिवशी त्याला थोडे अन्न मिळाले. नैवेद्य दाखवून त्याचे तीन भाग केले ते तिवे खाणार तोच तेथे एक अतिथी आला. त्याला त्याने आपला भाग दिला. त्याने पुनः याचना केली, तेव्हा बायकोचा व पुत्राचा हिस्साही त्याला देऊन त्यांनी भगवच्चिंतन निर्विकार मनाने, त्रिदेह स्थिती संभाळून सुरू केले !! त्यांची ही धर्मनिष्ठा व सात्विक धैर्य-भक्ती पाहून भगवंताने त्यांना दर्शन देऊन त्यांचा तत्काल उद्धार केला. तसाच ज्ञानी बळी, यांनी कष्ट सोसून धर्माचे कसे रक्षण केले हे तुम्हाला माहीत आहे ना ?

“ सत्यासारखा दुसरा धर्म या जगात नाही, असे त्याचे वर्णन वेद, तंत्रादि शास्त्रे आणि पुराणे करतात. असा धर्म मला आज सहज प्राप्त झाला असता त्याचा जर मी त्याग केला, तर माझी त्रैलोक्यात अपकीर्ती होईल ! संभाविताच्या पदरी जर अपकीर्ती आली तर कोट्यवधी मरणयातनांचा दारुण दाह त्याला सोसावा लागतो ! हे तात ! तुमच्यासारख्या वडील मंडळींना मी काय सांगावे ? आपल्या बोलण्यावर पुन्हा मी बोलणे म्हणजेच पाप ! म्हणून, हात जोडून वडिलांच्या चरणी आमच्यावतीने कोट्यवधी नमस्कारपूर्वक सांगा की, बाबा ! आमची कोणत्याही प्रकारची बिल्कुल काळजी करू नका ! ” ९५



चौ० – तुम्ह पुनि पितु सम अति हित मोरें । बिनती करउँ तात कर जोरें ।।
सब बिधि सोइ करतब्य तुम्हारें । दुख न पाव पितु सोच हमारें ।।
सुनि रघुनाथ सचिव संबादू । भयउ सपरिजन बिकल निषादू ।।
पुनि कछु लखन कही कटु बानी । प्रभु बरजे बड़ अनुचित जानी ।।
सकुचि राम निज सपथ देवाई । लखन सँदेसु कहिअ जनि जाई ।।
कह सुमंत्रु पुनि भूप सँदेसू । सहि न सकिहि सिय बिपिन कलेसू ।।
जेहि बिधि अवध आव फिरि सीया । सोइ रघुबरहि तुम्हहि करनीया ।।
नतरु निपट अवलंब बिहीना । मैं न जिअब जिमि जल बिनु मीना ।'

दो० – मइकें ससुरें सकल सुख जबहिं जहाँ मनु मान ।
तहँ तब रहिहि सुखेन सिय जब लगि बिपति बिहान ।। ९६ ।।

चौ० – बिनती भूप कीन्ह जेहि भाँती । आरति प्रीति न सो कहि जाती ।।
पितु सँदेसु सुनि कृपानिधाना । सियहि दीन्ह सिख कोटि बिधाना ।।
सासु ससुर गुर प्रिय परिवारू । फिरहु त सब कर मिटै खभारू ।।
सुनि पति बचन कहति बैदेही । सुनहु प्रानपति परम सनेही ।।
प्रभु करुनामय परम बिबेकी । तनु तजि रहति छाँह किमि छेंकी ।।

"आपण तर वडिलांच्या प्रमाणेच माझे अत्यंत हित करणारे ! आमच्यासाठी पित्यांना शोक अगर दुःख मुळीच होणार नाही, अशा करता जे जे करावे लागेल, ते सर्व प्रकारानी आपण करा, एवढीच आपणाला हात जोडून माझी विनंती आहे !"

रघुनाथाचा आणि सचिवाचा हा चाललेला संवाद ऐकण्यासाठी आपल्या परिजनासह निषाद तेथे उभा राहिला होताच. पण प्रत्यक्ष ती भाषणे कानावर पडू लागल्यानंतर मात्र त्यांची अंतःकरणे दुःखाने भरून येऊ लागली !

इतक्यात लक्ष्मणांच्या मुखातून काही कटू शब्द बाहेर पडले. परंतु ते अत्यंत अनुचित समजूत प्रभूनी त्यांना पुढे बोलू दिले नाही. त्यांना संकोच वाटला. त्यांनी सुमंताला आपली शपथ घालून सांगितले, 'लक्ष्मणाचा निरोप मात्र जाऊन सांगायचा नाही हो !'

इतके झाल्यावर सीतेसाठी जो दशरथराजांचा निरोप होता, तो सांगण्यास सुमंताने सुरुवात केली.

"भूपती म्हणाले, सीतेला वनातील क्लेश सोसणार नाहीत, म्हणून ज्याच्या योगाने सीता परत घरी येईल अशी, हे रघुवरा ! आपण तिची समजूत घालावी. नाहीतर माझ्या जिवाचा सगळाच आधार तुटल्यामुळे, पाण्यावाचून जसा मासा जगू शकत नाही, तसे माझे प्राण देहात राहणे अशक्य होईल ! म्हणून सासरी आणि माहेरी तिला सगळ्या प्रकारची सुखे असल्यामुळे, तिच्या मनाला वाटेल त्याप्रमाणे तिने या आपत्तीचा शेवट होईपर्यंत सुखाने राहावे." ९६.

रघुनाथ ! ही विनंती करत असता दशरथ महाराजांच्या हृदयातील प्रेम किती उचंबळून आले व ते किती व्याकुल झाले, ते सांगण्यास माझ्याजवळ शब्दच नाहीत !"

कृपानिधी रामांनी वडिलांचा तो संदेश ऐकून सीतेला पुष्कळ उपदेश केला. शेवटी ते म्हणाले, "हे पाहा, सासरे, सासू, गुरू आणि प्रिय परिवार यांचे दुःख, तुम्ही परत गेल्यामुळे कमी होईल यात मुळीच शंका नाही !"

वैदेहीने आपल्या पतीचे भाषण शांतपणाने ऐकून घेतले आणि नंतर ती म्हणाली, "हे प्राणपती ! आपण परम स्नेही आहात, तसेच परम विवेकी असून, प्रभो ! आपले हृदय दयेने भरून राहिले आहे. मला

प्रभा जाइ कहँ भानु बिहाई। कहँ चंद्रिका चंदु तजि जाई॥
पतिहि प्रेममय बिनय सुनाई। कहति सचिव सन गिरा सुहाई॥
तुम्ह पितु ससुर सरिस हितकारी। उतरु देउँ फिरि अनुचित भारी॥

दो० – आरति बस सनमुख भइउँ बिलगु न मानब तात।
आरजसुत पद कमल बिनु बादि जहाँ लगि नात॥ ९७॥

चौ० – पितु बैभव बिलास मैं डीठा। नृप मनि मुकुट मिलित पद पीठा॥
सुखनिधान अस पितु गृह मोरें। पिय बिहीन मन भाव न भोरें॥
ससुर चक्कवइ कोसलराऊ। भुवन चारि दस प्रकट प्रभाऊ॥
आगें होइ जेहि सुरपति लेई। अरध सिंघासन आसनु देई॥
ससुरु एतादृस अवध निवासू। प्रिय परिवारु मातु सम सासू॥
बिनु रघुपति पद पदुम परागा। मोहि केउ सपनेहुँ सुखद न लागा॥
अगम पंथ बन भूमि पहारा। करि केहरि सर सरित अपारा॥
कोल किरात कुरंग बिहंगा। मोहि सब सुखद प्रानपति संगा॥

दो० – सासु ससुर सन मोरि हुँति बिनय करबि परि पायँ।
मोर सोचु जनि करिअ कछु मैं बन सुखी सुभायँ॥ ९८॥

असे सांगा की देहाला सोडून त्याची छाया राहाते का? सूर्याला सोडून त्याच्या प्रभेने कुठे जावे? चंद्राला सोडून चांदणे पाहिजे असे म्हणणारांची इच्छा कशी पूर्ण होणार!"

याप्रमाणे पतीला प्रेममय शब्दात विनवून सुमंताला मधुर वाणीने सीता म्हणते, "माझे वडील जनक व सासरे दशरथमहाराज यांच्याप्रमाणेच आपणही माझ्यासाठी काळजी वाहाणारे आहात. अशा स्थितीत आपल्या सांगण्याप्रमाणे न वागता काही बोलणे हे अत्यंत अयोग्य होय!

"परंतु मोठ्या संकटात सांपडल्यामुळेच मी हे अलम्प्यपणाचे वर्तन करीत असल्यामुळे, हे तात! त्याला अयोग्य मानू नका! माझे निर्वाणीचे एकच तत्त्व ऐका. 'आर्यपुत्र-पद-कमलविण नाती व्यर्थ जगात!' ९७ (पतिचरण सोडून सर्व नाती व्यर्थ होत.)

वडिलांचे वैभव शिगेस पोचलेले या डोळ्यांनी पाहिले. अनेक मांडलिक राजांचे मुकुट माझ्या वडिलांच्या पदपीठावर विनम्र झालेले आहेत! इतके सुखाचे आगर असणारे माझे माहेर घर जरी आहे तरी पतिविहीन स्थितीत मला त्याची चुकुनसुद्धा गोडी वाटत नाही.

"तसेच इकडे सासरीही माझे सासरे कोसलराज हे सम्राट्! चौदा भुवनात त्यांचा प्रभाव प्रकट झालेला आहे. प्रत्यक्ष देवांचा राजा इंद्र त्यांना सामोरा येऊन त्यांचे स्वागत करतो व स्वतःच्या अर्ध्या आसनावर शेजारी बसवून घेतो! अशा योग्यतेचे दशरथमहाराज माझे सासरे आहेत! सर्व परिवार अत्यंत प्रेम करणारा असून, सासूबाई तर आईची कधी आठवणच होऊ देत नाहीत!

परंतु असे सर्व भाग्य असूनही रघुपति-चरणकमळातील परागवाचून यांपैकी, मला कोणीही सुखकारक होतील, असे वाटत नाही! पण याच्या उलट, वनातील, चालायला अत्यंत त्रासदायक वाटा, जंगली जमीन, भयंकर पहाड व त्यातील हत्ती व सिंहासारखी क्रूर श्वापदे, अफाट पसरलेली सरोवरे व विस्तृत पात्रांच्या नद्या, वन्य जातीचे कोळी, भिल्ल, तसेच हरीण व पक्षी–हे सर्व, माझ्या प्राणपतींच्या चरणाजवळ मला सुखच देतील!

"मामंजी आणि सासूबाई यांच्या चरणी वंदनपूर्वक माझी अशी विनंती सांगावी की, माझी थोडीसुद्धा काळजी करू नका. मी वनात अगदी मनापासून सुखी आहे!" ९८



चौ० –प्राणनाथ प्रिय देवर साथा । बीर धुरीन धरें धनु भाथा ।।
नहिं मग श्रमु भ्रमु दुख मन मोरें । मोहि लगि सोचु करिअ जनि भोरें ।।
सुनि सुमंत्रु सिय सीतलि बानी । भयउ बिकल जनु फनि मनि हानी ।।
नयन सूझ नहिं सुनइ न काना । कहि न सकइ कछु अति अकुलाना ।।
राम प्रबोधु कीन्ह बहु भाँती । तदपि होति नहि सीतलि छाती ।।
जतन अनेक साथ हित कीन्हे । उचित उतर रघुनंदन दीन्हे ।।
मेटि जाइ नहिं राम रजाई । कठिन करम गति कछु न बसाई ।।
राम लखन सिय पद सिरु नाई । फिरेउ बनिक जिमि मूर गवाँई ।।

दो ० –रथु हाँकेउ हय राम तन हेरि हेरि हिहिनाहिं ।
देखि निषाद बिषादबस धुनहिं सीस पछिताहिं ।। ९९ ।।

चौ ० –जासु बियोग बिकल पसु ऐसें । प्रजा मातु पितु जिइहहिं कैसें ।।
बरबस राम सुमंत्रु पठाए । सुरसरि तीर आपु तब आए ।।
मागी नाव न केवटु आना । कहइ तुम्हार मरमु मैं जाना

" वीरांमध्ये अग्रगण्य, हातात धनुष्य व बाणांनी भरलेला भाता धरण करणारे असे माझे प्राणनाथ व भाऊजी बरोबर असता, मला कधीही दुःख किंवा घरची आठवण होणार नाही अथवा शीणही येणार नाही! म्हणून, जरासुद्धा आपण माझी चुकून चिंता करू नका. "

ही शांत अशी सीतेची वाणी ऐकून, मणी हरवल्यानंतर जसा फणी (भुजंग) विकल होतो, त्याचप्रमाणे सुमंताची शोचनीय स्थिती झाली ! त्याचे कान बधिर झाले. डोळ्यांना अंधारी येऊ लागली. तो किती व्याकुळ झाला, हे सांगणेच कठीण !

रामांनी त्याला अनेक प्रकारांनी समजून सांगण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याच्या पोटात भडकलेली आग थोडीसुद्धा शमेना !

सुमंताने आपली सर्व पुण्याई खर्च करून रामाना रथातून परत अयोध्येला नेण्याची शिकस्त केली परंतु त्याच्या प्रत्येक कल्पनेला योग्य असे उत्तर रघुनंदनांनी देऊन त्याला निरुत्तर केले !

नाहीतरी रामाची आज्ञा कोणालाच मोडता येणार नाही ! कर्माची गती अत्यंत कठीण आहे. तिच्यावर इलाज चालत नाही !

सुमंताने शेवटी श्रीराम, सीता व लक्ष्मण यांच्या चरणावर आपले मस्तक नमवले व आपले सर्व भांडवल बुडवून एखादा व्यापारी ज्याप्रमाणे परमदुःखी होऊन परतावा, त्याचप्रमाणे शोकाकुल स्थितीत सुमंताने रथ फिरवला !

सुमंत रथ हाकू लागला, पण रामाकडे पुनः पुन्हा पाहून घोडे खेकाळू लागले ! हे दृश्य पाहून मात्र निषादांच्या हृदयाचे पाणी झाले. दुःखातिरेकाने त्यांनी आपले मस्तक वडवून घेण्यास सुरवात केली ! ९९

खरेच आहे ! ज्याच्या विरहाने प्रत्यक्ष पशू इतके हैराण होतात. तो नजरेआड (वनवासाला जाऊन) वर्षानुवर्षे होणार हे समजल्यावर, प्राणापेक्षा जास्त प्रेम करणारी प्रजा व जन्म देणारे आईबाप कसे जगणार ?

नाविक–अनुराग

जुलमाने सुमंताला निरोप देऊन राम गंगेच्या काठावर येऊन पोचले त्यांनी नावाड्याला नाव आणण्यास सांगितले पण तो नाव आणण्यास तयार होईना तो म्हणतो,



चरन कमल रज कहुँ सबु कहई । मानुष करनि मूरि कछु अहई ।।
छुअत सिला भइ नारि सुहाई । पाहन तें न काठ कठिनाई ।।
तरनिउ मुनि घरिनी होइ जाई । बाट परइ मोरि नाव उड़ाई ।।
एहिं प्रतिपालउँ सबु परिवारू । नहिं जानउँ कछु अउर कबारू ।।
जौं प्रभु पार अवसि गा चहहू । मोहि पद पदुम पखारन कहहू ।।

छं०—पद कमल धोइ चढ़ाइ नाव न नाथ उतराई चहौं ।
मोहि राम राउरि आन दसरथ सपथ सब साची कहौं ।।
बरु तीर मारहुँ लखनु पै जब लगि न पाय पखारिहौं ।
तब लगि न तुलसीदास नाथ कृपाल पारु उतारिहौं ।।

सो०—सुनि केवट के बैन प्रेम लपेटे अटपटे ।
बिहसे करुनाऐन चितइ जानकी लखन तन ।। १०० ।।

चौ०—कृपासिंधु बोले मुसुकाई । सोइ करु जेहिं तव नाव न जाई ।।
बेगि आनु जल पाय पखारू । होत बिलंबु उतारहि पारू ।।
जासु नाम सुमिरत एक बारा । उतरहिं नर भवसिंधु अपारा ।।
सोइ कृपालु केवटहि निहोरा । जेहिं जगु किय तिहु पगहु ते थोरा ।।

" तुमचे इंगित मला माहीत आहे! लोक म्हणतात की तुमच्या चरण-कमलरजःकणात माणसे बनवण्याची काहीतरी जादू आहे. दगडाला नुसता पाय लावल्यावरोबर त्याची एक सुंदर बाई झाली! आणि लाकूड दगडापेक्षा जास्त कठीण आहे होय? तुमचे पाय माझ्या नावेला लागले की माझी नाव जाणार उडून! आणि तिच्या जागी होणार ऋषींची एक बायको! आणि मग माझी वाट कशी लागायची? नुसता नावेचा धंदा करून हा सगळा खटारा सांभाळलाय! पैसा मिळवायला दुसरी कुठलीच अक्कल बापाने शिकवली नाही. मग माझ्या पोटापाण्याची सोय काय? म्हणून प्रभो! आपल्याला जर नदीच्या पलीकडे जायचे असले तर मला ते पदकमळ धुण्यास परवानगी द्या!!

" हे नाथ! मी आपले चरणकमल धुऊन मगच आपणाला नावेवर चढवतो. मला आपल्याकडून उतराई (पैल तीराला नेण्याबद्दलच्या मोबदल्याची) बिलकुल इच्छा नाही! हे राम! मी आपली आणि दशरथ महाराजांची शपथ घेऊन सांगतो की, मी अगदी हे सर्व खरे खरे बोलत आहे. लक्ष्मणांनी मला तीर मारला तरी बेहत्तर! पण, हे तुलसीदासाचे नाथ! हे कृपालो! पाय धुतल्याशिवाय आपणाला नदीच्या पलीकडे मी नेणार नाही!"

नावाड्याचे ते वेडेवाकडे पण शुद्ध प्रेमाचे शब्द, करुणेची खाण असणाऱ्या भगवंतांच्या कानावर आले तेव्हा लक्ष्मण आणि जानकी याच्याकडे पाहात ते हसू लागले! १००

" अरे बाबा! तुझी नाव ज्यामुळे उडून जाणार नाही, असे तुला काय करावयाचे ते कर! तुझे काय म्हणणे, पाय धुणार ना? आण पाणी आणि धू एकदा लवकर पाय! आम्हाला लवकर पलीकडे ने; फार उशीर झाला आहे!" कृपासिंधूनी त्याला स्मितपूर्वक सांगून टाकले.

एकच वेळ ज्याच्या नावाचे नुसते स्मरण केले असता जर अपार असा भवसागर तरून जाऊ शकतो, ज्याची तीन पावले ठेवण्याला सर्व विश्व पुरत नाही, तो करुणाकर आता गंगा उतरून पलीकडे स्वतःला नेण्यासाठी एका कोळ्याची विनवणी करत आहे!!

पद नख निरखि देवसरि हरषी । सुनि प्रभु बचन मोहँ मति करषी ॥
केवट राम रजायसु पावा । पानि कठवता भरि लेइ आवा ॥
अति आनंद उमगि अनुरागा । चरन सरोज पखारन लागा ॥
बरषि सुमन सुर सकल सिहाहीं । एहि सम पुन्यपुंज कोउ नाहीं ॥
दो ० –पद पखारि जलु पान करि आपु सहित परिवार ॥
पितर पारु करि प्रभुहि पुनि मुदित गयउ लेइ पार ॥ १०१ ॥
चौ ० –उतरि ठाढ़ भए सुरसरि रेता । सीय रामु गुह लखन समेता ॥
केवट उतरि दंडवत कीन्हा । प्रभुहि सकुच एहि नहिं कछु दीन्हा ॥
पिय हिय की सिय जाननिहारि । मनि मुदरी मन मुदित उतारी ॥
कहेउ कृपाल लेहि उतराई । केवट चरन गहे अकुलाई ॥
नाथ आजु मैं काह न पावा । मिटे दोष दुख दारिद दावा ॥
बहुत काल मैं कीन्हि मजूरी । आजु दीन्ह बिधि बनि भलि भूरी ॥
अब कछु नाथ न चाहिअ मोरें । दीनदयाल अनुग्रह तोरें ॥
फिरती बार मोहि जो देबा । सो प्रसादु मैं सिर धरि लेबा ॥
दो ० –बहुत कीन्ह प्रभु लखन सियँ नहिं कछु केवटु लेइ ।
बिदा कीन्ह करुनायतन भगति बिमल बरु देइ ॥ १०२ ॥

प्रभुपदनख पाहून प्रथम देवनदीला हर्ष झाला होता. पण केवटाजवळ रामाची विनवणी चालू असता गंगेच्या बुद्धीला मोठा ताण पडला. साक्षात् भगवान् पलीकडे जाण्यासाठी कोळ्याचे आर्जव कसे करतात, हा तिच्यापुढे प्रश्न होता. परंतु जवळ येताच, आपल्या उत्पत्तीचे स्थान-भगवंताच्या चरणाचे नख ओळखताच तिला परमानंद झाला ! कारण भगवंताच्या नरलीलेचे रहस्य तिच्या ध्यानी येऊन तिचा मोह नष्ट झाला !

आज्ञा मिळताच, नावाडी काटवटभर पाणी घेऊन आला. प्रभुपदकमल तो प्रक्षाळू लागला, त्यावेळी हृदयातील आनंद नुसता उसळून वर येत होता !

सर्व देवांनी त्याच्यावर पुष्पवृष्टी करून त्याची स्तुती केली, कारण एवढा भाग्यवान दुसरा कोणी सांपडणेच शक्य नाही !

पाय धुऊन होताच ते सर्व तीर्थ त्याने आपल्या परिवारासह प्राशन केले. अशा प्रकारे आपल्या पितरांचा उद्धार करून त्याने प्रभूला मोठ्या आनंदाने नदीच्या पलीकडे नेले. १०१

गंगेच्या वाळवंटात सीता, राम गुह व लक्ष्मण असे एकत्र उभे राहिले. नावाड्याने प्रभूला दण्डवत प्रणाम केला. याला आपण काहीच दिले नाही या कल्पनेने त्याना संकोच वाटला. सीता आपल्या पतीचे मन बरोबर जाणणारी असल्याने आपल्या हातातील रत्नजडित अंगठी तिने चटकन् मोठ्या आनंदाने काढली !

" ही घे तुझी उतराई ! " असे म्हणून त्याच्या पुढे ती मुद्रिका रामांनी करताच तो प्रेमभराने व्याकुळ झाला व त्याने त्याचे चरण धरले !

" हे नाथ ! आज मला काय मिळावयाचे राहिले ? माझे सर्व दोष दुःख व दारिद्य याची आग खलास झाली. जन्मभर हीच मजुरी करत आलो पण विधात्याने आज एकदमच भरपूर भरपाई करून टाकली. हे प्रभो, दीनदयाळा तुझ्या कृपेने आता मला कशाचीच वाण राहिली नाही, तथापि आपण जेव्हा परत याल त्यावेळी जे काही द्याल तो प्रसाद मी मस्तकावर धारण करीन ! "

प्रभू , लक्ष्मण व सीता यांनी त्याला परोपरीने समजावून सांगितले. परंतु नावाड्याने काहीच जेव्हा घेण्याचे नाकारले. तेव्हा कृपायतन भगवंतांनी विमल भक्तीचे वरदान देऊन त्याला निरोप दिला. १०२

चौ० –तब मज्जनु करि रघुकुलनाथा । पूजि पारथिव नायउ माथा ।।
सियँ सुरसरिहि कहेउ कर जोरी । मातु मनोरथ पुरउबि मोरी ।।
पति देवर सँग कुसल बहोरी । आइ करौं जेहिं पूजा तोरी ।।
सुनि सिय बिनय प्रेम रस सानी । भइ तब बिमल बारि बर बानी ।।
सुनु रघुबीर प्रिया बैदेही । तब प्रभाउ जग बिदित न केही ।।
लोकप होहिं बिलोकत तोरें । तोहि सेवहिं सब सिधि कर जोरें ।।
तुम्ह जो हमहि बड़ि बिनय सुनाई । कृपा कीन्हि मोहि दीन्हि बड़ाई ।।
तदपि देबि मैं देबि असीसा । सफल होन हित निज बागीसा ।।

दो० --प्राननाथ देवर सहित कुसल कोसला आइ ।
पूजिहि सब मनकामना सुजसु रहिहि जग छाइ ।। १०३ ।।

चौं० –गंग बचन सुनि मंगल मूला । मुदित सीय सुरसरि अनुकूला ।।
तब प्रभु गुहहि कहेउ घर जाहू । सुनत सूख मुखु भा उर दाहू ।।
दीन बचन गुह कर जोरी । बिनय सुनहु रघुकुलमनि मोरी ।।
नाथ साथ रहि पंथु देखाई । करि दिन चारि चरन सेवकाई ।।
जेहिं बन जाइ रहब रघुराई । परनकुटी मैं करबि सुहाई ।।
तब मोहि कहँ जसि देव रजाई । सोइ करिहउँ रघुबीर दोहाई ।।
सहज सनेह राम लखि तासू । संग लीन्ह गुह हृदयँ हुलासू ।।
पुनि गुहँ ग्याति बोलि सब लीन्हे । करि परितोषु बिदा तब कीन्हे ।।

रघुकुलनाथानी नंतर स्नान केले पार्थिव पूजा करून नमस्कार केले. नंतर सीतेने हात जोडून प्रार्थना केली, " हे गंगामाते ! माझे सर्व मनोरथ पूर्ण कर ! पती व दीर यांच्यासह मी परत सुखरूप आले म्हणजे तुझी यथाविधी पूजा करीन ! "

सीतेची ही प्रेमळ विनंती ऐकून गंगेच्या शुभ्र पाण्यातून स्पष्ट शब्द बाहेर पडले.

" हे रघुवीरप्रिया वैदेही ! ऐक तुझा महिमा कोण जाणत नाही ? केवळ तुझ्या कृपादृष्टीने मानव लोकपाल होऊ शकतात. सर्व सिद्धी हात जोडून तुझ्या सेवेसाठी तयार आहेत. मला मोठेपणा देण्यासाठीच केवळ तू ही माझी प्रार्थना केली आहेत तथापि माझी वाणी सत्य होण्याची आलेली सुसंधी साधण्यासाठी मी तुला आशीर्वाद देतेच ! तुझे प्राणनाथ आणि भाऊजी यांच्या सह तू सुखरूप अयोध्येला परत येशील. तुमच्या सर्व कामना पूर्ण होऊन सर्व जगात तुमचे सुयश पसरेल " १०३

भावी मांगल्याचे सूचक असे ते गंगेचे वचन ऐकून गंगा आपणास अनुकूल आहे अशी सर्वांची खात्री झाली व त्यांना आनंद झाला.

गुहाला घरी जाण्यासाठी जेव्हा प्रभूंनी आज्ञा दिली तेव्हा त्याचे तोंड उतरले व त्याचे अंतःकरण दुःखाने भरून आले. त्याने दीनवाणीने हात जोडून प्रार्थना केली,

" हे रघुकुलमणी आता माझी थोडी विनंती ऐका ! हे नाथ मी आपल्याबरोबर येऊन वाटाड्याचे काम करतो चार दिवस मला या चरणांची एवढी सेवा घडू दे ! ज्या वनात जाऊन राहाण्याचे रघुपति ठरवतील तिथे मी छानदार झोपडी तयार करून देईन. मग जसे रघुवीर मला सांगतील तसे आपल्या पायाची शपथ !—मी करायला तयार होईन !

रामांनी त्याचा तो सहज स्नेह पाहिला आणि बरोबर येण्यास त्याला परवानगी दिली. गुहाचा आनंद गगनात मावेना !

गुहाने आपल्या जातभाईना बोलावले व ही आनंदाची बातमी सांगून त्यांना समाधानांत परत पाठविले,

दो० – तब गनपति सिव सुमिरि प्रभु नाइ सुरसरिहि माथ ।
सखा अनुज सिय सहित बन गवनु कीन्ह रघुनाथ ।। १०४ ।।

चौ० – तेहि दिन उभय बिटप तर बासू । लखन सखाँ सब कीन्ह सुपासू ।।
प्रात प्रातकृत करि रघुराई । तीरथराजु दीख प्रभु जाई ।।
सचिव सत्य श्रद्धा प्रिय नारी । माधव सरिस मीतु हितकारी ।।
चारि पदारथ भरा भँडारू । पुन्य प्रदेस देस अति चारू ।।
छेत्रु अगम गढ़ु गाढ़ सुहावा । सपनेहुँ नहिं प्रतिपच्छिन्ह पावा ।।
सेन सकल तीरथ बर बीरा । कलुष अनीक दलन रनधीरा ।।
संगमु सिंहासनु सुठि सोहा । छत्रु अखयबटु मुनि मनु मोहा ।।
चवँर जमुन अरु गंग तरंगा । देखि होहिं दुख दारिद भंगा ।।

दो० – सेवहिं सुकृती साधु सुचि पावहिं सब मनकाम ।
बंदी बेद पुरान गन कहहिं बिमल गुन ग्राम ।। १०५ ।।

चौ० – को कहि सकइ प्रयाग प्रभाऊ । कलुष पुंज कुंजर मृगराऊ ।।
अस तीरथपति देखि सुहावा । सुख सागर रघुबर सुखु पावा ।।
कहि सिय लखनहि सखहि सुनाई । श्रीमुख तीरथराज बड़ाई ।।
करि प्रनामु देखत बन बागा । कहत महातम अति अनुरागा ।।
एहि बिधि आइ बिलोकी बेनी । सुमिरत सकल सुमंगल देनी ।।

गणपती व शंकर यांचे स्मरण करून गंगेला नमस्कार केला आणि गुह, लक्ष्मण व सीता यांच्यासह रघुनाथ वनात गेले. १०४

त्या दिवशी रात्री एका वडाच्या झाडाखालीच वस्ती पडली लक्ष्मण आणि गुह यांनी सर्व प्रकारची सोय केली.

रघुपतीनी प्रातःकृत्य उरकले आणि प्रयागास जाऊन तीर्थ राजाचे दर्शन घेतले.

त्या राजाचा सत्य हा श्रेष्ठ मंत्री आहे श्रद्धा ही प्रिय पत्नी आहे आणि [illegible] हित करणारे मित्र आहेत, धर्म, अर्थ, काम व मोक्ष अशा चारी पुरुषार्थांचा खजिना भरून राहिला आहे! ती पुण्यभूमी हाच त्या राजाचा देश प्रयाग क्षेत्र हा सुंदर भक्कम पण दुर्गम असा त्याचा किल्ला आहे. कारण पापरूपी शत्रूचा त्यात स्वप्नातही प्रवेश होऊ शकत नाही. संपूर्ण तीर्थ हे त्याचे रणशूर सैनिक आहेत. पापरूपी सैन्याचा संहार करण्यात ते खंदे वीर आहेत गंगा, यमुना व सरस्वती यांचा त्रिवेणी संगम हे त्याचे मनोहर सिंहासन आहे. मुनींच्याही मनाला मोह उत्पन्न करणारे अक्षय्यवटासारखे त्यावर छत्र आहे. गंगा आणि यमुना नदीवरील जे तरंग तेच या राजाचे चामर असून त्यांच्या नुसत्या दर्शनाने दुःख आणि दारिद्र्याचा नाश होतो. पुण्यात्मे व पुनीत साधुजन या तीर्थराजाचे सेवन (सेवा) करून आपले सर्व मनोरथ पूर्ण करून घेतात ! वेद व सर्व पुराणे हे भाट असून या राजाच्या निर्मल गुण-समुदायाचे ते गायन करतात. १०५

पाप समुदायरूपी हत्तीचे निर्दालन करणारा जणू काही मृगेंद्रच असा हा तीर्थराजा, याच्या प्रभावाचे संपूर्णपणे कोण वर्णन करणार ?

स्वतः सुखसागर असणाऱ्या रघुवीरांनी, अशा सुंदर तीर्थराजाचे दर्शन घेऊन आनंद लुटला ! सीतेला, लक्ष्मणाला व गुहाला, स्वमुखाने तीर्थराजाचा अत्यंत मोठा महिमा प्रभूनी सांगितला. वाटेत वनश्री व बागा पुनः पुन्हा पाहात नमस्कार करत, अत्यंत प्रेमाने त्यांचे महात्म्य सांगत ही सर्व मांगल्यांची प्राप्ती करून देणारे हे स्थान आहे !

मुदित नहाइ कीन्हि सिव सेवा । पूजि जथाबिधि तीरथ देवा ।।
तब प्रभु भरद्वाज पहिं आए । करत दंडवत मुनि उर लाए ।।
मुनि मन मोद न कछु कहि जाई । ब्रह्मानंद रासि जनु पाई ।।
दो० - दीन्हि असीस मुनीस उर अति अनंदु अस जानि ।
लोचन गोचर सुकृत फल मनहुँ किए बिधि आनि ।। १०६ ।।
चौ० - कुसल प्रस्न करि आसन दीन्हे । पूजि प्रेम परिपूरन कीन्हे ।।
कंद मूल फल अंकुर नीके । दिए आनि मुनि मनहुँ अमी के ।।
सीय लखन जन सहित सुहाए । अति रुचि राम मूल फल खाए ।।
भए बिगतश्रम रामु सुखारे । भरद्वाज मृदु बचन उचारे ।।
आजु सुफल तपु तीरथ त्यागू । आजु सुफल जप जोग बिरागू ।।
सफल सकल सुभ साधन साजू । राम तुम्हहि अवलोकत आजू ।।
लाभ अवधि सुख अवधि न दूजी । तुम्हरें दरस आस सब पूजी ।।
अब करि कृपा देहु बर एहू । निज पद सरसिज सहज सनेहू ।।
दो० - करम बचन मन छाड़ि छलु जब लगि जनु न तुम्हार ।
तब लगि सुखु सपनेहुँ नहीं किएँ कोटि उपचार ।। १०७ ।।
चौ० - सुनि मुनि बचन रामु सकुचाने । भाव भगति आनंद अघाने ।।

आनंदाने सर्वांनी स्नाने उरकली. रामानी आपले शिवपूजन यथासांग केले. विधिपूर्वक तीर्थे व देवता यांचे पूजन संपवले आणि प्रभू भरद्वाजांच्या आश्रमास येऊन पोचले !

मुनींना दंडवत केला, तोच त्यांनी रामाला हृदयाशी घट्ट कवटाळले. जणू काही ब्रह्मानंदाची पूर्ण रासच भारद्वाजमुनींच्या हाती लागल्याने त्यांना यावेळी केवढा आनंद झाला, याचे वर्णन करण्यास शब्द पुढेच येणार नाहीत !

मुनिवर भारद्वाजांनी आशीर्वाद दिला. त्यांच्या हृदयात आनंदाच्या लाटा उसळत होत्या ! त्यांना वाटले, श्रीसीता व लक्ष्मण यांच्यासह प्रभूश्रीरामचंद्रांचे दर्शन आज (आपल्या स्वतःच्या आश्रमात अनायासे) करवून, जणू काही विधात्याने, या वेळेपर्यंतच्या सर्व पुण्याईचे फल मूर्तिमंत करूनच आपल्या डोळ्यांसमोर उभे केले आहे ! १०६

क्षेम-कुशल विचारून मुनींनी त्यांना आसन दिले. प्रेमपूर्ण अंतःकरणाने पूजन करून भगवंतांना संतुष्ट केले. त्यानंतर जणू काही उत्तम प्रकारच्या अमृताचीच बनवलेली अशी कंदमूल-अंकुर, फळे रामचंद्रांना मुनींनी अर्पण केली. ती सीता, लक्ष्मण व गुह यांच्यासह प्रभूंनी मोठ्या रुचीने सेवन केली.

सर्वश्रमांचा परिहार होऊन राम सुखी झालेले भारद्वाजांनी पाहिले आणि मग त्यांनी मधुर वाणीने बोलण्यास प्रारंभ केला, " राम ! सीता अनुज लक्ष्मण यांच्यासह आपले आज दर्शन झाल्यामुळे, माझ्या सर्व तपस्येचे सार्थक झाले. तीर्थराजांच्या सान्निध्यात राहिल्याचे चीज झाले. वैराग्य, जप-योग, इतकेच काय पण शुभ अशी केलेली सर्व साधने आज सुफळ झाली ! आपल्या त्रिवर्गाच्या दर्शनाने सगळ्या आशा पूर्ण झाल्या ! कारण लाभाची आणि सुखाची याशिवाय दुसरी सीमाच कोणती नाही !!

" शरीर, मन व वाणी यांनी निष्कपट होऊन, जोपर्यंत जीव तुझा दास होत नाही. तोपर्यंत कोट्यवधी साधने करूनही व्यर्थ जाणार व स्वप्नातही त्याला सुखाची प्राप्ती होणे अशक्य आहे ! म्हणून आपल्या चरण कमली माझी चित्त वृत्ती सहज-स्वभावतःच रंगावी, एवढाच आता कृपा करून मला वर द्यावा." १०७

भारद्वाजांच्या अंतःकरणातील भावभक्ती पाहून जरी रामांना आनंदाची तृप्ती वाटत होती, तरी प्रत्यक्ष भाषा चालू असताना त्यांना संकोचच वाटला !



तब रघुबर मुनि सुजसु सुहावा । कोटि भाँति कहि सबहि सुनावा ॥
सो बड़ सो सब गुन गन गेहू । जेहि मुनीस तुम्ह आदर देहू ॥
मुनि रघुबीर परसपर नवहीं । बचन अगोचर सुखु अनुभवहीं ॥
यह सुधि पाइ प्रयाग निवासी । बटु तापस मुनि सिद्ध उदासी ॥
भरद्वाज आश्रम सब आए । देखन दसरथ सुअन सुहाए ॥
राम प्रनाम कीन्ह सब काहू । मुदित भए लहि लोयन लाहू ॥
देहिं असीस परम सुखु पाई । फिरे सराहत सुंदरताई ॥

दो० —राम कीन्ह बिश्राम निसि प्रात प्रयाग नहाइ ।
चले सहित सिय लखन जन मुदित मुनिही सिरु नाइ ॥ १०८ ॥

चौ० —राम सप्रेम कहेउ मुनि पाहीं । नाथ कहिअ हम केहि मग जाहीं ॥
मुनि मन बिहसि राम सन कहहीं । सुगम सकल मग तुम्ह कहुँ अहहीं ॥
साथ लागि मुनि सिष्य बोलाए । सुनि मन मुदित पचासक आए ॥
सबन्हि राम पर प्रेम अपारा । सकल कहहिं मगु दीख हमारा ॥
मुनि बटु चारि संग तब दीन्हे । जिन्ह बहु जनम सुकृत सब कीन्हे ॥
करि प्रनामु रिषि आयसु पाई । प्रमुदित हृदयँ चले रघुराई ॥

नंतर रघुवरांनीही भारद्वाजांच्या उज्ज्वल सत्कीर्तीचे अनेक प्रकारे वर्णन करून सर्वांना सांगितले. भगवान् शेवटी म्हणाले, ' हे मुनीश ! तुम्ही ज्याचा मान सन्मान करून आदर कराल, असा कोणीही मनुष्य सर्व सद्गुणांचे माहेरघर बनून मोठा बनल्याशिवाय राहाणार नाही ! "

मुनी सद्गदित भावाने रघुवीराला प्रमाण करू लागले व भारद्वाज हे श्रेष्ठ ऋषी समजून त्यांना रघुनाथ वंदन करू लागले, त्यावेळी त्यांना जे सुख होत होते, त्याचे वर्णन शब्दांच्या कक्षेत बसत नाही !

दशरथ महाराजांचे सुंदर सुत भारद्वाजांच्या आश्रमात आले आहेत, ही बातमी वायुवेगाने सर्वत्र पसरली व प्रयागवासी बटू, तापस, मुनी, सिद्ध, उदासी अशा सर्वांचा लोंढा रघुवीरांचे आदरयुक्त दर्शन घेण्यासाठी वाहू लागला !

रामांनी सर्वांनाच नमन केले. आलेल्या मंडळींचे डोळे प्रभूच्या सौंदर्यावर खिळले, तेव्हा त्यांना झालेल्या आनंदाचे वर्णन कसे करावे ? अंतःकरण तृप्त झाल्यावर त्यांनी आशीर्वाद दिले आणि सौंदर्याची वाखाणणी करीत ते सर्व लोक परतले.

रात्री विश्रांती घेतल्यानंतर सकाळी प्रयाग तीर्थात प्रभूंनी स्नान केले. सीता लक्ष्मण व गुह यांच्यासह भारद्वाजांना आनंदाने नमन करून राम पुढे निघाले. १०८

जाताना प्रेमाने मुनींना विचारले, " हे नाथ ! आम्ही यापुढे कोणत्या मार्गाने जावे ? "

हा प्रश्न ऐकून भारद्वाज मनात हसले व म्हणतात, " रामा ! सर्वच मार्ग तुम्हाला सुगम आहेत. "

रामाच्या बरोबर पाठविण्यासाठी भारद्वाजांनी नंतर शिष्यांना बोलावले त्याबरोबर एकदम पन्नास शिष्य मोठ्या आनंदाने पुढे झाले. रामप्रभूच्या ठिकाणी सर्वांचे अपार प्रेम असल्याने सर्व आम्हाला रस्ताबरोबर माहीत आहे, असे सांगू लागले, शेवटी ज्यांनी अनेक जन्मी सर्व प्रकारची पुण्याई जोडली होती, अशा चार बटूंना भारद्वाजांनी बरोबर जाण्यास परवानगी दिली. नंतर मुनींना पुनः प्रणाम केल्यावर ऋषींची आज्ञा मिळाली व प्रसन्न चित्ताने रघुराज पुढे चालले.

ग्राम निकट जब निकसहि जाई। देखहिं दरसु नारि नर धाई॥
होहिं सनाथ जनम फलु पाई। फिरहिं दुखित मनु संग पठाई॥
दो०—बिदा किए बटु बिनय करि फिरे पाइ मन काम।
उतरि नहाए जमुन जल जो सरीर सम स्याम॥ १०९॥
चौ०—सुनत तीरबासी नर नारी। धाए निज निज काज बिसारी॥
लखन राम सिय सुंदरताई। देखि करहि निज भाग्य बड़ाई॥
अति लालसा बसहिं मन माहीं। नाउँ गाउँ बूझत सकुचाहीं॥
जे तिन्ह महुँ बयबिरिध समाने। तिन्ह करि जुगुति रामु पहिचाने॥
सकल कथा तिन्ह सबहि सुनाई। बनहि चले पितु आयसु पाई॥
सुनि सबिषाद सकल पछिताहीं। रानी रायँ कीन्ह भल नाहीं॥
तेहि अवसर एक तापसु आवा। तेजपुंज लघु बयस सुहावा॥
कबि अलखित गति बेषु बिरागी। मन क्रम बचन राम अनुरागी॥
दो०—सजल नयन तन पुलकि निज इष्टदेउ पहिचानि।
परेउ दंड जिमि धरनितल दसा न जाइ बखानि॥ ११०॥
चौ०—राम सप्रेम पुलकि उर लावा। परम रंक जनु पारसु पावा॥
मनहुँ प्रेमु परमारथ दोऊ। मिलत धरें तन कह सबु कोऊ॥

प्रभू–वाल्मीकि–मीलन

वाटेतील गावावरून जेव्हा ही मंडळी निघाली, तेव्हा स्त्रिया व पुरुष हे अलौकिक सौंदर्य पहाण्यासाठी धावत येऊ लागले. मूळचे अनाथ असे ते सर्व लोक जन्माचे सार्थक करून सनाथ होत असत व आपल्या मनाला रघुनाथाच्यासह पाठवून शरीर बरोबर जाणे अशक्य असल्याने त्याला मोठ्या कष्टाने परत फिरवत.

त्यानंतर श्रीरामचंद्रानी विनंतिपूर्वक त्या चार बटूंना परत जाण्यास निरोप दिला. त्यांनाही त्यांचे मनोरथ पूर्ण झाल्याचे समाधान लाभल्याने ते आज्ञेप्रमाणे परतले. यमुनेच्या पैलतीराला जाऊन प्रभूच्या शरीराप्रमाणे श्यामवर्णाच्या जलात सर्वांनी स्नाने केली. १०९

यमुनातीरवासी लोकांच्या कानावर दोन परम सुंदर कुमार व एक परम सुंदर सुकुमारी येत आहे अशी बातमी जाताच आपल्या कामांचा विसर पडून ते दर्शनार्थ धावत सुटले. लक्ष्मण-राम-सीता यांचे अपूर्व सौंदर्य पाहावयास मिळाल्यानंतर ते स्वतःच्या भाग्याची प्रशंसा करू लागले. यांची माहिती मिळावी म्हणून त्यांना मोठी जिज्ञासा वाटत होती, परंतु नाव-गाव त्यांना कसे विचारावे म्हणून त्यांना मोठा संकोच वाटत असे.

तथापि त्या मंडळीत जे वयोवृद्ध जाणते होते, ते युक्तीने रामाला ओळखत असत. अशी मंडळी भोवतालच्या लोकांना पित्राज्ञा प्रमाण मानून राम वनाला कसे चालले आहेत, वगैरे सर्व हकीकत सांगत असत.

ही कथा ऐकताच त्या लोकांना मोठा विषाद होई व ते राजाला व राणीला त्यांनी हे बरे केले नाही म्हणून दोष देत असत.

याच प्रसंगी एक सुंदर तेजस्वी व कोवळ्या वयाचा असा तपस्वी तेथे आला. त्याचे सत्य स्वरूप कवीला अज्ञात होते. (तो कवी असून, स्वतःचा परिचय करून देण्याची इच्छा नव्हती) त्याचा वेष वैराग्ययुक्त होता. मनाने, वाणीने व कर्माने तो श्रीरामचंद्रांचा भक्त होता.

आपले इष्ट दैवत समोर आलेले पाहाताच त्याचे डोळे आनंदाश्रूंनी डबडबले. सर्व शरीर रोमांचित झाले व अंतःकरणाची काय स्थिती झाली, ने सांगणे अशक्य झाल्याने तो प्रभुचरणी दण्डवत् पडून राहिला. ११०

रामांनी त्याला अत्यंत प्रेमाने उठवून पुलकयुक्त शरीराने आलिंगन दिले. त्यावेळी कमालीच्या दरिद्र्याला



बहुरि लखन पायन्ह सोइ सागा । लीन्ह उठाइ उमगि अनुरागा ॥
पुनि सिय चरन धूरि धरि सीसा । जननि जानि सिसु दीन्हि असीसा ॥
कीन्ह निषाद दंडवत तेही । मिलेउ मुदित लखि राम सनेही ॥
पिअत नयन पुट रूपु पियूषा । मुदित सुअसनु पाइ जिमि भूखा ॥
ते पितु मातु कहहु सखि कैसे । जिन्ह पठए बन बालक ऐसे ॥
राम लखन सिय रूपु निहारी । होहिं सनेह बिकल नर नारी ॥
दो ० --तब रघुबीर अनेक बिधि सखहि सिखावनु दीन्ह ।
राम रजायसु सीस धरि भवन गवनु तेइँ कीन्ह ॥ १११॥
चौ ० --पुनि सियँ राम लखन कर जोरी । जमुनहि कीन्ह प्रनामु बहोरी ॥
चले ससीय मुदित दोउ भाई । रबितनुजा कइ करत बड़ाई ॥
पथिक अनेक मिलहिं मग जाता । कहहिं सप्रेम देखि दोउ भ्राता ॥
राज लखन सब अंग तुम्हारें । देखि सोचु अति हृदय हमारें ॥
मारग चलहु पयादेहि पाएँ । ज्योतिषु झूठ हमारें भाएँ ॥
अगमु पंथु गिरि कानन भारी । तेहि महँ साथ नारि सुकुमारी ॥
करि केहरि बन जाइ न जोई । हम सँग चलहिं जो आयसु होई ॥
जाब जहाँ लगि तहँ पहुँचाई । फिरब बहोरि तुम्हहि सिरु नाई ॥

परीस मिळाल्याप्रमाणे त्याला परमानंद झाला. ते दृश्य पाहून सर्व लोकांच्या मुखातून उद्‌गार बाहेर पडले, " खरोखर प्रेम व परमार्थ शरीर धारण करूनच परस्परास भेटत आहेत ! "

त्यानंतर तो लक्ष्मणांच्या पाया पडला. त्यांनीही प्रेम भराने त्याला धरून उठवला. लगेच त्याने मातोश्री जाणून, सीतेच्या चरणांची धूळ आपल्या मस्तकावर घेतली. तिनेही आपले बालक समजून त्याला आशीर्वाद दिले.

निषादपतीने त्याला दण्डवत् केला व रामाचा स्नेही समजून मोठ्या आनंदाने गुहाला त्या तपस्व्याने भेट दिली व आपल्या [हा तपस्वी-ध्यानस्थ तुलसीदास असून, हनुमंत नव्हेत.] नेत्रपुटांनी त्या रूपामृताचे पान करू लागला. एखाद्या भुकेलेल्या मनुष्याला मनमुराद मिष्टान्न मिळाल्याप्रमाणे तो मुदित झाला !

ग्रामवासी स्त्रिया आपसात बोलू लागल्या, " हे सखी ! सांग बरं, असल्या सुकुमार बालकांना वनात पाठविणारे आईबाप कसले असावेत ? "

याचे कारण श्रीराम, सीता व लक्ष्मण यांचे ते अलौकिक सौंदर्य पाहून सर्वच स्त्रिया व पुरुष प्रेमाने व्याकुळ होऊन जात.

त्यानंतर अनेक प्रकारची शिकवण गुहसख्याला रघुवीरांनी दिली. रामाज्ञा शिरसावंद्य मानून तो आपल्या घराकडे परतला. १११

गुह परत गेल्यावर सीता, राम व लक्ष्मण यांनी हात जोडून यमुनेला पुनः नमन केले व त्या रवितनयेची (यमुनेची) महती वर्णन करीत सीतेसह दोघे बंधू मोठ्या संतोपाने पुढे निघाले.

वाटेत अनेक वाटसरूंनी या बंधूना पाहावे आणि म्हणावे, " अहो तुमच्या ठिकाणी सर्व सामुद्रिक, राजचिन्हे, तुमच्या अंगावर पाहून आमच्या हृदयाला असह्य वेदना होतात. तुम्ही अनवाणी चालू लागल्याचे दृश्य पाहून सामुद्रिक ज्योतिष शास्त्र खोटे असेच वाटते ! रस्ता मूळचाच कठीण, त्यात पुनः डोंगर व गहन अरण्ये ! हेही कसे तरी सोसेल पण त्यात अत्यंत सुकुमार अशी स्त्री बरोबर ! हत्ती सिंह, वाघ इत्यादि हिंस्र पशूंनी भरलेले हे भयानक वन नुसते दृष्टीने पाहाणे ही कठीण ! आपली आज्ञा मिळाल्यास आम्ही बरोबर येऊ ! आपल्या ठरलेल्या ठिकाणी आपणास पोचवून प्रणामपूर्वक परत फिरू. "

दो०—एहि बिधि पूँछहिं प्रेम बस पुलक गात जलु नैन ।
कृपासिंधु फेरहिं तिन्हहि कहि बिनीत मृदु बैन ।। ११२ ।।

चौ०—जे पुर गाँव बसहिं मग माहीं । तिन्हहि नाग सुर नगर सिहाहीं ।।
केहि सुकृतीं केहि घरीं बसाए । धन्य पुन्यमय परम सुहाए ।।
जहँ जहँ राम चरन चलि जाहीं । तिन्ह समान अमरावति नाहीं ।।
पुन्यपुंज मग निकट निवासी । तिन्हही सराहहिं सुरपुरबासी ।।
जे भरि नयन बिलोकहिं रामहि । सीता लखन सहित घनस्यामहि ।।
जे सर सरित राम अवगाहहिं । तिन्हहि देव सर सरित सराहहिं ।।
जेहि तरु तर प्रभु बैठहिं जाई । करहिंकलपतरु तासु बड़ाई ।।
परसि राम पद पदुम परागा । मानति भूमि भूरि निज भागा ।।

दो०—छाँह करहिं घन बिबुधगन बरषहिं सुमन सिहाहिं ।
देखत गिरि बन बिहग मृग रामु चले मग जाहिं ।। ११३ ।।

चौ०—सीता लखन सहित रघुराई । गाँव निकट जब निकसहिं जाई ।।
सुनि सब बाल बृद्ध नर नारी । चलहिं तुरत गृहकाजु बिसारी ।।
राम लखन सिय रूप निहारी । पाइ नयनफलु होहिं सुखारी ।।
सजल बिलोचन पुलक सरीरा । सब भए मगन देखि दोउ बीरा ।।

याप्रमाणे हे वाटसरू ज्योतिषी लोक प्रेमविवश होत, शरीर पुलकित होऊन त्यांच्या नेत्रातून प्रेमाश्रूंचा पूर लोटत. ते प्रार्थना करीत असत. परंतु कृपेचे सागर श्रीरामचंद्र त्यांना कोमल व नम्र वचनांनी समजावून परत फिरवीत. ११२

भगवंताच्या वाटेवर जे पूर किंवा गाव लागे, त्याचा नागलोकव देवलोकातील नगरवासी लोक मोठा हेवा करून स्तुती करत व म्हणत की, खरोखर कोणा पुण्यात्म्याने कोणत्या शुभमुहूर्तावर या गावांना वसविले ! प्रभूंच्या सान्निध्य सुखाने ती सर्व पवित्र, सुंदर व धन्य झाली ! जेथे जेथे श्रीरामचरणाचे ठसे उमटत, ते ते ठिकाण अमरावतीलाही आपल्या महत्त्वाने लाज उत्पन्न करी ! रस्त्याच्या आसपास वस्ती करून राहाणाऱ्यांच्या पुण्याईचा मोठाच साठा; कारण स्वर्गात राहणाऱ्या देवताही त्यांची स्तुती करत. खरेच आहे, सीता, लक्ष्मण यांच्यासह त्या घनःश्याम रामाला डोळे भरून पाहण्याचे भाग्य अतुल्यच नव्हे का ?

ज्या सरोवरात अगर नदीत राम स्नान करत. त्यांची महती देवसरोवरे व देवनद्या मुक्तकंठाने गात. ज्या तरुच्या छायेत प्रभू विश्रांतीसाठी बसत, तोच महान कल्पवृक्ष, असे देव म्हणत ! श्रीराम-चरणकमलातील रजःकण आपणाला लागत आहेत, हे पाहून पृथ्वी आपल्याला मोठ्या भाग्याची प्राप्ती झाली, असे मानत असे. आकाशात मेघ येऊन रामावर छाया करित, देव पुष्पवृष्टी करून स्तुती करित. पण तिकडे लक्ष न देता पर्वत वन व पशुपक्षी यांना पाहात पाहात राम रस्त्याने चालू लागत. ११३

लक्ष्मण आणि सीतेसह रघुपती ज्या ज्या गावांवरून जात, त्या त्या गावी ही बातमी पोचताच, आपली घरची कामे विसरून बाल, वृद्ध नर-नारी अत्यंत घाईने त्यांच्याकडे जात. रामसीता व लक्ष्मण यांचे अलौकिक लावण्य, पाहून, आपल्या डोळ्यांचे सार्थक झाल्याचे सौख्य लुटत ! त्या दोन धनुर्धारी वीरांना पाहात असता, त्यांचे डोळे आनंदाश्रूंनी भरून येत, अंगावर रोमांच उठत व निर्निमेष नेत्रांनी ते सौंदर्य लुटत असता त्यांचे देहभान हरपे !! त्यांच्या त्या परमानंदाचे कोणी वर्णन करावे ? जणू काही जन्मदरिद्र्याला चिंतामणीच्या राशीचीच प्राप्ती झाली !

कोणी जात असलेला मनुष्य दिसताच त्याला हाक मारून कोणी सांगत, " अरे, याच क्षणाला जा आणि आपल्या डोळ्यांचे पारणे फेडण्याचा लाभ लुटा ! "



बरनि न जाइ दसा तिन्ह केरी । लहि जनु रंकन्ह सुरमनि ढेरी ॥
एकन्ह एक बोले सिख देहीं । लोचन लाहु लेहु छन एहीं ॥
रामहि देखि एक अनुरागे । चितवत चले जाहिं सँग लागे ॥
एक नयन मग छबि उर आनी । होहिं सिथिल तन मन बर बानी ॥
दो० — एक देखि बट छाँह भलि डासि मृदुल तृन पात ।
कहहिं गवाँइअ छिनुकु श्रमु गवनब अबहिं कि प्रात ॥ ११४ ॥
चौ० — एक कलस भरि आनहिं पानी । अँचइअ नाथ कहहिं मृदु बानी ॥
सुनि प्रिय बचन प्रीति अति देखी । राम कृपाल सुसील बिसेषी ॥
जानी श्रमित सीय मन माहीं । घरिक बिलंबु कीन्ह बट छाहीं ॥
मुदित नारि नर देखहिं सोभा । रूप अनूप नयन मनु लोभा ॥
एकटक सब सोहहिं चहुँ ओरा । रामचंद्र मुख चंद चकोरा ॥
तरुन तमाल बरन तनु सोहा । देखत कोटि मदन मनु मोहा ॥
दामिनि बरन लखन सुठि नीके । नख सिख सुभग भावते जी के ॥
मुनिपट कटिन्ह कसें तूनीरा । सोहहिं कर कमलनि धनु तीरा ॥
दो० — जटा मुकुट सीसनि सुभग उर भुज नयन बिसाल ।
सरद परब बिधु बदन बर लसत स्वेद कन जाल ॥ ११५ ॥
चौ० — बरनि न जाइ मनोहर जोरी । सोभा बहुत थोरि मति मोरी ॥
राम लखन सिय सुंदरताई । सब चितवहिं चित मन मति लाई ॥

कोणी रामाला पाहात असता इतके वेडावून जात की, ते रामाच्या पाठोपाठ सर्वस्वाचा विसर पडून सरळ चालू लागत; तर कोणी त्या दैवी सौंदर्यसुधेचे पान करत असता आपल्या डोळ्यांच्या वाटेने त्या लावण्याला हृदयात आणल्यावर त्या आनंदातिरेकाने त्यांच्या शरीर मन-वाणीवरील त्यांचा ताबा नष्ट होत असे.

इतक्यात कोणीतरी वडाच्या झाडाखालील गर्द छाया पाहून सर्वत्र स्वच्छता करीत, कोमल तृण व पल्लवाचे आसन बनवीत व त्या ठिकाणी राम येताच प्रार्थना करत, ' एक घटकाभर येथे बसून आपले श्रम परिहार करा; थोड्या वेळाने, नाहीतर उद्या सकाळी पुढे जाल ! ' ११४

कोणीतरी तेवढ्यात तांब्याभरून पाणी घेऊन येत व कोमल वाणीने म्हणत, ' नाथ ! चूळ भरून टाकावी ! '

अशा प्रकारचे त्या लोकांचे ते निष्काम प्रेम पाहून व त्यांची ती गोड वाणी ऐकून, कृपाळू रामचंद्र अत्यंत सुशील असल्याने, सीता श्रमलेली आहे, हे ओळखून त्या वडाच्या झाडाखाली घटकाभर थांबत. त्यामुळे आनंदित होऊन, स्त्रिया व पुरुष त्या अनुपमेय रूपाची शोभा पाहत असता त्यांच्या डोळ्यांचा व मनाचा हव्यास पुरत नसे, श्रीरामचंद्राच्या मुखचंद्राच्या किरणांचा लाभ लुटणारे ते सर्व चकोर, चारी दिशांना उभे राहून टकमक पाहत असत. नवीन ताज्या भराने वाढलेल्या तमाल वृक्षाप्रमाणे ज्याच्या शरीराचा वर्ण शोभतो आहे, तो पाहून कोट्यवधी मदनांच्या मनाला मोह उत्पन्न होई, विजेच्या तेजाप्रमाणे अत्यंत सुंदर अशी लक्ष्मणाची नखशिखांत शोभणारी मूर्ति मनाची विलक्षण पकड घेत होती.

मुनीप्रमाणे वल्कले नेसलेले, त्यावर भाता कसलेला, करकमलात उत्तम धनुष्य व बाण धारण केलेले, मस्तकावर जटा-मुकुट, शोभायमान वक्षस्थल व बाहू, डोळे मोठे व पाणीदार, शरद्‌ऋतूतील अत्यंत तेजस्वी पूर्णचंद्राप्रमाणे आकर्षक मुखमंडलावर मोत्याप्रमाणे घामाचे बिंदू चमकत असलेले, अशी ती मनोहर जोडी ! ११५

तिचे लावण्य अमर्याद व माझी बुद्धी थोडी ! अशा स्थितीत मला तिचे वर्णन करताच येत नाही !

तथापि ते ग्रामवासी लोक मात्र आपल्या चित्त-मन-मतीला एकवटून लक्ष्मण-राम सीतेच्या सौंदर्याचे

थके नारि नर प्रेम पिआसे। मनहुँ मृगी मृग देखि दिआ से ॥
सीय समीप ग्रामतिय जाहीं। पूँछत अति सनेहँ सकुचाहीं ॥
बार बार सब लागहिं पाएँ। कहहिं बचन मृदु सरल सुभाएँ ॥
राजकुमारि बिनय हम करहीं। तिय सुभायँ कछु पूँछत डरहीं ॥
स्वामिनि अबिनय छमबि हमारी। बिलगु न मानब जानि गवाँरी ॥
राजकुअँर दोउ सहज सलोने। इन्ह तें लही दुति मरकत सोने ॥

दो०—स्यामल गौर किसोर बर सुंदर सुषमा ऐन।
सरद सर्बरीनाथ मुखु सरद सरोरुह नैन ॥ ११६ ॥

मासपारायण, चौदहवाँ विश्राम
नवाह्नपारायण, चौथा विश्राम

चौ०—कोटि मनोज लजावनिहारे। सुमुखि कहहु को आहिं तुम्हारे ॥
सुनि सनेहमय मंजुल बानी। सकुची सिय मन महुँ मुसुकानी ॥
तिन्हहि बिलोकि बिलोकति धरनी। दुहुँ सकोच सकुचति बरबरनी ॥
सकुचि सप्रेम बाल मृग नयनी। बोली मधुर बचन पिकबयनी ॥
सहज सुभाय सुभग तन गोरे। नामु लखन लघु देवर मोरे ॥
बहुरि बदनु बिधु अंचल ढाँकी। पिय तन चितइ भौंह करि बाँकी ॥
खंजन मंजु तिरीछे नयननि। निज पति कहेउ तिन्हहि सियँ सयननि ॥
भई मुदित सब ग्रामबधूटीं। रंकन्ह राय रासि जनु लूटीं ॥

निरीक्षण करीत होते. परंतु त्यांची अंतःकरणे भगवत्प्रेमाने वेडावली असल्याने, जणू काही प्रकाशाचा स्रोत पाहून हरीण व हरिणी थक्क व्हाव्यात, तशी त्यांची अवस्था झाली !

त्यातील काही ग्रामवासी स्त्रिया सीतेजवळ गेल्या. अंतःकरणात जिज्ञासा जबरदस्तपण विचारण्याला मात्र त्यांना संकोच वाटत होता. घटकोघटकी त्या सगळ्या सीतेच्या पाया पडत. शेवटी धीर धरून सरळ व कोमल वाणीने त्या म्हणाल्या, "हे राजकुमारी एक विनंती करतो. स्त्रीस्वभावामुळे तुम्हाला विचारण्याची भीती वाटते; म्हणून हे स्वामिनी ! आमच्या या धिटाईबद्दल आम्हाला क्षमा करावी. गावढळ बायका म्हणून आमच्यावर रागावूं मात्र नका हं !

"हे दोघे राजकुमार जात्याच इतके सुंदर आहेत की ज्यांच्या तेजाच्या अंशाने नीलमणी व सोने यांना कांती लाभली आहे ! एक सावळा व एक गौर असे हे पहिल्या पंचविशीतील तरुण, दोघेही परमसुंदर असून, लावण्याची खाणी आहेत. शरदृतूतील पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे यांचे मुख असून, शरदृतूतील कमलाप्रमाणेच त्यांचे नेत्र आहेत." ११६.

कोट्यवधी मदनांनीही ज्यांच्यापुढे सौंदर्याच्या बाबतीत हार खावी, असे हे दोघेजण, हे सुमुखी ! तुझे कोण लेवढे सगळे आम्हाला सांगशील का ?"

त्यांचे हे प्रेमळ व कर्णमधुर भाषण ऐकूण सीतेला मनातल्या मनात स्मित केले, पण त्यांच्या प्रश्नाचे उत्तर देण्याचा तिलाही संकोच वाटू लागला. उत्तम गौरवर्णाच्या सीतेने त्यांचेकडे एकवेळ पाहिले व संकोचाने ती पुनः जमिनीकडे पाहू लागली. तिला दोन्ही बाजूनी अडचण वाटू लागली. न सांगावे तर त्या स्त्रिया दुःखी होतील; सांगावे तर कसे सांगायचे ? हरिणीच्या [illegible] सुंदर नयनाच्या सीतेला याप्रमाणे प्रेमामुळें लाज वाटू लागली ! अखेर कोकिळेच्या मधुर वाणीने ती म्हणाली, "स्वभावतः सुशील व सुंदर गोरेपान, ज्यांचे नाव लक्ष्मण आहे, ते माझे धाकटे दीर !"

दो० –अति सप्रेम सिय पायँ परि बहुबिधि देहिं असीस ।
सदा सोहागिनि होहु तुम्ह जब लगि महि अहि सीस ॥ ११७॥

चौ० –पारबती सम पतिप्रिय होहू । देबि न हम पर छाड़ब छोहू ॥
पुनि पुनि बिनय करिअ कर जोरी । जौं एहि मारग फिरिअ बहोरी ॥
दरसनु देब जानि निज दासी । लखीं सीयँ सब प्रेम पिआसी ॥
मधुर बचन कहि कहि परितोषीं । जनु कुमुदिनीं कौमुदीं पोषीं ॥
तबहिं लखन रघुबर रुख जानी । पूँछेउ मगु लोगन्हि मृदु बानी ॥
सुनत नारि नर भए दुखारी । पुलकित गात बिलोचन बारी ॥
मिटा मोदु मन भए मलीने । बिधि निधि दीन्ह लेत जनु छीने ॥
समुझि करम गति धीरजु कीन्हा । सोधि सुगम मगु तिन्ह कहि दीन्हा ॥

दो० –लखन जानकी सहित तब गवनु कीन्ह रघुनाथ ।
फेरे सब प्रिय बचन कहि लिए लाइ मन साथ ॥ ११८ ॥

चौ० –फिरत नारि नर अति पछिताहीं । दैअहि दोषु देहिं मन माहीं ॥
सहित बिषाद परसपर कहहीं । बिधि करतब उलटे सब अहहीं ॥

एवढे बोलून सीतेने आपला मुखचंद्र पदराने झाकला; आपल्या प्रियपतीकडे एकवेळ निरखून पाहिले व भुवई वाकवून, खंजन पक्ष्याच्या सुंदर डोळ्यानी एका बाजूने पाहात, त्या ग्रामीण स्त्रियांना सीतेने श्रीराम हे आपले पती आहेत, असे खुणेने सुचवले !

एवढे समजल्यावर रंकांना संपत्तीची रास जणू लुटण्यास मिळाल्याप्रमाणे त्या सर्व ग्रामवासी स्त्रिया आनंदित झाल्या. त्यानी मोठ्या प्रेमाने सीतेला नमन केले व अनेक प्रकारे आशीर्वाद दिले; (शुभेच्छा प्रकट केल्या.) "शेष जोपर्यंत ही पृथ्वी आपल्या मस्तकावर धारण करीत आहे, तोपर्यंत तुम्ही अखंड सौभाग्यवती व्हा ! ११७

पार्वतीप्रमाणे आपल्या पतीला प्रिय व्हा. आमच्यावरील प्रेम मात्र कधी कमी करू नका ! हात जोडून एवढीच प्रार्थना वारंवार करतो की, जर आमच्यावर या रस्त्याला आपल्या पायांनी पुनः विभूषित केले, तर आम्हाला आपल्या चरणाच्या दासी समजून दर्शन द्या."

त्यांचे हे मनापासूनचे भाषण ऐकून त्या किती शुद्ध प्रेमाने विनवणी करीत आहेत, ते सीतेच्या ध्यांनी आले. मधुर व कोमल अशा भाषणाने त्यांना भरपूर संतुष्ट केले. जणू काही चंद्रकिरणांनी चंद्रविकासी कमळेच खुलत आहेत !

इतका वेळ गेल्यानंतर रघुवराच्या मनाचा कल समजून लक्ष्मणाने नम्रपणे त्या लोकांना रस्त्याची माहिती विचारली. त्याबरोबर सर्व स्त्रिया व पुरुष अत्यंत दुःखी झाले. त्यांची काया पुलकित होऊन डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या ! त्यांचे अंतःकरण उदास होऊन झालेला सर्व आनंद मावळला. जणू काही दैवाने दिलेला निधी कर्माने नेला ! आपले 'कर्म' म्हणून त्यांनी धीर धरला व विचारविनिमय करून त्यातल्यात्यात सोपा व सरळ रस्ता कोणता तो सांगितला.

लक्ष्मण व जानकी यांच्यासह नंतर रघुनाथांनी गमन केले. गोड भाषणाने त्या लोकांची शरीरे मागे परतवली तरी त्यांची मने आपल्याबरोबर घेतलीच. ११८

स्त्रिया व पुरुष परत फिरताना अत्यंत व्याकुळ होत असते. मनात आपल्या दैवाला दोष देऊन विषादाने एकमेकास म्हणत, "खरोखर विधीची सर्व कृती उलटीच ! तो अत्यंत निष्ठुर, अनिर्बंध, व निःशंक

निपट निरंकुस निठुर निसंकू। जेहिं ससि कीन्ह सरुज सकलंकू ॥
रूख कलपतरु सागरु खारा। तेहिं पठए बन राजकुमारा ॥
जौं पै इन्हहि दीन्ह बनबासू। कीन्ह बादि बिधि भोग बिलासू ॥
ए बिचरहिं मग बिनु पदत्राना। रचे बादि बिधि बाहन नाना ॥
ए महि परहिं डासि कुस पाता। सुभग सेज कत सृजत बिधाता ॥
तरुबर बास इन्हहि बिधि दीन्हा। धवल धाम रचि रचि श्रमु कीन्हा ॥
दो०—जौं ए मुनि पट धर जटिल सुंदर सुठि सुकुमार।
बिबिध भाँति भूषन बसन बादि किए करतार ॥ ११९ ॥
चौ०—जौं ए कंद मूल फल खाहीं। बादि सुधादि असन जग माहीं ॥
एक कहहिं ए सहज सुहाए। आपु प्रगट भए बिधि न बनाए ॥
जहँ लगि बेद कही बिधि करनी। श्रवन नयन मन गोचर बरनी ॥
देखहु खोजि भुअन दस चारी। कहँ अस पुरुष कहाँ असि नारी ॥
इन्हहि देखि बिधि मनु अनुरागा। पटतर जोग बनावै लागा ॥
कीन्ह बहुत श्रम ऐक न आए। तेहिं इरिषा बन आनि दुराए ॥
एक कहहिं हम बहुत न जानहिं। आपुहि परम धन्य करि मानहिं ॥
ते पुनि पुन्यपुंज हम लेखे। जे देखहिं देखिहहिं जिन्ह देखे ॥

असा आहे. चंद्राला त्याने क्षयी व कलंकी केला. कल्पतरूला वृक्ष बनवले आणि सागराला खारट करून ठेवला. असा तो असल्यानेच त्याने या राजकुमारांना वनात पाठवले! अशा राजबिंडयांना जर वनवास भोगावा लागावयाचा तर मग नाना प्रकारचे भोग-विलास निर्माण केले तरी कशाला? यांनी रस्त्यावर जर अनवाणी चालावयाचे तर मग विधीने नाना प्रकारची वाहने तरी का केली? जमिनीवर गवत व झाडाची पाने अंथरून जर यानी झोपावे, तर मग उत्तम शय्यांचा उपयोगच काय? झाडाच्या खालीच जर यानी वास्तव्य करावे असे ठरले तर त्या ब्रह्मदेवाने मोठे मोठे प्रासाद बांधण्यासाठी व्यर्थच श्रम घेतले म्हणावयाचे! इतक्या सुंदर आणि सुकुमार राजकुमारांनी जर केसांच्या जटा वळून वल्कले धारण करावयाची तर त्या विधीने इतक्या नाना प्रकारच्या दागिन्यांचा आणि वस्त्रांचा बाजार भरवला तरी कशाला? यानी कंदमूळ फळे खाल्ल्यावर अमृतादि खाद्यपदार्थ जगात व्यर्थच! ११९.

यावर कोणी म्हणे हे स्वभावतःच सुंदर असून स्वतःच प्रकट झाले आहेत. यांना निर्माण करण्यात ब्रह्मदेवाचा मुळीच संबंध नाही! याचे कारण वेदांनी ब्रह्मदेवाची म्हणून जेवढी कान, डोळे व मन यांना आकलन होणारी सृष्टी वर्णन केली आहे, ती सर्व चौदा भुवने धुंडाळून पाहिले तरी असे पुरुष अगर अशी स्त्री कुठेच सांपडणार नाही!

ब्रह्मदेवाने यांना पाहिल्याबरोबर त्याला हे फारच आवडले व त्यांच्यासारखे दुसरे स्त्री-पुरुष निर्माण करण्यासाठी तो प्रयत्न करू लागला. पुष्कळ श्रम करूनही ते साधेना, म्हणून त्या मत्सराने त्याने याना वनात भटकावयास लावले.

कोणी म्हणाले, आम्हाला इतकी खोल विचार करण्याची अक्कल मुळीच नाही. पण आम्ही स्वतःला मात्र परम धन्य समजतो. इतकेच नव्हे आमच्याप्रमाणे ज्यांना यांचे दर्शन घडले किंवा घडेल, ते सर्वच मोठे पुण्यवान होत!



दो० — एहि बिधि कहि कहि बचन प्रिय लेहिं नयन भरि नीर ।
किमि चलिहहिं मारग अगम सुठि सुकुमार सरीर ।। १२० ।।

चौ० — नारि सनेह बिकल बस होहीं । चकईं साँझ समय जनु सोहीं ।।
मृदु पद कमल कठिन मगु जानी । गहबरि हृदयँ कहहिं बर बानी ।।
परसत मृदुल चरन अरुनारे । सकुचति महि जिमि हृदय हमारे ।।
जौं जगदीस इन्हहि बनु दीन्हा । कस न सुमनमय मारगु कीन्हा ।।
जौं मागा पाइअ बिधि पाहीं । ए रखिअहिं सखि आँखिन्ह माहीं ।।
जे नर नारि न अवसर आए । तिन्ह सिय रामु न देखन पाए ।।
सुनि सुरूपु बूझहिं अकुलाई । अब लगि गए कहाँ लगि भाई ।।
समरथ धाइ बिलोकहिं जाई । प्रमुदित फिरहिं जनमफलु पाई ।।

दो० — अबला बालक बृद्ध जन कर मीजहिं पछिताहिं ।
होहिं प्रेमबस लोग इमि रामु जहाँ जहँ जाहिं ।। १२१ ।।

चौ० — गावँ गावँ अस होइ अनंदू । देखि भानुकुल कैरव चंदू ।।
जे कछु समाचार सुनि पावहिं । ते नृप रानिहि दोसु लगावहिं ।।
कहहिं एक अति भल नरनाहू । दीन्ह हमहिं जोइ लोचन लाहू ।।
कहहिं परसपर लोग लोगाईं । बातें सरल सनेह सुहाईं ।।

अशा प्रकारे प्रभुवियोगाने तळमळणाऱ्या त्या ग्रामवासी लोकांची आपसात प्रेमळ बोलणी चालू असतां त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहू लागत. शेवटीं त्यांच्या मुखांतून वाक्य बाहेर पडे, “ अतिशय सुकुमार अशा शरीराच्या त्या अलौकिक राजकुमारांनी व कुमारीने भयंकर कठीण अशा रस्त्याने कसे चालावे हो !” १२०

सायंकाळी चक्रवाकी ज्याप्रमाणे व्याकुळ व्हावी तशा सर्व स्त्रिया अत्यंत प्रेम विव्हल झाल्या.

त्यांचे कोमल चरणकमल व रस्त्याचा कमालीचा कठीणपणा मनात येऊन त्यांची हृदये कासावीस होत व मधुर वाणीने त्या बोलत, “ यांच्या अति सुकुमार लाल लाल पावलांच्या तळव्यांचा स्पर्श होत असता, आमच्या हृदयाप्रमाणेच पृथ्वीलाही क्लेश होत असतील नाही ? जगदीशाने यांना वनवास जर दिला तर मग निदान सर्व वाटा फुलांनी भरून तरी कां ठेवल्या नाहीत ?

“ खरोखर आम्ही मागू ते जर विधी देणार असेल तर एवढीच त्याच्या चरणी प्रार्थना करू की, यांना आमच्या डोळ्यांआड केव्हाच करू नको ! ”

वेळेवर ज्या स्त्रीपुरुषांना येता आले नाही त्यांना अर्थात् सीतारामाचे दर्शन दुरावले. त्यांच्या स्वरूपाचे वर्णन ऐकून ते तळमळून विचारत, ‘ आता कुठपर्यंत गेले असतील हो ? ’

ज्यांना अंगांतील सामर्थ्याचा जोर होता, ते धावत जाऊन दर्शन घेत व आपला जन्म सफल झाला, या आनंदाने ते परत फिरत. परंतु स्त्रिया, लहान मुले व वृद्ध यांना, अंगात तेवढी शक्ती नसल्यामुळे ते दुःखाने हात चोळून हळहळत बसत !

ज्या ज्या ठिकाणी राम गेले, तेथील लोकांची प्रेमामुळे अशी विलक्षण स्थिती होत असे. १२१

सूर्यवंशरूपी कुमुदिनींना उमलविणारा हा रामचंद्र पाहून गावोगांवचे लोक अशी आनंदाची लूट करीत असत.

त्यांच्या वनवासाची सर्व हकीकत ज्यांच्या कानी पडे ते राजाराणींना दोष देत असत ! याच्या उलट कोणी राजाला धन्यवादही देत असत; कारण त्यांच्या या कृतीमुळेच आम्हाला हा नयन-लाभ झाला असे ते म्हणत !

स्त्रिया आणि पुरूष अशा प्रेमळ सुंदर आणि सरळ कथा एकमेकांना सांगत. ते म्हणत, “ ज्यांच्या पोटी

ते पितु मातु धन्य जिन्ह जाए । धन्य सो नगरु जहाँ तें आए ॥
धन्य सो देसु सैलु बन गाऊँ । जहँ जहँ जाहिं धन्य सोइ ठाऊँ ॥
सुखु पायउ बिरंचि रचि तेही । ए जेहि के सब भाँति सनेही ॥
राम लखन पथि कथा सुहाई । रही सकल मग कानन छाई ॥

दो०—एहि बिधि रघुकुल कमल रबि मग लोगन्ह सुख देत ।
जाहिं चले देखत बिपिन सिय सौमित्रि समेत ॥ १२२ ॥

चौ०—आगें रामु लखनु बने पाछें । तापस बेष बिराजत काछें ॥
उभय बीच सिय सोहति कैसें । ब्रह्म जीव बिच माया जैसें ॥
बहुरि कहउँ छबि जसि मन बसई । जनु मधु मदन मध्य रति लसई ॥
उपमा बहुरि कहउँ जियँ जोही । जनु बुध बिधु बिच रोहिनि सोही ॥
प्रभु पद रेख बीच बिच सीता । धरति चरन मग चलति सभीता ॥
सीय राम पद अंक बराएँ । लखन चलहिं मगु दाहिन लाएँ ॥
राम लखन सिय प्रीति सुहाई । बचन अगोचर किमि कहि जाई ॥
खग मृग मगन देखि छबि होहीं । लिए चोरि चित राम बटोहीं ॥

दो०—जिन्ह जिन्ह देखे पथिक प्रिय सिय समेत दोउ भाई ॥
भव मगु अगमु अनंदु तेइ बिनु श्रम रहे सिराइ ॥ १२३ ॥

हे जन्माला आले ते आईबाप धन्य ! ज्या नगराहून ते आले, नगर धन्य होय ! तो देश, ते वन, तो पर्वत तो गाव, इतकेच काय, ज्या ज्या ठिकाणी ते जातील ते प्रत्येक ठिकाण धन्यच ! यांना निर्माण करून ब्रह्मदेवाला मोठे सुख झाले; कारण त्याचे श्रीरामचंद्र सर्व प्रकारे स्नेही आहेत. "

प्रवासी रामलक्ष्मणांच्या अशा सुकथेने सर्व रस्ते व वने भरून राहिली होती !

रघुकुलरूपी कमलांना खुलविणारे सूर्य असे श्रीरामचंद्र अशा प्रकारे मार्गावरील लोकांना सुखवीत जानकी व लक्ष्मण यांच्यासह वनांची शोभा पाहात पुढे निघाले. १२२

सर्वांच्या पुढे राम, शेवटी लक्ष्मण व मध्ये सीता असे त्रिवर्ग तपस्व्याच्या वेषात फारच शोभून दिसत. दोघांच्यामध्ये सीता ब्रह्म आणि जीव यांच्या दरम्यानच्या मायेच्या सांध्याप्रमाणे सुंदर दिसे त्यांचे सौंदर्य माझ्या मनात जसे स्थिरावले आहे तसे सांगतो. मला वाटते वसंत ऋतू आणि मदन यांच्यामध्ये रतीच जणू खुलते ! किंवा पुनः हृदयातून शोधून उपमा देतो; बुध व चंद्र यांच्यामध्ये जणू रोहिणीच शोभत आहे !

प्रभुपदांचे ठसे दोन ठिकाणी पडल्यानंतर त्यांना आपल्या पायाचा स्पर्श होऊ नये अशी भीती बाळगून दोहोंच्यामध्ये सीता आपले पाऊल टाकी आणि सीता-राम यांच्या पद-चिन्हाना सांभाळून त्यांना उजवी घालून लक्ष्मण चालत असे !

राम सीता व लक्ष्मण यांच्यामधील सुप्रीती ही शब्दांच्या पलीकडील असल्याने ती मी कशी बोलून दाखवू ?

पक्षी व पशूसुद्धा त्यांच्या सौंदर्याला पाहून प्रेमानंदात मग्न होत असत. पायी चालणाऱ्या रामाने त्यांचे चित्त चोरून नेले होते.

याप्रमाणे सीतेसह ते दोन प्रिय प्रवासी बंधू ज्यांना ज्याना दिसले त्यानी त्यानी संसाररूपी अत्यंत दुर्गम असा रस्ता विनाश्रम सुखाने शेवटास नेला यात शंकाच नाही ! १२३

चौ ०—अजहुँ जासु उर सपनेहुँ काऊ। बसहुँ लखनु सिय रामु बटाऊ॥
राम धाम पथ पाइहि सोई। जो पथ पाव कबहुँ मुनि कोई॥
तब रघुबीर श्रमित सिय जानी। देखि निकट बटु सीतल पानी॥
तहँ बसि कंद मूल फल खाई। प्रात नहाइ चले रघुराई॥
देखत बन सर सैल सुहाए। बालमीकि आश्रम प्रभु आए॥
राम दीख मुनि बासु सुहावन। सुंदर गिरि काननु जलु पावन॥
सरनि सरोज बिटप बन फूले। गुंजत मंजु मधुप रस भूले॥
खग मृग बिपुल कोलाहल करहीं। बिरहित बैर मुदित मन चरहीं॥

दो ०—सुचि सुंदर आश्रमु निरखि हरषे राजिवनेन।
सुनि रघुबर आगमनु मुनि आगें आयउ लेन॥ १२४॥

चौ ०—मुनि कहुँ राम दंडवत कीन्हा। आसिरबादु बिप्रबर दीन्हा॥
देखि राम छबि नयन जुड़ाने। करि सनमानु आश्रमहिं आने॥
मुनिबर अतिथि प्रानप्रिय पाए। कंद मूल फल मधुर मगाए॥
सिय सौमित्रि राम फल खाए। तब मुनि आश्रम दिए सुहाए॥
बालमीकि मन आनंदु भारी। मंगल मूरति नयन निहारी॥
तब कर कमल जोरि रघुराई। बोले बचन श्रवन सुखदाई॥

वाल्मीकि आश्रमात

लक्ष्मण, सीता व राम हे प्रवासी त्रिवर्ग आजही जर एखाद्याच्या हृदयात—स्वप्नातसुद्धा—राहिले तर क्वचित् एखाद्या विरळ्या मुनीला प्राप्त होणारा असा श्रीरामाच्या परमधामाचा मार्ग त्याला सापडेल !

रघुवीराला सीता श्रमल्याची चिन्हे दिसू लागताच, जवळच्याच एका वटवृक्षाखालील गार पाण्याचा झरा त्यांनी पाहिला व तेथेच मुक्काम केला. तेथे रघुवरांनी कंद-मूल-फलाचा आहार घेतला. दुसऱ्या दिवशी सकाळी स्नान करून ते पुढे निघाले.

वाटेतील वनराजी, सरोवरे व पर्वत यांचे सौंदर्य पाहात पाहात, प्रभुवर वाल्मीकींच्या आश्रमास येऊन पोचले. पर्वत, वन व पवित्र पाणी यांच्या सौंदर्यात, पद्धतशीर तयार केलेला तो मुनींचा शोभिवंत आश्रम रामांनी पाहिला. आत जाऊन पुढे पाहातात तो तलावात कमळे उमललेली दिसली व वनात वृक्ष फुलाफळांनी फुलले असून, भुंगे पुष्परस पिऊन मत्त झाल्याने मधुर गुंजारव करीत आहेत ! पशुपक्षी-गणांचा एकच कोलाहल होत असून, ते आपसांतील वैर विसरून वनांत प्रसन्न मनाने चरत व संचार करीत आहेत.

असा हा पवित्र व सुंदर आश्रम पाहून कमलनयन रामाला हर्ष झाला, इतक्यात रघुवराच्या आगमनाची बातमी कानी येताच त्यांना घेऊन जाण्यासाठी वाल्मीकी सामोरे आले. १२४.

वाल्मीकी पुढे दिसताच रामचंद्रानी दण्डवत् नमस्कार घातला; विप्रश्रेष्ठानी रामलक्ष्मणांना आशीर्वाद दिला. रामचंद्राला पाहून मुनींचे नयन तृप्त झाले. नंतर सन्मानपूर्वक वाल्मीकी त्यांच्यासह पर्णकुटीत आले.

प्राणासारखे प्रिय अतिथी म्हणून आपल्या आश्रमास आपण होऊन आल्यामुळे, मधुर अशी फले, कंदमूल इत्यादि त्यांनी मागविले. सीता, लक्ष्मण व राम यांनी फलाहार केल्यानंतर त्यांना मुनींनीं सोईस्कर व सुखावह असे विश्रांतिस्थान दिले.

त्या मंगलमूर्तींना निरखून पाहत असता वाल्मीकीच्या मनात परमानंदाच्या लाटा उसळू लागल्या !

विश्रांति घेतल्यानंतर रघुपतींनी हात जोडून ऐकावयास सुखकारक असे भाषण केले. ते म्हणाले, "हे

तुम्ह त्रिकाल दरसी मुनिनाथा। बिस्व बदर जिमि तुम्हरें हाथा॥
अस कहि प्रभु सब कथा बखानी। जेहि जेहि भाँति दीन्ह बनु रानी॥

दो०—तात बचन पुनि मातु हित भाइ भरत अस राउ।
मो कहुँ दरस तुम्हार प्रभु सबु मम पुन्य प्रभाउ॥१२५॥

चौ०—देखि पाय मुनिराय तुम्हारे। भए सुकृत सब सुफल हमारे॥
अब जहँ राउर आयसु होई। मुनि उदबेगु न पावै कोई॥
मुनि तापस जिन्ह तें दुखु लहहीं। ते नरेस बिनु पावक दहहीं॥
मंगल मूल बिप्र परितोषू। दहइ कोटि कुल भूसुर रोषू॥
अस जियँ जानि कहिअ सोइ ठाऊँ। सिय सौमित्रि सहित जहँ जाऊँ॥
तहँ रचि रुचिर परन तृन साला। बासु करौं कछु काल कृपाला॥
सहज सरल सुनि रघुबर बानी। साधु साधु बोले मुनि ग्यानी॥
कस न कहहु अस रघुकुलकेतू। तुम्ह पालक संतत श्रुति सेतू॥

छं०—श्रुति सेतु पालक राम तुम्ह जगदीस माया जानकी।
जो सृजति जगु पालति हरति रुख पाइ कृपानिधान की॥
जो सहससीसु अहीसु महिधरु लखनु सचराचर धनी।
सुर काज धरि नरराज तनु चले दलन खल निसिचर अनी॥

मुनिनाथ! आपण भूत-भविष्य-वर्तमान जाणणारे आहात. सर्व विश्व तळहातातील एका बोरासारखे तुम्हाला आहे."

या नंतर राणीने आपणाला वनाचे सुख कसे मिळवून दिले, ते सगळे वृत्त वर्णन करून सांगितल्यावर शेवटी प्रभु म्हणतात, "वडिलांचे वचन पूर्ण करणे, आईचे हित साधणे, भरतासारख्या भावाला राज्य मिळणे व त्यातही प्रभू! आपले चरण दर्शन होणे इतक्या सर्व गोष्टी माझ्या मोठ्या पुण्यसंचयामुळेच साधल्या! १२५ (अशाप्रकारे राणीने माझ्या पुण्याचे चतुर्विध फल माझ्या पदरात टाकून माझ्यावर अनंत उपकार केले, असे प्रभू सुचवितात.)

"हे मुनिराज! आपल्या पायांच्या दर्शनाने आमचे सर्व सुकृत चांगले फळास आले. आता आपल्या आज्ञेप्रमाणे, कोणाही मुनीला उद्वेग होणार नाही, अशा स्थळीं आम्ही राहू. कारण ज्या राजांच्या अत्याचारामुळे मुनी व तपस्वी यांना कष्ट होतात, ते राजे अग्नीशिवायच जळून जातात! ब्राह्मणांचा संतोष ज्याप्रमाणे सर्व मंगलाचे मूळ आहे, त्याप्रमाणे त्यांचा क्रोध हा कोटी कुळांना जाळून टाकण्याइतका प्रबल असतो."

"एवढ्यासाठी आपण योग्य स्थळ सुचवले म्हणजे, सीता व लक्ष्मण यांच्यासह मी तेथे जाईन. सुंदर पर्णकुटी बांधून, हे कृपाला! आम्ही काही काळ त्या ठिकाणी राहू."

हे रघुवराचे सहज व सरळ बोलणे ऐकून मुनीच्या मुखातून एकदम उद्गार बाहेर पडले, "शाबास हे रघुकुल केतु, तुमच्या तोंडून असे वचन बाहेर पडले नाही तरच आश्चर्य! वेदांची व धर्माची मर्यादा पालन करण्यासाठी तुम्ही नेहमीच काळजी घेता.

"राम! तुम्ही श्रुतिमर्यादा पालन करणारे जगदीश आहात व जानकी ही तुमची माया आहे. ती करुणानिधीचा कल पाहून जग निर्माण करते, त्याचे पालन करून शेवटी संहारही करते! हजारो मस्तकांचा, पृथ्वीला धारण करणारा, चराचराचा स्वामी जो शेष, तोच लक्ष्मण आहे. तुम्ही देवांचे कार्य साधण्यासाठी राजाचे शरीर धारण करून, दुष्ट राक्षसांच्या सेना समूहाचा विनाश करण्यासाठी निघालेले आहात.

सो० —राम सरूप तुम्हार बचन अगोचर बुद्धिपर ।
अबिगत अकथ अपार नेति नेति नित निगम कह ॥ १२६ ॥

चौ० —जगु पेखन तुम्ह देखनिहारे । बिधि हरि संभु नचावनिहारे ॥
तेउ न जानहिं मरमु तुम्हारा । औरु तुम्हहि को जाननिहारा ॥
सोइ जानइ जेहि देहु जनाई । जानत तुम्हहि तुम्हइ होइ जाई ॥
तुम्हरिहि कृपाँ तुम्हहि रघुनंदन । जानहिं भगत भगत उर चंदन ॥
चिदानंदमय देह तुम्हारी । बिगत बिकार जान अधिकारी ॥
नर तनु धरेहु संत सुर काजा । कहहु करहु जस प्राकृत राजा ॥
राम देखि सुनि चरित तुम्हारे । जड़ मोहहिं बुध होहिं सुखारे ॥
तुम्ह जो कहहु करहु सबु साँचा । जस काछिअ तस चाहिअ नाचा ॥

दो० —पूँछेहु मोहि कि रहौं कहँ मैं पूँछत सकुचाउँ ।
जहँ न होहु तहँ देहु कहि तुम्हहि देखावौं ठाउँ ॥ १२७ ॥

चौ० —सुनि मुनि बचन प्रेम रस साने । सकुचि राम मन महुँ मुसुकाने ॥
बालमीकि हँसि कहहिं बहोरी । बानी मधुर अमिअ रस बोरी ॥
सुनहु राम अब कहउँ निकेता । जहाँ बसहु सिय लखन समेता ॥

" राम ! तुमचे स्वरूप मानवी बुद्धीच्या पलीकडचे असल्याने त्याचे वर्णन शब्दांनी होऊ शकत नाही. ते स्वरूप अव्यक्त असून, अनिर्वचनीय व अनंत आहे. याच कारणाने 'नेति नेति' असे त्याचे वेद नेहमी वर्णन करतात. १२६

" या सर्व दृश्य विश्वाला पाहणारे द्रष्टे तुम्हीच असून, ब्रह्मा, विष्णू व शंभू यांनासुद्धा (नट-मर्कटाप्रमाणे) नाचविणारे आहात. ब्रह्मादिदेवांनाही तुमच्या शुद्ध स्वरूपाचे ज्ञान होत नाही, मग इतरांची काय कथा ? तुम्हीच जर एखाद्याला आपल्या स्वरूपाचे आकलन करण्याची शक्ती दिली तर तो तुम्हाला जाणतो, पण त्या तुमच्या ज्ञानाबरोबर तो तुमच्यात एकरूप होऊन जातो. हे रघुनन्दना ! भक्ताच्या हृदयाला चन्दनाप्रमाणे शांती देणारे आपण आहात. तुमची कृपा झाली तरच भक्त तुम्हाला जाणतात.

" असे ज्ञान झाल्यानंतर मग सच्चिदानन्दमय व सर्व विकारविरहित अशा आपल्या कायेचे त्या विकारहित (अधिकारसंपन्न) भक्ताला आकलन होते. संत व सुर यांच्यासाठीच आपण हे शरीर धारण केले आहे. परंतु वागणे व बोलणे मात्र एखाद्या मर्त्य राजाप्रमाणे ! अशाप्रकारचे आपले चरित्र ऐकून व प्रत्यक्ष पाहून, हे राम ! ज्ञात्यांना सुख होते व अज्ञान्यांना मोह होतो.

" तथापि तुमच्या भूमिकेवरून तुमचे हे वागणे योग्यच आहे. जसे सोंग घेतले, तशी त्याची बतावणी नराने नको का करायला ? आपण मला कुठे राहू म्हणून विचारले. यावर आपणास विचारण्यास संकोच वाटतो; पण नाइलाजाने विचारतो, आपण ज्या ठिकाणी नाही असे स्थळ दाखवा म्हणजे मग कुठे राहावयाचे ते स्थळ सांगेन ! " १२७

हे वाल्मीकीचे प्रेमरसमय वचन ऐकून रामचंद्रास संकोच वाटला व त्यांनी मनात स्मित केले.

त्यानंतर स्मितपूर्वक, सुधारसाने परिपूर्ण भरलेले असे सुमधुर भाषण मुनिश्रेष्ठांनी केले.

[१४ भुवने व भक्तांचे प्रकार]

भुवन १ ले

राम ! आता आपणास निवास्थाने सांगतो ऐका, त्या ठिकाणी सीता व लक्ष्मणासह आपण वस्ती करावी.

जिन्ह के श्रवन समुद्र समाना। कथा तुम्हारि सुभग सरि नाना॥
भरहिं निरंतर होहिं न पूरे। तिन्ह के हिय तुम्ह कहुँ गृह रूरे॥
लोचन चातक जिन्ह करि राखे। रहहिं दरस जलधर अभिलाषे॥
निदरहिं सरित सिंधु सर भारी। रूप बिंदु जल होहिं सुखारी॥
तिन्ह कें हृदय सदन सुखदायक। बसहु बंधु सिय सह रघुनायक॥

दो० – जसु तुम्हार मानस बिमल हंसिनि जीहा जासु।
मुकताहल गुन गन चुनइ राम बसहु हियँ तासु॥ १२८॥

चौ० – प्रभु प्रसाद सुचि सुभग सुबासा। सादर जासु लहइ नित नासा॥
तुम्हहि निबेदित भोजन करहीं। प्रभु प्रसाद पट भूषन धरहीं॥
सीस नवहिं सुर गुरु द्विज देखी। प्रीति सहित करि बिनय बिसेषी॥
कर नित करहिं राम पद पूजा। राम भरोस हृदयँ नहिं दूजा॥
चरन राम तीरथ चलि जाहीं। राम बसहु तिन्ह के मन माहीं॥
मंत्रराजु नित जपहिं तुम्हारा। पूजहिं तुम्हहि सहित परिवारा॥

ज्यांचे कान हे सागरासारखे व तुमच्या सुंदर कथा या नाना नद्या त्या कर्णसागरात निरन्तर भरत असता कधीच ज्यांना पुरे होत नाही अशांचे हृदय तुम्हाला वस्ती करण्यास शुभ आहे. *

भुवन २ रे

आपल्या दर्शनाच्या स्वरूपातील मेघाची अभिलाषा अखंड बाळगणारे, असे ज्यांनी आपले डोळे हेच चातक करून ठेवले आहेत; तलाव नद्या किंवा सागर यांना तुच्छ लेखून मेघजलाच्या एका बिंदूसाठी जसा चातक आर्त होतो तसा सर्व सोडून आपल्या रूपाचा एक बिंदू मिळताच ज्यांना सुखाची खाण सापडते, त्यांचे हृदय, हे रघुनायक! सीता व अनुजासह राहण्यास आपणास सुखदायक सदन आहे. **

भवन ३ रे

"तुमचे निर्मल यश हेच विमल मानस सरोवर व त्यात विहार करणारी हंसिनी ज्याची जिव्हा; ती आपले सद्गुणरूपी अनेक मोती एकसारखे टिपते. अशा मनुष्याच्या हृदयात, हे राम! आपण त्रिवर्गांनी राहावेच. १२८ +

भवन ४ थे

"ज्याचे नाक प्रभूच्या सुंदर व पवित्र प्रसादाचा सुवास नेहमी आदराने घेते, तुम्हाला समर्पण केलेल्या पदार्थांचेच जे भक्षण करतात, आणि प्रभूचा प्रसाद म्हणून वस्त्रे, भूषणे वगैरे धारण करतात; देव, ब्राह्मण व गुरु दिसताच बहुत प्रेमाने प्रार्थना-विनंती करून ज्यांचे मस्तक स्वभावतःच नमते; ज्यांचे हात नित्यकर्म व रामपद-पूजा करतात; ज्यांच्या हृदयाला दुसऱ्या कोणाचा भरंवसा न वाटता रामाचाच सर्वस्वी आधार वाटतो; रामतीर्थास जे अनवाणी चालत जातात, त्यांच्याच हृदयात-मनात, राम! आपण सीता-लक्ष्मणासह वास्तव्य करावे. ++

भवन ५ वे

"तुमच्या राम-मंत्र-राजाचा नित्यनियमाने जप करतात; तुमच्या परिवारासह नित्यनियमाने त्रिकाळी

---

* उ. भरद्वाज व शिवपार्वती. ** उ. मनु, शतरूपा दशरथ व जनकपुरीतील लोक.

+ उ. अयोध्यावासी नर-नारी. ++ उ. भरत.

तरपन होम करहिं बिधि नाना । प्रिय जेवाँइ देहिं बहु दाना ।।
तुम्ह तें अधिक गुरहि जियँ जानी । सकल भायँ सेवहिं सनमानी ।।

दो०—सबु करि मागहिं एक फलु राम चरन रति होउ ।
तिन्ह के मन मंदिर बसहु सिय रघुनंदन दोउ ।। १२९ ।।

चौ०—काम कोह मद मान न मोहा । लोभ न छोभ न राग न द्रोहा ।।
जिन्ह कें कपट दंभनहिं माया । तिन्ह कें हृदय बसहु रघुराया ।।
सब के प्रिय सब के हितकारी । दुख सुख सरिस प्रसंसा गारी ।।
कहहिं सत्य प्रिय बचन बिचारी । जागत सोवत सरन तुम्हारी ।।
तुम्हहि छाड़ि गति दूसरि नाहीं । राम बसहु तिन्ह के मन माहीं ।।
जननी सम जानहिं परनारी । धनु पराव बिष तें बिष भारी ।।
जे हरषहिं पर संपति देखी । दुखित होहिं पर बिपति बिसेषी ।।
जिन्हहि राम तुम्ह प्रानपिआरे । तिन्ह के मन सुभ सदन तुम्हारे ।।

दो०—स्वामि सखा पितु गुर जिन्ह के सब तुम्ह तात ।
मन मंदिर तिन्ह कें बसहु सीय सहित दोउ भ्रात ।। १३० ।।

तुमचे पूजन करतात; होम, तर्पण, मार्जन इत्यादि नानाप्रकारचे धार्मिक विधी जे शास्त्रोक्त पद्धतीने करतात; विप्रांना भोजन घालून त्यांना चांगली दाने देतात; मनात आपल्या सद्गुरूंना, तुमच्यापेक्षा श्रेष्ठ जाणून सर्वभावाने त्यांची सेवा करतात व त्यांचा सन्मान करतात; वरील सर्व करून शेवटी काया-वाचा-मनाने रामचरणी प्रेम हे एकच फळ मागतात; त्यांच्या मनमंदिरात हे रघुनन्दन ! सीतेसह तुम्ही दोघे बंधू राहा. १२९

भवन ६ वे

" कामवासना, क्रोध, मद, अभिमान, मोह, क्षोभ, लोभ, आसक्ती, मत्सर, कपट, ढोंग व ममत्व इत्यादि दोषरहित जे आहेत, त्यांच्या हृदयात हे रघुराया ! आपण सीता-लक्ष्मणांसह वसती करावी. **

भवन ७ वे

जे सर्वांचे खरे हित साधणारे असल्याने सर्वांनाच प्रिय असतात, ज्यांना सुख दुःख, स्तुति निंदादि द्वंद्वे सारखीच वाटतात; जे खरे व मधुर भाषण विचारपूर्वक करतात, जे जागृतावस्थेतच नव्हे, झोपेतसुद्धा तुम्हालाच शरण गेलेले असतात, ज्याना तुमच्यावाचून दुसरे आश्रयस्थान (गती) नाही; त्यांच्याच हृदयात राम ! आपण तिघांनी राहावे. ***

भवन ८ वे

परस्त्रीच्या ठिकाणी ज्यांचा मातृभाव स्थिर झाला आहे, परद्रव्यापेक्षा दुसरे भयंकर जहर विष नाही अशी ज्यांची खात्री आहे. दुसऱ्याच्या भाग्योदयाने जे सुखी होतात व दुसऱ्याच्या विपत्तीमुळे जे दुःखी होतात आणि राम ! ज्याना तुम्ही प्राणापेक्षा प्रिय वाटता, त्यांचे मन तुम्हाला राहाण्यास चांगले घर, आहे तेथे राहा ! +

भवन ९ वे

स्वामी, सखा, बाप, आई, गुरू या सर्व ठिकाणी ज्याला हे रामा, तुमचेच स्वरूप जाणवते किंवा ही सर्व नाती तुमच्या ठिकाणीच एकवटलेली जो अनुभवतो त्याच्या मनमंदिरात सीतेसह दोघे बंधू वास करा. १३० ++

---

*उ. अत्रि शरभंग **उ. नारद अरण्यकाण्ड. ***उ. सुग्रीव किष्किंधाकाण्ड पूर्वार्ध.

+ उ. अंगदादि रामदूत सीताशोधार्थ किष्किंधा. उत्तर भाग. ++ उ. हनुमान सुंदरकाण्ड पूर्वार्ध.

चौ० – अवगुन तजि सब के गुन गहहीं । बिप्र धेनु हित संकट सहहीं ॥
नीति निपुन जिन्ह कइ जग लीका । घर तुम्हार तिन्ह कर मनु नीका ॥
गुन तुम्हर समुझइ निज दोसा । जेहि सब भाँति तुम्हार भरोसा ॥
राम भगत प्रिय लागहिं जेहि । तेहि उर बसहु सहित बैदेही ॥
जाति पाँति धनु धरमु बड़ाई । प्रिय परिवार सदन सुखदाई ॥
सब तजि तुम्हहि रहइ उर लाई । तेहि के हृदयँ रहहु रघुराई ॥
सरगु नरकु अपबरगु समाना । जहँ तहँ देख धरें धनु बाना ॥
करम बचन मन राउर चेरा । राम करहु तेहि कें उर डेरा ॥

दो० – जाहि न चाहिअ कबहुँ कछु तुम्ह सन सहज सनेहु ।
बसहु निरंतर तासु मन सो राउर निज गेहु ॥ १३१ ॥

चौ० – एहि बिधि मुनिबर भवन देखाए । बचन सप्रेम राम मन भाए ॥
कह मुनि सुनहु भानुकुलनायक । आश्रम कहउँ समय सुखदायक ॥

भवन १० वे

" दुसऱ्याच्या दोषाकडे न पाहाता त्यांचे सद्‌गुण नेत्रढे घेतात, विप्र व धेनू यांच्यासाठी येतील ती संकटे सोसतात नैतिक वर्तनात श्रेष्ठ म्हणून जे जगात आदर्श बनतात, त्यांचे पवित्र अंतःकरण हे तुम्हां तिघाना उत्तम निवास स्थान आहे. [उ० बिभीषण सुंदरकांड उत्तरार्ध]

भवन ११ वे

स्वतःच्या ठिकाणी जे सद्‌गुण असतील ते सर्व तुमचे व दोष असतील ते स्वतःचे असे जो समजतो. ज्याला सर्व काळी व स्थळी सर्व बाबतीत तुमचाच भरंवसा वाटतो, ज्याला रामभक्तांच्याबद्दल पूर्ण आपुलकी वाटते, त्याच्या हृदयात सीता व लक्ष्मणासह रामा ! तुम्ही राहा ! [उ. जलनिधि सुंदरकाण्ड पूर्वार्ध.]

भवन १२ वे

" जात, गोत, धन, धर्म, मोठेपणा, प्रियजन, आप्तेष्टमंडळी, सौख्यदायक घर, सत्ता, इत्यादि सर्वांच्या ठिकाणचे ममत्व सोडून ज्याला अखंड तुमच्या चरणाचे ध्यान लागले त्याच्या हृदयात हे रघुराज ! सीता-लक्ष्मणासह राहा ! [उ. वानरगण लंकाकाण्ड उत्तरार्ध.]

भवन १३ वे

स्वर्ग नरक व मोक्ष यांची सारखीच किंमत करून सर्व ठिकाणी ज्याला आपल्या धनुर्धारी स्वरूपाचे दर्शन घडते मनाने, वाणीने व कृतीने ज्याने आपणाला तुमचा दास मानले आहे, त्याच्या हृदयात हे रामा ! आपले शिबिर करा. [उ. सनकादिक उत्तरकाण्ड पूर्वार्ध]

भवन १४ वे

" ज्याला कोणत्याही काळी कशाचीही गरज वाटत नाही फक्त तुमच्या चरणी ज्याचे स्वभावतःच अनन्य प्रेम असते त्याच्या हृदयात, आपली कायमची वस्ती करा ! कारण आपले खरे घर तेच आहे ! × [उ. काकभुशुंडी उत्तरकाण्ड उत्तरार्ध.] १३१

अशा प्रकारची भवने मुनिश्रेष्ठांनी दाखवली व त्यांच्या त्या शुद्ध प्रेमाच्या भाषणाने राम संतुष्ट झाले.

त्यानंतर मुनी म्हणाले, " हे रविकुलनायक ! आता या प्रसंगाला अनुसरून केव्हा, सर्व काळी कुठे, सुखदायक आश्रम करणे योग्य आहे ते सांगतो ऐका.

× (सू. चौदाभुवनांच्या समाधानकारक माहितीसाठी गू. च. पाहा.)

चित्रकूट गिरि करहु निवासू । तहँ तुम्हार सब भाँति सुपासू ।।
सैलु सुहावन कानन चारू । करि केहरि मृग बिहग बिहारू ।।
नदी पुनीत पुरान बखानी । अत्रिप्रिया निज तपबल आनी ।।
सुरसरि धार नाउँ मंदाकिनि । जो सब पातक पोतक डाकिनि ।।
अत्रि आदि मुनिबर बहु बसहीं । करहिं जोग जप तप तन कसहीं ।।
चलहु सफल श्रम सब कर करहू । राम देहु गौरव गिरिबरहू ।।

दो० –चित्रकूट महिमा अमित कही महामुनि गाइ ।
आइ नहाए सरित बर सिय समेत दोउ भाइ ।। १३२ ।।

चौ० – रघुबर कहेउ लखन भल घाटू । करहु कतहुँ अब ठाहर ठाटू ।।
लखन दीख पय उतर करारा । चहुँ दिसि फिरेउ धनुष जिमि नारा ।।
नदी पनच सर सम दम दाना । सकल कलुष कलि साउज नाना ।।
चित्रकूट जनु अचल अहेरी । चुकइ न घात मार मुठभेरी ।।
अस कहि लखन ठाउँ देखरावा । थलु बिलोकि रघुबर सुखु पावा ।।
रमेउ राम मनु देवन्ह जाना । चले सहित सुर थपति प्रधाना ।।
कोल किरात बेष सब आए । रचे परन तृन सदन सुहाए ।।
बरनि न जाहिं मंजु दुइ साला । एक ललित लघु एक बिसाला ।।

" आपण चित्रकूट पर्वतावर निवास करावा, कारण तेथे तुम्हाला सर्व प्रकारच्या सुखसोयी आहेत. पर्वत सुंदर असून, तेथे मनोहर वन आहे. अनेक हत्ती, सिंह, हरणे, इ. पशु व पक्ष्यांनी ते आपले विहारस्थान बनवले आहे.

" तेथे पुराणप्रसिद्ध [अत्रिपत्नी-] अनसूयेने स्वतःच्या तपोबलावर स्वर्गातून आणलेली अशी एक पावन नदी आहे. स्वर्गातील देवनदीचा तो एक प्रवाह असून, तिचे ' मंदाकिनी ' असे नाव आहे.

ती सर्व पातकरूपी मुलांना खाऊन टाकणारी एक डाकीणच आहे. अत्रि आदिकरून पुष्कळ मुनिश्रेष्ठांची तेथे वसती असून, ते जप-तप-योगादि साधनांनी आपले देह झिजवीत आहेत. म्हणून राम ! आपण त्या ठिकाणी गेल्याने या सर्व ऋषी मुनींच्या श्रमाचे सार्थक होईल व चित्रकूटाचाही महिमा आपल्या वास्तव्याने वाढेल ! "

यानंतर, वाल्मीकी महामुनींनी चित्रकूट पर्वताचा अपार महिमा वर्णन करून सांगितल्यावर या दोघा-भावांनी तेथे येऊन सीतेसह मंदाकिनी नदीत स्नान केले. १३२

चित्रकूट पर्वतावर त्रिवर्ग आले. तेव्हा राम म्हणाले, ' लक्ष्मणा ! आता कुठे तरी राहण्याला योग्य अशी जागा कायम केली पाहिजे. हा घाट मला बरा दिसतो. '

हे ऐकून लक्ष्मणाने पयस्विनी नदीच्या उत्तर तटावर नजर फेकली. तेथे एक ओढा धनुष्याच्या आकारासारखा चारी बाजूनी फिरलेला त्यांच्या दृष्टीस पडला. तो म्हणाला, त्या धनुष्याची दोरी शोभेल अशी ही मंदाकिनी नदी आहे., व शम, दम, दान हे बाण त्याला लावून सर्व पापे व कली या सावजांची शिकार करण्यासाठी चित्रकूट हा जणू निश्चल उभा राहिलेला शिकारी आहे ! तो समोरून असा मारा करतो की, त्याचा एकही नेम चुकत नाही ! " अशा मौजेचे वर्णन करून लक्ष्मणाने ते स्थान दाखवल्यावर, ते पाहून रघुवराचे मनास समाधान वाटले.

रामाचे मनास ती जागा आवडल्याचे देवांच्या लक्षात येताच शिल्पज्ञाचा नायक, त्वष्टा याला बरोबर घेऊन त्या ठिकाणी देव आले. कोळी व भिल्ल यांच्या वेषात त्यांनी चित्रकूटावर रामासाठी दोन वर्णनातीत सुंदर पर्णकुटी तयार केल्या ! त्यांपैकी एक लहान, पण विशेष टुमदार व दुसरी भरपूर प्रशस्त अशी बांधली.

दो ० –लखन जानकी सहित प्रभु राजत रुचिर निकेत ।
सोह मदनु मुनि बेष जनु रति रितुराज समेत ॥ १३३ ॥

मास पारायण, सत्रहवाँ विश्राम

चौ ० –अमर नाग किंनर दिसिपाला । चित्रकूट आए तेहि काला ॥
राम प्रनामु कीन्ह सब काहू । मुदित देव लहि लोचन लाहू ॥
बरषि सुमन कह देव समाजू । नाथ सनाथ भए हम आजू ॥
करि बिनती दुख दुसह सुनाए । हरषित निज निज सदन सिधाए ॥
चित्रकूट रघुनंदनु छाए । समाचार सुनि सुनि मुनि आए ॥
आवत देखि मुदित मुनिबृंदा । कीन्ह दंडवत रघुकुल चंदा ॥
मुनि रघुबरहि लाइ उर लेहीं । सुफल होन हित आसिष देहीं ॥
सिय सौमित्रि राम छबि देखहिं । साधन सकल सफल करि लेखहिं ॥

दो० –जथाजोग सनमानि प्रभु बिदा किए मुनिबृंद ।
करहिं जोग जप जाग तप निज आश्रमन्हि सुछंद ॥ १३४ ॥

चौ० –यह सुधि कोल किरातन्ह पाई । हरषे जनु नव निधि घर आई ॥
कंद मूल फल भरि भरि दोना । चले रंक जनु लूटन सोना ॥
तिन्ह महँ जिन्ह देखे दोउ भ्राता । अपर तिन्हहि पूँछहिं मगु जाता ॥

त्या मनोहर पर्णकुटीकेत [illegible] रामांनी वस्ती केल्यानंतर, रतीसह मदनच वसंतऋतूला घेऊन जणू तेथे मुनिवेषात निवास करीत आहे, असे त्या सुंदर गृहात, प्रभू शोभू लागले ! १३३

चित्रकूटावर राम राहू लागल्यानंतर अमर, नाग, किन्नर व दिक्पाल हे तत्काळ चित्रकूटावर आले. त्या सर्वांना रामांनी नमन केले. देवांना डोळ्यांचे समाधान लुटण्याचा लाभ मिळाल्याने आनंद झाला. त्यांनी भगवंतावर पुष्पवृष्टी केली व ते म्हणाले, "हे नाथ ! आज आम्ही सनाथ झालो."

प्रार्थनापूर्वक आपली सर्व दुःसह दुःखे भगवंताला सांगून आता त्यांचा लवकरच शेवट होणार, या खात्रीमुळे त्यांना आनंद झाला. नंतर सर्व जण आपआपल्या स्थानाला गेले.

तसेच रघुनन्दनाच्या चित्रकूटावरील निवासाची ज्या ज्या मुनिश्रेष्ठांना बातमी मिळाली, ते सर्व रामाला पाहण्याकरता येऊ लागले.

आनंदित झालेले मुनिवृंद आपल्याकडे येत आहेत, असे पाहताच रघुकुलचंद्रांनी त्यांना दण्डवत् प्रणाम केला. मुनींनी रघुवराला हृदयाशी धरून आपले आशीर्वाद सुफल होण्यासाठी रामाला आशीर्वाद दिले. राम, सीता व लक्ष्मण यांचे अलौकिक लावण्य पाहिल्यावर, आजपर्यंत आपण केलेली सर्व तपस्या सफल झाली, असे त्यांना वाटले.

सर्व मुनिवृंदांचा यथायोग्य सत्कार करून प्रभूंनी त्यांना निरोप दिला. आता आपण निर्भय झालो या खात्रीने, आपापल्या आश्रमात योग, जप, याग, जप इत्यादि कार्यक्रम त्यांनी मोकळेपणाने सुरू केले. १३४

वेषांतर केलेले देव, कोळी, भिल्ल इत्यादींना हे वृत्त समजले तेव्हा जणू काही नवनिधीच आपल्या घरी आल्याचा त्यांना हर्ष झाला. त्यांनी कंद-मूल-फलांनी द्रोण भरून, आपल्याबरोबर घेतले व रंक सोने लुटण्यासाठीच निघाले आहेत, अशा आनंदभराने ते रामदर्शनाकरता निघाले.

या दोन्ही भावांना त्यांच्यापैकी ज्यांनी अगोदर पाहिले होते, त्यांच्याकडे वाटेत इतर लोक चौकशी करू

कहत सुनत रघुबीर निकाई । आइ सबन्हि देखे रघुराई ।।
करहिं जोहारु भेंट धरि आगे । प्रभुहि बिलोकहिं अति अनुरागे ।।
चित्र लिखे जनु जहँ तहँ ठाढ़े । पुलक सरीर नयन जल बाढ़े ।।
राम सनेह मगन सब जाने । कहि प्रिय बचन सकल सनमाने ।।
प्रभुहि जोहारि बहोरि बहोरी । बचन बिनीत कहहिं कर जोरी ।।

दो० – अब हम नाथ सनाथ सब भए देखि प्रभु पाय ।।
भाग हमारें आगमनु राउर कोसलराय ।। १३५ ।।

चौ० – धन्य भूमि बन पंथ पहारा । जहँ जहँ नाथ पाउ तुम्ह धारा ।।
धन्य बिहग मृग काननचारी । सफल जनम भए तुम्हहि निहारी ।।
हम सब धन्य सहित परिवारा । दीख दरसु भरि नयन तुम्हारा ।।
कीन्ह बासु भल ठाउँ बिचारी । इहाँ सकल रितु रहब सुखारी ।।
हम सब भाँति करब सेवकाई । करि केहरि अहि बाघ बराई ।।
बन बेहड़ गिरि कंदर खोहा । सब हमार प्रभु पग पग जोहा ।।
तहँ तहँ तुम्हहि अहेर खेलाउब । सर निरझर जल ठाउँ देखाउब ।।
हम सेवक परिवार समेता । नाथ न सकुचब आयसु देता ।।

दो० – बेद बचन मुनि मन अगम ते प्रभु करुना ऐन ।
बचन किरातन्ह के सुनत जिमि पितु बालक बैन ।। १३६ ।।

लागले. याप्रमाणे रघुवीरांच्या सौंदर्याविषयी कोणी विचारावे व कोणी माहिती द्यावी, असे करीत ही कोळी-किरातांची टोळी, चित्रकूटावरील [illegible] आली. येताच त्या सर्वांनी रघुराजाकडे निरखून बघण्यास सुरवात केली. पुढे भेट ठेवून जोहार करावा व परम प्रेमाने प्रभूला पाहावे, असा त्यांचा कार्यक्रम सुरू झाला. चित्रात [illegible] जो ज्या ठिकाणी उभा राहिला, तेथेच स्थिर झाला. त्यांच्या अंगावर काटा उभा राहून, डोळ्यांतून अश्रूंचा पाट चालला.

ते सर्व स्नेहमग्न झालेले रामांनी ओळखले व मधुर भाषणाने त्यांनी त्यांचा सन्मान केला. तेव्हा त्या कोळी-किरातांनी पुनः पुन्हा प्रभूला जोहार केला व हात जोडून अत्यंत नम्रपणे ते म्हणतात, " हे नाथ, आपले चरण दिसल्यामुळे आम्ही आता सर्व सनाथ झालो. खरोखर केवळ आमच्या भाग्यानेच आपले या चित्रकूटावर येणे झाले ! १३५

जिथे जिथे आपले पाय लागले, ती भूमी, तो रस्ता, वने व ते पर्वत, सर्वच धन्य होत. इतकेच काय, त्या वनात विहार करणारे सर्व पशू व पक्षीसुद्धा धन्य होत. आपल्या दर्शनाने त्यांचे सर्वांचे जन्म सफल झाले. आपले रूप डोळे भरून पाहिल्यामुळे आम्हीही आपल्या परिवारासह धन्य झालो.

निवास करण्यासाठी आपण विचारपूर्वकच हे ठिकाण शोधून काढलेले दिसते. कारण ही जागा सर्वच ऋतूत सुखकारक आहे. आम्ही आपली सर्व प्रकारची सेवा करण्यास तयार आहो ! साप, वाघ, हत्ती व सिंह यांच्यासारख्या श्वापदांना आम्ही या पर्णकुटीपासून दूर ठेवू. हे प्रभू ! या घनदाट अरण्यातील पर्वत व गिरि-कंदर इतकेच नव्हे, अगदी याचा कानाकोपरा आम्हाला माहीत आहे. ठिकठिकाणी आपल्या शिकारीसाठी सावजे मिळवून देऊ ! तलाव, झरे, इत्यादि पाण्याची ठिकाणे आपणास दाखवू ! थोडक्यात सांगावयाचे म्हणजे आम्ही आपल्या सर्व परिवारासह आपल्या पायाचे दास आहोत. आम्हाला कोणतीही आज्ञा देण्यासाठी बिलकुल संकोच धरू नका. "

वेदांना व मोठमोठ्या मुनींच्या मनाला अगम्य असणारे असे करुणेचे निवासस्थान, आपल्या बाळाचे बोल जसे बाप आवडीने ऐकतो, तसे त्या भिल्लांचे भाषण मोठ्या प्रेमाने प्रभू ऐकू लागले. १३६

चौ० ० रामहि केवल प्रेमु पिआरा । जानि लेउ जो जाननिहारा ।।
राम सकल बनचर तब तोषे । कहि मृदु बचन प्रेम परिपोषे ।।
बिदा किए सिर नाइ सिधाए । प्रभु गुन कहत सुनत घर आए ।।
एहि बिधि सिय समेत दोउ भाई । बसहिं बिपिन सुर मुनि सुखदाई ।।
जब तें आइ रहे रघुनायकु । तब तें भयउ बनु मंगलदायकु ।।
फूलहिं फलहिं बिटप बिधि नाना । मंजु बलित बर बेलि बिताना ।।
सुरतरु सरिस सुभायँ सुहाए । मनहुँ बिबुध बन परिहरि आए ।।
गुंज मंजुतर मधुकर श्रेनी । त्रिबिध बयारि बहइ सुखदेनी ।।

दो ० –नीलकंठ कलकंठ सुक चातक चक्क चकोर ।
भाँति भाँति बोलहिं बिहग श्रवन सुखद चित चोर ।। १३७ ।।

चौ ० –करि केहरि कपि कोल कुरंगा । बिगत बैर बिचरहिं सब संगा ।।
फिरत अहेर राम छबि देखी । होहिं मुदित मृगबृंद बिसेषी ।।
बिबुध बिपिन जहँ लगि जग माहीं । देखि रामबनु सकल सिहाहीं ।।
सुरसरि सरसइ दिनकर कन्या । मेकलसुता गोदावरि धन्या ।।
सब सर सिंधु नदीं नद नाना । मंदाकिनि कर करहिं बखाना ।।
उदय अस्त गिरि अरु कैलासू । मंदर मेरु सकल सुरबासू ।।
सैल हिमाचल आदिक जेते । चित्रकूट जसु गावहिं तेते ।।
बिंधि मुदित मन सुखु न समाई । श्रम बिनु बिपुल बड़ाई पाई ।।

याचे कारण रामाला फक्त प्रेमच प्रिय आहे, हे जाणत्या लोकांनी समजून घ्यावे.

त्यानंतर रामानी स्नेहयुक्त अशा कोमल भाषणाने त्या सर्व वनचरांना संतुष्ट केले व त्यांना निरोप दिला. त्यांनी आपले मस्तक विनम्र करून रस्ता धरला. वाटेत प्रभुगुणांचे श्रवण कथन चालू ठेवून ते घरी येऊन पोचले.

देवांना व ऋषींना सुख देणारे असे ते दोघे बंधू सीतेसह वनात वसती करून अशा रीतीने राहिले. रघुनायकाचे वास्तव्य चित्रकूटावर सुरू झाल्यापासून सर्वच वन मंगलदायक झाले. नानाप्रकारचे वृक्ष फुलाफळांनी भरून गेले व त्यांच्यावर सुंदर अशा लतांचे मंडप बनले कल्पवृक्षाप्रमाणे स्वभावतःच शोभिवंत असणारे ते वृक्ष पाहिले म्हणजे वाटे या सर्वांनी नंदनवन सोडून येथे आगमन केले आहे, भ्रमरांचे मनोहर कळप मधुर गुंजारव करीत होते आणि त्यातून मद सुगंध शीतल असा वारा वाहात असे. मोर, पोपट; कोकीळ चातक, चक्रवाक आणि चकोरासारखे पक्षी असे नाना प्रकारचे कर्णमधुर शब्द काढीत असत की त्यामुळे कोणाच्याही चित्ताचे आकर्षण होई. १३७

वानर, सिंह, हत्ती डुकरे व हरणे असे पशू आपसातील वैर विसरून एकमेकांसह विहार करीत शिकारीसाठी राम बाहेर पडल्यांवर रामरूपपाहून इतरांपेक्षा हरिणांचे कळप अधिक आनंदित होत जगातील सर्व देव देवांनी वने या रामवनाला पाहून त्याची ईर्ष्या (हेवा) पूर्वक स्तुती करीत. देवनदी गंगा, सरस्वती सूर्यकन्या यमुना, मेकल कन्या नर्मदा व गोदावरी सर्व धन्य असलेल्या नद्या नाना प्रकारची सर्व सरोवरे विविध सागर नद, आणि नद्या सर्वच मंदाकिनीची प्रशंसा करू लागले.

उदयाचल व अस्ताचल, कैलास पर्वत, मंदाराचल व मेरुपर्वत इत्यादि सर्व देवांची स्थाने व हिमालयादि सर्व पर्वत चित्रकूट पर्वताचे यश गाऊ लागले. त्यामुळे विंध्यपर्वत आनंदित होऊन त्यांच्या मनात सुख मावेना. कारण काहीही श्रम न करताच भरपूर मोठेपणा त्याच्या आयता पदरी पडत होता.



दो ०—चित्रकूट के बिहग मृग बेलि बिटप तृन जाति ।
पुन्य पुंज सब धन्य अस कहहिं देव दिन राति ॥ १३८ ॥

चौ ०—नयनवंत रघुबर बिलोकी । पाइ जनम फल होहिं बिसोकी ॥
परसि चरन रज अचर सुखारी । भए परम पद के अधिकारी ॥
सो बनु सैलु सुभायँ सुहावन । मंगलमय अति पावन पावन ॥
महिमा कहिअ कवनि बिधि तासू । सुखसागर जहँ कीन्ह निवासू ॥
पय पयोधि तजि अवध बिहाई । जहँ सिय लखनु रामु रहे आई ॥
कहि न सकहिं सुषमा जसि कानन । जौं सत सहज होहिं सहसानन ॥
सो मैं बरनि कहौं बिधि केहीं । डाबर कमठ कि मंदर लेहीं ॥
सेवहिं लखनु करम मन बानी । जाइ न सीलु सनेहु बखानी ॥

दो ०—छिनु छिनु लखि सिय राम पद जानि आपु पर नेहु ।
करत न सपनेहुँ लखनु चितु बंधु मातु पितु गेहु ॥ १३९ ॥

चौ ०—राम संग सिय रहति सुखारी । पुर परिजन गृह सुरति बिसारी ॥
छिनु छिनु पिय बदनु निहारी । प्रमुदित मनहुँ चकोरकुमारी ॥
नाह नेहु नित बढ़त बिलोकी । हरषित रहति दिवस जिमि कोकी ॥

चित्रकूटावरील पशू, पक्षी, वृक्ष व वेली इतकेच काय शेकडो प्रकारचे गवतसुद्धा सर्वच मोठ्या पुण्याईच्या साठ्यामुळे अशाप्रकारे धन्य झाले आहे, असे रात्रंदिवस देव म्हणू लागले ! १३८

ज्यांना डोळे होते, ते सर्व चित्रकूटावरील प्राणी रघुवराला पाहून, त्यांच्या जन्म सफल झाल्यामुळे दुःख-रहित झाले ! जे अचर होते, ते चरणरज स्पर्शाने पुनीत होऊन फार सुखी झाले. कारण त्यांना परमपदाचा (मोक्षाचा) अधिकार त्यामुळे प्राप्त झाला.

चित्रकूट पर्वत व तेथील वन स्वभावतःच शोभिवंत असलेले, आता इतके मंगलमय झाले की, अति पावनांनाही पावन करण्याचे त्यांना सामर्थ्य प्राप्त झाले. यात आश्चर्य नाही; कारण जे ठिकाण सुखसागराचे निवासस्थान झाले, त्याचा महिमा सांगून कसा पुरा होणार? क्षीरसागर व अयोध्या यांचा त्याग करून सीताराम ज्या ठिकाणी येऊन राहिले, असे ते ठिकाण! म्हणून लक्षावधी शेषांनासुद्धा त्या वनाची परमशोभा वर्णन करता येणार नाही, ती मी कशी वर्णन करणार! एखाद्या डबक्यातील कासव का मंदरपर्वत पाठीवर घेईल?

अशा त्या चित्रकूट पर्वतावरील पर्णकुटीत हे त्रिवर्ग राहू लागल्यानंतर लक्ष्मण, सीतारामांची सेवा कायावाचामनाने करत असता, त्याच्या हृदयीचे प्रेम व त्याचे शील याची वाखाणणी कोण करू शकेल? सीता-रामाचे चरणदर्शन वारंवार त्याला मिळे, त्याचप्रमाणे त्या दोघांचे आपणावर किती निःसीम प्रेम आहे, याचा अनुभव त्याला क्षणोक्षणी येई त्यामुळे त्याला आपले बंधू, आईबाप किंवा घरदार यांचे स्मरण स्वप्नातसुद्धा, कधी झाले नाही. १३९

जसा लक्ष्मण संपूर्ण सुखी तशीच सीताही श्रीरामसंगतीत, अत्यंत आनंदात त्या पर्णकुटीत कालक्रमणा करू लागली. चुकूनसुद्धा तिला कधी आपल्या नगराची, परिवाराची आठवण होत नसे. जणू एखादी चकोर-कन्यकाच, आपल्या प्रियकराचा मुखचंद्र क्षणोक्षणी निरीक्षण करून, प्रमुदित होत आहे! आपल्या पतीचे आपणावरील प्रेम नित्य नवीन होऊन वाढत असल्याचे पाहून, जशी एखादी चक्रवाकाची मादी दिवसा हर्षित होते, तशी सीता सुखी होई.

याचा साहजिकच असा परिणाम झाला की, सीतेचे मन रामचरणावर अखंड खिळले; त्यामुळे अगणित

सिय मनु राम चरन अनुरागा । अवध सहास सम बनु प्रिय लागा ।।
परनकुटी प्रिय प्रियतम संगा । प्रिय परिवारु कुरंग बिहंगा ।।
सासु ससुर सम मुनितिय मुनिबर । असनु अमिअ सम कंद मूल फर ।।
नाथ साथ साँथरी सुहाई । मयन सयन सय सम सुखदाई ।।
लोकप होहिं बिलोकत जासू । तेहि कि मोहि सक बिषय बिलासू ।।
दो० –सुमिरत राम तजहिं जन तृन सम बिषय बिलासु ।
रामप्रिया जग जननि सिय कछु न आचरजु तासु ।। १४० ।।
चौ ०–सीय लखन जेहि बिधि सुखु लहहीं । सोइ रघुनाथ करहिं सोइ कहहीं ।।
कहहिं पुरातन कथा कहानी । सुनहिं लखनु सिय अति सुखु मानी ।।
जब जब रामु अवध सुधि करहीं । तब तब बारि बिलोचन भरहीं ।।
सुमिरि मातु पितु परिजन भाई । भरत सनेहु सीलु सेवकाई ।।
कृपासिंधु प्रभु होहिं दुखारी । धीरजु धरहि कुसमउ बिचारी ।।
लखि सिय लखनु बिकल होइ जाहीं । जिमि पुरुषहि अनुसर परिछाहीं ।।
प्रिया बंधु गति लखि रघुनंदनु । धीर कृपाल भगत उर चंदनु ।।
लगे कहन कछु कथा पुनीता । सुनि सुखु लहहिं लखनु अरु सीता ।।
दो ० –राम लखन सीता सहित सोहत परन निकेत ।
जिमि बासव बस अमरपुर सची जयंत समेत ।। १४१ ।।

अयोध्येइतके ते वन तिला प्रिय वाटू लागले. प्रियतम रामाची नित्य संगती लाभल्याने ती पर्णकुटीही तिला आवडू लागली. पक्षी व हरणे हाच तिचा आता लाडका परिवार झाला ! मुनिश्रेष्ठ व त्यांच्या बायका अशी दंपत्ये पाहिली की, हेच आपले या वेळी खरे सासू व सासरे असे तिला वाटे ! कंदमूल-फलांच्या भोजनाला अशा स्थितीत अमृताची चव येई. स्वनाथाच्या सान्निध्यात गवतावरील सुंदर अंथरूणसुद्धा मदनाच्या शेकडो शय्येच्या प्रमाणे सुखकर होई ! खरे पाहिले असता जिच्या नुसत्या कृपादृष्टीने सामान्य माणसे होत, तिला विषयविलास थोडेच मोहित करणार ?

विचार करा की, रामाचे स्मरण होताच रामदास विषय-विलासाचा कस्पटाप्रमाणे त्याग करतात, मग अशा रामाची जी प्रिय पत्नी, सर्व जगाची जननी, अशी ही सीता; तिच्यासंबंधी असे वर्णन केल्यास, त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काय आहे ? १४०

लक्ष्मण व सीता याप्रमाणे सुखी असताना, त्या दोघांना ज्यामुळे सुख लागेल, तेच रघुनाथ करीत व बोलत.

पुरातन भक्तिकथा व ज्ञान कहाण्या राम त्याना सांगत व त्या ऐकत असता सीता व लक्ष्मणाना फार सुख होई. परंतु ज्या ज्या वेळी रामाना अयोध्येचे स्मरण होई, तेव्हा त्याचे डोळे अश्रूंनी भरत. याचे कारण, त्यांच्या अंतश्चक्षूसमोर आई, बाप, आप्तमंडळी बंधू, भरताचे प्रेम, त्याचे शील व त्याची सेवा इत्यादि येऊन कृपा-सागरप्रभूना दुःख होई. परंतु ही वेळ दुःख करण्याची नाही, हे जाणून ते धैर्य धरत.

शरीराच्या हालचालीप्रमाणे त्याची छाया जशी बदलावी, तसेच राम दुःखी होताच सीता व लक्ष्मण दुःखाने व्याकुळ होत. परंतु भक्तांच्या हृदयाला चंदनाप्रमाणे सुख देणारे कृपाळू रघुनन्दन त्या दोघांना दुःखी पाहताच, पवित्र कथा सांगू लागत व त्यामुळे सीतेचे व लक्ष्मणाचे दुःख कुठल्या कुठे पळून जाई. ते पूर्ववत् लगेच सुखी होत.

एकंदरीत, शची व जयंतासह अमरावतीत राहाणाऱ्या इंद्राप्रमाणे, बंधू व सीता यांच्यासह त्या पर्ण-कुटीत राम शोभून दिसू लागले ! १४१



चौ० — जोगवहिं प्रभु सिय लखनहि कैसें । पलक बिलोचन गोलक जैसें ॥
सेवहिं लखनु सीय रघुबीरहि । जिमि अबिबेकी पुरुष सरीरहि ॥
एहि बिधि प्रभु बन बस सुखारी । खग मृग सुर तापस हितकारी ॥
कहेउँ राम बन गवनु सुहावा । सुनहु सुमंत्र अवध जिमि आवा ॥
फिरेउ निषादु प्रभुहि पहुँचाई । सचिव सहित रथ देखेसि आई ॥
मंत्री बिकल बिलोकि निषादू । कहि न जाइ जस भयउ बिषादू ॥
राम राम सिय लखन पुकारी । परेउ धरनितल ब्याकुल भारी ॥
देखि दखिन दिसि हय हिहिनाहीं । जनु बिनु पंख बिहग अकुलाहीं ॥

दो० — नहिं तृन चरहिं न पिअहिं जलु मोचहिं लोचन बारि ।
ब्याकुल भए निषाद सब रघुबर बाजि निहारि ॥ १४२ ॥

चौ० — धरि धीरजु तब कहइ निषादू । अब सुमंत्र परिहरहु बिषादू ॥
तुम्ह पंडित परमारथ ग्याता । धरहु धीर लखिबिमुख बिधाता ॥
बिबिधि कथा कहि कहि मृदु बानी । रथ बैठारेउ बरबस आनी ॥
सोक सिथिल रथु सकइ न हाँकी । रघुबर बिरह पीर उर बाँकी ॥

डोळ्यांच्या पापण्या जश्या बुबुळांना अतिशय जपतात, त्याच रीतीने राम, सीतेची व लक्ष्मणाची काळजी घेत, तसेच राम व सीता लक्ष्मणाला सांभाळत. याच्या उलट ज्याप्रमाणे अविवेकी मनुष्य आपल्या शरीरावरच जीव की प्राण प्रेम करतो तसेच सीता व रामाची प्रेमपूर्वक लक्ष्मण सेवा करत आणि लक्ष्मण व सीता रघुवराच्या सेवेत दक्ष असत !

पक्षी, पशू, देव व तपस्वी ऋषि-मुनी यांचे हित करणारे प्रभू याप्रमाणे वनातही अत्यंत सुख भोगू लागले.

आतापर्यंत रामचंद्रांच्या वन-गमनाची हकीकत जशी मनोरंजकपणे सांगितली तसेच आता सुमंत अयोध्येला परत कसा आला ते वृत्त ऐका.

प्रभूला पोचवून निषादांचा राजा गुह हा चौथ्या दिवशी परत शृंगवेरपुरास येऊन पाहातो तो सुमंत रथासह जागच्या जागीच पडलेला दिसला ! निषादाला पाहाताच सचिव अतिशय शोक करू लागला आणि अशाप्रकारे सुमंताला विकल स्थितीत पाहून गुहाला अतिशय दुःख झाले.

सुमंताच्या मुखातून, “ राम ! राम ! सीताऽ लक्ष्मण ! असे उद्‌गार एकसारखे येत होते व तो अत्यंत व्याकुळ होऊन जमिनीवर अक्षरशः लोळत होता !

दक्षिण दिशेकडे पाहून घोडे खिंकाळत होते. जणू काही पंख उपटल्यामुळे कासावीस झालेले पक्षीच ! ते गवत खाईनात किंवा पाणीही पिईनात ! त्यांच्या डोळ्यातून अश्रूंचा प्रवाह मात्र सारखा चालू राहिला होता. अशी त्या रघुवरांच्या घोड्यांची शोकाकुल स्थिती पाहून सर्वच निषाद व्याकुळ झाले. १४२

शोकमग्न स्थितीत काही काळ गेल्यावर निषादराजाने धीर धरून सुमंताला समजुतीच्या चार गोष्टी सांगण्याचा प्रयत्न केला. तो म्हणाला, “ आता किती दुःख करणार ? हा शोक केव्हातरी थांबविलाच पाहिजे ना ! तुम्ही माझ्यापेक्षा किती जाणणारे, परमार्थ काय हे समजलेले पंडित आहा ! यावेळी दैवच फिरले असे समजून धीर धरणे भाग आहे. ”

अशा रीतीने अनेक कथा कोमल वाणीने सांगून अखेर त्या सुमंताला निषादांनी उचलून आणून रथात बसवले परंतु त्याच्या हृदयात रघुवरविरहाचे दारुण दुःख भरले असल्यामुळे तो इतका शोकाकुल झाला होता की, रथ हाकणे त्याला शक्यच नव्हते !

चरफराहिं मग चलहिं न घोरे । बन मृग मनहुँ आनि रथ जोरे ।।
अढुकि परहिं फिरि हेरहिं पीछें । राम बियोगि बिकल दुख तीछें ।।
जो कह रामु लखनु बैदेही । हिंकरि हिंकरि हित हेरहिं तेही ।।
बाजि बिरह गति कहि किमि जाती । बिनु मनि फनिक बिकल जेहि भाँती ।।

दो० – भयउ निषादु बिषादबस देखत सचिव तुरंग ।
बोलि सुसेवक चारि तब दिए सारथी संग ।। १४३ ।।

चौ० – गुह सारथिहि फिरेउ पहुँचाई । बिरहु बिषादु बरनि नहिं जाई ।।
चले अवध लेइ रथहि निषादा । होहिं छनहिं छन मगन बिषादा ।।
सोच सुमंत्र बिकल दुख दीना । धिग जीवन रघुबीर बिहीना ।।
रहिहि न अंतहुँ अधम सरीरु । जसु न लहेउ बिछुरत रघुबीरू ।।
भए अजस अघ भाजन प्राना । कवन हेतु नहिं करत पयाना ।।
अहह मंद मनु अवसर चूका । अजहुँ न हृदय होत दुइ टूका ।।
मीजि हाथ सिरु धुनि पछिताई । मनहुँ कृपन धन रासि गवाँई ।।
बिरिद बाँधि बर बीरु कहाई । चलेउ समर जनु सुभट पराई ।।

वनातील स्वच्छंद विहार करणाऱ्या गेही किंवा नीळ जातीच्या हरिणाना पकडून आणून रथास जोडल्यावर जसे ते आढेवेढे घेतील, तसे ते घोडे तडफडू लागले. पुढे पाऊल म्हणून टाकेनात ! पुनःपुन्हा मागे मान वळवून पाहात व सारखे ढेपाळत ! रामवियोगाने अत्यंत पीडित झाल्याने तेही विकल झाले होते. अशाही स्थितीत कोणाच्या तोंडून 'राम, सीता, लक्ष्मण' असे शब्द बाहेर पडले तर लगेच प्रेमाने खिंकाळत ते त्या मनुष्याकडे पाहात, घोड्यांचे हे विरहदुःख किती सांगावे ! मणी हरविल्याने जसा फणी (भुजंग) तडफडावा तशीच व्याकुळ स्थिती यावेळी त्या घोडयांची झाली.

सुमंत आणि त्याचे ते घोडे या दोघांची वरीलप्रमाणे शोकशिथिल स्थिती पाहून निषादासही अत्यंत खेद झाला. शेवटी, रथासह सुमंताला योग्य ठिकाणी नेऊन पोचवण्यासाठी त्याने चार लायक असे सेवक बोलावून बरोबर सारथीसह दिले. १४३

सुमंताला पोचवून निषादांचा राजा गुह परत फिरला मात्र, आणि, त्याचीही रामविरहाने किती शोचनीय स्थिती झाली ती सांगणे अशक्य आहे.

अयोध्येकडे ते चौघे निषाद रथ घेऊन चालले असता त्या घोडयांची व सुमंताची दुःखी स्थिती पाहून, वाटेतसुद्धा क्षणोक्षणी दुःखी होत.

दुःखाने व्याकुळ झाल्यामुळे दीन बनलेला सचिव आपल्या मनात विचार करू लागला " खरोखर रघुवरविहीन जीवनाचा धिक्कार असो ! हे अधम शरीर नाहीतरी शेवटी जाणारच. परंतु आताच रघुवरवियोगामुळे पडून ते सुयश मात्र घेत नाही ! माझे प्राण आता अपकीर्ती व पातक यांना पात्र झाले असूनही अद्याप या शरीराला का सोडत नाहीत ? हाय हाय ! या नीच मनाने सुसंधी गमावली ! अयोध्येस जाण्यापूर्वी तरी अजून या हृदयाचे फुटून तुकडे का नाही होत ? "

अशा विचारांनी सुमंताच्या दुःखाने शेवटचे टोक गाठल्यामुळे त्याने हात चोळण्यास, डोके बडवून घेण्यास व पश्चात्ताप करण्यास सुरवात केली. तो अखेर इतका कासावीस झाला की, जणू एखाद्या कवडीचुंबकाचे सर्वच भांडवले बुडाले आहे ! किंवा ब्रीद बांधून मोठा शूरवीर म्हणून बढाई मारणारा वीर रणांगणातून

दो०—बिप्र बिबेकी बेदबिद संमत साधु सुजाति ।
जिमि धोखें मदपान कर सचिव सोच तेहि भाँति ।। १४४ ।।

चौ०—जिमि कुलीन तिय साधु सयानी । पतिदेवता करम मन बानी ।।
रहै करम बस परिहरि नाहू । सचिव हृदयँ तिमि दारुन दाहू ।।
लोचन सजल डीठि भइ थोरी । सुनइ न श्रवन बिकल मति भोरी ।।
सूखहिं अधर लागि मुहँ लाटी । जिउ न जाइ उर अवधि कपाटी ।।
बिबरन भयउ न जाइ निहारी । मारेसि मनहुँ पिता महतारी ।।
हानि गलानि बिपुल मन ब्यापी । जमपुर पंथ सोच जिमि पापी ।।
बचनु न आव हृदयँ पछिताई । अवध काह मैं देखब जाई ।।
राम रहित रथ देखिहि जोई । सकुचिहि मोहि बिलोकत सोई ।।

दो०—धाइ पूँछिहहिं मोहि जब बिकल नगर नर नारि ।
उतरु देब मैं सबहि तब हृदयँ बज्र बैठारि ।। १४५ ।।

चौ०—पुछिहहिं दीन दुखित सब माता । कहब काह मैं तिन्हहि बिधाता ।।
पुछिहि जबहिं लखन महतारी । कहिहउँ कवन सँदेस सुखारी ।।
राम जननि जब आइहि धाई । सुमिरि बच्छु जिमि धेनु लवाई ।।
पूँछत उतरु देब मैं तेही । गे बनु राम लखनु बैदेही ।।

जणू पळून आला आहे ! किंवा कोणी विवेकी, वेद जाणणारा, सज्जनांना मान्य व कुलीन असा विप्र जसा चुकून दारू प्यायल्यावर पश्चात्तापाने तडफडावा, तसा सचिव दुःखाने तप्त झाला होता. १४४

काया-वाचा-मनाने पती हीच देवता मानणारी, ज्ञानी व साध्वी अशी कुलीन स्त्री, जर कर्मगतीने आपल्या पतीला सोडून राहिली तर, तिच्या हृदयात जशी भयंकर आग पेटते, तसा सचिवाचा जीव कासावीस होऊ लागला.

डोळ्यांतून एकसारख्या अश्रूंच्या धारा वाहू लागल्यामुळे सरळ दिसेना, कानाला ऐकू येईना. बुद्धीही काम देईना. ओठ सुकून गेले. तोंडाला कोरड पडली. चौदा वर्षांच्या मुदतरूपी दारांच्या फळ्या व त्यांनी हृदयात जीवाला कोंडल्यामुळे तो जात नाही !

आईबापांची हत्या करून येणाऱ्या एखाद्या मुलाचा चेहेरा जसा काळठिक्कर पडावा, तसा सचिव अत्यंत निस्तेज झाल्याने त्याच्याकडे बघवेना ! रामवियोगामुळे झालेल्या हानी त्याला इतकी ग्लानी आली की, जणू काही एखादा पापी मनुष्य यमपुरीसच नेला जात आहे ! मुखातून शब्दबाहेर पडण्याचीही शक्यता संपली असता त्याची चिंता मात्र चालू आहे की, आता अयोध्येत जाऊन काय काय पाहाण्याचे माझ्या नशिबी येणार ?

नगरीत पाऊल टाकल्याबरोबर व्याकुळ झालेले स्त्री-पुरुष नागरिक धावत येऊन, मला अनेक प्रश्न विचारतील, तेव्हा स्वतःच्या हृदयाच्या जागी मोठे वज्र ठेवूनच मला त्यांना उत्तरे द्यावी लागतील ! १४५

अरे माझ्या दैवा ! जेव्हा अत्यंत दुःखी झाल्यामुळे दीन बनलेल्या सर्व माता माझ्याकडे चौकशी करतील तेव्हा त्याना काय सांगू ? लक्ष्मणाची आई जेव्हा मला विचारील, तेव्हा तिला सुख देणारा असा कोणता निरोप मी सांगू ? नुकतीच व्यालेली गाय आपल्या वासराची आठवण होताच धावत सुटावी, तशी राममाता आल्यावर राम, लक्ष्मण व सीता वनात गेली आणि मी जिवंत आलो, असेच तिच्या प्रश्नाचे उत्तर देऊ काय ? जो कोणी प्रश्न विचारील त्याला हे दुःखदायक उत्तर द्यावे, एवढेच सुख (?) आता नगरात जाऊन माझ्या नशिबी येणार !

केवळ रघुनाथाच्याच आधीन ज्याचे जीवन आहे, असे दुःखी व दीन राजे जेव्हा विचारतील, तेव्हा

जोइ पूँछिहि तेहि उतरु देबा । जाइ अवध अब एहु सुखु लेबा ।।
पूँछिहि जबहिं राउ दुख दीना । जिवनु जासु रघुनाथ अधीना ।।
देहउँ उतरु कौनु मुहु लाई । आयउँ कुसल कुअँर पहुँचाई ।।
सुनत लखन सिय राम सँदेसू । तृन जिमि तनु परिहरिहि नरेसू ।।

दो ० –हृदय न बिदरेउ पंक जिमि बिछुरत प्रीतमु नीरु ।
जानत हौं मोहि दीन्ह बिधि यहु जातना सरीरु ।। १४६ ।।

चौ ० –एहि बिधि करत पंथ पछितावा । तमसा तीर तुरत रथु आवा ।।
बिदा किए करि बिनय निषादा । फिरे पायँ परि बिकल बिषादा ।।
पैठत नगर सचिव सकुचाई । जनु मारेसि गुर बाँभन गाई ।।
बैठि बिटप तर दिवसु गवाँवा । साँझ समय तब अवसरु पावा ।।
अवध प्रबेसु कीन्ह अँधिआरें । पैठ भवन रथु राखि दुआरें ।।
जिन्ह जिन्ह समाचार सुनि पाए । भूप द्वार रथु देखन आए ।।
रथु पहिचानि बिकल लखि घोरे । गरहिं गात जिमि आतप ओरे ।।
नगर नारि नर ब्याकुल कैसें । निघटत नीर मीनगन जैसें ।।

दो ० – सचिव अगमनु सुनत सबु बिकल भयउ रनिवासु ।
भवनु भयंकरु लाग तेहि मानहुँ प्रेत निवासु ।। १४७ ।।

चौ ० –अति आरति सब पूँछहिं रानी । उतरु न आव बिकल भइ बानी ।।

आपल्या कुमारांना वनात पोचवून मी कुशल परत आलो, कुठल्या तोंडाने उत्तर देऊ ! लक्ष्मण, सीता व राम यांचा संदेश ऐकून दशरथराजे आपल्या देहरूपी तृणाचा त्यागच करतील, अशी माझी खात्री आहे ! प्रियतम पाणी आटल्यावर ज्याप्रमाणे चिखलाला भेगा पडतात त्याप्रमाणे प्रियतम रामाचा वियोग झाल्यावर ज्या अर्थी माझे हृदय भंगले नाही, त्या अर्थी या सर्व प्रकारच्या आत्यंतिक यातना भोगण्यासाठीच विधीने मला हे शरीर दिले आहे ! १४६

सुमंताच्या मनात अशाप्रकारे पश्चात्ताप चालू असता तमसानदीच्या काठांवर रथ येऊन जलद पोचला. लगेच सचिवाने त्या चार निषादांना विनंतीपूर्वक निरोप दिला. तेही सुमंताला दण्डवत् प्रणाम करून जड अंतःकरणाने परत फिरले.

गुरू, गाय व ब्राह्मण यांची हत्या केल्यानंतर जशी नगरात शिरताना लाज वाटेल, तितका संकोच यावेळी सुमंताला होत आहे. म्हणून एका झाडाखाली बसूनच कसा तरी त्याने दिवस घालविला व अंधार पडल्यावर योग्य संधी पाहून तो अयोध्येत शिरला आणि दारात रथ ठेवून झटकन् राजवाड्यात घुसला !

तरीही नुसता रथ परत आला एवढी माहिती ज्यांना ज्यांना मिळाली, ते सर्व तावडतोब रथ बघण्यासाठी राजद्वाराजवळ आले. त्यांनी सुमंताने नेलेला तोच रथ म्हणून झटकन् ओळखला, उन्हाळ्यांच्या दिवसात ज्याप्रमाणे गारा झपाट्याने विरघळतात, तशी सर्व गात्रे गळून जात असल्याने व्याकुळ झालेले घोडे त्यांनी रथाशेजारी पाहिले. ते दृश्य पाहून जलाशयातील पाणी झपाट्याने आटू लागल्यावर माशांचे थवे जसे कासावीस होतात, त्याप्रमाणे नगरातील सर्व स्त्रिया व पुरुष शोकाकुल झाले.

सुमंत आल्याचे वृत्त कानी आल्यावरोबर अंतःपुरातील सर्व राण्या व्याकुळ झाल्या. त्यामुळे सचिवाला तो राजवाडा जणू काही प्रेताचे निवासस्थान आहे, असा भयानक वाटू लागला ! १४७

सर्व राण्या येऊन त्याला प्रश्नामागून प्रश्न विचारू लागल्या; परंतु त्याचा कंठ कोरडा पडल्याने त्याच्या

सुनइ न श्रवन नयन नहिं सूझा । कहहु कहाँ नृप तेहि तेहि बूझा ॥
दासिन्ह दीख सचिव बिकलाई । कौसल्या गृहँ गईं लवाई ॥
जाइ सुमंत्र दीख कस राजा । अमित रहित जनु चंदु बिराजा ॥
आसन सयन बिभूषन हीना । परेउ भूमितल निपट मलीना ॥
लेइ उसासु सोच एहि भाँती । सुरपुर तें जनु खँसेउ जजाती ॥
लेत सोच भरि छिनु छिनु छाती । जनु जरि पंख परेउ संपाती ॥
राम राम कह राम सनेही । पुनि कह राम लखन बैदेही ॥

दो०—देखि सचिवँ जय जीव कहि कीन्हेउ दंड प्रनामु ।
सुनत उठेउ ब्याकुल नृपति कहु सुमंत्र कहँ रामु ॥ १४८ ॥

चौ०—भूप सुमंत्र लीन्ह उर लाई । बूड़त कछु अधार जनु पाई ॥
सहित सनेह निकट बैठारी । पूँछत राउ नयन भरी बारी ॥
राम कुसल कहु सखा सनेही । कहँ रघुनाथु लखनु बैदेही ॥
आने फेरि कि बनहि सिधाए । सुनत सचिव लोचन जल छाए ॥
सोक बिकल पुनि पूँछ नरेसू । कहु सिय राम लखन संदेसू ॥
राम रूप गुन सील सुभाउ । सुमिरि सुमिरि उर सोचत राऊ ॥

तोंडातून शब्द उमटेना ! त्याच्या कानाला शब्द ऐकू येईनासे झाले व पुढे कोण मनुष्य आहे, तेही त्याला दिसेना. अखेर त्याने ज्याला त्याला एकच प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. " महाराज कुठे आहेत ते सांगा."
शेवटी दासींनी त्याची विकल स्थिती पाहून त्याला कौसल्येच्या मंदिरात नेले.

त्या ठिकाणी पाऊल टाकताच अमृतविहीन चंद्राप्रमाणे राजे अगदी निस्तेज झालेले त्याला दिसले. त्यांच्या अंगावर कोणतींच भूषणे नव्हती इतकेच नव्हे आसन अगर अंथरूणही नव्हते ! अत्यंत मलिन स्थितीत ते नुसत्या भूमीवरच पडले होते. दीर्घ उसासे घेत असे शोक चिंता करीत ते पडले होते की स्वर्गातून पतन पावलेला जणू ययाति राजाच ! क्षणोक्षणी शोकाने इतके त्यांचे हृदय भरून येत होते की पंख जळल्यामुळे दु:खी होऊन खाली पडलेला जणू गृध्र-संपातीच ! त्यांच्या मुखातून राऽम ! राऽऽम ! हे स्नेही रामाऽ ! राऽम लक्ष्मण वैदेही अशा सारख्या हाका सुरू होत्या !

अशी केविलवाणी राजाची स्थिती सचिवाने पाहिली तथापि लगेच जयजीव म्हणून त्याने महाराजांना दण्डवत् प्रणाम केला त्या ओळखीच्या शब्दाबरोबर, व्याकुळ झालेले राजे उठून बसले व म्हणतात, ' सुमंता ! माझा राम कुठे आहे ?' १४८

असे म्हणून राजाने सुमंताला जवळ घेऊन दृढ आलिंगन दिले. बुडत असलेल्याला जणू काही थोडा आधार मिळाला ! नंतर त्याला अगदी आपल्या जवळ बसवून घेतले व डोळ्यातून अश्रूंचा पूर सुरू होऊन ते विचारू लागले, " प्रेमळ मित्रा माझा राम कुशल आहेना ? रघुपती, लक्ष्मण आणि वैदेही कुठे आहेत ! मी तुला सांगितल्याप्रमाणे त्यांना परत घेऊन आलास का ते तिघेही वनात गेले ? "

हा प्रश्न ऐकून सचिवाच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले !
शोकाकुल झालेल्या राजाने शेवटी विचारले, " सीता-राम-लक्ष्मणांचा निरोप तरी सांग. "

रामाचे रूप, रामाचे गुण, रामाचे शील, रामाचा गोड स्वभाव असे सर्व पुन:पुन्हा आठवून राजाच्या शोकसागराला एकसारखी भरती येऊ लागली ! त्याच्या अंतरीच्या आगीला वाचा फुटली, " माझ्या रामाला



राउ सुनाइ दीन्ह बनबासू । सुनि मन भयउ न हरषु हराँसू ।।
सो सुत बिछुरत गए न प्राना । को पापी बड़ मोहि समाना ।।

दो० —सखा रामु सिय लखनु जहँ तहाँ मोहि पहुँचाउ ।
नाहिं त चाहत चलन अब प्रान कहउँ सति भाउ ।। १४९ ।।

चौ० —पुनि पुनि पूँछत मंत्रिहि राऊ । प्रियतम सुअन सँदेस सुनाऊ ।।
करहि सखा सोइ बेगि उपाऊ । रामु लखनु सिय नयन देखाऊ ।।
सचिव धीर धरि कह मृदु बानी । महाराज तुम्ह पंडित ग्यानी ।।
बीर सुधीर धुरंधर देवा । साधु समाजु सदा तुम्ह सेवा ।।
जनम मरन सब दुख सुख भोगा । हानि लाभु प्रिय मिलन बियोगा ।।
काल करम बस होहिं गोसाईं । बरबस राति दिवस की नाईं ।।
सुख हरषहिं जड़ दुख बिलखाहीं । दोउ सम धीर धरहिं मन माहीं ।।
धीरज धरहु बिबेकु बिचारी । छाड़िअ सोच सकल हितकारी ।।

दो० —प्रथम बासु तमसा भयउ दूसर सुरसरि तीर ।
न्हाइ रहे जलपानु करि सिय समेत दोउ बीर ।। १५० ।।

चौ० —केवट कीन्हि बहुत सेवकाई । सो जामिनि सिंगरौर गवाँई ।।
होत प्रात बट छीरु मगावा । जटा मुकुट निज सीस बनावा ।।

मी यौवराज्याचा अभिषेक करतो म्हणून सांगितले आणि पाठविले वनवासाला ! पण त्याच्या अंतःकरणाला राज्य मिळण्याचे सुख किंवा वनवासाचे दुःख याचा लेशमात्र स्पर्श नाही ! असा माझा राम मला टाकून गेल्यावरसुद्धा माझे प्राण गेले नाहीत ! माझ्यासारखा महापापी खरोखर या सर्व जगात दुसरा असणेच शक्य नाही !

"राम, सीता व लक्ष्मण जेथे असतील तेथे मला लौकर पोचवा. सख्या सुमंता ! तुला खरेच सांगतो, नाहीतर माझे प्राण आता जाऊ पाहात आहेत !!" १४९.

सचिवाच्या मागे राजांनी पुनः पुन्हा तगादा सुरू केला, "माझ्या अत्यंत लाडक्या मुलांचा संदेश तरी सांग ना सुमंता ! सख्या, काहीतरी चांगली युक्ती करून सीता, लक्ष्मण आणि राम मला दाखव रे !"

अशा प्रकारे अत्यंत शोकविकल होऊन दशरथराजे विनवणी करत असता सचिवाच्या अंतःकरणाचेही पाणी पाणी होत होते, तशातही धीर धरून तो महाराजांना प्रेमळपणाने समजावून सांगतो,

"महाराज ! आपण विद्वान व विचारी आहात; चांगले धैर्यवान, शूरवीर असून धर्माचे रहस्य उत्तम प्रकारे जाणणारे ! देवा ! आपण आजपर्यंत साधुसंतांची अखंड सेवा केली. त्यामुळे जन्म-मरण, सुखदुःखाचे भोग, प्रियजनांचा संयोग व वियोग लाभ व नुकसान इत्यादि सर्व घटना, काळाच्या व कर्मांच्या प्रभावाने, आपली इच्छा असो नसो, रात्रीनंतर दिवस जसा यावयाचाच, तशा अनिवार्य गतीने घडतातच ! हे आपण समजू शकता. अशा स्थितीत सुखप्राप्त झाल्यावर आनंद पावणे व दुःखाच्या वेळी रडणे हे अज्ञानी मनुष्याचे वर्तन असते; आपणासारखे धैर्यवान पुरुष मात्र सुख-दुःखाना आपल्या अंतःकरणात सारखीच किंमत देऊन शांत राहतात ! यासाठी हे सर्व जाणून धीर धरा आणि सर्वांचेच हित आपल्या हाती आहे, म्हणून शोक करण्याचे सोडा."

अशी थोडी समजूत घालून सुमंताने रामाचे वृत्त सांगण्यास प्रारंभ केला. तो म्हणाला, "पहिल्या दिवशी तमसेच्या काठावर मुक्काम पडला. तेथे स्नान व जलपान करूनच सीतेसह दोघे वीर राहिले." १५०

दुसरी वस्ती गंगेच्या तीरी झाली. तेथे निषादराज गुहाने पुष्कळ सेवा केली व ती रात्र शृंगवेरपुरासच गेली.

"सकाळी उठल्यावर रघुपतींनी वडाचा चीक आणवून आपल्या मस्तकावर जटा-मुकुट तयार केला.

राम सखाँ तब नाव मगाई । प्रिया चढ़ाइ चढ़े रघुराई ॥
लखन बान धनु धरे बनाई । आपु चढ़े प्रभु आयसु पाई ॥
बिकल बिलोकि मोहि रघुबीरा । बोले मधुर बचन धरि धीरा ॥
तात प्रनामु तात सन कहेहु । बार बार पद पंकज गहेहू ॥
करबि पायँ परि बिनय बहोरी । तात करिअ जनि चिंता मोरी ॥
बन मग मंगल कुसल हमारें । कृपा अनुग्रह पुन्य तुम्हारें ॥

छं ० —तुम्हरें अनुग्रह तात कानन जात सब सुखु पाइहौं ।
प्रतिपालि आयसु कुसल देखन पाय पुनि फिरि आइहौं ॥
जननीं सकल परितोषि परि परि पायँ करि बिनती घनी ।
तुलसी करेहु सोइ जतनु जेहिं कुसली रहहिं कोसल धनी ॥

सो ० —गुर सन कहब सँदेसु बार बार पद पदुम गहि ।
करब सोइ उपदेसु जेहिं न सोच मोहि अवधपति ॥ १५१ ॥

चौ ० —पुरजन परिजन सकल निहोरी । तात सुनाएहु बिनती मोरी ॥
सोइ सब भाँति मोर हितकारी । जातें रह नरनाहु सुखारी ॥
कहब सँदेसु भरत के आएँ । नीति न तजिअ राजपदु पाएँ ॥
पालेहु प्रजहि करम मन बानीं । सेएहु मातु सकल सम जानी ॥
ओर निबाहेहु भायप भाई । करि पितु मातु सुजन सेवकाई ॥
तात भाँति तेहि राखब राऊ । सोच मोर जेहिं करै न काऊ ॥

रामसख्याने नंतर नाव मागवली. तेव्हा आपल्या प्रिय पत्नीला नावेत चढवून नंतर रघुपती स्वतः चढले. लक्ष्मणाने धनुष्याला बाण लावला व आपल्या प्रभूची आज्ञा मिळताच ते नावेत बसले.

"हा सर्व प्रकार माझ्या डोळ्यांसमोर चालू झाल्यामुळे मला अत्यंत व्याकुळ झालेला जेव्हा रघुवीरांनी पाहिला, तेव्हा धीर धरून मधुरवाणीने म्हणाले, "हे तात ! पुनःपुन्हा चरणकमल धरून माझे नमस्कार वडिलांना सांगावे. नंतर आणखी पाय धरून माझी विनंती सांगावी की, बाबा ! आपण माझी काळजी मुळीच करू नये. आपल्या कृपाप्रसादानेच व पुण्याईने प्रवासात व वनात आमचे सर्वत्र कुशल व मंगल सदोदित असणार.

"बाबा ! आपल्याकृपेने वनवासात मी नेहमी सुखीच राहीन; आणि आपल्या आज्ञेचे पालन करून सुखरूपपणे, आपल्या चरणदर्शनासाठी परत येईन.

"सर्व मातांचे चरणी पुनःपुन्हा नमन करून त्यांचे पुष्कळ सांत्वन केल्यावर अशी विनवणी करा की, तुम्ही सर्वांनी मिळून अयोध्यापती कुशल राहण्यासाठी जरूर सर्व प्रयत्न करा.

गुरु वसिष्ठांच्या चरणी शतशः प्रणाम निवेदन करून माझा संदेश सांगा की, माझ्याकरता महाराज शोक करणार नाहीत, असा उपदेश त्यांना करावा." १५१

"नागरिक स्त्रिया-पुरूष व आप्तेष्टमंडळी या सर्वांना प्रार्थनापूर्वक माझी विनंती समजावून सांगा की, राजांना पूर्ण सुखी जे करतील, तेच माझे सर्वप्रकारे हितकर्ते आहेत.

"भरत आजोळाहून परत आल्यावर त्यांना निरोप सांगा की, राज्य मिळाल्यावर नीती सोडू नका. काया-वाचा-मनाने आपल्या प्रजेचे पालन करा. सर्व मातांना सारख्याच मानून त्यांची सेवा करा. बंधो ! माता, पिता व सज्जन यांची योग्य प्रकारे सेवा करून, माझी चौदा वर्षांची वनवासाची मुदत संपेपर्यंत आपले बंधुत्वाचे नाते सांभाळा ! बाबांना अशा उत्तम रीतीने जपा की, ते चुकूनसुद्धा माझी चिंता करणार नाहीत.

लखन कहे कछु बचन कठोरा। बरजि राम पुनि मोहि निहोरा ।।
बार बार निज सपथ देवाई। कहबि न तात लखन लरिकाई ।।
दो० – कहि प्रनामु कछु कहन लिय सिय भइ सिथिल सनेह।
थकित बचन लोचन सजल पुलक पल्लवित देह ।। १५२ ।।
चौ०– तेहि अवसर रघुबर रुख पाई। केवट पारहि नाव चलाई ।।
रघुकुलतिलक चले एहि भाँती। देखउँ ठाढ़ कुलिस धरि छाती ।।
मैं आपन किमि कहौं कलेसू। जिअत फिरेउँ लेइ राम सँदेसू ।।
अस कहि सचिव बचन रहि गयऊ। हरनि गलानि सोच बस भयऊ ।।
सूत बचन सुनतहिं नरनाहू। परेउ धरनि उर दारुन दाहू ।।
तलफत बिषम मोह मन मापा। माजा मनहुँ मीन कहुँ ब्यापा ।।
करि बिलाप सब रोवहिं रानी। महा बिपति किमि जाइ बखानी ।।
सुनि बिलाप दुखहू दुखु लागा। धीरजहू कर धीरजु भागा ।।
दो० – भयउ कोलाहलु अवध अति सुनि नृप राउर सोरु।
बिपुल बिहग बन परेउ निसि मानहुँ कुलिस कठोरु ।। १५३ ।।
चौ०–प्रान कंठगत भयउ भुआलू। मनि बिहीन जनु ब्याकुल ब्यालू ।।
इंद्रीं सकल बिकल भइँ भारी। जनु सर सरसिज बनु बिनु बारी ।।
कौसल्याँ नृपु दीख मलाना। रबिकुल रबि अँथयउ जियँ जाना ।।

" इतक्यात काही कठोर शब्द लक्ष्मण बोलले, तेव्हा त्याना दटावले व रामचंद्रांनी वारंवार आपली स्वतःची शपथ घालून मला विनंती केली की, लक्ष्मणाचे बाळ-बोल महाराजांना जाऊन सांगू नका.

" त्यानंतर वैदेही वंदनपूर्वक काही बोलू लागणार तोच प्रेमभराने ती इतकी गहिवरली की तिचा कंठ दाटून आला; डोळे अश्रूंनी भरले अंग रोमांचित झाले. १५२

" इतक्यात रघुवरांची इच्छा जाणून पलीकडे जाण्यासाठी नावाड्याने होडी सोडली. याप्रमाणे रघुकुल-तिलक निघून गेले व मी आपल्या छातीचे वज्र करून बघत उभा राहिलो. माझे क्लेश कसे सांगू? जिवंत राहून राम-संदेश कसा तरी आणला एवढेच ! "

इतके बोलल्यावर सचिवांची वाणी बंद पडली. रामवियोगाने झालेल्या हानींमुळे तो विकल झाला. त्याच्या नेत्रांतून पाण्याचे लोट सुरू झाले.

सूताचे हे भाषण ऐकताच राजांनी पुनः जमिनीवर अंग टाकले. त्यांच्या हृदयात वियोगदुःखाची भयंकर आग भडकली! नव्या पाण्याचा फेस बाधल्यामुळे मासा दारुण मोहाने व्यापतो तसे दशरथ महाराज दुःखाने तळमळू लागले. त्यावेळी सर्व राण्याही रामाचे गुण आठवून विव्हळ होऊन आक्रोश करू लागल्या. त्या अत्यंत मोठ्या आपत्तीचे वर्णन कसे करता येणार?

सर्वांच्या दुःखाचे निनाद एवढे मोठे होते की त्यामुळे प्रत्यक्ष दुःखालाही दुःख झाले व मूर्तिमंत धैर्याचाही धीर सुटला!

राजवाड्यातील आक्रोशाचा ध्वनि बाहेर पडताच सर्व अयोध्या नगरीत एवढा घोर कोलाहल झाला की जणू पक्ष्यांनी भरगच्च भरलेल्या वनात रात्रीच्या वेळी भयंकर वज्रच पडले असावे! १५३

असा थोडा वेळ गेल्यानंतर पाहातात तो राजाचे प्राण कंठात आले व असे दिसले की जणू मणि विहीन झालेला नागच तडफडत आहे! सर्व इंद्रिये इतकी सुकली की जसा काही पाण्यावाचून सुकत चाललेला सरोवरातील कमळांचा ताटवाच! राजा अत्यंत क्षीण झालेला पाहून कौसल्येला वाटले की सूर्यकुळाचा सूर्य आता मावळत आहे?

उर धरि धीर राम महतारी । बोली बचन समय अनुसारी ।।
नाथ समुझि मन करिअ बिचारू । राम बियोग पयोधि अपारू ।।
करनधार तुम्ह अवध जहाजू । चढ़ेउ सकल प्रिय पथिक समाजू ।।
धीरजु धरिअ त पाइअ पारू । नाहिं त बूड़िहि सबु परिवारू ।।
जौं जियँ धरिअ बिनय पिय मोरी । रामु लखनु सिय मिलहिं बहोरी ।।
दो०–प्रिया बचन मृदु सुनत नृपु चितयउ आँखि उघारि ।
तलफत मीन मलीन जनु सींचत सीतल बारि ।। १५४ ।।
चौ० –धरि धीरजु उठि बैठ भुआलू । कहु सुमंत्र कहँ राम कृपालू ।।
कहाँ लखनु कहँ रामु सनेही । कहँ प्रिय पुत्रबधू बैदेही ।।
बिलपत राउ बिकल बहु भाँती । भइ जुग सरिस सिराति न राती ।।
तापस अंध साप सुधि आई । कौसल्यहि सब कथा सुनाई ।।
भयउ बिकल बरनत इतिहासा । राम रहित धिग जीवन आसा ।।
सो तनु राखि करब मैं काहा । जेहिं न प्रेम पनु मोर निबाहा ।।
हा रघुनंदन प्रान पिरीते । तुम्ह बिनु जिअत बहुत दिन बीते ।।
हा जानकी लखन हा रघुबर । हा पितु हित चित चातक जलधर ।।
दो० – राम राम कहि राम कहि राम राम कहि राम ।
तनु परिहरि रघुबर बिरहँ राउ गयउ सुरधाम ।। १५५ ।।

अशाही प्रसंगी रामजननी हृदयात धीर धरून त्या समयाला योग्य असे बोलली, " हे नाथ ! सर्व गोष्टी ध्यानी घेऊन विचार करा की रामवियोग हा अमर्याद सागर आहे. सर्व अयोध्या नगरी ही त्यातील जहाज असून आपणच त्याचे कर्णधार आहात ! रामावर प्रेम करणारी सर्वच माणसे त्यात प्रवासी म्हणून बसली आहेत. आपण धीर धरला तरच हे जहाज पैलतीराला जाईल. नाहीतर मात्र सर्वच परिवारासह आपण बुडणार !

" हे प्रियकर ! आपण माझी विनंती जर मनावर घेतलीत तर राम, लक्ष्मण व सीता आपणाला पुनः भेटतील. "

' राम . . . पुनः भेटतील ' हे प्रियेचे मधुर शब्द कानावर पडताच, पाण्यावाचून म्लान होऊन तडफडणाऱ्या माशावर जणू गार पाणी शिंपल्याप्रमाणे निघू पाहाणारे प्राण क्षणैक परत येऊन राजाने डोळे उघडले.

धीर धरून भूपश्रेष्ठ उठून बसले व म्हणतात, 'सुमंत्र ! माझा कृपाळू राम कुठे आहे सांग ! लक्ष्मण कुठे आहे ? सुस्नेही राम कुठे आहे ? माझी लाडकी सून वैदेही कुठे आहे ? '

व्याकुळ झालेले भूपती अशा रीतीने नानाप्रकारे विलाप करू लागले आणि ती काळरात्र युगासारखी होऊन संपता संपेना ! इतक्यात राजाला त्या अंध तपस्व्याच्या शापाची आठवण होऊन ती सर्व हकीकत दशरथांनी कौसल्येला सांगितली.

ती कथा सांगण्याचे चालू असता राजे पुनः अत्यंत कासावीस होऊन म्हणाले, " रामाशिवाय जग, प्याच्या या आशेचा धिक्कार असो ! ज्या देहाने माझा प्रेमपण पुरा केला नाही, त्याला आता ठेवून काय करावयाचे ? "–अखेर राजांनी एकच आर्त आरोळी दिली. " हा रघुनन्दन ! प्राणवासरा, तुझ्यावाचून इतके दिवस जगलो हेच पाप केले ! हा लक्ष्मण ! हा जानकी ! आपल्या पित्याच्या चित्त-चातकाच्या हितकर मेघा-हा रघुवरा !—"

" राम राम राम ! राऽम, राऽऽम राऽऽऽम ! " असे मोठ्याने उच्चारून रघुवराचे विरहदुःख असह्य झाल्यामुळे राजांनी देह टाकला व ते स्वर्गाला गेले. १५५

चौ ०–जिअन मरन फलु दसरथ पावा । अंड अनेक कमल जसु छावा ।।
जिअत राम बिधु बदनु निहारा । राम बिरह करि मरनु सँवारा ।।
सोक बिकल सब रोवहिं रानी । रूपु सीलु बलु तेजु बखानी ।।
करहिं बिलाप अनेक प्रकारा । परहिं भूमितल बारहिं बारा ।।
बिलपहिं बिकल दास अरु दासी । घर घर रुदनु करहिं पुरबासी ।।
अँथयउ आजु भानुकुल भानू । धरम अवधि गुन रूप निधानू ।।
गारीं सकल कैकइहि देहीं । नयन बिहीन कीन्ह जग जेहीं ।।
एहि बिधि बिलपत रैनि बिहानी । आए सकल महामुनि ग्यानी ।।

दो ० – तब बसिष्ठ मुनि समय सम कहि अनेक इतिहास ।
सोक नेवारेउ सबहि कर निज बिग्यान प्रकास ।।१५६।।

चौ ०–तेल नावँ भरि नृप तनु राखा । दूत बोलाइ बहुरि अस भाषा ।।
धावहु बेगि भरत पहिं चाहू । नृप सुधि कतहुँ कहहु जनि काहू ।।
एतनेइ कहेहु भरत सन जाई । गुर बोलाइ पठयउ दोउ भाई ।।
सुनि मुनि आयसु धावन धाए । चले बेग बर बाजि लजाए ।।

अयोध्येस भरत–परत

राजा दशरथांनी उत्तम प्रकारे जगण्याचे व योग्य वेळी मरण्याचे फळ बरोबर मिळवले, अशी त्यांच्या उज्ज्वल यशाने अनेक ब्रह्मांडे भरून गेली ! जिवंत असता रामाचा मुखचंद्र पाहिला व त्याचा वियोग होताच मरण सुशोभित केले !

कैकयीखेरीज करून सर्व राण्या शोकाकुल होऊन आक्रोश करू लागल्या. त्यांच्या तोंडून दशरथ महाराजांच्या रूप, शील, बळ, व तेज इ. गुणांचे वर्णन सुरू झाले. नानाप्रकारचे विलाप करीत असता असह्य दुःखाने त्या जमिनीवर कोसळून पडू लागल्या. व्याकुळ झालेले दास आणि दासी शोक करू लागल्या. सर्व नगरवासी घरोघरी रडू लागले.

सूर्यकुलाला प्रकाशित करणारा, धर्माची सीमा व गुण–रूपाचे निधान असा भानू आज मावळला !

सर्व लोक कैकयीला शिव्या देऊ लागले, कारण तिनेच आपल्या दुष्टकृत्याने सर्व जगाला आंधळे केले होते.

याप्रमाणे सर्व अयोध्या शोकसागरात बुडून गेली असता एकदाची ती रात्र संपून उजाडले; आणि ज्ञानसंपन्न असे सर्व मुनिवर अंतःपुरात आले.

त्यानंतर वसिष्ठगुरूंनी प्रसंगानुरूप अनेक ऐतिहासिक कथा सांगून आपल्या ज्ञानाच्या प्रभावाने सर्वांचा शोक कमी केला. १५६

तेलाच्या नावेत राजाचे शरीर ठेवून दूतांना बोलावले व आज्ञा दिली की, " तुम्ही भरताकडे धावत जा. राजाचे स्वर्गगमन झाले असे कुणालाही सांगू नका. भरताकडे जाऊन त्याला एवढेच सांगा की, दोघा बंधूंना नेण्यासाठी आम्हाला गुरु वसिष्ठांनी पाठविले आहे. "

दूत जाऊन भरताला आणतात

अशी आज्ञा होताच दूत इतक्या झपाट्याने पळाले की, अत्यंत वेगवान घोड्यांनाही त्यांनी आपल्या गतीने लाजविले !



अनरथु अवध अरंभेउ जब तें । कुसगुन होहिं भरत कहुँ तब तें ॥
देखहिं राति भयानक सपना । जागि करहिं कटु कोटि कलपना ॥
बिप्र जेवाँइ देहिं दिन दाना । सिव अभिषेक करहिं बिधि नाना ॥
मागहिं हृदयँ महेस मनाई । कुसल मातु पितु परिजन भाई ॥
दो ०–एहि बिधि सोचत भरत मन धावन पहुँचे आइ ।
गुर अनुसासन श्रवन सुनि चले गनेसु मनाइ ॥१५७॥
चौ ०–चले समीर बेग हय हाँके । नाघत सरित सैल बन बाँके ॥
हृदयँ सोचु बड़ कछु न सोहाई । अस जानहिं जियँ जाउँ उड़ाई ॥
एक निमेष बरष सम जाई । एहि बिधि भरत नगर निअराई ॥
असगुन होहिं नगर पैठारा । रटहिं कुभाँति कुखेत करारा ॥
खर सिआर बोलहिं प्रतिकूला । सुनि सुनि होइ भरत मन सूला ॥
श्रीहत सर सरिता बन बागा । नगरु बिसेषि भयावनु लागा ॥
खग मृग हय गय जाहिं न जोए । राम बियोग कुरोग बिगोए ॥
नगर नारि नर निपट दुखारी । मनहुँ सबन्हि सब संपति हारी ॥
दो ०–पुरजन मिलहिं न कहहिं कछु गवँहिं जोहारहिं जाहिं ।
भरत कुसल पूँछि न सकहिं भय बिषाद मन माहिं ॥१५८॥
चौ ०–हाट बाट नहिं जाइ निहारी । जनु पुर दहँ दिसि लागि दवारी ॥

इकडे अयोध्येत ज्यावेळेपासून अनर्थाला सुरुवात झाली, तेव्हापासूनच भरताला अपशकुन होत होते. रात्री भयंकर स्वप्ने पडत व जागा झाल्यावर कोट्यवधी कुतर्क त्यांच्या मनात येत. या सर्व आपत्तींच्या शमनासाठी त्यांनी ब्राह्मणांना भोजने घातली, दिवसा पुष्कळ दाने दिली. नाना प्रकारचे अभिषेक शंकराला केले. शंकराची प्रार्थना करून ते मनातल्या मनात मागत की ' माझे आई–बाप, परिवार व बंधू यांना खुशाल ठेवा.

अशा प्रकारे भरत मनात काळजी करीत असताच एकदम त्यांच्याजवळ दूत येऊन थडकले.

गुरूंची आज्ञा कानी पडताच, गणेशाला वंदन करून ते लगेच निघाले. १५७

वाऱ्याच्या वेगाने घोडे सोडून त्यांनी अवघड अशा नद्या, पर्वत व वने ओलांडली. त्यांच्या हृदयात चिंतेचा एवढा पूर वाढला की, त्यांना काहीही सुचत नव्हते. मनात असे येई कीं एकदम उडूनच जावे. पण ते अशक्य ! त्यामुळे एकेक क्षण एकेक वर्षासारखा वाटू लागला. अशा स्थितीत कसेतरी एकदा ते अयोध्येच्या जवळ येऊन झटकन् दाखल झाले.

नगरात शिरत असता पुष्कळ अपशकुन होऊ लागले. डोंबकावळे नको त्या ठिकाणी कर्कश ओरडू लागले. गाढव, कोल्हे, यांचे अपशकुनी आवाज कानावर येऊ लागले. ते ऐकून अगोदरच चिंताग्रस्त झालेला भरत अधिकच घाबरून गेला.

वने, बागा, तलाव व नद्या निस्तेज झालेल्या दिसल्या. सर्व अयोध्यानगरीही भयाण भासू लागली. पशू, पक्षी, हत्ती व घोडे यांच्या करुणास्पद स्थितीकडे पाहणेच अशक्य झाले; कारण रामवियोगरूपी कुरोगाने त्यांच्यावर प्रेतकळा आली होती. नगरांतील स्त्रिया व पुरुष सर्वस्वाला नागवल्याप्रमाणें अत्यंत विषण्ण दिसत होते.

कोणी वाटेत नगरवासी भेटलाच तर तो एक शब्दही न बोलता हळूच नमन करून चालू लागे. अंतःकरणात भय व मनाला चिंता एवढी मोठी होती की, कोणालाच कुशल विचारण्याचे भरतास धाडस होईना! १५८

बाजार व मुख्य रस्ते इतके शून्य झाले होते की, जणू नगरीला दाही दिशांनी वणवाच लागला आहे !

आवत सुत सुनि कैकयनंदिनि । हरषी रविकुल जलरुह चंदिनि ॥
सजि आरती मुदित उठि धाई । द्वारेहि भेंटि भवन लेइ आई ॥
भरत दुखित परिवारु निहारा । मानहुँ तुहिन बनज बनु मारा ॥
कैकेई हरषित एहि भाँती । मनहुँ मुदित दव लाइ किराती ॥
सुतहि ससोच देखि मनु मारें । पूँछति नैहर कुसल हमारें ॥
सकल कुसल कहि भरत सुनाई । पूँछी निज कुल कुसल भलाई
कहू कहँ तात कहाँ सब माता । कहँ सिय राम लखन प्रिय भ्राता ॥

दो० —सुनि सुत बचन सनेहमय कपट नीर भरि नैन ।
भरत श्रवन मन सूल सम पापिनि बोली बैन ॥ १५९ ॥

चौ० —तात बात मैं सकल सँवारी । भै मंथरा सहाय बिचारी ॥
कछुक काज बिधि बीच बिगारेउ । भूपति सुरपति पुर पगु धारेउ ॥
सुनत भरतु भए बिबस बिषादा । जनु सहमेउ करि केहरी नादा ॥
तात तात हा तात पुकारी । परे भूमितल ब्याकुल भारी ॥
चलत न देखन पायउँ तोही । तात न रामहि सौंपेहु मोही ॥

अशा भयंकर परिस्थितीत एके ठिकाणी मात्र उत्साहाला पूर येत होता. कैकेय राजाला आनंद देणारी व सूर्यवंशरूपी कमळांना (सूर्यविकासिनीपद्मे) चांदण्यारात्रीसारखी सुकविणारी कैकेयी, ' आपला मुलगा येत आहे, ' अशी बातमी ऐकताच आनंदली. तिने आरती सजवली व आनंदाने राजवाड्याच्या दरवाजाकडेच ती धावत गेली. तेथेच आरती ओवाळून तिने भरत शत्रुघ्नांना आपल्या वाड्यात आणले.

हिमपाताने झोडल्यामुळे जसे कमळांचे ताटवे सुकून जावेत, त्याचप्रमाणे दुःखभाराने कोमेजलेला सर्व परिवार जाताना भरताला वाटेत दिसला.

कैकयी – भरत – भेट

परंतु एकटी कैकेयी मात्र वाणीने, शरीराने व मनाने इतकी हर्षाने बेहोष झाली होती की जणू सर्व वनाला पेटवून आनंदित झालेली ती एक भिल्लीणच !

भरताचा चेहेरा चिंतामग्न व उदास बघून ती त्याला विचारते, 'माझ्या माहेरचे सर्व कुशल आहेत ना ?'

भरताने आपल्या आजोळीचे सर्व क्षेम सांगून तो म्हणाला, " आपल्याकडचे सर्व सुखी आहेत ना ? आई ! माझे बाबा कुठे आहेत ? सगळ्या माझ्या माता कुठे आहेत ते सांग ! सीता कुठे? माझे प्रिय बंधू राम व लक्ष्मण कुठे आहेत आई ? "

मुलाचे हे प्रेमळ भाषण ऐकून तिने आपल्या डोळ्याना नक्राश्रू आणले व भरताच्या कानाला व मनाला त्रिशूळ मारल्यासारखे भाषण त्या पापिणीने केले. १५९

ती म्हणते, " माझ्या बाळा ! मी सगळा व्यूह व्यवस्थित रचला. बिचाऱ्या मंथरेचे फार मोटे साहाय्य आपणाला या कामी झाले. मध्यंतरी दुर्दैवाने घाला घालून थोडे काम विघडवले. भूपती इंद्राच्या नगरीला गेले ! "

सिंहाची गर्जना ऐकून ज्याप्रमाणे हत्ती भयाभीत होतो त्याप्रमाणे हे कैकेयीचे भयंकर शब्द कानावर पडताच भरत शोकविव्हळ झाला !

" बाबा, बाऽबा ! बाऽबा ! ! " अशा आर्त हाका मारून तो अत्यंत व्याकुळ होऊन जमिनीवर पडला.

" बाबा ! शेवटी एकदा तुमची नुसती भेटसुद्धा मी घेऊ शकलो नाही ! मला रामाच्या स्वाधीन तुमच्या हातांनी केला नाही हो ! "

बहुरि धीर धरि उठे सँभारी । कहु पितु मरन हेतु महतारी ।।
सुनि सुत बचन कहति कैकेई । मरमु पाँछि जनु माहुर देई ।।
आदिहु तें सब आपनि करनी । कुटिल कठोर मुदित मन बरनी ।।
दो० –भरतहि बिसरेउ पितु मरन सुनत राम बन गौनु ।
हेतु अपनपउ जानि जियँ थकित रहे धरि मौनु ।। १६० ।।
चौ० बिकल बिलोकि सुतहि समुझावति । मनहुँ जरे पर लोनु लगावति ।।
तात राउ नहिं सोचै जोगू । बिढ़इ सुकृत जसु कीन्हेउ भोगू ।।
जीवत सकल जनम फल पाए । अंत अमरपति सदन सिधाए ।।
अस अनुमानि सोच परिहरहू । सहित समाज राज पुर करहू
सुनि सुठि सहमेउ राजकुमारू । पाकें छत जनु लाग अँगारू ।।
धीरज धरि भरि लेंहि उसासा । पापिनि सबहि भाँति कुल नासा ।।
जौं पै कुरुचि रही अति तोही । जनमत काहे न मारे मोही ।।
पेड़ काटि तैं पालउ सींचा । मीन जिअन निति बारि उलीचा ।।
दो ०–हंसबंसु दसरथु जनकु राम लखन से भाइ ।
जननी तूँ जननी भई बिधि सन छुक न बसाइ ।। १६१ ।।

असे शोकाकुल होऊन ओरडत असता धीर धरून त्याने स्वतःला सावरले व तो उठून बसला आणि विचारले, आई ! बाबांच्या अशा आकस्मिक मरणाला कारण तरी काय झाले ते सांग ! '

मुलाचा प्रश्न ऐकून जणू जखम चिरून त्यात विष भरावे, तशी सर्व हकीकत कैकेयीने आपली कुटिल व कठोर करणी मोठ्या आनंदानें आरंभापासून वर्णन करून सांगितली.

रामाचा वनवास व त्याला कारण आपण हे ऐकून वडिलांच्या मरणाचा संपूर्ण विसर भरताला पडला व एखाद्या जिवंत पुतळ्याप्रमाणे मौन धरून तो स्तब्ध राहिला. १६०

जखमेत पुनः मीठ भरावे, तिला (दुःसह डागण्या द्याव्या) त्याप्रमाणे शोकाकुल झालेल्या भरताची समजूत करण्यासाठी कैकेयी बोलू लागली; " बाळा ! राजांच्याबद्दल शोक करणे योग्य नाही; कारण त्यांनी सुकृत व सुकीर्ती यांचा संग्रह करून ठेवला आहे व सर्व प्रकारचे भोगही भोगले. जिवंत असताना मानवी जीवनाचे सार्थक केले व शेवटी देवेश्वराच्या सदनाला ते गेले. म्हणून या सर्व गोष्टींचा विचार करून शोक सोड आणि आपल्या सर्व राजैश्वर्यासह अयोध्येच्या राज्याचा उपभोग घे ! "

" अयोध्येच्या राज्याचा उपभोग घे " हे शेवटचे शब्द विशेषतः कानावर पडताच, पिकलेल्या जखमेवर निखारे ठेवल्याप्रमाणे त्याला असह्य वेदना झाल्या; व हा सर्व प्रकार ऐकून तो भयभीत झाला.

भीती व दुःख यांच्या मिश्र भावनांनी त्याचे हृदय भरून येऊन तो धापा टाकू लागला. शेवटी धीर धरून त्याने आपल्या पोट आगीला वाट फोडली. तो म्हणतो, ' पापिणी ! तू सर्वप्रकारांनी कुळाचा विध्वंस केलास ! तुझ्या मनात असली दुष्ट वासना जर होती तर मला जन्मतःच ठार का करून टाकले नाहीस ? तुझे हे दुष्ट कृत्य, झाडाचा बुंधा तोडून डहाळ्यांना पाणी घालण्यासारखे किंवा पाणी उपसून माशांना जगविण्या-प्रमाणे मूर्खपणाचे आहे !

" सूर्यवंशात जन्म मिळाला, दशरथराजांच्या सारखे वडील व राम-लक्ष्मणासारखे भाऊ लाभले, इतके भाग्य माझ्या वाट्याला येऊन केवळ तुझ्यासारखीच्या पोटी जन्माला घातल्याने ते सर्व व्यर्थ झाले ! दैवच डावे झाल्यावर माणसाच्या हातात काहीच राहत नाही ! " १६१

चौ० –जब तें कुमति कुमत जियँ ठयऊ। खंड खंड होय हृदउ न गयऊ ॥
बर मागत मन भइ नहिं पीरा। गरि न जीह मुहँ परेउ न कीरा ॥
भूपँ प्रतीति तोरि किमि कीन्ही। मरन काल बिधि मति हरि लीन्ही ॥
बिधिहुँ न नारि हृदय गति जानी। सकल कपट अघ अवगुन खानी ॥
सरल सुसील धरम रत राऊ। सो किमि जानै तीय सुभाऊ ॥
अस को जीव जंतु जग माहीं। जेहि रघुनाथ प्रानप्रिय नाहीं ॥
भे अति अहित रामु तेउ तोही। को तू अहसि सत्य कहु मोही ॥
जो हसि सो हसि मुहँ मसि लाई। आँखि ओट उठि बैठहि जाई ॥

दो ०–राम बिरोधी हृदय तें प्रगट कीन्ह बिधि मोहि।
मो समान को पातकी बादि कहउँ कछु तोहि ॥ १६२ ॥

चौं०– सुनि सत्रुघन मातु कुटिलाई। जरहिं गात रिस कछु न बसाई ॥
तेहि अवसर कुबरी तहँ आई। बसन बिभूषन बिबिध बनाई ॥
लखि रिस भरेउ लखन लघु भाई। बरत अनल घृत आहुति पाई ॥
हुमगि लात तकि कूबर मारा। परि मुह भर महि करत पुकारा ॥
कूबर टूटेउ फूट कपारू। दलित दसन मुख रुधिर प्रचारू ॥
आह दइअ मैं काह नसावा। करत नीक फलु अनइस पावा ॥

" गे! दुर्बुद्धी! जेव्हा तो दुष्ट व्यूह तू हृदयात रचलास, तुझ्या हृदयाचे फुटून तुकडे तुकडे कसे झाले नाहीत? असला कुळघातकी वर मागत असता तुझ्या हृदयात पोटशूळ का नाही उठला! जीभ झडून तुझ्या तोंडात किडे कसे नाही पडले? नृपांनी तुझ्यावर विश्वास तरी कसा ठेवला? का मरणकाळ जवळ आल्याने विधात्याने त्यांची बुद्धीच हरण करून नेली?

" स्त्रियांच्या अंतःकरणाचा ठाव ब्रह्मदेवालासुद्धा लागणे कठीण! व ही तर सर्वप्रकारचे कपट, पाप व दोष यांची प्रत्यक्ष खाणच! याच्या उलट भूपती, अगदी सरळ स्वभावाचे, सुशील व धर्मरत. अशा पाताळयंत्री स्त्रीचा स्वभाव ते कसा जाणू शकणार?"

" खरोखर या विश्वातील असा कोणीतरी जीवजंतू आहे काय की, ज्याला रघुनाथ प्राणप्रिय नाही? असे राम तुला हाडवैरी वाटले ना! तेव्हा काळे! तू आहेस तरी कोण ते मला खरोखर सांग तरी!"

भरताच्या अंतःकरणात तिच्यासंबंधी आता रागाच्या ऐवजी तिटकारा उत्पन्न होऊन तो तिला म्हणतो, " तू कोणी का असेनास! (तुझा माझा संबंध संपला!) मात्र आता तोंडाला काजळ फासून उठून दृष्टिआड जाऊन बैस. (मला तुझे काळे तोंड पुनः पाहाण्याची इच्छा नाही.)"

" विधात्याने रामविरोधिनीच्या पोटी मला (एकट्याला) उत्पन्न केला, तेव्हा माझ्यासारखा पातकी दुसरा कोण असणार? पण तुला तरी व्यर्थ बोलण्यात आता अर्थ काय?" (सर्व दोष माझाच!) १६२

कैकेयीच्या कृष्णकारस्थानामुळे शत्रुघ्नाच्या अंगाची नुसती लाही झाली होती. पण भरताच्या आज्ञेशिवाय त्याला काहीच करणे शक्य नव्हते! इतक्यात विशेष प्रकारची वस्त्रे परिधान करून व नाना प्रकारचे दागिने घालून नटून–थटून कुबडी तेथे आली. शत्रुघ्नाच्या दृष्टीस ती पडली मात्र, त्याबरोबर पेटलेल्या अग्नीत तुपाची आहुती पडावी, त्याप्रमाणे शत्रुघ्नाचा क्रोध भडकला. त्याने तिच्या कुबडावर अशी लाथ मारली की, ती ओरडतच तोंडावर धाडकन् कोसळली!

त्यामुळे तिचे कुबड मोडले, कपाळ फुटले, दांत पडले व तोंडातून रक्ताचा प्रवाह सुरू झाला. त्या स्थितीत ती विलाप करू लागली. ' हाय रे दैवा! मी यांचे काय बुडवले? यांचेच बरे करायला गेले आणि



सुनि रिपुहन लखि नख सिख खोटी । लगे घसटीन धरि धरि झोंटी ॥
भरत दयानिधि दीन्हि छड़ाई । कौसल्या पहिं गे दोउ भाई ॥
दो०— मलिन बसन बिबरन बिकल कृस सरीर दुख भार ।
कनक कलप बर बेलि बन मानहुँ हनी तुसार ॥ १६३ ॥
चौ०— भरतहि देखि मातु उठि धाई । मुरुछित अवनि परी झइँ आई ॥
देखत भरतु बिकल भए भारी । परे चरन तन दसा बिसारी ॥
मातु तात कहँ देहि देखाई । कहँ सिय रामु लखनु दोउ भाई ॥
कैकइ कत जनमी जग माझा । जौं जनमि त भइ काहे न बाँझा ॥
कुल कलंकु जेहिं जनमेउ मोही । अपजस भाजन प्रियजन द्रोही ॥
को तिभुवन मोहि सरिस अभागी । गति असि तोरि मातु जेहि लागी ॥
पितु सुरपुर बन रघुबर केतू । मैं केवल सब अनरथ हेतू ॥
धिग मोहि भयउँ बेनु बन आगी । दुसह दाह दुख दूषन भागी ॥
दो ०—मातु भरत के बचन मृदु सुनि पुनि उठी सँभारि ।
लिए उठाइ लगाइ उर लोचन मोचति बारि ॥ १६४ ॥
चौ० — सरल सुभाय मायँ हियँ लाए । अति हित मनहुँ राम फिरि आए ॥

त्यांचे हे असे वाईट फळ माझ्या पदरी टाकलेस ना ? अशा स्थितीत ती ओरडत असतानाच, ही बया नखशिखांत कपटाने व कृष्णकृत्याने भरलेली आहे, हे लक्षात आल्यामुळे शत्रुघ्नाने तिच्या झिंज्या धरून जमिनीवर इकडून तिकडे व तिकडून इकडे अशी अनेक वेळा संतापाने फरफटली !

शेवटी दयासागर भरताला ते पाहवेना त्यांनी तिची सुटका केली व दोघे बंधू त्याच पावली कौसल्येकडे गेले.

भरत आणि शत्रुघ्न कौसल्येच्या मंदिरात जाऊन पाहातात तो सुवर्णाच्या सुंदर कल्पतेवर वनात हिम-वृष्टी होऊन ती शुष्क झाल्याप्रमाणे जणू ती अत्यंत सुकून गेलेली, वस्त्रे मळलेली दुःखाच्या असह्य भाराने शरीर खंगून गेलेले व व्याकुळ झालेली अशी रामजननी त्यांना दिसली. १६३

आपला आवडता भरत आलेला पाहाताच अशाही स्थितीत ती धावत त्याच्या भेटीस गेली. परंतु अशक्ततेमुळे वाटेत चक्कर येऊन ती जमिनीवर पडली !

हे पाहाताच भरत अत्यंत दुःखाने कासावीस होऊन तिचे पायावर त्याने लोळण घेतले व तो देहभान विसरला ! त्याच्या मुखातून आर्त शब्द बाहेर पडू लागले, " आई ! माझे बाबा कुठे आहेत ते दाखव ! सीतेसह माझे भाऊ राम–लक्ष्मण कुठे आहेत ? आई ! कैकयी जगात जन्माला कशाला आली ? आलीच तर वांझ का नाही झाली ? माझ्यासारख्याला आपल्या कुलाला कलंक लावणाऱ्या प्रियकर स्वजनांचा द्रोह केल्याने अपकीर्तीस पात्र बनलेल्याला तिने जन्म कशाला दिला ? ज्याच्यामुळे आई ! तुझी अशी केविलवाणी स्थिती झाली, अशा या भरतासारखा त्रैलोक्यात तरी कोणी दुर्दैवी असेल का ?

" बाबांना स्वर्गाला पाठविणारा व रघुवराला वनवास भोगावयास लावणारा सर्व अनर्थांचे मूळ कारण असा मीच धूमकेतू ! एक कळक दुसऱ्या कळकाला घासून सर्व वन जाळतो व स्वतः ही जळतो. तसाच मी सर्वांना दुःखी करून स्वतःही अनेक दोष दुःखाचे व पश्चात्तापाचे कोठार बनलो आहे. "

भरताचे हे दुःखदैन्यपूर्ण कोमल भाषण कानावर पडताच राममाता आपले दुःख आवरून तेथून उठली. तिने भरताला उठवून पोटाशी धरले. अती दुःखामुळे तिच्या डोळ्यातून अश्रूंचा पूर सुरू झाला ! १६४

सरळ स्वभावाची ती आदर्श राममाता ! जणू रामच वनातून परत आला अशा प्रेमाने तिने भरताला

भेंटेउ बहुरि लखन लघु भाई। सोकु सनेहु न हृदयँ समाई॥
देखि सुभाउ कहत सबु कोई। राम मातु अस काहे न होई॥
माताँ भरतु गोद बैठारे। आँसु पोंछि मृदु बचन उचारे॥
अजहुँ बच्छ बलि धीरज धरहू। कुसमउ समुझि सोक परिहरहू॥
जनि मानहु हियँ हानि गलानी। काल करम गति अघटित जानी॥
काहुहि दोसु देहु जनि ताता। भा मोहि सब बिधि बाम बिधाता॥
जो एतेहुँ दुख मोहि जिआवा। अजहुँ को जानइ का तेहि भावा॥

दो० – पितु आयस भूषन बसन तात तजे रघुबीर।
बिसमउ हरषु न हृदयँ कछु पहिरे बलकल चीर॥ १६५॥

चौ० – मुख प्रसन्न मन रंग न रोषू। सब कर सब बिधि करि परितोषू॥
चले बिपिन सुनि सिय सँग लागी। रहइ न राम चरन अनुरागी॥
सुनतहिं लखनु चले उठि साथा। रहहिं न जतन किए रघुनाथा॥
तब रघुपति सबही सिरु नाई। चले संग सिय अरु लघु भाई॥
रामु लखनु सिय बनहि सिधाए। गइउँ न संग न प्रान पठाए॥
यहु सबु भा इन्ह आँखिन्ह आगें। तउ न तजा तनु जीव अभागें॥
मोहि न लाज निज नेहु निहारी। राम सरिस सुत मैं महतारी॥

कवटाळले. थोड्या वेळाने जेव्हा ती लक्ष्मणाच्या धाकट्या भावाला भेटली तेव्हा तिच्या अंतःकरणात शोक व स्नेह मावेना !

हे स्वाभाविक प्रेम पाहून भोवतालच्या लोकांच्या तोंडून सहजच उद्‌गार निघाले, " असे का होणार नाही ? अहो रामाचीच आई ती ! "

नंतर कौसल्येने भरताला आपल्या मांडीवर घेतला. त्याचे अश्रू आपल्या पदराने पुसून, प्रेमळ शब्दात म्हणते, 'बाळा ! माझ्या वासरा ! नको रडू; धीर धर ! शोक करत बसण्याला ही वेळ अयोग्य आहे. काळाची व कर्माची गती विलक्षण असते, हे समजून झालेल्या हानीबद्दल जिवाला असे लावून नको घेऊस !

" बाळा ! चुकूनसुद्धा कोणाला दोष देऊ नको. माझ्यावर विधाताच सर्वस्वी उलटला, त्याला कोण काय करणार ? इतके भयंकर दुःख कोसळूनसुद्धा त्याने मला अजून जिवंत ठेवले आहे ! आणखी कोणत्या याहून भयंकर यातना मी सोसाव्यात, अशी त्याची इच्छा आहे, कळत नाही !

" बाळा ! तुला काय सांगू रे ! रघुवीराने, वडिलांची आज्ञा प्रमाण मानून अंगावरील वस्त्रे व भूषणे काढून टाकली आणि जेव्हा वल्कल वस्त्रे परिधान केली, तेव्हा त्याच्या हृदयात तिळमात्र हर्षविषाद उत्पन्न झाला नाही ! " १६५

" कुठे जीव अडकला नाही, का कोणावर रागावले नाहीत ! प्रसन्न मुखाने सर्वांची नानाप्रकारे समजूत घातली. रामचरणाचे निःसीम प्रेम असल्यामुळे सीता वनात रामाबरोबर गेली. ही बातमी कानावर पडताच लक्ष्मणही बरोबर गेला. रघुनाथांनी पुष्कळ प्रयत्न करूनही तो राहिला नाही ! शेवटी रघुपतींनी सर्वांना मस्तक नमवून प्रणाम केले आणि धाकटा भाऊ व सीता यांच्यासह ते निघून गेले !

" राम वनात गेले, सीता आणि लक्ष्मणही त्यांच्यासह वनांत गेले ! मी बरोबर गेले तर नाहीच, पण माझे प्राणही त्यांच्या मागोमाग पाठविले नाहीत ! या डोळ्यादेखत हे सगळे घडले, तरीसुद्धा हा दुर्दैवी जीव या देहाला सोडून जात नाही. असल्या पाषाण हृदयाची मी ! भरता, रामासारखा मुलगा आणि त्याची मी आई असे म्हणण्याची, त्याच्यावरील माझे असले प्रेम पाहून, मला लाजसुद्धा कशी वाटत नाही ?

जिएँ मरें भल भूपति जाना । मोर हृदय सत कुलिस समाना ।।

दो० – कौसल्या के बचन सुनि भरत सहित रनिवासु ।
ब्याकुल बिलपत राजगृह मानहुँ सोक नेवासु ।। १६६ ।।

चौ० – बिलपहिं बिकल भरत दोउ भाई । कौसल्याँ लिए हृदयँ लगाई ।।
भाँति अनेक भरतु समुझाए । कहि बिबेकमय बचन सुनाए ।।
भरतहुँ मातु सकल समुझाई । कहि पुरान श्रुति कथा सुहाई ।।
छल बिहीन सुचि सरल सुबानी । बोले भरत जोरि जुग पानी ।।
जे अघ मातु पिता सुत मारें । गाइ गोठ महिसुर पुर जारें ।।
जे अघ तिय बालक बध कीन्हें । मीत महीपति माहुर दीन्हें ।।
जे पातक उपपातक अहहीं । करम बचन मन भव कबि कहहीं ।।
ते पातक मोहि होहुँ बिधाता । जौं यहु होइ मोर मत माता ।।

दो० – जे परिहरि हरि हर चरन भजहिं भूतगन घोर ।
तेहि कइ गति मोहि देउ बिधि जौं जननी मत मोर ।। १६७ ।।

चौ० - बेचहिं बेदु धरमु दुहि लेहीं । पिसुन पराय पाप कहि देहीं ।।
कपटी कुटिल कलहप्रिय क्रोधी । बेद बिदूषक बिस्व बिरोधी ।।
लोभी लंपट लोलुपचारा । जे ताकहिं परधनु परदारा ।।
पावौं मैं तिन्ह कै गति घोरा । जौं जननी यहु संमत मोरा ।।

" जगावे कसे व केव्हा मरावे हे महाराजांनाच चांगले समजले. माझे हृदय मात्र विधात्याने शेकडो वज्रासारखे कठोर घडवले आहे ! "

कौसल्येचे हे आतड्याला पीळ पाडणारे भाषण ऐकून, भरत आणि सर्व राण्या व्याकुळ होऊन एवढा विलाप करू लागल्या की जणू तो राजवाडा मूर्तिमंत शोकाचे निवासस्थानच बनला. १६६

अशावेळी भरत व शत्रुघ्न हे दोघे बंधू व्याकुळ होऊन शोक करत असता कौसल्येने त्यांना पोटाशी धरले. त्यांची समजूत करून दुःखाचा आवेग कमी करण्यासाठी तिने अनेक विवेकपूर्ण वचने सांगितली.

त्यानंतर सर्व मातांचे दुःख शमन करण्याकरिता भरताने वेद व पुराणातील पुष्कळ कथा त्यांना सांगितल्या.

याप्रमाणे शोकाचा पहिला अनिवार भर ओसरल्यावर भरतानी हात जोडले व निष्कपट अंतःकरणाने, पवित्र, सरळ व कर्णमधुर असे भाषण केले.

" आई ! जर या कृष्णकृत्याशी माझा लेशमात्र संबंध असेल तर तो विधाता जगातील सर्व महापापे व उपपापे माझ्या पदरी बांधो. आईबाप व मुलगा यांना ठार मारल्यामुळे जे पातक लागते, तसेच गायीचे गोठे व ब्राह्मणाची गावे जाळल्यामुळे जे पातक लागते, स्त्रीहत्या व बालहत्यांचे जे पातक, मित्र किंवा राजा यांच्यावर विषप्रयोग केल्याचे पातक, इतकेच काय, कायिक, वाचिक व मानसिक अशी जी पापे ज्ञात्यांनी वर्णिली आहेत–अशी सर्व महापापे व उपपापे विधाता माझ्या पदरी बांधो !

आई ! कैकेयीचा दुष्टपणा मला जर मान्य असेल तर, हरिचरणांना सोडून भयंकर पिशाच्चांची भक्ती करणाऱ्यांना प्राप्त होणारी दुर्गती विधाता मला देवो ! १६७.

माते ! या भयंकर घटनेची पूर्वी नुसती कल्पना जरी मला असेल तरी, वेदांचा विक्रय करणारे पोटासाठी धर्माचा धंदा करणारे, दुसऱ्यांची पापे सांगणारे चहाडखोर, कुटिल (खट्याळ), (भांडणे लावणारे) भांडखोर, कपटी, रागीट, वेदनिन्दक, सर्वांशी विरोधक, लोभी, विषयलंपट, बुवाबाजी करणारे, परधनाची इच्छा करणारे, व्यभिचारी यांना जी भयंकर दुर्गती प्राप्त होते ती मला मिळो !

जे नहिं साधुसंग अनुरागे । परमारथ पथ बिमुख अभागे ।।
जे न भजहिं हरि नरतनु पाई । जिन्हहि न हरि हर सुजसु सोहाई ।।
तजि श्रुतिपंथु बाम पथ चलहीं । बंचक बिरचि बेष जगु छलहीं ।।
तिन्ह कै गति मोहि संकर देऊ । जननी जौं यहु जानौं भेऊ ।।

दो० — मातु भरत के बचन सुनि साँचे सरल सुभायँ ।
कहति राम प्रिय तात तुम्ह सदा बचन मन कायँ ।। १६८ ।।

चौ० — राम प्रानहु तें प्रान तुम्हारे । तुम्ह रघुपतिहि प्रानहु तें प्यारे ।।
बिधु बिष चवै स्रवै हिमु आगी । होइ बारिचर बारि बिरागी ।।
भएँ ग्यानु बरु मिटै न मोहू । तुम्ह रामहि प्रतिकूल न होहू ।।
मत तुम्हार यहु जो जग कहहीं । सो सपनेहुँ सुख सुगति न लहहीं ।।
अस कहि मातु भरतु हियँ लाए । थन पय स्रवहिं नयन जल छाए ।।
करत बिलाप बहुत यहि भाँती । बैठेहिं बीति गई सब राती ।।
बामदेउ बसिष्ठ तब आए । सचिव महाजन सकल बोलाए ।।
मुनि बहु भाँति भरत उपदेसे । कहि परमारथ बचन सुदेसे ।।

हे जननि ! कैकेयीच्या मनातील या भेदबुद्धीची मला जर जाणीव असेल तर, साधुसंगतीचा द्वेष करणारे जे दुर्दैवी लोक परमार्थ मार्गाला प्रतिकूल झालेले असतात.

परम दुर्लभ मानव देह मिळूनही जे भगवद्भक्ती करीत नाहीत ज्यांना विष्णू व शिव यांच्या सत्कथा गोड वाटत नाहीत. वेदप्रणीत धर्म सोडून जे भलत्याच मार्गाने चालतात—अधर्माने चालतात, (अधर्माचे आचरण करतात,) लोकांची दिशाभूल करणारा वेष करून त्याच्या जोरावर जे जगाला फसवतात त्यांची दुर्गती मला शंकर देवोत ! ”

भरताचे हे स्वभावतःच सरळ व सत्य असे भाषण ऐकून कौसल्यामाता म्हणते, “ बाळा काया-वाचा-मनाने तू रामावर सदोदित प्रेम करणारा आहेस, हे आम्हाला माहीत का नाही ?” १६८

राम तर तुला स्वतःच्या प्राणापेक्षा प्रिय आहेत व तसेच रामाचे तुझ्यावर प्राणापेक्षा अधिक प्रेम आहे.

एकाद्या वेळी चंद्रातून अमृताच्या ऐवजी विषाचा वर्षाव होईल, हिमकणातून अग्निकण पडतील, मेघ पाण्याने भरण्याच्या ऐवजी पाण्याचा संबंध सोडतील. ज्ञानाने मोहाचा नाश निश्चित होतो पण तसा नाशही कदाचित् होणार नाही—एवढ्या सर्व अशक्य गोष्टी जरी शक्य झाल्या तरीही तुझ्याकडून रामाला विरोधी आचरण घडणार नाही. या दुष्ट कृष्णकृत्यात तुझे अंग आहे असे जे म्हणतील त्यांना स्वप्नातसुद्धा सुख किंवा सद्गती मिळणार अशी माझी खात्री आहे ! ”

हे बोलत असता रामजननीच्या वात्सल्य-भावनाना भरती आली. तिने झटकन भरताला कवटाळले. त्यावेळी तिच्या स्तनातून प्रेमाचे पय व डोळ्यातून अश्रू वाहू लागले !

दशरथांचे और्ध्वदेहिक

याप्रमाणे सर्वच कमीजास्त प्रमाणात शोकसागरात बुडाल्यामुळे बसल्या वसल्याच ती रात्र उजाडली ! सकाळी लगेच वसिष्ठगुरू व वामदेव आले त्यानी मुख्यमंत्री व महाजन (प्रतिष्ठित नागरिक) याना बोलावून घेतले त्याचप्रमाणे समयानु रूप चार परमार्थाच्या गोष्टी सांगून मुनींनी भरताला पुष्कळ उपदेश केला. ते शेवटी म्हणाले, “ बाबा ! आता अंतःकरण घट्ट केले पाहिजे व आज पुढे उभे राहिलेले कर्तव्य पार पाडले पाहिजे. ”

दो० – तात हृदयँ धीरजु धरहु करहु जो अवसर आजु ।
उठे भरत गुर बचन सुनि करन कहेउ सबु साजु ।। १६९ ।।

चौ० – नृपतनु बेद बिदित अन्हवावा । परम बिचित्र बिमानु बनावा ।।
गहि पद भरत मातु सब राखी । रहीं रानि दरसन अभिलाषी ।।
चंदन अगर भार बहु आए । अमित अनेक सुगंध सुहाए ।।
सरजु तीर रचि चिता बनाई । जनु सुरपुर सोपान सुहाई ।।
एहि बिधि दाह क्रिया सब कीन्ही । बिधिवत न्हाइ तिलांजुलि दीन्ही ।।
सोधि सुमृति सब बेद पुराना । कीन्ह भरत दसगात बिधाना ।।
जहँ जस मुनिबर आयसु दीन्हा । तहँ तस सहस भाँति सबु कीन्हा ।।
भए बिसुद्ध दिए सब दाना । धेनु बाजि गज बाहन नाना ।।

दो० – सिंघासन भूषन बसन अन्न धरनि धन धाम ।
दिए भरत लहि भूमिसुर भे परिपूरन काम ।। १७० ।।

चौ० – पितु हित भरत कीन्हि जसि करनी । सो मुख लाख जाइ नहिं बरनी ।।
सुदिनु सोधि मुनिबर तब आए । सचिव महाजन सकल बोलाए ।।
बैठे राजसभाँ सब जाई । पठए बोलि भरत दोउ भाई ।।
भरतु बसिष्ठ निकट बैठारे । नीति धरममय बचन उचारे ।।

गुरुजींची अशी आज्ञा होताच भरत झटकन् उठले आणि त्यांनी पुढील सर्व तयारी करण्यास सांगितले. १६९

लगेच वेदांना मान्य अशा दशरथाच्या देहाला यथाविधी स्नान घातले. अत्यंत विलक्षण अशा प्रकारचे एक विमान तयार करण्यात येऊन ते उत्तम प्रकारे सजवले.

सर्व माता सती जाण्यास तयार झाल्या असता भरताने प्रार्थना करून त्यांना मागे ठेवून घेतले. त्यानी सर्वांनी, राम दर्शनेच्छेनेच सती जाण्याचे रहित केले.

चंदन, अगरू आणि सुंदर सुगंधी पदार्थ यांचे किती ढीग पडले, त्याला मर्यादा नाही. नंतर शरयूच्या काठावर जणू स्वर्गास जाण्यासाठी उत्तम जिनाच, अशी चिता प्रयत्नपूर्वक रीतीने रचली. त्यानंतर प्रेतदहन-क्रिया सर्वप्रकारे विधिपूर्वक पार पडली.

संबंधी मंडळीनीं स्नाने करून तिलांजली दिली. श्रुतिस्मृतिपुराणोक्त अशी दहा दिवसांची क्रिया भरताने यथासांग केली. ज्या ज्या ठिकाणी श्रेष्ठ मुनीनी जशी जशी आज्ञा दिली, तेथे भरताने अनेक पटींनी व उत्तम प्रकारे ती पार पाडली.

बाराव्या दिवशी विशेष शुद्ध झाल्यावर, पुष्कळ दाने दिली. त्यात नानाप्रकारची वाहने, हत्ती, घोडे, गायी, सिंहासने, विविध अलंकार, वस्त्रे, धान्यादि पदार्थ, जमीन घरे, पैसे (धन) इत्यादि सर्व होते. भरताने व शत्रुघ्नाने ही सर्व दाने ब्राह्मणांना दिली. व ती घेणारे ब्राह्मण सर्व प्रकारे तृप्त झाले. १७०

अयोध्येतील दरबार

आपल्या पूज्य पित्याच्या पारलौकिक कल्याणासाठी भरताने जे क्रिया कर्म केले, त्याचे वर्णन करण्यास लाख तोंडेही पुरी पडणार नाहीत.

त्यानंतर एक शुभ दिवस पाहून पुनः वसिष्ठ गुरू आले, त्यांनी सचिव, महाजन व इतर सर्व सभासद बोलावून आणविले. सर्व मंडळी राजदरबारात आपल्या नियोजित ठिकाणी बसल्यावर भरत व शत्रुघ्न यांना बोलावून घेतले. भरताला अगदी आपल्या आसनाजवळ बसवून धर्म व नीती यांनी युक्त असे वसिष्ठांनी भाषण केले.

प्रथम कथा सब मुनिबर बरनी । कैकइ कुटिल कीन्हि जसि करनी ॥
भूप धरमब्रतु सत्य सराहा । जेहिं तनु परिहरि प्रेमु निबाहा ॥
कहत राम गुन सील सुभाऊ । सजल नयन पुलकेउ मुनिराऊ ॥
बहुरि लखन सिय प्रीति बखानी । सोक सनेह मगन मुनि ग्यानी ॥
दो० – सुनहु भरत भावी प्रबल बिलखि कहेउ मुनिनाथ ।
हानि लाभु जीवनु मरनु जसु अपजसु बिधि हाथ ॥ १७१ ॥
चौ० – अस बिचारि केहि देइअ दोसू । ब्यरथ काहि पर कीजिअ रोसू ॥
तात बिचारु करहु मन माहीं । सोच जोगु दसरथु नृपु नाहीं ॥
सोचिअ बिप्र जो बेद बिहीना । तजि निज धरमु बिषय लयलीना ॥
सोचिअ नृपति जो नीति न जाना । जेहि न प्रजा प्रिय प्रान समाना ॥
सोचिअ बयसु कृपन धनवानू । जो न अतिथि सिव भगति सुजानू ॥
सोचिअ सूद्रु बिप्र अवमानी । मुखर मानप्रिय ग्यान गुमानी ।
सोचिअ पुनि पति बंचक नारी । कुटिल कलहप्रिय इच्छाचारी ॥
सोचिअ बटु निज ब्रतु परिहरई । जो नहिं गुर आयसु अनुसरई ॥
दो० – सोचिअ गृही जो मोहबस करइ करम पथ त्याग ।
सोचिअ जती प्रपंच रत बिगत बिबेक बिराग ॥ १७२ ॥
चौ० – बैखानस सोइ सोचै जोगू । तपु बिहाइ जेहि भावइ भोगू ॥

मुनिवरांनी प्रथम, कैकेयीने केलेल्या कुटिल कारस्थानाची कथा सांगितली. त्यानंतर धर्मव्रती व सत्यसंध दशरथराजानी आपल्या देहाचा त्याग करून स्वतःच्या प्रेमाचे परमश्रेष्ठ स्वरूप कसे सिद्ध केले, याचे योग्य वर्णन केले.

पुढे रामाचे गुण, शील व स्वभाव यांची महती गात असता मुनिश्रेष्ठ वसिष्ठांचेही डोळे अश्रूंनी भरून आले व त्यांचे शरीर रोमांचित झाले. लक्ष्मण-सीता यांच्या राम प्रेमाचे वर्णन करत असता तर स्नेह व शोक-सागरात, ज्ञानी असणारेही गुरुवर निमग्न झाले ! अखेर दुःखाने व्याकुळ होऊन मुनिनाथ म्हणाले,

" भरता ! पाहा, होणारी विधिघटना किती अनिवार असते ! खरोखर, हानी, लाभ, जगणे, मरणे यश अपयश हे सर्व दैवाच्याच आधीन असते ! १७१

" हे जाणून कोणाला दोष द्या आणि निष्कारण कोणावर रोष करा ?

बाळा ! आपल्या मनात विचार करून पाहा म्हणजे तुझ्या हे ध्यानी येईल की, राजा दशरथांचे इतके उज्ज्वल चारित्र्य आहे की, त्यात दुःख करण्यासारखे काहीच नाही ! "

गुरु वसिष्ठ पुढे म्हणाले, " खरोखर कोणाकरता दुःख वाटावे ते सांगतो ऐका ! वेदाध्ययन न केलेला, स्वधर्म सोडून विषयाच्या चिखलात रुतलेला असा ब्राह्मण; ज्याला राजनीतीचा गंध नाही व आपली प्रजा प्राणाप्रमाणे प्रिय नाही असा राजा; धनवान असून कृपण, अतिथिसत्कार व शिवभक्ती यांचे वाकडे असणारा वैश्य; ज्ञानाची घमेंड बाळगून बडबड करणारा व ब्राह्मणांचा अपमान करणारा असा शूद्र.

आपल्या इच्छेप्रमाणे मनसोक्त वागणारी, कपटी, भांडखोर व पतीला फसवणारी स्त्री; गुरुजीच्या आज्ञा न पाळणारा आणि ब्रह्मचर्यव्रत पालन न करणारा विद्यार्थी (बटु); मोहवश होऊन स्वकर्माचा त्याग करणारा गृहस्थ, ज्याचे ठिकाणी विवेक व वैराग्य नसल्यामुळे जो पुनः प्रपंचात रंगला असा संन्यासी; १७२

भोगांची ओढ न संपल्यामुळे जो तपस्येचा त्याग करतो असा वानप्रस्थ–हे सर्व शोक करण्यास योग्य होत.

" तसेच परदोषांची चर्चा करून चहाड्या करणारा; निष्कारण रागावणारा; आई, बाप, विद्यागुरू व

सोचिअ पिसुन अकारन क्रोधी । जननि जनक गुर बंधु बिरोधी ॥
सब बिधि सोचिअ पर अपकारी । निज तनु पोषक निरदय भारी ॥
सोचनीय सबहीं बिधि सोई । जो न छाड़ि छलु हरि जन होई ॥
सोचनीय नहिं कोसलराउ । भुवन चारिदस प्रगट प्रभाऊ ॥
भयउ न अहइ न अब होनिहारा । भूप भरत जस पिता तुम्हारा ॥
बिधि हरि हरु सुरपति दिसिनाथा । बरनहिं सब दसरथ गुन गाथा ॥

दो० – कहहु तात केहि भाँति कोउ करिहि बड़ाई तासु ॥
राम लखन तुम्ह सत्रुहन सरिस सुअन सुचि जासु ॥ १७३ ॥

चौ० – सब प्रकार भूपति बड़भागी । बादि बिषादु करिअ तेहि लागी ॥
यहु सुनि समुझि सोचु परिहरहू । सिर धरि राज रजायसु करहू ॥
रायँ राजपदु तुम्ह कहुँ दीन्हा । पिता बचनु फुर चाहिअ कीन्हा ॥
तजे रामु जेहिं बचनहि लागी । तनु परिहरेउ राम बिरहागी ॥
नृपहि बचन प्रिय नहिं प्रिय पाना । करहु तात पितु बचन प्रवाना ॥
करहु सीय धरि भूप रजाई । हइ तुम्ह कहँ सब भाँति भलाई ॥
परसुराम पितु अग्या राखी । मारी मातु लोक सब साखी ॥
तनय जजातिहि जौबनु दयऊ । पितु अग्याँ अघ अजसु न भयऊ ॥

व बंधुजन यांच्याशी विरोध करणारा, सर्व प्रकारे दुसऱ्याना अपकार करणारा, स्वतःच्या शरीराचे चोचले करणारा, अत्यंत निष्ठुर –हे सर्व शोक करण्यास योग्य आहेत.

"या सर्वांत निष्कपट अंतःकरणाने जो भगवंताची भक्ती करत नाही, त्याची स्थिती सर्व प्रकारे अत्यंत शोचनीय असते.

याच्या उलट चौदा भुवनात ज्यांचा प्रभाव गाजला आहे असे कोसलाधिप कोणत्याही प्रकारे शोचनीय नाहीत ! हे भरत ! तुझ्या जनकाप्रमाणे भूतकाली तर राजा झाला नाहीच आता पृथ्वीवरील सर्व राजांत त्याला जोड नाही; इतकेच नव्हे पुढे कधीही असा राजाच होणार नाही ! ब्रह्म, विष्णू, महेश्वर, इंद्र व दिक्पाल हे सर्वच दशरथाच्या गुणकथा वर्णत आहेत."

राम, लक्ष्मण आणि तुम्ही दोघे बंधू यांच्यासारखे पवित्र पुत्र ज्याला लाभले त्यांचा महिमा, हे भरत ! कोणाला तरी कसा वर्णन करता येणार, ते सांग ! १७३

" खरोखर महाराज सर्व प्रकारे मोठेच भाग्यवान ! त्यांच्याकरिता खेद करणे व्यर्थ होय ! म्हणून या सांगिलेल्या सर्व गोष्टी समजावून घ्या आणि अंतःकरणातील सर्व शोक सोडा. दशरथराजांची जी आज्ञा तुम्हाला आहे ती शिरसावंद्य मानून पाळा !"

रामाने राज्यपद, तुम्हाला दिले आहे, म्हणून आपल्या पित्याचे वचन सत्य करून दाखवा. वचनपालनासाठीच प्रत्यक्ष रामाचा त्याग करून त्याच्या दुःसह विरहामुळे त्यांनी आपले शरीर सोडले ! महाराजांना जेवढे वचन प्रिय होते, तेवढे स्वतःचे प्राण त्याना प्रिय नव्हते ! म्हणून त्यांचे पुत्र तुम्ही, आपल्या पित्याच्या वचनाचे परिपालन करा ! राजाची आज्ञा शिरसामान्य करण्यातच तुम्हाला सर्वस्वी भलेपणा आहे. परशुरामानी पित्राज्ञा पालन करण्यासाठी प्रत्यक्ष जननीला ठार केली ही कथा जगजाहीर आहे. त्याचप्रमाणे पित्राज्ञापालन करण्याकरताच ययातीला त्याच्या पुरु नावाच्या पुत्राने आपले यौवन दिले. पित्याची आज्ञा दोघानी याप्रमाणे पालन केल्यामुळे त्याना पाप लागले नाही किंवा त्यांची अपकीर्ती झाली नाही.

दो ० –अनुचित उचित बिचारु तजि जे पालहिं पितु बैन ।
ते भाजन सुख सुजस के बसहिं अमरपति ऐन ।। १७४ ।।

चौ ० –अवसि नरेस बचन फुर करहु । पालहु प्रजा सोकु परिहरहू ।।
सुरपुर नृपु पाइहि परितोषू । तुम्ह कहुँ सुकृतु सुजसु नहिं दोषू ।।
बेद बिदित संमत सबही का । जेहि पितु देई सो पावइ टीका ।।
करहु राजु परिहरहू गलानी । मानहु मोर बचन हित जानी ।।
सुनि सुखु लहब राम बैदेहीं । अनुचित कहब न पंडित केहीं ।।
कौसल्यादि सकल महतारीं । तेउ प्रजा सुख होहिं सुखारीं ।।
परम तुम्हार राम कर जानिहि । सो सब बिधि तुम्ह सन भल मानिहि ।।
सौंपेहु राजु राम के आएँ । सेवा करेहु सनेह सुहाएँ ।।

दो ० –कीजिअ गुर आयसु अवसि कहहिं सचिव कर जोरि ।
रघुपति आएँ उचित जस तस तब करब बहोरि ।। १७५ ।।

चौ ० –कौसल्या धरि धीरजु कहई । पूत पथ्य गुर आयसु अहई ।।
सो आदरिअ करिअ हित मानी । तजिअ बिषादु काल गति जानी ।।
बन रघुपति सुरपति नरनाहू । तुम्ह एहि भाँति तात कदराहू ।।
परिजन प्रजा सचिव सब अंबा । तुम्हही सुत सब कहँ अवलंबा ।।

" म्हणून हे योग्य का अयोग्य असा विचारसुद्धा न करता जे आपल्या वडिलांची आज्ञा अमलात आणतात ते या जगात सुखाला व सुयशाला पात्र बनून परलोकी गेल्यावर इंद्राच्या अमरावतीत वसती करतात. " १७४.

" एवढ्याकरिता राजाचे वचन अवश्य सत्य करून दाखवा व प्रजेचे योग्य पालन करून सर्वांचा शोक नाहीसा करा. स्वर्गी गेलेल्या राजांना यामुळे संतोष होईल व तुम्हालाही पुण्याचा लाभ होऊन सुयश मिळेल. त्यासाठी तुम्हाला कोणीही दोष देणार नाही हे खास समजा. कारण ही गोष्ट वेदसंमत व सर्वांना मान्य अशीच आहे की पित्याने ज्याला राज्य दिले, त्याने ते करावे. म्हणून मनाचे दुःख टाकून तुम्ही राज्य करा. तुमच्या हिताचे सांगत आहे अशी खात्री बाळगून त्याप्रमाणे वागा.

तुम्ही राज्याचा स्वीकार केल्याचे ऐकून राम आणि वैदेही सुखी होतील. कोणीही जाणता मनुष्य हे अयोग्य ठरवणार नाही. कौसल्या आदिकरून सर्व माता, प्रजाजन सुखी झाल्याचे पाहून ते सुखी होतील. तुमच्या व रामाच्या संबंधातील मर्म (रहस्य) ज्यांना पूर्ण माहीत आहे ते सर्व लोक तुम्ही भले आहांत असेच मानतील. चौदा वर्षांची मुदत संपल्यावर राम परत आले कीं त्यांचे राज्य त्यांना द्यावे व त्यांच्या चरणांची सेवा प्रेमपूर्वक करावी. "

याप्रमाणे गुरू वसिष्ठांचे भाषण होताच सचिवांनी हात जोडून प्रार्थना केली, " आपल्या पूज्य गुरू वसिष्ठांच्या आज्ञेचे अगत्य पालन करा ! हे तात ! जेव्हा रघुपती परत येतील तेव्हा जे योग्य ते अवश्य करावे. १७५

अशाही वेळी आपल्या कर्तव्यास जागणारी रामजननी कौसल्या धीर धरून म्हणते, 'हे पुत्र ! गुरुजींची आज्ञा नेहमीच हित करणारी असते. म्हणून तिच्या पालनाने आपले खास कल्याण होणार, असा विश्वास बाळगून त्याप्रमाणे वागावे. काळाची गतीच विचित्र, त्यात कोणाही व्यक्तीचा दोष नाही, हे लक्षात घेऊन सर्व खेद सोडावा. कारण रघुपती वनाला गेले आणि नगरपती स्वर्गाला गेले. तू चांगला समजूतदार असूनही असा घाबरून गेलास ! सर्व प्रजाजन, मंत्रिमंडळ, तुझ्या सगळ्या माता आणि परिवार या सर्वांचा यावेळी, बाळा !

लखि बिधि बाम कालु कठिनाई । धीरजु धरहु मातु बलि जाई ॥
सिर धरि गुर आयसु अनुसरहू । प्रजा पालि परिजन दुखु हरहू ॥
गुर के बचन सचिव अभिनंदनु । सुने भरत हिय हित जनु चंदनु ॥
सुनी बहोरि मातु मृदु बानी । सील सनेह सरल रस सानी ॥
छं ० –सानी सरल रस मातु बानी सुनि भरतु ब्याकुल भए ।
लोचन सरोरुह स्रवत सींचत बिरह उर अंकुर नए ॥
सो दसा देखत समय तेहि बिसरी सबहि सुधि देह की ॥
तुलसी सराहत सकल सादर सीवँ सहज सनेह की ॥
सो ० –भरतु कमल कर जोरि धीर धुरंधर धीर धरि ।
बचन अमिअँ जनु बोरि देत उचित उत्तर सबहि ॥ १७६ ॥

मासपारायण, अठारहवाँ विश्राम

चौ ० –मोहि उपदेसु दीन्ह गुर नीका । प्रजा सचिव संमत सबही का ॥
मातु उचित धरि आयसु दीन्हा । अवसि सीस धरि चाहउँ कीन्हा ॥
गुर पितु मातु स्वामि हित बानी । सुनि मन मुदित करिअ भलि जानी ॥
उचित कि अनुचित किएँ बिचारू । धरमु जाइ सिर पातक भारू ॥
तुम्ह तौ देहु सरल सिख सोई । जो आचरत मोर भल होई ॥
जद्यपि यह समुझत हउँ नीकें । तदपि होत परितोषु न जी कें ॥

तूच एकटा आधार आहेस ! म्हणून दैवाची पावले उलट आणि काळाची कठोर करणी असल्यामुळे ही तुझी आई तुझ्यावरून आपल्या कायेची कुरवंडी करते; तू आता धीर धर, गुरु श्रेष्ठांची आज्ञा मस्तकी धारण करून त्याप्रमाणे वाग. प्रजेचे पालन करून आपल्या सर्व परिवाराच्या दुःखाचा एकदाचा शेवट कर. ”

गुरुजींची आज्ञा, सचिवांनी दिलेले अनुमोदन हे सर्व जणू हृदयाला चंदनाप्रमाणे शीतल असणारे असे सर्व ऐकून घेतले. त्यावर आणखी स्नेह, शील सरलता या रसांची खाणच अशी मातेची कोमलवाणी भरताच्या कानावर पडली.

या सर्वांचा परिणाम भरताच्या मनावर होऊन तो व्याकुळ झाला; आणि त्याच्या हृदयातील विरहाच्या नवीन अंकुरावर, नेत्ररूपी कमळे पाझरून पाणी शिंपडू लागली. अशा शोकाकुल भरताला पाहून त्यावेळी सभेतील सर्वांचेच देहभान हरपले. भरताच्या जातिवंत आणि सुंदर स्नेहाच्या त्या कमालीच्या स्वरूपाची सर्वच आदराने मनोमनी स्तुती करू लागले.

सर्वच सभागृह अशा निःस्तब्ध स्थितीत थोडा वेळ होते. शेवटी धैर्यधुरंधर अशा भरताने धीर धरला. करकमल जोडून आपले शब्द जणू अमृतात घोळून ते आता सर्वांना योग्य असे उत्तर देत आहेत. १७६

“ पूज्य वसिष्ठ गुरूंनी मला अत्यंत शोभन असा उपदेश केला. तो प्रजाजन सचिवादि सर्व सभासदांना मान्य झाला. इतकेच नव्हे तो उपदेश अत्यंत योग्य आहे असे समजून मातोश्रींनीही आज्ञा केली. अर्थात अशी आज्ञा शिरसामान्य करणे माझे कर्तव्यच आहे !

गुरू, पिता, माता व धनी यांची हितकर वचने शुभ समजून समाधानयुक्त अंतःकरणाने त्याप्रमाणे वागावे. ती योग्य का अयोग्य अशी नुसती चिकित्सा करत बसल्यासही धर्माचा नाश होऊन अशा मनुष्याच्या डोकीवर पातकाचे मोठेच ओझे होते !

तुम्ही दिलेला उपदेश अत्यंत सरळ अंतःकरणाचाच असल्याने त्या प्रमाणे वागल्यास माझे कल्याणच होणार अशी माझी ठाम समजूत आहे ! पण माझ्या जीवाची तळमळ मात्र शांत होत नाही.

अब तुम्ह बिनय मोरि सुनि लेहू । मोहि अनुहरत सिखावनु देहू ।।
उतरू देउँ छमब अपराधू । दुखित दोष गुन गनहिं न साधू ।।

दो०–पितु सुरपुर सिय रामु बन करन कहहु मोहि राजु ।
एहि तें जानहु मोर हित कै आपन बड़ काजु ।। १७७ ।।

चौ०–हित हमार सियपति सेवकाईं । सो हरि लीन्ह मातु कुटिलाईं ।।
मैं अनुमानि दीख मन माहीं । आन उपायँ मोर हित नाहीं ।।
सोक समाजु राजु केहि लेखें । लखन राम सिय बिनु पद देखें ।।
बादि बसन बिनु भूषन भारू । बादि बिरति बिनु ब्रह्मबिचारू ।।
सरुज सरीर बादि बहु भोगा । बिनु हरिभगति जायँ जप जोगा ।।
जायँ जीव बिनु देह सुहाई । बादि मोर सबु बिनु रघुराई ।।
जाउँ राम पहिं आयसु देहू । एकहिं आँक मोर हित एहू ।।
मोहि नृप करि भल आपन चहहू । सोउ सनेह जड़ता बस कहहू ।।

दो०–कैकेई सुअ कुटिलमति राम बिमुख गतलाज ।
तुम्ह चाहत सुखु मोहबस मोहि से अधम कें राज ।। १७८ ।।

चौ०–कहउँ साँचु सब सुनि पतिआहू । चाहिअ धरमसील नरनाहू ।।
मोहि राजु हठि देइहहु जबहीं । रसा रसातल जाइहि तबहीं ।।

" म्हणून, मी आता जी आपणास विनंती करतो ती ऐकून घ्यावी व मग मला योग्य अशी शिकवण द्यावी अशा प्रकारे आपल्या भाषणावर मी पुनः उत्तर देत आहे याबद्दल क्षमा करा. अंतःकरणात जो अत्यंत दुःखी झाला आहे त्याच्या गुणदोषाकडे साधुपुरुष कानाडोळाच करतात.

सीताराम वनवास दुःख भोगत आहेत ! परम पूज्य प्रेमळ पिताजी नुकतेच स्वर्गाला गेले आहेत ! आणि अशा विपत्तीच्या वेळी आपण म्हणता, 'बाळा ! राज्य कर !' असे सांगण्यात माझे काही हित होईल असे आपणास वाटते की आपले एखादे महत्कार्य त्यामुळे साधेल अशी आपली समजूत आहे ? १७७

वस्तुतः सीतापतीच्या सेवेतच आमचे खरे हित ! परंतु ते जननीच्या कुटिलपणाने नष्ट करून टाकले. मी आपल्या मनात पुष्कळ साधक-बाधक विचार करून पाहिला. तेव्हा माझी खात्री झाली की दुसऱ्या कोणत्याही उपायाने माझे हित होणार नाही !

" जोपर्यंत राम, सीता, लक्ष्मण यांचे चरण दृष्टी पडले नाहीत तोपर्यंत शोककारक अशा अनेक कारणांनी भरलेल्या या राज्याची काय किंमत आहे ? वस्त्रावाचून दागिन्यांचा भार, वैराग्यावाचून ब्रह्माचा विचार, रोगी शरीराला दिलेल्या पुष्कळ भोग्य वस्तू, हरिभक्तीवाचून जप व योग, प्राणावाचून सुंदर शरीर—ज्याप्रमाणे हे सर्व एकावाचून दुसरे व्यर्थ आहेत. त्याचप्रमाणे माझे सर्वच रघुवरावाचून वृथा आहे, म्हणून रामाकडे जाण्याची मला आज्ञा द्या. त्यातच माझे अत्यंत हित आहे. हाच माझा एक सिद्धान्त आहे !

" मला राजा करून आपण आपले हित साधावे अशी जी इच्छा करता ते आपले सांगणे, केवळ माझ्या-बद्दल आपणास वाटणाऱ्या स्नेहातूनच निर्माण झाले आहे; कारण मी कैकेयीचा मुलगा, माझी बुद्धि दुष्ट, रामाला विरोध करणारा, लज्जाहीन, अशा माझ्यासारख्या अधमाला राज्य देऊन तुम्ही सुखाची इच्छा करता हा केवळ तुमच्या बुद्धीला मोह उत्पन्न झाल्याचाच परिणाम नव्हे काय ? १७८

" मी अगदी अंतःकरणपूर्वक खरे तत्त्व सांगतो. त्यावर आपण विश्वास ठेवा की, 'राजा हा धर्मशील असावा' अशा स्थितीत जर माझ्यासारख्याला हट्टाने आपण राज्य दिले तर ही सर्व पृथ्वीच माझ्या घोर पापाने

मोहि समान को पाप निवासू । जेहि लगि सीय राम बनबासू ।।
रायँ राम कहुँ काननु दीन्हा । बिछुरत गमनु अमरपुर कीन्हा ।।
मैं सठु सब अनरथ कर हेतू । बैठ बात सब सुनउँ सचेतू ।।
बिनु रघुबीर बिलोकि अबासू । रहे प्रान सहि जग उपहासू ।।
राम पुनीत बिषय रस रूखे । लोलुप भूमि भोग के भूखे ।।
कहँ लगि कहौं हृदय कठिनाई । निदरि कुलिसु जेहिं लही बड़ाई ।।

दो० — कारन तें कारजु कठिन होई दोसु नहिं मोर ।
कुलिस अस्थि तें उपल तें लोह कराल कठोर ।। १७९ ।।

चौ० — कैकेई भव तनु अनुरागे । पावँर प्रान अघाइ अभागे ।।
जौं प्रिय बिरहँ प्रान प्रिय लागे । देखब सुनब बहुत अब आगे ।।
लखन राम सिय कहुँ बनु दीन्हा । पठइ अमरपुर पति हित कीन्हा ।।
लीन्ह बिधवपन अपजसु आपू । दीन्हेउ प्रजहि सोकु संतापू ।।
मोहि दीन्ह सुखु सुजसु सुराजू । कीन्ह कैकई सब कर काजू ।।
एहि तें मोर काह अब नीका । तेहि पर देन कहहु तुम्ह टीका ।।
कैकइ जठर जनमि जग माहीं । यह मोहि कहँ कछु अनुचित नाहीं ।।

रसातळाला जाईल ! सीतारामाला वनवासाची दुःखे भोगावयास लावण्यास जो कारणीभूत झाला त्याच्यासारखा सर्व पातकांचे माहेरघर बनलेला दुसरा कोण असेल ?

" राजांनी रामाला वनवासाला पाठवला; पण अशा पुत्राचा वियोग होताच ताबडतोब त्यांनी स्वर्गवास पत्करला ! मी मात्र या सर्व अनर्थांना कारण असणारा, अजून माझे प्राण न जाता, जिवंत राहून या सर्व गोष्टी ऐकत बसलो आहे ! रामविरहित असे रामाचे वसतिस्थान (मंदिर) या डोळ्यांनी पाहिले, सर्व जगाने माझा उपहास केलेला कानांनी ऐकला, इतके सोसूनही हे प्राण जगले आहेत ! साहजिकच आहे, कारण रामासारख्या पवित्र विषयाच्या रसात माझे प्राण उदास असून, राज्योपभोगासाठी मात्र ते लाचावलेले आहेत ! माझ्या हृदयाचा निष्ठुरपणा मी किती सांगू ? खरोखर त्याने वज्रालाही लाजवून स्वतःला मोठेपणा मिळवला आहे !

" पण यात माझा थोडासुद्धा दोष नाही. केव्हाही कार्य हे आपल्या मूळ कारणपेक्षा कठीण असणारच ! दगडातून लोखंड निर्माण झाले, पण त्याची तलवार ही दगडापेक्षा कठीण व भयंकर ! तसेच दधीचि ऋषींच्या हाडापासून इंद्राने बनवलेले वज्र. त्या अस्थींपेक्षा अनंतपट कठीण व भयंकर बनले ! " १७९

[तसाच दुष्ट व व क्रूर ' कैकेयी ' या कारणापासून निपजलेला कार्यरूप भरत, भयंकर कठोर व रामविरोधी बनला यात काय आश्चर्य !]

" कैकेयीपासून उत्पन्न झालेल्या शरीरावर, आसक्त झालेले असे हे नीच प्राण पूर्णपणे अभागी आहेत ! प्रिय रामाच्या विरहातसुद्धा मला जर माझे प्राण अजून प्रिय वाटत आहेत, तर एवढ्यानेच काय झाले ? अजून पुढे पुष्कळ पाहण्यास व ऐकावयास मिळेल !

" मला जन्म देणाऱ्या कैकेयीने सर्वांचेच काम साधले आहे. लक्ष्मण, राम व सीता यांना वनवास दिला. पतीला स्वर्गाला पाठवून त्यांचे हित साधले. स्वतःला वैधव्य आणि अपकीर्ती घेतली. प्रजेला शोक आणि संताप अर्पण केला. इतके सर्व करण्याचा मुख्य हेतू काय, तर मला सुख, सुयश व सुराज्य मिळावे !

" यापेक्षा माझा या जगात अधिक मोठा लाभ व्हायचा कोणता उरला ? यातच विशेष म्हणजे, आपण मला राज्याभिषेक करू इच्छिता ! कैकेयीच्या पोटी या जगात जन्मलेल्याला, अशा प्रकारच्या सर्व

मोरि बात सब बिधिहिं बनाई । प्रजा पाँच कत करहु सहाई ॥

दो० –ग्रह ग्रहीत पुनि बात बस तेहि पुनि बीछी मार ।
तेहि पिआइअ बारुनी कहहु काह उपचार ॥ १८० ॥

चौ ०–कैकइ सुअन जोगु जग जोई । चतुर बिरंचि दीन्ह मोहि सोई ॥
दसरथ तनय राम लघु भाई । दीन्हि मोहि बिधि बादि बड़ाई ॥
तुम्ह सब कहहु कढ़ावन टीका । राय रजायसु सब कहँ नीका ॥
उतरु देउँ केहि बिधि केहि केही । कहहु सुखेन जथा रुचि जेही ॥
मोहि कुमातु समेत बिहाई । कहहु कहिहि के कीन्ह भलाई ॥
मो बिनु को सचराचर माहीं । जेहि सिय रामु प्रानप्रिय नाहीं ॥
परम हानि सब कहँ बड़ लाहू । अदिनु मोर नहिं दूषन काहू ॥
संसय सील प्रेम बस अहहू । सबुइ उचित सब जो कछु कहहू ॥

दो ०–राम मातु सुठि सरलचित मो पर प्रेमु बिसेषि ।
कहइ सुभाय सनेह बस मोरि दीनता देखि ॥ १८१ ॥

चौ ०–गुर बिबेक सागर जगु जाना । जिन्हहि बिस्व कर बदर समाना ॥
मो कहँ तिलक साज सज सोऊ । भएँ बिधि बिमुख बिमुख सबु कोऊ ॥

गोष्टीत अयोग्य असे काहीच नाही ! माझ्या जन्माचे अशा प्रकारचे धिंडवडे काढण्याचे विधात्यानेच ठरवल्यावर प्रजा व पंच यांचे तरी मग, साह्य कशाला लागणार ?

" अगोदरच अनिष्ट ग्रहांनी पछाडलेला, त्यातच वात होऊन इंगळी चावल्यावर पुनः त्याला दारू पाजणे हा काय त्यावर उपचार आहे ? १८०

कैकेईच्या दुर्दैवी मुलाला या जगात जे जे योग्य ते सर्व कुशल विरंची मला देत आहे. दशरथांचा मुलगा व रामाचा धाकटा भाऊ हे महत्त्व मला देण्यात मात्र तो ब्रह्मदेव चुकला !

तुम्ही म्हणता मी राज्यारोहण करावे. तशी रामाज्ञा असून तिचे पालन करण्यातच स[illegible] कल्याण आहे असेही तुमचे मत आहे. अशा स्थितीत मी कोणाला काय काय उत्तरे देऊ ? ज्याना जसे वाटेल तसे त्यांनी खुशाल म्हणावे. मी आणि कुमाता कैकेयी यांच्याशिवाय भरताने राज्याचा स्वीकार केला हे चांगले केले असे कोणीतरी म्हणेल काय ?

" या सर्व स्थावरजंगम सृष्टींत, सीताराम ज्याला प्राणप्रिय नाहीत असा माझ्याशिवाय दुसरा कोणीतरी हीन प्राणी सापडेल काय ? जी अत्यंत मोठी हानी तिलाच आपण परमलाभ मानता, पण यांत तुमचा कोणाचाच दोष नाही. माझेच दिवस वाईट आले आहेत !

आपल्या दृष्टीने आपण सगळे लोक जे म्हणत आहात ते सर्व योग्यच आहे. कारण आपल्या हृदयातील माझ्यावरील प्रेम, आपला सुस्वभाव व या बिकट काळी संशयग्रस्त झालेली आपली अंतःकरणे यांचा तो एकत्रित परिणाम आहे !

" राममाता अत्यंत सरळ बुद्धीची, त्यांत पुनः माझ्यावर तिचे फारच प्रेम आहे, अशा स्थितीत ही माझी केविलवाणी सर्व स्थिती पाहून सहजच स्नेहवश होऊन ती तसे म्हणाली. १८१

" गुरु वसिष्ठ हे विवेकांचे सागर आहेत ही गोष्ट जगजाहीर आहे. हे सर्व विश्व त्यांना तळ हातावरील बोरासारखे आहे ! अशांनीसुद्धा मला राजटिळक करण्यास सिद्ध व्हावे ! खरोखर एकदा आपले दैव फिरले की सर्वच उलट वागू लागतात !

परिहरि रामु सीय जग माहीं । कोउ न कहिहि मोर मत नाहीं ।।
सो मैं सुनब सहब सुखु मानी । अंतहुँ कीच तहाँ जहँ पानी ।।
डरु न मोहि जग कहिहि कि पोचू । परलोकहु कर नाहिन सोचू ।।
एकइ उर बस दुसह दवारी । मोहि लगि भे सिय रामु दुखारी ।।
जीवन लाहु लखन भल पावा । सबु तजि राम चरन मनु लावा ।।
मोर जनम रघुबर बन लागी । झूठ काह पछिताउँ अभागी ।।

दो ० –आपनि दारुन दीनता कहउँ सबहि सिरु नाइ ।
देखें बिनु रघुनाथ पद जिय कै जरनि न जाइ ।। १८२ ।।

चौ० –आन उपाउ मोहि नहिं सूझा । को जिय कै रघुबर बिनु बूझा ।।
एकहि आँक इहइ मन माहीं । प्रातकाल चलिहउँ प्रभु पाहीं ।।
जद्यपि मैं अनभल अपराधी । भै मोहि कारन सकल उपाधी ।।
तदपि सरन सनमुख मोहि देखी । छमि सब करिहहिं कृपा बिसेषी ।।
सील सकुच सुठि सरल सुभाऊ । कृपा सनेह सदन रघुराऊ ।।
अरिहुक अनभल कीन्ह न रामा । मैं सिसु सेवक जद्यपि बामा ।।
तुम्ह पै पाँच मोर भल मानी । आयसु आसिष देहु सुबानी ।।
जेहिं सुनि बिनय मोहि जनु जानी । आवहिं बहुरि रामु रजधानी ।।

"मला, भरताला-हे कपटकारस्थान मुळीच मान्य नाही," असे या जगात राम आणि सीतेशिवाय कोणीच म्हणणार नाही ! तरी पण आता मला लोक जे म्हणतील ते सुखाने ऐकले पाहिजे; व सोसले पाहिजे कारण जेथे पाणी आहे तेथे तळाला गाळ असणारच !

"अशा सर्व प्रकारानी विपरीत स्थितीत राज्य स्वीकार केला व न केला तरीही आता जग माझी निंदा करणार, हे ठरलेलेच आहे ! पण जगाने मला खोटा म्हणून माझी कितीही निर्भर्त्सना केली, तरी मला त्याची भीती वाटत नाही- अंती सद्गती लाभणार नाही, याचीही मला खंती (दुःख) वाटत नाही. माझ्या हृदयाला रात्रंदिवस जर कोणता वणवा जाळत असेल, तर तो म्हणजे, सीतारामांच्या वनवासदुःखाला मी कारण झालो आहे !

"जन्मातील खरा लाभ लक्ष्मणाने उत्तम प्रकारे लुटला आहे. कारण सर्वस्वाचा त्याग करून त्याने आपले मन रामचरणी लावले आहे. अशा स्थितीत रघुनाथांच्या. वनवासाकरताच ज्याचा जन्म झाला, त्या अभाग्याने उगीच पश्चात्तापाची वटवट का करावी ? सर्वांच्या चरणी मस्तक नमवून मी आपली भयंकर दीनता सांगतो की रघुनाथाच्या चरणदर्शनाशिवाय माझ्या हृदयातील आग शांत होणार नाही !" १८२

"मला तरी दुसरा उपाय सुचतच नाही. रघुवराशिवाय माझ्या जिवाला काय वाटते, ते कुणाला समजणार ? एकच निश्चित गोष्ट माझ्या मनाला पटते, आणि त्याप्रमाणे मी प्रभूकडे चालू लागलो, जरी मी अपराधी व वाईट आहे; जरी माझ्यामुळेच ही सर्व अनर्थपरंपरा सुरू झाली आहे; तरीसुद्धा शरण आलेला असा जेव्हा मला राम सन्मुख बघतील, तेव्हा माझ्या सर्व दोषांची क्षमा करून ते माझ्यावर कृपेचा वर्षाव करतील !

"सुशील, भिडस्तपणा, सरळ स्वभाव, कृपा व प्रेम या सर्व सद्गुणांचे माहेरघर म्हणजे रघुराव ! प्रत्यक्ष शत्रूचेसुद्धा कधी, समोर शरण आल्यावर, रामांनी अनहित केले नाही. मग जरी मी अत्यंत दुष्ट झालो असलो, तरी त्याच कृपाछत्राखाली वाढलेला, त्यांचा बाळ आणि चरणांचा सेवक आहे !

"म्हणून तुम्हीही पंचमंडळींनी हाच माझ्या परम हिताचा विचार समजून मला निरोप द्यावा; व असा सुंदर आशीर्वाद द्या की, ज्याच्या योगाने मला आपला सेवक जाणून, माझी विनंती राम ऐकतील व राजधानीला

दो० – जद्यपि जनमु कुमातु तें मैं सठु सदा सदोस ।
आपन जानि न त्यागिहहिं मोहि रघुबीर भरोस ॥ १८३ ॥

चौ० – भरत बचन सब कहँ प्रिय लागे । राम सनेह सुधाँ जनु पागे ॥
लोग बियोग बिषम बिष दागे । मंत्र सबीज सुनत जनु जागे ॥
मातु सचिव गुर पुर नर नारी । सकल सनेहँ बिकल भए भारी ॥
भरतहि कहहिं सराहि सराही । राम प्रेम मूरति तनु आही ॥
तात भरत अस काहे न कहहू । प्रान समान राम प्रिय अहहू ॥
जो पावँरु अपनी जड़ताईं । तुम्हहि सुगाइ मातु कुटिलाईं ॥
सो सठु कोटिक पुरुष समेता । बसिहि कलप सत नरक निकेता ॥
अहि अघ अवगुन नहिं मनि गहई । हरइ गरल दुख दारिद दहई ॥

दो० – अवसि चलिअ बन रामु जहँ भरत मंत्रु भल कीन्ह ।
सोक सिंधु बूड़त सबहिं तुम्ह अवलंबनु दीन्ह ॥ १८४ ॥

चौ० – भा सब कें मन मोदु न थोरा । जनु घन धुनि सुनि चातक मोरा ॥
चलत प्रात लखि निरनउ नीके । भरतु प्रानप्रिय भे सबही के ॥
मुनिहि बंदि भरतहि सिरु नाई । चले सकल घर बिदा कराई ॥
धन्य भरत जीवनु जग माहीं । सीलु सनेहु सराहत जाहीं ॥

परत येतील ! माझा जन्म जरी कुमातेच्या पोटी झाला असला, तसाच मी जरी सदोदित नाठाळ व नीच असलो, तरीही हा आपला आहे, याची जाणीव ठेवून माझा त्याग राम करणार नाहीत, असा मला पूर्ण भरवसा आहे. १८३

जणू रामाविषयीच्या प्रेमामृतात पाकवलेले असे हे भरताचे भाषण सर्वांनाच आवडले. रामविरहरूपी भयंकर हालाहलाने सर्व लोक जळून जात असता सबीज मंत्राच्या श्रवणाने ते जणू देहभानावर आले ! राम-प्रेमाची ती प्रत्यक्ष मूर्ती म्हणजे भरत ! पाहून माता, सचिव त्याला गुरु वसिष्ठ नागरिक स्त्रिया व पुरुष सर्वच; प्रेम, भावना उचंबळून आल्यामुळे व्याकुळ झाले.

भरताचा त्यांनी पुनः पुन्हा फार गौरव केला व म्हणू लागले की, "भरत म्हणजे देहधारी रामप्रेमच ! हे तात ! हे भरत ! आपल्या मुखातून अशी वाक्ये का बाहेर पडणार नाहीत ? तुम्ही रामाला प्राणासारखे प्रिय असून रामावरही तुमचे प्राणापेक्षा श्रेष्ठ प्रेम आहे ! जो कोणी नीच मनुष्य आपल्या मूर्खपणाने तुमच्या जननीचे कुटिल कारस्थान तुमच्यावर लादील तो दुष्ट, आपल्या कोट्यवधि पूर्वजांसह शंभर कल्पपर्यंत नरकात पिचत पडेल !

सर्पमणी सर्पाचे दोष कधीच घेत नाही. उलट विष, दुःख व दैन्य याचा परिहार करतो. हे भरत ! रामाकडे वनात चलावच. आपण दिलेला सल्ला खरोखरच अत्यंत कल्याणकारक आहे. आम्ही सगळेच शोक सागरात बुडत होतो अशा वेळी आपण केवढा मोठा आधार दिला !" १८४

मेघ गर्जना ऐकताच ज्याप्रमाणे मोर आणि चातक आनंदाने बेहोप होतात तशीच भरताच्या या भाषणाने सर्वांची अवस्था झाली ! उद्या सकाळी रामदर्शनासाठी निघावे असा शुभ निर्णय जाहीर होताच भरत सर्वांनाच प्राणप्रिय वाटू लागले !

त्यांनी मुनींना वंदन केले भरतापुढे शिर नमवले व सर्व मंडळी निरोप घेऊन आपापल्या घरी जावयास निघाली. जाताना वाटेत ते एकमेकाला म्हणत, 'खरोखर भरताचे जीवन या जगात धन्य आहे ! धन्य, धन्य भरत !' याप्रमाणे भरताच्या स्नेहाची व शीलाची वाखाणणी करीत मंडळी चालली.

कहहिं परसपर भा बड़ काजू । सकल चलै कर साजहिं साजू ॥
जेहि राखहिं रहु घर रखवारी । सो जानइ जनु गरदनि मारी ॥
कोउ कह रहन कहिअ नहिं काहू । को न चहइ जग जीवन लाहू ॥
दो० – जरउ सो संपति सदन सुखु सुहृद मातु पितु भाइ ।
सनमुख होत जो राम पद करै न सहस सहाइ ॥ १८५ ॥
चौ० – घर घर साजहिं बाहन नाना । हरषु हृदयँ परभात पयाना ॥
भरत जाइ घर कीन्ह बिचारु । नगरु बाजि गज भवन भँडारू ॥
संपति सब रघुपति कै आही । जौं बिनु जतन चलौं तजि ताही ॥
तौ परिनाम न मोरि भलाई । पाप सिरोमनि साइँ दोहाई ॥
करइ स्वामि हित सेवकु सोई । दूषन कोटि देइ किन कोई ॥
अस बिचारि सुचि सेवक बोले । जे सपनेहुँ निज धरम न डोले ॥
कहि सबु मरमु धरमु भल भाषा । जो जेहि लायक सो तेहिं राखा ॥
करि सबु जतनु राखि रखवारे । राम मातु पहिं भरतु सिधारे ॥
दो० – आरत जननी जानि सब भरत सनेह सुजान ।
कहेउ बनावन पालकीं सजन सुखासन जान ।
चौ० – चक्क चक्कि जिमि पुर नर नारी । चहत प्रात उर आरत भारी ॥
जागत सब निसि भयउ बिहाना । भरत बोलाए सचिव सुजाना ॥

'फारच मोठे कार्य साधले नाही ?' असे परस्परास सांगत सर्वच मंडळी प्रवासाच्या तयारीस लागली. अशा वेळीं ज्याला घर संभाळण्यासाठी मागे ठेवत त्याला वाटे जणू आपला कोणी तरी गळाच कापत आहेत ! म्हणून मागे राहा असे कोणीच कोणाला सांगेना. कारण रामदर्शनाचा जीवनलाभ आवडत नाही असे त्यात कोण होते ? याच्या उलट त्यांना असे वाटत होते की सर्व संपत्ती घर त्यातील सुखे आप्तेष्ट, बांधव आई-बाप ही जर, रामचरणाला सन्मुख होत असता आनंदाने सहाय्यक होत नसतील तर त्यांना आग लागो ! १८५

घरोघर नाना प्रकारची वाहने सुसज्ज करण्याचे काम सुरू झाले. उद्या आपण जावयास निघणार म्हणून त्याना केवढा हर्ष झाला होता !

भरत परत घरी गेल्यावर शांतपणे विचार करू लागला की अयोध्येत यावेळी घोडे, हत्ती राजवाडे, खजिना इत्यादि जे सर्व आहे ती रघुपतीची संपत्ती आहे; ती सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने योजना न करता जर तशीच टाकून मी गेलो तर तो स्वामीद्रोह होतो व सर्व पातकात त्याची प्रथम गणना होते. मला कोणीही कोट्यवधी दोष दिले तरी हरकत नाही. एक गोष्ट मी पूर्णपणे जाणतो की जो आपल्या स्वामीचे हित करतो तोच खरा सेवक! हा विचार कायम होताच स्वप्नातसुद्धा जे कधी बेइमान झाले नाहीत असे कसाला उतरलेले जातिवंत सेवक बोलावून आणले व भरतानी त्यांना त्यांच्या कर्तव्याची योग्य शब्दांत जाणीव करून दिली. त्यानंतर प्रत्येकाकडे त्यांच्या त्यांच्या लायकीप्रमाणे काम सोपवले. याप्रमाणे संरक्षणाची योग्य ती तजवीज करून त्याने सर्वत्र पहारेकरी ठेवले व ते राममातेकडे गेले.

त्याठिकाणी त्यांनी पाहिले की सर्व माता दुःखी असून रामदर्शनार्थ उत्सुक झालेल्या आहेत, तेव्हा खऱ्या जिव्हाळ्याची जाणीव असणाऱ्या भरतानी पालख्या मेणे इत्यादी सुखावह वाहने त्यांच्यासाठी सुसज्ज करण्याची आज्ञा दिली. १८६

चक्रवाक पक्षी आणि त्यांची मादी ज्याप्रमाणे सूर्योदयासाठी प्रत्येक क्षणी उत्सुक असतात तशाच अतीव उत्कंठेने अयोध्यावासी नागरिकांनी ती रात्र कशीतरी जागून कंठली !

कहेउ लेहु सबु तिलक समाजू । बनहिं देब मुनि रामहि राजू ।।
बेगि चलहु सुनि सचिव जोहारे । तुरत तुरग रथ नाग सँवारे ।।
अरुंधती अरु अगिनि समाऊ । रथ चढ़ि चले प्रथम मुनिराऊ ।।
बिप्र बृंद चढ़ि बाहन नाना । चले सकल तप तेज निधाना ।।
नगर लोग सब सजि सजि जाना । चित्रकूट कहँ कीन्ह पयाना ।।
सिबिका सुभग न जाहिं बखीना । चढ़ि चढ़ि चलत भईं सब रानी ।।
दो०—सौंपि नगर सुचि सेवकनि सादर सकल चलाइ ।
सुमिरि राम सिय चरन तब चले भरत दोउ भाइ ।। १८७ ।।
चौ०—राम दरस बस सब नर नारी । जनु करि करिनि चले तकि बारी ।।
बन सिय रामु समुझि मन माहीं । सानुज भरत पयादेहिं जाहीं ।।
देखि सनेहु लोग अनुरागे । उतरि चले हय गय रथ त्यागे ।।
जाइ समीप राखि निज डोली । राम मातु मृदु बानी बोली ।।
तात चढ़हु रथ बलि महतारी । होइहि प्रिय परिवारु दुखारी ।।
तुम्हरें चलत चलिहि सबु लोगू । सकल सोक कृस नहिं मग जोगू ।।
सिर धरि बचन चरन सिरु नाई । रथ चढ़ि चलत भए दोउ भाई ।।

उजाडताच भरतानी जाणत्या सचिवांना आपल्या जवळ बोलावून घेतले आणि सांगितले की राज्याभिषेकाची सर्व सामग्री बरोबर घ्या. रामास मान्य झाले तर गुरू वसिष्ट त्याना राज्याभिषेक करतील. आता निघण्याची तयारी मात्र जलद करा ' हे ऐकताच ते वंदन करून परतले. जल्दीने त्यांनी हत्ती, घोडे व रथ उत्तम सजवले.

अरुंधती व सर्व साहित्यासह अग्नी यांच्यासह मुनिश्रेष्ठ रथात प्रथम बसून सर्वांच्या पुढे निघाले.

सर्व प्रकारच्या तेज आणि तपांची राशीच जणू असे विप्रांचे समुदाय निरनिराळ्या वाहनांतून निघाले.

त्याचप्रमाणे बाकीचे सर्व नागरिक आपापली वाहने मोठ्या शिकस्तीने सजवून चित्रकूटावर जाण्यासाठी बाहेर पडले.

ज्यांच्या चांगुलपणाचे वर्णन करणे अशक्य अशा शोभिवंत पालख्यांतून सर्व राण्या चालल्या.

इमानी व कर्तबगार अशा सेवकांच्याकडे अयोध्येचा बंदोबस्त व संरक्षण यांची जबाबदारी सोपवून त्यांची सर्वांची आदराने रवानगी केली. राम व सीता यांच्या चरणाचे स्मरण करून बंधू शत्रुघ्नासह चालू लागले.

सूर्याच्या चण्डकिरणांनी तप्त झालेल्या हत्तिणी व हत्ती एखादा जलाशय पाहून झपाट्याने त्याकडे धावत जातात, तसेच रामदर्शनोत्सुक नर-नारी रस्ता झपाट्याने मागे टाकत होत्या !

सीताराम वनवासात आहेत, हे मनात येताच बंधूसह भरत चालत जाऊ लागले. त्यांचे ते रामावरील निःसीम प्रेम पाहून सर्वच लोकांना त्याचे कौतुक वाटून, त्यानीही आपली वाहने सोडून पायी चालण्यास सुरवात केली. हा सर्व प्रकार राममातेच्या नजरेस येताच आपली डोली भरताजवळ थांबवून ती कोमल वाणीने त्याला म्हणाली, " बाळा ! मी मागते ते ऐक; तू रथात बैस आपला प्रेमळ सर्व परिवार किती दुःखी झाला आहे, ते पाहा तर एकवेळ ! तुम्ही पायी चालू लागल्यावर सगळेच पायी चालणार, परंतु सर्वच लोक शोकाने व दुःखाने थकले असल्याने त्यांच्या पायात आता चालण्याची शक्तीच उरली नाही. "

ही आज्ञा लगेच शिरसामान्य करून चरणी वंदन केले व दोघेही बंधू रथात बसून जाऊ लागले.

तमसा प्रथम दिवस करि बासू। दूसर गोमति तीर निवासू ॥
दो० – पय अहार फल असन एक निसि भोजन एक लोग ।
करत राम हित नेम ब्रत परिहरि भूषन भोग ॥ १८८ ॥
चौ० – सई तीर बसि चले बिहाने। सृंगबेरपुर सब निअराने ॥
समाचार सब सुने निषादा । हृदयँ बिचार करइ सबिषादा ॥
कारन कवन भरतु बन जाहीं। है कछु कपट भाउ मन माहीं ॥
जौं पै जियँ न होति कुटिलाई। तौ कत लीन्ह संग कटकाई ॥
जानहिं सानुज रामहि मारी। करउँ अकंटक राजु सुखारी ॥
भरत न राजनीति उर आनी। तब कलंकु अब जीवन हानी ॥
सकल सुरासुर जुरहिं जुझारा। रामहि समर न जीतनिहारा ॥
का आचरजु भरतु अस करहीं। नहिं बिष बेलि अमिअ फल फरहीं ॥
दो० – अस बिचारि गुहँ ग्याति सन कहेउ सजग सब होहु ।
हथवाँसहु बोरहु तरनि कीजिअ घाटारोहु ॥ १८९ ॥
चौ० – होहु सँजोइल रोकहु घाटा। ठाटहु सकल मरै के ठाटा ॥
सनमुख लोह भरत सन लेऊँ। जिअत न सुरसरि उतरन देउँ ॥
समर मरनु पुनि सुरसरि तीरा। राम काजु छनभंगु सरीरा ॥
भरत भाइ नृपु मैं जन नीचू। बड़ें भाग असि पाइअ मीचू ॥

पहिल्या दिवशी तमसा नदीच्या तटी वस्ती पडली. गोमतीच्या तीरावर दुसरा मुक्काम केला.

कोणी फक्त दूधच घेत. कोणी नुसती फळे खात. कोणी फक्त भोजन, रात्री एकदाच करीत. या प्रमाणे रामदर्शनासाठी आपापल्या शक्त्यनुसार लोक नेम, व्रते इत्यादि करू लागले. सर्वांनीच अलंकार व सुखोपयांचा त्याग केला. १८८

तिसऱ्या दिवशी सई नदीच्या तीरावर राहून उजाडताच निघून ही मंडळी शृंगवेरपुराजवळ आली.

ही बातमी निषादांचा राजा गुह याला मिळताच तो खिन्न होऊन मनात विचार करू लागला—

भरत वनात जाण्याचे कारण काय असावे? काही तरी मनात कपट असले पाहिजे. कपटभाव जर अंतःकरणात नसता तर बरोबर सैन्य घेण्याचे काहीच कारण नव्हते. लक्ष्मणासह रामाचा वध करून आपण निष्कंटक अशा राज्याचा उपभोग सुखाने घ्यावा, असाच त्याचा हेतू असला पाहिजे. परंतु भरताला राजनीतीचा योग्य असा पोच दिसत नाही. पूर्वी केलेल्या कारस्थानामुळे कायमचा कीर्तीला कलंक लागला. आता प्रत्यक्ष प्राणावरच पाळी येणार! मोठे रणझुंझार असे सर्व देव आणि दैत्य जरी एकत्र होऊन रामाबरोबर लढण्यासाठी रणांगणावर ठाकले, तरीही त्यांच्यापैकी कोणीच रामाला जिंकू शकणार नाही. बाकी भरतानी असे दुष्टपणाचे कर्म केले, तर त्यात आश्चर्य करण्यासारखे काहीच नाही! विषाच्या वेलीला अमृताची फळे थोडीच लागणार!

असा विचार पूर्ण होताच गुहाने आपल्या जातभाईंना त्याची थोडक्यात कल्पना दिली व म्हणाला, "सर्वजण पूर्ण सावध राहा! सुकाणूंचे दांडे काढून घ्या. होडया खोल पाण्यात बुडवून टाका; व सर्व घाट उत्तम प्रकारे अडवून धरा. १८९

"सगळे जण युद्धाच्या तयारीने सुसज्ज व्हा. घाट अडवून धरत असता सर्वांनीच रणांगणात मरण्याची तयारी ठेवा. भरताबरोबर रणांगणात आपण सर्व लढूया. कुडीत प्राण आहे, तोपर्यंत गंगानदीच्या पैलतीरास कोणासही जाऊ द्यावयाचे नाही. युद्धात मरण, तेही गंगेच्या काठी व सर्वांत मुख्य म्हणजे रामकार्यात! शरीर तर बोलून चालून क्षणभंगुर! त्यातही मी एक नीच रामसेवक. याच्या उलट भरत राजा व राम बंधू!! अशा बरोबर लढताना रणांगणांत येणारे मरण हे मोठ्या भाग्यनेच मिळणार!

स्वामि काज करिहउँ रन रारी । जस धवलिहउँ भुवन दस चारी ।।
तजउँ प्रान रघुनाथ निहोरें । दुहूँ हाथ मुद मोदक मोरें ।।
साधु समाज न जाकर लेखा । राम भगत महुँ जासु न रेखा ।।
जायँ जिअत जग सो महि भारू । जननी जौबन बिटप कुठारू ।।

दो०—बिगत बिषाद निषादपति सबहि बढ़ाइ उछाहु ।
सुमिरि राम मागेउ तुरत तरकस धनुष सनाहु ।। १९० ।।

चौ०—बेगहु भाइहु सजहु सँजोऊ । सुनि रजाइ कदराइ न कोऊ ।।
भलेहिं नाथ सब कहहिं सहरषा । एकहिं एक बढ़ावइ करषा ।।
चले निषाद जोहारि जोहारी । सुर सकल रन रूचइ रारी ।।
सुमिरि राम पद पंकज पनहीं । भाथीं बाँधि चढ़ाइन्हि धनहीं ।।
अँगरी पहिरि कूँडि सिर धरहीं । फरसा बाँस सेल सम करहीं ।।
एक कुसल अति ओड़न खाँड़े । कूदहिं गगन मनहुँ छिति छाँड़े ।।
निज निज साजु समाजु बनाई । गुह राउतहि जोहारे जाई ।।
देखि सुभट सब लायक जाने । लै लै नाम सकल सनमाने ।।

दो०—भाइहु लावहु धोख जनि आजु काज बड़ मोहि ।
सुनि सरोष बोले सुभट बीर अधीर न होहि ।। १९१ ।।

" स्वामिकार्यासाठी घनघोर युद्ध करीन. त्यामुळे चौदाही भुवनांत माझी धवल कीर्ती पसरेल. रघुनाथाच्या कार्यासाठी आपले प्राण अर्पण करीन आणि त्यामुळे मला दुहेरी आनंद मिळेल. (रामकार्य व रणी मरण) ज्याची गणना साधुसमाजात होत नाही, रामभक्तांच्या यादीत ज्याचे नाव नाही, असा मनुष्य खरोखर भूमीला भारभूत होऊन व्यर्थ जगत असतो. आपल्या मातेच्या यौवनरूपी वृक्षाला तो खरोखर कुऱ्हाडीसारखाच घातक होय !

निषादराजा विषादरहित होऊन आपल्या सर्व अनुयायांच्या ठिकाणी त्याने उत्साह उत्पन्न केला. रामाचे स्मरण केले व जलद धनुष्य, भाता चिलखत इत्यादि आणावयास सांगितले ! १९०

नंतर तो म्हणतो, " बंधूनो ! झटपट तयारी करून सज्ज व्हा. लढण्याची आज्ञा मिळताच न डरता हल्ला चढवा. "

" ठीक, ठीक ! महाराज ! " असे आश्वासन सर्वांनी दिले व ते एकमेकाला वीरश्री चढेल अशी भाषा बोलू लागले. आपल्या राजाला नमन करून ते चारी दिशांना विभागले. सगळेच निषाद शूर असल्यामुळे त्यांना युद्धाची मोठी हौस वाटत होती. रामचरणकमलातील जोडयांचे स्मरण करून त्यानी आपल्या भात्या (लहान भाते) कसल्या, धनुकल्यांना दोऱ्या लावून तयार केल्या. अंगावर कवच व डोक्यावर शिरस्त्राणे घातली. भाले, बरच्या, तलवारी परशू , बाण इत्यादी घासून साफसूफ केले. फरी (छोटी, ढाल) व तलवार खेळण्यात जे पटाईत होते ते जणू जमीन सोडून आकाशातच उडू लागले. याप्रमाणे आपापली टोळी व सामानसुमान सज्ज करून ते क्रमाने जाऊन गुहराजाला जोहारू लागले.

लढाईला योग्य अशी सर्व सेना सुसज्ज झालेली गुहाने पाहिल्यावर प्रत्येकाचे नाव घेऊन त्याने सर्वांचा सन्मान केला. त्यानंतर तो आपल्या सर्व सैन्याला उद्देशून बोलू लागला,

" बंधूनो ! आज माझे फारच मोठे काम आहे. तरी मला धोक्यात मात्र घालू नका. " त्यावर त्यांनी एकमुखाने आवेशाने उत्तर दिले. " हे वीराग्रणी ! आपण बिलकुल काळजी करू नये. १९१

चौ०—राम प्रताप नाथ बल तोरे। करहिं कटकु बिनु भट बिनु घोरे ॥
जीवत पाउ न पाछें धरहीं। रुंड मुंडमय मेदिनि करहीं ॥
दीख निषादनाथ भल टोलू। कहेउ बजाउ जुझाऊ ढोलू ॥
एतना कहत छींक भई बाँए। कहेउ सगुनिअन्ह खेत सुहाए ॥
बूढ़ु एकु कह सगुन बिचारी। भरतहि मिलिअ न होइहि रारी ॥
रामहि भरतु मनावन जाहीं। सगुन कहइ अस बिग्रहु नाहीं ॥
सुनि गुह कहइ नीक कह बूढ़ा। सहसा करि पछिताहिं बिमूढ़ा ॥
भरत सुभाउ सीलु बिनु बूझें। बड़ि हित हानि जानि बिनु जूझें ॥

दो०—गहहु घाट समिटि सब लेउँ मरम मिलि जाइ।
बूझि मित्र अरि मध्य गति तस तब करिहउँ आइ ॥ १९२ ॥

चौ०—लखब सनेहु सुभायँ सुहाएँ। बैरु प्रीति नहिं दुरइँ दुराएँ ॥
अस कहि भेंट सँजोवन लागे। कंद मूल फल खग मृग मागे ॥
मीन पीन पाठीन पुराने। भरि भरि भार कहारन्ह आने ॥
मिलन साजु सजि मिलन सिधाए। मंगल मूल सगुन सुभ पाए ॥
देखि दूरि तें कहि निज नामू। कीन्ह मुनीसहि दंड प्रनामू ॥

"रामाचा प्रताप व तुझा प्रबल आधार यांच्या जोरावर आज आम्ही रणांगणावर सर्व पायदळ व घोडदळ यांचा फडशा पाडून दाखवतो! जोपर्यंत या देहात प्राण आहेत तोपर्यंत रणक्षेत्रावर मागे पाय घेणार नाही. सर्व रणांगण डोकी व धड यांनी नुसते भरून टाकतो!"

याप्रमाणे त्यांचे उत्साहपूर्ण भाषण निषाद राजाने ऐकले, त्याचप्रमाणे अपेक्षेबाहेर आपल्या अनुयायांचा पसरलेला तो सेनासागर पाहिला आणि त्याने लढाईच्या प्रारंभाचा इशारा देणारा ढोल बडवण्यास हुकूम दिला.

इतक्यात डाव्या बाजूस कोणीतरी शिंकले. त्याबरोबर शकुन जाणणारे म्हणाले, "आपली फत्ते होणार! परंतु शकुनाचा विचार करून एक म्हातारा म्हणाला, "भरताची भेट घ्या; माझ्या मते युद्धच होणार नाही, भरत रामाला परतवण्यासाठी प्रार्थना करावी, या हेतूने जात आहेत. वैरभावच नाही, त्यामुळे युद्धाचे कारणच नाही, असे हा शकुन सांगतो!"

हे ऐकून गुह राजा म्हणाला, "वृद्धांचे वचन योग्यच आहे. मूर्ख मनुष्य अविचाराने काही तरी करतो व मग बसतो पश्चात्ताप करीत! भरताच्या अंतःकरणातील भावना, त्याचे शील इत्यादि समजून न घेता आपण जर लढण्यास सुरवात केली तर त्यात आपले व्यर्थ भरपूर नुकसान होईल. वीर हो! तुम्ही सर्व घाट मात्र अडवून धरा. मी जाऊन भेट घेतो. भरताचा शत्रू, मित्र अगर उदास यापैकी कोणता भाव आहे हे जाणून मग त्याला योग्य अशी पुढील पावले टाकू."

"मनुष्याच्या सुस्वभावावरून त्याच्या अंतःकरणातील प्रेम उघड होते. एखाद्याचे प्रेम किंवा वैर लपवून किती लपणार?"

लगेच भरताच्या भेटीसाठी सादर करावयाच्या वस्तू जमविण्यास सुरुवात झाली. कंद, मूल, फळे, पशू व पक्षी यांची मागणी केली. पाठीण जातीचे जुने व खारवलेले मोठे मासे, वगैरे नाना जिन्नस सेवकांनी पाटया भरभरून आणले. भेटीचे सर्व पदार्थ एकत्र शिस्तीने घेऊन निषाद राजा भरताच्या भेटीस निघाला. त्याबरोबर त्याला मंगलसूचक पुष्कळ शुभशकुन झाले.

दुरून दृष्टीस पडताच गुहाने आपले नाव वगैरे नम्रपणे सांगून मुनिश्रेष्ठ वसिष्ठास त्याने दण्डवत्

जानि रामप्रिय दीन्हि असीसा । भरतहि कहेउ बुझाइ मुनीसा ॥
राम सखा सुनि संदनु त्यागा । चले उतरि उमगत अनुरागा ॥
गाउँ जाति गुहँ नाउँ सुनाई । कीन्ह जोहारु माथ महि लाई ॥

दो०—करत दंडवत देखि तेहि भरत लीन्ह उर लाइ ।
मनहुँ लखन सन भेंट भइ प्रेम न हृदयँ समाइ ॥ १९३ ॥

चौ०—भेंटत भरतु ताहि अति प्रीती । लोग सिहाहिं प्रेम कै रीती ॥
धन्य धन्य धुनि मंगल मूला । सुर सराहि तेहि बरिसहिं फूला ॥
लोक बेद सब भाँतिहि नीचा । जासु छाँह छुइ लेइअ सींचा ॥
तेहि भरि अंक राम लघु भ्राता । मिलत पुलक परिपूरित गाता ॥
राम राम कहि जे जमुहाहीं । तिन्हहि न पाप पुंज समुहाहीं ॥
यह तौ राम लाइ उर लीन्हा । कुल समेत जगु पावन कीन्हा ॥
करमनास जलु सुरसरि परई । तेहि को कहहु सीस नहिं धरई ॥
उलटा नामु जपत जगु जाना । बालमीकि भए ब्रह्म समाना ॥

दो०—स्वपच सबर खस जमन जड़ पावँर कोल किरात ।
रामु कहत पावन परम होत भुवन बिख्यात ॥ १९४ ॥

नमस्कार घातला. हा रामाचा आवडता आहे, याची कल्पना गुरुजींना असल्यामुळे त्यांनी त्याला आशीर्वाद दिला; आणि त्याने रामप्रभूला कसे सहाय्य केले, त्यामुळे 'रामसखा' कसा बनला आहे, वगैरे वृत्त चटकन् वसिष्ठांनी समजावून सांगितले.

'रामसखा' हे शब्द कानावर येताच भरतानी रथाच्या खाली उडी टाकली व प्रेमभराने गुहास भेटण्यासाठी त्याच्याकडे ते चालत गेले. त्याने भरत जवळ येताच आपले गाव, निषादाची जात व गुह हे स्वतःचे नाव सांगून जमिनीला अगदी मस्तक टेकून जोहार केला. परंतु तो दण्डवत् घालत आहे असे दिसताच भरतांनी त्याच्याकडे धावत जाऊन त्याला उठवला व हृदयाशी कवटाळला. त्यावेळी भरताला लक्ष्मण-भेटीचाच जणू आनंद होऊन, उसळून येणाऱ्या प्रेमभावना हृदयात मावेनात ! १९३

भरतानी त्याला इतक्या प्रेमाने मिठी मारली की, पाहणारे सर्व लोक त्या प्रेमाची ती आगळी रीत पाहून मोठ्या ईर्षेने त्यांची प्रशंसा करू लागले.

आकाशातूनही मंगलसूचक 'धन्य, धन्य' असा धन्यवाद ऐकू येऊ लागला. देवांनी निषाद राजाची स्तुति करून त्याच्यावर पुष्पवृष्टी केली. ते म्हणाले, "जो लोकात व वेदांत सर्व प्रकारे नीच म्हणून ठरलेला, ज्याच्या नुसत्या छायेचा स्पर्श झाला तर स्नान करावे, असे सांगितले आहे, त्याला रामचंद्राचे धाकटे बंधू प्रेमभराने कवटाळून भेटत आहेत व त्यावेळी त्यांचे सर्व शरीर रोमांचांनी फुलून गेले आहे.

"याचा अर्थ असा की, 'राम राम' असे म्हणून जे नुसती जांभई देतात, त्यांच्या समोरसुद्धा पापांचा समुदाय येऊ शकत नाही. मग याला तर प्रत्यक्ष रामचंद्रांनी आपल्या हृदयाशी कवळून त्याच्या सर्व कुळासह त्याला जगपावन केला आहे. कर्मनाशी नदीचे पाणी जर गंगेत एकदा पडले तर मग त्याला आपल्या मस्तकावर कोण नाही धारण करीत ? नुसत्या 'राम' या नामाच्या उलट्या जपाने वाल्मीकी ब्रह्मसमान झाले, हे सर्व जगात प्रसिद्ध आहे.

"चांडाळ, भिल्ल, खस, यवन, कोळी, किरात इत्यादि जड, मूढ, नीच लोकसुद्धा रामनामाच्या उच्चाराने परम पावन होऊन जगद्विख्यात बनतात. १९४

चौ० —नहिं अचिरिजु जुग जुग चलि आई । केहि न दीन्हि रघुबीर बड़ाई ॥
राम नाम महिमा सुर कहहीं । सुनि सुनि अवध लोग सुखु लहहीं ॥
रामसखहि मिलि भरत सप्रेमा । पूँछी कुसल सुमंगल खेमा ॥
देखि भरत कर सीलु सनेहू । भा निषाद तेहि समय बिदेहू ॥
सकुच सनेहु मोदु मन बाढ़ा । भरतहि चितवत एकटक ठाढ़ा ॥
धरि धीरजु पद बंदि बहोरी । बिनय सप्रेम करत कर जोरी ॥
कुसल मूल पद पंकज पेखी । मैं तिहुँ काल कुसल निज लेखी ॥
अब प्रभु परम अनुग्रह तोरें । सहित कोटि कुल मंगल मोरें ॥

दो० —समुझि मोरि करतूति कुलु प्रभु महिमा जियँ जोइ ।
जो न भजइ रघुबीर पद जग बिधि बंचित सोइ ॥ १९५ ॥

चौ० —कपटी कायर कुमति कुजाती । लोक बेद बाहेर सब भाँती ॥
राम कीन्ह आपन जबही तें । भयउँ भुवन भूषन तबही तें ॥
देखि प्रीति सुनि बिनय सुहाई । मिलेउ बहोरि भरत लघु भाई ॥
कहि निषाद निज नाम सुबानीं । सादर सकल जोहारीं रानीं ॥
जानि लखन सम देहिं असीसा । जिअहु सुखी सय लाख बरीसा ॥

" परंतु यात आश्चर्यकारक असे काहीच नाही, कारण हे युगायुगांमध्ये चालत आले आहे. रघुवीरांनी कोणाला मोठेपणा दिला नाही. "

याप्रमाणे देवांनी रामनामाचा महिमा वर्णन केला व तो सर्व अयोध्यावासी लोकांनी जेव्हा ऐकला, तेव्हा त्यांना सुखसमाधान झाले.

भरत रामसख्याला पुनः अतिशय प्रेमाने भेटले व त्याला क्षेम, कुशल, सुमंगल, समाचार विचारला.

भरताचे सुशील व त्याचे रामावरील अतुल्य प्रेम पाहून, निषाद राजा देहभान विसरून गेला ! पूर्वी केलेल्या भरतासंबंधीच्या भलत्या कल्पना व त्याची जाहीर प्रतिक्रिया यामुळे त्याचे आता लज्जेने मुख नमले. रामावरील भरताचे प्रेम व भगवंताचे आपल्या अजाण बालकावरील प्रेम यांची जाणीव होऊन त्याचे अंतःकरण आनंदाने भरून वाहू लागले, व तो त्या स्थितीत भरताकडे टक लावून पाहातच राहिला !

शेवटी धीर धरून त्याने भरताच्या चरणांना वंदन केले व हात जोडून प्रेमाने त्याने विनंती केली, " सर्व कुशलांचे मूळ जे श्रीरामपदकमल त्याचे या दासाला दर्शन झाल्यापासून माझी खात्री झाली की, आता त्रिकाळही माझे कुशलच असणार ! आणि हे प्रभो ! आता तर तुझ्या परम अनुग्रहाने कोटी कुळांसहित माझे मंगल झाले. "

" माझे कुल व माझी करणी एका बाजूस व दुसऱ्या बाजूस प्रभूंनी केलेली माझ्यावरील कृपा व त्यांचा मोठेपणा हे सर्व घेतल्यानंतरही जो रघुवीर चरणांची भक्ती करणार नाही, त्याला विधीने निश्चित फसवले म्हणून समजावे. " १९५.

" मी मूळचाच कपटी, भ्याड, दुष्टबुद्धीचा, हीन जातीत जन्म पावलेला ! याप्रमाणे लौकिक व वैदिक व्यवहारांत सर्व प्रकारे बहिष्कृत असा आहे. परंतु आश्चर्य हे की, रामचंद्रांनी मला आपला म्हटला, त्यावेळेपासून असा मी अधम असूनही भुवनभूषण बनलो ! मग हा केवढा रामाचा महिमा ! "

त्या निषादराजाचे ते शुद्धप्रेम पाहिले, त्याचप्रमाणे त्याने योग्य अशी विनंती केल्यावरून भरताचे बंधु शत्रुघ्न त्या गुहाला प्रेमाने भेटले !

आपले नाव गोड शब्दात सांगून गुहाने सर्व राण्यांना आदरपूर्वक जोहार केला. राण्यांनीही त्याला लक्ष्मणाप्रमाणे समजून आशीर्वाद दिला की, ' शंभरलक्षवर्षे सुखाने जग बरे बाबा ! '

निरखि निषादु नगर नर नारी । भए सुखी जनु लखनु निहारी ॥
कहहिं लहेउ एहिं जीवन लाहू । भेंटेउ रामभद्र भरि बाहू ॥
सुनि निषादु निज भाग बड़ाई । प्रमुदित मन लइ चलेउ लेवाई ॥

दो०—सनकारे सेवक सकल चले स्वामि रुख पाइ ।
घर तरु तर सर बाग बन बास बनाएन्हि जाइ ॥ १९६ ॥

चौ०—सृंगबेरपुर भरत दीख जब । भे सनेहँ सब अंग सिथिल तब ॥
सोहत दिएँ निषादहि लागू । जनु तनु धरें बिनय अनुरागू ॥
एहि बिधि भरत सेनु सबु संगा । दीखि जाइ जग पावनि गंगा ॥
रामघाट कहँ कीन्ह प्रनामू । भा मनु मगनु मिले जनु रामू ॥
करहिं प्रनाम नगर नर नारी । मुदित ब्रह्ममय बारि निहारी ॥
करि मज्जनु मागहिं कर जोरी । रामचंद्र पद प्रीति न थोरी ॥
भरत कहेउ सुरसरि तव रेनू । सकल सुखद सेवक सुरधेनू ॥
जोरि पानि बर मागउँ एहू । सीय राम पद सहज सनेहू ॥

दो०—एहि बिधि मज्जनु भरतु करि गुर अनुसासन पाइ ।
मातु नहानीं जानि सब डेरा चले लवाइ ॥ १९७ ॥

अयोध्यावासी स्त्रिया-पुरुष त्याच्याकडे निरखून पाहू लागले; त्याची ती शुद्ध रामभक्ती पाहून त्याना लक्ष्मणास पाहिल्यासारखे समाधान वाटले. ते आपसात बोलत, "काय हो भाग्य याचे ! यालाच खरोखर जन्माचे फळ लाभले. कारण प्रत्यक्ष रामचंद्रानी याला आपल्या बाहूत कवटाळून भेट दिली !"

सर्वांच्या तोंडून अशा प्रकारे स्वतःच्या भाग्याची प्रशंसा ऐकून मोठ्या संतोषाने सर्व सैन्यासह भरताला तो आपल्या पुराकडे घेऊन गेला.

लगेच निषाद राजाने आपल्या सेवकांना खुणेने सूचना दिली. त्याबरोबर त्या सर्वांनी आपल्या स्वामीचा हेतू लक्षात घेऊन घरात, झाडाच्याखाली, तलावाच्या काठावर, बागेत व वनात या सर्व मंडळीसाठी उतरण्यास योग्य जागा तयार केल्या ! १९६

शृंगवेरपुर दृष्टीसमोर येताच भरताची सर्व गात्रे रामस्नेहाने शिथिल झाली. त्यामुळे भरतानी गुहाच्या खांद्यावर हात ठेवून चालताना त्याचा आधार घेतला. असे ते चालू लागले असता जणू प्रेम व विनयाचीच देहधारी जोडी चालत आहे असे ते शोभू लागले !

याप्रमाणे सर्व सेनेसह भरत पुढे गेले. त्यांना लवकरच सर्व जगाला पावन करणाऱ्या भागीरथीचे दर्शन घडले.

रामघाट पुढे दिसताच त्याला जेव्हा भरतांनी प्रणाम केला तेव्हा ते इतके प्रेममग्न झाले की जणू प्रत्यक्ष रामाचीच भेट झाली आहे ! नागरिक नर-नारींनी जेव्हा वंदन केले, तेव्हा ते शुभ्र पाणी पाहून त्यांना ब्रह्मच त्या पाण्याच्या स्वरूपात जणू वाहात आहे असे सुख-समाधान झाले ! सर्वांनी स्नाने केल्यावर हात जोडून प्रार्थना केली की आम्हाला रामचंद्राच्या चरणी उत्कट प्रेम दे !

भरत म्हणाले, 'हे सुरसरिते ! तुझ्या जलाचा एकेककणसुद्धा सर्वांना सुखदायक असतो व सेवकांची तर तू कामधेनूच आहेस ! म्हणून हात जोडून एवढाच वर मागतो की, [illegible] मला स्वाभाविक प्रेम दे."

याप्रमाणे भरताचे स्नान होताच त्यानी गुरु वसिष्ठांची आज्ञा घेतली. सर्व मातांची स्नाने उरकलेली आहेत, अशी खात्री झाल्यावर तंबू वगैरे सर्व सामानासह निघाले. १९७

चौ ० –जहँ तहँ लोगन्ह डेरा कीन्हा । भरत सोधु सबही कर लीन्हा ।।
सुर सेवा करि आयसु पाई । राम मातु पहिं गे दोउ भाई ।।
चरन चाँपि कहि कहि मृदु बानी । जननीं सकल भरत सनमानी ।।
भाइहि सौंपि मातु सेवकाई । आपु निषादहि लीन्ह बोलाई ।।
चले सखा कर सों कर जोरें । सिथिल सरीरु सनेह न थोरें ।।
पूँछत सखहि सो ठाउँ देखाऊ । नेकु नयन मन जरनि जुड़ाऊ ।।
जहँ सिय रामु लखनु निसि सोए । कहत भरे जल लोचन कोए ।।
भरत बचन सुनि भयउ बिषादू । तुरत तहाँ लइ गयउ निषादू ।।

दो ० –जहँ सिंसुपा पुनीत तर रघुबर किय बिश्रामु ।
अति सनेहँ सादर भरत कीन्हेउ दंड प्रनामु ।। १९८ ।।

चौ ० –कुस साँथरी निहारि सुहाई । कीन्ह प्रनामु प्रदच्छिन जाई ।।
चरन रेख रज आँखिन्ह लाई । बनइ न कहत प्रीति अधिकाई ।।
कनक बिंदु दुइ चारिक देखे । राखे सीस सीय सम लेखे
सजल बिलोचन हृदयँ गलानी । कहत सखा सन बचन सुबानी ।।
श्रीहत सीय बिरहँ दुतिहीना । जथा अवध नर नारि बिलीना ।।
पिता जनक देउँ पटतर केही । करतल भोगु जोगु जग जेही ।।

ज्याला त्याला योग्य अशी जी जागा वाटली तेथे, लोकांनी तंबू ठोकले. भरतानी सर्वांची चाकशी केली. गुरुजींची सेवा करून त्यांची आज्ञा घेतली व दोघे बंधू रामभातेकडे आले. तिचे पाय चेपले. तिच्याबरोबर चार शब्द मधुरवाणीने बोलून भरताने सर्व मातांचा सन्मान केला.

त्यानंतर सर्व मातांची सेवा करण्याचे काम शत्रुघ्नाकडे सोपवून भरतानी निषादास बोलावून घेतले. मित्राच्या हातात हात घालून भरत निघाले. प्रेमभराने भरताचे सर्व शरीर पुनः शिथिल झाले.

" मित्रा ! सीता, राम व लक्ष्मण ज्या ठिकाणी निजले ते स्थळ मला जरासे दाखवतोस काय? मनाची व डोळ्याची जळजळ त्या जागेच्या दर्शनाने थोडीशी निवेल. " हे बोलत असता भरताच्या डोळ्यांचे कोपरे पाण्याने भरले.

भरताचे भाषण ऐकून निषादाला विषाद वाटला व चटकन् त्याने त्या इष्ट जागेकडे त्याला नेले. रघुवरांनी ज्या जागी विश्रांती घेतली होती ती जागा एका पवित्र शिसवीच्या झाडाखाली होती. त्या जागेचे दर्शन घडताच भरतानी प्रेम व आदरयुक्त अंतःकरणाने दंडवत् प्रणाम केला. १९८

जवळ जाऊन ती गवत व कोवळ्या पानांची बनवलेली शय्या पाहिली. तिला भरतानी प्रदक्षिणा घालून वंदन केले. त्या जागी जेथे रामचंद्राच्या पायांचा ठसा जमिनीवर उमटला होता. त्यातील एक रज-कण घेऊन तो भरताने आपल्या नेत्रांना लावला. त्यावेळी स्नेहभावाला हृदयात आलेली जी भरती भरताने अनुभवली तिचे वर्णन अशक्य ! त्याचप्रमाणे सीतेच्या वस्त्रातून सोन्याच्या जरीच्या दोन चार टिकल्या पडलेल्या दिसताच त्यांना सीतेच्या प्रमाणे समजून आदराने त्या मस्तकी धारण केल्या !

डोळे अश्रूंनी भरले व हृदय व्याकुळ झाले. अशा स्थितीत कोमल वाणीने निषादसख्याला भरत म्हणाले, " मित्रा ! हे कांचनकण किती निस्तेज झाले आहेत, ते पाहिलेस का? अगदी अशीच दीन-मलिन स्थिती अयोध्यावासी नरनारींची झाली आहे ! जिचे वडील जनकराजे इतके मोठे आहेत की, त्यांना पृथ्वीवर जोडच नाही; जगातील सर्व भोग व योग अगदी त्यांच्या मुठीत आहेत ! त्याचप्रमाणे इकडे ज्याचा हेवा अमरावतिपती

ससुर भानुकुल भानु भुआलू । जेहि सिहात अमरावतिपालू ।।
प्राननाथु रघुनाथ गोसाईं । जो बड़ होत सो राम बड़ाईं ।।

दो०—पति देवता सुतीय मनि सीय साँथरी देखि ।
बिहरत हृदय न हहरि हर पबि ते कठिन बिसेषि ।। १९९ ।।

चौ०—लालन जोगु लखन लघु लोने । भे न भाइ अस अहहिं न होने ।।
पुरजन प्रिय पितु मातु दुलारे । सिय रघुबीरहि प्रानपिआरे ।।
मृदु मूरति सुकुमार सुभाऊ । तात बाउ तन लाग न काऊ ।।
ते बन सहहिं बिपति सब भाँती । निदरे कोटि कुलिस एहिं छाती ।।
राम जनमि जगु कीन्ह उजागर । रूप सील सुख सब गुन सागर ।।
पुरजन परिजन गुर पितु माता । राम सुभाउ सबहि सुखदाता ।।
बैरिउ राम बड़ाई करहीं । बोलनि मिलनि बिनय मन हरहीं ।।
सारद कोटि कोटि सत सेषा । करि न सकहि प्रभु गुन गन लेखा ।।

दो०—सुखस्वरूप रघुबंसमनि मंगल मोद निधान ।
ते सोवत कुस डासि महि बिधि गति बलवान ।। २०० ।।

चौ०—राम सुना दुखु कान न काऊ । जीवनतरु जिमि जोगवइ राऊ ।।
पलक नयन फनि मनि जेहि भाँती । जोगवहिं जननि सकल दिन राती ।।

इंद्र करतात, असे सूर्यवंशातील सूर्याप्रमाणे प्रतापी सासरे; जिचे प्राणनाथ प्रत्यक्ष रघुनाथ, ते एवढे मोठे आहेत, की, सर्व मोठ्यांचा मोठेपणा त्यांच्याच महतीने !—अशा पतिव्रता स्त्री-शिरोमणी सीतेची ही तृणशय्या पाहून, हर ! हर ! हे माझे हृदय कंप सुटून फुटले नाही; अजूनही फुटत नाही, त्या अर्थी ते वज्रापेक्षाही फार कठीण असलेच पाहिजे !"

"लाड करण्यासारखा, सुलक्षणी व सुंदर असा लक्ष्मणासारखा माझा भाऊ तिन्ही काळी (भूत-भविष्य-वर्तमान) मिळावयाचा नाही. सर्व नागरिकांचा प्रिय, आईबापांचा लाडका, सीता व रघुवीर यांचे प्राणाहून अधिक प्रेम त्याच्यावर ! नाजुक बांध्याचा, स्वभावसुद्धा मायाळू ! त्याच्या शरीराला गरम हवा कशी ती माहीत नाही. अशा माझ्या लक्ष्मणाला आज सर्व प्रकारची दुःखे वनात सोसावी लागत:आहेत ! आणि हे रामजन्मावरही माझे हृदय कठोरपणात कोट्यवधी कुलिशांना लाजवीत आहे !

"रामचंद्रांनी जन्माला येऊन सर्व जग सर्वत्र प्रकाशमय केले. ते रूप शील सुख व सर्व सद्गुण यांचे सागर आहेत. नागरिक; आप्तेष्ट वर्ग, गुरू, वडील व माता, या सर्वांना रामांनी आपल्या स्वभावाने सुखी केले. इतकेच काय, रघुकुलाचे वैरीसुद्धा रामाची स्तुती करतात. याचे कारण त्यांचे भाषण, त्यांची भेट, त्यांच्या वर्तनातील विनय यांच्यामुळे त्यांचीही तहान-भूक हरते !

"कोट्यवधी सरस्वती व अगणित शेष यांनासुद्धा प्रभूच्या सद्गुण समुदायांचे लेश मात्र वर्णन करता येणार नाही, तेथे, मी ते किती व कसे करणार ?

"तात्पर्य, सुखस्वरूप असणारे व कल्याण आणि आनंदाचे प्रत्यक्ष निवासस्थान असे रघुवंशमणी रामचंद्र, ते या जमिनीवरील तृणशय्येवर झोपले ! तेव्हा देवाची गती अत्यंत जबरदस्त, असेच म्हणणे भाग आहे !" २००

"रामांनी नुसते कानानेसुद्धा कधी दुःख म्हणजे काय ते ऐकले नव्हते ! कारण संजीवन-वृक्षाप्रमाणे राजांनी त्यांना जपले. डोळ्यांना पापण्यांनी सांभाळावे, किंवा भुजंगाने आपल्या मणीची काळजी घ्यावी, तशाच

ते अब फिरत बिपिन पद्चारी । कंद मूल फल फूल अहारी ।।
धिग कैकई अमंगल मूला । भइसि प्रान प्रियतम प्रतिकूला ।।
मैं धिग धिग अघ उदधि अभागी । सबु उतपातु भयउ जेहि लागी ।।
कुल कलंकु करि सृजेउ बिधाताँ । साइँ दोह मोहि कीन्ह कुमाताँ ।।
सुनि सप्रेम समुझाव निपादू । नाथ करिअ कत बादि बिषादू ।।
राम तुम्हहि प्रिय तुम्ह प्रिय रामहि । यह निरजोसु दोसु बिधि बामहि ।।

छं०—बिधि बाम की करनी कठिन जेहिं मातु कीन्ही बावरी ।
तेहि राति पुनि पुनि करहिं प्रभु सादर सरहना रावरी ।।
तुलसी न तुम्ह सो राम प्रीतमु कहतु हौं सौंहें किएँ ।
परिनाम मंगल जानि अपने आनिए धीरजु हिएँ ।।

सो०—अंतरजामी रामु सकुच सप्रेम कृपायतन ।
चलिअ करिअ बिश्रामु यह दृढ़ आनि मन ।। २०१ ।।

चौ०—सखा बचन सुनि उर धरि धीरा । बास चले सुमिरत रघुबीरा ।।
यह सुधि पाइ नगर नर नारी । चले बिलोकन आरत भारी ।।
परदखिना करि करहिं प्रनामा । देहिं कैकइहि खोरि निकामा ।।

प्रकारे मातांनी रामाचा रात्रंदिवस सांभाळ केला.— असे रामचंद्र आता बनातून अनवाणी, वणवण फिरत आहेत व कंदमूळ, फल-फूल यांपैकी वेळेला जे मिळेल त्यावर आपली भूक भागवत आहेत !

" खरोखर या सर्व अमंगल घटनांचे मूळ कारण असणाऱ्या कैकेयीचा धिक्कार असो ! कारण प्राणाहून प्रियतम असणाऱ्या अशा रामाशीही तिला विरोध करण्याची कुबुद्धी झाली ! परंतु तिच्यापेक्षाही ज्या दुर्दैवी पाप-सागराकरिता हे सर्व उत्पात घडून आले, त्या माझ्या धिक्कार-धिक्कार असो !

" जन्माला घालतानाच कुळाला कलंक लावणारा म्हणून विधात्याने मला उत्पन्न केले आणि दुष्टबुद्धीच्या मातेने माझ्या पदरी स्वामीचा द्रोह बांधला ! " हे बोलत असता भरत दुःखाने अगदी हैराण झाले.

तेव्हा निषादराजालाही वाईट वाटून तो प्रेमाने समजावू लागला. " नाथ ! व्यर्थ का विषाद मानता ? तुम्ही रामचंद्रास प्रिय असून, राम तुम्हाला प्रिय आहेत. सर्व घटनांचा सारांश एवढाच आहे की, सर्व दोष विपरीत लीला करणाऱ्या विधीचा आहे ! त्याची करणी इतकी कठीण आहे की, त्याने आपल्या जननीला बावळी करून टाकली !

" येथे ज्या दिवशी रात्री मुक्काम, होता, तेव्हा घटकोघटकी प्रभू अत्यंत आदराने आपली स्तुती करीत होते. मी शपथपूर्वक सांगतो की, आपल्यासारखा प्रिय रामचंद्रास कोणीही नाही ! नाथ ! शेवटी सर्व काही मंगलच होईल, हे जाणून आपण आता धीर धरावा.

" रामचंद्र आपले अंतरंग जाणणारे आहेत ना ! शिवाय प्रेम, संकोच व करुणा यांचे ते माहेरघरच आहेत याची तुम्हालाच माझ्यापेक्षा जास्त कल्पना. मग हा विचार मनात पक्का करून चला उठा पाहू; आणि थोडी विश्रांती घ्या ! "

सख्याचे ते भाषण ऐकले. थोडा धीर धरला; आणि रघुनाथाचे स्मरण करीत ते आपल्या मुक्कामाच्या ठिकाणावर परतले.

भरत नुकतेच परत आले, त्यांनी सीता-रामांच्या विश्रांतीचे ठिकाण पाहिले, इत्यादि वृत्त अयोध्यावासी-जनांच्या कानी पडताच, अत्यंत आतुरतेने ते स्थळ पाहावयास सर्व नारी-नर निघाले. त्या शिसवीच्या झाडाखाली जाऊन त्यांनी प्रथम सीता रामचंद्राच्या तृणशय्येला प्रदक्षिणा घातल्या व नंतर वंदन केले. ते दृश्य पाहताच प्रत्येकाने कैकेयीला मनमुराद दोष दिले. त्यांचे डोळे अश्रूंनी भरून येत व त्यावेळी ते प्रतिकूल

भरि भरि बारि बिलोचन लेहीं। बाम बिधातहि दूषन देहीं ॥
एक सराहहिं भरत सनेहू। कोउ कह नृपति निबाहेउ नेहू ॥
निंदहिं आपु सराहि निषादहि। को कहि सकइ बिमोह बिषादहि ॥
एहि बिधि राति लोगु सबु जागा। भा भिनुसार गुदारा लागा ॥
गुरहि सुनावँ चढ़ाइ सुहाई। नईं नाव सब मातु चढ़ाईं ॥
दंड चारि महँ भा सबु पारा। उतरि भरत तब सबहि सँभारा ॥

दो०–प्रातक्रिया करि मातु पद बंदि गुरहि सिरु नाइ।
आगें किए निषाद गन दीन्हेउ कटकु चलाइ ॥ २०२ ॥

चौ०–कियउ निषादनाथु अगुआईं। मातु पालकीं सकल चलाईं ॥
साथ बोलाइ भाइ लघु दीन्हा। बिप्रन्ह सहित गवनु गुर कीन्हा ॥
आपु सुरसरिहि कीन्ह प्रनामू। सुमिरे लखन सहित सिय रामू ॥
गवने भरत पयादेहिं पाए। कोतल संग जाहिं डोरिआए ॥
कहहिं सुसेवक बारहिं बारा। होइअ नाथ अस्व असवारा ॥
रामु पयादेहि पायँ सिधाए। हम कहँ रथ गज बाजि बनाए ॥
सिर भर जाउँ उचित अस मोरा। सब तें सेवक धरमु कठोरा ॥
देखि भरत गति सुनि मृदु बानी। सब सेवक गन गरहिं गलानी ॥

दैवाला दूषण देत. कोणी भरताच्या स्नेहाची स्तुती करीत, तर कोणी म्हणत, दशरथ राजानीच आपल्या प्रेमाचा खरेपणा शेवटपर्यंत राखला.

शेवटी त्यांनी स्वतःचीच निंदा सुरू केली व निषादाच्या भाग्याची प्रशंसा केली. त्यावेळी सर्वांची हृदये शोकाने व मोहाने किती कासावीस झाली, याचे कोण वर्णन करील!

अशा प्रकारे सर्व रात्रभर लोक आपसात बोलत जागेच राहिले. सूर्योदय होताच नावा चालू लागल्या एका सुंदर नौकेत वसिष्ठगुरूंना चढवले. त्याचप्रमाणे अगदी नव्या नावात सर्व मातांना बसवल्या. अवघ्या चार घटकात सर्व मंडळी पैलतीराला गेली. खाली उतरताच सर्वजण सुखरूप आले काय, यासंबंधी भरतांनी चौकशी केली.

त्यानंतर भरतांनी सर्व प्रातःकालीन नित्यकर्म उरकले. मातांच्या चरणी मस्तक ठेवून गुरूना वंदन केले. निषादांच्या टोळ्याना आघाडीवर ठेवून सर्व सैन्य पुढे रवाना केले. २०२

निषादनाथाकडे वाटाड्याचे काम दिले;आणि मातांचे सर्व मेणे पाठविले. धाकट्या भावाला–शत्रुघ्नाला–बरोबर दिल्यावर विप्रमंडळीसह गुरुश्रेष्ठांनी गमन केले.

स्वतः प्रथम देवनदीला वंदन केले. त्यानंतर लक्ष्मण, सीता व राम यांना हृदयात स्थिर केले आणि भरत पायीच चालत निघाले. त्यामुळे कोतवाल जणू शोभेचे घोडे बागदोर लावून बरोबर घेऊन चालले! ते स्वामिभक्त सेवक असल्यामुळे त्यांनी वारंवार सांगावे, ‘ नाथ! घोड्यावर स्वार व्हावे की!’ परंतु त्यावर भरतांनी लोच म्हणावे,

“ राम तर अनवाणीच पायी पायी गेले! आणि आमच्याच करता घोडे, रथ, हत्ती ही वाहने ठेवली! खरे पाहिले तर मी मस्तकाने चालत जाणेच योग्य! सर्व धर्मांत सेवकाचा धर्म अत्यंत कठोर असतो” (रामचरणधूलीला मस्तकाने वंदन करत=डोक्याने चालत)

अशी ही भरताची कोमलवाणी ऐकून आणि त्यांची ती दीनवाणी मनःस्थिती ओळखून सगळेच सेवक अतिशय खेद करू लागले.

दो० —भरत तीसरे पहर कहँ कीन्ह प्रबेसु प्रयाग।
कहत राम सिय राम सिय उमगि उमगि अनुराग॥ २०३॥

चौ० —झलका झलकत पायन्ह कैसें। पंकज कोस ओस कन जैसें॥
भरत पयादेहिं आए आजू। भयउ दुखित सुनि सकल समाजू॥
खबरि लीन्ह सब लोग नहाए। कीन्ह प्रनामु त्रिबेनिहिं आए॥
सबिधि सितासित नीर नहाने। दिए दान महिसुर सनमाने॥
देखत स्यामल धवल हलोरे। पुलकि सरीर भरत कर जोरे॥
सकल काम प्रद तरिथराऊ। बेद बिदित जग प्रगट प्रभाऊ॥
मागउँ भीख त्यागि निज धरमू। आरत काह न करइ कुकरमू॥
अस जियँ जानि सुजान सुदानी। सफल करहिं जग जाचक बानी॥

दो० —अरथ न धरम न काम रुचि गति न चहउँ निरबान।
जनम जनम रति राम पद यह बरदानु न आन॥ २०४॥

चौ० —जानहुँ रामु कुटिल करि मोही। लोग कहउ गुर साहिब द्रोही॥
सीता राम चरन रति मोरें। अनुदिन बढ़उ अनुग्रह तोरें॥
जलदु जनम भरि सुरति बिसारउ। जाचत जलु पबि पाहन डारउ॥
चातकु रटनि घटें घटि जाई। बढ़ें प्रेमु सब भाँति भलाई॥

याप्रमाणे अनवाणीच पायी चालत भरत मग तिसऱ्या प्रहरी प्रयाग क्षेत्रात शिरले. अशा स्थितीत मार्ग आक्रमण करत असता प्रत्येक पावलाबरोबर राम, राम, सीता, राम ! असे स्मरण केल्यामुळे त्यांचे अंतःकरण प्रेमभराने अगदी उचंबळून येत होते. २०३

प्रथमच असे अनवाणी पायी चालल्यामुळे कमळाच्या कोषात दवांचे बिंदू जसे चमकावेत तसे भरताच्या पायावर फोड झळकू लागले. ही बातमी सर्वांच्या कानी पडताच जो तो हळहळू लागला.

आल्याबरोबर भरतानी चौकशी केली तेव्हा कळले की, सर्वांची स्नाने उरकली आहेत तेव्हा भरत एकटेच त्रिवेणीसंगमावर आले आणि त्यानी नमस्कार घातला. विधिपूर्वक त्या गंगायमुनेच्या शुभ्रश्याम जलात स्नान करून विप्राना आदर पूर्वक दाने दिली.

त्या श्यामल-धवल अशा पाण्यांच्या लाटा निरीक्षण करत असता, भरताचे हात जोडले गेले व सर्व शरीर रोमांचित झाले. त्याच स्थितीत त्यांच्या मुखातून शब्द उमटू लागले, " हे सुतीर्थराज ! आपण सर्व कामना पूर्ण करणारे आहात, असा आपला प्रभाव जसा वेदामध्ये, तसाच लोकांमध्येही प्रसिद्ध आहे !

" म्हणून मी स्वधर्म सोडून भीक मागत आहे ! कारण उघडच आहे. आर्त झालेला मनुष्य प्रसंगी कोणतेही कुकर्म करण्यास मागे पुढे पाहात नाही, हे जाणून, जे सुजाण व खरे दाते असतात, ते या जगात याचक काय मागतो, याचा विचार न करता त्यांच्या मनकामना सफल करतात ! माझे मागणे एवढेच आहे—

" मला धर्म, अर्थ, काम यांपैकी कोणत्याही पुरुषार्थाची इच्छा नाही. इतकेच नव्हे, मला निर्वाणाची (मोक्षाची) सुद्धा गरज नाही. दुसरे कोणतेच वरदानही नको. फक्त जन्मोजन्मी रामाच्या चरणकमळी निःसीम प्रेम द्या. " २०४

" मला राम जरी दुष्ट बुद्धीचा समजले, सर्व जगाने स्वामी व गुरू यांचा द्रोह करणारा अशी माझी निंदा केली, तरीही सीतारामांच्या चरणाचे अनुपम प्रेम, तुझ्या कृपेने माझे नित्य नवे वाढो. कारण मेघाने जन्मभरही आठवण काढली नाही, पाण्याची याचना करत असता वज्र व पाषाण यांचा मारा केला, तरीही चातकाची आर्त मागणी जर बंद पडेल तर त्याला ते दूषणच आहे. (त्याची अकीर्ती होईल.) मेघांबद्दल त्याचे प्रेम अखंड वाढत राहाण्यातच त्याचा चांगुलपणा आहे !

कनकहिं बान चढ़इ जिमि दाहें । तिमि प्रियतम पद नेम निबाहें ॥
भरत बचन सुनि माझ त्रिबेनी । भइ मृदु बानि सुमंगल देनी ॥
तात भरत तुम्ह सब बिधि साधू । राम चरन अनुराग अगाधू ॥
बादि गलानि करहु मन माहीं । तुम्ह सम रामहि कोउ प्रिय नाहीं ॥

दो० — तनु पुलकेउ हियँ हरषु सुनि बेनि बचन अनुकूल ।
भरत धन्य कहि धन्य सुर हरषित बरषहिं फूल ॥ २०५ ॥

चौ० — प्रमुदित तीरथराज निवासी । बैखानस बटु गृही उदासी ॥
कहहिं परसपर मिलि दस पाँचा । भरत सनेहु सीलु सुचि साँचा ॥
सुनत राम गुन ग्राम सुहाए । भरद्वाज मुनिबर पहिं आए ॥
दंड प्रनामु करत मुनि देखे । मूरतिमंत भाग्य निज लेखे ॥
धाइ उठाइ लाइ उर लीन्हे । दीन्हि असीस कृतारथ कीन्हे ॥
आसनु दीन्ह नाइ सिरु बैठे । चहत सकुच गृहँ जनु भजि पैठे ॥
मुनि पूँछब कछु यह बड़ सोचू । बोले रिषि लखि सीलु सँकोचू ॥
सुनहु भरत हम सब सुधि पाई । बिधि करतब पर किछु न बसाई ॥

" सोन्याचे तेज ज्याप्रमाणे तापविल्याने वाढते, तसेच आपल्या प्रियतमाच्या चरणप्रेमाचा नेम, कोणत्याही विपत्तीत, रक्षण करण्यानेच सेवकाची पात्रता वाढते ! "

ही भरताची प्रार्थना ऐकून, त्रिवेणीच्या मध्यभागी सुमंगलदायक अशी कोमलवाणी झाली. " हे तात, भरत ! तुम्ही सर्वप्रकारे निष्पाप व निष्कलंक आहात! तुमचे रामचरणकमलांची जे प्रेम आहे, त्याचा अंत कोणासच लागणार नाही. म्हणून तुम्ही मनात जे दुःख मानता ते व्यर्थ आहे. रामाला तुमच्यासारखे प्रिय कोणीच नाही. "

त्रिवेणीचे हे अनुकूल वचन ऐकताच भरताच्या हृदयात हर्ष भरला व अंगावर पुलक फुलले ! त्याचवेळी—

" धन्य धन्य भरत ! " असा जयघोष करत देवांनी आनंदनिर्भर होऊन भरतावर पुष्पवृष्टी केली. २०५

तीर्थराज प्रयाग क्षेत्री राहाणारे ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यासी असे चारी आश्रमांतील सर्व लोक दहा-पंधरा लोकांच्या टोळ्या करून आपसात म्हणत की, ' भरताचे शील आणि प्रेम खरोखरच अगदी निर्मळ आहे नाही ? '

या स्वतःच्या स्तुतीकडे लक्ष न देता रामाच्या शोभन गुणांचे जे वर्णन होई त्यातच मग्न होऊन भरत भारद्वाजांच्या आश्रमाजवळ आले. मुनींचे दुरून दर्शन होताच भरतांनी दण्डवत् प्रणाम केला. परंतु अशी ती विनयशील व प्रेममयी भरताची मूर्ती पाहाताच भारद्वाजाना वाटले या स्वरूपात आपले देहधारी भाग्यच आपल्या घरी चालून आले आहे !

मुनी धावतच भरताकडे गेले आणि आपल्या हातानी उठवून भरताला त्यांनी हृदयाशी कवटाळले. आणि योग्य ते आशीर्वाद देऊन कृतार्थ केले. आश्रमात नेऊन आसन दिले; परंतु त्या आसनावर बसताना एवढा मनाला संकोच वाटत होता की, आसनावर बसण्याऐवजी ते संकोच-भवनात घुसू पाहात आहेत असे वाटले. याचे कारण असे की, मुनींनी कोणताही प्रश्न विचारला तर कोणत्या तोंडाने त्याला आपण उत्तर द्यावे या चिंतेने त्यांचा जीव अगदी मुठीत आला होता !

भरताचे हे उत्तम शील व त्याचा भिडस्तपणा ध्यानी येताच भारद्वाजऋषींनी कोणताच प्रश्न न विचारता उलट भरताच्याच हृदयाची तळमळ शांत करणारे भाषण सुरू केले, " भरत ! आम्हाला सर्व खरी माहिती मिळाली आहे. त्यावरून ज्या विधिकरणीपुढे कोणाचाच उपाय चालत नाही, तिचा हा सर्व अनर्थ आहे हे

दो ० –तुम्ह गलानि जियँ जनि करहु समुझि मातु करतूति ।
तात कैकइहि दोसु नहिं गई गिरा मति धूति ।। २०६ ।।

चौ ० –यहउ कहत भल कहिहि न कोऊ । लोकु बेदु बुध संमत दोऊ ।।
तात तुम्हार बिमल जसु गाई । पाइहि लोकउ बेदु बड़ाई ।।
लोक बेद संमत सबु कहई । जेहि पितु देइ राजु सो लहई ।।
राउ सत्यब्रत तुम्हहि बोलाई । देत राजु सुखु धरमु बड़ाई ।।
राम गवनु बन अनरथ मूला । जो सुनि सकल बिस्व भइ सूला ।।
सो भावी बस रानि अयानी । करि कुचालि अंतहुँ पछितानी ।।
तहँउँ तुम्हार अलप अपराधू । कहै सो अधम अनाय असाधू ।।
करतेहु राजु त तुम्हहि न दोषू । रामहि होत सुनत संतोषू ।।

दो ० –अब अति कीन्हेहु भरत भल तुम्हहि उचित मत एहु ।।
सकल सुमंगल मूल जग रघुबर चरन सनेहु ।। २०७ ।।

चौ ० –सो तुम्हार धनु जीवनु प्राना । भूरिभाग को तुम्हहि समाना ।। ।।
यह तुम्हार आचरजु न ताता । दसरथ सुअन राम प्रिय भ्राता ।।

उघड झाले. आपल्या आईच्या कृतीचा विचार करून मनात तुम्ही मुळीच खेद करू नका. बाळा ! यात कैकेयीचा बिलकुल दोष नाही. तिच्या बुद्धीस सरस्वती विपरीत वळण लावून गेल्याचा हा परिणाम आहे. २०६

सरस्वती बुध्दीत बदल करून गेली, हे म्हणणेही अज्ञानी अशा कोणाही मनुष्यास पटण्यासारखे नाहीच ! म्हणून लौकिक व्यवहारात कोणीही कैकेयीला दोषी ठरवणारच, त्याला काही उपाय नाही. तथापि ज्ञानी भक्त (वेद-बुध) मात्र असेच म्हणणार की, कैकेयी दोषी नाही आणि सरस्वती बुध्दिभेद करून गेली.

शिवाय तुमच्या धवल यशाचे गायन मात्र लोकात व वेदात असे दोन्हीकडे होईल ! कारण तुमच्या अशा अलौकिक वर्तनाने लोक आणि वेदसुद्धा महत्त्व पावतील. असे पाहा, पित्याने ज्याला राज्य दिले त्यानेच राज्य करावे, ही गोष्ट लौकिक व वैदिक व्यवहारालाही मान्यच आहे. दशरथराजे जिवंत राहिले असते तर ते सत्यप्रतिज्ञ असल्यामुळे त्यांनी तुम्हाला आजोळाहून आणवून राज्य, धर्म, सुख व मोठेपणा अर्पण केला असता !

रामाचे वनवासाला जाणे हे सर्व अनर्थाचे मूळ आहे, यात शंकाच नाही ! त्यामुळे सर्व जग अत्यंत दुःखित झाले आहे, हेही खरे. परंतु ती गोष्ट केवळ प्रारब्धाधीनच असल्याने तशी घडली. अडाणी राणीने भवितव्यतेला बळी पडून कारस्थान केले, पण तिलाही आता भरपूर पश्चाताप होत आहे.

अशी वस्तुस्थिती असल्यामुळे, या सर्व खेदजनक घटनांत तुमचा थोडासासुद्धा अपराध आहे, असे जो म्हणेल तो नीच, मूर्ख व दुष्ट असेच ठरेल ! याप्रमाणे तुमचे अंतःकरण निष्पाप असल्याने जर तुम्ही राज्याचा स्वीकार केला असता तरीही तुम्हाला कोणताच दोष लागला नसता. ते वृत्त ऐकून रामानासुद्धा संतोष वाटला असता.

तथापि, भरत ! तुम्ही केले ते फार चांगले केले ! अशा प्रकारे वर्तन करणे हे तुमच्या शीलास साजेसेच आहे. कारण या जगात सर्व सुमंगलाचे मूळ म्हणजे 'रघुवराच्या चरणकमली शुद्ध प्रेम असणे.' २०७

ते तर तुमचे धन, जीवन व प्राणच ! म्हणून जगात तुमच्यासारखा मोठा भाग्यवान दुसरा कोणी सापडेल काय ? असे असूनही आमच्यासारख्यांना यात नवल काहीच वाटत नाही ! दशरथमहाराजांचे पुत्र आणि रामचंद्राचे धाकटे भाऊ एवढ्या मोठ्या वारसदारीत हे असणारच.

सुनहु भरत रघुबर मन माहीं । पेम पात्रु तुम्ह सम कोउ नाहीं ।।
लखन राम सीतहि अति प्रीति । निसि सब तुम्हहि सराहत बीती ।।
जाना मरमु नहात प्रयागा । मगन होहिं तुम्हरें अनुरागा ।।
तुम्ह पर अस सनेहु रघुबर कें । सुख जीवन जग जस जड़ नर कें ।।
यह न अधिक रघुबीर बड़ाई । प्रनत कुटुंब पाल रघुराई ।।
तुम्ह तौ भरत मोर मत एहू । धरें देह जनु राम सनेहू ।।

दो ०—तुम्ह कहँ भरत कलंक यह हम सब कहँ उपदेसु ।
राम भगति रस सिद्धि हित भा यह समउ गनेसु ।। २०८ ।।

चौ ०—नव बिधु बिमल तात जसु तोरा । रघुबर किंकर कुमुद चकोरा ।।
उदित सदा अँथइहि कबहूँ ना । घटिहि न जग नभ दिन दिन दूना ।।
कोक तिलोक प्रीति अति करिही । प्रभु प्रताप रबि छबिहि न हरिही ।।
निसि दिन सुखद सदा सब काहू । ग्रसिहि न कैकइ करतबु राहू ।।
पूरन राम सुपेम पियूषा । गुर अवमान दोष नहिं दूषा ।।
राम भगत अब अमिअँ अघाहूँ । कीन्हेहु सुलभ सुधा बसुधाहूँ ।।
भूप भगीरथ सुरसरि आनी । सुमिरत सकल सुमंगल खानी ।।
दसरथ गुन गन बरनि न जाहीं । अधिकु कहा जेहि सम जग नाहीं ।।

भरत ! आमचा स्वतःचा अनुभव सांगतो पाहा. रघुवरांच्या अंतःकरणात तुमच्याइतके जिव्हाळ्याचे दुसरे कोणीच नाही. आमच्या आश्रमात मुक्काम होता त्या रात्री सीता, राम व लक्ष्मण यांच्या मुखातून अत्यंत प्रेमभराने तुमचेच वर्णन चालू असता उजाडले. त्रिवेणीच्या स्नानावेळीही हेच मर्म कळले. तुमच्या प्रेमामध्ये ते त्यावेळी पूर्ण मग्न झाले. खरोखर सुखी जीवनावर जेवढे मूर्खाचे प्रेम असते तितके उत्कट प्रेम रामाचे तुमच्यावर आहे ! इतके केले तरीही रघुवीराचा हा काही फारसा मोठेपणा नाहीच. कारण त्यांना जे शरण जातात, त्यांच्या कुटुंबांचे पालन करणे, हे त्यांचे ब्रीदच आहे ! हे भरत ! माझी तर अशी खात्री झाली आहे की, तुम्ही म्हणजे जणू रामाचा देहधारी स्नेहच !

तुमच्या ठिकाणी स्वयंसिद्ध असलेला भक्तिरस, तुम्हाला वाटते की, हा कलंक आहे. (असे शुद्ध प्रेमाने रामचरणी रत झालेले हृदय) पण आम्हा सर्वांना तोच उपदेश आहे, रामभक्तिरूपी रससिद्धीसाठी हा श्रीगणेशा -शुभमुहूर्त आहे." २०८

हे तात ! (भरत !) तुझे विमल यश हा एक अद्भुत विमल चंद्र आहे. कारण याला उदयास्त नसून, तो अखंड प्रकाशमान राहाणार. त्याचा लाभ घेण्यासाठी रघुवराचे सेवक हेच चकोर व कैरव अगदी सतत टपलेले राहाणार ! या चंद्राला क्षय तर नाहीच पण जगरूपी आकाशात दिवसेंदिवस याची वृद्धीच होत राहाणार ! आश्चर्य हे की, सर्व जग व स्वर्गादि लोकरूपी चक्रवाकसुद्धा या चंद्रावर अत्यंत प्रेमच करतील ! शिवाय प्रभू श्रीरामचंद्राच्या [illegible] याच्या तेजाला मालिन्य येणार नाही ! हा कीर्तिचंद्र रात्रंदिवस सर्वांनाच सदोदित सुखदायक होईल. कैकेयीने केलेल्या दुष्कृतिरूपी राहूला हा ग्रासता येणार नाही !

रामाच्या अनन्य प्रेमरूपी अमृताने हा पूर्ण झाला आहे. गुरूचा रागाने अपमान केल्यामुळे दूषित झालेला नाही. म्हणून रामभक्त हो ! आता रामप्रेमरूपी अमृत पोटभर प्या ! भरतानी या वसुधातलावर या सुधेची जणू पाणपोईच घातली आहे ! जिच्या केवळ स्मरणाने सर्व सुमंगलाची खाण हाती लागते ती गंगा भगीरथाने पृथ्वीवर आणली. त्यामुळे त्याची कीर्ती अमर झाली ! दशरथांच्या गुण समुदायांचे तर वर्णन करणेच अशक्य ! जगात त्यांच्यासारखाच कोणी नाही मग त्यांच्यापेक्षा श्रेष्ट कुठे असणार ? कारण त्यांच्या प्रेमाला व संकोचाला

दो० – जासु सनेह सकोच बस राम प्रगट भए आइ ।
जे हर हिय नयननि कबहुँ निरखे नहीं अघाइ ॥ २०९ ॥

चौ० – कीरति बिधु तुम्ह कीन्ह अनूपा । जहँ बस राम पेम मृगरूपा ॥
तात गलानि करहु जियँ जाएँ । डरहु दरिद्रहि पारसु पाएँ ॥
सुनहु भरत हम झूठ न कहहीं । उदासीन तापस बन रहहीं ॥
सब साधन कर सुफल सुहावा । लखन राम सिय दरसनु पावा ॥
तेहि फल कर फलु दरस तुम्हारा । सहित पयाग सुभाग हमारा ॥
भरत धन्य तुम्ह जसु जगु जयऊ । कहि अस पेम मगन मुनि भयऊ ॥
सुनि मुनि बचन सभासद हरषे । साधु सराहि सुमन सुर बरषे ॥
धन्य धन्य धुनि गगन पयागा । सुनि सुनि भरतु मगन अनुरागा ॥

दो० – पुलक गात हियँ रामु सिय सजल सरोरुह नैन ।
करि प्रनामु मुनि मंडलिहि बोले गदगद बैन ॥ २१० ॥

चौ० – मुनि समाजु अरु तीरथराजू । साँचिहुँ सपथ अघाइ अकाजू ॥
एहिं थल जौं किछु कहिअ बनाई । एहि सम अधिक न अघ अधमाई ॥
तुम्ह सर्बग्य कहउँ सतिभाऊ । उर अंतरजामी रघुराऊ ॥

वश होऊन पुत्ररूपाने भगवान राम म्हणून त्यांच्या घरी प्रकटले. परंतु आपल्या मनाचे डोळे करून त्याच भगवंताना सतत पाहात असलेले महादेव अद्याप कधी तृप्त झालेले दिसत नाहीत. २०९

म्हणून हे भरत ! तुम्ही असा अनुपमेय कीर्तिचंद्र उदित केला की, ज्यात तुमच्यावरील व भक्तावरील राम-प्रेमरूपी मृग राहिला आहे. हे तात ! अशा स्थितीत तुम्ही आपल्या मनात निष्कारण कष्टी होत आहात. हातात परीस असून दारिद्र्याला भिणाऱ्या मनुष्यासारखी तुमची स्थिती झाली आहे !

भरत ! आम्हाला खोटे बोलण्याचे काहीच कारण नाही. आम्ही उदासीन वृत्तीने वनात राहणारे तपस्वी आहोत. म्हणून जे बोलतो ते ध्यानी घ्या. सर्व साधनांचे उत्तम फळ म्हणजे लक्ष्मण, राम व सीता यांचे दर्शन; ते लाभले ! आणि त्या फळाचेही फळ म्हणजे तुमचे दर्शन; तेही अनायासे पदरी पडले, हे प्रयागतीर्थ राजासह आमचे मोठेच भाग्य होय !

भरत ! तुम्ही धन्य आहात ! आपल्या यशाने तुम्ही जग जिंकून टाकले !"

हे सारे बोलत असता भारद्वाजांचे हृदय भरत-प्रेमाने भरून आले व त्याचे मुखातून पुढे शब्दच उमटेना !

भारद्वाजांचे वरील भाषण श्रवण करून सर्व सभासदांना हर्ष झाला !

त्याचवेळी 'शाबास ! शाबास ! छान ! छान !' असे म्हणत आकाशातून देवांनी पुष्पवृष्टी केली.

आकाशात व प्रयाग क्षेत्रात सर्वत्र 'धन्य भरत ! धन्य भद्राराज मुनि !' अशा जयघोषांचे शब्द कानी पडत असता भरतही रामप्रेमात मग्न झाले !

अंतःकरणात सीताराम, देह पुलक-प्रफुल्ल झालेला, आणि नेत्रकमळांतून अश्रू वाहत आहेत; अशी स्थिती भरताची झाली असता सर्व मुनिसमुदायापुढे शिर नमवून सद्गदित वाणीने त्यांनी चार शब्द बोलण्यास सुरुवात केली. २१०

" मुनिश्रेष्ठांचा समाज व तीर्थराज पुढे असता खरोखर शपथ घेणेसुद्धा अत्यंत अकार्य करण्यासारखे आहे. तसेच येथे काही बनवून मी सांगेन तर त्याच्यासारखे किंवा त्यापेक्षा अधिक पाप व नीचपण नाही. म्हणून मी सद्भावनेनेच सांगतो. आपण सर्वज्ञ आहात व रघुवर अंतर्यामीचे जाणणारे आहेत.

मोहि न मातु करतब कर सोचू । नहिं दुखु जियँ जगु जानिहि पोचू ।।
नाहिन डरु बिगरिहि परलोकू । पितहु मरन कर मोहि न सोकू ।।
सुकृत सुजस भरि भुअन सुहाए । लछिमन राम सरिस सुत पाए ।।
राम बिरहँ तजि तनु छनभंगू । भूप सोच कर कवन प्रसंगू ।।
राम लखन सिय बिनु पग पनहीं । करि मुनि बेष फिरहिं बन बनहीं ।।

दो० – अजिन बसन फल असन महि सयन डासि कुस पात ।
बसि तरु तर नित सहत हिम आतप बरषा बात ।। २११ ।।

चौ० – एहि दुख दाहँ दहइ दिन छाती । भूख न बासर नींद न राती ।।
एहि कुरोग कर औषधु नाहीं । सोधेउँ सकल बिस्व मन माहीं ।।
मातु कुमत बढ़ई अघ- मूला । तेहिं हमार हित कीन्ह बँसूला ।।
कलि कुकाठ कर कीन्ह कुजंत्रू । गाड़ि अवधि पढ़ि कठिन कुमंत्रू ।।
मोहि लगि यहु कुठाटु तेहिं ठाटा । घालेसि सब जगु बारहबाटा ।।
मिटइ कुजोगु राम फिरि आएँ । बसइ अवध नहिं आन उपाएँ ।।
भरत बचन सुनि मुनि सुखु पाई । सबहिं कीन्हि बहु भाँति बड़ाई ।।
तात करहु जनि सोचु बिसेषी । सब दुखु मिटिहि राम पग देखी ।।

" मला मातेच्या कृतीबद्दल वाईट वाटत नाही. तसेच मला जग खोटा मानील या मुळेही मी दुःखी होत नाही. परलोकाचा नाश होईल, म्हणून मी घाबरून जात नाही. किंवा पित्याच्या मरणाचाही शोक आता मजजवळ उरला नाही; कारण त्यांचे सुपुण्य वा सुयश चौदा भुवनांत भरले असून, राम-लक्ष्मणासारखे त्यांना पुत्र लाभले ! रामाचा वियोग होताच त्यांनी आपल्या नश्वर शरीराचा ताबडतोब त्याग केला. अशा भूपतीसाठी शोक करण्याला जागाच कुठे राहिली !

" परंतु राम, सीता व लक्ष्मण हे मुनिवेष-वल्कले-परिधान करून वना-वनांतून अनवाणी फिरत आहेत, मृगाची कातडी नेसायची, फळे खायची, व नुसत्या जमिनीवर पाला-पाचोळा व गवत यांच्या शय्येवर झोपायचे. झाडांच्या खाली राहून सदोदित ऊन, वारा, पाऊस व थंडी सहन करायची, अशा दुःखांत त्यांची जीवनयात्रा सुरू आहे. २११

त्यामुळे माझ्या हृदयात आग भडकली असून ती मला अखंड जाळत आहे. त्यामुळे दिवसा भूक लागत नाही की रात्री झोप येत नाही ! या भयंकर रोगावर सारे विश्व शोधून पुष्कळ पाहिले. औषधच नाही ! !

" मातेची दुष्ट बुद्धी हाच अती पापी सुतार, माझ्या हितासाठी त्याने वाकस बनवले. कलह रूपी अत्यंत निंद्य असे शुष्क काष्ठ घेऊन त्याने एक कुयत्र बनवले. आणि दुष्ट मंत्र म्हणून चौदा वर्षांच्या मुदतीनें ते अयोध्येत खोल पुरून ठेवले !"

" माझ्यासाठी अशा प्रकारचा कुत्सित थाट सजवला आणि सर्व जगाला बारा वाटांना लावून नष्ट केले."

" म्हणून माझ्या मुल्य हृद्रोगाचा शेवट होण्याला रामचंद्र वनवासातून परत फिरणे हा एकच मार्ग आहे. दुसऱ्या कोणत्याही उपायाने अयोध्येचे पुनरुज्जीवन होणार नाही !"

भरताचे वरील भाषण ऐकून भारद्वाजांना संतोष वाटला व इतर सर्व मंडळींनी नानाप्रकारे त्या भाषणाची स्तुती केली.

शेवटी मुनी म्हणाले, " ताता ! आता विशेष शोक नका करू ! रामचंद्रांच्या चरणांचे एकदा दर्शन झाले की, सर्व दुःखे टळतील."

दो० – करि प्रबोधु मुनिबर कहेउ अतिथि पेमप्रिय होहु ।
कंद मूल फल फूल हम देहिं लेहु करि छोहु ।। २१२ ।।

चौ० – सुनि मुनि बचन भरत हियँ सोचू । भयउ कुअबसर कठिन सँकोचू ।।
जानि गरुइ गुर गिरा बहोरी । चरन बंदि बोले कर जोरी ।।
सिर धरि आयसु करिअ तुम्हारा । परम धरम यहु नाथ हमारा ।।
भरत बचन मुनिबर मन भाए । सुचि सेवक सिष निकट बोलाए ।।
चाहिअ कीन्हि भरत पहुनाई । कंद मूल फल आनहु जाई ।।
भलेहिं नाथ कहि तिन्ह सिर नाए । प्रमुदित निज निज काज सिधाए ।।
मुनिहि सोच पाहुन बड़ नेवता । तसि पूजा चाहिअ जस देवता ।।
सुनि रिधि सिधि अनिमादिक आईं । आयसु होइ सो करहिं गोसाईं ।।

दो० – राम बिरह ब्याकुल भरतु सानुज सहित समाज ।
पहुनाई करि हरहु श्रम कहा मुदित मुनिराज ।। २१३ ।।

चौ० – रिधि सिधि सिर धरि मुनिबर बानी । बड़भागिनि आपुहि अनुमानी ।।
कहहिं परसपर सिधि समुदाई । अतुलित अतिथि राम लघु भाई ।।
मुनि पद बंदि करिअ सोइ आजू । होइ सुखी सब राज समाजू ।।

यात्रमाणे सांत्वन केल्यानंतर पुनः मुनी म्हणाले, “ आपण आता आमच्या प्रेमाचे प्रिय अतिथी झाले पाहिजे; आणि आम्ही जे कंदमूल-फल इत्यादि देऊ ते कृपा करून गोड मानून घ्या. ” २१२

ही भारद्वाजांची विनंती ऐकून भरताच्या मनात चिंता उत्पन्न झाली. भलत्याच वेळी त्याना कठीण संकोच वाटू लागला. हो म्हणणे बरे नाही; नाही म्हणता तर येतच नाही. पुनः विचार करून पाहिला व गुरुजींच्या वचनाचे महत्त्व जाणून त्यांच्या चरणी वंदन केले. हात जोडून ते मुनीस म्हणाले, “ नाथ ! आपली आज्ञा शिरसावंद्य मानून तिचे पालन करणे, हाच आमचा परम धर्म आहे. ”

भरताचे म्हणणे मुनींच्या मनास आवडून त्यांनी इमानी सेवक व शिष्य बोलावून जवळ घेतले व त्यांना सांगितले की, आपणाला आता भरताचा आतिथ्य-सत्कार करावयाचा आहे; तेव्हा तुम्ही जाऊन कंद, मूळ व फले घेऊन या. ”

“ आज्ञा नाथ ! ” म्हणून त्यांनी मुनींच्या चरणी वंदन केले व ते आपल्या ठरल्या कामावर मोठ्या उत्साहाने गेले.

नंतर भारद्वाजमुनी एकांतात चिंताग्रस्त होऊन विचार करू लागले. “ आपण बडा अतिथी-पाहुणा तर बोलावला आहे. आता जसा देव, तशी त्याची पूजा करणे आवश्यक व योग्य आहे. ”

ही मुनींची मनःस्थिती जाणून ऋद्धी व अणिमादिक सिध्दी तावडतोब आल्या व मुनींना म्हणाल्या, “ आपण जशी आज्ञा द्याल, तशी चोख व्यवस्था लगेच करतो ! ”

त्यावर मुनी प्रसन्न होऊन म्हणाले, ‘ अनुज शत्रुघ्न व सर्व समाज यांच्यासह भरत राम विरहामुळे व्याकुळ झाले आहेत. तरी पाहुणचार करून त्यांच्या श्रमाचा परिहार करा. ’ २१३

ऋध्दिसिध्दींनी हे मुनीश्वरांचे भाषण शिरसावंद्य मानले व ही कामगिरी स्वतःच्या मोठ्या भाग्याने आपणास मिळाली, असे त्यांना वाटले.

“ रामाचे धाकटे बंधू अतुलनीय पाहुणे आहेत. तेव्हा मुनिचरणांना वंदून आपण सर्व समाज सुखी होईल, असे करू या. ”

अस कहि रचेउ रुचिर गृह नाना। जेहि बिलोकि बिलखाहिं बिमाना॥
भोग बिभूति भूरि भरि राखे। देखत जिन्हहि अमर अभिलाषे॥
दासीं दास साजु सब लीन्हें। जोगवत रहहिं मनहि मनु दीन्हें॥
सब समाजु सजि सिधि पल माहीं। जे सुख सुरपुर सपनेहुँ नाहीं॥
प्रथमहिं बास दिए सब केही। सुंदर सुखद जथा रुचि जेही॥

दो०—बहुरि सपरिजन भरत कहुँ रिषि अस आयसु दीन्ह॥
बिधि बिसमय दायकु बिभव मुनिबर तपबल कीन्ह॥ २१४॥

चौ०—मुनि प्रभाउ जब भरत बिलोका। सब लघु लगे लोकपति लोका॥
सुख समाजु नहिं जाइ बखानी। देखत बिरति बिसारहिं ग्यानी॥
आसन सयन सुबसन बिताना। बन बाटिका बिहग मृग नाना॥
सुरभि फूल फल अमिअ समाना। बिमल जलासय बिबिध बिधाना॥
असन पान सुचि अमिअ अमी से। देखि लोग सकुचात जमी से॥
सुर सुरभी सुरतरु सबही कें। लखि अभिलाषु सुरेस सची कें॥
रितु बसंत बह त्रिबिध बयारी। सब कहँ सुलभ पदारथ चारी॥

असा त्यांचा आपसात विचार कायम झाला! व त्या कामाला लागल्या—

मग उशीर काय? नानाप्रकारची अशी सुंदर घरे त्यांनी बनवली की, ती पाहून देवांना आपल्या कौशल्याची लाज वाटली. त्यानंतर त्या घरांतून ऐश्वर्य इतके विपुल भरून ठेवले की, ते पाहून प्रत्यक्ष देवांनासुद्धा हाव सुटली! प्रत्येक घरात, दास आणि दासी, सेवेची साधने घेऊन पाहुण्यांच्या आवडीनिवडीप्रमाणे हाकेस ‘ओ’ म्हणण्यास अगदी तयार राहिल्या! आणि हे सर्व तयार करण्यास त्यांना पळाचाही वेळ लागला नाही. असे सर्व सुखावह केले की, त्या सुखाची कल्पना देवांना स्वप्नातही स्वर्गात आली नव्हती!

याप्रमाणे सर्व सुसज्ज होताच सर्व पाहुण्यांना, ज्यांच्या त्यांच्या अपेक्षेप्रमाणे, सुंदर आणि सौख्यदायक असे निवास (घरे) दिले. ऋषींच्या आज्ञेप्रमाणे त्यानंतर पुनः परिजनासह भरतासही निवासस्थान दिले.

मुनींच्या तपोबलाच्या जोरावर, ब्रह्मदेवालासुद्धा फार आश्चर्यचकित करून सोडणारे वैभव त्या सिद्धींनी निर्माण केले. २१४

मुनी भारद्वाजाचे अशा प्रकारचे अलौकिक सामर्थ्य जेव्हा भरताने पाहिले, तेव्हा सर्व लोक व लोकपाल त्याला कुचकामाचे वाटले.

ऋद्धिसिद्धींनी निर्माण केलेली सुखसामग्री अवर्णनीयच होती. ती पाहून ज्ञानीसुद्धा वैराग्य विसरले. आसने, शय्या, उत्तम वस्त्रे, भूषणे, छत, वने, पुष्पवाटिका, विविध प्रकारचे पशू-पक्षी, सुवासिक फुले, अमृताच्या रुचीची रसाळ फळे, विविध प्रकारचे अनुपम व निर्मल जलाशय, अमृतालासुद्धा अमृताप्रमाणे रुचकर असे अत्यंत पवित्र असे खाण्यापिण्याचे पदार्थ पाहून रामदर्शनार्थ मनाने सर्वसंयमी झालेले लोक यांनासुद्धा हे भोग भोगण्याची इच्छा झाली, पण लोकाना कळले तर काय म्हणतील. म्हणून त्यांचा उपभोग घेत असता मनातल्या मनात साधकाप्रमाणे लाजू लागले.

प्रत्येकांच्या दारात एक कामधेनू व एक कल्पवृक्ष! ही रेलचेल पाहून इंद्र व इंद्राणींना या सुखाची हाव वाटू लागली! प्रत्येकाची स्वतंत्र बाग. त्याबागेत वसंत ऋतूचे वैभव; मंद, सुगंध, शीतळ असा वायू असलेला; खाण्याचे चारी प्रकार व षड्रस सर्वांना सुलभ झाले. प्रत्येकासाठी, पुष्पमाला, चंदन, उटणी, व अत्तरे

स्रक चंदन बनितादिक भोगा । देखि हरष बिसमय बस लोगा ।।

दो०—संपति चकई भरतु चक मुनि आयस खेलवार ।
तेहि निसि आश्रम पिंजराँ राखे भा भिनुसार ।। २१५ ।।

मासपारायण, उन्नीसवाँ विश्राम

चौ०—कीन्ह निमज्जनु तीरथराजा । नाइ मुनिहि सिरु सहित समाजा ।।
रिषि आयसु असीस सिर राखी । करि दंडवत बिनय बहु भाषी ।।
पथ गति कुसल साथ सब लीन्हें । चले चित्रकूटहिं चितु दीन्हें ।।
रामसखा कर दीन्हें लागू । चलत देह धरि जनु अनुरागू ।।
नहिं पद त्रान सीस नहिं छाया । पेमु नेमु ब्रतु धरमु अमाया ।।
लखन राम सिय पंथ कहानी । पूँछत सखहि कहत मृदु बानी ।।
राम बास थल बिटप बिलोकें । उर अनुराग रहत नहिं रोकें ।।
देखि दसा सुर बरिसहिं फूला । भइ मृदु महि मगु मंगल मूला ।।

वगैरे अंगास लावण्यासाठी, व तरुण स्त्रिया वगैरे भोगसुद्धा सर्वांना सुलभ केले ! हा सर्व प्रकार पाहून काही लोकांना हर्ष व आश्चर्य वाटले, तर काहीना आश्चर्य व विषाद वाटला.

[एका बाजूस रामविरहाने तळमळत असलेले भरताचे हृदय व दुसऱ्या बाजूस स्वर्गातील देवांना प्रलोभन वाटेल, अशा भोगसामग्रीची रेलचल करून सोडलेली ! भारद्वाजाश्रमातील सुंदर भवने,–त्यापैकीच एक उत्कृष्ट अर्थात् भरतास दिले होते– त्यामुळे त्याने ती रात्र कशी काढली ते समजून घेण्यासारखे आहे.]

ऋद्धिसिद्धींनी उत्पन्न केलेली ती सर्व भोगसंपत्ती हीच चक्रवाकाची मादी आणि भरत हा चक्रवाक. भारद्वाजांची आज्ञा हाच गारोडी– त्याने, सर्व रात्रभर आश्रमातील पिंजऱ्यात (एका सुंदर भवनात) त्यांना (संपत्ती व भरत यांना) कोंडून ठेवले ! २१५.

(चक्रवाकांचे जोडपे एका पिंजऱ्यात असूनही रात्री परस्पराकडे ३६ आकड्यानेच राहातो हा त्यांचा स्वभाव ! तेथील सुखोपभोगांचा भरताने लेशमात्र आस्वाद घेतला नाही, हा भावार्थ.)

उजाडताच तीर्थराजावर सर्वांची स्नाने झाली. सर्व समाजासह भारद्वाज मुनींना भरतानी वंदन केले. त्यांची आज्ञा व आशीर्वाद शिरसावंद्य मानले. पुनःपुन्हा दण्डवत करून नम्रपणाने कृतज्ञता व्यक्त केली. बरोबर उत्तम वाटाडे घेतले आणि सर्व समाजासह चित्रकूटाच्या रस्त्याला भरत लागले.

आता मात्र भरताचे सर्व लक्ष चित्रकूटावरच संपूर्णपणे केंद्रित झाल्याने त्याने निषादांचा राजा गुह याला आपल्याबरोबर घेतले व त्याचा हात आधाराला धरून, देहधारी प्रेमाची प्रत्यक्ष मूर्तीच पावले टाकू लागली.

मस्तकावर छाया नाही की, पायात पादत्राण नाही ! इतके असूनही प्रेमाच्या नेमात व सेवाधर्माच्या व्रतात काडीचासुद्धा कसूर किंवा कपट यांचे नाव नाही ! लक्ष्मण, राम आणि सीता याच वाटेने कसे कसे गेले, असे गुहाला विचारावे व त्याने भरताना मधुर वाणीने सर्व सांगावे ! रामांनी वास्तव्य केलेले एखादे स्थळ, एखादा वृक्ष वाटेत दिसला की, प्रत्येक ठिकाणी आपल्या प्रेमाचे काय प्रदर्शन करावे, असा भरताना संकोच वाटे व ते आपले स्नेहपूर्ण भाव दाबण्याचे प्रयत्न करीत, परंतु अखेर हा खटाटोप व्यर्थच होई !

भरताची ही प्रेमशिथिल स्थिती पाहून आकाशातून पुष्पवृष्टी होई आणि पृथ्वी भरताचा सर्व मार्ग कोमल

दो ० —किएँ जाहिं छाया जलद सुखद बहइ बर बात ।
तस मगु भयउ न राम कहँ जस भा भरतहि जात ।। २१६ ।।

चौ ० —जड़ चेतन मग जीव घनेरे । जे चितए प्रभु जिन्ह प्रभु हेरे ।।
ते सब भए परम पद जोगू । भरत दरस मेटा भव रोगू ।।
यह बड़ि बात भरत कइ नाहीं । सुमिरत जिनहि रामु मन माहीं ।।
बारक राम कहत जग जेऊ । होत तरन तारन नर तेऊ ।।
भरतु राम प्रिय पुनि लघु भ्राता । कस न होइ मगु मंगलदाता ।।
सिद्ध साधु मुनिबर अस कहहीं । भरतहि निरखि हरषु हियँ लहहीं ।।
देखि प्रभाउ सुरेसहि सोचू । जगु भल भलेहि पोच कहुँ पोचू ।।
गुर सन कहेउ करिअ प्रभु सोई । रामहि भरतहि भेट न होई ।।

दो० —राम सँकोची प्रेम बस भरत सपेम पयोधि ।
बनी बात बेगरन चहति करिअ जतनु छलु सोधि ।। २१७ ।।

चौ० —बचन सुनत सुरगुरु मुसुकाने । सहसनयन बिनु लोचन जाने ।।

करून तो मांगल्याने भरून टाकी ! सजल मेघ त्याच्यावर छाया धरत व शीत-मंद-सुगंध वारे अत्यंत सुखावह वाहात ! भरत चित्रकूटाकडे जात असता मार्ग जेवढा सुखकारक झाला इतका तो प्रत्यक्ष रामांनाही अनुकूल झाला नाही. २१६

" त्या मार्गावरील जड व चेतन असे जे अनेक जीव ज्यांनी रामाचे दर्शन घेतले व ज्याच्यावर प्रभूची कृपादृष्टी पडली ते सर्व त्याच वेळी मोक्षाचे अधिकारी बनले ! "

" आता त्यांच्या भाग्याने त्याच रस्त्याने भरत निघाल्यामुळे त्यांना या श्रेष्ठ रामभक्ताचे दर्शन घडत आहे व तोही त्या अनेक जडचेतन जीवांना पाहात आहे. त्यामुळे त्यांचा सर्व भवरोगच नष्ट झाला. त्यांना भक्ती प्राप्त झाली ! "

" परंतु यामुळे भरताला मोठे महत्त्व नाही; कारण स्वतः प्रभू रामच ज्याचे मनात अखंड स्मरण करीत आहेत एवढा त्याचा मूळचाच अधिकार ! नुसते एकवेळ मुखाने ' राम ' असे नाम उच्चारले तरी असे लोक स्वतः तर उद्धरून जातातच पण इतराना कल्याणाचा मार्ग दाखवण्याचा त्यांना अधिकार प्राप्त होतो !

असा ज्या रामाच्या नुसत्या नामाचा महिमा त्या रामाचाच प्रत्यक्ष धाकटा प्रिय भाऊ भरत रस्त्याने अनवाणी निघाल्यावर सर्व रस्ताच मंगलदायक का बनणार नाही ! "

अशा प्रकारचे विचार सिद्ध, साधू व मुनिश्रेष्ट आपसात प्रकट करत असत व भरताचे दर्शन घेऊन आपले अंतःकरण आनंदाने भरून टाकीत !

परंतु एवढा भरताचा महिमा दृष्टीस पडताच देवांचा राजा इंद्र दुःखाने तळमळू लागला. बरोबरच आहे, हे जग भल्याला भले होते व हेच जग नीचाला रडायला लावते !

मौज पाहा ! इंद्र बृहस्पतीची प्रार्थना करू लागला, " प्रभो ! आता काहीतरी उपाय लवकर काढा की ज्यामुळे रामाची व भरताची व भेटच होणार नाही. कारण प्रभूचा मिडस्त स्वभाव प्रेमाला वश होणारा, भरत तर प्रेमाचा प्रत्यक्ष क्षीरसागरच ! म्हणून काही तरी कारस्थान शोधून लवकर प्रयत्न करा; नाही तर सरस्वतीचे पाय धरून मंथरेची बुद्धी बदलण्यापासून आतापर्यंत जमवून आणलेला सर्व डाव विस्कटून जाईल. ! २१७

इंद्राचे हे भाषण ऐकून बृहस्पतीनी स्मित केले. हजारो डोळे असूनही ज्ञाननेत्राभावी, इंद्राची त्यांनी आंधळ्यातच (मूर्खात) गणना केली ! ते म्हणाले,

मायापति सेवक सन माया। करइ त उलटि परइ सुरराया ॥
तब किछु कीन्ह राम रुख जानी । अब कुचालि करि होइहि हानी ॥
सुनु सुरेस रघुनाथ सुभाऊ । निज अपराध रिसाहिं न काऊ ॥
जो अपराधु भगत कर करई । राम रोष पावक सो जरई ॥
लोकहुँ बेद बिदित इतिहासा । यह महिमा जानहिं दुरबासा ॥
भरत सरिस को राम सनेही । जगु जप राम रामु जप जेही ॥

दो० — मनहुँ न आनिअ अमरपति रघुबर भगत अकाजु ।
अजसु लोक परलोक दुख दिन दिन सोक समाजु ॥ २१८ ॥

चौ० — सुनु सुरेस उपदेसु हमारा । रामहि सेवकु परम पिआरा ॥
मानत सुखु सेवक सेवकाई । सेवक बैर बैरु अधिकाई ॥
जद्यपि सम नहिं राग न रोषू । गहहिं न पाप पूनु गुन दोषू ॥
करम प्रधान बिस्व करि राखा । जो जस करइ सो तस फलु चाखा ॥
तदपि करहिं सम बिषम बिहारा । भगत अभगत हृदय अनुसारा ॥
अगुन अलेप अमान एक रस । रामु सगुन भए भगत पेम बस ॥

" अरे सुरराया ! मायापतीच्या सेवकावर जर मायेचा (कपटाचा) प्रयोग केला तर प्रयोग करणाऱ्यावरच तो उलटतो ! राज्याभिषेकाच्या वेळी जो प्रयोग केला, त्यावेळी त्याच्यामागे काहीशी रामाची इच्छा होती. पण जर का आता तसले काही कारस्थान (माया) केले तर हानी होईल !

" हे देवेंद्र ! रघुपतीचा स्वभाव कसा आहे, ते सांगतो ऐक. स्वतःचा अपराध कोणी केला म्हणून त्याना कधीही त्या व्यक्तीचा क्रोध येत नाही. पण त्यांच्या अनन्य भक्तांचा अपराध करणारे मात्र रामाच्या रोषरूपी अग्नीत जळतात. लोकांमध्ये व वेदांतही हा रामस्वभाव इतिहासप्रसिद्ध आहे. आणि त्या स्वभावाची बरोबर कल्पना, दुर्वासांना आलेली आहे !

" आता तूच विचार करून पाहा, भरतासारखा जिव्हाळ्याचा रामाचा दुसरा भक्त कोण आहे ! सर्व जग रामाचा जप करते आणि राम स्वतः ज्याच्या जप करतात, त्या भरताचा केवढा महिमा ! ! "

" म्हणून हे अमरपती ! अशा रघुपतिभक्ताचे अनिष्ट करण्याची नुसती कल्पनासुद्धा मनात आणू नका. तसे करणाराची सर्व लोकांत अपकीर्ती होऊन त्याला परलोकातसुद्धा दुःखच भोगावे लागेल ! आणि त्या दुःखाचा शेवट न होता त्याची एकसारखी वाढच होत राहील ! " २१८

" हे सुरेश ! माझा उपदेश ऐका. रामाला आपले सेवक परम प्रिय असतात. अर्थात् जेव्हा कोणी त्याच्या सेवकाची सेवा करतात, तेव्हा त्यांना सुख होते व त्यांच्या सेवकांशी वैर करणाराशी त्यांचे हाडवैर निर्माण होते ! "

" यावर कोणाला शंका येईल की, प्रभू सर्वांशी समान. त्यांचे कोणावर प्रेम नाही किंवा कोणाबद्दल त्यांना द्वेषही नसतो. याचे कारण ते कोणाच्याच पाप अगर पुण्याचा गुणदोष आपल्याकडे घेत नाहीत ! सर्वच विश्वाची रचना त्यांनी कर्मप्रधान केली असून, प्रत्येकाला स्वतःच्या भल्या अगर बुऱ्या कर्मांचे चांगले-वाईट फळ चाखावे लागते. मग राम एकावर प्रेम करतात व एकाचा द्वेष करतात, हे म्हणणे कसे योग्य ?

" याचे उत्तर असे की, वरील सिद्धान्त सर्वसाधारपणे जरी बरोबर असला तरी भक्त व अभक्तांच्या हृदयीच्या भावनाना अनुसरून प्रभू भक्ताशी प्रेमाचा व द्वेषाचा व्यवहार करतात, हेही खरेच आहे ! "

" कारण गुणातीत, अलिप्त अलेप, अप्रमेय, कोणाशी कसाही प्रकारचा ज्याचा संबंध नाही, असे एकरस निर्गुण परब्रह्मच भक्तांच्या प्रेमाला वश होऊन ' राम ' स्वरूपात सगुण झाले आहे. त्यामुळे राम आपल्या

राम सदा सेवक रुचि राखी । बेद पुरान साधु सुर साखी ॥
अस जियँ जानि तजहु कुटिलाई । करहु भरत पद प्रीति सुहाई ॥

दो० —राम भगत परहित निरत पर दुख दुखी दयाल ।
भगत सिरोमनि भरत तें जनि डरपहु सुरपाल ॥ २१९ ॥

चौ० —सत्यसंध प्रभु सुर हितकारी । भरत राम आयस अनुसारी ॥
स्वारथ बिबस बिकल तुम्ह होहू । भरत दोसु नहिं राउर मोहू ॥
सुनि सुरबर सुरगुर बर बानी । भा प्रमोदु मन मिटी गलानी ॥
बरषि प्रसून हरषि सुरराऊ । लगे सराहन भरत सुभाऊ ॥
एहि बिधि भरत चले मग जाहीं । दसा देखि मुनि सिद्ध सिहाहीं ॥
जबहि रामु कहि लेहिं उसासा । उमगत पेमु मनहुँ चहु पासा ॥
द्रवहिं बचन सुनि कुलिस पषाना । पुरजन पेमु न जाइ बखाना ॥
बीच बास करि जमुनहिं आए । निरखि नीरु लोचन जल छाए ॥

दो० —रघुबर बरन बिलोकि बर बारि समेत समाज ।
होत मगन बारिधि बिरह चढ़े बिबेक जहाज ॥ २२० ॥

सेवकाची आवड पुरवितात, अशी वेद, पुराणे, साधू व सुर हे साक्ष देतात ! "

" हे देवेंद्र ! हा सर्व विषय शांतपणे ध्यानी आणून आपल्या अंतःकरणातील दुष्ट भावनांचा त्याग करा; आणि भरताच्याच चरणाची निःसीम भक्ती करा. कारण रामभक्त दयाळू असल्यामुळे साहजिकच परदुःख पाहून त्यांना दुःख होते. त्यामुळे ते नेहमी दुसऱ्याचे हित साधण्यातच दंग असतात. आणि भरत तर अशा सर्व भक्तांत सर्वश्रेष्ठ ! मग त्याला भिण्याचे कारणच राहिले नाही. " २१९..

" शिवाय, प्रभू सत्यप्रतिज्ञ आहेत. सुरांचे कल्याण करण्याचे त्यांनी अभिवचन दिलेलेच आहे. भरतही सर्वस्वी रामाच्या आज्ञेप्रमाणे वागणारे आहेत. म्हणून भरतामुळे राम अयोध्येला परत जातील, अशी भीती बाळगण्याचे मुळीच कारण नाही ! "

" तुम्ही मात्र स्वार्थाला विशेष बळी पडल्यामुळे व्याकुळ झाला आहात. यात भरताचा काहीच दोष नसून, तुमच्या बुद्धीला भ्रम झाला आहे. "

इतका स्पष्ट खुलासा करणारे बृहस्पतीचे भाषण, सुरवरांनी ऐकले, तेव्हा त्यांची तळमळ पूर्ण शांत झाली. अंतःकरणातील दुःख नाहीसे झाल्याने ते आनंदित झाले. भरतावर पुष्पवृष्टी करून त्यांच्या सुस्वभावाचे गुणगान मग ते करू लागले !

इकडे अशाप्रकारे भरताचा पायी प्रवास चालू असता त्याची ती प्रेमविव्हल मूर्ती पाहून सिद्ध व मुनी मोठ्या ईर्ष्येने (असे भाग्य आपणाला कधी लाभेल काय, या भावनेने) त्यांची स्तुती करीत !

" राऽऽम " असा उच्चार करीत जेव्हा ते दीर्घ श्वास घेत, तेव्हा जणू चारी दिशांना प्रेमाचा पूर येईल. तो भरताचा राम, प्रेमार्त स्वर कानी पडताच प्रत्यक्ष पाषाणाला आणि कठोर वज्रालाही पाझर फुटत असे. मग स्नेहभावाने भारलेल्या पुरजनांची स्थिती कशी शोकाकुल होत असेल, ते शब्दांनी सांगणे अशक्य !

मध्ये एक मुक्काम करून यमुनेजवळ जेव्हा भरत आले, तेव्हा ते श्यामवर्णाचे पाणी पाहून त्यांचे डोळे पाण्याने डबडबले !

रघुवराच्या वर्णाचे ते सुंदर पाणी पाहून सर्व समाजासह विरहसागरात बुडत असता भरताने विवेक-रूपी जहाजाचा आधार घेतला ! (विवेकाने अनावर दुःख कमी केले.) २२०

चौ ०—जमुन तीर तेहि दिन करि बासू । भयउ समय सम सबहि सुपासू ॥
रातिहिं घाट घाट की तरनी । आईं अगनित जाहिं न बरनी ॥
प्रात पार भए एकहि खेवाँ । तोषे रामसखा की सेवाँ ॥
चले नहाइ नदिहि सिर नाई । साथ निषादनाथ दोउ भाई ॥
आगें मुनिबर बाहन आछें । राजसमाज जाइ सबु पाछें ॥
तेहि पाछें दोउ बंधु पयादें । भूषन बसन बेष सुठि सादें ॥
सेवक सुहृद सचिवसुत साथा । सुमिरत लखनु सीय रघुनाथा ॥
जहँ जहँ राम बास बिश्रामा । तहँ तहँ करहिं सप्रेम प्रनामा ॥

दो ०—मगबासी नर नारि सुनि धाम काम तजि धाइ ।
देखि सरूप सनेह सब मुदित जनम फलु पाइ ॥ २२१ ॥

चौ ०—कहहिं सपेम एक एक पाहीं । रामु लखनु सखि होहिं कि नाहीं ॥
बय बपु बरन रूपु सोइ आली । सीलु सनेहु सरिस सम चाली ॥
बेषु न सो सखि सीय न संगा । आगें अनी चली चतुरंगा ॥
नहिं प्रसन्न मुख मानस खेदा । सखि संदेहु होइ एहिं भेदा ॥
तासु तरक तियगन मन मानी । कहहिं सकल तेहि सम न सयानी ॥
तेहि सराहि बानी फुरि पूजी । बोली मधुर बचन तिय दूजी ॥

त्या दिवशी यमुनेच्या काठीच वस्ती पडली. त्या प्रसंगानुरूप सर्वांच्या सुखसोयी लागल्या. निषादांचा राजा बरोबरच असल्यामुळे अनेक घाटांवरील नावा रात्रीच भराभर अगणित जमू लागल्या. त्याचे वर्णन कसे करावे ? सूर्योदय होताच एका खेपेतच सर्व सैन्य व समाज पैलतीराला पोचला, तेव्हा गुहाच्या त्या कामगिरीने सर्वांना मोठा संतोष झाला.

स्नाने उरकल्यावर यमुनेला वंदन केले आणि दोघे बंधू निषादराजांसह निघाले. दिव्य रथात बसून गुरू वसिष्ठ प्रथम निघाले. त्यांच्या पाठोपाठ सर्व राजसमाज चालू लागला. अंगावर अत्यंत साधी भूषणे घालून व वस्त्रे परिधान करून त्यांच्या मागून दोघे भ्राते जाऊ लागले. त्यांच्याबरोबर सेवक मित्र व सचिव-सुत असून सर्वच; लक्ष्मण, सीता व रघुनाथ यांचे स्मरण करीत आहेत. ज्या ज्या ठिकाणी रामाच्य ावस्तीचे अगर विश्रांतीचे स्थळ दिसे त्या त्या जागी, वाटेत सर्वच मंडळी प्रेमाने प्रणाम करत असत.

रस्त्यावरील गावोगावचे लोक सर्व स्त्रिया व पुरुष बातमी लागताच, हातची कामे व घरदार सोडून धावतच येत असत. भरत-शत्रुघ्नांचे अलौकिक सौंदर्य व त्यांचे रामप्रेम पोटभर पाहिले म्हणजे आपल्या जन्माचे सार्थक झाल्याचे समाधान त्यांना होई. २२१

नंतर त्यांची आपसात होणारी प्रेमळ भाषा ऐकण्यासारखी झाली. " सखी हे राम आणि लक्ष्मणच दिसतात नाही ? वय शरीराचा बांधा, रंग, रूप इत्यादि अगदी बरोबर जसेच्या तसे आहे ! एकमेकांवरचे प्रेम आणि स्वभावसुद्धा अगदी तंतोतंत बरोबर आहे. आणि चालणेसुद्धा हुबेहूब ! "

दुसरी म्हणाली, " पण वेष निराळा आहे. बरोबर सीता दिसत नाही. पुढे चतुरंगिणी सेना चालत आहे ! "

तोच तिसरी म्हणते, " मनातील खेदामुळे मुखे सुकलेली दिसतात; सखी ! या भेदामुळेच शंका येते नाही ? "

सर्वच स्त्रियांच्या मनाला तिचा तर्क पटला. त्या सगळ्या म्हणाल्या, " खरंच ग ऽ खरं ! आमच्यात तुझ्यासारखी शहाणी दुसरी कोणीच नाही. " असे म्हणून दुसरीने तिला शाबासकी दिली व ती मधुर वाणीने

कहि सपेम सब कथाप्रसंगू । जेहि बिधि राम राज रस भंगू ।।
भरतहि बहुरि सराहन लागी । सील सनेह सुभाय सुभागी ।।

दो० – चलत पयादें खात फल पिता दीन्ह तजि राजु ।
जात मनावन रघुबरहि भरत सरिस को आजु ।। २२२ ।।

चौ० – भायप भगति भरत आचरनू । कहत सुनत दुख दूषन हरनू ।।
जो किछु कहब थोर सखि सोई । राम बंधु अस काहे न होई ।।
हम सब सानुज भरतहि देखें । भइन्ह धन्य जुबती जन लेखें ।।
सुनि गुन देखि दसा पछिताहीं । कैकइ जननि जोगु सुतु नाहीं ।।
कोउ कह दूषनु रानिहि नाहिन । बिधि सबु कीन्ह हमहि जो दाहिन ।।
कहँ हम लोक बेद बिधि हीनी । लघु तिय कुल करतूति मलीनी ।।
बसहिं कुदेस कुगाँव कुबामा । कहँ यह दरसु पुन्य परिनामा ।।
अस अनंदु अचिरिजु प्रति ग्रामा । जनु मरुभूमि कलपतरु जामा ।।

दो० – भरत दरसु देखत खुलेउ मग लोगन्ह कर भागु ।
जनु सिंघलबासिन्ह भयउ बिधि बस सुलभ प्रयागु ।। २२३ ।।

चौ० – निज गुन सहित राम गुन गाथा । सुनत जाहिं सुमिरत रघुनाथा ।।
तीरथ मुनि आश्रम सुरधामा । निरखि निमज्जहिं करहिं प्रनामा ।।

बोलू लागली; रामराज्याचा रसभंग करणारा सर्व प्रसंग तिने प्रेमाने सांगितला. त्यानंतर ती भरताचे शील, स्नेह, शुद्धभाव व उत्तम भाग्य यांची प्रशंसा करू लागली. शेवटी ती म्हणाली,

" पित्याने दिलेल्या राज्याचा त्याग केला; फलाहारावर राहून अनवाणी चालत अयोध्येला परत चला, अशी रघुवरांना विनंती करण्यासाठी भरत जात आहेत! खरोखर त्यांच्यासारखा कुणीतरी आज सर्व जगात सापडेल का ? " २२२

" भरतांची भक्ती, त्यांचे आचरण व त्यांचा बंधुभाव यांचे श्रवण अगर कथन केले तरीही दुःखे व दूषण यांचा नाश होतो. सखी ! सांगावे तितके थोडेच ! रामाचाच भाऊ, मग असा कसा नसणार ? "

" सानुज भरताचे आम्हाला दर्शन झाल्यामुळे स्त्रियांमध्ये धन्य म्हणूनच आपली गणना होणार ! "

भरताच्या सद्गुणांचे ते वर्णन ऐकून व त्याची ती प्रेमविकल स्थिती बघून त्या स्त्रिया कष्टी होऊन म्हणाल्या, " असल्या सुशील मुलाला दुष्ट कैकेयी आई मात्र बिलकुल योग्य दिसत नाही, बाई ! "

लगेच दुसऱ्या स्त्रिया म्हणाल्या, " यात राणीचा मुळीच दोष नाही; आम्हाला जे दैव अनुकूल झाले, त्यानेच हे सर्व घडवून आणले. वैदिक व लौकिक आचारधर्मांत आम्ही सर्वस्वी हिणकस, तुच्छ आणि पापी कुळात जन्माला येऊन पापकर्मच करणाऱ्या, मळकट, निंद्य देशात व क्षुद्र गावात राहाणाऱ्या. अशा आमच्या-सारख्या नीच कळकळ स्त्रिया कुठे, आणि पुण्याचाच परिणाम म्हणून मिळणारे भरताचे दर्शन कुठे ? "

मारवाडात जणू कल्पवृक्ष उगवावा, असे आश्चर्य व सुख प्रत्येक गावात पाहावयास मिळे. आज भरताचे अशा प्रकारे, मार्गावरील सर्व लोकांना दर्शन होत असल्यामुळे त्यांचे भाग्य खुलले होते; जणू सिंहलद्वीपा-मधील लोकांना भाग्याने प्रयागराजाचे दर्शनच सुलभ झाले ! २२३.

याप्रमाणे, स्वतःच्या गुणांच्यासह रामाच्या सद्गुणांच्या कथा श्रवण करीत व रघुनाथाचे चिंतन करीत भरतांचा प्रवास चालू होता. वाटेत कुठेही तीर्थे, मुनिवरांचे आश्रम, देवतांची स्थाने दिसली की, नमनपूर्वक



मनहीं मन मागहिं बरु एहू । सीय राम पद पदुम सनेहू ॥
मिलहिं किरात कोल बनबासी । बैखानस बटु जती उदासी ॥
करि प्रनामु पूँछहिं जेहि तेही । केहि बन लखनु रामु बैदेही ॥
ते प्रभु समाचार सब कहहीं । भरतहि देखि जनम फलु लहहीं ॥
जे जन कहहिं कुसल हम देखे । ते प्रिय राम लखन सम लेखे ॥
एहि बिधि बूझत सबहि सुबानी । सुनत राम बनबास कहानी ॥

दो० — तेहि बासर बसि प्रातहीं चले सुमिरि रघुनाथ ।
राम दरस की लालसा भरत सरिस सब साथ ॥ २२४ ॥

चौ० — मंगल सगुन होहिं सब काहू । फरकहिं सुखद बिलोचन बाहू ॥
भरतहि सहित समाज उछाहू । मिलिहहिं रामु मिटिहि दुख दाहू ॥
करत मनोरथ जस जियँ जाके । जाहिं सनेह सुराँ सब छाके ॥
सिथिल अंग पग मग डगि डोलहिं । बिहबल बचन पेम बस बोलहिं ॥
रामसखाँ तेहि समय देखावा । सैल सिरोमनि सहजसुहावा ॥
जासु समीप सरित पय तीरा । सीय समेत बसहिं दोउ बीरा ॥

स्नान, दर्शन व प्रणाम इत्यादि अनुक्रमे ते करीत. मनातल्या मनात सर्वत्र एकच वर मागत की, "आम्हाला सीतारामचरणकमली प्रेम द्यावे !

वाटेत, भिल्ल, कोळी, वनात राहणारे, वानप्रस्थ, ब्रह्मचारी, घरात राहून साधन करणारे आणि संन्यासी भेटताच त्यांना नमस्कार करून विचारत की, " लक्ष्मण, राम आणि सीता कोणत्या वनात आहेत, ते तुम्हाला माहीत आहे का ? "

प्रभूची सर्व माहिती त्यांनी सांगावी व भरताचे दर्शन घेऊन जन्माच्या सार्थकाचे फळ लुटावे !

आपल्या डोळ्यांनी आम्ही त्यांना कुशल असलेले पाहिले, असे कोणी सांगताच, असे सांगणाऱ्याविषयी आवडत्या रा[illegible]प्रमाणे आपुलकी वाटावी !

अशा रीतीने सर्वांच्याकडे मधुरवाणीने ते चौकशी करीत व उत्तरादाखल रामाच्या वनवासाची सविस्तर कथा त्यांना ऐकावयास मिळे.

त्या दिवशी (यमुनेपासून २५ मैलांपेक्षा अधिक दूर आल्यावर हा आठवा) मुक्काम केला. सकाळी लवकर रघुनाथांचे स्मरण करून मंडळी मार्गस्थ झाली. जेवढी रामदर्शनाची उत्सुकता भरताना वाटत होती, तेवढीच बरोबरच्या सर्वांना जाणवत होती. २२४

आता सर्वांनाच मंगल शकुन होऊ लागले. (पुरुषांचा उजवा व स्त्रियांचा डावा) बाहू आणि डोळे यांचे सुखदायक स्फुरण अनुभवास येऊ लागले. सर्व समाजासह भरताना अंतःकरणात एवढा उत्साह वाटू लागला की, आता लवकरच रामदर्शन होऊन सर्व दुःख व ताप यांचा शेवट होणार !

ज्याला जे मनोरथ सुचले, ते त्याने करण्यास सुरूवात केली. स्नेहरूपी सुरा पिऊन झिंगल्याप्रमाणे त्यांची आता पावले पडू लागली. सर्व अवयव सैल पडले. रस्त्यावर पाय ठेवताना जो तो लटपटू लागला. प्रेमाने व्याकुळ होऊन एकमेकाशी बोलत ते चालू लागले.

इतक्यात रामसख्याने नैसर्गिकरीत्याच शोभिवंत असलेला कामदगिरी श्रेष्ठ पर्वत सर्वांना दाखवला. आणि सांगितले की त्याच्या शेजारीच पयस्विनी नदीच्या तीरावर सीतेसह दोन वीराग्रणींचे वसतिस्थान आहे...

देखि करहिं सब दंड प्रनामा । कहि जय जानकि जीवन रामा ।।
प्रेम मगन अस राजसमाजू । जनु फिरि अवध चले रघुराजू ।।

दो ० –भरत प्रेमु तेहि समय जस तस कहि सकइ न सेपु ।
कबिहि अगम जिमि ब्रह्मसुखु अह मम मलिन जनेषु ।। २२५ ।।

चौ ० –सकल सनेह सिथिल रघुबर कें । गए कोस दुइ दिनकर ढरकें ।।
जलु थलु देखि बसे निसि बीतें । कीन्ह गवन रघुनाथ पिरीतें ।।
उहाँ रामु रजनी अवसेषा । जागे सीयँ सपन अस देखा ।।
सहित समाज भरत जनु आए । नाथ बियोग ताप तन ताए ।।
सकल मलिन मन दीन दुखारी । देखीं सासु आन अनुहारी ।।
सुनि सिय सपन भरे जल लोचन । भए सोचबस सोच बिमोचन ।।
लखन सपन यह नीक न होई । कठिन कुचाह सुनाइहि कोई ।।
अस कहि बंधु समेत नहाने । पूजि पुरारि साधु सनमाने ।।

हे भाषण कानी पडताच सर्वांनी दण्डवत् प्रणाम केले व " जानकीजीवन स्मरण जय जय राम ! " असा एकच उच्च स्वरात जयघोष केला. यावेळी सर्व राजसमाज प्रेमभावात इतका मग्न झाला की, जणू रघुराज परत अयोध्येस येत आहेत, असेच सर्वांना क्षणभर वाटले.

सर्व मंडळी असा अपूर्व आनंद लुटत असता भरताच्या हृदयात त्यावेळी जे प्रेमाला भरते आले त्याचे वर्णन करणे शेषासही अशक्य ! तसेच मी आणि माझे या मायेच्या मोहाने मलिन झालेल्या संसारी जीवाला जितके ब्रह्मसुख अगत्य तितकेच हे वर्णन कविमतीलाही अतर्क्य आहे ! २२५

रामविरह-दुःखाने सर्व समाज जरी अगदी गळून गेल्यासारखा झाला होता तरीही, आता लवकरच दर्शन घडणार या नवीन उत्साहाच्या भरात अस्तमान झाल्यावरही दोन कोस त्यांची चाल झाली. आणि नंतर योग्य जागा पाणी वगैरे पाहून रात्रीची त्यांनी वस्ती केली. उजाडल्याबरोबर लगेच रघुनाथप्रेमाच्या ओढीने सर्व जण झपाट्याने वाट चालू लागले. *

तिकडे पहाटे राम उठताच सीता, स्वतःला पडलेले स्वप्न सांगू लागली, " हे पाहा, मला जणू सर्व समाजासह भरत आल्यासारखे दिसले आणि नाथांच्या वियोगामुळे उत्पन्न झालेल्या तापामुळे त्याचे शरीर किती तरी तापल्यासारखे वाटले ! सर्वच समाज किती कितीतरी दुःखी दीन –उदास दिसला म्हणून सांगू ? आणि सासूबाई अगदीच कशातरी दिसल्या. मला बाई ते सांगवतसुद्धा नाही !"

कंठ दाटून आल्यामुळे त्याच्यापुढे सीतेचे सांगणे बंद पडले. परंतु ऐकलेल्या स्वप्नाचाच परिणाम होऊन दुसऱ्यांच्या दुःखाचे निरसन करणारे प्रभू स्वतःच शोकाकुल झाले. त्यांच्या डोळ्यांत अश्रू चमकू लागले. " लक्ष्मण ! हे स्वप्न बरे नाही ! काही तरी अशुभ खबर कोणी येऊन देणार. '' एवढे उद्गार रामचंद्रांच्या मुखातून बाहेर पडले.

बंधूसह प्रभूंनी लगेच स्नान करून त्रिपुरारी (शंकर) पूजन केले. त्यानंतर अन्य साधुसंतांचा योग्य सन्मान करण्यासाठी स्तुतिनमनपूर्वक त्यांना कंदमूलादि समर्पण केले.

---

* गोरखपूर टीका- रामप्रेमाने सर्व लोक गळून गेल्यामुळे सूर्यास्त होईपर्यंत त्यांची चाल सर्व दिवसात फक्त दोन कोसच झाली. सूर्यास्त झाल्यावर पाणी व वसतीस योग्य जागा पाहून त्यांनी काहीही न खाता-पिता तेथे वसती केली. रात्र संपल्यावर श्रीरघुनाथजींच्या प्रिय भरताने पुढे चालण्यास प्रारंभ केला.

छं० —सनमानि सुर मुनि बंदि बैठे उतर दिसि देखत भए ।
नभ धूरि खग मृग भूरि भागे बिकल प्रभु आश्रम गए ॥
तुलसी उठे अवलोकि कारनु काह चित सचकित रहे ।
सब समाचार किरात कोलन्हि आइ तेहि अवसर कहे ॥

दो० —सुनत सुमंगल बैन मन प्रमोद तन पुलक भर ।
सरद सरोरुह नैन तुलसी भरे सनेह जल ॥ २२६ ॥

चौ० —बहुरि सोचबस भे सियरवनू । कारन कवन भरत आगवनू ॥
एक आइ अस कहा बहोरी । सेन संग चतुरंग न थोरी ॥
सो सुनि रामहि भा अति सोचू । इत पितु बच इत बंधु सकोचू ॥
भरत सुभाउ समुझि मन माहीं । प्रभु चित हित थिति पावत नाहीं ॥
समाधान तब भा यह जाने । भरतु कहे महुँ साधु सयाने ॥
लखन लखेउ प्रभु हृदयँ खभारू । कहत समय सम नीति बिचारू ॥
बिनु पूछें कछु कहउँ गोसाईं । सेवकु समयँ न ढीठ ढिठाई ॥
तुम्ह सर्बग्य सिरोमनि स्वामी । आपनि समुझि कहउँ अनुगामी ॥

दो० —नाथ सुहृद सुठि सरल चित सील सनेह निधान ।
सब पर प्रीति प्रतीति जियँ जानिअ आपु समान ॥ २२७ ॥

याप्रमाणे दुःस्वप्ननाशासाठी जे जे कर्तव्य ते उरकून, देवांचे पूजन व मुनिवरांना वंदन करून राम आपल्या आसनावर बसले. इतक्यात थोड्याच वेळात त्यांनी सहज उत्तरेकडे पाहिले, तो आकाशात खूप धूळ उडत असलेली त्यांना दिसली. अनेक पशू व पक्षी भ्याल्यामुळे आपल्या आश्रमाकडे धाव घेत असल्याचेही त्यांच्या नजरेस आले. हा काय प्रकार आहे, या चिंतेने चकित होऊन प्रभू उठून पाहू लागले, तोच कोळी-भिल्लांनी येऊन सर्व खबर दिली.

तुलसीदास सांगतात की, तो अतिमंगलकारक समाचार [भरतभेटीचा] कानी पडताच, प्रभूंचे मन प्रमुदित झाले, शरीर रोमांचांनी भरले, व शरदऋतूतील सरोरुहा (कमला) सारख्या नेत्रात स्नेहामुळे अश्रू भरले ! २२६

सीतारमणाला पुनः चिंता वाटू लागली की, भरताच्या येण्याचे कारण काय असावे ? इतक्यात कोणी कोळ्याने येऊन सांगितले की, बरोबर अफाट चतुरंगिणी सेना आहे ! हे ऐकून तर रामास फारच चिंता वाटू लागली. कारण इकडे पित्याचे वचन व दुसरीकडे भावाची अती भीड ! भरताच्या प्रेमळ स्वभावाचे स्मरण होताच प्रभूच्या चित्ताला क्षणभरसुद्धा स्थिरता येईना. शेवटी, भरत आपल्या आज्ञेत आहे, तो सुशील असून समंजस आहे, हे मनात आल्यावर मग मनाला समाधान मिळाले.

प्रभूंचे मन चिंताग्रस्त आहे, एवढे नजरेस येताच त्या प्रसंगाला योग्य अशी राजनीती सांगण्यास लक्ष्मणांनी सुरुवात केली, " स्वामी ! आपण न विचारताच मी काही बोलू इच्छितो. पण प्रसंगी असा धीटपणा सेवकाने दाखवणे म्हणजे ते त्याचे उद्धटपणाचे लक्षण नव्हे !

" स्वामी ! आपण सर्वज्ञांत श्रेष्ठ आहात असे असूनही हा आपल्या चरणाचा सेवक जे मनाला योग्य वाटते ते बोलत आहे. "

" नाथ ! आपले अंतःकरण स्वच्छ आहे तसेच आपला सरळ स्वभाव आहे. आपण सुशील असून स्नेहाचे आगर आहात. सर्वांवरच आपले प्रेम असून सर्वांचा आपणास मोठा विश्वास वाटतो कारण सगळेच आपल्यासारखे आहेत असे आपणास वाटते. " २२७

चौ० –बिषई जीव पाइ प्रभुताई । मूढ़ मोह बस होहिं जनाई ॥
भरतु नीति रत साधु सुजाना । प्रभु पद प्रेमु सकल जगु जाना ॥
तेउ आजु राम पदु पाई । चले धरम मरजाद मेटाई ॥
कुटिल कुबंधु कुअवसरु ताकी । जानि राम बनवास एकाकी ॥
करि कुमंत्रु मन साजि समाजू । आए करै अकंटक राजू ॥
कोटि प्रकार कलपि कुटिलाई । आए दल बटोरि दोउ भाई ॥
जौं जियँ होति न कपट कुचाली । केहि सोहाति रथ बाजि गजाली ॥
भरतहि दोसु देइ को जाएँ । जग बौराइ राज पदु पाएँ ॥

दो० –ससि गुर तिय गामी नघुषु चढ़ेउ भूमिसुर जान ।
लोक बेद तें बिमुख भा अधम न बेन समान ॥ २२८ ॥

चौ० –सहसबाहु सुरनाथु त्रिसंकू । केहि न राजमद दीन्ह कलंकू ॥
भरत कीन्ह यह उचित उपाऊ । रिपु रिन रंच न राखब काऊ ॥
एक कीन्हि नहिं भरत भलाई । निदरे रामु जानि असहाई ॥
समुझि परिहि सोउ आजु बिसेषी । समर सरोष राम मुखु पेखी ॥
एतना कहत नीति रस भूला । रन रस बिटपु पुलक मिस फूला ॥
प्रभु पद बंदि सीस रज राखी । बोले सत्य सहज बलु भाषी ॥

परंतु विषयी जीव जेव्हा सत्ताधीश होतात तेव्हा ते मोहवश होऊन मूढ बनतात व आपली सत्ता प्रगट करू लागतात. प्रत्यक्षच उदाहरण पाहा. भरत नीतिरत, साधू व जाणते असून प्रभुपदी त्यांचे निसीम प्रेम आहे, हे सर्व विश्वाला ठाऊक आहे. तथापि तेसुद्धा आज राज्य प्राप्त होताच धर्ममर्यादा उल्लंघन करून निघाले आहेत.

" कुटिल बुद्धीचा दुष्ट भाऊ ही अडचणीची वेळ साधून व राम वनात एकटे आहेत हे जाणून कुविचाराने त्याने सर्व जय्यत तयारी केली आणि मिळालेले राज्य निष्कंटक करण्यासाठी आता ते चालून येत आहेत. कोट्यवधी प्रकारांनी कुटिलपणाविषयी मन कलुषित करून सैन्याची जमवाजमव केली आणि आज दोघे बंधू लढाईच्या तयारीने येत आहेत.

• " खरोखर मनात जर कपट व कुटिल हेतु नसता तर मग रथ, घोडे व हत्तींची ही अफाट सेना घेऊन येणे कोणाला आवडले असते ? बाकी भरताला तरी उगीच दोष देण्यात अर्थ काय म्हणा ! राज्यपद मिळाल्यावर जगात कोणालाही मदोन्मत्तता येणारच ! "

" चंद्र, गुरुपत्नीगामी बनला, नहुष राजाने ब्राह्मणांना वाहन बनवले (आपली पालखी वाहण्यास लावले) वेन राजाने लौकिक, वैदिक मर्यादा ओलांडून अत्याचार केले. त्याच्यासारखा दुसरा अधम कोण ? " २२८

" सहस्रार्जुन, इंद्र, त्रिशंकू इत्यादि अनेक उदाहरणे आहेत. राज्यमदाने कोणाला कलंक लावला नाही ? "

" भरताच्या दृष्टीने ही वागणूक योग्य अशीच आहे. कारण शत्रू व ऋण यांचा लेशसुद्धा मागे ठेवू नये, अशी नीतीच आहे; परंतु भरताने एक गोष्ट मात्र चांगली केली नाही. ती म्हणजे राम वनवासात असहाय आहेत हे माहीत असून त्याने बुद्धिपुरस्सर अनादर केला. तथापि आज रणांगणात रामचंद्राचे सरोष मुख दिसताच त्याचेही विशेष फल काय ते कळेलच ! "

इतके भाषण होत असता लक्ष्मण नीतिरस विसरला व वीररसरूपी वृक्ष रोमांचाच्या रूपाने त्याच्या शरीरावर फुलला. (नीतीची शिस्त सांगत असता वीरश्री येऊन अंगावर रोमांच उठले !)

प्रभुपदाना वंदन करून चरणरज मस्तकी लावले; आणि आपले सहज सामर्थ्य प्रकट करण्यासाठी

अनुचित नाथ न मानब मोरा । भरत हमहि उपचार न थोरा ।।
कहँ लगि सहिअ रहिअ मनु मारें । नाथ साथ धनु हाथ हमारें ।।

दो० – छत्रि जाति रघुकुल जनमु राम अनुग जगु जान ।
लातहुँ मारें चढ़ति सिर नीच को धूरि समान ।। २२९ ।।

चौ० – उठि कर जोरि रजायसु मागा । मनहुँ बीर रस सोवत जागा ।।
बाँधि जटा सिर कसि कटि भाथा । साजि सरासनु सायकु हाथा ।।
आजु राम सेवक जसु लेऊँ । भरतहि समर सिखावन देऊँ ।।
राम निरादर कर फलु पाई । सोवहुँ समर सेज दोउ भाई ।।
आइ बना भल सकल समाजू । प्रगट करउँ रिस पाछिल आजू ।।
जिमि करि निकर दलइ मृगराजू । लेइ लपेटि लवा जिमि बाजू ।।
तैसेहिं भरतहि सेन समेता । सानुज निदरि निपातउँ खेता ।।
जौं सहाय कर संकरु आई । तौ मारउँ रन राम दोहाई ।।

दो० – अति सरोष माखे लखनु लखि सुनि सपथ प्रवान ।
सभय लोक सब लोकपति चाहत भभरि भगान ।। २३० ।।

चौ० – जगु भय मगन गगन भइ बानी । लखन बाहुबलु बिपुल बखानी ।।
तात प्रताप प्रभाउ तुम्हारा । को कहि सकइ को जाननिहारा ।।
अनुचित उचित काजु किछु होऊ । समुझि करिअ भल कह सबु कोऊ ।।

सत्य तेच ते बोलले, " नाथ ! माझे करणे अयोग्य मानू नये, भरताने आपले पूजन (छळणूक) थोडे केले नाही ! नाथांचे माझ्यावर कृपाछत्र आहे व माझ्या हातात धनुष्य आहे, मी जातिवंत क्षत्रिय असून, रघुकुलात माझा जन्म झाला; आणि जगात याला रामसेवक म्हणतात ! धुळीसारखे नीच तर कोणी जगात नाही ना ? पण तीसुद्धा लाथ मारताच (मारणारीच्या) डोक्यावर चढतेच ! " २२९.

एवढे बोलून लक्ष्मण उठले. हात जोडून जेव्हा आज्ञा मागितली तेव्हा निद्रिस्त असलेला वीररसच जणू जागा झाला असे वाटले. जटाजूट ठाकठीक बांधला; कमरेला भाता कसला, धनुष्य सज्ज करून हातात बाण घेतला; आणि आवेशयुक्त ते बोलू लागले,

" आज युद्धात भरताला चांगलाच धडा देऊन रामसेवक म्हणून यश घेतो. रामाचा अपमान करण्याचे फळ पदरी घेऊन ते दोघेही बंधू रणांगणावर कायमचे डोळे मिटोत ! सर्व समाज एकत्र होऊन आला, हा चांगलाच योग आज आला आहे. आता मागचा सर्व गिळलेला राग प्रकट केल्याशिवाय राहात नाही. सिंह ज्याप्रमाणे हत्तींच्या कळपाचा लीलेने फडशा पाडतो, किंवा जसा बहिरी ससाणा लावी पक्ष्यांची चटणी उडवतो, त्याचप्रमाणे, शत्रुघ्नासह भरताला, त्याच्या अफाट सेना-सागराबरोबरच खेळत खेळत तुडवून ठार करून टाकीन ! प्रत्यक्ष शंकर जरी भरताला मदत करण्याकरिता आले तरीही, रामाची शपथ घेऊन सांगतो की, रामाच्या शत्रूंना ठार मारल्याशिवाय मी आज मुळीच राहणार नाही ! "

लक्ष्मण संतापाने लाल झालेले पाहिले, त्याचप्रमाणे त्यांनी घेतलेली सत्य शपथ ऐकली आणि सर्व लोक व लोकपाल भयभीत झाले. ते इतके घाबरले की, आपापले लोक सोडून कुठेतरी सुरक्षित स्थळी पळून जाण्याच्या तयारीला ते लागले ! २३०.

याप्रमाणे थोडा वेळ सर्वच जग भयातुर झालेले पाहून आकाशवाणी झाली. तिने लक्ष्मणाच्या शौर्याची पुष्कळ प्रशंसा केली, " तात ! तुमचा प्रताप व प्रभाव कोण जाणणार व कोण वर्णन करू शकणार ? तथापि कोणतेही कार्य अयोग्य किंवा योग्य याचा अगोदर पूर्ण विचार करून, जे कामाला हात घालतात त्यांनाच

सहसा करि पाछें पछिताहीं । कहहिं बेद बुध ते बुध नाहीं ॥
सुनि सुर बचन लखन सकुचाने । राम सीयँ सादर सनमाने ॥
कही तात तुम्ह नीति सुहाई । सब तें कठिन राजमदु भाई ॥
जो अचवँत नृप मातहिं तेई । नाहिन साधुसभा जेहिं सेई ॥
सुनहु लखन भल भरत सरीसा । बिधि प्रपंच महँ सुना न दीसा ॥

दो० – भरतहि होइ न राजमदु बिधि हरि हर पद पाइ ।
कबहुँ कि काँजी सीकरनि छीरसिंधु बिनसाइ ॥ २३१ ॥

चौ० – तिमिरु तरुन तरनिहि मकु गिलई । गगनु मगन मकु मेघहिं मिलई ॥
गोपद जल बूड़हिं घटजोनी । सहज छमा बरु छाड़ै छोनी ॥
मसक फूँक मकु मेरु उड़ाई । होइ न नृपमदु भरतहि भाई ॥
लखन तुम्हार सपथ पितु आना । सुचि सुबंधु नहिं भरत समाना ॥
सगुनु खीरु अवगुन जलु ताता । मिलइ रचइ परपंचु बिधाता ॥
भरतु हंस रबिबंस तड़ागा । जनमि कीन्ह गुन दोष बिभागा ॥
गहि गुन पय तजि अवगुन बारी । निज जस जगत कीन्हि उजिआरी ॥
कहत भरत गुन सीलु सुभाऊ । पेम पयोधि मगन रघुराऊ ॥

जगात कोणीही बरे म्हणतात. परंतु उतावळेपणाने काही तरी करून नंतर पश्चात्ताप करत बसतात, ते शहाणे नव्हेत, असे ज्ञाते व वेदही सांगतात.”

ती आकाशवाणी कानी पडताच लक्ष्मण लाजले, परंतु राम व सीता यांनी त्यांचा आदरपूर्वक सन्मान केला. व नंतर राम म्हणाले, “ तात ! तुम्ही सांगितलेली राजनीती खरोखर सुंदरच आहे. बंधू ! इतर सर्व मदांपेक्षा राज्यमद कठीण असतो, हे अगदी खरेच. परंतु ज्यांना संतांची संगती लाभली नाही, त्या राजानाच हा राज्यमद पिऊन धुंदी चढते ! परंतु लक्ष्मण ! माझ्या भरतासारखा भला माणूस, ब्रह्मदेवाने निर्माण केलेल्या सर्व सृष्टीत पाहिला तर नाहीच, पण कानांनीसुद्धा ऐकावयास मिळाला नाही ! !”

“ हे लक्षात ठेव की, भरताला ब्रह्मदेव, हरी व हर यांच्या पदवीला जरी चढवले, तरीही त्याला चुकूनसुद्धा राज्यमद होणार नाही ! कांजीच्या शिंतोड्याने क्षीरसागर कधी तरी नासेल काय, सांग बरं ? २३१

“ घनदाट अंधःकाराने माध्यान्हीच्या सूर्याला गिळणे, सगळे आकाश एकाच ढगात साठवले जाणे, गायीच्या खुरा एवढ्या पाण्यात अगस्ति ऋषींचे बुडून जाणे, क्षमा हा आपला प्रकृतिस्वभाव पृथ्वीने सोडणे, एका चिलटाच्या फुंकराने मेरुपर्वत उडणे; या गोष्टी कालत्रयीही घडणार नाहीत, हे तर खास ना ? पण क्षणभर आपण समजू त्यासुद्धा झाल्या तरीही भरताला नृपमदाचा मुळींच स्पर्शही होणार नाही !!...” रामचंद्रांच्या भरत प्रेमाला भरती आली !—

“ लक्ष्मण ! तुझी शपथ व वडिलांची आण घेऊन सांगतो की, भरतासारखा शुद्ध प्रेमाचा भाऊ जगात दुसरा मिळायचा नाही ! बाळा ! सद्गुणरूपी दूध व अवगुणरूपी जल एकत्र करून ब्रह्मदेवाने ही सृष्टिरचना केली आहे. रविकुलरूपी मानस सरोवरात भरत हा हंस जन्मला आणि त्याने गुणदोषांचा क्षीर-नीर-विवेक केला. गुणरूपी पयाचा स्वीकार करून, अवगुणरूपी पाणी टाकले. अशी कर्तबगारी केल्यामुळे त्याच्या सुयशाने अखिल जगाला केवढा उजळा मिळाला.”

भरताच्या सद्गुणांचे त्याच्या असामान्य शीलाचे व प्रेमळ स्वभावाचे वर्णन करता करता स्वतः रघुवर त्या प्रेम सागरात निमग्न झाले–(देहभान विसरून जाऊन भरतचिंतनात गढून गेले.)

दो० — सुनि रघुबर बानी बिबुध देखि भरत पर हेतु ।
सकल सराहत राम सो प्रभु को कृपानिकेतु ।। २३२ ।।

चौ० — जौं न होत जग जनम भरत को । सकल धरम धुर धरनि धरत को ।।
कबि कुल अगम भरत गुन गाथा । को जानइ तुम्ह बिनु रघुनाथा ।।
लखन राम सियँ सुनि सुर बानी । अति सुखु लहेउ न जाइ बखानी ।।
इहाँ भरतु सब सहित सहाए । मंदाकिनीं पुनीत नहाए ।।
सरित समीप राखि सब लोगा । मागि मातु गुर सचिव नियोगा ।।
चले भरतु जहँ सिय रघुराई । साथ निषादनाथु लघु भाई ।।
समुझि मातु करतब सकुचाहीं । करत कुतरक कोटि मनमाहीं ।।
रामु लखनु सिय सुनि मम नाऊँ । उठि जनि अनत जाहिं तजि ठाऊँ ।।

दो० — मातु मते महुँ मानि मोहि जो कछु करहिं सो थोर ।
अघ अवगुन छमि आदरहिं समुझि आपनी ओर ।। २३३ ।।

चौ० — जौं परिहरहिं मलिन मनु जानी । जौं सनमानहिं सेवकु मानी ।।
मोरें सरन रामहि की पनही । राम सुस्वामि दोसु सब जनही ।।
जग जस भाजन चातक मीना । नेम पेम निज निपुन नबीना ।।

रघुवरांचे हे भाषण ऐकून व भरतावरील त्यांचे ते गाढ प्रेम पाहून सर्व देवानी प्रभूंची स्तुती केली की, " रामचंद्रासारखा कृपेचे माहेरघर असणारा समर्थ स्वामी कोणी तरी असेल काय ? " २३२

ते पुढे म्हणतात, " भरताचा जन्म जर जगात झाला नसता तर या धरणीवर व सर्व धर्मांची धुरा कोणी धारण केली असती ? अनेक कवी व ज्ञानी पुरुष यानासुद्धा भरताच्या सद्‌गुण-चरिताचा अंत लागत नाही; मग त्यांचे पूर्ण आकलन, हे रघुनाथ ! तुमच्याशिवाय दुसऱ्या कोणास होणार ? "

देवांच्या या भरत-गुण गायनाने लक्ष्मण, राम व सीता यांना अत्यंत सुख झाले, त्याचे वर्णन शब्दात करणे अशक्य आहे.

इकडे सर्व मंडळींच्यासह भरतानी मंदाकिनीच्या पवित्र जलात सकाळी स्नाने उरकली. त्यानंतर सर्व समाजाला नदीच्याच काठावर थांबण्यास सांगितले व माता, गुरू आणि सचिव यांची आज्ञा घेऊन; ज्या ठिकाणी सीता आणि रघुनाथांचे वास्तव्य होते, तिकडे जाण्यासाठी भरत निघाले. जाताना निषादनाथ व शत्रुघ्न यानांच फक्त बरोबर घेतले.

चालत असता जननीच्या करणीचे स्मरण होऊन भरत मनात लाजले व कोट्यवधी कुतर्क करण्यास लागले. त्यांना वाटले, ' राम, सीता व लक्ष्मण माझे नाव ऐकून आपले निवासस्थान सोडून दुसरीकडे तर कुठे जाणार नाहीत ना ? '

मातेच्याच बुद्धीचा मी असणार असे समजून राम जे जे करतील, ते सर्व अपुरेच होईल. पण आपल्या स्वतःकडे जर बघतील (शरणागतरक्षक, सेवक, हितकर, दयासागर इ.) तर माझ्या सर्व दोषांची व पातकांची क्षमा करून मला आदराने जवळ करतील. २३३

मी मलिन मनाचा, पापी आहे, असे समजून माझा जरी त्याग केला, किंवा सेवक मानून सन्मान केला तरीही मला स्वामीचे जोडेच (पादुकाच) खरा आश्रय देणारे आहेत. कारण स्वामींच्या ठिकाणी आवश्यक असणाऱ्या सर्व श्रेष्ठ गुणांचे राम आहेत व सर्व प्रकारचे दोष या दासाचे आहेत. राम हे चांगले स्वामी आहेत व दोष सर्व या दासाचा आहे. जगात खरोखर मासा व चातक हेच खरे यशाचे मानकरी आहेत, कारण माशाचे पाण्यावरील प्रेम व चातकाचा मेघाकडून एक बिंदू मिळावा म्हणून केलेला नेम, हे दोघे कोणत्याही स्थितीत आपला भाव नित्य नवा व शुद्ध ठेवण्यात खरे पटाईत आहेत.

अस मन गुनत चले मग जाता । सकुच सनेहँ सिथिल सब गाता ।।
फेरति मनहुँ मातु कृत खोरी । चलत भगति बल धीरज धोरी ।।
सब समुझत रघुनाथ सुभाऊ । तब पथ परत उताइल पाऊ ।।
भरत दसा तेहि अवसर कैसी । जल प्रबाहँ जल अलि गति जैसी ।।
देखि भरत कर सोचु सनेहू । भा निषाद तेहि समयँ बिदेहू ।।
दो० – लगे होन मंगल सगुन सुनि गुनि कहत निषादु ।
मिटिहि सोचु होइहि हरषु पुनि परिनाम बिषादु ।। २३४ ।।
चौ० – सेवक सत्य बचन सब जाने । आश्रम निकट जाइ निअराने ।।
भरत दीख बन सैल समाजू । मुदित छुधित जनु पाइ दुखारी ।।
ईति भीति जनु प्रजा दुखारी । त्रिबिध ताप पीड़ित ग्रह भारी ।।
जाइ सुराज सुदेस सुखारी । होहिं भरत गति तेहि अनुहारी ।।
राम बास बन संपति भ्राजा । सुखी प्रजा जनु पाइ सुराजू ।।
सचिव बिरागु बिबेकु नरेसू । बिपिन सुहावन पावन देसू ।।
भट जम नियम सैल रजधानी । सांति सुमति सुचि सुंदर रानी ।
सकल अंग संपन्न सुराऊ । राम शरन आश्रित चित्त चाऊ ।।

मनात अशा प्रकारचे तर्कवितर्क करीत मार्गाने जात असता लज्जा आणि स्नेह यांच्यामुळे भरताच्या सर्व शरीरात शैथिल्य आले. मातेने केलेले दोष जणू त्यांना मागे फिरवीत आहेत पण भक्तिबल व धीर या चाहुरी (चारबैल गाडीला जोडल्यावर पुढच्या जोडीला चाहुरी म्हणतात.) च्या जोरावर ते पुढे चालत आहेत, रघुनाथाच्या प्रेमळस्वभावाचे स्मरण होताच मात्र पावले भराभर पडून रस्ता ओसरे ! जलभ्रमराची जशी पाण्याच्याप्रवाहाने गती होते (प्रवाहातल्या धारेत सापडला की पुढे व बाजूस असला की उलट मागे) तशी यावेळी वाटेत चालत असता भरताची स्थिती झाली होती. भरताच्या अंतरीचे प्रेम व होणारा मनस्ताप पाहून निषादराजाही खराच विदेह झाला. त्याचे देहभान हारपले.

इतक्यात मंगल शकुन होऊ लागले. ते ऐकून व त्याचा विचार करून निषादराजा म्हणतो, " शोकाचा नाश होऊन हर्ष होईल परंतु शेवटी मात्र विषादच होईल. " २३४

गुहाची शकुनचिकित्सा सर्व बरोबर आहे असे समजून ते चालू लागले व लवकरच आश्रमाच्या सन्निध आले. ती वनराजी व तो पर्वतांचा समूह दिसू लागताच भुकेलेल्याला सुग्रास अन्न मिळावे तसा भरताना आनंद झाला.

ज्याप्रमाणे ईतीच्या भीतीने दुःखित झालेली, (अतिवृष्टी, अनावृष्टी, उंदीर, टोळ, पोपट, अंतर्गत यादवी व परचक्र या सात आपत्तीना ईती म्हणतात.) तसेच महामारी, ग्रहदशा व त्रिविधिताप, आधिभौतिक आधिदैविक व अध्यात्मिक) यांनी पिडलेली प्रजा, चांगला राजा असून, उत्तम देश आहे अशा ठिकाणी गेली असता, तिला जसे सुख होईल तशा प्रकारचे परम समाधान भरताच्या तप्त हृदयाला सहजच होऊ लागले.

प्रत्यक्ष रामच त्या वनात वसती करून राहत असल्यामुळे त्या वनात सर्व प्रकारची संपत्ती येऊन स्थिरावली होती. जणू उत्तम राजा मिळाल्यामुळे प्रजा अत्यंत सुखी आहे. या राजाचे राज्य कसे आहे पाहा. वैराग्य हा मुख्य प्रधान, विवेकयुक्त ज्ञान हा राजा, सुंदर व पवित्र वन हाच उत्तम प्रदेश, यम नियमादि * शूर सैनिक, चित्रकूट पर्वत ही राजधानी, शांती व सद्बुद्धी या शुद्ध अंतःकरणाच्या सुंदर राण्या, हा उत्तम नृपती राज्याच्या सर्व अंगांनी सुसज्ज आहे आणि त्याचे वैशिष्ट्य म्हणजे तो रामचरणाचा आश्रित असल्यामुळे त्याच्या मनाचा उत्साह अखंड टिकून राहतो.

---

* यम–अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह हे पाच यम. नियमः–शौच, संतोष, तप, स्वाध्याय व ईश्वरप्रणिधान हे पाच नियम.

दो० — जीति मोह महिपालु दल सहित बिबेक भुआलु ।
करत अकंटक राजू पुरँ सुख संपदा सुकालु ।। २४५ ।।

चौ० — बन प्रदेस मुनि बास घनेरे । जनु पुर नगर गाउँ गन खेरे ।।
बिपुल बिचित्र बिहग मृग नाना । प्रजा समाजु न जाइ बखाना ।।
खगहा करि हरि बाघ बराहा । देखि महिष बृष साजु सराहा ।।
बयरु बिहाइ चरहिं एक संगा । जहँ तहँ मनहुँ सेन चतुरंगा ।।
झरना झरहिं मत्त गज गाजहिं । मनहुँ निसान बिबिधि बिधि बाजहिं ।।
चक चकोर चातक सुक पिक गन । कूजत मंजु मराल मुदित मन ।।
अलिगन गावत नाचत मोरा । जनु सुराज मंगल चहु ओरा ।।
बेलि बिटप तृन सफल सफूला । सब समाजु मुद मंगल मूला ।।

दो० — राम सैल सोभा निरखि भरत हृदयँ अति पेमु ।
तापस तप फलु पाइ जिमि सुखी सिरानें नेमु ।। २३६ ।।

मास पारायण, बीसवाँ विश्राम

नवाह्नपारायण, पाँचवाँ विश्राम

चौ० — तब केवट उँचें चढ़ि धाई । कहेउ भरत सन भुजा उठाई ।।

या राजाचा जो शत्रू मोह व त्याचे अफाट सैन्य यांचा या विवेकभूपतीने आपल्या सहाय्यक सेनेच्या मदतीने धुव्वा उडविल्यामुळे आता तो आपल्या राजधानीत निष्कंटक असे राज्य सुखाने करत आहे. त्यामुळे त्याच्या राज्यात पिके उत्तम येतात, सर्व प्रकारची संपत्ती एकत्रित होते व प्रजा सकल सुखाने पूर्ण होऊन आनंदाने नांदते. २३५

अशा या सुख-समृद्धीच्या वनराज्यात, मुनींचे किती तरी आश्रम आहेत. ते आश्रम पाहिले म्हणजे या राज्यातील जणू हीच उत्तम पुरे, नगरे गावे व खेडी आहेत, असे वाटते. त्यामुळे राज्यातील अवर्णनीय असा मुख्य प्रजाजनांचा समूह म्हणजे या वनातील चित्र-विचित्र रंगाचे अनेक पक्षी व पशू हाच ठरतो. गेंडे, वाघ, रेडे व म्हशी, गायी, बैल, रानडुकरे, सिंह, हत्ती यांना पाहून त्यांची कोण किती स्तुती करणार ? हे सर्व पशू आपसातील वैर विसरून एकमेकांबरोबर अशा प्रेमाने फिरत असतात की जणू या राज्यातील ही चतुरंगिणी सेनाच सर्वत्र सुखाने फिरत आहे !

उत्कृष्ट पाण्याने भरून निर्झर धो धो वाहत आहेत व मत्त हत्ती संतुष्ट होऊन गर्जना करीत आहेत. या राज्यातील हेच जणू विविध नगारे वाजत आहेत ! चक्रवाक, चकोर, चातक, पोपट, कोकिळा व सुंदर हंस यांचे थवे असे प्रसन्न चित्ताने कूजन करीत आहेत की, हीच जणू या राज्यातील मंगल वाद्ये वाजत आहेत ! भुंग्यांचा गुंजारव, मोरांचे जागोजागी चाललेले नृत्य पाहिले म्हणजे वाटते की जणू या सुराज्यात ही सर्वत्र लग्नादिक मंगल कार्येच चालू आहेत ! वेली, वृक्ष व नानाप्रकारचे गवत, फुलांनी व फळांनी अगदी लगडलेले आहे. यामुळे येथील सर्वच समाज आनंद व मांगल्याचे माहेर आहे अशी खात्री पटते.

रामगिरीच्या या शोभेचा मनमुराद आस्वाद घेतल्यावर, एखाद्या तपस्व्याला, त्याच्या तपस्येचे फळ मिळाल्यानंतर, त्याच्या सर्व व्रत नियमांची सांगता करून तो जसा परम सुखी होतो, तसेच हृदयात सुप्रेम वाढून भरताचे पूर्ण समाधान झाले. २३६

त्या वनराजीच्या अनुपमेय सौंदर्याचा नयन-लाभ लुटण्यात भरत गर्क झाला असता निषादराजा धावत धावत एका उंच टेकडीवर जाऊन उभा राहिला आणि हात वर करून भरताला सांगू लागला " नाथ ! त्या

नाथ देखिअहिं बिटप बिसाला । पाकरि जंबु रसाल तमाला ॥
जिन्ह तरुबरन्ह मध्य बटु सोहा । मंजु बिसाल देखि मनु मोहा ॥
नील सघन पल्लव फल लाला । अबिरल छाहँ सुखद सब काला ॥
मानहुँ तिमिर अरुनमय रासी । बिरची बिधि सँकेलि सुषमा सी ॥
ए तरु सरित समीप गोसाँई । रघुबर परनकुटी जहँ छाई ॥
तुलसी तरुबर बिबिध सुहाए । कहुँ कहुँ सिय कहुँ लखन लगाए ॥
बट छायाँ बेदिका बनाई । सिय निज पानि सरोज सुहाई ॥

दो०—जहाँ बैठि मुनिगन सहित नित सिय रामु सुजान ।
सुनहिं कथा इतिहास सब आगम निगम पुरान ॥ २३७ ॥

चौ०—सखा बचन सुनि बिटप निहारी । उमगे भरत बिलोचन बारी ॥
करत प्रनाम चले दोउ भाई । कहत प्रीति सारद सकुचाई ॥
हरषहिं निरखि राम पद अंका । मानहुँ पारसु पायउ रंका ॥
रज सिर धरि हियँ नयनन्हि लावहिं । रघुबर मिलन सरिस सुख पावहिं ॥
देखि भरत गति अकथ अतीवा । प्रेम मगन मृग खग जड़ जीवा ॥
सखहि सनेह बिबस मग भूला । कहि सुपंथ सुर बरषहिं फूला ॥

विशाल वृक्षांना पाहा. ते ऽ पाहा पिंपरी, जांभूळ, आंबा व तमाल वृक्ष ! त्या सर्व सुंदर वृक्षांच्या अगदी मधोमध एक मोठा वटवृक्ष आहे तो दिसला का ?

" हा वड किती सुंदर आहे म्हणून सांगू ? त्याची शोभा व विस्तार त्याच्याकडे पाहिले की कोणाचेही मन मोहून जाते ! त्याची पाने खूप दाट असून निळसर रंगाची आहेत. आणि सर्वत्र लाल लाल फळे लटकली आहेत ! बरोबर दिसला ना ? छाया इतकी घनदाट आहे की तिन्ही त्रिकाळी तेथे आराम वाटतो ! त्या वडाच्या झाडाकडे पाहिले म्हणजे असे वाटते की जणू ब्रह्मदेवाने परम शोभेला एकत्र करून तिमिर व अरुण (काळोख व लालिमा) यांनी भरलेली एक रासच रचली आहे ! ! "

" स्वामी ! हे सर्व वृक्ष नदीच्या जवळ असून तिथेच रघुवरांची उत्तम पर्णकुटी आहे. ज्या ठिकाणी नानाप्रकारची छानदार तुळशीची झाडे आहेत. त्यातील काही सीतेने व काही लक्ष्मणांनी लावली आहेत. वडाच्या झाडाखाली सीतेने आपल्या करकमलांनी चांगला लांब, रुंद व एक हातभर उंच असा बसण्याकरता ओटा (वेदिका) घातला आहे. त्याच्यावर मुनिमंडळीसह बसून, सुजाण सीताराम नेहमी वेद, शास्त्र, पुराणे, इतिहास इत्यादि सर्व प्रकारच्या कथा श्रवण करीत असतात. " २३७

रामसख्याचे ते बरोबर कल्पना देणारे भाषण ऐकताच भरताचे डोळे त्या वटवृक्षावर खिळले आणि त्या विशाल नेत्रातून अश्रूंचे पूर वाहू लागले. आता लवकरच प्रत्यक्ष प्रभुचरण दर्शन होण्याइतके ते समीप आल्यामुळे हृदयात दाबून ठेवलेल्या रामप्रेमाला अनावर पूर आला ! भरत व शत्रुघ्न त्याच जागेपासून रामचंद्राच्या पर्णकुटीपर्यंत दण्डवत घालीत जाऊ लागले. त्या वेळच्या भरताच्या प्रीतीचे स्वरूप सांगण्यास शारदाही शरमते !

वाटेत कुठे रामचंद्राचे पाऊल उमटलेले दिसले की जणू जन्मदरिद्र्याला परीस लाभल्याप्रमाणे आनंद होऊन त्याकडे दोघे बंधू टक लावून पाहात. त्या ठिकाणची धूळ मस्तकाला हृदयाला आणि डोळ्यांना लावल्यावर रघुरायाच्या भेटीचे सुख त्यांना होई !

भरताच्या अंतःकरणाची त्यावेळेची ती अत्यंत प्रेमविव्हळ स्थिती सांगता न येण्यासारखी होती. त्यामुळे ती दिसताच पशुपक्षी जडजीवही प्रेममग्न झाले, मग त्या गुहाची दशा कशी झाली असेल ? तो इतका प्रेमविव्हळ झाला की, त्याचा रस्ताच चुकला ! तेव्हा देवांनी बरोबर वाट दाखवली व पुष्पवृष्टी केली ! भरताचा



निरखि सिद्ध साधक अनुरागे । सहज सनेहु सराहन लागे ।।
होत न भूतल भाउ भरत को । अचर सचर चर अचर करत को ।।

दो० –पेम अमिअ मंदरु बिरहु भरतु पयोधि गँभीर ।
मथि प्रगटेउ सुर साधु हित कृपासिंधु रघुबीर ।। २३८ ।।

चौ० –सखा समेत मनोहर जोटा । लखेउ न लखन सघन बन ओटा ।।
भरत दीख प्रभु आश्रमु पावन । सकल सुमंगल सदनु सुहावन ।।
करत प्रबेस मिटे दुख दावा । जनु जोगीं परमारथु पावा ।।
देखे भरत लखन प्रभु आगे । पूँछे बचन कहत अनुरागे ।।
सीस जटा कटि मुनि पट बाँधें । तून कसें कर सरु धनु काँधें ।।
बेदी पर मुनि साधु समाजू । सीय सहित राजत रघुराजू ।।
बलकल बसन जटिल तनु स्यामा । जनु मुनिबेष कीन्ह रति कामा ।।
कर कमलनि धनु सायकु फेरत । जिय की जरनि हरत हँसि हेरत ।।

दो० –लसत मंजु मुनि मंडली मध्य सीय रघुचंदु ।
ग्यान सभाँ जनु तनु धरें भगति सच्चिदानंदु ।। २३९ ।।

तो स्वाभाविक स्नेह पाहून सिद्ध व साधक यांच्यात रामचंद्राचे प्रेम निर्माण झाले व अशा अलौकिक स्नेहाची ते प्रशंसा करू लागले.

ते म्हणाले, " भरताचा जन्म या पृथ्वीतलावर होऊन त्याचा हा स्नेह जर प्रकट झाला नसता तर चरांना अचर व अचरांना चर कोणी केले असते ? " (पशू व पक्षी देहभान विसरून अचेतन जड बनले व वृक्ष-पाषाणादींना प्रेमाने पाझर फुटलेले सिद्धांना दिसले, म्हणजे ते चेतन बनले !) ते पुढे म्हणतात, " खरोखर कृपासागर रघुवीरांनी साधु व सुरांच्या हितासाठी भरत हाच अगाध क्षीरसागर, विरह-मंदराने घुसळल्यामुळे त्यातून हे अनुपमेय प्रेमामृत निघाले ! " २३८.

रामसख्यासह ती मनोहर जोडी घनदाट झाडीच्या आडून येत असल्यामुळे, लक्ष्मण पाहू शकला नाही. आता ही मंडळी आश्रमाच्या अगदी निकट आली. सर्व मंगलाचे शुभ निवासस्थान असा प्रभूचा सुंदर आश्रम भरताने एकदा डोळे भरून पाहिला !

योग्याला जणू परमार्थाचा लाभ होऊन सर्व प्रकारच्या दुःखातून व मनस्तापातून त्याची पूर्ण सुटका व्हावी, तशीच बरोबर सुखशांतीची स्थिती आश्रमाच्या परिसरात पाऊल टाकताच भरताच्या अनुभवास आली !

प्रभूच्या पुढे लक्ष्मण खडे असून, विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर प्रेमाने देत आहेत, असे दृश्य भरतास प्रथम दिसले. त्याच्या मस्तकावर जटा आहेत, मुनिवस्त्रे कमरेवर घट्ट परिधान केली असून त्यात परिधान केलेला भाता बांधला आहे. हातात बाण व खांद्यावर धनुष्य घेतले आहे.

वर वर्णन केलेल्या ओट्यावर (वेदीवर) साधू व मुनीमंडळींचा समाज बसला आहे आणि त्या मंडळीत सीतेसह रघुराज विराजमान झालेले आहेत ! वल्कले धारण केलेले, जटाधारी व श्यामवर्णाचे प्रभू व सीता असे दिसले की, जणू रती व मदन यांनीच मुनिवेष घेतला आहे. रघुराज आपल्या कमलासारख्या हातात धनुष्य व बाण फिरवीत असून, मंदहास्ययुक्त अशा केवळ कृपाकटाक्षानेच एकेकाचा मनस्ताप नाहीसा करीत आहेत.

मुनिमंडळामध्ये बसलेली सीता व रघुवंशाला चंद्राप्रमाणे प्रसन्न करणारे राम, असे विराजत आहेत की, जणू ज्ञान सभेमध्ये भक्ती व सच्चिदानंद ब्रह्मच शरीर धारण करून बसली आहेत ! २३९

चौ० – सानुज सखा समेत मगन मन । बिसरे हरष सोक सुख दुख गन ।।
पाहि नाथ कहि पाहि गोसाईं । भूतल परे लकुट की नाईं ।।
बचन सपेम लखन पहिचाने । करत प्रनामु भरत जियँ जाने ।।
बंधु सनेह सरस एहि ओरा । उत साहिब सेवा बस जोरा ।।
मिलि न जाइ नहिं गुदरत बनई । सुकबि लखन मन की गति भनई ।।
रहे राखि सेवा पर भारू । चढ़ी चंग जनु खैंच खेलारू ।।
कहत सप्रेम नाइ महि माथा । भरत प्रनाम करत रघुनाथा ।।
उठे रामु सुनि पेम अधीरा । कहुँ पट कहुँ निषंग धनु तीरा ।।

दो० – बरबस लिए उठाइ उर लाए कृपानिधान ।
भरत राम की मिलनि लखि बिसरे सबहि अपान ।। २४० ।।

चौ० – मिलनि प्रीति किमि जाइ बखानी । कबिकुल अगम करम मन बानी ।।
परम पेम पूरन दोउ भाई । मन बुधि चित्त अहमिति बिसराई ।।
कहहु सुपेम प्रगट को करई । केहि छाया कबि मति अनुसरई ।।

धाकटा भाऊ व रामसखा यांच्यासह भरताचे मन इतके त्या दर्शनात रमले की, हर्ष-शोक, सुख-दुःख इत्यादि सर्व द्वंद्वांचा त्याला अगदी विसर पडला. किंचित देह भानावर येताच, 'नाथ माझे रक्षण करा ! प्रभो, माझे रक्षण करा !' असे त्यांच्या मुखावाटे शब्द बाहेर पडत असताच त्यांचे शरीर एखाद्या छडीप्रमाणे जमिनीवर पडले.

पाठमोऱ्या स्थितीत पण सुपरिचित असल्याने ते प्रेमळ वचन लक्ष्मणांनी झटकन् ओळखले व भरत प्रणाम करीत आहेत, हे त्यांच्या लक्षात आले. *

एका बाजूस बंधु-स्नेहाचा जोर तर दुसऱ्या बाजूस सेवेची ओढ अतिशय; भरतास भेटताही येत नाही व त्यांच्याकडे दुर्लक्षही करता येत नाही ! लक्ष्मणांच्या मनाच्या या रस्सीखेचीचे वर्णन चतुर. कवी करतात की, उंच चढलेल्या पतंगाला खेळाडू ज्याप्रमाणे ओढतो (हातावेगळा होऊ देत नाही. तसेच सेवेची अधिक महती समजून –सेवा मुख्य मानून– लक्ष्मण स्वस्थ राहिले.) ×

पण दम निघेना ! म्हणून जमिनीवर सप्रेम डोके टेकून नमन केले व लगेच लक्ष्मण बोलले की, 'रघुनाथा भरत प्रणाम करीत आहेत !'

हे शब्द कानी पडले न पडले तोच, राम, प्रेमाने इतके अधीर झाले व झटकन् उठले की, कुठे भाता पडला, कुठे अंगावरचे वस्त्र पडले, कुठे उजव्या हातातील बाण गळून पडला व कुठे धनुष्य पडले, याचे त्यांना भानच उरले नाही !

धावत जाऊन बळेच, कृपानिधीने भरताला आपल्या हृदयाशी कवटाळला ! !

राम व भरत यांच्या या अलौकिक भेटीचे दृश्य पाहणारे देव व मुनी यांचे सर्व देहभान हरपले. २४०

श्रीराम-भरत भेटीची प्रीती वर्णन करून कशी सांगणार ? ती कोणत्याही कवीच्या कृति-मन-वाणीला न आकलन करता येणारी आहे !

दोन्ही भाऊ मन, बुध्दी, चित्त, अहंकार यांचे विस्मरण होऊन त्या जागी केवळ परम प्रेमाच्या श्रेष्ठ भावनेने सर्वस्वी भारून गेले आहेत. या निःसीम प्रेमाचे स्वरूप कोण स्पष्ट करील सांगा पाहू ? कवींच्या

---

* प्रभुसन्मुख उभे राहून प्रश्नाचे उत्तर देणे हा सेवाधर्म एका बाजूस व प्रिय बंधू भरत आल्याची वर्दी देणे ही स्नेहाची ओढ दुसरीकडे–

× भरतप्रेमाचा पतंग वर ओढतो आहे व सेवाधर्माची दोरी खेचली जात आहे.



कबिहि अरथ आखर बलु साँचा । अनुहरि ताल गतिहि नटु नाचा ॥
अगम सनेह भरत रघुबर को । जहँ न जाइ मनु बिधि हरि हर को ॥
सो मैं कुमति कहौं केहि भाँती । बाज सुराग कि गाँडर ताँती ॥
मिलनि बिलोकि भरत रघुबर की । सुरगन सभय धकधकी धरकी ॥
समुझाए सुरगुरु जड़ जागे । बरषि प्रसून प्रसंसन लागे ॥

दो० – मिलि सपेम रिपुसूदनहि केवटु भेंटेउ राम ।
भूरि भायँ भेंटे भरत लछिमन करत प्रनाम ॥ २४१ ॥

चौ० – भेंटेउ लखन ललकि लघु भाई । बहुरि निषादु लीन्ह उर लाई ॥
पुनि मुनिगन दुहुँ भाइन्ह बंदे । अभिमत आसिष पाइ अनंदे ॥
सानुज भरत उमगि अनुरागा । धरि सिर सिय पद पदुम परागा ॥
पुनि पुनि करत प्रनाम उठाए । सिर कर कमल परसि बैठाए ॥
सीयँ असीस दीन्हि मन माहीं । मगन सनेहँ देह सुधि नाहीं ॥
सब बिधि सानुकूल लखि सीता । भे निसोच उर अपडर बीता ॥
कोउ किछु कहइ न कोउ किछु पूँछा । प्रेम भरा मन निज गति छूँछा ॥
तेहि अवसर केवटु धीरजु धरि । जोरि पानि बिनवत प्रनामु करि ॥

बुध्दीने तरी कशाच्या आधारावर वर्णन करावे ? (गू. चं. पाहा.) कारण कर्म, मन व वचन यांनी ते स्पष्ट जाणणे अशक्य आहे.

कवींचे खरे बळ म्हणजे अक्षरे व त्यांचा अर्थ ! जसा एखादा नट तालाची गती पाहूनच नाचतो, तसा कवींचा सर्व खेळ अर्थ व अक्षरांवर चालणार !

परंतु रघुवर-भरतांचा स्नेह इतका अगम्य आहे की, ब्रह्मा, विष्णू व महेश यांच्या चित्तांचा नुसता त्याला स्पर्शही होऊ शकत नाही ! असल्या परम श्रेष्ठ स्नेहाचे, मी जड बुध्दीच्या सहाय्याने वर्णन कसे करणे शक्य ? हरळीच्या गाठाळ धाग्याने कधी सतारीप्रमाणे रागदारीचे स्वर निघू शकतील काय ?

रघुवर-भरत भेट पाहून देवांच्या समुदायाच्या हृदयात धडधडू लागले. मग सुरगुरू बृहस्पतींनी समजावले तेव्हा ते मंद बुध्दीचे शुध्दीवर आले. आणि त्यानी दोघांवर पुष्पवृष्टी करून प्रशंसा करण्यास प्रारंभ केला.

नंतर रामचंद्र प्रथम अत्यंत प्रेमाने शत्रुघ्नाला भेटले व नंतर त्यांनी निषादराजास भेट दिली ! लक्ष्मणाने भरतास प्रणाम करताच भरत त्यांना मोठ्या प्रेमभावाने भेटले. २४१

लगेच लक्ष्मण मोठ्या उत्कंठेने (हौसेने) शत्रुघ्नास भेटले व निषादराजासमुद्धा त्यांनी आलिंगन दिले.

भरत व शत्रुघ्नांनी मुनिमंडळींना नमस्कार करताच त्यानीही इष्ट आशीर्वाद दिल्यामुळे दोघा बंधूंना आनंद झाला.

आपल्या धाकट्या भावासह भरताने, अतिशय स्नेहादराने सीतेच्या चरणांची धूळ आपल्या मस्तकी धारण केली व वारंवार प्रणाम केले. तेव्हा सीतेने त्यांना उठवले त्यांच्या मस्तकांवर आपला करकमल ठेवून त्यांना बसवले. सीता त्यांना मनातल्या मनात आशीर्वाद देत असता तिच्या अंतःकरणात स्नेहला एवढी भरती आली की, ती देहभान विसरली !

(सीतेला आपल्या मातेच्यासह आपल्याविषयी बहुतेक तिरस्कार असावा अशा प्रकारची) स्वतःच्या कल्पनेनेच निर्माण केलेली भरताची भीती, सीता प्रसन्न पाहून, संपूर्ण नष्ट झाली व त्याचे मन चिंताविरहित झाले.

कोणाशी कोणी काय बोलावे हेही सुचेना ! कारण सर्वांचीच अंतःकरणे प्रेमभराने इतकी भारली गेली होती की संकल्पविकल्पात्मक झोके देऊन प्रेरणा देण्याचे मनाचे काम बंदच पडले होते.

दो० – नाथ साथ मुनिनाथ के सकल पुर लोग ।
सेवक सेनप सचिव सब आए बिकल बियोग ।। २४२ ।।

चौ० – सीलसिंधु सुनि गुर आगवनू । सिय समीप राखे रिपुदवनू ।।
चले सबेग रामु तेहि काला । धीर धरम धुर दीनदयाला ।।
गुरहि देखि सानुज अनुरागे । दंड प्रनाम करन प्रभु लागे ।।
मुनिबर धाइ लिए उर लाई । प्रेम उमगि भेंटे दोउ भाई ।।
प्रेम पुलकि केवट कहि नामू । कीन्ह दूरि तें दंड प्रनामू ।।
रामसखा रिषि बरबस भेंटा । जनु महि लुठत सनेह समेटा ।।
रघुपति भगति सुमंगल मूला । नभ सराहि सुर बरिसहिं फूला ।।
एहि सम निपट नीच कोउ नाहीं । बड़ बसिष्ठ सम को जग माहीं ।।
दो० – जेहि लखि लखनहु तें अधिक मिले मुदित मुनिराउ ।
सो सीतापति भजन को प्रगट प्रताप प्रभाउ ।। २४३ ।।

चौ० – आरत लोग राम सबु जाना । करुनाकर सुजान भगवाना ।।
जो जेहि भायँ रहा अभिलाषी । तेहि तेहि कै तसि तसि रुख राखी ।।
सानुज मिलि पल महुँ सब काहू । कीन्ह दूरि दुखु दारुन दाहू ।।

अशी ही सर्वांची विलक्षण स्थिती झालेली पाहून गुहाने धारिष्ट करून हात जोडले, प्रणाम केला व विनंतीपूर्वक तो म्हणाला, " नाथ ! सर्व माता, सचिव, नागरिक स्त्रिया व पुरुष, सेवक व सैनिक असे सर्व लोक आपल्या विरहाने व्याकुळ होऊन मुनिनाथांच्या [गुरु वसिष्ठांच्या] बरोबर आलेले आहेत ! २४२

' गुरु वसिष्ट आले आहेत ' येवढे शब्द कानी पडताच शीलाचा सागर असणाऱ्या रामांनी तत्काळ शत्रुघ्नास सीतेच्या संरक्षणासाठी ठेवून आपण अतिशय घाईने निघाले. याचे कारण ते धीर, धर्मधुरंधर व दीनदयाळ आहेत.

गुरुजींचे चरण दृष्टीस पडताच लक्ष्मणासह रामांच्या अंतःकरणात प्रेमादर उत्पन्न झाला व प्रभू असूनही दण्डवत प्रणाम करण्यास त्यांनी प्रारंभ केला. ते दिसताच गुरुश्रेष्ट धावतच आले. प्रेमभराने त्यांनी दोघा बंधूंना आपल्या हृदयाशी कवटाळले !

हे गुरु-शिष्यांचे श्रेष्ट प्रेम निषादराजाने पाहिले व त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले. त्याने आपले नाव सांगून लांबूनच दण्डवत् प्रणाम केला त्याबरोबर तो रामसखा आहे हे वसिष्ट गुरूंच्या आता अनुभवाने, अधिक परिचयाने व भरतसहवास-प्रेमाने ध्यानी येऊन त्याला ते अशा बळजबरीने आता भेटले की जणू काही जमिनीवर लोळणारे प्रेमच त्यांनी गोळा करून घेतले.

(राजा जमिनीवर दंडवत घालत मागे सरतो आहे व वसिष्ट धावत जाऊन त्याला उचलून घेण्याची शिकस्त करत आहेत हे दृश्य पाहून गोस्वामींनी वरील वर्णन केले आहे.)

तो सोहाळा पाहत असता आकाशातून देवांनी पुष्पवृष्टी केली व ते वर्णन करू लागले. रघुपतीची भक्ती सर्व मांगल्याचा पायाच कशी बनते पाहा. निषादासारखा पृथ्वीवर कोणी नीच नाही व वसिष्ट गुरूप्रमाणे दुसरा कोणीच श्रेष्ट नाही; परंतु लक्ष्मणापेक्षाही अधिक प्रेमाने मुनिश्रेष्ट याला भेटत आहेत ! सीतापतीच्या भजनाचा प्रभाव केवढा मोठा आहे याचे हे जगजाहीर उदाहरणच नव्हे काय ? २४३

करुणाकर, भगवान व सुजाण रामाला सर्वच लोक आर्त आहेत, हे कळताच, ज्यांच्या ज्यांच्या अंतःकरणात जशी जशी अपेक्षा होती, तशी त्यांची आवड पूर्ण केली. लक्ष्मणासह एका क्षणात सर्वांना भेटले व भयंकर विरहदुःख व त्यामुळे होणारी त्यांची अंतरीची आग पूर्ण शांत केली. ही फारच मोठी विस्मय-

यह बड़ि बात राम कै नाहीं । जिमि घट कोटि एक रबि छाहीं ॥
मिलि केवटहि उमगि अनुरागा । पुरजन सकल सराहहिं भागा ॥
देखी राम दुखित महतारीं । जनु सुबेलि अवलीं हिम मारीं ॥
प्रथम राम भेंटी कैकेई । सरल सुभायँ भगति मति भेई ॥
पग परि कीन्ह प्रबोधु बहोरी । काल करम बिधि सिर धरि खोरी ॥

दो०—भेटीं रघुबर मातु सब करि प्रबोधु परितोषु ।
अंब ईस आधीन जगु काहु न देइअ दोषु ॥ २४४ ॥

चौ०—गुरतिय पद बंदे दुहु भाई । सहित बिप्रतिय जे सँग आई ॥
गंग गौरि सम सब सनमानीं । देहिं असीस मुदित मृदु बानीं ॥
गहि पद लगे सुमित्रा अंका । जनु भेंटी संपति अति रंका ॥
पुनि जननी चरननि दोउ भ्राता । परे पेम ब्याकुल सब गाता ॥
अति अनुराग अंब उर लाए । नयन सनेह सलिल अन्हवाए ॥
तेहि अवसर कर हरष बिषादू । किमि कबि कहै मूक जिमि स्वादू ॥
मिलि जननिहि सानुज रघुराऊ । गुर सन कहेउ कि धारिअ पाऊ ॥
पुरजन पाइ मुनीस नियोगू । जल थल तकि तकि उतरेउ लोगू ॥

नक गोष्ट रामांनी केली, असे वाटण्याचे मुळीच कारण नाही ! कोटी घटांत, एका सूर्याला आपले प्रतिबिंब डण्यास किती वेळ लागतो ?

नागरिक लोक गुहाला मोठ्या प्रेमाने भेटण्यास उत्सुक आहेत, हे जाणून लोकांच्या इतकी लक्षावधी हांची रूपे प्रभूंनी प्रकट केली व ते रामलक्ष्मणाप्रमाणे गुहास भेटले आणि त्यांनी त्याच्या व आपल्या मोठ्या ाग्याची प्रशंसा केली.

रामांना सर्व माता इतक्या दुःखी दिसल्या की, जणू उत्तम वेलीच्या ओळी थंडीच्या कडाक्याने ुकून गेल्या आहेत.

सर्व मातांच्या अगोदर राम कैकेयीला भेटले व आपल्या अंतःकरणातील शुद्ध भक्तीच्या भावनेने व रळ स्वभावाने तिची दुष्ट बुद्धी पश्चात्तापाने अगदी भिजवून चिंब केली ! तिच्या पायावर आपले मस्तक वले व सर्व दोष, प्रतिकूल काळ व विधी आणि कर्म यांच्या माथी मारून तिचे सांत्वन केले.

त्यानंतर कौसल्या, सुमित्रेखेरीज सर्व मातांना भेटून त्यांचे समाधान व संतोष केला. शेवटी कैकेयीसमक्ष हणाले, " अंब ! ईश्वरेच्छेनेच सर्व जगाचा व्यवहार चालला असल्याने कोणालाच दोष देऊ नये हे बरे ! " २४४.

गुरुपत्नी अरुंधतीच्या चरणी दोघा बंधूंनी वंदन केले व त्याचप्रमाणे त्यांच्या बरोबर ज्या दुसऱ्या ब्राह्मण वासिनी आल्या होत्या, त्यांनाही नमस्कार केला. गंगा व गौरीप्रमाणे त्यांचा सन्मान केला. त्यांनी आनंदित ोऊन मधुरवाणीने रामलक्ष्मणाना शुभाशीर्वाद दिले.

त्यानंतर दोघे भाऊ सुमित्रेला वंदन करून तिच्या मांडीवर बसले, त्यावेळी जणू अत्यंत दरिद्र्याला ंपत्तीच भेटली !

पुढे दोन बंधू जेव्हा कौसल्येच्या चरणी पडले तेव्हा त्यांचे देह परम प्रेमाने व्याकुळ झाले. कौसल्येने या दोघांना हृदयाशी धरले व स्नेहामुळे नेत्रातून वाहणाऱ्या अश्रूंनी त्यांना न्हाऊ घातले ! मुक्याने चव सांगणे जसे अशक्य, त्याप्रमाणे त्या प्रसंगी वाहणाऱ्या हर्षविषादाचे वर्णन करून सांगणे कवीला सर्वस्वी अशक्य आहे ?

याप्रमाणे जननीला वंदन केल्यावर रघुपतींनी गुरू वसिष्ठांना आश्रमाला पाय लावण्याविषयी प्रार्थना केली.

मुनीश्वरांची आज्ञा मिळताच सर्व नागरिक आपापल्या सोयीप्रमाणे जागा व पाणी यांची चौकशी कर करून उतरू लागले.

दो ० —महिसुर मंत्री मातु गुर गने लोग लिए साथ ।
पावन आश्रम गवनु किय भरत लखन रघुनाथ ।। २४५ ।।

चौ ० —सीय आइ मुनिबर पग लागी । उचित असीस लही मन मागी ।।
गुरपतिनिहि मुनि तियन्ह समेता । मिली पेमु कहि जाइ न जेता ।।
बंदि बंदि पग सिय सबही के । आसिरबचन लहे प्रिय जी के ।।
सासु सकल जब सीयँ निहारीं । मूदे नयन सहमि सुकुमारीं ।।
परीं बधिक बस मनहुँ मरालीं । काह कीन्ह करतार कुचालीं ।।
तिन्ह सिय निरखि निपट दुखु पावा । सो सबु सहिअ जो दैउ सहावा ।।
जनकसुता तब उर धरि धीरा । नील नलिन लोयन भरि नीरा ।।
मिली सकल सासुन्ह सिय जाई । तेहि अवसर करुना महि छाई ।।

दो ० —लागि लागि पग सबनि सिय भेंटति अनुराग ।
हृदयँ असीसहिं पेम बस रहिअहु भरी सोहाग ।। २४६ ।।

चौ ० —बिकल सनेहँ सीय सब रानीं । बैठन सबहि कहेउ गुर ग्यानीं ।।
कहि जग गति मायिक मुनिनाथा । कहे कछुक परमारथ गाथा ।।
नृप कर सुरपुर गवनु सुनावा । सुनि रघुनाथ दुसह दुखु पावा ।।
मरन हेतु निज नेहु बिचारी । भे अति बिकल धीर धुर धारी ।।
कुलिस कठोर सुनत कटु बानी । बिलपत लखन सीय सब रानी ।।

ब्राह्मण, मंत्री, माता, गुरू आदि निवडक लोकांना बरोबर घेऊन लक्ष्मण, भरत, रघुपती पावन अशा आश्रमाकडे निघाले. २४५

मुनिवर आलेले दिसताच सीतेने पुढे येऊन त्यांच्या चरणांना वंदन केले. तेव्हा अपेक्षित व इष्ट अशा आशीर्वादाचा तिला लाभ झाला. त्यानंतर अरुंधतीसह दुसऱ्या ज्या मुनिपत्नी आल्या होत्या, त्या सर्वांना ती भेटली. त्यावेळच्या प्रेमाचे वर्णन करणे शक्य नाही. प्रत्येकीला वेगवेगळे असे सर्वांना सीतेने नमस्कार केले व तिला आवडणारे असे आशीर्वाद मिळाले.

परंतु सुकुमार सीतेने जेव्हा सासवांकडे पाहिले, तेव्हा भीतीने तिने एकदम् डोळे घट्ट मिटले ! ती मनात म्हणते, 'व्याधाच्या हातात या सर्व हंसिनी पडल्या काय ? दैवाने काय हा दुष्टपणा केला ? इकडे सीतेकडे पाहताच त्यांनाही अत्यंत दुःख झाले व मनातल्या मनात त्या म्हणतात, 'काय करायचे, दैव जे सोसावयास लावील तें सोसणे भागच आहे !

जनकसुतेने धीर धरून डोळे उघडले, पण नीलकमलासारखे तिचे ते सुंदर डोळे त्यावेळी अश्रूंनी भरले होते ! तशाच स्थितीत ती सर्व सासवांना जाऊन भेटली, तेव्हा सर्व पृथ्वीवर जणू करुणाच पसरली ! प्रयेकी चरण धर धरून ती अत्यंत प्रेमाने सर्व सासवांना भेटली. त्यांनीही प्रेमाने मनात, 'अखंड सौभाग्य भोगशील' असा आशीर्वाद तिला दिला. २४६

परंतु सीता आणि सर्व राण्या स्नेहाने व्याकुळ झाल्या आहेत, असे पाहून ज्ञानी गुरूंनी त्यांना बसावयास सांगितले. नंतर या जगातील सर्वच व्यवहार कसा मिथ्या आहे, ते समजावून देण्यासाठी काही समयोचित परमार्थाच्या कथा सांगितल्या.

थोडया वेळाने दशरथ राजांच्या स्वर्गवासाची जेव्हा त्यांनी हकीकत सांगितली, तेव्हा रघुनाथ अत्यंत दुःखी झाले ! त्यांतल्यात्यात, आपल्या पित्याच्या मृत्यूस आपल्यावरील प्रेमच कारणीभूत झाले हे समजल्यावर स्वतः धीरधुरंधर असूनही शोकाने फारच व्याकुळ झाले.

ते अप्रिय व वज्रासारखे कठोर भाषण कानी पडल्यावर लक्ष्मण, सीता आणि राणीवसा यांनी फारच

सोक बिकल अति सकल समाजू । मानहुँ राजु अकाजेउ आजू ॥
मुनिबर बहुरि राम समुझाए । सहित समाज सुसरित नहाए ॥
ब्रतु निरंबु तेहि दिन प्रभु कीन्हा । मुनिहु कहें जलु काहुँ न लीन्हा ॥

दो० – भोरु भएँ रघुनंदनहि जो मुनि आयसु दीन्ह ।
श्रद्धा भगति समेत प्रभु सो सबु सादरु कीन्ह ॥ २४७ ॥

चौ० – करि पितु क्रिया बेद जसि बरनी । भे पुनीत पातक तम तरनी ॥
जासु नाम पावक अघ तूला । सुमिरत सकल सुमंगल मूला ॥
सुद्ध सो भयउ साधु संमत अस । तीरथ आवाहन सुरसरि जस ॥
सुद्ध भएँ दुइ बासर बीते । बोले गुर सन राम पिरीते ॥
नाथ लोग सब निपट दुखारी । कंद मूल फल अंबु अहारी ॥
सानुज भरतु सचिव सब माता । देखि मोहि पल जिमि जुग जाता ॥
सब समेत पुर धारिअ पाऊ । आपु इहाँ अमरावति राऊ ॥
बहुत कहेउँ सब कियउँ ढिठाई । उचित होइ तस करिअ गोसाँई ॥

दो० – धर्म सेतु करुनायतन कस न कहहु अस राम ।
लोग दुखित दिन दुइ दरस देखि लहहुँ बिश्राम ॥ २४८ ॥

विलाप केला ! सर्व लोकही अत्यंत शोकाने इतके व्याकुळ झाले की, जणू भूपमरण आजच घडले !

मुनिवरानी पुनः रामाचे सांत्वन केल्यावर सर्व लोकांसह त्यांनी मंदाकिनीच्या त्या सुंदर पाण्यात स्नाने केली. त्या दिवशी प्रभूंनी अर्थात निर्जल व्रत केले. सर्वांनीच असे व्रत करण्याचे कारण नाही, असे मुनींनी सांगितले, तरीसुद्धा कोणी पाणीही घेतले नाही !

उजाडल्यावर मुनिश्रेष्ठांनी जशी आज्ञा दिली त्याप्रमाणे, श्रद्धा, भक्ती व आदरयुक्त होऊन जगदीशानी पित्याचे सर्व क्रिया-कर्मांतर केले ! २४७

वेदोक्त पद्धतीप्रमाणे पित्याचे सर्व और्ध्वदेहिक केल्यावर पातकरूपी अंधाराला सूर्यासारखे असणारे प्रभू पुनीत झाले ! पातकरूपी कापसाला ज्याचे नाम अग्नीप्रमाणे जाळते, ज्याचे स्मरण सर्व श्रेष्ठ मंगलांचे मूळ आहे, ते नित्य शुद्ध [बुद्ध, भगवान] शुद्ध झाले ! याबाबतीत सज्जनांचे मत असे आहे की, प्रभूंचे हे शुद्ध होणे म्हणजे प्रत्यक्ष गंगेत पुनः तीर्थांचे आवाहन करण्यासारखेच आहे ! गंगेत ती तीर्थे येऊन पावन होतात, त्याप्रमाणे येथे प्रभूच्या संसर्गाने ती कर्मे पुनीत झाली.

याप्रमाणे सर्व शुद्धी करणाऱ्या क्रिया होऊन दोन दिवस झाल्यानंतर राम, गुरु वसिष्ठांना प्रेमाने म्हणाले, " नाथ ! सर्वच लोकांना अत्यंत कष्ट होत आहेत. केवळ कंद, मूळ, व फळे खाऊन व पाणी पिऊन त्यांना दिवस कंठावे लागतात. अशा स्थितीत भरत, शत्रुघ्न, माता, सचिव इत्यादींना पाहात असता एकेक पळ मला युगासारखे त्रासदायक वाटते. नृपती स्वर्गात व आपण येथे, असे असल्यामुळे, सर्व समाजासह आपण लवकर अयोध्येला परतणे बरे असे मला वाटते. धिटाई करून मी इतके अधिक बोललो, मी फारच बोललो तथापि स्वामींनी पसंतीनुरूप इष्ट ते करावे.

त्यावर वसिष्ठ गुरू म्हणाले, ' राम ! तुम्ही धर्ममर्यादांचे स्थापन व पालन करणारे आहात, त्याचप्रमाणे दयेचे तर सर्वस्वी आश्रयस्थानच आहात, मग तुमच्या मुखातून असे शब्द बाहेर येणार नाहीत असे कसे होईल? परंतु आपल्या विरहामुळे दुःखी झालेल्या सर्व लोकांना आपल्या मुखाच्या दर्शनाने जो विसावा मिळतो आहे, तो त्याना दोन दिवस घेऊ द्या ! २४८.

चौ० — राम बचन सुनि सभय समाजू । जनु जलनिधि महुँ बिकल जहाजू ॥
सुनि गुर गिरा सुमंगल मूला । भयउ मनहुँ मारुत अनुकूला ॥
पावन पयँ तिहुँ काल नहाहीं । जो बिलोकि अघ ओघ नसाहीं ॥
मंगलमूरति लोचन भरि भरि । निरखहिं हरषि दंडवत करि करि ॥
राम सैल बन देखन जाहीं । जहँ सुख सकल सकल दुख नाहीं ॥
झरना झरहिं सुधासम बारी । त्रिबिध तापहर त्रिबिध बयारी ॥
बिटप बेलि तृन अगनित जाती । फल प्रसून पल्लव बहु भाँती ॥
सुंदर सिला सुखद तरु छाहीं । जाइ बरनि बन छबि केहि पाहीं ॥

दो० — सरनि सरोरुह जल बिहग कूजत गुंजत भृंग ।
बैर बिगत बिहरत बिपिन मृग बिहंग बहुरंग ॥ २४९ ॥

चौ० — कोल किरात भिल्ल बनबासी । मधु सुचि सुंदर स्वादु सुधा-सी ॥
भरि भरि परन पुटीं रचि रूरी । कंद मूल फल अंकुर जूरी ॥
सबहि देहिं करि बिनय प्रनामा । कहि कहि स्वाद भेद गुन नामा ॥
देहिं लोग बहु मोल न लेहीं । फेरत राम दोहाई देहीं ॥
कहहिं सनेह मगन मृदु बानी । मानत साधु पेम पहिचानी ॥

गुरुजींच्याकडे रामानी केलेली विनंती ऐकून सर्वच समाजाच्या तोंडचे पाणी पळाले ! जणू सागरात जहाज अगदी बुडण्याच्याच बेताला आले ! परंतु गुरुजींचे मंगलाला जन्म देणारे भाषण ऐकून प्राणघातक होणारा वाराच जणू प्राणरक्षक बनला !

मग काय, सर्व समाजात सर्वत्र आनंद पसरला. त्यांचा दिनक्रम आता सुखाने सुरू झाला. दर्शनानेच पापांची धावपळ उडविणाऱ्या मंदाकिनीच्या पावन जलात त्यांचे त्रिकाळ स्नान सुरू झाले. मंगलमूर्ती रामचंद्रांना आपल्या डोळ्यात पुनः पुन्हा भरून दण्डवत प्रणाम अनेक वेळा करून प्रेमभराने टक लावून ते पाहू लागले ! जेथे सर्व दुःखांचे निर्मूलन होऊन हाती सर्व सुखे अनायासे येतात, अशा त्या (कामदपर्वत) रामगिरीला व रामवनाला बघण्याकरता ते फिरू लागले !

वाटेत त्यांना अमृताप्रमाणे ज्यांचे पाणी अखंड वाहात आहे, असे झरे पाहावयास मिळत. त्याचप्रमाणे मंद सुगंध व शीतल असा वारा त्रिविधतापांचे (आधिभौतिक आध्यात्मिक व आधिदैविक) हरण करत असे. वृक्ष, वेली व गवत यांचे प्रकार तर अगणित असल्यामुळे त्यांना येणारी पाने फुले, फळे ही सर्व तशीच नानाप्रकारची दिसत. सुखकारक अशा वृक्ष छायेखाली निवांत बसण्याला योग्य अशा सुंदर शिळा पडलेल्या असत. अशा या वनराजीचे अपूर्व सौंदर्य कोण वर्णू शकणार !

एखादा तलाव पाहावयास मिळाला की, त्यात कमळे उत्तम फुललेली असावयाची, जलपक्ष्यांचे कूजन व भुंग्याचा मधुर गुंजारव कानावर येई. तसेच पशू व अनेक रंगाचे पक्षी आपसातील वैर विसरून त्या वनात स्वैर विहार करीत असलेले नजरेस पडत. २४९.

कोळी, कातकरी, भिल्ल वगैरे वनात राहणारे लोक, पवित्र, सुंदर व रुचकर मध, पानांच्या द्रोणात पुष्कळ भरून; तसेच कंद-मूळ-फळे व अंकुराच्या जुड्या सर्वांना नमस्कारपूर्वक विनंती करून देण्यास येत. त्या त्या पदार्थांची नावे, गुण व चव यांचीही ते मोठ्या उत्साहाने पुनः पुन्हा सांगून माहिती देत !

अयोध्यावासी लोक त्यांना पुष्कळ किंमत खुषीने देऊ लागत, पण ते चुकूनसुद्धा ती घेत नसत. अशा स्थितीत हे जिन्नस आम्ही तुमच्याकडून फुकट घेणार नाही म्हणून परत देऊ लागले की, ते रामाची शपथ घालीत. डोळ्यात आसवे येऊन सद्गदित होऊन मधुर वाणीने म्हणत, ' हे पाहा आपणासारखे साधु लोक अंतराचे प्रेम ओळखून सेवा मान्य करतात ! ' त्यांनी पुढे म्हणावे,—



तुम्ह सुकृती हम नीच निषादा । पावा दरसनु राम प्रसादा ।।
हमहि अगम अति दरसु तुम्हारा । जस मरु धरनि देवधुनि धारा ।।
राम कृपाल निषाद नेवाजा । परिजन प्रजउ चहिअ जस राजा ।।

दो०—यह जियँ जानि सँकोचु तजि करिअ छोहु लखि नेहु ।
हमहि कृतारथ करन लगि फल तृन अंकुर लेहु ।। २५० ।।

चौ०—तुम्ह प्रिय पाहुने बन पगु धारे । सेवा जोगु न भाग हमारे ।।
देब काह हम तुम्हहि गोसाँई । ईंधनु पात किरात मिताई ।।
यह हमारि अति बड़ि सेवकाई । लेहिं न बासन बसन चोराई ।।
हम जड़ जीव जीव गन घाती । कुटिल कुचाली कुमति कुजाती ।।
पाप करत निसि बासर जाहीं । नहि पट कटि नहि पेट अघाहीं ।।
सपनेहुँ धरम बुद्धि कस काऊ । यह रघुनंदन दरस प्रभाऊ ।।
जब तें प्रभु पद पदुम निहारे । मिटे दुसह दुख दोष हमारे ।।
बचन सुनत पुरजन अनुरागे । तिन्ह के भाग सराहन लागे ।।

छं०—लागे सराहन भाग सब अनुराग बचन सुनावहीं ।
बोलनि मिलनि सिय राम चरन सनेहु लखि सुखु पावहीं ।।

" खरोखर आम्ही अत्यंत नीच व आपण अत्यंत पुण्यवान् आहात. केवळ रामाच्या कृपेमुळेच आपल्या दर्शनाचा योग आला. नाहीतर मारवाडात ज्याप्रमाणे पावन गंगा दुर्लभ त्याचप्रमाणे आपले दर्शन आम्हाला येथे अशक्य ! परंतु कृपाळू रामचंद्रांनी निषादांच्यावर दयेची वृष्टी केली. मग सांगा बरे, परिजन आणि प्रजा राजानुरूपच नको का असायला ? म्हणून आपण संकोच सोडून आमच्या स्नेहाकडे पाहा, आणि आम्हाला कृतार्थ करण्यासाठी तरी कृपाळू होऊन आम्ही फळ, अंकुर इत्यादि जी गवताची काडी देऊ तेवढी घ्या .'२५०

" आपणासारखे प्रिय व थोर पाहुणे आमच्या वनात आले, परंतु आपली योग्य अशी सेवा करण्याइतके भाग्य आमच्या कुठे वाट्यास आले आहे ? हे स्वामी आम्ही आपणाला देऊन देऊन देणार तरी काय ? जे आमच्याजवळ असेल तेच ना ? जळणासाठी लाकडे व ती पेटण्यासाठी लागणारा झाडाचा पाला, हाच किराताच्या स्नेहापासून होणारा लाभ ! खरे म्हणजे, आम्ही तुमची वस्त्रे व भांडी चोरत नाही हीच, आम्ही तुमची मोठी सेवा करत आहो ! ! अनेक प्राण्यांची हिंसा करणारे आम्ही अडाणी लोक; स्वभावानेच दुष्ट, वाईट चालीचे, दुर्बुध्दी व जातीने नीच आहोत.

रात्रंदिवस पापे करण्यात आमचा जन्म जात असल्याने अंगभर वस्त्र अगर पोटभर अन्न आम्हाला कधीच मिळत नाही. धर्माने वागण्याची आवड, आमच्यापैकी कोणालाही यापूर्वी नुसती स्वप्नातसुद्धा उत्पन्न झाली नव्हती. परंतु आमच्यातील हा जो चांगुलपणा आज तुम्हाला दिसतो आहे, तो सर्व रघुनन्दनाच्या चरण दर्शनाचाच महिमा आहे ! प्रभुचरणकमल दृष्टीस पडल्यापासून आमची सर्व दुःसह दुःखे व दोष नावाला-सुद्धा उरले नाहीत ! "

त्या भिल्ल-किरातांचे हे भक्तिभावाचे भाषण ऐकत असता अयोध्यावासी नागरिकांचे अंतःकरण प्रेमाने भरून आले; आणि त्या अडाणी व पापी समजल्या जाणाऱ्या लोकांच्या श्रेष्ठ भाग्याची त्यांनी मनापासून प्रशंसा केली. त्यांची-बोलण्या—चालण्याची रीत व सीता-रामचरणी स्नेह या विषयी एकमेकाशी बोलत असता या नागरिकाना मोठे सुख झाले.

नर नारि निदरहिं नेहु निज सुनि कोल भिल्लनि की गिरा ।
तुलसी कृपा रघुबंसमनि की लोह लै लौका तिरा ।।

सो०—बिहरहिं बन चहु ओर प्रति दिन प्रमुदित लोग सब ।
जल ज्यों दादुर मोर भए पीन पावस प्रथम ।। २५१ ।।

चौ०—पुरजन नारि मगन अति प्रीती । बासर जाहि पलक सम बीती ।।
सीय सासु प्रति बेष बनाई । सादर करइ सरिस सेवकाई ।।
लखा न मरमु राम बिनु काहूँ । माया सब सिय माया माहूँ ।।
सीयँ सासु सेवा बस किन्हीं । तिन्ह लहि सुख सिख आसिष दीन्हीं ।।
लखि सिय सहित सरल दोउ भाई । कुटिल रानि पछितानि अघाई ।।
अवनि जमहि जाचति कैकेई । महि न बीचु बिधि मीचु न देई ।।
लोकहुँ बेद बिदित कबि कहहीं । राम बिमुख थलु नरक न लहहीं ।।
यहु संसउ सब के मन माहीं । राम गवनु बिधि अवध कि नाहीं ।।

त्या भिल्ल किरातांचे प्रेमळ भाषण ऐकून अयोध्यावासी स्त्री-पुरुषांनी, रामावरील आपल्या स्नेहाची निंदा केली ! ते म्हणाले,

"हे लोक स्वतःपापी व पतित; यांच्या संगतीने व दर्शनानेसुद्धा पुण्यक्षय होऊन पतित होण्याची भीती. म्हणजे, हे लोक, लोखंडासारखे स्वतः बुडून, संगतीच्या दुसऱ्या पदार्थांलाही बुडविणारे ! कडू भोपळे मात्र यांच्या उलट ! ते स्वतः पाण्यावर तरंगतात व त्यांच्या आधाराने दुसऱ्यानाही ते तारतात ! पण या वनात राहणाऱ्या या लोकांचे परिवर्तन पाहिले म्हणजे रामकृपेने काय चमत्कार होतो ते कळते. पहा, या लोखंडाच्या फळीवर ठेवलेले भोपळे घेऊन ती फळी पाण्यांत तरंगात आहे ! ही रघुवंशमणी रामाची कृपा की, लोखंड आपल्या पृष्ठभागावर नौकांना घेऊन परतीराला जाते; भोपळ्यांच्या पेटयाला आपल्या पृष्ठभागावर घेऊन लोखंड पाण्यावर तरत आहे !

पहिल्या पावसाने जसे मोर व बेडूक पुष्ट आणि तुष्ट होऊन विहार करतात, त्याचप्रमाणे अयोध्यावासी सर्व लोक दररोज मोठया आनंदाने त्या चित्रकूट पर्वतावरील वनातून चारी दिशांना स्वैर संचार करू लागले. २५१

चित्रकूटावर रामचंद्राच्या सान्निध्यात अयोध्यावासी जनांचा काळ इतका प्रेममग्न स्थितीत जाऊ लागला की, त्यांचे दिवस एका निमिषाप्रमाणे जाऊ लागले !

प्रत्येक सासूच्या सेवेकरिता सीतेने स्वतंत्र रूप घेऊन त्यांच्यात भेद न करिता तिने सर्वांची एक-भावाने शुश्रूषा केली. हे मर्म फक्त श्रीरामचंद्राशिवाय कोणीच जाणले नाही. इतरांची, एकच सीता असल्याची समजूत होती. याचे कारण सर्व मायेमध्ये श्रेष्ठ माया म्हणजे सीता ! अशा आदिमायेने स्वतः सेवा केल्यानंतर कोणती सासू संतुष्ट होणार नाही ? त्यांचे पूर्ण समाधान होऊन त्यांनी सीतेला उत्तम शिकवण व शुभाशीर्वाद दिले !

याप्रमाणे सर्वच सासवा जरी सारख्याच प्रसन्न झाल्या होत्या, तरी त्यापैकी एका सासूची स्थिती अगदी निराळी होती. सीतेचे शुद्ध सरळ वागणे व तशीच राम-लक्ष्मण या दोन्ही भावांची निष्कपटी अंतःकरणे पाहून कुटिल कैकेयी राणीस मात्र पूर्ण पश्चात्ताप झाला. आपल्या पोटात घेण्यासाठी तिने पृथ्वीची प्रार्थना केली पण ती भंगून कुठे ठाव देईना म्हणून कैकेयीने मरणासाठी यमाची विनवणी केली, पण विधी तेही कबूल करीना !

असे होणे साहजिकच आहे; कारण रामविमुखाला नरकातसुद्धा थारा मिळत नाही, असा लौकिक व्यवहार व वैदिक सिद्धान्त आहे आणि विद्वानसुद्धा तेच सांगतात.

असो. एवढा एक कैकेयीचा अपवाद सोडला तर बाकीचे सर्व लोक संपूर्ण सुखी होते. फक्त रामाला अयोध्येला परतविणारी विधिघटना घडणार की नाही, एवढाच संशय सर्वांच्या मनाला चटका लावत होता.



दो ० –निसि न नींद नहिं भूख दिन भरतु बिकल सुचि सोच ।
नीच कीच बिच मगन जस मीनहि सलिल सँकोच ।। २५२ ।।

चौ ० –कीन्हि मातु मिस काल कुचाली । ईति भीति जस पाकत साली ।।
केहि बिधि होइ राम अभिषेकू । मोहि अवकलत उपाउ न एकू ।।
अवसि फिरहिं गुर आयसु मानी । मुनि पुनि कहब राम रुचि जानी ।।
मातु कहेहुँ बहुरहिं रघुराऊ । राम जननि हठ करबि कि काऊ ।।
मोहि अनुचर कर केतिक बाता । तेहि महँ कुसमउ वाम बिधाता ।।
जौं हठ करउँ ते निपट कुकरमू । हरगिरि तें गुरु सेवक धरमू ।।
एकउ जुगुति न मन ठहरानी । सोचत भरतहि रैनि बिहानी ।।
प्रात नहाइ प्रभुहि सिर नाई । बैठत पठए रिषयँ बोलाई ।।

दो ० –गुर पद कमल प्रनामु करि बैठे आयसु पाइ ।
बिप्र महाजन सचिव सब जुरे सभासद आइ ।। २५३ ।।

चौ – ० बोले मुनिबरु समय समाना । सुनहु सभासद भरत सुजाना ।।
धरम धुरीन भानुकुल भानू । राजा रामु स्वबस भगवानू ।।
सत्यसंध पालक श्रुति सेतू । राम जनमु जग मंगल हेतू ।।
गुर पितु मातु बचन अनुसारी । खल दलु दलन देव हितकारी ।।

अशी संशयाकुल सर्वांची जरी मनःस्थिती होती, तरी भरताची तगमग विलक्षणच होती. या पावन चिंतेमुळे त्याला दिवसा भूक व रात्री झोप नसल्यामुळे, पाणी आटू लागल्यानंतर खोल चिखलात अडकलेला मासा जसा तडफडावा, तशी भरताची स्थिती होऊन तो हैराण झाला होता ! २५२

रात्रभर त्याच्या मनात विचार येत, ' साळीचे पीक पिकण्याच्या वेळी जसे एकाएकी ईती (पूर्वीची टीप पाहा.) चे भय उत्पन्न व्हावे, त्याप्रमाणे अगदी सुखाचे शिखर गाठण्याच्या वेळी, जननीला निमित्त करून काळाने कुचेष्टा केली ! रामांना अभिषेक कसा होणार, याविषयी उपाय सुसंबद्धपणे मनात टिकत नाही.

गुरुजींची आज्ञा वंद्य समजून राम खास परत फिरतील, परंतु रामचंद्राचा कल पाहूनच गुरुजी बोलणार ! आईचा शब्द खाली पडू द्यावयाचा नाही, म्हणून रघुराज परततील, परंतु ती आहे रामजननी ! ती कधीतरी हट्ट करील काय ? आणि मी बोलूनचालून पायाचा सेवक, त्यात दैव उलटे आणि वेळ खोटी ! अशाही स्थितीत जर मी हट्ट धरला तर ते परम पातक होणार ! कारण सेवकधर्म हा प्रत्यक्ष कैलासाहूनही जड आहे ! '

अशा रीतीने एकही उपाय मनाला पटेना व अशी चिंता चालू असताच पटकन् उजाडले. म्हणून स्नानादि उरकून प्रभूला प्रणाम केला व भरत खाली बसले. तोच वसिष्ठऋषींचे बोलावणे आले. लगेच तिकडे जाऊन त्यानी गुरुपदकमली प्रणाम केला व आज्ञा घेऊन ते खाली बसले. थोड्याच वेळात विप्रवृंद, महाजन, सचिव व इतर सर्व सभासद त्या ठिकाणी जमले. २५३

चित्रकूट खासगी सभा

योग्य वेळ झाली आहे हे ओळखून वसिष्ठ म्हणाले, " सर्व सभ्य लोकहो त्याचप्रमाणे सुजाण भरत ! माझे चार शब्द ऐकून घ्या. राजा राम हे भगवान् आहेत. तसेच त्याच्या स्वाधीन सर्व असून ते कोणाच्याही आधीन नाहीत. ते धर्मधुरीण आहेत. सूर्यकुलाचे सूर्य, सत्यसंधा श्रुतीच्या मर्यादा पाळणारे असून रामाचा जन्मच मुळी अखिल जगताचे मंगल साधण्यासाठी आहे गुरु, बाप, आई यांच्या आज्ञेप्रमाणे जरी ते वागणारे असले तरी देवांच्या हिताकरिता सर्व दुष्टांचे निर्दाळण करणे हे त्याचे ब्रीद आहे. नीती कशी, प्रेमाचे खरे स्वरूप व परमार्थ म्हणजे

नीति प्रीति परमारथ स्वारथु । कोउ न राम सम जान जथारथु ।।
बिधि हरि हरु ससि रबि दिसिपाला । माया जीव करम कुलि काला ।।
अहिप महिप जहँ लगि प्रभुताई । जोग सिद्धि निगमागम गाई ।।
करि बिचार जियँ देखहु नीकें । राम रजाइ सीस सबही कें ।।

दो ०–राखें राम रजाइ रुख हम सब कर हित होइ ।
समुझि सयाने करहु अब सब मिलि संमत सोइ ।। २५४ ।।

चौ ०–सब कहुँ सुखद राम अभिषेकू । मंगल मोद मूल मग एकू ।।
केहि बिधि अवध चलहिं रघुराऊ । कहहु समुझि सोइ करिअ उपाऊ ।।
सब सादर सुनि मुनिबर बानी । नय परमारथ स्वारथ सानी ।।
उतरु न आव लोग भए भोरे । तब सिरु नाइ भरत कर जोरे ।।
भानुबंस भए भूप घनेरे । अधिक एक तें एक बड़ेरे ।।
जनम हेतु सब कहँ पितु माता । करम सुभासुभ देइ बिधाता ।।
दलि दुख सजइ सकल कल्याना । अस असीस राउरि जगु जाना ।।
सो गोसाइँ बिधि गति जेहिं छेंकी । सकइ को टारि टेक जो टेकी ।।

काय, खरा स्वार्थ कसा साधावा, हे रामचंद्रांप्रमाणे यथार्थ कुणीच जाणू शकत नाही."

"ब्रह्मदेव, शंकर, विष्णू, चंद्र, सूर्य, दिक्पाल, माया, जीव, कर्म, काळ, शेष, भूपती, योग व त्यांच्या साह्याने मिळणारी सिद्धी जी वेदशास्त्रांत सांगितली आहे, या सर्वांच्या ठिकाणी असणारी प्रभुता-सामर्थ्य-सत्ता शक्ती इत्यादींचा मनाशी नीट विचार करून पाहा म्हणजे ध्यानात येईल की सर्वांना रामाच्या आज्ञेमध्येच वागावे लागते. ती ओलांडण्याची कोणालाही ताकद नाही!"

"म्हणून रामाची आज्ञा व रामाची आवड सांभाळण्यामध्येच आपले सर्वांचे कल्याण आहे."

"आपण सर्व सभ्य मंडळी जाणती असल्याने जे सर्वांना संमत होऊन योग्य वाटेल ते करावे." २५४

"रामचंद्रांना राज्याभिषेक करणे हीच सर्वांना सुखदायक गोष्ट असून सर्व मांगल्य व आनंद यांना आधारभूत असणारा तोच एक मार्ग आहे म्हणून रघुराज अयोध्येला परत कसे येतील या संबंधी आपण जसे मार्गदर्शन कराल तशी तजवीज तावडतोब करू."

राजनीती व परमार्थ यांच्याबरोबरच स्वार्थाचाही योग्य विचार ज्यात उत्तम प्रकारे केलेला आहे असे मुनिश्रेष्ठांचे भाषण सर्वांनी आदराने ऐकले.

परंतु वसिष्ठ गुरूंनी भाषणाच्या शेवटी जो प्रश्न टाकला होता त्याचे उत्तर देण्याची कोणाचीच कुवत नसल्याने सर्वच स्तंभित होऊन बसले.

सर्वच सभा अशी हतबुद्ध झालेली पाहून भरतांनी आपले मस्तक सर्वांच्यापुढे नमवले व हात जोडून बोलण्यास प्रारंभ केला.

"या सूर्यवंशात, एकापेक्षा एक थोर असे कितीतरी भूपती झाले. सर्वांच्या जन्माला आई-बाप हेच निमित्त कारण होऊन त्यांच्या कर्माचे शुभ अगर अशुभ फल देणारा विधाताच होता. अशी वस्तुस्थिती सर्वत्रच पाहावयास मिळत असली तरी त्या राजांच्या दुःखाचा बीमोड करून त्यांचे निश्चित कल्याण साधण्याची ताकद गुरुदेवा, आपल्या आशीर्वादात आहे, ही गोष्ट सर्व जगाला माहीत आहे! विधिगतीला अशाप्रकारे प्रतिबंध करणारे असे स्वामी आपणच आहात. आपण एकदा एखादी गोष्ट विशिष्ट प्रकारे करण्याचा निश्चय केल्यानंतर मग ती टाळण्याला कोण समर्थ आहे?

दो ० —बूझिअ मोहि उपाउ अब सो सब मोर अभागु ।
सुनि सनेहमय बचन गुर उर उमगा अनुरागु ।। २५५ ।।

चौ ० —तात बात फुरि राम कृपाहीं । राम बिमुख सिधि सपनेहुँ नाहीं ।।
सकुचउँ तात कहत एक बाता । अरध तजहिं बुध सरबस जाता ।।
तुम्ह कानन गवनहु दोउ भाई । फेरिअहिं लखन सीय रघुराई ।।
सुनि सुबचन हरषे दोउ भ्राता । भे प्रमोद परिपूरन गाता ।।
मन प्रसन्न तन तेजु बिराजा । जनु जिय राउ रामु भए राजा ।।
बहुत लाभ लोगन्ह लघु हानी । सम दुख सुख सब रोवहिं रानी ।।
कहहिं भरतु मुनि कहा सो कीन्हे । फलु जग जीवन्ह अभिमत दीन्हे ।।
कानन करउँ जनम भरि बासू । एहि तें अधिक न मोर सुपासू ।।

दो ० —अंतरजामी रामु सिय तुम्ह सरबग्य सुजान ।
जौं फुर कहहु त नाथ निज कीजिअ बचनु प्रवान ।। २५६ ।।

चौ ० —भरत बचन सुनि देखि सनेहू । सभा सहित मुनि भए बिदेहू ।।
भरत महा महिमा जलरासी । मुनि मति ठाढ़ि तीर अबला-सी ।।

" असे परम अधिकारी आपण असून आता आम्हाला उपाय विचारता व त्यासंबंधी अखेर मलाच बोलावे लागत आहे हेही एक माझे मोठेच अभाग्य आहे ! "

स्नेहभावाने भरपूर ओथंबलेले भरताचे हे भाषण ऐकून वसिष्ठ गुरूंचेही हृदय प्रेमाने भरून आले. २५५

थोडा वेळ शांतपणे विचार करून ते पुनः गंभीर शब्दात बोलू लागले, " तात ! तुम्ही म्हणाला ते सर्व सत्यच आहे. पण जे घडले तेही रामाच्याच कृपेने घडले. कारण रामविमुखाला कोणत्याच कामात, स्वप्नातही यश मिळणार नाही !

" आता, प्रस्तुत प्रश्नासंबंधी बोलण्यास आम्हास थोडा संकोच वाटतो. जेव्हा सर्वच नाश पावण्याचा प्रसंग येतो, तेव्हा विचारवंत, नाइलाजाने, अर्ध्याचा त्याग करण्यास खुषीने तयार होतात.

" त्यादृष्टीने तुम्ही दोघे बंधू जर वनवासाला गेला तर सीता लक्ष्मण-रघुराजांना परत फिरवू. "

हे सुंदर वचन कानी पडताच दोन्ही बंधूंना हर्ष झाला. त्यांची काया आनंदाने भरून गेली ! त्यांचे अशा प्रकारे उल्हासाने परिपूर्ण झालेले शरीर व मन तेजाने इतके चमकू लागले की, जणू दशरथराजे पुनः जिवंत झाले आहेत व रामांनी सिंहासन भूषविले आहे !

लोकांच्या दृष्टीने राम राजे होणे, हा मोठा लाभ व भरत शत्रुघ्नांनी वनवासास जाणे ही तुलनात्मक दृष्टीने कमी हानी ! परंतु राण्यांना सुख व दुःख या योजनेत सारखेच असल्याने त्यांनी भरत-शत्रुघ्न वियोगाच्या कल्पनेने रडण्यास सुरुवात केली.

भरतांनी सांगितले की, मुनिश्रेष्ठांच्या वचनाप्रमाणे केल्याने जगातील जीवमात्रांना इष्ट फलप्राप्ती होईल. हे ध्येय साधण्याकरिता मी चौदा वर्षेच काय पण जन्मभर वनात राहण्यास तयार आहे. कारण रामचंद्रांच्या राज्यस्वीकारापेक्षा मला अधिक श्रेष्ठ असे दुसरे कोणतेच सुख नाही !

" राम व सीता हे हृदयात आहेतच; आपण तर सर्वज्ञ असून जाणते आहात. मग हे नाथ ! आपण सुचविलेला उपाय जर खराच असेल, तर आपण आपले वचन सत्य करावेच ! " २५६

भरताचे हे भाषण ऐकले; त्याचा रामचरणी अलौकिक स्नेह पाहिला आणि सर्वच सभा व मुनीदेखील देहभान विसरले ! (विदेही झाले.)

भरताचा अगाध महिमा एखाद्या अथांग सागरासारखा दिसू लागला व त्यापुढे एखाद्या अबला स्त्रीप्रमाणे मुनींची बुद्धी त्या सागराच्या काठावर उभी राहिलेली दिसली !

गा चह पार जतनु हियँ हेरा । पावति नाव न बोहितु बेरा ॥
औरु करिहि को भरत बड़ाई । सरसी सीपि कि सिंधु समाई ॥
भरतु मुनिहि मन भीतर भाए । सहित समाज राम पहिं आए ॥
प्रभु प्रनामु करि दीन्ह सुआसनु । बैठे सब सुनि मुनि अनुसासनु ॥
बोले मुनिबरु बचन बिचारी । देस काल अवसर अनुहारी ॥
सुनहु राम सरबग्य सुजाना । धरम नीति गुन ग्यान निधाना ॥

दो ०—सब के उर अंतर बसहु जानहु भाउ कुभाउं ।
पुरजन जननी भरत हित होइ सो कहिअ उपाउ ॥ २५७ ॥

चौ ०—आरत कहहिं बिचारि न काऊ । सूझ जुआरिहि आपन दाऊ ॥
सुनि मुनि बचन कहत रघुराऊ । नाथ तुम्हारेहि हाथ उपाऊ ॥
सब कर हित रुख राउरि राखें । आयसु किएँ मुदित फुर भाषें ॥
प्रथम जो आयसु मो कहुँ होई । माथें मानि करौं सिख सोई ॥
पुनि जेहि कहँ जस कहब गोसाईं । सो सब भाँति घटिहि सेवकाईं ॥
कह मुनि राम सत्य तुम्ह भाषा । भरत सनेहँ बिचारु न राखा ॥

या सागराच्या पैलतीरास जाण्यासाठी ती विचारी काही उपाय शोधू लागली, पण नाव, तराफा, जहाज यापैकी कोणतेच साधन तिला मिळेना !

कारण भरताच्या या श्रेष्ठ महतीचे वर्णन कोण करू शकणार ? एखाद्या सरोवरातील शिंपल्यात सागराची का साठवण होईल ?

या भाषणामुळे मुनींच्या अंतःकरणात भरताबद्दलचे प्रेम अगोदर होते त्यापेक्षा आता अमर्यादच झाले.

भरताच्या प्रश्नाचे काहीच उत्तर न देता सर्व समाजासह मुनी सरळ रामाकडे गेले.

गुरू आले आहेत, असे दिसताच प्रभूंनी प्रणाम करून वसिष्ठांना शुभ आसन दिले. मुनिवरांची आज्ञा मिळताच सर्व मंडळी आपापल्या जागी बसली.

चित्रकूटावरील पहिला दरबार

सर्व मंडळी व्यवस्थित स्थानापन्न झालेली पाहून ती जागा, तो समय व तो प्रसंग यांचा शांतपणे विचार करून मुनिश्रेष्ठ म्हणाले, " हे पाहा राम ! आपण सर्वज्ञ असून, चतुर आहात. धर्मनीती, गुण व ज्ञान यांचे सागर आहांत. आपण सर्वांच्याच हृदयात निवास करीत असल्यामुळे कोणांचा सद्भाव कसा व कोणाचा कुभाव किती, हे आपणास बरोबर कळते. तरी आता अयोध्यावासी सर्व जनता, माता, व भरत यांचे हित साधण्याकरिता आपणच उपाय सांगावा ! २५७

" कारण दुःखाने तळमळत असलेला मनुष्य कधी विचारपूर्वक बोलत नसतो ! त्याचप्रमाणे जो जुगारी असतो, त्याला फक्त आपणच डाव जिंकावा असे वाटते. तशीच आमची सर्वांची स्थिती झाली असल्याने अपणच यातून योग्य मार्ग दर्शन करणे जरूर आहे."

मुनिश्रेष्ठांचे म्हणणे समजून घेतल्यावर रघुराजे म्हणाले, " नाथ ! सर्व उपाय आपल्याच हाती आहे ! आपल्या मनाप्रमाणे वागणे व आपली आज्ञा आनंदाने पाळणे यांतच सर्वांचे हित साधणार आहे.

" म्हणून प्रथम मला जी आज्ञा होईल ती शिरसावंद्य मानून मी ती संतोषाने पाळीन. त्यानंतर ज्यांना प्रभू जसे सांगतील त्याप्रमाणेच सर्व प्रकारे सगळे वागतील ! "

यावर मुनी म्हणाले, " राम ! तुम्ही जे सांगितले ते सत्यच आहे, परंतु भरताच्या स्नेहामुळे आता माझी



तेहि तें कहउँ बहोरि बहोरी । भरत भगति बस भइ मति मोरी ॥
मोरें जान भरत रुचि राखी । जो कीजिअ सो सुभ सिव साखी ॥

दो ० –भरत बिनय सादर सुनिअ करिअ बिचारु बहोरि ।
करब साधुमत लोकमत नृपनय निगम निचोरि ॥ २५८ ॥

चौ ० –गुर अनुरागु भरत पर देखी । राम हृदयँ आनंदु बिसेषी ॥
भरतहि धरम धुरंधर जानी । निज सेवक तन मानस बानी ॥
बोले गुर आयस अनुकूला । बचन मंजु मृदु मंगलमूला ॥
नाथ सपथ पितु चरन दोहाई । भयउ न भुअन भरत सम भाई ॥
जे गुर पद अंबुज अनुरागी । ते लोकहुँ बेदहुँ बड़भागी ॥
राउर जा पर अस अनुरागू । को कहि सकइ भरत कर भागू ॥
लखि लघु बंधु बुद्धि सकुचाई । करत बदन पर भरत बड़ाई ॥
भरतु कहहिं सोइ किएँ भलाई । अस कहि राम रहे अरगाई ॥

दो ० –तब मुनि बोले भरत सन सब सँकोचु तजि तात ।
कृपासिंधु प्रिय बंधु सन कहहु हृदय कै बात ॥ २५९ ॥

चौ ० –सुनि मुनि बचन राम रुख पाई । गुरु साहिब अनुकूल अघाई ॥
लखि अपनें सिर सबु छरु भारू । कहि न सकहिं कछु करहिं बिचारू ॥

विचारशक्तीच खलास झाली आहे. म्हणूनच मी पुनःपुन्हा सांगतो की भरताच्या भक्तीला माझी बुद्धी अत्यंत वश झाली आहे. याकरिता माझे मत असे आहे की भरताच्या इच्छेप्रमाणे जे कराल तेच सर्वांचे कल्याणकारक ठरेल ! आणि याला साक्ष प्रत्यक्ष सदाशिवच आहेत ! !

"तात्पर्य भरताची विनंती ऐकून घ्या. तिचा आदरपूर्वक पुनः विचार करा आणि शेवटी साधुमत, लोकमत, राजनीती व वेद यांचे जे उत्तम सार आपल्या दृष्टीने ठरेल ते करा." २५८

भरतावरील हे एवढे गुरुजींचे प्रेम पाहून रामाच्या हृदयात आनंदाला मोठी भरती आली. भरत धर्म-धुरंधर असून काया-वाचा-मनाने आपले अंतरंग जाणणारा एकनिष्ठ सेवक आहे, हे जाणून गुरुवचनाला अनुकूल असे मधुर, मनोहर व मंगलकारक वचन राम बोलले,

"नाथ ! आपली शपथ व पितृचरणांची आण घेऊन सांगतो की, भरतासारखा भाऊ या चौदा भुवनांत मिळावयाचा नाही. गुरुचरणकमलांच्या ठिकाणी ज्यांचे शुद्ध प्रेम असते तेच लौकिक मताने व वेदांच्या सिद्धान्ताप्रमाणे मोठे भाग्यवान असतात. म्हणून आपणासारख्या श्रेष्ठ गुरूजींचे ज्याच्यावर एवढे अपार प्रेम आहे अशा भरताच्या श्रेष्ठ भाग्याची, कोण यथायोग्य प्रशंसा करू शकेल ? भरत धाकटा भाऊ असल्यामुळे त्याच्या मोठेपणाची प्रशंसा त्याच्या तोंडावर करण्यास बुध्दीला संकोच वाटतो !

"एवढ्याकरता आता भरत जे म्हणतील तेच करणे चांगले" इतके बोलून राम स्तब्ध राहिले.

रामांचे भाषण संपले. भरत तर पुढे काहीच बोलत नाहीत असे दिसून आले तेव्हा, मुनी वसिष्ठ भरताला म्हणाले, "तात ! आता संकोच सोडून, आपल्या दयासागर प्रिय बंधूला तुझ्या हृदयात जे आहे ते सांग की एकदा !" २५९

गुरुजींचे भाषण ऐकले; रामाचे मन ध्यानी आले. त्यावरून गुरू व स्वामी राम पूर्ण अनुकूल आहेत, अशी खात्री झाली. परंतु आपल्याच शिरावर सर्व भार पडलेला पाहून काय बोलावे, हेच भरतांना समजेना ! म्हणून विचार करण्यास सुरुवात केली. अशा मनःस्थितीत असतानाच, अंगावर रोमांच उठलेले आहेत व

पुलकि सरीर सभाँ भए ठाढ़े । नीरज नयन नेह जल बाढ़े ॥
कहब मोर मुनिनाथ निबाहा । एहि तें अधिक कहौं मैं काहा ॥
मैं जानउँ निज नाथ सुभाऊ । अपराधिहु पर कोह न काऊ ॥
मो पर कृपा सनेहु बिसेषी । खेलत खुनिस न कबहूँ देखी ॥
सिसुपन तें परिहरेउँ न संगू । कबहुँ न कीन्ह मोर मन भंगू ॥
मैं प्रभु कृपा रीति जियँ जोही । हारेहुँ खेल जितावहिं मोही ॥

दो०—महूँ सनेह सकोच बस सनमुख कही न बैन ।
दरसन तृपित न आजु लगि पेम पिआसे नैन ॥ २६० ॥

चौ०—बिधि न सकेउ सहि मोर दुलारा । नीच बीचु जननी मिस पारा ॥
यहउ कहत मोहि आजु न सोभा । अपनीं समुझि साधु सुचि को भा ॥
मातु मंदि मैं साधु सुचाली । उर अस आनत कोटि कुचाली ॥
फरइ कि कोदव बालि सुसाली । मुकुता प्रसव कि संबुक काली ॥
सपनेहुँ दोसक लेसु न काहू । मोर अभाग उदधि अवगाहू ॥
बिनु समुझें निज अघ परिपाकू । जारिउँ जायँ जननि कहि काकू ॥
हृदयँ हेरि हारेउँ सब ओरा । एकहि भाँति भलेहिं भल मोरा ॥
गुर गोसाइँ साहिब सिय रामू । लागत मोहि नीक परिनामू ॥

कमळासारख्या नेत्रात प्रेमाश्रु भरले आहेत, असे भरत सभेत बोलण्यास उठले. " मुनिनाथांनी मला जे सांगावयाचे होते ते सांगून टाकले आहे. त्यापेक्षा अधिक उत्तम असे आता मी काय सांगू ? प्रभूंच्या स्वभावाची मला बरोबर जाणीव आहे. अपराध करणारावरसुद्धा रागावणे त्यांना माहीत नाही. माझ्यावर तर विशेषच कृपा व प्रेम ! खेळातदेखील कधी रागावलेले दिसले नाहीत. म्हणून अगदी बाळपणापासून त्यांचा संग मी सोडला नाही व त्यांनीही कधी माझा मनोभंग केला नाही. प्रभूंची माझ्यावर कृपा करण्याची जी रीत मी अनुभवली, तिचे काय वर्णन करू ! खेळातसुद्धा माझ्यावर हार आली असता मला जीत दिली ! !

" असे असल्यामुळे त्या प्रेमाला व अंतःकरणातील संकोचाला वश होऊन मी कधीही तोंडावर उलट बोललो नाही. आणि अद्यापही या प्रेमासाठी तहानलेल्या डोळ्यांची दर्शनाने तृप्ती झाली नाही. " २६०

" परंतु आमच्या दोघा भावांतील हे प्रेम दैवाला पाहवले नाही आणि त्या नीचाने नीच जननीच्या निमित्ताने आमच्या प्रेमात अंतर पाडले. पण हे बोलणेसुद्धा मला शोभत नाही. स्वतःच्याच मताने कोण साधू आणि सोवळा ठरला ?

" माझी आई दुष्ट आणि मी मात्र साधू आणि सदाचारी ! असे मनात आणणे हाच अपराध दुराचाऱ्यांच्या वर्गात मला सामील करतो. कोद्रवाच्या कणसातून कधी चांगल्या साळी निघाल्यात का ? काळ्याच्या शिंपल्यातून सुंदर मोती कधी निर्माण झाले आहे ? तसे पाहिले तर स्वप्नातसुद्धा कोणासही लेश मात्र दोष देणे चूक. कारण माझा अभाग्याचा सागरच अगाध आहे !

" आपल्या पातकांचा काय परिणाम होणार हे न ओळखता आपल्या जननीला भलभलते बोलून तिच्या हृदयात व्यर्थ आग पेटविली ना ? हृदयात सर्वप्रकारे शोधून शोधून थकलो. माझे हित करणारी आता फक्त एकच गोष्ट उरली आहे ती म्हणजे सीताराम माझे स्वामी आहेत व गुरू सर्व समर्थ प्रभू आहेत. म्हणूनच मनाला आधार वाटतो की, शेवटी माझे पुष्कळ कल्याणच होईल.



दो० –साधु सभाँ गुर प्रभु निकट कहउँ सुथल सति भाउ।
प्रेम प्रपंचु कि झूठ फुर जानहिं मुनि रघुराउ ॥ २६१ ॥

चौ० – भूपति मरन पेम पनु राखी। जननी कुमति जगतु सबु साखी ॥
देखि न जाहिं बिकल महतारीं। जरहिं दुसह जर पुर नर नारीं ॥
महीं सकल अनरथ कर मूला। सो सुनि समुझि सहिउँ सब सूला ॥
सुनि बन गवनु कीन्ह रघुनाथा। करि मुनि बेष लखन सिय साथा ॥
बिनु पानहिन्ह पयादेहि पाएँ। संकरु साखि रहेउँ एहि घाएँ ॥
बहुरि निहारि निषाद सनेहू। कुलिस कठिन उर भयउ न बेहू ॥
अब सबु आँखिन्ह देखेउँ आई। जिअत जीव जड़ सबइ सहाई ॥
जिन्हहि निरखि मग साँपिनि बीछी। तजहिं बिषम बिषु तामस तीछी ॥

दो० – तेइ रघुनंदनु लखनु सिय अनहित लागे जाहि।
तासु तनय तजि दुसह दुख दैउ सहावइ काहि ॥ २६२ ॥

चौ० – सुनि अति बिकल भरत बर बानी। आरति प्रीति बिनय नय सानी ॥
सोक मगन सब सभाँ खभारू। मनहुँ कमल बन परेउ तुसारू ॥
कहि अनेक बिधि कथा पुरानी। भरत प्रबोधु कीन्ह मुनि ग्यानी ॥
बोले उचित बचन रघुनंदू। दिनकर कुल कैरव बन चंदू ॥

" साधूंच्या सभेत प्रभू व गुरू यांच्या समीप, या तीर्थात, मी सद्भावनेने शेवटी एकच सांगतो की, माझ्यात शुद्ध प्रेम आहे की कपट आहे, मी बोलतो ते सत्य की खोटे हे मुनी व रघुराव बरोबर जाणतात. " २६१.

" आपल्या प्रेमाचा पण व प्रतिज्ञा पालन करून भूपती मरण पावले. कारण जननीला कुमती उत्पन्न झाली. याला सर्व भुवने साक्षी आहेत. या सर्वांचा परिणाम होऊन सर्व माता व्याकुळ झाल्या व दुःसह विरह-ज्वराने जळत असलेले नागरिक यांच्याकडे पाहवेना ! या सर्व अनर्थांच्या मुळाशी मीच आहे, हे ऐकून व समजून घेऊन मी अनेक प्रकारचे कष्ट सोसले.

" सीता व लक्ष्मणासह रघुनाथ मुनिवेष धारण करून वनात गेले, आणि अनवाणी पायी चालत गेले, हेही ऐकले; आणि शंकरसाक्षी आहेत की, या घावानेही मी अद्याप जगलो आहे ! निषादासारख्याचा जातिवंत जिव्हाळा पाहूनसुध्दा हे वज्राहून कठीण हृदय दुभंग झाले नाही ! आता येथे आल्यावर या डोळ्यांनी सर्व नीट प्रत्यक्ष पाहिले, तरीही हा जड जीव जिवंतपणीच सर्व यातना सोसवीत आहे !

" ज्यांना पाहून रस्त्यातील इंगळ्या व नागिणी यांनी आपला राग व भयंकर विष यांचासुद्धा त्याग केला, ते दोघे रघुनन्दन व सीता जिच्या चित्ताला शत्रू वाटले, त्या कैकेयीच्या पुत्राला सोडून दैवाने तरी दुःसह दुःख, आणखी कोणास सोसावयास लावावे ? " २६२.

अंतरीच्या वेदना, शुद्ध प्रेम, विनय व नीतियुक्त असलेली अतिव्याकुळ पण श्रेष्ठ अशी भरताची वाणी ऐकताच सर्वच सभा शोकाकुल होऊन अशी तळमळू लागली की जणु कमळांच्या वनात तीव्र असा हिमपातच झाला !

सर्वांत जास्त शोकाकुल भरतच झाल्यामुळे ज्ञानी वसिष्ठ मुनींनी प्राचीन अनेक प्रकारच्या कथा सांगून भरताचे सांत्वन केले.

त्यानंतरही भरताचे पूर्ण समाधान व्हावे या हेतूने दिनकर कुलरूपी चंद्रविकासिनी कमळांच्या वनास चंद्राप्रमाणे प्रसन्न करणारे रघुनन्दन रामचंद्र योग्य असे वचन बोलले.

तात जायँ जिहँ करहु गलानी । ईस अधीन जीव गति जानी ॥
तीनि काल तिभुअन मत मोरें । पुन्यसिलोक तात तर तोरे ॥
उर आनत तुम्ह पर कुटिलाई । जाइ लोकु परलोकु नसाई ॥
दोसु देहिं जननिहि जड़ तेई । जिन्ह गुर साधु सभा नहिं सेई ॥
दो० – मिटिहहिं पाप प्रपंच सब अखिल अमंगल भार ।
लोक सुजसु परलोक सुखु सुमिरत नामु तुम्हार ॥ २६३ ॥
चौ० – कहहुँ सुभाउ सत्य सिव साखी । भरत भूमि रह राउरि राखी ॥
तात कुतरक करहु जनि जाएँ । बैर पेम नहिं दुरइ दुराएँ ॥
मुनि गन निकट बिहग मृग जाहीं । बाधक बधिक बिलोकि पराहीं ॥
हित अनहित पसु पच्छिउ जाना । मानुष तनु गुन ग्यान निधाना ॥
तात तुम्हहि मैं जानउँ नीकें । करौं काह असमंजस जीकें ॥
राखेउ रायँ सत्य मोहि त्यागी । तनु परिहरेउ पेम पन लागी ॥
तासु बचन मेटत मन सोचू । तेहि तें अधिक तुम्हार सँकोचू ॥
ता पर गुर मोहि आयसु दीन्हा । अवसि जो कहहु चहउँ सोइ कीन्हा ॥
दो० – मनु प्रसन्न करि सकुच तजि कहहु करौं सोइ आजु ।
सत्यसंध रघुबर बचन सुनि भा सुखी समाजु ॥ २६४ ॥

" ईश्वराच्या आधीन जीवांची गती आहे हे समजल्यानंतरसुद्धा हे तात ! तुम्ही जे अत्यंत दुःख करता ते व्यर्थ आहे ! तुम्ही खरोखरच सर्वश्रेष्ठ पुण्यश्लोक आहात. कारण माझे मत असे आहे की त्रिभुवनात व त्रिकाळी जे पुण्यश्लोक झाले असतील व होतील त्या सर्वांचा क्रम तुमच्या खालीच राहील! तुमच्यावर जे कोणी मनातसुद्धा दुष्टपणा लादतील ते लोक आपला इह व परलोकीच्या कल्याणाचा नाश करतील! तेच अडाणी लोक तुमच्या आईला दोष देतील की ज्यानी गुरू आणि साधु सभा यांचे सेवन केलेले नाही.

" तुझ्या नावाचे नुसते स्मरण केले असता सर्व पातकांची द्वारे मिटतील! जन्ममरणाचे चक्र थांबेल ! ज्याला अमंगल म्हणतात त्या सर्वांचे निर्मूलन होईल. या जगात त्यांना सुयश लाभेल व परलोकी सुख सद्गती खास मिळेल ! २६३

" भरत ! शंकराला साक्षी ठेवून सांगतो की तुम्ही या पृथ्वीचे रक्षण केले तरच ती राहील नाहीतर नष्ट होईल. एवढा तुमचा महिमा असल्यामुळे व्यर्थ कुतर्क तात ! नका करू ! मनुष्याचे प्रेम अगर त्याच्या अंतःकरणातील वैर लपवून का कुठे लपते? पशुपक्ष्यांचाच व्यवहार पाहा, ते मुनिजनांच्या जवळ प्रेमाने जमतात, परंतु व्याधासारखे हिंसक दिसताच पळून जातात. याप्रमाणे पशुपक्ष्यांनासुद्धा जिथे आपले हित करणारा आणि अहित करणारा ओळखता येतो तेथे ज्ञान व अनेक गुणांचे भाण्डार असणारा मानवदेह ज्याना मिळाला, त्यांना शत्रुमित्र ओळखणे कठीण होईल काय ?

" तात ! तुमच्या अंतःकरणातील शुद्ध प्रेमाचे स्वरूप मी पूर्णपणे जाणतो. परंतु यावेळी मोठे धर्मसंकट पडले आहे, काय करू ? राजांनी माझा त्याग करूनही सत्याचे पालन केले; आणि आपल्या प्रेमाचा पण सिद्ध करण्याकरिता मरण स्वीकारले ! अशा श्रेष्ठ पुरुषाच्या वचनाला बाध आणणे मनाला फार कष्टदायक वाटते ! म्हणून वनात जाण्याचा निश्चयच पुढे चालू ठेवावा तर वडिलांच्यापेक्षाही तुमच्या जीवाची तळमळ पाहून अधिक संकोच वाटतो. अशाही स्थितीत गुरुजींनी आज्ञाच दिली असल्याने तुम्ही म्हणाल ते अवश्य करू ! एवढ्याकरता भीड सोडून प्रसन्न चित्ताने आज तुम्हाला जे वाटते ते जरूर सांगा. त्याची अंमलबजावणी खास होईल. "

सत्यप्रतिज्ञ अशा रघुवरांचे हे अनुकूल भाषण ऐकून सर्वच समाज अत्यंत सुखी झाला. २६४

चौ० — सुर गन सहित सभय सुरराजू । सोचहि चाहत होन अकाजू ॥
बनत उपाउ करत कछु नाहीं । राम सरन सब गे मन माही ॥
बहुरि बिचारि परस्पर कहहीं । रघुपति भगत भगति बस अहहीं ॥
सुधि करि अंबरीष दुरबासा । भे सुर सुरपति निपट निरासा ॥
सहे सुरन्ह बहु काल बिषादा । नरहरि किए प्रगट प्रहलादा ॥
लगि लगि कान कहहिं धुनि माथा । अब सुर काज भरत के हाथा ॥
आन उपाउ न देखिअ देवा । मानत रामु सुसेवक सेवा ॥
हियँ सपेम सुमिरहु सब भरतहि । निज गुन सील राम बस करतहि ॥

दो० — सुनि सुर मत सुरगुर कहेउ भल तुम्हार बड़ भागु ।
सकल सुमंगल मूल जग भरत चरन अनुरागु ॥ २६५ ॥

चौ० — सीतापति सेवक सेवकाई । कामधेनु सय सरिस सुहाई ॥
भरत भगति तुम्हरें मन आई । तजहु सोचु बिधि बात बनाई ॥
देखु देवपति भरत प्रभाऊ । सहज सुभाउँ बिबस रघुराऊ ॥
मन थिर करहु देव डरु नाहीं । भरतहि जानि राम परिछाहीं ॥
सुनि सुरगुर सुर संमत सोचू । अंतरजामी प्रभुहि सकोचू ॥
निज सिर भारु भरत जियँ जाना । करत कोटि बिधि उर अनुमाना ॥

कारण त्यांना आता रामचंद्र अयोध्येला परत येण्याची शक्यता जोराने वाटू लागली ! !

त्याचीच बरोबर प्रतिक्रिया देवलोकी पाहावयास मिळाली ! सर्व [illegible] देवेंद्राला धडकी भरली ! आता आपणाला अनिष्ट अशी घटना घडणार (रामचंद्र परत अयोध्येत जाणार) म्हणून त्यांनी शोक करण्यास सुरुवात केली. परंतु उपाय काय करावा, हे मात्र सुचेना. शेवटी मनाने सर्वच देव रामाला शरण गेले.

त्याचवेळी ते एकमेकास म्हणू लागले, ' अहो, रामाला शरण जाऊन काय उपयोग ? रघुपती हे भक्तांच्या भक्तीलाच वश असणार, तेथे तुमची-आमची दाद लागणार कशी ? अंबरिषाची बाजू धरून दुर्वासांना धडा दिल्याची कथा स्मरताच देव आणि देवेंद्र यांची पूर्ण निराशा झाली !

शोक चालू असताच त्यांच्या ध्यानी आले की, देवानी दीर्घकाळ दुःखे सहन केल्यानंतर अखेर प्रल्हादालाच त्यांची दया येऊन त्याने नरहरींना प्रकट केले ! अर्थात् देवापेक्षा भक्तालाच आता शरण गेले पाहिजे. त्यांनी आपले कपाळ बडवून घेण्यास प्रारंभ केला व [illegible] कानास लागून देव म्हणतात, " आता देवांची गती सर्वस्वी भरताच्याच हाती आहे, हे पक्के समजा. दुसरा उपायच नाही. कारण राम आपल्या एकनिष्ठ सेवकाच्या सेवेचाच मान राखतात. म्हणून आता प्रेमाने आपापल्या हृदयात भरताचेच स्मरण करा. अहो, त्याने आपल्या सद्गुणांनी व सुस्वभावाने रामाला पूर्णपणे वश केले आहे. "

देवांच्या अंतःकरणात हा ठाम निश्चय झाल्याचे पाहून देवगुरू म्हणाले, " देवहो ! तुम्ही खरोखर मोठे भाग्यवान आहात. कारण जगात सर्व सुमंगलांचे मूळ म्हणजे भरताच्या चरणी उत्पन्न झालेले प्रेम होय." २६५

सीतापतीच्या सेवकाचे चरणसेवन हे शेकडो कामधेनूंच्या इतके [illegible]. भरतांची भक्ती तुमच्या मनात उत्पन्न झाली, त्याचवेळी विधीने तुमचे कार्य साधले, आता कशाची चिंता करता ?

हे सुरेंद्रा ! भरताचा महिमा केवढा मोठा आहे पाहा की, त्यांना रघुराजा [illegible] विशेष वश (विवश) आहेत ! तरीपण देवांनो ! मनातील भीती पूर्णपणे काढून टाका; आणि त्याला शांत करा. कारण भरत रामाचीच पडछाया आहे असे समजा !—

देवांची चिंता व बृहस्पतींचे मन अंतर्यामी प्रभूंनी ऐकले व त्याना संकोच झाला.

त्याचवेळी आपल्या शिरावर सर्व भार पुनः येऊन पडला, हे पाहून, हृदयात नानाप्रकारचे उलटसुलट

करि बिचारु मन दीन्ही ठीका । राम रजायस आपन नीका ॥
निज पन तजि राखेउ पनु मोरा । छोहु सनेहु कीन्ह नहिं थोरा ॥

दो० — कीन्ह अनुग्रह अमित अति सब बिधि सीतानाथ ।
करि प्रनामु बोले भरतु जोरि जलज जुग हाथ ॥ २६६ ॥

चौ० — कहौं कहावौं का अब स्वामी । कृपा अंबुनिधि अंतरजामी ॥
गुर प्रसन्न साहिब अनुकूला । मिटी मलिन मन कलपित सूला ॥
अपडर डरेउँ न सोच समूलें । रबिहि न दोसु देव दिसि भूलें ॥
मोर अभागु मातु कुटिलाई । बिधि गति बिषम काल कठिनाई ॥
पाउ रोपि सब मिलि मोहि घाला । प्रनतपाल पन आपन पाला ॥
यह नइ रीति न राउरि होई । लोकहुँ बेद बिदित नहिं गोई ॥
जगु अनभल भल एकु गोसाईं । कहिअ होइ भल कासु भलाईं ॥
देउ देवतरु सरिस सुभाऊ । सनमुख बिमुख न काहुहि काऊ ॥

दो० — जाइ निकट पहिचानि तरु छाँह समनि सब सोच ।
मागत अभिमत पाव जग राउ रंकु भल पोच ॥ २६७ ॥

चौ० — लखि सब बिधि गुर स्वामि सनेहू । मिटेउ छोभु नहिं मन संदेहू ॥
अब करुनाकर कीजिअ सोई । जन हित प्रभु चित छोभु न होई ॥

तर्क करण्यास भरतांनी सुरुवात केली व शेवटी निश्चय केला की, रामांची आज्ञा पाळण्यातच माझे सर्व हित साठवले आहे; कारण आपला पण मोडून त्यांनी माझा पण राखला! अहाहा! माझ्यावर त्यांचा केवढा स्नेह आणि कृपा तर किती मोठी! सीतानाथांनी माझ्यावर सर्व प्रकारचे अगणित असे अतिशय अनुग्रह केले आहेत. विचारांचा प्रवाह येथपर्यंत येताच, आपले कमलासमान असलेले हात जोडून नमस्कार करून भरत बोलू लागले. २६६

"स्वामी! आता काय सांगू आणि सांगायला लावू? आपण कृपेचे सागर असून माझ्या अंतरीचे सर्व जाणणारे आहात. गुरुजी प्रसन्न आहेत व नाथही अनुकूल आहेत! हे पाहिल्यानंतर मनानेच कल्पना करून निर्माण केलेली सर्व दुःखे नष्ट झाली. वस्तुतः काळजी करण्यासारखे काहीच नव्हते, पण मी स्वतःच्या भीतीनेच भ्यालो, हे देव! एखादाची दिशा भूल झाली तर त्यात सूर्यनारायणाचा काय दोष?"

"माझे अभाग्य, जननीची कुटिलता, प्रतिकूल दैव, निष्ठुर काळ या सर्वांनी पण करून (पैज मारून) घाला घातला आणि माझा नाश केला; परंतु प्रभूंनी प्रणतपाल हा पण (ब्रीद) पाळला म्हणून वाचवले."

"अशा प्रकारे शरण येणाराचा प्रतिपाल करण्याची आपली रीत काही नवीन नाही. वेदांत व लोकांत ती प्रसिद्ध आहे, गुप्त मुळीच नाही! तसे पाहिले तर हे सर्व जग शत्रू असून खरे हित करणारे फक्त स्वामीच! मग कोणाच्या भलेपणाने आमचे भले होणार?" (स्वामींच्याच!)

"देवा आपला स्वभाव कल्पतरूसारखा आहे, कोणालाही कधी सन्मुख नाही की कोणाला विमुख नाही! असे असल्यामुळे या तरूचे हे स्वरूप जाणून जे त्याच्या जवळ जातात त्यांचा शोक चिंता इत्यादींचा नाश त्या तरूची छाया करतेच; पण मागितल्याबरोबर जे इष्ट असेल ते त्याला तत्काळ मिळते! मग मागणारा या जगातील कोणीही राजा, रंक, भला अगर बुरा असो त्याची कामना पूर्ण होतेच." २६७

माझे स्वामी व गुरू आपणच आहात आणि माझ्याबद्दलचे आपले उत्कट प्रेम इतके! हे पाहिल्यानंतर माझ्या हृदयाची सर्व तळमळ शांत झाली. मनात कोणत्याच प्रकारचा संशय उरला नाही.

"हे करुणाकरा! आता एवढेच करा की ज्यामुळे या दासासाठी प्रभूच्या चित्ताला लवमात्र क्षोभ

जो सेवकु साहिबहि सँकोची । निज हित चहइ तासु मति पोची ॥
सेवक हित साहिब सेवकाई । करै सकल सुख लोभ बिहाई ॥
स्वारथु नाथ फिरें सबही का । किएँ रजाइ कोटि बिधि नीका ॥
यह स्वारथ परमारथ सारू । सकल सुकृत फल सुगति सिंगारू ॥
देव एक बिनती सुनि मोरी । उचित होइ तस करब बहोरी ॥
तिलक समाजु साजि सबु आना । करिअ सुफल प्रभु जौं मनु माना ॥

दो ० —सानुज पठइअ मोहि बन कीजिअ सबहि सनाथ ।
नतरु फेरिअहिं बंधु दोउ नाथ चलौं मैं साथ ॥ २६८ ॥

चौ ० —नतरु जाहिं बन तीनिउ भाई । बहुरिअ सीय सहित रघुराई ॥
जेहि बिधि प्रभु प्रसन्न मन होई । करुना सागर कीजिअ सोई ॥
देवँ दीन्ह सबु मोहि अभारू । मोरें नीति न धरम बिचारू ॥
कहउँ बचन सब स्वारथ हेतू । रहत न आरत कें चित चेतू ॥
उतरु देइ सुनि स्वामि रजाई । सो सेवकु लखि लाज लजाई ॥
अस मैं अवगुन उदधि अगाधू । स्वामि सनेहँ सराहत साधू ॥

होणार नाही. कारण नीच बुध्दीचा सेवकच आपल्या स्वार्थासाठी धन्याला अडचणीत आणतो. आपल्या वैयक्तिक सुखाच्या कल्पनाना तिलांजली देऊन जो स्वामीच्या सेवेतच स्वतःचे हित पाहातो तोच खरा सेवक !

हे नाथ ! आपण अयोध्येस परत येण्यात आमचा सर्वांचाच स्वार्थ साधणार आहे आणि आपण दिलेल्या आज्ञेचे पालन करण्यात कोट्यवधी प्रकारचे कल्याण आहे हे तत्त्व म्हणजे खऱ्या अर्थाने स्वार्थाचे व परमार्थाचे सार असून सर्व प्रकारच्या पुण्याईचे ते फल आहे. इतकेच काय संपूर्ण शुभगतीचा तो एकमेव शृंगार आहे !

" हे देव ! प्रथम माझी एक विनंती मान्य करावी व नंतर जे योग्य वाटेल ते करावे ! राज्यटिळक आपणास करण्यासाठी सर्व सामग्री सज्ज करून बरोबर आणली आहे. हे प्रभो आपणास मान्य असल्यास तिचे सार्थक करावे."

" धाकट्या बंधूबरोबर (शत्रुघ्नासह) मला वनात पाठवून आपण अयोध्येस परतावे म्हणजे सर्व अयोध्यावासी सनाथ होतील."

" तसे करणे कोणत्याही कारणास्तव शक्य नसल्यास लक्ष्मण व शत्रुघ्न यांना अयोध्येस परत पाठवून प्रभूंनी मला आपल्याबरोबर वनात न्यावे ! " २६८

" नाहीतर, माझ्यासह तिन्ही बंधू वनात जातील व श्रीसीतेसह रघुनाथ अयोध्येस परत फिरतील."

" हे करुणासागरा ! ज्या योजनेने प्रभूचे मन प्रसन्न होईल, तेच करावे,"

" हे देव ! माझ्या मस्तकावर सर्व भार आपण दिला. परंतु मला ना नीती ना धर्माचा विचार ! आतापर्यंत मी जे बोलतो ते सर्व माझ्या स्वार्थासाठीच. आर्त मनुष्याच्या अंतःकरणात योग्यायोग्यतेचा विवेक कुठून उरणार ?

" खरोखर पाहता, स्वामींची आज्ञा ऐकल्यावर जो सेवक उत्तर देण्याचे अनुचित कर्म करतो, त्याला पाहून प्रत्यक्ष लज्जा लाजून मान खाली घालते. आणि मी अवगुणांचा एवढा सागर आहे की, तेच—उत्तर देण्याचे—पाप माझ्या हातून घडत आहे ! परंतु, आपण माझे स्वामी, प्रेमाला वश होऊन मला 'साधू' म्हणून माझी स्तुती करीत आहा ! "

अब कृपाल मोहि सो मत भावा । सकुच स्वामि मन जाइँ न पावा ॥
प्रभु पद सपथ कहउँ सति भाऊ । जग मंगल हित एक उपाऊ ॥

दो० — प्रभु प्रसन्न मन सकुच तजि जो जेहि आयसु देब ।
सो सिर धरि धरि करिहि सबु मिटिहि अनट अवरेब ॥ २६९ ॥

चौ० — भरत बचन सुचि सुनि सुर हरषे । साधु सराहि सुमन सुर बरषे ॥
असमंजस बस अवध नेवासी । प्रमुदित मन तापस बनबासी ॥
चुपहिं रहे रघुनाथ सँकोची । प्रभु गति देखि सभा सब सोची ॥
जनक दूत तेहि अवसर आए । मुनि बसिष्ठँ सुनि बेगि बोलाए ॥
करि प्रनाम तिन्ह रामु निहारे । बेषु देखि भए निपट दुखारे ॥
दूतन्ह मुनिबर बूझी बाता । कहहु बिदेह भूप कुसलाता ॥
सुनि सकुचाइ नाइ महि माथा । बोले चर बर जोरें हाथा ॥
बूझब राउर सादर साईं । कुसल हेतु सो भयउ गोसाईं ॥

दो० — नाहिं त कोसल नाथ कें साथ कुसल गइ नाथ ।
मिथिला अवध बिसेष तें जगु सब भयउ अनाथ ॥ २७० ॥

चौ० — कोसलपति गति सुनि जनकौरा । भे सब लोक सोक बस बौरा ॥
जेहिं देखे तेहि समय बिदेहू । नामु सत्य अस लाग न केहू ॥

" हे कृपाले ! ज्यात नाथांना संकोच होणार नाही, तीच गोष्ट मला आवडते असे निश्चित समजावे. प्रभूच्या चरणांची शपथ घेऊन सद्भावाने सांगतो की, सर्व सौमंगल्यासाठी एकच उपाय आहे—

संकोच सोडून सुप्रसन्न अंतःकरणाने प्रभू ज्याला जे सांगतील, ती आज्ञा शिरसामान्य करून सर्वच वागतील आणि भावी विघ्ने व आता उत्पन्न झालेला पेचप्रसंग यातून आपली सुटका होईल." २६९

याप्रमाणे भरताचे पवित्र भाषण श्रवण करून सर्वांना संतोष झाला, " साधू ! साधू ! " असा स्तुतिपाठ करून देवांनी पुष्पवृष्टी केली.

भरताच्या भाषणात अखेरचा निर्णय प्रभू रघुनाथांनीच द्यावयाचा असा समारोप झाल्याने आता रामचंद्रांकडून कोणता निर्णय बाहेर पडतो, या काळजीत सर्व अयोध्यावासी जनता पडली. इकडे तपस्वी, वनात राहणारे लोक राम वनातच राहणार, या आशेने आनंदित झाले.

अंतःकरणात सर्व बाजूंनी संकोच उत्पन्न होऊन काही काळ रघुनाथ स्वस्थ बसले. प्रभूंची ही अडचण ध्यानी येऊन सभेला हळहळ वाटू लागली.

जनकदूतांचे आगमन

सर्व सभा याप्रमाणे चिंतातुर झाली आहे, इतक्यात जनकराजांच्याकडून दूत आल्याचे वृत्त समजले. लगेच वसिष्ठ गुरुजींनी त्यांना तावडतोब बोलावून घेतले.

विनम्र होऊन दूतांनी मुनिश्रेष्ठांना प्रणाम केले. रामचंद्राचा तो वनवासी वेष त्यांच्या दृष्टीस पडताच त्यांना अत्यंत दुःख झाले.

मुनिवरांनी मिथिलेश्वराचे कुशल दूतांना विचारले तेव्हा त्या श्रेष्ठ दूतांना मोठा संकोच झाला. त्यांनी हात जोडले व मस्तक नमवून ते म्हणाले, " हे स्वामिन ! आपण आम्हाला जो आदरपूर्वक प्रश्न विचारला हेच हे नाथ ! आमच्या कुशलाला कारण आहे. नाहीतर प्रभो ! कोसलेश्वर दशरथमहाराजांच्या बरोबरच सर्व प्रकारचे कुशल संपले आहे ! त्यांच्या स्वर्गवासामुळे सर्व जगत अनाथ झाले आहे, परंतु त्यातल्या त्यात मिथिला आणि अयोध्या विशेषप्रकारे अनाथ झाल्या आहेत. २७०

अयोध्याधिपांच्या परलोकवासाचे वृत्त जेव्हा जनकपुरवासीयांच्या कानावर आले तेव्हा दुःखातिरेकाने

रानि कुचालि सुनत नरपालहि । सूझ न कछु जस मनि बिनु ब्यालहि ॥
भरत राज रघुबर बनबासू । भा [illegible] हृदयँ हराँसू ॥
नृप बूझे बुध सचिव समाजू । कहहु बिचारि उचित का आजू ॥
समुझि अवध असमंजस दोऊ । चलिअ कि रहिअ न कह कछु कोऊ ॥
नृपहिं धीर धरि हृदयँ बिचारी । पठए अवध चतुर चर चारी ॥
बूझि भरत सति भाउ कुभाऊ । आएहु बेगि न होइ लखाऊ ॥

दो० —गए अवध चर भरत गति बूझि देखि करतूति ।
चले चित्रकूटहि भरतु चार चले तेरहूति ॥ २७१ ॥

चौ० —दूतन्ह आइ भरत कइ करनी । जनक समाज जथामति बरनी ॥
सुनि गुर परिजन सचिव महीपति । भे सब सोच सनेहँ बिकल अति ॥
धरि धीरजु करि भरत बड़ाई । लिए सुभट साहनी बोलाई ॥
घर पुर देस राखि रखवारे । हय गय रथ बहु जान सँवारे ॥
दुघरी साधि चले ततकाला । किए बिश्रामु न मग महिपाला ॥
भोरहिं आजु नहाइ प्रयागा । चले जमुन उतरन सबु लागा ॥
खबरि लेन हम पठए नाथा । तिन्ह कहि अस महि नायउ माथा ॥
साथ किरात छ सातक दीन्हे । मुनिबर तुरत बिदा चर कीन्हे ॥

त्यांना भ्रमिष्ट बनवले. त्यावेळी ज्यांनी विदेहभूपतीना शोकविव्हळ स्थितीत पाहिले. त्यांना त्यांचे विदेह (देहाभिमानरहित) हे नाव खरे वाटणे शक्यच नव्हते. राणीच्या कपटकारस्थानाचे स्वरूप समजल्यावर तर मणिविरहित फणी (भुजंगा) प्रमाणे ते अगदी बेचैन झाले. भरताला राज्य व रघुवराचा वनवास पाहून मिथिलेशांच्या हृदयातसुद्धा भीती व विषाद उत्पन्न झाला.

त्यांनी मंत्री व विद्वान लोकांची सभा बोलावली आणि विचार करून या प्रसंगी काय करावे याचा निर्णय देण्यास सांगितले. अयोध्येची ती दुःस्थिती समजून व दोन्हीकडून पेच निर्माण झाल्याचे जाणून अयोध्ये-कडे चला किंवा मिथिलेतच राहा असे कोणीच काही बोलले नाही.

कोणाकडूनच कोणताही निर्णय मिळणे अशक्य हे पाहून राजानी धीर धरला व विचारपूर्वक हुषार अशा चार गुप्त जासूदांना अयोध्येस रवाना केले. त्याना जाताना बजावले की त्यानी रामा वरील भरताचे प्रेम किंवा द्वेष यांचा पूर्ण छडा लावून सत्वर परत यावे, कोणासही स्वतःचा पत्ता कळू देता कामा नये.

त्याप्रमाणे हे अयोध्येस गेले. भरताचा भाव जाणला, कृती पाहिली, व भरत चित्रकूटाकडे निघताच हेर मिथिलेस परतले. २७१

मिथिलेस परत येऊन जनकमहाराजांच्या सभेत भरतांच्या कृतीचे यथामती वर्णन केले. ते ऐकत असता गुरु, कुटुंबीय मंडळी, मंत्री व प्रत्यक्ष विदेहभूपती सर्वच स्नेह आणि शोक अशा मिश्र भावनांच्या भरतीने अत्यंत व्याकुळ झाले.

शेवटी धीर धरून राजांनी भरताची स्तुती केली व कसलेल्या शूर सैनिकांना व दरोग्यांना बोलावून घेतले. राजवाडा नगरी व देश यांच्या संरक्षणाची योग्य अशी तजवीज केली. हत्ती, घोडे, रथ व अनेक प्रकारची इतर वाहने सुसज्ज केली. सूर्योदयापूर्वी दोन घटकांचा गर्गाचार्य मुहूर्त साधून सर्व घाईने निघाले. वाटेत कुठेच विसावा घेण्यासही महाराज थांबले नाहीत ! पहाटेचे स्नान प्रयागावर उरकले; आणि लगेच प्रयाण करून सर्व मंडळी यमुनापार होऊ लागली. त्यानंतर आपणास खबर देण्यासाठी आमची रवानगी केली. "

इतके सांगून दूतांनी जमिनीवर मस्तक विनम्र केले.

बरोबर सहा-सात किरातांना देऊन मुनिनाथांनी दूतांना परत पाठविले.

दो० — सुनत जनक आगवनु सबु हरषेउ अवध समाजु ।
रघुनंदनहि सकोचु बड़ सोच बिबस सुरराजु ।। २७२ ।।

चौ० — गरइ गलानि कुटिल कैकेई । काहि कहै केहि दूषनु देई ।।
अस मन आनि मुदित नर नारी । भयउ बहोरि रहब दिन चारी ।।
एहि प्रकार गत बासर सोऊ । प्रात नहान लाग सबु कोऊ ।।
करि मज्जनु पूजहिं नर नारी । गनप गौरि तिपुरारि तमारी ।।
रमा रमन पद बंदि बहोरी । बिनवहिं अंजुलि अंचल जोरी ।।
राजा रामु जानकी रानी । आनँद अवधि अवध रजधानी ।।
सुबस बसउ फिरि सहित समाजा । भरतहि रामु करहुँ जुबराजा ।।
एहि सुख सुधाँ सींचि सब काहू । देव देहु जग जीवन लाहू ।।

दो० — गुर समाज भाइन्ह सहित राम राजु पुर होउ ।
अछत राम राजा अवध मरिअ माग सबु कोउ ।। २७३ ।।

चौ० — सुनि सनेहमय पुरजन बानी । निंदहिं जोग बिरति मुनि ग्यानी ।।
एहि बिधि नित्य करम करि पुरजन । रामहि करहिं प्रनाम पुलकि तन ।।
ऊँच नीच मध्यम नर नारी । लहहिं दरसु निज निज अनुहारी ।।
सावधान सबही सनमानहिं । सकल सराहत कृपानिधानहिं ।।

जनकमहाराज आल्याची बातमी ऐकून अयोध्यावासी सर्व नगरजनांना हर्ष झाला. रघुनंदानाना मोठा संकोच वाटू लागला तर देवेंद्राला शोकाने अगदी हैराण केले. २७२.

कुटिल कैकेयीला आतल्या आत पश्चात्तापाने जाळण्यास प्रारंभ केला, तिचे हातपाय गळले. आपल्या हृदयाची ही परमव्यथा ती कोणास सांगणार ? आणि दोष तरी कोणाला देणार ?

अयोध्येतील स्त्री-पुरुष ही बातमी ऐकताच हर्षित होऊन मनातल्या मनात म्हणू लागले, "फार बरं झालं; आता आणखी चार दिवस श्रीरघुनंदनचरण दर्शनाचा लाभ घेत आपणाला चित्रकूटावर रहावयास मिळणार !"

अशा कार्यक्रमात तो दिवस केव्हा पळाला ते कळलेही नाही व दुसऱ्या दिवशी सकाळी सर्व मंडळी प्रातःस्नानास निघाली. स्नानोत्तर स्त्रिया व पुरुष गणपती, गौरीशंकर व सूर्यनारायण यांचे पूजन उरकून रमारमणाच्या चरणवंदनास आले. पुरुष हात जोडून व स्त्रिया नम्रपणे पदर पसरून प्रार्थना करतात. "श्रीराम राजा होवो, श्रीजानकी राणी होवो, त्याचप्रमाणे अयोध्या राजधानी आनंदाचे शिखर गाठून पूर्ववत् सर्व समाजासह सुखाने वसू दे; श्रीरामचंद्र भरताना युवराजा करोत हे देव ! अशा प्रकारच्या सुखामृताचे आम्हा सर्वांवर सिंचन करून या जगातील जीवनाचा श्रेष्ठ लाभ आम्हाला द्यावा. गुरुवसिष्ठ सर्व अयोध्यावासी स्त्रिया, पुरुष आणि बंधू श्रीरामचंद्राचे राज्य अयोध्येत होवो. तसेच प्रभु रामचंद्र राजपद भोगत असलेले डोळ्यानी पहात असताच आमचा देह अयोध्येत पडो !"२७३

अशा प्रकारची अयोध्यावासीयांची प्रेममय वाणी ऐकून ज्ञानी मुनीदेखील आपल्या योग व वैराग्याची निंदा करू लागत !

याप्रमाणे आपले नित्यकर्म संपवून नगरजन, जेव्हा, भक्तिभावाने रामचंद्रांना प्रणाम करत, तेव्हा त्यांचे शरीर पुलकित होई ! उच्च, नीच व मध्यम अशा सर्व श्रेणीतील स्त्रिया व पुरुष आपापल्या अधिकाराप्रमाणे प्रभूंचे दर्शन घेत असत. त्या वेळी अत्यंत सावधानतेने प्रत्येकाचा योग्य तो सन्मान रघुनाथ करत असल्यामुळे सर्वच मंडळी त्या कृपानिधानाची मनःपूर्वक स्तुती करीतः—

लरिकाइहि तें रघुबर बानी । पालत नीति प्रीति पहिचानी ॥
सील सकोच सिंधु रघुराऊ । सुमुख सुलोचन सरल सुभाऊ ॥
कहत राम गुन गन अनुरागे । सब निज भाग सराहन लागे ॥
हम सम पुन्य पुंज जग थोरे । जिन्हहि रामु जानत करि मोरे ॥

दो ० — प्रेम मगन तेहि समय सब सुनि आवत मिथिलेसु ।
सहित सभा संभ्रम उठेउ रबिकुल कमल दिनेसु ॥ २७४ ॥

चौ ० — भाइ सचिव गुर पुरजन साथा । आगें गवनु कीन्ह रघुनाथा ॥
गिरिबरु दीख जनकपति जबहीं । करि प्रनामु रथ त्यागेउ तबहीं ॥
राम दरस लालसा उछाहू । पथ श्रम लेसु कलेसु न काहू ॥
मन तहँ जहँ रघुबर बैदेही । बिनु मन तन दुख सुख सुधि केही ॥
आवत जनकु चले एहि भाँती । सहित समाज प्रेम मति माती ॥
आए निकट देखि अनुरागे । सादर मिलन परसपर लागे ॥
लगे जनक मुनिजन पद बंदन । रिषिन्ह प्रनामु कीन्ह रघुनंदन ॥
भाइन्ह सहित रामु मिलि राजहि । चले लवाइ समेत समाजहि ॥

" अहो ! रघुवराचा हा बाणा अगदी बालपणापासून आमच्या परिचयाचा आहे. प्रत्येकाच्या प्रेमाची ओळख ठेवून ते नीतीचे उत्तम रक्षण करीत आलेले आहेत. खरोखर, श्रीरघुनाथ म्हणजे सुशील व भिडस्तपणा यांचा अगदी सागरच ! त्याचे सुंदर मुखकमल, सर्वदा सर्वांच्यावर प्रसन्न असल्याने किती मनोहर दिसते! आणि कृपा व प्रेमामृताची वृष्टी करणारे ते सुंदर नेत्रकमल किती रमणीय म्हणून सांगावे ? इतके असूनही कौसल्यानन्दनाचा स्वभाव तर कमालीचा सरळ ! "

याप्रमाणे श्रीरामचंद्राच्या गुणसमुच्चयाची स्तुती करत असता त्यांच्या हृदयातील प्रेमाला भरती येई व ते स्वतःच्याच भाग्याची शेवटी स्तुती करू लागत. ते म्हणत, ' या जगात आमच्या इतकी पुण्याची पुंजी बाळगणारे फारच थोडे असणार ! कारण राम आम्हाला प्रेमाने आपले समजतात;

अंतर्यामी अशा विचारसागरात मग्न असताच मिथिलेश आल्याची वर्दी आली. त्याबरोबर सर्व सभेसह, रविकुलरूपी कमलांचे सूर्य श्रीरामचंद्र, सादर झटकन उठले. २७४

बंधू , सचिव, वसिष्ठ गुरू व नागरिक यांच्यासह श्रीरघुनाथ जनकमहाराजांच्या निघाले.

इकडे गिरिश्रेष्ठ कामदनाथाचे दर्शन घडताच त्याना नमन करून जनक नृपती रथातून खाली उतरले. श्रीरामाच्या दर्शनाची लालसा सर्वांनाच लागल्याने एवढा उत्साह वाटत होता की त्यामुळे वाटचालीचे कष्ट किंवा थकवा यांचे नावच नव्हते ! उघडच आहे. जेथे श्रीरामचंद्र व जानकी तेथे सर्वांच्या मनाचा लय लागलेला मग मनावाचून नुसत्या शरीराला सुख दुःखाची शुद्धी कुठून असणार ?

अशाप्रकारे अत्युत्कट प्रेम भराने देहभान हरपलेल्या स्थितीत मिथिलापती आपल्या समाजासह पायी-पायी चालत येत आहेत !

दृष्टीच्या टप्प्यात येतांच अंतःकरणातील भक्तिभावाला पूर येऊन ही मंडळी एकमेकांना भेटण्यासाठी जवळ आली.

वसिष्ठादि मुनिजनांच्या पदकमली जनकानी वंदन केले. त्याचप्रमाणे शतानंद विश्वामित्र आदिकरून जनक पुरवासी ऋषिजनांना रघुनंदनानी (बंधूसह) प्रणाम केले. बंधूच्यासह रामचंद्र, राजा जनकांना भेटले व त्यांना त्यांच्या समाजासह आपल्या आश्रमाकडे नंतर घेऊन निघाले.

दो० —आश्रम सागर सांत सर पूरन पावन पाथु ।
सेन मनहुँ करुना सरित लिएँ जाहिं रघुनाथु ॥ २७५ ॥

चौ० — बोरति ग्यान बिराग करारे । बचन ससोक मिलत नद नारे ॥
सोच उसास समीर तरंगा । धीरज तट तरुबर कर भंगा ॥
बिषम बिषाद तोरावति धारा । भय भ्रम भवँर अबर्त अपारा ॥
केवट बुध बिद्या बड़ि नावा । सकहिं न खेइ ऐक नहिं आवा ॥
बनचर कोल किरात बिचारे । थके बिलोकि पथिक हियँ हारे ॥
आश्रम उदधि मिली जब जाई । मनहुँ उठेउ अंबुधि अकुलाई ॥
सोक बिकल दोउ राज समाजा । रहा न ग्यानु न धीरजु लाजा ॥
भूप रूप गुन सील सराही । रोवहिं सोक सिंधु अवगाही ॥

छं० —अवगाहि सोक समुद्र सोचहिं नारि नर व्याकुल महा ।
दै दोष सकल सरोष बोलहिं बाम बिधि कीन्हो कहा ॥
सुर सिद्ध तापस जोगिजन मुनि देखि दसा बिदेह की ।
तुलसी न समरथु कोउ जो तरि सकै सरित सनेह की

त्यावेळी असे वाटले की श्रीरामचंद्रांचा आश्रम हाच कोणीएक शांतरसरूपी पवित्र जलाने अथांग असलेला सागर असून जनक राजांची सेना ही एक करुणरसाची नदी आहे आणि त्या सागराला या नदीने मिळावे म्हणून श्रीरघुनाथ तिला नेत आहेत ! २७५

तिला एवढा पूर आला आहे की की तिने ज्ञान-वैराग्यरूपी आपल्या उंच तीराना बुडविले आहे. लोकांच्या मुखातून बाहेर पडणारी शोकवचने हेच नद व नाले तिला मिळत आहेत. मिथिलावासी नरनारींच्या मुखातून शोकातिरेकाने निघणारे उसासे याच त्या करुणारसनदीच्या जलावरील वायूच्या प्रचंड लाटा होऊन त्या तिच्या काठावरील विशाल धैर्यवृक्षाना समूळ उपटून टाकत आहेत ! भावी दुःखाची धार मधून सपाट्याने वाहात असून तिच्यात मोह व भ्रमरूपी भोवरे असंख्य चक्रांप्रमाणे फिरत आहेत !

मिथिलावासी जनतेतील शहाणी माणसे ही नावाडयाप्रमाणे असून ब्रह्मविद्याहीच एक मोठी नाव आहे. पण त्या नावाडयाना या महापूर आलेल्या करुणारस-नदीची अटकळच येत नसल्याने तीत आपली ज्ञान नौका कशी सोडावी व कशी चालवावी याचे सोडण्याचे त्याना धाडसच होईना !

वनात फिरणारे बिचारे कोळी आणि किरात हे वाटसरू असून त्यांनी या करुणारसनदीचा पूर पाहून, मनात हार खाल्याने हात टेकले ! अशा स्थितीत जेव्हा ती नदी आश्रमसागराला येऊन मिळाली तेव्हा तो व्याकुळ झाल्यामुळे क्षुब्ध होऊन उफाळला !

दोन्ही राजांचे समाज इतके शोकाकुल झाले की त्यांच्यात ज्ञान धैर्य व लाज ही उरलीच नाही ! स्वर्गस्थ दशरथ महाराजांचे सद्गुण, स्वरूप व सुशील यांच्या स्तुतीला प्रारंभ होऊन सर्वच लोक रडून इतका आक्रोश करू लागले की जणू शोकसागरात ते आता बुडयाच मारत आहेत !

शोकसागरात मग्न झालेल्या त्या स्त्रीपुरुषांनी इतके रुदन केले की, ते अत्यंत व्याकुळ झाले ! संतप्त होऊन ते विधीला दोष देत व म्हणत, 'हाय ! हाय ! प्रतिकूल विधात्याने काय केले हे ?'

देवता, सिद्ध, तपस्वी, योगी आणि मुनिसमुदाय यापैकी ज्यांनी ज्यांनी विदेहांची त्या वेळेची स्थिती पाहिली त्यापैकी कोणीच जनकांना त्या प्रेमनदीतून पैल तीरास नेण्यास समर्थ नव्हता. कारण प्रत्येक जण त्यांच्याप्रमाणेच त्यावेळी प्रेम विव्हळ झाला होता.

सो० — किए अमित उपदेस जहँ तहँ लोगन्ह मुनिबरन्ह ।
धीरजु धरिअ नरेस कहेउ बसिष्ठ बिदेह सन ।। २७६ ।।

चौ० — जासु ग्यानु रबि भव निसि नासा । बचन किरन मुनि कमल बिकासा ।।
तेहि कि मोह ममता निअराई । यह सिय राम सनेह बड़ाई ।।
बिषई साधक सिद्ध सयाने । त्रिबिध जीव जग बेद बखाने ।।
राम सनेह सरस मन जासू । साधु सभाँ बड़ आदर तासू ।।
सोह न राम पेम बिनु ग्यानू । करनधार बिनु जिमि जलजानू ।।
मुनि बहुबिधि बिदेहु समुझाए । राम घाट सब लोग नहाए ।।
सकल सोक संकुल नर नारी । सो बासरु बीतेउ बिनु बारी ।।
पसु खग मृगन्ह कीन्ह अहारू । प्रिय परिजन कर कौन बिचारू ।।

दो० — दोउ समाज निमिराजु रघुराजु नहाने प्रात ।
बैठे सब बट बिटप तर मन मलीन कृस गात ।। २७७ ।।

चौ० — जे महिसुर दसरथ पुर बासी । जे मिथिलापति नगर निवासी ।।
हंस बंस गुर जनक पुरोधा । जिन्ह जग मगु परमारथु सोधा ।।
लगे कहन उपदेस अनेका । सहित धरम नय बिरति बिबेका ।।
कौसिक कहि कहि कथा पुरानीं । समुझाई सब सभा सुबानीं ।।

मुनीश्वर जागोजागी लोकांना अखंड उपदेश करू लागले. गुरु वसिष्ठ विदेहराजांना म्हणाले, ' हे नरेश आता धीर धरावा ! ' २७६

वस्तुत: जनक महाराजांच्या ज्ञानरूपी सूर्यापुढे अज्ञान-रात्र नष्ट होई. तसेच ज्यांच्या वचनकिरणांच्या योगाने मुनिरूपी कमळे विकास पावतात. अशा विदेह भूपतींच्या जवळ मोह व माया येणार तरी कशी ? परंतु हा सीतारामाच्या प्रेमाचा महिमा आहे ! (जनकांचे दु:ख हे लौकिक अज्ञानामुळे निर्माण झाले नव्हते.)

विषयी, साधक व ज्ञानी सिद्ध अशा तीन प्रकारच्या लोकांचे जगात अस्तित्व असते असे वेदांनी सांगितले आहे. परंतु या तीन प्रकारातून ज्याचे मन [illegible] आर्द्र होते त्यांचाच साधुसभेत मोठा सन्मान होतो. कर्णधाराशिवाय ज्याप्रमाणे जहाज इष्ट स्थळी जाऊ शकत नाही त्याचप्रमाणे, रामभक्तीविना ज्ञानाला सफलतेच्या दृष्टीने किंमत नाही !

वसिष्ठगुरूंनी अनेक प्रकारे विदेह भूपतींची समजूत घातल्यानंतर सर्वच मंडळींनी रामघाटावर स्नाने केली. सर्व स्त्रिया व पुरुष शोकविकल झाल्यामुळे त्यांनी त्या संबंध दिवशी व रात्री पोटात पाण्याचा थेंबही घेतला नाही (भोजनाची गोष्ट तर दूरच !) कारण पशू पक्षी हरिणे यांनी सुद्धा जेथे त्यादिवशी आहार केला नाही. तेथे प्रिय परिवार व कुटुंबीजनांचा विचार करण्याचा प्रश्नच कसा उत्पन्न होणार ?

दुसऱ्या दिवशी प्रात:स्नाने आटपून निमिराज जनक व रघुराज रामचंद्र आणि दोघांचा मोठा समाज परिवार अशी सर्व मंडळी रामपर्णकुटी जवळील एका विशाल वटवृक्षाखाली बसली. सर्वांची शरीर अत्यंत कृश व मने खिन्न दिसत होती. २७७

दशरथांच्या अयोध्येतील व जनकपुरीतील जे ब्राह्मण तेथे आले होते, त्याप्रमाणे सूर्यवंशाचे गुरु वसिष्ठ आणि जनकांचे राजगुरू शतानंद, ज्यांनी अभ्युदय (ऐहिक उन्नती) व नि:श्रेयस (पारलौकिक हित) यांच्या प्राप्तीचा मार्ग उत्तम प्रकारे चोखाळला होता,—अशा अनेकांनी धर्म, नीती वैराग्य आणि विवेक यांचा उपदेश ठिकठिकाणी करण्यास प्रारंभ केला.

विश्वामित्रांनी ऐतिहासिक व पौराणिक कथा अत्यंत गोड अशा भाषेने सभेत सांगून सर्वांची समजूत घातली.

तब रघुनाथ कौसिकहि कहेऊ । नाथ कालि जल बिनु सबु रहेऊ ॥
मुनि कह उचित कहत रघुराई । गयउ बीति दिन पहर अढ़ाई ॥
रिषि रुख लखि कह तेरहुति राजू । इहाँ उचित नहिं असन अनाजू ॥
कहा भूप भल सबहि सोहाना । पाइ रजायसु चले नहाना ॥

दो०—तेहि अवसर फल फूल दल मूल अनेक प्रकार ।
लइ आए बनचर बिपुल भरि भरि काँवरि भार ॥ २७८ ॥

चौ०—कामद भे गिरि राम प्रसादा । अवलोकत अपहरत बिषादा ॥
सर सरिता बन भूमि बिभागा । जनु उमगत आनँद अनुरागा ॥
बेलि बिटप सब सफल सफूला । बोलत खग मृग अलि अनुकूला ॥
तेहि अवसर बन अधिक उछाहू । त्रिबिध समीर सुखद सब काहू ॥
जाइ न बरनि मनोहरताई । जनु महि करति जनक पहुनाई ॥
तब सब लोग नहाइ नहाई । राम जनक मुनि आयसु पाई ॥
देखि देखि तरुबर अनुरागे । जहँ तहँ पुरजन उतरन लागे ॥
दल फल मूल कंद बिधि नाना । पावन सुंदर सुधा समाना ॥

दो०—सादर सब कहँ रामगुर पठए भरि भरि भार ।
पूजि पितर सुर अतिथि गुर लगे करन फरहार ॥ २७९ ॥

तेव्हा रघुनाथांनी कौशिकांना नम्र विनंती केली. ' नाथ ! सर्व मंडळींनी कालपासून पाण्याचाही स्वीकार केलेला नाही. (आता काही आहार घ्यावा.)

त्यावर विश्वामित्र म्हणाले, " रघुपती योग्य असेच बोलले. आजही अडीच प्रहर दिवस निघून गेला !"

विश्वामित्रांचा रोख ओळखून मिथिलेश्वर म्हणाले, " या ठिकाणी (राम कंद-मूलफलाहारी असता) अन्न खाणे अत्यंत अनुचित आहे. "

जनकांचे हे मत सर्वांनाच पटून मंडळी आज्ञा मिळताच स्नानासाठी उठली.

त्या प्रसंगाचे महत्त्व ओळखून कोळी, किरात आदिकरून वनचरांनी, कावडी भरभरून अनेक प्रकारचे खाद्य पदार्थ फळे, फुले, पाने (पालेभाज्या) मूल —यांच्या सारखे आणून, त्यांची रेलचेल उडवली ! २७८

याचे कारण श्रीरामचंद्रांच्या कृपेने सर्व पर्वतच मनात येईल ते पदार्थ देण्यास समर्थ झाले. त्यांच्या केवळ दर्शनानेच सर्व दुःखांचा परिहार होत होता !

तेथील सरोवरे, नद्या, वने आणि इतर भूभाग यांना प्रेम व आनंदाचा जणू पूरच आला होता. सर्व वृक्ष आणि वेली फळाफुलांनी बहरल्या. पशु-पक्षी आणि मधुकर हे मधुर आवाज काढीत होते. सर्व वनात त्यांमुळे अधिकच उत्साह भरून राहिला आणि मंद-सुगंध-शीतल असा वारा सर्वांना सुख देऊ लागला, अशा प्रकारच्या त्या वनाच्या मनोहरतेचे वर्णन करणेच अशक्य. जणू पृथ्वी जनकराजांना पाहुणचारच करत राहिली आहे असे वाटे !

जनकपुरवासी सर्व लोकांची स्नाने उरकल्यावर श्रीरामचंद्र, जनकमहाराज व मुनिवर्य यांची आज्ञा मिळताच वृक्ष वेलींचे सौभाग्य पुनःपुन्हा प्रेमपूर्वक पाहण्यास प्रारंभ केला व आपापल्या आवडीप्रमाणे एकेक वृक्षाखाली ते उतरू लागले.

थोड्याच वेळात श्रीरामचंद्रांच्या गुरूंनी (वसिष्ठांनी) पवित्र, सुंदर व अमृताप्रमाणे स्वादिष्ट असे अनेक प्रकारचे कंद, मूळ, फळ, फूल, पाने इत्यादि सर्वांना वेळेवर आणि भरपूर पोचतील अशी अत्यंत आदरपूर्वक तजवीज केली. त्यानंतर मिथिला निवासी स्त्री पुरुषांनी, आपले पितर, देवता, अतिथी आणि गुरू यांचे प्रथम पूजन करून फलाहार (फराळ !) करण्यास सुरुवात केली. २७९

चौ० —एहि बिधि बासर बीते चारी। रामु निरखि नर नारि सुखारी ॥
दुहु समाज असि रुचि मन माहीं। बिनु सिय राम फिरब भल नाहीं ॥
सीता राम संग बनबासू। कोटि अमरपुर सरिस सुपासू ॥
परिहरि लखन रामु बैदेही। जेहि घरु भाव बाम बिधि तेही ॥
दाहिन दइउ होइ जब सबही। राम समीप बसिअ बन तबही ॥
मंदाकिनि मज्जनु तिहु काला। राम दरसु मुद मंगल माला ॥
अटनु राम गिरि बन तापस थल। असनु अमिअ सम कंद मूल फल ॥
सुख समेत संबत दुइ साता। पल सम होहिं न जनिअहिं जाता ॥

दो० —एहि सुख जोग न लोग सब कहहिं कहाँ अस भागु।
सहज सुभायँ समाज दुहु राम चरन अनुरागु ॥ २८० ॥

चौ० —एहि बिधि सकल मनोरथ करहीं। बचन सप्रेम सुनत मन हरहीं ॥
सीय मातु तेहि समय पठाईं। दासीं देखि सुअवसरु आईं ॥
सावकास सुनि सब सिय सासू। आयउ जनकराज रनिवासू ॥
कौसल्याँ सादर सनमानी। आसन दिए समय सम आनी ॥
सीलु सनेहु सकल दुहु ओरा। द्रवहिं देखि सुनि कुलिस कठोरा ॥

असा कार्यक्रम चार दिवस चालला. श्रीरामचंद्राला निरखून पाहत राहण्याचे भाग्य लाभल्याने सर्वच नारी-नर सुखी होते. त्यामुळे दोन्ही समाजांच्या मनात, श्रीरामचंद्राला बरोबर घेतल्याशिवाय परत फिरणे अयोग्य, अशी आवड निर्माण झाली.

" वनात, सीतारामबरोबर वास करण्यास मिळणे हे कोट्यवधी अमरावतीतील सुखाच्या खाणीप्रमाणे आहे. श्रीराम, श्रीलक्ष्मण व श्रीसीता याना वनात सोडून घराची ओढ ज्यांना लागेल त्यांना विधीने चकवले म्हणून खास समजावे! अहो, दैव जेव्हा पूर्ण अनुकूल होते त्याच वेळी श्रीरामाचे वनात सान्निध्य लाभते. मंदाकिनीत त्रिकाळ स्नान करावे, आनंद व मांगल्य यांचे माहेर असणारे श्रीरामचंद्रांचे रूप डोळे भरून पहावे, श्रीरामचंद्रांच्या कृपेस पात्र झालेल्या कामदनाथ पर्वतावर यथेच्छ विहार करीत, वनराजी व मुनिश्रेष्ठांचे आश्रम यांना पाहत फिरावे, अमृताप्रमाणे रुचकर अशा कंद-मूलफलांचा स्वाद घ्यावा,—असा आनंद लुटत असता ही चौदा वर्षे एका क्षणाप्रमाणे होऊन केव्हा गेली ते कळणारसुद्धा नाही!"

अशी भाषा सर्व समाजात परस्परात चाले व शेवटी ते म्हणत, " एवढया सुखाचे भाग्य कुठले आपल्या नशिबी! इतकी कुठे आपली पात्रता आहे?"

अयोध्यावासी व मिथिलावासी नागरिकांचे श्रीरामचंद्रांच्या चरणी अशा प्रकारचे प्रेम नैसर्गिकच होते! २८०

वरीलप्रमाणे मनोरथ एकाने बोलून दाखवावेत व दुसऱ्याने ते प्रेमपूर्ण शब्द ऐकत असताच त्याचे मन तदाकार व्हावे असा प्रकार सर्वत्र पाहावयास मिळे.

सुनयनादि व कौसल्यादि भेट

कौसल्या आदिकरून राण्यांच्या भेटीसाठी सीतेच्या मातेने (सुनयनेने) पाठविलेल्या दासी, योग्यसंधी पाहून आल्या. त्यांनी चौकशी केली व सीतेच्या सासूंना आता फुरसत आहे असे त्यांच्याकडून कळताच जनकाच्या राण्या भेटीसाठी आल्या.

कौसल्येने सर्वांचा योग्य सन्मान केला व त्याप्रसंगाला उचित अशी आसने त्याना देवविली.

त्या प्रसंगी दोन्ही बाजूंचे प्रेम व शील पाहून व ऐकून अत्यंत कठोर अशा वज्रालाही पाझर फुटला!

पुलक सिथिल तन बारि बिलोचन । महि नख लिखन लगीं सब सोचन ॥
सब सिय राम प्रीति कि सि मूरति । जनु करुना बहु बेष बिसूरति ॥
सीय मातु कह बिधि बुधि बाँकी । जो पय फेनु फोर पबि टाँकी ॥
दो० – सुनिअ सुधा देखिअहिं गरल सब करतूति कराल ।
जहँ तहँ काक उलूक बक मानस सकृत मराल ॥ २८१ ॥
चौ० – सुनि ससोच कह देबि सुमित्रा । बिधि गति बड़ि बिपरीत बिचित्रा ॥
जो सृजि पालइ हरइ बहोरी । बाल केलि सम बिधि मति भोरी ॥
कौसल्या कह दोसु न काहू । करम बिबस दुख सुख छति लाहू ॥
कठिन करम गति जान बिधाता । जो सुभ असुभ सकल फल दाता ॥
ईस रजाइ सीस सबही कें । उतपति थिति लय बिषहु अमी कें ॥
देबि मोह बस सोचिअ बादी । बिधि प्रपंचु अस अचल अनादी ॥
भूपति जिअब मरब उर आनी । सोचिअ सखि लखि निज हित हानी ॥
सीय मातु कह सत्य सुबानी । सुकृती अवधि अवधपति रानी ॥
दो० – लखनु रामु सिय जाहुँ बन भल परिनाम न पोचु ।
गहबरि हियँ कह कौसिला मोहि भरत कर सोचु ॥ २८२ ॥

सर्वांची शरीरे शिथिल होऊन त्यावर रोमांच उभे राहिले; शोक व प्रेम यांच्या भरतीमुळे डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहात आहेत. पायांच्या नखानी जमीन कुरतडत सर्वांचा आक्रोश सुरू आहे. सर्वच श्रीसीता-रामाच्या प्रेमरूपी मूर्ती सारख्या दिसल्या ! आणि त्यांचा तो शोक पाहून प्रत्यक्ष करुणाच अनेक रूपे धारण करून विलाप करीत आहे असे वाटले.

अखेर सुनयना म्हणाली, " विधीची बुद्धीच अत्यंत तिढयाची आहे म्हणूनच याने दुधाच्या फेसाप्रमाणे मऊ पदार्थांला वज्रासारख्या कठीण घणाने कुटण्याचे हे निंद्य कार्य केले ! अमृताचे वर्णन फक्त कानाने ऐकावयाचे आणि विष मात्र पावलोपावली पाहावयाचे ! विधात्याची सगळी करणीच भयंकर ! पाहावे तिकडे कावळे, बगळे आणि घुबडे ! हंस फक्त एकट्या मानसात मात्र ! ! "

त्यावर शोकग्रस्थिनीनच सुमित्रादेवी, म्हणाली, " विधीची लीला अत्यंत विपरीत आणि विचित्र हे खरेच ! सर्व सृष्टीची उत्पत्ती करून तिचे पालन करतो व तोच शेवटी तिची राखरांगोळी करतो ! अगदी लहान पोरांच्या खेळाप्रमाणे त्याची बुद्धी भोळी (विवेकशून्य) आहे "

हे ऐकून कौसल्या बोलली, ' दोष कोणाचाच नाही. सुख दुःख, हानी लाभ हे सर्व आपापल्या कर्मांचेच फळ असते. कर्मांची गति कठीण (गहन) आहे. त्या गतीचे ज्ञान ब्रह्मदेवालाच असते म्हणून तो सर्वांना त्याच्या त्याच्या कर्मांस अनुसरून शुभ किंवा अशुभ असे फळ देऊ शकतो. सर्वांत श्रेष्ठ ईश्वराची आज्ञा आहे. उत्पती, स्थिती, (पालन), आणि संहार, तसेच अमृत अगर विष या सर्व गोष्टी त्या परमेश्वराच्याच स्वाधीन असतात. म्हणून, हे देवी, मोहाला वश होऊन शोक करत बसणे व्यर्थ आहे. विधात्याने निर्माण केलेला हा सर्व प्रपंच असाच अनादि असून त्यातून कोणाचीच सुटका होऊ शकत नाही !

हे सखी महाराजांचे जीवन व त्यांचा मृत्यू यांचा विचार मनात येऊन आपण जो शोक करत आहो तो केवळ आमच्या हिताची हानी झाली म्हणूनच ! (स्वार्थाला वश होऊन).

" आपले वचन सत्य व उत्तमच आहे. पुण्यात्म्यांचे मुकुटमणी दशरथ महाराजांची आपण पट्टराणी मग आपल्या ठिकाणी असे श्रेष्ठ ज्ञान असणे साहजिकच ! " असे उद्गार जनक महिषी सुनयनेच्या मुखातून लगेच बाहेर पडले. त्याबरोबर कंठ दाटून येऊन कौसल्या म्हणते, " श्रीराम, लक्ष्मण आणि सीता वनवासाला गेले, याचा परिणाम शेवटी चांगलाच होईल. माझा जीव, भरतासाठी मात्र तिळतिळ तुटत आहे ! " २८२

चौ० — ईस प्रसाद असीस तुम्हारी । सुत सुतबधू देवसरि बारी ॥
राम सपथ मैं कीन्हि न काऊ । सो करि कहउँ सखी सति भाऊ ॥
भरत सील गुन बिनय बड़ाई । भायप भगति भरोस भलाई ॥
कहत सारदहु कर मति हीचे । सागर सीप कि जाहिं उलीचे ॥
जानउँ सदा भरत कुलदीपा । बार बार मोहि कहेउ महीपा ॥
कसें कनकु मनि पारिखि पाएँ । पुरुष परिखिअहिं समय सुभाएँ ॥
अनुचित आजु कहब अस मोरा । सोक सनेहँ सयानप थोरा ॥
सुनि सुरसुरि सम पावनि बानी । भईं सनेह बिकल सब रानी ॥

दो० — कौसल्या कह धीर धरि सुनहु देबि मिथिलेसि ।
को बिबेकनिधि बल्लभहि तुम्हहि सकइ उपदेसि ॥ २८३ ॥

चौ० — रानि राय सन अवसरु पाई । अपनी भाँति कहब समुझाई ॥
रखिअहिं लखनु भरतु गवनहिं बन। जौं यह मत मानै महीप मन ॥
तौ भल जतनु करब सुबिचारी । मोरें सोचु भरत कर भारी ॥
गूढ़ सनेह भरत मन माहीं । रहें नीक मोहि लागत नाहीं ॥

शंकरांच्या कृपेने आणि आपणा सर्वांच्या आशीर्वादाने माझा मुलगा राम व सून अगदी गंगेच्या पाण्याप्रमाणे पवित्र अंतःकरणाची आहेत. हे सखी ! मी आजपर्यंत रामाची शपथ कधीच घेतली नाही, पण आज सद्भावनेने, तीसुद्धा घेऊन सांगते—

" माझ्या भरताचे शील, त्याचे सद्‌गुण, त्याची नम्रता, त्याच्या अंतःकरणाचा मोठेपणा, त्याचे बंधुप्रेम, त्याचे सौजन्य, त्याची श्रद्धा आणि त्याचा रामचरणांचा अनुराग यांचे वर्णन करण्यास प्रत्यक्ष सरस्वतीही कचरते ! शिंपीने कधी सागर उपसणे शक्य आहे काय ? "

" भरत, आमच्या रघुकुलाचा अखंड तेवत राहणारा दीप आहे, याची मला प्रथमपासूनच जाणीव आहे. बरोबर तेच रहस्य, माझ्या जवळ नृपनायक अनेक वेळा बोलले.

" सोन्याला कसोटीवर घासल्यानंतर व रत्नाला पारखी मिळाल्यानंतरच त्यांची खरी किंमत कळून येते.

" [illegible] कठीण प्रसंग आल्यावर, कोण पुरुष कशा प्रकारे वागतो, हे पाहूनच त्याची परीक्षा होत असते. "

परंतु आज मी हे जे भरताचे गुणगान करीत आहे, ते ही एका दृष्टीने अयोग्यच आहे ! शोकाकुल झाल्याने किंवा स्नेहवश बनल्याने मनुष्याच्या ठिकाणी विवेक कमी होणारच. "

कौसल्यादेवीचे हे गंगाजलाप्रमाणे पुनीत असे भाषण श्रवण करून सर्वच राण्या स्नेहाने व्याकुळ झाल्या.

तेव्हा पुनः धीर धरून कौसल्या म्हणते, " हे देवी मिथिलेश्वरी ! मी काय म्हणते ते ऐकावे ! तसे पाहिले तर ज्ञानाचे भाण्डार असणारे असे जनक महाराज व त्यांची आपण प्रियराणी, आपणाला उपदेश कोण करू शकणार ? " २८३

" हे राणी ! योग्य संधी पाहून, आपण जनक महाराजांना आपल्या परीने समजावून सांगा की, लक्ष्मणाला परत अयोध्येला पाठवा आणि रामाबरोबर भरताची रवानगी करा. अर्थात महाराजांना हे म्हणणे योग्य वाटले तरच हो ! तसा मोका साधला तर मात्र विचारपूर्वक आपली शिकस्त करा. मला सर्वांत अधिक काळजी भरताचीच लागली आहे. भरताच्या रामप्रेमाची खोली अगाध आहे. त्यामुळे तो मागे राहिल्यास—त्याचा परिणाम बरा होईल असे मला वाटत नाही. "

लखि सुभाउ सुनि सरल सुबानी। सब भइ मगन करुन रस रानी ॥
नभ प्रसून झरि धन्य धन्य धुनि। सिथिल सनेहँ सिद्ध जोगी मुनि ॥
सबु रनिवासु बिथकि लखि रहेऊ। तब धरि धीर सुमित्राँ कहेऊ ॥
देबि दंड जुग जामिनि बीती। राम मातु सुनि उठी सप्रीती ॥

दो० – बेगि पाउ धारिअ थलहि कह सनेहँ सतिभाय।
हमरें तौ अब ईस गति कै मिथिलेस सहाय ॥ २८४ ॥

चौ० – लखि सनेह सुनि बचन बिनीता। जनकप्रिया गह पाय पुनीता ॥
देबि उचित असि बिनय तुम्हारी। दसरथ घरिनि राम महतारी ॥
प्रभु अपने नीचहु आदरहीं। अगिनि धूम गिरि सिर तिनु धरहीं ॥
सेवकु राउ करम मन बानी। सदा सहाय महेसु भवानी ॥
रउरे अंग जोगु जग को है। दीप सहाय कि दिनकर सोहै ॥
रामु जाइ बनु करि सुर काजू। अचल अवधपुर करिहहिं राजू ॥
अमर नाग नर राम बाहुबल। सुख बसिहहिं अपनें अपनें थल ॥
यह सब जागबलिक कहि राखा। देबि न होइ मुधा मुनि भाषा ॥

दो० – अस कहि पग परि पेम अति सिय हित बिनय सुनाइ।
सिय समेत सियमातु तब चली सुआयसु पाइ ॥ २८५ ॥

कौसल्येचा शुद्ध भाव व तिची सरल आणि उत्तम वाणी कानी पडल्यानंतर सर्वच राण्या पुनः करुण-रसात बुडून गेल्या.

त्या प्रसंगी आकाशातून पुष्पवृष्टीची झड सुरू झाली. सर्वत्र ' धन्य, धन्य, ' असा ध्वनी उमटू लागला. सिद्ध, योगी आणि मुनी याच्या अंतःकरणात स्नेहाला भरती आली !

हा प्रकार पाहून व ऐकून सर्व राण्या चकित होऊन पाहू लागल्या. त्यावेळी सावधानता राखून धैर्याने सुमित्रा सूचना देते, " हे देवी ! दोन घटका रात्र होऊन गेली. "

त्याबरोबर प्रेमाने राममातेने सर्वांचा निरोप घेतला. स्नेहपूर्ण वाणीने ती शेवटी म्हणाली, ' हे सखी ! आता या बरं लवकर ! मिथिलेश्वर आम्हास सहाय्यास असल्यावर श्रीमहेश (ईश्वर) योग्य तो सन्मार्ग आता दाखवणारच ! २८४

कौसल्येचे प्रेम व तिची विनयशील वाणी ऐकून जनकमहाराजांच्या प्रियराणीने कौसल्येचे चरण धरले व म्हणाली, " हे देवी ! आपण दशरथमहाराजांची राणी व श्रीरामचंद्राची माता आहात. आपल्या मुखातून असे विनम्रवचन येणे योग्यच ! प्रभू आपल्या नीच दासालाही आदरभावाने वागवतात. अग्नी धुराला व पर्वत गवताला आपल्या मस्तकावर नाही का धारण करीत ? आमचे राजे काया-वाचा मनाने आपले दास आहेत, आणि श्रीमहेशपार्वती आपणास सहाय्य करण्यास सदैव सिद्ध आहेत हे खरे !

" वस्तुतः आपणास सहाय्य करण्याची कोणाची लायकी आहे ? सूर्याला सहाय्य करणारा म्हणून दिव्याची काय शोभा ठरणार ? श्रीरामचंद्र वनात जाऊन देवांचे कार्य पार पाडतील व परत येऊन अयोध्येत शांतपणे राज्य करतील ! "

" देव स्वर्गात, नाग पातळात, आणि नर पृथ्वीवर श्रीरघुनाथांच्या बाहूंच्या बळावर लोकात सुखाने वास करू लागतील. मुनीश्वर याज्ञवल्क्यांनी पूर्वीच हे भाकित करून ठेवले आहे. हे देवी मुनिवरांचे वचन खोटे ठरणार नाही ! "

याप्रमाणे बोलून अत्यंत प्रेमाने कौसल्येच्या चरणी तिने प्रणाम केला. सीतेला बरोबर पाठवण्यासाठी विनंती केली व प्रेमाने सुखकर आज्ञा मिळताच सीतेसह सीतामाता आपल्या छावणीकडे निघाली. २८५



चौ० – प्रिय परिजनहि मिली बैदेही । जो जेहि जोगु भाँति तेहि तेही ॥
तापस बेष जानकी देखी । भा सबु बिकल बिषाद बिसेषी ॥
जनक राम गुर आयसु पाई । चले थलहि सिय देखी आई ॥
लीन्हि लाइ उर जनक जानकी । पाहुनि पायन पेम प्रान की ॥
उर उमगेउ अंबुधि अनुरागू । भयउ भूप मनु मनहुँ पयागू ॥
सिय सनेह बटु बाढ़त जोहा । ता पर राम प्रेम सिसु सोहा ॥
चिरजीवी मुनि ग्यान बिकल जनु । बूड़त लहेउ बाल अवलंबनु ॥
मोह मगन मति नहिं बिदेह की । महिमा सिय रघुबर सनेह की ॥

दो० – सिय पितु मातु सनेह बस बिकल न सकी सँभारि ।
धरनिसुताँ धीरजु धरेउ समउ सुधरमु बिचारि ॥ २८६ ॥

चौ० – तापस बेष जनक सिय देखी । भयउ पेमु परितोषु बिसेषी ॥
पुत्रि पबित्र किए कुल दोऊ । सुजस धवल जगु कह सबु कोऊ ॥
जिति सुरसरि कीरति सरि तोरी । गवनु कीन्ह बिधि अंड करोरी ॥
गंग अवनि थल तीनि बड़ेरे । एहिं किए साधु समाज घनेरे ॥

सीता-परिजन जनकादि भेट

तेथे पोचल्यावर ज्याना ज्या प्रकारे भेटणे योग्य, त्या त्या प्रकारे वैदेही आपल्या प्रिय परिवाराला व आप्तवर्गाला भेटली.

जानकीचा तो तापसवेष पाहून सर्वच मंडळी व्याकुळ झाली व त्यांना विशेषच विषाद वाटला !

श्रीरामगुरू वसिष्ठांची आज्ञा घेऊन जनकमहाराज आपल्या तळावर येताच त्यांनी सीतेला पाहिले. आपले पवित्र प्रेम व प्राण यांची पाहुणी असलेली अशी जानकी त्यांनी लगेच हृदयाशी घट्ट धरली. त्याबरोबर हृदयातील वात्सल्य-सागराला भरती आली. आणि नृपतींचे मन जणू काही प्रयाग क्षेत्रच बनले. त्या वात्सल्य सागराच्या आतून आदिशक्ती सीतेचा अलौकिक स्नेह हाच कोणी वटवृक्ष वाढत असलेला राजाला दिसला. तसेच त्या वटवृक्षावर श्रीरामचंद्राच्या प्रेमस्वरूपातील बालक (बालमुकुंद) भगवान् सुशोभित झालेला नृपतीने पाहिला.

त्यामुळे जनकमहाराजांचा ज्ञानरूपी चिरंजीवी मार्कण्डेय मुनी व्याकुळ होऊन त्या सागरात गटंगळ्या खात खात श्रीराम प्रेमरूप सुंदर बालकाच्या आश्रयास आल्याने ते बचावले. वस्तुतः विदेहराजांची बुद्धी मोहाने कधीच चळणे शक्य नव्हते. परंतु श्रीसीतारामाच्या प्रेमाचा एवढा महिमा की, त्याने अशा महान् ज्ञान्याचे ज्ञानही व्याकुळ करून सोडले !

पिता जनक व माता सुनयना यांचे ते परम प्रेम पाहून सीताही व्याकुळ होऊन काही काळ स्वतःचा तोल सांभाळू शकली नाही–शोकवश झाली ! परंतु परम धैर्यवती अशी ती धरणीची सुता असल्याने, तो प्रसंग व त्यावेळचे स्वतःचे श्रेष्ठ कर्तव्य यांची जाणीव होऊन तिने धीर धरला. २८६

सीतेला तपस्विनीच्या वेषात पाहून जनकांना केवढा संतोष झाला व किती प्रेम वाढले ! त्याचा परिणाम पुढील उद्गारांत दिसला. " बालिके ! तू दोन्ही कुळे पवित्र केलीस ! तुझ्या निर्मळ कीर्तीने सर्व जगत् उज्ज्वल होऊन राहिले आहे, असेच सर्वांच्या तोंडून ऐकू येते ! तुझ्या यशगंगेने देवनदी भागीरथीचाही पराभव केला आहे. कारण ती फक्त एकाच ब्रह्मांडाला विदित आहे. पण तुझी कीर्तीरूपी गंगा कोटी ब्रह्मांडातून वाहात चालली आहे ! गंगेने हरिद्वार, प्रयाग व गंगासागर एवढ्या तीनच स्थानांना प्रसिद्ध केले, परंतु तुझ्या या जान्हवीने अनेक संतसमाजरूपी तीर्थस्थाने बनविली आहेत."

पितु कह सत्य सनेहँ सुबानी। सीय सकुच महुँ मनहुँ समानी ॥
पुनि पितु मातु लीन्हि उर लाई। सिख आसिष हित दीन्हि सुहाई ॥
कहति न सीय सकुचि मन माहीं। इहाँ बसब रजनी भल नाहीं ॥
लखि रुख रानि जनायउ राऊ। हृदयँ सराहत सीलु सुभाऊ ॥

दो० — बार बार मिलि भेंटि सिय बिदा कीन्हि सनमानि ॥
कही समय सिर भरत गति रानि सुबानि सयानि ॥ २८७ ॥

चौ० — सुनि भूपाल भरत व्यवहारू। सोन सुगंध सुधा ससि सारू ॥
मूदे सजल नयन पुलके तन। सुजसु सराहन लगे मुदित मन ॥
सावधान सुनु सुमुखि सुलोचनि। भरत कथा भव बंध बिमोचनि ॥
धरम राजनय ब्रह्मबिचारू। इहाँ जथामति मोर प्रचारू ॥
सो मति मोरि भरत महिमाही। कहै काह छलि छुअति न छाँही ॥

स्नेहाने पण सत्य असेच वाक्ये पित्याच्या मुखातून जरी बाहेर पडत होती. तरी त्यात स्वतःच्या स्तुतीचा भाग असल्यामुळे संकोचाने सीतेला जणू गिळूनच टाकले!

शेवटी आईबापांनी सीतेला पुनः पोटाशी धरून चार सदुपदेशाच्या गोष्टी सांगितल्या व शुभाशीर्वाद दिले.

हा सर्व कार्यक्रम चालू असता सीतेच्या मनात विचार चालू झाला की, रात्री सासूबाईंची सेवा सोडून इथे राहणे योग्य नव्हे; "येथे राहणे म्हणजे पतिसंगती, सेवा यांच्यापेक्षा माहेरची ममता अधिक असे सिद्ध करणे आहे. आणि ते वानप्रस्थ धर्माच्या विरुद्ध आहे. ज्या परिस्थितीत पती त्या परिस्थितीत पत्नी. प्रभू झोपडीत! एकटे! व मी स्वजनांच्या संगतीत–राजवाड्यात नटून राहू? गाद्यागिरद्यांवर लोळू? *परंतु आईबापांच्या प्रेमामुळे तिला स्पष्ट बोलवेना.

सुनयनेच्या हे चटकन् ध्यानी आले व तिने जनकमहाराजांना सीतेच्या अंतःकरणाची कल्पना दिली. सीतेच्या सुशीलतेची व स्वभावाची थोरवी पाहून मातापित्यांची अंतःकरणे किती भरून आली!

त्यानंतर पुनः पुन्हा सीतेला भेटून, सन्मानपूर्वक राजाराणींनी तिची पाठवणी केली.

चतुर राणीने योग्य समय पाहून, मधुर वाणीने महाराज जनकांना भरताच्या गंभीर मनःस्थितीची कल्पना दिली. २८७

जनक-सुनयना संवाद

सोन्यात सुगंध दरवळावा. किंवा समुद्रमंथनातून निघालेल्या अमृतात चंद्रातील अमृताचा सारभाग मिसळावा; त्याप्रमाणे भरताचे ते अपूर्व व अतुल्य वर्तन. सुनयना राणीच्या मुखातून श्रवण करत असता जनक महाराजांचे अंतःकरण प्रेम विव्हळ झाले. अंगावर रोमांच उभे राहू लागले व नेत्रातून वाहणारा स्नेहजलाचा प्रवाह जणू अडवून _ भरताचे हृदयात ध्यान करण्यासाठी _ त्यांनी आपले डोळे मिटले!

थोड्याच वेळात त्यांचे मन मुदित होऊन. मुखातून भरताच्या सत्कीर्तीची गंगा वाहू लागली.

" हे सुमुखी! हे सुलोचनी! जन्म मरणाच्या फेऱ्यातून जीवाला मुक्त करणारी भरतकथा. पूर्ण सावध राहून ऐक. धर्म, राजनीती आणि ब्रह्म-विचार हे तीन विषय यथामती. मी समजून घेतले आहेत. परंतु अशा प्रकारची माझी जाणती बुद्धी. भरताच्या मोठेपणाचे वर्णन कसे करणार? कारण आपली शिकस्त करूनही युक्तिप्रयुक्तीने, त्या भरत सुयशाच्या सुंदर्या छायेलाही ती स्पर्श करू शकत नाही!"

---

* वा. रा. प्रमाणे वय १०–२०।। वनवासात ७२ दि. आहे. असे असून केवढी धर्मनिष्ठा! पातिव्रत्यपालन!



बिधि गनपति अहिपति सिव सारद। कबि कोबिद बुध बुद्धि बिसारद ॥
भरत चरित कीरति करतूती। धरम सील गुन बिमल बिभूती ॥
समुझत सुनत सुखद सब काहू। सुचि सुरसरि रुचि निदर सुधाहू ॥

दो० — निरवधि गुन निरुपम पुरुषु भरतु भरत सम जानि।
कहिअ सुमेरु कि सेर सम कबिकुल मति सकुचानि ॥ २८८ ॥

चौ० — अगम सबहि बरनत बरबरनी। जिमि जलहीन मीन गमु धरनी ॥
भरत अमित महिमा सुनु रानी। जानहिं रामु न सकहिं बखानी ॥
बरनि सप्रेम भरत अनुभाऊ। तिय जिय की रुचि लखि कह राऊ ॥
बहुरहिं लखनु भरतु बन जाहीं। सब कर भल सब के मन माहीं ॥
देबि परंतु भरत रघुबर की। प्रीति प्रतीति जाइ नहिं तरकी ॥
भरतु अवधि सनेह ममता की। जद्यपि रामु सीम समता की ॥
परमारथ स्वारथ सुख सारे। भरत न सपनेहुँ मनहुँ निहारे ॥
साधन सिद्धि राम पग नेहू। मोहि लखि परत भरत मत एहू ॥

दो० — भोरेहुँ भरत न पेलिहहिं मनसहुँ राम रजाइ।
करिअ न सोचु सनेह बस कहेउ भूप बिलखाइ ॥ २८९ ॥

ब्रह्मदेव, गणपती, महादेव, शेष, सरस्वती, कवी, ज्ञानी, पण्डित आणि मोठे बुद्धिवान् या सर्वांपैकी कोणालाही भरताचे चरित्र, त्याची उज्ज्वल कीर्ती, कार्यकुशलता, त्याचा श्रेष्ठ आचार, त्याचे सुशील, त्याचा सद्गुण साठा आणि त्याचे निर्मल ऐश्वर्य हे समजून घेण्यास, मनःपूर्वक ऐकण्यास अत्यंत सुखकारक आहे. कारण पावित्र्यात भागीरथीला आणि माधुर्यात अमृताला त्याने तुच्छ करून मोडले आहे !

" खरोखर भरत हा अगाध सद्गुणसागर आहे. त्याच्याशी तुलना करण्यास दुसरा पुरुषच नाही. म्हणून भरतासारखा कोण म्हणाल तर भरतच असे समजले पाहिजे ! सुमेरू पर्वताची तुळना शेराच्या वजनाबरोबर करणे कधी तरी योग्य होईल काय ? हे जाणूनच कवीसमाजाची बुद्धी भरतवर्णनात संकोचित होते ! " २८८

" हे सुवर्णे ! पाण्याच्या अभावी पृथ्वीवर माशाचे चलनवलन जसे अशक्य, तशीच भरतगुणगान योग्यप्रकारे करण्यास कोणाचीही बुद्धी असमर्थ आहे. हे राणी ! तुला सांगू का ! भरताच्या अपरिमित मोठेपणाची बरोबर कल्पना एकट्या श्रीरामचंद्रानाच आहे. पण तेही त्याचे वर्णन करू शकत नाहीत ! "

याप्रमाणे भरताच्या योरवीचे स्नेहपूर्ण वर्णन केल्यानंतर राणी सुनयनेच्या मनातील हेतू जाणून महाराज म्हणाले,

" लक्ष्मणाने परत अयोध्येस जावे व भरताने श्रीरामचंद्राबरोबर वनात जावे यात सर्वांचे हित व हाच सर्वांचा मनातील इष्ट हेतु ! असे जरी आहे तरी हे देवी ! भरत व राम यांचे परस्पर प्रेम आणि एकाचा दुसऱ्यावरील विश्वास यांची खरी कल्पना कोणालाच येणार नाही. जरी श्रीरामचंद्र हे समतेची सीमा आहेत ! तरी भरत हेही प्रेम आणि ममतेची सीमाच आहेत ! श्रीरामचरणाचे अनन्य प्रेम सोडून भरताने सर्व प्रकारचा स्वार्थ, परमार्थ अगर सुख यांची सुमती कल्पनासुद्धा स्वप्नात आणलेली नाही ! म्हणून श्रीरामपदी दृढ भक्ती हीच सिद्धी व हेच साधन असे भरताने निश्चित ठरवले अशी माझी ठाम समजूत आहे ! "

शेवटी भरत प्रेमाने सद्गदित होऊन जनकमहाराजांनी राणीला सांगितले की, मनानेसुद्धा रामाज्ञेचा अव्हेर भरताकडून चुकूनही होणार नाही. म्हणून स्नेहाला वश होऊन व्यर्थ शोक करू नये. २८९

चौ० – राम भरत गुन गनत सप्रीती। निसि दंपतिहि पलक सम बीती॥
राज समाज प्रात जुग जागे। न्हाइ न्हाइ सुर पूजन लागे॥
गे नहाइ गुर पहिं रघुराई। बंदि चरन बोले रुख पाई॥
नाथ भरतु पुरजन महतारी। सोक बिकल बनबास दुखारी॥
सहित समाज राउ मिथिलेसू। बहुत दिवस भए सहत कलेसू॥
उचित होइ सोइ कीजिअ नाथा। हित सबही कर रौरें हाथा॥
अस कहि अति सकुचे रघुराऊ। मुनि पुलके लखि सीलु सुभाऊ॥
तुम्ह बिनु राम सकल सुख साजा। नरक सरिस दुहु राज समाजा॥
दो० – प्रान प्रान के जीव के जिव सुख के सुख राम।
तुम्ह तजि तात सोहात गृह जिन्हहि तिन्हहि बिधि बाम॥ २९०॥
चौ० – सो सुखु करमु धरमु जरि जाऊ। जहँ न राम पद पंकज भाऊ॥
जोगु कुजोगु ग्यानु अग्यानू। जहँ नहिं राम पेम परधानू॥
तुम्ह बिनु दुखी सुखी तुम्ह तेहीं। तुम्ह जानहु जिय जो जेहि केहीं॥
राउर आयसु सिर सबही कें। बिदित कृपालहि गति सब नीकें॥
आपु आश्रमहि धारिअ पाऊ। भयउ सनेह सिथिल मुनिराऊ॥
करि प्रनामु तब रामु सिधाए। रिषि धरि धीर जनक पहिं आए॥

श्रीराम व भरत यांचे गुणगान प्रेमपूर्वक करणे व केलेले ऐकणे असा कार्यक्रम चालू असता पतिपत्नींची ती रात्र [illegible] सरून गेली.

प्रातःकाळ होताच दोन्ही राजसमाजातील लोक जागृत झाले. स्नानादि नित्यकर्मे आटोपून त्यांनी देवतांची पूजा केली.

श्रीरामचंद्रांनी स्नानादि प्रातःकर्म उरकताच ते गुरु वसिष्ठांकडे गेले; त्यांचे चरणी मस्तक नमविले व त्यांचा कल पाहून बोलू लागले.

“नाथ ! भरत, माझ्या सर्व माता, अयोध्येचे [illegible] वनातील दुःखे सहन करत आहेत. त्याचप्रमाणे [illegible] मिथिलेश महाराज [illegible] विकल आहेत [illegible] आहेत. म्हणून [illegible] असे करावे. हे नाथ ! सर्वांचेच हित आपल्या हाती आहे !”

असे बोलून अतिशय संकोचाने रघुराजांनी आपले भाषण संपविले. परंतु त्याच वेळी श्रीरामचंद्रांचा सुस्वभाव व सुशील पाहून गुरु वसिष्ठ प्रेमानंदाने पुलकित झाले व त्यांनी [illegible].

“राम ! दोन्ही राजसमाजांतील लोकांना तुमच्याशिवाय सर्व सुखे नरकासारखी दुःखप्रद वाटतात. हे रामचंद्रा ! तुम्ही प्राणांचेही प्राण, सर्व जीवांचे आधारभूत जीव आणि सुखाचे सुख असे असता तुम्हाला सोडून ज्यांना घरी [illegible] असेल त्यांचे दैवच फिरले म्हणायचे ! २९०

ज्या ठिकाणी श्रीरामचरणांचे प्रेम नाही, त्या ठिकाणच्या सुखाला, कर्माला आणि [illegible] आग लागो. ज्यामध्ये रामप्रेमाला मुख्य स्थान नाही तो योग म्हणजे कुयोग व ते ज्ञान हे अज्ञानच होय !

हे रघुनाथा ! तुमच्याशिवाय दोन्ही समाजांतील आम्ही सर्व दुःखी व तुमच्यामुळे आम्ही सर्व सुखी. ज्याच्या हृदयात जे काय आहे ते सर्व योग्य प्रकारे आपण जाणताच ! आपली आज्ञा सर्वांना शिरसा मान्य आहे. हे कृपाळो ! सर्वांच्या स्थितीचे आकलन तुम्ही करतच आहात. म्हणून आपण आता आश्रमात जावे.”
एवढे बोलत असता मुनिवरांचा कंठ दाटून आला. श्रीरामचंद्रांनी गुरुवरांना वंदन केले व ते आश्रमाकडे परतले.

वसिष्ठ-जनक भेट

वसिष्ठांनीही मन आवरले व ते जनक राजाच्याकडे आले. त्यांच्या संभाषणात गुरुवरांनी श्रीरामचंद्रांचे

राम बचन गुरु नृपहि सुनाए। सील सनेह सुभायँ सुहाए ॥
महाराज अब कीजिअ सोई। सब कर धरम सहित हित होई ॥

दो० – ग्यान निधान सुजान सुचि धरम धीर नरपाल।
तुम्ह बिनु असमंजस समन को समरथ एहि काल ॥ २९१ ॥

चौ०–सुनि मुनि बचन जनक अनुरागे। लखि गति ग्यानु बिरागु बिरागे ॥
सिथिल सनेहँ गुनत मन माहीं। आए इहाँ कीन्ह भल नाहीं ॥
रामहि रायँ कहेउ बन जाना। कीन्ह आपु प्रिय प्रेम प्रवाना ॥
हम अब बन तें बनहि पठाई। प्रमुदित फिरब बिबेक बड़ाई ॥
तापस मुनि महिसुर सुनि देखी। भए प्रेम बस बिकल बिसेषी ॥
समउ समुझि धरि धीरजु राजा। चले भरत पहिं सहित समाजा ॥
भरत आइ आगें भइ लीन्हे। अवसर सरिस सुआसन दीन्हे ॥
तात भरत कह तेरहुति राऊ। तुम्हहि बिदित रघुबीर सुभाऊ ॥

दो०–राम सत्यब्रत धरम रत सब कर सीलु सनेहु।
संकट सहत सकोच बस कहिअ जो आयसु देहु ॥ २९२ ॥

शील व स्नेह यांचे प्रतिबिंबवत् असणारे, स्वभावतः सुन्दर असे भाषण मिथिलाधिपाना सांगितले, आणि शेवटी समारोप केला,

"महाराज! आता आपण तेच करावे की, ज्याच्या योगाने धर्माचे रक्षण होऊन सर्वांचे हित होईल. हे राजन्! तुम्ही ज्ञानाचे भाण्डार, सुजाण, पवित्र, कर्तव्य पालनात न उमगणारे आहात. सध्याचा प्रसंग मोठा विकट प्राप्त झाला आहे. यावेळी तुमच्याशिवाय या संकटातून पार पाडण्यास दुसरा कोण समर्थ आहे?"२९१

वसिष्ठमुनींचे हे भाषण ऐकत असता, विदेह भूपांचे प्रेमभावाने हृदय इतके भरून आले की, त्याच्याकडे पाहून ज्ञान व वैराग्यांनाही वैराग्य प्राप्त झाले! (अर्थात् महाराजांचे ज्ञान व वैराग्य संपुष्टात आले!)

अशा प्रकारे प्रेमशिथिल स्थितीत जनक मनात विचार करू लागले, यावेळी आपण येथे येऊन फसलो यात शंका नाही! राजा दशरथांनी श्रीरामांना वनात पाठविले आणि आपल्या प्रिय पुत्रावरील प्रेम सत्य करून दाखवले! (प्रियविरहाबरोबर प्राणत्याग केला.)

परंतु आम्ही आता त्यांना साध्या वनातून गहन वनात पाठविणार व स्वतःच्या शहाणपणाचा टेंभा मिरवित स्वगृही परतणार! (आम्हाला मुळीच मोहमाया नाही, आम्ही श्रीरामालाही वनात सोडून आलो पण दशरथांच्याप्रमाणे मेलो मात्र नाही!)

विदेह राजांची ती खेदखिन्न स्थिती पाहून तपस्वी, मुनी व ब्राह्मण असे सर्वच प्रेमवश होऊन अधिकच व्याकुळ झाले.

शेवटी राजांनीच प्रसंग ओळखून धीर धरला व सर्व मंडळीसह ते भरतांच्याकडे गेले.

जनक राजे येत आहेत, असे समजताच भरत त्याना सामोरे आले व त्यांचे स्वागत केले. नंतर आदराने युक्त असे, त्या प्रसंगाला अनुसरून त्यांना शुभ आसन दिले.

सर्व सभासद स्वस्थानी बसल्यानंतर निमिराज बोलू लागले:– "तात भरत! तुम्हाला रघुवरांच्या स्वभावाची कल्पना आहेच! ते, सत्यव्रत धर्मरत, अत्यंत प्रेमळ व सुशील असे असल्याने सर्वांचे स्वभाव जाणून त्यांच्या भावनांना ते जपतात. यामुळेच संकोच पाऊन ते आता संकटे सोसत आहेत. म्हणून यावेळी तुम्ही जसे आम्हाला सांगाल त्याप्राणे वागण्यास आम्ही श्रीरामचंद्रांना तयार करू." २९२

चौं० – मुनि तन पुलकि नयन भरि बारी। बोले भरतु धीर धरि भारी॥
प्रभु प्रिय पूज्य पिता सम आपू। कुलगुरु सम हित माय न बापू॥
कौसिकादि मुनि सचिव समाजू। ग्यान अंबुनिधि आपुनु आजू॥
सिसु सेवकु आयसु अनुगामी। जानि मोहि सिख देइअ स्वामी॥
एहिं समाज थल बूझब राउर। मौन मलिन मैं बोलब बाउर॥
छोटे बदन कहउँ बड़ि बाता। छमब तात लखि बाम बिधाता॥
आगम निगम प्रसिद्ध पुराना। सेवाधरमु कठिन जगु जाना॥
स्वामि धरमु स्वारथहि बिरोधू। बैरु अंध प्रेमहि न प्रबोधू॥

दो० – राखि राम रुख धरमु ब्रतु पराधीन मोहि जानि।
सब कें संमत सर्ब हित करिअ पेमु पहिचानि॥ २९३॥

चौं० – भरत बचन सुनि देखि सुभाऊ। सहित समाज सराहत राऊ॥
सुगम अगम मृदु मंजु कठोरे। अरथु अमित अति आखर थोरे॥
ज्यों मुखु मुकुर मुकुरु निज पानी। गहि न जाइ अस अद्भुत बानी॥

हे भाषण ऐकून भरताचे डोळे अश्रूंनी भरून आले. अंगावर रोमांच आले. अशा स्थितीत मोठ्या प्रयत्नाने त्यांनी धीर धरला व ते बोलू लागले.

"हे प्रभो! आपण माझ्या पित्याप्रमाणे प्रिय व पूज्य आहात; आणि कुलगुरू वसिष्ठांप्रमाणे आमच्या हिताला मातापिताही जपणार नाहीत! विश्वामित्र आदिकरून मुनी, सचिव वगैरे मंडळींनी ही सभा भरली आहे. शिवाय सद्यःकालीन ज्ञानाचे सागर असे आपणही आज उपस्थित आहात. हे स्वामी! मला आपला बालक व आज्ञेप्रमाणे वागणारा सेवक समजून योग्य ती आज्ञा द्यावी.

"अशा प्रकारचे पुण्यस्थळ, एवढ्या ज्ञानी व पूज्य मंडळींची ही सभा. अशा ठिकाणी आपण प्रश्न विचारला आता मी जर गप्प बसलो तर ते पातक होणार व बोललो तर मूर्खपणा पदरी येणार! तथापि मी आता लहान तोंडी मोठा घास घेत आहे. माझे दैवच यावेळी प्रतिकूल झाले आहे. हे पाहून आपण मला क्षमा करावी.

वेदशास्त्रे व पुराणे यात प्रसिद्ध असून, सर्व जगताला जाहीर असणारी ही गोष्ट आहे की, सेवाधर्म अत्यंत कठीण आहे. आता कसा विलक्षण प्रसंग ओढवला पाहा! स्वामींसाठी करावयाचे कर्तव्य व स्वतःचा स्वार्थ यात विरोध उत्पन्न झाला आहे. वैर आंधळे बनते व प्रेम विवेकशून्य होते. (म्हणजे स्वार्थाने बोलले अगर कर्तव्याची भूमिका धरली तरी दोन्ही बाजूंनी चूक होण्याची भीती आहेच.)

"म्हणून माझी परवशता ध्यानी घ्यावी व मला काय वाटते ते न पाहता श्रीरामचंद्रांचा रोख समजून घ्यावा, धर्म आणि सत्यव्रत यांचे पालन व्हावे. सर्वांना ती गोष्ट मान्य असावी व त्यात आपले सर्वांचेच कल्याण साधावे असे जे ठरेल ते सगळ्यांची आवड सांभाळून अवश्य करावे." २९३

याप्रमाणे भरताचे भाषण ऐकले त्यांच्या [illegible] झाला आणि सर्व समाजासह जनकराजे भरताची वाखाणणी करू लागले.

"भरताचे वचन दिसण्यास सोपे पण कळण्यास कठीण. जसे मंजुळ व कोमल, तसेच ते न्याय-निष्ठुरही आहे! त्यातील अक्षरांची संख्या अगदीच थोडी पण अपार अर्थ अगदी भरगच्च भरला आहे! आपल्या मुखाचे प्रतिबिंब आरशात पडते व आरसा हातात असतो पण असे असूनही ते प्रतिबिंब मात्र हाती येत नाही! बरोबर असाच प्रकार भरताच्या या अद्भुतवाणीचा आहे! केवळ शब्दांच्या साह्याने त्यातील अर्थ पडताळता येत नाही!"



भूप भरतु मुनि सहित समाजू । गे जहँ बिबुध कुमुद द्विजराजू ॥
सुनि सुधि सोच बिकल सब लोगा । मनहुँ मीनगन नव जल जोगा ॥
देवँ प्रथम कुलगुर गति देखी । निरखि बिदेह सनेह बिसेषी ॥
राम भगतिमय भरतु निहारे । सुर स्वारथी हहरि हियँ हारे ॥
सब कोउ राम पेममय पेखा । भए अलेख सोच बस लेखा ॥

दो० — रामु सनेह सकोच बस कह ससोच सुरराजु ।
रचहु प्रपंचहि पंच मिलि नाहिं त भयउ अकाजु ॥ २९४ ॥

चौ० — सुरन्ह सुमिरि सारदा सराही । देवि देव सरनागत पाही ॥
फेरि भरत मति करि निज माया । पालु बिबुध कुल करि छल छाया ॥
बिबुध बिनय सुनि देवि सयानी । बोली सुर स्वारथ जड़ जानी ॥
मो सन कहहु भरत मति फेरू । लोचन सहस न सूझ सुमेरू ॥
बिधि हरि हर माया बड़ि भारी । सोउ न भरत मति सकइ निहारी ॥
सो मति मोहि कहत करु भोरी । चंदिनि कर कि चंडकर चोरी ॥

एवढे बोलून जनक स्वस्थ राहिले. पुढे काय बोलावे हे कोणालाच समजेना ! तेव्हा महाराज, मुनि-वसिष्ठ आणि सर्वच समाज तेथून उठला आणि देवतारूपी कुमुदांना खुलविणारे रामचंद्र जेथे बसले होते तेथे ही सर्व मंडळी येऊन दाखल झाली.

जनक व वसिष्ट यांच्यासारख्यांनासुद्धा या प्रसंगी मार्गदर्शन करता येत नाही हे पाहून पावसाळ्या-पूर्वी पहिले पाणी आल्याने मासे जसे तडफडतात त्याप्रमाणे सर्व समाजाची शोक विव्हळ स्थिती झाली.

देवतांनी प्रथम कुलगुरु वसिष्ठांना स्नेहांकुल झालेले पाहिले व नंतर त्यांना विदेह भूपतीचा विशेष प्रकारचा जिव्हाळा दिसून आला, त्याचप्रमाणे रामभक्तीने ओतप्रोत भरलेला भरत त्यांच्या नजरेत भरून आणि त्यांची स्वार्थी मने निराश होऊन भीतीने गांगरून गेली ! म्हणून त्यांनी सर्व समाजाकडे एकवेळ दृष्टी टाकली तो तो सर्व रामप्रेममयच दिसले ! त्यामुळे त्यांच्या शोकाला सीमाच उरली नाही ! !

स्वार्थी सुर हरले – घावरले

हे पाहून दुःखाने हैराण झालेला देवेंद्र म्हणू लागला की, सर्वत्र रामप्रेम व भक्ती आणि रामतर स्नेह व संकोच यांना वश होणारे; एवढ्याकरिता सर्वांनी एकत्र होऊन आता काही तरी मायेचे कारस्थान करा. नाही तर सर्वच काम बिघडणार ! २९४

देवतानी लगेच सरस्वतीचे स्मरण केले; आणि ती प्रकट होताच तिची स्तुती करून शेवटी प्रार्थना केली, " हे देवी आम्ही सर्व देव तुला शरण आलो आहो. आमचे आता तूच रक्षण कर. तुझ्याशिवाय आम्हाला आता दुसरा थारा उरला नाही. आपल्या मायेची रचना करून भरताची मती फिरव; आणि काही तरी युक्ती करून या हताश देवसमाजाचे रक्षण करावे. "

ही देवतांची विनंती ऐकून स्वार्थांध देवांची बुद्धी चळली, अशी सरस्वतीची खात्री झाली. ती सुज्ञ असल्याने सुरेंद्राला म्हणते,

" मला भरताची बुद्धी फिरव म्हणून सांगत आहात, हजारो डोळे असूनही तुम्हांला सुमेरू पर्वत दिसत नाही ! वस्तुतः ब्रह्मा, विष्णू व महेश यांची माया अत्यंत प्रबल; परंतु तीसुद्धा भरताच्या मतीकडे पाहण्यास अबला ठरते ! अशा प्रभावी भरतमतीला मला फिरव म्हणता ? चांदण्याने चंद्रालाच कधी चोरला आहे काय ?

भरत हृदयँ सिय राम निवासू । तहँ कि तिमिर जहँ तरनि प्रकासू ।।
अस कहि सारद गइ विधि लोका । विबुध बिकल निसि मानहुँ कोका ।।

दो० – सुर स्वारथी मलीन मन कीन्ह कुमंत्र कुठाटु ।
रचि प्रपंच माया प्रबल भय भ्रम अरति उचाटु ।। २९५ ।।

चौ० – करि कुचालि सोचत सुरराजू । भरत हाथ सबु काजु अकाजू ।।
गए जनकु रघुनाथ समीपा । सनमाने सब रबिकुल दीपा ।।
समय समाज धरम अबिरोधा । बोले तब रघुबंस पुरोधा ।।
जनक भरत संबादु सुनाई । भरत कहाउति कही सुहाई ।।
तात राम जस आयसु देहू । सो सबु करै मोर मत एहू ।।
सुनि रघुनाथ जोरि जुग पानी । बोले सत्य सरल मृदु बानी ।।
बिद्यमान आपुनि मिथिलेसू । मोर कहब सब भाँति भदेसू ।।
राउर राय रजायसु होई । राउरि सपथ सही सिर सोई ।।

दो० – राम सपथ सुनि मुनि जनकु सकुचे सभा समेत ।
सकल बिलोकत भरत मुखु बनइ न उतरु देत ।। २९६ ।।

(चांदण्याने कधी प्रखर किरणाच्या सूर्याला लपवले आहे काय ?) भरताच्या हृदयात सीतारामांचा निवास आहे. ज्या ठिकाणी सूर्याचा स्वच्छ प्रकाश आहे, तेथे अंधार कसा निर्माण करावयाचा ? "

इतके बोलून सरस्वती सत्यलोकाला निघून गेली. त्यामुळे रात्री चक्रवाक जसे कासावीस होतात, तशी देवांची व्याकुळता वाढली. अखेर, स्वार्थामुळे मलिन झालेल्या मनाने देवांनी कुत्सित विचार केला. कपट-मायेच्या जोरावर निंद्य षड्यंत्र निर्माण केले ! त्याच्या मायावी प्रबल [illegible] भ्रम, भय, अप्रीती व उच्चाटन यांचा सर्वत्र फैलाव झाला ! २९५

हे कपट कुयंत्र करूनही सुरपतीची चिंता सुरूच होती. त्याची खात्री होती की, काम साधणे अगर बिघडणे हे सर्वस्वी भरताच्याच हाती.

चित्रकूट : दुसरा दरबार

वर सांगितल्याप्रमाणे जनक रघुनाथांच्या समीप जाताच रवि कुळाच्या दीपाने –श्रीरामांनी सर्वांचे योग्य स्वागत केले.

सर्व सभासद आपापल्या आसनावर बसल्यानंतर, रघुकुलाचे पुरोहित वसिष्ठ यांचे भाषण सुरू झाले. अर्थात् तो प्रसंग, तो समाज व धर्म विचार यांना अनुकूल असेच ते होते. त्यांनी प्रथम जनक भरत संवाद निवेदन केला. त्यानंतर भरताने केलेल्या सुन्दर भाषणाचे वर्णन केले; आणि 'हे तात राम ! आपण जशी आज्ञा द्याल त्याप्रमाणे सर्व जण करतील, असे मला वाटते. असे म्हणून त्यांनी आपले भाषण संपवले.

हे ऐकताच दोन्ही हात जोडून सत्य, सरळ व मधुर असे भाषण रघुनाथांनी केले:–

" आपण व मिथिलापती उपस्थित असता मी काही सांगणे हे सर्वथैव अयोग्य आहे. आपण महाराजांच्या विचारे जी आज्ञा द्याल ती, आपली शपथ घेऊन सांगतो –मला शिरसामान्य आहे. "

श्रीरामचंद्रांची ही शपथ ऐकताच मुनिवर व जनक यांच्यासह सर्वच सभासदांनी संकोचाने खाली मान घातली ! कोणाच्याच मुखातून उत्तर म्हणून एकही शब्द येईना. सगळे भरताच्या मुखाकडे पाहू लागले. २९६

चौ० – सभा सकुच बस भरत निहारी । रामबंधु धरि धीरजु भारी ॥
कुसमउ देखि सनेहु सँभारा । बढ़त बिंधि जिमि घटज निवारा ॥
सोक कनकलोचन मति छोनी । हरी बिमल गुन गन जगजोनी ॥
भरत बिबेक बराहँ बिसाला । अनायास उधरी तेहि काला ॥
करि प्रनामु सब कहँ कर जोरे । रामु राउ गुर साधु निहोरे ॥
छमब आजु अति अनुचित मोरा । कहउँ बदन मृदु बचन कठोरा ॥
हियँ सुमिरी सारदा सुहाई । मानस तें मुख पंकज आई ॥
बिमल बिबेक धरम नय साली । भरत भारती मंजु मराली ॥

दो० – निरखि बिबेक बिलोचनन्हि सिथिल सनेहँ समाजु ।
करि प्रनामु बोले भरतु सुमिरि सीय रघुराजु ॥ २९७ ॥

चौ० – प्रभु पितु मातु सुहृद गुर स्वामी । पूज्य परम हित अंतरजामी ॥
सरल सुसाहिबु सील निधानू । प्रनतपाल सर्बग्य सुजानू ॥
समरथ सरनागत हितकारी । गुनगाहकु अवगुन अघ हारी ॥
स्वामि गोसाँइहि सरिस गोसाईं । मोहि समान मैं साइँ दोहाईं ॥
प्रभु पितु बचन मोह बस पेली । आयउँ इहाँ समाजु सकेली ॥

सर्वच सभा स्तंभित झाली आहे, असे पाहून रामबंधूने पराकाष्ठा करून धीर धरला. अगस्तिऋषींनी वाढणाऱ्या विंध्यपर्वताला जसा आवरला त्याप्रमाणे, भरताने आपल्या अंतरंगातून उसळणाऱ्या प्रेम-प्रवाहाला प्रतिकूल काळ पाहून सावरले.

शोकरूपी हिरण्याक्षाने सर्व सभासदांच्या बुद्धिरूपी पृथ्वीचे हरण केले. त्या बुद्धीतूनच पावन अशा गुणसमूहरूपी जगाची उत्पत्ती होणार ! अशावेळी भरताच्या विवेकरूपी विशाल वराहाने अगदी सहज (विनाप्रयास) [शोकरूपी हिरण्याक्षाचा नाश करून] तिचा तत्काळ उद्धार केला !

सर्व सभासदांना दोन्ही हात जोडून प्रणाम केला व श्रीरामचंद्र, जनक, गुरू वसिष्ठ आणि सर्व साधुसंत यांना उद्देशून विनंतीपूर्वक बोलण्यास भरतांनी प्रारंभ केला.

" आजच्या प्रसंगी माझ्या या अयोग्य कृतीला क्षमा करावी. कारण मी कोमल मुखाने कठोर भाषण करत राहिलो आहे."

लगेच भरतांनी सुंदर अशा सरस्वतीचे हृदयात स्मरण केले त्याबरोबर भरताच्या (नाभिरुपी) मानस सरोवरातून येऊन ती भरतमुखकमलात विराजमान झाली. विवेक, धर्म व नीतियुक्त अशी भरताची निर्मलवाणी हीच सुन्दर हंसिनी असून ती आता गुणदोषांचा विवेक पृथक्करण करील.

भरतांनी सर्व समाजाकडे स्नेह शिथिल झालेला आपल्या विवेक नयनाने पाहिले, हृदयात सीतारामांचे स्मरण केले व सर्वांना प्रणाम करून आपल्या भाषणास प्रारंभ केला. २९७

" हे प्रभो ! आपण पिता, माता, सुहृद्, गुरू, स्वामी, परम पूज्य, परमहित साधणारे व अंतर्यामी वास करणारे आहात, तसेच सरळ हृदयाचे श्रेष्ठस्वामी असून, शीलाचे भाण्डार आहात, सर्वज्ञ व सुजाण असून शरणागताचे रक्षण करणारे आहात, त्याचप्रमाणे फार समर्थ, असून शरण आलेल्यांचे हित करणारे आहात सद्‌गुणांचा आदर करणारे असून, दुर्गुण व पाप नष्ट करणारे असेही आपण आहात. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे आपणासारखे सुस्वामी आपणच व अशा स्वामींचा द्रोह करणारा, या सर्व जगात माझ्यासारखा मीच !

" मोहाला बळी पडून प्रभूची (आपली) व पित्यांची आज्ञा मोडली; मोठा समाज सजवून चित्रकूट

जग भल पोच ऊँच अरु नीचू । अमिअ अमरपद माहुरु मीचू ॥
राम रजाइ मेट मन माहीं । देखा सुना कतहुँ कोउ नाहीं ॥
सो मैं सब बिधि कीन्हि ढिठाई । प्रभु मानी सनेह सेवकाई ॥

दो० – कृपाँ भलाई आपनी नाथ कीन्ह भल मोर ।
दूषन भे भूषन सरिस सुजसु चारु चहु ओर ॥ २९८ ॥

चौ० – राउरि रीति सुबानि बड़ाई । जगत बिदित निगमागम गाई ॥
कूर कुटिल खल कुमति कलंकी । नीच निसील निरीस निसंकी ॥
तेउ सुनि सरन सामुहें आए । सकृत प्रनामु किहें अपनाए ॥
देखि दोष कबहुँ न उर आने । सुनि गुन साधु समाज बखाने ॥
को साहिब सेवकहि नेवाजी । आपु समाज साज सब साजी ॥
निज करतूति न समुझिअ सपनें । सेवक सकुच सोचु उर अपनें ॥
सो गोसाइँ नहिं दूसर कोपी । भुजा उठाइ कहउँ पन रोपी ॥
पसु नाचत सुक पाठ प्रबीना । गुन गति नट पाठक आधीना ॥

दो० – यों सुधारि सनमानि जन किए साधु सिरमोर ।
को कृपाल बिनु पालिहैं बिरिदावलि बरजोर ॥ २९९ ॥

पर्वतावर आले. या सर्व भूतलावर, भले-बुरे, उंच अथवा नीच, अमृत व अमरपद, विष व मृत्यु यांपैकी कोणीही असा पाहिला अगर ऐकला नाही, जो श्रीरामचंद्रांची आज्ञा नुसत्या मनानेही मोडू शकेल !

"परंतु हे देव ! तशाप्रकारचे धाडस मी केले, आणि प्रभूंनी अशा अपराधाला प्रेमाने उत्तम सेवेचे रूप दिले. हे नाथ ! आपण आपल्या कृपेने व भलेपणाने माझे फार हित साधले, त्यामुळे माझ्या दूषणांना भूषणांचा मोठेपणा आला व चारी दिशांना माझी सुकीर्ती पसरली ! २९८

"हे नाथ ! आपली वागण्याची रीत व सुंदर स्वभावाची महती सर्व जगात प्रसिद्ध असून, वेदशास्त्रांनी तिचे गायन केले आहे. क्रूर, कुटिल, खल, कुबुद्धी, कलंकी, नीच, शीलहीन, निरीश्वरवादी व अनाथ निःशंक (बेछूट) असा असूनही जर तो आपणाला सन्मुख होऊन शरण आला आहे, असे आपल्या कानी आले, तर त्याने फक्त एकवेळच प्रणाम केल्याबरोबर त्याला आपण आपलासा करता !

"मग, त्याचे दोष दिसले तरी ते आपण कधीही विचारात घेत नाही व त्याचे गुण नुसते ऐकल्यावरच त्यांचे संतांच्या समाजात वर्णन करता. अशा प्रकारे आपल्या सेवकावर कृपा करणारा स्वामी कोण आहे की, जो आपण होऊनच आपल्या सेवकाच्या सर्व गरजा पूर्ण करून त्याचे रक्षण करतो. आपल्या सेवकांकरता आपण काय काय केले याचे स्वप्नातही स्मरण न करता, उलट आपल्या दासाला संकोच होऊ नये, यासाठी मात्र सतत काळजी करतो.

"एवढ्याकरता मी दोन्ही हात वर करून प्रतिज्ञापूर्वक सांगतो की, असा स्वामी आपल्याशिवाय दुसरा कोणीच सापडणार नाही ! (माकडे) नाचतात, किंवा शिकवल्याप्रमाणे पोपट बोलण्यात पटाईत होतात. परंतु पोपटाचा बोलण्याचा गुण अगर माकडादिकांचा नाचण्याचा पराक्रम सर्वस्वी बोलवणाऱ्या व नाचवणाऱ्या व्यक्तींच्या आधीन असतो !

"तथापि आपल्या सेवकाकडून अशाप्रकारे बिघडलेली गोष्ट सुधारून घेऊन त्याचा एवढा गौरव केला की, त्याला सर्व साधुसज्जनांचा आपण मुकुटमणी बनवला ! हे कृपाळो ! आपल्याशिवाय अशा प्रकारचे आपले ब्रीद प्रयत्न करूनही दुसरा कोण योग्य रीतीने पाळू शकेल ! २९९

चौ० – सोक सनेहँ कि बाल सुभाएँ । आयउँ लाइ रजायसु बाएँ ॥
तबहुँ कृपाल हेरि निज ओरा । सबहि भाँति भल मानेउ मोरा ॥
देखेउँ पाय सुमंगल मूला । जानेउँ स्वामि सहज अनुकूला ॥
बड़ें समाज बिलोकेउँ भागू । बड़ीं चूक साहिब अनुरागू ॥
कृपा अनुग्रहु अंगु अघाई । कीन्हि कृपानिधि सब अधिकाई ॥
राखा मोर दुलार गोसाईं । अपनें सील सुभायँ भलाईं ॥
नाथ निपट मैं कीन्हि ढिठाई । स्वामि समाज सकोच बिहाई ॥
अबिनय बिनय जथारुचि बानी । छमिहि देउ अति आरति जानी ॥
दो० – सुहृद सुजान सुसाहिबहि बहुत कहब बड़ि खोरि ॥
आयसु देइअ देव अब सबइ सुधारी मोरि ॥ २०० ॥
चौ० – प्रभु पद पदुम पराग दोहाई । सत्य सुकृत सुख सीवँ सुहाई ॥
सो करि कहउँ हिए अपने की । रुचि जागत सोवत सपने की ॥
सहज सनेहँ स्वामि सेवकाई । स्वारथ छल फल चारि बिहाई ॥
अग्या सम न सुसाहिब सेवा । सो प्रसादु जन पावै देवा ॥
अस कहि प्रेम बिबस भए भारी । पुलक सरीर बिलोचन बारी ॥
प्रभु पद कमल गहे अकुलाई । समउ सनेहु न सो कहि जाई ॥

" मी प्रेमामुळे शोकाकुल होऊन अगर बालकाच्या अज्ञपणाने आपले वचन खरोखर मोडून येथे आलो. तरीही कृपाळू स्वामींनी आपले ब्रीद ध्यानी, घेऊन माझे हे सर्वच कृत्य गोड मानून घेतले. सर्व मांगल्याचे मूळ असे आपले चरण मला पाहावयास मिळाले तेव्हाच माझे स्वामी स्वभावतःच मला अनुकूल आहेत हेही ध्यानी आले. एवढया मोठ्या समाजात स्वतःचे भाग्य पाहावयास सापडले की एवढा मोठा अपराध माझ्या हातून घडला असताही माझ्यावर स्वामींचा केवढा स्नेह आहे !

" कृपानिधानानी याप्रमाणे माझ्यावर सर्वापेक्षा जास्त भरपूर कृपा व अनुग्रह केला. (कारण त्या कृपेस लागणारी पात्रता माझ्या ठिकाणी लवलेशाही नाही) हे स्वामी ! आपल्या स्वाभाविक सौजन्याने व सुशीलाने आपण माझे सर्व लाड पुरविले.

" हे नाथ ! स्वामी व श्रेष्ठाचा एवढा समाज यांची भीड न धरता तसेच आपले बोलणे विनयाचे किंवा अविनयाचे याचा विचार न करता मन मानेल तसे भापण करण्याचे मी फारच मोठे धाडस केले आहे तथापि हे देवा ! माझी शोकार्त मनःस्थिती जाणून मला क्षमा करावी.

निर्हेतुक कल्याण करणारा जाणता व श्रेष्ठ अशा मालकापुढे अधिक बोलणे हासुद्धा मोठा अपराध आहे. म्हणून हे प्रभो ! आता मला कोणतीही आज्ञा द्यावी. तिच्या पालनानेच मी पूर्ण निर्दोषी होईन. २००

प्रभूच्या चरणकमलातील रजांची जी शपथ तीच सत्य, सुकृत व सुख यांची शुभ सीमा आहे. मग प्रभुपदरज व प्रभुपद यांचे काय सांगावे ? ती शपथ घेऊन, जागेपणी, झोपेत व स्वप्नातही असणारी माझ्या हृदयाची आवड मी सांगतो.

" ती आवड म्हणजे कपट, स्वार्थ व चारी पुरुषार्थ सोडून स्वाभाविक प्रेमाने स्वामीची सेवा करणे; आणि आज्ञापालनाप्रमाणे (आपल्या श्रेष्ठ स्वामीची) आणखी कोणतीही सेवा असू शकत नाही. हे देव ! या दासाला आज्ञारूपी तो प्रसाद लाभावा ! "

अशा प्रकारे बोलत असता क्षणाक्षणाने अंतरीच्या प्रेमाचे भरते वाढतच होते; वरील वाक्य संपताच भरतांच्या शरीरावर रोमांच उठले व डोळ्यातून अश्रूंचा पूर सुरू झाला. अत्यंत व्याकुळ झाल्याने भाषण बंद पडले, आणि भरताने प्रभुपदकमलांना मिठी मारली ! तो प्रसंग व ते प्रेमाचे भरते यांचे वर्णन करणेच अशक्य !

कृपासिंधु सनमानि सुबानी। बैठाए समीप गहि पानी॥
भरत बिनय सुनि देखि सुभाऊ। सिथिल सनेहँ सभा रघुराऊ॥

छं० – रघुराउ सिथिल सनेहँ साधु समाज मुनि मिथिला धनी।
मन महुँ सराहत भरत भायप भगति की महिमा घनी॥
भरतहि प्रसंसत बिबुध बरषत सुमन मानस मलिन से।
तुलसी बिकल सब लोग सुनि सकुचे निसागम नलिन से॥

सो० – देखि दुखारी दीन दुहु समाज नर नारि सब।
मघवा महा मलीन मुए मारि मंगल चहत॥ ३०१॥

चौ० – कपट कुचालि सीवँ सुरराजू। पर अकाज प्रिय आपन काजू॥
काक समान पाकरिपु रीती। छली मलीन कतहुँ न प्रतीती॥
प्रथम कुमत करि कपटु सँकेला। सो उचाटु सब कें सिर मेला॥
सुरमायाँ सब लोग बिमोहे। राम प्रेम अतिसय न बिछोहे॥
भय उचाट बस मन थिर नाहीं। छन बन रुचि छन सदन सोहाहीं॥
दुबिध मनोगति प्रजा दुखारी। सरित सिंधु संगम जनु बारी॥
दुचित कतहुँ परितोषु न लहहीं। एक एक सन मरमु न कहहीं॥

कृपासिंधू श्रीरामचंद्रांनी मधुर वाणीने भरताचा सन्मान केला व त्यांचा हात धरून अगदी आपल्या जवळ बसवून घेतले. भरतांची ती विनंती व स्वभाव पाहून सर्व सभा व रघुराजही अंतरीच्या स्नेहाला पूर येऊन सद्‌गदित झाले.

रघुराज, संतसाधूंचा तो समाज, मुनिवर, मिथिलाधिपती असे सर्वच स्नेहाकुळ होऊन मनोमनी भरताच्या श्रेष्ठ भक्तीची व बंधुप्रेमाची भरपूर स्तुती करू लागले. आकाशातील देवांनी मात्र अजून शंकित असलेल्या भरताची प्रशंसा करून त्याच्यावर पुष्पवृष्टी केली.

परंतु रात्र पडू लागताच ज्याप्रमाणे कमले कोमेजतात त्याप्रमाणे भरताचे भाषण ऐकून सर्व सभासद व्याकुळ झाले.

शोकाने अगोदरच नित्राण झालेल्या दोन्ही समाजातील नरनारींना दीन आणि दुःखी पाहिल्यावर अत्यंत मलिन अशा मनाच्या इंद्राला मेलेल्याना मारून आपले मंगल साधण्याची इच्छा होत आहे! २७१.

यांत नवल काहीच नाही. कारण कपट व कारस्थान यांची परम सीमा म्हणजे सुरेंद्र! दुसऱ्याची हानी व स्वतःचा लाभ हा त्याला प्रिय! पाक दैत्याचा शत्रु जो इन्द्र त्याची ही रीत कावळ्याप्रमाणेच आहे. तो कपटी व क्षुद्र अंतःकरणाचा आहे. त्यामुळे त्याचा कोणावरच विश्वास नाही. प्रथमच त्याने कुत्सित विचाराने अनेक प्रकारचे कपट कारस्थान रचले. आता त्याने त्याचा प्रयोग सर्वांच्याच मस्तकावर केला. त्या देवमायेने सर्व लोकांना विशेष प्रकारे मोहित केले. तथापि त्यांच्या हृदयातील श्रीरामचंद्राचे अत्यंत प्रेम मात्र समूळ निघाले नाही! तथापि उच्चाटनाचा परिणाम होऊन लोकांची मने भयभीत, अस्थिर झाली. क्षणभर रामचरणांजवळ वनात राहावे असे वाटे, तर दुसऱ्याच क्षणी घराची ओढ उत्पन्न व्हावी. नदी समुद्राला मिळाली म्हणजे केव्हा तिचे पाणी समुद्रात जाते, तर केव्हा समुद्राचे पाणी नदीत शिरते. त्यामुळे जशी त्या पाण्याची अस्थिर चंचल गती होते, तशीच लोकांची द्विधा मनःस्थिती झाल्याने सर्वच समाज अत्यंत दुःखी झाला.

चित्ताची शांती अशा प्रकारे नष्ट झाल्यामुळे कोणाच्याच अंतःकरणात संतोष उरला नाही, पण आपल्या मनातील ही चलबिचल एक दुसऱ्यास [illegible] तयार नव्हता. कृपानिधान श्रीरामचंद्रांनी हे पाहिल्यावर ते

लखि हियँ हँसि कह कृपानिधानू। सरिस स्वान मघवान जुबानू ॥

दो० — भरतु जनकु मुनिजन सचिव साधु सचेत बिहाइ।
लागि देवमाया सबहि जथाजोगु जनु पाइ ॥ ३०२ ॥

चौ० — कृपासिंधु लखि लोग दुखारे। निज सनेहँ सुरपति छल भारे ॥
सभा राउ गुर महिसुर मंत्री। भरत भगति सब कै मति जंत्री ॥
रामहि चितवत चित्र लिखे से। सकुचत बोलत बचन सिखे से ॥
भरत प्रीति नति बिनय बड़ाई। सुनत सुखद बरनत कठिनाई ॥
जासु बिलोकि भगति लवलेसू। प्रेम मगन मुनिगन मिथिलेसू ॥
महिमा तासु कहै किमि तुलसी। भगति सुभायँ सुमति हियँ हुलसी ॥
आपु छोटि महिमा बड़ि जानी। कबिकुल कानि मानि सकुचानी ॥
कहि न सकति गुन रुचि अधिकाई। मति गति बाल बचन की नाईं ॥

दो० — भरत बिमल जसु बिमल बिधु सुमति चकोरकुमारि।
उदित बिमल जन हृदय नभ एकटक रही निहारि ॥ ३०३ ॥

मनात हसले व म्हणाले, ' कुत्रा, इंद्र व कामी तरुण पुरुष हे सर्व एकाच प्रकारच्या स्वभावाचे असतात. यात शंका नाही [पाणिनीचे सूत्र—श्वायुवा मघवन्नपि ! सारखी रूपे.]

भरत, जनक, मुनिमंडळी, मंत्री, व ज्ञानी साधुसंत एवढे सोडून, बाकीच्या सर्वांच्या प्रकृतिधर्माला अनुसरून कमजास्त प्रमाणात देवमायेने आपला पगडा त्यांच्यावर बसवला. ३०२

कृपासागर श्रीरामचंद्रांना, आपल्यावरील जनतेच्या प्रेमामुळे इंद्राकडून त्यांचा होणारा अत्यंत छळ तत्काळ दिसून आला.

आपल्यावरील जनतेचे प्रेम एका बाजूस आणि इंद्राची माया दुसरीकडे यांचा परिणाम होऊन सर्व लोक दुःखी झाले आहेत, असे कृपासागर श्रीरामचंद्रांना दिसून आले.

[याप्रमाणे इंद्राच्या कारस्थानाचा परिणाम पाहिल्यानंतर पुनः सभेतील वृत्त पाहण्यासारखे आहे.]

सर्व सभासद, राजाजनक, वसिष्ठगुरू आणि मंत्रिमंडळी अशा सर्वांच्या बुद्धीला भरताच्या पराकाष्ठेच्या भक्तीने चांगलेच गुंगवले !

चित्राप्रमाणे सभेतील सर्व लोक रामाकडे टक लावून पाहू लागले. शिकवून तयार केलेले बोलताना जशी लाज वाटते, त्याप्रमाणे सर्वच संकोचित होऊन स्तब्ध राहिले. कारण, भरताची प्रीती, नम्रता, विनय आणि मोठेपणा ऐकण्यास सुखकारक परंतु मुखाने त्याचे वर्णन करणे कठीण ! ज्याच्या भक्तीचा नुसता लवलेश पाहून वसिष्ठाच्या सारखे ब्रह्मर्षी व विदेहासारखे मिथिलेश्वर प्रेममग्न होतात, त्या भरताचा महिमा तुलसीदास कसे वर्णन करणार ! परंतु त्यांची भक्ती व त्यांच्या उदात्त भावना यामुळे कवीच्या हृदयात सद्‌बुद्धी मात्र विकसित होऊन राहिली आहे.

तथापि त्या बुद्धीला स्वतःच्या लहानपणाची व भरतमहिमा महान् असल्याची जाणीव असल्यामुळे तिने कविपरंपरेची मर्यादा मानली व ती भरताच्या मोठेपणाचे वर्णन करण्यास लाजली ! त्यांच्या सद्‌गुणसमुच्चया-बद्दल आवड तर अमर्याद आहे. परंतु लहान मुलांच्या भाषेप्रमाणे त्या गुणाचे वर्णन करण्यास ती बुद्धी कुण्ठित होते.

भरताचे निर्मल यश हा एक निष्कलंक चंद्र आहे आणि कवीची सुबुद्धी ही एक चकोर कुमारी आहे. भक्तांच्या शुद्ध हृदयरूपी आकाशात हा भरत-यश-निष्कलंक-चंद्रमा उगवलेला पाहून ती सुबुद्धी—चकोरी एकसारखी टकमक पाहत राहिली आहे; मग त्या यशाचे वर्णन कोण करणार ? ३०३

चौ० — भरत सुभाउ न सुगम निगमहूँ । लघु मति चापलता कबि छमहूँ ॥
कहत सुनत सति भाउ भरत को । सीय राम पद होइ न रत को ॥
सुमिरत भरतहि प्रेमु राम को । जेहि न सुलभु तेहि सरिस बाम को ॥
देखि दयाल दसा सबही की । राम सुजान जानि जन जी की ॥
धरम धुरीन धीर नय नागर । सत्य सनेह सील सुख सागर ॥
देसु कालु लखि समउ समाजू । नीति प्रीति पालक रघुराजू ॥
बोले बचन बानि सरबसु से । हित परिनाम सुनत ससि रसु से ॥
तात भरत तुम्ह धरम धुरीना । लोक बेद बिद प्रेम प्रबीना ॥

दो० — करम बचन मानस बिमल तुम्ह समान तुम्ह तात ।
गुर समाज लघु बंधु गुन कुसमयँ किमि कहि जात ॥ ३०४ ॥

चौ० — जानहु तात तरनि कुल रीती । सत्यसंध पितु कीरति प्रीती ॥
समउ समाजु लाज गुरजन की । उदासीन हित अनहित मन की ॥
तुम्हहि बिदित सबही कर करमू । आपन मोर परम हित धरमू ॥
मोहि सब भाँति भरोस तुम्हारा । तदपि कहउँ अवसर अनुसारा ॥
तात तात बिनु बात हमारी । केवल गुरकुल कृपाँ सँभारी ॥
नतरु प्रजा परिजन परिवारू । हमहि सहित सबु होत खुआरू ॥

भरताच्या स्वभावाचे वर्णन वेदांनाही सुगम नाही ! म्हणून माझ्या अल्पबुद्धीच्या चांचल्याबद्दल कविजनांनी क्षमा करावी ! भरतांच्या सद्भावनांची ही कथा सांगत व ऐकत असता कोणा मानवाचे श्रीसीता-रामचरणी प्रेम उत्पन्न होणार नाही ? भरताच्या नुसत्या स्मरणाने ज्याला रामभक्ती सुलभ होणार नाही त्याच्या सारखा या जगात अभागी कोण ? असो.

(आता पुनः चित्रकूटावरील दरबारात काय चालले ते पाहू या.)

दयाळू व सुजाण अशा [illegible] सभेतील सर्वांची ती विस्कळ स्थिती पाहिली. आपला परमभक्त व बंधू भरत याच्या हृदयातील भावना त्यांनी आणल्या आणि बोलण्याचे ठरवले ! धर्मधुरंधर धैर्यशाली, नीतिचतुर सत्य, स्नेह, शील व सुखसागर, नीती राजन प्रीतीचे पालन करणारे असे श्रीरामचंद्र असल्याने ते स्थळ, तो प्रसंग आणि तो दरबार यांना अनुसरून त्यांनी भाषण केले. त्यांचे भाषण म्हणजे वाणीचे जणू सर्वस्व-हित, परिणामी आणि ऐकण्यास चंद्राच्या रसा (अमृता) प्रमाणेच होते.

श्रीरामचंद्र म्हणाले, ' बाळा, भरता ! तुम्ही धर्माची धुरा धारण करणारे आहात. लौकिक व्यवहार आणि वेदांचे रहस्य दोन्हीचे तुम्ही जाणते आहात. इतके असूनही शुद्ध प्रेम करण्यात अत्यंत प्रवीण आहात ! कर्माने, वाणीने व मनाने तुमच्यासारखे निर्मळ फक्त तुम्ही एकटेच ! वडील मंडळींच्या समाजात व अशा प्रतिकूल प्रसंगी धाकट्या बंधूच्या गुणांचे वर्णन कसे करावे ! ३०४

" हे तात ! सूर्यकुलाची रीत, सत्य प्रतिज्ञअशा आपल्या पित्याची कीर्ती व प्रीती, पुढे बसलेला समाज, हा बिकट प्रसंग, गुरुजनांची मर्यादा, [illegible] मित्र, उदासीन आणि शत्रू यांच्या मनातील भावना या सर्वांची तुम्हाला पूर्ण जाणीव आहे.

" तसेच सर्वांची व्यक्तिशः कर्तव्ये, तुमचे व माझे परमहित साधणारा यावेळी कोणता धर्म आहे, याचेही ज्ञान तुम्हाला आहे. त्यामुळे माझा तुमच्यावर संपूर्ण भरंवसा आहे तथापि [illegible] चार शब्द सांगतो.

" बाळ भरता ! आपल्या पित्याच्या अभावी आपली होणारी दुर्दशा केवळ पूर्ण गुरुकृपेनेच वाचली ! नाहीतर, सर्व प्रजा, कुटुंबीय मंडळी व सगळा गोतावळा यांचा [illegible] सर्वस्वी नाश झाला असता.

जौं बिनु अवसर अथवँ दिनेसू । जग केहि कहहु न होइ कलेसू ॥
तस उतपातु तात बिधि कीन्हा । मुनि मिथिलेस राखि सबु लीन्हा ॥
दो० —राज काज सब लाज पति धरम धरनि धन धाम ।
गुर प्रभाउ पालिहि सबहि भल होइहि परिनाम ॥ ३०५ ॥
चौ० —सहित समाज तुम्हार हमारा । घर बन गुर प्रसाद रखवारा ॥
मातु पिता गुर स्वामि निदेसू । सकल धरम धरनीधर सेसू ॥
सो तुम्ह करहु करावहु मोहू । तात तरनिकुल पालक होहू ॥
साधक एक सकल सिधि देनी । कीरति सुगति भूतिमय बेनी ॥
सो बिचारि सहि संकटु भारी । करहु प्रजा परिवारु सुखारी ॥
बाँटी बिपति सबहिं मोहि भाई । तुम्हहि अवधि भरी बड़ि कठिनाई ॥
जानि तुम्हहि मृदु कहउँ कठोरा । कुसमयँ तात न अनुचित मोरा ॥
होहिं कुठायँ सुबंधु सहाए । ओड़िअहिं हाथ असनिहु के घाए ॥
दो ०—सेवक कर पद नयन से मुख सो साहिबु होइ ।
तुलसी प्रीति कि रीति सुनि सुकबि सराहहिं सोइ ॥ ३०६ ॥
चौ ०—सभा सकल सुनि रघुबर बानी । प्रेम पयोधि अमिअँ जनु सानी ॥
सिथिल समाज सनेह समाधी । देखि दसा चुप सारद साधी ॥

अस्तकाळापूर्वीच जर सूर्य मावळला तर कोणाला त्रास होणार नाही सांगा बरं? तशाच प्रकारचा हा विधिविरचित उत्पात झाला असता. गुरू वसिष्ठ मुनी व मिथिलेश्वर यांनीच त्यातून आपला संपूर्णपणे बचाव केला!

“ राज्याचा सर्व कारभार, लज्जा, (पत, प्रतिष्ठा) धर्म, पृथ्वी, धन, घर—या सर्वांचे संरक्षण गुरुजींचे प्रभावी सामर्थ्य करील व शेवट गोड होईल. ३०५

गुरुजींचा अनुग्रह हाच घरात व वनात, समाजासहित तुमचे व आमचे रक्षण करणारा आहे!

“ आपली आई, वडील, गुरू व स्वामी यांच्या आज्ञेचे पालन हे समस्त धर्मांचे सार, पृथ्वीचे धारण करण्यात हा आज्ञापालनधर्म, शेषाप्रमाणे समर्थ आहे! म्हणून त्या धर्मांचे पालन तुम्ही करावे व मलाही करू द्यावे. हे तात! असे करून तुम्ही या सूर्यकुळाचे पालक व्हावे.”

“ [illegible] आज्ञापालनरूपी साधना ही एक संपूर्ण सिद्धीची प्राप्ती करून देणारी, ऐश्वर्य, सद्गती व कीर्तिमय त्रिवेणी आहे! हाच विचार अंतःकरणावर ठसवून हा भयंकर संकटाचा काळ निभावून काढा आणि सर्व प्रजा व परिजन यांना सुखी करा.

“ माझ्यावरील आपत्ती सर्वांनी वाटून घेतली आहे; परंतु चौदा वर्षांचा काळ कंठण्याचे तुझ्यावर ओढवलेले दुःख मात्र अती कठीण आहे. बाळा तुमचे सुकुमार अंतःकरण ही जाणत असूनही ही वियोगरूपी कठोर कथा मी सांगत आहे. पण माझे हे करणे अयोग्य समजू नका! काळच तसा कठीण आला, त्याला मी तरी काय करू? संकटांच्या वेळी सुबंधूच साह्य करणार. वज्राचा आघात निवारण करण्यास हातच उपयोगी पडणार!

“ हात, पाय आणि डोळे याप्रमाणे सेवकाने असावे व सर्वांचे व पालन त्यांचे स्वामीने मुखाप्रमाणे होऊन करावे. अशा प्रकारची ही सेवक व धनी यांच्यामधील प्रेमाची आदर्श रीत समजून, सत्कवी तिचे मनापासून वर्णन करतात!” ३०६

सर्व सभेने अगदी मंत्रमुग्ध होऊन हे रघुवरांचे भाषण श्रवण केले. जणू काही प्रेमरूपी क्षीरसागराचे मंथन करून काढलेल्या अमृतातच ते मिसळले होते. त्यामुळे सर्व लोकांची स्नेह समाधी लागून ते मनाने विरघळून गेले; आणि हे पाहून शारदेने मौनच स्वीकारले!

भरतहि भयउ परम संतोषू । सनमुख स्वामि बिमुख दुख दोषू ॥
मुख प्रसन्न मन मिटा बिषादू । भा जनु गूँगेहि गिरा प्रसादू ॥
कीन्ह सप्रेम प्रनामु बहोरी । बोले पानि पंकरुह जोरी ॥
नाथ भयउ सुखु साथ गए को । लहेउँ लाहु जग जनमु भए को ॥
अब कृपाल जस आयसु होई । करौं सीस धरि सादर सोई ॥
सो अवलंब देव मोहि देई । अवधि पारु पावौं जेहि सेई ॥

दो०–देव देव अभिषेक हित गुर अनुसासनु पाइ ।
आनेउँ सब तीरथ सलिलु तेहि कहँ काह रजाइ ॥ २०७ ॥

चौ०–एकु मनोरथु बड़ मन माहीं । सभयँ सकोच जात कहि नाहीं ॥
कहहु तात प्रभु आयसु पाई । बोले बानि सनेह सुहाई ॥
चित्रकूट सुचि थल तीरथ बन । खग मृग सर सरि निर्झर गिरिगन ॥
प्रभु पद अंकित अवनि बिसेषी । आयसु होइ त आवौं देखी ॥
अवसि अत्रि आयसु सिर धरहू । तात बिगतभय कानन चरहू ॥
मुनि प्रसाद बनु मंगल दाता । पावन परम सुहावन भ्राता ॥
रिषिनायकु जहँ आयसु देहीं । राखेहु तीरथ जलु थल तेहीं ॥
सुनि प्रभु बचन भरत सुखु पावा । मुनि पद कमल मुदित सिरु नावा

दो०–भरत राम संबादु सुनि सकल सुमंगल मूल ।
सुर स्वारथी सराहि कुल बरषत सुरतरु फूल ॥ २०८ ॥

आपले प्रभू आता पूर्ण अनुकूल आहेत, अशी भरतांची खात्री झाल्यामुळे त्यांच्या अंतःकरणातील दुःख व दोष यांनी पूर्णपणे पळ काढला. त्यांना परमसंतोषाची प्राप्ती झाली. मुखावर प्रसन्नता दिसू लागली. मनातील विषाद सर्वस्वी नष्ट झाला. जणू सरस्वतीकडून मुक्याला वाणीचा प्रसादच लाभला! त्यांनी प्रेमभराने पुनः प्रणाम केला व हात जोडून भाषण केले.

“हे नाथ! आपल्यासह वनात येण्याचे सुख मला मिळाले व या जगात जन्माला येऊन जे साधावयाचे तेही साधले. आता हे कृपाळो! आपण जी आज्ञा द्याल तिचे मी आदरपूर्वक पालन करीन. मात्र असे काही मला अवलंबन (जीवाला आधार) द्यावे की, ज्याच्या सेवेने मला हा चौदा वर्षांचा काळ, हे देवा! कंठणे शक्य होईल.

“हे देव! गुरुजींची आज्ञा मिळवून मी प्रभूंच्या अभिषेकासाठी सर्व तीर्थांचे पाणी आणले आहे. त्याचे काय करावयाचे त्याबद्दल आज्ञा व्हावी. २०७.

“[illegible] मनात एक मोठा मनोरथ [illegible] आहे; पण भीती, संकोच यामुळे बोलून दाखवणे होत नाही.”

“तात! बोल ना” असे जेव्हा प्रभू बोलले, तेव्हा प्रेमाने शुभ असे वचन, भरत बोलले.

“आज्ञा जर मिळाली तर, चित्रकूटावरील पवित्र स्थाने तीर्थे, वने, पक्षी, पशू, तलाव, नद्या, निर्झर आणि पर्वतांच्या रांगा इत्यादि व विशेषतः प्रभुचरणांकित भाग्यवान भूमी पाहून यावे असे वाटते.

“अत्रिमुनींची आज्ञा अवश्य घेऊन निश्चितपणे वनातून फिरावे. कारण त्यांच्याच कृपेने हे सर्व वन मंगलदायक पावन व अत्यंत मनोहर बनले आहे. म्हणून ते ऋषिनायक हे तीर्थांचे पाणी ज्या ठिकाणी ठेवण्यास सांगतील तेथे ते ठेवावे,” असे लगेच प्रभूंचे उत्तर मिळाले; ते ऐकून भरतांना समाधान झाले. त्यांनी लगेच अत्रिऋषींच्या चरणी आनंदाने मस्तक नमवले.

सर्व मंगलाचे मूलकारण असणारा असा भरत व राम यांचा संवाद ऐकून सर्व स्वार्थी सुरांनी रघुकुलाची प्रशंसा करीत कल्पवृक्षांच्या कुसुमांची त्यांच्यावर वृष्टी केली. २०८.

चौ० – धन्य भरत जय राम गोसाईं । कहत देव हरषत बरिआईं ।।
मुनि मिथिलेस सभाँ सब काहू । भरत बचन सुनि भयउ उछाहू ।।
भरत राम गुन ग्राम सनेहू । पुलकि प्रसंसत राउ बिदेहू ।।
सेवक स्वामि सुभाउ सुहावन । नेमु पेमु अति पावन पावन ।।
मति अनुसार सराहन लागे । सचिव सभासद सब अनुरागे ।।
सुनि सुनि राम भरत संबादू । दुहु समाज हियँ हरषु बिषादू ।।
राम मातु दुखु सुखु सम जानी । कहि गुन राम प्रबोधीं रानी ।।
एक कहहिं रघुबीर बड़ाई । एक सराहत भरत भलाई ।।
दो० – अत्रि कहेउ तब भरत सन सैल समीप सुकूप ।
राखिअ तीरथ तोय तहँ पावन अमिअ अनूप ।। ३०९ ।।
चौ० – भरत अत्रि अनुसासन पाई । जल भाजन सब दिए चलाई ।।
सानुज आपु अत्रि मुनि साधू । सहित गए जहँ कूप अगाधू ।।
पावन पाथ पुन्यथल राखा । प्रमुदित प्रेम अत्रि अस भाषा ।।
तात अनादि सिद्ध थल एहू । लोपेउ काल बिदित नहिं केहू ।।
तब सेवकन्ह सरस थलु देखा । कीन्ह सुजल हित कूप बिसेषा ।।

‘ धन्य भरत ! धन्य भरत ! जय गोस्वामीं राम ! जय गोस्वामी राम !! भरताना धन्यवाद ! स्वामी श्रीरामचंद्रांचा जय असो. ’ असे जोरजोराने म्हणत देव हर्षमय झाले.

मिथिलेश्वर, गुरू वसिष्ठ व सर्व सभासद यांना भरताचे भाषण ऐकून उत्साह वाटला. भरत व श्रीरामचंद्र यांचे सद्‌गुण व त्यांचे परस्पर प्रेम यांचे स्तवन करीत असता विदेह नृपती पुलकित होऊन स्तुती करू लागले. ते म्हणाले, “ दास आणि स्वामी या दोघांचेही सुंदर स्वभाव आज आपणास पाहावयास मिळाले. यांचे प्रेम व व्रतपालन हे पावनांनाही अत्यंत पावन करणारे असेच आहे. ” यानंतर सचिव व सर्वच सभासद आपापल्या बुध्दीप्रमाणे हे वर्णन करू लागले. व अशी स्तुती करत असता सगळेच प्रेममग्न झाले. राम आणि भरत यांचा संवाद ऐकून मिथिला व अयोध्या नगरीतील नागरिकांची ह्रदये हर्ष व विषादाने भरून गेली. राम-भरत संवादाने त्यांना परमानंद झाला, परंतु रामवियोगाचा संभव दिसल्याने ते कष्टी झाले !

श्रीराममाता कौसल्या विचारी असल्याने दुःख व सुख यांची सारखीच वाटणी झाल्याचे पाहिले. श्रीरामचंद्राच्या सद्‌गुणांची स्तुति करून दुसऱ्या सर्व राण्यांचे तिने सांत्वन केले.

लोकसमाजात कोणी श्रीरामचंद्राच्या विशाल अंतःकरणाची चर्चा करण्यात रंगले तर कोणी भरतांच्या सौजन्याच्या वर्णनात दंग झाले !

भरत-कूप व भरत चित्रकूट यात्रा

त्यावेळी अत्रिऋषींनी भरतांना सांगितले की, “ या पर्वताच्या जवळच एक छानदार आड आहे त्यामध्ये पवित्र अनुपम व श्रेष्ठ अमृताप्रमाणे असणारे हे अनेक तीर्थांचे पाणी आपण ठेवू या ! ३०९

याप्रमाणे अत्रींची आज्ञा मिळताच भरतांनी तीर्थांची सर्व भांडी तिकडे रवाना केली व आपला धाकटा भाऊ शत्रुघ्न, अत्रिमुनी आणि दुसरी संत-साधुमंडळी यांच्यासह स्वतः त्या अगाध कूपाकडे गेले. ती सर्व तीर्थजले त्या पावन कूपात ठेवली; तेव्हां अत्रिऋषी आनंदित होऊन प्रेमभराने उद्‌गारले,“ हे तात! हा कूप म्हणजे एक अनादि सिद्ध स्थळ आहे. काळाच्या ओघात याचे नावही लोपले होते, त्यामुळे त्याचा कोणालाच पत्ता नव्हता ! ”

भरतांच्या सेवकांच्या कानी हा त्या स्थळाचा महिमा पडताच त्या पावन तीर्थांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांनी त्याची योग्य अशी खोदणी करून त्याला एका सुंदर कूपाचे रूप दिले.

विधि बस भयउ बिस्व उपकारू । सुगम अगम अति धरम बिचारू ॥
भरतकूप अब कहिहहिं लोगा । अति पावन तीरथ जल जोगा ॥
प्रेम सनेम निमज्जत प्रानी । होइहहिं बिमल करम मन बानी ॥

दो० – कहत कूप महिमा सकल गए जहाँ रघुराउ ।
अत्रि सुनायउ रघुबरहि तीरथ पुन्य प्रभाउ ॥ ३१० ॥

चौ० – कहत धरम इतिहास सप्रीती । भयउ भोरु निसि सो सुख बीती ॥
नित्य निबाहि भरत दोउ भाई । राम अत्रि गुर आयसु पाई ॥
सहित समाज साज सब सादें । चले राम बन अटन पयादें ॥
कोमल चरन चलत बिनु पनहीं । भइ मृदु भूमि सकुचि मन मनहीं ॥
कुस कंटक काँकरीं कुराईं । कटुक कठोर कुबस्तु दुराईं ॥
महि मंजुल मृदु मारग कीन्हे । बहत समीर त्रिबिध सुख लीन्हे ॥
सुमन बरषि सुर घन करि छाहीं । बिटप फूलि फलि तृन मृदुताहीं ॥
मृग बिलोकि खग बोलि सुबानी । सेवहिं सकल राम प्रिय जानी ॥

दो० – सुलभ सिद्धि सब प्राकृतहु राम कहत जमुहात ।
राम प्रानप्रिय भरत कहुँ यह न होइ बड़ि बात ॥ ३११ ॥

दैवयोगाने सर्व जगावर उपकार घडला. धर्माचा विचार वस्तुतः अत्यंत अगम्य असा असतो, परंतु या कूपाने आपल्या प्रभावाच्या सामर्थ्याने तो सुगम करून दिला ! पूर्वीचाच पावन कूप आता या अनेक तीर्थांच्या संयोगाने परम पावन झाला. यापुढे या तीर्थाला लोक ' भरतकूप ' असेच म्हणतील. नियमाने यात श्रद्धापूर्वक स्नान करणारे सर्व प्राणी काया-वाचा-मनाने पवित्र होतील. "

अशा प्रकारे ' कूप-महिमा ' वर्णन करत करत, जेथे श्रीरघुनाथ होते त्या ठिकाणी सर्व मंडळी येऊन पोचली.

अत्रिऋषींनी त्या तीर्थाचा पुण्यप्रभाव श्रीरघुवीरांना निवेदन केला. ३१०

धर्म व इतिहास यांची प्रेमपूर्वक चर्चा चालू असता, त्या आनंदात सर्व रात्र सुखाने उलटली व उजाडले !

आपल्या अनुजासह भरतांनी नित्यकर्म उरकले. श्रीराम, अत्रिऋषी व गुरु वसिष्ठ यांची परवानगी घेतली आणि साधा पोषाख करून सर्व समाजासह श्रीराम वनाला प्रदक्षिणा करण्यासाठी ते पायीच निघाले.

त्यांचे अत्यंत कोमल चरण व पादत्राण नसलेले असे पाहून पृथ्वी मनातल्या मनात संकोचित झाली व तिने आपला पृष्ठभाग परम कोमल बनवला ! दर्भ, काटे, खडे, खाचखळगे, नाना प्रकारची कुसळे इत्यादि सर्व त्रासदायक कठोर पदार्थ तिने पूर्णपणे गडप केले; आणि भरत ज्या रस्त्यावरून चालणार ते सर्व अगदी कोमल व सुंदर करून टाकले. शिवाय तो प्रवास सुखकारक व्हावा म्हणून मंद, सुगन्धित व शीतल असा वारही वाहू लागला.

मार्गावर देवतांनी पुष्पवृष्टी केली, मेघांनी छाया पाडली, वृक्ष व लता फुलांनी व फळांनी लवल्या ! गवते अत्यंत कोवळी झाली; पशू वाजूला उभे राहून टक लावून पाहू लागले आणि अनेक प्रकारच्या पक्ष्यांनी आपले मधुर गायन सुरू केले. श्रीरामचंद्राचे अत्यंत आवडते भरत पायी प्रवासास निघाल्याचे समजताच, अशा प्रकारे सर्वांनी आपापली सेवा सादर केली !

एखाद्या सामान्य मनुष्याने केवळ जांभई देत असताना " राम " असा नामघोष केला तर त्यालाही सर्व सिद्धी सुलभ होऊन जातात. मग प्रत्यक्ष श्रीरामचन्द्राच्या प्राणाहून प्रिय अशा भरतासाठी, वरीलप्रमाणे सर्वांनी सेवा केली तर त्यात नवल ते काय ! ३११

चौ ०–एहि बिधि भरतु फिरत बन माहीं । नेमु प्रेमु लखि मुनि सकुचाहीं ॥
पुन्य जलाश्रय भूमि बिभागा । खग मृग तरु तृन गिरि बन बागा ॥
चारु बिचित्र पवित्र बिसेषी । बूझत भरतु दिब्य सब देखी ॥
सुनि मन मुदित कहत रिषिराऊ । हेतु नाम गुन पुन्य प्रभाऊ ॥
कतहुँ निमज्जन कतहुँ प्रनामा । कतहुँ बिलोकत मन अभिरामा ॥
कतहुँ बैठि मुनि आयसु पाई । सुमिरत सीय सहित दोउ भाई ॥
देखि सुभाउ सनेहु सुसेवा । देहिं असीस मुदित बनदेवा ॥
फिरहिं गएँ दिनु प्रहर अढ़ाई । प्रभु पद कमल बिलोकहिं आई ॥

दो ०–देखे थल तीरथ सकल भरत पाँच दिन माझ ।
कहत सुनत हरि हर सुजसु गयउ दिवसु भइ साँझ ॥ ३१२ ॥

चौ ०–भोर न्हाइ सबु जुरा समाजू । भरत भूमिसुर तेरहुति राजू ॥
भल दिन आजु जानि मन माहीं । रामु कृपाल कहत सकुचाहीं ॥
गुर नृप भरत सभा अवलोकी । सकुचि राम फिरि अवनि बिलोकी ॥
सील सराहि सभा सब सोची । कहुँ न राम सम स्वामि सँकोची ॥

याप्रमाणे त्या वनातून भरत फिरत असता त्यांचे श्रीरामचरणी अगाध प्रेम व व्रताचरणाची खडतरता पाहून तपस्वी मुनींनीही लज्जेने खाली माना घातल्या !

चालत असता, नदी, विहीर, कुण्ड इत्यादि पवित्र जलस्थाने, भूपृष्टाचे वेगळे वेगळे विभाग, पक्षी, पशु, वृक्ष, गवत, पर्वत, वने, बगीचे असे सर्व विशेष प्रकारे सुन्दर पवित्र, आणि दिव्य पाहताच भरतांनी चौकशी करावी व त्यांची जिज्ञासा पाहून ऋषिवर्य अत्रींनी सर्वांचे मूळ कारण, नाव गुण व पुण्यप्रभाव इत्यादि प्रसन्नमनाने त्यांना सांगावे, असा क्रम चालू होता.

भरतांनी कुठे स्नान करावे, प्रणाम करावा, कुठे एखाद्या मनोहर स्थळाच्या सौंदर्याचा आनंद लुटावा, तर कुठे अत्रींची आज्ञा घेऊन क्षणभर बसावे व दोन्ही बंधूंनी सीतेसहित श्रीरामांचे हृदयात स्नेहाने स्मरण करावे !

भरतांचा तो स्वभाव प्रेम व सुंदर सेवाभाव पाहून वनदेवतांना आनंद होई व त्यांच्या मुखातून आशीर्वाद बाहेर पडत.

याप्रमाणे सर्व मंडळींनी अडीच प्रहर दिवस जाईपर्यंत ती रामवनाची प्रदक्षणा केली व परत येऊन श्रीरघुनाथ-चरणकमलांचे दर्शन घेतले. असा नित्यक्रम पाच दिवस चालू राहिल्यावर सर्व तीर्थस्थानांचे दर्शन घेऊन झाले. भगवान विष्णु व महादेव यांच्या सुयशाचे कथन-श्रवण चालू असता तो पाचवा दिवसही संपला व संध्याकाळ झाला. ३१२

चित्रकूटावरील तिसरा दरबार

सहाव्या दिवशी सकाळी प्रातःकाली स्नानादि नित्यकर्म आटपून भरत, ब्राह्मण, राजा जनक व सर्व समाज एकत्र जमले. सर्वांची पाठवणी करण्यास आजचा दिवस योग्य आहे असे जाणूनही ते प्रत्यक्ष बोलून दाखवण्याचा कृपाळू प्रभूना संकोच वाटला.

एकवेळ त्यांनी गुरू वसिष्ट मिथिलाधिपती, भरत व सारी सभा यांच्याकडे दृष्टी टाकली. परंतु पुनः संकोचामुळे दृष्टी फिरवून ती खाली जमिनीकडे लावली.

प्रभूंची ही संकोचाकुल स्थिति सभेतील सर्वांच्या ध्यानी आली. त्यानी श्रीरामचंद्राच्या शीलाची स्तुती केली व ते सचिंत होऊन मनात म्हणू लागले, ' कुणि न रामसम भिडस्त नृपती ! '

भरत सुजान राम रुख देखी । उठि सप्रेम धरि धीर बिसेषी ॥
करि दंडवत कहत कर जोरी । राखीं नाथ सकल रुचि मोरी ॥
मोहि लगि सहेउ सबहिं संतापू । बहुत भाँति दुखु पावा आपू ॥
अब गोसाइँ मोहि देउ रजाई । सेवौं अवध अवधि भरि जाई ॥

दो०—जेहिं उपाय पुनि पाय जनु देखै दीनदयाल ।
सो सिख देइअ अवधि लगि कोसलपाल कृपाल ॥ ३१३ ॥

चौ०—पुरजन परिजन प्रजा गोसाई । सब सुचि सरस सनेहँ सगाई ॥
राउर बदि भल भव दुख दाहू । प्रभु बिनु बादि परम पद लाहू ॥
स्वामि सुजानु जानि सब ही की । रुचि लालसा रहनि जन जी की ॥
प्रनतपालु पालिहि सब काहू । देउ दुहू दिसि ओर निबाहू ॥
अस मोहि सब बिधि भूरि भरोसो । किएँ बिचारु न सोचु खरो सो ॥
आरति मोर नाथ कर छोहू । दुहुँ मिलि कीन्ह ढीठु हठि मोहू ॥
यह बड़ दोषु दूरि करि स्वामी । तजि सकोच सिखइअ अनुगामी ॥
भरत बिनय सुनि सबहिं प्रसंसी । खीर नीर बिबरन गति हंसी ॥

दो०—दीनबंधु सुनि बंधु के बचन दीन छलहीन ।
देस काल अवसर सरिस बोले रामु प्रबीन ॥ ३१४ ॥

श्रीरघुनाथांचा रोख सुजाण भरतांच्या ध्यानात येताच ते प्रेमपूर्वक उठून उभे राहिले. विशेष प्रयत्न करून धीर धरला. सर्वांना दण्डवत प्रणाम करून हात जोडले व बोलण्यास प्रारंभ केला.

" हे नाथ ! आपण माझ्या सर्व प्रकारच्या आवडी पूर्ण केल्या. माझ्यासाठी सर्वांनी अनेक कष्ट सहन केले व आपणासही नाना प्रकारच्या दुःखांना तोंड द्यावे लागले.

" आता मला स्वामींनी आज्ञा द्यावी म्हणजे चौदा वर्षे संपेपर्यंत मी अयोध्येची सेवा करतो. तथापि हे दीनदयाळ ! या सर्व सुदर्शनांच्या अवलोकनाने आज्ञापालनाने सामर्थ्य देण्यासाठी हे कोसलाधीश ! हे कृपाळो, ज्या उपायाने हे चरण पुनः दिसतील असे साधन शिकवा. ३१३. [१४ वर्षांचा दीर्घकाळ संपेपर्यंत जिवंत राहण्यास आधार पाहिजे हा भावार्थ.]

" प्रभो ! सर्व प्रजाजन, अयोध्यावासी नागरिक व परिवार या सर्वांचा आपल्या ठिकाणी पवित्र स्नेह असून त्यांची आपुलकीही सरस आहे. त्यामुळे आपल्या सान्निध्यात भवदावानलसुद्धा सुखकर वाटतो व आपला वियोग झाल्यास मिळण्यास कठिण असा मोक्ष सुद्धा व्यर्थ वाटतो.

" तथापि सर्वांची मनःस्थिती व या दासाची रुची, तळमळ व कळकळ जाणणारे असे प्रणतपाल स्वामी असल्याने ते सर्वांचेच पालन करतील व ते सर्वसमर्थ आहेत, म्हणून दोन्हीकडच्या सर्व गोष्टी निभावून नेतील, असा मला सर्वप्रकारे पूर्ण भरंवसा वाटतो. त्यामुळे विचारांती आता शोक अगर चिंता यांचा लवलेशही उरला नाही.

" नाथ ! आपली कृपा व माझी आर्त स्थिती या दोघांनी मला बळजबरीने धीट बनवले. हा माझा महान दोष पोटात घालून कोणताही संकोच न बाळगता या आपल्या दासाला योग्य तो धडा द्या. "

दुधापासून पाणी वेगळे करण्याचे कौशल्य असलेल्या हंसिणीप्रमाणे विवेकपूर्ण केलेल्या भरताच्या विनंतीची प्रशंसा करण्यात सर्व सभा दंग झाली.

दीनांवर बंधूप्रमाणे प्रेम करणारे प्रभु रामचंद्र ! त्यांनी आपल्याच प्रत्यक्ष बंधूंचे हे मोकळ्या मनाने केलेले दीन वचन ऐकले आणि काळ व वेळ यांचे अचूक ज्ञान असणाऱ्या प्रवीण प्रभूंनी योग्य असे भाषण केले. ३१४.

चौ० – तात तुम्हारि मोरि परिजन की । चिंता गुरहि नृपहि घर बन की ॥
माथे पर गुर मुनि मिथिलेसू । हमहि तुम्हहि सपनेहुँ न कलेसू ॥
मोर तुम्हार परम पुरुषारथु । स्वारथु सुजसु धरमु परमारथु ॥
पितु आयसु पालिहिं दुहु भाईं । लोक बेद भल भूप भलाईं ॥
गुर पितु मातु स्वामि सिख पालें । चलेहुँ कुमग पग परहिं न खालें ॥
अस बिचारि सब सोच बिहाई । पालहु अवध अवधि भरि जाई ॥
देसु कोसु परिजन परिवारू । गुर पद रजहिं लाग छरुभारू ॥
तुम्ह मुनि मातु सचिव सिख मानी । पालेहु पुहुमि प्रजा रजधानी ॥

दो० – मुखिआ मुखु सो चाहिऐ खान पान कहुँ एक ।
पालइ पोषइ सकल अँग तुलसी सहित बिबेक ॥ ३१५ ॥

चौ० – राजधरम सरबसु एतनोई । जिमि मन माहँ मनोरथ गोई ॥
बंधु प्रबोधु कीन्ह बहु भाँती । बिनु अधार मन तोषु न साँती ॥
भरत सील गुर सचिव समाजू । सकुच सनेह बिबस रघुराजू ॥
प्रभु करि कृपा पाँवरीं दीन्हीं । सादर भरत सीस धरि लीन्हीं ॥
चरनपीठ करुनानिधान के । जनु जुग जामिक प्रजा प्रान के ॥

" बाळा ! तुमची, माझी व सर्वांचाच, तसेच घराची व वनाची चिंता गुरू वसिष्ठ व मिथिलेश्वर वाहात आहेतच. अशा प्रकारे या दोघांचे कृपाछत्र आपल्या मस्तकावर असल्याने, तुम्हाला व आम्हाला स्वप्नातसुद्धा दुःखाचा अनुभव येणार नाही. म्हणून माझा व तुमचा स्वार्थ, सुयश, सुधर्म, परमपुरुषार्थ आणि परमार्थ म्हणजे दोघांनी पित्यांची आज्ञा पालन करणे हा आहे. असे केल्यानेच वेद व व्यवहार यांना अनुसरून आपले कल्याण होईल. महाराजानाही भलेपणा येईल.

" याचे कारण असे आहे की, धनी, आई, बाप व गुरू यांचे वचन जे अंतःकरणपूर्वक पाळतात ते जरी रस्ता चुकून कुमार्गाला लागले तरीही त्याच्या हातून प्रत्यक्ष दुष्ट कृति होत नाही, अशी श्रद्धा बाळगून सर्व प्रकारची चिंता सोडा व परत अयोध्येस जाऊन मुदतीच्या अखेर अयोध्येचे पालन करा.

" देश, कोप (खजिना) अयोध्यावासी जनता आणि आपला सर्व इष्ट मित्रांचा परिवार यांच्यासंबंधी तुम्हास काळजी नको. त्यांचा भार गुरुपदरजावर आहे !. गुरू वसिष्ठ, आपल्या सर्व माता आणि मंत्रिमंडळ यांच्या विचाराने तुम्ही वागावे व पृथ्वी, प्रजाजन आणि राजधानी अयोध्या यांचा सांभाळ करावा.

" आता सर्व राजधर्माचे रहस्य एका सूत्रात सांगतो. मुख्य मनुष्य हा आपल्या मुखासारखा असावा. खाण्यापिण्याला ते एकटेच असते, पण सर्व अंगांचे व अवयाचे परिपालन पोषण मुख कसे विवेकाने करते ! ३१५

सर्व मनोरथ एका मनातच जसे साठवलेले असतात, त्याप्रमाणे संपूर्ण राजधर्माचे सार या एका वाक्यात गुप्तपणे भरलेले आहे ! "

याप्रमाणे भरताला श्रीरामचंद्रांनी अनेक प्रकारे उपदेश केला; परंतु काही आधार मिळाल्याशिवाय त्यांच्या चित्तास संतोष व शांती मिळेना.

तथापि एका बाजूस हे भरतांचे शील व दुसऱ्या बाजूस गुरू आणि मंत्रिमंडळादिकांचा समाज यामुळे अंतःकरणात बंधु प्रेम व बाह्यतः लोकलज्जा यामुळे रघुराजांना अत्यंत संकोच वाटू लागला. आता इलाज नाही, असे जाणून अखेर कृपाळू प्रभूनी आपल्या पायातील खडावा भरताना दिल्या व त्यांनी त्या अत्यंत आदराने आपल्या मस्तकावर धारण करून घेतल्या.

करुणासागर श्रीरामचंद्रांच्या त्या पादुका म्हणजे प्रजेच्या प्राणांचे संरक्षण करण्यासाठी दोन धैर्यशाली

संपुट भरत सनेह रतन के । आखर जुग जनु जीव जतन के ॥
कुल कपाट कर कुसल करम के । बिमल नयन सेवा सुधरम के ॥
भरत मुदित अवलंब लहे तें । अस सुख जस सिय रामु रहे तें ॥

दो० – मागेउ बिदा प्रनामु करि राम लिए उर लाइ ।
लोग उचाटे अमरपति कुटिल कुअवसरु पाइ ॥ ३१६ ॥

चौ० – सो कुचालि सब कहँ भइ नीकी । अवधि आस सम जीवनि जी की ॥
नतरु लखन सिय राम बियोगा । हहरि मरत सब लोग कुरोगा ॥
रामकृपाँ अवरेब सुधारी । बिबुध धारि भइ गुनद गोहारी ॥
भेंटत भुज भरि भाइ भरत सो । राम प्रेम रसु कहि न परत सो ॥
तन मन बचन उमग अनुरागा । धीर धुरंधर धीरजु त्यागा ॥
बारिज लोचन मोचत बारी । देखि दसा सुर सभा दुखारी ॥
मुनिगन गुर धुर धीर जनक से । ग्यान अनल मन कसें कनक से ॥
जे बिरंचि निरलेप उपाए । पदुम पत्र जिमि जग जल जाए ॥

दो० – तेउ बिलोकि रघुबर भरत प्रीति अनूप अपार ।
भए मगन मन तन बचन सहित बिराग बिचार ॥ ३१७ ॥

चौ० – जहाँ जनक गुर गति मति भोरी । प्राकृत प्रीति कहत बड़ि खोरी ॥

संरक्षकच ! भरताच्या स्नेहरूपी रत्नाला जतून ठेवण्याकरिता ती मंजूषाच ! जीवाचे जतन करण्यात 'रा' व 'म' या दोन अक्षरांसारख्याच रक्षक ! रघुकुलाचे त्या कपाट. कुशल कर्म करण्याच्या प्रसंगी हात आणि सेवारूपी सुधर्माला त्या डोळ्याप्रमाणे दृष्टी देण्याऱ्या आहेत.

पादुकांचे हे अवलंबन मिळताच भरताला केवढा आनंद झाला ! अयोध्येस येऊन सीताराम राहिल्याप्रमाणेच त्यांना सुख मिळाले श्रीरामचरणी प्रणाम करून भरताने निरोप मागताच प्रभूंनी त्याला हृदयाशी कवटाळले ! ३१६

अशा या कठीण प्रसंगी इंद्राने लोकांचे कुटिलपणे उच्चाटन केले. परंतु ही त्याची नीच कृती चौदा-वर्षांच्या मर्यादित मुदतीच्या दृष्टीने सर्वांच्या जीवांना उत्तम संजीवनीच ठरली ! नाहीतर सीता, प्रभु रामचंद्र व लक्ष्मण यांच्या वियोगरूपी कुरोगाने सर्व लोक "हाय हाय" करतच मेले असते !

याप्रमाणे श्रीरामाच्या कृपेने सव संकटाचा परिहार झाला. इतकेच नव्हे देवांनी केलेले कपटकारस्थान-सुद्धा हितावह व सहाय्यकच ठरले !

जेव्हा दोन्ही बाहूंनी कवटाळून श्रीरामांनी भरताला आपल्या हृदयाशी धरले तेव्हाच्या त्या बंधु प्रेमाचे वर्णन करणे अशक्य आहे ! दोघांच्या तन–मन-वाणीत प्रेमाला पूर आला आणि धीर धुरंधर असूनही त्याचा धीर सुटला. हुंदके येऊ लागले ! त्यांच्या [illegible] अश्रूंच्या धारा वाहू लागल्या.

दोघा भावांची ही दशा पाहून देव व सर्वसभा यास फार दुःख झाले. विश्वामित्र, [illegible] मुनीश्वर गुरू वसिष्ट, ज्ञानरूपी अग्नीत [illegible] कसाला ज्याचे मन लागले आहे असे धीरधुरीण जनक यांना ब्रह्मदेवाने जन्मताच निर्लेप उत्पन्न केले. त्यामुळे जगरूपी जलात कमळाच्या पानाप्रमाणे ते अखंड अनासक्त राहिले. असे सर्वश्रेष्ठपुरुष सुद्धा रघुवर भरताची ती अनुपम व अपार प्रीती पाहून ज्ञान वैराग्यांसह तनमन वाणीने दुःख, शोक मग्न झाले ! ३१७

ज्या ठिकाणी गुरू वसिष्ट जनकासारख्यांची बुद्धी भांबावून गेली, त्याठिकाणी सर्वसाधारण लोकांच्या हृदयातील प्रेमाला केवढी अनिवार भरती आली असेल याचे वर्णन करणेच अयोग्य !

बरनत रघुबर भरत बियोगू । सुनि कठोर कवि जानिहि लोगू ।।
सो सकोच रसु अकथ सुबानी । समउ सनेहु सुमिरि सकुचानी ।।
भेंटि भरत रघुबर समुझाए । पुनि रिपुदवनु हरषि हियँ लाए ।।
सेवक सचिव भरत रुख पाई । निज निज काज लगे सब जाई ।।
सुनि दारुन दुखु दुहूँ समाजा । लगे चलन के साजन साजा ।।
प्रभु पद पदुम बंदि दोउ भाई । चले सीस धरि राम रजाई ।।
मुनि तापस बनदेव निहोरी । सब सनमानि बहोरि बहोरी ।।

दो० — लखनहि भेंटि प्रनामु करि सिर धरि सिय पद धूरि ।
चले सप्रेम असीस सुनि सकल सुमंगल मूरि ।। ३१८ ।।

चौ० — सानुज राम नृपहि सिर नाई । कीन्हि बहुत बिधि बिनय बड़ाई ।।
देव दया बस बड़ दुखु पायउ । सहित समाज काननहिं आयउ ।।
पुर पगु धारिअ देइ असीसा । कीन्ह धीर धरि गवनु महीसा ।।
मुनि महिदेव साधु सनमाने । बिदा किए हरि हर सम जाने ।।
सासु समीप गए दोउ भाई । फिरे बंदि पग आसिष पाई ।।
कौसिक बामदेव जाबाली । पुरजन परिजन सचिव सुचाली ।।

खरोखर रघुवर-भरताच्या वियोगाचे जर वर्णन केले तर ते ऐकत असता लोक म्हणतील काय हो कठोर अंतःकरणाचा हा कवि ! अशाप्रकारे उत्पन्न झालेल्या लज्जेचा रससुद्धा सुंदर वाणीला बोलून दाखवता न आल्याने त्याप्रसंगाचे ते बंधु-प्रेम आठवूनच ती विरमली.

भरताला भेटून त्याचे सांत्वन केल्यावर समाधानपूर्वक शत्रुघ्नाला पोटाशी धरले !

सेवक आणि सचिव भरताची इच्छा समजताच, आपापल्या कामास लागले.

प्रभुचरण सोडून आता निघावयाचे हे समजताच दोन्ही राजसमाजांत दुःख पसरले.

निघण्यासाठी जो तो आपापल्या सामानसुमानाची बांधाबांधी करू लागला.

दोघा बंधूंनी प्रभुचरणांसी प्रणाम केले आणि रामाज्ञा शिरसामान्य करून त्यांनी निरोप घेतला. मुनी तपस्वी व वनदेवता यांची प्रार्थना केली. त्यांचा पुनः पुन्हा सन्मान केला. लक्ष्मणाची भेट घेतली. सीतेला नमस्कार करून तिची पायधूळ मस्तकी धारण केली. त्यावेळी सुमंगल मूळ असे सीतेचे प्रेमळ आशीर्वाद त्यांच्या कानी पडले. ३१८.

हे समाधान मिळताच भरत व शत्रुघ्न तेथून जावयास निघाले.

इकडे लक्ष्मणासह रामचंद्रांनी जनक राजांच्या पायावर मस्तक ठेवून नमस्कार केला. नंतर त्यांची नानाप्रकारे प्रशंसा करून शेवटी प्रार्थना केली.

" देव ! दयाळू अंतःकरणाने सर्व समाज बरोबर घेऊन आपण वनात आला. अनेक दुःखे सोसली आता आम्हाला आशीर्वाद देऊन आपल्या नगरीस परतावे. "

भावनांचा भर विवेकाने दाबून मिथिलेश्वरानी रस्ता धरला.

त्यानंतर मुनी ब्राह्मण व साधू यांना त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणे नमस्कार प्रार्थना इत्यादि करून, हरिहराप्रमाणे आदरयुक्त असा सर्वांना निरोप दिला.

प्रभूंनी लगेच लक्ष्मणासह सासवांच्याकडे जाऊन वंदनपूर्वक त्यांचे आशीर्वाद घेतले व ते आश्रमाकडे परत आले.

तेव्हा कौशिक, वामदेव, जाबाली आदिकरून सज्जन, सचिव, अयोध्या व मिथिलावासी नागरिक आणि

जथा जोगु करि बिनय प्रनामा । बिदा किए सब सानुज रामा ॥
नारि पुरुष लघु मध्य बड़ेरे । सब सनमानि कृपानिधि फेरे ॥

दो०—भरत मातु पद बंदि प्रभु सुचि सनेहँ मिलि भेंटि ।
बिदा कीन्ह सजि पालकी सकुच सोच सब मेटि ॥ ३१९ ॥

चौ०—परिजन मातु पितहि मिलि सीता । फिरी प्रानप्रिय प्रेम पुनीता ॥
करि प्रनामु भेंटीं सब सासू । प्रीति कहत कबि हियँ न हुलासू ॥
सुनि सिख अभिमत आसिष पाई । रही सीय दुहु प्रीति समाई ॥
रघुपति पटु पालकीं मगाईं । करि प्रबोधु सब मातु चढ़ाईं ॥
बार बार हिलि मिलि दुहु भाईं । सम सनेहँ जननीं पहुँचाईं ॥
साजि बाजि गज बाहन नाना । भरत भूप दल कीन्ह पयाना ॥
हृदयँ रामु सिय लखन समेता । चले जाहिं सब लोग अचेता ॥
बसह बाजि गज पसु हियँ हारें । चले जाहिं परबस मन मारें ॥

दो०—गुर गुरतिय पद बंदि प्रभु सीता लखन समेत ।
फिरे हरष बिसमय सहित आए परन निकेत ॥ ३२० ॥

चौ०—बिदा कीन्ह सनमानि निषादू । चलेउ हृदयँ बड़ बिरह बिषादू ॥
कोल किरात भिल्ल बनचारी । फेरे फिरे जोहारि जोहारी ॥

इतर आप्त-स्वकीय मंडळी यांना यथायोग्यप्रकारे विनंती वंदनादि करून अनुजासह रघुनंदनांनी निरोप दिला.

याप्रमाणे श्रेष्ठ, मध्यम व कनिष्ठ अशा सर्व स्त्री-पुरुषांना कृपानिधींनी सन्मानपूर्वक परत धाडले.

आता भरतमातेची पाठवणी करण्याचे कर्तव्य प्रभु करू लागले. प्रथम तिच्या चरणावर मस्तक टेकले; शुद्ध प्रेमाने तिला भेटले. तिच्या हृदयातील स्वाभाविक शोक व लज्जा यांचे निरसन केले आणि सजवून आणलेल्या मेण्यात तिला बसवून आदरे स्वतः पोचवण्यास गेले. ३१९

राम व जनक यांच्या भेटीनिरोपाचा कार्यक्रम चालू असता आपल्या माहेरच्या परिवार, माता व पिता यांना भेटून, पवित्र पतिप्रेम असणारी सीता आश्रमाकडे परत आली.

नंतर सर्व सासवांना सीतेने प्रणाम केला; त्या सगळ्या तिला भेटल्या. परंतु त्यांच्या सासू-सून प्रेमाचे वर्णन करण्यास कवीस उत्साह वाटत नाही. सासूबाईंकडून शिकवण व इष्ट आशीर्वाद यांची प्राप्ती झाल्यावर ती दोन्ही अंतःकरणे स्नेहात मग्न झाले.

तोपर्यंत रघुपतींनी सुंदर मेणे मागवले. समजूत घालून सर्व मातांना मेण्यात बसवले. दोघा भावांच्या मिळून-मिसळून, वारंवार, समान स्नेहाने मातांच्याबरोबर भेटी झाल्या. अशा रीतीने सर्व मातांना पोहोचविले.

हत्ती, घोडे व इतर वाहने इत्यादि सजवून, भरत व राजा जनक यांच्या सैन्यासह लोक-समाज मार्गाने चालू लागला. सर्वांच्या हृदयात लक्ष्मणासह राम-सीता आहेत व सर्वच लोक फक्त जड देहाने चालत आहेत. इतकेच काय बैल, घोडे, हत्ती, उंट, खेचरे इत्यादि पशुदेखील रामविरहाने व्याकुळ होऊन परवशते-मुळे मन मारून चालले आहेत.

शेवटी सीता व लक्ष्मण यांच्यासह प्रभूंनी गुरु वसिष्ठ व गुरुपत्नी अरुंधती यांना वंदन केले व हर्ष-विषादयुक्त होऊन ते आपल्या पर्णकुटीत परत आले. ३२०

त्यानंतर, सर्वांच्या मागून निषाद राजाला सन्मान देऊन परतवला. जाताना त्याचेही हृदय राम-विरह दुःखाने भरून आलेच !



प्रभु सिय लखन बैठि बट छाहीं। प्रिय परिजन बियोग बिलखाहीं ॥
भरत सनेह सुभाउ सुबानी। प्रिया अनुज सन कहत बखानी ॥
प्रीति प्रतीति बचन मन करनी। श्रीमुख राम प्रेम बस बरनी ॥
तेहि अवसर खग मृग जल मीना। चित्रकूट चर अचर मलीना ॥
बिबुध बिलोकि दसा रघुबर की। बरषि सुमन कहि गति घर घर की ॥
प्रभु प्रनामु करि दीन्ह भरोसो। चले मुदित मन डर न खरो सो ॥

दो० — सानुज सीय समेत प्रभु राजत परन कूटीर।
भगति ग्यानु बैराग्य जनु सोहत धरें सरीर ॥ ३२१ ॥

चौ० — मुनि महिसुर गुर भरत भुआलू। राम बिरहँ सबु साजु बिहालू ॥
प्रभु गुन ग्राम गनत मन माहीं। सब चुपचाप चले मग जाहीं ॥
जमुना उतरि पार सबु भयऊ। सो बासरु बिनु भोजन गयउ ॥
उतरि देवसरि दूसर बासू। रामसखाँ सब कीन्ह सुपासू ॥
सई उतरि गोमतीं नहाए। चौथें दिवस अवधपुर आए ॥
जनकु रहे पुर बासर चारी। राज काज सब साज सँभारी ॥

अखेर उरले कोळी, किरात, भिल्ल इत्यादि वन्य जातीचे लोक ! त्यांनाही श्रीरामचंद्रांनी योग्य रीतीने निरोप दिला. वारंवार जोहार करून ही सर्व मंडळीसुद्धा परत गेली.

आता सर्वत्र मोकळे मोकळे दिसू लागले. तेव्हा एका वडाच्या झाडाखाली लक्ष्मण व जानकी यांच्यासह प्रभू बसले. सर्वच प्रिय आप्त व परिवार एकदम निघून गेल्यामुळे त्याचा विरह जाणवल्याने ते व्याकुळ झाले. बोलण्याच्या ओघात त्यानी लक्ष्मणाला व आपल्या प्रियेला भरताचा स्नेह, त्याचा सुस्वभाव व त्याचे मधुर भाषण यांचे वर्णन करून ते सांगू लागले.बोलता बोलता भरताच्या मन, वाणी व कर्म यांतील प्रतीती व प्रेमाची भरपूर वाखाणणी सुरू होऊन प्रभू प्रेमवश झाले !

श्रीरामचंद्रांची ती रसवंती व त्यांचे स्नेहपूर्ण होऊन नयनातून वाहणारे नीर पाहून पशू, पक्षी, जलचर, इतकेच काय चित्रकूटावरील सर्व चराचर खिन्न झाले.

रघुपतींची ही दशा पाहून देवांतील विशेष जाणत्यांनी पुष्पवृष्टी केली अणि भगवंतांना स्मरणार्थ आपल्या घरच्या दुर्दशेची कहाणी सांगितली. त्यावर प्रभूनी प्रणामपूर्वक त्याना आश्वासन दिले, तेव्हा त्याच्या मनात भयाचा भासही न उरल्याने ते अत्यंत आनंदित होऊन स्वस्थानी गेले.

चित्रकूट पर्वतावरील दैनंदिन जीवन शांतपणे सुरू झाले त्यावेळी जणू ज्ञान, वैराग्य व भक्ती यांनीच प्रभू श्रीरामचंद्र, लक्ष्मण व सीता यांची शरीरे अनुक्रमे धारण करून त्या पर्णकुटीत ते एकत्र शोभत आहेत असे वाटे ! ३२१

आता जनक-भरत समाजाच्या प्रवासाचे स्वरूप पाहा. मुनी, भरत, गुरू वसिष्ठ, जनक भूप सर्व विप्र-समुदाय आणि बाकीचे सगळे लोक रामविरहाने व्याकुळ होऊन प्रभूच्या गुणसमूहाचे मनाने चिंतन करीत अगदी चूपचाप रस्त्याने पावले टाकत आहेत !

यमुनेपार सर्व समाज होईपर्यंत पहिल्या दिवसाचा प्रवास झाला. त्या दिवशी अन्न खाण्याची कोणास इच्छाच झाली. नाही दुसऱ्या दिवशी गंगेच्या पैलतीरास जाऊन शृंगवेरपुरीत वस्ती पडली. सर्वांच्या सुख-सोयीची तरतूद करण्यास तेथे रामसखा गुह होताच ! सई नदी उतरून गोमतीत स्नाने करण्यापर्यंत तिसऱ्या दिवशीची मजल झाली आणि सर्व मंडळी चौथ्या दिवशी अयोध्येस येऊन पोचली.

जनक महाराजानी अयोध्येत चार दिवस मुक्काम ठेवून सर्व राज्यकारभार व सैन्य, कोष इत्यादीची

सौंपि सचिव गुर भरतहि राजु । तेरहुति चले साजि सबु साजू ।।
नगर नारि नर गुर सिख मानी । बसे सुखेन राम रजधानी ।।

दो० — राम दरस लगि लोग सब करत नेम उपबास ।
तजि तजि भूषन भोग सुख जिअत अवधि कीं आस ।। ३२२ ।।

चौ० — सचिव सुसेवक भरत प्रबोधे । निज निज काज पाइ सिख ओधे ।।
पुनि सिख दीन्हि बोलि लघु भाई । सौंपी सकल मातु सेवकाई ।।
भूसुर बोलि भरत कर जोरे । करि प्रनाम बय बिनय निहोरे ।।
ऊँच नीच कारजु भल पोचू । आयसु देब न करब सँकोचू ।।
परिजन पुरजन प्रजा बोलाए । समाधानु करि सुबस बसाए ।।
सानुज गे गुर गेहँ बहोरी । करि दंडवत कहत कर जोरी ।।
आयसु होइ त रहौं सनेमा । बोले मुनि तन पुलकि सप्रेमा ।।
समुझब कहब करब तुम्ह जोई । धरम सारु जग होइहि सोई ।।

दो० — सुनि सिख पाइ असीस बड़ि गनक बोलि दिनु साधि ।।
सिंघासन प्रभु पादुका बैठारे निरुपाधि ।। ३२३ ।।

व्यवस्थित पाहणी केली. त्यानंतर मंत्रिमंडळ, गुरु वसिष्ठ व भरत यांच्याकडे राज्यव्यवस्थेची जबाबदारी सोपवून आलेल्या सर्व समाजासह ते मिथिलेस गेले.

गुरु वसिष्ठांच्या उपदेशामुळे रामचंद्राच्या राजधानीत सर्व स्त्रिया व पुरुष सुखाने कालक्रमणा करू लागले. रामदर्शनाची ओढ नव्हती कोणाला ? त्यामुळे सर्वांनीच आपापल्या [illegible] नेम व उपवास वगैरे सुरू केले. त्याबरोबरच अलंकार घालणे, चैन करून सुखोपभोग घेणे, इत्यादींचा त्यांनी मनापासून स्वतःच्याच इच्छेने त्याग केला. चौदा वर्षांची ठरलेली मर्यादा होती म्हणूनच त्यांच्या कुडीत प्राण टिकून राहिले ! ३२२.

[illegible] हर्षाने भरतानी तावडतोब व्यवस्था लावली. मंत्री व उत्तम सेवक यांना बोलावून त्यांना स्वकर्तव्याची योग्य कल्पना दिली. आज्ञेप्रमाणे ते आपापल्या कार्याला लागले.

शत्रुघ्नाला बोलावून जवळ घेतले व [illegible] सेवेची त्याला सगळी माहिती देऊन ती कामगिरी त्याच्याकडे दिली.

लगेच श्रेष्ठ ब्राह्मणांना आणवून त्यांना नमस्कार केला; आणि हात जोडून अत्यंत नम्रतेने प्रार्थना केली :—" चांगले अगर वाईट, मोठे किंवा हलके कोणतेही काम असो, आपण संकोच न बाळगता मला आज्ञा देत जावी. "

शेवटी प्रजा, नागरिक व इष्टमित्र यांना जमवून तुम्ही सर्वांनी सुखात रहावे असे त्यांना आश्वासन दिले.

इतकी सर्व ठिकाणची व सर्वांची राजकीयदृष्ट्या शिस्त लावल्यानंतर आपल्या धाकट्या भावाला बरोबर घेऊन भरत गुरुगृही गेले. दण्डवत प्रणाम करून हात जोडले व भरतांनी प्रार्थना केली की, " आज्ञा होईल तर व्रतस्थ (कडक नियमांचे पालन करत) रहावे अशी इच्छा आहे. "

हे ऐकताच मुनीश्वरांचे सर्व शरीर रोमांचित झाले आणि ते म्हणाले, " जे काही तुम्ही मनात आणाल (समजता व समजाल) बोलाल व कराल ते या जगात सर्व धर्मांचे सार होईल हे निश्चित समजा. "

याप्रमाणे उपदेश व उत्तम आशीर्वाद मिळाल्यावर भरत घरी परत आले. ज्योतिषी बोलावून त्यांना शुभ दिवस पाहण्यास सांगितले व त्या मुहूर्तावर प्रभूंच्या सिंहासनी पादुका सिंहासनावर स्थापन केल्या. ३२३



चौ० — राम मातु गुर पद सिरु नाई। प्रभु पद पीठ रजायसु पाई ॥
नंदिगावँ करि परन कुटीरा। कीन्ह निवासु धरम धुर धीरा ॥
जटाजूट सिर मुनिपट धारी। महि खनि कुस साँथरी सँवारी ॥
असन बसन बासन ब्रत नेमा। करत कठिन रिषिधरम सप्रेमा ॥
भूषन बसन भोग सुख भूरी। मन तन बचन तजे तिन तूरी ॥
अवध राजु सुर राजु सिहाई। दसरथ धनु सुनि धनदु लजाई ॥
तेहिं पुर बसत भरत बिनु रागा। चंचरीक जिमि चंपक बागा ॥
रमा बिलासु राम अनुरागी। तजत बमन जिमि जन बड़भागी ॥

दो० — राम पेम भाजन भरतु बड़े न एहिं करतूति।
चातक हंस सराहिअत टेंक बिबेक बिभूति ॥ ३२४ ॥

चौ० — देह दिनहुँ दिन दूबरि होई। घटइ तेजु बलु मुखछबि सोई ॥
नित नव राम प्रेम पनु पीना। बढ़त धरम दलु मनु न मलीना ॥
जिमि जलु निघटत सरद प्रकासे। बिलसत बेतस बनज बिकासे ॥

(निरुपाधी = उपाधिरहित. उपाधि धर्मचिन्तायां कुटुंबव्यापृते छले—विश्वमेदिनी. धर्मचिंता, कौटुंबिक जबाबदारी व कपट या तीनी गोष्टी पादुकांच्या बाबतीत नव्हत्या. सिंहासनावर प्रभू बसले असते तर या तिन्ही गोष्टींना त्यांना तोंड द्यावे लागले असते.)

आता भरत 'मुनेमाने' कसे राहू लागले ते पाहा. प्रथम राममाता कौसल्या व गुरू यांच्या पायावर मस्तक ठेवले. प्रभुपादुकांची आज्ञा घेतली. जवळच 'नंदिगांवी' एक पर्णकुटी तयार करविली आणि त्या ठिकाणी धर्म-धुरंधर व धीर अशा भरतानी निवास केला. मस्तकावर जटा बांधल्या अंगावर वल्कले धारण केली. जमीन खणून खाली एक गुहा तयार केली व तेथे दर्भासन घातले. खाणेपिणे, वल्कले वापरणे, भांडी व इतर सुख साधनांचा उपयोग न करणे, व्रते व नियम यांचे पालन आणि इतर सर्वकठीण असे ऋषिधर्म याचे स्वसंतोषाने पालन सुरू झाले. म्हणजे भूषणे, अनेक प्रकारची वस्त्रे व विषय भोगाचे भरपुर सुख यांना शरीराने, मनाने व वाणीने तृणासमान तुच्छ समजून त्यांचा त्याग केला.

भरताच्या या त्यागाचे व वैराग्याचे वैशिष्ट्य थोडक्यात समजून घेण्यासारखे आहे. अयोध्येच्या राज्याचा लोभ प्रत्यक्ष इंद्रालाही वाटे व दशरथाच्या धनाची माहिती समजून कुबेर लाजत असे! असे राज्य व वैभव पायाजवळ चालून आले असता चाफ्याच्या बागेत जसा भुंगा अलिप्त राहतो त्याचप्रमाणे त्या अयोध्या नगरीत अनासक्त होऊन भरत राहत होते!

परंतु रामप्रेमी महाभाग्यवान भक्त लक्ष्मीच्या विलासांचा, ओकलेल्या अन्नाप्रमाणे तिरस्कार करतात. मग भरत तर प्रत्यक्ष रामचंद्रांच्या प्रेमास पूर्णपणे पात्र झालेले त्यांचे वरीलप्रमाणे अनासक्तीचे वर्तन झाल्याने त्यात विशेष काहीच नाही. नाहीतरी चातक व हंस यांची जी जगात प्रशंसा होते ती दृढनेम व विवेक या त्यांच्या विशेष गुणांच्या वैभवामुळेच! ३२४

अपूर्व असे जीवन भरतासारख्या श्रेष्ट राजबिंड्याचे सुरू झाल्यावर काही परिणाम होणे साहजिकच! मेद कमी होऊ लागल्याने दिवसें दिवस शरीर कृश होऊ लागले. परंतु बल व मुख कान्ती यात मुळीच कमतरता आली नाही. तसेच रामप्रेमाचा पण मात्र नित्य नवीन व पुष्ट होत चालला. धर्माचे सैन्य वाढू लागले. मनाला मालिन्य येणे एकदम बंद झाले!

निसर्गातही हाच चमत्कार पाहावयास मिळतो. शरदृतूने आपला प्रकाश पाडला की पाणी कमी होऊ लागते. पण वेत खुलू लागते आणि कमळे विकास पावतात.

सम दम संजम नियम उपासा । नखत भरत हिय बिमल अकासा ॥
ध्रुव बिस्वासु अवधि राका सी । स्वामि सुरति सुरबीथि बिकासी ॥
राम पेम बिधु अचल अदोषा । सहित समाज सोह नित चोखा ॥
भरत रहनि समुझनि करतूती । भगति बिरति गुन बिमल बिभूती ॥
बरनत सकल सुकबि सकुचाहीं । सेस गनेस गिरा गमु नाहीं ॥

दो० – नित पूजत प्रभु पाँवरी प्रीति न हृदयँ समाति ।
मागि मागि आयसु करत राज काज बहु भाँति ॥ ३२५ ॥

चौ० – पुलक गात हियँ सिय रघुबीरू । जीह नामु जप लोचन नीरू ॥
लखन राम सिय कानन बसहीं । भरतु भवन बसि तप तनु कसहीं ॥
दोउ दिसि समुझि कहत सबु लोगू । सब बिधि भरत सराहन जोगू ॥
सुनि ब्रत नेम साधु सकुचाहीं । देखि दसा मुनिराज लजाहीं ॥
परम पुनीत भरत आचरनू । मधुर मंजु मुद मंगल करनू ॥
हरन कठिन कलि कलुष कलेसू । महामोह निसि दलन दिनेसू ॥

आता हा भरताचा शारदीय पूर्ण चंद्र कसा शोभतो पहा. शम, दम, संयम, नियम व उपवास ही नक्षत्रे भरताच्या स्वच्छ हृदयाकाशात चमकू लागली. विश्वासाचा ध्रुवतारा तेथे अढळ आहे. चौदा वर्षांची मुदत हीच पौर्णिमा व त्या रात्रीत स्वामींच्या विकसणाऱ्या स्मृतींचा अफाट असा आकाशगंगेचा पट्टा उजळला आहे. आणि अशा या पौर्णिमेच्या रात्री रामप्रेमाचा अचल व दोषरहित पूर्ण चंद्र वर नांदत आहे. आल्या समाजासह भरताच्या निर्मळ हृदयाकाशात अत्यंत शोभायुक्त असा नित्य प्रकाशमान होत आहे ! *

असो, भरताची भावना, रहाणी, कर्तृत्व, भक्ती, वैराग्य, विमल गुण व पवित्र भाग्य यांचे वर्णन करण्यास कोणताही कवी कचरतोच ! कारण त्याला माहीत असते की, या कामी, शेष, गणपती व सरस्वती यांच्या बुद्धीनेही शरणचिठ्ठी दिली आहे !!

या द्वितीय सोपानाचा शेवट जवळ आला. अशा वेळी भरताचे दर्शन करु या ! रोजच्या नियमाप्रमाणे भरताचे पादुकापूजन चालू आहे. हृदयात प्रभुप्रेम मावत नसल्याने नेत्रातून ते नीरस्वरूपाने गळत आहे. सर्व शरीर कसे रोमांचित झाले आहे ! हृदयातील सीता-रघुवीर जिभेवर नामाच्या जपस्वरूपात निनादित होत आहेत !

अनेक प्रकारची राज्य कारभाराची कामे, जरूर तेव्हा पादुकांची आज्ञा घेऊन भरत निकालात निघत आहेत ! ३२५

तिकडे लक्ष्मण, राम व सीता वनात रहतात, तर इकडे भरत भवनात राहूनही सर्व प्रकारे तपाचरणाने शरीर कष्टवत आहेत ! अशा ह्या दोन्हीकडील प्रकार ध्यानी घेताच लोक म्हणू लागले की, सर्वोपरि सर्व दृष्टींनी भरत प्रशंसनीय आहेत. कारण भरताचे व्रत नियम पाहून तिकडचे साधू संकोचित होतात व भरताची प्रेमदशा पाहून मोठे मोठे मुनिराजही लज्जेने माना खाली घालतात.

असे हे भरताचे आचरण किती परम पुनीत आहे ! ते नुसतेच पुनीत नाही, तर ते श्रवणमधुर, मनोहर, आनंददायक व मंगलकारकसुद्धा आहे. कारण त्याच्या श्रवणाने कठिण अशा कलिकालातील दुष्कृतांचा व क्लेशांचा (अविद्यादि पंच ×) नाश होतो. ते आचरण म्हणजे महामोहरूपी रात्रीचा संपूर्ण नाश करून ज्ञानाचा स्वच्छ प्रकाश पाडणारा सूर्यच आहे. नागाशीरूपी हत्तीचे निर्दालन करणारा तो सिंह

---

* [शम, दम, + १२ यम + १२ नियम + उपवास = २७.नक्षत्रेही २७.]

× अविद्याऽस्मितारागद्वेषाऽभिनिवेशाः पंचक्लेशाः ।

पाप पुंज कुंजर मृगराजू । समन सकल संताप समाजू ॥
जन रंजन भंजन भव भारू । राम सनेह सुधाकर सारू ॥

छं०—सिय राम प्रेम पियूष पूरन होत जनमु न भरत को ।
मुनि मन अगम जम नियम सम दम बिषम ब्रत आचरत को ॥
दुख दाह दारिद दंभ दूषन सुजस मिस अपहरत को ।
कलिकाल तुलसी से सठन्हि हठि राम सनमुख करत को ॥

सो०—भरत चरित करि नेमु तुलसी जो सादर सुनहिं ।
सीय राम पद प्रेमू अवसि होइ भव रस बिरति ॥ ३२६ ॥

मासपारायण, इक्कीसवाँ विश्राम

इति श्रीमद्रामचरितमानसे सकलकलिकलुषविध्वंसने द्वितीयः सोपानः समाप्तः ।

॥ अयोध्याकांड समाप्त ॥

असून सर्व संशय समूहांचा नाश करणारा यम राजा आहे. (शमननाशः = यम ' शमनो यमराड् यम :' अमरे.) तसेच ते भरताचरण भक्तांचे मनोरंजन करणारे असून, भवभाराचे भंजन करणारे आहे. श्रीरामचरण प्रेम निर्माण करण्यात तर ते सुधाकरसार म्हणजे अगदी चंद्रापासून स्रवणारे अमृतच आहे ! !

श्रीसीताराम प्रेमरूपी अमृताने पूर्ण असे भरत जन्मले नसते तर मुनिमनासही अगम्य असे कठीण व्रत व शम, दम, यम, नियम यांचे आचरण कोणी केले असते ? तसेच आपल्या सुयशाच्या निमित्ताने दारिद्र्य (मोह) दंभ व दुःखाची आग यांचे कोणी निवारण केले असते काय ? आणि या भयंकर कलिकाळात तुलसीदासांच्या सारख्या शठांना (मूढांना) आग्रहपूर्वक रामसंमुख तरी कोण करणार ?

या कांडाच्या शेवटी तुलसीदास आशीर्वाद रूपाने सांगतात की, जे कोणी भरतचरित्राचे आदराने व नेमाने श्रवण करतील त्यांना सीतारामपदी प्रेम नक्की मिळेल व त्यासाठी आवश्यक असे सांसारिक विषयरसात जे वैराग्य त्याची प्राप्तीही निश्चित होईल. ३२६

[इति श्रीमद्रामचरित मानसे सकलकलिकलुष विध्वंसने द्वितीय सोपानः]

याप्रमाणे सर्व कलिकालीन पातकांचा संहार करणाऱ्या श्रीमद्रामचरित मानसातील मराठी गद्यानुवादाचा दुसरा सोपान समाप्त झाला.

॥ अयोध्याकांड समाप्त ॥

॥ श्री रामचंद्राच्या चरणी सर्व अर्पण ॥



पितृतुल्य जटायूचे दर्शन घेऊन श्रीरामांनी प्रेमळ शब्दांनी त्याचा दुःखभार हलका केला.

॥ श्रीगणेशाय नमः ॥

॥ श्रीराम समर्थ ॥

अरण्यकांड

तृतीय सोपान

श्लोक

मूलं धर्मतरोर्विवेकजलधेः पूर्णेन्दुमानन्ददं
वैराग्याम्बुजभास्करं ह्यघघनध्वान्तापहं तापहम् ।
मोहाम्भोधरपूगपाटनविधौ स्वःसम्भवं शङ्करं
वन्दे ब्रह्मकुलं कलङ्कशमनं श्रीरामभूपप्रियम् ॥ १ ॥
सान्द्रानन्दपयोदसौभगतनुं पीताम्बरं सुन्दरं
पाणौ बाणशरासनं कटिलसत्तूणीरभारं वरम् ।

अनुवादककृत मंगलाचरण

ज्यांच्या डाव्या हातात अत्यंत तेजस्वी धनुष्य असून, उजव्या हातात बाण आहे, ज्यांच्या पाठीमागे सीता (भूमिकन्या) व तिच्यामागे लक्ष्मण असे शोभत आहेत. ज्यांनी वृक्षाच्या सालींची केलेली निर्मल वस्त्रे (वल्कले) धारण केली आहेत; जटामुकुटधारण केलेला असून, जे भक्तांना अभय देणारे आहेत, असे अरण्यात जात असणारे रघुवर (राम) आमचे रक्षण करोत!

श्रीसद्गुरुचरणरूपी मानससरोवर पूर्ण निर्मल आहे. उत्तम मुक्ताफले (उत्तम मोत्ये-मुक्तिरूप फले) ते पुरवते. परमहंसांना प्राप्त होणारे ते अत्यंत पवित्र व श्रेष्ठ (पूरितम्) स्थान आहे. संसारापासून उत्पन्न होणाऱ्या भीतिरूपी आगीला आपल्या [illegible] पाण्याने विझवणारे आहे. त्रिविधतापाच्या दावाग्नीचे ते शमन करते व जन्म-संकटापासून सोडवते म्हणून ते माझे रक्षण करो.

मूळ मंगलाचरण

धर्मरूपी तरूचे मूळ, विवेकसागराला आनंदाची भरती आणणारे पूर्णचंद्र, वैराग्यरूपी कमलांना विकसित करणारे सूर्य, पापरूपी घनदाट अंधःकाराला निश्चित हटविणारे व त्रिविधतापनाशक मोहमेघांच्या समुदायाना छिन्नविछिन्न करणारे, चिदाकाशात उत्पन्न होणारे वायू, (स्वःसंभव) ब्रह्मदेवाचे वंशज (आत्मज), कलंक नाहीसा करणारे व जे [illegible] प्रिय आणि ज्यांना [illegible] प्रिय आहेत अशा, श्रीशङ्करांना मी वंदन करतो. १

पाण्याने भरलेल्या मेघाप्रमाणे ज्याचा देह श्यामल झाल्यामुळे ज्याला विशेष प्रकारचे सौंदर्य प्राप्त होऊन तो आनन्दघन बनला आहे. पिवळ्या रंगाची सुंदर वल्कले परिधान केलेले, लावण्य संपन्न, हातात धनुष्यबाण,

राजीवायतलोचनं धृतजटाजूटेन संशोभिम्
सीतालक्ष्मणसंयुतं पथिगतं रामाभिरामं भजे ।। २ ।।

सो० – उमा राम गुन गूढ़ पंडित मुनि पावहिं बिरति ।
पावहि मोह बिमूढ़ जे हरि बिमुख न धर्म रति ।।

चौ० – पुर नर भरत प्रीति मैं गाई । मति अनुरूप अनूप सुहाई ।।
अब प्रभु चरित सुनहु अति पावन । करत जे बन सुर नर मुनि भावन ।।
एक बार चुनि कुसुम सुहाए । निज कर भूषन राम बनाए ।।
सीतहि पहिराए प्रभु सादर । बैठे फटिक सिला पर सुंदर ।।
सुरपति सुत धरि बायस बेषा । सठ चाहत रघुपति बल देखा ।।
जिमि पिपीलिका सागर थाहा । महा मंदमति पावन चाहा ।।
सीता चरन चोंच हति भागा । मूढ़ मंदमति कारन कागा ।।
चला रुधिर रघुनायक जाना । सींक धनुष सायक संधाना ।।

दो ० – अति कृपाल रघुनायक सदा दीन पर नेह ।।
ता सन आइ कीन्ह छलु मूरख अवगुन गेह ।। १ ।।

चौ ० – प्रेरित मंत्र ब्रह्मसर धावा । चला भाजि बायस भय पावा ।।
धरि निज रूप गयउ पितु पाहीं । राम बिमुख राखा तेहि नाहीं ।।

कमरेला भात्याचा शोभिवंत भार, उत्तम कमळाप्रमाणे विशाल नेत्र असलेले, जटामंडळ धारण केल्यामुळे मनोहररूप झालेले, सीता लक्ष्मणासह मार्गाने जात असलेले, आपल्या सुंदर पत्नीला आनंद देणारे, असे जे श्रीरामचंद्र त्यांना मी शरण जातो. (भजे) २

मंगलाचरणानंतरच्या सोरठ्यात शंकर पार्वतीला म्हणतात, " हे उमे ! श्रीरामांचे गुण गूढ आहेत. त्यांच्यामुळे पंडित-मुनींना वैराग्याचा लाभ होतो. परंतु त्याच गुणांच्यामुळे जे हरिविमुख आहेत व धर्माचरणाचे ज्यांना प्रेम नाही, त्यांच्या बुद्धीला विशेषप्रकारचा मोह होतो.

पुरवासी लोक व भरत यांच्या अनुपम सुन्दर प्रीतीचे वर्णन यथामती केल्यावर सुर, नर व मुनी यांना आवडणारे, वनात प्रभूंनी केलेले अतिपावन चरित्र आता सुरू होत आहे. हे उमे ! आता ते लक्षपूर्वक तू ऐक.

एकदा श्रीरामचंद्रांनी सुन्दर फुले गोळा करून आपल्या हातांनी त्यांची छानदार भूषणे बनवली आणि अत्यंत आदराने ते फुलांचे दागिने स्वतः सीतेच्या अंगावर घालून ते एका उत्तम अशा स्फटिकाच्या शिळेवर बसले.

अशावेळी देवराज इंद्राच्या मुलाने (जयंताने) कावळ्याचे रूप घेतले. तो शठ आता रघुपतीचे बळ पाहात आहे. मुंगीने सागराचा ठाव घेण्याची इच्छा करण्याइतकेच हे त्याचे कृत्य मूर्खपणाचे ! तो मूर्ख, अत्यंत मंदबुद्धीचा. बोलून चालून कावळा ! त्याने सीतेच्या पायाला चोच मारली आणि पळाला !

सीतेच्या पायातून रक्त वाहू लागलेले पाहताच रघुनायकांनी दर्भाच्याच धनुष्याला एक दर्भाचा बाण लावला.

वास्तविक रघुनायक अती कृपाळू. नेहमी दीनावर स्नेह करणारे असे असता त्याने येऊन कपट केले; बरोबरच आहे ! तो कावळा जात्याच मूर्ख व दुर्गुणाचे माहेर घर ! १

प्रभूंनी सोडलेल्या ब्रह्मशराने त्या कावळ्याची पाठच धरली. तेव्हा तो वायस भयभीत होऊन पळत सुटला. त्याने ते कावळ्याचे रूप टाकले. आणि स्वतःचे रूप घेऊन तो जयंत आपल्या पित्याजवळ इंद्रापाशी गेला पण तो रामविरोधी आहे, असे पाहून त्याने मुलगा असूनही त्याला मुळीच आश्रय दिला नाही. मागे

भा निरास उपजी मन त्रासा। जथा चक्र भय रिषि दुर्बासा॥
ब्रह्मधाम सिवपुर सब लोका। फिरा श्रमित ब्याकुल भय सोका॥
काहूँ बैठन कहा न ओही। राखि को सकइ राम कर द्रोही॥
मातु मृत्यु पितु समन समाना। सुधा होइ बिष सुनु हरिजाना॥
मित्र करइ सत रिपु कै करनी। ता कहँ बिबुधनदी बैतरनी॥
सब जगु ताहि अनलहु ते ताता। जो रघुबीर बिमुख सुनु भ्राता॥
नारद देखा बिकल जयंता। लागि दया कोमल चित संता॥
पठवा तुरत राम पहिं ताही। कहेसि पुकारि प्रनत हित पाही॥
आतुर सभय गहेसि पद जाई। त्राहि त्राहि दयाल रघुराई॥
अतुलित बल अतुलित प्रभुताई। मैं मतिमंद जानि नहिं पाई॥
निज कृत कर्म जनित फल पायउँ। अब प्रभु पाहि सरन तकि आयउँ॥
सुनि कृपाल अति आरत बानी। एकनयन करि तजा भवानी॥

सो० – कीन्ह मोह बस द्रोह जद्यपि तेहि कर बध उचित।
प्रभु छाड़ेउ करि छोह को कृपाल रघुबीर सम॥ २॥

सुदर्शन चक्र लागल्यावर जशी दुर्वास ऋषींची अवस्था झाली होती, त्याचप्रमाणे प्रत्यक्ष बापही आपणाला संरक्षण देऊ शकत नाही हे कळताच तो अतिशय घाबरला व त्याची निराशा झाली.

मागे ब्रह्मशर लागल्याने त्याला सारखे पळावेच लागले. तो खूप दमला. भयाने व शोकाने व्याकुळ होऊन ब्रह्मलोक व शिवलोक इत्यादींतूनही फेऱ्या मारल्या; पण त्याला कोणी नुसते 'बस' असेसुद्धा म्हटले नाही. साहजिकच आहे रामाचा द्रोह करणाऱ्याचे रक्षण कोण करू शकणार?

"हे हरियाना, गरुडा! ऐक." (काकभुशुंडी गरुडाला सांगतात.)

"रामद्रोह्याला बाप यमासारखा, आई मृत्यूप्रमाणे व अमृत विषासमान होते. मित्र शेकडो शत्रूंची करणी करू लागतो. आणि देवनदी गंगा त्याला वैतरणीचे फळ देते. याचा इत्यर्थ एवढाच की, जो कोणी राम-विमुख झाला, त्याला हे सर्व जगच अग्नीहून अधिक ताप देऊ लागते!

[वैतरणी=यमलोकाच्या द्वारातील रक्त-पू-केस यांचा अत्यंत जोराचा प्रवाह, घन अंधःकार व नौकाहीन अशी नदी.]

अशा प्रकारे, सर्व बाजूंनी हताश व व्याकुळ झालेला जयंत नारदांच्या नजरेस आला. संतांचे मन कोमल! त्यांना त्याची दया आली. त्यांनी त्या जयंतरूप कावळ्याला लगेच रामाकडे पाठविला आणि 'त्राहि प्रणतहित' [शरण आलेल्याचे रक्षण करणारे आपण आहात, मला तारा.] असे मोठ्याने म्हण, अशी शिकवण दिली.

त्याप्रमाणे, आतुर व भयभीत झालेला तो प्रभूजवळ गेला व पाय धरून म्हणाला, 'हे रघुराज! हे दयाळो! माझे रक्षण करा. आपली प्रभुता अतुल्य व आपले सामर्थ्यही तसेच. मतिमंद मी; माझ्या ते ध्यानी आले नाही. प्रभो! मी आपल्या दुष्कृत्याबद्दल भरपूर शिक्षा भोगली; आता मी आपणास शरण आलो आहे. मला या ब्रह्मशरापासून वाचवा.'

"त्या वायसाची ती आर्तवाणी, हे भवानी! कृपाळू प्रभूंनी ऐकली व त्याला ठार न मारता फक्त त्याचा एक डोळा फोडून त्याला सोडून दिले.

खरोखर, मोहवश होऊन त्याने द्रोह केला म्हणून त्याचा वध करणेच जरी योग्य होते, तरी पण दया करून प्रभूंनी त्याला जिवंत सोडला! रघुवीरासारखा इतका दयाळू कोणी तरी असेल काय? २

असो. आता चित्रकूटावरील चरित्राचा समारोप करून आपणास प्रभूबरोबर प्रयाण करावयाचे आहे.



चौ० – रघुपति चित्रकूट बसि नाना । चरित किए श्रुति सुधा समाना ॥
बहुरि राम अस मन अनुमाना । होइहि भीर सबहिं मोहि जाना ॥
सकल मुनिन्ह सन बिदा कराई । सीता सहित चले द्वौ भाई ॥
अत्रि के आश्रम अब प्रभु गयऊ । सुनत महामुनि हरषित भयऊ ॥
पुलकित गात अत्रि उठि धाए । देखि रामु आतुर चलि आए ॥
करत दंडवत मुनि उर लाए । प्रेम बारि द्वौ जन अन्हवाए ॥
देखि राम छबि नयन जुड़ाने । सादर निज आश्रम तब आने ॥
करि पूजा कहि बचन सुहाए । दिए मूल फल प्रभु मन भाए ॥

सो० – प्रभु आसन आसीन भरि लोचन सोभा निरखि ।
मुनिबर परम प्रबीन जोरि पानि अस्तुति करत ॥ ३ ॥

छं० – नमामि भक्त वत्सलं । कृपालु शील कोमलं ॥
भजामि ते पदांबुजं । अकामिनां स्वधामदं ॥ १ ॥
निकाम श्याम सुंदरं । भवांबुनाथ मंदरं ॥
प्रफुल्ल कंज लोचनं । मदादि दोष मोचनं ॥ २ ॥
प्रलंब बाहु विक्रमं । प्रभोऽप्रमेय वैभवं ॥
निषंग चाप सायकं । धरं त्रिलोक नायकं ॥ ३ ॥

चित्रकूट पर्वतावर राहिल्यापासून कानांना अमृतासारखी मधुर अशी अनेक महत्कृत्ये रघुपतींनी केली, त्यामुळे प्रभूंच्या मनात असा विचार आला की, 'आता सर्वांनी ओळखल्यामुळे येथे गर्दी होणार.' हा विचार निश्चित होताच मुनिगणांचा निरोप घेऊन सीतेसह दोघे बंधू निघाले.

प्रथम हे त्रिवर्ग जेव्हा अत्रिऋषीच्या आश्रमात शिरले तेव्हा त्या मुनिश्रेष्ठाला केवढा आनंद झाला ! त्यांची काया पुलकित झाली व स्वागतासाठी ते धावतच आले. पुढून हे महर्षी धावत येत असल्याचे पाहून श्रीरामचंद्रही वेगाने चालून त्यांच्याजवळ आले.

रामलक्ष्मण त्यांना दण्डवत प्रणाम करत असताच त्यांनी दशरथनंदनांना आपल्या हृदयाशी कवटाळले. त्यावेळी मुनीच्या नेत्रांतून प्रेमाश्रूंचा पूर चालल्यामुळे त्याखाली रामलक्ष्मण न्हाऊन निघाले !

ते राम रूप पाहून अत्रींचे डोळे निवले. अत्यंत आदरपूर्वक सर्वांना ऋषिवर्यांनी आपल्या आश्रमातील पर्णकुटीत आणले. लगेच मुनींनी त्रिवर्गाची पूजा केली. मधुर भाषणयुक्त रुचकर कंदमूल फले भोजनास सादर केली. प्रभूंनी ती नावाजत स्वीकारली. एवढे झाल्यावर श्रीरामचंद्र, सीता व लक्ष्मण याना उच्चासनावर बसवले आणि नंतर डोळे भरून ती शोभा पाहात असता अत्रिऋषींचे हात जोडले गेले व त्यांच्या मुखावाटे भगवंताची स्तुती बाहेर पडू लागली. ३

प्रभूचा प्रभाव जाणून निःसंशय मनाने श्रीरामभक्ती करतो तो प्रवीण; आणि अशा प्रवीणांत ऋषिवर्य अतिप्रवीण ! मग ती स्तुती सर्वश्रेष्ठ असणारच ! प्रत्यक्षच अनुभव घेणे इष्ट.

" भक्तवत्सल कृपाळू व कोमल स्वभावाचे असे आपण आहात म्हणून आपल्या चरणी मी वंदन करतो. निष्काम भक्तांना आपले धाम देणारे आपले चरणकमल असल्याने मी त्यांचा आश्रय करतो. १

आपले सावळे रूप अत्यंत सुन्दर असून या भवसागराचे मंथन करण्यास आपण मंदराचलासारखे आहात. पूर्ण उमललेल्या कमळासारखे हे आपले नेत्र ! त्याचे दर्शन होताच मदमत्सरादि दोषापासून जीवाची सुटका होते ! २

आपले हे आजानुबाहू ! त्यांचा पराक्रम प्रमाणांनी कसा जाणणार ? तसेच आपले ऐश्वर्यही प्रमाणातीत आहे. त्रैलोक्याचे नायक असून आता आपण भाता आणि धनुष्यबाण धारण केलेले आहेत. ३

दिनेश वंश मंडनं । महेश चाप खंडनं ॥
मुनींद्र संत रंजनं । सुरारि वृंद भंजनं ॥ ४ ॥
मनोज वैरि वंदितं । अजादि देव सेवितं ॥
विशुद्ध बोध विग्रहं । समस्त दूषणापहं ॥ ५ ॥
नमामि इंदिरा पतिं । सुखाकरं सतां गतिं ॥
भजे सशक्ति सानुजं । शची पति प्रियानुजं ॥ ६ ॥
त्वदंघ्रि मूल ये नराः । भजंति हीन मत्सराः ॥
पतंति नो भवार्णवे । वितर्क वीचि संकुले ॥ ७ ॥
विविक्त वासिनः सदा । भजंति मुक्तये मुदा ॥
निरस्य इंद्रियादिकं । प्रयांति ते गतिं स्वकं ॥ ८ ॥
तमेकमद्भुतं प्रभुं । निरीहमीश्वरं विभुं ॥
जगद्गुरुं च शाश्वतं । तुरीयमेव केवलं ॥ ९ ॥
भजामि भाव वल्लभं । कुयोगिनां सुदुर्लभं ॥
स्वभक्त कल्प पादपं । समं सुसेव्यमन्वहं ॥ १० ॥
अनूप रूप भूपतिं । नतोऽहमुर्विजा पतिं ॥
प्रसीद मे नमामि ते । पदाब्ज भक्ति देहि मे ॥ ११ ॥

आपण सूर्यवंशात जन्म घेऊन तो वंश भूषित केला. तसेच शंकराच्या धनुष्याचे अतुलित सामर्थ्याने खंडन केले! आता मुनिश्रेष्ठ व संत यांना आनंद देण्यासाठी देवाच्या शत्रुसमुहाचा (असुरांचा) नाश करणारे होणार आहात! ४

" मदनारी शंकर आपणाला वंदन करतात व ब्रह्मादि देव आपली सेवा करतात. विशेष प्रकारे निर्मल असा आपला ज्ञानमय देह आहे. त्याच्या दर्शनाने समस्त [illegible] आपणास मी वंदन करतो." ५

" आपण लक्ष्मीचे पती आहात. सुखाचे सागर असल्याने संतांचे एकमेव आश्रयस्थान बनला आहात. आपण इंद्राचे प्रिय धाकटे बंधू आहात. [illegible] आपली शक्ति सीता व अनुज लक्ष्मण यांच्यासह अशा आपणाला मी नमन करतो." ६

" मत्सररहित होऊन जे लोक आपल्या चरणमूळांचे [illegible] भजन करतात, ते नाना प्रकारच्या तर्कवितर्करूपी तरंगांनी भरलेल्या भवसागरात पडत नाहीत. ७

" इंद्रियादिकांचा निग्रह करून मुक्तीच्या इच्छेने जे [illegible] पुरुष तुमचा सदोदित आश्रय करतात, ते मुक्त होतात." (स्वकं [illegible] ८

" एकमेव अद्‌भुत, सर्वसमर्थ, [illegible], सर्वांच्या [illegible] चालवणारे, जगद्‌गुरु, शाश्वत; परात्पर (तुरीय) अशा त्या केवळ स्वरूपालाच मी शरण जात आहे. ९.

भावप्रिय आपण, असल्यामुळे कुयोगी (त्यांना आपल्या चरणांचे प्रेम प्राप्त होऊ शकत नाही) लोकांना आपण अतिदुर्लभ होता, परंतु आपल्या भक्तांना मात्र [illegible] वांछित फळ देता. आपण सम असून (अन्वहं=अनुदिन) आपली सेवा सदोदित सुलभ रीतीने करता येते. अशा प्रभूंना मी नमन करतो." १०

भूपतीच्या रूपात आपले सौंदर्य अनुपमेय आहे! आपण या भूकन्या सीतेचे पती आहात अशा आपणाला मी नम्रपणे शरण आलो आहे; माझ्यावर प्रसन्न व्हा. मी आपणाला नमस्कार करतो; मला या चरण कमलांची भक्ती द्या." ११

पठंति ये स्तवं इदं । नरादरेण ते पदं ॥
व्रजंति नात्र संशयं । त्वदीय भक्ति संयुताः ॥ १२ ॥

दो० – बिनती करि मुनि नाइ सिरु कह कर जोरि बहोरि ।
चरन सरोरुह नाथ जनि कबहुँ तजै मति मोरि ॥ ४ ॥

चौ० – अनुसुइया के पद गहि सीता । मिली बहोरि सुसील बिनीता ॥
रिषिपतिनी मन सुख अधिकाई । आसिष देइ निकट बैठाई ॥
दिव्य बसन भूषन पहिराए । जे नित नूतन अमल सुहाए ॥
कह रिषिबधू सरस मृदु बानी । नारिधर्म कछु ब्याज बखानी ॥
मातु पिता भ्राता हितकारी । मितप्रद सब सुनु राजकुमारी ॥
अमित दानि भर्ता बयदेही । अधम सो नारि जो सेव न तेही ॥
धीरज धर्म मित्र अरु नारी । आपद काल परिखिअहिं चारी ॥
बृद्ध रोगबस जड़ धनहीना । अंध बधिर क्रोधी अति दीना ॥
ऐसेहु पति कर किएँ अपमाना । नारि पाव जमपुर दुख नाना ॥
एकइ धर्म एक ब्रत नेमा । कायँ बचन मन पति पद प्रेमा ॥
जग पतिब्रता चारि बिधि अहहीं । बेद पुरान संत सब कहहीं ॥
उत्तम के अस बस मन माहीं । सपनेहुँ आन पुरुष जग नाहीं ॥

" जे मानव अत्रिऋषींनी केलेल्या या स्तुतीचे आदराने पठण करतील, त्यांना शुद्ध भक्ती मिळून आपल्या स्थानाला ते जातील, यांत बिलकुल शंका नाही. " १२

याप्रमाणे स्तुती केल्यावर मुनींनी मस्तक विनम्र करून पुनः हात जोडले व म्हणाले, " हे नाथ ! माझी बुध्दी आपल्या चरणकमळांना कधीही न सोडो. ४

अत्रीची स्तुती संपताच सुशील व विशेष नम्र असणाऱ्या सीतेने प्रथम अनसूयेचे पाय धरले व मग तिला मातेप्रमाणे भेटली. ऋषिपत्नीच्या मनाला यावेळी केवढे सुख झाले ! तिने सीतेला आशीर्वाद देऊन आपल्या जवळ बसविली. नंतर अनुसूयेने सीतेला अशी दिव्य साडीचोळी व वस्त्रे दिली की जी नित्य नवी, स्वच्छ व सुन्दर बनत राहतील.

याप्रमाणे सीतेचा आदर झाल्यावर सीतेच्या निमित्ताने मधुर व कोमल वाणीने स्त्रियांचे काही धर्म वर्णन करून सांगण्यास अत्रिपत्नीने प्रारंभ केला.

" हे राजकुमारी ! चार शब्द सांगते; लक्षपूर्वक ऐक ! आई, बाप, बंधुवर्ग हे सर्व आपले हित करणारे आहेत. परंतु त्यांच्याकडून मिळणाऱ्या सुखाची एक विशिष्ट मर्यादा ठरलेली असते. आपल्या पतीकडून मात्र पतिव्रतेला प्रत्यक्ष मोक्षसुखाची जोड होत असल्याने त्याच्याकडून मिळणारे सुख अमर्याद आहे ! अशी वस्तुस्थिती असता आपल्या पतिदेवाची जी मनःपूर्वक सेवा करत नाही ती स्त्री अधम होय !

" धैर्य, धर्म, मित्र आणि स्त्री या चारीना आपत्काळीच कस लागतो. म्हणून वृद्ध, रोगी, मूर्ख, आंधळा बहिरा, रागीट आणि अत्यंत दीन झालेला अशाही स्थितीतील पतीचा स्त्रियानी अपमान केल्यास त्यांना यमपुरीत अनेक प्रकारची दुःखे भोगावी लागतात. म्हणून काया-वाचा-मनाने आपल्या पतिदेवाच्या चरणी प्रेम करणे एवढा एकच स्त्रियांच्या करिता संपूर्ण धर्म. हेच एक त्यांचे महाव्रत व हाच एक मुख्य नियम होय !

" या दृष्टीने पहाता जगातील पतिव्रतांचे चार प्रकार होतात आणि वेद, पुराणे व संतांची वाक्ये यांचेही रहस्य तेच आहे. उत्तम दर्जाच्या पतिव्रतेचे मनात असा अखंड भाव असतो की तिचा पती सोडून साऱ्या जगांत स्वप्नातही अन्य पुरुषाचे अस्तित्व तिला जाणवत नाही.

मध्यम परपति देखइ कैसें । भ्राता पिता पुत्र निज जैसें ॥
धर्म बिचारि समुझि कुल रहई । सो निकिष्ट त्रिय श्रुति अस कहई ॥
बिनु अवसर भय तें रह जोई । जानेहु अधम नारि जग सोई ॥
पति बंचक परपति रति करई । रौरव नरक कल्प सत परई ॥
छन सुख लागि जनम सत कोटी । दुख न समुझ तेहि सम को खोटी ॥
बिनु श्रम नारि परम गति लहई । पतिब्रत धर्म छाड़ि छल गहई ॥
पति प्रतिकूल जनम जहँ जाई । बिधवा होइ पाइ तरुनाई ॥

सो० — सहज अपावनि नारि पति सेवत सुभ गति लहइ ।
जसु गावत श्रुति चारि अजहुँ तुलसिका हरिहि प्रिय ॥ ५ (क) ॥
सुनु सीता तव नाम सुमिरि नारि पतिब्रत करहिं ।
तोहि प्रानप्रिय राम कहिउ कथा संसार हित ॥ ५ (ख) ॥

चौ० — सुनि जानकीं परम सुखु पावा । सादर तासु चरन सिरु नावा ॥
तब मुनि सन कह कृपानिधाना । आयसु होइ जाउँ बन आना ॥
संतत मो पर कृपा करेहू । सेवक जानि तजेहु जनि नेहू ॥
धर्म धुरंधर प्रभु कै बानी । सुनि सप्रेम बोले मुनि ग्यानी ॥
जासु कृपा अज सिव सनकादी । चहत सकल परमारथ बादी ॥

मधल्या वर्गातील पतिव्रता, परपुरुषाकडे पाहात असता त्यांच्या वयोमानाप्रमाणे आपला पिता, बंधु अगर पुत्र अशी या वर्गातील स्त्रियांची त्याच्या ठिकाणी निष्ठा कायम राहते. या नंतर वेदांत असे सांगितले आहे की जिच्या पातिव्रत्याचे रक्षण धर्मबंधने व कुलमर्यादा यांच्यामुळेच होते ती निकृष्ट दर्जाची स्त्री होय !

" आणि ज्या स्त्रीला अनुकूल संधी न सापडल्याने किंवा भयामुळे पातिव्रत्याचे उल्लंघन करता आले नाही, ती स्त्री या जगातील अधम दर्जाची होय ! आपल्या पतीचा विश्वासघात करून परपुरुषाशी रममाण होणाऱ्या स्त्रीला शंभर कल्पपर्यंत रौरव नरकात पिचत पडावे लागते !! स्वर्गीक क्षणिक सुखाकरिता असंख्य जन्मात भोगाव्या लागणाऱ्या दुःखाची जी कदर करत नाही [illegible] खोटी स्त्री दुसरी कोण असणार !

" निष्कपट अंतःकरणाने पातिव्रत्य धर्माचे पालन जी स्त्री करते ती दुसऱ्या कोणत्याही कष्टप्रद साधना शिवाय परमगती मिळवते. यांच्या उलट आपल्या पतीला जी विरोध करते ती दुसऱ्या जन्मी तारुण्यात वैधव्य प्राप्त जेथे होणार त्याठिकाणी जन्माला जाते. !

" जन्मतः अपवित्र असलेली स्त्री पतिसेवा करून अनायासे शुभगतीची प्राप्ती करून घेऊ शकते. पातिव्रत्य धर्माच्या पालनाच्या जोरावरच तुळस भगवंताला प्रिय झाली व तिचे सुयश चारी वेद गात आहेत ! (५ क)

हे सीते ! ऐक. अग तुझ्या नुसत्या नामाच्या वारंवार स्मरणाने स्त्रिया पतिव्रत्य धर्माचे आचरण करण्यास समर्थ बनतात एवढा तुझा महिमा आहे. श्रीरामचंद्र हे तुला प्राणाप्रमाणे प्रिय आहेत ! आतापर्यंत पतिव्रताधर्म जो सांगितला, तो तुझे निमित्त करून सर्व जगातील स्त्रियांच्या कल्याणाकरिताच सांगितला. (५ ख)

जानकीने हे सर्व ऐकल्यावर तिला परम समाधान झाले आणि अत्रिपत्नी अनसूयेच्या पदकमली तिने अत्यंत भक्तिपुरस्सर आपले मस्तक नमवले.

याप्रमाणे स्त्रियांचा हा कार्यक्रम संपताच कृपानिधान श्रीरामचंद्रांनी मुनिश्रेष्ठास विनविले, ' आपली आज्ञा झाली तर आता दुसऱ्या वनात जाऊ. माझ्यावर आपली कृपा सदोदित असावी व आपला सेवक मला समजून माझ्यावरील आपल्या प्रेमात कमतरता होऊ नये. "

धर्मधुरंधर अशा प्रभू रामचंद्रांचे हे गोड भाषण ऐकून ज्ञानी अशा अत्रिऋषींनी प्रेमपूर्वक बोलण्यास प्रारंभ केला, " ब्रह्मदेव, शंकर व सनकादि मुनींसारखे तत्त्ववेत्ते ज्यांची कृपा आपल्यावर व्हावी म्हणून तळमळत

ते तुम्ह राम अकाम पिआरे । दीन बंधु मृदु बचन उचारे ।।
अब जानी मैं श्री चतुराई । भजी तुम्हहि सब देव बिहाई ।।
जेहि समान अतिसय नहिं कोई । ता कर सील कस न अस होई ।।
केहि बिधि कहौं जाहु अब स्वामी । कहहु नाथ तुम्ह अंतरजामी ।।
अस कहि प्रभू बिलोकि मुनि धीरा । लोचन जल बह पुलक सरीरा ।।

छं ० —तन पुलक निर्भर प्रेम पूरन नयन मुख पँकज दिए ।
मन ग्यान गुन गोतीत प्रभु मैं दीख जप तप का किए ।।
जप जोग धर्म समूह तें नर भगति अनुपम पावई ।
रघुबीर चरित पुनीत निसि दिन दास तुलसी गावई ।।

दो ० —कलिमल समन दमन मन राम सुजस सुखमूल ।
सादर सुनहिं जे तिन्ह पर राम रहहिं अनुकूल ।। ६ (क) ।।

सो ० —कठिन काल मल कोस धर्म न ग्यान न जोग जप ।
परिहरि सकल भरोस रामहि भजहिं ते चतुर नर ।। (ख) ।।

चौ ० —मुनि पद कमल नाइ करि सीसा । चले बनहि सुर नर मुनि ईसा ।।

आहेत; हे रामचंद्र ! असे तुम्ही आहात ! ज्यांच्या सर्व कामना नष्ट झाल्या, त्यानाही आपल्या चरणांच्या प्रीतीची कामना राहतेच ! शिवाय हे भगवन् ज्याना कोणीच नाही अशा दीनांचे आपणच बंधू बनता ! असे आपण यावेळी माझ्याशी कोमलवाणीने वरील रीतीने बोलत आहात !

" लक्ष्मीची चतुराई आता माझ्या लक्षात आली. सर्व देवांना सोडून आपल्याच भजनी ती लागली, याचे कारण आपल्याप्रमाणे, सर्व दृष्टीनी श्रेष्ठ दुसरे कोणीच नाही ! मग अशांचे शील, इतके उच्च दर्जाचे कसे असणार नाही ?

" नाथ ! आपण सर्वांच्या हृदयात निवास करणारे आहात. ' हे स्वामी ! आता आपण जावे, ' असे शब्द माझ्या मुखातून कसे बाहेर पडतील, ते आपणच सांगावे ! "

वरील शेवटचे वाक्य बोलत असता धैर्यवान अत्रिऋषींच्याही हृदयातील भावनांना अनावर पूर आला.

शरीर रोमांचित होऊन त्यांच्या डोळ्यातून प्रेमाश्रूंची धार सुरू झाली. मोठ्या कष्टाने त्यांनी आपली नजर प्रभूवर स्थिरावली. अत्रिऋषींची त्यावेळची अवस्था प्रेक्षणीय होती.

अंतःकरण भक्तिभावाने भरून आले आहे. सर्व काया पुलकित झाली आहे. श्रीरामचंद्राच्या मुखकमलावर एकसारखी दृष्टी खिळली आहे. मनात विचार चालू आहेत की, असे कोणते तपाचरण अगर जपानुष्ठान माझ्या कडून घडले की, ज्याच्या प्रभावाने मन, बुद्धी, गुण व इंद्रिये यांच्या कक्षेत न सापडणाऱ्या अशा प्रभूंचे प्रत्यक्ष दर्शन घेण्याचे भाग्य मी लुटत आहे !

जप, योग व धर्माचे अनेक प्रकारचे आचरण यांच्या सहाय्याने मनुष्याला अनुपम भक्तीचा लाभ होतो. हे जाणून, त्यासाठीच श्रीरघुवीरांच्या पवित्र चरित्राचे गायन तुलसीदास रात्रंदिवस करत आहेत. आणि हे खरेच आहे की, श्रीरामचंद्राचे सुंदर यश कलियुगातील पापांचे नाश करणारे, मनाला संयमी बनवणारे व सर्व सुखाचे मूळ असे आहे. या चरित्राचे आदरपूर्वक श्रवण करणाराला श्रीरामचंद्र अनुकूल राहतात ! ६ (क)

हा भयंकर कलिकाल म्हणजे एक पापांची रासच आहे ! या काळी कोणालाच आपल्या मनाप्रमाणे धर्माचरण, ज्ञानप्राप्ती, योगसाधन अगर जपानुष्ठान करता येत नाही. या वस्तुस्थितीची बरोबर कल्पना येऊन इतर वरील सर्व साधनांचा भरवसा न धरता जे श्रीरामचरणाची उपासना करतात, ते लोकच खरे शहाणे ! ६(ख)

देवता, मुनी व मानव यांचे स्वामी असणाऱ्या श्रीरघुनाथ, मुनींच्या चरणकमली आपले मस्तक विनम्र

आगें राम अनुज पुनि पाछें । मुनि बर बेष बने अति काछें ॥
उभय बीच श्री सोहइ कैसी । ब्रह्म जीव बिच माया जैसी ॥
सरिता बन गिरि अवघट घाटा । पति पहिचानि देहिं बर बाटा ॥
जहँ जहँ जाहिं देव रघुराया । करहिं मेघ तहँ तहँ नभ छाया ॥
मिला असुर बिराध मग जाता । आवतहीं रघुबीर निपाता ॥
तुरतहिं रुचिर रूप तेहिं पावा । देखि दुखी निज धाम पठावा ॥
पुनि आए जहँ मुनि सरभंगा । सुंदर अनुज जानकी संगा ॥

दो० – देखि राम मुख पंकज मुनिबर लोचन भृंग ।
सादर पान करत अति धन्य जन्म सरभंग ॥ ७ ॥

चौ० – कह मुनि सुनु रघुबीर कृपाला । संकर मानस राजमराला ॥
जात रहेउँ बिरंचि के धामा । सुनेउँ श्रवन बन ऐहहिं रामा ॥
चितवत पंथ रहेउँ दिन राती । अब प्रभु देखि जुड़ानी छाती ॥
नाथ सकल साधन मैं हीना । कीन्ही कृपा जानि जन दीना ॥
सो कछु देव न मोहि निहोरा । निज पन राखेउ जन मन चोरा ॥

करून वनातून पुढे जाण्यास निघाले. पुढे श्रीराम व मागे धाकटा भाऊ लक्ष्मण दोघेही मुनिवरांच्या वेषात अत्यंत खुलून दिसत होते. ब्रह्म आणि जीव यांच्या मधोमध शोभणाऱ्या मायेप्रमाणे या दोघांच्या मधोमध सीता शोभत होती !

अशा त्रिवर्गांचे वनगमन सुरू होताच पुढे येणाऱ्या नद्या, घनदाट अरण्ये, पर्वत व अवघड घाट यांनी हे आपले स्वामी आहेत याची जाणीव ठेवून, त्यांना उत्तम प्रकारची वाट सादर केली. त्याचप्रमाणे देवश्रेष्ठ श्रीरघुनाथ ज्या ज्या ठिकाणी चालत जात तेथे तेथे मेघ आकाशातून त्यांच्यावर आपल्या छायेचे छत्र धरण्यास चुकत नसत.

एका वेळी रस्त्यात एकदम विराध राक्षस पुढे आला. रघुवीरांनी त्याचा झटकन् निकाल लावला. भगवंतांच्या हातांनी त्याचा वध होऊन देह पडताच त्याला लगेच दिव्य शरीराची प्राप्ती झाली. त्याची दीनवाणी स्थिती पाहून प्रभूंनी त्याची आपल्या श्रेष्ठ निवासस्थानी (वैकुंठाकडे) रवानगी केली.

याप्रमाणे वनातून गमन चालू असता, ज्या ठिकाणी शरभंग मुनींचा आश्रम होता, त्या स्थळाला आपला सुंदर भाऊ लक्ष्मण व जानकी यांच्यासह प्रभू येऊन पोहोचले.

श्रीरामचंद्राचे मुखकमल दृष्टी पडताच, मुनिवरांच्या नेत्ररूपी भृंग्यांनी अत्यंत आदराने त्यातील मकरंद पिण्यास प्रारंभ केला ! शरभंगाचा जन्म धन्य ! ७

तो परमभाग्याचा आनंद काही काळ उपभोगल्यानंतर शरभंग मुनी बोलू लागले. " हे कृपाळू रघुवीर ! शंकराच्या मनरूपी मानससरोवरातील हे राजहंसा ! ऐका. मी ब्रह्मलोकास जाण्यासाठी निघालो असता माझ्या कानी आले की, श्रीरामचंद्र याच वनात येणार आहेत. त्यावेळेपासून रात्रंदिवस आपली एकसारखी मार्गप्रतीक्षा करत येथे काळ कंठत आहे. अशा स्थितीत आज प्रभूंचे दर्शन झाल्याने माझ्या अंतःकरणास साहजिकच परम समाधान झाले.

" हे नाथ ! मी कोणत्याही प्रकारचे साधन न करताच हे भाग्य मला लाभले आहे. आपल्या अत्यंत दीन दासाची जाणीव ठेवून आपणच ही माझ्यावर कृपा केली आहे हे निश्चित ! पण असे करण्यात आपण माझ्यावर कोणताच उपकार मात्र केलेला नाही; कारण भक्तांच्या मनाची चोरी करणारे आपण, माझ्यावर दया करून आपण फक्त आपली प्रतिज्ञा खरी करून दाखवली !



तब लगि रहहु दीन हित लागी। जब लगि मिलौं तुम्हहि तनु त्यागी ॥
जोग जग्य जप तप ब्रत कीन्हा। प्रभु कहँ देइ भगति बर लीन्हा ॥
एहि बिधि सर रचि मुनि सरभंगा। बैठे हृदयँ छाड़ि सब संगा ॥

दो० – सीता अनुज समेत प्रभु नील जलद तनु स्याम।
मम हियँ बसहु निरंतर सगुनरूप श्रीराम ॥ ८ ॥

चौ० – अस कहि जोग अगिनि तनु जारा। राम कृपाँ बैकुंठ सिधारा ॥
ताते मुनि हरि लीन न भयऊ। प्रथमहिं भेद भगति बर लयऊ ॥
रिषि निकाय मुनिबर गति देखी। सुखी भए निज हृदयँ बिसेषी ॥
अस्तुति करहिं सकल मुनि बृंदा। जयति प्रनत हित करुना कंदा ॥
पुनि रघुनाथ चले बन आगे। मुनिबर बृंद बिपुल सँग लागे ॥
अस्थि समूह देखि रघुराया। पूछी मुनिन्ह लागि अति दाया ॥
जानत हूँ पूछिअ कस स्वामी। सबदरसी तुम्ह अंतरजामी ॥
निसिचर निकर सकल मुनि खाए। सुनि रघुबीर नयन जल छाए ॥

" आता माझी प्रार्थना एवढीच आहे की या देहाचा त्याग करून आपल्या निजधामास मला नेईपर्यंत आपण याच ठिकाणी थांबावे. "

एवढे बोलून शरभंग मुनींनी त्यावेळेपर्यंत केलेले योग, यज्ञ, जप, तप व व्रतादिक सर्व साधन प्रभूचरणी अर्पण केले व त्या सर्वांचा मोबदला म्हणून भक्तीचे वरदान मागून घेतले अशाप्रकारे अत्यंत दुर्लभ अशी प्रभूची भक्ती प्राप्त होताच शरभंगांनी बाणांची चिता रचली. सर्व प्रकारच्या अंतरीच्या वासनांचा त्याग केला. नंतर त्या चितेवर मुनिवर जाऊन बसले आणि मनःपूर्वक प्रार्थना केली.

नील मेघाप्रमाणे शरीराची श्यामवर्ण कान्ती असणाऱ्या सगुणरूप श्रीरामचंद्रा ! श्रीसीता व धाकटे बंधू लक्ष्मण यांच्यासह याच आपल्या रूपात आपण माझ्या हृदयात सदोदित वास्तव्य करा. ८

याप्रमाणे प्रार्थना करून शरभंग मुनींनी योगाग्नी प्रकट केला व त्यामध्ये आपल्या शरीराला जाळून टाकले. देहांतकाळी रामकृपेचा लाभ झाल्यामुळे ते मुनी वैकुंठास गेले. त्यांनी प्रथमच भेदभक्तीचा वर मिळविल्या-मुळे भगवंतांच्या ठिकाणी ते लीन झाले नाहीत (सायुज्यमुक्ती घेतली नाही.)

जमलेल्या मुनिमंडळींना ऋषिवर्य शरभंगांना ही दुर्लभ गती मिळालेली प्रत्यक्ष पाहण्यास मिळाल्यामुळे त्यांच्या अंतःकरणात अपूर्व सुख-समाधानाला भरती आली !

शरणागताचे हित करणारे करुणाकंद म्हणून त्यांनीं प्रभूंचा जयजयकार केला व त्यांची मनःपूर्वक खूप स्तुती केली.

शरभंगांच्या समाधानाचा असा कार्यक्रम यथासांग पार पाडून प्रभू वनात पुढे निघाले, त्यावेळी श्रेष्ठ मुनींचा मोठा जमाव श्रीरामचंद्रांच्याबरोबर तसाच पुढे जाऊ लागला.

वाटेत एक मोठा हाडांचा ढीग रघुरायांच्या नजरेस येताच त्यांना अत्यंत दया येऊन बरोबरच्या ऋषींस त्यांनी त्याबद्दलची माहिती विचारली तेव्हा ते म्हणाले,

" हे स्वामी ! आपण सर्व पाहणारे असून सर्वांच्या हृदयात निवास करणारे आहात, त्यामुळे आपण हे जाणत असून आम्हाला का विचारता ? आम्ही काय सांगावे, राक्षसांच्या टोळ्यांनी खाऊन टाकलेल्या अनेक मुनींच्या हाडांची ही रास पडली आहे ! ! "

हे शब्द कानी पडताच कृपाळू रघुवीरांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले व लगेच आपले आजानुबाहू

दो० — निसिचर हीन करउँ महि भुज उठाइ पन कीन्ह ।
सकल मुनिन्ह के आश्रमन्हि जाइ जाइ सुख दीन्ह ॥ ९ ॥

चौ० — मुनि अगस्ति कर सिष्य सुजाना । नाम सुतीछन रति भगवाना ॥
मन क्रम बचन राम पद सेवक । सपनेहुँ आन भरोस न देवक ॥
प्रभु आगवनु श्रवन सुनि पावा । करत मनोरथ आतुर धावा ॥
हे बिधि दीनबंधु रघुराया । मो से सठ पर करिहहिं दाया ॥
सहित अनुज मोहि राम गोसाई । मिलिहहिं निज सेवक की नाई ॥
मोरे जियँ भरोस दृढ़ नाहीं । भगति बिरति न ग्यान मन माहीं ॥
नहिं सतसंग जोग जप जागा । नहिं दृढ़ चरन कमल अनुरागा ॥
एक बानि करुनानिधान की । सो प्रिय जाकें गति न आन की ॥
होइहैं सुफल आजु मम लोचन । देखि बदन पंकज भव मोचन ॥
निर्भर प्रेम मगन मुनि ग्यानी । कहि न जाइ सो दसा भवानी ॥
दिसि अरु बिदिसि पंथ नहिं सूझा । को मैं चलेउँ कहाँ नहिं बूझा ॥
कबहुँक फिरि पाछें पुनि जाई । कबहुँक नृत्य करइ गुन गाई ॥
अबिरल प्रेम भगति मुनि पाई । प्रभु देखैं तरु ओट लुकाई ॥

वर उचलून सर्व ऋषींच्या समोर त्यांनी प्रतिज्ञा केली की, ही सर्व पृथ्वी मी लवकरच राक्षसहीन करीन!

ही प्रतिज्ञा भगवंतांच्या तोंडातून बाहेर पडताक्षणीच सर्व मुनिवर्गात केवढा धीर आला! त्या ऋषि-श्रेष्ठांच्या पैकी प्रत्येकाच्या आश्रमात जाऊन प्रभूंनी त्यांना फार सुखसंतोष दिला. ९.

त्यानंतर श्रीरामचंद्र पुढे निघाले. श्रीलक्ष्मण जानकीसहित प्रभू अगस्त्यांच्या आश्रमाच्या दिशेने येत असल्याची खबर सुतीक्ष्ण नामक श्रेष्ठ रामभक्ताला मिळाली. हा अगस्ती ऋषींचा मुख्य शिष्य होता. त्याची भगवंताच्या चरणी शुद्ध भक्ती होती. काया-वाचा-मनाने तो स्वतःला रामाचा इमानी सेवक समजत असे. स्वप्नातही इतर देवतांची त्याने कधी आशा बाळगली नाही. वरील बातमी कानी पडताच तो [illegible] अत्यंत आतुर होऊन चारी दिशांना धावू लागला. त्याचे मनोरथ सुरू झाले.

“हे विधी! दीनांचे बंधू असणारे रघुराज, माझ्यासारख्या मूर्खावर दया करतील काय? आपल्या धाकट्या भावासह, माझ्या अंतःकरणाचे स्वामी श्रीरामचंद्र, मला आपला सेवक समजून कधी भेटतील बरं? मी अगदीच अपात्र! माझ्या मनात दृढ भरंवसा नाही. त्याचप्रमाणे ज्ञान, वैराग्य आणि भक्ती यांचे नावसुद्धा माझ्या मनात नाही. कधी संतांची संगती घडली नाही. जप, योग अगर [illegible] त्याग या पैकीहि काहीच माझ्या हातून घडले नाही. निदान भगवंताच्या चरणकमळी उत्कट प्रेम असावे. पण तेही माझ्या वाट्यास आले नाही! तथापि जो अनन्यगतिक झाला, तो भगवंताला प्रिय होतो, असा कृपानिधान श्रीरघुनाथाचा बाणा आहे. आणि माझे भांडवल तेवढेच! त्याच्या जोरावर जन्ममरण-दुःखातून सोडवणारे असे श्रीरामचंद्रांचे मुख-कमळ पाहून आज माझ्या डोळ्यांचे मी खास पारणे फेडणार!”

अशा मनोरथात गर्क झालेल्या त्या मुनींच्या हृदयात जेव्हा रामचरणप्रेमाला पूर आला, तेव्हा हे भवानी, त्यांच्या त्यावेळच्या स्थितीचे वर्णन करणे फारच कठीण! आपण रस्त्यानेच चालतो काय, ही योग्य दिशा आहे का भलतीच, आपण कोण, निघालो कुठे, इत्यादि सर्वच गोष्टींचे भान हरवून गेले! एकदा मागे वळावे, पुनः परत फिरावे, नाहीतर उभा राहिलेल्या ठिकाणीच प्रभूंच्या गुणांचे गायन करीत नाचू लागावे.

अशा प्रकारे अविरल प्रेमभक्ती प्राप्त झालेला आपला हा लाडका भक्त आहे, हे प्रभूंनी पाहिले. मौज पाहण्यासाठी ते एका झाडामागे लपले!



अतिसय प्रीति देखि रघुबीरा । प्रगटे हृदयँ हरन भव भीरा ।।
मुनि मग माझ अचल होइ बैसा । पुलक सरीर पनस फल जैसा ।।
तब रघुनाथ निकट चलि आए । देखि दसा निज जन मन भाए ।।
मुनिहि राम बहु भाँति जगावा । जाग न ध्यानजनित सुख पावा ।।
भूप रूप तब राम दुरावा । हृदयँ चतुर्भुज रूप देखावा ।।
मुनि अकुलाइ उठा तब कैसें । बिकल हीन मनि फनिबर जैसें ।।
आगें देखि राम तन स्यामा । सीता अनुज सहित सुख धामा ।।
परेउ लकुट इव चरनन्हि लागी । प्रेम मगन मुनिबर बड़भागी ।।
भुज बिसाल गहि लिए उठाई । परम प्रीति राखे उर लाई ।।
मुनिहि मिलत अस सोह कृपाला । कनक तरुहि जनु भेंट तमाला ।।
राम बदनु बिलोक मुनि ठाढ़ा । मानहुँ चित्र माझ लिखि काढ़ा ।।

दो ०—तब मुनि हृदयँ धीर धरि गहि पद बारहिं बार ।
निज आश्रम प्रभु आनि करि पूजा बिबिध प्रकार ।। १० ।।

चौ ०—कह मुनि प्रभु सुनु बिनती मोरी । अस्तुति करौं कवन बिधि तोरी ।।
महिमा अमित मोरि मति थोरी । रबि सन्मुख खद्योत अँजोरी ।।
श्याम तामरस दाम शरीरं । जटा मुकुट परिधन मुनिचीरं ।।

त्यांची ती श्रेष्ठ भक्ती रघुवीरांनी निरखून पाहिली आणि संसारदुःख हरण करणारे प्रभू सुतीक्ष्णांच्या हृदयात प्रकट झाले. त्याबरोबर, ज्या ठिकाणी रस्त्यात, तो भक्तिरंगात रंगून नाचत होता, तेथेच एखाद्या पुतळ्या-प्रमाणे अचल होऊन त्याने बैठक मारली ! सर्वांगावर फणसाप्रमाणे काटा उभा राहिला !

हे पाहून रघुनाथ त्याच्या अगदी जवळ आले; आणि आपल्या भक्ताची ती भावसमाधी पाहून मनात परम संतुष्ट झाले. त्या स्थितीतून त्याला देहभानावर आणण्यासाठी श्रीरामचंद्रांनी पुष्कळ प्रयत्न केले; परंतु अंतरीच्या ध्यानानंदात गढून गेलेला सुतीक्ष्ण जागाच होईना !

शेवटी प्रभूंनी आपले दशरथनंदन रूप लपवून त्याच्या हृदयात चतुर्भुजरूप प्रकट केले त्याबरोबर घाबरे होऊन ते मुनिश्रेष्ठ झटकन् उठले आणि मणी हरवलेल्या महाभुजंगाप्रमाणे तळमळू लागले ! इतक्यांत सुखाचे माहेरघर असणारे असे सावळे श्रीरामरूप, सीता लक्ष्मणासह पुढेच प्रत्यक्ष उभे ठाकलेले त्याच्या दृष्टीस पडले !

मग काय ! परम भाग्यवान तो मुनिश्रेष्ठ एखाद्या छडीप्रमाणे, प्रेममग्न स्थितीत, भगवंताच्या चरण-कमळावर चटकन् पडला ! रामप्रभूंनी आपल्या दीर्घबाहूंनी सुतीक्ष्णाला लगेच उठवून अत्यंत प्रेमाने आपल्या हृदयाशी कवटाळले ! त्या मुनीला कृपाळू प्रभू भेटत असता एखाद्या तमालवृक्षाची व सुवर्णतरूची गाठ पडल्याप्रमाणे ते दृश्य रमणीय दिसू लागले. नंतर रामचंद्राच्या मुखकमळावर सुतीक्ष्णाने अशी टक लावली की, जणू तो मनुष्य नसून, तशा स्थितीत काढलेले ते एक चित्रच आहे !

भवसागराची भरती ओसरल्यावर मुनिवराने धीर धरून, पुनः पुन्हा प्रभुचरणी मस्तक नमवले; आणि त्यांना आपल्या आश्रमात आणून अनेक प्रकारे त्यांचे पूजन केले. १०

त्यानंतर हात जोडले व प्रार्थना करू लागले :—

" हे प्रभो ! माझी एक विनंती ऐका. मी आपली स्तुती कशाप्रकारे करू ? सूर्याच्या प्रचण्ड तेजापुढे काजव्याची चमक असावी, त्याप्रमाणे तुझा अनंत महिमा आणि माझी अल्प बुद्धी !" मुनी पुढे प्रार्थू लागले. " प्रभो ! जटांचा मुकुट बनवलेले व मुनिवल्कल परिधान केलेले तुझे शरीर पाहिले म्हणजे, एक नील-

पाणि चाप शर कटि तूणीरं । नौमि निरंतर श्रीरघुवीरं ।।
मोह विपिन घन दहन कृशानुः । संत सरोरुह कानन भानुः ।।
निशिचर करि वरुथ मृगराजः । त्रातु सदा नो भव खग बाजः ।।
अरुण नयन राजीव सुवेशं । सीता नयन चकोर निशेशं ।।
हर हृदि मानस बाल मरालं । नौमि राम उर बाहु विशालं ।।
संशय सर्प ग्रसन उरगादः । शमन सुकर्कश तर्क विषादः ।।
भव भंजन रंजन सुर यूथः । त्रातु सदा नो कृपा वरूथः ।।
निर्गुण सगुण विषम सम रूपं । ज्ञान गिरा गोतीतमनूपं ।।
अमलमखिलमनवद्यमपारं । नौमि राम भंजन महि भारं ।।
भक्त कल्पपादप आरामः । तर्जन क्रोध लोभ मद कामः ।।
अति नागर भव सागर सेतुः । त्रातु सदा दिनकर कुल केतुः ।।
अतुलित भुज प्रताप बल धामः । कलि मल विपुल विभंजन नामः ।।
धर्म वर्म नर्मद गुण ग्रामः । संतत शं तनोतु मम रामः ।।

कमळांची माळाच आहे असे वाटते. ज्याने धनुष्य व बाण घेऊन [illegible] असा रघुवीरा ! माझा तुला सर्वकाळ नमस्कार !

" मोहरूपी वनदाट अरण्याला जाळून टाकणारा जणू अग्नीच असे, [illegible] मात्र सूर्याप्रमाणे प्रफुल्लित करतो ! [illegible] आहेस तसाच जन्ममरणरूपी [illegible] म्हणून [illegible] रक्षण करणार !

" तुझे आरक्त डोळे [illegible] मनोहर [illegible] नेत्रचकोरांना [illegible] पूर्णचंद्राप्रमाणे सुखकारक वाटते आहे. [illegible] विहार करत असते ! विशाल वक्षस्थळ व आजानुबाहु [illegible] मी तुला वंदन करतो. "

" संशयरूपी [illegible] ग्रस्त [illegible] त्यांना [illegible] नाश करतो. [illegible] विलक्षण तर्कजालात [illegible] विषाद उत्पन्न झाल्यास [illegible] चक्रातून सोडवणारा व देवसमाजाचे रंजन करणारा. [illegible] रघुनाथा ! आमचे रक्षण सतत करा !

" हे निर्गुण, सगुण, विषम व समरूप ! [illegible] वाणी व [illegible] अनुपम [illegible] दोषरहित व अनन्त असे आपण असून, पृथ्वीचा भार [illegible] आहात ! हे रामचंद्रा ! मी तुला नमस्कार करतो. "

" आपल्या भक्तांच्यासाठी कल्पवृक्षांची बाग बनणारे, क्रोध, लोभ, मद आणि काम यांना दहशत देणारे, अत्यंत कुशल असून संसार [illegible] सेतु होणारे असे सूर्यकुळाचे ध्वज श्रीरामचंद्र ! माझे सतत रक्षण करा. "

" ज्यांच्या बाहूंचा पराक्रम अतुलनीय आहे; [illegible] आपल्या केवळ नामस्मरणाने कलियुगातील महापातकांचा नाश होतो; धर्माचे कवच [illegible] असे असून, आपल्या गुणसमुदायामुळे भक्तांना आनंदाची प्राप्ती होते असे श्रीरामचंद्र ! आपण माझे अखंड कल्याण करावे ! "

" निर्मळ, व्यापक, अविनाशी व सर्वांच्या हृदयात निरन्तर [illegible] असे जरी आपण आहात, तरी हे खरारि, श्रीरामा ! लक्ष्मण व सीता यांच्यासह वनात [illegible] आपल्या स्वरूपात माझ्या हृदयात वास्तव्य करावे ! "

जदपि बिरज ब्यापक अबिनासी । सब के हृदयँ निरंतर बासी ॥
तदपि अनुज श्री सहित खरारी । बसतु मनसि मम काननचारी ॥
जे जानहिं ते जानहुँ स्वामी । सगुन अगुन उर अंतरजामी ॥
जो कोसल पति राजिव नयना । करउ सो राम हृदय मम अयना ॥
अस अभिमान जाइ जनि भोरे । मैं सेवक रघुपति पति मोरे ॥
सुनि मुनि बचन राम मन भाए । बहुरि हरषि मुनिबर उर लाए ॥
परम प्रसन्न जानु मुनि मोही । जो बर मागहु देउँ सो तोही ॥
मुनि कह मैं बर कबहुँ न जाचा । समुझि न परइ झूठ का साचा ॥
तुम्हहि नीक लागै रघुराई । सो मोहि देहु दास सुखदाई ॥
अबिरल भगति बिरति बिग्याना । होहु सकल गुन ग्यान निधाना ॥
प्रभु जो दीन्ह सो बरु मैं पावा । अब सो देहु मोहि जो भावा ॥

दो ० —अनुज जानकी सहित प्रभु चाप बान धर राम ।
मम हिय गगन इंदु इव बसहु सदा निहकाम ॥ ११ ॥

चौ ०— एवमस्तु करि रमानिवासा । हरषि चले कुंभज रिषि पासा ॥
बहुत दिवस गुर दरसनु पाएँ । भए मोहि एहिं आश्रम आएँ ॥
अब प्रभु संग जाउँ गुर पाहीं । तुम्ह कहँ नाथ निहोरा नाहीं ॥

" सगुण, निर्गुण व अंतर्यामी अशा आपल्या स्वरूपात आपले ज्ञान करून घेणारे, त्या त्या स्वरूपाचे आकलन करोत बिचारे; माझ्या हृदयाला मात्र, कोसलपती, कमलनयन श्रीरामचंद्रा ! आपण आपले निवासस्थान बनवावे. "

" हेतू असा की, आपण माझे स्वामी व आपल्या चरणांचा मी सेवक हा अभिमान चुकूनसुद्धा माझ्या बुद्धीने सोडता कामा नये ! "

सुतीक्ष्ण मुनींची ही भावभक्तीने भरलेली प्रार्थना ऐकून श्रीरामचंद्र मनात अतिशय प्रसन्न झाले; आणि आनंदित होऊन त्या ऋषींना पुनः आपल्या हृदयाशी कवटाळले.

आणि म्हणाले, " मुने ! पूर्ण संतुष्ट झालो आहे, मी असे समजून तुला आवडणारा कोणताही वर माग, तो लगेच देईन ! "

त्यावर अगस्ति-शिष्य म्हणतो, " मी या पूर्वी वर केव्हाच मागितला नाही. माझ्या हे लक्षात येत नाही की, काय मागणे खरे व कोणते मागणे खोटे. म्हणून हे रघुनाथा ! आपण आपल्या दासाला सुख देणारे, आपणाला जो वर माझ्या दृष्टीने योग्य वाटेल तो वर मला द्यावा. "

हे ऐकून श्रीरामचंद्र परम संतोषाने म्हणाले, " हे मुने ! अविरल भक्ती, वैराग्य, विज्ञान आणि सर्व सद्गुण व ज्ञान यांचे निधान तू होशील. "

त्यावर पुनः सुतीक्ष्ण मुनी म्हणतात, ' हे प्रभो ! आपण जो वर मला दिला, तो मला प्राप्त झालाच; आता माझ्या मनात एक आवड उत्पन्न झाली आहे तेवढी पूर्ण करावी. हे प्रभो, श्रीरामचंद्रा ! धाकटा भाऊ लक्ष्मण व श्रीसीतामाता यांच्यासह हातात धनुष्यबाण घेतलेले असे, आपण स्थिर होऊन माझ्या हृदयरूपी आकाशात पूर्ण चंद्राप्रमाणे अखंड प्रकाशमान व्हा. " ११

" ठीक ! होईल बरे तसे ! " असे सांगून लक्ष्मीपती श्रीरघुवर अगस्तिऋषींच्या आश्रमाकडे हर्षाने निघाले.

त्यावेळी सुतीक्ष्णाने प्रार्थना केली, " माझे गुरू, अगस्तिऋषींचे दर्शन घेऊन मी या आश्रमात आलो, त्यावेळेपासून दीर्घकाळ लोटला. आता आपणासह मी गुरुजींच्याकडे येतो. असे करण्यात हे नाथ ! मी आपणावर काहीच उपकार करत नाही. "

देखि कृपानिधि मुनि चतुराई । लिए संग बिहसे द्वौ भाई ॥
पंथ कहत निज भगति अनूपा । मुनि आश्रम पहुँचे सुरभूपा ॥
तुरत सुतीछन गुर पहिं गयऊ । करि दंडवत कहत अस भयऊ ॥
नाथ कोसलाधीस कुमारा । आए मिलन जगत आधारा ॥
राम अनुज समेत बैदेही । निसि दिनु देव जपत हहु जेही ॥
सुनत अगस्ति तुरत उठि धाए । हरि बिलोकि लोचन जल छाए ॥
मुनि पद कमल परे द्वौ भाई । रिषि अति प्रीति लिए उर लाई ॥
सादर कुसल पूछि मुनि ग्यानी । आसन बर बैठारे आनी ॥
पुनि करि बहु प्रकार प्रभु पूजा । मोहि सम भाग्यवंत नहिं दूजा ॥
जहँ लगि रहे अपर मुनि बृंदा । हरषे सब बिलोकि सुखकंदा ॥

दो०—मुनि समूह महँ बैठे सन्मुख सब की ओर ।
सरद इंदु तन चितवत मानहुँ निकर चकोर ॥ १२ ॥

चौ०—तब रघुबीर कहा मुनि पाहीं । तुम्ह सन प्रभु दुराव कछु नाहीं ॥
तुम्ह जानहु जेहि कारन आयहुँ । ताते तात न कहि समुझायउँ ॥
अब सो मंत्र देहु प्रभु मोही । जेहि प्रकार मारौं मुनिद्रोही ॥

मुनींचे हे चातुर्य पाहून, कृपानिधी आपल्या बंधूसह हसले व त्यांनी सुतीक्ष्णाला बरोबर घेतले. वाटेत आपल्या अनुपम भक्तीचे वर्णन करत असता देवतांचे राजाधिराज श्रीरामचंद्र अगस्ती आश्रमाला येऊन पोचले.

आश्रम दृष्टीस पडताच, सुतीक्ष्ण झटकन् आपल्या अगस्ती गुरूसमीप गेला आणि दण्डवत प्रणामपूर्वक बोलू लागला :-

"हे नाथ! ज्यांचे रात्रंदिवस ध्यान करण्यात आपण रहून गेला होता ते कोसलाधीश, दशरथनंदन, जगदाधार श्रीरामचंद्र, अनुज लक्ष्मण व सीता यांच्यासह आपल्या भेटीस आले आहेत."

वरील शब्द कानी पडताच मुनिश्रेष्ठ झटकन् उठून धावतच सुटले. दुरून भगवंतांचे दर्शन होताच आनंद व प्रेम अशा दुहेरी भावनांनी त्यांचे डोळे भरून आले.

समीप येताच दोन्ही बंधू ऋषिचरणी दण्डवत प्रणाम करण्याकरिता पडत असताना ऋषींनी त्यांना वरच्यावर धरून मोठ्या प्रेमाने आपल्या हृदयाशी ओढले.

ज्ञानी अगस्तींनी आदरपूर्वक कुशल विचारून त्यांना आपल्याबरोबर आश्रमात आणले व उच्च आसनावर बसवले. अनेक उपचारांनी प्रभुपदपूजा करून मुनिराज म्हणाले, "माझ्यासारखा भाग्यवान आज दुसरा कोणीच नाही!"

अगस्ती आश्रमाच्या आसपास जेवढे दुसरे मुनी होते, ते सर्व प्रभु-आगमनाची बातमी कळताच तेथे भराभर जमले व आनन्दकन्द श्रीरामचंद्राचे दर्शन घेऊन हर्षभराने खुलले!

त्यावेळचे ते दृश्य अत्यंतच आकर्षक होते. भोवताली सर्व बाजूंनी मुनींचा समुदाय मंडलाकार बसला आहे. प्रत्येकास श्रीरामचंद्र समोर दिसत असल्याने चकोरसमुदायाने शारदीय पूर्ण चंद्राकडे टक लावावी त्याप्रमाणे सर्वच ऋषींचे नयन प्रभु-मुख-कमलावर स्थिरावले! १२

थोड्याच वेळात श्रीराम अगस्तींना म्हणाले, "प्रभो! आपणास गुप्त, अज्ञात, असे काहीच नाही. ज्या हेतूने मी वनात आलो तो आपण जाणतच असल्याने मी उघड बोललो नाही. हे प्रभो! आता मला आपण असा मंत्र (सल्ला) द्यावा की ज्याच्या प्रभावामुळे मुनींचा द्रोह करणाऱ्या राक्षसांना मी ठार करीन."



मुनि मुसुकाने सुनि प्रभु बानी । पूछेहु नाथ मोहि का जानी ।।
तुम्हरेइँ भजन प्रभाव अघारी । जानउँ महिमा कछुक तुम्हारी ।।
ऊमरि तरु बिसाल तव माया । फल ब्रह्मांड अनेक निकाया ।।
जीव चराचर जंतु समाना । भीतर बसहिं न जानहिं आना ।।
ते फल भच्छक कठिन कराला । तव भयँ डरत सदा सोउ काला ।।
ते तुम्ह सकल लोकपति साई । पूँछेहु मोहि मनुज की नाईं ।।
यह बर मागउँ कृपानिकेता । बसहु हृदयँ श्री अनुज समेता ।।
अबिरल भगति बिरति सतसंगा । चरन सरोरुह प्रीति अभंगा ।।
जद्यपि ब्रह्म अखंड अनंता । अनुभव गम्य भजहिं जेहि संता ।।
अस तव रूप बखानउँ जानउँ । फिरि फिरि सगुन ब्रह्म रति मानउँ ।।
सतत दासन्ह देहु बड़ाई । तातें मोहि पूँछेहु रघुराई ।।
है प्रभु परम मनोहर ठाऊँ । पावन पंचवटी तेहि नाऊँ ।।
दंडक बन पुनीत प्रभु करहू । उग्र साप मुनिबर कर हरहू ।।
बास करहु तहँ रघुकुल राया । कीजे सकल मुनिन्ह पर दाया ।।
चले राम मुनि आयसु पाई । तुरतहिं पंचबटी निअराई ।।

दो० – गीधराज सैं भेंट भइ बहु बिधि प्रीति बढ़ाइ ।
गोदावरी निकट प्रभु रहे परन गृह छाइ ।। १३ ।।

प्रभू श्रीरामचंद्रांचे हे भाषण ऐकून अगस्तिमुनींनी स्मित केले व ते म्हणाले " नाथ ! आपण मला काय समजून हा प्रश्न केला ? पापांचा नाश करणाऱ्या प्रभो मी आपल्याच भजनाच्या प्रभावाने आपला तिळमात्र महिमा जाणू शकतो—

" एखाद्या अत्यंत विशाल औदुंबराच्या वृक्षाप्रमाणे आपली माया असून त्याला अगणित उंबरे लागावीत तशी ब्रह्मांडे आहेत. त्या फळातील किड्याप्रमाणे चराचर जीवसृष्टी असून त्या किड्यांना बाह्य जगाची कल्पनाही नसते. तसेच या ब्रह्मांडांतील सर्व जीव अज्ञानात असतात. या ब्रह्मांडाच्या स्वरूपातील फळांना गट्ट करणारा कराल कठीण काळ ! पण त्यालाही आपला सदोदित धाक वाटतो.

"असा ज्यांचा महिमा ते सर्व लोकपालांचे नायक, तुम्ही एखाद्या साधारण मनुष्याप्रमाणे मला विचारता ! हे कृपाधाम, मी आता एवढाच वर मागतो की श्रीसीता व अनुज लक्ष्मण यांच्यासह आपण माझ्या हृदयात निवास करावा. तसेच अविरल भक्ती, वैराग्य, सत्संगती आणि आपल्या पदकमली अभंग अशी प्रीती मला प्राप्त होवो !

" जरी आपण अखण्ड व अनन्त असे ब्रह्म आहात; केवळ अनुभवगम्यच आपले हे स्वरूप असून त्याचे संत भजन करतात अशा आपल्या स्वरूपाचे मला आकलन झाले किंवा मी त्याचे जरी वर्णन करू शकलो तरीही या माझ्यासमोर असलेल्या आपल्या शामसुन्दर सगुण स्वरूपाचे ठिकाणीच क्षणोक्षणी माझे मन रममाण होवो.

" आपल्या दासाला मोठेपणा देण्याचा आपला दण्डक असल्यानेच, हे रघुराज ! आपण मला वरील प्रश्न विचारला. हे प्रभो ! विचारलेच आहे तर सांगतो ऐका. एक परम मनोहर व पवित्र असे स्थळ आहे. त्याचे नाव पंचवटी. हे स्थान ज्या दण्डकारण्यात आहे त्याला आता, हे रघुनाथा ! आपण पवित्र करावे, आणि मुनिश्रेष्ठ गौतमांच्या भयंकर शापातून त्याला मोकळे करावे !

" हे रघुकुल स्वामिन् ! सर्व समाजावर दयेचे छत्र धरून आपण त्याच स्थळी वास्तव्य करावे. "

अगस्तिमुनींचा निरोप घेऊन श्रीरामचंद्र तेथून निघाले व लवकरच पंचवटीच्या समीप येऊन पोचले. त्या ठिकाणी गिधाडांचा राजा जटायू , यांची भेट झाली त्याच्याबरोबर अनेक प्रकारे स्नेह संपादन केला व गोदावरीच्या तीरावर पर्णकुटी बांधून प्रभू राहिले. १३

चौ० — जब ते राम कीन्ह तहँ बासा । सुखी भए मुनि बीती त्रासा ॥
गिरि बन नदीं ताल छबि छाए । दिन दिन प्रति अति होहिं सुहाए ॥
खग मृग बृंद अनंदित रहहीं । मधुप मधुर गुंजत छबि लहहीं ॥
सो बन बरनि न सक अहिराजा । जहाँ प्रगट रघुबीर बिराजा ॥
एक बार प्रभु सुख आसीना । लछिमन बचन कहे छलहीना ॥
सुर नर मुनि सचराचर साईं । मैं पूछउँ निज प्रभु की नाईं ॥
मोहि समुझाइ कहहु सोइ देवा । सब तजि करौं चरन रज सेवा ॥
कहहु ग्यान बिराग अरु माया । कहहु सो भगति करहु जेहिं दाया ॥

दो० — ईस्वर जीव भेद प्रभु सकल कहौ समुझाइ ।
जातें होइ चरन रति सोक मोह भ्रम जाइ ॥ १४ ॥

चौ० — थोरेहि महँ सब कहउँ बुझाई । सुनहु तात मति मन चित लाई ॥
मैं अरु मोर तोर तैं माया । जेहिं बस कीन्हे जीव निकाया ॥
गो गोचर जहँ लगि मन जाई । सो सब माया जानेहु भाई ॥
तेहि कर भेद सुनहु तुम्ह सोऊ । बिद्या अपर अबिद्या दोऊ ॥

त्या ठिकाणी श्रीरामाचा निवास होताच सर्व मुनिमंडळी पूर्ण निर्भय झाली. त्यांना कोणत्याही प्रकारचे भय वाटेनासे झाले. पर्वत, वन, नदी व तलाव यांच्या ठिकाणी विशेष प्रकारचे सौंदर्य आले व त्यांची दिवसेंदिवस शोभा वाढू लागली. पक्षि, पशु व भ्रमर यांचे समूह आनंदाने नांदू लागले; व मधुकरांच्या मधुर गुंजारवाने त्याला फारच मनोहरता प्राप्त झाली. हे सर्व सहजच आहे. कारण त्या ठिकाणी प्रत्यक्ष रघुनाथाचा निवास आहे त्या वनाचे वर्णन शेषनागाला तरी करणे शक्य आहे काय !

श्रीरामगीता (भक्तियोग) लक्ष्मणाचा अनुरोध

अशा प्रकारे पर्णकुटीतील या निवासाने वनवासाचे दिवस सौख्य समाधानाने सुरू झाले. एके दिवशी प्रभू सुखसंतोषात आसनावर बसलेले लक्ष्मणाने पाहिले आणि अगदी निष्कपट अंतःकरणाने त्याच्या मुखातून शब्द बाहेर पडले.

"भगवन् ! या वेळी माझ्या अंतःकरणातून ज्या भावना उत्पन्न होत आहेत त्या आपल्याकडे बंधुत्वाच्या दृष्टीने मला पाहूच देत नाहीत. आपण सुरनर-मुनी व स्थावर जंगम सृष्टी यांचे स्वामी या स्वरूपात मला दिसत आहात; म्हणून त्याच भगवद्भावनेने मी आपणाला काही विचारू इच्छितो.

"देवा ! मला असे तत्त्व समजावून सांगा की, त्यामुळे मी सर्वांचा त्याग करून आपल्या चरणधूलीची सेवा करू शकेन ! हे प्रभो ! ज्ञान, वैराग्य, माया आणि जिच्यावर आपण दया करता अशा भक्तीचे लक्षण समजावून द्या. तसेच जीव व ईश्वर यातील भेदही मला स्पष्ट करून सांगा. म्हणजे माझ्या ठिकाणचे भ्रम, मोह व शोक इत्यादि दोष नष्ट होऊन आपल्या चरणकमळांचे शुद्ध प्रेम मला लाभेल." १४

लक्ष्मणांची ही शुद्ध अंतःकरणाची जिज्ञासा तृप्त करण्यासाठी श्रीरामचंद्र बोलू लागले.

"बाळा ! अगदी थोडक्यातच या सर्वांची तुम्हाला माहिती सांगतो. तुम्ही मात्र आपली बुद्धी, मन व चित्त यांची सर्व शक्ती एकवटून समजून घ्या.

"मी आणि माझे, तू आणि तुझे अशी द्वैताची भावना जागृत करून सर्व जीवसमुदायाला वश करणारी जी ईश्वराची शक्ती तीच माया. त्याचप्रमाणे हे बंधो ! आपली इंद्रिये आणि त्यांचे विषय, इतकेच काय, मनाला आकलन होणारा सर्व पसारा मायेचा आहे. हे ध्यानी धर.

"अशा या मायेचे दोन भेद आहेत. एक विद्या आणि दुसरी अविद्या. ही दुसरी अविद्यारूप मायाच

एक दुष्ट अतिसय दुखरूपा । जा बस जीव परा भव कूपा ।।
एक रचइ जग गुन बस जाकें । प्रभु प्रेरित नहिं निज बल ताकें ।।
ग्यान मान जहँ एकउ नाहीं । देख ब्रह्म समान सब माहीं ।।
कहिअ तात सो परम बिरागी । तृन सम सिद्धि तीनि गुन त्यागी ।।

दो ० –माया ईस न आपु कहुँ जान कहिअ सो जीव ।
बंध मोच्छ प्रद सर्बपर माया प्रेरक सीव ।। १५ ।।

चौ ० –धर्म तें बिरति जोग तें ग्याना । ग्यान मोच्छप्रद बेद बखाना ।।
जातें बेगि द्रवउँ मैं भाई । सो मम भगति भगत सुखदाई ।।
सो सुतंत्र अवलंब न आना । तेहि आधीन ग्यान बिग्याना ।।
भगति तात अनुपम सुखमूला । मिलइ जो संत होइँ अनुकूला ।।
भगति कि साधन कहउँ बखानी । सुगम पंथ मोहि पावहिं प्रानी ।।
प्रथमहिं बिप्र चरन अति प्रीती । निज निज कर्म निरत श्रुति रीती ।।
एहि कर फल पुनि बिषय बिरागा । तब मम धर्म उपज अनुरागा ।।
श्रवनादिक नव भक्ति दृढ़ाहीं । मम लीला रति अति मन माहीं ।।

दुष्ट व अत्यंत दुःख देणारी आहे. या अविद्यामायेच्या वश होऊनच जीव जन्म-मरणरूप कूपात पडतो.

" दुसरी विद्या माया-सत्व रजादि त्रिगुण, हिच्या आधीन असून, प्रभूच्या प्रेरणेने ही जगाची उत्पती करते. स्वतंत्रपणे काही करण्याचे सामर्थ्य मात्र तिला मुळीच नाही.

" असे हे मायेचे स्वरूप चांगले ठसल्यावर ज्ञान, वैराग्य कळण्यास उशीर लागत नाही. जेथे मान (अमानित्व इ. भ. गीता. अ. १३ श्लो. ७-११ पाहा.) आदिकरून दोष नसून, सर्व जगात समान स्वरूपात ब्रह्मसाक्षात्कार होतो, त्या स्थितीला ज्ञान म्हणावे.

" सर्व प्रकारच्या सिद्धी व त्रिगुण यांचा जो एखाद्या कस्पटाप्रमाणे त्याग करू शकतो तोच हे तात ! वैराग्यसंपन्न झाला असे समजते !

" मायेचे, ईश्वराचे व आपले स्वतःचे ज्याला सत्य स्वरूप समजत नाही तो जीव असे म्हणावे आणि बंध व मोक्ष देणारा, सर्वाहून श्रेष्ठ असून ज्याचे अस्तित्व सर्वापलीकडे राहते. ज्याच्या प्रेरणेनेच मायेच्या (विद्यारूप) कार्याला प्रारंभ होतो. तो ईश्वर होय ! " १५

(आता ज्ञान, वैराग्य व मोक्ष यांची प्राप्ती कशी होते ते ऐक.) धर्माच्या आचरणाने वैराग्याची प्राप्ती होते, योगाच्या अभ्यासाने ज्ञान होते व त्या ज्ञानाच्या साह्यानेच मोक्ष मिळतो, असे वेदांनी वर्णन केले आहे.

[" आता प्रभू भक्तियोगाचे निरूपण करतील त्यात एक मोठा चमत्कार दिसेल. राम आता आपले नरनाट्य एकदम विसरतील व मी भगवान् परमात्मा या भावनेने बोलू लागतील. गु. चं "–]

" हे बंधो ! जिच्या योगाने माझ्या हृदयाला झटकन् पाझर फुटतो ती माझी भक्ती ! ती भक्तांना सुख देते. ती स्वतंत्र असून तिला दुसऱ्याचा आधार लागत नाही (अन्य साधना नको.) ज्ञान आणि विज्ञानही अशा भक्तीच्याच आधीन असते ! बाळा ! अशी ही भक्ती अनुपमसुखाचे मूळ आहे. पण संत अनुकूल झाल्याशिवाय मात्र तिची प्राप्ती होत नाही !

" तथापि सोप्या मार्गाने प्राण्याला माझी प्राप्ती करून घेण्याला उपयुक्त अशी या भक्तीची साधने आता सविस्तर सांगतो. "

" विप्रचरणी अत्यंत प्रेम हे पहिले साधन आहे. त्याचे फळ म्हणून दुसऱ्या साधनाचा लाभ होतो. त्यामुळे आपापल्या वर्णाश्रमकर्मात वेदशास्त्र पद्धतीने आचारपरिपालनाचे साचार प्रेम उत्पन्न होते ! असे

संत चरन पंकज अति प्रेमा । मन क्रम बचन भजन दृढ़ नेमा ॥
गुरु पितु मातु बंधु पति देवा । सब मोहि कहँ जानै दृढ़ सेवा ॥
मम गुन गावत पुलक सरीरा । गदगद गिरा नयन बह नीरा ॥
काम आदि मद दंभ न जाकें । तात निरंतर बस मैं ताकें ॥

दो० — बचन कर्म मन मोरि गति भजनु करहिं निःकाम ।
तिन्ह के हृदय कमल महुँ करउँ सदा बिश्राम ॥ १६ ॥

चौ० — भगति जोग सुनि अति सुख पावा । लछिमन प्रभु चरनन्हि सिरु नावा ॥
एहि बिधि गए कछुक दिन बीती । कहत बिराग ग्यान गुन नीती ॥
सूपनखा रावन कै बहिनी । दुष्ट हृदय दारुन जस अहिनी ॥
पंचबटी सो गइ एक बारा । देखि बिकल भइ जुगल कुमारा ॥
भ्राता पिता पुत्र उरगारी । पुरुष मनोहर निरखत नारी ॥
होइ बिकल सक मनहि न रोकी । जिमि रबिमनि द्रव रबिहि बिलोकी ॥
रुचिर रूप धरि प्रभु पहिं जाई । बोली बचन बहुत मुसुकाई ॥

स्वधर्माचरण घडू लागले म्हणजे त्याद्वारे साधन विषय वैराग्य, हे फळ प्राप्त होते आणि या वैराग्याच्या वृत्तीने भागवत धर्मावर श्रद्धाप्रेम उत्पन्न होते ! या प्रेमाचा परिपाक श्रवण कीर्तनादि नवविधा भक्ती दृढ होण्यात बनतो आणि माझ्या अवतार लीलेच्या विषयी मनात उत्कट प्रेमाची वाढ सुरू होते. ह्याही पुढे तयारी झाल्यानंतर संतांच्या चरणाचे गाढ प्रेम अंकुरित होते ! त्यानंतर योग्य काळी संतांची कृपा होताच मनाने आचरणाने व वाणीने असा साधक दृढनेमाने भजन करू लागतो.

" त्यामुळे आई, बाप, विद्या शिकविणारे गुरू, भाऊ, देव, व पती इत्यादि सर्वांच्या ठिकाणी अशा भक्ताला माझ्या स्वरूपाचा साक्षात्कार होऊ लागतो आणि त्या त्या स्वरूपात तो माझीच अखंड सेवा करतो. मग काय, माझ्या गुणांचे गायन सुरू होताच, त्याच्या सर्वांगावर रोमांच उभे राहतात, कंठ सद्गदित होतो व डोळ्यांतून आनंदाश्रूंचा पूर वाहू लागतो !!

" अशा माझ्या परमप्रिय भक्ताच्या ठिकाणी नंतर काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर, दंभ इत्यादि विकार समूळ नष्ट झाल्याने, त्याचा मी सदासर्वदा अंकित होऊन राहतो. तात्पर्य, ज्यांना वाणीने, कर्माने व मनाने माझ्याशिवाय दुसरा आधार उरतच नाही व जे निष्काम होऊन माझे, वाणी-कर्म-मनाने भजन करतात, त्यांच्या हृदयकमळात मी कायमचा विसावा घेत राहतो !" १६

अशा प्रकारच्या श्रेष्ठ भक्तियोगाचे रहस्यामृत प्रत्यक्ष प्रभूंच्या मुखातून स्रवत असता त्याच्या पानाने लक्ष्मण अत्यंत सुखी झाले. त्यांनी शेवटी प्रभूंच्या चरणावर आपले मस्तक टेकून नमस्कार केला.

याप्रमाणे वैराग्य, ज्ञान, गुण व नीती यांच्याविषयी माहिती सांगत राहत असता पंचवटीत काही दिवस निघून गेले.

अशा स्थितीत एके दिवशी, नागिणीप्रमाणे अंतःकरण जहराने भरलेली, भयंकर अशी शूर्पणखा नावाची रावणाची बहीण पंचवटीत एकाएकी आली.

त्रिभुवन लावण्य ललाम अशा त्या सुंदर राजकुमारांच्याकडे तिने पाहिले मात्र तोच ती कामविकाराने घायाळ झाली !

काकभुशुंडी गरुडाला सांगतात—' हे उरगारी ! सूर्याला पाहताच जसा सूर्यमणी पाझरतो, त्याचप्रमाणे प्रत्यक्ष भाऊ, बाप, मुलगा अशा नात्यांतीलही मनोहर पुरुषांना निरखून पाहत असता स्त्री-कामविव्हल होऊन आपले मन आवरू शकत नाही !'

सुपाएवढी नखे असलेल्या त्या भयानक राक्षसिणीने लगेच एका सुन्दर तरुण स्त्रीचे रूप घेतले आणि

तुम्ह सम पुरुष न मो सम नारी । यह सँजोग बिधि रचा बिचारी ॥
मम अनुरूप पुरुष जग माहीं । देखेउँ खोजि लोक तिहु नाहीं ॥
तातें अब लगि रहिउँ कुमारी । मनु माना कछु तुम्हहि निहारी ॥
सीतहि चितइ कही प्रभु बाता । कहइ कुआर मोर लघु भ्राता ॥
गइ लछिमन रिपु भगिनी जानी । प्रभु बिलोकि बोले मृदु बानी ॥
सुंदरि सुनु मैं उन्ह कर दासा । पराधीन नहिं तोर सुपासा ॥
प्रभु समर्थ कोसलपुर राजा । जो कछु करहिं उनहि सब छाजा ॥
सेवक सुख चह मान भिखारी । ब्यसनी धन सुभ गति बिभिचारी ॥
लोभी जसु चह चार गुमानी । नभ दुहि दुध चहत ए प्रानी ॥
पुनि फिरि राम निकट सो आई । प्रभु लछिमन पहिं बहुरि पठाई ॥
लछिमन कहा तोहि सो बरई । जो तृन तोरि लाज परिहरई ॥
तब खिसिआनि राम पहिं गई । रूप भयंकर प्रगटत भई ॥
सीतहि सभय देखि रघुराई । कहा अनुज सन सयन बुझाई ॥

श्रीरामचंद्रांच्या जवळ आली. गालातल्या गालात अनेक वेळा हसत हसत तिने बोलण्यास सुरवात केली.

" हे पाहा, तुमच्यासारखा सुन्दर पुरुष कुठे पाहावयास मिळायचा नाही, आणि माझ्यासारखी लावण्यवती दुनिया धुंडून सांपडायची नाही ! ब्रह्मदेव मोठा विचारवंत म्हणूनच तुमची व माझी अशी त्याने जोडी जमवली !

" आतापर्यंत सर्व त्रैलोक्य पालथे घातले, कुठे तरी आपल्या सौंदर्याला साजेल, योग्यतेला शोभेल, असा पुरुष आढळेल म्हणून, पण व्यर्थ ! एकसुद्धा पुरुष कुठेच दिसला नाही, म्हणून मला आतापर्यंत कुमारी म्हणूनच दिवस कंठावे लागले !

" पण आज तुमच्याकडे बारकाईने पाहिल्यावर—पूर्ण नाहीच पण थोडे बरे वाटले ! "

हे सर्व नाटक ध्यानी येण्यास प्रभूस थोडाच वेळ लागणार ? सीतेकडे पाहून तिला श्रीराम म्हणाले, " बाई ! माझा धाकटा भाऊ कुमार आहे की ! "

हे ऐकताच ती लगबगीने लक्ष्मणाजवळ गेली. ही शत्रूची बहीण आहे, याची जाणीव प्रभुप्रेरणेने लक्ष्मणास होताच, श्रीरघुवीराकडे पाहतच मधुर वाणीने ते म्हणाले, " हे सुंदरी ! ऐक. मी यांचा सेवक आहे; आणि सेवक म्हटला की, तो पर स्वाधीन ! त्याच्यापासून तुला सुखाचा लाभ कसा होणार ! माझे स्वामी मात्र समर्थ आहेत. ते कोसलपुरीचे राजे आहेत. त्यामुळे त्यांनी काही केले, (दुसरे लग्न) तरी ते त्यांना शोभेल ! (मला नाही शोभणार.)

" तुला खरे सांगतो ऐक. सेवकाने सुखाची व मानाची; भिकाऱ्याने आदर सत्काराची; दुर्व्यसनी मनुष्याने श्रीमंत होण्याची; व्यभिचाऱ्याने सद्गतीची; लोभी माणसाने व घमेंडखोर हेराने सुयशाची—इच्छा करणे म्हणजे या सर्वांनी आकाशाचे दूध काढण्या इतकीअशक्य व मूर्खपणाची गोष्ट करण्यासारखे आहे ! "

असे स्वागत झाल्याने ती पुनः श्रीरामचंद्राकडे परतली. त्यांनी तशीच लक्ष्मणाकडे पाठवली. तेव्हा तिला लक्ष्मण म्हणाले :—

" तुझ्याबरोबर लग्न करणाराने अगोदर लज्जेशी काडीमोड केली पाहिजे ! निर्लज्जच तुझ्याबरोबर लग्न करणार ! "

हे ऐकून तिची पूर्ण फजिती झाली व ती चिडून भयंकर रूपाने रामाकडे गेली. तिचे ते विकट व विक्राळ रूप पाहून सीता भ्यालेली पाहताच रघुराजांनी आपल्या अनुजाला संकेताने चटकन् सुचवले.

दो ० –लछिमन अति लाघवँ सो नाक कान बिनु कीन्हि ।
ताके कर रावन कहँ मनौ चुनौती दीन्हि ॥ १७ ॥

चौ ० –नाक कान बिनु भइ बिकरारा । जनु स्रव सैल गेरु कै धारा ॥
खर दूषन पहिं गइ बिलपाता । धिग धिग तव पौरुष बल भ्राता ॥
तेहिं पूछा सब कहेसि बुझाई । जातुधान सुनि सेन बनाई ॥
धाए निसिचर निकर बरूथा । जनु सपच्छ कज्जल गिरि जूथा ॥
नाना बाहन नानाकारा । नानायुध धर घोर अपारा ॥
सूपनखा आगें करि लीनी । असुभ रूप श्रुति नासा हीनी ॥
असगुन अमित होहिं भयकारी । गनहिं न मृत्यु बिबस सब झारी ॥
गर्जहिं तर्जहिं गगन उड़ाहीं । देखि कटकु भट अति हरषाहीं ॥
कोउ कह जिअत धरहु द्वौ भाई । धरि मारहु तिय लेहु छड़ाई ॥
धूरि पूरि नभ मंडल रहा । राम बोलाइ अनुज सन कहा ॥
लै जानकिहि जाहु गिरि कंदर । आवा निसिचर कटकु भयंकर ॥

त्याबरोबर लक्ष्मणांनी आपल्या कुशल हस्ताने झटकन तिचे नाक व कान छाटून जणू काही तिच्या हस्ते रावणाला आव्हानच दिले ! १७

शूर्पणखेचे नाक व कान कापल्यानंतर ती फारच भयंकर दिसू लागली. जणू डोंगरावरून काविचे पाट वहावेत, त्याप्रमाणे तिच्या तोंडावरून रक्ताचे लोट वाहू लागले ! आरडा-ओरडा करीत ती खरदूषण राक्षसांच्याकडे गेली आणि त्यांना म्हणाली, " बंधो ! तुमच्या पुरुषार्थाला व बळाला धिक्कार असो. "

काय घडले याविषयी त्यांनी चौकशी केल्यानंतर तिने इत्थंभूत वृत्त त्यांना सांगितले. त्याबरोबर मोठ्या संतापाने त्यांनी राक्षसांचे प्रचंड सैन्य युद्धासाठी सज्ज केले.

जणू काय पंख फुटलेल्या काजळाच्या पर्वताच्या टोळ्यांप्रमाणे राक्षसांच्या झुंडी च्या झुंडी एक इकडून तिकडे धावू लागल्या.

ओ हो ! किती प्रकारची त्यांची ती वाहने ! त्यांच्या आकारांचे तर विचारूच नका; आणि त्या राक्षसांनी अशी विलक्षण आणि विविध शस्त्रे धारण केली आहेत की, त्यामुळे त्यांचे मूळचे अक्राळ-विक्राळ स्वरूप अतिशयच भयंकर दिसू लागले !

नाक-नाक कापलेल्या अमंगलरूप अशा आपल्या बहिणीला सर्वांच्या पुढे ठेऊन-पुढारी करून ते खरदूषण आपल्या प्रचंड सैन्यासह श्रीरामचंद्रावर चाल करून निघाले.

भयसूचक असे अगणित अपशकुन होत असले तरी त्या सर्व राक्षसांचा मरणकाळ अगदी नजीक येऊन ठेपल्यामुळे त्यांनी त्या दुश्चिन्हांना मुळीच भीक घातली नाही !

सैन्यातील वीरांच्या गर्जना, धाक दाखविणाऱ्या डरकाळ्या, आकाशातील त्यांच्या भराऱ्या असे आपल्या शूर राक्षसांचे ते सैन्य पाहून त्यांच्या शूर सेनापतींना मोठा आनंद झाला.

आता त्यांच्या वल्गना ऐकू येऊ लागल्या. कोणी म्हणाले, ' त्या दोन्ही भावांना जिवंत धरा, कोणी दुसरे म्हणाले, ' छे छे त्यांना ठारच केले पाहिजे. इतक्यात तिसरे ओरडले, ' अहो ! त्या सुंदर स्त्रीला प्रथम पळवून आणा !

राक्षसांच्या त्या अफाट सैन्यांच्या धुळीमुळे सर्व आकाश धुळीने भरून गेलेले दिसताच श्रीरामांनी आपल्या धाकट्या भावास बोलावून जवळ घेतले व म्हणाले, ' निशाचरांचे घोर सैन्य आपल्यावर चाल करून येत आहे, अशावेळी जानकीचे रक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे काम असल्याने तिला घेऊन या डोंगराच्या सुरक्षित गुहेत जा.

रहेहु सजग सुनि प्रभु कै बानी । चले सहित श्री सर धनु पानी ।।
देखि राम रिपुदल चलि आवा । बिहसि कठिन कोदंड चढ़ावा ।।

छं० –कोदंड कठिन चढ़ाइ सिर जट जूट बाँधत सोच क्यों ।
मरकत सयल पर लरत दामिनि कोटि सौं जुग भुजग ज्यों ।।
कटि कासि निषंग बिसाल भुज गहि चाप बिसिख सुधारि कै ।
चितवत मनहुँ मृगराज प्रभु गजराज घटा निहारि कै ।।

सो ०– आइ गए बगमेल धरहु धरहु धावत सुभट ।
जथा बिलोकि अकेल बाल रबिहि घेरत दनुज ।। १८ ।।

चौ ० – प्रभु बिलोकि सर सकहिं न डारी । थकित भई रजनीचर धारी ।।
सचिव बोलि बोले खर दूषन । यह कोउ नृपबालक नर भूषन ।।
नाग असुर सुर नर मुनि जेते । देखे जिते हते हम केते ।।
हम भरि जन्म सुनहु सब भाई । देखी नहिं असि सुंदरताई ।।
जद्यपि भगिनी कीन्हि कुरूपा । बध लायक नहिं पुरुष अनूपा ।।
देहु तुरत निज नारि दुराई । जीअत भवन जाहु द्वौ भाई ।।

“ सावध राहा ! ” असे अखेरचे शब्दकानी पडताच धनुष्यबाण हातात सज्ज करून श्रीसीतेसह लक्ष्मणांनी रस्ता धरला.

शत्रूचे सैन्य समीप आल्याचे कळताच मोठ्याने हसून श्रीरामचंद्रांनी आपल्या वज्रासारख्या कठीण कोदंडाला सज्ज केले.

वज्रासारख्या कठीण धनुष्याला दोरी लावून आपला जटाजूट ठाकठीक करत असता एखाद्या नील मण्यांच्या पर्वतावर कोट्यवधी विजांच्याबरोबर जणू दोन सर्प लढत असल्याप्रमाणे त्यावेळीं प्रभू शोभून दिसत होते !

कमरेला विशाल भाता कसला, आपल्या दोन्ही दीर्घ बाहूनी धनुष्य व घासून बाण घेतला जणू एखाद्या गजराजांच्या कळपांकडे मृगराजाने दृष्टी फेकावी अशा बेडर वृत्तीने त्या येणाऱ्या शत्रूच्या सेनेवर आपली नजर रोखून प्रभू उभे आहेत !

उगवत्या सूर्याला एकटा पाहून मन्देह नावाचे राक्षस जसे त्याला घेरतात त्याप्रमाणे मोठमोठे राक्षस योध्दे ‘ धरा, धरा ! असे ओरडत श्रीरामचंद्रावर हल्लाकरण्यासाठी मोठ्यावेगाने धावत येऊन त्यांनी प्रभूला घेरले. ’ १८

पण चमत्कार काय झाला ? प्रभूला डोळे भरून पाहिल्याबरोबर त्यांच्यावर बाण कोणीच सोडू शकेना. सगळे राक्षसवीर चकित झाले व एकसारखी टक लावून त्यांच्याकडे नुसते पाहतच राहिले !

थोडयाच वेळाने आपल्या मंत्र्यांना खरदूषणानी बोलावून घेतले व म्हणाले, “ हा कोणीतरी नरविभूषण असा राजपुत्र दिसतो आहे. नाग, असुर, देव, नर व मुनी जितके आहेत ते सर्व आम्ही पाहिले; काही जिंकले, बाकीचे ठार मारले, पण बंधूनो ! साऱ्या जन्मात एवढे सौंदर्य आमच्या डोळ्यांनी या पूर्वी कधीच पाहिले नाही. यांनी आपल्या बहिणीला विद्रूप केली. हे खरे असले तरी हा अनुपम पुरुष असल्याने याचा वध करणे अयोग्य आहे.

“ म्हणून त्यांना आमचा असा निरोप सांगा की, लपवून ठेवलेल्या आपल्या स्त्रीला आमच्या स्वाधीन झटकन् करून तुम्ही दोघे भाऊ जीव घेऊन घरी परत जा.

मोर कहा तुम्ह ताहि सुनावहु । तासु बचन सुनि आतुर आवहु ।।
दूतन्ह कहा राम सन जाई । सुनत राम बोले मुसुकाई ।।
हम छत्री मृगया बन करहीं । तुम्ह से खल मृग खोजत फिरहीं ।।
रिपु बलवंत देखि नहिं डरहीं । एक बार कालहु सन लरहीं ।।
जद्यपि मनुज दनुज कुल घालक । मुनि पालक खल सालक बालक ।।
जौं न होइ बल घर फिरि जाहू । समर बिमुख मैं हतउँ न काहू ।।
रन चढ़ि करिअ कपट चतुराई । रिपु पर कृपा परम कदराई ।।
दूतन्ह जाइ तुरत सब कहेऊ । सुनि खर दूषन उर अति दहेऊ ।।

छं०— उर दहेउ कहेउ कि धरहु धाए बिकट भट रजनीचरा ।
सर चाप तोमर सक्ति सूल कृपान परिघ परसु धरा ।।
प्रभु कीन्हि धनुष टकोर प्रथम कठोर घोर भयावहा ।
भए बधिर ब्याकुल जातुधान न ग्यान तेहि अवसर रहा ।।

दो०— सावधान होई धाए जानि सबल आराति ।
लागे बरषन राम पर अस्त्र सस्त्र बहुभाँति ।। १९ (क) ।।
तिन्ह के आयुध तिल सम करि काटे रघुबीर ।
तानि सरासन श्रवन लगि पुनि छाँड़े निज तीर ।। १९ (ख) ।।

"आमचा असा निरोप कळवून जल्द काय ते उत्तर घेऊन या."

दूतांनी जेव्हा हा संदेश श्रीरामचंद्रांना सांगितला, तेव्हा त्यांनी स्मितपूर्वक उत्तर दिले.

"आम्ही जातीचे क्षत्रिय असून [illegible] खलरूपी पशूंची शिकार करण्यासाठी वनात त्यांचा शोध करीत फिरतो. बलाढ्य शत्रूला पाहून कच खाणे आम्हाला माहीत नाही. पण याच्या उलट प्रत्यक्ष काळ जरी लढण्यास सामोरा आला तरी त्याच्याबरोबर एकवेळ दोन हात करण्यास कमी करणार नाही!

"मी जरी मानव असलो तरी दानवकुळाचा संहार करण्यास समर्थ आहे; आणि जरी बालक दिसलो तरी मुनींचा पालक आहे. म्हणून जरूर तेव्हा खलांना ठार केल्याशिवाय सोडणार नाही.

"सामना देण्याची ताकद नसेल तर पळ का काढत नाही? रणांगणातून पाठ फिरवणाऱ्यावर मी कधीच शस्त्र सोडत नाही. धावून आला [illegible]; आणि आता कपटाने हे कौशल्याचे प्रदर्शन का आरंभिले आहे? एकदा शत्रू म्हटल्यावर त्याच्याशी दयेची भाषा करणे हे अत्यंत भ्याडपणाचे लक्षण आहे."

हे झणझणीत उत्तर दूतांच्या मुखाने तावडतोब चोख [illegible] अंगाची संतापाने नुसती लाही लाही उडाली!

मनातल्या मनात [illegible] ते ओरडले, "अरे, पाहता काय, धरा त्या पोराला!"

अशी मुख्य सेनापतींची आज्ञा मिळताच ते अक्राळ-विक्राळ राक्षस-योद्धे धावले. धनुष्य, बाण, तोमर, शक्ती, शूळ, पट्टे, परशू, गदा इत्यादि शस्त्रे त्यांच्या हातात दिसत आहेत.

राक्षसांचे सैन्य वेगाने आपल्यावर हल्ला करण्यास आलेले पाहताच प्रभूंनी प्रथम आपल्या धनुष्याचा कठोर, घोर व भयंकर असा टणत्कार केला की, त्या आवाजाने राक्षसांच्या कानठळ्या बसून ते घाबरून गेले. त्यांना तिळमात्रसुद्धा शुद्धी उरली नाही.

सावध झाल्यावर त्यांना बालकरूपात दिसणाऱ्या शत्रूच्या बळाची चांगलीच खात्री झाल्याने, अनेक प्रकारच्या शस्त्रास्त्रांचा श्रीरामचंद्रावर ते अगदी वर्षाव करू लागले. १९ (क)

आपल्या बाणांनी त्यांच्या त्या सर्व शस्त्रास्त्रांचे तिळाएवढे प्रथम तुकडे करून मग रघुवीरांनी आपले धनुष्य कानापर्यंत खेचले व त्यातून बाण सुटू लागले. १९ (ख)

छं० – तब चले बान कराल। फुंकरत जनु बहु ब्याल ॥
कोपेउ समर श्रीराम । चले बिसिख निसित निकाम ॥
अवलोकि खरतर तीर। मुरि चले निसिचर बीर ॥
भए क्रुद्ध तीनिउ भाइ। जो भागि रन ते जाइ ॥
तेहि बधब हम निज पानि। फिरे मरन मन महुँ ठानि ॥
आयुध अनेक प्रकार । सनमुख ते करहिं प्रहार ॥
रिपु परम कोपे जानि। प्रभु धनुष सर संधानि ॥
छाँड़े बिपुल नाराच । लगे कटन बिकट पिसाच ॥
उर सीस भुज कर चरन। जहँ तहँ लगे महि परन ॥
चिक्करत लागत बान। धर परत कुधर समान ॥
भट कटत तन सत खंड। पुनि उठत करि पापंड ॥
नभ उड़त बहु भुज मुंड। बिनु मौलि धावत रुंड ॥
खग कंक काक सृगाल। कटकटहिं कठिन कराल ॥

छं० – कटकटहिं जंबुक भूत प्रेत पिसाच खर्पर संचहीं।
बेताल बीर कपाल ताल बजाइ जोगिनि नंचहीं॥
रघुबीर बान प्रचंड खंडहिं भटन्ह के उर भुज सिरा ।

जणू फुत्कार करणाऱ्या पुष्कळ भुजंगाप्रमाणेच ते कराल बाण शत्रूंवर सुटू लागले. याप्रमाणे रणांगणात रुष्ट होऊन श्रीराम जेव्हा अत्यंत तीक्ष्ण बाणांचा वर्षाव शत्रूवर करू लागले, तेव्हा त्या खडतर तीरांच्या नुसत्या दर्शनानेच राक्षसवीर पळ काढू लागले.

आपल्या सैन्याला घबराटीने घेरलेले पाहून खर, दूषण व त्रिशिरा हे तिघे बंधू संतप्त झाले. त्यांनी सैन्यातील पळपुट्या सर्व राक्षसांना फर्मावले की, “युद्धातून पळून जाणाऱ्या प्रत्येकाचा आम्ही आपल्या हातांनी शिरच्छेद करू!”

तेव्हा मात्र आपल्या देहावर पाणी सोडून ते परत वळले आणि अगणित व विविध अशा आयुधांचा त्यांनी समोरून मारा केला.

शत्रू फार चवताळले आहेत, असे पाहून प्रभूंनी आपल्या धनुष्यावर एक साधा बाण लावला. त्याच्या साह्याने अनेक लोखंडी बाण (नाराच) भराभर सुटू लागले. मग काय, त्या विक्राळ राक्षसांची नुसती लांडगेतोड सुरू झाली. हात, पाय, छाती, भुज, डोकी इत्यादींच्या रणांगणावर राशीच्या राशी पडू लागल्या!

राक्षसांच्या शरीरात भगवंताचा तीक्ष्ण बाण घुसताच त्यांनी हत्तीसारखा खूप मोठा चित्कार करावा व पर्वतप्राय त्यांचे शरीर धरणीवर कोसळावे! याप्रमाणे राक्षसवीरांच्या देहांचे शतशः तुकडे तुकडे होऊ लागले.

अशाही स्थितीत आपल्या राक्षसी मायेने जे आकाशात उड्डाण करू इच्छित त्यांची मुण्डकी व भुजा त्यांच्या अगोदरच गगन-विहार करावयास जात व मस्तकहीन धडे रणक्षेत्रावर धावू लागत. त्यांचा समाचार घेण्यासाठी कावळे, गिधाडे, करकोचे इत्यादि पक्षी व कोल्हे धावून येत; आणि धडांचे लचके तोडत असता कठोर व भयानक असा कट् कट् शब्द त्यांच्या मुखातून बाहेर पडे.

अशा वेळी रणांगणावरील दृश्य मोठे प्रेक्षणीय होते. कोल्हे कट्कट्, तट्तट् असा आवाज काढीत आहेत. भूत, प्रेत व पिशाच्चे डोक्यांच्या कवट्यात रक्तमांसादि गोळा करण्यासाठी भरत आहेत. इकडे त्याचवेळी वीर वेताळ कवट्यांचा ताल धरू लागले, तर तिकडे त्या तालावर योगिणी नाचू लागल्या!

वरील खेळ व कार्यक्रम शिस्तीत चालावा म्हणूनच की काय, रघुवीरांचे प्रखर बाण प्रचंड निशाचर-वीरांचे उर, बाहू, मस्तके इत्यादींचे खंडण करू लागले. याप्रमाणे जिकडे तिकडे राक्षसांचे पर्वतप्राय देह

जहँ तहँ परहिं उठि लरहिं धरु धरु करहिं भयकर गिरा ॥ १ ॥
अंतावरीं गहि उड़त गीध पिसाच कर गहि धावहीं ।
संग्राम पुर बासी मनहुँ बहु बाल गुड़ी उड़ावहीं ॥
मारे पछारे उर बिदारे बिपुल भट कहँरत परे ।
अवलोकि निज दल बिकल भट तिसिरादि खर दूषन फिरे ॥ २ ॥
सर सक्ति तोमर परसु सूल कृपान एकहि बारहीं ।
करि कोप श्रीरघुबीर पर अगनित निसाचर डारहीं ॥
प्रभु निमिष महुँ रिपु सर निवारि पचारि डारे सायका ।
दस दस बिसिख उर माझ मारे सकल निसिचर नायका ॥ ३ ॥
महि परत उठि भट भिरत मरत न करत माया अति घनी ।
सुर डरत चौदह सहस प्रेत बिलोकि एक अवध धनी ॥
सुर मुनि सभय प्रभु देखि मायानाथ अति कौतुक करयो ।
देखहिं परसपर राम करि संग्राम रिपु दल लरि मरयो ॥ ४ ॥

धडाधड धरणीवर पडत आहेत व पुनः तसेच निर्भीड उठून 'धरा धरा' असा भयंकर ओरडा करत धावून लढत आहेत ! १

त्याच वेळी मेलेल्या राक्षसांची आतडी तोंडात धरून गिधाडे उडू लागली व त्या आतड्यांची खाली लोंबत असलेली टोके हातात धरून पिशाच्चे वगैरे धावू लागली. ते दृश्य पाहून असे वाटले की, जणू युद्ध-पुरीतील पुष्कळ मुले पतंग आकाशात उडवून खेळत आहेत !

मारून पाडलेले, वक्षस्थळे फुटलेले अनेक योद्धे रणभूमीवर पडून रे रे करीत कण्हत व विव्हळत आहेत.

या प्रमाणे आपले सर्व सैन्य व्याकुळ झाले आहे, असे दिसून येताच खर-दूषण त्रिशिरादि योद्धे त्वरेने धावले. २

अखेरीचा निकराचा हल्ला चढविण्याच्या दृष्टीने बाण, शक्ती, शूळ, खड्ग, तोमर, परशू, परिघ, गदा इत्यादि शस्त्रास्त्रे संतप्त झालेल्या अगणित असुर सैनिकांकडून एकदम श्रीरघुवीरांवर सुटली.

प्रभूंनी ती सर्व एका निमिषात तोडून टाकली. एकवेळ मोठी गर्जना करून बाण सोडण्याचा सपाटा सुरू केला. राक्षस सेनापतींच्या छातीवर दहा दहा बाण एकदम मारले. ३

तथापि त्यामुळे ते ठार झाले नाहीत. बाण लागताच खाली कोसळावे, पुन्हा उठून लढू लागावे व राक्षसांच्या मायेने पुनः पुन्हा चाल करावी. असा क्रम सुरू झाला.

अशा तऱ्हेने माया निर्माण करून लढणारे चौदा हजार निशिचर व एकटे कोसलपतिराम त्यांना तोंड देणारे, असा अत्यंत विषम प्रकारचा हा सामना पाहून देव घाबरले.

देव व मुनी यांची अशी चिंताव्याकुळ झालेली स्थिती मायापती भगवंतांच्या ध्यानी येण्यास उशीर थोडाच लागणार !

यावर तत्काळ उपयोगी पडणारे असे एक कौतुक त्यावेळी प्रभूंनी केले. त्याचा परिणाम असा झाला की, प्रत्येक निशाचरास पुढे येणारा दुसरा राक्षस रामरूप दिसू लागला. त्यामुळे सर्व शत्रू सैन्यात आपसात लढाई सुरू होऊन ते चौदा हजार राक्षस ठार झाले ! ! ४



दो ० –राम राम कहि तनु तजहिं पावहि पद निर्बान ।
करि उपाय रिपु मारे छन महुँ कृपानिधान ।। २० (क) ।।
हरषित बरषहिं सुमन सुर बाजहिं गगन निसान ।
अस्तुति करि करि सब चले सोभित बिबिध बिमान ।। २० (ख) ।।

चौ ० –जब रघुनाथ समर रिपु जीते । सुर नर मुनि सब के भय बीते ।।
तब लछिमन सीतहि लै आए । प्रभु पद परत हरषि उर लाए ।।
सीता चितव स्याम मृदु गाता । परम प्रेम लोचन न अघाता ।।
पंचबटीं बसि श्रीरघुनायक । करत चरित सुर मुनि सुखदायक ।।
धुआँ देखि खरदूषन केरा । जाइ सुपनखाँ रावन प्रेरा ।।
बोली बचन क्रोध करि भारी । देस कोस कै सुरति बिसारी ।।
करसि पान सोवसि दिनु राती । सुधि नहिं तव सिर पर आराती ।।
राज नीति बिनु धन बिनु धर्मा । हरिहि समर्पे बिनु सतकर्मा ।।
बिद्या बिनु बिबेक उपजाएँ । श्रम फल पढ़ें किएँ अरु पाएँ ।।
संग तें जती कुमंत्र ते राजा । मान ते ग्यान पान तें लाजा ।।
प्रीति प्रनय बिनु मद ते गुनी । नासहिं बेगि नीति अस सुनी ।।

एकमेकांना मारत असता 'राम' 'राम' असे म्हणत त्यांचे प्राण गेल्याने त्यांना मोक्षपद प्राप्त झाले. अशी युक्ती करून कृपानिधानांनी एका क्षणात एवढ्या अफाट शत्रू सैन्याचा निःपात केला. २० (क)

ते पाहून देवांना आनंद झाला. त्यांनी भगवंतावर पुष्पवृष्टी केली व आकाश दुदुंभीच्या निनादाने भरून टाकले. आपापली वेगळी स्तुती करून आपल्या सुंदर विमानातून ते सर्व देव स्वस्थानी परत गेले. २० (ख)

याप्रमाणे श्रीरघुनाथाने शत्रूंना युद्धात ठार मारल्यावर सगळे देव, मनुष्य व मुनी यांचे भय नाहीसे झाले.

लक्ष्मण सीतेला घेऊन गिरीगुहेतून परत आले. हर्षभराने प्रभूंच्या पायी दंडवत प्रणाम करत असता मोठ्या संतोषाने त्यांनी आपल्या अनुजाला हृदयाशी कवटाळले.

त्याप्रसंगी प्रभूंच्या श्याम व अतिकोमल तनूकडे टक लावून पाहत असता सीतेच्या नेत्रांना तृप्ती मिळेना !

पंचवटीत राहून, सुर व मुनी यांना सुखदायक असे चरित्र श्रीरघुनायक अशा प्रकारे करीत आहेत.

इकडे वरीलप्रमाणे खर-दूषण-त्रिशिर व त्यांचे चौदा हजार सैन्य यांचा फडशा एकट्या श्रीरामचंद्रांनी पाडल्यानंतर शूर्पणखा सरळ लंकेला गेली व तिने रावणाला चिथावणी दिली. भर दरबारात अत्यंत रागाने ती बोलू लागली !

" तुला आपला देश व खजिना याची मुळीच शुद्धी राहिलेली नाही ! दारू प्यावी आणि रात्रंदिवस ताणून द्यावी, हा तुझा कार्यक्रम ! तुझ्या डोकीवर शत्रू थैमान घालत आहे, याची तुला दाद तरी आहे का ?

" नीतीवाचून राज्य, धर्मावाचून धन, हरीला अर्पण न करता केलेले सत्कर्म आणि विवेक उत्पन्न न होता शिकलेली विद्या, यांचे पढणे, करणे, मिळणे यापासून फक्त श्रमच पदरात पडणार. अन्य फलप्राप्ती मुळीच होणार नाही !

" कुमंत्राने राज्य, कुसंगतीने साधक, अहंकाराने ज्ञान, मद्यपानाने लाज, प्रणयाच्या अभावी प्रीती आणि गुणसंपन्न मनुष्य घमेंडीने–शीघ्र नाश पावतात, असे नीती सांगते, त्याचे स्मरण आहे काय ?

सो० —रिपु रुज पावक पाप प्रभु अहि गनिअ न छोट करि ।
अस कहि बिबिध बिलाप करि लागी रोदन करन ।। २१ (क)

दो० —सभा माझ परि ब्याकुल बहु प्रकार कह रोइ ।
तोहि जिअत दसकंधर मोरि कि असि गति होइ ।। २१ (ख) ।।

चौ ०—सुनत सभासद उठे अकुलाई । समुझाई गहि बाँह उठाई ।।
कह लंकेस कहसि निज बाता । केइँ तव नासा कान निपाता ।।
अवध नृपति दसरथ के जाए । पुरुष सिंघ बन खेलन आए ।।
समुझि परि मोहि उन्ह कै करनी । रहित निसाचर करिहहिं धरनी ।।
जिन्ह कर भुजबल पाइ दसानन । अभय भए बिचरत मुनि कानन ।।
देखत बालक काल समाना । परम धीर धन्वी गुन नाना ।।
अतुलित बल प्रताप द्वौ भ्राता । खल बध रत सुर मुनि सुखदाता ।।
सोभा धाम राम अस नामा । तिन्ह के संग नारि एक स्यामा ।।
रूप रासि बिधि नारि सँवारी । रति सत कोटि तासु बलिहारी ।।
तासु अनुज काटे श्रुति नासा । सुनि तव भगिनि करहिं परिहासा ।।
खर दूषन सुनि लगे पुकारा । छन महुँ सकल कटक उन्ह मारा ।।

" अरे बाबा ! शत्रू, रोग, अग्नी, पाप, स्वामी सर्प हे लहान आहेत. म्हणून त्यांची अवहेलना करण्याचा परिणाम चांगला होत नाही रे ! "

असे सांगून तिने नानाप्रकारे हेल काढून रडण्यास सुरुवात केली. २१ (क)

भर सभेत तिने रडून ओरडून आपला जीव अगदी कासावीस करून घेतला व शेवटी म्हणाली " दशमुखा ! अरे, तू जिवंत असताना माझी अशी दुर्दशा व्हावी याची खंत कशी वाटत नाही ! " २१ (ख)

हा सर्व दुर्दशेचा आक्रोश पाहून सर्व सभासदही व्याकुळ झाले. त्यांनी उठून तिची समजूत घातली व दंडाला धरून तिला बसवले.

तेव्हा लंकापती तिला विचारतो, "अग ! तुझे नाक-कान कोणी कापले ! तुझी सर्व हकीकत तरी सांग."

त्यावर तिने उत्तर दिले. " ते अयोध्याधीश दशरथ राजाचे पुत्र आहेत; ते पुरुषसिंह शिकारीसाठी वनात हिंडत आहेत. त्यांच्या सामर्थ्याची मला बरोबर कल्पना आहे. सर्व पृथ्वी ते लवकरच निशाचरहीन खास करणार ! अरे, दशानना ! या पुरुषसिंहाच्या बाहुबळाचा आश्रय मिळाल्यामुळे सर्व मुनी निर्भय झाले असून आता ते वनात खुशाल हिंडू लागले आहेत.

" दिसायला कसे अगदी सुकुमार बालक, पण परमधीर, धनुर्विद्येत निपुण, नाना गुणांनी युक्त असल्याने प्रत्यक्ष काळच आहेत, अशी खात्री बाळगा ! त्या दोन्ही बंधूंच्या सामर्थ्याला जोडच नाही; आणि त्यांच्या प्रतापासही तोड नाही ! खलांचा वध करण्यात तत्पर असल्याने त्यांच्यामुळे देव आणि मुनी सुखी झाले आहेत.

" त्यांच्यापैकी जे सौंदर्याचे आगर आहेत, त्यांचे नाव राम. त्यांच्याबरोबर एक अत्यंत लावण्यवती (श्यामा) अशी स्त्री आहे. ब्रह्मदेवाने तिला अशी श्रेष्ठ रूपराशी बनवली आहे की, तिच्यावरून कोट्यवधी रती ओवाळून टाकाव्यात !

" त्याच्याच धाकट्या भावाने माझे नाक कान कापले आणि तुझी बहीण म्हणून सांगितल्यावर माझी थट्टा केली.

" माझी अशी विटंबना केल्याचे खरदूषणांना समजताच त्यांनी त्या पुरुषसिंहाला युद्धासाठी लगेच आव्हान दिले ! पण दशमुखा ! ! काय सांगू , एका क्षणात त्यांच्या सर्व सैन्यासह, एकट्या रामाने त्यांचा संहार केला ! "



खर दूषन तिसिरा कर घाता । सुनि दससीस जरे सब गाता ॥

दो०—सूपनखहि समुझाइ करि बल बोलेसि बहु भाँति ॥
गयउ भवन अति सोचबस नीद परइ नहिं राति ॥ २२ ॥

चौ०—सुर नर असुर नाग खग माहीं । मोरे अनुचर कहुँ कोउ नाहीं ॥
खर दूषन मोहि सम बलवंता । तिन्हहि को मारइ बिनु भगवंता ॥
सुर रंजन भंजन महि भारा । जौं भगवंत लीन्ह अवतारा ॥
तौ मैं जाइ बैरु हठि करऊँ । प्रभु सर प्रान तजें भव तरऊँ ॥
होइहि भजनु न तामस देहा । मन क्रम बचन मंत्र दृढ एहा ॥
जौं नररूप भूपसुत कोऊ । हरिहउँ नारि जीति रन दोऊ ॥
चला अकेल जान चढ़ि तहवाँ । बस मारीच सिंधु तट जहवाँ ॥
इहाँ राम जसि जुगुति बनाई । सुनहु उमा सो कथा सुहाई ॥

दो०— लछिमन गए बनहिं जब लेन मूल फल कंद ।
जनकसुता सन बोले बिहसि कृपा सुख बृंद ॥ २३ ॥

चौ०—सुनहु प्रिया ब्रत रुचिर सुसीला । मैं कछु करबि ललित नरलीला ॥
तुम्ह पावक महुँ करहु निवासा । जौ लगि करौं निसाचर नासा ॥

आपल्या प्रत्यक्ष बहिणीच्या तोंडून खर, दूषण आणि त्रिशिरा यांचे मरण ऐकून रावणाच्या सर्वांगाची नुसती लाही लाही झाली. तरीपण ते सर्व आत दाबून त्यांने शूर्पणखेची समजूत घातली. तिची खात्री पटावी म्हणून आपल्या बळाचे त्याने तोंड भरून वर्णन केले.

तथापि आतल्या आत त्याला चिंता सारखी जाळत राहिल्याने त्याने घरी जाऊन रात्री झोपण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ ! २२

तो स्वतःशीच बोलू लागला, " देव, मानव, नाग व पक्षी यांच्यात माझ्या सेवकाच्याही बरोबरीचा या जगात कोणीच नाही. खर-दूषणांचे सामर्थ्य तर माझ्याच तोडीचे मग त्यांना भगवंताशिवाय दुसरा कोण मारणार !

" देवांचे दुःख नाहीसे करून भूमीचा भार हलका करणाऱ्या भगवंताने जर अवतार घेतला असेल तर मी त्यांच्याकडे स्वतः जाऊन हट्टाने वैर करतो. मग प्रभू आपल्या बाणांनी मला ठार करतील. साहजिकच अशा प्रकारे प्राण सोडल्याने मी भवसागरांतून तरून जाईन. या तमोगुणी राक्षसदेहाने भगवंताची भक्ती घडणे अशक्य आहे, म्हणून मनाने, वाणीने व देहाने आता केलेला गुप्त बेतच पक्का ठरला.

" असे नसून कोणी सामान्य मानव राजपुत्र असतील तर त्या दोघांना जिंकून त्या स्त्रीला बलात्काराने पळवून आणीन.''

एकांतात स्वगत असा विचार निश्चित ठरल्यावर, सागरतीरावर ज्या ठिकाणी मारीच राहात होता, तिकडेबरोबर सारथीसुद्धा न घेता रावण एकटाच रथात बसून निघाला.

शंकर पार्वतीला सांगतात, ' उमे ! इथे रामचंद्रांनी जी युक्ती केली, तिची सुंदर कथा आज सांगतो ऐक. सीतेसह राम पंचवटीतील पर्णकुटीत बसले आहेत. कंद-मूल-फळादि आणण्यासाठी लक्ष्मण वनात गेले असता कृपा व सुख यांचे सागर असणारे श्रीराम हसत, जनकन्येला म्हणाले, २३

" पतिव्रता धर्माचे सुन्दर पालन करणाऱ्या प्रिये ! सुशीले ! हे पाहा की, मी आता काही (ललित) नरलीला करणार आहे. म्हणून माझ्याकडून राक्षसांचा नाश पूर्ण होईपर्यंत तुम्ही पावकात निवास करावा. ''

जबहिं राम सब कहा बखानी। प्रभु पद धरि हियँ अनल समानी॥
निज प्रतिबिंब राखि तहँ सीता। तैसइ सील रूप सुबिनीता॥
लछिमनहूँ यह मरमु न जाना। जो कछु चरित रचा भगवाना॥
दसमुख गयउ जहाँ मारीचा। नाइ माथ स्वारथ रत नीचा॥
नवनि नीच कै अति दुखदाई। जिमि अंकुस धनु उरग बिलाई॥
भयदायक खल कै प्रिय बानी। जिमि अकाल के कुसुम भवानी॥

दो०—करि पूजा मारीच तब सादर पूछी बात।
कवन हेतु मन व्यग्र अति अकसर आयहु तात॥ २४॥

चौ०—दसमुख सकल कथा तेहि आगें। कही सहित अभिमान अभागें॥
होहु कपट मृग तुम्ह छलकारी। जेहि बिधि हरि आनौं नृपनारी॥
तेहिं पुनि कहा सुनहु दससीसा। ते नररूप चराचर ईसा॥
तासों तात बयरु नहिं कीजै। मारें मरिअ जिआएँ जीजै॥
मुनि मख राखन गयउ कुमारा। बिनु फर सर रघुपति मोहि मारा॥
सत जोजन आयउँ छन माहीं। तिन्ह सन बयरु किएँ भल नाहीं॥
भइ मम कीट भृंग की नाई। जहँ तहँ मैं देखउँ दोउ भाई॥
जौं नर तात तदपि अति सूरा। तिन्हहि बिरोधि न आइहि पूरा॥

श्रीरामचंद्रांनी जेव्हा सर्व योजना व्यवस्थितपणे समजावून सांगितली तेव्हा प्रभुपद हृदयात धारण करून जनकसुतेने आपले सत्यरूप अग्नीत गुप्त केले. त्याचवेळी अगदी आपलेच प्रतिबिंब अशी हुबेहुब दुसरी सीता आपल्या जागी तयार करून तिने ठेवली. प्रत्यक्ष सीतेप्रमाणेच ही प्रतिबिंबरूप सीतासुद्धा तशीच सुशील, सुरूप अत्यंत नम्र अशी असल्याने, भगवंतांनी केलेल्या या गुप्त योजनेचा [illegible] पत्तासुद्धा लागला नाही!

इकडे यावेळेपर्यंत, रावण मारीचाच्या निवासापर्यंत गेला. त्या स्वार्थरत नीचाने मस्तक नमवून मारीचाला नमस्कार केला. अशा नीचाचे नमन हे अंकुश, धनुष्य, सर्प व मांजर यांच्या नमण्याप्रमाणेच परिणामी अतिशय दुःखदायक ठरते! शंकर म्हणतात, ‘हे भवानी! भलत्याच वेळी येणारी ही फुले जशी भयसूचक असतात, तशीच दुष्टाची प्रियवाणी दुःखदायक असते!

रावणाने जरी मस्तक नमवले तरी मारीचाने त्याची पूजा करून अत्यंत आदराने त्याला विचारले, “तात,! असे एकटे, उदासचित्त व लगबगीने माझ्याकडे येण्यात आपला काय हेतू आहे?” २४

अत्यंत दुर्दैवी रावणाने मोठ्या अहंपणाने सर्व कथा त्याला सांगितली व शेवटी म्हणाला की, “तुम्ही मायावी मृग बनून कपटाने त्या आश्रमाच्या जवळ जा. म्हणजे नृपाच्या स्त्रीस मला चोरून आणता येईल.”

ते ऐकताच मारीचाने समजावून सांगितले, “हे दशकंठा! मी सांगतो ते ऐका. ते मानव शरीरात जरी दिसले तरी ते चराचराचे ईश्वर आहेत. तात! त्यांच्याशी वैर करून कल्याण होणार नाही. त्यांनी मारले तर मरणे भाग आहे; जगविले तरच आपण जगू अशी त्यांची सत्ता आहे.

“हे मी स्वतःच्या अनुभवाचेच बोलत आहे. विश्वामित्राच्या यज्ञाचे रक्षण करण्यासाठी हेच दोघे बंधू आले होते. त्यावेळी तर ते कुमार होते; परंतु असे असूनही मला रघुपतींनी केवळ एक बोथट बाण मारला. त्याचा परिणाम म्हणजे मी शंभर योजने दूर अंतरावर फेकला गेलो. म्हणून सांगतो की, त्यांच्याशी आपण वैर करणे केव्हाच हिताचे होणार नाही.

“त्यावेळेपासून माझी कीटभृंगासारखी स्थिती झाली आहे. जिकडे पहावे तिकडे माझ्यासमोर ते दोघे भाऊच मला एकसारखे दिसतात. तुझ्या समजुतीप्रमाणे ते मनुष्य आहेत, असे मानले तरीही बाबा! ते अतिशय शूर असल्यामुळे त्यांच्याशी वैर धरून आपणास शेवटपर्यंत टिकाव धरता येणार नाही!

दो० —जेहिं ताडका सुबाहु हति खंडेउ हर कोदंड ।
खर दूषन तिसिरा बधेउ मनुज कि अस बरिबंड ॥ २५ ॥

चौ० —जाहु भवन कुल कुसल बिचारी । सुनत जरा दीन्हिसि बहु गारी ॥
गुरु जिमि मूढ करसि मम बोधा । कहु जग मोहि समान को जोधा ॥
तब मारीच हृदयँ अनुमाना । नवहि बिरोधें नहिं कल्याना ॥
सस्त्री मर्मी प्रभु सठ धनी । बैद बंदि कबि भानस गुनी ॥
उभय भाँति देखा निज मरना । तब ताकिसि रघुनायक सरना ॥
उतरु देत मोहि बधब अभागें । कस न मरौं रघुपति सर लागें ॥
अस जियँ जानि दसानन संगा । चला राम पद प्रेम अभंगा ॥
मन अति हरष जनाव न तेही । आजु देखिहउँ परम सनेही ॥

छं० — निज परम प्रीतम देखि लोचन सुफल करि सुख पाइहौं ।
श्री सहित अनुज समेत कृपानिकेत पद मन लाइहौं ॥
निर्बान दायक क्रोध जा कर भगति अबसहि बसकरी ।
निज पानि सर संधानि सो मोहि बधिहि सुखसागर हरी ॥

" त्यांचे सामर्थ्य केवढे आहे, ते तू जाणतोसच. ताटकेसारखी राक्षसी व महावतार सुबाहू यांचा वध बालपणीच करून, महेशाचे कोदंड खंडित केले ! आणि ताजे उदाहरण म्हणजे केवळ एकट्याने खर, दूषण व त्रिशिरा यांचा सर्व सैन्यासह फडशा पाडला ! अशा प्रकारचा, बलिष्ठांनाही वंद्य असणारा पुरुष काय सामान्य मानव म्हणायचा ? " २५

" तात्पर्य, आपल्या अफाट कुळाच्या संरक्षणाचा, विचार ध्यानी आणून तुम्ही सरळ रस्ता धरावा. " रावणाचा मामा मारीच. म्हणून त्याने तळमळीने एवढा त्याला उपदेश केला.

पण तो कानीं पडताच रावणाच्या अंगाचा नुसता तिळपापड झाला. त्याने मारीचाला शिव्यांची लाखोली वाहिली व म्हणाला, " अगदी गुरुसारखा मला उपदेश करतोस काय ? बोल माझ्यासारखा जगात कोण योद्धा आहे ? "

मारीच मनात विचार करू लागला. रावणाला विरोध करणेही बरे नाही. कारण शास्त्राप्रमाणे नऊजणांशी विरोध करून कुणाचेच कल्याण होत नाही. शस्त्रधारी, मर्म जाणणारा स्वामी (अन्नदाता, राजा वगैरे), दुर्जन, धनवान, वैद्य, भाट, (बंदी) आणि कुशल स्वयंपाकी, यात रावणाची गणना अनेक ठिकाणी होत असल्याने त्याच्याशी वैर करून भागणार नाही.

मारीचास याप्रमाणे दोन्ही बाजूस स्वतःचे मरण दिसू लागल्याने तो मनाने रघुनायक चरणांस शरण गेला. त्याच्या मनात पुनःविचार आला, " याला उत्तर दिले तर हा हतभागी मला ठार मारणार ! मग मरणच स्वीकारायचे तर ते रघुपतीचा बाण लागूनच का मरू नये ? "

हा विचार निश्चित ठरताच श्रीरामचरणी अभंग प्रीतीने हृदय भरून तो दशाननाच्या बरोबर त्याच्या इच्छेप्रमाणे निघाला. आज परमस्नेही प्रभूचे दर्शन घेईन, त्यांना डोळे भरून मी पाहीन, इत्यादि भक्तिभावनांनी त्याच्या मनात हर्षाच्या लाटा उसळू लागल्या. पण रावणास मात्र त्याची कल्पना त्याने बिलकुल येऊ दिली नाही. मारीचाच्या मनोरथ-सागराला अनावर भरती येऊ लागली. " मी आता आपल्या परम प्रियतमाला पाहून आपल्या नेत्रांचे पारणे फेडीन; तेव्हा मला केवढे सुख होईल ! त्यावेळी श्रीसीता व अनुज लक्ष्मण यांच्यासह कृपानिधीच्या चरणी मी आपले मन अखंड लावीन.

ज्यांचा क्रोधसुद्धा मोक्ष (निर्वाण) दायक आहे आणि ज्यांची भक्ती तर कोणालाही वश करणारी आहे. असा सुखसागर हरी आपल्या हातांनी शरसंधान करून, माझा वध करील. मला धरण्यासाठी, हातात

दो० —मम पाछें धर धावत धरें सरासन बान ।
फिरि फिरि प्रभुहि बिलोकिहउँ धन्य न मो सम आन ॥ २६ ॥

चौ० —तेहि बन निकट दसानन गयऊ । तब मारीच कपटमृग भयऊ ॥
अति बिचित्र कछु बरनि न जाई । कनक देह मनि रचित बनाई ॥
सीता परम रुचिर मृग देखा । अंग अंग सुमनोहर बेषा ॥
सुनहु देव रघुबीर कृपाला । एहि मृग कर अति सुंदर छाला ॥
सत्यसंध प्रभु बधि करि एही । आनहु चर्म कहति बैदेही ॥
तब रघुपति जानत सब कारन । उठे हरषि सुर काजु सँवारन ॥
मृग बिलोकि कटि परिकर बाँधा । करतल चाप रुचिर सर बाँधा ॥
प्रभु लछिमनहि कहा समुझाई । फिरत बिपिन निसिचर बहु भाई ॥
सीता केरि करेहु रखवारी । बुधि बिबेक बल समय बिचारी ॥
प्रभुहि बिलोकि चला मृग भाजी । धाए रामु सरासन साजी ॥
निगम नेति सिव ध्यान न पावा । मायामृग पाछें सो धावा ॥
कबहुँ निकट पुनि दूरि पराई । कबहुँक प्रगटइ कबहुँ छपाई ॥
प्रगटत दुरत करत छल भूरी । एहि बिधि प्रभुहि गयउ लै दूरी ॥

धनुष्यबाण धरून माझ्यामागे प्रभू धावत असता, मी मागे वळून पुनः पुन्हा त्या श्यामवनाला पाहीन. खरोखर माझ्यासारखा दुसरा कोणीच धन्य नाही !" २६

अपेक्षित वनाच्या जवळ दशानन येताच मारीचाने मायावी मृगाचे जे रूप घेतले, ते इतके विलक्षण होते की, त्याचे वर्णन करणे अशक्य आहे. सर्व देह लखलखीत पिवळ्याधमक सोन्याचा असून, त्यावर जागोजागी रत्ने चमकत आहेत अशा त्या परम रुचिर हरिणाकडे सीतेने पाहिले मात्र, तोच त्याच्या प्रत्येक अवयवाच्या मनोहरतेने तिच्या चित्ताची अगदी पकडच घेतली.

तिने लगेच प्रार्थना केली, ' हे देवा ! कृपाकर रघुवीरा ! मी काय म्हणते ते ऐकणार ना ? पाहिले का, या हरिणाचे कातडे किती सुंदर आहे ते ! सत्यप्रतिज्ञ प्रभो !' वैदेहीने अखेर स्पष्टच मागणी केली–' याला मारून याचे चर्म मला आणून देणार ना ?'

रघुपती सर्व कार्यकारणपरंपरा जाणतच असल्याने, देवांचे कार्य साधण्याचा प्रारंभ आता होणार, या हर्षाने उठले. त्या हरिणाकडे एकवेळ नजर टाकली. उत्साहाने अगदी कमर कसून हातात सुंदर धनुष्य घेतले व त्यावर रुचिर बाण लावला.

त्या मृगाची शिकार करण्यासाठी निघण्यापूर्वी प्रभूंनी लक्ष्मणास स्पष्ट कल्पना दिली, " बंधो ! यावेळी वनात अनेक राक्षस घिरट्या घालत आहेत. एवढ्याकरता आपल्या बुद्धीचे, विवेकाचे शरीराचे बळ यांनी घेऊन कालमानानुरूप, विचारपूर्वक सीतेचे उत्तम रक्षण कर. "

एवढे सांगून प्रभू त्या मृगाच्या रोखाने निघाले. आपल्यामागे आता पाठलाग होणार, हे जाणून तो पळत सुटला. श्रीरामचंद्रांनी लगेच धनुष्य सज्ज केले व ते धावू लागले !

ज्याचे नेति नेति म्हणून निगम (वेद) वर्णन करतात, प्रत्यक्ष शंकराच्याही ध्यानात जे सापडत नाहीत, ते देवाधिदेव मायामृगाच्या मागे धावत सुटले ! केवढे आश्चर्य ! !

तो मृग मायावीच असल्याने त्याने आपले कपटकौशल्य गाजवण्यास प्रारंभ केला. केव्हा अगदी जवळ दिसावे तर एकदम् क्षणात दूर प्रकट व्हावे; केव्हा त्या खळाने स्पष्ट नजरेसमोर यावे तर केव्हा मुळीच गुप्त व्हावे. अशा प्रकारे लपत, गुप्त-प्रकट होत, नानाप्रकारे डावपेच करत प्रभूला त्याने आश्रमापासून दूर नेले !

तब तकि राम कठिन सर मारा । धरनि परेउ करि घोर पुकारा ॥
लछिमन कर प्रथमहिं लै नामा । पाछें सुमिरेसि मन महुँ रामा ॥
प्रान तजत प्रगटेसि निज देहा । सुमिरेसि रामु समेत सनेहा ॥
अंतर प्रेम तासु पहिचाना । मुनि दुर्लभ गति दीन्हि सुजाना ॥
दो० — बिपुल सुमन सुर बरषहिं गावहिं प्रभु गुन गाथ ।
निज पद दीन्ह असुर कहुँ दीनबंधु रघुनाथ ॥ २७ ॥
चौ० — खल बधि तुरत फिरे रघुबीरा । सोह चाप कर कटि तूनीरा ॥
आरत गिरा सुनी जब सीता । कह लछिमन सन परम सभीता ॥
जाहु बेगि संकट अति भ्राता । लछिमन बिहसि कहा सुनु माता ॥
भृकुटि बिलास सृष्टि लय होई । सपनेहुँ संकट परइ कि सोई ॥
मरम बचन जब सीता बोला । हरि प्रेरित लछिमन मन डोला ॥
बन दिसि देव सौंपि सब काहू । चले जहाँ रावन ससि राहू ॥
सून बीच दसकंधर देखा । आवा निकट जती कें बेषा ॥

त्याच्या या कपटाचा शेवट करण्याचा काळ येताच श्रीरामचंद्रानी नेम धरून एक कठीण बाण त्याला मारला. त्याबरोबर त्याने खूप मोठी आरोळी दिली व तो धरणीवर पडला !

तेव्हा श्रीरामचंद्रांच्या आवाजात ' हा लक्ष्मण ! हा सीते ! ' अशी घोर व दीन मोठ्याने हाक प्रथम त्याने मारली व नंतर मनात रामाचे स्मरण केले, भक्तियुक्त अंतःकरणाने त्याने रामाचे स्मरण अंतकाळी सुरू केले व मायावी मृगरूप टाकून स्वतःच्या राक्षसदेहात मारीच प्रकट झाला.

त्याच्या अंतरीचे शुद्ध प्रेम जाणून, प्रभूंनी मुनिदुर्लभ अशी कैवल्यमुक्ती त्याला दिली.

या असुरालासुद्धा दीनबंधू रघुनाथांनी निजपद दिलेले पाहून देवांनी प्रभूच्या गुणगाथा गात गात, पुष्कळ फुलाची त्यांच्यावर वृष्टी केली. २७

अशा प्रकारे त्या खलाचा वध होताच हातात धनुष्य व कमरेला भाता असे धारण करून प्रभू लगेच परत फिरले. त्यावेळचे त्यांचे लावण्य अत्यंत खुलून दिसत होते !

मारीचाच्या त्या आर्त व दीर्घ हाकेने इकडे सीतेची केविलवाणी स्थिती केली. तो भयंकर शब्द कानी पडताच अत्यंत भयभीत होऊन सीता लक्ष्मणास म्हणाली, " जा, जा ! अगदी झटकन् जा ! तुमचे बंधू मोठ्या संकटात आहेत ! "

त्यावर लक्ष्मण हसून म्हणाले, " माते ! ऐक. ज्याच्या नुसत्या भुवईच्या रागाने वाकण्याबरोबर सबंध सृष्टीचा संपूर्ण नाश होतो, तो प्रभू स्वप्नात तरी कधी संकटात पडणे शक्य आहे काय ? "

परंतु हरीच्या प्रेरणेने जेव्हा सीतेच्या मुखातून लक्ष्मणास लागट असे शब्द बाहेर पडले, तेव्हा त्याच हरीच्या योजनेने लक्ष्मणाचा निश्चय ढळला.

आता आपली सीतारक्षणाची जबाबदारी दुसऱ्याकडे सोपवणे भाग आहे असे जाणून कर्तव्यपरायण लक्ष्मणाने ते काम वनदेवता आणि दिशांचे देव यांच्याकडे अंतःकरणपूर्वक सोपविले; आणि रावणरूपी चंद्राच्या राहूकडे स्वतः निघाले.

लक्ष्मणाने पर्णकुटी सोडली. तो दूर निघून गेला. सर्वत्र पूर्ण सामसूम झाले. आता आपला हेतू साधण्यास योग्य संधी आली, हे जाणून दशकंठ संन्यासीरूपाने चोरासारखी पावले टाकत भीत भीत आश्रमाकडे येऊ लागला !

काकभुशुंडी गरुडाला इषारा देतात, ' हे खगेश्वरा ! कशी मौज आहे पाहा ! ज्याच्या भयाने देवांची व

जाकें डर सुर असुर डेराहीं । निसि न नींद दिन अन्न न खाहीं ॥
सो दससीस स्वान की नाई । इत उत चितइ चला भड़िहाई ॥
इमि कुपंथ पग देत खगेसा । रह न तेज तन बुधि बल लेसा ॥
नाना बिधि करि कथा सुहाई । राजनीति भय प्रीति देखाई ॥
कह सीता सुनु जती गोसाईं । बोलेहु बचन दुष्ट की नाईं ॥
तब रावन निज रूप देखावा । भई सभय जब नाम सुनावा ॥
कह सीता धरि धीरजु गाढ़ा । आइ गयउ प्रभु रहु खल ठाढ़ा ॥
जिमि हरिबधुहि छुद्र सस चाहा । भएसि कालबस निसिचर नाहा ॥
सुनत बचन दससीस रिसाना । मन महुँ चरन बंदि सुख माना ॥

दो०— क्रोधवंत तब रावन लीन्हिसि रथ बैठाइ ।
चला गगनपथ आतुर भयँ रथ हाँकि न जाइ ॥ २८ ॥

चौ०— हा जग एक बीर रघुराया । केहिं अपराध बिसारेहु दाया ॥
आरति हरन सरन सुखदायक । हा रघुकुल सरोज दिननायक ॥
हा लछिमन तुम्हार नहिं दोसा । सो फलु पायउँ कीन्हेउँ रोसा ॥

असुरांची घाबरगुंडी उडते. त्यांना रात्री झोप लागत नाही की दिवसा अन्न गिळता येत नाही ! एवढा ज्याचा दरारा, तो दशशिराचा रावण एखाद्या कुत्र्यासारखा सुटा चोर, भामटा बनून इकडे-तिकडे चारी दिशांना विचकून पाहत पर्णकुटीजवळ येत आहे ! खरेच आहे. एकदा कुमार्गावर पाऊल टाकले की तेज, बुद्धि. बळ, अगर देहबळसुद्धा बिल्कुल तरत नाही !

असा तो चोर संन्याशीरूपाने पर्णकुटीत शिरला व सीतेला नानाप्रकारच्या चटकदार कथा सांगून त्याने तिला प्रीति, राजनीति, भय व विशेष लोभ दाखवला.

तेव्हा सीतेने खवळून विचारले, " अहो, तुम्ही यती स्वामी ना ? मग आपण एखाद्या दुष्ट खळाप्रमाणे कसे बोलत आहात ? "

या रोकड्या सवालाने आपले बिंग फुटले अशी खात्री होऊन रावणाने आपले दहा तोंडाचे खरे रूप प्रगट करून स्वतःचे नाव सांगितले त्याबरोबर मात्र सीता घाबरली ! तथापि स्थितीत दृढ धीर धरून सीता म्हणाली, " अरे दुष्टा ! जरा थांब, प्रभु आलेच ते बघ ! एखाद्या क्षुद्र ससाने सिंहाच्या स्त्रीची इच्छा करावी, तशी बुद्धी भ्रष्ट झाल्याने हे निशिचर राजा ! तुझे आता दिवस भरलेच म्हणून समज ! "

तीक्ष्ण बाणासारखे हे शब्द कानात शिरल्याने दशशीश साहजिकच संतापला, पण मनात सीतेच्या चरणांना वंदन करून त्याने सुख मानले.

आता तेथे अधिक थांबण्याने आपला मुख्य हेतू निष्फळ होणार; अशी रावणाला धास्ती वाटल्याने, त्याने त्या बाह्यतः संतप्त स्थितीतच सीतेला झटकन् उचलून रथात बसवून वेगाने व तातडीने आकाशातून निघाला; पण आतल्या आत इतका घाबरला होता की, त्याला रथ सरळ हाकतासुद्धा येईना ! २८

या अनपेक्षित व आकस्मिक भयंकर घटनेने सीतेच्या दुःखास सीमाच उरली नाही. अत्यंत दीन बनून ती आक्रोश करू लागली,

" हा ! जगातील अद्वितीय वीरा रघुराया ! मी असा काय अपराध अगर गुन्हा केला की, ज्याची शिक्षा म्हणून यावेळी आपण माझ्यावर दया करण्याचे विसरलात !

" हाय ! हाय ! हे संकट निवारण करणाऱ्या ! शरणागतास सुख देणाऱ्या ! रघुकुलकमलसूर्या ! "

" हा लक्ष्मणा ! तुमचा मुळीच दोष नाही हो ! मी तुमच्यावर निष्कारण रागावले, त्याचेच हे फळ आता मी भोगत आहे ! "



बिबिध बिलाप करति बैदेही । भूरि कृपा प्रभु दूरि सनेही ॥
बिपति मोरि को प्रभुहि सुनावा । पुरोडास चह रासभ खावा ॥
सीता कै बिलाप सुनि भारी । भए चराचर जीव दुखारी ॥
गीधराज सुनि आरत बानी । रघुकुलतिलक नारि पहिचानी ॥
अधम निसाचर लीन्हें जाई । जिमि मलेछ बस कपिला गाई ॥
सीते पुत्रि करसि जनि त्रासा । करिहउँ जातुधान कर नासा ॥
धावा क्रोधवंत खग कैसें । छूटइ पबि परबत कहुँ जैसें ॥
रे रे दुष्ट ठाढ़ किन होही । निर्भय चलेसि न जानेहि मोही ॥
आवत देखि कृतांत समाना । फिरि दसकंधर कर अनुमाना ॥
की मैनाक कि खगपति होई । मम बल जान सहित पति सोई ॥
जाना जरठ जटायू एहा । मम कर तीरथ छाँड़िहि देहा ॥
सुनत गीध क्रोधातुर धावा । कह सुनु रावन मोर सिखावा ॥
तजि जानकीहि कुसल गृह जाहू । नाहिं त अस होइहि बहुबाहू ॥
राम रोष पावक अति घोरा । होइहि सकल सलभ कुल तोरा ॥

अशा प्रकारे वैदेहीचा विविध प्रकारे विलाप चालू असता ती पुनः कळवळून म्हणाली, ' अत्यंत कृपाळू व परम स्नेही असे प्रभू मला दुरावले; आता ही माझी विपत्ती त्याना कोण सांगणार ? हा रासभ (गाढव) यज्ञातील अत्यंत पवित्र हुतशेष खाऊ पाहत आहे ! काय करू ? "

सीतेचा हा पाषाणासही पाझर फोडणारा विलाप ऐकून सर्व चराचर सृष्टी अत्यंत दुःखी झाली.

इतक्यात गृध्रराज जटायूच्या कानावर ती आर्तवाणी गेली. त्याबरोबर त्याने ओळखले की, रघुकुलटिळक श्रीरामचंद्रांची स्त्री सीता संकटात आहे. लगेच त्याच्या हेही लक्षात आले की, एखाद्या कपिला गायीला कसाब जसा नेतो, त्याचप्रमाणे हा अधम कोणी निशाचर त्या विचाऱ्या जानकीला असहाय स्थितीत पळवत आहे.

जटायूने सीतेचें सांत्वन करून तिला धीर देण्यासाठी लगेच आश्वासन दिले; ' सीते, मुली ! जरासुद्धा मनात भय धरू नकोस, आता इतक्यात त्या निशाचराचा मी नाश करतो बघ ! " असे बोलून त्याने क्रोधाने अशी झडप घातली की, जसे वज्रच पर्वतावर सुटले असावे !

जटायूने गर्जना केली, " अरे दुष्टा ! अरे ! तू थांबत का नाहीस ? अगदी निर्भयपणे चालला आहेस यावरून तू मला ओळखले नाहीस असे दिसते. "

आपल्या मागून कोणी तरी कृतान्तासारखा गर्जना करत येत असल्याचे, दशकंठाने मागे वळून पाहिल्यावर, त्याच्या लक्षात आले. तो आपल्या मनाशी विचार करू लागला. ' हा मैनाक पर्वत असेल काय ? का खगपती गरुड ? तसे असल्यास आपल्या स्वामीसह तो माझे बल चांगलेच जाणतो. "

रावणाचा असा विचार चालू असता जटायूची झेप समीप आली, त्याबरोबर त्याची ओळख पटून तो म्हणतो, " अरे, हा तर थेरडा जटायू ! माझ्या हातारूपी तीर्थात हा लवकरच आपला देह विसर्जन करील!" (माझ्या हाताने मरेल.)

दशाननाचे हे संतापजनक शब्द कानी येताच जटायूने त्याच्या अंगावर एकदम झडप घातली व म्हणाला, " रावणा मी सांगतो ते मुकाट्याने ऐक. जानकीला सोडून दे आणि सुखरूप घर गाठ. नाहीतर हे बहुभुजा ! परिणाम काय घडेल ठाऊक आहे काय ? श्रीरामचंद्राचा संताप हा भयंकर पावक आहे आणि तुझे (तावक) सर्व कुल त्यात पतंग होईल. (जळून मरेल.)

रावण स्वतः रणशूर असल्याने जटायूच्या असल्या भाषेला उत्तर देण्याची त्याला गरज वाटली नाही;

उतरु न देत दसानन जोधा। तबहिं गीध धावा करि क्रोधा॥
धरि कच बिरथ कीन्ह महि गिरा। सीतहि राखि गीध पुनि फिरा॥
चोचन्ह मारि बिदारेसि देही। दंड एक भइ मुरुछा तेही॥
तब सक्रोध निसिचर खिसिआना। काढ़ेसि परम कराल कृपाना॥
काटेसि पंख परा खग धरनी। सुमिरि राम करि अद्भुत करनी
सीतहि जानि चढ़ाइ बहोरी। चला उताइल त्रास न थोरी॥
करति बिलाप जाति नभ सीता। ब्याध बिबस जनु मृगी सभीता॥
गिरि पर बैठे कपिन्ह निहारी। कहि हरिनाम दीन्ह पट डारी॥
एहि बिधि सीतहि सो लै गयउ। बन असोक महँ राखत भयऊ॥

दो०—हारि परा खल बहु बिधि भय अरु प्रीति देखाइ।
तब असोक पादप तर राखिसि जतन कराइ॥ २९ (क)॥

नवाह्नपारायण, छठा विश्राम

जेहि बिधि कपट कुरंग सँग धाइ चले श्रीराम।
सो छबि सीता राखि उर रटति रहति हरिनाम॥ २९ (ख)॥

आणि आतल्याशी हा राक्षस थोडाही इच्छित नाही. असे पाहून तेव्हाच जटायूचा क्रोध अनावर झाला. त्याने एकदम रावणावर हल्ला करून त्याच्या केसांना धरले आणि त्याला रथाच्या बाहेर ओढून टाकले. त्या हिसक्याने तो जमिनीवर चारीमुंड्या चीत झाला! तेव्हा या गृध्राने सीतेला रथातून काढून दूर नेऊन ठेवली व तो परत फिरला. त्याने चोचीने रावणाच्या शरीरावर घाव घालून जागोजागी इतके लचके तोडले व त्याचे कातडे फाडले की, रावण तो घटकाभर एक घटकाभर बेशुद्ध होऊन पडला.

शुद्धीवर येताच राक्षस क्रोधाने बेभान झाला व चिडून अत्यंत घोर खड्ग उपसले व त्याने जटायूवर हल्ला केला. थोड्याच झटापटीत रावणाने त्याचे पंख तोडल्यामुळे जटायू रामस्मरण करीत जमिनीवर पडला!

रावणाशी युद्ध करून त्याला दुर्जन करण्यात जटायूने खरोखरच मोठी अद्भुत करणी केली. हे निःसंशय!!

आता पुन्हा काय विघ्न येते न कळे. या कल्पनेने दशमुखाने सीतेला उचलून पुन्हा रथात घातली व तो उतावीळपणाने अती भयभीत होऊन निघाला.

एखाद्या व्याधाच्या तावडीत सापडलेल्या हरिणीप्रमाणे घाबरून गेल्यामुळे, आकाशातून जात असता सीता मोठ्याने आक्रोश करू लागली!

अशा स्थितीतच तिला एका डोंगराच्या माथ्यावर काही वानर बसलेले पाहावयास मिळाले. सीतेने 'हरी हरी' म्हणून आपले एक वस्त्र त्यांच्याकडे खाली टाकून दिले.

रावण पुढे थोडाही न थांबता सीतेला घेऊन लंकेला गेला आणि अशोकवनिकेत तिला कडेकोट बंदोबस्तात ठेवली.

त्यानंतर नानाप्रकारे प्रीती व भीती दाखवून सीतेला वश करण्याची त्या दुष्टाने शिकस्त केली: पण अखेर त्याला हारच खावी लागली. तेव्हा एका अशोक वृक्षाखालीच व्यवस्था करून त्याने सीतेला ठेवली. २९ (क)

कपटमृगाच्या मागे ज्या प्रकाराने श्रीराम धावत गेले, ते मनोहर रूप सीतेच्या हृदयात अखेरीचे दृश्य म्हणून स्थिरावल्याने त्याच रूपाचे ध्यान व हरिनामाचा जप करत सीतेचे अशोकवनातील दिवस अत्यंत दुःखद स्थितीत मोठ्या कष्टाने जाऊ लागले. २९ (ख)



चौ० – रघुपति अनुजहि आवत देखी । बाहिज चिंता कीन्हि बिसेषी ॥
जनकसुता परिहरिहु अकेली । आयहु तात बचन मन पेली ॥
निसिचर निकर फिरहिं बन माहीं । मम मन सीता आश्रम नाहीं ॥
गहि पद कमल अनुज कर जोरी । कहेउ नाथ कछु मोहि न खोरी ॥
अनुज समेत गए प्रभु तहवाँ । गोदावरि तट आश्रम जहवाँ ॥
आश्रम देखि जानकी हीना । भए बिकल जस प्राकृत दीना ॥
हा गुन खानि जानकी सीता । रूप सील ब्रत नेम पुनीता ॥
लछिमन समुझाए बहु भाँती । पूछत चले लता तरु पाँती ॥
हे खग मृग हे मधुकर श्रेनी । तुम्ह देखी सीता मृगनैनी ॥
खंजन सुक कपोत मृग मीना । मधुप निकर कोकिला प्रबीना
कुंद कली दाड़िम दामिनी । कमल सरद ससि अहिभामिनी ॥
बरुन पास मनोज धनु हंसा । गज केहरि निज सुनत प्रसंसा ॥
श्रीफल कनक कदलि हरषाहीं । नेकु न संक सकुच मन माहीं ॥

आता परत दण्डकारण्यात काय चालले आहे ते पाहा. मारीचाचा वध करून श्रीरामचंद्र परत येत असता आपल्याकडेच लक्ष्मण येत असलेला त्यांनी पाहिला. बाह्यतः मोठी चिंता दाखवून लक्ष्मण जवळ येताच प्रभू म्हणाले, " तात ! हे काय केलेस ? जनकसुतेला एकटी टाकून माझी आज्ञा मोडलीस व इकडे आलास ? राक्षसांच्या टोळ्या वनात हिंडत आहेत, असे तुला बजावले होते. आता मात्र सीता आश्रमात पाहावयास मिळणार नाही असेच मला वाटते ! "

हे ऐकून लक्ष्मण घाबरला त्याने प्रभूचे पाय धरले व हात जोडून दीनवाणीने तो म्हणाला, " नाथ ! यात माझा काहीही दोष नाही ! "

(लक्ष्मण असत्य बोलणार नाही हे माहीत असल्याने ' तुझा नाही दोष तर कोणाचा ते सांग, ' असे रघुनाथाने विचारले नाही. ही वेळ चर्चेची नसून आलेली शंका खरी की खोटी हे पाहणे पहिले कर्तव्य असल्याने दोघेही त्या मार्गाला लागतात. गू. चं.)

एक शब्दही न बोलता गोदावरीच्या काठी जेथे आश्रम होता तेथे प्रभू अनुजासह गेले आणि पाहतात तो काय ! आश्रमात खरोखरच जानकी नाही !

एखाद्या प्राकृत मनुष्याप्रमाणे प्रभू दीन झाले. विरह व्याकुळ होऊन त्यांनी विलाप करण्यास सुरुवात केली. " हा ! गुणखाणी जानकी ! हा सीते ! सुशील पतिव्रते ! सुंदरी ! पवित्र नियमाचे काटेकोर पालन करणाऱ्या सीते ! हाय हाय ! "

तो शोक पाहून लक्ष्मणाचाही जीव कासावीस होऊ लागला. प्रभूची नानाप्रकारे समजूत घालण्याचा त्याने प्रयत्न केला. पण व्यर्थ ! श्रीरामचंद्र विरह व्याकुळ होऊन पशुपक्ष्याना, वृक्षाना व लताना विचारीत चालले ! !

" हे मधुकर-मालिका हो ! अहो पशूनो ! अहो पक्ष्यांनो ! माझी हरिणाक्षी सीता तुम्हाला कुठे दिसली का ?

" पोपट, कबूतर, खंजनपक्षी, हरीण, मीन, मधुपांचे थवे, प्रवीण कोकिळा, कुंदाच्या कळ्या, डाळिंब, वीज, शरदृऋतूतील चंद्र, नागीण, वरुणपाश, मदनधनुष्य, हंस, हत्ती व सिंह यांच्या कानी आज त्यांचीच प्रशंसा येत आहे !

" बेलफळ, सोने, सोनकेळ (वृक्ष) यांना आज हर्ष होत आहे. जरासुद्धा लाजलज्जा अगर भय असे कोणाचेही त्यांना नाही वाटत !

सुनु जानकी तोहि बिनु आजू । हरषे सकल पाइ जनु राजू ॥
किमि सहि जात अनख तोहि पाहीं । प्रिया बेगि प्रगटसि कस नाहीं ॥
एहि बिधि खोजत बिलपत स्वामी । मनहुँ महा बिरही अति कामी ॥
पूरनकाम राम सुखरासी । मनुजचरित कर अज अबिनासी ॥
आगें परा गीधपति देखा । सुमिरत राम चरन जिन्ह रेखा ॥

दो० — कर सरोज सिर परसेउ कृपासिंधु रघुबीर ।
निरखि राम छबि धाम मुख बिगत भई सब पीर ॥ ३० ॥

चौ० — तब कह गीध बचन धरि धीरा । सुनहु राम भंजन भव भीरा ॥
नाथ दसानन यह गति कीन्ही । तेहिं खल जनकसुता हरि लीन्ही ॥
लै दच्छिन दिसि गयउ गोसाईं । बिलपति अति कुररी की नाईं ॥
दरस लागि प्रभु राखेउँ प्राना । चलन चहत अब कृपा निधाना ॥
राम कहा तनु राखहु ताता । मुख मुसुकाइ कही तेहिं बाता ॥
जा कर नाम मरत मुख आवा । अधमउ मुकुत होइ श्रुति गावा ॥
सो मम लोचन गोचर आगें । राखौं देह नाथ केहि खाँगें ॥

" जानकी ! ऐक ! तू नाहीस म्हणून हे सगळे इतके आनंदित झाले आहेत की- जणु काय, त्यांना राज्यपदच मिळाले आहे !! "

(सीता अप्राकृत व प्राकृत स्त्रियांच्या [illegible] सौंदर्याचे वर्णन करण्यासाठी काव्यसृष्टीतील ज्या उपमाने सीतेने आपल्या अतुल्य लावण्याने तुच्छ केली होती. पण आज सीता तिथे नसल्याने त्यांना स्वतःचे स्थान राज्यपद मिळाल्याचा आनंद झाला.

श्रीरामचंद्र पुढे बोलू लागले. " सीते ! ही स्पर्धा तुला कशी सहन होते ? लवकर प्रकट होऊन यांची खोड मोडावी असे तुला कसे वाटत नाही ? "

श्रीरघुपती हे सर्व जगाचे व इंद्रियांचे स्वामी ! परंतु जणू अतिकामी व महाविरही [illegible] आपल्या प्रियेला शोधीत असता असा विलाप करत आहेत. याचे कारण ते सर्वकामना परिपूर्ण झालेले, सुखाची संपूर्ण रास, जन्मरहित, विनाश नसलेले असे असून सर्वांना विश्राम देण्यासाठी केवळ नरलीला म्हणून हे सर्व करत आहेत.

विलाप करीत व जागोजागी सीतेची [illegible] चौकशी करीत प्रभू चालले असता समोरच गृध्रराज पडलेला दिसला. त्याच्या अंतःकरणात [illegible] वज्रांकुशध्वजादि चिन्हांचे ध्यान सुरू आहे. त्याची ती भक्तियुक्त स्थिती पाहताच रघुवीर झटकन पुढे गेले व आपला कमलहस्त त्याच्या मस्तकावर ठेवला.

केवढे भाग्य त्या जटायूचे ! मस्तकावर प्रभूचा हात पडताच त्याने त्या शोभाधाम मुखारविंदावर आपली नजर स्थिर केली. त्याबरोबर त्याच्या सर्व यातना व दुःखे पार नाहीशी झाली ! ३०

भावनांचा भर थोडा ओसरल्यावर धीर धरून तो गृध्रराज बोलू लागला. ' रामा ! भवभयभंजना ! ऐका. नाथ ! त्या दशमुखाने माझी ही अशी दशा केली व त्या खळाने जानकीला पळवून नेली. टिटवीसारखा एकसारखा तिचा आक्रोश चालू असता तिला तो [illegible] घेऊन गेला.

" प्रभो ! केवळ आपल्या दर्शनासाठीच मी अतिकष्टाने प्राण राखून ठेवले आहेत. आता मात्र ते जाण्याच्या बेतात आहेत. "

हे ऐकताच दयाघन श्रीराम म्हणाले, " तात ! तुम्ही आपला देह राखावा ! त्याचा त्याग करू नका. "

त्यावर, सस्मित मुखाने जटायूने खुलासा केला. " ज्यांचे नाम मरताना जरी तोंडात आले तरीही

जल भरि नयन कहहिं रघुराई । तात कर्म निज तें गति पाई ॥
परहित बस जिन्ह के मन माहीं । तिन्ह कहुँ जग दुर्लभ कछु नाहीं ॥
तनु तजि तात जाहु मम धामा । देउँ काह तुम्ह पूरनकामा ॥

दो० – सीता हरन तात जनि कहहु पिता सन जाइ ।
जौं मैं राम त कुल सहित कहिहि दसानन आइ ॥ ३१ ॥

चौ० – गीध देह तजि धरि हरि रूपा । भूषन बहु पट पीत अनूपा ॥
स्याम गात बिसाल भुज चारी । अस्तुति करत नयन भरि बारी ॥

छं० – जय राम रूप अनूप निर्गुन सगुन गुन प्रेरक सही ।
दससीस बाहु प्रचंड खंडन चंड सर मंडन मही ॥
पाथोद गात सरोज मुख राजीव आयत लोचनं ।
नित नौमि रामु कृपाल बाहु बिसाल भव भय मोचनं ॥ १ ॥
बलमप्रमेयमनादिमजमब्यक्तमेकमगोचरं ।
गोबिंद गोपर द्वंद्वहर बिग्यानघन धरनीधरं ॥

अधमसुद्धा मुक्त होतात, असे वेद म्हणतात. तो प्रभू माझ्या डोळ्यासमोर प्रत्यक्ष दिसत असता, नाथ ! मी कोणत्या श्रेष्ठ सुखाच्या आशेने देह रक्षण करू ? ”

जटायूच्या अंतकाळची त्याची ही अढळ निष्ठा पाहून रघुराजाचे विशाल डोळे अश्रूंनी डबडबले. त्या स्तिीत त्यांच्या मुखातून साहजिकच उद्गार निघाले, “ तात ! तुम्ही आपल्या स्वतःच्या पावन कर्मानेच सद्गति मिळविली आहे. ज्यांच्या मनात दुसऱ्याच्या कल्याणाची सतत तळमळ असते, त्यांना या जगात दुर्लभ असे काहीच नाही.

“ तुम्ही अंतःकरणाने पूर्णतृप्त असल्याने तुम्हाला कशाचीच इच्छा उरलेली नाही. मग आता तुम्हाला मी काय द्यावे ? असे असूनही तुमचा हा पक्षिदेह पडताच तुम्हाला वैकुंठाची (माझ्या धामाची) प्राप्ती होईल, असा मी वर देतो !

“ मात्र एक गोष्ट लक्षात ठेवा. रावणाने सीतेला पळवून नेल्याची हकीकत मात्र माझ्या पित्याला तुम्ही तेथे गेल्यावर सांगू नका. मी जर ‘ राम ’ असेन तर, ते वृत्त सांगण्याचे काम आपल्या कुळासह स्वर्गाला जाऊन दशाननच करील. ” ३१

त्या गृध्रराजाच्या कानी, हे शब्द पडताच न पडतात तोच त्याचा तो विशाल पक्षिदेह गतप्राण होऊन तेथे पडला व त्याला प्रत्यक्ष हरीचे रूप प्राप्त झाले. अनुपम पीतांबर परिधान केलेला असून, अंगावर अमोल भूषणे घातली आहेत; श्यामवर्णाची शरीर कांती तळपत आहे व विशाल असे त्याला चार बाहू आहेत; डोळे आनंदाश्रूंनी भरले असून, त्या स्थितीत तो श्रीरामाची स्तुती करू लागला.

“ हे श्रीराम प्रभो ! आपला (प्रभाव प्रकट करा !) विजय असो ! आपले रूप अनुपम असून आपण सगुण व निर्गुण असे दोन्ही प्रकारचे आहात. त्याचप्रमाणे त्रिगुणांचे खरे प्रेरकही आपणच आहात. दशशीर्षाच्या प्रचंड शिरांचे व बाहूंचे खंडण करण्यासाठी हातात तीक्ष्ण बाण घेणाऱ्या, भूमीचे विभूषण असणाऱ्या, पाण्याने भरलेल्या मेघाप्रमाणे श्याम शरीर, कमलासारखे मुख, लाल कमलासारखे विशाल नेत्र व दीर्घ बाहू असलेल्या, भवभयातून सोडविणाऱ्या कृपाळू रामा ! माझे आपणास अखंड वंदन असो. ” १

“ आपले बल अपरिमित आहे. आपण अनादि असून जन्मरहित आहात. तसेच अव्यक्त, एक, अगोचर, वेदान्तवेद्य (गोविन्द), इंद्रियातीत, (सुख-दुःख, लाभ-हानी, जन्म-मरण इत्यादी) द्वन्द्वाचा नाश करणारे, केवळ विज्ञानघनस्वरूप व पृथ्वीला धारण करणारे आहात. जे राममंत्र जपतात, अशा अनंत संतांच्या व

जे राम मंत्र जपंत संत अनंत जन मन रंजनं ।
नित नौमि राम अकाम प्रिय कामादि खल दल गंजनं ॥ २ ॥
जेहि श्रुति निरंजन ब्रह्म ब्यापक बिरज अज कहि गावहीं ।
करि ध्यान ग्यान बिराग जोग अनेक मुनि जेहि पावहीं ॥
सो प्रगट करुना कंद सोभा बृंद अग जग मोहई ।
मम हृदय पंकज भृंग अंग अनंग बहु छबि सोहई ॥ ३ ॥
जो अगम सुगम सुभाव निर्मल असम सम सीतल सदा ।
पस्यंति जं जोगी जतन करि करत मन गो बस सदा ॥
सो राम रमा निवास संतत दास बस त्रिभुवन धनी ।
मम उर बसउ सो समन संसृति जासु कीरति पावनी ॥ ४ ॥

दो० — अबिरल भगति मागि बर गीध गयउ हरिधाम ।
तेहि की क्रिया जथोचित निज कर कीन्ही राम ॥ ३२ ॥

चौ० — कोमल चित अति दीनदयाला । कारन बिनु रघुनाथ कृपाला ॥
गीध अधम खग आमिष भोगी । गति दीन्ही जो जाचत जोगी ॥
सुनहु उमा ते लोग अभागी । हरि तजि होहिं बिषय अनुरागी ॥
पुनि सीतहि खोजत द्वौ भाई । चले बिलोकत बन बहुताई ॥

दासांच्या मनास आनंद देणारे आपण अनंतच असून, कामना सोडून सेवा करणारे आपणाला प्रिय आहेत. तसेच कामादि खलांच्या समुदायाचा विनाश करणारेही आपणच आहात. अशा श्रीरामचंद्रा ! माझे आपणाला अखंड नमन असो " २

" निरंजन, गुणातीत, विरज, अज, ब्रह्म, विभु, व्यापक इत्यादि प्रकारे ज्याचे वर्णन श्रुती करतात; तसेच ध्यान, वैराग्य, योग इत्यादि अनेक साधनांनी मुनींना ज्याची कशी तरी प्राप्ती होते; असे ते (ब्रह्म) करुणारूपी जलाची वृष्टी करणारे कंद=जलद, सौंदर्य निधान असणारे प्रकट होऊन, सर्व चराचराला मोहित करीत आहेत व माझ्या हृदयरूपी कमळात भृंगाप्रमाणे विराजमान होणाऱ्या त्यांच्या प्रत्येक अंगाच्या ठिकाणी अनेक अनंगांचे सौंदर्य शोभत आहे ! " ३

" जो अगम्यही आहे व सुगमही आहे; सहज निर्मळ आहे, तसेच विषम असून, समही आहे; व सदोदित शीतल आहे. ज्याचा अनुभव घेण्यासाठी योग्यांना मन व इंद्रिये अंकित करून त्याच्या ठायी लावतात, तोच त्रिभुवनांचा स्वामी, रमानिवास राम आपल्या दासांना मात्र निरंतर वश होऊन राहतो; ज्याची पावन कीर्ती जन्ममरणाच्या चक्रातून मुक्त करते, तो रघुनाथ माझ्या हृदयात निवास करो. " ४

याप्रमाणे त्या भाग्यवान जटायूने शेवटी अविरल भक्तीचा वर मागून घेतला व तो हरिकृपेनेच हरिधामाला गेला. त्याचा तेथे गिधाडाचा जो देह पडला होता, त्याची उत्तरक्रिया श्रीरामचंद्रांनी स्वतःच्या हातांनी योग्य रीतीने केली ! ३२

ही सर्व प्रभूंची लीला वर्णन करत असता शंकराचे हृदय भक्तिरसाने उचंबळून आले. ते म्हणाले, " उमे ! पाहा, माझे रघुनाथ किती कोमल मनाचे, दीनावर दया करणारे व कारणाशिवायच कृपा करणारे आहेत ! मांसभक्षक असा अधम जातीचा गिधाड पक्षी, पण त्यालासुद्धा जिच्यासाठी योगी याचना करतात, (पण जी त्यांना मिळत नाही ,) अशी गती दिली ! अशा हरीला सोडून जे लोक विषयांवर प्रेम करतात, ते खरोखर किती अभागी म्हणावेत ! "

संकुल लता बिटप घन कानन । बहु खग मृग तहँ गज पंचानन ॥
आवत पंथ कबंध निपाता । तेहिं सब कही साप कै बाता ॥
दुरबासा मोहि दीन्ही सापा । प्रभु पद पेखि मिटा सो पापा ॥
सुनु गंधर्ब कहउँ मैं तोही । मोहि न सोहाइ ब्रह्मकुल द्रोही ॥

दो० — मन क्रम बचन कपट तजि जो कर भूसुर सेव ।
मोहि समेत बिरंचि सिव बस ताकें सब देव ॥ ३३ ॥

चौ० — सापत ताड़त परुष कहंता । बिप्र पूज्य अस गावहिं संता ॥
पुजिअ बिप्र सील गुन हीना । सूद्र न गुन गन ग्यान प्रबीना ॥
कहि निज धर्म ताहि समुझावा । निज पद प्रीति देखि मन भावा ॥
रघुपति चरन कमल सिरु नाई । गयउ गगन आपनि गति पाई ॥
ताहि देइ गति राम उदारा । सबरी कें आश्रम पगु धारा ॥
सबरी देखि राम गृहँ आए । मुनि के बचन समुझि जियँ भाए ॥
सरसिज लोचन बाहु बिसाला । जटा मुकुट सिर उर बनमाला ॥

इकडे त्या घनदाट अरण्यातून ते दोघे बंधू, जटायूची क्रिया संपवून, सीतेचा शोध करत पुढे चालू लागले. ते वन, वृक्ष आणि लता यांनी अगदी गुंफून काढले होते. अनेक प्रकारचे पक्षी, लांडगे, हत्ती व सिंह यांच्यासारखे पशू त्यांना वाटेत पाहावयास मिळाले.

अशा प्रकारे त्या गहन वनातून हे दोघे रघूत्तम मार्ग काढीत असता वाटेत कबंध नावाचा राक्षस एकदम आडवा आला. लगेच त्याला प्रभूनी ठार केला !

तो राक्षसाचा देह पडताच, आपणास दुर्वास ऋषींनी कसा शाप दिला, त्यामुळे हा राक्षसदेह कसा प्राप्त झाला व आता प्रभुचरणांच्या दर्शनाने ते पूर्वपाप कसे नष्ट झाले, वगैरे सर्व शापवृत्त कबंधाने कृतज्ञतापूर्वक भगवंताना निवेदन केले !

त्याची हकीकत ऐकल्यावर, श्रीरामचंद्रांनी एक महत्त्वाचा सिद्धान्त, त्याच्या निमित्ताने सांगितला. प्रभू म्हणाले, " हे गंधर्वा ! मी तुला सांगतो ते ऐक. ब्राह्मणाच्या कुळाचा द्रोह करणारा मला मुळीच आवडत नाही. याचे कारण असे की, जो कृतीने, वाणीने व मनाने, कपट सोडून ब्राह्मणांची सेवा करील त्याला माझ्यासह ब्रह्मदेव, शंकर व सगळे देव वश होतील. " ३३

" ही सेवा करत असता ब्राह्मणांनी शाप दिले; ताडन केले किंवा कठोर भाषण केले, तरीही त्यांच्या संबंधीचा आपला पूज्यभाव कमी होता कामा नये, असेच सर्व संत सांगत आले आहेत.

" शीलहीन व गुणहीन ब्राह्मणसुद्धा पूज्यच; पण गुणगणांत व ज्ञानात निपुण असा शूद्र असला तरी तो मात्र पूज्य होऊ शकत नाही. "

त्या गंधर्वाचे आपल्या चरणी निःसीम प्रेम पाहून तो प्रभूला प्रिय वाटला आणि त्याच कारणाने वरील पद्धतीने त्यांनी आपला भागवत धर्म त्याला समजावून सांगितला.

त्यानंतर भक्तियुक्त अंतःकरणाने त्याने रघुपतीच्या चरणकमली आपले शिर नमवले व अपेक्षित अशी सद्‌गती मिळाल्याने तो आकाशमार्गाने गेला.

याप्रमाणे उदार श्रीरामचंद्रांनी त्या गंधर्वाला सद्‌गती देऊन लगेच शबरीच्या आश्रमाकडे ते गेले.

शबरीचा त्यावेळेचा परमानंद काय वर्णन करावा ! आपण होऊनच राम आपल्या घरी आलेले दिसताच शबरीला मातंग मुनींचे आशीर्वचन आठवले व खूण पटल्याने हृदयात ती श्यामसुंदर मूर्ती तिने ओतप्रोत भरून ठेवली !

ती मूर्ती कशी होती ? कमळासारखे डोळे, गुढघ्यापर्यंत लांब हात, मस्तकावर जटांचा मुकुट बनवलेला,

स्याम गौर सुंदर दोउ भाई । सबरी परी चरन लपटाई ॥
प्रेम मगन मुख बचन न आवा । पुनि पुनि पद सरोज सिर नावा ॥
सादर जल लै चरन पखारे । पुनि सुंदर आसन बैठारे ॥

दो०—कंद मूल फल सुरस अति दिए राम कहुँ आनि ।
प्रेम सहित प्रभु खाए बारंबार बखानि ॥ ३४ ॥

चौ०—पानि जोरि आगें भइ ठाढ़ी । प्रभुहि बिलोकि प्रीति अति बाढ़ी ॥
केहि बिधि अस्तुति करौं तुम्हारी । अधम जाति मैं जड़मति भारी ॥
अधम ते अधम अधम अति नारी । तिन्ह महँ मैं मतिमंद अघारी ॥
कह रघुपति सुनु भामिनि बाता । मानउँ एक भगति कर नाता ॥
जाति पाँति कुल धर्म बड़ाई । धन बल परिजन गुन चतुराई ॥
भगति हीन नर सोहइ कैसा । बिनु जल बारिद देखिअ जैसा ॥
नवधा भगति कहउँ तोहि पाहीं । सावधान सुनु धरु मन माहीं ॥
प्रथम भगति संतन्ह कर संगा । दूसरि रति मम कथा प्रसंगा ॥

दो०—गुर पद पंकज सेवा तीसरि भगति अमान ।
चौथि भगति मम गुन गन करइ कपट तजि गान ॥ ३५ ॥

हृदयावर वनातील फुलांची माळा रुळत आहे अशा त्या श्याम व गौर दोन्ही सुंदर भावांच्या पायांना धावत जाऊन शबरीने मिठी घातली व त्यांना प्रणाम केला. त्यावेळी तिचे हृदय प्रेमातिशयाने इतके भरून आले की, तिच्या तोंडातून शब्दच बाहेर पडेना ! त्यामुळे मुखकडे ती पाहावे. हृदय उचंबळून येताच पुनः चरणकमलावर वंदनासाठी शिरकमल अर्पण करावे. असा तिचा क्रम काही वेळ चालू राहिला !

थोडा वेळ असा गेल्यावर पाणी घेऊन तिने त्यांचे पाय मोठ्या आदराने धुतले व मग दोघांनाही सुंदर आसनावर बसवले. अत्यंत सुरस अशी कंदमुळे, फळे तिने रामचंद्रास आणून दिली. ते दोघे त्यांची वारंवार वाखाणणी करत ती प्रेमाने खाऊ लागले. ३४

शबरीच्या आश्रमातील ते दृश्य किती गोड आहे ! लक्ष्मणासह श्रीरामचंद्र आसनावर बसले आहेत. शबरी हात जोडून पुढे उभी आहे. प्रभूच्या मुखकमलाचे निरीक्षण चालू असता तिच्या प्रेमसागराला सारखी भरती येत आहे ! अखेर तिच्या मुखातून शब्द उमटू लागले –

" हे स्वामी ! मी तुमची स्तुती करू तरी कशी ? जन्म अत्यंत अधम जातीत; आणि बुद्धी मठ्ठ ! अधमात अधम अशा ज्या स्त्रिया त्यातीलही मी अतिअधम आणि त्यात हे अघनाशना माझी बुद्धी अत्यंत मंद !

तिचे ते अत्यंत दैन्याचे भाषण ऐकून रघुपती द्रवले, तिला आश्वासन देण्यासाठी एक महत्त्वाचा सिद्धान्त व स्वतःचा स्वभाव सांगतात. " हे भामिनी ! सांगतो ते ऐक. मला एक भक्तीचेच नाते मान्य आहे. जात, पात, कुल, धर्म, मोठेपणा, धन, बल, परिवार, सद्गुण, चातुर्य इत्यादि सर्व असून, ज्याच्या ठिकाणी माझी भक्ती नाही तो मानव, पाण्यावाचून असलेल्या मेघाप्रमाणे पोकळ । व्यर्थ । असतो !

भगवान संतुष्ट होऊन शबरीला भक्तिरहस्य सांगतात;

" शबरी ! तुला नवविधाभक्ती सांगतो. ती लक्षपूर्वक ऐकून हृदयावर पक्की ठसवून ठेव. संतांची संगती ही पहिली व मुख्य भक्ती होय; माझ्या कथा एकाग्रतेने मन अतिशय दंग होऊ लागणे ही दुसरी भक्ती होय; अहंपणा व मानाची कल्पना सोडून श्रीगुरुचरणांची प्रेमभराने निरहंकार होऊन सेवा करणे ही तिसरी भक्ती; निष्कपट अंतःकरणाने माझ्या गुणांचे गायन करणे ही चौथी भक्ती. " ३५



चौ० — मंत्र जाप मम दृढ़ बिस्वासा । पंचम भजन सो बेद प्रकासा ॥
छठ दम सील बिरति बहु करमा । निरत निरंतर सज्जन धरमा ॥
सातवँ सम मोहि मय जग देखा । मोतें संत अधिक करि लेखा ॥
आठवँ जथालाभ संतोषा । सपनेहुँ नहि देखइ परदोषा ॥
नवम सरल सब सन छलहीना । मम भरोस हियँ हरष न दीना ॥
नव महुँ एकउ जिन्ह कें कोइ । नारि पुरुष सचराचर कोई ॥
सोइ अतिसय प्रिय भामिनि मोरें । सकल प्रकार भगति दृढ़ तोरें ॥
जोगि बृंद दुरलभ गति जोई । तो कहुँ आजु सुलभ भइ सोई ॥
मम दरसन फल परम अनूपा । जीव पाव निज सहज स्वरूपा ॥
जनकसुता कइ सुधि भामिनी । जानहि कहु करिबरगामिनी ॥
पंपा सरहि जाहु रघुराई । तहँ होइहि सुग्रीव मिताई ॥
सो सब कहिहि देव रघुबीरा । जानतहूँ पूछहु मतिधीरा ॥
बार बार प्रभु पद सिरु नाई । प्रेम सहित सब कथा सुनाई ॥

छं० — कहि कथा सकल बिलोकि हरि मुख हृदयँ पद पंकज धरे ।
तजि जोग पावक देह हरि पद लीन भइ जहँ नहिं फिरे ॥

त्यानंतर वेदांनी सांगितलेली उत्तम अशी पाचवी भक्ती म्हणजे दृढविश्वासाने माझ्या मंत्राचा जप करणे ही होय; शम-दम-शील असणे, हे कर, ते कर, असा कर्म करण्याचा अतिहव्यास नसणे, सज्जनांनी घालून दिलेल्या मार्गानेच श्रद्धायुक्त असे निरंतर आचरण, ही सहावी भक्ती; सर्व जगातील प्रत्येक पदार्थमात्रात सारख्याच स्वरूपात 'राम' पाहणे व संत-सद्‌गुरूंना माझ्यापेक्षा अधिक मान देणे, ही माझी सातवी भक्ती होय. जे आपल्या प्रारब्धानुसार प्राप्त होईल त्यांत संतोष मानणे व स्वप्नातसुद्धा दुसऱ्याच्या दोषाकडे लक्ष न जाणे, ही आठवी भक्ती; कोणीही असो आपले वागणे सरळ; त्यात लबाडी किंवा कपट याचा लवलेश नसणे; प्रत्येक घटनेत सर्व भार माझ्यावरच घालून अवलंबून राहणे व त्यानंतर जे जे प्राप्त होईल त्याचा, सुखदुःख न होता स्वीकार करण्याचे मनाला वळण लागणे, ही अखेरची नववी भक्ती होय.

" हे भामिनी ! या नऊ प्रकारच्या भक्तींपैकी एक जरी स्थिरावलेली असली तर स्त्री-पुरुष, चर वा अचर, कोणी का असेना, अशी व्यक्ती मला अत्यंत प्रिय होते. असे असता नऊही भक्ती दृढ असणारी अशी तू मला किती आवडत असशील, याचा विचार कर !!

" म्हणून, योगीलोकांनासुद्धा जी गति दुर्लभ आहे, तीच आज तुझ्या पायाशी चालून आली आहे; आणि माझ्या दर्शनाचे परम अनुपम फल हेच की, जीव आपले सहज सत्यस्वरूप पावतो ! " बरे, ते असो. हे भामिनी करिवरगामिनी ! जनकसुतेची तुला जी काही माहिती असेल ती आम्हाला सांग ना ! "

हे ऐकताच शबरी म्हणाली, " रघुराज ! आपण जर पंपा सरोवराला गेला तर आपली आणि सुग्रीवाची मैत्री होईल. हे देवाधिदेवा, रघुवीरा ! आपणाला जरुर ती सर्व माहिती तो सांगेल. हे मतिधीरा ! (शबरीच्या हृदयातील भक्तिभाव उचंबळून येऊ लागला.) आपण सर्व जाणत असता माझ्याकडे माहिती विचारता ! "

हे वाक्य अर्धवट असताच तिने अत्यंत सद्‌गदित होऊन प्रभुपदी आपले मस्तक पुनःपुन्हा ठेवले. आणि तिला [illegible] होती तेवढी सर्व कथा तिने श्रीरघुरायाला निवेदन केली.

शबरीची सर्व कथा संपली. हरिचरणकमले तिने आपल्या हृदयसिंहासनावर स्थापन केली. हरिमुखावर आपली दृष्टी निश्चल केली आणि त्या परमोच्च आनंदात तल्लीन असतानाच योगपावक (अग्नि) प्रकट करून

नर विविध कर्म अधर्म बहु मत सोकप्रद सब त्यागहू ।
बिस्वास करि कह दास तुलसी राम पद अनुरागहू ॥

दो० – जाति हीन अघ जन्म महि मुक्त कीन्हि असि नारि ।
महामंद मन सुख चहसि ऐसे प्रभुहि बिसारि ॥ ३६ ॥

चौ० – चले राम त्यागा बन सोऊ । अतुलित बल नर केहरि दोऊ ॥
बिरही इव प्रभु करत बिषादा । कहत कथा अनेक संबादा ॥
लछिमन देखु बिपिन कइ सोभा । देखत केहि कर मन नहिं छोभा ॥
नारि सहित सब खग मृग बृंदा । मानहुँ मोरि करत हहिं निंदा ॥
हमहिं देखि मृग निकर पराहीं । मृगीं कहहिं तुम्ह कहँ भय नाहीं ॥
तुम्ह आनंद करहु मृग जाए । कंचन मृग खोजन ए आए ॥
संग लाइ करिनी करि लेहीं । मानहुँ मोहि सिखावनु देहीं ॥
सास्त्र सुचिंतित पुनि पुनि देखिअ । भूप सुसेवित बस नहिं लेखिअ ॥
राखिअ नारि जदपि उर माहीं । जुबती सास्त्र नृपति बस नाहीं ॥
देखहु तात बसंत सुहावा । प्रिया हीन मोहि भय उपजावा ॥

प्रभुसन्मुख आहेत. तोपर्यंतच आपल्या देहाची रक्षा करून ठेवली. अशा प्रकारे ज्या स्थानी गेल्यानंतर पुनः परत यावे लागत नाही. त्याची प्राप्ती शबरीने करून घेतली.

या पावन शबरी-चरित्राने तुलसीदास रहित होऊन स्वतःच्या मनास म्हणतात. " हे नरा ! नानाप्रकारची कर्मे. अधर्म व अनेक मतमतांतरे सोडून आणि दृढ विश्वासाने श्रीरामचरणांचे प्रेम आपल्या हृदयात पक्के धर ! बा जड मना ! जातिहीन व पापांची जन्मभूमी अशी शबरीसारखी स्त्री असूनसुद्धा ज्या प्रभूने मुक्त केले केली त्याला विसरून. आणखी कोणत्या श्रेष्ठ सुखासाठी तू धडपडत आहेस ! " ३६

शबरीला मुक्ती देऊन श्रीरामचंद्र लक्ष्मणासह पुढे निघाले. ते गहन अरण्य त्या अतुलपराक्रमी दोघां नरसिंहांनी ओलांडले.

रस्त्याने चालत असता पत्नीच्या विरही पुरुषाप्रमाणे प्रभू पुनः शोक करू लागले व त्या शोकाला पूरक अशा अनेक कथा व संवाद सांगू लागले.

" लक्ष्मणा ! बघ तर खरी या अरण्याची शोभा ! इतके हे सृष्टिसौंदर्य पाहिल्यावर कोणाच्या मनात अस्थिरता उत्पन्न होणार नाही ! हे सर्व पशुपक्ष्यांचे समुदाय आपापल्या स्त्रीसह फिरत आहेत व जणू माझी निंदाच करत आहेत !

" ते पाहा हरिणांचे कळप मला पाहून कसे पळून सुटले ! आणि त्या हरिणी पाहा आपल्या प्रियकरांशी हितगुज करीत आहेत की. तुम्हाला मुळीच भय नाही. तुम्ही मृगयोनीत जन्मला असला तरी आता खूप आनंद लुटा ! ते पाहा नर असून सुवर्णमृगाच्या शोधात अरण्यात भटकत आहेत !

" ते पाहा. हत्ती आपल्या हत्तिणींना बरोबर घेत आहेत व जणू मला हा धडाच देत आहेत की. शास्त्राचे उत्तम अध्ययन केले असले तरी त्याचे पुनः पुन्हा मनन करावे. तसेच नृपतींना कितीही उत्तम सेवा केली तरी तो आपणाला वश झाला आहे असे मुळीच समजू नये, त्याचप्रमाणे आपल्या प्रियेला जरी हृदयातसुद्धा जपून ठेवा तरी पण जागरूक राहून तिचे रक्षण हे केलेच पाहिजे. याचे कारण स्त्री, शास्त्र व राजा हे कोणालाही कायमचे वश होत नाहीत !



दो० – बिरह बिकल बलहीन मोहि जानेसि निपट अकेल ।
सहित बिपिन मधुकर खग मदन कीन्ह बगमेल ।। ३७ (क) ।।

देखि गयउ भ्राता सहित तासु दूत सुनि बात ।
डेरा कीन्हेउ मनहुँ तब कटकु हटकि मनजात ।। ३७ (ख) ।।

चौ० – बिटप बिसाल लता अरुझानी । बिबिध बितान दिए जनु तानी ।।
कदलि ताल बर धुजा पताका । देखि न मोह धीर मन जाका ।।
बिबिध भाँति फूले तरु नाना । जनु बानैत बने बहु बाना ।।
कहुँ कहुँ सुंदर बिटप सुहाए । जनु भट बिलग बिलग होइ छाए ।।
कूजत पिक मानहुँ गज माते । ढेक महोख ऊँट बिसराते ।।
मोर चकोर कीर बर बाजी । पारावत मराल सब ताजी ।।
तीतिर लावक पदचर जूथा । बरनि न जाइ मनोज बरूथा ।।
रथ गिरि सिला दुंदुभीं झरना । चातक बंदी गुन गन बरना ।।
मधुकर मुखर भेरि सहनाई । त्रिबिध बयारि बसीठीं आई ।।
चतुरंगिनी सेन सँग लीन्हें । बिचरत सबहि चुनौती दीन्हें ।।

" तात लक्ष्मणा ! या सुंदर वसंताची ही शोभा किती रमणीय आहे ! पण मी प्रियाहीन असल्यामुळे तो मला मात्र भिववीत आहे ! मी विरहाने व्याकुळ, बलहीन आणि अगदीच एकटा आहे असे पाहून कानन, भ्रमर व पक्षी यांच्यासह मदन माझ्यावर चाल करून येत आहे ! " ३७ (क)

" पण मी एकटा नसून माझ्या बरोबर माझा भाऊ आहे हे दिसताच त्याचा दूत परत गेला आणि त्याने हे वृत्त आपल्या धन्याला– मदनाला– कळवले. मग ही महत्त्वाची बातमी ऐकताच जणू आपल्या सैन्याला थोपवून हे तात ! कामदेव तळ ठोकून बसला आहे ! ३७ (ख)

यानंतर कामदेवाच्या सैन्याच्या रूपकाने वसंत ऋतूचे वर्णन सुरू होते—

" लक्ष्मणा, पाहा तो सैन्याचा कसा तळ पडला आहे. विशाल वृक्षावर लता अशा पसरल्या आहेत की जणू नानाप्रकारचे तंबूच ताणले आहेत ! सुंदर केळी व ताडांची झाडे जणू उत्तम ध्वजपताकाच फडकवत आहेत. अशावेळी, जे धीर असतील त्यांचेच मन यांना पाहून मोहित होणार नाही.

" विविध जातीचे तरू, नाना प्रकारच्या फुलांनी बहरले आहेत. त्यांच्याकडे पाहिले म्हणजे वाटते, जणू वीरवेष धारण करून हे तिरंदाजच उभे आहेत ! कुठे कुठे खूप मोठे विशाल वृक्ष असे खुलून दिसत आहेत की, जणू हे महावीर सुटे सुटे उभे राहून आपापल्या सैन्यांचे रक्षण करीत आहेत.

" कोकिळांचे कूजन ऐकले म्हणजे वाटते जणू या मत्त हत्तींच्या गर्जनाच चालू आहेत. त्याचवेळी ढेंक व महोख पक्षी ओरडू लागले की वाटते, जणू उंट व खेचरे ओरडत आहेत ! मोर, चकोर पोपट हे या मदनसैन्यातील जणू श्रेष्ठ प्रकारचे घोडेच आहेत. त्यातल्या त्यांत कबूतरे, पारवे व हंस हे जणू अरबी घोडे (बाजी) आहेत.

" तित्तिर आणि लावा पक्ष्यांचे तांडे हे या सैन्यातील जणू पायदळाच्याच तुकड्या आहेत. खरोखर या कामदेवाच्या सैन्याचे कोण व किती वर्णन करणार ? पर्वतशिला हेच रथ आणि निर्झर हेच जणू त्यावरून वाजणारे नगारे आहेत ! चातक भाट हे जणू मदन राजाच्या गुणांचे सुस्वर गायन करीत आहेत.

" भ्रमरांचा गुंजारव जणू भेरी व सनया यांचे वादनाचे काम करत आहे; आणि मंद, सुगंध-शीतल असा वेळेवर वाहणारा वारा हा जणू विद्वान् वकील आहे ! अशा प्रकारे आपल्या चतुरंग सेनेसह मदन जणू सर्वांना आव्हान देतच या वेळी फिरत आहे.

लछिमन देखत काम अनीका । रहहिं धीर तिन्ह कै जग लीका ॥
एहि कें एक परम बल नारी । तेहि तें उबर सुभट सोइ भारी ॥

दो० — तात तीनि अति प्रबल खल काम क्रोध अरु लोभ ।
मुनि बिग्यान धाम मन करहिं निमिष महुँ छोभ ॥ ३८ (क) ॥

लोभ कें इच्छा दंभ बल काम कें केवल नारि ।
क्रोध कें परुष बचन बल मुनिबर कहहिं बिचारि ॥ ३८ (ख) ॥

चौ० — गुनातीत सचराचर स्वामी । राम उमा सब अंतरजामी ॥
कामिन्ह कै दीनता देखाई । धीरन्ह कें मन बिरति दृढ़ाई ॥
क्रोध मनोज लोभ मद माया । छूटहिं सकल राम कीं दाया ॥
सो नर इंद्रजाल नहिं भूला । जा पर होइ सो नट अनुकूला ॥
उमा कहउँ मैं अनुभव अपना । सत हरि भजनु जगत सब सपना ॥
पुनि प्रभु गए सरोबर तीरा । पंपा नाम सुभग गंभीरा ॥
संत हृदय जस निर्मल बारी । बाँधे घाट मनोहर चारी ॥
जहँ तहँ पिअहिं बिबिध मृग नीरा । जनु उदार गृह जाचक भीरा ॥

" लक्ष्मणा ! कामाची ही सेना पाहून ज्यांचे धैर्य टिकेल, त्यांनाच या जगात खरी किंमत आहे ! कामाचे मुख्य, परम बळ म्हणजे स्त्री होय. तिच्या तावडीतून शिताफीने सुटेल तोच खरा शूर, महावीर होय ! तात ! काम, क्रोध, आणि लोभ हे तिघे अत्यंत प्रबळ असे खल आहेत. यांचे इतके सामर्थ्य आहे की, अगदी विज्ञानाचे निवासस्थान बनलेल्या मुनींच्याही मनात हे एका निमिषात क्षोभ उत्पन्न करू शकतात. " ३८ क.

" इच्छा आणि दंभ हे लोभाचे सैन्य असून कामाचे सर्व मदार केवळ स्त्रीवर आहे आणि कठोर भाषण हे क्रोधाचे सैन्य आहे असे विचारवंत मुनिश्रेष्ठांचे मत आहे " ३८ ख

हे सर्व कामदेवाचे व त्यांच्या सैन्याचे वर्णन प्रभू करत असता त्यांच्या मनाचा ग्रहणावरून नजर चळण्याचा संभव असल्याने शंकर पार्वतीस सूचनात्मक सत्य-सिद्धान्त सांगतात.

" उमे ! राम हे खरोखर गुणातीत असून सर्व चराचरांचे स्वामी आहेत. सर्वांच्या हृदयात राहून ते सर्वज्ञ बनतात. यावेळी ते कामी लोकांची दीन दशा या हेतूने दाखवत आहेत की, तिचे मनन केल्याने धीर पुरुषांचे वैराग्य दृढ व्हावे ! काम, क्रोध, लोभ, मद, माया इत्यादि सर्व विकार श्रीरामाची दया होईल तेव्हाच सुटतात. पाहा की, ज्याच्यावर नट प्रसन्न असतो, तो मनुष्य इंद्रजालातील चमत्कार पाहून भुलत नाही. उमे ! लांब कशाला ? या बाबतीतील प्रत्यक्ष आमचाच अनुभव तुला सांगतो ! एक हरिभजन तेवढे त्रिकालाबाधित सत्य म्हणून उरते आणि त्या खेरीज उरलेला सर्व जगातील पसारा व व्यवहारांचा गोंधळ हे एक मिथ्या इंद्रजाल, मोठे स्वप्न आहे ! ! "

कामदेवाच्या सैन्याच्या स्वरूपाने सृष्टिसौंदर्याने सुपर्णी खाण बनलेल्या त्या वनराजीतून वरील प्रमाणे वर्णन करीत हे दोन वीर चालत चालत मनोहर व गंभीर अशा पंपा सरोवराच्या तीराला गेले.

ती सरोवराची शोभा पाहून दोन्ही भाऊ समाधान पावले. त्याचे पाणी पाहून त्यांना निर्मळ हृदयाची आठवण झाली. त्याला उत्तम प्रकारे बांधलेले चार सुंदर घाट त्यांना दिसले. जागजागी हरिणांचे कळप शांतपणे त्या अमृततुल्य पाण्याने आपली तहान शांत करत होते. जणू, कोणी त्याचा उदार दात्याच्या घरी याचकांचा

दो० – पुरइनि सघन ओट जल बेगि न पाइअ मर्म ।
मायाछन्न न देखिऐ जैसें निर्गुन ब्रह्म ॥ ३९ (क) ॥

सुखी मीन सब एक रस अति अगाध जल माहिं ।
जथा धर्मसीलन्ह के दिन सुख संजुत जाहिं ॥ ३९ (ख) ॥

चौ० – बिकसे सरसिज नाना रंगा । मधुर मुखर गुंजत बहु भृंगा ॥
बोलत जलकुक्कुट कलहंसा । प्रभु बिलोकि जनु करत प्रसंसा ॥
चक्रबाक बक खग समुदाई । देखत बनइ बरनि नहिं जाई ॥
सुंदर खग गन गिरा सुहाई । जात पथिक जनु लेत बोलाई ॥
ताल समीप मुनिन्ह गृह छाए । चहू दिसि कानन बिटप सुहाए ॥
चंपक बकुल कदंब तमाला । पाटल पनस परास रसाला ॥
नव पल्लव कुसुमित तरु नाना । चंचरीक पटली कर गाना ॥
सीतल मंद सुगंध सुभाऊ । संतत बहइ मनोहर बाऊ ॥
कुहू कुहू कोकिल धुनि करहीं । सुनि रव सरस ध्यान मुनि टरहीं ॥

दो० – फल भारन नमि बिटप सब रहे भूमि निअराइ ।
पर उपकारी पुरुष जिमि नवहिं सुसंपति पाइ ॥ ४० ॥

चौ० – देखि राम अति रुचिर तलावा । मज्जनु कीन्ह परम सुख पावा ॥

मेळावाच जमला आहे ! तलावातील पाणी निर्मळ, खरे पण ते घनदाट कमलिनीच्या जाळ्यातून त्याचे मर्म नजरेस येणे कठीण होते. नाहीतर मायेने झाकलेल्या निर्गुण ब्रह्माचे रहस्य असेच दृष्टिआड होत नाही का ? ३९ (क)

धर्मशीलांचे दिवस जसे अखंड सुखाने सजून संपतात, त्याचप्रमाणे पंपासरोवरातील अगाध जळात संचार करणाऱ्या माशांच्या सुखास केव्हाच कोणाची दृष्ट लागत नसे ! ३९ (ख)

असे ते मनोहर पंपा सरोवर हे दोघे दशरथनंदन निरखून पाहू लागले. त्यांना त्यात नानारंगांची कमळे फुललेली दिसली. त्या पूर्ण उमललेल्या कमलांवर मधुपांचे थवे, मृदू व मंजुळ गुंजारव करत असल्याचे त्यांच्या कानी आले, त्याचवेळी पाण-कोंबडे आणि कलहंस बोलत असलेले पाहून लक्ष्मणाला वाटले, प्रभुदर्शनाने संतुष्ट होऊन हे त्यांचे भक्त त्यांच्या चरणी आपली स्तुती सुमनांजलीच अर्पण करीत आहेत ! चक्रवाक, बगळे व अनेक प्रकारच्या इतर पक्ष्यांचे थवे पाहण्यातच मनुष्य इतका रंगून जातो की त्याचे वर्णन करणे अशक्य! याचे ही भान त्यावेळी त्याला राहात नाही ! त्या सुन्दर पक्ष्यांचे ते मधुर कूजन ऐकले म्हणजे वाटे हे त्या पंपा सरोवराने आपले हस्तक येणाऱ्या-जाणाऱ्या वाटसरूंना स्वागतार्थ निमंत्रण देण्यासाठीच ठेवले आहेत !

अशा त्या अनुपमेय पंपा सरोवराच्या काठावर साहजिकच अनेक मुनींनी आपले सुंदर आश्रम बनवले होते. व त्यांच्या सभोवार चारी दिशांना उत्तुंग वृक्ष जणू पहारेकऱ्याचेच अखंड काम निरलसपणे करत होते ! त्यात चंपक, बकुळ, कदंब, तमाल, पाडळी, फणस, पळस, आम्र इत्यादि नानातरूंना नवीन पालवी आहे. काहींना फुलानी आच्छादित केले असून, त्यांच्यावर भृगांच्या पंक्ती गुंजारव करीत आहेत त्यांच्याशीं कानगोष्टी करण्यासाठी त्रिविध पवन फेऱ्या करीत आहे. अशा त्या सृष्टिसौंदर्याने बहरलेल्या वृक्षराजीवर बसून ज्यावेळी कोकिळांचा कुहू–कुहू असा रसाळध्वनी ध्यानस्थ मुनींच्या कानावर येतो, तेव्हा त्यांना ध्यानरसाचा झटकन् विसर पडतो ! परोपकारी पुरुष नव भाग्य वैभवाच्या लाभाने जसे नम्र होतात, तसेच फळ-भाराने वृक्ष इतके नमले आहेत की जणू ते भूमिमातेस भेटण्यासच येत आहेत ! ४०

पंपा सरोवराचे ते सौंदर्य पाहून रामचंद्रानी त्यात जेव्हा स्नान केले. तेव्हा त्यांना परम सुख झाले. त्या

देखी सुंदर तरुवर छाया । बैठे अनुज सहित रघुराया ॥
तहँ पुनि सकल देव मुनि आए । अस्तुति करि निज धाम सिधाए ॥
बैठे परम प्रसन्न कृपाला । कहत अनुज सन कथा रसाला ॥
बिरहवंत भगवंतहि देखी । नारद मन भा सोच बिसेषी ॥
मोर साप करि अंगीकारा । सहत राम नाना दुख भारा ॥
ऐसे प्रभुहि बिलोकउँ जाई । पुनि न बनिहि अस अवसरु आई ॥
यह बिचारि नारद कर बीना । गए जहाँ प्रभु सुख आसीना ॥
गावत राम चरित मृदु बानी । प्रेम सहित बहु भाँति बखानी ॥
करत दंडवत लिए उठाई । राखे बहुत बार उर लाई ॥
स्वागत पूँछि निकट बैठारे । लछिमन सादर चरन पखारे ॥

दो० - नाना बिधि बिनती करि प्रभु प्रसन्न जियँ जानि ।
नारद बोले बचन तब जोरि सरोरुह पानि ॥ ४१ ॥

चौ० - सुनहु उदार सहज रघुनायक । सुंदर अगम सुगम बर दायक ॥
देहु एक बर मागउँ स्वामी । जद्यपि जानत अंतरजामी ॥
जानहु मुनि तुम्ह मोर सुभाऊ । जन सन कबहुँ कि करउँ दुराऊ ॥

नंतर त्यांनी एक उत्कृष्ट वडाचे झाड पाहिले आणि त्याच्या सुंदर शीतळ छायेत अनुज लक्ष्मणासह ते बसले.

अशा प्रकारे एकांत, शांत, प्रशांत अशा मनोहर ठिकाणी लक्ष्मणासह रघुवीर विश्रांती घेण्यासाठी बसलेले पाहताच, सर्व देव व मुनी पुन्हा तेथे आले. त्यांनी स्वतंत्रपणे श्रीरामांची स्तुती करून स्वतःच्या लोकांस गेले.

कृपाळु श्रीरामचंद्र परम प्रसन्न होऊन त्या ठिकाणी ते आपल्या अनुजाला भक्तांच्या व भक्ति विषयक रसाळ कथा सांगू लागले. या नंतर " प्रभु-नारद संवाद " प्रकरण सुरू होईल.

आपण मायेच्या प्रभावाने नाडून भगवंताला भयंकर शाप दिला व दयासागराने ते जसेच्या तसे स्वीकारून त्याप्रमाणे आता विरहवेदनांचे दुःख ते भोगत असलेले दिसत आहे. हे पाहून नारदांचे मन अत्यंत शोकाकुल झाले. त्यांना वाटले, माझ्या शापाचा अंगीकार करून श्रीरामचंद्र हे दुःखाने असा पुष्कळ ताप सोशीत आहेत. अशा विरहवंत स्थितीत प्रभूला पाहण्याची संधी पुन्हा मिळणे अशक्य. म्हणून एकदा प्रत्यक्ष जाऊन पाहणे जरूर.

हा विचार मनात येताच लगेच हाती वीणा घेऊन रामांचे रामचरित्र गायन व त्यांचे प्रेमभराने वर्णन करत ज्या ठिकाणी प्रभू लक्ष्मणासह वडाच्या पारावर होते, त्या सरोवराच्या काठी बसले होते, तेथे स्वारी येऊन दाखल झाली.

दंडवत करीत असताच प्रभूंनी नारदास उचलून घेतले व पुष्कळ वेळ आपल्या हृदयाशी कवटाळले. नंतर स्वागत केले. कुशल प्रश्न विचारले आणि आपल्या जवळ बसवून घेतले.

त्यानंतर लक्ष्मणाने आदरपूर्वक त्यांचे पाय धुतले. नारदांनी नानाप्रकारांनी प्रभूंची प्रार्थना केली. व प्रभू प्रसन्न आहेत, हे त्यांनी मनात आणले हस्तकमळ जोडून नारद बोलू लागले. ४१

" सहज उदार रघुनायका ! हे पहा की, आपण आपल्या भक्तांना अगम असणारा, पण तुम्हाला सुगम व आपल्या हृदयास द्रव उत्पन्न करील, असा वर आपण देणार असल्याने मी आपणाकडे एक वर आज मागणार आहे. हे स्वामी ! आपण अंतर्यामी असल्याने सर्व जाणतच आहात. "

यावेळी नारदाच्या अंतःकरणाच्या तळमळीची श्रीरामचंद्रांना पूर्ण जाणीव असल्याने ते म्हणाले. " मुनी ! माझा स्वभाव तुम्हाला ठाऊकच आहे. भक्तांपासून कधी काही लपवून ठेवतो का ? अशी कोणती माझी प्रिय

कवन बस्तु असि प्रिय मोहि लागी । जो मुनिबर न सकहु तुम्ह मागी ।।
जन कहुँ कछु अदेय नहिं मोरें । अस बिस्वास तजहु जनि भोरें ।।
तब नारद बोले हरषाई । अस बर मागउँ करउँ ढिठाई ।।
जद्यपि प्रभु के नाम अनेका । श्रुति कह अधिक एक तें एका ।।
राम सकल नामन्ह ते अधिका । होउ नाथु अघ खग गन बधिका ।।

दो० – राका रजनी भगति तव राम नाम सोइ सोम ।
पर नाम उडगन बिमल बसहुँ भगत उरब्योम ।। ४२ (क) ।।

एवमस्तु मुनि सन कहेउ कृपासिंधु रघुनाथ ।
तब नारद मन हरष अति प्रभु पद नायउ माथ ।। ४२ (ख) ।।

चौ० – अति प्रसन्न रघुनाथहि जानी । पुनि नारद बोले मृदु बानी ।।
राम जबहिं प्रेरेउ निज माया । मोहेहु मोहि सुनहु रघुराया ।।
तब बिबाह मैं चाहउँ कीन्हा । प्रभु केहि कारन करै न दीन्हा ।।
सुनु मुनि तोहि कहउँ सहरोसा । भजहिं जे मोहि तजि सकल भरोसा ।।
करउँ सदा तिन्ह कै रखवारी । जिमि बालक राखइ महतारी ।।
गह सिसु बच्छ अनल अहि धाई । तहँ राखइ जननी अरगाई ।।
प्रौढ़ भएँ तेहि सुत पर माता । प्रीति करइ नहिं पाछिलि बाता ।।

वस्तू आहे की, नारदा तुम्ही ती मागू शकत नाही ? दासांना न देण्यासारखे:(अदेय) माझे काहीच नाहीं, हा विश्वास केव्हाही सोडू नका. ”

इतके आश्वासन मिळाल्यावर नारदांना मोठा हर्ष झाला. आपले मनोगत लगेच त्यांनी बोलून दाखवले. “ मग उद्धटपणा करून एक वर मागतोच. तर एकाहून एक श्रेष्ठ अशी प्रभूची अनेक नामे श्रुतींनी जरी सांगितली असली तर नाथ ! आपले ‘ राम ’ हे एकच नाव सर्वांत श्रेष्ठ होवो. पापरूपी पक्षिसमूहाचा नाश करण्यात इतर नामांपेक्षा त्यात अधिक सामर्थ्य असावे. आपली भक्ती ही पौर्णिमेची रात्र अशी मानल्यास त्यातील पूर्णचंद्र-रामनाम ठरून इतर सर्व विमल नावे निर्मल नक्षत्रांच्या समुदायाप्रमाणे व्हावीत असले हे धवल चांदणे भक्ताच्या हृदयाकाशात अखंड प्रकाशमान होवो. ” ४२ (क)

हे ऐकून कृपासिंधू रघुनाथ, ‘ असेच होवो, ’ ‘एवमस्तु’ असे म्हणाले तेव्हा नारदाना केवढा संतोष झाला. त्यांनी त्याच निरतिशयानंद भावनेने ओथंबलेल्या अंतःकरणाने प्रभूच्या पायावर आपले मस्तक नमवले. ४२ (ख)

अगदी मन मोकळेपणाने बोलण्यास ही वेळ चांगली आहे. आज प्रभू फारच प्रसन्न आहेत असे पाहून नारद पुन्हा मधुर वाणीने म्हणाले, “ राम ! (तेच नाव ! लगेच उपयोग !) जेव्हा आपल्या मायेला प्रेरून मला मोहित केलत, तेव्हा प्रभो रघुराया ! मला लग्न करण्याची इच्छा झाली होती, मग आपण कोणत्या कारणास्तव मला लग्न करू दिले नाही ? ”

ही मळमळ एकदा पूर्णपणे शमवलीच पाहिजे हे जाणून भगवान म्हणाले, “ मुनी ऐक. माझ्या ठिकाणी राग मुळीच नाही. मी पूर्ण समाधानाने आता सर्व खुलासा करतो. हे ताता ! आई मुलाला जपते त्याप्रमाणे सर्व भरवसा सोडून जो मला भजतो, अशा भक्ताचे संरक्षण मी सतत करतो. लहान बालक अग्नी किंवा साप धरण्यास धावू लागले, म्हणजे त्याची माता त्याला न कळत जसे त्याचे हळूच निवारण करते, तसेच मी अशा प्रसंगी वागतो.

“ पण तेच बाळ मोठे झाल्यावर त्याच्या आईचे त्याच्यावर प्रेम असतेच; नाही असे नाही, पण आता

मोर प्रौढ़ तनय सम ग्यानी । बालक सुत सम दास अमानी ॥
जनहि मोर बल निज बल ताही । दुहु कहँ काम क्रोध रिपु आही ॥
यह बिचारि पंडित मोहि भजहीं । पाएहुँ ग्यान भगति नहिं तजहीं ॥

दो० – काम क्रोध लोभादि मद प्रबल मोह कै धारि ।
तिन्ह महँ अति दारुन दुखद मायारूपी नारि ॥ ४३ ॥

चौ० – सुनु मुनि कह पुरान श्रुति संता । मोह बिपिन कहुँ नारि बसंता ॥
जप तप नेम जलाश्रय झारी । होइ ग्रीषम सोषइ सब नारी ॥
काम क्रोध मद मत्सर भेका । इन्हहि हरषप्रद बरषा एका ॥
दुर्बासना कुमुद समुदाई । तिन्ह कहँ सरद सदा सुखदाई ॥
धर्म सकल सरसीरुह बृंदा । होइ हिम तिन्हहि दहइ सुख मंदा ॥
पुनि ममता जवास बहुताई । पलुहइ नारि सिसिर रितु पाई ॥
पाप उलूक निकर सुखकारी । नारि निबिड़ रजनी अँधिआरी ॥
बुधि बल सील सत्य सब मीना । बनसी सम त्रिय कहहिं प्रबीना ॥

दो० – अवगुन मूल सूलप्रद प्रमदा सब दुख खानि ।
तातें कीन्ह निवारन मुनि मैं यह जियँ जानि ॥ ४४ ॥

चौ० – सुनि रघुपति के बचन सुहाए । मुनि तन पुलक नयन भरि आए ॥

ते पूर्वीसारखे असत नाही ! ज्ञानी मला प्रौढ मुलासारखे वाटतात व ते अहंपणा सोडून सेवक बनतात, लहान अजाण बालकावरील आईच्या वात्सल्याप्रमाणे त्यांच्यावर माझे प्रेम असते. ज्ञान्याला व बालकसम भक्ताला काम, क्रोध इत्यादि शत्रूसारखेच असतात. तथापि ज्ञानी प्रौढ तनयाप्रमाणे असल्यामुळे शत्रूवर विजय मिळ-वण्यास त्यांना स्वतःच्याच बळावर झगडावे लागते. याच्या उलट या शत्रूपासून भक्तांचे संरक्षण करण्यास आई-प्रमाणे मी त्यांना सतत सामर्थ्य पुरवतो हे जाणून स्वतःचे हित जाणण्याची ज्यांना बरोबर जाणीव असते, असे खरे पंडित मला भजतात व ज्ञानलाभ झाल्यानंतरसुद्धा भक्तीचा त्याग करीत नाहीत.

" काम, क्रोध, लोभ व मद आदिकरून मोहाची अत्यंत बलवती अशी सेना आहे. पण त्या सर्व सैन्यात अत्यंत भयंकर व दुःखदायक अशी नारीरूपाने असलेली माया आहे. " ४३

हे मुनी ! ऐक. पुराणे, वेद आणि संत म्हणतात की, मोहरूपी वनातील नारी ही वसंत ऋतूप्रमाणे आहे. त्या वनातील जप, तप व नेम आदि पुष्कळ मोटे जलाशय आहेत. परंतु नारी ही ग्रीष्म ऋतू बनून त्या सर्वांना शुष्क करून टाकते ! काम, क्रोध, मद व मत्सर इत्यादि बेडकांना हर्ष देणारा वर्षाऋतू म्हणजे एकटी नारी आहे. दुष्टवासनारूपी रात्रविकासी कमळांचे जे ताटवे आहेत, त्यांना सदा खुलविणारी स्त्री शरद् ऋतू आहे. '

" सर्व प्रकारचे धर्मांचे आचार हे सूर्य-विकासिनी कमळांचे समुदाय आहेत, परंतु अधम सौख्य देणारी स्त्री, ही हेमंत ऋतुरूप होऊन त्यांना जाळून टाकते. असा हा नारीरूपी शिशिर ऋतू सर्वत्र वावरू लागला की, ममतारूपी काटेधमासांची झुडपे सर्वत्र नवीन पालवीने हिरवळतात. पापरूपी घुबडांच्या समूहाना सुखकारक अशी निबिड अंधारी रात्र म्हणजे स्त्रीच होय ! बुद्धी, बल, शील, सत्य इत्यादि माशांना गळासारखी होऊन स्त्री अतिवेगाने ओढून घेते असे प्रवीण सांगतात.

" अवगुणांची मुळी, यातना भोगावयास लावणारी आणि अत्यंत दुःखाची जणू खाणच अशी प्रमदा सुंदर तरुण स्त्री) आहे. नारदा ! हे अंतःकरणात जाणून मी तुमचे त्यापासून निवारण केले. " ४४

रघुपतीचे सुंदर भाषण ऐकून नारदमुनींचे शरीर रोमांचित झाले आणि डोळे अश्रूंनी भरून आले, कोणत्या

कहहु कवन प्रभु कै असि रीती । सेवक पर ममता अरु प्रीती ॥
जे न भजहिं अस प्रभु भ्रम त्यागी । ग्यान रंक नर मंद अभागी ॥
पुनि सादर बोले मुनि नारद । सुनहु राम बिग्यान बिसारद ॥
संतन्ह के लच्छन रघुबीरा । कहहु नाथ भव भंजन भीरा ॥
सुनु मुनि संतन्ह के गुन कहउँ । जिन्ह ते मैं उन्ह कें बस रहउँ ॥
षट बिकार जित अनघ अकामा । अचल अकिंचन सुचि सुखधामा ॥
अमित बोध अनीह मितभोगी । सत्यसार कबि कोबिद जोगी ॥
सावधान मानद मदहीना । धीर धर्म गति परम प्रबीना ॥
दो० – गुनागार संसार दुख रहित बिगत संदेह ।
तजि मम चरन सरोज प्रिय तिन्ह कहुँ देह न गेह ॥ ४५ ॥

चौ० – निज गुन श्रवन सुनत सकुचाहीं । पर गुन सुनत अधिक हरषाहीं ॥
सम सीतल नहिं त्यागहिं नीति । सरल सुभाउ सबहि सन प्रीती ॥
जप तप ब्रत दम संजम नेमा । गुरु गोबिंद बिप्र पद प्रेमा ॥
श्रद्धा छमा मयत्री दाया । मुदिता मम पद प्रीति अमाया ॥
बिरति बिबेक बिनय बिग्याना । बोध जथारथ बेद पुराना ॥
दंभ मान मद करहिं न काऊ । भूलि न देहिं कुमारग पाऊ ॥

स्वामीची अशी रीत आहे व कोणत्या धन्याची आपल्या सेवकावर अशी प्रीती आहे ते सांगा पाहू ? मग भ्रम सोडून अशा प्रभूचे जे भजन करीत नाहीत. त्यांना ज्ञानरंक, मूढ मती व अभागीच म्हणणे भाग आहे ! !

अत्यंत कृतज्ञतेने नारदांनी पुनः प्रार्थना केली. " हे विज्ञानविशारद राम ! भवभीतिभंजना रघुवीरा ! अनाथांच्या नाथा ! मला एकवेळ संतांची लक्षणे आपल्या मुखाने ऐकावयाची इच्छा आहे ! "

नारदावर आज भगवान पूर्ण संतुष्ट असल्याने त्यांनी लगेच संतांची लक्षणे सांगितली. " मुने ! ज्या सद्‌गुणांच्यामुळे मी संतांचा अखंड अंकित बनतो ती त्यांची लक्षणे सांगतो ऐक ! संतांनी कामक्रोधादि षड्‌विकार जिंकलेले असून ते निष्पाप, अकाम, अचल, अंकिचन, अन्तर्बाह्य पवित्र व सुखाचे निवासस्थान बनतात. त्यांचे ज्ञान अपरिमित असून त्यांच्या सर्व इच्छा नष्ट झालेल्या असतात. अत्यंत आवश्यक तेवढेच विषयांचे भोग ते भोगतात; सत्य हे सार समजणारे कवी विद्वान व योगी असे असतात. स्वतः सावध राहतात व दुसऱ्यास मान देतात. निगर्वी धैर्यवाद, धर्मज्ञ असे की धर्माचरणात ते परम निपुण असतात. सद्‌गुणांचे माहेरघर, संसार दुःख रहित त्याचे हृदय सदोदित संशयरहित असल्याने माझ्या चरणकमलांवाचून त्याना इतर देह, गेह इत्यादि काहीच प्रिय वाटत नाही. " ४५

" स्वतःची स्तुती सुरू होताच त्याना संकोच वाटतो, पण दुसऱ्याच्या गुणगायनाच्या वेळी त्यांना मोठा हर्ष होतो. चित्तात सर्वत्र समभावना ठेवल्याने त्यांची शांती अढळ राहते. नीतीचा चुकूनसुद्धा त्याच्याकडून त्याग होत नाही. स्वभावतः सरळ राहून सर्वांवर प्रेम करतात. व्रत, जप, तप, इंद्रिय निग्रह मनोनिग्रह आणि निमम यांचे पालन ते निष्ठेने करतात. इतके करूनही सद्‌गुरु गोविंद (परमात्मा) व विप्र यांच्या चरणी त्यांचे निःसीम प्रेम असते. बळकट श्रद्धा, दया, क्षमा मैत्री, मुदिता हे गुण अंगी असून माझ्या (रघुपतीच्या) चरणी अकृत्रिम व सहज प्रेम असते.

" त्याचप्रमाणे, वैराग्य, विवेक, विनय आणि विज्ञानसंपन्न असून, वेद पुराणातील रहस्य ते उत्तम प्रकारे जाणतात. दंभ, घमेंड, मस्ती, हे विकार त्यांच्याठिकाणी केव्हाच उमटत नाहीत; आणि चुकूनसुद्धा त्यांचे पाऊल अनीतीच्या रस्त्यावर पडत नाही. माझ्या लीला सदोदित गाण्याचे व ऐकण्याचे त्यांना परम व्यसन लागते; आणि स्वार्थ निरपेक्ष राहून शत्रूचेसुद्धा हित करण्यासाठी सदैव कमर कसून तयार राहतात. नारदा !

गावहिं सुनहिं सदा मम लीला। हेतु रहित परहित रत सीला॥
मुनि सुनु साधुन्ह के गुन जेते। कहि न सकहिं सारद श्रुति तेते॥

छं० — कहि सक न सारद सेष नारद सुनत पद पंकज गहे।
अस दीनबंधु कृपाल अपने भगत गुन निज मुख कहे॥
सिरु नाइ बारहिं बार चरनन्हि ब्रह्मपुर नारद गए।
ते धन्य तुलसीदास आस बिहाइ जे हरि रँग रँए॥

दो० — रावनारि जसु पावन गावहिं सुनहिं जे लोग।
राम भगति दृढ़ पावहिं बिनु बिराग जप जोग॥ ४६ (क)॥
दीप सिखा सम जुबति तन मन जनि होसि पतंग।
भजहि राम तजि काम मद करहि सदा सतसंग॥ ४६ (ख)॥

मासपारायण, बाइसवाँ विश्राम

इति श्रीमद्रामचरितमानसे सकलकलिकलुषविध्वंसने तृतीयः सोपानः समाप्तः।

॥ अरण्यकांड समाप्त ॥

संतांच्या गुणांचे वर्णन कोठवर करावे? त्यांच्या अनंत गुणांचे वर्णन शारदा व अनंत [illegible] यांनाही करता येणे अशक्य आहे!"

हे ऐकताच नारदांनी पुन्हा प्रभूंचे चरण धरले. किती रघुनाथ किती दीनबंधु आणि कृपाळू! त्यांनी आपल्या मुखाने स्वभक्तांचे गुणवर्णन स्वतः कथन केले!

असे मनात म्हणत नारदांनी प्रभूंच्या चरणांवर पुनःपुन्हा मस्तक नमवले व मोठ्या समाधानाने ब्रह्मलोकाचा रस्ता धरला!

'सर्व आशा सोडून जे [illegible] हरिरंगात रंगले तेच खरे धन्य होत!' असा निर्णय शेवटी गोस्वामींनी दिला. 'रावणारि [illegible] असे हे पावन यश जे लोक ऐकतात व गातात ते जप, योग, वैराग्य यांच्याखेरीजच दृढ रामभक्ती मिळवतात. ४६ (क)

परंतु हे मना! [illegible] अकर्षित होऊन मरू मात्र नको. त्यासाठी काम व मद यांचा त्याग कर, रामभजन सतत कर व अखंड संतांची संगती जोड! ४६ (ख)

याप्रमाणे कलियुगातील सर्व पातकांचा विध्वंस करणाऱ्या [illegible] मानसातील तृतीय सोपान संपला.

॥ अरण्यकांड समाप्त ॥

॥ श्री रामचंद्राच्या चरणी सर्व अर्पण ॥





प्रभू रामचंद्रांनी आपल्याजवळची मुद्रिका हनुमंताच्या स्वाधीन केली.

॥ श्रीगणेशाय नमः ॥

॥ श्रीराम समर्थ ॥

किष्किंधाकांड

चतुर्थ सोपान

स्तोत्र

कुन्देन्दीवरसुन्दरावतिबलौ विज्ञानधामावुभौ
शोभाढ्यौ वरधन्विनौ श्रुतिनुतौ गोविप्रवृन्दप्रियौ ।
मायामानुषरूपिणौ रघुवरौ सद्धर्मवर्मौ हितौ
सीतान्वेषणतत्परौ पथिगतौ भक्तिप्रदौ तौ हि नः ॥ १ ॥
ब्रह्माम्भोधिसमुद्भवं कलिमलप्रध्वंसनं चाव्ययं
श्रीमच्छम्भुमुखेन्दुसुन्दरवरे संशोभितं सर्वदा ।
संसारामयभेषजं सुखकरं श्रीजानकीजीवनं
धन्यास्ते कृतिनः पिबन्ति सततं श्रीरामनामामृतम् ॥ २ ॥

अनुवादककृत मंगलाचरण

वैदेहीचा शोध करीत असता प्रत्येक झाडाला आणि हरिणीला जानकी मानणारे, त्यांना गाढ आलिंगन देऊन, या मिषाने त्यांना दुर्लभ सद्गती देतात, आपल्या शोकाच्या प्रलापांनी, आत्महिताच्या मार्गाने जाणाऱ्यांना कामरूपाच्या (स्त्रीच्या) विषयी वैराग्य देतात, ते कामान्धाचे जन्ममृत्युभयदायक चरित्र (लीला) करून दाखवणारे राम, आमचे रक्षण करोत. १

महाभयाचे निवारण करणारे, कलियुगातील पापांच्या प्रवाहांना साफ जाळून टाकणारे (पूर्ण आटवणारे), त्रिविध तापरूपी कुमुदांना सूर्याच्या तापासारखे (तापदायक), हरिचरणकमलांचे उत्तम दर्शन करविणारे, भ्रमादिक अंधार नाहीसा करणारे, आत्मसुखरूपी प्रकाश देण्यात भास्करासारखे, आणि कामदेवाच्या शत्रूस (शंकरास) सुख देणारे रामनाम, हे मनुजा ! स्मरण कर. २

मूळ मंगलाचरण

कुंदाची फुले व नीलकमल याप्रमाणे सुन्दर, अतिबलवान, विज्ञानाचे धाम, शोभासंपन्न, श्रेष्ठ धनुर्धर, वेदांनी स्तुती केलेले, गायी व ब्राह्मण समुदाय ज्यांना प्रिय आहेत, मायेने मनुष्यरूप धारण केलेले, रघुकुलात श्रेष्ठ, सद्धर्माचे चिलखत (संरक्षक), सर्वांचे हितकर्ते, सीतेच्या शोध करण्यात गुंतलेले, मार्गस्थ असलेले ते दोघे रघुवर, आम्हाला भक्तिप्रदान करणारे आहेत हे निश्चित ! १

[रामायणरूपी सागराचा समुद्भव उत्पत्ती ज्याच्यापासून झाला, (ब्रह्म-वेद-रामायण) वेदरूपी सागराच्या मंथनातून उत्पत्ती झाली, ते कलिमलाचा विध्वंस करणारे, अविनाशी, श्रीमान शंभूच्या अतिसुन्दर व श्रेष्ठ मुखचंद्रात सर्वदा शोभायमान असलेले, भवरोगाचे औषध, सुखकारक आणि श्रीजानकीचे जीवन असणारे, श्रीरामनामरूपी अमृत जे सतत प्राशन करतात, ते बुद्धिमान लोक धन्य होत !] २

[किष्किंधाकांड हे सर्व रामायणाचे जसे हृदय आहे. याची सविस्तर माहिती गूढार्थ चंद्रिका टीकेत रहस्यासारखी आहे. अशा या काण्डाच्या प्रारंभी श्री गोस्वामी काशीक्षेत्राची महती गातात.]

सो ०–मुक्ति जन्म महि जानि ग्यान खानि अघ हानि कर ।
जहँ बस संभु भवानि सो कासी सेइअ कस न ।।
जरत सकल सुर बृंद विषम गरल जेहिं पान किय ।
तेहि न भजसि मन मंद को कृपाल संकर सरिस ।।

चौ० –आगें चले बहुरि रघुराया । रिष्यमूक पर्बत निअराया ।।
तहँ रह सचिव सहित सुग्रीवा । आवत देखि अतुल बल सींवा ।।
अति सभीत कह सुनु हनुमाना । पुरुष जुगल बल रूप निधाना ।।
धरि बटु रूप देखु तैं जाई । कहेसु जानि जियँ सयन बुझाई ।।
पठए बालि होहिं मन मैला । भागौं तुरत तजौं यह सैला ।।
बिप्र रूप धरि कपि तहँ गयऊ । माथ नाइ पूछत अस भयऊ ।।
को तुम्ह स्यामल गौर सरीरा । छत्री रूप फिरहु बन बीरा ।।
कठिन भूमि कोमल पद गामी । कवन हेतु बिचरहु बन स्वामी ।।
मृदुल मनोहर सुंदर गाता । सहत दुसह बन आतप बाता ।।
की तुम्ह तीनि देव महँ कोऊ । नर नारायन की तुम्ह दोऊ ।।

दो० –जग कारन तारन भव भंजन धरनी भार ।
की तुम्ह अखिल भुवन पति लीन्ह मनुज अवतार ।। १ ।।

पापांचा विनाश करणारी, ज्ञानाची खाण व मुक्तीची जन्मभूमीच आहे. जेथे प्रत्यक्ष उमाशंभू निवास करतात अशी काशी आहे हे कळूनसुद्धा ती निवास करण्यास योग्य कशी ठरत नाही ?

सगळा देवांचा समुदाय जळून जात असता, ज्यांनी हालाहल प्राशन केले, त्यांना हे मंद मना ! तू कां भजत नाहीस ? शंकरासारखा शीघ्र कृपाळू कोण आहे ?

असो. याप्रमाणे मंगलाचरण व तदनुषंगिक वर्णन संपल्यानंतर आता रामायणाचे कथासूत्र सुरू होते. श्रीरामचंद्रांचा पंपा सरोवराच्या काठी नारदाशी अत्यंत गोड, गोड असा सुखसंवाद झाल्यानंतर तेथून ती बंधूंची जोडी उठली आणि वनातून पुढे चालत चालत ऋष्यमूक नावाच्या पर्वताजवळ पोचली.

या पर्वतावर आपल्या मंत्रिमंडळासह सुग्रीव राहात होता. अतुल्य सामर्थ्याची सीमाच असलेले दोन पुरुष आपल्याच पर्वताकडे येत असल्याचे पाहून तो भयभीत झाला व हनुमंतास म्हणतो, " हनुमंता ! ऐक. बल व रूप यांचे सागर असलेले ते दोन पुरुष जवळ जाऊन पाहा. बाबा ! तू बटू ब्रह्मचारी रूपाने त्यांची माहिती घे. त्यांच्या मनातील हेतू ध्यानी घेऊन मला खुणेने कळव. मलिन मनाच्या वालीने त्यांना पाठविले असेल व त्यांचेही तसेच मलिन मन असेल तर तशी खूण कर म्हणजे मी हा पर्वत सोडून झटकन् दुसरीकडे पळून जाईन.

मारुतीने आपल्या मालकाच्या इच्छेप्रमाणे बटुरूप घेतले. श्रीरामचंद्रांच्या जवळ येऊन आपले मस्तक नमवले व म्हणतो, " अत्यंत सुन्दर अशा श्याम व गौर शरीराचे असे तुम्ही कोण आहांत ? तुमच्याकडे पाहिले म्हणजे तुम्ही क्षत्रिय राजकुमार असल्याचे कळून येते, पण मग तुम्ही वनात का हिंडत आहात हे मात्र ध्यानी येत नाही ? स्वामी ! ही भूमी कठीण आहे आणि आपण अतिसुकुमार असून, पायीच चालत आहात; असे आपण कोणत्या हेतूने वनात फिरत आहात ? जरी आपले देह अगदी कोमल, मनोहर व सुंदर आहेत, तरी वनातील दुःसह ऊन व वारा मात्र आपण सहन करीत आहात हे कसे ?

" मला तर वाटते तुम्ही तीन देवांपैकी कोणीतरी आहात ! की, तुम्ही दोघे नर आणि नारायण आहात ? की, जगाचे मूळ कारण भवसागरातून जीवांना तारणारे, सकल भुवनांचे स्वामी असून पृथ्वीचा भार नाहीसा करण्यासाठी मनुज अवतार घेतलेले आहात ? " १

चौ० – कोसलेस दसरथ के जाए । हम पितु बचन मानि बन आए ॥
नाम राम लछिमन दोउ भाई । संग नारि सुकुमारि सुहाई ॥
इहाँ हरी निसिचर बैदेही । बिप्र फिरहिं हम खोजत तेही ॥
आपन चरित कहा हम गाई । कहहु बिप्र निज कथा बुझाई ॥
प्रभु पहिचानि परेउ गहि चरना । सो सुख उमा जाइ नहिं बरना ॥
पुलकित तन मुख आव न बचना । देखत रुचिर बेष कै रचना ॥
पुनि धीरजु धरि अस्तुति कीन्ही । हरष हृदयँ निज नाथहि चीन्ही ॥
मोर न्याउ मैं पूछा साईं । तुम्ह पूछहु कस नर की नाईं ॥
तव माया बस फिरउँ भुलाना । ता ते मैं नहिं प्रभु पहिचाना ॥

दो० – एकु मैं मंद मोहबस कुटिल हृदय अग्यान ।
पुनि प्रभु मोहि बिसारेउ दीनबंधु भगवान ॥ २ ॥

चौ० – जदपि नाथ बहु अवगुन मोरें । सेवक प्रभुहि परै जनि भोरें ॥
नाथ जीव तव मायाँ मोहा । सो निस्तरइ तुम्हारेहिं छोहा ॥
ता पर मैं रघुबीर दोहाई । जानउँ नहिं कछु भजन उपाई ॥
सेवक सुत पति मातु भरोसें । रहइ असोच बनइ प्रभु पोसें ॥

हनुमंताचे हे अनोळखी [illegible] ऐकून [illegible] म्हणाले, "आम्ही कोसलाधीश दशरथ महाराजांचे पुत्र [illegible] वनात आलो. आमची दोघे [illegible] आम्ही [illegible] व फार सुंदर अशी [illegible]. म्हणून अहो विप्र ! [illegible]."

"[illegible] श्रीरामचंद्रांनी [illegible] हनुमंताला [illegible] वेळ ! [illegible]

[illegible] कोणाला वर्णन करता [illegible] हनुमंताचे [illegible] वीर [illegible] केवढा हर्ष झाला !

[illegible] हनुमंताने [illegible] "स्वामी ! [illegible] अनेक प्रश्न विचारले [illegible] आम्ही [illegible] झाल्याने [illegible] अनोळख माझी बुद्धी [illegible] वर माझे अज्ञान ! [illegible]"

"नाथ ! [illegible] प्रभूंनी कधी [illegible] नाथ ! तुमच्या [illegible] जीव [illegible] शकतो.

"त्यांत हे रघुवीर ! [illegible] सेवक आपल्या स्वामींच्या व [illegible] करणे प्रभूला भागच पडते."



अस कहि परेउ चरन अकुलाई। निज तनु प्रगटि प्रीति उर छाई॥
तब रघुपति उठाइ उर लावा। निज लोचन जल सींचि जुड़ावा॥
सुनु कपि जियँ मानसि जनि ऊना। तैं मम प्रिय लछिमन ते दूना॥
समदरसी मोहि कह सब कोऊ। सेवक प्रिय अनन्यगति सोऊ॥

दो० –सो अनन्य जाकें असि मति न टरइ हनुमंत।
मैं सेवक सचराचर रूप स्वामि भगवंत॥ ३॥

चौ० –देखि पवनसुत पति अनुकूला। हृदयँ हरष बीती सब सूला॥
नाथ सैल पर कपिपति रहई। सो सुग्रीव दास तव अहई॥
तेहि सन नाथ मयत्री कीजे। दीन जानि तेहि अभय करीजे॥
सो सीता कर खोज कराइहि। जहँ मरकट कोटि पठाइहि॥
एहि बिधि सकल कथा समुझाई। लिए दुऔ जन पीठि चढ़ाई॥
जब सुग्रीवँ राम कहुँ देखा। अतिसय जन्म धन्य करि लेखा॥
सादर मिलेउ नाइ पद माथा। भेंटउ अनुज सहित रघुनाथा॥
कपि कर मन बिचार एहि रीती। करिहहिं बिधि मो सन ए प्रीती॥

हे बोलत असता हनुमंत पुनः प्रेमभराने कासावीस झाला. त्याने स्वतःच्या शरीरात प्रकट होऊन आपल्या प्रभूचे पाय धरले. त्यावेळी त्याच्या भक्तिभावाला अनावर भरती आली.

आपल्या परमप्रिय सेवकाला लगेच उठवून प्रभूंनी हृदयाशी कवटाळले व आपल्या डोळ्यातील अश्रूंनी त्याच्या मस्तकावर सिंचन करून त्याचे सांत्वन केले; आणि म्हणाले–

"हे कपी ! ऐक. तू आपल्या मनात थोडेसुद्धा स्वतःला कमी मानू नकोस. माझ्या लक्ष्मणाच्या दुप्पट तुझ्यावर माझे प्रेम आहे. मी समदर्शी आहे, असे सर्वच जरी तत्त्वाच्या दृष्टीने म्हणता असले तरी मला मात्र अनन्यगती सेवकच खरा प्रिय असतो. आणि अशा सेवकाचे लक्षण तुला सांगतो ते पूर्ण ध्यानी ठेव. चराचर विश्वरूपाने माझे प्रभू भगवानच प्रकट झालेले आहेत, आणि अशा विश्वरूपी प्रभूचा मी सेवक आहे, हा दृढ निश्चय ज्याचा कधीही ढळत नाही तोच, हनुमंता ! खऱ्या अर्थाने अनन्य सेवक होऊ शकतो." ३

याप्रमाणे आपले स्वामी पूर्ण प्रसन्न आहेत, अशी खात्री झाल्यानंतर मनाची सर्व मळमळ संपून हनुमंताला मोठा आनंद झाला ! सुग्रीवासंबंधी सर्व वृत्त त्याने तत्काळ सांगण्यास सुरुवात केली. "नाथ ! या समोरील पर्वतावर कपिपती सुग्रीव राहतो व तो तुमचा दास आहे. नाथ ! आपण त्याच्याशी मैत्री करावी आणि तो दीन आहे, हे ध्यानी घेऊन त्याला भीतीपासून मुक्त करावा. असे जर भाषण केले तर आपल्या कोट्यवधी माकडांना चारी दिशांना पाठवून तो सीतेच्या शोधाच्या कामी आपणास चांगलीच मदत करील."

अशा प्रकारे पुढील कार्याची सर्व रूपरेषा प्रभूंना त्याने समजावून दिली व भगवंतांची संमती मिळताच दोघा बंधूना हनुमंताने चटकन् आपल्या पाठीवर बसवून सुग्रीव बसला होता, तेथे रामलक्ष्मणांना नेले.

श्रीरामचंद्रांना लक्ष्मणासह पाहताच त्या अनुपम सौंदर्याने सुग्रीवाचे डोळे निवले व त्याला आपल्या जन्माचे पूर्णपणे सार्थक झाल्याचे समाधान मिळाले. लगेच प्रभूच्या पायावर आपले मस्तक ठेवून तो प्रेमादराने त्यांना भेटला. तेव्हा अनुजासह रघुनाथही त्याला भेटले.

त्या बंधूंचे ते अतुल्य तेज पाहून सुग्रीव मनात विचार करू लागला, "हे असे श्रेष्ठ राजकुमार आणि मी एक सामान्य वानर ! हे विधी ! माझ्यावर स्नेही म्हणून हे खरोखरच प्रेम करतील काय ? परंतु हे कोडे सोडविण्यास हनुमंत तयार होतेच !

दो०— तब हनुमंत उभय दिसि की सब कथा सुनाइ।
पावक साखी देइ करि जोरी प्रीति दृढ़ाइ ॥ ४ ॥

चौ०— कीन्हि प्रीति कछु बीच न राखा। लछिमन राम चरित सब भाषा ॥
कह सुग्रीव नयन भरि बारी। मिलिहि नाथ मिथिलेसकुमारी ॥
मंत्रिन्ह सहित इहाँ एक बारा। बैठ रहेउँ मैं करत विचारा ॥
गगन पंथ देखी मैं जाता। परबस परी बहुत बिलपाता ॥
राम राम हा राम पुकारी। हमहि देखि दीन्हेउ पटडारी ॥
माँगा राम तुरत तेहिं दीन्हा। पट उर लाइ सोच अति कीन्हा ॥
कह सुग्रीव सुनहु रघुबीरा। तजहु सोच मन आनहु धीरा ॥
सब प्रकार करिहउँ सेवकाई। जेहि विधि मिलिहि जानकी आई ॥

दो०— सखा वचन सुनि हरषे कृपासिंधु बलसींव।
कारन कवन बसहु बन मोहि कहहु सुग्रीव ॥ ५ ॥

त्यांनी दोन्हीकडील हकीकत येथपर्यंत रामचंद्रांना सांगून रघुवीर-सुग्रीवांचा परिचय दृढ करून दिला आणि (अग्नि) पावक साक्षीला ठेवून प्रतिज्ञापूर्वक दोघांच्या दृढ स्नेहाचा दुवा जोडून दिला! ४

दोघांचे एकमेकांवर एवढे प्रेम बसले की, त्यांच्यात आडपडदा असा राहिलाच नाही. तेव्हा लक्ष्मणाने सर्व रामचरित्र सुग्रीवाला सांगून विशेषतः सीतेच्या [illegible] श्रीरामचंद्रांना कसे विव्हळ करून सोडत आहे हे सांगत असता सुग्रीवाचे अंतःकरण गहिवरले. डोळे पाण्याने भरून आले व त्याला बोलल्याशिवाय राहवेना; तो म्हणाला.

“नाथ! नाथ! नका काळजी करू. मी खात्रीने सांगतो. मिथिलेशकन्या आपणास भेटेलच; कारण एके दिवशी माझ्या मंत्र्यांसह बैठकीत मी बसलो होतो. तेव्हा आकाशमार्गाने जात असलेल्या एका स्त्रीचे रडणे आमच्या कानी आले. तिला कोणी तरी जबरदस्तीने पळवून नेत होता.

“तिचा आवाज ऐकताच आम्ही वर पाहू लागलो तोच ‘राम, राम! हा राम!’ असे स्पष्ट शब्द आमच्यापैकी प्रत्येकाने ऐकले. आम्ही हे शब्द ऐकले याची त्या स्त्रीस खात्री होताच तिने [illegible] धावून यावे म्हणून एक वस्त्र आमच्या दिशेने टाकून दिले ते आम्ही मोठ्या काळजीने सांभाळून ठेवले आहे.”

हे सुग्रीवाचे भाषण ऐकत असता रघुनंदन सीतेचा शोध लागल्याचे समजून मोठ्या अधीरतेने ते वस्त्र मागविले. लगेच त्वरेने ते वस्त्र आणून अत्यादराने त्यांना [illegible] स्वाधीन केले.

आपल्या प्रिय सीतेच्या त्या वस्त्राकडे पाहताच प्रत्यक्ष सीता भेटल्याचे समाधान रघुनाथास झाले. पण तसे होऊन शकत नाही हे कळताच प्रिय पत्नीच्या विरह दुःखाने पुनः भरून आले. त्या वस्त्राला आपल्या हृदयाशी कवटाळून त्यांनी व्याकुळ होऊन विलाप केला.

त्यावेळी त्या ऋष्यमूक पर्वतावर करुणरसानेच पदार्पण केले असे वाटले. सर्वच वानर व लक्ष्मण यांचा शोक सुरू झाला. अखेर धीर धरून सुग्रीव म्हणाला, “रघुवीर! मी सांगतो ते ऐकून तरी घ्या. आता आपण चांगला धीर धरा. शोक मुळीच करू नका. मी अगदी प्रतिज्ञेवर सांगतो की, जे जे करावे लागेल ते सर्व प्रयत्न मी करीन, पण आपणाला सीतामातेची भेट करून दिल्याशिवाय स्वस्थ राहणार नाही!”

सुग्रीवाच्या या भाषणाने कृपासिंधू व अनन्तशक्ती रघुवीर हर्षित झाले. सुग्रीवाच्या सख्यत्वाची साक्ष पटून स्वकर्तव्य परायणतेच्या भूमिकेवरून म्हणतात, “सुग्रीवा! आपण वनातील या ऋष्यमूक पर्वतावर का राहता ते कारण मला सांगा बरे!” ५



चौ० – नाथ बालि अरु मैं द्वौ भाई । प्रीति रही कछु बरनि न जाई ॥
मय सुत मायावी तेहि नाउँ । आवा सो प्रभु हमरें गाऊँ ॥
अर्ध राति पुर द्वार पुकारा । बाली रिपु बल सहै न पारा ॥
धावा बालि देखि सो भागा । मैं पुनि गयउँ बंधु सँग लागा ॥
गिरिबर गुहाँ पैठ सो जाई । तब बाली मोहि कहा बुझाई ॥
परिखेसु मोहि एक पखवारा । नहिं आवौं तब जानेसु मारा ॥
मास दिवस तहँ रहेउँ खरारी । निसरी रुधिर धार तहँ भारी ॥
बालि हतेसि मोहि मारिहि आई । सिला देइ तहँ चलेउँ पराई ॥
मंत्रिन्ह पुर देखा बिनु साईं । दीन्हेउ मोहि राज बरिआईं ॥
बाली ताहि मारि गृह आवा । देखि मोहि जियँ भेद बढ़ावा ॥
रिपु सम मोहि मारेसि अति भारी । हरि लीन्हेसि सर्बसु अरु नारी ॥
ताकें भय रघुबीर कृपाला । सकल भुवन मैं फिरेउँ बिहाला ॥

सुग्रीवाच्या जिव्हाळ्याचाच हा प्रश्न असल्याने तो अंतःकरण मोकळे करून बोलू लागला, " नाथ ! सांगतो ऐका. वाली आणि मी असे आम्ही दोघे भाऊ. आमचे परस्परांवरील प्रेम [illegible]इचे होते. पण एके दिवशी काय प्रकार झाला, मयासुराचा मायावी नावाचा मुलगा, प्रभू ! आमच्या नगरीवर चाल करून आला. मध्यरात्रीच्या सुमारास वेशीवर येऊन त्याने गर्जनापूर्वक युद्धाला आव्हान दिले. अर्थात् वालीला या त्याच्या बळाच्या घमेंडीची चीड आली.

" त्याबरोबर वालीने उलट गर्जना करून त्याचा पाठलाग केला. वालीचा तो आवेश पाहून मायावीनी भीतीने गाळण उडाली; आणि तो एकसारखा पळतच सुटला. अर्थात् वालीने त्याचा पिच्छा पुरविण्याचे ठरवून तो त्याच्या मागोमाग धावत सुटला. अशावेळी शत्रूवर चाल करून रात्रीबेरात्री पळत सुटलेल्या भावाच्या मदतीस जाणे हे आपले कर्तव्य समजून मीही त्याच्या पाठीमागून लगेच त्याच दिशेने धावलो.

" आता वाली आपणाला पकडणार असे वाटताच मायावी एका पर्वतावरील खोल अंधाऱ्या गुहेत दूर जाऊन लपला. परंतु त्याही स्थितीत त्याला सोडायचा नाही, असा निश्चय करून वाली मला म्हणाला, " पंधरा दिवस माझी वाट पाहून जर मी परत येत नाही अशी खात्री झाली तर मला मायावीने ठार केला असे समज."

" हे खरारी ! खरे सांगतो, पक्का महिना मी त्या गुहेच्या तोंडाजवळ तिष्ठत होतो ! एके दिवशी काय चमत्कार झाला, त्या गुहेतून रक्ताचा लोंढाच बाहेर वाहू लागला !! मला साहजिकच वाटले, वाली ठार झाला आणि आता मायावी बाहेर येताच तो मला ठार मारल्याशिवाय राहणार नाही.

" मग मी एक मोठी शीळ आणून त्या गुहेचे दारच बंद करून टाकले आणि किष्किंधेला पळतच परत आलो, पुष्कळ दिवस नगरी राजहीन राहिल्यामुळे मंत्र्यानी मला, माझी इच्छा नसता, गादीवर बसवले.

" अशी वस्तुस्थिती असता, सर्वच घटना अनपेक्षित घडल्या. मायावीला वालीने ठार केल्यामुळे त्या राक्षसाच्या रक्ताचा लोंढा आला होता. त्याचा फडशा पाडून परत येताच आपला भाऊ भेटेल व विजयानंद दोघे उपभोगू ही वालीची अपेक्षा गुहेला लावलेल्या शिळेने पार भंगून गेली; इतकेच नव्हे, मी राज्यही करू लागलो !

" मग काय, त्याला माझा अति संताप आला. माझ्या सर्व सत्यकथनाचा काहीही परिणाम न होता, त्या दिवसापासून वालीने मला आपला हाडवैरी मानला. मला खूप मार दिला. माझे सर्वस्व हिरावून घेऊनही न थांबता माझी प्रिय पत्नीही त्याने हिसकावून नेली !!

" या सर्व प्रकारामुळे हे कृपाळू रघुवीरा ! मला एवढी भीती वाटू लागली की, मी सगळ्या भुवनातून

इहाँ साप बस आवत नाहीं । तदपि सभीत रहउँ मन माहीं ॥
सुनि सेवक दुख दीनदयाला । फरकि उठीं द्वै भुजा बिसाला ॥

दो० — सुनु सुग्रीव मारिहउँ बालिहि एकहिं बान ।
ब्रह्म रुद्र सरनागत गएँ न उबरिहिं प्रान ॥ ६ ॥

चौ० — जे न मित्र दुख होहिं दुखारी । तिन्हहि बिलोकत पातक भारी ॥
निज दुख गिरि सम रज करि जाना । मित्रक दुख रज मेरु समाना ॥
जिन्ह कें असि मति सहज न आई । ते सठ कत हठि करत मिताई ॥
कुपथ निवारि सुपंथ चलावा । गुन प्रगटै अवगुनन्हि दुरावा ॥
देत लेत मन संक न धरई । बल अनुमान सदा हित करई ॥
बिपति काल कर सतगुन नेहा । श्रुति कह संत मित्र गुन एहा ॥
आगें कह मृदु बचन बनाई । पाछें अनहित मन कुटिलाई ॥
जाकर चित अहि गति सम भाई । अस कुमित्र परिहरेहिं भलाई ॥
सेवक सठ नृप कृपन कुनारी । कपटी मित्र सूल सम चारी ॥
सखा सोच त्यागहु बल मोरें । सब बिधि घटब काज मैं तोरें ॥

भटकत राहिलो. अरे या ऋष्यमूक पर्वतावर येऊन थोडा दम टाकला; कारण शापामुळे या पर्वतावर त्याला येता येत नाही. असे जरी असले तरी त्याच्या मारामुळे मला एवढी धास्ती बसली आहे की, मी निश्चिंत केव्हाच नसतो!"

आपल्याप्रमाणेच पत्नीचा विरह झालेला आणि त्याचे कारण प्रत्यक्ष सख्ख्या भावाने, थोरला बंधू जिवंत असता, भावजयीस हिरावून नेले. हे आपल्या सेवकाचे दुःख समजताच रघुवीराचे दोन्ही बाहू स्फुरण पावू लागले. ते म्हणाले, "सुग्रीव! ऐक. एकाच बाणाने मी वालीचा वध करीन मग तो जरी ब्रह्मदेव व शंकर यांना शरण गेला तरी आता तो जिवंत राहू शकत नाही!" ६

सुग्रीवाच्या निमित्ताने मित्राचा श्रेष्ठ धर्म श्रीरामचंद्र सांगू लागले. "मित्राचे दुःख ऐकून ज्यांच्या हृदयाला सहानुभूतीच्या वेदना होत नाहीत, अशा अधमाच्या मुखावलोकनानेही भयंकर पाप लागते! जो खरा मित्र असेल, त्याला आपले दुःखाचे डोंगरही क्षुद्र वाटतात. पण आपल्या मित्राचे, रजाप्रमाणे दुःखही त्याला मेरू पर्वताएवढे मोठे वाटते! स्वभावतःच अशी ज्यांची बुद्धी नाही, त्यांनी मैत्री करण्याच्या भानगडीतच का पडावे?

"आपल्या मित्राला कुमार्गापासून खेचून घेऊन सन्मार्गाला लावतो. त्याचे दोष सर्वांच्या नजरेपासून लपवून ठेवून गुणाचे मात्र गायन मुक्त कंठाने करतो; त्याला काही देताना भय वाटत नाही. किंवा त्याचे घेताना संकोच शिवत नाही. आपल्या कुवतीला अनुसरून सदोदित आपल्या मित्राचे हित करण्यास झटतो; व मित्र संकटात पडलेला कळताच याच्या स्नेहात शतपट वाढ होते, असे जे कोणी वागतात त्यांच्या ठिकाणीच खरे मित्राचे गुण आहेत, असे संत आणि वेद सांगतात.

"याच्या उलट स्वार्थसाधुपणाने तोंडावर गोड गोड बोलून प्रेमाचे प्रदर्शन दाखवावयाचे आणि पाठ फिरताच पोटातील कपट त्याच तोंडाने ओकून अहित करावयाचे, असे विषारी नागाच्या डाव धरण्याच्या खोडीप्रमाणे ज्याचे चित्त असते, अशा कुमित्रांचा संबंध सोडवणेच कल्याणकारक ठरते; कारण उलट बोलणारा सेवक, कृपण राजा, दुष्ट स्त्री आणि कपटी मित्र या चारी व्यक्ती [illegible] दुःखच देतात."

याप्रमाणे मित्रांची लक्षणे सुग्रीवाला सांगून प्रभू त्याला आश्वासन देतात. "मित्रा! माझ्या सामर्थ्यावर विश्वासून तू आता सर्व शोक आणि चिंता सोड. लवकरच तुझी सर्व कामे मी यशस्वी करून दाखवतो!"



कह सुग्रीव सुनहु रघुबीरा। बालि महाबल अति रनधीरा ।।
दुंदुभि अस्थि ताल देखराए। बिनु प्रयास रघुनाथ ढहाए ।।
देखि अमित बल बाढ़ी प्रीती। बालि बधब इन्ह भइ परतीती ।।
बार बार नावइ पद सीसा। प्रभुहि जानि मन हरष कपीसा ।।
उपजा ग्यान बचन तब बोला। नाथ कृपाँ मन भयउ अलोला ।।
सुख संपति परिवार बड़ाई। सब परिहरि करिहउँ सेवकाई ।।
ए सब राम भगति के बाधक। कहहिं संत तव पद अवराधक ।।
शत्रु मित्र सुख दुख जग माहीं। माया कृत परमारथ नाहीं ।।
बालि परम हित जासु प्रसादा। मिलेहु राम तुम्ह समन बिषादा ।।
सपने जेहि सन होइ लराई। जागें समुझत मन सकुचाई ।।
अब प्रभु कृपा करहु एहि भाँती। सब तजि भजनु करौं दिन राती ।।
सुनि बिराग संजुत कपि बानी। बोले बिहँसि रामु धनु पानी ।।
जो कछु कहेहु सत्य सब सोई। सखा बचन मम मृषा न होई ।।

हे ऐकल्यावर त्या सुकुमार दशरथ नंदनांचे सुन्दर शरीर पाहून त्यांच्या सामर्थ्याची शंका बाळगणारा सुग्रीव म्हणाला, " रघुवीरा ! आपण बलवान आहात. पण वाली महाबलवान असून मोठा रणशूर योद्धा आहे. "

असे बोलून त्यांच्या सामर्थ्याला कसोटी लावण्याच्या हेतूने सुग्रीवाने प्रभूंना दुंदुभी राक्षसाच्या हाडाचा एक पर्वतप्राय ढीग व ताडाचे सात वृक्ष दाखवले. परंतु पाहिल्याबरोबरच अगदी लीलेने विनायास ते सर्वच्या सर्व रघुनाथांनी उधळून दिले.

रघुवीराच्या अमर्याद ताकदीची अशी प्रत्यक्ष खात्री झाल्यावर सुग्रीवाचे श्रीरामचरणी निःसीम प्रेम बसले, व ते वालीचा वध खास करतील अशी त्याच्या मनात प्रतीती आली. त्याने वारंवार प्रभूच्या पायावर मस्तक नमविले व हे प्रभू आहेत हे समजल्याने कपीश्वर सुग्रीवाला हर्ष झाला. परंतु चरणस्पर्शाने आत्मज्ञान उपजले आणि त्याच्या प्रभावाने सुग्रीव आता बोलू लागला.

" नाथ ! आपल्या कृपेने माझ्या मनाला चंचल करणाऱ्या सर्व वासना नष्ट होऊन ते आता पूर्णपणे शांत झाले आहे. मोठेपणा अनेक उपभोग, आप्तेष्ट, सर्व प्रकारची संपत्ती इत्यादींचा त्याग करून इतःपर आपल्या पायांची फक्त सेवाच करीत राहावे असे आता वाटू लागले आहे ! कारण तुमच्या चरणांची उपासना करणारे सर्व संत वरील सर्व गोष्टी रामभक्तीला बाधक आहेत असे म्हणतात आणि त्याचे म्हणणे खरेच आहे. कारण शत्रुमित्र, सुख दुःखे इत्यादि जगातील सर्व गोष्टी मायेने उत्पन्न केलेल्या म्हणजे मिथ्या असून त्यांना पारमार्थिक दृष्ट्या खरे अस्तित्व मुळीच नाही !

" माझ्या सर्व विषादांचे शमन करणाऱ्या श्रीरामा ! ज्याच्या प्रसादाने मला हे चरण दिसले, तो वाली आता माझा शत्रू कसा ठरणार ? त्याला माझा परम हितकर्ताच समजले पाहिजे. स्वप्नातसुद्धा जर त्याच्यासह माझे येथून पुढे युद्ध होईल तर जागे होताच मला शरमेने खाली मान घालावी लागेल ! म्हणून आता माझ्यावर अशी कृपा करावी की, सर्व संग सोडून केवळ तुमच्या भजनातच माझा रात्रंदिवसाचा सर्व काळ जावा ! "

हे सर्व वैराग्यपूर्ण विचार सुग्रीवाच्या मुखाने ऐकले व हातात धनुष्य घेऊन श्रीरामचंद्र मोठ्याने हसत म्हणाले, " हे मित्रा तुम्ही जे म्हणालात ते सर्व सत्यच आहे; पण वालीचा वध करण्याची माझी प्रतिज्ञा खोटी होऊ शकत नाही त्याला काय करणार ? "

हा प्रसंग खरोखरच मोठा मौजेचा असल्याने काकभुशुंडीने शंका समाधानासाठी एक मोठा महत्त्वाचा

नट मरकट इव सबहि नचावत । रामु खगेस बेद अस गावत ॥
लै सुग्रीव संग रघुनाथा । चले चाप सायक गहि हाथा ॥
तब रघुपति सुग्रीव पठावा । गर्जेसि जाइ निकट बल पावा ॥
सुनत बालि क्रोधातुर धावा । गहि कर चरन नारि समुझावा ॥
सुनु पति जिन्हहि मिलेउ सुग्रीवा । ते द्वौ बंधु तेज बल सींवा ॥
कोसलेस सुत लछिमन रामा । कालहु जीति सकहिं संग्रामा ॥

दो० — कह बाली सुनु भीरु प्रिय समदरसी रघुनाथ ।
जौं कदाचि मोहि मारहिं तौ पुनि होउँ सनाथ ॥ ७ ॥

चौ० — अस कहि चला महा अभिमानी । तृन समान सुग्रीवहि जानी ॥
भिरे उभौ बाली अति तर्जा । मुठिका मारि महाधुनि गर्जा ॥
तब सुग्रीव बिकल होइ भागा । मुष्टि प्रहार बज्र सम लागा ॥
मैं जो कहा रघुबीर कृपाला । बंधु न होइ मोर यह काला ॥
एकरूप तुम्ह भ्राता दोऊ । तेहि भ्रम तें नहिं मारेउँ सोऊ ॥

सिद्धान्त व्यक्त केला आहे. "हे गरुडा ! ज्याप्रमाणे खेळाडू नट माकडाला नाचवितो, त्याचप्रमाणे श्रीरामचंद्र स्वतःच जगाला आपल्या इच्छेप्रमाणे नाचवीत असतात. असे वेदांनी वर्णन केले आहे."

वरीलप्रमाणे सुग्रीवाच्या बुद्धीला दृढ निश्चय करवून, हातीं धनुष्य व बाण घेतलेले रघुनाथ सुग्रीवासह वालीच्या वधासाठी निघाले. [illegible] येताच, वालीला युद्धाचे आव्हान देण्यासाठी रघुपतींनी सुग्रीवाला पुढे पाठवले. रघुनाथ पाठीराखा लाभल्याने त्यानेही जवळ जाऊन मोठा भुभुःकार केला !

एकाएकी व अगदीच अनपेक्षितपणे सुग्रीवाची ती युद्धाची हाक ऐकताच वाली संतापाने ताडकन् उठला आणि धावतच सुटला ! परंतु वाटेतच तारेने त्याचा हात धरला आणि त्याच्या पायावर मस्तक टेकून त्याला अडवले; त्याची योग्य समजूत घालण्यासाठी ती सांगू लागली.

"हे पतिदेवा ! आज माझे जरा ऐकावे. सुग्रीवाला जे भेटले आहेत, त्या दोघा भावांचे तेज आणि बल अमर्याद आहे. अहो ! ते कोसलेश दशरथांचे पुत्र राम व लक्ष्मण असून, प्रत्यक्ष काळालासुद्धा ते युद्धात तेव्हाच जिंकतील !"

परंतु वालीच्या पारमार्थिक धारणेची त्याच्या राणीला कल्पना नव्हती. वालीने हे ऐकून असेच उत्तर केले.

"प्रिय राणी ! अग भित्रे ! ऐक. तू म्हणतेस ते रघुनाथ आहेत, मग ते समदर्शी असणार ! आणि त्यातूनही त्यांच्या हातून मरण आले तर मी धन्यच होणार नाही का ?" ७

एवढे बोलून त्या कोमल पाशातून वालीने आपली झटकन् सुटका करून घेतली व अत्यंत अभिमानाने सुग्रीवाला कस्पटासमान लेखून त्याने चाल केली.

हा हा म्हणता दोघांचे मल्लयुद्ध सुरू झाले. मोठा [illegible] वाली सुग्रीवाला तराटणी (तर्जे) देऊ लागला. वालीने एक जोराने बुक्की मारली व मोठ्याने गर्जना केली ! त्याबरोबर अशा वज्रघातासारख्या तडाख्याने आपण मरणार असे वाटून तो भ्याला आणि पळत सुटला.

श्रीरामचंद्र बाजूला बसून हे युद्ध पाहत होते. त्यांच्या जवळ सुग्रीव येऊन म्हणाला. "हे कृपाळू रघुवीरा ! मी तुम्हाला सांगितले नव्हते का, की हा भाऊ नसून माझा प्रत्यक्ष काळच आहे !"

यांच्या भरवशांवर आपण चाल करून गेलो आणि पळून आलो नसतो तर मरण ओढवले असते, या भावनेने सुग्रीवाने केलेले भाषण ऐकून श्रीरामचंद्रांनी आपल्या कृतीचा खुलासा केला. ते म्हणाले, "सुग्रीव-सख्या ! अरे तुम्ही दोघे भाऊ इतके तंतोतंत एकसारखेच दिसत होता की, त्यातील नक्की सुग्रीव कोणता याचाच मला भ्रम उत्पन्न झाला. केवळ एवढ्याच कारणाने मी वालीला मारले नाही !"



कर परसा सुग्रीव सरीरा । तनु भा कुलिस गई सब पीरा ॥
मेली कंठ सुमन कै माला । पठवा पुनि बल देइ बिसाला ॥
पुनि नाना बिधि भई लराई । बिटप ओट देखहिं रघुराई ॥

दो०—बहु छल बल सुग्रीव कर हियँ हारा भय मानि ।
मारा बालि राम तब हृदय माझ सर तानि ॥ ८ ॥

चौ०—परा बिकल महि सर के लागें । पुनि उठि बैठ देखि प्रभु आगें ॥
स्याम गात सिर जटा बनाएँ । अरुन नयन सर चाप चढ़ाएँ ॥
पुनि पुनि चितइ चरन चित दीन्हा । सुफल जन्म माना प्रभु चीन्हा ॥
हृदयँ प्रीति मुख बचन कठोरा । बोला चितइ राम की ओरा ॥
धर्म हेतु अवतरेहु गोसाईं । मारेहु मोहि ब्याध की नाईं ॥
मैं बैरी सुग्रीव पिआरा । अवगुन कवन नाथ मोहि मारा ॥
अनुज बधू भगिनी सुत नारी । सुनु सठ कन्या सम ए चारी ॥
इन्हहि कुदृष्टि बिलोकइ जोई । ताहि बधें कछु पाप न होई ॥
मूढ़ तोहि अतिसय अभिमाना । नारि सिखावन करसि न काना ॥

एवढे बोलून रघुनाथांनी सुग्रीवाच्या देहावरून आपला अमृतमय हात फिरवला. त्याबरोबर त्याची सर्व पीडा नष्ट होऊन त्याचा देह वज्रच बनला. खुणेसाठी त्याच्या गळ्यात फुलांची माळ घातली व अतुल्य बल देऊन त्याला पुन्हा युद्धाला पाठवला.

सुग्रीव आणि वाली यांचे ताज्या दमाने पुन्हा मल्लयुद्ध सुरू झाले व झाडाच्या एका बाजूस बसून रघुराज ते पाहू लागले. सुग्रीवाने नवीन प्राप्त झालेल्या ताकतीच्या जोरावर अनेक डावपेचांनी युद्ध केले, पण मध्येच मनातील भीतीने तो कचरला; त्या बरोबर श्रीरामचंद्रांनी धनुष्य ताणून वालीच्या हृदयातच नेमका बाण मारला ! ८

एकदम वर्मी बाण लागताच व्याकुळ होऊन वाली जमिनीवर पडला; इतक्यात पुढे प्रभू पाहून तो तशाही स्थितीत उठून बसला. त्यावेळी त्याला काय दिसले व त्याची स्थिती कशी झाली, हे समजून घेणे मोठे आल्हादजनक आहे.

सावळे शरीर, मस्तकावर जटांचा मुगुट बनवलेला अरुणवर्णाची छटा असलेले डोळे आणि हातात बाण व सज्ज केलेले धनुष्य अशा त्या रूपाकडे वालीने पुनः पुन्हा न्याहाळून पाहिले, अखेर सर्व चित्त चरणावर लावले, आणि राम हे प्रभू आहेत असे मनाला पटल्यावर आपल्यावर जन्माचे सार्थक झाले असे त्याला वाटले.

याप्रमाणे हृदय प्रेमाने भरले पण मुखाने कठोर बोलत तो रामाकडे निरखून पाहून म्हणतो, " स्वामी ! तुम्ही धर्मासाठी अवतार घेतला आणि मला मात्र व्याधाप्रमाणे लपून ठार केलात काय ? तुम्ही समदर्शी मग मी तुमचा वैरी आणि सुग्रीव मात्र सखा कसा झाला ? आणि असा कोणता दोष मी केला की, ज्याची शिक्षा म्हणून मला ठार केले ? "

दिसण्यात बिनतोड अशा या प्रश्नांचे उत्तर प्रभूंना लगेच देणे भागच होते ते म्हणाले, " अरे शठा ! ऐक. धाकट्या भावाची बायको, बहीण, पुत्राची बायको व कन्या या चौघीही शास्त्राप्रमाणे कन्याच आहेत, याच्याकडे नुसते वाईट नजरेने पाहिल्याबरोबर त्याचा जर वध केला तर जरासुद्धा पाप लागत नाही ! शिवाय तुला स्वतःच्या शरीरबलाचा एवढा अभिमान झाला आहे की प्रत्यक्ष तुझ्या प्रिय पत्नीने तुला हितोपदेश केला तोसुद्धा तू मनावर घेतला नाहीस ! त्याचप्रमाणे सुग्रीव हा माझ्या सामर्थ्यावर विश्वासून आहे ही गोष्ट तुला

मम भुज बल आश्रित तेहि जानी। मारा चहसि अधम अभिमानी॥

दो०—सुनहु राम स्वामी सन चल न चातुरी मोरि।
प्रभु अजहूँ मैं पापी अंतकाल गति तोरि॥९॥

चौ०—सुनत राम अति कोमल बानी। बालि सीस परसेउ निज पानी॥
अचल करौं तनु राखहु प्राना। बालि कहा सुनु कृपानिधाना॥
जन्म जन्म मुनि जतनु कराहीं। अंत राम कहि आवत नाहीं॥
जासु नाम बल संकर कासी। देत सबहि सम गति अविनासी॥
मम लोचन गोचर सोइ आवा। बहुरि कि प्रभु अस बनिहि बनावा॥

छं०—सो नयन गोचर जासु गुन नित नेति कहि श्रुति गावहीं।
जिति पवन मन गो निरस करि मुनि ध्यान कबहुँक पावहीं॥
मोहि जानि अति अभिमान बस प्रभु कहेउ राखु सरीरही।
अस कवन सठ हठि काटि सुरतरु बारि करिहि बबूरही॥१॥
अब नाथ करि करुना बिलोकहु देहु जो बर मागऊँ।

तुझ्या [illegible] कळली असता त्याला ठार करण्याचा तू कसून प्रयत्न केलास! शरीर बळाच्या अहंकारानेच ही सर्व पातके करण्यास तू प्रवृत्त झालास ना."

वालीचा सर्व वाद व्यर्थचा होता, त्यांनंच इतका खुलासा प्रभूंनी केल्यावर त्याने सरळ शरण-चिठ्ठी दिली.

"हे राहा श्रीरामचंद्रा! स्वामींच्या पुढे माझ्या या [illegible] थोडेच टिकाव धरणार? पण प्रभुराया! मला एक सांग की आता माझा अंतकाळ समीप आला आहे अशा वेळी, आपल्या शरण जाण्याचे मला भाग्य लाभूनही मी पापीच म्हणून अजून मरणार काय?" ९.

रघुनाथ मूळचेच भक्तवत्सल! आणि दीनवाणीने वालीने हा प्रश्न विचारला. आता प्रभूला कुठला धीर! ते धावतच पुढे गेले आणि आपल्या हाताने वालीच्या मस्तकाला स्पर्श करून म्हणतात.

"अरे वाली! तुझे पाप संपले. तुला पाहिजे तर तुझी काया अमर करतो. प्राण का सोडतोस? जिवंत राहा की!"

त्यावर श्रेष्ठ धारणेचा वाली म्हणतो, "हे कृपानिधाना! मी काय म्हणतो ते ऐका. अनेक मुनी जन्मो-जन्मी तपस्येत आपला देह झिजवतात तरी अंतकाळी तुमचे 'राम' हे नावसुद्धा त्यांच्या मुखात येत नाही! [illegible] ज्याच्या नामाच्या बळावर सर्वांना सारखी अशी अविनाशी मुक्ती शंकर काशीक्षेत्रात देतात; तो परमात्मा राम, आज अंतकाळी माझ्या चर्मचक्षूंसमोर प्रत्यक्ष उभा आहे! प्रभो! तुम्हीच सांगा. सुषम प्रयत्न करून तरी असा योग निश्चित जमवून आणता येईल काय?"

वालीचे प्राण प्रयाण करण्याच्या मार्गाला लागल्याने तो सद्गदित होऊन म्हणतो, "ज्याच्या गुणांचे वर्णन श्रुतीसुद्धा 'नेति नेति' म्हणूनच नित्य करतात; तसेच प्राण व मन यांच्या विजयाने इंद्रिये नीरस करून ध्यानात केव्हातरी ज्याची प्राप्ती एखाद्या मुनीला होऊ शकते तो परमात्मा आज अंतकाळी माझ्या भाग्याने माझ्या नजरेच्या समोर आला आहे; मला दर्शनास लाभला आहे!! परंतु देहाच्या बळाचा अभिमान मला फार झाल्याने तो देह मला प्रिय असणार असे प्रभूंना वाटून आपण मला सांगता की, देह ठेव. पण असा कोण मूर्ख असेल की, हट्टाने कल्पतरूला तोडून त्याचे बाभळीला कुंपण करील? १

"नाथ! आता वेळ थोडा राहिला. एकवेळ माझ्याकडे आपली अमृत दृष्टी कृपेने टाका आणि मागतो

जेहिं जोनि जन्मौं कर्म बस तहँ राम पद अनुरागऊँ ॥
यह तनय मम सम बिनय बल कल्यानप्रद प्रभु लीजिऐ ।
गहि बाँह सुर नर नाह आपन दास अंगद कीजिऐ ॥ २ ॥

दो० – राम चरन दृढ़ प्रीति करि बालि कीन्ह तनु त्याग ।
सुमन माल जिमि कंठ ते गिरत न जानइ नाग ॥ १० ॥

चौ० – राम बालि निज धाम पठावा । नगर लोग सब ब्याकुल धावा ॥
नाना बिधि बिलाप कर तारा । छूटे केस न देह सँभारा ॥
तारा बिकल देखि रघुराया । दीन्ह ग्यान हरि लीन्ही माया ॥
छिति जल पावक गगन समीरा । पंच रचित अति अधम सरीरा ॥
प्रगट सो तनु तव आगें सोवा । जीव नित्य केहि लगि तुम्ह रोवा ॥
उपजा ग्यान चरन तब लागी । लीन्हेसि परम भगति बर मागी ॥
उमा दारु जोषित की नाईं । सबहि नचावत रामु गोसाईं ॥
तब सुग्रीवहि आयसु दीन्हा । मृतक कर्म बिधिवत सब कीन्हा ॥

तेवढा वर मला द्या, ‘ माझ्या कर्मानुसार ज्या ज्या योनीत मला जन्म घ्यावा लागेल त्या प्रत्येकीत हे राम ! तुमच्या चरणांचे प्रेम माझे ठिकाणी अखंड राहावे ! तसेच कल्याणदात्या हे प्रभो ! हा माझा मुलगा अंगद तो विनय, बल इत्यादि गुणांनी अगदी माझ्यासारखाच आहे; त्याचा आपण स्वीकार करावा आणि त्याला आपल्या हातीं धरून हे सुर-नर-नाथ ! या अंगदाला आपल्या चरणांचा दास करावा. ” २

असे बोलून श्रीरामचरणी अत्यंत दृढ प्रेम ठेऊन आपल्या देहाचा त्याग वालीने केला ! ! हत्तीच्या गळ्यातून एखादी सुमन माळ खाली गळून पडत असता त्याला जसे ते कळतसुद्धा नाही त्याप्रमाणे प्रभूच्या कृपादृष्टीने वालीला अंतःकाळी बिलकुल भास न होता त्याच्या प्राणांच्या संगतीतून सुटून त्याचा देह जमिनीवर निश्चेष्ट पडला ! १०

वालीचे उत्कट प्रेम पाहून प्रभूंनी त्याला रामधामास (नित्य वैकुंठास) पाठविला.

वाली ठार झाल्याची बातमी कानावर पडताच सुग्रीव आणि वाली यांचे मल्लयुद्ध पाहण्यासाठी त्या मैदानात जमलेले सर्व नागरिक श्रीराम-सुग्रीव यांच्या भीतीने घाबरून किष्किंधेकडे पळत सुटले.

वालीची प्रिय पतिव्रता स्त्री तारा तर नानाप्रकारे शोक करत असता तिचे केस सुटले. कारण दुःखातिरेकाने तिचे देहभानच हरपले !

शोकावेगाने तारा विकल झालेली पाहून रघुरायांनी तिला ज्ञान दिले आणि तिच्या बुद्धीवरील मायेचे पटल दूर सारले. ते तिला म्हणाले, “ हे पाहा ! पृथ्वी, जल, अग्नी, आकाश व वायू या पंचभूतांच्या तत्त्वांनी निर्माण झालेले हे अतिअधम शरीर, तुझ्या समोरच प्रत्यक्ष असून, झोपले आहे, आणि जीव नित्य असून त्याला मरणच नाही. मग मेल्याबद्दलचा शोक तू करत आहेस तो कुणासाठी ? ”

प्रभूच ज्ञान-दाते सद्गुरू झाल्यावर ज्ञानप्राप्तीस व अज्ञाननाशास किती वेळ लागणार ? तारेच्या हृदयात ज्ञानाचा प्रकाश पडताच ती शोक आवरून उठली आणि तिने श्रीरामचरणांना भक्तिपुरःसर नमन-केले आणि ‘ मला आपली परम भक्ती प्राप्त व्हावी ’ असा वर मागून घेतला.

इतकी शोकाकुल झालेली तारा लगेच शांत होऊन मार्गस्थ झाल्याचा चमत्कार पार्वतीस जाणवल्याने शंकर म्हणतात, “ उमे ! इंद्रियांचे स्वामी राम, सर्व जीवांना एखाद्या कळसूत्री लाकडाच्या बाहुलीप्रमाणे नाचवीत असतात ! ”

सुग्रीवाला आज्ञा देऊन मेलेल्या बंधूची–उत्तर क्रिया, प्रभूंनी त्याच्याकडून यथाविधी करवून घेतली.

राम कहा अनुजहि समुझाई । राजु देहु सुग्रीवहि जाई ॥
रघुपति चरन नाइ करि माथा । चले सकल प्रेरित रघुनाथा ॥

दो० — लछिमन तुरत बोलाए पुरजन बिप्र समाज ।
राजु दीन्ह सुग्रीव कहँ अंगद कहँ जुबराज ॥ ११ ॥

चौ० — उमा राम सम हित जग माहीं । गुरु पितु मातु बंधु प्रभु नाहीं ॥
सुर नर मुनि सब कै यह रीती । स्वारथ लागि करहिं सब प्रीती ॥
बालि त्रास ब्याकुल दिन राती । तन बहु ब्रन चिंताँ जर छाती ॥
सोइ सुग्रीव कीन्ह कपिराऊ । अति कृपाल रघुबीर सुभाऊ ॥
जानतहूँ अस प्रभु परिहरहीं । काहे न बिपति जाल नर परहीं ॥
पुनि सुग्रीवहि लीन्ह बोलाई । बहु प्रकार नृपनीति सिखाई ॥
कह प्रभु सुनु सुग्रीव हरीसा । पुर न जाउँ दस चारि बरीसा ॥
गत ग्रीषम बरषा रितु आई । रहिहउँ निकट सैल पर छाई ॥
अंगद सहित करहु तुम्ह राजू । संतत हृदयँ धरेहु मम काजू ॥
जब सुग्रीव भवन फिरि आए । राम प्रबरषन गिरि पर छाए ॥

दो० — प्रथमहिं देवन्ह गिरि गुहा राखेउ रुचिर बनाइ ।
राम कृपानिधि कछु दिन बास करहिंगे आइ ॥ १२ ॥

त्यानंतर अधिक वेळ न घालविता लक्ष्मणास किष्किंधेतील पुढील सर्व कार्यक्रमाची जरूर ती स्पष्ट कल्पना दिली आणि सांगितले की, 'तुम्ही किष्किंधेत जाऊन सुग्रीवाच्या राज्याभिषेकाचा समारंभ साजरा करा.' रघुपतीच्या चरणी आपली मस्तके नमवून आज्ञेप्रमाणे सर्व मंडळी पुढील कार्यासाठी किष्किंधेकडे रवाना झाली.

नगरीतील सर्व स्त्रिया व पुरुष तसेच ब्राह्मणमंडळी झटकन् एकत्र करून लक्ष्मणांनी सुग्रीवाचा राज्याभिषेक व त्याचबरोबरच अंगदाचा यौवराज्याभिषेक असे दोन्ही उत्सव सांगपणे पार पाडले ! ११

सुग्रीवाच्या ऋष्यमूक पर्वतावरील प्रथम भेटीपासून सुरू झालेली ही विलक्षण घटना त्याच्या राज्याभिषेकाने पुरी झाली. अत्यंत झटपट सर्व गोष्टी झाल्या असल्या तरी त्या चित्ताला चटका लावून बोध घेणाऱ्यास उत्तम धडा शिकवणाऱ्या अशाच असल्याने त्या सर्वांचा फायदा घेऊन आपल्या प्रिय अर्धांगीस शंकर सांगतात,

"उमे ! या उभ्या जगात माझ्या रामचंद्रासारखा हितकर्ता, गुरु (कुलगुरु) पिता, माता, बंधू, धनी, इत्यादी कोणीच नाही ! कोठेही पाहा, देव, मानव अगर मुनी, सर्वच स्वार्थाने अंध झालेले व स्वार्थासाठीच प्रेम करणारे असतात ! पण माझा रघुनाथ कसा आहे ? वालीच्या भयाने रात्रंदिवस व्याकुळ झालेला, सर्व शरीर जखमांनी भरलेले व चिंताग्नीने हृदयात आग पेटलेला, असा मूळचा सुग्रीव, त्याला प्रभूंनी सर्व कपींचा राजा केला ! रघुनाथाचा असा अत्यंत कृपाळू स्वभाव असल्याचा हा रोकडा अनुभव घेऊनही जे लोक अशा प्रभूचे चरण सोडतात, त्यांना नाना विपत्तींना तोंड द्यावे लागले, तर त्यात नवल ते काय ?"

राज्याभिषेकाचे कार्य साग झाल्यावर सुग्रीवाला प्रभूंनी बोलावून आणविले; राज्यकारभार उत्तम करता यावा म्हणून त्याला नानाप्रकारच्या राजनीतीचे धडे स्वतः दिले आणि शेवटी सांगितले, "हे कपीश्वर, सुग्रीव ! ऐक. चौदा वर्षांचा काळ संपेपर्यंत कोणत्याही नगरीत मला मुळीच प्रवेश करता येत नाही. एवढ्याकरता आता ग्रीष्म ऋतू संपून वर्षा समीप आल्याने शेजारच्याच एखाद्या पर्वतावर आम्ही वस्ती करू. तुम्ही युवराज अंगदासह सुखाने राज्य करा; पण माझ्या कामाचे मात्र विस्मरण होऊ देऊ नका !"

सुग्रीव मान डोलावून आपल्या राजवाड्यास परतले व त्यानंतर श्रीरामचंद्र प्रवर्षण पर्वतावर राहावयास गेले.

कृपानिधी श्रीराम या पर्वतावर निवास करण्यास येणार, याची देवांना पूर्वकल्पना होतीच. म्हणून त्यांनी त्या गिरीवर एक सुंदर अशी गुहा अगोदरच तयार करून ठेवली होती ! १२



चौ० — सुंदर बन कुसुमित अति सोभा । गुंजत मधुप निकर मधु लोभा ॥
कंद मूल फल पत्र सुहाए । भए बहुत जब ते प्रभु आए ॥
देखि मनोहर सैल अनूपा । रहे तहँ अनुज सहित सुरभूपा ॥
मधुकर खग मृग तनु धरि देवा । करहिं सिद्ध मुनि प्रभु कै सेवा ॥
मंगलरूप भयउ बन तब ते । कीन्ह निवास रमापति जब ते ॥
फटिक सिला अति सुभ्र सुहाई । सुख आसीन तहाँ द्वौ भाई ॥
कहत अनुज सन कथा अनेका । भगति बिरति नृपनीति बिबेका ॥
बरषा काल मेघ नभ छाए । गरजत लागत परम सुहाए ॥

दो० — लछिमन देखु मोर गन नाचत बारिद पेखि ।
गृही बिरति रत हरष जस बिष्नुभगत कहुँ देखि ॥ १३ ॥

चौ० — घन घमंड नभ गजरत घोरा । प्रिया हीन डरपत मन मोरा ॥
दामिनि दमक रह न घन माहीं । खल कै प्रीति जथा थिर नाहीं ॥
बरषहिं जलद भूमि निअराएँ । जथा नवहिं बुध बिद्या पाएँ ॥
बूँद अघात सहहिं गिरि कैसें । खल के बचन संत सह जैसें ॥
छुद्र नदीं भरि चलीं तोराई । जस थोरेहुँ धन खल इतराई ॥

माल्यवान पर्वताच्या प्रवर्षण (प्रस्रवण) शिखरावर प्रभूंचे पदार्पण, देवांनी खोदून तयार केलेल्या गुहेत निवास करण्यासाठी होताच त्या पर्वताचा चित्रकूटाप्रमाणे कायापालट लगेच झाला. तो दैवी सौंदर्याने नटला ! सर्व वन वृक्षाच्या कुसुम फलरूप वैभवाने खुलल्यामुळे त्याला अवर्णनीय शोभा प्राप्त झाली. त्यामुळे भुंग्याचे कळप मधाच्या लोभाने सर्वत्र गुंजारव करीत होते. प्रभू तेथे येताच, कंद, मूळ, फळे व पाने सुशोभित व विपुल झाली !

अशा प्रकारे एकंदरीत त्या शैलाचे ते अनुपम सौंदर्य पाहून अनुजासह तेथेच देवांचे राजे प्रभू राहिले. तेव्हा देव, सिद्ध व मुनी, भ्रमर, पक्षी व मृग यांची रूपे घेऊन आपापल्यापरीने श्रीरघुनाथांची सेवा करू लागले ! श्री रमापतींनीच प्रत्यक्ष निवास केल्यावर ते वन मंगलरूप झाले, हे उघडच आहे !

त्या प्रवर्षण पर्वतावरील श्रीरामचंद्रांचे निवासस्थान होण्याचे भाग्य ज्या गुहेस लाभले होते, तिने एक स्फटिकांची शिला दोघा भावांना बसून सुखसंवाद करण्यासाठी सादर केली. तिच्यावर बसून दोघांच्या अनेक कथा चालत. त्यांतून लक्ष्मणास उपदेश करण्याच्या निमित्ताने भक्ती, वैराग्य, राजनीती व ज्ञान यांची शिकवण दिली जाई.

एके दिवशी वरीलप्रमाणे संवाद चालू असता वर्षाकाळच्या मेघांनी आकाश भरले. त्यांची गर्जना फारच कर्णमधुर होती ! त्यामुळे प्रभू सुखी होऊन सुन्दर संवादाचा झरा वाहू लागला.

" लक्ष्मणा ! ते पाहा मोरांचे समूह जलदास पाहून कसे नाचत आहेत, जणू वैराग्यसंपन्न गृहस्थांना विष्णुभक्तांचे दर्शन झाल्याने ते आनंदित झाले आहेत. ! " १३

हे महान् मेघ, आकाशात वेगाने धावत असता गडगडाट करत आहेत व त्यामुळे, लक्ष्मणा ! प्रियाहीन मी असल्याने माझ्या मनाला फार भीती वाटत आहे. ते पाहा, खलांच्या प्रीतीप्रमाणे विजांचा चमचमाट अती अस्थिर आहे.

' विद्या प्राप्त झाल्यावर बुध ज्याप्रमाणे नमतात (नम्र होतात) त्याचप्रमाणे आत भरपूर पाणी भरलेले मेघ लक्ष्मणा पाहा, जमिनीपर्यंत खाली येऊन वर्षू लागले ! संतांनी खलांचे वाक्प्रवाह संथपणे सोसावे, तसेच हे

भूमि परत भा ढाबर पानी। जनु जीवहि माया लपटानी॥
समिटि समिटि जल भरहिं तलावा। जिमि सदगुन सज्जन पहिं आवा॥
सरिता जल जलनिधि महुँ जाई। होइ अचल जिमि जिव हरि पाई॥

दो० — हरित भूमि तृन संकुल समुझि परहिं नहिं पंथ।
जिमि पाखंड बाद तें गुप्त होहिं सदग्रंथ॥ १४॥

चौ० — दादुर धुनि चहु दिसा सुहाई। बेद पढ़हिं जनु बटु समुदाई॥
नव पल्लव भए बिटप अनेका। साधक मन जस मिलें बिबेका॥
अर्क जवास पात बिनु भयऊ। जस सुराज खल उद्यम गयऊ॥
खोजत कतहुँ मिलइ नहिं धूरी। करइ क्रोध जिमि धरमहि दूरी॥
ससि संपन्न सोह महि कैसी। उपकारी कै संपति जैसी॥
निसि तम घन खद्योत बिराजा। जनु दंभिन्ह कर मिला समाजा॥
महाबृष्टि चलि फूटि किआरीं। जिमि सुतंत्र भएँ बिगरहिं नारीं॥
कृषी निरावहिं चतुर किसाना। जिमि बुध तजहिं मोह मद माना॥
देखिअत चक्रबाक खग नाहीं। कलिहि पाइ जिमि धर्म पराहीं॥

पर्वत अगदी शांत राहून कोसळणाऱ्या पावसाच्या थेंबांचे प्रहार सोसत आहेत! थोडासाच संपत्तीचा लाभ होताच हलक्या मनाची माणसे जशी उन्मत्त होतात, त्याचप्रमाणे थोडा पाऊस पडताच क्षुद्र नद्या भरून फोफावत निघाल्या आहेत. मायेच्या योगाने शुद्ध चैतन्याचा संपर्क घडून त्याला जीवस्वरूप जसे प्राप्त होते, तसेच स्वच्छ पाण्याला पृथ्वीच्या संसर्गाने गढूळपणा येत आहे. तर त्याचवेळी सज्जनांनी सावकाश जसा सद्गुणांचा संग्रह करावा, तशाच रीतीने हे तलाव अगदी संथपणे पाणी आपल्यात साठवून घेत आहेत. त्याच्याबरोबर, हरीच्या प्राप्तीने जीवाचे जन्ममरण चक्र जसे थांबते तसेच नद्यांच्या पाण्याला एकदा सागरात प्रवेश मिळाला की, त्यांचे स्थलांतर थांबून त्याला स्थैर्य येते.

"नास्तिकांच्या वादविवादाने जसे सद्ग्रंथ (वेदशास्त्रपुराणादि) लुप्तप्राय होतात, तसेच सर्वत्र वृष्टी होऊन हिरवेगार गवत उगवल्याने मार्ग अगर वाटा नकळतच नाहीशा झाल्या." १४.

मात्र जागोजागी होणारा बेडकांचा मोठा ध्वनी बालकांच्या (बटूंच्या) वेद पठणाचे स्मरण करून देत आहेत!

"ज्ञानप्राप्ती झाल्यावर साधकाच्या मनाला जसा संतोषाचा बहर येतो तसेच नवे पल्लव फुटल्याने हे वृक्ष खुलून दिसत आहेत, ते पाहिलेस का लक्ष्मणा! त्याचप्रमाणे राज्ययंत्र व्यवस्थित झाले म्हणजे गुंडांचे चाळे जसे एकदम् बंद होतात, तसेच रुई व जवासा यांच्या झाडांची पाने पूर्णपणे गळून गेली! क्रोध उत्पन्न झाला की, धर्म ज्याप्रमाणे नाहीसा होतो, तशीच पावसामुळे धूळ शोधूनही सापडत नाही!

"उपकार करणाऱ्या सत्पुरुषाची (राजाच्या) संपत्तीला जसा एक विशेष प्रकारचा तजेला दिसतो, तशी धान्यसंपन्न झालेली ही सर्व पृथ्वी (भूमि) आता खुलून दिसत आहे. रात्रीच्या घनांधकारात जमलेल्या अनेक काजव्यांची चमक पाहून वाटते की, जणू दांभिकांच्या सभ्यांचे संमेलनच भरले आहे! आणि लक्ष्मणा! ती मौज पाहा. स्वातंत्र्य प्राप्त झाल्याने जशा स्त्रिया बिघडतात, तसेच अतिवृष्टीने शेतांच्या ताली फुटून वाहत आहेत!

"ज्ञानी भक्त व संत हे मान, मद मोह, व मत्सर इत्यादि दोषांची पाळेमुळे खणून काढतात, त्याचप्रमाणे कुशल शेतकरी आपल्या पिकात भांगलण करून एवढेसुद्धा तण शिल्लक ठेवत नाहीत.! कलियुगाचा प्रारंभ होताच धर्माचार जसे पळून जातात, तसेच चक्रवाकासारखे पक्षी आता अजिबात दिसेनासे झाले!

ऊसर बरषइ तृन नहिं जामा । जिमि हरिजन हियँ उपज न कामा ॥
बिबिध जंतु संकुल महि भ्राजा । प्रजा बाढ़ जिमि पाइ सुराजा ॥
जहँ तहँ रहे पथिक थकि नाना । जिमि इंद्रिय गन उपजें ग्याना ॥

दो०—कबहुँ प्रबल बह मारुत जहँ तहँ मेघ बिलाहिं ।
जिमि कपूत के उपजें कुल सद्धर्म नसाहिं ॥ १५ (क) ॥

कबहुँ दिवस महँ निबिड़ तम कबहुँक प्रगट पतंग ।
बिनसइ उपजइ ग्यान जिमि पाइ कुसंग सुसंग ॥ १५ (ख) ॥

चौ०—बरषा बिगत सरद रितु आई । लछिमन देखहु परम सुहाई ॥
फूलें कास सकल महि छाई । जनु बरषाँ कृत प्रगट बुढ़ाई ॥
उदित अगस्ति पंथ जल सोषा । जिमि लोभहि सोषइ संतोषा ॥
सरिता सर निर्मल जल सोहा । संत हृदय जस गत मद मोहा ॥
रस रस सूख सरित सर पानी । ममता त्याग करहिं जिमि ग्यानी ॥
जानि सरद रितु खंजन आए । पाइ समय जिमि सुकृत सुहाए ॥

हरिभक्तांच्या हृदयात कामाचा मोड जसा डोके वर काढूच शकत नाही, त्याचप्रमाणे वाळूसरा जमिनीत पडलेला पाऊस पळून जातो व तेथे गवताची एक काडीसुद्धा उगवत नाही ! तसेच चांगला राजा मिळाल्यावर प्रजेच्या संख्येत जशी भरमसाट वाढ होते त्याप्रमाणे चांगला पाऊस पडल्यामुळे नानाप्रकारच्या क्षुद्र जीव-जंतूंनी पृथ्वी कशी गजबजून गेली आहे.

" आणि ज्ञान उत्पन्न झाल्यावर लक्ष्मणा ! जशी इंद्रिये जागच्या जागी थंड होतात तसेच हा जोराचा वर्षाऋतु सुरू झाल्यामुळे प्रवासी जेथल्या तेथेच तटस्थ राहिले आहेत. (अडकून पडले आहेत.) येथे आल्या-पासून एकतरी प्रवासी आपणाला कधी या डोंगरावरून तरी दिसला काय ? कुपुत्राने कुलाचारांचा नाश करावा तसेच सोसाट्याचा वारा सुटला की सर्व मेघांना कुठल्याकुठे पळवून नेले ! " १५ (क)

लक्ष्मणा ही मौज पाहा ! एकदम भर दिवसा आकाश मेघांनी व्याप्त होऊन सर्वत्र अंधार पडतो तर क्षणांत ते सर्व ढग लयाला जाऊन सूर्य आपल्या दिव्य तेजाने तळपू लागतो. कुसंगतीने ज्ञान लयाला जाते. आणि सुसंगतीने ज्ञानाचा दिव्य उदय होतो, अगदी बरोबर असेच ही उजेड अंधाराची पाठशिवणी पाहून वाटते ना ? १५ (ख)

" लक्ष्मणा ! आता वर्षाऋतू संपून शरदऋतू आला. त्याची कशी विशेष शोभा आहे ती पाहा. काश जातीच्या दर्भांनी फुलून सर्व भूमीला आपल्या फुलांनी आच्छादून टाकले आहे; ते पाहून वाटते की वर्षाऋतू या रीतीने आपले म्हातारपणच प्रकट करत आहे.

" अगस्तीचा तारा उदय पावला आणि संतोष ज्याप्रमाणे लोभाचे शोषण करतो तसे मार्गातील पाणी शरदृऋतूने नाहीसे केले. मद आणि मोहरहित अशा संतांच्या निर्मल हृदयाप्रमाणे नद्या व तलाव यातील पाणी स्फटिकासारखे आता शोभू लागले परंतु ज्ञानी जसा हळूहळू ममतेचा त्याग करतात तसे ते स्वच्छ झालेले पाणी मात्र दिवसेंदिवस कमी होत आहे. "

" आपण केलेली सत्कर्मे लक्ष्मणा ! योग्य वेळी जशी सफल होतात तसे शरद् ऋतु सुरू होताच खंजन पक्षी दिसू लागले त्याचप्रमाणे चिखल किंवा धूळ मुळींच नसलेली पृथ्वी नीतिनिपुण अशा राजाच्या कारकीर्दीप्रमाणे सुंदर व सुखदायक होत आहे.

पंक न रेनु सोह असि धरनी। नीति निपुन नृप कै जसि करनी॥
जल संकोच बिकल भइँ मीना। अबुध कुटुंबी जिमि धनहीना॥
बिनु घन निर्मल सोह अकासा। हरिजन इव परिहरि सब आसा॥
कहुँ कहुँ बृष्टि सारदी थोरी। कोउ एक पाव भगति जिमि मोरी॥

दो०—चले हरषि तजि नगर नृप तापस बनिक भिखारि।
जिमि हरिभगति पाइ श्रम तजहिं आश्रमी चारि॥१६॥

चौ०—सुखी मीन जे नीर अगाधा। जिमि हरि सरन न एकउ बाधा॥
फूलें कमल सोह सर कैसा। निर्गुन ब्रह्म सगुन भएँ जैसा॥
गुंजत मधुकर मुखर अनूपा। सुंदर खग रव नाना रूपा॥
चक्रबाक मन दुख निसि पेखी। जिमि दुर्जन पर संपति देखी॥
चातक रटत तृषा अति ओही। जिमि सुख लहइ न संकरद्रोही॥
सरदातप निसि ससि अपहरई। संत दरस जिमि पातक टरई॥
देखि इंदु चकोर समुदाई। चितवहिं जिमि हरिजन हरि पाई॥
मसक दंस बीते हिम त्रासा। जिमि द्विज द्रोह किएँ कुल नासा॥

[illegible] ते माझा [illegible] सद्गुरू [illegible].

[illegible] निर्मळ आकाश [illegible] स्मर्णीय [illegible] आहे ते [illegible] लक्ष्मणा!

"आता [illegible] अशा [illegible] हरिभक्ती प्राप्त झाली [illegible] साधनरूप [illegible] श्रमाचा [illegible] [illegible] राजे, तपस्वी, व्यापारी आणि भिकारी संन्यासी [illegible] निघाले." १६

"[illegible] कधी कधी होत [illegible] नाही आणि [illegible] लक्ष्मणा! [illegible] त्यातील कमळे फुलल्यानंतर [illegible] सुंदर दिसत आहे! [illegible] अनुरूप असून; [illegible] शब्दात व्यक्त करीत आहेत!

"तथापि, [illegible] जसे दुर्जन दुःखी होतात, [illegible] रात्र येऊ लागताच चक्रवाक पक्षी [illegible] होत आहेत! [illegible] शकत नाही. [illegible] अनिवृत्तीने [illegible].

"संतांच्या दर्शनाने जशी पातके दूर [illegible] किरणांचा ताप शांत करतात! आणि हरिभक्तांना हरीची प्राप्ती झाल्यावर [illegible] निरखून पाहतात, तसेच, हे लक्ष्मणा! चकोरांचे समुदाय चंद्राकडे [illegible].

"द्विज-द्रोहाने ज्याप्रमाणे कुळाचा सर्वस्वी नाश होतो, [illegible]

दो० – भूमि जीव संकुल रहे गए सरद रितु पाइ ।
सद्गुर मिलें जाहिं जिमि संसय भ्रम समुदाइ ।। १७ ।।

चौ० – बरषा गत निर्मल रितु आई । सुधि न तात सीता कै पाई ।।
एक बार कैसेहुँ सुधि जानौं । कालहु जीति निमिष महुँ आनौं ।।
कतहुँ रहउ जौं जीवति होई । तात जतन करि आनउँ सोई ।।
सुग्रीवहुँ सुधि मोरि बिसारी । पावा राज कोस पुर नारी ।।
जेहिं सायक मारा मैं बाली । तेहिं सर हतौं मूढ़ कहँ काली ।।
जासु कृपाँ छूटहिं मद मोहा । ता कहुँ उमा कि सपनेहुँ कोहा ।।
जानहिं यह चरित्र मुनि ग्यानी । जिन्ह रघुबीर चरन रति मानी ।।
लछिमन क्रोधवंत प्रभु जाना । धनुष चढ़ाइ गहे कर बाना ।।

दो० – तब अनुजहि समुझावा रघुपति करुना सींव ।
भय देखाइ लै आवहु तात सखा सुग्रीव ।। १८ ।।

चौ० – इहाँ पवनसुत हृदयँ बिचारा । राम काजु सुग्रीवँ बिसारा ।।
निकट जाइ चरनन्हि सिरु नावा । चारिहु बिधि तेहि कहि समुझावा ।।
सुनि सुग्रीवँ परम भय माना । बिषयँ मोर हरि लीन्हेउ ग्याना ।।

यांचा समूळ नायनाट केला. तसेच, सद्गुरुप्राप्तीनंतर जसे संशय आणि भ्रम यांचे सर्व जाळे खलास होते, त्याचप्रमाणे, वर्षाकालात भूमीवर जे जीवांचे अनेक बारीक-सारीक प्राण्यांचे अनिवार पीक आले होते, ते सर्व शरदागमनाबरोबर हा हा म्हणता खलास झाले. " १७

वरील प्रमाणे ऋतुवर्णन चालू असताच सीतेचे स्मरण होऊन श्रीरामचंद्र म्हणाले, " लक्ष्मणा ! वर्षाऋतू तर गेलाच, पण शरदातील निर्मल ऋतू आला, तरीही सीतेचा शोध लागला नाही. कसा का लागेना, पण एकदा तिचा शोध लागला मात्र पाहिजे, म्हणजे प्रत्यक्ष काळालाही निमिषात जिंकून आणीन. तात ! कुठेही सीता जिवंत असल्याचे कळले तर वाटेल ते प्रयत्न करून तिला आणीन !

" सुग्रीव माझी आठवण विसरला असे दिसते. साहजिकच आहे; खजिना, राजधानी व बायको मिळाल्यावर आता कोणाची जरुर उरली ? पण वालीला ज्या बाणाने ठार केला, त्यानेच उद्या मी त्या मूर्खाला मारू शकेन. "

संतापस्थितीत हे शब्द बाहेर पडले, पण " उमे !"—शंकर म्हणतात, " ज्याच्या कृपेने मद-मोहादिकांचा नाश होतो, त्यांना स्वप्नात तरी खराखुरा क्रोध येणे शक्य आहे काय ? परंतु रघुवरचरणी दृढ प्रेम करणाऱ्या ज्ञानी मुनींनाच प्रभूंच्या अशा लीलांचे रहस्य झटकन् ध्यानी येते. "

प्रभू क्रोधयुक्त झाले आहेत, असे लक्ष्मणाने पाहिले मात्र, त्याबरोबर स्वतःच्या धनुष्यास दोरी लावून हाती बाण घेतला, तेव्हा करुणेची परमसीमा असणारे रघुपती अनुजाला समजावून सांगतात, " हे तात ! सुग्रीव माझा सखा आहे ! त्याला भय दाखवून घेऊन या म्हणजे झाले; ठार करायचा नाही हो ! " १८

तिकडे प्रवर्षण पर्वतावर श्रीरामचंद्र व लक्ष्मण यांचा वरील संवाद चालू असतानाच इकडे किष्किंधेत [illegible] सुग्रीवाने रामकार्य करण्याचे टाळले, याची जाणीव झाली. त्याबरोबर तो सरळ आपल्या राजाकडे गेला. त्याच्या चरणावर आपले मस्तक ठेवले आणि साम, दान, दंड व भेद अशा चारी राजनैतिक उपायांनी त्याची समजूत घातली.

अशाप्रकारे आपल्या हातून महान अपराध घडल्याची कल्पना हनुमंताच्या मुखाने बरोबर येताच त्याची गाळण उडाली. दीन होऊन तो म्हणाला, " मारुते ! भोग भोगण्यात माझी बुद्धी भ्रष्ट झाली हेच खरे ! आता

अब मारुतसुत दूत समूहा। पठवहु जहँ तहँ बानर जूहा॥
कहहु पाख महुँ आव न जोई। मोरें कर ता कर बध होई॥
तब हनुमंत बोलाए दूता। सब कर करि सनमान बहूता॥
भय अरु प्रीति नीति देखराई। चले सकल चरनन्हि सिर नाई॥
एहि अवसर लछिमन पुर आए। क्रोध देखि जहँ तहँ कपि धाए॥

दो० – धनुष चढ़ाइ कहा तब जारि करउँ पुर छार।
ब्याकुल नगर देखि तब आयउ बालिकुमार॥ १९ ॥

चौ० – चरन नाइ सिरु विनती कीन्ही। लछिमन अभय बाँह तेहि दीन्ही॥
क्रोधवंत लछिमन सुनि काना। कह कपीस अति भयँ अकुलाना॥
सुनु हनुमंत संग लै तारा। करि विनती समुझाउ कुमारा॥
तारा सहित जाइ हनुमाना। चरन बंदि प्रभु सुजस बखाना॥
करि विनती मंदिर लै आए। चरन पखारि पलँग बैठाए॥
तब कपीस चरनन्हि सिरु नावा। गहि भुज लछिमन कंठ लगावा॥
नाथ विषय मम मद कछु नाहीं। मुनि मन मोह करइ छन माहीं॥

मुदतीच वेळ घालवू नका. जेथे जेथे आपल्या वानरांचे कळप आहेत, त्या प्रत्येक ठिकाणी एकदम तातडीने इतक्या दूतांना रवाना करा; आणि त्यांना बजावून असे सांगा, तातडीने या की, जे कार्तिक शु॥ ५ च्या आत जे येणार नाहीत, ते माझ्या हातने ठार होतील!"

कपीश्वराचा हा हुकूम ऐकून घेऊन हनुमंतांनी दूतांना बोलावून आणले व त्यांचा मोठा सन्मान केला. त्यांना प्रेमाने कामाची कोणती कल्पना दिली व कामात कुचराई करणारास कशी कठोर शिक्षा होईल त्याचीही स्पष्ट शब्दात जाणीव करून दिली. त्यानंतर त्या सर्वांनी नमन केले व ते आपापल्या कामास निघाले.

इतक्यात संतापाने लाल झालेली लक्ष्मणाची स्वारी किष्किंधा नगरीत येऊन दाखल झाली. त्यांचे ते रुद्रावतार पाहताच वानर चारी दिशांना जीव घेऊन पळत सुटले.

धनुष्याला दोरी चढवून लक्ष्मण गर्जना करून म्हणाले, "आता एका क्षणात सर्व नगरी जाळून तिची राख करून टाकतो!"

प्रत्यक्ष शेषाचा अवतार असलेल्या त्या [illegible] तोंडचे ते हुंकारासारखे भयंकर शब्द कानी पडताच सर्व नगरी भयाने हैराण झाल्याचे पाहून वालीकुमार अंगद धैर्याने सामोरा आला. १९

त्याने धावत येऊन प्रथम लक्ष्मणाच्या पायावर आपले मस्तक टेकले. त्यावेळी रघुनंदनांनी आपल्या भुजा उचलून त्याला अभय दिले.

सक्रुद्ध लक्ष्मण नगरीत आले आहेत. ही वार्ता दूतांनी जेव्हा सुग्रीवाला कळविली, तेव्हा तो भयाने कासावीस होऊन म्हणतो, "हनुमंता! आता माझी काही धडगत दिसत नाही! तारेला बरोबर घे आणि तूच लक्ष्मणाकडे जाऊन त्यांची समजूत घाल."

आज्ञेप्रमाणे तारेसह हनुमान लक्ष्मणाजवळ आले. त्यांना प्रणाम करून प्रथम प्रभु श्रीरामचंद्रांच्या सुयशाचे वर्णन केले व नंतर प्रार्थना करून त्यांना मंदिरात घेऊन आले. त्यांचे पाय धुवून लक्ष्मणास सुंदर मंचावर बसविले. इतके झाल्यावर सुग्रीवाला धीर येऊन त्याने लक्ष्मणांच्या पायावर मस्तक टेकले. त्यानंतर लक्ष्मणांनी त्याला आपल्या बाहूंनी धरले व गळ्यात गळा घालून मोठ्या प्रेमाने त्याला भेटले.

कपीश्वराची भीती यामुळे दूर होऊन त्याला बोलण्याचा धीर आला. "नाथ! विषयांच्यासारखा दुसरा कोणताच मद नाही. माझ्या मनाला त्याने मोह उत्पन्न केला यात नवल नाही. पण मी मी म्हणणाऱ्या मुनींच्याही मनाला तो क्षणात गुंगवून टाकतो!"

सुनत बिनीत बचन सुख पावा । लछिमन तेहि बहुविधि समुझावा ॥
पवन तनय सब कथा सुनाई । जेहि बिधि गए दूत समुदाई ॥

दो० – हरषि चले सुग्रीव तब अंगदादि कपि साथ ।
रामानुज आगें करि आए जहँ रघुनाथ ॥ २० ॥

चौ० – नाइ चरन सिरु कह कर जोरी । नाथ मोहि कछु नाहिन खोरी ॥
अतिसय प्रबल देव तव माया । छूटइ राम करहु जौं दाया ॥
बिषय बस्य सुर नर मुनि स्वामी । मैं पावँर पसु कपि अति कामी ॥
नारि नयन सर जाहि न लागा । घोर क्रोध तम निसि जो जागा ॥
लोभ पाँस जेहिं गर न बँधाया । सो नर तुम्ह समान रघुराया ॥
यह गुन साधन तें नहिं होई । तुम्हरी कृपाँ पाव कोइ कोई ॥
तब रघुपति बोले मुसुकाई । तुम्ह प्रिय मोहि भरत जिमि भाई ॥
अब सोइ जतनु करहु मन लाई । जेहि बिधि सीता कै सुधि पाई ॥

दो० – एहि बिधि होत बतकही आए बानर जूथ ।
नाना बरन सकल दिसि देखिअ कीस बरूथ ॥ २१ ॥

चौ० – बानर कटक उमा मैं देखा । सो मूरुख जो करन चह लेखा ॥

सुग्रीवाच्या या नम्र वर्तनाने व भाषणाने लक्ष्मणास समाधान झाले व त्यांनी त्या वानरराजाची अनेक प्रकारे समजूत घातली. त्यानंतर पुढे येऊन पवनतनयाने सीतेच्या शोधासाठी वानर पाठविण्याकरिता दूत सर्वत्र पाठविण्याची योजना कशी झाली आहे ती सर्व हकीकत सांगितली.

ती ऐकून लक्ष्मण संतुष्ट झाले. त्यामुळे धीर येऊन अंगद आदि वानरांच्यासह रामानुज लक्ष्मणास सर्वांच्या पुढे करून मोठ्या आनंदाने सुग्रीव, प्रवर्षण पर्वतावरील श्रीरामचंद्र निवास स्थानाला येऊन पोचले. २०

प्रभुसान्निध सर्व मंडळी आली. सुग्रीव पुढे होऊन त्यांनी प्रथम पदकमली आपले शिर नमवले आणि हात हात जोडून म्हणाले, " नाथ ! जे घडले त्यात माझा काहीच दोष नाही; कारण देवा ! तुमची माया अत्यंत प्रबल आहे. व राम ! तुम्ही जर दया केली तरच तिच्या पकडीतून सुटता येते. स्वामी ! देव, मानव व फार काय तपस्वी मुनीसुद्धा विषयांना वश होतात ! अशा स्थितीत माझ्यासारख्या अतिनीच व अतिकामी अशा पामर पशूंची (वानरांची) पाड तो काय ?

" स्त्रियांचे नेत्रकटाक्षरूपी बाणांनी जो घायाळ झाला नाही, क्रोध रूपी घोर व भीषण अशा अंधाऱ्या रात्री जो बेसावध होत नाही, आणि लोभरूपी फासाने ज्याचा गळा आवळला नाही, तो नर, हे रघुराया ! तुमच्यासारखाच समर्थ होय ! या सर्व शत्रूंवर मात करण्याची शक्ती कोणतेही साधन करून प्राप्त होत नाही; केवळ तुमच्या कृपेनेच क्वचित एखाद्या भाग्यवानाला ती लाभते ! "

आपल्या दोषाची व वस्तुस्थितीची विनचूक कल्पना सुग्रीवास झालेली पाहून प्रभू हसले व म्हणाले, ' सुग्रीवा ! माझ्या भरतबंधूप्रमाणे तुम्ही मला फार प्रिय आहात. झाले ते झाले; ते होऊन गेले. येथून पुढे मात्र मन:पूर्वक असा कसून प्रयत्न करा की, ज्याच्या योगाने लवकरात लवकर सीतेचा पत्ता लागेल. "

याप्रमाणे संभाषण चालू असताच भराभर वानरांच्या टोळ्या येऊ लागल्या व थोड्याच वेळात जिकडे पहावे तिकडे अनेक रंगांच्या वानरांचे थवेच्या थवे दिसू लागले. २१

महेश पार्वतीला म्हणाले, " उमे ! त्या वानरसैन्याचा एवढा अफाट सागर परतला की, ते सर्व मी पाहिले, अगर त्यांची मी मोजदाद करू शकतो, असे जो कोणी म्हणेल त्याची मूर्खांतच गणना करावी लागेल."

आइ राम पद नावहिं माथा। निरखि बदनु सब होहिं सनाथा॥
अस कपि एक न सेना माहीं। राम कुसल जेहि पूछी नाहीं॥
यह कछु नहिं प्रभु कइ अधिकाई। बिस्वरूप ब्यापक रघुराई॥
ठाढ़े जहँ तहँ आयसु पाई। कह सुग्रीव सबहि समुझाई॥
राम काजु अरु मोर निहोरा। बानर जूथ जाहु चहुँ ओरा॥
जनकसुता कहुँ खोजहु जाई। मास दिवस महँ आएहु भाई॥
अवधि मेटि जो बिनु सुधि पाएँ। आवइ बनिहि सो मोहि मराएँ॥

दो०—बचन सुनत सब बानर जहँ तहँ चले तुरंत।
तब सुग्रीवँ बोलाए अंगद नल हनुमंत॥ २२॥

चौ०—सुनहु नील अंगद हनुमाना। जामवंत मतिधीर सुजाना॥
सकल सुभट मिलि दच्छिन जाहू। सीता सुधि पूँछेहु सब काहू॥
मन क्रम बचन सो जतन बिचारेहु। रामचंद्र कर काजु सँवारेहु॥
भानु पीठि सेइअ उर आगी। स्वामिहि सर्ब भाव छल त्यागी॥
तजि माया सेइअ परलोका। मिटहिं सकल भवसंभव सोका॥
देह धरे कर यह फलु भाई। भजिअ राम सब काम बिहाई॥

[illegible] आल्यानंतर [illegible] अलौकिक [illegible] स्वतःच [illegible] सनाथ [illegible] अशा प्रकारे [illegible] उरला नाही की, श्रीरामांनी त्याला कुशल विचारले नाही! [illegible] व्यापक [illegible] असे घडल्यानंतर त्यात आश्चर्य [illegible] असे काहीच नाही!

आज्ञा मिळताच [illegible] आपापल्या जागी [illegible] उभे राहिले. तेव्हा सुग्रीव [illegible] उभा राहिला. सर्व सैन्याला प्राण [illegible] करून [illegible] म्हणाले, " हे वानरवीर हो! तुमच्या भाग्याने तुम्हाला श्रीरामचंद्रांचे काम [illegible] आहे. यांनी तुम्ही हे काम [illegible] पार पाडल्यास मीही तुमचा ऋणी होईन! म्हणून, हे बानरयूथपांनो! तुम्ही आता आपापल्या दिशेने चारी दिशांना सीता-शोधार्थ जा. मात्र बंधूंनो! [illegible] तुम्ही परत येऊन आपल्या कामगिरीचे इतिवृत्त इकडे [illegible] केले पाहिजे. [illegible] जे कोणी या मुदतीनंतर परत येतील, त्यांना वध करविणे मला भाग पडेल हे मात्र विसरू नका!"

सुग्रीवाची वचने [illegible] होताच कपींच्या टोळ्या चारी दिशांना रवाना झाल्या. पूर्व, पश्चिम व उत्तर दिशेस वानरांचे कळप निघून गेल्यावर सुग्रीवाने अंगद, नल व हनुमान यांना प्रेमादराने बोलावून जवळ घेतले. २२

व तो म्हणाला, " हे नील, अंगद, हनुमान, जांबवंत [illegible] तुम्ही [illegible] धीरबुद्धीचे व कर्तव्यपरायण आहात. तुम्ही सर्व वीर श्रेष्ठांनी दक्षिण दिशेला जाऊन [illegible] सीतेचा शोध घ्यावा. मनाने, कर्माने व वाणीने योग्य त्या उपायांची योजना करून रामकार्य सिद्धीला न्यावे. सूर्याचे सेवन पाठीवर व अग्नीचे पोटाकडून करावे; (सूर्याचे ऊन पाठीवर घ्यावे व अग्नीची उष्णता पोटाकडून घ्यावी.) आणि स्वामीची सेवा, कपट सोडून जीवे-भावे करावी. कोणत्याही प्रकारच्या मोहाला वश न होता हे कर्तव्य उत्तमप्रकारे करावे. असे केल्याने तुम्हाला परलोकाची प्राप्ती होऊन तुम्ही जन्ममरण-परंपरेतील सर्व दुःखातून मुक्त व्हाल.

" बंधूंनो! तुम्ही सुज्ञ आहात. मी तुम्हाला शिकवतो असे नाही. तथापि हे पक्के ध्यानात ठेवा की, देह धारण केल्याचे सार्थक [illegible] सर्व क्षुद्र वासनांचा त्याग करून श्रीरामचंद्राच्या चरणांचे प्रेम दृढ धरते! हे ज्याने साधले तोच खरा गुणवान् आणि तोच खरा भाग्यवान्."

सोइ गुनग्य सोई बड़भागी । जो रघुबीर चरन अनुरागी ॥
आयसु मागि चरन सिरु नाई । चले हरषि सुमिरत रघुराई ॥
पाछें पवन तनय सिरु नावा । जानि काज प्रभु निकट बोलावा ॥
परसा सीस सरोरुह पानी । करमुद्रिका दीन्हि जन जानी ॥
बहु प्रकार सीतहि समुझाएहु । कहि बल बिरह बेगि तुम्ह आएहु ॥
हनुमत जन्म सुफल करि माना । चलेउ हृदयँ धरि कृपानिधाना ॥
जद्यपि प्रभु जानत सब बाता । राजनीति राखत सुरत्राता ॥

दो० — चले सकल बन खोजत सरिता सर गिरि खोह ।
राम काज लयलीन मन बिसरा तन कर छोह ॥ २३ ॥

चौ० — कतहुँ होइ निसिचर सैं भेटा । प्रान लेहिं एक एक चपेटा ॥
बहु प्रकार गिरि कानन हेरहिं । कोउ मुनि मिलइ ताहि सब घेरहिं ॥
लागि तृषा अतिसय अकुलाने । मिलइ न जल घन गहन भुलाने ॥
मन हनुमान कीन्ह अनुमाना । मरन चहत सब बिनु जल पाना ॥

याप्रमाणे सुग्रीवाचे भाषण झाल्यानंतर अंगदादि कपींनी आपल्या राजाची आज्ञा घेतली, त्याच्या पायावर मस्तक नमवले आणि मोठ्या हर्षाने रघुपतीचे स्मरण करीत ते चालू लागले. सर्वांच्या शेवटी पवन तनयाने आपले शिर नमवले. तेव्हा पुढील कामगिरी याच्याच हातून पार पडणार हे जाणून प्रभूंनी त्याला आपल्या जवळ घेतला !

हनुमंताचे परम भाग्य !—प्रभूंनी आपला कमलहस्त त्याच्या मस्तकावर ठेवला; आणि हा आपला दास आहे हे जाणून नाव कोरलेले हातातील अंगठी पवनतनयाच्या स्वाधीन केली. शेवटी सांगितले की नानाप्रकारांनी सीतेचे सांत्वन करा. माझे सामर्थ्य आणि मला होणारा विरह यांची कल्पना तिला देऊन तुम्ही झपाट्याने परत या. ”

रघुनाथांचे हे प्रेम व हा विश्वास प्रत्यक्ष अनुभवास आल्यावर आपला जन्म सुफल झाला असे साहजिकच हनुमन्तास वाटले. नंतर [illegible] आपल्या हृदयात पूर्णपणे धारण करून त्यांनी प्रभूंचा निरोप घेतला.

प्रभू जरी सर्वज्ञ आहेत, तरी देवांचे रक्षण करण्यासाठी अवतार घेतलेले दशरथनंदन राजनीतीचे योग्य प्रकारे पालन करत आहेत !

अंगदादि वानर तेथून सर्वांचे निरोप घेऊन निघाले. वाटेतील सर्व वने, तलाव, नद्या, डोंगर, दऱ्या, गुहा इत्यादी ठिकाणी शोध घेत ही वानराची टोळी निघाली. रामकार्यात त्यांचे मन इतके लीन झाले आहे की, त्यांना स्वतःच्या देहाच्या ममत्वाचे पूर्ण विस्मरण झाले आहे. २३

वाटेत एखादा राक्षस भेटला तर त्याच्या अशी थोबाडीत वसावयाची की, त्याने पुनः पाणीही मागू नये. याच्या उलट पर्वत व अरण्ये धुंडीत असता एखादा मुनी दर्शनास मिळाला तर लगेच त्याच्याभोवती सर्वजण गोळा होत.

अशा प्रकारे त्यांचे सीता-संशोधन सुरू असता एका प्रसंगी अत्यंत तहान लागून सर्वच व्याकुळ झाले. पाणी पाणी करून ते त्या घनदाट अरण्यात वणवण फिरत असता पाणी तर नाहीच, पण उलट रस्ता चुकून भुलून गेले. त्यांची ती केविलवाणी स्थिती पाहिल्यावर हनुमंताला स्पष्ट कल्पना आली की, थोडावेळ पाणी न मिळाल्यास हे आता प्राण कासावीस होऊन पटापट मरणार !

चढ़ि गिरि सिखर चहूँ दिसि देखा । भूमि बिबर एक कौतुक पेखा ॥
चक्रबाक बक हंस उड़ाहीं । बहुतक खग प्रबिसहिं तेहि माहीं ॥
गिरि ते उतरि पवनसुत आवा । सब कहुँ लै सोइ बिबर देखावा ॥
आगें कै हनुमंतहि लीन्हा । पैठे बिबर बिलंबु न कीन्हा ॥

दो० — दीख जाइ उपवन बर सर बिगसित बहु कंज ।
मंदिर एक रुचिर तहँ बैठि नारि तप पुंज ॥ २४ ॥

चौ० — दूरि ते ताहि सबन्हि सिरु नावा । पूछें निज बृत्तांत सुनावा ॥
तेहिं तब कहा करहु जल पाना । खाहु सुरस सुंदर फल नाना ॥
मज्जनु कीन्ह मधुर फल खाए । तासु निकट पुनि सब चलि आए ॥
तेहिं सब आपनि कथा सुनाई । मैं अब जाब जहाँ रघुराई ॥
मूदहु नयन बिबर तजि जाहू । पैहहु सीतहि जनि पछिताहू ॥

प्रसंगाचे गांभीर्य पाहून हनुमान एका उंच शिखरावर उड्डाण करून चढले. चारी दिशांना निरखून पाहात असता त्याना जमिनीमध्ये एक विवराचे जागी मोठे आश्चर्य पहावयास मिळाले.

चक्रवाक, बगळे, मराळ, हंसादी पक्षी उडत असलेले इत्यादी पक्षी त्या भुयारातून बाहेर येत होते आणि बहुतेक सर्वच जातीचे पक्षी त्या विवरात शिरत होते. हे कौतुक पाहताच पवनसुत खाली आला व त्याने आपल्या सर्व सवंगड्यांना त्या भुयाराचे गमन दाखविण्यासाठी त्याच्याजवळ आणले. आत पक्षी जातात, त्या अर्थी तेथे वृक्ष असले पाहिजेत. त्याशिवाय फळांचे वृक्ष कसे असणार. ज्या अर्थी आत कुंजरेसारखी पक्षी आत जातात, त्या अर्थी तेथे जलाशयसुद्धा असावे. पण त्या भुयारात शिरते कुणी ?

अखेर तहानेने प्राण कासावीसच झाल्यामुळे त्यांनी हनुमंताला पुढे करून त्याच्या आधाराने सर्वजण त्या विवरात शिरले. आत जाऊन पाहतात तो दुसरे आश्चर्य ! एक सुंदर उपवन व त्यात पुष्कळ कमळांनी फुललेले एक मनोहर सरोवर ! त्याच्या काठावर अतिरमणीय असे एक मंदिर आणि त्या मंदिरात तपोराशी अशी एक सुंदर स्त्री बसलेली ! २४

आश्चर्यचकित होऊन ही आश्चर्ये पाहून ते सर्व वानर एकत्र झाले व त्यांच्यापैकी सर्वांनी त्या स्त्रीला दुरून प्रणाम केले. आणि तिने विचारल्यावरून आपला सर्व वृत्तान्त त्यांनी सांगितला.

त्यानंतर अपेक्षित असे वृत्त समजल्याने तिला संतोष झाल्याचे दिसले. ती म्हणाली, " आता तुम्ही जलपान करा व सुंदर रसाळ फळे वाटेल तितक्या प्रकारची व भरपूर आहेत, ती मनसोक्त खा बरं !

त्या सर्व वानरांचा आनंद गगनात मावेना. त्यांनी त्या सरोवरात यथेच्छ स्नाने केली. मधुर फळे पाहिजे तितकी खाल्ली आणि ते सर्व पुन्हा अत्यंत आदराने तिच्या जवळ दर्शनास आले. त्या वानरांना आता या मातृवत्सल तपस्विनीची सर्व हकीकत समजून घेण्याची व शक्यतर सीतेच्या शोधाची माहिती तिच्याकडून मिळण्याची फारच उत्कंठा लागली.

वानरांची वरील जिज्ञासा हनुमंताकडून समजल्यावर तिने आपली कथा सांगितली. (" माझे नाव स्वयंप्रभा. दिव्य नावाच्या गंधर्वाची मी मुलगी. माझ्या मैत्रिणीचे नाव हेमा. तिने ब्रह्मलोकाला जाताना वानरांच्या आगमनाची सांगितलेली खूण पटेपर्यंत मी येथे तपस्या केली. ती खूण पटण्याचा आज योग आला. आता तिच्याच सांगण्याप्रमाणे मी रघुनाथाकडे जाऊन त्यांची स्तुती करीन, म्हणजे ते मला निजधामास पाठवतील; (मूळाला संक्षिप्त पुरवणी गृ. चं. च्या आधारे.)

तुम्ही डोळे मिटा आणि विवर सोडा म्हणजे योग्य ठिकाणी चहूदिशी पोचाल. सीता मिळेल. काही चिंता करू नका बरं बाळांनो ! "



नयन मूदि पुनि देखहिं बीरा । ठाढ़े सकल सिंधु कें तीरा ।।
सो पुनि गई जहाँ रघुनाथा । जाइ कमल पद नाएसि माथा ।।
नाना भाँति बिनय तेहिं कीन्ही । अनपायनी भगति प्रभु दीन्ही ।।

दो० – बदरीबन कहुँ सो गई प्रभु अग्या धरि सीस ।
उर धरि राम चरन जुग जे बंदत अज ईस ।। २५ ।।

चौ० – इहाँ बिचारहिं कपि मन माहीं । बीती अवधि काज कछु नाहीं ।।
सब मिलि कहहिं परस्पर बाता । बिनु सुधि लएँ करब का भ्राता ।।
कह अंगद लोचन भरि बारी । दुहुँ प्रकार भइ मृत्यु हमारी ।।
इहाँ न सुधि सीता कै पाई । उहाँ गएँ मारिहि कपिराई ।।
पिता बधे पर मारत मोही । राखा राम निहोर न ओही ।।
पुनि पुनि अंगद कह सब पाहीं । मरन भयउ कछु संसय नाहीं ।।
अंगद बचन सुनत कपि बीरा । बोलि न सकहिं नयन बह नीरा ।।
छन एक सोच मगन होइ रहे । पुनि अस बचन कहत सब भए ।।

तपस्विनीच्या आज्ञेप्रमाणे त्या सर्व वानरांनी डोळे घट्ट मिटले आणि पुन्हा थोड्याच वेळाने उघडले. केवढे आश्चर्य ! ते सर्वच वानर सागराच्या तीरावर उभे ! !

वानरासंबंधीच्या स्वकर्तव्यातून वरीलप्रमाणे उत्तम प्रकारे मुक्त झाल्यानंतर ती लगेच रघुनाथाकडे गेली; तेथे गेल्यावर श्रीरामचरणकमलांना नम्रपणे वंदन करून नानाप्रकारे त्यांची स्तुती केली.

संतुष्ट होऊन स्वयंप्रभेला प्रभूंनी आपली अनपायिनी (अविनाशी) भक्ती दिली. आपल्या अनेक शतकांच्या तपस्येचे पूर्ण सार्थक झालेले पाहून, त्या तपस्विनीने मोठ्या संतोषाने श्रीरामचंद्राची आज्ञा शिरसामान्य केली; आणि ब्रह्मदेव व शंकर ज्या चरणांना वंदन करतात, ते आपल्या हृदयात धारण करून ती उर्वरित आयुष्य संपविण्यासाठी बदरी वनात गेली. २५

आश्चर्याची पहिली लाट ओसरल्यावर, इकडे सागराच्या तीरी बसून ते वानर विचार करू लागले. सुग्रीवाने दिलेली एक महिन्याची मुदत तर केव्हाच संपली; सीतेच्या शोधाचे कार्य अजून काहीच झाले नाही !
वरील चिंताग्रस्त विचार मनात आल्यानंतर सर्वच वानर एकत्र झाले व विचारविनिमय करू लागले. ‘ सीतेचा शोध अपेक्षेप्रमाणे लागला नाही, आता पुढे काय करावे ? ’

डोळ्यात अश्रूंना भरती येऊन अंगद म्हणाला, ‘ आम्हाला आता काही केले तरी दोन्ही बाजूनी मरण येणार, हे ठरलेलेच दिसते. इथे सीतेचा शोध लागत नसल्याने, आम्हाला परत काळे तोंड दाखवता येत नाही, व तिकडयातून स्वगृहाच्या आशेने किष्किंधेला गेलोच तर पूर्वी हुकूम दिल्याप्रमाणे सुग्रीव सर्वांना स्वतःच ठार करणार !

‘ वालीचा वध झाल्यानंतरच त्याने मला ठार केला असता; पण केवळ श्रीरामचंद्रांच्या कृपेमुळे मी वाचलो, यात सुग्रीवाने माझ्यावर मुळीच उपकार केलेला नाही !’

वरील विचारसरणीच्या भोवऱ्यात सांपडलेला अंगद, सर्वांना वारंवार सांगत सुटला की, आता आपण मरणार, मरण आता अटळ आहे. काय हे आपले दुर्दैव !

प्रत्यक्ष युवराजानेच असा धीर सोडून शोक सुरू केल्याने, कपिवीरांच्या मुखातून शब्दच उमटेना ! त्यांच्या नेत्रातून अश्रूंच्या धारा लागल्या ! थोडा वेळ तेथेच सर्वच शोकाकुल होऊन कोणीच अवाक्षर आपल्या मुखातून काढले नाही.

हम सीता कै सुधि लीन्हें बिना । नहिं जैहैं जुबराज प्रबीना ॥
अस कहि लवन सिंधु तट जाई । बैठे कपि सब दर्भ डसाई ॥
जामवंत अंगद दुख देखी । कहीं कथा उपदेस बिसेषी ॥
तात राम कहुँ नर जनि मानहु । निर्गुन ब्रह्म अजित अज जानहु ॥
हम सब सेवक अति बड़भागी । संतत सगुन ब्रह्म अनुरागी ॥

दो०—निज इच्छाँ प्रभु अवतरइ सुर महि गो द्विज लागि ।
सगुन उपासक संग तहँ रहहिं मोच्छ सब त्यागि ॥ २६ ॥

चौ०—एहि बिधि कथा कहहिं बहु भाँती । गिरि कंदराँ सुनी संपाती ॥
बाहेर होइ देखि बहु कीसा । मोहि अहार दीन्ह जगदीसा ॥
आजु सबहि कहँ भच्छन करऊँ । दिन बहु चले अहार बिनु मरऊँ ॥
कबहुँ न मिल भरि उदर अहारा । आजु दीन्ह बिधि एकहिं बारा ॥
डरपे गीध बचन सुनि काना । अब भा मरन सत्य हम जाना ॥
कपि सब उठे गीध कहँ देखी । जामवंत मन सोच बिसेषी ॥

शेवटी सर्वांनी अंगदाला असा निश्चय कळविला. "हे प्रवीण युवराज ! आम्ही [illegible] ठरविले की, सीतेचा शोध लागल्याशिवाय परत फिरावयाचेच नाही !"

या ठरावानुसार सर्व वानर समुद्राच्या तीरावर दर्भ पसरून आसने घालून बसले.

अशाप्रकारे सर्व [illegible] व नैराश्याने [illegible] सर्वांत वृद्ध असा जांबवंताने, मुख्यतः अंगदाचा दुःखभार थोडा हलका करावा या हेतूने, उपदेशपर [illegible] कथा [illegible].

"हे तात ! रामचंद्रांना मनुष्य मात्र नव्हे; ते [illegible] असे तत्त्वतः निर्गुण ब्रह्म आहेत, हे ध्यानी धरा.

"आपण सर्व सेवकांचे केवढे भाग्य उदयाला आले की, असे हे साक्षात निर्गुण ब्रह्म श्रीरामचंद्रस्वरूपात सगुण झाल्याने त्यांच्या ठिकाणी आमचे सतत प्रेम आहे !

"देव, गायी, ब्राह्मण आणि पृथ्वी यांच्यासाठी प्रभु स्वतःच्या इच्छेने अवतार घेतात; आणि त्यावेळी [illegible] सर्व मोक्षांचा त्याग करून या सगुण ब्रह्माच्या सोबत राहतात !" २६

वानरांच्या अशा अनेक प्रकारे चर्चा होत्या. त्यांचा आवाज गिरिकंदरेत असलेल्या संपातीला ऐकू आला. त्याबरोबर तो आपल्या गुहेच्या तोंडाशी येऊन पाहतो तो वानरांची [illegible] पसरलेली त्याला दिसली. ती पाहून त्याला मोठा आनंद झाला. [illegible] उद्गार काढू लागला. "जगदीशाने आज मला अनायासे आहार मिळवून दिला. आता [illegible] करून टाकतो. कित्येक दिवस झाले अन्नावाचून मरतो आहे ! पोटभर खावयास कधी मिळाले [illegible] नाही. आणि आज [illegible] विधात्याने [illegible] सर्वच [illegible] अन्नाची [illegible] पाठविलेली दिसते !"

सर्व वानरांना भीतीने [illegible] झाले व [illegible]. या [illegible] मोठ्याने केले होते. त्याचा [illegible] ऐकून [illegible] अतिशय घाबरले व म्हणू लागले की, "आता मरण आले [illegible] नाही !"

त्या [illegible] गिधाडाला टकमक [illegible] पाहून [illegible] उठून उभे राहिले; जबाबदार व जरठ जांबवंताच्या काळजाचे पाणी पाणी झाले ! [illegible] अशी [illegible] बघून, आता सर्वांचे प्राण वाचविण्यासाठी [illegible] करून पाहावे असे त्याला वाटले. यांची [illegible] युवराज अंगदाला [illegible] शोकाकुल [illegible] म्हणाला," [illegible]

कह अंगद बिचारि मन माहीं । धन्य जटायू सम कोउ नाहीं ॥
राम काज कारन तनु त्यागी । हरि पुर गयउ परम बड़भागी ॥
सुनि खग हरष सोक जुत बानी । आवा निकट कपिन्ह भय मानी ॥
तिन्हहि अभय करि पूछेसि जाई । कथा सकल तिन्ह ताहि सुनाई ॥
सुनि संपाति बंधु कै करनी । रघुपति महिमा बहु बिधि बरनी ॥

दो ०—मोहि लै जाहु सिंधुतट देउँ तिलांजलि ताहि ।
बचन सहाइ करबि मैं पैहहु खोजहु जाहि ॥ २७ ॥

चौ ०—अनुज क्रिया करि सागर तीरा । कहि निज कथा सुनहु कपि बीरा ॥
हम द्वौ बंधु प्रथम तरुनाई । गगन गए रबि निकट उड़ाई ॥
तेज न सहि सक सो फिरि आवा । मैं अभिमानी रबि निअरावा ॥
जरे पंख अति तेज अपारा । परेउँ भूमि करि घोर चिकारा ॥
मुनि एक नाम चंद्रमा ओही । लागी दया देखि करि मोही ॥
बहु प्रकार तेहिं ग्यान सुनावा । देह जनित अभिमान छड़ावा ॥
त्रेताँ ब्रह्म मनुज तनु धरिही । तासु नारि निसिचर पति हरिही ॥
तासु खोज पठइहि प्रभु दूता । तिन्हहि मिलें तैं होब पुनीता ॥

गृध्रराज जटायूसारखा धन्य कोणी नाही ! रामकार्यासाठी त्याने आपल्या देहावर पाणी सोडले व तो हरिपुरास (वैकुंठास) गेला. त्याच्या परमभाग्याला सीमाच नाही ! "

अंगदाने जटायूच्या भाग्याबद्दल हर्ष व स्वतःच्या प्राणसंकटामुळे शोक असे मिश्रविकारांचे (हर्षशोकयुक्त) भाषण केले व संपातीच्या कानात त्यातील ' जटायू ' हा शब्द फारच जोराने घुसला ! त्याची जिज्ञासा जागी होऊन तिच्या तृप्तीसाठी तो अधिकाधिक जवळ येऊ लागला. परंतु त्यामुळे वानर समुदायाच्या भीतीने अगदी थरकापच झाला.

त्यांची ती भीतिग्रस्त स्थिती पाहून संपातीने त्यांना अभय दिले व जवळ जाऊन जटायू संबंधी विचारले; तेव्हा अंगदाची मात्रा लागू झाल्याची साक्ष पटून त्यांना धीर आला. जटायूची सर्व कथा त्यांनी सांगितली व आपल्या धाकट्या भावाने एवढी महान् कर्तबगारी केल्याचे समजून संपाती नानाप्रकारे रघुपतीचा महिमा वर्णू लागला. शेवटी त्याने विनंती केली, " हे वानरहो ! मला येथून सागराच्या तीराजवळ न्या, म्हणजे आपल्या भावाला मी तिलांजली देतो. मग तुम्हाला जे सहाय्य नुसत्या शब्दांनी करता येईल ते करीन. एवढे मात्र खास सांगतो की, तुम्ही जिचा शोध करीत आहात ती तुम्हाला निश्चित सापडेल. " २७

संपातीला सागराच्या तीराला नेण्याचे काम मोठ्या प्रेमाने वानरांनी कृतज्ञता पूर्वक केले. तेथे गेल्यावर, आपल्या धाकट्या भावाची क्रिया त्याने केली. नंतर सर्व वानरांना उद्देशून तो म्हणाला, हे वानर वीरहो ! आता माझी स्वतःची कथा तुम्हाला सांगतो ती ऐका.

माझा धाकटा भाऊ जटायू आणि मी, ऐन तारुण्यात असता स्वबलाच्या मस्तीने एके दिवशी आकाशात उंच उंच उडत अगदी सूर्याजवळ चाललो. सूर्याच्या तेजाची झळ लागताच तो परत फिरला; परंतु मी स्वतःच्या शक्तीचा अभिमान बाळगणारा असल्याने सूर्याच्या अगदी जवळ गेलो. परंतु ते तेज अत्यंत प्रखर ! माझे पंख जळाले व मी घोर चीत्कार करत जमिनीवर येऊन पडलो.

" अशाही आपत्काळी चंद्रमा नावाचे मुनी सदय होऊन माझ्या जवळ आले. माझी ती दशा पाहून त्यांनी सहानुभूतिपूर्वक मला पुष्कळ प्रकारांनी ज्ञानाचा उपदेश केल्यामुळे माझा देहजनित अभिमान नाहीसा झाला. शेवटी ते म्हणाले, ' त्रेतायुगात परब्रह्मच मानवशरीर धारण करील आणि निशाचरांचा राजा त्यांची स्त्री पळवून नेईलच. तिच्या शोधासाठी प्रभू दूत पाठवतील. त्यांची आणि तुझी भेट होऊन त्यांचा तुझ्या शरीराला

जमिहहिं पंख करसि जनि चिंता। तिन्हहि देखाइ देहेसु तैं सीता॥
मुनि कइ गिरा सत्य भइ आजू। सुनि मम बचन करहु प्रभु काजू॥
गिरि त्रिकूट ऊपर बस लंका। तहँ रह रावन सहज असंका॥
तहँ असोक उपबन जहँ रहई। सीता बैठि सोच रत अहई॥

दो० –मैं देखउँ तुम्ह नाहीं गीधहि दृष्टि अपार।
बूढ़ भयउँ न त करतेउँ कछुक सहाय तुम्हार॥ २८॥

चौ० –जो नाघइ सत जोजन सागर। करइ सो राम काज मति आगर॥
मोहि बिलोकि धरहु मन धीरा। राम कृपाँ कस भयउ सरीरा॥
पापिउ जा कर नाम सुमिरहीं। अति अपार भवसागर तरहीं॥
तासु दूत तुम्ह तजि कदराई। राम हृदयँ धरि करहु उपाई॥
अस कहि गरुड़ गीध जब गयऊ। तिन्ह कें मन अति बिसमय भयऊ॥
निज निज बल सब काहूँ भाषा। पार जाइ कर संसय राखा॥
जरठ भयउँ अब कहइ रिछेसा। नहिं तन रहा प्रथम बल लेसा॥
जबहिं त्रिबिक्रम भए खरारी। तब मैं तरुन रहेउँ बल भारी॥

स्पर्श झाला की, ते [illegible] होतील. [illegible] काही चिंता करू नकोस. मग त्यांना सीता कुठे आहे ते बिनचूक दाखवत जा." [illegible] मुनीचे ते [illegible] वाणी आज खरी ठरलीच; म्हणून [illegible] तुम्हीही [illegible] कार्य करा.

"आता सीतेसंबंधी [illegible] सांगतो [illegible]. त्रिकूट पर्वतावर [illegible] आहे. तेथे रावण राज्य करत आहे. तो स्वभावतःच कोणत्याही प्रकारची शंका [illegible] आहे. त्या लंकानगरीत अशोक या नावाचे एक उपवन असून, त्यात सीता [illegible] आहे. त्या अशोकाच्याच झाडाखाली बसून ती अखंड शोकमग्न आहे, हे सर्व मला दिसत आहे. [illegible] मात्र दिसत नाऽही! याचे कारण [illegible] दृष्टी आहे. आता मी म्हातारा झालो आहे, नाहीतर मी तुम्हाला काही तरी मदत केली असती!" २८

"तथापि [illegible] काही महत्त्वाच्या [illegible]. जो शंभर योजनांचा [illegible] ओलांडील व जो बुद्धीचे आगर असेल, त्यालाच हे रामकार्य करणे शक्य आहे. [illegible] बुद्धीच [illegible]. [illegible] माझ्याकडे पाहून तरी मनात धीर धरा; विचार करा की, माझे शरीर [illegible] तुम्ही [illegible] कसे होते आणि रामकृपेने आता त्याला कसे [illegible] आहे!

"ज्याच्या [illegible] नामाच्या उच्चाराने [illegible] अपार [illegible] जातात; त्याचे तुम्ही दूत [illegible] आणि [illegible] अजिबात सोडा. श्रीरामचंद्रांचे [illegible] ध्यान करीत कार्याला प्रारंभ करा. म्हणजे ते [illegible] पडेल."

एवढे सांगून [illegible] अस्त्याने. [illegible], 'हे गरुड! [illegible] जेव्हा त्या अजस्र [illegible] आकाशात [illegible], तेव्हा [illegible] आश्चर्यचकित झाले!' [illegible] आता [illegible] प्रश्न पुढे [illegible] आपल्या सामर्थ्याची मर्यादा किती आहे, ते [illegible] प्रारंभ केला. परंतु [illegible] आत्मविश्वासाने मात्र निःसंशय कोणीच खात्री देईना!

ऋक्षेश जांबवंत म्हणाले, "वीर हो! मी आता [illegible] थकून गेलो आहे, हे तुम्ही पाहताच. माझ्या शरीरात, पूर्वीच्या [illegible] उरलेला नाही [illegible]! त्यावेळी राम [illegible] त्रिविक्रम झाले, त्यावेळी मी [illegible] होतो, माझ्या ताकदीला तेव्हा मर्यादाच नव्हती!

दो ० – बलि बाँधत प्रभु बाढ़ेउ सो तनु बरनि न जाइ।
उभय घरी महँ दीन्हीं सात प्रदच्छिन धाइ ।। २९ ।।

चौ ० –अंगद कहइ जाउँ मैं पारा। जियँ संसय कछु फिरती बारा ।।
जामवंत कह तुम्ह सब लायक। पठइअ किमि सबही कर नायक ।।
कहइ रीछपति सुनु हनुमाना। का चुप साधि रहेहु बलवाना ।।
पवन तनय बल पवन समाना। बुधि बिबेक बिग्यान निधाना ।।
कवन सो काज कठिन जग माहीं। जो नहिं होइ तात तुम्ह पाहीं ।।
राम काज लगि तव अवतारा। सुनतहिं भयउ पर्बताकारा ।।
कनक बरन तन तेज बिराजा। मानहुँ अपर गिरिन्ह कर राजा ।।
सिंहनाद करि बारहिं बारा। लीलहिं नाघउँ जलनिधि खारा ।।
सहित सहाय रावनहि मारी। आनउँ इहाँ त्रिकूट उपारी ।।
जामवंत मैं पूँछउँ तोही। उचित सिखावनु दीजहु मोही ।।
एतना करहु तात तुम्ह जाई। सीतहि देखि कहहु सुधि आई ।।
तब निज भुज बल राजिवनैना। कौतुक लागि संग कपि सेना ।।

" बलीला बांधून टाकण्यासाठी जेव्हा प्रभूंनी आपला देह वाढवला, त्यावेळच्या त्यांच्या देहाचे वर्णन कोण करू शकणार ? पण तुम्हाला सांगून ठेवतो, एवढयाही अमर्याद देहाला धावत जाऊन अवघ्या दोन घटकांच्या काळात या म्हाताऱ्याने प्रदक्षिणा केल्या ! ! २९

जांबवंताचे हे भाषण संपताच युवराज अंगद म्हणाले, " सागराला उल्लंघून जाणे आपणाला शक्य आहे. परंतु पुन्हा परत येववेल की नाही याची मात्र खात्री वाटत नाही ! "

जांबवंताने अंगदाची बाजू सांभाळून धरण्यासाठी लगेच निर्वाळा दिला, " युवराज तुम्हाला अशक्य असे काहीच नाही एवढे सामर्थ्य तुम्हाला आहे; परंतु तुम्ही आमचे नायक असल्यामुळे आम्ही तुम्हाला कसे पाठवावे ? "

एवढे बोलून ऋक्षपतीने हनुमंताला रोखले व म्हणतात " हनुमान ! अरे तू सर्व श्रेष्ठ बली असून असा मुक्यासारखा का बसला आहेस ? अरे, तू पवनतनय असल्याने तुझे सामर्थ्य पवनासारखे आहे. त्याचप्रमाणे बुद्धी, ज्ञान व विज्ञान यांचे तू निवासस्थान आहेस ! म्हणून जगात असे कोणते कठीण कार्य आहे की, हे तात ! ते तुझ्या शक्तीच्या आटोक्याबाहेरचे ठरेल ! तुझा अवतार रामकार्यासाठीच आहे. " हा संदेश कानात शिरताच हनुमान् एकदम पर्वताएवढे झाले !

त्यांचा तो पर्वताकार देह पिवळा पिवळा धमक सोन्यासारखा होता. त्याचे तेज चारी दिशांना एवढे पसरले की, जणू हे पर्वतांचे राजे दुसरे सुमेरूच !

हनुमंतांनी पुनः पुन्हा मोठ्याने सिंहनाद केला व म्हणाले, " हा खारा समुद्रना, मी लीलेने त्यावरून उड्डाण करून जाईन. इतकेच काय त्याच्या अनुयायांसह रावणाला ठार करू का काय ते सांगा पाहू. वाटल्यास त्रिकूट पर्वतच उपटून येथे आणतो !

" जांबवंत ! मी तुम्हाला विचारतो, तरी मी निश्चित काय करावे याचा योग्य तो मला उपदेश करा. "

जांबवंतांनी हनुमंताच्या अपेक्षेप्रमाणे त्याला कल्पना दिली, " हे तात ! तुम्ही लंकेला जाऊन एवढेच करावे की, सीतेची गाठ घ्यावी आणि परत येऊन सीतेचे कुशल-समाचार सांगावा.

छं० – कपि सेन संग सँघारि निसिचर रामु सीतहि आनिहैं ।
त्रैलोक पावन सुजसु सुर मुनि नारदादि बखानिहैं ॥
जो सुनत गावत कहत समुझत परम पद नर पावई ।
रघुबीर पद पाथोज मधुकर दास तुलसी गावई ॥

दो० – भव भेषज रघुनाथ जसु सुनहिं जे नर अरु नारि ।
तिन्ह कर सकल मनोरथ सिद्ध करहिं त्रिसिरारि ॥ ३० (क) ॥

सो० – नीलोत्पल तन स्याम काम कोटि सोभा अधिक ।
सुनिअ तासु गुन ग्राम जासु नाम अघ खग बधिक ॥ ३० (ख)

मासपारायण, तेईसवाँ विश्राम

इति श्रीमद्रामचरितमानसे सकलकलिकलुषविध्वंसने चतुर्थः सोपानः समाप्तः ।

॥ किष्किन्धाकांड समाप्त ॥

"मग राहिलेले रघुवीर कौतुकानेच कपिसैन्य बरोबर घेऊन स्वतःच्याच बाहुबळाने सीतेला सोडवून आणतील. प्रभू रामचंद्र काही सैन्य बरोबर घेऊन निशाचरांचा वध करतील आणि सीतेला आणतील; आणि या त्रैलोक्याला पावन करणाऱ्या सुयशाचे गायन देव, मुनी व नारदादिक करतील."

ज्याच्या श्रवणाने, गायनाने, कथनाने व समजण्याने मनुष्यांना परमपद प्राप्त होते, ते सुयश, रघुवीर पदकमलांच्या ठिकाणचा मधुकर रूप तुलसीदास गात आहेत.

आता फलश्रुती सांगतात–जे कोणी स्त्री अथवा पुरुष [illegible] भवरोगाचे औषध [illegible] सेवन करतील (ऐकतील), त्यांचे सर्व मनोरथ त्रिपुरारी शंकर सिद्ध करतील. ३० (क)

म्हणून ज्याचे शरीर नीलकमलाप्रमाणे तेजस्वी श्यामवर्णाचे आहे, ज्यामुळे ज्याची शोभा, कोटी कामदेवांच्या सौंदर्यापेक्षा अधिक आहे, ज्याचे नाव पापरूपी पक्ष्यांचा संहार करणारे आहे, त्यांच्या गुणसमूहाचे श्रवण करणे हेच आपले श्रेष्ठ कर्तव्य ठरते. ३० (ख)

याप्रमाणे कलियुगातील सर्व दोषांचा सर्वस्वी नाश करणाऱ्या श्रीरामचरितमानसाचा चतुर्थ सोपान संपला.

॥ किष्किन्धाकांड समाप्त ॥

॥ श्री रामचंद्राच्या चरणी सर्व अर्पण ॥






लंकेवर स्वारी करण्यासाठीं श्रीराम [illegible] [illegible] देत आहे.

॥ श्रीगणेशाय नमः ॥

॥ श्रीराम समर्थ ॥



पञ्चम सोपान

श्लोक

शान्तं शाश्वतमप्रमेयमनघं निर्वाणशान्तिप्रदं
ब्रह्माशम्भुफणीन्द्रसेव्यमनिशं वेदान्तवेद्यं विभुम् ।
रामाख्यं जगदीश्वरं सुरगुरुं मायामनुष्यं हरिं
वन्देऽहं करुणाकरं रघुवरं भूपालचूडामणिम् ॥ १ ॥

नान्या स्पृहा रघुपते हृदयेऽस्मदीये
सत्यं वदामि च भवानखिलान्तरात्मा ।
भक्तिं प्रयच्छ रघुपुङ्गव निर्भरां मे
कामादिदोषरहितं कुरु मानसं च ॥ २ ॥

अनुवादककृत-मंगलाचरण

ज्याच्या ऋणातून मुक्त होण्यास स्वतः रामचंद्रसुद्धा समर्थ होत नाहीत त्या, भक्तांमध्ये अग्रगण्य असलेल्या, खलांचा समुदाय व खलांचे वन यांचा विध्वंस करणाऱ्या, संसारसागराच्या पार जाण्याचा निश्चय करणारास ज्याचे सहाय मिळू शकते अशा, वानरांचे मरणभय हरण करणाऱ्या, अंजनीपुत्र, वायुसुत कपीश्वरास मी वन्दन करतो. १

ज्याच्या अनुग्रहरूपी सूर्याच्या किरणांनी सर्व जग नाहीसे केले, त्या केवल चैतन्यमूर्ती, ब्रह्मविद्वरिष्ठ श्रीगुरुमहाराजांची मी स्तुती करतो. २

मूळ मंगलाचरण

शान्त; नित्य; अस्तित्वात असणारे; प्रमाणांनी ज्यांचे ज्ञान होऊ शकत नाही; मायाजनित पाप-विकार ज्यांच्यात नाहीत; मोक्ष व शान्ती (भक्ती) देणारे, ब्रह्मदेव, शंकर व शेष ज्यांची निरंतर सेवा करतात; जे वेदान्ताच्या साधनाने जाणले जातात; जे आकाशासारखे सर्वव्यापी आहेत; सर्व जगाचे ईश्वर; सर्व देवांत श्रेष्ठ; मायेच्या योगाने मनुष्यरूप घेणारे; राजांचे शिरोमणी, करुणेचे सागर, राम नावाचे हरी; असे जे रघुवर त्यांना मी वन्दन करतो. १

हे रघुपते! मी सत्य सांगतो की, माझ्या हृदयात (अन्य) दुसरी काही इच्छा नाही. हे आपण सर्वांचे अंतरात्मा आहात, त्यामुळे जाणताच. हे रघुकुलश्रेष्ठ! मला प्रगाढ (पूर्ण) भक्ती द्या व माझे मन कामादि विकाररहित राहील असे करा. २

अतुलितबलधामं हेमशैलाभदेहं
दनुजवनकृशानुं ज्ञानिनामग्रगण्यम् ।
सकलगुणनिधानं वानराणामधीशं
रघुपतिप्रियभक्तं वातजातं नमामि ।। ३ ।।

चौ० —जामवंत के बचन सुहाए । सुनि हनुमंत हृदय अति भाए ।।
तब लगि मोहि परिखेहु तुम्ह भाई । सहि दुख कंद मूल फल खाई ।।
जब लगि आवौ सीतहि देखी । होइहि काजु मोहि हरष बिसेषी ।।
यह कहि नाइ सबन्हि कहुँ माथा । चलेउ हरषि हियँ धरि रघुनाथा ।।
सिंधु तीर एक भूधर सुंदर । कौतुक कूदि चढ़ेउ ता ऊपर ।।
बार बार रघुबीर सँभारी । तरकेउ पवनतनय बल भारी ।।
जेहिं गिरि चरन देइ हनुमंता । चलेउ सो गा पाताल तुरंता ।।
जिमि अमोघ रघुपति कर बाना । एही भाँति चलेउ हनुमाना ।।

अतुल बलाचे निवासस्थान, सोन्याच्या पर्वतासारखे तेजस्वी शरीर असलेले, दैत्यरूपी वनाचे दावाग्नी, ज्ञान्यात सर्व श्रेष्ठ, सर्व सद्‌गुणांचे सागर, वानरांचे मुख्य अधिकारी आणि रघुपतीचे आवडते भक्त अशा पवन-सुताला मी प्रणाम करतो. ३

याप्रमाणे सुन्दरकांडाचे प्रारंभीचे मंगल झाल्यावर रामायण कथेस प्रारंभ होतो.

किष्किंधाकांडाच्या शेवटी हनुमंताने जांबवंतास विचारले की, “ जांबवंत मी पुसतो तुजसी । करा योग्य उपदेशा मजसी ।। ” अशी विनंती केल्यावर ‘ जाउनि इतके तात करावे । सीते बघुनि वृत्त आणावे । अशी कामगिरी करावी असे जांबवंताने थोडक्यात सांगून रामचंद्र हे प्रभू कसे आहेत, सर्व काही तेच करणार असून कौतुकासाठी कपींचे साहाय्य घेणार आहेत, वगैरे अवतार रहस्य त्याने प्रकट केल्यावर मागील काण्ड फलश्रुतीसह समाप्त झाले. त्याचा कथा संदर्भ घेऊन आता सुंदरकाण्डाला प्रारंभ होत आहे.

जांबवंताचे सुंदर भाषण ऐकल्यानंतर हनुमंताच्या चित्ताला ते फारच आवडले. पुढे काय करावे हा प्रश्न संपून कर्तव्याची निश्चिती झाली. हनुमान आता जावयास सिद्ध होऊन निरोप घेताना म्हणतात, “ मी परत येईपर्यंत तुम्हाला कंटाळवाणा काळ जाणार. त्याला इलाज नाही. तोपर्यंत कंद-मूळ-फळे खात दुःख सहन करा व माझी वाट पाहात राहा. सीतेला पाहून मी तिची गाठ घेईन व लगेच परतेन. माझ्या मनाला अनावर उत्साह वाटत आहे, हाच शुभमुहूर्त व यावरून हे कार्य निश्चित होणार अशी मला खात्री वाटते. ”

एवढे सांगून हनुमंताने सर्वांनाच नमस्कार केला. हृदयात श्रीरघुनाथाचे ध्यान करत अत्यंत आनंदाने हा वायुसुत निघाला ! अफाट समुद्रावरून उड्डाण करावयाचे होते म्हणून योग्य तऱ्हेची उसळी (जंप किंवा स्टार्ट-इंग्रजी) मारता यावी म्हणून जवळच्याच एका सुंदर पर्वतावर त्याने टुणकन उडी मारली. पावित्र्यात उभे राहून उसळी मारण्याची तयारी केली. अनेक वेळा रघुवीराचे हृदयात स्मरण केले, आणि बलाढ्य पवन-तनयाने जोराने उड्डाण केले !

त्या उसळीचा एवढा हपका त्या पर्वताला बसला की, तो तत्क्षणी पाताळालाच गेला !

अफाट आकाश वर व अगाध सागर खाली अशा स्थितीत, रघुपतीच्या अमोघ बाणाप्रमाणे हनुमंत सपाट्याने पुढे निघाले.

[स्कंध पुराणाच्या आधारे मार्गशीर्ष शु. ।। ११ ला हनुमान सागरोल्लंघनास निघाले, तेथून पुढचे सर्व तिथिपत्रक गू. च. पाहा.]

हनुमंताचे समुद्रावरून उल्लंघन सुरू होताच सागर विचार करू लागला, हा रघुपतीचा दूत आहे,

जलनिधि रघुपति दूत बिचारी । तैं मैनाक होहि श्रमहारी ।।

दो० —हनूमान तेहि परसा कर पुनि कीन्ह प्रनाम ।
राम काजु कीन्हें बिनु मोहि कहाँ बिश्राम ।। १ ।।

चौ० —जात पवनसुत देवन्ह देखा । जानैं कहुँ बल बुद्धि बिसेषा ।।
सुरसा नाम अहिन्ह कै माता । पठइन्हि आइ कही तेहिं बाता ।।
आजु सुरन्ह मोहि दीन्ह अहारा । सुनत बचन कह पवनकुमारा ।।
राम काजु करि फिरि मैं आवौं । सीता कइ सुधि प्रभुहि सुनावौं ।।
तब तव बदन पैठिहउँ आई । सत्य कहउँ मोहि जान दे माई ।।
कवनेहुँ जतन देइ नहिं जाना । ग्रससि न मोहि कहेउ हनुमाना ।।
जोजन भरि तेहिं बदनु पसारा । कपि तनु कीन्ह दुगुन बिस्तारा ।।
सोरह जोजन मुख तेहिं ठयऊ । तुरत पवनसुत बत्तिस भयऊ ।।
जस जस सुरसा बदनु बढ़ावा । तासु दून कपि रूप देखावा ।।
सत जोजन तेहिं आनन कीन्हा । अति लघु रूप पवनसुत लीन्हा ।।

याला यावेळीं सहाय्य करणे आपले कर्तव्य. यावळी मैनाकाची मदत घेणे इष्ट म्हणून तो मैनाकास म्हणाला. " हे मैनाका ! यावेळी रामदूताचे श्रमहरण करण्याचे सुपुण्य तू जोड "

लगेच मैनाकाचे [illegible] असा [illegible]-जलमंडल असा हिरण्मय आपले मस्तक सागराच्यावर हनुमंताच्या वाटेवर काढले. ते पाहून मैनाकाला आपल्या उजव्या हाताचा स्पर्श केला व मस्तक नमवून नंतर प्रणाम केला. पवनसुत [illegible] म्हणाला, " तुला धन्यवाद ! परंतु रामकार्य [illegible] मला विसावा घेणे शक्यच नाही ! " १

याप्रमाणे एका विघ्नातून हनुमान मोकळा होतो तोच त्याच्या पुढे अधिक भयंकर दुसरे विघ्न ' आ ' वासून उभे ! आपले काम [illegible] निघालेल्या पवनसुताचे बळ व बुद्धी ते काम करण्यास विशेष प्रकारे योग्य आहे की नाही याची खात्री करून घेण्याची देवांना इच्छा झाली. त्यासाठी परीक्षक म्हणून सर्पांची माता ' सुरसा ' हिची त्यांनी योजना केली.

ती हनुमंताच्या वाटेत आडवी आली व म्हणते, ' अहाहा ! आज देवांनी मला काय उत्तम आहार दिला आहे ! "

त्यावर [illegible] नम्रपणे सुचवले, " मातोश्री ! मी रामाचे काम करून परत येतो. सीतेचा शोध केल्याचे वृत्त प्रभूला देतो; आणि पुन्हा येऊन तुझ्या मुखात नक्की शिरेन हे मी अगदी खरे खरे सांगतो. माते ! यावेळी मला जाऊ दे ! "

परंतु अनेक प्रकारे प्रयत्न करूनही ती हनुमन्ताला पुढे जाऊ देईना त्यावेळी ' तू मला का नाही ग्रासत ? ' असे तिला विचारले. कारण ती आपणाला गिळू शकणार नाही ही त्याला खात्री होतीच !

हे दिलेले आव्हान ऐकताच सुरसेने एकदम एक योजनभर आपले मुख पसरले. कपीने लगेच आपल्या शरीराचा आकार दोन योजने केला ! त्याबरोबर तिने आपले तोंड सोळा योजनांच्या अंतराएवढे केले. पवन-सुताचा देह तात्काळ बत्तीस योजनांचा झाला. आता तिला चांगलाच चेव आला ! सुरसेने जेवढे विशाल तोंड करावे त्याच्या दुप्पट आकाराचा देह हनुमंतांनी करावा असा क्रम सुरू झाला. शेवटी तिने वासून आपले तोंड शंभर योजनाएवढे आवाढव्य पसरले !

पवनसुताने देवदूतांचा हा खेळ आपल्या बुद्धिबळाने उधळविला. तो एकदम अत्यंत लहान मशका-

बदन पइठि पुनि बाहेर आवा । मागा बिदा ताहि सिरु नावा ।।
मोहि सुरन्ह जेहि लागि पठावा । बुधि बल मरमु तोर मैं पावा ।।

दो ० –राम काजु सबु करिहहु तुम्ह बल बुद्धि निधान ।।
आसिष देइ गई सो हरषि चलेउ हनुमान ।। २ ।।

चौ० – निसिचरि एक सिंधु महुँ रहई । करि माया नभु के खग गहई ।।
जीव जंतु जे गगन उड़ाहीं । जल बिलोकि तिन्ह कै परिछाहीं
गहइ छाहँ सक सो न उड़ाई । एहि बिधि सदा गगनचर खाई ।।
सोइ छल हनुमान कहँ कीन्हा । तासु कपटु कपि तुरतहिं चीन्हा ।।
ताहि मारि मारुतसुत बीरा । बारिधि पार गयउ मतिधीरा ।।
तहाँ जाइ देखी बन सोभा । गुंजत चंचरीक मधु लोभा ।।
नाना तरु फल फूल सुहाए । खग मृग बृंद देखि मन भाए ।।
सैल बिसाल देखि एक आगें । ता पर धाइ चढ़ेउ भय त्यागें ।।

एवढा बनला, शिरला तिच्या मुखातून आणि पडला कानाच्या भोकातून बाहेर !! लगेच तिच्यापुढे पूर्वरूपात आपले मस्तक नमवून हनुमंताने निरोप मागितला.

" आईसाहेब ! आता आहे का जाण्यास परवानगी ? "

माता म्हणून नमस्कार केल्यावर आशीर्वाद देणे भागच होते, शिवाय परीक्षेत उत्तम प्रकारे उत्तीर्ण झाल्याने ती संतुष्ट झाली व म्हणते, " देवांनी मला ज्या हेतूने पाठविले, तो सफल झाला. तुझ्या बळाचे व बुद्धीचे रहस्य मला बरोबर कळले. हे तात ! तुम्ही बळ-बुद्धीचे निधान असल्यामुळे सर्व रामकार्य साधाल. बर असा माझा मनःपूर्वक तुम्हाला आशीर्वाद आहे ! "

आपण आपले काम चोख बजावले या समाधानाने सुरसा निघून गेली व अंगीकृत कार्य यशस्वी होणार असा शुभाशीर्वाद प्रथमच मिळाल्याने संतुष्ट होऊन हनुमान पुढे चालला. २

इतक्यात तिसऱ्या विघ्नाची नांदी झाल्याचे हनुमंताला कळले. त्या सागरात सिंहिका नावाची राहूची आई राक्षसी होती. आपल्या मायेने, आकाशातून जाणाऱ्या पक्ष्यांना धरून ती खात असे. आकाशातून उडणाऱ्या पक्ष्याची पाण्यात पडलेली पडछाया प्रथम ती धरत असे. ज्या पक्ष्याची छाया तिच्या मुखात सांपडे, त्याला लगेच वरून खाली जबरदस्त ओढ लागावयाची आणि इतकी की अखेर तो पक्षी सरळ तिच्या मुखात जात असे. या रीतीने आकाशातून जाणाऱ्यांना खाण्याचा तिचा क्रम होता !

वेगाने आकाशातून उड्डाण चालू असता हनुमंताची गती अशीच कुंठित होऊन त्याला खाली ओढ लागली; परंतु कपीने तिचे कपट चटकन् ओळखले. एका तडाख्यातच तिचा निकाल लावला व धीराचा आणि बुद्धीचा असा हनुमान पुन्हा कोणतेही विघ्न वाटेत न येता, सागराच्या पैलतीरास जाऊन पोचला !

समुद्राच्या काठावर उतरताच पुढे नजर टाकली.तो त्याला मनोहर वनशोभा पाहावयास मिळाली. मधाच्या लोभाने भ्रमरांचा गुंजारव त्याच्या कानी आला. नाना प्रकारचे सुन्दर वृक्ष फळाफुलांनी लहडलेले त्याने पाहिले. त्या ठिकाणचे पक्ष्यांचे आणि पशूंचे समुदाय पाहून तर त्याचे मन गुंगूनच गेले ! पण असे असूनही एकाही क्षणाचा विसावा न घेता किंवा एकही फळ तोंडात न घालता पुढेच दिसलेल्या एका विशाल पर्वतावर उडया मारीत अगदी निर्धास्तपणे तो चढला !

हा त्रिकूट पर्वत, ज्याच्यावर हनुमान चढला त्या शिखराचे नाव सुवेल. याच्यावर खूप मोठी सपाटी ! पुढील राम-रावण युद्ध याच विस्तृत जागी होणार. या स्थानाचे महत्त्व फारच असल्याने रावणाने या पर्वत-

उमा न कछु कपि कै अधिकाई। प्रभु प्रताप जो कालहि खाई॥
गिरि पर चढ़ि लंका तेहिं देखी। कहि न जाइ अति दुर्ग बिसेषी॥
अति उतंग जलनिधि चहु पासा। कनक कोट कर परम प्रकासा॥

छं०— कनक कोट बिचित्र मनि कृत सुंदरायतना घना।
चउहट्ट हट्ट सुबट्ट बीथीं चारु पुर बहु बिधि बना॥
गज बाजि खच्चर निकर पदचर रथ बरूथन्हि को गनै।
बहुरूप निसिचर जूथ अतिबल सेन बरनत नहिं बनै॥ १॥
बन बाग उपबन बाटिका सर कूप बापीं सोहहीं।
नर नाग सुर गंधर्ब कन्या रूप मुनि मन मोहहीं॥
कहुँ माल देह बिसाल सैल समान अतिबल गर्जहीं।
नाना अखारेन्ह भिरहिं बहुबिधि एक एकन्ह तर्जहीं॥ २॥
करि जतन भट कोटिन्ह बिकट तन नगर चहुँ दिसि रच्छहीं।

शिखरावर पहारेकरी म्हणून प्रत्यक्ष काळाचीच नेमणूक केली होती. असा सर्व प्रकार असता हा कपी त्या ठिकाणी थोडीही भीती न वाटता गेला. हे ऐकून पार्वतीला साहजिकच थोडे आश्चर्य वाटले. तेव्हा शंकर एक महत्त्वाचा सिद्धान्त या प्रसंगानुरूप सांगतात.

" उमे ! अग यात या कपीचा काही फारसा मोठेपणा नाही. हा सर्व प्रभूचाच प्रताप आहे. जो प्रत्यक्ष काळाला जरूर तर खाऊन टाकण्यास शेवटी कमी करणार ! "

अत्यंत उंच अशा त्या सुवेळ शिखरावर बैठक मारून हनुमंताने [illegible] राजधानी असलेली लंका त्याच्या नजरेस भरली ! तिचा कडेकोट बंदोबस्त पाहून तर मनसुद्धा चकित झाले ! अगोदर त्या नगरीची रचना फारच उंचवट्यावर, त्यातच सभोवती पसरलेला अफाट समुद्र ! [illegible] लखलख प्रकाश पाडणाऱ्या अशा चमत्कार सोन्याच्या तटाने सर्व लंकेला तटबंदी केलेली !

हनुमंताने अधिक बारकाईने निरीक्षण सुरू केले. तो सोन्याचा कोट. चित्रविचित्र रत्नांनी जडलेला असल्याने फारच रमणीय दिसत होता ! त्या तटाच्या आत नानाप्रकारचे महाल. घरे. वाडे अगदी पक्कात आहेत. सर्व नगरातील चव्हाटे. बाजार. [illegible] मोठमोठ्या रस्त्यांनी उत्तम [illegible] आहे. बाजार तर [illegible] ! अशा प्रकारे त्या नगरीची सर्वच [illegible] सुंदर बनवलेली !

तसेच हत्ती. घोडे. खेचरे. [illegible] [illegible] आहेत की त्यांची मोजदाद करणेच अशक्य ! [illegible] [illegible] [illegible] अत्यंत बलिष्ठ अशा राक्षसांचे सैन्य [illegible] वर्णन कोण करू शकणार !

त्यानंतर हनुमंत आपल्या [illegible] [illegible] वने. बागा. उपवने. पुष्पवाटिका. तलाव. [illegible] [illegible] मनुष्य. नाग. देव. गंधर्व इत्यादींच्या कन्या [illegible] सौंदर्याने मुनींच्या मनालासुद्धा मोह पडावा ! [illegible] [illegible] [illegible] आहेत !

हे सर्व [illegible] अनुमान [illegible] हनुमान त्या दृष्टीने पाहू लागताच [illegible] विकट अशा देहाचे [illegible] चारीबाजूंनी अगदी कडक पहारा ठेवून. लंकेचे रक्षण करीत आहेत !

कहुँ महिष मानुष धेनु खर अज खल निसाचर भच्छहीं ॥
एहि लागि तुलसीदास इन्ह की कथा कछु एक है कही ।
रघुबीर सर तीरथ सरीरन्हि त्यागि गति पैहहिं सही ॥ ३ ॥

दो० – पुर रखवारे देखि बहु कपि मन कीन्ह बिचार ।
अति लघु रूप धरौं निसि नगर करौं पइसार ॥ ३ ॥

चौ० – मसक समान रूप कपि धरी । लंकहि चलेउ सुमिरि नरहरी ॥
नाम लंकिनी एक निसिचरी । सो कह चलेसि मोहि निंदरी ॥
जानेहि नहीं मरमु सठ मोरा । मोर अहार जहाँ लगि चोरा ॥
मुठिका एक महा कपि हनी । रुधिर बमत धरनीं ढनमनी ॥
पुनि संभारि उठी सो लंका । जोरि पानि कर बिनय ससंका ॥
जब रावनहि ब्रह्म बर दीन्हा । चलत बिरंचि कहा मोहि चीन्हा ॥
बिकल होसि तैं कपि कें मारे । तब जानेसु निसिचर संघारे ॥
तात मोर अति पुन्य बहूता । देखेउँ नयन राम कर दूता ॥

इतक्यात पवनसुताला एक किळसवाणा प्रकार नजरेस आला. काही काही ठिकाणी दुष्ट राक्षस, म्हशी, रेडे, माणसे, गायी, गाढवे, शेळ्या यांना जसेच्या तसेच खात आहेत !!

हे सर्व रघुवीरबाणरूपी तीर्थात देहत्याग करून परम गती पावणार, हे सत्य असल्यानेच तुलसीदासांनी त्रोटक अशी यांची कथा सांगितली.

नगररक्षकांचा कडेकोट बंदोबस्त प्रत्यक्ष पाहिल्यावर साहजिकच दूरदर्शी रामदूताच्या लक्षात आले की, दिवसा प्रवेश सुखासुखी होणे अशक्य ! मुख्य काम बाजूस राहून गौण गोष्टीत शक्तीचा व काळाचा व्यर्थ व्यय होणार !

त्यामुळे या विचारात अत्यंत ल्हानरूप घेऊनच रात्री नगरात शिरण्याचे त्यांचे ठरले. ३

रात्र झाली. हनुमान अगदी बारीक चिल्टाएवढा झाला ! नरहरीचे स्मरण करून लंकेत प्रवेश करण्यासाठी निघाला. पण छे ! अशाहि स्थितीत त्याच्या कानावर दरडावून बोलल्याचे काही शब्द पडले, "कोण तू ? माझा अपमान करून चोरासारखा कुठे आणि कशासाठी नगरात शिरतोस ? "

हनुमान आश्चर्याने पाहू लागले. ती एक लंका दुर्गाची देवी अत्यंत जागरुक लंकिनी नावाची राक्षसीण; मुख्य द्वाराचे रक्षण करणारी रात्रंदिवस, विशेष सामर्थ्याने युक्त अशी, खडी उभी होती ! ती पुढे बोलू लागली, शठा ! (लबाड, मध्यस्थ) तुला माझ्या सामर्थ्याचे रहस्य समजले नाही वाटते ? लंकेत शिरणारा प्रत्येक चोर मला खाऊन टाकण्याचा अधिकार आहे, समजलास ? "

ही दरडावणीची भाषा कानी पडली व अन्य उपाय थकले, तेव्हा समुद्रोल्लंघनाच्या वेळेएवढे एकदम पर्वताकार शरीर प्रकट केले ! तरीही रस्ता मिळेना म्हणून नाइलाजाने एक डाव्या हाताची झणझणीत बुक्की मारली; त्याबरोबर ती भयंकर मोठी राक्षसीण धाडकन जमिनीवर कोसळली आणि भडाभडा रक्त ओकू लागली !

त्या चिल्टासारख्या प्राण्याचा चट्टामट्टा करायचे बाजूस राहून स्वतःच मरण्याचा प्रसंग आलेला पाहून पाणीने पाजावे पाणी ? तदा वदे खल विनम्र वाणी प्रज्ञा. या न्यायाने स्वतःला तशाही स्थितीत सावरून ती उठली व भीत भीत हात जोडून नम्रवाणीने बोलू लागली, "हे पाहा माझे दोन शब्द ऐकून घ्यावे. " ब्रह्मदेव रावणाला वर देऊन गेले तेव्हा विरंची मला एक खूण सांगून गेले की जेव्हा तू कपीच्या माराने व्याकुळ होशील तेव्हा खूण गाठ बांध की, सर्व राक्षसांचे दिवस भरले ! हे तात ! माझ्या पूर्वसुकृताचा साठा खरोखरच मोठा आहे. म्हणूनच या डोळ्यांना रामाचा दूत पाहण्याचे भाग्य लाभले !

दो० — तात स्वर्ग अपबर्ग सुख धरिअ तुला एक अंग।
तूल न ताहि सकल मिलि जो सुख लव सतसंग॥ ४॥

चौ० — प्रबिसि नगर कीजे सब काजा। हृदयँ राखि कोसलपुर राजा॥
गरल सुधा रिपु करहिं मिताई। गोपद सिंधु अनल सितलाई॥
गरुड़ सुमेरु रेनु सम ताही। राम कृपा करि चितवा जाही॥
अति लघु रूप धरेउ हनुमाना। पैठा नगर सुमिरि भगवाना॥
मंदिर मंदिर प्रति करि सोधा। देखे जहँ तहँ अगनित जोधा॥
गयउ दसानन मंदिर माहीं। अति बिचित्र कहि जात सो नाहीं॥
सयन किएँ देखा कपि तेही। मंदिर महुँ न दीखि बैदेही॥
भवन एक पुनि दीख सुहावा। हरि मंदिर तहँ भिन्न बनावा॥

दो० — रामायुध अंकित गृह सोभा बरनि न जाइ।
नव तुलसिका बृंद तहँ देखि हरष कपिराइ॥ ५॥

चौ० — लंका निसिचर निकर निवासा। इहाँ कहाँ सज्जन कर बासा॥

"सत्संगतीचा महिमा काय सांगावा! हे तात! स्वर्गसुखे व मोक्षसुख ही सर्व, तराजूच्या एका पारड्यात घातली व दुसऱ्यात अगदी क्षणभरच घडलेल्या संतसंगतीचे सुख घातले तरीही या सत्संगतीपासून मिळणाऱ्या सुखाच्या पासंगासही ती सर्व सुखे पुरत नाहीत! ४

लंकिनी आता हनुमंताच्या आदराने प्रेरित होऊन सहानुभूतिपूर्वक बोलू लागली, "हे रामदूता! आपण आता कोसलपुर राजाला हृदयात ठेवून खुशाल नगरात शिरा आणि आपली इष्ट कार्ये साधा."

क्षणात झालेली ही कमालीची क्रान्ति पाहून गरुड विस्मयाने काकभुशुंडीच्या मुखाकडे जिज्ञासेने पाहू लागला; म्हणून त्याने लगेच या प्रसंगाचे रहस्य सांगितले. "हे गरुडा! यात आश्चर्य काहीच नाही! एकदा श्रीरामचंद्रांनी ज्याच्यावर आपली कृपा केली त्याला, विष अमृत होते, शत्रु मित्र बनतात, अफाट सागर, गायीच्या खुराने चिखलात पडलेल्या खळग्यात साठलेले पाणी असते ना, इतका लहान होतो. प्रत्यक्ष अग्नी थंडगार होतो आणि एवढा मोठा सुमेरु पर्वतसुद्धा क्षुद्र रजःकणाइतका लहान वाटतो!"

आता आपला मार्ग निर्विघ्न झाला, अशी खात्री होताच पुनः अत्यंत लहान रूप घेतले व भगवंताचे स्मरण करून हनुमान लंकापुरीत शिरला!

सीतेच्या संशोधनाला आता प्रत्यक्ष सुरुवात झाली. राक्षसांचे प्रत्येक मंदिर (हनुमंताच्या सान्निध्याने सर्व घरे मंदिरे झाली व सर्व राक्षस निष्पाप बनले.) हनुमंताने तपासण्यास प्रारंभ केला. पाहावे तिकडे अगणित निशाचर-वीर दिसत होते. सर्वत्र चौकशी केल्यावर प्रत्यक्ष दशाननाच्या [illegible] प्रवेश केला. आत जाऊन निरीक्षण करतो तो विलक्षणच सर्व वैभव! त्याचे वर्णन शब्दांनी न करणेच बरे. आपल्या मंदिरात रावण घोरत पडला होता; परंतु हजारो देहभोगरत स्त्रियांमध्ये. कपीच्या नेत्रांना वैदेही मात्र कुठेच दिसली नाही!

नको ती दृश्ये केवळ सीतेच्या शोधासाठी पहात असता पवनसुताच्या पवित्र हृदयाला अत्यंत किळस आला! अशा मनःस्थितीत असतानाच त्याला एक सुंदर भवन दिसले. आणि त्यातही विशेष म्हणजे त्याच्या शेजारीच एक स्वतंत्र हरिमंदिर होते. रावणपालित लंकेतील हे अतुल्य स्थान पाहताच पवनसुताची प्रीती वाढली व तो बारकाईने पाहू लागला; तो त्याचे आणखी आश्चर्य वाढले. त्या गृहावर श्रीरामचंद्रांच्या आयुधांची चित्रे काढलेली दिसली; त्यामुळे त्याची शोभा वर्णनातीत वाढली! इतक्यात भोवतालच्या तुळसी मंजरींनी भरलेल्या ताटव्यांचा आल्हादकारक सुवास दरवळू लागल्याने कपिराजाचे मन हर्षित झाले! ५

'लंका म्हणजे राक्षसांच्या वस्तीचे ठिकाण! याठिकाणी कसचा सत्पुरुषाचे घर पाहावयास



मन महुँ तरक करैं कपि लागा । तेहीं समय बिभीषनु जागा ॥
राम राम तेहिं सुमिरन कीन्हा । हृदयँ हरष कपि सज्जन चीन्हा ॥
एहि सन हठि करिहउँ पहिचानी । साधु ते होइ न कारज हानी ॥
बिप्र रूप धरि बचन सुनाए । सुनत बिभीषन उठि तहँ आए ॥
करि प्रनाम पूँछी कुसलाई । बिप्र कहहु निज कथा बुझाई ॥
की तुम्ह हरि दासन्ह महँ कोई । मोरें हृदय प्रीति अति होई ॥
की तुम्ह रामु दीन अनुरागी । आयहु मोहि करन बड़भागी ॥

दो० — तब हनुमंत कही सब राम कथा निज नाम ।
सुनत जुगल तन पुलक मन मगन सुमिरि गुन ग्राम ॥ ६ ॥

चौ० — सुनहु पवनसुत रहनि हमारी । जिमि दसनन्हि महुँ जीभ बिचारी ॥
तात कबहुँ मोहि जानि अनाथा । करिहहिं कृपा भानुकुल नाथा ॥

मिळणे, हे कसे शक्य?' असा बुद्धिमंतांत श्रेष्ठ असणाऱ्या बुद्धीला ताण पाडणारा हा प्रसंग! अशा अडचणीत हनुमंत विचार करत असताच बिभीषण आपल्या घरी जागा झाला; आणि 'राम, राम, सीताराम!' असा प्रभूच्या नावाचा उच्चार कपीच्या कानी पडताच त्याला केवढा आनंद झाला! या घरात राहणारा हा गृहस्थ सज्जन असलाच पाहिजे ही त्याबरोबरच खात्री झाली! लगेच असाही विचार आला की, कोणीही सज्जन दुसऱ्याच्या कामात अडचण निर्माण करत नाही; मग या रामभक्ताशी आपण मुद्दाम परिचय करून घेणे यावेळी आपल्या उद्दिष्टास उपकारकच होणार!

हा विचार ठरला, तरीही हेराच्या भूमिकेवरून सावधगिरी घेणे आवश्यक होते. म्हणून हनुमंताने दूर दृष्टी ठेवून एका ब्राह्मणाचे लगेच रूप घेतले व बिभीषणाच्या दरवाज्याजवळ हळूच जाऊन त्याला परिचयाचा व आवडणारा प्रभूच्या नावाचा स्पष्ट उच्चार केला. "राम, राम, सीताराम!"

वेळ रात्रीची. अशा वेळी अगदी खुणेच्या शब्दांची हाक! कोणीतरी रामभक्तच आपल्या भाग्याने धावून आला, या भावनेने बिभीषण चटकन् जागेचा उठला आणि खाली जाऊन स्वतःच दरवाजा उघडला.

दाराशी एक अनुपमेय दैवी तेजाचा ब्राह्मण पाहताच प्रथम आदराने प्रणाम केला व आपल्या महालात त्यांना नेऊन कुशल प्रश्न विचारले.

परंतु हा ब्राह्मण रावण राज्यात आपल्या भवनापर्यंत रात्रीच्या वेळी सुखरूप येऊ शकला त्याअर्थी हा सामान्य ब्राह्मण खास नाही, गोष्ट ध्यानी येण्यास बिभीषणासारख्या मुत्सद्याला काय वेळ लागणार? म्हणून त्याने कुशल प्रश्नांची लांबड बंद केली व ब्राह्मणाचे सत्य स्वरूप जाणण्यासाठी प्रश्न केला, "महाराज! आपली माहिती सविस्तर सांगणार ना? आपण कोणी हरिभक्तांपैकी आहात काय? नाहीतर आपल्याबद्दल एवढे अलोट प्रेम माझ्या हृदयात उत्पन्न होण्याचे कोडे कसे सुटणार? का, दीनावर स्नेह करणारे रामच तुम्ही आहात; आणि मला महाभाग्यवान करण्यासाठी माझ्या घरी आपण होऊनच चालून आलात. तुम्ही साधेसुधे ब्राह्मण खास नाही, हे तरी खरे ना?" बिभीषणाच्या शुद्ध अंतःकरणाची व रामप्रेमाची साक्ष पटवण्यास त्याच्या या आर्त प्रश्नांचा उमाळा पुरेसा होता!

हनुमंताने सर्व संशयनिरास झाल्यामुळे लगेच बिभीषणाला मुळापासून रामकथा सांगितली व शेवटी स्वतःचे नावही सांगितले. हे सांगणे व ऐकणे चालू असता दोघांच्याही शरीरावर रोमांच उठले व भगवंताच्या दीनवत्सलतादि गुणांचे स्मरण होऊन त्यांची मने प्रेमात बुडून गेली. ६

शेवटी स्वतःच्या हीन-दीन स्थितीचे स्मरण होऊन बिभीषण म्हणाला, "हे पाहा पवनसुत! बत्तीस दातांमध्ये जशी बिचारी जीभ राहते तसेच आमचे या ठिकाणचे जीवन अखंड दुःखाचे आहे. तात! मला अनाथ समजून, भानुकुलनाथ माझ्यावर कधी तरी कृपा करतील का?

तामस तनु कछु साधन नाहीं । प्रीति न पद सरोज मन माहीं ॥
अब मोहि भा भरोस हनुमंता । बिनु हरिकृपा मिलहिं नहिं संता ॥
जौं रघुबीर अनुग्रह कीन्हा । तौ तुम्ह मोहि दरसु हठि दीन्हा ॥
सुनहु बिभीषन प्रभु कै रीती । करहिं सदा सेवक पर प्रीती ॥
कहहु कवन मैं परम कुलीना । कपि चंचल सबहीं बिधि हीना ॥
प्रात लेइ जो नाम हमारा । तेहि दिन ताहि न मिलै अहारा ॥

दो०— अस मैं अधम सखा सुनु मोहू पर रघुबीर ।
कीन्ही कृपा सुमिरि गुन भरे बिलोचन नीर ॥ ७ ॥

चौ०—जानतहूँ अस स्वामि बिसारी । फिरहिं ते काहे न होहिं दुखारी ॥
एहि बिधि कहत राम गुन ग्रामा । पावा अनिर्बाच्य बिश्रामा ॥
पुनि सब कथा बिभीषन कही । जेहि बिधि जनकसुता तहँ रही ॥
तब हनुमंत कहा सुनु भ्राता । देखी चहउँ जानकी माता ॥
जुगुति बिभीषन सकल सुनाई । चलेउ पवनसुत बिदा कराई ॥

"माझी हीन स्थिती कोणत्या शब्दात तुम्हाला सांगू ? आमचा देह तमोगुणी त्यामुळे थोडेसुद्धा साधन घडत नाही; चरणकमली प्रेम तर मुळीच नाही. बरे हृदयात तरी पदसरोज असतील, तर तेही भाग्य नाही. तथापि हनुमंता ! आता मला भरवसा वाटतो की राम या दासाला सनाथ करतील; कारण हरिकृपेशिवाय संतांची भेटच होत नाही ! जेव्हा रघुवीराने कृपा केली तेव्हाच तुम्ही स्वतः आपण होऊन माझ्या घरी आला आणि मला दर्शन दिले !"

यावर हनुमंताने आपला अनुभव सांगून त्याला आश्वासन दिले. "बिभीषणा ! ऐका. प्रभूंची अशी रीती आहे की, आपल्या सेवकांवर अखंड प्रीती करतात ! तुम्हीच सांगा. माझा जन्म केवढ्या उच्च कुळातला ? मी तर केवळ कपी ! स्वभावतः चंचल आणि सर्व प्रकारे इतका हीन की, प्रातःकाळी जर कोणी कपी, वानर असे म्हटले, तर त्या दिवशी उपाशी राहण्याचीच त्याच्यावर पाळी ! तुम्ही निदान परमश्लोक पुलस्त्य कुळातले तरी आहात.

"मित्रा ! ऐक. मी इतका अधम असूनसुद्धा रघुवीराने माझा आदर केला !"

हे वाक्य तुटकपणे निघत असता प्रभूंच्या कृपाळू स्वभावाचे स्मरण होऊन हनुमंताचे नेत्र अश्रूंनी भरून आले. ७

शेवटी हनुमंताने कळवळून बिभीषणास सांगितले, 'माझे स्वामी असे आहेत हे जाणूनसुद्धा जे त्याला विसरतात आणि विषयोपभोग घेत फिरतात त्यांच्या नशिबाचे दुःख कसे सुटणार ?"

याप्रमाणे श्रीराम प्रभूंचे एकामागून एक अशा अनेक गुणांचे संकीर्तन चालू असता त्या दोघांना वर्णनातीत शांतीसुख मिळाले.

लंकेत आपण का आलो, हे हनुमंताच्या मुखाने बिभीषणास पूर्वीच कळले होते. ते मुख्य कार्य [illegible]. आता जनकनंदिनी अशोकवनात आपले जीवन कसे कंठीत आहे, याची सर्व हकीकत बिभीषणाने आपल्या सख्याला सांगितली.

ते वृत्त कानी पडताच अत्यंत उत्कंठेने हनुमान म्हणाला, "बंधो ! ऐक. मी जानकीमातेला पाहू इच्छितो, म्हणून मी कसा, कोठून कुठे गेलो असता दर्शन होईल तेवढे वृत्त सांग !"

बिभीषणाने लगेच बिनचूक युक्ती सांगितली; आणि पवनसुत आपल्या इष्टकार्यसिद्धीसाठी निरोप घेऊन निघाला.

करि सोइ रूप गयउ पुनि तहवाँ । बन असोक सीता रह जहवाँ ॥
देखि मनहि महुँ कीन्ह प्रनामा । बैठेहिं बीति जात निसि जामा ॥
कृस तनु सीस जटा एक बेनी । जपति हृदयँ रघुपति गुन श्रेनी ॥

दो०–निज पद नयन दिएँ मन राम पद कमल लीन ।
परम दुखी भा पवनसुत देखि जानकी दीन ॥ ८ ॥

चौ०–तरु पल्लव महुँ रहा लुकाई । करइ बिचार करौं का भाई ॥
तेहि अवसर रावनु तहँ आवा । संग नारि बहु किएँ बनावा ॥
बहु बिधि खल सीतहि समुझावा । साम दान भय भेद देखावा ॥
कह रावनु सुनु सुमुखि सयानी । मंदोदरी आदि सब रानी ॥
तव अनुचरीं करउँ पन मोरा । एक बार बिलोकु मम ओरा ॥
तृन धरि ओट कहति बैदेही । सुमिरि अवधपति परम सनेही ॥
सुनु दसमुख खद्योत प्रकासा । कबहुँ कि नलिनी करइ बिकासा ॥
अस मन समुझु कहति जानकी । खल सुधि नहिं रघुबीर बान की ॥
सठ सूनें हरि आनेहि मोही । अधम निलज्ज लाज नहिं तोही ॥

बिभीषण भेट, संवाद इत्यादी कार्यक्रम उरकल्यावर हनुमंताने आपले पहिले अतिलघुरूप धारण केले, आणि अशोकवनात जेथे सीता होती, त्याठिकाणी स्वारी तडक गेली. सीतेला पाहून मनातच प्रणाम केला. नंतर असे दिसून आले की, सीता बसलेली असताच रात्रीचे प्रहर एकामागून एक निघून जात आहेत.

मस्तकावरील केसांची एक जटारूपी वेणी बनली आहे, देह अत्यंत कृश झाला आहे; हृदयात रघुपतीच्या गुणगणांचे पुनःपुन्हा चिंतन (जप) चालू आहे. नजर स्वतःच्याच पायाकडे लागलेली असून मन श्रीरामचरणी लीन झालेले आहे ! अशा या दीन दशेत जानकीला पाहून पवनसुताला परम दुःख झाले. ८

तरुपल्लवात लपून बसलेला हनुमान मनात विचार करत आहे की, आता करू तरी काय ?

इतक्यात चक्क प्रकाश ःपडून मोठा आवाज कानी आला. पाहतो तो विभूषित अशा अनेक स्त्रियांच्या घोळक्यातून प्रत्यक्ष रावणच त्या ठिकाणी येत आहे !

हनुमंताची उत्कंठा व चिंता अधिकच वाढू लागली.

सीतेच्या सन्निध आल्यावर त्या खलाने साम, दाम, दंड व भेद या चारी प्रकारच्या युक्त्या करून तिची समजूत घालण्याची शिकस्त केली. तो म्हणतो,

" हे सुमुखी ! तू शहाणी आहेस. मी काय सांगतो ते ऐकून तरी घे. हे पाहा, तू संतुष्ट व्हावीस म्हणून या माझ्या पट्टराणी मंदोदरीसुद्धा एकूणएक सर्व राण्यांना तुझ्या पायाच्या दासी करण्यासही मी तयार आहे ! अशी अगदी अंतःकरणपूर्वक माझी प्रतिज्ञा आहे. आणि हे सर्व कशासाठी, तर तू एक वेळ माझ्याकडे प्रेमाने पाहावेस ! "

सर्वस्वी नाइलाज झाल्यामुळे रामभक्त, वीररमणी वैदेही संतप्त होऊन, सतीचा अपमान करणाऱ्या त्या नीचास बेडरपणे उत्तर देते. गवताची एक काडी तिने मध्ये धरली; परमस्नेही अशा अयोध्यापतीचे स्मरण केले आणि म्हणाली,

" अरे दहा तोंडाच्या ! बडबड बंद करून ऐक. काजव्या ! तुझ्या उजेडाने सूर्यविकासिनी कमलिनी कधी तरी उमलेल होय ? अक्कल असली तर समजून घे. अरे दुष्टा ! तुला रघुवीर-बाणाची आठवण तरी आहे का नाही ? भामट्या ! नाहीतर मी एकटी बघून मला चोरून कशाला आणली असतीस ? अधम ! निर्लज्ज !! लाज कशी ती तुला राहिलीच नाही ! "

दो०—आपुहि सुनि खद्योत सम रामहि भानु समान।
परुष बचन सुनि काढ़ि असि बोला अति खिसिआन ॥ ९ ॥

चौ०—सीता तैं मम कृत अपमाना। कटिहउँ तव सिर कठिन कृपाना ॥
नाहिं त सपदि मानु मम बानी। सुमुखि होति न त जीवन हानी ॥
स्याम सरोज दाम सम सुंदर। प्रभु भुज करि कर सम दसकंधर ॥
सो भुज कंठ कि तव असि घोरा। सुनु सठ अस प्रवान पन मोरा ॥
चंद्रहास हरु मम परितापं। रघुपति बिरह अनल संजातं ॥
सीतल निसित बहसि बर धारा। कह सीता हरु मम दुख भारा ॥
सुनत बचन पुनि मारन धावा। मयतनयाँ कहि नीति बुझावा ॥
कहेसि सकल निसिचरिन्ह बोलाई। सीतहि बहु बिधि त्रासहु जाई ॥
मास दिवस महुँ कहा न माना। तौ मैं मारबि काढ़ि कृपाना ॥

[illegible] काजव्या [illegible] कठोर [illegible] आपलं जाहीर [illegible]. हे [illegible] आपली तलवार [illegible] आणि संतापाने बेभान होऊन तो म्हणतो. ९.

"सीते ! [illegible] अपमान करते आहेस. [illegible] ही तलवार [illegible] ! आता तुझी मान [illegible] हे सुमुखी ! [illegible] आहे. माझी विनंती [illegible] मान्य कर. [illegible] हे सुमुखे ! [illegible] कर."

रावणाच्या या [illegible] पुनः [illegible] सीता [illegible]. "[illegible] ! कृष्ण-कमळांच्या [illegible] सुंदर [illegible] हत्तीच्या सोंडेसारखा प्रबल [illegible] तो बाहू माझ्या कंठावर [illegible] की तुझी घोर तलवार [illegible] . अशी माझी [illegible] आहे. [illegible] ठेव."

(अथवा [illegible]कमळांच्या [illegible] तेजस्वी व सुशोभित [illegible] सोंडेप्रमाणे समर्थ असा रघुवीराचा बाहू जिच्या कंठी [illegible] तिच्या मानेवर हे [illegible] , घोर , तलवार पडेल काय ?)

सीता पुढे म्हणते, "हे चंद्रहास ! [illegible] तलवारीचे नाव [illegible] उत्पन्न झालेला माझा सर्व प्रकारचा [illegible] हरण कर. तुझी धार शीतल आणि तीक्ष्ण अशी [illegible] माझा सर्व दुःखभार हरण करण्यास तू समर्थ आहेस ! [illegible] अर्थ हे चन्द्रहास [illegible] ! [illegible] उत्पन्न झालेला माझा [illegible] कर ! [illegible] आहे; त्या [illegible] माझा [illegible] दुःखांचा डोंगर [illegible] !)

([illegible] रावणाच्या तलवारीची [illegible] सीता [illegible] तरी सीता श्रेष्ठ प्रतीची रामभक्त [illegible] रावणाच्या [illegible] कसे शक्य ? रामभक्त संकटकाळी [illegible] रघुवीराला शरण [illegible] !

[illegible] रावणाच्या [illegible] सूक्ष्म अर्थ [illegible] . [illegible] सीता बेदर-कारपणे करत आहे. मात्र [illegible] तलवारीने मस्तक उडवण्यासाठी [illegible] . [illegible] त्याचा हात [illegible]. नीतीच्या चार गोष्टी सांगून त्याची समजूत [illegible].

[illegible] अशा [illegible] , "[illegible] व [illegible] चांगली छळा. एक महिन्यात [illegible] माझे वचन मानले नाही [illegible] तलवार [illegible] मारीन."

दो० –भवन गयउ दसकंधर इहाँ पिसाचिनि बृंद ।
सीतहि त्रास देखावहिं धरहिं रूप बहु मंद ॥ १० ॥

चौ० –त्रिजटा नाम राच्छसी एका । राम चरन रति निपुन बिबेका ॥
सबन्हौ बोलि सुनाएसि सपना । सीतहि सेइ करहु हित अपना ॥
सपनें बानर लंका जारी । जातुधान सेना सब मारी ॥
खर आरूढ़ नगन दससीसा । मुंडित सिर खंडित भुज बीसा ॥
एहि बिधि सो दच्छिन दिसि जाई । लंका मनहुँ बिभीषन पाई ॥
नगर फिरी रघुबीर दोहाई । तब प्रभु सीता बोलि पठाई ॥
यह सपना मैं कहउँ पुकारी । होइहि सत्य गएँ दिन चारी ॥
तासु बचन सुनि ते सब डरीं । जनकसुता के चरनन्हि परीं ॥

दो० –जहँ तहँ गईं सकल तब सीता कर मन सोच ।
मास दिवस बीतें मोहि मारिहि निसिचर पोच ॥ ११ ॥

चौ० –त्रिजटा सन बोलीं कर जोरी । मातु बिपति संगिनि तैं मोरी ॥
तजौं देह करु बेगि उपाई । दुसह बिरहु अब नहिं सहि जाई ॥

माकडाच्या हाती कोलीत दिल्याप्रमाणे दशाननाची वरील आज्ञा मिळताच, त्याची पाठ फिरली नाही तोच अनेक निशाचरी पिशाचिनींच्याप्रमाणे भयंकर विद्रूप देह धारण करून सीतेला भय दाखवू लागल्या ! १०

अशा या दुर्धर स्थितीत सीतेला त्रिजटेने मोठा आधार दिला. ही एक रामभक्त व ज्ञानी अशी बिभीषणाची मुलगी होती. सर्व राक्षसिनींना तिने आपल्याजवळ बोलावून त्यांना रात्री स्वतःस पडलेले स्वप्न सांगितले. शेवटी ती म्हणाली, ' माझे ऐकायचे असेल तर तुम्ही सीतेची सेवा करून आपले हित साधा कशा ! काय भयंकर स्वप्न ते ! एक मोठा वानर आला; त्याने आपली सगळी लंका जाळून टाकली आणि राक्षसाचे सैन्य ठार केले. आणि काय सांगू तुम्हाला ? आपल्या दशानन महाराजांना मी नग्न स्थितीत गाढवावर बसलेले पाहिले ! त्यांची दाही शिरे मुंडन केलेली होती आणि वीसही हात छाटलेले !! अशा स्थितीत रावण यमाच्या दिशेला गेलेला मला दिसला; (स्वप्नात) आणि जणू काय लंकेचे राज्य बिभीषणाला मिळाले ! आपल्या सर्व लंकानगरीत रघुवीराची सर्वत्र द्वाही फिरली व लगेच प्रभूंनी सीतेला बोलावून घेतलीसुद्धा ! "

इतके सांगून शेवटी त्रिजटेने त्यांना बजावले, ' ऐकले का माझे हे सगळे स्वप्न ? पण मी तुम्हाला बजावून सांगते की, हे स्वप्न दोन चार दिवस जाताच खरे ठरणार. "

त्रिजटेची योग्यता सर्व निशाचरींना पूर्ण माहिती होती. तिचे स्वप्न सांगून संपताच त्या सगळ्या पिशाचिनीरूप राक्षसींच्या छातीत भीतीने धक्काच बसला. आणि त्या दीन बनून पटापटा जनकसुतेच्या पाया पडल्या !

आता इथे थांबणेसुद्धा धोक्याचे हे जाणून त्या सगळ्याजणी चारी दिशेला चालत्या झाल्या. सर्वत्र सामसूम झाले. सीतेच्या चिंतेला चालना मिळाली. ' एक महिन्याचाच प्रश्न. तेवढा संपला की हा नीच निशाचर मला ठार मारल्याशिवाय राहणार नाही. ११

शेवटी हा एकच विचार तिच्या मनाची पकड घेऊन बसला.

आपली झालेली मानसिक दैन्यावस्था बोलून दाखवण्यास यावेळी त्रिजटाच फक्त उरली, असे पाहून सीतेने हात जोडले व ती कळवळून प्रार्थना करू लागली, " माते ! या विपत्तीत खरे सहाय्य करणारी तूच एक माझी मैत्रीण. तू झालेला सर्व प्रकार प्रत्यक्षच पाहिलास ना ? मग आता मी जगून काय उपयोग ? आपल्या हाताने या देहाचा शेवट करणेच आता योग्य. त्यासाठी तू मला लवकर मदत करणार ना ? यापुढे

आनि काठ रचु चिता बनाई । मातु अनल पुनि देहि लगाई ॥
सत्य करहि मम प्रीति सयानी । सुनै को श्रवन सूल सम बानी ॥
सुनत बचन पद गहि समुझाएसि । प्रभु प्रताप बल सुजसु सुनाएसि ॥
निसि न अनल मिल सुनु सुकुमारी । अस कहि सो निज भवन सिधारी ॥
कह सीता बिधि भा प्रतिकूला । मिलिहि न पावक मिटिहि न सूला ॥
देखिअत प्रगट गगन अंगारा । अवनि न आवत एकउ तारा ॥
पावकमय ससि स्रवत न आगी । मानहुँ मोहि जानि हतभागी ॥
सुनहि बिनय मम बिटप असोका । सत्य नाम करु हरु मम सोका ॥
नूतन किसलय अनल समाना । देहि अगिनि जनि करहि निदाना ॥
देखि परम बिरहाकुल सीता । सो छन कपिहि कलप सम बीता ॥

हा दुःखद विरह मला आता सोसणे शक्यच नाही. तुला म्हणून एकच प्रार्थना. काष्ठांची चिता रच; तिच्यावर चांगले सौभाग्यालंकार घालून मी सजून, मी चितेवर रघुवीराच्या चरणकमलांचे चिंतन करत बसते. तू दे अग्नी लावून. त्रिजटे! तू शहाणी आहेस. माझ्या प्रेमाची प्रतिज्ञा तूच खरी कर! करशील ना? नच सांग बरं त्या नीचाचे ते शूळासारखे शब्द कोण सहन करील? मला तर बाई पुनः ते ऐकवणार नाहीत. नकोच तो प्रसंग!"

पुढे सीतेच्या मुखातून शब्दच उमटेना. इतकी ती गहिवरली.

सीतेचे हे दीनवाणे शब्द व तिची सद्गदित झालेली स्थिती त्रिजटेने पाहिली. तिचेही हृदय भरून आले. पण मोठी कर्तव्यदक्ष आणि समंजस ती असल्याने तिने सीतेचे पाय धरले. अनेक गोष्टी सांगून तिचे सांत्वन केले; आणि प्रभूचा प्रताप, सुयश व बळ वर्णन करून त्यांचे सामर्थ्य तिच्या कानावर घातले.

इथे अधिक वेळ थांबणे बरे नाही असे वाटून काढता पाय घेण्यापूर्वी ती म्हणाली, "सुकुमारी! तुझ्या इच्छेप्रमाणेच करायचे झाले तरी, रात्री यावेळी अग्नी कुठेही मिळणे शक्य नाही. बरं, येते हं आता!" असे सांगून तिने आपल्या घराचा रस्ता धरला.

एवढ्या अफाट विश्वांत साथ करणारी एकटी त्रिजटा; आणि तीही निघून गेली. त्यामुळे सीता फारच व्याकुळ झाली. दुःखाचा आवेग आवरेना. त्याचा बांध फोडण्यासाठीच जणू तिच्या मुखातून शब्द बाहेर पडू लागले. "यावेळी दैवच माझ्यावर उलटलेले दिसते. मग अग्नी कसा मिळणार आणि माझा हा पोटशूळ तरी कसा नष्ट होणार? आकाशात दिसणारे निखारे अगदी प्रगट दिसतात, पण त्यातून कोणीतरी निदान एकतरी या पृथ्वीवर येईल तर शपथ! हा चंद्र प्रत्यक्ष अग्निमय बनलेला दिसतो, पण मी हतभागी तो माझ्यावर आपली आग कशी ओतणार?"

सीतेच्या दुःखाला अनिवार कढ येऊन ती शेवटी डोळ्यासमोरच्या अशोक वृक्षालाच विनवू लागली. "हे अशोका! माझी एवढी विनंती तू ऐकच. निदान आपले नाव सत्य करण्यासाठी तरी तू माझा शोक नाहीसा कर. ही तुझी नवी नवी पालवी अगदी लाल लाल निखाऱ्यासारखी आहे. दे मला अग्नी आणि कर या देहाचा शेवट. म्हणजे तू 'अ-शोक' खरा होशील!"

सीतेची ती परम विरहाकुल स्थिती पाहून अति लघुरूप धरून बसलेल्या कपीला तो क्षण एका कल्पा-एवढा मोठा वाटला! आता आपण काय करावे असा विचार चालू होता. इतक्यात सीतेने अशोक वृक्षाजवळ अग्नीसाठी प्रार्थना केली. हा प्रसंग बरा साधला असे वाटून हनुमंताने प्रभूची करमुद्रिका हळूच खाली सोडली!

सो०—कपि करि हृदयँ बिचार दीन्हि मुद्रिका डारि तब ।
जनु असोक अंगार दीन्ह हरषि उठि कर गहेउ ।। १२ ।।

चौ०—तब देखी मुद्रिका मनोहर । राम नाम अंकित अति सुंदर ।।
चकित चितव मुदंरी पहिचानी । हरष बिषाद हृदयँ अकुलानी ।।
जीति को सकइ अजय रघुराई । माया तें असि रचि नहिं जाई ।।
सीता मन बिचार कर नाना । मधुर बचन बोलेउ हनुमाना ।।
रामचंद्र गुन बरनैं लागा । सुनतहिं सीता कर दुख भागा ।।
लागीं सुनैं श्रवन मन लाई । आदिहु तें सब कथा सुनाई ।।
श्रवनामृत जेहिं कथा सुहाई । कही सो प्रगट होति किन भाई ।।
तब हनुमंत निकट चलि गयऊ । फिरि बैठीं मन बिसमय भयऊ ।।

चमचम चमकत खाली काही तरी येत आहे. असे पाहताच आपली मागणी अशोकाने पुरवली. आला खाली निखारा ! या आनंदाने सीता त्या चमकीकडे धावतच गेली आणि झटकन् तो चमकणारा पदार्थ उचलला ! १२

पाहते तो निखारा नसून मन हरण करणारी मुद्रिका आहे. निरीक्षण करताच तिच्यावर कोरलेले अति-सुंदर रामनाम नजरेत भरले ! सीतेच्या हृदयाची ओढ त्या मुद्रिकेने खूपच वाढवली. कारण तिची आता ओळख पटली ! पण त्याच क्षणी जनकनंदिनीच्या मस्तकात विचारांचे केवढे काहूर माजले ! त्यामुळे हर्ष आणि विषाद या भावनांच्या उलटसुलट वृत्तींना भरती येऊन वैदेही विकल झाली.

तिच्याकडे पाहात सीता तिला जणू विचारू लागली, तू इथे आलीस कशी ? का आलीस ? कोणी आणली तुला ? प्रभूचा व तुझा वियोग होण्याचे कारण तरी काय ? " इत्यादी प्रश्न विचारत असता जी हर्षाची उकळी होती ती शमन होऊन भलतीच शंका हृदयाला चाटताच जानकी संचित झाली. आश्चर्य, हर्ष, भय, शोक, चिंता, विरह इत्यादी भावनांनी नुसता कल्लोळ उडवून दिला !

पण थोडा विचार करताच खात्री झाली व ती स्वतःशीच पुटपुटली, " वेडया मना ! तू किती रे चंचल अधीर आहेस ! त्यांना जिंकून ही कोणीतरी आणली, किंवा निराश्रित झाल्यामुळे ती स्वतःच आली असे तुला वाटले तरी कसे ? रघुपती असून अजिंक्य-अजित आहेत हे तू कसं विसरलास ? अनंत ब्रह्मांडात त्याना कोणी जिंकणार नाही व जिंकल्याशिवाय ही हातची सुटायची नाही ! "

दुसरे मन लगेच तिला विचारते, " ते खरे ! पण मग ही इथे आली कशी ? अगदी हुबेहुब तशीच सोन्याची बनवून टाकली असेल एखाद्या राक्षसाने. छे ! छे ! अशी सुंदर, माझे वैदेहीचे चित्त चोरणारी मुद्रिका कोणाच्याही मायेला बनवणेच अशक्य ! ही त्याचीच करमुद्रिका, तीच चिदानंदमय. तीच ही ! "

सीतेचे मन अनेक विचारांनी व्याकुळ होत आहे, असे दिसताच हनुमंताने रामनाम व राम-गुणवर्णन मधुर स्वरात सुरू केले ! ते श्रवणामृत पान करत असता सीतेला न कळत तिचे पंचप्राण तिच्या कानात एकवटले आणि अंतःकरणातील दुःख कुठे व केव्हा पळाले ते मुळी तिला कळलेच नाही.

कान व मन लावून सीता ऐकत आहे, हे पाहून हनुमंताने अगदी आरंभापासून सर्व रामकथेचे सुंदर गायन सुरू केले. अशा अपूर्व आनंदात निमग्न असता सीतेच्या मुखातून सहज उद्गार निघाले, " कानाना अगदी अमृताप्रमाणे अशी सुंदर कथा जो कोणी वर्णन करत आहे, तो प्रकट का होत नाही ? "

मातेच्या दर्शनास ही जणू स्पष्ट परवानगीच लाभली. या आनंदाने हनुमान मंद मंद पावले टाकत सीतेसन्निध येऊ लागला. परंतु त्याची निराशा झाली. सीतेने चटकन् आपले तोंड फिरवले ! कारण तिचे मन भय, विचार व आश्चर्य यांनी भारले. आता काय करावे, असे पुनः त्याला नवे कोडे निर्माण झाले.

राम दूत मैं मातु जानकी। सत्य सपथ करुनानिधान की॥
यह मुद्रिका मातु मैं आनी। दीन्हि राम तुम्ह कहँ सहिदानी॥
नर बानरहि संग कहु कैसें। कही कथा भइ संगति जैसें॥

दो०—कपि के बचन सप्रेम सुनि उपजा मन बिस्वास॥
जाना मन क्रम बचन यह कृपासिंधु कर दास॥ १३॥

चौ०—हरिजन जानि प्रीति अति गाढ़ी। सजल नयन पुलकावलि बाढ़ी॥
बूड़त बिरह जलधि हनुमाना। भयहु तात मो कहुँ जलजाना॥
अब कहु कुसल जाउँ बलिहारी। अनुज सहित सुख भवन खरारी॥
कोमलचित कृपाल रघुराई। कपि केहि हेतु धरी निठुराई॥
सहज बानि सेवक सुख दायक। कबहुँक सुरति करत रघुनायक॥
कबहुँ नयन मम सीतल ताता। होइहहिं निरखि स्याम मृदु गाता॥
बचनु न आव नयन भरे बारी। अहह नाथ हौं निपट बिसारी॥
देखि परम बिरहाकुल सीता। बोला कपि मृदु बचन बिनीता॥

अत्यंत दीनवाणीने सीतेला हनुमंताने प्रार्थना केली. " जननी ! जानकी ! मी रामदूत आहे. करुणानिधानाची शपथ घेऊन मी सत्य सांगतो की, आई ! ही मुद्रिका मी आणली; श्रीरामचंद्रांनी तुम्हाला माझी ओळख पटावी म्हणून ही खूण दिली आहे."

परंतु एवढ्यानेसुद्धा संपूर्ण संशय निरास झाला नाही; म्हणून सीतेने स्पष्ट विचारले, नर आणि वानर यांची संगत घडणे कसे शक्य ते सांग. ते प्रथम बोल !"

त्या बरोबर सुग्रीव-राम सख्य प्रसंग. इत्थंभूत वर्णन करून सांगणे हनुमंताला भाग पडले.

कपीचे ते प्रेमळ भाषण ऐकल्यावर मात्र सीतेच्या मनात विश्वास उत्पन्न झाला की हा कपी रामदूत आहे. इतकेच नव्हे, तो कृपासिंधू रघुपतींचा शरीराने, मनाने व वाणीने खरा दास आहे. अशी तिची खात्री झाली. १३

या जाणिवेचा परिणाम दिसू लागला. हृदयात प्रीती अतिशय वाढली, अंगावर रोमांच उभे राहिले व डोळे अश्रूंनी भरून आले. अंतर सीतेचे मातृ हृदय बोलू लागले. बाळा, हनुमंता, मी विरह सागरात बुडत असता तू अगदी नौकेसारखा होऊन धावून आलास ! सर्व इडापिडा टळो ताता ! आता एकदा मला सांग पाहू. धाकट्या भावासह सुखनिधी खरारी कुशल आहेत ना ? रघुराज कोमल चित्ताचे व कृपाळू स्वभावाचे आहेत; सत्य हे का ! ते माझ्या बाबतीत एवढे निष्ठुर बनले. याचे कारण तरी काय ? सेवक सुखदायक हे तर त्यांचे सहज ब्रीद. असे असता मला अशी दुःखात का बरं टाकली ? कपिवरा ! रघुनायकाला माझी कधी आठवण तरी होते का रे ?

" बाळा ! कोमल व श्यामल गात्रांना पाहून माझे डोळे कधी निवतील का रे ?"

मग हे शब्द मुखावाटे निघत असता अंतराच्या प्रेमाला अनावर पूर आला आणि तो नेत्रातून वाहू लागला. मुखावाटे शब्द उमटणे कठीण झाले. कसे तरी दोन चार शब्द उमटले. " हाय नाथ ! मी पक्की विसरले ना ? "

तरी खुणेची करमुद्रिका हातात व रामदूत समोर उभा आहे !!

विरह दुःखाने परम व्याकुळ झालेल्या सीतेला पाहून कपी कोमलवाणीने नम्रपणे म्हणाला, ' आई !

मातु कुसल प्रभु अनुज समेता । तव दुख दुखी सुकृपा निकेता ॥
जनि जननी मानहु जियँ ऊना । तुम्ह ते प्रेमु राम कें दूना ॥

दो ० –रघुपति कर संदेसु अब सुनु जननी धरि धीर ।
अस कहि कपि गदगद भयउ भरे बिलोचन नीर ॥ १४ ॥

चौ ० –कहेउ राम बियोग तव सीता । मो कहुँ सकल भए बिपरीता ॥
नव तरु किसलय मनहुँ कृसानू । कालनिसा सम निसि ससि भानू ॥
कुबलय बिपिन कुंत बन सरिसा । बारिद तपत तेल जनु बरिसा ॥
जे हित रहे करत तेइ पीरा । उरग स्वास सम त्रिबिध समीरा ॥
कहेहू तें कछु दुख घटि होई । काहि कहौं यह जान न कोई ॥
तत्व प्रेम कर मम अरु तोरा । जानत प्रिय एकु मनु मोरा ॥
सो मनु सदा रहत तोहि पाहीं । जानु प्रीति रसु एतनेहि माही ॥
प्रभु संदेसु सुनत बैदेही । मगन प्रेम तन सुधि नहिं तेही ॥
कह कपि हृदयँ धीर धरु माता । सुमिरु राम सेवक सुखदाता ॥
उर आनहु रघुपति प्रभुताई । सुनि मम बचन तजहु कदराई ॥

दो ० –निसिचर निकर पतंग सम रघुपति बान कृसानु ।
जननी हृदयँ धीर धरु जरे निसाचर जानु ॥ १५ ॥

बंधूसह प्रभू कुशल आहेत बरं ! पण ते अत्यंत कृपेचे आगर असल्यामुळे तुमच्या दुःखाने दुःखी आहेत. माते! तुम्ही मनात काही भलतेसलते मुळीच मानू नका. तुमच्या वियोगामुळे श्रीरामचंद्राचे तुमच्यावर दुप्पट प्रेम वाढले आहे. आई ! आता थोडा धीर धर म्हणजे तुला रघुपतीचा संदेश सांगतो. ”

पण हे बोलत असता कपीच सद्‌गदित झाला व त्याचे नेत्र पाण्याने भरले. १४

आलेला आवेग थोडा ओसरल्यावर हनुमान बोलू लागला, “ राम म्हणाले, हे सीते ! तुझ्या विरहाने सर्वच माझ्यावर उलटले आहेत. वृक्षांची नवी शीतल पालवी मला जणू आग झाली आहे; रात्र कालरात्रीसारखी भयानक, कारण चंद्र सूर्यासारखा तापदायक झाला आहे. चंद्रविकासी कमलांचे ताटवे भाल्यांच्या वनासारखे व्रणकारक झाले असून, मेघ जणू उकळणारे तेलच ओतत असतात ! थोडक्यात सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की, तू जवळ असता जे जे मला सुखदायक व हितकारक होते, ते सर्वच आता पीडा देत आहेत. त्रिविध वारासुद्धा त्यामुळे मला सर्पाच्या श्वासासारखा तापदायक वाटतो.

“ दुःख दुसऱ्याला सांगितल्याने काही कमी होते हे खरे. पण सांगू कोणाला हे दुःख जाणणारे ? कोण आहेत ? कोऽणी जाणत नाही; कारण प्रिये ! तुझ्या नी माझ्या प्रेमाचे तत्त्व एका माझ्या मनालाच माहीत आहे; आणि ते माझे मन अखंड तुझ्या जवळच असते. एवढयात काय तो प्रीतिरस तुझ्या ध्यानी येईल ”

प्रभुचा वरील संदेश श्रवण करत असता वैदेही इतकी प्रेममग्न झाली की, तिचे सर्वच देहभान हरपले, ते पाहून हनुमंताने पुनः प्रार्थना केली, “ माते ! धीर धर आणि सेवकास सुखदायक अशा श्रीरामाचे स्मरण कर. रघुपतीची प्रभुता मनात आण; आणि माझ्या शब्दावर विश्वास ठेवून मनातील भयाची हकालपट्टी कर. हे सगळे राक्षसांचे मोठे सैन्य पतंगासारखे असून रघुपतीचे बाण हे भडकलेल्या अग्नीच्या उंच ज्वालासारखे आहेत. म्हणून माते ! थोडा धीर धर ! हे सगळे राक्षस आता जळून खाक झाले अशीच खात्री बाळग. ” १५

चौ०—जौं रघुबीर होति सुधि पाई । करते नहिं बिलंबु रघुराई ॥
राम बान रबि उएँ जानकी । तम बरूथ कहँ जातुधान की ॥
अबहिं मातु मैं जाउँ लवाई । प्रभु आयसु नहिं राम दोहाई ॥
कछुक दिवस जननी धरु धीरा । कपिन्ह सहित अइहहिं रघुबीरा ॥
निसिचर मारि तोहि लै जैहहिं । तिहुँ पुर नारदादि जसु गैहहिं ॥
हैं सुत कपि सब तुम्हहि समाना । जातुधान अति भट बलवाना ॥
मोरें हृदय परम संदेहा । सुनि कपि प्रगट कीन्हि निज देहा ॥
कनक भूधराकार सरीरा । समर भयंकर अतिबल बीरा ॥
सीता मन भरोस तब भयऊ । पुनि लघु रूप पवनसुत लयऊ ॥

दो०—सुनु माता साखामृग नहिं बल बुद्धि बिसाल ।
प्रभु प्रताप तें गरुड़हि खाइ परम लघु ब्याल ॥ १६ ॥

चौ०—मन संतोष सुनत कपि बानी । भगति प्रताप तेज बल सानी ॥
आसिष दीन्हि रामप्रिय जाना । होहु तात बल सील निधाना ॥
अजर अमर गुननिधि सुत होहू । करहुँ बहुत रघुनायक छोहू ॥

"जर तुझा शोध रघुवीरास लागला असता तर त्यांनी विलंब मुळीच लावला नसता. हे जानकी ! रामबाणरूपी सूर्याचा उदय झाल्यावर गाढ अंधकाररूपी हे राक्षस कसे टिकणार ?"

"आई ! तुझे दुःख पाहिल्यावर असे वाटते की तुला आताच घेऊन जावे ! पण रामाची शपथ सांगतो की, प्रभूंची तशी आज्ञा नाही. म्हणून जानकी ! आणखी थोडे दिवस धीर धर. वानरांचे अफाट सैन्य घेऊन रघुवीर लवकरच येतील.

"निशाचरांचा नाश करून प्रभू तुला सन्मानाने परत घेऊन जातील; आणि नारदादि मुनी मग प्रभूंचे यश त्रैलोक्यात गातील !"

एक चिमुकला वानर युद्धाच्या लंब्या बाता भरदार रंगवून सांगत आहे असे पाहून जानकीला साहजिक शंका येऊन ती म्हणते, "हे सुत ! सगळे वानर तुझ्यासारखेच चिमुकले आहेत का ? प्रचंड-विक्राळ शरीराचे राक्षस योद्धे अत्यंत बलवान आहेत; म्हणून मला मोठी शंका वाटते की, हे कसे शक्य होणार ?"

सीतेने ही अडचण बोलून दाखवताच कपीने आपला समुद्रोल्लंघनाच्या वेळेचा देह एकदम प्रकट केला !

मग काय ? त्या बालरूप हनुमंताच्या जागी सोन्यासारखे चमकणारे सुमेरु पर्वतासारखे शरीर ! आणि रणांगणात भीती उत्पन्न करणारा अत्यंत बलवान् वीर सीतेला दिसला !

ते विशाल व रौद्र रूप पाहून सीतेच्या मनात भरवसा उत्पन्न झाला. लगेच पवनसुत बालरूपात पुढे राहून म्हणतो, "माते ! ऐक. वानरांना मोठे बळ किंवा विशाल बुद्धिमत्ता कुठली असणार ? पण प्रभू पाठिराखा असला म्हणजे त्यांच्या प्रतापाने अत्यंत लहान सापसुद्धा प्रबळ गरुडालाही भीक न घालता गट्ट करण्यास कमी करणार नाही. १६

तेज, बल व प्रताप यांच्या बरोबरच भक्तियुक्त अशा कपीच्या कृती व उक्तीमुळे सीतेला मनात फार संतोष वाटला; आणि याला राम प्रिय असून रामाचाहि हा लाडका आहे असे जाणून वैदेहीचे हृदय त्याला आशीर्वाद देण्यासाठी उत्सुक झाले.

"बाळा ! तू बलशाली होऊन शीलाचा सागर हो ! तुला वार्धक्य अथवा मृत्यू यांचे भय उरणार नाही आणि सर्व सद्गुणांचे निवासस्थानच तू बनशील. आणखी काय सांगू ! तात, रघुनायक तुझ्यावर अमाप कृपा करतील असा तुला माझा अंतःकरणपूर्वक आशीर्वाद आहे.

करहुँ कृपा प्रभु अस सुनि काना । निर्भर प्रेम मगन हनुमाना ॥
बार बार नाएसि पद सीसा । बोला बचन जोरि कर कीसा ॥
अब कृतकृत्य भयउँ मैं माता । आसिष तव अमोघ बिख्याता ॥
सुनहु मातु मोहि अतिसय भूखा । लागि देखि सुंदर फल रूखा ॥
सुनु सुत करहिं बिपिन रखवारी । परम सुभट रजनीचर भारी ॥
तिन्ह कर भय माता मोहि नाहीं । जौं तुम्ह सुख मानहु मन माहीं ॥

दो० – देखि बुद्धि बल निपुन कपि कहेउ जानकीं जाहु ।
रघुपति चरन हृदयँ धरि तात मधुर फल खाहु ॥ १७ ॥

चौ० – चलेउ नाइ सिरु पैठेउ बागा । फल खाएसि तरु तोरैं लागा ॥
रहे तहाँ बहु भट रखवारे । कछु मारेसि कछु जाइ पुकारे ॥
नाथ एक आवा कपि भारी । तेहिं असोक बाटिका उजारी ॥
खाएसि फल अरु बिटप उपारे । रच्छक मर्दि मर्दि महि डारे ॥

'प्रभू कृपा करतील' असे आशीर्वचन मातेच्या मुखातून बाहेर पडले आणि ते हनुमंताने ऐकले मात्र, तोच तो गाढ प्रेमात मग्न झाला !

आता आपणाला मिळावयाचे असे काहीच उरले नाही, अशा कृतज्ञतेने त्याने जानकीच्या चरणी आपले मस्तक अनेक वेळा नमवले व शेवटी हात जोडून म्हणाला, " माते ! मी आता कृतकृत्य झालो. कारण तुझे आशीर्वाद अमोघ असतात हे जगप्रसिद्ध आहे. "

समुद्रोल्लंघनार्थ उड्डाण केल्यापासून अनेक संकटांना, तहान-भूक विसरून, बेदरकारपणे तोंड देणारा हनुमान-'रामकार्य केल्याविना कुठला मज विश्राम' असे मैनाकाला विनयाने सुचवणारा पवनसुत आता कृत-कृत्य झाल्याने त्याला भूक लागली व तो म्हणतो,

" आई ग ! माझे ऐकतेस का ? सुंदर झाडे रुचकर फळांनी लगडलेली पाहून मला इतके कडाडले आहे की, केव्हा एकदा ती खाऊन टाकीन ! "

" ते खरे रे " सीता सचिंत होऊन म्हणते, ' बाळा ! या वनाचे रक्षण करणारे फार मोठे बलाढ्य रणशूर असे राक्षस आहेत ! "

" असेनात का " हनुमंताने झटकन् बेफिकिरीने उत्तर दिले. " आई त्या राक्षसांचे भय ! आणि मला ! रामदूताला ! नावसुद्धा काढू नकोस ! फळे खाऊन माझी तृप्ती झाली म्हणजे तुला सुख होणार असेल तरच मात्र हो म्हण. नाहीतर मुळीच नको. "

कपीच्या बुद्धीचे चातुर्य आणि सामर्थ्याचा पूर्ण विश्वास पाहून जानकी म्हणाली, ' जा बरं ! पण बाळा रघुपतींच्या पायांचे ध्यान करत मधुर तेवढीच फळे खा हं ! " १७

पडत्या फळाची आज्ञा घेतली आणि हनुमंताने सीतेला शिर नमवून वंदन केले. स्वारी जी निघाली ती सरळ फळ बागेत शिरली. फळे खाण्याच्या सपाट्याबरोबर वृक्षांच्या मोडतोडीचाही सपाटा सुरू झाला ! त्या बागेचे रक्षण करण्यासाठी रावणाने चौदा हजार लढवय्ये राक्षस जय्यत तयार ठेवले होते.

हनुमंताच्या वरील कार्यक्रमास अडथळा करण्यास जे गेले त्यांची तावडतोब यमाकडे रवानगी झाल्याचे पाहून जे विशेष धूर्त होते, त्यांनी सरळ पोबारा करून रावणाला ती भयंकर बातमी धापा टाकीत दिली. " नाथ ! एक आला ! ! कपी ! भारी ! ! ! आला आहे. त्याने आपली अशोक वाटिका उध्वस्त करून टाकली ! फळे तर खूप खाल्लीच, पण तेवढ्याने कुठे भागले ? मोठमोठाले वृक्ष त्याने मुळासह उपटून टाकले ! आणि आम्ही रक्षक त्याच्यावर तुटून पडलो पण त्याने बहुतेकांना जमिनीवर लोळवले ! आम्ही जीव घेऊन कसे तरी वर्दी देण्यास आलो.

सुनि रावन पठए भट नाना। तिन्हहि देखि गर्जेउ हनुमाना॥
सब रजनीचर कपि संघारे। गए पुकारत कछु अधमारे॥
पुनि पठयउ तेहिं अच्छकुमारा। चला संग लै सुभट अपारा॥
आवत देखि बिटप गहि तर्जा। ताहि निपाति महाधुनि गर्जा॥

दो० – कछु मारेसि कछु मर्देसि कछु मिलएसि धरि धूरि।
कछु पुनि जाइ पुकारे प्रभु मर्कट बल भूरि॥ १८॥

चौ० – सुनि सुत बध लंकेस रिसाना। पठएसि मेघनाद बलवाना॥
मारसि जनि सुत बाँधेसु ताही। देखिअ कपिहि कहाँ कर आही॥
चला इंद्रजित अतुलित जोधा। बंधु निधन सुनि उपजा क्रोधा॥
कपि देखा दारुन भट आवा। कटकटाइ गर्जा अरु धावा॥
अति बिसाल तरु एक उपारा। बिरथ कीन्ह लंकेस कुमारा॥
रहे महाभट ताके संगा। गहि गहि कपि मर्दइ निज अंगा॥
तिन्हहि निपाति ताहि सन बाजा। भिरे जुगल मानहुँ गजराजा॥

हे अगदीच अनपेक्षित आणि अपूर्व असे वृत्त ऐकताच अनेक योद्ध्यांना (८० हजार किंकर नावाचे घोर राक्षस – वा. रा.) या माकडाला पकडून चाल करून जाण्याचा रावणाने हुकूम सोडला.

त्यांना पाहिल्याबरोबर हनुमंताने एक वेळ मोठी गर्जना केली आणि असा घोर मारला की, निम्मे ठारच झाले, काही कण्हत कुंथत पडले व उरले ते गेले रावणाकडे बोंब करीत!

रावणाने तावडतोब आपला मुलगा अक्ष (अक्षय) याला अमर्याद सेना बरोबर देऊन चाल करून जाण्यास सांगितले.

रावणसुत आलेला नजरेने पाहिला मात्र, आणि तेथेच एक मोठा वृक्ष उपटून हातात घेतला. त्याला प्रथम चांगला दम भरला आणि तेथेच ठार करून खूप मोठी गर्जना केली!!

याप्रमाणे मुख्य सेनापतीचाच मुडदा पडल्यावर बाकीच्यांचा चुराडा उडविण्यास काय उशीर? कित्येकांचे प्राण गेले, तर कित्येकांची चेंदामेंदीच झाली. [illegible] मातीत घालण्यास सुद्धा उशीर लागला नाही! हनुमंताची नजर चुकवून कित्येकजण पळाले व रावणाकडे धावत्या धावत्या जाऊन ओरडले, "प्रभू! माकड मोठेच बलवान आणि शूर! सांगायची सोयच नाही!!" १८.

आपल्या पुत्रालाच ठार केल्याचे समजताच रावण संतापाने लाल झाला आणि त्याने बलवान मेघनादाला जाण्याची आज्ञा दिली; व जाताना सूचना दिली, "बाळ! त्याला ठार मारू नकोस; बांधून टाक आणि घेऊन ये. पाहू तर त्या कुठला कोण आहे तो!"

भावाचा वध केल्याचे समजून संतप्त झालेला अतुल योद्धा इंद्रजित आता हनुमंतावर स्वारी करण्यास निघाला.

आल्यावर आता चालून येणारा योद्धा भयंकर आहे असे पाहून हनुमंताने कडकडून दात खाल्ले आणि घनघोर गर्जना करून त्याच्यावर तो तुटून पडला. एका विशाल वृक्षाच्या तडाख्याने रथाबरोबर लंकेश्वराचा हा मुलगा रथावरून उडून खाली पडला!

तेथे बरोबर आलेल्या महान योद्ध्यांच्या झुंडीच्या झुंडी हनुमंताने उचलून आपल्या अंगावरच दाबून त्यांना चिरडून चिरडून टाकण्याचा सपाटा लावला.

सोबत्यांचा अशा रीतीने चुराडा करून झाल्यावर [illegible] होऊन आलेल्या इंद्रजिताबरोबर कुस्ती सुरू झाली! तेव्हा असे वाटले की जणू दोन बलाढ्य हत्तीच [illegible] झुंजत आहेत!

मुठिका मारि चढ़ा तरु जाई । ताहि एक छन मुरुछा आई ॥
उठि बहोरि कीन्हिसि बहु माया । जीति न जाइ प्रभंजन जाया ॥

दो० — ब्रह्म अस्त्र तेहिं साँधा कपि मन कीन्ह बिचार ॥
जौं न ब्रह्मसर मानउँ महिमा मिटइ अपार ॥ १९ ॥

चौ० — ब्रह्मबान कपि कहुँ तेहिं मारा । परतिहुँ बार कटकु संघारा ॥
तेहिं देखा कपि मुरुछित भयऊ । नागपास बाँधेसि लै गयऊ ॥
जासु नाम जपि सुनहु भवानी । भव बंधन काटहिं नर ग्यानी ॥
तासु दूत कि बंध तरु आवा । प्रभु कारज लगि कपिहिं बँधावा ॥
कपि बंधन सुनि निसिचर धाए । कौतुक लागि सभाँ सब आए ॥
दसमुख सभा दीखि कपि जाई । कहि न जाइ कछु अति प्रभुताई ॥

पहिल्या झपाट्याला हनुमंताने इंद्रजिताच्या छातीवर अशी एक बुक्की लगावली की, त्याच्या तोंडाला फेस येऊन तो जमिनीवर बेशुद्ध स्थितीतच क्षणभर पडला ! हनुमंताने टुनूकन उडी मारून एका उंच वृक्षाचा शेंडा गाठला.

हा वानर सामान्य नाही एवढा, शुद्धीवर आल्यानंतर इंद्रजिताची खात्री झाली. त्याने नानाप्रकारची आसुरी माया करून हनुमंताला जिंकण्याची शिकस्त केली, पण प्रभंजनतनय मुळीच आवरेना !

शेवटी, आता अन्य उपायच उरला नाही, असे पाहून मेघनादाने बाणावर ब्रह्मास्त्राचा प्रयोग केला.

त्यावेळी हनुमंताने विचार केला की, मी जर ब्रह्मास्त्राची महती राखली नाही तर अपार महिमा नष्ट होईल. ब्रह्मदेवावर कोणीच विश्वास ठेवणार नाही ! १९

[ब्रह्मास्त्र=ब्रह्मदेवाच्या कृपेने मिळणारे अस्त्र. प्रयोग करणाराने तसा विनियोग केल्यास केवळ अर्ध्या घटकेत—१२ मिनिटात त्रैलोक्याचाही नाश करण्याचे सामर्थ्य या अस्त्रात आहे. यातही गायत्रीमंत्र मुख्य आहेच. मेघनादाने इंद्राच्या मुसक्या बांधल्या, त्यावेळी त्याच्या सुटकेसाठी ब्रह्मदेवाने हे अस्त्र त्याला दिले. परंतु हनुमंताच्या जन्मकाळीच ब्रह्मदेवाच्या वराने या अस्त्राच्या कक्षेतून त्याची सुटका झाल्याने तो निर्भय होता. विशेष माहिती. गू. चं. पाहा.]

म्हणून या ब्रह्मास्त्राचा प्रतिकार करावयाचा नाही, असे हनुमंताने ठरवले. इतक्यात मेघनादाने ब्रह्मास्त्र सोडले. त्या ब्रह्मास्त्राने विराट देहाचा कपी खाली कोसळला, पण पडता पडता अशा खुबीने हनुमान कलंडला की त्याच्या अंगाखाली राक्षसांचे सैन्य पुष्कळच चिरडले !

इंद्रजिताला वाटले, कपी मूर्छित पडला आहे; म्हणून जलदी करून त्याला नागपाशात आवळला. आणि रावणाकडे नेला.

[ब्रह्मास्त्राने मूर्छित झाल्यावर अमोघ असे 'नागपाश' हेच एक बंधनास्त्र आहे. मंत्राच्या साह्याने नाग निर्माण होतात व ते सर्वांगाला घट्ट आवळतात. यावर उपाय फक्त गरुडास्त्राचाच-गू. चं.]

हनुमंताला नागपाशात बांधून नेला हे ऐकताच पार्वतीच्या मुखावर भीतीची छटा उमटली; म्हणून शंकर तिचे समाधान करतात, 'भवानी ! ऐक. ज्याच्या नामाचा जप केल्याने मनुष्यास सत्य ज्ञान होऊन तो भवबंधन तोडू शकतो, त्याचा दूत कधीतरी बंधनात सांपडणे शक्य आहे काय ? खरे पाहिले तर, प्रभूच्या कार्यासाठी कपी स्वतःच बंधनात सापडला होता !

कपीला बांधल्याची बातमी सर्व नगरात पसरताच जो तो मजा बघण्यासाठी आपल्या घरातून रावणसभेकडे धावत सुटला.

रावण दरबारात पदार्पण करताच हनुमन्ताने रावण व त्याचे वैभव एकवेळ निरखून पाहिले. ते ऐश्वर्य

कर जोरें सुर दिसिप बिनीता । भृकुटि बिलोकत सकल सभीता ॥
देखि प्रताप न कपि मन संका । जिमि अहिगन महुँ गरुड़ असंका ॥

दो० — कपिहि बिलोकि दसानन बिहसा कहि दुर्बाद ।
सुत बध सुरति कीन्हि पुनि उपजा हृदयँ बिषाद ॥ २० ॥

चौ० — कह लंकेस कवन तैं कीसा । केहि कें बल घालेहि बन खीसा ॥
की धौं श्रवन सुनेहि नहिं मोही । देखउँ अति असंक सठ तोही ॥
मारे निसिचर केहिं अपराधा । कहु सठ तोहि न प्रान कइ बाधा ॥
सुनु रावन ब्रह्मांड निकाया । पाइ जासु बल बिरचति माया ॥
जाकें बल बिरंचि हरि ईसा । पालत सृजत हरत दससीसा ॥
जा बल सीस धरत सहसानन । अंडकोस समेत गिरि कानन ॥
धरइ जो बिबिध देह सुरत्राता । तुम्ह से सठन्ह सिखावनु दाता ॥
हर कोदंड कठिन जेहिं भंजा । तेहि समेत नृप दल मद गंजा ॥
खर दूषन त्रिसिरा अरु बाली । बधे सकल अतुलित बलसाली ॥

दो० — जाके बल लवलेस तें जितेहु चराचर झारि ।
तासु दूत मैं जा करि हरि आनेहु प्रिय नारि ॥ २१ ॥

खरोखरच वर्णनातीत असे होते ! सर्व देव व दिक्पाल हात जोडून विशेष नम्रतेने उभे राहिले आहेत; आणि सगळेच भयग्रस्त होऊन रावणाच्या भिवयाकडे पाहात आहेत.

एवढा त्याचा प्रताप पाहूनही कपीच्या मनात जरासुद्धा भीती उत्पन्न झाली नाही. सर्पांच्या सभेत गरुड जसा निःशंक प्रवेश करील तशाच बेडरपणे कपी त्या रावणाच्या सभेत वावरला !

ही त्या कपीची निर्भय स्थिती रावणाच्या नाकाला झोंबली व हसत हसत तो अपशब्द बोलू लागला. याने़च आपल्या मुलाला ठार मारले याचे स्मरण होताच त्याच्या अंतःकरणात आगीचा भडका उडाला. २०

प्रश्नामागे प्रश्नांची त्याने सरबत्ती सोडली. "अरे कपी ! तू कोण आहेस ? कोणाच्या बळावर माझ्या उत्तम वनाची तू नासधूस केलीस ? माझा प्रताप तुझ्या कानावर कधी पडला होता की नाही ? अरे शठा ! तुझ्या तोंडावर भीतीचे नावसुद्धा दिसत नाही ! माझ्या इतक्या राक्षसांना कोणत्या अपराधाकरता ठार केलेस ? मूर्खा ! तुला आपले प्राण धोक्यात आहेत याची मुळीच कशी भीती वाटत नाही ? तू कोण म्हणजे अजून जिवंत सुटशील ! "

रावणाचे सर्व प्रश्न ऐकल्यानंतर हनुमंताने शांतपणे उत्तरे देण्यास प्रारंभ केला. "हे रावणा ! ऐक. ज्याच्यापासून शक्ती मिळाल्यानंतर माया अनंत कोटि-ब्रह्मांडे निर्माण करू शकते; त्याचप्रमाणे ज्याच्यापासून सामर्थ्य मिळाल्यावर ब्रह्मदेव सृष्टी उत्पन्न करतो. विष्णू तिचे पालन व शंकर संहार करतात; ज्याच्यापासून बळाची प्राप्ती झाल्यानंतरच सहस्र मुखांचा शेष, पर्वत व कानने यांच्यासह सर्व ब्रह्मांड आपल्या मस्तकावर तोलून धरतो; तुमच्यासारख्या शठांना शिक्षा करून देवांचे रक्षण करण्यासाठी जो अनेक प्रकारचे देह धारण करतो; ज्याने ज्याने कठीण असे शिवधनुष्य मोडले, आणि तुझ्यासह सर्व राजे लोकांची मस्ती जिरवली; तसेच खर, दूषण, त्रिशिरा आणि वाली यांच्यासारखे अतुलित बलशाली ज्याने ठार केले; इतकेच नव्हे, ज्याच्या बळाच्या लवलेशाने तू सारी चराचर सृष्टी जिंकलीस आणि ज्याची अत्यंत प्रिय अशी पत्नी तू चोरून आणलीस, त्याचाच मी दूत आहे. समजले, मी कोण व माझे बळ कोणाचे ते ?" २१.

चौ० — जानउँ मैं जा तुम्हारि प्रभुताई । सहसबाहु सन परी लराई ॥
समर बालि सन करि जसु पावा । सुनि कपि बचन बिहसि बिहरावा ॥
खायउँ फल प्रभु लागी भूँखा । कपि सुभाव तें तोरउँ रूखा ॥
सब कें देह परम प्रिय स्वामी । मारहिं मोहि कुमारग गामी ॥
जिन्ह मोहि मारा ते मैं मारे । तेहि पर बाँधेउँ तनयँ तुम्हारे ॥
मोहि न कछु बाँधे कइ लाजा । कीन्ह चहउँ निज प्रभु कर काजा ॥
बिनती करउँ जोरि कर रावन । सुनहु मान तजि मोर सिखावन ॥
देखहु तुम्ह निज कुलहि बिचारी । भ्रम तजि भजहु भगत भय हारी ॥
जाकें डर अति काल डेराई । जो सुर असुर चराचर खाई ॥
तासों बयरु कबहुँ नहिं कीजै । मोरे कहें जानकी दीजै ॥

दो० — प्रनतपाल रघुनायक करुना सिंधु खरारि ।
गएँ सरन प्रभु राखिहैं तव अपराध बिसारि ॥ २२ ॥

चौ० — राम चरन पंकज उर धरहू । लंका अचल राजु तुम्ह करहू ॥
रिषि पुलस्ति जसु बिमल मयंका । तेहि ससि महुँ जनि होहु कलंका ॥
राम नाम बिनु गिरा न सोहा । देखु बिचारि त्यागि मद मोहा ॥

" रावणा ! तुझा प्रताप मला पूर्ण माहीत आहे. सहस्रार्जुनाबरोबर तू लढाई केलीस, वालीशी युद्ध करताना तू विजयी झालास ! " कपीचे हे मर्मी लागणारे भाषण त्याने हसण्यावारी नेले !

" प्रभो ! ऐका, मला अतिशय भूक लागली होती म्हणून मी फळे खाल्ली. यात माझा काय दोष ? कपीच्या स्वभावास अनुसरून वृक्षांची मोडतोड केली. अहो स्वामी ! सगळ्यांनाच आपला देह अत्यंत प्रिय असतो, अशा स्थितीत तुमचे कुमार्गगामी निशाचर मला मारू लागले की हो ! मग ज्यांनी मला मारले, त्यांना मी उलट मारले, यात माझा काय अपराध ?

" त्यानंतर तुमच्या पराक्रमी मुलाने मला बांधलाच की. बांधला तर बांधला त्यात त्याचे काही चुकले नाही. बरे, मी बांधला गेलो यात मला काहीच लाजलज्जा वाटत नाही. कारण की, माझ्या प्रभूचे कार्य मला करावयाचे आहे. तसे नसते तर त्याची तरी मला बांधण्याची काय छाती होती ?

" मिळाली ना तुझ्या सर्व प्रश्नांची योग्य अशी उत्तरे ? असो. आता रावणा ! मी हात जोडून विनंती करतो की, अहंपणा सोडून माझी एवढी शिकवण ऐका. प्रथम तुमच्या श्रेष्ठ कुळाचा जरा विचार करून पाहा; आणि भ्रम सोडून भक्तांच्या सर्व भीतीचा नाश करणाराचे भजन करा. जो सुर, असुर, चर आणि अचर या सर्वांना खाऊन टाकतो, असा प्रत्यक्ष काळही ज्याच्या भीतीने अत्यंत घाबरतो, त्याच्याशी कधीही वैर करू नका व तुमच्या कल्याणाचीच गोष्ट मी सांगतो अशी खात्री बाळगून जानकीस देऊन टाका.

एवढा भयंकर गुन्हा केल्यावर ते शिक्षा नाही का करणार ? क्षमा करणे कसे शक्य अशी मनात शंका-सुद्धा बाळगू नका. कारण रघुनायक हे शरणागताचे पालन करणारे, करुणेचे निवासस्थान असून खराचे शत्रू आहेत. तुम्ही शरण गेलात तर तुमचे सर्व अक्षम्य अपराध विसरून प्रभू तुमचे रक्षण करतील " २२.

" त्यानंतर श्रीरामचंद्रांचे चरणकमल हृदयात धारण करून तुम्ही लंकेचे राज्य अखंड करावे.

" हे रावणा एकच विनंती तुम्ही पुलस्तिऋषीच्या निर्मल यशरूपी विमल मृगांकात (चंद्रात) कलंक बनू, नकाच !

" रामनामाविना वाणीला शोभा नाही, हा सत्य सिद्धान्त आहे; पण तो समजण्यासाठी तुला मद व मोह यांचा त्याग करून शांतपणे विचार करणे भाग आहे ! हे देवांच्या शत्रो ! सर्व प्रकारचे दागिने अंगावर

बसन हीन नहिं सोह सुरारी। सब भूषन भूषित बर नारी॥
राम बिमुख संपति प्रभुताई। जाइ रही पाई बिनु पाई॥
सजल मूल जिन्ह सरितन्ह नाहीं। बरषि गएँ पुनि तबहिं सुखाहीं॥
सुनु दसकंठ कहउँ पन रोपी। बिमुख राम त्राता नहिं कोपी॥
संकर सहस बिष्नु अज तोही। सकहिं न राखि राम कर द्रोही॥

दो० – मोहमूल बहु सूल प्रद त्यागहु तम अभिमान।
भजहु राम रघुनायक कृपा सिंधु भगवान॥ २३॥

चौ० – जदपि कही कपि अति हित बानी। भगति बिबेक बिरति नय सानी॥
बोला बिहसि महा अभिमानी। मिला हमहि कपि गुर बड़ ग्यानी॥
मृत्यु निकट आई खल तोही। लागेसि अधम सिखावन मोही॥
उलटा होइहि कह हनुमाना। मतिभ्रम तोर प्रगट मैं जाना॥
सुनि कपि बचन बहुत खिसिआना। बेगि न हरहु मूढ़ कर प्राना॥
सुनत निसाचर मारन धाए। सचिवन्ह सहित बिभीषनु आए॥

घालून एखादी सुंदर तरुणी सजवली, [illegible] मात्र [illegible] न देता उभी केली तर तिला काही शोभा येईल काय. नव्हे ती अशुभ, अशोभनीय ठरेल! [illegible] भोंवळणाऱ्या सुंदर बायकोला आहे, हे ध्यानात ठेव."

"शिवाय जे रामाला विमुख झाले त्यांनी मिळविलेली संपत्ती व प्राप्त झालेली सत्ता प्राप्त होणारी ती नाश पावल्यातच जमा हे ही निश्चित समज. कारण ज्या नद्यांना उगमाच्या मार्गी जिवंत झरा नसतो, त्यांचे पाणी पावसाळा संपताच [illegible] होणार, हे उघडच आहे!

"म्हणून हे दशकंठ! मी अगदी प्रतिज्ञापूर्वक सांगतो ते लक्षपूर्वक विचारात घे. रामविरोधकाचे कोणीही पाठीराखा असू शकत नाही. हजारो शंकर, विष्णू व ब्रह्मदेव जरी आले तरीही जो श्रीरामाचा द्रोह करतो, त्याचे संरक्षण करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात नाही! एवढ्याकरता मोहापासून ज्याचा जन्म होतो व ज्याच्यामुळे अनेक प्रकारची दुःखे आणि संकटे भोगावी लागतात, अशा भ्रमाला व अभिमानाला सोडा आणि कृपासागर षड्गुणैश्वर्य भगवान रघुनायक अशा श्रीरामचंद्राला अनन्यभावपूर्वक शरण जा." २३

अशाप्रकारे भक्ती, ज्ञान, वैराग्य व नीती यांनी युक्त असे अत्यंत कल्याणकारक असा हितोपदेश हनुमन्ताने केला तरी त्याचा थोडासुद्धा उपयोग झाला नाही.

कपीचे भाषण संपताच तो महा अभिमानी रावण मोठ्याने हासी तोंड उघडून खो खो करून पोटभर हसला आणि म्हणाला, "आज आम्हाला हे मोठे विद्वान कपिगुरु लाभले बुवा!" एवढे बोलून तो वायुसुताच्या अंगावर एकदम उसळला. "अरे ए खला! तुझा मरणकाळ जवळ आल्यामुळेच अधमा! तुला असला उपदेश मला करण्याची बुद्धी झालेली दिसते!

"छे! छे!" हनुमंताने ताडकन उत्तर दिले. "याच्या उलटच होणार आहे. [तुझाच मृत्यू जवळ आला आहे.] कारण तुझ्या बुद्धीला भ्रम झाल्याचे उघड दिसत आहे!"

हे संतापजनक शब्द कानी पडताच रावण अत्यंत चिडला व ओरडला. "अरे याला एका तडाख्यासरशी ठारच का करत नाही?"

ही राक्षसराजाची आज्ञा होताच अनेक निशाचर भराभर हत्यारे हाती घेऊन हनुमंताचा वध करण्यासाठी धावले, तोच आपल्या मंत्रिमंडळासह बिभीषण तेथे येऊन दाखल झाले.

नाइ सीस करि बिनय बहूता । नीति बिरोध न मारिअ दूता ।।
आन दंड कछु करिअ गोसाँई । सबहीं कहा मंत्र भल भाई ।।
सुनत बिहसि बोला दसकंधर । अंग भंग करि पठइअ बंदर ।।

दो० —कपि कें ममता पूँछ पर सबहि कहउँ समुझाइ ।
तेल बोरि पट बाँधि पुनि पावक देहु लगाइ ।। २४ ।।

चौ० —पूँछहीन बानर तहँ जाइहि । तब सठ निज नाथहि लइ आइहि ।।
जिन्ह कै कीन्हिसि बहुत बड़ाई । देखउँ मैं तिन्ह कै प्रभुताई ।।
बचन सुनत कपि मन मुसुकाना । भइ सहाय सारद मैं जाना ।।
जातुधान सुनि रावन बचना । लागे रचैं मूढ़ सोइ रचना ।।
रहा न नगर बसन घृत तेला । बाढ़ी पूँछ कीन्ह कपि खेला ।।
कौतुक कहँ आए पुरबासी । मारहिं चरन करहिं बहु हाँसी ।।
बाजहिं ढोल देहिं सब तारी । नगर फेरि पुनि पूँछ प्रजारी ।।
पावक जरत देखि हनुमंता । भयउ परम लघुरूप तुरंता ।।
निबुकि चढ़ेउ कपि कनक अटारीं । भईं सभीत निसाचर नारीं ।।

त्यांनी आपले मस्तक रावणापुढे नमवले आणि अनेक प्रकारे विनवून सांगितले, "नीतीविरुद्ध ही आपली आज्ञा असल्याने दूताला ठार मारू नये. प्रभो ! दुसरी एखादी शिक्षा करावी."

हे ऐकून सगळे सभासद एखमुखाने म्हणाले, "वा ! वा !! फारच चांगला सल्ला अगदी वेळेवर दिला !"

लगेच रावणाने हसत हसत फेर हुकूम केला; "बरोबर ! या वानराचा अंगभंग करून याला परत पाठविणेच अधिक योग्य ! सगळ्यांना आम्ही स्पष्ट सांगतो की, वानराचे प्रेम त्याच्या शेपटीवर फार असते, म्हणून तेलात भिजलेली वस्त्रे गुंडाळून द्या त्याची शेपटी पेटवून !" २४

'अगदी कसा मला पाहिजे तस्साच हुकूम मिळाला ! वाणीची देवता मला मदत करण्यासाठीच रावणाच्या जिभेवर या वेळी बसली यात शंकाच नाही.' मनातल्या मनात स्मित करत असता हनुमंताच्या अंतःकरणात हा विचार चमकून गेला.

रावणराजा बोले आणि मूर्ख राक्षसदळ दळे ! सगळ्या नगरीतून गुंडाळण्यास वस्त्रे व तेलातुपांचे हंडेच्याहंडे आले व शेवटी हे तिन्ही जिन्नस लंकेत औषधाला उरले नाहीत. कारण जसा तेलतुपात भिजवून वस्त्रे गुंडाळण्याचा कारखाना अनेक हातांनी सुरू झाला, तसाच आपले शेपूट सतत वाढते ठेवण्याचा खेळ हनुमंताने गुपचूप चालू केला !

आता लवकरच या विध्वंसक वानराची शेपटी पेटवणार व आपणाला मोठी मौज पाहावयास मिळणार म्हणून राक्षस व राक्षसिणींच्या झुंडीच्या झुंडी चारी दिशांनी पवनसुताच्या भोवती गोळा होऊ लागल्या !

त्यातील काही क्षुद्र वृत्तीच्या राक्षसांनी हनुमंताला लाथा व बुक्या मारण्याचा सपाटा लावला तर ते पाहून काही टाळ्यांचा कडकडाट करत तर दुसरे मोठ्याने ढोल बडवीत !

अशा थाटात सर्व पुरीतून मारुतीची धिंड निघाली व शेवटी मोठा भडका होईपर्यंत फुंकून, शेपटी एकदाची पेटविली !

शेपटी उत्तम प्रकारे पेटलेली आहे अशी प्रथम खात्री करून घेतली व लगेच हनुमंताने नागपाशातून सहज सुटता येईल एवढे चटकन् छोटे रूप घेतले; आणि मोकळा होताच टुणकन् उडी मारून स्वारी एका सोन्याच्या गच्चीवर जाऊन बसली !

हा प्रकार पाहिल्याबरोबर राक्षसांच्या स्त्रियांचे धाबे दणाणले व पळता भुई थोडी झाली !

दो० —हरि प्रेरित तेहि अवसर चले मरुत उनचास ।
अट्टहास करि गर्जा कपि बढ़ि लाग अकास ॥ २५ ॥

चौ० —देह बिसाल परम हरुआई । मंदिर तें मंदिर चढ़ धाई ॥
जरइ नगर भा लोग बिहाला । झपट लपट बहु कोटि कराला ॥
तात मातु हा सुनिअ पुकारा । एहिं अवसर को हमहि उबारा ॥
हम जो यह कपि नहिं होई । बानर रूप धरें सुर कोई ॥
साधु अवग्या कर फलु ऐसा । जरइ नगर अनाथ कर जैसा ॥
जारा नगरु निमिष एक माहीं । एक बिभीषन कर गृह नाहीं ॥
ता कर दूत अनल जेहिं सिरिजा । जरा न सो तेहि कारन गिरिजा ॥
उलटि पलटि लंका सब जारी । कूदि परा पुनि सिंधु मझारी ॥

दो —पूँछ बुझाइ खोइ श्रम धरि लघु रूप बहोरि
जनकसुता कें आगें ठाढ़ भयउ कर जोरि ॥ २६ ॥

हरीचे प्रेरणेने एकुण पन्नास प्रकारचे वारे (मरुत) वाहू लागले !

हनुमन्ताने एकवेळ मोठ्याने भयंकर भुभुःकार केला व एवढे मोठे शरीर वाढवले की, त्याचे मस्तक आकाशाला जाऊन भिडले ! २५

देह जेवढा महान तेवढाच चलाख ! एका मंदिरावरून दुसऱ्या मंदिरावर, याप्रमाणे मारुतीच्या भराभर झेपा जाऊ लागल्या. सर्व लंका एका क्षणात पेटल्याचे पाहून नागरिक राक्षस कासावीस झाले. त्यांच्या डोळ्यांना पाहवेना एवढया मोठ्या अक्राळविक्राळ ज्वाळा धाडधाड पेटून उंच उंच अशा अंतराळात विहार करू लागल्या. आगीचा एकच डोंब उठून सर्वत्र हलकल्लोळ उडाला !

“ हाय हाय ! आई ग ! अहो बाबा ! ”, याप्रमाणे सर्वत्र आरोळ्या ऐकू येऊ लागल्या. “ अहो यावेळी आमचे रक्षण करण्यास कोणी धावून येतो का हो ! ” ओरडणाऱ्या काही शहाणे पुनः कपाळाला हात लावून ओरडू लागले, ‘ काय सांगावे हो ! आम्ही म्हणतच होतो की, हा साधा वानर नाही. हा कोणी वानररूपाने आलेला देवच असला पाहिजे. साधूचा अपमान केला म्हणजे त्याचे फळ असेच पदरी पडायचे ! पहाना आता. एखाद्या अनाथाच्या नगराप्रमाणे ही लंका कशी जळत राहिली आहे. आहे का कोणी तिला विझवण्यास समर्थ ? ”

श्रीरामभक्त बिभीषणाचे घर तेवढे शिल्लक; त्याला आगीचा स्पर्शही झाला नाही ! बाकीची सर्व लंका बघता बघता जळून गेली !

एवढा काळ आकाशी स्वैरपणे फिरणारा हनुमानाचा काय बाट, अशी शंका श्रेष्ठ पार्वतीला आल्याचे महादेवांनी ओळखले; त्रीच खुलासा करतात, “ अग गिरिजे ! अग्नीचीही उत्पत्ती ज्यांच्यापासून होते, त्यांचाच हनुमान दूत ना ? मग त्याची शेपटी जाळण्याची काय छाती आहे त्या अग्नीची ! ”

एखाद्या उच्च मंदिरावर जाऊन नजर टाकावी, कुठे काही राहिले असेल त्याचा पुनः भडका उडवावा, अशा प्रकारे उलट-सुलट पुनः पुन्हा उड्या मारून आता पेटवायचे काही शिल्लक उरले नाही अशी खात्री करून घेतली; आणि मग दिली समुद्रात उडी घेऊन ! त्याशिवाय ते जळत शेपूट व शरीर शांत होणार कसे !

शेपूट विझून शांत झाले. झालेल्या श्रमांचा पूर्ण परिहार केला. नंतर पहिल्याप्रमाणे छोटे रूप पुनः घेतले आणि जणू आपण काहीच केले नाही, अशी ऐटीत स्वारी हात जोडून जानकीपुढे येऊन चूप उभी राहिली ! २६

चौ ० —मातु मोहि दीजे कछु चीन्हा । जैसें रघुनायक मोहि दीन्हा ॥
चूड़ामनि उतारि तब दयऊ । हरप समेत पवनसुत लयऊ ॥
कहेहु तात अस मोर प्रनामा । सब प्रकार प्रभु पूरनकामा ॥
तात सक्रसुत कथा सुनाएहु । बान प्रताप प्रभुहि समुझाएहु ॥
दीन दयाल बिरिदु संभारी । हरहु नाथ मम संकट भारी
मास दिवस महुँ नाथु न आवा । तौ पुनि मोहि जिअत नहिं पावा ॥
कहु कपि केहि बिधि राखौं प्राना । तुम्हहु तात कहत अब जाना ॥
तोहि देखि सीतलि भइ छाती । पुनि मो कहुँ सोइ दिनु सो राती ॥

दो ० — जनकसुतहि समुझाइ करि बहु बिधि धीरजु दीन्ह ।
चरन कमल सिरु नाइ कपि गवनु राम पहिं कीन्ह ॥ २७ ॥

चौ ० —चलत महाधुनि गर्जेसि भारी । गर्भ स्रवहिं सुनि निसिचर नारी ॥
नाघि सिंधु एहि पारहि आवा । सबद किलिकिला कपिन्ह सुनावा ॥
हरषे सब बिलोकि हनुमाना । नूतन जन्म कपिन्ह तब जाना ।

आता एकच कामगिरी उरली. ती म्हणजे मातोश्रीचा निरोप व जाताना खूण. त्तासाठी हनुमंताने प्रार्थना केली, " आई ऽ ऽ ! मला दे ग ! काही खूण तरी ? जशी रघुनायकांनी तुझ्याकडे येताना आपली करमुद्रिका दिली तशी काही तरी दे. "

सीतेने तावडतोब आपल्या वेणीतून चूडामणी काढून हनुमंताच्या हातात ठेवला. त्यावेळी दोघांनाही आनंद वाटला; पण आता निरोपाची वेळ आली हे पाहताच वैदेहीचा कंठ भरून येऊ लागला.

" बाळा ! माझा प्रणामपूर्वक त्यांना निरोप सांग की, प्रभो ! आपण सर्व प्रकारे पूर्णकाम आहात. पण हे नाथ ! मी इथे अनाथ होऊन पडले आहे. मी काही पूर्णकाम नाही. आता दीनदयाळू हे आपले ब्रीद आठवा; आणि माझे हे भयंकर संकट दूर करा ! हनुमन्त बाळा ! ती काकरूपधर शक्रसुताच्या-मागे ब्रह्मशर सोडल्याची कथा त्यांना सांग व प्रभूंच्या त्या बाणाचा प्रताप त्यांना लक्षात आणून दे. आणि अगदी बजावून सांग हं; नाथ जर महिन्याच्या आत नाही आले, तर मागून आल्यावर मी काही त्यांना जिवंत दिसायची नाही ! ! "

आता मात्र सीतेच्या विरहदुःखाला अनावर कढ आला. " हे कपिवरा ! तूच सांग बरं की, मी आता प्राणांचे रक्षण कसे करू ? तात ! तू सुद्धा ' आता जातो ' म्हणतोस ! "

" बाळा ! तुला पाहून, तुझ्याशी बोलून मी आपल्या असह्य दुःखाला थोडेतरी मागे सारले होते, पण तू गेल्यावर पुनः मला तेच त्रासदायक दिवस व त्याच तापदायक रात्री ! "

जनकसुतेची ही करुणास्पद स्थिती पाहून तिला अनेक समजुतींच्या गोष्टी सांगितल्या व पुष्कळ धीर दिला निरोप घेण्यापूर्वी तिच्या चरणकमलांना वंदन करून रामाकडे जाण्यास कपी निघाला. २७

समुद्रावरून परत उड्डाण करताना एवढी मोठी गर्जना हनुमन्ताने केली की, ती कानी पडल्याबरोबर भीतीने राक्षसींचे गर्भ गळून पडले !

सागराचे पैलतीर जसजसे जवळ येऊ लागले, तसे त्या तीरावर मार्गप्रतिक्षा करत बसलेले वानर हनुमन्ताकडे पाहून आपसात कुजबुजू लागले. ' आला हनुमान ! तो पाहा ! ' इत्यादि किलबिल चालू असतानाचा आनंदसूचक असा ' किलकिल ' असा हनुमन्ताचा आवाज परत त्यांच्या कानावर आला.

हनुमन्ताकडे तहानलेल्या डोळयांनी पोटभर पाहिल्यावर ते वानर आपसात म्हणतात, " गड्यांनो आज आपल्या कुडीत पुनः प्राण आला, खरे की नाही ? "

मुख प्रसन्न तन तेज बिराजा। कीन्हेसि रामचंद्र कर काजा॥
मिले सकल अति भए सुखारी। तलफत मीन पाव जिमि बारी॥
चले हरषि रघुनायक पासा। पूँछत कहत नवल इतिहासा॥
तब मधुबन भीतर सब आए। अंगद संमत मधु फल खाए॥
रखवारे जब बरजन लागे। मुष्टि प्रहार हनत सब भागे॥

दो० —जाइ पुकारे ते सब बन उजार जुबराज॥
सुनि सुग्रीव हरष कपि करि आए प्रभु काज॥ २८॥

चौ० —जौं न होति सीता सुधि पाई। मधुबन के फल सकहिं कि खाई॥
एहि बिधि मन बिचार कर राजा। आइ गए कपि सहित समाजा॥
आइ सबन्हि नावा पद सीसा। मिलेउ सबन्हि अति प्रेम कपीसा॥
पूँछी कुसल कुसल पद देखी। राम कृपाँ भा काजु बिसेषी॥
नाथ काजु कीन्हेउ हनुमाना। राखे सकल कपिन्ह के प्राना॥
सुनि सुग्रीव बहुरि तेहि मिलेऊ। कपिन्ह सहित रघुपति पहिं चलेऊ॥

आता पवननंदन बराच जवळ दिसू लागला. त्याची ती कळकळवाणी काया आणि मुखावरील प्रसन्नतेचे मंद स्मित पाहून सर्वांची खात्री झाली की, त्याने रामचंद्रांचे कार्य सिद्धीस नेले!

इतक्यात हनुमान त्यांच्याजवळ येऊन ठेपलेसुद्धा! मग काय, हर्षाच्या भरात [illegible] सर्व वानर कडकडून भेटले. मरत असलेल्या माशांना पाण्यात सोडल्यावर जसा आनंद होतो, तसे सारे वानर सुखी झाले.

नंतर मोठ्या हर्षाने सारे वानर रघुपतीकडे जावयास निघाले. [illegible] देवी सीतेचा सारा इतिहास कळण्यास तयार झाला. वाटेत निघालेले वानर विचारीत व हनुमान [illegible] सर्व कथा सांगत. असा कार्यक्रम सुरू होता.

किष्किंधेजवळ येताच सर्वांनी अंगदाची संमती घेतली व सुग्रीवाच्या मधुवनात शिरून [illegible] व फळे खाण्याचा सपाटा लावला! [illegible] त्यांनी ही बातमी सुग्रीवाला कळवि[illegible] निघून गेले.

रखवाल्यांनी [illegible] आणि सुग्रीवाची भेट घेऊन [illegible] म्हणून सांगितले, "महाराज! युवराजांनी आमचे मधुवन सर्व उजाड करून टाकले!"

हे ऐकून [illegible] सुग्रीव [illegible] त्याने कयास बांधला की, हे सर्व वानर प्रभुकार्य संपवून परत आले असतील! २८

त्याच्या मनात साहजिकच विचार आला की, सीतेचा शोध जर लागला नसता तर [illegible] मधुवनातील फळांना हात तरी लावण्याचे धाडस होते काय.

सुग्रीवाचा असा विचार चालू होता, तोच युवराज अंगद सर्व [illegible] घेऊन पोचलेसुद्धा!

सर्वांनी येताच आपले मस्तक करांजुळे नमवले व त्याच्या चरणी नमस्कार केला. [illegible] जो जो जवळ आला, त्याच्या अगदी गळ्यात गळा घालून सुग्रीव मोठ्या प्रेमाने सर्वांना भेटला.

सर्व वानरांनी आपापल्या जागी बसल्यावर कपिराजाने त्यांना कुशल प्रश्न विचारले. त्यावेळी त्या सर्वांनी सांगितले.

" महाराज! आपले चरण आम्हाला दिसले हेच आमचे खरे कुशल. श्रीरामचंद्राच्या कृपेने विशेष कार्य घडून आले. नाथ! सारी कामगिरी एकट्या हनुमानानेच केली व आम्हा सर्वांचे प्राण वाचविले."

हे ऐकून सुग्रीवाने उठून हनुमन्ताला पुनः भेट दिली. आणि सर्वजण रघुपतीकडे निघाले.

राम कपिन्ह जब आवत देखा । किएँ काजु मन हरष बिसेषा ॥
फटिक सिला बैठे द्वौ भाई : परे सकल कपि चरनन्हि जाई ॥

दो० —प्रीति सहित सब भेटे रघुपति करुना पुंज ।
पूँछी कुसल नाथ अब कुसल देखि पद कंज ॥ २९ ॥

चौ ०—जामवंत कह सुनु रघुराया । जा पर नाथ करहु तुम्ह दाया ॥
ताहि सदा सुभ कुसल निरंतर । सुर नर मुनि प्रसन्न ता ऊपर ॥
सोइ बिजई बिनई गुन सागर । तासु सुजसु त्रैलोक उजागर ॥
प्रभु कीं कृपा भयउ सबु काजू । जन्म हमार सुफल भा आजू ॥
नाथ पवनसुत कीन्हि जो करनी । साहसहुँ मुख न जाइ सो बरनी ॥
पवनतनय के चरित सुहाए । जामवंत रघुपतिहि सुनाए ॥
सुनत कृपानिधि मन अति भाए । पुनि हनुमान हरषि हियँ लाए ॥
कहहु तात केहि भाँति जानकी । रहति करति रच्छा स्वप्रान की ॥

दो०—नाम पाहरू दिवस निसि ध्यान तुम्हार कपाट ।
लोचन निज पद जंत्रित जाहिं प्रान केहिं बाट ॥ ३० ॥

श्रीरामचंद्रानी येणाऱ्या कपीच्या मुखावरील हास्ययुक्त उत्साह जेव्हा पाहिला, तेव्हाच खूण गाठ बांधली की हे सर्व विशेष हर्षित त्यावरून कृतकार्य होऊन आलेले आहेत, त्यामुळे त्यांनाही मनात विशेष हर्ष झाला.

श्रीरामलक्ष्मणांची जोडी एका स्फटिकशिळेवर बसताच सर्वांनी त्यांचे पायी प्रणाम केले.

करुणासागर प्रभू सर्वांना प्रेमाने भेटलें व क्षेमकुशल विचारले.

सर्वजण एक मुखाने म्हणाले " नाथ ! आपले चरणकमल दिसले, आता आमचे कुशल आहे ! " २९

सर्वांत वृद्ध जांबुवंत. त्याने विशेष वृत्त सांगितले, " रघुराया ! ऐक; नाथ ! तुम्ही ज्याच्यावर दया करता त्याचे सदा कल्याण व निरंतर कुशलच असते, मग सुर, नर व मुनी असे सर्वच त्याच्यावर सदोदित प्रसन्न असतात, असा भाग्यवंतच खरा विजयी, विनयी व गुणसागर होऊन त्याची सत्कीर्ती त्रैलोक्यात प्रकाशित होते.

" प्रभो ! सर्वकार्य झाले ते आपल्या कृपेनेच ! पण त्यामुळे आमच्या जन्माचे मात्र खास सार्थक झाले. नाथ ! या सर्व घटनेत पवनसुताने जी अलौकिक करणी केली, तिचे वर्णन हजारो मुखांनी करूनही पुरे होणार नाही. "

अशी आवश्यक प्रस्तावना करून जांबुवंताने पवनतनयांच्या सुंदर व अद्भुत कामगिरीची रघुपतीला व्यवस्थित कल्पना दिली.

जांबुवंताचे भाषण चालू असतानाच ती कामगिरी व ज्याने आपल्या मतिबलाने ती सांगपणे पार पाडली तो हनुमान, कृपानिधीच्या मनास फार आवडला.

जांबुवंताकडून वृत्त समजून घेतले व लगेच हनुमन्ताला मोठ्या हर्षाने आपल्या हृदयाशी कवटाळले आणि प्रभू म्हणाले,

" तात ! सांगा पाहू, जानकी राहते तरी कशी व आपल्या प्राणांचें रक्षण करते तरी कशी ? "

हनुमन्ताने सांगण्यास सुरुवात केली, " नाथ ! आपले नाम रात्रंदिवस पहाऱ्यावर आहे. तुमचे ध्यानरूपी दार सदोदित बंद आहे; दृष्टी स्वतःच्याच पायावर अखंड खिळली आहे. अशा स्थितीत प्राणांना बाहेर जाण्यास वाटच कुठे राहिली ! " ३०

चौ०—चलत मोहि चूड़ामनि दीन्ही। रघुपति हृदयँ लाइ सोइ लीन्ही॥
नाथ जुगल लोचन भरि बारी। बचन कहे कछु जनककुमारी॥
अनुज समेत गहेहु प्रभु चरना। दीन बंधु प्रनतारति हरना॥
मन क्रम बचन चरन अनुरागी। केहिं अपराध नाथ हौं त्यागी॥
अवगुन एक मोर मैं माना। बिछुरत प्रान न कीन्ह पयाना॥
नाथ सो नयनन्हि को अपराधा। निसरत प्रान करहिं हठि बाधा॥
बिरह अगिनि तनु तूल समीरा। स्वास जरइ छन माहिं सरीरा॥
नयन स्रवहिं जलु निज हित लागी। जरैं न पाव देह बिरहागी॥
सीता कै अति बिपति बिसाला। बिनहिं कहें भलि दीनदयाला॥

दो०—निमिष निमिष करुनानिधि जाहिं कलप सम बीति॥
बेगि चलिअ प्रभु आनिअ भुज बल खल दल जीति॥ ३१॥

चौ०—सुनि सीता दुख प्रभु सुख अयना। भरि आए जल राजिव नयना॥
बचन कायँ मन मम गति जाही। सपनेहुँ बूझिअ बिपति कि ताही॥
कह हनुमंत बिपति प्रभु सोइ। जब तव सुमिरन भजन न होइ॥
केतिक बात प्रभु जातुधान की। रिपुहि जीति आनिबी जानकी॥

" निरोप घेण्याच्या वेळी त्यांनी काढून हा चूडामणी माझ्या हाती आदराने दिला !"

लगेच रघुपतींनी हनुमंताकडून तो चूडामणी घेतला आणि आपल्या हृदयास लावला.

त्याचवेळी मारुती पुढे सांगू लागला, " नाथ ! [illegible] नेत्रांत पाणी आणून आपणास निरोप सांगितला, ' अनुजासह प्रभूंचे पाय धरून असा विनंति करा की, हे दीनबंधु ! शरणागतांची दुःखे हरण करणाऱ्या प्रभो ! मनाने, शरीराने व वाणीने आपल्या चरणी अनुरक्त असलेली मी ! कोणत्या [illegible] माझा आपण त्याग केला ? [illegible] विचार केल्यावर माझ्या मनात माझा एक अपराध आढळतो आणि तो हा की, आपल्या चरणांच्या वियोगानंतर माझे प्राण जडदेहात राहिले आहेत, ते गेले नाहीत ! पण नाथ ! तो सुद्धा अपराध या नेत्रांचा आहे. कारण [illegible] प्राणांना हे [illegible] बाहेर जाऊ देत नाहीत.

" विरहरूपी अग्नी [illegible] आहे. देह [illegible] शुष्क झाला आहे. श्वासांचा वारा वाहत असता एका क्षणात शरीर जळून खाक झाले असते; पण काय करणार ? हे नेत्र स्वतःच्या हितासाठी (प्रभुदर्शनार्थ) पाण्याची (अश्रूंची) वृष्टी करत असल्याने [illegible] विरहाग्नी [illegible] तनूला जाळू शकत नाही."

असा प्रत्यक्ष संदेश सांगून हनुमान स्वतःच्या डोळ्यांनी जी पाहिली [illegible] तिचे वर्णन करून सांगतात. " दीनदयाळा ! सीतेची [illegible] अतिशय मोठी आहे; तिचे आपण वर्णन न करणेच बरे; कारण माझ्याच्याने ती सांगवत नाही. थोडक्यात सांगायचे म्हणजे, हे करुणासागरा ! तिचे एकेक निमिषाचे जीवन तिला एकेक कल्पासारखे कष्टप्रद होत आहे. म्हणून आपण सत्वर चला व. आपल्या बाहुबलाने या खळांचा व त्याच्या सैन्याचा चुराडा करून मातोश्रींना आणू या " ३१

हनुमंताच्या तोंडून सीतेचे दुःख श्रवण करून अत्यंत सुखधाम प्रभूंच्या राजीव नेत्रात अश्रु चमकू लागले; व म्हणाले, " हनुमंता ! शरीराने- मनाने व वाणीने ज्याला माझ्याशिवाय अन्य गति नाही त्याला स्वप्नात तरी कधी विपत्ती शिवेल काय ?"

ते ऐकून हनुमान म्हणाले, " प्रभो ! जेव्हा तुमचे स्मरण, भजन वगैरे घडत नाही तीच खरी विपत्ती ! त्या निशाचरांची नाहीतर कथा ती काय ? शत्रूंना जिंकून जानकीला परत आणण्यास आपणाला थोडाच वेळ लागणार ?"

सुनु कपि तोहि समान उपकारी । नहिं कोउ सुर नर पुनि तनुधारी ॥
प्रति उपकार करौं का तोरा । सनमुख होइ न सकत मन मोरा ॥
सुनु सुत तोहि उरिन मैं नाहीं । देखेउँ करि बिचार मन माहीं ॥
पुनि पुनि कपिहि चितव सुरत्राता । लोचन नीर पुलक अति गाता ॥

दो०—सुनि प्रभु बचन बिलोकि मुख गात हरषि हनुमंत ।
चरन परेउ प्रेमाकुल त्राहि त्राहि भगवंत ॥ ३२ ॥

चौ०—बार बार प्रभु चहइ उठावा । प्रेम मगन तेहि उठब न भावा ॥
प्रभु कर पंकज कपि कें सीसा । सुमिरि सो दसा मगन गौरीसा ॥
सावधान मन करि पुनि संकर । लागे कहन कथन कथा अति सुंदर ॥
कपि उठाइ प्रभु हृदयँ लगावा । कर गहि परम निकट बैठावा ॥
कहु कपि रावन पालित लंका । केहि बिधि दहेउ दुर्ग अति बंका ॥
प्रभु प्रसन्न जाना हनुमाना । बोला बचन बिगत अभिमाना ॥
साखामृग कै बड़ि मनुसाई । साखा तें साखा पर जाई ॥
नाघि सिंधु हाटकपुर जारा । निसिचर गन बधि बिपिन उजारा ॥

सीतेसाठी एवढे अतुल्य कार्य करणाऱ्या हनुमन्ताबद्दल कृतज्ञतेने अंतकरण भरून येऊन प्रभू बोलू लागले, " हे कपि ! ऐक. सुर, नर, मुनी इत्यादी श्रेष्ठ देह धारण करणारातसुद्धा तुझ्यासारखा माझ्यावर उपकार करणारा दुसरा कोणीच नाही. आता तुझ्या उपकाराची मी फेड कशी करू ? कारण काय केले असता तुझ्या या ऋणाची भरपाई होईल असा जेव्हा मी विचार करतो तेव्हा माझ्या मनाची गती कुंठित होते. म्हणून हे सुता ! ऐक; मी तुझ्या उपकाराच्या कर्जातून मुक्त होऊच शकत नाही, असे विचारांती ठरले ! "

स्वतः देवांचे पालन करणारे असूनसुद्धा श्रीराम वारंवार हनुमंताच्या तोंडाकडे पाहू लागले; त्यांचे डोळे पाण्याने भरले आणि अंगावर थरारून जोराचा काटा उभा राहिला ! !

अशी ही स्थिती प्रभूची होऊन ते हनुमंताच्या मुखाकडे पाहात असता हनुमंताचीही तशीच दीनवाणी स्थिती झाली. तोही रामचंद्राच्या अश्रूपूर्ण नेत्राकडे व रोमांचित शरीराकडे पाहू लागला. त्याबरोबर त्याचेही सर्व शरीर अत्यंत वेगाने पुलकित झाले. प्रेमाकुल होऊन त्याने प्रभूचे पाय घट्ट धरले व म्हणतो, " भगवंता ! भगवंता ! ! रक्ष रक्ष ! " असे म्हणून त्याने प्रभूच्या पायावर लोळण घेतली. ३२

हनुमंताला झटकन् उठवून पोटाशी धरावे या इच्छेने प्रभू त्याला वारंवार उठवू पाहात आहे; पण तो इतका प्रेममग्न झाला आहे की, त्याला ते चरणकमल सोडूच नये असे वाटत आहे.

शेवटी प्रभूंनी आपले करकमल त्याच्या मस्तकावर ठेवले !

परंतु हे वर्णन करून सांगत असता गौरीश शंकरांना उन्मनी दशा प्राप्त झाली. थोड्याच वेळात आपल्या मनाला सावध करून पुढील अत्यंत सुंदर कथा उमेला ते सांगू लागले.

हनुमन्ताला त्या करस्पर्शाने कृतकृत्यता प्राप्त झाली. प्रथम त्याला उठवून प्रभूंनी आपल्या हृदयाशी धरला व नंतर हाताला धरून आपल्या अत्यंत जवळ बसला.

दोघेही भावनांचा भर ओसरू स्थिर झाल्यावर श्रीरामचंद्रांनी विचारले, " हे कपि ! अति दुर्गम व अति विकट अशी रावणाने कडेकोट बंदोबस्तात ठेवलेली लंका तू जाळलीस तरी कशी ? "

प्रभू प्रसन्न आहेत, हे जाणून हनुमंताने निरहंकार बुद्धीने सांगितले, " भगवान्, आमचा शाखा-मृगांचा पुरुषार्थ काय सांगावा ? झाडाच्या एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर व्यर्थ उड्या मारणे ही आमची कर्तबगारी ! अशा स्थितीवरून उड्डाण, सोन्याच्या नगरीची होळी, अनेक राक्षसांच्या टोळ्यांच्या एकेका सपाट्यात चक्काचूर, अशोकवनाचा विध्वंस इत्यादी अलौकिक कार्यें कुठे माकडाच्या हातून होतात ? रघुपते !

सो सब तव प्रताप रघुराई। नाथ न कछू मोरि प्रभुताई॥

दो० – ता कहुँ प्रभु कछु अगम नहिं जा पर तुम्ह अनुकूल।
तव प्रभावँ बड़वानलहि जारि सकइ खलु तूल॥ ३३॥

चौ० – नाथ भगति अति सुखदायनी। देहु कृपा करि अनपायनी॥
सुनि प्रभु परम सरल कपि बानी। एवमस्तु तब कहेउ भवानी॥
उमा राम सुभाउ जेहिं जाना। ताहि भजनु तजि भाव न आना॥
यह संबाद जासु उर आवा। रघुपति चरन भगति सोइ पावा॥
सुनि प्रभु बचन कहहिं कपिबृंदा। जय जय जय कृपाल सुखकंदा॥
तब रघुपति कपिपतिहि बोलावा। कहा चलैं कर करहु बनावा॥
अब बिलंबु केहि कारन कीजे। तुरत कपिन्ह कहुँ आयसु दीजे॥
कौतुक देखि सुमन बहु बरषी। नभ तें भवन चले सुर हरषी॥

हा सर्व आपल्या प्रतापाचाच खेळ होय! त्यात माझ्या पुरुषार्थाचा संबंधच नाही!

"प्रभो! ज्याच्यावर आपण एकदा प्रसन्न झालात, त्याला या जगात दुर्गम आणि दुःसाध्य असे काय उरणार? तुमच्या प्रभावाने क्षुद्र कापूसमुद्दा अनेक वडवाग्नींना जाळू शकेल!" ३३

"हे नाथ! आपण प्रसन्न असाल तर एकच मागणे मागतो आहे. अती सुख देणारी व कधीही नाश न पावणारी अशी आपल्या चरणकमलांची भक्ती माझ्यावर कृपा करून द्या."

शंकर पुनः म्हणाले, "भवानी! कपीची ती परम सरळ वाणी ऐकून प्रभूंनी 'एवमस्तु' म्हटले. हे उमे! ज्याला एकदा माझ्या रामाचा स्वभाव अनुभवाला आला, त्याला या जगात रामभजनाशिवाय दुसरे काही आवडणेच शक्य नाही! हा प्रभू-हनुमान संवाद ज्याच्या हृदयात ठसला [illegible] भक्ती प्राप्त झालीच म्हणून समज.

आपल्या प्रिय हनुमन्ताला जे पाहिजे ते प्रभूंनी दिले, हे कळताच सर्व [illegible] जमावांनी एकच प्रचंड घोष उठविला. "कृपाळू व सुखकंद* असणाऱ्या श्रीरामचंद्रांचा त्रिवार जय-जय-जय कार असो!!!"

सीतेचा शोध करण्याचे काम आता पूर्ण झाले, हे पाहून रघुनाथांनी कपिपती सुग्रीवाला बोलावून सांगितले की, 'प्रयाणाची तयारी करावी. सर्व कपींना एकदम हुकूम द्यावेत; वेळ गमावण्यास कोणतेच कारण आता उरलेले नाही.'

रावणाच्या वधासाठी सर्व सिद्ध [illegible] देवांनी आता प्रभू आपल्या [illegible] रचना करून निघणार हे कौतुक पाहिले. त्यांनी पुष्कळ फुलांचा वर्षाव केला व आकाशमार्गे आपापल्या निवासस्थानी निघून गेले.

सीतेचा ठावठिकाणा लागताच सुग्रीव [illegible] एकदा चढाई करून, नक्की जाणीव झाल्याने त्याने योग्य ती पूर्वतयारी करूनच ठेवली होती.

श्रीरामचंद्रांनी सैन्याची जमवाजमव करण्याबद्दल आज्ञा देताच तत्काळ जमा होण्याबद्दल सर्व वानर व ऋक्ष यांच्या सेनापतींना हुकूम सुटले; आणि ते थाटच नाहीत अल्पकाळाने राजाचा हुकूम कानी पडताच सेनापतींच्या झुंडीमागून झुंडी एकत्र गोळा झाल्या.

त्यांचा तो समुदाय, अनेक रंगांच्या त्यांच्या अंगावरील केसांमुळे मोठा रंगीबेरंगी अफाट मालिकाच बनला!

---

* सुखकंद—सुखरूपी जलाचा वर्षाव करणारे मेघ.



दो ० — कपिपति बेगि बोलाए आए जूथप जूथ ।
नाना बरन अतुल बानर भालु बरूथ ।। ३४ ।।

चौं ० —प्रभु पद पंकज नावहिं सीसा । गर्जहिं भालु महाबल कीसा ।।
देखी राम सकल कपि सेना । चितइ कृपा करि राजिव नैना ।।
राम कृपा बल पाइ कपिंदा । भए पच्छजुत मनहुँ गिरिंदा ।।
हरषि राम तब कीन्ह पयाना । सगुन भए सुंदर सुभ नाना ।।
जासु सकल मंगलमय कीती । तासु पयान सगुन यह नीती ।।
प्रभु पयान जाना बैदेहीं । फरकि बाम अँग जनु कहि देहीं ।।
जोइ जोइ सगुन जानकिहि होई । असगुन भयउ रावनहि सोई ।।
चला कटकु को बरनै पारा । गर्जहिं बानर भालु अपारा ।।
नख आयुध गिरि पादपधारी । चले गगन महि इच्छाचारी ।।
केहरिनाद भालु कपि करहीं । डगमगाहिं दिग्गज चिक्करहीं ।।

छंद ० —चिक्करहिं दिग्गज डोल महि गिरि लोल सागर खरभरे ।

श्रीरामचंद्राच्या कृपेस ते सर्वच वानर व अस्वल पात्र झाल्याने त्यांच्या अंगात विलक्षण सामर्थ्याचे वारे संचारू लागले. ३४

प्रत्येकाने येताच प्रभुपदी आपले; शिर नमवले; आशीर्वाद घेतला व बळाचा संचार होऊ लागताच मोठ्यामोठ्या गर्जना करण्यास सुरुवात केली !

लवकरच सर्वत्र सेनासागर पसरला. श्रीरामचंद्रांनी त्या अफाट सैन्याचे शांतपणे निरीक्षण केले आणि त्या सर्व सैन्यात बळाचा उदय होण्यासाठी आपल्या कमलनेत्रांनी त्यांच्यावर कृपाकटाक्ष टाकला !

एवढे भाग्य लागताच सर्वांची बलवृद्धी झपाट्याने होऊ लागली. साधे वानर कपींद्र झाले व पंख असलेल्या पर्वतश्रेष्ठासारखे ते दिसू लागले.

सुग्रीवाशी विचारविनिमय करून निघण्यास हरकत नाही, असे समजताच श्रीरामचंद्रांनी सेनेसह हर्षाने प्रयाण केले. उत्तम प्रकारच्या शुभशकुनांनी भक्तिविजयाची आपणहून नांदी केली !

ज्यांची स्वतःची कीर्तीच सर्व मांगल्याचे माहेरघर आहे, त्यांना प्रयाणकाळी शुभशकुन झाले नाहीतर त्या शकुनांचेच कमनशीब म्हणावयाचा प्रसंग येणार ! म्हणून अशी सुसंधी ते शकुन थोडीच दवडणार !

इकडे लंकेत त्याचवेळी अशोकवनात चिंताक्रान्त होउन बसलेल्या वैदेहीची सर्व वामांगे स्फुरण पावून श्रीरामचंद्राचे प्रयाणच जणू ती सुचवू लागली !

तसेच जानकीला जो जो शुभशकुन अशोकवनात झाला, तो तो तिकडे रावणाला बरोबर अशुभ तसाच त्याचवेळी होऊ लागला !

अठरा पद्मे वानरांची ती सेना श्रीरामचंद्रांच्यासह निघाली. तिचे वर्णन करणेच अशक्य ! अगणित वानर व रीस आणि त्यांच्या आवेशयुक्त गगनभेदी आरोळ्या ! त्यांची तीक्ष्ण नखे, हीच शस्त्रे. कोणी हातात मोठेमोठे वृक्ष घेतलेले, तर कोणी विशाल पर्वतच चेंडूप्रमाणे झेलत निघाले. मनात येताच त्यांनी आकाशात उड्डाण करावे व इच्छा होईल तर जमिनीवरून चालावे ! या अफाट सैन्याच्या भाराने व त्यांच्या वारंवार होणाऱ्या सिंहनादाने सर्वत्र हलकल्लोळ उडवून दिला.

दिग्गजांना हिसके बसू लागल्याने स्वतःची जागा सांभाळणे कठीण झाले व ते चीत्कार करू लागले ! पृथ्वी थरथर कापू लागली ! त्यामुळे तिच्या पाठीवरील पर्वत डोलू लागले; ताणि सागर खवळले.

मन हरष सब गंधर्ब सुर मुनि नाग किंनर दुख टरे ॥
कटकटहिं मर्कट बिकट भट बहु कोटि कोटिन्ह धावहीं ।
जय राम प्रबल प्रताप कोसलनाथ गुन गन गावहीं ॥ १ ॥
सहि सक न भार उदार अहिपति बार बारहिं मोहई ।
गह दसन पुनि पुनि कमठ पृष्ठ कठोर सो किमि सोहई ॥
रघुबीर रुचिर प्रयान प्रस्थिति जानि परम सुहावनी ।
जनु कमठ खर्पर सर्पराज सो लिखत अबिचल पावनी ॥ २ ॥

दो० – एहि बिधि जाइ कृपानिधि उतरे सागर तीर ।
जहँ तहँ लागे खान फल भालु बिपुल कपि बीर ॥ ३५ ॥

चौ०–उहाँ निसाचर रहहिं ससंका । जब तें जारि गयउ कपि लंका ॥
निज निज गृहँ सब करहिं बिचारा । नहिं निसिचर कुल केर उबारा ॥

[illegible] अत्यंत आनंद झाला; [illegible] अशे त्याना वाटले.

कट् कट् असा [illegible] अशा [illegible] धावू लागले. [illegible] "जय राम प्रबल प्रताप !" "जय कोसलनाथ !" असा [illegible] चालूलेच होते. १

या [illegible] होऊ लागला. सैनिकांनी [illegible] वारंवार [illegible].

[illegible] कधीही न [illegible] आहे, असा [illegible] !२

[illegible] मागे. [illegible] पोचले, आणि सर्व सैन्याचा [illegible].

प्रभूचा [illegible] नव्हता. [illegible] मनसोक्त फळ खाल्ली ! ३५.

लंकेची होळी करून हनुमंत [illegible] तथापि जाहीर तोंड उघडण्याची [illegible] चुलीजवळ बसून त्यांची [illegible] चर्चा चाले.

" आता या [illegible] काही [illegible] नाही. [illegible] त्यांचा दूत आला तर त्याने किती

जासु दूत बल बरनि न जाई । तेहि आएँ पुर कवन भलाई ।।
दूतिन्ह सन सुनि पुरजन बानी । मंदोदरी अधिक अकुलानी ।।
रहसि जोरि कर पति पग लागी । बोली बचन नीति रस पागी ।।
कंत करष हरि सन परिहरहू । मोर कहा अति हित हियँ धरहू ।।
समुझत जासु दूत कइ करनी । स्त्रवहिं गर्भ रजनीचर धरनी ।।
तासु नारि निज सचिव बोलाई । पठवहु कंत जो चहहु भलाई ।।
तव कुल कमल बिपिन दुखदाई । सीता सीत निसा सम आई ।।
सुनहु नाथ सीता बिनु दीन्हें । हित न तुम्हार संभु अज कीन्हें ।।

दो० – राम बान अहि गन सरिस निकर निसाचर भेक ।
जब लगि ग्रसत न तब लगि जतनु करहु तजि टेक ।। ३६ ।।

चौ० – श्रवन सुनी सठ करि बानी । बिहसा जगत बिदित अभिमानी ।।
समय सुभाउ नारि कर साचा । मंगल महुँ भय मन अति काचा ।।
जौं आवइ मर्कट कटकाई जिअहिं बिचारे निसिचर खाई ।।

राक्षस गारद केले; आणि सगळी लंका पेटविली. असा ज्यांच्या दूताचा पराक्रम, ते स्वतःच या रावणावर चालून आल्यावर आपलं काय भलं होणार ते दिसतच आहे. ''

याप्रमाणे घरोघर चाललेली चर्चा एके दिवशी दासीच्या (दूती) तोंडून पट्टराणी मंदोदरीच्या कानी पडताच ती अतिशयच बेचैन झाली.

कार्येषुमंत्री ही भूमिका मंदोदरीची पक्की असल्यामुळे भावी संकटाची बरोबर कल्पना एकान्तात आपल्या पतिराजाला देण्यासाठी तिने हात जोडले, दशाननाच्या पायावर आपले मस्तक ठेवले आणि कळवळून ती बोलू लागली—

'' प्राणनाथ ! प्रत्यक्ष प्रभूशी सुरू केलेले वैर सोडून द्या. तुमचे जास्तीत जास्त कल्याण ज्याच्या योगाने साधेल अशीच विनवणी मी करणार असल्याने माझे म्हणणे शांतपणाने ऐकून घ्या व तसे करा.

'' अहो, त्यांच्या दूताने येथे येऊन काय हाहाःकार उडवला, त्याची नुसती आठवण झाली तरी या क्षणाला निशाचरांच्या गृहिणींचे गर्भपात होत आहेत !

'' म्हणून हे प्रिया ! आपले कल्याण व्हावे असे आपणाला वाटते ना ? मग आपल्या सचिवाला बोलवा आणि त्याच्याबरोबर त्याची स्त्री तात्र्डतोब त्यांच्याकडे परत पाठवा. तुमच्या कुलरूपी कमलवनाला कडाक्याच्या थंडीप्रमाणे दुःख देणारी ही सीता आहे, हे माझे सांगणे पक्के लक्षात ठेवा.

'' नाथ ! पुनः पुन्हा प्रार्थना करून सांगते ऐका. सीता अर्पण केल्याशिवाय तुमचे उपास्य दैवत शंकर व ब्रह्मदेवसुद्धा तुमचे हित करू शकणार नाहीत !

'' रामाचे बाण हे सर्पांच्या समुदायासारखे असून, निशाचरांचे समूह बेडकांच्याप्रमाणे त्यांच्या मुखी पडणार ! म्हणून जो पर्यंत त्यांनी ग्रासले नाही त्या पूर्वीच हट्ट सोडून त्यांच्या निवारणासाठी यत्न करा. '' ३६

मंदोदरीने एवढी जीव तोडून प्रार्थना केली. परंतु जगविख्यात घमेंडखोर असा तो दुर्जन तिचे भाषण संपताच खो खो करून मोठ्याने हासला; आणि म्हणतो काय, ' बायका म्हटल्या की त्या भित्र्या असायच्याच ! एवढ्या मांगल्याच्या सोहाळ्यात तुझा हा भेदरटपणा ! मनच अगदी कोवळे दुसरे काय ? अग ! समजा आले मोठे माकडांचे सैन्य; काय होईल ? आपले बिचारे राक्षस त्यांना भराभर गट्ट करून चार दिवस सुखाने मजातरी मारतील !

कंपहिं लोकप जाकी त्रासा। तासु नारि सभीत बड़ि हासा॥
अस कहि बिहसि ताहि उर लाई। चलेउ सभाँ ममता अधिकाई॥
मंदोदरी हृदयँ कर चिंता। भयउ कंत पर बिधि बिपरीता॥
बैठेउ सभाँ खबरि असि पाई। सिंधु पार सेना सब आई॥
बूझेसि सचिव उचित मत कहहू। ते सब हँसे मष्ट करि रहहू॥
जितेहु सुरासुर तब श्रम नाहीं। नर बानर केहि लेखे माहीं॥

दो०—सचिव बैद गुर तीनि जौं प्रिय बोलहिं भय आस।
राज धर्म तन तीनि कर होइ बेगिहीं नास॥ ३७॥

चौ०—सोइ रावन कहुँ बनी सहाई। अस्तुति करहिं सुनाइ सुनाई॥
अवसर जानि बिभीषनु आवा। भ्राता चरन सीसु तेहिं नावा॥
पुनि सिरु नाइ बैठ निज आसन। बोला बचन पाइ अनुसासन॥
जौ कृपाल पूँछिहु मोहि बाता। मति अनुरूप कहउँ हित ताता॥
जो आपन चाहै कल्याना। सुजसु सुमति सुभ गति सुख नाना॥

" त्याचा [illegible] आहे की, [illegible] ! आणि [illegible] घाबरून गेली आहे. ही केवढी हास्यास्पद गोष्ट ! "

असे बोलून तो पुन: [illegible] अधिक [illegible] आलिंगन देऊन व [illegible] विशेष उत्साहाने दरबाराकडे निघाला.

ह्या सगळ्याच विपरीत प्रकार पाहून मंदोदरीच्या मनात चिंता आणि [illegible] आता असे वाटू लागले की, आपल्या प्रिय पतीवर दैवच उलटले. [illegible]

[illegible] दशानन महाराज दरबारात जाऊन सिंहासनावर आरूढ होताच दूतांनी बातमी दिली की, [illegible] सैन्यासह [illegible] आहे. "

" सचिवांनो ! [illegible] " रावण म्हणाला.

सचिव [illegible] हसत म्हणाले. " महाराज ! [illegible] देवांना आणि दानवांना जिंकत असता [illegible] नाही. [illegible] काय ! "

[illegible] करून असत्य पण प्रिय बोलतील तर राज्य, देह आणि धर्म [illegible]. ३७

[illegible] कानात [illegible].

तथापि [illegible] असल्याची बातमी [illegible] आहे, याची जाणीव त्याला [illegible].

ज्येष्ठ बंधूच्या पायावर मस्तक ठेवून त्याने नमस्कार केला. पुन: [illegible] करून आपल्या आसनावर जाऊन बसला आणि आज्ञा मिळाल्यानंतर बोलू लागला.

" हे कृपाळू ताता ! [illegible] मी आपला अनुज व मंत्री असल्याने आपणाला हितकारक असे [illegible] मी आपणास सांगतो.

" स्वामी ! [illegible] आपले कल्याण [illegible] परलोकी [illegible] अशी

सो परनारि लिलार गोसाईं । तजउ चउथि के चंद कि नाईं ॥
चौदह भुवन एक पति होई । भूतद्रोह तिष्टइ नहिं सोई ॥
गुन सागर नागर नर जोऊ । अलप लोभ भल कहइ न कोऊ ॥

दो०—काम क्रोध मद लोभ सब नाथ नरक के पंथ ।
सब परिहरि रघुबीरहि भजहु भजहिं जेहि संत ॥ ३८ ॥

चौ०—तात राम नहिं नर भूपाला । भुवनेस्वर कालहु कर काला ॥
ब्रह्म अनामय अज भगवंता । ब्यापक अजित अनादि अनंता ॥
गो द्विज धेनु देव हितकारी । कृपा सिंधु मानुष तनुधारी ॥
जन रंजन भंजन खल ब्राता । बेद धर्म रच्छक सुनु भ्राता ॥
ताहि बयरु तजि नाइअ माथा । प्रनतारति भंजन रघुनाथा ॥
देहु नाथ प्रभु कहुँ बैदेही । भजहु राम बिनु हेतु सनेही ॥
सरन गएँ प्रभु ताहु न त्यागा । बिस्व द्रोह कृत अघ जेहि लागा ॥
जासु नाम त्रय ताप नसावन । सोइ प्रभु प्रगट समुझु जियँ रावन ॥

अंतःकरणपूर्वक तळमळ असेल तर त्याने गणेशचतुर्थीच्या चंद्राप्रमाणेच परस्त्रीचा मुखचंद्र त्याज्य समजणे जरूर आहे. चुकूनही त्यांच्याकडे त्याने पाप दृष्टीने पाहू नये !

" भूतांचा द्रोह करणारा चौदा भुवनांचा (७ स्वर्ग+७ पाताल) धनी जरी असला, तरीही त्याचा नाश झाल्याशिवाय राहत नाही; आणि परस्त्रीच्या जीवाची तडफड याच्याइतका कमालीचा परद्रोह नाही !

" तसेच सद्गुणांचा आणि चातुर्याचा जरी पुतळा असला तरी तिळमात्र लोभाने जर का एकदा डागळला की, त्याचा भलेपणा संपला म्हणून समजावे ! परस्त्रीचे हरण हे लोभाचे लक्षण नव्हे काय ?

" नाथ ! तात्पर्य एकच. काम, क्रोध, मद, लोभ इत्यादी सर्व विकार हे नरकाचे मार्गच असल्याने, या सर्वांचा मनःपूर्वक त्याग करून, ज्याला संत-सज्जन शरण जातात, अशा रघुवीराच्याच भजनी लागा." ३८

" हे तात ! आपल्या शत्रूला शरण जा, असे मी सांगितल्यामुळे आपण संतप्त होण्याचाही संभव आहे, म्हणून अधिक स्पष्ट करून सांगतो, तेही समजून घ्या. राम हे केवळ एक मानवी राजेच नाहीत; ते भुवनेश्वर असून काळाचाही काळ आहेत. म्हणजेच ते माया-दोषरहित, जन्मरहित, षड्गुणैश्वर्यसंपन्न, सर्वव्यापक, कोणाकडून केव्हाच जिंकले न गेलेले, ज्यांना जन्म नाही व म्हणून अंतही नाही असे ते पूर्ण ब्रह्म आहेत.

" असे असता, त्यांनी हे मनुष्याचे रूप का घेतले, तेही ध्यानात घेण्यासारखे आहे. ते कृपेचे सागर आहेत, म्हणून देव, पृथ्वी, ब्राह्मण व गाय यांच्या कल्याणाचा साहजिकच त्यांना कळवळा आला. त्यासाठी त्यांना हे मनुजरूप धारण करावे लागले. अशी ही त्यांच्या अवताराची भूमिका असल्याने बंधो ! भक्तांचे मनोरंजन, व खलांचे निर्दालन करून वेदधर्माचे रक्षण करण्यासाठी हे दोघे बंधू अवतरलेले आहेत.

" जो शरण आला त्याची दुःखे नाहीशी करून टाकणे हेच त्याचे ब्रीद असल्याने त्या रघुनाथाला वैरी न समजता त्याच्या चरणी नमन करा.

" हे नाथ ! राम निरपेक्ष प्रेम करणारे आहेत; म्हणून प्रभूंना वैदेही परत द्या व त्यांची भक्ती करा. तुम्हाला स्वतःच्या कृतकर्माबद्दल शंका बाळगण्याची जरूरी नाही; कारण एखाद्याने सर्व जगाचा द्रोह करण्याचे जरी पातक केले आणि तोसुद्धा जर मनोभावे शरण गेला तर प्रभू त्याचाही अव्हेर करीत नाहीत, इतके ते दयासागर आहेत."

" फार काय सांगावे, ज्याच्या नुसत्या नामाचा उच्चार करीत राहिल्याने त्रिविध तापांचा नाश होतो, म्हणजे जीव मुक्त होतो, ते प्रभूच प्रत्यक्ष प्रकट होऊन अगदी जवळ आले आहेत. हे, अरे रावणा मनात नीट समजून घे." (पुलस्ती ऋषींचे वचन जसेच्या तसे सांगितले म्हणून 'अरे' —गू. चं.)

दो०—बार बार पद लागउँ बिनय करउँ दससीस।
परिहरि मान मोह मद भजहु कोसलाधीस॥ ३९ (क)॥
मुनि पुलस्ति निज सिष्य सन कहि पठई यह बात।
तुरत सो मैं प्रभु सन कही पाइ सुअवसरु तात॥ ३९ (ख)॥

चौ०—माल्यवंत अति सचिव सयाना। तासु बचन सुनि अति सुख माना॥
तात अनुज तव नीति बिभूषन। सो उर धरहु जो कहत बिभीषन॥
रिपु उतकरष कहत सठ दोऊ। दूरि न करहु इहाँ हइ कोऊ॥
माल्यवंत गृह गयउ बहोरी। कहइ बिभीषनु पुनि कर जोरी॥
सुमति कुमति सब कें उर रहहीं। नाथ पुरान निगम अस कहहीं॥
जहाँ सुमति तहँ संपति नाना। जहाँ कुमति तहँ बिपति निदाना॥
तव उर कुमति बसी बिपरीता। हित अनहित मानहु रिपु प्रीता॥

बिभीषण पुनः कळकळून प्रार्थना करतो. "हे दशशीर्ष ! मी तुमच्या [illegible] नमन करून विनंती करतो की, आपण निशाचराधिप. [illegible]. सर्वेश्वर अजिंक्य इत्यादी मान, मोह, मद [illegible] वरील आपल्या वडिलांचा संदेश श्रवण करून तरी मोह आणि [illegible] जा. ३९ (क)

"पुलस्ती मुनींनी आपल्या शिष्याच्या तोंडी ही फार महत्त्वाची गोष्ट [illegible] कळविली. [illegible] [illegible]. हे तात ! मी जलद येऊन स्वामीच्या चरणी निवेदन केली." ३९ (ख)

"यात माझ्या पदरचे असे एक अक्षरही नाही."

रावणाच्या आजोबाचे (आईचा बाप) नाव माल्यवंत असे होते. तो फार [illegible] त्यालाही रावणाने आपल्या मंत्रिमंडळात सन्मानाचे मोठे स्थान दिले होते. बिभीषणाचे [illegible] त्याला फारच संतोष वाटला. '[illegible] सर्वी [illegible]' [illegible] याच वेळी [illegible] असे त्याने ठरवले. आपला नातू राक्षस राजा [illegible] तो [illegible] आहे. [illegible] आजोबा नसून, शिवाय जबाबदार मंत्री आहेत. [illegible] सचिवांना [illegible] विचारलेच आहे. [illegible] विचार करून तो म्हणाला.

"तात ! तुमचा धाकटा भाऊ बिभीषण [illegible] आहे. [illegible] सांगेल ते [illegible] घेऊन त्याप्रमाणे वागा."

[illegible] रावणाच्या [illegible] [illegible]. "[illegible] माझ्या [illegible] आहेत [illegible]."

[illegible] दरबार सोडून [illegible] ! [illegible] तो आपल्या [illegible] आग्रहाच्या [illegible] तो म्हणाला.

"नाथ ! [illegible] आणि [illegible] अशी [illegible] प्रकारची [illegible] अंतःकरणात असते, म्हणून वेद आणि पुराणे असे [illegible] की, [illegible] सुबुद्धि [illegible] दुष्टबुद्धी काम करते, तेथे [illegible] नानाप्रकारची संकटे [illegible] असते.

"महाराज ! या वेळी आपल्या हृदयावर कुमतीने [illegible] आहे; त्याचाच परिणाम म्हणून विनाश [illegible] आहात आणि तुमच्या [illegible] मित्र समजून तुमची [illegible] आहे. [illegible] ना ! सर्व [illegible] काळरात्रच म्हणून अवतरलेल्या सीतेवर तुम्ही अत्यंत प्रेम करत आहात !"

कालराति निसिचर कुल केरी । तेहि सीता पर प्रीति घनेरी ।।

दो० – तात चहन गहि मागउँ राखहु मोर दुलार ।
सीता देहु राम कहुँ अहित न होइ तुम्हार ।। ४० ।।

चौ० – बुध पुरान श्रुति संमत बानी । कही बिभीषन नीति बखानी ।।
सुनत दसानन उठा रिसाई । खल तोहि निकट मृत्यु अब आई ।।
जिअसि सदा सठ मोर जिआवा । रिपु कर पच्छ मूढ़ तोहि भावा ।।
कहसि न खल अस को जग माहीं । भुज बल जाहि जिता मैं नाहीं ।।
मम पुर बसि तपसिन्ह पर प्रीती । सठ मिलु जाइ तिन्हहि कहु नीती ।।
अस कहि कीन्हेसि चरन प्रहारा। अनुज गहे पद बारहिं बारा ।।
उमा संत कइ इहइ बड़ाई । मंद करत जो करइ भलाई ।।
तुम्ह पितु सरिस भलेहिं मोहि मारा। रामु भजें हित नाथ तुम्हारा ।।
सचिव संग लै नभ पथ गयऊ । सबहि सुनाइ कहत अस भयऊ ।।

सात्त्विक व शुद्ध अंतःकरणाच्या बिभीषणाचे बंधुप्रेम अनावर होऊन त्याचा कंठ भरून आला; त्याने रावणाचे पायावर पुनः आपले मस्तक ठेवले; व तळमळून तो विनवू लागला, " हे तात ! मी तुमचे पाय धरून एक मागणे मागतो, माझ्यावरील आपल्या प्रेमाखातर एवढे करा. सीता तेवढी रामाला देऊन टाका. मी अगदी अंतःकरणपूर्वक सांगतो की, त्यामुळे आपले अहित मुळीच होणार नाही. " ४०

वेद, पुराणे, संत व नीतिशास्त्र यांना संमत असणारेच भाषण बिभीषणाने अत्यंत कळवळून केले. परंतु सर्व पाणी पालथ्या घागरीवर ! इतकेच नव्हे, त्याचा परिणाम अगदी उलटा ! !

बिभीषण दीन मुखाने रावणाकडे पाहत असता तो संतापाने लाल होऊन खाडकन् सिंहासनावरून उठला आणि ओरडला " अरे खला ! आता तुझी मरणाची वेळ जवळच आली हे खास. मूर्खा ! आजपर्यंत मी वाचवला म्हणूनच जिवंत राहिलास हे विसरलास होय ? आणि मूढा, आता तुला माझ्या शत्रूचा पक्ष गोड वाटू लागला, आँ !

" अरे पृथ्वीच्या पाठीवर असा कोण बलवान् आहे की ज्याच्या सामर्थ्याची रग मी आपल्या बाहूंच्या शक्तीवर जिरवली नाही ? अरे खला ! बोल ना; आता का तोंड उघडत नाहीस ? माझ्या नगरीत राहून प्रेम मात्र त्या तापसावर करतोस काय ? शठा ! हो चालता. तूच त्याच्या चरणी लाग आणि शिकव त्यांना तुझी अक्कल ! "

हे बोलत असता रावण क्रोधाने बेभान झाला व बिभीषणाला त्याने भर दरबारात फडाफड लाथा मारल्या ! पण संत बिभीषणाने आपल्या ज्येष्ठ बंधूच्या लाथेला वंदनच केले. हे ऐकताच पार्वतीचे हृदय उचंबळून आलेले सदाशिवांनी पाहिले व ते म्हणाले, " उमे ! अग, संताचा मोठेपणा हाच की ते अपकार करणाराचेही हित करण्यासाठीच झटतात. "

बिभीषण शेवटी बोलू लागला—

" हे नाथ ! आपण माझे ज्येष्ठ बंधू , माझ्या वडिलांच्याच जागी. मला लाथा मारल्या हे चांगलेच केले. यात वाईट असे काय आहे ? पण लत्ताप्रहार खाऊनही पुनः माझी एकच प्रार्थना, रामाच्या भजनानेच तुमचे कल्याण होईल ! "

एवढी अखेरची गोष्ट दशाननाला बजावून बिभीषणाने आपल्या मंत्रिमंडळाला खूण केली आणि त्यांच्या-सह त्याने आकाशात उंच उड्डाण केले. रावणासह सर्व नागरिकांना आपली भूमिका जाहीररीत्या स्पष्ट करून सांगण्यासाठी त्याने खडया सुरात बजावले.

दो० — राम सत्यसंकल्प प्रभु सभा कालबस तोरि ।
मैं रघुबीर सरन अब जाउँ देहु जनि खोरि ॥ ४१ ॥

चौ० — अस कहि चला बिभीषनु जबहीं । आयूहीन भए सब तबहीं ॥
साधु अवग्या तुरत भवानी । कर कल्यान अखिल कै हानी ॥
रावन जबहिं बिभीषन त्यागा । भयउ बिभव बिनु तबहिं अभागा ॥
चलेउ हरषि रघुनायक पाहीं । करत मनोरथ बहु मन माहीं ॥
देखिहउँ जाइ चरन जलजाता । अरुन मृदुल सेवक सुखदाता ॥
जे पद परसि तरी रिषिनारी । दंडक कानन पावनकारी ॥
जे पद जनकसुताँ उर लाए । कपट कुरंग संग धर धाए ॥
हर उर सर सरोज पद जेई । अहोभाग्य मैं देखिहउँ तेई ॥

दो० — जिन्ह पायन्ह के पादुकन्हि भरतु रहे मन लाइ ।
ते पद आजु बिलोकिहउँ इन्ह नयनन्हि अब जाइ ॥ ४२ ॥

चौ० — एहि बिधि करत सप्रेम बिचारा । आयउ सपदि सिंधु एहिं पारा ॥
कपिन्ह बिभीषनु आवत देखा । जाना कोउ रिपु दूत बिसेषा ॥
ताहि राखि कपीस पहिं आए । समाचार सब ताहि सुनाए ॥

"हे निशाचरांनो ! तू आणि तुझे हे सर्व सभासद [illegible] आहात. श्रीरामचंद्र हे सत्य-संकल्प प्रभू असल्याने आता श्रीरघुवीराला मी शरण जात आहे. आता मला कोणी दोष देऊ नका. ४१

बिभीषणमहाराजांच्या [illegible] लंकेचा त्याग केला, [illegible] झाले. हे जाणून शंकर पार्वतीला सांगतात की, भवानी ! साधूचा अपमान केला तर सर्व प्रकारच्या [illegible] गोष्टींचा नाश होतो. जेव्हा रावणाने बिभीषणाचा त्याग केला, तेव्हाच त्याचे वैभव नाहीसे होऊन तो अभागी बनला. [illegible] जाहीर घोषणा करून [illegible] बिभीषणाने श्रीरामचंद्राकडे प्रयाण केले, तेव्हाच त्या सर्व सभासदांचे आयुष्य संपुष्टात आले !

इकडे मोठ्या हर्षाने बिभीषण रघुनाथाकडे निघाला. [illegible] मनात मनोरथांच्या इमल्या-वर इमले उठवू [illegible] कोमल व सेवकांना सुखदायक असे [illegible] ज्या चरणांच्या [illegible] अहिल्येचा उद्धार केला व ज्यांनी दंडकारण्याला पावन केले, [illegible] ज्या चर-णांना जनकसुतेने आपल्या हृदय [illegible] स्थापन केले आहे, शंकराच्या [illegible] जे चरण कमळा-सारखे शोभतात, ज्या रामाच्या पादुकांचे [illegible] आपल्या मनात [illegible] स्थापन केले आहे, ते पाद - ते चरणकमळ मी माझ्या भाग्याने [illegible] आज - आता [illegible] ! या माझ्या [illegible] डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहणार ! केवढे मोठे माझे भाग्य - धन्य मी होय [illegible] ! ४२

विचारांच्या या तंद्रीत [illegible] व [illegible] घेऊन [illegible]. यांचीही दाद बिभीषणाला लागली नाही.

आकाशमार्गाने तो येत असता कपींनी [illegible] त्याच्यावर नजर ठेवली होती. हा कोणी तरी रावणाचा विशेष प्रकारचा दूत येत असल्याचे त्यांनी [illegible] सर्व [illegible] वाटले.

बिभीषण [illegible] उतरताच [illegible] ठेवून कपी सर्व सुग्रीवाकडे आले व त्याला सर्व वृत्त कळवले.



कह सुग्रीव सुनहु रघुराई। आवा मिलन दसानन भाई ॥
कह प्रभु सखा बूझिऐ काहा। कहइ कपीस सुनहु नरनाहा ॥
जानि न जाइ निसाचर माया। कामरूप केहि कारन आया ॥
भेद हमार लेन सठ आवा। राखिअ बाँधि मोहि अस भावा ॥
सखा नीति तुम्ह नीकि बिचारी। मम पन सरनागत भयहारी ॥
सुनि प्रभु बचन हरष हनुमाना। सरनागत बच्छल भगवाना ॥

दो० – सरनागत कहुँ जे तजहिं निज अनहित अनुमानि।
ते नर पावँर पापमय तिन्हहि बिलोकत हानि ॥ ४३ ॥

चौ० – कोटि बिप्र बध लागहिं जाहू। आएँ सरन तजउँ नहिं ताहू ॥
सनमुख होइ जीव मोहि जबहीं। जन्म कोटि अघ नासहिं तबहीं ॥
पापवंत कर सहज सुभाऊ। भजनु मोर तेहि भाव न काऊ ॥
जौं पै दुष्टहृदय सोइ होई। मोरें सनमुख आव कि सोई ॥
निर्मल मन जन सो मोहि पावा। मोहि कपट छल छिद्र न भावा ॥

ते सर्व समजून घेतल्यावर सुग्रीव रघुनाथांच्या जवळ गेला आणि म्हणाला, 'रघुराजा ! ताजी बातमी ऐका. दशकंठाचा भाऊ आपणास भेटण्यास आला आहे."

"सखे, कपीश्वर ! मग तुमचे मत काय आहे?" प्रभूंनी विचारले.

त्यावर सुग्रीवाने दूरदर्शीपणाने उत्तर दिले, 'हे पाहा, नरराजा ! निशाचरांची माया मोठी गूढ; लवकर पत्ता लागायचा नाही. मायेने त्यांना कोणतेही रूप घेता येते. मग हे रूप घेऊन कोण आणि कशासाठी आला आहे, हे कसे एकदम कळणार? ही वेळ आहे युद्धाची; तेव्हा आमच्यातील काही भेद या युक्तीने समजून घेण्याकरताच तो शठ आलेला असला पाहिजे. म्हणून माझ्यामते त्याला बांधून ठेवावा."

सुग्रीवाचे हे राजनीतिवर भाषण रघुवीरांनी ऐकले व म्हणतात, "मित्रा ! तुम्ही जे नीतीचे मत सांगितले ते उत्तम आहे; परंतु शरणागताचे भय हरण करणे हे माझे ब्रीद आहे."

सीतेचा शोध करण्याच्या कामी ज्या विभीषणाचे अमोल सहाय्य झाले, तो स्वतःच्या इच्छेने प्रभूस शरण आला असता त्याला बांधून ठेवावा, असा निर्णय कपीश्वरानी दिलेला ऐकून हनुमन्ताच्या तोंडचे पाणीच पळाले ! परंतु प्रभुमुखातून बाहेर पडलेले, शरणागत-भयहारीचे ब्रीद कानी पडल्यावर त्याला केवढा हर्ष झाला ! तो मनात म्हणाला, 'भगवंता ! तुम्ही खरेच शरणागतवत्सल आहात याची ही ताजी साक्षच पटली !'

प्रभू पुढे बोलू लागले, "आपले अकल्याण होईल असे समजून, शरण आलेल्याचा जे तिरस्कार करतात, ते लोक नीच, पापाची खाणच आहेत, अशी खात्री बाळगावी; त्याचे नुसते तोंड पाहण्यानेही आपली हानी होते !" ४३

"इतकेच नव्हे, सख्या सुग्रीवा ! कोटिब्रह्महत्येचे पाप करूनसुद्धा जर मला कोणी शरण आला तर त्याचासुद्धा मी त्याग करत नाही. असे का ते रहस्य सांगतो. ऐक, जेव्हा जीव माझ्यासमोर येतो, त्याचक्षणी केवळ माझ्या दर्शनाने त्याची कोटी जन्मांची पापे नष्ट होतात ! आणि दुसरे असे की, अस्सल पापी स्वभावतःच माझ्याकडे पाठ फिरवतो, त्याला माझे भजन स्वप्नातही आवडत नाही. या दृष्टीने पाहिले तर तुझ्या ध्यानी येईल की, हा शत्रुबंधू जर खराच दुष्टहृदयी असता तर तो माझ्यासमोर चुकूनही आला नसता ! अर्थात् जो मनाचा निर्मळ असेल त्यालाच माझ्या दर्शनाची आवड उत्पन्न होते ! याचे कारण कपटी, ढोंगी, परदोषावरच सदा नजर ठेवणारे असे लोक मला मुळीच आवडत नाहीत.

भेद लेन पठवा दससीसा । तबहुँ न कछु भय हानि कपीसा ॥
जग महुँ सखा निसाचर जेते । लछिमनु हनइ निमिष महुँ तेते ॥
जौं सभीत आवा सरनाईं । रखिहउँ ताहि प्रान की नाईं ॥

दो० — उभय भाँति तेहि आनहु हँसि कह [illegible] ।
जय कृपाल कहि कपि चले अंगद हनू समेत ॥ ४४ ॥

चौ० — सादर तेहि आगें करि बानर । चले जहाँ रघुपति करुनाकर ॥
दूरिहि ते देखे द्वौ भ्राता । नयनानंद दान के दाता ॥
बहुरि राम छबिधाम बिलोकी । रहेउ ठटुकि एकटक पल रोकी ॥
भुज प्रलंब कंजारुन लोचन । स्यामल गात प्रनत भय मोचन ॥
सिंघ कंध आयत उर सोहा । आनन अमित मदन मन मोहा ॥
नयन नीर पुलकित अति गाता । मन धरि धीर कही मृदु बाता ॥

"ही झाली आमची नीति. [illegible] "भेद" [illegible] बाजूचा शोध [illegible] आहे. [illegible] सुग्रीव, नुकसान नाही किंवा आपल्याला कुठलाही [illegible] नको !

"याचे कारण मित्र ! [illegible] म्हणून [illegible] आहेत. [illegible] !

"[illegible] प्राणाप्रमाणे मी रक्षण करीन. सुग्रीव [illegible] !"

'[illegible] असो [illegible] ऐकून [illegible] प्रभु [illegible] त्या मनोहर हास्याने त्यांनी [illegible] केली !

"जय कृपाळू ! जय कृपाळू" [illegible] अंगद व हनुमान [illegible] बिभीषणास आणण्यास निघाले. ४४

[illegible] लवकरच [illegible] आहे.

आदराने त्याला पुढे [illegible] त्याच्या हृदयात [illegible] !

करुणासागर रघुवीर [illegible] लागले.

लवकरच. [illegible]

सौंदर्यमूर्ती [illegible] बरोबर एकदम [illegible] [illegible] गेली.

बिभीषण [illegible]

ते विशाल आजानुबाहु. [illegible] सावळे शरीर ! सिंहासारखे [illegible] विराजमान होणारे अनंत मदनांना मोहिनी [illegible] !!

या त्रैलोक्य[illegible] अशा [illegible] उभे राहिले; डोळ्यातून आनंदाश्रु [illegible] प्रयत्न करू लागला.

नाथ दसानन कर मैं भ्राता । निसिचर बंस जनम सुरत्राता ।।
सहज पापप्रिय तामस देहा । जथा उलूकहि तम पर नेहा ।।

दो ० —श्रवन सुजसु सुनि आयउँ प्रभु भंजन भव भीर ।
त्राहि त्राहि आरति हरन सरन सुखद रघुबीर ।। ४५ ।।

चौ ० —अस कपि करत दंडवत देखा । तुरत उठे प्रभु हरष बिसेषा ।।
दीन बचन सुनि प्रभु मन भावा ।भुज बिसाल गहि हृदयँ लगावा ।।
अनुज सहित मिलि ढिग बैठारी । बोले बचन भगत भयहारी ।।
कहु लंकेस सहित परिवारा । कुसल कुठाहर बास तुम्हारा ।।
खल मंडलीं बसहु दिनु राती । सखा धरम निबहइ केहि भाँती ।।
मैं जानउँ तुम्हारि सब रीती । अति नय निपुन न भाव अनीती ।।
बरु भल बास नरक कर ताता । दुष्ट संग जनि देइ बिधाता ।।
अब पद देखि कुसल रघुराया । जौं तुम्ह कीन्हि जानि जन दाया ।।

दो ० —तब लगि कुसल न जीव कहुँ सपनेहुँ मन बिश्राम ।
जब लगि भजत न राम कहुँ सोक धाम तजि काम ।। ४६ ।।

" हे नाथ ! एक सुस्कारा टाकून तो पुढे बोलू लागला. " मी दशमुखाचा भाऊ आहे. हे सुररक्षका ! मी निशाचरांच्या हीन वंशात जन्मलो. त्यामुळे दिवाभिताच्या जसा ओढा स्वभावतःच अंधाराकडे तसेच या तामस देहाला पापांचे नैसर्गिक आकर्षण असते.

" असे असूनही आपण भव भीतिभंजन करणारे आहात, हे आपले सुयश ऐकून हे धीर, प्रभो ! मी आपणाला शरण आलो आहे. शरणागताचे दुःख हरण करून त्याला सुख देणाऱ्या रघुवीरा ! माझे रक्षण करा. मला आपल्या चरणाजवळ घ्या. " ४५

या शेवटच्या वाक्यानंतर बिभीषणाच्या मुखातून शब्दच निघणे बंद झाले व त्याने फक्त दंडवत् प्रणाम करण्याचे ठरवले.

तो दंडवत करू लागणार असे दिसताच प्रभू घाईने व विशेष संतुष्ट होऊन उठले. त्याच्या दीन भाषणाने तो प्रभूच्या मनात चांगलाच भरला होता, त्यामुळे त्याला श्रीरामचंद्रांनी आपल्या विशाल बाहूंनी चटकन् वर उठवला आणि आपल्या हृदयाशी धरला. लक्ष्मणानेही श्रीरामचंद्रांच्या मागून लगेच त्याला आलिंगन दिले. प्रभूंनी त्याला आपल्या जवळ बसवून घेतले आणि भक्तांच्या भीतीचे हरण करणारे रघुवीर त्यास विचारू लागले, " हे लंकेश ! कुत्सित ठिकाणी राहण्याचे तुमच्या नशिबी आले, तेव्हा परिवारासह तुम्ही कुशल आहात ना तेवढे प्रथम सांगा. शिवाय, मित्रा ! तुमच्या भोवती रात्रंदिवस खलांचा गराडा पडलेला असणार, अशा स्थितीत तुमच्या धर्माचरणाचा तेथे निभाव लागतो तरी कसा ? एकंदरीत तुमच्या अंतःकरणाची ठेवण बरोबर माझ्या ध्यानी आली. तुम्ही नीतिनिपुण असून अनीतीची तुम्हाला मनापासून चीड आहे, हे खरे ना ? हे ताता ! नरकात वास करणे एकपरी बरे, पण त्या विधात्याने दुर्जनांची संगत मात्र कोणाला देऊ नये असे वाटते ! ! "

प्रभूच्या या प्रेमळ व आपुलकीच्या भाषणाने बिभीषणाला धीर येऊन एक प्रकारची विशेष प्रीती उत्पन्न झाली. आता त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची यथामती उत्तरे देऊ लागला. " हे रघुराया ! याला आपला दास समजून जेव्हा दया केली व आपल्या पायांचे दर्शन दिले तेव्हाच त्याचे कुशल सुरू झाले ! नाही तरी हे खरेच आहे की, दुःख शोकांचे जणू निवासस्थानच अशा ज्या अनेक कामना, त्यांचा त्याग करून जीव जोपर्यंत रामाच्या भजनी लागत नाही, तोपर्यंत त्याचे कुशल नाही व त्याच्या मनाला स्वप्नातही स्वस्थता मिळणार नाही ! " ४६

चौ०—तब लगि हृदयँ बसत खल नाना। लोभ मोह मच्छर मद माना॥
जब लगि उर न बसत रघुनाथा। धरें चाप सायक कटि भाथा॥
ममता तरुन तमी अँधिआरी। राग द्वेष उलूक सुखकारी॥
तब लगि बसति जीव मन माहीं। जब लगि प्रभु प्रताप रबि नाहीं॥
अब मैं कुसल मिटे भय भारे। देखि राम पद कमल तुम्हारे॥
तुम्ह कृपाल जा पर अनुकूला। ताहि न ब्याप त्रिबिध भव सूला॥
मैं निसिचर अति अधम सुभाऊ। सुभ आचरनु कीन्ह नहिं काऊ॥
जासु रूप मुनि ध्यान न आवा। तेहिं प्रभु हरषि हृदयँ मोहि लावा॥

दो०—अहो भाग्य मम अमित अति राम कृपा सुख पुंज।
देखेउँ नयन बिरंचि सिव सेब्य जुगल पद कंज॥४७॥

चौ०—सुनहु सखा निज कहउँ सुभाऊ। जान भुसुंडि संभु गिरिजाऊ॥
जौं नर होइ चराचर द्रोही। आवै सभय सरन तकि मोही॥
तजि मद मोह कपट छल नाना। करउँ सद्य तेहि साधु समाना॥
जननी जनक बंधु सुत दारा। तनु धनु भवन सुहृद परिवारा॥
सब कै ममता ताग बटोरी। मम पद मनहि बाँध बरि डोरी॥

"जोंपर्यंत [illegible] कमरेला [illegible] पाहिजे की, [illegible] लोभ, मोह, मद, मत्सर, [illegible] कामक्रोध नाहीसे होतात! [illegible] कुठल्या कुठे पळून जाते!

"हे श्रीरामचंद्रा! तुमच्या [illegible] हे कृपाळू! तुम्ही [illegible]!

"प्रभो, रघुनाथा! [illegible] निशाचर, माझा स्वभाव अधम [illegible] मुनींच्या ध्यानातही [illegible]!

"हे रामचंद्रा! [illegible] नाही! [illegible] पाहावयास मिळाले ना." ४७

बिभीषणाच्या [illegible] पणाने प्रभु त्याला म्हणाले, "[illegible] शिव-पार्वती [illegible] आहे. परंतु तो [illegible] मद व अनेक प्रकारचे [illegible] ज्ञानी भक्त [illegible] साधुसम करतो.

"आता या [illegible] बंधू, [illegible] स्वतःचे शरीर, धन [illegible] करतात; [illegible]

समदरसी इच्छा कछु नाहीं। हरष सोक भय नहिं मन माहीं॥
अस सज्जन मम उर बस कैसें। लोभी हृदयँ बसइ धनु जैसें॥
तुम्ह सारिखे संत प्रिय मोरें। धरउँ देह नहिं आन निहोरें॥

दो०—सगुन उपासक परहित निरत नीति दृढ़ नेम।
ते नर प्रान समान मम जिन्ह कें द्विज पद प्रेम॥ ४८॥

चौ०—सुनु लंकेस सकल गुन तोरें। तातें तुम्ह अतिसय प्रिय मोरें॥
राम बचन सुनि बानर जूथा। सकल कहहिं जय कृपा बरूथा॥
सुनत बिभीषनु प्रभु कै बानी। नहिं अघात श्रवनामृत जानी॥
पद अंबुज गहि बारहिं बारा। हृदयँ समात न प्रेमु अपारा॥
सुनहु देव सचराचर स्वामी। प्रनतपाल उर अंतरजामी॥
उर कछु प्रथम बासना रही। प्रभु पद प्रीति सरित सो बही॥
अब कृपाल निज भगति पावनी। देहु सदा सिव मन भावनी॥

टाकतात. त्यामुळे ते समदर्शी बनून त्यांच्या अंतःकरणातील सर्व वासनांचा नाश होतो. अर्थात अशी स्थिती झाल्यावर त्यांच्या मनात हर्ष, शोक, भय इत्यादी विकार उत्पन्नच होत नाहीत.

"विभीषणा! हे खरे सज्जन. आणि यांना मी आपल्या हृदयात कसे सांभाळून ठेवतो सांगू का? लोभी मनुष्य आपल्या अंतःकरणात जसे धन ठेवतो, अगदी तस्से!! मग इतरांनी कितीही प्रार्थना केल्या तरी तिळमात्र न हालणारा मी अशा तुमच्यासारख्या प्रेमळ संतांनी धावा केला की, लगेच मी देह धारण करून अवतार घेतो.

"कारण हे सर्व साधुसंत सगुणाची उपासना करतात, परहित साधण्याच्या कामी आपली सर्व शक्ती एकवटून रंगून जातात. नीतिनियमांचे काटेकोर पालन करणारे, यम नियमांच्या धर्माचरणाचा दृढनेम पाळणारे ब्राह्मणांच्या चरणी शुद्ध प्रेम बाळगणारे, असे ते स्वभावतःच असल्याने ते मला मी प्राणाहून प्रिय असल्यास त्यात नवल ते काय?" ४८

"हे लंकापती, ऐक; आतापर्यंत वर्णन केलेले संताचे सर्व गुण तुझ्या ठिकाणी असल्यामुळे तुम्ही मला साहजिकच अत्यंत प्रिय झाला."

प्रत्यक्ष शत्रूचा भाऊ आला असताही त्याच्यावर एवढी कृपा केल्याचे पाहून सर्व कपिसमुदायातून जय-जयकाराची एकच गगनभेदी गर्जना बाहेर पडली, "जय कृपावरूथ, जय श्रीरघुवीर की जय!"

शरणागतावरील प्रेम व वात्सल्य भावरूपी अमृत— स्वर्गातील अमृताहूनही अधिक सुखकर, स्वादु, मधुर व अवीट असे अलौकिक असल्याने विभीषणाच्या कानांना व मनाला असे वाटले की, याचा असा प्रवाह अखंड वाहत राहावा!

अशा मनःस्थितीत, तो भावनांनी भारलेला विभीषण दुसरे काय करणार! प्रभुचरणकमलांना वारंवार मिठी मारत असता त्याच्या हृदयात अपार उत्पन्न होत असलेली प्रीती मावेना! ती शब्दरूप होऊन त्याच्या मुखावाटे बाहेर पडू लागली.

"हे देव! स्थावरजंगमांचे स्वामी! माझी थोडी याचना पूर्ण करावी. प्रणतांचे पालन करणारे आपण अंतर्यामी रूपाने हृदयात आहाच. सांगतो ऐका. प्रभूंच्या चरणांची प्रीती पूर्वी फारच थोडी होती, त्यामुळे थोडी फार दुसरी इच्छा राहिली होती; पण आता मात्र प्रभु-पद-प्रीतीची सरिताच वाहू लागल्याने तिच्यातून उरल्यासुरल्या सर्व वासना वाहून गेल्या. एक इच्छा मात्र बळकट हृदयाला चिकटून राहिली आहे. हे कृपाळू! शंकरांच्या मनालासुद्धा सदोदित आवडणारी आपली पावन भक्ती तेवढी मला द्यावी; दुसरे मागणे नाही!"

एवमस्तु कहि प्रभु रनधीरा । मागा तुरत सिंधु कर नीरा ॥
जदपि सखा तव इच्छा नाहीं । मोर दरसु अमोघ जग माहीं ॥
अस कहि राम तिलक तेहि सारा । सुमन बृष्टि नभ भई अपारा ॥

दो० — रावन क्रोध अनल निज स्वास समीर प्रचंड ।
जरत बिभीषनु राखेउ दीन्हेउ राजु अखंड ॥ ४९ (क) ॥
जो संपति सिव रावनहि दीन्हि दिएँ दस माथ ।
सोइ संपदा बिभीषनहि सकुचि दीन्हि रघुनाथ ॥ ४९ (ख) ॥

चौ० — अस प्रभु छाड़ि भजहिं जे आना । ते नर पसु बिनु पूँछ बिषाना ॥
निज जन जानि ताहि अपनावा । प्रभु सुभाव कपि कुल मन भावा ॥
पुनि सर्बग्य सर्ब उर बासी । सर्बरूप सब रहित उदासी ॥
बोले बचन नीति प्रतिपालक । कारन मनुज दनुज कुल घालक ॥
सुनु कपीस लंकापति बीरा । केहि बिधि तरिअ जलधि गंभीरा ॥
संकुल मकर उरग झष जाती । अति अगाध दुस्तर सब भाँती ॥
कह लंकेस सुनहु रघुनायक । कोटि सिंधु सोषक तव सायक ॥
जद्यपि तदपि नीति असि गाई । बिनय करिअ सागर सन जाई ॥

[illegible] "एवमस्तु" [illegible] तात्काळ [illegible] तिलक [illegible].

"हे [illegible] [illegible] निष्फळ न ठरणारे असते."

[illegible] असा लंकेश [illegible] पुष्पवृष्टि केली.

काय [illegible] राज्य दिले. ४९ (क)

[illegible] बिभीषणाला [illegible]

[illegible] पुच्छ व शिंगे [illegible] स्वभाव [illegible].

याप्रमाणे [illegible] आहे असे [illegible] शरीर धारण करणारे [illegible].

"हे [illegible] मकर व नानाप्रकारचे [illegible] जाण्यास अत्यंत कठिण आहे. [illegible] ?"

रघुनाथाच्या या प्रश्नाचे [illegible] स्वस्थ [illegible] [illegible]

दो० – प्रभु तुम्हार कुलगुर जलधि कहिहि उपाय बिचारि ।
बिनु प्रयास सागर तरिहि सकल भालु कपि धारि ॥ ५० ॥

चौ० – सखा कही तुम्ह नीकि उपाई । करिअ दैव जौं होइ सहाई ॥
मंत्र न यह लछिमन मन भावा । राम बचन सुनि अति दुख पावा ॥
नाथ दैव कर कवन भरोसा । सोषिअ सिंधु करिअ मन रोसा ॥
कादर मन कहुँ एक अधारा । दैव दैव आलसी पुकारा ॥
सुनत बिहसि बोले रघुबीरा । ऐसेहिं करब धरहु मन धीरा ॥
अस कहि प्रभु अनुजहि समुझाई । सिंधु समीप गए रघुराई ॥
प्रथम प्रनाम कीन्ह सिरु नाई । बैठे पुनि तट दर्भ डसाई ॥
जबहिं बिभीषन प्रभु पहिं आए । पाछें रावन दूत पठाए ॥

दो ०– सकल चरित तिन्ह देखे धरें कपट कपि देह ।
प्रभु गुन हृदयँ सराहहिं सरनागत पर नेह ॥ ५१ ॥

चौ० – प्रगट बखानहिं राम सुभाऊ । अति सप्रेम गा बिसरि दुराऊ ॥
रिपु के दूत कपिन्ह तब जाने । सकल बाँधि कपीस पहिं आने ॥

प्रार्थना करावी हे इष्ट; कारण प्रभो ! सागर तुमचा पूर्वज असल्याने विचार करून काही तरी तोच उपाय सुचवील; आणि अनायासे आपले ॠक्षकपींचे हे सर्व सैन्य पैलतीरास जाईल.” ५०

त्यावर लगेच श्रीरामचंद्रांनी आपली मान्यता दर्शविली. “ मित्रा ! छान उपाय सुचविलात; करून पाहू या. दैव जर अनुकूल असेल तर आपले काम खास फत्ते होईल.”

श्रीरामचंद्र-बिभीषण संवाद ऐकून लक्ष्मण नाराज झाला; आणि दैवाच्या भरंवशाची रघुवीराची भाषा ऐकून तर त्याला फारच दुःख झाले. आपल्या धन्याने स्वतःच अपमान करून घेण्याचे धोरण स्वीकारलेले त्याला असह्य होऊन तो उफाळला, “ नाथ ! दैवाचा कसला भरंवसा ? संतप्त होऊन सर्व सागर एका क्षणात शोषून टाकावा ! भेदरट लोक आपल्या मनाला दैवाचा आधार देत असतात; आणि दैवच बलवत्तर, दैवापुढे कोणाचे काय चालणार ? “ असला ओरडा फक्त आळशी व कर्तृत्वशून्य लोकच करत असतात. ”

आपल्या धाकट्या भावाची ती तडक पाहून रघुवीर मंदस्मितपूर्वक म्हणाले, “ हो, लक्ष्मणा ! तुझ्या म्हणण्याप्रमाणेच करू या हं ! पण मनात थोडा धीर धर म्हणजे झाले ! ”

अशी लक्ष्मणाची समजूत घालून रघुराज सागराच्या तीरावर गेले. प्रथम मस्तक नमवून त्याला नमस्कार केला व नंतर एका तटाजवळील जागेवर दर्भ पसरून त्यावर आसनमांडी प्रभूंनी घातली आणि प्रार्थना सुरू केली.

श्रीरामचंद्रांची प्रार्थना निवांतपणे चालण्यासाठी आता थोडा वेळ लंकेकडे फेरफटका मारू या.

बिभीषणाला लत्ताप्रहार केल्यामुळे, तो जाहीर सूचना देऊन रघुनाथाकडे गेल्याचे समजताच रावणाने त्याच्या पाठोपाठ आपले हेर पाठविले. आपली हेरगिरी निर्विघ्न पार पडण्यासाठी त्यांनी वानरांचेच देह धारण केले आणि कपिसैन्यात मोकळेपणाने वावरून, दोन दिवस श्रीरघुनाथाकडे बिभीषण आल्यापासून जे जे घडले ते सर्व त्यांनी निरीक्षण केले. विशेषतः शरणागतावरील प्रभूचा स्नेह व त्यांचे सद्गुण पाहून, त्याची वाखाणणी ते मनातल्या मनात करू लागले. ५१

परंतु रामस्वभाववर्णनाची त्या हेरांची ऊर्मी त्यांना पुढे अनावर झाली. ते देहभान विसरून अत्यंत प्रेमाने उघड-उघड प्रभुगुणगान गाऊ लागले. त्यामुळे वानरांनी त्याचे कपट उघडकीस आणून रावणाचे दूत

कह सुग्रीव सुनहु सब बानर। अंग भंग करि पठवहु निसिचर॥
सुनि सुग्रीव बचन कपि धाए। बाँधि कटक चहु पास फिराए॥
बहु प्रकार मारन कपि लागे। दीन पुकारत तदपि न त्यागे॥
जो हमार हर नासा काना। तेहि कोसलाधीस कै आना॥
सुनि लछिमन सब निकट बोलाए। दया लागि हँसि तुरत छोड़ाए॥
रावन कर दीजहु यह पाती। लछिमन बचन बाचु कुलघाती॥

दो० — कहेहु मुखागर मूढ़ सन मम संदेसु उदार।
सीता देइ मिलहु न त आवा कालु तुम्हार॥ ५२॥

चौ० — तुरत नाइ लछिमन पद माथा। चले दूत बरनत गुन गाथा॥
कहत राम जसु लंकाँ आए। रावन चरन सीस तिन्ह नाए॥
बिहसि दसानन पूँछी बाता। कहसि न सुक आपनि कुसलाता॥
पुनि कहु खबरि बिभीषन केरी। जाहि मृत्यु आई अति नेरी॥
करत राज लंका सठ त्यागी। होइहि जव कर कीट अभागी॥
पुनि कहु भालु कीस कटकाई। कठिन काल प्रेरित चलि आई॥
जिन्ह के जीवन कर रखवारा। भयउ मृदुल चित सिंधु बिचारा॥

म्हणून त्यांच्या [illegible] करून [illegible]. " असा [illegible] हुकूम झाला.

मग काय. [illegible] हातीं [illegible] ! [illegible] आज्ञेची अंमलबजावणी करण्यासाठी [illegible]. [illegible] त्यांना मारपीट [illegible] केली, तरी [illegible] त्यांना सोडले [illegible].

" [illegible] " असे [illegible] ओरडले. [illegible] दोघांनी नमे करणाराम कोसलाधीशांची शपथ घातली.

हेरांची ती [illegible] ऐकून [illegible] दशा पाहून रामानुजाला [illegible] आली. [illegible] आणि [illegible] " हे पत्र रावणाच्या हातीं देऊन [illegible].

" हे [illegible] ! [illegible] असे केले नाहीस तर तुमचा [illegible]. " ५२

हातीं [illegible] परत निघाले.

[illegible], श्रीरामांचे [illegible] त्यांनी रावणाचा दरबार गाठला. [illegible] केले.

त्या हेरांना [illegible]. ' हे शुक ! अरे तू आपले कुशल का [illegible]. चांगला येथे सुखाने राज्य करीत असता [illegible] जाईल !

" असो. यानंतर पुनः [illegible] आहेत, ते सांग. त्यांच्या जीवनाचे [illegible] ! आणि हो; इतके सांगून



कहु तपसिन्ह कै बात बहोरी । जिन्ह के हृदयँ त्रास अति मोरी ।।

दो ०—की भइ भेंट कि फिरि गए श्रवन सुजसु सुनि मोर ।
कहसि न रिपु दल तेज बल बहुत चकित चित तोर ।। ५३ ।।

चौ ०—नाथ कृपा करि पूँछेहु जैसें । मानहु कहा क्रोध तजि तैसें ।।
मिला जाइ जब अनुज तुम्हारा । जातहिं राम तिलक तेहि सारा ।।
रावन दूत हमहि सुनि काना । कपिन्ह बाँधि दीन्हे दुख नाना ।।
श्रवन नासिका काटै लागे । राम सपथ दीन्हे हम त्यागे ।।
पूँछिहु नाथ राम कटकाई । बदन कोटि सत बरनि न जाई ।।
नाना बरन भालु कपि धारी । बिकटानन बिसाल भयकारी ।।
जेहिं पुर दहेउ हतेउ सुत तोरा । सकल कपिन्ह महँ तेहि बलु थोरा ।।
अमित नाम भट कठिन कराला । अमित नाग बल बिपुल बिसाला ।।

दो ०—द्विबिद मयंद नील नल अंगद गद बिकटासि ।
दधिमुख केहरि निसठ सठ जामवंत बलरासि ।। ५४ ।।

चौ ०—ए कपि सब सुग्रीव समाना । इन्ह सम कोटिन्ह गनइ को नाना ।।
राम कृपाँ अतुलित बल तिन्हहीं । तृन समान त्रैलोकहि गनहीं ।।

झाल्यावर मग ज्यांच्या हृदयात माझ्या भयंकर भीतीची धडकी बसली असेल त्या तापसाचे सर्व वृत्त सांग. पण काय रे ! त्यांची आणि तुझी भेट तरी झाली, का माझे अपार सुयश ऐकून तू जाग्यावूनीच काढला त्यांनी पळ ?

" माझा शत्रू, त्याचे सैन्य, त्याचे सामर्थ्य व कुवत इत्यादीविषयी काहीच कसा बोलत नाहीस ? एकंदरीत अगदी गार (चकित) होऊन आल्यासारखा दिसतोस, त्याचे काय कारण ? ५३

शुकाला आता बोलण्यास सवड मिळाली; कारण रावणाचीच प्रश्नांची सरबत्ती आतापर्यंत सुरू होती. शुक बोलू लागला, " नाथ ! आपण कृपेने जसे विचारले तसेच न रागावता मी जे सांगेन ते ऐकून त्यावर विश्वास ठेवा.

" तुमचा अनुज जाऊन भेटताच रामाने त्याला लंकाधीश म्हणून राज्याभिषेक केला. आम्ही रावणाचे दूत-हेर म्हणून कळताच कपींनी आम्हाला बांधून अनेक प्रकारे आमचा छळ केला. आमचे नाक व कान कापणारच होते, परंतु रामशपथ घातली तेव्हा सोडले आम्हाला !

" ही झाली आमची हकीकत. ज्या सैन्याविषयी तुम्ही माहिती विचारली तिचे वर्णन शतकोटी मुखांनीही करता यावयाचे नाही. ती वानरभल्लांची सेना अनेक रंगाची व श्रेष्ठ आहे. तिच्यातील ते भल्ल आणि कपी विक्राळ मुखाचे, विशाल देही आणि भयानक आहेत. आणि विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्याने आपली लंकापुरी जाळली व तुमच्या पुत्राला ठार केला. तो कपीही आम्ही त्या सैन्यात पाहिला; पण सर्वांत कमी बळाचा असा तो आम्हाला वाटला. यावरून त्या सैन्याची व त्यातील सैनिकांच्या बलाची आपणास स्पष्ट कल्पना येईल ! किती अगणित योद्धे आणि किती अगणित त्यांची नावे ! ते अक्राळ-विक्राळ शरीराचे व भयंकर स्वभावाचे आहेत; त्यांच्या अंगात अगणित हत्तींचे बळ असून त्यांचे विशाल देह आहेत !

" त्यांच्यापैकी काहींची नावे लक्षात राहिलेली सांगतो. द्विविद, मयंद, नील, नल, अंगद, गद, विकटासी, दधिमुख, केसरी, निशठ, शठ, आणि जांबवंत. " ५४

हे सर्वच त्यांच्या सुग्रीव राजासारखे असून अत्यंत बलशाली आहेत. आणि यांच्यासारखे कोट्यावधी वीर नानाप्रकारचे त्या सैन्यात भरून राहिलेले आहेत. शिवाय रामकृपेने यांच्या ठिकाणी अतुल्य अशा सामर्थ्याचा

अस मैं सुना श्रवन दसकंधर। पदुम अठारह जूथप बंदर॥
नाथ कटक महँ सो कपि नाहीं। जो न तुम्हहि जीतै रन माहीं॥
परम क्रोध मीजहिं सब हाथा। आयसु पै न देहिं रघुनाथा॥
सोषहिं सिंधु सहित झष ब्याला। पूरहिं न त भरि कुधर बिसाला॥
मर्दि गर्द मिलवहिं दससीसा। ऐसेइ बचन कहहिं सब कीसा॥
गर्जहिं तर्जहिं सहज असंका। मानहुँ ग्रसन चहत हहिं लंका॥

दो०—सहज सूर कपि भालु सब पुनि सिर पर प्रभु राम।
रावन काल कोटि कहुँ जीति सकहिं संग्राम॥५५॥

चौ०—राम तेज बल बुधि बिपुलाई। सेष सहस सत सकहिं न गाई॥
सक सर एक सोषि सत सागर। तब भ्रातहि पूँछेउ नय नागर॥
तासु बचन सुनि सागर पाहीं। मागत पंथ कृपा मन माहीं॥
सुनत बचन बिहसा दससीसा। जौं असि मति सहाय कृत कीसा॥
सहज भीरु कर बचन दृढ़ाई। सागर सन ठानी मचलाई॥
मूढ़ मृषा का करसि बड़ाई। रिपु बल बुद्धि थाह मैं पाई॥
सचिव सभीत बिभीषन जाकें। बिजय बिभूति कहाँ जग ताकें॥

संचार झाला आहे. त्यामुळे [illegible] शक्य नाही; परंतु त्यांच्या सेनापतींचा आकडा [illegible] आहे.

प्रत्यक्ष कटकाच्या [illegible] नाथ! कपिसैन्यात असा एक ही कपी नाही की, जो तुम्हाला युद्धात जिंकू शकणार नाही. [illegible] उत्सुक होऊन [illegible] हात चोळतात. परंतु रघुनाथ [illegible]

" [illegible] काढू. दशशिरांचे मर्दन करून [illegible] ! " असे [illegible] काही बोलत असता या कानांनी ऐकले [illegible] ! [illegible] असून [illegible] आहेत.

" [illegible] सर्वसमर्थ असा प्रभू [illegible] ! [illegible] रावणालाच काय [illegible] नाही ! ५५.

" प्रत्यक्ष रामचंद्रांचे तेज, बल व बुद्धी [illegible] टेकतील ! [illegible] सागर तो शोषून टाकील. [illegible] आणि [illegible] शब्दाला मान देऊन [illegible] करते आहेत. [illegible] ! "

बिभीषणाचे [illegible] आहेत. [illegible] एक [illegible] दशमुखाने [illegible] हसला आणि उपहासाने म्हणाला, " [illegible] आहेत ! आणि आमचा [illegible] मुळचाच [illegible] आहेत.

" अरे मूर्खा ! काय म्हणून [illegible] आहेत ! [illegible] सामर्थ्याचा व अकलेचा [illegible] अरे ! [illegible] बिभीषण हा ज्याचा आधारभूत मंत्री, [illegible] शक्य आहे काय ? "



सुनि खल बचन दूत रिस बाढ़ी । समय बिचारि पत्रिका काढ़ी ।।
रामानुज दीन्ही यह पाती । नाथ बचाइ जुड़ावहु छाती ।।
बिहसि बाम कर लीन्ही रावन । सचिव बोलि सठ लाग बचावन ।।

दो० – बातन्ह मनहि रिझाइ सठ जनि घालसि कुल खीस ।
राम बिरोध न उबरसि सरन बिष्नु अज ईस ।। ५६ (क) ।।
की तजि मान अनुज इव प्रभु पद पंकज भृंग ।
होहि कि राम सरानल खल कुल सहित पतंग ।। ५६ (ख) ।।

चौ० – सुनत सभय मन मुख मुसुकाई । कहत दसानन सबहि सुनाई ।।
भूमि परा कर गहत अकासा । लघु तापस कर बाग बिलासा ।।
कह सुक नाथ सत्य सब बानी । समुझहु छाड़ि प्रकृति अभिमानी ।।
सुनहु बचन मम परिहरि क्रोधा । नाथ राम सन तजहु बिरोधा ।।
अति कोमल रघुबीर सुभाऊ । जद्यपि अखिल लोक कर राऊ ।।
मिलत कृपा तुम्ह पर प्रभु करिही । उर अपराध न एकउ धरिही ।।
जनकसुता रघुनाथहि दीजे । एतना कहा मोर प्रभु कीजे ।।

याप्रमाणे वाग्युद्धात शुकाला चारी मुंड्या चीत करून रावणाने तत्त्वतः घसरलेली आपली बाजू सावरून धरली व तोंडचे पाणी पळून गेलेल्या सर्व सभासदांना थोडा धीर दिला. शुकाचा पराभव झाल्याने 'शेषं कोपेन पूरयेत्' या न्यायास अनुसरून तो त्या खलाच्या मूर्खपणाच्या वाचाळतेस ऐकून चिडला आणि ही संधी योग्य आहे, असे दिसताच त्याने तो लक्ष्मणाने दिलेला खलिता काढला.

"नाथ ! रामानुजाने हे पत्र दिले आहे ते वाचवून घ्या एकदा आपली छाती निववून ! असे म्हणून शुकाने तो खलिता पुढे केला.

पुनः एकदा दाही तोंडातून खेंकाळण्याचा आवाज काढून रावणाने ते पत्र एका डाव्या हाताने घेतले व त्या शठाने एका सचिवास ते वाचण्यासाठी दिले. पत्र वाचन सुरू झाले---

"अरे शठा ! नुसत्या शब्दपांडित्याने आपल्या मनाची करमणूक करून आपल्या सर्व कुळाचा व्यर्थ घात करू नकोस. रामाशी वैर करून तू जरी ब्रह्मा, विष्णू आणि हर याना शरण गेलास तरीही तुझे प्राण वाचणार नाहीत. ५६ (क)

"घमेंडीच्या सर्व कल्पना सोड; आणि आपल्या धाकट्या भावाप्रमाणे प्रभुचरणकमलभृंग हो ! नाहीतर रामबाणरूपी भडकणाऱ्या अग्नीच्या ज्वालांत आपल्या सर्व कुळासह पतंगाप्रमाणे जळून खाक हो ! !" ५६ (ख)

लक्ष्मणाने पाठविलेल्या खलित्यातील मजकूर कानी पडताच दशातन मनात चांगलाच हादरला; पण तोंडावर मंद हास्य करीत तो सर्वांना समजावून सांगतो की, 'जमिनीवर उताणा पडलेल्या माणसाने जसे हातांनी आकाश धरण्याचा आव आणावा, तशीच व्यर्थ बडबड हा लघू तापस करीत आहे."

ते ऐकताच शुकाला हा शेरा असह्य झाला व तो लगेच म्हणाला, "नाथ ! ती वाणी अक्षरशः खरी होणारी आहे असे आपला देहाभिमान सोडून समजा व न रागावता माझे सांगणे अजून ऐका. नाथ ! पुनः सांगतो, रामाशी वैर करण्याची कल्पनाच सोडा. रघुवीर जरी भुवनांचे (लोकांचे) राजे आहेत, तरी त्यांचा स्वभाव अती कोमल आहे.

"माझी खात्री आहे की, तुम्ही जाऊन भेटताच प्रभू तुमच्यावर कृपा करतील व तुमचा एकसुद्धा अपराध मनात ठेवणार नाहीत; म्हणून स्वामी ! रघुनाथास जनकसुता द्यावी. हात जोडून प्रार्थना करतो, एवढी माझी विनंती ऐकावीच."

जब तेहिं कहा देन बैदेही । चरन प्रहार कीन्ह सठ तेही ॥
नाइ चरन सिरु चला सो तहाँ । कृपासिंधु रघुनायक जहाँ ॥
करि प्रनामु निज कथा सुनाई । राम कृपाँ आपनि गति पाई ॥
रिषि अगस्ति कीं साप भवानी । राछस भयउ रहा मुनि ग्यानी ॥
बंदि राम पद बारहिं बारा । मुनि निज आश्रम कहुँ पगु धारा ॥

दो०— बिनय न मानत जलधि जड़ गए तीनि दिन बीति ॥
बोले राम सकोप तब भय बिनु होइ न प्रीति ॥ ५७ ॥

चौ०— लछिमन बान सरासन आनू । सोषौं बारिधि बिसिख कृसानू ॥
सठ सन बिनय कुटिल सन प्रीती । सहज कृपन सन सुंदर नीती ॥
ममता रत सन ग्यान कहानी । अति लोभी सन बिरति बखानी ॥
क्रोधिहि सम कामिहि हरि कथा । ऊसर बीज बएँ फल जथा ॥
अस कहि रघुपति चाप चढ़ावा । यह मत लछिमन के मन भावा ॥
संधानेउ प्रभु बिसिख कराला । उठी उदधि उर अंतर ज्वाला ॥
मकर उरग झष गन अकुलाने । जरत जंतु जलनिधि जब जाने ॥
कनक थार भरि मनि गन नाना । बिप्र रूप आयउ तजि माना ॥

'वैदेही द्यावी' [illegible] लाथ मारल्या. [illegible] विचाने थोडी [illegible] आपले मस्तक [illegible]

प्रभुमंत्रिस [illegible]

[illegible] पुनः पुन्हा रामचरणांना [illegible]

[illegible] काठी प्रभू [illegible]

तीन दिवस [illegible] मान देईना [illegible]

[illegible]

[illegible] उत्तम नीती [illegible] मागसाला वैराग्याचा [illegible] कामाने मनुष्याला [illegible] धान्याला [illegible]

[illegible] समाधान [illegible] लागल्या ! [illegible] हे सर्व [illegible] ब्राह्मणाच्या [illegible]

दो०—काटेहिं पइ कदरी फरइ कोटि जतन कोउ सींच।
बिनय न मान खगेस सुनु डाटेहिं पइ नव नीच ।। ५८ ।।

चौ०—सभय सिंधु गहि पद प्रभु केरे। छमहु नाथ सब अवगुन मेरे ।।
गगन समीर अनल जल धरनी। इन्ह कइ नाथ सहज जड़ करनी ।।
तव प्रेरित मायाँ उपजाए। सृष्टि हेतु सब ग्रंथनि गाए ।।
प्रभु आयसु जेहि कहँ जस अहई। सो तेहि भाँति रहें सुख लहई ।।
प्रभु भल कीन्ह मोहि सिख दीन्ही। मरजादा पुनि तुम्हरी कीन्ही ।।
ढोल गवाँर सूद्र पसु नारी। सकल ताड़ना के अधिकारी ।।
प्रभु प्रताप मैं जाब सुखाई। उतरिहि कटकु न मोरि बड़ाई ।।
प्रभु अग्या अपेल श्रुति गाई। करौं सो बेगि जो तुम्हहि सोहाई ।।

दो०—सुनत बिनीत बचन अति कह कृपाल मुसुकाइ।
जेहि बिधि उतरै कपि कटकु तात सो कहहु उपाइ ।। ५९ ।।

चौ०—नाथ नील नल कपि द्वौ भाई। लरिकाईं रिषि आसिष पाई ।।
तिन्ह कें परस किएँ गिरि भारे। तरिहहिं जलधि प्रताप तुम्हारे ।।

या अनुभवावरून सार काय निघते? तांबड्या सालीच्या केळांचे झाड नानाप्रकारे पाणी घालूनसुद्धा ज्याला फळ येत नाही; तेच कापल्यानंतर मात्र फळते, तसेच हे खगेश! (भुशुंडी सांगतो) ऐकून ठेव; नीचांना विनंती करून काही उपयोग होत नाही. त्यांना चांगली जरब घातली तरच ते वठणीवर येतात!" ५८

असो. वर वर्णन केल्याप्रमाणे सागर आला. भयभीत होऊन त्याने प्रभूचे पाय धरले व प्रार्थना करू लागला, 'नाथ! माझे सर्व दोष क्षमा करावे.

"हे स्वामी! आकाश, वायू, अग्नी, जल व पृथ्वी ही पंचमहाभूते स्वभावतःच जड आहेत. तसेच सर्व सद्‌ग्रंथातून वर्णन केले आहे की, सृष्टिरचनेसाठी तुम्ही प्रेरणा दिलेल्या मायेने यांना उत्पन्न केले आहे.

"हे प्रभो! ज्याला तुमची जशी आज्ञा आहे तसे वागण्यानेच तो सुखी होतो. (याच्या उलट पंचमहाभूतांनी जर आपला स्वभाव सोडून वागण्याचे ठरवले तर त्यांना दुःख होईलच, पण सर्वत्र अनर्थ ओढवतील) अशाही स्थितीत प्रभो! आपण मला जे शासन केलेत ते योग्यच आहे, त्याबद्दल माझी तक्रार नाही. मला एवढेच आपल्या नजरेस आणावयाचे आहे की, आम्हाला घालून दिलेली मर्यादाही आपणच निर्माण केलेली आहे!

"तथापि ढोल, अडाणी मनुष्य (गवार), पशुतुल्य शूद्र व पशूप्रमाणे वागणारी स्त्री, हे सर्व स्वभावतःच (मार खाण्यास) लायक असतात.

"आपल्या प्रतापाने मी सुकून जाईन व आपले सैन्य पैलतीरास जाईलही. परंतु तसे केल्याने त्यात माझी इभ्रत मुळीच राहाणार नाही.

"तथापि रामाज्ञा ही सर्वांनाच शिरसामान्य– तिचा भंग कोणीच करू शकत नाही असे श्रुती सांगतात; म्हणून आपली जशी आज्ञा होईल त्याचप्रमाणे मी ताबडतोब वागण्यास तयार आहे."

सागराचे ते सर्व नरमाईचे भाषण ऐकून कृपानिवास स्मित करून म्हणाले, "सर्व विषय सध्या बाजूस ठेवून, हे तात! आता असा उपाय सांगा की, ज्यामुळे हे अफाट सैन्य सागरावरून पैलतीरास सहज जाईल." ५९

"हो, सांगतोच. ऐका प्रभो!" सागर सांगू लागला, "नाथ! नील व नल या दोघा कपिबंधूंना बालपणीच ऋषींचा आशीर्वाद मिळालेला आहे. त्यामुळे त्यांनी स्पर्श केलेले मोठमोठे पर्वतसुद्धा, तुमच्या

मैं पुनि उर धरि प्रभु प्रभुताई। करिहउँ बल अनुमान सहाई॥
एहि बिधि नाथ पयोधि बँधाइअ। जेहिं यह सुजसु लोक तिहुँ गाइअ॥
एहि सर मम उत्तर तट बासी। हतहु नाथ खल नर अघ रासी॥
सुनि कृपाल सागर मन पीरा। तुरतहिं हरी राम रनधीरा॥
देखि राम बल पौरुष भारी। हरषि पयोनिधि भयउ सुखारी॥
सकल चरित कहि प्रभुहि सुनावा। चरन बंदि पाथोधि सिधावा॥

छं०—निज भवन गवनेउ सिंधु श्रीरघुपतिहि यह मत भायऊ।
यह चरित कलि मलहर जथामति दास तुलसी गायऊ॥
सुख भवन संसय समन दवन बिषाद रघुपति गुन गना।
तजि सकल आस भरोस गावहि सुनहि संतत सठ मना॥

दो०—सकल सुमंगल दायक रघुनायक गुन गान।
सादर सुनहिं ते तरहिं भव सिंधु बिना जलजान॥६०॥

मासपारायण, चौबीसवाँ विश्राम

इति श्रीमद्रामचरितमानसे सकलकलिकलुषविध्वंसने पञ्चमः सोपानः समाप्तः।

॥ सुंदरकांड समाप्त ॥

प्रतापाने [illegible] सुर्वीच [illegible] प्रभूचा [illegible] धारण करून यथाशक्ती [illegible]!

" नाथ! [illegible] मुक्त होईल; आणि प्रभो! [illegible] आहे. [illegible] माझ्या उत्तर तटावर [illegible] अनेक [illegible] करा."

याप्रमाणे [illegible] आणि [illegible] निवारण केले.

प्रभूचे [illegible] सुखी झाला. [illegible] सर्व अन्यायांचा [illegible] वाचून [illegible] आणि [illegible] पडले.

अशा प्रकारे कलियुगातील [illegible] सुखाचे निवासस्थान असून [illegible] अनेक गुणांचे. हे शठ मना! सर्वांचा [illegible].


याचे कारण असे आहे की, [illegible] देणारे आहे. जे कोणी [illegible] उरणार नाही. ६०

सकळ कलि कलुषांचा [illegible] पाचवा [illegible] झाला.

॥ सुंदरकांड समाप्त ॥

॥ [illegible] ॥





रणभूमीवर रावण गतप्राण होताच वानरांनीं श्रीरामांचा जयजयकार केला.

॥ श्रीगणेशाय नमः ॥

॥ श्रीजानकीवल्लभो विजयते ॥

लंकाकांड

षष्ठ सोपान

श्लोक

रामं कामारिसेव्यं भवभयहरणं कालमत्तेभसिंहं
योगीन्द्रं ज्ञानगम्यं गुणनिधिमजितं निर्गुणं निर्विकारम् ।
मायातीतं सुरेशं खलवधनिरतं ब्रह्मवृन्दैकदेवं
वन्दे कन्दावदातं सरसिजनयनं देवमुर्वीशरूपम् ॥ १ ॥
शङ्खेन्द्वाभमतीवसुन्दरतनुं शार्दूलचर्माम्बरं
कालव्यालकरालभूषणधरं गङ्गाशशाङ्कप्रियम् ।
काशीशं कलिकल्मषौघशमनं कल्याणकल्पद्रुमं
नौमीड्यं गिरिजापतिं गुणनिधिं कन्दर्पहं शङ्करम् ॥ २ ॥

अनुवादककृत-मंगलाचरण

अहंकार दशानन, मोह कुंभकर्ण व काम मेघनाद या शत्रूंना त्यांच्या परिवारासह ठार करून, मिथिल राजकन्या शान्ता (सीता) हिने युक्त झालेले राम आम्हाला अभयदायक होवोत.

एखादा मनुष्य पुष्कळ अमृत पिऊन जरी रोगांपासून मुक्त झाला, तरी ते स्वर्गीय अमृत जन्मभय व प्रपंच यांचे निवारण करू शकत नाही. परंतु या महाभयांचे निवारण करणारे जे श्रीगुरुचरण प्रक्षालनामृत, ते मात्र अतिपुण्यरूप धनाने संतुष्ट केलेल्या प्रभूंच्या कृपेने पावन झालेल्यांनाच मिळते.

मूळ मंगलाचरण

कामारी शंकर ज्यांची सेवा करतात व जे अशा शंकरांची सेवा करतात, भवभयाचे हरण करणारे, काळरूपी मदोन्मत्त हत्तीला सिंहरूप असणारे, सर्व योगीजनांत श्रेष्ठ, ज्ञानानेच ज्यांची प्राप्ती होते, जे गुणाकर आहेत, जे सर्वांनाच सर्वकाळी अजिंक्य आहेत, जे निर्गुण, निराकार असून, मायेच्या पलीकडे आहेत; सर्व देवांचे स्वामी, दुष्टांचा वध करण्यात तत्पर, ब्राह्मणांचा समाज हाच ज्यांचा एकमेव देव आहे व जे ब्रह्मवृंदाचे मुख्य देव आहेत; मेघासारखे निर्मळ व सुंदर, कमलनयन, पृथ्वीपतीचे रूप असलेले देव असे जे श्रीरामचंद्र त्यांना मी वन्दन करतो. १

शंख व चंद्र यांच्यासारखे कांतिमान व अत्यंत सुंदर शरीर असलेले, व्याघ्रचर्म परिधान केलेले, काळासारखे भयंकर सर्प व मुण्डमाळा यांच्यासारखी भयानक भूषणे धारण केलेले, गंगा व चंद्र यांच्यावर प्रेम करणारे व यांचे प्रिय असणारे, कलीच्या पापांच्या ओघांचा नाश करणारे, कल्याणाचे कल्पवृक्ष, गुणाकार, कामदेवाला मारणारे, स्तुतीला योग्य असणारे, पार्वतीचे पती व काशीनगरीचे प्रभू असे जे शंकर, त्यांना मी नमन करतो. २

यो ददाति सतां शम्भुः कैवल्यमपि दुर्लभम् ।
खलानां दण्डकृद्योऽसौ शङ्करः शं तनोतु मे ।। ३ ।।

दो० — लव निमेष परमानु जुग बरष कलप सर चंड ।
भजसि न मन तेहि राम को कालु जासु कोदंड ।।

सो ०— सिंधु बचन सुनि राम सचिव बोलि प्रभु अस कहेउ ।
अब बिलंबु केहि काम करहु सेतु उतरै कटकु ।।
सुनहु भानुकुल केतु जामवंत कर जोरि कह ।
नाथ नाम तव सेतु नर चढ़ि भव सागर तरहिं ।।

चौ० — यह लघु जलधि तरत कति बारा । अस सुनि पुनि कह पवनकुमारा ।।
प्रभु प्रताप बड़वानल भारी । सोषेउ प्रथम पयोनिधि बारी ।।
तव रिपु नारि रुदन जल धारा । भरेउ बहोरि भयउ तेहिं खारा ।।
सुनि अति उकुति पवनसुत केरी । हरषे कपि रघुपति तन हेरी ।।
जामवंत बोले दोउ भाई । नल नीलहि सब कथा सुनाई ।।
राम प्रताप सुमिरि मन माहीं । करहु सेतु प्रयास कछु नाहीं ।।
बोलि लिए कपि निकर बहोरी । सकल सुनहु बिनती कछु मोरी ।।

जे शम्भू दुर्लभ असलेले कैवल्यसुद्धा सज्जनांना देतात, त्याबरोबर जे खलांना योग्य शासन करतात, असे शङ्कर माझ्या ठिकाणी रामभक्तिरूप कल्याणाचा विस्तार करोत. ३

लव, निमेष, परमाणू, तसेच युग, वर्षे, कल्प हे ज्याचे भयंकर बाण आहेत आणि काळ ज्याचे धनुष्य आहे त्या श्रीरामचंद्राला, हे मना ! तू का भजत नाहीस ?

मागील कथानुसंधान— सुन्दरकाण्डाच्या शेवटी सेतुबंधाची युक्ती सांगून सागराने निरोप घेतल्यानंतर आपल्या सचिवांना एकत्र करून प्रभू राम म्हणाले, " आता उशीर कशाकरता ? जलद सेतुबंधाचे काम हाती घ्या म्हणजे आपली सैन्ये सागराच्या पैलतीरावर जातील. "

त्यावर वृद्ध जांबवंताला सत्यार्थाने मौज करण्याची लहर लागली. तो हात जोडून म्हणतो, " हे भानुकुल-केतू ! हे नाथ ! माझे म्हणणे थोडेसे ऐका. आपले नामच सेतू आहे; त्याच्यावर चढून मानव भवसागरसुद्धा तरून जातात ! मग हा लहानसा सागर तरून जाण्यास कितीसा वेळ लागणार !

जांबवंतानंतर पवनसुताला दोन शब्द बोलण्याची ऊर्मी आवरेना; तो म्हणाला, " प्रभूचा प्रताप हाच एक जबरदस्त वडवानल आहे; त्यानेच प्रथम या सागराचे सर्व पाणी शोषून टाकले होते. परंतु तुमच्या शत्रूच्या स्त्रियांच्या अश्रुधारांचे पूर येऊन त्याला पुनः भरून टाकला; आणि त्यामुळे तो खारा झाला ! "

पवनतनयाची ही अतिशयोक्ती ऐकून सर्व कपी रघुपतिमुखकमलाकडे कौतुकाने पाहू लागले. त्यावेळी त्यांना केवढा हर्ष झाला !

त्यानंतर जांबवंताने नल व नील बंधूना बोलावून आणले आणि त्यांना समजावून सांगितले की, प्रभू श्रीरामचंद्राच्या प्रतापाचे मनात स्मरण करीत सेतुबंधनाचे काम करा म्हणजे त्यांत तुम्हाला काहीच प्रयास न पडता ते काम सांगपणे पार पडेल.

या प्रमाणे नल-नीलांना त्यांच्या कर्तव्याची कल्पना देऊन जांबवानाने सर्व कपिसमुदाय एकत्र जमवला व भाषण केले; " बंधूंनो ! तुम्ही सर्वजण आता माझी थोडीशी विनंती ऐका. हे भल्लु आणि कपी हो ! आपल्या हृदयात श्रीरामचरणकमले धारण करून यापुढे एक खेळ सुरू करा पाहू ! अकाळ-विक्राळ मर्कटांचे तुम्ही सर्व थवे आता पळण्याची शर्यत लावा आणि मोठमोठे वृक्ष आणि पर्वत भराभर आणा. "

राम चरन पंकज उर धरहु । कौतुक एक भालु कपि करहु ॥
धावहु मर्कट बिकट बरूथा । आनहु बिटप गिरिन्ह के जूथा ॥
सुनि कपि भालु चले करि हूहा । जय रघुबीर प्रताप समूहा ॥

दो०—अति उतंग गिरि पादप लीलहिं लेहिं उठाइ ।
आनि देहिं नल नीलहि रचहिं ते सेतु बनाइ ॥ १ ॥

चौ०—सैल बिसाल आनि कपि देहीं । कंदुक इव नल नील ते लेहीं ॥
देखि सेतु अति सुंदर रचना । बिहसि कृपानिधि बोले बचना ॥
परम रम्य उत्तम यह धरनी । महिमा अमित जाइ नहिं बरनी ॥
करिहउँ इहाँ संभु थापना । मोरे हृदयँ परम कलपना ॥
सुनि कपीस बहु दूत पठाए । मुनिबर सकल बोलि लै आए ॥
लिंग थापि बिधिवत करि पूजा । सिव समान प्रिय मोहि न दूजा ॥
सिव द्रोही मम भगत कहावा । सो नर सपनेहुँ मोहि न पावा ॥
संकर बिमुख भगति चह मोरी । सो नारकी मूढ़ मति थोरी

दो०—संकरप्रिय मम द्रोही सिव द्रोही मम दास ।
ते नर करहिं कलप भरि घोर नरक महुँ बास ॥ २ ॥

ही आज्ञा करतांच राजाचा "जय रघुवीर प्रताप समूह !!" असा मोठा जयजयकार करून त्याच तालात त्यांनी कूच केले.

मग काय ! डोंगराच्या डोंगर मोठमोठाले वृक्ष व दगडांचे ढिग आणून [illegible] ते झेलून नल व नील सेतूबंधाचे काम झपाट्याने करू लागले ! १

१ निश्चित [illegible] चतुर्दशीला थोड्या सैन्यासह सुवेल पर्वतावर तळ ठोकले. [illegible] सर्व सैन्य सेतूवरून आले; आणि [illegible] वेढा पडला होता.

श्रीरामचंद्र ते सेतूचे [illegible] अति सुंदर रचना पाहून [illegible] "ही भूमी परम रम्य व उत्तम आहे [illegible] मनात आली आहे."

हे ऐकून सुग्रीवाने अनेक दूत [illegible] सर्व मुनिवरांना बोलावून आणले. त्यांच्या [illegible] पूजा केली.

पूजा-समाप्ती [illegible] "शिवासमान दुसरा कोणीही मला प्रिय नाही. म्हणून शिवाचा द्रोह करून [illegible] माझी स्वप्नातही प्राप्ती होणार नाही. [illegible] माझ्या भक्तीची जो इच्छा करतो, तो जड बुद्धीचा, [illegible] नरकाचाच अधिकारी होय ! याचे कारण असे की, माझा द्रोह करून शंकरांचे [illegible] माझे भक्त म्हणविणारे असे दोन्ही प्रकारचे लोक [illegible] नरकातच निवास करतात ! २



चौ० — जे रामेस्वर दरसनु करिहहिं । ते तनु तजि मम लोक सिधरिहहिं ॥
जो गंगाजलु आनि चढ़ाइहि । सो साजुज्य मुक्ति नर पाइहि ॥
होइ अकाम जो छल तजि सेइहि । भगति मोरि तेहि संकर देइहि ॥
मम कृत सेतु जो दरसनु करिही । सो बिनु श्रम भवसागर तरिही ॥
राम बचन सब के जिय भाए । मुनिबर निज निज आश्रम आए ॥
गिरिजा रघुपति कै यह रीती । संतत करहिं प्रनत पर प्रीती ॥
बाँधा सेतु नील नल नागर । राम कृपाँ जसु भयउ उजागर ॥
बूड़हिं आनहि बोरहिं जेई । भए उपल बोहित सम तेई ॥
महिमा यह न जलधि कइ बरनी । पाहन गुन न कपिन्ह कइ करनी ॥

दो० — श्रीरघुबीर प्रताप ते सिंधु तरे पाषान ।
ते मतिमंद जे राम तजि भजहिं जाइ प्रभु आन ॥ ३ ॥

चौ० — बाँधि सेतु अति सुदृढ़ बनावा । देखि कृपानिधि के मन भावा ॥
चली सेन कछु बरनि न जाई । गर्जहिं मर्कट भट समुदाई ॥
सेतुबंध ढिग चढ़ि रघुराई । चितव कृपाल सिंधु बहुताई ॥
देखन कहुँ प्रभु करुना कंदा । प्रगट भए सब जलचर बृंदा ॥
मकर नक्र नाना झष ब्याला । सतजोजन तन परम बिसाला ॥

" परंतु जे कोणी भक्तिभावाने या रामेश्वराचे दर्शन घेतील, ते देह त्यागानंतर वैकुण्ठास खास जातील. गंगाजल आणून जे रामेश्वरावर घालतील, त्या लोकांना सायुज्यमुक्ती प्राप्त होईल. तसेच निष्काम व निष्कपट होऊन जे भजन-पूजनादिक रामेश्वराची सेवा करतील, त्यांना शंकर माझी भक्ती बहाल करतील ! त्याचप्रमाणे माझे निदर्शनाखाली बनलेल्या या सेतूचे जे कोणी दर्शन घेतील, ते विनायास भवसागर तरून जातील."

याप्रमाणे भावनांच्या भरतीतून प्रसादपूर्ण असे बाहेर पडलेले प्रभूंचे शब्द सर्वांच्याच मनाला आवडले आणि मुनिवर निरोप घेऊन आपापल्या आश्रमाला परतले.

रामेश्वर-स्थापनेची ही सर्व कथा पार्वतीला सांगितल्यावर श्रेष्ठ रामभक्त शंकरांना शेरा देणे भागच होते, " गिरिजे ! रघुपतीची ही रीत आहे की, ते सतत प्रणतावर अशीच प्रीती करतात ! "

वर वर्णन केल्याप्रमाणे चतुर नल-नीलांनी सेतुबंधाचे काम तडीस लावले व रामकृपेने त्यांचे हे यश जगात उज्ज्वल झाले.

केवढा चमत्कार हा ! जे स्वतः बुडून दुसऱ्यांना बुडवतात, असे पाषाण जहाजासारखे पाण्यावर तरंगू लागले ! परंतु हा महिमा सागराचा असे कोणी म्हणत नाहीत किंवा नल-नीलांच्या कर्तबगारीलाही ते श्रेय नाही; अथवा त्या पाषाणांच्या गुणधर्मात काही अपूर्व बदल झाला, अशीही कोणाची समजूत नाही.

अर्थात श्रीरघुवीरांच्या प्रतापानेच सागरात पाषाण तारण्याची किमया घडवून आणली हेच खरे ! इतके समजल्यानंतर जे मतिमंद असतात तेच प्रभु श्रीरामाला सोडून इतरांच्या व्यर्थ भजनी लागतात. ३

सेतू बांधून झाला; त्याचे काम, भरभक्कम केलेले पाहून कृपानिधी रघुवीराचे मन प्रसन्न झाले.

आज्ञा मिळताच त्यावरून कपिसेना चालू लागण्याची तयारी झाली. त्या सेनेचे यथार्थ वर्णन करणे अशक्य आहे. वानरवीराच्या झुंडीच्या झुंडी मोठमोठ्याने गर्जना करत आहेत !

सेतुबंधाच्या तटावर चढून कृपाळू रघुराज सागराचा विस्तार व इतर गोष्टी पाहू लागले. त्याबरोबर त्या करुणाकंदाच्या दर्शनासाठी सर्व जलचराचे थवेच्या थवे जलाच्या पृष्ठभागावर आले.

त्यात नानाप्रकारचे मकर, नक्र, मासे आणि साप असे सर्व प्रकट झाले. त्यांची शरीरे केवढी मोठी

अइसेउ एक तिन्हहि जे खाहीं। एकन्ह कें डर तेपि डेराहीं॥
प्रभुहि बिलोकहिं टरहिं न टारे। मन हरषित सब भए सुखारे॥
तिन्ह की ओट न देखिअ बारी। मगन भए हरि रूप निहारी॥
चला कटकु प्रभु आयसु पाई। को कहि सक कपि दल बिपुलाई॥

दो०—सेतुबंध भइ भीर अति कपि नभ पंथ उड़ाहिं।
अपर जलचरन्हि ऊपर चढ़ि चढ़ि पारहि जाहिं॥४॥

चौ०—अस कौतुक बिलोकि द्वौ भाई। बिहँसि चले कृपाल रघुराई॥
सेन सहित उतरे रघुबीरा। कहि न जाइ कपिजूथप भीरा॥
सिंधु पार प्रभु डेरा कीन्हा। सकल कपिन्ह कहुँ आयसु दीन्हा॥
खाहु जाइ फल मूल सुहाए। सुनत भालु कपि जहँ तहँ धाए॥
सब तरु फरे राम हित लागी। रितु अरु कुरितु काल गति त्यागी॥
खाहिं मधुर फल बिटप हलावहिं। लंका सन्मुख सिखर चलावहिं॥
जहँ कहुँ फिरत निसाचर पावहिं। घेरि सकल बहु नाच नचावहिं॥

अहाट! [illegible] अजस्र दुसरे [illegible] भीती [illegible]

त्यांचे [illegible] मुखाची [illegible] डिवाचे बंद [illegible]

[illegible] सेतुबंधाचे [illegible] आता [illegible] पुलावर [illegible]

प्रभु [illegible] उड्या मारीत [illegible]

[illegible] थोडयाच [illegible] सांगण्यात [illegible]

[illegible] सुंदर फळे व मूळ [illegible]

[illegible] कालाची [illegible] टाकल्या होत्या.

वानरांनी मधुर फळे [illegible] आणीत. [illegible]

कुठे [illegible]

दसनन्हि काटि नासिका काना । कहि प्रभु सुजसु देहिं तब जाना ।।
जिन्ह कर नासा कान निपाता । तिन्ह रावनहि कही सब बाता ।।
सुनत श्रवन बारिधि बंधाना । दस मुख बोलि उठा अकुलाना ।।

दो ०–बाँध्यो बननिधि नीरनिधि जलधि सिंधु बारीस ।
सत्य तोयनिधि कंपति उदधि पयोधि नदीस ।। ५ ।।

चौ ०–निज बिकलता बिचारि बहोरी । बिहँसि गयउ गृह करि भय भोरी ।।
मंदोदरीं सुन्यो प्रभु आयो । कौतुकहीं पाथोधि बँधायो ।।
कर गहि पतिहि भवन निज आनी । बोली परम मनोहर बानी ।।
चरन नाइ सिरु अंचलु रोपा । सुनहु बचन प्रिय परिहरि कोपा ।।
नाथ बयरु कीजे ताही सों । बुधि बल सकिअ जीति जाही सों ।।
तुम्हहि रघुपतिहि अंतर कैसा । खलु खद्योत दिनकरहि जैसा ।।
अतिबल मधु कैटभ जेहिं मारे । महाबीर दितिसुत संघारे ।।
जेहिं बलि बाँधि सहसभुज मारा । सोइ अवतरेउ हरन महि भारा ।।
तासु बिरोध न कीजिअ नाथा । काल करम जिव जाकें हाथा ।।

आलेला पाहताच आपल्या दातांनी त्यांचे नाक व कान छाटीत व त्याला सांगत, म्हण ' जयजय रघुवीर समर्थ ' ' सीतापती रामचंद्र की जय ! " एवढा कार्यक्रम झाला की त्यांना श्रीरामागमन रावणास कळविण्यासाठी सोडून देत.

नाक–कान छाटले गेल्याने ज्यांची केविलवाणी स्थिती झाली. त्यांनी साहजिकच जाऊन दशाननास सर्व वृत्त कळवले.

समुद्राला बांधून सैन्य आपल्या तीरावर येऊन दाखल झाल्याची बातमी त्यांच्या कानी पडताच तो व्याकुळ होऊन दाही तोंडांनी एकदम ओरडला—

" काय, म्हणता काय ? खरोखरच नीरनिधी, वननिधी, जलधी, सिंधू, वारीश, तोयनिधी, कंपती, उदधी, पयोधी, नदीश—बांधला ? " ५

आपण उगीचच घाबरलो असे विचारांती ध्यानी आल्यावर तो एकदा मोठ्याने हसला आणि त्या निकट येऊन ठेपलेल्या भीतीवर पडता टाकून त्याने घरचा रस्ता धरला.

इकडे रावणाप्रमाणेच मंदोदरीच्याही कानी आले की सहजलीलेने सेतू बांधून प्रभू आले.

जिथे रावणाचीच प्रथम घाबरगुंडी उडाली, तेथे हे ऐकून मंदोदरीची काय अवस्था झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी ! रावणाने राजवाड्यात पाऊल टाकताच तिने पुढे येऊन आपल्या पतीचा हात धरला आणि त्याला स्वतःच्या महालात नेले. त्याच्या पायावर आपले मस्तक ठेवले, पदर पसरला आणि अत्यंत मधुर वाणीने मंदोदरीने प्रार्थना केली.

" प्रियकरा ! न रागावता माझे एवढे बोलणे ऐकून घ्यावे. नाथ ! बुद्धीने व बळाने ज्याला जिंकणे शक्य आहे त्याच्याशीच वैर करणे योग्य ठरेल. तुमच्यात आणि रघुपतीत–रागावू नका हं ! खरे तेच बोलते– काजवा व दिनकर यांच्याइतके अंतर आहे. प्रत्यक्ष पुरावा तुमच्या पुढेच आहे की ! अत्यंत बलवान् अशा मधू व कैटभ या दैत्यांना मारले; हिरण्याक्ष व हिरण्यकशिपू अशा दितीच्या दोन्ही महावीर पुत्रांचा संहार केला; बळीला बांधून सहस्रबाहूलाही ठार केला; इतका ज्याचा मोठा पराक्रम, तोच भूभार हरण करणारा अवतरला आहे !

" नाथा ! जीव, काळ व कर्मे ज्याच्या सर्वस्वी स्वाधीन आहेत, त्याच्याशी विरोध करून शेवटी काय

दो०—रामहि सौंपि जानकी नाइ कमल पद माथ।
सुत कहुँ राज समर्पि बन जाइ भजिअ रघुनाथ॥ ६॥

चौ०—नाथ दीनदयाल रघुराई। बाघउ सनमुख गएँ न खाई॥
चाहिअ करन सो सब करि बीते। तुम्ह सुर असुर चराचर जीते॥
संत कहहिं असि नीति दसानन। चौथेंपन जाइहि नृप कानन॥
तासु भजनु कीजिअ तहँ भर्ता। जो कर्ता पालक संहर्ता॥
सोइ रघुबीर प्रनत अनुरागी। भजहु नाथ ममता सब त्यागी॥
मुनिबर जतनु करहिं जेहि लागी। भूप राजु तजि होहिं बिरागी॥
सोइ कोसलाधीस रघुराया। आयउ करन तोहि पर दाया॥
जौं पिय मानहु मोर सिखावन। सुजसु होइ तिहुँ पुर अति पावन॥

दो०—अस कहि नयन नीर भरि गहि पद कंपित गात।
नाथ भजहु रघुनाथहि अचल होइ अहिवात॥ ७॥

चौ०—तब रावन मयसुता उठाई। कहै लाग खल निज प्रभुताई॥
सुनु तैं प्रिया बृथा भय माना। जग जोधा को मोहि समाना॥
बरुन कुबेर पवन जम काला। भुज बल जितेउँ सकल दिगपाला॥

[illegible] पुत्राला राज्य अर्पण करा [illegible] ६

"नाथ! रघुराज [illegible] नाही. [illegible]

"[illegible] ते सर्व तुम्ही पूर्ण केले आहे. सुर, असुर, [illegible]

"हे दशानन! [illegible] म्हणून [illegible] आणि नाथ! [illegible] त्याला शरण जा.

"अहो! [illegible] तो मिळत नाही. [illegible] रघुराया. [illegible]

"हे प्रियकर! [illegible] पवित्र सुयश [illegible]."

[illegible] थरथर कापत [illegible] "नाथ! [illegible] तरी चिरकाल टिकण्यासाठी [illegible]." ७

इतके बोलून, [illegible]!

तिला उठवून [illegible] लागला—"प्रिये! [illegible] वीर या जगात दुसरा कोण आहे. [illegible] कुबेर, [illegible] दोघांना केवळ स्वतःच्या

देव दनुज नर सब बस मोरें । कवन हेतु उपजा भय तोरें ॥
नाना बिधि तेहि कहेसि बुझाई । सभाँ बहोरि बैठ सो जाई ॥
मंदोदरीं हृदयँ अस जाना । काल बस्य उपजा अभिमाना ॥
सभाँ आइ मंत्रिन्ह तेहिं बूझा । करब कवन बिधि रिपु सैं जूझा ॥
कहहिं सचिव सुनु निसिचर नाहा । बार बार प्रभु पूछहु काहा ॥
कहहु कवन भय करिअ बिचारा । नर कपि भालु अहार हमारा ॥

दो० —सब के बचन श्रवन सुनि कह प्रहस्त कर जोरि ।
नीति बिरोध न करिअ प्रभु मंत्रिन्ह मति अति थोरि ॥ ८ ॥

चौ० —कहहिं सचिव सठ ठकुरसोहाती । नाथ न पूर आव एहि भाँती ॥
बारिधि नाघि एक कपि आवा । तासु चरित मन महुँ सबु गावा ॥
छुधा न रही तुम्हहि तब काहू । जारत नगरु कस न धरि खाहू ॥
सुनत नीक आगें दुख पावा । सचिवन अस मत प्रभुहि सुनावा ॥
जेहिं बारीस बँधायउ हेला । उतरेउ सेन समेत सुबेला ॥
सो भनु मनुज खाब हम भाई । बचन कहहिं सब गाल फुलाई ॥

बाहुबलाने मी जिंकले आहेत. देव, मानव व दानव, स्वर्ग, पृथ्वी व पाताळ यांतील सर्वच माझ्या अंकित आहेत. अशा स्थितीत तुला भय वाटण्याचे काहीच कारण नाही ! ”

अशा रीतीने आपल्याकडून शक्य त्या प्रकारांनी तिची समजूत घालण्याचा प्रयत्न करून, स्वारी सरळ दरबारात जाऊन सिंहासनावर बसली.

मंदोदरीने आपल्या मनात खूण-गाठ बांधली की, काळाने आपल्या पतीच्या गळ्याला फास लावल्यानेच हा आत्मघातकी अभिमान त्याला यावेळी झालेला आहे.

दशाननाचा दरबार सुरू होताच त्याने सचिवापुढे प्रश्न टाकला, “ सचिवहो ! शत्रू येऊन दाखल झाला. कसा सामना द्यावा ते बोला. ”

“ हे निशाचर नायका ! प्रभो ! वारंवार विचारण्याची गरजच काय ? महाराजांनी सांगावं तरी खरं की, भय कोणते आणि विचार तो कशाचा करायचा ? नर, कपी आणि अस्वले हे तर आपले नित्याचे खाद्य-पदार्थ ! ”

मंत्र्यांचा तो लाळघोटेपणा रावणपुत्र प्रहस्ताला असह्य होऊन तो ताडकन् उठला आणि हात जोडून म्हणाला, “ प्रभो ! नीतीला विरोधी वर्तन करू नये; कारण या मंत्र्यांना बेताचीच अक्कल उरलेली दिसते !” ८

“ हे सर्वच अत्यंत शठ बनल्याने तोंडपुजेपणा करून बोलत आहेत. नाथ ! असल्या विचारसरणीने आपला निभाव लागणार नाही.

“ अहो, राज कारणपटू सचिव ! एकच वानर समुद्र ओलांडून आला, तर त्याचे चरित्र अजून सर्वांच्या काळजात घर करून बसले आहे ! तेव्हा, तो वानर तुमचा खाण्याचा पदार्थ नव्हता, का तुम्हाला भूक लागली नव्हती ? नगर जाळीत असता तुमच्यापैकी एकाने तरी त्याला खायचा होता की !

“ म्हणून सांगतो की, सचिवांनी प्रभूला जे मत सांगितले ते जरी ऐकायला गोड असले तरी त्याचा परिणाम भयंकर होईल.

“ ज्यांनी सहज लीलेने सागरावर सेतू बांधविला व आपल्या अफाट सेनेसह सुवेल पर्वतावर येऊन तळ दिला, त्याला साधारण मनुष्य म्हणणे व सहज खाऊन टाकू अशी भाषा वापरणे, वीराचा आव आणून केलेली वृथा वल्गना होय !

तात बचन मम सुनु अति आदर। जनि मन गुनहु मोहि करि कादर॥
प्रिय बानी जे सुनहिं जे कहहीं। ऐसे नर निकाय जग अहहीं॥
बचन परम हित सुनत कठोरे। सुनहिं जे कहहिं ते नर प्रभु थोरे॥
प्रथम बसीठ पठउ सुनु नीती। सीता देइ करहु पुनि प्रीती॥

दो०—नारि पाइ फिरि जाहिं जौं तौ न बढ़ाइअ रारि।
नाहिं त सन्मुख समर महि तात करिअ हठि मारि॥ ९॥

चौ०—यह मत जौं मानहु प्रभु मोरा। उभय प्रकार सुजसु जग तोरा॥
सुत सन कह दसकंठ रिसाई। असि मति सठ केहिं तोहि सिखाई॥
अबहीं ते उर संसय होई। बेनुमूल सुत भयहु घमोई॥
सुनि पितु गिरा परुष अति घोरा। चला भवन कहि बचन कठोरा॥
हित मत तोहि न लागत कैसें। काल बिबस कहुँ भेषज जैसें॥
संध्या समय जानि दससीसा। भवन चलेउ निरखत भुज बीसा॥
लंका सिखर उपर आगारा। अति बिचित्र तहँ होइ अखारा॥
बैठ जाइ तेहिं मंदिर रावन। लागे किंनर गुन गन गावन॥
बाजहिं ताल पखाउज बीना। नृत्य करहिं अपछरा प्रबीना॥

"तात ! [illegible] सल्ला [illegible] आहे ! [illegible] लोकच या जगात [illegible] लोक मात्र, हे प्रभो ! फारच विरळ !

"याच [illegible] अर्पण करून [illegible] नये. नाहीतर, तात ! [illegible]."

"प्रभो ! [illegible] अंतर्यामी केली तर दोन्ही प्रकारांनी [illegible]."

प्रहस्ताचे [illegible] अक्कल कोणी शिकवली ? [illegible] बेटात काटे [illegible] !"

मातृभक्त [illegible] शिनोडे उठवलेले [illegible] परत करून त्याने [illegible] औषध रुचत नाही. [illegible] झाला आहेस !" [illegible] वाटाण्याच्या अक्षता [illegible] पाहत दशमुख [illegible].

त्रिकूट पर्वताच्या [illegible] ठिकाणी एक फार उत्तम [illegible] किन्नरांनी त्याचे गुणगायन सुरू केले. [illegible] नृत्य करू लागल्या.



दो० — सुनासीर सत सरिस सो संतत करइ बिलास ।
परम प्रबल रिपु सीस पर तद्यपि सोच न त्रास ॥ १० ॥

चौ० — इहाँ सुबेल सैल रघुबीरा । उतरे सेन सहित अति भीरा ॥
सिखर एक उतंग अति देखी । परम रम्य सम सुभ्र बिसेषी ॥
तहँ तरु किसलय सुमन सुहाए । लछिमन रचि निज हाथ डसाए ॥
ता पर रुचिर मृदुल मृगछाला । तेहिं आसन आसीन कृपाला ॥
प्रभु कृत सीस कपीस उछंगा । बाम दहिन दिसि चाप निषंगा ॥
दुहुँ कर कमल सुधारत बाना । कह लंकेस मंत्र लगि काना ॥
बड़भागी अंगद हनुमाना । चरन कमल चापत बिधि नाना ॥
प्रभु पाछें लछिमन बीरासन । कटि निषंग कर बान सरासन ॥

दो० — एहि बिधि कृपा रूप गुन धाम रामु आसीन ।
धन्य ते नर एहिं ध्यान जे रहत सदा लयलीन ॥ ११ (क) ॥

पूरब दिसा बिलोकि प्रभु देखा उदित मयंक ।
कहत सबहि देखहु ससिहि मृगपति सरिस असंक ॥ ११ (ख) ॥

चौ० — पूरब दिसि गिरिगुहा निवासी । परम प्रताप तेज बल रासी ॥
मत्त नाग तन कुंभ बिदारी । ससि केसरी गगन बन चारी ॥

रावणाचे ते ऐश्वर्य आणि भोगविलास पाहिल्यावर शेकडो इंद्रासारखे तो सुखोपभोग घेत आहे असे वाटे, आणि विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे अत्यंत प्रबल शत्रू शिरावर येऊन बसला असूनही त्याच्या चित्ताला चिंता किंवा भीती यांचा नुसता स्पर्शसुद्धा नाही ! १०

त्याला तसाच मजा करण्यासाठी सोडून आपण आता श्रीरामचंद्रांच्या दर्शनासाठी सुवेल पर्वतावर जाऊ या. पाहा, रघुवीर सेनेसह तेथे उतरल्यावर भलतीच गर्दी झाली. त्याच पर्वताचे एक अती उंच शिखर आहे. त्याच्यावरील जमीन अत्यंत मनोहर, सपाट, आणि परम शुभ आहे, असे लक्ष्मणाच्या नजरेस येताच, त्याने कोमल तरुपल्लव व सुंदर फुले यांच्या सहाय्याने स्वतःच्या हातांनी एक छानदार विशेष प्रकारची बैठक तयार केली. तिच्यावर एक कोमल व सुंदर मृगचर्म घातले. त्या आसनावर कृपासागर येऊन बसले आहेत.

आता सुवेल शैलावरील प्रभूंचे ध्यानपूर्ण निरीक्षण करून पाहा. प्रभूंचे मस्तक कपिपती सुग्रीवाच्या मांडीवर आहे; त्यांच्या डाव्या बाजूस धनुष्य व उजव्या बाजूस भाता आहे; दोन्ही हातात बाण घेऊन प्रभू त्यांचे निरीक्षण करत आहेत. लंकेश्वर बिभीषण प्रभूंच्या कानात काही गुप्त मसलत सांगत आहे. सर्वात मोठे भाग्य अंगद हनुमंताचे कारण ते दोघे निरनिराळ्या रीतींने चरणकमल चेपीत आहेत. प्रभूंच्या मागे लक्ष्मण वीरासन घालून कमरेला भाता व हातात धनुष्यबाण घेऊन बसले आहेत.

कृपा, रूप आणि गुण यांचे धाम, श्रीराम, याप्रमाणे आसनावर विराजमान झाले आहेत. या ध्यानात सदोदित निमग्न होण्याचे भाग्य ज्यांना लाभेल ते धन्य होत ! ११ (क)

अशा स्थितीत प्रभूंनी पूर्व दिशेकडे पाहिले, तो त्यास चंद्र उगवलेला दिसला. (पा. शु।। १५ गू. चं. पाहा.) तेव्हा सर्वांना त्या चंद्राकडे पाहण्यास प्रभूंनी सांगितले व म्हणाले, "पाहा, कसा सिंहासारखा निर्भय दिसतो आहे ! ११ (ख)

पूर्व दिशारूपी गिरिगुहेत निवास करणारा; प्रताप, तेज व बल यांचा सागर, अंधाररूपी मदोन्मत्त हत्तीच्या गंडस्थळांना विदीर्ण करणारा असा हा शशीसिंह गगनवनात स्वैरसंचार करीत आहे.

बिथुरे नभ मुकुताहल तारा। निसि सुंदरी केर सिंगारा॥
कह प्रभु ससि महुँ मेचकताई। कहहु काह निज निज मति भाई॥
कह सुग्रीव सुनहु रघुराई। ससि महुँ प्रगट भूमि कै झाँई॥
मारेउ राहु ससिहि कह कोई। उर महँ परी स्यामता सोई॥
कोउ कह जब बिधि रति मुख कीन्हा। सार भाग ससि कर हरि लीन्हा॥
छिद्र सो प्रगट इंदु उर माहीं। तेहि मग देखिअ नभ परिछाहीं॥
प्रभु कह गरल बंधु ससि केरा। अति प्रिय निज उर दीन्ह बसेरा॥
बिष संजुत कर निकर पसारी। जारत बिरहवंत नर नारी॥

दो०—कह हनुमंत सुनहु प्रभु ससि तुम्हार प्रिय दास।
तव मूरति बिधु उर बसति सोइ स्यामता अभास॥१२ (क)॥

नवाह्नपारायण. सातवाँ विश्राम

पवन तनय के बचन सुनि बिहँसे रामु सुजान।
दच्छिन दिसि अवलोकि प्रभु बोले कृपानिधान॥१२ (ख)॥

चौ०—देखु बिभीषन दच्छिन आसा। घन घमंड दामिनी बिलासा॥
मधुर मधुर गरजइ घन घोरा। होइ बृष्टि जनि उपल कठोरा॥
कहत बिभीषन सुनहु कृपाला। होइ न तड़ित न बारिद माला॥
लंका सिखर उपर आगारा। तहँ दसकंधर देख अखारा॥

" आकाशात [illegible] "

हे वर्णन चालू [illegible] " [illegible] आहे, तो कसला आहे ते आपल्या [illegible] "

सुग्रीव म्हणाला, " रघुपते! [illegible] म्हणाला की, [illegible] कोणी अंगद म्हणाला की, [illegible] ते छिद्र पडले ते प्रकट [illegible]

प्रभु म्हणाले, " [illegible] आहे. [illegible] " [illegible] म्हणाले की, ' प्रभु [illegible] स्थानिकाच तो काळा [illegible] आहे! " १२ (क)

सुजाण [illegible] ते वचन ऐकून [illegible] दक्षिण दिशेकडे नजर टाकली व ते बोलू लागले. १२ (ख)

" बिभीषणा, [illegible] चमकत आहेत. [illegible] [illegible] नाही म्हणजे बरे! "

" छे, छे! कृपाळा! [illegible] मंदिर आहे. तिथे जलसा चालू असून [illegible] आहे.



छत्र मेघडंबर सिर धारी । सोइ जनु जलद घटा अति कारी ॥
मंदोदरी श्रवन ताटंका । सोइ प्रभु जनु दामिनी दमंका ॥
बाजहिं ताल मृदंग अनूपा । सोइ रव मधुर सुनहु सुरभूपा ॥
प्रभु मुसुकान समुझि अभिमाना । चाप चढ़ाइ बान संधाना ॥

दो ०—छत्र मुकुट ताटंक तब हते एकहीं बान ।
सब कें देखत महि परे मरमु न कोऊ जान ॥ १३ (क) ॥
अस कौतुक करि राम सर प्रबिसेउ आइ निषंग ।
रावन सभा ससंक सब देखि महा रसभंग ॥ १३ (ख) ॥

चौ० —कंप न भूमि न मरुत बिसेषा । अस्त्र सस्त्र कछु नयन न देखा ॥
सोचहिं सब निज हृदय मझारी । असगुन भयउ भयंकर भारी ॥
दसमुख देखि सभा भय पाई । बिहसि बचन कह जुगुति बनाई ॥
सिरउ गिरे संतत सुभ जाही । मुकुट परे कस असगुन ताही ॥
सयन करहु निज निज गृह जाई । गवने भवन सकल सिर नाई ॥
मंदोदरी सोच उर बसेऊ । जब ते श्रवनपूर महि खसेऊ ॥

" रावणाच्या मस्तकावर जे मेघडंबरी छत्र आहे. तीच जणू काळीकभिन्न मेघांची मोठी फळी उठलेली दिसत आहेत; आणि रावणाच्या सन्निध बसलेल्या मंदोदरी राणीच्या कानातील रत्नाची कर्णफुले तिच्या मानेच्या हालचालीबरोबर चमकली की, विजांचा लखलखाट झाल्याचा भास होतो. हे सुरश्रेष्ठा ! त्या मजलसीत, टाळ, मृदंग इत्यादी वाद्यांचा एकदम उठलेला जो गंभीर आवाज उठत आहे, तोच आपणाला मेघगर्जनेचा आभास उत्पन्न करतो. "

विभीषणाचे हे भाषण चालू असताच प्रभूचा रावणाच्या विलक्षण अभिमानाच्या कल्पनेने स्मितपूर्वक एक विचार कायम झाला व धनुष्य सज्ज होऊन त्यावर एक बाणही चढला.

त्या अमोघ बाणाने नेम धरून कशी मौज केली पाहा. त्याने रावणाचे छत्र, मुकुट व मंदोदरीचे कर्णफूल उडवले व ही अलौकिक कामगिरी एका क्षणात करून तो परत येऊन रामभात्यात शिरला !

सर्वांच्या डोळ्यासमोर जलसा अगदी भररंगात असता ही घटना कशी घडली, यांचे रहस्य कोणालाच कळले नाही. १३ (क)

परंतु असा एकाएकी महारस भंग झालेला पाहून सर्वच सभा भयभीत झाली. १३ (ख)

सर्वच सभ्य लोकांना, तो अत्यंत भयंकर असा अपशकुन वाटून त्यांच्या मनाला चटका लागला. त्यांचे चेहरे भीतीने काळे ठिक्कर पडून आपापल्या मनात ते विचारात गर्क झाले. त्यांना वाटले, कुठे भूकंप झाला नाही की एखादे महान वादळही सुटले नाही, बरे एखाद्या अस्त्र-शस्त्राचा हा प्रभाव म्हणावा तर कोणालाच काही पाहावयास मिळाले नाही !

सर्वच सभासदांची तोंडे भीतीने काळवंडलेली पाहून, फड मारून नेण्यासाठी तो प्रथम मोठ्याने हसला; आणि मोठ्या युक्तीने त्याने भाषण केले, ' अहो ! काय घाबरलात ! ज्याची मस्तके गळूनसुद्धा अपशकुन न होता, या रावणाला सदासर्वदा शुभच झाले, त्याच्या मस्तकावरचा नुसता मुकुट पडल्याने अपशकुन होतो होय ! काही काळजीचे कारण नाही. खुशाल आपापल्या घरी जाऊन निजा. "

एवढी आज्ञा मिळताच, सर्वांनी रावणापुढे मस्तक नमवून रस्ता सुधारला.

परंतु कर्णातील सौभाग्यभूषण जमिनीवर खचून पडल्यापासून मंदोदरीच्या चित्ताचे मात्र चिंतेने पाणी

सजल नयन कह जुग कर जोरी । सुनहु प्रानपति बिनती मोरी ॥
कंत राम बिरोध परिहरहू । जानि मनुज जनि हठ मन धरहू ॥

दो० — बिस्वरूप रघुबंस मनि करहु बचन बिस्वासु ।
लोक कल्पना बेद कर अंग अंग प्रति जासु ॥ १४ ॥

चौ० — पद पाताल सीस अज धामा । अपर लोक अँग अँग बिश्रामा ॥
भृकुटि बिलास भयंकर काला । नयन दिवाकर कच घन माला ॥
जासु घ्रान अस्विनीकुमारा । निसि अरु दिवस निमेष अपारा ॥
श्रवन दिसा दस बेद बखानी । मारुत स्वास निगम निज बानी ॥
अधर लोभ जम दसन कराला । माया हास बाहु दिगपाला ॥
आनन अनल अंबुपति जीहा । उतपति पालन प्रलय समीहा ॥
रोम राजि अष्टादस भारा । अस्थि सैल सरिता नस जारा ॥
उदर उदधि अधगो जातना । जगमय प्रभु का बहु कलपना ॥

दो० — अहंकार सिव बुद्धि अज मन ससि चित्त महान ।
मनुज बास सचराचर रूप राम भगवान ॥ १५ क ॥
अस बिचारि सुनु प्रानपति प्रभु सन बयरु बिहाइ ।
प्रीति करहु रघुबीर पद मम अहिवात न जाइ ॥ १५ ख ॥

. . . . .

पाणी होऊन गेले. [illegible] दोन्ही हात [illegible] माझी थोडी विनंती [illegible] अहितकारी आहे. [illegible] प्रत्येक अंगाच्या ठिकाणी [illegible]."

"[illegible] निवासस्थाने [illegible] सूर्य हाच डोळा; [illegible] उघडझाप होय. [illegible] पासून निर्माण झाले [illegible]."

"[illegible] वरुण जिव्हेच्या ठिकाणी [illegible] वनस्पती [illegible] अखंड चाहात [illegible] या त्याच्या [illegible] प्रभूने सर्व जगाला व्यापून टाकले आहे!

"शिव त्याचा अहंकार, ब्रह्मदेव बुद्धी, [illegible] विराट देह [illegible] आहे. [illegible] अता हे आपणाला कळेल की [illegible] वास त्याच्यात आहे. १५ (क).

हा विचार करून [illegible] प्रेम करा. हे [illegible] १५ (ख).

चौ० – बिहँसा नारि बचन सुनि काना । अहो मोह महिमा बलवाना ।।
नारि सुभाउ सत्य सब कहहीं । अवगुन आठ सदा उर रहहीं ।।
साहस अनृत चपलता माया । भय अबिबेक असौच अदाया ।।
रिपु कर रूप सकल तैं गावा । अति बिसाल भय मोहि सुनावा ।।
सो सब प्रिया सहज बस मोरें । समुझि परा प्रसाद अब तोरें ।।
जानिउँ प्रिया तोरि चतुराई । एहि बिधि कहहु मोरि प्रभुताई ।।
तव बतकही गूढ़ मृगलोचनि । समुझत सुखद सुनत भय मोचनि ।।
मंदोदरि मन महुँ अस ठयऊ । पियहि काल बस मतिभ्रम भयऊ ।।

दो० – एहि बिधि करत बिनोद बहु प्रात प्रगट दसकंध ।
सहज असंक लंकपति सभाँ गयउ मद अंध ।। १६ (क) ।।

सो० – फूलइ फरइ न बेत जदपि सुधा बरषहिं जलद ।
मूरुख हृदयँ न चेत जौं गुर मिलहिं बिरंचि सम ।। १६ (ख) ।।

चौ० – इहाँ प्रात जागे रघुराई । पूछा मत सब सचिव बोलाई ।।
कहहु बेगि का करिअ उपाई । जामवंत कह पद सिरु नाई ।।

मंदोदरीने अगदी अंतःकरणापासून कळवळून भाषण केले; परंतु त्याचा रावणावर काय परिणाम झाला? तिचे भाषण संपताच तो मोठ्याने एकवेळ खदाखदा हसला आणि म्हणतो काय, " अहो ! मोहाचा केवढा जबरदस्त प्रभाव आहे हा ? स्त्री-स्वभावाचे कवी वर्णन करतात ते खरेच ! त्यांच्या हृदयात आठ अवगुणांचे नित्य वास्तव्य असते, यात शंकाच नाही. ते अवगुण म्हणजे साहस, खोटेपणा, ममता, अस्थिर बुद्धी, भेदरटपणा, अपवित्रता, अडाणीपणा, निर्दयता; आणि त्यामुळेच माझ्या शत्रूच्या मोठेपणाचे एवढे लांबलचक वर्णन करून मला फार मोठे भय घालण्याचा प्रयत्न तू करत आहेस !

" परंतु प्रिये ! तू जे शत्रूचे हे मोठे रूप वर्णन केलेस ते सर्व चराचर विश्व मला वश झालेले आहे, हे केवळ तुझ्या कृपेनेच आज माझ्या ध्यानात आले ! खरोखर, प्रिये ! तुझी चतुरता काय वर्णन करावी ? माझ्याच मोठेपणाचे तू अशाप्रकारे आज वर्णन केलेस ! हे मृगलोचनी तुझी वाणी फार गूढ आहे, तिचा एवढा खोल अर्थ कळल्यानंतर केवढा आनंद होतो ? पण वरवर विचार केला तर तेच तुझे भाषण भीती उत्पन्न करते ! "

आपल्या पतीचे हे बरळणे ऐकून तो कालवश झाल्याने त्याच्या बुद्धीला चांगलाच भ्रम झालेला आहे, हे मंदोदरीला आता पूर्णपणे कळून चुकले.

वर वर्णन केलेल्या नमुन्याची थट्टा-मस्करी करत असता बाहेर फटफटीत झालेले पाहिले व स्वभावतःच निर्भय असणारा दशकंठ लंकापती मदांध होऊन सभेत गेला. १६ (क)

यावरून एक सिद्धान्त पटतो की, मेघांनी जरी प्रत्यक्ष अमृताची वृष्टी केली तरी वेताला कधी फुले आणि फळे येणार नाहीत; त्याचप्रमाणे जरी ब्रह्मदेवासारखे गुरुजी येऊन शिकवू लागले तरी गाळीव मूर्खाला अक्कल येण्याची आशा नको ! १६ (ख)

असो; आता आपला रघुनाथाकडे जाऊन काय चालले ते पाहू या. ते पाहा अगदी प्रातःकाळीच उठून रघुराज आपल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत काही महत्त्वाची चर्चा करण्यात गुंतले आहेत. ऐका, प्रभू प्रश्न विचारत आहेत, " बंधूंनो ! आता यापुढे काय उपाय करावा, ते लवकर सुचवा म्हणजे त्याची तत्काळ अम्मलबजावणी करू. "

हे ऐकताच सर्वांत वृद्ध जांबवान उठला, त्याने श्रीरामचरणी नमन केले आणि म्हणाला, " हे सर्वज्ञ !

सुनु सर्बग्य सकल उर बासी। बुधि बल तेज धर्म गुन रासी॥
मंत्र कहउँ निज मति अनुसारा। दूत पठाइअ [illegible]॥
नीक मंत्र सब के मन माना। अंगद सन कह [illegible]॥
बालितनय बुधि बल गुन धामा। लंका जाहु तात मम कामा॥
बहुत बुझाइ तुम्हहि का कहऊँ। परम चतुर मैं जानत अहऊँ॥
काजु हमार तासु हित होई। रिपु सन करेहु बतकही सोई॥

सो०— प्रभु अग्या धरि सीस चरन बंदि अंगद उठेउ।
सोइ गुन सागर ईस राम कृपा जा पर करहु॥ १७ (क)॥
स्वयंसिद्ध सब काज नाथ मोहि आदरु दियउ।
अस बिचारि जुबराज तन पुलकित हरषित हियउ॥ १७ (ख)॥

चौ०— बंदि चरन उर धरि प्रभुताई। अंगद चलेउ सबहि सिरु नाई॥
प्रभु प्रताप उर सहज असंका। रन बाँकुरा बालिसुत बंका॥
पुर पैठत रावन कर बेटा। खेलत रहा सो होइ गै भेंटा॥
बातहिं बात करष बढ़ि आई। जुगल अतुल बल पुनि तरुनाई॥

आपण सर्वांच्याच हृदयात [illegible]. [illegible] बुद्धी, बल, तेज, [illegible] सद्गुण [illegible]. तथापि आपण विचारले म्हणून [illegible] बुद्धि[illegible] [illegible]. [illegible] वालिकुमार अंगदाला प्रथम दूत म्हणून [illegible]."

"अगदी [illegible]! [illegible]." [illegible] जाहीर करताच. [illegible] अंगदा [illegible]! [illegible] सद्गुणांची [illegible] आहेस [illegible]! [illegible] [illegible] असल्यामुळे अधिक [illegible] नाही. [illegible] अर्थाच भाग [illegible]."

[illegible] तसेच या [illegible]. [illegible] रामकार्याही त्याचसाठी [illegible] आणि [illegible] टाकून अंगद [illegible] आहे.

[illegible] म्हणाला. "[illegible]." १७ (ख)

याचवेळी [illegible] असूनही मला [illegible] [illegible]! १८ (क)

त्यानंतर पुन: [illegible] नमन करून अंगद [illegible].

वालिकुमार [illegible] प्रभुप्रतापाने असंख्य [illegible]!

त्याची लंकेत [illegible] गाठ पडली. [illegible] रावणाच्या पुत्राने मोठ्या

तेहि अंगद कहुँ लात उठाई । गहि पद पटकेउ भूमि भवाँई ।।
निसिचर निकर देखि भट भारी । जहँ तहँ चले न सकहिं पुकारी ।।
एक एक सन मरमु न कहहीं । समुझि तासु बध चुप करि रहहीं ।।
भयउ कोलाहल नगर मझारी । आवा कपि लंका जेहिं जारी ।।
अब धौं कहा करिहि करतारा । अति सभीत करहिं बिचारा ।।
बिनु पूछें मगु देहिं दिखाई । जेहि बिलोक सोइ जाइ सुखाई ।।

दो०—गयउ सभा दरबार तब सुमिरि राम पद कंज ।
सिंह ठवनि इत उत चितव बीर बल पुंज ।। १८ ।।

चौ०—तुरत निसाचर एक पठावा । समाचार रावनहि जनावा ।।
सुनत बिहँसि बोला दससीसा । आनहु बोलि कहाँ कर कीसा ।।
आयसु पाइ दूत बहु धाए । कपिकुंजरहि बोलि लै आए ।।
अंगद दीख दसानन बैसें । सहित प्रान कज्जलगिरि जैसें ।।
भुजा बिटप सिर सृंग समाना । रोमावली लता जनु नाना ।।
मुख नासिका नयन अरु काना । गिरि कंदरा खोह अनुमाना ।।

दिमाखाने लाथ मारण्यासाठी पाय उचलल्याबरोबर, तोच पाय धरून त्याला गरगर फिरवला आणि जमिनीवर आपटून ठार केला !

लंकापतीच्या पुत्राला मारणारा हा कोणी तरी जबरदस्त शूर वीर आहे, असे पाहून राक्षसांच्या झुंडीच्या झुंडी, कोणताही आरडा ओरडा न करता मुकाट्याने पसार झाल्या.

हे कसे घडले याविषयी एक अवाक्षर काढण्याचीही कोणाची छाती होईना. रावणाचा बेटाच खलास झाला, हे समजून जाताना सर्वच गप्प होते.

अंगदाला येताना पाहून सर्व लंकानगरीत एकच कल्लोळ उडाला, " अरे आला! ज्याने लंका जाळली तोच कपी पुनः आला ! ! " सर्व जण अत्यंत भयभीत होऊन विचार करू लागले की, आता पुनः विधात्याने काय करायचे ठरवले आहे ते काहीच कळत नाही !

अंगद समोरून येताच घाबरून गेल्यामुळे, त्याने न विचारताच रावणाच्या सभेकडे जाणारा रस्ता ते दाखवू लागले व तितक्यातूनही जर एखाद्याकडे त्याने पाहिलेच तर त्याला आपले मरणच ओढवले असे वाटून त्याचे तोंड काळवंडून जाई.

अशा रीतीने युवराजाची स्वारी एकदाची रावणसभाद्वाराजवळ येऊन दाखल झाली. रामचरणकमलांचे स्मरण करून तो धीर, वीर, बलराशी सिंहाच्या ढबीने समोवार पाहू लागला. १८

नंतर एका राक्षसाला, ' रावणाला जाऊन कळव ' म्हणून सांगताच तो धावत आत गेला आणि त्याने ' एक कपी आपल्या भेटीस आला आहे ', असे वृत्त कळवले.

त्याबरोबर दशशीश मोठ्याने खेकाळला व म्हणाला, " कुठला कीश ? कोण असेल त्याला आणा आत."

आज्ञा मिळताच पुष्कळ दूत धावले व त्यांनी त्या कपिकुंजराला रावणसभेत आणले.

आत जाऊन अंगदाने पाहिले तो एक जिवंत काजळाचा पर्वतच बसला आहे असे रावणाला बघून त्याला वाटले. त्याचे वीस हात म्हणजे त्या पर्वतावरील वृक्ष, आणि त्याची दहा तोंडे ही त्या पर्वतावरील उंच शिखरे ! त्याच्या अंगावरील मोठे वाढलेले केस हाच तेथील लता व वेली. तोंडे, नाके, डोळे आणि कान यांची भगदाडे या सर्व पर्वतावरील गुहा आणि दऱ्या !

गयउ सभा मन नेकु न मुरा। बालितनय अतिबल बाँकुरा॥
उठे सभासद कपि कहुँ देखी। रावन उर भा क्रोध बिसेषी॥

दो०—जथा मत्त गज जूथ महुँ पंचानन चलि जाइ।
राम प्रताप सुमिरि मन बैठ सभाँ सिरु नाइ॥ १९॥

चौ०—कह दसकंठ कवन तैं बंदर। मैं रघुबीर दूत दसकंधर॥
मम जनकहि तोहि रही मिताई। तव हित कारन आयउँ भाई॥
उत्तम कुल पुलस्ति कर नाती। सिव बिरंचि पूजेहु बहु भाँती॥
बर पायहु कीन्हेहु सब काजा। जीतेहु लोकपाल सब राजा॥
नृप अभिमान मोह बस किंबा। हरि आनिहु सीता जगदंबा॥
अब सुभ कहा सुनहु तुम्ह मोरा। सब अपराध छमिहि प्रभु तोरा॥
दसन गहहु तृन कंठ कुठारी। परिजन सहित संग निज नारी॥
सादर जनकसुता करि आगें। एहि बिधि चलहु सकल भय त्यागें॥

दो०—प्रनतपाल [illegible] त्राहि त्राहि अब मोहि।
आरत गिरा सुनत प्रभु अभय करैगो तोहि॥ २०॥

चौ०—रे कपिपोत बोलु संभारी। मूढ़ न जानेहि मोहि सुरारी॥

अत्यंत जबर असा वीर [illegible] नाही, तो सभेत सरळ शिरला !

त्याला पाहताच सर्व सभासद [illegible] उठून उभे राहिले. [illegible] परिणाम झाला; पण त्यामुळे रावण मात्र मनात [illegible].

माजलेल्या हत्तींच्या कळपात [illegible] सिंहाने [illegible] हृदयात चालू ठेवून, [illegible] तो आसनावर बसला. १९

क्रोध प्रज्वलित [illegible] "अरे वानरा ! तू कोण आहेस ?"

"हे दशकंधरा ! मी रघुवीराचा दूत आहे. [illegible] तुमचे कुळ किती [illegible] ! [illegible] आणि [illegible] अनेक प्रकारे तुम्ही पूजा केलीत; आणि वर मिळविले. [illegible] जिंकलेत.

"तथापि राजाच्या [illegible] ! [illegible] वाईट गोष्ट तू केलीस ! [illegible] तसे केल्याने प्रभू दयाळू आहेत. [illegible] कुऱ्हाडी बांधा, इष्टमित्र [illegible] पुढे करून स्त्रिया मागून [illegible].

"चरणदर्शन होताच, [illegible] 'हे [illegible] ! हे रघुवंशमणे ! आता माझे रक्षण करा, माझे रक्षण करा.'

"अशी तुमची अत्यंत आर्त वाणी ऐकताच प्रभू तुम्हाला निर्भय करतील." २०

[illegible] रावणाच्या अंगाची लाही लाही झाली ! तो एकदम [illegible] ओरडला.

"अरे ए वानराच्या पोरा ! [illegible] मी [illegible] आहे हे [illegible] वाटते !

कहु निज नाम जनक कर भाई । केहि नातें मानिऐ मिताई ।।
अंगद नाम बालि कर बेटा । तासों कबहुँ भई ही भेटा ।।
अंगद बचन सुनत सकुचाना । रहा बालि बानर मैं जाना ।।
अंगद तहीं बालि कर बालक । उपजेहु बंस अनल कुल घालक ।।
गर्भ न गयहु ब्यर्थ तुम्ह जायहु । निज मुख तापस दूत कहायहु ।।
अब कहु कुसल बालि कहँ अहई । बिहँसि बचन तब अंगद कहई ।।
दिन दस गएँ बालि पहिं जाई । बूझेहु कुसल सखा उर लाई ।।
राम बिरोध कुसल जसि होई । सो सब तोहि सुनाइहि सोई ।।
सुनु सठ भेद होइ मन ताकें । श्रीरघुबीर हृदय नहिं जाकें ।।

दो० – हम कुल घालक सत्य तुम्ह कुल पालक दससीस ।
अंधउ बधिर न अस कहहिं नयन कान तव बीस ।। २१ ।।

चौ० – सिव बिरंचि सुर मुनि समुदाई । चाहत जासु चरन सेवकाई ।।
तासु दूत होइ हम कुल बोरा । अइसिहुँ मति उर बिहर न तोरा ।।
सुनि कठोर बानी कपि केरी । कहत दसानन नयन तरेरी ।।
खल तव कठिन बचन सब सहऊँ । नीति धर्म मैं जानत अहऊँ ।।
कह कपि धर्मसीलता तोरी । हमहुँ सुनी कृत पर त्रिय चोरी ।।
देखी नयन दूत रखवारी । बूड़ि न मरहु धर्म ब्रतधारी ।।

अगोदर आपले व आपल्या बापाचे नाव-गाव सांगितल्याशिवाय तुझ्या या मैत्रीचे नाते माझ्या कसे ध्यानी यावे?"

"माझे नाव अंगद. वालीचा मी मुलगा. माझ्या वडिलांची व तुमची कधी भेट झाली होती काय?"

अंगदाच्या या उत्तराने रावण खजिल झाला. काही बोलणे भाग, म्हणून म्हणतो,

"वाली? हो, आठवले; होता, एक वाली नावाचा वानर होता! आणि अंगदा! त्याच वालीचा बालक तूच का? अरेरे! कुळाचा घात करणारा, कुलांगार मुलगा उपजलास! व्यर्थ जन्माला आलास! यापेक्षा गर्भातूनच गळून गेला असतास तर फार चांगले झाले असते, कारण आपल्या तोंडाने स्वतःला त्या तापसाचा दूत म्हणवीत आहेस! कुठे आहे तो वाली? खुशाल आहे ना?"

हे शब्द ऐकून अंगदाला हसू आवरेना! तो म्हणाला, "दहा दिवस गेले म्हणजे तूच वालीकडे जा; आणि वालीला भेटून स्वतःच कुशल विचार हं! रामाशी वैर,केल्याने कसे कुशल राहते ते तो तुला स्वानुभवाने उत्तम सांगेल. शठा! ऐक; ज्याच्या हृदयात श्रीरघुवीराचे वास्तव्य नसते त्याच्याच मनात अशा प्रकारे बुताला फितूर करून घेण्याची वासना उत्पन्न होते.

"अरे दशशीरा! आम्ही कुलघातकी असे म्हणणारे तुम्ही मात्र कुळाचे पातक करणारे? अरे, आंधळे आणि बहिरेसुद्धा असे म्हणणार नाहीत आणि तुला तर वीस डोळे आणि वीस कान आहेत!" २१

"शंकर आणि ब्रह्मदेव यांच्यासह सर्व देव तसेच मुनीसमुदाय हे ज्यांच्या चरणांची सेवा करू इच्छितात, त्यांचा दूत होऊन आम्ही कुळ बुडवले; अशी बुद्धी तुझ्या ज्या हृदयात उत्पन्न झाली ते अजून फुटले कसे नाही?

कपीचे हे कठोर भाषण ऐकून दशाननाने आपले वीस डोळे वटारले व तो म्हणाला, "रे खला! हे तुझे सर्व कठोर भाषण मी सहन करतो याचे कारण मला नीती व धर्माचे पालन करण्याचे ज्ञान आहे!"

हे शब्द रावणाच्या तोंडून बाहेर पडण्याचा अवकाश की अंगदाने त्याचे बिंग चव्हाट्यावर आणलेच; तो म्हणाला, "तुझी धर्मशीलता ना? –हो, इतरांच्याप्रमाणे आमच्याही कानी आलीच आहे की, तू दुसऱ्याच्या बायका चोरून आणतोस! आणि दूतांचे रक्षण करण्याची तुझी नीतीतर आम्ही प्रत्यक्षच पाहिलेली आहे! अरे! अशी धर्मनीती पाळत बसण्यापेक्षा कुठेतरी पाण्यात बुडून का नाही मरत?

कान नाक बिनु भगिनि निहारी। छमा कीन्हि तुम्ह धर्म बिचारी॥
धर्मसीलता तव जग जागी। पावा दरसु हमहुँ बड़भागी॥

दो० – जनि जल्पसि जड़ जंतु कपि सठ बिलोकु मम बाहु।
लोकपाल बल बिपुल ससि ग्रसन हेतु सब राहु॥ २८ (क)॥
पुनि नभ सर मम कर निकर कमलन्हि पर करि बास।
सोभत भयउ मराल इव संभु सहित कैलास॥ २८ (ख)॥

चौ० – तुम्हरे कटक माझ सुनु अंगद। मो सन भिरिहि कवन जोधा बद॥
तव प्रभु नारि बिरहँ बलहीना। अनुज तासु दुख दुखी मलीना॥
तुम्ह सुग्रीव कूलद्रुम दोऊ। अनुज हमार भीरु अति सोऊ॥
जामवंत मंत्री अति बूढ़ा। सो कि होइ अब समरारूढ़ा॥
सिल्पि कर्म जानहिं नल नीला। है कपि एक महा बलसीला॥
आवा प्रथम नगरु जेहिं जारा। सुनत बचन कह बालिकुमारा॥
सत्य बचन कहु निसिचर नाहा। साँचेहुँ कीस कीन्ह पुर दाहा॥
रावन नगर अल्प कपि दहई। सुनि अस बचन सत्य को कहई॥

"तुझ्या बहिणीचे नाक व कान कापलेले प्रत्यक्ष पाहूनही [illegible] करताच ना?"

"केवढी तुमची ही धर्मशीलता! सर्व त्रैलोक्यात दुमदुमत राहिली आहे. आमचे मोठे भाग्य म्हणून अशा पुरुषाचे आज आम्हाला दर्शन झाले!"

अशा प्रकारे अंगद सर्व [illegible] फजिती [illegible] तो चिडून म्हणतो.

"हे जड जंतु कपी! उगीच बडबड करू नकोस! सठा! अरे माझ्या या वीस बाहूंकडे पाहा. लोकपालांच्या अफाट [illegible] ते सर्व राहूच आहेत." २८ (क)

शिवाय, आकाशातील [illegible] कैलास पर्वतच जणू हंसाप्रमाणे सुंदर दिसत होता!! २८ (ख)

"अरे प्रचंड माझे बाहुबल! अरे अंगदा! [illegible] तुमच्या सैन्यात [illegible] बोल!

"तुझा स्वामी स्त्रीविरहाने दुर्बल बनलेला; आणि त्याचा धाकटा भाऊ आपला प्रिय बंधू दुःखित म्हणून त्याच्या दुःखाने [illegible] दीन बनलेला! तुम्ही आणि सुग्रीव हे दोघे आणि [illegible] हितरात बनलेले आहात! आमचा धाकटा [illegible]! जांबवंत मंत्री आता [illegible] असल्याने तो लढणार हे [illegible] आहे. नल आणि नील [illegible] काम करणार!—

"हां! एक महाबलशाली कपी मात्र हनुमान आहे खरा! [illegible] लंकेत येऊन [illegible] लंकानगरी जाळली तो!"

ते शेवटचे वाक्य ऐकताच अंगदाने विचारले, "हे निशिचरनाथ! [illegible] म्हणता. खरेच एका कपीने तुमची लंका जाळली? अहो! [illegible] विश्वविजयी योद्ध्याची एवढी नगरी! आणि एका क्षुद्र कपीने ती जाळली! हे म्हणणे [illegible] खरे तरी [illegible]?



जो अति सुभट सराहेहु रावन । सो सुग्रीव केर लघु धावन ।।
चलइ बहुत सो बीर न होई । पठवा खबरि लेन हम सोई ।।

दो ० –सत्य नगरु कपि जारेउ बिनु प्रभु आयसु पाइ ।
फिरि न गयउ सुग्रीव पहिं तेहिं भय रहा लुकाइ ।। २३ (क) ।।
सत्य कहहि दसकंठ सब मोहि न सुनि कछु कोह ।
कोउ न हमारें कटक अस तो सन लरत जो सोह ।। २३ (ख) ।।
प्रीति बिरोध समान सन करिअ नीति असि आहि ।
जौं मृगपति बध मेडुकन्हि भलकि कहइ कोउ ताहि ।। २३ (ग) ।।
जद्यपि लघुता राम कहुँ तोहि बधें बड़ दोष ।
तदपि कठिन दसकंठ सुनु छत्र जाति कर रोष ।। २३ (घ) ।।
बक्र उक्ति धनु बचन सर हृदय दहेउ रिपु कीस ।
प्रतिउत्तर सड़सिन्ह मनहु काढ़त भट दससीस ।। २३ (ङ) ।।
हँसि बोलेउ दसमौलि तब कपि कर बड़ गुन एक ।
जो प्रतिपालइ तासु हित करइ उपाय अनेक ।। २३ (च) ।।

चौ० – धन्य कीस जो निज प्रभु काजा । जहँ तहँ नाचइ परिहरि लाजा ।।
नाचि कूदि करि लोग रिझाई । पति हित करइ धर्म निपुनाई ।।
अंगद स्वामिभक्त तव जाती । प्रभु गुन कस न कहसि एहि भाँती ।।

" आणि तू एवढा महापराक्रमी उत्तम योद्धा रावण असून, ज्याला पहिल्या प्रतीचा योद्धा म्हणून प्रशस्तिपत्र अर्पण करतोस, तो तर सुग्रीवाचा एक सामान्य दूत ! पुष्कळ प्रवास करण्याने का कोणी शूर ठरतो ? आम्ही तर त्याला नुसती बातमी काढण्यासाठीच पाठविला होता. अशा स्थितीत प्रभूची आज्ञा नसताना त्याने खरोखरच नगरी जाळल्याने तो परत सुग्रीवाकडे न जाता भीतीने कुठेतरी गुप्त ठिकाणी का लपून बसला त्याचे कोडे आज उलगडले ! " २३ (क)

" बाकी दशकंठा ! तू म्हणालास ते सर्व खरेच असल्याने ते ऐकून मला राग मुळीच आला नाही; आमच्या सैन्यात असा कोणीही योद्धा नाही की, तुझ्याशी लढाई करणे त्याला शोभेल. " २३ (ख)

" प्रेम किंवा वैर करावयाचे ते आपल्या बरोबरीच्याशी करावयाचे अशी नीती आहे; सिंहाने जर एखाद्या बेडकाला मारला तर काय त्या मृगराजाला कोणी बरे म्हणेल ? " २३ (ग)

" त्याचप्रमाणे तुझा वध करण्यात रामाला कमीपणाच असून, शिवाय अत्यंत दोष आहे ! तथापि, अरे दशकंठा ! ऐकून ठेव; क्षत्रिय जातीचा राग फार कठीण असतो ! " २३ (घ)

याप्रमाणे अंगदाच्या वक्रोक्तिरूपी धनुष्यातून वचनबाण सुटले. त्याने शत्रूच्या हृदयाला आगीचे चटके बसू लागले. तेव्हा योद्धा दशाननाने प्रत्युत्तर सांडस हातात घेऊन, ते हृदयात रुतलेले वचनबाण उपसून टाकण्याचा प्रयत्न केला. २३ (ङ)

दहा तोंडाचा तो रावण तेव्हा प्रथम हसला व म्हणाला, " या कपीचा एक मोठा गुण वाखाणण्यासारखा आहे खास ! जो त्याचा प्रतिपाळ करतो, त्याच्या हितासाठी नाना उपाय कसे करीत आहे पाहा तर ! " २३ (च)

" लाजलज्जा कोळून प्यालेला हा कीश वाटेल त्या ठिकाणी आपल्या स्वामीच्या कार्यासाठी कसा नाचत आहे ! खरोखर धन्य आहे याची ! नाचून, बागडून लोकरंजन करावे व आपल्या मालकाची तुंबडी भरावी, हा या जातीचा धर्म ! आणि त्याचे पालन हा उत्तम रीतीने करत आहे. अरे अंगदा ! तुमची माकडाची जात खरोखरच स्वामिभक्त; मग आपल्या स्वामीच्या गुणांचे तू वर्णन न केलेस तरच नवल !

मैं गुन गाहक परम सुजाना। तव कटु रटनि करउँ नहिं काना॥
कह कपि तव गुन गाहकताई। सत्य पवनसुत मोहि सुनाई॥
बन बिधंसि सुत बधि पुर जारा। तदपि न तेहिं कछु कृत अपकारा॥
सोइ बिचारि तव प्रकृति सुहाई। दसकंधर मैं कीन्हि ढिठाई॥
देखेउँ आइ जो कछु कपि भाषा। तुम्हरें लाज न रोष न माखा॥
जौं असि मति पितु खाए कीसा। कहि अस बचन हँसा दससीसा॥
पितहि खाइ खातेउँ पुनि तोही। अबहीं समुझि परा कछु मोही॥
बालि बिमल जस भाजन जानी। हतउँ न तोहि अधम अभिमानी॥
कहु रावन रावन जग केते। मैं निज श्रवन सुने सुनु जेते॥
बलिहि जितन एक गयउ पताला। राखेउ बाँधि सिसुन्ह हय साला॥
खेलहिं बालक मारहिं जाई। दया लागि बलि दीन्ह छोड़ाई॥
एक बहोरि सहसभुज देखा। धाइ धरा जिमि जंतु बिसेषा॥
कौतुक लागि भवन लै आवा। सो पुलस्ति मुनि जाइ छोड़ावा॥

दो०—एक कहत मोहि सकुच अति रहा बालि की काँख।
इन्ह महुँ रावन तैं कवन सत्य बदहि तजि माख॥ २४॥

"अरे मी [illegible]!"

"[illegible]! अरेरे [illegible]! [illegible] कडूनच तो मला समजली. [illegible] टाकली. तरीसुद्धा [illegible]."

"हे दशकंठा! [illegible] धाडस केले! [illegible] आलाच. [illegible] चेव, क्रोध अगर [illegible] नाही!"

हे [illegible] "अरे [illegible]!" असे [illegible] रावण म्हणाला.

"होय!" अंगद म्हणाला. [illegible] काही आठवल्याने [illegible] कसे [illegible]!

"अरे [illegible]! असे ते जाऊ दे. रावणा! [illegible] केला.

"एक रावण [illegible] बांधून! मग [illegible] केला. शेवटी बलीला दया [illegible] केले.

"एक रावण [illegible] जाऊन [illegible]!

"हे दशानना! [illegible] टाकला होता.

"[illegible]!" २४

चौ० — सुनु सठ सोइ रावन बलसीला । हरगिरि जान जासु भुज लीला ॥
जानउँ उमापति जासु सुराई । पूजेउँ जेहि सिर सुमन चढ़ाई ॥
सिर सरोज निज करन्हि उतारी । पूजेउँ अमित बार त्रिपुरारी ॥
भुज विक्रम जानहिं दिगपाला । सठ अजहूँ जिन्ह कें उर साला ॥
जानहिं दिग्गज उर कठिनाई । जब जब भिरउँ जाइ बरिआई ॥
जिन्ह के दसन कराल न फूटे । उर लागत मूलक इव टूटे ॥
जासु चलत डोलति इमि धरनी । चढ़त मत्त गज जिमि लघु तरनी ॥
सोइ रावन जग बिदित प्रतापी । सुनेहि न श्रवन अलीक प्रलापी ॥

दो० — तेहि रावन कहँ लघु कहसि नर कर करसि बखान ।
रे कपि बर्बर खर्ब खल अब जाना तव ग्यान ॥ २५ ॥

चौ० — सुनि अंगद सकोप कह बानी । बोलु सँभारि अधम अभिमानी ॥
सहसबाहु भुज गहन अपारा । दहन अनल सम जासु कुठारा ॥
जासु परसु सागर खर धारा । बूड़े नृप अगनित बहु बारा ॥
तासु गर्ब जेहि देखत भागा । सो नर क्यों दससीस अभागा ॥
राम मनुज कस रे सठ बंगा । धन्वी कामु नदी पुनि गंगा ॥
पसु सुरधेनु कल्पतरु रूखा । अन्न दान अरु रस पीयूषा ॥

[या प्रश्नाने मात्र रावण चारीमुंड्या चीत झाला; परंतु भरसभेत आपल्याच मुखाने आपली बेअब्रू करून घेण्याइतका तो मूर्ख नाही. अशा वेळी बचावाच्या तीन ढाली त्याच्याजवळ आहेत. १) दिक्पाल विजय. २) कैलास उचलणे. ३) शंकराना शिरे वाहणे. यावेळी सर्वांत मोठी ढाल तो पुढे करत तो म्हणतो,—गू. चं.]

" रे शठा ! ऐक; हा तो बलशाली रावण आहे की, ज्याच्या बाहूंची लीला कैलास व शंकर जाणतात. तसेच आपली शिरकमले वाहून ज्या सदाशिवाची त्याने पूजा केली, ते उमापती याचे शौर्य जाणून आहेत. ज्याने आपल्याच हाताने आपली मस्तके छाटून अगणित वेळा त्रिपुरारीचे पूजन केले तोच हा रावण ! तसेच ज्याच्या बाहूंचा पराक्रम दिक्पालांना इतका जाणवला आहे की, अजून त्यांच्या उरात त्या प्रसंगाची धडकी भरलेली आहे ! तोच हा रावण, समजलास ! ज्या ज्या वेळी मी दिग्गजांवर चालून गेलो, तेव्हा माझी वज्रासारखी छाती त्यांना भिडताच त्यांचे विक्राळ दात माझ्या छातीत तर रुतले नाहीतच, उलट त्या छातीच्या ठोकरीबरोबर मुळ्याप्रमाणे त्या दातांचे तुकडे उडाले ! एखादा मदोन्मत हत्ती छोट्या नावेत चढताना ती जशी डोलू लागते, तशीच ज्याच्या चालीने पृथ्वी डोलते, असा महान प्रतापी; जगविख्यात रावण, व्यर्थ वटवट करणाऱ्या ! तुझ्या कानी कधी आला आहे की नाही ?

" अशा त्या रावणाला तू क्षुद्र समजतोस आणि एका माणसाचे गुणगान करतोस ! रे जंगली तुच्छ कपी ! अरे खला ! आता समजली तुझी अक्कल ! " २५

श्रीरामचंद्राला साधा मानव म्हणताच अंगद भडकला, " अरे जड अभिमानी ! तोंड आवरून बोल. सहस्रार्जुनाच्या हजार हातरूपी वृक्षांना दावानलाप्रमाणे जाळणारा जो परशू याच परशूरूपी सागराच्या धारेत अगणित राजे पुष्कळवेळा बुडाले, असा परशू धारण करणारे परशुरामसुद्धा ज्याला पाहताच हतबल झाले, अरे दशमौली, अरे अभागी ! त्याला तू सामान्य मानव समजतोस ?

" अरे मूर्खा, शठा ! राम काय साधा मानव ? सर्व त्रैलोक्याला वश करणारा काम काय नुसता धनुर्धर ? शिव जिला शिरी धरतात, ती गंगा काय साधी नदी ? सर्व इच्छा पूर्ण करणारी कामधेनु काय साधारण पशू ? आणि कल्पतरूला काय क्षुद्र वृक्ष समजणार ? अन्नदान काय साधे दान, व मृताला संजीवन देणारे

बैनतेय खग अहि सहसानन। चिंतामनि पुनि उपल दसानन॥
सुनु मतिमंद लोक बैकुंठा। लाभ कि रघुपति भगति अकुंठा॥

दो० - सेन सहित तव मान मथि बन उजारि पुर जारि।
कस रे सठ हनुमान कपि गयउ जो तव सुत मारि॥ २६॥

चौ० - सुनु रावन परिहरि चतुराई। भजसि न कृपासिंधु रघुराई॥
जौं खल भएसि राम कर द्रोही। ब्रह्म रुद्र सक राखि न तोही॥
मूढ़ बृथा जनि मारसि गाला। राम बयर अस होइहि हाला॥
तव सिर निकर कपिन्ह के आगें। परिहहिं धरनि राम सर लागें॥
ते तव सिर कंदुक सम नाना। खेलिहहिं भालु कीस चौगाना॥
जबहिं समर कोपिहि रघुनायक। छुटिहहिं अति कराल बहु सायक॥
तब कि चलिहि अस गाल तुम्हारा। अस बिचारि भजु राम उदारा॥
सुनत बचन रावन परजरा। जरत महानल जनु घृत परा॥

दो० - कुंभकरन अस बंधु मम सुत प्रसिद्ध सक्रारि।
मोर पराक्रम नहिं सुनेहि जितेउँ चराचर झारि॥ २७॥

चौ० - सठ साखामृग जोरि सहाई। बाँधा सिंधु इहइ प्रभुताई॥
नाघहिं खग अनेक बारीसा। सूर न होहिं ते सुनु सब कीसा॥
मम भुज सागर बल जल पूरा। जहँ बूड़े बहु सुर नर सूरा॥

अमृत [illegible] कश्चित् [illegible] देऊ [illegible] गडु दे: अरे शठा! [illegible] आवडत्या [illegible] मुलखाला केला, [illegible] ” २६

“ अरे [illegible] खल! [illegible] देव! [illegible] दुर्दशा होईल, [illegible] धरणीवर [illegible] रणक्षेत्रावर [illegible] तेथे तुझ्या [illegible] भडकलेल्या अग्नीत [illegible] जळफळाट झाला.

“ अरे शठा! [illegible] सर्व चराचर सृष्टी जिंकली [illegible] ” २७

“ अरे, [illegible] अनेक वर्षी अनेक [illegible] भरलेला माझा [illegible] आहेत!

बीस पयोदि अगाध अपारा । को अस बीर जो पाइहि पारा ॥
दिगपालन्ह मैं नीर भरावा । भूप सुजस खल मोहि सुनावा ॥
जौं पै समर सुभट तव नाथा । पुनि पुनि कहसि जासु गुन गाथा ॥
तौ बसीठ पठवत केहि काजा । रिपु सन प्रीति करत नहिं लाजा ॥
हरगिरि मथन निरखु मम बाहू । पुनि सठ कपि निज प्रभुहि सराहू ॥

दो ० —सूर कवन रावन सरिस स्वकर काटि जेहिं सीस ।
हुने अनल अति हरष बहु बार साखि गौरीस ॥ २८ ॥

चौ ० —जरत बिलोकेउँ जबहिं कपाला । बिधि के लिखे अंक निज भाला ॥
नर कें कर आपन बध बाँची । हसेउँ जानि बिधि गिरा असाँची ॥
सोउ मन समुझि त्रास नहिं मोरें । लिखा बिरंचि जरठ मति भोरें ॥
आन बीर बल सठ मम आगें । पुनि पुनि कहसि लाज पति त्यागें ॥
कह अंगद सलज्ज जग माहीं । रावन तोहि समान कोउ नाहीं ॥
लाजवंत तव सहज सुभाऊ । निज मुख निज गुन कहसि न काऊ ॥
सिर अरु सैल कथा चित रही । ताते बार बीस तैं कही ॥

असे अपार व अगाध वीस सागर तरून पैलतीरास जाण्याची धमक असणारा कोण वीर आहे ते बोल!

" मी दिक्पालांना पाणी भरायला लावले; आणि दुष्टा ! मला तू एका मानव राजाची सत्कीर्ती सांगत बसलास ?

बरे, ते असो; ज्याचे गुण तू पुनः पुन्हा वर्णन केलेस तो तुझा नाथ जर मोठा बलाढ्य आहे, तर मग तुला दूत म्हणून कशाला पाठवले ? अशा प्रकारे शत्रूशी प्रीती करण्यास त्याला लाज नाही वाटत ? तुला एकदाच सांगून ठेवतो की, कैलास पर्वताला घुसळणाऱ्या या माझ्या बाहूकडे निरखून पाहा, आणि मग तुझ्या स्वामीच्या सामर्थ्याचे गोडवे गाण्याची तुला इच्छा राहते काय ते पाहू !

" अरे वस्तुस्थिती अशी आहे की, रावणासारखा शूर दुसरा कोण आहे ? आपल्या हाताने ज्याने स्वतःची मस्तके संतोषाने छाटून समाधानाने त्यांचे हवन अनेक वेळा अग्नीत केले; आणि याला प्रत्यक्ष गौरीशच साक्ष देण्यास तयार आहेत. " २८

" त्यावेळी एक मौज झाली. माझी शिरे अग्नीत जळत असता ब्रह्मदेवाने माझ्या कपाळावर लिहून ठेवलेले मला अनायासे वाचावयास मिळाले. त्यात माणसाच्या हातून माझे मरण आहे, असे विधिलिखित मी वाचले. आणि मला हसू अनावर झाले. माझ्यासारख्या एवढ्या बलाढ्य दशाननाला एका माणसाने मारणे शक्यच कसे ? त्या लेखाच्या स्मरणाने मला भीतीतर कधीच वाटत नाही; पण ती विधिवाणी खरी असणे शक्य नाही, अशीच खात्री वाटते. कारण लिहिणारा ब्रह्मदेव फार म्हातारा असून, त्याच्या बुद्धीला भ्रम झाला आहे !

" अशा स्थितीत दुसऱ्या एखाद्या वीराचे बल माझ्यापुढे लाज व मुर्वत सोडून किती वाखाणत बसला आहेस ? "

" छे ! छे ! लज्जेचा सर्व मक्ता महाराज आपल्याकडेच ! सर्व जगात तुमच्याएवढा लाजाळू कोणीच नाही ! स्वभावतः विनयी मनुष्य आपल्या मुखाने स्वतःचे गुणगान कधीच करत नसतो, यावरून नाही का तुमच्या भिडस्तपणाची खूण पटत ?

" आपली शिरे तोडली व कैलास पर्वत हालवला एवढ्याच दोन गोष्टी आपल्या सहज ध्यानी आल्या म्हणून त्या आतापर्यंत वीस वेळा सांगितल्यास !

सो भुजबल राखेहु उर घाली। जीतेहु सहसबाहु बलि बाली॥
सुनु मतिमंद देहि अब पूरा। काटें सीस कि होइअ सूरा॥
इंद्रजालि कहुँ कहिअ न बीरा। काटइ निज कर सकल सरीरा॥

दो० — जरहिं पतंग मोह बस भार बहहिं खर बृंद।
ते नहिं सूर कहावहिं समुझि देखु मतिमंद॥ [illegible] ॥

चौ० — अब जनि बतबढ़ाव खल करही। सुनु मम बचन मान परिहरही॥
दसमुख मैं न बसीठीं आयउँ। अस बिचारि रघुबीर पठायउँ॥
बार बार अस कहइ कृपाला। नहिं गजारि जसु बधें सृकाला॥
मन महुँ समुझि बचन प्रभु केरे। सहेउँ कठोर बचन सठ तेरे॥
नाहिं त करि मुख भंजन तोरा। लै जातेउँ सीतहि बरजोरा॥
जानेउँ तव बल अधम सुरारी। सूनें हरि आनिहि परनारी॥
तैं निसिचर पति गर्ब बहूता। मैं रघुपति सेवक कर दूता॥
जौं न राम अपमानहि डरऊँ। तोहि देखत अस कौतुक करऊँ॥

दो० — तोहि पटकि महि सेन हति चौपट करि तव गाउँ।
तव जुबतिन्ह समेत सठ जनकसुतहि लै जाउँ॥ ३० ॥

" [illegible] रावणा, सहस्रबाहु व बळी [illegible] आपल्या हृदयात [illegible] ठेवले [illegible]! [illegible] ना.

" अरे मठ्ठ डोक्याच्या! [illegible] कोणी शूर होतो?

" इंद्रजाल [illegible] म्हणून त्याची गणना शूरात कोणी करतो काय.

" तसेच [illegible] आणि [illegible] तांडा [illegible]! " २९.

" म्हणून, अरे मतिमंदा! [illegible] घमेंड सोडून मी काय [illegible].

" हे दशमुखा! [illegible] आलेलो नाही. [illegible]

[illegible]

कृपाळू रघुवीराचे [illegible] कठोर शब्द मी निमूटपणे ऐकून घेत आहे. नाहितर, [illegible] करून केव्हाच सीतामाईला घेऊन गेलो असतो.

" अरे अधम सुरारी! [illegible] गोष्टीवरूनच तुझ्या सामर्थ्याची [illegible] कल्पना आली.

तू राक्षसांचा राजा म्हणून [illegible] सेवकाचाही एक क्षुद्र चाकर आहे. [illegible] डोळ्यासमोर असा खेळ करून [illegible] तुझ्या सर्व सैन्याचा [illegible] परत न्यायची " ३०

चौ० – जौं अस करौं तदपि न बड़ाई । मुएहि बधें नहिं कछु मनुसाई ॥
कौल कामबस कृपिन बिमूढ़ा । अति दरिद्र अजसी अति बूढ़ा ॥
सदा रोगबस संतत क्रोधी । बिष्नु बिमुख श्रुति संत बिरोधी ॥
तनु पोषक निंदक अघ खानी । जीवत सव सम चौदह प्रानी ॥
अस बिचारी खल बधउँ न तोही । अब जनि रिस उपजावसि मोही ॥
सुनि सकोप कह निसिचर नाथा । अधर दसन दसि मीजत हाथा ॥
रे कपि अधम मरन अब चहसी । छोटे बदन बात बड़ि कहसी ॥
कटु जल्पसि जड़ कपि बल जाकें । बल प्रताप बुधि तेज न ताकें ॥

दो० – अगुन अमान जानि तेहि दीन्ह पिता बनबास ।
सो दुख अरु जुबती बिरह पुनि निसि दिन मम त्रास ॥ ३१ (क) ॥

जिन्ह के बल कर गर्ब तोहि अइसे मनुज अनेक ।
खाहिं निसाचर दिवस निसि मूढ़ समुझु तजि टेक ॥ ३१ (ख) ॥

चौ० – जब तेहिं कीन्हि राम कै निंदा । क्रोधवंत अति भयउ कपिंदा ॥
हरि हर निंदा सुनइ जो काना । होइ पाप गोघात समाना ॥

"तथापि मी असे केले म्हणून त्यात स्वसामर्थ्याची फुशारकी मारण्यासारखे काहीच नाही. तुझ्यासारख्या जिवंत मढ्याला मारण्यात माझा पुरुषार्थ तो काय ?

"जिवंत असून मेलेले कोण ते सांगू का ? ऐक : शाक्तपंथाचा आश्रय करून वाममार्गाचे आचरण करणारा. दोन : विषयोपभोगासाठी भक्ती व लाज सोडलेला. तीन : अतिकृपण. चार : गाळीव मूर्ख. पाच : अठराविश्वेदरिद्री. सहा : अपकृत्याने तोंडाला काळोखी फासलेला. सात : ज्याच्या गोवऱ्या मसणात गेल्या आहेत इतका वृद्ध. आठ : रोगाने कायमचा अंथरुण धरलेला. नऊ : सदोदित संतापाने लाल झालेला. दहा : विष्णूला शत्रू मानणारा. अकरा : वेदाच्या आज्ञा न मानणारा. बारा : संताना छळणारा. तेरा : शरीराचे चोचले करण्यातच सर्वस्वी शक्ती खर्च करणारा. आणि परनिंदेत गढून गेलेला असे हे चौदा प्रकारचे लोक केवळ पापांची खाणच असून सचेतन प्रेतासारखे समजावेत !

"हे जाणून, अरे खला ! तुला ठार मारण्याची इच्छाच होत नाही. मात्र आता भलती बडबड करून मला संताप आणू नकोस !"

अंगदाचे हे जळजळीत भाषण ऐकून रावण लाल झाला. आपले दहा ओठ चावीत आणि वीस हात चोळत तो ओरडला, अरे— ए अधम माकडा ! तुझे आता मात्र मरण जवळ आलेले दिसते; म्हणूनच लहान तोंडी मोठा घास घेण्याची तुला ही दुर्बुद्धी आठवलेली दिसते.

"अरे, ज्याच्या जोरावर तुझी ही कर्णकटू वाचाळता सुरू आहे, त्याच्याच जवळचे मुळी प्रताप, बल व तेज व बुध्दी यांचे दिवाळे निघाले आहे.

"त्याची नालायकी व शेळपटपणा पाहूनच बापाने त्याला वनवासासाठी हाकून दिला. एका बाजूला ते दुःख आणि त्यातच तरुण पत्नीचा विरह ! शिवाय रात्रंदिवस माझी भीती ! ३१ (क)

"असल्या माणसाच्या पाठबळावर तुला एवढा गर्व झाला आहे, पण हे तुला माहीत नाही की, त्याच्या सारखी अनेक माणसे माझे निशाचर रात्रंदिवस खाऊन गट्ट करीत आहेत. म्हणून हे अविवेकी मूर्खा ! हे समजून भलता हट्ट सोड. ३१ (ख)

याप्रमाणे जेव्हा प्रभू श्रीरामचंद्राची निंदा दशाननाने केली त्याबरोबर कपींद्राचा क्रोधानळ एकदम भडकला ! कारण हरी किंवा हर यांची निंदा जे शांतपणे ऐकतात, त्यांना गोहत्येसारखी पातके लागतात.

कटकटान कपिकुंजर भारी । दुहु भुजदंड तमकि महि मारी ॥
डोलत धरनि सभासद खसे । चले भाजि भय मारुत ग्रसे ॥
गिरत सँभारि उठा दसकंधर । भूतल परे मुकुट अति सुंदर ॥
कछु तेहिं लै निज सिरन्हि सँवारे । कछु अंगद प्रभु पास पबारे ॥
आवत मुकुट देखि कपि भागे । दिनहीं लूक परन बिधि लागे ॥
की रावन करि कोप चलाए । कुलिस चारि आवत अति धाए ॥
कह प्रभु हँसि जनि हृदयँ डेराहू । लूक न असनि केतु नहिं राहू ॥
ए किरीट दसकंधर केरे । आवत बालितनय के प्रेरे ॥

दो० — तरकि पवनसुत कर गहे आनि धरे प्रभु पास ।
कौतुक देखहिं भालु कपि दिनकर सरिस प्रकास ॥ ३२ (क) ॥
उहाँ सकोपि दसानन सब सन कहत रिसाइ ।
धरहु कपिहि धरि मारहु सुनि अंगद मुसुकाइ ॥ ३२ (ख) ॥

त्यामुळे [illegible] संतापाच्या भरात [illegible] जमिनीवर दोन्ही हात मारले.

त्याबरोबर काय चमत्कार झाला ! —

सगळी धरणी डोलून [illegible] जमिनीवर [illegible] लागले !

दशकंठाच्या [illegible] शिकस्तीने आपला [illegible] झाला.

[illegible] मुकुट [illegible].

ते [illegible] चार दैदीप्यमान मुकुट [illegible] !

आकाशातून [illegible] पळत ओरडले.

" हाय, हाय ! [illegible] ! "

दुसरे म्हणाले, " [illegible] आहेत. [illegible] आपल्यावर [illegible] ! "

रामरायांनी [illegible] राहू-केतू नव्हेत. [illegible] मुकुट आहेत ! "

त्याबरोबर, पवनसुताने [illegible] प्रभुचरणी आणून ठेवले.

ते मुकुट [illegible] आणि सूर्याच्या [illegible] !

मग काय, ते कौतुक [illegible] ठिकाणी [illegible] उडाली. ३२ (क)

सर्वांच्यापुढे [illegible] उडाली. तो चवताळून मोठ्याने ओरडला, " [illegible] ! "

[illegible] ३२ (ख)



चौ० – एहि बधि बेगि सुभट सब धावहु । खाहु भालु कपि जहँ जहँ पावहु ।।
मर्कटहीन करहु महि जाई । जिअत धरहु तापस द्वौ भाई ।।
पुनि सकोप बोलेउ जुबराजा । गाल बजावत तोहि न लाजा ।।
मरु गर काटि निलज कुलघाती । बल बिलोकि बिहरति नहिं छाती ।।
रे त्रिय चोर कुमारग गामी । खल मल रासि मंदमति कामी ।।
सन्यपात जल्पसि दुर्बादा । भएसि कालबस खल मनुजादा ।।
याको फलु पावहिगो आगें । बानर भालु चपेटन्हि लागें ।।
रामु मनुज बोलत असि बानी । गिरहिं न तव रसना अभिमानी ।।
गिरिहहिं रसना संसय नाहीं । सिरन्हि समेत समर महि माहीं ।।

सो० – सो नर क्यों दसकंध बालि बध्यो जेहिं एक सर ।
बीसहुँ लोचन अंध धिग तव जन्म कुजाति जड़ ।। ३३ (क) ।।
तव सोनित कीं प्यास तृषित राम सायक निकर ।
तजउँ तोहि तेहि त्रास कटु जल्पक निसिचर अधम ।। ३३ (ख) ।।

चौ० – मैं तव दसन तोरिबे लायक । आयसु मोहि न दीन्ह रघुनायक ।।
असि रिस होति दसउ मुख तोरौं । लंका गहि समुद्र महँ बोरौं ।।

रावणाचे ओरडणे सुरूच होते, " सुभटानो ! याला नेस्तनाबूद करून धावत जा; आणि जिथे जिथे वानर व अस्वले दिसतील ती सर्व एका झपाट्यात खाऊन गट्ट करा. जा. जा लवकर. या पृथ्वीवर अगदी औषधालाही माकड अगर वानर शिल्लक ठेवू नका. आणि हे काम संपताच त्या दोन तापसांना जिवंत पकडा."

दशाननाच्या या वायफळ वटवटीने अंगद पुनः खवळून म्हणाला, " व्यर्थ वल्गना करतोस, तुला लाज कशी वाटत नाही ?

" वास्तविक एवढा जाहीर अपमान झाल्यानंतर, हे कुळघातक्या ! तू आपला स्वतःचाच गळा कापून घेऊन मरावयास पाहिजे. निर्लज्जा ! अरे माझ्या नुसत्या जमिनीवरील एका चपराकीचा हा विलक्षण परिणाम झालेला पाहून तुझी छाती रक्त कशी ओकायला लागली नाही ?

" बायकाचोर, कुमार्गगामी, दुष्ट, पापराशी, मंदबुध्दी, कामी ! काय काय म्हणावे तुला ?

" सन्निपात ज्वरात वात झाल्याप्रमाणे तू अद्वातद्वा तोंडाला येतील ते शब्द बोलत आहेस !

" खल, नरभक्षक ! तुझे दिवस आता भरलेच म्हणून समज. वानर आणि भल्ल यांच्या थपडा तुझ्या थोबाडात बसू लागल्यानंतर या बडबडीचे फळ तुझ्या पदरात पडणार आहे.

" अरे नीचा ! श्रीरामाला माणूस म्हणत असता तुझ्या दाही जिभा, हे जड अभिमानी ! झडून कशा पडल्या नाहीत ? सर्व जिभाच काय त्यांच्यासह सर्व तोंडेच गळून पडण्याची वेळ आता लांब नाही !

" अरे दशशीर्षा ! एका बाणात ज्यांनी वालीसारख्या अतुल्य वीराला जमीनदोस्त केला तो मनुष्य होय ? अरे कुजानी, वीस डोळे असूनही आंधळा बनलास ! अरे जड, धिक्कार असो तुझ्या जन्माला ! ३३ (क)

" श्रीरामचंद्रांच्या शरसमूहाला आता फार तहान लागलेली असून, तुझ्या रक्तानेच ती आता शमणार आहे. आणि त्यांची निराशा होईल या भीतीनेच हे कठोर बडबडणाऱ्या निशाचरा ! तुला मी जिवंत सोडतो. " ३३ (ख)

अंगदाला कमालीची चीड आली. तो दात-ओठ खाऊन पुनः बोलू लागला, " तुझे दात पाडून घशात घालण्यास मला मुळीच वेळ लागणार नाही, पण काय करू रे, रघुनायकाची मला तशी आज्ञा नाही !

" असा संताप, संताप झाला आहे, आणि असे वाटते की, तुझी दहा तोंडे तोडून सगळी लंकानगरीच समुद्रात गाडून टाकावी !

गर्जहिं कुल समान तव लंका । मथन मध्य तुम्ह जैतु अनेका ।
मैं वानर फल खात न बारा । आयसु दीन्ह न राम उदारा ।
जुगुति सुनत रावन मुसुकाई । मूढ़ सिखिहि कहँ बहुत झुठाई ।।
बालि न कबहुँ गाल अस मारा । मिलि तपसिन्ह तें भएसि लबारा ।।
साँचेहुँ मैं लबार भुज बीहा । जौं न उपारिउँ तव दस जीहा ।।
समुझि राम प्रताप कपि कोपा । सभा माझ पन करि पद रोपा ।।
जौं मम चरन सकसि सठ टारी । फिरहिं रामु सीता मैं हारी ।
सुनहु सुभट सब कह दससीसा । पद गहि धरनि पछारहु कीसा ।।
इंद्रजीत आदिक बलवाना । हरषि उठे जहँ तहँ भट नाना ।।
झपटहिं करि बल बिपुल उपाई । पद न टरइ बैठहिं सिरु नाई ।।
पुनि उठि झपटहिं सुर आराती । टरइ न कीस चरन एहि भाँती ।।
पुरुष कुजोगी जिमि उरगारी । मोह बिटप नहिं सकहिं उपारी ।।

" [illegible] गहणाऱ्या [illegible] तुम्ही. [illegible] !

" [illegible] ."

अंगद आपल्या [illegible] ण्याची नेमी [illegible] . [illegible] तात्पर्यानच तुम्ही ही [illegible] !"

[illegible] उमळला

" अरे [illegible] मी लबाड हे [illegible] ."

[illegible] बटबटीचा [illegible] त्याने आपला [illegible] .

" अरे [illegible] ."

हे अंगदाच्या [illegible] वाटले. या [illegible] संकट टळले. [illegible] .

" अहो [illegible] !"

हे [illegible] उठले. अंगदाच्या [illegible] आणि कटाची केल्या. [illegible] जागी जाऊन [illegible] .

नाना [illegible] कपीचा [illegible] बिलकुल [illegible] !

हे [illegible]

दो ०— कोटिन्ह मेघनाद सम सुभट उठे हरषाइ ।
झपटहिं टरै न कपि चरन पुनि बैठहिं सिर नाइ ॥ ३४ (क) ॥
भूमि न छाँड़त कपि चरन देखत रिपु मद भाग ।
कोटि बिघ्न ते संत कर मन जिमि नीति न त्याग ॥ ३४ (ख) ॥

चौ ०— कपि बल देखि सकल हियँ हारे । उठा आपु कपि कें परचारे ॥
गहत चरन कह बालिकुमारा । मम पद गहें न तोर उबारा ॥
गहसि न राम चरन सठ जाई । सुनत फिरा मन अति सकुचाई ॥
भयउ तेजहत श्री सब गई । मध्य दिवस जिमि ससि सोहई ॥
सिंघासन बैठेउ सिर नाई । मानहुँ संपति सकल गँवाई ॥
जगदातमा प्रानपति रामा । तासु बिमुख किमि लह बिश्रामा ॥
उमा राम की भृकुटि बिलासा । होइ बिस्व पुनि पावइ नासा ॥
तृन ते कुलिस कुलिस तृन करई । तासु दूत पन कहु किमि टरई ॥
पुनि कपि कही नीति बिधि नाना । मान न ताहि कालु निअराना ॥

अनेकांनी प्रयत्न करून जे यश मिळवले नाही ते आपण आता खास मिळवणार, अशा आनंदाने मेघनादासारखे कोट्यवधी गाजलेले वीर दंड थोपटून उठले आणि पराकाष्ठा करून धडपडले, तथापि पाय काही हालेना. तेव्हा मानभंग होऊन त्यांनी आपल्या माना खाली नमवल्या. ३४ (क)

काय मौज झाली पाहा भूमी कपीचा पाय सोडीना म्हणून शत्रूच्या घमेंडीने मात्र आपला पाय काढला.
अहो, कोट्यवधी विघ्ने आली म्हणून संतांच्या मनाने कधी तरी रीती सोडली आहे काय? ३४(ख)

अंगदाचे अतुल्य सामर्थ्य पाहून सर्वांची मस्ती संपली. अखेर कपीने प्रत्यक्ष रावणाला आव्हान दिले!
मग करतो काय? उठला आणि त्याने धरला वालिसुताचा पाय!

तेव्हा तिरस्काराने हसून अंगद म्हणाला, "अरे मूर्खा! रामाचे चरण धरण्याच्या ऐवजी माझे पाय धरून तुझा उद्धार होणार नाही!"

हे ऐकून तो निशाचरांचा राजा लाजला आणि सिंहासनाकडे परत निघून गेला.

या सर्व घटनेचा जो व्हायचा तोच परिणाम झाला. रावणाचे तेज जाऊन तो काळाठिक्कर पडला. त्याची सर्व शोभा लयाला जाऊन भर दुपारच्या चंद्राप्रमाणे तो फिका झाला!

सर्व मस्तके अंगदाच्या चरणी नमवून तो पुनः सिंहासनावर बसला, तेव्हा असे वाटले की, त्याच्या सर्व संपत्तीचे दिवाळेच वाजले!

आणि यात नवल काहीच नाही; कारण राम जगाचा आत्मा व सर्वांच्या प्राणाचे ते स्वामी आहेत; त्यांच्याशी वैर करणारास विसावा कसा मिळणार?

शंकर पार्वतीला सांगतात, "हे उमे! श्रीरामचंद्राच्या नुसत्या भिवईच्या हालचालीने विश्वांचा जन्म होतो किंवा ती खलास होतात!

"त्यांच्या मनात आल्यास ते वज्राला कस्पटाइतके क्षुद्र बनवतील किंवा त्याच्या उलट साध्या गवताच्या काडीत वज्राचे सामर्थ्य भरतील.

"अशांच्या दूताने जर पण केला तर तो खोटा कसा ठरणार?

"इतके झाले व रावणाची पुरी खोड मोडली तरीही अंगदाने जाण्यापूर्वी रावणाला नीतीचा पुष्कळ उपदेश केला; परंतु रावणाचा काळच जवळ येऊन ठेपल्यामुळे तो उपदेश त्याला मानवणे शक्यच नव्हते.

रिपु मद मथि प्रभु सुजसु सुनायो। यह कहि चल्यो बालि नृप जायो॥
हतौं न खेत खेलाइ खेलाई। तोहि अबहिं का करौं बड़ाई॥
प्रथमहिं तासु तनय कपि मारा। सो सुनि रावन भयउ दुखारा॥
जातुधान अंगद पन देखी। भय ब्याकुल सब लागे बिसेषी॥

दो० — रिपु बल धरषि हरषि कपि बालितनय बल पुंज।
पुलक सरीर नयन जल गहे राम पद कंज॥ ३५ (क)॥
साँझ जानि दसकंधर भवन गयउ बिलखाइ।
मंदोदरीं रावनहि बहुरि कहा समुझाइ॥ ३५ (ख)॥

चौ० — कंत समुझि मन तजहु कुमतिही। सोह न समर तुम्हहि रघुपतिही॥
रामानुज लघु रेख खचाई। सोउ नहिं नाघेहु असि मनुसाई॥
पिय तुम्ह ताहि जितब संग्रामा। जाके दूत केर यह कामा॥
कौतुक सिंधु नाघि तव लंका। आयउ कपि केहरी असंका॥
रखवारे हति बिपिन उजारा। देखत तोहि अच्छ तेहिं मारा॥
जारि सकल पुर कीन्हेसि छारा। कहाँ रहा बल गर्ब तुम्हारा॥

याप्रमाणे शत्रूचा [illegible]
वालिनृपाचा पुत्र [illegible]

तेव्हां [illegible]
जेथपर्यंत [illegible]

[illegible]

[illegible]
रावणाच्या [illegible]

त्याचप्रमाणे [illegible]
सीतेने [illegible]

[illegible]
हनुमान [illegible]

[illegible]

[illegible]
उपदेशाच्या [illegible]
समजावून [illegible]

" प्रियकर, [illegible]
शोभेल काय! [illegible]
ती तुम्हाला [illegible]

" [illegible]
आहेत, त्याला [illegible]

" [illegible]
भीती वाटली काय! [illegible]
अशोकवनाचा [illegible]
जाळून [illegible]

अब पति मृषा गाल जनि मारहु । मोर कहा कछु हृदयँ बिचारहु ।।
पति रघुपतिहि नृपति जनि मानहु । अग जग नाथ अतुलबल जानहु ।।
बान प्रताप जान मारीचा । तासु कहा नहिं मानेहि नीचा ।।
जनक सभाँ अगनित भूपाला । रहे तुम्हउ बल अतुल बिसाला ।।
भंजि धनुष जानकी बिआही । तब संग्राम जितेहु किन ताही ।।
सुरपति सुत जानइ बल थोरा । राखा जिअत आँखि गहि फोरा ।।
सूपनखा कै गति तुम्ह देखी । तदपि हृदयँ नहिं लाज बिसेषी ।।

दो० – बधि बिराध खरदूषनहि लीलाँ हत्यो कबंध ।
बालि एक सर मार्‍यो तेहि जानहु दसकंध ।। ३६ ।।

चौ० – जेहिं जलनाथ बँधायउ हेला । उतरे प्रभु दल सहित सुबेला ।।
कारुनीक दिनकर कुल केतू । दूत पठायउ तव हित हेतू ।।
सभा माझ जेहिं तव बल मथा । करि बरूथ महुँ मृगपति जथा ।।
अंगद हनुमान अनुचर जाके । रन बाँकुरे बीर अति बाँके ।।

नाथ ! उगीच तोंडाच्या वल्गना करण्याचे आता बंद करून शांतपणाने मी काय सांगते याचा विचार करा.

" प्राणपती ! रघुपतीला सामान्य राजा समजू नका. तो चराचर सृष्टीचा स्वामी असून, त्याच्या सामर्थ्याला सीमाच नाही, हे ध्यानात घ्या.

" त्याच्या एका नुसत्या बोथट बाणाने आपली काय धूळधाण उडाली याची बरोबर कल्पना मारीचाला आली होती; परंतु +नीचा ! त्याच्या हितोपदेशालाही तू लाथाडलेस !

" बरे, तुम्हाला सीताच पाहिजे होती, तर तुमच्या अलोट सामर्थ्यासह तुम्ही धनुर्भंगाच्या प्रसंगी जनकाच्या सभेत होताच. मग ते शिवधनुष्य मोडून जेव्हा श्रीरामचंद्रानी जानकीला वरले तेव्हा युद्धात त्यांचा पराभव करून आणायची होती की तिला ! त्यावेळी तुमचा मोठा पराक्रम कुठे दिवे लावण्यात गुंतला होता ?

" इंद्राचा तो खुळा मुलगा जयंत असाच तुमच्याप्रमाणे रघुपतीचे सामर्थ्य क्षुद्र समजला ! काय परिणाम झाला ? श्रीराम दयाळू म्हणून जयंताला ठार केले नाही. त्यांनी काही शिक्षा पाहिजे म्हणून फक्त एकच डोळा फोडला!

" हे झाले त्या सुरपतिसुताचे, पण प्रत्यक्ष तुमच्या बहिणीची काय कमी दुर्दशा झाली ?

" भर दरबारात त्या शूर्पणखेचे-नाक-कान कापल्याने झालेले-विद्रूप तुम्ही पाहिलेच !

" इतके झाले म्हणून त्या मनाला थोडी तरी लाज वाटायची होती !

" अहो! विराध आणि खर दूषण यांच्या सारख्यांना ठार केले, ज्याने सहज लीलेने कबंध राक्षसाचा निःपात केला, (तुमच्या सारख्याला ज्याची भीती-) अशा वालीला नुसत्या एकाच बाणाने घायाळ केला, त्याच्या सामर्थ्याची अजूनही, एक सोडून दहा मस्तके असणाऱ्यालासुद्धा कल्पना येऊ नये ? ३६

" ज्यांनी केवळ खेळ म्हणून सागरावर सेतू बांधला. आपल्या सर्व सैन्यासह ज्यांनी सुवेल पर्वतावर येऊन तळ दिला, सूर्य वंशाचा प्रताप गाजविणारा ज्याचा कीर्तिरूप ध्वज आहे व जे कारुणिक आहेत. त्यांनी तुझे हित करावे याच हेतूने दूत पाठवला. पाहिले ना प्रत्यक्ष ? एखादा सिंह जसा हत्तीच्या कळपात घुसावा तसा अंगद बेधडक तुझ्या सभेत शिरला; आणि तुमच्या सर्वांच्या सामर्थ्याची घमेंड एकट्याने अगदी पुरेपूर जिरवली !

" अशा प्रकारचे, अंगद-हनुमंतासारखे रणझुंजार अत्यंत दुर्धर वीर ज्याच्या पायाचे दास आहेत, त्याला तुम्ही साधा मनुष्य मानता तरी कसे, हेच समजत नाही !

+ (पर स्त्रीहरणाचे नीच कृत्य करणाऱ्या !)

तेहि कहँ पिय पुनि पुनि नर कहहू। मुधा मान ममता मद बहहू॥
अहह कंत कृत राम बिरोधा। काल बिबस मन उपज न बोधा॥
काल दंड गहि काहु न मारा। हरइ धर्म बल बुद्धि बिचारा॥
निकट काल जेहि आवत साईं। तेहि भ्रम होइ तुम्हारिहि नाईं॥

दो० – दुइ सुत मरे दहेउ पुर अजहुँ पूर पिय देहु।
कृपासिंधु रघुनाथ भजि नाथ बिमल जसु लेहु॥ ३७॥

चौ० – नारि बचन सुनि बिसिख समाना। सभाँ गयउ उठि होत बिहाना॥
बैठ जाइ सिंघासन फूली। अति अभिमान त्रास सब भूली॥
इहाँ राम अंगदहि बोलावा। आइ चरन पंकज सिरु नावा॥
अति आदर समीप बैठारी। बोले बिहँसि कृपाल खरारी॥
बालितनय कौतुक अति मोही। तात सत्य कहु पूछउँ तोही॥
रावनु जातुधान कुल टीका। भुज बल अतुल जासु जग लीका॥
तासु मुकुट तुम्ह चारि चलाए। कहहु तात कवनी बिधि पाए॥
सुनु सर्बग्य प्रनत सुखकारी। मुकुट न होहिं भूप गुन चारी॥

" उठल्या [illegible] धर्मेदीचे दिले सर्व [illegible]

" [illegible] झाले. नाहीतर इतके [illegible] असे कसे झाले असते.

" हे [illegible] जवळ येऊन [illegible] काळाने [illegible]

" प्राणप्रिय ! [illegible] झाली ! आणि [illegible] शरण जाऊन शुद्ध [illegible]

हातांत [illegible]

[illegible]

[illegible] सिंहासनावर बसला.

इकडे [illegible] मस्तक टेकले.

त्यावेळेस [illegible] मोठ्याने हसून त्याला विचारले

" हे वालितनया ! [illegible] सर्व हकीकत [illegible] आहे असे [illegible] तरी कसे [illegible]



साम दान अरु दंड बिभेदा । नृप उर बसहिं नाथ कह बेदा ।।
नीति धर्म के चरन सुहाए । अस जियँ जानि नाथ पहिं आए ।।

दो ० – धर्महीन प्रभु पद बिमुख काल बिबस दससीस ।
तेहि परिहरि गुन आए सुनहु कोसलाधीस ।। ३८ (क) ।।
परम चतुरता श्रवन सुनि बिहँसे रामु उदार ।
समाचार पुनि सब कहे गढ़ के बालिकुमार ।। ३८ (ख) ।।

चौ ० – रिपु के समाचार जब पाए । राम सचिव सब निकट बोलाए ।।
लंका बाँके चारि दुआरा । केहि बिधि लागिअ करहु बिचारा ।।
तब कपीस रिच्छेस बिभीषन । सुमिरि हृदयँ दिनकर कुल भूषन ।।
करि बिचार तिन्ह मंत्र दृढ़ावा । चारि अनी कपि कटकु बनावा ।।
जथाजोग सेनापति कीन्हे । जूथप सकल बोलि तब लीन्हे ।।
प्रभु प्रताप कहि सब समुझाए । सुनि कपि सिंघनाद करि धाए ।।

यात आपली पुनः परीक्षा अप्रत्यक्षपणे घेतली जात आहे, एवढे ओळखण्याइतका युवराज चाणाक्ष असल्याने उत्तरा दाखल तो म्हणतो,

" हे सर्वज्ञा ! शरणागतावर कृपावृष्टी करणाऱ्या मेघा ! ते चार मुकुट नसून राजाचे चार गुण आहेत. साम, दान, दंड आणि भेद हे राज्याच्या ह्रदयात राहतात असे वेदातच सांगितले आहे.

" हे चार गुण म्हणजे नीतिधर्मांचे चार सुंदर चरणच आहेत आणि असा विचार करूनच रावणाचा धिःकार केल्यावर ते आपल्या पायाशी शरण आले आहेत.—

" दशानन काळाला पक्का वश झाला आहे; कारण त्याने धर्माचा आचार सोडला असून प्रभूच्या चरणाशी वैर मांडले आहे. हे समजून, कोसलाधीशा ! हे चारी गुण त्याला सोडून आपल्याकडे आले आहेत. " ३८ (क)

परत अंगदाच्या उत्तरातील हे परम चातुर्य पाहून उदार अशा श्रीरामचंद्राला हसू आवरेना !

नंतर वालिकुमाराने लंकेतील सर्व समाचार सविस्तर सांगितला. ३८ (ख)

शत्रूकडील आवश्यक तेवढी सर्व माहिती मिळाल्यावर आता युद्धाला सुरुवात करण्याशिवाय दुसरे काहीच कर्तव्य उरले नाही, अशी श्रीरामचंद्रांची खात्री झाली.

त्यानंतर त्यांनी लगेच आपल्या मंत्रिमंडळाची एक बैठक घेतली आणि लंकेच्या चार बिकट द्वारावर आक्रमण कसे करायचे ते ठरविण्यास सांगितले.

तेव्हा कपीश सुग्रीव, ऋक्षेश जांबवान, (लंकेश) बिभीषण यांनी सूर्यकुलभूषण श्रीरामप्रभूचे आपापल्या ह्रदयात स्मरण करून सर्वांनी विचारविनिमय केला.

अखेर सर्व वानर-सैन्याचे चार विभाग करावेत. प्रत्येक तुकडीवर योग्य अशा सेनापतीची नेमणूक करावी आणि नेमलेल्या सेनापतींना स्वकर्तव्याची बरोबर कल्पना देऊन शत्रूच्या राजधानीवर एकदम् चारी बाजूंनी हल्ला चढवावा, असा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

लगेच त्या ठरावाच्या अंमलबारीस सुरुवात होऊन त्या सर्व सेनापतींना प्रभूंचा प्रताप प्रथम सांगण्यात आला. त्यांच्या ह्रदयात पुढील कामगिरीचा स्वच्छ प्रकाश पडताच त्यांनी सिंहनाद केला व ते दौडत आपल्या तुकडीकडे निघून गेले.

त्या वानरवीरांच्या ठिकाणी शौर्याचा संचार होऊन बराच काळ लोटला होता. केव्हा एकदा युद्धाला सुरुवात होते, असे त्यांना होऊन गेले होते. त्यामुळे वरील आज्ञा मिळताच त्यांना उत्साहाचे भरते आले.

[illegible] राम [illegible] । [illegible] ॥
गर्जहिं तर्जहिं भालु कपीसा । जय [illegible] ॥
जानत परम दुर्ग अति लंका । प्रभु प्रताप कपि चले असंका ॥
घटाटोप करि चहुँ दिसि घेरी । मुखहिं निसान बजावहिं भेरी ॥

दो० — जयति राम जय लछिमन जय कपीस सुग्रीव ।
गर्जहिं सिंघनाद कपि भालु महा बल सींव ॥ [illegible] ॥

चौ० — लंकाँ भयउ कोलाहल भारी । सुना दसानन अति अहँकारी ॥
देखहु बनरन्ह केरि ढिठाई । बिहँसि निसाचर सेन बोलाई ॥
आए कीस काल के प्रेरे । छुधावंत सब निसिचर मेरे ॥
अस कहि अट्टहास सठ कीन्हा । गृह बैठें अहार बिधि दीन्हा ॥
सुभट सकल चारिहुँ दिसि जाहू । धरि धरि भालु कीस सब खाहू ॥
उमा रावनहि अस अभिमाना । जिमि टिट्टिभ खग सूत उताना ॥
चले निसाचर आयसु मागी । गहि कर भिंडिपाल बर साँगी ॥
तोमर मुद्गर परसु प्रचंडा । सूल कृपान परिघ गिरिखंडा ॥

त्यांनी श्रीरामचंद्र [illegible]

भल्लु आणि [illegible]

शत्रूच्या हृदयात [illegible]

लंकेत [illegible]

अमृतमुद्रा [illegible]

मेघांचा [illegible]

आणि या [illegible]

या [illegible]

भेदून जात. [illegible]

या [illegible]

हा हा [illegible]

दातीं तोंड [illegible]

[illegible]

सर्व [illegible]

[illegible]

[illegible] " [illegible]

" [illegible] "

असा त्याने [illegible]

' [illegible]

कोल्हेल [illegible]

[illegible]

आज्ञा केल्या.

[illegible]

राक्षसांनी [illegible]

जिमि अरुनोपल निकर निहारी । धावहिं सठ खग मांस अहारी ।।
चोंच भंग दुख तिन्हहि न सूझा । तिमि धाए मनुजाद अबूझा ।।

दो० – नानायुध सर चाप धर जातुधान बल बीर ।
कोट कँगूरन्हि चढ़ि गए कोटि कोटि रनधीर ।। ४० ।।

चौ० – कोट कँगूरन्हि सोहहिं कैसे । मेरु के सृंगनि जनु घन बैसे ।।
बाजहिं ढोल निसान जुझाऊ । सुनि धुनि होइ भटन्हि मन चाऊ ।।
बाजहिं भेरि नफीरि अपारा । सुनि कादर उर जाहिं दरारा ।।
देखिन्ह जाइ कपिन्ह के ठट्टा । अति बिसाल भालु सुभट्टा ।।
धावहिं गनहिं न अवघट घाटा । पर्बत फोरि करहि गहिं बाटा ।।
कटकटाहिं कोटिन्ह भट गर्जहिं । दसन ओठ काटहिं अति तर्जहिं ।।
उत रावन इत राम दोहाई । जयति जयति जय परी लराई ।।
निसिचर सिखर समूह ढहावहिं । कूदि धरहिं कपि फेरि चलावहिं ।।

मांसाहारी पक्षी लाल दगडांचे ढीग पाहून ते मांसच आहे, अशा कल्पनेने त्यावर धावत जाऊन जोरजोराने ते दगड चोचीने कुरतडू लागतात. आपल्या चोचीच्या ठिकऱ्या उडू लागून दुःख भोगावे लागणार याची त्यांना मुळीच जाणीव राहात नाही !

तसाच प्रकार यावेळी धावणाऱ्या या मूर्ख राक्षसांचा होता ! त्या कोट्यवधी बलवान राक्षसांनी हातात नानाप्रकारची आयुधे व धनुष्यबाण घेतले आणि ते रणझुंझार लंकानगरीच्या भोवती असणाऱ्या कोटाच्या बुरुजावर चढले. ४०

सुवर्णाचे रत्नखचित ते तट आणि त्याच्या बुरुजावर हे काळेकभिन्न राक्षस जेव्हा चढले, तेव्हा मेरू पर्वताच्या शिखरावर मेघांची दाटी झाल्याचाच भास होऊ लागला.

या राक्षसांनी लंकेच्या चारी बाजूस वानरसैन्याने गराडा घातलेला पाहिला. त्याचप्रमाणे त्यांच्या सैन्यातून वाजत असलेली तोंडी रणवाद्ये व तसेच जयजयकार ऐकले.

त्याबरोबर राक्षसांनी डंके वगैरे रणवाद्यांचा धडधडाट सुरू केला. तो ऐकून खरे जे रणशूर होते, त्यांचे बाहू स्फुरण पावू लागले.

परंतु भेरी, तुताऱ्या, शिंगे इत्यादी रणवाद्यांचा एकच तुमुळ असा आवाज होऊ लागताच जे भेदरट होते त्यांच्या अंगाला घाम सुटला व त्यांची छाती धडधडू लागली.

अशा घाबरलेल्या स्थितीत तटावरून खाली नजर टाकतात तो अत्यंत विशाल देहांच्या कपींच्या आणि रीसांच्या शूर वीरांच्या फौजा लढण्यास जय्यत तयार असल्याचे त्या भ्याड नरभक्षकांच्या नजरेस आले.

त्यांनी थोडा धीर धरून अधिक बारकाईने पाहिले तो या रीस व कपींच्या फौजांना डोंगरातील घाटाची अगर पहाडांची बिलकुल फिकीर दिसेना. पर्वत सबंधच उचलून त्याच्या ठिकऱ्या उडवतात व भराभर आपला रस्ता साफ करीत चाल करून येत आहेत असे त्यांना दिसून आले.

हे त्यांचे असे अचाट कृत्य चालू असता कट्‌कटा आवाज करीत, दातओठ खात व दटावत त्यांच्या मधून मधून मोठ्याने गर्जना होत. इतक्यात श्रीरामाचा जयघोष झाला. त्याला उलट उत्तर म्हणून राक्षसांनी रावणाच्या नावाचा जयजयकार केला. या मोठ्या जयजयकाराच्या आवाजातच लढाई सुरू झाली.

निशाचरांनी पर्वताची शिखरे हाल्वून खाली वानर सैन्यावर ढकलून द्यावीत, तोच त्या शिखरांना, उडी मारून कपिरीसांनी चेंडूप्रमाणे झेलावे आणि परत राक्षसांच्या सैन्यावर ती झुगारून द्यावीत, असा मोठा सुंदर खेळ सुरू झाला.

छं०—धरि कुधर खंड प्रचंड मर्कट भालु गढ़ पर डारहीं।
झपटहिं चरन गहि पटकि महि भजि चलत बहुरि पचारहीं॥
अति तरल तरुन प्रताप तरपहिं तमकि गढ़ चढ़ि चढ़ि गए।
कपि भालु चढ़ि मंदिरन्ह जहँ तहँ राम जसु गावत भए॥

दो०—एकु एकु निसिचर गहि पुनि कपि चले पराइ।
ऊपर आपु हेठ भट गिरहिं धरनि पर आइ॥ ४७॥

चौ०—राम प्रताप प्रबल कपिजूथा। मर्दहिं निसिचर सुभट बरूथा॥
चढ़े दुर्ग पुनि जहँ तहँ बानर। जय रघुबीर प्रताप दिवाकर॥
चले निसाचर निकर पराई। प्रबल पवन जिमि घन समुदाई॥
हाहाकार भयउ पुर भारी। रोवहिं बालक आतुर नारी॥
सब मिलि देहिं रावनहि गारी। राज करत एहिं मृत्यु हँकारी॥
निज दल बिचल सुनी तेहिं काना। फेरि सुभट लंकेस रिसाना॥

अशी झुगारून दिलेली [illegible]

राक्षस हातीं लागताच [illegible] आपटून जशा [illegible] करावा. [illegible]

भेदरट पळ काढू लागताच [illegible]

अत्यंत चपळ, तेजस्वी आणि [illegible] उड्या मारून ते राक्षसांच्या [illegible]

हे वाट [illegible] उचलावा. [illegible] उरलेला प्राण [illegible]

श्रीरामाच्या [illegible] त्यांना राक्षसांच्या [illegible] करून टाकले!

असा [illegible] दिवाकर " असा [illegible]

[illegible] जशी कुठल्या कुठे [illegible] चारी बाजूंनी जीव घेऊन [illegible]

[illegible] आणि [illegible] मरण. लहान [illegible] आणि [illegible]

काही ठिकाणी [illegible] " चांगले राज्य चालू [illegible] "

जीव घेऊन [illegible] वीरांना [illegible]

जो रन बिमुख सुना मैं काना । सो मैं हतब कराल कृपाना ।।
सर्बसु खाइ भोग करि नाना । समर भूमि भए बल्लभ प्राना ।।
उग्र बचन सुनि सकल डेराने । चले क्रोध करि सुभट लजाने ।।
सन्मुख मरन बीर कै सोभा । तब तिन्ह तजा प्रान कर लोभा ।।

दो० – बहु आयुध धर सुभट सब भिरहिं पचारि पचारि ।
ब्याकुल किए भालु कपि परिघ त्रिसूलन्हि मारि ।। ४२ ।।

चौ० –भय आतुर कपि भागन लागे । जद्यपि उमा जीतिहहिं आगे ।।
कोउ कह कहँ अंगद हनुमंता । कहँ नल नील दुबिद बलवंता ।।
निज दल बिकल सुना हनुमाना । पच्छिम द्वार रहा बलवाना ।।
मेघनाद तहँ करइ लराई । टूट न द्वार परम कठिनाई ।।
पवनतनय मन भा अति क्रोधा । गर्जेउ प्रबल काल सम जोधा ।।
कूदि लंक गढ़ ऊपर आवा । गहि गिरि मेघनाद कहुँ धावा ।।

"इतःपर युद्धातून जो कोणी पाठ दाखवून पळ काढील, त्याचे वृत्त कानी येताच मी स्वतः आपल्या तीक्ष्ण तरवारीने त्याचा शिरच्छेद करीन हे लक्षात ठेवा.

"आजपर्यंत माझे अन्न खाल्ले, माझ्या जिवावर सर्व प्रकारचे भोग भोगले—चैन केली आणि आता माझ्यासाठी लढण्याचा प्रसंग येताच प्राण प्रिय वाटू लागला काय ?"

रावणाचे हे संतप्त होऊन कडाडलेले भाषण ऐकताच सगळे चळचळा कापू लागले. त्यातील खरे शूर होते, त्यांना आपल्या [illegible] लाज वाटून ते दात-ओठ खाऊन पुनः शत्रूवर चालून गेले. प्रसंगी मस्तक तुटून रणांगणावर पडले तरी बेहत्तर—पण पुनः पाठ दाखवायची नाही, अशा छातीला छाती भिडवून प्रसंगी मरण पत्करणे हीच खरी शूराची शोभा, असा त्याच्या मनाचा आता पक्का निश्चय झाला.

आता मात्र राक्षसांनी निकराचा लढा दिला. अगोदरच अनेक प्रकारच्या शस्त्रास्त्रांनी त्यांचे सैन्य सुसज्ज होते. त्यात आता प्राणावर उदार होऊन त्यांनी घनघोर संग्राम माजवून अनेक प्रकारे रीस कपींचे सैन्य त्रिशूळ व परिघ इत्यादींचे वार करून अगदी घायाळ केले. ४२

या निकराच्या हल्ल्याचा साहजिकच परिणाम होऊन घाबरून गाळण उडालेले वानर जीव घेऊन पळू लागले !

रामाच्या सैन्याचा पराभव होतो की काय अशी भीती साहजिकच हे वृत्त समजून पार्वतीस वाटल्याचे शंकराच्या ध्यानी आले. म्हणून ते सांगतात—

"उमे ! यावेळी जरी कपिसैन्याचा थोडा वेळ पराभव झाल्यासारखे वाटले तरी शेवटी त्यांचाच विजय होणार आहे; म्हणून तू काळजी करू नकोस."

घाबरून पळत असलेल्या वानरांनी मोठमोठ्याने आपल्या [illegible] हाका मारण्यास सुरुवात केली. कोणी अंगदास तर कोणी हनुमन्तास; कोणी नलनीलांस तर कोणी द्विविदास—यांप्रमाणे सर्वत्र हाकाटी उडाली !

या हाकांची वर्दी पश्चिम दरवाजावर हल्ला चढवत असलेल्या हनुमंतास प्रथम मिळाली. आपले सैन्य व्याकुळ होऊन पळ काढीत आहे, हे त्याच्या ध्यानी आले; परंतु तो ज्याठिकाणी लढत होता तेथे प्रत्यक्ष मेघनादच तोंड देत असल्यामुळे ते द्वार भंग पावेना, अभेद्य वाटू लागले !

असा विलक्षण प्रसंग पाहून पवनसुताला भयंकर संताप येऊन तो प्रबलवीर काळासारखा गर्जना करू लागला !

भिरेउ सब मारुति सिर नाना [illegible] मारेसि लाता ॥
दूसरें सूत बिकल तेहि जाना । स्यंदन घालि तुरत गृह आना ॥

दो० — अंगद सुना पवनसुत गढ़ पर गयउ अकेल ।
रन बाँकुरा बालिसुत तरकि चढ़ेउ कपि खेल ॥ ४३ ॥

चौ० — जुद्ध बिरुद्ध क्रुद्ध द्वौ बंदर । राम प्रताप सुमिरि उर अंतर ॥
रावन भवन चढ़े द्वौ धाई । करहिं कोसलाधीस दोहाई ॥
कलस सहित गहि भवनु ढहावा । देखि निसाचरपति भय पावा ॥
नारि बृंद कर पीटहिं छाती । अब दुइ कपि आए उतपाती ॥
कपिलीला करि तिन्हहि डेरावहिं । रामचंद्र कर सुजसु सुनावहिं ॥
पुनि कर गहि कंचन के खंभा । कहेन्हि करिअ उतपात अरंभा ॥
गर्जि परे रिपु कटक मझारी । लागे मर्दै भुज बल भारी ॥
काहुहि लात चपेटन्हि केहू । भजहु न रामहि सो फल लेहू ॥

त्याने एक [illegible] एका झपाट्यात [illegible] मारली की, तो [illegible]

त्यावेळेस [illegible] घर गाठले.

पवनसुत [illegible] लीलेने तो [illegible]

त्या [illegible] पवनसुत [illegible] "जय [illegible] कळ्यासह [illegible]

ते [illegible] त्यांनी [illegible] एकदम [illegible]

त्या [illegible] कानावर [illegible].

तेव्हा [illegible] मोठे असे सोन्याचे [illegible] सुरू होऊन [illegible]

[illegible] कोणाच्या [illegible] तावीद देऊ [illegible]

दो० – एक एक सों मर्दहिं तोरि चलावहिं मुंड ।
रावन आगें परहिं ते जनु फूटहिं दधि कुंड ।। ४४ ।।

चौ० – महा महा मुखिआ जे पावहिं । ते पद गहि प्रभु पास चलावहिं ।।
कहइ बिभीषनु तिन्ह के नामा । देहिं राम तिन्हहू निज धामा ।।
खल मनुजाद द्विजामिष भोगी । पावहिं गति जो जाचत जोगी ।।
उमा राम मृदुचित करुनाकर । बयर भाव सुमिरत मोहि निसिचर ।।
देहिं परम गति सो जियँ जानी । अस कृपाल को कहहु भवानी ।।
अस प्रभु सुनि न भजहिं भ्रम त्यागी। नर मतिमंद ते परम अभागी ।।
अंगद अरु हनुमंत प्रबेसा । कीन्ह दुर्ग अस कह अवधेसा ।।
लंकाँ द्वौ कपि सोहहिं कैसें । मथहिं सिंधु दुइ मंदर जैसें ।।

दो० – भुज बल रिपु दलमलि देखि दिवस कर अंत ।
कूदे जुगल बिगत श्रम आए जहँ भगवंत ।। ४५ ।।

नारळावर नारळ मारून दोन्ही फोडावेत, त्याप्रमाणे एका राक्षसावर दुसरा राक्षस ठोकून दोघांचा चुराडा उडवावा, मुंडकी तुटून हाती येताच चेंडूसारखी ती आकाशात अशा बेताने उडवावी की, रावणाच्या पुढे जाऊन दह्याच्या मडक्याप्रमाणे ती फटाफट् फुटावीत ! ४४

त्यात कोणी शिष्ट सापडलाच तर त्याचे दोन्ही पाय पकडून त्याला श्रीरामचंद्राच्या चरणी समर्पण करण्यासाठी तंगडया धरून पद्धतशीर झुगारून देत.

असले शिष्ट येऊन प्रभूपुढे पाल्थे पडताच त्यांचे त्या भयंकर तडाख्याने प्राणोत्क्रमण होई. त्याचे वासलेले तोंड पाहून त्या राक्षसप्रमुखाचे नाव विभीषण श्रीरामचंद्राला सांगे; त्याबरोबर तो दयाघन त्यांना लगेच वैकुंठाला पाठवी.

" केवढे आश्चर्य पाहा ! " सदाशिवांच्या भावनांना भरती येऊन ते पार्वतीला सांगू लागले, " पाहिले तर माणसांना गट्ट करून ऋषि मुनींच्या मांसाच्या मिटक्या मारणारे असे हे नीच रजनीचर, अहर्निश विषयोपभोगात गढून गेलेले ! पण त्यांचे भाग्य केवढे मोठे ? उग्रतपस्या करून ज्या गतीसाठी योगी अखंड प्रार्थना करूनही त्यांना जी मिळत नाही, ती या असल्या राक्षसांना व मागताच मिळू लागली !!

" याचे एकच कारण; आणि ते म्हणजे राम कोमल मनाचे असून करुणासागर आहेत. ते म्हणतात, " अहो ! हे माझे वैरभावाने सतत स्मरण करत आले आहेत, मग नको का त्यांना सद्गती द्यायला ! "

हे पार्वती ! माझ्या प्रभूसारखा असा कृपाळू दुसरा कोण आहे सांग पाहू ?

" इतके समजल्यावरसुद्धा, जे लोक या भोवतालच्या भ्रमातून आपले मन बाजूस काढून त्याला भजत नाहीत, ते मठ्ठ डोक्याचे पामर आहेत, असे म्हटल्यास त्यात काय चुकले ! "

इकडे कोसलाधीशांचे सर्व लक्ष अंगद-हनुमंताच्या रणधुमाळीकडे वेधले असल्याने ते म्हणाले, " पाहा, पाहा, ते आपले दोन वीर शिरोमणी वालितनय-पवनसुत ! अफाट राक्षस सेनासागराला मनोहर मंदर पर्वताप्रमाणे घुसळत आहेत आणि कसा हलकल्लोळ उडवून देत आहेत ! "

त्यांचा हा समुद्रमंथनाचा कार्यक्रम सायंकाळ होईपर्यंत अव्याहत चालू राहिला ! आता सूर्यास्त होणार असे दिसताच खेळात रंगलेल्या दोन मुलांना वडिलांची आठवण होऊन त्यांनी जसे घराकडे पळत सुटावे, तसेच हे दोन वीर झटकन् उडी मारून भगवंताच्या पायाजवळ आले. ४५

चौ० – प्रभु पद कमल सीस तिन्ह नाए। देखि सुभट रघुपति मन भाए॥
राम कृपा करि जुगल निहारे। भए बिगतश्रम परम सुखारे॥
गए जानि अंगद हनुमाना। फिरे भालु मर्कट भट नाना॥
जातुधान प्रदोष बल पाई। धाए करि दससीस दोहाई॥
निसिचर अनी देखि कपि फिरे। जहँ तहँ कटकटाइ भट भिरे॥
द्वौ दल प्रबल पचारि पचारी। लरत सुभट नहिं मानहिं हारी॥
महाबीर निसिचर सब कारे। नाना बरन बलीमुख भारे॥
सबल जुगल दल समबल जोधा। कौतुक करत लरत करि क्रोधा॥
प्राबिट सरद पयोद घनेरे। लरत मनहुँ मारुत के प्रेरे॥
अनिप अकंपन अरु अतिकाया। बिचलत सेन कीन्हि इन्ह माया॥
भयउ निमिष महँ अति अँधिआरा। बृष्टि होइ रुधिरोपल छारा॥

दो० – देखि निबिड़ तम दसहुँ दिसि कपिदल भयउ खभार।
एकहि एक न देखई जहँ तहँ करहिं पुकार॥ ४६॥

[illegible] येताच त्यांनी प्रथम [illegible] [illegible] अस्लेले ते आपले दोन [illegible] [illegible] आपल्या [illegible] दोघांचे [illegible] काय सुख झाले त्याचे [illegible]!

अंगद व हनुमान [illegible] लढत असलेल्या नानाजातीच्या [illegible].

परंतु [illegible] जयकार केला व [illegible].

शत्रूचे सैन्य पुन: [illegible] आवाज केला व त्यांनी [illegible].

आतांची [illegible] लल्कान्या ऐकू येऊ लागल्या. [illegible] नानारंगांचे [illegible] रणशूरांच्या [illegible] लागले!

त्यांचे ते [illegible] वाऱ्यामुळे शारदीय [illegible].

अशा प्रकारे दोन्ही [illegible] असून, आपले सैन्य [illegible] यांच्या ध्यानात आले.

लगेच त्या दोघांनी [illegible]!

थोड्याच वेळात निबिड अंधार [illegible].

हा प्रकार वानर व [illegible] अशक्य झाले; आणि [illegible] अर्थात् वानरांची [illegible]



चौ० — सकल मरमु रघुनायक जाना । लिए बोलि अंगद हनुमाना ॥
समाचार सब कहि समुझाए । सुनत कोपि कपिकुंजर धाए ॥
पुनि कृपाल हँसि चाप चढ़ावा । पावक सायक सपदि चलावा ॥
भयउ प्रकास कतहुँ तम नाहीं । ग्यान उदयँ जिमि संसय जाहीं ॥
भालु बलीमुख पाई प्रकासा । धाए हरष बिगत श्रम त्रासा ॥
हनूमान अंगद रन गाजे । हाँक सुनत रजनीचर भाजे ॥
भागत भट पटकहिं धरि धरनी । करहिं भालु कपि अद्भुत करनी ॥
गहि पद डारहिं सागर माहीं । मकर उरग झष धरि धरि खाहीं ॥

दो० — कछु मारे कछु घायल कछु गढ़ चढ़े पराइ ।
गर्जहिं भालु बलीमुख रिपु दल बल बिचलाइ ॥ ४७ ॥

यातील इंगित ओळखण्यास श्रीरघुनाथांना मुळीच वेळ लागला नाही. त्यांनी अंगद व हनुमंतांना चटकन् बोलावून घेतले आणि हा गोंधळ केवळ राक्षसी मायेमुळे उडाला आहे, घाबरण्याचे बिलकूल कारण नाही, असे सांगितले.

त्या आक्रंताच्या मागे राक्षसांचा हा कावा आहे, हे कळताच क्रुद्ध होऊन अंगद व हनुमान् त्यांचा खरपूस समाचार घेण्यासाठी दौडत निघाले.

इकडे कृपानिधींनी सुहास्य करून धनुष्याला दोरी लावली. एक अग्निबाण त्यातून थोडयाच अवधीत सूं सूं करीत सुटला! त्याबरोबर केवढे आश्चर्य? सर्वत्र चक्क प्रकाश! अंधाराचे नावच नाही!!

ज्ञानाचा उदय झाल्यावर संशय कसा राहील?

रक्त, राखाडी व दगडयांचा वर्षाव बंद! अंधार कुठे पळाला त्याचा तर पत्ताच नाही. या आनंद-दायक आश्चर्याने भल्ल कपींचे श्रम व भीती त्यांना त्या अंधाराबरोबरच पळवून लावले.

त्या समाधानाच्या भरात त्यांनी पुनः शत्रूवर चाल केली. अंगद आणि हनुमानाने तर एवढी प्रचण्ड गर्जना केली की, ती ऐकताच राक्षसांना पळता भुई थोडी झाली!

पण घाबरून पळणारे निशाचर पुढे व त्यांचा उत्साहाचे भरते येऊन पाठलाग करणारे भल्ल कपी मागे! मग युद्धकौशल्याच्या मौजेला काय पारावर? मागे वानर पाहताच राक्षसांच्या पोटात भीतीचा गोळा उठे व पाय पुढे पडणे बंद होई! इतक्यात मागच्या पाठलाग करणाऱ्या कपिवीराने त्याला शेळी-मेंढीसारखा तंगडीला धरावा, गरगर फिरवावा आणि फाडकन् जमिनीवर आपटून त्याचा चेंदामेंदा करावा!

ही आपटाआपटीची कटकट ज्यांना किळसवाणी वाटे, त्यांनी दुसरा सोपा आणि परोपकारी मेजवानीचा मार्ग काढला. तंगडीला धरून उचललेल्या राक्षसांना जमिनीवर आपटून पृथ्वीला त्रास देण्याऐवजी त्यांनी ही राक्षसांची धेंडे सरळ समुद्रात भिरकावण्याचा सपाटा सुरू केला!

त्यामुळे मगर, साप, सुसरी यांना उत्कृष्ट मेजवानी मिळू लागून ते संतुष्ट झाले!

या सर्वांचा असा परिणाम झाला की, शेकडो राक्षस घायाळ होऊन रणक्षेत्रावर कण्हत पडले; हजारोंचा नुसता चिखल होऊन त्या रणांगणावर थर पडला; लक्षावधी निशाचरांची ताजी पक्वान्ने समुद्रातील जलचरांना मिळाली आणि दुरूनच हे भयानक दृश्य ज्यांनी पाहिले, त्यांनी लढण्याचा खुळेपणा न करता आल्या पावलीच किल्ल्यावर चढून परत घराकडे धूम ठोकली!

अशी ही लांडगेतोड यशस्वी झालेली पाहून भल्ल आणि बलीमुखांनी जयजयकाराच्या एकामागून एक गर्जना सुरू केल्या! ४७

चौ० — निसा जानि कपि चारिउ अनी। आए जहाँ कोसला धनी॥
राम कृपा करि चितवा सबही। भए बिगतश्रम बानर तबही॥
उहाँ दसानन सचिव हँकारे। सब सन कहेसि सुभट जे मारे॥
आधा कटकु कपिन्ह संघारा। कहहु बेगि का करिअ बिचारा॥
माल्यवंत अति जरठ निसाचर। रावन मातु पिता मंत्री बर॥
बोला बचन नीति अति पावन। सुनहु तात कछु मोर सिखावन॥
जब ते तुम्ह सीता हरि आनी। असगुन होहिं न जाहिं बखानी॥
बेद पुरान जासु जसु गायो। राम बिमुख काहुँ न सुख पायो॥

दो० — हिरन्याच्छ भ्राता सहित मधु कैटभ बलवान।
जेहिं मारे सोइ अवतरेउ कृपासिंधु भगवान॥ ४८ (क)॥

मानसरामायण, पचीसवाँ विश्राम

निशाचरांची [illegible]

[illegible] चरणाजवळ [illegible]

[illegible] कुठल्या कुठे [illegible]

[illegible] प्रागल्भ्य आणि [illegible] बैठक घेतली.

बैठकीच्या [illegible] क्रमशः [illegible] आपण [illegible]

[illegible] होण्याची [illegible] आहेत. [illegible] अत्यंत होता. [illegible]

"हे तात ! [illegible] बाळा ! [illegible]

"[illegible] प्रकारच्या [illegible] !"

"[illegible] मारले तोच कृपासिंधू [illegible] नाही ! ४८ (क).



कालरूप खल बन दहन गुनागार घनबोध ।
सिव बिरंचि जेहि सेवहि तासों कवन बिरोध ।। ४८ (ख) ।।

चौ०—परिहरि बयरु देहु बैदेही । भजहु कृपानिधि परम सनेही ।।
ताके बचन बान सम लागे । करिआ मुह करि जाहि अभागे ।।
बूढ़ भएसि न त मरतेउँ तोही । अब जनि नयन देखावसि मोही ।।
तेहिं अपने मन अस अनुमाना । बध्यो चहत एहि कृपानिधाना ।।
सो उठि गयउ कहत दुर्बादा । तब सकोप बोलेउ घननादा ।।
कौतुक प्रात देखिअहु मोरा । करिहउँ बहुत कहौं का थोरा ।।
सुनि सुत बचन भरोसा आवा । प्रीति समेत अंक बैठावा ।।
करत बिचार भयउ भिनुसारा । लागे कपि पुनि चहूँ दुआरा ।।

" तो काळरूप असून खलरूपी वनाचा दावानल आहे ! असे असूनही सर्व सद्‌गुणांचे ते माहेरघर आहे व ज्ञानाचे भाण्डार आहे; म्हणून प्रत्यक्ष शंकर व ब्रह्मदेवही त्याच्या चरणांची भक्ती करतात !

" अशा प्रभूशी केलेले वैर तुमचे कसे शेवटास जाणार ? ४८ (ख)

" म्हणून आपण विचारल्यावरून मंत्रिमंडळाचा अध्यक्ष या जबाबदारीने आणि तुमचा मातामह या प्रेमाच्या नात्याने अखेरचा निर्णय देतो.

—श्रीरामचंद्राशी सुरू केलेले वैर सोडा. त्यांची चोरून आणलेली भार्या त्यांना परत करा. एवढ्या भयंकर अपराधामुळे तो क्षमा करणार नाहीत, अशी शंकासुद्धा मनात आणू नका. तो कृपासागर असून, सर्वश्रेष्ठ असा सर्वांचा सखा आहे. ही भावना हृदयात ठेऊन त्याची भक्ती करायची, अशा निश्चयाने त्याला शरण जा, म्हणजेच तुमचे मरण चुकेल व नजीक येऊन ठेपलेला राक्षसांचा समूळ संहार टळेल ! ! "

— ' सरळेचि वक्र लागे, काळाने दृष्टि जेधवा तरळे ' या न्यायाने माल्यवंताचे अत्यंत मोलाचे व प्रेमाचे भाषण रावणाच्या हृदयात तीक्ष्ण बाणासारखे घुसले ! त्या संतापाच्या भरात तो एकदम उफाळला—

" थेरड्या, आपले प्रथम अभागी तोंड काळे कर ! तुझ्या पिकलेल्या केसांनी आणि आईच्या आतड्यांनी आज तुला वाचवला हे लक्षात ठेव, नाही तर आताच भलते बोलणारी जीभ छाटून मस्तक धडावेगळे केले असते, समजलास ! —हो; चालता हो अगोदर ! आणि जिवंत आहेस तोपर्यंत पुनः माझ्या डोळ्यासमोर येऊ नकोस ! "

मदोन्मत्त दशमुखाचे ते अपशब्द कानी पडताच त्याने मनात विचार केला की, कृपानिधान रामांनीच याचा निकाल लावण्याचे ठरवलेले दिसते !

त्या दुःसह शब्दांनी दुखावलेले त्याचे प्रेमळ व वयोवृद्ध अंतःकरण तेथून जाता जाता, रावणाची कान-उघाडणी करणारे वाक्प्रहार ओकलेच !

ते शब्द सहन न होऊन मेघनाद संतापाने उठला व म्हणाला, " उद्या सकाळीच माझ्या करामतीचा नमुना तुम्हाला पाहावयास मिळेल. तुमचे सर्वांचेच डोळे निवतील, एवढा पराक्रम मी करीन; म्हणून आता उगीच तोंडाची वाफ कशाला दवडू ? "

मुलाच्या या भाषणाने रावणाला धीर येऊन त्याने त्याला प्रेमाने मांडीवर घेऊन कवटाळले !

अशाप्रकारे मंत्रिमंडळाच्या या मसलतीत सर्व रात्र गेली. पाहतात तो पहाट झाली व कपींनी लंकेच्या चारी दिशेच्या वेशीवर हल्ला चढवला !

कोपि कपिन्ह दुर्घट गढ़ु घेरा। नगर कोलाहलु भयउ घनेरा॥
बिबिधायुध धर निसिचर धाए। गढ़ ते पर्बत सिखर ढहाए॥

छं०—ढाहे महीधर सिखर कोटिन्ह बिबिध बिधि गोला चले।
घहरात जिमि पबिपात गर्जत जनु प्रलय के बादले॥
मर्कट बिकट भट जुटत कटत न लटत तन जर्जर भए।
गहि सैल तेहि गढ़ पर चलावहिं जहँ सो तहँ निसिचर हए॥

दो०—मेघनाद सुनि श्रवन अस गढ़ु पुनि छेंका आइ।
उतर्‌यो बीर दुर्ग तें सन्मुख चल्यो बजाइ॥ ४८॥

चौ०—कहँ कोसलाधीस द्वौ भ्राता। धन्वी सकल लोक बिख्याता॥
कहँ नल नील दुबिद सुग्रीवा। अंगद हनूमंत बल सींवा॥
कहाँ बिभीषनु भ्राताद्रोही। आजु सबहि हठि मारउँ ओही॥
अस कहि कठिन बान संधाने। अतिसय क्रोध श्रवन लगि ताने॥

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

सर समूह सो छाड़ै लागा । जनु सपच्छ धावहिं बहु नागा ॥
जहँ तहँ परत देखिअहिं बानर । सन्मुख होइ न सके तेहि अवसर ॥
जहँ तहँ भागि चले कपि रीछा । बिसरी सबहि जुद्ध कै ईछा ॥
सो कपि भालु न रन महँ देखा । कीन्हेसि जेहि न प्रान अवसेषा ॥

दो० – दस दस सर सब मारेसि परे भूमि कपि बीर ।
सिंहनाद करि गर्जा मेघनाद बल धीर ॥ ५० ॥

चौ० – देखि पवनसुत कटक बिहाला । क्रोधवंत जनु धायउ काला ॥
महासैल एक तुरत उपारा । अति रिस मेघनाद पर डारा ॥
आवत देखि गयउ नभ सोई । रथ सारथी तुरग सब खोई ॥
बार बार पचार हनुमाना । निकट न आव मरमु सो जाना ॥
रघुपति निकट गयउ घननादा । नाना भाँति करेसि दुर्बादा ॥
अस्त्र सस्त्र आयुध सब डारे । कौतुकहीं प्रभु काटि निवारे ॥
देखि प्रताप मूढ़ खिसिआना । करै लाग माया बिधि नाना ॥
जिमि कोउ करै गरुड़ सैं खेला । डरपावै गहि स्वल्प सपेला ॥

दो० – जासु प्रबल माया बस सिव बिरंचि बड़ छोट ।
ताहि दिखावइ निसिचर निज माया मति खोट ॥ ५१ ॥

मेघनादाच्या धनुष्यातून सुटलेले शेकडो बाण जणू पंख असलेल्या सापाप्रमाणेच वानरवीरांच्या नरडीचा घोट घेण्यासाठी धावत सुटले. त्यांचा प्रहार होताच वानरवीर जागच्या जागी धडाधड ढासळून पडू लागले. त्यामुळे त्या सामान्य वानरांच्यापैकी समोर उभे राहून लढण्याची कोणाचीच छाती होईना !

निराश होऊन ते वानरसैन्य चारी दिशांना उधळत सुटले. तेव्हां त्या सर्वांना त्याने अगदी मृतप्राय करून सोडले ! याप्रमाणे मोठ्या मोठ्या वानरवीरांनाही दहा दहा बाण मारून त्याने मूर्च्छित करून पाडले आणि तो बलवान धैर्यशाली मेघनाद सिंहनाद करून गरजू लागला ! ५०

आपल्या सैन्याची अशी मेघनादाने दाणादाण उडविल्याचे दिसताच अत्यंत क्षुब्ध होऊन पवनसुत काळाप्रमाणे त्याच्या अंगावर धावून गेला.

एक अत्यंत मोठा पर्वत झटकन् उपटला आणि घाईघाईने तो घातला त्या मेघनादाच्या डोकीत !

आपल्या अंगावर तो विशाल पर्वत येत आहे, असे पाहून मेघनाद आकाशात पटकन् उडी मारून उडाला म्हणून वाचला; परंतु त्या पर्वताने त्याचा सारथी, रथ व घोडे यांचा चक्काचूर करून टाकलाच !

" युद्धाला असा सामोरा ये ! " म्हणून हनुमन्ताने त्याला अनेक वेळा आव्हान दिले, परंतु हे महाराज त्याच्या पूर्वपरिचयाचे असल्यामुळे छातीला छाती भिडवून लढण्याचे त्याने टाळले.

तो हनुमंताला सोडून सरळ रघुपतीकडे गेला आणि नानाप्रकारचे अपशब्द बोलून त्याने आपल्या असुरी जिभेची प्रथम लालसा पुरवली; तथापि त्या कोल्हेकुईकडे सिंह थोडेच लक्ष देणार ? आणि लगेच नाना प्रकारच्या शस्त्रास्त्रांचा त्याने मारा केला. परंतु प्रभूच्या वाऱ्यास ती येण्यापूर्वीच त्यांनी कौतुकाने त्या सर्वांच्या ठिकऱ्या उडवल्या ! हा अनपेक्षित प्रताप पाहिल्यावर तो चांगलाच चिडला आणि त्याने नाना प्रकारच्या मायेचे चाळे करून पोरखेळ सुरू केला !

सापाचे पिलू येऊन त्याने गरुडाला भीती दाखविण्याच्या मूर्खपणातलाच तो एक निःसंशय प्रकार होता ! कारण ज्यांच्या प्रबल मायेपुढे शंकर, ब्रह्मदेव आणि विश्वातील सर्व लहान-थोर हात टेकतात त्यांना हा दुष्ट-बुद्धीचा राक्षस-पुत्र आपली माया दाखवत आहे ! ५१

चौ० — नभ चढ़ि बरष बिपुल अंगारा। महि ते प्रगट होहिं जलधारा॥
नाना भाँति पिसाच पिसाची। मारु काटु धुनि बोलहिं नाची॥
बिष्टा पूय रुधिर कच हाड़ा। बरषइ कबहुँ उपल बहु छाड़ा॥
बरषि धूरि कीन्हेसि अँधिआरा। सूझ न आपन हाथ पसारा॥
कपि अकुलाने माया देखें। सब कर मरन बना एहि लेखें॥
कौतुक देखि राम मुसुकाने। भए सभीत सकल कपि जाने॥
एक बान काटी सब माया। जिमि दिनकर हर तिमिर निकाया॥
कृपादृष्टि कपि भालु बिलोके। भए प्रबल रन रहहिं न रोके॥

दो० — आयसु मागि राम पहिं अंगदादि कपि साथ।
लछिमन चले क्रुद्ध होइ बान सरासन हाथ॥ ५२॥

चौ० — छतज नयन उर बाहु बिसाला। हिमगिरि निभ तनु कछु एक लाला॥
इहाँ दसानन सुभट पठाए। नाना अस्त्र सस्त्र गहि धाए॥
भूधर नख बिटपायुध धारी। धाए कपि जय राम पुकारी॥

त्याने केलेल्या [illegible]

प्रथम आकाशातून [illegible]

त्याच्या उलट पुन्हा [illegible]

चारी दिशांनी नानाप्रकारची [illegible] अशा गर्जना करीत [illegible].

हे त्यांचे [illegible] दगडांचाच [illegible] हात आपणाला न [illegible]

श्रीरामसैन्याने [illegible] नव्हता त्यांना [illegible] असे त्या [illegible].

असले सैन्य [illegible] आले. [illegible] माया त्यांनी [illegible]!

[illegible] सर्वांच्या [illegible]!

[illegible] अत्यंत क्रुद्ध झालेले [illegible].

त्यावेळेला [illegible] बाहू अत्यंत [illegible]

आता मात्र [illegible] लक्ष्मणाचा स्वारी [illegible] सुसज्ज असे सैन्य [illegible].

[illegible] महाराज [illegible]!



भिरे सकल जोरिहि सन जोरी। इत उत जय इच्छा नहिं थोरी ॥
मुठिकन्ह लातन्ह दातन्ह काटहिं। कपि जयसील मारि पुनि डाटहिं ॥
मारु मारु धरु धरु धरु मारू। सीस तोरि गहि भुजा उपारू ॥
असि रव पूरि रही नव खंडा। धावहिं जहँ तहँ रुंड प्रचंडा ॥
देखहिं कौतुक नभ सुर बृंदा। कबहुँक बिसमय कबहुँ अनंदा ॥

दो०—रुधिर गाड़ भरि भरि जम्यो ऊपर धूरि उड़ाइ।
जनु अँगार रासिन्ह पर मृतक धूम रह्यो छाइ ॥ ५३ ॥

चौ०—घायल बीर बिराजहिं कैसे। कुसुमित किंसुक के तरु जैसे ॥
लछिमन मेघनाद द्वौ जोधा। भिरहिं परसपर करि अति क्रोधा ॥
एकहि एक सकइ नहिं जीती। निसिचर छल बल करइ अनीती ॥
क्रोधवंत तब भयउ अनंता। भंजेउ रथ सारथी तुरंता ॥
नाना बिधि प्रहार कर सेषा। राच्छस भयउ प्रान अवसेषा ॥
रावन सुत निज मन अनुमाना। संकठ भयउ हरिहि मम प्राना ॥

मग काय, हा हा म्हणता झाली रणधुमाळी सुरू! जोडीला जोड जमताच मल्लयुद्ध, मुष्टियुद्ध, द्वंद्वयुद्ध अशी सर्वत्र युध्दे चालू झाली. प्रत्येकाला वाटे यात मी विजयी होणारच!

श्रीराम-प्रताप-दिवाकराच्या सामर्थ्याने विजयाची खात्री असणारे कपी लाथा, बुक्या मारून-करचून चावा घेऊन त्या राक्षसांना घाबरवून सोडीत आहेत!

ऐका-ऐका! केवढा भयंकर आवाज हा—

'मारा मारा, धरा धरा, पकडून धरा, हातांनी मुंडया मुरगळा आणि हिसका मारून हात उखडा!'

—असला हा आवाज नऊ खंड पृथ्वीवर सर्वत्र दुमदुमून राहिला!

—हो! ही पाहा मजा—

—डोकी उडून गेलेली प्रचंड धडेच नुसती धरणीवर धावू लागली!

—आकाशात देवांच्या विमानांची दाटी झाली असून, या घनघोर संग्रामाचे नयनसौख्य लुटण्यात ते दंग झाले आहेत; परंतु त्यांची मुखकमले कधी आनंदाने टवटवीत दिसतात, तर कधी खेद व काळजीने कोमेजून जातात!

रणभूमीवर जागो-जागी असलेल्या खडयांतून रक्ताचे पाट वाहत असता साचून राहिले, आणि त्यावर धुळीचा थर बसल्याने ती सर्व ठिकाणे राखेखाली झाकून ठेवलेल्या निखाऱ्याप्रमाणे दिसत आहेत! ५३

लाल फुलांनी फुललेला विशाल पळस वृक्ष जसा खुलावा, तसे जखमेतून रक्ताचे प्रवाह चाललेले वीर शोभत आहेत.

अशा या युद्धाच्या धुमश्चक्रीत मुख्य योद्धे जे लक्ष्मण आणि मेघनाद, ते तर अत्यंत चिडीने एकमेकाशी झुंजत आहेत. कोणीच कोणास काही काळ आवरेना!

मेघनादाला जयाची शंका येऊ लागली; त्याबरोबर त्याने कपट व अन्यायाचे सहाय्य घेऊन डाव खेळण्याला प्रारंभ केला. इतक्यात लक्ष्मणाने एवढया जोराने त्याला तडाखे लगावले की, तो मरण्याच्या पंथालाच लागला; फक्त मेला नाही.

त्यामुळे रावणसुत घाबरला. त्याला येणाऱ्या महासंकटाची बरोबर कल्पना आली. आता आपण जर बेसावध राहिलो, तर हा आपले प्राण घेतल्याशिवाय मुळींच राहणार नाही, अशी खात्री होताच त्याने

बीरघातिनी छाड़िसि साँगी। तेज पुंज लछिमन उर लागी॥
मुरुछा भई सक्ति के लागें। तब चलि गयउ निकट भय त्यागें॥

दो० – मेघनाद सम कोटि सत जोधा रहे उठाइ।
जगदाधार सेष किमि उठै चले खिसिआइ॥ ५४॥

चौ० – सुनु गिरिजा क्रोधानल जासू। जारइ भुवन चारिदस आसू॥
सक संग्राम जीति को ताही। सेवहिं सुर नर अग जग जाही॥
यह कौतूहल जानइ सोई। जा पर कृपा राम कै होई॥
संध्या भइ फिरि द्वौ बाहनी। लगे सँभारन निज निज अनी॥
ब्यापक ब्रह्म अजित भुवनेस्वर। लछिमन कहाँ बूझ करुनाकर॥
तब लगि लै आयउ हनुमाना। अनुज देखि प्रभु अति दुख माना॥
जामवंत कह बैद सुषेना। लंका रहइ को पठई लेना॥

आपल्या जवळची वीरांचा हृदयी [illegible]

त्या तेजाच्या शक्तीचा तडाखा [illegible] पडला.

अशा प्रकारे आता मोठाच [illegible] होऊन निर्भय झालेला मेघनाद [illegible] प्रयत्न केला!

पण आश्चर्य असे की तो [illegible] तो नुसता जागचा हलतासुद्धा नाही. [illegible] चगळा कसा हलणार?

विचारे करून [illegible] परत गेले! ५४

ही कथा [illegible] सुबई किंचित [illegible] शकी असेल काय? [illegible] कसे जिंकणार?

"एवढे मात्र [illegible] त्यांना देणार!"

इतके होईपर्यंत [illegible] आणि प्रत्येक सेनापतीने [illegible]

वस्तुतः [illegible] विचारू लागले, "[illegible]"

इतक्यात [illegible] येऊन पोचले!

आपल्या [illegible]

त्या [illegible] पाहिजे, असे म्हणाला.



धरि लघु रूप गयउ हनुमंता । आनेउ भवन समेत तुरंता ॥

दो०—राम पदारबिंद सिर नायउ आइ सुषेन ।
कहा नाम गिरि औषधी जाहु पवनसुत लेन ॥ ५५ ॥

चौ०—राम चरन सरसिज उर राखी । चला प्रभंजनसुत बल भाषी ॥
उहाँ दूत एक मरमु जनावा । रावनु कालनेमि गृह आवा ॥
दसमुख कहा मरमु तेहिं सुना । पुनि पुनि कालनेमि सिरु धुना ॥
देखत तुम्हहि नगरु जेहिं जारा । तासु पंथ को रोकन पारा ॥
भजि रघुपति करु हित आपना । छाँड़हु नाथ मृषा जल्पना ॥
नील कंज तनु सुंदर स्यामा । हृदयँ राखु लोचनाभिरामा ॥
मैं तैं मोर मूढ़ता त्यागू । महा मोह मिसि सूतत जागू ॥
काल ब्याल कर भच्छक जोई । सपनेहु समर कि जीतिअ सोई ॥

ते शब्द कानी पडताच, हनुमंताने लहानरूपाने लंकेत प्रवेश करून, घरासुद्धा सुषेणाला आणून सादर केला.

या अनपेक्षित घटनेने त्या वैद्याचा भाग्योदय झाला. त्याने जवळ येताच कमलासारख्या श्रीरामचंद्राच्या पायावर आपले मस्तक नमवले. लगेच लागणाऱ्या वनस्पतीचे आणि ती ज्या पर्वतावर असते, त्याचे नाव सांगून ती कामगिरी करण्यासाठी समर्थ असणाऱ्या हनुमंताला त्याने विनवले. ५५

श्रीरामचंद्राचे चरण हृदयात धारण करून आपल्या पराक्रमाचे वर्णन स्वतःच्या मुखाने केले आणि प्रभंजनसुत आपल्या कामगिरीवर निघाला !

परंतु हेरांनी ही सर्व बातमी रावणाच्या कानी घातल्यामुळे तो धावतच कालनेमि नावाच्या राक्षसाच्या घरी आला. मारुतीच्या मार्गात यावेळी अडथळा आणणे कसे जरूर आहे, याची दशमुखाने त्याला कल्पना दिली.

तथापि रामदूताच्या वाटेत आडवा जाण्याने त्याचा शेवट आपल्या प्राणावर बेतण्याने होणार, याची पूर्ण जाणीव त्याला असल्यामुळे तो आपले डोके बडवून घेऊ लागला ! शेवटी हात जोडून केविलवाण्या वाणीने तो रावणाला म्हणाला,

" महाराज ! अहो, तुमच्या डोळ्यासमोर ज्याने सर्व लंकेची राखरांगोळी केली, त्याच्या मार्गात विघ्न कोणीच आणू शकणार नाही, हे उघड असता त्या कामगिरीवर मला पाठवता होय ?"

काही केले तर आता काळाच्या तोंडातला घास आपणाला लवकरच व्हावे लागणार हे ठाम ठरताच निदान मरण्यापूर्वी आपल्या पागल बनलेल्या प्रभूला शुद्धीवर आणण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करण्याचे कर्तव्य तरी पार पाडावे, या हेतूने तो कळवळून सांगू लागला—

" नाथ ! कशाला व्यर्थ बडबड करता ? सोडा हा सर्व वेडेपणा आणि त्या रघुपतीला शरण जाऊन आपले खरे कल्याण साधा !

" अहाहा ! केवढे ते नयनमनोहर, नीलकमलाची शोभा असणारे सुंदर शरीर ! त्या लावण्य ललामाला आपल्या हृदयात का धारण करत नाही ?

"—महा मोहरूपी रात्रीत तुम्ही घोरत पडला आहात. म्हणूनच मी लंकाधिपती रावण आणि तू माझा नोकर कालनेमि असली खोटी स्वप्ने तुम्हाला पडत आहेत ! परंतु हा सर्व अज्ञानामुळे उत्पन्न झालेला परिणाम मूर्खपणा असल्याने, जागे होऊन या सर्व खुळचट कल्पनांचा त्याग करा !

" हे दशानना ! साध्या एकाच गोष्टीचा विचार करा —अहो ! कालरूपी मत्त हत्तीलाच जो अखेर गट्ट करतो, त्याला काळाची काकडी असणाऱ्या तुमच्या सारख्याने, स्वप्नाततरी जिंकणे शक्य आहे ? "

दो०—सुनि दसकंठ रिसान अति तेहिं मन कीन्ह बिचार।
राम दूत कर मरौं बरु यह खल रत मल भार॥५६॥

चौ०—अस कहि चला रचिसि मग माया। सर मंदिर बर बाग बनाया॥
मारुतसुत देखा सुभ आश्रम। मुनिहि बूझि जल पियौं जाइ श्रम॥
राच्छस कपट बेष तहँ सोहा। मायापति दूतहि चह मोहा॥
जाइ पवनसुत नायउ माथा। लाग सो कहै राम गुन गाथा॥
होत महा रन रावन रामहिं। जितिहहिं राम न संसय या महिं॥
इहाँ भएँ मैं देखउँ भाई। ग्यान दृष्टि बल मोहि अधिकाई॥
मागा जल तेहिं दीन्ह कमंडल। कह कपि नहिं अघाउँ थोरें जल॥
सर मज्जन करि आतुर आवहु। दिच्छा देउँ ग्यान जेहिं पावहु॥

दो०—सर पैठत कपि पद गहा मकरीं तब अकुलान।
मारी सो धरि दिव्य तनु चली गगन चढ़ि जान॥५७॥

परंतु या [illegible] ते कळून आला.

[illegible] म्हणाला [illegible]

निश्चय [illegible]

[illegible] शिवमंदिर [illegible] मूर्तीच्या [illegible]

[illegible] पाणी [illegible] कुलाट [illegible]

हनुमंताने [illegible] आशीर्वाद दिला आणि [illegible]

[illegible] होणार [illegible] सर्व [illegible]

[illegible] कमंडलू पुढे केला.

[illegible]

[illegible] या. म्हणजे [illegible] लाभ होईल. [illegible]

हे [illegible] देहान्त [illegible]

परंतु [illegible] दिव्य देहाने [illegible]



चौ० – कपि तव दरस भइउँ निष्पापा। मिटा तात मुनिबर कर सापा॥
मुनि न होइ यह निसिचर घोरा। मानहु सत्य बचन कपि मोरा॥
अस कहि गई अपछरा जबहीं। निसिचर निकट गयउ कपि तबहीं॥
कह कपि मुनि गुरदछिना लेहू। पाछें हमहि मंत्र तुम्ह देहू॥
सिर लंगूर लपेटि पछारा। निज तनु प्रगटेसि मरती बारा॥
राम राम कहि छाड़ेसि प्राना। सुनि मन हरषि चलेउ हनुमाना॥
देखा सैल न औषध चीन्हा। सहसा कपि उपारि गिरि लीन्हा॥
गहि गिरि निसि नभ धावत भयऊ। अवधपुरी ऊपर कपि गयऊ॥

दो० – देखा भरत बिसाल अति निसिचर मन अनुमानि।
बिनु फर सायक मारेउ चाप श्रवन लगि तानि॥ ५८॥

चौ० – परेउ मुरुछि महि लागत सायक। सुमिरत राम राम रघुनायक॥

जाता जाता कृतज्ञेनेचे अश्रू टिपत ती उद्गारली “ हे कपी ! तुझ्या केवळ दर्शनानेच माझे सर्व पाप संपले, आणि मुनिवरांच्या शापातून सुटून माझा पहिला अप्सरेचा देह मला मिळाला !

“ पण लक्षात ठेव, हा मुनी नाही बरं ! खरं खरं सांगत्ये, तो एक घोर निशाचर आहे ! ”

एकामागून एक एवढया जलद या घटना घडत होत्या की, कोणीही क्षणभर स्तंभितच झाला असता !

परंतु औषधी वनस्पती आणण्याची त्वरा असल्याने कोणत्याच गोष्टीचा अधिक विचार करण्यास यावेळी हनुमंताला मुळीच सवड नव्हती.

फक्त या महामुनीना दक्षणा देण्याचे आडवे आलेले काम उरकून पुढे जाणे भागच असल्याने झटकन् आश्रमात येऊन मारुती म्हणाला.

“ अहो महामुनी ! तुम्ही प्रथम गुरुदक्षिणा घ्या; आणि मग (जिवंत राहिला तर–!) आम्हाला मंत्रदीक्षा द्या ! ”

एवढे शब्द मुखातून बाहेर पडत असताच मारुतीच्या शेपटीचा विळखा त्या कपटी मुनीच्या गळ्याला बसून तो आकाशात गिरक्या खाऊ लागला !

असा गगनसंचारी मुनीचा देह लगेच जमिनीवर जोराने आपटला !

प्राण जाण्यापूर्वी कालनेमीने आपला राक्षस देह प्रगट केला “ राम राम ” असा ध्वनी त्याच्या मुखातून बाहेर पडला आणि त्या निशाचराचा जड देह जमिनीवर निश्चेष्ट होऊन पडला !

त्याला सद्गती मिळाल्याचे समाधान मारुतीला मिळाले व त्या आनंदात स्वारीने द्रोणागिरी जलदीने गाठला.

परंतु अपेक्षित औषधी झटकन् सापडेना. तेव्हा सर्व पर्वताला शेपटीचा एक वळसा घालून हिसका मारताच एखादा दगड हलावा तसा द्रोणागिरी पर्वत मुळातून हालला. लगेच तो खांद्यावर घेऊन स्वारी सपाट्याने लंकेच्या दिशेने आकाशातून भरारी मारत निघाली !

हे सर्वच दृश्य, आकाशातून जात असता भरताच्या नजरेस अयोध्येत आले !

“ कोण हा अत्यंत विशाल असा प्राणी यावेळी आकाशातून एवढ्या वेगाने निघाला आहे ? कोणी तरी भयंकर राक्षसच असला पाहिजे ! ! ” एवढा विचार मनात येताच भरताने आकर्ण ताणलेल्या धनुष्यातून एक बोथट बाण त्या लक्ष्यावर सोडलासुद्धा ! ५८

—भरताचा बाण ! तो भयंकर आघात होताच, ‘ राम, राम ! रघुनायक ! ! ’ असे शब्द मारुतीच्या मुखातून मोठ्याने उच्चारले गेले आणि तो मूर्छित होऊन त्या पर्वतासह भरताच्या पुढे धाडकन् आदळला !

सुनि प्रिय बचन भरत तब धाए । कपि समीप अति आतुर आए ॥
बिकल बिलोकि कीस उर लावा । जागत नहिं बहु भाँति जगावा ॥
मुख मलीन मन भए दुखारी । कहत बचन भरि लोचन बारी ॥
जेहिं बिधि राम बिमुख मोहि कीन्हा । तेहिं पुनि यह दारुन दुख दीन्हा ॥
जौं मोरें मन बच अरु काया । प्रीति राम पद कमल अमाया ॥
तौ कपि होउ बिगत श्रम सूला । जौं मो पर रघुपति अनुकूला ॥
सुनत बचन उठि बैठ कपीसा । कहि जय जयति कोसलाधीसा ॥

सो० — लीन्ह कपिहि उर लाइ पुलकित तनु लोचन सजल ।
प्रीति न हृदयँ समाइ सुमिरि राम रघुकुल तिलक ॥ [illegible] ॥

चौ० — तात कुसल कहु सुखनिधान की । सहित अनुज अरु मातु जानकी ॥
कपि सब चरित समास बखाने । भए दुखी मन महुँ पछिताने ॥

प्राणप्रिय [illegible]

काय तो [illegible] ! [illegible]

[illegible] घाहून. [illegible] केले ! [illegible]

[illegible] दुःखाने [illegible]

" [illegible] दायक प्रसंग [illegible] !

[illegible] रामचरण [illegible]

" [illegible] मान्य [illegible] दूर होवो. "

[illegible]

[illegible]

[illegible] रामाच्या [illegible] हाणिलावर [illegible]

[illegible] भरताला [illegible]

" तात ! [illegible]

[illegible] मूर्च्छित [illegible]

[illegible] अशक्य. [illegible]

अहइ दैव मैं कत जग जायउँ । प्रभु के एकहु काज न आयउँ ॥
जानि कुअवसरु मन धरि धीरा। पुनि कपि सन बोले बलबीरा ॥
तात गहरु होइहि तोहि जाता । काजु नसाइहि होत प्रभाता ॥
चढ़ मम सायक सैल समेता । पठवौं तोहि जहँ कृपा निकेता ॥
सुनि कपि मन उपजा अभिमाना । मोरें भार चलिहि किमि बाना ॥
राम प्रभाव बिचारि बहोरी । बंदि चरन कह कपि कर जोरी ॥

दो०—तव प्रताप उर राखि प्रभु जैहउँ नाथ तुरंत ॥
अस कहि आयसु पाइ पद बंदि चलेउ हनुमंत ॥ ६० (क) ॥
भरत बाहुबल सील गुन प्रभु पद प्रीति अपार ।
मन महुँ जात सराहत पुनि पुनि पवनकुमार ॥ ६० (ख) ॥

चौ०—उहाँ राम लछिमनहि निहारी । बोले बचन मनुज अनुसारी ॥
अर्ध राति गइ कपि नहिं आयउ । राम उठाइ अनुज उर लायउ ॥
सकहु न दुखित देखि मोहि काऊ । बंधु सदा तव मृदुल सुभाऊ ॥
मम हित लागि तजेहु पितु माता । सहेहु बिपिन हित आतप बाता ॥
सो अनुराग कहाँ अब भाई । उठहु न सुनि मम बच बिकलाई ॥

" हाय रे दैवा ! मी जन्मलो तरी कशाला ? प्रभूच्या एकाही कामी या हतभाग्याचा उपयोग होऊ शकत नाही—उलट विघ्न मात्र आणतो. "

तथापि शोकाची ही वेळ नाही, हे जाणुन त्या वीरशिरोमणीने आपला दुःखाचा आवेग झटकन् दाबून तो कपीला म्हणाला—

" हे तात ! तुला लंकेस जाऊन पोचण्यास आता उशीर लागेल व सूर्योदय झाला की, कार्याची हानी होईल. म्हणून पर्वतासह माझ्या बाणावर तू चढ. मी तुला एका क्षणात कृपानिकेताजवळ पोचवतो. "

भरताचे हे आत्मविश्वासाच्या प्रेमाधीरतेतून उसळलेले शब्द ऐकून क्षणभर कपीच्या मनात अभिमान उत्पन्न झाला की, पर्वतासह माझे ओझे या बाणाला झेपणार कसे, आणि तो जाणार तरी कसा ?

परंतु दुसऱ्यास क्षणी प्रभूच्या प्रतापाचा विचार येऊन त्याचे ते संशयपटल दूर झाले व त्याने भरतचरणी मस्तक ठेवले, हात जोडले व प्रार्थना केली—

" हे नाथ ! हे प्रभू ! आपल्या प्रतापाचे नुसते स्मरण मी हृदयात करताच एका पळात परत जाईन, मग बाणाची गरज काय ? आज्ञा मिळताच हनुमन्ताने पुनः एकवेळ भरताच्या चरणी मस्तक नमवून लंकेचा मार्ग धरला. ६० (क)

जात असता भरताचे बाहुबल, शील, गुण आणि प्रभुपदी अपार प्रीती यांचे विचार त्याच्या मनात एकसारखे राहून येत होते. ६० (ख)

इकडे लंकेत तोपर्यंत केवढया शोकसागराला भरती आली ! " अर्धी रात्र संपून गेली तरी कपी कसा येत नाही ? " असे असह्य दुःखोद्गार काढून लक्ष्मणाकडे सामान्य मानवासारखे पाहून श्रीरामचंद्रांनी त्याला आपल्या हृदयाशी कवटाळला आणि आपल्या दुःखाच्या आटोक्याबाहेर चाललेला बांध फोडला—

" भाऊराया, यापूर्वी तू कधीही मला थोडेही दुःख झालेले पाहू शकला नाहीस, किती किती तुझा मायाळू स्वभाव रे ! माझ्यावरील तुझ्या अतुल्य प्रेमामुळे तू प्रत्यक्ष आई, बाप, गणगोत इत्यादि सर्वांचा त्याग केलास आणि माझ्या पाठोपाठ वनवासास येऊन वनातील थंडी, ऊन, वारा सहन केलास !

" बाळा ! ते माझ्यावरील तुझे उत्कट प्रेम आता कुठे गेले रे ? इतका व्याकुळ होऊन मी तुझ्या कानी कपाळी ओरडत असतानासुद्धा तू डोळे उघडून माझ्याकडे नुसता बघत कसा नाहीस ?

जौं जनतेउँ बन बंधु बिछोहू । पिता बचन मनतेउँ नहिं ओहू ॥
सुत बित नारि भवन परिवारा । होहिं जाहिं जग बारहिं बारा ॥
अस बिचारि जियँ जागहु ताता । मिलइ न जगत सहोदर भ्राता ॥
जथा पंख बिनु खग अति दीना । मनि बिनु फनि करिबर कर हीना ॥
अस मम जिवन बंधु बिनु तोही । जौं जड़ दैव जिआवै मोही ॥
जैहउँ अवध कवन मुहु लाई । नारि हेतु प्रिय भाइ गँवाई ॥
बरु अपजस सहतेउँ जग माहीं । नारि हानि बिसेष छति नाहीं ॥
अब अपलोकु सोकु सुत तोरा । सहिहि निठुर कठोर उर मोरा ॥
निज जननी के एक कुमारा । तात तासु तुम्ह प्रान अधारा ॥
सौंपेसि मोहि तुम्हहि गहि पानी । सब बिधि सुखद परम हित जानी ॥
उतरु काह दैहउँ तेहि जाई । उठि किन मोहि सिखावहु भाई ॥
बहु बिधि सोचत सोच बिमोचन । स्रवत सलिल राजिव दल लोचन ॥
उमा एक अखंड रघुराई । नर गति भगत कृपाल देखाई ॥

"तुझ्या वियोगाचा [illegible]
तर मी वडिलांचे वचनसुद्धा [illegible]

"माझ्या [illegible]
शकतो, [illegible]
त्यांची जागा तुझ्या [illegible]

"लक्ष्मणा ! [illegible]
पक्षी, मणिविहीन फणी [illegible]
जगू उजवा हातच [illegible]

"बाळा ! [illegible]
[illegible]

"हे पुत्रा ! [illegible]
निष्ठुर आणि कठोर [illegible]
असे वाटते !

"[illegible]
[illegible]
केला ! आणि आता [illegible]
त्याचा [illegible]

"बाबा [illegible]
आपल्या [illegible]
अतोनात शोक [illegible]

—[illegible]

"उमे ! [illegible]
दशा कशी होते, [illegible]"



सो० – प्रभु प्रलाप सुनि कान बिकल भए बानर निकर ।
आइ गयउ हनुमान जिमि करुना महँ बीर रस ।। ६१ ।।

चौ० – हरषि राम भेंटेउ हनुमाना । अति कृतग्य प्रभु परम सुजाना ।।
तुरत बैद तब कीन्हि उपाई । उठि बैठे लछिमन हरषाई ।।
हृदयँ लाइ प्रभु भेंटेउ भ्राता । हरषे सकल भालु कपि ब्राता ।।
कपि पुनि बैद तहाँ पहुँचावा । जेहि बिधि तबहिं ताहि लइ आवा ।।
यह बृत्तांत दसानन सुनेऊ । अति बिषाद पुनि पुनि सिर धुनेऊ ।।
ब्याकुल कुंभकरन पहिं आवा । बिबिध जतन करि ताहि जगावा ।।
जागा निसिचर देखिअ कैसा । मानहुँ कालु देह धरि बैसा ।।
कुंभकरन बूझा कहु भाई । काहे तव मुख रहे सुखाई ।।
कथा कही सब तेहिं अभिमानी । जेहि प्रकार सीता हरि आनी ।।
तात कपिन्ह सब निसिचर मारे । महा महा जोधा संघारे ।।
दुर्मुख सुररिपु मनुज अहारी । भट अतिकाय अकंपन भारी ।।
अपर महोदर आदिक बीरा । परे समर महि सब रनधीरा ।।

प्रत्यक्ष प्रभूच असा शोक करू लागल्यावर त्या वानरसैन्यात शोकसागराला केवढी भरती आली असेल, त्याची कल्पना करणेही कठीण आहे.

अशा त्या करुणरसात जणू वीररसाचे अपूर्व मिश्रण करण्यासाठीच द्रोणागिरी पर्वतासह हनुमान त्या ठिकाणी एकदम उतरले ! ६१

प्रभू परम सुजाण आणि अत्यंत कृतज्ञ असल्यामुळे चटकन् उठून आनंदाने मारुतीस भेटले. सुषेण वैद्याने जरूर ती वनस्पती जलदीने काढली व औषधोपचार करताच लक्ष्मण हर्षित होऊन उठून बसले !

प्रभूंनी आपल्या जणू पुनर्जन्म झालेल्या भावाला कडकडून मिठी मारली !

—ते पाहून भल्ल व कपींचा आनंद गगनात मावेनासा झाला.

वैद्यबुवांना जसे आणले तसेच, बिनबोभाट घरासह जागच्या जागी नेऊन ठेवण्याची कामगिरी हनुमंतानी वेगाने उरकली !

लक्ष्मण मूर्च्छेतून उठल्याची बातमी हेराकडून दशाननाला समजताच तो अत्यंत दुःखाने दाही कपाळे एकसारखी बडवू लागला !

आता आपल्या बलवान् अशा कुंभकर्ण बंधूला जागे केल्याशिवाय आपला निभाव लागणार नाही असे वाटून त्या दुःखातच त्याने घोरत असलेल्या कुंभकर्णाकडे धाव घेतली !

अनेक प्रकारची कानठिळ्या बसवणारी वाद्ये व आवाज यांचा उपयोग करून त्या निशाचराला एकदाचा रावणाने जागा केला.

स्वारी जागी होऊन अंगाला आळोखे-पिळोखे देत जेव्हा उठून जांभया देऊ लागली तेव्हा सर्व सृष्टीला आपल्या मुखात गडप करणारा काळच उठून बसला आहे असे दिसले !

पूर्ण जागा झाल्यावर आपली दृष्टी खिन्न झालेल्या आपल्या बंधूवर टाकून तो म्हणतो—

" बाबा ! तुझी दाही तोंडे कशाने इतकी सुकून गेली ? उत्तरादाखल त्या घमेंडखोर राक्षसाधिपाने जशा प्रकारे सीतेला चोरून आणली ती सर्व कथा आपल्या भावाला सांगितली व शेवटी म्हणाला—

" हे तात ! कपींनी सर्व निशाचर मारले व महा-महा-योद्ध्यांचासुद्धा संहार केला. दुर्मुख, सुररिपू, मनुजाहारी यांच्यासारखे वीर आणि अतिकाय, अकंपनासारखे महावीर, तसेच दुसरे महोदरादिक वीर रणधीरही रणांगणात पडले ! "

दो०—सुनि दसकंधर बचन तब कुंभकरन बिलखान।
जगदंबा हरि आनि अब सठ चाहत कल्यान॥ ६२॥

चौ०—भल न कीन्ह तैं निसिचर नाहा। अब मोहि आइ जगाएहि काहा॥
अजहूँ तात त्यागि अभिमाना। भजहु राम होइहि कल्याना॥
हैं दससीस मनुज रघुनायक। जाके हनूमान से पायक॥
अहह बंधु तैं कीन्हि खोटाई। प्रथमहिं मोहि न सुनाएहि आई॥
कीन्हेहु प्रभु बिरोध तेहि देवक। सिव बिरंचि सुर जाके सेवक॥
नारद मुनि मोहि ग्यान जो कहा। कहतेउँ तोहि समय निरबहा॥
अब भरि अंक भेंटु मोहि भाई। लोचन सुफल करौं मैं जाई॥
स्याम गात सरसीरुह लोचन। देखौं जाइ ताप त्रय मोचन॥

दो०—राम रूप गुन सुमिरत मगन भयउ छन एक।
रावन मागेउ कोटि घट मद अरु महिष अनेक॥ ६३॥

चौ०—महिष खाइ करि मदिरा पाना। गर्जा बज्राघात समाना॥
कुंभकरन दुर्मद रन रंगा। चला दुर्ग तजि सेन न संगा॥

रावणाचे हे [illegible]
म्हणाला. " मूर्खा जगज्जननीला [illegible]
शेवटी नाहककाजने [illegible]
" हे निशाचरनाथा, तू हे [illegible]
" हे तात! अजूनही [illegible]
" हे दशशीर्षा! [illegible]
समजणार? हाय! [illegible]
माझा [illegible]
" निशाचरनाथा [illegible]
नारद मुनींनी [illegible]
निघून गेली. [illegible]
" असो [illegible]
" श्याम [illegible]
[illegible]
असा [illegible]
क्षणभर [illegible]
रावणाने [illegible]
त्याने मद्याचे [illegible]
होते [illegible]
व [illegible]
कडकडाट होतो. [illegible]
त्याच्या [illegible]
असंख्य [illegible]

देखि बिभीषनु आगें आयउ । परेउ चरन निज नाम सुनायउ ।।
अनुज उठाइ हृदयँ तेहि लायो । रघुपति भक्त जानि मन भायो ।।
तात लात रावण मोहि मारा । कहत परम हित मंत्र बिचारा ।।
तेहिं गलानि रघुपति पहिं आयउँ । देखि दीन प्रभु के मन भायउँ ।।
सुनु सुत भयउ कालबस रावण । सो कि मान अब परम सिखावन ।।
धन्य धन्य तैं धन्य बिभीषन । भयहु तात निसिचर कुल भूषन ।।
बंधु बंस तैं कीन्ह उजागर । भजेहु राम सोभा सुख सागर ।।

दो०—बचन कर्म मन कपट तजि भजेहु राम रनधीर ।
जाहु न निज पर सूझ मोहि भयउँ कालबस बीर ।। ६४ ।।

चौ०—बंधु बचन सुनि चला बिभीषन । आयउ जहँ त्रैलोक बिभूषन ।।
नाथ भूधराकार सरीरा । कुंभकरन आवत रनधीरा ।।
एतना कपिन्ह सुना जब काना । किलकिलाइ धाए बलवाना ।।

आपल्या सैन्याशी लढण्यासाठी आपला भाऊ कुंभकर्ण येऊन दाखल झाल्याचे पाहताच कर्तव्यपरायण असा विभीषण समोर आला. त्याने नम्रपणे आपले मस्तक त्याच्या पायावर ठेवून आपले नाव सांगितले.

लगेच कुंभकर्णानेही तितक्याच शुद्ध प्रेमाने आपल्या धाकट्या भावास उचलून हृदयाशी कवटाळले. त्याच्या तोंडून जे वृत्त कुंभकर्णाच्या कानी आले, तसेच रावणाकडून जे समजले. त्यावरून तो रघुपतिभक्त झाला, अशी कुंभकर्णाची खात्री झाली आणि त्याला विभीषण अधिकच प्रिय वाटला!

बिभीषण कुंभकर्णाला म्हणाला, " तात ! रावणाचे परमकल्याण होण्यासाठी त्याला योग्य असा उपदेश करत असता त्याने संतापाने मला लाथ मारली. त्यामुळे माझी निराशा होऊन मी रघुपतीला शरण गेलो !

" प्रभूंनीही माझ्या अंतःकरणाची दीन वृत्ती ओळखून त्या क्षणापासून माझ्यावर केवढे प्रेम करण्यास सुरुवात केली आहे ! "

हे ऐकून कुंभकर्णाचे अंतःकरण भरून आल्याने तो बोलू लागला, " बाळा ! मी काय सांगतो ते नीट लक्षपूर्वक ऐक. रावणाच्या मस्तकावर आता मृत्यू नाचत राहिला असल्याने यावेळी का तो परमहितकारक उपदेश ऐकणार ?

" तथापि, पुत्रा, तू धन्य आहेस, खरोखर बिभीषणा, तू धन्य धन्य आहेस ! कारण तू राक्षसांच्या कुलात जन्म घेऊनही तू कुळभूषण होऊन ते कुल धन्य केलेस !

" बंधो ! शोभासागर व सुखनिधी रामाला शरण जाऊन आपला सर्व वंश प्रकाशमय केल्याने मला केवढा संतोष झाला म्हणून सांगू ?

इतके बोलत असता कुंभकर्णाचे हृदयही राममक्तिमय होऊन तो शेवटी म्हणाला, " बाळा विभीषणा ! कृतीने मनाने आणि वाणीने कपट सोडून रणधीर रामाच्या चरणकमलांची सेवा कर हं ! जा आता वीरा ! मीही कालवश झालो असून मलासुद्धा आपला की, परका हे कळत नाहीसे होऊ लागले आहे; म्हणून जा बरं ! " ६४

याप्रमाणे कुंभकर्णाने विभीषणाला धन्यवाद व आशीर्वाद देऊन त्याची पाठवणी करताच विभीषणही आपल्या ज्येष्ठ बंधूचा निरोप घेऊन जेथे त्रैलोक्यविभूषण श्रीरामचंद्र होते तेथे आला.

" हे नाथ ! पर्वताएवढे शरीर असलेला रणवीर कुंभकर्ण आपल्याबरोबर लढण्यासाठी येत आहे ! " अशी घाईने त्याने लगेच प्रभूला बातमी दिली.

कपींच्या कानावर हे कुंभकर्ण आगमनाचे वृत्त पडण्याची खोटी तोच सर्वांनी आनंदाने किलकिलाट करून त्याच्यावर हल्ला चढवला. पर्वत व मोठे वृक्ष उपटून त्यांनी आपल्या हातात घेतले, मोठ्याने सर्वांनी एक

गिरि, उपाटि बिटप अरु [illegible] । कटकटाइ डारत [illegible] ॥
कोटि कोटि गिरि सिखर प्रहारा । करहिं भालु कपि एक एक बारा ॥
मुर्यो न मनु तनु टर्यो न टार्यो । जिमि गज अर्क फलनि को मार्यो ॥
तब मारुतसुत मुठिका हन्यो । पर्यो धरनि ब्याकुल सिर धुन्यो ॥
पुनि उठि तेहिं मारेउ हनुमंता । घुर्मित भूतल परेउ तुरंता ॥
पुनि नल नीलहि अवनि पछारेसि । जहँ तहँ पटकि पटकि भट डारेसि ॥
चली बलीमुख सेन पराई । अति भय त्रसित न कोउ समुहाई ॥

दो०—अंगदादि कपि मुरुछित करि समेत सुग्रीव ।
काँख दाबि कपिराज कहुँ चला अमित बल सींव ॥ ६५ ॥

चौ०—उमा करत रघुपति नरलीला । खेलत गरुड़ जिमि अहिगन मीला ॥
भृकुटि भंग जो कालहि खाई । ताहि कि सोहइ ऐसि लराई ॥
जग पावनि कीरति बिस्तरिहहिं । गाइ गाइ भवनिधि नर तरिहहिं ॥
मुरुछा गइ मारुतसुत जागा । सुग्रीवहि तब खोजन लागा ॥

वेळ प्रभूच्या नावाचा [illegible] अंगावर टाकले !

कोसळती वानरवीरांची [illegible] त्यांच्यावर कार्तेपुढा [illegible] आलेल्या [illegible] !

साहजिकच आहे, [illegible] ।

हे त्याचे अचाट [illegible] वज्रातालातल्या टोला [illegible] कोसळले व तो [illegible].

तोच्याच वेळात [illegible] एका क्षणात तो [illegible] आणि पुढे [illegible] भयंकर [illegible] एकदी वानरवीर [illegible]

कुंभकर्णाने [illegible] पाडले; आणि [illegible] कुंभकर्ण पण [illegible] ।

अशा प्रकारे [illegible] नित्य समाधान [illegible].

" [illegible] तशी या [illegible]

" नाहीतर [illegible] का अशी लढाई करतो [illegible] ;

" [illegible] !"



सुग्रीवहु कै मुरुछा बीती । निबुकि गयउ तेहि मृतक प्रतीती ।।
काटेसि दसन नासिका काना । गरजि अकास चलेउ तेहिं जाना ।।
गहेउ चरन गहि भूमि पछारा । अति लाघवँ उठि पुनि तेहि मारा ।।
पुनि आयउ प्रभु पहिं बलवाना । जयति जयति जय कृपानिधाना ।।
नाक कान काटे जियँ जानी । फिरा क्रोध करि भइ मन ग्लानी ।।
सहज भीम पुनि बिनु श्रुति नासा । देखत कपि दल उपजी त्रासा ।।

दो ० –जय जय जय रघुबंस मनि धाए कपि दै हूह ।
एकहि बार तासु पर छाड़ेन्हि गिरि तरु जूह ।। ६६ ।।

चौ० – कुंभकरन रन रंग बिरुद्धा । सन्मुख चला काल जनु क्रुद्धा ।।
कोटि कोटि कपि धरि धरि खाई । जनु टीड़ी गिरि गुहाँ समाई ।।
कोटिन्ह गहि सरीर सन मर्दा । कोटिन्ह मीजि मिलव महि गर्दा ।।
मुख नासा श्रवनन्हि कीं बाटा । निसरि पराहिं भालु कपि ठाटा ।।

–आता रणांगणावरील मौजा पुनः पाहा. थोड्याच वेळात मारुतसुताची घेरी संपून तो सावध झाला आणि आपल्या राजाला–सुग्रीवाला–त्या रणधुमश्चक्रीत शोधू लागला, पण तो दिसेना.

विजयश्रीच्या उन्मादाने कुंभकर्ण लंकेकडे जात असता खाकोटीत मारलेला सुग्रीव खाली गळून पडला. त्याला वाटले, हे माकड मेले असावे ! परंतु प्रकार निराळाच होता.

सुग्रीव शुद्धीवर आला. त्याने संतप्त होऊन त्या पर्वतप्राय राक्षसधुडाचे नाक आणि कान सपाट्याबरोबर छाटून टाकले ! तेव्हा त्या मस्त झालेल्या राक्षसाच्या ध्यानी आले की, तो मेला नाही ! म्हणून त्याला तो पकडणार पण त्याच्या अगोदरच मोठी गर्जना करून सुग्रीवाने आकाशात उंच उड्डाण केले !

तरीसुद्धा धरण्याच्या आटोक्यात येताच कुंभकर्णाने त्याला पकडून पुनः जमिनीवर आपटलाच ! परंतु याखेपेस चपळाईने झटकन् उठून पुनः सुग्रीवाने एक चांगला फिरवून त्याला सणसणीत गुद्दा लगावला आणि तो बलशाली सुग्रीव प्रभुपाशी आला. जवळ येताच ' जयतिजयतिजय कृपानिधान ' असा त्याने मोठ्याने जय जयकार केला.

अंगावरून रक्ताचे पाट चालू झाल्यावर कुंभकर्णाने चौकशी केली तेव्हा आपले नाक आणि कान छाटले गेल्याची त्याला कल्पना आली; परंतु त्यामुळे दुःखी होऊन तो भयंकर चिडला आणि लंकेत परत जावयाच्या ऐवजी संतापाने पुनः रणांगणाकडे जोराने धावून आला.

कुंभकर्णाचे पर्वतासारखे अगडबंब शरीर मूळचेच भयंकर; आता तर नाक कान कापल्यामुळे ते भलतेच विद्रूप दिसू लागले ! ते अक्राळ-विक्राळ, कुरूप शिमग्यातील सोंग आपल्यावर परत धावून येत आहे, असे दिसताच कपिसैन्य घाबरून गेले.

परंतु " जय जय जय रघुवंशमणी " असा जयघोष करताच त्यांचे अंगात शक्तिसंचार झाला. सर्वांनी अनेक डोंगर, पर्वत, वृक्ष उपटून पुनः एकवेळ त्याच्या अंगावर एकदम मारा केला. ६६

नाक-कान छाटल्यापासून कुंभकर्णसुद्धा, इकडे अगदी जिवावर उदार होऊन आता प्रत्यक्ष काळाप्रमाणेच चिडून लढू लागला ! कोट्यवधी वानर एका सपाट्यात धरून ते लाह्याप्रमाणे गट्ट करावेत ! पाहणारांना असे वाटे की, अनेक टोळांचे थवे पर्वताच्या गुहेत शिरत आहेत !

तोंडात जसे कोट्यवधी वानर जात, तसेच ते कापलेल्या काननाकांच्या व वासलेल्या तोंडाच्या उघडलेल्या दरवाजातून थवेच्या थवे निसटून पळू लागले !

ते दृश्य पाहून तर कुंभकर्ण इतका रागावला की, कोटयवधी कपींना त्याने आपल्या अंगावर चिलटाप्रमाणे चिरडले व कोट्यवधी वानरांना हाताने कुस्करून त्यांचा लगदा करून धुळीत मिसळला !

रन मद मत्त निसाचर दर्पा । बिस्व ग्रसिहि जनु एहि बिधि अर्पा ॥
मुरे सुभट सब फिरहिं न फेरे । सूझ न नयन सुनहिं नहिं टेरे ॥
कुंभकरन कपि फौज बिडारी । सुनि धाई रजनीचर धारी ॥
देखी राम बिकल कटकाई । रिपु अनीक नाना बिधि आई ॥

दो०—सुनु सुग्रीव बिभीषन अनुज सँभारेहु सैन ।
मैं देखउँ खल बल दलहि बोले राजिवनैन ॥ ६७ ॥

चौ०—कर सारंग साजि कटि भाथा । अरि दल दलन चले रघुनाथा ॥
प्रथम कीन्हि प्रभु धनुष टँकोरा । रिपु दल बधिर भयउ सुनि सोरा ॥
सत्यसंध छाँड़े सर लच्छा । कालसर्प जनु चले सपच्छा ॥
जहँ तहँ चले बिपुल नाराचा । लगे कटन भट बिकट पिसाचा ॥
कटहिं चरन उर सिर भुजदंडा । बहुतक बीर होहिं सत खंडा ॥
घुर्मि घुर्मि घायल महि परहीं । उठि संभारि सुभट पुनि लरहीं ॥
लागत बान जलद जिमि गाजहिं । बहुतक देखि कठिन सर भाजहिं ॥

अता त्याचा [illegible] की. [illegible] गिळंकृत [illegible] !

[illegible] बघून [illegible] त्यांना [illegible].

याप्रमाणे कुंभकर्णाने [illegible] मोठा घेर घेऊन [illegible] !

[illegible]

[illegible] त्याच्या [illegible]

[illegible]

[illegible] फुत्कारत [illegible] राय, [illegible] [illegible] च राहिला !

अशा प्रकारे [illegible] लहू लागत. प्रभूचे [illegible] येत आहे असे [illegible].

* [illegible]

रुंड प्रचंड मुंड बिनु धांवहिं । धरु धरु मारु मारु धुनि गावहिं ॥

दो० – छन महुँ प्रभु के सायकन्हि काटे बिकट पिसाच ।
पुनि रघुबीर निषंग महुँ प्रबिसे सब नाराच ॥ ६८ ॥

चौ०–कुंभकरन मन दीख बिचारी । हति छन माझ निसाचर धारी ॥
भा अति क्रुद्ध महाबल बीरा । कियो मृगनायक नाद गँभीरा ॥
कोपि महीधर लेइ उपारी । डारइ जहँ मरकट भट भारी ॥
आवत देखि सैल प्रभु भारे । सरन्हि काटि रज सम करि डारे ॥
पुनि धनु तानि कोपि रघुनायक । छाँड़े अति कराल बहु सायक ॥
तनु महुँ प्रबिसि निसरि सर जाहीं । जिमि दामिनि घन माझ समाहीं ॥
सोनित स्रवत सोह तनु कारे । जनु कज्जल गिरि गेरु पनारे ॥
बिकल बिलोकि भालु कपि धाए । बिहँसा जबहि निकट कपि आए ॥

दो० – महानाद करि गर्जा कोटि कोटि गहि कीस ।
महि पटकइ गजराज इव सपथ करइ दससीस ॥ ६९ ॥

काहींची नुसती मस्तकेच आकाशात चेंडूप्रमाणे उडत.व ती 'धरा, मारा, मारा, धरा' असा एकच हल्कल्लोळ ओरडून उडवीत; आणि त्या मस्तकाच्या खाली राहिलेली प्रचंड धडे सर्व समरांगणात सैरावैरा पळत सुटत !

अशाप्रकारे एका क्षणात त्या सर्व भयंकर राक्षसांचा संहार करून प्रभूचे बाण पुनः परत येऊन भात्यात आपल्या जागी शिरले ! ६८

सूर्यप्रकाशात धुके विरघळून जावे, त्याप्रमाणे बघता बघता सर्व राक्षस सैन्य गारद झाल्याचे पाहून कुंभकर्ण चकित झाला !

त्याने संतप्त होऊन प्रथम मोठ्याने एकवेळ सिंहनाद केला आणि खडे उचलावेत त्याप्रमाणे भराभर डोंगर हातात घेऊन वानरांच्या सैन्याच्या मोठमोठ्या तुकडया जिकडे होत्या, त्या दिशेला ते प्रचण्ड पर्वत तो झोकून देऊ लागला !

त्या अजस्र पर्वताखाली आपल्या सैन्याचा चुराडा होणार, ही कल्पना येताच ते पर्वत आकाशात असताच त्यांना बाण मारून प्रभू त्यांचा धुरळा करून टाकीत !

कुंभकर्णाचा तो त्वेष पाहून रघुनायक कुपित झाले, त्यांनी आपल्या धनुष्याची दोरी कानापर्यंत ओढून अत्यंत तीक्ष्ण असे बाण एकामागून एक सोडण्याचा धडाका लावला. ते सर्व बाण भराभर कुंभकर्णाच्या त्या विराट काळ्याकभिन्न शरीरात शिरत आणि त्याची चाळणी करून चमकत बाहेर पडून परत प्रभूच्या भात्यांत येऊन घुसत. त्यावेळी अनेक विजा एकामागून एक चमकून मेघात शिराव्यात, तसा भास होई !

कुंभकर्णाच्या काळ्याकुट्ट देहातून रक्ताचे लक्षावधी पाट आता वाहू लागले आणि काजळाच्या पर्वतावरून गेरूचे प्रवाह वाहात असल्याप्रमाणे त्याला एक विचित्र प्रकारची शोभा आली !

त्याच्या शरीरातून असा रक्ताचा पूर वाहू लागल्याने तो चांगलाच हैराण झाला असेल, अशा खुळ्या कल्पनेने भल्लकपींच्या सैन्याने त्याच्यावर चाल केली ! त्यांना पाहून घटकर्णाला त्यांच्या मूर्खपणामुळे हासू आवरेना !

थोड्याच वेळात त्याने पुनः भयंकर गर्जना करून दशाननाच्या नावाची घोषणा केली; आणि लगेच एखाद्या मदोन्मत्त हत्तीप्रमाणे, कोट्यवधी कीशांना धरून तो भराभर आपटू लागला ! ६९

चौ०–भागे भालु बलीमुख जूथा। बृक बिलोकि जिमि मेष बरूथा॥
चले भागि कपि भालु भवानी। बिकल पुकारत आरत बानी॥
यह निसिचर दुकाल सम अहई। कपिकुल देस परन अब चहई॥
कृपा बारिधर राम खरारी। पाहि पाहि प्रनतारति हारी॥
सकरुन बचन सुनत भगवाना। चले सुधारि सरासन बाना॥
राम सेन निज पाछें घाली। चले सकोप महा बलसाली॥
खैंचि धनुष सर सत संधाने। छूटे तीर सरीर समाने॥
लागत सर धावा रिस भरा। कुधर डगमगत डोलति धरा॥
लीन्ह एक तेहिं सैल उपाटी। रघुकुल तिलक भुजा सोइ काटी॥
धावा बाम बाहु गिरि धारी। प्रभु सोउ भुजा काटि महि पारी॥
काटें भुजा सोह खल कैसा। पच्छहीन मंदर गिरि जैसा॥
उग्र बिलोकनि प्रभुहि बिलोका। ग्रसन चहत मानहुँ त्रैलोका॥

दो०–करि चिक्कार घोर अति धावा बदनु पसारि।
गगन सिद्ध सुर त्रासित हा हा हेति पुकारि॥ ७०॥

चौ०–सभय देव करुनानिधि जान्यो। श्रवन प्रजंत सरासनु तान्यो॥

[illegible] करींची दाणादाण उडाली! [illegible] उठली. "अहो हा [illegible]

"हे [illegible] आमचे रक्षण करा. [illegible]!" [illegible]

[illegible] घेऊन भगवान् [illegible] सपाट्याने पुढे गेले!

एकदम [illegible] शरीरात [illegible] तेव्हा त्याच्या [illegible]

[illegible] हात [illegible] उजव्याप्रमाणेच [illegible]!

इंद्राने [illegible] दिसू लागला. [illegible] त्रैलोक्यच गट्ट करणार!

भयंकर [illegible] साठी त्यांच्या [illegible].

—[illegible] हा! हाय! हाय! [illegible]! ७०

कुंभकर्ण [illegible]

बिसिख निकर निसिचर मुख भरेऊ। तदपि महाबल भूमि न परेऊ।।
सरन्हि भरा मुख सन्मुख धावा। काल त्रोन सजीव जनु आवा।।
तब प्रभु कोपि तीव्र सर लीन्हा। धर ते भिन्न तासु सिर कीन्हा।।
सो सिर परेउ दसानन आगें। बिकल उभय जिमि फनि मनि त्यागें।।
धरनि धसइ धर धाव प्रचंडा। तब प्रभु काटि कीन्ह दुइ खंडा।।
परे भूमि जिमि नभ तें भूधर। हेठ दाबि कपि भालु निसाचर।।
तासु तेज प्रभु बदन समाना। सुर मुनि सबहिं अचंभव माना।।
सुर दुंदुभीं बजावहिं हरषहिं। अस्तुति करहिं सुमन बहु बरषहीं।।
करि बिनती सुर सकल सिधाए। तेही समय देवरिषि आए।।
गगनोपरि हरि गुन गन गाए। रुचिर बीररस प्रभु मन भाए।।
बेगि हतहु खल कहि मुनि गए। राम समर महि सोभत भए।।

छं०—संग्राम भूमि बिराज रघुपति अतुल बल कोसल धनी।
श्रम बिंदु मुख राजीव लोचन अरुन तन सोनित कनी।।

निश्चीने जाणताच, आपले धनुष्य पुनः आकर्ण ताणले आणि लक्षावधी बाण एकदम सोडून त्या पर्वतप्राय राक्षसाचे तोंडच बाणांनी भरून टाकले. तरीसुद्धा तो महाबलवान् रणभूमीवर पडला नाही !

बाणांनी भरलेल्या तोंडाने तो कुंभकर्ण जेव्हा प्रभूच्या अंगावर धावून आला, तेव्हा प्रत्यक्ष काळाचा तो बोलका भाताच चालून येत आहे असे वाटले. आता याला जिवंत ठेवणे इष्ट नाही अशी खात्री होताच प्रभूंनी एका कराल बाणानेच त्याचे मस्तक धडावेगळे केले !

प्रभुबाणाने अशा कौशल्याने ते शिर उडवले की, ते दशानन जेथे बसला होता, त्याच्यासमोर बरोबर येऊन पडले.

डोकेच उडाल्यावर मणिविहीन फणीप्रमाणे त्याचे धड धडपडू लागले. त्या प्रचण्ड धडाची रणांगणावर जेव्हा धावाधाव सुरू झाली तेव्हा धरा खचू लागली ! हा प्रकारही अधिक चालवणे इष्ट नसल्याने प्रभूंनी त्या धडाचे लगेच दोन तुकडे करून टाकले !

आकाशातून दोन पर्वत पृथ्वीवर पडावेत, तसे त्या कुंभकर्णाच्या धडाचे दोन तुकडे भयंकर मोठा आवाज करून भूमीवर आदळले. त्याच्या खाली किती भल्ल कपी व राक्षस चिरडून ठार झाले त्याला गणती नाही !

कुंभकर्णाच्या मुखातून निघालेले प्राण तेज प्रभूंच्या मुखात सामावलेले पाहून मुनी व देव यांना मोठे आश्चर्य वाटले. देवांना नंतर एवढा आनंद झाला की, त्यांनी दुंदुभी वाजविल्या आणि स्तुती करून प्रभुमस्तकी पुष्कळ पुष्पवृष्टी केली !

हात जोडून त्यांनी विनंती केली व सर्व देव स्वस्थानी पसरले आणि त्याच वेळी देवर्षी नारद आले. आकाशातूनच त्यानी श्रीहरीच्या या सुंदर वीररसप्रधान गुणसमूहाचे गायन केले ! त्यामुळे प्रभू त्यांच्यावर प्रसन्न झाले.

जाण्यापूर्वी रावणाचा शीघ्र वध करावा असे स्मरण देऊन मुनिवर परत गेले.

त्यावेळी त्या समरभूमीवर ठाकलेल्या प्रभूचें सौंदर्य वर्णनातीत होते. कोसलेश रघुपती त्यावेळी अतुल्य बलाने त्या समरभूमीवर शोभत होते. श्रमामुळे घाम आला होता व त्याचे बिंदू मुखावर मोत्यासारखे चमकत होते. लाल कमळाचीच लाली जणू नेत्रात भरली होती व शरीरावरसुद्धा रक्त उडाल्याने जागोजागी त्याचे लाल कण विखुरले होते. धनुष्य व बाण दोन्ही हातात असून, त्याना ते फिरवीत आहेत. सभोवती कीशरीशांची

सुन सुग्रीव [illegible] [illegible] बिधि बंदे ।
कल दास तुलसी [illegible] आनन्द कंदे ॥

दो० – निसिचर अधम मलाकर ताहि दीन्ह निज धाम ।
गिरिजा ते नर मंदमति जे न भजहिं श्रीराम ॥ ७१ ॥

चौ० – दिन कें अंत फिरीं दोउ अनी । समर भई सुभटन्ह श्रम घनी ॥
राम कृपाँ कपि दल बल बाढ़ा । जिमि तृन पाइ लाग अति डाढ़ा ॥
छीजहिं निसिचर दिनु अरु राती । निज मुख कहें सुकृत जेहि भाँती ॥
बहु बिलाप दसकंधर करई । बंधु सीस पुनि पुनि उर धरई ॥
रोवहिं नारि हृदय हति पानी । तासु तेज बल बिपुल बखानी ॥
मेघनाद तेहि अवसर आयउ । कहि बहु कथा पिता समुझायउ ॥
देखेहु कालि मोरि मनुसाई । अबहिं बहुत का करौं बड़ाई ॥
इष्टदेव सैं बल रथ पायउँ । सो बल तात न तोहि देखायउँ ॥
एहि बिधि जल्पत भयउ बिहाना । चहुँ दुआर लागे कपि नाना ॥

गर्दी जमलेली आहे. आपल्या अनेक [illegible], सुरा तुलसीदास म्हणतात एका मुखाने मी त्याचे वर्णन करीत [illegible].

[illegible] करुणासागरस्वामींना [illegible] किती नीच व पापांचा [illegible]!

मग अशा [illegible] भाग आहे! ७१

सूर्यास्ताबरोबर दोन्ही सैन्ये [illegible] होते त्यांना लढण्यामुळे अत्यंत थकवा आला होता.

परंतु कपिसैन्यात [illegible] अग्नी भडकतो त्याप्रमाणे श्रीरामांची कृपा [illegible] होत असत.

[illegible] सत्कृत्याचे वर्णन केल्याने [illegible].

इकडे कुंभकर्णाचे मस्तक [illegible] त्याच्याबरोबरच कुंभकर्णाच्या अनेक [illegible] करीत रडू लागल्या!

अशा प्रकारे सर्वत्र कुंभकर्णासाठी शोक चालू असता [illegible] मेघनाद आला आणि त्याने [illegible] प्रकारांनी आपल्या बापाची समजूत घातली. तो म्हणाला, " [illegible] माझी कर्तबगारी दिसेल. [illegible] अर्थ नाही. इष्ट देवतेने मला बळ व रथ दिलेला आहे. [illegible] आलो नाही. असो."

याप्रमाणे बडबड चालू असता [illegible] होऊन लंकेच्या चारी वेशींवर कपिसैन्याने [illegible].



इत कपि भालु काल सम बीरा। उत रजनीचर अति रनधीरा ॥
लरहिं सुभट निज निज जय हेतू। बरनि न जाइ समर खगकेतू ॥

दो० — मेघनाद मायामय रथ चढ़ि गयउ अकास।
गर्जेउ अट्टहास करि भइ कपि कटकहि त्रास ॥ ७२ ॥

चौ० — सक्ति सूल तरवारि कृपाना। अस्त्र सस्त्र कुलिसायुध नाना ॥
डारइ परसु परिघ पाषाना। लागेउ बृष्टि करै बहु बाना ॥
दस दिसि रहे बान नभ छाई। मानहुँ मघा मेघ झरि लाई ॥
धरु धरु मारु सुनिअ धुनि काना। जो मारइ तेहि कोउ न जाना ॥
गहि गिरि तरु अकास कपि धावहिं। देखहिं तेहि न दुखित फिरि आवहिं ॥
अवघट घाट बाट गिरि कंदर। माया बल कीन्हेसि सर पंजर ॥
जाहिं कहाँ ब्याकुल भए बंदर। सुरपति बंदि परे जनु मंदर ॥
मारुतसुत अंगद नल नीला। कीन्हेसि बिकल सकल बलसीला ॥
पुनि लछिमन सुग्रीव बिभीषन। सरन्हि मारि कीन्हेसि जर्जर तन ॥
पुनि रघुपति सैं जूझै लागा। सर छाँड़इ होइ लागहिं नागा ॥

एका बाजूस काळासारखे भल्ल कपी आहेत, उलट राक्षससेनेतही अत्यंत रणबहादर असे शूर राक्षस आहेत. प्रत्येक वीराच्या अंतःकरणात आज आपण विजयी होणार, अशी महत्त्वाकांक्षा उसळत आहे !

काकभुशुंडी गरुडाला सांगतो, ' हे खगकेतू अशा या अतुल्य युद्धाचे वर्णन करणे अशक्य आहे."

इतक्यात एक मोठी गर्जना कानावर येऊन सर्व कपिसैन्यात घबराट पसरली. चौकशी केल्यानंतर कळले की, मेघनाद आपल्या मायामय रथात बसून त्याने आकाशात उड्डाण करून ही भयंकर गर्जना केली व तिचा हा परिणाम ! ७२

थोड्याच वेळात शक्ती, शूल, तरवारी, कृपाण इत्यादि अस्त्रे, शस्त्रे, वज्र व नानाप्रकारची आयुधे, परशू, परिघ आणि नुसते दगड सुद्धा या सर्वांचा आकाशातून नुसता पाऊस सुरू झाला. बाणांची सरबत्ती तर अशी चालू झाली की, जणू दाही दिशांना व्यापून राहिलेल्या मघा नक्षत्रातील मेघांची संतत धारच !

" धरा मारा; मारा धरा " असा आवाज कानावर आदळू लागला, परंतु कोण कोणाला धरतो व कोण कोणाला मारतो, कोण असे ओरडतो, याचा मात्र पत्ता मुळीच लागेना.

तरीसुद्धा आवाजाच्या रोखाने मोठे पर्वत व वृक्ष घेऊन वानरसैन्याने जोराने हल्ला चढवला, पण व्यर्थ ! कोणीच दिसेना ! त्यामुळे दुःखी होऊन ते परतले.

जिकडे तिकडे भराभर सैन्याची हालचालही बंद होण्याची वेळ आली. कारण मेघनादाने आपल्या बाणांच्या बळावर सर्वत्र अवघड घाट, त्यावरील वाटा, गिरिकन्दर इत्यादि सर्व मायेच्या जोरावर बाणांचे पिंजरेच बनवले ! पळून जाणेही अशक्य !

सर्व वानरसैन्याची त्यावेळेची केविलवाणी स्थिती पाहून इंद्राच्या कारागृहात पडलेल्या मंदर पर्वताची आठवण झाली !

मेघनादाच्या पराक्रमाने आज खरोखरच उच्चांक गाठला. मारुती, अंगद, नल, नील, इत्यादि सर्व बलशाली वानरांनासुद्धा त्याने पूर्णपणे घायाळ करून सोडले !

मग लक्ष्मण, सुग्रीव व बिभीषण यांना बाण मारून त्याने त्यांचे देह जर्जर केले !

याप्रमाणे सर्वांनाच त्याने जिंकल्यावर तो प्रत्यक्ष रघुपतीशी युद्ध करू लागला. त्या ठिकाणीही अपूर्व प्रकार दिसू लागला. इंद्रजिताच्या धनुष्यातून सुटणारा प्रत्येक बाण प्रभूच्या शरीराला नाग बनून डसू लागला !

व्याल पास बस भए खरारी । स्वबस अनंत एक अविकारी ॥
नट इव कपट चरित कर नाना । सदा स्वतंत्र एक भगवाना ॥
रन सोभा लगि प्रभुहिं बँधायो । नागपास देवन्ह भय पायो ॥

दो० — गिरिजा जासु नाम जपि मुनि काटहिं भव पास ।
सो कि बंध तर आवइ व्यापक बिस्व निवास ॥ ७३ ॥

चौ० — चरित राम के सगुन भवानी । तर्कि न जाहिं बुद्धि बल बानी ॥
अस बिचारि जे तग्य बिरागी । रामहि भजहिं तर्क सब त्यागी ॥
व्याकुल कटकु कीन्ह घननादा । पुनि भा प्रगट कहइ दुर्बादा ॥
जामवंत कह खल रहु ठाढ़ा । सुनि करि ताहि क्रोध अति बाढ़ा ॥
बूढ़ जानि सठ छाँड़ेउँ तोही । लागेसि अधम पचारै मोही ॥
अस कहि तरल त्रिसूल चलायो । जामवंत कर गहि सोइ धायो ॥
मारिसि मेघनाद कै छाती । परा भूमि घुर्मित सुरघाती ॥
पुनि रिसान गहि चरन फिरायो । महि पछारि निज बल देखरायो ॥

—स्वयश, अनंत, एक व अविकारी असेही [illegible]

—एखाद्या नटाप्रमाणे ते नाना प्रकार [illegible]

—तथापि ते भगवान [illegible] अशावेळी होण्याचा संभव [illegible]

[illegible] प्रभूंनी स्वतःला [illegible] पाणी पळाले ! ते घाबरले.

—इकडे रामकथा श्रवण [illegible] म्हणून शंकर म्हणाले—

" गिरिजे ! [illegible] प्रभू स्वतःच बंधनात [illegible]

" हे भवानी ! [illegible] नाही. असा विचार करून जे [illegible] सन्मार्ग धरतात !"

असो. मेघनादाने [illegible] अपशब्द बोलू लागला !

ते जांबवंताला [illegible] पळून जाऊ नकोस ! "

त्यावेळी [illegible] " अरे मूर्खा ! [illegible] देतोस ! " एवढे बोलून [illegible]

जांबवंताला [illegible] धावत जाऊन मेघनादाच्या [illegible] जमिनीवर पडला ! परंतु [illegible] भिरकावला की, [illegible]

बर प्रसाद सो मरइ न मारा । तब गहि पद लंका पर डारा ॥
इहाँ देवरिषि गरुड़ पठायो । राम समीप सपदि सो आयो ॥

दो० — खगपति सब धरि खाए माया नाग बरूथ ।
माया बिगत भए सब हरषे बानर जूथ ॥ ७४ (क) ॥
गहि गिरि पादप उपल नख धाए कीस रिसाइ ।
चले तमीचर बिकलतर गढ़ पर चढ़े पराइ ॥ ७४ (ख) ॥

चौ० — मेघनाद कै मुरछा जागी । पितहि बिलोकि लाज अति लागी ॥
तुरत गयउ गिरिबर कंदरा । करौं अजय मख अस मन धरा ॥
इहाँ बिभीषन मंत्र बिचारा । सुनहु नाथ बल अतुल उदारा ॥
मेघनाद मख करइ अपावन । खल मायावी देव सतावन ॥
जौं प्रभु सिद्ध होइ सो पाइहि । नाथ बेगि पुनि जीति न जाइहि ॥
सुनि रघुपति अतिसय सुख माना । बोले अंगदादि कपि नाना ॥
लछिमन संग जाहु सब भाई । करहु बिधंस जग्य कर जाई ॥

—म्हाताऱ्याने असा पराक्रम केला की, त्याने मिळवलेल्या वराचा पाठिंबा नसता तर या तडाख्याने मेघनाद खास ठारच झाला असता !

हे पाहून जांबवंताने पुनः त्याच्या पायाला धरून दिला लंकेत झोकून !

जांबवंत व मेघनाद यांचे युद्ध चालू असताच, नारदानी पाठविलेला गरुड रघुपतीपाशी येऊन दाखल झाला; आणि त्या पक्षिराजाने ती सर्व मायावी नागांची भेंडोळी भराभरा गट्ट करून टाकली ! त्यामुळे ती निशाचराची सर्व मायाच निष्फळ झाली.

त्याबरोबर असा चमत्कार झाला की, इतर सर्व सेनासमूहास मूर्छित पाडणारे बाण दिसायचे बंद झाले; आणि सर्वांच्या जखमा जणू स्वप्नात झाल्याप्रमाणे लक्ष्मणादि सर्व वीर अगदी सुखनिद्रेतून उठल्यासारखे ताजेतवाने झाले ! ते पाहून सर्व कपिसैन्याला केवढा आनंद झाला ! ७४ (क)

याप्रमाणे घमेंडखोर मेघनादाचे सर्व प्रयत्न धुळीस मिळाले व अत्यंत लाजिरवाणा असा पराभव मात्र त्याच्या पदरात पडल्याने पुन्हा रावणास तोंड दाखविण्यासुद्धा त्याला जागा उरली नाही.

मेघनादाची अशी फटफजिती जांबवंतासारख्या वृद्धाने उडवलेली पाहून वानरसेनेत उत्साहाचे भरते आले. नखे, पर्वत, वृक्ष व पाषाण ही आपली शस्त्रे घेऊन त्यांनी अत्यंत क्रुद्ध होऊन शत्रूवर मारा केला.

त्यामुळे राक्षस-सैन्य अतिशय व्याकुळ होऊन पळत सुटले व जीव वाचविण्यासाठी त्यांनी किल्ल्याचा आसरा घेतला. ७४ (ख)

काही काळ गेल्यानंतर इकडे लंकेत इंद्रजिताची मूर्च्छा उडाली, परंतु बापाला पाहताच त्याने लाजेने खाली मान घातली. तो सरळ एका उंच अशा पर्वताच्या गुहेत शिरला आणि तेथे बसून अजय यज्ञ करावा असे त्याने आपल्या मनाशी ठरविले.

ही बातमी हेराकडून बिभीषणाच्या कानी येताच योग्य वेळी सावधानतेची गुप्त मसलत करण्यासाठी तो श्रीरामचंद्राजवळ गेला आणि म्हणाला, "हे अतुल्य बलवान् व उदार नाथ ! एक महत्त्वाची बातमी देण्यास मी आलो आहे.—देवांना सर्व प्रकारे सतावणारा दुष्ट मायावी मेघनाद अपवित्र यज्ञ करत आहे. हा त्याचा यज्ञ जर का प्रभो, सिद्धीस गेला तर नाथ ! त्याला लवकर जिंकणे अशक्य होईल."

बिभीषणाने ही बातमी वेळेवर दिल्याने रघुनायकाला संतोष झाला. त्यांनी अंगद आदिकरून पुष्कळ वानरवीरांना लगेच बोलावून घेतले व त्यांना योग्य अशा आज्ञा दिल्या—

"वीरहो, लक्ष्मणासह तुम्ही सर्वांनी जाऊन मेघनादाच्या यज्ञाचा तावडतोब विध्वंस करा.

तुम्ह लछिमन मारेहु रन ओही। देखि सभय सुर दुख अति मोही॥
मारेहु तेहि बल बुद्धि उपाई। जेहिं छीजै निसिचर सुनु भाई॥
जामवंत सुग्रीव बिभीषन। सेन समेत रहेहु तीनिउ जन॥
जब रघुबीर दीन्हि अनुसासन। कटि निषंग कसि साजि सरासन॥
प्रभु प्रताप उर धरि रनधीरा। बोले घन इव गिरा सुबीरा॥
जौं तेहि आजु बधें बिनु आवौं। तौ रघुपति सेवक न कहावौं॥
जौं सत संकर करहिं सहाई। तदपि हतउँ रघुबीर दोहाई॥

दो०—रघुपति चरन नाइ सिरु चलेउ तुरंत अनंत।
अंगद नील मयंद नल संग सुभट हनुमंत॥ ७५॥

चौ०—जाइ कपिन्ह सो देखा बैसा। आहुति देत रुधिर अरु भैंसा॥
कीन्ह कपिन्ह सब जग्य बिधंसा। जब न उठइ तब करहिं प्रसंसा॥
तदपि न उठइ धरेन्हि कच जाई। लातन्हि हति हति चले पराई॥
लै त्रिसूल धावा कपि भागे। आए जहँ रामानुज आगे॥
आवा परम क्रोध कर मारा। गर्ज घोर रव बारहिं बारा॥

"लक्ष्मणा! तुला [illegible] उत्पन्न झाली आहे. [illegible] करूनच [illegible] तुम्ही आपल्या सैन्यासह [illegible]."

रघुवीरांची आज्ञा [illegible] हृदयात धारण करून [illegible]

"प्रभो! [illegible] म्हणविणार नाही! [illegible] मी त्याला [illegible]!"

असे लक्ष्मण [illegible] घेऊन त्वरेने निघाले.

अंगद, नील, मयंद, नल [illegible] हनुमान [illegible]

[illegible] आहे. [illegible] [illegible]

[illegible] करून [illegible]

[illegible] जावे असा [illegible]

आता [illegible] धावून गेले. [illegible] कारण ते [illegible]

[illegible] याच्या [illegible]



कोपि मरुतसुत अंगद धाए । हति त्रिसूल उर धरनि गिराए ।।
प्रभु कहँ छाँड़ेसि सूल प्रचंडा । सर हति कृत अनंत जुग खंडा ।।
उठि बहोरि मारुति जुबराजा । हतहिं कोपि तेहि घाउ न बाजा ।।
फिरे बीर रिपु मरइ न मारा । तब धावा करि घोर चिकारा ।।
आवत देखि क्रुद्ध जनु काला । लछिमन छाड़े बिसिख कराला ।।
देखेसि आवत पबि सम बाना । तुरत भयउ खल अंतरधाना ।।
बिबिध बेष धरि करइ लराई । कबहुँक प्रगट कबहुँ दुरि जाई ।।
देखि अजय रिपु डरपे कीसा । परम क्रुद्ध तब भयउ अहीसा ।।
छलिमन मन अस मंत्र दृढ़ावा । एहि पापिहि मैं बहुत खेलावा ।।
सुमिरि कोसलाधीस प्रतापा । सर संधान कीन्ह करि दापा ।।
छाड़ा बान माझ उर लागा । मरती बार कपटु सब त्यागा ।।

दो० – रामानुज कहँ रामु कहँ अस कहि छाँड़ेसि प्रान ।
धन्य धन्य तब जननी कह अंगद हनुमान ।। ७६ ।।

चौ० – बिनु प्रयास हनुमान उठायो । लंका द्वार राखि पुनि आयो ।।
तासु मरन सुनि सुर गंधर्बा । चढ़ि बिमान आए नभ सर्बा ।।

पहिली सलामी देण्यासाठी हनुमान व अंगद यांनी त्याला तोंड देण्यासाठी त्याच्यावर चाल केली. परंतु मेघनादाने आपल्या त्रिशूळाने त्यांच्या छातीवर जोराचा वार करून दोघांनाही जमिनीवर पाडले !

त्यानंतर प्रभू लक्ष्मणावर त्याने एक प्रचण्ड शूळ फेकला. अनंताने बाण मारून त्याचे दोन तुकडे केले.

इतक्यात हनुमान व अंगद सावध झाले व त्यांनीही मेघनादावर पुन्हा मारा सुरू केला. तथापि त्याला एकही घाव लागेना ! आपल्या मारण्याचा त्याच्यावर काहीच परिणाम होत नाही, हे दिसताच ते दोघे वानर-वीर नाइलाजाने परत फिरले.

परंतु त्यामुळे त्याला विजय उन्माद चढून त्याने घोर चित्कार केला व त्या दोघांची त्याने पाठ धरली!

जणू काळच क्रुद्ध होऊन त्यांच्यामागे लागला आहे, असे पाहून लक्ष्मणाने त्याच्यावर भयंकर बाण सोडले !

परंतु वज्रासारखे ते कराल बाण आपणावर येत आहेत, असे दिसताच तो दुष्ट झटकन् गुप्त झाला; आणि नाना प्रकारची मायावी रूपे घेऊन तो आता लढू लागला. केव्हा प्रकट व्हावे, तर अंगावर शस्त्र अगर बाण येताच लपावे, असे विलक्षण युद्ध-तंत्र त्याने अंमलात आणले.

शत्रूने आपणावर मारा करावा आणि आपण उलट हल्ला चढवण्यास जावे तर शत्रू दिसण्याचाच बंद होतो. असा शत्रू कोणीतरी कसा जिंकणार, अशा भीतीने कपी हैराण झाले !

आपले सैन्य माघार घेण्याच्या बेतात आहे, हे पाहून लक्ष्मण अत्यंत क्रुद्ध झाले. आपण या पाप्याला खेळण्याला फार वेळ दिला, अशी त्यांची खात्री झाली. कोसलपतींच्या प्रतापाचे स्मरण करून अत्यंत त्वेषाने आनंदाच्या धनुष्यातून बाण सुटला. तो बाण मेघनादाच्या छातीत घुसला, आपला मरणकाळ आला याची त्याला जाणीव झाली आणि त्याने आपले सर्व कपट सोडले.

" रामानुज कुठे आहे ? कुठे आहे राम ? " असे म्हणून त्याने प्राण सोडला.

—हे शब्द त्याच्या मुखातून बाहेर पडल्याचे ऐकून अंगद-हनुमान म्हणाले, ' धन्य धन्य आहे तुझी जननी ! ' ७६

मेघनादाचा तो जड देह हनुमंताने सहज लीलेने उचलला व लंकेच्या एका वेशीत ठेवून तो परत आला.

इंद्रजित मेल्याचे समजताच देव, सिद्ध गंधर्व इत्यादि सर्व विमानात बसून आकाशात आले. त्यांनी

बरषि सुमन दुंदुभीं बजावहिं । [illegible] बिमल जसु गावहिं ॥
जय अनंत जय जगदाधारा । तुम्ह प्रभु सब देवन्हि निस्तारा ॥
अस्तुति करि सुर सिद्ध सिधाए । लछिमन कृपासिंधु पहिं आए ॥
सुत बध सुना दसानन जबहीं । मुरुछित भयउ परेउ महि तबहीं ॥
मंदोदरी रुदन कर भारी । उर ताड़न बहु भाँति पुकारी ॥
नगर लोग सब ब्याकुल सोचा । सकल कहहिं दसकंधर पोचा ॥

दो० — तब दसकंठ बिबिधि बिधि समुझाईं सब नारि ।
नस्वर रूप जगत सब देखहु हृदयँ बिचारि ॥ ७६ ॥

चौ० — तिन्हहि ग्यान उपदेसा रावन । आपुन मंद कथा सुभ पावन ॥
पर उपदेस कुसल बहुतेरे । जे आचरहिं ते नर न घनेरे ॥
निसा सिरानि भयउ भिनुसारा । लगे भालु कपि चारिहुँ द्वारा ॥
सुभट बोलाइ दसानन बोला । रन सन्मुख जा कर मन डोला ॥
सो अबहीं बरु जाउ पराई । संजुग बिमुख भएँ न भलाई ॥
निज भुज बल मैं बयरु बढ़ावा । देहउँ उतरु जो रिपु चढ़ि आवा ॥

पुष्पवृष्टी केली आणि दुंदुभी वाजविल्या. [illegible] दाधारा ! प्रभो, तुम्ही सर्व [illegible]

इतके [illegible]

पुत्रवधाचा [illegible] दरीच्या दुःखाला [illegible] बरोबरच [illegible] व्याकुळ झाले. " दशकंठ [illegible]

[illegible] " हे पाहा. [illegible] आल्या. अंतःकरण [illegible] " ७७

अशा प्रकारे [illegible] शुभ व पवित्र आहेत.

[illegible] करणारे फारच [illegible]

अशाप्रकारे [illegible] सैन्याने लंकेच्या [illegible]

आता [illegible] एक सभा बोलावली [illegible]

" वीर हो ! [illegible] मन विचलित होत [illegible] वैराला शोभत नाही.

" [illegible] जोरावर [illegible] समर्थ आहे. हे लक्षात ठेवा ! "

अस कहि मरुत बेग रथ साजा । बाजे सकल जुझाऊ बाजा ॥
चले बीर सब अतुलित बली । जनु कज्जल कै आँधी चली ॥
असगुन अमित होहिं तेहि काला । गनइ न भुज बल गर्ब बिसाला ॥

छं०—अति गर्ब गनइ न सगुन असगुन स्रवहिं आयुध हाथ ते ॥
भट गिरत रथ ते बाजि गज चिक्करत भाजहिं साथ ते ।
गोमाय गीध कराल खर रव स्वान बोलहिं अति घने ।
जनु कालदूत उलूक बोलहि बचन परम भयावने ॥

दो०—ताकि कि संपति सगुन सुभ सुपनेहुँ मन बिश्राम ।
भूत द्रोह रत मोहबस राम बिमुख रति काम ॥ ७८ ॥

चौ०—चलेउ निसाचर कटकु अपारा । चतुरंगिनी अनी बहु धारा ॥
बिबिध भाँति बाहन रथ जाना । बिपुल बरन पताक ध्वज नाना ॥
चले मत्त गज जूथ घनेरे । प्राबिट जलद मरुत जनु प्रेरे ॥
बरन बरन बिरदैत निकाया । समर सूर जानहिं बहु माया ॥
अति बिचित्र बाहिनी बिराजी । बीर बसंत सेन जनु साजी ॥

हे दशमुखाचे भाषण चालू असताच त्या ठिकाणी निशाचरपतींचा वायुवेगी रथ सज्ज होऊन आला. अनेक प्रकारच्या रणवाद्यांचा कोलाहल एकदम सुरू झाला.

तो आवाज ऐकताच रावणाचे अत्यंत बलवान असे सगळे राखीव सैन्य चाल करून निघाले, तेव्हा जणू काजळाचे वावटळंच चालल्याचा देखावा दिसू लागला.

पाऊल टाकताच जरी त्या वीरांना भराभर अपशकून होऊ लागले तरी स्वतःच्या बाहुबळाचा अतिशय गर्व रावणाला असल्याने त्याने त्या अपशकुनांना मुळीच भीक घातली नाही !

' शकुन काय किंवा अपशकुन काय, मी त्याची फिकीर बिल्कुल करीत नाही, ' अशी वल्गना चालू असताच हातातील शस्त्रे गळून खाली पडली; रथातून शीर खाली कोसळू लागले; हत्ती, घोडे— चीत्कार करून तोंडे फिरवून परत पळू लागले; कोल्हे, गिधाडे, गाढवे आणि कुत्री आ[illegible] कर्कश आवाज काढून रडू लागली. त्याचवेळी घुबडांचा असा भयानक घुत्कार कानावर येऊ लागला की, वाटे, हे काळदूतच मृत्यूचे भयानक संदेश देत आहेत !

आणि हे सर्व योग्य असेच होत होते ! कारण, जो कामरत, राम-विमुख, मोहवश व भूतांचा द्रोह करणारा आहे, त्याला शुभ संपत्ती व शुभ शकुन होऊन स्वप्नात तरी त्याच्या मनाला शांती मिळण्याची आशा आहे काय ? त्या दुर्दैवी पामराला हे सुख मिळणेच अशक्य ! ७८

असे इकडे रावणाचे अफाट सैन्य या सर्व विघ्नाना तोंड देऊन चालू लागले; तेव्हा त्या हत्ती, घोडे रथ व पायदळाच्या चतुरंगिणी सेनेची एक महानदीच वाहत आहे असे वाटले ! त्या सैनिक-नदीत कित्येक रथ व तसलीच अनेक प्रकारची वाहने, त्यांच्यावरील विचित्र व अगणित ध्वजपताकांनी सजलेली आहेत.

मदोन्मत्त हत्तींचे असंख्य कळप जोराने धावत असता वर्षाकाळचे मेघ वाऱ्याच्या जोराने पळत असल्याचा भास होई !

आपल्या अंगावर चित्र विचित्र रंगाचा गणवेष (बाणा) वाढून पुष्कळ प्रकारच्या मायेची माहिती असणारे असे ते रणशूर वीर चालू लागले.

अशा प्रकारची ती चित्र विचित्र रंगांनी नटलेली सेना-नदी पाहिल्यावर जणू वसंतऋतूच सेनापती होऊन त्याने आपले सैन्य सजविले आहे असे वाटे !

चलत कटक [illegible] डगहीं । छुभित पयोधि कुधर डगमगहीं ।
उठी रेनु रबि गयउ छपाई । मरुत थकित बसुधा अकुलाई ।
पनव निसान घोर रव बाजहिं । प्रलय समय के घन जनु गाजहिं ।
भेरि नफीरि बाज सहनाई । मारू राग सुभट सुखदाई ।
केहरि नाद बीर सब करहीं । निज निज बल पौरुष उच्चरहीं ।
कहइ दसानन सुनहु सुभट्टा । मर्दहु भालु कपिन्ह के ठट्टा ।
हौं मारिहउँ भूप द्वौ भाई । अस कहि सन्मुख फौज रेंगाई ।
यह सुधि सकल कपिन्ह जब पाई । धाए करि रघुबीर दोहाई ॥

छं ०—धाए बिसाल कराल मर्कट भालु काल समान ते ।
मानहुँ सपच्छ उड़ाहिं भूधर बृंद नाना बान ते ।
नख दसन सैल महाद्रुमायुध सबल संक न मानहीं ।
जय राम रावन मत्त गज मृगराज सुजसु बखानहीं ॥

दो ०—दुहु दिसि जय जयकार करि निज निज जोरी जानि ।
भिरे बीर इत रामहि उत रावनहि बखानि ॥ ७९ ॥

राक्षस राजाच्या त्या अचाट [illegible] हलू लागले; सागर क्षुब्ध होऊन [illegible] दिसेनासा झाला, वायूची गती कुंठित होऊन पृथ्वी व्याकुळ झाली.

पणव, निशाण इत्यादि [illegible] गर्जनेचेच स्मरण होऊ लागले. त्याच [illegible] की त्या सर्वांच्या [illegible] सुख देणारा असल्याने [illegible] पराक्रमाचा वडेजाव सांगू लागले !

आपल्या सैन्यातील [illegible] “ शूर वीर हो ! ऐका. तुम्ही [illegible] दोन नृपबंधूना [illegible] !”

याप्रमाणे [illegible] आज्ञा दिली !

इकडे [illegible] राक्षससैन्यावर तुटून पडले ! [illegible] सैन्यावर गेले, तेव्हा अनेक [illegible] असे दृश्य दिसले !

नखे, दात, [illegible] झाल्याने त्यांना [illegible] !

“ मदोन्मत्त हत्तींच्या [illegible] प्रकट करून, श्रीरामचंद्रा ! या धावत आहेत [illegible] !” [illegible] गात आहेत !

शेवटी दोन्ही सैन्ये [illegible] पाहून पहिली [illegible] सुरुवात होऊ लागले ! ७९,



चौ०—रावनु रथी बिरथ रघुबीरा। देखि बिभीषन भयउ अधीरा ॥
अधिक प्रीति मन भा संदेहा। बंदि चरन कह सहित सनेहा ॥
नाथ न रथ नहिं तन पद त्राना। केहि बिधि जितब बीर बलवाना ॥
सुनहु सखा कह कृपानिधाना। जेहिं जय होइ सो स्यंदन आना ॥
सौरज धीरज तेहि रथ चाका। सत्य सील दृढ़ ध्वजा पताका ॥
बल बिबेक दम परहित घोरे। छमा कृपा समता रजु जोरे ॥
ईस भजनु सारथी सुजाना। बिरति चर्म संतोष कृपाना ॥
दान परसु बुधि सक्ति प्रचंडा। बर बिग्यान कठिन कोदंडा ॥
अमल अचल मन त्रोन समाना। सम जम नियम सिलीमुख नाना ॥
कवच अभेद बिप्र गुर पूजा। एहि सम बिजय उपाय न दूजा ॥
सखा धर्ममय अस रथ जाकें। जीतन कहँ न कतहुँ रिपु ताकें ॥

दो०—महा अजय संसार रिपु जीति सकइ सो बीर।
जाकें अस रथ होइ दृढ़ सुनहु सखा मतिधीर ॥ ८० (क) ॥

आपल्या शस्त्रास्त्रांनी अद्यावत् सुसज्य अशा शूर चतुरंगिणी सेनेसह प्रत्यक्ष रावण आता संतप्त होऊन निकाली लढा देण्यासाठी समोर आला व केवळ कपिभाल्लूंच्या सैन्याच्या मदतीने, रथसुद्धा नसलेल्या, अनवाणी अशा श्रीराम-लक्ष्मणासारख्या सुकुमार राजकुमारांनी त्याला तोंड द्यायचे, हे कासावीस करणारे दृश्य पाहून बिभीषणाचा धीर सुटला.

अमर्याद प्रेमळ मनाला असल्या शंका-कुशंका नेहमीच सतावून सोडतात. तसेच येथे झाले. बिभीषण अगदी बेचैन झाला व त्याने पुढे येऊन प्रभूचे चरण धरले व भरल्या अंतःकरणाने तो बोलू लागला—

"नाथ, आपल्या जवळ नाही रथ, ना चिलखत की पादत्राण! अशा स्थितीत त्या बलाढ्य व ससैन्य रावणाला आपण कसा जिंकणार?"

बिभीषणाचे हे प्रेमळ भाषण ऐकून कृपासागर रघुवीर म्हणाले, "सख्या, बिभीषणा! अरे, जय देणारा रथ दुसराच आहे. त्याचे लक्षण तुला सांगतो ते ऐक—

शौर्य आणि धैर्य ही त्या रथाची दोन चाके; त्यच्या बळकट ध्वजा आणि पताकाच्या जागी न डगमगणारे सत्य आणि न ढळणारे शील शोभते! बल, विवेक, इंद्रिय निग्रह आणि परहित हे त्या धर्म रथाचे चार घोडे असून, क्षमा, कृपा व समता या तिपेडी (तिहेरी) दोरीने (लगामाने) त्यांना रथाला जुंपले आहेत.

"यानंतर अशा रथात बसणाऱ्या रथीचा शस्त्रास्त्रांचा साठा कसा असतो तो समजून घे. [श्रीशंकराच्या ईशभजनाच्या रूपाने सुजाण सारथी घेऊन हातात वैराग्याची ढाल व संतोषाची तरवार उपसावयाची! परशूसाठी दान, बुद्धी हीच प्रचंड शक्ती, उत्तम विज्ञान (सर्व जग ब्रह्मरूप पाहणे) हेच कधी न मोडणारे व बळकट असे धनुष्य व त्याच्यासाठी अत्यंत शुद्ध व निश्चल मनाचा भाता सोबत ठेवून त्यात शम, यम, नियम यांच्या सारखे अनेक प्रकारचे बाण भरावेत. विप्रपूजा आणि गुरूसेवा हे अभेद्य कवच अंगावर घालावे म्हणजे विजय निश्चित पदरी टाकणारा एकमेव असा हा सर्वांगपरिपूर्ण रथ तयार झाला. मानवी जीवन यशस्वी करण्यास दुसरा उपाय नाही!

"मित्रा! आणि मौज कशी होते पाहा; असा धर्ममय रथ ज्याच्याजवळ आहे, त्याने जिंकावा कोणी शत्रूच जगात शिल्लक राहत नाही!

"हे दृढ बुध्दीच्या सख्या! सर्वस्वी अजिंक्य अशा या जन्ममरणरूप संसारशत्रूला जिंकू शकतो तोच खरा वीर; आणि ज्याच्याजवळ असा धर्ममय रथ असतो तोच वीर या शत्रूचा पूर्ण बिमोड करू शकतो. ८० (क)

सुनि प्रभु बचन बिभीषन हरषि गहे पद कंज।
एहि मिस मोहि उपदेसेहु राम कृपा सुख पुंज॥ ८० (ख)॥

उत पचार दसकंधर इत अंगद हनुमान
लरत निसाचर भालु कपि करि निज प्रभु आन॥ ८० (ग)॥

चौ०—सुर ब्रह्मादि सिद्ध मुनि नाना। देखत रन नभ चढ़े बिमाना॥
हमहू उमा रहे तेहिं संगा। देखत राम चरित रन रंगा॥
सुभट समर रस दुहु दिसि माते। कपि जयसील राम बल ताते॥
एक एक सन भिरहिं पचारहिं। एकन्ह एक मर्दि महि पारहिं॥
मारहिं काटहिं धरहिं पछारहिं। सीस तोरि सीसन्ह सन मारहिं॥
उदर बिदारहिं भुजा उपारहिं। गहि पद अवनि पटकि भट डारहिं॥
निसिचर भट महि गाड़हिं भालू। ऊपर ढारि देहिं बहु बालू॥
बीर बलीमुख जुद्ध बिरुद्धे। देखिअत बिपुल काल जनु क्रुद्धे॥

प्रभूचे हे भाषण ऐकून बिभीषणाला [illegible] आनंद झाला [illegible] पुन [illegible] चरणकमल धरले आणि सद्गदित होऊन तो म्हणाला, "[illegible] रामचंद्रा! या निमित्ताने आपण मला केवढा [illegible] उपदेश केला!" (८० ख)

[illegible] यांचा [illegible] तिकडून दशानन ललकारतो आहे व इकडून अंगद आणि हनुमान [illegible] उत्तर देत आहेत!

निशाचर आणि भल्लुकपींनी [illegible] आणि [illegible] सुरुवात लढाईला! (८० ग)

राम-रावण युद्धातील [illegible] आकाशात गर्दी करू लागली. त्यात ब्रह्मदेवादिदेव, सिद्ध व अनेक मुनिवर [illegible] होते.

पार्वतीला शंकर [illegible] "उमे! [illegible] पाहात होतोच.

दोन्हीकडील वीरांच्या अंगात [illegible] बल अमर्याद वाटले आणि [illegible]

एक वीर दुसऱ्याला [illegible] पाहावे तो [illegible] गलेलठ्ठ राक्षस पाहून [illegible] आहेत!

कोणी [illegible] आहेत, तर दुसरे [illegible] करून राक्षसांचे शिरे [illegible] त्याप्रमाणे ते मस्तक दुसऱ्या राक्षसाच्या [illegible] आहेत.

कोणी पोट फाडून आतडी बाहेर [illegible] तर कोणी [illegible] दुसरे कोणी राक्षसांचे [illegible] आहेत! कोणी [illegible] खड्डा [illegible] जिवंत राक्षस पुरून [illegible] टाकत आहेत!

[illegible] विरुद्ध [illegible] हे असंख्य अवतार प्रगट झाले आहेत असे [illegible]!



छं० – क्रुद्धे कृतांत समान कपि तन स्रवत सोनित राजहीं ॥
मर्दहिं निसाचर कटक भट बलवंत घन जिमि गाजहीं ॥
मारहिं चपेटन्हि डाटि दातन्ह काटि लातन्ह मीजहीं
चिक्करहिं मर्कट भालु छल बल करहिं जेहिं खल छीजहीं ॥ १ ॥
धरि गाल फारहिं उर बिदारहिं गल अँताबरि मेलहीं ।
प्रल्हादपति जनु बिबिध तनु धरि समर अंगन खेलहीं ॥
धरु मारु काटु पछारु घोर गिरा गगन महि भरि रहीं ।
जय राम जो तृन ते कुलिस कर कुलिस ते कर तृन सही ॥ २ ॥

दो० – निज दल बिचलत देखेसि बीस भुजाँ दस चाप ।
रथ चढि चलेउ दसानन फिरहु फिरहु करि दाप ॥ ८१ ॥

चौ० – धायउ परम क्रुद्ध दसकंधर । सन्मुख चले हूह दै बंदर ॥
गहि कर पादप उपल पहारा । डारेन्हि ता पर एकहिं बारा ॥

याप्रमाणे प्रत्यक्ष कृतान्तासारखे चवताळून लढत असलेले ते कपी राक्षसांच्या रक्ताने नखशिखान्त न्हाल्यामुळे फारच खुलून दिसत आहेत !

अंगात सामर्थ्याचा संचार झाल्यामुळे अगडबंब राक्षस दिसताच त्यावर तुटून पडावे आणि त्याला घायाळ करून माती चारावी. आणि अशा यशस्वी पराक्रमाबरोबर मेघ गर्जना करावी, असा त्यांचा कार्यक्रम सुरू झाला.

अशावेळी राक्षसवीरांना घायाळ करण्याच्या त्यांच्या अनेक युक्त्या असत. अवसानात असला तर नुसती एक थप्पड मारूनच त्याची कंबक्ती करावी; संताप आणल्यास त्याच्या नरडीचा घोट घेण्यासाठी त्याचा कर-करून चावा घ्यावा; एवढेही ज्याचे भाग्य नसेल त्याचे स्वागत कमरेत एक फक्कड लाथ मिळूनच व्हायचे ! त्याला पुनः पाणीही मागणे अशक्य होई !

अशा प्रकारे मर्कट-भल्लवीर हत्तीप्रमाणे चीत्कार करून अनेक युक्त्या-प्रयुक्त्या करून आपल्या दैवी सामर्थ्याच्या जोरावर त्या दुष्ट राक्षसाचा फडशा पाडीत आहेत ! १

कोणी राक्षसांचे गाल टरकावून देतात, कोणी छाती फाडतात, तर कोणी ढेरपोट्या राक्षसाचा डेरा फोडून त्यातील लांबलचक आतडी आपल्या गळ्यात घालतात ! हा देखावा पाहिल्यावर नारसिंहाचे अनेक अवतार एकदम प्रकट होऊन त्यांचा हा रणांगणावर खेळ सुरू झाला आहे असा भास होई ! –धरा, मारा, पकडा, कापा अशा घोर गर्जनांनी पृथ्वी व आकाश अगदी दुमदुमले आहे !

खरोखर एखाद्या गवताच्या काडीलाही वज्राप्रमाणे कठीण करणारे आणि मनात आल्यास प्रत्यक्ष वज्रालाही कस्पटाची सर सहज आणून सोडतात अशा सामर्थ्याच्या श्रीरामचंद्रांचा विजय असो ! २

आपल्या अजिंक्य मानलेल्या राक्षससैन्याची अशी लांडगेतोड आपल्या डोळ्यासमोर होत असलेली पाहून आपल्या वीस बाहूंनी दहा धनुष्ये हातात घेतली आणि दशानन स्वतः रथात बसून चाल करून आला.

“ मागे फिरा, फिरा मागे अगोदर. पळू नका. परत फिरा ! ” असे कंठशोष करून तो आपल्या सैन्यावर खेकसू लागला. त्यामुळे ते सैन्य संत्रस्त झाले. ८१

आपल्या सैन्याची पळपुटी तोंडे रणसन्मुख करून तो दशकंठ अत्यंत संतापाने कपिसेनेवर तुटून पडला ! वानरांना पूर्वीच्या विजयाचा उन्माद असल्याने यांनी असल्याने त्यांनी हुप् हुप् असा मोठा आवाज केला ! पुष्कळ पाषाण, वृक्ष, पर्वत त्यांनी उपटून घेतले आणि ते सर्व एकदम रावणाच्या अंगावर टाकण्यासाठी त्यांनी दशाननावर चाल केली.

लागहि सैल [illegible] [illegible] [illegible] [illegible]
चला न अचल [illegible] [illegible] [illegible] [illegible]
इत उत झपटि दपटि कपि [illegible] [illegible]
चले पराइ [illegible] [illegible] [illegible]
पाहि पाहि [illegible] [illegible]
तेहि देखे [illegible] [illegible]

छं० — [illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]

दो० — निज दल बिकल [illegible]
लछिमन चले क्रुद्ध [illegible]

चौ० — रे खल का मारसि कपि भालू । [illegible]
खोजत रहेउँ तोहि सुत घाती । आजु निपाति [illegible] ॥

[illegible] लागता ! [illegible] अस्त्रांचा [illegible] निश्चळ [illegible]

[illegible] चिरडणे, [illegible]

त्यानंतर " [illegible] रक्षण कर ! [illegible] पळत सुटले.

[illegible] दारी धनुष्यावर [illegible] प्रमाणे आकाश [illegible] आकाशात [illegible] [illegible] निघाले [illegible]

[illegible] लागले, " [illegible] धाव रे धाव ! "

[illegible] धनुष्य [illegible]

आ[illegible] " अरे [illegible] मी आलो आहे. [illegible]

[illegible]

" अरे, [illegible]

अस कहि छाड़ेसि बान प्रचंडा । लछिमन किए सकल सत खंडा ॥
कोटिन्ह आयुध रावन डारे । तिल प्रवान करि काटि निवारे ॥
पुनि निज बानन्ह कीन्ह प्रहारा । स्यंदनु भंजि सारथी मारा ॥
सत सत सर मारे दस भाला । गिरि सृंगन्ह जनु प्रबिसहिं ब्याला ॥
पुनि सत सर मारा उर माहीं । परेउ धरनि तल सुधि कछु नाहीं ॥
उठा प्रबल पुनि मुरुछा जागी । छाड़िसि ब्रह्म दीन्हि जो साँगी ॥

छं० —सो ब्रह्म दत्त प्रचंड सक्ति अनंत उर लागी सही ।
परयो बीर बिकल उठाव दसमुख अतुल बल महिमा रही ॥
ब्रह्मांड भवन बिराज जाकें एक सिर जिमि रज कनी ।
तेहि चह उठावन मूढ़ रावन जान नहिं त्रिभुअन धनी ॥

दो० —देखि पवनसुत धायउ बोलत बचन कठोर ।
आवत कपिहि हन्यो तेहिं मुष्टि प्रहार प्रघोर ॥ ८३ ॥

चौ० —जानु टेकि कपि भूमि न गिरा । उठा सँभारि बहुत रिस भरा ॥

तापलेले हृदय शांत करतो. हे शब्द त्याच्या मुखातून बाहेर पडत असताच, त्याने प्रचण्ड बाणाची नुसती झड लावली.

—लक्ष्मणाने त्या बाणांचे शेकडो तुकडे करून टाकले.

ते पाहून चिडून त्याने असंख्य आयुधे लक्ष्मणावर मारली; परंतु त्या सर्वांचे तिळा-तिळा एवढे तुकडे झाल्याचे रावणास पाहावयास मिळाले.

अशा रीतीने, त्या निशाचर पतीची युद्धाची घमेंड त्याच्याच वशात घातल्यावर अनंतांनी आपल्या चढाईच्या लढाईस सुरवात केली. पहिल्या झपाट्यालाच असे तीक्ष्ण बाण सोडले की, त्याच्या रथाच्या ठिकऱ्या उडाल्या आणि सारथी ठार झाला ! त्यानंतर प्रत्येक डोक्यावर शंभर याप्रमाणे दहा मस्तकांवर एकाच वेळी एक हजार बाण सोडले. ते सर्व बाण पर्वताच्या शिखरात भुजंग शिरावेत तसे घुसू लागले ! हे होते न होते तोच रावणाच्या छातीवर नेम धरून लक्ष्मणाच्या धनुष्यावरून एकदम् शंभर बाण सूं सूं करीत सुटले आणि त्यांनी बिनचूक आपल्या लक्ष्याचा भेद केला !

दशमुख घेरी येऊन धाडकन् रणभूमीवर पडला आणि त्याला तिळमात्र शुद्धी उरली नाही !

थोडा वेळ बेशुद्ध स्थितीत गेल्यानंतर रावणाने डोळे उघडले आणि त्या प्रबल निशाचराने संतापाने ब्रह्मदेवाकडून मिळालेली शक्ती लक्ष्मणावर सोडली.

ब्रह्मदेवाने दिलेली ती प्रचण्ड व अमोघ शक्ती ! अनंताच्या उरात ती लागताच तो वीर मूर्छित होऊन पडला !

या शत्रूबद्दलही कुतूहल असल्याने रावण लगेच धावत आला आणि आपल्या वीस हातांनी त्याला उचलू लागला. परंतु अतुल बलवान दशमुखालाही हार खावी लागली ! आणि ते सरळच होते— ज्याच्या एका मस्तकावर ब्रह्मांडरूपी घर रजःकणासारखे राहते त्याला, हा त्रिभुवनांचा धनी आहे, हे न ओळखता मूर्ख रावण उचलू पाहत आहे !

दशकंधराचा हा खुळचट खटाटोप पाहून पवनसुत त्याच्या अंगावर धावला आणि कठोर शब्दांनी चांगली हजेरी घेतली !

ते सहन न झाल्याने त्याने हनुमंताला एक अत्यंत घोर अशी बुक्की मारली. ८३

त्यामुळे त्याचा तोल जाऊन खाली गुढघे टेकून त्याने स्वतःला सावरले. तो जमिनीवर पडला नाही.

मुठिका एक ताहि कपि मारा। परेउ सैल जनु बज्र प्रहारा॥
मुरुछा गै बहोरि सो जागा। कपि बल बिपुल सराहन लागा॥
धिग धिग मम पौरुष धिग मोही। जौं तैं जिअत रहेसि सुरद्रोही॥
अस कहि लछिमन कहुँ कपि ल्यायो। देखि दसानन बिसमय पायो॥
कह रघुबीर समुझु जियँ भ्राता। तुम्ह कृतांत भच्छक सुर त्राता॥
सुनत बचन उठि बैठ कृपाला। गई गगन सो सकति कराला॥
पुनि कोदंड बान गहि धाए। रिपु सन्मुख अति आतुर आए॥

छं०—आतुर बहोरि बिभंजि स्यंदन सूत हति ब्याकुल कियो।
गिर्‌यो धरनि दसकंधर बिकलतर बान सत बेध्यो हियो॥
सारथी दूसर घालि रथ तेहि तुरत लंका लै गयो।
रघुबीर बंधु प्रताप पुंज बहोरि प्रभु चरनन्हि नयो॥

दो०—उहाँ दसानन जागि करि करै लाग कछु जग्य।
राम बिरोध बिजय चह सठ हठ बस अति अग्य॥ ८४॥

चौ०—इहाँ बिभीषन सब सुधि पाई। सपदि जाइ रघुपतिहि सुनाई॥

लगेच मारुतीने [illegible] होऊन अशी [illegible] की, [illegible] तसा तो चक्कर येऊन जमिनीवर कोसळला!

काही काळ गेल्यावर तो शुद्धीवर आला आणि [illegible] अनुभवला नसल्याने तोंड भरून त्याने हनुमंताच्या अचाट सामर्थ्याची [illegible] केली!

कपि म्हणाला, "धिक्कार, धिक्कार असो माझ्या [illegible] आणि [illegible] धिक्कार असो! [illegible] बुक्कीने ठार न होता तू देवद्रोही अजून [illegible] आहेस!"

एवढे [illegible] उचलून नेले!

ते पाहून दशमुखाला [illegible] विस्मय वाटला!

[illegible] तो प्रभूकडे पाहून [illegible] "[illegible] काळाचाही काळ असून, [illegible]!"

एवढे शब्द कानी [illegible] शक्ती आकाशात निघून गेली!

तात्काळ [illegible] दाखल झाला.

आतुरतेने [illegible] बाण छातीत घुसल्याने [illegible] करून आणखी [illegible].

तेव्हा रघुवीर बंधु प्रताप[illegible] नमस्कार केला.

तिकडे लंकेत दशानन [illegible] यज्ञाला तावडतोब सुरुवात केली.

तो दुष्ट [illegible] करत आहे. ८४

इकडे [illegible] आला [illegible].



नाथ करइ रावन एक जागा । सिद्ध भएँ नहिं मरिहि अभागा ।।
पठवहु नाथ बेगि भट बंदर । करहिं बिधंस आव दसकंधर ।।
प्रात होत प्रभु सुभट पठाए । हनुमदादि अंगद सब धाए ।।
कौतुक कूदि चढे कपि लंका । पैठे रावन भवन असंका ।।
जग्य करत जबहीं सो देखा । सकल कपिन्ह भा क्रोध बिसेषा ।।
रन ते निलज भाजि गृह आवा । इहाँ आइ बक ध्यान लगावा ।।
अस कहि अंगद मारा लाता । चितव न सठ स्वारथ मन राता ।।

छं० —नहिं चितव जब करि कोप कपि गहि दसन लातन्ह मारहीं ।
धरि केस नारि निकारि बाहेर तेऽतिदीन पुकारहीं ।।
तब उठेउ क्रुद्ध कृतांत सम गहि चरन बानर डारई ।
एहि बीच कपिन्ह बिधंस कृत मख देखि मन महुँ हारई ।।

दो० —जग्य बिधंसि कुसल कपि आए रघुपति पास ।
चलेउ निसाचर क्रुद्ध होइ त्यागि जिवन कै आस ।। ८५ ।।

चौ० —चलत होहिं अति असुभ भयंकर । बैठहिं गीध उड़ाइ सिरन्ह पर ।।
भयउ कालबस काहु न माना । कहेसि बजावहु जुद्ध निसाना ।।

“ नाथ! रावण एक यज्ञ करत आहे; तो जर सिद्धीस गेला तर तो अभागी मरणार नाही. म्हणून प्रभो! वानरवीरांना पाठवून त्या यज्ञाचा विध्वंस करावा म्हणजे तो दशकंठ त्रस्त होऊन युद्धाला येईल.”

प्रातःकाळ झाला व श्रीरघुवीरांनी आज्ञा देताच हनुमंत, अंगद आदिकरून सुभट त्या यज्ञविध्वंसनाच्या कामावर धावले. लीलेने उडया मारत ते लंकेत शिरले आणि बेडरपणे रावणाच्या राजवाड्यात घुसले. पाहतात तो दुष्ट रावण संभावितपणाने यज्ञ करण्यात दंग झाला आहे! “ अरे, हा बगळा निर्लज्जपणाने युद्धातून पळून घरी आला आणि आता मोठ्या शिष्टपणाने ध्यान करत बसला आहे!” अशी अंगदाने सलामी देऊन रावणाच्या पाठीत लाथांची सरबत्ती सुरू केली!

परंतु अत्यंत स्वार्थमग्न रावण आपले डोळे उघडून ध्यानभंग करीना! तेव्हा नाइलाज होऊन वानरांनी कडकडून त्याच्या शरीरावर दातांनी चावा घेतला आणि मंदोदरीसह त्याच्या सर्व स्त्रियांच्या केसाला धरून त्यांना फरफटत ओढण्यास सुरुवात केली. तेव्हा त्या दीन वाणीने ओरडत मोठमोठ्याने रडू लागल्या.

ते पाहून मात्र तो कृतान्तासारखा क्रुद्ध होऊन उठला व कपींचे पाय धरून त्यांना आपटून भराभर भिरकावले!

हे त्याचे काम तिकडे चालू असता दुसऱ्या कपींनी त्याच्या यज्ञकुंडात नानाप्रकारचे भलभलते पदार्थ टाकून त्या यज्ञाचा विध्वंस केला. यज्ञाचा विनाश झालेले ते दृश्य पाहून दशानन मनात चांगलाच चरकला!

यज्ञ-विध्वंसाचे काम यथासांग करून सर्व कपि रघुपतींपाशी सुखरूप येऊन पोचले. ८५

निशाचर पतीला आता जगण्याची आशा थोडीच उरल्याने त्याने आपली सर्व शक्ती एकवटून क्रोधाने शेवटचा निकराचा लढा देण्याचे ठरवले.

तो निघाल्यावरोबर पुन्हा पूर्वीपेक्षा अधिक मोठे अपशकुन झाले. गिधाडे वारंवार उडून त्याच्या दाही डोक्यांवर बसू लागली.

तथापि तो दशानन कालवशच झाला असल्याने असल्या भयंकर अपशकुनांनाही त्याने मुळीच भीक घातली नाही. एकदम् हुकूम सोडला—“ युद्धाची निशाणे, डंके, भेरी, इत्यादी वाजवा.”

चली तमीचर अनी अपारा । बहु गज रथ पदाति असवारा ॥
प्रभु सन्मुख धाए खल कैसें । सलभ समूह अनल कहँ जैसें ॥
इहाँ देवतन्ह अस्तुति कीन्ही । दारुन बिपति हमहि एहिं दीन्ही ॥
अब जनि राम खेलावहु एही । अतिसय दुखित होति बैदेही ॥
देव बचन सुनि प्रभु मुसुकाना । उठि रघुबीर सुधारे बाना ॥
जटा जूट दृढ़ बाँधे माथे । सोहहिं सुमन बीच बिच गाथे ॥
अरुन नयन बारिद तनु स्यामा । अखिल लोक लोचनाभिरामा ॥
कटितट परिकर कस्यो निषंगा । कर कोदंड कठिन सारंगा ॥

छं० —सारंग कर सुंदर निषंग सिलीमुखाकर कटि कस्यो ।
भुजदंड पीन मनोहरायत उर धरासुर पद लस्यो ॥
कह दास तुलसी जबहिं प्रभु सर चाप कर फेरन लगे ।
ब्रह्मांड दिग्गज कमठ अहि महि सिंधु भूधर डगमगे ॥

दो० —सोभा देखि हरषि सुर बरषहिं सुमन अपार ।
जय जय जय करुनानिधि छबि बल गुन आगार ॥ ८६ ॥

चौ० —एहीं बीच निसाचर अनी । कसमसात आई अति घनी ॥
देखि चले सन्मुख कपि भट्टा । प्रलयकाल के जनु घन घट्टा ॥

त्या आज्ञेची अमलबजावणी होण्यास मुळीच वेळ नाही. निशाचरांची भली मोठी चतुरंग सेना चालून लागली. अनेक हत्तींवर आरूढ झालेले वीर, घोडेस्वार, रथी आणि पायदळ निघाले.

मोठ्या टोळांच्या थव्याने अग्नीवर झडप घालण्यास जावे, त्याप्रमाणेच ते खल रघुवीरावर चाल करून धावत गेले.

इकडे देवांनी श्रीरामचंद्रांची पुष्कळ प्रकारांनी स्तुती करून शेवटी प्रार्थना केली की, रावणाने आम्हास दारुण दुःखे दिली आहेत. हे राम आता याला खेळविणे पुरे झाले; कारण की, दिवसेंदिवस वैदेही अधिकाधिक दुःखी होत आहे!

देवांचे म्हणणे कानी पडताच प्रभूंनी स्मितपूर्वक उठून आपल्या बाणावर एक वेळ नजर टाकली. मस्तकावर जटांचा मुकुट घट्ट बांधला. मधे मधे गुंफलेल्या फुलांनी त्याचे सौंदर्य चांगलेच खुलवले होते. आरक्त नेत्र व मेघश्याम शरीर पाहून सर्वांच्या डोळ्यांना केवढा आनन्द होत होता.

अक्षय भाता कमरेला कसून बांधला आणि शार्ङ्ग नावाचे कठीण धनुष्य हातात घेतले. बाहू भरदार व मनोहर आणि विशाल असे वक्षस्थल असून, त्यावर विप्रपाद चिन्ह विराजत आहे.

अशा तयारीने प्रभूंनी जेव्हा हातातील धनुष्य-बाणाला चालना दिली तेव्हा, तुलसीदास म्हणतात, ब्रह्माण्ड, दिग्गज, कूर्म, शेष, पृथ्वी, सागर व पर्वत लटलट कापू लागले!

श्रीरघुवीराच्या त्या सुंदर मूर्तीची शोभा पाहून देवांना परमानंद झाला आणि त्या आनंदाच्या भरात त्यांनी प्रभूवर अपार पुष्पवृष्टी सुरू केली; त्या बरोबरच शोभा, बल व सद्गुण यांचे जन्मस्थान असणाऱ्या अशा करुणानिधीचा मुक्तवाचे मोठमोठ्याने जयजयकार त्यांनी सारखा चालू केला. ८६

दरम्यानच्या काळात निशाचरांची सेना एकमेकांना टक्कर देत इतकी चाल करून आली की, तिची गणना करणेच अशक्य. त्यांना पाहताच इकडून प्रलयकाळच्या मेघाप्रमाणे वानरसुभटांनी तितक्याच जोराने त्यांना तोंड दिले.



बहु कृपान तरवारि चमंकहिं । जनु दहँ दिसि दामिनीं दमंकहिं ॥
गज रथ तुरग चिकार कठोरा । गर्जहिं मनहुँ बलाहक घोरा ॥
कपि लंगूर बिपुल नभ छाए । मनहुँ इंद्रधनु उए सुहाए ॥
उठइ धूरि मानहुँ जलधारा । बान बुंद भै बृष्टि अपारा ॥
दुहुँ दिसि पर्बत करहिं प्रहारा । बज्रपात जनु बारहिं बारा ॥
रघुपति कोपि बान झरि लाई । घायल भै निसिचर समुदाई ॥
लागत बान बीर चिक्करहीं । घुर्मि घुर्मि जहँ तहँ महिं परहीं ॥
स्रवहिं सैल जनु निर्झर भारी । सोनित सरि कादर भयकारी ॥

छं ० –कादर भयंकर रुधिर सरिता चली परम अपावनी ।
दोउ कूल दल रथ रेत चक्र अबर्त बहति भयावनी ॥
जलजंतु गज पदचर तुरग खर बिबिध बाहन को गने ।
सर सक्ति तोमर सर्प चाप तरंग चर्म कमठ घने ॥

युद्धाला तोंड लागले. दाही दिशांना दमक दमक करत विजाच चमचम चमकाव्यात त्याप्रमाणे पट्टे व तरवारी लखलखाट उडवू लागल्या. त्यातच हत्ती व घोडे यांचे अत्यंत कर्कश असे आवाज होताच कानठळ्या बसवणाऱ्या मेघगर्जनेचा भास होई !

कपींची लांबच लांब शेपटे आकाशात उंच इतकी पसरली की, जणू इतकी इंद्र धनुष्येच एकदम पडली आहेत ! त्यात खूप धूळ उडाली, तेव्हा जलधारा पडत असल्याचे दृश्य निर्माण झाले व बाणांच्या फैरी बरोबर जणू पर्जन्य–बिंदूची सर सुरू झाली ! दोन्ही बाजूंच्या सैन्यातून पर्वताची फेक सुरू होऊन एक पर्वत दुसऱ्या पर्वतावर मोठ्याने आदळल्यावर जो मोठा आवाज होई, त्यावेळी वीज पडत असता होत असलेल्या कडकडाटाची जाणीव होई !

क्रुद्ध झालेल्या रघुपतींनी तर बाणांची अशी झड लावली की, थोडयाच वेळात निशाचरांच्या अनेक तुकडया अत्यंत व्याकुळ झाल्या. अंगात बाण घुसताच चीत् चीत् असा शब्द वीरांच्या तोंडून बाहेर पडे आणि जागोजागी वीर कोलमडून पडत.

बाणांच्या भयंकर जखमा होऊन खाली पडलेल्या अगडबंब राक्षसांच्या शरीरातून रक्ताचे पाट चाललेले पाहून कोणालाही पर्वतावरून वाहणाऱ्या नाल्यांचेच स्मरण होत असे.

अशा वाहणाऱ्या रक्ताच्या पाटांचा संगम होत होत शेवटी त्या सर्वांची एक मोठी नदीच बनली ! ती पाहून भ्याडांच्या अंगाचा भयाने थरकाप झाला.

अशा प्रकारची भित्र्यांना भयंकर व अती अपवित्र अशी ती रक्ताची नदी रणक्षेत्रावरून वाहत चालली असता दोन्ही बाजूंची सैन्ये तिच्या किनाऱ्याप्रमाणे दिसली. दोन्ही सैन्यात इकडून तिकडे धावणारे रथ हे त्या नदीतील रेताड बेटे असे वाटे ! आणि त्या रथांची चाके फिरू लागली म्हणजे रक्तनदीतील भोवऱ्यांचा भयंकर भास होई. तसेच पायदळ, घोडे, हत्ती, गाढवे व विविध प्रकारची वाहने हे त्या रक्ताच्या नदीतील अनेक प्रकारचे असंख्य जलचरच होते ! बाण, शक्ती व तोमर हे सर्पाप्रमाणे जोराने पळत; धनुष्याची हालचाल ही लाटाप्रमाणे वाटे; वीरांच्या हातातील ढाली या नदीच्या पाण्यात फिरणारी कासवे फारच छान शोभत ! दोन्ही सैन्यातील वीर जेव्हा बाण लागून कोसळत, त्यावेळी या नदीच्या काठावरील वृक्ष पाण्याच्या धारेने उन्मळून पडल्याचे स्मरण होई ! रक्ताच्या जोडीला मज्जा वाहू लागली. म्हणजे नदीच्या पाण्यावरील फेसाची ती आठवण करून देत असे.

दो० —बीर परहिं जनु तीर तरु मज्जा बहु बह फेन ।
काद‍र देखि डरहिं तहँ सुभटन्ह के मन चेन ।। ८७ ।।

चौ० —मज्जहिं भूत पिसाच बेताला । प्रथम महा झोटिंग कराला ।।
काक कंक लै भुजा उड़ाहीं । एक ते छीनि एक लै खाहीं ।।
एक कहहिं ऐसिउ सौंघाई । सठहु तुम्हार दरिद्र न जाई ।।
कहँरत भट घायल तट गिरे । जहँ तहँ मनहुँ अर्धजल परे ।।
खैंचहिं गीध आँत तट भए । जनु बंसी खेलत चित दए ।।
बहु भट बहहिं चढ़े खग जाहीं । जनु नावरि खेलहिं सरि माहीं ।।
जोगिनि भरि भरि खप्पर संचहिं । भूत पिसाच बधू नभ नंचहिं ।।
भट कपाल करताल बजावहिं । चामुंडा नाना बिधि गावहिं ।।
जंबुक निकर कटक्कट कट्टहिं । खाहिं हुआहिं अघाहिं दपट्टहिं ।।
कोटिन्ह रुंड मुंड बिनु डोल्लहिं । सीस परे महि जय जय बोल्लहिं ।।

छं० —बोल्लहिं जो जय जय मुंड रुंड प्रचंड सिर बिनु धावहीं ।
खप्परिन्ह खग्ग अलुज्झि जुज्झहिं सुभट भटन्ह ढहावहीं ।।

—असल्या रणक्षेत्रावरील रक्ताच्या नदीला पाहून भित्र्यांची जशी बोबरगुंडी उडे, तशाच प्रकारे शूर-वीरांचे बाहू तिच्या दर्शनाने स्फुरण पावून त्यांना सुख होई ! ८७

या रक्ताच्या नदीतील याहून भयानक दृश्ये पाहा—

भुते, प्रेते, वेताळ, शिवगण आणि मोठे मोठे भयंकर झोटिंग त्या नदीत बुड्या मारून स्नान करू लागले ! कावळे, करकोचे इत्यादी पक्षी वीरांचे तुटके हात उचलून पळत आहेत, आणि ते हात दुसऱ्या पक्ष्यांना दिसताच ते हिसकाहिसकी करून ओढून खात आहेत ! असली त्यांची भांडणे पाहून कोणी म्हणतात, " मूर्खांनो ! इतकी रक्तमांसाची स्वस्ताई झाली तरी तुमच्या दरिद्री मनाला शांती मिळत नाही आणि तुमचे आपसात तंटे चालूच ! "

घायाळ झालेले वीर लंकादुर्गाच्या तटावर कण्हत पडलेले पाहिल्यावर अंतकाळी अर्धवट पाण्यात फेकलेल्या लोकांचे दृश्य डोळ्यासमोर उभे राही !

तटावर बसून प्रेतांची आतडी शांतपणे ओढत असलेल्या गिधाडाकडे पाहिले म्हणजे गळाचे मासे पकडणाऱ्यांचा यमुना हुबेहूब डोळ्यासमोर उभा राही !

त्या रक्ताची एवढी नदी दुथडी भरून चालली होती की, तिच्यातून पुष्कळ वीर वाहात चालले होते आणि त्यांच्या त्या वाहणाऱ्या प्रेतावर अनेक पक्षी बसले होते की, जणू नदीत कोणी लोक नौकाक्रीडाच करीत आहेत !

रणशूरांच्या मस्तकांच्या करवंटीत योगिणी रक्त भरत आहेत, तर त्याचवेळी भूत-पिशाचांच्या स्त्रिया आकाशात नृत्य करत आहेत. त्यांच्या त्या नाचण्याला बरोबर ताल धरता यावा म्हणून चामुंडा-नृमुंडांचे करताल हाताने वाजवीत आहेत व तोंडाने नानाप्रकारची गाणी गात आहेत !

जागजागी कोल्ह्यांचे कळप प्रेताची कातडी फाडून मांसाचे लचके तोडत असता एक दुसऱ्याला हूं हूं करून दरडावत आहेत ! शिरे नसलेली कोट्यवधी धडे मोठ्याने डोलू लागली व जमिनीवर पडलेली शिरे जय जय बोलू लागली !

धडांचे धावणे व मुंडांचा जयजयकार चालू असता पक्षी त्यांच्यावर झडपा घालून आपसात झुंजत आहेत ! त्याचवेळी त्यांच्यातील सुभट पुष्कळांना धडाधड ढकलून देत आहेत ! श्रीरामचंद्राच्या प्रतापाने संचार



बानर निसाचर निकर मर्दहिं राम बल दर्पित भए ।
संग्राम अंगन सुभट सोवहिं राम सर निकरन्हि हए ।।

दो० — रावन हृदयँ बिचारा भा निसिचर संघार ।
मैं अकेल कपि भालु बहु माया करौं अपार ।। ८८ ।।

चौ० — देवन्ह प्रभुहि पयादें देखा । उपजा उर अति छोभ बिसेषा ।।
सुरपति निज रथ तुरत पठावा । हरष सहित मातलि लै आवा ।।
तेज पुंज रथ दिब्य अनूपा । हरषि चढे कोसलपुर भूपा ।।
चंचल तुरग मनोहर चारी । अजर अमर मन सम गतिकारी ।।
रथारूढ़ रघुनाथहि देखि । धाए कपि बलु पाइ बिसेषी ।।
सही न जाइ कपिन्ह कै मारी । तब रावन माया बिस्तारी ।।
सो माया रघुबीरहि बाँची । लछिमन कपिन्ह सो मानी साँची ।।
देखी कपिन्ह निसाचर अनी । अनुज सहित बहु कोसलधनी ।।

छं० — बहु राम लछिमन देखि मर्कट भालु मन अति अपडरे ।
जनु चित्र लिखित लछिमन जहँ सो तहँ चितवहिं खरे ।।
निज सेन चकित बिलोकि हँसि सर चाप सजि कोसल धनी ।
माया हरी हरि निमिष महुँ हरषी सकल मर्कट अनी ।।

झालेले वानर राक्षसांच्या तुकड्यांना ठोकून त्यांचा चेंदामेंदा करत आहेत !

परंतु रघुवीर बाणाने प्राण सोडण्याचे भाग्य ज्यांना लाभले, असे सुभट रणांगणरूपी अंगणांत शांतपणे झोप घेत आहेत !

आपल्या डोळ्यादेखत राक्षसांच्या अफाट सेनेचा अशा प्रकारे धुव्वा उडवून विजयाने उन्मत्त झालेले अपार भल्लुकपींचे सैन्य पाहून रावण स्वतःशी विचार करू लागला की, आपण आता एकटे उरणार आणि हे कपिभल्ल सैन्य तर सागरासारखे पसरलेले, तेव्हा आता आपली अपार माया निर्माण करू या. ८८

रावणाचा स्वगत असा विचार चालू असता, इकडे देवाना प्रभू पादचारी असल्याची जाणीव होऊन ते सर्व एका विशिष्ट प्रकारे अत्यंत खिन्न झाले ! हे समजताच इंद्राने आपला रथ पाठवला व मातलीला ही परमश्रेष्ठ कामगिरी मिळाल्याने तो आनंदाने रथ घेऊन आला.

त्या तेजःपुंज, दिव्य व अनुपम रथात अयोध्यापती हर्षाने बसले. त्या श्रेष्ठ रथाला जोडलेले चारी घोडे चंचल, मनोहर, जरारहित व मरणरहित असून ते मनाप्रमाणे चालणारे आहेत.

आपले प्रभू अशा उत्कृष्ट रथात बसलेले पाहून कपिभल्लांना अधिकच अवसान चढून त्यांनी रावणावर चाल केली. अशा जोराने सर्व वानरवीरांनी त्यांच्यावर मारा केला की, तो त्या दुष्ट दशाननाला असह्य होऊन तो अगदी घायाळ झाला. तेव्हा पूर्वी ठरल्याप्रमाणे आपल्या मायेचा त्याने विस्तार केला.

रावणाच्या त्या मायेचा एवढा महिमा होता की, एका रघुवीराशिवाय लक्ष्मणासह सर्वांना ती अगदी खरी खरीच परिस्थिती वाटली. प्रभूंनी मात्र ते कपट तत्काळ ओळखले !

दशमुखाच्या मायेने राक्षस सैन्यात अगणित राम—लक्ष्मण दिसू लागले ! हे काय नवीन अनपेक्षित व अपूर्व विघ्न निर्माण झाले ? आता काय करावे, या विचाराने घाबरलेले असे लक्ष्मणासह सर्वच सैन्य जागच्या जागी दिङ्मूढ होऊन पुतळ्याप्रमाणे तटस्थ उभे राहिले !

भयाने आपली सगळी सेना चकित झालेली पाहून श्रीरामचंद्र हसले व आपल्या धनुष्यावर बाण चढवून एकानिमिषात हरीने रावणी माया नामशेष करून टाकली ! ते पाहताच वानर, भल्ल अत्यानंदाने नाचू लागले ! !

दो०—बहुरि राम सब तन चितइ बोले बचन गँभीर ।
द्वंदजुद्ध देखहु सकल श्रमित भए अति बीर ।। ८९ ।।

चौ०—अस कहि रथ रघुनाथ चलावा । बिप्र चरन पंकज सिरु नावा ।।
तब लंकेस क्रोध उर छावा । गर्जत तर्जत सन्मुख धावा ।।
जीतेहु जे भट संजुग माहीं । सुनु तापस मैं तिन्ह सम नाहीं ।।
रावन नाम जगत जस जाना । लोकप जाकें बंदीखाना ।।
खर दूषन बिराध तुम्ह मारा । बधेहु ब्याध इव बालि बिचारा ।।
निसिचर निकर सुभट संघारेहु । कुंभकरन घननादहि मारेहु ।।
आजु बयरु सबु लेउँ निबाही । जौं रन भूप भाजि नहिं जाही ।।
आजु करउँ खलु काल हवाले । परेहु कठिन रावन के पाले ।।
सुनि दुर्बचन कालबस जाना । बिहँसि बचन कह कृपानिधाना ।।
सत्य सत्य सब तव प्रभुताई । जल्पसि जनि देखाउ मनुसाई ।।

छं०—जनि जल्पना करि सुजसु नासहि नीति सुनहि करहि छमा ।
संसार महँ पूरुष त्रिबिध पाटल रसाल पनस समा ।।
एक सुमनप्रद एक सुमन फल एक फलइ केवल लागहीं ।

त्यानंतर सर्व कपिसैन्याला उद्देशून रघुवीर गंभीरवाणीने म्हणाले. " माझ्या वीर बंधूंनो ! आतापर्यंत अनेक प्रकारचे युद्ध दीर्घकाळ करून तुम्ही शिणलेले आहात. आता विसावा घेत सगळेजण द्वंद्वयुद्ध पाहा ! " ८९

एवढी सूचना देऊन मग रघुनाथाने रथ चालू केला. त्यावेळी स्वतःच्याच हृदयावरील विप्रचरण नमस्कार केला. कारण ती रणभूमी होती ! तेथे भूसुर कोठून असणार ?

रघुनाथाचा रथ चाल करून येत असलेला पाहून लंकेशाच्या अंगाची लाही झाली ! मोठमोठ्याने गर्जना करीत व दटावण्या देत स्वारी समोर आली आणि म्हणाली.

" हे तापसा ! ऐक ! आजपर्यंत युद्धात जिंकलेले व ठार केलेले वीर वेगळे आणि हा रावण वेगळा ! याच्या पराक्रमाचे यश सर्व जगात भरून राहिले आहे. ज्याच्या बंदिखान्यात प्रत्यक्ष लोकपाल अडकले आहेत तोच मी दशानन ! तुम्ही खर दूषण व विराध यांना मारले. बिचाऱ्या वालीचा व्याधासारखा वध केला. तसेच मोठमोठ्या राक्षस-सुभटांच्या सैन्याचा संहार करून माझ्या कुंभकर्ण-मेघनादादींना ठार केलेत. पण अरे नृपा ! युद्धातून जर पळ काढला नाहीस तर या सर्व तुझ्या कृत्यांचे उट्टे आजच काढतो पाहा ! आता या कठीण रावणाच्या तावडीत तू सापडला आहेस, तुला आज काळाच्या हवाली केलाच म्हणून समज ! "

रावणाच्या तोंडातून बाहेर पडत असलेली ही सर्व दुर्वचने श्रीरामचंद्रांनी शांतपणाने ऐकून घेतली. तो कालवश झाल्यानेच त्याची ही टकळी सुरू आहे हे समजून कृपानिधान मोठ्याने हसले व उत्तरादाखल बोलू लागले—

" दशानन ! तुझी सर्व प्रभुता सत्य आहे, अगदी सत्य आहे बाबा ! पण व्यर्थ बडबड करू नकोस. काय पराक्रम अंगात असेल तो आता प्रत्यक्ष करून दाखव !

" बाबा रे ! क्षमा कर. चार नीतीच्या गोष्टी सांगतो त्या लक्ष देऊन ऐक; उगीच वल्गना करून आपल्या सुयशाचा नाश करू नकोस. या जगात पाटल, आंबा व फणस या तीन वृक्षांच्यासारखे तीन प्रकारचे लोक असतात. पाटल वृक्षाला फक्त फुलेच येतात, आंब्याच्या झाडाला मोहोर येऊन फळे लागतात; आणि

एक कहहिं कहहिं करहिं अपर एक करहिं कहत न बागहीं ।।

दो ० –राम बचन सुनि बिहँसा मोहि सिखावत ग्यान ।
बयरु करत नहिं तब डरे अब लागे प्रिय प्रान ।। ९० ।।

चौ ० –कहि दुर्बचन क्रुद्ध दसकंधर । कुलिस समान लाग छाँड़ै सर ।।
नानाकार सिलीमुख धाए । दिसि अरु बिदिसि गगन महि छाए ।।
पावक सर छाँड़ेउ रघुबीरा । छन महुँ जरे निसाचर तीरा ।।
छाड़िसि तीब्र सक्ति सिखिआई । बान संग प्रभु फेरि चलाई ।।
कोटिन्ह चक्र त्रिसूल पबारै । बिनु प्रयास प्रभु काटि निवारै ।।
निफल होहिं रावन सर कैसें । खल के सकल मनोरथ जैसें ।।
तब सत बान सारथी मारेसि । परेउ भूमि जय राम पुकारेसि ।।
राम कृपा करि सूत उठावा । तब प्रभु परम क्रोध कहुँ पावा ।।

छं ० –भए क्रुद्ध जुद्ध बिरुद्ध रघुपति त्रोन सायक कसमसे ।
कोदंड धुनि अति चंड सुनि मनुजाद सब मारुत ग्रसे ।।
मंदोदरी उर कंप कंपति कमठ भू भूधर त्रसे ।
चिक्करहिं दिग्गज दसन गहि महि देखि कौतुक सुर हँसे ।।

फणसाच्या झाडाला फक्त फळेच येतात ! या तीन जातींच्या वृक्षांप्रमाणे कोणी नुसती तोंडाची वाफ घालवतात, करत नाहीत काहीच ! कोणी बोलतात आणि अपल्या शब्दाप्रमाणे करून दाखवतात, कोणी एक शब्दही न बोलता जे करायचे असेल ते प्रत्यक्ष करूनच दाखवतात.”

श्रीरामचंद्राचे हे नीतिरहस्यमय भाषण ऐकून रावण दाही तोंडे उघडून मोठ्याने खदाखदा हसला; आणि म्हणाला की, मला अक्कल शिकवत आहे, परंतु शूर्पणखेची विटंबना करून वैराला सुरुवात केली तेव्हा भय वाटले नाही, आणि आता प्राण प्रिय वाटत आहे ! पण उपयोग काय ?' ९०

याप्रमाणे मन मानेल तसे दुर्वचनांनी तोंडसुख घेऊन क्रुद्ध झालेल्या दशकंठाने वज्रासारखे कठीण बाण सोडण्याचा सपाटा सुरू केला. थोड्याच वेळात नानाप्रकारच्या त्या असंख्य बाणांनी दिशा, उपदिशा, आकाश व पृथ्वी भरून टाकली !

रघुवीराने एकाच पावक बाणाने ते रावणी अगणित बाण जाळून खाक केले.

त्यामुळे चिडून जाऊन त्याने एक तीव्र शक्ती सोडली; प्रभूंनी तिच्याबरोबर एक बाण देऊन तिची परत पाठवणी केली !

त्यानंतर त्याने कोट्यवधी चक्रे व त्रिशूळ सोडले, श्रीरामचंद्रांनी लीलेने त्यांचे तुकडे केले !

याप्रमाणे खलाच्या मनोरथासारखेच रावणाचे सर्व बाण व आयुधे व्यर्थ ठरली !

या सर्व पराभवामुळे चिडून जाऊन दशकंठाने एकाच वेळी शंभर बाण रामचंद्राच्या सारथ्याला मारले. त्याबरोबर ‘ जय राम ! ’ म्हणून ओरडत तो भूमीवर पडला !

नुसत्या कृपाकटाक्षाने प्रभूंनी त्याला उठवला आणि ते अत्यंत संतप्त झाले. रावणाशी घनघोर युद्ध करण्यास ते सिद्ध होताच भात्यातील बाण अधीर होऊन चुळबुळ करू लागले !

म्हणून प्रभूंनी धनुष्याचा अत्यंत कठोर असा टणत्कार केला, तेव्हा ते नरभक्षक भयार्त होऊन पळत सुटले !

मंदोदरीच्या छातीत थरकाप झाला, कूर्म आणि पर्वत थरथर कापू लागले; आणि भूमी संत्रस्त झाली. दिग्गजचीत्कार करत आपल्या दातांनी पृथ्वीला धरू लागले; ते कौतुक पाहून देवांना हसू आले. कानापर्यंत

दो० —तानेउ चाप श्रवन लगि छाँड़े बिसिख कराल।
राम मारगन गन चले लहलहात जनु ब्याल ॥ ९१ ॥

चौ० —चले बान सपच्छ जनु उरगा। प्रथमहिं हतेउ सारथी तुरगा ॥
रथ बिभंजि हति केतु पताका। गर्जा अति अंतर बल थाका ॥
तुरत आन रथ चढ़ि खिसिआना। अस्त्र सस्त्र छाँड़ेसि बिधि नाना ॥
बिफल होहिं सब उद्यम ताके। जिमि परद्रोह निरत मनसा के ॥
तब रावन दस सूल चलावा। बाजि चारि महि मारि गिरावा ॥
तुरग उठाइ कोपि रघुनायक। खैंचि सरासन छाँड़े सायक ॥
रावन सिर सरोज बनचारी। चलि रघुबीर सिलीमुख धारी ॥
दस दस बान भाल दस मारे। निसरि गए चले रुधिर पनारे ॥
स्रवत रुधिर धायउ बलवाना। प्रभु पुनि कृत धनु सर संधाना ॥
तीस तीर रघुबीर पबारे। भुजन्हि समेत सीस महि पारे ॥
काटतहीं पुनि भए नबीने। राम बहोरि भुजा सिर छीने ॥
प्रभु बहु बार बाहु सिर हए। कटत झटिति पुनि नूतन भए ॥
पुनि पुनि प्रभु काटत भुज सीसा। अति कौतुकी कोसलाधीसा ॥

धनुष्य ताणून; श्रीरामचंद्रांनी आपले कराल बाण सोडण्यास प्रारंभ केला. तेव्हा त्या बाणांची सरवत्ती झगझगीत सापासारखे सूं सूं करीत निघाले. ९१

पंख असलेल्या भुजंगाप्रमाणे सुटलेल्या त्या रामबाणांनी पहिल्या झपाट्याला रावणाच्या रथावरील सारथी व घोडे यांचा बळी घेतला. त्यानंतर रथ, पताका व ध्वज यांचा चुराडा केला. —हा पहिलाच दणका इतका सणसणीत होता की, त्याने रावणाची कमरच खचली! तथापि वर वर अवसान आणून त्याने खूप मोठ्याने गर्जना केली. चटकन् दुसऱ्या रथात बसून तो इतका खवळला की, त्याने एकदम असंख्य शस्त्रास्त्रांचा वर्षाव सुरू केला.

परंतु परद्रोह करण्यात सुख मानणाऱ्या मनुष्याच्या व्यर्थ प्रयत्नाप्रमाणे त्याचा हा सर्व खटाटोप निष्फळ झाला!

मग रावणाने दहा शूल एकदम सोडून मातलीच्या रथाचे चारी घोडे ठार करून जमिनीवर पाडले.

घोड्यांना अमृत दृष्टीने पाहताच ते उठले. लगेच अत्यंत क्रुद्ध होऊन रघुनायकानी धनुष्य ओढून इतके बाण सोडले की, त्यांची गती पाहून रावणाच्या दहा शिरकमळांत संचार करणारे पुष्कळ शरभ्रमरच चालून जात आहेत असे वाटले.

त्याच्या प्रत्येक कपाळावर दहा याप्रमाणे दाही कपाळांचे लक्ष्य धरून शंभर बाण एकाच वेळी सोडले व ते आत घुसून बाहेर पडताच त्या सर्व जखमातून रक्ताचे ओघ वाहू लागले!

दशाननाच्या दहा मस्तकांना आरपार भोके पाडून झालेल्या दोनशे जखमांतून असे रक्ताचे पाट वाहात असतानासुद्धा तो बलवान धावून आला, तेव्हा प्रभूंनी पुनः शरसंधान करून तीस बाण सोडताच त्याची दहा मस्तके आणि वीस हात तुटून खाली पडले.

पण काय चमत्कार! छाटल्याबरोबर प्रत्येक मस्तकाच्या जागी दुसरे मस्तक व हाताच्या जागी दुसरा हात येऊन रावण पहिल्याप्रमाणे तगडा वीर धावू लागला. प्रभूंनी पुनः पुनः तीस तीस बाण सोडून मस्तके व हात तोडावेत आणि पुनः पुन्हा पूर्ववत् डोकी वा बाहू नवीन तत्काल फुटावे, असा मोठा विलक्षण चमत्कारिक खेळ सुरू झाला!

कोसलाधीश अत्यंत खेळकर वृत्तीचे असल्याने त्यांनी हा गंमतीचा शिर-भुजा छाटीचा खेळ चालूच

रहे छाइ नभ सिर अरु बाहू । मानहुँ अमित केतु अरु राहू ॥
छं०—जनु राहु केतु अनेक नभ पथ स्रवत सोनित धावहीं ।
रघुबीर तीर प्रचंड लागहिं भूमि गिरन न पावहीं ॥
एक एक सर सिर निकर छेदे नभ उड़त इमि सोहहीं ।
जनु कोपि दिनकर करनिकर जहँ तहँ बिधुंतुद पोहहीं ॥

दो०—जिमि जिमि प्रभु हर तासु सिर तिमि तिमि होहिं अपार ।
सेवत बिषय बिबर्ध जिमि नित नित नूतन मार ॥ ९२ ॥

चौ०—दसमुख देखि सिरन्ह कै बाढ़ी । बिसरा मरन भई रिस गाढ़ी ॥
गर्जेउ मूढ़ महा अभिमानी । धायउ दसहु सरासन तानी ॥
समर भूमि दसकंधर कोप्यो । बरषि बान रघुपति रथ तोप्यो ॥
दंड एक रथ देखि न परेऊ । जनु निहार महुँ दिनकर दुरेऊ ॥
हाहाकार सुरन्ह जब कीन्हा । तब प्रभु कोपि कारमुक लीन्हा ॥
सर निवारि रिपु के सिर काटे । ते दिसि बिदिसि गगन महि पाटे ॥
काटे सिर नभ मारग धावहिं । जय जय धुनि करि भय उपजावहिं ॥
कहँ लछिमन सुग्रीव कपीसा । कहँ रघुबीर कोसलाधीसा ॥

ठेवला ! याचा आणखी एक परिणाम होऊन एक मौजेचे दृश्य निर्माण झाले रावणाच्या मस्तकांनी व हातांनी सर्व आकाश व्यापून गेले आणि लोकांना वाटले की, हे असंख्य राहू-केतूच सर्वत्र पसरले आहेत.

रक्त गळत असलेले जणू अनेक राहू-केतू आकाशमार्गाने धावत आहेत; व रघुवीराचे प्रचण्ड बाण लागत असल्याने ते भूमीवर येऊच शकत नाहीत. एकएका शरात छेदून भरलेले शिरांचे समूह आकाशात एकामागून एक उडत असता असे शोभत आहेत की जणू क्रुद्ध झालेले भगवान् सूर्यनारायण आपल्या अगणित किरणांनी चोहोकडे राहूनाच ओवत आहेत !

प्रभूंनी उडवलेली दशाननाची डोकी जशी जशी उडवावीत तशी तशी ती अपार उत्पन्न होत असल्याचे पाहून, अधिकाधिक विषयसेवनाने दररोज नवी भोगेच्छा कशी अधिक वाढते त्याचा हा उघड दाखला पटला ! ९२

शिरांची अशा प्रकारे वाढ होत असून आता आपणाला मरणाची भीती नाही अशी जणू खात्री पटून तो खल मरण विसरून अत्यंत खवळला आणि तो महाअभिमानी, गाळीव मूर्ख मोठमोठ्याने गर्जना करू लागला !

त्या रणभूमीवर संतप्त होऊन दाही धनुष्यांना खेचून त्याने एवढा बाणांचा पाऊस श्रीरामचंद्रांच्या रथावर पाडला की, थोडा वेळ प्रभूचा रथच दिसेनासा झाला ! एक घटकाभर रथ दृष्टीस पडला नाही. जणू सूर्य धुक्यातच दडून राहिला आहे !

अशा प्रकारे रघुवीर दृष्टिआड होताच देवांनी मोठा हाहाःकार करून सोडला, तेव्हा प्रभूंनी क्रोधाने धनुष्य हाती घेऊन पुनः शिरे व बाहू छाटण्याचा सपाटा लावला थोड्याच वेळात दशदिशा, आकाश व पृथ्वी त्यानी गच्च भरली.

कापलेली मस्तके एखाद्या सोडलेल्या तीराप्रमाणे आकाशात धावत असता जय जयकार करून भय उत्पन्न करू लागली. तसेच " लक्ष्मण कुठे आहे ? वानरराज सुग्रीव कुठे आहे ? कुठे आहे तो कोसलाधीश्वर रघुवीर ? " अशाही गर्जना त्या छाटलेल्या तोंडातून उठत व त्यामुळे सर्वत्र ववराट उत्पन्न होई !

छं०—कहँ रामु कहि सिर निकर धाए देखि मर्कट भजि चले ।
संधानि धनु रघुबंसमनि हँसि सरन्हि सिर बेधे भले ॥
सिर मालिका कर कालिका गहि बृंद बृंदन्हि बहु मिलीं ।
करि रुधिर सरि मज्जनु मनहुँ संग्राम बट पूजन चलीं ॥

दो०—पुनि दसकंठ क्रुद्ध होइ छाँड़ी सक्ति प्रचंड ।
चली बिभीषन सन्मुख मनहुँ काल कर दंड ॥ ९३ ॥

चौ०—आवत देखि सक्ति अति घोरा । प्रनतारति भंजन पन मोरा ॥
तुरत बिभीषन पाछें मेला । सन्मुख राम सहेउ सोइ सेला ॥
लागि सक्ति मुरुछा कछु भई । प्रभु कृत खेल सुरन्ह बिकलई ॥
देखि बिभीषन प्रभु श्रम पायो । गहि कर गदा क्रुद्ध होइ धायो ॥
रे कुभाग्य सठ मंद कुबुद्धे । तैं सुर नर मुनि नाग बिरुद्धे ।
सादर सिव कहुँ सीस चढ़ाए । एक एक के कोटिन्ह पाए ॥
तेहि कारन खल अब लगि बाँच्यो । अब तव कालु सीस पर नाच्यो ॥
राम बिमुख सठ चहसि संपदा । अस कहि हनेसि माझ उर गदा ॥

छं०—उर माझ गदा प्रहार घोर कठोर लागत महि पर्‌यो ।
दस बदन सोनित स्रवत पुनि संभारि धायो रिस भर्‌यो ॥

"राम कुठे आहे ?" असे ओरडत ती मस्तके आकाशात धावू लागलेली पाहून कपिसैन्यात धावपळ उडाली! तेव्हा रघुवंश शिरोमणीनि हसून पुनः शरसंधान केले व ती सर्व ओरडणारी डोकी बाणात ओवून टाकली.

त्यावेळी आणखी एक मौजेचे दृश्य निर्माण झाले. शिरांच्या मुंडमाळा हातात घेतलेल्या पुष्कळ कालिका थव्याथव्यांनी जमून, रक्ताच्या नदीत स्नान करून जणू समरवडाची पूजा करण्यासच निघाल्या आहेत !

ते पाहून दशकंठ चवताळला आणि त्याने एक प्रचंड शक्ती सोडली व ती जणू काळाच्या दंडासारखी विभीषणाच्या अंगावर आता कोसळणार !९३

इतक्यात ती भयानक शक्ती पाहून, शरणागतांचे संकट निवारण करण्याच्या आपल्या ब्रीदाचे प्रभूंना स्मरण झाले आणि मोठ्या शिताफीने झटकन विभीषणाला आपल्या मागे सारून श्रीरामचंद्रांनी ती शक्ती आपल्या अंगावर घेतली.

धाडकन् ती भयंकर शक्ती प्रभूच्या छातीवर आदळली रघुनाथ क्षणभर मूर्छित झाले !—हा झाला प्रभूचा खेळ, पण इकडे देवांच्या तोंडचे पाणी पळून त्यांचे प्राण कंठास आले !

आपल्या स्वामीला असे श्रम झालेले पाहून विभीषण बेभान झाला. त्याने आपल्या हातात एक भयंकर मोठी गदा घेतली आणि तो रावणावर तुटून पडला !

"अरे मंदभाग्या ! दुष्टा ! मूढा ! दुर्बुध्दी ! तू आजपर्यंत सुर, नर, मुनी व नाग इत्यादि सर्वांशी वैर केलेस. हा दुष्टपणा करण्याचे सामर्थ्य तुला कशाने आले, हेही मी जाणतो. तू आदराने आपली मुंडे शिवाला वाहिलीस म्हणून एकेका शिराची कोटी कोटी शिरे तुला मिळाली ! याच कारणाने तू आतापर्यंत जिवंत राहिलास; परंतु लक्षात ठेव की, आता काळ तुझ्या डोक्यावर नाचत आहे. अरे दुष्टा ! श्रीरामचंद्रांशी वैर करून सुखसंपत्तीची इच्छा करतोस ? पण असे सुख तुला मिळणे कालत्रयी अशक्य आहे !"

अशी प्रथम त्याची पूजा बांधून विभीषणाने त्याच्या छातीवर गदेचा जोराने तडाखा लगावला !

गदेचा घोर व कठोर असा घाव उरात लागताच रावण धाडकन् धुळीत कोसळून पडला ! तडाखा एवढा जोराचा होता की, त्याच्या दाही तोंडातून तो रक्त ओकू लागला.

इतकी स्थिती झाली तरी संतापून उठला आणि अत्यंत रागाने धावला, विभीषणाच्या अंगावर !



द्वौ भिरे अतिबल मल्लजुद्ध बिरुद्ध एकु एकहि हनै ।
रघुबीर बल दर्पित बिभीषनु घालि नहिं ता कहुँ गनै ॥

दो ० –उमा बिभीषनु रावनहि सन्मुख चितव कि काउ ।
सो अब भिरत काल ज्यों श्रीरघुबीर प्रभाउ ॥ ९४ ॥

चौ ० –देखा श्रमित बिभीषनु भारी । धायउ हनूमान गिरि धारी ॥
रथ तुरंग सारथी निपाता । हृदय माझ तेहि मारेसि लाता ॥
ठाढ़ रहा अति कंपित गाता । गयउ बिभीषनु जहँ जनत्राता ॥
पुनि रावन कपि हतेउ पचारी । चलेउ गगन कपि पूँछ पसारी ॥
गहिसि पूँछ कपि सहित उड़ाना । पुनि फिरि भिरेउ प्रबल हनुमाना ॥
लरत अकास जुगल सम जोधा । एकहि एकु हनत करि क्रोधा ॥
सोहहिं नभ छल बल बहु करहीं । कज्जलगिरि सुमेरु जनु लरहीं ॥
बुधि बल निसिचर परइ न पार्‍यो । तब मारुतसुत प्रभु संभार्‍यो ॥

दोघेही बलवान ! जुंपली दोघांची कुस्ती ! फडाफड तडाखे एकमेकांना देऊ लागले. परंतु रघुवीराचा पाठिंबा मिळून बलाढ्य झालेला बिभीषण आता रावणाला अगदी कस्पटासारखा मानू लागला !

प्रसंग आश्चर्याचा असल्याने शंकर पार्वतीला समजावून सांगतात; “ उमे ! रावणासमोर नुसती मान वर करून तरी पाहण्याची बिभीषणाची तयारी होती काय ? पण आता तोच बिभीषण कसा कृतान्तासारखा त्या दशाननाला ठोसे लगावत आहे पाहा ना ! आहे की नाही मौज ? अर्थात् हा सर्व माझ्या रघुवीराचाच प्रभाव बरं ! ” ९४

दोघा भावांची ही कुस्ती सगळेच मोठ्या कौतुकाने पाहत होते; परंतु बिभीषण बराच थकला असल्याची कल्पना हनुमंताला येताच एक मोठा पर्वत घेऊन तो रावणावर धावला !

त्याच्या एका धडकीबरोबर रावणाच्या सारथ्याचा, घोड्यांचा आणि रथाचासुध्दा चुराडा उडाला ! एवढे करूनही न थांबता रावणाच्या उरात त्याने खच्चून लाथा मारल्या !

एवढा जोराचा लत्ता प्रहार सोसूनही बलाढ्य रावण रणभूमीवर गडगडला नाही ! पण आता त्याचे सर्व शरीर लटलट कापू लागले !

दरम्यानच्या काळात सेवकाचे पालन करणारे श्रीरघुवीर यांच्याकडे बिभीषण गेला. आपल्या अंगावर येणारी शक्ती प्रभूंनी मला बाजूस सारून स्वतःच्या छातीवर घेतली, तिने माझा प्राण खास घेतला असता. या कृतज्ञतेच्या भावनेने त्याचे त्यावेळी हृदय काठोकाठ भरून आले !

इकडे अंगाचा थरकाप उडाला होता तरी पराभव पतकरायचा नाही, या चुरशीने रावण ललकारून हनुमंतावर जोराने प्रहार करीत होताच ! परंतु त्या प्रहाराने मारुतीला काहीच इजा न होता स्वारी शेपटी उभारून आकाशात उंच उडाली !

हनुमंताच्या शेपटीस धरून रावणही त्याच्या मागोमाग आकाशात उडाला. ते पाहून वायुसुताने उलट खाऊन त्याच्याबरोबर युद्धाला सुरुवात केली. आता या दोघा सारख्याच शक्तीच्या मल्लांची कुस्ती अंतराळी आकाशातच जुंपली आणि रागारागाने गुद्दागुद्दी झाली सुरू !

प्रेक्षकांच्या डोळ्याला एक अपूर्व देखावा दिसू लागला. काळ्या कुट्ट शरीराचा रावण काजळाच्या पर्वता-सारखा एका बाजूस आणि अंगावरील सुवर्णकांतीची लव सूर्यप्रकाशात चमकू लागल्याने मेरुपर्वताप्रमाणे तेजाने तळपणारा पवनसुत ! एक काजळ काळा व दुसरा सुवर्ण लखलखीत अशा दोन पर्वताच्या मल्लयुध्दाचा अपूर्व खेळ अंतराळात दिसू लागला !

कुस्ती जरी चांगली रंगली तरी आपल्या बुद्धीने व बळाने पाडूनसुध्दा तो दुष्ट पडत नाही असे जेव्हा

छं० —संभारि श्रीरघुबीर धीर पचारि कपि रावनु हन्यो ।
महि परत पुनि उठि लरत देवन्ह जुगल कहुँ जय जय भन्यो ॥
हनुमंत संकट देखि मर्कट भालु क्रोधातुर चले ।
रन मत्त रावन सकल सुभट प्रचंड भुज बल दलमले ॥

दो० —तब रघुबीर पचार धाए कीस प्रचंड ।
कपि बल प्रबल देखि तेहिं कीन्ह प्रगट पाषंड ॥ ९५ ॥

चौ० —अंतरधान उभय छन एका । पुनि प्रगटे खल रूप अनेका ॥
रघुपति कटक भालु कपि जेते । जहँ तहँ प्रगट दसानन तेते ॥
देखे कपिन्ह अमित दससीसा । जहँ तहँ भजे भालु अरु कीसा ॥
भागे बानर धरहिं न धीरा । त्राहि त्राहि लछिमन रघुबीरा ॥
दहँ दिसि धावहिं कोटिन्ह रावन । गर्जहिं घोर कठोर भयावन ॥
डरे सकल सुर चले पराई । जय कै आस तजहु अब भाई ॥
सब सुर जिते एक दसकंधर । अब बहु भए तकहु गिरि कंदर ॥
रहे बिरंचि संभु मुनि ग्यानी । जिन्ह जिन्ह प्रभु महिमा कछु जानी ॥

मारुतसुताच्या ध्यानी आले, तेव्हा त्याने प्रभूचे स्मरण केले; आणि धैर्यवन्त कपीने मोठ्याने ललकारून रावणाला एक झणझणीत तडाखा दिला. त्याबरोबर तो खाली पडला.

परंतु लगेच उठून त्याने मारुतीला ठोसा लगावला. त्याच्या प्रहाराने तो पडला, पण लगेच उठून त्याने दुसरा गुद्दा लगावला. अशा रीतीने दोघेही पडतात, उठतात, पुन्हा लढतात असे नमुनेदार मल्लयुध्द सुरू झाले. तेव्हा देवांनी दोघांचाही जयजयकार केला.

हनुमंताचे संकट पाहून भल्लकपिवीरांनी संतापून जोराचा हल्ला रावणावर चढवला ! पण रणमदमत्त निशाचरपतीने आपल्या प्रचंड भुजबळाने सर्वांचा चुराडा उडवला !

ते पाहून अफाट कपिसैन्याला रावणावर तुटून पडण्याची प्रभु-प्रेरणा मिळाली.

आता एवढ्या प्रबल सेना-सागरापुढे आपले एकट्याचे सामर्थ्य पुरे पडणार नाही हे जाणून दशकंधराने आपल्या पाखंडास प्रारंभ केला ! ९५

त्याच्या या वेळच्या मायेने प्रथम क्षणभर तो दिसेनासा झाला आणि लगेच त्या खलाने अनेक मायावी रावण निर्माण केले. मौज अशी झाली की रघुपतीच्या सैन्यात जेवढे कपिभल्ल तितके रावण होऊन प्रत्येक वीराच्या मागे एकेक स्वतंत्र रावण लागला ! याप्रमाणे अगणित दशशीश पाहून भल्लकपींचे सैन्य दाही दिशांना-दे माय धरणी ठाय म्हणत उधळले. " रक्ष लक्ष्मणा ! रक्ष रघुवीरा ! " असा जिकडे तिकडे [illegible] सैनिकांच्या तोंडून ओरडा सुरू झाला. त्यांचा आता मात्र धीर पारच सुटला, कारण घोर, कठोर व भयानक अशा गर्जना करत कोट्यवधी रावण दाही दिशांना त्यांच्या अंगावर धावून येत आहेत, असे त्यांना दिसू लागले.

सगळे देवसुद्धा घाबरले आणि घाई घाईने धावत सुटले. ते आपसात बोलू लागले, " बाबांनो ! आता जयाची कसली आशा बाळगता ? अहो, एका रावणाने सर्व देवांना जिंकले; आणि आता तर त्यांची गणतीच करणे अशक्य ! म्हणून आता कुठे सापडेल त्या पर्वताच्या गुहेत जाऊन जलदीने लपून बसा ! दुसरे काय करणार ? "

—प्रभुमहिमा अल्पसा ज्यांना ठाऊक होता, असे ज्ञानी मुनी, ब्रह्मदेव आणि शंकर तेवढे रावणाच्या या मायेला फसले नाहीत; म्हणून त्यांची विमाने आकाशात टिकाव धरून राहिली; आणि बाकीचे झाडून सर्व देव वाट दिसेल तिकडे पळून दिसेनासे झाले !



छं० — जाना प्रताप ते रहे निर्भय कपिन्ह रिपु माने फुरे ।
चले बिचलि मर्कट भालु सकल कृपाल पाहि भयातुरे ॥
हनुमंत अंगद नील नल अतिबल लरत रन बाँकुरे ।
मर्दहिं दसानन कोटि कोटिन्ह कपट भू भट अंकुरे ॥

दो० —सुर बानर देखे बिकल हँस्यो कोसलाधीस ।
सजि सारंग एक सर हते सकल दससीस ॥ ९६ ॥

चौ० —प्रभु छन महुँ माया सब काटी । जिमि रबि उएँ जाहिं तम फाटी ॥
रावनु एकु देखि सुर हरषे । फिरे सुमन बहु प्रभु पर बरषे ॥
भुज उठाइ रघुपति कपि फेरे । फिरे एक एकन्ह तब टेरे ॥
प्रभु बलु पाइ भालु कपि धाए । तरल तमकि संजुग महि आए ॥
अस्तुति करत देवतन्हि देखें । भयउँ एक मैं इन्ह के लेखें ।
सठहु सदा तुम्ह मोर मरायल । अस कहि कोपि गगन पर धायल ॥
हाहाकार करत सुर भागे । खलहु जाहु कहँ मोरें आगे ॥
देखि बिकल सुर अंगद धायो । कूदि चरन गहि भूमि गिरायो ॥

छं० — गहि भूमि पार्‍यो लात मार्‍यो बालिसुत प्रभु पहिं गयो ।

अशा प्रकारे ज्यांनी प्रभूंचा महिमा जाणला तेवढेच निर्भय राहिले. याच्या उलट कपिसैन्यातील सर्वांनाच हे शत्रू खरे वाटल्यामुळे ते सगळे हादरले आणि घाबरून ‘ कृपाळू, रक्षण करा ! ’ असा त्यांनी प्रार्थनेचा आक्रोश सुरू केला.

हनुमान, अंगद, नल-नील, जांबवान् इत्यादी जे रणशूर होते त्यांनी, आपल्या प्रचंड शक्तीच्या जोरावर मायावी दशाननाच्या कोट्यवधी भटांचा चुराडा उडवण्याचा सपाटा चालवला !

सुर व वानर या मायावी दशमुखाच्या भीतीने अगदी हैराण झालेले पाहून कोसलाधीश हसले व धनुष्यावर एकच बाण लावून त्यांनी त्या सर्व मायावी रावणाचा निःपात केला. आता त्यापैकी एकही दिसेनासा झाला ! ९६

सूर्योदयाबरोबर जसा अंधार नष्ट व्हावा, तसा प्रभूच्या एकाच बाणाने असंख्य मायावी रावणाचा पसारा खलास करून टाकला ! आता एकटाच खरा रावण तेवढा उरला अशी खात्री झाल्यावर देव परत आकाशात विमाने घेऊन जमले आणि त्यांनी मोठ्या आनंदाने प्रभूवर पुष्पवृष्टी केली !

श्रीरघुवीरानी आपले बाहू वर करून पळणाऱ्या कपींना परत फिरण्याची खूण केली; आणि परत फिरणाऱ्या कपींनी दुसऱ्या पळणाऱ्या सैनिकांना हाका मारून मागे वळण्यास सुरुवात केली.

प्रभुबलाने सामर्थ्याचा नवा संचार झालेले कपी धावतच परतले आणि अतिशय वेगाने रणक्षेत्रावर युद्धास सज्ज झाले.

देवांनी रघुपतीची स्तुती केलेली रावणाच्या कानावर गेली, तेव्हा तो म्हणतो, “ मी एकटाच उरलो असे तुम्हाला वाटते काय ? शठांनो ! तुम्ही तर नेहमीचे माझे मारखाऊ आहात; घेतो तुमचाच अगोदर समाचार ! ” असे संतापाने बोलून तो क्रुद्ध रावण एकदम् उड्डाण करत आकाशात देवांच्या पाठी लागला.

त्याबरोबर सर्वत्र हलकल्लोळ उडून देव चारी दिशांना पळत सुटले. तेव्हा रावण म्हणतो, “ खलांनो ! तुम्ही माझ्यापुढे कुठे जाल पळून ? ”

देवांची ही दैना पाहून अंगदाला दया आली. त्याने आकाशात उड्डाण करून रावणाचे पाय पकडले आणि पाडला त्याला पृथ्वीवर ! जमिनीवर पालथा पडल्यानंतर त्याला एक लाथ मारली आणि वालिसुत प्रभुपायी आला.

संभारि उठि दसकंठ घोर रव गर्जत भयो ॥
करि दाप चाप चढ़ाइ दस संधानि सर बहु बरषई ।
किए सकल भट घायल भयाकुल देखि निज बल हरषई ॥
दो० — तब रघुपति रावन के सीस भुजा सर चाप ।
काटे बहुत बढ़े पुनि जिमि तीरथ कर पाप ॥ ९७ ॥
चौ० — सिर भुज बाढ़ि देखि रिपु केरी । भालु कपिन्ह रिस भई घनेरी ॥
मरत न मूढ़ कटेहुँ भुज सीसा । धाए कोपि भालु भट कीसा ॥
बालितनय मारुति नल नीला । बानरराज दुबिद बलसीला ॥
बिटप महीधर करहिं प्रहारा । सोइ गिरि तरु गहि कपिन्ह सो मारा ॥
एक नखन्हि रिपु बपुष बिदारी । भागि चलहिं एक लातन्ह मारी ॥
तब नल नील सिरन्हि चढ़ि गयऊ । नखन्हि लिलार बिदारत भयऊ ॥
रुधिर देखि बिषाद उर भारी । तिन्हहि धरन कहुँ भुजा पसारी ॥
गहे न जाहिं करन्हि पर फिरहीं । जनु जुग मधुप कमल बन चरहीं ॥
कोपि कूदि द्वौ धरेसि बहोरी । महि पटकत भजे भुजा मरोरी ॥
पुनि सकोप दस धनु कर लीन्हे । सरन्हि मारि घायल कपि कीन्हे ॥
हनुमदादि मुरुछित करि बंदर । पाइ प्रदोष हरष दसकंधर ॥

थोड्याच वेळात दशकण्ठ सावध होऊन उठला आणि मेघाप्रमाणे गर्जना करू लागला. गर्वाने फुगून त्याने आपल्या दाही धनुष्यांवर बाण लावले व सर्वत्र बाणांचा पाऊस पाडू लागला. हा हां म्हणता सर्व कपिसैन्य घायाळ व भयव्याकुळ झालेले पाहून त्याला आपल्या [illegible] त्या कौतुकाने मोठा हर्ष झाला !

त्याची ती घमेंड कमी [illegible] रघुपतींनी रावणाची डोकी, हात, धनुष्य आणि बाण सर्वच एका क्षणात कापून टाकले; तरी तीर्थक्षेत्रात केलेल्या पापाप्रमाणे त्यांची तितक्याच वेगाने वाढ झाली ! ९७

प्रभूंनी डोकी उडवावीत, हात तोडावेत आणि ते सर्व पुनः पुन्हा वाढावेत. अशा प्रकारे शत्रूच्या शिर-भुजांची वाढ पाहून कपिभल्ल सैनिकांच्या तुकड्या संतप्त झाल्या. इतके करूनही तो मरत नाही हा विलक्षण प्रकार पाहून कपिभल्ल-वीर रावणावर चवताळून धावले.

अंगद, मारुती, नल, नील, सुग्रीव, द्विविद वगैरे सर्व बलवान वीरांनी एकच आघाडी उघडून शत्रूवर वृक्षांचा व पर्वतांचा भयंकर मारा केला. परंतु आपल्या प्रबल वीस हातांनी ते वृक्ष व पर्वत वरच्यावरच झेलून त्याचाच उलट मारा कपिवीरांवर करण्याचा कार्यक्रम त्याने पद्धतशीर सुरू केला.

तेव्हा त्याच्या अंगावर संतापाने चढून वानरांनी त्याच्या अंगाचे नखांनी फाडून लचके तोडले, त्याला खच्चून लाथा मारल्या ! आणि ते सगळे वानर टणाटण उड्या मारत निसटले. हा इकडे उद्योग सुरू होता त्याचवेळी नल-नील त्याच्या डोक्यावर चढले आणि आपल्या नखांनी त्याच्या कपाळावर जोराने ओरबाडून ती फाडली. तरी त्याला दाद लागली नाही. तोंडावर रक्ताचे ओघळ वाहत आल्यावर त्याला वाईट वाटले. मग त्या देवद्रोह्याने त्यांना धरण्यासाठी आपले हात पसरले, पण काही केल्या ते त्याच्या तावडीत सापडेनात. त्या दोघा वानरांनी अशी चपळाई करून त्याच्या हातावरच उड्या मारल्या की, जणू कमलवनात दोन भुंगेच गुंजारव करत क्रीडा करत आहेत !

अखेर उड्या मारमारून त्याने त्या दोघा वानरांना पकडले. एकदाचे आता फिरवून जमिनीवर आपटणार इतक्यात निसटून त्याचेच हात पुन्हा जोराने मुरगाळून ते पळाले !

आता दुसरा इलाज खुंटला म्हणून त्याने आपल्या दाही धनुष्यांवर बाण लावून अशी झोड उठवली की, सर्व कपिसैन्य पुनः घायाळ झाले. या खेपेस हनुमंतासह सर्व सुभटांना मूर्छित केले आणि पाहतो तो सायंकाल झाला म्हणून त्याला मोठा आनंद झाला.

मुरुछित देखि सकल कपि बीरा । जामवंत धायउ रनधीरा ।।
संग भालु भूधर तरु धारी । मारन लगे पचारि पचारी ।।
भयउ क्रुद्ध रावन बलवाना । गहि पद महि पटकइ भट नाना ।।
देखि भालुपति निज दल घाता । कोपि माझ उर मारेसि लाता ।।

छं० – उर लात घात प्रचंड लागत बिकल रथ ते महि परा ।
गहि भालु बीसहुँ कर मनहुँ कमलन्हि बसे निसि मधुकरा ।।
मुरुछित बिलोकि बहोरि पद हति भालुपति प्रभु पहिं गयो ।
निसि जानि स्यंदन घालि तेहि तब सूत जतनु करत भयो ।।

दो० – मुरुछा बिगत भालु कपि सब आए प्रभु पास ।
निसिचर सकल रावनहि घेरि रहे अति त्रास ।। ९८ ।।

मासपारायण, छब्बीसवाँ विश्राम

चौ० – तेही निसि सीता पहिं जाई । त्रिजटा कहि सब कथा सुनाई ।।
सिर भुज बाढ़ि सुनत रिपु केरी । सीता उर भइ त्रास घनेरी ।।
मुख मलीन उपजी मन चिंता । त्रिजटा सन बोली तब सीता ।।
होइहि कहा कहसि किन माता । केहि बिधि मरिहि बिस्व दुखदाता ।।

आपले सर्वच कपिवीर अशा प्रकारे रावणाने घेरी आणून रणक्षेत्रावर पाडल्याचे पाहून रणधीर जांबवंत पिसाळला. त्याच्याबरोबर अनेक वानर भल्ल-वीरांनी वृक्ष-पर्वत घेतले व ललकारीत. त्यानी रावणावर निकराचा हल्ला चढवला. रावणावर असा भयंकर मारा या कपि-भल्लांच्या तुकडीने केला की, त्वेषाने खवळून त्याने अनेक वीरांच्या तंगड्या धरून त्यांना जमिनीवर आपटण्याचा सपाटा सुरू केला.

आपल्या सैन्याचा होणारा असा संहार असह्य होऊन भल्ल-पती जांबवंताने रागाच्या भरात रावणाच्या छातीत एक फाडकन् लाथ मारली ! त्या प्रचंड तडाख्याने तो व्याकुळ होऊन रथातून जमिनीवर कोसळला !

त्यावेळी त्याच्या वीस मुठीत पकडलेले रीस जणू रात्री कमळात अडकून पडलेल्या मधुकरासारखेच वाटले !

रावण खरोखरच मूर्छित पडला की नाही अशी खात्री करून घेण्यासाठी आणखी एक लत्ताप्रहार करून तो खराच घेरी येऊन बेशुद्ध झाला आहे असे समजल्यावर जाबवंत जेथे प्रभू होते त्या ठिकाणी आला.

तिकडे रावण जेथे बेशुद्ध होऊन पडला होता त्या ठिकाणी त्याच्या सारथ्याने जाऊन त्याला रथात घातला आणि तिथेच बसून तो त्याला सावध करण्याचा प्रयत्न करू लागला.

भल्लकपींची मूर्छा उडाल्यावर ते सगळे प्रभुचरणाजवळ आले. तसेच अत्यंत भयभीत झालेले राक्षस तिकडे रावणाच्या भोवती गराडा घालून बसले. ९८

जांबवंताने रावणाला मूर्छित पाडला त्याच रात्री त्रिजटा सीतेजवळ गेली आणि रणभूमीवरील सर्व समाचार तिला थोडक्यात तिने सांगितला.

शत्रूची शिरे व बाहू प्रभूंनी अनेक वेळा उडवूनही तो मरत नाही उलट जेवढी मस्तके व हात तोडावेत तेवढे पुनः वाढतात हे वृत्त सीतेच्या कानी पडल्यावर तिच्या हृदयात भीती शिरली, मुख उदास झाले आणि मनात चिंतेने घर केले. शेवटी सीता त्रिजटेला म्हणाली,

"माई ! याचा शेवट कसा होणार ते तू का ग नाही सांगत ? साऱ्या विश्वाला त्राही त्राही करून सोडणारा तो कसा मरणार ते तरी सांग एकदा ! अग, रघुपतीच्या बाणांनी शिरे तुटून सुद्धा ज्या अर्थी तो

रघुपति सर सिर कटेहुँ न मरई । बिधि बिपरीत चरित सब करई ।।
मोर अभाग्य जिआवत ओही । जेहिं हौं हरि पद कमल बिछोही ।।
जेहिं कृत कपट कनक मृग झूठा । अजहुँ सो दैव मोहि पर रूठा ।।
जेहिं बिधि मोहि दुख दुसह सहाए। लछिमन कहुँ कटु बचन कहाए ।।
रघुपति बिरह सबिष सर भारी । तकि तकि मार बार बहु मारी ।।
ऐसेहुँ दुख जो राख मम प्राना । सोइ बिधि ताहि जिआव न आना ।।
बहु बिधि कर बिलाप जानकी । करि करि सुरति कृपानिधान की ।।
कह त्रिजटा सुनु राजकुमारी । उर सर लागत मरइ सुरारी ।।
प्रभु ताते उर हतइ न तेही । एहि के हृदयँ बसति बैदेही ।।

छं०—एहि के हृदयँ बस जानकी जानकी उर मम बास है ।
मम उदर भुअन अनेक लागत बान सब कर नास है ।।
सुनि बचन हरष बिषाद मन अति देखि पुनि त्रिजटाँ कहा ।
अब मरिहि रिपु एहि बिधि सुनहि सुंदरि तजहि संसय महा ।।

दो०—काटत सिर होइहि बिकल छुटि जाइहि तव ध्यान ।
तब रावनहि हृदय महुँ मरिहहिं रामु सुजान ।। ९९ ।।

चौ०—अस कहि बहुत भाँति समुझाई । पुनि त्रिजटा निज भवन सिधाई ।।
राम सुभाउ सुमिरि बैदेही । उपजी बिरह बिथा अति तेही ।।

मरत नाही त्या अर्थी ही सर्व विपरीत लीला विधीच करत आहे असे वाटते. ज्याने हरिचरणापासून माझी ताटातूट केली तेच दुर्दैव त्या दुष्टाला जगवीत असले पाहिजे ! ज्याने खोटा मायावी मृग बनवला तेच दुर्भाग्य माझ्यावर अजून रागावले आहे. काय सांगू त्रिजटामाई ! ज्या विधीने मला आजपर्यंत अनेक दुःसह दुःखे भोगायला लावली ज्याने माझ्या तोंडून लक्ष्मणास कटु शब्द बोलायला लावले, ज्याने रघुपति-विरहरूपी मोठे मोठे विषारी बाण माझ्या हृदयाचा नेम धरून सतत रोखून पुष्कळ वेळा मारण्याचा क्रम चालू ठेवला आणि इतके दुःख देऊनही जो मला मरूही देत नाही तोच विधी तोच तोच-विधी माई त्याला जगवीत आहे ग ऽ ऽ दुसरा को ऽ णी नाही ! "

—कृपानिधान रघुपतीचे पुनः पुन्हा स्मरण करून जानकी आपल्या साठलेल्या दुःखाला डोळ्यातील अश्रूंच्या स्वरूपात पाट फोडून नाना प्रकारांनी विलाप करू लागली.

त्रिजटा सुद्धा सीतेच्या अनिवार दुःखाने अत्यंत कष्टी झाली. शेवटी तिचे सांत्वन करण्याकरिता ती दैवी गुणाची राक्षसी म्हणाली " राजकुमारी ! नको नको रडू ! किती दुःख करतेस ? अग, त्याच्या उरात बाण घुसला की तो सुरारी मरेल बरं ! प्रभू त्याच्या उरात बाण का मारत नाहीत सांगू ? अगंऽ, त्यांना ठाऊक आहे की, त्याच्या हृदयात जानकी वसत आहे ! जानकीच्या हृदयात आपली वस्ती आणि आपल्या उदरात तर अनेक भुवने आहेत ! त्यामुळे तेथें बाण मारला तर त्यां सर्वांचाच नाश होणार ! म्हणून ते त्याच्या हृदयात अद्याप बाण मारत नाहीत. "

हे ऐकून सीतेला हर्ष झाला व अत्यंत विषादही वाटला. हे पाहून त्रिजटा म्हणाली की, " हे सुंदरी ! शत्रू कसा मरेल ते तुला सांगते. तू प्रथम आपल्या मनातला मोठा संशय सोडून दे ! — सांगते ऐक ! शिरे कापता कापता तो जेव्हा व्याकुळ होईल तेव्हा तुझे ध्यान बंद पडेल, असे होताच सुजाण राम रावणाच्या हृदयाचा नेम धरून बाण मारतील आणि लगेच तो मरेल ! ९९

—अशी अनेक प्रकारे सीतेची समजूत घालून त्रिजटा आपल्या घरी गेली.

परंतु तिची पाठ फिरताच पुनः श्रीरामचंद्राच्या प्रेमळ स्वभावाचे स्मरण झाले आणि सीतेच्या हृदयात

निसिहि ससिहि निंदति बहु भाँती । जुग सम भई सिराति न राती ।।
करति बिलाप मनहिं मन भारी । राम बिरहँ जानकी दुखारी ।।
जब अति भयहु बिरह उर दाहू । फरकेउ बाम नयन अरु बाहू ।।
सगुन बिचारि धरी मन धीरा । अब मिलिहहिं कृपाल रघुबीरा ।।
इहाँ अर्धनिसि रावनु जागा । निज सारथि सन खीझन लागा ।।
सठ रनभूमि छड़ाइसि मोही । धिग धिग अधम मंदमति तोही ।।
तेहिं पद गहि बहु बिधि समुझावा । भोरु भएँ रथ चढ़ि पुनि धावा ।।
सुनि आगवनु दसानन केरा । कपि दल खरभर भयउ घनेरा ।।
जहँ तहँ भूधर बिटप उपारी । धाए कटकटाइ भट भारी ।।

छं ० – धाए जो मर्कट बिकट कराल कर भूधर धरा ।
अति कोप करहिं प्रहार मारत भजि चले रजनीचरा ।।
बिचलाइ दल बलवंत कीसन्ह घेरि पुनि रावनु लियो ।
चहुँ दिसि चपेटन्हि मारि नखन्हि बिदारि तनु ब्याकुल कियो ।।

दो ० – देखि महा मर्कट प्रबल रावन कीन्ह बिचार ।
अंतरहित होइ निमिष महुँ कृत माया बिस्तार ।। १०० ।।

विरहाची आग पेटून ती तळमळू लागली. चंद्राची व त्या रात्रीची तिने पोटभर निंदा केली तरीसुद्धा युगासारखी वाढलेली मी रात्र संपता संपेना ! मनातल्या मनात पूर्वीच्या आयुष्यातील रामचरण-सहवासाची गोड जीवन चित्रे तिच्या अंतश्चक्षूच्या समोरून भराभर जसजशी सरकू लागली तसतशी, तिच्या विरहदुःखाला अधिकाधिक भरती आली ! त्यावेळी तिची समजूत घालणारी त्रिजटासुद्धा निघून गेली होती. त्यामुळे ती त्या असह्य दुःखाने माशासारखी तडफडून अत्यंत हैराण झाली.

–इतकी टोकाला दुःस्थिती जाताच सीतेचा डावा डोळा लवला आणि डावा बाहू स्फुरण पावू लागला !

हा खास शुभ शकुन आहे, अशी खूणगाठ तिने बांधून आपल्या मनाला धीर दिला की, आता लवकरच कृपाळू रघुवीर भेटतील.

–अर्धी रात्र उलटून गेल्यावर इकडे रावण शुध्दीवर आला. लगेच त्याने आपल्या सारथ्याची खरडपट्टी सुरू केली. " अरे शठा ! तू मला रणातून पळवून आणलास ! अधमा ! मंदमती ! धिक्कार, धिक्कार असो तुला!"

त्या बिचाऱ्याने रावणाचे पाय धरले व त्याची कशीबशी समजूत घातली.

उजाडल्याबरोबर रावणासाठी त्याने रथ तयार करून उभा केला; आणि त्यात बसून तो युद्धाला निघाला.

दशानन युद्धासाठी चालून येत आहे, ही बातमी मिळताच कपिसैन्यात मोठी खळबळ उडाली. जिथे जो वृक्ष दिसेल तो, आणि जो पर्वत दिसेल तो उपटून अगदी दात-ओठ खात ते महा योध्दे रावणाच्या नरडीचा घोट घेण्यासाठी धावले.

अक्राळ-विक्राळ शरीराचे ते कपिभल्लांचे सैन्य हातात मोठमोठे पर्वत व वृक्ष घेऊन अत्यंत चिडून धावत गेले आणि त्वेषाने त्या राक्षसांच्या सैन्याला जेव्हा झोडपून काढण्यास सुरवात केली, तेव्हा पोटात धस्स होऊन ते सर्व पळत सुटले.

याप्रमाणे शत्रूसैन्याला उधळून लावले आणि त्या बलवंत भल्लवानरांनी रावणाच्या रथाला चारी बाजूंनी गराडा घातला; लगेच वीस गालफाडावर थोबाडयामारणे, अंगावर पाहिजे तेथे चपराका मारणे, नखांनी ओरखडणे त्याच्या शरीराची चावून कातडी फाडणे इत्यादि मर्कट चेष्टा सुरू करून त्यांनी त्या दशकंधराला अगदी व्याकुळ केला.

हे महा बलवान् वानरवीर अत्यंत प्रबळ आहेत, यांच्या पुढे उभे राहून आपला आता निभाव लागणार नाही, हे ओळखून तो गुप्त झाला. आणि त्याने एक क्षणात मायेचा विस्तार केला. १००

छं०—जब कीन्ह तेहि पापंड। भए प्रगट जंतु प्रचंड॥
बेताल भूत पिसाच। कर धरें धनु नाराच॥ १॥
जोगिनि गहें करबाल। एक हाथ मनुज कपाल॥
करि सद्य सोनित पान। नाचहिं करहिं बहु गान॥ २॥
धरु मारु बोलहिं घोर। रहि पूरि धुनि चहुँ ओर॥
मुख बाइ धावहिं खान। तब लगे कीस परान॥ ३॥
जहँ जाहिं मर्कट भागि। तहँ बरत देखहिं आगि॥
भए बिकल बानर भालु। पुनि लाग बरषै बालु॥ ४॥
जहँ तहँ थकित करि कीस। गर्जेउ बहुरि दससीस॥
लछिमन कपीस समेत। भए सकल बीर अचेत॥ ५॥
हा राम हा रघुनाथ। कहि सुभट मीजहिं हाथ॥
एहि बिधि सकल बल तोरि। तेहिं कीन्ह कपट बहोरि॥ ६॥
प्रगटेसि बिपुल हनुमान। धाए गहे पाषान॥
तिन्ह रामु घेरे जाइ। चहुँ दिसि बरूथ बनाइ॥ ७॥
मारहु धरहु जनि जाइ। कटकटहिं पूँछ उठाइ॥
दहँ दिसि लँगूर बिराज। तेहिं मध्य कोसलराज॥ ८॥

—या खेपेच्या पाखंडाने निराळीच मौज दिसू लागली. वेताळ, भूत-पिशाच्चादि भयंकर जीव हातात धनुष्यबाण घेतलेले सर्वत्र दिसू लागले. १

—योगिणी एका हातात खड्ग व दुसऱ्या हातात नरमुंड घेऊन अगदी ताजे रक्त पिऊन नृत्य गान करू लागल्या. २

त्याचवेळी ‘धरा, मारा’ अशा भयानक आरोळ्या मारू लागल्या. हा प्रचण्ड भयंकर आवाज सर्वत्र भरून राहिला! असल्या भीतिप्रद योगिणी, वेताळ, भूत पिशाच्चे जबडा पसरून खाण्यासाठी अंगावर धावून येताच वानर धुम् पळू लागले! ३

पण चमत्कार असा की, जिकडे जीव घेऊन पळावे तिकडे आगीचा डोंब भडकलेला! अशी सर्व बाजूंनी कोंडी झाल्याने ते वानर-भल्ल सैनिक अतिशय व्याकुळ झाले.

—इतक्यात गुप्त झालेल्या रावणाने वाळूचा वळवाचा पाऊस सुरू केला. ४

आणि सर्व कपिसेना जागच्या जागी अगदी जेर करून जखडली! असे यश मिळवल्यावर दशाननाने खूप मोठी गर्जना केली. यावेळी लक्ष्मण, सुग्रीव इत्यादी मोठे मोठे वीरसुद्धा अगदी हातपाय जोडून अक्कल गुंग होऊन तटस्थ उभे राहिले. त्यामुळे सर्वांचाच धीर सुटला! ५

“हा! राम! हा! रघुनाथ!” असे म्हणत सगळे वीर हात चोळू लागले. याप्रमाणे सगळे कपिसैन्य झोडून आवळून टाकल्यावर त्याने दुसरी माया मोडली. ६

तिने काय काय मौजा दाखवल्या पाहा—

कित्येक हनुमान प्रकट होऊन ते पर्वत घेऊन धावत येऊ लागले. पुष्कळ टोळ्या-टोळ्यांनी येऊन त्यांनी रामाच्या भोवती गराडा घातला. ७

हुप् हुप् करीत शेपटे वर उचलून ओरडू लागले की, ‘धरा, मारा,’ पळून देऊ नका. अशा प्रकारे त्या मायावी मारुतींची अमर्याद शेपटे आकाशात दाही दिशांना पसरली आणि त्यांच्या मध्यभागी कोसल भूप राम दिसू लागले. ८



छं० – तेहिं मध्य कोसलराज सुंदर स्याम तन सोभा लही ।
जनु इंद्रधनुष अनेक की बर बारि तुंग तमालही ।।
प्रभु देखि हरष बिषाद उर सुर बदत जय जय जय करी ।
रघुबीर एकहिं तीर कोपि निमेष महुँ माया हरी ।। १ ।।
माया बिगत कपि भालु हरषे बिटप गिरि गहि सब फिरे ।
सर निकर छाड़े राम रावन बाहु सिर पुनि महि गिरे ।।
श्रीराम रावन समर चरित अनेक कल्प जो गावहीं ।
संत सेष सारद निगम कबि तेउ तदपि पार न पावहीं ।। २ ।।

दो० – ताके गुन गन कछु कहे जड़मति तुलसीदास ।
जिमि निज बल अनुरूप ते माछी उड़इ अकास ।। १०१ (क) ।।
काटे सिर भुज बार बहु मरत न भट लंकेस ।
प्रभु क्रीड़त सुर सिद्ध मुनि ब्याकुल देखि कलेस ।। १०१ (ख) ।।

चौ० – काटत बढ़हिं सीस समुदाई । जिमि प्रति लाभ लोभ अधिकाई ।।
मरइ न रिपु श्रम भयउ बिसेषा । राम बिभीषन तन तब देखा ।।
उमा काल मर जाकीं ईछा । सो प्रभु जन कर प्रीति परीछा ।।
सुनु सरबग्य चराचर नायक । प्रनतपाल सुर मुनि सुखदायक ।।

त्यांचे ते सुंदर श्याम शरीर यावेळी फारच खुलून दिसले. जणू पुष्कळ इंद्रधनुष्यांच्या बनवलेल्या सुंदर कुंपणात हा एक उंच तमाल वृक्षच शोभत आहे !

अशा प्रभूचे दर्शन होताच हर्षविषादयुक्त होऊन त्यांनी ' जय जय जय हरि ' असा मोठ्याने जयजयकार केला.

हा राक्षसी खेळ संतप्त रघुनाथांनी एकच बाण सोडून एका निमिषात खलास करून टाकला. १

या पाखंडातून सुटका होताच कपिभल्लांना मोठा आनंद होऊन त्यांनी पुनः वृक्ष व पर्वत घेऊन शत्रूवर हल्ला चढवला. त्याच वेळी श्रीरामचंद्रांनीही बाणांचा वर्षाव करून रावणाची मस्तके व बाहू तोडून जमिनीवर पाडण्याचा झपाटा पुनः लावला !

–अशा प्रकारचे हे श्रीराम-रावण युद्धाचे आख्यान अनंत कल्पे जरी वर्णन केले तरी वेद, शेकडो शेष व शारदा आणि सुकवीसुद्धा ते संपूर्ण व सांग करू शकणार नाहीत ! २

माशी ज्याप्रमाणे यथाशक्ती-अनंत आकाश आक्रमण करते–उडते, तसे त्या राम-रावण-रणचरित्राचे थोडेसे गुणवर्णन मंदबुद्धीच्या तुलसीदासाने केले. १०१ (क)

असो प्रभू वारंवार शिरे व बाहू छाटीत आहेत व वीर लंकेश मात्र मरत नाही ! प्रभू हेतु पुरःसर ही रणलीला जरी करत आहेत, तरी त्या युद्धाचे क्लेश नुसते पाहूनच सुर, सिद्ध व मुनी व्याकुळ झाले. १०१ (ख)

कोणत्याही गोष्टीची प्राप्ती होऊ लागली म्हणजे प्रत्येक खेपेला जशी त्या मनुष्याची हाव वाढत रहाते, तशी रावणाची शिरे प्रत्येक वेळी छाटताच वाढत होती !

शत्रू मारूनही मरत नाही व या शेवट नसणाऱ्या छाटा-छाटीच्या कार्यक्रमामुळे शीण मात्र विशेष येत आहे असे म्हणून श्रीरामचंद्रांनी एक वेळ बिभीषणाच्या तोंडाकडे सहेतुक पाहिले.

शंकर पार्वतीला यातील रहस्य उकलून दाखवतात, " उमे ! ज्याच्या इच्छेने काळसुद्धा मरतो, ते प्रभू आपल्या दासाच्या प्रेमाची नुसती परीक्षा पाहत आहेत, दुसरे काय ! "

बिभीषणाला त्याची पूर्ण कल्पना असल्याने तो हात जोडून उत्तर देतो, " हे सर्वज्ञ, चराचरनायक ! ऐका; आपण प्रणतपालक व सुरमुनींना सुख देणारे आहात. आपला हेतू जाणून मी सांगतो याच्या

नाभिकुंड पियूष बस याकें । नाथ जिअत रावनु बल ताकें ॥
सुनत बिभीषन बचन कृपाला । हरषि गहे कर बान कराला ॥
असुभ होन लागे तब नाना । रोवहिं खर सृकाल बहु स्वाना ॥
बोलहिं खग जग आरति हेतू । प्रगट भए नभ जहँ तहँ केतू ॥
दस दिसि दाह होन अति लागा । भयउ परब बिनु रबि उपरागा ॥
मंदोदरि उर कंपति भारी । प्रतिमा स्त्रवहिं नयन मग बारी ॥

छं०– प्रतिमा रुदहिं पबिपात नभ अति बात बह डोलति मही ॥
बरषहिं बलाहक रुधिर कच रज असुभ अति सक को कही ॥
उतपात अमित बिलोकि नभ सुर बिकल बोलहिं जय जए ।
सुर सभय जानि कृपाल रघुपति चाप सर जोरत भए ॥

दो०– खैंचि सरासन श्रवन लगि छाड़े सर एकतीस ।
रघुनायक सायक चले मानहुँ काल फनीस ॥ १०२ ॥

चौ०–सायक एक नाभि सर सोषा । अपर लगे भुज सिर करि रोषा ॥
लै सिर बाहु चले नाराचा । सिर भुज हीन रुंड महि नाचा ॥
धरनि धसइ धर धाव प्रचंडा । तब सर हति प्रभु कृत दुइ खंडा ॥

नाभिकुंडात अमृत आहे. त्याच्याच जोरावर याची कापलेली डोकी व हात पुनः पुन्हा वाढत आहेत !''

कृपाळू प्रभूंनी बिभीषणाच्या तोंडून ही गुप्त गोष्ट ऐकताच मोठ्या हर्षाने हातात अत्यंत तीक्ष्ण बाण घेतले.

—त्याबरोबर अनेक प्रकारचे अपशकुन होऊ लागले. कोल्ही, कुत्री व गाढवे मोठ्याने रडू लागली. जगाच्या दुःखाला कारण होणारे असे बोल पक्षी बोलू लागले; आणि जिकडे पाहावे तिकडे आकाशात अगणित धूमकेतू दिसू लागले ! दाही दिशांना भयंकर वणवा पेटला; व अमावास्या-पर्व नसताच सूर्याला ग्रहण लागू लागले. मंदोदरीच्या हृदयात जोराने थरकाप होऊ लागला. देवाल्यातील मूर्ती डोळ्यातून अश्रू ढाळू लागल्या.

अशा प्रकारे प्रतिमांचे रडणे सुरू होताच निरभ्र आकाशातून विजा पडू लागल्या. जोराचा वारा सुटला. भूकंपाचे धक्के एकामागून एक असे जोराने बसू लागले. इतक्यात आकाशात ढग येऊन रक्त, केस व धूळ यांचाच पाऊस पडू लागला !

—हे व असले अपशकुन इतके होऊ लागले की, त्यांचे सांग वर्णन कोणाला तरी कसे करता येणार ?

अगणित उत्पात होत असलेले पाहून आकाशात जमलेले देव व्याकुळ झाले व ते जयजयकार करू लागले.

देव भयभीत झाले आहेत हे पाहून कृपाळू रघुपतींनी आपल्या धनुष्यावर ते तीक्ष्ण बाण लावले; आणि धनुष्य कानापर्यंत जोराने खेचून एकदम एकतीस बाण सोडले. ते रघुनायकाचे सायक असे चालले की, जणू इतके काळ सर्पराजच रावणाचे प्राण हरण करण्यास निघाले आहेत ! १०२

रावणाच्या जवळ हे बाण येताच पहिल्या बाणाने प्रथम त्याच्या बेंबीजवळचे अमृत शोषून घेतले; आणि बाकीच्या तीस बाणांनी रागाने वीस हात व दहा मस्तके छाटली,

ती दहा मस्तके व वीस हात घेऊन ते मंदोदरीला भेट म्हणून देण्यासाठी बाण लंकेत निघाले; आणि रावणाचे हात व मस्तके नसलेले नुसतेच धड रणांगणात नाचू लागले. त्या प्रचंड धडाच्या धावण्याने पृथ्वी खचली. तेव्हा आणखी एक बाण मारून प्रभूंनी त्या धडाचे दोन तुकडे केले.

गर्जेउ मरत घोर रव भारी । कहाँ रामु रन हतौं पचारी ॥
डोली भूमि गिरत दसकंधर । छुभित सिंधु सरि दिग्गज भूधर ॥
धरनि परेउ द्वौ खंड बढ़ाई । चापि भालु मर्कट समुदाई ॥
मंदोदरि आगें भुज सीसा । धरि सर चले जहाँ जगदीसा ॥
प्रबिसे सब निषंग महुँ जाई । देखि सुरन्ह दुंदुभीं बजाई ॥
तासु तेज समान प्रभु आनन । हरषे देखि संभु चतुरानन ॥
जय जय धुनि पूरी ब्रह्मंडा । जय रघुबीर प्रबल भुजदंडा ॥
बरषहिं सुमन देव मुनि बृंदा । जय कृपाल जय जयति मुकुंदा ॥

छं० – जय कृपा कंद मुकुंद द्वंद हरन सरन सुखप्रद प्रभो ।
खल बल बिदारन परम कारन कारुनीक सदा बिभो ॥
सुर सुमन बरषहिं हरष संकुल बाज दुंदुभि गहगही ।
संग्राम अंगन राम अंग अनंग बहु सोभा लही ॥ १ ॥

सिर जटा मुकुट प्रसून बिच बिच अति मनोहर राजहीं ।
जनु नीलगिरि पर तड़ित पटल समेत उडुगन भ्राजहीं ॥
भुजदंड सर कोदंड फेरत रुधिर कन तन अति बने ।
जनु रायमुनीं तमाल पर बैठीं बिपुल सुख आपने ॥ २ ॥

मरताना रावण मोठयाने ओरडून म्हणाला, " कुठे आहे राम? मी त्याला ललकारून युद्धात मारतो. "

दशकण्ठ पडताच भूकंप झाला. सागर व नद्या क्षुब्ध झाल्या; आणि दिग्गज व पर्वत डळमळू लागले.

त्याच्या धडाचे केलेले दोन तुकडे रणभूमीवर पडत असता, ते वाढवून तो असा पडला की, त्याच्याखाली कपि भल्लांच्या अनेक तुकड्या चिरडल्या !

मंदोदरीच्या पुढे वीस हात व दहा डोकी ठेवून बाण जगदीशाकडे परतले; आणि प्रभूंच्या भात्यात आपल्या पूर्वीच्या जागी शिरले.

हा सर्व प्रकार पाहून देवांनी दुंदुभी वाजवल्या !

रावणाची प्राणज्योतसुद्धा प्रभूच्या मुखात शिरलेली पाहून शंकर आणि ब्रह्मदेव यांना मोठा हर्ष झाला !

" जय रघुवीर ! जय प्रबल भुजदंडा ! " असा जयघोष अखिल ब्रह्माण्डात दुमदुमून राहिला !

" जय कृपाल, जय जयति-मुकुंद ! " असा गजर करत देववृंद व मुनिवृंद पुष्पवृष्टी करू लागले. त्यांनी आणखी स्तुती केली.

" हे प्रभो, तुझा जय असो ! हे कृपारूपी जलदायका ! हे मुकुंदा ! हे राग-द्वेषादी द्वंद्वे हरण करणाऱ्या व शरणागताना सुख देणाऱ्या प्रभो ! हे दुष्टांच्या दलाचे विदारण करणाऱ्या विभो ! आपला जय असो ! असा जयजयकार करीत देव हर्षनिर्भर होऊन पुष्पांचा वर्षाव करत आहेत ! त्याच वेळी दुंदुभीचा धमधमाट चालला आहे; व संग्रामरूपी अंगणात रामचंद्राच्या अंगी अनेक अनंगांची अनुपम शोभा खुलत आहे ! १

मस्तकावर जटाचा मुकुट आहे. त्यात मधे मधे गुंफलेली सुंदर फुले अशी अतिमनोहर शोभत आहेत की, जणू नीलगिरीवर विद्युत्पटलासहित अनेक तारे विराजत आहेत ! आपल्या भुजदंडांनी बाण व कोदंड फिरवीत असून सुंदर रुधिर कण श्याम शरीरावर असे शोभत आहेत की, जणू लाल चिमण्या विपुल सुखात मग्न होऊन तमाल वृक्षावर बसल्या आहेत ! २

दो० – कृपादृष्टि करि बृष्टि प्रभु अभय किए सुर बृंद ।
भालु कीस सब हरषे जय सुख धाम मुकुंद ॥ १०३ ॥

चौ० – पति सिर देखत मंदोदरी । मुरुछित बिकल धरनि खसि परी ॥
जुबति बृंद रोवत उठि धाईं । तेहि उठाइ रावन पहिं आईं ॥
पति गति देखि ते करहिं पुकारा । छूटे कच नहिं बपुष सँभारा ॥
उर ताड़ना करहिं बिधि नाना । रोवत करहिं प्रताप बखाना ॥
तव बल नाथ डोल नित धरनी । तेज हीन पावक ससि तरनी ॥
सेष कमठ सहि सकहिं न भारा । सो तनु भूमि परेउ भरि छारा ॥
बरुन कुबेर सुरेस समीरा । रन सन्मुख धरि काहुँ न धीरा ॥
भुजबल जितेहु काल जम साईं । आजु परेहु अनाथ की नाईं ॥
जगत बिदित तुम्हारि प्रभुताई । सुत परिजन बल बरनि न जाई ॥
राम बिमुख अस हाल तुम्हारा । रहा न कोउ कुल रोवनिहारा ॥
तव बस बिधि प्रपंच सब नाथा । सभय दिसिप नित नावहिं माथा ॥
अब तव सिर भुज जंबुक खाहीं । राम बिमुख यह अनुचित नाहीं ॥
काल बिबस पति कहा न माना । अग जग नाथु मनुज करि जाना ॥

छं० – जान्यो मनुज करि दनुज कानन दहन पावक हरि स्वयं ।

प्रभूंनी अशाच स्थितीत देवांच्या समुदायावर एकवेळ कृपादृष्टीचा पाऊस पाडून त्यांना पूर्ण निर्भय केले ! त्याचवेळी इकडे भल्ल व कपिसैन्यातून " जय सुखधाम मुकुंद " असा एकच अत्यानंदाचा खूप मोठा जयजयकाराचा गजर उठला. १०३

आपल्या प्राणप्रिय पतीची मस्तके पुढे येऊन पडलेली पाहताच मंदोदरीच्या छातीत धक्का बसला. दुःखाने व्याकुळ होऊन ती धाडकन् धरणीवर पडली ! इतर सर्व स्त्रिया रडत, आक्रोश करीतच तेथे आल्या. त्यांनी मंदोदरीला सावध केली आणि तिच्यासह रणभूमीवर रावण जेथे पडला होता, तेथे त्या आल्या.

पतीची ती दुर्दशा पाहून त्या रडत विलाप करू लागल्या; त्यांचे केस सुटले व त्या देहभान विसरल्या. मग त्या नानातऱ्हांनी छाती बडवून घेऊ लागल्या व रडत रडत रावणाचा प्रताप वर्णन करू लागल्या. " हे नाथ ! तुमच्या अचाट बळाने पृथ्वी नेहमी डोलत होती व तुमच्यापुढे अग्नी, चंद्र व सूर्य हे निस्तेज झाले होते. तुमचा भार शेष व कूर्मसुद्धा सहन करू शकले नाहीत; आणि आता तेच तुमचे शरीर जमिनीवर मातीत पडले आहे !

" वरुण, कुबेर, इंद्र, वायू इत्यादि कोणीही तुमच्या समोर युद्धात धीर धरू शकले नाहीत. स्वामी ! तुम्ही आपल्या भुजबळाने काळ व यम यांनासुद्धा जिंकले; पण तेच तुम्ही आज इथे अनाथासारखे पडला आहात !

" तुमची प्रभुता अशी सगळ्या जगात प्रसिद्ध होती; आणि तुमच्या पुत्र-परिवाराचे बळसुद्धा कोणी वर्णन करणे शक्य नव्हते. असे असता तुम्ही रामविमुख झाल्यामुळे तुमचे हे असे हाल झाले व तुमच्यामागे तुमच्यासाठी रडायलासुद्धा कोणी योग्य पुरुष तुमच्या कुळात राहिले नाहीत ! असा तुमचा निर्वंश झाला.

" हे नाथा ! ब्रह्मदेवाने निर्माण केलेली सर्व सृष्टी तुम्हाला वश होती. दिक्पाल भयभीत होऊन रोज तुम्हाला नमन करत होते; पण आता मात्र तुमची शिरे व बाहू कोल्हे, कुत्रे इत्यादि खात आहेत ! रामविमुख झालात म्हणून हे तुमच्या नशिबी आले व ते तसे होणे योग्यच आहे !

" हे पतिदेवा ! तुम्ही काळाला विशेष वश झाल्यामुळे माझेच नव्हे, कोणाचेही नीतिधर्माचे सांगणे ऐकले नाही आणि चराचराचा नाथ, परमात्मा अशा प्रभूला तुम्ही मनुष्य समजलात ! "

" निशाचरांचे अरण्य जाळून टाकणारा दावाग्नी असणाऱ्या हरीलाच तुम्ही मानव ठरवला ! ज्याला प्रत्यक्ष

जेहि नमत सिव ब्रह्मादि सुर पिय भजेहु नहिं करुनामयं ॥
आजन्म ते परद्रोह रत पापौघमय तव तनु अयं ।
तुम्हहू दियो निज धाम राम नमामि ब्रह्म निरामयं ॥

दो ० –अहह नाथ रघुनाथ सम कृपासिंधु नहिं आन ।
जोगि बृंद दुर्लभ गति तोहि दीन्हि भगवान ॥ १०४ ॥

चौ ० –मंदोदरी बचन सुनि काना । सुर मुनि सिद्ध सबन्हि सुख माना ॥
अज महेस नारद सनकादी । जे मुनिबर परमारथबादी ॥
भरि लोचन रघुपतिहि निहारी । प्रेम मगन सब भए सुखारी ॥
रुदन करत देखीं सब नारी । गयउ बिभीषनु मन दुख भारी ॥
बंधु दसा बिलोकि दुख कीन्हा । तब प्रभु अनुजहि आयसु दीन्हा ॥
लछिमन तेहि बहु बिधि समुझायो । बहुरि बिभीषन प्रभु पहिं आयो ॥
कृपादृष्टि प्रभु ताहि बिलोका । करहु क्रिया परिहरि सब सोका ॥
कीन्हि क्रिया प्रभु आयसु मानी । बिधिवत देस काल जियँ जानी ॥

दो ० –मंदोदरी आदि सब देइ तिलांजलि ताहि ।
भवन गईं रघुपति गुन गन बरनत मन माहि ॥ १०५ ॥

चौ० –आइ बिभीषन पुनि सिरु नायो । कृपासिंधु तब अनुज बोलायो ॥

शंकर, ब्रह्मदेव व सर्व देव नमस्कार करतात त्याला, हे प्रिया ! –तो करुणासागर असूनही तुम्ही शरण गेला नाही ! इतकेच नव्हे तर तुमचा हा देह, जन्मापासूनच पापाच्या मोठ्या प्रवाहात सदोदित वाहत राहणारा असून, तसेच सदोदित दुसऱ्याशी वैर करण्यातच तुम्ही जन्म घालवला असूनही तुम्हाला त्या प्रभूने निजधाम दिले ! [तुमची कृती व रामाशी हाडवैर यामुळे तुम्ही खरे पाहिले तर दुर्गतीलाच जावयाचे !]

" –अशा त्या परब्रह्म स्वरूप, निर्दोष श्रीरामचंद्राला मी नमस्कार करते. "

" अहह ! नाथ ! रघुनाथासारखा कृपासिंधू दुसरा कोणीसुद्धा नाही, कारण योगी लोकांनासुद्धा दुर्लभ असणारी गती त्या भगवंताने तुला दिली ! " १०४

–भक्ती व विवेक यांनी भरलेले सती मंदोदरीचे हे शब्द ऐकून देव, मुनी व सिद्ध अशा सर्वांना परमसुख वाटले. ब्रह्मदेव, शंकर, नारद व सनकादिक असे जे चांगले परमार्थवादी मुनिश्रेष्ठ होते. त्यांनी डोळे भरून रघुपतीला निरखून पाहण्याची ही सुसंधी सोडली नाही. प्रेममग्न होऊन तो दर्शनलाभ लुटत असता ते सगळे सुखी झाले.

रावणाच्या त्या सर्व स्त्रिया रडत असलेल्या पाहून, बिभीषण त्यांच्या जवळ गेला व त्याला साहजिकच फार दुःख झाले. आपल्या भावाची ती दुर्दशा पाहून बिभीषणालाही शोकावेग आवरणे कठीण झाले, तेव्हा प्रभूंनी अनुजाला आज्ञा दिली. त्याप्रमाणे लक्ष्मणाने बिभीषणाचे नानाप्रकारे सांत्वन केल्यावर तो प्रभूकडे आला.

सखा बिभीषण जवळ येताच त्याच्याकडे कृपादृष्टीने पाहून प्रभूंनी त्याला सांगितले की, शोक सोडून आता बंधूची क्रिया करा.

बिभीषणानेही प्रभूआज्ञा शिरसामान्य केली; आणि देशकालाला अनुसरून रावणाची दहनक्रिया यथाविधी पार पाडली. मंदोदरी आदिकरून प्रमुख स्त्रियांनी त्याला तिलांजली दिली; रघुपतीच्या अनेक सद्गुणांचे मनात चिंतन करीत त्या आपल्या घरी गेल्या. १०५

– भूप बिभीषण प्रकरण –

आज्ञेप्रमाणे आपल्या भावाची उत्तरक्रिया यथाविधी पार पाडून बिभीषण परत आला व त्याच्या राज्याभिषेकासाठी प्रभुचरण कमलास नमन केले.

तुम्ह कपीस अंगद नल नीला । जामवंत मारुति नयसीला ।।
सब मिलि जाहु बिभीषन साथा । सारेहु तिलक कहेउ रघुनाथा ।।
पिता बचन मैं नगर न आवउँ । आपु सरिस कपि अनुज पठावउँ ।।
तुरत चले कपि सुनि प्रभु बचना । कीन्ही जाइ तिलक की रचना ।।
सादर सिंहासन बैठारी । तिलक सारि अस्तुति अनुसारी ।।
जोरि पानि सबहीं सिर नाए । सहित बिभीषन प्रभु पहिं आए ।।
तब रघुबीर बोलि कपि लीन्हे । कहि प्रिय बचन सुखी सब कीन्हे ।।

छं० – किए सुखी बानी सुधा सम बल तुम्हारें रिपु हयो ।
पायो बिभीषन राज तिहुँ पुर जसु तुम्हारो नित नयो ।।
मोहि सहित सुभ कीरति तुम्हारी परम प्रीति जो गाइहैं ।
संसार सिंधु अपार पार प्रयास बिनु नर पाइहैं ।।

दो० – प्रभु के बचन श्रवन सुनि नहिं अघाहिं कपि पुंज ।
बार बार सिर नावहिं गहहिं सकल पद कंज ।। १०६ ।।

चौ० – पुनि प्रभु बोलि लियउ हनुमाना । लंका जाहु कहेउ भगवाना ।।
समाचार जानकिहि सुनावहु । तासु कुसल लै तुम्ह चलि आवहु ।।
तब हनुमंत नगर महुँ आए । सुनि निसिचरी निसाचर धाए ।।
बहु प्रकार तिन्ह पूजा कीन्ही । जनकसुता देखाइ पुनि दीन्ही ।।
दूरिहि ते प्रनाम कपि कीन्हा । रघुपति दूत जानकीं चीन्हा ।।

लगेच कृपासिंधू रघुपतींनी अनुजाला बोलावला व म्हणाले की, तुम्ही, कपीश सुग्रीव, अंगद, नल, नील, जांबवंत आणि मारुती असे सर्व नीतिनिपुण मिळून सर्वांनी बिभीषणाबरोबर जावे आणि त्याना राज्यतिलक करावा. पितृवचनामुळे मी नगरात येऊ शकत नाही; पण [illegible] कपी व अनुज यांना पाठवत आहे.

लगेच आज्ञा [illegible] सगळी मंडळी गेली व त्यांनी [illegible] तयारी केली. बिभीषणाला आदराने सिंहासनावर बसवून राज्याभिषेक केला आणि त्याची स्तुती केली. हात जोडून सर्वांनी मस्तक नमवून त्यास नमस्कार केला. नंतर बिभीषणासह सर्वचजण प्रभुचरणी परत आले.

मुख्य कार्यक्रम आटोपल्यानंतर युद्धाच्या समारोपादाखल रघुवीराने कपींना बोलावले व प्रिय वाणीने सर्वांना सुखी केले. ते आपल्या अमृत वाणीने म्हणाले, " बंधूनो ! तुमच्या बळाने मी रिपू मारले, बिभीषणाला राज्य मिळाले व तुमचे सुयश सर्व जगात पसरले. माझ्यासहित ही तुमची शुभकीर्ती जे कोणी अतिप्रेमाने गातील ते अपार संसारसागराच्या पैलतीराला विनाश्रम जातील."

प्रभूच्या या भाषणाने वानर-सैनिकांचे समाधान झाले नाही. ते पुनः पुन्हा मस्तक नमवून चरणकमल धरू लागले. १०६

सीता-रघुपती-मीलन प्रकरण

बिभीषण राज्यारोहण व युद्धाचा समारोप ही मुख्य कामे यथासांग पाडल्यानंतर प्रभूनी हनुमंताला बोलावले व भगवंतांनी सांगितले की, " लंकेत जाऊन जानकीला समाचार सांगा व तिचे कुशल विचारून तुम्ही परत या."

तेव्हा हनुमान लंका नगरीत आले; हे कळताच निशाचर आणि निशाचरी त्याचे स्वागत करण्यास धावत आले. त्यांनी नाना प्रकारांनी त्याचा सत्कार केला व बरोबर जाऊन त्याला जनकसुता दाखवली.

हनुमंताने दुरून नमस्कार केला. तेव्हा जानकीने ओळखले की, हा रघुपतींचा दूत आहे. लगेच

कहहु तात प्रभु कृपानिकेता । कुसल अनुज कपि सेन समेता ॥
सब बिधि कुसल कोसलाधीसा । मातु समर जीत्यो दससीसा ॥
अबिचल राजु बिभीषन पायो । सुनि कपि बचन हरष उर लायो ॥

छं० – अति हरष मन तन पुलक लोचन सजल कह पुनि पुनि रमा ।
का देउँ तोहि त्रैलोक महुँ कपि किमपि नहिं बानी समा ॥
सुनु मातु मैं पायो अखिल जग राजु आजु न संसयं ।
रन जीति रिपुदल बंधु जुत पस्यामि राममनामयं ॥

दो० – सुनु सुत सदगुन सकल तव हृदयँ बसहुँ हनुमंत ।
सानुकूल कोसलपति रहहुँ समेत अनंत ॥ १०७ ॥

चौ० – अब सोइ जतन करहु तुम्ह ताता । देखौं नयन स्याम मृदु गाता ॥
तब हनुमान राम पहिं जाई । जनकसुता कै कुसल सुनाई ॥
सुनि संदेसु भानुकुलभूषन । बोलि लिए जुबराज बिभीषन ॥
मारुतसुत के संग सिधावहु । सादर जनकसुतहिं लै आवहु ॥

अधीरतेने विचारले, " तात ! सांगा पाहू, अनुज व सैन्य यांच्यासह कृपानिधी कुशल आहेत ना ? "

त्यावर हनुमंताने लगेच सांगितले, " माते ! कोसलाधीश सर्व प्रकारे कुशल आहेत; त्यांनी दशशीर्षाला युद्धात जिंकला; व बिभीषणाला अविचल राज्य मिळाले. "

कपीचे हे भाषण ऐकून जानकीच्या अंतःकरणाला मोठा हर्ष झाला. अंतःकरणात आनंदाच्या लाटा उसळत आहेत. सर्व शरीरावर रोमांच उभे राहिले आहेत. नेत्रातून आनंदाश्रूंच्या धारा चालल्या आहेत. अशी ती महालक्ष्मी रमा सद्गदित कंठाने पुनः पुन्हा म्हणते, " हे कपी ! मी तुला देऊ तरी काय ? तू आता जी आनंदाची गोड बातमी सांगितलीस तिच्या मोलाचे त्रैलोक्यातही काहीच नाही ! "

जगज्जननीची व आपल्या मातेची ती स्थिती पाहून हनुमंताचे हृदयही भरून आले. आपल्या आईचा कृतज्ञेतेचा भार हलका करण्यासाठी त्याने आपले अंतःकरण मोकळे केले, " माते ! मी काय सांगतो ते ऐक ! युद्धात शत्रूला व त्याच्या सैन्याला जिंकलेल्या श्रीरामचंद्रास बंधूसह पूर्णपणे कुशल स्थितीत मी आपल्या डोळ्यांनी पाहिले, आणि ते वृत्त तुला सांगून तुझा आनंदही याच डोळ्यांनी पाहिला, यातच मला निःसंशय सर्व जगाचे राज्य आज मिळाले. आता मला देण्याचे काय राहिले आई ? "

जानकीचे मातृहृदय वात्सल्याच्या भावनेने उचंबळून आले, " हे सुत ! मी काय सांगते ते ध्यानात ठेव. सर्व सद्गुण तुझ्या हृदयात निरंतर राहोत. हनुमंता ! अनंतासह कोसलपती सदा तुझ्यावर सुप्रसन्न असोत ! " १०७

मातेचा हा अमोघ आशीर्वाद मिळाल्यावर पवनसुताला केवढे सुख झाले असेल ? त्या विचारतंद्रीत असताच आईचे शब्द पुनः कानी आले.

" तात ! आता असा यत्न करावा की, श्यामल सुकुमार शरीराच्या रघुपतीला मी डोळ्यांनीं पोटभर पाहू शकेन. "

मातेचा निरोप घेऊन हनुमंत रामापाशी त्वरेने गेला व त्याने जनकसुतेचे कुशल सांगून तिचा तळमळीचा निरोपही निवेदन केला.

ते ऐकून भानुकुलभूषण रघुवीरांनी युवराज अंगद व बिभीषण यास बोलावून घेतले आणि सांगितले, " तुम्ही मारुतसुताच्याबरोबर जाऊन जनकसुतेला आदराने घेऊन या. "

तुरतहिं सकल गए जहँ सीता । सेवहिं सब निसिचरीं बिनीता ॥
बेगि बिभीषन तिन्हहि सिखायो । तिन्ह बहु बिधि मज्जन करवायो ॥
बहु प्रकार भूषन पहिराए । सिबिका रुचिर साजि पुनि ल्याए ॥
ता पर हरषि चढ़ी बैदेही । सुमिरि राम सुखधाम सनेही ॥
बेतपानि रच्छक बहु पासा । चले सकल मन परम हुलासा ॥
देखन भालु कीस सब आए । रच्छक कोपि निवारन धाए ॥
कह रघुबीर कहा मम मानहु । सीतहि सखा पयादें आनहु ॥
देखहुँ कपि जननी की नाईं । बिहसि कहा रघुनाथ गोसाईं ॥
सुनि प्रभु बचन भालु कपि हरषे । नभ ते सुरन्ह सुमन बहु बरषे ॥
सीता प्रथम अनल महुँ राखी । प्रगट कीन्हि चह अंतर साखी ॥

ही आज्ञा होताच जेथे निशाचरी विनम्रपणे सीतेची सेवा करत होत्या तेथे ही सर्व मंडळी येऊन दाखल झाली.

पुढील जनकसुतेच्या पाठवणीची योग्य अशी कल्पना बिभीषणाने निशाचरींना देताच त्यांनी सीतेला नाना प्रकारे न्हाऊ घातले. कितीतरी प्रकारचे अलंकार अंगावर घालून भारी किंमतीची सुंदर वस्त्रे नेसावयास व अंगावर घेण्यास दिली. एक सुंदर मेणा उत्तम शृंगारलेला सीतेसाठी आणला. सुखधाम व स्नेही अशा श्रीरामचंद्राचे स्मरण करून वैदेही हर्षाने त्यात बसली.

सीता मेण्यात बसताच त्याच्या चारी बाजूस भालदार, चोपदार उभे राहिले. वेताच्या छडया हातात घेतलेले संरक्षक मोठ्या उल्हासाने बरोबर जाण्यास तयार राहिले. मेणा श्रीरामचंद्रांच्या निवासस्थानाकडे चालू लागला.

सीतेच्या दर्शनासाठी अत्यंत उत्सुक झालेले भल्ल व कपी मेण्याच्या जवळ पुनः पुन्हा गर्दी करू लागले. त्याबरोबर चोपदार क्रोधाने त्याना चोप देऊन हाकलू लागले !

हा अनुचित प्रकार श्रीरघुवीराच्या नजरेस येताच त्यानी बिभीषणास बोलावून घेतले व म्हणाले, “ सख्या बिभीषणा ! मी सांगतो ते ऐका. यापुढे सीतेला पायी चालतच येऊ द्या. ”

एवढे सांगितल्यावर बिभीषण किंचित् संशयात पडल्याचे पाहून स्मितपूर्वक स्वामी श्रीरघुनाथानी खुलासा केला; “ असे केल्याने सगळे कपी तिला जननीप्रमाणे पाहतील.”

आपले मनोगत प्रभूंनी कसे जाणले, व जरूर ती आज्ञा कशी दिली असे म्हणत वानरवीर आनंदाने नाचू लागले !

वानरांची गैरसोय दूर झाल्याने देवांचीही सोय झाली व त्यांनी आकाशातून पुष्कळ पुष्पवृष्टी केली.

याप्रमाणे हुकुमाची अमलबारी होऊन सर्वत्र आनंद व जयजयकार चालू असताच, सीता पायीपायी प्रभूपाशी येऊ लागली !

इकडे त्याच वेळी प्रभूच्या मनात दुसराच विचार चालू झाला. पूर्वी रावण-स्पर्श टाळण्यासाठी सीतेला अग्नीत गुप्त राहण्यास सांगून तिची छाया-प्रतिकृति बाहेर ठेवली तीच सीता म्हणून आता वावरत असलेली नष्ट करून मूळ खरी सीता प्रकट करण्याचे अंतःसाक्षी प्रभूंनी मनातल्या मनात ठरवले.

इतक्यात पायी चालत सीता प्रभूच्या बरीच समीप आली. दीर्घ वियोगानंतर व प्राणांतक कष्ट सोसल्या-नंतर परमप्रिय पतिचरणाचे दुरूनच दर्शन-सुखाचा आनंद वैदेही लुटू लागली न लागली तोच—तिच्या हृदयाला धक्का बसला !

श्रीरामचंद्राच्या मुखातून अगदीच अनपेक्षित असे काही अपशब्द ते करुणानिधी असूनही पूर्वी सांगितलेल्या हेतूने बोलले !



दो० –तेहि कारन करुनानिधि कहे कछुक दुर्बाद ।
सुनत जातुधानीं सब लागीं करै बिषाद ।। १०८ ।।

चौ० –प्रभु के बचन सीस धरि सीता । बोली मन क्रम बचन पुनीता ।।
लछिमन होहु धरम के नेगी । पावक प्रगट करहु तुम्ह बेगी ।।
सुनि लछिमन सीता कै बानी । बिरह बिबेक धरम निति सानी ।।
लोचन सजल जोरि कर दोऊ । प्रभु सन कछु कहि सकत न ओऊ ।।
देखि राम रुख लछिमन धाए । पावक प्रगटि काठ बहु लाए ।।
पावक प्रबल देखि बैदेही । हृदयँ हरष नहिं भय कछु तेही ।।
जौं मन बच क्रम मम उर माहीं । तजि रघुबीर आन गति नाहीं ।।
तौ कृसानु सब कै गति जाना । मो कहुँ होउ श्रीखंड समाना ।।

छं० – श्रीखंड सम पावक प्रबेस कियो सुमिरि प्रभु मैथिली ।।
जय कोसलेस महेस बंदित चरन रति अति निर्मली ।।
प्रतिबिंब अरु लौकिक कलंक प्रचंड पावक महुँ जरे ।

विजेचा धक्का बसल्याप्रमाणे सर्वच भोवतालचे लोक आश्चर्याने खिन्न झाले. सीतेचे सच्चरित्र पाहून तिला त्रिजटेप्रमाणे सहाय्य करणाऱ्याबरोबर आलेल्या निशाचरी तर ढसढसा रडूच लागल्या ! १०८

भोंवतालचे सर्वच डोळे दिङमूढ व दुःखी होऊन एकवेळ जानकीकडे सहानुभूतीने, तर लगेच कौतिल्याच्या जिज्ञासेने प्रभूकडे आलटून पालटून स्थिरावू लागले !

या अनिश्चिततेचा शेवट लवकरच झाला. प्रभूचे वचन शिरसामान्य करून, मनाने, कर्माने व वाणीने पुनीत असलेली सीता लक्ष्मणास म्हणाली, "हे लक्ष्मण ! तुम्ही धर्मसहाय्यक व्हा आणि लवकर पावक पेटवा !"

विरह, विवेक आणि धर्म प्रीती यांनी मिश्रित असे सीतेचे ते वचन ऐकून लक्ष्मणाचे डोळे अश्रूंनी डबडबले. त्याचे दोन्ही हात प्रभूंना प्रार्थना करण्यासाठी जोडले गेले, परंतु त्याच्या तोंडून शब्द उमटे ना !

शेवटी श्रीरामचंद्राचा कल समजताच लक्ष्मण धावले आणि पावक पेटवून पुष्कळशी लाकडे जमा केली. थोड्याच वेळात त्याच्या सहाय्याने पावक भडकला व त्याच्या ज्वाळा धाडधाड उसळू लागल्या.

अशाप्रकारे तो पावक पेटलेला पाहून मनाला मुळीच क्लेश अगर दुःख न होता वैदेहीला उलट मोठा आनंद झाला. तिच्या हृदयास कसलेही भय वाटले नाही.

हे भयंकर दृश्य पाहत असता श्रीरामचंद्र व वैदेही यांच्याशिवाय बाकी सर्व प्रेक्षकांच्या हृदयाला यावेळी केवढा ताण जाणवला असेल, याची नुसती कल्पनाही करणे अशक्य आहे. ते सर्वजण जड अंतःकरणाने किंकर्तव्यमूढ होऊन तो सर्व प्रकार नाइलाजाने पाहत होते.

सीतेने भक्तियुक्त अंतःकरणाने मनातल्या मनात प्रदक्षिणा रामाला करून, सर्व देवांना, ब्राह्मणांना व सुवासिनींना नमस्कार केला. नंतर अग्नीच्याजवळ जाऊन तिने हात जोडून प्रार्थना केली, " कृतीने, मनाने व वाणीने माझ्या हृदयात श्रीरघुवीरावाचून मी अन्य कोणालाच निर्वाणीचा सखा मानला नसेल तर सर्वांची गती उत्तम जाणणारा अग्निनारायण असल्याने तो मला चंदनासारखा शीतल होवो ! "

अशी प्रार्थना करून प्रभू श्रीरामचंद्राचे स्मरण केले; आणि ज्या चरणांना महेश वंदन करतात व ज्या चरणांच्या ठिकाणी सीतेचे अनन्य निर्मल प्रेम आहे, त्या कोसलपतीचा जयजयकार मैथिलीने केला; व तो पावक चंदनासारखा शीतल आहे, अशा दृढ श्रध्देने तिने त्यात एकदम उडी घेतली !

सीतेची प्रतिकृती असणारी ती छाया सीता आणि तिला लागलेला तो लौकिक कलंक असे दोन्ही त्या प्रचंड पावकात जळून गेले ! हे प्रभुचरित्रातील रहस्य मात्र कोणाच्याही लक्षात आले नाही !

प्रभु चरित काहुँ न लखे नभ सुर सिद्ध मुनि देखहिं खरे ॥ १ ॥
धरि रूप पावक पानि गहि श्री सत्य श्रुति जग बिदित जो ।
जिमि छीरसागर इंदिरा रामहि समर्पी आनि सो ॥
सो राम बाम बिभाग राजति रुचिर अति सोभा भली ।
नव नील नीरज निकट मानहुँ कनक पंकज की कली ॥ २ ॥

दो० – बरषहिं सुमन हरषि सुर बाजहिं गगन निमान ।
गावहिं किंनर सुरबधू नाचहि चढ़ीं बिमान ॥ १०९ (क) ॥
जनकसुता समेत प्रभु सोभा अमित अपार ।
देखि भालु कपि हरषे जय रघुपति सुख सार ॥ १०९ (ख) ॥

चौ० – तब रघुपति अनुसासन पाई । मातलि चलेउ चरन सिरु नाई ॥
आए देव सदा स्वारथी । बचन कहहिं जनु परमारथी ॥
दीन बंधु दयाल रघुराया । देव कीन्हि देवन्ह पर दाया ॥
बिस्व द्रोह रत यह खल कामी । निज अघ गयउ कुमारगगामी ॥

काय हा भयंकर प्रसंग! आता पुढे काय होणार अशा प्राण कंठी आणणाऱ्या जिज्ञासेने त्या रणभूमीवरील सर्व जण आणि आकाशात असलेले सिध्द, मुनी व देव त्या भडभड जळणाऱ्या अग्नीच्या ज्वाळांकडे पाहतच राहिले! १

–इतक्यात सर्वांचे डोळे दिपवणारी व आश्चर्याने 'आ' वासायला लावणारी एक देदीप्यमान मूर्ती प्रत्यक्ष अग्निनारायणच त्या धडाडणाऱ्या अग्नीतून बाहेर येत असल्याचे सर्वांनी पाहिले. त्या तेजोमयी मूर्तीने वेदांत व लोकांत प्रसिध्द असलेली जी खरीखुरी मा–लक्ष्मी–सीता, तिचा हात धरून, क्षीरसागराने विष्णूला लक्ष्मी दिल्याप्रमाणे पुढे येऊन श्रीरामचंद्राला ती समर्पण केली.

सर्वांना केवढा हर्ष झाला! कोणी वर्णन करावे? आता सीतेला श्रीरामचंद्रांनी आपल्या डाव्या बाजूस मोठ्या प्रेमाने बसवून घेतली. तेव्हाची उत्तम शोभा आणि उत्कट सौंदर्य पाहिल्यावर असे वाटले की, जणू नवीन फुललेल्या नीलकमलाजवळ सोनकमळाची कळीच टवटवीत उमटू पाहात आहे!! २

श्रीरघुवीर व जानकी अशी आसनावर जवळ जवळ बसल्यावर जो आनंदी आनंद सर्वत्र पसरला, त्याबरोबर देवांनी पुष्पवृष्टी सुरू केली, तसेच त्यांनी दुंदुभी वगैरे वाद्ये वाजविल्यामुळे सर्व आकाश त्या आवाजाने दुमदुमून गेले. किन्नर गाऊ लागले आणि अप्सरा आपापल्या विमानात बसून नाचू लागल्या! १०९ (क)

जानकीसहित प्रभूंची ती अपरिमित व अपार शोभा पाहून सर्व सैन्यात सुखसमाधानाची एकच लाट उसळली! भल्ल व कपी तर इतके आनंदाने बेहोष झाले की, त्यांनी सुखसागर रघुपतींचा एकसारखा जयजयकार सुरू केला १०९ (ख)

–देवांनी केलेली स्तुति–

आता सर्व देव स्तुती करू लागतील. त्यानंतर ब्रह्मदेवाची स्तुती संपताच स्वर्गातून दशरथ पुत्रप्रेमाने धावून येतील. नंतर इंद्र व शंभू हे स्तुती करतील.

सीतेला सुखी केल्यावर श्रीरघुनाथांची आज्ञा मिळताच मातली, देवरथावरील सारथी पुढे आला. त्याने प्रभुचरणी मस्तक नमवले आणि निरोप मिळताच आपल्या रथासह तो स्वर्गाकडे चालू लागला.

इतक्यात सदोदित स्वार्थाचाच विचार करणाऱ्या देवांचा मेळावा तेथे हजर झाला आणि परमार्थाचा मोठा आव आणून त्यांनी प्रार्थना केली, " हे दीनबंधू! दयाळा! हे रघुराया! हे देवाधिदेवा! आपण आम्हा देवांच्या समुदायावर केवढी दया केली! अखिल जगाशी अखंड उभा दावा करण्यात पटाईत असा हा दुष्ट, कामी आणि कुमार्गाने जाणारा स्वतःच्याच पापांनी नाश पावला!



तुम्ह समरूप ब्रह्म अबिनासी । सदा एकरस सहज उदासी ।।
अकल अगुन अज अनघ अनामय । अजित अमोघसक्ति करुनामय ।।
मीन कमठ सूकर नरहरी । बामन परसुराम बपु धरी ।।
जब जब नाथ सुरन्ह दुखु पायो । नाना तनु धरि तुम्हइँ नसायो ।।
यह खल मलिन सदा सुरद्रोही । काम लोभ मद रत अति कोही ।।
अधम सिरोमनि तव पद पावा । यह हमरें मन बिसमय आवा ।।
हम देवता परम अधिकारी । स्वारथ रत प्रभु भगति बिसारी ।।
भव प्रबाहँ संतत हम परे । अब प्रभु पाहि सरन अनुसरे ।।

दो० – करि बिनती सुर सिद्ध सब रहे जहँ तहँ कर जोरि ।
अति सप्रेम तन पुलकि बिधि अस्तुति करत बहोरि ।। ११० ।।

छं० – जय राम सदा सुखधाम हरे । रघुनायक सायक चाप धरे ।।
भव बारन दारन सिंह प्रभो । गुन सागर नागर नाथ बिभो ।।
तन काम अनेक अनूप छबी । गुन गावत सिद्ध मुनींद्र कबी ।।
जसु पावन रावन नाग महा । खगनाथ जथा करि कोप गहा ।।
जन रंजन भंजन सोक भयं । गतक्रोध सदा प्रभु बोधमयं ।।
अवतार उदार अपार गुनं । महि भार बिभंजन ग्यानघनं ।।

" सदा सम असणारे असे अविनाशी ब्रह्म, नित्य एकरस, स्वभावतःच उदासीन, पूर्ण, अगुण, जन्मरहित पाप अगर विकार यांचा लवलेश नसणारे, अजित अमोघ शक्ती संपन्न आणि करुणामय असे प्रभो, आपले स्वरूप आहे.

" असे आपण आहात, म्हणूनच मत्स्य, कूर्म, वराह, वामन व परशुराम होऊन, हे नाथ ! जेव्हा जेव्हा आम्हा देवांना दुःख झाले, तेव्हा तेव्हा तुम्हीच अनेक प्रकारचे देह धारण केले आणि तुम्हीच आमच्या सर्व दुःखांचा परिहार केलात !

" खरोखर पाहिले तर हा दुष्ट, सदोदित पापे करण्यात, रंगलेला. देवांशी तर द्रोह सारखाच याने केला, काम, क्रोध, लोभ व मद यातच सदा मग्न असणारा, असा –अधमाचा शिरोमणी असूनसुद्धा त्याला तुमचे पद प्राप्त झाले; हे आमच्या मनाला मोठेच आश्चर्य वाटले !

" परंतु विचार केल्यावर सर्व कोडे उलगडले. वस्तुतः आम्ही सर्व देवता परम अधिकारी, पण स्वार्थ-परायण होऊन प्रभो ! तुमची भक्ती विसरलो. आणि म्हणूनच आम्ही निरंतर जन्ममरणाच्या फेऱ्यात सापडलो आहोत ! प्रभो ! आता मात्र आपल्या पायी शरण आलो आहोत; आमचे रक्षण करा ! "

अशी प्रार्थना करून सर्व देव, सिद्ध वगैरे हात जोडून जिकडे तिकडे उभे राहिलेले असताच ब्रह्म-देवाच्या हृदयात प्रेमाला भरते आले, त्याची सर्व काया रोमांचित झाली व मुखावाटे स्तुती सुरू झाली. ११०

" हे सर्वकाळी सुखाचे माहेरघर असणाऱ्या हरे ! हातात धनुष्य व बाण घेतलेल्या हे रघुनायका ! हे राम, आपला जय असो. हे प्रभो ! जन्ममरणरूप हत्तीला फाडून टाकणारे आपण सिंह आहात. हे नाथ ! हे विभो ! आपण गुणाचे सागर असून, चतुर आहात. आपल्या शरीराची छवी अनेक कामदेवांसारखी पण अनुपम आहे.

" सिद्ध, मुनिश्रेष्ठ व कवी आपले गुणवर्णन करीत आहेत. तुमचे यश पावन असून, आपण रावणरूपी सर्पश्रेष्ठाला गरुडाप्रमाणे रागाने धरलात. हे प्रभो ! आपण सेवकांना आनंद देऊन त्यांच्या शोक व भीतीचा नाश करणारे, सदा कोपरहित व अखंड ज्ञानमय आहात; आपला अवतार उदार व अपार गुणांनी भरलेला, भूभार हरण करणारा व ज्ञानघन आहे.

अज ब्यापकमेकमनादि सदा । करुनाकर राम नमामि मुदा ।।
रघुबंस बिभूषन दूषन हा । कृत भूप बिभीषन दीन रहा ।।
गुन ग्यान निधान अमान अजं । नित राम नमामि बिभुं बिरजं ।।
भुजदंड प्रचंड प्रताप बलं । खल बृंद निकंद महा कुसलं ।।
बिनु कारन दीन दयाल हितं । छबि धाम नमामि रमा सहितं ।।
भव तारन कारन काज परं । मन संभव दारुन दोष हरं ।।
सर चाप मनोहर त्रोन धरं । जलजारुन लोचन भूपबरं ।।
सुख मंदिर सुंदर श्रीरमनं । मद मार मुधा ममता समनं ।।
अनवद्य अखंड न गोचर गो । सबरूप सदा सब होइ न गो ।।
इति बेद बदंति न दंतकथा । रबि आतप भिन्नमभिन्न जथा ।।
कृतकृत्य बिभो सब बानर ए । निरखंति तवानन सादर ए ।।
धिग जीवन देव सरीर हरे । तव भक्ति बिना भव भूलि परे ।।
अब दीन दयाल दया करिऐ । मति मोरि बिभेदकरी हरिऐ ।।
जेहि ते बिपरीत क्रिया करिऐ । दुख सो सुख मानि सुखी चरिऐ ।।

" जन्मरहित, सर्व व्यापक, एक व अनादि असून, आपण नित्य आहात. हे सदा करुणाकरा रामचंद्रा ! मी आपणाला अत्यंत संतोषाने नमन करतो. हे रघुवंशाच्या विभूषणा ! दूषणादिकांचा नाश करून दीन विभीषणाला आपण लंकेचा भूपती केलात !

" गुणनिधान, ज्ञाननिधान, मानरहित, जन्मरहित, व्यापक व विकाररहित असणाऱ्या रामा ! मी आपणाला नमन करतो. आपल्या बाहूंचा प्रताप व बल प्रचंड आहेत. तसेच दुष्टांच्या सैन्यांचा संहार करण्यात आपण महाकुशल आहात.

" कारणाशिवायच दीनावर दया करून त्यांचे हित करणाऱ्या शोभाधामा ! रमेसहित मी आपणाला नमन करतो. आपण भवसागरातून तारणारे असून, माया व तिने निर्माण केलेले जग यांच्या पलीकडे आपले स्वरूप असल्याने आपण मनात उत्पन्न होणाऱ्या दारुण दोषांचा नाश करणारे आहात.

" आपल्या हातातील मनोहर धनुष्य बाण, तो कमरेला कसलेला सुन्दर भाता, लालकमळासारखे आपले डोळे हे सर्व पाहून आपण भूपश्रेष्ट असल्याची पूर्ण कल्पना येते. तसेच आपण सुखाचे मंदिर, सुन्दर लक्ष्मीरमण असून; मद, काम व मिथ्या ममता यांचा संहार करणारे आहात.

" पूर्णपणे दोषरहित, अखंड असे आपले स्वरूप असून ते इंद्रियांच्या आटोक्यात कधीच न येणारे आहे आपण सर्व जगांत ओतप्रोत भरलेले असूनही जग म्हणजेच आपण असे मात्र होऊ शकत नाही. इंद्रियांच्या ठिकाणी आपलेच चैतन्य खेळत असले तरी इंद्रिये म्हणजे आपण नव्हे; असे वेदच म्हणतात व ती दंतकथा नव्हे ! कारण एका दृष्टीने सूर्य आणि सूर्यप्रकाश हे जसे भिन्न आहेत, तसे दुसऱ्या दृष्टीने ते दोन्ही भिन्न नसून एकरूपच आहेत ! तसे याही बाबतीत.

" हे विभो ! आपले मुख आदराने निरखून पाहत असणारे हे सर्व वानर खरोखर किती कृतकृत्य झाले आहेत ! हे हरे ! वानरांच्या भाग्याशी तुलना करता आमचे जीवन व आमचे देवशरीर यांना धिक्कार असो ! कारण आपली भक्ती न करता आम्ही या भवभ्रमात खरोखर व्यर्थ फिरत राहिलो आहोत. " म्हणून हे दीन-दयाळा ! आता माझ्यावर कृपा करावी आणि ज्या माझ्या विभेद उत्पन्न करणाऱ्या बुद्धीने मी विपरीत आचरण करत असतो आणि दुःखालाच सुख मानून सुखी होऊन फिरत असतो, ती माझी विभेद बुद्धी दूर करा.



खल खंडन मंडन रम्य छमा । पद पंकज सेवित संभु उमा ।।
नृप नायक दे बरदानमिदं । चरनांबुज प्रेमु सदा सुभदं ।।

दो ० –बिनय कीन्हि चतुरानन प्रेम पुलक अति गात ।
सोभासिंधु बिलोकत लोचन नहीं अघात ।। १११ ।।

चौ ० –तेहि अवसर दसरथ तहँ आए । तनय बिलोकि नयन जल छाए ।।
अनुज सहित प्रभु बंदन कीन्हा । आसिरबाद पिताँ तब दीन्हा ।।
तात सकल तव पुन्य प्रभाऊ । जीत्यों अजय निसाचर राऊ ।।
सुनि सुत बचन प्रीति अति बाढ़ी । नयन सलिल रोमावलि ठाढ़ी ।।
रघुपति प्रथम प्रेम अनुमाना । चितइ पितहि दीन्हेउ दृढ़ ग्याना ।।
ताते उमा मोच्छ नहिं पायो । दसरथ भेद भगति मन लायो ।।
सगुनोपासक मोच्छ न लेहीं । तिन्ह कहुँ राम भगति निज देहीं ।।

" खलांचे खंडन केल्यामुळे आपण विशेष प्रकारे या महीचे रम्य भूषण बनला आहात. म्हणून ज्या चरणकमलांची सेवा शिव व उमासुद्धा करत असतात, त्या आपल्या चरणकमलांच्या ठिकाणी हे नृपनायका ! कल्याणकारक असे प्रेम उत्पन्न होईल असे वरदान मला द्या. "

अशीही स्तुती चालू असता प्रेमनिर्भर होऊन चतुराननाचा देह अत्यंत रोमांचित झाला, आणि दृष्टी एकसारखी त्या सौंदर्यसागरावर खिळली असल्याने डोळ्यांचे समाधान मात्र मुळीच होईना ! १११

–श्रीराम-दशरथ-समागम–

याप्रमाणे ब्रह्मदेवांनी स्तुती केल्यानंतर स्वर्गातून दशरथराजे त्या रणभूमीवर येऊन प्रकट झाले. आपल्या प्राणप्रिय पुत्राकडे पाहात असता त्यांच्या डोळ्यातून अश्रू ओघळले !

आपल्या पित्याचे दर्शन होताच अनुज लक्ष्मणासह प्रभूंनी दशरथाना वंदन केले. त्यांनी आपल्या पुत्रांना आशीर्वाद दिले.

मग राम म्हणाले, " तात ! हा सर्व तुमच्या पुण्याचा प्रभाव आहे. अजिंक्य असा निशाचरांचा राजा त्यामुळेच जिंकला गेला ! "

पुत्राचे हे वचन ऐकून पित्याच्या हृदयात एवढे प्रेम वाढले की, ते नेत्रांच्यावाटे बाहेर रस्ता काढू लागले व शरीरावर घनदाट रोमांच उभे राहिले.

जड देह पडल्यानंतरसुद्धा पित्याचे आपल्यावरील प्रेम नाहीसे झाले नाही हे ध्यानी येताच, रघुपतीनी आपल्या पित्याकडे कृपादृष्टीने फक्त पाहूनच, त्यास अपरोक्ष ज्ञानाचा दृढ स्वरूपात अनुभव आणून दिला !

अशा ज्ञानप्राप्तीनंतर जीवाला मोक्षप्राप्ती होणार हा सिद्धान्त दशरथाचा जड देह पडून प्रारब्धकर्म संपले. स्वर्गात क्रियमाण कर्म होऊ शकत नाही; आणि प्रत्यक्ष प्रभूनीच ज्ञान दिल्याने संचित कर्माचा संपूर्ण नाश झाला. आता ओघानेच त्याची मोक्षसिद्धी होते. परंतु त्याना मोक्ष मिळाला नाही, तो का ? अशी उमेची जिज्ञासा जाणून शंकर वेळीच खुलासा करतात—

" उमे ! ज्ञान दृढ झाल्यानंतरसुद्धा दशरथ नृप मुक्त झाले नाहीत, कारण दशरथानी मोक्षाचा स्वीकार केला नाही ' तू देव, मी भक्त ' इतकी भेदभावना शिल्लक ठेवली ! सगुणोपासक सायुज्य मुक्त घेत नाहीत; त्याना राम आपली भक्ती देतात ! "

ज्ञान झाल्याने आता दशरथानी प्रभूला वारंवार प्रणाम केला आणि मग दशरथराजे आनंदाने परत स्वर्गाला गेले.

बार बार करि प्रभुहि प्रनामा । दसरथ हरषि गए सुरधामा ॥

दो० –अनुज जानकी सहित प्रभु कुसल कोसलाधीस ।
सोभा देखि हरषि मन अस्तुति कर सुर ईस ॥ ११२ ॥

छं० –जय राम सोभा धाम । दायक प्रनत बिश्राम ॥
धृत त्रोन बर सर चाप । भुजदंड प्रबल प्रताप ॥ १ ॥
जय दूषनारि खरारि । मर्दन निसाचर धारि ॥
यह दुष्ट मारेउ नाथ । भए देव सकल सनाथ ॥ २ ॥
जय हरन धरनी भार । महिमा उदार अपार ॥
जय रावनारि कृपाल । किए जातुधान बिहाल ॥ ३ ॥
लंकेस अति बल गर्ब । किए बस्य सुर गंधर्ब ॥
मुनि सिद्ध नर खग नाग । हठि पंथ सब कें लाग ॥ ४ ॥
परद्रोह रत अति दुष्ट । पायो सो फलु पापिष्ट ॥
अब सुनहु दीन दयाल । राजीव नयन बिसाल ॥ ५ ॥
मोहि रहा अति अभिमान । नहिं कोउ मोहि समान ॥
अब देखि प्रभु पद कंज । गत मान प्रद दुख पुंज ॥ ६ ॥
कोउ ब्रह्म निर्गुन ध्याव । अव्यक्त जेहि श्रुति गाव ॥

याचे कारण स्वायंभुव मनूच्या देहात असता वर मागण्याच्यावेळी तीन जन्मांत तुम्ही माझे पुत्र व्हावे असा वर मागून जे प्रारब्ध निर्माण करून ठेवले होते ते दशरथांचा देह नडूनही संपणे शक्य नव्हते. पैकी पहिला दशरथ-देह संपला असून वसुदेव कृष्ण पिता आणि हरिगुप्त कल्की अवतारातील पिता असे दोन जन्म व्हावयाचे असल्याने नित्य वैकुंठास न जाता स्वर्गास गेले.

–इंद्राने केलेली स्तुती–

एवढ्या बलाढ्य दशाननाला युद्धात त्याच्या परिवारासह ठार केल्यानंतर लक्ष्मण व जानकी यांच्यासह प्रभू कोसलाधीश कुशल असलेले पाहून व त्यांची ती अतुल्य दैवी प्रभा निरखून देवांचा राजा इंद्र कृतज्ञतेने व हर्षाने बेहोप होऊन नम्रपणे स्तुती करू लागला. ११२

" शोभेचे धाम, शरण आलेल्यास समाधान देणारे. भाता आणि सुंदर धनुष्यबाण धारण केलेल्या, आणि प्रबल भुजदण्ड असलेल्या, हे श्रीरामचंद्रा ! आपला जय असो ! आपण खर व दूषण यांचे काळ व भयंकर निशाचरांचे मर्दन करणारे आहात, आपला जय असो ! हे नाथ, आपण हा दुष्ट मारला व आम्हा सर्व देवांना आता सनाथ केले.

" धरणीचा भार हरण करणारे आपण आहात. आपला महिमा उदार व अपार आहे, आपला जय असो. आपण कृपाल व रावणाचे शत्रू असून, राक्षसांचा निकाल लावला. आपला जय असो.

" लंकेशाला आपल्या बळाचा मोठा गर्व झाला होता; त्याने देव व गंधर्व यांना जिंकून तो मुनी, सिद्ध, नर, पक्षी, नाग इत्यादि सर्वांच्या अगदी हात धुऊन पाठी लागला होता ! परद्रोह करण्यात फार तत्पर आणि अत्यंत दुष्ट असा असल्याने त्या पाप्याला स्वकर्माचे फळ मिळाले.

" हे दीनदयाळ ! विशाल आणि राजीवनयना ! आता माझी विनंती मागितो ते ऐका. मला अत्यंत अभिमान होता की, माझ्यासारखा दुसरा कोणी व श्रेष्ठ नाही, पण आता प्रभूच्या पायांच्या दर्शनाने तो दुःखदायक अतिअभिमान गळून गेला !

" ज्याला वेद अव्यक्त या नावाने ओळखतात, त्या निर्गुण ब्रह्माचे कोणी ध्यान करतात, परंतु मला मात्र

मोहि भाव कोसल भूप । श्रीराम सगुन सरूप ॥ ७ ॥
बैदेहि अनुज समेत । मम हृदयँ करहु निकेत ॥
मोहि जानिऐ निज दास । दे भक्ति रमानिवास ॥ ८ ॥

छं० — दे भक्ति रमानिवास त्रास हरन सरन सुखदायकं ।
सुख धाम राम नमामि काम अनेक छबि रघुनायकं ॥
सुर बृंद रंजन द्वंद भंजन मनुजतनु अतुलितबलं ।
ब्रह्मादि संकर सेब्य राम नमामि करुना कोमलं ॥

दो० — अब करि कृपा बिलोकि मोहि आयसु देहु कृपाल ।
काह करौं सुनि प्रिय बचन बोले दीनदयाल ॥ ११३ ॥

चौ० — सुनु सुरपति कपि भालु हमारे । परे भूमि निसिचरन्हि जे मारे ॥
मम हित लागि तजे इन्ह प्राना । सकल जिआउ सुरेस सुजाना ॥
सुनु खगेस प्रभु कै यह बानी । अति अगाध जानहिं मुनि ग्यानी ॥
प्रभु सक त्रिभुअन मारि जिआई । केवल सक्रहि दीन्हि बड़ाई ॥
सुधा बरषि कपि भालु जिआए । हरषि उठे सब प्रभु पहिं आए ॥

या सगुण, साकार, श्रीराम कोसल भूपच प्रिय वाटतात; म्हणून चरणी प्रार्थना की, वैदेही व बंधू लक्ष्मण यांच्यासह आपण माझ्या हृदयात आपले निवासस्थान करा आणि मला आपला एक दास समजून, हे रमानिवास ! या चरणांची भक्ती द्या.

" हे रमानिवास ! शरणागतांची भीती हरण करून त्यास सुख देणाऱ्या, आपली भक्ती मला द्या. हे सुखधाम ! अनेक कामदेवांचे सौंदर्य एकवटलेल्या रघुनायका रामचन्द्रा ! मी आपणाला वन्दन करतो. हे देव-समुदायाला आनंद देणाऱ्या, सुखदुःखादि द्वंद्वांचा विनाश करणाऱ्या, मनुष्य-देहधारी पण अतुल्य बल असलेल्या, ज्याची ब्रह्मदेव आणि शंकर सेवा करतात, व जो करुणेने कोमल झालेला आहे, अशा श्रीरामचन्द्रा ! मी आपणाला वन्दन करतो !

" आता माझ्यावर कृपादृष्टी करून, हे कृपाळा ! मला काही आज्ञा द्यावी. काय करू ते, मला सांगावे."

इंद्राची ही प्रियवाणी ऐकून दीनांवर दया करणारे प्रभू म्हणाले, ११३

" हे सुरपती ! ऐका. आमच्या सैन्यातील ऋक्ष आणि वानर निशाचरानी ठार केलेले रणभूमीवर पडले आहेत, त्यांनी केवळ माझ्यासाठीच आपले प्राण दिले असल्याने, हे सुजाण सुरेशा ! त्यांना जिवंत करा. "

—काकभुशुंडी गरुडाला काही संशय येणार म्हणून सांगतात—

" खगपती, ऐका ! ही इंद्राला प्रभूनी दिलेली आज्ञा मोठी रहस्यमय आहे. ज्ञानी मुनीच तिचे इंगित जाणतात ! तसे पाहिले तर प्रभू केवळ आपल्या संकल्पानेच त्रिभुवनाला जगवू किंवा मारू शकतात. परंतु या प्रसंगी इंद्राला केवळ मोठेपणा देण्यासाठीच ही आज्ञा दिली. "

असो. इंद्राला ही आज्ञा मिळताच त्यांच्या अंगावर मूठभर मांस आले आणि त्याने ताबडतोब अमृताचा वर्षाव करून रणभूमीवर ठार झालेले सर्व भल्लु आणि कीश जिवंत केले !

त्याबरोबर झोपेतून जागे झाल्याप्रमाणे ते सर्व अंगाला आळोखेपिळोखे व जांभया देत उठले आणि प्रभू श्रीजानकीसहित सुखासनी बसलेले पाहताच, मोठ्या हर्षाने टणाटण् उडया मारीत त्यांच्या चरणाजवळ येऊन त्यांनी भक्तिभावाने त्यांना प्रणाम केले.

या ठिकाणी एक साहजिकच अशी शंका येते की, इंद्राने अमृताची वृष्टी सर्वेच रणभूमीवर केली. तेथे नुसते भल्लु व कपीच मरून पडलेले नसून, त्यात अनेक राक्षसही ठार झालेले लोळत होतेच. मग त्यांच्याही

सुधाबृष्टि भै दुहु दल ऊपर । जिए भालु कपि नहिं रजनीचर ॥
रामाकार भए तिन्ह के मन । मुक्त भए छूटे भव बंधन ॥
सुर अंसिक सब कपि अरु रीछा । जिए सकल रघुपति कीं इछा ॥
राम सरिस को दीन हितकारी । कीन्हे मुकुत निसाचर झारी ॥
खल मल धाम काम रत रावन । गति पाई जो मुनिबर पाव न ॥

दो०—सुमन बरषि सब सुर चले चढ़ि चढ़ि रुचिर बिमान ।
देखि सुअवसर प्रभु पहिं आयउ संभु सुजान ॥ ११४ (क) ॥
परम प्रीति कर जोरि जुग नलिन नयन भरि बारी ।
पुलकित तन गदगद गिराँ बिनय करत त्रिपुरारि ॥ ११४ (ख) ॥

छं०—मामभिरक्षय रघुकुल नायक । धृत बर चाप रुचिर कर सायक ॥
मोह महा घन पटल प्रभंजन । संसय बिपिन अनल सुर रंजन ॥
अगुन सगुन गुन मंदिर सुंदर । भ्रम तम प्रबल प्रताप दिवाकर ॥
काम क्रोध मद गज पंचानन । बसहु निरंतर जन मन कानन ॥
बिषय मनोरथ पुंज कुंज बन । प्रबल तुषार उदार पार मन ॥

अंगावर इतरांबरोबर अमृत पडले असता कीश व ऋक्ष उठले आणि रजनीचर मात्र तसेच पडले हे कसे शक्य आहे ?

या शंकेचे समाधान असे आहे— राक्षस ज्यावेळी मेले तेव्हा त्या सर्वांचे मन रघुपतीच्या कृपेने रामाकार बनूनच त्यांनी प्राण सोडले. त्यामुळे त्यांचे भवबंधन सुटून ते सर्वच मुक्त झाले. परंतु सर्व भल्ल आणि कपी मूळचेच देवांचे अंश असल्याने रघुपतीच्या इच्छेनेच इंद्राला मोठेपणा देऊन— जिवंत होऊन उठले !

अशा प्रकारे अनेक निशाचरांना मुक्त केले, इतकेच काय, खल पापाचे मूळपीठ, सदोदित विषय सेवनात रंगलेला, असल्या रावणालासुद्धा; मुनिश्रेष्ठांनासुद्धा जी सद्गती मिळणे कठीण, ती गती त्याला दिली ! हे पाहिल्यावर प्रभू रामचंद्रासारखा दीनांचे परमहित करणारा खरोखर दुसरा कोण आहे; असा प्रश्न कोणापुढे उभा राहणार नाही ?

एवढा हा कार्यक्रम उरकल्यानंतर सर्व देव आपापल्या सुंदर विमानातून प्रभूवर खूप पुष्पवृष्टी केल्यावर स्वस्थानी परतले.

आता आपणाला जावयास उत्तम संधी आहे, असे पाहून सुजाण शंभू प्रभूच्या जवळ आले. ११४(क)

आपल्या उपास्य देवतेचे ते गोड रूप दिसताच परम प्रेमाने त्यांनी आपले हात जोडले; त्याबरोबर त्यांच्या कमलासारख्या नयनातून आनंदाश्रू वाहू लागले ! तनू पुलकित होऊन कंठ सद्गदित झाला. व मुखातून भक्ति-भावाने स्तुती सुरू झाली. ११४ (ख)

" सुंदर हातात श्रेष्ठ धनुष्यबाण धारण केलेल्या रघुनायका ! माझे सर्वतोपरी रक्षण करा. आपण आत्मस्वरूपी अज्ञान हा मोह व श्रीरघुनायकाला मनुष्य समजणे हा महामोह अशा स्वरूपातील मेघसमूहांना पळवून लावणारा सोसाट्याचा वारा— आपण आहात; संशयरूपी अरण्याला दावानलासारखे खाक करून टाकणारे आणि सर्व देवांना आनंद देणारे आहात.

" तुम्हीच अगुण ब्रह्म, सगुण परमेश्वर व गुणांचे मंदिर असे सुंदर असून, भ्रमरूपी महा अंधकाराला नष्ट करणारे प्रचंड किरणांचे सूर्यनारायण आहात; तसेच काम, क्रोध व मदरूपी हत्तींचा विध्वंस करणारे भयानक सिंहही तुम्हीच असून, आपल्या भक्तांच्या मनरूपी काननात निरंतर निवास करीत असता.

" अनेक विषयोपभोगांच्या मनोरथांचे जाळे हेच एक प्रकारचे कमलाचे वन, त्याचा पार बीमोड



भव बारिधि मंदर परम दर। बारय तारय संसृति दुस्तर ॥
स्याम गात राजीव बिलोचन। दीन बंधु प्रनतारति मोचन ॥
अनुज जानकी सहित निरंतर। बसहु राम नृप मम उर अंतर ॥
मुनि रंजन महि मंडल मंडन। तुलसिदास प्रभु त्रास बिखंडन ॥

दो० – नाथ जबहिं कोसलपुरीं होइहि तिलक तुम्हार।
कृपासिंधु मैं आउब देखन चरित उदार ॥ ११५ ॥

चौ० – करि बिनती जब संभु सिधाए। तब प्रभु निकट बिभीषनु आए ॥
नाइ चरन सिरु कह मृदु बानी। बिनय सुनहु प्रभु सारँगपानी ॥
सकुल सदल प्रभु रावन मार्‍यो। पावन जस त्रिभुवन बिस्तार्‍यो ॥
दीन मलीन हीन मति जाती। मो पर कृपा कीन्हि बहु भाँती ॥
अब जन गृह पुनीत प्रभु कीजे। मज्जनु करिअ समर श्रम छीजे ॥
देखि कोस मंदिर संपदा। देहु कृपाल कपिन्ह कहुँ मुदा ॥
सब बिधि नाथ मोहि अपनाइअ। पुनि मोहि सहित अवधपुर जाइअ ॥
सुनत बचन मृदु दीनदयाला। सजल भए द्वौ नयन बिसाला ॥

करणारे असे हिमस्वरूपी आपण आहात. आपले औदार्य इतके मोठे आहे की, आमच्या मनाला त्याचे आकलन करणेच अशक्य आहे. कारण आमच्या मनाच्या कक्षेपलीकडेच आपले स्वरूप आहे. तथापि भक्तांच्या भवसागराचे मंथन करण्यासाठी आपण मंदर पर्वत बनता; म्हणून प्रार्थना करतो की, माझे परम भयनिवारण करून संसार सागराच्या पैलतीरास मला न्या.

" हे श्याम सुंदर शरीर ! हे राजीवनयन ! हे दीनबंधो ! शरणागतांची दुःखे हरण करणाऱ्या ! हे रामराजा ! आपले धाकटे बंधू लक्ष्मण व जानकी यांच्यासहित आपण माझ्या हृदयाच्या आत निवास करा. मुनींना आनंद देणारे, अखिल पृथ्वीचे भूषण, तुलसीदासाचे स्वामी व भक्ताच्या भीतीचा नाश करणारे असे आपण आहात.

" म्हणून शेवटी एकच प्रार्थना करतो की, हे नाथ ! जेव्हा कोसलपुरीत आपणाला राज्याभिषेक होईल तेव्हा हे कृपासिंधू ! ते आपले उदार चरित पाहण्याची मला परवानगी मिळावी म्हणजे मी येईन. " ११५

" **वसुनि पुष्पकीं कपींसमेत । निघति अयोध्ये कृपानिकेत** " (११६।१ ते १२१)

(वैशाख शुद्ध तृतीयेला सीता-रघुपती भेट झाली. लगेच वैशाख शुद्ध चतुर्थीला सुवेल पर्वतावरून प्रयाण केले. सुवेल पर्वतावर एकूण २११ दिवस रघुनाथांचे वास्तव्य होते. –गू. चं.)

याप्रमाणे स्तुती आटोपल्यानंतर शंभू कैलासाला परतले. थोड्याच वेळात प्रभुचरणाजवळ बिभीषण येऊन त्याने प्रभुचरणी मस्तक नमवून नम्रपणे बोलण्यास प्रारंभ केला—

" हे शारंगपाणी प्रभो ! माझी एक विनंती ऐकावी. आपण रावणाला त्याच्या कुळासुद्धा आणि सैन्यासुध्दा ठार केला. त्यामुळे आपले पावन यश त्रैलोक्यात पसरले. मी दीन, पापी, व मंदबुद्धीचा व हीन जातीत जन्माला आलेला असा असूनही माझ्यावर केवढी कृपा केली, सर्व जगाला माहीतच आहे !

" हे प्रभो ! आता या दासाचे घर पुनीत करावे, युध्दात झालेल्या श्रमाचा परिहार करण्यासाठी मंगल स्नान करावे; खजिना, मंदिर व सर्व प्रकारची संपत्ती एक वेळ दृष्टिखाली घालून त्या संपत्तीची प्रसन्न मनाने आपण कपींना ती देऊन टाकावी, " आणि दयाघना ! माझा सर्व प्रकारे अंगीकार करून मला या चरणांचा दास समजावा व बरोबर घ्यावा. त्यानंतरच अयोध्येस चलावे ! "

बिभीषणाचे हे नम्रवचन ऐकताच दीनदयाळ अशा प्रभु श्रीरामचंद्रांचे विशाल नेत्र अश्रूंनी भरले ! त्या

दो० —तोर कोस गृह मोर सब बचन सुनु भ्रात ।
भरत दसा सुमिरत मोहि निमिष कल्प सम जात ॥ ११६ (क) ॥

तापस बेष गात कृस जपत निरंतर मोहि ।
देखौं बेगि सो जतनु करु सखा निहोरउँ तोहि ॥ ११६ (ख) ॥

बीतें अवधि जाउँ जौं जिअत न पावउँ बीर ।
सुमिरत अनुज प्रीति प्रभु पुनि पुनि पुलक सरीर ॥ ११६ (ग) ॥

करेहु कल्प भरि राजु तुम्ह मोहि सुमिरेहु मन माहिं ।
पुनि मम धाम पाइहहु जहाँ संत सब जाहिं ॥ ११६ (घ) ॥

चौ० —सुनत बिभीषन बचन राम के । हरषि गहे पद कृपाधाम के ॥
बानर भालु सकल हरषाने । गहि प्रभु पद गुन बिमल बखाने ॥
बहुरि बिभीषन भवन सिधायो । मनि गन बसन बिमान भरायो ॥
लै पुष्पक प्रभु आगें राखा । हँसि करि कृपासिंधु तब भाषा ॥
चढ़ि बिमान सुनु सखा बिभीषन । गगन जाइ बरषहु पट भूषन ॥
नभ पर जाइ बिभीषन तबही । बरषि दिए मनि अंबर सबही ॥

स्थितीतच ते बोलू लागले, "अरे भाऊ ! तुझा खजिना, घर इत्यादी सर्व माझे आहे हे सर्वस्वी खरे; पण मी खरे सांगतो तेवढे ऐक. माझ्या प्राणप्रिय भरताच्या दशेचे स्मरण होताच मला आता एकेक क्षण एकेक कल्पासारखा वाटू लागला आहे. ११६ (क)

"काय सांगू बिभीषणा, माझा भरत तपस्वी वेषात राहत आहे. त्याच्या देहाचा सापळा बनला असून, माझ्या नामाचा अखंड जप तो करत आहे; म्हणून मित्रा ! तुला अगदी तळमळून प्रार्थना करतो की, त्याची व माझी भेट लवकरात लवकर होईल असा काही तरी आता उपाय कर." ११६ (ख)

"कारण ठरलेली मुदत टळून थोडा जरी उशीर झाला तर तो वीर मला जिवंत पाहावयास मिळणार नाही !"

—भरताच्या शुद्ध प्रीतीचे स्मरण होऊ लागताच प्रभूच्या शरीरावर पुनःपुन्हा रोमांच उभे राहू लागले. ११६ (ग)

अशी प्रेममग्न स्थिती असताच शेवटी श्रीरघुनाथांनी बिभीषणास आपला शुभाशीर्वाद व संदेश देऊन टाकला.

"तुम्ही कल्पभर राज्य करा व मनात माझे अखंड स्मरण करीत राहा; त्या योगाने ज्या माझ्या धामात सर्व संत जातात तेथे तुम्हीही जाल." ११६ (घ)

आपणाला अपेक्षित असा अत्युत्तम आशीर्वाद मिळाल्याने बिभीषणाला परम हर्ष झाला व त्या भावनेच्या भरात असताच त्याने कृपाधामाचे पाय धरले. त्याबरोबर सर्व कपिसैन्याला मोठा आनंद होऊन त्यांनीसुद्धा आपापल्या परीने प्रभूंचे चरणी मस्तक नमवून श्रीरघुवीराचे विमल गुण गाण्यास प्रारंभ केला. व त्या अवधीत बिभीषणाच्या मनात एक गोड कल्पना आली व तिची अंमलबजावणी करण्यासाठी चटकन् [illegible] तो राजवाड्याकडे परत गेला. लगेच रत्ने, भूषणे व वस्त्रे भरगच्च भरून पुष्पक विमान तयार केले; आणि ते तसे विमान आणून प्रभुचरणी समर्पण केले.

ते पाहून प्रभु हसून म्हणाले, "मित्रा बिभीषणा, आता थोडी मौज करू या. हे विमान आकाशात उंच नेऊन या सर्व चिजांचा खाली कपिसेनेवर पाऊस पाडा"

प्रभूच्या आज्ञेप्रमाणे ते विमान उंच उडाले व वरून रत्ने, भूषणे व वस्त्रे यांची वृष्टी झाली.

जोइ जोइ मन भावइ सोइ लेहीं । मनि मुख मेलि डारि कपि देहीं ॥
हँसे रामु श्री अनुज समेता । परम कौतुकी कृपा निकेता ॥

दो० – मुनि जेहि ध्यान न पावहिं नेति नेति कह बेद ।
कृपासिंधु सोइ कपिन्ह सन करत अनेक बिनोद ॥ ११७ (क) ॥
उमा जोग जप दान तप नाना मख ब्रत नेम ।
राम कृपा नहिं करहिं तसि जसि निष्केवल प्रेम ॥ ११७ (ख) ॥

चौ० – भालु कपिन्ह पट भूषन पाए । पहिरि पहिरि रघुपति पहिं आए ॥
नाना जिनस देखि सब कीसा । पुनि पुनि हँसत कोसलाधीसा ॥
चितइ सबन्हि पर कीन्ही दाया । बोले मृदुल बचन रघुराया ॥
तुम्हरें बल मैं रावनु मार्‍यो । तिलक बिभीषन कहँ पुनि सार्‍यो ॥
निज निज गृह अब तुम्ह सब जाहू । सुमिरेहु मोहि डरपहु जनि काहू ॥
सुनत बचन प्रेमाकुल बानर । जोरि पानि बोले सब सादर ॥
प्रभु जोइ कहहु तुम्हहि सब सोहा । हमरें होत बचन सुनि मोहा ॥

त्याबरोबर एकच गर्दी उडून वानर आणि भल्ल टणाटण् उडया मारून ज्यांना जे आवडले ते ते त्यांनी घेतले. परंतु तेजस्वी रत्न पाहून घ्यावे व तोंडात घालून पाहताच ते खाण्याचे फळ नव्हे म्हणून फेकून द्यावे, असा त्यांचा अपेक्षाभंगाचा खेळ सुरू झाला !

त्यांचा हा खुळेपणाचा खेळ पाहून श्रीराम, सीता आणि लक्ष्मण यांना हसू आवरेना! श्रीरामाचा हा विनोदी स्वभाव व त्या बरोबरच कृपेचे माहेरघर असे अंतःकरण, यावेळी मोठ्या मौजेने एकत्र पाहावयास मिळत होते.

खरोखर पाहिले असता ज्याची प्राप्ती मुनींना ध्यानातसुद्धा होणे कठीण, तसेच ज्याच्या वर्णनास वेद-सुद्धा पुरे पडत नाहीत व शेवटी ' नेति नेति ' म्हणतात, असे कृपासागर तेच श्रीराम यावेळी आपल्या प्राणप्रिय वानरांबरोबर अनेक प्रकारचा विनोद करत आहेत. ११७ (क)

पार्वतीच्या मनात शंका आल्याची खात्री झाली व शंकर लगेच ते जाणून खुलासा करू लागले, ' उमे ! असे कसे होते ? अशीच शंका तुझ्या अंतःकरणात आली ना ? तिचे समाधान ऐक. योग, जप, दान, तप, नानाप्रकारचे यज्ञ, नानाप्रकाची व्रते व नानाप्रकारचे नियम व धर्म करूनसुद्धा जी कृपा श्रीरामचंद्र करत नाहीत ती या वानरांचे निर्मळ प्रेम पाहून करतात, असाच बोध या प्रसंगाने मिळत नाही काय ?" ११७ (ख)

रत्ने चावून फेकण्याचा खेळ संपल्यानंतर भल्ल व कपी यांनी आपल्या आवडीप्रमाणे वस्त्रे व भूषणे अंगावर धारण करून ते एकेक श्रीरघुपतीपाशी येऊ लागले.

एकेकाचे नवीन सजलेले ते विचित्र सोंग पाहून प्रत्येक वेळी कोसलाधीशांना पोट धरधरून हसताना पुरेवाट झाली !

सर्व कपिसेना येऊन शिस्तीने बसलेली आहे, अशी खात्री होताच त्यांच्यावर एकवेळ कृपेची दृष्टी टाकली आणि रघुराया श्रीरामचंद्र मधुर वाणीने बोलू लागले—

" बंधूंनो ! तुमच्या बळावरच खरोखर रावणाला मारला व बिभीषण सख्याला राज्यावर बसविला. आता तुम्ही आपापल्या घरी खुशाल जा बरं ! माझे नेहमी स्मरण करा ! तुम्हाला कोणालाही आणि कशालाही भिण्याचे कारणच उरणार नाही ! "

रघुवीरांचे हे भाषण कानी पडताच सर्वच वानरांची हृदये होणाऱ्या विरहाने व्याकुळ झाली. तथापि ही परिस्थितीत धीर धरून त्यांनी हात जोडले व आपल्या भावना आदराने उघड केल्या—

" हे प्रभो ! तुम्ही जे बोलाल ते तुमच्या दृष्टीने जरी योग्य असले तरी ते भाषण ऐकून आमच्या अंतःकरणाला मात्र मोह उत्पन्न होतो !

दीन जानि कपि किए सनाथा । तुम्ह त्रैलोक ईस रघुनाथा ॥
सुनि प्रभु बचन लाज हम मरहीं । मसक कहूँ खगपति हित करहीं ॥
देखि राम रुख बानर रीछा । प्रेम मगन नहिं गृह कै ईछा ॥

दो० – प्रभु प्रेरित कपि भालु सब राम रूप उर राखि ।
हरष बिषाद सहित चले बिनय बिबिध बिधि भाषि ॥ ११८ (क) ॥
कपिपति नील रीछपति अंगद नल हनुमान ।
सहित बिभीषन अपर जे जूथप कपि बलवान ॥ ११८ (ख) ॥
कहि न सकहिं कछु प्रेम बस भरि भरि लोचन बारि ।
सन्मुख चितवहिं राम तन नयन निमेष निवारि ॥ ११८ (ग) ॥

चौ० – अतिसय प्रीति देखि रघुराई । लीन्हे सकल बिमान चढ़ाई ॥
मन महुँ बिप्र चरन सिरु नायो । उत्तर दिसिहि बिमान चलायो ॥
चलत बिमान कोलाहल होई । जय रघुबीर कहइ सबु कोई ॥

" हे रघुनाथा ! आपण त्रैलोक्याचे ईश असून, आमचे दैन्य जाणून आम्हा [illegible] कृतार्थ केलेत ! अशी वस्तुस्थिती असल्याने आताचे आपले भाषण ऐकून लज्जेने आम्हाला [illegible] झाले आहे; कारण चिलटाने पराक्रम केला व गरुडाचे कल्याण झाले अशी घटना कधी तरी होणे शक्य आहे काय ? "

तथापि श्रीरामचंद्रांची घरी [illegible] इच्छा पाहून सर्वच कपी व भल्ल काही काळ त्या दया-सागराच्या प्रेमरसात बुडून गेले. त्यांना घरी जाण्याची कशी ती इच्छाच होईना.

परंतु श्रीरामचंद्रांनी स्पष्ट आज्ञाच दिल्यावर त्यांचा नाइलाज होऊन त्यांच्यापैकी बहुतेक सर्वजणांनी श्रीरामरूप आपल्या हृदयात साठवले, आपापल्या परीने त्या रघुरायाची प्रार्थना केली आणि हर्ष व खेद यांच्या भावना आलटून पालटून उठत असता ते स्वगृहाकडे जाऊ लागले. ११८ (क)

तथापि त्याच वेळी कपिपती सुग्रीव, नील, ऋक्षपती जांबवान अंगद, नल, हनुमान व बिभीषण, तसेच त्यांच्या दर्जापर्यंत जवळ जवळ चढलेले दुसरे बलवान सेनानायक आपल्याच जागी बसून राहिले. ११८ (ख)

त्यांच्या हृदयातील प्रेमाला अनावर भरती आली. डोळ्यातून अश्रूंचा पूर सुरू झाला. श्रीरामाच्या मुख-कमलाकडे अगदी पापण्या न हालवता त्यांनी आपली दीनवाणी नजर लावली. हृदयातील प्रेमाला अनावर भरती आल्याने डोळ्यातून अश्रूंचा प्रवाह सारखा वाहू लागला. काही बोलावे म्हटले तर तोंडातून शब्द मात्र मुळीच उमटेना ! ११८ (ग)

सुग्रीवादि त्या सर्वांची ही अशी अनावर प्रेममग्न स्थिती पाहिल्यावर त्यांचा वियोग त्या करुणामूर्ती कोसलाधिपाला तरी कसा सहन होणार ?

सर्वांनीच पुष्पक विमानात बसून अयोध्येला श्रीरामचंद्राबरोबर येण्याचा फेरहुकूम लोकर सुटला. मग त्या आनंदाचे कसे वर्णन करावे ? चालू लागलेले सर्व कपी लोकर मागे वळले. सर्वांच्या मुखातून जयजय-काराची एकच गगनभेदी गर्जना झाली !

एवढा त्या अठरापद्म वानरांचा अफाट विस्तार हा हा म्हणता शिस्तीने पुष्पक विमानात बसलेल्या श्रीरघुनाथचरणाला वंदन करून सुखाने विमानात बसल्याचे समजताच श्रीरामचंद्रांनी मनात विप्रचरणास नमस्कार केला व विमान उत्तर दिशेला निघाले.

विमानाला गती मिळताच ' जय जय रघुवीर ' असा जय शब्द, तेथे राहिलेल्या राक्षसांचा व विमानात बसून जाणाऱ्या वानर भल्लांचा एकदम झाल्याने फारच मोठा कोलाहल झाला.



सिंहासन अति उच्च मनोहर । श्री समेत प्रभु बैठे ता पर ॥
राजत रामु सहित भामिनी । मेरु सृंग जनु घन दामिनी ॥
रुचिर बिमानु चलेउ अति आतुर । कीन्ही सुमन बृष्टि हरषे सुर ॥
परम सुखद चलि त्रिबिध बयारी । सागर सर सरि निर्मल बारी ॥
सगुन होहिं सुंदर चहुँ पासा । मन प्रसन्न निर्मल नभ आसा ॥
कह रघुबीर देखु रन सीता । लछिमन इहाँ हत्यो इँद्रजीता ॥
हनूमान अंगद के मारे । रन महि परे निसाचर भारे ॥
कुंभकरन रावन द्वौ भाई । इहाँ हते सुर मुनि दुखदाई ॥

दो० – इहाँ सेतु बाँध्यों अरु थापेउँ सिव सुख धाम ।
सीता सहित कृपानिधि संभुहि कीन्ह प्रनाम ॥ ११९ (क) ॥
जहँ जहँ कृपासिंधु बन कीन्ह बास बिश्राम ।
सकल देखाए जानकिहि कहे सबन्हि के नाम ॥ ११९ (ख) ॥

चौ० – तुरत बिमान तहाँ चलि आवा । दंडक बन जहँ परम सुहावा ॥
कुंभजादि मुनिनायक नाना । गए रामु सब कें अस्थाना ॥
सकल रिषिन्ह सन पाइ असीसा । चित्रकूट आए जगदीसा ॥

पाहा, पाहा त्या विमानात अत्यंत उंच व रत्नखचित अशा मनोहर सिंहासनावर सीतेसह प्रभू बसले आहेत. भामिनीसहित श्रीरामचंद्र यावेळी इतके खुलून दिसत आहेत की जणू मेरुपर्वताच्या शिखरावर चमकणाऱ्या विजेसह मेघच !

अशा प्रकारे ते रुचिर विमान अत्यंत वेगाने चालू झालेले पाहताच श्रेष्ठ अशा देवतानी आनंदित होऊन त्यावर खूप फुले उधळली !

शीतल, मंद, सुगंधी असा परमसुखदायक तीन प्रकारचा वारा वाहू लागला. सागर, नद्या व सरोवरे यांचे पाणी निर्मळ झाले. जिकडे पाहावे तिकडे शुभ शकुन होऊ लागले. सर्वांचे मन सुप्रसन्न झाले आणि चारी दिशांना व आकाशात कुठेच धुके अगर अभ्रे न राहिल्याने सर्वत्र स्वच्छ स्वच्छ दिसू लागले.

आता आपल्या प्रिय पत्नीला युद्धाची रम्य वार्ता प्रभू सांगू लागले, ' सीते ! हे आले रणांगण ! ते पाहा, त्याच ठिकाणी लक्ष्मणाने इंद्रजिताला ठार केला बरं का ! हं, हे पाहा; हनुमान आणि अंगद यांच्या माराने राक्षसांचे भारच्या भारे भरून पडले आहेत; ते पाहा आले ते ठिकाण, सुरमुनींना दुःख देणारे दोघे भाऊ, कुंभकर्ण आणि रावण, इथेच मारले गेले !

" जानकी ! हे स्थळ पाहा. या ठिकाणी समुद्रावर सेतू बांधून सुखधाम अशा शिवाची स्थापना झाली. " असे बोलत असताच श्रीरामेश्वरचे स्थान पुढे आले, त्याबरोबर कृपासिंधूने सीतेसह शंभूला प्रणाम केला ! ११९ (क)

याप्रमाणे पुढे जसे जसे विमान वेगाने चालू लागले तसे तसे, कृपासागराने लंकेस येताना, जेथे जेथे वनात वस्ती केली किंवा थोडा वेळ विसावा घेतला, ती ती सर्व ठिकाणे जानकीला, त्यांची नांवे सांगून, ओळीने त्यांची सविस्तर माहिती दिली. ११९ (ख)

विमान इतके भरधाव निघाले की, फारच थोड्या वेळात ते सुंदर अशा दण्डकारण्यात आले. थोडावेळ विमान खाली उतरवून त्या वनात अगस्ती आदिकरून जे मुनिश्रेष्ठ होते, त्या सर्वांच्या आश्रमाला श्रीरामचंद्रांनी भेटी दिल्या ! त्या त्या ठिकाणी जाताच ऋषींनी प्रभूंना मोठ्या प्रेमाने आशीर्वाद दिले.



तहँ करि मुनिन्ह केर संतोषा । चला बिमानु तहाँ ते चोखा ॥
बहुरि राम जानकिहि देखाई । जमुना कलि मल हरनि सुहाई ॥
पुनि देखी सुरसरी पुनीता । राम कहा प्रनाम करु सीता ॥
तीरथपति पुनि देखु प्रयागा । निरखत जन्म कोटि अघ भागा ॥
देखु परम पावनि पुनि बेनी । हरनि सोक हरि लोक निसेनी ॥
पुनि देखु अवधपुरी अति पावनि । त्रिबिध ताप भव रोग नसावनि ॥

दो० – सीता सहित अवध कहुँ कीन्ह कृपाल प्रनाम ।
सजल नयन तन पुलकित पुनि पुनि हरषित राम ॥ १२० (क) ॥
पुनि प्रभु आइ त्रिबेनीं हरषित मज्जनु कीन्ह ।
कपिन्ह सहित बिप्रन्ह कहुँ दान बिबिध बिधि दीन्ह ॥ १२० (ख) ॥

चौ० – प्रभु हनुमंतहि कहा बुझाई । धरि बटु रूप अवधपुर जाई ॥
भरतहि कुसल हमारि सुनाएहु । समाचार लै तुम्ह चलि आएहु ॥
तुरत पवनसुत गवनत भयऊ । तब प्रभु भरद्वाज पहिं गयऊ ॥
नाना बिधि मुनि पूजा कीन्ही । अस्तुति करि पुनि आसिष दीन्ही ॥

असा हा गोड कार्यक्रम उरकून जगदीश्वर विमानात स्वस्थानी येऊन पोचले त्या ठिकाणी अत्री आदिकरून सर्व मुनींना संतुष्ट केल्यावर तेथून विमान तडक निघाले.

कलिमल हरण करणारी, सुशोभित यमुना नदी, थोड्याच वेळात श्रीरामचंद्रांनी सीतेला दाखवली, लगेच पुढे पवित्र देवनदी गंगामाता दिसली. त्याबरोबर श्रीराम सीतेला म्हणाले, " सीते ! ही आली पाहा भागीरथी, कर तिला प्रणाम ! हं, आता आलेला हा तीर्थराज प्रयाग पाहा. याचा महिमा एवढा मोठा आहे की, कोट्यवधी जन्मातील जी अगणित पापे असतील ती सर्व तुझ्या याच्या दर्शनाने नाहीशी होतात ! लगेच तिथेच असलेला हा त्रिवेणी संगम पाहून घे. याच्या ठिकाणीही फार मोठे सामर्थ्य आहे. ही त्रिवेणी म्हणजे शोकाचे हरण करून हरिपदास नेणारी एक साधकाची शिडीच आहे.

" सीते ! अग आली पाहा त्रिविध ताप हरण करणारी आणि भवरोग विनाश करणारी, अत्यंत पवित्र अशी आपली अयोध्यापुरी ! "

कृपाळू श्रीरामचंद्रांनी सीतेसह लगेच अयोध्या नगरीला मनोभावे प्रणाम केला. त्यावेळी प्रभूंच्या हृदयात एवढा हर्ष झाला की सर्व शरीरावर पुनः पुन्हा रोमांच उभे राहून नेत्रात अश्रू चमकू लागले ! १२० (क)

अनपेक्षितरीतीने अयोध्येत उतरणे इष्ट नसल्यामुळे पुष्पकाला परत फिरण्याची आज्ञा देऊन त्याला प्रयागास पुन्हा आणले. तेथे उतरून सर्वांनी अत्यंत संतोषाने त्रिवेणीत स्नाने केली. त्यानंतर कपींच्यासह प्रभूनी तेथील क्षेत्रस्थ ब्राह्मणांना अनेक प्रकारची पुष्कळ दाने दिली. १२० (ख)

याप्रमाणे यथाविधी सर्व कार्यक्रम उरकल्यावर रघुनाथांनी हनुमंतास बोलावून जवळ घेतले. आणि बटुरूप घेऊन अयोध्येत जाण्याची कामगिरी समजावून दिली.

" भरताला आमचे त्रिवर्गांचे कुशल सांगा आणि अयोध्यावासीयांचा कुशल समाचार घेऊन तुम्ही लवकर परत या. "

आज्ञा मिळताच जल्दीने हनुमंत निघाले व सर्व कपिमंडळीसह पुन्हा विमानात बसून मधल्या वेळाचे सार्थक करण्याच्या दृष्टीने प्रभू भरद्वाज मुनींच्या आश्रमात आले.

मुनिश्रेष्ठांचा आनंद गगनात मावेना. त्यांनी प्रथम श्रीरामचंद्रांची अनुज सीतेसह नाना प्रकारे पूजा केली आणि अंतःकरण पूर्वक स्तुती करून शेवटी व्यावहारिक कर्तव्य पुरे करण्याकरता आशीर्वाद दिले.

मुनि पद बंदि जुगल कर जोरी । चढ़ि बिमान प्रभु चले बिहोरी ॥
इहाँ निषाद सुना प्रभु आए । नाव नाव कहँ लोग बोलाए ॥
सुरसरि नाघि जान तब आयो । उतरेउ तट प्रभु आयसु पायो ॥
तब सीता पूजी सुरसरी । बहु प्रकार पुनि चरनन्हि परी ॥
दीन्हि असीस हरषि मन गंगा । सुंदरि तव अहिवात अभंगा ॥
सुनत गुहा धायउ प्रेमाकुल । आयउ निकट परम सुख संकुल ॥
प्रभुहि सहित बिलोकि बैदेही । परेउ अवनि तन सुधि नहिं तेही ॥
प्रीति परम बिलोकि रघुराई । हरषि उठाइ लियो उर लाई ॥

छं०— लियो हृदयँ लाइ कृपा निधान सुजान रायँ रमापति ।
बैठारि परम समीप बूझी कुसल सो कर बीनती ॥
अब कुसल पद पंकज बिलोकि बिरंचि संकर सेब्य जे ।
सुख धाम पूरनकाम राम नमामि राम नमामि ते ॥ १ ॥

सब भाँति अधम निषाद सो हरि भरत ज्यों उर लाइयो ।

निघण्याची वेळ झाल्याचे ध्यानी येताच मुनिचरणाना वंदन झाल्यावर दोन्ही हात जोडून निरोप घेतला आणि प्रभू विमानात बसले. विमान पुन्हा चालू झाले.

इकडे निषादांचा राजा गुह याला श्रीकोसलेश्वरांच्या आगमनाची बातमी समजली. तेव्हा 'अरे नाव, नाव कुठे आहे? असे शब्द त्याच्या तोंडून बाहेर पडण्याचा अवकाश की हजारो निषाद गोळा झाले.

परंतु असा हा लोकांचा ओरडण्याचा व घाईने नावा एकत्र करण्याचा गोंधळ चालू असताच पुष्पकाने गंगा ओलांडलीसुध्दा! प्रभु-आज्ञा होताच ते तीरावर उतरले.

याठिकाणी गंगापूजनाचा विधी झाला. सीतेने अनेक प्रकारे गंगेचे पूजन करून पुनःपुन्हा अनेक वेळा तिच्या पदकमलांस वंदन केले. प्रत्यक्ष आदिमाताच पूजा करून वंदन करत असल्याने गंगेला प्रकट होणे भाग होते. त्याप्रमाणे पुढे येऊन प्रसन्न मनाने देवनदीने जानकीस आशीर्वाद दिला, " हे सुंदरी! तुझे सौभाग्य अखंड व अभंग राहील बरं! "

नावांची गरज संपून पलीकडच्या तीरावर प्रभू पोचल्याचे गुहाला कळताच तो प्रेमाकुल होऊन चरण-दर्शनासाठी तिकडे धावतच सुटला. प्रभुसमीप आला तेव्हा त्याच्या हृदयात केवढा आनंदसागर उफाळला होता! वैदेहीसह श्रीरघुवीर समोर दिसताच त्याने धाडकन् भूमीवर पडून दण्डवत् केले. त्याचे देहभानच हरपले!

—त्याची ती परम प्रीती पाहून प्रभूंनी मोठ्या हर्षाने त्याला आपल्या हातांनी उठवला आणि आपल्या हृदयाशी कवटाळले! केवढे त्याचे भाग्य!

सुजाणांचे राजे असेच रघुनाथ असल्याने त्यानी निषाद राजाची ती अत्यंत प्रेमनिर्भर स्थिती जाणून त्याला दृढ आलिंगन दिले व लक्ष्मीपती कृपानिधान अशा श्रीरामचंद्रांनी त्याला अगदी अगदी जवळ बसवून त्याचे कुशल विचारले.

तेव्हा गोड अशा वाणीने तो म्हणतो, " ज्या चरणकमलांची सेवा ब्रह्मदेव आणि शंकर करतात ते आपले हे चरणकमल मला पुन्हा पाहवयास मिळाले यातच माझे सर्व कुशल साठवले आहे. हे सुखधाम राम! मी आपणाला नमस्कार करतो. हे पूरितकाम राम! मी आपल्या पदकमली नम्रभावे प्रणाम करतो. " १

त्या प्रेमभावाने गुह व्याकुळ होत असलेला पाहून सर्व प्रकारे नीच असलेल्या निषादाला श्रीहरीने आपल्या भरतासारखा हृदयाशी कवटाळला!

मतिमंद तुलसीदास सो प्रभु बस बिसराइयो ॥
यह रावनारि चरित्र पावन राम पद रतिप्रद सदा ।
कामादिहर बिग्यानकर सुर सिद्ध मुनि गावहिं मुदा ॥ २ ॥

दो० – समर बिजय रघुबीर के चरित जे सुनहिं सुजान ।
बिजय बिबेक बिभूति नित तिन्हहि देहिं भगवान ॥ १२१ (क) ॥
यह कलिकाल मलायतन मन करि देखु बिचार ।
श्रीरघुनाथ नाम तजि नाहिन आन अधार ॥ १२१ (ख) ॥

मासपारायण, सत्ताईसवाँ विश्राम

इति श्रीमद्रामचरितमानसे सकलकलिकलुषविध्वंसने षष्ठः सोपानः समाप्तः ।

लंकाकांड समाप्त

इतके समजूनही तुलसीदास मतिमंद असल्याने त्या प्रभूला विसरलाच !

मानवाला पावित्र्याची प्राप्ती करून देणारे हे रावणारीचे पावन चरित्र वाचल्याने व मनन केल्याने श्रीरामचरणी अखंड प्रेम निर्माण होते. कामादि विकारांचा विनाश करून अन्वय ज्ञान उत्पन्न करण्याचे यात सामर्थ्य आहे. हे जाणून देव, मुनिश्रेष्ठ आणि सिद्ध याचे आनंदाने गायन व वर्णन करीत असतात.

अशाप्रकारचे युद्धातील श्रीरघुवीराच्या विजयाचे हे चरित्र सुजाणपणे श्रवण करतील, त्यांना नित्य विजय, अखंड विवेक व अविचल ऐश्वर्य यांची प्राप्ती प्रभुकृपेने खास होईल. १२१ (क)

हे मना ! तू अंतर्मुख होऊन शांतपणे विचार करून पाहा म्हणजे तुझ्या पूर्णपणे ध्यानात येईल की, हा कलिकाल म्हणजे सर्व प्रकारच्या पापांचे माहेरघर असल्याने श्रीरघुनाथाच्या नावाशिवाय तुझ्या उद्धाराला दुसरा आधारच नाही ! १२१ (ख)

—याप्रमाणे कलियुगातील भयंकर दोषांचे निर्दालन करणाऱ्या श्रीरामचरित मानसातील सहावी पायरी लंकाकांडाचा गद्य-अनुवाद समाप्त झाला.

॥ लंकाकांड समाप्त ॥

॥ श्री रामचंद्राच्या चरणी सर्व अर्पण ॥





श्रीराम आणि लक्ष्मण गुरुदेव वसिष्ठांना वंदन करीत
असतांना त्या दोघांचीही मने अपार श्रद्धेने भरून आली.

॥ श्रीगणेशाय नमः ॥

॥ श्रीजानकीवल्लभो विजयते ॥

उत्तरकांड

सप्तम सोपान

श्लोक

केकीकण्ठाभनीलं सुरवरविलसद्विप्रपादाब्जचिह्नं
शोभाढ्यं पीतवस्त्रं सरसिजनयनं सर्वदा सुप्रसन्नम् ।
पाणौ नाराचचापं कपिनिकरयुतं बन्धुना सेव्यमानं
नौमीड्यं जानकीशं रघुवरमनिशं पुष्पकारूढरामम् ॥ १ ॥

कोसलेन्द्रपदकञ्जमञ्जुलौ कोमलावजमहेशवन्दितौ ।
जानकीकरसरोजलालितौ चिन्तकस्य मनभृङ्गसङ्गिनौ ॥२॥

अनुवादककृत-मंगलाचरण

दिवस असूनसुद्धा मेघपटलाच्या आड असलेला सूर्य जसा दिसत नाही; तसाच मिथ्या-मायेच्या आवरणात असल्यामुळे कधीहि व काही केले तरी, मनाने किंवा डोळ्यांनी ज्याला पाहणे शक्य होत नाही; परंतु श्रीरामाने प्रेरणा दिलेल्या अत्यंत जोरदार गुरुकृपारूपी वायूने, अज्ञान आणि भक्तिरूपी मेघांना पळवून लावला म्हणजे जो प्रकट झाल्यासारखा वाटतो, तोच आत्मरूपी राम होय. ॥ १ ॥

वैराग्यस्वरूपी लक्ष्मणाला, विवेकरूपी वायुपुत्राला, शमादिषट्करूपी भरताला आणि मुमुक्षुतारूपी शत्रुघ्नाला मी वन्दन करतो. ॥ २ ॥

आत्मस्वरूपरूपी सिंहासनस्थाच्या मांडीवर अचल बसलेली, सर्व क्लेश हरण करणारी, विदेही स्थिती, विशोकस्थिती व विरक्ती इत्यादि अलंकारांनी विभूषित असलेली, अनंत सौख्यरूपी दिव्य तेजाने युक्त असलेली, स्वात्मशान्तिरूपी विदेह राजकन्या माझे रक्षण करो. ॥३॥

मूळ मंगलाचरण

मोराच्या कण्ठाच्या कान्तीसारखे नीलवर्ण, सर्व देवात श्रेष्ठ असून, विप्रचरणकमल चिन्हाने सुशोभित, अत्यंत शोभासंपन्न, पीताम्बरधारी, कमलनयन, सदासर्वदा सुप्रसन्न, हातात धनुष्यबाण धारण केलेले, वानर-समुदायाने युक्त, बंधू लक्ष्मणाने सेवित, पुष्पक विमानात बसलेले, जानकीपती, स्तुती करण्यास योग्य, रघुकुल-श्रेष्ठ जे राम, त्यांना मी निरन्तर नमस्कार करतो. १

कोसलपुरीचे स्वामी, श्रीरामचंद्र यांचे सुन्दर व कोमल असे दोन्ही चरणकमल ब्रह्मदेव व महादेव यांनी वंदन केलेले, आणि जानकीच्या करकमलांनी प्रेमपुरःसर चेपलेले, अशा चरणकमलांवर चिंतकाचा मनरूपी भ्रमर आसक्त झालेला असतो. २

कुन्दइन्दुदरगौरसुन्दरं अम्बिका[illegible] ।
[illegible] नौमि [illegible] ।। २ ।।

दो० —रहा एक दिन अवधि कर अति आरत पुर लोग ।
जहँ तहँ सोचहिं नारि नर कृस तन राम बियोग ।।
सगुन होहिं सुंदर सकल मन प्रसन्न सब केर ।
प्रभु आगवन जनाव जनु नगर रम्य चहुँ फेर ।।
कौसल्यादि मातु सब मन अनंद अस होइ ।
आयउ प्रभु श्री अनुज जुत कहन चहत अब कोइ ।।
भरत नयन भुज दच्छिन फरकत बारहिं बार ।।
जानि सगुन मन हरप अति लागे करन बिचार ।।

चौ० —रहेउ एक दिन अवधि अधारा । समुझत मन दुख भयउ अपारा ।।
कारन कवन नाथ नहिं आयउ । जानि कुटिल किधौं मोहि बिसरायउ ।।
अहह धन्य लछिमन बड़भागी । राम पदारबिंदु अनुरागी ।।
कपटी कुटिल मोहि प्रभु चीन्हा । ताते नाथ संग नहिं लीन्हा ।।
जौं करनी समुझै प्रभु मोरी । नहिं निस्तार कलप सत कोरी ।।

कुन्दाच्या फुलासारखे कोमल, चंद्रासारखे तेजस्वी, व शंखासारखे गंभीर, गोरे आणि सुन्दर असे पार्वतीचे पती, इच्छिलेले फळ देणारे, [illegible] कमळासारखे डोळे असलेले, कामापासून सोडवणारे असे जे शंकर त्यांना मी नमस्कार, करतो. २

यावेळी अयोध्येतील परिस्थिती अत्यंत प्रेक्षणीय अशी झाली होती. रघुनाथ परत येण्याच्या मुदतीचा अवघा एकच दिवस उरला आहे. त्यामुळे अयोध्या नगरीतील सर्व स्त्रिया व पुरुष रामदर्शनासाठी अत्यंत आर्त झालेले आहेत. रामविरहाने त्या सर्वांचे देह कृश झालेले असल्याने त्यांच्या चेहेऱ्यावर चिंतेची काळोखी पसरली आहे! २

अशी मानसिक ताणाची परिस्थिती टोकास जाऊन पोचली असताच एकदम सर्वत्र शुभशकुन होऊ लागले. ते पाहून सर्व लोकांच्या अंतःकरणात आनंदाचे किरण चमकू लागले. चारी बाजूनी नगराला रमणीय स्वरूप येऊन ते जणू सुचवू लागले की, प्रभू रामचन्द्र येत आहेत.

कौसल्यादि सर्व मातांच्या मनात तर एवढा आनंद उसळला आहे की, प्रभू सीता व लक्ष्मण यांच्यासह आले असे कोणीतरी [illegible] वाट चालत आहे!

नंदीग्रामात तपस्येसाठी बसलेल्या भरताचा उजवा डोळा व उजवा बाहू वारंवार फुरफुरू लागला. शुभ शकुन होत आहे, हे पाहून तो आपल्या मनात हर्षित होऊन विचार करू लागला.

जसे राम निजनगरी आले

आता फक्त रघुनाथानी दिलेल्या मुदतीपैकी एकच दिवस प्राणाला आधार म्हणून राहिला आहे, ही कल्पना मनात येताच भरताच्या दुःखसागराला अनावर भरती आली!

नाथ इथेसुद्धा आज परत आले नाहीत, याचे कारण तरी काय असावे? का मला कुटिल समजून माझा त्यांना पूर्ण विसरच पडला? अहाहा! लक्ष्मण खरोखर अत्यंत धन्य! केवढे त्याचे महाभाग्य! श्रीराम-चरणकमली त्याचे अनन्य प्रेम आहे म्हणूनच त्या कमलांना सोडून तो राहिला नाही!

—आणि मी? कपटी, कुटिल हे प्रभूनी जाणल्यामुळेच लक्ष्मणाप्रमाणे मला आपल्या बरोबर घेतला नाही!

—हो, हे खरेच आहे. पण अशा प्रकारे प्रभु जर माझ्या कृतीकडे पाहतील तर शतकोटी कल्पे गेली तरीही या भवसागरातून माझी सुटका होणे शक्य नाही!

जन अवगुन प्रभु मान न काऊ। दीन बंधु अति मृदुल सुभाऊ ॥
मोरे जियँ भरोस दृढ़ सोई। मिलिहहिं राम सगुन सुभ होई ॥
बीतें अवधि रहहिं जौं प्राना। अधम कवन जग मोहि समाना ॥

दो०–राम बिरह सागर महँ भरत मगन मन होत।
बिप्र रूप धरि पवनसुत आइ गयउ जनु पोत ॥ १ (क) ॥
बैठे देखि कुसासन जटा मुकुट कृस गात।
राम राम रघुपति जपत स्रवत नयन जल जात ॥ १ (ख) ॥

चौ०–देखत हनूमान अति हरषेउ। पुलक गात लोचन जल बरषेउ ॥
मन महँ बहुत भाँति सुख मानी। बोलेउ श्रवन सुधा सम बानी ॥
जासु बिरहँ सोचहु दिन राती। रटहु निरंतर गुन गन पाँती ॥
रघुकुल तिलक सुजन सुखदाता। आयउ कुसल देव मुनि त्राता ॥
रिपु रन जीति सुजस सुर गावत। सीता सहित अनुज प्रभु आवत ॥
सुनत बचन बिसरे सब दूखा। तृषावंत जिमि पाइ पियूषा ॥

—पण प्रभु दासाच्या दोषाकडे लक्ष देत नाहीत असा त्यांचा दयाळू स्वभाव आहे. ते दीनांचे खरे बंधू आहेत. आणि एवढीच गोष्ट माझ्या मनाला मोठा भरंवसा म्हणून उपयोगी पडते त्यामुळे वाटते की राम उद्या भेटतील.

शिवाय शुभ शकुनही एकसारखे होत असल्याने तेही तीच [illegible] गोष्ट सुचवीत आहेत.

—तथापि ही मुदत टळून गेली. श्रीरघुनाथ आले नाहीत आणि माझे प्राण या पापी देहाला सोडून गेले नाहीत तर माझ्यापेक्षा या उभ्या जगात अधिक नीच कोण असणार ?

रामविरहसागरात भरताचे मन याप्रमाणे गटांगळ्या खात आहे इतक्यात वटूरूप धारण केलेला पवनसुत जणू एखाद्या जहाजासारखा जवळ येऊन त्याच्या जवळ उभा राहिला. १ (क)

—ते मूर्तिमंत रामप्रेम पाहून तो थक्क होऊन पाहतच राहिला ! मस्तकावर जटांचा मुकुट बनविलेला आहे, भरताचा देह अत्यंत किडकिडीत झाला आहे; [illegible] दर्भाचे आसन घेतले आहे व मुखातून "राम, राम, रघुपती" असा सारखा नामाचा ध्वनी उमटत असून कमळासारख्या त्या विशाल डोळ्यातून अश्रूंची धार चालू आहे ! १ (ख)

भरताची ती रामप्रेमाने भारावलेली मूर्ती पाहून हनुमंताला अतिहर्ष झाला. त्याच्या अंगावर रोमांच उठू लागून भरताप्रमाणेच हनुमंताच्या नयनातूनही अश्रूंचा पूर वाहू लागला. त्याच्या मनात अनेक प्रकारचे सुखदायक असे विचार एकामागून एक आले. शेवटी कानांना [illegible] गोड वाटणारे शब्द त्याच्या मुखातून बाहेर पडले.

"आपण रात्रंदिवस ज्यांच्या विरहाने झुरत आहात आणि ज्यांच्या गुणगणाचे अखंड गायन करत आहात, ते सज्जनास सुख देणारे व सर्व देव आणि मुनी यांचे रक्षण करणारे रघुकुलतिलक सुखरूप परत आले आहेत.

"शत्रूंचा निःपात केल्यामुळे ज्यांच्या सुयशाचे गायन देवसुद्धा करत आहेत ते प्रभू, सीता व अनुज यांच्यासह लवकरच येत आहेत."

तहानेने प्राण कंठगत झालेल्याला अमृत पिण्यास मिळाल्यानंतर तो ज्या प्रमाणे आपले पूर्वीचे दुःख अजिबात विसरून जातो त्याचप्रमाणे; हनुमंताच्या तोंडून बाहेर पडलेले हे शब्द भरताच्या कानी पडताच मागील सर्व यातनांचा त्यांना पूर्ण विसर पडला !

अत्यानंदाची पहिली अनावर लाट ओसरल्यावर भरताची जिव्हा जागी होऊन बोलू लागली–

को तुम्ह तात कहाँ ते आए। मोहि परम प्रिय बचन सुनाए।।
मारुत सुत मैं कपि हनुमाना। नामु मोर सुनु कृपानिधाना।।
दीनबंधु रघुपति कर किंकर। सुनत भरत भेंटेउ उठि सादर।।
मिलत प्रेम नहिं हृदयँ समाता। नयन स्रवत जल पुलकित गाता।।
कपि तव दरस सकल दुख बीते। मिले आजु मोहि राम पिरीते।।
बार बार बूझी कुसलाता। तो कहुँ देउँ काह सुनु भ्राता।।
एहि संदेस सरिस जग माहीं। करि बिचार देखेउँ कछु नाहीं।।
नाहिन तात उरिन मैं तोही। अब प्रभु चरित सुनावहु मोही।।
तब हनुमंत नाइ पद माथा। कहे सकल रघुपति गुन गाथा।।
कहु कपि कबहुँ कृपाल गोसाईं। सुमिरहिं मोहि दास की नाईं।।

छं० – निज दास ज्यों रघुबंसभूषन कबहुँ मम सुमिरन कर्‍यो।
सुनि भरत बचन बिनीत अति कपि पुलकि तन चरनन्हि पर्‍यो।।
रघुबीर निज मुख जासु गुन गन कहत अग जग नाथ जो।
काहे न होइ बिनीत परम पुनीत सदगुन सिंधु सो।।

दो० – राम प्रान प्रिय नाथ तुम्ह सत्य बचन मम तात।

"हे तात! तुम्ही कोण? कोठून आलात? मला परम प्रिय अशी बातमी तुम्ही सांगितलीत!"

"मी मारुतसुत, जातीचा वानर आहे. हे कृपासागरा! माझे नाव हनुमान आहे. दीनबंधू रघुनाथाचा मी एक दास!"

हे पवनसुताचे उत्तर ऐकल्याबरोबर भरत आपल्या जागेवरून झटकन् उठले आणि त्याला आदराने भेटले.

त्यावेळी हृदयातील रामप्रेमरस उसळून बाहेर पडू लागला. काया पुलकित होऊन नेत्रातून घळघळा जल वाहू लागले.

"हे कपी! तुझ्या दर्शनाने माझे सर्व दुःख हरपले. मला आज प्रिय रामच भेटले असे वाटले." असे म्हणून भरताने हनुमंताला रघुनायकाचे कुशल पुनः पुन्हा विचारले. व त्याप्रमाणे ते कपीने सांगितले; तेव्हा भरत म्हणाले, "बंधो! या कामगिरीसाठी मी तुला काय बक्षीस देऊ? तू आणलेल्या बातमीच्या मोलाचे पृथ्वीवर काहीही नाही; असेच विचारांती मला वाटत आहे! म्हणून तुझ्या ऋणाची फेड अशक्य ठरून तुझा कायमचाच ऋणी झालो आहे!—असो. आता मला सर्व प्रभुचरित्र सांग पाहू."

तेव्हा हनुमंताने भरताच्या पायावर आपले मस्तक विनम्र करून श्रीरघुपतीचे सर्व चरित्र साररूपाने सांगितले. ते ऐकून घेत असता भरताच्या अंतःकरतात एक कल्पना जोराने येऊन तो म्हणाला, "हे कपी! कृपाघन स्वामी राम, कधी काळी आपल्या एखाद्या दासाप्रमाणे माझी आठवण काढतात काय? सांग पाहू!"

रघुवंशाचे विभूषण असणारे श्रीरामचंद्र आपल्या एखाद्या दासाप्रमाणे माझी कधीतरी आठवण काढतात का? ही भरताची अत्यंत नम्र विनवणी कानी पडत असता, त्या श्रेष्ठ बंधूच्या प्रेमाची धारणा पाहून हनुमंताच्या अंगावर झटकन् काटा उभा राहिला आणि त्या मूर्तिमंत रामप्रेमाच्या पायावर दण्डवत् प्रणामा सारखा तो पडला.

त्याच्या मनात विचार आला की, चराचराचे स्वामी असे जे श्रीरघुवीर ते ज्याच्या अनेक सद्गुणाची तोंड भरून स्तुती करतात, ते भरत इतके विनयशील, परम सद्गुणसंपन्न व सद्गुणसागर का असणार नाहीत?

"हे नाथ! काय सांगू? श्रीरामाचे तुमच्यावर आपल्या प्राणाप्रमाणे प्रेम आहे, हे माझे सांगणे अक्षरशः खरे आहे!"

पुनि पुनि मिलत भरत सुनि हरप न हृदयँ समात ।। २ (क) ।।

सो० — भरत चरन सिरु नाइ तुरित गयउ कपि राम पहिं ।
कही कुसल सब जाइ हरषि चलेउ प्रभु जान चढ़ि ।। २ (ख) ।।

चौ० — हरषि भरत कोसलपुर आए । समाचार सब गुरहि सुनाए ।।
पुनि मंदिर महँ बात जनाई । आवत नगर कुसल रघुराई ।।
सुनत सकल जननीं उठि धाईं । कहि प्रभु कुसल भरत समुझाईं ।।
समाचार पुरबासिन्ह पाए । नर अरु नारि हरषि सब धाए ।।
दधि दुर्बा रोचन फल फूला । नव तुलसी दल मंगल मूला ।।
भरि भरि हेम थार भामिनी । गावत चलिं सिंधुरगामिनी ।।
जे जैसेहिं तैसेहिं उठि धावहिं । बाल बृद्ध कहँ संग न लावहिं ।।
एक एकन्ह कहँ बूझहिं भाई । तुम्ह देखे दयाल रघुराई ।।
अवधपुरी प्रभु आवत जानी । भई सकल सोभा कै खानी ।।
बहइ सुहावन त्रिबिध समीरा । भइ सरजू अति निर्मल नीरा ।।

असे उत्तर हनुमंताच्या मुखातून बाहेर पडताच भरताच्या हृदयात हर्षाच्या अनावर लाटा उसळून त्यांनी पवनसुताला पुनः पुन्हा हृदयाशी प्रेमाने कवटाळले. २ (क)

तो आनंदाचा भर थोडासा कमी होताच भरताच्या पायावर पुनः एक वेळ मस्तक टेकून श्रीरामचंद्राकडे कपी वेगाने परतला; आणि अयोध्येकडील भरतभेटीने त्यांनी आलेले सर्व कुशलवृत्त त्याने निवेदन केले. ते समजताच संतोषाने प्रभू पुन्हा विमानात बसून आपल्या परिवारासह निघाले. २ (ख)

इकडे भरतजींनी मोठ्या उल्हासाने अयोध्येस येऊन प्रथम गुरू वसिष्ठांना ती आनंदाची सगळी बातमी सांगितली.

त्यानंतर आपल्या राजवाड्यात येऊन वृत्त कळवले की, रघुपती अयोध्येला सुखरूप परत येत आहेत !

हे शब्द कानावर येताच सर्व माता अक्षरशः धावतच सुटल्या आणि त्यांनी भरताला वेढा घालून त्याच्यावर प्रश्नांचा नुसता पाऊस पाडला. तेव्हा त्यांचे पूर्ण समाधान होईल, असे सविस्तर कुशल त्यांनी सांगितले.

इकडे हा परमसंतोष देणारा बिनतारी संदेश सर्व अयोध्यानगरीत एका क्षणात पसरला आणि नागरिक, स्त्रिया व पुरुष यांचा नुसता लोंढाच राजमंदिराकडे दौडत सुटला !

सविस्तर व खात्रीलायक बातमी समजून घेऊन श्रीरघुनाथांच्या स्वागताची पूर्वतयारी करण्यासाठी तेवढ्याच जलदीने सर्व नगरवासी परतले आणि थोड्याच वेळात, दही, दूर्वा, गोरोचन, फळे, फुले आणि मंगलकारक अशा तुलसीच्या ताज्या मंजिरा सुवर्णाच्या तबकात भरून, गोड गाणी गात, गजगतीने चाललेल्या सुंदर सुवासिनी सर्वत्र दिसू लागल्या !

इतर नागरिक ज्या ठिकाणी जसे होते, तसेच श्रीरामदर्शनासाठी धावत सुटले आणि आपल्याबरोबर पळताना अडचण होऊ नये म्हणून त्यांनी लहान पोरे आणि थकलेले म्हातारे मुळीच घेतले नाहीत !

धावत जात असता एकजण दुसऱ्याला अत्यंत अधीरतेने विचारतो, " काका ! दयाळू रघुराज तुम्ही पाहिले का हो ! "

चौदा वर्षांच्या दीर्घकाळच्या वनवासानंतर प्रभू अयोध्येत आज पदार्पण करणार म्हणून सर्व नागरिकांनी अयोध्येला सजवून तिला अगदी सौंदर्याची खाणच बनवली !

गार आणि सुगंधी अशा वाऱ्याची झुळूक सुरू झाली आणि शरयू नदीचे पाणी स्फटिकासारखे स्वच्छ वाहू लागले.

दो० — हरषित गुर परिजन अनुज भूसुर बृंद समेत ।
चले भरत मन प्रेम अति सन्मुख कृपानिकेत ।। ३ (क) ।।
बहुतक चढ़ीं अटारिन्ह निरखहिं गगन बिमान ।
देखि मधुर सुर हरषित करहिं सुमंगल गान ।। ३ (ख) ।।
राका ससि रघुपति पुर सिंधु देखि हरषान ।
बढ़्यो कोलाहल करत जनु नारि तरंग समान ।। ३ (ग) ।।

चौ० — इहाँ भानुकुल कमल दिवाकर । कपिन्ह देखावत नगर मनोहर ।।
सुनु कपीस अंगद लंकेसा । पावन पुरी रुचिर यह देसा ।।
जद्यपि सब बैकुंठ बखाना । बेद पुरान बिदित जगु जाना ।।
अवधपुरी सम प्रिय नहिं सोऊ । यह प्रसंग जानइ कोउ कोऊ ।।
जन्मभूमि मम पुरी सुहावनि । उत्तर दिसि बह सरजू पावनि ।।
जा मज्जन ते बिनहिं प्रयासा । मम समीप नर पावहिं बासा ।।
अति प्रिय मोहि इहाँ के बासी । मम धामदा पुरी सुखरासी ।।
हरषे सब कपि सुनि प्रभु बानी । धन्य अवध जो राम बखानी ।।

सर्व प्रकारची तयारी झाली. गुरू वसिष्ठ, कुटुंबातील सर्व मंडळी, धाकटे बंधू शत्रुघ्न आणि अयोध्यावासी पूजनीय ब्रह्मवृंद असे एकत्र झाल्याची वर्दी येताच हर्षयुक्त अंतःकरणाने व अत्यन्त प्रेमपूर्ण मनाने कृपाधाम श्रीरामचंद्रांना सामोरे जाण्यासाठी भरत निघाले. ३ (क)

पुष्कळशा स्त्रिया गच्चीवर चढून विमानाकडे डोळे लावून उभ्या राहिल्या; त्यांच्या नजरेला विमान दिसताच त्यांना मोठा आनन्द होऊन मधुर आवाजात सुन्दर मंगल गीते गाण्यास त्यांनी प्रारंभ केला. ३ (ख)

त्यावेळचे ते अयोध्यानगरीचे मनोहर दृश्य पाहून कोणीही रसिक भक्त वेडाच झाला असता. आकाशातून येणारे ते विमान आणि त्यात उच्च सिंहासनावर बसलेले पूर्णिमेच्या चंद्राप्रमाणे श्रीरामचंद्र !

त्या पूर्णिमेच्या चंद्राला पाहून अयोध्यानगरसिंधूला आनंदाची भरती आली. त्यामुळे तो कोलाहल स्वरूपात तरंगासारख्या तरुणींच्यासह तो गर्जू लागला ! ३ (ग)

झपाट्याने येणाऱ्या त्या विमानातून अयोध्यानगरीचे दर्शन होताच सूर्यवंशरूपी कमलांना दिवाकराप्रमाणे फुलविणाऱ्या श्री रघुवीरांनी आपली मनोहर नगरी दाखवली.

“ हे कपीश सुग्रीव, अंगद, लंकेश बिभीषण थोडे लक्ष देऊन ऐका. हा सुंदर प्रदेश आणि ही पवित्र नगरी दिसू लागली पाहा. सगळेच लोक जरी वैकुण्ठाची बढाई सांगतात वेद आणि पुराणातून तशीच महती वर्णन केली असल्याचे जग जाहीर आहे; तथापि हे जरी खरे असले तरी या अयोध्यानगरी इतके ते वैकुण्ठही मला प्रिय वाटत नाही. वैकुण्ठ व अयोध्यानगरी यांच्या महत्त्वातील हे गूढरहस्य मात्र फारच थोडे जाणतात हे खरे आहे !

“ ही सुशोभित अशी नगरी माझी जन्मभूमी आहे. हिच्या उत्तर दिशेला पावन अशी शरयू नदी वाहत असून केवळ स्नानाने, विनायासे मनुष्याला सामीप्य मुक्तीचा लाभ ती देऊ शकते. इतका तिचा महिमा मोठा आहे !

“ अयोध्यावासी लोकावर माझे अत्यंत प्रेम आहे. त्यामुळे ही नगरी मला सुखाच्या राशीप्रमाणे वाटते. आणि त्याच कारणाने ती माझे परमधाम देण्यास समर्थ बनली आहे. ”

प्रभूची ही वाणी ऐकून सर्व कपींना मोठा संतोष झाला. ते म्हणाले, “ जिला प्रत्यक्ष श्रीरामचंद्र वाखाणतात ती अयोध्यानगरी खरोखर धन्य होय ! ”

दो० — आवत देखि लोग सब कृपासिंधु भगवान।
नगर निकट प्रभु प्रेरेउ उतरेउ भूमि बिमान ॥ ४ (क) ॥
उतरि कहेउ प्रभु पुष्पकहि तुम्ह कुबेर पहिं जाहु।
प्रेरित राम चलेउ सो हरषु बिरहु अति ताहु ॥ ४ (ख) ॥

चौ० — आए भरत संग सब लोगा। कृस तन श्रीरघुबीर बियोगा ॥
बामदेव बसिष्ट मुनिनायक। देखे प्रभु महि धरि धनु सायक ॥
धाइ धरे गुर चरन सरोरुह। अनुज सहित अति पुलक तनोरुह ॥
भेंटि कुसल बूझी मुनिराया। हमरें कुसल तुम्हारिहिं दाया ॥
सकल द्विजन्ह मिलि नायउ माथा। धर्म धुरंधर रघुकुलनाथा ॥
गहे भरत पुनि प्रभु पद पंकज। नमत जिन्हहि सुर मुनि संकर अज ॥
परे भूमि नहिं उठत उठाए। बर करि कृपासिंधु उर लाए ॥
स्यामल गात रोम भए ठाढ़े। नव राजीव नयन जल बाढ़े ॥

छं० — राजीव लोचन स्रवत जल तन ललित पुलकावलि बनी।
अति प्रेम हृदयँ लगाइ अनुजहि मिले प्रभु त्रिभुअन धनी ॥
प्रभु मिलत अनुजहि सोह मो पहिं उपमा कही।

कृपासागर भगवंतांनी सामोरे आलेले सर्व लोक पाहिले व नगराजवळ येताच विमानाला प्रभूंनी प्रेरणा दिली आणि लगेच ते खाली उतरले. ४ (क)

विमानातून जेव्हा सर्व मंडळी खाली उतरली तेव्हा प्रभूंनी लगेच त्याला कुबेराकडे जाण्यास सांगितले. धन्याकडे परत जावयास मिळणार या कल्पनेने समाधान व श्रीरामचंद्र-वियोग होणार म्हणून अत्यंत खेद अशा द्विधा मनःस्थितीत ते परत फिरले. ४ (ख)

विमान उतरलेले पाहताच भरतासह सर्व मंडळी तिकडे चालू लागली. श्रीरघुवीरांच्या वियोगाने सर्वांची शरीरे अतिशय कृश झालेली दिसली.

सामोरे येणाऱ्या मंडळीत वामदेव, वसिष्ठ यांच्यासारखे मुनिश्रेष्ठ दिसताच प्रभूंनी जमिनीवर धनुष्यबाण ठेवले आणि लक्ष्मणासह धावतच जाऊन गुरुदेवांचे चरणकमल धरले, त्यावेळी त्या दोघांची शरीरे रोमांच येऊन अत्यंत पुलकित झाली.

मुनिराजांनी दोघा बंधूंना झटकन् उठवून त्यांना प्रेमभराने आलिंगन दिले आणि त्यांचे क्षेमकुशल विचारले.

"आपल्या कृपेने आमचे अखंड कुशल आहेच," असे त्यावर प्रभूकडून त्यांना उत्तर मिळाले.

धर्मधुरंधर रघुकुलनायकांनी आपले मस्तक नमवून सर्व द्विजांना भेट दिली.

हा प्राथमिक कार्यक्रम उरकताच, ज्याम देव, मुनी, शंकर व ब्रह्मदेव वंदन करतात, अशा चरण-कमलांना भरतानी मिठी मारली; आणि जमिनीवर पडून दण्डवत् प्रणाम केला. उठवूनसुद्धा जमिनीवरून भरत लवकर उठेनात, तेव्हा मोठ्या प्रयासाने कृपानिधींनी त्यांना उचलून आपल्या हृदयाशी कवटाळले.

त्यावेळी त्या बंधू-भेटीकडे सर्वांचेच डोळे एकदम लागून राहिले. सावळ्या शरीरावर थरारून सर्वांगी काटा उभा राहिला आणि ताज्या उमललेल्या कमळाप्रमाणे असणाऱ्या विशाल नेत्रातून प्रेमाश्रूंना भरती आली !

केवढा अतुल्य प्रसंग तो ! कमल नेत्रातून प्रेमरस वाहात आहे. मनोहर शरीरांवर उठलेले ते रोमांच खुलून दिसत आहेत. त्रैलोक्याचे स्वामी प्रभू श्रीरामचंद्र आपल्या धाकट्या भरत-बंधूला अत्यंत प्रेमाने आलिंगन देऊन भेटत आहेत. भावांच्या या भेटीच्या वेळी प्रभू कसे शोभत होते, याचे वर्णन करून सांगण्यास उपमा



जनु प्रेम अरु सिंगार तनु धरि मिले बर सुषमा लही ॥ १ ॥
बूझत कृपानिधि कुसल भरतहि बचन बेगि न आवई ।
सुनु सिवा सो सुख बचन मन ते भिन्न जान जो पावई ॥
अब कुसल कौसलनाथ आरत जानि जन दरसन दियो ।
बूड़त बिरह बारीस कृपानिधान मोहि कर गहि लियो ॥ २ ॥

दो० – पुनि प्रभु हरषि सत्रुहन भेटें हृदयँ लगाइ ।
लछिमन भरत मिले तब परम प्रेम दोउ भाइ ॥ ५ ॥

चौ० – भरतानुज लछिमन पुनि भेंटे । दुसह बिरह संभव दुख मेटे ॥
सीता चरन भरत सिरु नावा । अनुज समेत परम सुख पावा ॥
प्रभु बिलोकि हरषे पुरबासी । जनित बियोग बिपति सब नासी ॥
प्रेमातुर सब लोग निहारी । कौतुक कीन्ह कृपाल खरारी ॥
अमित रूप प्रगटे तेहि काला । जथाजोग मिले सबहि कृपाला ॥
कृपादृष्टि रघुबीर बिलोकी । किए सकल नर नारि बिसोकी ॥
छन महिं सबहि मिले भगवाना । उमा मरम यह काहुँ न जाना ॥

देणे अशक्य आहे. जणू प्रेम आणि शृंगार यांनी प्रत्यक्ष शरीर धारण करून परस्परांची भेट घेत असता त्यांना अवर्णनीय शोभा प्राप्त झाली आहे ! १

हृदयाला घट्ट धरून भरताला भेटत असता कृपानिधींनी त्याला क्षेमकुशल विचारले; परंतु आनन्दातिशयाने कंठ दाटून आल्याने उत्तर देण्यासाठी शब्दच बाहेर उमटेना !

भरताच्या परम भाग्याची कल्पना शिवजींना असल्याने ते आपल्या प्रियेस म्हणतात, " उमे ! प्रभूंनी आपल्या हृदयाशी भरताला दृढ धरल्यानंतर त्याला जे सुख झाले ते मनाच्या आणि वाणीच्या कक्षेच्या बाहेरचे आहे. ज्यांना त्याचा अंशमात्र भाग्याने लाभला असेल, त्यांनाच ते बुद्धीने जाणणे शक्य आहे. "

भावनेचा भर किंचित् ओसरल्यावर भरतांनी बोलण्याचा प्रयत्न केला, " हे कोसलनाथ, या दीनदासाचे दुःख जाणून जेव्हा त्याला दर्शन दिले, तेव्हापासूनच तो कुशल आहे. खरोखर, वियोगसागरात बुडत असता कृपानिधानांनी मला हात धरूनच वर काढले आहे ! " २

त्यानंतर भरताप्रमाणेच शत्रुघ्नालाही हर्षाने हृदयाशी कवटाळून प्रभू भेटले. त्याचवेळी दुसरीकडे अत्यंत प्रेममग्न होऊन लक्ष्मण-भरत भेट सुरू होती. ५

नंतर लक्ष्मण-शत्रुघ्न भेट एकमेकांच्या गळा पडून अशा प्रकारे भेटले की, त्यामुळे परस्परांच्या विरहाने उत्पन्न झालेल्या दुःसह दुःखाचा एकदाचा शेवट झाला !

याप्रमाणे बंधूबंधूंच्या भेटी झाल्यावर शत्रुघ्नासह भरताने सीतेच्या चरणी आपले मस्तक नमवले. तेव्हा त्यांना परमसुख प्राप्त झाले.

प्रभूला डोळे भरून पाहिल्यावर अयोध्यावासीयांना मोठा हर्ष झाला व त्यांच्या चरणवियोगाने उत्पन्न झालेले सर्व दुःख नाहीसे झाले.

त्या प्रसंगी सर्व लोक भेटीसाठी अत्यंत प्रेमातुर झाले आहेत, असे जाणून कृपाळू खरारींनी एक कौतुक करून दाखवले. दयाळू श्रीरामचंद्रांनी लगेच अगणित रूपे धारण केली व ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे त्याला भेट दिली; रघुवीरांनी नंतर कृपादृष्टीने नागरिक स्त्रिया व पुरुष यांचा सर्व शोक नाहीसा केला !

या चमत्काराला उद्देशून सदाशिव पार्वतीला समजावून सांगतात की एक क्षणसुद्धा न लागता भगवान्



एहि बिधि सबहि सुखी करि रामा। आगे चले सील गुन धामा ॥
कौसल्यादि मातु सब धाई। निरखि बच्छ जनु धेनु लवाई ॥

छं०—जनु धेनु बालक बच्छ तजि गृहँ चरन बन परबस गईं।
दिन अंत पुर रुख स्रवत थन हुंकार करि धावत भईं ॥
अति प्रेम प्रभु सब मातु भेटीं बचन मृदु बहुबिधि कहे।
गइ बिषम बिपति बियोगभव तिन्ह हरष सुख अगनित लहे ॥

दो०—भेटेउ तनय सुमित्राँ राम चरन रति जानि।
रामहि मिलत कैकई हृदयँ बहुत सकुचानि ॥ ६ (क) ॥
लछिमन सब मातन्ह मिलि हरषे आसिष पाइ।
कैकइ कहँ पुनि पुनि मिले मन कर छोभु न जाइ ॥ ६ (ख) ॥

चौ०—सासुन्ह सबनि मिली बैदेही। चरनन्हि लागि हरषु अति तेही ॥
देहिं असीस बूझि कुसलाता। होइ अचल तुम्हार अहिवाता ॥
सब रघुपति मुख कमल बिलोकहिं। मंगल जानि नयन जल रोकहिं ॥
कनक थार आरती उतारहिं। बार बार प्रभु गात निहारहिं ॥

सर्वांना भेटले परंतु यातील मर्म मात्र कोणाच्याच ध्यानी आले नाही. याप्रमाणे सर्वांना सुखी करून, शील व सद्गुण यांची केवळ खाणच असणारे श्रीरामचंद्र पुढे निघाले.

त्यावेळी कौसल्या आदिकरून सर्व माता अशा धावत सुटल्या की जणू नुकत्याच व्यालेल्या गाई आपल्या वत्साला पाहून पळत आहेत !

परवशतेमुळे आपल्या छोट्या वासराला घरी सोडून वनात चरावयास गेलेल्या नुकत्याच व्यालेल्या गाई सूर्य मावळण्याची वेळ होताच, आपल्या वछड्याला स्तनपान देण्यासाठी हुं हुं करत व पान्हा अनावर झाल्याने अचळातून दूध गळत अशा नगराच्या दिशेने जशा धावत सुटतात तशीच बरोबर स्थिती यावेळी सगळ्याच राममातांची झाली होती !

त्या सगळ्या मातांचे ते शुद्ध अंतःकरण पाहून प्रभू सर्वांना प्रेमाने भेटले व त्यांच्याशी मधुर भाषण केले. तेव्हा श्रीरामविरहाने उत्पन्न झालेले असह्य दुःख नाहीसे होऊन त्यांना परमानंद व अत्यंत सौख्य यांचा लाभ झाला.

आपल्या पुत्राचे श्रीरामचरणी प्रेम पाहून मोठ्या समाधानाने सुमित्रा लक्ष्मणाला भेटली. त्याचप्रमाणे हृदयात अत्यंत लज्जित होऊन कैकेयी रामाला भेटली. ६ (क)

लक्ष्मण आपल्या सगळ्या मातांना भेटला व त्यांचे शुभाशीर्वाद मिळाल्यामुळे त्याला संतोष झाला. शेवटी सरळ अंतःकरणाच्या लक्ष्मणाने कैकेयीला पुनः पुन्हा भेट देऊन तिचे सांत्वन करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; परंतु तिच्या हृदयाला अखंड जाळणारा पश्चात्ताप लेशमात्र कमी झाला नाही. ६ (ख)

सर्व सासूबाईना वैदेही भेटली व त्यांच्या पायी वंदन केल्यावर तिला अतिशय हर्ष झाला. त्यांनी जानकीला शुभाशीर्वाद देऊन तिचे क्षेमकुशल विचारले; आणि शेवटी मुली तुझे सौभाग्य अखंड राहो ! " असे उद्गार त्यांनी काढले.

त्यानंतर त्या सर्व मातांनी रघुपतीच्या मुखकमलाकडे टक लावून पाहण्यास सुरवात केली, तेव्हा नयनातून वाहणारा पूर मंगल समय जाणून त्यांनी आवरून धरला.

सोन्याच्या तबकातून तयार केलेल्या आरत्या जागोजागी सुवासिनी ओवाळू लागल्या आणि आरती ओवाळत असता पुनः पुन्हा प्रभूंचे सर्व अवयव निरखून पाहात असता त्यांना केवढा प्रमोद होत होता !



नाना भाँति निछावरि करहीं । परमानंद हरष उर भरहीं ॥
कौसल्या पुनि पुनि रघुबीरहि । चितवति कृपासिंधु रनधीरहि ॥
हृदयँ बिचारति बारहिं बारा । कवन भाँति लंकापति मारा ॥
अति सुकुमार जुगल मेरे बारे । निसिचर सुभट महाबल भारे ॥

दो० —लछिमन अरु सीता सहित प्रभुहि बिलोकति मातु ।
परमानंद मगन मन पुनि पुनि पुलकित गातु ॥ ७ ॥

चौ० —लंकापति कपीस नल नीला । जामवंत अंगद सुभसीला ॥
हनुमदादि सब बानर बीरा । धरे मनोहर मनुज सरीरा ॥
भरत सनेह सील ब्रत नेमा । सादर सब बरनहि अति प्रेमा ॥
देखि नगरबासिन्ह कै रीती । सकल सराहहिं प्रभु पद प्रीती ॥
पुनि रघुपति सब सखा बोलाए । मुनि पद लागहु सकल सिखाए ॥
गुर बसिष्ट कुलपूज्य हमारे । इन्ह की कृपाँ दनुज रन मारे ॥
ए सब सखा सुनहु मुनि मेरे । भए समर सागर कहँ बेरे ॥
मम हित लागि जन्म इन्ह हारे । भरतहु ते मोहि अधिक पिआरे ॥

त्याच वेळी नानाप्रकारचे पदार्थ प्रभूवरून ओवाळून टाकत असता होणारा हर्ष आणि परमानन्द आपल्या हृदयात खच्चून साठवून ठेवण्यास त्या भाविक स्त्रिया बिलकूल हयगय करत नव्हत्या.

या कार्यक्रमाची सांगता कौसल्येच्या मंगल हातानी झाली. तेव्हा तिनेही रणधीर कृपासिंधूला घडी घडी निरखून पाहण्याच्या सुखाची लूट केलीच! त्यावेळी तिच्या मातृहृदयात जोराने वारंवार विचार येई, 'माझी बाळे किती सुकुमार; आणि कर्दनकाळासारखे महाबलवान रणशूर राक्षस! असे असता कसा ग बाई त्या दहा तोंडाच्या लंकेश रावणाला यानी मारला असेल!"

लक्ष्मण, सीता यांच्यासह प्रभूला मायेच्या नजरेने फिर फिरून पाहत असता कौसल्येची काया रोमांचानी पुनः पुन्हा फुलावी आणि तिचे मन परमानंदात निमग्न व्हावे, असा किती तरी काळ गेला! ७

लंकापती बिभीषण, कपीश सुग्रीव, नलनील, जांबवंत, अंगद आणि हनुमान आदिकरून सर्व सुशील वानरवीरांनी अयोध्येत पाऊल टाकताच मनोहर अशी मानवी शरीरे धारण केली!

या सर्व मंडळीच्या मनाची पक्कड सर्वांत जास्त भरताने घेतली. त्याचा सुस्वभाव, श्रीरामचरणी त्यांचे दृढ प्रेम, नियमाने [illegible] काटेकोरपणा, कडकडीत व्रताचरणातील त्यागाचा आदर्श, इत्यादि पाहून त्यांना त्यांची तोंड भरून किती स्तुती करावी हेच कळेना!

त्याचप्रमाणे अयोध्येतील सर्व नागरिकांचे प्रेम, शील आणि विनय यांनी भरलेली वागण्याची रीत पाहूनही या सर्वांचे मूळ कारण जी प्रभुपदकमली त्यांची अनन्य भक्ती —तिचीच स्तुती हे सगळे कपिवर करू लागले.

इतक्यात श्रीरघुपतींनी आपल्या सर्व सख्यांना बोलावून घेतले आणि त्यांना मुनिचरणी वंदन करण्याचा आदेश दिला.

परस्परांची ओळख करून देण्याचा कार्यक्रम सुरू झाला. बिभीषणादिकास उद्देशून प्रभू म्हणाले, " हे आमचे पूजनीय कुलगुरू वसिष्ठ; यांच्या कृपाशिर्वादाच्या जोरावरच रणांगणावर राक्षसांचा संहार करणे शक्य झाले!"

—सर्वांनी वसिष्ठगुरूंना आदरपूर्वक वंदन केले.

त्यानंतर गुरुदेवांना उद्देशून रघुनायक आपल्या सख्यांची ओळख करून देतात—

" मुनिश्रेष्ठ! हे पाहा माझे सगळे सखे. समरांगणरूपी सागर खवळला असता अगदी जहाजासारखे हे माझ्या मदतीस धावले. माझ्या हितासाठी या सर्वांनी आपल्या पंचप्राणांची कुरवंडी केली असल्याने साहजिकच भरतापेक्षाही माझ्या प्रेमाचे हे अधिक वारसदार बनले!"

सुनि प्रभु बचन मगन सब भए । निमिष निमिष उपजत सुख नए ।।

दो० – कौसल्या के चरनन्हि पुनि तिन्ह नायउ माथ ।
आसिष दीन्हे हरषि तुम्ह पिय मम जिमि रघुनाथ ।। ८ (क) ।।
सुमन बृष्टि नभ संकुल भवन चले सुखकंद ।
चढ़ी अटारिन्ह देखहिं नगर नारि नर बृंद ।। ८ (ख) ।।

चौ० – कंचन कलस बिचित्र सँवारे । सबहिं धरे सजि निज निज द्वारे ।।
चंदनवार पताका केतू । सबन्हि बनाए मंगल हेतू ।।
बीथीं सकल सुगंध सिंचाई । गजमनि रचि बहु चौक पुराईं ।।
नाना भाँति सुमंगल साजे । हरषि नगर निसान बहु बाजे ।।
जहँ तहँ नारि निछावरि करहीं । देहिं असीस हरष उर भरहीं ।।
कंचन थार आरती नाना । जुबतीं सजें करहिं सुभ गाना ।।
करहिं आरती आरतिहर कें । रघुकुल कमल बिपिन दिनकर कें ।।
पुर सोभा संपति कल्याना । निगम सेष सारदा बखाना ।।
तेउ यह चरित देखि ठगि रहहीं । उमा तासु गुन नर किमि कहहीं ।।

प्रत्यक्ष प्रभूंच्याच तोंडून ही अशा प्रकारची तारीफ चालू असता सगळेच कपिवीर प्रेमानंदात गढून गेले; आणि अशाच प्रकारची क्षणोक्षणी त्यांना नवनवीन सुखाची दिवाळी होऊ लागली !

याप्रमाणे गुरुवंदन पार पडल्यावर ही सर्वच मंडळी, माता कौसल्येला प्रणाम करण्यास आली. सर्वांनी कौसल्येच्या चरणी प्रेमादराने आपली मस्तके विनम्र करताच, अत्यंत हर्षाने तिने सर्वांना उत्तम आशीर्वाद दिले आणि म्हणाली, " बाळांनो, माझ्या रघुनाथासारखेच तुम्ही सगळे माझे लाडके आहात बरं ! " ८ (क)

आता बाहेरील सर्व कार्यक्रम संपले असे समजाच, सुखकंद आपल्या मंदिराकडे निघाले. त्याबरोबर पुष्पवृष्टीने सर्व आकाश भरून गेले; आणि त्या गर्दीत आपणाला श्रीरामचंद्राचे मुखकमळ मनासारखे दिसणार नाही, म्हणून ज्यांना शक्य त्या सर्व नागरिक स्त्री-पुरुषांच्या झुंडीच्या झुंडी गच्चीवर भराभर चढून तो अपूर्व नयनसुखाचा सोहाळा लुटू लागल्या ! ८ (ख)

घरोघरी रत्नांनी सुन्दर सजवलेले सुवर्णकलश प्रत्येकाने आपल्या दरवाजात व्यवस्थित मांडून ठेवले आणि हा चिरापेक्षित मंगलदिन उगवला, हे जाणून, गुढ्या उभारल्या. पताका व ध्वज फडकवले आणि मनोहर तोरणे बांधून जागोजागी आकर्षक कमानींची सजावट केली.

सर्व रस्त्यांवर सुगंधित द्रव्यांचे सडे शिंपण्यात आले. त्याचप्रमाणे गजमौक्तिकांच्या रांगोळ्या नक्षीदार अशा कौशल्याने जागोजागी काढल्या. अनेक प्रकारचे सुन्दर असे मंगलसूचक साज जेवढे सजवता येतील तेवढे सजवले; आणि सर्व नगरीत मोठ्या उल्हासाने जागोजागी नानाप्रकारची मंगलवाद्ये वाजू लागली.

मिरवणूक अशा थाटाने निघाली असता ज्या ज्या घरासमोर प्रभू येत, तेथील सुवासिनी लगेच त्यांना ओवाळून हर्षनिर्भर अंतःकरणाने आशीर्वाद देत असत. अशाप्रकारे सुवर्णाच्या तबकात आरत्या सजवून तरुण-सुवासिनी मंगल गायन करीत जागोजागी मार्गप्रतीक्षा करीत उभ्या राहिल्या होत्या !

दुःखाचा नाश करणारे व रघुकुलरूपी कमलवनाला प्रफुल्लित करणारे दिवाकर असे श्रीरामचंद्र यांची आरती सौभाग्यवती स्त्रिया करण्यात याप्रमाणे गढून गेल्या !

त्यावेळी सर्व अयोध्यानगरीला केवढी शोभा प्राप्त झाली होती ! संपत्ती व मांगल्य यांनी ती कशी परिपूर्ण होऊन राहिली होती, याचे वर्णन वेद, शेष आणि सरस्वती करत आहेत; परंतु तेही या प्रसंगी हा सर्व अनुपमेय सोहळा पाहून चकित झाली ! असा प्रकार असल्याने शंकर पार्वतीला विचारतात, " उमे ! मग बिचारा मानव त्याचे सद्गुण संकीर्तन कसे करू शकणार ? "



दो०— नारि कुमुदिनीं अवध सर रघुपति बिरह दिनेस ।
अस्त भएँ बिगसत भईं निरखि राम राकेस ।। ९ (क) ।।
होहिं सगुन सुभ बिबिधि बिधि बाजहिं गगन निसान ।
पुर नर नारि सनाथ करि भवन चले भगवान ।। ९ (ख) ।।

चौ०—प्रभु जानी कैकई लजानी । प्रथम तासु गृह गए भवानी ।।
ताहि प्रबोधि बहुत सुख दीन्हा । पुनि निज भवन गवन हरि कीन्हा ।।
कृपासिंधु जब मंदिर गए । पुर नर नारि सुखी सब भए ।।
गुर बसिष्ट द्विज लिए बुलाई । आजु सुघरी सुदिनु समुदाई ।।
सब द्विज देहु हरषि अनुसासन । रामचंद्र बैठहिं सिंघासन ।।
मुनि बसिष्ट के बचन सुहाए । सुनत सकल बिप्रन्ह अति भाए ।।
कहहिं बचन मृदु बिप्र अनेका । जग अभिराम राम अभिषेका ।।
अब मुनिबर बिलंब नहिं कीजै । महाराज कहँ तिलक करीजै ।।

दो०— तब मुनि कहेउ सुमंत्र सन सुनत चलेउ हरषाइ ।
रथ अनेक बहु बाजि गज तुरत सँवारे जाइ ।। १० (क) ।।

अयोध्यानगरी आनंदाने फुलून गलेल्या स्त्रियांनी सर्वत्र भरलेली पाहून कवीला वाटले, स्त्रिया हीच चंद्रविकासिनी कमळे अयोध्यानगरीरूपी सरोवरात श्रीरघुनाथाच्या विरहसूर्याने मिटून म्लान झाली होती, परंतु तो विरहसूर्य आता अस्तास गेला आणि श्रीरामचंद्र हाच पूर्णेंदु त्यांच्या पुढे आल्याने त्याच्या कृपाकिरणांनी ती सर्व कमले आता त्यानगरसरोवरात उमलून आनंदाने नाचत आहेत ! ९ (क)

अनेक प्रकारचे शुभशकुन होऊ लागले. आकाशात प्रत्येक ठिकाणी नगारे वाजू लागले.

नागरिक नरनारींना दर्शन देऊन कृतार्थ केल्यावर भगवान श्रीरामचंद्र आपल्या राजवाड्यात शिरले. ९(ख)

शंकर पार्वतीला एक महत्त्वाची गोष्ट यावेळी जाणवून देतात—

" हे भवानी ! माता कैकेयी लज्जित झालेली आहे, हे जाणून प्रभू प्रथम तिच्या महालात गेले; आणि तिची नानाप्रकारे समजूत घालून पश्चात्तापाने अहर्निश जळत असलेल्या तिच्या अंतःकरणास पुष्कळ सुख दिले.

त्यानंतर श्रीहरी आपल्या महालाकडे वळले.

याप्रमाणे कृपासिंधू श्रीरघुनाथ आपल्या मंदिरात पूर्वीप्रमाणे पुनः येऊन दाखल झालेले पाहून नागरिक सर्व स्त्रिया आणि पुरुष सुखी झाले.

यानंतर अधिक वेळ न घालवता वसिष्ठ गुरूंनी वामदेवादिक विप्रांना बोलावून घेऊन सांगितले. की, आज शुभ दिवस असून सगळे काही शुभ आहे. ब्राह्मणहो ! आपण उल्हासाने अनुज्ञा द्यावी म्हणजे रामचंद्र सिंहासन विभूषित करतील. "

मुनिश्रेष्ठ वसिष्ठांचे हे अत्यंत मनोहर भाषण ऐकून सर्व ब्राह्मणमंडळी प्रसन्न झाली; आणि त्यांनीही अत्यंत संतोषाने सांगितले, की, श्रीरामचंद्राचा राज्याभिषेक सर्व जगाला आनंद देणारा असल्याने हे मुनिश्रेष्ठ ! आता वेळ न लावता महाराजांना अभिषेक करावा. "

याप्रमाणे सर्व विप्रवृंदाची अंतःकरणपूर्वक संमत्ती मिळताच वसिष्ठमुनींनी सुमंत्रास पुढील तयारीबद्दल सूचना दिली. ती कानी पडताच ते तयारी करण्याकरता मोठ्या उल्हासाने निघून गेले.

सर्वांनाच राम राज्याभिषेकाची उत्सुकता असल्याने हां हां म्हणता अनेक रथ, घोडे, हत्ती वगैरे मोठ्या जलदीने नटवून तयार केले १० (क)

जहँ तहँ धावन पठइ पुनि मंगल द्रब्य मगाइ ।
हरष समेत बसिष्ट पद पुनि सिरु नायउ आइ ॥ १० (ख) ॥

नवाह्नपारायण, आठवाँ विश्राम

चौ ०–अवधपुरी अति रुचिर बनाई । देवन्ह सुमन बृष्टि झरि लाई ॥
राम कहा सेवकन्ह बुलाई । प्रथम सखन्ह अन्हवावहु जाई ॥
सुनत बचन जहँ तहँ जन धाए । सुग्रीवादि तुरत अन्हवाए ॥
पुनि करुनानिधि भरतु हँकारे । निज कर राम जटा निरुआरे ॥
अन्हवाए प्रभु तीनिउ भाई । भगत बछल कृपाल रघुराई ॥
भरत भाग्य प्रभु कोमलताई । सेष कोटि सत सकहिं न गाई ॥
पुनि निज जटा राम बिबराए । गुर अनुसासन मागि नहाए ॥
करि मज्जन प्रभु भूषन साजे । अंग अनंग देखि सत लाजे ॥

दो ०–सासुन्ह सादर जानकिहि मज्जन तुरत कराइ ।
दिब्य बसन बर भूषन अँग अँग सजे बनाइ ॥ ११ (क) ॥
राम बाम दिसि सोभति रमा रूप गुन खानि ।
देखि मातु सब हरषीं जन्म सुफल निज जानि ॥ ११ (ख) ॥

अनेक मंगल वस्तू आणण्यासाठी वसिष्टांनी निरनिराळ्या ठिकाणी दूत पाठवले. थोड्याच काळात सर्व पदार्थ घेऊन ते परत आले आणि त्यांनी आनंदाने वसिष्टचरणी मस्तक नमवले. १० (ख)

राज्याभिषेकाचा दिवस उगवला अयोध्यानगरी सर्वत्र उत्तम प्रकारे शृंगारली; आणि देवांनी तर पुष्पवृष्टीची झडच लावली.

रामचंद्रांनी सेवकाना बोलावून सांगितले की पहिल्याने सुग्रीवादि माझ्या मित्राना मंगलस्नाने घाला.

ही आज्ञा कानांवर येताच जिकडे ही सर्व मंडळी होती, तिकडे सेवक धावतच गेले आणि सुग्रीवादिकांस अभ्यंग स्नाने घातली.

त्यानंतर कृपासागरांनी भरतास बोलावून आपल्या हातानी त्याच्या जटा मोकळ्या केल्या; आणि भरत, लक्ष्मण व शत्रुघ्न यांना स्वतः स्नाने घातली !–रघुपती असे भक्त वत्सल व कृपाळू आहेत. अशा प्रकारचे हे भरताचे भाग्य आणि प्रभूचा कोमल स्वभाव यांचे वर्णन करताना शेकडो कोटी शेषसुद्धा थकतील !

मग रामचंद्रांनी आपल्या जटा स्वतःच मोकळ्या केल्या व गुरू वसिष्ठांची आज्ञा घेऊन स्नान केले. त्यानंतर प्रभूनी आपल्या अंगावर भूषणे घातली. तेव्हा त्या श्याम तनूला जी शोभा आली, ती पाहून शेकडो अनंगही लाजले.

पुरुष मंडळीच्या स्नानादिकांचा हा कार्यक्रम बाहेर चालू असता अंतःपुरात सासवांनी सीतेला झटकन् पण उत्तमप्रकारे न्हाऊ घातले. नंतर दिव्यवस्त्रे नेसवून श्रेष्ठ प्रकारचे दागिने तिच्या अंगावर योग्य रीतीने घालून तिला चांगली सजविली. ११ (क)

अशाप्रकारे रूप व गुण यांची खाण अशी जानकी श्रीरामचंद्रांच्या डाव्या बाजूस आसनावर वसल्या नंतर अत्यंत शोभू लागली.

ती मनोहर जोडी अशी एकत्र बसलेली डोळे भरून पाहिली आणि आपला जन्म आता सुफल झाला असे समजून सर्व माता आनंदित झाल्या. ११ (ख)

सुनु खगेस तेहि अवसर ब्रह्मा सिव मुनि बृंद ।
चढि बिमान आए सब सुर देखन सुखकंद ।। ११ (ग)।।

चौ०—प्रभु बिलोकि मुनि मन अनुरागा । तुरत दिब्य सिंघासन मागा ।।
रबि सम तेज सो बरनि न जाई । बैठे राम द्विजन्ह सिरु नाई ।।
जनकसुता समेत रघुराई । पेखि प्रहरषे मुनि समुदाई ।।
बेद मंत्र तब द्विजन्ह उचारे । नभ सुर मुनि जय जयति पुकारे ।।
प्रथम तिलक बसिष्ट मुनि कीन्हा । पुनि सब बिप्रन्ह आयसु दीन्हा ।।
सुत बिलोकि हरषीं महतारी । बार बार आरती उतारी ।।
बिप्रन्ह दान बिबिधि बिधि दीन्हे । जाचक सकल अजाचक कीन्हे ।।
सिंघासन पर त्रिभुअन साईं । देखि सुरन्ह दुंदुभीं बजाईं ।।

छं०—नभ दुंदभीं बाजहिं बिपुल गंधर्ब किंनर गावहीं ।
नाचहिं अपछरा बृंद परमानंद सुर मुनि पावहीं ।।
भरतादि अनुज बिभीषनांगद हनुमदादि समेत ते ।

" हा अतुल्य व अत्यंत दुर्मिळ असा सोहाळा पाहण्यासाठी "— काकभुशुंडी गरुडाला सांगतो, ' हे खगराजा ! त्यावेळी, ब्रह्मदेव, शंकर स्वर्गादिकांतील सर्व मुनिवृंद आणि इतर सर्व देव, सुखकंदाच्या दर्शनासाठी आपापल्या विमानात बसून आले. ११ (ग)

जानकीसह प्रभूला सुखासीन पाहून गुरू वसिष्ठांच्या हृदयातही प्रेमाचे भरते आले. त्यांनी दिव्य सिंहासन तावडतोब आणण्याची आज्ञा दिली. लगेच सूर्यासारखे तेजस्वी सिंहासन आणण्यात आले. त्याचे वर्णन शब्दानी करणे अशक्य आहे.

सर्व ब्राह्मणांना नमस्कार करून श्रीरामचंद्र जानकीसह त्या सिंहासनावर योग्य प्रकारे जाऊन विराजमान झाले.

जनक तनयेसह रघुराजाला त्या दैदीप्यमान सिंहासनावर एकत्र बसलेले निरखत असता सर्व मुनिमंडळीना केवढा तरी संतोष झाला.

मग ब्राह्मणांनी वेदमंत्रांचा उच्चार सुरू करताच आकाशात देव व मुनी यांनी मोठ्याने जयघोष सुरू केला.

इतकी सर्व तयारी होताच गुरुवसिष्ठांनी श्रीरामचंद्राला प्रथम राज्यतिलक लावला व मग इतर सर्व विप्रमंडळींना तिलक लावण्यास अनुमती दिली.

चौदा वर्षांपूर्वी होणारा हा राज्याभिषेक आज झालेला पाहून सर्व मातांना केवढा आनंद झाला असेल व त्यांनी त्या हृदयाभिरामाला सिंहासनावर बसलेला पाहून किती तरी वेळा आरती ओवाळली असेल !

रघुराजाने ब्राह्मणाना नानाप्रकारची दाने दिली त्याचप्रमाणे याचकांना इतके भरपूर दिले की, त्यांना पुन्हा याचना करण्याची इच्छाच उरली नाही.

त्रैलोक्याचे स्वामी राजसिंहासनावर बसले. (तरी श्रीरघुवीराच्या आज्ञेने अयोध्येत एकही वाद्य वाजले नाही, कारण सर्वांच्याच हृदयाला दशरथ राजांचा स्वर्गवास या आनंदाच्या प्रसंगी विशेष प्रकारे खटकत होता.) हे पाहून देवांनी दुंदुभी आदिकरून अनेक मंगलवाद्ये आकाशात वाजविण्यास प्रारंभ केला.

मग काय, सर्वत्र आनंदीआनंद सुरू झाला. आकाशात पुष्कळ दुंदुभी वाजत आहेत, गंधर्व किन्नर गात आहेत, अप्सरांचे समुदाय नाचत आहेत, आणि हे सर्व पाहून आणि ऐकून देव, मुनी परमानंद पावत आहेत.

भरत, शत्रुघ्न व लक्ष्मण हे सर्व भाऊ, बिभीषण, अंगद व हनुमान आदिकरून सभोवती उभे असून,

गहें छत्र चामर ब्यजन धनु असि चर्म सक्ति बिराजते ।
श्री सहित दिनकर बंस भूषन काम बहु छबि सोहई ।
नव अंबुधर बर गात अंबर पीत सुर मन मोहई ।।
मुकुटांगदादि बिचित्र भूषन अंग अंगन्हि प्रति सजे ।
अंभोज नयन बिसाल उर भुज धन्य नर निरखंति जे ।। २ ।।

दो० –बह सोभा समाज सुख कहत न बनइ खगेस ।
बरनहिं सारद सेष श्रुति सो रस जान महेस ।। १२ (क) ।।
भिन्न भिन्न अस्तुति करि गए सुर निज निज धाम ।
बंदी बेष बेद तब आए जहँ श्रीराम ।। १२ (ख) ।।
प्रभु सर्बग्य कीन्ह अति आदर कृपानिधान ।
लखेउ न काहूँ मरम कछु लगे करन गुन गान ।। १२ (ग) ।।

छं० – जय सगुन निर्गुन रूप रूप अनूप भूप सिरोमने ।
दसकंधरादि प्रचंड निसिचर प्रबल खल भुज बल हने ।।
अवतार नर संसार भार बिभंजि दारुन दुख दहे ।
जय प्रनतपाल दयाल प्रभु संजुक्त सक्ति नमामहे ।। १ ।।

छत्र, दोन चवऱ्या, पंखा, धनुष्य, तलवार, ढाल आणि शक्ती त्यांनी घेतली असल्याने श्रीरघुनंदनी ती प्रभावळ फारच खुलून दिसत आहे ! १

खरोखर सीतेसह रविवंश विभूषण श्रीरामचंद्रांची त्यावेळेची शोभा अनेक कामदेवांच्या सौंदर्यांना एकवटल्याप्रमाणे अपूर्व दिसली ! तिचे वर्णन करावे तितके थोडे. नवीन व सजल अशा मेघासारख्या सुंदर श्याम शरीरावरील पीतांबराने देवाचेसुद्धा मन मोहित केले. मस्तकी मुकुट बाजुबंद इत्यादि विभूषणे शरीरावर जागच्या जागी योग्यप्रकारे घातली तेव्हा ते कमळासारखे विशाल नेत्र, विशाल छाती व विशाल बाहू असलेले ते सावळे, गोजिरे रूप निरखून पाहण्याचे ज्यांना भाग्य लाभले ते सर्वच धन्य होत ! २

काकभुशुंडीचे अंतःकरण यावेळी आनंदातिशयाने उचंबळून आल्यामुळे तो गरुडाला या प्रसंगाचे महत्त्व जाणण्यासाठी सांगतो, ' हे खगेश गरुडा ! श्रीरामराजांच्या राज्याभिषेकाच्या वेळची त्यांची ती शोभा; तो समाज व व त्यांनी केलेली ती सुखाची लूट यांचे वर्णन करणे अशक्य ! शेष, शारदा व वेद त्या प्रसंगाचे वर्णन करण्यात रंगून जातात, पण त्यांनाही ते वर्णन यथासांग करून संपवण्याचे सामर्थ्य नाही !

–मात्र त्या वर्णनाचा रस एकटे महेशच संपूर्णपणे जाणू शकतात ! १२ (क)

आकाशातील देवांनी विमानातूनच भिन्न भिन्न प्रकारची स्तुती केली व त्यांनी विमाने स्वस्थानी जाण्यास निघाली. तेव्हा भाटांचा वेष घेऊन प्रत्यक्ष वेद श्रीरामचंद्र जेथे सिंहासनावर विराजमान झाले होते, तेथे आले. आपली स्तुतिसुमने प्रत्यक्षच श्रीरघुराजाच्या चरणी समर्पण करण्याचा त्यांचा हेतू होता. १२ (ख)

समोर येताच, सर्वज्ञ कृपानिधान प्रभूंनी त्यांना ओळखून अत्यंत आदर दिला. पण त्यातील मर्म मात्र कोणासच कळले नाही. वेदांनी गुणगानास प्रारंभ केला– १२ (ग)

" हे सगुणरूप ! हे निर्गुणरूप, हे अनुपमरूप असलेल्या राजांच्या शिरोमणे ! आपले ऐश्वर्य प्रकट करा. (जय.) हे दिनमणे ! दशकण्ठ रावण व इतर प्रचण्ड खल निशाचररूपी अंधःकाराचा तुम्ही आपल्या प्रबल करांनी नाश केला. मनुष्याचा देह धारण करून अशाप्रकारे पृथ्वीचा भार हलका केला ! आणि देवादिक सज्जनांच्या दुःखाचा परिहार केला. म्हणून प्रणतांचे पालन करणाऱ्या हे दयाळू प्रभो ! शक्तिसहित असलेल्या तुम्हाला आम्ही नमस्कार करतो; तुम्ही आपले ऐश्वर्य आता प्रकट करा ! " १



तव विषम माया बस सुरासुर नाग नर अग जग हरे ।
भव पंथ भ्रमत अमित दिवस निसि काल कर्म गुननि भरे ॥
जे नाथ करि करुना बिलोके त्रिविधि दुख ते निर्बहे ।
भव खेद छेदन दच्छ हम कहुँ रच्छ राम नमामहे ॥ २ ॥
जे ग्यान मान बिमत्त तव भव हरनि भक्ति न आदरी ।
ते पाइ सुर दुर्लभ पदादपि परत हम देखत हरी ॥
बिस्वास करि सब आस परिहरि दास तव जे होइ रहे ।
जपि नाम तव बिनु श्रम तरहिं भव नाथ सो समरामहे ॥ ३ ॥
जे चरन सिव अज पूज्य रज सुभ परसि मुनिपतिनी तरी ।
नख निर्गता मुनि बंदिता त्रैलोक पावनि सुरसरी ॥
ध्वज कुलिस अंकुस कंज जुत बन फिरत कंटक किन लहे ।
पद कंज द्वंद मुकुंद राम रमेत नित्य भजामहे ॥ ४ ॥
अब्यक्तमूलमनादि तरु त्वच चारि निगमागम भने ।
पट कंध साखा पंच बीस अनेक पर्न सुमन घने ॥
फल जुगल बिधि चटु मधुर बेलि अकेलि जेहि आश्रित रहे ।

" हे हरे ! कराल अविद्यारूपी तुमच्या दुष्ट मायेला वश होऊन, काल कर्म आणि गुणांनी, देव दानव, नाग, मानव व सर्व चराचर जीवसृष्टी रात्रंदिवस या अपार संसार वनात भटकत राहिले आहेत. खरोखर हे नाथ ! अशा स्थितीत तुम्हीच कृपादृष्टीने ज्यांना पाहता तेच त्रिविध तापातून सुटतात ! म्हणून जन्ममरणाच्या दुःखांचे व श्रमाचे मूळच काढून टाकण्यात कुशल असलेल्या श्रीरामचंद्रा ! आमचे रक्षण कर. आम्ही तुला नमस्कार करतो. " २

" जे ज्ञानाच्या अभिमानाने उन्मत्त होऊन तुझ्या भवसंहारक भक्तीचा आदर करत नाहीत, ते देवांनासुद्धा दुर्लभ अशा मोक्षपदाची प्राप्ती झाल्यावरही पतन पावताना आम्ही प्रत्यक्ष पाहतो; परंतु जे विश्वासयुक्त होऊन सर्व आशा व भरंवसा सोडतात आणि अंतःकरणपूर्वक तुझे दास होतात, ते तुझ्या नामाचा अखंड जप करून अनायासाने भवसागर तरून जातात ! असे तुझे जे महाप्रभावी नाम त्याचे आम्ही स्मरण करतो. "३

" जे चरण शिव आणि ब्रह्मदेव यांना पूज्य आहेत, ज्यांचे शुभ रजःकण लागताच गौतमपत्नी अहल्येचा उद्धार झाला. हे हरे ! ब्रह्मदेवादिक मुनींनी वंदन करून पूजिलेली व जगाला पावन करणारी देव नदी गंगा ज्या चरणांच्या नखापासून प्रकट झाली, तसेच ध्वज, वज्र, अंकुश व कमल या चिन्हांनी मंडित अशा ज्या चरणांना वनात हिंडत असता काटे लागून घट्टे पडले आहेत, ती चरणकमलांची जोडी, हे मुकुन्द ! हे राम ! हे रमेश ! आम्ही आपल्या हृदयात नित्य भजत असतो. " ४

यानंतर संसाररूपाने प्रकट दिसणाऱ्या प्रभूला वेद वंदन करतात—

" वेदशास्त्रादि सांगतात की, विद्यामाया हे मूळ असलेला एक अनादि तारणारा तरू आहे; त्याला एकावर एक अशा चार पुरुषार्थांच्या साली आहेत, जन्मादि षड्विकार या सहा* मोठ्या फांद्या असून पंचमहाभूतांच्या पंचीकरणाच्या पंचवीस+ डहाळ्या आहेत; विषयवासना ही पाने व त्यांच्या प्राप्त्यर्थ केलेली फुले× अगणित असून फळे मात्र दुःखरूप कडू व सुखरूप गोड अशी दोन प्रकारची लागतात. त्या संसारवृक्षाचा आश्रय करून एकच अविद्यामाया वेली राहते. या वृक्षाचे एक दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्याला नित्य नवी

*जायते, अस्ति, वर्धते, विपरिणमते, अपक्षीयते व नश्यति. +काम, क्रोध, शोक, मोह, भय; चलन, वल्गन, प्रसारण आकुंचन, निरोध; क्षुधा, तृषा, आलस्य, निद्रा, मैथुन; शुक्र, शोणित, लाळ, मूत्र, स्वेद आणि अस्थि, मांस, त्वचा, नाडी, रोम. ×कायिक, वाचिक, मानसिक कर्मे ही फुले.

पल्लवत फूलत नवल नित संसार बिटप नमामहे ॥ ५ ॥
जे ब्रह्म अजमद्वैतमनुभवगम्य मनपर ध्यावहीं ।
ते कहहुँ जानहुँ नाथ हम तव सगुन जस नित गावहीं ॥
करुनायतन प्रभु सद्गुनाकर देव यह बर मागहीं ।
मन बचन कर्म बिकार तजि तव चरन हम अनुरागहीं ॥ ६ ॥

दो०—सब के देखत बेदन्ह बिनती कीन्हि उदार ।
अंतर्धान भए पुनि गए ब्रह्म आगार ॥ १३ (क) ॥
बैनतेय सुनु संभु तब आए जहँ रघुबीर ।
बिनय करत गदगद गिरा पूरित पुलक सरीर ॥ १३ (ख) ॥

छं०—जय राम रमारमनं समनं । भवताप भयाकुल पाहि जनं ॥
अवधेस सुरेस रमेस बिभो । सरनागत मागत पाहि प्रभो ॥
दससीस बिनासन बीस भुजा । कृत दूरि महा महि भूरि रुजा ॥
रजनीचर बृंद पतंग रहे । सर पावक तेज प्रचंड दहे ॥
महि मंडल मंडन चारुतरं । धृत सायक चाप निषंग बरं ॥
मद मोह महा ममता रजनी । तम पुंज दिवाकर तेज अनी ॥

पालवी फुटून नवीन नवीन फुले येतच राहतात, असे जे संसारवृक्षाचे तुमचे राम स्वरूप आहे, त्या तुम्हाला आम्ही नमन करतो. ५

"अज, अद्वैत व स्वसंवेद्य असे ब्रह्म असून ते मनाच्या पलीकडे आहे, अशा स्वरूपात त्याचे आम्हाला ज्ञान होते व त्याचेच आम्ही ध्यान करतो, असे ज्ञानी व वक्ते कोण असतील ते असोत. आम्ही मात्र हे नाथ ! आपली सगुण कीर्तीच गात असतो; हे करुणानिधे, प्रभो ! सद्गुणांच्या सागरा, हे देवा ! आम्ही तर एवढाच वर मागतो की, मनाने, वाणीने व कर्माने कामक्रोधादि सर्व विकारांचा त्याग करून कर्म-वाचा-मनाने तुमच्या चरणांच्या ठिकाणी आमचे प्रेम प्रकट असावे." ६

याप्रमाणे भाटांच्या रूपाने येऊन वेदांनी सर्वांच्या देखत अशी अत्यंत महत्वपूर्ण, उदार श्रीरामचंद्रांची स्तुती केली आणि ते अदृश्य होऊन ब्रह्मलोकास गेले. १३ (क)

काकभुशुंडी गरुडाला कथासूत्राकडे विशेष लक्ष देण्यासाठी म्हणतो, "हे विनतापुत्रा आता महत्त्वाचा आलेला कथाभाग ऐक. भाटांच्या वेषातील वेद स्तुती करून गेल्यानंतर पूर्वी परवानगी काढून ठेवल्याने राज्यारोहणसमारंभाचे नेत्रसुख अनुभवण्यात रंगलेले शंभु श्रीरघुवीराजवळ आले. त्यांचे सर्व शरीर रोमांचांनी भरले होते व कंठ भरून आला होता. अशा स्थितीतच त्यांनी स्तुतीला सुरुवात केली. १३ (ख)

"हे राम ! हे लक्ष्मीरमणा ! हे भवतापविनाशका ! आपला उत्कर्ष प्रकट करा. आणि भवतापाच्या भयाने व्याकुळ झालेल्या जनांचे व आपल्या या दासाचे रक्षण करा. हे अयोध्याधीशा, देवांच्या स्वामी, हे रमापती, हे विभो ! मी शरणागत इतकेच मागत आहे की, माझे रक्षण करा.

"दहा डोकी व वीस हात असणाऱ्या रावणाचा विनाश करून या पृथ्वीच्या सर्व महाक्लेशाचे निरसन केले. तसेच राक्षसांचे समूहरूपी महापतंग-समुदाय, त्यांना आपल्या बाणांच्या स्वरूपातील प्रचंड पावकाच्या तेजाने जाळून टाकलेत.

"उत्तम प्रकारचे धनुष्यबाण व भाता धारण केलेले आपण या भूमंडलाचे सर्वांत सुन्दर असे भूषण आहात. त्याचप्रमाणे आपले तेज सूर्याच्या अनेक किरणांच्यासारखे असल्याने महामद, महामोह आणि ममतारूपी रात्र यामुळे पडणारा गाढ अंधःकार नष्ट करण्यास आपणच समर्थ आहात.



मनजात किरात निपात किए। मृग लोग कुभोग सरेन हिए ॥
हति नाथ अनाथनि पाहि हरे। विषया बन पावँर भूलि परे ॥
बहु रोग बियोगन्हि लोग हए। भवदंघ्रि निरादर के फल ए ॥
भव सिंधु अगाध परे नर ते। पद पंकज प्रेम न जे करते ॥
अति दीन मलीन दुखी नितहीं। जिन्ह कें पद पंकज प्रीति नहीं ॥
अवलंब भवंत कथा जिन्ह कें। प्रिय संत अनंत सदा तिन्ह कें ॥
नहिं राग न लोभ न मान मदा। तिन्ह कें सम बैभव वा बिपदा ॥
एहि ते तव सेवक होत मुदा। मुनि त्यागत जोग भरोस सदा ॥
करि प्रेम निरंतर नेम लिएँ। पद पंकज सेवत सुद्ध हिएँ ॥
सम मानि निरादर आदरही। सब संत सुखी बिचरंति मही ॥
मुनि मानस पंकज भृंग भजे। रघुबीर महा रनधीर अजे ॥
तव नाम जपामि नमामि हरी। भव रोग महागद मान अरी ॥
गुन सील कृपा परमायतनं। प्रनमामि निरंतर श्रीरमनं ॥
रघुनंद निकंदय द्वंद्वघनं। महिपाल बिलोकय दीन जनं ॥

दो० – बार बार बर मागउँ हरषि देहु श्रीरंग।
पद सरोज अनपायनी भगति सदा सतसंग ॥ १४ (क) ॥

" अनेक प्रकारच्या विषयवासना उत्पन्न करणारा काम हा भिल्ल असून मानव प्राणी हाच कोणी एक मृग त्याच्या छातीत अनर्थकारक उपभोगरूपी बाण मारून तो निःपात करीत आहे. म्हणून हे हरी ! आपण त्याला जिंकून विषयरूपी अरण्यात भ्रमिष्ट होऊन भरकटलेल्या पामर अनाथाचे रक्षण करा.

" अनेक रोगांनी व वियोगादि दुःखांनी लोक मारले गेले आहेत, पण तुमच्या चरणांच्या अनादराचेच हे फळ त्यांच्या पदरी पडत आहे ! नाहीतरी तुमच्या चरणकमलांच्या ठिकाणी प्रेम न करणारे लोकच अगाध भवसिंधूत पडतात. तुमच्या चरणकमली कधीही प्रीती न केल्याचा परिणाम म्हणून लोक नेहमी अत्यंत दीन, पापी व सदा दुःखी असलेले पाहवयास मिळतात ! पण ज्यांनी आपल्या कथांचा आधार घेतला आहे, त्यांना संत आणि अनंत भगवान आपोआप प्रिय वाटू लागतात !

" अशा लोकांना मद नसतो की मान नसतो; विषयांची प्रीती नसते की कोणत्याच गोष्टीचा लोभ नसतो; वैभव किंवा विपत्ती आली तरी त्यांच्या मनाची समता ढळत नाही. यामुळे ज्ञानमार्गी लोक योगाची खोटी आशा सोडून तुमच्या चरणाचे अखंड दास होण्यातच आनंद मानतात. शरीराने निरंतर नेमनिष्ठ होऊन, शुद्ध हृदयाने तुमच्या चरणकमलांची ध्यान भजनादि पूजा अत्यंत भक्तीने करतात; आणि मानापमानाचे गाठोडे खुंटीला ठेवून हे सर्व संत या जगात सुखाने संचार करतात.

" मुनींच्या मनरूपी कमळात भृंगाप्रमाणे वास्तव्य करणाऱ्या प्रभो ! महारणधीर आणि अजेय रघुवीरा ! मी आपली भक्ती करतो, हे हरि मी आपल्या नामाचा जप करून आपणाला नमस्कार करतो; कारण आपण भवरोगाचे महान औषध असून दुरभिमानाचे हाडवैरी आहात ! त्याच्याबरोबरच सद्गुण, सुशील व कृपा यांचे परम निवासस्थान आहात; तुम्ही लक्ष्मीकान्त आहात. मी तुम्हाला निरंतर प्रणाम करतो. रघुनंदन ! सर्व द्वंद्वांचे निकंदन करा; आणि हे महीपालका ! या दीन दासाकडे आणि दीन जनाकडे कृपादृष्टीने अवलोकन करा !

" हे श्रीरंगा ! शेवटी आपल्या चरणाजवळ पुनः पुन्हा एकच वर मागतो की, मला तुमच्या चरणकमलांची अविनाशी भक्ती आणि तुमच्या भक्तांची सदोदित संगती प्राप्त व्हावी; एवढेच प्रभो ! मला आनंदाने द्या. " १४ (क)

बरनि उमापति राम गुन हरषि गए कैलास ।
तब प्रभु कपिन्ह दिवाए सब बिधि सुखप्रद बास ।। १४ (ख) ।।

चौ० – सुनु खगपति यह कथा पावनी । त्रिबिध ताप भव भय दावनी ।।
महाराज कर सुभ अभिषेका । सुनत लहहिं नर बिरति बिबेका ।।
जे सकाम नर सुनहिं जे गावहिं । सुख संपति नाना बिधि पावहिं ।।
सुर दुर्लभ सुख करि जग माहीं । अंतकाल रघुपति पुर जाहीं ।।
सुनहिं बिमुक्त बिरत अरु बिषई । लहहिं भगति गति संपति नई ।।
खगपति राम कथा मैं बरनी । स्वमति बिलास त्रास दुख हरनी ।।
बिरति बिबेक भगति दृढ़ करनी । मोह नदी कहँ सुंदर तरनी ।।
नित नव मंगल कौसलपुरी । हरषित रहहिं लोग सब कुरी ।।
नित नइ प्रीति राम पद पंकज । सब कें जिन्हहि नमत सिव मुनि अज ।।
मंगन बहु प्रकार पहिराए । द्विजन्ह दान नाना बिधि पाए ।।

याप्रमाणे रामगुणांचे वर्णन करून उमापती इष्ट वर प्राप्ती झाल्यामुळे हर्षित होऊन कैलासाला गेले. सदाशिवांना सुखाने निरोप दिल्यानंतर प्रथम प्रभूंनी कपींना सर्व प्रकारे सुख देणारी निवासस्थाने देण्याची व्यवस्था केली. १४ (ख)

– श्रीरामराज्याभिषेक कथा फलश्रुती –

राज्याभिषेकाचे वर्णन संपताच काकभुशुंडी गरुडाला त्या कथेचे फारच महत्त्व असल्याने तिचीच नंतर फलश्रुती सांगतो.

" हे खगपती ! ऐक; ही कथा सर्वांनाच पावन करणारी आहे. तिच्या श्रवणाने त्रिविध तापांचा नाश होऊन जन्ममरणरूप संसाराचे भयही नाहीसे होते !

" महाराज श्रीरामचंद्रांच्या या शुभ राज्याभिषेकाचे श्रवण केल्याने जे निष्काम असतील त्यांना वैराग्यासह ज्ञान मिळेल; परंतु जे लोक सकाम होऊन ते ऐकतील अगर गातील त्यांना इष्ट असणारी अनेक सुखे आणि नानाप्रकारच्या संपत्तीचा लाभ होईल. जिवंत असता या जगातच देवांनासुद्धा दुर्लभ अशी सुखे त्यांना मिळून त्यांचा जड देह पडताच रघुपतिपुरीत त्यांचा पुनर्जन्म होईल.

" थोडक्यात सार म्हणजे मुक्तांना भक्ती मिळेल. विरक्तांना सद्गती लाभेल आणि विषयी श्रोत्यांना नवनवीन ऐश्वर्यांचा उपभोग प्राप्त होईल.

" हे पक्षिराजा ! मी आपल्या बुद्धीप्रमाणे रामकथा वर्णन केली. हिच्या श्रवण–पठणाने दुःख, दैन्य आणि भय यांचा नाश होतो. तसेच ही वैराग्य, ज्ञान व भक्ती यांना दृढ करणारी असून अज्ञानकृत मोहनदी तरून जाण्यास ती उत्तम प्रकारची नाव आहे ! "

असो. अयोध्यापुरीतील नागरिकांनी रामराज्यारोहण समारंभाला जोडूनच दररोज नवीन मंगलोत्सवाचे कार्यक्रम सुरू केले. त्यामुळे नागरिकातील बालपासून वरपर्यंतच्या सर्व वर्गातील लोकांना निरपवाद अशी आनंदाची दिवाळी होऊ लागली; आणि हे अनुपम सुख अयोध्यावासीयांना मिळणे साहजिकच होते, कारण श्रीरामचंद्रांच्या ज्या चरणकमलांना मुनी, ब्रह्मदेव व शिव वंदन करतात, त्या चरणकमलांच्या ठिकाणी सर्व नागरिकांची प्रीती नित्य नवी वाढत आहे !

.. काहीतरी निमित्ताने विप्रांना नानाप्रकारची दाने व भिकाऱ्यांना अनेक तऱ्हेची वस्त्रे, भूषणे देण्याचा कार्यक्रम लोकांकडून सर्वत्र चालू झाला.

दो० — ब्रह्मानंद मगन कपि सब कें प्रभु पद प्रीति ।
जात न जाने दिवस तिन्ह गए मास षट बीति ॥ १५ ॥

चौ० — बिसरे गृह सपनेहुँ सुधि नाहीं । जिमि परद्रोह संत मन माहीं ॥
तब रघुपति सब सखा बोलाए । आइ सबन्हि सादर सिरु नाए ॥
परम प्रीति समीप बैठारे । भगत सुखद मृदु बचन उचारे ॥
तुम्ह अति कीन्हि मोरि सेवकाई । मुख पर केहि बिधि करौं बड़ाई ॥
ताते मोहि तुम्ह अति प्रिय लागे । मम हित लागि भवन सुख त्यागे ॥
अनुज राज संपति बैदेही । देह गेह परिवार सनेही ॥
सब मम प्रिय नहिं तुम्हहि समाना । मृषा न कहउँ मोर यह बाना ॥
सब कें प्रिय सेवक यह नीती । मोरें अधिक दास पर प्रीती ॥

दो० — अब गृह जाहु सखा सब भजेहु मोहि दृढ़ नेम ।
सदा सर्बगत सर्बहित जानि करेहु अति प्रेम ॥ १६ ॥

चौ० — सुनि प्रभु बचन मगन सब भए । को हम कहाँ बिसरि तन गए ॥
एकटक रहे जोरि कर आगे । सकहिं न कछु कहि अति अनुरागे ॥

– पाहुण्यांची पाठवणी –

सर्व कपींची प्रभुपदी अनन्य भक्ती असल्यामुळे ते ब्रह्मानंदात अखंड मग्न असत. त्यामुळे दिवस उगवला केव्हा व मावळला केव्हा याची दाद न लागताच ते पळून जाऊ लागले. अशा स्थितीत सहा महिन्याचा काळ नकळत केव्हाच निघून गेला. १५

संतांच्या मनास जसा परद्रोहाचा पूर्णपणे विसर पडतो, तसाच सर्व कपींना आपल्या घरादाराचा विसर पडला; घराचे कधी स्वप्नसुद्धा पडले नाही !

सहामहिन्यांचा भरपूर दीर्घ काळ लोटल्यानंतर एके दिवशी रघुपतींनी आपल्या कपिसख्यांना बोलावून घेतले. त्याप्रमाणे सर्वजण येऊन त्यांनी आदराने चरणी मस्तक नमवले. रघुपतींनी त्यांना आपल्या हातानी धरून परम प्रीतीने आपल्याजवळ बसवले. त्यानंतर भक्तांना सुख देणारे प्रभू मधुर वाणीने म्हणाले,

" सख्यांनो ! तुम्ही माझी अत्यंत सेवा केली; परंतु तुमच्या तोंडावरच तुमचा मोठेपणा वर्णू तरी कसा ? माझ्या सेवेच्या पायी तुम्ही आपल्या घरादारांचा व गृहसौख्याचा त्याग केला, आणि याच कारणाने तुम्ही मला अतिशय अत्यंत प्रिय झाला आहात, किती म्हणून सांगू ?

माझे धाकटे भाऊ, राज्य, वैभव-संपत्ती, वैदेही, परिवार, घरे, देह आणि स्नेही हे सगळे मला प्रिय आहेत, परंतु तुमच्याइतके नाहीत, हे लक्षात ठेवा. हे केवळ तुमच्या तोंडापुरते बोलतो असे समजू नका; कारण खोटे न बोलणे हे माझे ब्रीद आहे.

" सेवक सर्वांनाच प्रिय असतात असा नियम आहे. परंतु माझी मात्र दासांवर अधिक प्रीती असते !

" मित्रांनो ! आता तुम्ही सर्व आपापल्या घरी जा आणि दृढ नेमाने माझी भक्ती करा. मी सर्वांमध्ये आहे सर्वांचे हित करणारा आहे, हे जाणून माझ्यावर आत्यंतिक अखंड प्रेम करा. " १६

प्रभूंनी हे वचन ऐकून ते सगळे प्रेममग्न झाले; आणि आपण कोण, कोठे आहो याचे आणि देहाचे भानच त्यांना राहिले नाही. सर्वांचे हात जोडलेले आणि स्तुती-प्रार्थना करावी असे वाटते, परंतु मुखावाटे शब्दच उमटेना ! मुखावर एकसारखी टक लावून सगळे प्रभूकडे नुसते पाहतच राहिले.

परम प्रेम तिन्ह कर प्रभु देखा । कहा बिबिध बिधि ग्यान बिसेषा ॥
प्रभु सन्मुख कछु कहन न पारहिं । पुनि पुनि चरन सरोज निहारहिं ॥
तब प्रभु भूषन बसन मगाए । नाना रंग अनूप सुहाए ॥
सुग्रीवहि प्रथमहिं पहिराए । बसन भरत निज हाथ बनाए ॥
प्रभु प्रेरित लछिमन पहिराए । लंकापति रघुपति मन भाए ॥
अंगद बैठ रहा नहिं डोला । प्रीति देखि प्रभु ताहि न बोला ॥

दो० – जामवंत नीलादि सब पहिराए रघुनाथ ।
हियँ धरि राम रूप सब चले नाइ पद माथ ॥ १७ (क) ॥
तब अंगद उठि नाइ सिरु सजल नयन कर जोरि ।
अति बिनीत बोलेउ बचन मनहुँ प्रेम रस बोरि ॥ १७ (ख) ॥

चौ० – सुनु सर्बग्य कृपा सुख सिंधो । दीन दयाकर आरत बंधो ॥
मरती बेर नाथ मोहि बाली । गयउ तुम्हारेहि कोंछें घाली ॥
असरन सरन बिरदु संभारी । मोहि जनि तजहु भगत हितकारी ॥
मोरें तुम्ह प्रभु गुर पितु माता । जाउँ कहाँ तजि पद जलजाता ॥
तुम्हहि बिचारि कहहु नरनाहा । प्रभु तजि भवन काज मम काहा ॥

श्रीरघुवीरांनी त्यांचे उत्कट प्रेम जाणले; व नानाप्रकारे त्यांना ज्ञानाचा उपदेश करून त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

तथापि वियोगाची कल्पनाच कोणाला सहन होईना व प्रभूच्या समोर काही बोलणेही शक्य होईना, म्हणून श्रीरामचंद्राच्या चरणकमलाकडे दीन मुद्रेने नुसते पाहतच राहिले.

थोड्याच वेळात प्रभूंनी अलंकार व नानाप्रकारची वस्त्रे आणविली. ती अत्यंत मोलाची व अनेक आकर्षक रंगाची होती. प्रभूंनी प्रथम सुग्रीवाला वस्त्र-भूषणांचा आहेर केला. भरताने उठून ती वस्त्रे, भूषणे त्याच्या अंगावर घातली. त्यानंतर प्रभूच्या आज्ञेने लंकेश बिभीषणाला लक्ष्मणाने वस्त्रे व भूषणे अर्पण केली; ती भानुकुलनाथ रघुपतींना पसंत पडली.

हे सर्व चालू असता अंगदाची मनस्थिती विरहदुःखाने अगदी टोकास जाऊन पोचली. त्याची हालचाल सर्वस्वी बंद होऊन एखाद्या पुतळ्यासारखा तो बसून राहिला. त्याची ती उत्कट प्रीती पाहून प्रभूंनी त्याला बोलावलाच नाही; तसाच बसू दिला.

वरील प्रमाणेच ज्याच्या त्याच्या योग्यता-रुचीस अनुसरून, जांबवंत व नीलादि सर्व वानरांना रघुनाथांनी आहेर केले; तेव्हा सुग्रीवादि सर्व मंडळी रामरूप हृदयात धारण करून आणि रघुनाथाच्या चरणी आपले मस्तक विनम्र करून चालू लागले. १७ (क)

सर्वजण गेलेले पाहून अंगद कसातरी उठला. त्याने दण्डवत प्रणाम केला. त्याच्या नेत्रातून अश्रूंच्या धारा वाहत असता हात जोडून, जणू प्रेमरसात पाकवलेलेच अत्यंत नम्र असे भाषण त्याने केले. १७ (ख)

" हे कृपासागरा !...हे सुखसिंधो !...दीनांच्या दयासागरा ! हे आर्तांच्या उत्तम बंधो !...हे नाथ ! माझी एक विनवणी ऐका. मरतेवेळी वालीने जेव्हा मला तुमच्या पदरात घातला तेव्हाच माझ्या पित्याने प्राण सोडला; म्हणून हे भक्तांचे हित करणाऱ्या प्रभो ! अनाथांचे रक्षण करणे हे तुमचे ब्रीद लक्षात आणून माझा त्याग करू नका. तुम्हीच माझे स्वामी, तुम्हीच गुरू, माझे माता-पिता, गण-गोत, सर्व काही तुम्हीच; अशी स्थिती असल्याने, या तुमच्या चरणकमलांचा त्याग करू कसा ? आणि जाऊ तरी कुठे ?

" हे भूपश्रेष्ठा ! आपणच विचार करून पाहा की, प्रभूला सोडून घरी माझे काम तरी काय आहे ?

बालक ग्यान बुद्धि बल हीना । राखहु सरन नाथ जन दीना ॥
नीचि टहल गृह कै सब करिहउँ । पद पंकज बिलोकि भव तरिहउँ ॥
अस कहि चरन परेउ प्रभु पाही । अब जनि नाथ कहहु गृह जाही ॥

दो० — अंगद बचन बिनीत सुनि रघुपति करुना सींव ।
प्रभु उठाइ उर लायउ सजल नयन राजीव ॥ १८ (क) ॥
निज उर माल बसन मनि बालितयन पहिराइ ।
बिदा कीन्हि भगवान तब बहु प्रकार समुझाइ ॥ १८ (ख) ॥

चौ० — भरत अनुज सौमित्रि समेता । पठवन चले भगत कृत चेता ॥
अंगद हृदयँ प्रेम नहिं थोरा । फिरि फिरि चितव राम कीं ओरा ॥
बार बार कर दंड प्रनामा । मन जस रहन कहहिं मोहि रामा ॥
राम बिलोकनि बोलनि चलनी । सुमिरि सुमिरि सोचत हँसि मिलनी ॥
प्रभु रुख देखि बिनय बहु भाषी । चलेउ हृदयँ पद पंकज राखी ॥
अति आदर सब कपि पहुँचाए । भाइन्ह सहित भरत पुनि आए ॥
तब सुग्रीव चरन गहि नाना । भाँति बिनय कीन्हे हनुमाना ॥
दिन दस करि रघुपति पद सेवा । पुनि तव चरन देखिहउँ देवा ॥

ज्ञानहीन, बुद्धिहीन, बलहीन असे हे बालक दीन होऊन आपणाला शरण आले आहे; हे नाथ ! द्या त्याला चरणाचा आश्रय !

" रघुवीरा ! असा मी हीन-दीन असलो तरी तुमच्या घरची सर्व हलकी कामे करत जाईन; आणि अशा प्रकारे हे पदपंकज मला अखंड दर्शनाला मिळाले म्हणजे मी हा भवसागर सहज तरून जाईन. "

शेवटचे वाक्य बोलत असता अंगदाचा कंठ पुन्हा जोराने दाटून आला, " प्रभो रक्षण करा " असे शब्द कसे तरी त्याच्या तोंडून उमटले आणि तो रघुनाथाच्या पायावर डोके ठेवून दंडासारखा पडला; आणि म्हणाला, " नाथ ! आता नका हो सांगू मला की, घरी जाच ! "

अंगदाची ही प्रेमविव्हल स्थिती पाहून व त्याचे नम्र भाषण ऐकून करुणेची सीमा असणाऱ्या श्रीरघुपतींनी त्याला आपल्या दोन्ही हातांनी उचलून हृदयाशी धरला; त्यावेळी त्यांच्या कमळासारख्या विशाल आणि सुंदर नेत्रात अश्रू उचंबळून आले ! १८ (क)

भगवंतांनी अनेक प्रकारे त्याची समजूत घातली. आपल्या अंगावरील वस्त्रे व भूषणे स्वतःच त्याच्या अंगावर घातली; आणि त्याला कसातरी मोठ्या कष्टाने निरोप दिला. १८ (ख)

आता अंगदासह सर्व मंडळी निघाली. शत्रुघ्न लक्ष्मणांसह भक्तकृतज्ञ भरत सुग्रीवादिकांस पोचवण्यास निघाले. त्या सर्व मंडळीत, हृदयात अपार राम-प्रेम असलेला अंगद मात्र अजून केविलवाण्या मुद्रेने प्रभूकडे प्रेमाने पाहतच आहे, वारंवार दण्डवत् नमस्कार करत असता त्याच्या मनात विचार येई की, अजून कदाचित राम मला राहा असे म्हणतील ! श्रीरामचंद्रांचे पाहणे, चालणे, बोलणे आणि हसत हसत भेटणे इत्यादि स्मरण होऊन त्याच्या हृदयात दुःखाचे आवेग उसळत आहेत !

अखेर प्रभूचा निश्चय कायम आहे अशी खात्री झाल्यावर जाण्यापूर्वी त्याने अनेक प्रकारे प्रार्थना-विनंती केली. आपल्या हृदयात श्रीरामचरणकमले धारण केली आणि अंगदाची स्वारी जड पावले टाकत बाहेर पडली.

इतक्यात सुग्रीवादि वानरवीरांना पोचवून भावांसह भरत परत आले. तेव्हा मग सुग्रीवाचे पाय धरून हनुमंताने नानाप्रकारे विनंती करून सांगितले, हे देवा ! काही दिवस (दहा) रघुपतींची चरणसेवा करून मी पुनः आपल्या पायाशी येईन. "

पुन्य पुंज तुम्ह पवनकुमारा । सेवहु जाइ कृपा आगारा ॥
अह कहि कपि सब चले तुरंता । अंगद कहइ सुनहु हनुमंता ॥

दो० –कहेहु दंडवत प्रभु सैं तुम्हहि कहउँ कर जोरि ।
बार बार रघुनायकहि सुरति कराएहु मोरि ॥ १९ (क) ॥
अस कहि चलेउ बालिसुत फिरि आयउ हनुमंत ।
तासु प्रीति प्रभु सन कही मगन भए भगवंत ॥ १९ (ख) ॥
कुलिसहु चाहि कठोर अति कोमल कुसुमहु चाहि ।
चित्त खगेस राम कर समुझि परइ कहु काहि ॥ १९ (ग) ॥

चौ० – पुनि कृपाल लियो बोलि निषादा । दीन्हे भूषन बसन प्रसादा ॥
जाहु भवन मम सुमिरन करेहु । मन क्रम बचन धर्म अनुसरेहू ॥
तुम्ह मम सखा भरत सम भ्राता । सदा रहेहु पुर आवत जाता ॥
बचन सुनत उपजा सुख भारी । परेउ चरन भरि लोचन बारी ॥
चरन नलिन उर धरि गृह आवा । प्रभु सुभाउ परिजनन्हि सुनावा ॥
रघुपति चरित देखि पुरबासी । पुनि पुनि कहहिं धन्य सुखरासी ॥

ते ऐकून श्रीरामसंकेत जाणणारा सुग्रीव म्हणाला, " हे पवनकुमारा ! तुम्ही पुण्यराशी आहात; तुम्ही परत जाऊन यापुढे कायमचेच कृपाधाम रघुपतीच्या सेवेत राहा."

एवढे भाषण सुग्रीवाचे होताच सगळे कपी जलदीने चालू लागले; आणि हनुमान परत येण्यास वळले, तोच वालिसुत अंगद जवळ येऊन म्हणाला, " हनुमंता ! एवढे तरी करा. मी तुम्हाला हात जोडून विनंती करतो की, माझा प्रभूला दण्डवत् नमस्कार गेल्यावर सांगा आणि प्रसंगानुरूप पुनः पुन्हा माझी आठवण प्रभूला देत जा. " १९ (क)

इतकी प्रार्थना करून अंगदही मार्गस्थ झाला; आणि हनुमान परत आला. लगेच त्याने अंगदाच्या अनावर प्रेमभावनेचे वर्णन प्रभूजवळ केले; ते ऐकत असता भगवंतही प्रेममग्न झाले. १९ (ख)

रघुनाथाच्या हृदयाची ही दोन टोकांची स्थिती यावेळी पाहावयास मिळाल्याने काकभुशुंडी गरुडाचे शंकानिरसन करतो, " हे खगेश्वरा ! श्रीरामचंद्राचे चित्त वज्रापेक्षाही अत्यंत कठोर व [illegible] अति कोमल कसे आहे ते पाहिलेस ना ? त्याचे रहस्य कोणाला कसे कळणार ? १९ (ग)

बड्या पाहुण्याचा हा [illegible] व पाठवणी झाल्यानंतर कृपाळू रघुनाथाने निषादराजा गुहाला बोलावले आणि त्यालाही वस्त्रे, भूषणे प्रसाद म्हणून दिली. त्याला निरोप देताना प्रभू म्हणाले,

" सख्या ! आता घरी परत जा बरं. माझी सतत आठवण ठेवून मनाने, कर्माने व वाणीने धर्मानुसार वागा. मित्रा ! भरतासारखे तुम्ही माझे भाऊच असल्याने अयोध्येला मधूनमधून आपुलकीने खुशाल येत जा."

एवढे भगवंताचे शुद्ध प्रेम आपणाला लाभल्याने स्वर्गोवर आपण किती धन्य आहो, याची जाणीव निषादराजाला होऊन त्याला केवढे सुखसमाधान वाटले ! तो रघुनाथाच्या पाया पडला, तेव्हा त्याचे नेत्र आनंदाश्रूंनी भरून आले. भगवंताचे चरणकमल हृदयात धारण करून तो आपल्या घरी परतला.

शृंगवेरपुरात त्याचे पाऊल पडताच त्याच्या आप्तजनांनी त्याला अनेक प्रश्न विचारले. त्यांची जिज्ञासा जाणून त्यांना राज्यारोहणवृत्त सविस्तर सांगितले व प्रभुप्रसाद दाखवून [illegible] स्वभावाची अनेकप्रकारे वाखाणणी केली.



राम राज बैठें त्रैलोका। हरषित भए गए सब सोका॥
बयरु न कर काहू सन कोई। राम प्रताप बिषमता खोई॥

दो० — बरनाश्रम निज निज धरम निरत बेद पथ लोग।
चलहिं सदा पावहिं सुखहि नहिं भय सोक न रोग॥ २०॥

चौ० — दैहिक दैविक भौतिक तापा। राम राज नहिं काहुहि ब्यापा॥
सब नर करहिं परस्पर प्रीती। चलहिं स्वधर्म निरत श्रुति नीती॥
चारिउ चरन धर्म जग माहीं। पूरि रहा सपनेहुँ अघ नाहीं॥
राम भगति रत नर अरु नारी। सकल परम गति के अधिकारी॥
अल्पमृत्यु नहिं कवनिउ पीरा। सब सुंदर सब बिरुज सरीरा॥
नहिं दरिद्र कोउ दुखी न दीना। नहिं कोउ अबुध न लच्छनहीना॥
सब निर्दंभ धर्मरत पुनी। नर अरु नारि चतुर सब गुनी॥
सब गुनग्य पंडित सब ग्यानी। सब कृतग्य नहिं कपट सयानी॥

– श्रीरामराज्य वर्णन –

श्रीरघुनाथाची कारकीर्द सुरू झाल्यानंतर, रामराजाचे चरित्र पाहून प्रजाजनांच्या मुखातून सर्वत्र धन्योद्गार निघू लागले. रामराज्याचा प्रारंभ झाल्याने त्रैलोक्य आनंदित झाले. शोक, भय इत्यादि विकार नाहीसे झाले. लोकांनी एकमेकांशी शत्रुत्व करण्याचे सोडून दिले. कारण रामप्रभूच्या प्रतापाने विषमताच निघून गेली.

प्रजेमध्ये आपापल्या वर्णाचे व आश्रमाचे धर्म समजून घेऊन निष्ठेने त्याचे पालन करण्याची तत्परता दिसून येऊ लागली. वेदमार्गाने सर्व लोक वागू लागले; त्यामुळे त्यांना अखंड सुख मिळू लागले व रोग, भय, शोक इत्यादि दोष कुठेच दिसेनासे झाले. २०

त्याचप्रमाणे रामराज्यात आध्यात्मिक, (स्वतःच्या देहापासून उत्पन्न होणारे ताप) आधिदैविक, (देवयोनीतील जीवापासून उत्पन्न होणारे ताप) व आधिभौतिक (पंचमहाभूतांच्यापासून उत्पन्न होणारे ताप) असे त्रिविध ताप कोणासही होत नाहीसे झाले.

सगळे लोक एकमेकांवर प्रेम करू लागले; आणि वेदशास्त्रांनी सांगितलेल्या नीतीने आपापल्या धर्माचे आचरण्यात गढून गेले.

सत्य, शौच, दया व दान या चारी चरणांनी धर्म पूर्णपणे जगात नांदू लागला; कारण की, स्वप्नात-सुद्धा पाप घडेनासे झाले.

अयोध्या नगरवासी सर्व स्त्रिया आणि पुरुष परम गतीचे अधिकारी बनले, याचे कारण सगळेच अखंड रामभक्तिपरायण झाले.

अकाल मृत्यू कुठेही येईना; तसेच कोणालाही कसलीच पीडा उरली नाही. सर्वच नागरिक नारीनर निरोगी व सुंदर शरीराचे झाले. कोणीही दुःखी नाही; कुठेच दारिद्र्य उरले नाही, कोणीच मूर्ख राहिला नाही आणि कोणीही शुभलक्षणहीन नाही !

ढोंगबाजी कुठेच औषधालासुद्धा उरली नाही; कारण सगळेच धर्मशील असून, पवित्र आचरण करू लागले. सर्व स्त्रिया आणि पुरुष चातुर्यसंपन्न झाले; आणि त्यांच्या ठिकाणी सद्गुणांची आवड निर्माण झाली. तसेच त्यांना दुसऱ्याच्या गुणांची किंमत समजण्याइतके ते ज्ञानी आणि समंजस झाले. कृतज्ञतेचे साम्राज्य सर्वत्र पसरले, आणि समाजातून गुंडगिरीचे पूर्ण उच्चाटन झाले.

दो० – राम राज नभगेस सुनु सचराचर जग माहिं।
काल कर्म सुभाव गुन कृत दुख काहुहि नाहिं ॥ २१ ॥

चौ० – भूमि सप्त सागर मेखला। एक भूप रघुपति कोसला ॥
भुअन अनेक रोम प्रति जासू। यह प्रभुता कछु बहुत न तासू ॥
सो महिमा समुझत प्रभु केरी। यह बरनत हीनता घनेरी ॥
सोउ महिमा खगेस जिन्ह जानी। फिरि एहिं चरित तिन्हहु रति मानी ॥
सोउ जाने कर फल यह लीला। कहहिं महा मुनिबर दमसीला ॥
राम राज कर सुख संपदा। बरनि न सकइ फनीस सारदा ॥
सब उदार सब पर उपकारी। बिप्र चरन सेवक नर नारी ॥
एकनारि ब्रत रत सब झारी। ते मन बच क्रम पति हितकारी ॥

दो० – दंड जतिन्ह कर भेद जहँ नर्तक नृत्य समाज।
जीतहु मनहि सुनिअ अस रामचंद्र कें राज ॥ २२ ॥

चौ० – फूलहिं फरहिं सदा तरु कानन। रहहिं एक सँग गज पंचानन ॥
खग मृग सहज बयरु बिसराई। सबन्हि परस्पर प्रीति बढ़ाई ॥
कूजहिं खग मृग नाना बृंदा। अभय चरहिं बन करहिं अनंदा ॥

एवढ्यानेच भागले नाही. रामराज्याचे आणखी अपूर्व वैशिष्ट्य गरुडाला पटवण्यासाठी काकभुशुंडी म्हणतो, " हे पक्षिराजा! ऐक. सर्व स्थावर जंगम जगात काल, कर्म, स्वभाव व गुण यांच्यामुळे उत्पन्न होणारे दुःख रामराज्यात, जरासुद्धा कोणाला उरले नाही. " २१

अशा भाग्याचा लाभ सर्वांना व्हावा म्हणून सप्त समुद्राचा कमरपट्टा असलेल्या पृथ्वीचे कोसल-भूप श्रीरघुपती हे एकमेव सम्राट झाले. तसे पाहिले तर ज्याच्या रोमरोमात अनेक ब्रह्मांड भुवने आहेत, त्याला या साम्राज्याचे कसले महत्त्व? आणि प्रभूचा तो अपार महिमा कळल्यावर हे वर्णन करीत बसणे त्यांना फारच कमीपणा आणणारे आहे.

परंतु हे खगपती! असे असूनसुद्धा मौज अशी की, तो अपार महिमा ज्यांनी जाणला आहे, तेसुध्दा या भगवंतांच्या लीला-चरित्रावर फार प्रेम करतात; कारण अशा प्रेमामुळेच तो अपार महिमा कळू शकतो, असे इंद्रियांना आवरून धरणारे अत्यंत थोर मुनिश्रेष्ठसुद्धा सांगतात.

असो. थोडक्यात सांगायचे म्हणजे रामराज्यात जी सुखे ज्या विविध प्रकारची संपत्ती होती, त्यांचे वर्णन सहस्र मुखांचा शेष व प्रत्यक्ष वाग्देवता सरस्वतीसुद्धा करू शकत नाहीत.

सर्व लोक उदार व सगळेच परोपकारी स्त्रिया व पुरुष दोघेही विप्रांच्या चरणांची सेवा करण्यात सुख मानीत. राज्यात कुठेही एकपत्नी-व्रताचेच पालन करणारा; आणि त्यांच्या स्त्रिया मनाने वाणीने व कृतीने पति-हिताला जपणाऱ्या अशा होत्या.

रामराज्यात ' भेद ' उरला तो फक्त नृत्य करणाऱ्या लोकांच्या नर्तक समाजातच! (ताल, राग, स्वर इत्यादि स्वरूपांत) दंड फक्त संन्याशांच्या हातात आणि जिंका हा शब्द केवळ मनाच्या बाबतीत लावला जात असे. २२

रामराज्यातील मानवेतर सृष्टीकडे आता पाहा. वनातील वृक्षसुद्धा सदा सर्वकाळी फुलांनी व फळांनी लवलेले दिसू लागले. वैरभावच नष्ट झाल्याने हत्ती आणि सिंह एकत्र सुखाने विहार करू लागले. याचप्रमाणे सर्व पशू आणि पक्षीसुद्धा आपले स्वाभाविक वैर विसरून एकमेकावर अधिकाधिक प्रेम करू लागली. पाहावे तिकडे पक्ष्यांचे थवे निर्भयपणे कूजन करू लागले व पशूंचे कळप निर्भयपणे आनंदाची लूट करीत संचार करू लागले. त्याना थोडेसुद्धा भय कुठेच वाटेनासे झाले.



सीतल सुरभि पवन बह मंदा । गुंजत अलि लै चलि मकरंदा ॥
लता बिटप मागें मधु चवहीं । मनभावतो धेनु पय स्रवहीं ॥
ससि संपन्न सदा रह धरनी । त्रेताँ भइ कृतजुग कै करनी ॥
प्रगटीं गिरिन्ह बिबिधि मनि खानी । जगदातमा भूप जग जानी ॥
सरिता सकल बहहिं बर बारी । सीतल अमल स्वाद सुखकारी ॥
सागर निज मरजादाँ रहहीं । डारहिं रत्न तटन्हि नर लहहीं ॥
सरसिज संकुल सकल तड़ागा । अति प्रसन्न दस दिसा बिभागा ॥

दो० – बिधु महि पूर मयूखन्हि रबि तप जेतनेहि काज ।
मागें बारिद देहिं जल रामचंद्र कें राज ॥ २३ ॥

चौ० – कोटिन्ह बाजिमेध प्रभु कीन्हे । दान अनेक द्विजन्ह कहँ दीन्हे ॥
श्रुति पथ पालक धर्म धुरंधर । गुनातीत अरु भोग पुरंदर ॥
पति अनुकूल सदा रह सीता । सोभा खानि सुसील बिनीता ॥
जानति कृपासिंधु प्रभुताई । सेवति चरन कमल मन लाई ॥
जद्यपि गृहँ सेवक सेवकिनी । बिपुल सदा सेवा बिधि गुनी ॥
निज कर गृह परिचरजा करई । रामचंद्र आयसु अनुसरई ॥

शीतल, मंद व सुगंधी वारा सतत वाहू लागला. फुलातील रस वाहून नेणारे भुंगे सर्वत्र एकसारखे गुंजारव करू लागले. लता आणि वृक्ष ज्याला जेवढा पाहिजे तेवढा पुष्परस मध पाझरू लागले. गाई जरूरी-प्रमाणे दूध अचळातून गाळू लागल्या. भूमी सर्वकाळीच अनेक प्रकारच्या धान्याच्या पिकांनी भरलेली राहू लागली.

—याप्रमाणे त्रेतायुगात कृतयुगाची परिस्थिती निर्माण झाली. ती आणखी पुढे पाहा.

जगदात्मा भगवान् जगाचे भूपती झाले आहेत हे जाणून पर्वतांनी नानाप्रकारच्या रत्नांच्या खाणी प्रकट केल्या. सर्व नद्या गोड, निर्मल, थंड व सुखदायक असे उत्तम पाणी वाहून नेऊ लागल्या.

सागर आपापल्या मर्यादांचे पालन करून रत्ने किनाऱ्यांवर टाकू लागले व ती लोक घेऊ लागले. सर्व तलाव कमलांनी झाकले गेले. दाही दिशांशी व्यापलेले सर्व आकाश अत्यंत प्रसन्न झाले. श्रीरामचंद्राच्या राज्यात चंद्र आपल्या किरणांनी पृथ्वीला संपन्न करू लागला, सूर्य जरूर तेवढीच उष्णता देऊ लागला आणि मेघ मागणीप्रमाणे पाऊस पाडू लागले ! २३

राज्यारोहण समारंभ झाल्यावर श्रीरामप्रभूंनी कोट्यवधी अश्वमेघ यज्ञ केले आणि ब्राह्मणांना अगणित दाने दिली.

श्रीरघुवीर हे वेदमार्गाचे पालन करणारे, धर्माची धुरा धारण केलेले आणि सत्व, रज, तम यांच्याही पलीकडचे आहेत; पण ऐश्वर्याचा उपभोग पाहून मात्र इंद्राच्या वैभवाचे स्मरण होते.

शोभेची खाण असणारी, सुशील आणि नम्र सीता पतीच्या मनाचा कल पाहून अहर्निश वागते. कृपासिंधू रामचंद्रांच्या प्रभुत्वाची प्रथम पासूनच तिला पूर्ण कल्पना असल्यामुळे त्यांच्या चरणकमलांची सेवा ती अगदी मन लावून करते.

राजवाड्यात प्रत्येक कामात निपुण अशा दासदासींचा भरगच्च भरणा असूनसुद्धा आपल्या मंदिरातील सर्व कामे स्वतः करण्याचीच शिस्त जानकीने ठेवली होती आणि त्याही बाबतीत श्रीरामचंद्रांची आज्ञाच तिला प्रमाण होती.

जेहि बिधि कृपासिंधु सुख मानइ । सोइ कर श्री सेवा बिधि जानइ ॥
कौसल्यादि सासु गृह माहीं । सेवइ सबन्हि मान मद नाहीं ॥
उमा रमा ब्रह्मादि बंदिता । जगदंबा संततमनिंदिता ॥

दो० — जासु कृपा कटाच्छु सुर चाहत चितव न सोइ ।
राम पदारबिंद रति करति सुभावहि खोइ ॥ २४ ॥

चौ० — सेवहिं सानकूल सब भाई । राम चरन रति अति अधिकाई ॥
प्रभु मुख कमल बिलोकत रहहीं । कबहुँ कृपाल हमहि कछु कहहीं ॥
राम करहिं भ्रातन्ह पर प्रीती । नाना भाँति सिखावहिं नीती ॥
हरषित रहहिं नगर के लोगा । करहिं सकल सुर दुर्लभ भोगा ॥
अहनिसि बिधिहि मनावत रहहीं । श्रीरघुबीर चरन रति चहहीं ॥
दुइ सुत सुंदर सीता जाए । लव कुस बेद पुरानन्ह गाए ॥
दोउ बिजई बिनई गुन मंदिर । हरि प्रतिबिंब मनहुँ अति सुंदर ॥
दुइ दुइ सुत सब भ्रातन्ह केरे । भए रूप गुन सील घनेरे ॥

एकंदरीत जेणेकरून कृपासिंधू रघुनाथ सुख मानतील तेच करण्याचे सीतेने धोरण ठेवले, सेवेच्या शास्त्रातील रहस्य त्यातच साठवल्याची तिला जाणीव होती. पतिसेवेत जशी उणीव पडू दिली नाही, तशीच कौसल्यादि सर्व सासवांच्या शुश्रूषेत सुद्धा कुठेच कमी पडू देत नसे. कारण सर्व व अहंपणा यांचा स्पर्शही तिला झाला नव्हता. तथापि तिचा अधिकार केवढा मोठा !-उमा, रमा व सरस्वती यांनी जिच्या चरणी आपले मस्तक ठेवावे, एवढ्या योग्यतेची जगदंबा–सीता ! तिच्या ठिकाणी साहजिकच दोषांचे नावसुद्धा असणे अशक्य !

जिच्या कृपाकटाक्षाची मार्गप्रतीक्षा सर्वच देव सदोदित करत बसले आहेत, पण जी त्यांच्याकडे चुकून-सुध्दा पाहत नाही, ती श्रीसीता आपला असा ताठर स्वभाव सोडून श्रीरामचंद्राच्या चरणकमली परम प्रेम करत आहे ! २४

पत्नीच्या प्रेमाप्रमाणेच बंधूप्रेमही श्रीरघुनाथाचे अनुपमच होते.

भरतादिक सर्व भावांची रामपदकमली अत्यंत अनन्य प्रीती असल्यामुळे तेही रघुनाथास अनुकूल राहून त्यांची सेवा करतात. सन्निध राहून सदोदित प्रभु मुखकमलाकडे त्यांची एकाग्र नजर असते. हेतू हा की, कृपाळू मला कधी काही तरी सेवा करण्यास सांगतील.

याच्या उलट श्रीरामसुध्दा सर्व बंधूंवर सारखे प्रेम करून वेळोवेळी प्रसंगानुरूप त्यांना नीतीचे धडे अनेक प्रकारे शिकवितात.

देवांनासुद्धा दुर्लभ असे सर्व प्रकारचे भोग भोगत राहणारे प्रजाजन, अशा रीतीने सर्व बाजूंनी सगळा संच जमलेला पाहून आनंदमग्न होऊ लागले. त्यांच्या अंतःकरणात रात्रंदिवस एकाच प्रार्थनेचा सूर ऐकू येई, आणि तो म्हणजे, " हे विधी ! श्रीरघुवीरचरणी दृढ प्रेम द्या, एवढेच तुमच्या जवळ मागणे आहे.

अशा प्रकारे निर्भेळ दैवी सुखाचा काही काळ गेल्यानंतर सीतेला लव आणि कुश असे सुंदर पुत्र झाले; त्यांचे वर्णन वेद आणि पुराणे यांनीही केले आहे. ते दोघेही विजयी, विनयी; आणि केवळ सद्गुणांची खाण असे आहेत की, त्यांना पाहिल्यावर कोणालाही असे वाटते की, श्रीहरीचीच ही तंतोतंत प्रतिकृती आहे !

- भरतादि बंधूंनासुद्धा दोन दोनच पुत्र झाले. ते ही सगळे अत्यंत रूपसंपन्न, सद्गुणशाली व परम शीलवान असेच निपजले.

दो० – ग्यान गिरा गोतीत अज माया मन गुन पार ।
सोइ सच्चिदानंद घन कर नर चरित उदार ।। २५ ।।

चौ० – प्रातकाल सरऊ करि मज्जन । बैठहिं सभाँ संग द्विज सज्जन ।।
बेद पुरान बसिष्ट बखानहिं । सुनहिं राम जद्यपि सब जानहिं ।।
अनुजन्ह संजुत भोजन करहीं । देखि सकल जननीं सुख भरहीं ।।
भरत सत्रुहन दोनउ भाई । सहित पवनसुत उपवन जाई ।।
बूझहिं बैठि राम गुन गाहा । कह हनुमान सुमति अवगाहा ।।
सुनत बिमल गुन अति सुख पावहिं । बहुरि बहुरि करि बिनय कहावहिं ।।
सब कें गृह गृह होहिं पुराना । राम चरित पावन बिधि नाना ।।
नर अरु नारि राम गुन गानहिं । करहिं दिवस निसि जात न जानहिं ।।

दो० – अवधपुरी बासिन्ह कर सुख संपदा समाज ।
सहस सेष नहिं कहि सकहिं जहँ नृप राम बिराज ।। २६ ।।

चौ० – नारदादि सनकादि मुनीसा । दरसन लागि कोसलाधीसा ।।
दिन प्रति सकल अजोध्या आवहिं । देखि नगरु बिरागु बिसरावहिं ।।

—खरोखर पाहता जो अजन्मा आहे. बुद्धी, वाणी व इंद्रिये यांच्या कक्षेच्या बाहेर ज्याचे स्थान आहे, आणि जो माया, व गुण यांच्या पलीकडे आहे तोच सच्चिदानंदघन भगवान उदार नरलीला करीत आहे ! २५

श्रीरामचंद्रांचा दिनक्रम सकाळीच शरयूनदीतील स्नानाने सुरू होई. त्यानंतर ब्राह्मण व सज्जन यांच्यासह दरबारात काही काळ जाई. त्याठिकाणी गुरू वशिष्ठ वेद-पुराणे यातील रहस्य सांगत व सर्वज्ञ प्रभू मन लावून श्रवण करत.

हा सकाळचा कार्यक्रम उरकल्यानंतर आपल्या धाकट्या तिन्ही बंधूंना पंगतीस घेऊन दुपारी भोजन होई. त्यावेळी सर्व मातांच्या सुखसागराला भरती येई.

तिसऱ्या प्रहरी भरत आणि शत्रुघ्न हे बंधू हनुमंताला बरोबर घेऊन उपवनात जात असत. तेथे निवांत जागी बसून ते दोघे बंधू पवनसुताला श्रीरामचंद्रांच्या कथा विचारीत व सुमतिमान् हनुमंत भगवंताचे चिंतन करून त्या प्रेमभराने सांगत. त्या श्रीरामगुणसंकीर्तनाचे श्रवण चालू असता त्यांना अत्यंत सुख होत असे. त्यामुळे श्रवण केलेल्याच कथा ते पुनः पुन्हा सांगण्यासाठी हनुमंताला विनवीत.

या दोघा भावांप्रमाणेच नागरिकांनाही रामचरित्राची अवीट गोडी लागली होती. घरोघरी पुराणे व नानाप्रकारच्या पावन करणाऱ्या रामचरित्र कथा सांगितल्या जाऊ लागल्या. स्त्रिया व पुरुष श्रीरामचंद्रांचे गुण-गान करत असता इतके तल्लीन होत की, दिवस आणि रात्र केव्हा निघून जाते याचा त्यांना पत्ताच लागत नाही.

—खरेच आहे ते ! जेथे राजाधिराज श्रीरामचंद्र निवास करतात त्या अयोध्येसारख्या पुण्य नगरीत राहण्याचे परम भाग्य ज्यांना लाभले त्यांच्या सुखसंपत्तिसागराचे वर्णन हजारो शेषांनाही करता येणे शक्य नाही ! २६

अशी ही अपूर्व पर्वणी अयोध्येत आल्यामुळे नारदादि व सनकादिक मुनीश्वर, कोसलेश श्रीरामचंद्रांच्या दर्शनासाठी दररोज अयोध्येत येत असत; आणि अयोध्यापुरी सर्व सुखाचे आगर बनलेली पाहून त्यांना आपल्या वैराग्याच्या विसर पडे !

जातरूप मनि रचित अटारीं। नाना रंग रुचिर गच ढारीं॥
पुर चहुँ पास कोट अति सुंदर। रचे कँगूरा रंग रंग बर॥
नव ग्रह निकर अनीक बनाई। जनु घेरी अमरावति आई॥
महि बहु रंग रचित गच काँचा। जो बिलोकि मुनिबर मन नाचा॥
धवल धाम ऊपर नभ चुंबत। कलस मनहुँ रबि ससि दुति निंदत॥
बहु मनि रचित झरोखा भ्राजहिं। गृह गृह प्रति मनि दीप बिराजहिं॥

छं० — मनि दीप राजहिं भवन भ्राजहिं देहरीं बिद्रुम रची।
मनि खंभ भीति बिरंचि कनक मनि मरकत खची॥
सुंदर मनोहर मंदिरायत अजिर रुचिर फटिक रचे।
प्रति द्वार द्वार कपाट पुरट बनाइ बहु बज्रन्हि खचे।

दो० — चारु चित्रसाला गृह गृह प्रति लिखे बनाइ।
राम चरित जे निरख मुनि ते मन लेहिं चोराइ॥ २७॥

चौ० — सुमन बाटिका सबहिं लगाईं। बिबिध भाँति करि जतन बनाईं॥
लता ललित बहु जाति सुहाईं। फूलहिं सदा बसंत कि नाईं॥

त्या भाग्यवान पुरीचे एकवेळ अंतरंग पाहा. घरांच्या गच्च्या सोन्याच्या बनवून, त्यात कौशल्याने सुंदर रत्ने बसविली होती. आणि विविध रंगांच्या फरश्यांनी त्यांचे आकर्षण भरपूर वाढवले होते. नगराच्या भोवती भक्कम व सुन्दर तटबंदी असून, त्यावर जागोजागी चित्रविचित्र रंगांचे बुरूज बनविले होते. त्यांना पाहून असे वाटे की, जणू नवग्रहांनी आपली सैन्ये एकत्र करून इंद्राची जी राजधानी अमरावती, तिलाच वेढा घातला आहे.

त्या तटबंदीच्या वरच्या भागाच्या व सज्जांच्या वगैरे जमिनी अनेक प्रकारच्या रंगांच्या रत्नांनी बनवल्या होत्या. त्यामुळे त्यांचे सौंदर्य इतके खुलून दिसे की, ते पाहून मुनिवरांची विरक्त मनेसुद्धा हर्षातिरेकाने नुसती नाचू लागत!

उज्ज्वल असे महाल इतके उंचावले होते की, त्यांना आकाशाचे जणू चुंबन घेण्याचीच इच्छा झाली आहे; घराच्यावरील कळस इतके तेजाने तळपत की, जणू सूर्यचंद्रांच्या तेजाचा तिरस्कार करण्याचाच त्यांचा विचार आहे! महालांच्या खिडक्यातूनसुद्धा विविध रंगांची रत्ने बसविल्यामुळे त्यांच्या उघडझाकीबरोबर त्या रत्नांची दिव्य प्रभा सर्वत्र फाकत असे! घरातून दिवाबत्तीची व्यवस्था रत्नांच्या दीपांनीच केल्याने त्यांचा प्रकाश अतुल्य असाच अंतर्भागात पडत असे!

याप्रमाणे घरोघरी मणिदीप शोभत आहेत, पोवळ्यांच्या बनविलेल्या दाराच्या चौकटींनी ती घरे विराजत आहेत; आत रत्नांचे खांब माणके आणि पाचू जडलेल्या सोन्याच्या भिंती यांची रचना इतकी सुंदर साधली होती की, जणू विरंचीनेच आपल्या हाताने त्यांची बांधणी केली आहे!

ही सर्व नगरीतील घरांची रचना! आता प्रत्यक्ष श्रीरामचंद्राच्या मंदिराचा मनोहरपणा त्या मानाने किती असेल याची कल्पनाच करणे बरे. ते मंदिर सौंदर्याने सर्वस्वी नटलेले असून, चांगले लांब रुंद भरपूर प्रशस्त असे बनवले होते. त्याच्या समोरील अंगण नुसत्या स्फटिकाचेच तयार केले आणि प्रत्येक दरवाजाच्या फळ्या सोन्याच्या घेऊन त्यात अनेक हिरे मोठ्या कलाकुसरीने जडविले होते.

घरोघरी चित्रशाळा असून, त्यांत श्रीरामचरित्र उत्तमप्रकारे खुलवून चित्रित केले आहे; अशी मनोहर चित्रे पाहत असता मुनींचीही मन मोहून जात! २७

नगरीत घरोघरी सर्व लोकांनी आपापल्या घराजवळ उत्तम प्रकारच्या फुलबागा लावल्या; आणि हर-एक प्रकारचा प्रयत्न करून त्या सुसज्ज करण्याची त्यांनी शिकस्त केलेली होती! त्यातच नाना जातींच्या

गुंजत मधुकर मुखर मनोहर । मारुत त्रिबिधि सदा बह सुंदर ॥
नाना खग बालकन्हि जिआए । बोलत मधुर उड़ात सुहाए ॥
मोर हंस सारस पारावत । भवननि पर सोभा अति पावत ॥
जहँ तहँ देखहिं निज परिछाहीं । बहु बिधि कूजहिं नृत्य कराहीं ॥
सुक सारिका पढ़ावहिं बालक । कहहु राम रघुपति जन पालक ॥
राज दुआर सकल बिधि चारू । बीथीं चौहट रुचिर बजारू ॥

छं०—बाजार रुचिर न बनइ बरनत बस्तु बिनु गथ पाइए ।
जहँ भूप रमानिवास तहँ की संपदा किमि गाइए ॥
बैठे बजाज सराफ बनिक अनेक मनहुँ कुबेर ते ।
सब सुखी सब सच्चरित सुंदर नारि नर सिसु जरठ जे ॥

दो०—उत्तर दिसि सरजू बह निर्मल जल गंभीर ।
बाँधे घाट मनोहर स्वल्प पंक नहिं तीर ॥ २८ ॥

सुंदर व मनोहर लता लावल्या होत्या. आणि वसंत ऋतूप्रमाणे सर्व ऋतूत त्या उत्तम प्रकारे फुलत! एवढे सृष्टिसौंदर्य एकत्र झाल्यावर भुंग्यांचा गुंजारव आणि मधमाश्यांची मध एकत्र करण्याची घाई यांना काय तोटा? त्यांचे ते कर्णमधुर संगीत श्रवण करणाराची तहान-भूक विसरून जाई!

त्या सर्व उपवनांतून व बागांतून वाहणारा वारा नेहमीच शीतल, मंद व सुगंधी असा वाहात असे. बालकांनी त्यातच आवडीने नानाप्रकारचे पक्षी पाळले असून, ते मधुर शब्द बोलतात. व आकाशात उडताना फारच शोभा देतात. मोर, हंस, करकोचे, कबुतरे, पारवे इत्यादि पक्षी वरील प्रकारच्या दैदीप्यमान घरांवर बसल्यानंतर त्यांच्या शोभेत विलक्षण भर पडते. जिथे उडतील तेथे चमकदार काही तरी असल्याने त्यांच्या त्यात पडछाया पडतात, व त्यांना पाहून त्यांचे नाचणे व शब्द करणे सुरू होते. बालक आपल्या पाळलेल्या पोपटांना व साळुंक्यांना धडे देतात, "म्हणा राम राम; म्हणा रघुपति जनपालक!"

असो. पुढे चला आणि पाहा. ते रामराजाच्या राजमंदिराचे महाद्वार! त्यात सौंदर्य उत्पन्न करण्याचे कुठे उरले आहे ते शोधूनही तज्ज्ञाला सापडणार नाही!

नगरीतील सर्व रस्ते, चव्हाटे आणि बाजारही असे उत्कृष्ट शोभेचे नमुने व निर्दोष म्हणून पाहण्यासारखे आहेत.

आता अयोध्यानगरीतील बाजारात चला म्हणजे त्यांचे वैशिष्टय पाहून तर कोणीही थक्कच होईल, मुख्य गोष्ट म्हणजे या बाजारात पैसा न मोजता जिन्नस फुकट मिळतात!

शंका घेण्याचे कारणच नाही; कारण लक्ष्मीनिवास श्रीरघुनाथ जेथे भूपती आहेत, त्या ठिकाणच्या संपत्तीचे वर्णन कोण आणि कसा करू शकणार? आपापल्या दुकानात व्यापारी लोडाला टेकून शांतपणे हरी हरी करत बसले आहेत! अशी दुकाने निरनिराळ्या पेठेतून भरपूर आहेत. कापड, दागदागिने, जवाहिर व वाणसामान अशा मुख्य पेठा असून सर्वच व्यापारी एवढे कोट्यधीश आहेत की त्यांना पाहून कुबेरानेच रामराज्यात हे अनेक अवतार घेतले आहेत असे वाटते.

नागरिक स्त्रिया, पुरुष, बाल आणि वृद्ध सर्वच अत्यंत सुखी, सुंदर आणि शुद्ध चारित्र्यसंपन्न आहेत.

यानंतर अयोध्येच्या उत्तर दिशेस शरयूनदी वाहात आहे. तिला रामराज्यात कोणते सौभाग्य प्राप्त झाले ते पाहा. तिचे पाणी कोणत्याही ऋतूत निर्मळ व खोल असेच वाहू लागले. तिच्या तीरावर सोई पाहून अनेक उत्तम मनोहर घाट बांधले आहेत. त्यांच्यावर कुठेही कडेला चिखलाचे नाव नाही. २८

चौ० —दूरि फराक रुचिर सो घाटा । जहँ जल पिअहिं बाजि गज ठाटा ॥
पनिघट परम मनोहर नाना । तहाँ न पुरुष करहिं अस्नाना ॥
राजघाट सब बिधि सुंदर बर । मज्जहिं तहाँ बरन चारिउ नर ॥
तीर तीर देवन्ह के मंदिर । चहुँ दिसि तिन्ह के उपबन सुंदर ॥
कहुँ कहुँ सरिता तीर उदासी । बसहिं ग्यान रत मुनि संन्यासी ॥
तीर तीर तुलसिका सुहाई । बृंद बृंद बहु मुनिन्ह लगाई ॥
पुर सोभा कछु बरनि न जाई । बाहेर नगर परम रुचिराई ॥
देखत पुरी अखिल अघ भागा । बन उपबन बापिका तड़ागा ॥

छं० — बापीं तड़ाग अनूप कूप मनोहरायत सोहहीं ।
सोपान सुंदर नीर निर्मल देखि सुर मुनि मोहहीं ॥
बहु रंग कंज अनेक खग कूजहिं मधुर गुंजारहीं ।
आराम रम्य पिकादि खग रव जनु पथिक हंकारहीं ॥

दो० — रमानाथ जहँ राजा सो पुर बरनि कि जाइ ।
अनिमादिक सुख संपदा रहीं अवध सब छाइ ॥ २९ ॥

त्या घाटांचीसुद्धा व्यवस्थित वर्गवारी केली होती. ज्याठिकाणी हत्ती, घोडे इत्यादींचे समूह पाणी पितात तो घाट त्यांच्या दृष्टीने उत्तम बांधला असून इतर घाटांपासून दूर व स्वतंत्र आहे. पाणी भरण्यासाठी स्त्रियांच्या करिता मुख्यतः अनेक घाट असून ते अत्यंत मनोहर आहेत. त्यांच्यावर स्नानासाठी वगैरे पुरुषांनी जायचे नाही अशी शिस्त आहे. त्याशिवाय राजघाट म्हणून सार्वजनिक उपयोगाकरता अनेक घाट छानदार व सुबक भरभक्कम बांधणीचे असून त्यांच्यावर चारी वर्णांच्या लोकांना स्नाने करण्याची सोय आहे.

नदीच्या तीरावर जागोजागी विष्णू व शंकर यांची पुष्कळ मंदिरे असून त्यांच्या सभोवती सुंदर उपवने आहेत. त्यांच्या जवळपास कुठे कुठे बैरागी, ज्ञानरत मुनी व संन्यासी यांच्याकरिता मठ-मठ्या बांधलेल्या असून त्यातून ते राहतात. नदीच्या काठाकाठाने मुनिगणांनी तुळशी लावून त्यांची सुन्दर वनेच्या वने पुष्कळ बनली आहेत !

—याप्रमाणे नगराचे अंतरंग व त्याच्या आसपासचा बाहेरचा प्रदेश यांचे सौंदर्य अवर्णनीय असे आहे. अशा त्या पावन अयोध्यानगरीचे नुसते दर्शन घडल्यानेसुद्धा पापाचा डागसुद्धा उरत नाही.

शरयू नदीच्या पाण्याची जशी घाट बांधून सर्वांच्याकरता व्यवस्था केली आहे, त्याचप्रमाणे पाण्याचा विपुल पुरवठा व्हावा म्हणून नगरीच्या बाहेर जागोजागी, विहिरी, तलाव व त्याच्याभोवती वने आणि उपवने यांची नुसती रेलचेल आहे. त्यांची अनुपम शोभा पाहा.

अत्यंत अतुल्य सौंदर्याचे आड व विहिरी व तलाव बांधलेले असून, ते सर्व विशाल आणि मनोहर आहेत. त्यांच्यात ज्या ज्या ठिकाणी आत उतरण्याची सोय केली आहे, त्या ठिकाणच्या पायऱ्या इतक्या छान बांधल्या आहेत आणि आतील पाणी असे स्फटिकासारखे स्वच्छ आहे की, त्या सुखसोई पाहून अमृत प्राशन करणाऱ्या मुनी-देवांनाहि मोह उत्पन्न झाल्याशिवाय राहात नाही. तलाव आणि मोठ्या विहिरीतून अनेक रंगाची कमले फुललेली आहेत; भुंगे गुंजारव करीत आहेत आणि जवळच्या वृक्षांवरून पक्षी मधुर गाणी गात आहेत.

—अशाप्रकारे सर्वच उद्याने रमणीय असून, त्या ठिकाणच्या कोकिलादि पक्ष्यांचे पंचम स्वरातील कुहूऽ कुहूऽ ऐकले म्हणजे असे वाटते की, ते मोठ्या आदराने वाटसरूंना बोलावतच आहेत !

असो. ज्या ठिकाणी रमानाथ रघुवीर राजा आहेत, त्या नगराचे वर्णन करून कधीकाळी संपणार का आहे ? अणिमादिक अष्ट महासिद्धी, ऋद्धी आणि नवनिधी यांनी अयोध्यानगरीतच आपले ठाणे कायमचे ठेवले. २९

चौ० – जहँ तहँ नर रघुपति गुन गावहिं । बैठि परसपर इहइ सिखावहिं ॥
भजहु प्रनत प्रतिपालक रामहि । सोभा सील रूप गुन धामहि ॥
जलज बिलोचन स्यामल गातहि । पलक नयन इव सेवक त्रातहि ॥
धृत सर रुचिर चाप तूनीरहि । संत कंज बन रबि रनधीरहि ॥
काल कराल ब्याल खगराजहि । नमत राम अकाम ममता जहि ॥
लोभ मोह मृगजूथ किरातहि । मनसिज करि हरि जन सुखदातहि ॥
संसय सोक निबिड़ तम भानुहि । दनुज गहन घन दहन कृसानुहि ॥
जनकसुता समेत रघुबीरहि । कस न भजहु भंजन भव भीरहि ॥
बहु बासना मसक हिम रासिहि । सदा एक रस अज अबिनासिहि ॥
मुनि रंजन भंजन महि भारहि । तुलसिदास के प्रभुहि उदारहि ॥

दो० – एहि बिधि नगर नारि नर करहिं राम गुन गान ।
सानुकूल सब पर रहहिं संतत कृपानिधान ॥ ३० ॥

चौ० – जब ते राम प्रताप खगेसा । उदित भयउ अति प्रबल दिनेसा ॥
पूरि प्रकास रहेउ तिहुँ लोका । बहुतेन्ह सुख बहुतन मन सोका ॥
जिन्हहि सोक ते कहउँ बखानी । प्रथम अबिद्या निसा नसानी ॥

या सर्व सुख-संपत्तीचे सार्थकही तितकेच कसोशीने केले जाई. जिथे तिथे लोक रघुपतीचे गुण गातात; आणि बसून एकमेकाम हेच शिकवतात की, शरणागतांचा प्रतिपाल करणाऱ्या रामाला भजा. शोभा, शील, रूप आणि गुण यांचे माहेरघर असणाऱ्या श्रीरामाला भजा; श्यामल शरीराच्या कमलनयन रामाला भजा; पापण्या जसे डोळ्यांचे रक्षण करतात तसे आपल्या सेवकाचे रक्षण करणाऱ्या रामाला भजा; सुन्दर बाण, उत्कृष्ट धनुष्य व मनोहर भाता धारण करणाऱ्या रामाला भजा; संतरूपी कमलवनाला फुलविणाऱ्या रणधीर श्रीरामसूर्याला भजा; त्यांना शरण जाताच, निष्काम सेवा करणाऱ्यांना अविद्यामायेतून सोडविणाऱ्या श्रीरामाला भजा.

" लोभमोहादिरूपाने त्रस्त करणाऱ्या हरिणांच्या कळपांना मारणाऱ्या श्रीराम स्वरूपातील पारध्यास भजा; कामरूपी हत्तीचा विनाश करणाऱ्या सिंहाला, आणि सेवकांना सुखविणाऱ्या रामाला भजा; संशय व शोकरूपी निबिड अंधकाराचा नाश करणाऱ्या भानूला भजा; अशा रीतीने सर्वच जन्ममरणरूप दुःखाचा नाश करणाऱ्या जानकीसहित रघुवीराला तुम्ही का भजत नाही ? "

" अनेक वासनारूपी डासांच्या समूहाला मारणाऱ्या रामरूप हिमराशीला का नाही भजत ? तसेच नित्य एकरस, जन्मरहित, अविनाशी अशा श्रीरामाची का भक्ती करत नाही ! "

—याप्रमाणे अयोध्येतील नागरिक सर्व स्त्रिया आणि पुरुष रामगुणगानात दंग असल्यामुळे कृपानिधान श्रीरामचंद्र सर्वांवर सदोदित सारखेच अत्यंत प्रसन्न असतात. ३०

—श्रीरामप्रताप-दिनेश—

सर्व प्रकरणाचा उपसंहार करण्याच्या दृष्टीने काकभुशुंडी गरुडाला श्रीरामाचा प्रताप हाच कोणी एक सूर्य उगवल्यानंतर काय मौज झाली ते सांगतो. " हे खगपती ! जेव्हा रामचंद्रांचा प्रतापरूपी अत्यंत प्रखर सूर्य उदयास आला, तेव्हापासून त्याच्या प्रकाशाने तिन्ही लोक भरून गेले. त्यामुळे पुष्कळांना सुख झाले. त्याबरोबरच दुःखी होणारेही अनेक होतेच !

ज्यांना दुःख झाले त्यांचेच वर्णन अगोदर करतो म्हणजे तुझी शंका राहणार नाही. श्रीरामप्रताप

अघ उलूक जहँ तहाँ लुकाने । काम क्रोध कैरव सकुचाने ।।
बिबिध कर्म गुन काल सुभाऊ । ए चकोर सुख लहहिं न काऊ ।।
मत्सर मान मोह मद चोरा । इन्ह कर हुनर न कवनिहुँ ओरा ।।
धरम तड़ाग ग्यान बिग्याना । ए पंकज बिकसे बिधि नाना ।।
सुख संतोष बिराग बिबेका । बिगत सोक ए कोक अनेका ।।

दो०—यह प्रताप रबि जाकें उर जब करइ प्रकास ।
पछिले बाढ़हिं प्रथम जे कहे ते पावहिं नास ।। ३१ ।।

चौ०—भ्रातन्ह सहित रामु एक बारा । संग परम प्रिय पवनकुमारा ।।
सुंदर उपवन देखन गए । सब तरु कुसुमित पल्लव नए ।।
जानि समय सनकादिक आए । तेज पुंज गुन सील सुहाए ।।
ब्रह्मानंद सदा लयलीना । देखत बालक [illegible] ।।
रूप धरें जनु चारिउ बेदा । समदरसी मुनि बिगत बिभेदा ।।
आसा बसन ब्यसन यह तिन्हहीं । रघुपति चरित होइ तहँ सुनहीं ।।
तहाँ रहे सनकादि भवानी । जहँ घटसंभव मुनिबर ग्यानी ।।
राम कथा मुनिबर बहु बरनी । ग्यान जोनि पावक जिमि अरनी ।।

भानूच्या उग्र किरणांनी पहिल्या प्रथम अविद्यारूपी रात्रीचा नाश झाला. पापरूपी घुबडे जिथल्या तिथेच लपून बसली; आणि काम, क्रोध इत्यादि चंद्रविकासिनी कमळांतील भ्रागच जवळ जवळ गेला आणि ती कोमेजली. तसेच स्वभाव, काल, गुण व नानाप्रकारची कर्मे या स्वरूपांतील चकोरांना कुठेच सुख मिळेनासे झाले. मोह, मद आणि मत्सर हे मोठेच वस्ताद चोर आहेत; परंतु त्यांच्या कर्तृत्वकलेला आता कुठेच अवकाश उरला नाही !

याच्या उलट जे सुखी झाले, त्यांची आता माहिती सांगतो. धर्मरूपी तलावात ज्ञान आणि विज्ञान अनेक कमळे फुलली. त्याचप्रमाणे सुख, संतोष, वैराग्य आणि विवेक या स्वरूपातील अनेक चक्रवाकांचा शोक नाहीसा झाला.

——अशा प्रकारचा हा [illegible] ज्याच्या हृदयात जेव्हा प्रकाश पाडतो, तेव्हा त्याच्या [illegible] मागून वर्णन केलेल्या ज्ञान-विज्ञान, सुख-संतोषादिकांची वाढ होते व आधी वर्णन केलेल्या कामक्रोधादिकांचा नाश होतो. ३१

—सनकादिक प्रकरण—

एके दिवशी आपल्या भावांना व अत्यंत प्रिय असलेल्या [illegible] बरोबर घेऊन श्रीरामचंद्र सुंदर उपवन पाहण्यासाठी गेले. त्यावेळी सर्व तरूंना नवीन पालवी फुटून [illegible] फुलले होते.

हा प्रसंग व ही जागा आपणाला अनुकूल आहे, हे जाणून त्या ठिकाणी त्या दिवशी सनकादिक मुनी आले. ते तेजःपुंज, अतिसुंदर, गुण व शीलसंपन्न असून सदोदित ब्रह्मानंदात निमग्न राहात असत. दिसायला अगदी लहान बालके पण फार पुरातन काळची ! त्यांना पाहिल्यावर जणू चारी वेदांनीच ही शरीरे धारण केली आहेत असे वाटे, इतके ते समदर्शी व भेदभावरहित असे होते.

दिशा हीच त्यांची वस्त्रे आणि रघुपतिचरित्रकथा जिथे चालली असेल तिथे जाऊन ती श्रवण करणे हेच त्यांचे व्यसन ! शंकर पार्वतीस स्मरण करून देतात की, ज्ञानी मुनिश्रेष्ठ अगस्तिऋषींच्या आश्रमात हे होते बरं का ! अरणीच्या मंथनाने अग्निहोत्री ज्याप्रमाणे अग्नी उत्पन्न करतात, त्याचप्रमाणे अगस्तिऋषींनी ज्ञान उत्पन्न करणारी पुष्कळ रामकथा वर्णन केली. ती सनकादिकांनी श्रवण केली व तेथून आता ते अयोध्येत समय जाणून आले.



दो० — देखि राम मुनि आवत हरषि दंडवत कीन्ह ।
स्वागत पूँछि पीत पट प्रभु बैठन कहँ दीन्ह ।। ३२ ।।

चौ० — कीन्ह दंडवत तीनिउँ भाई । सहित पवनसुत सुख अधिकाई ।।
मुनि रघुपति छबि अतुल बिलोकी । भए मगन मन सके न रोकी ।।
स्यामल गात सरोरुह लोचन । सुंदरता मंदिर भव मोचन ।।
एकटक रहे निमेष न लावहिं । प्रभु कर जोरें सीस नवावहिं ।।
तिन्ह कै दसा देखि रघुबीरा । स्रवत नयन जल पुलक सरीरा ।।
कर गहि प्रभु मुनिबर बैठारे । परम मनोहर बचन उचारे ।।
आजु धन्य मैं सुनहु मुनीसा । तुम्हरें दरस जाहिं अघ खीसा ।।
बड़े भाग पाइब सतसंगा । बिनहिं प्रयास होहिं भव भंगा ।।

दो० — संत संग अपबर्ग कर कामी भव कर पंथ ।
कहहिं संत कबि कोबिद श्रुति पुरान सदग्रंथ ।। ३३ ।।

चौ० — सुनि प्रभु बचन हरषि मुनि चारी । पुलकित तन अस्तुति अनुसारी ।।
जय भगवंत अनंत अनामय । अनघ अनेक एक करुनामय ।।
जय निर्गुन जय जय गुन सागर । सुख मंदिर सुंदर अति नागर ।।
जय इंदिरा रमन जय भूधर । अनुपम अज अनादि सोभाकर ।।

ते सनत्कुमार पुढून येत असलेले दिसताच रामचंद्रांनी त्यांना दण्डवत् नमस्कार केला. स्वागत करून त्यांना कुशल प्रश्न विचारले आणि बसण्यास आसन म्हणून आपल्या अंगावरील पिवळा शेला प्रभूनी जमिनीवर पसरला. ३२ त्याबरोबर तिन्ही भावांनी पवनसुतासह मुनींना दण्डवत् प्रणाम केला व त्यांना मोठे समाधान वाटले.

इकडे त्या मुनींनी रघुपतीचे अतुल्य रूप निरखून पाहण्यास सुरुवात केली आणि त्या सौंदर्यराशीने त्यांच्या मनाला अनावर केले. भवातून सोडविणाऱ्या, श्यामल शरीर, कमलनयन अशा सुंदरतेच्या मंदिराकडे ते पापण्या न हालवता टक लावून एकसारखे बघतच उभे राहिले. आसनावर बसलेच नाहीत! आणि हात जोडून, मस्तक विनम्र करून प्रभू त्यांच्यापुढे उभे!

सनत्कुमारांची ती प्रेममग्न स्थिती रघुवीराने पाहिली आणि त्यांच्याही नेत्रातून प्रेमाश्रू वाहू लागले व देहावर रोमांच उभे राहिले. अशा प्रेममग्न स्थितीत त्यांचा थोडा काळ गेल्यावर मुनिवरांचा हात धरून प्रभूनी त्यांना आसनावर बसवले. त्यानंतर श्रीरामचंद्र परम मनोहर असे वचन बोलले.

" अहो मुनिश्रेष्ठ! ऐका! आज मी धन्य झालो; कारण तुमचे दर्शन पापांच्या राशीचा संहार करणारे आहे! खरोखर अशी ही संतांची संगती महाभाग्याने मिळते; कारण त्यामुळे विनायासच भवाचा नाश होतो. संतांचा संग हा मोक्षाचा सुखद मार्ग असून, विषयी जनांची संगती हा भवसागरात खोल खोल नेणारा मार्ग आहे, असे संत, कवी, पंडित, वेद, पुराणे आणि इतर सद्ग्रंथ सांगतात. ३३

—सनकादिकृत स्तुती—

प्रभूंचे हे भाषण ऐकून चारी मुनींना हर्ष झाला; त्यांच्या सर्व शरीरांवर रोमांच उभे राहिले आणि त्यांनी एकमुखाने प्रभूची स्तुती केली.

" हे भगवंता! आपले ऐश्वर्य प्रकट करा. आपण अंतरहित, विकाररहित, पापरहित, विश्वरूपाने अनेक आणि आत्मरूपाने एक असून करुणामय आहात. तसेच निर्गुण असून, गुणाचे सागरही आपणच असल्याने आपला त्रिवार जय असो! आपण सुखाचे मंदिर असून, लावण्यराशी आहात. आपल्या चातुर्याला सीमाच नाही! हे महालक्ष्मीपते! आपला विजय असो! हे पृथ्वीला धारण करणाऱ्या प्रभो! आपला विजय असो!

ग्यान निधान अमान मानप्रद । पावन सुजस पुरान बेद बद ॥
तग्य कृतग्य अग्यता भंजन । नाम अनेक अनाम निरंजन ॥
सर्ब सर्बगत सर्ब उरालय । बससि सदा हम कहुँ परिपालय ॥
द्वंद बिपति भव फंद बिभंजय । हृदि बसि राम काम मद गंजय ॥

दो० — परमानंद कृपायतन मन परिपूरन काम ।
प्रेम भगति अनपायनी देहु हमहि श्रीराम ॥ ३४ ॥

चौ० — देहु भगति रघुपति अति पावनि । त्रिबिधि ताप भव दाप नसावनि ॥
प्रनत काम सुरधेनु कलपतरु । होइ प्रसन्न दीजै प्रभु यह बरु ॥
भव बारिधि कुंभज रघुनायक । सेवत सुलभ सकल सुख दायक ॥
मन संभव दारुन दुख दारय । दीनबंधु समता बिस्तारय ॥
आस त्रास इरिषादि निवारक । बिनय बिबेक बिरति बिस्तारक ॥
भूप मौलि मनि मंडन धरनी । देहि भगति संसृति सरि तरनी ॥
मुनि मन मानस हंस निरंतर । चरन कमल बंदित अज संकर ॥
रघुकुल केतु सेतु श्रुति रच्छक । काल करम सुभाउ गुन भच्छक ॥

“ आपण [illegible], जन्मरहित, अनादि असून. दोघेही केवळ [illegible] आहात. त्याचप्रमाणे ज्ञानाचे भांडार असून, स्वतः पूर्ण निरभिमानी आहात. [illegible] कोणीच करू शकणार नाही ! म्हणूनच आपल्या या [illegible] रंगून गेली आहेत !

“ आपण सर्वज्ञ, कृतज्ञ आणि अज्ञानाचा नाश करणारे आहात. [illegible] अनेक नावे असली तरी आपण वस्तुतः नामरहितच आहात ! त्याचप्रमाणे [illegible] विकार त्यांचा आपणावर काहीच परिणाम होऊ शकत नाही. असे आपण निरंजन आहात.

“ सर्वरूपी, सर्वव्यापक असून [illegible] आमचे सर्वप्रकारे पालन करा. अशी आमची प्रार्थना ! [illegible] आणि हे श्रीरामचंद्रा, आमच्या हृदयात [illegible]


“ आपण परमानंदस्वरूप, कृपेचे धाम आणि [illegible] आहात. म्हणून हे श्रीराम ! आपल्या चरणी [illegible]

याप्रमाणे चौघांनी स्तुती केली. [illegible] आपल्या मागणीची प्रार्थना करतात.

“ हे रघुपती ! त्रिविध [illegible] भवाच्या अभिमान [illegible] भक्ती द्या. शरणागतांच्या कामना [illegible] ! हे [illegible] सेवा करण्यास सुलभ व सकल सुख देणाऱ्या हे रघुनायका ! [illegible] ! आमच्या मनात उत्पन्न होणाऱ्या दारुण दुःखाचा नाश करा; आणि त्याच आमच्या मनात [illegible]

“ भय आशा, ईर्षा [illegible] निवारण करणारे [illegible] विनय, विवेक [illegible] लावणारे आहात. हे भूप-शिरोमणी ! [illegible] नेणारी आपली भक्ती आम्हाला द्या.

“ मुनींच्या मनरूपी [illegible] निरंतर नमन करतात. आपण रघुकुलाचे कीर्तिध्वज, वेदमार्गाचे [illegible]



तारन तरन हरन सब दूषन । तुलसिदास प्रभु त्रिभुवन भूषन ॥

दो० – बार बार अस्तुति करि प्रेम सहित सिरु नाइ ।
ब्रह्म भवन सनकादि गे अति अभीष्ट बर पाइ ॥ ३५ ॥

चौ० – सनकादिक बिधि लोक सिधाए । भ्रातन्ह राम चरन सिरु नाए ॥
पूछत प्रभुहि सकल सकुचाहीं । चितवहिं सब मारुतसुत पाहीं ॥
सुनी चहहिं प्रभु मुख कै बानी । जो सुनि होइ सकल भ्रम हानी ॥
अंतरजामी प्रभु सभ जाना । बूझत कहहु काह हनुमाना ॥
जोरि पानि कह तब हनुमंता । सुनहु दीनदयाल भगवंता ॥
नाथ भरत कछु पूँछन चहहीं । प्रस्न करत मन सकुचत अहहीं ॥
तुम्ह जानहु कपि मोर सुभाऊ । भरतहि मोहि कछु अंतर काऊ ॥
सुनि प्रभु बचन भरत गहे चरना । सुनहु नाथ प्रनतारति हरना ॥

दो० – नाथ न मोहि संदेह कछु सपनेहुँ सोक न मोह ।
केवल कृपा तुम्हारिहि कृपानंद संदोह ॥ ३६ ॥

चौ० – करउँ कृपानिधि एक ढिठाई । मैं सेवक तुम्ह जन सुखदाई ॥
संतन्ह कै महिमा रघुराई । बहु बिधि बेद पुरानन्ह गाई ॥

विनाश करणारे आहात. स्वतः तरून आपल्याबरोबर इतरांना तारता, आणि तरून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्यांच्या सर्व दूषणांचे हरण करता." [असे असल्याने हे तुलसीदासांच्या प्रभो ! आपण त्रैलोक्याचे एकमेव भूषण बनला आहात.]

सनत्कुमारांनी अशी पुनः पुन्हा स्तुती केली; प्रेमाने आपले मस्तक प्रभुचरणी नमवले आणि अत्यंत आवडता असा वर मिळाल्याने मोठ्या संतोषाने ते ब्रह्मलोकास गेले. ३५

याप्रमाणे स्तुती करून सनत्कुमार सत्य लोकास निघून जाताक्षणी भरतादिक भावांनी रामचरणी आपले मस्तक नमवले. मनात तर काही विचारण्याची उत्कट इच्छा, पण प्रभूना विचारण्याचा सगळ्यांनाच संकोच वाटू लागल्याने ते मारुतीच्या मुखाकडे सहेतुक दृष्टीने पाहू लागले.

ज्याच्या योगाने सगळ्या भ्रमांचा नाश होईल, अशी प्रभुमुखातील वाणी ऐकण्याची त्यांची सर्वांचीच उत्कट इच्छा आहे, हे अंतर्यामीत्व असणाऱ्या प्रभूंना जाणण्यास थोडाच वेळ लागणार ? लगेच रघुनाथांनी विचारले, " काम आहे काय ? "

तेव्हा हात जोडून हनुमंत म्हणाला, " दीनदयाळा भगवंता ! सांगतो, ऐका; नाथ ! भरत काही विचारू इच्छितात; पण त्यांच्या मनात विचारण्यास संकोच वाटत आहे. "

त्यावर श्रीरामचंद्र म्हणाले, " कपी ! तुम्ही माझा स्वभाव जाणताच; माझ्या अंतःकरणात भरताविषयी कधी तिळभर तरी आडपडदा आहे काय ?

हे प्रभूचे वचन ऐकून भरताने श्रीरघुनाथाचे पाय धरले व म्हणाला, " नाथ ! शरणागतांची दुःखे दूर करणाऱ्या भगवंता ! माझे म्हणणे ऐकून घ्यावे. हे नाथ ! आपल्या चरणकृपेने माझ्या अंतःकरणात आता कोणत्याही प्रकारची शंका उरली नाही; किंवा स्वप्नातसुद्धा शोक अगर मोह राहिला नाही. पण कृपानंदसागरा ! प्रभो ! हे सर्व आपल्या कृपेनेच झाले आहे. " ३६

" तथापि हे दयासागरा ! मी एक सेवक असून, आपण सेवकास सुख देणारे आहात, ही जाणीव ठेवून मी एक धाडस करत आहे. हे रघुपती ! संतांचा पुष्कळ महिमा वेद व पुराणे अनेक प्रकारे वर्णन

श्रीमुख तुम्ह पुनि कीन्हि बड़ाई । तिन्ह पर प्रभुहि प्रीति अधिकाई ।।
सुना चहउँ प्रभु तिन्ह कर लच्छन । कृपासिंधु गुन ग्यान बिचच्छन ।।
संत असंत भेद बिलगाई । प्रनतपाल मोहि कहहु बुझाई ।।
संतन्ह के लच्छन सुनु भ्राता । अगनित श्रुति पुरान बिख्याता ।।
संत असंतन्हि कै असि करनी । जिमि कुठार चंदन आचरनी ।।
काटइ परसु मलय सुनु भाई । निज गुन देइ सुगंध बसाई ।।

दो० – ताते सुर सीसन्ह चढ़त जग बल्लभ श्रीखंड ।
अनल दाहि पीटत घनहिं परसु बदन यह दंड ।। ३७ ।।

चौ० – बिषय अलंपट सील गुनाकर । पर दुख दुख सुख सुख देखे पर ।।
सम अभूतरिपु बिमद बिरागी । लोभामरष हरष भय त्यागी ।।
कोमलचित दीनन्ह पर दाया । मन बच क्रम मम भगति अमाया ।।
सबहि मानप्रद आपु अमानी । भरत प्रान सम मम ते प्रानी ।।
बिगत काम मम नाम परायन । सांति बिरति बिनती मुदितायन ।।
सीतलता सरलता मयत्री । द्विज पद प्रीति धर्म जनयत्री ।।
ए सब लच्छन बसहिं जासु उर । जानेहु तात संत संतत फुर ।।
सम दम नियम नीति नहिं डोलहिं । परुष बचन कबहूँ नहिं बोलहिं ।।

करतात; तसेच आपल्या श्रीमुखानेही त्यांचे महत्त्व अनेक वेळा वर्णिले आहे. संतांच्यावर प्रभूंची प्रीतीही अधिक असते; म्हणून गुण आणि ज्ञान यांत निपुण असणाऱ्या अशा कृपासिंधूच्या मुखातून मी अशा संतांची लक्षणे ऐकू इच्छितो. हे शरणागतांचे पालन करणाऱ्या प्रभो ! संत आणि असंत-'खल'-यांतील भेद वेगळा करून मला समजावून सांगा."

इतक्या प्रेमळपणाने व शुद्ध जिज्ञासेने आपल्या भावाने प्रश्न विचारलेला पाहून प्रभूंना समाधान झाले व त्यांनी लगेच बोलण्यास प्रारंभ केला–" हे बंधो ! संतांची लक्षणे ऐक; ती अगणित असून, वेद व पुराणांत प्रसिद्ध आहेत. कुऱ्हाड आणि चंदन जशी आचरणात असतात, तशीच असंत आणि संत यांची करणी असते.

" बंधो ! परशू चंदनाला तोडतो, कापतो, तरीसुद्धा चंदन आपला गोड सुगंध हा गुण त्या कापणाऱ्या परशूला देतो. एवढी क्षमाशीलता त्या चंदनाच्या ठिकाणी असल्यामुळे ते चंदन देवांच्या मस्तकावर चढते; आणि सर्व जगाला प्रिय होते. परंतु परशूला मात्र अग्नीत तापवून त्याच्या तोंडावर घणाचे घाव सपासप एक पडतात, असा दंड त्या परशूला मिळतो. ३७

" उत्तम प्रकारचे संत विषयोपभोगाला आसक्त नसतात; शीलाची व सद्गुणांची खाण असतात; परदुःख पाहून ते दुःखी होतात व दुसऱ्याच्या सुखात त्यांचे सुख समाधान सामावलेले असते. सर्वांवर सारखेच त्यांचे प्रेम असते व त्यांना जगांत शत्रुभाव कुठेच असत नाही. निगर्वी स्वभाव व वैराग्ययुक्त अंतःकरण त्यात लोभ, क्रोध, हर्ष आणि भीती यांना राहण्यास जागाच असत नाही.

" ते कोमल मनाचे असून, दीनांवर दया करणारे असतात; आणि मनाने, वाणीने व कृतीने कपटहीन अशी माझी भक्ती करतात. दुसऱ्या कोणालाही मान देण्यास ते नेहमी उत्सुक असतात. पण स्वतःस कुठे मान मिळावा अशी त्यांना चुकूनही इच्छा असत नाही. अशा सद्गुणांचे संत हे निवासस्थान असल्याने, भरता ! ते मला माझ्या प्राणासारखे प्रिय असतात.

" मध्यम प्रकारचे संतही अकाम असून, माझ्या नामात परायण असतात; शांती, वैराग्य, नम्रपणा व आनंदी स्वभाव हे सद्गुण त्यांच्या अंगी अखंड असतात. थंड स्वभाव, सरळ वागणूक, जगाशी मैत्री, धर्माला जन्म देणारे असे विप्रचरणी प्रेम; ही सगळी लक्षणे ज्याच्यात असतील तो, हे तात ! सदोदित खरा संत जाणावा.



दो० – निंदा अस्तुति उभय सम ममता मम पद कंज ।
ते सज्जन मम प्रानप्रिय गुन मंदिर सुख पुंज ।। ३८ ।।

चौ० – सुनहु असंतन्ह केर सुभाऊ । भूलेहुँ संगति करिअ न काऊ ।।
तिन्ह कर संग सदा दुखदाई । जिमि कपिलहि घालइ हरहाई ।।
खलन्ह हृदयँ अति ताप बिसेषी । जरहिं सदा पर संपति देखी ।।
जहँ कहुँ निंदा सुनहिं पराई । हरषहिं मनहुँ परी निधि पाई ।।
काम क्रोध मद लोभ परायन । निर्दय कपटी कुटिल मलायन ।।
बयरु अकारन सब काहू सों । जो कर हित अनहित ताहू सों ।।
झूठइ लेना झूठइ देना । झूठइ भोजन झूठ चबेना ।।
बोलहिं मधुर बचन जिमि मोरा । खाइ महा अहि हृदय कठोरा ।।

दो० – पर द्रोही पर दार रत धन पर अपबाद ।
ते नर पाँवर पापमय देह धरें मनुजाद ।। ३९ ।।

चौ० – लोभइ ओढ़न लोभइ डासन । सिस्नोदर पर जमपुर त्रास न ।।

" शम, दम, नियम आणि नीती यांचा त्याग जे कधीच करत नाहीत, ज्यांच्या तोंडातून कठोर शब्द कधीही येत नाही, निंदा व स्तुती यांना जे समान किंमत देतात, आणि ज्यांची माझ्या चरणकमली ममता असते; ते गुणमंदिर व सुखराशी संत मला प्राणासारखे प्रिय असतात. " ३८

–याप्रमाणे सर्वश्रेष्ठ, उत्तम व मध्यम प्रकारच्या संतांची लक्षणे सांगून झाल्यानंतर प्रभू खलांची लक्षणे सांगतात.— " आता खलांचा स्वभाव ऐका; आणि कोणत्याही काळी चुकूनसुद्धा त्यांची संगत करू नका. सुशील, गरीब गायीला जशा ओढाळ गायी बिघडवतात, त्याचप्रमाणे या खलांच्या संगतीने अखेर दुःख ठरलेलेच असते.

" या खलांच्या हृदयात नेहमीच कोणती ना कोणती आग पेटलेलीच असते. मुख्यतः दुसऱ्याची संपत्ती पाहून ते सदोदित जळत असतात; परंतु जर कुठे दुसऱ्याची निंदा चाललेली त्यांच्या कानी आली तर त्यांना मोहोराचा हंडा सापडल्याप्रमाणे मोठा हर्ष होतो. काम, क्रोध, लोभ आणि मद या दुष्ट भावनांना ते अखंड बळी पडलेले असतात; त्यामुळे त्यांची अंतःकरणे निर्दय, कपटी, कुटिल व सर्व प्रकारच्या पापांची निवासस्थाने बनलेली असतात.

" या खलांचे सर्वांशीच निष्कारण वैर असते. इतरांच्याप्रमाणे त्यांच्या समजुतीप्रमाणे त्यांचे अनहित करणारे जे असतील, त्याशी ते रीतसर वैर करतातच, पण खलांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे खरोखर हित करणारे जे असतील त्यांच्याशीसुद्धा यांचे वैर असतेच.

" खोटेपणाची तर कमालच खलांच्या ठिकाणी झालेली असते. खाण्यापिण्यात जसा खोटेपणा, तसा देणेघेणेसुद्धा खोटेपणाच ! भोजनसुद्धा खोटेपणाशिवाय त्यांचे होत नाही ! भाषा अगदी मोराप्रमाणे मधुर आणि हृदय त्याच्याप्रमाणेच महा विषारी सर्प खाऊन त्याच्या जहराने ओतप्रोत भरलेले, त्यामुळे कमालीचे कठोर बनलेले असते.

" दुसऱ्यांचा द्रोह करणे, परस्त्रिया व परद्रव्य आणि परनिंदा यांच्या ठिकाणी विलक्षण आवड. अशा प्रकारचे लोक अत्यंत नीच असून, जन्माने जरी ते मनुष्याच्या देहात अवतरले असले तरी नरभक्षक राक्षसच असतात हे लक्षात ठेवावे. ३९

" यानंतर या खलांचा लोभ केवढा पाहा– त्यांचे अंथरूण लोभ व पांघरूणसुद्धा लोभच ! पशूप्रमाणे उदरभरण करून स्त्रीविषयाचा उपभोग घेणे एवढेच जीवनाचे श्रेष्ठ कर्तव्य ते समजतात. असे करत असता यमयातनांची ते कदर बिलकुल बाळगत नाहीत !

काहू की जौं सुनहिं बड़ाई । स्वास लेहिं जनु जूड़ी आई ।।
जब काहू कै देखहिं बिपती । सुखी भए मानहुँ जग नृपती ।।
स्वारथ रत परिवार बिरोधी । लंपट काम लोभ अति क्रोधी ।।
मातु पिता गुर बिप्र न मानहिं । आपु गए अरु घालहिं आनहिं ।।
करहिं मोह बस द्रोह परावा । संत संग हरि कथा न भावा ।।
अवगुन सिंधु मंदमति कामी । बेद बिदूषक परधन स्वामी ।।
बिप्र द्रोह पर द्रोह बिसेषा । दंभ कपट जियँ धरें सुबेषा ।।

दो० — ऐसे अधम मनुज खल कृतजुग त्रेताँ नाहिं ।
द्वापर कछुक बृंद बहु होइहहिं कलिजुग माहिं ।। ४० ।।

चौ० — पर हित सरिस धर्म नहिं भाई । पर पीड़ा सम नहिं अधमाई ।
निर्नय सकल पुरान बेद कर । कहेउँ तात जानहिं कोबिद नर ।।

" त्यांच्या स्वभावाची मौज मात्र मोठी गमतीदार असते. दुसऱ्याच्या अभ्युदयाची वार्ता जर चुकून त्या खलांच्या कानी आले तर ते एवढा दीर्घ श्वासोच्छ्वास घेऊ लागतात की, लोकांना वाटावे यांना हीवच भरत आहे! परंतु त्याच्या उलट एखाद्यावर भयंकर आपत्ती कोसळली असे जर यांना समजले तर त्यांना एवढे सुख होते की, जणू पृथ्वीचे साम्राज्यच त्यांना लाभले आहे!

" सदोदित स्वार्थाशिवाय दुसरी भाषा नाही. त्यामुळे अगदी जवळच्या आप्तकुटुंबीयांविषयी त्यांचे मन साफ नसतेच! विषयसुखाच्या बाबतीत अगदी रक्तात मुरलेले गोचीड! त्यामुळे ते अत्यंत कामी असतात. त्या एका दोषाच्या पाठोपाठच त्याचे दुसरे दोन बंधू लोभ आणि क्रोध हे दोष खलांच्या ठिकाणी पराकोटीस जाऊन पोचलेले असतात.

" या सर्व दोषांचा असा साठा झाल्यामुळे साहजिकच ते आई, बाप, गुरु, ब्राह्मण इत्यादि वंदनीय वडिलांच्यापैकी कोणालाच जुमानीत नाहीत व दुर्वर्तनाचा असा विक्रम करून देतात की, त्यांचा स्वतःचा नाश तर ते करून घेतातच, पण त्याबरोबरच त्यांच्या अनिष्ट कृतीचे अंधानुकरण करणाऱ्या इतर सर्वांचाही नाश झाल्याशिवाय राहत नाही.

" अज्ञानामुळे उत्पन्न होणारा मोह त्यांना परद्रोह करण्यास प्रवृत्त करतो. त्यापासून सुटका होण्यास लागणारा संतसंग व हरिकथेची आवड; परंतु या गोष्टींचा त्यांना मनापासून तिटकारा!

" अशा प्रकारे खल हे दुर्गुणांचे सागर, चलाख पण हीन बुद्धीचे, विषयांत रममाण होणारे किडे, वेदांची निंदा करणारे, दुसऱ्याची संपत्ती दुष्ट कारवाया करून लुबाडणारे आणि त्यावर गबर बनलेले असतात. हे नीच लोक सर्वांचा द्वेष करतातच, पण त्यातल्यात्यात ब्राह्मणवर्गाचा द्वेष यांच्या रोमरोमात भिनलेला असतो. ढोंग व कपटकारस्थानांनी त्यांचे अंतरंग जरी पूर्ण बरबटलेले असले तरी त्यांचा बाहेरील पोषाख, बोलण्याची भाषा व वागण्याची शिस्त इतकी बेमालूम असते की, मी मी म्हणणाऱ्यांनाही त्यांच्या नीच अंतरंगाचा सुगावा लागणे कठीण!

" असले नीच खल कृत व त्रेतायुगात जन्मालाच येत नाहीत; द्वापारयुगात तुरळक दिसू लागतात; आणि कलियुगात मात्र यांचीच बहुसंख्या होऊन साहजिकच सामाजिक जीवनाचे यंत्र त्यांच्याच तंत्राने सुरू होते." ४०

संत व असंतांच्या गुणवर्णन प्रकरणाचा समारोप करण्याच्या दृष्टीने शेवटी प्रभू म्हणाले, " हे बंधू! तात्पर्य काय की, परहितासारखा धर्म नाही व परपीडेसारखे अधम काही नाही. हाच सर्व पुराणांचा वेदांचा निर्णय असून, पंडितांना तोच मान्य असल्याने मी त्याचा एवढा ऊहापोह केला."



नर सरीर धरि जे पर पीरा । करहिं ते सहहिं महा भव भीरा ॥
करहिं मोह बस नर अघ नाना । स्वारथ रत परलोक नसाना ॥
कालरूप तिन्ह कहँ मैं भ्राता । सुभ अरु असुभ कर्म फल दाता ॥
अस बिचारि जे परम सयाने । भजहिं मोहि संसृत दुख जाने ॥
त्यागहिं कर्म सुभासुभ दायक । भजहिं मोहि सुर नर मुनि नायक ॥
संत असंतन्ह के गुन भाषे । ते न परहिं भव जिन्ह लखि राखे ॥

दो० — सुनहु तात माया कृत गुन अरु दोष अनेक ।
गुन यह उभय न देखिअहिं देखिअ सो अबिबेक ॥ ४१ ॥

चौ० — श्रीमुख बचन सुनत सब भाई । हरषे प्रेम न हृदयँ समाई ॥
करहिं बिनय अति बारहिं बारा । हनूमान हियँ हरष अपारा ॥
पुनि रघुपति निज मंदिर गए । एहि बिधि चरित करत नित नए ॥
बार बार नारद मुनि आवहिं । चरित पुनीत राम के गावहिं ॥
नित नव चरित देखि मुनि जाहीं । ब्रह्मलोक सब कथा कहाहीं ॥
सुनि बिरंचि अतिसय सुख मानहिं । पुनि पुनि तात करहु गुन गानहिं ॥

" मनुष्यासारखे सारासार विचार करणारे शरीर मिळूनसुद्धा जे दुसऱ्याचा छळ करतात, त्यांना कायमपणे भयंकर अशा जन्म मृत्युरूपी चौऱ्यांशी लक्ष योनींच्या फेऱ्यात फिरावे लागते. कारण मोहामुळे मनुष्य स्वार्थपरायण होतो व नाना प्रकारची पापे करतो. मग त्याचा परलोक बुडणार हे उघडच ! त्यांच्या शुभ किंवा अशुभ कर्मांचे फळ मात्र शेवटी मलाच काळाच्या रूपाने त्यांच्या पदरी टाकावे लागते.

" ही वस्तुस्थिती ध्यानी घेऊन जे परम शहाणे असतात, त्यांना जन्म-मरणाचा भोवरापुढे स्पष्ट दिसत असल्याने ते मला शरण येतात. पुण्य व पाप यांची दोन प्रकारची फळे देणारे सर्व कर्म ते सोडून देतात आणि देवांना मानवांना व [illegible] वंदनीय अशा मला ते भजतात.

" आतापर्यंत संताचे सद्गुण व असंतांचे दुर्गुण जे मी सांगितले ते जे लक्षात ठेवतात त्यांना भवसागराची भीती उरत नाही !

" हे तात ! एक महत्त्वाचे तत्त्व सांगतो ते ऐका. सर्व गुण आणि दोष हे मायेनेच निर्माण केलेले आहेत. अशा स्थितीत कोणाचेही गुणदोष पाहात न बसणे हाच गुण असून, त्यांची चिकित्सा करू लागणे हा अविवेक आहे. " ४१

प्रभूच्या मुखातून आपणाला अपेक्षित असे ते भाषण ऐकून भरतादि बंधूंना मोठा आनंद होऊन त्यांच्या हृदयात प्रेम मावेना ! त्यांनी वारंवार भगवंताची स्तुती आपल्या मनाचे समाधान होईपर्यंत केली, तेव्हा हनुमंताच्या अंतर्यामी हर्षाच्या लाटा उसळू लागल्या.

वरील कार्यक्रम संपताच रघुपती आपल्या मंदिरात परत फिरले.

—अशा प्रकारच्या प्रभूच्या नवीन लीलांनी [illegible] दिवस जाऊ लागले.

ब्रह्मर्षी नारदांचेही आगमन अयोध्येला पुनः पुन्हा होई आणि श्रीरामाचे पावन चरित्र त्यांच्या मुखाने गाइलेले नागरिकांना ऐकण्याचा लाभ होत असे.

अयोध्येत आल्यावर त्यांना नित्य नवे प्रभुचरित्र पाहावयास मिळे आणि तिचे रसभरित वर्णन सत्यलोकात परत जाऊन सांगण्याची एकही संधी ते वाया जाऊ देत नसत. नारदांच्या मुखातील ते भगवद्गुणगान ऐकत असता ब्रह्मदेव परम सुखी होऊन म्हणत, " तात ! एवढ्याने समाधान होत नाही. त्याच कथेचे पुनः गुणगायन कर पाहू ! "

सनकादिक नारदहि सराहहिं । जद्यपि ब्रह्म निरत मुनि आहहिं ॥
सुनि गुन गान समाधि बिसारी । सादर सुनहिं परम अधिकारी ॥
दो०—जीवनमुक्त ब्रह्मपर चरित सुनहिं तजि ध्यान ।
जे हरि कथाँ न करहिं रति तिन्ह के हिय पापान ॥ ४२ ॥
चौ०—एक बार रघुनाथ बोलाए । गुर द्विज पुरबासी सब आए ॥
बैठे गुर मुनि अरु द्विज सज्जन । बोले बचन भगत भव भंजन ॥
सुनहु सकल पुरजन मम बानी । कहउँ न कछु ममता उर आनी ॥
नहिं अनीति नहिं कछु प्रभुताई । सुनहु करहु जो तुम्हहि सोहाई ॥
सोइ सेवक प्रियतम मम सोई । मम अनुसासन मानै जोई ॥
जौं अनीति कछु भाषौं भाई । तौं मोहि बरजहु भय बिसराई ॥
बड़ें भाग मानुप तनु पावा । सुर दुर्लभ सब ग्रंथन्हि गावा ॥
साधन धाम मोच्छ कर द्वारा । पाइ न जेहिं परलोक सँवारा ॥
दो०—सो परत्र दुख पावइ सिर धुनि धुनि पछिताइ ।
कालहि कर्महि ईस्वरहि मिथ्या दोप लगाइ ॥ ४३ ॥

सनकादि मुनीसुद्धा वस्तुतः अखंड ब्रह्मानंद समाधीन असावयाचे, परंतु नारदाच्या मुखातून श्रीरघुनाथ-लीला-गायन सुरू होताच ते डोलू लागत व त्यांच्याकडे स्तुतीचा वर्षाव करीत. कारण अशा वेळी हे गुणगान श्रवण करत असता त्यांना स्वतःच्या समाधिसुखाचा विसर पडे व या कथेचे श्रवण करण्याचा त्यांचा श्रेष्ठ अधिकार असल्याने त्यांच्या हृदयात परमादर निर्माण होई.

याप्रमाणे जीवन्मुक्त व ब्रह्मनिष्ठसुद्धा ध्यानाचा त्याग करून हरिकथा श्रवण करण्यात तल्लीन होत !

हे स्पष्ट कळल्यानंतरही ज्यांच्या हृदयात हरिकथेची आवड उत्पन्न होत नाही, त्यांची अंतःकरणे दगडाचीच बनलेली असली पाहिजेत ! ४२

—पुरजन गीता—

अशाप्रकारे सर्वत्र आनंदी-आनंद चालू असता एके दिवशी रघुनाथाने सर्वांना बोलावले; तेव्हा वसिष्ठ गुरू, श्रेष्ठ ब्राह्मण, आणि सर्व नागरिक स्त्रिया व पुरुष आले.


गुरू, मुनी, ब्राह्मण व इतर सर्व सज्जन आपापल्या स्थानी सभेत बसलेले आहेत असे पाहून, भक्तांच्या जन्ममरणरूप दुःखाचा विनाश करणारे श्रीरघुनाथ बोलू लागले—

"सर्व पुरवासी लोक हो ! मी काय सांगतो ते लक्षपूर्वक ऐका. कोणताही स्वार्थ मनात धरून मी बोलणार नाही, याची खात्री बाळगा. त्याचप्रमाणे सत्तेच्या जोरावर मी आपल्यापुढे कोणत्याही अनाचाराचाही प्रचार करणार नाही. माझ्या भाषणातून मी जो आदेश करणार आहे, तो आपण शांतपणाने ऐकून समजून घ्या, आणि जर तो तुमच्या बुद्धीला पटला तर मात्र त्याप्रमाणे वागण्यास सुरुवात करा. याप्रसंगी ही एक गोष्ट आपल्या नजरेस मी आणू इच्छितो की, माझी आज्ञा जो पाळतो तोच माझा खरा सेवक व तोच माझा सर्वांत आवडता !

" असे आहे तरी, बंधूनो, मी काही अनीती सांगितली तर निर्भयपणे तुम्ही माझा निषेध करा.

" असो. आपण सर्वांना मिळालेला मनुष्यदेह हा महाभाग्याने लाभ झालेला आहे. हा नरदेह मिळणे देवांनासुद्धा फार कठीण आहे अशी वर्णने पुराणादि सद्ग्रंथातून केलेली आहेत आणि ती यथार्थही आहेत. कारण हा मानव देह म्हणजे खरोखर साधनांचे माहेरघर असून मोक्षाचे हे एक उघडलेले दारच आहे.

" अशा प्रकारचा हा नरदेह मिळूनसुद्धा जे मोक्षाची जोड करत नाहीत, ते मेल्यानंतर त्यांना नाना प्रकारची असह्य दुःखे भोगावी लागतात. त्यावेळी ते आपले मस्तक बडवून घेतात व अनेक रीतीने रडून पश्चात्ताप करतात. तेव्हा काळाला, कर्माला आणि प्रसंगी ईश्वरालासुद्धा निष्कारण दोष देतात !" ४३



चौ ०—एहि तन कर फल विषय न भाई । स्वर्गउ स्वल्प अंत दुखदाई ।।
नर तनु पाइ विषयँ मन देहीं । पलटि सुधा ते सठ बिष लेहीं ।।
ताहि कबहुँ भल कहइ न कोई । गुंजा ग्रहइ परस मनि खोई ।।
आकर चारि लच्छ चौरासी । जोनि भ्रमत यह जिव अबिनासी ।।
फिरत सदा माया कर प्रेरा । काल कर्म सुभाव गुन घेरा ।।
कबहुँक करि करुना नर देही । देत ईस बिनु हेतु सनेही ।।
नर तनु भव बारिधि कहुँ बेरो । सन्मुख मरुत अनुग्रह मेरो ।।
करनधार सद्गुर दृढ नावा । दुर्लभ साज सुलभ करि पावा ।।

दो ०—जो न तरै भव सागर नर समाज अस पाइ ।
सो कृत निंदक मंदमति आत्माहन गति जाइ ।। ४४ ।।

चौ ०—जौं परलोक इहाँ सुख चहहू । सुनि मम बचन हृदयँ दृढ़ गहहू ।।
सुलभ सुखद मारग यह भाई । भगति मोरि पुरान श्रुति गाई ।।
ग्यान अगम प्रत्यूह अनेका । साधन कठिन न मन कहुँ टेका ।।
करत कष्ट बहु पावइ कोऊ । भक्ति हीन मोहि प्रिय नहिं सोऊ ।।

म्हणून बंधूंनो ! हे लक्षात पक्के ठेवा की, या नरतनूचे फळ विषयोपभोग हे नाही बरं. इतकेच नव्हे, स्वर्गातील सर्व प्रकारची सुखेसुद्धा या नरतनूपुढे अगदी तुच्छ असून, परिणामी दुःखदायकच असतात.

" अशी वस्तुस्थिती असल्याने परम भाग्याने ज्यांना नरतनू मिळूनसुद्धा जे जीव विषयसुख घेण्यात आपल्या मनाला रमवतात, ते अमृत देऊन त्याच्या मोबदल्यात विष घेण्याइतके महामूर्ख असतात. खरोखर हातातील परीस टाकून देऊन जो गुंजा गोळा करत बसतो, त्याला कोणी तरी शहाणा म्हणेल काय ?

" [illegible] मोलाचा हा मानवी देह परम भाग्याने [illegible] हा अविनाशी जीव चार खाणी आणि चौऱ्यांयशी लक्ष योनींतून भ्रमण करत असतो. याचे अशा प्रकारे अखंड भटकण्याचे कारण म्हणजे मायेच्या प्रेरणेने प्रकृती, काळ, कर्म आणि गुण यांनी ते घेरलेले असतात.

" अशा प्रकारे अनेक योनीतून अखंड [illegible] जीवाची ईश्वराला केव्हातरी करुणा येते. याचे कारण तो प्रभू जीवावर निर्हेतुक स्नेह करणारा त्याचा सुहृद आहे; म्हणून त्याच्यावर दया करून तो त्या जीवाला मनुष्य देहात जन्माला घालतो.

पूर्वी [illegible] नरदेह हा त्याला या भवसागरातून तरून जाण्यासाठी एखाद्या जहाजाप्रमाणे मिळतो. शिवाय माझ्या कृपेचा अनुकूल वारा सुटून त्याला इष्ट दिशेला जाण्यास मदत होते; आणि पूर्वसुकृताने सुकाणू बळकट धरण्यास सद्गुरू मिळाले की, सर्व संच अत्यंत दुर्लभ असूनही जीवाला भाग्याने सुलभ होऊन त्याच्या हाती येतो !

" परंतु जो मनुष्य या सर्व दुर्लभ गोष्टी मिळूनही जर भवसागर तरून गेला नाही, तर हीनबुद्धीच्या जीवाला माझ्याशी कृतघ्न झाल्याचे महापातक लागून अखेर त्याला आत्महत्या करणाराची घोर नरकयातना भोगावी लागते. " ४४

" एवढ्यासाठी इहलोकी सुख मिळून परलोकी सद्गतिसुख मिळावे अशी जर इच्छा असेल तर मी सांगतो ते मनःपूर्वक ऐकून अंतःकरणात खोल साठवून ठेवा.

बंधूंनो ! सुलभ आणि सुखदायक असा मार्ग म्हटला म्हणजे—वेदपुराणात वर्णिलेली माझी भक्ती हाच होय. ज्ञानमार्ग कळण्यास कठीण असून, शिवाय त्यात अपार विघ्ने आहेत. त्या मार्गाने जाणाऱ्याच्या मनाला आधार मुळीच नसल्यामुळे त्याचे साधन करणे अत्यंत दुष्कर होते. अशाही स्थितीत महाप्रसाने एखाद्याला ते ज्ञान मिळते, परंतु भक्तिहीन ज्ञानी मला मुळीच आवडत नाही.

भाक्ति सुतंत्र सकल सुख खानी । बिनु सतसंग न पावहिं प्रानी ॥
पुन्य पुंज बिनु मिलहिं न संता । सतसंगति संसृति कर अंता ॥
पुन्य एक जग महुँ नहिं दूजा । मन क्रम बचन बिप्र पद पूजा ॥
सानुकूल तेहि पर मुनि देवा । जो तजि कपटु करइ द्विज सेवा ॥

दो०—औरउ एक गुपुत मत सबहि कहउँ कर जोरि ।
संकर भजन बिना नर भगति न पावइ मोरि ॥ ४५ ॥

चौ०—कहहु भगति पथ कवन प्रयासा । जोग न मख जप तप उपवासा ॥
सरल सुभाव न मन कुटिलाई । जथा लाभ संतोष सदाई ॥
मोर दास कहाइ नर आसा । करइ तौ कहहु कहा बिस्वासा ॥
बहुत कहउँ का कथा बढ़ाई । एहि आचरन बस्य मैं भाई ॥
बैर न बिग्रह आस न त्रासा । सुखमय ताहि सदा सब आसा ॥
अनारंभ अनिकेत अमानी । अनघ अरोष दच्छ बिग्यानी ॥
प्रीति सदा सज्जन संसर्गा । तृन सम बिषय स्वर्ग अपबर्गा ॥
भगति पच्छ हठ नहिं सठताई । दुष्ट तर्क सब दूरि बहाई ॥

"याच्या उलट, भक्ती पूर्ण स्वतंत्र असून, तिच्यामुळे मानव पूर्ण सुखी होतो. [illegible] भक्ती संतांच्या संगतीशिवाय मात्र कोणालाच मिळत नाही. आणि पुण्य[illegible] संतांची भेट होत नाही. कारण ही सत्संगती प्राप्त झाली की जन्ममरण दुःखाचा नाश [illegible].

"आता ज्या पुण्याईच्या जोरावर असा सत्संग लाभावयाचा त्या पुण्याई[illegible] आहे. त्याच्या जोडीचे दुसरे पुण्यच नाही. असे हे श्रेष्ठपुण्य म्हणजे मनाने, कृतीने व वाचेने विप्रांच्या चरणांची सेवा करणे होय. म्हणून निष्कपट होऊन जो कोणी ब्राह्मणांची सेवा करतो, त्यांच्यावर सर्व देव आणि मुनी प्रसन्न असतात.

"याशिवाय आणखी एक गुप्त रहस्य आहे. ते मी आपणाला हात जोडून [illegible] – शंकर भजनाशिवाय माझ्या भक्तीचा लाभ कोणालाही कधीही होऊ शकत नाही." ४५

"असो. यापूर्वी ज्या भक्तिमार्गाचे श्रेष्ठ मार्ग म्हणून स्तुति केली [illegible] पडतात ते तरी सांगा. या मार्गाने जागारात्र योग नको, यज्ञयाग नको, [illegible] नकोत !

"गरज आहे ती स्वाभाविक [illegible]. मनात कपट न [illegible] त्यांत चित्त संतुष्ट ठेवण्याची ! [illegible] त्याने इतर साधनांची जर आशा बाळगली तर त्याचा माझ्यावर [illegible] !

"फार विस्तार करून सांगण्याची गरजच आहे कुठे ? बंधूंनो, असे [illegible] होतो, हे त्रिकाल सत्य आहे. असा माझा जो भक्त असतो, तो कोणाशी वैर [illegible] भांडणही करत नाहीत. त्याला माझ्यावाचून कशाचीही आशा [illegible] राहात नाही. दाही दिशांना [illegible].

"ज्याप्रमाणे निषिद्ध कर्म तो करत नाही, त्याचप्रमाणे [illegible] इच्छा राहात नाही. कोणत्याही घरदार किंवा स्थानावर त्याची आसक्ती न [illegible] इच्छा असत नाही. तो निष्पाप कधीही न रागावणारा, [illegible] असतो. त्याला संतांच्या संगतीची आवड असते व [illegible] मानतो. भक्ति-पक्षात तो हट्ट धरतो, पण वेडेपणा मात्र करत नाही. [illegible] कल्पही [illegible]



दो०—मम गुन ग्राम नाम रत गत ममता मद मोह ।
ता कर सुख सोइ जानइ परानंद संदोह ॥ ४६ ॥

चौ०—सुनत सुधासम बचन राम के । गहे सबनि पद कृपाधाम के ॥
जननि जनक गुर बंधु हमारे । कृपा निधान प्रान ते प्यारे ॥
तनु धनु धाम राम हितकारी । सब बिधि तुम्ह प्रनतारति हारी ॥
असि सिख तुम्ह बिनु देइ न कोऊ । मातु पिता स्वारथ रत ओऊ ॥
हेतु रहित जग जुग उपकारी । तुम्ह तुम्हार सेवक असुरारी ॥
स्वारथ मीत सकल जग माहीं । सपनेहुँ प्रभु परमारथ नाहीं ॥
सब के बचन प्रेम रस साने । सुनि रघुनाथ हृदयँ हरषाने ॥
निज निज गृह गए आयसु पाई । बरनत प्रभु बतकही सुहाई ॥

दो०—उमा अवधबासी नर नारी कृतारथ रूप ।
ब्रह्म सच्चिदानंद घन रघुनायक जहँ भूप ॥ ४७ ॥

चौ०—एक बार बसिष्ट मुनि आए । जहाँ राम सुखधाम सुहाए ॥
अति आदर रघुनायक कीन्हा । पद पखारि पादोदक लीन्हा ॥
राम सुनहु मुनि कह कर जोरी । कृपासिंधु बिनती कछु मोरी ॥

कुतर्कांना जागा बिलकुल देत नाही. माझ्या गुणसमूहात व माझ्या नामस्मरणात तो नेहमी रंगलेला असतो. त्याच्या हृदयात ममता, मद, मोह नसतो.—अशा लक्षणांनी युक्त असलेला जो माझा भक्त, त्याला मी वश होतो; आणि त्यामुळे त्याचे सुख तोच जाणतो व तो परमानंदसागरात अखंड पोहत राहतो. " ४६

—पुरजनकृत स्तुती—

श्रीरामाचे अमृतासारखे हे भाषण ऐकून त्या सर्वांनी कृपाधामाचे पाय धरले. त्यांची अंतःकरणे भरून आली व मुखातून शब्द बाहेर पडले. " हे कृपानिधी ! आपणच आमचे आई, बाप, बंधू इत्यादि सर्व आहात. त्यामुळे आमच्या प्राणापेक्षाही अधिक प्रिय आपण झाला आहात. शरणागतांचे दुःख हरण करणाऱ्या रामा ! आपणच आमचे तन, धन, धाम आणि सर्वतोपरि हितकर्ते आहात.

आतापर्यंत आपण जो आम्हाला उपदेश केला, तसा दुसरा कोणीच करणे शक्य नाही. आई-बाप हितकर्ते व उपदेश करणारे असतात परंतु त्यांचे प्रेमसुद्धा स्वार्थीच ! हे असुरारी ! आपण आणि आपले सेवक असे दोनच जगात खरे निरपेक्ष उपदेश करणारे ! बाकीचे सर्व स्वार्थाने भारलेलेच ! स्नेही आणि मित्र ! हे प्रभो ! या पृथ्वीच्या पाठीवर खरा परमार्थी मित्र स्वप्नातसुद्धा कोणी सापडणार नाही. "

लोकांचे हे प्रेमरसाळ भाषण ऐकले आणि श्रीरघुनाथ आपल्या हृदयात हर्षित झाले.

सर्व लोक प्रभूंची आज्ञा घेऊन आपापल्या घरी चालले, परंतु जाताना सर्वांच्या तोंडी श्रीरामचंद्रांच्या सुंदर भाषणाच्या स्तुतीचा एकच विषय ! सर्वत्र सगळीकडे सारखाच चालू होता.

शंकर पार्वतीला म्हणतात, " उमे ! ज्याठिकाणी सच्चिदानंदन ब्रह्मच श्रीरघुपती म्हणून सिंहासनावर भूप होऊन विराजमान झाले, त्या अयोध्यानगरीतील पुरुष आणि स्त्रिया कृतार्थ आहेत हे सांगणे नकोच !"४७

सुखाचे धाम अत्यंत मनोहर असे. श्रीराम आपल्या मंदिरात बसले असता एके दिवशी त्या ठिकाणी मुनिवर वसिष्ठ आले. रघुनायकांनी त्यांचा आदर-सन्मान करून त्यांचे पाय धुतले आणि चरणतीर्थ प्राशन केले ! परंतु त्यानंतरची घटना अगदीच अपूर्व अशी घडली. मुनिश्रेष्ठांनीच हात जोडून सद्गदित अंतःकरणाने बोलण्यास सुरुवात केली—

" हे कृपासागरा, श्रीरामा ! माझी थोडीशी विनंती आहे. ती ऐकून घ्यावी ! आपल्या निकट सान्निध्यात

देखि देखि आचरन तुम्हारा । होत मोह मम हृदयँ अपारा ।।
महिमा अमिति बेद नहिं जाना । मैं केहि भाँति कहउँ भगवाना ।।
उपरोहित्य कर्म अति मंदा । बेद पुरान सुमृति कर निंदा ।।
जब न लेउँ मैं तब बिधि मोही । कहा लाभ आगें सुत तोही ।।
परमातमा ब्रम्ह नर रूपा । होइहि रघुकुल भूषन भूपा ।।
दो० — तब मैं हृदयँ बिचारा जोग जग्य ब्रत दान ।
जा कहुँ करिअ सो पैहउँ धर्म न एहि सम आन ।। ४८ ।।
चौ० — जप तप नियम जोग निज धर्मा । श्रुति संभव नाना सुभ कर्मा ।।
ग्यान दया दम तीरथ मज्जन । जहँ लगि धर्म कहत श्रुति सज्जन ।।
आगम निगम पुरान अनेका । पढ़े सुने कर फल प्रभु एका ।।
तव पद पंकज प्रीति निरंतर । सब साधन कर यह फल सुंदर ।।
छूटइ मल कि मलहि के धोएँ । घृत कि पाव कोइ बारि बिलोएँ ।।
प्रेम भगति जल बिनु रघुराई । अभिअंतर मल कबहुँ न जाई ।।
सोइ सर्बग्य तग्य सोइ पंडित । सोइ गुन गृह बिग्यान अखंडित ।।
दच्छ सकल लच्छन जुत सोई । जाकें पद सरोज रति होई ।।

दीर्घकाळ घालविला व आपले आदर्श आचरण पुनः पुन्हा असे अनेक वेळा पाहिले; त्यामुळे माझ्या हृदयाला अमर्याद मोह उत्पन्न होतो; आणि ते साहजिकच आहे. कारण आपला महिमाच अगाध असून त्याचे पूर्ण ज्ञान प्रत्यक्ष वेदांनासुद्धा होत नाही ! मग भगवंता ! तो मला कसा वर्णन करता येईल ?

" तसे पाहिले तर हा आमचा पुरोहिताचा धंदा अत्यंत नीच ! वेद, पुराणे व स्मृती ग्रंथांनीसुद्धा या धंद्याची भरपूर निंदा केलेली दिसते. हे जाणूनच [illegible] काम करण्याचे मी नाकारले. तेव्हा ब्रह्मदेव मला म्हणाले. " पुत्रा ! अरे हे काम तुला घेण्यास सांगण्यात आमचा मोठा हेतु आहे. तुला पुढे मोठा लाभ होणार आहे. अरे ! परमात्मा ब्रह्मच मनुष्यरूपाने रघुकुलाचे भूषण असे भूपती होणार आहेत ! "

" हे पित्याचे भाषण ऐकून मी मनात विचार करू लागलो, ज्योअर्थी ज्यांच्या प्राप्तीसाठी योग, यज्ञ, व्रते आणि दाने करतात त्यांचीच जर या कुलात हा धंदा करून जोड होणार असेल तर मग या पुरोहिताच्या धंद्यासारखा निंद्य नव्हे, श्रेष्ठ असा दुसरा व्यवसायच मिळणार नाही ! " ४८

" जप, तप, नियम, योग, वर्णाश्रमधर्म, वेदांनी सांगितलेली नाना शुभ कर्मे. ज्ञान, दया इंद्रियनिग्रह तीर्थयात्रा इत्यादि वेदांनी व संतांनी जितके धर्म सांगितले आहेत त्या सर्वांचे आणि हे प्रभो ! वेद, शास्त्रे, पुराणे इत्यादींच्या श्रवणाचे व पठणाचे मुख्य फळ एकच आहे. या व इतर सर्व साधनांचे सुंदर फळ म्हणजे तुमच्या चरणकमली प्रगाढ प्रेम हेच आहे. मळाने धुऊन कधी मळ गेला आहे काय ? तसेच पाणी घुसळून कधी त्यातून तूप देणारे लोणी कोणास मिळाले आहे काय ? [भक्तीशिवाय इतर सर्व साधने मळ—व्यर्थ— आहेत हे सुचवले आहे.]

" रघुवरा ! अंतःकरणाचा मळ प्रेमभक्तिजलाशिवाय कधीच जाणे शक्य नाही. म्हणून तोच सर्वज्ञ, तोच तत्त्वज्ञ, तोच पंडित, तोच सर्व सद्गुणांचे धाम, तोच अखंड विज्ञानी, तोच चतुर आणि तोच सगळ्या शुभ लक्षणांनी युक्त समजावा की, ज्याचे आपल्या चरणकमलांच्या ठिकाणी गाढ प्रेम असते.



दो० – नाथ एक बर मागउँ राम कृपा करि देहु।
जन्म जन्म प्रभु पद कमल कबहुँ घटै जनि नेहु ॥ ४९ ॥

चौ० – अस कहि मुनि बसिष्ट गृह आए। कृपासिंधु के मन अति भाए ॥
हनूमान भरतादिक भ्राता। संग लिए सेवक सुखदाता ॥
पुनि कृपाल पुर बाहेर गए। गज रथ तुरग मगावत भए ॥
देखि कृपा करि सकल सराहे। दिए उचित जिन्ह जिन्ह तेइ चाहे ॥
हरन सकल श्रम प्रभु श्रम पाई। गए जहाँ सीतल अवँराई ॥
भरत दीन्ह निज बसन डसाई। बैठे प्रभु सेवहिं सब भाई ॥
मारुतसुत तब मारुत करई। पुलक बपुप लोचन जल भरई ॥
हनूमान सम नहिं बड़भागी। नहिं कोउ राम चरन अनुरागी ॥
गिरिजा जासु प्रीति सेवकाई। बार बार प्रभु निज मुख गाई ॥

दो० – तेहि अवसर मुनि नारद आए करतल बीन।
गावन लगे राम कल कीरति सदा नबीन ॥ ५० ॥

चौ० – मामवलोकय पंकज लोचन। कृपा बिलोकनि सोच बिमोचन ॥
नील तामरस स्याम काम अरि। हृदय कंज मकरंद मधुप हरि ॥

" हे समजत असल्यानेच हे नाथ ! मी एकच वर मागतो; आणि रामा कृपा करून तो मला द्याच. प्रभो ! आपल्या चरणकमलांच्या ठिकाणी माझे प्रेम, जन्मोजन्मी चुकूनसुद्धा कधीही कमी होऊ नये. " ४९

याप्रमाणे भरून आलेल्या अंतःकरणाने विनंती करून अत्यंत जड पावलांनी वसिष्ठमुनी आपल्या आश्रमाकडे परत गेले. त्यांच्या हृदयाची ती अनन्य भक्ती पाहून कृपासिंधू प्रभूलाही ते अतिशय प्रिय झाले.

त्यानंतर सेवकांना सुख देणाऱ्या स्वामींनी हनुमान भरतादि भाऊ व इतर सर्व सेवकांना बरोबर घेतले; आणि कृपाळू प्रभू नगरातून बाहेर पडले. हत्ती, रथ, घोडे इत्यादि आपली सर्व संपत्ती त्यांनी त्या ठिकाणी मागवून आणवली. एकवेळ त्या सर्व संपत्तीकडे आपली कृपादृष्टी टाकून त्या ऐश्वर्याची स्तुती केली; आणि आपल्या सेवकांची आवड पाहून ज्यांना जे प्रिय वाटले ते त्याला प्रेमाने देऊन टाकले.

एवढा कार्यक्रम पार पडल्यानंतर सर्वांचे श्रम हरण करणाऱ्या प्रभूला श्रम झाल्याने ते गार अशा आंबराईत गेले. लगेच भरताने आपल्या हाताने बसण्यासाठी वस्त्र पसरले व त्यावर प्रभू बसले. बंधू उभे राहून सेवा करू लागले. तेव्हा वायुपुत्र हनुमान वारा घालू लागला. त्यावेळी त्याच्या शरीरावर रोमांच उभे राहिले व डोळे पाण्याने भरले.

" खरोखर हनुमन्तासारखा महाभाग्यवान व श्रीरामचरणप्रेमी दुसरा कोणीही नाही. गिरिजे ! त्याने केलेल्या सेवेचे, त्याच्या प्रीतीचे वर्णन प्रत्यक्ष प्रभूनी आपल्या मुखाने वारंवार केलेले आहे."—शंकरानी पार्वतीस या प्रसंगाची व मारुतीच्या भाग्याची थोडक्यात कल्पना दिली.

इतक्यात हातात दोन भोपळ्याचे तंतुवाद्य —वीन घेतलेले नारदमुनी त्यावेळी तेथे आले आणि श्रीरामप्रभूंची सदैव नवीन राहणारी सुंदर कीर्ती गाऊ लागले. ५०

नारदांच्या स्तुतीची ही अपूर्व पर्वणी आहे. आता पुनः हा प्रसंग नाही हे जाणून नारद प्रेमविव्हळ झाले. भगवंत आपल्या आवडत्याचे नाव तर काढतच नाहीत, पण नुसते आपल्याकडे पाहतही नाहीत, म्हणून त्यांनी सद्गदित होऊन प्रार्थना सुरू केली—

" कृपादृष्टीने शोकापासून मुक्त करणाऱ्या कमललोचना ! माझ्याकडे दयेची एकवेळ तरी नजर टाका ! नीलकमलाप्रमाणे ताजा व टवटवीत श्यामवर्ण असणाऱ्या हे हरि ! मदनाचे शत्रू जे शंकर, त्यांच्या हृदयातील प्रेम-मकरंदाचे अखंड पान करणारे आपण मधुप आहात !

जातुधान बरूथ बल भंजन। मुनि सज्जन रंजन अघ गंजन॥
भूसुर ससि नव बृंद बलाहक। असरन सरन दीन जन गाहक॥
भुज बल बिपुल भार महि खंडित। खर दूषन बिराध बध पंडित॥
रावनारि सुखरूप भूपबर। जय दसरथ कुल कुमुद सुधाकर॥
सुजस पुरान बिदित निगमागम। गावत सुर मुनि संत समागम॥
कारुनीक ब्यलीक मद खंडन। सब बिधि कुसल कोसला मंडन॥
कलि मल मथन नाम ममताहन। तुलसिदास प्रभु पाहि प्रनत जन॥

दो० — प्रेम सहित मुनि नारद बरनि राम गुन ग्राम॥
सोभासिंधु हृदयँ धरि गए जहाँ बिधि धाम॥ ५१॥

चौ० — गिरिजा सुनहु बिसद यह कथा। मैं सब कही मोरि मति जथा॥
राम चरित सत कोटि अपारा। श्रुति सारदा न बरनै पारा॥
राम अनंत अनंत गुनानी। जन्म कर्म अनंत नामानी॥
जल सीकर महि रज गनि जाहीं। रघुपति चरित न बरनि सिराहीं॥

" तसेच राक्षसांच्या महाबलवान सैन्याचा फडशा पाडून मुनींना व संतांना आनंद देणारे व पापांचा संहार करणारे आपणच आहात. ब्राह्मणांचा समुदाय हेच एक हंगामाला आलेले पीक मानल्यास त्याला भरघोस पीक आणण्यास पाऊस पाडून त्याची योग्य वाढ करणारे मेघ आपणच आहात.

" जगात शरण जाण्यास ज्यांना कोणीच उरले नाही, त्यांना एकमेव असे आश्रय आधार असून अशा दीनांचे खरे पालक आपणाशिवाय दुसरे कोणीच नाही. कारण आपल्या बाहूंचे सामर्थ्य अपार आहे. त्यामुळे आपण भूमीला भारभूत झालेल्यांचा संहार केला. हे आपले चातुर्य खरदूषण विराधांचा विध्वंस करत असता प्रामुख्याने प्रचीतीस आले !

" म्हणून हे रावणाचे शत्रू ! सुखस्वरूप, भूपश्रेष्ठ, दशरथरूपी कुमुदांना खुलविणाऱ्या चंद्ररूप श्रीरामचंद्रा आपला विजय असो ! आपली ही सुंदर कीर्ती पुराणात, वेदांत व इतर शास्त्रांत वर्णिलेली असून मुनी व संत यांच्या समागमात ते गात असतात.


" करुणाशील, मिथ्या मदाचा नाश करणारे, सर्व कार्यात पूर्ण कुशल आणि अयोध्यापुरीचे भूषण असे आपण आहात. आपल्या नुसत्या नामाने कलियुगातील पापाचा संहार होतो. अविद्यामायेचा नाश करण्यासही तेच नाम समर्थ आहे. म्हणून हे तुलसीदासांच्या प्रभो ! आपल्या चरणी शरण आलेल्या या दीन दासाचे रक्षण करा. "

याप्रमाणे नारदांनी श्रीरामचंद्रांच्या गुणसमूहाचे वर्णन केले आणि सौंदर्याचा सागरच असणाऱ्या अशा प्रभूला आपल्या हृदयसिंहासनावर विराजमान झालेले पाहून ते समाधानाने सत्यलोकाला निघून गेले. ' ५१

श्रीमानस कथेचा उपसंहार

गोस्वामींनी आपल्या महाकाव्य नाट्याचा एक नमुना अशाप्रकारे पडदा पाडून— मुख्य कथा एकदम संपवून— या ठिकाणी दाखवला आहे. आता महेश समारोप करतात, " हे गिरिजे ! ऐक. ही उज्ज्वल कथा माझ्या बुद्धीच्या कुवतीप्रमाणे मी सांगून संपवली. तसे पाहिले तर रामचरित्राचा शतकोटी विस्तार असल्याने ते कोणासही अपार असेच आहे. त्यामुळे वेद व वाणीची देवता शारदासुद्धा त्या चरित्राचे संपूर्ण वर्णन करण्यास असमर्थच ठरतात. कारण, राम अनंत आहेत. अर्थात ते अनंत गुणांची खाण आहेत. नुसते जन्म, केलेले कर्म, व त्यावेळची नावे सांगणेसुद्धा अशक्य, कारण तीही अगणितच आहेत.

" पाण्याचे तुषार किंवा पृथ्वीचे रजःकण कदाचित मोजणे शक्य होईल, परंतु रघुपतीचे चरित्र मात्र



बिमल कथा हरि पद दायनी । भगति होइ सुनि अनपायनी ।।
उमा कहिउँ सब कथा सुहाई । जो भुसुंडि खगपतिहि सुनाई ।।
कछुक राम गुन कहेउँ बखानी । अब का कहौ सो कहहु भवानी ।।
सुनि सुभ कथा उमा हरषानी । बोली अति बिनीत मृदु बानी ।।
धन्य धन्य मैं धन्य पुरारी । सुनेउँ राम गुन भव भय हारी ।।

दो०—तुम्हारी कृपाँ कृपायतन अब कृतकृत्य न मोह ।
जानेउँ राम प्रताप प्रभु चिदानंद संदोह ।। ५२ (क) ।।
नाथ तवानन ससि स्रवत कथा सुधा रघुबीर ।
श्रवन पुटन्हि मन पान करि नहिं अघात मतिधीर ।। ५२ (ख) ।।

चौ०—रामचरित जे सुनत अघाहीं । रस बिसेष जाना तिन्ह नाहीं ।।
जीवनमुक्त महामुनि जेऊ । हरि गुन सुनहिं निरंतर तेऊ ।।
भव सागर चह पार जो पावा । राम कथा ता कहँ दृढ़ नावा ।।
बिषइन्ह कहँ पुनि हरि गुन ग्रामा । श्रवन सुखद अरु मन अभिरामा ।।
श्रवनवंत अस को जग माहीं । जाहि न रघुपति चरित सोहाहीं ।।
ते जड़ जीव निजात्मक घाती । जिन्हहि न रघुपति कथा सोहाती ।।

वर्णन करून संपणार नाही. तथापि मी सांगितलेली रघुपतीची ही पवित्र कथा, वैकुंठाची प्राप्ती करून देणारी आहे आणि त्या कथेच्या श्रवणाने अविनाशी भक्ती मिळते.

"—उमे हीच कथा काकभुशुंडीने गरुडास सांगितली., म्हणून ती सगळी सुंदर कथा जशीच्या तशी मी तुला सांगितली. सारांश, हे भवानी ! मी काही थोडेसे रामगुण वर्णन करून सांगितले; आता आणखी काय सांगू बोल ! "

ही शुभ रामकथा प्रत्यक्ष सदाशिवांच्या मुखातून श्रवण करण्यास मिळाल्यामुळे उमेला हर्ष झाला; म्हणून ती अतिनम्र कोमलवाणीने म्हणाली,

" हे त्रिपुरारी ! मी खरोखर धन्य धन्य धन्य आहे की, मला श्रीरामचंद्रांचे भवभयहरण करणारे गुण ऐकावयास मिळाले. हे कृपाधाम ! तुमच्या कृपेनेच मी कृतकृत्य झाले; आता माझ्या हृदयात मोह राहिला नाही. त्यामुळे श्रीरामचंद्रांचा प्रताप मला आता समजून तेच सच्चिदानंदघन प्रभू आहेत, अशी खात्री पटली.

" हे नाथ ! आपल्या मुखचंद्रातून रघुवीर कथामृताचा वर्षाव होत आहे, आणि हे धीरमती ! माझ्या कानाच्या ओठानी ते कितीही सेवन केले तरी मन तृप्त होत नाही, ते अमृत आणखी प्यावे असेच वाटते. " ५२ (ख)

" याचे कारण असे की, रामचरित्र ऐकून ज्याना आता पुरे असे वाटते, त्यांना यातील रसाची विशेष लज्जत समजलीच नाही, असे म्हणणे भाग आहे. "

" जे जीवन्मुक्त महामुनी आहेत, तेसुद्धा न कंटाळता नेहमी हरिगुण श्रवण करतात; आणि हे त्यांचे करणे योग्यच आहे. भवसागराच्या पार जाण्याची इच्छा ज्याला असेल, त्याला रामकथा ही न भंग पावणारी नौका आहे, ही गोष्ट ते जाणून असतात.

" जीवन्मुक्त ही कथा या कारणाने ऐकतील यात विशेष काही नाही. पण ही रामकथा विषयी लोकांच्यासुद्धा कानांना सुख देते आणि चित्ताला प्रसन्न करते.

" इतकेच काय, कान असलेला असा या जगात कोण आहे की त्याला रघुपतीचे चरित्र प्रिय वाटत नाही? असे म्हणण्याचे कारण असे की, ज्यांना रघुपतिकथा आवडत नाही ते जीव जड आणि आत्मघातकी होत !

हरिचरित्र मानस तुम्ह गावा । सुनि मैं नाथ अमिति सुख पावा ॥
तुम्ह जो कही यह कथा सुहाई । कागभसुंडि गरुड़ प्रति गाई ॥

दो० –बिरति ग्यान बिग्यान दृढ़ राम चरन अति नेह ।
बायस तन रघुपति भगति मोहि परम संदेह ॥ ५३ ॥

चौ०–नर सहस्र महँ सुनहु पुरारी । कोउ एक होइ धर्म ब्रतधारी ॥
धर्मसील कोटिक महँ कोई । बिषय बिमुख बिराग रत होई ॥
कोटि बिरक्त मध्य श्रुति कहई । सम्यक ग्यान सकृत कोउ लहई ॥
ग्यानवंत कोटिक महँ कोऊ । जीवनमुक्त सकृत जग सोऊ ॥
तिन्ह सहस्र महुँ सब सुख खानी । दुर्लभ ब्रह्म लीन बिग्यानी ॥
धर्मसील बिरक्त अरु ग्यानी । जीवनमुक्त ब्रह्मपर प्रानी ॥
सब ते सो दुर्लभ सुरराया । राम भगति रत गत मद माया ॥
सो हरि भगति काग किमि पाई । बिस्वनाथ मोहि कहहु बुझाई ॥

दो० –राम परायन ग्यान रत गुनागार मति धीर ।
नाथ कहहु केहि कारन पायउ काक सरीर ॥ ५४ ॥

चौ०–यह प्रभु चरित पवित्र सुहावा । कहहु कृपाल काग कहँ पावा ॥

"हे नाथ ! आपण विस्ताराने सांगितलेले हरिचरित्र मानस ऐकून मला अपार सुख झाले !"

उत्तरकाण्ड उत्तरार्ध–भुशुण्डी-गरुड संवाद-प्रस्तावना

"प्रभो ! आपण आणखी काय सांगू असे विचारल्याने मी आपली शंका सांगते. आपण म्हणतात की, ही सुंदर कथा काकभुशुंडीने गरुडास विस्तारपूर्वक सांगितली. अर्थात् त्याचे वैराग्य, ज्ञान व विज्ञान दृढ असून रामचरणी त्याचा अत्यंत स्नेह आहे, हे उघड आहे. कावळ्याचा देह असून, त्याला रघुपतीची प्रेमभक्ती प्राप्त झालेली आहे. अद्याप मलासुद्धा ती मिळालेली नाही. म्हणून मला याबाबतीत मोठी शंका आहे की, तो जन्मजात कावळा नसावा." ५३

"अहो त्रिपुरारी ! आपणाला सर्वत्र काय पाहावयास मिळते ? हजारो मनुष्यांत कोणी तरी एखादा धर्मव्रताचे आचरण करणारा असतो. अशा कोट्यवधी धार्मिकांत असा एखादाच आढळतो की, जो विषय-पराङ्मुख राहून वैराग्यात रंगलेला आहे ! यानंतर असे वेदांनच म्हटले आहे की- अशा प्रकारच्या कोट्यवधी विरक्तांत खरे ज्ञान कोणा एखाद्याच भाग्यवंताला लाभते; आणि अशा कोट्यवधी ज्ञानी लोकांत चुकून एखादा जीवन्मुक्तांच्या श्रेष्ठ दशेला जाऊन पोचतो. परंतु अशा हजारो जीवन्मुक्तांना तपासाले तेव्हा कदाचित् सर्व सुखाची खाण अशा ब्रह्मात अखंड लीन असणारा विज्ञानी दृष्टीस पडतो !

यावरून हेच सिद्ध होते की, धर्मशील, अत्यंत विरक्त, ज्ञानी, जीवन्मुक्त आणि विज्ञानी हे एकापेक्षा एक श्रेष्ठ असून, फार दुर्लभ आहेत. परंतु या सर्व प्राण्यांपेक्षा- हे सुरराजा ! रामभक्ती करण्यात रंगलेला व मद आणि माया यांच्या तावडीतून कायमचा मोकळा झालेला कोणी सांपडणेच कठीण !

"अशी वस्तुस्थिती असता इतकी अति दुर्लभ असणारी हरिभक्ती कावळ्याला कशी मिळाली हे गूढच आहे ! म्हणून हे विश्वनाथ ! तेवढे रहस्य मला समजून सांगावे. तो काकभुशुंडी रामभक्तिपरायण कसा झाला, ज्ञानाची त्याला कशी प्राप्ती झाली, सर्व सद्गुणांचे माहेर घर तो कसे बनला, एवढा धीरमती असता, हे नाथ ! त्याला कावळ्याचे शरीर कसे प्राप्त झाले, त्याला काय कारण झाले ?– हे सर्व मला सांगा." ५४

"शिवाय हे सुंदर आणि पवित्र प्रभुचरित्र त्या कावळ्याला कुठे मिळाले ? आणि हे मदनारी !

तुम्ह केहि भाँति सुना मदनारी। कहहु मोहि अति कौतुक भारी॥
गरुड़ महाग्यानी गुन रासी। हरि सेवक अति निकट निवासी॥
तेहिं केहि हेतु काग सन जाई। सुनी कथा मुनि निकर बिहाई॥
कहहु कवन बिधि भा संबादा। दोउ हरि भगत काग उरगादा॥
गौरि गिरा सुनि सरल सुहाई। बोले सिव सादर सुख पाई॥
धन्य सती पावन मति तोरी। रघुपति चरन प्रीति नहिं थोरी॥
सुनहु परम पुनीत इतिहासा। जो सुनि सकल लोक भ्रम नासा॥
उपजइ राम चरन बिस्वासा। भव निधि तर नर बिनहिं प्रयासा॥

दो० — ऐसिअ प्रस्न बिहंगपति कीन्ह काग सन जाइ।
सो सब सादर कहिहउँ सुनहु उमा मन लाइ॥ ५५॥

चौ० — मैं जिमि कथा सुनी भव मोचनि। सो प्रसंग सुनु सुमुखि सुलोचनि॥
प्रथम दच्छ गृह तव अवतारा। सती नाम तब रहा तुम्हारा॥
दच्छ जग्य तव भा अपमाना। तुम्ह अति क्रोध तजे तब प्राना॥
मम अनुचरन्ह कीन्ह मख भंगा। जानहु तुम्ह सो सकल प्रसंगा॥
तब अति सोच भयउ मन मोरें। दुखी भयउँ बियोग प्रिय तोरें॥
सुंदर बन गिरि सरित तड़ागा। कौतुक देखत फिरउँ बेरागा॥

आपण हे चरित्र कसे श्रवण केले? खरोखरच हे समजून घेण्याची मला फारच उत्कंठा आहे. कारण आपण मदनारी आणि एका कावळ्याकडून रामचरित्र श्रवण? तसेच गरुड स्वतः महाज्ञानी सद्गुणांचे आगर, श्रीहरीचा प्रत्यक्ष सेवक आणि भगवंताच्या सन्निध कायम राहणारा असे त्यांचे वाहन असून, एवढे श्रेष्ठ मुनी सोडून त्याने एका कावळ्याकडे जाऊन ही रामकथा का ऐकावी? याप्रमाणे काक आणि सर्पभक्षक गरुड या दोन हरिभक्तांचा संवाद कसा घडला तेही सांगा. ”

गौरीची ही सरळ व मनोहर वाणी ऐकून शंकर सुखी झाले; आणि आदराने म्हणाले, “ हे सती! तू धन्य आणि पावन आहेस. त्याचप्रमाणे तुझी बुद्धीसुद्धा आता शुद्ध झाली आहे; याचे कारण रघुपतीपदी तुझी प्रीती आता थोडीथोडकी नसून, ती अत्यंत झाली आहे.

“ म्हणून ज्याच्या श्रवणाने सर्व लोकांच्या भ्रमाचा निरास होतो, असा परम पावन इतिहास तुला या निमित्ताने सांगतो; तो शांतपणे समजून घे. त्या वृत्तान्ताच्या श्रवणाने रामचरणी विश्वास उत्पन्न होईल आणि कोणीही मनुष्य अनायासे भवसागर तरून जाईल.

“ उमे! तू जसे आता प्रश्न विचारलेस ना त्याचप्रमाणे खगराजाने काकाकडे जाऊन तशीच माहिती विचारली. तो सर्व इतिहास मी आदरपूर्वक सांगतो. उमे! तूसुद्धा मन लावून तो ऐक. ” ५५

शंकर अत्यंत स्नेहभावाने बोलू लागले. “ हे सुमुखी! हे सुलोचनी! भवसागरातून पैलतीरास नेणारी ही कथा मी प्रथम कशी ऐकली, या तुझ्या प्रश्नाचे प्रथम उत्तर देतो. तो प्रसंग ऐक.

“ प्रथम तुमचा अवतार दक्षप्रजापतीच्या घरी झाला, तेव्हा तुमचे नाव सती असे होते. परंतु दक्षाच्या यज्ञात तुमचा अपमान झाल्यामुळे तुम्ही संतापाच्या भरात प्राण सोडला. मग माझ्या सेवकांनी त्या यज्ञाचा विध्वंस केला, वगैरे तो सर्व प्रसंग तुम्हाला माहीत आहेच. ती सर्व हकीकत ऐकल्यावर माझ्या मनाला अत्यंत शोक झाला; व प्रिये! तुझ्या विरहाने मी फार दुःखी झालो.

“ कुठे तरी जीवाला थोडा विरंगुळा पडावा म्हणून नंतर मी सुंदर पर्वत, वने, नद्या, तलाव वगैरे रमणीय स्थळे पाहत, त्यांचे कौतुक करत भटकत राहिलो; परंतु कोणत्याही ठिकाणी व कशाचेही मनाला समाधान वाटले नाही.

गिरि सुमेर उत्तर दिसि दूरी । नील [illegible] ॥
तासु कनकमय सिखर सुहाए । चारि चारु [illegible] ॥
तिन्ह पर एक एक बिटप बिसाला । बट पीपर पाकरी रसाला ॥
सैलोपरि सर सुंदर सोहा । मनि सोपान देखि मन मोहा ॥

दो० — सीतल अमल मधुर जल जलज बिपुल बहुरंग ।
कूजत कल रव हंस गन [illegible] ॥ ५६ ॥

चौ० — तेहिं गिरि रुचिर बसइ खग सोई । तासु नास [illegible] ॥
माया कृत गुन दोष अनेका । मोह [illegible] ॥
रहे ब्यापि समस्त जग माहीं । तेहि गिरि [illegible] ॥
तहँ बसि हरिहि भजइ जिमि कागा । [illegible] ॥
पीपर तरु तर ध्यान सो धरई । [illegible] ॥
आँब छाँह कर मानस पूजा । तजि हरि [illegible] ॥
बर तर कह हरि कथा प्रसंगा । आवहिं सुनहिं [illegible] ॥
राम चरित बिचित्र बिधि नाना । प्रेम सहित [illegible] ॥

“ अगदीच अटकत असता उत्तर दिशेला [illegible] पुनः फार दूर एक अत्यंत सुंदर असा नील पर्वत आहे, [illegible] शिखरे आहेत. ती बघून माझ्या मनाला [illegible].


त्या चारी शिखरांवर प्रत्येकी एक असे [illegible] त्या नीलपर्वतावर एक सुंदर तलाव शोभत असून, त्याच्या [illegible] मन लुब्ध होते. त्याचे पाणी थंड, मधुर आणि स्वच्छ [illegible] त्याच्या मधून हंसाचे कळप मधुर स्वराने कूजन करीत असून, [illegible] असतो. ” ५६

“ अशा त्या मनोहर नील पर्वतावर [illegible] [चारयुगांची एक चौकडी अशी [illegible] पुनः रात्र. [illegible] आयुष्य संपून महा कल्पान्त होतो. [illegible] दोष सगळ्या जगाला व्यापून राहिले आहेत. [illegible] फिरकतसुद्धा नाहीत.

“ उमे ! अशा सुंदर पर्वतावर राहून तो कावळा [illegible] प्रेमाने श्रवण कर.

त्या नील पर्वताच्या [illegible] दुसऱ्या शिखरावरील [illegible] तिसऱ्या शिखरावरील आंब्याच्या [illegible] दुसरा उद्योगच सुचत नाही.

याप्रमाणे तीन शिखरांवरील तीन वृक्षांच्या [illegible] शिखरावरील [illegible] पक्षी त्याठिकाणी जमा होतात. मग तो [illegible] करीत असतो.



सुनहिं सकल मति बिमल मराला । बसहिं निरंतर जे तेहिं ताला ॥
जब मैं जाइ सो कौतुक देखा । उर उपजा आनंद बिसेषा ॥

दो० – तब कछु काल मराल तनु धरि तहँ कीन्ह निवास ।
सादर सुनि रघुपति गुन पुनि आयउँ कैलास ॥ ५७ ॥

चौ० – गिरिजा कहेउँ सो सब इतिहासा । मैं जेहि समय गयउँ खग पासा ॥
अब सो कथा सुनहु जेहि हेतू । गयउ काग पहिं खग कुल केतू ॥
जब रघुनाथ कीन्हि रन क्रीड़ा । समुझत चरित होति मोहि ब्रीड़ा ॥
इंद्रजीत कर आपु बँधायो । तब नारद मुनि गरुड़ पठायो ॥
बंधन काटि गयो उरगादा । उपजा हृदयँ प्रचंड बिषादा ॥
प्रभु बंधन समुझत बहु भाँती । करत बिचार उरग आराती ॥
ब्यापक ब्रह्म बिरज बागीसा । माया मोह पार परमीसा ॥
सो अवतार सुनेउँ जग माहीं । देखेउँ सो प्रभाव कछु नाहीं ॥

दो० – भव बंधन ते छूटहिं नर जपि जा कर नाम ।
खर्ब निसाचर बाँधेउ नागपास सोइ राम ॥ ५८ ॥

चौ० – नाना भाँति मनहि समुझावा । प्रगट न ग्यान हृदयँ भ्रम छावा ॥
खेद खिन्न मन तर्क बढ़ाई । भयउ मोहबस तुम्हरिहिं नाई ॥

अशा ठिकाणी, त्या तलावात सतत राहणारे निर्मळ बुद्धीचे सगळे हंस ते रामचरित्र नेहमी श्रवण करीत असतात. योगायोगाने मी जेव्हा फिरत तेथे गेलो तेव्हा त्या ठिकाणचे ते सर्व कौतुक पाहून माझ्या मनाने चांगलीच पकड घेतली. मग मी तेथे हंसाचेच रूप घेऊन काही काळ त्या सरोवरात काढला. त्यामुळे अनायासे काकभुशुंडीच्या तोंडून श्रीरामचरित्राचे आदराने श्रवण करणे शक्य झाले. असा काही काळ गेल्यानंतर मी परत कैलासास आलो. ५७

– गरुडाचे कावळ्याकडे गमन –

शंकर पुढे बोलू लागले, मी हे रामचरित्र त्या काकाजवळ कसे ऐकले हे तुला समजले. आता " पक्षिकुलभूषण गरुड ज्या कारणास्तव काकभुशुंडीकडे गेला ती कथा यानंतर सांगतो ती ऐक.

श्रीरघुनाथाने रणांगणावर जेव्हा क्रीडा केली, त्या वेळी जी त्यांनी तेथे लीला केली, तिची आठवण होताच मला लाज वाटते. मौज अशी केली की, इंद्रजिताच्या नागपाशात रघुनाथ स्वतःच सापडले. त्यावेळी त्यांना मोकळे करण्यासाठी नारदांनी गरुडाला पाठविला. भुजंग-भक्षक गरुडाने ते सर्व नाग गिळंकृत करून नागपाशाचे बंधन तोडून तो परत गेला.

परंतु मनात विचार करत असता त्याला अत्यंत विषाद झाला. प्रभूच्या नागपाश-बंधनाचे स्मरण होताच गरुड नानाप्रकारांनी पुष्कळ विचार करू लागला:– जो सर्वव्यापक, विकाररहित, वाणीपती, मायामोहातीत परमेश्वर आहे, तोच या स्वरूपात अवतरला आहे, असे ऐकले होते; पण येऊन आता प्रत्यक्ष पाहिले तो तो प्रभाव काहीसुद्धा दिसला नाही. ज्याच्या नामाचा जप करून मनुष्य भवबंधनातून सुटतात, त्या रामाला एका क्षुद्र निशाचराने नागपाशात बांधला ! हे कसे शक्य ? ५८

आपल्या विचारसरणीतच काही तरी चूक होत असेल म्हणून गरुडाने आपल्या मनाची नानाप्रकारे समजूत घालण्याचा प्रयत्न करून पाहिला; पण व्यर्थ ! मनाला बोध मुळीच होईना ! उलट भ्रमाने हृदय मात्र व्यापून गेले. मनात तर्कांचे जाळे वाढू लागले आणि त्यामुळे अंतःकरण बेचैन झाले. अशा स्थितीत गरुड दुःखी होऊन अत्यंत खिन्न झाला. राम परमेश्वर नाहीत असे वाटून तुम्ही जसे एका काळी मोहाला वश झाला होता, तशीच बरोबर स्थिती यावेळी पक्षिराज गरुडाची झाली.

व्याकुल गयउ देवरिषि पाहीं। कहेसि जो संसय निज मन माहीं॥
सुनि नारदहि लागि अति दाया। सुनु खग प्रबल राम कै माया॥
जो ग्यानिन्ह कर चित्त अपहरई। बरिआईं बिमोह मन करई॥
जेहिं बहु बार नचावा मोही। सोइ ब्यापी बिहंगपति तोही॥
महामोह उपजा उर तोरें। मिटिहि न बेगि कहें खग मोरें॥
चतुरानन पहिं जाहु खगेसा। सोइ करेहु जेहि होइ निदेसा॥

दो० – अस कहि चले देवरिषि करत राम गुन गान।
हरि माया बल बरनत पुनि पुनि परम सुजान॥ ५९॥

चौ० – तब खगपति बिरंचि पहिं गयऊ। निज संदेह सुनावत भयऊ॥
सुनि बिरंचि रामहि सिरु नावा। समुझि प्रताप प्रेम अति छावा॥
मन महुँ करइ बिचार बिधाता। माया बस कबि कोबिद ग्याता॥
हरि माया कर अमिति प्रभावा। बिपुल बार जेहि मोहि नचावा॥
अग जगमय जग मम उपराजा। नहिं आचरज मोह खगराजा॥
तब बोले बिधि गिरा सुहाई। जान महेस राम प्रभुताई॥
बैनतेय संकर पहिं जाहू। तात अनत पूछहु जनि काहू॥
तहँ होइहि तव संसय हानी। चलेउ बिहंग सुनत बिधि बानी॥

शेवटी व्याकुळ होऊन तो देवर्षी नारदाकडे जाऊन आपल्या मनात उत्पन्न झालेले संशयाचे काहूर त्याने त्याच्याजवळ मोकळेपणाने बोलून दाखवले.

ते सर्व ऐकल्यावर संतहृदयाच्या देवर्षींना त्याची अत्यंत दया आली व "हे खगा! रामचंद्रांची माया अत्यंत बलवान् आहे!" असे उद्गार त्यांच्या मुखातून बाहेर पडले व ते पुढे सांगू लागले. "पक्षिराजा! ही माया ज्ञात्यांच्या चित्तालासुद्धा आकर्षण करते व बलात्काराने त्यांच्या चित्तात अनिवार मोह उत्पन्न करते. ज्या मायेने मला पुष्कळ वेळा नाचविले आहे, तीच यावेळी तुझ्या अंतःकरणाला व्यापून राहिली आहे.

"तुझ्या मनाला यावेळी जो विलक्षण मोह जाणवत आहे तो मी तुला कोणत्याही प्रकारे उपदेश करून लवकर नाहीसा होणार नाही; म्हणून तुम्ही सरळ ब्रह्मदेवाकडे जा व ते सांगतील तसे करा."

याप्रमाणे गरुडाला कळकळीने मार्गदर्शन करून, देवर्षी नारदांनी श्रीराम-गुणगान कीर्तन करीत आपला पाय काढला व चालत असता परम सुजाण असल्याने हरिमायेच्या बळाचे वर्णन ते वारंवार करू लागले. ५९.

नारदांच्या सांगण्यावरून गरुड सरळ सत्यलोकाला गेला आणि त्याने आपली संशयाकुल झालेली मनःस्थिती ब्रह्मदेवापुढे मोकळेपणाने उघड केली.

ते ऐकून विरंचीने श्रीरामचंद्रांना नमन केले आणि त्यांच्या प्रभावाचे स्मरण होताच त्यांच्या हृदयात प्रेमाला भरते आले. तेव्हा त्यांच्या मनात विचार येऊ लागले, 'खगेन्द्र, हरिमायेच्या प्रभावाला मर्यादाच नाही. त्यामुळे ज्ञानी, कवी, पंडित इत्यादि सर्व राम-मायेला वश होतात. इतकेच काय, या मायेने मलासुद्धा पुष्कळ वेळा नाचविले आहे.

'तसे पाहू गेले तर स्थावर-जंगमात्मक सर्व जग तर मीच निर्माण केले आहे. मग प्रत्यक्ष श्रीहरीचे वाहन असणाऱ्या गरुडाला त्या मायेने मोहित केले असेल तर त्यात काहीच आश्चर्य नाही.'

असा विचार मनात पूर्ण झाल्यानंतर मधुरवाणीने विधी म्हणाले, "हे खगेशा! श्रीरामाचा प्रभाव महेशासच बरोबर माहीत आहे. म्हणून वैनतेया! तुम्ही शंकराकडे जा; तात! दुसऱ्याकुठेही जाऊ नका व कोणालाही विचारू नका. सदाशिवच तुमच्या अंतःकरणाचे पूर्ण समाधान करतील."

ते ऐकून ब्रह्मदेवांचा गरुडाने निरोप घेतला व तो सत्यलोकाहून कैलासास येण्यासाठी निघाला.



दो ० — परमातुर बिहंगपति आयउ तब मो पास ।
जात रहेउँ कुबेर गृह रहिहु उमा कैलास ।। ६० ।।

चौ० — तेहिं मम पद सादर सिरु नावा । पुनि आपन संदेह सुनावा ।।
सुनि ता करि बिनती मृदु बानी । प्रेम सहित मैं कहेउँ भवानी ।।
मिलेहु गरुड़ मारग महँ मोही । कवन भाँति समुझावौं तोही ।।
तबहिं होइ सब संसय भंगा । जब बहु काल करिअ सतसंगा ।।
सुनिअ तहाँ हरि कथा सुहाई । नाना भाँति मुनिन्ह जो गाई ।।
जेहि महुँ आदि मध्य अवसाना । प्रभु प्रतिपाद्य राम भगवाना ।।
नित हरि कथा होत जहँ भाई । पठवउँ तहाँ सुनहु तुम्ह जाई ।।
जाइहि सुनत सकल संदेहा । राम चरन होइहि अति नेहा ।।

दो ० — बिनु सतसंग न हरि कथा तेहि बिनु मोह न भाग ।
मोह गएँ बिनु राम पद होइ न दृढ़ अनुराग ।। ६१ ।।

चौ ० — मिलहिं न रघुपति बिनु अनुरागा । किएँ जोग तप ग्यान बिरागा ।।
उत्तर दिसि सुंदर गिरि नीला । तहँ रह काकभुसुंडि सुसीला ।।
राम भगति पथ परम प्रबीना । ग्यानी गुन गृह बहु कालीना ।।
राम कथा सो कहइ निरंतर । सादर सुनहिं बिबिध बिहंगवर ।।
जाइ सुनहु तहँ हरि गुन भूरी । होइहि मोह जनित दुख दूरी ।।

मग अत्यंत आतुर झालेला पक्षिराज जेव्हा माझ्यापाशी आला, तेव्हा मी कुबेराच्या घरी जाण्याच्या वाटेवर होतो. आणि उमे ! त्या तुम्ही कैलासावर होता. ६०

माझ्याजवळ येताच गरुडाने आदराने माझ्या पायावर मस्तक ठेवून आपला संशय स्पष्ट करून सांगितला; हे भवानी ! त्याची ती विनंती आणि नम्रवाणी ऐकून मी प्रेमाने त्याला सांगितले, " गरुडा ! तू येथे रस्त्यात मला भेटलास; अशा महत्त्वाच्या शंकेचे समाधान असे वाटेवर उभ्या उभ्या करणे अशक्य आहे. पुष्कळ काळ संतांची संगती झाल्यावरच सर्व संशयाचा नाश होत असतो. संतांच्या मेळाव्यात मुनिवृंदांच्या मुखातून चालत असलेल्या सुंदर हरिकथा श्रवण कराव्यात, त्यात आरंभी, मध्ये व शेवटी प्रभू श्रीरामभगवंताचच प्रतिपादन चालू असलेले ऐकावयास मिळेल.

अशा हरिकथा ज्या ठिकाणी नित्यनियमाने अखंड चालतात तिकडे तुम्हाला पाठवतो. तिथे जाऊन तुम्ही त्या ऐका. म्हणजे तुमच्या सर्व संशयाचा नाश होऊन श्रीरामचरणी अत्यंत प्रेम उत्पन्न होईल.

" हे तात ! सत्संगाशिवाय हरिकथा ऐकावयास मिळत नाही. त्यांच्या श्रवणाशिवाय मोहाचा नाश होऊ शकत नाही; आणि मोहाचे समूळ उच्चाटन झाल्याशिवाय श्रीरामचंद्रांच्या चरणी बळकट प्रेमाची प्राप्ती होत नाही. ६१

श्रीरघुपतीचा सगुण साक्षात्कार दृढ अनुरागाशिवाय केवळ वैराग्याने, तपाने, ज्ञानाने अथवा योगयाग करून होत नाही.

" असो ! उत्तर दिशेला एक मनोहर नील पर्वत आहे त्यावर सुशील असा काकभुशुंडी राहातो, तो श्रीरामाच्या भक्तिमार्गात परम प्रवीण असून ज्ञानाचे व सद्‌गुणांचे धाम आहे. त्याचे वास्तव्य त्याजागी फार प्राचीन काळापासून आहे. तो नित्य नियमाने श्रीरामचंद्राची कथा विस्तार करून सांगत असतो; आणि ती ऐकण्याकरता नानाप्रकारचे श्रेष्ट पक्षी त्या ठिकाणी येतात. त्या ठिकाणी जाऊन दीर्घकाळ हरिचरित्र श्रवण करा म्हणजे मोहामुळे उत्पन्न झालेली तुमची सर्व दुःखे दूर होतील. "

मैं जब तेहि सब कहा बुझाई। चलेउ हरषि मम पद सिरु नाई॥
ताते उमा न मैं समुझावा। रघुपति कृपाँ मरमु मैं पावा॥
होइहि कीन्ह कबहुँ अभिमाना। सो खोवै चह कृपानिधाना॥
कछु तेहि ते पुनि मैं नहिं राखा। समुझइ खग खगही कै भाषा॥
प्रभु माया बलवंत भवानी। जाहि न मोह कवन अस ग्यानी॥

दो० — ग्यानी भगत सिरोमनि त्रिभुवनपति कर जान।
ताहि मोह माया नर पावँर करहिं गुमान॥ ६२ (क)॥

मासपारायण, अट्ठाईसवाँ विश्राम

सिव बिरंचि कहुँ मोहइ को है बपुरा आन।
अस जियँ जानि भजहिं मुनि माया पति भगवान॥ ६२ (ख)॥

चौ० — गयउ गरुड़ जहँ बसइ भुसुंडा। मति अकुंठ हरि भगति अखंडा॥
देखि सैल प्रसन्न मन भयऊ। माया मोह सोच सब गयऊ॥
करि तड़ाग मज्जन जलपाना। बट तर गयउ हृदयँ हरषाना॥
बृद्ध बृद्ध बिहंग तहँ आए। सुनै राम के चरित सुहाए॥
कथा अरंभ करै सोइ चाहा। तेही समय गयउ खगनाहा॥

अशा रीतीने गरुडाची व्यवस्थितपणे समजूत केल्यानंतर त्याने माझ्या चरणांवर मस्तक ठेवले व तो आनंदाने काक भुशुंडीकडे गेला. उमे ! रघुपतीच्या कृपेने मला या सर्व बाबतीतले मर्म समजल्यामुळेच मी स्वतः त्याला उपदेश केला नाही. गरुडाला केव्हा तरी अभिमान झाला असेल व कृपानिधान रघुपती तो समूळ उपटून टाकू पाहत आहेत. आणि याच हेतूने मी त्याला काकाकडे पाठविले.

कोणताही विषय उत्तम समजावून सांगण्याकरता दुसरा पक्षीच पाहिजे; पक्ष्यांतील भाषा पक्ष्यांना उत्तम कळणार! मी त्याला ठेवून घेतले नाही, याला हेही एक कारण आहेच.

“ भवानी ! प्रभूची माया अशी बलवान आहे की, ज्याला ती मोहित करणार नाही, असा कोणीच ज्ञानी सापडणार नाही. प्रत्यक्षच पाहाना:– ज्ञानी, भक्तशिरोमणी आणि त्रिभुवनपतीचे, नारायण–विष्णूचे वाहन असा जो गरुड, त्यालासुद्धा त्या मायेने मोहित केला ना?

—अशी परिस्थिती असता नीच मनुष्य व्यर्थ घमेंड करतातच ! ६२ (क)

केवळ कल्याणस्वरूप असे शिव आणि विश्वाची विशेष रचना करणारे विरंची यांनासुद्धा जी मोहात पाडते, अशा हरिमायेपुढे इतर बिचाऱ्या जीवांची किंमत काय ! हे रहस्य हृदयात आणून, ज्ञानी सिद्ध आणि मुनीसुद्धा मायापती भगवान श्रीरघुपतीचे भजन करतात. ६२ (ख)

– काक-उरगाद संवाद –

अकुंठित बुद्धी व अखंड हरिभक्ती असलेला भुशुंडी ज्याठिकाणी निवास करत होता, त्या ठिकाणी गरुड जाऊन पोचला. तेथे येताच त्या नील पर्वताच्या दर्शनाने त्याचे मन प्रसन्न झाले. कारण त्याच्या नुसत्या दर्शनानेच माया, शोक, मोह इत्यादि त्याचे सर्व दोष नाहीसे झाले. त्याने तेथील तलावात स्नान करून अमृता-सारख्या त्या पाण्याने आपली तहान शांत केली. त्यानंतर तो, ज्या वडाच्या झाडाखाली भुशुंडी श्रीहरिकथेचे गायन करत होता, त्या ठिकाणी गेला.

ते ठिकाण पाहूनच त्याच्या अंतःकरणात हर्ष मावेना. तेथे पाहिले तो सुंदर रामचरित्राचे श्रवण करण्यासाठी वृद्ध वृद्ध असे पुष्कळ पक्षी जमले आहेत; आणि तो भुशुंडी कथेचा आरंभ करण्याच्या विचारात आहे, तोच पक्षिराज गरुड तेथे गेला.



आवत देखि सकल खगराजा । हरषेउ बायस सहित समाजा ।।
अति आदर खगपति कर कीन्हा । स्वागत पूछि सुआसन दीन्हा ।।
करि पूजा समेत अनुरागा । मधुर बचन तब बोलेउ कागा ।।

दो० – नाथ कृतारथ भयउँ मैं तव दरसन खगराज ।
आयसु देहु सो करौं अब प्रभु आयहु केहि काज ।। ६३ (क) ।।
सदा कृतारथ रूप तुम्ह कह मृदु बचन खगेस ।
जेहि कै अस्तुति सादर निज मुख कीन्हि महेस ।। ६३ (ख) ।।

चौ० – सुनहु तात जेहि कारन आयउँ । सो सब भयउ दरस तव पायउँ ।।
देखि परम पावन तव आश्रम । गयउ मोह संसय नाना भ्रम ।।
अब श्रीराम कथा अति पावनि । सदा सुखद दुख पुंज नसावनि ।।
सादर तात सुनावहु मोही । बार बार बिनवउँ प्रभु तोही ।।
सुनत गरुड़ कै गिरा बिनीता । सरल सुप्रेम सुखद सुपुनीता ।।
भयउ तासु मन परम उछाहा । लाग कहै रघुपति गुन गाहा ।।
प्रथमहिं अति अनुराग भवानी । रामचरित सर कहेसि बखानी ।।
पुनि नारद कर मोह अपारा । कहेसि बहुरि रावन अवतारा ।।
प्रभु अवतार कथा पुनि गाई । तब सिसु चरित कहेसि मन लाई ।।

दो० – बालचरित कहि बिबिधि बिधि मन महँ परम उछाह ।
रिषि आगवन कहेसि पुनि श्रीरघुबीर बिबाह ।। ६४ ।।

—सर्व खगांचा राजा येत असलेला पाहून त्या पक्षिसमाजासहित त्या वायसाला आनंद झाला. सर्वांनी गरुडाचा मोठा आदर-सत्कार केला. भुशुंडीने त्याचे स्वागत करून कुशल विचारले व बसण्यास सुंदर आसन दिले. त्यानंतर मोठ्या प्रेमाने त्याने खगेश्वराची पूजा केली, आणि मग तो कावळा मधुरवाणीने बोलू लागला.

"हे नाथ! खगराज! आपल्या दर्शनाने मी आज कृतार्थ झालो. आपण जी आज्ञा द्याल ती मी पालन करीन. प्रभो आज कोणत्या हेतूने आपले येणे झाले?" ६३ (क)

ते प्रेमळ वचन ऐकून कोमल वाणीने गरुड म्हणाला,

"ज्यांची सादर प्रशंसा महेशांनी आपल्या मुखाने केली, ते तुम्ही सदा कृतार्थरूपच आहात. ६३ (ख)

हे तात! ऐकावे; मी ज्या हेतूने इकडे आलो ते माझे काम झाले. व तुमचे दर्शन घडले. तुमचा हा परम पावन आश्रम पाहूनच माझ्या अंतःकरणातील मोह, नानाप्रकारचे संशय व भ्रम नष्ट झाले. हे तात! अत्यंत पावन करणारी, सदा सुख देणारी आणि दुःखाच्या समूहाचा विनाश करणारी अशी श्रीरामचंद्रांची कथा आता मला आदर पूर्वक सांगा. एवढीच हे प्रभो! माझी आपणाला पुनः पुन्हा विनंती आहे."

अत्यंत नम्र, प्रेमळ, सरळ, सुखदायक आणि परम पावन अशी ही गरुडाची वाणी ऐकताच त्या काकाच्या मनात विलक्षण उत्साहाला भरती आली, व तो रघुपतीची कथा सांगू लागला.

– भुशुंडीकथित श्रीरामचरित मानस –

शंकर सांगू लागले,- "हे भवानी! भुशुंडीने प्रथम श्रीरामचरिताचे सुंदर मानससरोवराच्या रूपकात अत्यंत प्रेमाने वर्णन केले. मग नारदास झालेल्या मोहाचे वर्णन करून रावणाच्या अवताराची कथा सांगितली. त्यानंतर प्रभूच्या अवताराची कथा सुरू करून भगवंताच्या शिशुलीला अत्यंत प्रेमाने कथन केल्या. मग विविध प्रकारचे बालचरित्र उत्साहाने-प्रेमोत्साहानेवर्णन करून पुढे विश्वामित्रांच्या आगमनापासून तो श्रीरघुवीर-विवाहापर्यंतची कथा त्याने सांगितली. ६४

चौ० – बहुरि राम अभिषेक प्रसंगा । पुनि नृप बचन राज रस भंगा ।।
पुरबासिन्ह कर बिरह बिषादा । कहेसि राम लछिमन संबादा ।।
बिपिन गवन केवट अनुरागा । सुरसरि उतरि निवास प्रयागा ।।
बालमीक प्रभु मिलन बखाना । चित्रकूट जिमि बसे भगवाना ।।
सचिवागवन नगर नृप मरना । भरतागवन प्रेम बहु बरना ।।
करि नृप क्रिया संग पुरबासी । भरत गए जहँ प्रभु सुख रासी ।।
पुनि रघुपति बहु बिधि समुझाए । लै पादुका अवधपुर आए ।।
भरत रहनि सुरपति सुत करनी । प्रभु अरु अत्रि भेंट पुनि बरनी ।।

दो० – कहि बिराध बध जेहि बिधि देह तजी सरभंग ।
बरनि सुतीछन प्रीति पुनि प्रभु अगस्ति सतसंग ।। ६५ ।।

चौ० – कहि दंडक बन पावनताई । गीध मइत्री पुनि तेहिं गाई ।।
पुनि प्रभु पंचबटीं कृत बासा । भंजी सकल मुनिन्ह की त्रासा ।।
पुनि लछिमन उपदेस अनूपा । सूपनखा जिमि कीन्हि कुरूपा ।।
खर दूषन बध बहुरि बखाना । जिमि सब मरमु दसानन जाना ।।
दसकंधर मारीच बतकही । जेहि बिधि भई सो सब तेहिं कही ।।
पुनि माया सीता कर हरना । श्रीरघुबीर बिरह कछु बरना ।।
पुनि प्रभु गीध क्रिया जिमि कीन्ही। बधि कबंध सबरिहि गति दीन्ही ।।

त्यानंतर रामाभिषेक प्रसंगाच्या कथेत दशरथ राजाच्या वचनामुळे राज्याभिषेकाचा विरस कसा झाला ते वर्णन केले. पुढे अयोध्यावासी लोकांचा विरह विषाद सांगून. त्यानंतर राम-लक्ष्मण संवाद कसा झाला ते सांगितले. श्रीरामचंद्रांचे वनगमन, नाविकाचे प्रेमवर्णन. गंगा नदी उतरून पलीकडे गमन. प्रयागात एकरात्र मुक्काम, याची कथा मग त्याने सांगितली. यानंतर प्रभू व वाल्मीकी यांची भेट सांगून भगवान चित्रकूट पर्वतावर जाऊन कसे राहिले याचे वर्णन केले.

पुढे सुमंत्र सचिवाचे अयोध्येत परत येणे, दशरथ राजांचे मरण. भरताचे मामाकडून परत येणे आणि त्याचे राम प्रेम हे सांगितले. त्यानंतर भरताने दशरथराजांची उत्तरक्रिया केली आणि सुखराशी श्रीरामचंद्र जेथे होते, त्या चित्रकूट पर्वतावर पुरवासी लोकांसह भरताचे गमन हा कथा भाग त्याने सांगितला.

चित्रकूट पर्वतावर रामभरत भेट झाल्यावर रघुपतींनी त्याचे नानाप्रकारे सांत्वन केले, आणि पादुका घेऊन भरत अयोध्येला परत आले. पुढे भरताची राहणी इत्यादी कथा सांगून इंद्राचा मुलगा जयंत याने कावळ्याचे रूप घेऊन केलेली वेडेपणाची करणी, प्रभू-अत्रिऋषी भेट हे चरित्र त्याने वर्णन केले.

मग ज्याप्रकारे विराधाचा वध करून पुढे जात असता शरभंग भेटला व त्याने देहत्याग केला, सुतीक्ष्णाची अतुल्य प्रीती प्रभू अगस्ती यांचा सत्संग सांगून. ६५

प्रभूनी दंडकवन पावन केल्याचे व जटायूशी मैत्री केल्याचे वृत्त त्याने कथन केले. त्यानंतर श्रीरामचंद्रांच्या पंचवटीतील वास्तव्यामुळे सर्व मुनी कसे निर्भय झाले ही हकीकत सांगितल्यावर लक्ष्मणाला अनुपम उपदेश केल्याची कथा झाली.

त्याला जोडून शूर्पणखेस कुरूप केल्यावर त्रिशिर-खर-दूषणांचे वध केल्याने दशाननाला या सर्वांचे मर्म कसे कळले, हे समजावून दिले. त्याच्यापुढे रावण-मारीच संवाद सांगून मायासीतेचे हरणाने रघुवीरास कसा विरह झाला, तो प्रसंग वर्णन केला. पुढे रघुपतींनी जटायूची क्रिया केली व वाटेत कबंधाच्या वधानंतर शबरीच्या आश्रमात जाऊन तिला गती दिली. हे रसाळ वृत्त भुशुंडीकडून एकाग्रमनाने मिळाले. पुनः सीता-



बहुरि बिरह बरनत रघुबीरा । जेहि बिधि गए सरोबर तीरा ।।

दो० – प्रभु नारद संबाद कहि मारुति मिलन प्रसंग ।
पुनि सुग्रीव मिताई बालि प्रान कर भंग ।। ६६ (क) ।।
कपिहि तिलक करि प्रभु कृत सैल प्रबरषन बास ।
बरनन बर्षा सरद अरु राम रोष कपि त्रास ।। ६६ (ख) ।।

चौ० – जेहि बिधि कपिपति कीस पठाए । सीता खोज सकल दिसि धाए ।।
बिबर प्रबेस कीन्ह जेहि भाँती । कपिन्ह बहोरि मिला संपाती ।।
सुनि सब कथा समीरकुमारा । नाघत भयउ पयोधि अपारा ।।
लंकाँ कपि प्रबेस जिमि कीन्हा । पुनि सीतहि धीरजु जिमि दीन्हा ।।
बन उजारि रावनहि प्रबोधी । पुर दहि नाघेउ बहुरि पयोधी ।।
आए कपि सब जहँ रघुराई । बैदेही की कुसल सुनाई ।।
सेन समेति जथा रघुबीरा । उतरे जाइ बारिनिधि तीरा ।।
मिला बिभीषन जेहि बिधि आई । सागर निग्रह कथा सुनाई ।।

दो० – सेतु बाँधि कपि सेन जिमि उतरी सागर पार ।
गयउ बसीठी बीरबर जेहि बिधि बालिकुमार ।। ६७ (क) ।।
निसिचर कीस लराई बरनिसि बिबिधि प्रकार ।
कुंभकरन घननाद कर बल पौरुष संघार ।। ६७ (ख) ।।

चौ० – निसिचर निकर मरन बिधि नाना । रघुपति रावन समर बखाना ।।
रावन बध मंदोदरि सोका । राज बिभीषन देव असोका ।।

विरह वर्णन करत प्रभू पंपा सरोवराच्या तीरी कसे आले, हे सांगून प्रभू-नारद संवादाचा सुंदर प्रसंग वर्णन केला. नंतर मारुती भेट, सुग्रीवाशी मैत्री व वालीचा वध ही कथा झाली. ६६ (क)

त्याच्या मागून सुग्रीवाचा राज्याभिषेक, प्रभूचा प्रवर्षण पर्वतावर वास, त्याला जोडून वर्षा व शरदृतूचे वर्णन केले. मग श्रीरामाचा सुग्रीवावर झालेला रोष व त्याचा परिणाम होऊन सुग्रीवाला वाटलेले भय, पुढे कपीश सुग्रीवाने सीता-शोधासाठी कपींना कसे पाठविले. ६६ (ख)

त्यांचे सर्व दिशांना गमन, कपींचा विवरात प्रवेश, शेवटी सागरतीरावर त्यांची व संपातीची भेट, हा कथाभाग सांगण्यात आला. त्यानंतर पवनसुताने संपाती व जांबवान यांनी सांगितलेली माहिती घेऊन अपार सागरोल्लंघन केले व लंकेत प्रवेश करून सीतेला कसा धीर दिला, हे रोमांचकारी वृत्त त्याने कथन केले.

त्यानंतर अशोक वनाचा विध्वंस, रावणाला उपदेश, लंकापूर जळणे व पुनः समुद्रोल्लंघन करून परत येणे, ही वायुसुताची महनीय कामगिरी सांगितली. त्याच्यापुढे सर्व कपींचे रघुपतिसन्निध गमन, हनुमंताने वैदेही कुशल निवेदन केले, लगेच सैन्यासह रघुवीर सागराच्या तीरावर आले, बिभीषणाची शरणागति आणि सागरनिग्रह हे प्रसंग भुशुंडीने सांगितले.

त्याच्यामागून सेतुबंधानंतर कपिसेना सागरपार गेली. श्रेष्ठ वालिकुमाराचे दूत म्हणून लंकेत जाणे. ६७ (क)

निशाचरांशी कपींच्या लढाईचे सविस्तर वर्णन, कुंभकर्णाची अवाढव्य शक्ती व अचाट पराक्रम, त्याचप्रमाणे मेघनादाचेही बळ व पौरुष व दोघांचा संहार कसा केला, हे वर्णन ऐकावयास मिळाले. ६७ (ख)

त्याच्यापुढे अनेक प्रकारांनी राक्षसांच्या सैन्याचे मरण, रघुपति-रावणयुद्ध, रावणवध. मंदोदरीचा शोक या प्रसंगांचे वर्णन झाले.

सीता रघुपति मिलन बहोरी । सुरन्ह कीन्हि अस्तुति कर जोरी ॥
पुनि पुष्पक चढ़ि कपिन्ह समेता । अवध चले प्रभु कृपा निकेता ॥
जेहि बिधि राम नगर निज आए । बायस बिसद चरित सब गाए ॥
कहेसि बहोरि राम अभिषेका । पुर बरनत नृपनीति अनेका ॥
कथा समस्त भुसुंड बखानी । जो मैं तुम्ह सन कही भवानी ॥
सुनि सब राम कथा खगनाहा । कहत बचन मन परम उछाहा ॥

सो० — गयउ मोर संदेह सुनेउँ सकल रघुपति चरित ।
भयउ राम पद नेह तव प्रसाद बायस तिलक ॥ ६८ (क) ॥
मोहि भयउ अति मोह प्रभु बंधन रन महुँ निरखि ।
चिदानंद संदोह राम बिकल कारन कवन ॥ ६८ (ख) ॥

चौ० — देखि चरित अति नर अनुसारी । भयउ हृदयँ मम संसय भारी ॥
सोइ भ्रम अब हित करि मैं माना । कीन्ह अनुग्रह कृपानिधाना ॥
जो अति आतप ब्याकुल होई । तरु छाया सुख जानइ सोई ॥
जौं नहिं होत मोह अति मोही । मिलतेउँ तात कवन बिधि तोही ॥
सुनतेउँ किमि हरि कथा सुहाई । अति बिचित्र बहु बिधि तुम्ह गाई ॥
निगमागम पुरान मत एहा । कहहिं सिद्ध मुनि नहिं संदेहा ॥

ह्या कथा सांगून बिभीषण राज्यारोहण, देवांना दुःखशोकातून मुक्त करणे, [illegible] देवांनी केलेली प्रभूची स्तुती व कपींच्यासह कृपाळू राम पुष्पक विमानातून अयोध्येस परत निघाले, ही हकीकत त्याने कथन केली.

त्याच्यापुढे श्रीरामचंद्र अयोध्येस कसे आले, ते सर्व उज्ज्वल चरित्र वायसाने विस्ताराने वर्णन केले. पुढे श्रीरामचंद्रांच्या राज्याभिषेकाची कथा सांगून, शेवटी [illegible] वर्णन करत असता अनेक प्रकारच्या राजनीतीचे वर्णन त्याने केले.

याप्रमाणे काकाने सांगितलेल्या [illegible] कल्पना गरुडाने कशी दिली, ते सांगून शंकर पार्वतीस म्हणाले, ' हे भवानी ! याप्रमाणे भुशुंडीने वर्णन केलेलीच सर्व रामकथा मी तुम्हाला सांगितली. ही सर्व कथा श्रवण करून खगनाथाच्या मनात मोठा उत्साह वाढून तो म्हणाला, " मी सर्व रामचरित्र श्रवण केले; आणि माझा संदेह नाहीसा झाला. हे वायस-टिळका ! माझ्या हृदयात [illegible] जो स्नेह उत्पन्न झाला, तो खरोखर तुमच्याच कृपेने ! ६८ (क)

" रावणाशी युद्ध चालू असता प्रभूंना बंधनात पाहून मला अतिशय मोह झाला होता की, सच्चिदानंद घनराम, स्वतःच बंधनात पडून व्याकुळ झाले कसे ? " ६८ (ख)

" अगदी प्राकृत मनुष्यासारखे चरित्र पाहून माझ्या मनात भारी संशय आले. परंतु मला झालेला भ्रम आता हिताचा वाटला; आणि कृपासागर प्रभूंनी तो माझ्यावर अनुग्रहच केला, अशी माझी खात्री झाली आहे.

" उन्हाच्या कडक उष्णतेने जो व्याकुळ झाला असेल, त्यालाच झाडाच्या शीतल छायेचे सुख अनुभवाला येते. दर्शन मला जर तो मोह झालाच नसता तर, हे तात ! तुझे दर्शन मला कसे झाले असते ? तसेच, अत्यंत विलक्षण प्रसंगांनी भरलेली अशी सुंदर हरिकथा जी तुम्ही अनेक प्रकारांनी सांगितली, ती ऐकण्याचे भाग्य मला कसे लाभले असते ?

" वेद, पुराणे व तंत्रादि शास्त्रे यांचे सर्वांचे हेच मत आहे, आणि सिद्ध व मुनी हेच निःसंदेहपणे

संत बिसुद्ध मिलहिं परि तेही । चितवहिं राम कृपा करि जेही ॥
राम कृपाँ तव दरसन भयऊ । तव प्रसाद सब संसय गयऊ ॥

दो० – सुनि बिहंगपति बानी सहित बिनय अनुराग ।
पुलक गात लोचन सजल मन हरषेउ अति काग ॥ ६९ (क) ॥
श्रोता सुमति सुसील सुचि कथा रसिक हरि दास ।
पाइ उमा अति गोप्यमपि सज्जन करहिं प्रकास ॥ ६९ (ख) ॥

चौ० – बोलेउ काकभसुंड बहोरी । नभग नाथ पर प्रीति न थोरी ॥
सब बिधि नाथ पूज्य तुम्ह मेरे । कृपापात्र रघुनायक केरे ॥
तुम्हहि न संसय मोह न माया । मो पर नाथ कीन्हि तुम्ह दाया ॥
पठइ मोह मिस खगपति तोही । रघुपति दीन्हि बड़ाई मोही ॥
तुम्ह निज मोह कही खग साईं । सो नहिं कछु आचरज गोसाईं ॥
नारद भव बिरंचि सनकादी । जे मुनिनायक आतमबादी ॥
मोह न अंध कीन्ह केहि केही । को जग काम नचाव न जेही ॥
तृस्नाँ केहि न कीन्ह बौराहा । केहि कर हृदय क्रोध नहिं दाहा ॥

दो० – ग्यानी तापस सूर कबि कोबिद गुन आगार ।
केहि कै लोभ बिडंबना कीन्हि न एहिं संसार ॥ ७० (क) ॥
श्रीमद बक्र न कीन्ह केहि प्रभुता बधिर न काहि ।

सांगतात की, श्रीराम ज्याच्याकडे कृपादृष्टीने पाहतात, त्यालाच विशुद्ध अंतःकरणाचे संत भेटतात! त्याच श्रीरामाच्या कृपेने आपले दर्शन घडले व आपल्या प्रसादाने माझे सर्व संशय नष्ट झाले. ”

विनय आणि प्रेम यांनी भरलेली अशी गरुडाची भाषा ऐकून काकभुशुंडीच्या अंगावर रोमांच उभे राहिले, ढोळ्यात आनंदाश्रू येऊन अंतःकरणात हर्ष मावेना! ६९ (क)

शंकर म्हणतात, ‘हे उमे! शुद्ध बुद्धी, सुशील, पवित्र, कथेतील रहस्य जाणणारा आणि हरिभक्त असा श्रोता मिळाला म्हणजे अत्यंत गुप्त ठेवण्यासारखे रहस्यसुद्धा संत त्याच्याजवळ प्रकट करतात. ६९ (ख)

पक्षिराज गरुडावर काकभुशुंडीचे थोडेथोडके नव्हे, पुष्कळ प्रेम बसल्यामुळे तो आदराने पुनः बोलू लागला, “ नाथ! आपण मला सर्व प्रकारे पूज्य मूळचेच आहात आणि विशेषतः आपण श्रीरघुनाथाच्या कृपेला पात्र झालेले आहात! खरे पाहिले तर आपणाला संशयही नाही–नव्हता आणि आपण मोहातही पडला नव्हता. खरोखर आपणच माझ्यावर दया केली. मोहाच्या निमित्ताने आपणाला माझ्याकडे श्रीरघुपतीनी पाठविले आणि मला मोठेपणा दिला.

पक्षिराज! आपण स्वतःला मोह झाला म्हणून म्हणाला, पण आपणाला तसा मोह झाला असल्यास त्यात आश्चर्य मानण्यासारखे मात्र काहीच नाही. मला सांगा, नारद, शंकर, ब्रह्मदेव, व सनकादिकांसारखे जे आत्मवादी मुनिनायक इत्यादि अत्यंत थोर आहेत ना? मग त्यातून कोणाला मोहाने आंधळे केले नाही? कामाने नाचविला नाही असा कोण आहे? तृष्णेने कोणाला नाही वेडा केला? क्रोधाने ज्याच्या हृदयात भडका उडवला नाही, असा कोण आहे? ज्ञानी, तपस्वी, शूर, कवी, पंडित आणि अगदी सद्‌गुणांचे आगर असे असणाऱ्यातसुद्धा असा कोण आहे की, या जगात लोभाने ज्याची अत्यंत विटंबना केली नाही? ७० (क)

हेही असो, पण लक्ष्मीचा मद कोणाला नाही खोडसाळ बनवीत? हाती सत्ता आली आणि तिने बहिरा

मृगलोचनि के नैन सर को अस लाग न जाहि ॥ ७० (ख) ॥

चौ० – गुन कृत सन्यपात नहिं केही । कोउ न मान मद तजेउ निबेही ॥
जोबन ज्वर केहि नहिं बलकावा । ममता केहि कर जस न नसावा ॥
मच्छर काहि कलंक न लावा । काहि न सोक समीर डोलावा ॥
चिंता साँपिनि को नहिं खाया । को जग जाहि न ब्यापी माया ॥
कीट मनोरथ दारु सरीरा । जेहि न लाग घुन को अस धीरा ॥
सुत बित लोक ईषना तीनी । केहि कै मति इन्ह कृत न मलीनी ॥
यह सब माया कर परिवारा । प्रबल अमिति को बरनै पारा ॥
सिव चतुरानन जाहि डेराहीं । अपर जीव केहि लेखे माहीं ॥

दो० – ब्यापि रहेउ संसार महुँ माया कटक प्रचंड ।
सेनापति कामादि भट दंभ कपट पाषंड ॥ ७१ (क) ॥
सो दासी रघुबीर कै समुझें मिथ्या सोपि ।
छुट न राम कृपा बिनु नाथ कहउँ पद रोपि ॥ ७१ (ख) ॥

चौ० – जो माया सब जगहि नचावा । जासु चरित लखि काहुँ न पावा ॥
सो प्रभु भ्रू बिलास खगराजा । नाच नटी इव सहित समाजा ॥

बनवला नाही असा कोणी आहे काय ? असा शूर वीर कोण दिसला काय की, [illegible] नेत्र कटाक्षरूपी बाणांनी जो घायाळ झाला नाही ? ७० (ख)

त्रिगुणांनी उत्पन्न केलेला सन्निपात रोग कोणाला नाही झाला ? असा कोण आहे की, अभिमानाने आणि मदाने ज्याला पछाडला नाही ?

तसेच, पहिली पंचवीशी कोणाचे टोके जाग्यावर ठेवते ? आंधळ्या प्रेमाने कोणाच्या नोंदाला काळोखी फासली नाही ? मत्सराने ज्याची कीर्ती कलंकित केली नाही असा कोणी आहे काय ? त्याचप्रमाणे शोकरूपी झंझावाताने हालवून खिळखिळा कोणाला केला नाही ? चितारूपी सापिणीच्या भक्ष्यस्थानी पडला नाही असा कोणी आहे काय ? म्हणूनच मी विचारतो की, या सर्व जगात ज्याला मायेने व्यापले नाही असा कोण सापडणार ?

" खरोखर आपण जेवढे मनोरथ करतो, तेवढ्या वाळवी लाकडाच्या मुंग्या आहेत; आणि आपले जड शरीर हे एक लाकूड आहे. मग असा धीरवीर कोण आहे की, ज्याचे शरीरकाष्ठ या वाळवीच्या किड्यांनी खाल्ले नाही ? पुत्रैषणा, लोकैषणा आणि वित्तैषणा या तीन एषणा (प्रबळ इच्छा) कोणाच्या बुद्धीला मलिनपणा आणत नाहीत ?

" हा सर्व मायेचा परिवार आहे; हा फार प्रबळ असून अपार आहे; याचे पूर्णपणे वर्णन कोणालाच त्यामुळे करता येणार नाही. शिव आणि चतुर्मुख ब्रह्मदेवसुद्धा जिला भिऊन असतात, तिच्यापुढे इतर जीवांची गणती काय ?

" अशा या मायेच्या प्रचण्ड सैन्याने सर्व विश्वाला व्यापून टाकले आहे. त्या सैन्यातील सेनापती म्हणजे काम, क्रोध आणि लोभ; तसेच दंभ, कपट, पाखंड वगैरे सर्व शूर योद्धे आहेत. ७१ (क)

ती माया ज्ञान झाल्यावर जरी मिथ्या होत असली तरी ती रघुवीराची दासी आहे; म्हणून हे पक्षिराज ! मी प्रतिज्ञेवर सांगतो की, श्रीरघुवीर रामचंद्रांच्या कृपेशिवाय जीव तिच्या जाळ्यातून बाहेर पडूच शकत नाही. " ७१ (ख)

" शांतपणे विचार करून पाहिले तर असे दिसून येईल की, ती माया सर्व जगाला नाचवीत असून, तिची करणी मात्र कोणाच्याच लक्षात येत नाही ! असे असूनही, हे खगराजा ! आपल्या सर्व परिवारासह ती प्रभूच्या भुवयांच्या नुसत्या हालचालीवर नटीसारखी नाचत राहते !

सोइ सच्चिदानंद घन रामा । अज बिग्यान रूप बल धामा ॥
ब्यापक ब्याप्य अखंड अनंता । अखिल अमोघसक्ति भगवंता ॥
अगुन अदभ्र गिरा गोतीता । सबदरसी अनवद्य अजीता ॥
निर्मम निराकार निरमोहा । नित्य निरंजन सुख संदोहा ॥
प्रकृति पार प्रभु सब उर बासी । ब्रह्म निरीह बिरज अबिनासी ॥
इहाँ मोह कर कारन नाहीं । रबि सन्मुख तम कबहुँ कि जाहीं ॥

दो० —भगत हेतु भगवान प्रभु राम धरेउ तनु भूप ।
किए चरित पावन परम प्राकृत नर अनुरूप ॥ ७२ (क) ॥
जथा अनेक बेष धरि नृत्य करइ नट कोइ ।
सोइ सोइ भाव देखावइ आपुन होइ न सोइ ॥ ७२ (ख) ॥

चौ०—असि रघुपति लीला उरगारी । दनुज बिमोहनि जन सुखकारी ॥
जे मति मलिन बिषयबस कामी । प्रभु पर मोह धरहिं इमि स्वामी ॥
नयन दोष जा कहँ जब होई । पीत बरन ससि कहुँ कह सोई ॥
जब जेहि दिसि भ्रम होइ खगेसा । सो कह पच्छिम उयउ दिनेसा ॥
नौकारूढ़ चलत जग देखा । अचल मोह बस आपुहि लेखा ॥
बालक भ्रमहिं न भ्रमहिं गृहादी । कहहिं परस्पर मिथ्याबादी ॥

" एवढे ज्याचे पराकाष्ठेचे सामर्थ्य आहे, तोच सच्चिदानंद घन प्रभू श्रीरामचंद्र होय. तो अजन्मा असून, केवळ विज्ञानरूप आहे. बलाचे मोहरघर आहे. त्याचप्रमाणे व्यापक आणि व्याप्य असे विश्वही तोच आहे. तो अखंड, अनंत, परिपूर्ण, अमोघशक्ती व षड्गुणैश्वर्यरूप भगवंत आहे, तो अगुण असून, मोठ्याहून मोठा (अदभ्र) वाणी व इतर इंद्रिये यांच्या पलीकडे असणारा, सर्वदर्शी, निर्दोष, व कधीही कोणी न जिंकलेला असा आहे. तो ममतारहित, निराकार, मोहरहित, नित्य, मायादिरहित व सुखराशी आहे. मूळमायेच्याही पलीकडे असणारा तो प्रभू, सर्वांच्या हृदयात वास करणारा, इच्छारहित, विकाररहित (विरज) अविनाशी ब्रह्मच श्रीरामचंद्र आहेत !

" अशा श्रीरघुवीराच्या ठिकाणी मोहाचे कारण उत्पन्न होणेच शक्य नाही. सूर्याच्या समोर अंधार कधी गेला आहे काय ? भगवंत श्रीरामचंद्र भक्तांच्या कल्याणासाठी भूपतीचा देह धारण करून अवतरले आहेत. त्यांनी सामान्य मनुष्याप्रमाणे वागूनही परमपावन असे चरित्र निर्माण करून ठेवले ! " ७२ (क)

" जसा एखादा बहुरूपी अनेक वेष घेऊन नाचतो आणि घेतलेल्या सोंगाला अनुसरून त्याची बतावणी करतो, परंतु तो स्वतः त्यातील कोणीच होत नाही; तसेच हे प्रभूचे नर चरित्र आहे ! " ७२ (ख)

" हे सर्पशत्रो अशीच रघुपतीची लीला आहे; ती दानवांना विमोहित करणारी, परंतु भक्तांना मात्र सुखकारक असते.

" अहो स्वामी ! जे मलिन बुद्धी, विषयवश, आणि कामी असतात, तेच प्रभूवर मोहाचा आरोप करतात. कावीळ झालेला मनुष्यच चंद्र पिवळा आहे, असे म्हणतो. हे खगेश्वरा ! जेव्हा एखाद्याला दिशांचा भ्रम होतो, तेव्हाच तो सूर्य पश्चिमेला उगवला आहे, असे म्हणू लागतो. नावेत बसणाराला जगच पळत आहे, असे वाटते. आणि मोहाने स्वतःला मात्र अचल आहे, असे तो मानतो. मुले काळ्या-माळ्या करून गरगर फिरू लागतात. आणि खोटे बोलणारी ती पोरे स्थिर असणाऱ्या घराकडे पाहून म्हणतात, ' पाहा, घरे कशी फिरत आहेत ! '

हरि बिषइक अस मोह बिहंगा। सपनेहुँ नहिं अग्यान प्रसंगा ।।
मायाबस मतिमंद अभागी। हृदयँ जमनिका बहुबिधि लागी ।।
ते सठ हठ बस संसय करहीं। निज अग्यान राम पर धरहीं ।।

दो०—काम क्रोध मद लोभ रत गृहासक्त दुखरूप।
ते किमि जानहिं रघुपतिहि मूढ़ परे तम कूप ।। ७३ (क) ।।
निर्गुन रूप सुलभ अति सगुन जान नहिं कोइ।
सुगम अगम नाना चरित सुनि मुनि मन भ्रम होइ ।। ७३ (ख) ।।

चौ०—सुनु खगेस रघुपति प्रभुताई। कहउँ जथामति कथा सुहाई ।।
जेहि बिधि मोह भयउ प्रभु मोहि। सोउ सब कथा सुनावउँ तोही ।।
राम कृपा भाजन तुम्ह ताता। हरि गुन प्रीति मोहि सुखदाता ।।
ताते नहिं कछु तुम्हहिं दुरावउँ। परम रहस्य मनोहर गावउँ ।।
सुनहु राम कर सहज सुभाऊ। जन अभिमान न राखहिं काऊ ।।
संसृत मूल सूलप्रद नाना। सकल सोक दायक अभिमाना ।।
ताते करहिं कृपानिधि दूरी। सेवक पर ममता अति भूरी ।।
जिमि सिसु तन ब्रन होइ गोसाईं। मातु चिराव कठिन की नाईं ।।

"हे गरुड! हरिविषयीच्या मोहाची अशीच गोष्ट आहे. त्या प्रभूच्या ठिकाणी स्वप्नातसुद्धा अज्ञानाचा प्रवेश होण्याचा संभव नसतो.

"परंतु होते काय, मंदबुद्धीचे अभागी लोक मायेला वश होतात व स्वतःच्या हृदयावर चढलेली नाना-प्रकारची पटले विसरून, पढतमूर्ख बनल्याने हट्टाला बळी पडतात आणि प्रभुविषयी संशयग्रस्त होऊन आपले स्वतःचे अज्ञान प्रभूवर लादतात.

"असे त्यांनी केले तर त्यात आश्चर्य ही कांही नाही. याचे कारण काम, क्रोध, लोभ, मद इत्यादिकांत हे जीव रंगलेले असतात, ज्याचे स्वरूपच दुःखदायक आहे अशा घर, बायकामुले. आप्तइष्टांचा परिवार यावर त्यांची आसक्ती बसते. अशांना रघुपतीचे ज्ञान होणे कसे शक्य आहे? खरे पाहिले तर ते मूढ अज्ञानांधःकार रूपी आडातच पडलेले असतात!" ७३ (क)

"त्याप्रमाणे दुसराही एक महत्त्वाचा सिद्धान्त आहे, निर्गुण रूप जाणण्याला त्या मानाने सोपे, परंतु सगुण रूप जाणण्याची शक्ती कोणालाच नसते त्याचा परिणाम असा होतो की सोप्या व कळण्यास कठीण अशा दोन्हीं प्रकारच्या भगवंताच्या लीलांचे श्रवण करून ज्ञानी मुनीसुद्धा प्रसंगी मोहात पडतात!" ७३ (ख)

– भुशुंडीला भक्तिप्राप्ती –

"हे खगेश! आता रघुपतीचा महिमा सांगतो; ऐका; हीही कथा सुन्दर आहे. माझ्या बुद्धीप्रमाणे ती मी आपणास सांगतो प्रथम मला मोह कसा झाला, तो सगळा वृत्तान्त. प्रभो! ऐका! हे तात! तुमच्यावर श्रीरामाची कृपा असून हरिगुण ऐकण्याचे तुम्हाला प्रेम आहे हे समजल्यापासून मला केवढे सुख होत आहे! म्हणून आतां तुमच्यापासून काहीच लपवून न ठेवता परत मनोहर असे रहस्यमय वर्णन मी सांगतो.

"श्रीरामाचा सहज स्वभाव असा आहे की. ते आपल्या भक्तांचा अभिमान कधीही शिल्लक राहू देत नाहीत. याचे कारण असे की, हाच अभिमान नानाप्रकारचे क्लेश देऊन सर्व प्रकारचे शोक उत्पन्न करणाऱ्या जन्म-मरण-रूप संसाराचे मूळ आहे! म्हणून आपल्या सेवकावर फार प्रेम करणारे कृपानिधी रघुपती त्या अभिमानाला दूर करतात.

"स्वामी! आपल्या बालकाच्या अंगावर जर कुठे गळू झाले तर त्याची आई मन घट्ट करून ते



दो० –जदपि प्रथम दुख पावइ रोवइ बाल अधीर ।
ब्याधि नास हित जननी गनति न सो सिसु पीर ।। ७४ (क) ।।
तिमि रघुपति निज दास कर हरहिं मान हित लागि ।
तुलसिदास ऐसे प्रभुहि कस न भजहु भ्रम त्यागि ।। ७४ (ख) ।।

चौ० –राम कृपा आपनि जड़ताई । कहउँ खगेस सुनहु मन लाई ।।
जब जब राम मनुज तनु धरहीं । भक्त हेतु लीला बहु करहीं ।।
तब तब अवधपुरी मैं जाउँ । बालचरित बिलोकि हरषाउँ ।।
जन्म महोत्सव देखउँ जाई । बरष पाँच तहँ रहउँ लोभाई ।।
इष्टदेव मम बालक रामा । सोभा बपुष कोटि सत कामा ।।
निज प्रभु बदन निहारि निहारी । लोचन सुफल करउँ उरगारी ।।
लघु बायस बपु धरि हरि संगा । देखउँ बालचरित बहुरंगा ।।

दो० – लरिकाईं जहँ जहँ फिरहिं तहँ तहँ संग उड़ाउँ ।
जूठनि परइ अजिर महँ सो उठाइ करि खाउँ ।। ७५ (क) ।।
एक बार अतिसय सब चरित किए रघुबीर ।
सुमिरत प्रभु लीला सोइ पुलकित भयउ सरीर ।। ७५ (ख) ।।

चौ० – कहइ भसुंड सुनहु खगनायक । रामचरित सेवक सुखदायक ।।
नृप मंदिर सुंदर सब भाँती । खचित कनक मनि नाना जाती ।।

कापवून घेते; त्यावेळी ते बालक प्रथम जरी दुःख करते, व अधीर होऊन रडते तरी त्याची दूरदर्शी माता धीर धरून रोगविनाशासाठी त्या मुलाच्या दुःखाकडे दुर्लक्षच करते " ७४ (क)

तसेच रघुपती आपल्या सेवकाच्या हितासाठी त्याचा अभिमान नष्ट करतात. म्हणून तुलसीदास विचारतात की, भ्रमाचा त्याग करून अशा प्रभूची भक्ती मानव का करत नाहीत ? ७४ (ख)

" हे खगेश ! रामाची माझ्यावरील कृपा व माझा वेडेपणा वर्णन करून सांगतो ती कथा लक्षपूर्वक ऐका. ज्या ज्या वेळी राम आपल्या भक्तासाठी मनुष्यदेह धारण करतात, तेव्हा तेव्हा त्यांच्या कल्याणाचा मार्ग दिसावा म्हणून ते अनेक लीला करतात.

" ती संधी साधून मी अयोध्येत जातो आणि बालचरित्र पाहून मनसोक्त आनंद लुटतो. अगदी श्रीरामाच्या जन्मोत्सवाला हजर राहतो. तो पाच वर्षे ! माझा पायच तेथून निघत नाहीं याचे कारण माझे इष्ट दैवत बालरामचंद्र असून त्याच्या शरीराची शोभा कोट्यवधी मदनाच्या एकवटलेल्या सौंदर्याला फिकी पाडणारी असते. अशा वेळी माझ्या प्रभूचा मुखचंद्र वारंवार पाहून हे उरगारी ! मी आपल्या डोळ्यांचे पारणे फेडतो.

" त्यावेळी कावळ्याच्या पिलाचे रूप घेऊन मी श्रीहरीच्या बरोबर फिरतो आणि नाना प्रकारच्या बाललीला पाहतो. बालपणी श्रीराम जेथे जेथे फिरतात तेथे त्यांच्या बरोबर उडत जातो व अंगणात त्यांच्या तोंडून जे खाली पडेल ते उष्टे उचलून प्रसाद म्हणून खातो. " ७५ (क)

एकदा रघुवीराने विलक्षणच लीला केली. कवी म्हणतात प्रभूच्या त्या लीलेचे स्मरण होताच काकभुशुंडीचे शरीर रोमांचित होऊन पंख फुलले ! ७५ (ख)

तेव्हा भुशुंडी म्हणाला, " हे खगनायका ! सेवकास सुख देणारे श्रीरामचरित्र ऐका ! दशरथमहाराजांचा सर्व दृष्टींनी सुंदर असा महाल सर्वच सोन्याचा बनवलेला आणि त्यात रत्ने बसवलेली, अशा महालात चौघा बंधूंच्या नेहमीच्या खेळाकरता तयार केलेल्या मनोहर अंगणाचे तर वर्णन करताच येणार नाही ! अंगणांत आपल्या मातांना सुख देणारे रघुनायक बाललीला करत हिंडत असतात.

बरनि न जाइ रुचिर अँगनाई । जहँ खेलहिं नित चारिउ भाई ॥
बालबिनोद करत रघुराई । बिचरत अजिर जननि सुखदाई ॥
मरकत मृदुल कलेवर स्यामा । अंग अंग प्रति छबि बहु कामा ॥
नव राजीव अरुन मृदु चरना । पदज रुचिर नख ससि दुति हरना ॥
ललित अंक कुलिसादिक चारी । नूपुर चारु मधुर रवकारी ॥
चारु पुरट मनि रचित बनाई । कटि किंकिनि कल मुखर सुहाई ॥

दो० – रेखा त्रय सुंदर उदर नाभी रुचिर गँभीर ।
उर आयत भ्राजत बिबिधि बाल बिभूषन चीर ॥ ७६ ॥

चौ० – अरुन पानि नख करज मनोहर । बाहु बिसाल बिभूषन सुंदर ॥
कंध बाल केहरि दर ग्रीवा । चारु चिबुक आनन छबि सींवा ॥
कलबल बचन अधर अरुनारे । दुइ दुइ दसन बिसद बर बारे ॥
ललित कपोल मनोहर नासा । सकल सुखद ससि कर सम हासा ॥
नील कंज लोचन भव मोचन । भ्राजत भाल तिलक गोरोचन ॥
बिकट भृकुटि सम श्रवन सुहाए । कुंचित कच मेचक छबि छाए ॥
पीत झीनि झगुली तन सोही । किलकनि चितवनि भावति मोही ॥
रूप रासि नृप अजिर बिहारी । नाचहिं निज प्रतिबिंब निहारी ॥
मोहि सन करहिं बिबिधि बिधि क्रीड़ा । बरनत मोहि होति अति ब्रीड़ा ॥
किलकत मोहि धरन जब धावहिं । चलउँ भागि तब पूप देखावहिं ॥

त्यांचे त्यावेळचे शरीर मरकत रत्नासारखे सावळ्या रंगाचे किती नाजुक ! आणि प्रत्येक अवयवांची शोभा तर अनेक कामदेवांच्यासारखी ! नुकत्याच उमलेल्या लालकमळासारखे लालचुंद अणि कोमल असे तळवे– पायाची बोटे फारच छान असून, नखे तर चंद्राच्या कांतीला लाजविणारी– तळव्यांवर वज्र, अंकुश, ध्वज व ऊर्ध्व रेषा ही चार सुंदर चिन्हे कशी सुरेख दिसतात ! पायातील नूपुरे उत्कृष्ट असून, त्यांचा मंजुळ आवाज होतो. रत्नजडित सोन्याचा कडदोरा आणि त्याला सुंदर आणि मधुर आवाज करणाऱ्या घागऱ्या लावलेल्या ! पोटावर छानदार तीन रेषा दिसतात आणि बेंबी तर मनोहर अशी खोल आहे. छाती भरदार व रुंद आणि त्यावर अनेक प्रकारची बाळलेणी व वस्त्रे विराजत आहेत. ७६

लाल तळहात, हाताची बोटे व नखे मन हरण करणारी असून, विशाल बाहूवर सुंदर दागिने घातलेले; बालसिंहासारखे खांदे असून, शंखासारखा त्रिवलीयुक्त भरदार गळा आहे. हनुवटी सुंदर व मुख तर सौंदर्याची सीमाच ! बोबडे बोल, लाल ओठ व खालचा ओठ तर फारच मनोहर ! तोंडात चिमुकले पांढरे शुभ्र सुंदर दोन दोन दात आहेत.

गालाचे सौंदर्य आणि नाकाचा मनोहरपणा तर कमालीचा ! चंद्राच्या किरणासारखे सर्वांना आल्हाद-कारक हसणे; जन्ममरणापासून सुटका करणारे नीलकमलासारखे डोळे, आणि कपाळावर गोरोचनाचा टिळा खुलत असलेला. भिवया बाकदार, कान सम प्रमाणात आणि सुंदर. केस काळे कुरळे असल्याने त्यांची शोभा तर अवर्णनीयच. अंगात झिरझिरीत पिवळ्या रंगाचे झबले घातलेले किती डोळ्यात भरते ! अशा प्रभूंची नजर आणि खिदळणे पाहून तर मी अगदी बेहद्द खूष होतो.

दशरथमहाराजांच्या अंगणात सौंदर्यराशी श्रीरामचंद्र एके दिवशी विहार करत असता स्वतःच्या पडछायेकडे पाहून नाचू लागले. त्यानंतर माझ्याबरोबर अशी काही मौजेच्या क्रीडा करू लागली की, त्यांचे वर्णन करत असता मला अगदी लाजल्यासारखे होते. मौज अशी झाली की, ते खिदळत खिदळत मला धरण्यासाठी धावले, तेव्हा मी पळालो; मग मी जवळ यावे म्हणून मला आपल्या हातातला अनरसा दाखवू लागले.



दो० – आवत निकट हँसहिं प्रभु भाजत रुदन कराहिं ।।
जाउँ समीप गहन पद फिरि फिरि चितइ पराहिं ।। ७७ (क) ।।
प्राकृत सिसु इव लीला देखि उभय मोहि मोह ।
कवन चरित्र करत प्रभु चिदानंद संदोह ।। ७७ (ख) ।।

चौ० – एतना मन आनत खगराया । रघुपति प्रेरित ब्यापी माया ।।
सो माया न दुखद मोहि काहीं । आन जीव इव संसृत नाहीं ।।
नाथ इहाँ कछु कारन आना । सुनहु सो सावधान हरिजाना ।।
ग्यान अखंड एक सीताबर । माया बस्य जीव सचराचर ।।
जौं सब कें रह ग्यान एकरस । ईस्वर जीवहि भेद कहहु कस ।।
माया बस्य जीव अभिमानी । ईस बस्य माया गुन खानी ।।
परबस जीव स्वबस भगवंता । जीव अनेक एक श्रीकंता ।।
मुधा भेद जद्यपि कृत माया । बिनु हरि जाइ न कोटि उपाया ।।

दो० – रामचंद्र के भजन बिनु जो चह पद निर्बान ।
ग्यानवंत अपि सो नर पसु बिनु पूँछ बिषान ।। ७८ (क) ।।
राकापति षोड़स उअहिं तारागन समुदाइ ।
सकल गिरिन्ह दव लाइअ बिनु रबि राति न जाइ ।। ७८ (ख) ।।

अशा स्थितीत धावत धावत माझ्याजवळ येत तेव्हा हसत व मी उडून जाताच रडू लागत; त्यांनी रडू नये म्हणून त्यांच्या पाया पडण्यासाठी मी जवळ जाऊ लागलो की, भ्याल्यासारखे पळत सुटत. मी मागोमाग गेलो तर पुनः मागे वळून मला पहात आणि पळू लागत. ७७ (क)

अशा प्रकारची अगदी प्राकृत बालकासारखी त्यांची ती लीला पाहून मला मोह उत्पन्न झाला की, प्रभू सच्चिदानंदघन असून, असला कसला खेळ करत आहेत ? ७७ (ख)

हे खगराया ! गरुडा ! मी इतके मनात आणताच रघुपतीच्या प्रेरणेने, त्यांच्या मायेने मला पछाडले. तथापि मला ती माया जरासुद्धा दुःखकारक मात्र नव्हती. याचे मुख्य कारण म्हणजे अन्य जीवांप्रमाणे तिच्यामुळे मला संसृतीत पडावे लागले नाही.

असे होण्याचे येथे निराळे कारण आहे. ते, हे हरिवाहना ! सावधान राहून ऐक. एकटे सीतापतीच अखंड ज्ञानस्वरूप आहेत. त्यांच्याखेरीज उरलेली सर्व सचर व अचर प्राण्याची सृष्टी —जीव मायेला वश झालेले आहेत.

—सर्वांचेच ज्ञान जर सदा अखंड राहिले तर मग ईश्वर आणि जीव यांच्यात भेद कुठे उरला ? तो समजून घ्या. जीव देहाचे अभिमानी असल्याने मायेला वश असतात. पण तीच गुणांची खाण असलेली माया ईश्वराला वश असते. याचा अर्थ असा की, भगवान स्वतंत्र आहेत आणि जीव मात्र परवश आहेत. श्रीपती भगवान एकच आहेत; पण जीव अगणित असतात.

—मायेने केलेला भेद जरी मिथ्या असला तरी हरिकृपेशिवाय कोट्यवधी उपाय करूनही तो जात नाही; म्हणून श्रीरामचंद्राच्या भजनाशिवाय मोक्ष मिळविण्याची जो इच्छा करील, तो नर जरी कितीही ज्ञानवान असला तरी शिंग व शेपूट नसलेला पशूच समजावा ! ७८ (क)

—सोळा कलांनी पूर्णचंद्र आकाशात तेजाने तळपत असला, व नक्षत्रगणांचे सर्व समुदाय उगवले, त्याचवेळी पृथ्वीवरील सर्व पर्वतांना वणवा लावून ते भडकवले, तरीही सूर्याशिवाय रात्र जाणार नाही ! ! ७८ (ख)

चौ०– ऐसेहिं हरि बिनु भजन खगेसा। मिटइ न जीवन्ह केर कलेसा ॥
हरि सेवकहि न ब्याप अबिद्या। प्रभु प्रेरित ब्यापइ तेहि बिद्या ॥
ताते नास न होइ दास कर। भेद भगति बाढ़इ बिहंगबर ॥
भ्रम तें चकित राम मोहि देखा। बिहँसे सो सुनु चरित बिसेषा ॥
तेहि कौतुक कर मरमु न काहूँ। जाना अनुज न मातु पिताहूँ ॥
जानु पानि धाए मोहि धरना। स्यामल गात अरुन कर चरना ॥
तब मैं भागि चलेउँ उरगारी। राम गहन कहँ भुजा पसारी ॥
जिमि जिमि दूरि उड़ाउँ अकासा। तहँ भुज हरि देखउँ निज पासा ॥

दो०– ब्रह्मलोक लगि गयउँ मैं चितयउँ पाछ उड़ात।
जुग अंगुल कर बीच सब राम भुजहिं मोहि तात ॥ ७९. (क) ॥
सप्तावरन भेद करि जहाँ लगें गति मोरि।
गयउँ तहाँ प्रभु भुज निरखि ब्याकुल भयउँ बहोरि ॥ ७९. (ख) ॥

चौ०– मूदेउँ नयन त्रसित जब भयऊँ। पुनि चितवत कोसलपुर गयऊँ ॥
मोहि बिलोकि राम मुसुकाहीं। बिहँसत तुरत गयउँ मुख माहीं ॥
उदर माझ सुनु अंडज राया। देखेउँ बहु ब्रह्मांड निकाया ॥
अति बिचित्र तहँ लोक अनेका। रचना अधिक एक ते एका ॥

त्याचप्रमाणे हे खगेशा ! रघुपती-भजनाशिवाय जीवांच्या क्लेशांचा नाश होत नाही. म्हणून जे हरि-सेवक झाले त्यांना पुनः अविद्या माया कधीच व्यापत नाही. प्रभूला इच्छा झाल्यास त्यांनी प्रेरणा दिलेली विद्यामाया मात्र हरिभक्तांना व्यापते. त्यामुळे त्यांचा नाश न होता, उलट हे पक्षिश्रेष्ठा ! त्यांची भेदभक्ती बाळसे धरते.

मला भ्रमाने चकित झालेला पाहून राम विहसले, ते विशेष प्रकारचे चरित्र आता सांगतो ऐक. प्रभूंनी त्यावेळी केलेल्या लीलेचे मर्म मात्र तेथे असलेल्या कोणाच्याच ध्यानी आले नाही. धाकटे भाऊ, दशरथराजे अगर सर्व माता यापैकी कोणालाही थोडीसुद्धा कल्पना आली नाही !

काय मौज झाली पाहा. ते सावळे शरीर आणि अत्यंत लाल लाल तळहात व तळपाय असलेले प्रभू रांगत रांगत मला धरण्यासाठी धावले. तेव्हा हे उरगारी, गरुडा ! मी पळू लागलो. बाल रामचंद्रांनी मला धरण्यासाठी आपले हात खूप लांब पसरले. म्हणून मी आकाशात दूर दूर व उंच उंच उडू लागलो. परंतु चमत्कार असा की, ते लांब हात व तो हरी मी वळून पाहिले की, माझ्या मागेच असल्याचे मला दिसून येई.

भीतीने मी सत्यलोकापर्यंत उडालो. व असा वारंवार उडत असता मागे पुनः वळून पाही, तो माझ्यात आणि रामबाहूत सतत फक्त दोनच अंगुळांचे अंतर असल्याचे मला दिसे. ७९. (क)

अशा भयभीत स्थितीत सात आवरणांचा भेद करून आपली गती जेथपर्यंत अकुंठित होती, तेथपर्यंत गेलो. परंतु कुठेही गेलो तरी माझ्या मागे दोन बोटांच्या अंतरावर प्रभूचे हात असलेले पाहून मी पुनः मनातल्या-मनात अगदी हैराण झालो. ७९. (ख)

शेवटी भीतीने मी आपले डोळे घट्ट मिटले. थोड्याच वेळाने उघडून पाहिले तो मी अयोध्येत परत आलो आहे, असे मला दिसून आले.

मी नजरेसमोर येताच राम हसले, आणि काय सांगू ! प्रभूंच्या हसण्याबरोबर त्या बाल रामाच्या मुखात माझा प्रवेश झाला. मग हे पक्षिराजा ! प्रभूंच्या पोटातच मला ब्रह्मांडाचे समूह दिसले. त्या ब्रह्मांडातील विचित्र

कोटिन्ह चतुरानन गौरीसा । अगनित उडगन रबि रजनीसा ।।
अगनित लोकपाल जम काला । अगनित भूधर भूमि बिसाला ।।
सागर सरि सर बिपिन अपारा । नाना भाँति सृष्टि बिस्तारा ।।
सुर मुनि सिद्ध नाग नर किंनर । चारि प्रकार जीव सचराचर ।।

दो० – जो नहिं देखा नहिं सुना जो मनहूँ न समाइ ।
सो सब अद्भुत देखेउँ बरनि कवनि बिधि जाइ ।। ८० (क) ।।
एक एक ब्रह्मांड महुँ रहउँ बरष सत एक ।
एहि बिधि देखत फिरउँ मैं अंड कटाह अनेक ।। ८० (ख) ।।

चौ० – लोक लोक प्रति भिन्न बिधाता । भिन्न बिष्नु सिव मनु दिसित्राता ।।
नर गंधर्ब भूत बेताला । किंनर निसिचर पसु खग ब्याला ।।
देव दनुज गन नाना जाती । सकल जीव तहँ आनहि भाँति ।।
महि सरि सागर सर गिरि नाना । सब प्रपंच तहँ आनइ आना ।।
अंडकोश प्रति प्रति निज रूपा । देखेउँ जिनस अनेक अनूपा ।।
अवधपुरी प्रति भुवन निनारी । सरजू भिन्न भिन्न नर नारी ।।
दसरथ कौसल्या सुनु ताता । बिबिध रूप भरतादिक भ्राता ।।
प्रति ब्रह्मांड राम अवतारा । देखउँ बालबिनोद अपारा ।।

दो० – भिन्न भिन्न मैं दीख सबु अति बिचित्र हरिजान ।
अगनित भुवन फिरेउँ प्रभु राम न देखेउँ आन ।। ८१ (क) ।।

भुवनांची रचना एकापेक्षा एक सरस होती. कोट्यवधी ब्रह्मदेव, कोट्यवधी शंकर, अगणित नक्षत्रे, अगणित सूर्यचंद्र, अगणित लोकपाल, यम, काळ, अगणित विशाल पर्वत व अफाट पसरलेले भूप्रदेश मला त्या ठिकाणी दिसू लागले. त्याचप्रमाणे असंख्य सागर, नद्या, तलाव, अरण्ये आणि नानाप्रकारचा इतर सर्व सृष्टिविस्तार मी पाहिला.

तसेच देव, मुनी, सिद्ध, नाग, नर, किन्नर इत्यादि चारी खाणींचे स्थावर-जंगम सर्व जीव मला दिसले. याशिवाय जे पूर्वी कधी पाहिले किंवा ऐकलेसुद्धा नव्हते, इतकेच नव्हे कल्पनारूपानेदेखील जे कधी मनातही येणे शक्य नव्हते, ते सर्व अद्भुत दृश्य मला दिसले. पण त्याचे वर्णन कसे करता येणार ? ८० (क)

अशा या अपूर्व देखाव्याचा पुरेपुर उपयोग घेण्यासाठी मी प्रत्येक ब्रह्मांडात शंभर शंभर वर्षे राहिलो, आणि याप्रमाणे मी ती अगणित ब्रह्मांडे पाहात पाहात फिरू लागलो. ८० (ख)

प्रत्येक ब्रह्मांडात भिन्न भिन्न ब्रह्मदेव, भिन्न भिन्न विष्णू, शंकर, मनू, दिक्पाल इत्यादी भिन्न आहेत. गंधर्व, भूते, वेताळ, मनुष्य, सर्प, निशाचर, पशू, पक्षी, किन्नर, देवदान व समुदाय इत्यादी सर्व नानाजातीचे आहेत व सर्वच जीव भिन्न प्रकारचे आहेत. जमीन, सागर, नद्या, तलाव व पर्वत नानाप्रकारचे असून प्रत्येक ब्रह्मांडात सर्व प्रपंचच निरनिराळा आहे असे दिसले.

सर्व ब्रह्मांडात माझे स्वतःचे रूपही भिन्न दिसले; आणि पुष्कळ वस्तू दिसल्या. तसेच, प्रत्येक ब्रह्मांडात अयोध्यापुरी भिन्न दिसली. शरयू भिन्न आणि नारीनरही भिन्न प्रकारचे दिसले. त्याचप्रमाणे प्रत्येक ब्रह्मांडातील अयोध्येत दशरथ, कौसल्या, माता, भरत, लक्ष्मण व शत्रुघ्न असे बंधू दिसले व त्यांची रूपे भिन्न भिन्न होती.

त्यावेळी प्रत्येक ब्रह्मांडात झालेला राम-अवतार पाहिला व अपार बाललीलाही पाहिल्या. हे हरि ! यात मी पाहिलेले सर्व भिन्न भिन्न व अतिविचित्र होते; मी अगणित ब्रह्मांडात फिरलो; पण कोणत्याही ब्रह्माण्डात प्रभू राम मात्र वेगळे दिसले नाहीत ! ८१ (क)

सोइ सिसुपन सोइ सोभा सोइ कृपाल रघुबीर ।
भुवन भुवन देखत फिरउँ प्रेरित मोह समीर ॥ ८१ (ख) ॥

चौ० – भ्रमत मोहि ब्रह्मांड अनेका । बीते मनहुँ कल्प सत एका ॥
फिरत फिरत निज आश्रम आयउँ । तहँ पुनि रहि कछु काल गवाँयउँ ॥
निज प्रभु जन्म अवध सुनि पायउँ । निर्भर प्रेम हरषि उठि धायउँ ॥
देखउँ जन्म महोत्सव जाई । जेहि बिधि प्रथम कहा मैं गाई ॥
राम उदर देखेउँ जग नाना । देखत बनइ न जाइ बखाना ॥
तहँ पुनि देखेउँ राम सुजाना । माया पति कृपाल भगवाना ॥
करउँ बिचार बहोरि बहोरी । मोह कलिल ब्यापित मति मोरी ॥
उभय घरी महँ मैं सब देखा । भयउँ भ्रमित मन मोह बिसेषा ॥

दो० – देखि कृपाल बिकल मोहि बिहँसे तब रघुबीर ।
बिहँसतहीं मुख बाहेर आयउँ सुनु मतिधीर ॥ ८२ (क) ॥
सोइ लरिकाई मो सन करन लगे पुनि राम ।
कोटि भाँति समुझावउँ मनु न लहइ बिश्राम ॥ ८२ (ख) ॥

चौ० – देखि चरित यह सो प्रभुताई । समुझत देह दसा बिसराई ॥
धरनि परेउँ मुख आव न बाता । त्राहि त्राहि आरत जन त्राता ॥
प्रेमाकुल प्रभु मोहि बिलोकी । निज माया प्रभुता तब रोकी ॥

प्रत्येक ब्रह्माण्डात तेच शिशुपण, तीच शोभा, व तेच कृपाळू रघुवीर मी ब्रह्माण्ड-ब्रह्माण्डात मायेच्या वाऱ्याने प्रेरणा केल्यामुळे पाहात राहिलो. ८१ (ख)

अशा प्रकारे अगणित ब्रह्माण्डात मी भ्रमण करत असता जणू शंभर कल्पाइतका काळ निघून गेला. त्यानंतर मी भटकत भटकत स्वतःच्या आश्रमात परत आलो; आणि काही काळ तेथे राहिलो. त्यानंतर जेव्हा कळले की, माझ्या प्रभूचा जन्म अयोध्येत झाला, तेव्हा प्रेमाने व आनंदाने धावतच निघालो. अयोध्येत जाऊन जन्ममहोत्सव पाहिला, त्याची कल्पना मी पूर्वी दिलीच आहे.

श्रीरामाच्या उदरात मला जी अगणित ब्रह्माण्डे दिसली, ती पाहणे शक्य होते; परंतु त्यांचे वर्णन करणे अशक्य होते, हे लक्षात असू द्या. मी प्रभूचा अवतार झाल्याचे ऐकून अयोध्येत गेलो, तेव्हा त्या ठिकाणी पुन्हा मायापती, कृपाळू, सुजाण भगवान मला दिसले.

मी वारंवार पुष्कळ विचार केला, परंतु माझी बुद्धी मोहरूपी मळाने व्यापलेली होती; त्यामुळे काही उपयोग झाला नाही. प्रभूच्या उदरात मला जे दिसले ते बाहेर या जगाच्या कालमानाप्रमाणे फक्त दोन घटकांतच दिसले. परंतु तेवढ्या वेळेत माझ्या मनाला विशेष प्रकारच्या मोहाने कमालीचा ताण पडून ते अतिशय थकून गेले.

उदरांतील माझी ती व्याकुळ झालेली स्थिती श्रीरामचंद्रांनी पाहिली व ते मोठ्याने हसले; आणि हे धीरमती गरुडा! त्या हसण्यानंतर मी प्रभूच्या मुखातून निघून बाहेर आलो. ८२ (क)

मला पाहून प्रभू पुन्हा पूर्वीचीच बाललीला माझ्याबरोबर करू लागले. मी आपल्या मनाला नानाप्रकारे समजावण्याचा प्रयत्न केला, परंतु काही केल्या त्याला शांती मिळेना. ८२ (ख)

हे प्राकृत शिशूसारखे चरित्र पाहून आणि तो पाहिलेला प्रभाव आठवून माझी देह शुध्दी राहिली नाही. "हे आर्त जनपालका! त्राहि, त्राहि!" असे म्हणत मी जमिनीवर पडलो, आणि माझ्या मुखातून शब्दही निघेना अशा प्रकारे प्रेम विव्हळ झालेला पाहून, प्रभूंनी आपल्या प्रबल मायेला आवरले, माझ्या

कर सरोज प्रभु मम सिर धरेऊ। दीनदयाल सकल दुख हरेऊ॥
कीन्ह राम मोहि बिगत बिमोहा। सेबक सुखद कृपा संदोहा॥
प्रभुता प्रथम बिचारि बिचारी। मन महँ होइ हरष अति भारी॥
भगत बछलता प्रभु कै देखी। उपजी मम उर प्रीति बिसेषी॥
सजल नयन पुलकित कर जोरी। कीन्हिउँ बहु बिधि बिनय बहोरी॥

दो० —सुनि सप्रेम मम बानी देखि दीन निज दास।
बचन सुखद गंभीर मृदु बोले रमानिवास॥ ८३ (क)॥
काकभुसुंडि मागु बर अति प्रसन्न मोहि जानि।
अनिमादिक सिधि अपर रिधि मोच्छ सकल सुख खानि॥ ८३ (ख)॥

चौ० —ग्यान बिबेक बिरति बिग्याना। मुनि दुर्लभ गुन जे जग नाना॥
आजु देउँ सब संसय नाहीं। मागु जो तोहि भाव मन माहीं॥
सुनि प्रभु बचन अधिक अनुरागेउँ। मन अनुमान करन तब लागेउँ॥
प्रभु कह देन सकल सुख सही। भगति आपनी देन न कही॥
भगति हीन गुन सब सुख ऐसे। लवन बिना बहु बिंजन जैसे॥
भजन हीन सुख कवने काजा। अस बिचारि बोलेउँ खगराजा॥
जौं प्रभु होइ प्रसन्न बर देहू। मो पर करहु कृपा अरु नेहू॥
मन भावत बर मागउँ स्वामी। तुम्ह उदार उर अंतरजामी॥

मस्तकावर आपले करकमल ठेवले आणि दीनदयाळ श्रीरामचंद्रांनी माझे सर्व दुःख नाहीसे केले. त्याचवेळी सेवकांना सुख देणाऱ्या कृपाघन श्रीरामचंद्रांनी मला त्या विलक्षण प्रकारच्या मोहातूनही सोडवले.

—पूर्वीच्या त्या सर्व प्रभुतेचा मी विचार केला, तेव्हा माझे अंतःकरण आनंदाने भरून गेले. त्यातच प्रभूची ही भक्तवत्सलता ताजीच अनुभवल्याने माझ्या हृदयात त्या चरणांची अधिकच प्रीती उत्पन्न झाली; नेत्रातून अश्रू वाहू लागले, सर्व शरीर रोमांचित होऊन पंख फुलले; मी हात जोडले आणि प्रभूला नानाप्रकारे विनवणी केली.

माझी ती प्रेमळवाणी ऐकून व हा आपला दास अगदी दीन झाला आहे, हे जाणून श्रीलक्ष्मीनिवास रघुपती गंभीर, सुखदायक व मधुर वचन बोलले. ८३ (क)

"काक भुशुंडी! मी अत्यंत प्रसन्न झालो आहे, असे समजून कोणताही वर माग. पाहिजे तर अणिमादिक अष्ट महासिद्धी, सगळ्या ऋध्दी, आणि सर्व सुखांचे माहेर असणारा मोक्षसुद्धा माग. ८३ (ख)

तसेच ज्ञान, विवेक, वैराग्य, विज्ञान आणि मुनीनासुद्धा जगात दुर्लभ असणारे नानाप्रकारचे सद्‌गुण आज मी तुला देईन, यात मुळींच शंका नाही. म्हणून तुझ्या मनाला जे आवडेल, ते खुशाल मागून घे."

प्रभूचे हे भाषण ऐकून मी प्रेमभावनेने अगदी भरून गेलो. व मनात शांतपणाने विचार करू लागलो की, सगळे सुख मागून घे, असे जरी प्रभू म्हणाले, तरी माझी भक्ती मागून घे, असे काही म्हणाले नाहीत; मीठ नसलेले भाज्या वगैरे अन्न जसे बेचव, तसेच भक्तीवाचून सर्व सुख व सर्व गुण! एवढ्या करता भजन-हीन सुख काय कामाचे? हा विचार पक्का होऊन हे खगराजा! मी म्हणालो की,

"हे प्रभू! जर आपण प्रसन्न होऊन मला वर देत आहात आणि जर माझ्यावर एवढी कृपा आणि असा स्नेह करता तर माझ्या मनाला जो वर आवडतो तोच मी मागतो; आपण उदार असून माझ्या हृदयात

दो० – अबिरल भगति बिसुद्ध तव श्रुति पुरान जो गाव ।
जेहि खोजत जोगीस मुनि प्रभु प्रसाद कोउ पाव ॥ ८४ (क) ॥
भगत कल्पतरु प्रनत हित कृपा सिंधु सुख धाम ।
सोइ निज भगति मोहि प्रभु देहु करि राम ॥ ८४ (ख) ॥

चौ० – एवमस्तु कहि रघुकुलनायक । बोले बचन परम सुखदायक ॥
सुनु बायस तैं सहज सयाना । काहे न मागसि अस बरदाना ॥
सब सुख खानि भगति तैं मानी । नहिं जग कोउ तोहि सम बड़भागी ॥
जो मुनि कोटि जतन नहिं लहहीं । जे जप जोग अनल तन दहहीं ॥
रीझेउँ देखि तोरि चतुराई । मागेहु भगति मोहि अति भाई ॥
सुनु बिहंग प्रसाद अब मोरें । सब सुभ गुन बसिहहिं उर तोरें ॥
भगति ग्यान बिग्यान बिरागा । जोग चरित्र रहस्य बिभागा ॥
जानब तैं सबही कर भेदा । मम प्रसाद नहिं साधन खेदा ॥

दो० – माया संभव भ्रम सब न ब्यापिहहिं तोहि ।
जानेसु ब्रह्म अनादि अज अगुन गुनाकर मोहि ॥ ८५ (क) ॥
मोहि भगत प्रिय संतत अस बिचारि सुनु काग ।
कायँ बचन मन मम पद करेसु अचल अनुराग ॥ ८५ (ख) ॥

चौ० – अब सुनु परम बिमल मम बानी । सत्य सुगम निगमादि बखानी ॥

अंतर्यामी रूपाने राहून सर्व जाणतच आहा. म्हणून आपल्या ज्या प्रगाढ व मायातीत भक्तीची प्रशंसा वेदपुराणे करतात; आणि जिला मुनी व श्रेष्ठ योगी शोधत असतात, परंतु जी प्रभूच्या कृपेने क्वचित एखाद्यालाच मिळते. ८४ (क)

तीच आपली भक्ती, हे प्रभो ! भक्तांचे मनोरथ पूर्ण करणाऱ्या कल्पतरो ! शरणागताचे हित करणाऱ्या कृपासागरा ! हे सुखधाम श्रीरामचंद्रा ! माझ्यावर दया करून ती भक्ती मला द्या. " ८४ (ख)

ही अत्यंत दीन अशी वाणी ऐकून प्रभू म्हणाले.

" तथास्तु ! " मला परम सुख देणारे असे वचन बोलले, " हे वायसा ! ऐक; तू स्वभावतःच शहाणा असल्याने असे वरदान का बरे मागणार नाहीस ? सर्व प्रकारची सुखे देणारी भक्ती तू मागितलीस म्हणून तुझ्या सारखा महाभाग्यवान जगात कोणीही नाही. जे मुनी जप आणि योग यांच्या अग्नीने आपला देह जाळीत असतात त्यांनासुद्धा जी भक्ती कोट्यवधी प्रयत्नांनी मिळत नाही, ती भक्ती तू मागितलीस हे तुझे चातुर्य मला अत्यंत आवडले. आणि त्यामुळे मी तुझ्यावर अधिकच प्रसन्न झालो आहे.

" हे विहंगा ! ऐक माझ्या अनुग्रहाच्या बळाने सगळे सद्गुण तुझ्या हृदयात वास करतील. ज्ञान, भक्ती, विज्ञान, वैराग्य, योग, माझे चरित्र आणि चरित्र-रहस्य या सर्वांचे विभाग आणि भेद तू माझ्या कृपेने जाणशील; त्यासाठी कोणत्याच प्रकारचे साधनाचे कष्ट करण्याची तुला गरज नाही. इतःपर मायेपासून उत्पन्न होणारे भ्रम तुझ्या बुद्धीला व्यापणार नाहीत. तू मला अनादि, गुणातीत, जन्मरहित व गुणसागर असे ब्रह्म जाण. ८५ (क)

मला भक्त सदोदित प्रिय असतात. म्हणून हे काका ! लक्षपूर्वक ऐक; मनाने, कृतीने व वाणीने माझ्या चरणी अगदी अढळ प्रेम कर ! ८५ (ख)

सत्य, सुगम, आणि वेदपुराणांनी ज्याची प्रशंसा केली आहे अशी माझी अत्यंत पवित्र अशी वाणी आहे,

निज सिद्धांत सुनावउँ तोही । सुनु मन धरु सब तजि भजु मोही ॥
मम माया संभव संसारा । जीव चराचर बिबिधि प्रकारा ॥
सब मम प्रिय सब मम उपजाए । सब ते अधिक मनुज मोहि भाए ॥
तिन्ह महँ द्विज द्विज महँ श्रुति धारी । तिन्ह महुँ निगम धरम अनुसारी ॥
तिन्ह महँ प्रिय बिरक्त पुनि ग्यानी । ग्यानिहु ते अति प्रिय बिग्यानी ॥
तिन्ह ते पुनि मोहि प्रिय निज दासा । जेहि गति मोरि न दूसरि आसा ॥
पुनि पुनि सत्य कहउँ तोहि पाहीं । मोहि सेवक सम प्रिय कोउ नाहीं ॥
भगति हीन बिरंचि किन होई । सब जीवहु सम प्रिय मोहि सोई ॥
भगतिवंत अति नीचउ प्रानी । मोहि प्रान प्रिय असि मम बानी ॥

दो ० —सुचि सुसील सेवक सुमति प्रिय कहु काहि न लाग ।
श्रुति पुरान कह नीति असि सावधान सुनु काग ॥ ८६ ॥

चौ ० —एक पिता के बिपुल कुमारा । होहिं पृथक गुन सील अचारा ॥
कोउ पंडित कोउ तापस ग्याता । कोउ धनवंत सूर कोउ दाता ॥
कोउ सर्बग्य धर्मरत कोई । सब पर पितहि प्रीति सम होई ॥
कोउ पितु भगत बचन मन कर्मा । सपनेहुँ जान न दूसर धर्मा ॥
सो सुत प्रिय पितु प्रान समाना । जद्यपि सो सब भाँति अयाना ॥

तो तुला सांगतो. ऐक! आता मी तुला आपला सिद्धान्त सांगतो, तो सावधपणे ऐकून अंतःकरणात कोरून ठेव— सर्व सोड आणि माझी भक्ती कर. माझ्या मायेपासून उत्पन्न झालेल्या या संसारात कितीतरी प्रकारचे जीव आहेत. मीच सर्वांना निर्माण केले असल्याने ते सर्वच मला प्रिय आहेत.

तथापि, त्या सर्व प्राण्यांत मनुष्यप्राणी मला अधिक प्रिय वाटतात. त्या मनुष्यात पुनः ब्राह्मण, ब्राह्मणांत वेद मुखोद्गत असलेले प्रिय, त्यांच्यात वेदांच्या आज्ञेप्रमाणे वागणारे अधिक प्रिय असतात. त्याच्यात विरक्त अधिक आवडते. विरक्तापेक्षा ज्ञानी प्रिय, आणि ज्ञान्यापेक्षा विज्ञानी अधिक प्रिय असतात.

अशा विज्ञान्यात ज्याला माझीच गती आहे आणि दुसरी कोणाचीच आशा उरलेली नाही तो माझा दास मी अधिक प्रिय मानतो. मी तुला पुनः पुन्हा सत्य सांगतो की दासासारखा मला प्रिय कोणीही नाही. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे भक्तिविहीन ब्रह्मदेव जरी असला तरी तो मला मनुष्येतर जीवांच्या इतकाच प्रिय वाटेल. याच्या उलट भक्तिमान जीव जरी महा नीच असला तरी तो मला प्राणा-ाग्न्या प्रिय असतो. ही माझी प्रतिज्ञा आहे.

—शुची, सुशील आणि सुमती असलेला सेवक कोणाला प्रिय वाटत नाही सांग पाहू? वेदपुराणे जी नीती सांगतात ती हे काका! सावधान चित्ताने श्रवण कर. ८६

एकाच बापाचे पुष्कळ मुलगे असले तरी ते गुण, शील व आचार यांत वेगवेगळे असतात. कोणी होतो पंडित, तर कोणाला तपाचरण आवडते, कोणी चलाख बुद्धीचा, कोणी शूर, कोणी धनवान तर कोणी दाता होतो; तर कोणी धर्माप्रमाणे वागण्यावर निष्ठा ठेवणारे असतात; असे असले तरी सर्वांवर बापाचे प्रेम सारखेच असते.

अशा सर्व मुलांत एखादा वाणीने, मनाने व वागणुकीने आपल्या बापावरच सर्वस्वी प्रेम करणारा असून पितृभक्तीशिवाय दुसरा धर्म स्वप्नातसुद्धा तो जाणत नाही; असा मुलगा जरी सर्व प्रकारे मूर्ख असला तरी तो प्राणासारखा प्रिय होतो, हे आपण पाहतो ना?

अगदी याच न्यायाने माझे वर्तन घडते. पशुपक्ष्यादि सर्व तिर्यग् योनीतील जीव, देव, मनुष्य व निशाचर

एहि बिधि जीव चराचर जेते । त्रिजग देव नर असुर समेते ।।
अखिल बिस्व यह मोर उपाया । सब पर मोहि बराबरि दाया ।।
तिन्ह महँ जो परिहरि मद माया । भजै मोहि मन बच अरु काया ।।

दो०—पुरुष नपुंसक नारि वा जीव चराचर कोइ ।
सर्ब भाव भज कपट तजि मोहि परम प्रिय सोइ ।। ८७ (क) ।।

सो०—सत्य कहउँ खग तोहि सुचि सेवक मम प्रानप्रिय ।
अस बिचारि भजु मोहि परिहरि आस भरोस सब ।। ८७ (ख) ।।

चौ०—कबहूँ काल न ब्यापिहि तोही । सुमिरेसु भजेसु निरंतर मोही ।।
प्रभु बचनामृत सुनि न अघाउँ । तनु पुलकित मन अति हरषाउँ ।।
सो सुख जानइ मन अरु काना । नहिं रसना पहिं जाइ बखाना ।।
प्रभु सोभा सुख जानहिं नयना । कहि किमि सकहिं तिन्हहि नहिं बयाना ।।
बहु बिधि मोहि प्रबोधि सुख देई । लगे करन सिसु कौतुक तेई ।।
सजल नयन कछु मुख करि रूखा । चितइ मातु लागी अति भूखा ।।
देखि मातु आतुर उठि धाई । कहि मृदु बचन लिए उर लाई ।।
गोद राखि कराव पय पाना । रघुपति चरित ललित कर गाना ।।

सो०—जेहि सुख लागि पुरारि असुभ बेष कृत सिव सुखद ।
अवधपुरि नर नारि तेहि सुख महुँ संतत मगन ।। ८८ (क) ।।

यांसह जितके चराचर जीव आहेत, म्हणजेच दुसऱ्या भाषेत हे सगळे विश्व मी निर्माण केलेले आहे; अर्थात् सर्वांवर माझीसारखी दया असते; परंतु त्यांतील जो जीव अभिमान, आसक्ती व कपट सोडून मनाने, वाणीने व प्रत्यक्ष कर्माने मला भजतो तो जीव; मग स्त्री, पुरुष, नपुंसक, लहान, थोर स्थावर, जंगम, कोणीही असो, सिद्धान्त एकच की, जो अनन्य होऊन निष्कपट अंतःकरणाने माझी भक्ती करतो, तो मला अत्यंत प्रिय होतो, हे पक्के ध्यानात ठेव. ८७ (क)

"हे खगा! तुला खरोखर सांगून ठेवतो, की पवित्र, अनन्यगतिक, कपटहीन व निष्काम असा माझा दास मला प्राणप्रिय असतो, हे जाणून इतरांचा भरंवसा —आशा सोडून माझीच भक्ती कर. ८७ (ख)

"यापुढे तुझ्यावर काळाची सत्ता मुळीच चालणार नाही. तू निरंतर माझे स्मरण आणि भजन मात्र करत राहा."

असे हे प्रभु-वचनामृताचे पान करत असता माझी तृप्ती होईना! माझ्या अंतःकरणात आनंदाचे भरते येऊन सर्व शरीरावरील पुलकामुळे पंख फुलले. त्या वेळचे ते भाषण ऐकणाऱ्या कानांना व समजून घेणाऱ्या मनालाच सुख झाल्याने त्याचे वर्णन करणे जिव्हेला शक्य नाही! तसेच, प्रभूंच्या त्या वेळच्या सौंदर्याची लूट केली डोळ्यांनी, पण त्यांना वाचा नसल्याने ते विचारे त्या आनंदाचे वर्णन कसे करू शकणार?

आता सांगितल्याप्रमाणे अनेक प्रकारचा मला उपदेश देऊन सुखी केले आणि प्रभू पुन्हा तीच बाल-लीला करू लागले. डोळ्यात पाणी आणले, आणि तोंड उतरल्यासारखे करून फार भूक लागल्याप्रमाणे आईकडे दीनवाण्या नजरेने पाहू लागले. हे पाहिल्याबरोबर माता कौसल्या उठून धावतच आली, गोड व कोमल असे शब्द बोलत तिने पटकन् उचलून त्यांना आपल्या हृदयाशी प्रथम धरले. मग मांडीवर घेऊन पाजले आणि ते चालू असता रघुपतीच्या लीला ती सुखाने गाऊ लागली.

सुखदायक व स्वतः कल्याणस्वरूप अशा त्रिपुरारींनी ज्या सुखासाठी अशुभ रूप धारण केले, त्या सुखसरितेत अयोध्यावासी नर-नारी निरंतर पोहत राहतात. ८८ (ख)

सोई सुख लवलेस जिन्ह बारक सपनेहुँ लहेउ ।
ते नहिं गनहिं खगेस ब्रह्मसुखहि सज्जन सुमति ।। ८८ (ख) ।।

चौ० – मैं पुनि अवध रहेउँ कछु काला । देखेउँ बालबिनोद रसाला ।।
राम प्रसाद भगति बर पायउँ । प्रभु पद बंदि निजाश्रम आयउँ ।।
तब ते मोहि न ब्यापी माया । जब ते रघुनायक अपनाया ।।
यह सब गुप्त चरित मैं गावा । हरि मायाँ जिमि मोहि नचावा ।।
निज अनुभव अब कहउँ खगेसा । बिनु हरि भजन न जाहिं कलेसा ।।
राम कृपा बिनु सुनु खगराई । जानि न जाइ राम प्रभुताई ।।
जानें बिनु न होइ परतीती । बिनु परतीति होइ नहिं प्रीती ।।
प्रीति बिना नहिं भगति दिढ़ाई । जिमि खगपति जल कै चिकनाई ।।

सो० – बिनु गुर होइ कि ग्यान ग्यान कि होइ बिराग बिनु ।
गावहिं बेद पुरान सुख कि लहिअ हरि भगति बिनु ।। ८९ (क)।।
कोउ बिश्राम कि पाव तात सहज संतोष बिनु ।
चलै कि जल बिनु नाव कोटि जतन पचि पचि मरिअ ।। ८९ (ख) ।।

चौ० – बिनु संतोष न काम नसाहिं । काम अछत सुख सपनेहुँ नाही ।।
राम भजन बिनु मिटहिं कि कामा । थल बिहीन तरु कबहुँ कि जामा ।।
बिनु बिग्यान कि समता आवइ । कोउ अवकास कि नभ बिनु पावइ ।।
श्रद्धा बिना धर्म नहिं होई । बिनु महि गंध कि पावइ कोई ।।

अशा या सुखाचा लवलेश ज्याला निदान स्वप्नात एकदा जरी मिळाला तरी तो सद्बुद्धीचा सज्जन, हे खगेजा! मग प्रत्यक्ष ब्रह्मसुखालाही किंमत देत नाही. ८८ (ख)

अशी वस्तुस्थिती असल्याने मी काही दिवस अयोध्येत राहून प्रभूच्या रसाळ अशा बाललीला पाहिल्या. श्रीरामचंद्रांच्या कृपेने मला इष्ट असा भक्तिवर मिळाल्याने पाच वर्षांचा काळ लोटताच प्रभुचरणाना वंदन करून मी आपल्या आश्रमात परत आलो. याप्रमाणे रघुनायकांनी या दासाला आपला म्हटल्यापासून, प्रभूची माया मला व्यापू शकली नाही.

—असो, हरिमायेने ज्या प्रकाराने मला मोहित केला ते सर्व गुणचरित्र येथपर्यंत मी आपणाला सविस्तर असे सांगितले. आता मी आपला स्वतःचा अनुभव सांगतो की, हरिभजनावाचून क्लेशांचा नाश नाही. तसेच हे खगराजा! ऐकून ठेव की, रामाच्या कृपेशिवाय रामाचा प्रभाव कळणे शक्य नाही. तसा प्रभाव समजल्याशिवाय विश्वास बसत नाही, विश्वासावाचून प्रीती उत्पन्न होत नाही आणि प्रीतीशिवाय भक्तीला बळकटी येत नाही, जसा हे खगनाथा! तेल-तुपाशिवाय पाण्याला पक्का चिकटपणा ठरू शकत नाही.

शिवाय-मी आपणाला विचारतो की, गुरुशिवाय ज्ञान कधी प्राप्त होते काय? आणि वैराग्याशिवाय कधी ज्ञान प्राप्त होते? त्याचप्रमाणे वेदपुराणे वर्णन करतात की, हरिभक्तीवाचून सुख कधीच मिळत नाही. ८९ (क)

हे तात! अंतःकरणाच्या नैसर्गिक संतोषाशिवाय जीवाला कधी शांति लाभ होईल काय? मरे मरेपर्यंत कष्ट केले तरी पाण्याशिवाय कधी तरी नाव चालणे शक्य आहे काय? ८९ (ख)

संतोषावाचून अनेक कामनांचा नाश होत नाही; आणि जेथे या अनेक अतृप्त वासनांची बकबक आहे, तिथे स्वप्नातसुद्धा सुखाचा लाभ होणे शक्य नाही. आणि रामभजनाशिवाय –कामना, कामक्रोध आदिकरून शत्रूंचा नायनाट कधी तरी होईल काय? जमिनीवाचून झाड उगवणे व आकाशाशिवाय पोकळी असणे जसे अशक्य, तसेच विज्ञानाशिवाय समता येत नाही व श्रद्धेवाचून धर्म घडत नाही. पृथ्वीतत्त्वाशिवाय सुगंध अगर दुर्गंध कधी तरी मिळणे शक्य आहे?

बिनु तप तेज कि कर बिस्तारा। जल बिनु रस कि होइ संसारा॥
सील कि मिल बिनु बुध सेवकाई। जिमि बिनु तेज न रूप गोसाँई॥
निज सुख बिनु मन होइ कि थीरा। परस कि होइ बिहीन समीरा॥
कवनिउ सिद्धि कि बिनु बिस्वासा। बिनु हरि भजन न भव भय नासा॥

दो० — बिनु बिस्वास भगति नहिं तेहि बिनु द्रवहिं न रामु।
राम कृपा बिनु सपनेहुँ जीव न लह बिश्रामु॥ ९० (क)॥

सो० — अस बिचारि मतिधीर तजि कुतर्क संसय सकल।
भजहु राम रघुबीर करुनाकर सुंदर सुखद॥ ९० (ख)॥

चौ० — निज मति सरिस नाथ मैं गाई। प्रभु प्रताप महिमा खगराई॥
कहेउँ न कछु करि जुगुति बिसेषी। यह सब मैं निज नयनन्हि देखी॥
महिमा नाम रूप गुन गाथा। सकल अमित अनंत रघुनाथा॥
निजनिज मतिमुनि हरिगुन गावहिं। निगम सेष सिव पार न पावहिं॥
तुम्हहि आदि खग मसक प्रजंता। नभ उड़ाहिं नहिं पावहिं अंता॥
तिमि रघुपति महिमा अवगाहा। तात कबहुँ कोउ पाव कि थाहा॥
रामु काम सत कोटि सुभग तन। दुर्गा कोटि अमित अरि मर्दन॥
सक्र कोटि सत सरिस बिलासा। नभ सत कोटि अमित अवकासा॥

हे खगपते! तपाशिवाय तेज, जलतत्त्वाशिवाय रस मिळणे जसे अशक्य, त्याप्रमाणे संतांची सेवा केल्याशिवाय शिवाची प्राप्ती होणे अशक्य असते. हे स्वामी! तेजतत्त्वाशिवाय रूप दिसते काय? आत्म-सुखावाचून मनाला स्थैर्य मिळणे तसेच शक्य नाही. त्याचप्रमाणे वायूवाचून स्पर्श होणे व विश्वासाशिवाय कोणत्याही सिद्धि प्राप्त होणे हे जसे अशक्य, तसेच हरिभजनाशिवाय जन्ममृत्युरूप संसाराच्या भयापासून सुटणे असंभवनीय आहे.

तात्पर्य, विश्वासावाचून भक्ती नाही, तिच्याशिवाय श्रीरामाच्या हृदयाला पाझर फुटत नाही, आणि रामकृपेशिवाय जीवाला स्वप्नातसुद्धा विश्रांति मिळत नाही. ९० (क)

हे जाणून हे धीरबुद्धी! सर्व कुतर्क आणि संशय सोडून करुणासागर, सुंदर व सुखदायक अशा श्रीरघुवीर रामालाच भजा. ९० (ख)

हे नाथ! हे खगराजा! प्रभूच्या प्रतापाचा महिमा मी आतापर्यंत यथामती वर्णन केला. तो करत असता त्यात आपल्या पदरचे काही वाढून ती कथा युक्तीने फुगवून अगर वाढवून बिल्कुल सांगितली नाही. जेवढे सांगितले तेवढे सर्व मी आपल्या डोळ्यांनी अगोदर अनुभवले आहे.

श्रीरघुनाथाचा महिमा, नाम, रूप व गुण यांच्या कथा सर्वच अपार व अनंत आहेत. रघुनाथसुद्धा अनंत आहेत. अशा रघुनाथाचा वेद, शेष व शिव यांना देखील जरी अंतपार लागत नाही तरी मुनी आपापल्या बुद्धिशक्तीप्रमाणे हरिगुण चरित्रादि गातातच.

हे खगेश्वर! आपल्यापासून क्षुद्र डासापर्यंत आकाशगामी सर्व जीवजंतू आकाशात उडतात, पण त्याचा अंत कोणासच लागत नाही. तसाच श्रीरघुपतीचा महिमा अपार असल्याने त्याचा ठाव कोणता व कधी लागणे शक्य आहे?

याचे कारण श्रीराम शरीराने शेकडो कामदेवांच्यासारखे सुंदर आहेत; अनंत कोटी दुर्गाप्रमाणे असंख्य शत्रूंचा संहार करण्यास समर्थ आहेत. भोगविलासांच्या बाबतीत शेकडो कोटी इंद्रांना मागे सारणार आहेत.

दो ० –मरुत कोटि सत बिपुल बल रबि सत कोटि प्रकास ।
ससि सत कोटि सुसीतल समन सकल भव त्रास ।। ९१ (क) ।।
काल कोटि सत सरिस अति दुस्तर दुर्ग दुरंत ।
धूमकेतु सत कोटि सम दुराधरष भगवंत ।। ९१ (ख) ।।

चौ ० –प्रभु अगाध सत कोटि पताला । समन कोटि सत सरिस कराला ।।
तीरथ अमित कोटि सम पावन । नाम अखिल अघ पूग नसावन ।।
हिमगिरि कोटि अचल रघुबीरा । सिंधु कोटि सत सम गंभीरा ।।
कामधेनु सत कोटि समाना । सकल काम दायक भगवाना ।।
सारद कोटि अमित चतुराई । बिधि सत कोटि सृष्टि निपुनाई ।।
बिष्नु कोटि सम पालन कर्ता । रुद्र कोटि सत सम संहर्ता ।।
धनद कोटि सत सम धनवाना । माया कोटि प्रपंच निधाना ।।
भार धरन सत कोटि अहीसा । निरबधि निरुपम प्रभु जगदीसा ।।

छं ०– निरुपम न उपमा आन राम समान रामु निगम कहै ।।
जिमि कोटि सत खद्योत सम रबि कहत अति लघुता लहै ।।
एहि भाँति निज निज मति बिलास मुनीस हरिहि बखानहीं ।
प्रभु भाव गाहक अति कृपाल सप्रेम सुनि सुख मानहीं ।।

शेकडो कोटी आकाशाएवढी पोकळी त्यांच्यात असून. शेकडो कोटी वायूचे विपुल बळ त्यांच्यात आहे. शेकडो कोटी सूर्यांसारखा प्रकाश असून, तितक्याच चंद्रासारखे अत्यंत शीतल व विशेषेकरून सर्व भवभयाचे हरण करणारे आहेत. ९१ (क)

त्यांच्याबरोबर शेकडो कोटी काळासारखे दुस्तर, दुर्गम व दुरंत असून, तितक्याच धूमकेतूसारखे अत्यंत भयानक पण त्याच वेळी भगवानही आहेत. ९१ (ख)

प्रभू अनेक कोटी पाताळासारखे अगाध आहेत, शेकडो कोटी यमराजासारखे क्रूर, भयंकर आहेत. अगणित कोटी तीर्थांसारखे पावन करणारे असून, त्यांचे केवळ नामच संपूर्ण पातकांच्या समूहांचा नाश करणारे आहेत.

कोटयवधी हिमालय पर्वतासारखे रघुवीर अचल असून, शेकडो कोटी सागरांच्याप्रमाणे गंभीर आहेत. तसेच शेकडो कोटी कामधेनूप्रमाणे आपल्या भक्तांच्या कामना परिपूर्ण करणारे ते असून, अमित कोटी शारदांच्यासारखे चातुर्य त्यांच्यात आहे. शेकडो कोटी ब्रह्मदेवांच्याप्रमाणे सृष्टी निर्माण करण्याचे कौशल्य त्यांच्यात असून अनेक कोटी विष्णूसारखे त्या सृष्टीचे पालनही ते करू शकतात. त्यांच्याबरोबर अनंत कोटी रुद्रासारखे संहारासही ते समर्थ आहेत !

शेकडो कोटी कुबेरासारखे श्रीरघुनाथ धनवान असून, कोट्यवधी मायांच्या सारखे प्रपंचांचे निधान आहेत. भार सहन करण्यात ते शेकडो कोटी शेषांसारखे आहेत. सारांश, प्रभू रघुनाथ जगदीश्वर असून, सीमारहित व उपमा रहित असे आहेत.

दुसरी कोणाची उपमा देणे अशक्य असल्याने श्रीराम उपमारहित आहेत. म्हणून वेद सांगतात की, श्रीराम हे रामासारखेच आहेत. शतकोटी काजव्यासारखा सूर्य आहे, असे म्हणण्यात जसा सूर्याला फार कमीपणा येतो, तसेच वरील सर्व वर्णन एका दृष्टीने श्रीरामाच्या सामर्थ्यास कमीपणा आणणारेच आहे. तथापि कांही कल्पना येण्यासाठी मुनिश्रेष्ठ आपल्या बुद्धिवैभवानुसार श्रीहरीचे वर्णन करतात. परंतु प्रभू अतिकृपाळू असून भक्तांच्या अंतःकरणातील भाव जाणणारे आहेत; म्हणून प्रेमाने हे सर्व ऐकतात व सुख मानतात.

दो० –रामु अमित गुन सागर थाह कि पावइ कोइ ।
संतन्ह सन जस किछु सुनेउँ तुम्हहि सुनायउँ सोइ ॥ ९२ (क) ॥

सो० – भाव बस्य भगवान सुख निधान करुना भवन ।
तजि ममता मद मान भजिअ सदा सीता रवन ॥ ९२ (ख) ॥

चौ० –सुनि भुसुंडि के बचन सुहाए । हरषित खगपति पंख फुलाए ॥
नयन नीर मन अति हरषाना । श्रीरघुपति प्रताप उर आना ॥
पाछिल मोह समुझि पछिताना । ब्रह्म अनादि मनुज करि माना ॥
पुनि पुनि काग चरन सिरु नावा । जानि राम सम प्रेम बढ़ावा ॥
गुर बिनु भव निधि तरइ न कोई । जौं बिरंचि संकर सम होई ॥
संसय सर्प ग्रसेउ मोहि ताता । दुखद लहरि कुतर्क बहु ब्राता ॥
तव सरूप गारुडि रघुनायक । मोहि जिआयउ जन सुखदायक ॥
तव प्रसाद मम मोह नसाना । राम रहस्य अनूपम जाना ॥

दो० –ताहि प्रसंसि बिबिधि बिधि सीस नाइ कर जोरि ।
बचन बिनीत सप्रेम मृदु बोलेउ गरुड बहोरि ॥ ९३ (क) ॥

श्रीराम अगणित गुणांचे सागर आहेत; त्यामुळे त्यांचा थांगपत्ता कोणाला लागला आहे काय ? संतांच्या संगतीत जसे मला थोडे.फार समजले तसे मी आपणाला सांगितले. ९२ (क)

भगवान सुखाचे आगर व करुणेचे माहेरघर असून सद्भावनेला वश होणारे आहेत, म्हणून आसक्ती अभिमान व प्रतिष्ठेची आकांक्षा सोडून सीतारमणाची सदोदित उपासना करा. ९१ (ख)

—गरुडाची कृतज्ञता—

याप्रमाणे काकभुशुंडीचे सुंदर भाषण ऐकल्यावर गरुडाने मोठा आनंद झाल्यामुळे आपले पंख फुलवले. डोळे आनंदाश्रूंनी भरून आले व पोटात हर्ष मावेना ! आतापर्यंत ऐकलेला श्रीरघुपतींचा प्रताप शांतपणे हृदयात त्याने धारण केला. त्याचवेळी पूर्वीच्या मोहाचे स्मरण होऊन तो पश्चात्ताप करू लागला की, अनादि ब्रह्माला मी वेडेपणाने मनुष्य समजलो.

अशा मनःस्थितीत भुशुंडीच्या पायावर त्याने वारंवार मस्तक नमवले व त्याला प्रभू रामचंद्रांच्या जागी मानून त्याच्या वरील प्रेमात वाढ केली. कारण मोह नाश करणारा तो गुरू हे अनुभवाने ठरले होते त्याची आता खात्री झाली की, गुरूशिवाय भवसागर कोणीच तरून जाऊ शकत नाहीत; मग ते ब्रह्मदेवासारखे सृष्टिरचना करणारे असोत किंवा सर्व जगाचे कल्याण करणाऱ्या शंकरासारखे असोत ! शेवटी त्याने आपल्या भावनाना थोडा बांध घालून तो बोलू लागला,

“तात ! मला संशयरूपी सर्प चावला होता. त्यामुळे कुतर्करूपी दुःखदायक लहरी पुष्कळ येत होत्या. अशावेळी सेवकाला सुख देणाऱ्या रघुनायक गारुड्याने तुमच्या रूपाने माझे प्राण वाचवले. तुमच्या कृपेने माझा मोह गेला व श्रीरामाचे अनुपम रहस्य मला कळले.

—गरुड प्रश्न—

त्यानंतर भुशुंडींची नानाप्रकारे प्रशंसा करून गरुडाने आपले मस्तक नमवले; हात जोडले व विनयाने कोमल व प्रेमळ असे भाषण पुनः केले ९३ (क)

प्रभु अपने अबिबेक ते बूझउँ स्वामी तोहि।
कृपासिंधु सादर कहहु जानि दास निज मोहि ॥ ९३ (ख) ॥

चौ० – तुम्ह सर्बग्य तग्य तम पारा। सुमति सुसील सरल आचारा ॥
ग्यान बिरति बिग्यान निवासा। रघुनायक के तुम्ह प्रिय दासा ॥
कारन कवन देह यह पाई। तात सकल मोहि कहहु बुझाई ॥
राम चरित सर सुंदर स्वामी। पायहु कहाँ कहहु नभगामी ॥
नाथ सुना मैं अस सिव पाहीं। महा प्रलयहुँ नास तव नाहीं ॥
मुधा बचन नहिं ईस्वर कहई। सोउ मोरें मन संसय अहई ॥
अग जग जीव नाग नर देवा। नाथ सकल जगु काल कलेवा ॥
अंड कटाह अमित लय कारी। कालु सदा दुरतिक्रम भारी ॥

सो० – तुम्हहि न ब्यापत काल अति कराल कारन कवन।
मोहि सो कहहु कृपाल ग्यान प्रभाव कि जोग बल ॥ ९४ (क) ॥

दो० – प्रभु तव आश्रम आएँ मोर मोह भ्रम भाग।
कारन कवन सो नाथ सब कहहु सहित अनुराग ॥ ९४ (ख) ॥

चौ० – गरुड़ गिरा सुनि हरषेउ कागा। बोलेउ उमा परम अनुरागा ॥
धन्य धन्य तव मति उरगारी। प्रस्न तुम्हारि मोहि अति प्यारी ॥
सुनि तव प्रस्न सप्रेम सुहाई। बहुत जनम कै सुधि मोहि आई ॥
सब निज कथा कहउँ मैं गाई। तात सुनहु सादर मन लाई ॥

" हे प्रभो ! स्वामी ! माझ्या अविवेकाने मी आपणास काही विचारत आहे. हे कृपासागरा ! मला आपला दास समजून आदरपूर्वक माहिती सांगा " ९३ (ख)

" तुम्ही सर्वज्ञ असून तत्त्वाचे ज्ञाते आहात; तसेच मायारूपी अंधःकाराच्या पलीकडे गेलेले असल्याने वैराग्य, ज्ञान व विज्ञान यांचे निवासस्थान बनलात. सर्वांत मुख्य गोष्ट म्हणजे श्रीरघुनाथाचे तुम्ही प्रिय भक्त आहात. इतके असून तुम्हाला हा कावळ्याचा देह मिळाला. याचे कारण काय, ते मला, हे तात ! समजावून सांगा. तसेच हे स्वामी आपण पक्षी असून हे सुन्दर रामचरित मानस आपणाला कसे आणि कुठे मिळाले ? " शिवाय हे नाथ ! मी श्रीशंकरांकडून असेही ऐकले की, महाप्रलयाच्यावेळीसुद्धा आपला नाश होत नाही. शंकर कधी खोटे बोलणारच नाहीत पण माझ्या मनात आपला संशय निर्माण झाला आहे की, सर्व स्थावर-जंगम, जीव, नाग, मनुष्य आणि देव असे सर्व जग तर हे नाथ ! काळाचे भक्ष्य आहे. अनंत ब्रह्मांडांत लय करणारा काळ हा सदोदित अत्यंत अनिवार्य असा आहे. असला अत्यंत जबरदस्त व भयंकर काळ आपणाला व्यापीत नाही. याचे कारण काय असेल तेही हे कृपाळू मला सांगावे. याला कारण आपल्या ज्ञानाचे सामर्थ्य की काही योग-सिद्धी ? ९४ (क)

हे प्रभो ! आपल्या आश्रमात पाऊल टाकताच माझ्या अंतःकरणातील मोह व भ्रम एकदम नाहीसे झाले. याचे कारण काय ? हे सर्व नाथ ! मला स्नेहपूर्वक सांगा. ९४ (ख)

–गरुडाच्या प्रश्नांची उत्तरे–

शंकर पार्वतीला सांगू लागले, " उमे ! गरुडाच्या या भाषणाने भुशुंडीला हर्ष होऊन तो अत्यंत प्रेमाने बोलू लागला, " हे उरगारी ! खरोखर तुझी बुद्धी धन्य धन्य आहे ! एकंदरीत तुमचे प्रश्न मला फार आवडले. तुमच्या प्रेमळ व सुंदर प्रश्नामुळे मला माझ्या पुष्कळ जन्मांचे स्मरण झाले. ताता ! माझी सर्व कथा मी आता

जप तप मख सम दम ब्रत दाना । बिरति बिबेक जोग बिग्याना ॥
सब कर फल रघुपति पद प्रेमा । तेहि बिनु कोउ न पावइ छेमा ॥
एहिं तन राम भगति मैं पाई । ताते मोहि ममता अधिकाई ॥
जेहि तें कछु निज स्वारथ होई । तेहि पर ममता कर सब कोई ॥

सो० – पन्नगारि असि नीति श्रुति संमत सज्जन कहहिं ।
अति नीचहु सन प्रीति करिअ जानि निज परम हित ॥ ९५ (क) ॥
पाट कीट तें होइ तेहि तें पाटंबर रुचिर ।
कृमि पालइ सबु कोइ परम अपावन प्रान सम ॥ ९५ (ख) ॥

चौ० – स्वारथ साँच जीव कहुँ एहा । मन क्रम बचन राम पद नेहा ॥
सोइ पावन सोइ सुभग सरीरा । जो तनु पाइ भजिअ रघुबीरा ॥
राम बिमुख लहि बिधि सम देही । कबि कोबिद न प्रसंसहिं तेही ॥
राम भगति एहिं तन उर जामी । ताते मोहि परम प्रिय स्वामी ॥
तजउँ न तन निज इच्छा मरना । तन बिनु बेद भजन नहिं बरना ॥
प्रथम मोहँ मोहि बहुत बिगोवा । राम बिमुख सुख कबहुँ न सोवा ॥
नाना जनम कर्म पुनि नाना । किए जोग जप तप मख दाना ॥
कवन जोनि जनमेउँ जहँ नाहीं । मैं खगेस भ्रमि भ्रमि जग माहीं ॥
देखेउँ करि सब करम गोसाईं । सुखी न भयउँ अबहि की नाईं ॥
सुधि मोहि नाथ जन्म बहु केरी । सिव प्रसाद मति मोहँ न घेरी ॥

सांगतो. तुम्ही आदराने मन लावून श्रवण करा. व्रत, जप, तप, यज्ञ, याग; शम, दम, दान, वैराग्य, ज्ञान या सर्वांचे फळ रघुपतीचरणी भक्ती हेच आहे, कारण त्याशिवाय कोणालाच कल्याणाची प्राप्ती होत नाही.

"याच कावळ्याच्या देहात मला अशा रामभक्तीचा लाभ झाला, म्हणून साहजिकच या देहावर माझे अत्यंत प्रेम बसले. आणि ते साहजिकच आहे. कारण ज्याने आपला काही स्वार्थ साधतो त्याच्यावर कोणीही प्रेम करणारच ! हे सर्पशत्रू ! श्रुतींना मान्य असलेली अशी नीती आहे आणि संतही हेच सांगत आले आहेत की, आपले परमहित साधत असेल तर अत्यंत नीचावरसुद्धा प्रेम करावे. ९५ (क)

रेशमाचे किडे रेशीम देतात, त्या रेशमापासून पुढे मनोहर रेशमी वस्त्रे बनतात, म्हणून अत्यंत अपवित्र असे किडेसुद्धा मनुष्य अगदी प्राणासारखे जपून पाळतोच ना ! ९५ (ख)

मनाने, कृतीने व वाणीने श्रीरामचरणी प्रेम करणे हाच जीवाचा खरा स्वार्थ होय. कारण रामविमुख असणारा प्रत्यक्ष ब्रह्मदेवासारखा देह जरी मिळाला तरी कवी व पंडित त्या देहाची स्तुती मुळीच करत नाहीत. आणि हे स्वामी ! या कावळ्याच्या देहात श्रीरामभक्ती उत्पन्न झाली म्हणूनच मला हा काकदेह अत्यंत प्रिय झाला आहे. तसे पाहिले तर मी इच्छामरणी आहे, परंतु असे असूनही या देहाचा त्याग करावा असे वाटत नाही; कारण देहाशिवाय भजन करता येत नाही असे वेदच वर्णन करतात.

असो ! अगदी आरंभी अज्ञान मोहाने मलासुद्धा मूढ छळले. कारण त्यामुळेच मी रामविमुख स्थितीत राहिलो; अर्थात सुखाच्या झोपेची त्यावेळी केव्हाच आशा करणे व्यर्थ होते. अनेक जन्मात फिरत असता नाना प्रकारची योग यज्ञ, जप, तप, दान इत्यादी अनेक कर्मे केली. हे खगेशा ! जगात अशी एकही योनी आता उरलेली नाही की, मी जिच्यात जन्म घेतला नाही. त्याचप्रमाणे मी सर्वप्रकारची कर्मे करून पाहिली परंतु आताच्यासारखे सुख मी कधीच अनुभवले नाही.

"नाथ ! मला अनेक जन्मांची आठवण आहे. याचे कारण श्रीशिवजींची कृपा. त्यामुळे माझ्या बुद्धीला

दो० – प्रथम जन्म के चरित अब कहउँ सुनहु बिहगेस ।
सुनि प्रभु पद रति उपजइ जातें मिटहिं कलेस ॥ ९६ (क) ॥
पूरुब कल्प एक प्रभु जुग कलिजुग मल मूल ।
नर अरु नारि अधर्म रत सकल निगम प्रतिकूल ॥ ९६ (ख) ॥

चौ० – तेहिं कलिजुग कोसलपुर जाई । जन्मत भयउँ सूद्र तनु पाई ॥
सिव सेवक मन क्रम अरु बानी । आन देव निंदक अभिमानी ॥
धन मद मत्त परम बाचाला । उग्रबुद्धि उर दंभ बिसाला ॥
जदपि रहेउँ रघुपति रजधानी । तदपि न कछु महिमा तब जानी ॥
अब जाना मैं अवध प्रभावा । निगमागम पुरान अस गावा ॥
कवनेहुँ जन्म अवध बस जोई । राम परायन सो परि होई ॥
अवध प्रभाव जान तब प्रानी । जब उर बसहिं रामु धनुपानी ॥
सो कलिकाल कठिन उरगारी । पाप परायन सब नर नारी ॥

दो० – कलिमल ग्रसे धर्म सब लुप्त भए सदग्रंथ ।
दंभिन्ह निज मति कल्पि करि प्रगट किए बहु पंथ ॥ ९७ (क) ॥
भए लोग सब मोहबस लोभ ग्रसे सुभ कर्म ।
सुनु हरिजान ग्यान निधि कहउँ कछुक कलिधर्म ॥ ९७ (ख) ॥

चौ० – बरन धर्म नहिं आश्रम चारी । श्रुति बिरोध रत सब नर नारी ॥
द्विज श्रुति बेचक भूप प्रजासन । कोउ नहिं मान निगम अनुसासन ॥

मोह झाला नाही. खगराज ! आता माझ्या पहिल्या जन्माची हकीकत सांगतो, ऐका; ती ऐकून प्रभूच्या चरणी दृढ प्रेम निर्माण होईल आणि त्यामुळे सर्व प्रकारचे क्लेश टळतील. ९६ (क)

प्रभो ! पूर्वी एका कल्पात पापांचे मूळ असणारे कलियुग सुरू होते. तेव्हा पुरुषाबरोबर स्त्रियासुद्धा पाप करण्यात दंग झाल्या होत्या. आणि वेद शास्त्राला विरोध करण्यात सर्वांचे एकमत होते. ९६ (ख)

अशा त्या युगात शूद्र होऊन माझा जन्म अयोध्येत झाला. मनाने, कर्माने व वाणीने मी तेव्हा शिवाची उपासना करत असे. परंतु त्याबरोबरच अन्य देवांची निंदा करण्यात माझा अभिमान वाढीस लागला. त्याबरोबरच श्रीमंती आल्याने धनमदमत्त बनून अत्यंत बडबड करणारा आणि क्रूर बनलो. त्याचा परिणाम असा झाला की, हृदयात दंभ खूप वाढला.

अशा स्थितीत रघुपतीच्या राजधानीत राहूनही अयोध्येचा महिमा माझ्या ध्यानी येणे शक्यच नव्हते. आता मात्र त्या पुरीचा महिमा पूर्ण समजला. वेद, शास्त्रे व पुराणे त्या नगरीचा महिमा सांगतात की, कोणत्याही जन्मात जो अयोध्येत वास करतो, तो पुढे रामपरायण झाल्याशिवाय राहणार नाही. परंतु धनुर्धारी राम हृदयात राहिल्याशिवाय अयोध्येचा महिमा मात्र ध्यानी येत नाही.

–कलिधर्म–

असो हे उरगारी ! तो कलिकाल फार कठीण होता. सर्व धर्म कलिमलाने ग्रासले; सद्ग्रंथ लुप्त झाले, याचे कारण दांभिकांनी आपल्या बुद्धीचे कल्पिलेले पुष्कळ पंथ प्रकट झाले. ९७ (क)

सगळेच लोक मोहाला बळी पडल्याने कोणतेही बाहेरून दिसणारे चांगले काम ते करणाऱ्याच्या पोटातील स्वार्थाने बरबटले गेले. हे हरियाना ! ज्ञाननिधी ! तुला थोडीशी कलिधर्मांची कल्पना देतो, ती समजून घे. ९७(ख)

कलियुगात चार वर्ण व चार आश्रम यांची घडी विस्कटून ते नाहीसे होतात. वेदाला जे अमान्य तेच करण्यात सर्व स्त्रिया व पुरुष आनंद मानू लागतात. वेदांचा विक्रय करून ब्राह्मण आपला उदरनिर्वाह करू

मारग सोइ जा कहुँ जोइ भावा । पंडित सोइ जो गाल बजावा ॥
मिथ्यारंभ दंभ रत जोई । ता कहुँ संत कहइ सब कोई ॥
सोइ सयान जो परधन हारी । जो कर दंभ सो बड़ आचारी ॥
जो कह झूँठ मसखरी जाना । कलिजुग सोइ गुनवंत बखाना ॥
निराचार जो श्रुति पथ त्यागी । कलिजुग सोइ ग्यानी सो बिरागी ॥
जाकें नख अरु जटा बिसाला । सोइ तापस प्रसिद्ध कलिकाला ॥

दो० — असुभ बेष भूषन धरें भच्छाभच्छ जे खाहिं ।
तेइ जोगी तेइ सिद्ध नर पूज्य ते कलिजुग माहिं ॥ ९८ (क) ॥

सो० — जे अपकारी चार तिन्ह कर गौरव मान्य तेइँ ।
मन क्रम बचन लबार तेइ बकता कलिकाल महुँ ॥ ९८ (ख) ॥

चौ० — नारि बिबस नर सकल गोसाई । नाचहिं नट मर्कट की नाई ॥
सूद्र द्विजन्ह उपदेसहिं ग्याना । मेलि जनेऊ लेहिं कुदाना ॥
सब नर काम लोभ रत क्रोधी । देव बिप्र श्रुति संत बिरोधी ॥
गुन मंदिर सुंदर पति त्यागी । भजहिं नारि पर पुरुष अभागी ॥

लागतात व करांच्या व कायद्याच्या जाचाने प्रजेला पिळून आपली पोळी पिकवणारा राज्यकारभार सुरू होतो. वेदशास्त्रांची आज्ञा कोणीच मानत नाहीत. ज्याच्या मनाला जसे वागावे असे वाटेल, तोच त्याचा आदर्श धर्माचार ! पुष्कळ बढाया मारण्यात जो कुशल, त्यालाच लोक पंडित समजतील. काही तरी नवीन टूम काढून मोठे कार्य करण्याचा आव आणणे, ते लोकांच्या नजरेत भरण्यासाठी जरूर तो बाह्य ढोंगाचा डोलारा निर्माण करणे आणि एकाचा अगर अनेकांचा स्वार्थ साधणे, हे ज्यांना उत्तम प्रकारे जमते, त्यांना कलियुगात संत मानतात !

दुसऱ्याच्या डोकीवरून हात फिरवून आपला खिसा गरम करण्यात पटाईत होणे हीच शहाणपणा व चातुर्याची मुख्य परीक्षा कलियुगात समजली जाईल, आचारधर्माचे दिखाऊ अवडंबर जो माजवतो, त्यालाच लोक सदाचारसंपन्न म्हणतात ! खोटे बोलून थट्टामस्करी करण्याची कला ज्यांनी उत्तम प्रकारे हस्तगत केली असेल, त्यालाच गुणवान समजून त्याचा समाजात उदो उदो होतो !

वैदिक धर्माचा त्याग करून आचारहीन बनणाऱ्या मनुष्याला ज्ञान-वैराग्य उत्तम प्राप्त झाले आहे, असे मानतात. तसेच खडतर तपस्येची खूण म्हणजे जटा व नखांची अधिक लांबी एवढीच मानण्यात येऊ लागले. अमंगळ वेष धारण करणे अमंगळ भूषणे घालून खाण्यापिण्याचे ताळतंत्र सोडण्याचे जेवढे अधिक जमेल, तितकी योगी, सिद्ध व पूज्य पुरुष म्हणून समाजात अधिक वहावा होईल ! ९८ (क)

मनात दुसऱ्याला हुकमी अपकार करण्याचे तंत्र ज्याने स्वाधीन करून घेतले असेल त्यालाच कलियुगात समाजाच्या नेतेपणाचा मान मिळून त्याचा गौरव सुरू होतो. त्याचप्रमाणे मनाने, वाणी व कृतीने लबाडी करण्याची बेमालूम हातोटी ज्याला साधली, तोच वक्ता म्हणून कलियुगात गाजतो ! ९८ (ख)

अहो स्वामी ! या कलियुगात सामान्यपणे सगळे पुरुष स्त्रियांच्या विशेष प्रकारे आधीन झालेले असतात त्यामुळे त्यांचा कल पाहून एखादा गारुड्याच्या माकडाप्रमाणे ते सुंदर नाचतात. शूद्र द्विजांना ज्ञानाचा उपदेश करतात व गळ्यात जानवे घालून नुसतीच दाने नव्हेत तर ब्राह्मणांनी मुद्दाम जी घेऊ नयेत, असली निंद्य दाने घेतात. सर्वच पुरुष कामांध, लोभी व क्रोधी होतात आणि वेद, ब्राह्मण, देव व संत यांच्याशी अगदी उभा दावा मांडतात. अभागिनी स्त्रिया सुंदर व सद्गुणी पतीचा त्याग करून पर पुरुषाशी अनैतिक संबंध ठेवतात.

सौभागिनी बिभूषन हीना। बिधवन्ह के सिंगार नबीना ॥
गुर सिष बधिर अंध का लेखा। एक न सुनइ एक नहिं देखा ॥
हरइ सिष्य धन सोक न हरई। सो गुर घोर नरक महुँ परई ॥
मातु पिता बालकन्हि बोलावहिं। उदर भरै सोइ धर्म सिखावहिं ॥

दो० — ब्रह्म ग्यान बिनु नारि नर कहहिं न दूसरि बात।
कौड़ी लागि लोभ बस करहिं बिप्र गुर घात ॥ ९९ (क) ॥
बादहिं सूद्र द्विजन्ह सन हम तुम्ह ते कछु घाटि।
जानइ ब्रह्म सो बिप्रबर आँखि देखावहिं डाटि ॥ ९९ (ख) ॥

चौ० — पर त्रिय लंपट कपट सयाने। मोह द्रोह ममता लपटाने ॥
तेइ अभेदबादी ग्यानी नर। देखा मैं चरित्र कलिजुग कर ॥
आपु गए अरु तिन्हहू घालहिं। जे कहुँ सत मारग प्रतिपालहिं ॥
कल्प कल्प भरि एक एक नरका। परहिं जे दूषहिं श्रुति करि तरका ॥
जे बरनाधम तेलि कुम्हारा। स्वपच किरात कोल कलवारा ॥
नारि मुई गृह संपति नासी। मूड़ मुड़ाइ होहिं संन्यासी ॥
ते बिप्रन्ह सन आपु पुजावहिं। उभय लोक निज हाथ नसावहिं ॥

सुवासिनी स्त्रियांना सौभाग्यभूषणे अंगावर घालणे नकोसे होऊ लागते व विधवा स्त्रियांचे शृंगार मात्र नवे नवे सजू लागतात.

गुरु-शिष्यांची जोडी आंधळ्या व बहिऱ्यासारखी वागते. आपला शिष्य कसा वागतो, हे गुरू पाहात नाहीत व गुरूंनी काय सांगितले ते न ऐकण्याइतके शिष्य बहिरे बनतात. परंतु आपल्या शिष्याचा शोक हरण न करता फक्त त्याच्या धनाचाच अपहार करतात, त्यांना भयानक नरकयातना भोगाव्या लागतात. आई-बाप आपल्या बालकांना जवळ घेऊन ज्याने पोट भरेल तोच धर्म शिकवतात; त्यांच्या संस्कारक्षम अंतःकरणावर भक्तीचे संस्कार मुळीच करत नाहीत.

ब्रह्मज्ञान इतके सवंग होते की, स्त्रिया अगर पुरुष त्या शिवाय दुसरी बातच करत नाहीत! परंतु प्रत्यक्ष कृतीत मात्र प्रसंगी एक कवडीच्या फायद्यासाठी लोभाला बळी पडून ब्राह्मणाची अगर प्रत्यक्ष गुरूचीही हत्या करण्यास मागे पुढे पाहात नाहीत! ९९ (क)

ब्राह्मणांशी वादविवाद करून शूद्र विचारतात की, आम्ही तुमच्यापेक्षा काही कमी आहोत की काय? शेवटी डोळे लाल करून पाहतात व त्या संतापाच्या भरात दरडावून म्हणतातः–' ब्रह्म जाणतो तोच विप्र-श्रेष्ठ!' ९९ (ख)

परस्त्रीलंपट; मोह, ममता व द्रोह यांनी लिडबिडलेले पण तोंडाने मात्र स्वतःला केवल द्वैती, ज्ञानी म्हणविणारे, त्यांनाच खरे ज्ञानी असे कलियुगात समजतात. खगराजा! असे हे कलियुगाचे स्वरूप मी स्वतः पाहिले आहे. त्या युगातील शहाणे म्हणविणारे हे लोक स्वतः पतित, नष्ट झालेले असतात, परंतु जर कोणी एखाद्या ठिकाणी सन्मार्गाने वागू लागले तर त्यांना वाटेल ते करून धर्मभ्रष्ट करतात.

स्वतःच्या कुतर्कट बुद्धीने जे कोणी वैदिक सिद्धान्ताना दोष देतात, त्यांना एकेक नरकांत कल्प कल्पपर्यंत पिचत पडावे लागते. तेली, कुंभार, चाण्डाल, भिल्ल, कोळी, कलाल इत्यादि जे त्रैवर्णिकांहून खालच्या दर्जाचे असतात, त्यातील एखाद्याची बायको मेली, किंवा काही कारणाने घर, दार, संपत्ती नष्ट झाली म्हणजे मुंडक्याचे मुंडन करून असे लोक लगेच संन्यासी बनतात. नंतर ब्राह्मणाकडून आपली पूजा करवून घेतात. आणि असे करून आपल्या हातानीच इहलोक व परलोक यातील कल्याणाला तिलांजली देतात.

बिप्र निरच्छर लोलुप कामी । निराचार सठ बृषली स्वामी ॥
सूद्र करहिं जप तप ब्रत नाना । बैठि बरासन कहहिं पुराना ॥
सब नर कल्पित करहिं अचारा । जाइ न बरनि अनीति अपारा ॥

दो० —भए बरन संकर कलि भिन्नसेतु सब लोग ।
करहिं पाप पावहिं दुख भय रुज सोक बियोग ॥ १०० (क) ॥
श्रुति संमत हरि भक्ति पथ संजुत बिरति बिबेक ।
तेहिं न चलहिं नर मोह बस कल्पहिं पंथ अनेक ॥ १०० (ख) ॥

छं० —बहु दाम सँवारहिं धाम जती । बिषया हरि लीन्हि न रहि बिरती ॥
तपसी धनवंत दरिद्र गृही । कलि कौतुक तात न जात कही ॥
कुलवंति निकारहिं नारि सती । गृह आनहिं चेरि निबेरि गती ॥
सुत मानहिं मातु पिता तब लौं । अबलानन दीख नहीं जब लौं ॥
ससुरारि पिआरि लगी जब तें । रिपुरूप कुटुंब भए तब तें ॥
नृप पाप परायन धर्म नहीं । करि दंड बिडंब प्रजा नितहीं ॥
धनवंत कुलीन मलीन अपी । द्विज चिन्ह जनेउ उघार तपी ॥
नहिं मान पुरान न बेदहि जो । हरि सेवक संत सही कलि सो ॥

दुसऱ्या बाजूस ब्राह्मणही वेदाध्ययनरहित, [illegible], कामी, आचारभ्रष्ट, मूर्ख आणि शूद्रादि जातीच्या स्त्रियांचे पती झालेले असतात. अशी स्थिती झाली म्हणजे शूद्र नाना प्रकारे जप, [illegible], तप इत्यादि करतात आणि उच्चासनावर बसून [illegible] कार्यक्रम करू लागतात.

अशा प्रकारे सर्वच लोक आपापल्या मनाला वाटेल तसे वागू लागतात. मग समाजात अनीतीला एवढा ऊत येतो की, त्याचे वर्णन शब्दात करणे अशक्य आहे. सारांश, कलियुगात सर्व लोक वेदशास्त्रांच्या मर्यादा झुगारून देतात व वर्णसंकर माजवतात. हातून अशा रीतीने पापे घडू लागल्यावर त्यांचे फळ भय, रोग, शोक इत्यादि दुःखे भोगणे ओघानेच त्यांच्या नशिबी येते. १०० (क)

यांचे कारण, वेदसम्मत, वैराग्य ज्ञानयुक्त हरिभक्तीचा जो मार्ग आहे, तो मोहवश झालेले लोक धरत नाहीत व आपल्या कल्पनेने अनेक पंथ काढतात. १०० (ख)

वर्णधर्मांच्या दुर्दशेबरोबरच आश्रम धर्मांचीही कलियुगात कशी दुर्दशा होते ते पाहा. संन्यासी पुष्कळ पैसे जमवतात व त्याच्या जोरावर बंगले उठवतात! विषयोपभोगाच्या मागे लागल्याने वैराग्याचा पूर्ण दुष्काळ पडतो! याचा अर्थ तपस्वी हे श्रीमंत झाले व गृहस्थांच्या घरी अठरा विश्वे दारिद्र्य आले. [illegible] अशा आश्चर्यांचे वर्णन खरोखर करणेच नको असे वाटते.

कुलीन व पतिव्रता स्त्रियांना पुरुष घराच्या बाहेर काढतात आणि अशा प्रकारे सन्मार्ग सोडून हीन जातीच्या दुःशील स्त्रियांना रखेल्या म्हणून घरात [illegible] शिष्टां(?)चा आचार सुरू होतो. जोपर्यंत बायकोचे तोंड पाहिले नाही तोपर्यंतच मुले आईबापांना मान देतात; याचे कारण एकदा सासुरवाडीची गोडी लागली की घरातील माणसे शत्रूसारखी वाटू लागतात!

राज्याची सूत्रे हाती घेणारेही पापपरायण होऊन निधर्मी बनतात. प्रजेला व्यर्थ करांचा दंड भरावयास लावतात व त्यांच्या जन्माचे एकसारखे धिंडवडे काढतात!

वाटेल ते करून केवळ पैसा ज्याने एकदा कमावला त्याने कितीही पापे केली असली तरी त्यांनाच समाजात कुलीन समजतात. [illegible] ब्राह्मण ओळखण्याची खूण म्हणून फक्त जानवे शिल्लक राहील, आणि नग्न–वस्त्रविहीन राहणे हेच तपस्येचे लक्षण समजले जाईल. पुराणे वेद हे ज्याला अमान्य तोच कलियुगातील

कबि बृंद उदार दुनी न सुनी । गुन दूषक ब्रात न कोपि गुनी ॥
कलि बारहि बार दुकाल परै । बिनु अन्न दुखी सब लोग मरै ॥

दो० — सुनु खगेस कलि कपट हठ दंभ द्वेष पाषंड ।
मान मोह मारादि मद ब्यापि रहे ब्रह्मंड ॥ १०१ (क)॥
तामस धर्म करहिं नर जप तप ब्रत मख दान ।
देव न बरषहिं धरनीं बए न जामहिं धान ॥ १०१ (ख) ॥

छं० — अबला कच भूषन भूरि छुधा । धनहीन दुखी ममता बहुधा ॥
सुख चाहहिं मूढ़ न धर्म रता । मति थोरि कठोरि न कोमलता ॥
नर पीड़ित रोग भोग कहीं । अभिमान बिरोध अकारनहीं ॥
लघु जीवन संबतु पंच दसा । कलपांत न नास गुमानु असा ॥
कलिकाल बिहाल किए मनुजा । नहिं मानत क्वौ अनुजा तनुजा ॥
नहिं तोष बिचार न सीतलता । सब जाति कुजाति भए मगता ॥
इरिषा परुषाच्छर लोलुपता । भरि पूरि रही समता बिगता ॥
सब लोग बियोग बिसोक हए । बरनाश्रम धर्म अचार गए ॥
दम दान दया नहिं जानपनी । जडता परबंचनताति घनी ॥

खरा संत व हरिभक्तपरायण ! कवींचे पेव फुटणार पण उदार मनुष्य अथवा दाता मात्र कलियुगात औषधाला सापडणार नाही.

दुसऱ्यांच्या सद्गुणांनासुद्धा नावे ठेवण्याची खोड सर्वत्र पण स्वतःसद्गुणी होणारे कोणीच नाहीत. कलियुगात दुष्काळाचे प्रसंग वारंवार येत राहिल्याने लोकांना अन्नान्न करून मरण्याची वेळ येते. हे खगेश ! ऐका; कलियुगात कपट, हट्ट, द्वेष, दंभ, वेदधर्मांच्या विरुद्ध प्रचार; मान, मोह, काम, क्रोध, व लोभ यांनी ब्रह्मांड सदोदित व्यापलेले होते. १०१ (क)

व्रत, जप, तप, यज्ञ, दान इत्यादि धर्माचे आचरण करायचे झाले तरी लोक ते तामसी पद्धतीने करतात. पृथ्वीवर इंद्रदेवता पाऊस पाडीत नाही व पेरलेले धान्यादि उगवत नाहीसे होते हे लक्षात असू द्या. १०१ (ख)

सर्व दागिन्यांचे मुख्य सार म्हणजे स्त्रिया आपले केसच मानतील. प्रत्येक विषयोपभोगाची बकबक वाढल्याने अतृप्तीची भूक फार लागते. धनहीन असूनही विषयासक्ती अत्यंत असल्याने सदा दुःखी व सदा हाय ! हाय ! ! सुखासाठी त्यांची धडपड असते परंतु इतक्या वेडाने भारलेल्या असतात की धर्माच्या आचरणाची आवड मुळीच उत्पन्न होत नाही. बुध्दी मुळचीच थोडी पण तीसुद्धा कोमल नसून कठोर !

शरीरात या ना त्या रोगाने कायमचे ठाणे दिल्याने भोगांचा उपभोग घेण्याचीही त्यात ताकत उरत नाही; तथापि ·ोगाच्या खोट्या अभिमानाने परस्परांत व्यर्थ विरोध वाढविण्याचे काम चालू असते. आयुष्य पाहिले तर अगदीच थोडे, पांच-दहा वर्षांचे, पण घमेंड तर एवढी की, जणूं प्रलयाच्या वेळीसुद्धा नाश होणार नाही.

कलीने माणसाचे सदोदित इतके हाल हाल होऊनसुद्धा ही आपली मुलगी अगर ही आपली बहीण एवढाही विवेक उरत नाही. याचे कारण अंतःकरणात संतोष नाही, डोक्यात विचार नाही किंवा मनांत शांतता नाही. सर्व जातीचे व हीन जातीचेही लोक भीक मागत सुटतात !

ईर्षा, कठोर भाषण, अतिलोभीपणा हे दोष इतके भरपूर होतात की, त्यामुळे समता नष्ट होते. सर्व लोक काहीना काही नाही म्हणून व काही ना काही असलेले गेले म्हणून तळतळत असतात. वर्णधर्म व आश्रमधर्म याचे आचार समाजातून नष्ट झाल्याचे हे असे स्पष्ट परिणाम दिसू लागतात.

इंद्रियनिग्रह, दान, दया आणि समजूतदारपणा यांच्या अधिष्ठानावर व्यक्ति व समाज यांचे सौख्य

तनु पोषक नारि नरा सगरे । परनिंदक जे जग मो बगरे ।।

दो० – सुनु ब्यालारि काल कलिमल अवगुन आगार ।
गुनउँ बहुत कलिजुग कर बिनु प्रयास निस्तार ।। १०२ (क) ।।
कृतजुग त्रेताँ द्वापर पूजा मख अरु जोग ।
जो गति होइ सो कलि हरि नाम तें पावहिं लोग ।। १०२ (ख) ।।

चौ० – कृतजुग सब जोगी बिग्यानी । करि हरि ध्यान तरहिं भव प्रानी ।।
त्रेताँ बिबिध जग्य नर करहीं । प्रभुहि समर्पि कर्म भव तरहीं ।।
द्वापर करि रघुपति पद पूजा । नर भव तरहिं उपाय न दूजा ।।
कलिजुग केवल हरि गुन गाहा । गावत नर पावहिं भव थाहा ।।
कलिजुग जोग न जग्य न ग्याना । एक अधार राम गुन गाना ।।
सब भरोस तजि जो भज रामहि । प्रेम समेत गाव गुन ग्रामहि ।।
सोइ भव तर कछु संसय नाहीं । नाम प्रताप प्रगट कलि माहीं ।।
कलि कर एक पुनीत प्रतापा । मानस पुन्य होहिं नहि पापा ।।

दो० – कलिजुग सम जुग आन नहिं जौं नर कर बिस्वास ।
गाइ राम गुन गन बिमल भव तर बिनहिं प्रयास ।। १०३ (क) ।।

अवलंबून असते, परंतु कलियुगात त्यांच्या अभावानेच ते उठून दिसतात! त्यामुळे मूर्खपणा व दुसऱ्याची फसवणूक करण्याची वृत्ती यांना अगदी ऊत येतो. अन्न व वस्त्र मिळवणे हेच सर्व स्त्रिया व पुरुष यांचे मुख्य जीवनकार्य बनते व परनिंदा हाच नेहमीचा भाषणाचा सर्वत्र विषय होऊन बसतो.

हे सर्पशत्रू! ऐकून ठेव; कलिकाळ हे आतापर्यंत वर्णन केल्याप्रमाणे पापाचे व अवगुणाचे माहेरघर आहे; परंतु कलियुगाचा हा एक मोठा गुण आहे की, या युगात माणसाचा श्रमावाचून उद्धार होऊ शकतो. १०२ (क)

कृतयुगात योगाचे आचरण, त्रेतायुगात यज्ञांचे अनुष्ठान व द्वापरयुगात पूजा-व्रतादि यांनी जी गती मिळते, तीच कलियुगात केवळ हरिनामाने लोकांना मिळते. १०२ (ख)

कृतयुगात सर्व लोक योगी व विज्ञानी होतात, आणि हरीचे ध्यान करत सर्व प्राणी भवसागर तरून जातात. त्रेतायुगात मनुष्य अनेक प्रकारचे यज्ञ करतात आणि सर्व कर्मे प्रभूला समर्पण करून संसार-सागराच्या पैल तीरास जातात. द्वापरयुगात श्रीरघुनाथांच्या चरणांची पूजा करून मानवांचा भवसिंधूतून उद्धार होतो. त्याशिवाय दुसरा मार्गच त्यांना नाही. कलियुगात श्रीहरीच्या गुणकथांचे गायन करून मनुष्याला भवसागराचा ठाव घेता येतो. इतर युगाप्रमाणे कलियुगात योग, यज्ञ अगर ज्ञान यांचा आधार मिळत नाही. फक्त श्रीरामाचे गुणगायन करणे हाच एकमेव आधार म्हणून सर्व साधनांचा भरवसा सोडून जो श्रीरामाला भजतो व प्रेमभराने त्याच्या सद्‌गुणांचे गायन करतो तोच भवसागर तरून जातो यांत बिल्कुल संशय नाही. भगवंताच्या नामाचा प्रताप या युगात गुप्त नसून अगदी उघडा आहे.

याशिवाय कलियुगाचा आणखी एक पवित्र असा प्रभाव आहे या युगात केवळ मनाने केलेले पुण्य जमेस पडते. परंतु चुकून एखादावेळी मानसिक पाप घडल्यास इतर युगात त्याचे दुःखदायक फळ भोगावे लागते. कलियुगात मात्र अशा मानसपापाचे फळ भोगावे लागत नाही!

या दृष्टीने विचार केल्यास खरोखर कलियुगासारखे फळदायी दुसरे युगच नाही याचे कारण असे की, मनुष्य विश्वासाने जर श्रीरामाच्या विमल अशा गुणसमुच्चयाचे गायन करील तर दुसरे कोणते ही कष्ट न घेता तो या जन्म-मरणरूप चक्रातून मोकळा होईल. १०३ (क)

प्रगट चारि पद धर्म के कलि महुँ एक प्रधान ।
जेन केन बिधि दीन्हें दान करइ कल्यान ।। १०३ (ख) ।।

चौ०–नित जुग धर्म होहिं सब केरे । हृदयँ राम माया के प्रेरे ।।
सुद्ध सत्व समता बिग्याना । कृत प्रभाव प्रसन्न मन जाना ।।
सत्व बहुत रज कछु रति कर्मा । सब बिधि सुख त्रेता कर धर्मा ।।
बहु रज स्वल्प कछु तामस । द्वापर धर्म हरष भय मानस ।।
तामस बहुत रजोगुन थोरा । कलि प्रभाव बिरोध चहुँ ओरा ।।
बुध जुग धर्म जानि मन माहीं । तजि अधर्म रति धर्म कराहीं ।।
काल धर्म नहिं ब्यापहिं ताही । रघुपति चरन प्रीति अति जाही ।।
नट कृत बिकट कपट खगराया । नट सेवकहि न ब्यापइ माया ।।

दो०–हरि माया कृत दोष गुन बिनु हरिभजन न जाहिं ।
भजिअ राम तजि काम सब अस बिचारि मन माहिं ।। १०४ (क) ।।
तेहिं कलिकाल बरष बहु बसेउँ अवध बिहगेस ।
परेउ दुकाल बिपति बस तब मैं गयउँ बिदेस ।। १०४ (ख) ।।

चौ०–गयउँ उजेनी सुनु उरगारी । दीन मलीन दरिद्र दुखारी ।।
गएँ काल कछु संपति पाई । तहँ पुनि करउँ संभु सेवकाई ।।

धर्माचे सत्य, तप, दया व दान असे चार प्रसिद्ध चरण आहेत; परंतु कलियुगात त्यापैकी दान हा एकच मुख्य आहे. कारण देश, काल, पात्र यांचा विचार न करता कोणत्याही प्रकारे दिलेले दान या युगात कल्याण करते. १०३ (ख)

असो ! एकंदरीत श्रीरामाच्या मायेच्या प्रेरणेनेच सर्व लोकांच्या हृदयात युगधर्म उत्पन्न होत असतात. शुद्ध सत्वगुण, समता, विज्ञान आणि सर्वकाळी मन प्रसन्न राहणे हा कृतयुगाचा धर्म आहे. सत्वगुण पुष्कळ व जरासा रजोगुण कर्मांची आवड असून सर्व प्रकारे सुखी जीवन हा त्रेतायुगाचा धर्म आहे. पुष्कळ रजोगुण, थोडा सत्वगुण व थोडा तमोगुण; आणि मानसिक हर्ष व भय वाटणे, हा द्वापरयुगाचा धर्म समजावा. तमोगुण पुष्कळ थोडा रजोगुण, सत्वगुणाचा अभाव, आणि चहूकडे विरोध हा कलीचा महिमा जाणावा. शहाणे लोक आपल्या मनातील युगधर्म जाणून अधर्माचा त्याग करतात व धर्मावर निष्ठा ठेवतात व तसेच ज्याचे श्रीरघुपती-चरणी अत्यंत प्रेम आहे त्यांना हे युगधर्म बाधत नाहीत. हे खगराया ! जादुगाराचे सर्व इंद्रजाल प्रेक्षकांना भयानक वाटते. परंतु त्या जादुगारांच्या सेवकाला त्याची भीती थोडीच वाटणार ?

सारांश, श्रीहरीच्या मायेने निर्माण केलेले दोष व गुण हरिभजनावाचून जात नाहीत, हे मनावर बिंबवून सर्व कामना सोडाव्या आणि श्रीरामाचे भजन करावे. १०४ (क)

– भुशुंडी शूद्रजन्म चरित्र –

अहो पक्षिराज ! अशा या कलिकालात मी पुष्कळ वर्षे अयोध्येत राहिलो; पण एकदा तेथे पडला दुष्काळ. तेव्हा संकटात सापडल्यामुळे परदेशाला निघून गेलो. १०४ (ख)

हे खगेश ! त्यावेळी साहजिकच मी अत्यंत उदास, दरिद्री, दीन व दुःखी अशा स्थितीत उज्जयिनीला गेलो. त्या ठिकाणी काही दिवस राहून उद्योग धंदा केला व चार पैसे गाठीला लावले. तेव्हा पुनः शिव-भक्तीला प्रारंभ केला.

बिप्र एक बैदिक सिव पूजा। करइ सदा तेहि काजु न दूजा ।।
परम साधु परमारथ बिंदक । संभु उपासक नहिं हरि निंदक ।।
तेहि सेवउँ मैं कपट समेता। द्विज दयाल अति नीति निकेता ।।
बाहिज नम्र देखि मोहि साईं । बिप्र पढ़ाव पुत्र की नाईं ।।
संभु मंत्र मोहि द्विजबर दीन्हा । सुभ उपदेस बिबिध बिधि कीन्हा ।।
जपउँ मंत्र सिव मंदिर जाई । हृदयँ दंभ अहमिति अधिकाई ।।

दो० –मैं खल मल संकुल मति नीच जाति बस मोह ।
हरिजन द्विज देखें जरउँ करउँ बिष्नु कर द्रोह ।। १०५ (क) ।।

सो० –गुर नित मोहि प्रबोध दुखित देखि आचरन मम ।
मोहि उपजइ अति क्रोध दंभिहि नीति कि भावई ।। १०५ (ख) ।।

चौ० –एक बार गुर लीन्ह बोलाई । मोहि नीति बहु भाँति सिखाई ।।
सिव सेवा कर फल सुत सोई । अबिरल भगति राम पद होई ।।
रामहि भजहिं तात सिव धाता । नर पावँर कै केतिक बाता ।।
जासु चरन अज सिव अनुरागी । तासु द्रोहँ सुख चहसि अभागी ।।
हर कहुँ हरि सेवक गुर कहेऊ । सुनि खगनाथ हृदय मम दहेऊ ।।
अधम जाति मैं बिद्या पाएँ । भयउँ जथा अहि दूध पिआएँ ।।

माझ्या सुदैवाने तेथील एका वैदिक ब्राह्मणाची भेट झाली. तो वेद विधियुक्त शिवोपासना नित्य करीत असे आणि त्याशिवाय दुसरा कोणताच व्यवसाय त्याला सुचत नसे. तो मोठा सत्पुरुष व खऱ्या परमार्थाचे रहस्य जाणणारा होता. जरी असा तो निष्ठावंत शिवभक्त होता तरी चुकूनसुद्धा तो श्रीहरीची निंदा करीत नसे. अशा ब्राह्मणाची पोटात कपट धरून मी सेवा करू लागलो.

परंतु तो भोळा विचारा ब्राह्मण परम दयाळू असून, नीतीचे तर केवळ माहेरघरच होता. त्याने माझी वरकरणी नम्रता खरी मानली; आणि माझ्यावर अगदी पोटच्या पोराप्रमाणे प्रेम करून तो मला शिकवू लागला. लवकरच त्या द्विजश्रेष्ठाने मला शिवमंत्राचा उपदेश केला आणि दुसरीही मोलाची पुष्कळ प्रकारची शिकवण दिली. त्यानंतर शिवमंदिरात जाऊन मी मला मिळालेल्या मंत्राचा जप करण्यास सुरवात केली. तथापि मनातील दंभ व अभिमान यांचे वृक्ष जोराने फोफावू लागलेच. मी स्वभावाने दुष्ट, त्यात नीच जातीचा, व माझी बुद्धी पापाने भरलेली त्यामुळे मी मोहवश होऊन विष्णुभक्त व ब्राह्मण दृष्टीस पडताच माझ्या तळव्याची आग मस्तकास जाऊन पोचे. आणि मी रात्रंदिवस विष्णूचा द्रोह करीत असे. १०५ (क)

हे असले माझे वागणे पाहून गुरुजीना दुःख होई व ते मला योग्य उपदेश करत असत. परंतु त्याचा परिणाम उलट होऊन मला फार संताप येत असे आणि तेच बरोबर. कारण दांभिकाला नीतीचा उपदेश कसा आवडणार ? १०५ (ख)

शेवटी माझे दुर्वर्तन गुरुजीना असह्य होऊन त्यांनी मला हाक मारून जवळ घेतले आणि नाना प्रकारची नीती ते शिकवू लागले. ते म्हणाले, " अरे बाळा ! श्रीरामचरणी अत्यंत गाढ व निर्मळ भक्ती हेच तर शिवसेवेचे अखेरचे फळ आहे. शंकर व ब्रह्मदेवसुद्धा श्रीरामाला भजतात. मग आपल्यासारख्या पामर मानवांची कथा ती काय ! अरे, करंट्या ! ब्रह्मदेव व शंकर ज्याच्या चरणी प्रेम करतात त्यांचा द्रोह करून सुख मिळवू पाहतोस ? "

माझ्या गुरूंनी शंकरास हरिसेवक म्हटलेले ऐकून माझ्या हृदयाची अहो पक्षिराज ! नुसती लाही लाही झाली ! मी नीच जातीचाच असल्यामुळे. सापाला दूध पाजल्यामुळे जशी त्याच्या हालाहलाचीच वाढ होणार

मानी कुटिल कुभाग्य कुजाती । गुर कर द्रोह करउँ दिन राती ॥
अति दयाल गुर स्वल्प न क्रोधा । पुनि पुनि मोहि सिखाव सुबोधा ॥

जेहि ते नीच बड़ाई पावा । सो प्रथमहिं हति ताहि नसावा ॥
धूम अनल संभव सुनु भाई । तेहि बुझाव घन पदवी पाई ॥
रज मग परी निरादर रहई । सब कर पद प्रहार नित सहई ॥
मरुत उड़ाव प्रथम तेहि भरई । पुनि नृप नयन किरीटन्हि परई ॥
सुनु खगपति अस समुझि प्रसंगा । बुध नहिं करहिं अधम कर संगा ॥
कबि कोबिद गावहिं असि नीती । खल सन कलह न भल नहिं प्रीती ॥
उदासीन नित रहिअ गोसाईं । खल परिहरिअ स्वान की नाईं ॥
मैं खल हृदयँ कपट कुटिलाई । गुर हित कहइ न मोहि सोहाई ॥

दो० —एक बार हर मंदिर जपत रहेउँ सिव नाम ।
गुर आयउ अभिमान तें उठि नहिं कीन्ह प्रनाम ॥ १०६ (क) ॥
सो दयाल नहिं कहेउ कछु उर न रोष लवलेस ।
अति अघ गुर अपमानता सहि नहिं सके महेस ॥ १०६ (ख) ॥

चौ०—मंदिर माझ भई नभबानी । रे हतभाग्य अग्य अभिमानी ॥
जद्यपि तव गुर कें नहिं क्रोधा । अति कृपाल चित्त सम्यक बोधा ॥

तसाच प्रकार विद्या मिळाल्यावर माझा झाला. मी मानी, कुटिल, दुर्भागी व हलक्या जातीचा असल्यामुळे, वरील उपदेश गुरुजींनी केल्यापासून मी त्यांचा रात्रंदिवस द्रोह करू लागलो.

अशा प्रकारे मी जरी गुरूंशी वागत होतो तरी ते फारच दयाळू असल्यामुळे त्यांना कधीही थोडासुद्धा माझा राग आला नाही, परंतु पुनः पुन्हा मला सदुपदेश करण्याचे त्यांचे काम चालूच असे !

परंतु नीचाचा स्वभाव भयंकर, ज्याच्या साहाय्याने तो मोठा होतो त्याचाच नाश प्रथम तो करतो ! उदाहरणार्थ अग्नीपासून धूर उत्पन्न होतो; परंतु हे खगा ! तो मेघाच्या उच्च स्थानी जाताच त्याच्या जन्मदात्या अग्नीलाच विझवतो ! रस्त्यावरची धूळ, सगळ्यांच्या लाथा खात अपमान सहन करत पडलेली असते. परंतु तिची दया येऊन वाऱ्याने तिला उडवून वर घेतली की प्रथम ती वाऱ्यातच भरते, आणि संधी सापडताच त्या देशाच्या राजाच्या डोळ्यात भरण्यास अगर त्याच्या राजमुकुटावरसुद्धा जाऊन बसण्यास ती मागे पुढे पाहात नाही !

खगपती ! ऐक; असा हा प्रसंग पाहून, शहाणे लोक नीचांची संगत अजीबात करत नाहीत. कवी आणि पंडित अशी नीती सांगतात की, दुर्जनाशी भांडण करणेच नुसते वाईट नव्हे तर त्यांच्यावर प्रेम करणे-सुद्धा परिणामी अनिष्टच ! म्हणून त्यांच्याशी उदासीन वागून कुत्र्याप्रमाणे दुरूनच त्यांचा संबंध सोडावा.

असाच मी दुष्ट व हृदयात कपट व वाकडेपणा भरलेला असल्याने माझे गुरूंनी केलेला हितोपदेश मला मुळीच आवडत नसे. एके दिवशी मी नेहमीप्रमाणे शिवमंदिरात शिवनामजप करत बसलो होतो, इतक्यात त्या ठिकाणी माझे गुरू आले; पण मी गर्वाने ताठ झाल्यामुळे उठून त्यांना नमस्कार केला नाही. १०६ (क)

माझे गुरु मात्र इतके दयाळू की, ते हा उद्धटपणा पाहून एक शब्दही बोलले नाहीत किंवा त्यांना माझा रागही आला नाही. परंतु ते महत्पातक, तो गुरूचा अपमान, महेश सहन करू शकले नाहीत. १०६ (ख)

—आणि त्या शंकराच्या मंदिरातच एकदम आकाशवाणी झाली—

“ अरे हतभाग्या ! मूर्खा ! गर्विष्ठा ! तुझ्या गुरूला राग आला नाही; कारण ते अत्यंत दयाळू

तदपि साप सठ दैहउँ तोही । नीति बिरोध सोहाइ न मोही ॥
जौं नहिं दंड करौं खल तोरा । भ्रष्ट होइ श्रुतिमारग मोरा ॥
जे सठ गुर सन इरिषा करहीं । रौरव नरक कोटि जुग परहीं ॥
त्रिजग जोनि पुनि धरहिं सरीरा । अयुत जन्म भरि पावहिं पीरा ॥
बैठ रहेसि अजगर इव पापी । सर्प होहि खल मल मति ब्यापी ॥
महा बिटप कोटर महुँ जाई । रहु अधमाधम अधगति पाई ॥

दो०–हाहाकार कीन्ह गुर दारुन सुनि सिव साप ।
कंपित मोहि बिलोकि अति उर उपजा परिताप ॥ १०७ (क) ॥
करि दंडवत सप्रेम द्विज सिव सन्मुख कर जोरि ।
बिनय करत गदगद स्वर समुझि घोर गति मोरि ॥ १०७ (ख) ॥

नमामीशमीशान निर्वाणरूपं । विभुं व्यापकं ब्रह्म वेदस्वरूपं ॥
निजं निर्गुणं निर्विकल्पं निरीहं । चिदाकाशमाकाशवासं भजेऽहं ॥ १ ॥
निराकारमोंकारमूलं तुरीयं । गिरा ग्यान गोतीतमीशं गिरीशं ॥
करालं महाकाल कालं कृपालं । गुणागार संसारपारं नतोऽहं ॥ २ ॥

अंतःकरणाचे असून, यथार्थ ज्ञानी आहेत ! म्हणून अरे शठा ! मला तुला शाप देणे भाग आहे; अशा प्रकारे नीतीचे नियम पायाखाली तुडवलेले मला मुळीच आवडत नाही. अरे दुष्टा ! अशा प्रसंगी मी जर तुला दंड केला नाही तर धर्ममार्गाचा नाश होईल. अरे ! जे शठ गुरूशी ईर्षा करतात ते कोटी युगे रौरव नरकात पडतात. त्यानंतर कृमिकीटादि तिर्यग् योनीत जन्माला जातात आणि दहा हजार वर्षे पीडा भोगतात !

" अरे पाप्या ! तू गुरूच्या समोर अजगरासारखा बसून राहिलास; रे दुष्टा ! तुझी बुद्धी पापमय आहे म्हणून तू भुजंग होशील; जा ! अरे अधमाहून अधमा ! या अधोगतीला पावून महावृक्षाच्या ढोलीत जाऊन पड !"

हा घोर शिव–शाप ऐकून गुरूंनी हाहाःकार केला; आणि मी भीतीने थरथर कापत आहे, हे पाहून त्यांना फार वाईट वाटले. १०७ (क)

त्यांनी भक्तियुक्त अंतःकरणाने लगेच शंकरास दण्डवत् प्रणाम केला, हात जोडले आणि मला मिळणाऱ्या घोर गतीचा विचार येऊन त्यांचे हृदय भरून आले. शेवटी गहिवरल्या कंठाने ते शिवाची स्तुती करू लागले. १०७ (ख)

– रुद्राष्टक –

" मोक्ष-स्वरूप, सर्व शक्तिमान्, व्यापक ब्रह्म, ज्ञानस्वरूप, ईशान्य दिशेचे स्वामी, हे ईशान ! मी आपणाला नमस्कार करतो.

चिरस्थायी, सर्व गुणातीत, आत्मस्वरूप, विरुद्ध कोणतीही कल्पना नसलेले, इच्छारहित, चिदाकाशरूप, आकाशाचा वास ज्यांच्या आदे व ज्यांचा वास आकाशात आहे, अशा आपणाला मी शरण आलो आहे.

निराकार, ओंकाराचे मूळ, विश्व, तैजस, प्राज्ञ या देहत्रयांच्या विभूंच्या पलीकडील, तसेच अवस्थात्रय, कालत्रय, भेदत्रय व देहत्रय यांच्या अतीत असलेले, असे तुरीय, कर्मेंद्रिये व ज्ञानेंद्रिये यांच्या पलीकडील, ईश्वर, कैलासपती, अत्यंत भयंकर, काळाचेही काळ, तसेच कृपाळू, गुणांचे निवासस्थान, स्वतः जन्ममरणरूप संसाराच्यापासून मुक्त असून भक्तांच्या संसाराचा अंत करणारे हे महाकाल ! मी आपणाला नमस्कार करतो. २

तुषाराद्रि संकाश गौरं गभीरं । मनोभूत कोटि प्रभा श्री शरीरं ।।
स्फुरन्मौलि कल्लोलिनी चारु गंगा । लसद्भालबालेन्दु कंठे भुजंगा ।। ३ ।।
चलत्कुंडलं भ्रू सुनेत्रं विशालं । प्रसन्नाननं नीलकंठं दयालं ।।
मृगाधीश चर्माम्बरं मुण्डमालं । प्रियं शंकरं सर्वनाथं भजामि ।। ४ ।।
प्रचंडं प्रकृष्टं प्रगल्भं परेशं । अखंडं अजं भानुकोटि प्रकाशं ।।
त्रयः शूल निर्मूलनं शूलपाणिं । भजेऽहं भवानीपतिं भावगम्यं ।। ५ ।।
कलातीत कल्याण कल्पान्तकारी । सदा सज्जनानन्ददाता पुरारी ।।
चिदानंद संदोह मोहापहारी । प्रसीद प्रसीद प्रभो मन्मथारी ।। ६ ।।
न यावद् उमानाथ पादारविन्दं । भजंतीह लोके परे वा नराणां ।।
न तावत्सुखं शान्ति सन्तापनाशं । प्रसीद प्रभो सर्वभूताधिवासं ।। ७ ।।
न जानामि योगं जपं नैव पूजां । नतोऽहं सदा सर्वदा शंभु तुभ्यं ।।
जरा जन्म दुःखौघ तातप्यमानं । प्रभो पाहि आपन्नमामीश शंभो ।। ८ ।।

श्लोक—रुद्राष्टकमिदं प्रोक्तं विप्रेण हरतोषये ।
ये पठन्ति नरा भक्त्या तेषां शम्भुः प्रसीदति ।। ९ ।।

हिमालयासारखे गौरवर्णाचे व गंभीर, कोटी मदनांच्यासारखे तेजस्वी व सौंदर्यसंपन्न शरीर असलेले; ज्यांच्या प्रकाशमय मस्तकावर तरंगांनी युक्त अशी सुंदर गंगा आहे; ज्यांच्या कपाळावर बालचंद्रमा असून कंठात भुजंग शोभत आहे, अशा श्रीशंकरांची मी उपासना करतो. ३

ज्यांच्या कानातील कुण्डले डोलत आहेत, ज्यांच्या भुवया व सुंदर डोळे विशाल आहेत; जे प्रसन्नमुख, नीलकण्ठ व दयाळू आहेत, ज्यांनी वाघाच्या कातडयाचे वस्त्र परिधान केले आहे व गळ्यात नृमुंडांची माळ घातली आहे, अशा प्रिय व कल्याण करणाऱ्या, आणि सर्वांचे नाथ असलेल्या श्रीशंकरांचे मी भजन करतो. ४

खवळलेले, उत्कृष्ट, निश्चयी, परमेश्वर, अखंड, अजन्मा, कोटी सूर्यांसारखे दिव्य तेजाने तळपणारे, त्रिविध तापरूपी दुःखांचे निर्मूलन करणारे, हातात त्रिशूळ धारण केलेले व भावभक्तीनेच ज्यांची प्राप्ती होऊ शकते अशा भवानीपतीची मी भक्ती करतो. ५

कलांच्या कक्षेबाहेर असे पूर्ण, कल्याण करणारे व कल्पान्त करणारे, संत सज्जनांना सदोदित आनंद देणारे, त्रिपुरासुरांचे शत्रू, सच्चिदानंद घन, मोह हरण करणारे व मदनाचे शत्रू ! हे प्रभू ! आपण प्रसन्न व्हा ! प्रसन्न व्हा ! ६

हे उमापती ! जोपर्यंत आपल्या चरणकमलांचे भजन मनुष्य करत नाहीत, तोपर्यंत त्यांच्या त्रिविध तापांचा नाशच होत नसल्याने त्यांना इहलोकी अगर परलोकी सुख शांती मिळण्याची आशाच नको म्हणून सर्व भूतांच्या हृदयात निवास करणाऱ्या हे प्रभो ! आपण प्रसन्न व्हा. ७

हे शंभो ! मला योगांचे ज्ञान नाही, की जप कसा करावा ते समजत नाही इतकेच काय, मला आपली पूजा करणेही जमत नाही म्हणून; सर्वदा मी फक्त आपल्याला नमस्कार करत असतो.

हे प्रभो ! हे परमेश्वरा ! हे शंभो ! म्हातारपण जन्मयातना इत्यादि दुःखांच्या लोटांनी सतत जळत राहिल्यामुळे मी आपत्तीत पडलो आहे म्हणून माझे रक्षण करा. " ८

त्या श्रेष्ठ ब्राह्मणाने शंकरांना संतुष्ट करण्यासाठी म्हटलेले हे रुद्राष्टक जे लोक भक्तीने पठण करतील त्यांच्यावर शंभू खास प्रसन्न होतील. ९

दो० – सुनि बिनती सर्बग्य सिव देखि बिप्र अनुरागु।
पुनि मंदिर नभबानी भइ द्विजबर बर मागु ॥ १०८ (क) ॥
जौं प्रसन्न प्रभु मो पर नाथ दीन पर नेहु।
निज पद भगति देइ प्रभु पुनि दूसर बर देहु ॥ १०८ (ख) ॥
तव माया बस जीव जड संतत फिरइ भुलान।
तेहि पर क्रोध करिअ प्रभु कृपासिंधु भगवान ॥ १०८ (ग) ॥
संकर दीनदयाल अब एहि पर होहु कृपाल।
साप अनुग्रह होइ जेहिं नाथ थोरेहीं काल ॥ १०८ (घ) ॥

चौ० – एहि कर होइ परम कल्याना। सोइ करहु अब कृपानिधाना ॥
बिप्र गिरा सुनि परहित सानी। एवमस्तु इति भइ नभ बानी ॥
जदपि कीन्ह एहिं दारुन पापा। मैं पुनि दीन्हि कोप करि सापा ॥
तदपि तुम्हारि साधुता देखी। करिहउँ एहि पर कृपा बिसेषी ॥
छमासील जे पर उपकारी। ते द्विज मोहि प्रिय जथा खरारी ॥
मोर श्राप द्विज ब्यर्थ न जाइहि। जन्म सहस अवस्य यह पाइहि ॥
जनमत मरत दुसह दुख होई। एहि स्वल्पउ नहिं ब्यापिहि सोई ॥
कवनेउँ जन्म मिटिहि नहिं ग्याना। सुनहि सूद्र मम बचन प्रवाना ॥
रघुपति पुरीं जन्म तव भयऊ। पुनि तैं मम सेवाँ मन दयऊ ॥

—सर्वज्ञ शिवांनी ही प्रार्थना ऐकली. विप्राच्या अंतःकरणातील प्रेमाचा शुद्ध उमाळा जाणला आणि त्या मंदिरात पुनः आकाशवाणी झाली, "हे विप्रश्रेष्ठा ! वर माग !" १०८ (क)

ती आज्ञा ऐकून ब्राह्मणाला आनंद झाला व तो म्हणाला, "प्रभू ! आपण जर माझ्यावर प्रसन्न आहात आणि नाथ ! जर या दीनावर आपला स्नेह आहे तर प्रभो ! मला आपल्या चरणांची भक्ती देऊन दुसरा वर द्यावा." १०८ (ख)

"हे प्रभो ! जड व मूढ असे जीव आपल्या मायेला वश होऊन भुलतात व भटकत राहतात; तरी हे करुणासागरा ! हे भगवंता ! त्याच्यावर आपण कोप करू नये. १०८ (ग)

दीनावर दया करणाऱ्या कल्याणकारी शंकरा ! कृपाळा ! नाथ ! आता आपण याच्यावर अशी कृपा करा की, थोडाच काळ गेल्यावर शापानंतरचा अनुग्रह होईल ! हे कृपानिधाना ! हा परम कल्याण पावेल असे आता आपण करावे." १०८ (घ)

परहिताने भरलेले असे ते ब्राह्मणाचे वचन ऐकून 'एवमस्तु' (असे होवो.) अशी आकाशवाणी झाली. याने जरी घोर पाप केले आणि मी जरी रागाने शाप दिला असला तरीसुद्धा तुमचा साधुपणा पाहून आता मी याच्यावर विशेषच कृपा करतो.

हे द्विज ! जे क्षमाशील आणि परोपकारी असतात, ते मला खरारी रामचंद्रांसारखे प्रिय वाटतात. हे विप्रा ! माझा शाप व्यर्थ जाणार नाही. याला हजार जन्म नक्की घ्यावे लागतील. पण जन्मताना व मरताना दुःसह दुःख होते, ते आता याला जरासुद्धा होणार नाही. शिवाय कोणत्याही जन्मात याच्या ज्ञानाचा नाश होणार नाही. अरे शूद्रा ! माझे प्रमाणभूत असे वचन पुरे ऐकून घे —

रघुपतिपुरीत तुझा जन्म झाला आणि तेथे तू माझ्या भजनात आपले मन गुंतवलेस, म्हणून त्या पुरीच्या



पुरी प्रभाव अनुग्रह मोरें । राम भगति उपजिहि उर तोरें ।।
सुनु मम बचन सत्य अब भाई । हरितोषन ब्रत द्विज सेवकाई ।।
अब जनि करहि बिप्र अपमाना । जानेसु संत अनंत समाना ।।
इंद्र कुलिस मम सूल बिसाला । कालदंड हरि चक्र कराला ।।
जो इन्ह कर मारा नहिं मरई । बिप्र द्रोह पावक सो जरई ।।
अस बिबेक राखेहु मन माहीं । तुम्ह कहँ जग दुर्लभ कछु नाहीं ।।
औरउ एक आसिषा मोरी । अप्रतिहत गति होइहि तोरी ।।

दो०—सुनि सिव बचन हरषि गुर एवमस्तु इति भाषि ।
मोहि प्रबोधि गयउ गृह संभु चरन उर राखि ।। १०९ (क) ।।
प्रेरित काल बिंधि गिरि जाइ भयउँ मैं ब्याल ।
पुनि प्रयास बिनु सो तनु तजेउँ गएँ कछु काल ।। १०९ (ख) ।।
जोइ तनु धरउँ तजउँ पुनि अनायास हरिजान ।
जिमि नूतन पट पहिरइ नर परिहरइ पुरान ।। १०९ (ग) ।।
सिवँ राखी श्रुति नीति अरु मैं नहिं पावा क्लेस ।
एहि बिधि धरेउँ बिबिधि तनु ग्यान न गयउ खगेस ।। १०९ (घ) ।।

चौ०—त्रिजग देव नर जोइ तनु धरऊँ । तहँ तहँ राम भजन अनुसरऊँ ।।

प्रभावाने व माझ्या अनुग्रहाने तुझ्या हृदयात रामभक्ती उत्पन्न होईल. अरे बाबा! आणखी एक सत्य सिद्धान्त सांगतो ऐक—

ब्राह्मणाची सेवा हे श्रीहरीला संतुष्ट करणारे व्रत आहे. आता पुनः कधीही विप्रांचा अपमान करू नकोस; तसेच संत हे अनंतासारखे आहेत, हेही ध्यानात ठेव. इंद्राचे वज्र, माझा विशाल असा शूळ आणि श्रीहरीचे भयंकर सुदर्शन चक्र यांनी मारूनसुद्धा ज्याना मरण येत नाही तोच ब्राह्मणांच्या द्रोहरूपी आगीत जर सापडला तर जळून खाक होतो!

—एवढी महत्त्वाची गोष्ट नेहमी मनात बाळगलीस म्हणजे तुला या जगात दुर्लभ असे काहीही उरणार नाही.

माझा आणखी एक आशीर्वाद तुला आहे की, "तुझी गती यापुढे अकुंठित होईल."

शिवाचे हे आशीर्वाद पूर्ण कृपावचन ऐकून माझ्या प्रेमळ गुरुजीना आनंद झाला; आणि 'एवमस्तु' तथास्तु असे ते म्हणाले. मला पुनः उपदेशाचे चार शब्द सांगितले व शंभुचरणाचे हृदयात ध्यान करीत ते आपल्या घरी परत गेले. १०९ (क)

श्रीशंकराच्या शापास अनुसरून काळाच्या गतीने मी विंध्य पर्वतावर सापाच्या जन्माला गेलो. काही दिवस त्या स्थितीत गेले आणि बिलकुल दुःख अगर कष्ट न होता मी तो सर्पदेह सोडला. १०९ (ख)

हे हरिवाहना! जसे मनुष्य नवे वस्त्र नेसून जुने वस्त्र आनंदाने टाकून देतात त्याचप्रमाणे मी जो जो देह धारण केला तो तो काही त्रास न पडता योग्य वेळी सोडला १०९ (ग)

याप्रमाणे श्रीशंकरांनी वेदमर्यादेचे रक्षण केले व मलाही थोडेसुद्धा क्लेश भोगावे लागले नाहीत. याप्रमाणे हे पक्षिराजा! मी पुष्कळ देह धारण केले तरी शिवकृपेने प्रत्येक देहात माझे ज्ञान अखंड राहिले. १०९ (घ)

पशुपक्ष्यादि तिर्यग् योनीत किंवा देव मनुष्यादीच्या जन्मात जो जो देह धारण केला, त्या त्या देहात मी शंकराच्या अनुग्रहाने श्रीराम भजन सतत करत राहिलो. अशाही स्थितीत माझ्या अंतःकरणाला सतत

एक सूल मोहि बिसर न काऊ । गुर कर कोमल सील सुभाऊ ॥
चरम देह द्विज कै मैं पाई । सुर दुर्लभ पुरान श्रुति गाई ॥
खेलउँ तहूँ बालकन्ह मीला । करउँ सकल रघुनायक लीला ॥
प्रौढ़ भएँ मोहि पिता पढ़ावा । समझउँ सुनउँ गुनउँ नहिं भावा ॥
मन ते सकल बासना भागी । केवल राम चरन लय लागी ॥
कहु खगेस अस कवन अभागी । खरी सेवा सुरधेनुहि त्यागी ॥
प्रेम मगन मोहि कछु न सोहाई । हारेउ पिता पढ़ाइ पढ़ाई ॥
भए कालबस जब पितु माता । मैं बन गयउँ भजन जनत्राता ॥
जहँ जहँ बिपिन मुनीस्वर पावउँ । आश्रम जाइ जाइ सिरु नावउँ ॥
बूझउँ तिन्हहि राम गुन गाहा । कहहिं सुनउँ हरषित खगनाहा ॥
सुनत फिरउँ हरि गुन अनुबादा । अब्याहत गति संभु प्रसादा ॥
छूटी त्रिबिधि ईषना गाढ़ी । एक लालसा उर अति बाढ़ी ॥
राम चरन बारिज जब देखौं । तब निज जन्म सफल करि लेखौं ॥
जेहि पूँछउँ सोइ मुनि अस कहई । ईश्वर सर्ब भूतमय अहई ॥
निर्गुन मत नहिं मोहि सोहाई । सगुन ब्रह्म रति उर अधिकाई ॥

वेदना देणारी एक गोष्ट मात्र माझ्या मागची सुटली नाही. ती म्हणजे माझ्या श्रीगुरूंचा मायाळू स्वभाव आणि त्यांच्याशी मी केलेले कृतघ्नतेचे वर्तन !

असो. हा कावळ्याचा देह मिळून पुढील शेवटचा देह मला ब्राह्मणाचा मिळाला. देवांनासुद्धा हा देह दुर्लभ आहे असे वेद व पुराणात वर्णन आहे. त्या देहात असतानाही सर्व बालकांत मिळून माझा खेळ म्हणजे श्रीरघुनायकाच्याच सगळ्या लीला ! थोडासा मोठा झाल्यावर माझ्या वडिलांनी मला शिक्षण देण्यास प्रारंभ केला. ते सर्व मी ऐकून घेई व विचाराने मला ते समजतही असे; परंतु तो माझ्या आवडीचा विषय कधीच झाला नाही याचे कारण, केवळ श्रीरामचरणींच माझे सर्व लक्ष लागून राहिल्याने माझ्या मनात दुसरी कोणतीच वासना उठण्याचे बंद झाले !

हे नाथ ! या जगात असा कोण अभागी आहे की, कामधेनूचा त्याग करून जो गाढवीची सेवा करील? रामप्रेमात मग्न झालेल्या मला त्यामुळे काहीच रुचले नाही; शेवटी माझे वडील मला शिकवून थकले आणि त्यांनी माझे नाव सोडून दिले. काही काळ गेल्यावर माता व पिता हे दोघेही परलोकी निघून गेले व दासांचे रक्षण करणाऱ्या भगवंताच्या भजनासाठी मी वनात निघून गेलो.

अरण्यात फिरत असता ज्या ज्या ठिकाणी एखादा मुनिश्रेष्ठ दिसे, तेथे तेथे जाऊन त्यांना नमस्कार करावा, त्यांच्या मुखातून राम-गुण-गाथा ऐकण्याची इच्छा दाखवावी व ते सांगू लागले म्हणजे हर्षित होऊन ऐकत बसावे, असा श्रीहरींच्या गुणानुवाद श्रवणाचा कार्यक्रम सुरू ठेवत मी भटकू लागलो. शिवाच्या प्रसादाने मला मनात येईल तिकडे विनाश्रम जाता येतच होते.

अशी माझी ही रामोपासना सुरू असता, इच्छा, संतती, संपत्ती व कीर्ती यांची प्राप्ती व्हावी, अशा तीन प्रकारच्या प्रबल इच्छा माझ्या ठिकाणच्या नाहीशी झाल्याचा मला अनुभव आला. हृदयात मात्र एकच लालसा अत्यंत वाढली की, श्रीरामाचे प्रत्यक्ष दर्शन होईल तेव्हाच जन्माचे सार्थक झाले असे वाटेल.

म्हणून ज्या ज्या मुनिवरांना सगुण ब्रह्मप्राप्तीचे साधन सांगा म्हणून प्रार्थना करावी, त्यांनी त्यांनी ईश्वर सर्वभूतमय आहे, असे मला उत्तर द्यावे. पण हे त्यांचे निर्गुण मत मला मुळीच आवडेना; याचे कारण सगुण ब्रह्माच्या आवडीने माझ्या हृदयात खोल मूळ धरले होते.



दो० – गुर के बचन सुरति करि राम चरन मनु लाग ।
रघुपति जस गावत फिरउँ छन नव अनुराग ॥ ११० (क) ॥
मेरु सिखर बट छायाँ मुनि लोमस आसीन ।
देखि चरन सिरु नायउँ बचन कहेउँ अति दीन ॥ ११० (ख) ॥
सुनि मम बचन बिनीत मृदु मुनि कृपाल खगराज ।
मोहि सादर पूँछत भए द्विज आयहु केहि काज ॥ ११० (ग) ॥
तब मैं कहा कृपानिधि तुम्ह सर्बग्य सुजान ।
सगुन ब्रह्म अवराधन मोहि कहहु भगवान ॥ ११० (घ) ॥

चौ० – तब मुनीस रघुपति गुन गाथा । कहे कछुक सादर खगनाथा ॥
ब्रह्मग्यान रत मुनि बिग्यानी । मोहि परम अधिकारी जानी ॥
लागे करन ब्रह्म उपदेसा । अज अद्वैत अगुन हृदयेसा ॥
अकल अनीह अनाम अरूपा । अनुभव गम्य अखंड अनूपा ॥
मन गोतीत अमल अबिनासी । निर्बिकार निरवधि सुख रासी ॥
सो तैं ताहि तोहि नहिं भेदा । बारि बीचि इव गावहिं बेदा ॥
बिबिधि भाँति मोहि मुनि समुझावा । निर्गुन मत मम हृदयँ न आवा ॥
पुनि मैं कहेउँ नाइ पद सीसा । सगुन उपासन कहहु मुनीसा ॥
राम भगति जल मम मन मीना । किमि बिलगाइ मुनीस प्रबीना ॥

त्यामुळे श्रीगुरूंच्या उपदेशाचे स्मरण होऊन माझे मन श्रीरघुपतीचरणी जडले. मी श्रीरामाचे सुयश गात गात स्वैर संचार करू लागलो व माझी ही प्रीती क्षणोक्षणी अधिकाधिक वाढू लागली. ११० (क)

एके दिवशी एक विलक्षण घटना घडली. मी पूर्वी सांगितल्याप्रमाणे मन मानेल तसा अकुंठित संचार करीत फिरत असता मेरुपर्वताच्या शिखरावरील एक वडाच्या सावलीत बसलेल्या लोमश नामक मुनीच्या जवळ माझ्या भाग्याने येऊन पोचलो. त्यांना पाहताच मी त्यांच्या चरणांना वंदन केले व अति दीनवाणीने बोलण्यास सुरुवात केली. ११० (ख)

हे पक्षिराज! माझे नम्र व कोमल शब्द कानी पडल्यावर त्या कृपाळू मुनींनी आदराने मला विचारले, "हे द्विज, तुम्ही कोणत्या कामासाठी माझ्याकडे आला?" ११० (ग)

"अहो कृपानिधी! आपण सर्वज्ञ व सुजाण आहात. भगवान! सगुण ब्रह्माची आराधना कशी करावी ते मला सांगावे," ११० (घ) असे मी उत्तर दिले.

तेव्हा हे पक्षिराज! मुनीश्वरांनी रघुपतीच्या काही गुणकथा आदराने सांगितल्या. त्यानंतर स्वतः ब्रह्मज्ञान-परायण, विज्ञानी मुनी मला परम अधिकारी समजून निर्गुण ब्रह्माचा उपदेश करू लागले. ते म्हणाले, 'ते ब्रह्म जन्मरहित, अद्वैत, निर्गुण आणि हृदयेश्वर आहे. ते पूर्ण, इच्छारहित, [illegible]; स्वानुभवानेच जाणता-येण्यासारखे अखंड आणि उपमारहित आहे. ते मनाच्या व इंद्रियांच्या पलीकडे असून, मायारूपी, मलरहित, अविनाशी, विकार व सीमा रहित, आणि सुखाची राशी आहे. वेद वर्णन करतात की, तेच तू आहेस; जल आणि तरंगाप्रमाणे त्याच्यांत व तुझ्यात भेद नाही."

या प्रमाणे सांगून मुनि जरी मला नाना तऱ्हेने शिकवत होते, तरी काही केल्या निर्गुण मत माझ्या गळी उतरेना, तेव्हा मी पुनः पायावर डोके ठेवून विनंती केली, 'अहो मुनीश्वर! मला सगुणाची उपासना सांगावी. माझे मन रामभक्तिजलातील मासा बनल्याने, अहो प्रवीण मुनीश्वर, त्या मनाला आता वेगळे कसे करता येईल?

सोइ उपदेस कहहु करि दाया । निज नयनन्हि देखौं रघुराया ॥
भरि लोचन बिलोकि अवधेसा । तब सुनिहउँ निर्गुन उपदेसा ॥
मुनि पुनि कहि हरिकथा अनूपा । खंडि सगुन मत अगुन निरूपा ॥
तब मैं निर्गुन मत कर दूरी । सगुन निरूपउँ करि हठ भूरी ॥
उत्तर प्रतिउत्तर मैं कीन्हा । मुनि तन भए क्रोध के चीन्हा ॥
सुनु प्रभु बहुत अवग्या किएँ । उपज क्रोध ग्यानिन्ह के हिएँ ॥
अति संघरषन जौं कर कोई । अनल प्रगट चंदन ते होई ॥

दो० — बारंबार सकोप मुनि करइ निरूपन ग्यान ।
मैं अपने मन बैठ तब करउँ बिबिधि अनुमान ॥ १११ (क) ॥
क्रोध कि द्वैतबुद्धि बिनु द्वैत कि बिनु अग्यान ।
मायाबस परिछिन्न जड़ जीव कि ईस समान ॥ १११ (ख) ॥

चौ० — कबहुँ कि दुख सब कर हित ताकें । तेहि कि दरिद्र परस मनि जाकें ॥
परद्रोही की होहिं निसंका । कामी पुनि कि रहहिं अकलंका ॥
बंस कि रह द्विज अनहित कीन्हें । कर्म कि होहिं स्वरूपहि चीन्हें ॥
काहू सुमति कि खल सँग जामी । सुभ गति पाव कि परत्रिय गामी ॥
भव कि परहिं परमात्मा बिंदक । सुखी कि होहिं कबहुँ हरि निंदक ॥
राजु कि रहइ नीति बिनु जानें । अघ कि रहहिं हरि चरित बखानें ॥

म्हणून आपण सदय होऊन या ब्राह्मणाला असा उपदेश करा की, तो आपल्या डोळ्यांनी रघुराज श्रीरामचंद्रास निरखून पाहू शकेल. मी एकवेळ डोळे भरून अयोध्यापती रामचंद्रांस पाहीन आणि मग आपला निर्गुण उपदेश श्रवण करीन. ”

हे ऐकून मुनीश्वरांनी पुन्हा अनुपम हरिकथा सांगून सगुण स्वरूपाच्या खंडनासह निर्गुणाचे निरूपण सुरू केले, त्यावेळी मीही निर्गुण मताचे खंडण करून फार हट्टाने सगुणाचाच पक्ष सिद्ध केला.

अशा प्रकारे जेव्हा त्यांच्या उत्तराला माझ्याकडून प्रत्युत्तर जाऊ लागले तेव्हा मुनींच्या देहावर क्रोधाची चिन्हे प्रकट झालेली दिसू लागली. यात नवल नाहीच. प्रभू ! कोणा ज्ञान्याचाही फार अपमान झाल्यावर त्याला राग येणे स्वाभाविकच आहे. अति संघर्ष झाल्यावर शीतल अशा चंदनातूनसुद्धा अग्नि प्रकट होतोच !

मुनी वारंवार संतप्त होऊन ज्ञानाचेच निरूपण करू लागले. तेव्हा बसल्या बसल्या माझे मनात विचार येऊ लागले. १११ (क)

द्वैतबुद्धीशिवाय राग येणे कसे शक्य ? आणि अज्ञानाशिवाय तर द्वैताला जागाच नाही ! तात्पर्य काय की, मायेला वश होणारा, मर्यादित जड जीव ईश्वराच्या बरोबरीचा होईल काय ? १११ (ख)

माझे तर्कचक्र पुढे फिरू लागले. जो सर्वांचे हित इच्छितो त्याला त्यामुळे कधी दुःख होते काय ? ज्याच्या हातात परीस आहे तो कधी दरिद्री राहील ? परद्रोह करणारास निर्भयता कोठून मिळणार ? तसेच कामी मनुष्य निष्कलंक राहणे कसे शक्य ? ब्राह्मणाचे अहित करून वंश राहतो काय ?

आत्मज्ञान ज्याला झाले त्याला पुनः कर्मबंध कसा लागणार ? खलांच्या संगतीत कोणाला सद्बुद्धी मिळाली ? परस्त्रीगामी पुरुषाला सद्‌गती मिळेल काय ? ब्रह्मज्ञान्याला जन्ममरणचक्रात सापडावे लागेल ? भगवंताची निंदा करून सुखाची आशा कशी सफळ होणार ? नीतिज्ञानाच्या अभावी राज्याला स्थैर्य कोठून येणार ? हरिचरित्र वर्णन केल्यावर पाप कसे उरणार ? पुण्यावाचून पवित्र यशाची



पावन जस कि पुन्य बिनु होई । बिनु अघ अजस कि पावइ कोई ॥
लाभु कि किछु हरि भगति समाना । जेहि गावहिं श्रुति संत पुराना ॥
हानि कि जग एहि सम किछु भाई । भजिअ न रामहि नर तनु पाई ॥
अघ कि पिसुनता सम कछु आना । धर्म कि दया सरिस हरिजाना ॥
एहि बिधि अमिति जुगुति मन गुनऊँ । मुनि उपदेस न सादर सुनऊँ ॥
पुनि पुनि सगुन पच्छ मैं रोपा । तब मुनि बोलेउ बचन सकोपा ॥
मूढ़ परम सिख देउँ न मानसि । उत्तर प्रतिउत्तर बहु आनसि ॥
सत्य बचन बिस्वास न करही । बायस इव सबही ते डरही ॥
सठ स्वपच्छ तव हृदयँ बिसाला । सपदि होहि पच्छी चंडाला ॥
लीन्ह श्राप मैं सीस चढ़ाई । नहिं कछु भय न दीनता आई ॥

दो० — तुरत भयउँ मैं काग तब पुनि मुनि पद सिरु नाइ ।
सुमिरि राम रघुबंत मनि हरषित चलेउँ उड़ाइ ॥ १११ (क) ॥
उमा जे राम चरन रत बिगत काम मद क्रोध ।
निज प्रभुमय देखहिं जगत केहि सन करहिं बिरोध ॥ ११२ (ख) ॥

चौ० — सुनु खगेस नहिं कछु रिषि दूषन । उर प्रेरक रघुबंस बिभूषन ॥
कृपासिंधु मुनि मति करि भोरी । लीन्ही प्रेम परिच्छा मोरी ॥

कधी प्राप्ती झाली आहे काय ? तसेच पापाशिवाय कधी अपयश पदरी पडते काय ? श्रुती, संत व पुराणे जिला वाखाणतात, त्या हरिभक्तीसारखा दुसरा लाभ जगात कोणता आहे ? मनुष्यदेह मिळूनसुद्धा श्रीरामाचे भजन न करणे या सारखी दुसरी हानी जगात आहे काय ? [illegible] दुसरे पाप आहे काय ? हे हरियाना ! दयेसारखा दुसरा धर्म आहे काय ?

—असे पिंजलेल्या कापसाच्या तुटक [illegible] भाराभर असंबद्ध तर्क करण्यात मी गुंगून गेलो. अर्थात् मुनींच्या उपदेशाकडे आदरपूर्वक लक्ष देणे अशक्य झाले. शिवाय प्रत्येक वेळी मी सगुणाचाच पक्ष सिद्ध करत राहिलो. या सर्वांचा परिणाम होऊन मुनीश्वर एकदम भडकले—

" मूढा ! मी तुला उत्तम प्रकारचा उपदेश करत असता तू तो मानीत नाहीस आणि उत्तर-प्रत्युत्तर करतोस ? सत्य वचनावरसुद्धा तुझा विश्वास बसत नाही आणि कावळ्यासारखा सगळ्यांना घाबरतोस मात्र ! अरे शठा ! तुझ्या हृदयात स्वतःच्याच मनाचा अभिमान फार मोठा भरला आहे, म्हणून तू आताच्या आता चाण्डाल पक्षी— कावळा हो ! "

मुनींचा हा शाप मी प्रसाद म्हणून मस्तकावर धारण केला. मला त्याचे मुळीच भय वाटले नाही, किंवा दैन्यही जाणवले नाही.

त्याचक्षणी मी कावळा झालो; आणि मुनिचरणी मस्तक नमवून [illegible] श्रीरामाचे स्मरण-पूर्वक अत्यानदाने उडत निघालो. " ११२ (क)

हा विलक्षण प्रसंग असल्याने सदाशिव पार्वतीस त्यातील रहस्य समजावून देतात, ' उमे ! श्रीरामचरणी रत असून, ज्यांच्यात अभिमान, काम, क्रोध इत्यादि विकाराचे नावही उरत नाही त्यांना सर्वच जग आपल्या उपास्य देवतेने व्यापलेले दिसू लागते. असे झाल्यावर विरोध कोणाबरोबर करणार ? ' ११२ (ख)

काक भुशुंडीने आपले कथानक पुढे सुरू केले, " हे खगेश ऐक. त्या शापात ऋषींचा काहीसुद्धा दोष नाही. रघुवंशविभूषण श्रीरामच सर्वांच्या हृदयात प्रेरणा देणारे आहेत. त्या कृपासागराने मुनींच्या बुद्धीला

मन बच क्रम मोहि निज जन जाना । मुनि मति पुनि फेरी भगवाना ॥
रिषि मम महत सीलता देखी । राम चरन बिस्वास बिसेषी ॥
अति बिसमय पुनि पुनि पछिताई । सादर मुनि मोहि लीन्ह बोलाई ॥
मम परितोष बिबिधि बिधि कीन्हा । हरषित राममंत्र तब दीन्हा ॥
बालकरूप राम कर ध्याना । कहेउ मोहि मुनि कृपानिधाना ॥
सुंदर सुखद मोहि अति भावा । सो प्रथमहिं मैं तुम्हहि सुनावा ॥
मुनि मोहि कछुक काल तहँ राखा । रामचरितमानस तब भाषा ॥
सादर मोहि यह कथा सुनाई । पुनि बोले मुनि गिरा सुहाई ॥
रामचरित सर गुप्त सुहावा । संभु प्रसाद तात मैं पावा ॥
तोहि निज भगत राम कर जानी । ताते मैं सब कहेउँ बखानी ॥
राम भगति जिन्ह कें उर नाहीं । कबहुँ न तात कहिअ तिन्ह पाहीं ॥
मुनिमोहि बिबिधि भाँति समुझावा । मैं सप्रेम मुनि पद सिरु नावा ॥
निज कर कमल परसि मम सीसा । हरषित आसिष दीन्ह मुनीसा ॥
राम भगति अबिरल उर तोरें । बसिहि सदा प्रसाद अब मोरें ॥

दो० —सदा राम प्रिय होहु तुम्ह सुभ गुन भवन अमान ।
कामरूप इच्छा मरन ग्यान बिराग निधान ॥ ११३ (क) ॥
जेहिं आश्रम तुम्ह बसब पुनि सुमिरत श्रीभगवंत ।
ब्यापिहि तहँ न अबिद्या जोजन एक प्रजंत ॥ ११३ (ख) ॥

भूल पाडून माझ्या प्रेमाची परीक्षा घेतली. मी मनाने, वाणीने आपला दास आहे, असे जाणून भगवंतांनीच पुनः मुनींची बुध्दी फिरवली !

चाण्डाल पक्षी केल्यावरसुद्धा माझ्या ठिकाणी संताप उत्पन्न झाला नाही किंवा दैन्यही निर्माण झाले नाही. हे माझे महापुरुषासारखे शील ऋषींनी पाहिले. तसेच माझा रामचरणी अत्यंत विश्वासही पाहिला. तेव्हा ते अतिखिन्न होऊन पुनः पुन्हा पश्चात्ताप करू लागले.

असा थोडा वेळ गेल्यावर मुनींनी मला आदराने जवळ बोलावून घेतला आणि परोपरींनी सांगून माझा संतोष केला व हर्षित होऊन मला राममंत्र दिला त्यानंतर कृपानिधान मुनींनी मला बालरूप रामचंद्राचे ध्यान व ते कसे करावे हे शिकवले. सुंदर आणि सुखदायक असे ते ध्यान मला फार फार आवडले. ते मी तुम्हाला पूर्वीच सांगितले आहे. त्यानंतर मुनींनी मला काही काळ आपल्याजवळ ठेवून घेतले आणि त्यावेळी मला, ' रामचरित-मानस ' सांगितले. ही सर्व कथा अत्यंत आदरपूर्वक सांगून मुनींनी सुंदर रहस्यमय भाषण केले,

" हे गुप्त आणि मनोहर ' रामचरितमानस ' मला शंकराच्या कृपाप्रसादाने मिळाले. तू श्रीरामचंद्रांचा निजभक्त आहेत हे जाणून मी ही सगळी कथा तुला विस्तारपूर्वक रंगवून सांगितली. हे तात ! ज्याच्या हृदयात रामभक्ती नाही त्यांना ही कथा केव्हाही सांगू नये. "

मग मुनींनी मला पुन्हा नानाप्रकारे उपदेश केला तेव्हा मी त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवले. आपले करकमल माझ्या मस्तकावर ठेवून मुनीश्वरांनी मोठ्या संतोषाने मला आशीर्वाद दिला.

" माझ्या कृपेने श्रीरामचंद्रांची प्रगाढ भक्ती नित्य तुमच्या हृदयात राहील; आणि श्रीरामास तुम्ही सदोदित प्रिय व्हाल. तसेच सर्व सद्गुणांचे माहेरघर [illegible] इच्छेप्रमाणे रूप धारण करणारे ज्ञाननिधान; वैराग्यनिधान. ११३ (क)

आणि इच्छामरणी व्हाल. श्री भगवंताचे स्मरण करीत तुम्ही ज्या आश्रमात राहाल, तिथे चार कोस-पर्यंत अविद्या व्यापणार नाही. ११३ (ख)



चौ० – काल कर्म गुन दोष सुभाऊ। कछु दुख तुम्हहि न ब्यापिहि काऊ ॥
राम रहस्य ललित बिधि नाना। गुप्त प्रगट इतिहास पुराना ॥
बिनु श्रम तुम्ह जानब सब सोऊ। नित नव नेह राम पद होऊ ॥
जो इच्छा करिहहु मन माहीं। हरि प्रसाद कछु दुर्लभ नाहीं ॥
सुनि मुनि आसिष सुनु मतिधीरा। ब्रह्मगिरा भइ गगन गँभीरा ॥
एवमस्तु तव बच मुनि ग्यानी। यह मम भगत कर्म मन बानी ॥
सुनि नभ गिरा हरष मोहि भयऊ। प्रेम मगन सब संसय गयऊ ॥
करि बिनती मुनि आयसु पाई। पद सरोज पुनि पुनि सिरु नाई ॥
हरष सहित एहिं आश्रम आयउँ। प्रभु प्रसाद दुर्लभ बर पायउँ ॥
इहाँ बसत मोहि सुनु खग ईसा। बीते कलप सात अरु बीसा ॥
करउँ सदा रघुपति गुन गाना। सादर सुनहिं बिहंग सुजाना ॥
जब जब अवधपुरीं रघुबीरा। धरहिं भगत हित मनुज सरीरा ॥
तब तब जाइ राम पुर रहऊँ। सिसुलीला बिलोकि सुख लहऊँ ॥
पुनि उर राखि राम सिसुरूपा। निज आश्रम आयउँ खगभूपा ॥
कथा सकल मैं तुम्हहि सुनाई। काग देह जेहिं कारन पाई ॥

काल, कर्म, त्रिगुण, दोष आणि स्वभाव यांच्यापासून उत्पन्न होणारे दुःख तुम्हाला कधीही होणार नाही. तसेच इतिहास-पुराणांत गुप्त अथवा प्रकट असलेले अनेक प्रकारचे सुंदर रामरहस्य काहीही श्रम न करता तुम्हाला कळेल.

अहो ! श्रीरामचरणी तुमचा नित्य नवा अधिकाधिक स्नेह होवो. फार काय, तुम्ही मनात जी कोणतीही इच्छा कराल, ती हरिकृपेने तुमची सहज पूर्ण होईल. ”

हे धीरमती ! पक्षिराज ! मुनींचा असा मोलाचा आशीर्वाद मिळताक्षणीच आणखी एक चमत्कार झाला. त्याच वेळी आकाशात गंभीर अशी ब्रह्मवाणी झाली, “ हे ज्ञानीमुनी ! तुम्ही जे म्हणालात ते तसे होवो. कारण हा मनाने, वाचेने व कर्माने माझाच भक्त आहे. ”

—ती आकाशात झालेली भगवंतांची वाणी ऐकून मला केवढा आनंद झाला ! मी प्रेममग्न झालो; माझे सर्व संशय लयास गेले. मग मुनींनी प्रार्थना करून त्यांच्या चरणकमलांवर वारंवार मस्तक ठेवले. (प्रभूच्या कृपेने मला दुर्लभ वर मिळाल्याने) अंतःकरणात संतोषाच्या लाटा उसळत असताच मी या आश्रमात येऊन पोचलो.

अहो पक्षिराज ! मी या नील पर्वतावर राहू लागल्यापासून आतापर्यंत सत्तावीस कल्पांचा काळ लोटला ! [चार युगांच्या चौकड्या एक हजार वेळा गेल्या, म्हणजे ब्रह्मदेवाचा एक दिवस आणि ब्रह्मदेवाची अशी ३६० दिवसांची शंभर वर्षे गेल्यानंतर एक कल्प] आणि आता अठ्ठाविसावा कल्प चालू आहे; या ठिकाणी मी नित्यनियमाने रघुपतीच्या चरित्रातील कथांचे गायन करत असतो; आणि जाणते पक्षी ते आदराने ऐकतात.

आपल्या भक्तांच्यासाठी जेव्हा जेव्हा श्रीरघुवीर अयोध्येत मनुष्याचे शरीर धारण करून अवतार घेतात, तेव्हा तेव्हा मी रामनगरीत जाऊन राहतो व त्यांच्या बाललीला पाहून सुखाची लूट करतो. त्यानंतर श्रीरामचंद्रांचे ते पाच वर्षांचे बालरूप आपल्या हृदयात धारण करून आपल्या आश्रमाकडे परत येतो. [प्रत्येक कल्पात कोणत्यातरी एका त्रेतायुगात रामावतार होतो. म्हणजे भुशुंडीने आतापर्यंत सत्तावीस वेळा श्रीरघुपतीच्या बाललीला पाहिल्या; व पुढेही अनंत कल्पात तो प्रत्येक रामावतारातील बाललीला पाहत राहणार ! केवढे अतुल्य भाग्य त्याचे ! गू. चं.]

असो. मला हा कावळ्याचा देह कसा मिळाला, या विषयाची सर्व कथा मी तुम्हास सांगितली. हे तात !

कहिउँ तात सब प्रस्न तुम्हारी । राम भगति महिमा अति भारी ॥

दो० –ताते यह तन मोहि प्रिय भयउ राम पद नेह ।
निज प्रभु दरसन पायउँ गए सकल संदेह ॥ ११४ (क) ॥

मासपारायण, उन्तीसवाँ विश्राम

भगति पच्छ हठ करि रहेउँ दीन्हि महारिषि साप ।
मुनि दुर्लभ बर पायउँ देखहु भजन प्रताप ॥ ११४ (ख) ॥

चौ० –जे असि भगति जानि परिहरहीं । केवल ग्यान हेतु श्रम करहीं ॥
ते जड़ कामधेनु गृहँ त्यागी । खोजत आकु फिरहिं पय लागी ॥
सुनु खगेस हरि भगति बिहाई । जे सुख चाहहिं आन उपाई ॥
ते सठ महासिंधु बिनु तरनी । पैरि पार चाहहिं जड़ करनी ॥
सुनि भसुंडि के बचन भवानी । बोलेउ गरुड़ हरषि मृदु बानी ॥
तव प्रसाद प्रभु मम उर माहीं । संसय सोक मोह भ्रम नाहीं ॥
सुनेउँ पुनीत राम गुन ग्रामा । तुम्हरी कृपाँ लहेउँ बिश्रामा ॥
एक बात प्रभु पूँछउँ तोही । कहहु बुझाइ कृपानिधि मोही ॥
कहहिं संत मुनि बेद पुराना । नहिं कछु दुर्लभ ग्यान समाना ॥

तुमच्या इतर सर्व प्रश्नांची उत्तरे देऊन झालीच आहेत. मुख्यतः रामभक्तीचा महिमा अत्यंत आहे, हेही सांगितले.

आता हे कावळ्याचे शरीर मला प्रिय वाटण्याचे कारण हेच की, त्या शरीरात मी असता मला श्रीराम-चरणांचे शुद्ध प्रेम प्राप्त झाले. तसेच या शरीरात असता माझ्या उपास्य देवतेचे—बालरूप रामचंद्राचे—मला दर्शन घडले. आणि सर्व संशय नष्ट झाले. ११४ (क)

– रामरहस्य-प्रकरण (भक्तिमहिमा) -

भुशुंडी गरुडाला भक्तिमहिमा सांगतो–

भक्ति-पक्षाचा हट्ट धरला म्हणून महर्षींचा शाप झाला तरीसुद्धा मुनींनाही दुर्लभ असे वर मिळाले. हा भक्तीचा केवढा प्रताप आहे, ते प्रत्यक्षच पाहा ! ११४ (ख)

भक्ती इतकी प्रभावी आहे, हे जाणूनसुद्धा जे तिचा त्याग करतात आणि भक्तिहीन केवळ ज्ञानासाठी श्रम करतात, ते पढतमूर्ख समजावे. घरी आलेल्या कामधेनूला हाकून देऊन दुधासाठी रुईचे झाड शोधित भटकणाऱ्याला दुसरे काय म्हणावे ?

खगेश ! ऐक; हरिभक्तीचा त्याग करून जे इतर साधनांनी सुख मिळवण्याची इच्छा करतात, ते खरो-खरच मूर्ख होत. याचे कारण, योग्य अशा जहाजाशिवायच महासागरातून पलीकडे जाण्याची ते वेड्यासारखी इच्छा करतात.”

शंकर म्हणतात, ‘भवानी ! भुशुंडीचे हे भाषण ऐकून गरुडाला समाधान वाटून तो कोमल वाणीने बोलला—

‘हे प्रभो ! तुमच्या कृपेने आता माझ्या हृदयात संशय उरला नाही. तसेच शोक, मोह अगर भ्रम हेही दोष उरले नाहीत. श्रीरामचंद्राचे पवित्र असे सद्‌गुणांनी भरलेले असे चरित्र ऐकले. आणि तुमच्या कृपेने आता माझ्या चित्ताला सुखसमाधान प्राप्त झाले आहे.

“तथापि हे कृपासागरा ! मला आपणाला एका बाबतीत खुलासा पाहिजे. तेवढा सविस्तर करावा. वेद, पुराणे, संत व मुनी असा सिद्धान्त मांडतात की, ज्ञानासारखे अत्यंत दुर्लभ असे जगात काही नाही. आणि



सोइ मुनि तुम्ह सन कहेउ गोसाईं । नहिं आदरेहु भगति की नाईं ।।
ग्यानहि भगतिहि अंतर केता । सकल कहहु प्रभु कृपा निकेता ।।
सुनि उरगारि बचन सुख माना । सादर बोलेउ काग सुजाना ।।
भगतिहि ग्यानहि नहिं कछु भेदा । उभय हरहिं भव संभव खेदा ।।
नाथ मुनीस कहहिं कछु अंतर । सावधान सोउ सुनु बिहंगबर ।।
ग्यान बिराग जोग बिग्याना । ए सब पुरुष सुनहु हरिजाना ।।
पुरुष प्रताप प्रबल सब भाँती । अबला अबल सहज जड़ जाती ।।

दो० —पुरुष त्यागि सक नारिहि जो बिरक्त मति धीर ।
न तु कामी बिषयाबस बिमुख जो पद रघुबीर ।। ११५ (क) ।।

सो ०—सोउ मुनि ग्याननिधान मृगनयनी बिधु मुख निरखि ।
बिबस होइ हरिजान नारि बिष्नु माया प्रगट ।। ११५ (ख) ।।

चौ० —इहाँ न पच्छपात कछु राखउँ । बेद पुरान संत मत भाषउँ ।।
मोह न नारि नारि कें रूपा । पन्नगारि यह रीति अनूपा ।।
माया भगति सुनहु तुम्ह दोऊ । नारि बर्ग जानइ सब कोऊ ।।
पुनि रघुबीरहि भगति पिआरी । माया खलु नर्तकी बिचारी ।।

असले दुर्लभ ज्ञान लोमशमुनींनी तुम्हाला आपणहून सांगितले. तथापि तुम्ही त्याला भक्तीसारखा आदर दिला नाही.

"त्यामुळे मला विचारावेसे वाटू लागले की, ज्ञान आणि भक्ती यांत अंतर किती, हे प्रभो ! कृपा करा ! मला ते सगळे सविस्तर समजावून सांगावे."

हे उरगारी गरुडाची जिज्ञासा समजून भुशुंडीला संतोष झाला; आणि तो त्या विषयात तज्ज्ञ असल्याने त्याने त्या प्रश्नाचे पद्धतशीर उत्तर देण्यास सुरुवात केली—

—भक्ती व ज्ञान यांच्या परिणामाच्या दृष्टीने तसे पाहिले तर त्यांच्याच काही भेद नाही. कारण संसारापासून उत्पन्न होणाऱ्या दुःखांचा नाश दोन्हीही करू शकतात. तरी पण नाथ ! श्रेष्ट मुनींच्या मताने दोन्हीत काही अंतर आहे. ते हे खगश्रेष्ठा ! सावधानतेने ऐकावे.

विराग, योग, बोध आणि विबोध हे सर्वच, हे हरियाना ! पुरुष आहेत. पुरुषांचा सगळाच प्रताप प्रबल असतो; आणि अबला स्त्रिया स्वभावतःच दुर्बल आणि निसर्गतःच मूर्ख असतात, हे जरी खरे असले तरी वैराग्यसंपन्न, सात्विक धैर्याचा, आणि रघुवीरचरणांचा भक्त असलेला पुरुषच अबला समजल्या जाणाऱ्या स्त्रियांच्या प्रेमपाशातून सुटू शकतो. परंतु कामी, विषयोपभोगाला चटावलेला आणि भक्तिहीन असा असलेला पुरुष स्वभावतः प्रबल असला तरी अबलेच्या पुढे हतबल होतो. ११५ (क)

फार कशाला ? रघुवीरचरणविमुख असणारे ज्ञाननिधान मुनीसुद्धा हरिणीसारखे सुंदर नेत्र असलेल्या तरुण स्त्रीचे चंद्रासारखे मुख पाहून तिच्या प्रेमपाशात गुरफटले जातात ! याचे कारण असे की, हे हरिवाहना ! अबला असणारी स्त्री म्हणजे प्रत्यक्ष डोळ्यासमोर वावरणारी विष्णूची मायाच आहे. ११५ (ख)

लोमश प्रसंगाप्रमाणे या ठिकाणी मी भक्तिपक्षाची बाजू घेऊन मुळीच सांगत नाही. तर वेद, पुराण, संत यांचेच मत तेच सांगतो. हे सर्पशत्रू ! अशी एक सामाजिक जीवनात अनुपमेय मौज पाहावयास मिळते की, एखादी स्त्री कितीही सुंदर असली तरी तिला पाहून दुसरी कोणतीही स्त्री मोहित होऊ शकत नाही !

या तत्त्वास अनुसरून विचार करा म्हणजे असे दिसून येईल की, माया व भक्ती या दोन्ही स्त्रीवर्गातीलच आहेत, हे उघड आहे. आता या दोन्हीत रघुवीराला भक्तीच भारी प्रिय आहे. कारण माया

भगतिहि सानुकुल रघुराया । ताते तेहि डरपति अति माया ।।
राम भगति निरुपम निरुपाधी । बसइ जासु उर सदा अबाधी ।।
तेहि बिलोकि माया सकुचाई । करि न सकइ कछु निज प्रभुताई ।।
अस बिचारि जे मुनि बिग्यानी । जाचहिं भगति सकल सुख खानी ।।

दो० — यह रहस्य रघुनाथ कर बेगि न जानइ कोइ ।
जो जानइ रघुपति कृपाँ सपनेहुँ मोह न होइ ।। ११६ (क) ।।
औरउ ग्यान भगति कर भेद सुनहु सुप्रबीन ।
जो सुनि होइ राम पद प्रीति सदा अबिछीन ।। ११६ (ख) ।।

चौ० — सुनहु तात यह अकथ कहानी । समुझत बनइ न जाइ बखानी ।।
ईस्वर अंस जीव अबिनासी । चेतन अमल सहज सुख रासी ।।
सो मायाबस भयउ गोसाईं । बँध्यो कीर मरकट की नाईं ।।
जड़ चेतनहि ग्रंथि परि गई । जदपि मृषा छूटत कठिनई ।।
तब ते जीव भयउ संसारी । छूट न ग्रंथि न होइ सुखारी ।।
श्रुति पुरान बहु कहेउ उपाई । छूट न अधिक अधिक अरुझाई ।।
जीव हृदयँ तम मोह बिसेषी । ग्रंथि छूट किमि परइ न देखी ।।

बिचारी ही बोलून चालून नटी ! आणि रघुराया भक्तीलाच अनुकूल असल्यामुळे माया तिला अतिशय घाबरते; म्हणून निरुपम व अनन्य अशी हरिभक्ती ज्याच्या हृदयात अखंड राहते, त्याला पाहूनच माया लाजते आणि आपले प्रभुत्व त्याच्यावर गाजवू शकत नाही.

हे रामरहस्य समजल्यावर जे मुनी ब्रह्म तत्पर असतात, तेसुद्धा पूर्ण सुख देणारी भक्ती मागतात. परंतु हे रघुनाथाचे रहस्य कोणालाच लवकर उमगत नाही. जो कोणी रघुपतीच्या कृपेने हे रहस्य जाणतो. त्याला पुनः स्वप्नातसुद्धा मोह होत नाही ! ११६ (क)

अहो अतिप्रवीण पक्षिराज ! ज्ञान व भक्ती यातील आणखी एक भेद सांगतो तो ऐका. त्याची माहिती समजल्यावर श्रीरामचरणांच्या ठिकाणी कधीही न होणारी अशी भक्ती मिळते ! ११६ (ख)

स्वरूप, साधन, अधिकारी आणि फल या बाबतीत ज्ञान व भक्ती यात फरक कोणता ते दाखवण्यासाठी भुशुंडी पुढे सांगतो—

— ज्ञानदीप —

हे तात ! सांगता न येण्यासारख्या तत्त्वाची एक रूपकात्मक कहाणीच्या साधाने माहिती देतो. कारण ते या कहाणीने समजणे शक्य आहे, परंतु ते शब्दांनी सांगता येण्यासारखे नाही.

जीव हा ब्रह्माचा अंश असल्याने तो अविनाशी. चेतन, मायातीत व सहजसुखराशी असा आहे. असे त्याचे मूळ शुद्ध स्वरूप असता मायेला वश झाल्याने प्रभू असून राघू व माकड [illegible] बंधनात पडला.

आता या बंधनात जड व चेतन यांची जी गाठ पडली, ती जरी खोटी असली तरी सुटणे मात्र कठीण असते. अशी ही गाठ पडल्यापासूनच जीव, जन्ममरणरूप संसारचक्रात फिरू लागतो. आणि एक लेशभरही त्याला सुखाचा लाभ होत नाही.

ही गाठ सोडण्यासाठी वेद-पुराणादिकांनी पुष्कळ उपाय सांगितले आहेत; पण त्यांनी ही गाठ सुटत तर नाहीच, उलट ती अधिकाधिक घट्ट मात्र होत राहते, याचे कारण जीवाच्या हृदयात मोहामुळे गाढ अंधार पडलेला असतो त्यामुळे ही गाठच त्याच्या नजरेस येत नाही; मग ती सुटण्यासाठी प्रयत्न करणे दूरच !

अस संजोग ईस जब करई । तबहुँ कदाचित सो निरुअरई ।।
सात्विक श्रद्धा धेनु सुहाई । जौं हरि कृपा हृदयँ बस आई ।।
जप तप ब्रत जम नियम अपारा । जे श्रुति कह सुभ धर्म अचारा ।।
तेइ तृन हरित चरै जब गाई । भाव बच्छ सिसु पाइ पेन्हाई ।।
नोइ निबृति पात्र बिस्वासा । निर्मल मन अहीर निज दासा ।।
परम धर्ममय पय दुहि भाई । अवटै अनल अकाम बनाई ।।
तोष मरुत तब छमाँ जुड़ावै । धृति सम जावनु देइ जमावै ।।
मुदिताँ मथै बिचार मथानी । दम अधार रजु सत्य सुबानी ।।
तब मथि काढ़ि लेइ नवनीता । बिमल बिराग सुभग सुपुनीता ।।

दो० –जोग अगिनि करि प्रगट तब कर्म सुभासुभ लाइ ।
बुद्धि सिरावै ग्यान घृत ममता मल जरि जाइ ।।११७ (क)।।
तब बिग्यानरूपिनी बुद्धि बिसद घृत पाइ ।
चित्त दिआ भरि धरै दृढ़ समता दिअटि बनाइ ।। ११७ (ख) ।।
तीनि अवस्था तीनि गुन तेहि कपास तें काढ़ि ।
तूल तुरीय सँवारि पुनि बाती करै सुगाढ़ि ।।११७ (ग) ।।

आता पुढे सांगितला जाईल असा जेव्हा ईश्वर योग आणतो तेव्हाच कदाचित ती गाठ सुटण्याचा संभव असतो; म्हणजे ज्ञानमार्गातसुध्दा परमेश्वरी कृपा ही पाहिजेच !

सात्विक श्रध्दारूपी व्यालेली सुंदर गाय जर श्रीहरीच्या कृपेने येऊन हृदयात राहिली व अपार व्रत, जप, तप, यम, नियम, आणि वेदांनी सांगितलेले सात्विक धर्माचरण हा हिरवा चारा त्या गायीला पोटभर खाण्यास मिळाला तर भावरूपी वत्साची भेट होताच ती पान्हवते.

अशा गायीची धार काढताना ती स्थिर राहावी म्हणून निवृत्तिरूपी भाळदोरीचा उपयोग करून विश्वासरूपी धारेची चरवी घ्यावी आणि आपल्या इमानी नोकराप्रमाणे कामास तयार असलेले निर्मळ मन हाच दूध काढणारा गवळी असला पाहिजे.

त्यानंतर परम धर्ममय दूध काढून कामनाहीन अग्नी पेटवून त्यावर ते दूध तो तापवितो. मग क्षमा व संतोषरूपी वाऱ्याने ते जरूर तेवढे निवल्यावर धृतिरूपी विरजण सारखे लावून त्या दुधाचे तो दही बनवतो.

पुढे नित्यानित्यवस्तुविचाररूपी रवीने, दुसऱ्याच्या आनंदाने आनंदित होण्याची वृत्ती हेच ताक करण्याचे भांडे, त्यात ते दही घालतो. इंद्रियनिग्रहाच्या घुसळ खांबास, सत्य व सुवाणीरूपी घुसळदोरीने तो चक्का घुसळून निर्मल, सुंदर व अति पवित्र वैराग्यरूपी लोणी काढून घेतो.

मग योगरूपी अग्नी (कुंडलिनी शक्ती) प्रकट करून त्याला शुभ व अशुभ अशा दोन्ही कर्मांच्या शेणी लावून, त्यावर वैराग्यरूपी लोणी उकळून ममतारूपी मळ जळून गेल्यावर ११७ (क) त्या लोण्याचे तयार झालेले ज्ञानरूपी तूप बुद्धी निववितें तेव्हा ते घट्ट होते.

मग विज्ञानरूपिणी बुद्धी, ज्ञानरूपी निर्मल तूप मिळताच, चित्तरूपी पणती त्या ज्ञानतुपाने भरून समता ठाणवई करून ती पणती स्थिर राहील, अशी त्या ठाणवईवर ठेवते. ११७ (ख)

नंतर त्या साधकाच्या देहरूपी कापसातून तीन अवस्था व तीन गुण यांना बाहेर काढते; आणि तुरीयावस्थारूपी कापूस पिंजून चांगली जाडी घट्ट वात (ती विज्ञानरुपिणी बुध्दी) वळते. ११७ (ग) आणि मग असा देदीप्यमान विज्ञानमय दीप पेटवते की, त्याच्याजवळ जाताच मद वगैरे सर्व पतंग जळून जातील.

सो०—एहि बिधि लेसै दीप तेज रासि बिग्यानमय ।
जातहिं जासु समीप जरहिं मदादिक सलभ सब ।। ११७ (घ) ।।

चौ०—सोहमस्मि इति बृत्ति अखंडा । दीप सिखा सोइ परम प्रचंडा ।।
आतम अनुभव सुख सुप्रकासा । तब भव मूल भेद भ्रम नासा ।।
प्रबल अबिद्या कर परिवारा । मोह आदि तम मिटइ अपारा ।।
तब सोइ बुद्धि पाइ उँजिआरा । उर गृहँ बैठि ग्रंथि निरुआरा ।।
छोरन ग्रंथि पाव जौं सोई । तब यह जीव कृतारथ होई ।।
छोरत ग्रंथि जानि खगराया । बिघ्न अनेक करइ तब माया ।।
रिद्धि सिद्धि प्रेरइ बहु भाई । बुद्धिहि लोभ दिखावहिं आई ।।
कल बल छल करि जाहिं समीपा । अंचल बात बुझावहिं दीपा ।।
होइ बुद्धि जौं परम सयानी । तिन्ह तन चितव न अनहित जानी ।।
जौं तेहि बिघ्न बुद्धि नहिं बाधी । तौ बहोरि सुर करहिं उपाधी ।।
इंद्री द्वार झरोखा नाना । तहँ तहँ सुर बैठे करि थाना ।।
आवत देखहिं बिषय बयारी । ते हठि देहिं कपाट उघारी ।।

नित्य शुद्ध, बुद्ध, सच्चिदानंदघन असा जो आत्मा तोच मी आहे, ही जी अखंड वृत्ती तीच या दीपाची अती प्रचंड ज्योत होय. तिच्याजवळ जाताच मद आदिकरून सर्व पतंग जळून जातात. ११७ (घ)
तसेच आत्म-अनुभव-सुख हाच या ज्योतीचा प्रकाश पडला म्हणजे, संसृतीचे मूळ जे ब्रह्म आणि जीव यात भेद मानणे हा भ्रम, हाच जो अंधार त्याचा नाश होतो.

त्याच्याबरोबरच मोह आदिकरून अत्यंत प्रबळ अशा अविद्येच्या अफाट परिवाराच्या अंधाराचाही नाश होतो. तेव्हा ती विज्ञान रूपिणी बुद्धी प्रकाश मिळाल्यावर हृदयरूपी घरात बसून जडचेतन ग्रंथी सोडू लागते. हे त्या बुध्दीचे गाठ सोडण्याचे काम यशस्वी झाले तर हा जीव कृतार्थ होतो. परंतु, हे पक्षिराज ! ही गाठ सोडली जात आहे, असे जेव्हा मायेला दिसते, तेव्हा ती अनेक विघ्ने निर्माण करते.

अरे बाबा ! ती अविद्यामाया पुष्कळ ऋध्दी आणि अणिमादिक पुष्कळ सिध्दी यांना पाठवते. त्या बुध्दीला अनेक प्रकारे लोभन दाखवतात. नाना प्रकारच्या युक्त्या-प्रयुक्त्या करून बळाने किंवा छळाने ती जबर माया स्वतःच त्या ज्ञान दिव्याजवळ जाते व पदराच्या वाऱ्याने तो विझवून टाकते.

परंतु ती बुध्दी जर अत्यंत शहाणी असेल, तर यात आपले अहित आहे हे ओळखून त्या मायेच्या कपट-कारस्थानाकडे लक्ष न देता ती आपल्या सुखातच रंगून राहते; आणि अशा प्रकारे त्या विघ्नांच्या आपत्तीतून बुध्दीने जर आपली सुटका करून घेतली तर दुसऱ्या संकटांतून परस्पर मुक्त होते.

देव येऊन त्या बुध्दीला छळू लागतात. शरीरातील इंद्रियांची दारे याच अनेक खिडक्या आहेत; त्या प्रत्येक खिडकीत एकेक देवता ठाण मांडून बसलेली असते. विषयरूपी जोराचा वारा बाहेरून येत आहे, असे पाहून ते त्या खिडक्यांची बंद असलेली दारे एकदम जोराने उघडतात. त्यातून तो सोसाट्याचा वारा जेव्हा हृदयरूपी घरात घुसतो, तेव्हा विज्ञान रूपी दिवा मालवतो.

[कान, कातडी, डोळे, जीभ आणि नाक-ही पाच ज्ञानेंद्रिये. दिशा, वायू, सूर्य, वरुण व अश्विनी-कुमार या अनुक्रमे देवता. वाणी, हात, पाय, शौचद्वार, मूत्रद्वार-ही पाच कर्मेंद्रिये आहेत. व अग्नि, इंद्र, उपेंद्र, यम आणि प्रजापती या क्रमशः त्यांच्या देवता आहेत. याप्रमाणे प्रत्येक इंद्रियाची एकेक देवता सूक्ष्म देहात असून, त्या त्या इंद्रियांची दारे जी जड देहात असतात, त्यात हा देह असेपर्यंत त्या निवास करून राहतात. त्यांची सत्ता त्या त्या इंद्रियावर चालून तो तो इंद्रियांचा विषयोपभोग त्या देवतांना मिळतो. पण वृत्ती उठत नाहीशी झाल्याने त्यांचा खाना बंद पडतो व तो भोग मिळेनासा झाल्याने त्या त्या देवता धडपड करू लागतात.]

जब सो प्रभंजन उर गृहँ जाई । तबहिं दीप बिग्यान बुझाई ॥
ग्रंथि न छूटि मिटा सो प्रकासा । बुद्धि बिकल भइ बिषय बतासा ॥
इंद्रिन्ह सुरन्ह न ग्यान सोहाई । बिषय भोग पर प्रीति सदाई ॥
बिषय समीर बुद्धि कृत भोरी । तेहि बिधि दीप को बार बहोरी ॥

दो० – तब फिरि जीव बिबिधि बिधि पावइ संसृति क्लेस ।
हरि माया अति दुस्तर तरि न जाइ बिहगेस ॥ ११८ (क) ॥
कहत कठिन समुझत कठिन साधत कठिन बिबेक ।
होइ घुनाच्छर न्याय जौं पुनि प्रत्यूह अनेक ॥ ११८ (ख) ॥

चौ० – ग्यान पंथ कृपान कै धारा । परत खगेस होइ नहिं बारा ॥
जो निर्बिघ्न पंथ निर्बहई । सो कैवल्य परम पद लहई ॥
अति दुर्लभ कैवल्य परम पद । संत पुरान निगम आगम बद ॥
राम भजत सोइ मुकुति गोसाईं । अनइच्छित आवइ बरिआई ॥
जिमि थल बिनु जल रहि न सकाई । कोटि भाँति कोउ करै उपाई ॥
तथा मोच्छ सुख सुनु खगराई । रहि न सकइ हरि भगति बिहाई ॥
अस बिचारि हरि भगत सयाने । मुक्ति निरादर भगति लुभाने ॥

महत्प्रयासाने लावलेला तो विज्ञानप्रदीप अशा दुर्दैवाने मालवल्यावर ग्रंथी सुटण्याचे बाजूलाच राहून हृदयात पडलेला प्रकाशही नाहीसा होतो. विषयरूपी वादळाने बुध्दी व्याकुळ होते. याचे मूळ कारण म्हणजे इंद्रियांच्या देवतांना स्वभावतःच ज्ञानाचा तिटकारा असून, विषयोपभोग सदोदित फार प्रिय असतात.

विषयरूपी झंझावाताने बुध्दी भांबावून गेल्यावर मग पूर्वीप्रमाणे प्रयत्नपूर्वक विज्ञान-दीप पुनः कोण लावणार? अर्थात् हा ज्ञानदीप विझल्याने जन्ममरण परंपरेचे क्लेश, दुःख भोगण्याचे, जीवाच्या नशिबी येते!

अहो पक्षिराज! श्रीहरीची अविद्यामायासुद्धा अत्यंत दुस्तर असल्याने जीवाला या ज्ञानमार्गाने तरून जाता येत नाही! ११८ (क)

याचे कारण असे की, या शुद्ध ज्ञानाची साक्ष पटविणारा मिळणे अगोदर कठीण; तितक्यांतून भाग्याने कोणी मिळालाच तर त्याने सांगितल्यानंतर आपल्या बुध्दीत प्रकाश पडणे कठीण; समजा शब्दाचे ज्ञान सुदैवाने झाले तरी त्या ज्ञानाच्या सहाय्याने प्रत्यक्ष जीव-शिवैक्य साधणे त्याहून कठीण! इतके कठीण असलेले ज्ञान घुणाक्षर न्यायाने झालेच तरी अनेक विघ्नांच्या आपत्तीत ते टिकणे अशक्य! ११८ (ख)

[घुणाक्षर न्याय—एक प्रकारच्या वाळवीने लाकूड खाल्यावर न कळत जी अक्षरे त्या लाकडावर उठतात, त्यांना घुणाक्षरे म्हणतात. त्याप्रमाणे प्रारब्धवशात्, सहज ज्ञान झाले तर.]

हे खगेश्वर! ज्ञानमार्ग म्हणजे दुधारी तलवारीची धारच कशी आहे हे पाहिले ना? त्यामुळे त्या मार्गाने जाणाऱ्या साधकाचे अधःपतन होण्यास वेळच लागत नाही. तथापि या सर्व अडचणीतून शिरसलामत जो निभावून निवेल त्याला अत्यंत दुर्लभ अशा मोक्षरूपी परम पदाची प्राप्ती होते, यांत शंकाच नाही!

परंतु मधेच जर घसरला गेला की गेला रसातळाला हेही तितकेच खरे! म्हणून संत, पुराणे, वेद व इतर शास्त्रे हेच कोणी वक्ते (वद=वक्ता) सांगतात की, कैवल्याची प्राप्ती अत्यंत दुर्लभ आहे.

अहो स्वामी! श्रीरामचंद्राचे भजन करीत राहिल्यास तीच अतिदुर्लभ कैवल्यमुक्ती भक्ताची इच्छा नसतानासुद्धा बळजबरीने चालून त्याच्याकडे येते. म्हणून हे सिद्ध आहे की, नानाप्रकारे कोट्यवधी यत्न केले तरी काही आधारभूत स्थळ मिळाल्याशिवाय जसे पाणी राहूच शकत नाही, तसेच हे खगराजा! हरिभक्तीचा आश्रय मोक्षसुखाला मिळाला तरच ते मोक्षसुख राहू शकते.

हे समजून जे शहाणे हरिभक्त असतात, ते मुक्तीचा अनादर करून भक्तीवर लुब्ध होतात; कारण

भगति करत बिनु जतन प्रयासा । संसृति मूल अविद्या नासा ।।
भोजन करिअ तृपिति हित लागी । जिमि सो असन पचवै जठरागी ।।
असि हरि भगति सुगम सुखदाई । को अस मूढ़ न जाहि सोहाई ।।

दो० —सेवक सेव्य भाव भव न तरिअ उरगारि ।
भजहु राम पद पंकज अस सिद्धांत बिचारि ।। ११९ (क) ।।
जो चेतन कहँ जड़ करइ जड़हि करइ चैतन्य ।
अस समर्थ रघुनायकहि भजहिं जीव ते धन्य ।। ११९ (ख) ।।

चौ० —कहेउँ ग्यान सिद्धांत बुझाई । सुनहु भगति मनि कै प्रभुताई ।।
राम भगति चिंतामनि सुंदर । बसइ गरुड़ जाके उर अंतर ।।
परम प्रकास रूप दिन राती । नहि कछु चहिअ दिआ घृत बाती ।।
मोह दरिद्र निकट नहिं आवा । लोभ बात नहिं ताहि बुझावा ।।
प्रबल अबिद्या तम मिटि जाई । हारहिं सकल सलभ समुदाई ।।
खल कामादि निकट नहिं जाहीं । बसइ भगति जाके उर माहीं ।।
गरल सुधासम अरि हित होई । तेहि मनि बिनु सुख पाव न कोई ।।

भक्ती करत राहिल्याने, जन्ममरणरूप संसाराचे मूळ असणाऱ्या अविद्येचा [illegible] अगदी अनायासे नाश होतो.

भोजन केल्याने सुख होऊन शिवाय मनुष्याची तृप्ती होते; आणि ते खाल्लेले अन्न पचवून खाणाऱ्याच्या शरीराचे पोषण करण्याचे काम जठरानल परस्परच करतो. भोजनाप्रमाणेच भजनही सुखदायक व सोपे साधन आहे, पण ते वेळच्यावेळी, व्यवस्थितपणे, आवडीने करावे म्हणजे भगवत्प्रेम, आत्मानुभव व त्याला लागणारे वैराग्य या गोष्टी आपोआप अनायासे परस्पर सिद्ध होत जातात.

—असे हे भजनाचे साधन असता, असा कोण मूर्ख असेल की, ज्याला ते साधन आवडीने घ्यावे असे वाटत नाही?

सारांश, हे उरगारी गरुड! मी सेवक असून, भगवान् हे माझे स्वामी आहेत; अशा श्रद्धायुक्त भावावाचून भवसागर तरून जाणे शक्य नाही; या सिद्धान्ताचा विचार करून [illegible] भजन करा. ११९ (क)

कारण जो चेतनाला जड करतो व जडाला चेतन बनवतो अशा समर्थ [illegible] जे भजतात, ते जीव धन्य होत! ११९ (ख)

हे तात! ज्ञानसिद्धान्त जसा तुम्हाला सविस्तर समजावून सांगितला, तसाच आता या भक्तिमण्याची प्रभुता ऐका. रामभक्ती हा एक खरोखरच सुंदर चिंतामणी आहे. गरुडा! हे रत्न ज्या कोणा परम भाग्यवंताच्या हृदयामध्ये चमकत राहते, तो सुदैवी पुरुष रात्रंदिवस परम प्रकाशरूपच असतो. याचे कारण हा चिंतामणी रात्रंदिवस अखंड प्रकाश पाडत असतोच. याला कोणत्याही दिव्याप्रमाणे पणती, वात, तेल-तूप, इत्यादि साधनसामग्रीची मुळीच गरज नसते.

मोहरूपी दारिद्र्याची या [illegible] सावलीही पडत नाही किंवा विषयलालसा त्याला विझवू शकत नाही. त्याच्या प्रकाशात कितीही प्रबळ अविद्यारूपी अंधकार असला तरी त्याचा नाश होतो. आणि मद, मत्सर, ईर्षा, असूया, कपट, दंभ, पाखंड, इत्यादि पतंगांचा थवा एकदम मागे सरतो!

त्याचप्रमाणे ज्यांच्या हृदयात एकदा हरिभक्ती राहू लागते, त्यांच्याजवळ काम व क्रोध हे खल जात नाहीत; इतकेच काय, विषसुद्धा त्याला [illegible] पुष्टी देते व हाडवैरी असणारे शत्रू हितकर्ते मित्र बनतात! अर्थात् अशा रामभक्ती [illegible] कोणालाच खरे सुख मिळणार नाही, हे उघडच आहे.



ब्यापहिं मानस रोग न भारी । जिन्ह के बस सब जीव दुखारी ।।
राम भगति मनि उर बस जाकें । दुख लवलेस न सपनेहुँ ताकें ।।
चतुर सिरोमनि तेइ जग माहीं । जे मनि लागि सुजतन कराहीं ।।
सो मनि जदपि प्रगट जग अहई । राम कृपा बिनु नहिं कोउ लहई ।
सुगम उपाय पाइबे केरे । नर हतभाग्य देहिं भटभेरे ।।
पावन पर्बत बेद पुराना । राम कथा रुचिराकर नाना ।।
मर्मी सज्जन सुमति कुदारी । ग्यान बिराग नयन उरगारी ।।
भाव सहित खोजइ जो प्रानी । पाव भगति मनि सब सुख खानी ।।
मोरें मन प्रभु अस बिस्वासा । राम ते अधिक राम कर दासा ।।
राम सिंधु घन सज्जन धीरा । चदन तरु हरि संत समीरा ।।
सब कर फल हरि भगति सुहाई । सो बिनु संत न काहूँ पाई ।।
अस बिचारि जोइ कर सतसंगा । राम भगति तेहि सुलभ बिहंगा ।।

दो० —ब्रह्म पयोनिधि मंदर ग्यान संत सुर आहिं ।
कथा सुधा मथि काढ़हिं भगति मधुरता जाहिं ।। १२० (क) ।।
बिरति चर्म असि ग्यान मद लोभ मोह रिपु मारि ।
जय पाइअ सो हरि भगति देखु खगेस बिचारि ।। १२० (ख) ।।

तसेच ज्यांच्या योगाने जीवांना सर्व दुःखे भोगावी लागतात, तसले मानस रोग हरिभक्ताला कधीच छळत नाहीत. म्हणूनच ज्याच्या हृदयात रामभक्ती चिंतामणी असतो, त्याला स्वप्नातसुद्धा दुःखाचा लेशही अनुभवण्याचा प्रसंग येत नाही !

अर्थात् या जगात तेच चतुर शिरोमणी की, जे हा मणी मिळवण्यासाठी शिकस्तीचे प्रयत्न करतात. परंतु इतका उघडा जरी हा मणी आहे तरी श्रीरामाच्या कृपेशिवाय तो कोणाला मिळत नाही. तथापि तो मिळवण्याचा उपाय मात्र तसा कठीण नाही. अडचण एक आहे की, तो सोपा उपाय असून हतभागी मनुष्य त्याला पायाच्या ठोकरीने लाथाडतात ! म्हणून तो सोपा उपाय सांगतो, ऐकून ठेव.

वेद, पुराणे हे पवित्र पर्वत आहेत, आणि अपार रामकथा या त्या पर्वतातील सुंदर खाणी आहेत. त्या खाणींची माहिती मर्मज्ञ संतांच्याकडून घ्यावी, नंतर हे उरगारी—ज्ञान व वैराग्याचे दोन डोळे स्वच्छ उघडून सदबुध्दीचे टिकाव हाती घेऊन जो प्राणी शुध्द भावाने त्या खाणीत शोधत राहील त्याला सर्व सुखदायक असा हा भक्तिमणी हाती लागल्याशिवाय खास राहणार नाही.

हे प्रभू गरुडा ! मला असा विश्वास वाटतो की, रामाचे दास रामापेक्षा मोठे असतात. राम सागर असून धीर संत हे मेघ आहेत. श्रीहरीचंदन तरू व संत हे वायूसारखे आहेत. त्यांच्या कृपेशिवाय सर्व साधनांचे फळ असणाऱ्या सुंदर हरिभक्तीचा लाभ कोणालाही होऊ शकत नाही. हे ध्यानात घेऊन हे विहंगा ! जो संत-समागम करतो त्याला रामभक्ती सहज प्राप्त होते.

वेद पुराणे हाच कोणी क्षीरसागर, ज्ञान हा मंदर पर्वत व संत हे त्याचे मंथन करणारे देव या क्षीरसागराच्या मंथनाने ते भक्तिरूपी माधुरी असलेले कथामृत त्यातून काढतात. १२० (क)

हे खगपती ! हरिभक्तीचे श्रेष्ठत्व आणखीही विचार करणाराला पटते. एका हातात वैराग्याची ढाल व दुसऱ्या हातात ज्ञानाची तलवार घेऊन लोभ, मद, मोह मत्सरादि शत्रूंना मारून विजयाची प्राप्ती करून देणारी फक्त हरिभक्तीच होय ! १२० (ख)

चौ० – पुनि सप्रेम बोलेउ खगराऊ । जौं कृपाल मोहि ऊपर भाऊ ॥
नाथ मोहि निज सेवक जानी । सप्त प्रस्न मम कहहु बखानी ॥
प्रथमहिं कहहु नाथ मतिधीरा । सब ते दुर्लभ कवन सरीरा ॥
बड़ दुख कवन कवन सुख भारी । सोउ संछेपहिं कहहु बिचारी ॥
संत असंत मरम तुम्ह जानहु । तिन्ह कर सहज सुभाव बखानहु ॥
कवन पुन्य श्रुति बिदित बिसाला । कहहु कवन अघ परम कराला ॥
मानस रोग कहहु समुझाई । तुम्ह सर्बग्य कृपा अधिकाई ॥
तात सुनहु सादर अति प्रीती । मैं संछेप कहउँ यह नीती ॥
नर तन सम नहिं कवनिउ देही । जीव चराचर जाचत तेही ॥
नरक स्वर्ग अपबर्ग निसेनी । ग्यान बिराग भगति सुभ देनी ॥
सो तनु धरि हरि भजहिं न जे नर । होहिं बिषय रत मंद मंद तर ॥

[अशा रीतीने भक्ति चिंतामणीची महती सांगून भुशुंडीने गुरु केलेली गीता संपविली. त्यानंतर भुशुंडी गुरूच्या आज्ञेवरून गरुडाने त्या सर्व मिळालेल्या माहितीचा [illegible] विचार करून पाहिला. तेव्हा काही प्रश्न उत्पन्न झाले व त्या विषयांचे सिध्दान्त जाणण्याची प्रबल इच्छा उत्पन्न झाली म्हणून तो आता सात प्रश्न विचारील. गु. चं.]

– सप्त प्रश्न-गीता –

[हे प्रश्न सातच असले तरी त्यांची व्याप्ती विशाल आहे. [illegible] अत्यंत आवश्यक सिध्दान्तांचा ऊहापोह भुशुंडीने या प्रकरणात केला आहे. या सात प्रश्नांचे [illegible] घेऊन त्याचे नित्य मनन करत, त्यात त्याज्य [illegible] गोष्टींचा त्याग करून सेव्य व कर्तव्य म्हणून सांगितलेल्या गोष्टीचे ग्रहण व कृती मनुष्य करू शकेल तर या प्रकारचे [illegible] तो दुःखहीन, निष्कंटक, निर्भय अशा परमानंद साम्राज्याचा अधिपती झाल्याशिवाय राहणार नाही. हे प्रकरण मानसमधील सर्व सिद्धान्ताचे सार-सर्वस्व आहे, असे म्हणणे वावगे होणार नाही. – गु. चं.]

भक्तिमणीचा महिमा समजून घेतल्यावर खगराज गरुड भुशुंडींना प्रेमाने म्हणाला, " हे कृपाळू ! माझ्यावर जर आपला एवढा स्नेह आहे, तर मला आपला निज सेवक समजून माझ्या सात प्रश्नांचे सविस्तर विवरण करून सांगावे.

हे धीर बुद्धिनाथ ! पहिल्यानेच हे सांगावे की, सर्वांत दुर्लभ शरीर कोणते ? सर्वांत मोठे दुःख कोणते, व सर्वांत मोठे सुख कोणते ते विचार करून थोडक्यात मला सांगा. संत व दुर्जन यांचे मर्म तुम्ही जाणता. म्हणून त्यांच्या सहज स्वभावाची मला कल्पना द्या. वेदांत वर्णन केलेले अत्यंत [illegible] मोठे पुण्य कोणते ? आणि वेदांत वर्णन केलेले अत्यंत घोर असे पातक कोणते तेही सांगा. शेवटी मानसरोगांचे विस्तृत वर्णन करून सांगा.

–आपण सर्वज्ञ असून माझ्यावर आपली मोठी कृपा आहे. म्हणूनच हे प्रश्न [illegible] मी धाडस केले.

ते प्रश्न ऐकून घेतल्यावर त्यांची उत्तरे भुशुंडीने दिली– हे नाथ ! आदराने व अत्यंत प्रेमाने ऐका. मीही तशाच भावनेने ही नीती थोडक्यात सांगतो.–

' नरदेहापेक्षा श्रेष्ठ असा दुसरा देह नाही. तो आपणास मिळावा म्हणून [illegible] चराचर जीव याचना करत असतात. याचे कारण असे की, नरक, स्वर्ग व मोक्ष यांच्याकडे नेणारी ही एकच शिडी आहे. याचप्रमाणे ज्ञान, वैराग्य व सुंदर भक्ती यांचीही प्राप्ती याच शरीरात होते.

अशा प्रकारचे अत्यंत दुर्लभ असे शरीर प्राप्त झाल्यावर जे मानव हरीचे भजन करत नाहीत, [illegible] योपभोगात रंगून जातात, ते जड बुद्धीचे असून पुढे अधिकाधिक मंद बुद्धीचे होत राहतात. आपल्या हातातील



काँच किरिच बदलें ते लेहीं। कर ते डारि परस मनि देहीं ।।
नहिं दरिद्र सम दुख जग माहीं। संत मिलन सम सुख जग नाहीं ।।
पर उपकार बचन मन काया। संत सहज सुभाउ खगराया ।।
संत सहहिं दुख पर हित लागी। पर दुख हेतु असंत अभागी ।।
भूर्ज तरू सम संत कृपाला। पर हित निति सह बिपति बिसाला ।।
सन इव खल पर बंधन करई। खाल कढ़ाइ बिपति सहि मरई ।।
खल बिनु स्वारथ पर अपकारी। अहि मूषक इव सुनु उरगारी ।।
पर संपदा बिनासि नसाहीं। जिमि ससि हति हिम उपल बिलाहीं ।।
दुष्ट उदय जग आरति हेतू। जथा प्रसिद्ध अधम ग्रह केतू ।।
संत उदय संतत सुखकारी। बिस्व सुखद जिमि इंदु तमारी ।।
परम धर्म श्रुति बिदित अहिंसा। पर निंदा सम अघ न गरीसा ।।
हर गुर निंदक दादुर होई। जन्म सहस्र पाव तन सोई ।।
द्विज निंदक बहु नरक भोग करि। जग जनमइ बायस सरीर धरि ।।
सुर श्रुति निंदक जे अभिमानी। रौरव नरक परहिं ते प्रानी ।।
होहिं उलूक संत निंदा रत। मोह निसा प्रिय ग्यान भानु गत ।।

परीसमणी—तिरस्काराने मोबदला देऊन त्याच्या बदला काचेचे तुकडे घेण्यासारखी त्यांची ही कृती वेडेपणाची असते!

दारिद्र्यासारखे जगात दुसरे दुःख नाही; आणि संतांच्या भेटीसारखे दुसरे श्रेष्ठ सुख या पृथ्वीच्या पाठीवर नाही! खगराजा! वाणीने, मनाने व कर्माने परोपकार करणे हाच संतांचा सहज स्वभाव असतो, असे संत परहितासाठी स्वतः दुःख सहन करतात व अभागी असंत (दुर्जन) दुसऱ्यांना दुःख देण्यासाठी स्वतः दुःख सोसण्यात तयार होतात. आणि हाच त्यांचा जन्मस्वभाव होय.

संत हे भूर्ज तरूसारखे स्वतः अखंड साली काढून घेऊन झिजणारे कृपाळू असतात व दुसऱ्याच्या हितासाठी विनंती सोसतात. दुर्जन मात्र तागासारखा स्वतःची साल काढून घेऊन दुसऱ्याला दुःख देण्याकरता विपत्तींनी मरतो. हे उरगारी! ऐक! काहीही स्वार्थ न साधताच साप व उंदीर यांच्याप्रमाणे खल दुसऱ्यांना अपकार करत राहतो. पावसाच्या गारा ज्याप्रमाणे पिकांचा नाश करून स्वतः विरघळून नाहीशा होतात, तसेच दुर्जन दुसऱ्यांच्या संपत्तीचा विनाश करून शेवटी स्वतः नष्ट होतात.

प्रसिध्द नीच ग्रह जो धूमकेतू त्याचा उदय जसा जगाच्या दुःखाला आणि पीडेला कारण होतो, तसेच दुष्टांचे उदय जगाच्या आपत्तीकरताच होतात.

याच्या उलट चंद्र व सूर्य यांचे उदय जसे विश्वाला सुखदायक होतात, तसेच संतांचे उदय हे विश्वाच्या अखंड हितासाठी व सुखाकरताच होत असतात—

वेदांनी सांगितलेला अहिंसा हाच श्रेष्ठ धर्म होय; आणि हिमालय पर्वताहूनही परनिंदा हे मोठे पाप आहे. तसेच हरी-हर व गुरू यांची निंदा करणारा पुष्कळ नरकातील यांतना भोगून शेवटी बेडकाच्या जन्माला जातो आणि पुनः एक हजार वेळा पुनः पुन्हा त्याच देहात त्याला जन्म घ्यावा लागतो.

तसेच ब्राह्मणांची निंदा करणारा अनेक प्रकारच्या नरकयातना भोगून नंतर या जगात कावळा होऊन जन्माला येतो. अर्थात् असे जे अभिमानी प्राणी देवांची निंदा करतात, ते रौरव नरकात पडतात व शेवटी कावळ्याच्या जन्माला जातात. संतांची निंदा करण्यात जे तत्पर असतात, ते मोहांधकारात सुख मानणारे आणि ज्ञान-सूर्यापासून दुरावलेले असल्याने, त्यांना योग्य असा घुबडाचा जन्म येतो. त्याचप्रमाणे ज्यांना

सब कै निंदा जे जड़ करहीं । ते चमगादुर होइ अवतरहीं ॥
सुनहु तात अब मानस रोगा । जिन्ह ते दुख पावहिं सब लोगा ॥
मोह सकल व्याधिन्ह कर मूला । तिन्ह ते पुनि उपजहिं बहु सूला ॥
काम बात कफ लोभ अपारा । क्रोध पित्त नित छाती जारा ॥
प्रीति करहिं जौं तीनिउ भाई । उपजइ सन्यपात दुखदाई ॥
बिषय मनोरथ दुर्गम नाना । ते सब सूल नाम को जाना ॥
ममता दादु कंडु इरषाई । हरष बिषाद गरह बहुताई ॥
पर सुख देखि जरनि सोइ छई । कुष्ट दुष्टता मन कुटिलई ॥
अहंकार अति दुखद डमरुआ । दंभ कपट मद मान नेहरुआ ॥
तृस्ना उदर बृद्धि अति भारी । त्रिबिधि ईषना तरुन तिजारी ॥
जुग बिधि ज्वर मत्सर अबिबेका । कहँ लगि कहौं कुरोग अनेका ॥

दो० — एक ब्याधि बस नर मरहिं ए असाधि बहु ब्याधि ।
पीड़हिं संतत जीव कहुँ सो किमि लहै समाधि ॥ १२१ (क) ॥
नेम धर्म आचार तप ग्यान जग्य जप दान ।
भेषज पुनि कोटिन्ह नहिं रोग जाहिं हरिजान ॥ १२१ (ख) ॥

सर्वांचीच निंदा करण्याचे दुर्व्यसन जडलेले असते, त्यांना उलटे लोंबत राहून स्वतःचीच विष्ठा खाणाऱ्या वटवाघळांचा देह मिळतो !

– मानस:रोग –

हे तात ! आता सर्वांनाच दुःख देणाऱ्या मानस रोगांचे वर्णन ऐका. अज्ञान हेच सर्व मानस रोगांचे मूळ आहे. मग त्यांच्यापासून पुष्कळ प्रकारचे दुःखद रोग उत्पन्न होतात. काम हा वात आहे, लोभ हाच कफ असून, तो अमर्याद आहे. क्रोध हा पित्तासारखा असून, तो नित्य छाती जाळत राहतो; आणि या तीन्ही भावांची गट्टी जमली की, अत्यंत दुःखदायक असा सन्निपात उत्पन्न होतो.

नानाप्रकारचे दुःखानेही पूर्ण होण्यास कठीण असे जे विषयांचे मनोरथ केले जातात, तेच सर्व शूल आहेत. त्यांची नुसती नावे सुद्धा अगणित आहेत. त्यांची मोजदाद कोण कशी करणार ?

मानसरोगातील ईर्षा ही खरूज आणि ममता ही नायटे व गजकर्ण होत, आणि हर्ष-विषाद या ग्रहांची तर विपुलताच असते. दुसऱ्याचे सुख पाहून हृदयाचा व अंगाचा दाह होणे हा क्षय रोग; तसेच दुष्टपणा व मनाचा खट्याळपणा हे दोन प्रकारचे कोड-रोग आहेत.

अहंकार हा अत्यंत दुःखदायक अर्बुद (कॅन्सर) रोग होय. दंभ, कपट, मान, मद हा नारू नावाचा रोग होय. अनावर विषयतृष्णा ही अत्यंत प्रबळ अशी उदरव्यथा आहे. तीन प्रकारच्या जबर इच्छा (संतती, संपत्ती, कीर्ती) हा तिसऱ्या दिवशी येत राहणारा ताप आहे.

—मत्सर हा वैष्णव आणि अविवेक हा शैव ज्वर आहे. असे हे कुरोग अनंत असल्याने त्यांचे वर्णन किती करावे ?

या अगणित रोगांपैकी कोणत्याही एका रोगानेसुद्धा लोक मरतात, आणि या असल्या मानस व्याधी तर अनेक व असाध्य अशा आहेत; या सदा सर्वकाळ जीवाला पीडा देत असतात. मग त्या जीवाला समाधान कसे मिळणार ? १२१ (क)

नियम, धर्म, आचार, तप, ज्ञान, यज्ञ, जप, दान आणि दुसरी कोट्यवधी औषधे (उपाय) करून-सुद्धा हे हरिवाहना ! हे रोग जात नाहीत. १२१ (ख)

चौ ० —एहि बिधि सकल जीव जग रोगी। सोक हरष भय प्रीति बियोगी ।।
मानस रोग कछुक मैं गाए। हहिं सब कें लखि बिरलेन्ह पाए।।
जाने ते छीजहिं कछु पापी। नास न पावहिं जन परितापी ।।
बिषय कुपथ्य पाइ अंकुरे। मुनिहु हृदयँ का नर बापुरे ।।
राम कृपाँ नासहिं सब रोगा। जौं एहि भाँति बनै संयोगा ।।
सदगुर बैद बचन बिस्वासा। संजम यह न बिषय के आसा ।।
रघुपति भगति सजीवन मूरी। अनूपान श्रद्धा मति पूरी ।।
एहि बिधि भलेहिं सो रोग नसाहीं। नाहिं त जतन कोटि नहिं जाहीं ।।
जानिअ तब मन बिरुज गोसाँई। जब उर बल बिराग अधिकाई ।।
सुमति छुधा बाढ़इ नित नई। बिषय आस दुर्बलता गई ।।
बिमल ग्यान जल जब सो नहाई। तब रह राम भगति उर छाई ।।
सिव अज सुक सनकादिक नारद। जे मुनि ब्रह्म बिचार बिसारद ।।
सब कर मत खगनायक एहा। करिअ राम पद पंकज नेहा ।।
श्रुति पुरान सब ग्रंथ कहाहीं। रघुपति भगति बिना सुख नाहीं ।।
कमठ पीठ जामहिं बरु बारा। बंध्या सुत बरु काहुहि मारा ।।

अशाप्रकारे जगातील सर्वच जीव रोगी आहेत. त्यामुळे शोक, हर्ष, भय, प्रीती आणि वियोग यानी ते पीडलेले आहेत.

आतापर्यंत मी काही मानस रोगांचे वर्णन केले. ते रोग कमीजास्त प्रमाणात सगळ्यांनाच झालेले असले तरी कोणी एखादाच जाणतो की, मी मानस रोगानी पीडलो आहे ! तशा प्रकारची जाणीव झाल्याने ते थोडे कमी होतात इतकेच परंतु सर्व दृष्टीनी लोकांना त्रस्त करणारे ते पापी मानस रोग सर्वस्वी नष्ट मुळीच होत नाहीत.

विषयरूपी कुपथ्य मिळताच मुनींच्या हृदयालसुध्दा ते हा हा म्हणता अनावर बळावतात. अशा स्थितीत बिचाऱ्या सामान्य मानवांची या रोगाने किती दुर्दशा होत असेल ते काय सांगावे ?

वैद्य सद्गुरू त्यांच्या वचनावर विश्वास आणि विषयांची आशा नसणे हे पथ्य अशा तीन गोष्टी जर श्रीरामाच्या कृपेने जुळून आल्या तरच सर्व मानस रोग नाहीसे होतात. मग रामकथा श्रवणरूपी रघुपतिभक्ती ही संजीवनी मुळी, हे औषध व अत्यंत पवित्र सात्विक श्रद्धा हे अनुपान या उपायाने विनायास हे सर्व मानस रोग नाश पावतात. परंतु हा सोडून दुसरे कोट्यवधी प्रयत्न केले तरी ते मुळीच नाहीसे होत नाहीत !

हे स्वामी ! हृदयात जेव्हा वैराग्यरूप बळ वाढते तेव्हाच मन निरोगी झाले असे समजावे. मन रोगमुक्त झाले म्हणजे सद्बुद्धिरूप भूक दिवसेंदिवस वाढू लागते आणि त्याबरोबर विषयाशारूप दुर्बलता कमीकमी होऊ लागते. इतके झाले म्हणजे विमल ज्ञानरूपी स्वच्छ पाण्यात जेव्हा साधक स्नान करील तेव्हा श्रीरामचरण प्रेम-भक्ती हृदयांत कायमची स्थिर होईल.

शंकर, ब्रह्मदेव, शुकाचार्य, सनकादि मुनी, ब्रह्मर्षी नारद आणि याशिवाय जे मुनिश्रेष्ठ ब्रह्मविचार करण्यात परम प्रवीण आहेत, हे खगनायक ! त्या सर्वांचे एकच सांगणे आहे की, मानवाने स्वतःच्या आत्यंतिक कल्याणासाठी श्रीरामचरणकमली भक्ती करावी. तेच मत श्रुती, पुराण आणि सर्व सद्ग्रंथांचेही असून, श्रीरघुपतीच्या भक्तीवाचून जीवाला खरे सुख मिळणार नाही, हाच सिध्दान्त त्यांनीही प्रस्थापित केला आहे. आणि तो तितक्याच भरभक्कम पायावर आधारलेला आहे.

कारण, प्रसंगी कासवाच्या पाठीवर केस दिसतील किंवा वांझ बाईच्या मुलाचाही कोणी वध करील,

फूलहि नभ-बरु बहुबिधि फूला । जीव न लह सुख हरि प्रतिकूला ॥
तृषा जाइ-बरु मृगजल पाना । बरु जामहि सस सीस बिषाना ॥
अंधकारु बरु रबिहि नसावै । राम बिमुख न जीव सुख पावै ॥
हिम तें अनल प्रगट बरु होई । बिमुख राम सुख पाव न कोई ॥

दो० — बारि मथें घृत होइ बरु सिकता ते बरु तेल ।
बिनु हरि भजन न भव तरिअ यह सिद्धांत अपेल ॥ १२२ (क) ॥
मसकहि करइ बिरंचि प्रभु अजहि मसक ते हीन ।
अस बिचारि तजि संसय रामहि भजहिं प्रबीन ॥ १२२ (ख) ॥

श्लोक— विनिश्चितं वदामि ते न अन्यथा वांचसि मे ।
हरिं नरा भजन्ति येऽतिदुस्तरं तरन्ति ते ॥ १२२ (ग) ॥

चौ० — कहेउँ नाथ हरि चरित अनूपा । ब्यास समास स्वमति अनुरूपा ॥
श्रुति सिद्धांत इहइ उरगारी । राम भजिअ सब काज बिसारी ॥
प्रभु रघुपति तजि सेइअ काही । मोहि से सठ पर ममता जाही ॥
तुम्ह बिग्यानरूप नहिं मोहा । नाथ कीन्हि मो पर अति छोहा ॥

तसेच, असंभवनीय अशा नाना प्रकारच्या फुलांनी आकाश जरी फुलले तरीही श्रीहरी-प्रतिकूल जीवाला सुख मिळणार नाही !

इतकेच नव्हे, एखाद्या वेळी मृगजळ पिऊन तहान भागेल, किंवा सशाच्या डोक्यावर शिंगे फुटतील. नव्हे अंधाराने सूर्य गिळून टाकला, तरीही श्रीरामाकडे पाठ फिरवणारांना सुख मिळणे शक्य नाही. बर्फातून जरी विस्तव निघाला तरीही श्रीरामाला विसरणारांना सुखाची आशा नाही ! पाणी घुसळून त्यातून उत्तम तूप देणारा लोण्याचा गोळा निघाला, किंवा वाळू गाळून तेल मिळाले, तरीही हरिभजनावाचून जन्ममरणरूप चक्रातून सुटका होणार नाही. हा सिद्धान्त कायमच राहणार व तो कोणत्याही काळी खोटा ठरणार नाही ! १२२ (क)

श्रीरघुनाथाचे सामर्थ्यच तसे अतुल्य व अपार आहे. त्यांच्या मनात आल्यास ते एखाद्या चिलटाला ब्रह्मदेव करतील, व गैरमर्जी झाल्यास प्रत्यक्ष ब्रह्मदेवालासुद्धा ढेकुणापेक्षाही खालच्या दर्जाला पोचवतील ! हे अतर्क्य व अनंत सामर्थ्य ध्यानी घेऊन जो सर्व प्रकारचे संशय टाकतो. व श्रीरामचंद्रांच्या चरणी सर्वभावे लीन होतो तोच खरा शहाणा होय. १२२ (ख)

आता शेवटी विशेष प्रकारे निश्चित केलेला सिद्धान्त मी तुला सांगतो; आणि तो सिद्धान्त कोणत्याही काळी खोटा ठरणार नाही. —जे मानव श्रीहरीला भजतात तेच तरण्यास अत्यंत कठीण अशा भवसागराच्या पैलतीरास सुखाने जातात ! १२२ (ग)

— उपसंहार —

[श्रीरामचरित मानसातील चारी वक्ते आपापल्या कथांचा उपसंहार आता करतील. गोस्वामी, याज्ञवल्क्य, शंकर व काकभुशुंडी हे चारी वक्ते उलट क्रमाने आपापल्या कथांचा उपसंहार करणार, कारण त्याच क्रमाने त्या आधारलेल्या आहेत.]

भुशुंडी गरुडास म्हणाला, ' नाथ ! हे अनुपम हरिचरित्र काही विस्ताराने व काही संक्षेपाने असे यथामती मी आतापर्यंत सांगितले. हे सर्पशत्रू गरुडा ! हा वेदांचाच सिद्धान्त आहे की, सर्व ऐहिक व्यवहारांतून लक्ष काढून ते श्रीरामचरणी अखंड लावावे. माझ्यासारख्या अत्यंत मूर्ख कावळ्यावरसुद्धा ज्यांचे अलोट प्रेम आहे, त्या रघुपतीला सोडून उपासना करण्यास दुसरा कोण योग्य ठरणार ?

तसे पाहिले तर खरोखर तुम्ही विज्ञानस्वरूपच आहात. तुमच्या ठिकाणी मोह नव्हताच ! परंतु अहो

पूँछिहु राम कथा अति पावनि । सुक सनकादि संभु मन भावनि ।।
सत संगति दुर्लभ संसारा । निमिष दंड भरि एकउ बारा ।।
देखु गरुड़ निज हृदयँ बिचारी । मैं रघुबीर भजन अधिकारी ।।
सकुनाधम सब भाँति अपावन । प्रभु मोहि कीन्ह बिदित जग पावन ।।

दो० – आजु धन्य मैं धन्य अति जद्यपि सब बिधि हीन ।
निज जन जानि राम मोहि संत समागम दीन ।। १२३ (क) ।।
नाथ जथामति भाषेउँ राखेउँ नहिं कछु गोइ ।
चरित सिंधु रघुनायक थाह कि पावइ कोइ ।। १२३ (ख) ।।

चौ०– सुमिरि राम के गुन गन नाना । पुनि पुनि हरष भुसुंडि सुजाना ।।
महिमा निगम नेति करि गाई । अतुलित बल प्रताप प्रभुताई ।।
सिव अज पूज्य चरन रघुराई । मो पर कृपा परम मृदुलाई ।।
अस सुभाउ कहुँ सुनउँ न देखउँ । केहि खगेस रघुपति सम लेखउँ ।।
साधक सिद्ध बिमुक्त उदासी । कबि कोबिद कृतग्य संन्यासी ।।
जोगी सूर सुतापस ग्यानी । धर्म निरत पंडित बिग्यानी ।।
तरहिं न बिनु सेएँ मम स्वामी । राम नमामि नमामि नमामी ।।
सरन गएँ मो से अघ रासी । होहिं सुद्ध नमामि अबिनासी ।।

नाथ ! आपण माझ्यावर फार मोठी कृपा केली. कारण, शुकसनकादि व शंभू यांच्या मनाला अत्यंत संतोष देणारी अशी परमपावन श्रीरामकथा आपण मला विचारली.

या संसारात संतांची संगती एकच वेळेला एक घटकाभर नव्हे. एक क्षणभरसुध्दा मिळणे फार कठीण आहे. अहो गरुड ! आपणच सुविचार करून पाहा की, रघुनाथ-भजनाची माझी लायकी आहे काय ? सर्व पक्ष्यांत मी अधम; सर्व दृष्टीनीही अधम असून, सर्व प्रकारे अपवित्र असा आहे. अशाही मला, पावन करून या जगात माझ्या प्रभूने प्रसिध्द बनवला !

असो. मी जरी सर्व प्रकारे हीन असलो तरी आजचा दिवस धन्य व मीही अती धन्य झालो आहे ! कारण श्रीरामचंद्रांनी आपला दास अत्यंत दीन आहे, हे जाणून मला बसल्याजागी संत समागम आणून दिला. १२३ (क)

असो. नाथ ! काहीही गुप्त न ठेवता आपल्या बुध्दीप्रमाणे मी सर्व सांगितले. श्रीरघुनायकाचे चरित्र हा एक सागर असून त्याचा ठाव कोणाला केव्हा तरी लागेल काय ? १२३ (ख)

श्रीरामचंद्रांच्या अनेक गुणसमुच्चयाचे स्मरण होऊन जाणत्या भुशुंडीच्या हृदयात आनंदाच्या लाटा वारंवार येऊ लागल्या.

—'नेति नेति' म्हणून ज्याचा महिमा वेद वर्णन करत असतात तसेच प्रभूना, प्रताप व बल इत्यादि सर्व ज्यांचे अतुलनीय आहेत, ज्या रघुनायकाचे चरणी शंकर व ब्रह्मदेव हे पूजा करतात त्यांनी माझ्यावर कृपा केली यावरून त्यांच्या अंतःकरणाची परम कोमलता उघड होते. अहो खगराज ! असा स्वभाव कुठे कोणाचा ऐकला नाही किंवा पाहिलाही नाही. अशा स्थितीत माझ्या रघुपतीची मी बरोबरी कोणाशी करू ?

साधक, सिद्ध, जीवन्मुक्त, विरागी, कवी, कोविद, कृतज्ञ, संन्यासी, शूर, उत्तम तपस्वी, योगी, ज्ञानी, धर्मशील, पंडित आणि विज्ञानी इत्यादि कोणीही असोत, त्यांनी माझ्या स्वामींची सेवा केली नाही तर ते खास तरणार नाहीत.

हे राम ! मी तुला पुनः पुन्हा नमस्कार करतो; वारंवार नमस्कार करतो. ज्यास शरण जाताच माझ्या सारखे पापांचे पर्वत शुद्ध होतात त्या अविनाशी श्रीरामचंद्राला मी नमन करतो.

दो० — जासु नाम भव भेषज हरन घोर त्रय सूल ।
सो कृपाल मोहि तो पर सदा रहउ अनुकूल ॥ १२४ (क) ॥
सुनि भुसुंडि के बचन सुभ देखि राम पद नेह ।
बोलेउ प्रेम सहित गिरा गरुड़ बिगत संदेह ॥ १२४ (ख) ॥

चौ० — मैं कृत्यकृत्य भयउँ तव बानी । सुनि रघुबीर भगति रस सानी ॥
राम चरन नूतन रति भई । माया जनित बिपति सब गई ॥
मोह जलधि बोहित तुम्ह भए । मो कहँ नाथ बिबिध सुख दए ॥
मो पहिं होइ न प्रति उपकारा । बंदउँ तव पद बारहिं बारा ॥
पूरन काम राम अनुरागी । तुम्ह सम तात न कोउ बड़भागी ॥
संत बिटप सरिता गिरि धरनी । पर हित हेतु सबन्ह कै करनी ॥
संत हृदय नवनीत समाना । कहा कबिन्ह परि कहै न जाना ॥
निज परिताप द्रवइ नवनीता । पर दुख द्रवहिं संत सुपुनीता ॥
जीवन जन्म सुफल मम भयऊ । तव प्रसाद संसय सब गयऊ ॥
जानेहु सदा मोहि निज किंकर । पुनि पुनि उमा कहइ बिहंगबर ॥

दो० — तासु चरन सिरु नाइ करि प्रेम सहित मतिधीर ।
गयउ गरुड़ बैकुंठ तब हृदयँ राखि रघुबीर ॥ १२५ (क) ॥

ज्याचे नामच भवरोगाचे औषध आहे व जे महाघोर तापत्रयाचा नाश करते तो कृपाळू प्रभू सदा माझ्यावर प्रसन्न असो. १२४ (क)

अत्यंत सद्‌गदित होऊन भुशुंडीने हे जे भावनापूर्ण उद्‌गार काढले व त्याचे श्रीरामप्रभूच्या चरणी असलेले निरतिशय प्रेमही पाहावयास मिळाले त्यामुळे अंतःकरणातील सर्व संशयकल्लोळातून मुक्त झालेला गरुड प्रेमभराने बोलू लागला. १२४ (ख)

"श्रीरघुवीराच्या भक्तिरसात पाकवलेले असे जे आपले भाषण, त्याने मला कृतकृत्य केले. श्रीरामचरणी नवीन दृढ प्रीती उत्पन्न झाली व मायेपासून उत्पन्न झालेली आपत्ती नष्ट झाली. अहो नाथ ! या मोहसागरातून तारून नेण्यास मला आपण जहाज झाल्यामुळे अनेक प्रकारचे सुख मला आपण खरोखर दिले, यात शंकाच नाही.

या आपल्या उपकारांची फेड माझ्या हातून होणे शक्यच नाही: म्हणून मी वारंवार पाया पडतो व क्षमा मागून विनंती करतो तेवढी ऐकावी.

'हे तात ! तुमच्या सर्व वासना परिपूर्ण झाल्या असून, तुमच्यासारखा रामभक्त कोणीही सापडणार नाही. अर्थात तुमच्याप्रमाणे भाग्यवानही दुसरा कोण असणार ? संत, वृक्ष, नद्या, पर्वत व पृथ्वी यांची कृतीही केवळ परोपकारासाठीच नेहमी असते, हे मला आता स्वानुभवाने पटले !

संतांच्या अंतःकरणाचा कोमलपणा पाहून त्याला लोण्याची उपमा देणाऱ्या कवींना संतहृदयाचे रहस्य न कळल्यानेच त्यांनी ही चुकीची उपमा दिली. कारण लोणी स्वतःला ताप झाल्याने विरघळते, परंतु अती पवित्र संत हे दुसऱ्याच्या दुःखाने द्रवतात !

असो. तुमच्या कृपाप्रसादाने माझे सर्व संशय संपले व माझा जन्म सर्व जीवनासह सफल झाला. एकच प्रार्थना की, या पुढे मला आपण आपल्या पायाचा कायमचा बंदा गुलाम मानावा !

शंकर सांगतात, 'उमे ! खगश्रेष्ठ गरुड अगदी सद्‌गदित होऊन त्याने ही काकभुशुंडीजवळ पुनः पुन्हा प्रार्थना केली ! आणि त्या कावळ्याच्या चरणावर प्रेमाने मस्तक नमवले व तो धीरमती गरुड आपल्या हृदयात रघुवीरास धारण करून वैकुंठास गेला. १२५ (क)



गिरिजा संत समागम सम न लाभ कछु आन ।
बिनु हरि कृपा न होइ सो गावहिं बेद पुरान ॥ १२५ (ख) ॥

चौ० —कहेउँ परम पुनीत इतिहासा । सुनत श्रवन छूटहिं भव पासा ॥
प्रनत कल्पतरु करुना पुंजा । उपजइ प्रीति राम पद कंजा ॥
मन क्रम बचन जनित अघ जाई । सुनहिं जे कथा श्रवन मन लाई ॥
तीर्थाटन साधन समुदाई । जोग बिराग ग्यान निपुनाई ॥
नाना कर्म धर्म ब्रत दाना । संजम दम जप तप मख नाना ॥
भूत दया द्विज गुर सेवकाई । बिद्या बिनय बिबेक बड़ाई ॥
जहँ लगि साधन बेद बखानी । सब कर फल हरि भगति भवानी ॥
सो रघुनाथ भगति श्रुति गाई । राम कृपाँ काहूँ एक पाई ॥

दो० —मुनि दुर्लभ हरि भगति नर पावहिं बिनहिं प्रयास ।
जे यह कथा निरंतर सुनहिं मानि बिस्वास ॥ १२६ ॥

चौ० —सोइ सर्बग्य गुनी सोइ ग्याता । सोइ महि मंडित पंडित दाता ॥
धर्म परायन सोइ कुल त्राता । राम चरन जा कर मन राता ॥
नीति निपुन सोइ परम सयाना । श्रुति सिद्धांत नीक तेहिं जाना ॥
सोइ कबि कोबिद सोइ रनधीरा । जो छल छाड़ि भजइ रघुबीरा ॥
धन्य देस सो जहँ सुरसरी । धन्य नारि पतिब्रत अनुसरी ॥

—गिरिजे ! यावरून तुला समजेल की, या जगात संत-समागमासारखा दुसरा मोठा लाभच नाही; परंतु तो मात्र हरिकृपेवाचून मिळत नाही, असे वेद पुराणे वर्णन करतात, ते किती खरे आहे पाहा ! १२५ ख

[येथे भुशुंडी-गरुड संवादाची समाप्ती झाली. हा संवाद पहिला व उरलेल्या तीन संवादांना आधार भूत असलेला संवाद होय.]

मी हा परम पुनीत इतिहास सांगितला. तो कानांनी नुसता ऐकल्यानेसुद्धा भवपाश तुटतात. याचे कारण असे की, जे कोणी ही कथा कान व मन लावून ऐकतात, त्यांचे कायिक-वाचिक व मानसिक सर्व पाप पूर्ण नाहीसे होते.

तीर्थाटन आणि विविध साधनांचे समुदाय—उदाहरणार्थ योग, वैराग्य आणि ज्ञान यांत निपुणता, अनेक कर्मे व धर्माचरणे, अनेक व्रते, अनेक दाने, मनोनिग्रह, इंद्रियांचा संयम, जप तप व विविध यज्ञ-यागादि साधने, विप्रसेवा, गुरुसेवा व भूतमात्रांवर दया करणे, विद्या; विनय व विवेक यांची महती इत्यादि जेवढी म्हणून साधने वेदांनी वर्णन केलेली आहेत त्या सर्वांचे अंतिम फल, हे भवानी ! हरिभक्तीच आहे.

तथापि वेदांनी वर्णन केलेली ती श्रीरघुनाथभक्ती रामकृपेने कोणा एखाद्या भाग्यवंतालाच मिळते; परंतु जे लोक विश्वासयुक्त अंतःकरणाने ही कथा अखंड ऐकत राहतात, त्यांना, मुनिदुर्लभ असलेली ती रघुनाथभक्ती सहजासहजी विनायास मिळते. १२६

म्हणून शेवटी असेच म्हणणे भाग पडते की, ज्यांचे मन श्रीरामचरणी रत झाले, तोच खरा सर्वज्ञ, तोच गुणी, तोच पृथ्वीला सुशोभित करणारा ज्ञाता, तोच पंडित, तोच दाता, तोच धर्मपरायण आणि आपल्या कुलाचे खरे रक्षण करणाराही तोच होय !

मनातील कपट सोडून रघुवीरास अनन्य होऊन जो भजतो, तोच खरा नीतिनिपुण, परम शहाणा तोच, व तोच कवि, खरा आणि रणधीर होय; व त्यानेच श्रुतीचा सिध्दान्त चांगल्या प्रकारे समजून घेतला; हे लक्षात ठेवा.

देवनदी गंगा ज्या देशातून वाहते, तो देश धन्य होय; जी स्त्री पतिव्रताधर्माचे निष्ठेने पालन करते, तीच स्त्री धन्य होय; तसेच राजनीतीचे काटेकोर पालन करणाराच भूपती धन्य होय; आपल्या धर्माचरणाला

धन्य सो भूपु नीति जो करई। धन्य सो द्विज निज धर्म न टरई॥
सो धन धन्य प्रथम गति जाकी। धन्य पुन्य रत मति सोइ पाकी॥
धन्य घरी सोइ जब सतसंगा। धन्य जन्म द्विज भगति अभंगा॥

दो०—सो कुल धन्य उमा सुनु जगत पूज्य सुपुनीत।
श्रीरघुबीर परायन जेहि नर उपज बिनीत॥१२७॥

चौ०—मति अनुरूप कथा मैं भाषी। जद्यपि प्रथम गुप्त करि राखी॥
तव मन प्रीति देखि अधिकाई। तब मैं रघुपति कथा सुनाई॥
यह न कहिअ सठही हठसीलहि। जो मन लाइ न सुन हरि लीलहि॥
कहिअ न लोभिहि क्रोधिहि कामिहि। जो न भजइ सचराचर स्वामिहि॥
द्विज द्रोहिहि न सुनाइअ कबहूँ। सुरपति सरिस होइ नृप जबहूँ॥
राम कथा के तेइ अधिकारी। जिन्ह कें सत संगति अति प्यारी॥
गुर पद प्रीति नीति रत जेई। द्विज सेवक अधिकारी तेई॥
ता कहँ यह बिसेष सुखदाई। जाहि प्रानप्रिय श्रीरघुराई॥

दो०—राम चरन रति जो चह अथवा पद निर्बान।
भाव सहित सो यह कथा करउ श्रवन पुट पान॥१२८॥

चौ०—राम कथा गिरिजा मैं बरनी। कलि मल समनि मनोमल हरनी॥

थोडेसुद्धा न टाळणारा ब्राह्मण धन्य होय! भोग व नाश या दोन गती सोडून दान ही [illegible] मुख्य गती ज्याच्या धनाला मिळते ते धन धन्य होय; जी बुद्धी सदोदित पुण्यकर्म करण्यात गढलेली असते, तीच धन्य व पावन होय; जेवढा काळ संतसमागमात गेला, तेवढेच आयुष्य धन्य झाले; अखंड द्विजभक्ती ज्या जन्मात घडेल, तो जन्म धन्य! हे उमे ऐक! ज्या कुळात [illegible] विनयी पुत्र उत्पन्न होईल ते कुळ धन्य. तेच सर्व जगात पूज्य आणि अत्यंत पवित्र होय. १२७

इतिहासरूपी ही कथा माझ्या बुद्धीप्रमाणे मी सांगितली. प्रथम मी ही [illegible] ठेवली होती. हे खरे आहे, परंतु तुझ्या मनातील या कथेची विशेष आवड पाहिल्यावरच ही [illegible] तुला सांगितली.

मूर्ख, हट्टी स्वभावाचे आणि [illegible] श्रीहरीच्या लीलांचे श्रवण करीत नाहीत अशा लोकांना ही कथा सांगू नये. तसेच जे लोभी, रागीट स्वभावाचे व कामी असून [illegible] त्याच्या स्वामीला—श्रीरघुपतीला—जे भजत नाहीत त्यांना त्याचप्रमाणे ब्राह्मणांचा द्रोह करणारा जरी [illegible] असला तरी त्यालासुद्धा अशा प्रकारच्या आठ अनधिकाऱ्यांना ही कथा कधीही सांगू नये.

आता या कथेच्या श्रवणाला अधिकारी कोण आहेत ते सांगतो. संतांच्या [illegible] अत्यंत आवड असणारे, आपल्या गुरूंच्या चरणी प्रेम बाळगणारे, नीतिनियमांचे मनापासून आचरण करणारे, ब्राह्मणांची सेवा करण्यात आनंद मानणारे आणि श्रीरघुनायक हे ज्यांना प्राणप्रिय वाटतात या सर्वांना ही कथा विशेष सुखदायक होत असल्याने ते सर्व या कथेचे अधिकारी आहेत.

[रामचरित मानस हा विषय आहे. याच्या श्रवणाचे अधिकारी म्हणून कोण ते सांगितल्यावर त्या विषयाचे प्रयोजन व संबंध सांगतात. अधिकारी, विषय, संबंध व प्रयोजन यांना अनुबंध चतुष्टय म्हणतात. गु. चं.]

म्हणून ज्याला श्रीरामचंद्रांच्या चरणी दृढ प्रेमभक्ती पाहिजे असेल किंवा ज्याला कैवल्यमोक्ष मिळावा असे वाटत असेल त्याने श्रद्धा-विश्वासपूर्ण भावनेने या कथामृताचे [illegible] मनसोक्त प्राशन करावे. १२८

– उमा-शंभू संवादाचा उपसंहार –

गिरिजे! कलिमलाचे शमन करणारी, [illegible] नाश करणारी, अशी ही रामकथा वर्णन करून

संसृति रोग सजीवन मूरी। राम कथा गावहिं श्रुति सूरी ॥
एहि महँ रुचिर सप्त सोपाना। रघुपति भगति केर पंथाना ॥
अति हरि कृपा जाहि पर होई। पाउँ देइ एहिं मारग सोई ॥
मन कामना सिद्धि नर पावा। जे यह कथा कपट तजि गावा ॥
कहहिं सुनहिं अनुमोदन करहीं। ते गोपद इव भवनिधि तरहीं ॥
सुनि सब कथा हृदय अति भाई। गिरिजा बोली गिरा सुहाई ॥
नाथ कृपाँ मम गत संदेहा। राम चरन उपजेउ नव नेहा ॥

दो०—मैं कृतकृत्य भइउँ अब तव प्रसाद बिस्वेस।
उपजी राम भगति दृढ़ बीते सकल कलेस ॥ १२९ ॥

चौ०—यह सुभ संभु उमा संबादा। सुख संपादन समन बिषादा ॥
भव भंजन गंजन संदेहा। जन रंजन सज्जन प्रिय एहा ॥
राम उपासक जे जग माहीं। एहि सम प्रिय तिन्ह कें कछु नाहीं ॥
रघुपति कृपाँ जथामति गावा। मैं यह पावन चरित सुहावा ॥
एहिं कलिकाल न साधन दूजा। जोग जग्य जप तप ब्रत पूजा ॥
रामहि सुमिरिअ गाइअ रामहि। संतत सुनिअ राम गुन ग्रामहि ॥

तुला मी सांगितली. भवरोगाला नष्ट करणारी जी संजीवन मुळी तीच रामकथा असे वेद व विद्वान लोक वर्णन करतात. हिच्यात जे सात सुंदर सोपान आहेत, तेच श्रीरघुनाथभक्तीच्या प्राप्तीचे मार्ग आहेत. आणि ज्याच्यावर अत्यंत हरिकृपा होते, तोच या मार्गावर पाऊल टाकतो.

जे ही कथा कपट टाकून गातात, त्यांच्या मनातील सर्व कामना सिध्दीस जातात; व ऐकतात, सांगतात व हिची प्रशंसा करतात ते गोपदाप्रमाणे लीलेने भवसागर तरून जातात.

सर्व कथा ऐकून संपली व ती पार्वतीला फारच आवडली. तेव्हा त्या गिरिजेच्या तोंडून सहजच पुढील गोड शब्द बाहेर पडले.

“ हे नाथ ! आपल्या कृपेने माझे सर्व संशय गेले. आणि श्रीरामाच्या चरणी पूर्वी कधीच नसलेले असे नवीन प्रेम निर्माण झाले. अहो विश्वेश्वर ! मी केवळ तुमच्याच कृपेने आता कृतार्थ झाले व माझ्या हृदयात श्रीरामाची दृढ भक्ती उत्पन्न झाली; आणि मोह व संशय यामुळे उत्पन्न होणाऱ्या मानसिक सर्व यातना संपल्या! १२९

[येथे पार्वतीचे भाषण संपून, शंभू-उमा संवादाचा शेवट झाला. याच्या पुढे याज्ञवल्क्य आपल्या कथेचा थोडक्यात उपसंहार करतात. मात्र भारद्वाज कथाश्रवणात अत्यंत तल्लीन झाल्याने एकही शब्द बोलत नाहीत.]

याज्ञवल्क्य म्हणतात—“ कल्याणकारक असा हा शंभू-उमासंवाद विषादांचा नाश करून सुखप्राप्ती करून देणारा आहे. तसेच नानाप्रकारच्या संशयांचा निरास करून जन्ममरण चक्रातून सोडविणारा असल्याने संतांना हाच प्रिय वाटतो. त्यामुळे सर्व लोकांचे मनरंजन करण्याचे सामर्थ्य त्या संवादात भरगच्च भरले आहे. याचा असा परिणाम झाला आहे की, सर्व जगात जे रामभक्त असतील त्यांच्या कानी एकदा हे रामचरित मानस पडले की, त्यापेक्षा दुसरे काहीच त्याना आवडत नाहीसे होते. असे हे सुंदर व पुनीत असे श्रीरामचरित्र श्रीरघुनाथाच्याच कृपेने यथामती विस्तारपूर्वक हे भारद्वाजा ! तुम्हाला सांगितले.”

आता श्री गोस्वामी आपल्या कथेचा उपसंहार करतात—या कलियुगात योग, यज्ञ, जप, तप, व्रत, पूजन इत्यादि दुसरे कोणतेही साधन मुल्य नाही फक्त श्रीराम सद्‌गुण समूहाचेच सतत श्रवण करावे, श्रीराम नामाचेच स्मरण करावे, आणि श्रीरामचंद्राच्या चरित्राचे सतत गायन करावे. हेच सर्वांना सुखदायक व खात्रीचे असे साधन आहे.

जासु पतित पावन बड़ बाना । गावहिं कबि श्रुति संत पुराना ॥
ताहि भजहि मन तजि कुटिलाई । राम भजें गति केहिं नहिं पाई ॥
छं० –पाई न केहिं गति पतित पावन राम भजि सुनु सठ मना ।
गनिका अजामिल ब्याध गीध गजादि खल तारे घना ॥
आभीर जमन किरात खस स्वपचादि अति अघरूप जे ।
कहि नाम बारक तेपि पावन होहिं राम नमामि ते ॥ १ ॥
रघुबंस भूषन चरित यह नर कहहिं सुनहिं जे गावहीं ।
कलि मल मनोमल धोइ बिनु श्रम राम धाम सिधावहीं ॥
सत पंच चौपाईं मनोहर जानि जो नर उर धरै ॥ २ ॥
दारुन अबिद्या पंच जनित बिकार रघुबर हरै ।
सुंदर सुजान कृपा निधान अनाथ पर कर प्रीति जो ।
सो एक राम अकाम हित निर्बानप्रद सम आन को ॥
जाकी कृपा लवलेस ते मतिमंद तुलसीदासहूँ ।
पायो परम बिश्रामु राम समान नाहीं कहूँ ॥ ३ ॥
दो० –मो सम दीन न दीन हित तुम्ह समान रघुबीर ।
अस बिचारी रघुबंस मनि हरहु बिषम भव भीर ॥ १३० (क) ॥

म्हणून ज्याचे पतितपावन हे मोठे ब्रीद आहे असे वेद, पुराणे संत व कवी वर्णन करतात त्या [illegible] श्रीरामचंद्रांला हे मना ! सर्व कुटिलता सोडून शरण जा व त्याचेच भजन कर. श्रीरामांचे भजन केल्याने [illegible] गती मिळाली नाही ? अरे मूर्ख मना ! पतितपावन अशा श्रीरामचंद्रास भजून कोणाला गती मिळाली नाही [illegible] तरी सांग. वेश्या-गणिका, अहंकारी अजामिळ, ब्राह्मण असूनसुद्धा [illegible] प्रेमाने [illegible] सर्वांशी वैर करून हिंसा करणारा रत्नाकर व्याध, (पुढे वाल्मीकी झाला), जटायू व संसारी [illegible] गजेंद्र. इत्यादि दुष्टांच्या समूहांना प्रभूंनी तारलेच ! [ही पाच उदाहरणे अविद्या, अस्मिता, राग, द्वेष व अभिनिवेश या पंचक्लेशांची क्रमशः आहेत. गू. चं. पाहा.]

तसेच, आभीर, यवन, किरात, खस, चाण्डाल इत्यादि ज्यांचे जीवनच पापमय असते. अशा [illegible] जन्मलेल्यांनासुध्दा एकवेळच रामनामाचा उच्चार करून पावन होता येते. असा तुझ्या नामाचा [illegible] महिमा आहे. म्हणून, हे राम ! मी तुला नमस्कार करतो.

रघुवंशभूषण श्रीरामचंद्रांचे हे चरित्र जे कोणी सांगतील, ऐकतील आणि गातील, ते या [illegible] पाप, मल व मनोविकाररूपी मळ धुऊन टाकून [illegible] नित्य वैकुंठरूपी धामास जातील. [illegible] यातील फक्त (पाच+सात) बारा मनोहर चौपाया (बालकांड दो. १०८ मधील. गू. चं. पाहा. [illegible]) त्यांचे हृदयात जे कोणी ध्यान करतील, त्यांनाही घोर अविद्यापंचक (पंचक्लेश) आणि त्यापासून उत्पन्न [illegible] विकार (मानसरोग) यातून श्रीरघुवर मुक्त करतील.

याचा प्रत्यक्ष अनुभव श्रीरघुनाथकृपेने आपणास या [illegible] कसा आला ते गोस्वामी [illegible] —

सुंदर, सर्वदर्शी कृपासागर असून जो अनाथावर प्रीती करतो, असा प्रभू फक्त एक श्रीरामचंद्रच [illegible]. त्यांच्याशिवाय निर्हेतुक हितकर्ते व निष्कामांचे मित्र व मोक्ष देणारा दुसरा कोण आहे ? ज्यांच्या कृपेच्या केवळ लेशामुळे मंदबुद्धी तुलसीदाससुद्धा परमविश्राम पावला. तो प्रभू रामच ! [illegible] प्रभू कोठेही नाही.

गोस्वामींच्या हृदयाला रामभक्तीचे भरते अनावर होऊन ते म्हणतात, " रघुवीरा ! माझ्यासारखा कोणी दीन नाही; आणि तुमच्यासारखा दीनांचे हित करणाराही कोणी नाही; हे जाणून, हे रघुवंशमणी ! [illegible] अशा जन्म-मरणरूप भीतीपासून माझी सुटका करा. १३० (क)

कामिहि नारि पिआरि जिमि लोभिहि प्रिय जिमि दाम।
तिमि रघुनाथ निरंतर प्रिय लागहु मोहि राम ॥ १३० (ख)॥

श्लोक– यत्पूर्वं प्रभुणा कृतं सुकविना श्रीशम्भुना दुर्गमं
श्रीमद्रामपदाब्जभक्तिमनिशं प्राप्त्यै तु रामायणम्।
मत्वा तद्रघुनाथनामनिरतं स्वान्तस्तमःशान्तये
भाषाबद्धमिदं चकार तुलसीदासस्तथा मानसम् ॥ १ ॥
पुण्यं पापहरं सदा शिवकरं विज्ञानभक्तिप्रदं
मायामोहमलापहं सुविमलं प्रेमाम्बुपूरं शुभम्।
श्रीमद्रामचरित्रमानसमिदं भक्त्यावगाहन्ति ये
ते संसारपतङ्गघोरकिरणैर्दह्यन्ति नो मानवाः ॥ २ ॥

मासपारायण, तीसवाँ विश्राम
नवाह्नपारायण, नवाँ विश्राम

इति श्रीमद्रामचरितमानसे सकलकलिकलुषविध्वंसने सप्तमः सोपानः समाप्तः।

कामी पुरुषाला जसे तरुण स्त्रीचे रूप-गुण व तिच्यापासून मिळणारे सुख:आवडते व लोभी मनुष्याला जशी पैशाच्या संख्यावाढीची प्रीती असते तसेच हे रघुनाथ! हे राम! तुम्ही मला प्रिय व्हा. (तसे ध्यान व जप आवडो.) १३० (ख)

शेवटचे संस्कृत श्लोक

श्रीरामचंद्रांच्या चरणकमलांची भक्ती नित्य-निरंतर प्राप्त व्हावी म्हणून प्रभू व उत्कृष्ट कवी शंकर यांनी जे रामायण पूर्वी रचले होते, ते समजण्यास फार कठीण, पण अत्यंत रघुनाथनामपरायण आहे, हे समजल्यावर तुलसीदासाने आपल्या अंतरातील अज्ञानांधकार नाहीसा व्हावा म्हणून जसेच्या तसेच श्रीरामचरितमानसरूपाने आपल्या भाषेत रचले. १

हे श्रीरामचरित मानस पुण्यरूप आहे; पापाचा विनाश करणारे असून, सदोदित कल्याण करणारे, (सदाशिवाचा वरदकर (हस्त) विमल ज्ञान व भक्ती देणारे आहे. तसेच मायामोहादि मल यांचा नाश करणारे असून, अत्यंत निर्मल आहे. प्रेमरूपी जलाने काठोकाठ भरलेले आहे. आणि मंगलरूप आहे अशा या श्रीरामचरित मानसात जे मानव भक्तियुक्त अंतःकरणाने बुडया मारतात, त्या मानवांना संसाररूपी सूर्याच्या अत्यंत कडक अशा किरणांचे भाजून टाकणारे चटके बसणार नाहीत! २

समश्लोकीसमवृत्त अनुवादक (श्री. प. प. प्रज्ञानंद सरस्वती) कृत उपसंहार हे श्रीरामा! सुखांचा जणू हारच असणाऱ्या अशा तुझ्या नामांत माझे अंतःकरण सतत रंगून जावे; त्याचप्रमाणे अत्यंत सुकुमार अशा तुझ्या चरणकमलांवर माझ्या मनमधुकराने नित्य तरंगत राहावे! तुझ्या सद्गुण-समुच्चयांचा मोठेपणा हा आकाशाहूनही विशाल व अगाध असल्याने त्याचे गायन करावे. कारण तोच त्रिविध तापरूपी सूर्याच्या ताप-सागराचे तुझे चरणरूपी तीर दाखवून भक्तांना तारतो. हे प्रभो! या प्रज्ञानाचा जोपर्यंत देह जिवंत आहे, तोपर्यंत दृढ विश्वासाने, या विश्वाच्या स्वरूपात असणाऱ्या तुझ्या रूपाची त्याला सेवा घडो!

याप्रमाणे कलियुगातील सर्व पातकांचा नाश करण्यास समर्थ असणाऱ्या श्रीरामचरितमानसाचा सातवा सोपान संपला.

॥ उत्तरकांड समाप्त ॥

कठीण शब्दांचा अर्थ

अउरउ-विशेष, आणखी, कोणीही.
अकथ–अवर्णनीय.
अकनि–श्रवण करून, जवळ.
अकरण–निष्कारण, हेतुशून्य, अकारण.
अकल–कलारहित, अनाकलनीय.
अकसर–निश्चयपूर्वक, एकाएकी, अकस्मात.
अकुलाना–व्याकुळ होणे.
अकूपार–समुद्र, अथांग.
अकुंठ–अप्रतिहत, तीक्ष्ण, तेजस्वी.
अखाडा–आखाडा, मेळा, जमाव, समाज, मैफल.
अग–स्थावर, पर्वत, वृक्ष.
अगर–अगरू.
अगवानी–सामोरा जाऊन आणणे.
अगहन–मार्गशीर्ष मास.
अगहुड–समोर, पुढे.
अघाई–आंतृप्ती, पोटभरून, यथेष्ट.
अघाती–आघात करणारा; संपणे, रिकामे होणे.
अघारी–ईश्वर, अघनाशक.
अचगरी–दुष्टपणा.
अच्छ(अक्ष)–नेत्र, इंद्रिय, रुद्राक्ष, रथ, सर्प, गरुड.
अच्छत–अक्षत, अक्षय्य.
अचरज–आश्चर्य.
अचला–पृथ्वी.
अछत–विद्यमान, असताच, अक्षत.
अजगव–पिनाक, शिवधनुष्य.
अजसी–यशोरहित, निंदित.
अजहुँ (हूं)–अद्यापहि, अजूनदेखील.
अजिर–आंगण.
अटपट–बोबडे बोल, उलटे सुलटे.
अटा– सज्जा, माडया.
अढुकी–अडकून.
अतंक–भय, दुःख, रोग, संताप.
अथब- अस्त होणे, मरणे.
अथयउ–अस्त झाला.
अथाई-विश्रांति स्थान, विश्रांति घेऊन, बिछाईत, आसन, अंथरुण घालणे.
अदन–भोजन.
अदभ्र–संपूर्ण.
अदाया–कठोरता, निर्दयता.
अध–नीच, अधोभागी, खाली.
[illegible], स्वर्गीय, ज्ञान, पठित.
[illegible] ज्ञाता.
अधृष्ट–नम्र, शील.
अनअहिवान–वैधव्य.
अनइस–वाईट, अनिष्ट, कुचाळ.
[illegible]–मृदंग
अनख–ईर्षा, क्रोध, द्वेष.
अनखगार–क्रोधाने शिवी देणे.
अनट–अनिष्ट, विपरीत, अनुचित.
अनत–अन्यत्र.
अनमिल–बिजोड, असंबद्ध.
अनवद्य–अनिंदित.
अन्वह–निरंतर, क्रोधरहित, दास्य करणे.
अन्हवाए–स्नान घातले.
अनामय–रोगरहित.
अनिमनी (अनमनी)–उदास, हताश.
अनी–तीक्ष्ण, सेना, क्रोध.
अनीक–सेना, समूह.
अनीह–इच्छारहित.
अनुग–अनुचर, सेवक.
अनुभाव–महिमा, प्रभाव.
अनुरोध–उपकार, अपेक्षा, अनुसरण, प्रीती, अनुकूलता.
अनुहर– (अनुहार) योग्य, सदृश.
[illegible]–[illegible].
अनैसे–तेढा, वाईट दृष्टीने, अनिष्ट.
अप–हानी, पाणी, भिन्न.
[illegible] आपली गति.
अपगा, आपगा–नदी.
अपडर–भय, निर्भय, आपली भीती.
अपत–पापी, निर्लज्ज, अप्रतिष्ठा.
अपवर्ग–मोक्ष.
अपहरई– हरण, नाश करून.
अपेल–निश्चल, अनुल्लंघनीय.
अबूझ–अडाणी, मूर्ख.
अभिधान–कोश, नाव.
अभिसारिका–संकेत स्थानी भेटण्यास जाणारी स्त्री.
[illegible] शत्रु.
अमर्ष– क्रोध.

अमाया–अकृत्रिम, कामनारहित, निष्कपट.
अमिय (अमी)–अमृत.
अमृषेव–सत्यवत्.
अय– लोखंड, वज्र, गति.
अयन–गृह, स्थान, षाण्मासिककाल.
अयान–अजाणता, मूर्खता.
अयानप–मूर्ख, अप्रबुद्ध.
अर्श–आकाश, मूळव्याध.
अर्हं–पूजा.
अरगाई–अरगानी–स्तब्ध होऊन.
अरति–वैराग्य, विरक्ति, प्रेमाभाव.
अरणि–अग्निहोत्रीय पात्रविशेष.
अरति–अराति, शत्रू.
अरु–आणखी.
अरुझि–जोराने उत्पन्न होणे, सोडणे, मोकळे करणे.
अरूनचूड, अरुनसिखा–कुक्कुट, कोंबडा.
अरूनोपल–माणिक.
अलच्छि–दरिद्री.
अलान–शृंखला.
अलीक–खोटे, असार, मिथ्या.
अलीहा–असत्य.
अलोल–स्थिर, शांत.
अलिंद–भ्रमर.
अलुझि–सोडणे, मोकळे करणे, गुंता काढणे.
अवकलित–निश्चित, दृढ.
अवकीर्न–नष्टवत्, भ्रष्ट नियम.
अवगति–ज्ञान, अनन्यगति.
अवगथ–निंदा.
अवट–आखणे.
अवडेरि–त्यागकरून, फसवून, दगा देऊन.
अवढर–अवघड.
अवद्य–अधम, नीच.
अवदात–उज्वल, शुद्ध.
अवध–अयोध्या, सीमा, समय.
अवर्त्त–भोवरा, मेघविशेष, चक्र.
अवराधक–सेवक, दास.
अवराधना–आराधना.
अवरेखि–प्रतिज्ञा करून.
अवरेव–संकट दशा, काव्य गुणविशेष, मत्स्यविशेष.
अवसि–अवश्य.
अवसेरि–विलंब, उत्कंठा, आशा.
अवाध्य–अतर्क्य, बाधारहित.
अवाधि–दुःखरहित, सुखरूप.
अवाँ–आंवा (कुंभाराचा)
असगुन–अशुभसूचक शकुन, अपशकुन.
अस्तुति–स्तुति, प्रशंसा.
असम–अद्वितीय, वक्र.
असमसर–कामदेव, मदन.
असवारा–स्वार.
असित–काळे, शामवर्ण.
अहमिति–अहंकार, घमेंडखोर.
अहिनी–सर्पिणी
अहिबेल–नागवेल.
अहिभुज–मोर, गरुड.
अहिमति–क्रोधी, दुष्ट.
अहिवात–सौभाग्य.
अहीर–शूद्रजातिविशेष.
अहेर–मृगया, शिकार.
अहेरा, री–शिकारी.
आइ–आयुष्य, येऊन.
आकर–खाण, येऊन.
आखर–अक्षर, वर्ण.
आखू–उंदीर.
आगर–चतुर.
आगिल–पुढे होणारा, भविष्यकालीन.
आगी–अग्नि, आग.
आचरज–आश्चर्य.
आतनोति–विस्तृत करतो.
आन–दुसरा, मर्यादा, शपथ.
आनवी–घेऊन ये.
आयतन–घर, स्थान, देऊळ.
आयस–आज्ञा.
आरती–पीडा, अतिप्रीती.
आराती–शत्रू.
आलबाल–आळे.
आशिष–आशीर्वाद, वर.
आसा–दिशा, आश्रय, उमेद.
आसीन–बसलेला.
आँक–निश्चय, हेतु, चिन्ह, अंक, रुई.
आँकुवे–अंकुरित, उत्पन्न झाले, अंकुर, शाखा.
आँत–आतडी.
आँधी–वावटळ.
इभ–हत्तीचा बच्चा, समान.
इमि–अशा प्रकारे.

ईति--दैवी आपत्ती.
ईशन,ईछन, ईक्षन-दृष्टी, नजर.
ईशना-लालसा, वासना.
उअहि-उदय होणे.
उए-उगवलेले.
उकठि -कुंठित, वाळलेले, वाकडेतिकडे.
उकसहि-जागीच उसळून, तुकावून.
उघरहि-स्पष्ट होणे.
उचाटू-उच्चाटण.
उछंग-उत्संग, मांडी.
उजयार-प्रकाश.
उजरे-उध्वस्थ, नष्ट होणे, उज्ज्वल, शुभ्र.
उजागर-प्रख्यात, जगद्विख्यात,
उताल-उंच.
उतराई-भाडे, आतर, तरीचे भाडे.
उतायल-उतावीळ, व्याकुळ.
उघरे-उद्धरले, प्रकाशित, उघडे, तुटपुंजे, स्पष्ट.
उनींद-अपूर्ण निद्रा.
उपधान-तक्या, उशी.
उपबर्हन- पलंगपोस.
उपाटी-उत्पाटन करणे, उपटणे.
उबका-वमन, वांती.
उबर, उबारा--वांचून, वांचले, निभावले, वाचविणारा, आश्रय.
उमगत-प्रसन्न, प्रफुल्लित, उचंबळणे, उकळया येणे.
उमरितरू-औदुंबर.
उयेउ-उदय झाला.
उरगाद-गरुड.
उरिन-ऋणरहित.
उलीचा-उपसून टाकले.
उसासु-दीर्घ निश्वास.
उहार-उघडे केले, उघडे.
ऊख-ऊंस.
ऊगर-औदुंबर.
ऊना-कमी, उदास.
ऊसर-उखीर, नापीक.
ऊंच-श्रेष्ठ,
एकाकिन्ह-एकटा, फटिंग.
एकंत-एकांत, निर्जन.
ऐन-निवास स्थान, नेत्र, सूर्याचा मार्ग.
ओंट-पडदा, छाया, आड होणें.
ओंडनखांडे-तलवार बहादूर.

[illegible]
ओढन-पांघरण्याचे वस्त्र. ओढणी.
ओघे-[illegible], अधिकारी.
ओर-कडे.
ओरे-ओले, गारा.
[illegible]
औडर-अवघड, कठिण.
औसर-[illegible], अवकाश, मर्जी. मौका.
[illegible]
अंगरी-कवच.
अंगवनि-सहन करून, अंगवळणी पडणे.
अंघ्रि-चरण.
अंचवत-आचवणे, मुकणे,
अंचल-पदर.
अंजि, आंजि-अंजन घालून
अंजोरी-चमकणे
अंतावरी-आतडी.
अंथयउ-अस्त झाला.
अंधियार-अंधार झाला.
अंबक-नेत्र.
कछु-कछुक-थोडेसे, किंचित्
कटकटहि-कटकट शब्द करणे.
कठवता-काष्ठपात्र, लांकडी कुंडी.
[illegible]-[illegible]र, नावाडी.
कत-कोठे, किती, काय, कसे.
कद[illegible]-[illegible].
कदंब-वृक्षविशेष, समूह.
कपूत-कुपुत्र
कपिदु-वानरश्रेष्ठ
[illegible]
कबारू-हुन्नर, काबाड, धंदा.
कमठ-कासव.
[illegible]
[illegible] दंड.
करक-दुःख, पीडा, करकरून झोंबणे.
करख-कर्ष, आकर्षण करणे, दोन तोळे द्रव्य, वैर, अत्यंत संताप, चीड,
करतब-कर्तव्य, हातोटी, कर्तबगारी, कुशलता.
करतूती-करण्याचे सामर्थ्य, कर्तबगारी.
करवरे-अदृष्ट, आपत्ती, अनिष्ट.
करवाल-खड्ग, तरवार.
करषा-वैर.
करिया-काळे.

कल–मधुर शब्द, सुंदर, काल, उद्या.
कलबल–कपट, डावपेच.
कलिल–चिखल, मलीन.
कलेवर–मृत शरीर, प्रेत.
कलेस–दु:ख.
कलोल–क्रीडा.
कविनासा–कर्मनाशा नदी.
कसमसात–व्याकुळ होणे, चवताळून, कासावीस, रेटून.
क्षोभू–ममता, क्षोभ,
कह्रत–कण्हत.
कहार–शूद्रजातिविशेष.
कहाव–वर्णन, कथा.
कहँ–कोठे, द्वितीया व चतुर्थीचा प्रत्यय.
काई–शेवाळे.
काकु–दु:शब्द, वक्रोक्ती.
काग–कावळा.
काछिय, काछे–वळविणे, नाचविणे, ओढणे, वापरणे.
कटि, काटि–कंबर, कमर.
काठ–लाकूड, काठी.
कानि (नी)–लज्जा, संकोच.
कामदगाई–कामधेनू.
कायर–भित्रा.
कारिव–काळेपणा, शामता.
कारी–काळी, करणारी.
कास–दमा, खोकला, एक प्रकारचे गवत.
काहु–काय.
काहू–कोणी.
कियारी–आळे, पाळे, फुलझाडांच्या ओळी.
किरिच–खंड, तुकडा, शस्त्र.
किसान–शेतकरी.
कीच-कीच–सडा, चिखल.
कीन्ह–केले, रचिले.
कीश–वानर.
कुकाठ–वाईट काष्ठ.
कुचाह–अनिष्ट, अनिश्चित वार्ता.
कुठाहर–अनुचित स्थान, मर्मस्थान.
कुदारी–कुदळ.
कुधातु–लोखंड.
कुवलय–कमळ.
कुमुदबंधु–चंद्रमा.
कुरी–अनेक जाती.
कुलह–टोपी.
कुली–संपूर्ण.
कुलिश–वज्र.
कुहू–कोकिळा, अमावास्येची रात्र.
कूट–पर्वत शिखर, व्यंगोक्ति.
कूटी–व्यंग्यवचन.
कूडी–शिरस्त्राण.
कूर–कुटिल, क्रूर, मूर्ख, कपटी.
कूबर–कुबड.
कूल–किनारा, तीर.
कृपा–कृपाण, तलवार
कुसानु, कृशानु–अग्नी.
केकी–मोर.
केतिक–किती.
केदली–केळ.
केर, (रा)–चा–ची–चे, केळ.
केली–क्रीडा.
केवट–नावाडी.
केहरी–सिंह, वानरविशेष.
केहि–कोणाला.
कैरव–कुमुदिनी, धूर्त.
कोक–चक्रवाक पक्षी.
कोकनद–रक्त कमल.
कोका–चक्रवाक, रतिशास्त्र.
काछे–ओटी, पदर.
कोतल–मोकळाघोडा.
कोदव–कारडू, कोद्रव, धान्यविशेष.
कोपल–नूतनपर्ण, अंकूर.
कोये–गोलक, नेत्र.
कोरि, कोरी–कोरून, कोरीव, वीस.
कोविद–विद्वान, पंडित.
कोह–क्रोध, राग.
कोहाब–क्रुद्ध होणे, रुसवा.
कौमुदी–चंद्रप्रकाश, चंद्रिका.
कौर–घास, ग्रास.
कंगूरा–बुरुज, काठ, कड.
कंज–कमल.
कंटक–काटा, वैरी.
कंत–भर्ता, पति, कांत.
कंपती–समुद्र.
कंबु–शंख.
काँधि–स्वीकारणे, खांद्यावर उचलून घेणे.

कुंज–लता, मंडप.
कुंत–भाला.
कुंहड–कोंबडा.
खगहा–व्याध, गेंडा, पारधी.
खचाई–खेचून.
खट्ट–खाट, पलंग.
खटाई–आंबटपणा.
खटाहि–स्थिर राहणे, सुखावणे, निभावणे.
खप्पर–कपाल, भिक्षापात्र.
खभारू–गडबड, क्षोभ, खभार, खरभर.
खरी–गर्दभी, निष्कपट, सत्य.
खसी–ढासळून पडणे, खचणे, कोसळणे.
खाई–खंदक, दरी.
खागा–तरवार.
खानिक–खाणीसंबंधी, खनिज.
खाल–चर्म, त्वचा.
खाली–रिकामा.
खिन्न–उदास.
खिसियानी–चिडखोर, लज्जित, चरफडत.
खीन–दुर्बल, सुकुमार, नाजुक, क्षीण.
खीस–नाश, ध्वंस.
खीसा–नष्ट होणे, गलित होणे, खचलेला.
खुटाई–दुष्टपणा.
खटानी–समाप्त झाली, निःशेष झाली.
खुनूस–क्रोध, खुनशीपणा, द्वेश, त्वेष.
खुवारू–दुःखी.
खेत–क्षेत्र.
खेरे–खेडेगाव.
खेलवार–गारुडी.
खोज–शोध, पत्ता लावणे.
खोई–गमावली, हरवली.
खोडस–सोळा.
खोरी–थट्टा, विनोद, गल्ली, खोडी.
खोरे–लंगडा, खोडकर.
खोली–पोकळ नळी.
खोवे–हरवतो, गमावतो.
खोह–गुहा.
खंजन,खंजरीय–पक्षिविशेष.
खँसि–ढासळला, खचला.
खाँगे–कमी होणे, खंगणे, जेरीस येणे.
गई–गेली, झाली.
गच–गच्ची, फरशी, छत.
गढ–कोट, किल्ला.
गथ–मूल्य, किंमत.
गनि–विचार करून.
गनी–विचारी, धनवान, प्रसिद्ध.
गने–शेल्की.
गभुआरे–कुरळे केस. झुबकेदार भुरे केस.
गय (ज)– हत्ती.
गयल–गल्ली, आडवाट.
गयंद–मत्त हत्ती.
गर–गळा, विष, रोग.
गरई–गळून जातो, नष्ट होतो. लज्जित होतो.
गरद–धूळ.
गरदन–गळा, कंठ.
गरह–ग्रह, वातरोग.
गरही–नष्ट होतो.
ग्राह–मकर, नक्र.
गरुअ–गंभीर, अवजड.
गरुता–गौरव, बोजडपणा.
गव–प्रयोजन, मतलब, कारण ,गाय.
[illegible]
गहई, गहिह–ग्रहण करतो, स्वीकारतो.
गहगह–आनंदाचा वाद्यगजर, गजबज.
गहन–निबिड अरण्य, घोर जंगल, पकडणे, ग्रहण.
गहवर–गहिवर, आविर्भाव, वृक्षाच्छादित स्थान.
गहरु–विलंब.
[illegible], गोशाला.
गाजन–गर्जना, गाजलेला, गिना.
गाढ–विपत्ती, वेदना, घट्ट, दृढ.
गाढा–घट्ट, दृढ.
गात–गात्र, अवयव, देह.
गाथा–इंगित, कथा.
गाथे–गोवलेले, ओवलेले.
गादुर–[illegible]. ••
गारी–अपशब्द, शिवी.
[illegible], कथा, ग्राहक.
गिरिन्दा–हिमालय.
गीध–गृध्र, गिधाड.
गुडी–पतंग, बाहुली.
[illegible] करतो, जाणतो.
[illegible] पैलतीराला जाणे.
गुनहु–विचार करणे.
[illegible]
गुमान–अभिमान, अनुमान.

गुल्लर, गुलर–अुंबर, औदुंबर.
गुह्–भिल्ल, कोळी.
गुहार–हांक, धावा.
गेरु–गेरू, सोनकाव.
गो–गाय, इंद्रिय, दिशा, पार्शी, वाणी, स्वर्ग, वज्र.
गोई–गुप्त.
गोद–अंक, मांडी,
गोपर–इंद्रियातीत, अगोचर.
गोमायु–कोल्हा.
गोसाई–स्वामी.
गौन–गमन.
गंजन–नाश, गांजणूक.
गँवार–गाँवढळ, खेडवळ.
घटन–घटणे, क्षीण होणे.
घट्टा, घट्ट–नदीचा घाट, तीर.
घनेरे–अनेक प्रकारे, दाट, पुष्कळ, विपुल.
घमोई, घमोर–कीड, वाळवी.
घमंड–अहंकार.
घरना–गृहिणी.
घरिक–एक घटकाभर, थोडा वेळ.
घरी– घडि, घटका, घडचाळ.
घबरी–घाबरून, समूहाने.
घहरात–गर्जणे.
घाउ–जखम, घाव, आघात.
घाटि–कमीपणा, नीचपणा.
घाये–दिले.
घालक–नाशक.
घुन–जंतुविशेष, वाळवी.
घुणाक्षर–किडचाने खाल्लेली, कोरलेली, अक्षराकृती.
घूमित–घेरी येऊन.
घेरा–घेरले.
चक्केवे–चक्रवर्ती राजा.
चख–नेत्र, चाखणे, भोगणे, आस्वाद घेणे, पाहणे.
चपरि–शीघ्र, चपळ.
चबेना–पोहे, चुरमुरे इ. चा फराळ, भेळ.
चमगादुर–वटवाघुळ, घुबड.
चर–दूत, जंगम.
चरफराहि–चरफडणे.
चरम–ढाल, शेवटचा, चर्म.
चवई–श्रवणे, टिपकणे.
चह–अपेक्षा करणे, आवडणे, इच्छा करणे.
चाऊ, चाव–आनंद, सुंदर.

चाक, चाका–चक्र, उचललेले.
चाकना–वीज, छापले, शिक्के मारले.
चाड–आश्रय, आवश्यकता.
चापत, चापी–चेपणे, अडवणे, अपहार करणे.
चिक्कन–स्निग्ध.
चिकनाई–स्निग्धपणा.
चित–चित्त, मन.
चितचेता–चित्ताची, सावधानता.
चितव, चितवत–पाहणे.
चितवन–अवलोकन, दृष्टी.
चितेरा–चितारी, चित्रकार, चित्रीत केलेला, कोरलेला.
चिन्हारी–परिचय.
चिबुक–हनुवटी.
चिर–नित्य, विलंब, कायमचा.
चिराना–चिरकालीन, चिरणे.
चीखा–स्वाद घेणे, ओरडला.
चीन्हा–चिन्ह, ओळखले.
चुनौती–इशारत, आव्हान.
चूरन–चूर्ण.
चेत–शुद्धि, स्फुरण, स्मरण, विचार, ज्ञान.
चेरा–सेवक.
चेरी–दासी.
चोप–उत्साह.
चौगान–खेळण्याचेठिकाण, व्यायामशाळा, आखाडा.
चौतनी–चौकोनी टोपी.
चौपट–तळपट, सत्यनाश.
चौहट– चव्हाटा.
चंग–पतंग.
चंचरीक–भ्रमर, भुंगा.
चंदिना–चांदणे.
चंद्रहास–खड्ग, तलवार.
चंपत–गुप्त, बेपत्ता.
चापें–आविर्भाव, उत्साह, अवडंबर.
छत–जखम, खूण, व्रण.
छत्रक–छत्री.
छत्री–क्षत्रिय.
छबि–शोभा, सौंदर्य.
छमा–क्षमा, माफी, पृथ्वी, धरणी.
छय–क्षय.
छयल–सुंदर, तरुण.
छरभारू–अत्यंत भार.

छले—अनुपम, धूर्त, कपटी.
छरे—रेखीव, सडसडीत, एकाकी, भिन्न.
छाई—व्याप्त होणे, व्याप्त करणे.
छाके—उन्मत्त, आश्चर्ययुक्त, तन्मय, तृप्त.
छाछी—ताक.
छाजा—शोभले, खुलले.
छाया—प्रतिबिंब, आच्छादित होणे, व्याप्त होणे, व्याप्त झालेला.
छार—क्षार, भस्म.
छाला—त्वचा, चर्म.
छिन—क्षण.
छीजै—क्षीण.
छीर—क्षीर, दूध.
छुधा—भूक.
छुभे—भयभीत होणे.
छूछ—रिक्त, रिकामा.
छूटे—सुटून जाणे.
छेका—छिद्र, भिन्न, विलग.
छेकी—गराडा घालणे.
छेम—क्षेम, कुशल.
छोनिप—राजा.
छोली—स्पष्ट केलेली, सोललेले.
छौना—बालक.
छींक—शिंक.
छेंक—छिद्र, विलग, भिन्न.
जगमगित—दीप्तिमान.
जगावहु—जागृत करा.
जठेरा—ज्येष्ठ.
जडी—जडित, जडीबुट्टी.
जत—यत्न.
जतन—उपाय.
जनकौरा—जनकसंबंधी.
जनावा—सूचित केले, जाणवले.
जनि— नाही, उत्पन्न करून, इंगित.
जनेऊ—जानवे.
जनेत—वरात.
जमुहात—जांभई देत.
ज्याये—जिवंत केले, पालन केले.
जरनि—दाह, तळमळ, पोळणे, भाजणे.
जरहिं—जळून जातो.
जरा—वृद्धावस्था, संताप झाला, थोडेसे.
जलजाल—जलयान, नौका, नाव.
जवनिका—पडदा.
जम, [illegible]—[illegible], यम.
जहि—त्याग करून.
जहँ, जहाँ—जेथे.
जहांन—जग, दुनिया.
जागवलिक—याज्ञवल्क्य मुनी.
जाता—पुत्र, झालेला, गेलेला.
[illegible]
जातुधान—राक्षस.
जान—रथ, यान, विमान अत्यंत प्रिय, आत्मा, प्राण.
जानि—जाणून, समजून.
जाप—जप.
जाम—प्रहर, याम.
[illegible]—उत्पन्न झाला, स्थिर झाला.
जामिक—चौकीदार.
जाये—बालक, उत्पन्न केलेले.
जार—जाळून भस्म करणे, जार.
जावक—तरुण.
जासू—ज्वाला.
जिअत—जिवंत.
जिआऊ—बचावणे, वाचविणे.
जिआये—[illegible] केले, जिवंत केले.
[illegible] घ्या.
जिमि—ज्याप्रमाणे, जणु काय.
जिय—प्राण, जीव.
जीह—जीभ, प्राण.
जिवनमूरि—संजीवनी औषध.
जी—मन, जीव.
जुआरा—जुगार खेळणारा.
जुआरिहि—जुगाऱ्याला.
जुग—दोन, युग.
जुगुति—युक्ती, चतुराई.
जुझाऊ—शूर, रणझुंजार.
जुटत—जुळत, जमत एकत्र येत, भिडत, लढत.
जुठारी—उष्टे करणे.
जुडाना—शांत झाला.
जुरै—प्राप्त झाले.
जूथ—समूह, सेना.
जून—प्राचीन, वेळ.
जूरी—सरदी, जुडी, गट्टा बांधणे.
जूहा—सेना.
जेते—जेवतात, जितके, जिकणारे असतील, तितके.

जेवनार---जेवणावळ, पंगत.
जहि---ज्याला, जो.
जोगवत–प्रयत्न करणे, सांभाळणे.
जोटा–दोन, युग्म.
जोते–जोडले.
जोबन–यौवन.
जोरी–जोडी.
जोही–पाहून, तपास करून.
जोंक–जळू.
झख–मासा.
झगुलिया–झबले.
झपट–झपाटणे.
झरति–टपकणे.
झरि–झड, निरंतर.
झलकत–चमकत.
झाषा–झाकले.
झारि–झाडून, झाडून सर्व.
झारी–कमंडलू, सेना, झाडणे, झोडणे.
झीनी–बारीक, टुमदार, लहान.
झोटी–जटा, शेंडी, वेणी.
झँई–अंधेरी, घेरी.
झंपेउ–आड येण.
झिगुलिया–चोळणा
झोंटा–जटा.
टरई–टळणे.
टहल–फिरणे, शुश्रूषा.
टाप–टाच, उल्लंघन करणे.
टार–टाळणे.
टिट्टिभ–टिटवी.
टेई–धार लावून.
टेक–प्रतिज्ञा, बोज.
टेकी–प्रतिज्ञा केली, शब्द पाळला.
टेरे–हाक मारली.
ठकुर सुहाती–आदर सत्कार, मनधरणी करणे.
ठठुकी–अडखळणे.
ठवनी–उभे राहण्याची, चालण्याची ऐट.
ठाढ–उभा.
ठाना–निश्चित केला. ठाण मांडले.
ठाहरू–स्थान, मुक्काम.
डस–चावणे.
डाढे–कठीण, भस्म केले.
डाबर–डबके.
डासन–बिछाना, आसन.
डासि–अंथरुण.
डीठा–दृष्टी पडणे.
डीठी–दृष्ट लागणे.
डेराहि–भीती, भितो.
डेवढ–दीड.
डोर–दोरी.
डोरिआये–दोर लावून बांधणे.
डोल–पोहरा, डोळणे, हालणे.
डाँटेहि–दटावणे.
ढनमनी–ढासळली, पडली.
ढरक– खालावले.
ढहाये–उलथवून टाकणे.
ढावर– गढूळ, खोल.
ढारी–ढाल, उतार. ढाळलेली.
ढिग–समीप.
ढेक–सारस पक्षी.
ढेरी–समूह.
ढोटा–बालक.
तकहु–अवलोकन करा.
तकि–लक्ष्यवेध करून.
तन–शरीर, कडे.
तनकाऊ–थोडेदेखील.
तनोतु–विस्तृत करणे.
तनोरुह–केश.
तपसाल–तपस्वी.
तमकि–रागाहून, चिडून, आवेशाने.
तमारी–सूर्य.
तमोचर–राक्षस.
तरकस–भाता.
तरज–इषारा, आवेश, तडफ, सोडणे.
तरन, तारन–जीवन्मुक्त, तरून, तारणारा, तारक.
तरनी–नौका.
तुमुहानी, त्रिमुहानी–त्रिमुखी, त्रिमार्गगामिनी गंगा.
त्रिय, तृय–स्त्री.
तरंगिनी–नदी.
तरंगी–स्वेच्छाचारी, स्वैर.
तलफत–व्याकुळ होत, तडपत.
तहँ–तेथ.
तहवाँ–त्या ठिकाणी.
ताग–सूत्र.
ताज–किरीट.
ताजी–अश्वजाति.
ताटंक–कर्णफूल.

तातें–तप्त, संतप्त, त्यामुळे उष्ण, म्हणून.
ताला–कुलुप.
तिन्ह, तिन– तें, त्यांना.
तिमि–त्या प्रकारें.
तिय–स्त्री.
तिरहूति–मिथला देश.
तीछे–तीक्ष्ण.
तुरत–त्वरित.
तूरी–समान, तुल्यबल, वाघ.
तोप्यो–छपविला, थांबविला.
तोरावति–वेगवान.
थाथी, थाती–आमानत.
थार, थारा–थाली, परात.
थाह–अंत, थांग.
थैली–पिशवी.
थोर–थोडे, किंचित.
दमक–प्रकाश, योगी.
दर–शंख, भय, छिद्र, खिडकी, दरारा, अल्प.
दलि–नाश करुन.
दव–दवानल.
दाईज–आंदण.
दादि, दादु–गजकर्ण, चर्मरोग विशेष.
दादुर–बेडूक.
दाया– दया, अनुग्रह.
दारू, रु–काठी, मद्य, वृक्ष.
दावनी–भस्म करणारी.
दाहिनी–उजवी,अनुकूल.
दिनदानी–अत्यंत उदार, दीनदयाळ.
दिया–दीप, दिवा,दिला, अर्पण केला.
दुर्ग–किल्ला,दुर्गम, अगम्य.
दुराधर्ष– अत्यंत निर्भय.
दुराव, दुरावा–कपट.
दुरे–लपविणे,छपविणें.
दुलहा–वर, नवरदेव.
दूबर–दुर्बल.
दृग–नेत्र.
देवर–दीर.
देहरी–देवडी.
दोउ, ऊ–दोन.
दंड–काठी.
धसै–प्रवेश करुन.
धावन–दूत.
धनि, धुनी, ध्वनि–ध्वनि, आवाज.
[illegible]
धोखे–धोक्यांत.
धोरी–बैल.
धंधक, धंधरक–पोटार्थी
नति–प्रणाम.
ननिऔरे–आजोळ.
नभग–पक्षी, नभचर देवता.
नसावनी–नाशवंत.
नाइ–नमनकरून, सदृश.
नाई–[illegible], फेकून.
नाऊ–नापिक.
नाऊँ–नांव, नाम.
नाकनटी–अप्सरा.
नाठी–नष्ट केलेली.
नाये–प्रणाम केला.
नारकी–पापी.
नारा–नाला, नाडा. चिक्कार शब्द, घोषणा.
नारे–नाले.
[illegible], वाकत.
नावरि–लहान नाव, नावाडी.
नाह–नाथ, पति.
नाहर–व्याघ्र, वादी, मोटेचा नाडा.
निकाई–सौंदर्य, सज्जनता.
निकाय–समूह.
निकेत–घर.
निगम–वेद.
निचोर–तत्त्व, सार. पिळून काढलेला अर्क, सत्त्व.
निछावर–ओवाळून टाकणे, ओवाळणी.
निधान–द्रव्यसंचय निधान, खाण.
निबाह–निर्वाह.
निढुकी–अडखळून.
निबेरी–चुकविणे, धाब्यावर बसविणे, निकाल लावणे.
नियराई–समीप येवून.
निबंहा–निर्वाह केला, निभाऊन नेले.
निरूबरई–सोडविले, निवारण केले.
निरूवारे–जटा उतरविणे.
[illegible]
निसरत–बाहेर येणे.
निसाना–डंका, दुंदुभी, ध्वजा.
निसेन–शिडी.
निसोत–केवळ, नुसते

निहार–निरखणें, पाहणे, बर्फ.
निहोर–प्रार्थना करणे, आभार मानणे, उपकार स्मरणे.
नीक, नीका–सुंदर, चांगला.
नेऊ–किंचित.
नेग–बिदागी (अलुते बलुत्यांची)
नेगी–भागीदार, बलुतेदार.
नेव, नीव–पाया, मूळ.
नेवत–आमत्रंण, निमंत्रण देऊन.
नेवाजी, नेवाजू–दयाळु.
नेह, नेहा, नेहू–प्रेम, स्नेह.
नोई–भाला (गायीचे पाय बांधण्याची दोरी.)
नाँघउ–उल्लंघन करणे.
पखारी–प्रक्षालून, करून धुवून.
पग, पगु–पाय, चरण.
पचि–शिकस्तकरून, पच्ची करून.
पछिताना–पश्चताप करणे.
पछिले–मागील.
पटतर–उपमा.
पटोर–रेशमी वस्त्र.
पठए–पाठविले.
पत्रिका–निमंत्रण पत्र.
पतिआन–विश्वास ठेवणे.
पतोह–सून.
पतंग–सूर्य. जंतूविशेष.
पदपीढा–पादुका.
पनच–प्रत्यंचा.
पनव–पणव, दुंदुभी.
पनही–जोडा.
पनारे–नाले, प्रवाह.
पनिघट–पाण घाट, नदीचा घाट.
पयादेहि–पायाने, अनवाणी.
पर–शत्रू, दुसरा.
प्रकृष्ट–श्रेष्ठ.
प्रजारना–भस्म करणें.
प्रत्यूह–विघ्न.
प्रबंध–काव्य रचना, नियम, सोय.
प्रभंजन–वायु.
परस–स्पर्श करणे, पारसमणी.
परसि–स्पर्श करून.
परहि–पडतात.
प्रवाना–प्रमाण.
प्रस्थिति–हालचाल करणे, मार्गक्रमण.
परहीं–पडतात.
प्रसून–फूल.
पराने–पळून गेले.
परावन–धावपळ, पलायन.
परास–पळस.
परिकर–कंबर. परिवार, नौकरचाकर.
परिखा–खंदक.
परिचारे–हाक मारणे.
परिचाहीं–प्रतिबिंब, पडच्छाया.
परिहरहिं–सोडून देणे.
परिहारि–सोडून.
परुषाक्षर–कठोर वचन.
पलक–पापणी.
प्लव–नौका.
पलिहहिं–पालन करणे.
पलोटत–पाय चेंपणे.
पवारि–फेकून.
पवि–वज्र.
पषारे–प्रक्षालन करून.
पसाउ, ऊ–प्रसन्नता, प्रसाद.
पसेव–घाम.
पहिचाने–ओळखले.
पहिरावने–पोशाख.
पहिरहिं–धारण करणे.
पहँ–जवळ, समीप.
पाइ, पाई–प्राप्त होऊन, मिळून.
पाकी–पवित्र, परिपक्व.
पाख–पंधरवडा, पंख, बल.
पागे–ओथंबलेले.
पाट–रेशीम.
पाटल–गुलाब.
पाटंबर–रेशमी वस्त्र.
पाठीन–मोठा मासा.
पाती–पत्र, पंक्ति.
पाथोद–मेघ.
पारमन–मनाच्या पलिकडे.
पारा–पारद.
पालब–पालनपोषण करणे.
पास–जवळ.
पासा–कडे, फासा, समीप, बाजू.
पाहन–पाषाण, दगड.
पाहरू–चौकीदार, पहारेकरी.

पांति–समूह, पंगत.
पाँवडे–पायघड्या.
पाँवर–पामर.
पावरी–पादुका.
पिय–प्रिय, पति.
पियासे–तृषित
पिराने–दुखणे.
पिरीते–प्रीतियुक्त, प्रेमाने ओथंबलेले.
पिरोजा–रत्नविशेष, नीलमणी.
पिशुन–चुगलखोर, पिसवा, दुरात्मा, फितुर.
पीठ–आसन
पुनि–पुनः.
पुरइनि–नीलकमल.
पुरट–सुवर्ण.
पुहुमि–धरणी, पृथ्वी.
पूँछ–विचारणे, शेपटी, पुच्छ.
पूजिहि–सिद्ध होईल.
पूप–मालपुवा, घारगा, घीवर, एक खाद्यपदार्थ.
पेखे–पाहून.
पेखिय–अवलोकन करा.
पेड–वृक्ष, मूळ.
पेलिहहि–अवज्ञा करील.
पेली–अतिक्रमण, उल्लंघन करून.
पेषन–निरीक्षण करून.
पेठे–प्रवेश केला.
पैन–तीक्ष्ण.
पैरत–चालणे.
पैस्तार–प्रवेश.
पैहहि–प्राप्त होईल.
पोच–नीच.
पोचो–अधम.
पोत–जहाज, बालक, दंड.
पोतक–बालक.
पोषे–पोषणे, पालन करणे.
[illegible]
पौढ़ाए–झोपविले, शयन करविले.
पंच–पांच.
फनि–सर्प.
फरकि–स्फुरण पावून.
फराक–विस्तीर्ण अफाट.
फहरत–रोमांचित होत आहे, लहरी येणे, [illegible] लवणे, शुभशकुन.

[illegible]–शोभायमान [illegible].
फुर–सत्य.
फुरि, फुरी–प्रत्ययास आली.
फूल–फूल.
बखाने–व्याख्यान केले, वर्णन केले.
बगमेल–[illegible], [illegible] समूह.
बगरे–विस्तार केला, पसरले.
[illegible].
बजाज–कापडकरी, कापडाचा व्यापारी.
बटाऊ–[illegible], वाटसरू, पांथस्थ
बटोर–एकत्र करून.
[illegible]
बडप्पन–श्रेष्ठपणा.
बढ़ई–सुतार, वाढणे, अधिक होणे.
बतकही–गोष्टी.
बतिया–गप्पा गोष्टी, कच्चे फळ.
बद्य–वर्णन करण्यायोग्य.
बदइ–बोरीचे झाड.
बदि–वर्णन करणे, मागणे, वद्य पक्ष.
बधब–वध करणे.
बंधावा–समारंभ, अभिनंदन.
बधिक–पारधी.
बधेउ–वध केला.
[illegible].
बनावा–समारंभ, देखावा, कारागिरी.
बनी–सुंदर झाली.
बबूरहि–बाभळीस.
[illegible], कोशिंबिरी, तोंडी लावणी.
बयर–वैर, बोर.
[illegible] असत्य.
बयार– री–मंद वायु, वाऱ्याची झुळूक
बये–पेरले.
बर–पति, वर, सुंदर, वरदान.
बरजै–वर्ज्य करून.
बरजोरा–जबरदस्त, जबरीने.
बरद–वरदाता, बैल.
बरबस–जबरदस्तीने, हट्टाने.
बररे–बरळणे.
बराई–निवडक, निवडून, वगळून.
बरियाई–बलात्काराने.
बरियार–बलिष्ठ.
बरियाता–वरात.

बरियाँ–समय, वेळ.
बरिबंड–बलवान.
बरु–पाहिजेतर, कदाचित, एकवेळ.
बरूथ–समूह.
बरेषी–मागणी.
बलाहक–मेघ,
बलित–वेष्टित.
बलिमुख–वानर.
बसई–निवास करतो.
बसवर्ति–आधीन.
बसह–नंदी, बैल.
बसा–निवास केला.
बसाई–गंधयुक्त होऊन, वसवून.
बसीठी–दूत, वकील.
बसूला–वाकस.
बसेरा–आबादी आबाद, जागा, वस्ती, निवारा.
बहरावा–विषयांतर करणे, मन वळविणे.
बहुरि–पुनः.
बहोर, बहोरी–पुनः
बाउर–वायु.
बाउ–विक्षिप्त बावळा.
बाएँ–प्रतिकूल.
बागहि–डोलणे, फिरणे, घुमणे.
बागुर–फासा, पाश.
बाज–श्येन पक्षी, बहिरीससाणा.
बाढ–वृद्धी.
बादि–विनाकारण, व्यर्थ नको, निषेधार्थक शब्द.
बादी–वावदूक.
बाना–प्रतिज्ञा, बाण.
बानैत–धनुर्धारी वीर.
बार–वेळ, बाल, केश, दरवाजा, दिवस.
बारक–एकवेळ.
बारिश–समुद्र, पाऊस.
बारे–बालक, जाळून टाकिले.
बावरी–बावळी.
बासव–इंद्र.
बासा–निवासस्थान, सुवासित केले.
बाहिज–बाह्यतः
बाहिनी–सेना, नदी.
बिकटासी–भयंकर मुखी.
बिकरारा–विक्राळ.
बिकाय–विक्रय.

बिग्रह–लढाई, शरीर.
बिगोर–नाश केला.
बिगोवा–नष्ट केले, झुलविले, लपविले.
बिटप–वृक्ष.
बिडरी–अत्यंत भयभीत होणे, फैलावलेली.
बिढई–सामर्थ्य, उत्पादन करून.
बितान–मंडप, मांडव.
बिथुरे–विस्तार होणें, विखुरलेले.
बिधान–शास्त्रोक्त विधि, नाम, इ.
बिधुंतुद–राहू.
बिनवउँ–विनंती करणे.
बिबाकी–विरूप केली, नष्ट केली.
बिभाती–प्रकाशित होणे, दिसणें.
बिमात्र–सावत्र भाऊ.
बियानी–प्रसवलेली.
बिरद–प्रतिज्ञा, दंतरहित.
बिरव–शब्दरहित.
बिरुज–रोगरहित.
बिरुदावली–क्रीदावळी.
बिलख–व्याकुळ, दुःखपीडित होऊन, ओंगळ.
बिलगाही–अलग होऊन.
बिलाही–नष्ट होऊन.
बिलोए–मंथन करणे, घुसळणे.
बिशोक–शोकरहित.
बिसूरति–चिंता करीत, सुस्कारे टाकीत.
बिहाई–सोडून, त्याग करून.
बिहान–प्रातःकाल, उद्या, होऊन चुकले.
बीच–मध्ये.
बीचि–लहरी, तरंग.
बीति–संपली, अतिक्रांत झाली, मर्यादा ओलांडली.
बीथी–गल्ली.
बीहड–कठिण, घनदाट.
बुताई–शांत केली.
बूझ–ज्ञान, समजूत.
बूता–पुरुषार्थ, बल.
बृषली–दासी.
बेग–लवकर.
बेरे–नाव, नौका.
बेसर–नथ, खेचरे.
बेहड–ऊंचनीच.
बेह–वेध, छिद्र, द्विधा.
बैठार–बसविले.

बैना–वाणी.
बैषानस–वानप्रस्थ.
बोरहि–निमग्न करणे, पुटे देणे, बुडविणे.
बोरा–गर्क केले, निमग्न केले.
बोरि–बुडवून.
बोहित–नौका.
बौराई–पागल होणें.
बौराह–पागल.
बंक, बंका–चाणाक्ष, धूर्त, हुशार.
बंगा–तिरसट, लुच्चा.
बंदनवार–तोरण, मंगलवाद्य.
बंसी–वेणू, गळ, बासरी.
बुंद–पर्जन्यधार, कण, थेंब.
बृंदारका–देवता.
भग–ऐश्वर्य, इच्छा.
भटभेरे–युद्ध.
भडिहाई–चोरी.
भणित–वर्णन केले.
भदेश–अनुचित, कुरूप, ओजरहित.
भनंता–कथन करणे.
भा–प्रकाश, झाले.
भाग–भाग्य, हिस्सा, पळणे.
भाजि–पळून.
भाय–भाव, प्रीति, बंधु.
भाये–आवडणे, अनुमानाने, अंदाजाने.
भाँये–अनुमान करीत असता.
भावती–प्रिय, रूपवती.
भावा–आवडले.
भिनुसार–प्रातःकाल.
भीतर–आत.
भिरत–भिडणे, युद्ध करणे.
भीर, भीरा, भीरि–भीड, गर्दी, समीप, भीति.
भुआल–भूपाल.
भुलाऊ–भुलणारा, चूकभूल.
भूजव–भक्षण करणे, भोगणे.
भूति–ऐश्वर्य, रक्षा.
भूरि–विपुल.
भूल–विस्मृति, अपराध.
भेंसा–रेडा.
भोर–प्रातःकाल, संदेह.
भोरा–भोळा.
भोरी–भोळी, भ्रमविली.

भाँति–प्रकार, रीति.
भाँवरी–सप्तपदी.
भिंदिपाल–शस्त्र विशेष.
मकु–परंतु, कदाचित्, किंबहुना.
मग–मार्ग.
मचलाई–विस्तार, फैलाव होणे, मळमळ, लघळपणा.
मज्जहि–स्नान करितात.
मझारि, री–मध्ये.
मतवारे–उन्मत्त, मद्यपी.
मनजात–कामदेव, चिंता.
मनमारे–चिंताक्रांत, हताश, उद्विग्न.
मनावन–प्रसन्न करणे, समजूत घालणे.
[illegible] सर्प, मण्यार साप.
मनुजाद–राक्षस.
[illegible] पराक्रम.
मनोज, मनोभव–मदन.
मय–दैत्यविशेष.
मयन–मदन.
मयंक–चंद्र.
मरइ–मरतो.
मर्दन–नाश.
[illegible].
मराल–हंस.
मरोरि–मुरडून.
मष्ट–मौन.
मसखरी–मस्करी.
मसान–स्मशान.
मसि–शाई.
महतारी–म्हातारी, आई, माता.
[illegible] क्रोध, मक्षिका.
[illegible] क्रुद्ध झाली, [illegible].
माची–प्रारंभ झाला, व्यापली, माजून राहिली, व्यापली.
मांजा–स्वच्छ केले, वर्षाऋतूतील पहिल्या पर्जन्याचा फेस
माझ–मध्ये.
माते–उन्मत्त, हे माते!!
[illegible] मोजले.
मार–मदन, तडाखा.
माषी–क्रुद्ध झाली, माशी.
माहुर–विष.
मिटई, मिटहि–मिटतात.
मिलाप–भेट, मन मिळाव, संयोग.
मीच, मीचु–मृत्यु.

मींजत–चोळणे.
मींत–मित्र.
मुइ, मुई–मेलेली, मृत.
मुकुट–आरसा.
मुखागर–मूर्ख, बाष्कळ, मोंडाळ, मुजोर.
मुठभेर–हातघाई.
मुधा–असत्य, वृथा.
मुयहु–मारलेल्यास, मेल्यावर.
मुरा–मुरला, मेला, संपला, परत फिरला.
मुरि–पाठ दाखवून.
मुरे–पाठ दाखविली.
मुसुकाई–मंद हास्य करून, स्मित करून.
मूर, मूरि–जडी बूटी, मुळी.
मृतक–प्रेत.
मेचक–कृष्णवर्ण.
मेटि–मिटविले, नष्ट केले.
मेली–मिळविणे, फेकणे, वापरणे.
मैला–दुष्ट, मळलेला, दुःखित, विष्ठा.
मो–माझे.
मोहि–मला, मोहित करून, बेशुद्ध करून.
मोहू–मला, मोह.
मंगता, मंगन–याचक.
मंजु–प्रिय, मनोहर.
मंजुल–सुंदर.
माँगा–याचना केली.
माँजा–रोगविशेष.
मूंदे–झाकले.
यातुधान–राक्षस.
रखवारे–रखवालदार, रक्षक, पालनहार.
रचना–निर्माण कौशल्य.
रजायसु–आज्ञा.
रटँहि–घोकणी घेणे, स्मरण करणे.
रद-दांत, रद्द.
रदपट–अधरोष्ठ, तोंड.
रनिवास–अंतःपुर.
रय–वेग.
रये–रंगले.
रस–माधुर्य, बल, प्रेम, गंध, स्वाद.
रसाल–मधुर, आम्र.
रहन, रहनि–राहणी, राहणे.
राउर–महाराज, महाराजांचा.
राका–रात्र.
राखा–रक्षण केले, रक्षक.
राचा–रचना केली, प्रसन्न–दंग–झाले; तल्लीनता.
राता–रत झाले, आरक्त.
रार, रारी–वैर, युद्ध.
रावरी–तुमची.
रिष्ट–प्रसन्न, हृष्ट.
रिस–क्रोध.
रीझत–प्रसन्न होत.
रीझै–प्रसन्न होणे.
रुख–दृष्टी, रोख.
रुज–व्याधि, रुजणे.
रूख–वृक्ष.
रूरी–अति सुंदर.
रेख-चिन्ह.
रेसू–ईर्ष्या.
रोकहि–अटकाव करण.
रोप–रोवणे.
रोमपाट–ऊर्णावस्त्र, लोकरीचे वस्त्र.
रोवनि–रुदन.
रोहु–मस्त्यविशेष, रोख.
रौताई–राजेपणा, सरदारी.
रेंगाई–रेंगाळत जाणे, सन्मुख चालविणे
लकुट–काठी.
लखहि–पाहणे.
लखाऊ–चिन्ह, उघडकीस आणणे.
लखि–निरखून.
लगि–करिता, लागून.
लटत–दुर्बल होत.
लय–तन्मयता, नाश.
लरि–लढून.
लरिका–बालक, मुलगा.
लरिकाई–बाळपण, हूडपणा,
ललकी–उत्साहपूर्वक, कडकडून.
लवाई–सवत्से, धेनु,
लहहि–प्राप्त होणे.
लहकौरि–ललकारून.
लहत, लहब–मिळविणे, प्राप्त करून घेणे.
लहलहात–वेगाने.
लाउब–लाऊन घेणे.
लाटी–दुर्बल झाली.
लायक–योग्य.
लिलार–कपाळ, मस्तक, प्रेम, ब्रह्मदेव, नशीब

लीक, लीका–प्रशंसा, रेख, मर्यादा,
लीन्ह्–प्राप्त करून घेतली.
लुकाई–दडून बसणे.
लुनिय–प्राप्त होणे.
लुब्धक–लोभी.
लूक–उल्का,
लेखहि–लेखणे.
लेखे–हिशेबी.
लेत–घेत, स्वीकार करीत.
लेसै–जोड देणे, उजळून देणे.
लोई–पेळू, लोकरीचे वस्त्र, कणकेची लाटी.
लोगाई–स्त्री.
लोन–मीठ.
लोना–सुंदर, मृदु, कोमल.
लोनाई–सुदरता, सौंदर्य.
लोयन–नेत्र, लोचन.
लोवा–लावापक्षी.
लांघे–ओलांडून, उल्लंघून.
सई–उद्योग, सही, शिक्कामोर्तब, शरयू.
सकाता–लज्जित होणे, पराङ्मुख होणे.
सकिल–एकत्र होऊन, मिळून, एकत्र येऊन.
सकुचानी–संकोचून.
सकृत्–एक वेळ.
सकेल–एकत्र करून.
सखर–शुद्ध, दोषरहित, ओजयुक्त.
सखिन–सखी [illegible].
सगलानि–ग्लानियुक्त,
सगुन–शकुन.
सगुनिअन्ह–ज्योतिषी.
सचान–शिकारी पक्षी, ससाणा.
सचु–सुख, आनंद.
सचुपई–चुपचुप.
सजग–सावध, सिद्ध, तयार.
सटुकि–बेताबेताने पळून जाणे, निसटून जाणे, फटकारणे.
सठ, शठ–दुष्ट, षंड.
सडसी–सांडशी.
सतिभाये–सद्भावाने.
सन–ताग, संवत्सर.
सनकारे–इशारा दिला, फरमाविले.
सनमान–आदर
सनाह–पतिसहित, कवच, युद्धतत्पर

[illegible]
[illegible]–[illegible], [illegible] [illegible].
सबर–प्रतिमहित, वरप्रदान, [illegible] दाबर.
[illegible]–[illegible]ना.
[illegible] होणे.
समास–संक्षेप.
समिति, समीति– सभा.
[illegible]–समजाऊन देणे.
सय–शंभर
सयन–निद्रा, शय्या, भाव. नेत्र विक्षेपाने. इशारा.
सयाने–शहाणे.
सर–बाण, सरोवर.
सरबस–सरस्वती, स्वादिष्ट होणे.
सराहिय–प्रशंसा करून.
साहिब–स्तुति केली पाहिजे.
सरिवारी–नदीचे जल.
सीखंड, श्रीखंड– चंदन, श्रीखंड.
स्रुवा–हवनपात्र.
सलोने–सुंदर, पाणीदार.
स्वबस–स्वाधीन.
सस्य–धान्य.
सहनाई–सनई.
सहम–भीति, अहंकारयुक्त, सहनशीलता, साहणे.
[illegible]–[illegible]नेत्र
सहि–सहन करून.
[illegible]–[illegible] सुख देणारे.
सही–हस्ताक्षर, निश्चित.
[illegible]–[illegible].
[illegible] [illegible]र.
[illegible]–[illegible].
मान–सन्मान, अहंकार, शेखी.
[illegible]–[illegible] संमिश्र.
सामुझि–बुद्धी, समजण्यायोग्य.
[illegible]–[illegible] शोभा, घर, वर्ष.
[illegible]–[illegible]क, कटुवादी. शास्ता.
[illegible]–[illegible].
सियन–शिवण.
सियान–[illegible]
[illegible]–[illegible], शिखर.
सिधादे–चालू लागले.
सिधाया–जाता झाला.
[illegible]–[illegible] जमा होणे.

सिय–सीता.
सियरे–शीतल.
सिरिजा–निर्माण केला.
सिरात–समाप्त होणे.
सिरान–समाप्त होणे.
सिरांनी–समाप्त झाली.
सिहाऊ–संतोष, अभिनंदन.
सिहात-अभिनंदन, गौरव, प्रशंसा करणे.
सीकर–कण, थेंब.
सीदँहि–दुःखी होणे, कंपित होणे.
सीय–सीता.
सीव–सीमा, अंत.
सुआर–आचारी.
सुखमा–सौंदर्य.
सुजान–चतुर, प्रवीण.
सुटुकि–चाबुक मारून.
सुठि–अत्यंत.
सुतीछी–अत्यंत तीक्ष्ण.
सुदेस–सुंदर, स्वदेश, रेखीव.
सुनासीर–इंद्र.
सुनि–ऐकून.
सुपात–सुख, सोय.
सुभाऊ–स्वभाव, साधारणतः.
सुभाय–स्वभावतः
सुमिरत–स्मरण करीत,
सुरसरि–भागीरथी.
सुराती–चांगली रात्र, दैत्य.
सुहाई–सुंदर, शोभून दिसली.
सुहावनी–रमणीय.
सूकरखेत–वराहक्षेत्र.
सूझ–नजर, बुद्धि, जाणीव, समजणे, दिसणे, सुचणे.
सूझँहि–गोचर होतात.
सूध–सरळ.
सून–शून्य–एकांत.
सेइय–सेवन करा.
सेयेउ–सेवा केली.
सेवत–सेवा करीत.
सेवरी–भिल्लीण, शबरी.
सैन– नेत्राचा इषारा, सैन्य.
सोऊ– तोच
सोई–तोच, निद्रा घेतली.
सोइ–तोच "
सोग–शोक.
सोच (शोच)– शोक.
सोती–शयन करती, झोपणे.
सोसु–सूर्य.
सोह–शोभणे.
सोहाई–शोभायमान होणे.
सोहावनी–सुंदर.
सौरज–शौर्य, वीरपुत्र,
संभार, संभारा–सांभाळला, सांभाळ केला.
संसृति–जग, संसार.
साँग–शस्त्रविशेष, लोहगोळा.
सिगँरौर–श्रृंगवेरपूर.
सौपि–सोपविली, सोपवून.
हटक–अटकाव.
हठि–हट्टाने.
हति–नष्ट करून, ठार करून.
हथवासहु–वल्हे, वल्हविणे.
हनहि–नाश करणे.
हने–वाजविले, हनन केले.
हये–मारून टाकले.
हर–हल, नांगर, हरण करणे. शंकर.
हरासू–शोक.
हरिजाना–गरूड.
हरीसा–सुग्रीव, कपिपति.
हरुआई–सूक्ष्मता, हलकेपणा.
हलराई–झोके देत.
हलोरे–तरंग, हेलकावे.
हहरि–घाबरून, हळहळून, निराश होऊन.
हारइ–पराजित होणे, नाउमेद होणे.
हारी–जेरीस आला, थकला.
हिय, हिया– हृदय, मन.
हिसिषा–चढाओढ, ईर्षा, हिंसाबुद्धी.
हुटकी–ठोकर मारून.
हुन–हवन केले.
हुमगी–उडी मारून, झटका येऊन.
हुलस्या–प्रसन्न होणे.
हुलसी–उल्हासित झाली.
हूहा–प्रसन्नतेचा शब्द.
हेति–हायहाय करून.
होनि–भवितव्यता, वृत्तान्त, भविष्यवादी.
होब–होणार.
हँकारी–बोलावून आणली.
हीचे–खोवणे, जमविणे., कुंठित होणे, हार खाणे, लज्जित होणे.

शुद्धिपत्रक

पृष्ठे	ओळ वरून	ओळ खालून	अशुद्ध	शुद्ध
२८	७	–	करीव	गरीब
३४	–	११	विचार	विहार
३७	–	४	माणसांत	मानसात
३९	१२	–	बहुरबरन	बहु बरन
३	२०	–	अपार	अपर
४१	,,	–	यह तजही	यह सर तजही
४१	७	–	जम	जल
५२	–		ब्राह्मणी	ब्रह्माणी
,,	–	१२	योगानीत	वियोगातीन
,,	१	–	अंभु	संभु
,,	१३	–	जोबी नहि	जो बिनहि
५९	–	११	माणसांनी केलेल्या	माणसांच्या झालेल्या
६०	४	–	मरनु संभु	मरनु मुनी संभु
६३	९	–	असा	अस
७१	४	–	पुनीसा	मुनीसा
७५	६	–	वमगाना	भगवाना
७७	–	१२	वैकुण्ठित	वैकुण्ठात
७८	२	–	मदुर	मधुर
७३	,,	–	उमरू	डमरू
,,	–	११	मोर	मौर
,,	–	८	तीत	तीन
,,	१७	–	वर घोड्याची	वरघोड्याची
८०	–	३	तोडे	तोंडे
८३	१	–	अगवाग	अगवान
८७	४	–	केरे	करै जनि
,,	९	–	विधिध	विविध
,,	११	–	बसत	बसन
,,	–	१३	वेदरहित	वेद विहित
८८	१२	–	लै	लै सिव
८९	५	–	विधि	विधि भोग
,,	७	–	सदर	ममर
,,	९	–	ज्ञान	जान
,,	–	१५	बहुमान	बहुमान दान
९१	१३	–	सातरसु	सांतरसु
९२	२	–	हिएँ	हियँ
९७	२	–	बिबका	बिबेका
९९	१३	–	परमातका	परमातमा
,,	–	९	रामचद्र	राममंत्र
१०१	–	८	मन तू	मत तू
,,	–	२	विश्वात्मरूप	निःस्वात्मरूप
१०४	४	–	बोलि बोलि	बोलि
१०९	६	–	अनुरहित	अंतरहित
११०	६	–	मुनि	मुनहि मनि
,,	१०	–	जयमाला	जयमाल
१११	२	–	गनबोले	गन बोले
,,	–	३	विश्व मोहिनी	विश्वमोहिनी व दुसऱ्याबाजूस लक्ष्मी !
११२	४	–	मद	मद
११४	६	–	कल्मम	कल्प
१२०	१३	–	एमस्तु	एवमस्तु
,,	–	१६	धुर	मधुर
१२१	११	–	अघर	अवर
१२४	८	–	विप्रभव	विप्रभवन
१२६	११	–	मुक्ति	मुक्ती
१२८	१२	–	माहि	मोहि
१२९	१३	–	संधारा	संभारा
१३१	१५	–	कोष	कोण
१४०	१	–	दीन्हि	दीन्हे
,,	१६	–	बठ	बैठ
१४२	९	–	कछू, कहे हु	कछु, कहेऊ
१४४	–	८	जरा	जमा अग्नि
१४७	–	७	होऊन	घेऊन
१५०	–	३	ते आहे	ते न
१५२	१५	–	अरु नी	अरु राती
१५३	–	१	विपयांत	विश्वांत
१५८	१५	–	अनीह	अवीह अज
१६२	४	–	समपि	समर्पि
१६४	१५	–	सरमर	समीर
१६६	१४	–	यह	हय
१७०	१६	–	आप	आए
१७१	४	–	हही	हठी
१८२	१६	–	पठवा	पठवा जनक
१९१	७	–	हासि	हारि
१९४	–	२	रवि	मणि
,,	७	–	जगु	जग

पृष्ठे	वरून	खालून	अशुद्ध	शुद्ध
,,	–	१६	शत्रु चापा	शंभु चापा
१९९	५	–	संस	संख
२०४	३	–	जानी	(जानि) जानि
,,	९	–	सब	सम
२०५	४	–	बिख	बिस्व
२०९	४	–	जनुकु	जनकु
,,	६	–	जहइ	जरइ
२१२	१	–	अनजातन	अन जानत
,,	९	–	स्रवा	स्रुवा
,,	१२	–	बिधित	बिदित
२१३	५	–	कलु	कुल
२१५	८	–	पठन	पठए
२१७	११	–	बिल मोचन	बिलोचन
,,	१२	–	मोठी	मीठि
२२१	–	११	जनक	जनक सुता
२२२	९	–	पुलि	पुनि
२२५	८	–	नान	गान
,,	९	–	नगर	नागर
२२८	१	–	सुक	सुख
२२९	–	१२	वियोगजन्म	वियोगजन्य
२३१	१०	–	जा ही	न जाहीं
२३२	२	–	सिन्ह	तिन्ह
२३५	७	–	बाजि	बर बाजि
,,	१२	–	सुरस	सुरेस
२३९	६	–	परिचाने	पहिचाने
२४०	१३	–	भगिमनी	भामिनी
२४१	१५	–	शकर्त	शांति
२४८	९	–	मनोहर	वधुवरांचेमनोहर
२५१	१५	–	प्रतापानेच	प्रसादानेच
,,	५	–	आता	आंत
२५४	६	–	पुनि	पुनि पुनि
२५६	१३	–	फेरै	फेरे
२६०	९	–	विमुल	विपुल

(२६४ ओळ ५ च्या नंतर वाचा : भूपति ब़ोलि बराती लीन्हे। जान बसन मुनि भूपन दीजे ॥)

पृष्ठे	वरून	खालून	अशुद्ध	शुद्ध
२७६	–	१३	महिषमणी	महिप माणि
२९२	–	८	डोळधाच्या	डोक्याच्या
३२५	–	२	विचार	विकार
३३७	–	१६	लक्ष्मणसीता	लक्ष्मण गीता
३४०	–	१६	शमजूत	समजून

पृष्ठे	वरून	खालून	अशुद्ध	शुद्ध
३५९	१७	–	बोटासारखे	बोरासारखे
३६९	–	१७	मारसे होत	माणसे लोकपं होतात
३८१	२०	–	झोपल्यामुळे	झोडपल्यामुळे
३९०	–	१४	ब्रह्म	बह्मा
,,	–	७	रामाने	राजाने
३९९	–	१०	चालु	भरत चालू
४०७	–	४	देवाची	दैवाची
४१५	–	७	नष्ट केले	घालवून दिले
४२५	१८	–	अगत्य	अगम्य
४३१	१२	–	सूनाजू	सुराजा
४३७	१	–	के	के मातु
४३९	११	–	भेटति	भेंटति अति
,,	१३	–	कहेत	कहेउ
४४८	२	–	सब	बस
४६५	–	५	पातळांत	पाताळांत
४७०	१८	–	उमगणारे	डगमगणारे
४७५	७	–	निसिल	निसील
,,	८	–	आपणाए	अपनाए
४८३	१६	–	धैर्यांचा	धर्मांचा
,,	–	१३	श्रीराम वनाला	श्रीरामवनाला
५०६	–	६	भव सागराची	भाव सागराची
५१५	–	१३	नाक नाक	नाक कान
५२४	९	–	सेगा	संगा
५२७	–	११	चरणानी	चरणाना
५३१	१७	–	अंगत	अंग
५३६	१४	–	यद	पद
५४३	६	–	मोहि	मोह
५४४	–	१३	धैर्यवाद	धैर्यवान
५४५	६	–	बिहाये	बिहाइ
५५०	१०	–	जहँ	जहँ तहँ
५५१	१२	–	कवच	कवन
५५४	१९	–	उघडुन	उडवून
५५८	–	१८	मास	त्रास
५६४	२०	–	शरदातील	शरदासारखा
५६७	–	४	परंपरानित	परंपराजनित
५७३	–	१४	समकार्य	रामकार्य
५७४	१७	–	प्रदक्षणा	७ प्रदक्षणा

शब्द	पृष्ठ	ऊपर	नीचे	अशुद्ध	शुद्ध
[illegible]	[illegible]		—	[illegible]	[illegible]
[illegible]		[illegible]	—	[illegible]	मर्मिनि
[illegible]	[illegible]	[illegible]	—	[illegible]	[illegible]
[illegible]	,,	[illegible]	—	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	—	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]		—	[illegible]	[illegible]
[illegible]	,,	[illegible]	—	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	—	[illegible]	धम
[illegible]	[illegible]	[illegible]	—	[illegible]	कुटिल
[illegible]	,,	[illegible]	—	[illegible]	[illegible]
[illegible]	३१३	—	१२	[illegible]	[illegible]
[illegible]	३१४	[illegible]	—	[illegible]	[illegible]
[illegible]	३१५	१३	—	[illegible]	[illegible]
[illegible]	३२३	१	—	घोर	घोर कठोर
[illegible]	,,	१३	—	[illegible]	पर
मो	३२६	१०	—	बिरुद	बिरुद भानु
नन	[illegible]	[illegible]	—	[illegible]	नन
[illegible]	[illegible]	—	[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	३४१	[illegible]	—	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	—	[illegible]	[illegible]	[illegible]
आइ	[illegible]	[illegible]	—	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	१०	—	[illegible]	[illegible]
आइक	[illegible]	१	—	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	१	—	[illegible]	[illegible]
धीर वीर	,,	[illegible]	—	[illegible]	[illegible]
[illegible]	३५३	—	[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	,,	—	१०	बिदेही	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	—	[illegible]	[illegible]
कांहीव	,,	११	—	करी	करि
[illegible]	,,	[illegible]	—	[illegible]	[illegible]
केहरी					
[illegible]	३६३	[illegible]	—	चदनवार	बंदनवार
[illegible]	३६८	१२	—	रमेन	रमेम
[illegible]	,,	१५	—	[illegible]	[illegible]
रिपुदल	[illegible]	[illegible]	—	[illegible]	[illegible]
भचंड	३३७	[illegible]	—	जनित	[illegible]
लछिमन	३९१	३	—	[illegible]	जिय
[illegible]	४०१	५	—	[illegible]	[illegible]
[illegible]	४०२	८	—	रन	नर
निमि	४०७	[illegible]	—	[illegible]	[illegible]
अवध	४०८	—	१३	[illegible]	[illegible]
कपि	४१३	—	१९	ढोके	डोके

पृष्ठे	वरून	खालून	अशुद्ध	शुद्ध
८१६	१४	–	चहित	चरित
८१७	१३	–	नीज	नील
,,	१७	–	बरतन	बरनत
८१८	४	–	सदोह	संदोह
८२३	४	–	देहु	देहु दया
,,	१३	–	न	अब न
८२५	१०	–	रसाना	रसना
,,	११	–	बयाना	वयना
८२६	१४	–	बाव	नाव
,,	,,	–	पचि	पचि पचि
८२७	१८	–	शिवाची	शीलाची
८३१	–	४	यश	यज्ञ
८३६	९	–	रोग	रोग न
८३७	३	–	बिस्तार	निस्तार

पृष्ठे	वरून	खालून	अशुद्ध	शुद्ध
८३८	६	–	स्वल्प	स्वल्प सत्व
८४३	६	–	क्रोध	क्रोध न
८४५	६	–	सेवा	सेव
८४६	२	–	छन	छन छन
८५९	६	–	अब	अघ
८६०	२३	–	विनंती	आपत्ती
८६३	९	–	वांचसि	वचासि
८६६	४	–	कल्पकरू	कल्पतरू
,,	–	३	कवि	कवि
८६९	८	–	बिनु	बिनु श्रम
,,	९	–	जानित	जानि
,,	१०	–	बिकार	त्रिकार श्री
,,	१४	–	समान	समान प्रभु

आरती श्रीरामचरितमानसाची (मराठी)

जय जय जय जय आरती सुखकर रामचरित्राते ॥ सुखकर० ॥
श्रवणें मननें पठणें गानें दे हरि मित्राते ॥ ध्रु० ॥
शंकर मानसिं रचिलें गावें हिमगिरि कन्या ते ॥ पार्व० ॥
काकभुशुंडी याज्ञवल्क्य मुनि लोमश घटजाते ॥ १ ॥
नरहरि तुलसीदासा पासुनि गंगादासाते ॥ पासुनि०
तेणे होउनि कृपा ह दिधलें मजला दीनाते ॥ २ ॥
भवभयहरणा शांतिवितरणा रघुवरचरणाते ॥ वितरणा० ॥
प्रेमळ पापविनाशन पावन करवुनी माते ॥ ३ ॥
मातेसम मम अहित निवारुनि निजपद द्याव्याते ॥ निवा० ॥
सच्चित सुखकर रामकृपाकर भक्तिरसा दाते ॥ ४ ॥
जनहितकारक षड्रिपु मारक भवतारक पाते ॥ मारक० ॥
नाहीं साधन नीति सुशिक्षण तुजसम जगताते ॥ ५ ॥
म्हणुनी रामें आज्ञापुनि मज या अनुवादाते ॥ रामें० ॥
करवुनि केलें तर्णि कांहिंसें नव उपकाराते ॥ ६ ॥
परधर्मींहि निधर्मी वानिति बहु महिमा त्याते ॥ बहु० ॥
वेद-शास्त्रवर-मंथन उद्धृत या नवनीताते ॥ ७ ॥
नवनीताचा स्वाद घेउनी नवनीतचि व्हावें ॥ नवनीत० ॥
रामचरितवर तुलसीवंदन प्रज्ञा करि भावें ॥ ८ ॥

आरती श्रीरामाची (चाल–भुवन सुंदराची)

आरती रघुवर रामाची । संसृति ताप विरामाची ॥ध्रु०॥ नारायण जो परमात्मा । अन्तर्यामी जीवात्मा । स्थापाया तो श्रुतिधर्मा । अवतरे [illegible] । प्रभु सुखधामा अवतरला ॥ चाल ॥ मनुजरूपधर । पितरा सुखकर । बंधु प्रियकर । [illegible] । सेवक भवभयभंगाची ॥ १ ॥ मारीचादिक संहर्ता । मुनिमखरक्षण जो कर्ता । पथिमुनि नारी उद्धरता । धनुभांजि सीतेचा भर्ता । भार्गवदर्प विमर्द करी ॥ चाल ॥ पित्राज्ञ वरि । गमन वनीं करि । पूजित मुनिवरि । गुहकमित्राची । लक्ष्मण सीतासहिताची ॥ २ ॥ दशमुख भगिनिस विरूपिलें । त्रिशिराखरदूषण वधिलें । चौदा सहस्त्र निवटीले । पावन दंडक वन केलें ॥ रावण जानकीस हरता ॥ चाल ॥ विरहाकुल अति सेवित कपिपति । वाली असु हति । सिंधुबंधकाची । शरणागतार्ति हरणाची ॥ ३ ॥ निशिचर पतंग पावक हा । रावण वारण सिंह महा । सुरपति सुरनर मुनि भय हा । बिभीषण केला भूप पहा । सीता विरहानल विझवी । कपि संजीवन । पुष्पकवाहन । भरता मीलन । कोसलभूपाची प्रज्ञास्वामी रामाची ॥ ४ ॥ आरती रघुवर० ॥

भजन (१) राजाराम करा निःकाम । प्रेमें सेवुं सदा तव नाम ॥
प्रेमें गाऊं पावन नाम । लाभे खास परम विश्राम ॥ राजा राम०

(२) राम राम राम । राम राम राम ।
राम राम राम राम राम राम राम ॥
दयाळु राजा राम माझा स्नेहाळु सीताराम ।
कृपाळु राजाराम माझा दयाळु राजाराम ।
राम राम राम राम राम राम राम ॥